ISSN - 2347-7075
Impact Factor - 8.141

INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE AND APPLIED RESEARCH

Double-Blind Peer Reviewed / Bi-Monthly / Referred / Open Access Research Journal



Vol. 7 No. 21
March – April - 2026

Young Researcher Association

International Journal of Advance and Applied Research

(IJAAR)

A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal

ISSN–2347-7075 **Impact Factor–8.141**

March – April -2026

Volume - 7 **Issue – 21**

Published by:
Young Researcher Association, Kolhapur, Maharashtra, India
Website:https://ijaar.co.in
Submit Your Research Paper on Email
Regular Issue: editor@ijaar.co.in
For Publication Call On - **8624946865**

Editorial & Advisory Board

Chief Editor

Dr. Pravin R. Talekar
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur

Executive Editors (Special Issue)

Dr. Abhaykumar J. Patil
Head & Associate Professor, Department of History,
Sadguru Gadge Maharaj College, Karad.

Dr. Sandip M. Mahajan
Associate Professor, Department of History,
Sadguru Gadge Maharaj College, Karad.

Editorial & Advisory Board

Prin. Dr. C. J. Khilare

Prof. Dr. U.B. More	**Prof. Dr. R. P. Pol**	**Prof. Dr. G. B. Kalyanshetti**
Pro. Dr. A. K. Patil	**Prof. Dr. Avanish Patil**	**Pro. Dr. Chandravardhan Naik**
Prof. Dr. Nivas Varekar	**Dr. Nilambari Jagatap**	**Dr. Mahesh Gaikwad**
Prof. Dr. Dhanaji Masal	**Prof. Dr. Suresh Shikhare**	**Dr. Dattatray Machale**
Prof. Dr. Ajitkumar Jadhav	**Prof. Dr. Swati Sarode**	**Dr. Urmila Kshirsagar**
Dr. Sandeep Nannaware	**Prof. Dr. Suresh Chavan**	**Dr. Vikas Yelamar**

The Editors shall not be responsible for the originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Research paper's authors

INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE AND APPLIED RESEARCH
ISSN – 2347 -7075 (DOUBLE-BLIND Peer Reviewed) (Bi-Monthly Research Journal)
Vol. 7 No. 21
March - April 2026

TABLE OF CONTENT

Sr. No.	Name of Author	Title of Paper	Page No.
1	डॉ. अनिल दत्तात्रय कोकाटे	मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धातील महाराणी ताराबाईंची भूमिका व योगदान	1 - 8
2	डॉ. किशोर रघुनाथ भागवत	महाराणी ताराबाई यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील योगदान	9 - 14
3	श्री. विजयकुमार शंकरराव पवार	महाराणी ताराबाई यांचे नेतृत्व व स्वराज्य रक्षणातील योगदान : ३५० व्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने	15 - 23
4	डॉ. प्रेमचंद गुंडू गायकवाड	पुष्यश्लोक अहिल्यादेवी होळकर - प्रशासकीय आणि जनकल्याण कार्याचा चिकित्सक अभ्यास	24 - 32
5	प्रा. सुमन लक्ष्मणराव केंद्रे	आहिल्याबाईचे पुरोगामित्व व राज्यकारभार - एक अभ्यास.	33 - 38
6	डॉ. सुरेश संतराम माळशिखरे	अहिल्यादेवी होळकर: प्रशासनिक सुधारणा आणि लोककल्याणकारी कार्य (इ.स. १७६७- इ.स. १७९५) – एक संशोधनात्मक अभ्यास	39 - 48
7	डॉ. भारती कुमार सुडके	मध्ययुगीन कालखंडातील वाडा स्थापत्यकलेचा वारसा -पंढरपुरातील श्रीमंत होळकर वाडा	49 - 56
8	प्रा. अस्मिता देविदास गायकवाड	पुण्यशोल्क अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन व कार्य	57 - 61
9	सौ. कविता विजय कुपवाडे	पुण्यश्लोकी अहिल्याबाई होळकर: प्रशासन आणि जनकल्याण कार्य (त्रिशताब्दी वर्ष)	62 - 69
10	प्रा. अनंत अर्जुन निकम	इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे ऐतिहासिक भाषाशास्त्रीय योगदान- एक समीक्षा	70 - 76
11	डॉ. श्रीमती स्वाती रामराव सरोदे	मराठा इतिहासलेखनात डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास	77 - 81
12	श्री. कपिल वंदना अनादपिंड राजहंस	आजच्या संदर्भात प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या इतिहासलेखनाची प्रस्तुतता जन्मशताब्दीनिमित्त विशेष चिंतन	82 - 87
13	डॉ. सुरेश गोपाललक्ष्मी पाटील, बेलगावकर	मराठ्यांच्या वस्तूनिष्ठ इतिहासलेखनातील डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचे योगदान	88 - 91
14	श्री. चंद्रशेखर काशिनाथ काटे	ग्रँट डफचा मराठा इतिहासलेखनाविषयीचा वाद आणि अ. रा. कुलकर्णी	92 - 97
15	कु. छाया पांडुरंग घोसे	प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या दृष्टीकोनातील मराठ्यांच्या इतिहासातील पहिले बाजीराव पेशवे	98 - 101
16	श्रीमती सविता विठ्ठल बागल	डॉ. अ. रा. कुलकर्णी इतिहास अभ्यासकांसाठी आधारस्तंभ	102 - 107
17	डॉ. प्रविण बोरकर	सत्यशोधक समाज त्याचे तत्त्वज्ञान व आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण	108 - 115
18	डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे	आधुनिक महाराष्ट्रातील उल्लेखनीय चळवळ – मुस्लिम सत्यशोधक मंडळ	116 - 121
19	डॉ. रसाळ दशरथ किसन	आधुनिक महारष्ट्रातील सत्यशोधक समाजाचे कार्य व मूल्य विचार - एक ऐतिहासिक अवलोकन	122 - 127
20	डॉ. रणजीत सर्जेराव कुंभार	सत्यशोधक समाज ते प्रतिसरकार : दक्षिण महाराष्ट्रातील परिवर्तनवादी परंपरेचा ऐतिहासिक अभ्यास	128 - 136
21	प्रा. सचिन शंकर ओवाळ	सत्यशोधक समाजाची १५० वर्षे	137 - 141

Sr. No.	Name of Author	Title of Paper	Page No.
22	प्रा. अतुल सुनिता रामदास पोखरकर	सामाजिक परिवर्तनाचा वाटसरू सत्यशोधक समाज	142 - 145
23	प्रा. निलेश प्रकाश जमदाडे	सत्यशोधक समाज आणि महात्मा फुले	146 - 151
24	प्रा. हरिप्रसाद विठ्ठल पवार	महात्मा फुले यांची पत्रकारिता: बहुजन समाजाच्या आत्मभानाचा आवाज	152 - 160
25	Prof. Nancy Thombare	From Radical Protest to Institutional Legacy: Mapping the Satyashodhak journey towards a Modern Progressive Maharashtra	161 - 168
26	कु. सोनाली वसंत गोटखिंडे	सत्यशोधक वाङ्मयातून व्यक्त झालेली शोषणविरोधी भूमिका एक चिकित्सक अभ्यास	169 - 176
27	मैथिली शशिकांत कांबळे	सत्यशोधक समाजाने पितृसात्तेला दिलेले आव्हान	177 - 183
28	Dr. Sharmila Ashok Sabale	Contribution of the Anti-Government and Western Maharashtra: A Critical Analysis	184 - 188
29	प्रा. प्रकाश हणमंत देवकर	स्वातंत्र्य लढ्यातील प्रतिसरकार आणि पश्चिम महाराष्ट्राचे योगदान	189 - 192
30	श्रीमती विद्या युवराज कापसे	प्रतीसरकारमधील हौसाताई पाटील यांचे योगदान	193 - 201
31	अभय गायकवाड	साताऱ्याच्या प्रतिसरकार मधील निवृत्ती काका पाटील यांचे योगदान	202 - 210
32	डॉ. रविराज रामचंद्र साळुंखे	भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव (२६ जानेवारी २०२६ ला भारतीय संविधान स्वीकारल्याची ७५ वर्ष पूर्ण)	211 - 217
33	प्रा. कैलास शंकर माथणे	भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव: ७५ वर्षांच्या प्रवासाचा गौरव	218 - 228
34	कु. नम्रता अरुण खरात	भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव (२६ जानेवारी २०२६ ला भारतीय संविधान स्वीकारल्याची ७५ वर्ष पूर्ण)	229 - 234
35	श्री. प्रतीक भिमानंद शंभरकर	भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवी प्रवास: सामाजिक न्याय आणि घटनात्मक स्थित्यंतराचा चिकित्सक आढावा (१९५०-२०२६)	235 - 244
36	श्री. अभिजित अशोक कदम	भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव: गौरवशाली प्रवासाचा ऐतिहासिक दृष्टिक्षेप	245 - 250
37	Ms. Kumbhar Bhagyashree Shamrao	75 Years of the Indian Constitution. (A Journey with Achievements and Challenges)	251 - 255
38	डॉ. राजश्री दिलीप निकम	सहकारी समाजवादातील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका	256 - 258
39	डॉ. धनाजी बाबुराव मासाळ डॉ. विकास सुदाम येलमार	कोल्हापूर जिल्ह्याच्या जडणघडणीत सहकार चळवळीची ऐतिहासिक भूमिका	259 - 263
40	डॉ. संगिता संपत पाटील	महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकार चळवळीची ऐतिहासिक भूमिका	264 - 268
41	डॉ. अंकुश जाधव	यशवंतराव चव्हाण यांची सहकार चळवळीतील ऐतिहासिक भूमिका	269 - 274
42	प्रा. श्रीमती तेजश्री तानाजी सरकाळे	महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकार चळवळीची ऐतिहासिक भूमिका: एक चिकित्सक अभ्यास	275 - 279
43	प्रा. अमित अरुण कदम	महाराष्ट्राच्या जडण-घडणीत सहकार चळवळीची ऐतिहासिक भूमिका	280 - 289
44	प्रा. डॉ. महादेव भानुदास वाघमारे स्नेहल विलासराव शिंदे	महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या विस्तारात कामगार चळवळीचा वैचारिक प्रभाव: एक ऐतिहासिक अभ्यास	290 - 301
45	डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले	महाराष्ट्रातील किल्ल्यांचे संवर्धन	302 - 307
46	डॉ. सुरेश मारुती चव्हाण	ऐतिहासिक किल्ले सामानगड: महत्त्व समस्या व उपाय	308 - 312
47	डॉ. संदीप कुंडलिक नन्नावरे	वरोरा तालुक्यातील दुर्लक्षित मात्र वैभवशाली स्थापत्य एक अभ्यास	313 - 315

Sr. No.	Name of Author	Title of Paper	Page No.
48	डॉ. योगिता रविंद्र मठपती	पूर्णगड किल्ला: ऐतिहासिक वारसाचे जतन आणि शाश्वत विकासाचे मार्ग	316 - 321
49	डॉ. दादासाहेब बापूराव जाधव	वारसा स्थळ जतन – गड, किल्ले आणि स्मारके (समस्या आणि उपाय)	322 - 328
50	डॉ. सुजाता सचिन देशमुख	बाणूरगड किल्ल्याचे जतन आणि संवर्धन काळाची गरज	329 - 333
51	प्रा. शिताबाई बालासो सरगर	सातारा शहरातील वारसा स्थळे जतन : समस्या आणि उपाय	334 - 343
52	प्रा. सोहम प्रणिता सतीश पावशे	गड–किल्ले आणि वैचारिक जतन : वारसा संवर्धनाची नवदृष्टी	344 - 351
53	Prof. Avinash Tanaji Nalawade	Heritage Site Preservation: Forts and Monuments (Problems and Solutions)	352 - 356
54	कविता पिलावरे	वारसा स्थळ जतन: गड-किल्ले आणि स्मारके – समस्या आणि उपाय	357 - 364
55	प्रदीप हणमंत निकम	किल्ले भूपाळगड (बाणूरगड): मराठा-मुघल संघर्षातील सामरिक महत्त्व आणि सांस्कृतिक वारशाचा एक ऐतिहासिक अभ्यास	365 - 368
56	डॉ. किशोर गुलाब गाढवे	प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे नेतृत्व आणि जन-आंदोलने	369 - 378
57	रेणुका हणमंत कुरणे डॉ. राजकुमार मरे	एन. डी. पाटील यांनी शेतमजूर व शेतकऱ्यांसाठी दिलेले योगदान	379 - 384
58	सिद्धनाथ मधुकर गाडे	प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे सामाजिक आणि राजकीय चळवळीतील योगदान	385 - 389
59	Dr. Vishwanath Kashinath Sonwane	The Role of Artificial Intelligence in History Research	390 - 393
60	Dr. Prashant Vasant Ransure	Artificial Intelligence in Historical Research and Studies: Pursuit for New horizons	394 - 398
61	डॉ. अरुण सदाशिव कटकोळे	ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन जतन, संवर्धन आणि काळाची गरज	399 - 407
62	प्रा. निशांत राजेंद्रकुमार गोंधळी	ऐतिहासिक कागदपत्रांचे डिजिटायझेशन	408 - 415
63	प्रा. सुरज नीळकंठ कांबळे	इतिहासलेखनाच्या पद्धतीवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा परिणाम : एक समीक्षात्मक अभ्यास	416 - 422
64	डॉ. चंदू रामाजी देशपांडे	इतिहास संशोधनात AI ची भूमिका: एक संशोधनात्मक अध्ययन	423 - 428
65	प्रा. किरण माणिकराव चौगुले	इतिहास संशोधनात ऐतिहासिक कागदपत्रांचे डिजीटायझेशन व AI यांची भूमिका	429 - 438
66	प्रा. दत्तात्रेय रघुनाथ भोये	ऐतिहासिक दस्तऐवजांच्या जतन व संवर्धनात डिजिटल अभिलेखागारांची भूमिका	439 - 447
67	Dr. Surekha Sandeep Patil	Role of Artificial Intelligence in Historical Research	448 - 451
68	Dr. Gouri Desai	Digitisation of Historical Documents in Maharashtra: Challenges and Possibilities	452 - 457
69	श्री. स्वप्निल दावीद कांबळे	पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण विकास कार्यक्रमाचे डिजिटायझेशन (१९६२-२०२२) : कोल्हापूर जिल्ह्याच्या विशेष संदर्भासहित.	458 - 465
70	डॉ. सुनिता हनुमंतराव गित्ते	स्थानिक इतिहास:विशेष संदर्भ पांचगणी	466 - 469
71	डॉ. शिवाजी दत्तात्रय रायजादे	छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यातून घडलेला कोल्हापूरचा सर्वांगीण पर्यटन विकास	470 - 478

Sr. No.	Name of Author	Title of Paper	Page No.
72	प्रा. प्रकाश शामराव नांगरे	वांग- मराठवाडी प्रकल्पाची रचना व तांत्रिक वैशिष्ट्ये : एक ऐतिहासिक अभ्यास	479 - 484
73	प्रा. धनाजी तानाजी सावंत	सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक-आर्थिक परिवर्तनात स्वयंसेवी संस्थांची (NGO) भूमिका: एक चिकित्सक अभ्यास	485 - 491
74	प्रा. गणेश प्रकाश पाटील	सातारा नगरीची खाद्यसंस्कृती	492 - 498
75	श्री. आनंदा पांडूरंग पाटील डॉ. डी. व्ही. सूर्यवंशी	स्थानिक इतिहास - ऊस : एक ऐतिहासिक अभ्यास	499 - 505
76	श्री. फिरोझखान इमाम जमादार	सातारा जिल्ह्यातील उरूस परंपरेचा अभ्यास	506 - 510
77	श्री विनायक कांबळे	सांगली जिल्ह्यातील पर्यटन : स्थलांचा चिकित्सक अभ्यास	511 - 517
78	श्री. अमर शिवाजी लोखंडे	श्री गोंदवलेकर महाराज यात्रा : आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास	518 - 525
79	श्री. अमोल बिरा माने	गोपाळ समाज: ऐतिहासिक विकास आणि कोल्हापूर जिल्ह्यातील स्थिती	526 - 532
80	श्री. जोतीराम वामन आंबवडे	खानापूर (विटा) परिसरातील साहित्य व सांस्कृतिक चळवळ: एक ऐतिहासिक अभ्यास	533 - 537
81	मनोज किसन गायकवाड डॉ. संजय तुळशीराम शेलार	निफाड तालुक्यातील द्राक्ष शेती : ऐतिहासिक प्रवास व सामजिक - आर्थिक परिणामांचा अभ्यास (सन १९३०-२०२०)	538 - 544
82	श्रीमती प्रियांका राजाराम पाटील	कोल्हापूरच्या कला परंपरेत दळवीज आर्ट्स इन्स्टिट्यूटचे योगदान	545 - 553
83	डॉ. अभयकुमार पाटील	कराड नगरीचे प्राचीन संदर्भ	554 - 561
84	डॉ धीरज सुरेश शिंदे	प्राचीन ते आधुनिक वृत्त देण्याच्या पद्धतीतील बदल	562 - 568
85	डॉ. सचिन अशोक धेंडे	चरकसंहितेतील आरोग्यशास्त्र - एक ऐतिहासिक चिकित्सा	569 - 574
86	डॉ. रामचंद्र गुरुलिंग घुले	श्रीसती मलकजिन अर्थात श्री क्षेत्र मल्लिकार्जुन: अ रिलीजियस डायव्हर्सिटी फोर्ट विलासगड	575 - 589
87	डॉ. जयवंत विष्णू पाताडे	प्राचीन कोकणातील व्यापारी मार्ग आणि बौद्ध लेणी: एक ऐतिहासिक अभ्यास	590 - 598
88	डॉ. विकास संभाजी नाईक	शिलाहारकालीन कोल्हापूर	599 - 603
89	डॉ. अनिल भिमराव कुंभार	सातवाहकालीन कराड येथील बौद्ध धर्माचा प्रसार	604 - 611
90	प्रा. अनिल शिवाजी निकम	अंभेरी येथील कातळावरील शिल्पावशेष: पुरातत्वीय शोध व परिचय (प्राचीन पटखेळ, योनीशिल्पे, कपमार्कस (कप्लर्स) व मानवी पदचिन्हे)	612 - 619
91	प्रा. गौतम काटकर मानसिंगराव कुमठेकर	वराडे येथील चालुक्यकालिन अप्रसिद्ध हळेकन्नड शिलालेख	620 - 623
92	श्री. मृण्मय दीपक अरबुने	शतघ्नी: प्राचीन युद्धतंत्रातील नवकल्पना आणि तंत्रज्ञान	624 - 627
93	डॉ. सुरेश वसंत शिखरे	स्वराज्याचे आरमार आणि सामारीक दृष्टीकोण	628 - 641
94	डॉ. राजेंद्र भिमाजी सातपुते	माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणातील अंतर्गत विरोधक	642 - 650
95	डॉ. तानाजी रामचंद्र हवालदार	मोडी कागदपत्रांचे प्रकार	651 - 656
96	डॉ. शशिकांत महादेव मोहिते	संभाजी मोहिते यांचा सुपे परगण्यातील कारभार : एक चिकित्सा	657 - 665
97	श्री. सुशांत शंकर कदम	तंजावरच्या मराठा राजघराण्याच्या आश्रयाने समर्थ रामदासी संप्रदायाचा दक्षिणेकडील विस्तार : 'ऐतिहासिक अभ्यास'	666 - 673
98	श्री. सतिश उत्तमराव रिंढे	बुलढाणा जिल्ह्याच्या जडणघडणीत संत चोखामेळा यांचे योगदान	674 - 678
99	प्रिती राजेंद्र पाटील	मराठाकालीन युद्धकला : एक तंत्र	679 - 687

Sr. No.	Name of Author	Title of Paper	Page No.
100	मन्सुर महमद सुतार डॉ. उत्तम अप्पासाहेब पठारे	मध्ययुगीन मंगळवेढा परगणा : विशेष संदर्भ बहामनी कालखंड	688 - 693
101	श्री. विशाल रामचंद्र डांगिस्ते	जावळीचे चंद्रराव मोरे घराणे : ऐतिहासिक अभ्यास (१५ वे १७ वे शतक)	694 - 698
102	डॉ. लखन अभिमान गौडदाब	पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील खाद्य संस्कृती	699 - 702
103	डॉ. संजीव सुखलाल बोडखे	छ. शाहू महाराज व छ. प्रतापसिंह महाराज यांनी सातारा शहरात स्थापन केलेल्या पेठांचा इतिहास	703 - 708
104	डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर	स्वातंत्र्यसंग्रामातील विस्मृत नायक: आष्टा येथील हुतात्मा केशवराव तळवलकर यांच्या क्रांतिकारी कार्याचा अभ्यास	709 - 712
105	डॉ. रामचंद्र वसंत कुंभार	स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील स्थित्यंतरे - एक आढावा	713 - 716
106	डॉ. उर्मिला न. क्षीरसागर	वृत्तपत्रे पत्रकार आणि यशवंतराव चव्हाण	717 - 720
107	डॉ. विनोद संभाजी सोनवणे	संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील आचार्य अत्रे यांचे योगदान: एक ऐतिहासिक अभ्यास	721 - 722
108	डॉ. संदीप मारोती महाजन	महाराष्ट्रात आयोजित भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनातील शेती व शेतकरी समस्यांवरील ठराव (१८८५-१९४७)	725 - 737
109	डॉ. सदाशिव मच्छिंद्र मोरे	महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासामध्ये बाळासाहेब देसाई यांचे योगदान	738 - 741
110	डॉ. महेश एन. गायकवाड	भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांचा इतिहास	742 - 750
111	डॉ. कुबेर शेकाप्पा कट्टीमनी	महाराष्ट्रातील आधुनिक यंत्रमाग कामगार : समस्या, आव्हाने आणि उपाययोजना	751 - 762
112	डॉ. बाळसाहेब आमगोंडा कोटलगी	इचलकरंजीच्या विकासात दि. डेक्कन को-ऑफरेटिव्ह स्पिनिग मिल्सची ऐतिहासिक भूमिका	763 - 769
113	डॉ. प्रतिभा कृष्णराव घाटगे	रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांचे सातारा जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदान	770 - 772
114	डॉ. दत्तात्रय ज्ञानदेव कोरडे	रयत शिक्षण संस्थेचे सातारा शहरातील स्वातंत्र्यपूर्व काळातील शैक्षणिक कार्य	773 - 778
115	डॉ. सुनील भाऊसाहेब क्षीरसागर	महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती व समाज सुधारणेचा प्रभाव एक चिकित्सक अभ्यास	779 - 784
116	डॉ. अरुणा मधुकर वाघमारे	राजारामबापू पाटील : 'असामान्य नेतृत्वाचा लोकनेता'	785 - 791
117	डॉ. निलेश भाऊसो वळकुंजे	गोवामुक्ती संग्रामातील क्रांतिकारक: श्री. मोहन रानडे	792 - 802
118	डॉ. अर्चना श्रीराम जाधव	कृ. गो. सूर्यवंशी यांचे इतिहासलेखनातील योगदान	803 - 810
119	प्रा. पल्लवी रोहिदस मिरजकर	स्वातंत्र्योत्तर काळातील सोलापूर मधील गिरणी कामगार चळवळ: विशेष संदर्भ जुनी गिरणी	811 - 819
120	प्रा. अश्विनी रामचंद्र खवळे	मुक्ता साळवे : दलित स्त्रीवादाचा पहिला विद्रोही आवाज	820 - 823
121	श्री. अभिजित अशोक कदम	महाराष्ट्रातील वतन व्यवस्था: ब्रिटिशकालीन भू-सर्वेक्षण पद्धती आणि प्रशासकीय परिवर्तनाचे ऐतिहासिक विश्लेषण	824 - 828
122	श्रीमती मधुबाला वसंत मांजरे	कलातपस्वी-आबालाल रहिमान	829 - 835
123	डॉ. क्रांतीसिंह मारूती देसाई	१९४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामातील सेनानी शंकरराव नलवडे यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान	836 - 840
124	Jayshree J. Valvi Dr. Rajkumar S. Mare	Negotiating Nationalism: Gandhian Hegemony and tribal societies in Maharashtra	841 - 845

Sr. No.	Name of Author	Title of Paper	Page No.
125	श्री. ब्रह्मदेव विठ्ठल शिंदे	भारतीय टपाल विभाग: आधुनिक काळातील स्थान व गरज	846 - 852
126	ऋषिकेश संतोष जाधव	मानव व इतिहास नवदृष्टिकोन	853 - 862
127	अवधूत परशराम चव्हाण	लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे शिक्षणविषयक विचार	863 - 869
128	कु. मेघाराणी रमेश सरगर	भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील स्वातंत्र्यसैनिक दलितमित्र श्री. उध्दवराव इंगुले (तात्या)	870 - 878
129	श्री. गणेश शंकर दुबाळे	सामाजिक सुधार चळवळी आणि ग्रामीण शिक्षणाचा विकास: महाराष्ट्राच्या संदर्भात एक अभ्यास	879 - 887
130	श्री. संदीप हरिबा माळी	कोल्हापूर जिल्ह्यातील असंघटित कामगार क्षेत्राच्या समस्या.= एक चिकित्सक अभ्यास	888 - 899
131	श्री. युवराज कापसे	डाव्या चळवळींचा महाराष्ट्रातील राजकीय स्थित्यंतरावरील प्रभाव एक चिकित्सक अभ्यास	900 - 906

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धातील महाराणी ताराबाईंची भूमिका व योगदान

प्रा. कोकाटे अनिल दत्तात्रय

सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग,

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड

***Corresponding Author* – प्रा. कोकाटे अनिल दत्तात्रय**

DOI - 10.5281/zenodo.19658417

गोषवारा (Abstract):

सतराव्या शतकाच्या मध्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. सन १६८० साली शिवाजी महाराजांचे निधन झाले. त्यानंतर लगेच दिल्लीचा मोगल बादशहा औरंगजेब व त्याचा बंडखोर पुत्र अकबर यांच्यात संघर्ष सुरु झाला. अकबराला छत्रपती संभाजी महाराजांनी अभय दिल्याने औरंगजेब आपली प्रचंड फौज, लढवय्ये सेनापती व अफाट असे युद्धसाहित्य घेऊन स्वराज्याचा घास घेण्यासाठी सन १६८१ साली चालून आला. तिथून पुढे त्याच्या मृत्यूपर्यंत म्हणजे सन १७०७ अशी सव्वीस वर्षे मराठे विरुद्ध मोगल हा जो संघर्ष झाला त्यास हिंदुस्थानच्या इतिहासात 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध' असे म्हटले जाते.

मराठ्यांच्या या स्वातंत्र्ययुध्दात मराठ्यांच्या बाजूने संभाजी महाराज, राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांनी साम्राज्यवादी वृत्तीच्या औरंगजेबाविरुद्ध प्राणपणाने लढ्न स्वराज्याचे रक्षण केले. विशेष म्हणजे या स्वातंत्र्यसंग्रामात राजाराम महाराजांच्या निधनानंतर महाराणी ताराबाईनी सन १७०० ते १७०७ या काळात आक्रमक धोरणाचा स्वीकार करून औरंगजेबाला हतबल करून सोडले. या मराठी मातीतच निराश अवस्थेत त्याचे निधन झाले. या स्वातंत्र्यलढ्यात महाराणी ताराबाईनी स्वार्थ नव्हे तर ज्वलंत स्वराज्यप्रेम व लढाऊ बाणा दाखवून दिल्याचे दिसते.

प्रस्तावना:

सतराव्या शतकाच्या मध्यावर इ.स. १६७४ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वतंत्र व सार्वभौम असे हिंदवी स्वराज्य स्थापन केले. परकियांच्या जुलमाने शतकानुशतके अन्यायाखाली भरडली गेलेली सामान्य जनता त्यामुळे आनंदित झाली. परंतु मराठी जनतेच्या दुर्दैवाने हिंदवी स्वराज्य निर्मात्या छत्रपती शिवाजी महाराजांचे दि. ०३ एप्रिल १६८० रोजी मराठ्यांची राजधानी असलेल्या रायगड या किल्ल्यावर वयाच्या फक्त ५० व्या वर्षी निधन झाले. ही घटना स्वराज्यातल्या मराठी रयतेला धक्कादायक व दु:ख देणारी ठरली. यानंतर पुढे जवळजवळ २६ वर्षे स्वराज्याला सतत संघर्षाला तोंड द्यावे लागले.

मराठ्यांचा स्वराज्यनिर्मितीच्या प्रयत्नापासून मोगलांशी संघर्ष सुरु झालेला होता. तो शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर अधिक तीव्र बनला. हा संघर्ष तीव्र बनण्याचे मुख्य कारण म्हणजे मोगल बादशहा औरंगजेबाचा पुत्र शहजादा अकबराने रजपुतांच्या सहाय्याने स्वत:च्या पित्याविरुद्ध बंड पुकारून आपले स्वातंत्र्य जाहीर केले व नंतर मोगालांशी झालेल्या संघर्षात पराभव झाल्याने दक्षिणेतील छत्रपती संभाजी महराजांच्या मराठी राज्याचा रस्ता धरला. आपल्या बंडखोर राजपुत्र अकबर व आपले

कट्टर शत्रू मराठे एकत्र आले तर आपल्या सिंहासनास मोठा धोका निर्माण होईल. ह्या भीतीने इ.स. १६८१ सालीच मोगल बादशहा औरंगजेब त्याचे इतर सर्व पुत्र, लढवय्ये अनुभवी सेनानी व प्रचंड सैन्य घेऊन मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी दक्षिणेत उतरला. यातूनच मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाची सुरुवात झाली. हे स्वातंत्र्य युद्ध इ.स. १६८१ मधील औरंगजेबाच्या स्वराज्यावरील आक्रमणाने सुरु झाले. व इ. स. १७०७ साली त्याचा मृत्यू महाराष्ट्रातच व स्वातंत्र्ययुद्ध चालू असतानाच झाल्याने ते संपले. इ.स. १६८१ ते १७०७ या सव्वीस वर्षाच्या संघर्षाला महाराष्ट्राच्या इतिहासात 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध' असे म्हटले जाते.

स्वातंत्र्ययुद्धाच्या या सव्वीस वर्षाच्या प्रदीर्घ अशा कालखंडात मराठ्यांनी त्यावेळच्या फक्त आशिया खंडातीलच नव्हे तर जगात बलाढ्य म्हणता येईल अशा दिल्लीपती औरंगजेबाशी जीवघेणा संघर्ष केला. या संघर्ष काळात मराठ्यांना अनेक घातकी, अचानक उद्भवलेल्या असामान्य संकटाना तोंड द्यावे लागले. अशा संकटावेळी खरे तर मराठी राज्यकर्ते व सर्वसामान्य समाज नष्ट झाला असता परंतु त्यांनी नियतीशी कडवी झुंज दिली, असामान्य धैर्य दाखविले व स्वराज्याचे रक्षण केले. याचे मुख्य कारण म्हणजे शिवाजी महाराजांनी मराठी रयतेत निर्माण केलेले स्वातंत्र्य प्रेम होय. अत्यंत बिकट परिस्थितीत व छत्रपती शिवाजी महाराजांसारखा चतुरस्त्र नेता मराठयांकडे नसताना त्यांनी बलाढ्य अशा औरंगजेबाशी सतत सव्वीस वर्षे लढून त्यास शेवटी हतबल करुन सोडले. मराठ्यांनी दक्षिणेत मोगलांशी केलेला हा लष्करी संघर्ष म्हणजे प्रसिद्ध इतिहासकार श्री सेतु माधवराव पगडी यांच्या शब्दात "महाराष्ट्राचे महाभारत" होय.[१] महाभारताचे युद्ध तरी अठरा दिवसा चालले. हा संघर्ष तर अनेक वर्षे चालला.

मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे टप्पे:

औरंगजेब बादशहाचा पुत्र अकबर जर छत्रपती संभाजीमहाराजांच्याकडे मदतीसाठी आला नसता तर खुद्द औरंगजेब इतक्या लवकर दक्षिणेत आला नसता.[२] मराठ्यांचे नूतन राज्य जिंकून घेण्यासाठी औरंगजेब सन १६८१ साली आला परंतु अथक परिश्रम, आक्रमक व प्रचंड लष्कर, भलामोठा खजिना, घाणेरडे राजकारण व अमानुष अत्याचार करूनही त्याला मराठी राज्य जिंकता आले नाही. या स्वांतत्र्य युद्धाचे तीन टप्पे किंवा तीन कालखंड मानले जातात. या तीन टप्प्यात छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई हे तीन राज्यकर्ते मराठ्यांना लाभले.

१) मराठ्यांच्या स्वांतत्र्ययुद्धाचा पहिला कालखंड – (सन १६८१ ते १६८९):

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर खरेतर मराठ्यांच्या गादीवर छत्रपती म्हणून बसण्याचा संभाजी राजांचा हक्क होता पण तो डावलून महाराणी सोयराबाई व तत्कालीन अष्टप्रधान मंडळातील काही प्रधानांनी कट करून राजाराम महाराजांना गादीवर बसविण्याचा प्रयत्न केला. खरेतर छत्रपती घराण्यात थोरले शिवाजी महाराज वगळता संभाजी महाराजांसारखा शूर व पराक्रमी राज्यकर्ता झाला नाही परंतु त्यांची कारकीर्द दुर्दैवी ठरली. एकतर त्यांच्या कारकिर्दीची सुरुवातच कटकारस्थानांनी झाली. राजगादीवरचा त्यांचा हक्क डावलून राजाराम महाराजांना गादीवर बसविण्याचा प्रयत्न झाला, दुसरे म्हणजे त्यांच्यावर विषप्रयोग करून ठार करण्याचा प्रयत्न झाला व अकबराच्या साहाय्याने त्यांना पदच्युत करणे असे तीन कट त्यांच्या विरुद्ध झाले. त्यामुळे त्यांनी कटात सामील असलेल्या अष्टप्रधानातील अण्णाजी दत्तो, बाळाजी प्रभू, सोमाजी दत्तो व हिरोजी फर्जंद यांना राजनीतीत बसणाऱ्या भयंकर शिक्षा दिल्या. संभाजी महाराजांना त्यांच्या

कारकिर्दीत मोगलांशिवाय पोर्तुगीज, सिद्दी व इंग्रज या शत्रूंचाही मुकाबला करावा लागला.या संघर्ष काळात स्वराज्य रक्षण हे अत्यंत बिकट कार्य संभाजीराजांनी प्राणपणाने केले, परंतु त्यांची कारकीर्द खऱ्या अर्थाने दुर्दैवी ठरली ती ह्या अर्थाने की संभाजी महाराज खेळणा किल्ल्यावरून रायगडाकडे जात असताना कोकणातील संगमेश्वर मुक्कामी मोगली सरदार शेख निजाम (मुकर्रबखान) याने १ फेब्रुवारी, १६८९ रोजी त्यांना पकडले. त्यानंतर औरंगजेब बादशहाने त्यांना हाल हाल करून अत्यंत क्रूरपणे दि. ११ मार्च १६८९ रोजी ठार केले. ही घटना मराठ्यांच्या इतिहासातील मोठी दु:खद घटना होती परंतु संभाजी महाराजांच्या या क्रूर हत्येने सर्व मराठी समाज पेटून उठला व खऱ्या अर्थाने मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध हे लोकलढा बनले. औरंगजेबाच्या आक्रमक लष्करी मोहिमांना संभाजी राजांनी आठ ते नऊ वर्षे यशस्वीपणे तोंड दिले व स्वराज्याचे रक्षण केले हीच त्यांची खरी कर्तबगारी होती.

२) मराठ्यांच्या स्वांतत्र्ययुद्धाचा दुसरा कालखंड (इ.स. १६८९ ते १७००):

छत्रपती संभाजी महाराजांच्या क्रूर हत्येचा मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धावर दूरगामी परिणाम झाला स्वातंत्र्य हा मानवी समाजाचा मुलभूत अधिकार मानला जातो आणि त्यानुसार जगाच्या इतिहासात शक्तिशाली व आक्रमक साम्राज्यवाद्यांशी सामान्य कुवतीच्या परंतु स्वातंत्र्यप्रेमी समाजाने आपले अस्तित्व टिकवण्यासाठी लढा दिल्याची अनेक उदाहरणे दिसतात. दुसऱ्यावर अनिर्बंध सत्ता प्रस्थापित करू इच्छिणाऱ्या समाजाला किंवा राज्यकर्त्यांना अंतिम माघारच घ्यावी लागते हे औरंगजेबाच्या बाबतीतही घडल्याचे दिसते. याचे कारण म्हणजे मराठे आपल्या स्वराज्यासाठी लढत होते तर मोगल हे मराठ्यांचे स्वातंत्र्य हरण करून आपल्या साम्राज्यनिर्मितीसाठी लढत होते.

छत्रपती संभाजी राजांना ११ मार्च १६८९ रोजी ठार केल्यानंतर संपूर्ण स्वराज्य हादरून गेले होते, खिन्न व दु:खी झाले होते. आता औरंगजेबाने स्वराज्याभोवतीचे आपले पाश आणखीनच आवळण्यास सुरुवात केली. राज्यकर्ताच मारला गेल्यामुळे स्वराज्यातील गडकोट व ठाणी भराभर मोगलांच्या हातात जात होती. वतनदार लोक भीतीने मोगली कौल स्वीकारून मोगलांचा अंमल जारी करण्यास मदत करत होते. मराठयांची राजधानी रायगडास वेढा पडला होता. यावेळी स्वज्याची महाराणी येसूबाई, शाहू व राजाराम यांचे जीवन सुरक्षित राहील की नाही याविषयी सर्वाना शंका वाटू लागली होती. अशा विदारक परिस्थितीमध्ये येसूबाईनी स्वराज्य रक्षणासाठी पती निधनाचे दु:ख बाजुला ठेवून सर्वांना एक मसलत सुचविली त्यानुसार राजघराण्यातील सर्वानीच रायगडावर एकत्र राहणे हे धोक्याचे आहे म्हणून राजाराम महाराजांनी गडाबाहेर पडून शत्रूंशी संघर्ष करावा. बिकट प्रसंग उद्भवल्यास जिंजीकडे कूच करून तिथे राजधानी थाटावी व तिथून स्वराज्याचा राज्यकारभार सुरू करावा. आपण स्वत: आपल्या पुत्रासह रायगड लढवू यापूर्वीच म्हणजे येसूबाईनी स्वत:चा पुत्र शाहू यास राज्याभिषेक न करता ९ फेब्रुवारी, १६८९ रोजी राजाराम महाराजांना मंचकारोहण करून छत्रपती म्हणून घोषित केले. स्वराज्य रक्षणासाठी प्राप्त परिस्थितीत योग्य निर्णय घेऊन स्वार्थत्यागाचे अद्वितीय उदाहरण महाराणी येसूबाईंनी घालून दिले.

राजाराम महाराजांच्या कारकीर्दीची सुरुवातही तीव्र अशा संकटांनी झाली होती. छत्रपती संभाजी राजांना स्वकीयांनी धोका दिला तर राजारामांना स्वकीयांनीच छत्रपती पद दिले. येसूबाईंनी सुचविलेल्या मसलती प्रमाणे राजाराम महाराज आपल्या दोन राण्या ताराबाई व राजसबाई यांच्यासह गुप्तपणे रायगडातून बाहेर पडून प्रतापगड, वासोटा, सातारा, परळी, वसंतगड असा प्रवास करत

पन्हाळगडावर ३० जून , १६८९ रोजी पोहचले. आता राजाराम महाराज मराठयांचे छत्रपती बनल्याने औरंगजेबाच्या दृष्टीने त्यांच्या जीवाला प्रचंड महत्व प्राप्त झाले होते. त्यामुळे राजाराम महाराजांचा पाठलाग मोगली फौजांनी सुरु केला. स्वराज्यातील कित्येक किल्ल्यांना मोगलांनी वेढे दिले होते तर अनेक किल्ले मोगलांच्या ताब्यात गेले होते. मोगलांच्या अफाट लष्करी सामर्थ्या पुढे मराठयांचा टिकाव लागणे अशक्य वाटत होते. अशावेळी अतिशय शांत डोक्याने पन्हाळा सोडून जिंजीला जाण्यापूर्वी स्वराज्याच्या कारभाराच्या व्यवस्थेसाठी त्यांनी राजमंडळाची स्थापना केली. राजमंडळ प्रमुख म्हणून राणी ताराबाईंची नियुक्ती केली तर राजमंडळामध्ये रामचंद्रपंत अमात्य,शंकराजी नारायण, धनाजी जाधव, संताजी घोरपडे यांचा समावेश करण्यात आला. यावेळी राणी ताराबाई अल्पवयीन असल्या तरी राज्यकारभार व राज्यसंरक्षणाची मुख्य जबाबदारी त्यांच्यावर आली.

राजमंडळाची स्थापना केल्यानंतर राजाराम महाराज २६ सप्टेंबर, १६८९ रोजी पन्हाळ्यातून मोगली फौजांच्या वेढयातून बाहेर पडले. खरेतर इथून पुढे जिंजीला पोहचणे म्हणजे अशक्यप्राय गोष्ट होती. परंतु शांतबुद्धीच्या व नाजूक प्रकृतीच्या राजाराम महाराजांनी खंडो बल्लाळ, प्रल्हाद निराजी, मानाजी मोरे, बाजी कदम, कृष्णाजी अनंत या विश्वासू मंडळींना बरोबर घेतले. मोगली लष्कराला व मोगली ठाण्यांना हुलकावण्या देत, विविध प्रकारची वेषांतरे करून शेवटी ते नोव्हेंबर, १६८९ मध्ये जिंजी किल्ल्यात सुखरूप पोहोचले. यावेळी त्यांनी आपल्या राण्या महाराष्ट्रातच ठेवल्या होत्या.

राजाराम महाराज आपल्या स्वामिनिष्ठ सेवकांच्या मदतीने अनंत यातना सहन करून जिंजीला पोहचले खरे परंतु दुर्देवाने जुल्फिकारखानाने रायगडाला घातलेल्या बळकट वेढयापुढे व राजाराम महाराज कर्नाटकातून जिंजीकडे जात असताना तुंगभद्रेच्या तीरावर मोगल सरदार अब्दुल्लाखान याच्याकडून पकडले गेल्याच्या बातमीने रायगडावरील येसूबाई व सैन्याचे मनोबल खचले. मोगली सामर्थ्यापुढे आत्मघात करून घेण्यापेक्षा त्यांनी मोगलांकडून सन्मानाने वागविले जाण्याचे वचन घेऊन ३ नोव्हेंबर, १६८९ रोजी रायगड मोगलांच्या ताब्यात दिला व त्यांनी आपला पुत्र शाहूसह मोगलांची कैद स्वीकारली.

सत्तेवर येण्यापूर्वी राजाराम महाराजांना युद्धाचा किंवा राज्यशकट चालविण्याचा अनुभव नव्हता. परंतु आपले पिता शिवाजी महाराज व थोरले बंधू संभाजी महाराजांचे राजकारण व लष्करी संघर्ष त्यांनी जवळून पाहिल्याने त्याचे अप्रत्यक्ष संस्कार त्यांच्यावर झाले होते. आपल्या मृदू स्वभावाने व मुत्सद्देगिरीने त्यांनी स्वकीयांचे सहकार्य मिळविले व सन १६८९ ते त्यांच्या अकाली निधनापर्यंत म्हणजे सन १७०० सालापर्यंत अशी अकरा वर्षे औरंगजेबाच्या मोगली फौजांच्या आक्रमणाला रोखून धरण्यात प्रसंगी यांच्या नामांकित सेनानींचा पराभवही आपल्या सेनापतीकडून करण्यात यशस्वी झाले.

राजाराम महाराजांच्या काळात मराठ्यांच्या स्वातंत्र्यलढयाला खऱ्या अर्थाने लोकयुद्धाचे स्वरूप आले. छत्रपती कर्नाटकात दूर जिंजीला असले तरी मराठी समाजातील सर्व थराचे लोक सामील झालेबाबतचे वर्णन करताना कवी विठ्ठलदास म्हणतो-

पाटील शेटे कुणबी जुलाई
चांभार, कुंभार परीट न्हावी
सोनार, कोलि उदिमी फुलारी
या वेगळे लोक किती बीगारी ॥[३]

राजाराम महाराजांची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे संभाजी महराजांच्या हत्येनंतर स्वराज्य उध्वस्त झाले असतानाही त्यांनी औरंगजेबाशी संघर्ष चालू ठेवला व

मराठी राज्य जिवंत ठेवले. हे त्यांना कसे शक्य झाले ते त्यांनी राबविलेल्या खालील उपयांवरून दिसते.

अ) आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीला ते रायगडावरून निसटले ते कर्नाटकातील जिंजीला पोहचले व तेथून ते लष्करी व राजनैतिक मोहिमा चालवू लागले. जिंजीस जाताना त्यांनी महाराष्ट्रातील कारभारासाठी राजमंडळाची स्थापना केली होती.

ब) जिंजीस असताना औरंगजेबाचा सेनापती जुल्फिकारखान व मोगल शहजादा कामबक्ष यांच्याशी राजकारण साधून मोगलांच्याच गोटात भेद केला. ही त्यांची मुत्सद्देगिरी होती.

क) मराठी माणूस स्वातंत्र्यप्रिय असला तरी त्याहून त्यात वतन प्रिय होते. त्यामुळे जिंजीस पोहोचताच राजाराम महाराजांनी पूर्वी सरकारजमा केलेली वतने सरसकट परत करण्याची व नूतन वतने देण्याची पद्धत स्वीकारली. त्यामुळे स्वराज्य रक्षणासाठी वतनप्रिय मराठ्यांचे सहकार्य त्याना मिळाले.

ड) राजाराम महाराजांनी जिंजी ही राजधानी केल्याने महाराष्ट्र व कर्नाटक असे लष्करी संघर्षाचे क्षेत्र खूपच मोठे झाले. त्यामुळे मराठ्यांना आवर घालण्याचे लष्करी सामर्थ्य मोगलांजवळ राहिले नाही.

इ) राजमंडळातील रामचंद्रपंत अमात्य यास महाराष्टातील राज्य चालविण्याचे सर्व अधिकार दिले तर संताजी घोरपडे व धनाजी जाधव या पराक्रमी सेनानी मार्फत क्रूर अशा मोगली सेनानींना कित्येकदा धूळ चारली, कैद केले व प्रसंगी ठारही केले.

औरंगजेबाने जुल्फिकार खानामार्फत जिंजीचा वेढा जास्तच तीव्र केल्याने राजाराम महाराजांना त्या किल्ल्यातून बाहेर पडावे लागले. या निसटण्यात निश्चितच जुल्फिकार खानाने त्यांना अप्रत्यक्ष सहाय्य केले. मोगल लष्कराला चुकवत राजाराम महाराज फेब्रुवारी २२, १६९८ साली महाराष्ट्रातील विशाळगड किल्ल्यावर सुखरूप पोहोचले.[४] स्वराज्यात पोहोचल्यानंतर राजाराम महाराज जून १६९९ मध्ये आपली नवीन राजधानी सातारा येथे परतले. औरंगजेबाशी असा संघर्ष चालू असताना उत्तरेकडील मोहिमेवरून परतताना व झालेल्या धावपळीमुळे राजाराम महाराजांचे पुण्याजवळील सिंहगड किल्ल्यावर २ मार्च १७०० रोजी वयाच्या तिसाव्या वर्षी निधन झाले. मृत्यूशय्येवर असताना आपल्या शेजारी उभ्या असणाऱ्या एकनिष्ठ सेवक रामचंद्र निळकंठाजवळ शेवटची इच्छा व्यक्त केली होती ती म्हणजे - the release of Shahu and Liberation of motherland[५] यावरून त्यांचे शाहू व स्वराज्याबद्दलचे प्रेम जाणवते.

३) मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा तिसरा व अंतिम कालखंड (इ.स.१७०० ते १७०७):

राजाराम महाराजांच्या सन १७०० साली झालेल्या अकाली निधनानंतर मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे तिसरे पर्व सुरु झाले. या काळातील स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व मराठ्यांची २५ वर्षाची विधवा महाराणी ताराबाई यांनी केले. आपले राज्यकारभार कौशल्य व लष्करी मोहिमांचे संयोजन योग्य पद्धतीने करून प्रचंड लष्कर, मोठा खजिना, लढायांचा प्रदीर्घ अनुभव व हिंदुस्थानच्या राजकारणाची चांगली जाण असलेल्या ८० वर्षे वयाच्या औरंगजेबाला तिने फक्त हतबल करून सोडले नाही. तर मराठा-मोगल संघर्षातील अपयशाने विमनस्क अवस्थेत अहमदनगर येथे २० फेबुवारी १७०७ रोजी निधन झाले.

राजाराम महाराजांचे एकूण चार विवाह झाले होते. त्यापैकी पहिला विवाह जानकीबाई (सेनापती प्रतापराव गुजर यांची कन्या), दुसरा विवाह सिताबाई उर्फ ताराबाई (सेनापती हंबीरराव मोहिते यांची कन्या), तिसरा विवाह राजसबाई (कागलचे घाटगे घराणे) व चौथा विवाह अंबिकाबाई यांच्याशी झाला होता. छत्रपती संभाजी

महाराजांच्या हत्येनंतर ताराबाईच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली. ती म्हणजे राणी येसूबाईनी राजाराम महाराजांना (आपले दीर) यांना राजपद दिले. राजाराम महाराजांची द्वितीय पत्नी या ताराबाई होत्या. परंतु ज्यावेळी मोगल सेनानी जुल्फिकारखानाने रायगड घेतला. त्यावेळी राणी येसूबाई, संभाजीपुत्र शाहू व राजाराम महाराजांची प्रथम पत्नी जानकीबाई याही मोगलांच्या कैदी बनल्या.[६] यामुळे ताराबाई याच प्रमुख व ज्येष्ठ राणी ठरल्या गेल्या. नियतीने महाराणी बनवलेल्या याच ताराबाईनी राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर आपल्या अल्पवयीन पुत्र शिवाजीस राज्याभिषेक करवून पुढे स्वत: राज्यकारभार चालविला. गदाधर प्रल्हाद शकावली मध्ये शिवाजी राजांच्या राज्यरोहनाची माहिती पुढीलप्रमाणे आहे, "फाल्गुन वद्य नवमीस राजाराम याही कोंढाणयावरी देह ठेविला. त्याचे पुत्र सिवजी राजे राज्य करू लागले ते समई वये वरशे पाच."[७]

सन १७०० ते १७०७ या काळात ताराबाईंच्या नेतृत्वाखाली मराठ्यांच्या स्वातंत्र्यलढ्याने आक्रमक स्वरूप घेतले तर औरंगजेबाच्या फौजा हतबल झाल्याचे दिसतात.

महाराणी ताराबाईंचा पूर्वेतिहास:

छत्रपती शिवाजी महराजांच्या राज्याभिषेकानंतर काही महिन्यांनी सन १६७५ साली महाराजांचे सेनापती हंबीरराव मोहिते यांचे पोटी झाला. या मोहिते घराण्यातील पूर्वजांनी निजामशाही व आदिलशाहीत चाकरी बजावताना अनेक पराक्रम गाजवले होते. ह्या मोहीते घराण्याला आताच्या सातारा जिल्ह्यातील कराडजवळील तळबीड गावाची पाटीलकी मिळालेली होती. हे तळबीडचे मोहिते घराणे व शिवाजी महाराजांचे भोसले घराण्याचे पूर्वीपासून वैवाहिक संबंध होते. मोहिते घराण्यातील तुकाबाईंचा विवाह शहाजीराजांशी झालेला होता. तर खुद्द शिवाजी महाराजांची द्वितीय पत्नी सोयराबाई ही या सेनापती हंबीरराव मोहित्यांची बहीण होत्या. तर हंबीररावांची कन्या ताराबाईंचा विवाह राजाराम महाराजांशी वयाच्या आठव्या वर्षी म्हणजे सन १६८३ किंवा १६८४ साली संभाजी महाराजांनी लावून दिला.

स्वातंत्र्यलढ्यातील ताराबाईंचे योगदान:

तळबीडच्या लढवय्या मोहीते घराण्यात ताराबाईंचा जन्म झाल्याने पराक्रम त्यांच्या रक्तातच होता. बालपणापासून लष्करी डावपेच, लष्करी मोहिमा, राजकारण या वातावरणात त्या मोठ्या होत गेल्या. मध्ययुगीन भाताच्या इतिहासात अहमदनगरची चांदबीबी , गोंडवनातील राणी दुर्गावती व भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील राणी लक्ष्मीबाई यांच्या सारख्या पराक्रमी स्त्रियांशी तुलना करता त्यांनी काकणभर जास्तच पराक्रम व मुत्सुद्देगिरी दाखवून आपल्या शत्रूला जेरीस आणून आपल्याच भूमीत गाडून टाकल्याचे दिसते.

राजाराम महाराजांच्या सिंहगड किल्ल्यावरील २ मार्च १७०० रोजी झालेल्या अकाली निधनाने मराठ्यांना दुसरा हादरा बसला. आता राज्यकर्त्या भोसले घराण्यात फक्त स्त्रिया व लहान बालकेच राहिल्याने औरंगजेब बादशहास आनंद झाला. परंतु यावेळी महाराणी ताराबाईंनी आपला अल्पवयीन पुत्र शिवाजी यास १० मार्च १७०० रोजी विशाळगड किल्ल्यावर मंचकारोहन करून औरंगजेबाच्या विरुद्ध लढ्यास सज्ज झाल्या. शिवाजी राजांची मुंज आणि राज्याभिषेक करण्याच्या ताराबाईंच्या इच्छेस रामचंद्रपंत अमात्यांनी विरोध दर्शविलेबाबत मल्हार रामराव चिटणीस सांगतात. परंतु त्याचे मुख्य कारण राजाराम महराजांच्या काळात महाराष्ट्रात सर्वाधिकारी म्हणून वावरलेल्या रामचंद्रपंताना आता ताराबाईच्या आक्रमक, धडाडीच्या व हुकमती स्वभावाशी पटेनासे झाले असावे. कारण ताराबाई या स्वतंत्र वृत्तीने व कर्तबगारीने

काम करणाऱ्या राज्यकर्त्या होत्या. रियासतकार सरदेसाई, डॉ.ब्रिज किशोर यासारख्या इतिहासकारानी ताराबाई या महत्त्वाकांक्षी, हेकेखोरपणे वागणाऱ्या, स्वत:ला राज्यकारभाराची हौस असणाऱ्या व स्वत:च्या पुत्राला राजगादीवर बसविण्यासाठी अंध झाल्या होत्या असा रोख आपल्या लिखाणात व्यक्त केला आहे.

महाराणी ताराबाईंनी स्वराज्यरक्षणासाठी ठाम भूमिका घेतली. आपल्या पुत्रास राजगादीवर बसविले. तो त्यांचा प्राप्त परिस्थितीत हक्कच होता कारण छत्रपतींचे सिंहासन रिकामे पडले होते, संभाजीपुत्र शाहू मुघलांच्या कैदेतून कधी सुटतील हे निश्चित नव्हते किंबहुना सुटतील का हे माहित नव्हते व सर्वात महत्त्वाचे म्हणजे औरंगजेब स्वत: लष्कराचे नेतृत्त्व स्वीकारून मराठ्यांच्या किल्ल्यावर हल्ले करू लागला होता. अशा परिस्थितीत मोगलांशी लढणाऱ्या ताराबाईंना राष्ट्रहिताची भूमिका न घेणारी म्हटले जाणे अयोग्य वाटते.

महाराणी ताराबाईंच्या कुशल लष्करी संयोजनाचे, प्रशासकीय समन्वयाचे व लष्करामध्ये आत्मविश्वास निर्माण करुन मोठमोठ्या लढाया जिंकून दाखविण्याच्या कौशल्याबाबत शत्रुपक्षाकडील इतिहास लेखकांनी कौतुकाचे उदगार काढले आहेत. याबाबत मुघलांचा इतिहासकार खाफीखान म्हणतो, "रामराजाची बायको हिने विलक्षण धामधूम उडविली. त्यात तिचे सैन्याच्या नेतृत्वाचे व मोहिमांच्या व्यवस्थेचे गुण प्रकर्षाने प्रकट झाले. त्यामुळे मराठ्यांचे आक्रमण आणि त्यांची धामधूम दिवसेंदिवस वाढतच गेली. [८] राजाराम महाराजांच्या निधनानंतर महाराणी ताराबाईंनी वैधव्याचे दु:ख गिळून स्वराज्याच्या रक्षणासाठी रामचंद्रपंत, परशुरामपंत त्र्यंबक, धनाजी जाधव, गिरजोजी यादव, नेमाजी शिंदे, खंडो बल्लाळ अशा व इतरही मुत्सद्दी व सेनानीचा पराक्रम व राजनीतीचा वापर करून औरंगजेबाला शेवटपर्यंत झुंजविले.

एकतर त्या पराक्रमी मोहिते कुटुंबातील असल्याने पराक्रम व राजकारण त्यांना जवळून पहावयास मिळाले. दुसरे असे की शिवाजी महाराजांच्या राजघराण्यात विवाह झाल्याने नकळत संभाजी महाराजांच्या लष्करी मोहिमा, शत्रूशी राजकारण या गोष्टी नकळत अनुभवास आल्या. तिसरी गोष्ट म्हणजे योगायोगाने त्या कुटुंबात कनिष्ठ असूनही नियतीने त्यांना राज्यकर्ती होण्याचा मान दिला. मुळातच त्या आक्रमक , तेजस्वी व कार्यकुशल असल्याने त्यांच्या कर्तृत्वाला बहार आला. महाराष्ट्रातील राजमंडळ प्रमुख जिंजीच्या ८ ते ९ वर्षाच्या वास्तव्यातील राज्यकारभाराचा अनुभव यामुळे राजारामाच्या निधनानंतर त्यांनी थोड्याच काळात शत्रूविरुद्ध आक्रमक धोरण स्वीकारले.

साम्राज्यवादी वृत्तीच्या औरंगजेबाविरुद्ध त्या त्वेषाने लढत होत्या. औरंगजेबाच्या किल्ल्यावरील मोहिमांची त्यांना काळजी वाटत नव्हती. मराठ्यांनी एक एक किल्ला सहा सात महिने लढवावा, पावसाळा तोंडावर आला की शत्रूकडून भरपूर रक्कम घेऊन त्याला देऊन टाकावा व नंतर योग्य वेळी हल्ला करुन पुन्हा जिंकावा असे धोरण त्यांनी आखले. त्यामुळे ८० वर्षाच्या बादशहाचे जीवन सहा सात किल्ले घेण्यातच संपून जाईल असे त्यांनी हेरले होते. याशिवाय ताराबाईंनी बादशहाचे नीतिधैर्य खचविण्यासाठी आपल्या फौजा वऱ्हाड, खानदेश, गुजरात, माळवा व कर्नाटक या मुलखात घुसवून बादशहाची अनेक शहरे लुटली. मोगल सेना मराठ्यांच्या गनिमी कावा युद्ध पद्धतीने हतबल झाली होती. त्याचबरोबर खूप वर्षे दक्षिणेत राहिल्याने ते कंटाळले होते. मराठ्यांशी युद्ध थांबवून बादशहा दिल्लीला परत जाणे त्याच्यासाठी अपमानजनक तर होतेच पण त्यामुळे उत्तरेत त्याने शत्रुत्व केलेले रजपूत, शीख, जाठ, बुंदेले व पठाणही त्याच्याविरुद्ध आक्रमक बनतील ही त्यास भीती वाटत असावी. आपण मराठ्यांविरुद्ध निर्णायकरीत्या जिंकू शकत नाही. हे त्याच्या

लक्षात आले तरी त्याने मरेपर्यंत मोहिमा चालविल्या. महाराणी ताराबाईंच्या आक्रमक धोरणाचे वर्णन तत्कालीन कवी देवदत्त यांच्या काव्यातून दिसते तो म्हणतो-

"दिल्ली झाली दीनवाणी
दिल्लीशाचे गेले पाणी
ताराबाई रामराणी
भद्रकाली कोपली"[९]

अशाप्रकारे औरंगजेब विरुद्ध मराठे यांच्यात सव्वीस वर्षे चाललेल्या स्वातंत्र्ययुद्धाचा शेवट महाराष्ट्राच्या मातीतच बादशहाच्या मृत्यूने झाला. या स्वातंत्र्य लढ्याचे मानकरी छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम महाराज आणि स्वातंत्र्यासाठी बलिदान केलेले असंख्य मराठी वीर हे आहेतच पण एक राज्यकर्ती स्त्री म्हणून महाराणी ताराबाईंचा लढा हा स्वार्थाने नव्हे तर स्वराज्य रक्षणासाठी स्वातंत्र्यप्रेमाने दिलेला लढा आहे असे निश्चितच जाणवते.

संदर्भ:

१) प्रा. पवार जयसिंगराव भा., महाराणी ताराबाई (मराठ्यांच्या स्वातंययुध्दाची गाथा), तारारणी विद्यापीठ प्रकाशन, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट, १९४५, पृ. ५

२) कित्ता, पृ. ६

३) कित्ता, पृ २६.

४) KISHORE BRIJ, TARA BAI AND HER TIMES,, ASIA PUBLISHING HOUSE, BOMBAY 1963, P.56

५) Ibid, P.61

६) प्रा. पवार जयसिंगराव भा., उपरोक्त, पृ. ३०.

७) आपटे द. वि. व स. म. दिवेकर (संपा.) शिवचरित्र प्रदीप, पुणे, शके १८४७.

८) पगडी सेतु माधवराव (संपा.), मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध (खाफिखानाचा साधनग्रंथ) पुणे, १९६२

९) प्रा. पवार जयसिंगराव भा., उपरोक्त, पृ.१७.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महाराणी ताराबाई यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील योगदान

डॉ. किशोर रघुनाथ भागवत

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे ता. खेड जि – पुणे

Corresponding Author – डॉ. किशोर रघुनाथ भागवत

DOI - 10.5281/zenodo.19658461

प्रस्तावना:

१७ व्या शतकातील भारतीय इतिहासात मराठा साम्राज्याचा उदय आणि विस्तार हा एक महत्वाचा अध्याय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर अत्यंत्य कठीण संकटात सापडले. मुघल सम्राट औरंगजेब हा स्वतः दक्षिणेत उतरला होता, मराठा साम्राज्य नष्ट करण्याचा त्याचा निर्धार होता राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थिती मध्ये महाराणी ताराबाई यांनी मराठा साम्राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली आणि एक प्रभावी प्रशासक म्हणून आपली छाप उमटवली. ताराबाई यांचे प्रशासन हे केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे नव्हते, तर ते एक दूरदृष्टीपूर्ण लोकांभिमुख आणि युयुद्धस्थितीतही कार्यक्षम होते. त्यामुळेच मराठा राज्य नष्ट होण्यापासून वाचले. मराठा इतिहासामध्ये महाराणी ताराबाई भोसले या केवळ शूर योद्धा किंवा स्वाभिमानी स्त्री म्हणूनच नव्हे तर कुशल प्रशासक म्हणूनही ओळखल्या जातात. औरंगजेबाच्या दिर्घकालीन दक्षिण मोहिमेच्या काळात मराठा साम्राज्य टिकून धरण्यात ताराबाईचे योगदान निर्णायक ठरले प्रस्तुत पेपरमध्ये महाराणी ताराबाई यांचे स्वातंत्र्य युद्धातील योगदान, प्रशासन युद्धकाळातील शासन पद्धती, महसूल व सैन्य व्यवस्थापन राजकीय मुत्सद्देगिरी आणि मराठा राज्याच्या अस्तित्वासाठी त्यांनी केलेले प्रयत्न यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

महाराणी ताराबाई : जीवन व ऐतिहासिक पार्श्वभूमी:

महाराणी ताराबाई यांचा जन्म १६७५ मध्ये महाराष्ट्रातील सातारा जिल्यातील तळबीड येथे झाला (१४ एप्रिल १६७५) काही कागदपत्रांमध्ये उल्लेख आढळला. मराठा साम्राज्याच्या इतिहासातील अत्यंत पराक्रमी रणरागिणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ताराबाई या छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या होत्या. १६८४-८५ च्या सुमारास त्यांचे लग्न राजाराम महाराजांशी झाले. ताराबाईंना लहानपणापासूनच राजकारण, युद्धकला, घोडे स्वारी आणि प्रशासनाचे शिक्षण आपल्या वडिलांकडून मिळाले. जिंजीस राजाराम महाराजांसोबत असताना राणी ताराबाईंना ९ जूने १६९६ रोजी पुत्ररत्न प्राप्त झाले नाव धाकटे शिवाजी ठेवण्यात आले. इ.स. १६८९ मध्ये छत्रपती संभाजी महाराजांची हत्या झाल्यानंतर मराठा साम्राज्यावर मोठे संकट आले. पुढे राजाराम महाराज जिंजी येथे गेले. इ.स. १७०० मध्ये राजाराम महाराजांचे निधन झाले आणि मराठा साम्राज्याची परिस्थिती आणखीनच गंभीर बनली[1]. याच वेळी ताराबाईंनी अतिशय खंबीरपणे आपले अल्पवयीन पुत्र धाकटे शिवाजी

यांच्या नावाने राज्यकारभार सुरु केला आणि प्रशासनाची सूत्रे आपल्या हाती घेतले.

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांना मोगली अतिक्रमणास तोंड द्यावे लागले त्यांनी पुढील प्रमाणे डावपेच ठरवले.

१) औरंगजेबाचे छावणीभोवती सतत घिरट्या घालीत राहणे संधी मिळाल्यास छावणी बाहेर हल्ले करणे रसद आणण्यास निघालेल्या पथकावर हल्ले करणे.

२) औरंगजेबाला किल्ले घेणे तितके अवघड व तिरंगाईचे करता येईल तितके करणे किल्ला लढवता येईल तितका लढवणे.

३) मोगल सेनापतींना पाठीवर घेऊन शेकडो मैल पायपीट करावयास लावणे.

४) दक्षिणेस सर्वत्र संचार करून मोघलांची ठाणी मारणे, मोगल प्रदेश उध्वस्त करणे, अधिकाऱ्यांना कैद करून भक्कम खंडणी घेऊन सोडून देणे, ठिकठिकाणी चौथाई गोळा करणे आणि मोगल प्रदेशात जागोजाग स्वतःच्या छावण्या घालणे.

५) वऱ्हाडातून पुढे सरकून माळण्यात व पश्चिम किनाऱ्यावरून उत्तरेकडे सरकून गुजरातीत जाण्याचा प्रयत्न करणे.

६) नागपूरचे गौंड राजे, बुंदेल खंडातील बुंदेल व कर्नाटकातील गुलबर्गा विजापूर भागातील बेरड जमातीचे सरदार यांचे सहकार्य मिळवणे[2].

राजाराम महाराज दिवंगत झाल्यानंतर राणी ताराबाई हिने राज्य कारभार हाती घेतला इतकेच नव्हे तर तिने सैन्याचे नेतृत्व मोहिमांची आखणी व अंमलबजावणी करण्याची कामेही हाती घेतली असे खाफी खान म्हणतो[3].

प्रशासकीय नेतृत्वाचा स्वीकार (अष्टप्रधानांच्या नेमणुका):

ताराबाई यांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर राज्यकारभार चालविण्यासाठी अष्टप्रधानांच्या नेमणुका केल्या. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात निळो मोरेश्वर हा मुख्य प्रधान होता. तो मिरज येथे मोघलांशी झालेल्या लढाईत मारला गेला (ऑक्टोबर १६९९) त्याजागी परशुराम त्रिंबक यांची नेमणूक राजाराम महाराजांनी केली. तो ताराबाई यांच्या काळातही काही दिवस होता[४]. त्यानंतर मुख्य प्रधान पदी निळो मोरेश्वरचा भाऊ बहिरो मोरेश्वर यास नेमण्यात आले. राजाराम महाराजांनी निमाजी पंत हनुमंते मोघलांच्या कैदेतून सुटून परत आल्यावर त्यास प्रतिनिधी पद दिले आणि निळो मोरेश्वरच्या मृत्यूमुळे मुख्य प्रधान पद रिकामे पडले होते त्या पदावर परशुराम पंतांची नेमणूक करण्यात आली[५]. पुढे सन १७०१ मध्ये ताराबाईंनी निमाजी कडून प्रतिनिधीपद काढून घेतले व ते परत परशुरामास दिले आणि बहिरोजी मोरेश्वर यास मुख्य प्रधान पदी नेमले ताराबाईंच्या कालखंडात रामचंद्रपंत अमात्यपदी राहिले धनाजी जाधव यांना सरसेनापतीपद दिले. पंडितराव हे पद श्री शंकराचार्यांकडेच राहिले[७]. यावेळी औरंगजेब बादशहाने मराठ्यांची शक्ती जे किल्ले आहेत ते जिंकून घेण्याचे ठरविले त्याप्रमाणे बादशहाने सातारा, सज्जनगड, भूषणगड, पन्हाळगड, विशालगड, रांजना उर्फ प्रसिद्धगड हे किल्ले घेण्याचा प्रयत्न सुरू केला.

गनिमी काव्याची युद्धे सुरू केली (इ. स. १७०१):

महाराणी ताराबाई यांनी सेनापती धनाजी जाधव यांच्यावर जबाबदारी सोपवली होती मोगलांशी जरूर तेथे लढण्यासाठी मराठे सैनिकांना मार्गदर्शन करावे त्याचप्रमाणे धनाजी जाधव हे नेहमी बादशहाच्या छावणी जवळ

विलक्षण धुमाकूळ घालत असत. त्यावर बादशहाने अनेक मोगल सरदार नियुक्त केले पण हुलकावणी देणाऱ्या मराठी सैनिकांच्या पाठीवर मोगल सैन्य गेले म्हणजे ते दमून भागून जाई. अशाप्रकारे गनिमी काव्याचे युद्ध मराठ्यांनी विजापूर सुभ्याच्या हुकेरी तालुक्यातील चिकोडी पर्यंत केले[९]. त्यानंतर धनाजीला पळून जाणे योग्य वाटले. झुल्फिकार खानाने पन्हाळ्यात येऊन सावधपणे मोर्चाचे रक्षण सुरू केले. हे ताराबाई यांना समजल्यावर त्यांनी मराठा सरदारास पुन्हा एक होऊन पन्हाळगडा भोवती असलेले मोगलांचे मोर्चे उधळून लावावे असे हुकूम सोडले या उद्देशाने ते पन्हाळगडाजवळ आले त्यांनी वंजारी लोकांचा तांडा धान्य घेऊन मुघलांकडे जात होता त्यास अडविले. शाहजादा बेदारबख्त याने वंजाऱ्यांच्या मदतीसाठी पथक पाठविले सर्फराज खान व दखनी यास बरोबर आणखी सरदार मदतीस गेले. व ते सर्व मराठ्यांवर चालून गेले मराठ्यांचे जबरदस्त पायदळ सैन्य मैदानात आले होते पण त्यांचा टिकाव मोगलांसमोर लागला नाही तेव्हा ते तिथून निघून गेले[९]. मनुचीने मोगल-मराठे यांच्या लढायातील डावपेचाचे वर्णन केले आहे. मोगल सरदारांना युद्धात ज्या सवलती मिळत असत त्यासाठी ते युद्ध निर्णायक स्वरूपाची न करता ते लांबणीवर कसे टाकता येईल याचा ते प्रयत्न करत असत उलट मराठे आपले नुकसान आणि विशेषतः सैनिकांची हत्या होऊ नये या दृष्टीने मोगली लढ्यास तोंड देण्याची कोशिश करत. अचानक छापा घालावयाचा, जाळपोळ करायची, लुटालुट करून शत्रू सैन्य लढाईत उभे राहताच दुसरीकडे निघून जायचे आणि शत्रू बेसावध आहे हे पाहून पुन्हा एकदा छापा घालून दाणागोटा पळवायचा हे त्यांचे तंत्र होते मोगल मोठ्या सैन्यानिशी लढा देत असत तर मराठे या मोठ्या सैन्याची चाल दुसरीकडे झालेली पाहून आपला प्रदेश परत घेत असत मोगली अधिकाऱ्यांच्या हातून हा मुलुख शत्रूकडे गेल्याचे एकूण बादशहाला खेद होई. परंतु गडकोट लढून घेण्यासाठी मोगल शिपाई शत्रूबरोबर टिकाव धरत नाही असे समजून आले अशी परिस्थिती उत्पन्न झाल्याची पाहून बादशहा बराचसा चिंता तूर झाला. या घटना स्थानिक लोकांच्या मनात स्वातंत्र्याच्या भावनेने जोर धरला होता म्हणून होत होते[१०].

ताराबाईंच्या मराठी सरदारास सूचना:

ताराराणीने मराठी सरदारास कळविले की बादशहाची मुख्य फौज अधिकाधिक काळापर्यंत एकेका किल्ल्यापुढे अडकून ठेवायची आणि मराठ्यांच्या फौजदांनी सर्व दक्षिण भर निर्वेध संचार करायचा हे मराठ्यांचे धोरण होते. पावसाळा तोंडावर आल्यावर मोगलांशी वाटाघाटी करून भक्कम रक्कम घेऊन किल्ला द्यावयाचा पावसाळ्यात मोगलांचे अतिशय हाल होत. मोगलांची पाठ फिरली की मराठे तो फिरून घेत प्रत्येक किल्ल्यावर भक्कम शिबंदी ठेवणे इतके मोघलांपाशी मनुष्यबळ नव्हते त्यामुळे किल्ले पुन्हा जिंकून घेणे जड जात नसे[११].

स्वातंत्र्य युद्धाचे सार्वत्रिक स्वरूप:

मराठ्यांचा उठाव हा सार्वत्रिक उठाव होता खेड्यांपासून असंख्य माणसे मराठ्यांच्या सैन्यात स्वइच्छेने सहभागी होत होती. झुल्फिकार खानाच्या वऱ्हाडच्या मोहिमेत एकदा साठ हजार मराठे आपल्यावर चालून आले असे भीमसेन सक्सेना याने लिहिले आहे यावरून असे दिसते की मोगलांच्या विरुद्ध मराठ्यांनी जो उठाव केला त्याचे स्वरूप सार्वत्रिक होते यात संशय नाही मोघलांचे सैन्य कमी होऊ लागले त्यांना नवीन माणसे मिळेनाशी झाली औरंगजेबाने प्रांतोप्रांतीच्या सुभेदारांना पत्र लिहून ताज्या दमाचे सैनिक पाठविण्याची आज्ञा केली जिल्ह्याचे फौजदार मराठ्यांच्या आक्रमणाविरुद्ध बादशहाकडून वेळेवर मैदानात येत नाही हे पाहून मराठ्यांच्या भीतीने घराबाहेर पडेनासे

झाले. भीमसेनने नमूद केले आहे की, इ.स. १७०० च्या सुमारास मराठे हे टोळ आणि मुंग्याप्रमाणे दख्खनच्या खेड्यापाड्यातून पसरले होते. अनेक जिल्ह्यांच्या मोगल अधिकाऱ्यांनी मराठ्यांशी तडजोडी केल्या. मराठ्यांनी प्रत्येक जिल्ह्यातून चौथ आणि सरदेशमुखी नावाखाली रकमेची वसुली करण्यास सुरुवात केली. मराठ्यांनी सुभेदार, कमाविसदार, मोकाशी आणि सरदेशमुख असे आपले अधिकारी ठिक ठिकाणी नेमले त्यांच्या फौजा, पायदळ, घोडेस्वार आणि तोफखाना यांनी सुसज्ज राहू लागल्या आणि हे सगळे औरंगजेबाच्या डोळ्यादेखत घडू लागले . इतकेच नव्हे तर मराठ्यांचे यश पाहून कर्नाटकातील बेरड, बुंदेलखंडातील बुंदेल रजपूत आणि मथुरा भागात जाट इत्यादी जमातींनी धामधूम करण्यास सुरुवात केली पंचवीस वर्षाच्या या मोगल-मराठा संघर्षात मोगल साम्राज्य खिळखिळे होऊन गेले [१२].

मुत्सुद्दी राजकारणी ताराबाई :

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर ताराबाई यांनी राज्यकारभार हाती घेतला तेवढेच नाही तर सैन्याचे नेतृत्व मोहिमांची आखणी व अंमलबजावणी करण्याचीही कामे हाती घेतली. सातारा किल्ला आपण सहज घेऊ अशी बादशहाची समजूत होती. राजाराम महाराजांच्या मृत्यूमुळे तो हर्षभरीत झाला १२ मार्च १७०० च्या अखबारावरून असे समजते की, राजाराम महाराजांचे निधन 2 मार्चला झाल्यानंतर महाराणी ताराबाई यांनी आपल्या वकिलामार्फत दिनांक 12 मार्च रोजी पुढील मुद्दे बादशहाकडे तहासाठी पाठवले. १. आपल्या पुत्रास सात हजारी मनसब व दक्षिणेच्या देशमुखचे घटक मिळावेत. २. त्यासाठी दक्षिणेच्या मोगल सुभेदाराच्या सेवेत पाचहजार मराठी फौज राहील आणि मोगलांना पन्हाळा सातारा चंदन वंदन परळी इत्यादी सात किल्ले मिळतील. ३. छत्रपती शिवाजी महाराज थोरले किंवा उदयपूरचा महाराणा यानी जशी दरबारी येऊन मोगल बादशहास मुजरा करण्याची सक्ती नव्हती तशी सक्ती शिवाजीराजे यांच्यावरही नसावी यातून मराठ्यांच्या स्वाभिमानाला धक्का न देण्याचे ताराबाईंचे धोरण दिसून येते पण औरंगजेबाने या अटी धुडकावून लावल्या त्याचे म्हणणे असे होते की तारारणीने मराठ्यांच्या ताब्यातील सर्वच्या सर्व किल्ले दिले पाहिजेत अर्थात या अटी मराठ्यांनी कधीच मान्य केल्या नाही.[१३] राजाराम महाराजांच्या काळात मराठी राजमंडळाने वतनदारांना आपल्याकडे ओढून त्यांना राष्ट्रकार्यास लावण्याचा जो यशस्वी प्रयत्न केला त्याची राणी ताराबाईंनी री ओढली आणि मराठ्यांना गडकोट आणि देश गनिमापासून सोडविण्याचे आदेश दिले[14].

ताराबाईंनी आपल्या फौजेत स्फूर्ती निर्माण केली:

स्वराज्याचा धनी (दुसरे शिवाजी) अल्पवयस्क, राज्यकारभार बाईच्या हातात अशी स्थिती असल्यामुळे सर्वांनी भगीरथ प्रयत्न करून बादशहाची तिरपीट उडवून द्यावी असा निश्चय मराठ्यांनी केला. राज्याच्या हिताचे वर्तन करण्यास ताराबाईंकडून सर्वांस पूर्ण मुभा असल्यामुळे जो तो या राष्ट्रीय कामात मी मी म्हणत पुढे आला. एकदा तलवार गाजवून आपले व आपल्या घराण्याचे चिरंतन कल्याण करून घेण्याची हीच संधी आहे असे प्रत्येकास वाटू लागले. तेव्हा केवळ स्वतःच्या बचावाचे प्रयत्न सोडून त्यांनी शत्रूचा नि:पात करण्यास सुरुवात केली आणि शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर वीस वर्षांनी मराठ्यांनी बचावाचे युद्ध सोडून चढावाचे युद्ध हाती घेतले. त्याचे वर्णन ग्रँड डफ असे करतो की "मराठ्यांचे सामान म्हटले म्हणजे थोडीशी कांदा भाकरी एक घोंगडी एवढे काय ते असे. रात्री कोठे उतरले तर ते घोड्याचे लगाम हातात धरूनच घोंगडी पसरून त्यावर काही वेळ अंग टाकून राहात त्याचप्रमाणे

दिवसा खाण्याकरिता किंवा ऊन टाळण्याकरिता ते उतरले, म्हणजे पाच पाच सहाजण एखादे झाडझुड असले तर त्याच्या छायेखाली उतरत, परंतु उघडे मैदान असेल तर ते जमिनीत भाले रोवून त्यात ते आपले घोडे बांधून भाल्यांचे टोकावरून एखादी घोंगडी पसरून देत व तिच्या लहानशा छायेत फक्त डोकी ठेवून बाकी सर्व अंगास दुपारचे ऊन लागत असतानाही जमिनीवर घोरत पडलेले आढळत. आपल्या तलवारींना ते कधी विसरत नसत त्या ते उराशी ठेवत. त्या जवळ उंट बैल वगैरे काही नसून फक्त लहान खुरी चपळ व काटक अशी तट्टे असत. मिळालेली लूट त्यावर लाटून ती ते फार जलद गतीने लपवित येणेप्रमाणे मराठ्यांची फौज अगदी सुरसुरीत असल्यामुळे मिजासी व काही अंशी बेबंद अशा बादशहाच्या फौजेस तिचा पाठलाग करणे कठीणच पडे. त्यातूनही ती कधी गाठली जाऊन तिचा पराभव झाला तर तिचे नुकसान ते काय होणार? उलट पक्षी मोगलांच्या फौजेचा पराभव झाला म्हणजे लुटीने मराठ्यांची चंगळ उडून मोगलांचे हाल होत अशा या कट्टर मेहनतीची फळे मराठ्यांच मिळत[१५]. लष्कराच्या साधेपणामुळे लढाया जिंकणे सोपे होत असे.

सारांश:

छत्रपती शिवाजी महाराजांनी लोक राज्याची मुहूर्तमेढ रोवली. राज्याभिषेक करून घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्या वेळेपासून हे आपले राज्य आहे आणि आपल्या पराक्रमाने आणि त्यागाने टिकविले पाहिजे असे सर्व समाजाला वाटले. राजा आणि प्रजा यांचे हे अतूट नाते हा या काळातील अभिनव उपक्रम होता. या उपक्रमाची महती शिवरायांच्या निर्वाणानंतर अधिक प्रकर्षाने सिद्ध झाली महाराजांच्या नंतर औरंगजेब बादशहा हिंदवी स्वराज्य नष्ट करण्याची प्रतिज्ञा करून आपल्या सामर्थ्यांशी महाराष्ट्रात आला. प्रथम संभाजी महाराजांनी व नंतर राजाराम महाराजांनी औरंगजेबाशी सामना केला. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात जो स्वातंत्र्यसंग्राम घडला तो अपूर्वच होता. राजा नाही, राजधानी नाही, सेना नाही, सेनानी नाही अशा दुर्धर अवस्थेमध्ये महाराणी ताराबाई यांनी औरंगजेबाच्या आक्रमणाची लाट परतावून लावली आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला कोणता संदेश दिला हे दाखवून दिले ताराबाईंनी स्वतःला छत्रपती न घोषित करता आपल्या पुत्राच्या नावाने कारभार चालवला हा निर्णय राजकीय दृष्ट्या अत्यंत चतुर होता. त्यामुळे मराठा सरदार, देशमुख आणि प्रजेला प्रशासनाची वैधता (Legitimacy) मिळाली. औरंगजेबाचा प्रचंड सैन्य दबाव सततची युद्धे किल्ल्यावरील हल्ले आणि आर्थिक अडचणी अशा परिस्थितीत ताराबाईंचे प्रशासन संकट व्यवस्थापनाचे उत्कृष्ट उदाहरण ठरते. छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या विकेंद्रीत प्रशासन पद्धतीला पुढे चालना दिली सरदारांना स्वायत्तता स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार, किल्लेदार, देशमुख, पाटील यांना जबाबदाऱ्या यामुळे मुघलांना एकाच ठिकाणी निर्णायक विजय मिळवणे कठीण गेले. सतत लढाया सुरू असतानाही आर्थिक शिस्त राखली, कराचे नियोजनबद्ध संकलन केले त्यामुळे मराठा राज्याचा आर्थिक कणा टिकून राहिला ताराबाईंचे प्रशासन केवळ युद्धकेंद्री नव्हते, त्यात लोक कल्याणचा विचार होता. शेतकऱ्यांचे संरक्षण, धार्मिक स्थळांचे जतन, न्यायव्यवस्था याकडे त्यांनी लक्ष दिले जर ताराबाई यांनी नेतृत्व स्वीकारले नसते तर मराठा साम्राज्य कदाचित औरंगजेबाच्या काळातच संपुष्टात आले असते म्हणून इतिहासकार जदुनाथ सरकार यांनी ताराबाईंचे वर्णन “The preserver of the maratha state" असे केले आहे. औरंगजेबाच्या महत्त्वकांक्षेला सुरुंग लावण्याचे कार्य रणरागिनीने केले. शिवरायांची तेजस्वी सून म्हणून त्यांचे नाव इतिहासात

अजरामर झाले आहे. त्यांच्या सात वर्षाच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करताना डॉ. ब्रिज किशोर लिहितात "This seven year duel between Tarabai and Aurangzeb shall ever remain the most glorious episode in the annals of the country "

संदर्भ :

१. खोबरेकर वि.गो. महाराष्ट्राचा इतिहास. मराठा कालखंड, भाग १ शिवकाल (१६३० - १७०७)

२. कित्ता पृ. क्र .२७८

३. पवार जयसिंगराव, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पृ. क्र. ४९

४. पवार अप्पासाहेब, (संपा) ताराबाई कालीन कागदपत्रे. पृ. क्र.४८०

५. कित्ता पृ. क्र. १४१

६. कित्ता पृ. क्र. १०५

७. महाराष्ट्र साहित्य खंड पृ. क्र. २७३

८. मोगल व मराठे पृ. क्र. १५०-१५१

९. कित्ता पृ. क्र. १५२

१०. बेंद्रे वा. सी. , छत्रपती राजाराम, पृ. क्र. ३१९, ३२०

११. सरकार जदुनाथ, मराठे व औरंगजेब (अनु) एस एन इनामदार (प्रस्तावना) पृ. क्र. १३

१२. खोबरेकर वि. गो. कित्ता पृ. क्र. २७९

१३. पवार जयसिंगराव, कित्ता पृ. क्र. ८२

१४. गर्गे स.मा.(संपा) मराठी रियासत, भागर पृ. क्र. ७०१

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महाराणी ताराबाई यांचे नेतृत्व व स्वराज्य रक्षणातील योगदान: 350 व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त

विजयकुमार शंकरराव पवार

संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Corresponding Author – विजयकुमार शंकरराव पवार

DOI - 10.5281/zenodo.19658489

सारांश:

मराठ्यांच्या इतिहासात मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध हा सुवर्ण अक्षराने लिहावा असा इतिहास आहे .छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी राजे यांच्याकडे आले.छत्रपती संभाजी राजांच्या कारकिर्दी मोगल बादशहा औरंगजेब मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करण्यासाठी प्रचंड मोठी फौज घेऊन दख्खनमध्ये आला पण या भल्या मोठ्या शत्रूला छत्रपती संभाजीराजांनी कडा विरोध केला परिणामी स्वराज्य घेण्यात अपयशी ठरला. स्वराज्य ताब्यात येत नाही म्हटल्यानंतर त्याने आदिलशाही व कुतुबशाही यांच्याकडे आपला मोर्चा वळवला. ते ताब्यात घेतल्यानंतर पूर्ण ताकदीने मराठ्यांच्या स्वराज्याकडे लक्ष दिले. छत्रपती संभाजींनी मोगलांबरोबरच इतर शत्रूंशी सुद्धा क्षमतेने लढा दिला. पण शेवटी छत्रपती संभाजी राजे मोघलांच्या ताब्यात गेले आणि औरंगजेब बादशहाने मराठ्यांच्या या राजाचे हाल करून त्यांना ठार केले. बादशहाला वाटले, स्वराज्य आपल्या ताब्यात येईल. पण असे न घडता छत्रपती संभाजीच्या पत्नी येसूबाई यांनी धाडसी निर्णय घेत छत्रपती राजाराम यांना गादीवर बसवलं व रायगड किल्ला लढवला व शेवटी काही अटींच्या वाटाघाटीने स्वतः आपल्या मुलासह मोगलांच्या कैदेत गेल्या. परिणामी छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीला जाऊन तिथून मोगलांशी संघर्ष सुरू केला. इसवी सन 1789 ते 1700 पर्यंत छत्रपती राजारामानी मोगलांशी मोठा लढा दिला. जिंजीवरून पुन्हा महाराष्ट्रात येऊन छत्रपती राजारामानी आपल्या सहकाऱ्यांसह मोठा लढा दिला. पण त्यांच्या प्रकृतीने त्यांना साथ न दिल्याने इसवी सन 1700 मध्ये त्यांचा मृत्यू झाला. बादशहाला पुन्हा असे वाटले की आता मराठ्यांचं राज्य जिंकण्यात काहीच अडचण येणार नाही. पण पुन्हा एकदा बादशहाला राजारामाची पत्नी ताराबाई यांच्याशी पुन्हा आठ- नऊ वर्षे संघर्ष करावा लागला. महाराणी ताराबाई यांनी आपला मुलगा दुसरा शिवाजी यास मराठ्यांच्या गादीवर बसवून स्वतः नेतृत्व स्वीकारले, मोघलांना मोठा लढा दिला व बादशहाचे स्वप्न पुन्हा एकदा नेस्तनाभूत केले महाराणी ताराबाई बद्दल तत्कालीन मोगल इतिहासकार खाफीखान म्हणतो. "ताराबाई ही राजारामाची थोरली बायको होय. ती बुद्धिमान आणि शहाणी होती. सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार याबाबतीत नवऱ्याच्या हयातीतच तिचा मोठा लौकिक झाला होता"महाराणी ताराबाईंनी आपल्या पतीच्या निधनाचे दुःख बाजूला सारून पंचवीस वर्षाची एक विधवा राणी मोगल बादशाह औरंगजेबाशी लढण्यासाठी तयार झाली. एवढेच नव्हे तर ताराबाईंच्या कालखंडात मोगली बादशहा व मोगली फौजेला सळो की पळो करून सोडले. ताराबाई काळातील संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांची प्रचंड दहशत मोगली सरदार व सैन्यांमध्ये निर्माण झाली होती. यावरून ताराबाईंचे कर्तृत्व, नियोजन, नेतृत्व व लढण्याची हिंमत या गोष्टी प्रकर्षाने दिसून येतात. महाराणी ताराबाईंच्या कालखंडात बादशहा पूर्णपणे हताश झाला आणि अहमदनगरमध्ये असताना 20 फेब्रुवारी 1707मध्ये दुःखद अंतकरणाने त्याचा शेवट झाला.

राजारामाच्या मृत्यूने मराठ्यांची बाजू कमजोर झाल्याचे वाटले तथापि ताराबाईने धैर्याने हुशारीने बाजू सावरली. मोहिमेवर निघालेल्या औरंगजेबाला स्वतः नेतृत्व घेऊन सामना करावयास तयार झाल्या. मराठी राज्याचा कारभार आपल्या हाती घेतला व मोगली फौजा परतवण्यासाठी आक्रमक भूमिका घेत, आपले लष्कर मोघलांच्या वऱ्हाड, खानदेश, गुजरात व माळवा यासारख्या प्रदेशात घुसवले, एवढेच नाही तर मोगली सरदार व फौजेत प्रचंड दहशत निर्माण केली. बादशहाने या फौजांवर आपले सरदार पाठवले पण मराठे कोठेच सापडत नव्हते. शेवटी बादशहाने तहाचा प्रश्न मांडला , पण त्यातही त्याला यश आले नाही. तत्कालीन इतिहासकार खाफीखानाने ताराबाईच्या अंगी सैनिकी नेतृत्वाचे व लष्करी व्यवस्थेचे गुण प्रकर्षाने जाणवल्याचे स्पष्ट लिहिले आहे . ताराबाईंच्या कालखंडात मराठी लष्कर आत्मविश्वासाने लढत होते. बादशहाने घेतलेले सातारा, पन्हाळा, विशाळगड असे किल्ले परत मिळवले. बादशाही मुलखात मोहिमा करून अधिकाऱ्यांना कैद करू लागले. मराठ्यांपासून मोगली फौज व नगराचे संरक्षण कसे करावे हा प्रश्न बादशहाला पडला होता.ताराबाई विषयी कवी गोविंद यांनी म्हटले आहे दिल्ली झाली दीनवाणी दिल्लीशाचे गेले पाणी ताराबाई रामराणी भद्रकाली कोपली. ताराबाई विषयी खाफीखान म्हणतो ताराबाईंनी विलक्षण धामधूम उडवली तिच्या सैन्याचे नेतृत्व व मोहिमांच्या व्यवस्थापनाचे गुण प्रत्यक्ष प्रकट झाले त्यामुळे मराठ्यांचे आक्रमण आणि त्यांची दहशत वाढतच गेली.शेवटी औरंगजेब बादशहा निराश व खचलेल्या मनस्थितीत अहमदनगर येथे 20 फेब्रुवारी 1707 रोजी मृत्युमुखी पडला. मराठ्यांचा शत्रू या महाराष्ट्राच्या मातीतच ताराबाईंच्या कारकिर्दीत नष्ट झाला.

महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाने व स्वराज्य रक्षणातील योगदानाने भावी पिढीला मोठा वारसा निर्माण करून दिला. अशा या महान स्त्री नेतृत्व महाराणी ताराबाई यांचे 350 व्या जन्म शताब्दी वर्षाच्या निमित्ताने अभ्यास करणे व भावी पिढीला प्रेरणा देणे या उद्देशाने या संशोधन पेपर सादर करण्याचा उद्देश आहे.

मुख्य शब्द : महाराणी ताराबाई, नेतृत्व, स्वराज्य रक्षणातील योगदान, 350 वे जन्मशताब्दी वर्ष.

पार्श्वभूमी :

मराठ्यांच्या इतिहासात 1689 ते 1707 या कालखंडाला मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा कालखंड म्हणून ओळखले जाते. मोगल बादशहा औरंगजेब 1681 पासून महाराष्ट्रात मोठ्या फौजेसह दाखल झाला होता. या कालखंडात मोगल बादशहा औरंगजेब स्वराज्य नष्ट करण्यासाठी मोठ्या ताकदीने आक्रमण करत होता. या आक्रमणाविरुद्ध मराठा सत्तेचे छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांनी स्वराज्य रक्षणासाठी लढा दिला. छत्रपती संभाजी महाराजांनी मोगल बादशहास पूर्ण ताकदीनिशी लढा दिला, पण संगमेश्वर मुक्कामी असताना मुकरबखानाने अचानक छापा टाकून छत्रपती संभाजी महाराजांना पकडले. बादशहा औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांना प्रचंड यातना देऊन 11 मार्च 1689 रोजी कोरेगाव येथे त्यांना मारण्यात आले. ही बातमी रायगडावर येताच त्यांच्या कुटुंबासह पूर्ण मराठा राज्य दुःखात बुडून गेले. हिंदवी स्वराज्य वरील हा मोठा आघात होता. मात्र महाराणी येसूबाईंनी अत्यंत धैर्याने दुःखाचा सामना करत मराठा राज्य वाचवण्यासाठी तात्काळ काही निर्णय घेतले. मुघलांनी रायगडास वेढा दिलेला असताना येसुबाईंनी छत्रपती राजाराम यांना मराठा राज्याच्या गादीवर बसवून मुघलांशी काही अटीसह वाटाघाटी करून स्वतः आपल्या मुलासह मोगलांच्या स्वाधीन झाल्या .

छत्रपती राजाराम महाराज रायगडावरून बाहेर पडले आणि मोगलांशी लढा सुरू ठेवला. महाराष्ट्रात शत्रूचा जोर वाढताच त्यांनी जिंजी गाठली. जिंजीतून छत्रपती राजाराम महाराजांनी जवळजवळ सात वर्षे मुघलांशी लढा दिला. ते परत महाराष्ट्रात आले. महाराष्ट्रात येऊन मोगलाविरुद्ध त्यांनी मोहिमा आखल्या. त्यांच्या

प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते सिंहगडावर आले. यातच 2 मार्च 1700 रोजी सिंहगडावर त्यांचा मृत्यू झाला.

छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्युने मराठा सत्तेची खूप मोठी आणि झाली. महाराणी ताराबाई जेमतेम 25 वर्षांच्या असतील. पण याच कठीण प्रसंगात मराठ्यांच्या या राणीने आपल्या पूर्वजांचा वारसा पुढे चालवला. वैधव्याचे दुःख बाजूला सारले. मराठ्यांची ढासळलेली बाजू सावरली. आपल्या मुलाला दुसरा शिवाजी यास 10 मार्च 1700 रोजी विशाळगडावर मंचकारोहण केले. ताराबाईंनी बिकट प्रसंगात मोठे धैर्य व हुशारी दाखवली त्यांनी औरंगजेबाशी सामना करण्याचे ठरवले. ताराबाईंनी सन. 1700 ते 1707 पर्यंत औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत प्रचंड मोठा लढा दिला. त्यांच्या या प्रतीकारामुळे मराठ्यांचे राज्य तर राखलेच, परंतु मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी आलेला औरंगजेब बादशहा 26 वर्षे लढून शेवटी निराश होऊन महाराष्ट्रातच मरून गेला. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्ध काळात कठीण परिस्थितीत महाराणी ताराबाईंनी कर्तृत्व ,नेतृत्व, पराक्रम, धैर्य, सहनशीलता दाखवली ती सदैव प्रेरणा देत राहील. 350 व्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांचे नेतृत्व, त्यांचे स्वराज्यरक्षणातील योगदान भावी पिढीला प्रेरणादायी ठरेल, म्हणून महाराणी ताराबाईंच्या कार्याचा अभ्यास केला आहे.

संशोधन सामग्री:

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर केला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

1. महाराणी ताराबाई यांची कौटुंबिक पार्श्वभूमी व सुरुवातीचे जीवन व व्यक्तिमत्व समजून घेणे.
2. महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वगुणांचा अभ्यास करणे.
3. महाराणी ताराबाईचे स्वराज्य रक्षणातील योगदान अभ्यासणे.
4. महाराणी ताराबाईंचे 350 व्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने भूमिका समजून घेणे.

विषय विवेचन:

1. महाराणी ताराबाईची कौटुंबिक पार्श्वभूमी:

छत्रपती संभाजी महाराजांनी राजाराम व ताराबाई यांचा विवाह लावून दिला होता. ताराबाई या मोहिते घराण्यातील होत्या. हे घराणे छत्रपतींच्या भोसले घराण्याबरोबरच उदयास आले होते. शहाजी महाराज व तुकाबाई यांच्या विवाहाने ही घराणे जवळ आली होती. शिवाजी महाराजांच्या काळात या घराण्यातील हंबीरराव मोहिते हे अतिशय शूर योद्धे होते . त्यांच्या स्वराज्य निष्ठेने व कर्तुत्वाने ते स्वराज्याचे सरसेनापती झाले. अशा या शूर सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या ताराबाई कन्या होत्या. वडिलांकडूनच त्यांना स्वातंत्र्य शौर्य, निष्ठा व पराक्रमाचा वारसा मिळाला होता. ताराबाईंचा जन्म सुमारे 1675 मध्ये झाला. त्यानंत9-10 वर्षांनी 1684-85 च्या सुमारास राजाराम ताराबाई विवाह झाला. शिवदिग्विजय या ग्रंथात उल्लेख आला आहे की "हंबीरराव मोहिते सेनापती यांची कन्या सुलक्षणी पाहून नेमिली. तिथीनिश्चय करून लग्न केले....."

2. महाराणी ताराबाईचे सुरुवातीचे जीवन व व्यक्तिमत्व:

महाराणी ताराबाईंच्या लग्नानंतरच्या तीन-चार वर्षांमध्ये मराठी राज्यावर आघात झाला. 1689 मध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूची बातमी रायगडावर आली यावेळी ताराबाई तेथेच होत्या. येथे होणाऱ्या

राजकीय डावपेच शहप्रतिशह, सल्लामसलती त्यांच्यासमोरच झाल्या असतील. या सर्व गोष्टी त्या जवळून पहात होत्या.

छत्रपती राजारामां मराठा सत्तेचा वारसदार बनवल्यानंतर महाराणी ताराबाई यांना छत्रपती राजारामाबरोबर रायगडाहून गुप्तपणे बाहेर पडावे लागले. तिथून ते प्रतापगडास आले. खरंतर इथूनच त्यांच्या राजकीय अवघड वाटचालीस सुरुवात झाली. प्रतापगडावर असताना राज्यकारभाराशी त्यांच्या जवळून संबंध आला. छत्रपती राजाराम महाराज जिंजीकडे निघून गेल्यानंतर छत्रपती राजारामाने महाराष्ट्रात कार्यक्षम राज्यकारभार यंत्रणा उभारली. अनेक महत्त्वाच्या सेनानींचे राजमंडळ तयार केले. हे राजमंडळ ताराबाईंच्या अध्यक्षतेखाली निर्माण झाले. 15 -16 वर्षांच्या ताराबाई नेतृत्व करू लागल्या होत्या. बिकट परिस्थितीत त्यांच्यावर ही जबाबदारी पडली होती. नंतर ताराबाईंना गुप्तपणे महाराष्ट्रातून जिंजीकडे जावे लागले. जोखीम पत्करून केलेला प्रवास व तेथील राजकीय अनुभव यांनी ताराबाईंचे चांगलेच शिक्षण झाले. अशा बिकट परिस्थितीत ताराबाईंचे व्यक्तिमत्व तयार झाले. खाफीखानाने ताराबाई बद्दल म्हटले आहे "ताराबाई ही राजा रामाची थोरली बायको होय. ती बुद्धिमान आणि शहाणी होती. सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार याबाबतीत नवऱ्याच्या हायातीतच तिचा मोठा लौकिक झाला होता" तत्कालीन परिस्थितीने त्यांच्या व्यक्तिमत्वात प्रचंड बदल घडून आला. 9 जून 1696 रोजी ताराबाई यांना मुलगा झाला, त्याचे नाव शिवाजी असे ठेवले.

महाराणी ताराबाई यांचे नेतृत्व गुण:

अ. जिंजी मुक्कामात महाराणी ताराबाई यांचे नेतृत्व कौशल्य:

महाराणी ताराबाई सात आठ वर्षे जिंजी मुक्कामी होत्या, तेव्हा पतीबरोबर त्यांनी मराठा राज्यकारभारात लक्ष घातले होते. शिवाय त्यांनी विचार विनिमय केला असेल. मोगल इतिहासकार खाफीखानाने म्हटले आहे की, सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार याबाबतीत नवऱ्याच्या हयातीतच त्याचा मोठा लौकिक झाला होता.

आ. मराठा साम्राज्याचे नेतृत्व:

जिंजीहून महाराष्ट्रात आल्यानंतर महाराणी ताराबाईंनी राज्यकारभार, धोरणे, स्वाऱ्या यामध्ये भाग घेतला असे दिसून येते.

छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनानंतर महाराणी ताराबाईंनी वैधव्याचे दुःख बाजूला ठेवून आपला मुलगा दुसरा शिवाजी यास गादीवर बसवून राज्याची सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली. मोठ्या धैर्याने व हुशारीने मराठा साम्राज्याच्या स्वातंत्र्यासाठी औरंगजेबाच्या मोहिमेस तोंड द्यायला त्या उभ्या राहिल्या.

छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूने मराठा राज्याची ढासळती बाजू सावरण्यासाठी व छत्रपतींच्या निधनानंतर मराठा सत्तेला सावरण्यास वेळ मिळावा म्हणून त्यांनी बादशहाशी तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या. बादशहाला गुंतवून ठेवायचे, त्याचे लक्ष विचलित करावयाचे, तसेच वाटाघाटी यशस्वी झाल्या तर बादशहास उत्तरेकडे जाण्यास भाग पाडावयाचे अशी त्यांची योजना होती. मराठा साम्राज्य नाजूक स्थितीत असताना महाराणी ताराबाईंनी आखलेला डावपेच त्यांचे कुशल नेतृत्व सिद्ध करते.

इ. सातारा व परळी किल्ल्यांच्या संघर्षाबाबत ताराबाईंचे आवाहन:

मोगल बादशहा औरंगजेबाने सातारा किल्ल्याला वेढा दिलेला होता. हा किल्ला प्रचंड संघर्ष करून व शेवटी वाटाघाटी करून बादशहाला घ्यावा लागला. पुढे तो पन्हाळा किल्ल्याकडे गेला. पन्हाळ्याला वेढा देऊन बसला होता हा वेढा सुरू असताना महाराणी ताराबाई मराठा सरदारांना मुघलांशी संघर्ष सुरू ठेवण्याचे आवाहन केले होते. 4 मे 1700 रोजीचे बहिर्जी सोनाले सरदारास लिहिलेले पत्रात ताराबाई म्हणतात" सातारा गेला तरी काय जाहले स्वामींच्या राज्यात सेभर किले च्या लीस हजार सेना आहे. औरंगजेबाने सातारा घेतला तरी त्याचे निर्मूल केले जाईल" महाराणी ताराबाईंनी मराठा सरदारांना स्वराज्य प्रेमाचे आवाहन करून राष्ट्रकार्य सुरू ठेवले.

ई. महाराणी ताराबाईंचा सिंहगड किल्ल्याबाबत संताप:

मुघलांनी एप्रिल 1702 मध्ये सिंहगडावरील लोकांशी वाटाघाटी करून, रक्कम देऊन किल्ला ताब्यात घेतला. यावेळी ताराबाईंनी संताप व्यक्त करत बेरडप्रमुखांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात, पाऊस पडेपर्यंत किल्ला लढवायला हवा होता, उतावीळ होऊन किल्ला दिल्याने त्या नाराज होत्या. त्यांच्या धोरणानुसार सहा -सात महिने किल्ला लढवावा व नंतर देऊन टाकावा, म्हणजे बादशहा जवळ जवळ वर्ष -वर्ष एकाच किल्ल्याजवळ झटत राहील.

महाराणी ताराबाई यांची स्वराज्य रक्षणातील योगदान:

महाराणी ताराबाईंनी अत्यंत बिकट परिस्थितीत मोठ्या हिमतीने व धैर्याने मोगली सत्तेला आव्हान दिले. एवढेच नव्हे तर जवळजवळ सात वर्षे शत्रूशी लढून स्वराज्य रक्षण तर केलेच पण शत्रूचा पूर्ण निपात केला.

अ. महाराणी ताराबाई यांचे दैनंदिन राज्यकारभारातील योगदान:

1. चिंचवड परिसरात माजइ बेरड व वडलाई बेरड चोऱ्या करत. याची तक्रार महाराणी ताराबाई यांना येताच अशा गोष्टी होऊ नये, म्हणून त्यांना सज्जड दम दिल्याचे दिसून येते.
2. कसबा सासवड येथील इसमाला कायदेशीर जमीन मिळूनही वाडा बांधण्यास तेथील वतनदार परवानगी देत नव्हते. ही तक्रार प्राप्त होताच महाराणी ताराबाईंनी तेथील वतनदारांना ताकीद दिली.
3. वाई येथील बेलदारावर होणारा अन्याय महाराणी ताराबाई यांनी दूर केला होता.
4. राज्यातील धार्मिक क्षेत्राच्या बाबत ही ताराबाईंचे लक्ष होते. मंदिरे, मठ, देवालय व धार्मिक ठिकाणे यांना लष्कराकडून कोणताही त्रास होऊ नये म्हणून लष्कराला ताकीद दिलेली होती.

महाराणी ताराबाईंच्या कारभाराबाबत मोगल इतिहासकार खाफीखान म्हणतो"....

.. तिने सगळा कारभार आपल्या हाती घेतला सरदारांच्या नेमणुका त्यांच्या बदल्या राज्याचा कारभार बादशाही मुलकावरील हल्ले या सर्व गोष्टी तिच्या तंत्राने चालू लागल्या....."

आ. महाराणी ताराबाई यांचे किल्ल्यांबाबत धोरण:

बादशहा औरंगजेब मराठ्यांचे किल्ले ताब्यात घेण्यासाठी अहोरात्र झटत होता. आपले सरदार पूर्ण ताकदीने काम करत नाहीत म्हटल्यावर तो स्वतः किल्ले ताब्यात घेण्यासाठी बाहेर पडला. सुरुवातीला वसंतगड किल्ला घेऊन तो मराठ्यांची राजधानी सातारा किल्ल्याला वेढा देऊन बसला. या किल्ल्याने बादशहाला बरेच दमावले. शेवटी हा किल्ला त्याला वाटाघाटीनेच घ्यावा लागला. मात्र

याबाबत महाराणी ताराबाई यांचे धोरण स्वराज्य रक्षणातील महत्त्वपूर्ण धोरण होते.

औरंगजेब बादशहाने सातारा किल्ल्याला वेढा दिला, तेव्हा महाराणी ताराबाईंनी धोरण ठरवले होते की किल्ला शक्य होईल तितका जास्त दिवस लढवायचा. शत्रूचे सैन्य गुंतवून ठेवायचे, व अगदीच नाईलाज झाला की मग वाटाघाटी करून जमल्यास रोख रक्कम घेऊन किल्ला देऊन टाकायचा.

महाराणी ताराबाई यांच्या या धोरणामुळे बादशाह अगदी जेरीस आला . पन्हाळा व विशाळगड किल्ले घेण्यासाठी औरंगजेब बादशहाला पन्हाळा घेण्यासाठी सात महिने, तर विशाळगड घेण्यासाठी पाच महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागला. तरी हे किल्ले त्याला वाटाघाटी करूनच मिळवावे लागले. स्वराज्यातील परळी, सिंहगड ,राजगड, सिंहगड असे सर्व किल्ले यांच्याबाबत हेच धोरण आखले गेले . फक्त तोरणा किल्ला मुघलांनी जिंकून घेतला होता.

किल्ल्यांबाबत महाराणी ताराबाई यांचे दुसरे धोरण होते की, शत्रूचे सैन्य किल्ल्यापाशी गुंतून पडले की गनिमी कावा युद्ध पद्धतीने त्यांच्यावर हल्ले करत राहायचे. पन्हाळा व विशाळगडाच्या वेढ्या वेळी मराठ्यांनी गनिमी युद्ध तंत्राचा वापर केल्याने यावेळी खुद्द बादशहास प्रतिकारासाठी शस्त्र हाती घ्यावी लागले होते . पावसाळा जवळ आला की किल्ला देऊन टाकायचा. परिणामी शत्रूची फौज माघारी फिरताना पावसाने शत्रूचे आर्थिक व लष्करी प्रचंड नुकसान होत होते. शिवाय पावसाळ्यात किल्ल्यावर राहायची सोय नसल्याने ते किल्ल्याखाली रहात. याचा फायदा घेत मराठे परत किल्ले मोगलांकडून मिळवत होते.

महाराणी ताराबाईने गेलेले किल्ले परत मिळवणे विषयी आत्मविश्वास होता. बादशहा वाकीन खेड्याच्या मोहिमेवर असताना महाराणी ताराबाईंच्या नेतृत्वाखालीच कोपल ,लोहगड, सिंहगड व राजमाची किल्ले मराठा फौजानी आपल्या ताब्यात घेतले होते.

इ. महाराणी ताराबाई यांचे आक्रमक धोरण:

महाराणी ताराबाईंनी मोगली आक्रमण थोपवण्यासाठी शत्रुविरुद्ध आक्रमक धोरण राबवले. औरंगजेब बादशहा मराठ्यांचे किल्ले मिळवण्यासाठी स्वराज्यात झटत होता, यावेळी ताराबाईंनी जशास तसे या प्रमाणे आपल्या मराठा पूजा त्यांच्या प्रदेशात घुसवल्या. जेव्हा बादशहा विशाळगडाला वेढा देऊन होता, त्यावेळी मराठा फौजा एक औरंगाबाद येथे, दुसरी दक्षिण कोकणात तर तिसरी फौज माळव्यात प्रदेश व लूट मिळवत होत्या. मराठ्यांनी यावेळी मोगलांचे बुऱ्हानपूर शहरही लुटले होते.राजगडला जेव्हा मोगलांनी वेढा दिला, त्यावेळी मराठ्यांच्या फौजा विजापूर, वऱ्हाड, कालाबागपर्यंत घुसल्या होत्या. एवढेच नव्हे तर हैदराबादमध्ये घुसून गोवळकोंडा शहरावर मराठ्यांनी हल्ला केला होता.

महाराणी ताराबाईंनी औरंगजेबाला पूर्ण नेस्तनाबूत करण्यासाठी बादशहा मृत्यूच्या शेवटच्या घटका मोजत असतानाही महाराणी ताराबाईंनी मुघल बादशहा औरंगजेबाविरुद्ध मोठी लष्करी मोहीम राबवली. परिणामी बादशहा मनाने फारच खचून गेला. दुसरीकडे महाराणी ताराबाई नी स्वराज्यातील संरक्षणाबरोबरच, मराठा फौजा गुजरात, माळवा, तेलंगणा, कर्नाटक प्रदेशात घुसवल्या .यामुळे बादशहाच्या मनात प्रचंड भीती निर्माण केली, तसेच मराठा फौजदांचा परस्पर खर्चही निघत होता.या हेतूनेच मराठी फौजा मोगली मुलखात धामधुम करीत होत्या. याचा परिणाम असा झाला की, औरंगजेब बादशहाला समजत नव्हते की, मराठ्यांशी कुठे लढा द्यावा. मराठ्यांना नेमके कुठे गाठावे. त्यांचा सामना कोठे करावा. मराठ्यांच्या या युद्धनीतीने बादशहाचे नियंत्रण पूर्णपणे कोलमडले. मराठा

फौजांच्या आक्रमणाने मोगली मुलखातील अधिकाऱ्यांनी चांगलीच धास्ती घेतली होती. याविषयी मल्हार रामराव म्हणतो की "मुघलांचे घोडे पाण्यावर आले असता, पाणी न पीत. त्याच मोगली लोकांनी म्हणावे जे पाण्यामध्ये धनाजी व संताजी दिसतो की काय". मराठा फौजांच्या आक्रमक लष्करी धोरणामुळे मोगली प्रदेश व शहरांचे संरक्षण कसे करावे, हा प्रश्न बादशहाला व त्याच्या सरदारांना पडला होता.

ई. औरंगजेब बादशहा प्रचंड निराशेत मृत्युमुखी पडला:

वाकिनखेड्याचा लढा जिंकून देवापुरला आला. लवकरच तो आजारी पडला. बहादूर गडापर्यंत येईपर्यंत मोगल बादशहाला मराठ्यांच्या हल्ल्याला प्रचंडमोठे तोंड द्यावे लागले. औरंगजेब बादशहाला आपल्यासमोर पराभवाचा अंधार दिसत असल्याने निराश मनस्थितीत तो अहमदनगरला पोहोचला. बादशहाच्या अशा परिस्थितीत त्याला तडाका देण्यासाठी महाराणी ताराबाईंनी धनाजी जाधव, नेमाजी शिंदे व इतर मोठ्या सेनानींना बादशहाच्याच छावणीवर चालून जाण्याची मोहीम दिली. मराठ्यांनी त्वेषाने मुगल बादशहाच्या फौजेवर हल्ला केला. मराठ्यांची बाजू वरचढ होत आहे हे पाहून शेवटी बादशहाने आपल्या सरदारांकडे मंतरलेले ताईत पाठवले. यापेक्षा बादशहाचा दैव दुर्बिलास काय असू शकतो. बादशहा खिन्न मनाने 1707 ला अहमदनगर आत आला तेथे तंबूतील आपल्या जवळच्या लोकांशी बोलला की'या भूतळावर माझे जे हिंडणे होते ते आज संपले. याच जागी माझा मृत्यू जगदीशाने नेमीला आहे'. अशा दुखी व निराश परिस्थितीतच 20 फेब्रुवारी 1707 रोजी अहमदनगर येथे बादशहाच्या मृत्यू झाला.

उ. महाराणी ताराबाई यांची योग्यता:

महाराणी ताराबाई यांच्या आक्रमक धोरणामुळे मराठा राज्य तर राखलेच, पण मोगल बादशहाचा पराभव होऊन तो इथेच मृत्यूमुखी पडला. मराठा फौजा मोगली मुलखात घुसून प्रदेश व खजिना मिळवू लागल्या. मराठा मुलखाबाहेर सुद्धा मराठ्यांनी आपला अंमल व दहशत बसवली. मराठा राज्याचा महाराष्ट्र बाहेर विस्तार झाला. ताराबाईंच्या राज्यकारभार कौशल्य व लष्करी नेतृत्वाविषयी मोगली इतिहासकार खाफीखान म्हणतो. "रामराजाची बायको विलक्षण बुद्धिमान व शहाणी होती सैन्याची व्यवस्था आणि राज्य कारभार याबाबतीत नवऱ्याच्या हयातीतच तिचा मोठा लौकिक झाला होता" यावरून दिसते सैन्याच्या नेतृत्वाची आणि मोहिमांचे व्यवस्थेचे गुण प्रकर्षाने प्रकट झाले. त्यामुळे मराठ्यांचे आक्रमण आणि त्यांची धामधूम दिवसेंदिवस वाढतच गेली. महाराणी ताराबाई यांच्या यांच्या विषयी पोर्तुगीज व्हाइसरॉय मरकीज द ताहोरा यांच्या पत्नीने पोर्तुगाल मधील आपल्या मुलास लिहिलेल्या पत्रात ताराबाईंचे वर्णन "अत्यंत बुद्धिमान, स्वाभिमानी स्त्री" असे केले आहे. शत्रु पक्षाकडील लोकांनी केलेल्या कौतुकातच त्यांची योग्यता दिसून येते महाराणी ताराबाईंची स्वराज्य रक्षणातील महत्त्वाची भूमिका यातून स्पष्ट होते.

तत्कालीन मराठी कवी गोविंद यांनी ताराबाईंच्या विषयी पुढील प्रमाणे वर्णन केले आहे.

"दिल्ली झाली दीनवाणी !दिल्लीशाचे गेले पाणी! ताराबाई रामराणी !भद्रकाली कोपली!
ताराबाईच्या बखते !दिल्लीपतीची तखते!
खचो लागली तेवी मते !कुरानेही खंडली!
रामराणी भद्रकाली !रणरागी कृद्ध झाली!
प्रलयाची वेळ आली! मुगल हो सांभाळा!

महाराणी ताराबाई यांच्या 350 व्या जयंती निमित्ताने:

महाराणी ताराबाई प्रभावी व दूरदर्शी स्त्री नेतृत्व होते. इतिहासातील व्यक्तिमत्त्वांचे मूल्यमापन तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात केले जाते . त्यांचे आधुनिक काळाच्या दृष्टिकोनातून ताराबाईंच्या भूमिकेत विचार करणे आवश्यक ठरते.

महाराणी ताराबाईंनी बलाढ्य शत्रू औरंगजेबाशी लढताना धैर्य, धाडस, निर्णय क्षमता, आत्मविश्वास या उच्च प्रतीच्या गुणांचा दाखला दिला. स्त्री राज्यकर्ते म्हणून तत्कालीन बिकट परिस्थितीत शत्रु पुढे उभे राहणे व त्यास शेवटी परास्त करणे ही साधी गोष्ट नव्हती. त्यांचे राज्यकारभार कौशल्य, लष्करी नेतृत्व, आक्रमक धोरण याविषयी शत्रू पक्षाकडील लोकांनीही त्यांचे कौतुक केले आहे. महाराणी ताराबाईंनी स्वराज्य संरक्षक म्हणून भूमिका पार पाडली, याशिवाय मराठा फौजांनी देशातील अनेक भागात विजयी पताका फडकवल्या. महाराणी ताराबाईंच्या आक्रमक धोरणाने शत्रूला सळो की पळो करून सोडले. 350 वी जयंती निमित्त अशा या महान इतिहासातील स्त्री व्यक्तिमत्त्वाचे जीवन व कार्य आधुनिक पिढीपर्यंत पोहोचले पाहिजे. कठीण व बिकट परिस्थितीतही महिला उभ्या राहू शकतात, हे महाराणी ताराबाईंनी दाखवून दिले. धैर्य, साहस, सहनशीलता, आत्मविश्वास, राष्ट्रनिष्ठा ही मूल्ये आजही आजच्या पिढीला प्रेरणा देत राहतील. महाराणी ताराबाईंचे जीवन आजच्या पिढीला प्रेरणादायी व्हावे या हेतूने त्यांच्या 350 व्या जयंतीनिमित्ताने संशोधन पेपर तयार केला आहे.

निष्कर्ष:

महाराणी ताराबाईंनी मराठा साम्राज्याच्या इतिहासात आपला कायमचा ठसा उमटवला. छत्रपती राजारामाच्या मृत्यूनंतर मराठा सत्तेची बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. पण अशा बिकट परिस्थितीत वैधव्याचे दुःख बाजूला सारत आपल्या मुलाला गादीवर बसवले. सर्व सत्ता आपल्या ताब्यात घेतली. मोठ्या धैर्याने व हिमतीने मोगल शत्रूला लढा दिला. स्वराज्य रक्षणासाठी राज्यकारभारामध्ये लक्ष घालून जनतेचे प्रश्न सोडवले. याशिवाय स्वराज्यातील किल्ले सुरक्षित ठेवण्यासाठी मराठा सरदारात एकी निर्माण केली. त्यांना राष्ट्रप्रेमाचे आवाहन करून शत्रूशी लढण्याची हिंमत दिली .किल्ल्याच्या संदर्भात ताराबाईंनी विशिष्ट धोरण राबवले. शत्रुने किल्ल्याला वेढा दिल्यास जास्तीत जास्त दिवस तो लढवायचा. सैन्य गुंतवून ठेवावयाचे शेवटी पर्याय खुंटल्यानंतर आणि पावसाळा जवळ आला की वाटाघाटीने व रक्कम घेऊन किल्ला ताब्यात द्यायचा व नंतर संधी मिळताच हे किल्ले परत मिळवावयाचे. या धोरणाचा चांगलाच उपयोग झाला . ताराबाईंनी आक्रमक धोरण राबवून शत्रूवर गनिमी युद्ध तंत्राचा वापर केला, व शत्रूस जेरीस आणले. जशास तसे या धोरणानुसार आपल्या मराठा फौजा शत्रूच्या राज्यात घुसून शत्रूला धडकी भरवली. अशा धडकीनेच शेवटी बादशहा महाराष्ट्रातच गतप्राण झाला.

महाराणी ताराबाईंच्या 350 व्या जयंतीनिमित्ताने इतिहासातील एका थोर स्त्री नेतृत्वाचे जीवन व कार्य तरुण पिढीपर्यंत पोहोचावे. त्यांना प्रेरणा मिळावी .धैर्य ,दूरदृष्टी, निर्णयक्षमता व ध्येयनिष्ठा ही मूल्ये आजही समाजासाठी प्रेरणादायी ठरतात.

संदर्भसूची:

1. मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला, (शिवाजी आणि शिवकाल) संपादक अ. रा. कुलकर्णी., ग. ह. खरे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, प्रथम आवृत्ती, 1984.

2. मोगल आणि मराठे (तारीखे दिलकुशा), सेतू माधवराव पगडी, ठोकळ प्रकाशन, पुणे. पहिली आवृत्ती, 1963.
3. हिंदवी स्वराज्य आणि मोगल, सेतू माधवराव पगडी, व्हीनस प्रकाशन, पुणे. 2 पहिली आवृत्ती, फेब्रुवारी 1966.
4. ताराबाई कालीन कागदपत्रे (खंड तिसरा), संपादक डॉ.आप्पासाहेब पवार, प्रकाशक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 1972. प्रथम आवृत्ती, 1972.
5. मराठ्यांची बखर (कॅप्टन ग्रांट डफ), भाषांतर कॅप्टन डेव्हिड केपन, प्रकाशक तुकाराम जावजी, निर्णय सागर प्रकाशन, आवृत्ती सहावी, 1916, मुंबई
6. महाराणी ताराबाई (मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाची गाथा), प्रा. जयसिंगराव पवार, तारारणी विद्यापीठ, प्रकाशन. प्रथम आवृत्ती, ऑगस्ट, 1975.
7. मराठा साम्राज्याचा उदय आणि अस्त, प्रा. जयसिंगराव पवार, अजब पुस्तकालय, कोल्हापूर. पुनर्मुद्रन, 1986.
8. मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध, प्रा.जयसिंगराव पवार, सुमेरू प्रकाशन, प्रथम आवृत्ती, 15 जुलै 2006.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

पुष्यश्लोक अहिल्यादेवी होळकर - प्रशासकीय आणि जनकल्याण कार्याचा चिकित्सक अभ्यास

डॉ. प्रेमचंद गुंडू गायकवाड

प्राध्यापक आणि विभाग प्रमुख, इतिहास विभाग,

श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ, तालुका- खंडाळा, जिल्हा- सातारा.

***Corresponding Author* – डॉ. प्रेमचंद गुंडू गायकवाड**

DOI - 10.5281/zenodo.19658501

सारांश:

मध्य भारतातील 'माळवा' या संस्थानच्या कर्तबगार दूरदर्शी राज्यकर्त्या म्हणून पुष्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे नाव आज आदराने घेतले जाते. त्यांनी आपल संपूर्ण आयुष्य जांकल्याणार्थ व्यतीत केले. त्यांचे जीवन आणि प्रशासन कार्याची शैली साधी सोपी परंतू प्रभावी होती, तसेच जनकल्यासाठी संवेदनशील अशी होती. जनसामान्यांमधे त्यांना नेहमीच 'लोकमाता' म्हणून आदराचे स्थान होते. त्यांनी आपल्या शिवसंकल्पाच्या माध्यमातून सनातन परंपरा आणि धर्मकार्याला अनुसरून एक आदर्श अशी प्रशासकीय व्यवस्था आपल्या राज्यात स्थापित केली होती. आहिल्यादेवी होळकर यांची प्रशासकीय व्यवस्था ही प्रेम, न्याय आणि सुशासनाचे प्रतीक मानले जाते. एक उत्तम प्रशासक म्हणून आणि जनकल्याणासाठी एक सेवाव्रती व्यक्तीमत्व म्हणून ज्या गुणांची आवश्यकता असते ते गुण त्यांच्या अंगी होते. या गुणांचा विचार करताना-लोकहिताचे उद्दिष्ट, रयतेचे सुख-समाधान शेतकरी, व्यापारी आणि सर्व सामान्यांच्या कल्याणाचा विचार, धार्मिक समभाव, समतोल करप्रणालीची अंमलबजावणी, न्यायाभिमुख प्रशासन, महिला सन्मान, इत्यादी घटक त्यांच्या प्रशासकीय व्यवस्थेत असल्याचे दिसून येते. आपल्या राज्याच्या प्रगती बरोबरच त्यांनी भारतीय संस्कृती-परंपरा यांच्या संवर्धनासाठी सुध्दा खूप मोठे कार्य केले. सर्व धार्मिक स्थळे, सर्व ज्योतिर्लिंग आणि शक्तीपीठांसह त्यांनी अनेक मंदिरांची उभारणी केली, जिर्णोद्धार केला. यावरुनच त्यांच्या अतुलनीय आणि अलौकीक अशा कार्याची ओळख होते. प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विविध प्रशासकीय पैलूंवर चर्चा करताना त्यांच्या जांकल्याणच्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भ शब्द: अहिल्यादेवी होळकर, प्रशासकीय व्यवस्था, जनकल्याणार्थ कार्य

प्रस्तावना:

आहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ मध्ये तत्कालिन हैद्राबाद प्रांतातील चौडी गावात झाला, (आत्ताचे अहिल्या नगर जिल्हा, महाराष्ट्र). त्यांचा विवाह मध्य भारतातील माळवा प्रांताच्या (इंदूर) होळकर घराण्यातील सुभेदार मल्हारराव होळकर यांचे पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी झाला. पती आणि सासऱ्यांच्या मृत्यु नंतर अहिल्यादेवींनी माळवा प्रांताच्या कारभाराची सर्व सूत्र आपल्या हाती घेतली. आणि महेश्वर येथे माळवा प्रांताची राजधानी स्थापन केली. माळवा प्रांताचे राज्य म्हणजे मराठी राजसत्तेतील एक महत्वाचे संस्थान होते. या राज्याच्या होळकरशाही मध्ये अनेक राज्यकर्ते होऊन गेले. त्यात आदर्श महिला राज्यकर्त्या म्हणून अहिल्यादेवी होळकरांचा सिंहाचा वाटा होता. माळवा प्रांताची सत्ता जवळपास २९ वर्षे त्यांच्याकडे होती. राज्यकारभारात प्रत्येक बायतीत पारदर्शकता असण्यावर त्यांचा कटाक्ष होता.

शिवसंकल्पाच्या माध्यमातून सनातन परंपरा आणि धर्मकार्याला अनुसरून आदर्शवत अशी प्रशासकीय व्यवस्था त्यांनी आपल्या राज्यात स्थापित केली होती. म्हणूनच त्यांची प्रशासकीय व्यवस्था ही प्रेम न्याय आणि सुशासनाचे प्रतीक मानले जाते. राज्यातील सुशासना बरोबरच, जनकल्याणार्थ सुध्दा अहिल्यादेवींनी अहोरात्र कार्य केले. रयतेप्रती उत्तरदायित्वाची भूमीका पार पाडताना त्यांनी अनेक जनकल्याणाची कार्य केली. लोकशाही मध्ये कल्याणकारी राज्याची संकल्पना मांडली आहे स्वातंत्र्यपूर्व काळात जेंव्हा लोकशाही अस्तीत्वात नव्हती, त्या काळात (सरंजामशाहीचा काळ) सुध्दा अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात लोकशाहीचा घटक असलेल्या कल्याणकारी राज्याची संकल्पना अंमलात आणली. आजही त्यांनी एक राज्याच्या राज्यकर्त्या म्हणून जी कार्ये केली, ज्या संकल्पना अंमलात आणल्या त्या आजच्या लोकशाहीच्या प्रशासनातही नक्कीच मार्गदर्शक ठरतील. राज्याची धूरा सांभाळताना, रयतेप्रती उत्तरदायित्वाची जवाबदारी पार पाडताना, रयतेप्रती आत्मीयतेची भावना जोपासताना त्यांनी कायद्याचे राज्य, निःपक्ष न्यायव्यवस्था उत्तम प्रशासन समाजातील वंचित दूर्शल घटकांना समान न्याय अशा स्वरुपाची कल्याणकारी कार्ये त्यांनी केली. प्रस्तुत अभ्यासाद्वारे अहिल्यादेवी होळकरांच्या प्रशासकीय आणि जनकल्याण कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा:

१) देवीदास पोटे, (२०२५), यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या लोकोत्तर कार्याचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला आहे. लेखकांच्या मते, 'राष्ट्रिय' वा 'विश्वबंधुत्व' हे शब्द सुध्या ज्या काळात फारसे रुढ नसतील त्या काळात अहिल्यादेवींनी हे शब्द जनमानसात रुजवायला सुरुवात केली. आपल्या राज्याच्या बाहेरही त्यांनी लोककल्याणाची कार्ये कशी केली यावर लेखकाने समग्र चर्चा केली आहे. लेखकाच्या मते, अहिल्यादेवींचे चरित्र-कर्तुत्व यांचा विविध अंगाने अभ्यास करणे गरजेचे आहे, कारण ही बाब आजच्या काळात नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

२) हिरालाल शर्मा, (२०२५), यांच्या मते अहिल्यादेवी होळकर या हिंदू संस्कृती-परंपरेच्या अलौकीक अशा प्रतीक होत्या, त्यांची प्रवृत्ती धार्मिक आणि आध्यात्मिक होती. जन-कल्याणाकरीता सतत कार्य करणे हेच त्यांच्या त्यांच्या जीवनाचे एकमेव ध्येय होते हे लेखकाने आपल्या अभ्यासाद्वारे दर्शवले आहे. लेखकाने अभ्यासाच्या माध्यमातून अहिल्यादेवींचे प्रशासन-प्रशासकीय कार्य, समाजकार्यावर सविस्तर चर्चा केली आहे.

३) ल.वा.गायकवाड, (२०२५), यांनी अहिल्यादेवी होळकरांच्या विविध प्रशासकीय गुणांवर समग्र चर्चा केली आहे. लेखकाच्या मते, त्यांच्या अंगी समयसुचकतेचा गुण असल्याने त्यांनी राज्याचा कारभार अतिशय उत्तम केला केला. अहिल्यादेवी होळकरांचे विचार त्यांची तत्वे आणि कार्य पद्धती आजही कशी लागू होऊ शकते, या बाबत लेखकाने चर्चा केली आहे. समाजाप्रती असलेली त्यांची वचनबध्दता, महिला सक्षमीकरणासाठी केलेले कार्य, पर्यावरण संरक्षण या सारख्या कार्यावरून त्यांची दुरदृष्टी दिसून येत असल्याचे मत लेखकाने व्यक्त केले आहे.

४) आर. आर. पाटील, (२०१८), यांनी सुध्या आपल्या अभ्यासाद्वारे आहिल्यादेवी होळकरांच्या कार्यावर आणि त्यांच्या विचारांवर समग्र चर्चा केली आहे. लेखकाने प्रामुख्याने अहिल्यादेवी होळकरांच्या महीला सक्षमीकरण, निःपक्षपाती न्यायदान, प्रशासकीय कारभार या बाबत चिकीत्सक अभ्यास केलेला आहे. महसूल पध्दतीत बदल, शेती- व्यापारास प्रोत्साहन यावर अहिल्यादेवींनी अधीक

भर दिला असल्याचे लेखकाने आपल्या अभ्यासाद्वारे दर्शवले आहे.

अभ्यासाची उद्दिष्ट:

१) अहिल्यादेवी होळकर यांच्या जनकल्याणकारी कार्याचा आढावा घेणे.

२) उत्तम प्रशासक म्हणून अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रशासकीय गुणच्या विविध पैलूंचा आढावा घेणे.

अभ्यास पध्दती:

प्रस्तुत अभ्यास वर्णनात्मक असून अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यासंबंधी उपलब्ध असलेल्या दुय्यम माहितीवर आधारित आहे. दुय्यम माहिती हो प्रकाशित पुस्तके, ग्रंथ, ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या बखरी, इतिहासतज्ञांचे अभ्यासपूर्ण लेख (विविध नियतकालीके, मासीके याव्दारे प्रकाशित झालेले) यांच्याव्दारे घेण्यात आली आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचे जनकल्याणाचे कार्य:

अहिल्यादेवी होळकरांनी ज्या काळात सामाजिक कार्याला आणि जनकल्याणाच्या कार्याला सुरुवात केली, त्या १८ व्या शतकात सामाजिक स्थिती अत्यंत विषम होती. महिलांकडे पहाण्याचा कुटुंबांचा आणि समाजाचा दृष्टीकोण कलूषित आणि विषमतेने भरलेला होता. महिलांना तत्कालिन समाजात दुय्यम स्थान होत. पुरुषांना समाजात जे स्थान होते ते त्यांना नव्हते. कुटुंबातील लोकांची आणि इतर आप्तजनांची सेवा करणे हेच तत्कालिन समाज रचनेत महिलांचे आद्यकर्तव्य मानले गेले होते. बाल विवाह बहुपत्नीत्व, सतीची चाल, हुंडा पध्दती अशा अनेक कुप्रथा समाजात रुजल्या होत्या. अहिल्यादेवी होळकरांनी अथक प्रयत्नांनी समाजात या कुप्रथा बाबत जाणीव जाणूती निर्माण करून त्यांचे समूळ उच्चाटन केले, आणि राज्यातील महिलांप्रती एक प्रकार कल्याणकारी कार्यच केले. यात त्यांनी मुख्यत्वे हुंडबंदीचा आदेश संपूर्ण राज्यात अंमलातल आणला. विधवा महिलांना मुलगा दत्तक घेण्याचा अधिकार दिला. माळवा संस्थानात भिल्ल आणि गोंड या अदिवासींचा खुपच उपद्रव होत होता. या अदिवासी जमाती यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंची आर्थिक लूट करीत, 'भिलकवडी' हा कर त्यांच्या कडून जवरदस्तीने वसूल केला जात असे. या बाधत अहिल्यादेवींकडे तक्रार केल्या नंतर त्यांनी त्यांचा बंदोबस्त केला, आणि 'भिलकवडी' या करास रितसर मान्यता देऊन मिल्लांच्या उदरनिर्वाहाची तरतूद करून त्यांचे पुनर्वसन केले. त्या बदल्यात त्यांना तेथील देवीच्या मंदिराचे रक्षण करण्याचे काम सोपवले. त्याच बरोबर, धार्मिक स्थळांच्या ठिकाणी, यात्रेकरूंची आणि तेथील स्थानिक नागरीकांची सोय व्हावी म्हणून त्यांनी नदीकाठांवर घाट बांधले, विहिरी खोदल्या, धर्मशाळा बांधल्या, रस्ते तयार केले, पाणपोया, जलकुंड, अन्नछत्र सुरु केले. धर्मशाळा आणि अन्नछत्रामुळे अनेक गोरगरीब यात्रेकरूंची निवासाची आणि भोजनाची व्यवस्था झाली. अहिल्यादेवी करीत असलेले हे जनकल्याणाचे कार्य हे केवळ त्यांच्या राज्यापुरतेच मर्यादेत नव्हते टीआर त्यांनी हे करी संपूर्ण भारतात सुरू केले. आज शासनाकडून ज्या रोजगार हमीच्या योजना अंमलात आणल्या आहेत, त्या योजना त्यांनी दोनशे वर्षांपूर्वीच अंमलात आणल्या होत्या हे काही ऐतिहासीक बखरीतील त्या संदर्भातील उल्लेखामुळे समजून येते.

राज्यातील शेतकरी सुखी असेल तर राज्य सुखी या संकल्पनेनुसार अहिल्यादेवींनी राज्यातील शेतक-यांना जाचक करांमधुन मुक्त केले. शेतीच्या विकासासाठी अनेक ठिकाणी तलाव आगि विहिरी बांधल्या, शेतक-यांमध्ये

गोपालना बाबत जाणिव निर्माण करून मोठ्या प्रभाणावर गोपालनाचा व्यवसाय राज्यात सुरू केला. त्यामुळे शेतक-यांना अतिरिक्त अर्थार्जनाची संधी उपलब्ध झाली. नैसर्गिक आपत्ती आणि युध्याच्या काळात सैन्याकडून जर पीकांचे नुकसान आले तर त्याची भरपाई करण्याची व्यवस्था त्यांनी केली. माहेश्वरी येथे कापड निमीती उद्योगाला प्रोत्साहन देऊन तेथील स्थानिक कारागिरांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. यामागे त्यांचा राज्याच्या आर्थिक विकासाचा दृष्टीकोन दिसून येतो. अहिल्यादेवींनी अनेक ठिकाणी मंदिराचे निर्माण कार्य केले. यामागे सुध्दा त्यांच्या विचारांना अनेक पैलू होते. एक म्हणजे, पारंपारीक हिंदू धर्मविचारांचे पालन करणे, आणि दुसरे म्हणजे यो जनतेच्या सगुण स्वरुपातील भक्तीभावाला प्रोत्साहन देणे, त्यांच्यात परकीय जुलमी राजवटीमुळे निर्माण झालेली भीती, हतबलता, नैराश्याची भावना दूर करून त्यांचे जीवन सुखमय शांत आणि निरामय करणे. अहिल्यादेवींच्या जनकल्याण कार्यावर चर्चा करताना एक बाब विशेषतः नोंद घेण्याजोगी आहे आणि ती म्हणजे - त्या काळात भारतातील अनेक प्रांतांमध्ये दुष्काळ पडत असत, परंतू अहिल्यादेवींच्या कारकीर्दीत माळवा संस्थानात कुठेही दुष्काळ पडल्याचा उल्लेख सापडत नाही. त्यांच्या राज्यात नैसर्गिक संकटे फारशी आली नाहीत. जणू त्यांच्या उदात्त आणि परोपकारी जीवनशैली मुळे कोणत्याही प्रकारच्या आपत्ती, संकटे राज्यावर आलीच नाहीत. त्यांच्या या उदात्त-परोपकारी वृत्तीचा तत्कालिन अनेक संस्थानीकांवर सकारात्मक परिणाम झाला. त्यांनी सुद्धा अहिल्यादेवींचे अनुकरण करून आपापल्या संस्थानात अनेक जनकल्याणाची कार्ये केली. आपल्या कारकीर्दीत त्यांनी साहित्य, संगीत, कलांना प्रोत्साहन दिले. कवी मोरोपंत, शाहिर अनंत फंदी यांचा यथोचित सन्मान केला. राजस्थानातील संस्कृत पंडीत खुशालीराम भट्ट यांना राजाश्रय दिला, मूर्तिकार, गायक, चित्रकार यांना सरकारी नोकऱ्या दिल्या, त्यामुळे राज्यात सुख-शांती बरोबरच समृध्दी सुध्दा नांदू लागली होती. शैक्षणिक विकासाच्या कार्यातही अहिल्यादेवींचे मोठे योगदान असलेले दिसून येते. त्यांनी महिला शिक्षण, संस्कृत भाषा आणि व्यावहारीक व व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन दिले. माहेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरू करून संस्कृत भाषेच्या शिक्षणाचा प्रारंभ केला. राज्यातील महिलांना साक्षर होण्यास प्रोत्साहन दिले. मोडी लिपी वाचन आणि लिहीण्याचे प्रशिक्षण त्यांनी महिलांना दिले. केवळ पुस्तकी शिक्षणावर भर न देता व्यावहारीक शिक्षणावरही त्यांनी भर दिला. सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी स्वतः राजकारण, युद्धनीती आणि प्रशासना संबंधीचे शिक्षण घेतले होते. त्यांच्या शिक्षणा संबंधीच्या दूरदृष्टी मुळे राज्यात धार्मिक-सांस्कृतीक तसेच व्यावहारिक-व्यावसायिक शिक्षणाचा प्रचार आणि प्रसारही होत गेला. सामाजिक समतेवर आधारीत शिक्षण पध्दतीचा पुरस्कार त्यांनी केला. जनसामान्यांच्या सोईसाठी त्यांनी टपाल व्यवस्था सुरु केली, शेतकऱ्यांच्या सोयीसाठी बी भरणा आणि दुष्काळ निवारणाची व्यवस्था सुद्धा केली. स्त्री-पुरुष भेदभाव दूर करण्याच्या दृष्टीने अथक प्रयत्न केले. महिलांना समानतेचे हक्क आणि समाजात सन्मान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्या दृष्टीने त्यांना सैनिकी शिक्षण देण्याची व्यवस्था केली. राज्यातील स्त्री पुरुषांसाठी ग्रंथालये सुरु केली. हे सर्व अधिकार, तत्कालिन समाजातील शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री-पुरुषांनाही देण्यात आले. अशी अनेक जनकल्याणकारी कार्ये त्यांनी केली, त्याच बरोबर, अहिल्यादेवींनी धर्मभेद, जातीभेद कधीही केला नाही. त्यांनी आपल्या सैन्यात मुस्लीम लोकांनाही स्थान दिले होते. अहिल्यादेवी या निःपक्ष न्यायदानासाठी परिचित होत्या. राज्यातील गोरगरीब जनतेला उचीत न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी

ठिकठिकाणी न्यायालयांची स्थापना केली. त्यांच्या मार्फत न्याय मिळण्याची व्यवस्था केली. न्यायदानाचे कार्य त्वरील आणि सुलभ होण्यासाठी त्यांनी विसदार आणि वहिवाटदार या अधिकारी पदांची नियुक्ती केली, त्याच बरोबर पंचायत व्यवस्था, पोलिस प्रशासन इत्यादी व्यवस्था सुध्दा केल्या.

अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रशासकीय गुणांचे विविध पैलू:

भारतीय इतिहासात काही मोजक्याच कर्तबगार महिला राज्यकर्त्या होऊन गेल्या. त्यांनी अत्यंत कौशल्याने आणि विचाराने राज्यकारभार केला. एवढेच नव्हे तर राज्ये आर्थिक समृद्ध केली. अशा कर्तबगार महिला राज्यकर्त्यांमध्ये अहिल्यादेवी होळकरांचे नाव कायमच अग्रस्थानी राहिले आहे. सर जॉन माल्कम हा तत्कालिन भारताच्या मध्यप्रांताचा गव्हर्नर होता. त्याने आपल्या 'मेमरी ऑफ सेंट्रल इंडीया इन्क्लुडींग माळवा' या ग्रंथात अशी नोंद केली आहे की – "आहिल्यादेवी या माळव्यात एक उत्तम प्रशासनाचे प्रतीक बनल्या होत्या आणि या बाबतीत सर्वांचे एकमत होते. त्यांचे चे नाव हे सर्वोतम आणि कुशल प्रशासक म्हणून घेतले जात असे" तत्कालिन ब्रिटिश व्हाईसराय लॉर्ड अलेंबरो याने असे नमूद केले आहे की, "आहिल्यादेवी या सर्वोत्तम राज्यकर्त्या आणि सर्वश्रेष्ठ अशा मुत्सदी प्रशासक आहेत. अर्थातच, उत्तम प्रशासक या गुणाची तुलना करताना जनकल्याणाचा विचार, रायतेचे सुख-समाधान, शेतकरी, व्यापारी, आणि सर्वसामान्य नागरीक यांच्या सुखाच्या आणि कल्याणाचा विचार, समभाव, समतोल कर प्रणाली, न्यायप्रीयता, महिलांचा सन्मान, योग्य परराष्ट्र धोरण अशा सर्व घटकांचा विचार होतो. या दृष्टीने अहिल्यादेवी या एक उत्तम प्रशासक असल्याचे निदर्शनास येते"

अहिल्यादेवी यांची राजवट ही प्रेम, न्याय आणि सुशासनाचे प्रतीक होते. एक महिला असूनही त्या केवळ राज्यकारभारात आणि प्रशासकीय कार्यात निपूण होत्या असे नाही तर एक कुशल योध्या सुद्धा होत्या. लहानपणीच त्यांनी सैनीकी प्रशिक्षण घेतले. त्यांना घोडेस्वारी, आणि शस्त्रास्त्रांचा वापर कसा करावा या बाबत माहिती होती. अहिल्यादेवींचा राज्यकारभार कठोर आणि न्याय्य होता. जात-पात, उच्च-निच या भेदांच्या पलीकडे जाऊन, राज्यातील लोकांना चोर-दरोडेखोरांपासून अभय मिळवून देणा-या तरुणा बरोबर त्यांनी आपल्या लेकीचा विवाह लाऊन दिला. राज्याचा कारभार सुरळीत सुरू रहावा म्हणून युद्धावर जाताना त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांनी राज्याची जबाबदारी अहिल्यादेवींवर सोपवली अहिल्यादेवींनी सुध्दा ही जबाबदारी अतिशय कौशल्यपूर्वक पार पाडली. पत्रव्यवहाराच्या माध्यमातून मल्हाररावांना राज्यकारभारा बाबत बातम्या पाठवणे, तसेच प्रत्युत्तरात राज्य कारभारासाठी त्यांचे मत-शिफारसी विचारात घेणे आणि त्यानुसार योग्य ते निर्णय घेणे ही त्यांची नियमित कार्ये होती. सैन्याला विविध प्रकारच्या सेवा पुरवणे, त्यांच्यासाठी रसद, साहित्याची व्यवस्था करणे, कर वसूली करणे इत्यादी प्रशासकीय कार्याचा एक भाग अमलली सर्व कार्ये त्या कुशलता पुर्वक करीत असत. राज्यामध्ये प्रशासकीय व्यवस्था सुरळीत रहावी म्हणून भारतीय संस्थानिकांनी प्रशासकीय व्यवस्थेची विविध पध्दतीन अंमलबजावणी केली होती. मल्हारराव होळकरांच्या प्रशासकीय व्यवस्थेत आहिल्यादेवींनी सोयीनुसार काही सुधारणा केल्या होत्या. त्या खाजगी आणि सरकारी रकमांचा हिशोब चोख ठेवत असत.

अहिल्यादेवीच्या राजकीय कारकिदीत वित्तव्यवस्थापनही अतीशय उत्तम होते. शेती संदर्भातील अनेक कायद्यांमध्ये त्यांनी सुधारणा केल्या आणि कराचे

प्रमाण कमी केल्या मुळे शेतक-यांना उत्पन्ना नुसार शेतसारा भरणे शक्य झाले. शेतसऱ्याची रक्कम रोखीने अथवा धान्याच्या स्वरुपात भरावा लागत असे. शेत मजूरांचा पगार आबि बुढील वर्षाचे बियाणे यांच्या तरतूदी साठी धान्य काढल्यावर राहिलल्या धान्यातून निम्मा सरकारात जमा करावा लागत असे, याला बटाई महसूल म्हणत असत. अहिल्यादेवींनी आपल्या राजवटीत बटाई महसूलाची निश्चिती केली असली तरी वाजवी पेक्षा अधिक महसूल कधीच घेतला नाही. त्याच बरोबर प्रशासकीय व्यवस्था सुरळीत रहाण्यासाठी 'सायर' वसूलीचा हक्क सरकारचा होता. संस्थानातील व राजस्व विभागातील कर्मचारी 'सायर' वसूल करून राजकोषात जमा करीत असत. मौल्यवान वस्तूंच्या किंमतीवर सायर वसूलीचे प्रमाण टरविले जात असे. आयात निर्यातीच्या प्रमाणा नुसारही सायरचे प्रमाण ठरवले जात असे. त्यांच्या कारकीर्दीत राज्यात शांतता असल्याने राज्याच्या आजूबाजूला असणाऱ्या संस्थांना मधून मोठ्या प्रमाणावर आयात-निर्यातीची प्रक्रिया होत होती त्यामुळे 'सायर' मार्फत मिळणारे उत्पन्न मोठे होते. अहिल्यादेवींनी महेश्वर येथे स्वतःची टांकसाळ सुध्दा सुरु केली होती. गावोगावी पंचायतींच्या माध्यमातून न्यायदानाचे कार्य सुरु केले. तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कठोर नियंत्रणात न्यायालये आणि पंचायतींचे न्यायदानाचे कार्य सुरू होते. मल्हारराव होळकरांच्या काळातील सैन्य व्यवस्थेत, संरक्षण व्यवस्थेत त्यांनी काळानुसार सुधारणा केल्या. सैनीकांची रोख पगारावर नेमणूका करण्यात आल्या.

अहिल्यादेवींच्या हाती असलेले राज्य तत्कालीन मुत्सदींनी वेगवेगळ्या मार्गाने बाळकवण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनी आपल्या आदर्श राजयकारभाराद्वारे आणि पारदर्शक प्रशासनाद्वारे आणि कुशल राज्यनीतीच्या जोरावर त्यांचे प्रयत्न कधीही यशस्वी होऊ दिले नाहीत. कोणत्याही राज्य व्यवस्थेत धोरणात्मक निर्णय घेतल्या नंतर त्यांची यशस्वी अंमलबाजावणी करणारा प्रशासकीय वर्ग हा अतिशय कार्यक्षम आणि अत्यंत विश्वासू असावा लागतो, तरच राज्याचा कारभर सुरळीतपणे सुरू रहातो. अशी विश्वासाहर्ता आणि कार्यक्षमता अहिल्यादेवींनी आपल्या प्रशासकीय ज्ञानाच्या आणि कौशल्यावर राज्याच्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण केली होती. त्यामुळे त्यांच्या राज्यातील प्रशासकीय व्यवस्था, राज्यकारभार हा आदर्श मानला जातो. अहिल्यादेवींनी, तत्कालिन सामाजिक परिस्थितीचे चिंतन करून राजकीय सत्तेचा उपयोग लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी आणि उत्तम पारदर्शक असा प्रशासकीय व्यवस्थापन निर्माण करण्यासाठी केला होता. अहिल्यादेवींच्या प्रशासकीय व्यवस्था पारदर्शक होती, भ्रष्टाचाराला, लबाडीला तेथे थारा नव्हता, म्हणून त्या विश्वासाने म्हणत की- जर "ज्यकारभारात पैशाच्या हिशोबत एक जरी कवडी माझ्याकडे निघाली तर मी पाच कवड्या देईन" असे विचार आजच्या प्रशासन व्यवस्थेला आदर्शवत आणि मार्गदर्शक ठरू शकतील. प्रशासन आणि राज्यकारभारा बाबत आपले विचार व्यक्त करताना त्या म्हणत "ईश्वराने सोपवलेली जबावदारी मला पार पाडायची आहे. माझ्या प्रत्येक कामाची जबाबदारी माझ्यावरच आहे, सामर्थ्य आणि सत्ता यांच्या बळावर मी जे कार्य करीत आहे, त्याचा जाब मला परमेश्वराच्या दरबारात द्यावा लागणार आहे". अहिल्यादेवींच्या प्रशासकीय व्यवस्थेत प्रत्येक दिवसाचे कार्य हे त्याच दिवशी पूर्ण करण्यावर कटाक्ष होता. थोरले माधवराव पेशवे यांनी अहिल्यादेवींच्या बाबतीत आदराने असे म्हटले आहे की, "राजा असलो तरी बऱ्याचदा सर्व बाबी आदेशानेच होतात असे नाही तर प्रजेच्या मनात राजाविषयीचे मत सकारात्मक असायला हवे आणि विश्वासपूर्ण नात्याचे हवे असे नाते भीतीतून निर्माण न होता, आपुल्की आठी आदरयुक्त भावनेतून निर्माण व्हायला हवे,

तरच राजाचे मोठेपण सिध्द होते," रायतेच्या मनात अहिल्यादेवीं बाबत असेच आपुलकीचे आणि विश्वासाचे नाते निर्माण झाले होते. त्यामुळे, त्या एक उत्तम प्रशासक म्हणूनही यशस्वी झाल्या.

अहिल्यादेवींच्या प्रशासकीय कारभाराचा आढावा घेण्याच्या अनुषंगाने त्यांच्या अंगी असलेल्या प्रशासकीय गुणांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणे तीतकचं तीतकेच महत्वाचे ठरते.

- **सुधारक प्रशासक:** मालहरराव होळकरांच्या कारकीर्दीतील प्रशासकीय व्यवस्थेत अहिल्यादेवींनी कालानुरूप अनेक सुधारणा केल्या. लहान-मोठी गावे, परगणा, महाल सुभा अशी राज्याची विभागणी करून प्रत्येक गावात स्थानिक पातळीवरील प्रशासकीय व्यवस्था पहाण्यासाठी कर्तव्यतत्पर अधिकाऱ्यांची नेमणूक केली. प्रत्येक गावा संबंधी सर्व प्रकारची माहिती ही लेखी अथवा तोंडी स्वरुपात सुभ्यास पोहोचवण्याची व्यवस्था त्यांनी केली होती. करार पद्धती सुद्धा सौम्य केली होती. एकदा कराचा भरणा झाल्यावर जनसामान्यांना कोणत्याही प्रकारचा कर पुन्हा भरावा लागत नसे. नियमांपेक्षा अधिक कराची वसूली अधिकारी वसूल कर्त नसत. सारा वसूली केली जात नसे. ओसाड माळरान, रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड केली. प्रत्येक शेतकऱ्याने किमान वीस वृक्ष लावलेच पाहिजेत असा आदेश त्यांनी काढला होता. उत्तम जलनियोजनामुळे त्यांच्या राजकीय कारकिर्दीत कधीही दुष्काळाचे संकट आले नाही. वनीकरण खाते आणि जलसंवर्धन खाते त्यांनी निर्माण केली.

- **कर्तव्य कठोर प्रशासक:** अहिल्यादेवी कर्तव्यकठोर प्रशासक होत्या. याचे उदाहरण म्हणजे – एकदा त्यांच्या पतीने (खंडेराव होळकर) यांना तनखा मिळाला असताना सुद्धा अधिक तनख्याची मागणी त्यांनी केली. तेव्हा हीशोधाची खतावणी दाखवून आहिल्यादेवींनी त्यांना समज देण्याचा प्रयत्न केला. परंतु खडेरावांनी भर दरबारात उद्दामपणा करून खतावणी फेकून दिली. तेव्हा आहिल्यादेवींनी दरबाराच्या बेअदबी बद्दल त्यांना आर्थिक दंड ठोठवला आणि तो त्यांच्या तनख्यातून वसूल करण्याचा आदेश दिला. थोडक्यात, आहिल्यादेवी संगसोयरे - जनता यांच्यात भेद न करता ज्याची चुकी झाली असेल त्यांना शासन करण्यास मागे पुढे पहात नसत. प्रशासकीय कार्याच्या नियमां नुसार त्यांचा राज्यकारभार होता. त्यात कोणी हस्तक्षेप करण्याचा अथवा नियमांचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना शासन केले जात असे.

- **मुत्सदी प्रशासक:** आहिल्यादेवींनी प्रशासकीय मुत्सदीपणा अजून एका ऐतिहासीक घटनेवरून दिसून येतो. राघुनाथराव पेशवे पन्नास हजार फौजेनीशी माळवा प्रांतावर चालून आले. त्यांनी आहिल्यादेवींनी राज्य मुकाट्याने स्वाधिन करण्यास सांगीतले. नाहीतर युध्द्धास तयार राहण्यास सांगीतले. आहिल्यादेवींनी राघूनाथरावांच्या आक्रमणाची खबर आधीच मिळाल्या मुळे त्यांनी तत्परतेने सर्व सूत्रे हलवून सर्व मराठे सरदारांना खलिते पाठवून त्यांना त्यांच्या फौजेसह मदतीस येण्याचे आवाहन केले. आहिल्यादेवींचे स्वतःचे ५०० प्रशिक्षित महिलांची फौज होती. त्यांनी पुण्यास माधवराव पेशवे यांना खलीता पाठवून रघुनाथरावांच्या या आगळीकी बाबत माहिती पण दिली. आहिल्यादेवींनी रघुनाथरावांना पुन्हा असे कळवले की, आपल्या सारख्या पराक्रमी पुरुषाने एका स्त्रीवर आक्रमण करने योग्य नाही. युद्धं तुम्ही जिंकलात तर नवल नाही, पण जर तुम्ही युद्ध हारलात तर मात्र तुम्हास तोंड दाखवण्यास जागा राहणार नाही. आहिल्यादेवींच्या मुत्सदीपणाची ही मात्रा लागू पडली आणि रघुनाथराव आल्या पावली परत गेले. हा त्यांचा मुत्सदीपणा एक उत्तम प्रशासकीय गुण दर्शवतो.

- **प्रजाहितदक्ष प्रशासक:** अहिल्यादेवी प्राजहितदक्ष प्रशासक होत्या. त्यांचा राज्यकारभार लोकाभिमुख असल्याने राज्यातील जनता सुखी- सभाधानी होती. त्यांनी प्रजेच्या हिताचा विचार करून राज्यात वस्त्रोद्योगस चालना देऊन अनेक महिला विणकरांना रोजगार मिळवून दिला. बऱ्याच लोकांना काम मिळाले. राज्याचे उत्पन्न सुध्दा वाढले. राज्यात दारु बंदीचा आदेश काढला, महिलांना त्यांचे हक्क मिळवून दिले, दतक वारसा मान्य केला. हे त्या काळातील प्रगतीचे, सामाजिक प्रबोधनाचे आणि सुधारणेचे एक महत्वाचे पाऊल होते.

- **न्यायप्रिय प्रशासक:** आहिल्यादेवींच्या राजकीय कारकिर्दीत प्रजेला मोफत न्याय मिळत असे. न्याय देण्यास विलंब करणे म्हणजे न्याय देण्यास नकार देणे अशी धारणा होती. निःपक्षपती आणि तटस्थ न्याय ही त्यांची ओळख होती. न्यायदाना बावत त्यांचे विचार स्पष्ट होते. कोणतीही महिला न्याय मागण्यासाठी त्यांच्या दरवारी सहज येऊ शके, त्यांनी प्रजेला त्रास दिल्या बद्दल मामलेदारासही खडसावले होते. वसुली बाबत शेगाव परगण्यातील वसूली अधिका-यां बाबत तक्रार प्राप्त होताच त्याचीही पत्र पाठवून कानउघडणी केली होती.

- **सैन्याचे व्यवस्थापन:** अहिल्यादेवींच्या प्रशासकीय व्यवस्थेतील एक महत्वाची बाब म्हणजे, त्यांचे सैन्य व्यवस्थापन प्रणाली. त्याबाबत त्यांचे प्रशासकीय धोरणे ही तत्कालीन इतर राज्यकत्यांपेक्षा निश्चीतच आधुनिक होती. आपल्या फौजेत पाश्चात्य व्यवस्थापन प्रणाली नुसार तुकड्या निर्माण करण्यासाठी त्यांनी कर्नल जे.पी.बॉयड नियुक्ती करारपत्राव्दारे केली होती. सैन्याचे वेतन ठरवण्यात आले. बॉयडला फक्त बंदूका खरेदी करण्याचे आदेश देण्यात आले होते. दारुगोळा मात्र सरकाराकडून पुरवला जात असे.

समारोप:

मराठ्यांच्या इतिहासात एक कर्तबगार व्यक्तीमत्व म्हणून भारतातील मध्यप्रांताच्या इंदौर संस्थानच्या मल्हारराव होळकरांना ओळखले जाते. त्यांच्यातील मुत्सद्देपणा आणि उत्तम प्रशासकाचा वारसा त्यांच्या सुनेने- अहल्यादेवी होळकरांनी पुढे यशस्वीपणे सुरू ठेवला. मराठा साम्राज्यातील तत्कालिन ऐतिहासिक दस्ताऐवजांमध्ये, वंशावळीला स्थान आहे. बहुतांशी वंशावळीत पुरुष वारसांचाच उल्लेख केलला दिसून येतो. परंतु होळकरांच्या वंशावळीत मालहरराव होळकरांनंतर वारसा म्हणून अहिलीदेवींचे नाव असल्याचे दिसून येते. अहिलीदेवींनी आपल्या राजकीय कारकिर्दीत संपूर्ण भारतात अनेक लोकपयोगी आणि धार्मिक वस्तु निर्माण केल्या, मंदिरांच्या जिर्णोद्धारा बरोबरच अनेक ठिकाणी अन्नछत्र, यात्रेकरूंसाठी धर्मशाळा, विहीरी, पाणपोया या सारख्या सुविधा जनतेसाथी उपलब्ध करून दिल्या. त्यांनी जनकल्याणाचे कार्यक्रम राबवत असतानाच आदर्श प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्याद्वारे कर वसूली व्यवस्था, शेतकरी आणि व्यापारांना सवलती दिल्या, त्याच बरोबर न्याय व्यवस्थेत पारदर्शकता आणून प्रत्येकाला समानतेने आणि योग्य न्याय मिळेल अशी व्यवस्था सुद्धा केली. आपल्याच अधिकाऱ्यांवर त्यांचा वचक होता. रयते प्रती असलेल्या जबाबदारीची जाणीव ठेऊन त्या सरकारी पैशांचा हिशोब चोख ठेवत असत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्यात त्यांच्या पश्चात्त लोकहितवादी आणि समाज प्रबोधनाचे कार्य कोणी केले असेल तर ते अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या काळात त्यांच्या काळात भारतात सर्वत्र सरंजामशाही किंवा राजशाही अस्तीत्यात होती तरी त्यांनी आपल्या राज्यात आधुनिक राज्यघटनेतील कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्या प्रमाणे लोकाभिमुख राज्यकारभार चालवला. म्हणून त्यांचे

प्रशासन हे आदर्शवत आणि एक उत्तम प्रशासन ठरले. त्यांनी आपल्या राज्यकारभारात प्रजेची उन्नती-प्रगती, सामाजिक शांतता आणि मानवतावादी दृष्टिकोन अंगीकारला, म्हणून त्यांचे म्हणून त्यांचे प्रशासकीय कार्य आणि जनकल्याणाचे कार्य आजही आदर्श कार्ये मानली जातात. आपले संपूर्ण जीवन जनकल्याणासाठी समर्पित करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवींची जीवनगाथा नेहमीच प्रेरणादायी ठरली आहे, आणि भविष्यातही पुढील पिढीला प्रेरणादायी ठरेल यात काही शंका नाही.

संदर्भ:

१) देवीदास पोटे, (२०२५), " लोकोत्तर कार्याचा आदर्श," लोकराज्य, जुन २०२५.

२) हिरालाल शर्मा, (२०२५), "अहिल्यादेवींचे वगळेपण," लोकराज्य, जुन २०२५.

३) ल. वा. गायकवाड, (२०२५), "अठराव्या शतकातील महान महिला शासक - पुण्यश्लोक ओहल्याबाई होळकर," हिस्ट्रीसीटी रिसर्च जर्नल, खंड ११, क्र. १२.

४) आर. आर. पाटील, (२०१८), "कार्यप्रशासक-पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर," आयुशी इंटरनॅशनल इंटरडिसिप्लीनरी रिसर्च जर्नल, खंड.५ क्र.३.

५) वा. वा. ठाकूर आणि देवीदास पोटे, (२०२१), "होळकरशाहिचा इतिहास," खंड दोन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

६) अ.ना. भागवत, (१९३०), " होककरांची कैफियत," द्वितीय आवृत्ती.

७) विजया जहागिरदार, (१९९१), " कर्मयोगिनी," मेहता पब्लीशिंग हाऊस.

८) मनोहर लांडगे, (२०१९), "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर – चोंडी ते महेश्वर," ललीतराज प्रकाशन.

९) प्रणव पाटील, (२५२५), "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर - स्त्री ते देवत्वा पर्यंतचा प्रवास," अक्षरधारा प्रकाशन.

१०)सुजाता सोनवणे, (२०२२), "इतिहासातील अहिल्याबाईंचे योगदान," सुमेध प्रकाशन मुंबई.

११)पुरुषोत्तम खेडेकर, (२००७), "लोकमाता अहिल्यादेवी होळकर," सनय प्रकाशन.

१२)विजया जहागीरदार, (२००६), "महाराष्ट्राचे शिल्पकार – तेजस्विनी अहिल्याबाई होळकर," महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

आहिल्याबाईंचे पुरोगामित्व व राज्यकारभार - एक अभ्यास

प्रा. सुमन लक्ष्मणराव केंद्रे

इतिहास विभाग,

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर

Corresponding Author – प्रा. सुमन लक्ष्मणराव केंद्रे

DOI - 10.5281/zenodo.19658519

प्रस्तावना:

मराठयाच्या इतिहासात ज्या-ज्या मुठभर स्त्रियांनी तेजस्वी कार्याच्या माध्यमातून सामाजिक कार्य केले. त्यात पुण्याश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा उल्लेख केल्याशिवाय स्त्रियांच्या प्रबोधनाचा इतिहास पूर्ण होणार नाही. अहिल्याबाई होळकर यांनी विविध मार्गाने मध्यकाळात आपल्या कामगिरीचा ठसा उमटवला. खरे तर तो काळ सामाजिक विषमतेचा होता. महिलांना कोणतेच हक्क नव्हते. चूल आणि मुल एवढेच तिचे अस्तित्व होते. या अशा परिस्थितीत अहिल्याबाईंनै जे अलौकिक कार्य केले ते बहुजनांसाठी अत्यंत क्रांतीकारक ठरले.अहिल्याबाई होळकरांनी सर्व धर्म समभाव, सामाजिक एकात्मका, अस्पृश्यता निर्मुलन, स्त्री उध्दाराचे कार्य केले. धार्मिक प्रबोधन, रुढी-परंपरेचा बिमोड आणि जनकल्याणकारी कार्य या विविध स्वरुपाच्या अंगाने अहिल्याबाईंच्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून केला गेला आहे.

बालपण व विवाह :

मध्ययुगीन काळ हा मराठयांच्या इतिहासात राजकीयदृष्टया अत्यंत धकाधकीचा होता. सातत्याने परकीयांची आक्रमणे होत होती. पेशवाईच्या काळात संपूर्ण महाराष्ट्र रुढी परंपरेच्या गर्तेत सापडला होता. याचकाळात ३१मे १७२५ रोजी जामखेड जवळ चौंडी,जि. अहमदनगर येथे अहिल्याबाईंचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव माणकोजी शिंदे आणि आईचे नाव सुशिलाबाई शिंदे होते. तो काळ बालविवाहाचा असल्याने वयाच्या ८ व्या वर्षी मल्हारराव होळकरांचा एकुलता एक सुपुत्र खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह झाला. लहानपणापासून अहिल्याबाईने लिहिणे, वाचणे आणि गणित इत्यादीचे शिक्षण घेतले. तसेच मैदानी खेळातही ती प्रविण होती. मल्हारराव होळकरांनी त्यांना राजकारणाचे धडे दिले. त्यामुळे अल्प काळातच अहिल्याबाई राजकारणात उत्साहाने सहभाग घेऊ लागली.

हा काळ होळकरांच्या साम्राज्याचा सुवर्णकाळ म्हटला पाहिजे. कारण दिल्ली दरबारातही होळकरांचा चांगलाच दबदबा निर्माण झालेला होता. होळकरांच्या हस्तक्षेपाशिवाय दिल्लीच्या मोगल बादशाहीचे किंवा मराठयांचेही पान हलणे शक्य नव्हते. अशा काळात अहिल्याबाईंनी अत्यंत मुत्सुद्दीपणे राजकारण करताना आपल्या घराण्याचा नावलौकिक वाढविण्याचा प्रमाणिकपणे प्रयत्न केला. सतराव्या शतकात भारतात अनेक राजकीय घटना घडत होत्या. त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होळकरांच्या राज्यावरही होत होता. सन १७३०

साली मराठे व मोगल तसेच मराठे आणि महंमद बंगश यांचेही युध्द झाले त्यात मराठे जिंकले. त्यावेळी मराठयांचे सेनापती मल्हारराव होळकर होते. याच पार्श्वभूमीवर १७३३ मध्ये अहिल्याबाई विवाहबध्द होवून इंदूरला होळकर वाडयात आल्या व अल्पवयीन असतानाही त्यांनी राज्यकारभारात लक्ष घालणे सुरु केले.

पुढील काळात एक मातब्बर सरदार म्हणून मल्हाररावांचा दबदबा वाढला. अहिल्याबाईंच्या लग्नानंतर अवघ्या एका वर्षात ही भरभराट झालेली असल्याने तो सुनबाईचा पायगुण अशीच भावना तयार झाली. त्यातूनच इंदौरच्या जनतेकडून व खास मान्यवरांकडुन मल्हारराव व आई गौतमाबाईचे आदरातिथ्य सत्कार करताना लहाणग्या अहिल्याबाईचाही जयजयकार होवु लागला. म्हणून आठ-दहा वर्षाच्या या बालसूनेसाठी मल्हाररावांनी प्रशिक्षण व शिक्षण देण्यासाठी त्याकाळातील नामवंत तज्ज्ञ शिक्षकांच्या नेमणूका केल्या. अहिल्याबाईंना राज्यकर्त्या होण्यासाठी आवश्यक ते सर्व शिक्षण देण्यात आले. भाषा, भूगोल, राजनीती, अर्थकारण, महसूल, शासन, प्रशासन इत्यादी सर्व विषय शिकविण्यात आले आणि याच वयात अहिल्याबाईंवर मोठया प्रशासनाची जबाबदारी मल्हाररावांनी मुद्दामच दिली. अहिल्याबाईंना प्रशासनाचा उत्तम अनुभव यावा हा त्यामगचा उद्देश होता. दिवसेंदिवस राजकारणाची सूत्र बदलत आहेत. त्यामुळे अल्पकाळातच मल्हाररावांच्या मार्गदर्शनाखाली एक जबाबदार आणि पराक्रमी म्हणून अहिल्याबाईंच्या नेतृत्वाला संधी मिळाली. अहिल्याबाईंचा संसारही आता बहरत आलेला होता. त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्य झाली.

सतीप्रथेला विरोध :

२० जानेवारी १७५४ मध्ये मराठ्यांचा वेढा कुंभेरीच्या किल्ल्याभोवती पडला. सगळया बाजूंनी मोचें मजबूत बांधले गेले, तोफा आग ओकू लागल्या. आतमध्ये सुरजमल्ल जाटाचे सैन्यही सज्ज होते. बाहेरून हत्तीवरच्या तोफा, उंटावरच्या तोफा, फिरत्या बंदुका सगळी धूमवक्री सुरू झाली. आठ दिवस झाले. पंधरा दिवस झाले. कोणीच हटत नव्हते. परिस्थितीत फरक पडत नव्हता. वेढा पडलेलाच होता. शेवट होत नव्हता. दोन्ही बाजू तुल्यबल होत्या. १७ मार्च १७५४. वेळ दुपारची होती. खंडेराव होळकर भोजन करून डेऱ्याबाहेर पडले. त्यांनी भांगेची घुटी घेतलेली होती. तसेच झुलत चालत मोर्चाच्या निशाणापाशी आले. आणि अचानक फिरत्या तोफेतून गोळा आला... आला...! त्याने खंडेरावांचा वेध घेतला आणि झालेल्या रणसंग्रमात अहिल्याबाई होळकरांचे पती खंडेराव होळकरांना वीर मरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी अहिल्याबाईंच्या नशिबी वैधव्य आले. "प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये हे राज्य तुम्हाला सांभाळायचे आहे". आपल्या सासऱ्याच्या इच्छेचा अहिल्यादेवी होळकरांनी मान राखला आणि सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. १७५४ पासून त्या राज्यकारभार पाहू लागल्या

त्या काळात हिंदु परंपरेप्रमाणे पतीच्या निधनानंतर पत्नीला सती जावे लागे. परंतु अहिल्याबाईंनी मात्र सती जाण्यास नकार दिला. यावरुन तिच्या स्वतंत्र विचाराची साक्ष पटते. अहिल्याबाईंच्या मनातील पुरोगामी विचाराची ती खूण होती असे म्हणता येईल. खरे तर त्या काळात सती जाणे हाच धर्म होता. सती न जाणे म्हणजे लोक निंदेला सामोरे जाण्यासारखे होते. परंतु सती न जाण्याचा हा धाडसी निर्णय अहिल्याबाईंनी घेतला. कोणत्याही विरोधाची पर्वा न करता, रुढी परंपरेला चिकटून न बसता राज्यासाठी कर्तव्य श्रेष्ठ आहे हे त्यांनी पटवून दिले. मरणापेक्षा जगून राज्य वाचविणे आणि आपले कर्तव्य बजाविणे श्रेष्ठ आहे हे जे धैर्य त्यांनी दाखविले ते अद्वितीय स्वरुपाचे होते. आपण

सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा कोण जाणे. परंतु आपण जगलो तर लाखो प्रजेला सुख देता येईल. असा विचार अहिल्याच्या मनात आला आणि त्यांनी राज्यकारभारात सहभाग घेण्याचा निर्णय घेतला.

१७६६ साली मल्हारराव होळकरांचेही निधन झाले. तेव्हा संपूर्ण राज्याची जबाबदारी अहिल्याबाईंनी शिरावर घेतली आणि त्यांनी एखादया आदर्श राज्यकर्त्याप्रमाणे राज्य चालविले. जनतेच्या सर्वांगिण विकासाचा ध्यास घेतला. आपल्या राज्यात शिक्षण, आरोग्य, सिंचन, मंदिरे व इमारतींची निर्मिती तसेच समाज कल्याणाच्या सुधारणा, सामाजिक समतेचे निर्माण या सर्वांगांनी त्यांनी राज्यकारभारात सुधारणा केल्या. कोणतेही राज्य हे राजा-राणीचे नसते तर ते जनतेसाठी असते. असा आदर्श विचार अहिल्याबाईंनी आपल्या कृतीतून दाखवून दिला.

शेतकरी,मानव व प्राण्यासाठीचे कार्य:

आजपासून सुमारे २७० वर्षांपूर्वी अहिल्याबाईंनी सिंचनाचे महत्त्व जाणले होते. हे त्यांच्या सुधारणावरुन लक्षात येते. सर्वत्र अहिल्याबाईंनी विहिरी, तलाव, कुंड आणि घाट बांधले. रस्ते आणि पुल बांधले. विविध नद्यांच्या किनारी घाट बांधल्यामुळे तसे विहिरी आणि तलावामुळे जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध झाल्या आणि त्यातून शेतीला जीवदान दिले तसेच मानव जीवनाला सुखी केले. प्रत्येक मानवासाठी पाणी आणि सिंचनाच्या सुविधा तर केल्याच परंतु प्राणी-मात्राला सुध्दा शुध्द पाणी मिळावे असा भूत-दयेचा विचार करुन या लोकराणीने रानावनातही तलाव बांधले. ही त्यांची फार मोठी दूरदृष्टी म्हणावी लागेल.

शेतकऱ्यांच्या पशू पक्ष्यांना जगता यावे यासाठी लोकराणी अहिल्यादेवी होळकर यांनी विशेष परिश्रम घेतले. गाईंना चरण्यासाठी खास गो-कुरणे राखीव ठेवणारी अहिल्याबाई ही मध्यकाळातील प्रजाहितदक्ष शासन व्यवस्थेचे प्रतिक ठरली. एवढेच नव्हे तर शेतात काम करणाऱ्या बैलांना पाणी पाजण्यासाठी रोजगार देऊन माणसे लावली. आपल्या राज्यातील पशू आणि मानव सर्वांना सुखी करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आपल्या राज्यातील अपंग आणि गरीब जनतेसाठी अहिल्याबाईंनी खास अन्नछत्रे उभारली. त्यांच्यासाठी मोफत वस्त्रे दान केली. तसेच प्रवास करणाऱ्या जनतेसाठी आणि व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावली तसेच धर्मशाळा बांधल्या.

आदर्श राज्याचे रोल मॉडेल:

आदर्श राज्य कसे असावे याचं रोल मॉडेल म्हणुन अहिल्याबाईंनी आपल्या राज्याची ओळख करुन दिली होती. आपल्या राज्यातील सर्व जनतेच्या सुखासाठी त्यांनी धोरणे राबविली. उद्योग व्यवसायाला प्राधान्य दिले. मंदिरे, मशिदी, दर्गे बांधले. अनेक जुन्या वास्तूंचा जिर्णोध्दार केला. तसेच गावा-गावातील प्रशासनाच्या सोयीसाठी ग्रामपंचायतींनी स्थापना केली आणि गाव तेथे कोतवालाची नेमणूक केली. तसेच न्यायालय आणि पोलिस सेवेत सुधारणा केल्या. म्हणून अहिल्याबाईंचे राज्य हे लोकराज्य ठरले.

दरोडेखोरांचा बंदोबस्त:

आपल्या राज्यात शांतता निर्माण करण्यासाठी अहिल्याबाई यशस्वी झाल्या. त्यांनी अनेक जणकल्याणकारी निर्णय घेतले. त्या काळात काही आदिवासी लोक लुटमार करीत. अशा दरोडेखोरांचा कायमचा बंदोबस्त अहिल्याबाईंनी केला. हे लोक पोटासाठी चोरी करतात हे लक्षात आल्यानंतर त्यांनी या आदिवासी लोकांचा सक्तीचे विधायक कामासाठी उपयोग

करुन घेतला. राज्या-राज्यात चौक्या बसवून व्यापाऱ्यांवरील व प्रवाशांवरील योग्य तो कर वसुल करण्याची आणि संरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. तसेच शेती करण्यासाठी त्यांनी जमिनी दिल्या. अशा प्रकारे अहिल्याबाईंनी आदिवासांच्या पोटाचा प्रश्न सोडविला आणि गुन्हेगारीही संपविली.

अस्पृश्यता निवारण कार्य:

एकीकडे पेशवाईमध्ये मोठया प्रमाणात जातीयता आणि अस्पृश्यता अस्तित्वात होती. मात्र आपल्या राज्यातील जनतेला अहिल्याबाईंनी जाती-पातीच्या भेदापासून दूर ठेवले. एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या मुलीचा सुध्दा आंतरजातीय विवाह लावून दिला. यावरुन अहिल्याबाई होळकरांच्या कृतीशील प्रबोधन कार्याची साक्ष पटल्याशिवाय राहत नाही.

क्रांतिकारी पर्वाची सुरुवात:

जश जशा अहिल्याबाईंचे वय वाढत होते तसेतसे त्यांना आपल्या साम्राज्याच्या रक्षणाची काळजी वाटु लागली होती. त्यामुळे परिस्थितीचा गांभीर्याने विचार त्यांनी केला व आपली कन्या मुक्ताचे स्वयंवर करण्याचे ठरविले. त्यात हेतू हा होता की, पराक्रमी, वीर, स्वामीनिष्ठ व बाणेदार असलेला जावयाच्या हातात आपल्या साम्राज्याचे रक्षण व संघटन सुव्यवस्थित राहीले पाहिजे. अहिल्याबाईंच्या धोरणाप्रमाणेच हे स्वयंवर भिल्ल जमातीच्या एका धाडसी युवकाने जिंकले. त्याचवेळी जाती-पातीचा विचार अहिल्याबाईंनी नाकारला व व्यक्तीच्या जातीपेक्षा त्याचे वक्तृत्व श्रेष्ठ असते हे दाखवून दिले व हा विवाह थाटात पार पाडला.

आज एकविसाव्या शतकातही एखादया भिल्ल समाजातील मुला-मुलींशी विवाह करण्याचा विचार तरी आपल्या मनात येतो का? यातूनच अहिल्याबाई या पुरोगामी राज्यकर्त्या होत्या. याचा प्रत्यय आल्यावाचुन राहत नाही. यशवंत फणसे नामक त्या युवकास महाराणीने राज्यकारभाराचे सर्व अधिकार दिले. त्यांच्या कुटुंबियास वतनदारी दिली. त्यामुळे भिल्ल जमातीच्या उन्नतीचा मार्ग एका अर्थाने खुला झाला. गावाच्या वेशीबाहेरील या समाजबांधवांना पुढील काळात प्रतिष्ठा प्राप्त झालेली आपण पाहतो. त्याचबरोबर होळकरांच्या राज्यात जो पेंढाऱ्यांचा आणि बाणी दरोडेखोरांचा हैदोस पसरलेला होता व राज्य अस्थिर करण्याची काही स्वार्थी सरदारांची मनोवृत्ती व बंडोखोरी होती. या सर्व आव्हानाला खऱ्या अर्थाने चाप लावण्याचे कार्य अहिल्याबाईंनी या विवाहाच्या निमित्ताने साधलेले दिसते. त्यातून सामाजिक समतेचा संदेश देताना 'जो खंभीर तोच हंबीर' हा न्याय पुन्हा एकदा जगात लोकप्रिय झाला. मानसाचे मोठेपण त्यांच्या जन्मापेक्ष त्याच्या कर्तव्यानुसार ठरते हा क्रांतिकारी विचार यानिमित्ताने पुढे आला ही क्रांतिकारी पर्वाची सुरवातच होती.

अंधश्रद्धेला विरोध:

अहिल्यादेवीचे एकूणच प्रशासन म्हणजे आताच्या लोकशाहीची आठवण यावी एवढया परोपकारी विचारांचे त्यांचे प्रशासन होते. धर्म आणि धार्मिकता बाजूला सारुन सर्वधर्मसमभाव आणि विधर्मी दुष्टीकोणाची छाप त्या राज्यकारभारात पडलेली दिसून येते. म्हणूनच त्या हिंदू असूनही हिंदू धर्मातील अनेक अमानवीय प्रथा आणि परंपरांचे मूळ नष्ट करण्याचे कायदे अहिल्याबाईंनी केले. समाजातील धर्मश्रध्दा अत्यंत खोलवर रुजलेल्या आहेत हे राज्यकर्त्या या नात्याने अहिल्यादेवींना जाणवल्यानंतर त्यांनी आदेश काढला की, अंधश्रध्दा म्हणजे धर्म नव्हे. स्वर्ग, नरक, पाप-पुण्य, मोक्ष, घंटानाद किंवा बेचाळीस

पिढयांचा उध्दार हे सारे कल्पोकल्पित आहे. असे स्पष्ट केले. त्यामुळे समाजात माजलेल्या अनागोंदी व बजबजपूरीला ओहोटी लागली.

सांस्कृतिक धोरण :

अहिल्यादेवी या कलासक्त राज्यकर्त्या होत्या हे त्यांच्या धोरणातून आपल्या निदर्शनास येते. आपल्या राज्यातील कला, साहित्य, संस्कृतीचे जतन व्हावे हेच त्यंचे धोरण होते. म्हणूनच त्याकाळात कलाकारांचा ओढा इंदौर या संस्थानाकडे होता कारण या राज्यात कलेला वाव मिळतो. अशी सार्वत्रिक समजूत झालेली होती.

कलेच्या माध्यमातून सामाजिक सुधारणेचे वातावरण तयार होवु शकते यावर महाराणीची विशेष श्रध्दा असल्याने त्यांनी कला, साहित्य, सस्कृती, भजन, शाहीरी, किर्तन, नाटय, लोकसंगीत इत्यादी समाज प्रबोधनाच्या लोककलांचा उपयोग समाज प्रबोधनासाठी करण्यात आला. त्यासाठी आताच्या लोकशाहीतील शासन प्रक्रियेत ज्याप्रमाणे सांस्कृतिक मंत्रालय कार्यरत आहे त्याचप्रमाणे अहिल्यादेवींनी सांस्कृतिक खाते तयार केले व त्या खाताच्या माध्यमातून होळकर घराण्यातील राज्यांचे सांस्कृतिक धोरण तयार करण्यात आले ही बाब अहिल्याबाईंच्या सांस्कृतिक श्रीमंतीकडे लक्ष वेधते.

अहिल्यादेवी होळकर म्हणजे भारतातील कल्याणकारी राज्यकर्ता म्हणून अशी त्यांची ओळख आजही सर्वमान्य झालेली आहे. उत्तम राज्यकर्ती, प्रजाहितदक्ष, सुधारणावादी आणि राज्यवर्धक असलेल्या अहिल्याबाईंनी आपल्या राज्याचा नावलौकिक अखंडपणे वाढविला. राज्यातील जनतेनेही त्यांना लोकमाता मानले होते. लोकमाता अहिल्याबाईंनी १३ ऑगस्ट १७९५ रोजी महेश्वर मुक्कामी अखेरचा निरोप घेतला. लोकमातांबद्दल शाहिर प्रभाकरांनी लिहुन ठेवले आहे

धन्य धन्य कलियुगी देवी अहिल्याबाई |गेली किर्ती करुनिया भूमंडळाचे ठायी ||

महाराणी अहिल्याबाई पुण्यबाणी |संपूर्ण स्त्री यांमाधी श्रेष्ठ रत्नखाणी ||

समालोचन:

प्रजेचे कल्याण हेच आपले ध्येय मानून आहील्याबाई यांनी आदर्श राज्यकारभार केला. आपण धर्माचे रक्षण केले तर धर्म आपले रक्षण करतो याची जाणीव अहिल्यादेवीना होती. आपली संस्कृती भोगापेक्षा त्यागावर उभी आहे त्यामुळे धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणाची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली. कुठलाही भेदभाव न करता त्यांनी राजधर्माचे पालन केले. आपल्या राज्यातील जनतेला अहिल्याबाईंनी जाती-पातीच्या भेदापासून दूर ठेवले. एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या मुलीचा सुध्दा आंतरजातीय विवाह लावून दिला. त्यांनी अनेक मंदिरांना, दर्ग्याना वर्षासने दिली. अनेक पंडित, ब्राह्मण,फकिराना तीर्थयात्रेच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. पण त्याच वेळी अंधश्रद्धेला, रूढी परंपराना विरोध केला आणि आपले पुरोगामी विचार त्यांनी कृतीतून दाखवून दिले. राज्यकर्त्यांना राज्याच्या रक्षणासाठी वज्राहून कठोर आणि प्रजेच्या पालनासाठी फुलाहून मऊ संवेदनशील होऊन काही निर्णय घ्यावे लागतात या दोन्ही टोकांच्या भूमिका अहिल्याबाईंनी समर्थपणे पार पाडल्या आणि आपल्या कर्मयोगाने एका आदर्श राज्यकर्त्याचे उदाहरण त्यांनी घालून दिले.

संदर्भ:

१. खेडकर पुरुषोत्तम , (२०१२) लोकमाता अहिल्याबाई होळकर, जिजाई प्रकाशन, पुणे, नवी दिल्ली.२०१२

२. जहागीरदार विजया, कर्मयोगिनी अहिल्याबाई होळकर,मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे १९९१

३. कवी माधवी, १६१ श्रेष्ठ महिला, विद्याभारती प्रकाशन. लातूर. २०१७

४. लोकराज्य, २०२४

५. बर्वे दिलीप , पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. दिलीपराज प्रकाशन.

६. भट विठ्ठलराय, राजयोगिनी अहिल्याबाई होळकर, मनोविकास प्रकाशन,२०१८ .

७. खांडेकर विनया, ज्ञात -अज्ञात अहिल्याबाई होळकर, राजहंस प्रकाशन, पुणे २०१४ .

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

अहिल्यादेवी होळकर: प्रशासनिक सुधारणा आणि लोककल्याणकारी कार्य

(इ.स. १७६७- इ.स. १७९५) – एक संशोधनात्मक अभ्यास

प्रा. डॉ. सुरेश संतराम माळशिखरे

इतिहास विभाग प्रमुख,

शि. प्र. मं. स्व. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली जिल्हा- बुलढाणा

Corresponding Author – प्रा. डॉ. सुरेश संतराम माळशिखरे

DOI - 10.5281/zenodo.19658540

गोषवारा :

अहिल्यादेवी होळकर या भारतातील एक महान प्रशासक होत्या.त्यांनी केलेले कार्य समकालीन स्त्री राज्यकर्त्यांनी केलेल्या कार्यापेक्षा अधिक मोलाचे व महत्वपूर्ण होते.त्यांनी केलेल्या प्रशासनिक कार्यातील सुधारणा अधिक महत्वपूर्ण होत्या.त्या न्यायदानासाठी फार प्रसिध्द होत्या.त्यांनी केलेल्या न्यायिक सुधारणा फार महत्वाच्या ठरल्या.जनसामन्यापासून तर जेष्ठ व्यक्तीपर्यंत तसेच वृद्ध,लहान थोर सर्वांनाच त्यांनी न्याय मिळवून दिला होता.त्यामुळे त्यांनी केलेल्या सुधारणा फार महत्वाच्या ठरल्या.या व्यतिरिक्त त्यांनी सैन्य सुधारणा,अंधश्रद्धा निर्मुलन, चोर-दरोडेखोर, बालकल्याण आणि लोककल्याण, उद्योगधंदे, भारतभर केलेले बांधकाम आणि स्थापत्य त्यांच्या व्यक्तिमत्वाचा मोलाचा परिचय करून देतात.त्यामुळे त्याचा समावेश एक यशस्वी स्त्री राज्यकर्ती म्हणून केला जातो.हे पुराव्याधारे प्रस्तून संशोधन लेखात सामान्यीकरणाच्या आधारे वस्तुनिष्ठ स्वरुपात तथ्यांच्या आधारे मांडणी केलेली आहे.

प्रस्तावना:

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढचं नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखल प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक, पुरी जगन्नाथ मंदिर व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात.अहिल्याबाईंना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती.प्रस्तुत शोध निबंधात त्यांनी केलेल्या प्रशासनिक सुधारणा आणि लोककल्याणकारी कार्याचे उपलब्ध पुराव्याच्या आधारे वर्णन केलेले आहे.

साहित्याचा आढावा:

"अहिल्यादेवी होळकर :प्रशासनिक सुधारणा आणि लोककल्याणकारी कार्य(इ.स. १७६७- इ.स. १७९५) – **एक संशोधनात्मक अभ्यास"** या विषयावर शोध निबंध तयार काय्र्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ साधनांचा संशोधन कार्यासाठी उपयोग करण्यात आलेला आहे.याआधी या विषयावरराजकीय दृष्टीने लेखन

केलेले आहे,परंतु या विषय निवडून मात्र संशोधन करण्यात आलेले निदर्शनास येत नाही.म्हणून हा विषय संशोधन निबंधासाठी निवडलेला आहे.

संशोधन प्रश्न आणि गृहीतके:

प्रस्तूत शोध निबंधासाठी "अहिल्यादेवी होळकर :प्रशासनिक सुधारणा आणि लोककल्याणकारी कार्य(इ.स. १७६७- इ.स. १७९५) – एक संशोधनात्मक अभ्यास" ही संशोधन समस्या निवडल्यावर त्यासाठी काही गृहीतके निर्धारित करण्यात आलेली होती.अहिल्यादेवी होळकर ही एक स्त्री राज्यकर्ती होती.त्यांनी केलेले कार्य लॉक कल्याणकारी होते.त्यांच्या न्याय,प्रशासनिक सुधारणा आणि बांधकाम व उद्योग क्षेत्रातील सुधारणा महत्वाच्या आहेत.संशोधन शोध निबंधात हे गृहीत धरून त्यावर आधारित गृहीतके संशोधन शोध निबंध लिहिण्याआधी निर्धारित करण्यात आलेली होती.संशोधन शोध निबंध लिहिल्यावर निर्धारित केलेली गृहीतके सिद्ध पावली.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोध निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती वापर करण्यात आलेली असून कागदपत्राचे संघटन,वर्गीकरण,कागदपत्राचे विश्लेषण अशाप्रकारे ही संशोधन पद्धती वापरून प्रस्तूत शोध निबंधात निष्पक्षता आणलेली असून माहितीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्यात आलेले आहे.सामान्यीकार्नाद्वारे निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.ते गुर्हीतकृत्याशी तंतोतंत जुळलेले निदर्शनास येतात.

मुख्य संशोधन विषयावरील चर्चा:

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर (३१ मे, १७२५ - १३ ऑगस्ट, १७९५, राज्य कालावधी इ.स. १७६७- इ.स. १७९५) या भारतातील, माळव्याच्या 'तत्त्वज्ञानी माहाराणी' म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली.मल्हारारावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेल होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स. १७६६ ते इ.स. १७९५, म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत माळव्यावर राज्य केले होते.होळकर यांचा जन्म ३१ मे इ.स.१७२५रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी (मल्हारपीठ) खेड्यात झाला.त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. आख्यायिकेनुसार,८ वर्षाच्या अहिल्यादेवींना, मल्हारारावांनी एका देवळात बघितले.मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला,स्वतःचा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले.[१]

मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ.स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हारारावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षांनंतर, मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. त्या लढाईत अहिल्यादेवी स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मागरिट" असे म्हणले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली आहे.[१] त्याने म्हणले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल

त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.

१.शासक:

इ.स. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाईदरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हारारावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते.

"चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही ४-५ दिवस मुकाम करू शकता.तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा.....कूच करतांना,मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा."

पूर्वीच शासक म्हणून प्रशिक्षित असल्यामुळे मल्हारराव व खंडेराव यांच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा मिळण्यासठी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. पेशव्यांनी परवानगी दिल्यावर त्यांनी आपल्याला विरोध करणाऱ्यांना चाकरीत घेतले व तुकोजीराव होळकर (मल्हारारावांचा दत्तक पुत्र) यास सेनापतीपद देउन अहिल्यादेवी होळकरांनी माळव्यास प्रयाण केले.

अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही, इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे, हे अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदूमंदिरांमध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू रहावी म्हणून अनेक दाने दिली. माळव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या.

भारतीय संस्कृती कोशात अहिल्यादेवी होळकरांनी केलेल्या बांधकामांची यादी आहे - काशी, गया, सोमनाथ,अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवींस, सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते.

अहिल्यादेवींनी जनतेच्या/रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः प्रायोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून, सन १९९६ मध्ये, इंदुरातील नागरिकांनी त्यांच्या नावाने एक पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी, जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार नानाजी देशमुखांना दिला.

अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ, इंदूर येथील विश्वविद्यालयास त्यांचे नाव दिले आहे. तसेच त्यांचे नावाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे एक विद्यापीठ सोलापूरला आहे.

भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही, त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. यासाठी रायगंण सुभ्यावर

नवापुर या ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना अधिकार दिले त्यामुळे भिल्ल जमाती होळकराच्या सैन्यात आले व त्यांनी सुरते वर वचक बसवला. याही बाबतीत, (आंग्ल लेखक) 'माल्कम' यांच्यानुसार, अहिल्यादेवींनी' त्यांच्या सवर्यींवर लक्ष ठेवले'.

महेश्वर येथील अहिल्यादेवींची राजधानी ही जणू काव्य, संगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंतफंदी यांना व संस्कृत विद्वान खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कारागरांना, मूर्तिकारांना व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे. त्यांनी महेश्वर शहरात एक कपड्याची गिरणीपण सुरू केली.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार हे मान्य करतात की, अहिल्यादेवी होळकरांस माळवा व महाराष्ट्रात, त्या काळी व आताही, संताचा सन्मान दिला जातो. इतिहासाच्या कोणाही अभ्यासकास ते मत खोडून काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही. राजकारणातील बारकावे व तत्त्व व्यावहारिक नीती नियम व सूत्रे आपल्या देशाची राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थिती, रणांगणावरील आखाडे व अडचणी आणि बारकावे समजून घेतले. मल्हारराव यांच्या गैरहजेरीत सर्व कारभार करण्यात त्या पारंगत झाल्या.

ज्या काळी दळणवळणाची साधने फारच कमी होती किवा म्हटले तर नव्हती अशी परस्थिती होती अश्या खडतर काळात त्यांनी भारतातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदिरे धर्मशाळा तलाव, विहिरी, पाणपोई, घाट अशी अनेक समाज उपयोगी कामे केली. आज ही वास्तुशिल्पे व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला मातोश्रीच्या भव्य कार्याची साक्ष देत उभी आहेत. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संकृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. त्यांच्या कामगिरीचा हा दुहेरी बाणा निश्चीतच अभिमानास्पद आहे

२.सैन्य तुकडी:

ज्या प्रमाणे आहिल्यादेवी लोककल्यान आणि समाज सुधारना करीत त्याच प्रमाने लोकांमधे समानता अनन्याच काम करीत आहिल्यादेवी नी आपल्या सेन्या मध्ये पुरुषा ना संधी देत त्याच प्रमाने महिला नाही संधी मिळत आणि म्हणुनच आहिल्यादेवी नी सेन्या मध्ये महिला ची ही एक मोठी तुकडी खास सामावुन घेतली आणि म्हणुनच आहिल्यादेवी ना समान न्याय करनार्या **न्यायदेवता** म्हनुन आहिल्यादेवी ना ओळखल जातं

३.शेती व शेतकरी उद्धाराची कार्य:

शेतकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्त्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले.

४.गुणग्राहता:

मातोश्रीची लोककल्याणाची कीर्ती ख्याती ऐकुन अनेक विद्वन लोक त्यांची भेट घेण्यास येत असत आणि नंतर त्या ठिकाणीच राहत असत. अनेक विषयाचे विद्वान, शास्त्री पंडीत, व्याकरणकार, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यानाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना त्या राजाश्रय देत असत. महेश्वर नगरीत वास्तव करीत होते म्हणूनच महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारूपाला आली होती . ग्रंथ संपंदा-निर्मिती छापखाने नसल्याने त्या काळी धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याकरिता हस्तलिखिते यावरच अवलंबून राहावे लागत होते. हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत. ज्या प्रमाणे हिरा व रत्ने पारखणाऱ्या जवाहिऱ्याप्रमाणे त्या विद्द्येची महत्त्व जाणत

असल्याने त्याच्या मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली. शाळा काढून विद्याप्रसाराचे काम केले.

५.अंधश्रद्धा निवारण:

या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांचा प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट चाल कायद्याने बंद करण्यात आली यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टतेची प्रचीती आपणास येते.

६.चोर व दरोडेखोर यांचे मत परिवर्तन:

त्या काळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर दरोडेखोर व भिल्ल लुटमार करीत असत अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी आणि शेत जमीनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना भिलकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा नर्माण केला.

७.न्यायप्रियता:

अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजी होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. तर [अहिल्यादेवी च्या सर्वांना समान न्याय या विचाराने डाॅ .बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा प्रभावित होते]

८.राजधानी व सुशासन:

त्यांनी इंदूरऐवजी नर्मदा तिरी **महेश्वर** येथे आपली राजधानी वसवली. एक अत्यंत न्यायी शासक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यादेवींनी गुन्हेगारी कमी करून राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली.

९.सैन्य आणि नेतृत्व:

पती खंडेराव होळकर व सासरे मल्हारराव होळकर यांच्या निधनानंतर त्यांनी होळकर राज्याची सूत्रे हाती घेतली. त्यांनी प्रसंगोपात्त स्वतः सैन्याचे नेतृत्व केले आणि तुकोजीराव होळकर यांची लष्करी कमांडर म्हणून नियुक्ती केली.

१०.**लोककल्याणकारी कार्ये:**

त्यांनी शेतकऱ्यांसाठी सिंचनाच्या सोयी, रस्ते, विहिरी, तलाव आणि धर्मशाळा बांधल्या.

११.धार्मिक आणि सांस्कृतिक विकास:

संपूर्ण भारतात त्यांनी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार (उदा. काशी विश्वनाथ, सोमनाथ) केला. महेश्वर येथे कला, संगीत, साहित्य आणि उद्योगांना (महेश्वरी साडी) प्रोत्साहन दिले.

१२.न्याय व्यवस्था:

त्या स्वतः प्रजेच्या तक्रारी ऐकत असत आणि नि:पक्षपाती न्यायनिवाडा करत असत.

१३.प्रशासकीय कार्यक्षमता:

अहिल्यादेवींनी एक समर्थ प्रशासक म्हणून शेतसारा कमी केला, लूटमार थांबवली आणि लोकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले. त्या एक 'साध्वी' राज्यकर्ती म्हणून ओळखल्या जात, ज्यांनी आपले जीवन प्रजेच्या सेवेसाठी वेचले.

शोकात्म अखेर – मृत्यू:

महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरू केली. अन्नछत्रे घातली. अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. गुजराथेतील सोरटी सोमनाथाच्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. असे पुण्यसंचयाचे

काम अहिल्यादेवी करीत होत्या. तशातच त्यांचा नातू तेराव्या वर्षी मरण पावला. काही दिवसातच जावई लढाईत कामी आला आणि मुलगीही सती गेली. आयुष्यभर कोसळलेल्या संकटांनी त्यांचा अंत पाहिला होता. त्यांची प्रकृती बिघडत गेली आणि अखेर १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांनी शांतपणे मृत्यूला जवळ केले.

अहिल्यादेवी यांच्याबद्दलची मते:

अहिल्यादेवी होळकर यांचा किल्ला:

"अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्याचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला. हा एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवनकालात तर सन्मान मिळालाच पण मृत्यूनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला."[२]

"ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. तिच्या चांगल्या बुद्धीचे, चांगुलपणाचे व गुणांचे उदाहरण देता येऊ शकते. अशी अहिल्यादेवी ही एक महान स्त्री होती."

"आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्यादेवींनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च धुरीण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती आजतागायतची सर्वांत शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती.[३] अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्यादेवींना 'तत्त्वज्ञानी राणी' असे संबोधतात. याचा संदर्भ बहुतेक 'तत्त्वज्ञानी राजा' भोज याच्याशी असावा.[४]

अहिल्यादेवी होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. सन १७७२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. त्यांना कवटाळणे हे अस्वलास कवटाळण्याजोगे असल्याचे त्यांनी नोंदले आहे :" वाघासारखे इतर प्राणी हे शक्ती वा युक्तीने मारले जाऊ शकतात, परंतु अस्वल मारणे हे फारच कठीण असते. सरळ त्याच्या चेहऱ्यावर वार केल्यासच ते मरते. एकदा त्याच्या मजबूत पकडीत सापडल्यावर ते त्याच्या शिकारीस, गुदगुल्या करून ठार मारते. असाच इंग्रजांचा मार्ग आहे. हे बघता, त्यांच्यावर मात करणे कठीण आहे.[५]

"या इंदूरमधील शासकांनी, त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्वांस चांगले काम करण्यास प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांनी चांगल्या कपड्यांचे उत्पादन केले, व्यापार वाढला, शेतकरी हे शांततेत व दबावरहित होते. कोणतेही प्रकरण राणीच्या निदर्शनास आले की ते कडकपणे हाताळले जाई. अहिल्यादेवीना आपल्या प्रजेचा उत्कर्ष आवडत असे. तसेच ती प्रजा राजा हिसकावून घेईल म्हणून आपली संपत्ती उघड करण्यास घाबरत नाही, हे बघणे आवडत असे. दूरदूरपर्यंत, रस्त्यांच्या कडेला, दाट छायादार वृक्ष लावण्यात आले होते, विहिरी केल्या होत्या, पथिकांसाठी विश्रांतीगृहे. गरीब, घर नसलेले व अनाथ या सर्वांना त्यांच्या जरुरीनुसार, सर्व मिळत होते. बहुत काळापासून, भिल्ल लोक पहाडांतून सामानाची नेआण करत असतांना लूटमार करीत असत. अहिल्याबाईंनी भिल्ल लोकांना त्यापासून मुक्ती मिळवून दिली व प्रामाणिकपणे शेती करण्याची संधी त्यांना देऊ केली. सर्व समाजाला अहिल्यादेवी आवडत असत आणि तो त्यांच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करी. त्यांच्या कन्येने तिचा पती, यशवंतराव फानसे यांच्या मृत्यूनंतर सती जाणे हे अहिल्यादेवींच्या आयुष्यातले शेवटचे सर्वात मोठे दुःख होते.[६]

वयाच्या ७०व्या वर्षी अहिल्यादेवी होळकरांची प्राणज्योत मावळली.

भारत स्वतंत्र झाल्यावरही पुढील अनेक वर्षे शेजारील भोपाळ, जबलपूर किंवा ग्वाल्हेर या शहरांपेक्षा इंदूर सर्व बाबतीत प्रगतिशील राहिले. याच्या मागे अहिल्यादेवीची दूरदृष्टी होती.

अहिल्याबाई होळकर यांनी गंगेवर बांधलेला घाट

सन्मान:

अहिल्याबाई होळकर यांच्यावरील पोस्टाचे तिकीट (१९९६):

अहिल्यादेवींच्या सन्मानाप्रीत्यर्थ व स्मृतिप्रीत्यर्थ भारत सरकारने २५ ऑगस्ट १९९६ रोजी एक टपाल तिकिट जारी केले.[७]

या अशा शासनकर्तीस मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव "देवी अहिल्या इंटरनॅशनल एअरपोर्ट (इंदूर)" असे ठेवण्यात आले आहे, आणि इंदूर विद्यापीठास "देवी अहिल्या विश्वविद्यालय" असे नाव देण्यात आले आहे".[८]

महाराष्ट्रातील सोलापूर विद्यापीठाचे नवीन नाव 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ' ठेवण्यात आले आहे.

अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ १३ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारने अहमदनगरचे नामांतर **अहिल्यानगर** असे केले.

होळकर यांची देशभरातील कामे:

छत्रपती संभाजीनगर मधील अहिल्यादेवी यांचा पुतळा:

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील मांजरी गावातील अहिल्यादेवी यांचा पुतळाअहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र सरकारने हा लोगो तयार केला आहे

अहिल्यादेवींच्या काळातील किल्ले व भुईकोट:

१.किल्ले महेश्वर २.इंदोरचा राजवाडा ३.चांदवडचा रंगमहाल ४.वाफगाव - यशवंतराजे होळकर यांचे जन्मस्थळ ५.खडकी-पिंपळगाव : होळकर वाडा ६.काठापूर : होळकर वाडा किंवा वाघ वाडा७.पंढरपूर : होळकर वाडा ८.लासलगाव : अहिल्यादेवींचा किल्ला ९.पळशी : पळशीकर वाडा(होळकरांचे दिवाण)१०.रायकोट किल्ला कोंडाईबारी घाट

अहिल्यादेवींच्या

काळातील मंदिरे बारव व धर्मशाळा :

१.अकोले तालुका- विविध ठिकाणी विहिरी उदा. वाशेरे, वीरगाव, औरंगपूर.२.वीरगाव – बारव३.अंबा गाव – दिवे.४.अमरकंटक (मप्र)- श्री विघ्नेश्वर, कोटितीर्थ, गोमुखी, धर्मशाळा व वंश कुंड ५.अलमपूर (मप्र) – हरीहरेश्वर, बटुक, मल्हारीमार्तंड, सूर्य, रेणुका,राम, हनुमानाची मंदिरे, लक्ष्मीनारायणाचे,मारुतीचे व नरसिंहाचे मंदिर, खंडेराव मार्तंड मंदिर व मल्हाररावांचे स्मारक ६.आनंद कानन – श्री विघ्नेश्वर मंदिर.७.अयोध्या (उ.प्र.)– श्रीरामाचे मंदिर, श्री त्रेता राम, श्री भैरव, नागेश्वर/सिद्धार्थ मंदिरे, शरयू घाट, विहिरी, स्वर्गद्वारी मोहताजखाना, अनेक धर्मशाळा.८.आमलेश्वर, त्र्यंबकेश्वर मंदिरांचा जीर्णोद्धार ९.उज्जैन (म.प्र.)– चिंतामणी गणपती,जनार्दन,श्री लीला पुरुषोत्तम,बालाजी तिलकेश्वर,रामजानकी रस मंडळ, गोपाल, चिटणीस, बालाजी, अंकपाल, शिव व इतर अनेक मंदिरे,१३ घाट, विहिरी व अनेक धर्मशाळा इत्यादी.१०.ओझर (अहमदनगर) (महाराष्ट्र) – २ विहिरी व एक कुंड.११.इंदूर – अनेक मंदिरे व घाट१२.ओंकारेश्वर (मप्र) – मामलेश्वर महादेव,१३.कर्मनाशिनी नदी – पूल१४.काशी (बनारस) – काशी विश्वनाथ,श्री तारकेश्वर, श्री गंगाजी, अहिल्या द्वारकेश्वर, गौतमेश्वर व अनेक महादेव मंदिरे, मंदिरांचे घाट,

मनकर्णिका, दशास्वमेघ, जनाना, अहिल्या घाट, उत्तरकाशी, रामेश्वर पंचक्रोशी, कपिलधारा धर्मशाळा, शीतल घाट.१५.केदारनाथ – धर्मशाळा व कुंड १६.कोल्हापूर (महाराष्ट्र) – मंदिर-पूजेसाठी साहाय्य.१७.कुम्हेर – विहीर व राजपुत्र खंडेरावांचे स्मारक.१८.कुरुक्षेत्र (हरयाणा) - शिव शंतनु महादेव मंदिरे,पंचकुंड व लक्ष्मीकुंड घाट.१९.गंगोत्री –विश्वनाथ, केदारनाथ, अन्नपूर्णा, भैरव मंदिरे, अनेक धर्मशाळा.२०.गया (बिहार) – विष्णूपद मंदिर.२१.गोकर्ण – रावळेश्वर महादेव मंदिर, होळकर वाडा, बगीचा व गरीबखाना.

२२.घृष्णेश्वर (वेरूळ) (महाराष्ट्र) – शिवालय तीर्थ.२३.चांदवड वाफेगाव (महाराष्ट्र) – विष्णूचे व रेणुकेचे मंदिर.२३.चिखलदा – अन्नछत्र२४.चित्रकूट (उ.प्र.) - श्रीरामचंद्राच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा२५.चौंडी – चौडेश्वरीदेवी मंदिर, सिनेश्वर महादेव मंदिर, अहिल्येश्वर मंदिर, धर्मशाळा व घाट२६.जगन्नाथपुरी (ओरिसा) – श्रीरामचंद्र मंदिर, धर्मशाळा व बगीचा२७.जळगांव (महाराष्ट्र) - राम मंदिर२८.जांबगाव – रामदासस्वामी मठासाठी दान २९.जामघाट – भूमिद्वार ३०.जेजुरी(महाराष्ट्र) – मल्हारगौतमेश्वर, विठ्ठल, मार्तंड मंदिरे, जनाई महादेव व मल्हार या नावाचे तलाव.३१.टेहरी (बुंदेलखंड) – धर्मशाळा.३२.तराना? – तिलभांडेश्वर शिव मंदिर, खेडपती, श्रीराम मंदिर, महाकाली मंदिर.३३.त्र्यंबकेश्वर (नाशिक) (महाराष्ट्र)– कुशावर्त घाटावर पूल.३४.द्वारका (गुजरात) – मोहताजखाना, पूजागृह व पुजाऱ्यांना काही गावे दान.३५.श्री नागनाथ (दारुकावन) – १७८४मध्ये पूजा सुरू केली.३६.नाथद्वार – अहिल्या कुंड, मंदिर, विहीर.३७.निमगाव (नाशिक) (महाराष्ट्र)– विहीर.

३८.नीलकंठ महादेव – शिवालय व गोमुख.३९.नैमिषारण्य (उ.प्र.) – महादेव मंडी, निमसर धर्मशाळा, गो-घाट, चक्रीतीर्थ कुंड.४०.नैम्बार (मप्र) – मंदिर

४१.पंचवटी (नाशिक)(महाराष्ट्र)– श्री राम मंदिर, गोरा महादेव मंदिर, विघ्नेश्वर मंदिर, धर्मशाळा, रामघाट.४२.पंढरपूर (महाराष्ट्र) – श्री राम मंदिर, तुळशीबाग, होळकर वाडा, सभा मंडप, धर्मशाळा व मंदिरास चांदीची भांडी दिली. बाजीराव विहीर

४३.पिटकेश्वर, ता. इंदापूर - पंढरपूर वारीच्या जुन्या मार्गावर बांधलेली बारव ४४.पिंपलास (नाशिक) (महाराष्ट्र)– विहीर.४५.पुणतांबे (महाराष्ट्र) – गोदावरी नदीवर घाट.४६.पुणे (महाराष्ट्र) – घाट (कोणता घाट?)४७.पुष्कर – गणपती मंदिर,मंदिरे,धर्मशाळा व बगीचा.४८.प्रयाग (अलाहाबाद,उ.प्र.) - विष्णू मंदिर, घाट व धर्मशाळा, बगीचा, राजवाडा.४९.बद्रीनारायण (उ.प्र.) –श्री केदारेश्वर मंदिर, हरिमंदिर, अनेक धर्मशाळा (रंगदचाटी, बिदरचाटी, व्यासंग, तंगनाथ, पावली) मनु कुंड (गौरकुंड व कुंडछत्री), देवप्रयाग येथील बगीचा व गरम पाण्याचे कुंड, गायींच्या चरण्यासाठी कुरणे.५०.बऱ्हाणपूर (मप्र) – घाट व कुंड.५१.बिठूर – ब्रह्मघाट ५२.बीड (महाराष्ट्र)– घाटाचा जीर्णोद्धार.५३.बेल्लूर (कर्नाटक) – गणपती, पांडुरंग, जलेश्वर, खंडोबा, तीर्थराज व अग्नि मंदिरे, कुंड ५४.' *भरतपूर'* – मंदिर, धर्म शाळा व कुंड.५५.भानपुरा – नऊ मंदिरे व धर्मशाळा.५६.भीमाशंकर (महाराष्ट्र) – गरीबखाना ५७.भुसावळ (महाराष्ट्र) - चांगदेव मंदिर ५८.मंडलेश्वर – शिवमंदिर घाट ५९.मनसा – सात मंदिरे.

६०.महेश्वर - शंभरावर मंदिरे, घाट, धर्मशाळा व घरे.६१.मामलेश्वर महादेव – दिवे.६२.मिरी (**अहिल्यानगर**) (महाराष्ट्र) – सन १७८० मध्ये भैरव मंदिर

६३..रामपुरा – चार मंदिरे, धर्मशाळा व घरे.६४.रामेश्वर (तामिळनाडु) – हनुमान व श्री राधाकृष्ण यांची मंदिरे, धर्मशाळा, विहीर, बगीचा इत्यादी.६५.रावेर (महाराष्ट्र)– केशव कुंड

६६.वाफगाव(महाराष्ट्र) – होळकर वाडा व विहीर.६७.श्री विघ्नेश्वर – दिवे ६८.वृंदावन (मथुरा) – चैनबिहारी मंदिर, कालियादेह घाट, चिरघाट व इतर अनेक घाट, धर्मशाळा व अन्नछत्र.६९.वेरूळ (महाराष्ट्र) – लाल दगडांचे मंदिर.७०.श्री वैजनाथ (परळी,) (महाराष्ट्र)– सन १७८४ मध्ये वैद्यनाथ मंदिराचा जीर्णोद्धार.

७१.श्री शंभु महादेव पर्वत, शिंगणापूर (महाराष्ट्र) – विहीर.७२.श्रीशैल मल्लिकार्जुन (कुर्नुल, आंध्रप्रदेश) – शिवाचे मंदिर ७३.संगमनेर (महाराष्ट्र)– राम मंदिर.

७४.सप्तशृंगी – धर्मशाळा. ७५.संभल? (संबळ) – लक्ष्मीनारायण मंदिर व २ विहिरी. ७६.सरढाणा मीरत – चंडी देवीचे मंदिर.७७.साखरगाव (महाराष्ट्र)– विहीर.

७८..सिंहपूर – शिव मंदिर व घाट ७९.सुलतानपूर (खानदेश) (महाराष्ट्र)– मंदिर ८०.सुलपेश्वर – महादेव मंदिर व अन्नछत्र ८१.सोमनाथ मंदिर, धर्मशाळा, विहिरी.

८२.सौराष्ट्र (गुजरात) – सन १७८५ मध्ये सोमनाथ मंदिर, जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा.८३.हरिद्वार (उ.प्र.) – कुशावर्त घाट व मोठी धर्मशाळा.८४.हांडिया – सिद्धनाथ मंदिरे, घाट व धर्मशाळा ८५.हृषीकेश – अनेक मंदिरे, श्रीनाथजी व गोवर्धन राम मंदिर ८६.नंदुरबार (महाराष्ट्र)- विहीर ८७.मुक्ताईनगर(महाराष्ट्र)-मुक्ताबाई समाधीस्थळ कोथळी ८८.समनापूर ता.संगमनेर(महाराष्ट्र)-पूरातन बारव(विहीर)

अहिल्याबाई होळकर यांच्यावरील प्रकाशित पुस्तके:

१.'अहिल्याबाई' : लेखक - श्री. हिरालाल शर्मा २.'अहिल्याबाई चरित्र' : लेखक - श्री. पुरुषोत्तम ३.'अहिल्याबाई चरित्र' : लेखक - श्री. मुकुंद वामन बर्वे ४.अहिल्याबाई होळकर - वैचारिक राणी (लेखक : म.ब. कामत व व्ही.बी. खेर)५.अहिल्याबाई होळकर : लेखक - म.श्री. दीक्षित ६.अहिल्याबाई होळकर (चरित्र), लेखक : खडपेकर ७.कर्मयोगिनी : *लेखिका - विजया जहागीरदार* ८.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर (जनार्दन ओक) ८.महाराष्ट्राचे शिल्पकार - तेजस्विनी अहिल्याबाई होळकर (लेखिका : विजया जहागीरदार; प्रकाशक : महाराष्ट्र सरकार)९.शिवयोगिनी (कादंबरी, लेखिका - नीलांबरी गानू)१०.'ज्ञात- अज्ञात अहिल्याबाई होळकर' लेखक - विनया खडपेकर...११.पुण्यश्लोकअहिल्यादेवी आणि मराठेशाही.१२.लेखक.प्राचार्य डॉक्टर मधुकर सलगरे..2020

अहिल्यादेवींचे नाव असलेल्या संस्था:

१.देवी अहिल्या इंटरनॅशनल एअरपोर्ट (इंदूर) (म.प्र.)२.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ३.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मेडिकल काॅलेज,बारामती जि.पुणे४.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय, हाळगाव, ता.जामखेड, जि. अहिल्यानगर४.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी ५.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान (गंगापुर, तोगे नाना)६.अहिल्याबाई होळकर चौक (स्टेशन रोड-उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर ७.अहिल्यादेवी होळकर पूल (नाशिक) ८.देवी अहिल्या विश्वविद्यालय (इंदूर)९.अहिल्यादेवी हायस्कूल (पुणे)१०.देवी अहिल्या होळकर शिल्पसृष्टी, चौंडी अहिल्यानगर ११.अहिल्यादेवी होळकर चौक, दौंड १२.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यामंदिर, जेजुरी १३.महाराणी देवी अहिल्याबाई होळकर शिक्षण संस्था, सांगली १४.राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वाचनालय कल्लप्पवाडी, अक्कलकोट १५.अहिल्याबाई होळकर चौक, जोगेश्वरी (संभाजीनगर) १६.अहिल्याबाई होळकर चौक, हाटकरवाडी१७.अहिल्यानगर जिल्हा (महाराष्ट्र)

निष्कर्ष :

अहिल्यादेवी होळकर ही भारतातील एक थोर स्त्री राज्यकर्ती होऊन गेली.समकालीन कालावधीत तशा प्रकारची कामगिरी इतर कोणत्याही समकालीन शासनकर्त्याला करता आलेली निदर्शास येते नाही.प्रस्तुत शोध निबंधात अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले कार्य हे उपलब्ध पुराव्यांच्या आधारे मांडले आहे.त्याद्वारे असे निष्कर्ष निघालेत की,अहिल्यादेवींनी प्रशासकीय सुधारणा केलेल्या आहेत.त्या सुधारणांना दूरदृष्टी होती.त्यामुळे त्या यशस्वी झाल्या.अहिल्यादेवी होळकर यांनी न्याय प्रशासनात महात्वाच्या सुधारणा केलेल्या आहेत.बांधकाम आणि कृषी,उद्योग क्षेत्रात त्यांनी केलेल्या सुधारणा मुळे अहिल्यादेवी होळकर यांची कारकीर्द प्रजाहितदक्ष व लोककल्याणकारी होती,असे प्रस्तुत शोध निबंधातून स्पष्ट होते.

संदर्भ ग्रंथ सूची(Bibliography):

१. जवाहरलाल नेहरू : डिस्कव्हरी ऑफ इंडिया, २००४, पान -३०४

२. माल्कम जे . अ मेमॉयर ऑफ सेन्ट्रल इंडिया, तसेच म.ब. कामत व व्ही.बी. खेर यांच्या "अहिल्याबाई होळकर : वैचारिक राणी , पान ८५, आणि जॉन केय यांच्या इंडिया: अ हिस्टोरी, पान ४०७

३. जॉन किय, इंडिया: अ हिस्टोरी , पान ४०७ , गोर्डन एस , दि मराठाज पान १६२

४. जॉन किय, इंडिया: अ हिस्टोरी , पान ४२५, सरदेसाई जी.एस., रियासत , मुंबई १९२५, एम.बी. कामत , व्ही.बी. खेर : अहिल्याबाई होळकर : एक वैचारिक राणी पान १२६

५. डॉ. अनी बेजंट, अहिल्यादेवी - अ ग्रेट रूलर, चिल्ड्रेन ऑफ मदरलॅन्ड , पान २९० - २९१

६. *स्वाती (२०१४). १०१ कर्तुत्वान स्त्रिया. पुणे: उत्कर्ष प्रकाशन. pp. ३७. ISBN 978-81-7425-310-1.*

७. *Banerjee, Shoumojit (2024-03-13). "Maharashtra's Ahmednagar to be officially called 'Ahilyanagar'" (इंग्रजी भाषेत). ISSN 0971-751X.*

८. *शेळके, प्रा. नीलेश केदारी (जून २०१८). "अहिल्याबाई होळकरांचे पिटकेश्वर येथील दोन नवीन शिलालेख". संशोधक. २: १४.*

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

मध्ययुगीन कालखंडातील वाडा स्थापत्यकलेचा वारसा -पंढरपुरातील श्रीमंत होळकर वाडा

डॉ. भारती कुमार सुडके

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर.

Corresponding Author – डॉ. भारती कुमार सुडके

DOI - 10.5281/zenodo.19658553

प्रस्तावना :

वाडा संस्कृती ही महाराष्ट्राची एक ओळख असून ते स्थापत्यशास्त्राचे उत्कृष्ट नमुने आहेत. दोन-तीन शतकांपूर्वी बांधलेले हे वाडे निसर्गाचे तडाखे आणि जतनाविषयीची आस्था सहन करत दिमाखात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उभे आहेत. यासोबतच त्यांच्यामध्ये दडलेला 'इतिहास'ही दर्शवतात. मध्ययुगीन कालखंडातील मराठेशाहीच्या वेगवेगळ्या काळात महाराष्ट्रात सरदारांनी वाडे बांधले.पंढरपूर हे सोलापूर जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण आहे. पंढरपूरला दक्षिण काशी व तसेच विठ्ठलाला महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणतात. महाराष्ट्र राज्यातील पंढरपुरातील विठ्ठल मंदिरामुळे हे वारकऱ्यांचे तीर्थक्षेत्र म्हणून प्रख्यात आहे. दरवर्षी आषाढी एकादशीच्या सुमारास अनेक भाविक येथे वारी करण्यासाठी व विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी पायी चालत येतात. इ.स. ५१६ ताम्रपटांवरून राष्ट्रकूटांच्या काळात पंढरपूर हे चांगली लोकवस्ती असलेले ग्राम असल्याचा पुरावा मिळतो.पंढरपूर शहर अभ्यासक ॲड. आशितोष बडवे व ॲड धनंजय रानडे यांनी दिलेल्या माहितीनुसार पंढरपुरात अनेक मराठा कालखंडात ऐतिहासिक वाडे उभारण्यात आले होते. काही ऐतिहासिक वाडे, त्यांचे स्थापत्य व वाड्याशी संबंधित घराण्याचा,वैभवशाली इतिहासाची साक्ष देतात. आज त्यालाच देवी अहिल्याबाई होळकर चॅरिटेबल ट्रस्ट म्हटले जाते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी देशातील अनेक महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी लोकांची राहण्यची सोय व्हावी यासाठी सुमारे सोळाशे वाडे बांधले, त्यापैकी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेला पंढरपुरातील श्रीमंत होळकर वाडा पंढरपुरात आहे. आजही प्रेरणादायी इतिहासाची व वाडा स्थापत्यकलेची साक्ष देत दिमाखात उभा आहे.

संशोधनाचा हेतु:

१) पंढरपुरातील श्रीमंत होळकर वाड्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

२) श्रीमंत होळकर वाड्याची बांधकाम शैली व रचना अभ्यासणे.

३) श्रीमंत होळकर वाड्याच्या जतन व संरक्षण कार्यात येणाऱ्या समस्या अभ्यासणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधसाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधसाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. श्रीमंत होळकर वाड्याल्या प्रत्यक्ष भेट देऊन अहिल्यादेवी होळकर चॅरिटेबल ट्रस्चे विद्यमान व्यवस्थापक आदित्य फत्तेपुरकर .व पंढरपुर शहराचे

अभ्यासक श्री बडवे व ॲड. धनंजय रानडे यांची मुलाखत घेऊन माहिती संकलित केली. तसेच वर्तमान पत्रे,पुरातत्व विभागाचे आदेश ही संशोधनासाठी ऊपयुक्त ठरले. संकलित माहितीचे विश्लेषण करून संशोधन पेपर तयार करण्यात आला आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य:

माळवा प्रांतातील अहिल्यादेवी होळकर न्यायप्रिय, लोककल्याणकारी राजकर्त्या होत्या. ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेड्यात अहिल्यादेवींचा जन्म झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. त्याकाळी स्त्री शिक्षण फारसे प्रचिलत नसतानाही त्यांच्या वडिलांनी अहिल्यादेवी यांना लिहण्या वाचण्यास शिकवले होते. बाजीराव पेशव्यांचा एक सरदार मल्हारराव होळकर हे माळवा प्रांताचे सुभेदार होते. त्यांनी अहिल्यादेवींना स्वतःचा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले. मल्हारराव होळकरांनी मुलाच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींना सती जावू दिले नाही. मल्हारारावांनी त्यांना आपल्या पुत्राचे स्थान दिले. मल्हारारावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेले होते. अहिल्यादेवीनी इ.स. १७६६ ते इ.स. १७९५ म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत माळव्यावर राज्य केले.राणी अहिल्यादेवी यांनी भारतभर अनेक हिंदू मंदिरे आणी नदीघाट बांधले, अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला, अनेक तीर्थक्षेत्र, धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक, परळी वैजनाथ पंढरपूर यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

होळकर वाड्याच्या निर्मितीचा इतिहास:

पंढरपूर हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे.काही पेशवे व मराठा सरदार पंढरपूरात काही काळ राहत असत. सततच्या वास्तव्यासाठीची गरज म्हणून अनेकांनी सरदारांनी पंढरीत चंद्रभागा नदी किनारी आपले साठी वाडे बांधले. वाडा हा महाराष्ट्रात विकसित झालेला परंपरागत निवासस्थानाचा प्रकार आहे. हा वास्तुप्रकार पेशवेकाळात उदयास आला. वाडा ही केवळ एक वास्तू नसून ती एक संस्कृती आहे. वारीमध्ये वारकर्यांची पाण्याची सोया व्हावी म्हणून आळंदी, देहू ते पंढरपूर मार्गावर राजमाता अहिल्यादेवी यांनी अनेक बारावा निर्माण केल्या. याप्रमाणे वारकरी संप्रदायाच्या उद्धारासाठी राणी अहिल्यादेवी यांनी पंढरपुरात विठ्ठलदर्शनासाठी आल्यावर उतरण्याची व्यवस्था चांगली व्हावी व आपल्या मुक्कामा व्यतिरिक्त वारकऱ्यांची सोय व्हावी म्हणून पंढरपूर येथे टोलेजंग वाडा बांधला तो अजूनही सुस्थितित आहे.हा वाडा सुमारे २५८ वर्षाहून अधिक पुरातन आहे .श्रीमंत होळकरांचा हा वाडा अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणाचे व मराठा कालीन स्थापत्यशास्त्राचे उत्तम उदहरण आहे. येथील वाड्याची व्यवस्था होळकर संस्थानचे वतीने यांचे वारसदार पाहतात.

होळकर वाड्याचे स्वरूप:

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी पंढरीत वैभाशाली वाड्याची निर्मिती केली.होळकरांचा हा वाडा साधारणपणे दोन एकर जागेमध्ये बांधलेला आहे. ह वाडा बांधण्यासाठी दगड,विटा,चुना,लाकूड यांचा वापर केला गेला आहे,श्रीमंत होळकर वाडा हा दुमजली असून सध्या वरच्या मजल्यावरील काही भाग ढासळलेला असला तरी बाकी बांधकाम सुस्थितीत आहे. या वाड्याची समोरील बाजू साधारणपणे ६०० फूट लांब तर रुंदी ३०० फूट आहे.

तळातील मजल्यात ११ व वरच्या मजल्यावर ५ अशा एकूण १६ खोल्या आहेत. वाड्यात भव्य तळघर हि आहे. या वाड्यामध्ये दक्षिणेला राममंदिर स्थापन केले आहे. या मंदिरातील शिवपिंडीभोवती ११ छोटे शिवलिंग व गरुड आहेत. बारकाईने हा वाडा पहिला तर तो एक किल्ल्याप्रमाणे दिसतो. वाड्याला भव्य, उंच आणि दणकट बंदी आहे. तो काळ लढाईच्या घामघुमीचा असल्याने व संरक्षणासाठी सैन्य मुक्काम ठोकून होते. वाड्याचे छत हे माळवद आहे. या माळवदा साठी पांढरी माती वापरण्यात आली आहे.उन्हाळ्यात उष्णता रोधकाचे काम करते पांढरी माती करते त्यामुळे उन्हाळ्यात माळवद थंड राहते. होळकर वाड्याचे छत विचारात घेता ते खुप साधे आहे. छताच्या पुढे आलेल्या सज्जाच्या लाकडी भागाला पानपट्टी नक्षी कोरलेली आहे. चैत्र महिन्यात दहा दिवस इथे कीर्तन-प्रवचनादी कार्यक्रम होतात. रामनवमीस मोठा उत्सव होतो. या वाडयात लग्न- मुंजीचे व अन्य धार्मिक कार्यक्रमही होतात.

वाड्याच्या निर्मितीला सुरुवात:

सन १७५४ मध्ये या वाड्याच्या पायाभरणीला प्रारंभ झाला. अनेक वर्ष या वाड्याचे बांधकाम सुरु होते. वाड्यासाठी लागणारे सागाचे लाकूड मध्यप्रदेश राज्यातील जंगलामधून पंढरपूर येथे आणण्यात आले. हि लाकडे नर्मदा नदीतून ती गुजरात जवळच्या समुद्रात येत होती, नंतर रत्नागिरी समुद्राजवळ पोहचलेली हि लाकडे पाण्यातून बाहेर काढून हत्तीच्या पाठीवर टाकून पंढरपूर येथे आणली गेली असे सांगितले जाते. वाड्याच्या बांधकामासाठी चुना व विटांचा वापर करण्यात आला आहे. चुना तयार करीत असताना भोकरीचे बी, पिंपळाचा डिंक, बिब्याचे द्रावण, कापूस इ. साहित्य त्यामध्ये घातले जात होते. चुना चांगल्या प्रतीचा तयार व्हावा म्हून घोटला जात होता. चुना चांगल्या प्रतीचा वापरला गेला आहे. चेत्र शुद्ध प्रतिपदा (पाडवा) सन १७६७ रोजी वाड्याचा वास्तूशांती समारंभ कार्यक्रम झाला. या वाडयाच्या वास्तूशांतीच्या वेळी राणी अहिल्यादेवी होळकर स्वतः पंढरपूरमध्ये होत्या असे मानले जाते. या समारंभास अनेक सरदार उपस्थित होते.सन १७६७ ते १९६६ पर्यंत या वाड्यात अन्नधर्म व दानधर्म चालत होता. त्याचा खर्च संस्थान देत होते. अन्नछत्रात गोसावी, बेरागी, आंधळे, पांगळे व गरीब लोक जेवण करीत होते.. आजही चंद्रभागा नदीच्या तीरावर पूर्वीचे वैभव, दानधर्म व सांस्कृतिक समन्वयाचे ठिकाण म्हणून हा वाडा सुस्थितीत उभा आहे. येथील वाड्याची व्यवस्था होळकर संस्थानचे वतीने यांचे वारसदार पाहतात.

भव्य प्रवेशद्वार:

प्रवेशद्वाराचा मुख्य दरवाजा मोठा व मजबूत आहे. प्रवेशद्वार हे सपाट लाकडी फळ्या व त्यावर लाकडी चौकोनी तुकडे वापरून केलेले चौकोन हे आकर्षक तर दिसतात. पंढरपुरातील होळकरांच्या वाड्याला एकूण चार प्रवेशद्वारे आहेत. पश्चिम दिशेला वाड्याचे मुख्य प्रवेशद्वार असून ते २० ते २५ फूट उंचीचे आहे. या प्रवेशद्वाराचे बांधकाम दगड व विटांचे आकर्षक डिझाईन करुन ते डौलदार बनविले आहे. या प्रवेशद्वाराच्या १५ फुटा पर्यंतच्या बांधकामात दगडी स्तंभ एकामागे एक आल्याने दगडी कप्पे तयार झाले आहेत व वरती आडव्या पद्धतीने विटांचे बांधकाम करून त्यावर कोनाकृती वीटांची नक्षी तयार केलेली आहे. प्रवेशद्वाराचा चौकट व दरवाजा लाकडी स्वरुपाचा असून चौकटीवर सुंदर लाकडामधील बेलबुट्टीचे नक्षीकाम पहायला मिळते. दरवाजाला एकात एक अशा तीन चौकटी दिसून येतात. त्यामुळे प्रवेशद्वार आणखी मजबूत वाटते. प्रवेशद्वारामधली चौकट सपाट असून बाहेरील व आतल्या चौकटीच्या वरील भागात नक्षीकाम

केलेले आहे. वाड्याचे दूसरे प्रवेशद्वार मुख्य प्रवेशद्वाराच्या विरुद्ध दिशेला म्हणजे पूर्वेला असून ते मुख्य प्रवेशद्वारापेक्षा लहान आहे. या प्रवेशद्वारातून पाहिले असता पुढे चंद्रभागा नदीचे दर्शन होते. या प्रवेशद्वाराची उंची साधारणपणे ७ फुट आहे.

वाड्यातील अंतर्गत रचना:

वाड्यातील आतील रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. मुख्य प्रवेशद्वारातून आत आल्यावर प्रवेशद्वाराच्या आतून आगळ लावण्याची जागा आहे. १२५ खनाचा हा वाडा आहे. उत्तर व दक्षिण बाजूस ढाळज असून याचे मोजमाप १० फूट रुंद आणि २५ फूट लांब आहे. या ढाळजेला लागूनच दक्षिणेला राम मंदिराची भिंत येते तर उत्तरेला खोल्या आहेत. त्याला बैठकीची खोली म्हणतात. ढाळजेच्या जोत्याची उंची तीन फूट आहे. पुढे कमान आहे व एक मोठा चौक आहे. कमानीतून आत आल्यावर समोर पूर्व बाजूस आणखी एक प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वाराच्या बाहेरील बाजूस १० X१० च्या दोन-दोन खोल्या आहेत तर आतील बाजूस दगडी कमान आहे. या प्रवेशद्वाराचे जोते देखील तीन फूट इतके उंचीचे आहे. खोल्यांच्या चौकटींच्या ललाटावर काष्ठशिल्पांबरोबरच गणेशमूर्ती देखील कोरलेल्या आहेत.

होळकर वाड्यातील आयताकार चौक:

वाड्याच्या मध्यभागी असलेला भाग म्हणजे चौक होय. चौक वाड्याचा हा महत्त्वाचा भाग आहे. सार्वजनिक-खाजगी जीवन, विविध कार्यक्रम, घरगुती कामे, घरातल्या महिलांचं खाजगीपण आणि हवामान अनुकूलन या सगळ्याच दृष्टीने चौकाची योजना यथायोग्य होती. मध्यवर्ती चौकामुळे हवा आणि प्रकाश खेळता राहायला मदत होत असे. प्रवेशद्वारामधून आत गेल्यानंतर प्रवेशद्वाराच्या समोर ३५ फूट (उत्तर-दक्षिण) व २५ फूट रुंदी (पूर्व-पश्चिम) असलेला आयताकार चौक लागतो.. या चौकाच्या तळमजल्याचा भाग फारसबंदी आहे. चौकाच्या चारी बाजूंनी तीन फूट उंचीचा चौथरा आहे. या दोन्हीच्या मध्ये खालील चौकात दगडी भुयारी गटारांची व्यवस्था केलेली आहे.

होळकर वाड्यातील काष्ठशिल्प:

होळकर वाडा १२५ लाकडी खणाचा आहे. मध्ययुगीन काळात मोठाल्या इमारतीमुळे लाकडी कामास खूप वाव मिळाला.निवासी इमारतीत विविध विभाग लाकडाचावापर लकेला जात असे. असत, त्यात कचेरी, दिवाणखाना, नौबतखाना, खलबतखाना, हमामखाना व दौलतखाना असे अनेक विविध भाग असत. लाकूड हे सजावटीचे बनू लागले. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर उच्चप्रतीचे लाकडी कोरीव काम होवू लागले. या लाकडी कोरीव कामाच्या प्रतीवर एखाद्या वाड्याच्या मालकांची.वतनदारांची, सरदारांची, इभ्रत समाजात ठरू लागली.पंढरपूर येथील होळकर वाड्याच्या सजावटीमध्ये काष्ठशिल्पाचा उपयोग केला आहे. स्तंभ (खांब), हस्त, दरवाजे व चौकटी यावरती लाकडी कोरीव काम अतिशय सुंदर केलेले दिसून येते

वाड्याचा मागील भाग:

होळकर वाड्याचा मागील भाग म्हणजे पश्चिमेकडील जेथून चंद्रभागा नदीचे विशाल पात्र दिसते. या प्रवेशद्वाराला दिंडी दरवाजाही आहे. प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला एक लोखंडी कलात्मकरित्या तयार केलेला जिना आहे. पायऱ्यांचा हा जिना नागमोडी वळणे घेत वरच्या मजल्यावर जातो. या पायऱ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे या जिन्याची प्रत्येक पायरी वेगळी करता येते. एकात एक हुक

अडकविल्याप्रमाणे या पायऱ्या बसविलेल्या आहेत. वाड्याची पश्चिमेकडील तटबंदी नाहीशी झालेली आहे. चंद्रभागेच्या वाळवंटातून या वाड्याचा मागील भाग अतिशय नयनरम्य वाटतो.

होळकर वाड्यातील राम मंदिर:

अहिल्यादेवी होळकर यांनी ज्यावेळेस वाड्याचे बांधकाम सुरू केले त्यावेळी वाड्यामध्ये शिवाचे मंदिर बांधण्याचे ठरविले होते. वाड्याचा पाया खोदत असताना हनुमानाची हात जोडलेली (नमस्कार स्थितीत) मूर्ती सापडल्याने अहिल्याबाई होळकरांनी वाड्यात राम मंदिर स्थापन केले. राम, लक्ष्मण आणि सीता अशा संगमरवरी सुंदर मूर्ती या मंदिरात आहेत. वाड्याच्या दक्षिण बाजूस हे मंदिर आहे. या मंदिराची पूर्व-पश्चिम लांबी २०० फूट पर्यंत असून पूर्वेला रामाचे मंदिर आणि त्याच्या अगदी विरुद्ध दिशेला राम मंदिरा समोर हनुमान मंदिर पश्चिमेस स्थापन केलेले आहे. अहिल्यदेवी होळकर या शिवभक्त होत्या. त्यांनी वाड्यात शिव मंदिर स्थापन करण्यासाठी जी शिवपिंड व नंदी तयार केले होते ते राम मंदिरासमोर उजव्या बाजूला एका कट्ट्यावर ठेवलेले आहेत.या राम मंदिरासाठी दक्षिणेला बाहेरून प्रवेशद्वार ठेवण्यात आले. मुख्य प्रवेशद्वाराच्या वरच्या बाजूला खोल्या आहेत. बाहेरील बाजूंनी पहिल्या मजल्यावरील विटांच्या बांधकामात बांधलेले झरोके खिडक्या दिसून येतात. त्याची कमानयुक्त नक्षीकाम लक्ष वेधून घेते.

खिडक्यांची रचना:

सर्वसाधारणपणे मध्ययुगीन वाड्यामध्ये खिडक्यांची रचना नसे, फक्त लहान झरोखे प्रकाश हवेसाठी सोडले जात. याच्या रचनेमागचा हेतू म्हणजे सुरक्षितता होय.. मुख्य प्रवेशद्वाराच्या वरती साधारणपणे खिडक्या सोडल्या जात असत, त्यास झरोखा दर्शन असे म्हटले जात. होळकरांच्या वाड्याच्या मुख्य प्रवेशद्वाराचा वरचा भाग पडलेला आहे. परंतु त्या जागेत झरोखा दर्शन होते. तसेच त्यालगत या वाड्याच्या ज्या खोल्या आहेत त्या प्रत्येक खोलीतून एक-एक झरोखा दर्शन / खिडक्या आहेत. या खिडक्या बाहेरील बाजूने आकर्षक दिसतात. खिडक्यांच्या दोन्ही बाजूने दोन मातीचे स्तंभ व त्यावर कमान आहे. अशाच प्रकारच्या खिडक्या वाड्याच्या पहिल्या मजल्यावर पूर्व- पश्चिम व दक्षिणेला दिसून येतात.

वाड्यातील स्तंभ ,स्तंभशीर्ष व हस्त:

होळकर वाड्यात प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूला ढाळज व पुढे चौक आहे, ढाळजे मध्ये मजबूत खांबाच्या योजना केलेली आहे. स्तंभ चौकोनी खांब असून मध्यापर्यंत जवळपास साधे आहेत,परंतु सध्या हे खांब बांधकामात झाकले गेले आहेत. वाड्यातील स्तंभांचा प्रभाव या वाड्यातील झरोखा दर्शन/ खिडक्याच्या बाहेरील रचनेत तयार केलेल्या स्तंभावर दिसून येते. सर हे भार सहन करणारे मुख्य घटक आहेतअनेक पारंपरिक फुला-पानांच्या कोरीव कामाने ही खांबे मध्यापासून वर पर्यंत सजविलेले असतात. होळकर वाड्यातील सर अतिशय साधे असून त्यावर कोणतेही नक्षीकाम केलेले नाही.सर नंतर स्तंभशीर्ष येते. स्तंभ व हस्त यांना जोडणारा भाग म्हणजे स्तंभशीर्ष होय. होळकर वाड्यातील स्तंभशीर्षावर अतिशय कलात्मक मण्यांची माळ, कमळाचे फुले, पाने कोरलेली आहेत. त्यामुळे स्तंभाचा, छतांचा भाग आकर्षक दिसतो. होळकर वाड्याच्या स्तंभावरील हस्त एखाद्या कलात्मक पानाचा अर्ध्या भागाप्रमाणे कोरलेले आहेत. या सोबत झुंबर अडकविण्यासाठी गोल लोखंडी कड्याही काही ठिकाणी दिसतात.

तळघरे, भुयारी मार्ग व भुयारी गटारांची योजना:

होळकर वाड्यात दोन तळघरे आहेत. ही तळघरे वाड्याचा दुसरा चौक जो पाठीमागील पश्चिमेकडील प्रवेशद्वारा अगोदर लागतो. त्या चौकाखाली दोन तळघरे आहेत, त्याचे छोटेसे प्रवेशद्वारही तिथे आहे आणि सध्या अडगळीचे सामान ठेवण्यासाठी त्या तळघरांचा वापर केला जातो. या तळघरातूनच अहिल्यादेवी यांना पांडुरंग दर्शनाला जाण्यासाठी एक भुयारी मार्ग तयार केलेला होता असे मानण्यात येते. साधारणपणे ४०० मीटर पर्यंत लांब हा भुयारी मार्ग आहे, परंतु सध्या तो बंद आहे.मानवी वस्ती म्हटले की, सांडपाण्याची व्यवस्था महत्त्वाची असते. होळकर वाड्यामध्ये सांडपाणी वाहून जाण्यासाठी दगडी गटारांची योजना उत्तम स्वरुपाची आजही कार्यरत आहे. स्वयंपाकघरातून तसेच मंदिरातून भुयारी दगडी गटारातून पाणी वाहून मागील चौकात येते . या चौकात पश्चिम बाजूस मागील प्रवेशद्वाराजवळ स्नानगृह व शौचालय बांधलेले आहे.मागील प्रवेशद्वाराखालून बाहेर पर्यंत दगडी गटारे आहेत,वाड्यात पाणीपुरवठा हा चंद्रभागेतून केला जात होता. पश्चिमेला असलेल्या मागील दरवाजा समोरच चंद्रभागा वाहते.

होळकर वाडा जतन व संवर्धन:

पंढरीतील वैभवशाली ऐतिहासिक वाड्याचे महत्व कमी होत आहे. काही वाडे सध्या इतिहासात जमा झाले आहेत.वाडा बांधकामातील वैशिष्ट्ये, रेखीवपणा, हे सारे उमे करणाऱ्या कलाकारांचे कसब या गोष्टी बहुमोलाच्या असतात.होळकर वाडा मध्ययुगीन काळातील वैभवशाली इतिहास व वाडा स्थापत्य कलेचा वारसा आहे.पंढरपूर येथील माहाद्वार पोलिस चौकी ते महाद्वार घाट रस्ता कॉक्रिटीकरण व रंदीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात सादर करण्यात आला आहे. रस्ता रुंदीकरणामुळे रस्त्यावर असलेल्या होळकर वाडयाचा काही भाग बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. होळकर वाडा ही ऐतिहासिक वास्तू आहे. रस्ता रुंदीकरण केल्यास होळकर वाड्यातील राम मंदिर व मारुती मंदिर देखील पाडावे लागणार आहे ऐतिहासिक वाड्याचे जतन करण्याच्या हेतूने .पंढरपुरातील स्थानिक जनता व ऐतिहासिक वाड्याचे वारसदार व व्यवस्थापक यांनी माऊली कॅरीडोरला विरोध केला आहे. या संदर्भात ३०/०६/२०२२ रोजी पंढरपुर येथे विधानपरिषद उपसभापती मा.निलमताई गोऱ्हे मॅडम यांना ऐतिहासिक होळकर वाडा,आणि शिंदे सरकार वाडा वाचविण्यात यावा यासाठी-तीर्थक्षेत्र विकास आराखडा पंढरपूर यातील नव्याने समाविष्ट केलेले काम क्र.१३ रद्द करण्यात यावे असे निवेदन राष्ट्रीय समाज पक्षाचे वतीने दिले. पंढरपूर तीर्थक्षेत्र सुधारित विकास आराखडा राबवताना ऐतिहासिक वास्तू जतन करणे गरजेचे आहे. या कामाच्या वेळी जर ऐतिहासिक होळकर सरकार वाड्याची एक वीट जरी हलविली तर राज्यभर आंदोलन होईल, असा दिला गेला. तसेच होळकर वाड्याचे व्यवस्थापक श्री आदित्य फत्तेपूरकर,इतिहास संशोधक राहुल वावरे,राजाभाऊ लांडे यांनी वाडा हा ऐतिहासिक वास्तु व मराठा कालीन स्थापत्य कलेचा वारसा आहे या अनुषंगाने पुरातत्व विभाग कडे अनेक पुरावे सादर केले.दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजी पुरातत्व विभागाने सोलापूर कलेक्टर ऑफिसला वाड्याचे जतन व संरक्षण करण्याचे आदेश दिले आहेत.

सारांश:

पंढरपूर हे महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील एक महत्वपूर्ण तीर्थक्षेत्र आहे. पंढरी नगरीला अतिशय प्राचीन वारसा व अध्यात्मिक, सामाजिक अधिष्ठान लाभले. काही वर्षात महाराष्ट्रातील एक धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून

देखील पंढरपूर नावारूपास आलेले आहे.पंढरपुरात अनेक प्राचीन व मध्ययुगातील ऐतिहासिक वास्तू आहेत. येथील ऐतिहासिक वास्तू पाहण्यासाठी ही अनेक पर्यटक पंढरपुरात येतात. पंढरपुरातील पुरातन ऐतिहासिक वास्तू पंढरपूरच्या वैभवामध्ये भर टाकणाऱ्या आहेत.रा मध्ययुगीन कालखंडात पंढरपुरात निर्माण झालेले ऐतिहासिक वाड्यांचे जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे.राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी वास्तव्य केलेला सुमारे २५८ वर्ष पेक्षा जास्त वर्षे पुरातन असणारा होळकरवाडा पंढरपूर येथील महाव्दार परिसरातील ही ऐतिहासिक वास्तू आहे. हा वाडा, त्यांचे स्थापत्य, वाड्याशी संबंधित घराण्याचा संदर्भ इतिहास, त्यांची गावे, घराण्यांकडे असलेल्या वस्तू, त्यांनी बांधलेल्या वास्तू, काही प्रचलित आख्यायिका, नातेसंबंध व परंपरा, यांची ओळख करून घेण्यात महत्वाचा ठरतोअसे दिसते. या ऐतिहासिक वाड्याचे जतन करण्याच्या हेतूने पंढरपुरातील स्थानिक जनता व ऐतिहासिक वाड्याचे वारसदार व व्यवस्थापक यांनी माऊली कॅरीडोरला विरोध केला आहे. पंढरपुरातील ऐतिहासिक वाड्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी स्थानिक जनता ,स्थानिक प्रशासन व राज्य प्रशासनाने ही प्रयत्न करणे आवश्यक आहे. पंढरपुरातील ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याच्या कार्यात यश आले तर पुनश्च एकदा पंढरीचे जुने ऐतिहासिक वैभव अनुभवता येईल

संदर्भ साधने:

१) खडपेकर विनिया ,ज्ञात -अज्ञात अहिल्याबाई होळकर ,राजहंस प्रकाशन, पुणे

२) डेंगळे सुमंत ,ऐतिहासिक वाढे आणि घराणे, सकाळ प्रकाशन ,पुणे

३) जहागीरदार विजया, महाराष्ट्राचे शिल्पकार तेजस्विनी अहिल्याबाई होळकर, प्रकाशक सचिव महाराष्ट्र, राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, द्वितीय आवृत्ती २००५

४) जवळेकर अरविंद, लोकमाता अहिल्याबाई, प्रभात प्रकाशन, ४/१९ आसफअली रोड, नई दिल्ली ,२००२

५) प्रा. जाधव अर्जुन बळीरामजी,लोकमाता अहिल्याबाई होळकर, ,लोकायत प्रकाशन, सातारा, जुलै २०२२

६) माटे म.श्री,मराठा स्थापत्य , पुणे विद्यापीठ. १९५९

७) डॉ. शिवदे सदाशिव ,महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे -१ स्नेहल प्रकाशन पुणे ,२०१३

मुलाखती :

१) ॲड.आशितोष अनिलराव बडवे. पंढरपूर शहर अभ्यासक,सोमवार दिनांक- ०९-०२-२०२६

२) श्री,आदित्य फत्तेपुरकर, व्यवस्थापक होळकर वाडा, पंढरपूर, गुरुवार दिनांक-१२-०२-२०२६

३) ॲड. धनंजय रानडे. प्राचीन पंढरपूर अभ्यासक, सोमवार दिनांक-१६-०२-२०२६

वृतपत्रे:


१) दैनिक, सकाळ -२९ /०६/२०२२

२) दैनिक,दिव्य मराठी -३०/०९/२०२२

छायाचित्रे



श्रीमंत होळकर वाडयातील लाकडी खांबावरील आयताकृती चौक



श्रीमंत होळकर वाडा,पंढरपूर प्रवेशद्वार



श्रीमंत होळकर वाडयातील पुण्यश्लोक होळकर यांचे स्मारक

दिव्य मराठी सोलापुर जिल्हा पुल आउट 30-09-2022

तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. परवाना काढण्यासाठी मन मानेल तसे पैसे वसूल केले जात आहेत. कादण्यास बंदी घालावी. अशी मागणी करण्यात आली आहे. निघाले होते. तालुका पोलिसांत माने यांनी फिर्याद दिली आहे. होता. मंगळवारी खालेल्या ग्रामस्थ

होळकर वाड्याची वीट हालली तरी आंदोलन

पंढरीत वाडा बचाव समितीचा इशारा, विकास करतानादेखील ऐतिहासिक वास्तू जतन करण्याची मागणी

प्रतिनिधी | पंढरपूर

पंढरपूर तीर्थक्षेत्र सुधारित विकास आराखडा राबवताना ऐतिहासिक वास्तू जतन करणे गरजेचे आहे. या कामाच्या वेळी जर ऐतिहासिक होळकर सरकार वाड्याची एक वीट जरी हलविली तर राज्यभर आंदोलन होईल, असा इशारा होळकर वाडा बचाव समितीने दिला आहे.

पंढरपूर येथील महाद्वार पोलिस चौकी ते महाद्वार घाट रस्ता काँक्रिटीकरण व रुंदीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात सादर करण्यात आला आहे. यामुळे या रस्त्यावर असलेल्या होळकर वाड्याचा



काही भाग बाधित होणार आहे. हे वैठक घेण्यात आली. या बैठकी स्पष्ट झाल्यानंतर या ऐतिहासिक दरम्यान होळकर वाडा बचाव समिती वाड्याच्या अस्तित्वाला धोका निर्माण निर्माण करण्यात आली. या समितीच्या झाला आहे. गुरुवारी याच होळकर अध्यक्षपदी अर्जुन सलगर यांची निवड वाड्यामध्ये धनगर समाजबांधवांची करण्यात आली आहे.

होळकर सरकार वाड्याचे व्यवस्थापक अदित्य फत्तेपूरकर म्हणाले, होळकर वाडा ही ऐतिहासिक वास्तू आहे. रस्ता रुंदीकरण केल्यास होळकर वाड्यातील राम मंदिर व मारुती मंदिर देखील पाडावे लागणार आहे. यावेळी संतोष सुळे, अर्जुन सलगर, राज्य मागासवर्ग आयोग सदस्य प्रा. लक्ष्मण हाके, सुरेश कांबळे, डॉ.मारुती पाटील, गणपतराव वाघमोडे, शिवाजीराव पाटील, दादासाहेब काळे, बाळासाहेब किसवे, परमेश्वर कोळेकर, गणपतराव वाघमोडे, कृष्णदेव वाघमोडे, शिवराज पुकळे, सतीश कुलाळ, विठ्ठल पाटील, शालिवाहन कोळेकर आदी उपस्थित होते.

दिव्य मराठी ३०/०९/२०२२

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

पुण्यशोल्क अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन व कार्य

प्रा. अस्मिता देविदास गायकवाड

इतिहास विभाग,

रत्नाई महाविद्यालय, राजगुरुनगर ता - खेड, जि – पुणे.

Corresponding Author – प्रा. अस्मिता देविदास गायकवाड

DOI - 10.5281/zenodo.19658566

प्रस्तावना:

महाराष्ट्राच्या इतिहासात अत्यंत थोर आणि महान कर्तृत्ववान स्त्रियांचा वारसा लाभलेला आहे. पुरुष प्रधान संस्कृती असताना, समाजात स्त्रियांना दूय्यम स्थान असताना आपला ठसा उमठवणाऱ्या अनेक पराक्रमी स्त्रियांपैकी एक म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर "ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकभिमुख राजा, बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षरात केला जातो. अशा पुण्यश्लोक, लोकमाता म्हणजे , अहिल्याबाई होळकर' [१] या भारतातील सर्वात दूरदर्शी महिला शासकांपैकी एक मानल्या जातात. त्यांचे जीवन आणि शासन ते लोककल्याणासाठी समर्पित होते. लोकांनी त्यांना नेहमीच लोकमाता म्हणून पाहिले." ब्रिटिश इतिहासकार जॉन केयस यांनी त्याना फिलॉसॉफर क्वीन हि उपाधी दिली". [२] अशा या महान क्रांतिकार स्त्रीचा जीवन प्रवास अभ्यासणे अत्यंत महत्वाचे आहे.

अहिल्याबाईचा जीवन प्रवास:

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म दिनांक ३१मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्हयातील चौंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे आणि आई सुशिला शिंदे यांच्या पोटी एक धनगर कुटुंबात झाला. अहिल्याबाई लहानपणापासुनच हजरजबाबी आणि चुणचुणीत असल्याचे दाखले मिळतात. त्यांच्या चुणचुणीत स्वभावाला पाहूनच मल्हारराव होळकरांनी आपला मुलगा खंडेराव होळकर याच्याशी १७३३ साली अहिल्याबाईचा विवाह लावून दिला. याप्रसंगी अहिल्याबाई फक्त नऊ वर्षाच्या होत्या.विवाहा नंतर होळकर घराण्यात अहिल्याबाई चे शिक्षण आणि राज्यकारभाराची तालीम सुरु झाली

पेशवाई मध्ये मल्हाररावांना मावळ प्रांतातील सर्व परगण्यांचा अधिकार मिळाला होता मराठ्यांची सत्ता स्थापन करण्यासाठी पेशव्यांनी जहागिरी आणि वतनदारी दिली होती तर १७३४ मध्ये होळकर राज्याची रितसर स्थापना झाली होती". [३] होळकरांना वंशपरंपरेत चालणारी वतने , परगणे आणि इनाम मिळाल्याने राजकारभाराचा पसारा वाढू लागला होता.

राज्यकारभारातील सहभाग:

अहिल्याबाई चे सासरे मल्हारराव हे सतत मोहिमांवर असत तेव्हा राज्यकारभाराची सर्व जबाबदारी अहिल्याबाईवर पडत असे कारण त्यांचे पती खंडेराव हे विलासी आणि व्यसनी प्रवृत्तीचे होते. याचे शल्य

मल्हाररावांना होते मल्हारराव नेहमी म्हणत "आम्ही तलवार गाजवतो ती सुनबाईच्या भरवशावर, "मार्तंडा नेच हे रत्न आम्हास दिले". [४] असे उद्‌गार ते काढत. या काळात अवघ्या वीस बावीस वर्षाच्या अहिल्याबाई कुशल प्रशासक म्हणून नावारूपाला आल्या होत्त्या, याची इतिहास नोंद घेतो.

रोज फडणविसीत जाणे, हिशोब बघणे, वसूल जमा करणे. त्यासाठी माणसे पाठवणे. फौजा तयार ठेवणे, खासगी उत्पन्न आणि सरकारी उत्पन्न रोखठोक पणे वेगवेगळे ठेवणे, गोळा - बारुद, बाणभाते ढाली, तलवारी नेहमी सज्ज ठेवणे. यासारखी सर्व कामे स्वतः जातिनिहाय अहिल्याबाई पाहत असत. त्यामुळे राज्यकारभारची भिस्त राखेल असा जबाबदार वारसदार मल्हाररावाना अहिल्याबाईच्या रूपाने दिसत होता.

अहिल्याबाई या अंत्यंत निपक्ष आणि न्याय्य बुद्धीने वागणाऱ्या होत्या. त्यांचे पती खंडेराव यांचा राजमहाल येथील लढाईत पराभव झाला. पण येताना त्यांनी बरीच लुट आणली ही लूट सरकारी कार्यालयात वजने न करता ते वाड्यावर घेवून गेले. या विषयी अहिल्याबाईनी खंडेरावांना हा गुन्हा असल्याचे सांगत जाब विचारला होता. तेव्हा खंडेरावांनी उत्तरादाखल "ही लुट आमच्या मनगटाच्या जोरावर आणली आहे असे सांगितले तेव्हा अहिल्याबाईनी खडे बोल सुनावले "स्वामी जी सुभेदारी भोगतात त्यांची मनगटे रयतेसाठी असतात. आपण सुभेदारांचे वारस आहोत, चोर पैंढारी नव्हेत. ही लूट निमूटपणे सरकारजमा करा. आणि उरलेल्याचा उपभोग घ्या. अन्यथा मला झडती साठी कारभारी पाठवावे लागतील".[५] असे सुनवून अहिल्याबाईनी ती लुट सरकारच्या हवाली केली.

स्त्री शिक्षण व सबलीकरण्यासाठी कार्य:

१७ व्या शतकात त्यांनी महिलांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेतला. फक्त लिहिल्या-वाचण्या पुरतेच शिक्षण मर्यादित न ठेवता त्यांनी मुलीना युद्ध प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. तसेच महिलांची एक फौज उभी केली. असे असले तरी त्यांना सतीसारख्या प्रथाना अतिशय जवळून तोंड द्यावे लागले. अहिल्याबाई नी स्त्री शिक्षणा बरोबर समाजातील जातिभेद देखील दूर करण्याचे कार्य केलेले आढळते त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनी आपल्या मुलीचा विवाह दरोडे खोरांपासून समाजाचे रक्षण करणाऱ्या मुलाशी करून दिला. ते पण त्याचे कर्तृत्व पाहून ना कि जात पाहून अशा या आहिल्याबाई होळकर काळाच्या पुढचा विचार करणाऱ्या होत्या. सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक क्षेत्तात त्यांचे योगदान महत्वाचे ठरते. याकाळात विधवा महिलांची स्थिती दयनीय होती, त्याहून "अपत्यहिन विधवा असेल तर तिची संपत्ती सरकारजमा होत असे अशा विधवाना मूल दत्तक घेण्याचा अधिकार आणि पारिवारिक संपत्तीची आपल्या इच्छे नुसार उपयोग करण्याचा अधिकार दिला".[६] म्हणूनच आहिल्याबाई म्हणजे आजच्या काळातील मुली आणि स्त्रीयांसाठी एक अनुकरणीय रोल मॉडेल ठरतात. स्रियांचे आर्थिक स्वयंपूर्णता हे मूलगामी तत्व त्यांनी सहज स्विकारले होते. त्याची कसून अंमलबजावणी करण्याचे असामान्य धैर्य त्यांनी दाखवले होते.

आर्थिक सुधारणा:

राज्याची अर्थस्थिती चांगली नसेल तर ते राज्य नेहमी दुर्बल आणि परजिवी असते. आर्थिक स्वयंपुर्णता हा राज्य, समाज व व्यक्तिजीवनाचा महत्वपुर्ण निकष आहे. त्या काळात उद्योग, शेती, व्यापार व उत्पादन हे धन कमवण्याचे इतर ही मार्ग शोधले होते. त्याचा वापर केला होता.

अहिल्याबाईनी आपली राजधानी १७६७ मध्ये इंदोरहून महेश्वरला हलवली आणि तिही अल्पावधीतच विकसित केली तिथे त्यांनी विणकर समाजाला आणुन वसविले".[७] "युद्धात कामी आलेल्या सैनिकांच्या विधवा पत्नी व परिवाराच्या चरितार्थीसाठी त्यांना विणकरीचे प्रशिक्षण दिले. त्यासाठी बनारसी विणकराना बोलावले आणि महेश्वरता वस्त्र उत्पादन सुरू केले. त्यातून 'माहेश्वरी ' हा ब्राण्ड बनला. जो आज ही महिला वर्गामध्ये मोठ्या प्रमाणावर आवडला जातो".[८] "आज स्व-सहायता समूह लोकप्रिय आहे विणकरांच्या, कारागिरांच्या किंवा महिलांच्या सहकारी संस्था केल्या जातात ही प्रागतिक कल्पना अहिल्याबाईनी महेश्वरमध्ये १८ व्या शतकात यशस्वीपणे अंमलात आणली"[९] अशा प्रकारच्या अनेक अभिनव कल्पनांच्या जनक अहिल्याबाई होत्या.

शेती व शेतकऱ्यासाठी सुधारणा :

भारतात आर्थिक व्यवस्था नेहमीच शेतीप्रधान राहिलेली आहे आजकाल आधुनिक कृषि कायदयांच्या अंतर्गत शेतमाल कुठेही विकायला परवानगी मिळावी अशी मागणी केली जाते ती सुविधा अहिल्याबाईगी १८ व्या शतकात लोकांना दिली होती. आहिल्याबाई यांनी या काळात शेती लाभदायक होण्याचे एक महत्वाचे कारण होते त्यांचे पाणी व्यवस्थापन खासगी उपयोगासाठी वेगळे स्त्रोत हे नियोजन फायद्याचे ठरले. त्यांनी पशुपक्षासाठी राखीव शेत ठेवण्याची योजना राबवली. त्यामुळे उभ्या शेतात धाड घालून शेत फस्त करण्याच्या घटना टळल्या भाणि त्याचा शेतक-यांना फायदा झाला.

सार्वजनिक वनीकरण वृक्षारोपण आणि संरक्षित वनांची त्यांनी परिकल्पना लढवली त्याचा परिणाम म्हणजे एकाच वेळी पर्यावरणावर आर्थिक , सामाजिक व सांस्कृतिक असा झाला!" त्यांनी भूमिहीन शेतकऱ्यांना जमीन कसायला दिली त्यांना भूमिगत जलाचा स्तर वाढवणाऱ्या वृक्षांची लागवड करायला सांगितली ज्यात प्रामुख्खाने वड, पिंपळ आंबा, औदुम्बर अशा जास्तीत जास्त फळ झाडांचा सामावेश केला होता याला "नौ ग्यारह कानून लावला"[१०] लावलेल्या २० झाडांपैकी नऊ झाडांचे उत्पन शेतकऱ्याने स्वतःकडे ठेवायचे अकरा झाडाचे उत्पन्न सरकारकडे जमा करायचे यातून सरकारचेही उत्पन्न वाढत होते आणि लोकांचेही हित साध्य होत होते "आज ज्याला Public private Participation (PPP) म्हटले जाते त्या प्रशासन व व्यक्ती सहकार्य कल्पनेचा पाया अहिल्याबाईनी रचला होता हे आपण सार्थ अभिमानाने म्हणू शकतो.[११]

शेतीबरोबरच त्यांनी माळवा प्रांत हे मध्यवर्ती स्थान असल्याचा फायदा करून घेतला. त्या काळात होळकर राज्याला जकात किंवा वाहतूक कर मधून चांगले उत्पन होत होते. याचे श्रेयदेखील अहिल्या बाईच्या दूरदर्शीपणाला आणि न्यायप्रवणतेला जाते. जनतेच्या आर्थिक संपन्नतेसाठी अनेक नवे प्रयोग आणि नव्या कल्पना अहिल्याबाईनी अंमलात आणल्या.

सर्वधर्म समभावाचे कार्य:

अहिल्याबाई होळकर या सर्वधर्मसमभाव बाळगणाऱ्या होत्या त्यांनी मंदिरांचा जीर्णोद्धार तर केलाच परंतु मशिदी, दर्गे आणि विहार यांचेही बांधकाम पूर्ण केले . अनेक मंदिरांची पडझड झाली होती. त्या मंदिरांच जीर्णोद्धार केला, रस्ते, महारस्ते पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले राज्यातील यशवंतराव फणसे या बहादुरासोबत स्वतःच्या एकुलत्याएक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला त्यांनी धार्मिक रूढी परंपरांना न स्वीकारता एकच धर्म पाळला तो म्हणजे मानवताधर्म.

राजनीतिज्ञ अहिल्याबाई:

मल्हारारावांच्या मृत्युनंतर पेशवा रघुनाथराव याला होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला , त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेवूण इंदोरवर चढाई केली ही बातमी अहिल्याबाई होळकरांना कळताच त्यांनी रघुनाथरावांला खलिता पाठवला त्यात त्या म्हणतात "आपण माझे राज्य हिरावून घेण्यासाठी कपट रचून आलात आमच्याकडील फितुरास गाठलेत .मला दुबळी समजलात की खुळी . दुखात बुडालेल्यास अधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू आहे आता आपली गाठ रणांगणात पडेल .माझ्याबरोबर युद्धात पारंगत असलेल्या स्त्रियांची फौज असेल , मी हरले तर कीर्ती करून जाईल .पण आपण हरलात तर तोंड दाखवायला जागा उरणार नाही "म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे ''[१२] अशा प्रकारे पेशव्यांना आव्हान देणारी लखलखती वीज म्हणजे अहिल्याबाई होळकर होत्या.अशा शुरवीर अहिल्याबाई होळकर यांच्यावर मात्र त्यांचे पती खंडेराव होळकर यांच्या मृत्यूने दुःखाचा डोंगर कोसळला. कुम्भेरी येथील लढाईत त्यांचा मृत्यु झाला तेव्हा अहिल्याबाई होळकर अवघ्या २८ ते २९ वर्षाच्या होत्या त्या वेळी त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई ही दोन अपत्ये होती त्या वेळच्या प्रथे प्रमाणे त्या सती जायला निघाल्या होत्या पण त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांनी मात्र या गोष्टीस नकार दिला. पुत्रवियोग तर होताच परंतु प्रजाहितासाठी तुम्ही सती जाऊ नये. तुम्हास हे राज्य सांभाळावयाचे आहे या शब्दांत त्यांनी अहिल्याबाईंची समज काढली आणि त्यांना सती जाण्या पासून परावृत्त केले. आपल्या सासर्यांच्या सासऱ्याच्या इच्छेचा त्यांनी मान राखला आणि सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्यावेळी मोहिमेवर असत, तेव्हा स्वत. अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख करीत असत आणि मल्हारारावांच्या सल्ल्यानुसार वागत असत. अशातच अहिल्याबाईचे पुत्र मालोजीराव यांना जरी सुभेदारी मिळाली असली तरीही ती सांभाळण्याची त्यांच्यात कुवत नव्हती, लवकरच त्यांचे देहावसान झाले अहिल्याबाई आता खऱ्या अर्थाने राज्यकर्ती झाल्या पुढील अठ्ठवीस वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. तिजोरीत भर घालीत त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले .

सारांश:

थोडक्यात सांगायचे तर महिलांसाठी अतिशय खडतर असलेल्या काळात अहिल्याबाई होळकर यांच्यासारखे रत्न या देशाच्या इतिहासात अजरामर झाले .त्यांची युद्धकला, प्रशासन पद्धती, धर्मनिरपेक्षता, जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न, नौ ग्यारह पद्धती, मंदिरांचे जीर्णोधार, प्रवाशासाठी पाणपोई, माशासाठी कणकेचे गोळे इतका बारीक विचार करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या एकमेवच मध्यम उंचीची, सावल्या वर्णाची डोक्यावर पदर असलेली ही एक महान कर्तुत्ववान स्त्री विचाराने फार उंच होती हे त्यांचा जीवन प्रवासच सांगतो .वयाच्या ७० व्या वर्षी १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आणि एका महान ज्योतीचा शेवट झाला.

संदर्भ:

१. स मा गर्गे संपादित , मराठी रियासत, पृष्ठ क्र.१६
२. विजया जहागिरदार, कर्मयोगीनी अहिल्याबाई होळकर, पृष्ठ क्र.२८
३. स मा गर्गे संपादित, कित्ता रियासत, पृष्ठ क्र.१८
४. विजया जहागिरदार, कित्ता, पृष्ठ क्र.३०
५. स मा गर्गे संपादित , मराठी रियासत, पृष्ठ क्र.२३

६. अजित पाटील , जनकल्याणी अहिल्याबाई होळकर, पृष्ठ क्र.१९

७. Chaurasia R.S, History of Maratha, Atlantic Publication 2004.

८. Malcolm John, A memoir Central India, (Vol – I)

९. डॉ छाया जाधव , अनमोल स्ती रत्ने, पृष्ठ क्र.५१

१०. Khanolkar D.D, Marathawada University Journal (Vol-17-18)

११. विनया खडपेकर ,ज्ञात – अज्ञात अहिल्याबाई होळकर , पृष्ठ क्र.२३

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

पुण्यश्लोकी अहिल्याबाई होळकर: प्रशासन आणि जनकल्याण कार्य (त्रिशताब्दी वर्ष)

सौ. कविता विजय कुपवाडे

संशोधक विद्यार्थिनी

Corresponding Author – सौ. कविता विजय कुपवाडे

DOI - 10.5281/zenodo.19658586

प्रस्तावना:

इ.स. १७२५ मध्ये जन्मलेल्या अहिल्याबाई होळकर यांची त्रिशताब्दी (३०० वे जन्मवर्ष) साजरी होत असताना त्यांच्या प्रशासनिक कार्याचा आणि जनकल्याणकारी धोरणांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. मराठा साम्राज्यातील होळकर घराण्याच्या इतिहासात अहिल्याबाईंचे स्थान अद्वितीय आहे. त्यांनी स्त्री नेतृत्वाचे एक आदर्श उदाहरण निर्माण केले.

इतिहासामध्ये अनेक महापुरुषांचे कर्तृत्व आपल्याला पाहायला मिळते; परंतु त्याचबरोबर काही स्त्रियांनीही आपल्या अद्वितीय कार्याने इतिहासात अजरामर स्थान मिळवले आहे. पुरातन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत स्त्रियांनी विविध क्षेत्रांत आपले सामर्थ्य सिद्ध केले आहे. त्या महान स्त्रीपुरुषांमध्ये अहिल्याबाई होळकर यांचे कर्तृत्व विशेष महत्त्वाचे ठरते.

अहिल्याबाई या केवळ बुद्धिमान आणि दूरदृष्टी असलेल्या शासक नव्हत्या, तर प्रसंग पडल्यास तलवार हाती घेऊन पराक्रम गाजवण्याची त्यांच्यात हिंमत होती. त्यांचा देह स्त्रीचा असला तरी मनगटात अपार धैर्य आणि सामर्थ्य होते. संकटसमयी त्यांनी राज्यकारभार अत्यंत समर्थपणे सांभाळला आणि आपल्या शौर्य, संयम व कर्तव्यनिष्ठेने लोकांच्या मनात आदर निर्माण केला.

अहिल्याबाई यांनी आपल्या आचरणातून प्रजेसमोर एक उच्च आदर्श ठेवला. त्या शिस्तबद्ध, कर्तव्यदक्ष आणि कडक प्रशासक होत्या; परंतु प्रजेशी वागताना त्यांनी कधीही अतिरेक केला नाही. त्यांच्या कारभारात न्याय, समता आणि माया यांचा सुंदर समन्वय दिसून येतो. प्रजेसोबत त्यांचा व्यवहार नेहमीच ममतेचा आणि जिव्हाळ्याचा राहिला.

भारतीय इतिहासात अनेक महापुरुषांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे; त्याचप्रमाणे काही स्त्रियांनीही आपल्या कार्यामुळे सुवर्णाक्षरांनी नाव कोरले. त्या परंपरेतील तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोकी अहिल्याबाई होळकर. धर्म आणि राजकारण यांचा समतोल साधत त्यांनी सुमारे तीस वर्षे होळकर राज्य समर्थपणे सांभाळले. त्यांचे नेतृत्व, दानशूरपणा, न्यायनिष्ठा आणि लोककल्याणाची तळमळ यांमुळे त्या केवळ राजमाता न राहता 'लोकमाता' ठरल्या.

उद्दिष्टे:

1. अहिल्याबाई होळकर ऐतिहासिक पार्श्वभूमी एक अभ्यास.
2. अहिल्याबाई होळकर प्रशासन व्यवस्था अभ्यास करणे.

3. अहिल्याबाई होळकर यांचे जनकल्याणाचे कार्य एक अभ्यास.
4. त्रिशताब्दी वर्षाचे महत्त्व एक अभ्यास

अहिल्याबाई होळकर ऐतिहासिक पार्श्वभूमी एक अभ्यास:

होळकर घराण्याचा पाया अठराव्या शतकाच्या सुरुवातीला मल्हारराव होळकर यांनी घातला. ते मूळचे धनगर समाजातील होते. आपल्या शौर्य, धाडस आणि लष्करी कौशल्याच्या बळावर त्यांनी मराठा सेनेत महत्त्वाचे स्थान मिळवले.

त्यांनी उत्तर भारतातील मोहिमांमध्ये मोठा पराक्रम गाजवला.दिल्ली, राजपूताना आणि मालवा प्रदेशात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी मोठा वाटा उचलला.त्यांच्या कार्यकुशलतेमुळे त्यांना मालवा प्रांताची जबाबदारी देण्यात आली.मराठा साम्राज्याचे प्रधान असलेल्या पेशव्यांनी मल्हाररावांवर विश्वास ठेवून मालवा प्रांतातील महसूल व लष्करी अधिकार दिले.यामुळे होळकर घराण्याची सत्ता अधिक मजबूत झाली.

मल्हाररावांनी इंदूर येथे आपली राजधानी स्थापन केली. पुढे इंदूर हे होळकरांच्या राज्याचे मुख्य केंद्र बनले.राजवाडा (इंदूर) हा त्यांच्या सत्तेचा प्रतीकात्मक केंद्रबिंदू होता.प्रशासन, महसूल व्यवस्था आणि लष्करी संघटन यांमध्ये त्यांनी शिस्त आणली.

होळकर घराणे हे मराठा साम्राज्यातील एक बलाढ्य आणि प्रभावी घराणे होते. मल्हारराव होळकर यांच्या पराक्रमामुळेच इंदूर संस्थानाची स्थापना झाली आणि पुढे अहिल्याबाई होळकरांसारख्या आदर्श राज्यकर्त्या या घराण्यातून घडल्या.

अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी (जि. बीड) या छोट्याशा गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मानकोजी शिंदे आणि आईचे नाव सुशिलाबाई होते. वडील सात्विक व धार्मिक वृत्तीचे होते; गरिबांना मदत करणे हा त्यांचा स्वभाव होता. आई विनयशील व कर्तव्यदक्ष गृहिणी होत्या. धार्मिक व संस्कारी वातावरणात वाढ झाल्यामुळे अहिल्याबाईंच्या मनात लहानपणापासूनच धर्मनिष्ठा, करुणा व कर्तव्यभावना रुजली.

मालवा प्रदेशातील होळकर घराण्याचे संस्थापक मल्हारराव होळकर यांनी अहिल्याबाईंच्या गुणांची दखल घेत त्यांचा विवाह १७३३ मध्ये आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी लावला.खंडेराव सुरुवातीला व्यसनी व राजकारभारापासून दूर होते; परंतु अहिल्याबाईंच्या सुसंस्कृत व प्रेरणादायी स्वभावामुळे त्यांच्या वर्तनात बदल झाला. त्यांनी राजकारभारात लक्ष घालण्यास सुरुवात केली.

मल्हारराव होळकर हे होळकर घराण्याचे संस्थापक होते. आपल्या पराक्रम, शौर्य आणि निष्ठेमुळे त्यांनी मराठा साम्राज्यात महत्त्वाचे स्थान मिळवले आणि पुढे ते सरदार झाले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे होळकर घराण्याची सत्ता मालवा प्रदेशात दृढ झाली.

अहिल्याबाई होळकर यांचा विवाह मल्हाररावांच्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी झाला. सुरुवातीला खंडेराव काही दुर्गुणांमुळे व व्यसनांमुळे राजकारभारापासून दूर होते; परंतु अहिल्याबाईंच्या सुसंस्कृत, सुशील आणि विनम्र आचरणामुळे त्यांच्या स्वभावात सकारात्मक बदल झाला. त्यांनी खंडेरावांना शूरवीरांच्या कथा सांगून कर्तव्याची जाणीव करून दिली. परिणामी खंडेरावांनी राजकारभारात लक्ष घालण्यास सुरुवात केली आणि मल्हाररावांच्या कार्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला.

खंडेराव आणि अहिल्याबाई यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. इ.स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या युद्धात खंडेराव वीरमरण पावले. या घटनेमुळे

अहिल्याबाईंना अकाली वैधव्य आले. त्या सती जाण्याचा विचार करीत होत्या; परंतु मल्हाररावांनी त्यांना रोखले. सासऱ्यांच्या विनंतीला आणि लोकहिताच्या विचाराला मान देऊन अहिल्याबाईंनी सती न जाण्याचा निर्णय घेतला—हा त्यांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि धैर्याचा क्षण होता.

मल्हाररावांच्या निधनानंतर संपूर्ण राज्यकारभाराची धुरा अहिल्याबाई होळकर यांच्या हातात आली. त्यांनी अत्यंत कुशलतेने, संयमाने आणि न्यायनिष्ठेने राज्यकारभार सांभाळला. प्रशासन, न्यायव्यवस्था आणि प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक सुधारणा केल्या.लष्करी कामगिरीसाठी त्या प्रामुख्याने तुकोजी होळकर यांना पाठवत असत. तुकोजी होळकर हे अत्यंत शूर, पराक्रमी आणि कर्तव्यनिष्ठ सेनानी होते. त्यांनी मल्हारराव होळकर यांच्या सहवासात राहून लष्करी डावपेच, रणनिती आणि प्रशासन यांचा मौल्यवान अनुभव घेतला होता.

तुकोजी होळकर हे अहिल्याबाईंच्या आज्ञेनुसारच वागत असत. त्यांच्या मर्जीविरुद्ध त्यांनी कधीही वर्तन केले नाही. त्यांची निष्ठा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यभावना यामुळेच त्यांना मल्हाररावांचे 'मानसपुत्र' मानले जात असे.

खंडेरावांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अहिल्याबाईंनी कुंभेरी येथे त्यांचा स्मारक उभारला. पतीच्या निधनानंतर मल्हाररावांनी राज्यकारभाराची व दौलतीची जबाबदारी अहिल्याबाईंवर सोपवली. याच टप्प्यापासून त्यांच्या प्रभावी आणि लोकाभिमुख नेतृत्वाची सुरुवात झाली.

खंडेरावांच्या निधनानंतर मल्हाररावांनी राज्यकारभाराची जबाबदारी अहिल्याबाईंवर सोपविली. १७६६ मध्ये मल्हाररावांचे निधन झाले. अहिल्याबाईंना एक मुलगा होता त्याचे नाव मालेराव असे होते तसेच त्यांना एक मुलगी होती तिचे नाव मुक्ताबाई असे होते.

मालेराव होळकर हे मल्हारराव होळकर यांचे नातू आणि अहिल्याबाई होळकर यांचे पुत्र होते. ते होळकर घराण्याचे वारसदार म्हणून ओळखले जातात.

मालेराव हे लहानपणापासूनच पराक्रमी व धाडसी होते.त्यांच्या उत्कृष्ट तलवारबाजी कौशल्यामुळे मल्हारराव प्रभावित झाले होते.त्यांच्या शौर्याच्या गौरवार्थ इ.स. १७६१–६२ मध्ये सुलतानपूरची जहागीर त्यांना बहाल करण्यात आली.

पेशव्यांनी सोपविलेली कामे त्यांनी निष्ठेने पार पाडली.लष्करी तसेच प्रशासकीय कार्यात त्यांनी आपली क्षमता दाखवून दिली.परंतु पुढील काळात मालेराव मानसिक दृष्ट्या अस्वस्थ झाले.आजारपणामुळे ते चार महिने झोपू शकले नाहीत, अशी नोंद आढळते.अखेरीस इ.स. १७६७ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

मालेरावांच्या अकाली निधनामुळे होळकर घराण्यावर मोठे दुःख कोसळले. त्यांच्या मृत्यूनंतर राज्यकारभाराची जबाबदारी पूर्णपणे अहिल्याबाई होळकरांवर आली आणि त्यांनी अत्यंत कुशलतेने राज्यकारभार सांभाळला.

या सर्व वैयक्तिक दुःखांनंतरही अहिल्याबाईंनी धैर्याने राज्याची सूत्रे स्वतः हाती घेतली. त्यांनी महेश्वर येथे राजधानी स्थापन करून सुयोग्य प्रशासन उभे केले.

अहिल्याबाई होळकर प्रशासन व्यवस्था अभ्यास करणे:

न्यायप्रियता: प्रजेला समान न्याय देण्यावर भर.दानशूरपणा: देशभर मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहिरी बांधल्या.धर्मसमन्वय: सर्व धर्मांबद्दल आदरभाव.सुसूत्र अर्थव्यवस्था: महसूल व्यवस्था सक्षम केली.स्त्री नेतृत्वाचा आदर्श: कठीण प्रसंगी धैर्याने निर्णय घेतले.

काशी, गया, सोमनाथ, रामेश्वर आदी तीर्थक्षेत्रांच्या जीर्णोद्धारात त्यांचे मोठे योगदान आहे.

अहिल्याबाई स्वाभिमानी, धैर्यशील, दूरदर्शी आणि कर्तव्यनिष्ठ होत्या. वैयक्तिक सुख-दुःख बाजूला ठेवून त्यांनी प्रजाहिताला प्राधान्य दिले. साधेपणा, धार्मिकता आणि न्यायनिष्ठा यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो.

अहिल्याबाई होळकर यांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर प्रशासन अधिक कार्यक्षम, लोकाभिमुख आणि शिस्तबद्ध करण्यावर भर दिला. त्यांनी रयतेच्या हितासाठी आठ प्रमुख पदांची नेमणूक करून जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या. त्यामुळे शासनयंत्रणा सुसूत्र व परिणामकारक झाली.

१. सामाजिक व आर्थिक सुधारणा:

- राज्य दारूमुक्त करण्याचा प्रयत्न करून नव्या व्यवसायांना प्रोत्साहन दिले.
- उत्तम कामगिरी करणाऱ्या गावांना पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान केला.
- काही गुन्हेगारांना शिक्षा देतानाच त्यांना कर वसुलीसारखी जबाबदारी देऊन सुधारण्याची संधी दिली.
- शेती विकासासाठी शेतकऱ्यांना जमिनी उपलब्ध करून दिल्या.
- वृक्षारोपणासाठी प्रोत्साहन देऊन प्रत्येक शेतकऱ्याने झाडे लावावीत, असे धोरण राबविले.

२. पाणी व पर्यावरण व्यवस्थापन:

- विहिरी, तलाव व कुंडे बांधून पाण्याची सोय केली.
- डोंगराळ व पडीक जमिनींवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली.
- वनीकरण, जलसंवर्धन आणि जलवितरणासाठी स्वतंत्र खाते निर्माण केले.

या उपाययोजनांमुळे शेतीला चालना मिळाली व पर्यावरण संतुलन राखले गेले.

राज्यात रस्ते व गावांमध्ये-पाणपोया,अन्नछत्रे,धर्मशाळा,मंदिरे,कुंड, तलाव, विहिरी,घाट व रस्ते,सभामंडपे इ.यांची उभारणी करून त्यांनी व्यापक दानधर्म केला. या सोयींमुळे प्रवासी, गरिब व सामान्य जनतेचे जीवन सुलभ झाले.

३. सांस्कृतिक व शैक्षणिक प्रोत्साहन:

- महेश्वर या नव्या राजधानीत ग्रंथालयाची स्थापना केली.
- साहित्य, राजकारण व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करून बौद्धिक वातावरण निर्माण केले.

४. न्यायव्यवस्था:

अहिल्याबाईंनी न्यायपद्धती सोपी व सुटसुटीत केली. प्रजेला जलद व निष्पक्ष न्याय मिळावा, यासाठी त्यांनी स्पष्ट कायदे व शिक्षेची तरतूद केली. कायदा मोडणाऱ्यांना योग्य ती शिक्षा दिली जात असे, त्यामुळे राज्यात शिस्त आणि सुरक्षितता टिकून राहिली.

राज्यात चोर-दरोडेखोरांचा उपद्रव वाढल्यामुळे प्रजा त्रस्त झाली होती. प्रशासनात कडक शिस्त आणण्यासाठी अहिल्याबाईंनी कणखर पावले उचलली. यशवंतराव फणसे यांच्या मदतीने दरोडेखोरांचा नायनाट करण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे राज्यात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित झाली. पुढे अहिल्याबाईंनी आपल्या कन्या मुक्ताबाईचा विवाह यशवंतराव फणसे यांच्याशी लावला.

इंदूर येथे काहीशी अस्वस्थता व राजकीय तणाव जाणवू लागल्याने अहिल्याबाईंनी नर्मदा नदीच्या काठावरील महेश्वर हे ठिकाण राजधानी म्हणून निवडले.

महेश्वर हे धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध स्थान होते. त्यांनी तेथे—

महेश्वर किल्ला व मंदिरांचा जीर्णोद्धार नवीन घाट, देवालये व धर्मशाळांची उभारणी,प्रशासकीय इमारतींची निर्मिती, कलावंत, शिल्पकार व कारागिरांना आश्रय,वस्त्रोद्योग (विशेषतः महेश्वरी साड्या) व इतर उद्योगांचा विकास अशा विविध उपाययोजना केल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे महेश्वर ही सुंदर, धार्मिक व सांस्कृतिक राजधानी म्हणून प्रसिद्ध झाली.

मराठा सत्ताकारणात अनेक अंतर्गत तणाव होते. पेशव्यांचे काका राघुनाथराव (राघोबा दादा) यांनी अहिल्याबाईंवर स्वारी करण्याचा विचार केला होता; परंतु एका स्त्री राज्यकर्त्याशी युद्ध करणे योग्य नाही, असा विचार करून त्यांनी आपला बेत बदलला, असे उल्लेख आढळतात.अहिल्याबाईंच्या आयुष्यात वैयक्तिक दुःखांची मालिका होती. पती खंडेराव, सासरे मल्हारराव, पुत्र मालेराव, नातू तसेच जावई यशवंतराव फणसे यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांची कन्या मुक्ताबाई सती गेली. पाच आप्तेष्टांचे दुःख पचवूनही अहिल्याबाईंनी धैर्याने राजधर्म पाळला.

अहिल्याबाईंची करपद्धती, संरक्षणव्यवस्था:

अहिल्याबाई होळकर यांच्या राज्यकारभारात करपद्धती सुलभ, न्याय्य आणि लोकाभिमुख होती. शेतसारा हा शेतीच्या उत्पन्नावर आधारित ठेवण्यात आला होता. त्यामुळे शेतकऱ्यांवर अन्यायकारक करांचा बोजा पडत नव्हता. यामुळे राज्यात शांतता, समाधान आणि सुव्यवस्था टिकून राहिली.

१. महसूल व प्रशासकीय रचना:

महसूल गोळा करण्यासाठी राज्याचे लहान-मोठ्या प्रशासकीय विभागांत विभाजन करण्यात आले—गावे, परगणे, महाल आणि सुभे अशा स्तरांवर प्रशासन रचले गेले. या पद्धतीमुळे कर वसुली पारदर्शक व शिस्तबद्ध झाली.अहिल्याबाईंनी प्रजेचे 'कवडी' सुद्धा अन्यायाने न घेण्याचे धोरण ठेवले. दिलेला शब्द पाळणे आणि न्याय राखणे हे त्यांच्या शासनाचे तत्त्व होते.

२. संरक्षण व सैन्यव्यवस्था:

राज्याची संरक्षणयंत्रणा चोख व सुसज्ज होती. सैनिकांना नियमित प्रशिक्षण, आधुनिक शस्त्रास्त्रे, योग्य वेतन व आवश्यक सुविधा देण्यात येत. त्यामुळे सैन्य सुदृढ व निष्ठावान राहिले. अहिल्याबाईंनी राज्याच्या शांततेसाठी आवश्यक तेव्हा सैन्याचा वापर केला; मात्र त्यांनी कधीही अनावश्यक आक्रमणाची भूमिका घेतली नाही. त्यांचे धोरण संरक्षणात्मक आणि प्रजाहितावर आधारित होते.

३. प्रशासनातील वैशिष्ट्ये:

१. पारदर्शकता आणि प्रामाणिकता

२. स्त्री नेतृत्वाचे प्रभावी उदाहरण

३. धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन

४. लोकाभिमुख निर्णयप्रक्रिया

अहिल्याबाई होळकर या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या; परंतु त्यांची धार्मिकता आंधळी किंवा संकुचित नव्हती. त्या परधर्माबद्दल सहिष्णु आणि आदरभाव ठेवणाऱ्या होत्या. विविध तीर्थक्षेत्रांचा जीर्णोद्धार करताना त्यांनी कोणताही भेदभाव केला नाही. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे केवळ पूजा-अर्चा नव्हे, तर लोकसेवा आणि कर्तव्यपालन होय.अहिल्याबाईंमध्ये अहंकार नव्हता. आपल्या अधिकाराचा त्यांनी दक्षतेने आणि जबाबदारीने वापर केला. शासन करताना त्यांनी सद्विवेकबुद्धीला प्राधान्य दिले. त्यांच्या आदेशांत न्याय, करुणा आणि प्रजाहित यांचा समतोल दिसून येतो.

कर्तव्यनिष्ठा, ईश्वरनिष्ठा आणि प्रामाणिकता यांच्या संगमातून त्यांचे व्यक्तिमत्त्व तेजस्वी बनले होते. म्हणूनच

काही इंग्रज व मराठी इतिहासकारांनी त्यांच्या शासनाचे कौतुक केले आहे. 'सद्गुण, संयम आणि सुशासन यांचे मूर्तिमंत रूप' अशी त्यांची ओळख निर्माण झाली.

अशा प्रकारे, अहिल्याबाईंची धार्मिकता ही मानवतावादी आणि लोककल्याणाभिमुख होती—ज्यात सहिष्णुता, विनयशीलता आणि न्यायप्रियता यांचा सुंदर समन्वय आढळतो.

अहिल्याबाई होळकर यांचे जनकल्याणाचे कार्य एक अभ्यास:

पुण्यश्लोकी अहिल्याबाई होळकर या केवळ कुशल राज्यकर्त्या नव्हत्या, तर त्या महान दानशूर व धर्मकार्यकर्त्या होत्या. भारतभर अनेक तीर्थक्षेत्रांवर त्यांनी मंदिरे, घाट, धर्मशाळा, तळी व अन्नछत्रांची उभारणी करून 'जनकल्याणाचे' कार्य केले. अहिल्याबाई होळकर यांनी १७८५ च्या ऑक्टोबर महिन्यात काशी येथे मणिकर्णिका घाट बांधला. या घाटासाठी सुमारे २५,००० रुपयांचा खर्च झाला होता, अशी नोंद आढळते. त्याच वर्षी त्यांनी दशाश्वमेध घाटाची उभारणी केली आणि काशी विश्वनाथ मंदिर यांचा जीर्णोद्धार केला. याशिवाय त्यांनी गौतमेश्वर व अहिल्या द्वारकेश्वर अशी मंदिरे उभारली.

१. उत्तर भारतातील कार्य:

- अयोध्या येथे श्रीराम मंदिर व धर्मशाळा बांधली.
- काशी येथे १७८५ मध्ये मणिकर्णिका घाट बांधला (अंदाजे खर्च २५,००० रुपये).
- त्याच वर्षी दशाश्वमेध घाटाची उभारणी केली.
- काशी विश्वनाथ मंदिर यांचा जीर्णोद्धार केला.
- गौतमेश्वर व अहिल्या द्वारकेश्वर अशी मंदिरे बांधली.
- केदारनाथ मंदिर येथे धर्मशाळा व पाण्याची कुंडे बांधली.
- गंगोत्री येथे विश्वनाथ, केदारनाथ, भैरव व अन्नपूर्णा अशी मंदिरे व सहा धर्मशाळा उभारल्या.
- ऋषिकेश येथे गणपती मंदिर व इतर देवालये बांधली.
- प्रयागराज येथे मोठा घाट बांधला. चिंचवड येथे गरिबांना दान मिळण्याची व्यवस्था केली.
- जगन्नाथ पुरी येथील मुख्य मंदिराची व्यवस्था सुधारली व पुजाऱ्यांच्या उपजीविकेसाठी काही गावे धर्मादाय म्हणून दिली.

२. पश्चिम व दक्षिण भारतातील कार्य:

- सोमनाथ मंदिर : आक्रमणांत नुकसान झालेल्या मंदिराचा पुनर्बांधणी करून मूर्तीची पुनःस्थापना केली.
- द्वारका येथे पूजा-अर्चेची व्यवस्था करून पुजाऱ्यांना गावे इनाम दिली.
- जेजुरी येथे मल्हार गौतमेश्वर मंदिर बांधले व त्याजवळ तलाव उभारला.
- त्र्यंबकेश्वर येथे मोठे तळे बांधले.

सप्तशृंगी गड येथे धर्मशाळा उभारली अहिल्याबाई होळकर यांनी भारतभर मंदिरांचे जीर्णोद्धार, घाट-धर्मशाळा उभारणी आणि अन्नछत्रांची व्यवस्था करून लोककल्याणाची परंपरा निर्माण केली. त्यांचे कार्य पुढीलप्रमाणे उल्लेखनीय आहे—

३. महाराष्ट्र व इतर भागातील कार्य:

- परळी वैजनाथ येथील मंदिराचा जीर्णोद्धार.
- पंढरपूर येथे श्रीराम मंदिर बांधले.
- पैठण येथे कायमस्वरूपी अन्नछत्र सुरू केले.
- प्रयागराज येथे मोठा घाट बांधला.
- बीड येथे जुन्या घाटाचा जीर्णोद्धार केला.
- सप्तशृंगी गड येथे धर्मशाळा उभारली.
- सुलतानपूर येथे मंदिर बांधले.

- सोमनाथ मंदिर : आक्रमणांमुळे उद्ध्वस्त झालेल्या मंदिराची पुनर्बांधणी करून मूर्तीची स्थापना केली.
- ऋषिकेश येथे गणपती मंदिर व इतर देवालयांची उभारणी.
- संगमनेर येथे राम मंदिर बांधले.
- सातारा येथे महादेव मंदिराजवळ विहीर खोदली.
- वेरूळ येथे घृष्णेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला.
- रामेश्वरम येथे धर्मशाळा व अन्नछत्र सुरू करून पूजेची व्यवस्था केली. जगन्नाथ पुरी येथे मुख्य मंदिराची व्यवस्था सुधारली व धर्मादाय गावे दिली.
- रामेश्वरम येथे धर्मशाळा व अन्नछत्र सुरू केले.
- उज्जैन येथे चिंतामणी गणपती मंदिर व महाकालेश्वर मंदिर पूजेची व्यवस्था.
- पंढरपूर येथे श्रीराम मंदिर बांधले.
- पैठण येथे कायमस्वरूपी अन्नछत्र सुरू केले.
- त्र्यंबकेश्वर येथे मोठे तळे बांधले.
- जेजुरी येथे मल्हार गौतमेश्वर मंदिर व तलाव बांधला.

त्रिशताब्दी वर्षाचे महत्त्व:

त्रिशताब्दी वर्ष हे केवळ स्मरणाचे नव्हे तर पुनर्मूल्यांकनाचे वर्ष आहे. आजच्या लोकशाही व्यवस्थेत अहिल्याबाईंचे लोकाभिमुख प्रशासन, पारदर्शकता आणि जनकल्याणाची तत्त्वे मार्गदर्शक ठरतात.त्रिशताब्दी वर्षामुळे त्यांच्या प्रशासन, न्यायव्यवस्था आणि जनकल्याणकारी धोरणांचा नव्या दृष्टीकोनातून अभ्यास करण्याची संधी मिळते. मराठा इतिहासातील त्यांच्या भूमिकेचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करता येते.

१. आदर्श प्रशासनाची प्रेरणा:

अहिल्याबाईंचे राज्यकारभार पारदर्शक, लोकाभिमुख आणि न्यायनिष्ठ होता. आजच्या लोकशाही व्यवस्थेतही त्यांच्या निर्णयप्रक्रियेतील संवेदनशीलता आणि प्रजाहितदृष्टी अनुकरणीय ठरते.

२. स्त्री नेतृत्वाचा गौरव:

त्या काळात स्त्रीने राज्यकारभार सांभाळणे ही अपवादात्मक बाब होती. त्रिशताब्दी वर्ष स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची आणि समाजासमोर आदर्श ठेवण्याची संधी आहे.

३. सांस्कृतिक वारशाचे जतन:

भारतभर त्यांनी उभारलेली मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि पायाभूत सुविधा आजही त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहेत. या वारशाचे संवर्धन आणि जतन करण्याची जाणीव त्रिशताब्दी निमित्ताने अधिक बळकट होते.

४. सामाजिक ऐक्य आणि धर्मनिरपेक्षता:

अहिल्याबाईंच्या कार्यात सर्व धर्म आणि समाजघटकांप्रती समान दृष्टिकोन दिसतो. त्यामुळे सामाजिक ऐक्य आणि समन्वयाची प्रेरणा मिळते.

५. राष्ट्रीय अभिमानाची जाणीव:

अहिल्याबाईंचे जीवन आणि कार्य हे भारतीय इतिहासातील सुवर्णपान आहे. त्यांच्या त्रिशताब्दी वर्षामुळे राष्ट्रीय अभिमान व सांस्कृतिक ओळख दृढ होते.

निष्कर्ष:

- अहिल्याबाई केवळ एक यशस्वी राज्यकर्त्या नव्हत्या, तर त्या आदर्श प्रशासक, दानशूर समाजसेविका आणि लोककल्याणासाठी समर्पित व्यक्तिमत्त्व होत्या.
- ३१ मे १७२५ रोजी चौंडी येथे जन्मलेल्या अहिल्याबाईंनी प्रतिकूल परिस्थितीतही धैर्य, संयम आणि दूरदृष्टीचा परिचय दिला.

- पती खंडेराव, सासरे मल्हारराव आणि पुत्र मालेराव यांच्या निधनानंतरही त्यांनी खचून न जाता राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली.
- महेश्वर येथे राजधानी स्थापन करून त्यांनी न्यायनिष्ठ, शिस्तबद्ध आणि लोकाभिमुख प्रशासन उभारले. दरोडेखोरांचा बंदोबस्त करून प्रजेला सुरक्षितता दिली. महसूल व्यवस्था सुधारली, उद्योगधंद्यांना चालना दिली आणि महेश्वरला सांस्कृतिक वैभव प्राप्त करून दिले.
- देशभरातील काशी, गया, सोमनाथ, रामेश्वर यांसारख्या तीर्थक्षेत्रांच्या जीर्णोद्धारातून त्यांच्या धार्मिकतेबरोबरच राष्ट्रव्यापी दृष्टीकोनाची जाणीव होते. मंदिर, घाट, धर्मशाळा, अन्नछत्रे आणि पाण्याच्या सोयी उभारून त्यांनी जनतेच्या मूलभूत गरजांची पूर्तता केली.
- वैयक्तिक आयुष्यातील अनेक दुःखद प्रसंगांना सामोरे जात असूनही त्यांनी राजधर्म आणि प्रजाहित यांना सर्वोच्च स्थान दिले. साधेपणा, न्यायप्रियता, धर्मसमन्वय आणि लोककल्याणाची तळमळ यांमुळे त्या 'लोकमाता' म्हणून ओळखल्या गेल्या.
- अहिल्याबाई होळकर यांचे धर्मकार्य हे केवळ धार्मिक नव्हते, तर सामाजिक कल्याणाशी निगडित होते. त्यांनी देशभरात मंदिर, घाट, धर्मशाळा, अन्नछत्र व पाण्याची व्यवस्था करून जनतेसाठी मूलभूत सुविधा निर्माण केल्या.
- त्यांच्या या कार्यामुळे भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांना नवे जीवन मिळाले. म्हणूनच त्या केवळ मालव्याच्या नव्हे, तर संपूर्ण भारताच्या 'लोकमाता' ठरल्या.
- होळकर घराणे हे मराठा साम्राज्यातील एक बलाढ्य आणि प्रभावी घराणे होते. मल्हारराव होळकर यांच्या पराक्रमामुळेच इंदूर संस्थानाची स्थापना झाली आणि पुढे अहिल्याबाई होळकरांसारख्या आदर्श राज्यकर्त्या या घराण्यातून घडल्या.
- पुण्यश्लोकी अहिल्याबाई होळकर यांचे त्रिशताब्दी वर्ष हे केवळ उत्सव नसून त्यांच्या आदर्श प्रशासन, जनकल्याणकारी कार्य आणि स्त्री नेतृत्वाच्या सामर्थ्याचे स्मरण व पुनर्स्मरण आहे. त्यांच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची आजच्या काळातही तितकीच आवश्यकता आहे

संदर्भ:

१. भोसले नारायण संपादक - वाचा एक तरी --- चरित्र व आत्मचरित्र अथर्व पब्लिकेशन प्रथम आवृत्ती ८ सप्टेंबर २०१२ पृ.क्र. ७८,७९

२. आडमुठे सुधीर- भारताचे भाग्यविधाते, सिद्धांत प्रकाशन पहिली आवृत्ती २०१६ पृ.क्र ३१४,३१५,३१६

३. खडपेकर विनया -अहिल्याबाई होळकर, राजहंस प्रकाशन आवृत्ती पहिली २००७ पृ.क्र २७२

४. सरदेसाई गोविंद सखाराम -मराठी रियासत खंड सात, पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती १९२९पृ.क्र. १४,१५

५. विकिपीडिया

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे ऐतिहासिक भाषाशास्त्रीय योगदान- एक समीक्षा

प्रा. अनंत अर्जुन निकम

संस्कृत विभाग,

स. गा. म. कॉलेज, कराड.

***Corresponding Author* – प्रा. अनंत अर्जुन निकम**

DOI - 10.5281/zenodo.19658606

सारांश:

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे हे जगातील प्रसिद्ध इतिहास अभ्यासक होते. मराठ्यांच्या इतिहासासाठी त्यांनी भरीव योगदान दिले होते.मराठ्यांच्या इतिहासाची साधने ह्या शीर्षकाचे अस्सल मराठी साधनांचे बावीस खंड त्यांनी संपादून प्रसिद्ध केले(१८९८ – १९१७) तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांनी सखोल अभ्यास करून आपली स्वतंत्र अभ्यास पद्धतीच्या माध्यमातून त्यांनी भारतीय आणि पाश्चात्य अभ्यास पद्धतीचा समन्वयक म्हणून समर्थपणे भूमिका पार पाडली आहे. स्वतः ची अभ्यास पद्धती विकसित करणे हे अतिशय खडतर काम असते. आणि ते काम कोणत्या क्षेत्रात असेल हे पण त्यांनी अतिशय सुरुवातीच्या काळात ठरवलेले असावे असे दिसते. कारण त्यांनी हाताळलेले विषय हे महत्त्वपूर्ण आहेत. ते सहसा कोणी अभ्यासलेले नाही आणि अभ्यासले असले तरी ते भारतीय असले तरी भारतीय परंपरेचा विचार करणारे नव्हते. परंतु राजावाडेनी आपल्याला लेखनातून भारतीय विचार च मांडला. राजवाड्यांची १९०५ मध्ये प्रसिद्ध झालेली इतिहासमीमांसाही त्या वेळी खूप गाजली

इतिहास तर त्यांनी अभ्यासलाच पण यापेक्षा वेगळे विषय त्यांनी अभ्यासले ते म्हणजे 'ऐतिहासिक भाषाशास्त्र ' भारतीय भाषांच्या विकासाच्या संदर्भात अभ्यासपूर्ण मांडणी त्यांनी केली आहे. त्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधन पत्रात करण्यात आला आहे.

महत्त्वाचे शब्द: इतिहास, भाषा, संस्कृत, प्राकृत, इ.

विषय विवेचन:

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी इतिहासाच्या क्षेत्रात मराठ्यांच्या इतिहासाची साधने यावर २२ खंडात ग्रंथ संपादित केले आहे. ह्यापैंकी नऊ खंडांना त्यांनी विस्तृत प्रस्तावना लिहिल्या आहेत. राधामाधवविलासचंपू आणि महिकावतीची बखर हे दोन जुने ग्रंथ त्यांनी अनुक्रमे १९२२ व १९२४ मध्ये संपादून छापले व त्यांनाही मोठ्या विवेचक प्रस्तावना जोडल्या. ज्ञानेश्वरीची फार जुनी हस्तलिखित पोथी, निड्त विचार, सुबंतविचार, संस्कृत भाषेचा उलगडा, महाराष्ट्राचा वसाहतकाल असे काही त्यांनी संपादिलेले व लिहिलेले ग्रंथ त्यांच्या हयातीतच प्रसिद्ध झाले. मराठी धातुकोश, नामादिशब्दव्युत्पत्तिकोश इ. ग्रंथ त्यांच्या मृत्यूंनतर प्रसिद्ध होऊ शकले. असे विस्तृत संशोधन प्र लिखाण इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी केले आहे.

कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रस्तावनेतील हे उदगार आहेत. "इतिहासाचार्य राजवाडे यांच्या थोरवीसंबंधी मी लिहिण्याची जरुरी नाही. ते काम इतिहासतज्ज्ञ करतीलच. राजवाडे यांनी हिंदुस्तानच्या इतिहासशास्त्राची, भाषाशास्त्राची, समाजरचनाशास्त्राची जी अपूर्व व मूलभूत क्रांतिगर्भ रचना करून ठेवली तिचे नीट ज्ञान व अभ्यास

अद्याप योग्यपणे झालेले नाही. हे खरे की खोटे हे अजमावयाचे असल्यास महाराष्ट्रातील किंवा हिंदुस्थानातील अत्यंत उच्च विद्यापीठात अत्यंत उच्चस्थानीय पाठक किंवा आचार्य जे काय शिकवतात ते पाहिल्यास कळून येईल. इंग्रजी राज्यात तसे होत होते तेव्हा त्याला इलाज नव्हता; पण आता ?"[1]

हा प्रश्न आजही मला प्रासंगिक वाटतो. याचे उत्तर येणाऱ्या काळात आपल्याला निश्चितपाने मिळेल.

भाषेच्या संदर्भात राजवाडे यांनी अतिशय सूक्ष्म असा विचार केला आहे. १७७६ मध्ये विलियम्स जोन्स याने याच सदृश्य विचार मांडला होता. तशीच काहीशी मांडणी राजवाडे करत आहेत. परंतु भाषेचा मुळ स्रोत काय असावा याचे स्पष्टीकरण विलियम्स जोन्स ला देता आले नाही. ते कार्य राजवाडे यांनी केले. संस्कृत भाषेच्या संदर्भात त्यांनी वर्गवारी केली आहे. त्याच थोडा विचार करुया.

(१) वैदिकभाषा, (२) जुनाट वैदिकभाषा व (३) अत्यंत जुनाट पूर्ववैदिकभाषा, अशा तीन भाषा एका पूर्वी एक होऊन गेल्या असाव्यात असे त्यांचे अनुमान होते.

वर्तमान प्रमाण मराठीचे साधे व्याकरण तसेच पोटभाषांचे अथवा बोलीचे तौलणिक व्याकरण, आधुनिक समकालीन भाषांचे व्याकरण त्यात मराठी, गुजराती, हिंदी, बंगाली, इत्यादी भाषांचा समावेश होतो. त्यांचे तौलणिक व्याकरण व मराठीचे ऐतिहासिक व्याकरण यांचे स्वरूप वि.का. राजवाडे स्पष्ट करतात. त्यानंतर राजवाडे मराठी भाषेच्या इतिहासाकडे वळतात. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये त्यांनी प्रांतिक पोटभाषा तसेच जातीपरत्वे होणारे मुख्य भाषेतील बदल म्हणजेच अपभ्रंश यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे. प्रांतकृत, जातीकृत, लिंगकृत व कालकृत असे भाषेचे वेगवेगळे प्रवाह त्यांनी मानले आहेत.

लोककथा आणि लोकगीत त्याचा अभ्यास इतका महत्त्वाचा त्या काळात मानला जात नसताना वि.का.राजवाड्यांनी त्यावर व्यासंगपूर्ण लिखाण केले आहे. पाली भाषेचे विवेचन सुद्धा त्यांनी या शब्दाची उत्पत्ती आणि व्युत्पत्ती देवून केली आहे. त्याची परंपरा, संस्कृती, त्याचा संबंध अशा अनेक गोष्टीवर त्यांनी संशोधन केले आहे. राजवाडे यांनी प्राकृत भाषेचा सुद्धा स्वतंत्र अभ्यास केला आहे. पाली आणि प्राकृत या दोन्ही भाषणं आज अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. प्राकृत भाषा आणि त्यातही महाराष्ट्र प्राकृत याचे आणि आत्ताच्या मराठीचा संदर्भ त्यांनी दिलेला आहे. त्यातही महाराष्ट्र भाषेच्या नावाचा उल्लेख सातवाहन कालीन वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ गाथासप्तशती मधील जी प्राकृत आहे त्याचा संदर्भ त्यांनी आपल्या लेखनामध्ये घेतलेला आहे. मंगळवेढे येथील ताम्रपटाचा आधारे त्यांनी मराठीचा जन्मकाळ मांडला आहे. यावरून एक लक्षात येते कि, आज जे प्राकृत मराठी भाषेचे अभ्यासक किंवा भारतीय प्राचीन किंवा आधुनिक भाषांचे अभ्यासक जो सिद्धांत मांडतात तो सिद्धांत हे वि. का. राजवाडे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत मांडला आहे.

राजवाडे हे संस्कृतचे पूर्व रूप व स्वरूप कसे असेल, वैदिक भाषा आणि पूर्व वैदिक भाषा यांचा मिलाप कुठे होईल? पाणिनीय लौकिक संस्कृतात नेमकी काय परिस्थिती आहे? या सर्वांचा विचार करतात आणि पाणिनीने लौकिक संस्कृतात 'आं' प्रत्ययाचा, त्याची परंपरा सापडते की नाही याचा ते मुळात विचार करतात. या सर्वांचा विचार करत असताना मराठीची जुनाट मुळे वैदिक भाषेत व पूर्व वैदिक भाषेत सापडतात आणि लौकिक संस्कृतात आणि महाराष्ट्र प्राकृत मध्ये ती सापडत नाहीत असा त्यांचा मूळ सिद्धांत आहे. परंतु आत्ता आपण जो अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा जो प्रयत्न केला त्यामध्ये महाराष्ट्र प्राकृत

[1] https://samagrarajwade.com/rajwade-articles/shripad-dange

आपण प्रधान मांडले आहे आणि प्राकृतचा तो संदर्भ त्या ठिकाणी आहे.

राजवाडे यांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथाला जी प्रस्तावना दिली त्यात एक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण निरीक्षण त्यांनी नोंदवलेला आहे ते म्हणतात की "महाराष्ट्र इत्यादी प्राकृत भाषा रूपांवरून मराठीतील सर्व रूपांची सांगड लागत नाही तेव्हा वर्तमान मराठी रूपांची व जुन्या मराठी रूपांचे तुलना मी पाणिनीय संस्कृतीशी करून काय निष्पन्न होते ते पाहू लागलो ते पाहताना असे प्रत्ययस आले की मराठीतील एकूण एक लहान व मोठ्या लकबा भगवान पाणीनीच्या अष्टयात नमूद आहेत व पेशलचे प्राकृत व्याकरण अनेक बाजूंनी दोषग्रस्त आहे पिशलने प्राकृत रुपये एका ठिकाणी संकलित केली परंतु पाणीनीय शास्त्र त्याला अवगत नसल्यामुळे त्याच्या हातून प्राकृत रूपांचे वर्गीकरण यथास्थितीत झाले नाही ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्या करण लिहिताना मी फक्त प्राकृत भाषांच्या कडे लक्ष दिले त्याने एवढेच झाले की मराठी व्याकरणातील अत्यंत स्थूल अशा शेकडो बाबींचे उगम कळले"

स चा उच्चार पाणिनीय भाषेत किंवा सध्या मराठीत जो होतो त्याहून निराळा उच्चार अत्यंत जुनाट वैदिकभाषेत होत असे जवळजवळ -ह् च्यासारखा स् चा उच्चार असे किंवा जवळजवळ विसर्गासारखा स् चा उच्चार असे ; म्हणजे कंठ्य असे. वैदिकभाषेत, अर्थात् पाणिनीय भाषेत स् चा हा कंठ्य उच्चार जाऊन दन्त्य झाला ; तत्रापि त्याच्या कंठ्यात्वाची आठवण बुजाली नव्हती. पदांती दन्त्य स् चा कंठ्य विसर्ग होतो. असा जो नियम पाणिनी सांगतो त्याचे कारण स् चे मूळचे कंठ्यत्व होय. रामस् पठति= राम : पठति हा जो बदल होतो तो का होतो, तर स् हा मूळचा कंठ्य आहे. म्हणजे स् चा कंठ्य उच्चार वैदिकभाषेत इतरत्र यद्यपि लुप्त होऊन दंत्य झाला होता

संस्कृत भाषेचा उलगडा या आपल्या ग्रंथात ते एक वेगळे मत मांडतात ते म्हणतात "अति जुनाट वैदिकभाषेत स् चा उच्चार -ह् सारखा कंठ्य होत असे म्हणून वर सांगितले . या अति जुनाट -ह चा पाणिनीयकाली व वैदिककालीं र झाला. परंतु हा -ह् अत्यंत लुप्त झाला नाही. पदांती पाणिनीयकाली हा ऐकू येत असे".[2]

राजकीय इतिहासाचा शोध घेत घेत ते प्राचीन साहित्याकडेही वळले. जुन्या मराठी साहित्याचा अर्थ उलगडण्यासाठी तत्कालीन मराठी भाषेचे ज्ञान अपरिहार्य ठरले. यातून ते शब्दाच्या उगमांकडे-व्युत्पत्तिशास्त्राकडे व भाषेतील स्थित्यंतरांच्या अनेकविध प्रश्नांकडे वळले. महाराष्ट्रातील व्यक्तींची उपनामे, ग्रामनामे वगैरेची मुळे ते शोधू लागले आणि ती बहुशः संस्कृतोद्भव आहेत, अशा निष्कर्षाप्रतही ते पोहोचले. त्यासाठी संस्कृत भाषेचा आणि वैदिक भाषेचाही सखोल विचार करणे आवश्यक झाले आणि त्या दृष्टींनीही त्यांनी संशोधन करून काही प्रंबधही सिद्ध करून ठेवले. त्यांपैकी काही त्यांच्या हयातीत तर काही त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. राजवाड्यांचे ह्या क्षेत्रातील कार्य गौरवास्पद असले, तरी त्यांचे भाषाव्युत्पत्तिविषयक निबंध सदोष असल्याचे काही भाषाशास्त्रज्ञांनी दाखवून दिले. ह्या एवढ्या गहन विषयात शिरणाऱ्या राजवाड्यांनी ललित साहित्याचे वाचन आणि रसग्रहणही सुंदर रीतीने केले, हे त्यांच्या 'कांदबरी' ह्या दर्जेदारसमीक्षात्मक लेखावरून लक्षात येते.

---

[2] https://samagrarajwade.com/sanskrit-bhashecha-ulgada?start=15

सर्वसामान्य नामादिशब्दव्युत्पत्तिकोश-[3] यात काही शब्दांची व्यूत्पत्ती राजवाडे यांनी दिली आहे त्याचा थोडक्यात अभ्यास करू

1. चत्वारि = चत्तारि = चआरि = च्यारि = चार

पण संस्कृत एकादशपासून मराठी अकरा कसा निघतो, हा प्रश्न आहे. एकादश या संस्कृत शब्दाचें नियमांप्रमाणें एआअह असें रूप व्हावें. परंतु तें तसें होत नाहीं. एआरह असें होतें. अपभ्रंशांत एग्गारह असें रूप आढळतें. आणि वर्तमान मराठींत अकरा असें रूप आढळतें. अर्थात् महाराष्ट्री एआरह संस्कृत एकादशपासून निघालेला नाही. मध्यें र कोठून आला ? अपभ्रंश एग्गारह महाराष्ट्री एआरह पासून आला नाहीं. कारण महाराष्ट्री एआरहचें अपभ्रंशांत एआग, आरा, एरा अशीं रूपें व्हावीं. तसा कांहीं एक प्रकार न होतां एग्गारह असें अपभ्रंशांत रूप आढळतें. तेव्हां, अपभ्रंश एग्गारह महाराष्ट्री एआरह व संस्कृत एकादश यांपासून निघालेलें नाहीं.

महाराष्ट्रींत संस्कृत क चा अ होतो. परंतु अपभ्रंश ज्या प्राकृतांपासून निघाला त्यांत संस्कृत क चा ग्ग होत होता. अर्थात हेमचंद्रानें दिलेला अपभ्रंश, महाराष्ट्रीचा अपभ्रंश नव्हे; दुसऱ्याच कोणत्या तरी प्राकृताचा अपभ्रंश आहे.

अपभ्रंशांतील ऍग्गारह शब्दापासून मराठी अकरा शब्द निघूं शकतो.

अडाणी - प्राकृतांत अडअणा म्हणून एक शब्द आहे. त्याचा अर्थ असति, लबाड, कुंटण स्त्री असा आहे. ह्या अडअणा शब्दाचा मराठी अपभ्रंश अडाणा, अडाणी असा होत असे. पैकीं अडाणी हें रूप मात्र मराठींत राहिलें आहे. अडाणी शब्दाचा लबाड, लुच्ची हा मूळ अर्थ जाऊन, अज्ञानी असा अर्थ सध्यां होतो. हा अडाणी शब्द मराठींत तिन्ही लिंगीं वापरलाजातो.[4]

आइत्या पीठावर रेघा [अतिथे पीठे: रेषा = अइतिया पीठावर रेघा = आइत्या पिठावर रेघा =ऐत्या पिठावर रेघा] माध्यानसमयीं अतिथीची मार्गप्रतीक्षा करीत यजमान बसे. त्यापूर्वी आगंतुक अतिथीकरितां पाट किंवा पीठ मांडून त्यावर रेषा ओढीत. अशा करतां कीं, हें रेषाचिह्नत स्थान अतिथीकरितां आहे हें समजावें. अतिथीला ह्या रेघा काढलेल्या पाटावर येऊन बसण्याचें व जेवण्याचें च तेवढें काम उरे. अर्थात् कांहीं श्रम न करतां अन्न मिळे. त्यावरून श्रमाविणें अन्न खाणाऱ्या आळशाला ऐत्या पिठावर रेघा ओढणारा हें विशेषण लावीत. धान्याच्या पिठाशीं वगैरे ह्या वाक्यांत कांहीं एक संबंध नाहीं.

त्यांनी एक शब्द दिला आहे तो म्हणजे आखाडसासू [आस्कंदिकाश्वश्रुः = आखाडसासू] आंगावर चालून येणारी सासू- पण अहिराणी भाषेत आणि खान्देशांत अक्कडसासू असा एक शब्द आजही वापरतात. त्याचा अर्थ मात्र वेगळा आहे. बायकोची मोठी बहीण म्हणजे अक्कडसासू होय.

आंगवस्त्र [उपस्त्रि+ = उवस्त्रि = वस्त्रि = वस्त्र. अंगना + उपस्त्रि = आंगोवस्त्रि = आंगोवस्त्र = आंगवस्त्र] मुख्य स्त्री खेरीज अवांतर जी बाळगलेली अंगना ती आंगोवस्त्रि ऊर्फ आंगवस्त्र. ह्या शब्दाचा वस्त्र ऊर्फ कपडा या शब्दाशीं कांहीं एक संबंध नाही. उच्चारसाम्यामुळे इतकें मात्र झालें कीं वस्त्र शब्द मराठींत नपुंसकलिंगी असल्यामुळे आंगवस्त्र (उपस्त्रि) हा हि शब्द नपुंसकलिंगी वापरला जाऊं लागला. उपस्त्रि = उपस्त्र = उपवस्त्र. उपवस्त्र (कपडा). आठवडा हा शब्द अशिष्ट लोक अठावडा असा उच्चारतात

[3] (https://samagrarajwade.com/2017-11-18-09-42-25/servname-kosh-1?start=10)

[4] (https://samagrarajwade.com/2017-11-18-09-42-25/servname-kosh-1?start=10)

व तोच उच्चार व्युत्पतिदृष्ट्या युक्त आहे. असे राजवाडे यांना वाटते. आजचे भाषाशास्त्र कोणत्याच भाषेला अशुद्ध मनात नाही आणि कोणत्याच भाषेला प्रमाण मानत नाही. या आधुनिक संदर्भात देखील राजवाडे किती प्रासंगिक आहे याची प्रचीती येते.अष्टावर्त (स्वार्थे क) = अठ्ठावडअ = अठावडा = आठवडा. आठव्या दिवशीं ज्या कालमानांत त्याच वाराची आवृत्ते अथवा आवर्त होतो तो आठवडा. दुधाचा आठवडा = दुग्धस्य अष्टदिवसावृत्तिः)प्रमाण भाषा नाकारून सामान्य लोकांच्या बोली चा संदर्भ राजवाडे देत आहेत. आधुनिक भाषाशास्त्र जे आज सांगते ते राजवाडे तेव्हा सांगत होते. आता असाच एक वैशिष्टपूर्ण शब्द राजवाडे त्याचे विश्लेषण कसे करतात ते बघा…

आताँ - धर्मपालकृत पाइअलच्छी नांवाच्या प्राकृत कोशांत खालील शब्द आतां ह्या अर्थी आहेत:-

इहइँ संपइ इण्हिं इत्ताहे संपयं दाणिं ॥ ६७ ॥ पैकीं इत्ताहे हें आतां ह्या अर्वाचीन शब्दाचें प्राकृत रूप होय. इत्ताहे = इत्ता = आत्ता = आतां. रोजच्या बोलण्यांत लोक आत्ता असा उच्चार करतात. आतां ह्या अर्थी दाणिं शब्द ज्ञानेश्वरकालीन मराठींत येतो, त्याचें मूळ इदानीम्. (स. मं.)

असे अनेक भारतीय खेळ जे आपण खेळत नाही त्याचा उल्लेख राजवाडे करतात.

आंधळी कोशिंबीर - " अंधा कौशांबी " नांवाचा खेळ कौशांबी नामक शहरांत खेळत. कौशांबी शब्दाला र जोडला आहे. असा र लंडनांतील कनिष्ट लोक शब्दाच्या शेवटीं जोडतात. कोशिंबीर हा वनस्पतीचा वाचक शब्द हि सुचला.

१ इटीदांडू, २ लगोऱ्या, ३ मलखांब, ४ जोडी, ५ चाक, ६ गदगाफरी, ७ दंड, ८ नमस्कार, ९ उठाबशा, १० घोडी, ११ पाळणा, १२ झोंबी, १३ जेठी, १४ कुरघोडी, १५ आट्यापाट्या, १६ आंधळी कोशिंबीर, १७ हुतूतू, १८ हमामा, १९ झिम्मा, २० फुगडी, २१ कोंबडा, २२ गोट्या, २३ गल, २४ सागरगोटे, २५ टिपरी, २६ फांसा, २७ सोकटी किंवा सोंगटी, २८ चिंचोके, २९ खडे, ३० कानीं खडा, ३१ वाघमेंढ्या, ३२ टाळी, ३३ लोण वगैरे शेंकडों शब्द प्राकृतांतून मराठींत आले आहेत.

आयजी बायजी [अतिजातिः = अइजाइ - आयजी (स्थानांगसूत्र). व्यतिजातिः = बइजाइ = बायजी]

पितुः संपदं अतिलंघ्य जातः अतिजातः समृद्धतरः । पितुःईषद्धीनगुणः व्यतिजातः । श्रीमंत बापाच्या जोरावर गुणहीन मुलगा उदार. आयजीच्या जीवावर बायजी उदार.

इथंतथं [आयथातथ्यं = इथंतथं]

इथंतथं करूं नको म्ह० खोटें करूं नको. हा शब्द आपण खूपदा वापरतो पण अर्थ बदलला आहे.

आता जो शब्द मी तुम्हाला सांगणार आहे तो ऐकून तुम्हाला धक्का बसेल.

इन् मिन् तिन् [इँ, मीँ, तीँ = हीं, मीं आणि तीं]

अनुनासिकाचा अनुस्वार उच्चारिला. तीन ह्या संख्यावाचक शब्दाशीं तीँ या सानुनासिक शब्दाचा घोंटाळा करून अर्थनिष्पति केली आहे. (भा. इ. १८३२)

इशी, इश्श् - लहान मूल शौच्याला जावयाचें असल्यास त्याला इशीला जावयाचें का, म्हणून विचारतात. विशि विष्टायां (माध्यंदिनीय वाजसनेय संहिता-महीधरकृत वेददीप २५-७). विश् म्हणजे विष्टा. विश्= इश् (स्त्री) = इश. बायका घाणेरडा पदार्थ पाहिला असतां इश्श् मेलं असे शब्द उच्चारितात. त्यांतील इश्श् ह्या शब्दाचा अर्थ विष्टा असा आहे. (भा. इ. १८३३)

अथर्व वेद - यावरील दारील भाष्य हे अतिशय प्रसिद्ध आहे. यावर एका संदर्भावर राजवाडे काय म्हणतात ते पाहूया…

उकिरडा - ह्या शब्दावरून असें दिसतें कीं दारिल व केशव हे दोघे हि secondary प्राकृत म्हणजे प्राकृतिक, मराठी वगैरे भाषा बोलणारे होते.

कौशिक सूत्र २८।२

दारिल:- अवकर = उकुरटिकातृणानि

केशवः- उकरिडिका मार्जनिकातृणं

अर्थात् केशव हा महाराष्ट्रब्राह्मण आहे. (भा. इ. १८३२)

उतावळा हा एक शब्द आहे राजवाडे यांच्या मते या शब्दाचे मूळ मृच्छकटिक या नाटकात आहे याचा संदर्भ ते पुढीलप्रमाणे देतात. उतावळ (ळा-ळी-ळें) [उत्तापकः=उत्तावल: (मृच्छकटिक) = उतावळ (ळा-ळी-ळें)]

उभ्या पिकाची जमीन - यद् एकस्मिन् संवत्सरे द्विः फलति तद् उभयतः सस्यं क्षेत्रं । (आश्वलायनगृह्यसूत्रगार्ग्यनारायणीयवृत्ति-१-५-६) उभ्या पिकाची जमीन म्हणजे ज्या जमिनींत वर्षांतून दोनदा पीक येतें. (भा. इ. १८३६)

कर (प्रत्यय) - नगरकर, पुणेंकर, इंदूरकर, वऱ्हाडकर, काश्मीरकर इ. इ. इ.

हा कर प्रत्यय कोठून आला ? करणें या धातूपासून कर आला नाहीं हें निश्चित. आला म्हणावा, तर नगर करणारा तो नगरकर असा अर्थ होऊं लागेल. तो अनिष्ट. सबब, कर धातूपासून हा कर प्रत्यय आला नाहीं. हा कर प्रत्यय तेथें राहणारा या अर्थी आहे. संस्कृतांत असा प्रत्यय म्हणजे तास्थ्यार्थी प्रत्यय बुङ् होय. पाटलिपुत्रकः, कांपिल्यकः, नांदिपुरक: इ. इ. इ. ह्या वुङ् प्रत्ययापासून मराष्टी कर प्रत्यय आलेला आहे. वुङ् (क) च्या पुढें र मराठींत केवळ आगन्तुक आहे; परंतु तो महाराष्ट्रीद्वारा आला आहे. अस्मत्क, युष्मत्क यांबद्दल प्राकृतांत आम्हकेर, तुम्हकेर अशीं रुपें येतात. म्हणजे संस्कृत क वद्दल प्राकृत केर होतो. त्या केर चें मराठी कर. (सं.) पाटलिपुत्रक = (प्रा.) पाडळिपुत्तकेर = (म.) पाडलिपुत्रकर. नांदीपुरकः = नांदूरकेर = नांदूरकर. इ. इ. इ. (भा. इ. १८३३)

काही आडनावांच्या संदर्भात हा संदर्भ महत्त्वचा आहे.

विदेशी भाषेशी संबंध जोडण्यापेक्षा त्याची व्यूत्पत्ती मराठीतून कशी देता येईल असा एक नवीन सिद्धांत त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला असे दिसते.

कारभार [कार्यभारः = कारभार] कारबार ह्या फारशी शब्दाशीं कांहींएक संबंध नाहीं. स्वत: कारबार हा शब्द संस्कृत कार्यभार ह्या शब्दापासून निघालेला आहे. कारभार हा शब्द नामयाच्या जनांच्या अभंगांत येतो. (भा. इ. १८३४)

निष्कर्ष:

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी भाषेच्या क्षेत्रात भरीव असे योगदान दिले आहे. भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी आपण मर्यादित स्वरूपाचे प्रयत्न करतो आहोत. अनेक भाषा नष्ट होत आहेत भाषेचे अभ्यासक भाषा वाचवण्यासाठी अतिशय प्रयत्नपूर्वक काम करत आहेत. राष्टीय शैक्षणिक धोरण२०२० यासंबंधी महत्त्वपूर्ण भाष्य करते. पण ते अमलात कसे आणायचे? हा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचे उत्तर आपल्याला राजवाडे यांच्या लिखाणात सापडते. इतिहास आणि भाषा या दोन्ही विषयांचा संबंध मानवाशी आहे. मानव जोपर्यंत आहे तोपर्यंत हे विषय असणार. आणि मानव जरी नष्ट झाला तरी तो का नष्ट झाला याचे उत्तर देखी हेच दोन विषय देणार आहेत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात वि. का. राजवाडे यांचे योगदान पुन्हा नव्याने अभ्यासण्याची आवश्यकता आहे असे वाटते.

संदर्भ ग्रंथ:

१) शहा, मु. ब. (संपा.)- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे- समग्र साहित्य, खंड१ – मराठी भाषा व व्याकरण, प्रकाशन क्र.४४, राजवाडे संशोधन मंडळ प्रकाशन, धुळे, १९९५

२) तुळपुळे, शं. गो. (संपा)- ज्ञानेश्वरीची प्रस्तावना आणि ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण, महाराष्ट्र राज्य आणि साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००२

ऑनलाइन संदर्भ ग्रंथ/ संकेतस्थळ:

१) https://sahitya.marathi.gov.in/ebooks/.pdf

२) https://upload.wikimedia.org/wikipedia/commonsE_%28_Aitihasik_Prastavna-_Rajwade_Lekh_Sangrah_Volume_1_%29.pdf

३) https://archive.org/details/in.ernet.dli.2015.408044/page/n57/mode/1up

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

मराठा इतिहासलेखनात डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास

प्रा. (डॉ.) श्रीमती स्वाती रामराव सरोदे

इतिहास विभग प्रमुख,

वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड

Corresponding Author - प्रा. (डॉ.) श्रीमती स्वाती रामराव सरोदे

DOI - 10.5281/zenodo.19658741

सारांश (Abstract):

सदर शोधनिबंध आधुनिक महाराष्ट्रातील अग्रगण्य इतिहासकार डॉ. अनंत रामचंद्र कुलकर्णी (१९२५ - २००९) यांच्या मराठा इतिहासलेखनातील योगदानाचे विश्लेषणात्मक परीक्षण केले आहे. डॉ. कुलकर्णी यांनी पारंपरिक बखरवाङ्मय आणि औपनिवेशिक इतिहासलेखनातील मर्यादा ओळखून मराठा इतिहासाला वैज्ञानिक, वस्तुनिष्ठ आणि पुराव्याधिष्ठित अधिष्ठान प्राप्त करून दिले. विशेषतः शिवकालीन सामाजिक-आर्थिक जीवन, मराठा इतिहासलेखनाची परंपरा, पोर्तुगीज-मराठा संबंध, खेड्यांची अर्थव्यवस्था यांवर त्यांचे मूलगामी संशोधन आहे. त्यांनी इतिहासाचा 'संरचना - केंद्रित' दृष्टिकोन विकसित केला. त्यांच्या 'Maratha Historiography' सारख्या महत्त्वपूर्ण ग्रंथांतून त्यांनी मराठा इतिहासाला जागतिक इतिहासलेखनाच्या प्रवाहात मानाचे स्थान मिळवून दिले आहे.

बीजशब्द (Key Words): मराठा इतिहास, डॉ. अ. रा. कुलकर्णी, आर्थिक इतिहास, गावगाडा, वतनसंस्था, शिवकाल, ऐतिहासिक साधनचिकित्सा, मोडी कागदपत्रे.

प्रास्ताविक :

इतिहासलेखन म्हणजे केवळ भूतकाळातील घटनांची नोंद नसून त्या घटनांचे सातत्याने होणारे पुनर्मूल्यांकन होय. मराठा इतिहासाच्या बाबतीत ही बाब अधिक महत्त्वाची ठरते. १७व्या शतकापासून आजतागायत मराठ्यांच्या इतिहासावर विविध दृष्टिकोनातून अनेक ग्रंथ लिहिले गेले आहेत. ग्रॅन्ट डफ, जेम्स कॅनेडी, मॉन्स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांसारख्या ब्रिटिश इतिहासकारांनी मराठ्यांचे चित्रण प्रामुख्याने 'अराजक निर्माण करणारे', 'लुटारू' म्हणून केले. तर वि. का. राजवाडे, गोविंद सखाराम सरदेसाई, यदुनाथ सरकार यांसारख्या इतिहासकारांनी मराठ्यांचा इतिहास हिंदूंच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे प्रतीक म्हणून मांडला. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचे कार्य हे या दोन्ही प्रवाहांच्या पलीकडे जाणारे होते. ते महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक इतिहासाला केंद्रीय स्थान देणारे पहिले प्रमुख इतिहासकार मानले जातात. त्यांच्या कार्यातून मराठा इतिहासाचा अभ्यास 'व्यक्ती - केंद्रित' न राहता 'संरचना - केंद्रित' झाला. इतिहास हा केवळ नायकांची गाथा नसून, उत्पादनाच्या साधनांवरचा नियंत्रण, वर्गसंघर्ष, सामाजिक गटांची गतिशीलता आणि राजकीय सत्तेचा आर्थिक आधार यांचा अभ्यास आहे, हा दृष्टिकोन त्यांनी मराठा इतिहासाच्या अंगी बाणवला. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या योगदानाचा सर्वांगीण अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. मराठा इतिहास लेखनातील डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या मूलभूत कार्याचा परिचय करून घेणे.
२. त्यांनी मांडलेल्या आर्थिक आणि सामाजिक संकल्पनांचे (उदा. गावगाडा) विश्लेषण करणे.
३. इतिहास संशोधनासाठी त्यांनी वापरलेल्या साधनांच्या चिकित्सक पद्धतीचा अभ्यास करणे.
४. मराठा इतिहासाच्या पुनर्मूल्यांकनात त्यांच्या योगदानाचे महत्त्व स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती :

या शोधनिबंधात ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक साधनांमध्ये डॉ. कुलकर्णी यांचे मराठी व इंग्रजी ग्रंथ, संपादित कागदपत्रे आणि संशोधनपर लेखांचा समावेश आहे. दुय्यम साधनांमध्ये त्यांच्यावरील समीक्षालेख, परीक्षणे व अन्य इतिहासकारांची अभिप्रायात्मक मते यांचा आधार घेतला आहे. अभ्यासाची व्याप्ती मराठा इतिहासविषयक त्यांच्या लेखनापुरती मर्यादित ठेवण्यात आली आहे.

विषय विवेचन:

मराठा साम्राज्याचे इतिहासलेखन हे प्रामुख्याने दोन पद्धतीने विकसित झाले. ग्रॅन्ट डफ, जेम्स कॅनेडी, मॉन्स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांसारख्या ब्रिटिश इतिहासकारांनी मराठ्यांचे चित्रण प्रामुख्याने 'अराजक निर्माण करणारे' आणि 'लुटारू' म्हणून केले. तर वि. का. राजवाडे, गोविंद सखाराम सरदेसाई, यदुनाथ सरकार यांसारख्या इतिहासकारांनी मराठ्यांचा इतिहास हिंदूंच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे प्रतीक म्हणून मांडला. अ. रा. कुलकर्णी यांचे कार्य हे या दोन्ही प्रवाहांच्या पलीकडे जाणारे होते. त्यांच्यावर मार्क्सवादी इतिहासलेखनाचा प्रभाव होता. त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक इतिहासाला केंद्रीय स्थान दिले. त्यांच्या या महत्वपूर्ण कार्यामुळे मराठा इतिहासाचा अभ्यास 'व्यक्ती - केंद्रित' न राहता 'संरचना - केंद्रित' झाला. इतिहास हा केवळ नायकांची गाथा नसून, उत्पादनाच्या साधनांवरचा नियंत्रण, वर्गसंघर्ष, सामाजिक गटांची गतिशीलता आणि राजकीय सत्तेचा आर्थिक आधार यांचा अभ्यास आहे, हा दृष्टिकोन त्यांनी मराठा इतिहासाच्या अंगी बाणवला.

१. मराठा इतिहास लेखनातील डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या मूलभूत कार्य :

डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचे मराठा इतिहासलेखनातील कार्य मूलभूत आहे कारण त्यांनी इतिहासाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन विकसित केला. पारंपरिक इतिहासलेखन हे प्रामुख्याने राजकीय घटना, युद्धे आणि राजवंशांच्या कारकीर्दीपुरते मर्यादित होते. डॉ. कुलकर्णी यांनी याच्या पलीकडे जाऊन सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहासाचा सखोल अभ्यास केला. त्यांनी इतिहासाचा अभ्यास करताना अस्सल कागदपत्रे, अभिलेख आणि तत्कालीन दस्तऐवज यांचा आधार घेतला. केवळ मराठी भाषेतील साधनांवर अवलंबून न राहता फारसी, इंग्रजी, पोर्तुगीज, जर्मन, फ्रेंच आणि डच भाषांमधील ऐतिहासिक साधनांचाही अभ्यास करून त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाचे एक व्यापक चित्र उभे केले. आपले इतिहास लेखन सामान्य माणसालाही समजावे अशी भूमिका घेताना ते म्हणतात, 'सामान्य माणसाला, विशेषतः प्रौढ साक्षराला, आपल्या प्रांताचा इतिहास माहिती असावा म्हणून संशोधकाचा मुखवटा बाजूला ठेवून, पण शक्यतो अधिकृत इतिहास सोप्या भाषेत सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे."[१] डॉ. कुलकर्णी यांनी इतिहासाला' चौकटीत बंदिस्त न ठेवता त्यास लोकसंवादाचे साधन बनवले. संशोधनातील सत्यता आणि भाषेतील सुलभता यांचा त्यांनी संगम

साधला. त्यांच्या या भूमिकेमुळे इतिहासलेखनात 'वस्तुनिष्ठता' आणि 'सार्वजनिक सुलभता' या दोन्ही मूल्यांचा अंतर्भाव झाला. त्यांनी संशोधनाचा दर्जा न घालवता तो जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे महान कार्य केले.

२. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी मांडलेल्या आर्थिक आणि सामाजिक संकल्पनांचे विश्लेषण:

डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी मराठा काळातील सामाजिक - आर्थिक संकल्पनांचा सखोल अभ्यास करून इतिहासाचे एक नवीन परिमाण उभे केले. 'गावगाडा' ही संकल्पना त्यांच्या अभ्यासाचा एक महत्त्वाचा भाग होती. मराठा काळातील गाव ही केवळ वस्ती नसून ती एक स्वयंपूर्ण आर्थिक आणि सामाजिक व्यवस्था होती. गावातील पाटील, कुलकर्णी, चौगुला, महार या वतनदारांची कार्ये आणि त्यांचे परस्परसंबंध यांचे विश्लेषण तसेच 'अलुतेदार' आणि 'बलुतेदार' या संकल्पना त्यांनी विशद केल्या. त्यांच्या मते "अलुतेदार - बलुतेदार पद्धतीमुळे गाव ही एक स्वयंपूर्ण व्यवस्था निर्माण झाली होती."[२]

त्यांनी गावातील विविध व्यवसायिक जाती, त्यांचे पारंपरिक अधिकार आणि कर्तव्ये यांचा अभ्यास करून ग्रामीण समाजाचे वास्तववादी चित्र उभे केले. डॉ. कुलकर्णी यांनी 'गावगाडा' या संकल्पनेला ऐतिहासिक परिप्रेक्षात पाहिले. त्यांनी स्पष्ट केले की, बलुतेदारी पद्धत ही केवळ सेवा - शुल्काची देवाणघेवाण नव्हती, तर ती ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा होती. यामुळेच राजकीय अस्थिरतेच्या काळातही महाराष्ट्राचे ग्रामीण समाजजीवन कोसळले नाही. शिवकालीन महसूल व्यवस्थेचा सखोल अभ्यास करून शिवाजी महाराजांनी अमलात आणलेली महसूल पद्धत, जमिनीचे वर्गीकरण उत्पन्नाचे मूल्यमापन आणि सरकारी वाटा याबाबत मौलिक माहिती उपलब्ध करून दिली. तसेच शिवकालीन अर्थव्यवस्थेची व्याप्तीही दाखवून दिली.

३. इतिहास संशोधनासाठी डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी वापरलेल्या साधनांच्या चिकित्सक पद्धती :

डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या इतिहास संशोधनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी अवलंबलेली चिकित्सक पद्धती होय. ऐतिहासिक साधनांचा अभ्यास करताना त्यांनी केवळ साधनांचे संकलन न करता त्यांची सत्यता, प्रामाणिकता आणि उपयुक्तता यांची काटेकोर चिकित्सा केली. आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन करून त्यांनी अनेक नवीन साधने उपलब्ध करून दिली. लंडनच्या 'स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीज' (SOAS), जर्मनीतील हायडलबर्ग आणि पॅरिस येथे संशोधन करून त्यांनी ग्रँट डफसारख्या इतिहासकारांच्या लेखनपद्धतीचे विश्लेषण केले. त्यांच्या मते "ग्रँट डफच्या दृष्टीने इतिहास म्हणजे 'राजकीय इतिहास' होय. त्याला लढाया, युद्धे, दरबारांतील गटबाजी आणि व्यक्तींचे जय-पराजय यांत अधिक रुची होती. त्या काळातील अर्थव्यवस्था किंवा सामाजिक स्थिती अशा विषयांना त्याने गौण स्थान दिले."[३]

बखरी या ऐतिहासिक साधनांचा अभ्यास करताना डॉ. कुलकर्णी यांनी विशेष चिकित्सक दृष्टिकोन अवलंबला. त्यांच्या मते, "बखरींमधील अतिशयोक्ती, काल्पनिक घटना आणि पूर्वग्रह यांपासून सत्य घटना ओळखण्यासाठी त्यांची इतर साधनांशी तुलना करणे आणि भौगोलिक पुराव्यांचा मेळ घालणे अपरिहार्य आहे." [४] बखरींमधील अतिशयोक्ती, काल्पनिक घटना आणि पूर्वग्रह यापासून सत्य घटना ओळखण्यासाठी त्यांनी इतर साधनांशी तुलना, कालानुक्रमे घटना तपासणे आणि भौगोलिक पुराव्यांचा मेळ घालणे आवश्यक आहे हे अधोरेखित केले .त्यांनी बखरींना पूर्णपणे नाकारले नाही, तर त्यातील सत्य शोधण्यासाठी तौलनिक पद्धतीचा पुरस्कार केला.

इतिहासाच्या अभ्यासासाठी मराठी साधनांबरोबरच फारसी, पोर्तुगीज, इंग्रजी या भाषांमधील साधनांचा उपयोग अपरिहार्य आहे कारण मराठ्यांचे संबंध मोगल, आदिलशाही, कुतुबशाही तसेच पोर्तुगीज व इंग्रज यांच्याशी होते.असा त्यांचा आग्रह होता. म्हणून त्यांनी बहुभाषिक साधनांचा उपयोग करून मराठ्यांच्या इतिहासाला व्यापक परिमाण दिले.

४: मराठा इतिहासाच्या पुनर्मूल्यांकनात डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या योगदानाचे महत्त्व:

डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचे मराठा इतिहासाच्या पुनर्मूल्यांकनातील योगदान अनेक स्तरांवर महत्त्वपूर्ण ठरले. त्यांनी केवळ इतिहास लिहिला नाही, तर इतिहासाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन निर्माण केला.त्यांच्या मते, "इतिहास संशोधन ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. नवीन साधने उपलब्ध होतात, नवीन दृष्टिकोन विकसित होतात आणि त्यामुळे इतिहासाचे पुनर्मूल्यांकन होत असते."[५]

पारंपरिक इतिहासलेखनात मराठ्यांचा इतिहास हा प्रामुख्याने शिवाजी महाराज आणि पेशवे यांच्या पराक्रमाची गाथा म्हणून सादर केला गेला. डॉ. कुलकर्णी यांनी हे चित्र अपुरे असल्याचे सिद्ध केले. इतिहास संशोधक इरफान हबीब यांच्या मते, "प्रा. कुलकर्णी यांनी मराठ्यांच्या राजकीय इतिहासाच्या स्वरूपाचे योग्य आकलन व्हावे यासाठी सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा वेध घेण्याच्या महत्त्वपूर्ण परंपरेला चालना दिली." [६] या संदर्भात मराठा महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी, मिडिएवल महाराष्ट्र, द मराठाज या त्यांच्या तीन इंग्रजी ग्रंथांचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. त्यांनी दाखवून दिले की मराठ्यांचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तेचा इतिहास नसून तो सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचाही इतिहास आहे.

त्यानी पुणे विद्यापीठात इतिहास विभागाची स्थापना करून संशोधनाची नवी परंपरा सुरू केली. भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेच्या (ICHR) स्थापनेत त्यांचा मोठा वाटा होता आणि १९७८ ते १९८१ या काळात त्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून देशभर इतिहास संशोधनाला चालना दिली. त्यांचे ग्रंथ आजही मराठा इतिहासाच्या अभ्यासासाठी मूलभूत संदर्भग्रंथ मानले जातात.मास्को विद्यापीठातील संशोधक श्रीमती युजेनिया व्हॅनिना यांनी डॉ. अ.रा.कुलकर्णी यांच्यावर लिहिलेल्या लेखात,' महाराष्ट्राच्या भव्य व वैभवशाली इतिहास संशोधन परंपरेचा वारसा, खाणाखुणा प्रा.कुलकर्णी यांच्या लेखनातून सहज दिसून येतात.'या शब्दांत मराठा इतिहास लेखनातील त्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे.[७]

अशाप्रकारे, डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचे मराठा इतिहासाच्या पुनर्मूल्यांकनातील योगदान बहुआयामी आणि मूलभूत आहे. त्यांनी इतिहासलेखनाची नवी परंपरा निर्माण केली, सामाजिक-आर्थिक संकल्पनांचा सखोल अभ्यास केला, चिकित्सक पद्धतीचा विकास केला आणि इतिहासाला सामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचा विषय बनवले. त्यांचे कार्य आजही इतिहास अभ्यासकांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरते.

सारांश:

डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचे मराठा इतिहासलेखनातील योगदान मूलभूत व बहुआयामी आहे. पारंपरिक राजकीय इतिहासाच्या पलीकडे जाऊन त्यांनी सामाजिक - आर्थिक इतिहासाचा सखोल अभ्यास करून मराठा इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण केला. गावगाडा, शिवकालीन महसूल व्यवस्था, अलुतेदारी - बलुतेदारी पद्धत यांसारख्या संकल्पनांचे विश्लेषण करून सामान्य जनतेच्या जीवनाचे वास्तवदर्शी चित्र उभे केले.

बहुभाषिक साधनांचा वापर व बखरींसह विविध ऐतिहासिक साधनांची काटेकोर चिकित्सा करून संशोधनाची शिस्तबद्ध पद्धत विकसित केली. त्यांचे हे कार्य मराठा इतिहासाच्या अभ्यासासाठी युगप्रवर्तक ठरले.

निष्कर्ष:

१. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी मराठा इतिहासलेखनाला केवळ राजकीय घटनांपुरते मर्यादित न ठेवता सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून अभ्यासाची नवी दिशा दिली आणि संशोधनाची स्वतंत्र परंपरा निर्माण केली.

२. त्यांनी 'गावगाडा' व 'महसूल व्यवस्था' यांसारख्या मूलभूत संकल्पनांचा सखोल अभ्यास करून ग्रामीण समाजजीवनाचे वास्तव आणि वस्तुनिष्ठ चित्र स्पष्ट केले.

३. बहुभाषिक साधनसामग्रीचा आधार घेत चिकित्सक व शास्त्रीय पद्धतीने संशोधन करण्याची पद्धत त्यांनी इतिहासलेखनात रूजवली.

४. त्यांच्या लेखनातील अभ्यासपूर्ण दृष्टिकोनामुळे त्यांचे ग्रंथ आजही मराठा इतिहासाच्या अध्ययनासाठी आधारभूत व प्रमाण मानले जातात.

संदर्भ :

१. कुलकर्णी, अ. रा., अशी होती शिवशाही, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पाचवी आवृत्ती २००६, प्रस्तावना, पृ. क्र. ८

२. कुलकर्णी, अ. रा., मध्ययुगीन महाराष्ट्र (सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण) , मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती २००३, पृ. क्र. ४८.

३. कुलकर्णी, अ. रा., मराठ्यांचे इतिहासकार (इतिहासलेखन पद्धती) , डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती २००७, पृ. क्र. ६८.

४. कुलकर्णी, अ. रा., मराठ्यांचे इतिहासकार (इतिहासलेखन पद्धती) , डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती २००७, पृ. क्र. १८.

५. कुलकर्णी, अ. रा., मराठ्यांचे इतिहासकार (इतिहासलेखन पद्धती) , डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती २००७, पृ. क्र. २५०.

६. हबीब, इरफान, प्रस्तावना, मराठ्यांचे इतिहासकार (इतिहासलेखन पद्धती) , कुलकर्णी, अ. रा., डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती २००७, प्रस्तावना पृ. क्र. ७

७. Kulkarni P.M., Historian Dr. A.R. Kulkarni, research blog,

१. https://share.google/WSio8uazh3ByJTUYv , Date 19th February,2026,12.40 pm.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

आजच्या संदर्भात प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या इतिहासलेखनाची प्रस्तुतता

जन्मशताब्दीनिमित्त विशेष चिंतन

श्री. कपिल वंदना अनादपिंड राजहंस

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी

Corresponding Author - श्री. कपिल वंदना अनादपिंड राजहंस

DOI - 10.5281/zenodo.19658834

सारांश:

इतिहास म्हणजे केवळ गतकाळातील मृत घटनांचे सादरीकरण नसून, तो वर्तमानाला समजून घेण्याचा आणि भविष्याची दिशा निश्चित करण्याचा एक ज्ञानशाखीय (Epistemological) मार्ग आहे. ही व्यापक दृष्टी महाराष्ट्राच्या इतिहासलेखन परंपरेत ज्यांनी अत्यंत समर्थपणे रुजवली, त्या प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी (१९ एप्रिल १९२५ - २६ मे २००९) यांचे जन्मशताब्दी वर्ष (१९२५-२०२५/२६) आपण साजरे करत आहोत. प्रस्तुत शोधनिबंध हा डॉ. कुलकर्णी यांच्या संशोधन पद्धतीचा, वस्तूनिष्ठ दृष्टिकोनाचा आणि त्यांनी मराठा इतिहासाला दिलेल्या सामाजिक-आर्थिक (Socio-Economic) परिमाणाचा चिकित्सक अभ्यास आहे. 'महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी' या त्यांच्या युगप्रवर्तक ग्रंथापासून ते 'जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ' या वसाहतवादी इतिहासलेखनावरील त्यांच्या सडेतोड चिकित्सेपर्यंतचा त्यांचा प्रवास या निबंधात उलगडण्यात आला आहे. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या आणि सोशल मीडियाच्या युगात, जिथे इतिहासाचा वापर अनेकदा 'अस्मिता' आणि 'राजकारण' यासाठी एक हत्यार म्हणून केला जातो, तिथे डॉ. कुलकर्णी यांची 'कागदपत्रांवर आधारित' (Archival and Source-based) सत्यशोधक वृत्ती कशी दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरते, याचे सविस्तर विवेचन यात केले आहे. विशेषतः शिवकालीन कृषी अर्थव्यवस्था, दुष्काळ निवारण धोरणे आणि वतन संस्था यावर त्यांनी केलेले सूक्ष्म संशोधन, २१ व्या शतकातील भारतासमोरील कृषी आणि प्रशासकीय आव्हाने सोडवण्यासाठी कसे प्रस्तुत (Relevant) आहे, हा या शोधनिबंधाचा मुख्य निष्कर्ष आहे.

बीज शब्द: प्रा. अ. रा. कुलकर्णी, जन्मशताब्दी, मराठा इतिहास, सामाजिक-आर्थिक इतिहास, वतन पद्धती, वसाहतवादी इतिहासलेखन, सूक्ष्म-इतिहास, कृषी अर्थव्यवस्था.

प्रस्तावना: इतिहासलेखनाच्या नव्या युगाचा प्रारंभ:

भारतीय इतिहासलेखनाच्या परंपरेत, विशेषतः दख्खन आणि मराठा इतिहासाच्या संदर्भात, विसावे शतक हे अत्यंत स्थित्यंतराचे शतक मानले जाते. न्यायमूर्ती रानडे, वि. का. राजवाडे, सर यदुनाथ सरकार, आणि रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी मराठा इतिहासाचा भक्कम पाया रचला. मात्र, या सर्व पूर्वसुरींचा मुख्य भर हा 'राजकीय आणि लष्करी' इतिहासावर होता. लढाया, तह, दरबारातील घडामोडी आणि राजांचे पराक्रम याभोवती हा इतिहास फिरत होता. फ्रान्समधील 'ॲनाल्स स्कूल'ने ज्याप्रमाणे इतिहासाच्या केंद्रस्थानी 'सामान्य माणसाला' आणले, तोच प्रयोग महाराष्ट्रात प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी यशस्वीपणे राबवला.[1]

डॉ. कुलकर्णी यांच्या मते, राजांचा इतिहास हा समाजाचा समग्र इतिहास असू शकत नाही. समाजाचा खरा इतिहास हा गावगाड्यात, शेतकऱ्यांच्या बांधावर, आणि बाजारपेठांमध्ये घडत असतो. १९ एप्रिल १९२५ रोजी जन्मलेल्या या ऋषितुल्य इतिहासकाराची जन्मशताब्दी साजरी करत असताना, आपण केवळ एका व्यक्तीचे स्मरण करत नाही, तर 'वस्तूनिष्ठ आणि बहुआयामी इतिहासलेखनाच्या' परंपरेचा जागर करत आहोत. वर्तमानातील प्रश्नांची उत्तरे भूतकाळातील धोरणांमध्ये कशी दडलेली आहेत, हे शोधण्यासाठी डॉ. कुलकर्णी यांचे साहित्य आजही कसे प्रस्तुत ठरते, हे पाहणे औचित्याचे ठरेल.

संशोधन पद्धती आणि ज्ञानमीमांसा:

प्रा. अ. रा. कुलकर्णी यांचे इतिहासलेखन हे कोणत्याही पूर्वग्रहावर (Prejudice) किंवा भावनिक लाटेवर स्वार झालेले नव्हते. त्यांची संशोधन पद्धती ही अत्यंत वैज्ञानिक आणि पुराव्यांवर आधारित होती.

१. अस्सल साधनांचा आग्रह आणि पुराभिलेखागाराचा वापर:

त्यांनी कधीही केवळ बखरी किंवा दुय्यम साधनांवर (Secondary Sources) विसंबून इतिहास लिहिला नाही. पुण्याचे 'पेशवे दप्तर' (Pune Archives), 'एलियनेशन ऑफिस', लंडनचे 'इंडिया ऑफिस लायब्ररी', आणि पॅरिसचे अर्काईव्हज येथील लक्षावधी मोडी, पर्शियन आणि इंग्रजी कागदपत्रे त्यांनी अभ्यासली. "इतिहासकाराने न्यायाधीशाच्या भूमिकेत असावे, वकिलाच्या नाही," ही रँके प्रणीत भूमिका त्यांनी आयुष्यभर जपली.[2]

२. सूक्ष्म-इतिहास (Micro-History) दृष्टिकोन - इंदापूरचा अभ्यास:

१९६० च्या दशकात जागतिक पातळीवर 'मायक्रो-हिस्टरी'ची संकल्पना बाळसे धरत असताना, डॉ. कुलकर्णी यांनी आपल्या पीएच.डी. च्या संशोधनासाठी संपूर्ण मराठा साम्राज्याचा ढोबळ अभ्यास करण्याऐवजी केवळ 'इंदापूर परगण्या'ची निवड केली.[3] एका विशिष्ट परगण्यात जमिनीची मोजणी कशी होते, पिकांची प्रतवारी कशी ठरते, आणि रयतेकडून महसूल कसा गोळा केला जातो, याचे अत्यंत सूक्ष्म आणि सांख्यिकीय विश्लेषण (Statistical Analysis) त्यांनी केले. एका थेंबावरून संपूर्ण समुद्राची चव ओळखण्याच्या या त्यांच्या 'इंडक्टिव्ह' (Inductive) पद्धतीमुळे मराठा प्रशासनाचे खरे आर्थिक स्वरूप जगासमोर आले.

मराठा इतिहासाची सामाजिक-आर्थिक फेरमांडणी :

मराठा इतिहास हा केवळ शूरवीरांच्या तलवारीचा इतिहास नसून तो नांगराचा आणि तराजूचाही इतिहास आहे, हे डॉ. कुलकर्णी यांनी सप्रमाण सिद्ध केले.

१. कृषी अर्थव्यवस्था आणि रयत :

त्यांच्या 'महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी' या ग्रंथात त्यांनी शिवकालीन कृषी व्यवस्थेचे अत्यंत बारकाईने वर्णन केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे खऱ्या अर्थाने 'रयतेचे राज्य' का होते? तर त्याची उत्तरे त्यांच्या महसूल पद्धतीत दडलेली आहेत. जमिनीची मोजणी करण्यासाठी 'शिवशाही काठी'चा वापर, जमिनीच्या सुपीकतेनुसार (उदा. अव्वल, दुय्यम, सीम) साऱ्याची निश्चिती, आणि दुष्काळात शेतकऱ्यांना दिली जाणारी सवलत, याचे पुरावे डॉ. कुलकर्णी यांनी मोडी कागदपत्रांतून शोधून काढले.[4] त्यांनी स्पष्ट केले की, शिवरायांचे धोरण हे

शेतीचे केवळ शोषण करणारे नव्हते, तर कृषी-उत्पादन वाढीला प्रोत्साहन देणारे होते.

२. ग्रामसंस्था, बलुतेदारी आणि वतन पद्धती:

महाराष्ट्राच्या समाजजीवनाचा गाभा समजून घेण्यासाठी येथील 'गावगाडा' समजून घेणे आवश्यक आहे. डॉ. कुलकर्णी यांनी 'वतन', 'मिरासदार', आणि 'उपरी' या संकल्पनांची ऐतिहासिक उकल केली.[5] त्यांच्या मते, वतन हे केवळ उपजीविकेचे साधन नव्हते, तर ती समाजातील एक 'सत्ता' आणि 'प्रतिष्ठा' होती. पाटील, कुलकर्णी, चौगुले आणि बारा बलुतेदार यांच्यातील परस्पर संबंधांचे, त्यांच्यातील आर्थिक देवाणघेवाणीचे आणि हक्कांसाठी होणाऱ्या तंट्यांचे त्यांनी अत्यंत सजीव चित्रण केले आहे. यातून मध्ययुगीन महाराष्ट्राची खरी समाजरचना डोळ्यांसमोर उभी राहते.

वसाहतवादी इतिहासलेखनाची सडेतोड चिकित्सा:

अनेक दशके भारताचा इतिहास हा ब्रिटिश अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या ग्रंथांवर आधारित होता. कॅप्टन जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ याने १८२६ मध्ये लिहिलेला *'A History of the Mahrattas'* हा ग्रंथ दीडशे वर्षे 'बायबल' मानला गेला. मात्र, डफच्या लेखनात मराठ्यांबद्दल अनेक पूर्वग्रह होते. मराठ्यांना 'लुटारूंच्या टोळ्या' (Freebooters/Plunderers) ठरवण्याची वसाहतवादी प्रवृत्ती डफमध्ये होती.[6]

डॉ. कुलकर्णी यांनी या वसाहतवादी नरेटिव्हला उत्तर देण्यासाठी निव्वळ राष्ट्रवादी आणि भावनिक आरडाओरडा केला नाही. त्यांनी *'जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ'* हा स्वतंत्र ग्रंथ लिहून डफच्या साधनांची आणि निष्कर्षांची तात्विक चिरफाड केली.[7]

- "राज्यघटनेचा अभाव या दाव्याचे खंडन": डफचे म्हणणे होते की, *मराठ्यांकडे कोणतेही लिखित नियम किंवा राज्यघटना नव्हती*. यावर डॉ. कुलकर्णी यांनी 'आज्ञापत्र', 'रामचंद्रपंत अमात्य यांची राजनीती' आणि तत्कालीन 'कौलनामे' यांचे दाखले देऊन सिद्ध केले की, मराठा प्रशासन अत्यंत शिस्तबद्ध आणि लिखित नियमांवर (Codified Rules) आधारित होते.[8]
- "समन्वयी दृष्टिकोन": डफवर टीका करत असतानाच, डफने कागदपत्रे गोळा करण्यासाठी आणि इतिहासाचे जतन करण्यासाठी जे अपार कष्ट घेतले, त्याचे डॉ. कुलकर्णी यांनी मुक्त कंठाने कौतुक केले. टीकाकाराच्या जमेच्या बाजू मान्य करणारी ही 'शैक्षणिक प्रगल्भता' (Academic Maturity) डॉ. कुलकर्णी यांच्यात होती, जी आजच्या विद्वानांसाठी एक आदर्श आहे.

आजच्या संदर्भात इतिहासलेखनाची प्रस्तुतता:

प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांची जन्मशताब्दी साजरी करत असताना, त्यांचा इतिहास आजच्या २१ व्या शतकातील भारतासाठी, विशेषतः महाराष्ट्रासाठी, कसा प्रस्तुत (Relevant) आहे, याचे चिंतन करणे हा या शोधनिबंधाचा सर्वांत महत्त्वाचा भाग आहे.

१. कृषी संकट आणि ऐतिहासिक उपाययोजना:

आज महाराष्ट्र भीषण अशा कृषी संकटातून जात आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या हा अत्यंत ज्वलंत आणि वेदनादायी प्रश्न आहे. अशा वेळी, डॉ. कुलकर्णी यांनी उलगडून दाखवलेली शिवकालीन 'दुष्काळ निवारण नीती' मार्गदर्शक ठरते. १६३० च्या महाभयंकर दुष्काळानंतर (ज्याला 'दुर्गादेवीचा दुष्काळ' किंवा 'शहाजहानकालीन दुष्काळ' म्हटले जाते) शहाजीराजे

आणि शिवरायांनी रयतेला सावरण्यासाठी 'तगाई' (Tagai - बिनव्याजी कृषी कर्ज) वाटली. शेतकऱ्यांना बैलजोड्या आणि बी-बियाणे पुरवले. शिवाय जोपर्यंत पीक येत नाही, तोपर्यंत शेतसारा माफ केला.[9] आजच्या काळात केवळ कर्जमाफीच्या तात्पुरत्या मलमपट्टीपेक्षा, शेतकऱ्याला पुन्हा स्वतःच्या पायावर उभे करणारी ही 'शिवकालीन तगाई व्यवस्था', आधुनिक धोरणकर्त्यांसाठी एक उत्तम 'मॉडेल' आहे. हे मॉडेल डॉ. कुलकर्णी यांच्या संशोधनामुळेच आपल्यापर्यंत स्पष्टपणे पोहोचले आहे.

२. ग्रामप्रशासन आणि स्थानिक राजकारणाचे ऐतिहासिक धागे:

आज ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने आपण 'पंचायत राज' आणि स्थानिक स्वराज्य संस्था बळकट केल्या आहेत. परंतु, आजही गावागावांत ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत जी कमालीची ईर्षा आणि संघर्ष दिसतो, त्याची पाळेमुळे ऐतिहासिक 'वतनदारी' मानसिकतेत आहेत. डॉ. कुलकर्णी यांनी 'इंडियन व्हिलेज' या निबंधातून स्पष्ट केले आहे की, मध्ययुगीन काळात 'गोट' आणि 'मजलिस' (गावसभा) ही अत्यंत प्रभावी न्यायदान यंत्रणा होती.[10] गावचे प्रश्न गावातच आणि सर्वांच्या संमतीने सोडवण्याची ही पद्धत, आजच्या न्यायव्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी 'पर्यायी न्यायदान यंत्रणा' म्हणून अभ्यासता येऊ शकते.

३. अस्मितेचे राजकारण आणि वस्तूनिष्ठ इतिहासाची गरज:

आजच्या डिजिटल आणि सोशल मीडियाच्या युगात, 'व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटी'च्या माध्यमातून इतिहासाचे मोठ्या प्रमाणावर विकृतीकरण होत आहे. इतिहासाचा वापर समाजाला जोडण्याऐवजी, विशिष्ट जाती-धर्माविरुद्ध द्वेष पसरवण्यासाठी आणि स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी 'हत्यार' म्हणून केला जात आहे. "शिवाजी महाराजांच्या काळात अमुक जातीचे स्थान काय होते?" असे प्रश्न निर्माण करून समाजात तेढ निर्माण केली जात आहे.

अशा स्फोटक परिस्थितीत, डॉ. कुलकर्णी यांची 'कागदपत्रांवर आधारित सत्यनिष्ठ मांडणी' समाजासाठी संजीवनी ठरते. "इतिहासाकडे वर्तमानाच्या चष्म्यातून पाहू नये" (Avoiding Anachronism), हा त्यांचा स्पष्ट संकेत होता.[11] शिवराय हे केवळ एका विशिष्ट गटाचे नव्हते, तर ते सर्वसमावेशक रयतेचे राजे होते, हे कुलकर्णी सरांनी तत्कालीन जमाखर्चाच्या आणि अनुदानांच्या कागदपत्रांवरून सिद्ध केले आहे. समाजस्वास्थ्य टिकवण्यासाठी आज त्यांच्या या समतोल आणि पुराव्यांवर आधारित इतिहासदृष्टीची नितांत गरज आहे.

संस्थात्मक योगदान आणि वारसा:

एक खरा विचारवंत केवळ पुस्तके लिहून थांबत नाही, तर तो ज्ञानाची निर्मिती करणाऱ्या 'संस्था' उभ्या करतो. डॉ. कुलकर्णी यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख म्हणून दीर्घकाळ काम केले. त्यांनी अभ्यासक्रमात 'स्थानिक इतिहास' आणि 'मोडी लिपीचे वाचन' यांचा अंतर्भाव करून विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची गोडी निर्माण केली.[12]

१९९१ ते १९९३ या काळात ते नवी दिल्ली येथील 'भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेचे' (ICHR) अध्यक्ष होते. या सर्वोच्च पदावर असताना त्यांनी 'मराठ्यांचा इतिहास हा भारताच्या मुख्य प्रवाहातील इतिहास आहे', ही बाब राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ठसवली.[13] 'भारत इतिहास संशोधक मंडळ', पुणे (BISM) या शतक महोत्सवी संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले आणि जुन्या दुर्मिळ कागदपत्रांचे जतन व प्रकाशन करण्यात पुढाकार घेतला.[14] तसेच

परमानंदकृत 'शिवभारत' यांसारख्या संस्कृत महाकाव्याचे संपादन करून त्यांनी साधनांच्या चिकित्सेचा उत्तम आदर्श तरुण संशोधकांसमोर ठेवला.[15]

निष्कर्ष:

प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी हे विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या बौद्धिक परंपरेतील एक उत्तुंग शिखर आहे. त्यांच्या इतिहासलेखनाने मराठा इतिहासाला दरबारी राजकारणाच्या कोंडीतून मुक्त करून विशाल सामाजिक आणि आर्थिक पटलावर नेऊन ठेवले.[16] इतिहास हा निव्वळ अभिमानाचा किंवा द्वेषाचा विषय नसून, तो एका कठोर 'शास्त्रीय अभ्यासाचा' विषय आहे, हा विचार त्यांनी आयुष्यभर जोपासला.

आज त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात आपण पदार्पण करत असताना, त्यांच्या ग्रंथांचे केवळ पुनर्मुद्रण करणे पुरेसे नाही. तर, त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गावर चालून, दप्तरखान्यातील लाखो अप्रकाशित कागदपत्रे वाचणारी, त्याचे निर्भीडपणे विश्लेषण करणारी आणि सत्य मांडणारी नवी संशोधकांची पिळी निर्माण करणे, हीच प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांना वाहिलेली खरी आणि सार्थ आदरांजली ठरेल. आजच्या गोंगाटाच्या, 'फेक न्यूज'च्या आणि अस्मितांच्या राजकारणाच्या काळात, डॉ. कुलकर्णी यांचा शांत, संयमी, परंतु पुराव्यांवर आधारित ठाम आवाज, आपल्याला सत्याचा मार्ग दाखवत राहील, यात शंका नाही.

संदर्भ सूची:

१. Kulkarni, A. R. (1996). The Marathas: History and Administration. New Delhi: Books & Books. (First Edition). Page No. 12-18. (Refer to the transition of Historiography context).

२. कुलकर्णी, अ. रा. (२०११). इतिहास, इतिहासलेखन आणि इतिहासकार. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स. (पहिली आवृत्ती). पृष्ठ क्र. ६०-६८. (इतिहासकाराची न्यायाधीशाची भूमिका).

३. Kulkarni, A. R. (1969). Maharashtra in the Age of Shivaji. Pune: R. J. Deshmukh & Co. (First Edition). Page No. 22-35. (Indapur Pargana micro- study context).

४. कित्ता. प्रकरण: "Agrarian System" (कृषी व्यवस्था). Page No. 85-98.

५. कुलकर्णी, अ. रा. (१९९८). मध्ययुगीन महाराष्ट्र: सामाजिक व आर्थिक. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स. (पहिली आवृत्ती). पृष्ठ क्र. १२०-१४५. (वतन संस्था आणि गावगाडा).

६. Duff, James Grant. (1912). A History of the Mahrattas (Vol. I). Calcutta: R. Cambray & Co. (Annotated Edition). Page No. 42-45. (Reference to the colonial view of Marathas).

७. Kulkarni, A. R. (2006). James Cuninghame Grant Duff. Pune: Diamond Publications. (First Edition). Page No. 112-118. (Critique of Duff's work).

८. कित्ता. प्रकरण: "Administrative Insights". Page No. 125-130.

९. कुलकर्णी, अ. रा. (२०१०). शिवकालीन महाराष्ट्र. पुणे: राजहंस प्रकाशन. (तिसरी आवृत्ती). पृष्ठ क्र. ८८-९५. (दुष्काळ आणि तगाई व्यवस्था).

१०. Kulkarni, A. R. (2008). Medieval Maratha Country. New Delhi: Books & Books. (Revised Edition). Refer to Essay:

"The Indian Village with special reference to Medieval Deccan". Page No. 70-82.

११. Kulkarni, A. R. (1999). Jadunath Sarkar and Maratha History. Mumbai: Popular Prakashan. Page No. 40-45. (Context on objective analysis of history).

१२. Pawar, J. (Ed.). (2000). Studies in Indian History: Festschrift in Honour of Prof. A.R. Kulkarni. New Delhi: Reliance Publishing House. Page No. 9-14. (Biographical and institutional contribution).

१३. Kulkarni, A. R. (1995). "State in Medieval Maratha History". Proceedings of Indian History Congress, 56th Session. Page No. 22-28.

१४. खरे, ग. ह. आणि कुलकर्णी, अ. रा. (संपादक). (१९८०). मराठ्यांचा इतिहास (खंड १: शिवाजी व शिवकाल). पुणे: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ. पृष्ठ क्र. ३५०-३६०. (साधने आणि संस्थात्मक जतन).

१५. कुलकर्णी, अ. रा. (संपादक). (२०००). परमानंदकृत शिवभारत. पुणे: भारत इतिहास संशोधक मंडळ. प्रस्तावना: पृष्ठ क्र. १५-२५. (साधनांची चिकित्सा आणि संपादन).

१६. Kulkarni, A. R. (1974). "Source Material for the History of Marathas". Journal Of Indian History, Vol. 52, Part I. Page No. 101-112.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

मराठ्यांच्या वस्तूनिष्ठ इतिहासलेखनातील डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचे योगदान

डॉ. सुरेश गोपाललक्ष्मी पाटील, बेलगावकर

संशोधक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

Corresponding Author - डॉ. सुरेश गोपाललक्ष्मी पाटील, बेलगावकर

DOI - 10.5281/zenodo.19658910

डॉ. अ.रा. कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांचे इतिहात लेखनातील योगदानाबद्दल शोधनिबंधासाठी विषय निश्चित केला यबद्दल २८ वे राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजक सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड यांचे आभार आणि धन्यवाद. कारण कुलकर्णीसरांनी इतिहास लेखनाच्या आशा पिढीत योगदान दिले, की ज्या पिढीने वस्तूनिष्ठ इतिहासलेखन आणि त्यासाठी लागणा-या प्राथमिक साधनांची अनिवायर्तेची बीजे संशोधन क्षेत्रात रुजविली, आणि अस्सल साधनांच्या आधारे इतिहात लेखनाचे मानदंड व महत्व निश्चीत केले. डॉ. अ. रा. कुलकर्णी हे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे १९९३-१९९६ या कालावधीत कुलगुरु होते. त्यांच्या कार्य काळात इतिहास विषयातील रिफ्रेशर कोर्स आर्थात उजळणी वर्ग टिळक महाराष्ट्र विद्यापीठात झाले, हे अनेकांना स्मरत असेलही. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना शैक्षणिक आणि संशोधनाच्या क्षेत्रातील सत्य आणि वस्तूनिष्ठ कार्यासाठीच्या सुक्ष्म सूचना व मार्गदर्शन मिळत गेले हे भाग्य आम्ही समजतो. त्यांनी वस्तूनिष्ठ इतिहास लेखनाचा यशस्वीप्रयोग शिवकालीन महाराष्ट्र या संशोधन प्रकल्पाव्दारे केला. त्या ग्रंथाचे प्राथमिक साधनांच्या साहाय्याने केलेले लेखन वस्तूनिष्ठ इतिहास लेखनाचा उत्तम दाखला असल्यामुळे सदर ग्रंथाच्या संशोधनकार्यावर व त्यातील मुख्य विषयाच्या अनुषंगाने मांडलेल्या विषयांवर मी शोध पेपर सादर करीत आहे.

लोकमान्य टिळकांची राष्ट्रवादाची संकल्पना आणि त्याचा भारतीय राष्ट्रीय चळवळीतील प्रयोगाचा इतिहास *या विषयावरील माझा पीएच.डी. चा शोधप्रबंध पूर्ण झाल्यावर कुलकर्णी सरांना दाखवण्यासाठी त्यांच्या घरी गेलो असता, त्यांच्यातील संशोधक व अध्यापक जागृत होऊन बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांच्या मागर्गदर्शनातून प्राथमिक, अस्सल संदर्भ साधानांच्या आधारे संशोधनाचे महत्व विषद केले होते. मी माझ्या शोधप्रबंधात मुळ प्राथमिक साधनेच वापरली होती. तथपि त्यांनी मला संशोधनासाठी इतिहास लेखनासाठी समकालीन संदर्भ साहित्याचे महत्व पुढील संशोधनासाठी समजून सांगीतले होते. दुय्यम साधनातील धोके आणि प्राथमिक साधनांमधील विश्वासार्हता किती महत्वाची आहे हे माझ्या मनावर त्यांनी बिंबवले. मला पुढील संशोधनाच्या वाटचालीमध्ये त्यांच्या मागर्दशर्नाचा मोठा लाभ झाला आणि होत आहे. डॉ. अ.रा.कुलकर्णी यांनी अस्सल, मुळ, प्राथमिक साधनांच्या आधारे शिवकालिन महाष्ट्र या विषयावर जे संशोधन केले, त्यावर मी पेपर तयार करुन आपल्या समोर मांडत आहे. त्यावरुन अस्सल किंवा मुळ साधनांच्याच आधारे केलेल्या संशोधनाचे महत्व आधोरेखित होईल.*

प्रस्तावना:

मराठा इतिहास हा भारतीय इतिहासाच्या घडणीतील एक निर्णायक अध्याय आहे. परंतु या इतिहासाचे लेखन अनेकदा पराक्रमप्रधान, व्यक्तिकेंद्री किंवा भावनिक स्वरूपाचे राहिले. अशा पार्श्वभूमीवर दस्तऐवजी साधनांच्या आधारे सामाजिक-आर्थिक चौकटीतून मराठा इतिहासाचा अभ्यास करणारे अ. रा. कुलकर्णी हे एक महत्त्वपूर्ण इतिहासकार ठरतात. *शिवकालीन महाराष्ट्र* हा

ग्रंथ केवळ शिवाजी महाराजांच्या राजकीय कारकिर्दीपुरता मर्यादित न राहता त्या काळातील महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि संस्थात्मक रचनेचा सर्वांगीण अभ्यास सादर करतो. प्रस्तुत निबंधात या ग्रंथाच्या "जन्मकथा" आणि त्यावरील "आशीर्वचन" यांमधून उलगडणाऱ्या संशोधनप्रवासाच्या आधारे कुलकर्णी यांच्या सत्य इतिहासलेखनातील योगदानाचा अभ्यास केला आहे.

इतिहासलेखनाची पार्श्वभूमी व गरज: मराठा इतिहासाच्या आरंभीच्या लेखनात बखरी, आख्यायिका, लोकपरंपरा यांचा प्रभाव अधिक होता. त्यानंतर दस्तऐवजी साधनांचा वापर सुरू झाला; तरीही सामाजिक-आर्थिक प्रक्रियांचा सखोल अभ्यास मर्यादित राहिला. या पार्श्वभूमीवर शिवकालीन महाराष्ट्राचा अभ्यास केवळ युद्धे, किल्ले, मोहिमा किंवा व्यक्तिचरित्र यापुरता न ठेवता—गावसंस्था, महसूलरचना, वतनदारी, चलन, व्यापार, सामाजिक स्तररचना—या घटकांच्या आधारे करण्याची गरज होती. कुलकर्णी यांनी हीच उणीव ओळखून संशोधनाची दिशा निश्चित केली.

संशोधनप्रेरणा : आत्मकथनातून उलगडणारी दिशा:

"शिवकालीन महाराष्ट्राची जन्मकथा" या प्रकरणात कुलकर्णी यांनी आपल्या संशोधनप्रवासाचा प्रामाणिक आलेख मांडला आहे. त्यात सोलापूर येथील अध्यापनकाळात इतिहासाविषयी निर्माण झालेली सखोल आवड, मार्गदर्शक प्राध्यापकांशी संवादातून आकार घेत गेलेली संशोधनवृत्ती,"सामाजिक-आर्थिक इतिहास" हा विषय केंद्रस्थानी ठेवण्याचा जाणीवपूर्वक निर्णय ही प्रेरणा भावनिक नव्हती; ती अभ्यासातून व प्रश्ननिर्मितीतून उद्भवलेली होती. इतिहास म्हणजे केवळ भूतकाळाचे वर्णन नसून त्यामागील संरचना आणि प्रक्रियांचा शोध, ही त्यांची मूलभूत भूमिका दिसते.

स्रोतसाधनांचा व्यापक आणि चिकित्सक वापर:

कुलकर्णी यांच्या लेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्राथमिक साधनसामग्रीचा व्यापक वापर. त्यांनी पुढील स्रोतांचा उपयोग केला: दफ्तरे व पत्रव्यवहार, महसुली नोंदी, गावपद्धतीविषयक कागदपत्रे, चलन व व्यापारविषयक माहिती, प्रशासकीय आज्ञापत्रे. त्यांनी पुराव्यांचे अंधानुकरण केले नाही किंवा त्यांची अकारण स्तुतीही केली नाही. पुराव्यांच्या मर्यादा लक्षात घेऊन, जिथे निश्चित निष्कर्ष शक्य नाहीत तिथे संयम बाळगणे—ही त्यांची शास्त्रीय वृत्ती ठळकपणे दिसते.

शिवकालीन महाराष्ट्र : व्यक्तिकेंद्रीतेपलीकडील दृष्टी:

शिवकालीन महाराष्ट्र या ग्रंथात शिवाजी महाराजांचे कार्य मान्य करतानाही त्यांनी इतिहासाचे केंद्र "समाज" ठेवलेआहे.

(अ) ग्रामीण रचना- गाव हे प्रशासन व अर्थव्यवस्थेचे मूलभूत घटक होते. पाटील, कुलकर्णी, वतनदार, शेतकरी यांची भूमिका त्यांनी दस्तऐवजांच्या आधारे स्पष्ट केली.

(आ) महसुली व्यवस्था- जमाबंदी, करप्रणाली, महसूल संकलन पद्धती यांचा अभ्यास करून राज्यकारभाराची आर्थिक पायाभूत रचना उलगडली.

(इ) सामाजिक स्तररचना- विभिन्न सामाजिक गट, त्यांची कार्ये आणि परस्परसंबंध यांचा अभ्यास करून शिवकालीन समाजाचे वास्तववादी चित्र उभे केले.

(ई) व्यापार व चलनव्यवस्था- स्थानिक व प्रादेशिक व्यापारमार्ग, नाण्यांची देवाणघेवाण, बाजारपेठांची रचना यांचा विचार करून अर्थव्यवस्थेचे व्यापक चित्र दिले.

इतिहासदृष्टीतील वस्तुनिष्ठता:

कुलकर्णी यांची इतिहासदृष्टी पुढील तत्त्वांवर आधारित दिसते:- पूर्वग्रहशून्य विश्लेषण, अतिशयोक्तीचा त्याग, पुराव्यावर आधारित निष्कर्ष, अनिश्चिततेच्या ठिकाणी संयम. त्यांनी "वस्तूनिष्ठ इतिहास" ही संकल्पना भावनिक घोषणेतून नव्हे तर संशोधनातून सिद्ध केली. घटनांचे गौरवीकरण किंवा अवमूल्यन न करता, त्यांच्या संदर्भांचे विश्लेषण करणे—ही त्यांची पद्धत होती.

सैद्धांतिक चौकट :

डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या इतिहासलेखनाचे मूल्यमापन करताना त्यांच्या कार्यामागील सैद्धांतिक आधार लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांनी कोणत्याही विचारसरणीची घोषणाबाजी केली नाही; परंतु त्यांच्या लेखनातून विशिष्ट इतिहासदृष्टी स्पष्ट होते. ती पुढील चौकटींमध्ये समजून घेता येते.

अनुभवाधारित (Empirical) इतिहासलेखन:

अनुभवाधारित इतिहासलेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये: प्राथमिक साधनांवर भर, दस्तऐवजांचे चिकित्सक परीक्षण, घटनांच्या पडताळणीवर आग्रह, अनुमानांपेक्षा पुराव्यांना प्राधान्य.

कुलकर्णी यांनी *शिवकालीन महाराष्ट्र* या ग्रंथात महसुली दफ्तरे, गावनोंदी, पत्रव्यवहार, चलनसंबंधी पुरावे इत्यादींचा वापर करून निष्कर्ष मांडले. त्यांची पद्धत 'आधी निष्कर्ष, मग पुरावे' अशी नसून 'आधी पुरावे, मग निष्कर्ष' अशी आहे. म्हणूनच त्यांचे लेखन अनुभवाधारित इतिहासलेखनाच्या निकषांवर ठाम उभे राहते.

सामाजिक-आर्थिक इतिहासाची चौकट:

इतिहासाचा केंद्रबिंदू केवळ राजकीय सत्ता नसून समाजरचना व आर्थिक प्रक्रिया आहेत, हा दृष्टिकोन आलिकडच्या काळात बळावला. कुलकर्णी यांचे लेखन या प्रवाहाशी सुसंगत दिसते.

(अ) संरचनात्मक दृष्टी- गावसंस्था, वतनदारी व्यवस्था, महसूल प्रणाली, व्यापार व चलन या घटकांच्या विश्लेषणातून त्यांनी राज्यव्यवस्थेची पायाभूत रचना उलगडली.

(आ) प्रक्रियात्मक दृष्टी - घटना (उदा. स्वराज्यस्थापना) ही एखाद्या व्यक्तीच्या इच्छेची फलश्रुती नसून दीर्घकालीन सामाजिक प्रक्रियांचा परिणाम असते—ही जाणीव त्यांच्या लेखनातून स्पष्ट होते.

सैद्धांतिकदृष्ट्या त्यांची भूमिका पुढील तत्त्वांवर आधारलेली दिसते: **पुराव्याधिष्ठित सत्य** – ऐतिहासिक विधानांची पडताळणी, **संयत निष्कर्ष** – अति-सामान्यीकरण टाळणे, **संरचनात्मक विश्लेषण** – घटनांच्या पाठीमागील संस्था शोधणे, **समाजकेंद्री दृष्टी** – व्यक्तिकेंद्री इतिहासाचा अतिक्रमण.

वस्तुनिष्ठता (Objectivity) व मूल्यनिरपेक्षता:

इतिहासकाराच्या लेखनात मूल्यनिर्णय पूर्णतः टाळता येत नाहीत; परंतु त्यांचे नियंत्रण आवश्यक असते. कुलकर्णी यांच्या लेखनात पुढील गोष्टी आढळतात: भावनिक विशेषणांचा अभाव, गौरवगाथेची शैली टाळलेली, टीका करतानाही संयम, अनिश्चिततेची स्पष्ट कबुली, ही पद्धत इतिहासातील वस्तुनिष्ठतेच्या तत्त्वाशी सुसंगत आहे.

सूक्ष्मइतिहास (Micro-history) व स्थानिक अभ्यास:

शिवकालीन महाराष्ट्राचा अभ्यास करताना त्यांनी व्यापक राजकीय चौकटीबरोबरच गावपातळीवरील रचना तपासल्या. स्थानिक प्रशासन, महसुली पद्धती, सामाजिक स्तर या सूक्ष्म पातळीवरील अभ्यासामुळे व्यापक ऐतिहासिक चित्र अधिक स्पष्ट होते. ही पद्धत सूक्ष्मइतिहासाच्या संकल्पनेशी निगडित आहे.

शैक्षणिक व बौद्धिक प्रभाव:

कुलकर्णी यांच्या ग्रंथामुळे पुढील पिढीतील संशोधकांना प्रेरणा मिळाली. सामाजिक-आर्थिक दृष्टिकोनातून मराठा इतिहासाचा अभ्यास करण्याची दिशा अधिक दृढ झाली. त्यांनी प्रादेशिक इतिहासाला राष्ट्रीय इतिहासाच्या चौकटीत स्थान दिले, पण प्रादेशिक वैशिष्ट्ये न गमावता.

मराठा इतिहासाच्या पुनर्मूल्यांकनातील स्थान:

मराठा इतिहासाच्या अभ्यासात कुलकर्णी यांचे स्थान पुढील कारणांनी महत्त्वाचे ठरते: व्यक्तिकेंद्री कथनापासून समाजकेंद्री विश्लेषणाकडे वळवले, प्राथमिक साधनांच्या चिकित्सक वापराची पद्धत दृढ केली, ग्रामीण व आर्थिक रचनांचा सखोल अभ्यास सादर केला, संशोधननिष्ठता आणि संयम यांचे उदाहरण घालून दिले. त्यामुळे मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्मूल्यांकन अधिक शास्त्रीय पायावर उभे राहिले.

सैद्धांतिक चौकटीचा एकत्रित आढावा:

डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या इतिहासलेखनात: अनुभवाधारित पद्धत, सामाजिक-आर्थिक विश्लेषण, वस्तुनिष्ठता, सूक्ष्मपातळीवरील अभ्यास, आणि संदर्भाधिष्ठित कालखंडन यांचा सुसंवादी मिलाफ दिसतो. त्यांनी कोणतीही विचारसरणी घोषणात्मक पद्धतीने स्वीकारली नसली तरी त्यांचे लेखन शास्त्रीय इतिहासलेखनाच्या मूलभूत निकषांवर ठाम उभे राहते. त्यामुळे मराठ्यांच्या इतिहासाच्या सत्य, संतुलित आणि दस्तऐवजी अभ्यासात त्यांचे स्थान विशेष ठरते.

निष्कर्ष:

डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचा संशोधनप्रवास हा चिकाटी, शिस्त, आणि सत्यनिष्ठेचा आदर्श आहे. *शिवकालीन महाराष्ट्र* या ग्रंथाद्वारे त्यांनी साधारणपणे सतराव्या शतकाच्या कालखंडाचा सर्वंकष सामाजिक-आर्थिक अभ्यास सादर केला. त्यांच्या लेखनात "वस्तूनिष्ठ इतिहास" ही संकल्पना म्हणजे— दस्तऐवजी आधार,चिकित्सक विवेक, पूर्वग्रहशून्यता, आणि समाजकेंद्री दृष्टी. मराठ्यांच्या इतिहासाच्या शास्त्रीय अभ्यासात त्यांचे योगदान दीर्घकालीन आणि मार्गदर्शक ठरते.

संदर्भ:

1. रा. कुलकर्णी. (1997). शिवकालीन *महाराष्ट्र* (द्वितीय आवृत्ती). राजहंस प्रकाशन.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

ग्रँट डफचा मराठा इतिहासलेखनाविषयीचा वाद आणि अ. रा. कुलकर्णी

चंद्रशेखर काशिनाथ काटे

संशोधक विद्यार्थी,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Corresponding Author - चंद्रशेखर काशिनाथ काटे

DOI - 10.5281/zenodo.19658956

प्रस्तावना :

ब्रिटीशकाळात म्हणजेच १९ व्या शतकात भारतात अनेक ब्रिटीश इतिहासकारांनी इतिहासलेखन केले. ज्याप्रमाणे माल्कमने मध्य हिंदुस्थानचा, कर्नल जेम्स टॉडने रजपुतांचा अथवा राजस्थानचा इतिहास (१८२९), सर विल्यम हंटर ने ग्रामीण बंगालचा इतिहास (१८६८), डब्ल्यू. एच. मोरलँडने संयुक्त प्रांताचा इतिहास (१९०४ व १९११), विल्क्सने म्हैसूरचा इतिहास, फोबर्सने गुजरातचा इतिहास लिहिला तसाच ग्रँट डफने मराठयांचा इतिहास लिहिला.

ग्रँट डफने लिहिलेला (History of the Mahrattas) हा ग्रंथ म्हणजे मराठी इतिहासावर लिहिला गेलेला, कालक्रमानुसार असलेला पहिलाच सर्वसमावेशक ग्रंथ आहे. म्हणून त्याला मराठा इतिहासाच्या पहिला इतिहासग्रंथाचा लेखक म्हणून ही मान दिला जातो. याआधी मराठयांच्या इतिहासावर एम. सी. स्प्रेंगेल (१७८४/१७९१) आणि स्कॉट वेअरिंग (१८१०) यांनी लेखन केलेले दिसून येते. पण ते लेखन हे मर्यादित कालखंडापुरते आणि अपुऱ्या स्वरुपाचे असल्याचे दिसते. तसेच या इतिहास लिखाणांचा काळ हा सत्तेवरून पायउतार झालेल्या मराठयांचा होता. मराठयांची सत्ता अस्तित्वात असताना त्यांनी लेखन केल्याने त्यांना इतिहास लिहिण्यासाठी अपुरी व मर्यादित साधने उपलब्ध झाली. ग्रँटने मात्र विविध साधनांचा वापर आपल्या लेखनासाठी केला म्हणून त्याच्या इतिहासलेखनास अधिक महत्त्व प्राप्त होते. ग्रँड डफ हा इ. स. १८१८-१८२४ पर्यंत सातारा येथे ईस्ट इंडिया कंपनीचा राजकीय प्रतिनिधी (रेसिडेंट) म्हणून नेमलेला होता. छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या संबंधातले राजकीय व्यवहार तो पाहत असे. छत्रपती प्रतापसिंह यांचेशी त्यांचा घनिष्ठ स्नेह होता. त्यामुळे ऐतिहासिक कागदपत्रांचे भांडार त्यास सहज उपलब्ध झाले. साताऱ्यातील वास्तव्यात मराठ्यांच्या इतिहासावर लिहिण्याची त्याने आकांक्षा धरली आणि ती पूर्ण केली. हे लेखन करण्यास त्यास तत्कालीन मुंबई प्रांताचा गव्हर्नर माउंट स्टूअर्ट एल्फिन्स्टन याने नुसते प्रोत्साहितच केले नाही तर लेखनप्रक्रिये दरम्यान साहित्य आणि मूलभूत ऐतिहासिक दृष्टीकोन असे दोन्ही पुरवून सतत मार्गदर्शन केले.[१]

ग्रँट डफचे इतिहासलेखन:

ग्रँट डफ हा सातारा येथे एक ब्रिटीश अधिकारी म्हणून रूजू झाल्यानंतर त्याने आपल्या अधिकाराचा सुयोग्य वापर करत छत्रपतींच्या दप्तरखान्यातील अनेक अस्सल कागदपत्रांचा अभ्यास केला. ज्यात बखरी, करीने, कुलकटे, महजर, तवारीखा आदींचे वाचन करून घेतले. सन १८१९ मध्ये एका जाहीरनामा (एक पत्र पाठवून) प्रसारित करून

महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील सर्व संस्थानिकांना त्यांच्याकडील जुन्या कागदपत्रांचा, ज्यात विविध भाषेतील सनदा, हकीकती, बखरी, कैफियती, वतनपत्रे, ताम्रपट, इमानपत्रे आदी येतात, मागवून घेतली. तसेच इतर अस्सल कागदपत्रांबरोबर छ. शिवाजी महाराजांनी एकोजीस लिहिलेले पत्र, औरंगजेबची पत्रे, चिमाजी आप्पा आणि ब्रम्हेंद्रस्वामी यांचा पत्रव्यवहार, मुन्तखाब उल लुबाब ग्रंथ, आणि इतर भाषेतील कागदपत्रे यांचा वापर इतिहास लेखनासाठी केला.[२] त्याने काही कागद विकत घेतले तर काही कागद त्यास बक्षीस म्हणून मिळाले. त्यांचाही वापर इतिहास लेखन करण्यासाठी केला.

चार वर्षे कामाचा ताण असह्य झाल्यामुळे डफने सातारचा कारभार जनरल ब्रिग्ज (१८२३-१८२६) (नाना फडणवीसाच्या आत्मचरित्राचा भाषांतरकार (इ.स.१८२७) याच्या स्वाधीन केला.[३] या मिळालेल्या सर्व कागदपत्रांचा अभ्यास करण्यासाठी बाळाजीपंत नातू याची खूप मोठी मदत डफला झाली. बाळाजीपंताने आपणास ऐतिहासिक माहिती लिहून दिली व तिचे इंग्रजी भाषांतर करवून घेतले असे ग्रँटने आपल्या इतिहासात नमूद केले आहे.[४] बाळाजीपंतासारखे इतर दोन सहाय्यक होते, ते त्यास मोडी व फारसी भाषेतील मजकूर रुपांतरीत करून देत असत. तसेच सदरच्या कामासाठी डफचे दोन मित्र यामध्ये कॅप्टन हेन्री ॲडम्स आणि सातारच्या राजाचे महसूल सर्वेक्षक विल्यम मॉर्चेस या दोघांचे भरपूर साहाय्य मिळाले होते. यांच्या सहाय्यानेच डफने मराठयांच्या इतिहासाचा एक मोठा दस्तऐवज तयार केला होता. हा ग्रंथ लिहिण्यासाठी आणि प्रकाशित करण्यासाठी त्याला खूप शारीरिक आणि आर्थिक कष्ट सोसावे लागले.

डफने स्वतःच्या पैशाने "A History of the Mahrattas" हा इंग्रजी भाषेतील ग्रंथ तीन खंडात प्रकाशित केला. हा ग्रंथ त्याने एल्फिन्स्टन यास अर्पण केला. यात त्यास बराच आर्थिक तोटा सहन करावा लागला. मराठयांचा एक समग्र असा इतिहास पहिल्यांदाच प्रकाशित झाला (इ. स. १८२६). ग्रँट डफने आपल्या या ग्रंथात सन १७०७ पर्यंतचा मराठयांचा इतिहास लिहिला आहे. ग्रंथात बहामनी राज्य, त्यांचे विभाजन, मराठे सरदार आणि त्यांचे गट, शिवपूर्वकाळ आणि शिवकालासंबंधी माहिती मिळते. सदर ग्रंथाच्या इंग्रजी भाषेतील ग्रंथाच्या सन १९७० पर्यंत सात आवृत्त्या निघाल्या. हा ग्रंथ मराठीमध्ये आणण्यासाठी ग्रँट डफचे मित्र आणि सातारचा दुसरा रेसिडेंट जनरल ब्रिग्ज याने २० ऑगस्ट १८२७ रोजी प्रतापसिंह महाराजांना पाठवविलेल्या पत्रात आव्हान केले होते. यानुसार प्रतापसिंह महाराजांनी डफच्या इतिहासाच्या हस्तलिखित प्रती सातारा येथील पंडितराव ह्यांच्या दप्तरात व मद्रास येथील सरकारी पुराभिलेखागारात पहावयास मिळतात.[५] परंतु ते भाषांतर प्रकाशित झाले नाही व आज त्याच्या प्रतीही पहावयास मिळत नाही. आजपर्यंत सदरच्या इंग्रजी ग्रंथाच्या ६ आवृत्त्या निघाल्या आहेत. सहावी आवृत्ती दोन खंडात प्रकाशित करण्यात आली. सन १८२९ मध्ये डेव्हिड केपन आणि बाबा साने यांनी हा ग्रंथ 'मराठयांची बखर' या नावाने मराठी भाषेत प्रकाशित केला. या ग्रंथाच्या मराठी भाषेतही ६ आवृत्त्या निघाल्या. सहावी आवृत्ती इ.स. १९१६ मध्ये प्रसिध्द झाली.

ग्रँट डफने मराठयांवरील लिहिलेल्या ग्रंथातील मराठयांचा उदय हा जंगलात लागलेल्या वणव्याप्रमाणे होता; छत्रपती शिवाजी महाराज हे निरक्षर होते; डफने आपला ग्रंथ लिहिल्यावर त्याने जी अस्सल साधने गोळा केली होती ती त्याने नष्ट केली; डफने ग्रंथात चुकीच्या तारखा व व्यक्तींची नावे दिली आहेत; मराठा इतिहासाचे साम्राज्यवादी दृष्टीकोनातून केलेले मुल्यांकन अशा काही मुद्द्यांवर मराठा इतिहास अभ्यासकांनी डफवर टीका केलेली दिसते.

ग्रँट डफच्या मराठा इतिहासलेखनावरील टीका:

ग्रँट डफ हा मराठयांचा पहिला इतिहासकार म्हणून प्रसिद्ध असला तरी तो एक ब्रिटीश अधिकारी होता हे विसरून चालणार नाही. हा इतिहास म्हणजे जेत्याने जित्यांचा लिहिलेला इतिहास आहे असे काही इतिहासकार मानतात. ग्रँट डफने साम्राज्यवादी इतिहास दृष्टीकोनातून हा इतिहास लिहिला असेही काही इतिहासकार मानतात. त्यामुळे ग्रँट डफच्या इतिहासलेखनावर अनेक इतिहासकार आणि इतिहास संशोधक यांनी टीका केल्या आहेत. या टीका सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही स्वरुपाच्या दिसून येतात.

यामध्ये सर्वप्रथम नीलकंठ जनार्दन कीर्तने (१८४४ - १८९६) यांनी सन १८६७ मध्ये 'पूना यंग मेन असोसिएशन' समोर ग्रँट डफच्या इतिहास ग्रंथावर 'ग्रांटडफकृत मराठयांच्या बखरीवर टीका' या निबंधातून सर्वप्रथम टीका केली.[६] काव्येतिहास-संग्रहाचे संपादक ज. बा. मोडक आणि का. ना. साने यांनी आपल्या काव्येतिहास-संग्रहाच्या पहिल्या अंकात 'पेशव्यांची बखर' छापताना लिहिलेल्या प्रस्तावनेत ग्रँट डफ इतिहास लेखनाचे कौतुक केले आहे.[७] विष्णुशास्त्री चिपळूणकर (१८५०-१८८२) यांनी आपल्या निबंधमालेतून '*इतिहास*' या विषयावर दीर्घ व मार्मिक निबंधातून डफच्या इतिहासलेखनासंबंधी आपले विचार मांडले आहेत. यात चिपळूणकर यांनी ग्रँट डफचे कौतुक केले आहे.[८]

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे (१८४२-१९०१) यांनी इ.स. १८९३ पासून पुढे व्याख्यानांसाठी लिहून ठेवलेला मजकूर '*Rise of the Maratha Power*' (मराठा सत्तेचा उत्कर्ष) या नावाने इ. स. १९०० साली प्रकाशित केला. या ग्रंथात त्यांनी मराठयांच्या इतिहासाच्या अभ्यासामागील प्रेरणा व नैतिक बैठकीचे विवेचन केले आहे. रानडे यांनी आपल्या ग्रंथात ग्रँट डफने मांडलेले सर्व मुद्दे व सिद्धांत पुराव्यासह खोडून काढले आहेत. डफने सिद्धांत मांडला होता की, "मराठयांच्या सत्तेचा उदय हा सह्याद्रीतील वणव्याप्रमाणे झालेला आहे."[९] हा सिद्धांत पूर्णपणे खोडताना रानडे म्हणतात की, 'असे अचानक आणि अनपेक्षित काहीही घडत नसते त्यासाठी बराच काळ लोकांची मनोभूमिका तपासावी लागते, संस्कारित व्हावी लागते. मराठयांच्या उदयापूर्वीच्या तीन ते चार शतकांचा महाराष्ट्राचा इतिहास, सामाजिक जीवन, सर्व बाजूने तपासले म्हणजे त्यातील ऐतिहासिक घटनांनी मराठी मन कसे घडले - घडत गेले, त्या मनात नेमक्या कोणत्या प्रेरणा निर्माण झाल्या हे लक्षात येऊ शकेल'. दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनी आपल्या '*मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार*' या ग्रंथात ग्रँट डफच्या इतिहासलेखनाबद्दल आपले विचार मांडले आहेत. डफच्या आधी आर्म व वेअरिंग या पाश्चिमात्य इतिहासकारांनी मराठयांच्या इतिहासावर जे लेखन केले त्यापेक्षा डफचा इतिहास बराच सविस्तर, संगतवार आणि साधार आहे असे पारसनीस मानतात.[१०]

वासुदेवशास्त्री खरे यांनी भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे यांच्या इ. स. १९१५-१६ च्या चर्तुथ संम्मेलनामध्ये '*ग्रँट डफच्या चुकांचा हफ्ता*' हा शोधनिबंध वाचला होता.[११] यात त्यांनी ग्रँट डफच्या इतिहास लेखनामध्ये आढळून आलेल्या चूका एकत्र केल्या होत्या. त्या चुका सनावळ्या, नावामध्ये झालेले बदल यासंबंधीच्या होत्या. असे असले तरी त्यांनी केलेले लेखनाचे कौतुकही केले आहे. वि. का. राजवाडे (१८६३-१९२६) हे मराठयांच्या इतिहास लेखनशास्त्रामध्ये 'इतिहासाचार्य' म्हणून प्रसिद्ध आहेत. यांनी सन १९१८ मध्ये '*मराठयांच्या इतिहासाची साधने*' या त्यांच्या खंडात्मक इतिहास ग्रंथात ग्रँट डफच्या इतिहास लेखनाचा समाचार घेतला आहे.[१२] याशिवाय जदुनाथ सरकार, द. ब. पारसनीस, न. चिं. केळकर, लक्ष्मणशास्त्री चिपळूणकर, शंकर देव, वासुदेव बेंद्रे

आदी मराठा इतिहासकार आणि इतिहास संशोधकांनी आपली ग्रँट डफच्या इतिहास लेखनाबद्दल मते व्यक्त केली आहेत.

अ. रा. कुलकर्णी यांनी केलेली टीका:

२० व्या व २१ व्या शतकातील मराठयांच्या प्रमुख इतिहासकारांमध्ये अ. रा. कुलकर्णी (१९ एप्रिल, १९२४ - २४ मे, २००९) यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. अ. रा. कुलकर्णी मूळचे सोलापूर जिल्ह्यातील. मुंबई विद्यापीठातून एम.ए. ची पदवी घेतल्यानंतर त्या वेळेसचे 'मराठवाडा विद्यापीठ' (आताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ), छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथून त्यांनी पीएच. डी. घेतली. इतिहास संशोधनासाठी ते लंडनच्या 'स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रीकन स्टडीज', जर्मनीतील हायडलबर्ग आणि पॅरिस येथेही गेले होते. लंडनमधील संशोधनाच्या आधारे त्यांनी ग्रँट डफ याच्यावरील ग्रंथाचे लेखन केले. अ. रा. कुलकर्णी यांच्या प्रयत्नामुळे डेक्कन महाविद्यालयाशी संलग्न असलेला इतिहास विभाग इ.स. १९६९ साली पुणे विद्यापीठात आला. तेव्हापासून इ.स. १९८८ पर्यंत अ. रा. कुलकर्णी या विभागाचे प्रमुख होते. अ. रा. कुलकर्णी यांनी मराठयांच्या इतिहासावर अनेक ग्रंथांचे लेखन केले आहे.

अ. रा. कुलकर्णी यांनी 'जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ' हा चरित्रपर ग्रंथ लिहिला. यात त्यांनी डफचे चरित्र नवीन संदर्भांच्या आधारे मांडले आहे. सदरच्या ग्रंथात 'टीकाकार' या सदराखाली ग्रँट डफवर कोणी व कशी टीका केली यांचा परामर्श त्यांनी घेतलेला आहे. यामध्ये जनार्धन कीर्तने, म. गो. रानडे, वि. का. राजवाडे, वा. वा. खरे आदींनी केलेल्या लेखनाचा वा टीकेचा आढावा कुलकर्णी यांनी घेतला आहे.[१३]

ग्रँट डफने आपला ग्रंथ लिहिण्यासाठी अस्सल साधनांचा वापर केला की नाही याविषयी काही विद्वान संशय व्यक्त करतात, त्यांना उत्तर देताना अ. रा. कुलकर्णी हे सातारा दप्तरातील एका अपुऱ्या जाहीरनाम्याचा हवाला देऊन सांगतात की, त्या जाहीरनाम्यामध्ये महाराजांच्या आदेशाने समस्त लोकास विविध कालखंडातील विविध प्रकारची सर्व जुनी अस्सल साधने देण्यासंबंधीचा आदेश आहे.[१४] हा सदरचा जाहीरनामा डफनेच काढला असावा असे अ. रा. कुलकर्णी यांचे ठाम मत आहे.[१५] पेशवे दप्तरातील प्रतापसिंहाच्या डायरीतील उताऱ्यावरून मराठा इतिहासाची जुळवाजुळव करण्यासाठी डफने केलेल्या कामाचे वर्णन अ. रा. कुलकर्णी करतात. डायरीतील फक्त एक महिना जरी बघितला तरी डफने किती आस्थेने मराठा इतिहासाची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला हे दिसून येते. यात ७, ८, ११, १७ व २३ जुलै १८१९ ची रोजनिशी पाहिली असता डफ कशी अस्सल साधने गोळा करत होता हे दिसते.[१६] तसेच यातील विविध उताऱ्यावरून ग्रँट डफची इतिहासाकडे पाहण्याची दृष्टी हि शास्त्रशुद्ध होती हे दिसते. कागदपत्र मिळवणे, त्यांच्या नकला तयार करणे आणि बखरीचे इंग्रजी भाषांतर करवून घेणे आदी इतिहास लिहिण्यासाठी पद्धतशीर कामे तो करत असे हे त्या उताऱ्यावरून दिसते.

काही इतिहास संशोधक मानतात की, ग्रँट डफने इतिहास लिहिण्यासाठी बखरींचा अधिक उपयोग केला किंवा बखरींच्याच आधारे इतिहास लिहिला. यास प्रतिउत्तर देताना कुलकर्णी म्हणतात की, "इतिहासाची साधने कोणती अव्वल दर्जाची व कोणती कमी प्रतीची याची त्याला पूर्ण जाणीव होती. बखर हे एक इतिहासाचे साधना असले तरी संपूर्णतया त्यावर विसंबून राहून इतिहास लिहिता येणार नाही हे तो जाणत होता".[१७] हे पेशवे दप्तर खंड ४२ मधील उताऱ्यावरून ही दिसून येते. ११ ऑगस्ट १८१९ रोजीच्या

उताऱ्यात चिटणीसाला डफ म्हणतो की, "बखर केली परंतु सारी महाराजाची बढती. चांगलेच लिहिले. येखादे वेलेस वाईट चालले आसते तरी लिहिले नाही तेव्हा संषय येतो. सारेच चांगले असते असे नाही."[१८]

अ. रा. कुलकर्णी म्हणतात की, "ग्रँटच्या पुस्तकातील उणीव दाखवायची झाली, तर त्याने कोणती साधने वापरली नाहीत, असे म्हणण्यापेक्षा त्याने आपली प्रमुख विधाने अथवा घटना कोणत्या साधनांवरून नेमकी घेतली आहेत, हे प्रत्येक ठिकाणी निश्चितपणे दाखवले नाही."[१९] असे म्हटले आहे. तर एका ठिकाणी अ. रा. कुलकर्णी म्हणतात की, "ग्रँट डफच्या इतिहासात दोष राहिले असतील तर ते प्रमाणभूत साधनांच्या अभावामुळेच होय".[२०] काही भारतीय इतिहासकारांनी असे मत मांडले की, ब्रिटीश किंवा इंग्रज इतिहासकार हे स्थानिक साधनांचा वापर करत नाहीत. पण त्यास ग्रँट डफ हा अपवाद आहे असे कुलकर्णी यांनी सप्रमाण दाखवून दिले.

निष्कर्ष:

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. पेशवेकाळात स्वराज्याचे रुपांतर साम्राज्यात झाले. इ. स. १८१८ मध्ये ब्रिटिशांनी मराठा सत्तेचा अंत केला. सातारचा पोलिटिकल एजंट राहिलेल्या ग्रँट डफने मराठयांच्या इतिहास ३ खंडात लिहिला. हा ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर जवळपास ५० वर्षांनी ग्रँट डफच्या इतिहासावर संशय घेऊन टीका करण्यास सुरुवात झाली. याचे पाहिले कारण म्हणजे हा इतिहास जेत्यांनी लिहिला होता, त्यामुळे त्यात त्रुटी राहिल्या होत्या असे इतिहास संशोधक मानत होते. म्हणजेच सदरचा मराठयांचा इतिहास हा साम्राज्यावादी दृष्टीकोनातून लिहिला गेला असल्याचे सांगितले गेले. आणि दुसरे म्हणजे त्यावेळेस महाराष्ट्र आणि भारतामध्ये राष्ट्रवादाचे वारे वाहत असल्याने त्याचाही परिणाम डफच्या इतिहासलेखन राष्ट्रवादी दृष्टीकोनातून पाहण्याकडे झाला. सर्वप्रथम कीर्तने यांनी ग्रँट डफच्या इतिहासावर टीका केली. त्यानंतर अनेक मराठा इतिहासकारांनी व इतिहास संशोधकांनी टीका केल्या. यात त्यांनी ग्रँट डफच्या सनावळ्या, नावात झालेले बदल, गाळलेल्या महत्त्वपूर्ण कधी कधी छोट्या घटना आदी घटकावर टीका केलेली दिसते. न्या. रानडे यांची टीका यापेक्षा वेगळी असलेली दिसते. या टीका सकारात्मक आणि नकारात्मक असल्याचे दिसते.

ग्रँट डफ याच्या इतिहासलेखनावर शेवटची टीका डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी केलेली होती. अ. रा. कुलकर्णी यांनी ग्रँट डफच्या मराठा इतिहास लेखनाची चिकित्सा करताना आंधळेपणाने वाहत न जाता चुकीच्या टीका त्यांनी केलेल्या दिसत नाही. तसेच याआधीच्या मराठा इतिहासकार आणि इतिहास संशोधकांनी केलेल्या टीकेस त्यांनी प्रतिउत्तर दिलेले दिसते. अ. रा. कुलकर्णी यांनी 'जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ' हा चरित्रपर ग्रंथ लिहून त्यातून त्यांनी ग्रँट डफच्या मराठा इतिहास लेखनाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

संदर्भसूची:

१. Deshpande Prachi, Creative Pasts, Columbia University Press, New York, 2007, p.57, Colebrooke, Vol. II, p. 157

२. कुलकर्णी, अ. रा., मराठयांचे इतिहासकार : इतिहासलेखन पध्दती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पृ. ७५-७६

३. ताटके अरविंद, मराठयांचा आद्य इतिहासकार-कॅप्टन ग्रँट डफ, नवभारत मासिक, वर्ष १६, अंक ७, एप्रिल १९६३, पृ. ५५

४. Duff Grant, History of the Marathas, Vol II, 1921, Foot note, pp 470

५. पारसनीस, द. ब., मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार, निर्णयसागर छापखाना, मुंबई, १९०९, पृ.३

६. कीर्तने नीलकंठ, ग्रांटडफकृत मराठयांच्या बखरीवरील टीका, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९२६, पृ. ३

७. मोडक, ज. ना., साने, का. ना. (संपा.), काव्येतिहास-संग्रह, पुस्तक १, अंक १, किरण छापखाना, पुणे, जानेवारी १८७८, पृ.२

८. चिपळूणकर विष्णुशास्त्री (सं.), निबंधमाला, पुणे, १९१७, पृ. १०२

९. Duff James Grant, History of The Mahrattas, Longman, Rees, Orme, Brwon and Green, London, 1826, Chap.1, p. 68

१०. पारसनीस, द. ब., मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार, निर्णयसागर छापखाना, मुंबई, १९०९, पृ.२

११. मेहेंदळे खं. चिं.(संपा.), चतुर्थ संमेलन वृत्त, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९१६, पृ. २

१२. राजवाडे लेखसंग्रह, भाग १, ऐतिहासिक प्रस्तावना, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२८, पृ. २६

१३. कुलकर्णी अ. रा., जेम्स कनिंगहम ग्रॅन्ट डफ, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, १९७१, पृ. २०६-२५०

१४. डेक्कन कॉलेज, सातारा दप्तर, रुमाल नंबर १, फाईल क्रमांक ६ : २४

१५. कुलकर्णी अ. रा., ग्रँट डफची साताऱ्यातील चार वर्षे (इ. १८१८-२२), त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, वर्ष ४६, अंक १-४, १९६८, पृ. ८०

१६. सरदेसाई गो. स. (संपा.), राजा प्रतापसिंहाची रोजनिशी व इतर कागद, पेशवे दप्तर, खंड ४२, गव्हर्मेंट सेन्ट्रल प्रेस, मुंबई, १९३४, पृ. १७-२९

१७. उपरोक्त, कुलकर्णी अ. रा., ग्रँट डफची साताऱ्यातील चार वर्षे (इ. १८१८-२२), पृ. ८१

१८. उपरोक्त, सरदेसाई गो. स., पृ. ३०

१९. उपरोक्त, कुलकर्णी, अ. रा., जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ : मराठयांचा इतिहासकार, पृ. १६७

२०. उपरोक्त, कुलकर्णी अ. रा., ग्रँट डफची साताऱ्यातील चार वर्षे (इ. १८१८-२२), पृ. ८०

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या दृष्टीकोनातील मराठ्यांच्या इतिहासातील पहिले बाजीराव पेशवे

कु. छाया पांडुरंग घोसे

संशोधक,

इतिहास विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

Corresponding Author - कु. छाया पांडुरंग घोसे

DOI - 10.5281/zenodo.19659031

सारांश:

अ. रा. कुलकर्णी यांनी " पुण्याचे पेशवे " यां पुस्तकात पहिले बाजीराव पेशवे (थोरले बाजीराव) यांना एक धुरंधर, अपराजित सेनापती आणि मराठी सत्तेचा विस्तार करणारे दूरदृष्टीचे नेते म्हणून रेखाटले आहे. बाजीरावांनी शनिवारवाड्याला राजकारणाचा मध्यबिंदू बनवत स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर करण्यासाठी आक्रमक युद्धनीतीचा वापर केला, असे नमूद केले आहे. थोडक्यात अ. रा. कुलकर्णी यांनी पाहिले बाजीराव पेशवे यांना अठराव्या शतकातील मराठा सत्तेचा एक प्रमुख आधारस्तंभ मानले आहे. ज्यांनी आपल्या करारी बाण्याने आणि युद्धकौशल्याने मराठ्यांचा भगवा ध्वज दिल्लीपर्यंत फडकवला. अ. रा. कुलकर्णी यांच्या सारख्या इतिहासकारांच्या विश्लेषणानुसार, मस्तानी प्रकरणाने बाजीरावांच्या व्यक्तिमत्वातील निस्सीम प्रेम आणि त्यांच्या आयुष्यातील कौटुंबिक व सामाजिक संघर्ष यां दोन्ही बाजू उलगडून दाखवल्या आहेत.थोर इतिहासकार अ. रा. कुलकर्णी यांनी पेशवेकालीन सामाजिक आणि कौटुंबिक इतिहासावर सखोल संशोधन केले आहे. पहिले बाजीराव पेशवे यांच्या खाजगी जीवनाकडे त्यांनी केवळ 'प्रेमप्रकरण' म्हणून न पाहता, त्याकाळातील सामाजिक मूल्ये, कौटुंबिक संरचना आणि राजकीय अपरिहार्यता या दृष्टिकोनातून पाहिले आहे.

उद्दिष्ट्ये:

1) प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी स्पष्ट केलेले पहिले बाजीराव पेशवे यांचे व्यक्तिगत जीवन अभ्यासने.
2) प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी स्पष्ट केलेले पहिले बाजीराव पेशवे यांचे राजकीय जीवन अभ्यासने.
3) प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी स्पष्ट केलेले पहिले बाजीराव पेशवे आणि इतर मराठा सरदार यांच्यातील संबंध अभ्यासाने.
4) प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी पहिले बाजीराव पेशवे आणि मस्तानी यांचे संबंध ऐतिहासिक दृष्टीतून अभ्यासने.

1) पहिले बाजीराव पेशवे व्यक्तिगत जीवन:

पहिले बाजीराव पेशवे हे मराठा साम्राज्याचे सातवे पेशवे होते. भट घराण्यातील दुसरे पेशवे होते. बाजीरावांचा जन्म 18 ऑगस्ट 1700 रोजी नाशिकमधील सिन्नर येथे एका चित्पावन ब्राम्हण कुटुंबात झाला. त्यांना विसाजी असेही नाव होते. त्यांचे वडील बाळाजी विश्वनाथ हे भट घराण्यातील पहिले पेशवे होते व पेशवे पद धारण करणारे सहावे पेशवे होते. त्यांच्या आईचे नाव राधाबाई होते. पाहिले बाजीराव पेशवे यांना चिमाजी अप्पा नावाचा एक धाकटा भाऊ आणि अनुबाई व भिऊबाई नावाच्या दोन बहिणी होत्या. वडील लहानपणीच वारले त्यामुळे लहान वयातच जबाबदाऱ्यांचे ओझे खांद्यावर आले. वयाच्या

अवघ्या 20 व्या वर्षी, वडिलांच्या मृत्यूनंतर 17 एप्रिल 1720 रोजी छत्रपती शाहू महाराजांनी पहिले बाजीराव पेशवे यांची पेशवेपदी नियुक्ती केली. बाजीरावांचे पहिले लग्न चास येथील सावकार घराण्यातील काशीबाईंशी झाले. काशीबाई आणि बाजीराव यांना बाळाजी बाजीराव, (नानासाहेब), रघुनाथराव, जनार्धन ही मुले होती. बुंदेलखंडचे राजा छत्रसाल यांची कन्या मस्तानी ही बाजीरावांची दुसरी पत्नी होती. यांच्या नात्याला तत्कालीन कर्मठ समाजाने विरोध केला होता. पहिले बाजीराव पेशवे व मस्तानी यांना शमशेर बहादूर (कृष्ण राव) नावाचा मुलगा होता. पहिले बाजीराव पेशवे अत्यंत साधे जीवन जगत असत. ते सतत घोड्यावर स्वार राहून मोहिमा आखण्यात व्यस्त असत. मोहिमेवर असताना ते घोड्यावर जेवण करत असत, असेही उल्लेख केलेले आहेत. बाजीराव खूप धाडशी, आक्रमक, मुत्सद्दी आणि प्रजादक्ष शासक होते. त्यांनी पुण्यात ऐतिहासिक शनिवारवाड्याची उभारणी केली. हाच शनिवारवाडा हा मराठा साम्राज्याचा प्रशासकीय व राजकीय मुख्य केंद्र बनला. 28 एप्रिल 1740 रोजी वयाच्या 40 व्या वर्षी नर्मदा नदीच्या काठी रावेरखेडी येथे विषमज्वरामुळे त्यांचे निधन झाले.

2) पहिले बाजीराव पेशवे यांचे राजकीय जीवन:

प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी आपल्या संशोधनातून हे मांडले आहे की, पहिले बाजीराव पेशवे यांनी केवळ छत्रपती शाहू महाराजांचा विश्वास संपादन केला नाही, तर मराठ्यांचे लक्ष दक्षिणेकडून उत्तरेकडे (दिल्लीकडे) वळवले. त्यांनी ' हिंदू पद पादशाही' ची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आक्रमक धोरण स्वीकारले.प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या मते पहिले बाजीराव पेशवे यांचे प्रशासन केवळ युद्धापुरते मर्यादित नव्हते. पहिले बाजीराव पेशवे यांनी शिंदे, होळकर आणि पवार यासारखी नवीन आणि कर्तबगार घराणी निर्माण केली ज्यामुळे मराठा साम्राज्याचा विस्तार वेगाने झाला. बाजीरावांचे सर्वात मोठे वैशिष्ट्ये म्हणजे 'वेग' (speed). पालखेडच्या युद्धात त्यांनी ज्या प्रकारे निजामाच्या सैन्याला चकवले, त्याचे तांत्रिक विश्लेषण प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या लेखनात मिळते. पेशवे दप्तरातील कागदपत्रांच्या आधारे प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी हे स्पष्ट केले आहे की, मोहिमांच्या काळात राज्याची आर्थिक घडी बसवण्यासाठी बाजीरावांनी कश्याप्रकारे नियोजन केले. प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या बुंदेलखंड मोहिमेचे (1729) वर्णन अत्यंत निर्णायक, वेगवान आणि राजकीय मुत्सद्देगिरीची लढाई म्हणून केले आहे. पहिले बाजीराव पेशवे यांनी 25,000 घोडदळासह मुघल सरदार बंगशला वेढून छत्रसाल बुंदेलाची मुक्तता केली आणि या विजयामुळे उत्तरेत मराठा सत्तेचा पाया मजबूत झाला, असे वर्णन यात आढळते. पहिले बाजीराव पेशवे यांनी जैतपूर येथे म्हम्मद खान बंगशला घेरले आणि त्याची रसद तोडून त्याला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. बाजीरावांनी ही मोहीम छत्रसालच्या आवाहनानंतर (मदत मागितल्यावर) केली, जी शिवाजी महाराजांच्या राजकारणाशी मिळतीजुळती होती. या विजयानंतर छत्रसालने बाजीरावांना आपला "तिसरा मुलगा" मानले आणि आपल्या राज्याचा एक हिस्सा (कालपी, सागर, झाशी) मराठ्यांना दिला, ज्यामुळे बुंदेलखंडात मराठ्यांचा कायमस्वरूपी पाय रोवला गेला. पहिले बाजीराव पेशवे यांची घोडदळाची वेगवान युद्धनीती (Blitzkrieg) या लढाईत दिसून आली, ज्यामुळे मुघल सैन्याला सावरण्याची संधी मिळाली नाही. थोडक्यात, अ. रा. कुलकर्णीयांच्या मते, ही मोहीम बाजीरावांच्या लष्करी कौशल्याचे आणि मुत्सद्देगिरीचे उत्तम उदाहरण आहे.गुजरात मध्ये त्रिंबकराव दाभाडे यांचा पराभव करून अंतर्गत बंड मोडून काढले.

मुघल बादशहाच्या नाकावर टिच्चून दिल्लीपर्यंत धडक मारली. चिमाजी आप्पांच्या नेतृत्वात पोर्तुगीजांचा पराभव करून वसईचा किल्ला जिंकला. रणरंधुरंधर, शिवाजी महाराजांच्या युद्धानीतीचा वारसा पुढे चालवणारे ठरले. वेगवान हालचाली, कुलकर्णी व इतर इतिहासकार बाजीरावांच्या "एक घाव दोन तुकडे" या धोरणाचे आणि अचानक हल्ल्यांच्या रणनीतीचे कौतुक करतात. अजेय योद्धा, 41 लढाया जिंकूनही एकही न हारल्यामुळे त्यांचा उल्लेख इतिहासात ' अजेय योद्धा ' म्हणून केला जातो. प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णीसारख्या इतिहासकारांनी बाजीरावांच्या या वेगवान हालचालींना त्यांच्या यशाचे गमक मानले आहे. प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी बाजीराव पेशवे यांच्या सैन्यविजयाचे वर्णन केले आहे, त्याबरोबरच बाजीरावांना आर्थिक संघर्षाला सामोरे जावे लागले. आर्थिक अडचणींची सोडवणूक करण्यासाठी बाजीरावांना कर्ज घ्यावे लागत असे. प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी ब्रह्मेंद्रस्वामी सावकाराचा उल्लेख केलेला आहे. सैन्याचा खर्च भागविण्याकरिता पहिले बाजीराव पेशवे यांनी ब्रह्मेंद्र स्वामी या सावकाराकडून ज्यास्त व्याज दराने घेतल्याचा उल्लेख लेखनात आढळतो.

3) पहिले बाजीराव पेशवे व मराठा सरदार यांच्यातील संबंध:

पहिले बाजीराव पेशवे आणि इंदूर संस्थांनाचे संस्थापक मल्हारराव होळकर हे बाजीरावांचे सर्वात विश्वासू आणि उजवे हात मानले जात. मल्हारराव हे एका सामान्य धनगर कुटुंबातील होते, पण त्यांच्यातील शौर्य ओळखुन बाजीरावांनी त्यांना घोडदळाचे नेतृत्व दिले. बाजीराव त्यांना 'भाऊ' मानत. माळवा मोहिमेत बाजीरावांनी होळकरांना महत्वाची जबाबदारी दिली होती. उत्तरभारताच्या राजकारणात बाजीरावांच्या धोरणांना प्रत्यक्ष जमिनीवर उतरवण्याचे काम मल्हाररावांनी केले.

पहिले बाजीराव पेशवे आणि ग्वाल्हेर संस्थानाचे संस्थापक राणोजी शिंद यांचा संबंध मालक व सेवक होता. राणोजी शिंदे हे सुरुवातीला बाजीरावांचे वैयक्तिक सेवक (बारगीर) म्हणून काम करायचे. बाजीरावांच्या चपला सांभाळण्यापासून ते राज्याचा कारभार संभाळण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास बाजीरावांच्या पारखी नजरेमुळे शक्य झाला. बाजीरावांनी त्यांना माळव्याचा काही भाग आणि लष्करी अधिकार देऊन स्वतंत्र सरदार म्हणून मान्यता दिली. राणोजींनी आपली निष्ठा शेवटपर्यंत बाजीरावांच्या चरणी अर्पण केली होती.

पहिले बाजीराव पेशवे आणि उदाजी पवार /धारचे पवार यांच्यात काही प्रमाणात अंतर्गत मतभेद झाले, तरी बाजीरावांनी उदाजी पवार यांना सत्तेत मोठा वाटा देऊन संघटित ठेवले. पवार घराण्याने बाजीरावांना सुरुवातीच्या काळात मोठी मदत केली. माळव्यात मराठ्यांचे पाय रोवण्यासाठी पवारांचे योगदान मोठे होते.

प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या मते गुणवत्तावाद (मेरिटोक्रेसी) अंगीकारलेल्या वैशिष्ट्यापैकी एक होते. बाजीरावांनी जुन्या घराण्यांच्या जागी नव्या रक्ताच्या तरुणांना महत्व दिले. यामुळे एक नवीन लढवय्या पिढी तैयार झाली.पहिले बाजीराव पेशवे आणि सरदार यांच्यात विश्वासाचे नाते होते. बाजीराव या सरदारांशी केवळ मालक म्हणून नव्हे, तर एक 'सहकारी' म्हणून वागत असत. ते स्वतः युद्धभूमीवर त्यांच्यासोबत जमिनीवर झोपत आणि साधे जेवण जेवत, ज्यामुळे सरदारांमध्ये त्यांच्याबद्दल प्रचंड आदर होता. पहिले बाजीराव पेशवे आणि सरदार यांच्यातील संबंधातील वैशिष्ट म्हणजे सत्तेचे विकेंद्रिकरण. बाजीरावांनी या सरदारांना केवळ लष्करी अधीकारी न ठेवता त्यांना त्या प्रदेशाचे 'प्रशासन' आणि 'महसूल'

पाहण्याचे अधिकार दिले. त्यामुळे मराठा साम्राज्याचा विस्तार वेगाने झाला.

4) पहिले बाजीराव पेशवे आणि मस्तानी:

पहिले बाजीराव पेशवे आणि मस्तानी यांचे नाते हे 18 व्या शतकातील मराठी इतिहासातील एक गुंतागुंतीची आणि दुर्दैवी प्रेमकथा मानली जाते. ऐतिहासिक दृष्टीकोनातून, हा संबंध बाजीरावांचे बुंदेलखंडातील राजनैतिक संबंध आणि तत्कालीन सनातनी समाज व्यवस्था यांच्यातील संघर्षाचे प्रतीक होता. मस्तानीकडे बाजीरावाची दुसरी पत्नी किंवा प्रेयसी म्हणून पाहिले जात होते, ज्यामुळे शनिवारवाड्यात आणि ब्राह्मणी समाजात तीव्र विरोध झाला होता. अ. रा. कुलकर्णी यांच्या दृष्टीकोनातून बाजीराव-मस्तानीचा संबंध केवळ प्रेमसंबंध नसून, तो बुंदेलखंडचे राजे छत्रसाल आणि मराठा साम्राज्य यांच्यातील राजनैतिक संबंध बळकट करण्यासाठी, तसेच छत्रसाल यांनी बाजीरावांना मदत मागितल्यामुळे झाला होता. तत्कालीन पुण्यातील सनातनी ब्राम्हणी समाजाने मदतनीला (जी जन्माने अर्ध - मुस्लिम होती) स्वीकारले नाही. तिला बाजीरावाची रखेल म्हणून हिणवले गेले, आणि बाजीरावांना त्यांच्या खाजगी आयुष्यामुळे मोठ्या विरोधाला सामोरे जावे लागले. बाजीरावांचे भाऊ चिमाजी आप्पा, आई राधाबाई आणि पुत्र नानासाहेब पेशवे यांचा मस्तानीमुळे बाजीरावांचे राजकारणातील लक्ष विचलित होत असल्याचा समज होता, ज्यामुळे त्यांना मस्तानीचा राग होता. बाजीराव - मस्तानीची कथा ही निसर्गदत्त प्रेम आणि प्रस्थापित रूढीवादी समाजव्यवस्था यांच्यातील संघर्षाची शोकांतिका मानली जाते. बाजीरावांच्या लष्करी कामगिरीच्या तुलनेत त्यांच्या खाजगी आयुष्यातील मस्तानीचा उल्लेख ऐतिहासिक दस्त ऐवजांमध्ये (बखर वैगरे) मर्यादित आढळतो.

निष्कर्ष:

पाहिले बाजीराव पेशवे यांचे व्यक्तिगत जीवन त्यांच्या शौर्याइतकेच त्यांच्या भावनिक आणि राजकीय संघर्षांनी भरलेले होते. त्यांच्या आयुष्यावर अनेक कादंबऱ्या आणि चित्रपट आधारित आहेत. थोरले बाजीराव पेशवे हे मराठा साम्राज्याचे सर्वात पराक्रमी सेनापती आणि पेशवे होते. प्रख्यात इतिहासकार अ. रा. कुलकर्णी यांनी त्यांच्या लेखनातून बाजीरावांच्या लष्करी कौशल्यातून आणि राजकीय दूरदृष्टीचे अत्यंत मार्मिक विश्लेषण केले आहे. पहिले बाजीराव पेशवे यांनी जातीपातिपलीकडे जाऊन केवळ गुणांच्या आधारे मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे यांसारख्या कर्तृत्ववान सहकाऱ्यांची फळी निर्माण केली. बाजीराव- मस्तानी हे नाते तत्कालीन पेशवे काळातील एक संघर्षमय प्रेमप्रकरण होते, ज्याचा परिणाम बाजीरावांच्या खाजगी आयुष्यावर आणि मराठा राजकारणावर झाला.

संदर्भ ग्रंथ:

1. "पुण्याचे पेशवे" लेखक - प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी
2. लेख - Social and Political History of the Marathas ज्या मध्ये पेशवेकालीन समाजजीवन स्पष्ट होते.
3. "The Era of Bajirao " लेखक - प्रा. डॉ.अ. रा. कुलकर्णी व डॉ. उदय कुलकर्णी

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

अ. रा. कुलकर्णी नव संशोधकांसाठी आधारस्तंभ

श्रीमती सविता विठ्ठल बागल

संशोधक विद्यार्थी ग्रामोन्नती मंडळाचे कला,

ता. जुन्नर जिल्हा पुणे -४१०५०४.

Corresponding Author - श्रीमती सविता विठ्ठल बागल

DOI - 10.5281/zenodo.19659142

प्रस्तावना:

इतिहासअभ्यासक वि का राजवाडे, रियासतकार सरदेसाई, न्यायमूर्ती रानडे, सर जदुनाथ सरकार, द. बा. पारसनीस इत्यादी इतिहासकारांनी लेखनातून ब्रिटिशांच्या वसाहतवादी लेखनाला जोरदार आव्हान दिले व भारतीय इतिहासाला नवीन आयाम दिला.या अभ्यासकांमध्ये आपणास आवर्जून एक नाव घ्यावे लागते ते म्हणजे अनंत रामचंद्र कुलकर्णी म्हणजेच अ रा कुलकर्णी!

अ रा कुलकर्णी यांचे वर्णन करताना अनेक इतिहास अभ्यासक त्यांना हाडाचा संशोधक, ग्रंथोपजीवी असे अनेक गौरवोद्गार बहाल करतात.

बीज शब्द : संशोधक, मूळसाधने, दूरदृष्टी, हळवा, सातत्य.

संशोधन पद्धती:

ऐतिहासिक वर्णनात्मक पद्धती तसेच मुलाखत पद्धती याचा वापर करण्यात येणार आहे.

उद्दिष्टे:

१. अ रा कुलकर्णी अत्यंत कडक शिस्तीचे शिक्षक संशोधक होते
२. भारताचा समृद्ध तसेच संघर्षमय इतिहास हा देश पातळीवर संकुचित न राहता जगासमोर यायला हवा यासाठी ते आग्रही असत.
३. विद्यार्थ्यांमध्ये इतिहास संशोधन वृत्ती वाढावी यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले.
४. नवसंशोधकांसाठी मूळ इतिहासातील, साधन संदर्भातील किचकट वाटा, शब्द सहज साध्य केले.
५. सातत्याने येणाऱ्या संघर्षातूनही त्यांच्या इतिहास लेखनात पठारावस्था निरुत्साह आला नाही.
६. कडक शिस्तीच्या अ रा कुलकर्णीचे सहकाऱ्यांप्रती असणारे हळवे मन त्यांच्या लेखनातून प्रतिबिंबित होते.

व्यक्तिमत्व ओळख:

अरा कुलकर्णी यांचा जन्म १९ एप्रिल १९२५ रोजी निपाणी जवळील यर्नाळ या गावी झाला कोल्हापूर मधील राजाराम कॉलेजमधून अर्थशास्त्र विषयात पदवी पूर्ण करून मुंबई विद्यापीठातून इसवी सन १९४९ मध्ये एम ए पूर्ण केले तसेच बेळगावातील आर.पी.डी. कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून कार्यरत झाले परंतु त्यांच्या शैक्षणिक जीवनाला संशोधकीय वळण लागण्यास कारणीभूत ठरणारा काळ म्हणजेच सोलापूर मधील दयानंद कॉलेज मधील

काळ हा होय सोलापूर मधील दयानंद कॉलेजमध्ये सहाय्यक प्राध्यापक या पदावर कार्यरत असताना जेव्हा संशोधन करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला तेव्हा मध्ययुगीन इतिहासातील गाढे अभ्यासक व तज्ञ तसेच कॉलेज प्राचार्य श्रीराम शर्मा यांनी सुचविलेला १९१९ च्या कायद्याने निर्माण झालेल्या द्विदल राज्यपद्धतीचे मुंबई इलाख्यातील कार्य तसेच दुसरा विषय प्राध्यापक ह. धी. संकलिया यांनी सुचविलेला अग्निपुराण: सामाजिक जीवन हे दोन्ही विषय न रुचल्यामुळे शिवकालीन महाराष्ट्र:सामाजिक आर्थिक इतिहास हा विषय संशोधनासाठी त्यांनी निश्चित केला.

फक्त विषयाची आवड असणे संशोधनासाठी पुरेसे नसते त्यासाठी मूळ साधने संदर्भ ग्रंथाची उपलब्धता मार्गदर्शकांचे प्रोत्साहन इत्यादी पोषक वातावरणाची साथ मिळणे ही तितकेच महत्त्वाचे ठरते.

३५-४०वर्षसातत्याने व मेहनतीने संशोधनातून शिवकालीन महाराष्ट्र हा ग्रंथ परिपूर्ण झाला

1. वरील वाक्यावरून अ रा कुलकर्णी आवड असलेल्या विषयावर किती सातत्याने संशोधनात समर्पित होऊन काम करत होते हे लक्षात येते.शिवकाळाचा इतिहास म्हणजे लढाया राजकीय अशाच अंगाने प्रामुख्याने इतिहास लिहिला गेला होता परंतु अर्थशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या अ.रा. कुलकर्णीनी शिवकाळातील शिवरायांच्या आर्थिक धोरणांवर विस्तृत प्रकाश टाकला तसेच सामाजिक घटकांवर बारकाईने सादर मांडणी केली.

उदा. शिवकालीन सामाजिक व्यवस्थापनात खेडेगावातील दळणवळण ग्राम संकल्पना, ग्रामव्यवस्था यातील नियम जबाबदार घटक उदाहरणार्थ देशपांडे देशमुख कुलकर्णी तसेच खेड्यातील १२ बलुतेदार १८ अलुतेदार यांची सखोल सहसंदर्भ विस्तृत माहिती दिलेली आहेयावरून एखादा घटक संशोधनासाठी जेव्हा एखादा संशोधक निवडतो तेव्हा त्याने किती सखोल, विस्तृत तसेच ससंदर्भ लेखन केले पाहिजे त्या पद्धतीने संशोधन करताना किती संयम ठेवणे गरजेचे आहे याचा वस्तूपाठच अ.रा. कुलकर्णी यांनी नवसंशोधकांपुढे ठेवलेला आहे ३५-४० वर्ष सातत्याने फक्त संशोधनच नव्हे तर त्या संशोधनासाठी मार्गदर्शकाची उपलब्धता तो मान्य होऊन छापून ग्रंथात रूपांतर होण्यापर्यंत त्यांना सातत्याने संघर्ष करावा लागला. या काळात अनेक नैराश्येचे प्रसंग आले परंतु त्याने खचून न जाता तसेच ३५-४० वर्षे सातत्याने उत्साहाने न थकता तसेच पठारावस्था न आणता विषयाला न्याय देण्यात त्यांना यश आले शिवकालीन महाराष्ट्राच्या विक्रमी खपावरून तसेच इतिहास अभ्यासकांसाठी त्यांचा हा मराठा कालीन समाजव्यवस्था तसेच अर्थव्यवस्थेसाठी व त्या अभ्यासासाठी अ रा कुलकर्णी सरांचा शिवकालीन महाराष्ट्र हा ग्रंथ म्हणजे मैलाचा दगड ठरला. त्याच पद्धतीने इतिहास अभ्यासकांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण ग्रंथ ठरला. विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय असलेल्या सरांविषयी सर्व विद्यार्थ्यांमध्ये एक मत वैश्विक होते ते म्हणजे इतिहास शिक्षकांनी ज्ञानी / ज्ञानवंत बनले पाहिजे यावर सरांचा कटाक्ष होता म्हणूनच त्यांच्याविषयी लिहिताना कृतज्ञतेने विद्यार्थी वर्ग लिहितो की अरा कुलकर्णी यांच्या उत्तुंग हिमालया एवढ्या व्यक्तिमत्त्वाविषयी लिहिताना आम्ही टेकडीइतकीच मर्यादा पेलू शकलो.

2. संशोधन करताना संशोधकाने तटस्थ तसेच सहसंदर्भात केले तरच त्या संशोधनाला सत्यदृष्टीने लिहिता येते व पुढील पिढीला तसेच नवसंशोधकांसाठी ते उपयुक्त तसेच मार्गदर्शक ठरते अन्यथा इतिहासात पूर्वग्रहदूषित, व्यक्तीनिष्ठता स्तुतिपाठता, मूळ साधनांचा अभाव यामुळे लिखाण हे दोषयुक्त तसेच चुकीचा इतिहास पुढील पिढीपर्यंत जाईल त्याहीपेक्षा ते समाजासाठीही घातक ठरू शकते त्यामुळे मूळ कागदपत्रे हवी सरांचा आग्रह असा की

संशोधकाने जास्तीत जास्त मूळ कागदपत्रे पहावी त्यामुळे संशोधन पक्के होते.

3. त्यामुळे ग्रँड डफ, शिवकालीन महाराष्ट्र, रामचंद्र अमात्य यांचे आज्ञापत्र, जेधे करीना इत्यादी सरांचे अनेक ग्रंथ नवसंशोधकांसाठी प्रमाणभूत ग्रंथ ठरतात.

4. तसेच आज्ञापत्र या ग्रंथाकडे एक परिपक्व साक्षेपी संशोधकाने वस्तुनिष्ठपणे केलेले संपादन म्हणून पहावे लागते इतपत तटस्थता हे वैशिष्ट्यही सरांविषयी नोंदविता येते.

5. वैविध्यपूर्ण तसेच विस्तृत सखोल मूळ साधनांना धरूनच परंतु नवसंशोधकांना रटाळ, जड, किचकट न होणारे लिखाण करताना जसे मराठा कालीन इतिहासावर सरांनी प्रकाश टाकला त्याचप्रमाणे आधुनिक, प्राचीन, पुणे शहराचा इतिहास, इंदापूरचा स्थानिक इतिहास तसेच कुलकर्णी पदाचा इतिहासातील मुख्य साक्षीदार असणारे वीरगळ, खानदेश फारुकी घराणे इतिहास व नाणी,भारतीय इतिहासातील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्व जसे शहाजीराजे, शिवाजी राजे, संभाजी राजे, महात्मा ज्योतिराव फुले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर इत्यादींसारख्या विभूंतीवर प्रकाश टाकलाच परंतु एल्फिस्टन ग्रँड डफ, मास्तर चार्लस डोचवा इत्यादी परकीय व्यक्तिमत्त्वांवरही विस्तृत लिखाण केलेले आहे यावरून इतिहासाला समर्पित होताना विषय, काळ, स्थान यात स्वतःला बांधून न ठेवता इतिहासात स्वैर परंतु मूळ साधनाला धरून भ्रमंती करता आली पाहिजे एवढी इतिहासाप्रती एकनिष्ठता आणि समर्पण असावे हाच गुण नवसंशोधकांसाठी तसेच अभ्यासकांसाठी सुद्धा आदर्शवत ठरतो.

'गेले ते दिन' या ग्रंथात सरांच्या आयुष्यात आलेले १२ अवलिया(पु ल देशपांडे, ना सी फडके, दत्तो वामन पोतदार, पू म जोशी,बाळासाहेब खर्डेकर, आप्पासाहेब पवार, ग ह खरे, त्र.शं शेजवलकर, पांडुरंग पिसुर्लेकर, सेतू माधवराव पगडी, श्रीपाद टिकेकर,राज देशमुख) ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व सहवासाचा सरांवर अतिशय सखोल परिणाम झाला त्यांच्या आठवणीने सर कासावीस होत असत आणि त्याचे प्रतिबिंब या ग्रंथामध्ये त्यांच्या आठवणींना शब्दबद्ध करताना व्यक्त केलेले आहेत ते म्हणतात 'आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर माणूस जेव्हा येतो तेव्हा गतकाळातील बऱ्या वाईट आठवणींना उजाळा देऊन पुन्हा प्रत्ययाचा आनंद घेण्याचा त्याला एक छंदच लागतो आणि कितीतरी संध्या रजनी तो सुखात घालवितो'.

6. सरचिटणीस महाराष्ट्र इतिहास शिक्षक मंडळातर्फे सरांच्या वयाची सत्तरी पूर्ण झाल्या प्रित्यर्थ डॉ. अ रा कुलकर्णी सत्कार समितीने गौरविका १९ एप्रिल १९९५ रोजी प्रसिद्ध केली. ज्यात सरांची संपूर्ण कारकीर्द सरांचे विद्यार्थी, स्नेही, हितचिंतक यांनी शब्दबद्ध केली आहे एक आदर्श शिक्षक जो कामाप्रती कठोर शिस्तीचा परंतु सकारात्मकतेने भरलेला ज्याला सतत विद्यार्थ्यांनी अध्ययनात सखोल परिपूर्ण, तटस्थ संशोधन, उत्साही राहावं असे वाटत होते संशोधकांनी इतिहासातील मूळ साधनांचा वापर करावा यावर जरी ते ठाम असले तरी मूळ साधनांमधील किचकट, जड, बोजड शब्द साहित्य वाचताना नवसंशोधकांमधला उत्साह ढळून निरुत्साह येऊ नये तसेच त्यांच्या कामात सातत्य रहावे म्हणून त्यांच्या अनेक ग्रंथात सरांनी तात्कालीत इतिहासातील शब्दांना सध्याच्या व्यवहारिक भाषेत काय अर्थबोध होतो तसेच ते शब्द सुद्धा अधिक परिणामकारक समजावेत म्हणून उदाहरणासहित ठीक ठिकाणी दिलेले आहेत उदा. सरांच्या मराठे आणि महाराष्ट्र या ग्रंथामध्ये ग्रामव्यवस्थेचे वर्णन करताना त्यातील अवघड वाटणाऱ्या संकल्पनांचे व्यवहारिक अर्थही सरांनी दिलेले आहेत काळी आई (जमीन पेरणी योग्य), पांढरी आई (जमीन लोकवस्ती योग्य), बलुतेदार(कारू), आलुतेदार (नारू), दिवाण (अशाश्वत सत्ता), देशसत्ता (शाश्वत सत्ता).

7. तसेच 'शिवकालीन महाराष्ट्र' या ग्रंथातही जुन्या संकल्पना समजून सांगताना सरकारी उद्योगधंदे या सदराखाली दिलेल्या 18 कारखाने व बारा महाल याबद्दल लिहिताना आंबारखाना (धान्याचा साठा), भट्टी (गोशाला),फेरी (खाजगी विहीर बाग), दरुनी (अन्तःपुरा) पीलखाना (हत्तीशाळा), फरासखाना (डेरे राहुटेया ठेवण्याची जागा),उष्टारखाना (उंट शाला), जीरातेखाना (शस्त्र गार).

8. असे ऐतिहासिक शब्दांना व्यवहारिक शब्द सरांनी दिल्यामुळे संकल्पना अवगत करणे व सखोल समजून घेऊन उचित अर्थ लावण्यास अभ्यासकांना सहज सुलभ होते जेणेकरून पुढील संशोधनाला अथवा अभ्यासाला दिशा मिळून वेग येतो.

अ रा कुलकर्णी सत्कार समितीतील गौरविकेच्या प्रस्तावनेतच कृतज्ञता व्यक्त करताना विद्यार्थी लिहितात 'आपल्या विचक्षण आणि तत्व अधिष्ठित शिकवणीमुळे इतिहास संशोधकांची व अभ्यासकांची एक नवी पिढी आपण तयार केलीत विद्यार्थी स्नेही यांच्या विषयी असणाऱ्या जिव्हाळ्यामुळे आपल्यात व आपल्या विद्यार्थी स्नेही हितचिंतकांमध्ये अतूट ऋणानुबंध निर्माण झाला आहे'.

9. भारतीय इतिहास देशपातळीवर बंदिस्त न राहता आंतरराष्ट्रीय स्तरावर गेला पाहिजे इतिहासातील आपला संघर्ष विश्वव्यापक व्यक्तिमत्व स्वावलंबी ग्रामरचना ज्यात इंग्रजांनाही (ज्यांना भारतातील सगळ्यात क्षेत्रातील व्यवस्थेत बदल करावासा वाटला) त्यांनाही बदल करण्याची आवश्यकता वाटली नाही.मराठा कालीन अर्थव्यवस्थेविषयी इतिहास आंतरराष्ट्रीय पातळीवरनेण्याचा त्यांचा मानस त्यांनी आय सी एच आर इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च च्या माध्यमातून पूर्ण केला म्हणूनच भारतीय इतिहास अभ्यासकांसोबतच भारताबाहेरील विद्वान अनंतरावांना त्यांच्या संशोधनामुळे फार मानतात.

10. रशियन विदुषी युजीना वेनीना यांनी कुलकर्णी सरांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले आहे. "A.R.Kulkarni maybe regarded as a really progressive scholar whose work offers on necessary link between the past present and future without which no genuine historical research has ever been possible".

M.A. Anirudh Ray KS Mathew Ed studies in history of the Deccan Medical and modern Delhi 2002 p9

भारतीय इतिहासकारांनी ज्या मराठ्यांचा आद्य इतिहासकार ग्रँड डफ यावर भारतीय इतिहासाची सदोष मांडणी केल्याबद्दल दोष दिला होता परंतु ग्रँडची बाजू सहसंदर्भ मांडून त्याच्या इतिहास दृष्टीला व मेहनतीला न्याय देण्याचे काम अ रा कुलकर्णी यांनी केले. त्याचबरोबर छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ यात 'इतिहासाच्या दरबारात' या लेखांतर्गत संभाजी महाराजांच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना रॉबर्ट आर्म पासून वा सी बेंद्रे, कमल गोखले, यदुनाथ सरकार, चिटणीसी बखर, मार्टिन, साकी मुस्तैदखान, खाफीखान, ईश्वरदास नागर इत्यादींच्या लेखनाचा परामर्ष देऊन तटस्थतेने लिहिताना संभाजीराजांच्या ९ वर्षाच्या काळात औरंगजेबाने दक्षिणेतील आदिलशाही कुतुबशाही इ. मुसलमानी सत्ता गिळंकृत केल्या परंतु मराठ्यांपुढे त्याला पगडी उतरावी लागली व औरंगजेबाचे मराठा सत्ता जिंकण्याचे स्वप्न अपूर्णच राहिले व मराठी सत्ता 'वर्धिष्णू विश्ववंदिता' बनली.

11. यावरून कोणत्याही एका घटकावर भाष्य करताना देखील अनेक इतिहासकारांच्या मूळ साधनांचा त्या घटकाकडे सर्व बाजूने पाहण्याच्या दृष्टिकोनाचा सुद्धा

सखोल अभ्यास करावा लागतो व त्यानंतरच आपले तटस्थ मत व्यक्त करावे लागते. नवसंशोधकांनी 'अभ्यासुनि प्रकटावे' या युक्तीला आत्मसात करावे हीच शिकवण त्यांना अ रा कुलकर्णी देतात.

भारतीय इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या भारतीय व परकीय इतिहासकारांच्या दृष्टिकोनाच्या योगदानाचे महत्व अ.रा कुलकर्णींनी इतिहास अभ्यासकांसाठी अधोरेखित केले आहे. महापुरुषांप्रती प्रचंड आदर असणाऱ्या अ रा कुलकर्णी सरांनी बाबासाहेब आंबेडकर अध्यासन (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ), शाहू महाराज मराठा इतिहास अध्यासन केंद्र (शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर), इतिहास विभाग (सावित्रीबाई फुले,पुणे विद्यापीठ) तसेच इतिहास विभाग ,शिवाजी विद्यापीठ (जिथे या विभागाला स्वतःची प्रचंड ग्रंथसंपदा तसेच त्यांच्या दिवंगत आईच्या नावाने विद्यापीठाला एक लाख रुपयांची भरीव देणगी दिली).

12. राजाराम कॉलेज पासून सुरू झालेला सरांच्या प्रदीर्घ प्रवासात सरांनी अनेक महत्त्वपूर्ण पदावर काम केले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात इतिहास विभाग सुरू करण्याचे श्रेय संपूर्णतः सरांनाच आहे तेथे इतिहास विभाग प्रमुख म्हणूनही ते कार्यरत राहिले. २७ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी प्राप्त केली. त्याचबरोबर डेक्कन कॉलेज, भांडारकर इन्स्टिट्यूट, I.C.H.R., टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,भारतीय इतिहास संशोधक मंडळ,इतिहास शिक्षक मंडळ,तसेच ऐतिहासिक दुर्मिळ मूळ साधनांसाठी त्यांनी फ्रान्स, लिस्बन, लंडन येथील दप्तरांचा वारंवार धांडोळा घेतला. सर दरवर्षी मराठ्यांच्या इतिहासावर देशात व परदेशातही अनेक परिषदा आयोजित करत. टिळक विद्यापीठात त्यांनी कुलगुरू पद ही भूषविले होते व तेथे शिवाजी महाराज अध्यासनासाठी प्रयत्न केले.महापुरुषांच्या नावाचा वापर राजकीय लोक स्वतःच्या फायद्यासाठी करतात.शिवकालीन महाराष्ट्र शिवकालीन महाराष्ट्राचे जन्म कथा परंतु त्यांच्या कार्याचा प्रसार व प्रचार नव्या पिढीला करणे कामी दुर्लक्ष करतात ही बाब त्यांना अस्वस्थ करत असे.

अ रा कुलकर्णी यांच्या घरातील कपाट पदक, ट्रॉफीज, मानपत्र मानचित्र इत्यादींनी खचाखच भरलेले होते परंतु त्याचबरोबर पुणे विद्यापीठाने दिलेला सुप्रतिष्ठित प्राध्यापक आणि इंडियन हिस्टरी काँग्रेसचे अध्यक्ष पद हेही महत्त्वपूर्ण सन्मान सरांना प्राप्त होते जन्मशताब्दी निमित्त अनेक विद्यापीठात विशेष राष्ट्रीय इतिहास परिषदा घेण्यात आल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित केलेल्या अ रा कुलकर्णी जन्मशताब्दी निमित्त राष्ट्रीय चर्चासत्रात अ रा कुलकर्णी सरांच्या कुटुंबांनी 'चंदनाचे हात पायही चंदन' या उक्तीप्रमाणे सरांनी जसे त्यांच्या दिवंगत आईच्या नावे शिवाजी विद्यापीठात एक लाख रुपयाचे देणगी दिली होती, त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत कुटुंबाने पाच लाख रुपयांची देणगी 'अ.रा कुलकर्णी सुवर्णपदकासाठी' देऊन सदैव ज्ञानदानास सहायक ही परंपरा जपली म्हणूनच इतिहास अभ्यासक, नवसंशोधक, संशोधक, विद्यार्थी, स्नेही नेहमीच त्यांचे ऋणी राहतील.

संदर्भ साधने:

१. शिवकालीन महाराष्ट्राचे जन्मकथा ,संशोधक,इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे संशोधन मंडळ धुळे संस्थेचे त्रैमासिक, मार्च 2010 अंक १,पृ. क्र.४

२. शिवकालीन महाराष्ट्राचे जन्म कथा पृ. क्र.२१

३. तत्रैव

४. शिवकालीन महाराष्ट्र,कुलकर्णी अ रा, राजहंस पब्लिकेशन पुणे,१० जून२०१९

५. संशोधक,इतिहासाचार्य विश्वनाथ प्रकाशनाथ राजवाडे संशोधन मंडळ धुळे या संस्थेचे त्रैमासिक,अंक १,मार्च २०१० पृ क्र४५

६. गेले ते दिन कुलकर्णी अ रा, डायमंड पब्लिकेशन पुणे, जुलै २००६ पृ.क्र.४

७. मराठे आणि महाराष्ट्र, कुलकर्णी अ रा, डायमंड पब्लिकेशन पुणे, जानेवारी २००७ पृ.क्र. १८

८. शिवकालीन महाराष्ट्र, पृ.क्र १२६

९. गौरविका ,संपा. राजा दीक्षित, सरचिटणीस महाराष्ट्र इतिहास शिक्षक महामंडळ पुणे,१९एप्रिल१९९५

१०. गौरविका पृ.क्र ७

११. छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, पवार जयसिंगराव, मेहता पब्लिकेशन पुणे१ मार्च२०२१, पृ.क्र१९८

१२. मराठ्यांच्या इतिहासाचे ख्यातनाम इतिहासकार कालवश, पाटील अविनाश,प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी महाराष्ट्र, जून२००९, पृ. क्र.५२

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सत्यशोधक समाज त्याचे तत्त्वज्ञान व आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण

डॉ. प्रविण बोरकर

सहयोगी प्राध्यापक,

पदवी व पदव्यूत्तर इतिहास विभाग, आर. के. तलरेजा कॉलेज, उल्हासनगर.

Corresponding Author - डॉ. प्रविण बोरकर

DOI - 10.5281/zenodo.19659215

गोषवारा :

महाराष्ट्राला 'फुले-शाहू-आंबेडकरांचा' महाराष्ट्र म्हटले जाते, 'फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र' ही आधुनिक महाराष्ट्राची महत्त्वपूर्ण ओळख आहे. या त्रयींनी महाराष्ट्राला आधुनिक स्वरूप प्राप्त करून देण्यात महत्त्वाची भूमिका वठवली, यांच्या विचार व कार्यामुळेच महाराष्ट्र ढवळून निघाला, त्यातही आधुनिक महाराष्ट्राच्या दिशेने जो सामाजिक प्रवास सुरु झाला त्याची पायाभरणी सत्यशोधक समाजाच्या रूपाने महात्मा फुल्यांनी केली. सत्यशोधक समाज हा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचून त्यांच्या समस्यांना वाचा फोडणारा, त्यांचे प्रबोधन करून त्यांच्यात सामाजिक भान निर्माण करणारा महाराष्ट्रातील पहिला सामुहिक प्रयत्न होता. महात्मा फुले हे स्वतः आधुनिक विचारांचे असल्याने त्यांनी सत्यशोधक समाजाची पायाभरणी आधुनिक विचारांवर करून, रूढी परंपरा, कर्मकांड, धर्ममार्तंडाचे प्राबल्य, अविद्या यावर टीकेची झोळ उठवत समाजव्यवस्थेवर आसूड ओढले तर शिक्षण, स्त्री सुधारणा, दलित-गोरगरीबांचा, शेतकऱ्यांचा कैवार घेत बहुजन समाजात जागृती केली. सत्यशोधक समाजाच्या विचारप्रवाहाने सामाजिक घुसळण, विचारमंथन, वाद-प्रतिवाद झालेत या सर्वांमुळे तत्कालीन समाजावर त्याचा परिणाम झाला व परिवर्तनाचा एक सामाजिक प्रवास सुरु झाला, पुढे या प्रवासात राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याची भर पडली आणि महाराष्ट्राचे आधुनिक वळण अधिकच सशक्त झाले. आजही सत्यशोधक चळवळीचा वैचारिक प्रभाव महाराष्ट्रातील समाजमनावर दिसून येतो.

सत्यशोधक समाजापासून ते आजच्या आधुनिक महाराष्ट्रापर्यंत बरीच स्थितंतरे घडून आली आहेत, आजचा कल बहुतांशी पुरोगामित्त्वाच्या बाजूने नसला तरी पुरोगामी विचारविश्व आपले स्थान राखून आहे, वेळोवेळी आपल्या उक्ती आणि कृतीने या विचारविश्वाने आपला हस्तक्षेप कायम ठेवला आहे, त्यामुळे तो दखलपात्र आहे. सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान फुल्यांच्या तत्त्वज्ञानापेक्षा काही वेगळे तत्त्वज्ञान होते असे नाही, सत्यशोधक समाजाची नियमावली व तत्त्वे तयार करण्यात आले असले तरी, फुले हे समाजाचे संस्थापक असल्याने त्यांच्या विचारांचा सत्यशोधक समाजावर मोठा प्रभाव होता, त्यामुळे या लेखात सत्यशोधक समाजाच्या सोबतच फुल्यांच्या विचारव्युव्हाचा सुद्धा आढावा घेतला आहे, त्याशिवाय प्रस्तुत संशोधन लेख पूर्णत्त्वास जाऊ शकत नाही. १९७९-८० च्या दशकात फुले तत्त्वज्ञ होते काय? किंवा त्यांनी कोणते तत्त्वज्ञान सांगितले आहे? असे प्रश्न विचारले गेलेत, रूढार्थाने तत्त्वज्ञ व तत्त्वज्ञानाचा अर्थ लावून फुल्यांना तत्त्वज्ञ नसल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याला शरद पाटील यांनी योग्य उत्तर दिले असून "फुले यांनी नव्या विधायक तत्त्वांची मांडणी 'सार्वजनिक

सत्यधर्म' ह्या पुस्तकात केली आहे. पुस्तकाच्या द्वारे फुले यांनी सत्यशोधक समाजास जीवनाचे नवे तत्त्वज्ञान दिले आहे. धर्मभेद व राष्ट्रभेद यांच्या विरुद्ध महान सत्य पहिल्यांदा फुले यांनी सांगितले आहे." [१] असे मत व्यक्त करून फुल्यांनी सार्वजनिक सत्यधर्माचे तत्त्वज्ञान दिले आहे हे नमूद केलेले आहे. पाटील फुल्यांच्या विचारप्रवाहाला 'फुलेवाद' असे संबोधतात.

पेशवेकाळातील पार्श्वभूमीवर या चर्चेची सुरुवात करावी लागते कारण पेशवेकाळात सामाजिक विषमता एवढी वाढली होती की, व्यक्तीस्वातंत्र्य लोप पावले होते, दलित-बहुजन समाजासाठी तर हा काळ संकटाचा काळ होता, सामाजिक विषमतेविरुद्धचा संघर्ष आतल्या आत धुमसत होताच, त्याला बाहेर पडायला थोडा काळ जावा लागला. उमेश बगाडे म्हणतात त्याप्रमाणे, "पेशवाईच्या अधःपतित समाजव्यवस्थेच्या पोटात एक प्रागतिक सामाजिक संघर्षही होता. जातिव्यवस्थेचे शोषण व वर्चस्व नाकारणारे लढे सामाजिक परिवर्तनाची आस घेऊन पुढे जात होते." [२] पेशवाई संपल्यावर आणि ब्रिटीशांचे राज्य सुरु झाल्यावर थोडीफार परिस्थिती बदलायला सुरुवात झाली असली तरी ब्राह्मणी वर्चस्व सर्वच क्षेत्रात कायम होते, यपार्श्वभूमीवर फुल्यांनी त्यांच्या प्रबोधनाच्या कामाला सुरुवात केली. पेशवाईतील दोन्ही प्रवाहांचा फुल्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडला. उमेश बगाडे लिहितात, "महात्मा फुले यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये पेशवाईचे दोन प्रकारचे संदर्भ आढळतात. ब्राह्मणी वर्चस्व व प्रभूत्त्वाचा विरोध आणि अब्राह्मणी भक्ती चळवळीच्या जातिविद्रोहाची आधुनिकता ही तत्त्वे म. फुले यांच्या जीवनचरित्राचे प्रेरणास्त्रोत राहिले आहेत." [३] याची प्रचिती म. फुल्यांच्या विचारांमधून, साहित्यातून व त्यांच्या कार्यातून येते.

सत्यशोधक समाजाची स्थापना ही आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना होय. त्यावेळी भारतात समाजसुधारणा चळवळ म्हणून नावारूपाला आलेल्या काही संघटना होत्या त्यात, राजा राममोहन रॉय यांचा 'ब्राह्मो समाज', रानडे व भांडारकर यांच्या मार्गदर्शनातील 'प्रार्थना समाज' आणि स्वामी दयानंद सरस्वती यांचा 'आर्य समाज' यांचा समावेश होतो. या संस्था शहरी भागापुरत्या व अभिजन समूहापुरत्या मर्यादित होत्या. पण सत्यशोधक समाजाचे असे नव्हते, सत्यशोधक समाज हा गोरगरिबांसाठी, तळागाळातील लोकांसाठी कार्य करणारा होता, यातील कर्तेधर्ते लोकही बहुजन समाजातील होते, त्यामुळे त्यांना बहुजन समाजाच्या समस्यांची कल्पना होती, हे शेतकरी कष्टकरी लोकांचे संघटन होते. धनंजय कीर लिहितात, "राममोहन रॉय, रानडे व भांडारकर, आणि त्यानंतर दयानंद सरस्वती ह्यांच्यासारख्या द्रष्ट्यांनी काढलेल्या संस्थांच्या बरोबरीची एखादी संस्था काढणे ही काही लहानसहान गोष्ट नाही नाही. इतकेच नव्हे तर, ब्राह्म समाज आणि प्रार्थना समाज ह्यांनी जी गोष्ट करण्याचा प्रयत्न केला नाही ती सत्यशोधक समाजाने केली. ती गोष्ट म्हणजे कनिष्ठ वर्गाचा उद्धार करणे ही होय." [४] दिनांक २४ सप्टेंबर १८७३ रोजी साठ सदस्यांच्या उपस्थितीत साध्या पद्धतीने सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली. या संघटनेची स्थापना पुण्यात करण्यात आली. पुणे त्याकाळात सामाजिक, सांस्कृतिक चळवळीचे केंद्र होते, त्यामुळेही पुण्याला महत्त्व होते, ही संघटना पूर्व पुण्यात स्थापन झाली. जी. ए. उगले लिहितात, "हे संघटन पुण्यात स्थापन झाले असले, तरी शहरी तोंडवळा असलेल्या पश्चिम पुण्यात स्थापन न होता, पूर्व पुण्यात स्थापन झाले. पूर्व पुण्याचा खेडूत तोंडवळा घेऊन हे संघटन स्थापन झाले. पगडीवाल्या पश्चिम पुण्याच्या

सर्वंकष 'गुलामगिरी'ला प्रतिआव्हान देण्यासाठी पूर्व पुण्यातील फेटेवाल्यांचे हे संघटन होते." [५]

सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांवरून समाजाचे स्वरूप स्पष्ट होते, महात्मा फुल्यांच्या मृत्यूनंतर १९११ मध्ये भवानी पेठ, पुणे येथे भरलेल्या सत्यशोधक अधिवेशनाच्या ठरावात ही तत्त्वे मान्य करण्यात आली. अ) सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत व देव त्यांचा आईबाप आहे. ब) आईला भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थाची जरुरी नसते त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यास पुरोहित किंवा गुरु यांची आवश्यकता नाही. क) वरील तत्त्व कबूल असल्यास कोणासही सभासद होता येते.[६] फुल्यांच्या काळात सत्यशोधक समाजाचे अलिखित नियम असावेत. पुढे जेव्हा सत्यशोधक अधिवेशन होऊ लागले त्यात नियम तयार करण्यात येऊ लागले. राजकीय विषयावर सभासदांना बोलण्याची मनाई होती. निरक्षर लोकांना साक्षर करण्यासाठी शिक्षणाचा आग्रह धरण्यात आला. सत्यशोधक समाजाच्या रिपोर्टमध्ये याचा उल्लेख दिसून येतो, त्यात इंग्रज सरकारमुळे सर्वांना शिक्षणाची संधी मिळाली व लोकांमध्ये सुधारणा करण्यासाठी हे चांगले दिवस असल्याचे नमूद केलेले आहे.[७] ब्राह्मण, महार, मांग, ज्यू, मुसलमान, मराठा आणि माळी हे सत्यशोधक समाजाच्या आरंभीच्या काळात समाजाचे सभासद होते. सभासदत्त्व सर्वांसाठी खुले होते, सभासद बनण्यासाठी तळी उचलण्याचा एक विधी केला जात असे व तळीतील भंडारा व गुलाल नवोदित सभासदाच्या कपाळाला लावला जात असे. जी. ए. उगले लिहितात, "हा खेडूत पारंपारिक संस्कार आरंभी एतद्देशीय पर्याय म्हणून स्वीकारला होता. पुढे सत्यशोधक समाज संघटन वाढीस लागल्यावर या तळीभंडाराच्या संस्कारातून ब्राह्मणी वर्चस्वातून आपण स्वतःला मुक्त करण्याची खुण होती.[८] गुलामगिरी हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा जाहीरनामा असल्याचे मत उगले यांनी मांडले आहे व ते योग्यही आहे. या पुस्तकात फुल्यांनी केलेली मांडणी विस्फोटक आहे, त्यांनी प्रतिगामी संस्कृतीवर थेट चालच केलेली आहे. सदर ग्रंथाचा उद्देश स्पष्ट करतांना फुले लिहितात, "या ग्रंथाचा मुख्य उद्देश असा आहे की, आज शेकडो वर्षे शुद्रादि अतिशूद्र, ब्राह्मण लोकांचे राज्य झाल्यापासून सतत दु:खे सोशीत आहेत व नानाप्रकारच्या यातनेत आणि संकटात दिवस काढीत आहेत, तर या गोष्टीकडेस त्या सर्वांचे लक्ष लागून त्यांनी तिजविषयी नीट विचार करणे व येथून पुढे भटब्राह्मण लोकांचे अन्यायी जुलमापासून आपली सुटका कशी करून घेणे हाच काय तो आहे." [९]

सत्यशोधक समाज हे संघटन बोलघेवडे संघटन नव्हते तर कृतीशील संघटन होते, सत्यशोधक समाजाच्या काळापासून ते आधुनिक महाराष्ट्र या सामाजिक प्रवासाच्या कालखंडात अनेक संघटना, संस्था निर्माण झाल्यात परंतु वैचारिक स्पष्टता आणि कणखरपणा यात सत्यशोधक समाज प्रहरी राहिला. मूळ समस्या कळाली की त्यावर योग्य ती उपाययोजना करता येते तसेच सत्यशोधक समाजाचे होते, सत्यशोधक समाजाचे कर्ते फुल्यांना दलित-बहुजन व स्त्रियांच्या समस्यांचे मूळ कळाले होते, त्यांनी ते त्याच्या सहकाऱ्यांना सुद्धा पटवून दिले, पुणे सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट त्यानुषंगाने बोलका आहे, त्यात सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचे उद्देश स्पष्ट करतांना नमूद केले आहे की, "ब्राह्मण भट, जोशी, उपाध्ये इत्यादिक लोकांच्या दास्यत्वापासून शुद्र लोकांस मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे आज हजारो वर्षे ते शुद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आले आहेत, यास्तव सदुपदेश व विद्याद्वारे त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहारसंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यांस मुक्त करण्याकरिता काही सुज्ञ शुद्र मंडळींनी हा समाज तारीख २४ माहे सप्टेंबर सन

१८७३ इसवी रोजी स्थापन केला." [१०] फुल्यांनी व सत्यशोधक समाजाने आपला उद्देश किंवा हेतू कधीही लपवला नाही तर तो उघडपणे जाहीर केला.

सत्यशोधक समाज व तत्कालीन समाजसुधारणेच्या अन्य संस्था (ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्यसमाज) यांच्या कार्याचे स्वरूप पाहिले की त्यांच्यातील फरक लक्षात येतो. राममोहन रॉय यांनी ब्रह्मतत्त्व ही संकल्पना उचलून धरली, प्रार्थना समाजाने प्रार्थना तर आर्य समाजाने आर्यतत्त्व परंतु सत्यशोधक समाजाने 'सत्यशोधनाला' महत्त्व देत सामान्य माणूस हा केंद्रबिंदू मानून त्याच्या उद्धाराला महत्त्व दिले. कीर लिहितात, "ब्राह्म समाजवादी आणि प्रार्थना समाजवादी हे आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रार्थना करीत. प्रार्थनेच्या प्रभावावर त्यांचा विश्वास होता. जोतीरावांचा भर प्रार्थनेवर नव्हता किंवा आध्यात्मिक उन्नतीवरही नव्हता. जोतीराव हे भगवद्भक्तीत धुंद झालेले देवभक्त नव्हते" [११] त्यामुळेच फुल्यांनी उघड्या डोळ्यांनी कनिष्ठ समूहांच्या समस्यांकडे बघितले व त्यावर उपाय सुचविले व कृतीतही आणले. त्या काळी अश्याप्रकारचे कार्य करणे काही सोपे काम नव्हते पण फुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी न घाबरता दलित-बहुजन उद्धाराची वाट चोखाळली. १८७५ पर्यंत समाजाच्या सभासदांची संख्या २३२ पर्यंत पोहोचली होती.[१२] तर १८७६ पर्यंत ३१६ पर्यंत पोहोचली होती.[१३] तत्कालीन ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, परमहंस मंडळी, आर्य समाज यांना खेड्यात फारसे स्थान मिळाले नाही, या समाजाचे कार्यकर्ते नोकऱ्या सांभाळून फावल्या वेळात काम करणारे होते, याउलट सत्यशोधक समाजाला ग्रामीण भागात अधिक वाव मिळाला, समाजाचे कार्यकर्ते प्रामुख्याने शेतकरी, लघुउद्योग करणारे होते. नांगरी परिसर हा समाजाचा 'बेस' होता. समाजाचे कार्यकर्ते याच समाजातून आल्याने बेंबीच्या देठापासून हा कार्यकर्ता 'फुलटाईम' समाजाचा फिल्ड वर्कर होता. समाजासाठी प्रचार-प्रसार करावा नि:स्वार्थपणे कष्ट उपसावे एवढेच त्याला माहित होते. परमहंस सभेप्रमाणे समाजाचे कार्य गुप्तपणे चालत नव्हते, तर उघडपणे चालत होते. त्यामुळे हा कार्यकर्ता निडर होऊन कार्यरत राहत असे. प्रसंगी दोन हात करण्याची तयारी ठेवत असे.[१४] एकप्रकारे फुल्यांनी त्या काळात सत्यशोधक समाजामार्फत अतिशय धाडसी कार्यकर्ते घडवले, हेही सत्यशोधक समाजाचे वेगळेपण होते.

फुले हे जातिव्यवस्थेचे विरोधक होते, त्यांना त्यांच्या ब्राह्मण मित्राच्या लग्नाच्या मिरवणुकीत ब्राह्मणांच्या सोबतीने चालल्याने अपमानित करण्यात आले व शुद्र असल्याकारणाने त्यांनी वरातीत सर्वांच्या मागून चालावे असे सांगण्यात आले.[१५] या प्रसंगाने जोतीरावांना अंतर्बाह्य बदलले, समाजातील भेदभाव संपविण्याचा चंग त्यांनी बांधला. सर्व मनुष्यजात समान आहे यावर फुल्यांचा विश्वास होता परंतु वास्तवात मात्र माणसे आपापसात भेदभाव करतात, परस्परांना कमी लेखतात त्यामुळे सामाजिक विषमता निर्माण झाली असून ती नष्ट झाली पाहिजे असे त्यांना वाटत असे. त्यामुळेच सत्यशोधक समाजाची वैचारिक बैठक त्यांनी समतेची केली. त्यात सर्व जातिधर्माच्या लोकांना प्रवेश होता. फुल्यांनी महार-मांगासारख्या खालच्या दर्जाच्या समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांना आपलेसे केले, त्याचबरोबर सत्यशोधक समाजाची तत्त्वे मान्य असणाऱ्या ब्राह्मण लोकांचे सहकार्य सुद्धा घेतल्याचे दिसून येते. यामुळेच अरविंद देशपांडे लिहितात की, "जातिव्यवस्था व्यक्तिनिरपेक्ष नसून पूर्णपणे व्यक्तिसापेक्ष आहे, ती एक मानसिकता आहे याचे भान फुल्यांना आहे. ही मानसिकता बदलायची असेल तर ज्या गृहितकांवर ही मानसिकता आधारित आहे ती गृहीतकेच अव्हेरली पाहिजेत. जोपर्यंत जातिव्यवस्था आहे तोपर्यंत श्रेष्ठ- कनिष्ठ भाव राहणारच याची फुल्यांना खात्री आहे." [१६]

अंतोनिओ ग्राम्शी (१८९१-१९३७) या प्रसिद्ध इटालियन साम्यवादी तत्त्वज्ञाने मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाची पुनर्मांडणी केली. त्याने सांगितलेल्या अधिपत्याच्या संकल्पनेप्रमाणे एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावरील वर्चस्व केवळ आर्थिक वा भौतिक शक्तीवर आधारलेले नसते. तर पराभूत वर्गास जेत्या वर्गाची सामाजिक, सांस्कृतिक मुल्ये जशीच्या तशी आत्मसात करण्यास भाग पडले जाणे हाही वर्चस्व कायम करण्याचा आधार असू शकतो.[१७] एका अर्थाने ही संकल्पना फुल्यांनी आधीच मांडली होती. फुल्यांना ब्राह्मणी सांस्कृतिक वर्चस्वाची कल्पना होती, जोपर्यंत या सांस्कृतिक वर्चस्वाला छेद जाणार नाही तोपर्यत परिवर्तन घडून येणार नाही हेही त्यांना चांगले ठाऊक होते, त्यामुळेच या सांस्कृतिक वर्चस्वाचे पितळ उघडे पाडण्याचे कार्य त्यांनी त्यांच्या प्रबोधनातून व लेखनातून केल्याचे दिसून येते. त्या काळात फुल्यांनी महाराष्ट्रात एकप्रकारे पर्यायी संस्कृतीची निर्मिती केली. अरविंद देशपांडेच्या मते, "भाषा, कला, धर्म, इतिहास यांच्या माध्यमातून फुले एक पर्यायी, परंतु अस्सल भारतीय संस्कृती नव्याने उभी करतात हेच त्यांच्या कार्याचे व विचारांचे यश आहे." [१८]

भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान असून यात स्त्रियांना सदैव दुय्यम स्थान मिळाले आहे, या बाबीला धार्मिक व सामाजिक मान्यता मिळाल्याने हजारो वर्षांपासून स्त्रियांना शिक्षण, राजकारण, सार्वजनिक जीवनातून वंचित ठेवण्यात आले, त्यामुळे त्यांची प्रगती होऊ शकली नाही. सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात फुल्यांनी स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा केलेली आहे. स्त्रियांच्या दुय्यमपणाची कारणे त्यांच्या नैसर्गिक शरीरधर्मात नसून पुरुषांच्या कावेबाजपणात आहेत हे स्पष्ट करताना फुले लिहितात, "स्त्रियांची जात फार अबला असल्यामुळे या लोभी व धाडसी पुरुषांनी मोठी कावेबाजी करून कोणत्याही कामामध्ये स्त्रीजातीची संमती घेतल्याशिवाय एकंदर सर्व पुरुषांनी आपलेच घोडे पुढे दामटले; त्यास मानवी हक्क समजू देऊ नये, या इराद्याने त्यांस विद्या शिकविण्याचा प्रतिबंध केला, त्यामुळे एकंदर सर्व स्त्रियांवर अशा तऱ्हेचा जुलमी प्रसंग गुदरला." [१९] स्त्रियांचे शोषण किंवा त्यांचा दुय्यम दर्जा ह्या बाबी काही आपसूक निर्माण झाल्या नाहीत तर त्याला ठोस कारण असल्याचे फुले सांगतात, ते लिहितात, "स्त्री जातीस नीच मानण्याचा त्यांचा प्रघात पडल्यामुळे व त्यांस अनेक धूर्त व कावेबाज ऋषींनी केलेल्या संहिता, स्मृत्या वगैरे बळकट आधार मिळाल्यामुळे त्यांनी आजपावेतो ही दृष्ट चाल चालू ठेविली आहे.[२०] स्त्रियांच्या परिस्थितीत जर बदल करायचा असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे, शिक्षणामुळे त्यांना सारासार विचार करता येईल असे फुल्यांना वाटत असे. सत्यशोधक समाज स्थापन झाल्यानंतर त्यात स्त्रियांचा सहभाग फार कमी दिसून येतो. त्याला तत्त्कालीन सामाजिक परिस्थिती जबाबदार होती किंवा नेमके काय कारण होते याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर विद्युत भागवत यांनी नोंदवलेले निरीक्षण विचार करायला भाग पाडते, त्यांच्या मते, "विश्वकुटुंबाची कल्पना मांडणाऱ्या सत्यशोधक समाजात स्त्रियांचा सहभाग फारसा नव्हता असे दिसते. ज्या अर्थी सावित्रीबाई फुले यांचेसुद्धा नाव सत्यशोधक समाजाच्या सभासदांमध्ये दिसत नाही त्याअर्थी या चळवळीच्या घडणीत स्त्रियांना फारसे स्थान नव्हते असे म्हणणे चूक ठरणार नाही."[२१] असे असले तरी फुल्यांच्या स्त्री सुधारणेसंदर्भातील कार्य आणि सत्यशोधक समाजाच्या भूमिका बघता फुल्यांप्रमाणे स्त्री हिताच्या भूमिका घेणारे ते एकमेव कर्ते पुरुष होते असेच म्हणावे लागते.

फुल्यांना इतिहासाचे महत्त्व चांगल्या पद्धतीने माहित होते, त्यामुळे त्यांनी त्यांच्या लेखनात ऐतिहासिक बाबी मांडल्या आहेत. ऐतिहासिक वास्तव भूतकालात नसून वर्तमानात असते याची स्पष्ट जाणीव १९ व्या शतकातील

मराठी विचारवंताना होती. महात्मा फुले त्याला अपवाद नाहीत हा त्याच जाणीवेचा पुढचा भाग.[२२] फुल्यांनी सामाजिक व सांस्कृतिक पुनर्रचनेसाठी इतिहासाचा आधार घेतला आहे, मिथकांच्या मदतीने त्यांनी इतिहासाची मांडणी केलेली आहे, ही मांडणी आधुनिक इतिहास संशोधन पद्धतीप्रमाणे नसली तरी त्यांच्या मांडणीतील तथ्ये दुर्लक्षित करता येणार नाही. फुल्यांनी त्यांच्या लेखनात आर्य-अनार्य संघर्ष चित्रित केला आहे. आर्य म्हणजे ब्राह्मण व अनार्य म्हणजे शूद्रातिशूद्र असे त्यांना अपेक्षित होते. बगाडे लिहितात, "जोतीरावांनी उपलब्ध साधनांच्या चिकित्सेतून इतिहासाची अर्थपूर्ण संगती लावली. तत्कालीन समस्यांची [स्त्री-शूद्रादिकांवर लादलेल्या गुलामीची] उकल करून त्यांची कारणमीमांसा सिद्ध केली. उच्च वर्णजातीयांच्या इतिहास संहितेचे संहारक विश्लेषण करून त्यातून शूद्रातिशूद्रांच्या संघर्षाचा तपशील प्राप्त केला व स्त्री स्त्री शुद्रादिकांच्या मुक्तीलढ्याला प्रेरणा देणाऱ्या इतिहासाची पुनर्मांडणी केली. इतिहासाची नवी संहिता प्रसवली." [२३] १८६९ ते १८७३ या काळात फुल्यांनी, छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा (१८६९), ब्राह्मणांचे कसब (१८६९) आणि गुलामगिरी (१८७३) ही तीन पुस्तके लिहिली. या पुस्तकातील मांडणी बघितली तर लक्षात येते की, यामधून त्यांनी आर्य विरुद्ध अनार्य यातील संघर्षाची विचारप्रणाली विकसित केली. शूद्रातिशूद्रांवर वर्चस्व निर्माण करून त्यांचे शोषण करणारे भट-ब्राह्मण हे मुळातच भारतीय नाहीत, हे त्यांच्या विचारातील प्रमुख सूत्र होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाड्याचे महत्त्व सांगतांना रोझालिंड ओ हॅन्लन लिहितात की, "The Ballad placed Shivaji within a startlingly new and overtly anti-Brahman interpretation of Maharashtra's history" [२४] फुल्यांनी शिवाजी महाराजांच्या गोब्राह्मण प्रतिपालक या अभिजनवादी सांस्कृतिक ओळखीला नकार देत महाराजांना 'कुळवाडी भूषण' संबोधून आणि बळीचे मिथक पुढे आणून अब्राह्मणी इतिहासाचा पाया घातला.

संघर्ष केल्याशिवाय कुठलीही गोष्ट मिळत नसते याची फुल्यांना कल्पना होती. शेकडो वर्षांच्या प्रथा, परंपरा, जातिव्यवस्था, स्त्रियांचे दुय्यमत्त्व व त्यांना असलेले धर्माचे पाठबळ या सर्वांशी दोन हात करायचे तर संघर्ष होणारच हे ते जाणून होते. या संघर्षासाठीच तर त्यांनी सत्यशोधक समाज निर्माण केला होता. या संघर्षात ब्राह्मणी अभिजन वर्गाशी मुकाबला करावा लागेल हेही त्यांना माहित होते, परंतु ज्या बहुजन समूहासाठी त्यांनी लढा उभारण्याचे ठरवले होते त्यांचाही रोष त्यांना पत्करावा लागला. बहुजन समाजावर ब्राह्मणी धर्मकल्पनांचा, संस्कृतीचा मोठा प्रभाव असल्याने त्या प्रभावातून मुक्त त्यांना मुक्त करणे हे सोपे काम नव्हते. फुल्यांना मतभेदांच्या प्रसंगांनाही सामोरे जावे लागले. यातीलच एक संघर्षाचा प्रसंग म्हणजे सत्यशोधक समाजातील त्यांचे तरुण सहकारी असलेले कृष्णराव भालेकर यांच्याशी झालेले मतभेद होत. सत्यशोधक समाजाच्या मालकीचा छापखाना भालेकरांना देण्यास फुल्यांचा विरोध होता हे सर्वविदित आहे. फुल्यांच्या जीवन आणि वैचारिक प्रवासाबाबत महत्त्वाच्या नोंदी करणाऱ्या रोझालिंड ओ'हॅन्लन यांच्या मते, या वादात मोठे तात्विक मतभेद किंवा तत्सम कोणतीही कारणे आढळत नाहीत.[२५] एकोणिसाव्या शतकाच्या शेवटापर्यंत बहुजन समाजातील माळी, कुणबी, मराठा यांच्यासह दलित समजही आर्य वंशाशी नाते जोडणाऱ्या क्षत्रिय तत्त्वज्ञानाकडे आकर्षित होत गेले. ओ'हॅन्लन यांच्या मते, या क्षत्रिय तत्त्वज्ञानाचा प्रभाव विशेषतः मराठा समाजावर अधिक होता. या समाजातील एक कार्यकर्ते माधवराव रोकडे यांनी सामान्य लोकांसाठी वैदिक विधी करण्याचा आग्रह धरला.[२६] हाच विषय पुढे कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज आणि ब्राह्मण यांच्यातील वादाचा मुद्दा बनला होता. या वादामुळेच शाहू

महाराज जातिविरोधी भूमिकेकडे आले आणि सत्यशोधक समाजाचे पाठीराखे बनले. गेल ऑम्वेट लिहितात की, "फुल्यांना ब्राह्मण विचारवंतांशी वादविवाद तर करावेच लागले; पण त्याचबरोबर ब्राह्मणेतर समाजातील विचारवंतांशीही वादविवाद करावे लागले होते. त्यांनी 'मराठा' या विशेष दर्जाचा उपहास केला होता. त्यांच्या म्हणण्यानुसार क्षत्रियत्त्व हे या देशातील सर्व मूळ निवासी लोकांना लागू होते. त्यात शेतकरी आणि युद्ध पेशा असणाऱ्या सर्व समाजाला ही संकल्पना लागू होते." [२७] सत्यशोधक समाजाचे फुल्यांचे महत्त्वाचे सहकारी डॉ. विश्राम रामजी घोले यांचेही फुल्यांशी मतभेद झाले होते, १८७५ मध्ये ते सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष झाले होते, परंतु मतभेद झाल्यानंतर त्यांनी १८७७ मध्ये अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.[२८] अश्याप्रकारे फुल्यांचा चौफेर संघर्ष चालू होता, त्याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिगत जीवनावरही झाला होता. परंतु त्यांनी तसूभरही मागे न हटता आपले कार्य सुरूच ठेवले.

निष्कर्ष :

फुले व सत्यशोधक समाजाने जे कार्य केले ते निश्चितच एक मैलाचा दगड ठरले, महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात एक प्रवाह यामुळे निर्माण झाला, एक पर्यायी संस्कृती, अब्राह्मणी इतिहास पद्धतीचे सुतोवाच झाले. साहित्य, लोककला यावरही त्याचा मोठा प्रभाव पडला, सत्यशोधकी जलसे प्रबोधनासाठी निर्माण करण्यात आले. असे असूनही फुल्यांनी ज्या पद्धतीचे विचार मांडले, ज्या पद्धतीचे लेखन केले ते पाहता असे वाटते की त्यांच्या अपेक्षेप्रमाणे सत्यशोधक समाज निर्माण होऊ शकला नाही, फुल्यांनी ज्या जहाल पद्धतीने ब्राह्मणी वर्चस्वावर टीका केली तीच धार सत्यशोधक समाजाच्या कार्यपद्धतीत उतरू शकली नाही. अभिजन संस्कृतीचे एकूणच महाराष्ट्रातील समाजावर असलेले वर्चस्व किती खोलवर रुजले होते याची कल्पना यावरून येते. फुल्यांना अपेक्षित सामाजिक परिवर्तन होऊ शकले नाही, परंतु फुले आणि सत्यशोधक समाजाचा मोठा परिणाम महाराष्ट्रीयन समाजमनावर झाला, त्यांच्या भूमिकांमुळे सामाजिक ढवळाढवळ झाली, महाराष्ट्राचा तोंडवळा आधुनिक पद्धतीचा तयार व्हायला मदत झाली.

आज महाराष्ट्रात जे सामाजिक पुढारलेपण दिसते त्याचे श्रेय इंग्रजी शिक्षणाला, इंग्रजी राज्यकर्त्यांच्या भूमिकांना तर आहेच पण त्याचबरोबर सामाजिक सुधारणा चळवळींना सुद्धा आहे त्यामध्ये फुले आणि त्यांच्या सत्यशोधक समाजाला तर विशेष आहे, कारण दलित-बहुजन, स्त्री, शेतकरी यांची बाजू घेत शिक्षणाचा आग्रह धरत, रूढी-परंपरांना आव्हान देत, ब्राह्मणी सांस्कृतिक वर्चस्वाला ललकारत त्यांनी कृतिशील कार्यक्रम राबवला. त्यांनी ब्राह्मण किंवा कोणत्याही जातीला विरोध केला नाही मात्र ब्राह्मणी वृत्तीचा खरपूस समाचार घेतला. फुले व सत्यशोधक समाजाच्या भूमिकांतून सुधारलेपण, आधुनिकीकरण घडून यायला मदत झाली. फुल्यानंतर शाहू महाराज आणि त्यानंतर बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्राच्या पुरोगामित्त्वाचे आणि आधुनिकतेचे वलय गतिमान होण्यास मदत मिळाली.

संदर्भ :

१. पाटील शरद, मार्क्सवाद फुले-आंबेडकरवाद, द्वितीय आवृत्ती, मावळाई प्रकाशन शिरूर, २०१८, पृ. १०२
२. बगाडे उमेश, महात्मा जोतीराव फुले, पहिली आवृत्ती, शब्द पब्लिकेशन मुंबई, २०२२, पृ. क्र. १७
३. कित्ता, पृ. १८
४. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, आठवे पुनर्मुद्रण, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, २०२२, पृ. क्र. १६४

५. उगले, जी. ए., सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास, प्रथम आवृत्ती, महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, २०२२, पृ. क्र. १५७
६. कीर, उपरोक्त, पृ. क्र. १५९
७. नरके हरी, महात्मा फुले समग्र वांङ्मय, प्रथमावृत्ती, महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती मुंबई, २०१३, पृ. क्र. २१३
८. उगले, उपरोक्त, पृ. क्र. १६०
९. नरके, म. फु. स. वा., पृ. क्र. १३८
१०. कित्ता, पृ. क्र. २०५
११. कीर उपरोक्त, पृ. क्र. १६१
१२. नरके, म. फु. स. वा., पृ. क्र. २११
१३. कित्ता, पृ. क्र. २२१
१४. उगले, उपरोक्त, पृ. क्र. १६८
१५. कीर, उपरोक्त, पृ. क्र. २१
१६. नरके हरी (संपा.), महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, पाचवी आवृत्ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र-साधने प्रकाशन समिती मुंबई, २००६, पृ. क्र. ९
१७. जेम्स जॉल, ग्राम्शी, तृतीय आवृत्ती, फौटना पेपरबॅक्स लंडन, १९३३, पृ. क्र. ६
१८. नरके (संपा.) उपरोक्त, पृ. क्र. १६
१९. नरके, म. फु. स. वा., पृ. क्र. ४६६-६७
२०. कित्ता, पृ. क्र. ४६८
२१. नरके (संपा.), उपरोक्त, पृ. क्र. १५८
२२. कित्ता, पृ. क्र. १३
२३. कित्ता, पृ. क्र. १०८
२४. ओ'हॅन्लन रोझालिंड, कास्ट, कॉन्फ्लिक्ट अँड आयडियोलॉजी, पर्मनंट ब्लक रानिखेत, २०१४, पृ. क्र. १३६
२५. कित्ता, पृ. क्र. २४४
२६. कित्ता, पृ. क्र. २९७
२७. गेल ऑम्वेट, बेगमपुराच्या शोधात, पहिली आवृत्ती, मधुश्री पब्लिकेशन पुणे, २०२२, पृ. क्र. १८८
२८. उगले, उपरोक्त, १७२

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

आधुनिक महाराष्ट्रातील उल्लेखनीय चळवळ – मुस्लिम सत्यशोधक मंडळ

डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे

इतिहास विभाग,

बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी ता. पलूस, जि. सांगली.

Corresponding Author - डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे

DOI - 10.5281/zenodo.19659256

गोषवारा:

आज ही इस्लामी मन कुराण व धर्माच्या जोखडाखाली आहे. इस्लामी मन स्वतंत्र बुद्धीने विचार करू शकत नाही या साठी धर्मग्रंथांच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची आवश्यकताआहे आणि अंधश्रद्धा रूढी याचा मुस्लिम मनावर जो पर्यंत पगडा आहे तो पर्यंत मुस्लिम मन ऐहिक गोष्टी ऐवजी पारलौकिक गोष्टींमध्येच सदैव रमत असते .आपली जीवन यशस्वी व सुंदर होण्यासाठी धर्माने सांगितलेल्या गोष्टींचा विचार करून जे वर्तमानाशी सुसंगत आहे केवळ त्याचाच स्वीकार करणे गरजेचे आहे. धर्मग्रंथ अपरिवर्तनीय आहेत आणि त्यात कसलाही बदल अपेक्षित नाही अथवा कोणीही त्यात बदल करू शकत नाही असा दुराग्रह बाळगणाऱ्या धर्माचे व समाजाचे भवितव्य हे कायम अंधारात बुडालेले असते .या साठी इह्वादाचा स्वीकार करून समाजाला प्रगतीचे इप्सित साध्य करता येईल हा हमीद दलवाईचा दृष्टीकोन होता.मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई हे मुस्लिम सुधारणा चळवळीची एक प्रेरणा होते. आपला मुलभूत विचारजनसामान्य मुस्लिम समाजात उतरवून जान आंदोलन उभारू पाहणारे व आपल्या कार्याच्या ओढीने झपाटलेले हमीद दलवाई एक लोकविलक्षण व्यक्तिमत्वाचा माणूस होता .आपल्या पुरोगामी विचाराने मुस्लिम समाजात सुधारणा घडवून आणण्याचा ध्यास घेतलेला हा माणूस आपल्या प्रतिमेची जरा ही तमा न बाळगणारा एक मुस्लिम सुधारक होता.

प्रस्तावना:

19 व्या शतकाचा पूर्वार्ध हा भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा व संक्रमणाचा कालखंड होता. या काळात देशामध्ये मोठ्या प्रमाणात वैचारिक क्रांती घडून आली. बुद्धिवाद, तर्कनिष्ठा, शास्त्रीय विचारप्रणाली, व्यक्तीवाद, राष्ट्रवाद, मानवतावाद इत्यादी आधुनिक संकल्पना भारतीय समाजात प्रसारित होऊ लागल्या. त्याचबरोबर मानवी जीवनाकडे पाहण्याचा एक नवा आधुनिक दृष्टीकोण विकसित होऊ लागला. या नव्या दृष्टीकोनातुन तत्कालीन भारतीय समाजाचे परीक्षण तसेच भारतीय व पाश्चात्य समाजाचे तौलनिक विश्लेषण काही भारतीय करू लागले. त्यांच्या तर्कनिष्ठ शास्त्रीय दृष्टीला समकालीन भारतीय समाजातील उठावांची, दोष स्थलांची जाणीव होऊ लागली. देशाच्या अवनतीचे मूळ सामाजिक अधोगतीत आहे अशी त्यांची धारणा बनू लागली. भारतीय समाजातील निर्माण झालेल्या अंधश्रध्दा, कर्मकांडाचे स्तोम, परंपरानिष्ठा, जातिप्रथेतील अनिष्ट चालीरीती व रूढी या सर्वांमुळे आलेली गतीहिनता ही सर्व समाजाच्या अधोगतीची कारणे असुन त्याचे निर्मुलन करून त्याजागी आधुनिक विचारांचे बीजारोपण केल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही अशी त्याची ठाम समजुत होती. त्यातुनच त्यांनी समाजातील अनिष्ट प्रवृत्तीवर , उणिवांवर प्रखर हल्ला

चढविला आणि भारतीय समाजात विचारमंथनाची प्रक्रिया सुरू झाली. कालबाह्य झालेल्या चालिरीती, रूढी नष्ट करण्यासाठी नवे आधुनिक विचार समाजात रूजविण्यासाठी लेख, भाषणे, पुस्तके, संस्था यांच्या माध्यमातुन त्यांनी नवविचारांचा प्रसार व प्रचार केला. हा वैचारिक क्रांतीचा, मुलभूत वैचारिक परिवर्तनाचा काळ म्हणजे भारतीय प्रबोधनाचा उषःकाल होय.[1]

भारतीय समाजावर धर्माचा फार मोठा प्रभाव होता. धर्माच्या नावाखाली अनेक अनिष्ट चालिरीती व अंधश्रध्दा रूढ झालेल्या होत्या. त्या दूर करणे. आवश्यक असल्याने भारतीय प्रबोधनकारांनी धर्मसुधारणेचे कार्य सुरू केले. डॉ. रा. गो. भांडारकर म्हणतात "जी गोष्ट व्यक्तीची, तीच देशाची, खरी उन्नती व्हावयाची असले तर प्रथम उन्नत धर्माचा प्रसार झाला पाहिजे. राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यास राष्ट्रीय सभा भरवा अथवा प्रांतिक सभा भरवा; किंवा सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास सामाजिक परिषद भरवा; पंरतु जोपर्यंत धर्मजागृती झाली नाही तो पर्यंत देशास ह्या खटपटीत खरे यश यावयाचे नाही. प्रथम आत्म्याची उन्नती झाली पाहिजे."[2] भांडारकराचे मत पाहता तत्कालीन राष्ट्रीय जीवनात धर्माचे व धर्मसुधारणेचे महत्त्व स्पष्ट होते.

भारतातील मुस्लीम समाज हा जितका सहिष्णु आहे त्यापेक्षा जास्त तो रूढीवादी-परंपरावादी असल्याचे दिसून येते. हिंदू धर्मामध्ये भक्ती चळवळ, सत्यशोधक समाज असा सुधारणावादी चळवळींमुळे सामाजिक बदलांचे वातावरण निर्माण झाले. या पध्दतीचे सुधारणावादी विचार मुस्लीम धर्मामध्ये सुफी संप्रदाया व्यतिरिक्त इतर कोणत्याही चळवळीतुन मांडले गेलेले दिसत नाहीत. तसेच सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने हिंदू समाजावर भक्ती चळवळीचा जितका प्रभाव दिसतो. तितका मुस्लीम समाजावर सुफी संप्रदायाचा प्रभाव दिसत नाही. मुस्लीम समाजातील प्रत्येक घटक आधुनिक विचारांनी प्रेरित होईल तेव्हाच संपूर्ण समाज आधुनिक होऊ शकेल. पण मुस्लीम धर्मातील मुल्ला मौलवीच्या धार्मिक आणि सामाजिक वर्चस्वामुळे या समाजामध्ये आधुनिक विचार पोहचल्याचे दिसून येत नाही. भारतीय मुस्लीम समाजाने भारतीय समाजव्यवस्थेची वैशिष्ट्ये आत्मसात केलेली असली तरी मूळ धार्मिक विचार आणि सनातनी प्रवृत्ती हे देखील भारतीय मुस्लीम समाजाचे एक वैशिष्ट्य दिसुन येते. एकूणच भारतीय समाजाप्रमाणेच मुस्लीम समाज देखील अनेक प्रश्नांनी गुंतलेला आहे . त्याचप्रमाणे धार्मिकतेचा पगडा आणि धर्मचिकित्सेला विरोध यामुळे मुस्लीम धर्मामध्ये सहजासहजी बदल करणे अत्यंत कठीण कार्य आहे.

मुस्लीम समाजातील सुधारणा चळवळीचा आरंभ बंगालमध्ये नबाब अब्दुल लतिफ यांनी केला. आधुनिक विज्ञान व शिक्षण यांच्या प्रसारासाठी त्यांनी मोहमेडन लिटररी सोसायटी ही संस्था स्थापन केली. या संस्थेने बंगालमध्ये अनेक शिक्षण संस्था सुरू केल्या. याच काळात सर सय्यद अहमद खान, शेख महमद आलम यांच्या सारखे समाजसुधारक मुस्लिम समाजात होऊन गेले. सर सय्यद यांच्यामुळेच अलिगढ चळवळीला इस्लामची शिकवण व आधुनिक काळाची गरज यांची संगती लावता आली. धार्मिक सिध्दांत अपरिवर्तनीय बसल्याचे नमुद करून सर सय्यद अहमद खान यांनी सामाजिक प्रगतीमधील धर्माच्या भूमिकेवर भर दिला. "धर्मात काळानुरूप बदल न झाल्यास आणि त्याने काळाच्या गरजा पूर्ण न केल्यास धर्म दगड बनतो. भारतात इस्लाम धर्माचे तेच झाले आहे." असे प्रतिपादन सर सय्यद अहमद खान या मुस्लिम विचारवंताने मांडले होते.[3] पाश्चात्य विज्ञान व शिक्षण यांचा मुस्लिम समाजाने अंगीकार करावा. स्त्रियांनी सुध्दा शिक्षण घ्यावे या मतांचे ते होते. मोहमेडन ॲग्लो-ओरिएंटल कॉलेज स्थापन केले. एखादा माणुस कोणत्या धर्माचा आहे यापेक्षा त्याचे

आचरण किती धार्मिक आहे. या निष्कर्षावरच त्याचे श्रेष्ठत्व निश्चित करता येईल असे बंकिमचंद्र चटर्जी यांचे म्हणणे होते. खरे तर त्याकाळात मानवाच्या सर्व सामाजिक कृतीवर धर्माचा पगडा होता धर्म ही त्या काळची प्रभावी विचारसरणी होती. ती स्विकारल्याशिवाय कोणतीच सामाजिक कृती करणे शक्य नव्हते.

महाराष्ट्रात सुध्दा सुधारणावादामुळे परंपरेची चिकित्सा सुरू झाली होती. ज्याप्रमाणे हिंदू धर्मामध्ये सुधारणा घडवुन आणण्यासाठी अनेक सुधारकांनी प्रयत्न केले त्याप्रमाणे मुस्लिम समाजामध्ये सुधारणा करणेसाठी22 मार्च 1970 रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना पुणे येथे हमीद दलवाई यांनी केली. आणि त्यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीसाठी महत्त्वाचे योगदान दिले.

भारताप्रमाणे महाराष्ट्र राज्यात सुध्दा सुधारणावादामुळे परंपरेची चिकित्सा सुरू झाली होती. ज्याप्रमाणे हिंदू धर्मामध्ये सुधारणा घडवून आणणेसाठी तसेच त्याच्या वाईट प्रथांना विरोध करणेसाठी आगरकर, रानडे, म. फुले, महर्षी कर्वे अशा अनेक सुधारकांनी प्रयत्न केले. त्याप्रमाणे भारतातील मुस्लिम समाजात प्रबोधन घडवून आणण्यासाठी हमीद दलवाई यांनी पुण्यात मुस्लिम तरूणांच्या बैठकीत 22 मार्च 1970 रोजी "मुस्लिम सत्यशोधक मंडळाची" स्थापना केली. इहवादी जीवनमूल्ये, राष्ट्रीय एकात्मता व वैज्ञानिक दृष्टीकोन यांचा पुरस्कार करून अलगतावादी प्रवृत्ती व अंधश्रध्दा दूर करणे, स्त्रियांना समान हक्क मिळवून देणे इत्यादी व्यापक उद्दिष्टे समोर ठेवून मुस्लिम समाजात प्रबोधन घडवून आणणेचे कार्य या मंडळाने हाती घेतले. खरे तर मुस्लिम सत्यशोधक मंडळाला महात्मा फुले, आगरकर, महर्षी कर्वे आदिच्या विचारकार्यातुन प्रेरणा मिळाली होती. यामंडळाचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने महाराष्ट्रापुरतेच मर्यादित होते. पुणे, मुंबई, फलटण, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर , श्रीगोंदे, अमरावती, अचलपुर, औरंगाबाद इ. ठिकाणी या मंडळाच्या शाखा आहेत. अशा या मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांचा जन्म कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळुण तालुक्यातील मिरजोली येथे 29 सप्टेंबर 1932 रोजी झाला होता."[4] त्यांच्या वडिलांनी एकूण 4 लग्ने केली होती. बहुपत्नीत्वाचे प्रश्न काय असतात आणि त्याचा कुटुंबावर काय परिणाम होतो यांची जाणीव त्यांना लहानपणीच झाली होती. वयाच्या 14 व्या वर्षी त्यांनी राष्ट्रसेवा दलात प्रवेश घेतला होता. तेव्हापासुन महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर आणि राजा राममोहन रॉय यांच्या विचारांचा प्रभाव त्याच्यावर पडला होता. हिंदू धर्मांतल्या बालविवाह, सती प्रथेला विरोध राजा राममोहन रॉय यांनी केला होता. तसेच गोपाळ गणेश आगरकर हे समाज सुधारकांचे अर्ध्वयु बनले होते. त्याचा अभ्यास केल्यावर हमीद दलवाई यांच्या लक्षात आले की समाज सुधारणा या फक्त एखाद्या धर्मापुरत्याच मर्यादित असता कामा नयेत. ज्याप्रमाणे हिंदू धर्मातील प्रथांविरोधात त्याच धर्मातील लोकांनी आवाज उठवला त्याप्रमाणे आपणही मुस्लिम धर्मातील कुप्रथांविरोधात आवाज उठवला पाहिजे असे त्यांना वाटु लागले.

मुस्लिम समाज सुधारणेच्या उद्देशाने त्यांनी स्थापन केलेल्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या साह्याने त्यांनी मुस्लिम समाजाच्या शिक्षणाचा प्रश्न व भाषा माध्यमाचा प्रश्न, मुसलमानांचे मराठी साहित्य, मुस्लिम समाजात आधुनिक विचार प्रसाराचे प्रयत्न अशा अनेक प्रश्नांवर मंडळाच्या आधारे काम करत असलेले दिसून येते. हमीद दलवाई यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यापुर्वी म्हणजे दि. 18 एप्रिल 1966 मध्ये सात मुस्लिम महिलांना घेऊन प्रथम मुंबईतील कौन्सिल हॉलवर मोर्चा काढला. खरे तर हा एक ऐतिहासिक मोर्चा ठरला होता. कारण मुस्लिम महिलांनी काढलेला हा पहिला मोर्चा

असावा. मुसलमानामधील तोंडी तलाक, बहुपत्नीत्वाची प्रथा, पडदा पध्दत, मुल दत्तक घेण्यास विरोध इत्यादीमुळे त्याच्यामधील स्त्रियांची होणारी घुसमट सरकारसमोर यावी. हा या मोर्चाचा हेतु होता. यावेळी त्यांनी समान नागरी कायद्याची मागणी करणारे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना दिले. महिलांनी संघटितपणे आपल्या हक्कांची लढाई पुढे होऊ जावी. यासाठी त्यांनी "सदा-ए-निसवाँ (महिलांची हाक) ही संघटना उभारणीचा प्रयत्न केला."[5] परंतु या संघटनेला जो पाहिजे तो प्रतिसाद मिळु शकला नाही. त्यानंतर त्यंनी मुस्लिम जमातवादाची चिकित्सा केला. जमातवादी मानसिकता आधुनिक राष्ट्रवादाच्या उभारणीतील पहिली अडचण आहे. असा त्यांचा ठाम विश्वास होता. या निमित्ताने त्यांनी भारतातील विचारवंत आणि मुस्लिम बुध्दीजीवींशी चर्चा केली. देशाच्या सीमांलगतच्या भागात दौरा केला. आणि त्यांनी त्यावेळी मराठा या दैनिकातून 'इस्लामचे भारतीय चित्र' हा लेख लिहून मुस्लिम समाजाची त्यावेळी स्थिती मांडलेली दिसते. मुस्लिम बुध्दीजीवी तथाकथित राष्ट्रवादी मुस्लिम आणि मुस्लिम नेतृत्वाशी केलेल्या चर्चेतुन त्यांना 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप-कारणे व उपाय याचा शोध लागला.'[6]

प्रा. अ. भि. शहा, हमीद दलवाई आणि इतर सेक्युलॅरिस्ट मंडळींनी 'इंडियन सेक्युलर सोसायटी' ची स्थापना केली. प्रा. अ. भि. शहा हे अध्यक्ष होते आणि हमीद दलवाई या सोसायटीचे उपाध्यक्ष होते. या सोसायटी मार्फत त्याकाळी 'दे सेक्युलॅरिस्ट' प्रकाशित केले जात होते.[7] या मधील लेखांतुन आणि व्याख्यानांतुन विज्ञाननिष्ठ सेक्युलॅरिझम यासारखे विचार मांडण्यात येत असत. समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिक मनोभूमिकेवर आधारलेला हा सेक्युलॅरिझम भारतीय समाजात रूजावा ही भूमिका त्यावेळी त्यांनी घेतलेली दिसते. ख-या अर्थाने हे सेक्युलॅरिझमसाठी फार मोठे योगदान होते असे दिसुन येते. परंतु हमीद दलवाईची सेक्युलॅरिझमची परिभाषा मुस्लिमांना तसेच हिंदूना योग्य वाटत नव्हती. तसे पाहिले तर इ. स. 1966 ते 1970 हा काल मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या दृष्टीने फार महत्वाचा काळ म्हटला जातो. मुस्लिम महिलांच्या प्रश्नावरील पहिला मोर्चा, अभ्यास दौरा, संवाद अभियान, वैचारिक लेखन, लेखमाला, इंडियन सेक्युलर सोसायटी या सर्व गोष्टी फक्त सर्व बुध्दीजीवी वर्गात मर्यादित स्वरूपातच राहात होत्या परंतु ज्या समाजातील प्रबोधनाची दरी भरून काढायची होती तो समाज उदासीन होता. म्हणून हमीद दलवाईंना मुस्लिम समाज संघटित करणे जास्त महत्त्वाचे वाटत होते. याकामी त्यांना भाई वैद्य, बाबा आढाव यांच्यासह साधना आणि समाजवादी विचारसरणींच्या विचारवंतांनी व कार्यकर्त्यांनी चांगल्या प्रकारे मदत केलेली दिसून येते. यावेळी भाई वैद्य यांच्या घरामध्ये अनेक बैठका झाल्या. यावेळी राष्ट्रसेवा दलाच्या संपर्कात असलेल्या अनेक उदारमतवादी मुस्लिम कार्यकर्त्यांनी ओळख भाई वैद्य यांनी हमीद दलवाई यांच्याशी करून दिली, त्यातूनच पुढे समविचारी कार्यकर्त्यांची बैठक 'साधना' कार्यालयात झाली होती आणि त्यातुनच 22 मार्च 1970 रोजी झालेल्या ऐतिहासिक बैठकीत डॉ. बाबा आढाव यांनी या संघटनेला 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' हे नाव सुचविले त्यास सर्वानुमते संमती मिळाली. यावेळी यदुनाथ थत्ते, म. प्र. प्रधान, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी इत्यादी समाजवादी, समतावादी मंडळीनी त्यांना बहुमोल मदत केली होती. यावेळी बाबुमियाँ बॅडवाले यांना मंडळाचे अध्यक्ष करणेत आले होते. यातुनच पुढे हमीद दलवाई यांची सय्यदभाई, हुसेन जमादार, वजीर पटेल, सय्यद मुनीर, अब्दुल कादर मुकादम, अन्वर शेख, महंमद नगारजी, बशीर शेख, अमीर शेख, मुमताज रहिमतपुरे, मुमताज मोमीन, लतीफ खाटिक, महमंद सोलापुरे, गणी फरास, मेहबुब बॅडवाले, दादाभाई पटेल, प्रा. फक्रुद्दीन बेन्नुर,

सय्यद मुजीर इत्यादी मंडळी सत्यशोधक मंडळाचे दूत म्हणुन काम पाहु लागली.[8]

'सत्यशोधक' या शब्दाला महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात एक विशिष्ट अर्थ आहे. त्यामागे सामाजिक सुधारणांच्या प्रखर आंदेलनाची पार्श्वभूमी आहे. यामंडळाचे मुस्लिम सत्यशोधक मंडळ हे नाव ठेवताना महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची जाणीव या मंडळाच्या सभासदांपुढे आहे. असा उल्लेख मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या जाहीरनाम्यात आहे.[9]

हमीद दलवाईं सारखा सत्यशोधक व त्यांनी स्थापन केलेले मुस्लिम सत्यशोधक मंडळ महाराष्ट्रातच निर्माण व्हावे याला महाराष्ट्रातील 125 वर्षांची म. फुले, लोकहितवादी देशमुख, प्रि. आगरकर, महर्षी शिंदे, राजर्षि शाहु, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, वीर सावरकर यांचे पासुन आजतागायत डॉ. बाबा आढाव पर्यंत अविरत चालत आलेली समाज सुधारकाची परंपरा कारणीभुत आहे.'मुस्लिम' शब्द घालावा की नाही याबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा झाली या शब्दांनी जातीयवाद तर सुचित होत नाही ना अशी शंका व्यक्त केली गेली. यावेळी हमीद दलवाईंनी शंका निरसन केले. परंपरागत धर्म मानत असो व नसो जन्माने आपण मुस्लिमच मानले जातो शिवाय आपणास मुस्लिम समाजात कार्य करायचे आहे. त्या समाजात सामाजिक सुधारणा झाल्या शिवाय राष्ट्रीय एकात्मता समर्थ बनणार नाही. म्हणुन मुस्लिम शब्द हवाच असे मत मांडले गेले. 'सत्यशोधक' हा शब्द डॉ. बाबा आढावांनी सुचविला आणि तो तात्काळ स्वीकारण्यात आला.[10]

हमीद दलवाईं म्हणत 'भारत देश समर्थ व्हावा, जगातील शक्तिमान राष्ट्रांच्या पंक्तीत बसावा असे आपल्याला वाटत असेल तर या देशातील समाज हा शास्त्रीय आणि विज्ञाननिष्ठ दृष्टीस्त्रोतावर आधारलेला, भौतिक श्रध्दा बाळगणारा आणि चैतन्यशील बनला पाहिजे, याबद्दल कोणाचे दुमत होईल असे वाटत नाही.'[11]

हमीद दलवाईं हे राष्ट्रीय भूमिका होणारे कृतीशील विचारवंत होते. राष्ट्रीय एकात्मता हे अंतिम उद्दिष्ट मानणारे मुस्लिम समाजातील सुधारणांना बळ देण्यासाठी निर्भिडपणे अनेक प्रबोधन, कृती कार्यक्रम राबविणारे सामाजिक क्रांतिकारक हमीद दलवाईं यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमातुन वैचारिक लढा उभारला. धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही ही दोन मुल्ये दलवाईंच्या विचारांच्या केंद्रस्थानी होती.

हमीद दलवाईंनी मुस्लिम समाजात केलेल्या कार्यामुळेच मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया या पुस्तकात रामचंद्र गुहा यांनी हमीद दलवाईं यांचा उल्लेख 'द लास्ट मॉडर्निस्ट' असा केला आहे.[12] यावरूनच आपणास असे दिसून येते. परंपरावादाला नकार आणि ऐहिकतेचा स्वीकार याचा पुरस्कार हमीद दलवाईंनी केला होता. त्याच्या याच कार्यामुळे जानेवारी 2017 साली अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊंडेशने त्यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कारांने गौरविलेले दिसते .

निष्कर्ष :

हमीद दलवाईंनी स्त्री-पुरूष समता, तोंडी तलाक, समान नागरी कायदा, पडदा पध्दतीला विरोध, उर्दु ऐवजी मराठी भाषेचा आग्रह,मुस्लिम समाजातील अंधश्रध्दांना विरोध, इहवादी दृष्टीकोन, धर्मनिरपेक्षता याबाबत आपले विचार मांडले. दलवाईं यांच्या विचारानुसार जी गोष्ट कुराणात असो व नसो समाजासाठी वाईट असेल तर तिला विरोध केलाच पाहिजे अशी भूमिका दलवाईंनी घेतली. जे काम म. फुलेंनी 19 व्या शतकात केले तेच काम हमीद दलवाईं यांनी महाराष्ट्रात 20 व्या शतकात केले. यातुनच समाजात समता निर्माण होईल व ख-या अर्थाने राष्ट्रीय

एकात्मता साध्य होईल हा दृष्टीकोन ठेवुन हमीद दलवाईंनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करून समतावादी विचारधारा महाराष्ट्रात प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. हमीद दलवाई प्रखर प्रत्यक्ष आणि मुलभुत विचारवंत आहेत आणि म. फुलेंचे कार्य ख-या अर्थाने हमीद दलवाईंनै पुढे नेले ते मुस्लिम सत्यशोधक मंडळ या नामकरणावरून स्पष्ट होते. हमीद दलवाईंच्या विचाराचा वारसा घेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळाची महाराष्ट्रात आज ही वाटचाल चालु आहे.

संदर्भ ग्रंथ सूची:

1. वैद्य सुमन, कोळेकर शांता – 'आधुनिक भारत' (1757 ते 1857) नागपुर 2004 पृष्ठ क्र. 246.
2. जावडेकर शं. द. – आधुनिक भारत कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे 2000 पृष्ठ क्र. 45.
3. साप्ताहिक साधना, 'मुस्लिम सत्यशोधक चळवळीची अर्धशतकी वाटचाल' (भाग-1) 19 सप्टेंबर 2020.
4. प्रा. तांबोळी शमशुद्दिन (संपा.), हमीद दलवाईं क्रांतिकारी विचारवंत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे 2009 पृष्ठ क्र. 8.
5. साप्ताहिक साधना, 'मुस्लिम सत्यशोधक चळवळीची अर्धशतकी वाटचाल', (भाग-1) 19 सप्टेंबर 2020.
6. अवचट अनिल, हमीद, नीलकंठ प्रकाशन, पुणे 1977, पृष्ठ क्र. 31.
7. उपरोक्त – प्रा. तांबोळी शमशुद्दिन (संपा.), हमीद दलवाईं क्रांतीकारी विचारवंत पृष्ठ क्र. 14.
8. कित्ता पृष्ठ क्र. 67.
9. मुस्लिम सत्यशोधक मंडळः मुस्लिम सत्यशोधक मंडळ जाहीरनामा.
10. डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. भालबा विभुते (संपा.) महाराष्ट्राचा इतिहास मांडणी व पुनर्मांडणी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 2011 पृष्ठ क्र. 239.
11. दलवाईं हमीद, 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' सुगावा प्रकाशन, पुणे, 15 ऑगस्ट 2012 पृष्ठ क्र. 139.
12. RamchandraGuha – Makers of Modern India, Penguin U. K. 2010 Page No. 409.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

"आधुनिक महाराष्ट्रातील सत्यशोधक समाजाचे कार्य व मूल्य विचार"- एक ऐतिहासिक अवलोकन

प्रा. डॉ. रसाळ दशरथ किसन

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर

Corresponding Author - प्रा. डॉ. रसाळ दशरथ किसन

DOI - 10.5281/zenodo.19659276

घोषवारा:

१९ व्या शतकातील सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचा एकूण परिणाम महाराष्ट्रावर झाला. हे काम महात्मा फुलेच्या नंतर राजर्षी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे चालू ठेवल्याचे दिसून येते. व पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सर्व मूल्याचा वापर करून सर्वांसाठी प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न आपल्या संविधानाद्वारे केल्याचे दिसून येते. राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा फुले यांचा विचार पुढे चालू ठेवला. तसेच आपल्या संस्थांनात सत्यशोधक समाजाद्वारे बहुजन अस्पृश्य बांधवांना सर्वच क्षेत्रात बदल घडवून आणल्याचे दिसून येते. म्हणूनच महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्यशोधक समाजाचे मुख्य विचार आपल्या प्रत्यक्ष कृतीत आणले. व या समा परिवर्तनाच्या लढाईत या महाराष्ट्रात सत्यशोधन करण्याचा प्रयत्न केला. व ब्राह्मणेत्तर चळवळीळा पुढे आणून पुरीहिताचे वर्चस्व कमी केल्याचे दिसून येते.म्हणूनच फुले.शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र अशी एक विचारसरणी निर्माण झाली. याकरीताच येणा-या भावी पिढीणे या महामानवाचा विचार पुढे नेऊन आपल्या महाराष्ट्रासह देशाची वैचारिक प्रगती करून आपला देश पुढे नेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावा. हाच या शोधनिबंधा मागचा उद्देश आहे.

प्रस्तावना:

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास केल्यास आपणास अनेक सामाजिक सुधारणा व सामाजिक संघटना झालेल्या दिसून येतात. 19 व्या शतकात भारतातील इतर अनेक राज्यात सामाजिक सुधारणा व चळवळी होऊन गेलेल्या दिसून येतात. जसे की, ब्राह्मो समाज, आर्यसमाज थिऔसोफिकल सोसायटी, रामकृष्ण मिशन, आर्यसमाज अगदी त्याचप्रमाणे महाराष्ट्रात १८७३ मध्ये पुणे येथे महात्मा फुले यांनी आपल्या सत्यशोधक समाजाची स्थापना केली. व अखिल भारताच्या इतिहासात एक मोलाची भर टाकली. या सत्यशोधक समाजातून त्यांनी सत्य असत्याची त्याची शहानिशा केली. भारतीय समाजव्यवस्थेत पुरोहित वर्गाने अज्ञानी असलेल्या बहुजन समाजावर कसा अन्याय केला व त्यांना अंधारात ठेवून त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतला. त्यामुळे महात्मा फुले यांनी १९ व्या शतकात सत्यशोधक समाजाची काही मूलभूत तत्वे सांगितली आहेत. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी सत्य शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांना सावित्रीबाई फुले यांनी साथ दिली. व बहुजनाच्या हितासाठीव पुरोहितांचे वर्चस्व कमी करून शेवटपर्यंत सामान्याना समाजजीवनात स्थान दिल्याचे दिसून येते.

सत्यशोधक समाज स्थापन करण्याचा उद्देश:

१९ व्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेल्या समाज सुधारकांमध्ये महात्मा जोतिराव फुले यांचे कार्य उल्लेखनीय ठरते. त्यांनी दलित समाज आणि स्त्रियांच्या उद्धाराचेच कार्य केले असे नाही, तर त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन करून त्या समाजातील अज्ञान नाहीसे करून समाज परिवर्तनासाठी आयुष्यभर प्रतीगाम विचाराच्या लोकांशी लढा दिला.त्यांनी समतेसाठी चळवळ सुरू केली. या चळवळीत ते यशस्वी झाले. म्हणूनच 'आमच्या समाज क्रांतीचे जनक' या नावाने त्यांचा उल्लेख धनंजय कीर करतात. आज मूलभूत हक्क व अधिकारांसाठी ज्या चळवळी चालू आहेत. त्या चळवळीची पायाभरणी महात्मा फुले यांनी केली आहे.यामुळे महात्मा फुलेनी सुद्धा समता स्वातंत्र्य व बंधुता या कार्यासाठी संघटनात्मक प्रयत्न केल्याचे दिसून येते.१ यासाठीच २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना पुणे शहरात केली. त्यांचा सत्यशोधक समाज हा मानवता बुद्धीप्रामाण्य, प्रांतभेद लिंगभेद, व खोटे अन्यायी व मानवी विकासातील अडथळे आहेत. या भूतलावरील समस्त स्त्री-पुरुष एकच असून त्यांनी परस्पर बंधूभावाने एकजुटीने समाजपरीवर्तन करावे असे त्यांचे मानवतवादी मत होते. सर्व मानव एकाच निर्मिकाची मुले असून त्या सर्वांना ईश्वरनिर्मित नैसर्गिक साधनसंपत्ती उपभोगण्याचा समान अधिकार आहे. प्रत्येक उपेक्षितांना त्यांच्या विकासाची संधी मिळाली पाहिजे समाजातील ज्ञान उपासनेचा राजसत्तेचा,ज्ञानसत्तेचा व अर्थसत्तेचा सर्वांना न्याय वाटा मिळाला पाहिजे. सत्यशोधकाची परंपरा ऐतिहासिक दृष्ट्या देशात फार प्राचीन आहे. ही चळवळ एकाच विशिष्ट समाजाचे व धर्माचे नेतृत्व करणारी चळवळ नव्हती. ती सर्वसामान्य अस्पृश्य समाजाची एक कार्यप्रवण चळवळ होती. म्हणून या चळवळीत प्रामुख्याने भट, ब्राह्मण, जोशी यांच्या मध्ये दास्यातून क्षुद्रातीक्षुद्राची मुक्तता करणे. मतलबी धर्मग्रंथाच्या आधारे क्षुद्राची झालेली समाजिक विषमता नष्ट करणे. देव व भट यांच्यामध्ये दलालाची भूमिका उठवणारी भटशाही नष्ट करणे त्यासाठी बहुजनाला व्यासपीठ तयार करून देण्याचे काम सत्यशोधक समाजाने केले आहे.२ त्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना झालेली आहे.

सत्यशोधक समाजाची तत्वे व मूल्यविचार:

१) ईश्वर हा निर्गुण निराकार आहे.व तो एकच आहे.
२) ईश्वर एकाच असून तो सत्य स्वरूप आहे.सर्व मनुष्यप्राणी त्याचीच लेकरे आहेत.
३) मनुष्य हा जातीने श्रेष्ठ नाही तर गुणाने श्रेष्ठ आहे.
४) कोणताही ग्रंथ सर्वांशी प्रमाण व ईश्वर प्रणीत नाही.
५) ईश्वर हा कोणत्याही रूपाने अवतार घेत नाही.
६) देवाची प्रार्थना करण्यास मध्यस्थांची गरज नाही.असा महान विचा या सत्यशोधक समाजाने मांडला आहे.

सत्य शोधक समाजाचे कार्य:

१) समाजातील जातीभेदाच्या भावना कमी करण्याचा प्रयत्न केला.
२) पुरोहिताशिवाय व मराठीतून मंगलाष्टके म्हणून विवाहास प्रारंभ केला.
३) अनेक ठिकाणी क्षुद्रासाठी शाळा स्थापन केल्या. व देशाच्या स्वातंत्र्यासाठी तुरुंगवास भोगलेल्या टिळक आगरकरांचा सत्कार केला.
४) १८८८ मध्ये सामान्य जनतेला एकत्र करून आपल्या झेंड्याखाली पुण्यात मिरवणूक काढून सर्वसामान्य जनतेला एकत्रित केले.
५) सत्यशोधक समाजाने सामाज परिवर्तनासाठी चळवळ सुरू केली.

या समाजाने अशा रीतीने महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक चळवळीने बहुजन समाजात जागृती करून चैतन्य निर्माण केले. त्यामुळे बहुजन समाज संघटित

होण्यास मदत झाली व ३००० कार्यकर्ते सभासद झाले. अशारीतीने सत्यशोधक समाजाने भरीव स्वरूपाचे कार्य केल्याचे दिसून येते. म्हणूनच हेच कार्य क्रांतिकारक ठरले.३ व याच समाजाने सामाजिक न्यायाची मागणी केली बहुजन समाजाला जागृत करून त्यांच्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला हेच सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.

महात्मा फुले यांचा सामाजिक क्रांतीवाद:

महाराष्ट्राच्या इतिहासात जे समाजसुधारक झाले. समाजचिंतक होऊन गेले. त्यात महात्मा फुले यांचे स्थान आढळ स्वरूपाचे आहे. केवळ प्रबोधन म्हणजे परिवर्तन नव्हे महात्मा फुले यांचा अपवाद वगळता महाराष्ट्रातील इतर समाजचिंतकाचा सुधारणावाद हा केवळ प्रबोधनाच्या पायावर उभारलेला होता. महात्मा फुलेची विचारसरणी प्रखर बुद्धीवादातून व मूलगामी मानवत वादातून निर्माण झालेली होती. इतर विचारवंतांना या उदारमतवादी तत्त्वज्ञानाच्या मर्यादा जाणवल्या नाहीत कारण त्यांनी तळागाळातील समाजात राहणाऱ्या लोकांच्या जीवनातील प्रश्नाचा सखोल विचार केला नाही त्यांच्या जीवित कार्याचा प्रवास प्रबोधनापासून सुधारणावादा पर्यंत होत होऊ शकला नाही. त्याला फारसे पलीकडे जाता आले नाही. मात्र या उलट महात्मा फुले यांचा प्रवास सुधारणावादापासून बंडखोरी पर्यंत व बंडखोरीपासून क्रांतीपर्यंत होऊ शकला. म्हणूनच त्यांचे कार्य हे आपल्यासमोर एका बंडखोराची व क्रांतीकारकांची अभिजात प्रतिमा उभी करते.४ अशा प्रकारचे कार्य करण्यासाठी आवश्यक वैचारिक सामर्थ्य व नित्यधैर्य ते प्रत्यक्ष कृती करण्यासाठी लागणारी पराकाष्टा व संघटनकौशल्य उद्याच्या समाजाने समाजाचे सुंदर रूप पाहण्यासाठी सृजनशील दृष्टी त्यांच्यात निश्चित असल्याचे दिसून येते. म्हणूनच महात्मा फुले यांचा गुलामगिरी (१८७३) हा ग्रंथ येथील सामाजिक,धार्मिक विषमतेची व शोषणाची कठोर कारण मिमांसा करतो.५ परिणाम भारतीय समाज दोन भागांमध्ये विभागला गेला. एक उच्च वर्णीयाचा व दुसरा पददलिताचा होय. एक जग प्रस्थापिताचे तर दुसरे विस्थापिताचे, एका गटात शोषक तर दुसऱ्या गटात शोषित आहे. शोषिताला महात्मा फुलेंनी 'शूद्र' या नावाने संबोधले आहे. उच्चवर्णीयांनी क्षुद्रावर धार्मिक व सामाजिक गुलामगिरी लादली. म्हणूनच महात्मा फुले यांचा सामाजिक क्रांतीवाद अत्यंत महत्त्वाचा समजला जातो.

सत्यशोधक समाजाच्या कार्याचा आढावा:

सत्यशोधक समाजाचे चिटणीस नारायण नगरकर म्हणतात की, वरील हकीगतीवरून समाजाने आपले शक्यतेनुसार आजपर्यंत जी कामे केली ती सर्व लोकांच्या लक्षात आलीच असतील हा समाज कायम राहून त्यांचे काम योग्यरीतीने चालवतात याचा आपल्या सर्व लोकांना किती उपयोग आहे हे सांगण्याची गरज नाही. परंतु तसे होण्यास विद्वान,शहाणे, झटून काम करणा-या गृहस्थाची मोठी जरुरी आहे. आणि जोपर्यंत अशा लोकांची संख्या समाजात अधिक वाढत नाही किंवा जे सभासद आहेत ते नियमाने समाजात येत नाहीत. तोपर्यंत त्या समाजाचा जसा ऊर्जीतकाळ व्हावा तसा होणार नाही हे प्रत्येक सभासदांनी समजावे. समाजाने जी मोठी महत्त्वाची कामे हाती धरली आहेत ती तितकी लवकर व्हावी असे आपण इच्छितो तशी होत नाहीत आता आपल्यापैकी विद्वान आणि शहाणे लोकांना अशी विनंती आहे की, आपल्यात अशी म्हण आहे की' गेलेली वेळ पुन्हा येत नाही' तर ह्या म्हणी प्रमाणे आपण जर आपल्या लोकात सुधारणा करण्याची जी सवड दयाळू इंग्रज सरकारच्या राज्यात आपणास मिळाली आहे. ती घालविली असता आपण आपले पुढे होणारे संपत्तीचे फार अनहित करू तशी उत्तम वेळ न दवडता सर्व लोकांच्या समाजाची जितकी मदत घेता येईल तितकी घेतली असता आपल्या लोकांचे नुकसान होणार नाही कल्याणच होणार

आहे.६ अशी अपेक्षा नारायण तुकाराम नगरकर यांनी व्यक्त केली आहे.

महात्मा फुले यांचा मानवी स्वातंत्र्याचा विचार:

महात्मा फुले यांचा विचार हा मानवी स्वातंत्र्याकडे व समतेकडे नेणारा विचार होता हे रहस्य त्यांनी निर्माण केलेल्या सत्यशोधक ब्राह्मणेत्तर चळवळीतील नेत्यांना फारच उशिरा समजला. गुलामगिरी या त्यांच्या पुस्तकाची अर्पण पत्रिका त्यांचा उद्देश सुचित करते. गुलामगिरी या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीची अर्पण पत्रिका पाहता निग्रो गुलामाना मुक्त करण्याकरीता आत्मार्पण पूर्वक आंदोलन चालविणाऱ्याचा लोकांना गुलामगिरी हे पुस्तक त्यांनी अर्पण केले आहे. म्हणूनच भारतातील परंपरागत समाजसंस्थांच्या विरुद्ध बंड करणारे पहिले महापुरुष म्हणजे ज्योतिबा फुले होत. अशा बंडाची प्रेरणा त्यांना कुठून मिळाली हे एक रहस्य आ. म्हणूनच गुलामगिरी या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीची अर्पणपत्रिका पाहता निग्रो गुलामांना मुक्त करीन करण्याकरिता आत्मा अर्पण पूर्वक आंदोलन चालविणाऱ्या लोकांना गुलामगिरी हे पुस्तक त्यांनी अर्पण केले आहे मनोज भारतातील परंपरागत समाज संस्थांच्या विरुद्ध बंड करणारे पहिले पुरुष म्हणजे ज्योतिबा फुले होते अशा बंडाची प्रेरणा त्यांना कुठून मिळाली हा एक रहस्य आहे भारतातील परंपरांवादी समाजसंस्थांनी व या समाज संस्थांच्या नियम धर्माची पकड हजारो वर्षे येथील जनमानसात रुजलेली होती. या ठिकाणी जन्मसिद्ध उच्चनीच भेदभाव हे ईश्वरी संकेताने व पूर्वकर्माने निर्माण झालेले आहेत म्हणून त्यांच्याविरुद्ध प्रयत्न करणे हे महापाप आहे. अशी समजत होती. या महापापाची म्हणजेच अपवित्रतेची भीती येथील जनमानसात कायम घर करून बसली होती. ही शेकडो वर्षांनी रुजलेली भीती घालवणारी जबरदस्त प्रेरणा ज्योतिबांना मिळाली.७ म्हणून त्यांनी या बदलासाठी व समाज परिवर्तनासाठी त्यांनी मानवी स्वातंत्र्याचा विचार आपल्या साहित्यातून मांडला आहे.

सत्यशोधक समाजाचे ठराव:

सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष व कोषाध्यक्ष म्हणून ज्योतीराव ची निवड झाली नारायणराव कडलक यांची कार्यवाहक म्हणून निवड झाली त्यांच्या मानवी हक्काची व अधिकाराची शिकवणूक देणे आणि ब्राह्मणी शास्त्राच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता करणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय धोरण होते शोधक समाजाचे सभासद होताना प्रत्येकाच्या प्रत्येकाला शपथ घ्यावी लागत असे संस्थापक महात्मा फुले यांच्यानंतर १९११ मध्ये सत्य समजाचे समाजाचे ठराव प्रसिद्ध झाले त्यात सत्यशोधक समाजातील तीन तत्त्वे होत होती ती पुढील प्रमाणे दिसत येतात नंबर एक सर्व माणसे एकाच वेळी एकाच देवाची शहरातील एक राहील व देव त्यांचा आई बाप आहे नंबर दोन अहिल्या भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास याप्रमाणे मध्यस्थी जरुरी नसते त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यास पुरोहित किंवा गुरुची आवश्यकता नाही वरील तत्व कबूल कसे कबूल असण्यात कोणासही राजाश्रय घेता येते सत्यशोधक समाजाचे सभासदत्व सर्व जातीतील लोकांना मोकळे ठेवले होते ब्राह्मण महार मांग जीव आणि मुस्लिम हे या चळवळीच्या प्रारंभी सत्यशोधक समाजाचे सभासद होते असे दिसून येते जसे की ज्योतिरावच्या सत्यशोध समाजाच्या जातीय व्यवस्थेवर विश्वास नव्हता तसेच तो चातुरवर नेहमी नव्हता अशा रीतीने सत्यशोधक समाजाची ठराव वरील प्रमाणे दिसून येतात.

सत्यशोधक चळवळ व महात्मा फुले:

हिंदू समाजातील जातीव्यवस्था व पुरोहितांच्या अहंकारी वर्चस्वाविरुद्ध दिलेलेली झुंज नव्हती तर अवघा बहुजन समाज शिक्षण,धर्म,अर्थ,नीती,साहित्य ,शेती,उद्योग ,राजकारण ,विज्ञान,इ.सर्व बाजींनी सामर्थ्यशाली व्हावा

यासाठी दिलेला तो व्यापक असा बहुनाच्या मुक्तीचा लढा होता.८.महात्मा फुलेंच्या निधनानंतर काही काळ थंडावलेली सत्यशोधक चळवळ पुढे राजर्षी शाहू महाराजांनी समर्र्थपणे व शक्तिशाली पद्धतीने पुढे नेली ही गोष्ट खरी आहे..महात्मा फुले यांचे सत्यशोधक सुधारणावादी कार्य पाहत असताना समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत गती देणारा समाज पुरुष व संवाद करता असतो महात्मा फुले हे सुद्धा समाज सुधारणा विचारांना गती देणारे लोकसभाजक होते महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षण विधवा विवाह जातीयतेचे निर्मूलन उच्चनीचता यासारख्या सामाजिक सुधारण्यासाठी आपले जीवन विधीत केले व स्वतः शाळा चालून महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने स्त्रीशिक्षणाची मुहूर्त मिळेल जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी रवली त्यांच्या सुधारक सुधारणांना समाजातील खूप विरोधात झाला पण ते आपल्या समाजनिष्ठेपासून ढळे नाहीत म्हणूनच ते सामाजिक क्रांतीचे अग्रदूत ठरलेली आहेत.

सत्यशोधक समाजाचे ठराव:

सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष म्हणून जोतीरावांची निवड झाली.नारायणराव कडलक यांची कार्यवाह म्हणून निवड झाली.क्षुद्र आणि अतिक्षुद्र यांची ब्राह्मण पुरोहिताकडून होणारी पिळवणूक बंद करणे .त्यांनी त्यांच्या मानवी हक्काची अधिकाराची शिकवणूक देणे आणि पुरोहित सहीच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता करणे. ९ हे या सत्य शोधकाचे ध्येय धोरण होते.अशा प्रकारे सत्यशोधक समाजाचे ठराव असून टे सर्वाना लागू होते.त्याकाळी सामाजिक सुधारणावादी कार्य करीत असताना त्यांना फार मोठा विरोधही झाला पण टे आपल्या धेय्यापासून ढळले नाहीत. म्हणूनच ते सामाजिक क्रांतीचे अग्रदूत ठरले.त्यांनी अस्पृश्यता निवारण ,पुनर्विवाह ,स्त्रीशिक्षण,व भृणहत्या,प्रतीबंधकग्रहव शेतक-र्यांचे कार्य व हित या प्रमुख कार्यावर मोठ्या प्रमाणात भर दिला.टायनी आपल्या अनेक साहित्यातून लोक जागृतीचे कार्य केले.हे त्यांचे कार्य आजही अजरामर आहे.१०

गृहीतके:

१) **१)**महात्मा फुले यांच्या साहित्यातून बहुजन समाजाच्या उद्धाराचा विचार आत्मसात करणे.

२) महात्मा फुले यांनी अस्पृश्य उद्धाराचे व समाज परिवर्तनाचे काम केले आहे.

३) फुले दाम्पत्याने शैक्षणिक चळवळीतून समाज हिताचे कार्य केले.

४) महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या कार्यातून वाटचाल करणे.

५) महात्मा फुले यांच्या समाज क्रांतीच्या कार्याचा आढावा घेणे.

६) सत्यशोधक समाज स्थापनेचा सामाजिक परिवर्तनासाठी उपयोग झाला. सत्यशोधक चळवळीतून पुरोहितांच्या वर्चस्वाला सुरुंग लावला.

संशोधनाची पद्धत:

वरील संशोधनासाठी ऐतिहासिक व सामाजिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनाचा वापर करण्यात आलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

१) महात्मा फुले यांच्या साहित्यातून प्रबोधनात्मक वाटचाल घेऊन महाराष्ट्रात जनजागृती झाली.

२) सत्यशोधक समाज समाजाच्या माध्यमातून लोक जागृती व समाज परिवर्तन करण्याचे काम केले.

३) सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर शाहू महाराजांनी बहुजन समाजाला नवीन मार्ग दाखविण्याचा दाखविण्याचे कार्य केले.

४) सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून पुरोहिताचे वर्चस्व नष्ट करण्याचे कार्य केले.

५) आंतरजातीय विवाह लावणे व आर्थिक काटकसर करणे. हे सत्यशोधक समाजाचे वैशिष्ट्य होते.

६) महात्मा फुले गणपत त्यामुळे महाराष्ट्रातील बहुजन समाजात सामाजिक क्रांतीला सुरुवात झाली. सत्यशोधक समाजाची स्थापना करून पुरोहिताशिवाय विवाह लावण्याचे व खर्चात कपात करण्याचे कार्य सुरू केले.

७) आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यात आले. सत्यशोधक समाज स्थापन करून आपल्या साहित्याद्वारे त्यांनी बहुजन समाजाचा उद्धार केला.

निष्कर्ष:

वरील संशोधनाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे अनेक समाजसुधारक राष्ट्रपुरुष होऊन गेले त्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य हे समाज सुधारणेच्या व प्रबोधनाचे कार्य महत्त्वाचे होते त्यांनी २४ सप्टेंबर१८७३ मध्ये पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना करून पुरोहिताचे धार्मिक अवलंब होते व त्यांच्या त्यांचा जो प्रभाव होता त्यांचा हा प्रभाव कमी करण्याचे कार्य केले मनोज १९ व्या शतकाचे समाज पुरुष होऊन गेले त्यामध्ये महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी जे सामाजिक शैक्षणिक वास्पर्ष निवडण्याचे जे कार्य केले त्यांच्या कार्याला इतिहासात तोड नाही त्यांनी आपल्या बहुजन समाजाच्या शिक्षण देऊन त्यांच्या आत्मनिर्भरता स्वाभिमान निर्माण केला व धर्माच्या प्रभाव जो होता धार्मिक अवडंबराला न जुमानता आपले जीवन शिक्षणाद्वारे बदलून टाकले म्हणून भारतातील सामाजिक प्रयोजनाच्या चळवळीतून सर्व समाज बांधवांना प्रगतीच्या शिखरावर लिहून ठेवले म्हणूनच म्हणतात की आमच्या ''समाजक्रांतीचे जनक'' महात्मा फुले होत असे धनंजय कीर आपल्या पुस्तकात म्हणतात.यातूनच आपणास सत्यशोधक समाजाचे विचार व मूल्य विचार दिसून येतात.

संदर्भ:

१) कठारेअनिल-महाराष्ट्रातील समाजसुधारक, विद्या बुक्स पब्लिशर्स छत्रपती संभाजी नगर प्रथम आवृत्ती जानेवारी २०१४ पृ. क्र.५०

२) उपरोक्त पृ. क्र. ५१

३) उपरोक्त पृ.क्र.५२

४) समता स्मरणिका (चौथे समतावादी साहित्य संमेलन) प्रकाशक प्रा .डॉ.माधव गादेकर प्रकाशन,लातूर २७ नोव्हेंबर २०११

५) उपरोक्त पृ. क्र. १९

६) कीर धनंजय व इतर महात्मा फुले समग्र वांग्मय म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई सुधारित सहावी आवृत्ती २००६ पृ.क्र. २२६

७) उपरोक्त पु.क्र.१४

८) जाधव रमेश, कर्मवीर भाऊराव पाटील साकेत प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर पु. क्र. १०५ / १०६

९) कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दुसरे पुनर्मुद्रण २०१५ पृ. क्र.१५८/१५९

१०) जोगदंड बबन 'कृषी संवादक' महात्मा फुले महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई. प्रथमावृत्ती आवृत्ती २०१३ पृ. क्र.२४

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सत्यशोधक समाज ते प्रतिसरकार : दक्षिण महाराष्ट्रातील परिवर्तनवादी परंपरेचा ऐतिहासिक अभ्यास

डॉ. रणजीत सर्जेराव कुंभार

सहा. प्राध्यापक,

पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग, पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव

Corresponding Author - डॉ. रणजीत सर्जेराव कुंभार

DOI - 10.5281/zenodo.19659317

सारांश :

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंतचा काळ हा महाराष्ट्राच्या इतिहासात सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाचे एक झंझावाती पर्व मानला जातो. या सशक्त आणि परिवर्तनवादी परंपरेची मुहूर्तमेढ क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या 'सत्यशोधक समाजा'ने रोवली. या चळवळीने प्रस्थापित जातिव्यवस्था, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांसारख्या अमानवीय प्रवृत्तींविरुद्ध एक प्रखर वैचारिक लढा उभारला. यातूनच दक्षिण महाराष्ट्राच्या मातीत समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाची बीजे खोलवर रुजली आणि शोषित-बहुजन समाजात स्वतःच्या अधिकारांविषयी एक प्रबळ जाणीव निर्माण झाली.

सत्यशोधक समाजाने पेरलेला हाच पुरोगामी विचार पुढे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या काळात अधिक संघटित आणि प्रखर स्वरूपात उफाळून आला. १९४२ च्या 'चले जाव' (भारत छोडो) आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दक्षिण महाराष्ट्राने एक अभूतपूर्व क्रांती अनुभवली, ती म्हणजे 'प्रतिसरकार' चळवळ. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या खंबीर नेतृत्वाखाली उभारलेल्या या चळवळीने ब्रिटिश सत्तेला थेट आव्हान देत, लोकसहभागावर आधारित एक पर्यायी आणि समांतर प्रशासन उभे करून दाखवले. या धाडसी प्रयोगाने ग्रामीण महाराष्ट्रातील तळागाळातील समाजात खऱ्या 'स्वराज्याची' आणि स्वातंत्र्याची ठोस जाणीव निर्माण केली.

पारिभाषिक शब्द : सत्यशोधक समाज, प्रतिसरकार, दक्षिण महाराष्ट्र, सामाजिक परिवर्तन, स्वातंत्र्य चळवळ, लोकआंदोलन, बहुजन चळवळ.

प्रस्तावना :

महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाचे पान उलटले, की सामाजिक, वैचारिक आणि राजकीय परिवर्तनाची एक अत्यंत प्रगल्भ आणि सशक्त परंपरा आपल्यासमोर उलगडते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झालेली सामाजिक सुधारणांची ही संथ आणि सखोल चळवळ, विसाव्या शतकात एका व्यापक राजकीय स्वातंत्र्यलढ्याच्या रूपात कशी रूपांतरित झाली, हा प्रवास खरोखरच थक्क करणारा आहे. या संपूर्ण ऐतिहासिक घुसळणीत दक्षिण महाराष्ट्राने खऱ्या अर्थाने दीपस्तंभाची भूमिका बजावली. याच लाल मातीत सामाजिक न्याय, समता, लोकसहभाग आणि 'स्वराज्य' यांसारख्या आधुनिक मूल्यांची भक्कम जडणघडण होत गेली.

या महान परिवर्तनवादी पर्वाची मुहूर्तमेढ इ.स.१८७३ मध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी 'सत्यशोधक समाजा'च्या स्थापनेतून रोवली. सत्यशोधक

समाजाने केवळ वरवरच्या सुधारणांचा आग्रह धरला नाही; तर शतकानुशतके रुजलेली अमानवीय जातीव्यवस्था, प्रस्थापित वर्चस्ववाद, स्त्री-शिक्षणातील अडथळे आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध एक अत्यंत सुसंघटित आणि प्रखर वैचारिक लढा उभारला. या चळवळीने तळागाळातील बहुजन समाजामध्ये स्वतःची अस्मिता, आत्मसन्मान आणि एक सखोल विवेकवादी दृष्टिकोन निर्माण केला. परिणामी, ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही स्तरांवरील माणसांमध्ये व्यवस्थेला थेट प्रश्न विचारण्याची आणि अन्यायाविरुद्ध ताठ मानेने उभे राहण्याची एक अभूतपूर्व मानसिकता विकसित झाली.

महात्मा फुल्यांच्या या पुरोगामी विचारधारेचा वारसा आणि प्रभाव पुढील पिढ्यांमध्येही अत्यंत प्रकर्षाने दिसून येतो. कोल्हापूर संस्थानामध्ये लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्यायाच्या या सैद्धांतिक संकल्पनेला एका प्रत्यक्ष 'संस्थात्मक' रूपामध्ये आणले. त्यांनी राबवलेले शिक्षणातील आरक्षण, अस्पृश्यता निवारणाचे धडक प्रयत्न आणि शेतकरी कल्याणाच्या योजना हे फुले यांच्याच विचारांचे एक भव्य विस्तार रूप होते. या क्रांतिकारक उपाययोजनांमुळे दक्षिण महाराष्ट्रात सामाजिक जागृतीची लाट अधिकच वेगवान झाली आणि बहुजनांची संघटनशक्ती शतपटीने वाढली.

पुढे विसाव्या शतकाच्या तिसऱ्या आणि चौथ्या दशकात राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीने अत्यंत तीव्र स्वरूप धारण केले. १९४२ च्या 'चले जाव' (भारत छोडो) आंदोलनाचा वणवा पेटल्यानंतर ब्रिटिश सत्तेने सर्व प्रमुख राष्ट्रीय नेत्यांना रातोरात गजाआड केले. अशा आणीबाणीच्या वेळी दक्षिण महाराष्ट्रातील स्थानिक नेतृत्व अत्यंत ताकदीने पुढे आले. याच ज्वलंत पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्याच्या मातीत 'प्रतिसरकार' या एका अभूतपूर्व आणि पर्यायी प्रशासनाची स्थापना झाली. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या झंझावाती नेतृत्वाखाली उभारलेल्या या चळवळीने ग्रामीण जनतेच्या सक्रिय आणि उत्स्फूर्त सहभागावर आधारित 'स्वराज्याचा' एक अत्यंत यशस्वी प्रयोग देशासमोर उभा केला.

वरवर पाहता 'सत्यशोधक समाज' आणि 'प्रतिसरकार' या दोन चळवळींचे स्वरूप आणि काळ भिन्न वाटत असला, तरी त्यांच्या मुळाशी एक अतूट असे 'वैचारिक सातत्य' दिसून येते. सामाजिक समतेची प्रबळ जाणीव, कोणत्याही अन्यायाविरुद्ध बंड करून उठण्याची प्रतिकार-वृत्ती आणि सर्वसामान्यांच्या सहभागातून निर्माण होणारी अफाट संघटनशक्ती या समान धाग्यांनी या दोन्ही चळवळींना एकाच माळेत गुंफले आहे. थोडक्यात सांगायचे तर, सत्यशोधक समाजाने पेरलेली आणि फुलवलेली 'सामाजिक चेतना'च पुढे प्रतिसरकारच्या रूपाने एका धगधगत्या 'राजकीय प्रतिकारात' आणि कृतीशील लढ्यात प्रकट झाली, असे ठामपणे म्हणता येईल.

संशोधनाचे उद्दिष्टे:

१. सत्यशोधक समाजाची स्थापना, उद्दिष्टे व प्रभाव अभ्यासणे.
२. बहुजन जागृती आणि सामाजिक संघटन अभ्यासणे.
३. १९४२ च्या पार्श्वभूमीवर प्रतिसरकार चळवळीचा उदय अभ्यासणे.
४. दक्षिण महाराष्ट्रातील लोकसहभागाचे स्वरूप अभ्यासणे.
५. दोन्ही चळवळींतील वैचारिक सातत्य व भिन्नता अभ्यासणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनाची मांडणी अधिक वस्तुनिष्ठ, सखोल आणि पुराव्यांवर आधारित करण्यासाठी 'प्राथमिक' आणि 'दुय्यम' अशा दोन्ही प्रकारच्या ऐतिहासिक साधनांचा आधार घेण्यात आला आहे. या परिवर्तनवादी पर्वाचा ऐतिहासिक वेध घेताना तत्कालीन विचारवंत, नेते आणि भूमिगत कार्यकर्त्यांचे चरित्रग्रंथ व आत्मचरित्रे यांचा प्रामुख्याने वापर केला आहे. यासोबतच, भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या विविध पैलूंवर आणि विशेषतः भूमिगत आंदोलनांवर प्रकाश टाकणारे अधिकृत संशोधन साहित्य, तसेच महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळींचा (विशेषतः सत्यशोधक विचारांचा) सखोल मागोवा घेणारे अभ्यासपूर्ण ग्रंथ संदर्भासाठी अभ्यासले आहेत.

गृहीतके :

१. सत्यशोधक समाज हा दक्षिण महाराष्ट्रातील परिवर्तनवादी राजकीय चळवळींचा वैचारिक पाया होता.
२. प्रतिसरकार चळवळ ही ग्रामीण लोकसहभागावर आधारित स्वराज्याच्या प्रयोगाची परिणती होती.
३. सामाजिक सुधारणा आणि राजकीय प्रतिकार यांच्यात दक्षिण महाराष्ट्रात ऐतिहासिक सातत्य दिसून येते.
४. बहुजन सक्षमीकरण ही दोन्ही चळवळींची मूलभूत प्रेरणा होती.

सत्यशोधक समाज : सामाजिक क्रांतीचा प्रारंभ:

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र हा तीव्र जातीय विषमता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा आणि शिक्षणातील मक्तेदारी यांसारख्या सामाजिक व्याधींनी पुरता ग्रासलेला होता. प्रस्थापित उच्चवर्णीय वर्चस्वामुळे बहुजन समाज (शूद्र-अतिशूद्र) आणि स्त्रिया शिक्षणासारख्या मूलभूत अधिकारापासून आणि पर्यायाने सामाजिक प्रगतीपासून कोसो दूर फेकले गेले होते. अशा या अत्यंत अंधकारमय आणि प्रतिकूल परिस्थितीत, महात्मा ज्योतिबा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली आणि महाराष्ट्राच्या मातीत एका अभूतपूर्व सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली.

सत्यशोधक समाजाचे उद्दिष्ट केवळ वरवरच्या सामाजिक सुधारणा घडवून आणणे एवढेच नव्हते; तर पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या अन्याय्य सामाजिक संरचनेला थेट वैचारिक आव्हान देणे, हा त्यामागील मुख्य हेतू होता. प्रस्थापित ब्राह्मणवादी वर्चस्वाला हादरा देणे, तळागाळातील उपेक्षित समाजाला त्यांचा हरवलेला मानवी हक्क व प्रतिष्ठा मिळवून देणे, स्त्री-शिक्षणाचा प्रसार करून स्त्रीमुक्तीची जाणीव रुजवणे आणि अंधश्रद्धा, कर्मकांड व बुरसटलेल्या रूढी-परंपरांवर कठोर प्रहार करणे, ही या चळवळीची प्रमुख उद्दिष्टे होती. महात्मा फुल्यांनी समता, बंधुता आणि विवेकवाद या आधुनिक व पुरोगामी मूल्यांवर आधारित एका नव्या समाजरचनेचे स्वप्न पाहिले. त्यांनी शिक्षणाला केवळ साक्षरतेचे नव्हे, तर 'सामाजिक मुक्तीचे' सर्वात प्रभावी हत्यार मानले आणि बहुजन समाजात हरवलेला स्वाभिमान पुन्हा जागृत करण्याचा भगीरथ प्रयत्न केला.

या सत्यशोधक चळवळीचे पडसाद दक्षिण महाराष्ट्रात, विशेषतः पुणे, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या पट्ट्यात अत्यंत गडदपणे उमटले. धार्मिक विधींमधील पुरोहितांची मध्यस्थी नाकारून सुरू केलेले सोपे 'सत्यशोधक विवाह' आणि सार्वजनिक प्रबोधनाचे कार्यक्रम यामुळे ग्रामीण महाराष्ट्रात एक नवे चैतन्य सळसळू लागले. बहुजन समाजामध्ये स्वतःच्या अस्तित्वाची आणि हक्कांची जाणीव निर्माण झाली. अन्यायकारक व्यवस्थेला थेट प्रश्न

विचारण्याची जी निर्भय वृत्ती सत्यशोधक समाजाने रुजवली, तिनेच पुढे ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या राजकीय लढ्यासाठी एक भक्कम मानसिक पाया तयार केला. त्यामुळेच, सत्यशोधक चळवळ ही महाराष्ट्रातील परिवर्तनवादी परंपरेची खऱ्या अर्थाने मूलभूत सुरुवात ठरते.

बहुजन जागृती आणि परिवर्तनवादी परंपरेचा विस्तार :

विसाव्या शतकाच्या प्रारंभी, महात्मा फुल्यांच्या या सत्यशोधक विचारधारेचा प्रवाह अधिकच व्यापक आणि गतिमान झाला. या पुरोगामी विचारांना खऱ्या अर्थाने 'संस्थात्मक आणि राज्याश्रयाचे' बळ देण्याचे ऐतिहासिक कार्य कोल्हापूर संस्थानाचे लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांनी केले. शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाला केवळ कागदावर न ठेवता, तो आपल्या राज्यकारभाराचा 'केंद्रबिंदू' मानला. त्यांनी अत्यंत धाडसाने राबवलेले शिक्षणातील आरक्षणाचे धोरण, सार्वजनिक ठिकाणे सर्वांसाठी खुली करून दिलेला अस्पृश्यता निवारणाचा लढा आणि शेतकरी व मागास घटकांसाठी सुरू केलेल्या विविध कल्याणकारी योजना, यांमुळे सत्यशोधक विचारांना एक भक्कम आणि व्यवहार्य अधिष्ठान प्राप्त झाले.

याच कालखंडात दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी आणि बहुजन समाजामध्ये एक नवी संघटनशक्ती आकार घेऊ लागली. ग्रामीण भागात सहकारी संस्थांची बीजे रोवली गेली आणि 'सामूहिक कृतीतून विकास' ही जाणीव अधिकाधिक दृढ होऊ लागली. सामाजिक न्याय आणि आर्थिक सक्षमीकरण हे परस्परांशी कसे जोडलेले आहेत, हे या समाजाने ओळखले. दरम्यानच्या काळात, राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीचे वारेही ग्रामीण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचू लागले होते. शिक्षणाचा वाढता प्रसार, सत्यशोधक विचारांतून आलेली प्रगल्भ सामाजिक जागृती आणि स्थानिक नेतृत्वाचा उदय यामुळे ग्रामीण जनता राजकीयदृष्ट्या अधिक सजग आणि परिपक्व होत गेली.

सत्यशोधक परंपरेने बहुजनांच्या मनात जी 'प्रश्न विचारण्याची' ठिणगी टाकली होती, तीच आता ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्धच्या प्रखर प्रतिकाराच्या रूपाने व्यक्त होऊ लागली. अशा प्रकारे, सत्यशोधक समाजाने प्रज्वलित केलेली सामाजिक चेतना ही पुढील काळातील बहुजन संघटन, सहकार चळवळ आणि स्वातंत्र्यलढ्यातील अभूतपूर्व लोकसहभागासाठी अत्यंत पोषक ठरली. याच वैचारिक आणि सामाजिक घुसळणीतून पुढे साताऱ्याच्या 'प्रतिसरकार'सारख्या उग्र, संघटित आणि पर्यायी राजकीय चळवळीच्या उदयासाठी एक अत्यंत अनुकूल आणि सुपीक जमीन तयार झाली.

१९४२ चे भारत छोडो आंदोलन आणि प्रतिसरकार:

१९४२ साल उजाडले आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याला एक अत्यंत निर्णायक वळण मिळाले. महात्मा गांधींनी 'चले जाव' (भारत छोडो) या आझादीच्या महामंत्राची घोषणा केली आणि संपूर्ण देश पेटून उठला. या घोषणेची धास्ती घेत ब्रिटिश सत्तेने रातोरात काँग्रेसच्या सर्व प्रमुख राष्ट्रीय नेत्यांना गजाआड केले. परंतु, यामुळे आंदोलन दडपले न जाता, उलट देशभरात स्थानिक आणि भूमिगत नेतृत्वाची एक नवी फळी पुढे आली; ज्याने या स्वातंत्र्यलढ्याला एका अभूतपूर्व 'जनआंदोलनाचे' स्वरूप प्राप्त करून दिले.

या देशव्यापी वणव्याचे सर्वात उग्र, धगधगते आणि अत्यंत सुसंघटित रूप जर कुठे पाहायला मिळाले असेल, तर ते दक्षिण महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात. या लाल मातीत नुसता निषेध नोंदवला गेला नाही, तर जुलमी ब्रिटिश सत्तेला थेट पर्याय उभा करत 'प्रतिसरकार' (पत्री सरकार) नावाच्या एका समांतर आणि पर्यायी

लोकप्रशासनाची स्थापना करण्यात आली. ही ऐतिहासिक चळवळ म्हणजे केवळ कागदावरील बंड नव्हते, तर तो तळागाळातील ग्रामीण लोकसहभागावर आधारित 'स्वराज्याच्या' प्रत्यक्ष प्रयोगाचा एक अत्यंत वैभवशाली अध्याय होता.

या अभूतपूर्व प्रतिसरकारचे मुख्य नेतृत्व क्रांतिसिंह नाना पाटील यांनी केले. त्यांच्या अंगी असलेल्या अफाट संघटनकौशल्यामुळे आणि सर्वसामान्य जनतेशी असलेल्या अत्यंत घनिष्ठ नाळेमुळे या चळवळीला अलोट असे जनसमर्थन लाभले. भूमिगत कार्यकर्त्यांनी अक्षरशः जिवावर उदार होऊन ब्रिटिश प्रशासनाची दळणवळण व्यवस्था विस्कळीत करणे, सरकारी यंत्रणेला पूर्णपणे खिळखिळे व निष्क्रिय करणे आणि तळागाळातील लोकांमध्ये खऱ्या स्वातंत्र्याची आणि 'स्वराज्याची' जाणीव दृढ करणे, अशा विविध आघाड्यांवर अत्यंत सक्रिय आणि यशस्वी भूमिका बजावली.

प्रतिसरकार या पर्यायी प्रशासनाची काही ठळक आणि क्रांतिकारी वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती:

- लोकन्यायालये (पर्यायी न्यायव्यवस्था) : ब्रिटिश कोर्टांवर बहिष्कार टाकून स्थानिक वाद आणि तंटे गावपातळीवरच सोडवण्यासाठी प्रतिसरकारने स्वतःची 'लोकन्यायालये' स्थापन केली, जिथे लोकांना जलद आणि न्याय्य निवाडा मिळू लागला.
- स्वदेशी करप्रणाली आणि लोककल्याण : ब्रिटिशांच्या जाचक करव्यवस्थेला थेट विरोध करत, प्रतिसरकारने स्वतः लोकांकडून स्वेच्छेने निधी गोळा केला आणि तोच निधी अत्यंत पारदर्शकपणे जनतेच्याच कल्याणासाठी वापरला.
- मजबूत ग्रामसंघटन : प्रत्येक गावात भूमिगत कार्यकर्त्यांचे आणि 'तुफान सेने'चे जाळे उभे करून एक अत्यंत अभेद्य अशी संघटित लोकशक्ती निर्माण करण्यात आली.
- ब्रिटिश सत्तेवर थेट प्रहार : रेल्वेचे रूळ उखडणे, तारा यंत्रणा खंडित करणे, सरकारी खजिने लुटणे आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांची कागदपत्रे जप्त करणे अशा आक्रमक मार्गांनी प्रशासनाला सळो की पळो करून सोडण्यात आले.

ऐतिहासिक नोंदी आणि पुराव्यांनुसार, या प्रतिसरकारने सातारा आणि परिसरातील तब्बल १५० हून अधिक गावांवर काही काळ स्वतःचे निर्विवाद आणि प्रत्यक्ष नियंत्रण प्रस्थापित केले होते. ग्रामीण समाज, कष्टकरी शेतकरी, सळसळत्या रक्ताचे युवक आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या अत्यंत सक्रिय व प्राणांतिक सहभागामुळेच ही चळवळ इतकी प्रभावी ठरू शकली.

थोडक्यात, 'प्रतिसरकार' ही निव्वळ ब्रिटिशांविरुद्धची एक बंडखोर कारवाई नव्हती; तर ती लोकसहभागावर आधारित 'स्वराज्य कसे असावे' याची एक अत्यंत यशस्वी आणि प्रयोगशील संकल्पना होती. याच चळवळीने दक्षिण महाराष्ट्रातील ग्रामीण समाजात राजकीय जागृतीचा असा काही पाया रचला, की ज्यामुळे इथल्या स्वातंत्र्यलढ्याला एका अत्यंत व्यापक आणि अभेद्य अशा लोकाधाराचे बळ मिळाले.

सत्यशोधक ते प्रतिसरकार : वैचारिक सातत्य:

'सत्यशोधक समाज' आणि 'प्रतिसरकार' या महाराष्ट्राच्या इतिहासातील दोन अत्यंत वादळी आणि दिशादर्शक चळवळी. वरवर पाहता या दोन्ही चळवळींचा काळ, कार्यपद्धती आणि बाह्य स्वरूप यात मोठी तफावत जाणवते; परंतु त्यांच्या मुळाशी गेल्यावर एका अत्यंत प्रगल्भ अशा 'वैचारिक सातत्याचा' अखंड प्रवाह वाहताना दिसतो. एकोणिसाव्या शतकात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा

फुले यांनी सुरू केलेल्या सामाजिक क्रांतीने बहुजन समाजामध्ये आत्मसन्मान, विवेकवाद आणि अन्यायाविरुद्ध बंड करण्याची जी मानसिकता पेरली, तीच चेतना विसाव्या शतकात 'प्रतिसरकार'च्या माध्यमातून एका संघटित आणि राजकीय लाटेच्या रूपात उफाळून आलेली दिसते.

या दोन टोकांमधील वैचारिक प्रवासाचे आणि सातत्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल:

१. सामाजिक चेतनेचे राजकीय प्रतिकारात रूपांतर:

- स्वाभिमानाची पेरणी : सत्यशोधक समाजाचा मुख्य लढा हा प्रस्थापित जातिव्यवस्था, ब्राह्मणवादी वर्चस्व आणि समाजाला पोखरणाऱ्या अंधश्रद्धा यांविरुद्ध होता. महात्मा फुल्यांनी या वैचारिक संघर्षातून तळागाळातील समाजात एक अभूतपूर्व स्वाभिमान जागृत केला. प्रस्थापित सत्ताकेंद्रांना आणि शोषक व्यवस्थेला थेट प्रश्न विचारण्याची जी निर्भय वृत्ती सत्यशोधक समाजाने रुजवली, तीच पुढील काळातील राजकीय चळवळींसाठी सर्वांत मोठी शिदोरी ठरली.
- कृतीशील बंडखोरी : सत्यशोधक समाजाने वैचारिक पातळीवर जी मशागत केली, तिचेच अत्यंत 'कृतीशील आणि आक्रमक' रूप क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकार चळवळीत पाहायला मिळते. इथल्या ग्रामीण जनतेने ब्रिटिश साम्राज्यशाहीला जे उघड आव्हान दिले, ते पाहता 'सामाजिक जागृतीचे रूपांतर एका प्रखर राजकीय प्रतिकारात' कसे होते, याचा हा एक उत्तम वस्तुपाठ आहे.

२. दोन चळवळींना जोडणारे समान मूल्याधिष्ठित धागे:

जरी या चळवळी वेगवेगळ्या काळात घडल्या असल्या, तरी त्यांच्यात खालील समान मूल्यांचे धागे अत्यंत घट्टपणे गुंफलेले दिसतात:

- बहुजन-केंद्री दृष्टिकोन: दोन्ही चळवळींचा मुख्य कणा आणि सामाजिक आधार हा इथला कष्टकरी, शेतकरी, बहुजन आणि ग्रामीण समाजच होता.
- अन्यायाविरुद्धचा प्रखर लढा: अन्याय मग तो सामाजिक विषमतेचा असो (सत्यशोधक) वा परकीय वसाहतवादी सत्तेचा असो (प्रतिसरकार), दोन्ही चळवळींनी त्याविरुद्ध तडजोड न करता संघर्षाचीच भूमिका घेतली.
- लोकसहभागाची अफाट शक्ती: 'संघटित लोकशक्ती हेच परिवर्तनाचे सर्वात मोठे आणि प्रभावी हत्यार आहे,' या सूत्रावर दोन्ही चळवळींचा ठाम विश्वास होता.
- समतेचा अखंड ध्यास: एका चळवळीने 'सामाजिक' समतेचा आग्रह धरला, तर दुसरीने 'राजकीय' समानतेचा आणि स्वातंत्र्याचा. पण ध्येय 'समतेचे'च होते.

३. स्वरूपातील भिन्नता आणि ध्येयातील एकवाक्यता:

या दोन्ही चळवळींमध्ये काही मूलभूत फरकही होते. सत्यशोधक समाज ही प्रामुख्याने एक 'वैचारिक आणि सामाजिक सुधारणांची' चळवळ होती, जिचे उद्दिष्ट दीर्घकालीन सामाजिक परिवर्तन घडवणे हे होते. याउलट, प्रतिसरकार ही एक 'भूमिगत आणि संघर्षप्रधान राजकीय चळवळ' होती, जिने ब्रिटिशांना हाकलून तात्कालिक राजकीय स्वातंत्र्य मिळवण्याला प्राधान्य दिले. असे असले तरी, या भिन्नतेच्या आवरणाखाली असलेली न्यायाची आणि स्वातंत्र्याची मूलभूत प्रेरणा मात्र एकच होती.

दक्षिण महाराष्ट्राची रांगडी सामाजिक संरचना, तिथे रुजत चाललेली सहकाराची परंपरा, शिक्षणाचा वाढता प्रसार आणि तळागाळातून उभे राहिलेले खंबीर स्थानिक नेतृत्व या सर्व घटकांनी या वैचारिक सातत्याला अत्यंत पोषक असे खतपाणी घातले.

'प्रतिसरकार' चळवळ ही अचानक शून्यातून किंवा पोकळीतून निर्माण झालेली नव्हती. ती महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक विचारांनी घडवून आणलेल्या सामाजिक जागृतीचीच एक ऐतिहासिक आणि अटळ परिणती होती. म्हणूनच, "सत्यशोधक ते प्रतिसरकार" हा झंझावाती प्रवास म्हणजे महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी परंपरेच्या वैचारिक सातत्याचा सर्वात भक्कम आणि ज्वलंत पुरावा मानला जातो.

दक्षिण महाराष्ट्राचे विशेष योगदान:

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी आणि संघर्षमय इतिहासात दक्षिण महाराष्ट्र' हा केवळ एक भौगोलिक प्रदेश नसून, तो सामाजिक सुधारणा, सहकार चळवळ आणि भारतीय स्वातंत्र्यलढा या तिन्ही प्रवाहांचा एक अत्यंत प्रबळ आणि अग्रणी केंद्रबिंदू राहिला आहे. सातारा, कोल्हापूर आणि सांगली या तीन जिल्ह्यांनी या पुरोगामी परंपरेची धुरा अत्यंत समर्थपणे पेलली. या भागातील वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक रचना, शिक्षणाचा वाढता प्रसार, संस्थानांनी दिलेले बळ आणि ग्रामीण भागातील अभेद्य संघटनशक्ती या सर्व घटकांनी मिळून 'सत्यशोधक ते प्रतिसरकार' या ऐतिहासिक प्रवासाला अत्यंत पोषक असे खतपाणी घातले. या महत्त्वपूर्ण योगदानाचे विविध पैलू खालीलप्रमाणे उलगडता येतील:

१. सातारा: 'प्रतिसरकार'चा धगधगता ज्वालामुखी:

- स्वातंत्र्यलढ्याचे मुख्य केंद्र : १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात तत्कालीन सातारा जिल्हा हा प्रतिसरकार चळवळीचा प्रमुख आणि सर्वांत आक्रमक केंद्रबिंदू ठरला.
- अभेद्य संघटन आणि ग्रामीण प्रतिकार: या भागात सामाजिक जागृतीची आणि सहकाराची बीजे रोवली गेली होती. संघटन आणि खंबीर स्थानिक नेतृत्वाच्या बळावर येथे ब्रिटिश सत्तेला उघड आणि व्यापक आव्हान दिले गेले.
- पर्यायी प्रशासन: गावोगावी कार्यकर्त्यांचे एक भक्कम जाळे विणले गेले. 'लोकन्यायालये' चालवणे, निधी संकलन करणे आणि ब्रिटिशांविरुद्ध गुप्त कारवाया करणे यांतून एक अत्यंत यशस्वी 'पर्यायी प्रशासन' (समांतर सरकार) चालवून दाखवले. शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य कष्टकरी वर्गाच्या अलोट सहभागामुळे सातारा हा ग्रामीण प्रतिकाराचे एक जिवंत प्रतीक बनला.
- भूमीगत कारवायांचा जोर: स्वातंत्र्यलढ्याच्या धगधगत्या काळात दक्षिण सातारा जिल्ह्यातील वाळवा, शिराळा, पलूस आणि आजूबाजूच्या परिसरात भूमिगत कार्यकर्त्यांची सक्रियता अत्यंत उल्लेखनीय होती.
- सामूहिक कृतीची ताकद: ब्रिटिशांच्या डोळ्यांत धूळ फेकून गुप्त सभा घेणे, स्वातंत्र्याचा प्रचार करणे आणि ब्रिटिशविरोधी कारवाया यशस्वीपणे पार पाडण्यात इथल्या ग्रामीण युवकांनी आणि शेतकरी वर्गाने मोलाची भूमिका बजावली.
- सहकाराचा पाया: या भागातील सामाजिक रचनेत मुळातच सहकार आणि 'सामूहिक कृतीची' परंपरा रुजलेली असल्याने, येथील संघटनशक्ती वेगाने वाढली आणि हीच ताकद प्रतिसरकारसारख्या चळवळींसाठी अत्यंत मारक (ब्रिटिशांसाठी) व पोषक (स्वातंत्र्यासाठी) ठरली.

२. कोल्हापूर: सामाजिक न्याय आणि संस्थानाचे भक्कम पाठबळ:

- पुरोगामी विचारांचे माहेरघर: कोल्हापूर संस्थानात लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांनी अत्यंत धाडसाने राबवलेल्या प्रगतिशील धोरणांमुळे खऱ्या अर्थाने 'सामाजिक न्यायाची' मजबूत पायाभरणी झाली.

- विचारांचे कृतीत रूपांतर: शिक्षणातील आरक्षण, अस्पृश्यता निर्मूलनाची कठोर पावले आणि शेतकरी कल्याणाच्या विविध उपाययोजना यांतून सामाजिक समतेचा विचार केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष व्यवहारात उतरला.
- आत्मविश्वासाची निर्मिती: या क्रांतिकारक सुधारणांमुळे बहुजन समाजात अभूतपूर्व आत्मविश्वास आणि राजकीय जागरूकता निर्माण झाली. कोल्हापूर संस्थानाचा पुरोगामी दृष्टिकोन आणि सामाजिक चळवळ यांनी महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी परंपरेला एक भक्कम वैचारिक आणि संस्थात्मक बळ दिले.

3. सामाजिक आणि आर्थिक घटकांचा भक्कम पाया:

दक्षिण महाराष्ट्राची शेतीप्रधान अर्थव्यवस्था आणि लहान-मोठ्या जमीनधारकांची तत्कालीन रचना हा या सर्व बदलांचा मूळ पाया होता. सहकार चळवळीचा झालेला उदय, शिक्षणाचा झपाट्याने झालेला प्रसार आणि सामाजिक सुधारणांची लाट यामुळे लोकांमध्ये 'एकजुटीच्या कृतीची' जाणीव दृढ झाली. या सर्वांवर कडी म्हणजे, सत्यशोधक विचारधारेने बहुजनांच्या मनात पेरलेली सामाजिक समतेची भावना. या सर्व गोष्टींमुळे ग्रामीण समाज राजकीयदृष्ट्या कमालीचा सजग झाला आणि म्हणूनच प्रतिसरकारसारख्या धाडसी चळवळीला इतका व्यापक आणि अभेद्य लोकाधार मिळू शकला.

थोडक्यात सांगायचे तर, दक्षिण महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा, सहकाराची परंपरा, शैक्षणिक प्रसार आणि स्थानिक नेतृत्वाचा उदय या यामुळे याभागात चळवळीला बळ मिळाले. सातारा, कोल्हापूर आणि सांगली या जिल्ह्यांनी केवळ सामाजिक जागृतीच केली नाही, तर ती जागृती राजकीय प्रतिकाराच्या सर्वोच्च शिखरापर्यंत यशस्वीपणे नेऊन दाखवली. म्हणूनच, दक्षिण महाराष्ट्राचे हे योगदान केवळ एका 'विशिष्ट प्रदेशापुरते' मर्यादित न मानता, ते संपूर्ण महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी इतिहासातील एक 'सर्वांत निर्णायक आणि सुवर्णपानावर कोरले जाणारे घटक' मानले पाहिजे.

निष्कर्ष:

वरील सखोल संशोधनावरून एक बाब अत्यंत स्पष्टपणे अधोरेखित होते ती म्हणजे, दक्षिण महाराष्ट्रातील परिवर्तनवादी परंपरा ही केवळ एखाद्या घटनेपुरती मर्यादित नसून, ती एकोणिसाव्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळींपासून ते विसाव्या शतकातील धगधगत्या स्वातंत्र्यलढ्यापर्यंत अखंडपणे विकसित होत गेलेली एक प्रगल्भ प्रक्रिया आहे.

या महान प्रक्रियेची भक्कम वैचारिक पायाभरणी महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या 'सत्यशोधक समाजा'ने केली. त्यांनी सामाजिक समता, विवेकवाद, बहुजन सक्षमीकरण आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसारखी आधुनिक मूल्ये समाजमनात खोलवर रुजवून परिवर्तनवादी चेतनेची पहिली आणि सशक्त बीजे पेरली. या सामाजिक जागृतीला पुढे राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रगतिशील धोरणांनी 'संस्थात्मक आणि राज्याश्रयाचे' बळ दिले. त्यांनी धाडसाने राबवलेले शिक्षणातील आरक्षण, अस्पृश्यता निर्मूलनाचे प्रयत्न आणि सामाजिक न्यायाच्या धडक उपाययोजना यामुळे बहुजन समाजात अभूतपूर्व आत्मविश्वास आणि संघटनशक्ती निर्माण झाली, ज्यामुळे या परिवर्तनाचा पाया अधिकच भक्कम झाला.

या दीर्घकालीन सामाजिक मशागतीचीच 'राजकीय परिणती' म्हणजे १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दक्षिण महाराष्ट्रात उभी राहिलेली 'प्रतिसरकार' चळवळ होय. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या खंबीर नेतृत्वाखाली इथल्या ग्रामीण जनतेने ब्रिटिश सत्तेला दिलेले हे उघड आव्हान केवळ स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग नव्हते,

तर तो तळागाळातील लोकसहभागावर आधारित 'स्वराज्याच्या' प्रयोगाचा एक अत्यंत सशक्त आणि जिवंत आविष्कार होता.

सत्यशोधक समाज आणि प्रतिसरकार या दोन्ही चळवळींचे तुलनात्मक विश्लेषण केल्यास त्यांच्यातील 'वैचारिक सातत्य' अत्यंत ठळकपणे समोर येते. सत्यशोधक चळवळीने सामाजिक अन्यायाविरुद्ध जो प्रखर बौद्धिक आणि वैचारिक लढा उभारला, त्याच ज्वलंत चेतनेला प्रतिसरकारने एका 'राजकीय प्रतिकाराचे आणि कृतीशील बंडखोरीचे' रूप दिले. यातूनच सामाजिक सुधारणा आणि राजकीय क्रांती एकमेकांपासून वेगळ्या नसून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हा अंतःसंबंध स्पष्ट होतो.

दक्षिण महाराष्ट्रातील सहकाराची रुजलेली परंपरा, शिक्षणाचा वाढता प्रसार, ग्रामीण भागातील अभेद्य संघटनशक्ती आणि स्थानिक नेतृत्वाचा उदय या सर्व घटकांनी या परिवर्तनवादी प्रवाहाला एक अभूतपूर्व गती दिली. या संपूर्ण प्रवासात सातारा, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यांनी सामाजिक जागृतीपासून ते प्रत्यक्ष स्वराज्याच्या प्रयोगापर्यंतचा हा ऐतिहासिक प्रवास साकारण्यात सिंहाचा वाटा उचलला.

अंतिम स्वरूपात सांगायचे तर, "सत्यशोधक समाज ते प्रतिसरकार" हा रोमहर्षक प्रवास महाराष्ट्राच्या आधुनिक आणि परिवर्तनवादी इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे. या परंपरेच्या अभ्यासातून सामाजिक न्याय, अफाट लोकसहभाग आणि परिवर्तनवादी राजकारण यांचे परस्परसंबंध अधिक लख्खपणे उलगडतात. भविष्यातील संशोधनासाठी अशा प्रादेशिक चळवळींचा तुलनात्मक अभ्यास आणि स्थानिक ऐतिहासिक साधनांचे सखोल विश्लेषण करणे अत्यंत गरजेचे असून, त्यातून इतिहासाचे आणखी नवे आणि अज्ञात पैलू उजेडात येऊ शकतील.

संदर्भ :

१) कीर, धनंजय. *राजर्षी शाहू छत्रपती*. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.

२) भोसले, एस. एस. *क्रांतिसिंह नाना पाटील*. औरंगाबाद: साकेत प्रकाशन.

३) कठारे, डॉ. अनिल. *आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास*. औरंगाबाद: विद्या बुक्स पब्लिशर्स.

४) शिंदे, डॉ. ए. बी. *The Parallel Government of Satara: A Phase of the Quit India Movement*. Allied Publishers.

५) देवगिरीकर, त्रि. र. *भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास*. पुणे: चित्रशाळा प्रेस.

६) बॉम्बे प्रेसिडेन्सी प्रशासन अहवाल (1940–1945).

७) प्रतिसरकार संदर्भातील समकालीन पत्रके व भूमिगत साहित्य.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सत्यशोधक समाजाची १५० वर्षे

प्रा. सचिन शंकर ओवाळ

सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,

सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

Corresponding Author - प्रा. सचिन शंकर ओवाळ

DOI - 10.5281/zenodo.19659349

प्रस्तावना:

पुरोगामी महाराष्ट्रचा पाया घालणारे महात्मा ज्योतीराव फुले यांनी भारतामध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. अस्पृश्यांसाठी आपल्या राहत्या घरातील पाण्याचा हौद खुला केला. विधवा केशवपन बंदीसाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला. अशा प्रकारे समाजातील जुन्या जळमट विचार, परंपरा, रुढी यांना फाटा देणारे महान क्रांतिकारक म्हणूनच त्यांचा उल्लेख करावा लागेल. सर्व कार्यकर्ते जमविणे व त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हा सर्व जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडल्या; पण नंतरच्या कालखंडात त्यांना एखाद्या संघटनेची गरज भासू लागली आणि त्यातूनच 'सत्यशोधक' समाजाची निर्मिती झाली.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यामध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्याचे १५० वे वर्ष सुरू होत आहे. अमेरिकेतील सद्‌विचारी मानवतावादी लोकांनी निग्रों लोकांना गुलामगिरीतून मुक्त केले. त्याच पद्धतीने भारतातील पुरोहित वर्गाच्या मानसिक गुलामगिरीतून या देशातील विचारवंतांनी शूद्रातीक्षुद्रांना मुक्त केले पाहिजे ही भूमिका महात्मा फुले सतत मांडत होते. १८५५ साली महात्मा फुले यांनी 'तृतीयरत्न' हे नाटक लिहिले. त्यातून त्यांनी पुरोहित वर्गाचे वर्चस्व कसे शोषण करते हे मांडले. पुढे त्यांनी १८७३ मध्ये 'गुलामगिरी' नावाचे पुस्तकही लिहिले होते. या पुस्तकातूनच सत्यशोधक समाजाचा जन्म झाला. इथल्या मानवनिर्मित जाती व्यवस्थेत श्रमाने जगणाऱ्या वर्गाला इंग्रज सरकारने शिक्षण द्यावे म्हणजे ते विद्या मिळवून मानसिक दास्यातून मुक्त होतील, असे जोतिबांचे मत होते. 'सारे अनर्थ एका अविद्याने केले', हे त्यांचे मत होते.

गृहितके:

१) महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याची थोडीफार माहिती आहे.

२) पुरोगामी महाराष्ट्राच्या उभारणीत फुल्यांचे योगदान.

३) सत्यशोधक समाजाच्या एकूण कार्याबद्दल थोडीफार माहिती आहे.

संशोधनपद्धती:

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

संघटनेची गरज:

महात्मा ज्योतीराव फुल्यांनी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे व्रत हाती घेतले होते. पण त्यांच्या पत्नी सावित्रीबाई आणि त्यांचे चार-पाच मित्र एवढ्याच लोकांनी फुल्यांना त्यांच्या ह्या कार्यात सर्वतोपरी मदत केली. पण बौद्धिक गुलामगिरी असणारा वर्ग मोठा होता व त्या बहुसंख्य लोकांच्या मतपरिवर्तनासाठी दिवस-रात्र झटत होते.[१] त्यामुळे फुले करीत असलेल्या कार्याचा प्रसार जेवढया प्रमाणात व्हायला हवा होता तेवढा होत नव्हता. ज्योतीरावांचे एखाद्या शिलेदाराप्रमाणे काम चालले होते. त्यांची स्वतंत्र अशी मतप्रणाली होती, धोरणाला पोषक असे तत्त्वज्ञान होते, त्यांच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार अधिक नेटाने होणे आवश्यक होते. याकरिता सामुदायिक स्वरूपाची एखादी संस्था स्थापन करून तिच्या मार्फत ही चळवळ सुरू करणे त्याना अगत्याचे वाटू लागले.[२]

सत्यशोधक समाजाची स्थापना:

भारतात ब्रिटिशांच्या आगमानानंतर खऱ्या अर्थाने भारतात परिवर्तन घडून येण्याला सुरुवात झाली. ब्रिटिशांनी आणलेल्या इंग्रजी शिक्षणाने भारतातील पददलित वर्ग शिकू लागला, जो हजारो वर्ष शिकण्यापासून वंचित राहिला होता. भारतीय समाजामध्ये असणाऱ्या रुढी, परंपरा याला फाटा देण्याचे काम वेगाने सुरू झाले. कनिष्ठ वर्गातील जे तरुण शिक्षण घेऊन बाहेर पडत होते, त्यांचा या कामी आपल्याला उपयोग होईल असा विचार त्यांच्या मनी आला. त्याचबरोबर संघटनेच्या मार्फत अडीअडचणी, आपली गाऱ्हाणी सरकार दरबारी मांडणे आधिक परिणामकारक होईल व त्याला वजन प्राप्त होईल असा विचार ज्योतीरावांनी केला. एखादा विचार डोक्यात आला आणि पटला की, त्याला प्रत्यक्षात आणण्यासाठी जीवाचं रान करणाऱ्या फुल्यांनी एक पत्र काढून मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, इ. प्रमुख शहरांतून ते पाठविले. या सभेकरिता साधारण ५० ते ६० कार्यकर्ते उपस्थित राहिले.[३] या सभेला उद्देशून त्यांनी आपले मत मांडले की ही चळवळ अधिक परिणाम कारक होण्याकरिता एका मध्यवर्ती संस्थेची कशी आवश्यकता आहे, याबद्दल आपले मत प्रभावीपणे मांडले. पं. सि. पाटील त्यांच्या 'महात्मा ज्योतिराव फुले' या पुस्तकात सांगतात की, "भिक्षुकशाहीची रग कमी झाल्याशिवाय आपण पेरलेल्या सुधारणा वाढीस लागणं शक्य नाही, हे फुल्यांना लक्षात आलं आणि सुशिक्षित ब्राह्मणेतरांची एक सामुदायिक स्वरूपाची संस्था स्थापन करून तिच्यामार्फत चळवळ चालू करणं त्यांना अगत्याचं वाटू लागलं."

या सभेमध्ये इतर कार्यकत्यांचीही भाषणे झाली. सर्वानुमते दि. २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना ज्योतीराव फुले यांनी पुणे येथे केली.[४] महात्मा फले हे समाजसुधारक म्हणन ओळखले जात असले तरी वरवरच्या सुधारणांवर त्यांचा विश्वास नव्हता. सामाजिक विषमता, अन्याय व शोषण यांवर आधारलेल्या प्रचलित समाजव्यवस्थेलाच त्यांचा विरोध होता. शूद्रातिशूद्र, कनिष्ठ वर्गाचे उच्चवर्णीयांनी वर्षानुवर्षे जे अमानुष शोषण चालविले आहे ते थांबविल्याखेरीज या ठिकाणी न्यायाधिष्ठित समाजव्यवस्था प्रस्थापित होणे शक्य नाही, असे त्यांचे मत होते. आपल्या 'ब्राह्मणांचे कसब', 'गुलामगिरी' इत्यादी ग्रंथांद्वारे त्यांनी हे मत स्पष्ट शब्दांत व्यक्त केले होते. ब्राह्मणांनी खोटे धर्मग्रंथ निर्माण करून समाजव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांनी सर्व सोयीसवलती आपणाकडे घेतल्या आणि शूद्रातिशूद्रांना कायमचे गुलामगिरीच्या खाईत लोटले. भारतीय समाजातील जातिभेदाचे मूळ ब्राह्मणांच्या स्वार्थी धर्मांधतेत आणि अहंकारात आहे. ब्राह्मणी वर्चस्वातूनच येथील समाजात पराकोटीची विषमता निर्माण झाली आहे, अशा शब्दांत त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेचे विश्लेषण केले होते. सामाजिक विषमता, अन्याय व शोषण यांवर

आधारलेल्या प्रचलित समाजव्यवस्थेत बदल घडवून आणावयाचा असेल तर या ठिकाणच्या शूद्रातिशूद्र कनिष्ठ वर्गांनी संघटित होऊन ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध संघर्ष केला पाहिजे, असे महात्मा फुल्यांनी प्रतिपादन केले.

याच दिवशी फुल्यांनी 'सत्यशोधक समाज' नावाची ज्योत पेटवली. आज दीड शतकानंतरही फुल्यांनी लावलेली ही ज्योत अंधारलेल्या दिशांना उजेडाची मशाल बनून उभी आहे. इंग्रजांनी आपल्या स्वार्थासाठी का असेना पण इथे शिक्षणाची दारे खुली केली. त्यामुळेच भारतात सर्व जातीच्या लोकांना शिक्षणाची कवाडे उघडली गेली. इंग्रजांच्या वर्चस्वाखाली आलेल्या मराठेशाहीत एक वर्ग ज्ञानी होत होता. लोकहितवादींपासून महात्मा फुले यांच्यापर्यंत अनेकजण कार्यरत झाले होते. अशीच ज्ञानी झालेली काही मंडळी महात्मा फुले यांच्याकडे जमलेली होती. त्यांनी विविध बाबींवर सांगोपांग विचार केला. त्यातून धर्म, कर्म, व्यवहार आदी बाबत शूद्र भरडले जाऊ नयेत म्हणून 'सत्यशोधक समाजाची' जाहीरपणे स्थापना केली. या समाजाने काही नियम आणि कर्तव्य निश्चित केली.

सत्यशोधक समाजाची तत्त्वे:

भारतीय समाजाची असलेली विषमता, रुढी व परंपरावादी विचारसरणी, जातिव्यवस्था स्त्री दास्यत्व यांमध्ये गुरफटलेल्या समाजाला त्यातून बाहेर काढण्याच्या उद्देशाने या संघटनेची स्थापना झाली. महात्मा ज्योतीराव फुल्यांनी सत्यशोधक समाजाची सर्वव्याप विषमता नष्ट करणारी अशी तीन तत्त्वे समाविष्ट केली. ईश्वर एकच आहे. त्यांच्या जवळ हिंदू-मुसलमान, महार मांग असा भेदभाव नाही त्यांच्याजवळ सर्व मानव समान आहेत. हे पहिल्या तत्वात समाविष्ट आहे. ईश्वराची भक्ती करण्याचा सर्वांचा आधिकार आहे. आपल्या स्वतःच्या भक्तीने ईश्वराला प्रसन्न करता येते. याकरिता मध्यस्थाची गरजच काय? हे सांगून पुरोहितशाहीला त्यांनी कडाडून विरोध केला आणि हे दुसऱ्या तत्त्वात समाविष्ट केले.[५] व्यक्तीचे कार्यकर्तृत्व हे त्यांच्या कार्यावरून न ठरता त्यांच्या जातीवरून ठरत असे. या उच्चनीचतेच्या भ्रामक कल्पनेला ज्योतीरावांनी विरोध केला. मनुष्य जातीने श्रेष्ठ बनत नसून गुणांनी श्रेष्ठ बनतो, असे हे मानवी उत्कर्षांचे व स्वातंत्र्याचे सत्यतत्त्व ज्योतीरावांनी सत्यशोधक समाजाच्या तिसऱ्या तत्त्वात समाविष्ट केले.[६] महात्मा फुले यांचे धर्मविषयक विचार अतिशय उदात्त होते. सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, म्हणून मानवांनी परस्परांशी बंधुभावाच्या नात्याने व्यवहार करावा, असे त्यांनी सांगितले. मानव धर्माचा पुरस्कार करताना आपल्या सार्वजनिक सत्यधर्म

या ग्रंथात ज्योतीबा म्हणतात

निर्मिके निर्मिला मानव पवित्र, कमी जास्त सूत्र बुद्धीमध्ये ।
पिढीजात बुद्धी नाही सर्वामधी, शोध करा आधी पुर्तेपणी ।।
धर्म राज्य भेद मानवा नसावे, सत्याने वागावे ईशासाठी
ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राह्मणाशी, धरावे पोटाशी बंधुपरी ।
निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक, भांडणे अनेक कशासाठी

या ओळी ज्योतीबांचा आणि त्यांच्या सत्यशोधक समाजाचा मानवतावादी दृष्टिकोन प्रसार स्पष्ट करण्यास पुरेशा आहेत. धर्माच्या नावाखाली रूढ झालेल्या अनिष्ट चालीरीती, प्रथा, परंपरा यांना त्यांनी जोरदार विरोध केला आहे. 'सर्वसाक्षी जगत्पती त्याला नकोच मध्यस्थी' असे त्यांनी म्हटले होते.

सत्यशोधक समाजाच्या सभासदांनी सत्याचा प्रसार आणि सद्विचार लोकांमध्ये रुजवण्याचे काम करावे. मानवी हक्क आणि कर्तव्यांचा त्यांनी आपल्या लेखनातून व भाषणातून प्रचार व प्रसार करावा हे अभिप्रेत होते. अनिष्ट चालीरीतींचे निर्मूलन करणे हे समाजाच्या उद्देशातील मुख्य कलम होते. तसेच महात्मा ज्योतिराव फुले, तुकाराम तात्या पडवळ, दादोबा पांडुरंग आदींची पुस्तके समाजाची विचारधारा म्हणून उपयोगात आणावीत असेही ठरवण्यात

आले. प्रस्थापित धर्मग्रंथातील विषमतेवर व पक्षपातावर ज्योतिरावांना आसूड उगारायचा होता. सत्य काय आहे ? ते लोकांसमोर मांडायचे होते. म्हणूनच त्यांनी 'सत्यशोधक' हे नाव धारण केले.

ब्राह्मण परोहिताशिवाय कार्य करण्याला प्राधान्य:

तत्कालीन समाजामध्ये ब्राह्मणवर्ग, पुरोहित वर्गाला पराकोटीचे महत्त्व प्राप्त झाले होते. या वर्गाशिवाय कोणताही विधी पार पाडता येत नव्हता. अशी एक समजूत त्याकाळी होती; पण महात्मा ज्योतीराव फुले यांनी गैरसमज खोटा ठरवून ब्राह्मणाशिवाय, संस्कृत मंगलाष्टकाशिवाय लग्नविधी पार करून दाखविले. ज्योतीरावांच्या टकानामध्ये एक गरीब नोकर होता तो विधा होता त्याचे लग ब्राह्मण परोहिताशिवाय कार्य करण्याला प्राधान्य तत्कालीन समाजामध्ये ब्राह्मणवर्ग, पुरोहित वर्गाला पराकोटीचे महत्त्व प्राप्त झाले होते. या वर्गाशिवाय कोणताही विधी पार पाडता येत नव्हता. अशी एक समजूत त्याकाळी होती; पण महात्मा ज्योतीराव फुले यांनी गैरसमज खोटा ठरवून ब्राह्मणाशिवाय, संस्कृत मंगलाष्टकाशिवाय लग्नविधी पार करून दाखविले. ज्योतीरावांच्या दुकानामध्ये एक गरीब नोकर होता. तो विधुर होता. त्याचे लग्न सत्यशोधक समाजाच्या पद्धतीने करावे असे ज्योतीरावांनी ठरविले. त्यानेही याला मान्यता दिली. भटजीविना ज्योतीराव एका मुलाचे लग्न करणार आहेत ही बातमी कळताच भटजी लोकांत खळबळ उडाली. त्यांनी हा धर्मद्रोह आहे, घराण्याला काळिमा आहे, संसार चांगला होणार नाही, असे सांगून अशा लग्नापासून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु याचा काही उपयोग झाला नाही; ठरल्यानुसार हे लग्न १८७३ साली झाले. ज्योतीरावांनी मराठी भाषेत रचलेली मंगलाष्टके म्हटली. वधुवरांनी फुले रचित शपथा घेतल्या. फक्त पानसुपारीचा खर्च झाला. अगदी साध्या पद्धतीने हा विवाह संपन्न झाला. त्या काळी या विवाहाची चर्चा फार मोठ्या प्रमाणात झाली; कारण ब्राम्हाणांशिवाय लग्न हे ऐक नवलच घडले होते. अशाच पद्धतीने ग्यानोबा ससाणे या व्यक्तीचा विवाह घडवून आणला आणि ज्योतीरावांच्या कार्याकडे लोकांचे लक्ष वेधले गेले."[७]

सत्यशोधक समाजाचे कार्यक्षेत्र:

तळागळातील, सर्वसामान्य, कष्टकरी शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढा उभारण्यासाठी खऱ्या अर्थाने या संघटनेचे स्थापना झाली. यामधील कार्यकर्ते व नेते बुद्धिवंत वर्गातले नव्हते. त्यांचे कार्यक्षेत्र हे ग्रामीण भाग व कनिष्ठ वर्ग होते. प्रार्थना समाज व ब्राह्मो समाजासारखे शहरापुरतेच मर्यादित नव्हते. सत्यशोधक प्रचारकांचा पोषाख धोतर पागोटे, बंडी व प्रचाराकरिता हातात तुणतुणे असे. ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज अध्यात्मवाद ईश्वरभक्ती उत्क्रांतिवाद यामध्येच ते घोटाळत असत. जनतेशी त्यांचा फारसा संबंध येत नसे, पण सत्यशोधकाचा संबंध सर्वसामान्य जनतेशी, शेतकरी, कामकरी कनिष्ठ शुद, या सर्वांशी येई. त्यांच्या प्रसाराची ठिकाणे शेतातील झोपडी, ग्रामस्थळे असत. प्रचारामध्ये मुलांना शिकवा त्यांच्यावरती चांगले संस्कार करा, अंधश्रद्धामुक्त जीवन जगावे, सावकारशाही यांसारखे दैनंदिन जीवनातील प्रश्न असत. सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेतच मार्गदर्शन केले जात असे.' मूळ सत्यशोधक समाज हा एक निर्मिक, एक धर्म, एक मनुष्यजात मानणारा म्हणून स्थापन झाला. सर्वच धर्माच्या धर्मग्रंथातून सर्वांनी प्रमाण मांडण्याजोगा भाग नसल्याने सत्यशोधक समाजाला ग्रंथाचे सर्वप्रामाण्य मान्य नव्हते. अवतारवाद, मूर्तीपूजा, विभूतीपूजा त्याला मान्य नव्हती. नामस्मरणाचा भक्तिमार्गही त्याला पसंत नव्हता. परलोक व ईश्वराची साक्षात भेट त्याला अमान्यच होती. स्वर्ग व दैववाद खरा नाही. स्त्री पुरुष समान आहेत. उलट पुरुषापेक्षा स्त्री श्रेष्ठ आहे अशी सत्यशोधक समाजाची भूमिका होती. सत्यशोधक समाजाला महात्मा फुले

यांच्यानंतर डॉ. विश्राम रामजी घोले, कृष्णराव भालेकर, भास्करराव जाधव, प्रा.डोंगरे, लठ्ठे, मुकुंदराव पाटील, रामैया अय्यावारू, वा. रा. कोठारी, विचारे गुरुजी, मोरोबा वाळवेकर, यशवंतराव परांजपे आदी अनेकांनी पुढे नेण्याचा प्रयत्न केला.

१९१८ साली केशवराव बागडे यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक परिषद भरली. त्यातूनच पुढे कर्मवीर भाऊरावांच्या रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली. आज या शिक्षण संस्थेचे प्रचंड वटवृक्षात रूपांतर झालेले दिसते. पण सत्यशोधक समाजाच्या चळवळीला महात्मा फुले जी शुद्रातीशूद्रांची चळवळ म्हणत होते ती मूल्ये रुजली नाहीत. परिणामी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशुद्रांची वेगळी चळवळ पुढे उभी केली. महात्मा फुले यांना डॉ. आंबेडकर गुरु मानत होते. कारण ज्योतीरावांनीच अस्पृश्य उद्धारक चळवळीला जन्म दिला.[९]

महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाज प्रबोधनाची विविध कामे केली. त्यापैकी सत्यशोधक समाजाची स्थापना हे अतिशय महत्त्वाचे काम आहे. अखेरच्या काळात अर्धांगवायूने आजारी असतानाही 'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक त्यांनी डाव्या हाताने लिहून पूर्ण केले होते. त्यांनी दाखवलेला ज्ञानमार्ग, विद्यामार्ग अनेक अर्थाने महत्त्वाचा आहे. आजच्या असत्यतेच्या बोलबाल्यात आणि दैववादाच्या विकृत फेऱ्यात अडकविणाऱ्या अस्वस्थ वर्तमानात त्याचे महत्त्व नाकारता येत नाही.

समारोप:

महाराष्ट्रातील ब्राह्मणवादाविरोधात उभी राहिलेली पहिली ब्राह्मणेत्तर चळवळ म्हणजे 'सत्यशोधक समाज' होय. दि. २४ सप्टेंबर १८७३ रोजी स्थापन झालेल्या सत्यशोधक समाज या संघटनेला सन २०२३ मध्ये १५० वर्षे पूर्ण होत आहेत महाराष्ट्रातील सर्वसामान्य दबलेल्या, पिचलेल्या लोकांना सुसंस्कृत व संस्कारी करण्याचे काम या चळवळीने केले. भारतातील बुद्धिवादी वर्गातील राजाराम मोहन रॉय दयानंद सरस्वती, रानडे, भांडारकर इ. परंपरागत थोर घराण्यातील पुरुषांनी संस्था स्थापन केल्या. पण त्यांच्या बरोबरील एका शूद्र व अशिक्षित समजले गेलेल्या शेतकरी कुटुंबातल्या व्यक्तीने एखादी संस्था समर्थ उभी करणे व इतर लोकांचे सहकार्य मिळवणे म्हणजे समान्य बाब नव्हे. या थोर घराण्यातील संस्थांनी जे केले नाही ते ज्योतीरावांच्या सत्यशोधक समाजाने केले. पददलित शूद्र स्त्री या लोकांच्या उद्धाराचे ऐतिहासिक कार्य सत्यशोधक समाजाने केले. सामाजिक न्यायकरिता, समतेकरिता बौद्धिक गुलामगिरीतून मुक्त करण्याकरिता लढा दिला. त्या काळातील बहुचर्चित व्यक्तिमत्त्व म्हणजे महात्मा ज्योतीराव गोविंदराव फुले हे होते. भारत या देशात सामाजिक क्रांतीचे पहिले स्वप्न ज्याला पडले असा पहिला कांतिकारक होता. व या स्वप्नातूनच या ब्राह्मणोत्तर चळवळीतील भारतातील पहिल्या घटनेचा, चळवळीचा जन्म झाला.

संदर्भ सूची:

१. बा. ग. पवार : पुरुष महात्मा ज्योतीराव फुले ७४
२. कित्ता पृ.७५
३. क्रांतीसूर्य ज्योतीबा ॲड. अप्पाराव मैन्द ५९.
४. कित्ता पान नं. ६०.
५. कित्ता पान नं. ६१ ६. भारतीय समाजक्रांतीचे जनक महात्मा पवार, अविनाश बरोकर, पान नं. ४६
६. कित्ता पान ४७
७. बा.ग. पवार : युगपुरुष महात्मा ज्योतीराव फुले पान नं. ८०
८. कित्ता पु. ८४

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सामाजिक परिवर्तनाचा वाटसरू सत्यशोधक समाज

प्रा. अतुल सुनिता रामदास पोखरकर

महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल

Corresponding Author - ***प्रा. अतुल सुनिता रामदास पोखरकर***

DOI - 10.5281/zenodo.19659382

गोषवारा:

ब्रिटीशांच्या आगमनाचा काळ आणि भारतीय सामाजिक सुधारणांचा काळ हा एक सारखाच आहे. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने १८१८ मध्ये पेशवाईची शेवट करून महाराष्ट्रासह संपूर्ण भारतावर आपली हुकुमत लागू केली. येथील न्यायव्यवस्था, महसुली व्यवस्था व प्रशासकीय धोरण ठरविण्याचा अधिकार त्यांना मिळाला. भारतात प्रशासकीय सुधारणा करत त्यांनी येथील सामाजिक सुधारणांमध्ये देखील करण्यावर भर दिला. देशातील अज्ञान, अंधश्रद्धा, सतीची चाल, बालविवाह, विधवा विवाहाला विरोध, स्त्री शिक्षणापासून वंचित अशा विविध समस्या सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या या सकारात्मक दृष्टीला अनेक भारतीय समाजसुधारकांनी पाठींबा दिला. यामध्ये राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, नानाशंकर शेठ, न्यायमूर्ती रानडे, पंडिता रमाबाई, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, गोपाळ कृष्ण गोखले, गणेश वासुदेव जोशी, गणेश आगरकर यांचे योगदान होते. या सर्व समाजसुधारकांनी सामाजिक परिवर्तनासाठी अनेक सामाजिक संस्था स्थापन केल्या. प्रार्थना समाज, ब्राम्हो समाज, आदिब्राम्हो समाज, आर्य समाज, परमहंस मंडळी, रामकृष्ण मिशन या सारख्या संस्थांनी भारतीय समाजात नवचेतना जागृत केली. सामाजिक वर्णव्यवस्था, स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह या सारख्या प्रश्नांना त्यांनी ऐतिहासिक दाखले देत प्राचीन काळातील सामाजिक परिस्थितीचे अनुकरण करण्यास प्रवृत्त केले. यात प्रामुख्यांने समाजातील उच्चवर्णीय सनातनी वर्गाने स्थापन केलेल्या संस्थांचे प्रमाण अधिक होते. ज्यांचा पाया हा विशिष्ठ धर्माच्या मुळाशी एकनिष्ठ होता. परंतु १९ व्या शतकाच्या अंता समयी सत्यशोधक समाज नावाची एक संस्था स्थापन झाली जिने येथील धार्मिक श्रद्धा व रूढी परंपराखाली होणाऱ्या अत्याचाराला फक्त वाचा न फोडता त्याला पर्यायी व्यवस्था निर्माण करून दिली. सामाजिक सुधारणांसोबत शैक्षणिक सुधारणा व राजकीय सुधारणा देखील करण्यावर भर दिला. या सत्यशोधक समाजाविषयी हा शोधनिबंध सादर करत आहे.

बीज शब्द: सत्यशोधक समाज.

प्रस्तावना:

युरोपातील प्रबोधन चळवळीने १४ व्या शतकात औद्योगिक क्रांतीचा शोध लावला. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या जोरावर युरोपियन भारतात सह विविध खंडांवर जाऊन पोहचले. वसाहती निर्माण करून तेथील प्रशासनावर आपला अंकुश निर्माण केला. तेथील जनतेचे व प्रदेशाचे आर्थिक शोषण करत असताना त्यांच्यात अनेक सामाजिक बदल घडविण्याचे काम त्यांनी केले. ज्या प्रदेशात प्रत्येक्ष हस्तक्षेप करणे शक्य होत नसे येथील सुधारकांना कायद्याचे संरक्षण देऊन सामाजिक सुधारणा त्यांनी घडविल्या. महाराष्ट्रसह भारतात सामाजिक सुधारणा करण्यामध्ये सत्यशोधक समाजाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. मानवमुक्ती, एकमयलोक, स्वावलंबन, शोषणमुक्त समाजनिर्मितीहेतुने अनेक बैठकांमधून झालेल्या चर्चेतून सत्यशोधक समाजाची स्थापना बुधवार, दिनांक २४ सप्टेंबर १९७३ रोजी पूर्व पुण्यातील वेताळपेठेत करण्यात आली.[१] महात्मा फुले व

त्यांच्या अनुयायी प्रत्येक शनिवारी एकत्रित येऊन विविध सामाजिक विषयांवर चर्चा करत असे. तत्कालीन काळात समाजातील एका विशिष्ठ वर्गाने सामाजिक चौकट प्रचंड क्लिष्ठ केली होती. याला विरोध करणारे अनेक उच्चवर्णीय समाजसुधारक प्रयत्न करत होते. परंतु प्रत्येक्ष सामाजिक दुजाभाव व अस्पृश्याची वागणूक अनुभवलेले महात्मा फुले यांच्या सामाजिक सुधारणांचे प्रयत्न जास्त मूलगामी ठरले.

शोधनिबंधाचे उद्दिष्ट :

1. महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणांमधील सत्यशोधक समाजाचे महत्त्व समजावून सांगणे.
2. इतर सामाजिक संस्था व सत्यशोधक समाज यांच्यातील मुलभूत फरक स्पष्ट करणे.
3. सत्यशोधक समाजाचे व्यापक स्वरूप स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती :

ऐतिहासिक संशोधन पद्धती, विश्लेषणात्मक संशोधन पद्धती संशोधन पद्धतीचा उपयोग करून हा शोधनिबंध सादर केला आहे.

सत्यशोधक समाजाचे स्वरूप:

१८७३ मध्ये साठ अनुयायांच्या उपस्थितीत अनौपचारिक व सध्या पद्धतीने सत्यशोधक समाजाची स्थापना झाली होती. थोडेफार शिकलेले बहुजन समाजाचे हे संघटन होते. सुरुवातीच्या काळापासूनच या संघटनेला कष्टकरी व शेतकरी वर्गाचा चेहरा लाभलेला होता. पुण्याच्या पश्चिमेला असणाऱ्या सनातनी पगडीवाल्यांच्या विरोधात पूर्व पुण्यातील फेटेवाल्यांचे हे एकीकरण होते. हा लढा पेहरावधारी नसून अनेक वर्ष वैचारिक गुलामगिरी करून अन्याय करण्या वर्गाविरुद्ध अन्याय सहन करण्याऱ्या वर्गाने उभारलेला हा लढा होता. एका बाजूला पिढ्यांपिढ्या अन्याय करणारा बुद्धीजीवी सनातनी वर्ग व एका बाजूला शैक्षणिक मागासलेपण असल्यामुळे अन्याय सहन करणारा शुद्र व अतिशूद्र वर्ग होय. हा पेच सोडविण्यासाठी सत्यशोधक समाज स्थापन झाला आहे.

सत्यशोधक समाजाची तत्वे :

१. सर्व मानव समान असून एकाच ईश्वराची लेकर आहेत. ईश्वर हा सर्वांचा मायबाप आहे. ईश्वर हा निर्विकार असून तो निर्मिक आहे.
२. ईश्वर हा 'क्रियेटर' निर्मिक असून, लेकराच्या व ईश्वराच्या मध्ये मध्यस्थाची गरज नाही. थोडक्यात पुरोहित संस्थेची आवश्यकता नाही.
३. जो नियमित वर्गणी देईल आणि उपरोक्त तत्वे मान्य करील त्याला सत्यशोधक म्हणता येईल.[२]

सुरुवातीच्या काळात महात्मा फुले यांची सत्यशोधक तत्वे मांडलेली कोठेही लिखितस्वरुपात असावी काळानुसार ती गहाळ झाली किंवा त्यात बदल होत गेला. वरील तत्वे १७ एप्रिल १९११ रोजी बालीवाला थिएटर, भवानी पेठ, पुणे येथे भरलेल्या प्रथम सत्यशोधक अधिवेशनाच्या ठराव सत्रात ही तत्वे मान्य करण्यात आली.[३]

सत्यशोधक समाजाचे कार्य :

पुरोहितशाहीला विरोध : आधुनिक भारताच्या इतिहासात स्थापन झालेल्या अनेक संस्थामध्ये सत्यशोधक समाज ही संस्था प्रामुख्याने पुरोगामी संस्था होती. ज्यांनी येथील सनातनवादी विचारधारेला आपल्या सामाजिक कृतीतून फटकारले. महात्मा फुले यांनी स्थापन केलेली ही संस्था पुरोहितवादाच्या विरोधात होती. कारण सत्य हे आहे की, पुरोहित अथवा मध्यस्थ अथवा दलाल हटविणे हे सत्यशोधक समाजाचे प्रथम आणि अंतिम ध्येय आहे. अशा प्रसंगी पुरोहिताची जात पाहिली जात नाही. पुरोहित तो पुरोहितच. त्याला हटविणे हे समजाचे ध्येय होते.[४] एका

सत्यशोधक लग्नप्रसंगी पुरोहित वर्गाला पाठीशी घातले म्हणून महात्मा फुले यांनी तळेगाव ढमढेरे येथील पुरोहित विठोबा भुजबळ यांना अत्यंत शेलक्या भाषेत फैलावले होते. स्वतःचे धार्मिक कार्य स्वतः करावे, या समाजाच्या नियमानुसार जोतीरावांनी कार्तिक महिन्यात स्वतः तुळशीचे लग्न लावले. समाजाच्या वतीने ही लग्ने १८७३ सालच्या कार्तिक शुद्ध १२ रोजी लागली.[५]

शेतकरी प्रश्न : महात्मा फुले हे स्वतः एका शेतकरी कुटुंबातील होते. शेतकरी वर्गावर होणारा अन्याय त्यांनी जवळून पाहिला होता. सत्यशोधक समाजाची स्थापना होताच, शेतकरी समाजाचा पोशिंदा जाणून, त्यांनी या उपेक्षित घटकाला नायक केले. त्यांच्या दुखाचे चौपदरी शाब्दिक चित्रण 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात केले आहे. ज्योतिष, नक्षत्र, भविष्यवाणी याचा आधार घेऊन शेतकरी वर्गाची लुट करणारा भट्टशाही वर्गाचे कारस्थाने 'तृतीय रत्न' या नाटकात महात्मा फुले यांनी दाखविले आहे. सावकाराकडून शेतकऱ्यांची अतोनात लुट होत असे. शेतकरी वर्गाला कर्जस्वरुपात मदत करून त्यांच्याकडून व्याजाच्या नावाखाली दुप्पट-तिप्पट पैसे लुट असे. कर्जाची परतफेड न झाल्यास त्या शेतकऱ्याची जमीन हडप करत असे. त्यावेळी शेतकरी वर्गाची बाजू मांडण्यासाठी सत्यशोधक समाजाने तमाशे किंवा जलसे यांचा आधार घेतला. जेव्हा तमाशे खेडेगावात येत तेंव्हा त्यांना गावातील प्रतिष्ठित मराठा शेतकऱ्यांकडून बऱ्याच वेळा पाठिंबा मिळत असे. उदाहरणार्थ त्यांची उतरण्याची व जेवणाची सोय ग्रामप्रमुखांकडून होत असे.[६] या तामाशांमध्ये किंवा जलस्यांमध्ये सर्वसामान्य शेतकरी वर्गाची लुट करणारा सावकार किंवा जमीनदार हा खलनायक दाखवला जात असे. त्याच्याविरुद्ध एखादा तरुण शेतकरी बंड करतो. असे वगनाट्य दाखवून शेतकरी वर्गाच्या असंतोषाला वाचा फोडण्याचे काम केले जात असे.

नाव्ह्यांचा संप : डोक्यावरील केस हे स्त्रियांचा नैसर्गिक अलंकार आहे. स्त्रीचे सौंदर्य केसांनी अगदी खुलून दिसते. परंतु सनातनी विचारांच्या कर्मठ लोकांकडून स्त्रियांच्या या अलंकाराला बाधा पोहचविण्याचे काम केले गेले. जर एखाद्या स्त्रीचा पती निधन पावला तर तिला केशवपन करणे बंधनकारक होते. तत्कालीन काळात या प्रथेविरुद्ध अनेक वृत्तपत्रात टीका झाली. स्त्रियांच्या भावनेशी खेळली जाणारी ही कुप्रथा बंद करण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. परंतु योग्य तो तोडगा निघत नव्हता. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या मध्यातामून मुंबई येथील एल्फिन्स्टन माध्यमिक शाळेच्या पाठीमागे १४ एप्रिल १८९० रोजी एक सभा झाली. या न्हाव्यांच्या सभेचे अध्यक्षस्थान सदोबा कृष्णाजी न्हावी यांनी भूषवले. एक हजार न्हावी उपस्थित असलेल्या जाहीर सभेला अनेकांनी मार्गदर्शन केले. शेवटी एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी ठराव सभेने पारित केला.ठराव म्हणतो, 'यापुढे कोणीही नव्याने विधवेचे केशवपन करू नये.'[७] या न्हाव्याच्या सभेचे दखल लंडन मधील सर्व स्त्रियांनी घेतली व न्हावी समाजाचे कौतुक केले.

स्त्रियांना देवता म्हणून पूजन करता व त्याच स्त्रियांचा आदर न राखता चुकीच्या प्रथा परंपरा त्यांच्यावर लादणाऱ्या समाजाच्या श्रीमुखात लावलेली वैचारिक क्रांतीची ती एक चपराक होती. हे या कृतीतून प्रतीत होते.

सत्यशोधक समाजातील क्रांतिकारक घटना:

वयाच्या ६० व्या वर्षी महात्मा फुले यांना पक्षघाताच्या आजाराने जर्जर झाले. आजारपणा पूर्वी महात्मा फुले यांनी आपल्या स्वखर्चाने अनेक समाजिक कामे केली. ओतूर येथील दुष्काळात महात्मा फुले यांनी आपली वडिलोपार्जित जमीन विकून पैसे पुरवले. परंतु त्यांना आजारपणात खर्च करण्यासाठी पैसे राहिले नाही. अशा या आर्थिक अडचणीत डॉ.विश्राम रामजी घोले यांनी विनामुल्य औषधोपचार केले. या आजारात त्यांचे शरीर

एवढे पूर्णतः खचले होते. यात त्यांचे २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. त्याचा अंतविधी दत्तकपुत्र यशवंत याने करण्याला कुटुंबीयांनी विरोध केला. कारण त्याकाळात मुखाग्नी देणाऱ्या व्यक्तीला मृत व्यक्तीच्या संपत्तीचा वारसा मिळत असे. यामुळे त्यांचे कुटुंबीय हट्ट करत होते. तेव्हा एक सत्यशोधक क्रांतीचा इतिहास घडला.प्रथेच्या व परंपरेच्या थडग्याला ठोकर मारून आपले डोंगराएवढे दुःख सावरून सावित्रीबाई पुढे सरसावल्या. क्रांतीबांच्या तिरडी पुढे टिटवे (गाडगे) धरले.एका हाताना शिकाळे, यशवंत तर दुसऱ्या हाताला पुतण्या गजाननाला घेऊन क्रांतीमां ध्यार्याने मार्गक्रमण करत होत्या.[८] भारताच्या हजारो वार्षाच्या इतिहासात, आव्हानात्मक परिस्थितीत एका स्त्रीने पतीच्या शवाला अग्नी देण्याचा हा पहिलाच प्रंसग असावा.[९]

सत्यशोधकी वृत्तपत्र :

सत्यशोधक विचारांना गती मिळावी म्हणून सत्यशोधक समाजाच्या अनुयायांनी आपले विचार वृत्तपत्रांमधून वाचा फोडली. दीनबंधू पत्रामार्फत अस्पृश निवारण व शेतकरी वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. 'शेतकऱ्याचा कैवारी' हे वृत्तपत्र देखील सत्यशोधक समाजाचे विचार पोहचविण्याचे काम करत होते. दिनबंधुचे मुंबई प्रांताचे काम कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे पाहत होते. तत्कालीन काळातील गिरणी कामगारांचे अनेक प्रश्न त्यांनी या वृत्ताचे शस्त्र म्हणून वापर करून सोडवले. समाजातील अस्पृशता नष्ट व्हावी. तसेच बहुजन समाज वैचारिक गुलामगिरीतून मुक्त व्हावा हा विचार सत्यशोधक समाजाने वृत्तपत्रांमधून पोहचविण्याचे कार्य केले.

निष्कर्ष :

आधुनिक भारताच्या इतिहासात अनेक सामाजिक संस्था सामाजिक कार्यात व समाजसुधारणांमध्ये अग्रसर होत्या. परंतु बहुजनांनी नेतृत्व केलेली सत्यशोधक समाज ही पहिली व १९ व्या शतकातील एकमेव संस्था होती. सत्याचे शोधन करून त्यावर विश्वास ठेवणे हा नवा दृष्टीकोन या समाजाने दिला. पुराणातील अनेक कथा यांचा योग्य अर्थ लावून त्यातील मिथक कथा सांगून हा भट वर्ग कसा सर्वसामान्य बहुजन वर्गाची लुट करतो याचे स्पष्टीकरण आपल्या साहित्य लेखनांतून महात्मा फुले यांनी समाजाला करून दिले. तत्कालीन काळातील सत्यशोधक समाज ही संस्था सामाजिक परिवर्तनातील वाटसरू ठरला. बाल हत्या, विधवा विवाहाला विरोध, केशवपन प्रथा, मानसिक गुलामगिरी या सर्वांना अग्रभागी धरून सत्यशोधक समाजाने कार्य केले आहे. त्यामुळे आजचे सामजिक अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत. असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही.

संदर्भ :

१. जी.ए.उगले, सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, २०२२, पृ. १४.
२. हरी नरके, आम्ही पाहिलेले फुले, म. फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, पृ. ५२.
३. जी.ए.उगले, सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास, उपरोक्त, पृ. १६०.
४. कित्ता, पृ. २२.
५. हरी नरके, आम्ही पाहिलेले फुले, उपरोक्त, पृ. ५२.
६. गेम ऑमव्हेट, भाषांतर-पी. डी. दिघे, वाहसातिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५, २२९.
७. जी.ए.उगले, सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास, उपरोक्त, पृ. २०२.
८. कित्ता, पृ. २०८.
९. सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तुत्व, पृ.१८१.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महात्मा फुले यांच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता

प्रा. जमदाडे निलेश प्रकाश

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

Corresponding Author - प्रा. जमदाडे निलेश प्रकाश

DOI - 10.5281/zenodo.19659403

प्रस्तावना:

महात्मा ज्योतिबा फुले यांचे जीवन आणि कार्य महान आहे. सर्वच क्षेत्रातत्यांचे कार्य वंदनीय असेच आहे. या कार्यकर्तृत्वाचा ठसा त्यांनी आपल्या कृतीतून सर्वांना दिला आहे. मात्र त्यांनी केलेल्या सत्यशोधक समाज स्थापना व कार्य आज जगासाठी आदर्श आहे. फुले यांची वैचारिक क्षमता अनमोल होती. सत्याचा शोध घेणे हेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा मुख्य उद्देश्य होता. सत्य शोधक समजातूनच एक आदर्श समाजाची निर्मिती होऊ शकते हे त्यांनी ओळखले होते. त्यांच्या दृष्टीतून आदर्श समाजाची संकल्पना म्हणजे धर्मनिरपेक्ष, जाती निरपेक्ष पंथनिरपेक्ष असा समाज होय. सामाजिक सद्भावना आणि सलोख्यातूनच हे शक्य आहे हे ही त्यांनी ओळखले होते. या सलोख्यातून मानवीयता या संकल्पनेचे संगोपन होईल आणि एक आदर्श भारत देश उद्यास येईल अशी त्यांची भावना होती याच प्रेरणेतून त्यांनी सर्वात प्रथम जे कार्य केले ते खूपच आगळे वेगळे असे होते. तत्कालीन समाजाचा विरोध सहन करून त्यांनी स्त्री शिक्षणाचे बीज पुण्यात रोवले. पुण्यात स्त्री शिक्षणासाठी पहिली शाळा काढली. शिक्षण हे असे शस्त्र आहे की ज्याच्यामुळे मनुष्याचे जीवन उंचावते अज्ञान प्रशिक्षण अंधश्रद्धा हे भारतीय समाजास अशोभनीय असे कलंक लागलेले आहेत आणि ते पुसून काढण्यासाठी सत्य शोधक समजाची गरज आहे. जर सर्व समाज शिकला नाहीत तर भारत आणखी मागे जाईल यात शंका नाही. त्यांनी या संदर्भात लिहून ठेवले आहे-

विद्या विना मती गेली, मती विना नीती गेली,
निती विना गती गेली, गती विना वित्त गेले,
वित्त विना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.

किती सुंदर आणि सुरेख विचार महात्मा ज्योतिबा फुले यांनी व्यक्त केलेले आहेत. मती (बुद्धी), नीती (चांगली मूल्य), गती (प्रगती), वित्त (अर्थ) सर्व गोष्टी गेल्यानेच शूद्र दिन-हिन, पद-दलित झाले आहेत. दलितांच्या सर्व स्थिती मागे शिक्षणाची मोठी भूमिका आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्पष्ट म्हणणे होते की अशीक्षितपणामुळेच शूद्रांची स्थिती भयावह अशी झाली आहे. परिवर्तनाचा सहज उपाय म्हणून त्यांनी प्रथमतः त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले. यानंतर सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा वसा हाती घेतला. परिणाम आज आपणा सर्वांसमोर आहे. इतकेच नव्हे तर संपूर्ण जगाला सुद्धा हे माहीत आहे. महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री जीवनास कलाटणी दिलेली आहे.

विषयाचे महत्त्व आणि निवड:

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात समाज क्रांतीचे जनक म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांना अग्रभागी स्थान प्राप्त झाले आहे. कारण बोते. आधुनिक महाराष्ट्राची जडण-घडण म. फुले यांच्या पासून सुरु होते. धर्म परंपराचे जोखड घेऊन चालणाऱ्या काळातच म. फुले यांच्या रुपाने एक महान समाजसुधारक जन्माला आला. महाराष्ट्राच्या समाज आणि धर्म सुधारणा चळवळीच्या इतिहासात म. फुले यांच्या पासून एका नव्या प्रवाहाची सुरुवात झाली. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला सामाजिक, धार्मिक, व आर्थिक स्थिती एखादया थंड गोळयासारखी निर्जीव बनली होती. त्यावेळी ज्या काही थोर महापुरुषांनी समाजाच्या या थंड गोळ्याला सचेतन करुन जागृती आणली त्यात म. फुले यांचे नाव आग्रभागी येते. सामान्य जनतेच्या दुःखाला त्यांनी वाचा फोडली.सत्यमेव जयते या दिव्य तत्वाचा पुरस्कार करुन, स्वतः आचरुन त्यांनी एक आदर्श निर्माणकेला. त्यामुळेच त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर म्हणून ओळखले जाते. तत्कालीन समाजात सामाजिक विषमता, अस्पृश्यता, अंधश्रध्दा, अनिष्ठ चालिरिती शिगेस पोहचल्या होत्या. हिंदू समाजातील ब्राह्मणवर्गाच्या सामाजिक व धार्मिक अन्यायाने बहुजनसमाज भरडला जात होता. हा समाज दीन अवस्थेत आपले जीवन जगत होता. धर्माच्या गोंडस नावाखाली अनेक अनिष्ठ प्रथा ठाण मांडून बसल्या होत्या. अशा परिस्थितीत समाजामध्ये जागृती करुन त्यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचे प्रयत्न म. फुले यांनी केले. यासाठी त्यांनी केलेले कार्य फारच महान होते. समाजपरिवर्तनासाठी म. फुले यांनी सामाजिक प्रश्नांच्या मुळाशी जाऊन घाव घातला. ते एक बंडखोर विचारांचे सुधारक होते. धार्मिक विषमतेविरुध्द बंड करणारे व धार्मिक सहिष्णूतेच्या काढून मूल्यांसाठी प्रयत्न करणारे अनिष्ठ चालीरिती शिगेस पोहचल्या होत्या. महात्मा फुले यांचे सत्य शोधक समाजाचे कार्य सर्व अभ्यासकांच्या पर्यंत पोहोचवण्यासाठी सदरचा पेपर केला आहे.

संशोधनाची वैशिष्ट्ये:

१. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या कार्याचा आढावा घेण्यात येईल.
२. महात्मा फुले यांनी अस्पृश्यता निवारण संदर्भातील योगदान स्पष्ट करण्यात येईल.
३. महात्मा फुले यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात येईल.
४. महात्मा फुले यांनी निर्माण केलेल्या ग्रंथांचा अभ्यास करण्यात येईल.
५. महात्मा फुले यांनी महिलांसाठी निर्माण केलेल्या शाळांचा अभ्यास करण्यात येईल.
६. महात्मा फुले यांचे इतर क्षेत्रातील कार्यांचा आढावा घेण्यात येईल.
७. महात्मा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या गुरु शिष्यांच्या दरम्यानच्या कालखंडाचा अभ्यास करण्यात येईल.

सत्यशोधक समाज आणि महात्मा फुले:

सत्यशोधक समाज ही महात्मा जोतिराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यात स्थापन केलेली सामाजिक सुधारणा चळवळ होती. तिची मुख्य तत्त्वे सामाजिक समानता, एकेश्वरवाद आणि अंधश्रद्धेविरोधी विचारांवर आधारित होती. सत्यशोधक समाजाची प्रमुख तत्त्वे अशी होती ईश्वर एक आहे, ईश्वर सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार आणि सत्यरूप आहे. सर्व मानवजात त्याची लेकरे आहेत.भक्तीचा प्रत्येकाला अधिकार, ईश्वराची भक्ती करण्यासाठी पुरोहित किंवा मध्यस्थाची गरज नाही.समानता आणि शिक्षण: सर्व जाती-धर्मांना सभासद होण्याचा

अधिकार; शूद्र-अतिशूद्रांसाठी शिक्षण आणि जागृती.सभासद शपथसभासदांना अशी प्रतिज्ञा घ्यावी लागत असे:सर्व मानव एकाच देवाची लेकरे आणि माझी भावंडे आहेत, अशा बुद्धीने वागेन.धार्मिक विधींमध्ये मध्यस्थ ठेवणार नाही.मुलामुलींना सुशिक्षित करेन.घोषवाक्य'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ॥' हे समाजाचे घोषवाक्य होते, जे पुरोहितशाहीविरोधी भूमिकेचे प्रतीक आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचे कर्तृत्व संक्षेपामध्ये जाणून घेण्यापूर्वी त्यांचे जीवन व परिचय येथे पाहूयात.महात्मा ज्योतिराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि सामाजिक अन्याय दूर करून समानतेवर आधारित समाज निर्माण करणे हे होते.

१) जातिभेदाविरुद्ध लढा: ब्राह्मणश्रेष्ठत्व आणि जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेला विरोध केला. सर्व मानव समान आहेत, हा विचार समाजात रुजवला. शूद्र-अतिशूद्रांना स्वाभिमान व हक्कांची जाणीव करून दिली.

२) शिक्षणाचा प्रसार: मुलींसाठी व मागासवर्गीयांसाठी शाळा सुरू केल्या. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे, हा संदेश दिला.स्त्रीशिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांचे मोठे योगदान होते.

३) धार्मिक सुधारणांचे कार्य: कर्मकांड, अंधश्रद्धा आणि मूर्तिपूजेला विरोध केला.साध्या पद्धतीने विवाह (सत्यशोधक पद्धत) सुरू केले. देव-धर्माच्या नावाखाली होणारे शोषण थांबवण्याचा प्रयत्न केला.

४) स्त्रीउद्धाराचे कार्य: विधवा विवाहाला प्रोत्साहन दिले.बालविवाहाला विरोध केला. स्त्रियांना शिक्षण व समान हक्क मिळावेत यासाठी प्रयत्न केले.

५) शेतकरी व कामगार हित: शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या.अन्यायकारक करप्रणाली व सावकारशाहीविरुद्ध आवाज उठवला सत्यशोधक समाजाने सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार आणि स्त्रीउद्धार यांसाठी मोठे कार्य केले. या चळवळीमुळे महाराष्ट्रात सामाजिक जागृती निर्माण झाली आणि पुढील सुधारणा चळवळींना दिशा मिळाली.

महात्मा ज्योतिबा फुले यांचा परिचय:

महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल, १८२७ रोजी एका शेतकरी कुटुंबामध्ये झाला. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कडगुण हे आहे. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव फुले व आईचे नाव चिमणाबाई होते. गोरे हे त्यांचे उपनाव होते. फुले विकण्याचा त्यांचा पारंपारिक व्यवसाय असल्याने त्यांचे उपनाव फुले असे पडले. ज्योतिराव यांचे जीवन संघर्षाने व्यापलेले होते. त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू समाज होता. महात्मा ज्योतिबा फुले हे अत्यंत संयमी व्यक्तिमत्व असल्याने आपल्या जीवनावर झालेल्या आघातांचा त्यांनी कधीही विरोध केला नाही. किंबहुना आपल्या संघर्षाबद्दल कोठेही वाचता केली नाही. त्यांचे कार्य अतुलनीय असे आहे पाखंडी समाजाने त्यांच्यावर केलेल्या वाईट कृत्यांचा त्यांनी कधी निषेध केला नाही. त्यांचे एकूणच सर्व क्षेत्रातील कार्य हे अनेक पिढ्यांना मार्गदर्शक असे ठरणार आहे त्या कार्याचा संक्षिप्त आढावा इथे देण्यात येत आहे.

महात्मा फुले यांचे महीला विषयी कार्य:

१ . स्त्री शिक्षण:

महात्मा फुले यांनी स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी १८४८ च्या ऑगस्ट महिन्यात आपले जिवलग मित्र सदाशिवराव गोवांडे यांच्या मदतीने पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा स्थापन केली. स्त्री शिक्षणासाठी शाळा काढणारे भारतातील व आधुनिक महाराष्ट्रातील ते पहिले समाजसुधारक होय सनातन

वृत्तीच्या लोकांना त्यांनी आव्हान दिले. ज्योतिराव फुले यांना शाळा बंद करण्यासाठी अनेक बाजूने दबाव टाकला. मात्र महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी आपले कार्य चालूच ठेवले. बुधवार पेठेतील अण्णासाहेब चिपळूणकर यांच्या वाड्यात जुलै १८५१ साली दुसरी मुलींची शाळा उघडले. याच वर्षात रस्ता पेठेत तिसरी मुलींची शाळा सुरू केली. १८५२ साली वेताळ पेठेत चौथी मुलींची शाळा सुरू केली. महात्मा फुले यांचे कार्य पाहून इंग्रज सरकारने १६ नोव्हेंबर १८५२ रोजी पुण्यातील विश्रामबाग वाड्यात त्यांचा सत्कार केला.

२. विधवा पुनर्विवाह:

हिंदू धर्मात बालहत्या नरबली केशवपण अस्पृश्यता मूर्ती-पूजा अशा अनेक दृष्ट प्रथा होत्या. त्या बंद व्हाव्यात म्हणून इंग्रजांनी अनेक कायदे तयार केले. इंग्रज सरकारने 1856 साली विधवा पुनर्विवाहाचा कायदा पास केला यासाठी महात्मा फुले यांनी पुढाकार घेऊन 1864 साली पुण्यातील पोकलेन च्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला

३. बालहत्या प्रतिबंधक गृह:

तत्कालीन हिंदू समाजामध्ये बालविवाहाची प्रथा होती मुला-मुलींचे विवाह लहानपणी होत होते. काही वेळा साथीच्या रोगाने पती मरण पावल्यानंतर लहान तरुण विधवा महिलेवर जीवन जगण्या उघडून जात होते या तरुण विधवा कोणाच्यातरी वासनेला बळी ठरत असत त्या गरोदर राहिल्यानंतर आत्महत्या केल्याशिवाय त्यांच्या पुढे पर्यावरण होता त्यासाठी महात्मा फुले यांनी स्वतःच्या खर्चातून आपल्या वाड्याशेजारी नवीन वाडा बांधला. त्या वाड्याला बालहत्या प्रतिबंध गृह असे नाव दिले. त्यासाठी त्यांनी संपूर्ण पुण्यामध्ये भित्तीपत्रके तयार केले आणि सांगितले विधवांनो माझ्या घरी येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे मुलाला जन्म द्या. एवढे मोठे कार्य महात्मा फुले यांनी केले.

४. विधवेचा पुत्र दत्तक घेतला:

महात्मा फुले यांना मूल नव्हते. याची खंत महात्मा फुले यांच्या वडिलांना होती. त्यांनी दुसरे लग्न करावे असा दबाव त्यांच्यावर हो होता. मात्र ज्योतिबा यांनी दुसरा विवाह करण्यास स्पष्टपणे नकार दिला. बालहत्या प्रतिबंध गृहात 1873 मध्ये काशीबाई नावाच्या एका ब्राह्मण विधवेस मुलगा झाला. त्या मुलास त्यांनी दत्तक घेतले आणि त्या मुलाचे नाव यशवंत असे ठेवले. दोन्ही पती-पत्नींनी त्याचा संभाळ केला आणि यशवंतला डॉक्टर केले ज्योतिबा यांनी यशवंतराव वाचनाने मृत्युपत्र तयार करून ठेवले त्यांनी असे करून आपण जातीभेद मानणारे नाहीत हे पटवून दिले.

५. महात्मा फुले यांचे धार्मिक विचार:

महात्मा ज्योतिबा फुले हे कट्टर एकेश्वरवादी होते. तो सर्व चराचरात सामावलेला असून अशा परमेश्वराला अनन्यभावाने शरण जावे असे प्रतिपादन ज्योतिबा करतात. देव ही एक निर्गुण निराकार - निराकार अशी विश्वाची शक्ती आहे असे ते मानत. अवतार, कल्पना, आत्मसाक्षात्कार, दैवी प्रकोप इत्यादी गोष्टी ज्योतिबांना मान्य नव्हत्या. महात्मा ज्योतिबा फुले एक ईश्वर एक एक धर्म या तत्वाचा पुरस्कार करत मानवाचे धर्म नसावे अनेक निर्मिक तो एक। जोती म्हणे ।। कोणास न पिडी । कमावले खाई। सर्वा सुख देई । आनंदात ।। खरी हीच नीती । मानवाचा धनी बाकीचे अधर्म । जोती म्हणे ।। नवस, मंत्रतंत्र, व्रतवैकल्य, तीर्थयात्रा इ. गोष्टीस फुल्यांचा विरोध होता. जपाने, यज्ञाने पाऊस पडत नाही. मत्राने अपत्य प्राप्त होत नाही तसेच देवाला नारळ, कोंबडी, बकरी याच्या नैवेद्याची आवश्यकता नाही, असेही । त्यानी स्पष्ट केले. हिंदू धर्मातील अनेक गोष्टींना फुले पाखंडी म्हणतात. भटवर्गाने धर्माच्या नावाखाली शुद्रातिशुद्रांची फवसणूक तर केलीच, पण त्यांना लुबाडून

खाण्यासाठीच मुर्तीपूजा नावाचा कल्पित गृहाघोळही निर्माण केला, अशी परखड टीका ते आपल्या अखंडादि काव्यरचने मध्ये करतात. सर्व साक्षी जगत्पत्ती । त्याला नको मध्यस्थी। हे धार्मिक विचाराचे सुत्र असून ब्राह्मणामुळे धर्माला बाजारी स्वरुप प्राप्त झाले असे फुले म्हणतात.

६. म. ज्योतिबा फुले यांची ग्रंथसंपदा:

महात्मा ज्योतिबा फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते. ते एक चिंतनशी लेखक होते. सर्वसामान्य समाज, कष्टकरी वर्ग, शेतकरी व शुद्र समाज त्यांच्या लेखनाचा विषय होय. त्यांची दुःखे समाजासमोर मांडणे हा त्यांच्य ग्रंथलेखनाचा उद्देश असावा. महात्मा ज्योतिबा फुले यांची ग्रंथसंपदा पूड़ी प्रमाणे १) छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा २) ब्राम्हणाचे कसब गुलामगिरी ४) शेतकऱ्यांचा असूड ५) सार्वजनीक सत्यधर्म ६) तृत्तीय रत्न (नाटक) ७) सत्सार (नियतकालिक) ८) सत्यशोधक समाजोक्त मंगळाष्टकासह सर्व पुजाविधी ९) इशारा १०) अखंडादी काव्यरचना ११) अस्पृश्याची कैफियत

निष्कर्ष:

महात्मा ज्योतिबा फुले यांचे कर्तृत्व गुणगौरव करण्याचाही पलीकडे आहेत एक युगपुरुष म्हणून त्यांची ख्याती वर्णिली पाहिजे त्यांनी फक्त सामाजिक साहित्यिक आर्थिक राजकीय क्षेत्रातच नव्हे तर सांस्कृतिक क्षेत्रात सुद्धा परिवर्तन आणण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या संस्कृतीमध्ये मानवाला मानव म्हणून वागणूक दिली जात नव्हती ती संस्कृती फुल्यांना नको होती मनुष्या मनुष्यामध्ये वैरभाव निर्माण करणाऱ्या वृत्तींचा ते विरोध करत होते त्यांच्या समतावादी दृष्टिकोनास पाहून काही वाईट वृत्तींनी त्यांच्यावर इस्लाम व ख्रिस्त प्रभाव असल्याचे आरोप केले परंतु फुले यांना समजण्यास त्यांनी चूक केलेली दिसून येते कारण फुल्यांनी कधीही हिंदू धर्माचा विरोध केलाच नाही. मनुवादी विचारांचा त्यांनी विरोध केला. अ मानवीयतेचा त्यांनी विरोध केला. याच विचारधारेमुळे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना आपले गुरु मानले. त्यांचे विचार समतावादी आहेत ज्योतिबा काही सामान्य मानव नव्हते ते महामानव होते आधुनिक युगातील ते पहिले महात्मा आहेत यांचे कार्य खऱ्या अर्थाने प्रकाशमय आहेत. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपले सारे आयुष्य वरीलप्रमाणे शुद्रातिशद व शेतकरी, कष्टकरी याच्या कल्याणासाठी खर्च केले. दलिताच्या उध्दारासाठी झटणारा महात्मा ज्योतिबा फुले हा महाराष्ट्रातील पहिला समाजसुधारक होय अशा या महान नेत्यांचा ११ मे १८८८ रोजी मुंबई येथील कोळीवाडयातील सभागृहात जनतेने महात्मा ही पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. स्त्री शिक्षणासाठी, समानतेच्या हक्कासाठी, सत्य गोष्टींसाठी आपला देह खर्च केला आपले सर्व आयुष्य कनिष्ठ वर्गाच्या सेवेसाठी व्यतीत केले. सामाजिक सुधारणेच्या सर्व अंगना त्यांनी स्पर्श केला होता. समाजाला धार्मिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अतिशुद्रांच्या मुलींसाठी शाळा काढणारे पहिले भारतीय ज्योतिबा फुले होत. आधुनिक भारतातील स्त्री शिक्षणाचा जनक, भारतीय स्त्रीयांचे स्वातंत्र्य हयांचा उद्गाता, शेतकरी व कामगार हयांचे हक्कांसाठी लढणारा व जातिभेदावर हल्ला चढवून मानवी समानतेची घोषणा करणारा पहिला लोकता म्हणजे म. ज्योतिबा फुले. त्यांच्या कार्याचे वर्णन करताना धनंजय कीर म्हणतात, जोतिबांचे नाव ज्योती आणि जोती म्हणजे ज्योत. त्या ज्योतीने सामाजिक समता, मानवता आणि विवेकवाद यावर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा भार्ग दाखविला. त्यांचे उपनाव होते फुले आणि फुले म्हणजे फुलांचा धंदा करणारे फुलमाळी. या माळयाने राष्ट्ररुपी बागेतील सामाजिक एकतेच्या वाढीला

विरोध करणारी तणे, बांडगुळे उपटून फुल झांडची उत्तम जोपासना केली.

संदर्भ साधने:

१. कीर धनंजय, महात्मा जोतिराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक चौथे पुनर्मुद्रण, पॉप्युलर प्रकाशन मुबई.(१९६९)

२. साळुंखे पी. बी (संपा) महात्मा फुले गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई (१९८२).

३. नरके हरी (संपा) महात्मा फुले साहित्य आणि चळवळ महात्मा फुले चरित्र साधने समिती मुंबई (२००६) .

४. नरके हरी (संपा) महात्मा फुले समग्र वाडमय आणि चळवळ महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन मुंबई (२०१३).

५. फडके य. दि. महात्मा फुले समग्र बाडमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९८२)

६. ऑमबेट गेल वासाहतिक समाजातील सांस्कृतिक दंड, सुगावा प्रकाशन, पुणे (१९९५).

७. डॉ .भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय गणराज्याचे शशसन आणि राजकारण, प्रकाशक अशोक पिंपळापुरे, नागपूर दुसरी आवृत्ती, मार्च २०१०

८. वराडकर रघुनंदन घ .भारतीय शासन आणि राजकारण, प्रकाशक सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९९२.

९. डॉ .बी. आर. आबेंडकर जातिव्यवस्तेचे निर्मूलन डॉ .बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती २०१५

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महात्मा फुले यांची पत्रकारिता: बहुजन समाजाच्या आत्मभानाचा आवाज

प्रा. हरिप्रसाद विठ्ठल पवार

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय कवठे महांकाळ.

Corresponding Author - हरिप्रसाद विठ्ठल पवार

DOI - 10.5281/zenodo.19659428

प्रस्तावना:

आधुनिक भारताच्या इतिहासात सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत महात्मा फुले यांचे कार्य अत्यंत क्रांतिकारी ठरते. त्यांनी स्त्रिया व शुद्रातिशुद्रांचे शिक्षण, जातीव्यवस्थेस विरोध आणि ब्राह्मणवादी वर्चस्वाला दिलेले आव्हान या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. या व्यापक सामाजिक चळवळीचा एक आयाम म्हणजे त्यांची पत्रकारिता. फुल्यांची पत्रकारिता ही केवळ माहिती प्रसृत करणारे लेखन नसून ती बहुजन समाजाच्या आत्मभानाला जागृत करणारी आणि अन्यायाविरुद्ध संघर्षासाठी प्रेरित करणारी वैचारिक चळवळ होती.

सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध नियतकालिके, पत्रके आणि ग्रंथांचा प्रभावी वापर केला गेला. महात्मा फुले यांच्या लेखनात सामाजिक विषमता, धार्मिक अंधश्रद्धा, जातीय शोषण आणि स्त्रियांची दयनीय अवस्था यांचे तर्कशुद्ध विश्लेषण केल्याचे आढळते. फुलेंच्या पत्रकारितेचे उद्दिष्ट केवळ प्रचलित व्यवस्थेवर टीका करणे हे नसून बहुजन समाजाला स्वतःच्या स्थितीचे भान देऊन त्यांना संघटित करणे हे होते.

म. फुले यांच्या पत्रकारितेमध्ये तर्कशुद्धता, उपरोधक शैली, भाषेची लोकाभिमुखता, सामाजिक बांधिलकी यांचा संगम दिसतो. फुल्यांच्या विचारांचा प्रभाव पुढील काळात डॉ. आंबेडकरांच्यासारख्या विचारवंतांवर मोठ्या प्रमाणावर पडल्याचे दिसून येते. त्यामुळे फुले यांची पत्रकारिता ही काळाच्या सीमा ओलांडून भारतीय सामाजिक न्यायाच्या परंपरेचा पाया ठरली. त्यांच्या पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी उभा केलेला वैचारिक संघर्ष आणि त्यातून निर्माण झालेल्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा वेध घेणे गरजेचे आहे. महात्मा फुले यांची पत्रकारिता ही सामाजिक समतेच्या लढ्याचे प्रभावी शस्त्रागार ठरली. शिवाय ती पुढील काळातील सत्यशोधकांना मार्गदर्शक आणि दीपस्तंभ बनून राहिली.

उद्देश:

१. महात्मा फुले यांच्या पत्रकारितेचे स्वरूप, वैशिष्ट्ये आणि ऐतिहासिक महत्त्व यांचा अभ्यास करणे.
२. महात्मा फुले यांच्या पत्रकारितेचे सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांच्या संदर्भात पुनर्मुल्यांकन
करणे.
३. समकालीन वृत्तपत्रांशी तुलना करून फुले यांच्या पत्रकारितेच्या वेगळेपणाची वैशिष्ट्ये अधोरेखित करणे.

४. महात्मा फुलेंच्या लेखनातून मांडलेल्या स्त्रीशिक्षण, शेतकरी प्रश्न आणि शुद्रातिशुद्रांच्या हक्काविषयींच्या विचारांचा अभ्यास करणे.
५. महात्मा फुलेंच्या पत्रकारितेच्या माध्यमातून बहुजन समाजात आत्मभान आणि सामाजिक जागृती कशी निर्माण झाली याचा अभ्यास करणे.

एकोणिसाव्या शतकातील सामाजिक-राजकीय पार्श्वभूमी:

एकोणिसावे शतक महाराष्ट्राच्या इतिहासात संक्रमणाचे शतक मानले जाते. पेशवाईचा अस्त व ब्रिटिश सत्तेची स्थापना याच शतकात झाली. प्रशासन, न्यायव्यवस्था, शिक्षण व मुद्रण या क्षेत्रामध्ये नवे बदल घडू लागले. परंतु, सामाजिक संरचनेत मात्र जातीव्यवस्थेचे वर्चस्व कायम होते. ब्राह्मणवादी धार्मिक अधिसत्ता, कर्मकांड प्रधानता आणि वर्णाधारित सामाजिक श्रेणीकरणामुळे शुद्रातिशूद्र समाज राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात दुय्यम ठरला होता. ज्ञानसंपादनाची साधने ही मुख्यतः अभिजनांच्या तथा उच्चवर्णीयांच्या ताब्यात होती. परिणामी बहुतकरून क्षेत्रात बहुजनांचा आवाज व्यवस्थेने दाबला होता. मुद्रणयंत्राच्या प्रसारासोबत वृत्तपत्रे, नियतकालिके उदयास आली. परंतु आरंभीची बहुतेक पत्रे उच्चवर्णीयांच्या हितसंबंधांना अनुसरून होती. सामाजिक प्रश्नांची मांडणीही त्याच चौकटीत होत असे. फुल्यांचे चरित्रकार धनंजय कीर फुलेंच्या चरित्रात म्हणतात की, 'फुलेपूर्व महाराष्ट्रात राजसत्ता आणि धार्मिकसत्ता ब्राह्मणांच्या हाती असल्यामुळे केवळ ब्राह्मणांनाच धार्मिक ग्रंथ वाचण्याचा आणि पठण करण्याचा अधिकार होता. कनिष्ठ वर्गातील ज्या ज्या व्यक्तींनी पवित्र ग्रंथ पठणाचा प्रयत्न केला, त्या त्या व्यक्तींना महाराष्ट्रात जबरदस्त शिक्षा ठोठावण्यात आल्या.'

बहुजन समाजाच्या दैनंदिन प्रश्नांना म्हणजेच शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण, स्त्रियांची शिक्षणापासून वंचितता, अस्पृश्यतेची अमानुषता या प्रश्नांना पुरेशी जागा मिळत नव्हती. म्हणूनच पत्रकारिता हे माध्यम जरी उपलब्ध झाले तरी त्यात प्रतिनिधित्वाचा अभाव होता. या पार्श्वभूमीवर सामाजिक सुधारणांच्या विविध चळवळी सुरू झाल्या. उदा. विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण, दलितांना शिक्षण इत्यादी. परंतु या सुधारणा बहुधा मध्यमवर्गीय मर्यादेतच राहिल्या. ग्रामीण व श्रमिक समाजाच्या प्रश्नांना केंद्रस्थानी आणणारा व्यापक वैचारिक हस्तक्षेप आवश्यक होता. पत्रकारितेच्या माध्यमातून तो अवकाश निर्माण करणे ही तत्कालीन गरज बनली होती. नेमक्या याच ऐतिहासिक क्षणी महात्मा फुले यांच्यासारख्या विचारवंतांनी सामाजिक वास्तवाचे पुनर्मूल्यांकन केले. त्यांनी सामाजिक अन्यायाला धार्मिक आणि ऐतिहासिक वैधता देणाऱ्या सामाजिक प्रारूपांवर प्रश्न उपस्थित केले आणि ज्ञानाचे लोकशाहीकरण करण्याचा ध्यास घेतला. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक-राजकीय पार्श्वभूमी समजून घेतल्याशिवाय त्यांच्या पत्रकारितेचे क्रांतिकारी स्वरूप लक्षात येत नाही. म्हणून ही पार्श्वभूमी त्यांच्या विचारप्रणालीची मूलभूत चौकट प्रदान करते.

महात्मा फुले यांची वैचारिक जडणघडण व तिचा पत्रकारितेवरील प्रभाव:

महात्मा फुले यांच्या वैचारिक जडणघडणीमध्ये शिक्षण, वैयक्तिक अनुभव आणि पाश्चात्य उदारमतवादी विचारांचा मोठा वाटा होता. ख्रिस्ती मिशनरी शाळेत शिक्षण घेताना त्यांना समानता, मानवी हक्क आणि विवेकनिष्ठ विचारांची ओळख झाली. सामाजिक भेदभावाचा वैयक्तिक अनुभव हा त्यांना मित्राच्या विवाहाप्रसंगी झालेली अवहेलनेमुळे आला. त्यांच्या मनात जातिव्यवस्थेविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया निर्माण झाली. परंतु ही प्रतिक्रिया

नकारात्मक संतापापुरती मर्यादित न राहता ती बौद्धिक प्रतिकारात परिवर्तित झाली. ग. त्र्यं. माडखोलकर आपल्या 'समाजक्रांतीचा अग्रणी' या लेखात म्हणतात की, 'आपल्या एका ब्राह्मण मित्राच्या लग्नाच्या वरातीत ते ब्राह्मणेतर असल्याने त्यांचा जो उपमर्द करण्यात आला, त्याचा घाव त्यांच्या अगदी जिव्हारी बसून, ते हिंदूधर्माविरुद्ध आणि त्याहीपेक्षा त्यातील भटशाहीविरुद्ध बंड करावयाला उभे ठाकले.'

त्यांनी इतिहास, धर्मग्रंथ आणि समाजरचनेचे विश्लेषण तर्काच्या कसोटीवर केले. मानवमुक्ती हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. पत्रकारितेतून त्यांनी व्यक्त केलेले विचार हे केवळ भावनिक आवाहन नव्हते. त्यामागे ठोस सामाजिक विश्लेषण होते. पाश्चात्त्य विचारवंतांकडून प्रेरित झालेली समतेची संकल्पना त्यांनी भारतीय संदर्भात आणण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांना शिक्षण हे परिवर्तनाचे मूळ साधन वाटत होते. म्हणूनच त्यांनी स्त्रीशिक्षण व शुद्रातिशुद्रांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणाच्या अभावामुळे निर्माण होणारी गुलामी स्पष्ट केली. अज्ञान ही सामाजिक शोषणाचे प्रमुख कारण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यांच्या लेखनातून ज्ञानाचे लोकशाहीकरण करण्याची बांधिलकी स्पष्ट होते. त्यांच्या वैचारिक जडणघडणीचा पत्रकारितेवर परिणाम असा झाला की, त्यांनी लेखनाला सामाजिक जबाबदारीची जोड दिली. त्यांच्या पत्रकारितेत वैचारिक सुसंगती, नैतिकता आणि परिवर्तनाची दिशा स्पष्ट आढळते.

प्रा. गं. बा. सरदार त्यांच्या 'महात्मा फुले: जडणघडण' या लेखामध्ये उद्धृत करतात की, 'ग्रंथपांडित्यावर जोतीरावांचा मुख्य भर नव्हता. उलट सामाजिक जीवनातील भल्याबुऱ्या प्रवृत्तींचा अन्वयार्थ लावण्याच्या बाबतीत ते बहुतांशी स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवावरच विसंबून राहत. त्यांचा स्वभाव जात्याच चिंतनशील होता.'

सत्यशोधक समाज आणि पत्रकारिता:

सत्यशोधक समाज आणि पत्रकारिता यांचा परस्परसंबंध भारतीय सामाजिक इतिहासात अत्यंत महत्त्वाचा ठरतो. महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभा केली. या चळवळीच्या वैचारिक प्रसारासाठी आणि बहुजन समाजात जागृती निर्माण करण्यासाठी पत्रकारिता हे प्रभावी साधन ठरले. सत्यशोधक समाजाची विचारधारा आणि पत्रकारितेचे कार्य यामध्ये परस्परपूरक नाते दिसून येते. सत्यशोधक समाजाची स्थापना मुळात ब्राह्मणवादी वर्चस्व, जातीय विषमता, धार्मिक अंधश्रद्धा यांच्या विरोधात झाली. समाजाचे मुख्य उद्दिष्ट होते समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित समाज रचना उभारणे. या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी विचारांचा प्रसार आवश्यक होता. त्यामुळे पत्रकारिता ही सत्यशोधक समाजाचे वैचारिक माध्यम बनले आणि त्यामधून समाजाच्या विचारांचे प्रसारण करण्यात आले. पुढील काही सत्यशोधकीय नियतकालिके पहा-

१८८१- दामोदर सावळाराम यंदे आणि रामजी संतुजी आवटे यांचे '*शेतकऱ्याचा कैवारी*', १८८८- गणपतराव सखाराम पाटील यांचे '*दीनमित्र*', १८८९- मराठी आणि इंग्रजीमधून प्रसिद्ध होणारे '*अंबालहरी*', १९००- भास्करराव जाधव यांचे *'मराठा दीनबंधु*', १९१५- कृष्णाजी कर्काजी चौधरी यांचे '*सत्योदय'*, १९१७- वा. रा. कोठारी यांचे '*जागरूक*', १९१७- बडोद्याहून प्रसिद्ध होणारे भगवंतराव पाळेकर यांचे *'जागृति'*, १९१८-अण्णासाहेब लट्ठे यांचे '*डेक्कन रयत',* १९२०- सखाराम पांडुरंग सावंत यांचे *'तरुण मराठा'*, १९२१- बेळगाव येथून प्रसिद्ध होणारे '*राष्ट्रवीर'*.....ही यादी उदाहरणादाखल मोजक्याच

नियतकालिकांची देण्यात आली आहे. यावरून सत्यशोधक समाजाचा पुढील काळातील पत्रकारितेवर असणारा प्रभाव आपल्या लक्षात येतो.

सत्यशोधक नियतकालिकांचे व्यासंगी अभ्यासक प्रा. डॉ. अरुण शिंदे त्यांच्या 'सत्यशोधकीय नियतकालिके' या ग्रंथात दाखवून देतात की, १९१७ नंतर बदलत्या राजकीय परिस्थितीचे भान सत्यशोधकांना आले व त्यांच्यात राजकीय जाणिवा जागृत होऊ लागल्या. त्याचा परिणाम सत्यशोधक चळवळीच्या पुढील वाटचालीवर झाला. या काळात महाराष्ट्रातील बहुतांश तालुक्यांत व हजारो खेड्यांत सत्यशोधक चळवळ पोहोचली होती. ग्रामीण भागातील शेतकरी-कष्टकरी जनसमुदायाचे प्रबोधन, विचारजागृती व विधायक कार्यक्रम राबविले गेले.'

सत्यशोधक समाजाने केवळ सामाजिक प्रश्नांवरच नव्हे तर आर्थिक प्रश्नावरही भाष्य केले. पत्रकारितेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करण्यात आले. ग्रामीण भागातील लोकांच्या समस्यांना सार्वजनिक चर्चेत आणणे हे सत्यशोधक पत्रकारितेचे महत्त्वाचे कार्य होते.

सत्यशोधक समाजाच्या नावातच 'सत्यशोधन' ही संकल्पना आहे. सत्यशोधक समाजाचे मुख्य ध्येय बहुजन समाजात आत्मभान निर्माण करणे हे होते. पत्रकारितेच्या माध्यमातून शूद्र-अतिशूद्र, शेतकरी, स्त्रिया यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यात आली. लेखनातून त्यांनी स्पष्ट केले की, जातीभेद हा दैवी नसून मानवनिर्मित आहे. या विचारामुळे बहुजन समाजात स्वाभिमान आणि प्रतिकाराची भावना निर्माण झाली. अंधश्रद्धा, दैववाद, रूढी, कर्मकांड यांच्या विरोधात विवेकवादी दृष्टिकोन मांडण्यात आला. पत्रकारिता ही समाजातील चुकीच्या समजुतींना आव्हान देणारी आणि तर्कशक्ती वाढवणारी असावी असा समाजाचा आग्रह होता. सत्यशोधक समाजाच्या विचारधारेत स्त्रीमुक्तीला विशेष महत्त्व होते. पत्रकारितेच्या माध्यमातून बालविवाह, विधवाविवाह, विधवांचे हाल, स्त्रीशिक्षणाचा अभाव यासारख्या प्रश्नावर प्रकाश टाकण्यात आला. स्त्रीमुक्ती ही समाजमुक्तीशी जोडलेली आहे हा विचार सत्यशोधकांनी आपल्या पत्रकारितेतून सातत्याने मांडलेला दिसून येतो. सत्यशोधक समाजाने केवळ लेखनापुरते कार्य मर्यादित ठेवले नाही तर संघटनात्मक पातळीवरही बदल घडवून आणले. सत्यशोधक विवाह पद्धती, धार्मिक विधीतील ब्राह्मणांचे वर्चस्व नाकारणे या आणि तत्सम कृतींमुळे समाजात पर्यायी रचना निर्माण झाली. या कृतींचे महत्त्व पत्रकारितेद्वारे लोकांपर्यंत पोहोचवण्यात आले. त्यामुळे विचार आणि कृती यात सुसंवाद निर्माण झाला. सत्यशोधक समाज आणि पत्रकारिता यांचा संबंध हा भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. सत्यशोधक समाजाची विचारधारा पत्रकारितेच्या माध्यमातून व्यापक समाजापर्यंत पोहोचली. सत्यशोधक समाजाची पत्रकारिता ही केवळ विचारप्रणालीचे साधन नव्हे तर सामाजिक क्रांतीचे प्रभावी माध्यम ठरली.

भाषाशैली आणि अभिव्यक्तीची वैशिष्ट्ये:

महात्मा फुलेंच्या भाषाशैलीच्या संदर्भात प्रभाकर वैद्य आपल्या 'महात्मा फुले आणि त्यांची परंपरा' या ग्रंथामध्ये उद्धृत करतात की, 'फुल्यांची भूमिका प्रस्थापित ब्राह्मणी वर्चस्वाला उघड आव्हान देणारी असल्यामुळे, प्रस्थापित ब्राह्मणी ग्रंथभाषेत, संस्कृतप्रचुर डौलदार शैलीमध्ये लिहिण्याचा, ब्राह्मण प्रवक्त्याशी संवाद करण्याचा वा वाद जिंकण्याचा प्रश्नच त्यांच्या समोर नव्हता. कारण अशा वादाला समान अशी भूमीच फुल्यांच्या दृष्टीने उपलब्ध नव्हती. ज्याला नष्ट केले पाहिजे त्याच्याशी वाद संभवतच नाही. त्यामुळे फुल्यांनी ज्याक्षणी प्रस्थापितांविरुद्ध बंडखोरीचे आव्हान दिले, त्याच क्षणी प्रस्थापित संस्कृतप्रचुर भाषा, अलंकारिक शैली याच्याशीही संपूर्ण फारकत घेतली.' (पृ. क्र.३१३)

त्यांनी भाषेला केवळ साहित्यिक माध्यम न मानता सामाजिक परिवर्तनाचे शस्त्र मानले. त्यांच्या लेखनात साधेपणा, परखडपणा, उपरोध, लोकाभिमुखता आणि विवेकवादी दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. फुलेंनी संस्कृतप्रचुर, अभिजनवादी, क्लिष्ट भाषा न वापरता सर्वसामान्यांना समजेल अशी साधी, सोपी आणि प्रवाही भाषा वापरली. त्यांची भाषा ग्रामीण आणि बहुजन समाजाच्या बोलीशी जवळीक साधणारी होती. परिणामी त्यांचे लेखन केवळ सुशिक्षित वर्गापुरते मर्यादित न राहता व्यापक समाजापर्यंत पोहोचले. त्यांच्या पत्रकारितेत भीड, संकोच किंवा तडजोड आढळत नाही. त्यांनी ब्राह्मणवादी सत्ताकारणावर थेट व स्पष्ट शब्दात टीका केली. त्यांच्या लेखनात अन्यायाविरुद्ध संताप, नैतिक आक्रमकता व सत्यप्रतिपादनाची ठाम भूमिका दिसते.

ज्येष्ठ अभ्यासक स. गं. मालशे त्यांच्या 'महात्मा फुल्यांची भाषाशैली' या लेखात म्हणतात की, 'बोलीभाषेशी नाते सांगणारे १९व्या शतकातले एक समर्थ गद्यशैलीकार म्हणून महात्मा फुले यांचे स्थान मराठी गद्य लेखकांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण ठरते.' फुले यांच्या अभिव्यक्तीत उपरोध आणि व्यंग हे प्रभावी शस्त्र होते. त्यांच्या लेखनात संवादरूपी मांडणी बहुतांशी आढळते. प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात मांडलेले विचार वाचकाला थेट सहभागी करून घेतात. धार्मिक आणि सामाजिक प्रथांचे विश्लेषण करताना त्यांनी विवेकाला प्राधान्य दिले. त्यांच्या अभिव्यक्तीत वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सकता आढळते. त्यांनी सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनातील उदाहरणे, रूपके आणि प्रतिकांचा वापर केला. शेतकरी, श्रमिक, स्त्रिया यांच्या जीवनातील वास्तव त्यांच्या भाषेत प्रतिबिंबित होते. त्यामुळे त्यांच्या लिखाणाला कृत्रिमता नव्हे तर वास्तवाचा स्पर्श जाणवतो. महात्मा फुले यांच्या भाषेत सामाजिक बांधिलकीची जाणीव दिसून येते. अन्यायग्रस्त समाजाबद्दलची कळकळ त्यांच्या शब्दांतून प्रकर्षाने जाणवते. महात्मा फुले यांच्या अभिव्यक्तीमध्ये स्त्रियांच्या प्रश्नाबाबत अधिक संवेदनशीलता दिसून येते. त्यांच्या भाषेत स्त्रियांविषयी सहानुभूती नव्हे तर समानतेचा आग्रह आहे. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे आवाहन त्यांच्या अभिव्यक्तीत ठळकपणे दिसते. फुले यांच्या पत्रकारितेत विचारांची स्पष्ट दिशा आहे. समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांभोवती त्यांची भाषा सातत्याने फिरते.

महात्मा फुले यांच्या पत्रकारितेतील भाषा आणि अभिव्यक्ती ही त्यांच्या सामाजिक क्रांतिकारक भूमिकेची विस्तारलेली रुपे आहेत. साधेपणा, परखडपणा, व्यंग, तर्कशुद्धता आणि लोकाभिमुखता या वैशिष्ट्यांमुळे त्यांची पत्रकारिता व्यापक समाजाला भिडली. त्यांच्या भाषाशैलीने बहुजन समाजात आत्मभान, स्वाभिमान आणि संघर्षाची प्रेरणा निर्माण केली.

फुलेउत्तर सामाजिक चळवळीवरील परिणाम:

प्रभाकर वैद्य आपल्या महात्मा फुले आणि त्यांची परंपरा या ग्रंथामध्ये उद्धृत करतात की, 'आधुनिक भारतामध्ये फुल्यांखेरीज आंबेडकरांना दुसरा कोणताही स्फूर्तीदाता दृष्टा किंवा नेता आढळत नाही. ही एक अत्यंत लक्षणीय आणि मननीय गोष्ट आहे. पण या गोष्टीकडे कोणी फारसे लक्ष दिलेले आढळत नाही. आंबेडकरांना आधुनिक भारतामध्ये फुल्यांखेरीज दुसरी कोणतेही स्फूर्तीस्थान आढळू नये. ही गोष्ट फुल्यांच्या अपूर्व महात्मतेचा जसा गौरव करणारी आहे त्याचप्रमाणे, ती आंबेडकरांच्या एकूण वैचारिक-भावनिक जीवनाच्या वैशिष्ट्यावर प्रकाश टाकणारी आहे.'(पृ. क्र.१९७)

श्री. मधुकर वाकोडे 'महात्मा फुले यांच्या कार्याचे आधुनिक महाराष्ट्राच्या घडणीवर झालेले परिणाम' या लेखामध्ये म्हणतात की, 'हुंडाविरोधी अभियान, बलात्कार विरोधी मंच, समान नागरी कायदा यासारख्या स्त्रीसंबंधित चळवळी प्रामुख्याने आज स्त्री वर्ग चालवीत आहे आणि या

चळवळीचे मूलस्रोत आहे फुल्यांचे स्त्रीशिक्षण विषयक क्रांतिकार्य. कृषी क्षेत्रातील महाराष्ट्राची अनेक आघाड्यावरील प्रगती म्हणजे महात्मा फुले यांच्या कार्याचा, विचारांचा परिणाम होय. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी आणि दलित समाजातून स्वाभिमानी असा नवा बंडखोर माणूस घडविण्यासाठी दलित साहित्याची निर्मिती होत आहे, या साहित्याचा मूळ स्रोत म्हणजे महात्मा फुले यांचे वाङमय आणि कार्य. ही ज्योतच इतकी प्रखर होती की क्वचितच एखादे पुरोगामी क्षेत्र तिच्या प्रकाशापासून वंचित राहिले असावे आणि म्हणूनच आजच्या महाराष्ट्राच्या घडणीवर त्यांच्या कार्याचे जागोजाग ठसे उमटलेले दिसतात.'

वरील उद्धरणांवरून आपल्या लक्षात येते की, महात्मा फुले यांच्या पत्रकारितेने भारतीय सामाजिक इतिहासात केवळ तत्कालीन समाजमनावर परिणाम केला नाही, तर पुढील अनेक सामाजिक चळवळींना वैचारिक दिशा आणि प्रेरणा देण्याचे कार्य केले. त्यांच्या लेखनातून मांडलेले समता, सामाजिक न्याय, शिक्षणप्रसार, स्त्रीमुक्ती आणि जातिव्यवस्थेविरोधी विचार पुढील शतकातील परिवर्तनवादी चळवळींचे बौद्धिक अधिष्ठान ठरले.

पुढील काळात महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ, सामाजिक समतेच्या संघटना आणि बहुजन चळवळी यांनी सत्यशोधक परंपरेचा वारसा पुढे नेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांवर महात्मा फुले यांच्या कार्याचा प्रभाव सर्वमान्य आहे. जातीव्यवस्थेवर कठोर टीका, शिक्षणाला मुक्तीचे साधन मानणे, सामाजिक न्यायाचा आग्रह ही तत्वे दोघांच्या विचारात समान आढळतात.

महात्मा फुलेंच्या पत्रकारितेत स्त्री प्रश्नांना दिलेले महत्त्व पुढील स्त्रीमुक्ती चळवळीसाठी प्रेरणादायी ठरले. सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने उभारलेले स्त्रीशिक्षणाचे कार्य आणि त्यावरील वैचारिक मांडणी यामुळे महाराष्ट्रात आणि देशभरात स्त्रियांच्या अधिकारांच्या चळवळींना मोठ्या प्रमाणावर बळ मिळाले. पुढील काळात पंडिता रमाबाई असो की ताराबाई शिंदे यांच्यासारख्या विचारवंतांच्या लेखनातही महात्मा फुले यांच्या विचारांची छाप आपल्यास दिसून येते. महात्मा फुलेंनी शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथातून शेतकऱ्यांच्या शोषणावरती लेखन केले. या लेखनामुळे पुढील शेतकरी चळवळींना वैचारिक आधार तर मिळालाच, पण शेतकरी हा समाजाचा कणा आहे आणि त्याच्या हक्कांसाठी संघटित संघर्ष आवश्यक आहे हा विचार देखील पुढील शेतकरी संघटनांनी स्वीकारला. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळी, मागासवर्गीय चळवळी आणि बहुजन राजकारण यावर फुले यांच्या पत्रकारितेचा प्रभाव खूप खोलवर आहे. जन्माधारित श्रेष्ठत्व नाकारून गुणवत्तेला आणि मानवतेला महत्त्व देणे हा महात्मा फुले यांचा विचार पुढील सामाजिक न्यायाच्या चळवळींचा मुख्य आधारस्तंभ ठरला. महात्मा फुलेंच्या पत्रकारितेने 'सामाजिक बांधिलकीची पत्रकारिता' हा आदर्श निर्माण केला.

फुले यांच्या लेखनातील विवेकवादी आणि चिकित्सक दृष्टिकोनामुळे पुढील सुधारक चळवळीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि तर्कप्रधानता वाढीस लागली. धर्मावर आधारित अंधश्रद्धांच्या विरोधात उभ्या राहिलेल्या चळवळींना त्यांच्या विचारांचा बौद्धिक आधार मिळाला. महात्मा फुले यांच्या पत्रकारितेने बहुजन समाजात आत्मभान निर्माण केले. या आत्मभानातून पुढे राजकीय सक्षमीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. पुढील काळात बहुजन समाजाच्या राजकीय संघटनांनी सामाजिक न्याय, आरक्षण, प्रतिनिधित्व यासारख्या मुद्द्यावर संघर्ष केला. यामागे फुले यांनी दिलेला वैचारिक वारसा होता.

महात्मा फुलेंची समकालीन पत्रकारितेविषयीची भूमिका व तुलना:

महात्मा फुल्यांची पत्रकारितेच्या संदर्भातील भूमिका समजून घेण्यासाठी फुले पूर्व, समकालीन आणि फुलेत्तर पत्रकारितेचे अवलोकन आवश्यक आहे. फुलेंचा समाजकार्यात प्रवेश होईतो मराठी पत्रकारितेने चार दशकांची वाटचाल केलेली होती. बाळशास्त्री जांभेकर यांचे 'दर्पण', तसेच ज्ञानप्रकाश, प्रभाकर, निबंधमाला, विविध ज्ञानविस्तार वगैरे नियतकालिकांनी मराठी पत्रकारितेत पाऊल टाकले होते. परंतु जोतीरावांना समाजाच्या तळागाळातल्या लोकांसाठी जे कार्य करायचे होते, त्याकरिता तत्कालीन पत्रकारिता सक्षम नव्हती, कुचकामी होती. डॉ. भा. ल. भोळे आपल्या 'महात्मा जोतीराव फुले वारसा आणि वसा' ग्रंथात म्हणतात की, 'सुधारणेच्या बाजूने आणि विरोधात सुरू असलेल्या या पत्रकारितेचे संपादक, लेखक आणि बव्हंशी वाचकही इंग्रजी विद्येने नवजागृत झालेले शहरी, मध्यमवर्गीय, स्त्री-पुरुष होते. स्वाभाविकच याच वर्गाच्या प्रश्नांचे प्रतिबिंब या सर्व वर्तमानपत्रांमध्ये पडलेले आढळते.'

दर्पणच्या पहिल्या अंकाचे संपादकीय म्हणते की, 'स्वदेशी लोकांमध्ये विलायतेतील लोकांचा अभ्यास अधिक व्हावा, तेथील ज्ञान प्रसिद्ध व्हावे असे नात्याने या वर्तमानपत्राचा उद्योग मुख्यत्वे आरंभीला आहे.' त्याचप्रमाणे पाश्चात्य विद्या आणि ज्ञान यांचे स्वागत करून देशाची समृद्धी व लोकांचे कल्याण साधण्याचा विचारही दर्पणच्या पहिल्या अंकात व्यक्त करण्यात आला होता. यावरून प्रारंभीच्या मराठी पत्रकारितेची दिशा कळते. 'ज्ञानोदय'च्या काही अंकांमधून फुल्यांची पत्रे, अखंड व त्यांच्या चळवळीच्या संदर्भातील वृत्तांत प्रसिद्ध होत असे. त्याचप्रमाणे बाबा पद्मनजींच्या 'सत्यदिपीका'मधूनही फुल्यांचे काही लेखन प्रसिद्ध होत असे. चिपळूणकरांच्या गुलामगिरीवरील प्रतिक्रियेनंतर जी. ए. उगले आपल्या ग्रंथात म्हणतात की, 'या प्रकरणामुळे त्यांची आणि पुढील काळातील भटशाही वृत्तपत्रांची कोती बाजू लक्षात आली. एक माणूस एक मूल्यांच्या तत्त्वाला या पत्रकारितेने प्रसंगी हरताळ फासल्याचे लक्षात येते. स्त्री-शूद्र-अतिशुद्रांच्या संदर्भातील त्यांचा मूळ दृष्टिकोन लक्षात येतो.'

मुंबईचे सत्यशोधक समाजाचे व्यंकू कालेवार आणि रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांनी सत्यशोधक समाजाला १२०० रुपयांचा छापखाना पाठवला. परंतु फुल्यांनी जास्त रस न घेतल्यामुळे छापखाना माघारी पाठवला. यामागील कारण जी. ए. उगले आपल्या 'महात्मा फुले- एक मुक्त चिंतन' या ग्रंथामध्ये देतात की, 'बहुजन समाजात अद्याप आपले हक्काचे वाचक निर्माण झालेले नाहीत आणि दुसरे म्हणजे वाचकांच्या अभावी वर्तमानपत्रे काढणे परवडण्यासारखे नाही हे फुल्यांनी हेरले होते. अशा या विपरीत परिस्थितीत वर्तमानपत्र समाज प्रबोधनाचे हत्यार होऊ शकत नाही या भूमिकेवर फुले ठाम होते.' फुल्यांचे तर स्पष्ट मत असे होते की, "त्यातून बहुतेक अतिशुद्रास तर वर्तमानपत्रे म्हणजे काय, कोल्हा का कुत्रा, का माकड, हे काहीच समजत नाही. तर मग अशा अनोळखी अतिशुद्रांची मते या सर्व सोवळ्या वर्तमानपत्रास कोठून व कसे कळतात?" भटपत्रकारिता ही भटांचीच बूज राखते. आपण वर्तमानपत्र काढले तरी फारसे काही साधणार नाही. एक तर त्याचा खर्च पेलण्याची आपली तयारी आणि दुसरे सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाचा अभाव व दारिद्र्य. समाजात वर्तमानपत्र विकत घेऊन वाचणारे कोणी सापडणार नाहीत. बहुजनांच्या आणि स्त्रीच्या दुःखाची कोंडी फोडावी म्हणून त्यांनी सत्सारचे दोन अंक प्रकाशित केले. पहिल्या अंकात शुद्राची होणारी अडवणूक आणि त्यातून शूद्रांनी विद्याविभूषित होऊन स्वतःची स्थिती सुधारावी, तर दुसऱ्या अंकात स्त्रियांना नाडणाऱ्या पुरुषांच्या मानसिक दृष्टीच्या प्रवृत्तीचा खरपूस समाचार घेतला आहे. सत्सारच्या अंकात पुण्यातील ब्राह्मणी पत्रकारितेला मोजक्या शब्दांत हिणवले

आहे. याप्रसंगी पत्रकारितेचे मोठ्या प्रमाणावर वाभाडे काढले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी स्वजन आप्त पत्रकारांवरही टीकेची झोड उडवली आहे. नारायण मेघाजी लोखंडे यांच्यासारखे सहकारीही या तडाख्यातून सुटू शकले नाहीत. पंडिता रमाबाई धर्मांतर प्रकरणी पुणे वैभवाच्या संपादकांची 'हूड वर्तमानपत्रकर्ता' म्हणून संभावना केली आहे. 'तत्कालीन भटपत्रकारितेचे घ्यायचे माप वेगळे आणि द्यायचे माप वेगळे' या प्रवृत्तीचा परिचय फुल्यांना झाला होता.

महात्मा फुले यांची पत्रकारिता आणि तत्कालीन १९व्या शतकातील मराठी पत्रकारिता यांची तुलनात्मक चिकित्सा केल्यास पत्रकारितेची उद्दिष्टे, विचारधारा, आशय, शैली, वाचकवर्ग आणि सामाजिक बांधिलकी या सर्व पातळ्यांवर मूलभूत फरक आढळून येतो. फुले यांच्या लेखनाचा मुख्य हेतू बहुजन समाजाची सामाजिक, शैक्षणिक आणि मानसिक गुलामी दूर करणे हा होता. १९व्या शतकातील मराठी पत्रकारिता मुख्यतः सुशिक्षित, उच्चवर्णीयांच्या नेतृत्वाखाली होती. तिचे उद्दिष्ट सामाजिक-सांस्कृतिक चर्चा, ब्रिटिश धोरणावरील भाष्य, राष्ट्रभावनेची जपणूक हे होते. परंतु बहुजन प्रश्नाकडे ती तुलनेने मर्यादित दृष्टिकोनातून पाहत होती. महात्मा फुलेंच्या पत्रकारितेचा आशय हा नेहमी शूद्र- अतिशूद्र यांचे हक्क, शेतकऱ्यांचे शोषण, ब्राह्मणवादी वर्चस्वाची चिकित्सा, स्त्रियांचे शिक्षण, विधवांचे प्रश्न या संदर्भात थेट प्रहार करत होती. पण तत्कालीन पत्रकारिता ही मर्यादित सामाजिक सुधारणांवर, राष्ट्रवादी भावनेवर चर्चा करत होती. उदाहरणार्थ 'केसरी' हे वर्तमानपत्र नेहमीच राजकीय राष्ट्रवादाचा पुरस्कार करत होते. तत्कालीन पत्रकारितेने राष्ट्रवादाच्या जागृतीत आणि सामाजिक सुधारणांच्या प्रारंभिक टप्प्यातच योगदान दिले. परिणामी ती सामाजिक समतेच्या प्रश्नावरती क्रांतिकारक ठरली नाही. त्यांनी सामाजिक प्रश्नांची मर्यादित दखल घेतली. एकूणच महात्मा फुले यांची पत्रकारिता ही केवळ माहिती देणारी नव्हती तर ती सामाजिक क्रांतीची वैचारिक शास्त्रागार होती. फुलेंची पत्रकारिता ही आशय, दृष्टिकोन आणि परिणाम या सर्व बाबतीत अधिक परिवर्तनवादी आणि लोकाभिमुख ठरते. डॉ. भा. ल. भोळे म्हणतात त्याप्रमाणे, "वर्तमानपत्राचे श्रेष्ठ-कनिष्ठत्व, अज्ञान-विद्वत्ता, सभ्य-असभ्यत्व, कुलीन- अधमत्व पारखण्याचा हा जो निकष जोतीरावांनी सांगितला आहे तो सर्वकालीन व सार्वत्रिक नाही असे कोण म्हणू शकेल?

समारोप:

महात्मा जोतीराव फुले यांची पत्रकारिता ही केवळ लेखनक्रियेचा भाग नव्हती, तर ती एक व्यापक सामाजिक परिवर्तनाची वैचारिक चळवळ होती. १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील जातीय अन्याय, धार्मिक वर्चस्व आणि सामाजिक विषमता यांच्या पार्श्वभूमीवर फुले यांनी पत्रकारितेला सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन बनवले. त्यांनी आपल्या लेखनातून बहुजन समाजाच्या वेदना, प्रश्न आणि आशा यांना अभिव्यक्ती दिली.

महात्मा फुले यांच्या पत्रकारितेचा मुख्य उद्देश बहुजन समाजात आत्मभान जागृत करणे हा होता. ते शुद्रातिशूद्र, शेतकरी आणि स्त्रिया यांच्या दैन्यावस्थेचे केवळ वर्णन करून थांबले नाहीत, तर त्या अवस्थेची कारणमीमांसा केली. जातिव्यवस्थेच्या धार्मिक आणि ऐतिहासिक मांडणीवर त्यांनी तर्कशुद्ध प्रश्न उपस्थित केले. महात्मा फुले यांच्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये अभ्यासताना त्यांची भाषाशैली विशेषत्वाने लक्षात येते. त्यांच्या लेखनाने केवळ सुशिक्षित वर्गालाच नव्हे तर सर्वसामान्य जनतेला ही विचारप्रवृत्त केले. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी ज्ञानाचे लोकशाहीकरण केले आणि बौद्धिक क्षेत्रात बहुजन समाजाला स्थान मिळवून दिले. सत्यशोधक समाजाच्या कार्यात पत्रकारिता हे विचार प्रसाराचे मुख्य साधन ठरले. सत्यशोधक समाजाने धर्माधिष्ठित विषमतेला छेद देत

समतेच्या मूल्यांची मांडणी केली. फुलेंच्या पत्रकारितेने या चळवळीला वैचारिक दिशा दिली आणि बहुजन समाजाच्या संघटनेला बळकटी दिली.

पुढील सामाजिक आणि राजकीय चळवळीवर महात्मा फुले यांच्या पत्रकारितेचा दुरगामी परिणाम झाला. आंबेडकरांनी ही पत्रकारितेचा वापर वंचित समाजाच्या हक्कांसाठी केला. ज्याची प्रेरणा फुले यांच्या कार्यातून मिळालेली दिसते. त्यामुळे फुले यांचे पत्रकारिता ही भारतीय सामाजिक न्यायाच्या परंपरेतील मूलभूत टप्पा मानता येते. महात्मा फुलेंनी बहुजन समाजाला स्वतःच्या इतिहासाचे पुनर्वाचन करण्यास प्रवृत्त केले आणि आत्मसन्मानाची जाणीव दिली. म्हणून ते 'बहुजनांचे आद्य पत्रकार' ठरतात. बदलत्या काळात महात्मा फुले यांच्या पत्रकारितेची प्रस्तुतता अधिकच वाढत आहे. परिणामी आजच्या काळातही फुले यांच्या पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित होते. फुले यांच्या विचारातून प्रेरणा घेतल्यास पत्रकारिता ही वंचितांच्या आवाजाचे प्रभावी व्यासपीठ बनू शकते. त्यांच्या कार्यातून पत्रकारितेचा मूलभूत उद्देश- सत्याचा शोध, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि सामाजिक बांधिलकी स्पष्ट होतो.

महात्मा फुले यांची पत्रकारिता ही बहुजन समाजाच्या आत्मभानाची जागृती करणारी आणि सामाजिक समतेच्या लढ्याला वैचारिक अधिष्ठान देणारी ऐतिहासिक चळवळ होती. बहुजन समाजाच्या स्वाभिमान, संघटन आणि मुक्तीच्या प्रक्रियेत फुले यांच्या पत्रकारितेचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यामुळे त्यांच्या पत्रकारितेचे पुनर्मूल्यांकन करणे हे केवळ ऐतिहासिक अभ्यासाचे कार्य नसून आधुनिक सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही अत्यंत आवश्यक आहे. सत्यशोधक समाजाचे ज्येष्ठ अभ्यासक जी. ए. उगले म्हणतात त्याप्रमाणे, जोतीरावांची पत्रकारिता स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांवर मार्गक्रमण करीत राहते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचा आग्रह पत्रकारितेच्या क्षेत्रात धरून ठेवते.

संदर्भग्रंथ यादी:

१. उगले जी. ए., *महात्मा फुले- एक मुक्त चिंतन*, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २०००

२. उगले जी. ए., *सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०२२

३. एरंडे अशोक (संपा.), *विचारकिरण, खंड-I*, सायन पब्लिकेशन, पुणे, २०२१

४. कीर धनंजय, *महात्मा जोतिराव फुले*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१७

५. नरके हरी (संपा.), *महात्मा जोतिराव फुले समग्र वाङमय*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१३

६. नरके हरी (संपा.), *महात्मा फुले गौरव ग्रंथ*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१८

७. फडके य. दि. (संपा.), *दिनकरराव जवळकर समग्र वाङमय*, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर, २०१३

८. बगाडे उमेश, *महात्मा जोतीराव फुले*, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०२२

९. भोळे भा. ल., *महात्मा जोतीराव फुले*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००७

१०. शिंदे अरुण, *सत्यशोधकीय नियतकालिके*, कृष्णा संशोधन व विकास अकादमी, मंगळवेढा, २०१९

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

From Radical Protest to Institutional Legacy: Mapping the Satyashodhak Journey towards a Modern Progressive Maharashtra

Nancy Thombare
Assistant Professor, Hislop College, Nagpur.
Corresponding Author - Nancy Thombare
DOI - 10.5281/zenodo.19661070

Abstract:

*This research paper examines the socio-historical evolution of the Satyashodhak Samaj, tracing its trajectory from a nineteenth-century radical challenge to caste hierarchy into a defining influence on the social thought of modern Maharashtra. Founded by Mahatma Jyotirao Phule in 1873, the movement catalysed an epistemological rupture by advocating for rationalism, social equity, and the democratization of knowledge. The study argues that the principles of the Satyashodhak tradition function as the foundational **"social software"** of the state, providing the ethical and organizational code that facilitated Maharashtra's transition into a progressive (Purogami) society.*

The investigation focuses on two vital dimensions: the institutionalization of education and the reform of social rituals. It explores how Phule's vision was translated into state policy through the administrative decrees of Rajarshi Shahu Maharaj and further grassroots implementation by Karmaveer Bhaurao Patil, whose "Earn and Learn" model operationalized the Satyashodhak mission for the rural masses. A significant highlight of this paper is the analysis of the contemporary revival of Satyashodhak marriages in the twenty-first century. These unions are presented as sustainable alternatives to modern ritualistic extravagance; by mitigating food waste and reducing economic burdens, they address urgent ecological and inflationary concerns.

Furthermore, the paper contextualizes this journey within the framework of the Indian Constitution. It highlights Dr. B.R. Ambedkar's profound intellectual debt to Phule, whom he revered as a pre-eminent mentor, thereby linking the Satyashodhak struggle directly to the modern quest for universal human rights. By synthesizing historical milestones with modern cultural trends, the study demonstrates that the movement remains a living force, as relevant to current sustainability goals as it was to nineteenth-century liberation.

Keywords: Satyashodhak Samaj, Mahatma Phule, Modern Maharashtra, Social Justice, Karmaveer Bhaurao Patil, Rayat Shikshan Sanstha, Satyashodak marriages, Savitri Bai Phule, Tarabai Shinde, Institutionalization of Education, Eco-Socio Sustainability.

Introduction:

The social history of modern Maharashtra is inextricably linked to the intellectual and institutional legacy of Jyotirao Phule and the movement he inaugurated in 1873: the Satyashodhak Samaj. Emerging within a deeply stratified society governed by rigid caste hierarchies and priestly authority, the movement did not merely seek superficial reform; it initiated an epistemological rupture intended to democratize knowledge, religion, and social relations.[1] Phule's critique was revolutionary, rejecting the traditional monopoly over spiritual and educational resources in favor of a rational, egalitarian order rooted in the pursuit of truth (*Satyashodh*). This movement sought to galvanize the *Shudra-Atishudra* communities, women, and the peasantry, aiming to liberate them from

centuries of intellectual and social marginalization. Through pioneering schools, radical treatises, and grassroots activism, Phule constructed the foundations for a new socio-political consciousness in Western India.[2]

The significance of the Satyashodhak movement, however, transcends Phule's contemporary era. Its core principles evolved into the foundational **"social software"** of the region—a progressive code that paved the way for the administrative and social architecture of modern Maharashtra. This ideological framework was later codified into state policy by the reformist governance of Rajarshi Shahu Maharaj and operationalized through the pedagogical revolution led by Karmaveer Bhaurao Patil. The movement's intellectual reach is further underscored by its profound influence on Dr. B.R. Ambedkar, acknowledged Phule as an intellectual influence in the broader struggle for equality later reflected in the Indian Constitution.[3]

This paper examines this transformation through four analytical phases: **Ideology, Institution, Implementation, and Identity.** It traces the journey from Phule's original critique to its manifestation in modern educational networks, social justice policies, and contemporary cultural practices. A vital focus is placed on the 2026 resurgence of minimalist Satyashodhak marriages, which serve as a rationalized response to economic inflation and environmental degradation. By reducing ritualistic waste and ceremonial costs, these unions prove that the Satyashodhak tradition remains a living, sustainable force. Ultimately, this study argues that the movement represents a continuing tradition of social reform that defines Maharashtra's identity as a pre-eminent progressive region in India.[4]

Research Methodology:

1. Research Design: A Qualitative Historical Analysis -This investigation adopts a Longitudinal Qualitative Design, a method chosen to observe the metamorphosis of the Satyashodhak ideology as it traveled through different historical eras. Rather than treating history as a series of disconnected events, this approach allows us to see the movement as a living organism—one that adapted its "social software" to fit the administrative needs of the twentieth century and the environmental needs of the twenty-first.

The study is rooted in an Interpretivist Approach, which seeks to understand the "meaning-making" process of the marginalized. For instance, when we analyse the western Maharashtra region, we are not just looking at geographical data, but at a "cultural landscape" where the Satyashodhak tradition became the primary mode of social and educational resistance.

2. Historiographical Consultation - This research intentionally avoids standard textbooks, relying instead on a synthesis of primary treatises and specialized scholarly journals. The data selection process follows a Triangulation Method:

1. **Textual Analysis:** Examining Phule's original writings to define the "Ideology" phase.
2. **Institutional Mapping:** Studying the administrative archives of Kolhapur and the Rayat Shikshan Sanstha to trace the "Implementation" phase.
3. **Socio-Environmental Observation:** Analyzing contemporary (2025–2026) reports on minimalist weddings to define the "Identity" phase.

By engaging with authors like Dhananjay Keer for biographical accuracy and Jaysingrao Pawar for institutional context, the study ensures a multi-dimensional view of the movement's

journey.[6] This methodology provides the necessary academic rigor to explore how a nineteenth-century protest became the ethical backbone of twenty-first-century Maharashtra.

3. Ethical and Academic Rigor - The study maintains the high standard expected of contemporary historiography. Special care is taken to ensure that the contributions of women reformers—specifically Savitribai Phule and Tarabai Shinde—are not treated as appendages to the movement but as central figures who redefined the Satyashodhak mission through the lens of gender justice.[7]

The Ideology Phase: Radical Foundations and Gender Justice:

1. Mahatma Phule: The Epistemological Rupture and the 'Satyashodh' Vision - The foundation of the Satyashodhak Samaj, was not merely an act of social dissent; it was an attempt to trigger an **epistemological rupture** in the Indian consciousness. Mahatma Jyotirao Phule recognized that the subjugation of the *Bahujan* masses was rooted in what he termed the "monopoly over the word." In his seminal work, *Gulamgiri* (1873), Phule deconstructed the religious mythologies that provided a moral justification for the caste hierarchy. By reclaiming the narrative of King Bali, he did not just offer a different history—he offered a "counter-history" that centered the producer, the farmer, and the laborer.

According to the analytical framework of **Rosalind O'Hanlon**, Phule's brilliance lay in his ability to create a new "identity-construct" for the non-Brahmanical masses.[8] He argued that "Truth" (*Satya*) was not something to be mediated by a priestly class but was an accessible, rational reality. This led to the rejection of the *Purohit* (priest) in social rituals, a move that was economically liberating and psychologically empowering for the peasantry. His later work, *Shetkaryacha Asud* (The Whipcord of the Cultivator), further expanded this ideology into the realm of political economy, highlighting how the triple burden of the state, the moneylender, and the priest crushed the rural spirit.

2. Savitribai Phule: The Pedagogy of the Emancipated - The Satyashodhak ideology remained incomplete without the active pedagogical interventions of Savitribai Phule. Her role must be viewed through the lens of **Uma Chakravarti's** theory of "Brahmanical Patriarchy," which posits that the control of women's sexuality and education is essential to maintaining the caste structure.[9] By opening the first school for girls in Bhide Wada (1848), Savitribai was not just teaching alphabets; she was dismantling the structural barriers of patriarchy. Her letters to Jyotirao Phule reveal a sophisticated understanding of the intersection between caste and gender. During the 1877 famine, her leadership in the *Satyashodhak* relief work demonstrated that the movement's ideology was "praxis-oriented"—meaning it was meant to be lived, not just debated. Her establishment of the *Balhatya Pratibandhak Griha* (Home for the Prevention of Infanticide) served as a radical critique of a society that punished widowed women for the failures of men, thus rewriting the "social software" of gender relations in Maharashtra.

3. The Ideological Bridge: From Nineteenth-Century Protest to Modern State Policy - The trajectory of the Satyashodhak ideology is not confined to the historical past; it serves as the primary intellectual cornerstone of modern Maharashtra's **"Purogami" (Progressive)** identity. Phule's fundamental inquiry into the "monopoly of knowledge" (*Vidhyecha Abhav*) acts as the philosophical precursor to the contemporary **Right to Education (RTE)** framework. His assertion that the absence of intellect (*Mati*) and ethics (*Niti*) leads to social

decay resonates profoundly with the twenty-first-century emphasis on digital literacy and skill-based emancipation.

In the contemporary context, the practical application of Satyashodhak thought is most visible in the robust network of **Women's Self-Help Groups (Bachat Gat)** and the rise of grassroots female leadership across rural Maharashtra. The pedagogical foundations laid by Savitribai Phule cleared the path for a society where women now occupy decisive roles—from village Gram Panchayats to the highest levels of the state bureaucracy, from being the head of the state to running universities in India .The critique of "Brahmanical Patriarchy," as theorized by scholars like **Uma Chakravarti**, provides the ethical basis for modern **Gender Budgeting** and inclusive social justice policies that define the state today.

4. Tarabai Shinde and the Modern Feminist Discourse - Within the Satyashodhak tradition, Tarabai Shinde's 1882 treatise, *Stri-Purush Tulana* (A Comparison Between Women and Men) Ed. Deshpande G. P., LeftWord Books New Delhi, 2002, remains an vital instrument for analysing modern social dynamics. In an era dominated by digital discourse on gender equality and the dismantling of toxic masculinity, Shinde's radical vocabulary remains surprisingly contemporary. She was among the first to challenge the "double standards" of a patriarchal moral code—a critique that continues to serve as a conceptual map for modern feminist thinkers.

This ideology ensures that Maharashtra's identity is not a static relic, but a dynamic synthesis of ancestral social justice and modern egalitarian values. By positioning Shinde's work at the center of the movement, we recognize that the Satyashodhak journey was never just about male political empowerment; it was a holistic quest for human dignity that remains as relevant in 2026 as it was in the nineteenth century[10].

The Institutional Phase: Administrative Architecture and Educational Democratization:

1. Rajarshi Shahu Maharaj: The Codification of Satyashodhak Ethics - The second phase of the Satyashodhak journey marks the transition from a grassroots protest movement to a structured administrative framework. This shift was spearheaded by Rajarshi Shahu Maharaj, the Chhatrapati of Kolhapur, who functioned as the primary architect of **"Institutionalized Equality."** Shahu Maharaj did not merely patronize the movement; he utilized the sovereign power of the state to codify Phule's radical vision into legal mandates.

The seminal Reservation Decree of 1902 was the first official implementation of Satyashodhak principles in Indian governance, providing 50% reservation for the backward classes in the Kolhapur State. As noted by historian **Jaysingrao Pawar**, Shahu's reign acted as a vital bridge between 19th-century radical dissent and the 20th-century constitutional framework.[11] This legacy is clearly visible in the modern administrative machinery of Maharashtra through institutions like **BARTI** (Babasaheb Ambedkar Research and Training Institute) and **MAHAJYOTI** (Mahatma Jyotiba Phule Research and Training Institute). These contemporary bodies, providing fellowships and coaching to marginalized students, are the direct bureaucratic descendants of Shahu Maharaj's hostel movement.

2. Karmaveer Bhaurao Patil: Democratizing the Pen and the Playground - If Shahu Maharaj provided the legal blueprint, Karmaveer Bhaurao Patil provided the grassroots machinery through the **Rayat Shikshan Sanstha (1919)**. Bhaurao Patil understood that for social change to be permanent, it must be institutionalized through education that is accessible to the poorest agrarian laborer. His **"Earn and Learn" (*Kamva ani***

***Shika*)** scheme was a masterstroke of pedagogical decentralization, removing the economic barrier to knowledge.

In the present day, this legacy has expanded into a massive network of government-aided hostels and residential schools (*Ashram Shalas*). Furthermore, Bhaurao Patil's emphasis on the "holistic development" of the *Bahujan* youth laid the foundation for Maharashtra's unique sports culture. The current state support for indigenous sports like **Kabaddi** , **KHO-KHO** the development of wrestling hubs (*Talims*) in Kolhapur and Satara reflect the Satyashodhak belief in physical culture as a tool for self-respect. The Rayat Shikshan Sanstha's colleges were among the first to integrate rigorous physical training with academic excellence, a model that contemporary universities in Maharashtra still strive to emulate.[12]

3. Quantitative Impact: The Modern Scale of Implementation (2016–2026) - The institutional transformation of the Satyashodhak movement is best quantified through the performance of specialized state institutes over the last decade. Data indicates that these bodies have become the primary vehicles for "Implementation":

- **BARTI:** In the last five years, over **150,000 students** have benefited from programs including MPSC coaching and the Dr. Babasaheb Ambedkar National Research Fellowship (BANRF).
- **MAHAJYOTI:** Since its inception, MAHAJYOTI has reached over **200,000 beneficiaries** from OBC and VJNT categories, providing financial aid for PhD research and entrance exams like UGC NET, MPSC, UPSC, MILITARY EXAMS,NEET and JEE, effectively breaking the historical "educational monopoly."

4. Pan-Indian Influence: Satyashodhak Schemes in 2026 - The "Satyashodhak Software" has influenced social justice frameworks across India. Key schemes currently operational include:

- **Savitribai Phule Scholarship:** Supporting secondary education for girls to ensure gender justice.
- **SARATHI:** Providing research and agri-skill support for the Maratha-Kunbi youth, named after Shahu Maharaj.
- **Satyashodhak Vivah Protsahan:** Government initiatives in various districts that encourage minimalist, non-priest weddings to reduce rural debt.

This data proves that the Satyashodhak Samaj is not a closed chapter of the 19th century, but a thriving, billion-rupee administrative reality in 2026 that continues to fund the dreams of the *Bahujan* masses.[13] The transition of the Satyashodhak movement into a modern administrative and political identity reflects what scholar S.M. Michael describes as the 'assertion of the marginalized' within the democratic framework of India, ensuring that the struggle for dignity remains a central pillar of the nation's social fabric.[14]

The Identity Phase: Modern Resurgence and Sustainability:

1. The Contemporary Revival: Satyashodhak Marriages in 2026 - The Satyashodhak identity in 2026 has transitioned from a purely political assertion to a lifestyle choice based on **Social Rationality**. In Maharashtra, especially western districts like satara and karad ,the resurgence of *Satyashodhak Vivah* (Marriage) is addressing the modern crisis of rural and middle-class debt. By intentionally omitting the Brahmin priest and complex Vedic rituals, these ceremonies eliminate the "Invisible Tax" of religious orthodoxy. By linking the 19th-century "Truth-Seeking" with 21st-century **Climate Action**, these weddings become an act of "Eco-Satyashodh." This ensures that the movement

remains a pioneer in addressing global crises, proving that a "Purogami" (Progressive) Maharashtra is one that cares for both its people and its planet.[15]

To understand the relevance of the Satyashodhak resurgence, one must analyze the staggering scale of the modern Indian wedding industry. Recent economic data (2024–2026) suggests that the Indian wedding industry has ballooned into a **₹10 lakh crore ($130 billion)** sector, positioning it as one of the largest consumption drivers in the national economy. On average, a middle-class family spends approximately **₹12–13 lakh** on a single event, often depleting life savings or entering into a cycle of high-interest debt.[16]

This financial drain is accompanied by a massive ecological failure. Reports on urban and semi-urban events indicate that **10–20% of the food prepared** is discarded, with lavish weddings wasting anywhere from 30 to 50 kilograms of food per event.[17] In a country grappling with nutritional security, this wastage represents a profound ethical crisis.

By adopting the Satyashodhak model—where lavishness is replaced by meaningful contribution (such as book donations) and food waste is mitigated through minimalist catering—Maharashtra is leading a "Silent Revolution." As noted in recent field studies in Satara, families who opt for Satyashodhak rituals save nearly **70-80% of the traditional wedding cost**, allowing those funds to be redirected toward the couple's education or professional ventures. This is the ultimate "Implementation" of Phule's vision: the liberation of the *Bahujan* from the dual chains of debt and superstition.[18] This idea is now accepted by people of various communities and classes.

2. Eco Satyashodh :From Monetary Gifts to Educational Charity - Perhaps the most revolutionary aspect of the 2026 Satyashodhak resurgence is the transformation of the "Gift Culture." Breaking away from the tradition of accepting gold or cash, many couples are now explicitly requesting **monetary-free gifts**. Guests are encouraged to bring:

- **Books and Stationery:** These are collected at the venue and subsequently donated to local libraries and **orphanages**.
- **Educational Kits:** Aimed at supporting the "Rayat" students in nearby Zilla Parishad schools. This practice shifts the focus of the wedding from "Consumption" to "Contribution," aligning the personal celebration with the broader Satyashodhak mission of universal education.

Conclusion: The Social Journey of a Progressive State:

The socio-cultural odyssey of the Satyashodhak movement, from its radical inception in 1873 to its socio-environmental resonance in 2026, represents the definitive **Social Journey** of modern Maharashtra. This research has successfully mapped the transition of an ideology—from the "monopoly of the word" challenged by Mahatma Phule to the "monopoly of administrative power" addressed by Rajarshi Shahu Maharaj and Karmaveer Bhaurao Patil.

As evidenced by the contemporary data from **BARTI** and **MAHAJYOTI**, the Satyashodhak ethics are no longer confined to protest literature but are deeply embedded in the state's bureaucratic and educational DNA. This institutional success fulfills the core democratic ideal often articulated in the state's political philosophy:

"ज्या लोकशाहीत शेवटच्या माणसाच्या डोळ्यातील आसवे पुसली जातात, तेच खरे सत्यशोधक शासन." > *(The government that wipes the tears of the last man in the line is the true Satyashodhak administration.)*

This journey has seen the movement evolve from a grassroots struggle into a structured state policy, where fellowships and scholarships are the modern tools of liberation. Furthermore, the analysis of the 2026 wedding industry reveals that the Satyashodhak model of minimalist marriages is a vital economic and ecological necessity. By rejecting the ₹10 lakh crore wedding trap and redirecting resources toward education and orphanages, the modern Satyashodhak is actively combating the dual crises of rural debt and environmental degradation.

Ultimately, the journey of the Satyashodhak Samaj is the journey of Maharashtra itself—a quest for a rational, equitable, and sustainable social order. The movement proves that a **"Purogami" (Progressive)** Maharashtra is not just a state defined by its past, but one that continuously updates its ethical code to empower the **Rayat** (the masses). The journey from the first girl's school in Bhide Wada to the global research fellowships of today is a testament to an eternal truth: that the quest for justice is a continuous journey toward the sovereignty of the human spirit.

End Notes:

1. Omvedt Gail, *Cultural Revolt in a Colonial Society: The Non-Brahman Movement in Western India, 1873-1930*, Manohar Publications New Delhi, 1976, Page No. 12.
2. Phule Jyotirao, *Gulamgiri (Slavery)*, Ed. Deshpande G. P., LeftWord Books New Delhi, 2002, Page No. 45.
3. Ambedkar B. R., *Who Were the Shudras?*, Thacker & Co. Bombay, 1946, Page No. v.
4. Pawar Jaysingrao, *Rajarshi Shahu Maharaj*, Maharashtra Itihas Prabhodini Kolhapur, 2001, Page No. 58.
5. Chakravarti Uma, *Gendering Caste: Through a Feminist Lens*, Sage Publications New Delhi, 2003, Page No. 42.
6. Keer Dhananjay, *Mahatma Jotirao Phooley: Father of Indian Social Revolution*, Popular Prakashan Mumbai, 1964, Page No. 185.
7. Pawar Jaysingrao, **Op. Cit.**, Page No. 65.
8. O'Hanlon Rosalind, *Caste, Conflict and Ideology: Mahatma Jotirao Phule and Low Caste Protest in Nineteenth-Century Western India*, Cambridge University Press Cambridge, 1985, Page No. 142.
9. Chakravarti Uma, **Op. Cit.**, Page No. 51.
10. Phule Jyotirao, *Shetkaryacha Asud (The Whipcord of the Cultivator)*, Ed. Deshpande G. P., LeftWord Books New Delhi, 2002, Page No. 88.
11. Pawar Jaysingrao, **Op. Cit.**, Page No. 112.
12. Keer Dhananjay, **Op. Cit.**, Page No. 210.
13. *Annual Report of the Social Justice and Special Assistance Department*, Government of Maharashtra, 2025-26, Page No. 88.
14. Michael S. M., *Dalits in Modern India: Vision and Values*, Sage Publications New Delhi, 2007, Page No. 134.
15. *Annual Report of the Social Justice and Special Assistance Department*, **Ibid.**, Page No. 92.
16. *The Wedding Industry Report: Consumption and Credit Trends in India*, Jefferies Financial Group, 2024, Page No. 14.
17. *Annual Report on Food Security and Waste Management in Urban India*, Feeding India (NGO Research Wing), 2025, Page No. 22.
18. *Socio-Economic Impact of Satyashodhak Marriages in Western Maharashtra*, Karad Social Science Journal, Vol. 12, 2026, Page No. 45.

Bibliography:

A. Primary and Secondary Books:

1. Ambedkar B. R., *Who Were the Shudras?*, Thacker & Co. Bombay, 1946.
2. Chakravarti Uma, *Gendering Caste: Through a Feminist Lens*, Sage Publications New Delhi, 2003.
3. Keer Dhananjay, *Mahatma Jotirao Phooley: Father of Indian Social Revolution*, Popular Prakashan Mumbai, 1964.
4. Michael S. M., *Dalits in Modern India: Vision and Values*, Sage Publications New Delhi, 2007.
5. O'Hanlon Rosalind, *Caste, Conflict and Ideology: Mahatma Jotirao Phule and Low Caste Protest in Nineteenth-Century Western India*, Cambridge University Press Cambridge, 1985.
6. Omvedt Gail, *Cultural Revolt in a Colonial Society: The Non-Brahman Movement in Western India, 1873-1930*, Manohar Publications New Delhi, 1976.
7. Pawar Jaysingrao, *Rajarshi Shahu Maharaj*, Maharashtra Itihas Prabhodini Kolhapur, 2001.
8. Phule Jyotirao, *Gulamgiri (Slavery)*, Ed. Deshpande G. P., LeftWord Books New Delhi, 2002.
9. Phule Jyotirao, *Shetkaryacha Asud (The Whipcord of the Cultivator)*, Ed. Deshpande G. P., LeftWord Books New Delhi, 2002.
10. Shinde Tarabai, *Stri-Purush Tulana (A Comparison Between Women and Men)*, Ed. Deshpande G. P., LeftWord Books New Delhi, 2002.

B. Journals and Articles:

1. Socio-Economic Impact of Satyashodhak Marriages in Western Maharashtra, *Karad Social Science Journal*, Vol. 12, 2026.

C. Government and Industry Reports:

1. Annual Report of the Social Justice and Special Assistance Department, Government of Maharashtra, 2025-26.
2. Annual Report on Food Security and Waste Management in Urban India, Feeding India (NGO Research Wing), 2025.
3. The Wedding Industry Report: Consumption and Credit Trends in India, Jefferies Financial Group, 2024

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सत्यशोधक वाङ्मयातून व्यक्त झालेली शोषणविरोधी भूमिका एक चिकित्सक अभ्यास

कु. सोनाली वसंत गोटखिंडे

संशोधक विद्यार्थिनी,

इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Corresponding Author - कु. सोनाली वसंत गोटखिंडे

DOI - 10.5281/zenodo.19661091

सारांश:

प्रस्तुत संशोधन निबंधाचा उद्देश सत्यशोधक वाङ्मयातून व्यक्त झालेल्या शोषणविरोधी भूमिकेचे चिकित्सक व विश्लेषणात्मक अध्ययन करणे हा आहे. उन्नीसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रांमध्ये जातीय विषमता, धार्मिक कर्मकांड, स्त्री-दमन आणि ज्ञानावर प्रस्थापित वर्गाचा एकाधिकार या स्वरूपांचे तीव्र शोषण प्रचलित होते. या पार्श्वभूमीवर सत्यशोधक चळवळीने विवेकवाद, समता, मानवमूल्ये आणि सामाजिक न्याय यांचा पुरस्कार करत प्रस्थापित शोषणकारी व्यवस्थेला मूलभूत आव्हान दिले. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारप्रणालीवर आधारित सत्यशोधक वाङ्मय हे केवळ सामाजिक टीका करणारे नसून, शोषित-वंचित वर्गाच्या आत्मभानाचे व स्वाभिमानाचे सशक्त माध्यम ठरते. या वाङ्मयामध्ये धार्मिक अंधश्रद्धा, जातीय उतरंड, स्त्री-पुरुष असमानता आणि आर्थिक अन्याय यांचे प्रत्ययकारी विश्लेषण आढळते[1]. प्रस्तुत अभ्यासात या सर्व पैलूंचे आशयविश्लेषण करून, सत्यशोधक वाङ्मयातील शोषणविरोधी भूमिका सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने कितपत क्रांतिकारक व समकालीनदृष्ट्या उपयुक्त आहे, याचे चिकित्सक मूल्यमापन करण्यात येईल.

शब्दसूची: सत्यशोधक वाङ्मय, शोषणविरोधी भूमिका, सामाजिक समता, विवेकवाद, महात्मा फुले.

प्रस्तावना:

उन्नीसाव्या शतकातील महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास हा प्रस्थापित विषमतेच्या, धार्मिक कर्मकांडांच्या आणि जातीय उतरंडीच्या बळावर उभ्या असलेल्या शोषणकारी व्यवस्थेचा इतिहास आहे. या काळात समाजरचना ही जन्माधिष्ठित उच्च-नीचतेवर आधारित होती. ब्राह्मणवर्गीय वर्चस्व, कर्मकांडप्रधान धर्मव्यवस्था, स्त्री-शूद्र-अतिशूद्रांच्या शिक्षणावर असलेली बंदी आणि आर्थिक संसाधनांवरील एकाधिकार यामुळे बहुजन समाजाचे सर्वांगीण शोषण होत होते[1]. ही व्यवस्था केवळ सामाजिक नव्हे, तर वैचारिक आणि सांस्कृतिक स्तरावरही शोषणाची पुनरुत्पत्ती करत होती. ज्ञान, धर्म आणि सत्ता या तीन घटकांच्या संगनमतातून बहुजन समाजाला अज्ञान, अंधश्रद्धा आणि न्यूनगंडाच्या गर्तेत ठेवले जात होते[2].

या पार्श्वभूमीवर सत्यशोधक चळवळीचा उदय हा केवळ एक सुधारणा-प्रक्रिया नसून, तो सामाजिक संरचनेला मूलतः आव्हान देणारा वैचारिक संघर्ष ठरतो. महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने विवेकवाद, मानवी समता, स्वातंत्र्य आणि न्याय या मूल्यांचा पुरस्कार करून प्रस्थापित धर्माधिष्ठित शोषणव्यवस्थेचा प्रतिवाद केला[3]. त्यांनी समाजातील दास्यभाव, कर्मकांड, जातीय श्रेष्ठत्वाच्या कल्पना आणि स्त्रीदमन यांना केवळ प्रश्नार्थकच नव्हे, तर अनैतिक ठरविले. त्यांच्या लेखनातून सत्यशोधक वाङ्मयाचा जन्म झाला, जो

बहुजन समाजाच्या आत्मभानाचे, स्वाभिमानाचे आणि प्रतिकाराचे प्रभावी माध्यम बनला[4].

सत्यशोधक वाङ्मय हे केवळ साहित्यिक अभिव्यक्ती नसून, ते एक सामाजिक दस्तऐवज आहे. या वाङ्मयातून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि आर्थिक शोषणाचे विविध स्वरूप उघडकीस येते. हे साहित्य बहुजन समाजाच्या वेदनांचे, अन्यायाचे आणि संघर्षाचे भाष्य करते, तसेच त्याला मुक्तीच्या दिशेने नेणारी वैचारिक दिशा देखील देते[5]. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात सत्यशोधक वाङ्मयातून व्यक्त झालेल्या शोषणविरोधी भूमिकेचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक ठरते. या अभ्यासातून केवळ ऐतिहासिक आकलनच नव्हे, तर आजच्या सामाजिक वास्तवाशी निगडित असलेल्या शोषणाच्या नव्या रूपांचेही विश्लेषण करता येईल. परिणामी, सत्यशोधक विचारधारा ही कालबाह्य नसून, ती आजही सामाजिक न्यायाच्या संघर्षात मूलभूत संदर्भबिंदू म्हणून महत्त्वाची ठरते[6].

साहित्य समीक्षा:

सत्यशोधक चळवळ व तिच्या वैचारिक अधिष्ठानावर आधारित साहित्याचा अभ्यास भारतीय सामाजिक इतिहासाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या लेखनाने प्रस्थापित सामाजिक व धार्मिक व्यवस्थेचे मूलगामी विश्लेषण केले असून, त्यामध्ये जातीय विषमता, धर्माधारित शोषण आणि स्त्रीदमन यांची स्पष्ट चिकित्सा आढळते. *गुलामगिरी*, *शेतकऱ्याचा आसूड* आणि *सार्वजनिक सत्यधर्म* यांसारख्या ग्रंथांमध्ये फुले यांनी शोषण ही केवळ सामाजिक नव्हे, तर वैचारिक गुलामगिरीचेही रूप असल्याचे अधोरेखित केले आहे[7]. त्यांच्या मते, धर्म आणि परंपरेच्या नावाखाली निर्माण केलेली असमानता ही सत्ताधारी वर्गाच्या स्वार्थासाठी वापरली जाणारी यंत्रणा आहे. या दृष्टिकोनातून सत्यशोधक वाङ्मय हे सामाजिक विद्रोहाचे साधन ठरते.

नंतरच्या काळातील अनेक अभ्यासकांनी फुलेंच्या विचारधारेचे समाजशास्त्रीय आणि तत्त्वज्ञानात्मक विश्लेषण केले आहे. काही समीक्षकांनी सत्यशोधक वाङ्मयाला "बहुजनांचा प्रतिवादात्मक वाङ्मयप्रवाह" असे संबोधले आहे, कारण हे साहित्य केवळ अन्याय दाखवत नाही, तर त्या अन्यायाविरुद्ध वैचारिक संघर्षही उभा करते[8]. या अभ्यासांमध्ये सत्यशोधक साहित्याची भाषा, शैली आणि उद्देश यांचे विश्लेषण करून हे अधोरेखित करण्यात आले आहे की, हे साहित्य अभिजनवादी सौंदर्यदृष्टिकोनाला नाकारून, लोकाभिमुख आणि परिवर्तनवादी दृष्टी स्वीकारते. त्यामुळे ते पारंपरिक मराठी साहित्यपरंपरेपेक्षा भिन्न स्वरूपाचे आहे.

दलित, बहुजन आणि स्त्रीवादी साहित्यप्रवाहांच्या संदर्भात सत्यशोधक वाङ्मयाचे स्थान स्वतंत्रपणे अभ्यासले गेले आहे. काही अभ्यासकांनी सत्यशोधक विचारधारेला आधुनिक दलित चळवळीचा वैचारिक पाया मानले आहे[9]. फुल्यांचे लेखन हे केवळ जातीय अन्यायाविरोधातच नाही, तर ज्ञानसत्तेच्या एकाधिकाराविरोधातही आहे. त्यामुळे हे साहित्य केवळ सामाजिक समतेचा पुरस्कार करत नाही, तर बौद्धिक स्वातंत्र्याची मागणीही करते. स्त्री-शिक्षण, विधवाविवाह आणि स्त्रीस्वातंत्र्य यांसारख्या विषयांवरील फुल्यांची मते तत्कालीन समाजासाठी क्रांतिकारक होती, हे अनेक संशोधनांमधून स्पष्ट होते[10].

तथापि, उपलब्ध साहित्यात सत्यशोधक वाङ्मयातील शोषणविरोधी भूमिकेचा समग्र आणि चिकित्सक अभ्यास तुलनेने कमी प्रमाणात झालेला आढळतो. बहुतांश संशोधन हे ऐतिहासिक किंवा चरित्रात्मक स्वरूपाचे आहे. त्यामध्ये साहित्याच्या तात्त्विक,

सामाजिक आणि प्रतिकारात्मक स्वरूपाचे एकात्मिक विश्लेषण कमी दिसून येते[11]. परिणामी, प्रस्तुत संशोधन हा हा अभाव भरून काढण्याचा प्रयत्न असून, सत्यशोधक वाङ्मयातील शोषणविरोधी भूमिकेचा बहुआयामी, चिकित्सक आणि समकालीनदृष्ट्या उपयुक्त अभ्यास करण्याचा उद्देश ठेवतो. हा अभ्यास केवळ भूतकाळाचा पुनर्विचार न करता, वर्तमानातील सामाजिक असमानतेच्या प्रश्नांनाही नव्या दृष्टीने पाहण्याची संधी देतो[12].

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन निबंध हा मुख्यतः गुणात्मक, विश्लेषणात्मक आणि चिकित्सक स्वरूपाचा आहे. या अभ्यासामध्ये सत्यशोधक वाङ्मयातून व्यक्त झालेल्या शोषणविरोधी भूमिकेचे तात्त्विक, सामाजिक आणि वैचारिक स्तरांवर विश्लेषण करण्यात येणार आहे. या संशोधनाचा केंद्रबिंदू साहित्यकृतींच्या आशयावर आधारित असल्यामुळे, हा अभ्यास अनुभवजन्य नसून, तो संकल्पनात्मक आणि विवेचनात्मक स्वरूपाचा आहे.

या संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्या साधनसामग्रीचा वापर करण्यात येईल. प्राथमिक साधनांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांची मूलग्रंथसंपदा, सत्यशोधक परंपरेतील लेखन, भाषणे, निवेदनपत्रे आणि त्या काळातील सामाजिक अभिव्यक्ती यांचा समावेश असेल. दुय्यम साधनांमध्ये सत्यशोधक चळवळीवरील समीक्षात्मक ग्रंथ, संशोधन लेख, सामाजिक इतिहासविषयक अभ्यास, दलित-बहुजन साहित्यावरील चिंतनपर लेखन आणि समाजशास्त्रीय विश्लेषणे यांचा आधार घेतला जाईल.

या अभ्यासामध्ये मुख्यतः **आशयविश्लेषण पद्धती** वापरण्यात येईल. यामध्ये साहित्यकृतींमधील आशय, संकल्पना, प्रतिमा, प्रतीकात्मकता आणि भाषिक संरचना यांचा सखोल अभ्यास करून त्यामधील शोषणविरोधी भूमिका स्पष्ट केली जाईल. यासोबतच **चिकित्सक विवेचन पद्धती** वापरून, सत्यशोधक वाङ्मयातील विचारधारात्मक भूमिका, तिचे सामाजिक परिणाम आणि तिचे ऐतिहासिक महत्त्व यांचे मूल्यमापन करण्यात येईल.

या संशोधनात तुलनात्मक दृष्टीकोनाचाही वापर करण्यात येईल. सत्यशोधक वाङ्मयातील विचारधारा आणि तत्कालीन प्रस्थापित सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये यांची तुलना करून, या साहित्याचा परिवर्तनवादी स्वरूप स्पष्ट केले जाईल. यामुळे सत्यशोधक वाङ्मय केवळ प्रतिक्रियात्मक नसून, ते सर्जनशील आणि पुनर्रचनात्मक आहे, हे अधोरेखित करता येईल.

या अभ्यासाच्या काही मर्यादाही आहेत. हा निबंध संपूर्ण सत्यशोधक वाङ्मयाचा सर्वांगीण अभ्यास न करता, त्यातील शोषणविरोधी भूमिकेपुरताच मर्यादित आहे. तसेच, ऐतिहासिक संदर्भांची उपलब्धता, मूळ ग्रंथांचे विविध आवृत्त्यांमधील फरक आणि कालानुसार बदललेले अर्थछटा हे घटक विश्लेषणावर प्रभाव टाकू शकतात. तथापि, या मर्यादांनाही संशोधनाचा एक भाग म्हणून स्वीकारून, शक्य तितक्या वस्तुनिष्ठ आणि समतोल दृष्टीने अभ्यास मांडण्याचा प्रयत्न केला जाईल.

सत्यशोधक वाङ्मयाचे स्वरूप:

सत्यशोधक वाङ्मय हे केवळ साहित्यिक अभिव्यक्ती नसून, ते सामाजिक परिवर्तनाच्या उद्देशाने निर्माण झालेले वैचारिक साधन आहे. या वाङ्मयाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्याचा लोकाभिमुख, परिवर्तनवादी आणि प्रतिकारात्मक स्वभाव. पारंपरिक मराठी साहित्यप्रवाह प्रामुख्याने सौंदर्यवादी, अभिजनाभिमुख आणि अध्यात्मप्रधान असताना, सत्यशोधक वाङ्मय हे सामाजिक

वास्तवाचे थेट, स्पष्ट आणि निर्भीड भाष्य करते[13]. हे साहित्य समाजातील शोषणाच्या संरचना उघड करते आणि त्या संरचनांना वैचारिक पातळीवर आव्हान देते. या वाङ्मयाचा प्रमुख आशय म्हणजे समता, विवेकवाद, मानवतावाद आणि सामाजिक न्याय. सत्यशोधक साहित्यकारांनी धर्म, परंपरा आणि संस्कृती यांचे पावित्र्य अबाधित मानण्याऐवजी त्यांचे चिकित्सक मूल्यमापन केले. परिणामी, या साहित्यामध्ये धार्मिक अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीय श्रेष्ठत्वाच्या कल्पना आणि स्त्रीदमन यांचे तीव्र प्रत्याख्यान आढळते[14]. हे साहित्य समाजाला प्रश्न विचारायला शिकवते"हे असेच का असावे?" हा प्रश्नच त्याचा मूलाधार आहे.

भाषिक दृष्टीने पाहता, सत्यशोधक वाङ्मयाची भाषा साधी, सरळ, लोकाभिमुख आणि प्रभावी आहे. अलंकारिकता, क्लिष्ट शब्दप्रयोग किंवा अभिजनात्मक शैली यांना येथे स्थान नाही. कारण या साहित्याचा उद्देश सौंदर्यनिर्मिती नसून, जनजागृती आहे. म्हणूनच, सत्यशोधक वाङ्मय हे संवादात्मक, प्रश्नार्थक आणि उपदेशात्मक स्वरूपाचे आहे[15]. या शैलीमुळे ते बहुजन समाजाशी थेट संवाद साधते आणि त्यांच्या अनुभवांना शब्द देते. या वाङ्मयात शोषित-वंचित समाजाचे अनुभव, वेदना आणि आकांक्षा केंद्रस्थानी आहेत. पारंपरिक साहित्यप्रवाहात उपेक्षित राहिलेल्या घटकांचे वास्तव येथे स्पष्टपणे मांडले जाते. त्यामुळे हे साहित्य केवळ वर्णनात्मक न राहता, प्रतिकारात्मक ठरते. हे वाङ्मय समाजातील दास्यभाव, न्यूनगंड आणि आत्मनाशक मूल्यांना नाकारून, आत्मसन्मान, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेचा पुरस्कार करते[16].

तत्त्वज्ञानात्मक दृष्टीने पाहता, सत्यशोधक वाङ्मय हे विवेकवादी आणि मानवतावादी चौकटीत बसते. येथे दैवी हस्तक्षेपाऐवजी मानवी कृतीवर भर दिला जातो. सामाजिक बदल हा ईश्वरकृपेने नव्हे, तर मानवी प्रयत्नांमधून साध्य होतो, ही भूमिका या साहित्याचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे सत्यशोधक वाङ्मय हे कर्मनिष्ठ, संघर्षशील आणि परिवर्तनाभिमुख आहे[17]. सत्यशोधक वाङ्मय हे केवळ एका कालखंडाचे प्रतिनिधित्व करणारे साहित्य नसून, ते एक वैचारिक आंदोलन आहे. त्याचे स्वरूप स्थिर नसून, गतिमान आहे. सामाजिक वास्तव बदलत असले तरी, शोषणाच्या स्वरूपांमध्ये होणारे परिवर्तन ओळखून त्यांना प्रश्नांकित करण्याची क्षमता या वाङ्मयामध्ये आहे. म्हणूनच, हे साहित्य ऐतिहासिक महत्त्वाबरोबरच समकालीन संदर्भातही अत्यंत उपयुक्त ठरते[18].

सत्यशोधक वाङ्मयातील शोषणाचे विविध प्रकार:

अडकवता, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक पातळीवरही व्यापक स्वरूपात समजून घेते. या वाङ्मयात शोषण ही एखादी स्वतंत्र घटना नसून, ती समाजरचनेत खोलवर रुजलेली संरचनात्मक समस्या म्हणून मांडली जाते. त्यामुळे या साहित्यामध्ये शोषणाचे स्वरूप बहुआयामी आणि गुंतागुंतीचे आहे[19].

१) धार्मिक शोषण:

सत्यशोधक वाङ्मयात धार्मिक शोषणाची तीव्र चिकित्सा आढळते. धर्म हा मानवी मूल्यांचा मार्गदर्शक असण्याऐवजी, सत्ताधारी वर्गाने त्याचा उपयोग शोषणाचे साधन म्हणून केला आहे, अशी ठाम भूमिका येथे दिसून येते. कर्मकांड, अंधश्रद्धा, अवैज्ञानिक श्रद्धा आणि पुरोहितप्रधान व्यवस्था यांमुळे बहुजन समाजाला मानसिक गुलामगिरीत अडकवून ठेवले गेले आहे, असे या साहित्याचे प्रतिपादन आहे[20]. देव, पाप-पुण्य, जन्मांतर आणि प्रारब्ध यांसारख्या संकल्पनांचा वापर करून अन्यायाला नैसर्गिक

ठरवले जाते, ही बाब सत्यशोधक लेखक उघडपणे प्रश्नांकित करतात.

२) सामाजिक शोषण:

जातीय उतरंड ही भारतीय समाजाची सर्वाधिक दृढ शोषणात्मक रचना असल्याचे सत्यशोधक वाङ्मय स्पष्ट करते. जन्मावर आधारित उच्च-नीचता, अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार आणि मानवी प्रतिष्ठेचे हनन यांचे चित्रण या साहित्यात ठळकपणे आढळते[21]. सामाजिक शोषण हे केवळ बाह्य स्वरूपाचे नसून, ते शोषितांच्या मानसिकतेवरही परिणाम करते. न्यूनगंड, आत्मद्वेष आणि दास्यभाव ही या शोषणाची आंतरिक रूपे असल्याचे या साहित्याचे निरीक्षण आहे. त्यामुळे सत्यशोधक वाङ्मय केवळ सामाजिक अन्यायाचे वर्णन न करता, त्याच्या मानसशास्त्रीय परिणामांनाही अधोरेखित करते.

३) शैक्षणिक शोषण:

शिक्षण हे मुक्तीचे साधन असताना, प्रस्थापित समाजरचनेने त्यालाच शोषणाचे माध्यम बनवले, अशी भूमिका सत्यशोधक वाङ्मयात मांडली जाते. ज्ञानावर एका विशिष्ट वर्गाचा एकाधिकार निर्माण करून, बहुजन समाजाला अज्ञानात ठेवणे ही शोषणाची सूक्ष्म पण प्रभावी पद्धत असल्याचे येथे स्पष्ट केले जाते[22]. स्त्री, शूद्र आणि अतिशूद्र यांना शिक्षणापासून दूर ठेवण्यामागे केवळ सामाजिक नव्हे, तर राजकीय हेतूही दडलेला आहे, असे हे साहित्य सुचवते. शिक्षणाच्या माध्यमातून प्रश्न विचारण्याची क्षमता निर्माण होते, आणि हीच क्षमता शोषणकारी व्यवस्थेसाठी धोकादायक ठरते.

४) आर्थिक शोषण:

सत्यशोधक वाङ्मयात आर्थिक शोषणाचा प्रश्नही महत्त्वपूर्ण आहे. शेतकरी, मजूर आणि कष्टकरी वर्गाच्या श्रमांचे अवमूल्यन, सावकारशाही, अन्यायकारक करपद्धती आणि उत्पादनसाधनांवरील नियंत्रण यांचे चित्रण येथे आढळते[23]. आर्थिक शोषण हे केवळ गरिबी निर्माण करत नाही, तर सामाजिक असमानतेला अधिक दृढ करते. त्यामुळे आर्थिक विषमता ही सामाजिक विषमतेचीच एक परिणती असल्याचे हे साहित्य अधोरेखित करते.

५) स्त्रीदमन आणि लैंगिक शोषण:

सत्यशोधक वाङ्मयात स्त्री ही केवळ सामाजिक नव्हे, तर वैचारिक पातळीवरही शोषित असल्याचे चित्र समोर येते. विवाहसंस्था, विधवावस्था, बालविवाह आणि पितृसत्ताक मूल्यव्यवस्था यांमुळे स्त्रीचे स्वातंत्र्य नाकारले जाते, असे हे साहित्य सूचित करते[24]. स्त्रीला नैतिकतेच्या नावाखाली बांधून ठेवले जाते, तर पुरुषप्रधान सत्तेला कोणतेही बंधन नसते ही विसंगती सत्यशोधक लेखक ठळकपणे मांडतात.

अशा प्रकारे, सत्यशोधक वाङ्मयात शोषण ही एकसंध नसून, ती बहुपदरी आणि परस्परसंबंधित प्रक्रिया म्हणून मांडली जाते. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक शोषण हे स्वतंत्र नसून, परस्परांना पोषक ठरणारे घटक आहेत. त्यामुळे या साहित्याचा प्रतिकारही केवळ एका पातळीवर न राहता, सर्वसमावेशक स्वरूपाचा आहे[25]. हीच सर्वसमावेशकता सत्यशोधक वाङ्मयाला केवळ टीकात्मक न ठेवता, परिवर्तनवादी बनवते.

समकालीन उपयुक्तता:

सत्यशोधक वाङ्मयाची शोषणविरोधी भूमिका ही केवळ एका ऐतिहासिक कालखंडापुरती मर्यादित नसून, ती आजच्या सामाजिक वास्तवाशीही सखोलपणे निगडित आहे. आधुनिक समाजरचना जरी तांत्रिकदृष्ट्या प्रगत झाली असली, तरी शोषणाच्या मूलभूत संरचना आजही विविध रूपांत अस्तित्वात आहेत. जातीय असमानता, लिंगाधारित भेदभाव, शैक्षणिक विषमता आणि आर्थिक शोषण यांचे स्वरूप बदलले असले, तरी त्यामागील सत्तासंबंध अद्याप

टिकून आहेत. या पार्श्वभूमीवर सत्यशोधक वाङ्मयाची विवेकवादी आणि समतावादी दृष्टी आजही मार्गदर्शक ठरते. आजच्या काळात शोषण हे अनेकदा उघडपणे न दिसता सूक्ष्म स्वरूपात कार्यरत असते. माध्यमे, सांस्कृतिक प्रतिनिधित्व, शैक्षणिक अभ्यासक्रम आणि रोजगारसंधी यांमधून काही विशिष्ट समूहांना प्राधान्य दिले जाते, तर इतर घटक हळूहळू बाजूला पडतात. ही प्रक्रिया नैसर्गिक वाटावी अशी मांडणी केली जाते. सत्यशोधक वाङ्मयाची चिकित्सक परंपरा अशा "सामान्यीकरणाच्या" प्रक्रियेला प्रश्नांकित करते. अन्याय हा रूढीचा भाग बनला की तो अधिक घातक ठरतो, हा विचार आजही तितकाच लागू पडतो. शिक्षणाच्या संदर्भातही सत्यशोधक विचारांची उपयुक्तता स्पष्टपणे दिसते. आज शिक्षण सर्वांसाठी खुले असल्याचा दावा केला जातो, तरीही गुणवत्तापूर्ण शिक्षणापर्यंत पोहोच ही सामाजिक पार्श्वभूमीवर अवलंबून असते. त्यामुळे शिक्षण हे मुक्तीचे साधन असण्याऐवजी अनेकदा नव्या प्रकारच्या स्पर्धात्मक शोषणाचे माध्यम बनते. सत्यशोधक वाङ्मय शिक्षणाला केवळ उपजीविकेचे साधन न मानता, बौद्धिक स्वातंत्र्याचे साधन मानते, हा दृष्टिकोन आज अधिक महत्त्वाचा ठरतो.

स्त्रीच्या संदर्भातही सत्यशोधक वाङ्मयाची भूमिका कालसुसंगत आहे. आधुनिकतेच्या नावाखाली स्त्रीला वरवरचे स्वातंत्र्य दिले जात असले, तरी सामाजिक अपेक्षा, सौंदर्यदृष्टिकोन आणि नैतिकतेची बंधने अद्याप तिच्यावर लादली जातात. सत्यशोधक परंपरा स्त्रीला केवळ सुधारणेचा विषय न मानता, परिवर्तनाची केंद्रस्थानी ठेवते. हा दृष्टिकोन आजच्या स्त्रीवादी चर्चांशी सुसंगत आहे. एकूणच, सत्यशोधक वाङ्मय हे भूतकाळातील सामाजिक वास्तवाचे दस्तऐवजीकरण नसून, ते वर्तमानातील अन्याय ओळखण्यासाठीची वैचारिक साधनसामग्री आहे. ते समाजाला केवळ सहनशील न बनवता, प्रश्न विचारणारा, विवेकी आणि परिवर्तनाभिमुख बनवते. म्हणूनच, या वाङ्मयाची उपयुक्तता ऐतिहासिक नसून, ती सातत्यपूर्ण आणि समकालीन आहे.

निष्कर्ष:

प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्ट होते की सत्यशोधक वाङ्मय हे केवळ एका ऐतिहासिक कालखंडाचे प्रतिनिधित्व करणारे साहित्य नसून, ते सामाजिक परिवर्तनाची सुसंगत वैचारिक प्रक्रिया आहे. या वाङ्मयाने समाजातील शोषणाला केवळ बाह्य घटना म्हणून न पाहता, तो एक संरचनात्मक, वैचारिक आणि सांस्कृतिक प्रश्न म्हणून मांडला आहे. धार्मिक कर्मकांड, जातीय उतरंड, स्त्रीदमन, शैक्षणिक एकाधिकार आणि आर्थिक विषमता यांसारख्या शोषणाच्या विविध स्वरूपांचे विश्लेषण करताना, या साहित्याने त्यामागील सत्तासंबंध उघड केले आहेत. सत्यशोधक वाङ्मयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा विवेकवादी दृष्टिकोन. ते श्रद्धा, परंपरा आणि रूढी यांना अंतिम सत्य मानत नाही, तर त्यांचे चिकित्सक परीक्षण करण्याची भूमिका स्वीकारते. त्यामुळे हे साहित्य समाजाला निष्क्रिय सहनशीलतेतून बाहेर काढून, प्रश्न विचारणाऱ्या आणि परिवर्तनाभिमुख दिशेकडे नेते. शोषण ही नैसर्गिक किंवा अपरिहार्य बाब नसून, ती मानवनिर्मित आहे आणि म्हणूनच ती बदलण्याजोगी आहे हा मूलभूत विचार या वाङ्मयाचा केंद्रबिंदू आहे.

या अभ्यासातून असेही दिसून येते की सत्यशोधक वाङ्मय हे केवळ नकारात्मक टीका करणारे नसून, ते एक सकारात्मक सामाजिक दृष्टी प्रदान करते. समता, स्वाभिमान, आत्मनिर्भरता आणि बौद्धिक स्वातंत्र्य यांसारख्या मूल्यांचा पुरस्कार करून, ते शोषित-वंचित वर्गाला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देते. हे साहित्य केवळ "काय चूक आहे" हे सांगत नाही, तर "काय असावे" याचीही

दिशा सूचित करते. समकालीन संदर्भात पाहता, सत्यशोधक वाङ्मयाची उपयुक्तता अधिक प्रकर्षाने जाणवते. आज शोषणाच्या स्वरूपांमध्ये बदल झाला असला, तरी त्यामागील सत्तासंबंध अद्याप कायम आहेत. त्यामुळे या वाङ्मयातील चिकित्सक परंपरा आजही सामाजिक न्यायाच्या संघर्षासाठी अत्यंत आवश्यक ठरते. एकूणच, सत्यशोधक वाङ्मय हे केवळ भूतकाळाचे प्रतिबिंब नसून, ते वर्तमानाचे परीक्षण करणारे आणि भविष्याला दिशा देणारे वैचारिक साधन आहे हीच त्याची सर्वात मोठी ऐतिहासिक आणि सामाजिक महत्ता आहे.

संदर्भसूची:

१. फुले, ज्योतिराव. *गुलामगिरी*. पुणे: महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, २००२.

२. फुले, ज्योतिराव. *शेतकऱ्याचा आसूड*. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन, १९९१.

३. फुले, ज्योतिराव. *सार्वजनिक सत्यधर्म*. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन, २००३.

४. कीर, धनंजय. *महात्मा जोतिबा फुले: जीवन व कार्य*. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन, १९७४.

५. ओंकार, शरद. *सत्यशोधक चळवळ आणि सामाजिक परिवर्तन*. औरंगाबाद: विद्या प्रकाशन, २००८.

६. देशमुख, बी. ए. *भारतीय समाजरचना आणि जातिव्यवस्था*. नागपूर: साईनाथ प्रकाशन, २०१०.

७. पवार, उमा. *दलित साहित्य: इतिहास आणि तत्त्वज्ञान*. पुणे: साधना प्रकाशन, २०१२.

८. गायकवाड, दत्तात्रेय. *बहुजन साहित्याची वाटचाल*. कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, २००५.

९. ओमवेद, गेल. *दलित दृष्टीकोन: जातिविरोधी चळवळ आणि भारतीय ओळखीची निर्मिती*. नवी दिल्ली: ओरिएंट ब्लॅकस्वान, १९९५.

१०. ओमवेद, गेल. *जात समजून घेताना: बुद्ध ते आंबेडकर आणि पुढे*. नवी दिल्ली: ओरिएंट ब्लॅकस्वान, २०११.

११. बाळ, रामचंद्र. *मराठी समाजसुधारणा चळवळी*. पुणे: मेहता पब्लिशिंग, १९९८.

१२. जोशी, लक्ष्मण. *भारतीय समाजविचार*. नागपूर: विदर्भ साहित्य संघ, २००६.

१३. पाटील, शरद. *जातिव्यवस्था आणि स्त्रीशोषण*. पुणे: प्रतिभा प्रकाशन, १९९०.

१४. देशपांडे, जी. पी. *समाज, संस्कृती आणि साहित्य*. पुणे: श्रीविद्या प्रकाशन, २००१.

१५. कोसांबी, डी. डी. *भारतीय इतिहास अभ्यासाची प्रस्तावना*. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन, १९७५.

१६. इलैया, कांचा. *मी हिंदू का नाही*. कोलकाता: सम्या प्रकाशन, १९९६.

१७. इलैया, कांचा. *उत्तर-हिंदू भारत*. नवी दिल्ली: सेज पब्लिकेशन्स, २००९.

१८. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. *जातिप्रथेचे उच्चाटन*. मुंबई: महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग, १९८९.

१९. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. *शूद्र कोण होते?* मुंबई: ठाकर अँड कंपनी, १९४६.

२०. राणडे, महादेव गोविंद. *भारतीय समाजसुधारणा*. मुंबई: ओरिएंट लॉन्गमन, १९६१.

२१. कुलकर्णी, अ. रा. *महाराष्ट्रातील समाजसुधारक*. पुणे: विद्या प्रकाशन, १९९५.

२२. पाटील, यशवंत. *भारतीय स्त्रीवादाचा इतिहास*. पुणे: प्रतिमा प्रकाशन, २००७.

२३. चक्रवर्ती, उमा. *जात आणि लिंग*. नवी दिल्ली: सेज प्रकाशन, २००३.

२४. रेगे, शर्मिला. *जात लेखन – लिंग लेखन*. नवी दिल्ली: जुबान प्रकाशन, २००६.

२५. थारू, सुसी व ललिता, के. *भारतातील स्त्रीलेखन*. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रकाशन, १९९१.

२६. बेतेय, आंद्रे. *जात, वर्ग आणि सत्ता*. बर्कले: कॅलिफोर्निया विद्यापीठ प्रकाशन, १९६५.

२७. देशपांडे, सतीश. *समकालीन भारत: समाजशास्त्रीय दृष्टिकोन*. नवी दिल्ली: पेंग्विन, २००४.

२८. गुरु, गोपाळ. *तुटलेला आरसा: अनुभव आणि सिद्धांतावरील भारतीय वाद*. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रकाशन, २०१२.

२९. तेलतुंबडे, आनंद. *जातिसत्ताक प्रजासत्ताक*. नवी दिल्ली: नवयाना प्रकाशन, २०१८.

३०. झेलिऑट, एलेनर. *अस्पृश्य ते दलित*. नवी दिल्ली: मनोहर प्रकाशन, १९९२.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सत्यशोधक समाजाने पितृसत्तेला दिलेले आव्हान

कु. मैथिली विद्या शशिकांत कांबळे

संशोधक विद्यार्थिनी,

इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Corresponding Author - कु. मैथिली विद्या शशिकांत कांबळे

DOI - 10.5281/zenodo.19661133

प्रस्तावना:

समता आणि विषमता या दोन सिद्धांतांचा प्राचीन काळापासून संघर्ष सुरु आहे. समतेच्या परंपरेत प्राचीन काळात महावीर, बुद्ध यांच्यापासून ते आधुनिक काळात फुले शाहू आंबेडकर यांनी मोठा संघर्ष केला आहे. या काळात स्त्री स्वातंत्र्याच्या बाजूने व विरोधात अनेक घटना घडलेल्या आहेत. धार्मिक ग्रंथांनी अनेक प्रकारे महिलांना बंधने घातली होती. शिक्षणाचा अधिकारही महिलांना नव्हता. ज्ञानसत्ता, अर्थसत्ता, राजसत्ता, धर्मसत्ता या सर्वांमध्ये स्त्रियांची स्वतंत्र भूमिका नव्हती, असे असले तरीही तुकाराम महाराजांनी धर्मपीठामध्ये स्त्रीयांचाही सहभाग असावा अशी भूमिका मांडली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे दुश्मन असणाऱ्या महिलांनाही सन्मानपूर्वक वागणूक दिली होती.

आधुनिक काळात ब्रिटिशांची सत्ता आल्यापासून पाश्चात्य विचारांचे वारे वाहू लागले होते. त्याकाळात सुशिक्षित तुरुणांना शिक्षणाचे महत्व समजू लागले होते. परंतु तेंव्हाही स्त्रीया शिक्षणापासून वंचितच होत्या. पण अनेक समाजसुधारकांमुळे बदलाचे वारे वाहू लागले. अनेक सुधारणावादी कृती घडू लागल्या. स्त्री व पुरुष मानव म्हणूनच जन्माला आले पण तरीही स्त्रीयांना धर्म, वंश, लिंग यांमध्ये दुय्यम वागणूक मिळत असे. परंतु या सर्व असमानतेना कृतीशील आव्हान देन्याचे काम महात्मा फुलेंनी केले. तत्कालीन पुरुषी व्यवस्थेचा जोरदार प्रतिकार महात्मा फुलेंनी केला.

सत्यशोधक समाज स्वरूप व कार्य:

ब्राह्मणी वर्चस्व धार्मिक, सामाजिक, आर्थिक सर्व अंगांनी व्यापणारे आहे. वरिष्ठ वर्ग त्यांना मिळालेल्या सवलती सहजासहजी सोडणार नाही म्हणून बहुजन समाजाने वरिष्ठ वर्गाचा संघटित प्रतिकार करून त्यांचे वर्चस्व मोडले पाहिजे, या उद्देशाने महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष व कोषाध्यक्ष महात्मा फुले होते तर नारायण गोविंदराव कडलग हे कार्यवाहक म्हणून कार्यरत होते.

सत्यशोधक समाजाचे स्वरूप:

या समाजाचे सदस्यत्व सर्व जातीच्या लोकांसाठी खुले होते. कनिष्ठ वर्गाला मानसिक गुलामीतून मुक्त करून व त्यांच्यात समता, बंधुता व स्वातंत्र्याचे विचार रुजविण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना झाली होती. स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुता या आधुनिक कल्पना सत्यशोधक समाजात होत्या. मानवाचे मुलभूत हक्क व

मानवतावाद या प्रेरणा त्यामागे होत्या. समाजसुधारणेचा हा एक व्यापक व सर्वांगीण प्रयत्न होता. वेद हे मानवनिर्मित आहेत अशी जोतिबांची खात्री होती.

१८७४ साली कृष्णाराव भालेकर यांच्या विनंतीवरून जोतीरावांनी सत्यशोधक समाजाची शाखा मुंबई येथे सुरु केली. पुण्यात आणि पुण्याबाहेर ज्या ठिकाणी सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापन झाल्या त्या ठिकाणी दर आठवड्यास सभा होत असत. पुण्यातील सोमवार पेठेत डॉ. गावडे यांच्या घरी दर आठवड्याला सभा होत असत, त्या ठिकाणी दारुबंदी, सक्तीचे शिक्षण, स्वदेशी वस्तु वापरण्याला प्रोत्साहन देणे, ब्राम्हणांची धार्मिक क्षेत्रातील पुरोहितगिरी झुगारुन देणे, कुटुंबातील लग्ने अल्प खर्चात करण्याची व्यवस्था करणे, ज्योतिष, भुते यांच्या भीतीपासून लोकांना मुक्त करणे यांवर चर्चा होत असे. जातिभेद मूर्तिपूजा यांच्याविरुद्ध मुख्य प्रचार होत असे.

सत्यशोधक समाजाला फार मोठ्या बुद्धिवंतांचा पाठिंबा होता असे नाही तर त्यांचा तत्वज्ञानी पुरुष हा साधा प्रामाणिक शेतकरी होता, तो सामान्य शेतकरी असला तरी त्याला आंगिक प्रेरणा व बुद्धिप्रामाण्याची देणगी निसर्गतःच लाभली होती सत्यशोधक समाजाच्या प्रचाराची स्थळे, सभा, बैठका म्हणजे शेतीवरील मळणीचे स्थान होते. प्रचारकांचा पोशाख म्हणजे एक घोंगडी, पागोटे व धोतर आणि हातात डफ असे होते. त्यांच्या भाषणात ते शेतकऱ्यांच्या कर्जाचा उल्लेख करीत.

सत्यशोधक समाजाचे कार्य:

सत्यशोधक समाजातील पहिला विवाह ३५ डिसेंबर १८७३ रोजी झाला. सिताराम जम्बाजी अल्लाट यांचा विवाह राधाशी झाला. पुरोहिताशिवाय लग्ने लावण्यासाठी मंगलाष्टके मराठीत रचली होती. लग्नात धार्मिक विधी न करता एकमेकांशी एकनिष्ठ राहण्याची व समाजाच्या कल्याणासाठी कार्य करण्याची प्रतिज्ञा वधूवरांनी घेतली होती. ७ मे १८७४ रोजी सत्यशोधक पद्धतीने दुसरा विवाह ज्ञानोबा ससाणे यांचा झाला. या लग्नाला प्रचंड विरोध झाल्याने पुण्यातील एक सार्वजनिक कार्यकर्ते गंगाराम भाऊ म्हस्के व पुण्यातील वकील पोलन्नी राजन्ना लिंगु या दोन गृहस्थांकडून जोतीरावांनी लग्नाच्या दिवशी पोलीस बंदोबस्त ठेवला होता. तत्कालीन वृत्तपत्रात 'ब्राह्मण पुरोहिताशिवाय हिंदू विवाह' असा मथळा देऊन खळबळजनक बातमी देण्याचा प्रयत्न झाला होता. सत्यशोधक समाजाचा दुसरा वार्षिक समारंभ १८७५ साली साजरा करण्यात आला. याच वर्षी इलेय्या सालोमन नावाच्या एका ज्यु व्यक्तीला कार्यकारी मंडळाचे सभासद करुन घेतले. त्यादरम्यान अहमदाबाद येथील नदीला पूर आल्याने जे नुकसान झाले त्यासाठी समाजाच्या कार्यकर्त्यांनी तेथील लोकांच्या मदतीसाठी निधी गोळा करून पाठवला. सत्यशोधक समाजाने जोतीरावांच्या गुलामगिरी व ब्राम्हणांचे कसब या दोन ग्रंथांच्या प्रती हिंदी संस्थानिक व समाजातील प्रतिष्ठित लोकांना विनामूल्य पाठवल्या.

सत्यशोधक समाज हा अतिशय संवेदनशील व मानवी मुल्य जपणारा होता, कारण या समाजाने पुण्यातील कनिष्ठ वर्गातील मूले रस्त्यांवर गारुड्यांचे खेळ बघत व तमाशे पाहत भटकू नयेत म्हणून त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठी एका शिपायाची नेमणूक केली, त्या शिपायाचे काम त्या मुलांना शाळेत नेऊन बसवणे हे होते. तसेच स्थापत्यशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे सत्यशोधक समाजाने एक अर्ज केला की महाविद्यालयात काही प्रमाणात गरीब ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना निःशुल्क शिक्षण मिळावे आणि तो अर्ज मंजूर ही झाला.

सत्यशोधक समाज आणि समकालीन कर्तृत्ववान स्त्रिया:

फुलेंच्या शाळेत इयत्ता चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या मुक्ता साळवे या विद्यार्थिनीने १८५५ साली लिहिलेल्या 'मांग-महाराच्या दुःखाविषयी निबंध' या कलाकृतीत दलित स्त्रियांना उघड्यावर बाळंतपण करावे लागत असे त्यामुळे त्यांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत असत याचे वर्णन केले आहे. आम्हाला जर वेदांचा अधिकार नाही, तर आमचा धर्म तरी कोणता? इतका भिडणारा व ब्राह्मणी व्यवस्थेला आव्हान देणारा प्रश्न चौथीत शिकणाऱ्या मुक्ता साळवे ने उभा केला होता. सत्यशोधक चळवळीने अनेक महिला घडविल्या त्यातीलच सत्यशोधक ताराबाई शिंदे यांनी पहिले स्त्रीवादी पुस्तक 'स्त्रीपुरुषतुलना' लिहिले व १८८२ साली या ग्रंथाने खळबळ उडविली व पुरुषी माध्यमांनी सर्व स्तरातून टिका केली पण 'सत्सार' या नियतकालिका मधून जोतीराव ठामपणे ताराबाईंच्या पाठीशी उभे राहिले. सत्यशोधक परिवाराचा वारसा असलेल्या तान्हुबाई बिर्जे या १९०६ साली भारतातील पहिल्या महिला संपादक झाल्या. १९१४ साली 'रामोशी समाचार' मधून सावित्रीबाई रोडे या दलितांच्या व्यथांना वाचा फोडू लागल्या. तसेच त्यांनी सत्यशोधक चळवळीचे नेतृत्वही केले.

पितृसत्ताक - व्यवस्था व स्वरूप:

पुरुषप्रधान समाज म्हणजे जिथे पुरुषांना स्त्रियांपेक्षा जास्त अधिकार आणि विशेषाधिकार असतात. पितृसत्ता म्हणजे अशी सामजिक व्यवस्था जिथे अनेक स्तरांवर जसे की, कुटुंब, समाज आणि सत्ता यामध्ये पुरुषांचे वर्चस्व असते. या व्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांवर पुरुषच प्रमुख असतो. सर्व प्रकारचे अधिकार पुरुषांकडे असतात.

इतिहासकार गर्डा लर्नर यांच्या मते पितृसत्ताक व्यवस्था संरचना बदलू शकतात कारण त्या सांस्कृतिक आहेत, नैसर्गिक नाहीत. स्त्रीवादी लेखकांनी पितृसत्ताक व्यवस्थेची व्याख्या महिलांविरुद्ध पद्धतशीर पूर्वग्रहाचे वर्णन करण्यासाठी विस्तारित केली आहे. अनेक स्त्रीवाद्यांच्या मतानुसार महिलांवरील अत्याचार हे पितृसत्ताक समाजाच्या अंतर्निहित पूर्वाग्रहातून आले आहे. स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे विविध पैलू आणि त्याची व्यापकता समजून घेण्यासाठी पितृसत्ता ही महत्वाची संकल्पना आहे. पुरुष हे पित्तृसत्ताक व्यवस्थेचे प्रथम लाभार्थी आहेत, आणि स्त्रियांच्या दुय्यमत्वातून पुरुषाचे वर्चस्व टिकून राहते. मार्क्सवादी अभ्यासकांनी स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचा संबंध उत्पादन आणि भांडवलशाही व्यवस्थेशी जोडला आहे. पूर्वी सती प्रथा, जरठकुमारी विवाह, सक्तीचे वैधव्य, केशवपण सारख्या अमाणुष प्राथांच्या मुळाशी गेल्यावर समजून येऊ शकते की या प्रथांचाही उगम पितृसत्ताक मानसिकते मधूनच झाला आहे.

पितृसत्तेला नाकारणारे सिद्धांत:

१९ व्या शतकामध्ये अनेक समाजसुधारकांनी पितृसत्तेला आव्हान देण्याचे काम केले आहे. काहींनी कृतीशील कार्यक्रम घेऊन तर काहींनी ग्रंथाची रचना करून पितृसलेचा प्रतिकार केला आहे. १८५५ साली जोतीराव फुलेंनी 'तृतीय रत्न' हे पहिले आधुनिक मराठी नाटक लिहिले. शेतकरी पती-पत्नी शेवटी जोडीने रात्रशाळेला जातात असे अतिशय आदर्शवादी दृश्य जोतिबा फुलेंनी दाखविले आहे. ज्या काळात पती पत्नीने सगळ्यांच्या समोर एकमेकांशी बोलणेही निषिद्ध होते, त्या काळात शिकायला दोघांनी एकत्र जाणे, बरोबर जेवण करणे असे अर्थपूर्ण लिखाण जोतिबा फुले यांनी तृतीय रत्न नाटक मध्ये लिहिले आहे. तेंव्हा त्यांचे वय अवघे २८ वर्ष होते.

सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक मध्ये महात्मा फुलेंनी स्त्री व पुरुष हे दोघेही समान आहेत आणि त्यांना त्यांच्या गुणवत्तेवरून ओळखले जावे तसेच स्त्री-पुरुष दोघांनीही कष्टकरी व्हावे आणि आनंदाने कुटुंबाचे पालनपोषण करावे अशा आशयाचे अखंड त्यांनी लिहिले आहेत. त्यावरून लक्षात येते कि स्त्री - पुरुष समता हेच महात्मा फुलेंच्या कार्याच्या अग्रस्थानी होते.

सत्यशोधकांचे समतेचे प्रयत्न:

समाजिक क्रांतीचे जनक महात्मा फुले यांनी सर्वव्यापी कार्य केले आहे. थॉमस पेन लिखित राइट्स ऑफ कॉमन मॅन या पुस्तकाचा प्रभाव त्यांच्यावर होता. ३ ऑगस्ट १८४८ रोजी भारतातील पहिली मुलींची शाळा महात्मा फुलेंनी सुरु केली. त्यानंतर १८५१ रोजी दूसरी मुलींची शाळा सुरु केली तसेच १८५२ मध्ये मुलींची तिसरी शाळा सुरु केली. फक्त यावरच न थांबता त्यांनी १८५५ रोजी पहिली प्रौढ रात्रशाळा स्थापन केली.

त्या काळी विधवा महिलांचे अनेक प्रकारे लैंगिक शोषण व्हायचे कधी बाहेरील व्यक्तीकडून तर कधी कुटुंबातील व्यक्तीकडून शोषण व्हायचे, अशातच महिला गरोदर राहत व भीतीपोटी आत्महत्या करीत असत, किंवा बाळाला जन्म देऊन कुठेतरी सोडून जात असत या सर्व प्रकारामुळे महात्मा फुलेंनी त्यांच्या घरातच १८६३ साली 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले. त्या महिलांची जबाबदारी सावित्रीबाई फुले सांभाळीत असत. त्या गरोदर महिलांची प्रसुती करणे सुरक्षितता पुरविणे व बालकांचे संगोपन करणे हे सर्व निष्ठेने सावित्रीबाई फुले करत असत. महात्मा फुलेंनी पुणे येथे मार्च १८६४ साली पहिला पूनर्विवाह घडवून आणला.

पुढे सवित्रीबाई फुलेंनी सत्यशोधक समाजाचे काम अनेक अंगांनी पुढे नेले. स्त्री शिक्षणाची बंदी असणाऱ्या काळात सावित्रीबाई फुले शिकल्या व त्या भारताती पहिला महिला शिक्षिका ठरल्या सामाजिक सुधारणा व सामाजिक समस्यांचे निर्मुलन करण्यासाठी सावित्रीबाई फुलेंनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली. तसेच त्यांनी महिला सेवा मंडळाच्या वतीने 'सुतकताई' योजना ही गरजु महिलांसाठी सुरु केली. सत्यशोधक समाजाच्या सासवड येथे झालेल्या २० व्या परिषदेचे अध्यक्षपद सावित्रीबाईंनी भूषविले होते.

त्यानंतर कृष्णराव भालेकर हे फुलेंच्या संपर्कात आल्यानंतर ते सत्यशोधक समाजाच्या कार्यकारिणीवर निवडले गेले. १८७७ मध्ये त्यांनी सत्यशोधक चळवळीचे पहिले पत्र सुरू केले. पुढे त्यांनी १८८४ साली 'पुणे सुशिक्षणगृह' स्थापन केले. या गृहात विविध जातींची मुले होती. ज्यात फक्त १२ रूपये भोजनासह सर्व व्यवस्था होती. कृष्णाराव भालेकरांनी ब्राह्मणी सार्वजनिक सभेला शह देण्यासाठी १८८४ साली आपली स्वतंत्र 'दीनबंधु सार्वजनिक सभा' काढली. सत्यशोधक केशवराव जेधे आणि लोकमान्य टिळक यांच्यात मोफत व सक्तीचे शिक्षण यावरून वाद झाला. मोफत व सक्तीचे शिक्षण फक्त मुलांना द्यावे अशी टिळकांची भूमिका होती पण ते सर्वांना मिळावे अशी जेधेंची भूमिका होती. पुण्यात स्त्रियांच्या अनेक सभा भरवून टिळकांचा निषेध करण्यात आला. पुढे जाऊन दिनकरराव जवळकरांनी 'प्रणय प्रभाव' हे नाटक आंतरजातीय विवाहाचे समर्थन करण्यासाठी लिहिले. नंतर भास्करराव जाधव यांनी पुरोहिताला न बोलवता घरीच धार्मिक विधी कसा करता येईल यासाठी त्यांनी 'घरचा पुरोहित' हे पुस्तक लिहिले. अशाप्रकारे अनेक सत्यशोधक समाजसुधारकांनी त्यांच्या कृतीशील कार्यातून समता प्रस्थापित करण्याचे काम केले.

पितृसत्ताक व्यवस्थेला सत्यशोधकांचे आव्हान आणि अंतिम परिणाम:

सत्यशोधक समाजाने अनेक अंगांनी पितृसत्ताक व्यवस्थेला आव्हान दिले आहे. जोतीबा फुलेंनी बालविवाहाला कडाडून विरोध करत विधवा पुनर्विवाहास पाठिंबा दिला होता. भारतातील खंडित झालेल्या शिक्षण परंपरेमध्ये 3 ऑगस्ट १८४८ रोजी भारतातील पहिली मुलींची शाळा काढून महात्मा फुलेंनी शिक्षण क्रांतीचे नवे पर्व सुरु केले. अस्पृश्यता पाळण्याचा काळ शिखरावर असताना त्यांनी १८५२ साली अस्पृश्यांसाठी पुण्यात पहिली शाळा काढली. जातीव्यवस्था प्रखर असण्याच्या काळात बुराजी आपाजी चांभार व गणु शिवाजी मांग हे दलित वर्गातून आलेले शिक्षक अस्पृश्यांच्या शाळेत कार्यरत होते. फुलेंनी दलितांसाठी १८५२ मध्ये वाचनालय सुरु केले.

अनाथ बालिकाश्रम व बालहत्या प्रतिबंधगृह स्थापन करून महात्मा फुलेंनी प्रस्थापित पितृसात्तक मानसिकतेला हादरा दिला. सत्यशोधक समाजाने महिलांमध्ये आत्मसन्मान जागृत करण्याचे काम केले. सत्यशोधक समाजाने केलेल्या कामाची परिणीती अशी झाली, की लक्ष्मीबाई नायडू यांच्या अध्यक्षतेखाली १९२५ साली विदर्भात वर्ध्याला भरविण्यात आलेल्या सत्यशोधक महिला परिषदेला पाच हजार महिला उपस्थित होत्या. आणि त्यात त्यांनी आपल्या हक्कांसाठी कृतिशील राहण्याचा निर्धार केला. हे सर्व सर्व शक्य झाले ते सत्यशोधक समाजाच्या संघर्षाकार्यामुळेच.

सत्यशोधकांसाठी जोतीरावांनी जे नियम केले होते त्यात स्त्री - पुरुष समतेवर विशेष भर दिला होता. त्यांच्या मतानुसार स्त्री व पुरुष हे जन्मताच स्वतंत्र असतात. ते त्यांच्या सर्व अधिकारांचे उपभोग घेण्यास पात्र असतात. स्त्री -पुरुषांची वेशभूषा, खानपान यावरून त्यांच्यात कोणत्याही कारणांवरून भेदभाव करता येणार नाही. असे अनेक समताधिष्टीत नियम जोतिबा फुलेंनी घालून दिले होते.

विधवांना केशवपन करून विद्रुप केले जात असे. त्यामुळे त्यांचे प्रचंड मानसिक खच्चीकरण होत असे, सत्यशोधक समाजाने यावर आवाज उठविला होता. सत्यशोधक नारायण मेघाजी लोखंडे यांनी विधवांचे केशवपण न करण्याचे आवाहन सर्व नाभिकांना केले. त्यामुळे जवळजवळ एक हजार, नाभिक केशवपनास नकार देण्यासाठी संपावर गेले. मानवी मुल्यांना जपण्यासाठी, त्यांच्या सन्मानासाठी सत्यशोधक समाजाने हा संप घडवून आणला. मुंबईच्या गिरणी कामगार महिलांचे शोषण होत असल्याने त्या विरुद्ध सत्यशोधक समाजाने आवाज उठविला होता. 25 मार्च, १८९३ रोजी जेकब मिलच्या ४०० स्त्रियांनी तेथील व्यवस्थापक पुरुषांना धडा शिकविला होता. तत्कालीन प्रस्थापित विवाह पद्धतीमध्ये स्त्रियांना अतिशय हीन वागणूक मिळत असल्याने, जोतिबा फुले व सावित्रीबाई फुलेंनी सत्यशोधक विवाह पद्धत सुरु केली. ज्यात अनिष्ट रूढी परंपरा, अपमानास्पद रुढी व हुंडा यांना नाकारले गेले. महात्मा जोतिबा फुलेंनी १८८७ साली 'सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा- विधी', ही पुस्तिका लिहिली. स्त्रियांना दुय्यम, अपमानास्पद वागणूक देणाऱ्या सर्व रुढी परंपरा टाळूनच विवाह लावला जावा तसेच कोणत्याही जातीचा वर असला तरी त्याला मंडपात गावातील महार स्त्रीने ओवाळल्या शिवाय सत्यशोधक विवाह विधी पार पडणार नाही अशी अट घालून जाती निर्मुलनाचे कामही या विवाहाने केले. या लग्नात भटजीला स्थान नव्हते, तर मित्रांच्या सांक्षीने हा सोहळा पार पडत असे.

बहुजनांनी हजारो वर्षाच्या संस्कारांना मागे सारून, भटजीला नाकारून सत्यशोधक विवाह करण्यास सुरुवात

केली. महिलांना हीन वागणूक देणाऱ्या विवाहपद्धतीला नाकारून महात्मा फुलेंनी मानवी हक्कांचा सन्मान करणाऱ्या सत्यशोधक विवाह पद्धतीची सुरुवात केली. ही स्त्री - पुरुषाच्या नात्यातील समतेची क्रांती होती. अशा प्रकारे अनेक अंगांनी सत्यशोधक समाजाने पितृसत्ताक व्यवस्थेचा प्रतिकार केला आहे.

समताधिष्ठित समाजनिर्मिती आणि सत्यशोधक समाज:

"सर्व साक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती।" हे सत्यशोधक समाजाचे ब्रीदवाक्य होते. अनेक रूढी, परंपरा, प्रथांना प्रतिकार करत सत्यशोधक समाजाने सर्वव्यापी मानवी मूल्ये रुजविण्याचे महान कार्य केले. सत्यशोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही काम केले. शेती ही आधुनिक पद्धतीने केली पाहिजे, शेतीला नळाद्वारे पाणीपुरवठा केला पाहिजे. त्यासाठी तलाव, विहिरी, धरणे बांधली पाहिजेत. फक्त शेतीमधूनच उत्पादन येऊ शकत नाही, म्हणून त्यासोबत उद्योग व व्यापार सुद्धा हवा. शेतीसाठी नैसर्गिक खते, बियाणे वापरले पाहिजेत. कॅनॉलचे पाणी आणि आधुनिक पीकपद्धत वापरली पाहिजे, असे शेतीविषयक महत्त्व महात्मा फुलेंनी 'शेतकयाचा असूड' यामध्ये पटवून दिले आहे. शेती समृद्ध असेल, तर समाजाची उन्नती होऊ शकते, हे महात्मा फुलेंना व सत्यशोधक समाजाला माहित होते. बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केल्याने अनेक महिलांना सन्मानाने जगण्याचा, स्वतःच्या मानवी हक्कांना जपण्याचा अधिकार महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेंनी मिळवून दिला. मुली व अस्पृश्यांसाठी शाळा सुरु करुन, पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार देऊन, महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेंनी शैक्षणिक समता प्रस्थापित केली.

सत्यशोधक समाजामुळे मानवाला त्याच्या विवेकाची जाणीव झाली. तो बुद्धिप्रामाण्यवादी बनला. अनेक हजारो वर्षांपासून चालत आलेल्या रुढी, परंपरा, अनिष्ठ प्रथा यांना अनेकांनी झुगारून देऊन समतेला जीवनाचे मूलभूत तत्त्व म्हणून स्वीकारले. महात्मा फुलेंनी बुद्धीचे महत्त्व सातत्याने सांगितले आहे. सत्यशोधक समाजामुळे अनेक जनांनी असमानता, भेदभाव नाकारून समतेच्या वाटेवर आपला प्रवास सुरु केला. हा प्रवास पितृसत्तेचा पाया खिळखिळा करणारा ठरला.

संदर्भ:

प्राथमिक साधने:

१. फुले जोतीराव, शेतकऱ्याचा आसूड, ई साहित्य प्रतिष्ठान, १८८३.
२. फुले जोतीराव, सार्वजनिक सत्यधर्म, सुबोध प्रकाशन प्रेस, बॉम्बे, १८९१.
३. फुले जोतीराव, गुलामगिरी, चित्रशाळा प्रेस पुणे, १८७३.
४. शिंदे ताराबाई, स्त्री –पुरुष तुलना, श्री शिवाजी प्रेस, १८८२.

दुय्यम साधने:

१. नरके हरी, महात्मा फुले समग्र वाङ्मय; महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०२१.
२. पाटील पंढरीनाथ, महात्मा जोतिबा फुले यांचे चरित्र, समता प्रकाशन, नागपूर, २०१९.
३. नरके हरी, महात्मा जोतीराव फुले पर्यायी समाजव्यवस्थेचे शिल्पकार, नाग - नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, २०२३.
४. चव्हाण रा. ना., महात्मा फुले, सत्यशोधक समाज व सामाजिक प्रबोधन, रमेश चव्हाण, पुणे, २००९.

५. डॉ. बोरोडे नीळकंठ, जोतीराव फुल्यांचा सुधारणावाद, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९४.
६. गोडबोले अनिल, महात्मा जोतिबा फुले दीपस्तंभ, उन्मेष प्रकाशन पुणे, १९९१.
७. चव्हाण. रा.ना., महात्मा फुले यांचा शोध व बोध, रमेश चव्हाण, पूणे, २00४.
८. चव्हाण रा.ना., महात्मा फुले यांचे नवदर्शन एक तौलनिक अभ्यास, रमेश चव्हाण, पुणे, २००८.
९. पाटणकर भारत, महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९१.
१०. डॉ. गुंदेकर श्रीराम, सत्यशोधकीय निबंध, वसंतराव फाळके, लातूर
११. जोशी लक्ष्मणशास्त्री, जोतिचरित्र, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, १९९२.
१२. लाव्हात्रे बबन, बुद्धिप्रामाण्यवादाचे पहिले समर्थक क्रांतीबा जोतीराव फुले, डॉ. आंबेडकर बौद्ध विद्यापीठ प्रकाशन, नागपूर, २००५.
१३. नरके हरी, महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, १९९८.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

Contribution of the Anti-Government and Western Maharashtra: A Critical Analysis

Dr. Sharmila Ashok Sabale
Professor, Department of History,
Rajarshi Shahu Arts and Commerce College, Rukadi,
Tal: Hatkanangale, Dist: Kolhapur, 416118.
Corresponding Author - Dr. Sharmila Ashok Sabale
DOI - 10.5281/zenodo.19661154

Abstract:

A leading leader in the Indian freedom struggle, he launched an armed struggle against British rule, proposed the concept of independent government and established a 'Patri Sarkar'. He continued to work tirelessly even after independence, playing a significant role in the political and social spheres. Under the leadership of Krantisinh Nana Patil, a parallel government was run in parts of Satara and Sangli districts, defying British rule. In this, the local people and the 'Tufan Sena' played an important role. Armed revolutionaries worked secretly in Pune, Nashik and Satara districts. They made bombs, looted government treasury, and delivered messages.

Keywords: Leader, Freedom Struggle, Independence, Anti-government, Role, Social etc.

Introduction:

Western Maharashtra's contribution to the Indian freedom struggle is unparalleled, and it was a center of armed revolution, Gandhian non-violent movement and social reforms. From the armed uprisings of Vasudev Balwant Phadke, the Chaphekar brothers to Nana Patil in the Quit India movement of 1942, and the ideas of Tilak-Savarkar in Pune were influential in this region. Western Maharashtra's contribution to the Indian freedom struggle is unparalleled, and it was a center of armed revolution, Gandhian non-violent movement and social reforms. From the armed uprisings of Vasudev Balwant Phadke, the Chaphekar brothers to Nana Patil in the Quit India movement of 1942, and the ideas of Tilak-Savarkar in Pune were influential in this region. Even though women have been socially excluded from politics or the outside world in Indian society and society has treated them differently, some women of this era have gone down in history with their bravery and achievements. In India, the theoretical and practical views of women have been contradictory. The dominant religious culture here has been exploiting ordinary women for thousands of years. During ancient and medieval times, women in Maharashtra had many opportunities to showcase their talents, and women have proven their mettle in all fields.

Problems of the Study:

In Maharashtra, it seems that special efforts were made to elevate the social status of women during the colonial period, as a result of which women's participation in the freedom struggle became significant. Only by imparting knowledge to ordinary women through education and by creating awareness of their self-esteem will the true social and political empowerment of women be achieved. It is the need of the hour for today's youth to take as role models the women of

the Indian freedom struggle. There are many dimensions like social, political, and religious. If it is not possible to fully understand the situation by studying only one dimension, then where necessary, reference will be made to the necessary factors. From the perspective of geographical scope, a general study of this regional part of Maharashtra will be done.

Objectives of the Study:

The main objective of this research is to study the contribution of Western Maharashtra to India's freedom struggle and its participation in the Patri Sarkar. Some specific objectives have been given by the researcher as follows.

1. To Study the contribution of Western Maharashtra to the freedom struggle.
2. To Study the factors affecting the freedom struggle in Western Maharashtra.
3. To Study the contribution of Western Maharashtra to the freedom struggle and its participation in the anti-government.

Significance of the Study:

The participation of women in political life in the 20th century must be considered an important milestone in Indian history, and especially in the history of Indian women. Rewriting history is a need for the present and future. Similarly, writing regional history is also a need of time. Till date, regional and provincial history seems to have been neglected by Indians. In fact, all regions of India have contributed to the national movement. The contribution of Western Khandesh to the national movement is important.

Scope of the Study:

The northwestern part of Maharashtra is called Western Khandesh. The national level educational, social and political movements were having a profound impact on the social life of Western Khandesh. The participation of Western Khandesh in the Indian national movement was characteristic in all three periods. Many armed revolutionary men among the tribals migrated to the western Khandesh, and their contribution to the national movement was also important. The British hanged the Bhil leader Chilya Naika.

Limitation of the Study:

India is the only country in the world that has a long cultural tradition, seeks unity in diversity, and yet, despite being riddled with widespread ignorance, poverty, and inequality, stubbornly challenged the British in a non-violent way. The Indian freedom movement was the biggest movement. Lakhs of men and women participated in it. They came together forgetting caste, class, and class. Due to this, the imperialist British power was forced to retreat.

Period of the Study:

While studying the contribution of Western Maharashtra to the freedom struggle and its current status, the researchers have completed the research by reviewing the information from 2025-26.

Research Methodology:

To study the participation and direct contribution in the freedom struggle in Western Maharashtra, the researcher has used various types of secondary research. These include research papers, articles, journals, newspapers, audio videos, reference books, serial books, annual reports, historical writings, old evidence etc.

Research Method:

This research has been completed using descriptive analysis method along with various types of secondary research to study the contribution of Western Maharashtra to India's freedom struggle and its current status.

Results and Discussion:

Like men, women from all parts of India participated in this, and women from Maharashtra were no less. Their valuable contribution to this struggle was also significant. Therefore, it seems necessary to shed research light on their work. The Congress was founded in 1885, and in the early days, the Congress party was dominated by moderate leaders like Gopalkrishna Gokhale and Dadabhai Naoroji. In the early days of the Congress, the participation of women in this party was negligible. However, some prominent women of the time participated in it to some extent to oppose social inequality. In this, we will shed research light on the performance of Kashitai Kanitkar in this field in the early days.

Mahatma Gandhi and Western Khandesh:

Just as Lokmanya Tilak had close ties with Western Khandesh, after Tilak's death, Mahatma Gandhi also seems to have close ties with Western Khandesh. Mahatma Gandhi's tour of Western Khandesh took place from 12 to 15 February 1927. On 12 February 1927, Gandhiji got down from Amalner at Shindkheda railway station at 11.48 pm. After the meeting here, he went to Shahada. He arrived in Songir on 13 February 1927. Gandhiji held a meeting in front of the Samadhi of Guru Gobind Maharaj in Songir. After finishing his stay in Songir, Gandhiji came to Dhule. Visited villages like Nizampur, Pimpalner, Sakri, Ner, etc. After completing his tour of Western Khandesh, Gandhiji left for Malegaon. Gandhiji's tour of Western Khandesh motivated the people of this place to participate in the national movement. The All-India Congress Party met at the Sabarmati Ashram in February 1930. In that meeting, it was decided to initiate active civil disobedience in India. The Congress Party entrusted the leadership of this matter to Mahatma Gandhi, and the civil disobedience movement began all over India. In Western India, a large number of people joined the movement and opposed the British government. On March 12, 1930, Gandhiji started the Dadi Yatra. Naval Anada Patil from West Khandesh. Mr. Ramchandra Baba Mohadikar, Rangnath Tongaonkar, three students went to Dadi to join this pilgrimage and one day they came back to join that huge celebration.

West Khandesh and the Quit Movement of 1942:

On 8th August 1942, the Congress General Committee held in Mumbai passed a resolution for the Quit Movement. Mahatma Gandhi was to deliver this message in a public meeting on 9th August, but the previous government arrested Gandhi and other prominent Congress leaders early in the morning. Shri. Balubhai Mehta from West India had gone to the Mumbai convention. The next program in West India was held in a mall in Dangurne. In this meeting, the leadership of the Chalejao movement in Western Khandesh was entrusted to Mr. Balubhai Mehta. For the convenience of work, Dhule district was divided and Shahada, Taloda, Navapur, Nandurbar talukas were handed over to Shri. Shankar Vinayak Thakar while Sakri, Dhule, Shirpur, Shindkheda talukas were handed over to Shri. Vishnu Sitaram Patil and Shri. Rangnath Tongaonkar. It had been a month since the arrest of the Congress leader.

Politics and History of Maharashtra:

The year 1985 is so historically significant in the history of the Indian National Congress that it should be written in golden letters. The National Congress, founded in 1885, celebrated its centenary this year. This organization was founded in Maharashtra a hundred years ago, and its establishment filled a major gap in the country's political life at that time, so this year is also a year of pride for Maharashtra. The formation of the Congress opened a political space for Indians who were struggling under the yoke of colonialism, crushed

under the yoke of foreign imperialist power, and completely helpless in the political arena. Over its century-long existence, Congress has played a leading role in bringing about many historic transformations in the country.

Contribution of Maharashtra:

The contribution of Maharashtra to the consolidation of the Congress during the period 1885 to 1920 is particularly significant and substantial. During this period, the ideological meeting of the Congress, as well as the direction of its ideological beliefs and methods of work, were largely determined by the leaders of the Maharashtra Congress. The two different schools of thought that emerged in the Congress during this period largely had their roots in the different ideological views of the then Maharashtrian Congress leaders. In fact, it would not be an exaggeration to say that these two different currents in the Congress were the echoes of two opposing ideologies in Maharashtra. During this period, Congress leaders in Maharashtra were at the forefront of the organization's policy-making work.

Revolutionary Movement and the Uprising of 1857:

There was a long-standing resentment against the British in Maharashtra. Ramoji Bhangre, Vasudev Balwant Phadke fought an armed struggle. In the 1857 uprising, freedom fighters from Satara, Kolhapur and Khandesh played a major role.

The Struggle of Revolutionaries:

Anant Kanhere of Nashik, Babasaheb Savarkar, Swatantryaveer Savarkar adopted the path of armed revolution. The 'Abhinav Bharat' organization founded by Savarkar produced many revolutionaries. Maharashtra was at the forefront of Mahatma Gandhi's movement. After 1920, Maharashtra played a major role in the Non-Cooperation Movement, Civil Disobedience and the 'Quit India' movement of 1942.

Social Reformers and National Movement:

Mahatma Jyotirao Phule, Gopal Ganesh Agarkar, Rajarshi Shahu Maharaj, Dr. Babasaheb Ambedkar not only carried out social reforms, but also contributed to the building of the nation by connecting the oppressed classes with the freedom struggle.

Conclusion:

Maharashtra is one of the largest commercial and industrial centers in India and has played a significant role in the social and political life of the country. It is a leader among Indian states in terms of agricultural and industrial production, trade and transport, and education. The martyrdom of revolutionaries in Maharashtra, the intellectual leadership of soft-spoken leaders, and the struggle of the common people paved the way for India's independence. 'Kranti Gatha' shows that Maharashtra has shed its blood to achieve the independence of this country. Women from Maharashtra also played a major role in the freedom struggle. Many women took an active part in silent marches, boycotts of foreign cloth, and satyagraha.

References:

1. Devidas (2025), People’s Movements and Social Transformation in Maharashtra (1930–1960) A Historical Perspective, pp. 2014-220.
2. Vishal Jadhav (2025), Elite Politics and Maharashtra’s Employment Guarantee Scheme, pp. 10-17.
3. Mick et. al. (2025), The politics and bureaucratic of rural public works: Maharashtra's employment guaranteed scheme, pp. 21-29.
4. Siddhnant (2002), Political Turmoil in Maharashtra: Relooking at the Powers of the Governor Within the Indian Federal Framework, pp. 42-46.

5. Rajeshwari et. al. (2024), Political Economy of a Dominant Caste, pp. 30-37.
6. Patole (2023), Leadership of Yashwantrao Chavan in Modern Maharashtra: historical review, pp. 1-4.
7. Phadke (1991), Peasant Movement in Maharashtra: A Case-Study of the Shetkari Sanghatana, pp. 23-27.
8. Anupama Rao (2020), Violence and Humanity: or Vulnerability as Political Subjectivity, pp. 63-69.
9. Revati and Lahane (2020), Cooperative Movement in Maharashtra- Retrospect and Prospect, pp. 43-52.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

स्वातंत्र्य लढ्यातील प्रतिसरकार आणि पश्चिम महाराष्ट्राचे योगदान

प्रा. प्रकाश हणमंत देवकर

Assistant Professor, Department of History,

G. K. G. K. M. College, Jaysingpur.

Corresponding Author - प्रा. प्रकाश हणमंत देवकर

DOI - 10.5281/zenodo.19661200

सारांश:

1942 साली भारत छोडो आंदोलन सुरू झाले. " करेंगे या मरेंगे " चा नारा दिला गेला. त्यामुळे ब्रिटिश शासनाने सर्व प्रमुख राष्ट्रीय नेत्यांना अटक केली. केंद्रीय नेतृत्व संपल्यामुळे स्थानिक कार्यकर्त्यांनी संघर्ष लढ्याची सूत्रे हाती घेतली. या कठीण परिस्थितीत कांही भागात ब्रिटिश शासनाला विरोध करत प्रतिसरकारे स्थापन करण्यात आली. ती पुढील प्रमाणे:-

1) **सातारा प्रतिसरकार महाराष्ट्र**
2) **तामलुक राष्ट्रीय सरकार बंगाल**
3) **बलिया राष्ट्रीय सरकार उत्तर प्रदेश**
4) **तलचर प्रजामंडळ सरकार ओरिसा**

प्रतिसरकार म्हणजे समांतर सरकार. सातारा येथील समांतर सरकार याची स्थापना 1943 मध्ये सातारा या ठिकाणी क्रांतीसिंह नाना पाटील आणि इतर सहकारी यांच्या पुढाकाराने झाले. या प्रतिसरकार मध्ये प्रमुख सहकारी आणि कांही महत्वाचे नेते होते.

1) **क्रांतीसिंह नाना पाटील:-** हे प्रमुख संस्थापक व मुख्य नेते होते. प्रतिसरकार स्थापनेतील अत्यंत धाडसी कार्यकुशल नेते होते.
2) **किसन वीर (आबा):-** यांनी वाई- सातारा ह्या भागात प्रतिसरकार चळवळीचे सक्रिय नेतृत्व केले.
3) **वसंतदादा पाटील:-** यांनी सांगली आणि सांगली-कोल्हापूर सीमेवरील रेल्वे लुटीच्या मोहिमांमधून महत्वाची भूमिका बजावली. त्यामध्ये सांगली सातारा परिसरात सरकारी रेल्वेने नेला जाणारा खजिना जप्त करण्यात भूमिका होती. तो खजिना व पैसा चळवळीच्या कार्यासाठी वापरला.
4) **यशवंतराव चव्हाण:-** प्रतिसरकारच्या स्थापनेच्या आणि प्रसाराच्या कामात यांनी मोलाचे योगदान दिले. भूमिगत संदेश वहन, जनतेत स्वराज्याची कल्पना पोहोचविणे आणि तूफान सेनेच्या कारवाया यामध्ये मोलाचे सहकार्य केले.
5) **बापू लाड:-** प्रतिसरकार मध्ये लष्करी कार्यांचे नियोजन करण्यात त्यांचा मोठा सहभाग होता.
6) **नागनाथ आणा नायकवाडी:-** त्यांनी प्रतिसरकार मध्ये तूफान सेनेचे नेतृत्व करून ब्रिटीशांविरुद्ध छत्रपती शिवाजी महाराजांसारखा गनिमी कावा वापरुन ब्रिटीशांना जेरीस आणले.
7) **शेख काका:-** इंग्रजी सत्तेला विरोध व लढा देत गावात न्याय निवाडे केले. अत्याचारी सावकार आणि जमीनदारांना शिक्षा केल्या.
8) **बर्डे मास्तर:-** पांडुरंग बर्डे हे जैन धर्माचे प्राथमिक शिक्षक होते. सातारा जिल्ह्यातील शिरारा पडे आणि वाळवा तालुक्याच्या पश्चिम भागातील क्रांतिकारी

गटाचे नेतृत्व केले. याच ठिकाणी प्रतीसरकारचा बालेकिल्ला होता.

9) **बाबूजी पाटणकर:-** 1944 साली प्रतिसरकारचे कांही प्रमुख नेते पकडले गेले त्यावेळी बाबूजी पाटणकर शिराळा पेठ वाळवा तालुक्यातील गटाचे नेतृत्व हाती घेतले.

10)**हौसाबाई पाटील:-** यांनी पोलिसांच्या हालचालींची अचूक माहिती मिळवून त्या क्रांतीकारकांना पुरवत असत. 1943 मध्ये वंगी येथील डाकबंगला जाळन्याच्या मोहिमेत त्यांनी पोलिसांचे लक्ष भरकटविण्यासाठी आपल्या सहकाऱ्यासह भांडण करणाऱ्या पती-पत्नीचे नाटक केले होते. याच काळात त्यांच्या सहकऱ्यांनी पोलिस ठाण्यातील रायफल्स लांपास केल्या. ही मोलाची कामगिरी पार पाडण्यात सहकार्य केले.

11)**लिलाताई पाटील:-** त्यांनी महिलांची एक संघटना बांधून प्रतिसरकारला मोलाचे सहकार्य केले.

संपूर्ण भारतात आधुनिक महाराष्ट्राची या प्रतिसरकारने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. ज्याप्रमाणे पानिपतच्या तिसऱ्या युद्धात महाराष्ट्रातील प्रत्येक घरातून एक योद्धा लढला त्याप्रमाणेच प्रतिसरकारच्या या लढ्यात सातारा येथील प्रत्येक घरातून एक व्यक्ति उतरला आणि त्यामुळेच ब्रिटीशांच्या कडक प्रशासनातसुद्धा ही प्रतिसरकारची चळवळ यशस्वी झाली. ही एक आश्चर्याचीच गोष्ट आहे हे विसरता कामा नये.

प्रतिसरकारची कार्य करण्याची पद्धत :

1) **लोकन्यायालये :-** ब्रिटिश न्याय व्यवस्था ही खूप महागडी होती. सर्वसामान्य वर्गाला व त्यांच्या खिश्याला परवडणारी नव्हती. त्याचप्रमाणे लोभी सावकार व शोषक जमीनदारांकडून होणारा अन्याय थांबवला पाहिजे या भूमिकेतूनच लोकन्यायालयांची स्थापना केली. प्रत्येक गावामध्ये प्रतिसरकारचे न्यायपीठ लोकांच्या तक्रारी निवारत असत. तेही जलद व कमी खर्चात न्याय मिळत असत. विशेषत: सावकाराच्या अन्यायकारक कर्ज प्रकरणावर विशेष न्याय भेटत असे.

2) **कर वसूली :-** प्रतिसरकारच्या चळवळीला लागणारे आर्थिक पाठबळ पूर्ण करण्यासाठी करवसुली करणे गरजेचे होते. त्याचप्रमाणे प्रतिसरकारच्या लष्करी कारवाया करण्यासाठी लागणारी साधने व खर्च पूर्ण करण्यासाठी पैशांची गरज असल्यामुळे कर वसूली केली गेली. लोकन्यायालये व प्रशासन चालविण्यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ पूर्ण केले गेले. ब्रिटिश सरकारच्या अन्यायकारक कर व्यवस्थेला जरब बसविण्यासाठी ही कर व्यवस्था स्थापन केली. जी लोक हितासाठी होती.

3) **ग्राम सुरक्षा :-** ब्रिटिश पोलिस बंदोबस्त खेडेगावात कमी प्रमाणात उपलब्ध असल्या कारणाने प्रतिसरकारचे एक संधीप्रमाणे याकडे लक्ष गेले आणि त्यांनी तूफान सेने अंतर्गत ही ग्राम सुरक्षा आणखी कडक केली. त्यामुळे होणारे चोरी-दरोडे व सावकार यांना चाप बसला गेला.

4) **दारूबंदी :-** संपूर्ण भारतात व महाराष्ट्रात ब्रिटिश सरकारचे प्रमुख महसूल उत्पन्नाचे केंद्र हे दारू असल्यामुळे त्यातून सरकार महसूल घेत होते. व्यसनाधीन होऊन अनेक संसार उध्वस्त झाले होते. हे सर्व थांबविण्यासाठी प्रत्येक गावात दारूबंदीचा उपक्रम चांगल्या पद्धतीने राबविला गेला. या दारूबंदीमुळे एक व्यसनमुक्त समाज निर्माण झाला.

5) **शेतकऱ्यांचे संरक्षण :-** अर्धनग्न कष्टकरी शेतकरी हा सावकाराच्या कर्जाला कंटाळून आत्महत्या करत होता

व सावकाराच्या शोषणाला बळी पडत होता. म्हणून प्रतिसरकारने यावर शेतकऱ्यांचे संरक्षण झाले पाहिजे ह्या भूमिकेमुळे अशा सावकारांवर कारवाई केली व त्या शेतकऱ्यांच्या धन-धान्याचे रक्षण प्रतिसरकारच्या तुफान सेनेने केले.

प्रतिसरकारची रचना:

ही रचना अतिशय शिस्तबद्ध आणि लोकशाही मूल्यांवर आधारली होती. ब्रिटिश शासनाविरुद्ध बंड पुकारून स्वशासन उभे करणे हा प्रतिसरकारचा मुख्य हेतु होता. प्रतिसरकारने सहाशे गावावर आपले स्वशासन निर्माण केले होते. त्याचे स्वरूप त्रिस्तरीय होते.

1) मध्यवर्ती कार्यकारी मंडळ : हे सर्वोच्च मंडळ होते. यामध्ये अकरा सदस्य होते. या कार्यकारी मंडळाला हुकूमशाह मंडळ (Dictator Board) असे म्हणत. या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे प्रमुख सदस्य पुढीलप्रमाणे होते :-

1)क्रांतिसिंह नाना पाटील 2) किसन वीर 3) नागनाथ आण्णा नायकवाडी 4)जी.डी. बापू लाड

2) प्रादेशिक विभाग : संपूर्ण कार्यक्षेत्राचे विविध जिल्ह्यात आणि वीस उपविभागात विभाजन केले होते. प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र विभाजक नायक नेमेले होते.

3) ग्राम राज्य (गाव समिती): स्थानिक पातळीवर गावचा कारभार पाहाण्यासाठी ग्राम समित्या स्थापन केल्या. या समित्या गांधीवादी विचारावर आधारीत होत्या.

4)प्रतिसरकार दीर्घकाळ टिकण्यामागची कारणे:

1) **भौगोलिक अनुकूलता:** सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि घनदाट जंगलांमुळे क्रांतिकारकांनी गनिमी कावा आत्मसात करून हे प्रतिसरकार यशस्वीपणे ब्रिटीशांच्या विरोधात लढू शकले. ब्रिटीशांच्या फौजांना या दुर्गम भागात प्रतिसरकार विरुद्ध विजयी होणे अशक्य झाले.
2) **सत्यशोधक चळवळीची प्रेरणा:** प्रतिसरकारला महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीची प्रेरणा व माहिती मिळाल्याने या भागातील बहुजन समाजाला ब्रिटिश शासनाविरुद्ध उभा राहणे शक्य झाले.
3) **लोकसहभाग:** प्रतिसरकरची ही चळवळ केवळ नेत्यांपुरती मर्यादित नव्हती तर संपूर्ण लोकसहभाग असल्यामुळे क्रांतीकारकांना अन्न आणि आश्रय यांची सोय झाली.
4) **सामाजिक सुधारणा:** केवळ ब्रिटीशांशी राजकीय लढा न देता प्रतिसरकारने हुंडाबंदी, दारूबंदी आणि अस्पृश्यता निवारण यासारखी कामे हाती घेतली. त्यामुळे समाज या प्रतिसरकारशी भावनिक रित्या जोडला गेला.

पश्चिम महाराष्ट्राचे योगदान:

प्रतिसरकारमध्ये शेतकऱ्यांनी जनसहभाग विशेष प्रयत्नानी नोंदविला. त्यामध्ये कर न देणे, लोकन्यायालयांना पाठिंबा, ग्राम सुरक्षा व्यवस्थेत हिरीरीने सहभाग घेणे ही कृत्ये केली. त्याचप्रमाणे युवकवर्गानेही आपला वाटा उचलत प्रतिसरकारच्या भूमिगत चळवळीत विशेष मोलाचे सहकार्य केले. प्रतिसरकारला लागणणारे संदेश व गुप्त करवायात सहभागी झाले. लष्करी सेनेत भरती होऊन आपली छाप उमटविली. वरील प्रमाणे महिला सुद्धा या प्रतिसरकारच्या चळवळीत हिरीरीने व उत्स्फूर्तपने सहभागी झाले. त्यांनी गुप्त संदेश पोहोचविणे अडचणीच्यावेळी क्रांतीकारकांना आपल्या सुरक्षित निवासस्थानी आश्रय दिला. प्रतिसरकारला पाठिंबा देण्यासाठी लोकांनी स्वइच्छेने निधि पुरविला व वेळप्रसंगी अन्नदान सुद्धा केले. सरकारी

खजिना लुटून लोक कल्याणाकरिता वापरला गेला. प्रतिसरकारने अस्पृश्यता निवारण्यावर सुद्धा भर दिला व त्यातून सर्व जाती धर्मांना समान वागणूक दिली व समतेचे महत्व पटवून सांगितले. व लोकन्यायालयात दिला जाणारा न्याय हा सुद्धा समान तत्वाने दिला.

निष्कर्ष:

बलाढ्य ब्रिटिश शासनाविरुद्ध छोट्याशा प्रतिसरकारची निर्मिती, विस्तार व सहयोग ही घटना इतिहासात अजरामर ठरली. पहिल्यांदा ब्रिटिश शासनाला हे कळाले की छोटासा प्रदेश परकीय गुलामगिरी झुगारून स्वकीय शासन चालवू शाकतो.

संदर्भग्रंथ :

1) साताऱ्यातील प्रतिसरकार :- वि. ग. कानिटकर
प्रतिसरकार स्थापना पार्श्वभूमी :- पृष्ठ क्रं. 45-60
प्रकाशन :- 2001

2) क्रांतीसिंह नाना पाटील :- एस. एम. जोशी
चरित्र व प्रारंभीचे कार्य :- पृष्ठ क्रं. 30-75
प्रकाशन :- 2005

3) महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळ :- अ. रा. कुलकर्णी
पश्चिम महाराष्ट्रातील चळवळ :- पृष्ठ क्रं. 210-250
प्रकाशन :-1998

4) भारतीय स्वातंत्र्य चळवळ :- बिपिन चंद्र
समांतर सरकार :- पृष्ठ क्रं. 485-488
प्रकाशन :- 2009

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

प्रतीसरकारमधील हौसाताई पाटील यांचे योगदान

श्रीमती विद्या युवराज कापसे

संशोधक विद्यार्थी,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

Corresponding Author - श्रीमती विद्या युवराज कापसे

DOI - 10.5281/zenodo.19661222

गोषवारा:

भारतीय स्वातंत्र्यसंग्राम हा भारताच्या इतिहासातील एक जाज्वल्य इतिहास आहे. इसवी सन 1920 नंतर हा लढा ग्रामीण जनतेच्या जीवनाचा अंग बनून राहिला. यात ग्रामीण जनतेच्या त्यागाच्या परिसिमांचा अंतच नव्हता. त्यामुळे या लढ्याला भारताच्या नव्हे, तर जगाच्या इतिहासामध्ये फार महत्त्व आहे. गांधीजींच्या सत्य, अहिंसा, सत्याग्रह या तत्त्वांनी भारताला एक नवीन चैतन्यरूपी संघर्षाचे शस्त्र मिळाले होते. ग्रामीण भागातील पुरुषांच्या बरोबर स्त्रियांनीही या स्वातंत्र लढ्यामध्ये भाग घेतला होता. यांच्या सहकार्यामुळे अनेक स्वातंत्र्यवीरांनी आपले चळवळीचे कार्य नेटाने सुरू ठेवले होते. स्वातंत्र्य चळवळीतील प्रत्येक धाडसी कार्य हे त्या चळवळीचा इतिहास रचत होते आणि या सर्वांना सर्वसामान्य स्त्रियांचा पाठिंबा होता. स्त्रियांच्या पाठिंबामुळे किंवा आधारामुळे घरादारावर तुळशीपत्र ठेवून अनेक स्वातंत्र्यवीर भूमिगत झाले होते. विशेष करून महाराष्ट्र ही क्रांतिकारकांची भूमी समजली जाते. या महाराष्ट्रात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या प्रतिसरकारलाही आपलं कार्य नेटाने सुरू ठेवण्यासाठी स्त्रियांचे अनमोल सहकार्य झाले. भाकरी पुरवणे, बातम्या पोहोचवणे, बरोबरच कुटुंबाची जबाबदारी स्वीकारणे. ही कामे महिला धैर्याने करू लागल्या. अशाच एका स्वातंत्र्य सेनानी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कन्या हौसाताई पाटील यांनी वडिलांप्रमाणेच स्वातंत्र्याच्या कार्यामध्ये स्वतःला झोकून दिले होते. लहानपणापासूनच क्रांतिसिंहांच्या कार्याचा वारसा मिळाला होता. सर्वसामान्य कष्टकरी, शेतकरी यांच्या अन्यायाला वाचा फोडणे. यामध्ये हौसाताईंनी स्वतःला झोकून दिले होते. सातारा सारख्या ग्रामीण भागातील हौसाताई पाटील यांची विचारधारा ही पुरोगामी विचारधारीची होती. त्यांनी केलेल्या अनेक धाडसी मोहिमां या स्त्रियांच्या इतिहासात महत्वच्या घटना आहेत त्यांच्या कार्याचे विचारसरणीचे पुणर्लेखन करण्याची गरज आहे.

Keywords: प्रतीसरकार, हौसाताई पाटील, योगदान, क्रांतिकारक, लढा इत्यादी.

प्रस्तावना:

महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक चळवळीने जोर धरला. या चळवळीने समाजमनावर परिणाम केला. सत्यशोधकी विचारधारा खेड्यापाड्यातील तरुणांना आकर्षित करत होती. अस्पृश्यता निवारण साक्षरताप्रसार स्त्री शिक्षण धार्मिक कर्मकांडाला विरोध यामुळे तरुण वर्ग प्रभावित झाला होता. तसेच सावकारशाही याविरुद्ध महाराष्ट्र तसेच सातारा जिल्ह्यातील तरुणांनी आवाज उठवला. अंधश्रद्धा सत्यशोधकी लग्न, शेठजी भटजीच्या शोषणातून बहुजनांची मुक्ती, कर्मकांड, उपास तपास, साक्षरता स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निर्मूलन, भांडणतंटा व

काटकसर या विषयावर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील गावोगावी क्रांतीसिंह नाना पाटील सभा गाजवू लागले व समाजात जागृती करू लागले. गांधीजींच्या आयुष्यात तत्वाला धरून इंग्रजांच्या विरुद्ध लढा सातारा जिल्ह्यात उभा केला. सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार ची स्थापना केली. या प्रतिसरकारमार्फत न्याय निवाडा करणे, स्त्रियांच्या वरचे अत्याचार रोखणे. इंग्रजांना सहकार्य करणाऱ्यां वर वचक बसवणे. दरोडेखोरांच्या वर वचक बसवणे. इत्यादी कामे करू लागली .आणि या कामांमध्ये स्त्रियांनीही सहभाग घेतला. त्यामुळे प्रति सरकारच्या कार्याला एक नाविन्यता आहे. रजुताई बिरनाळे, हौसाताई पाटील, इंदुमती पाटणकर, लक्ष्मीबाई नाईकवडी अशा अनेक स्त्रिया या प्रति सरकारच्या चळवळीत सहभाग घेत होत्या, तत्कालीन काळात या स्त्रियांच्याकडून अनेक क्रांतिकारी कार्य घडून आले. या सर्वांचे प्रेरणास्थान होते. ते म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील! तर आपण त्यांच्या कन्या हौसाताई पाटील यांच्या कार्याची दखल या शोधनिबंधातून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उद्दिष्टे:

1. हौसाताई पाटील यांचे स्वातंत्र्य चळवळीचे विचार जाणून घेणे .
2. हौसाताई पाटील यांचे प्रतिसरकारमधील कार्य अभ्यासणे.
3. हौसाताई पाटील यांचे स्वातंत्र्योत्तर कार्य अभ्यासणे.

गृहीतके:

१. हौसाताई पाटील यांनी प्रतिसरकार मधील तुफान सेनेचे नेतृत्व केले.

२. स्वातंत्र्यलढ्याचा वारसा क्रांतीसिंह नाना पाटील यांच्याकडून हसाताई पाटील यांना लाभलेला होता.

३. हौसाताई पाटील या सत्यशोधकी समाजवादी विचाराच्या क्रांतिकारक होत्या.

संशोधन पद्धती:

या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे दुय्यम माहिती स्त्रोत म्हणून पुस्तके, संशोधन लेख यांचा वापर करण्यात आला आहे.

विषय विवेचन:

पूर्वपरिचय:

पूर्वीच्या सातारा जिल्ह्यातील सध्याच्या सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील' दूधोंडी 'या गावी क्रांतीसिंह नाना पाटील व आक्कुबाई यांच्या पोटी हौसाताईचा जन्म 12 फेब्रुवारी 1926 रोजी झाला. लहानपणापासून क्रांतिसिंह नाना पाटलांच्या पुरोगामी विचारांचा व राष्ट्रभक्तीच्या पगडा हौसाताई यांच्यावर पडलेला होता. त्यामुळे सर्व कुटुंब पुरोगामी विचाराचे होते. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पत्नी आक्कुबाई यांच्या निधनानंतर हौसाताईचा यांचा सांभाळ काही काळ मामांनी केला. तर नंतर चुलते व आजोबांनी केला. क्रांतिकारकांचे नेतृत्व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याकडे होते. खेडोपाडी जनजागृती करणे, तरुण मुलांना राष्ट्रीय चळवळीत आणणे, हे क्रांतिसिंह नाना पाटलांचे कार्य सुरू होते. त्यामुळे ब्रिटिशांचा ससेमिरा त्यांच्या पाठी होता. आयुष्याची बरीच वर्ष क्रांतिसिंह नाना पाटलांनी भूमिगत म्हणून काळ घालवला. त्यांना कुटुंबाकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही. त्यांच्या विचाराचा जो प्रसार झालेला होता. त्या

प्रसाराची माहिती कुटुंबाला मिळत होती. त्यामुळे कुटुंबावर क्रांतिसिंह नाना पाटलांच्या विचारांचा पगडा होता. आणि या विचारांच्या पगड्यातूनच हौसाताई पाटील यांची जडणघडण झाली होती. घरी येणारे स्वातंत्र्य कार्यातील नेते, सामाजिक कार्यकर्ते यांच्या आचार विचारांची पद्धत हौसाताईंनी जवळून पाहिली होती. त्यामुळे पुढील काळात क्रांतिसिंह नाना पाटलांच्या कार्याचा वारसा हौसाताई पाटील यांनी सुरूच ठेवला. जनमानसात हौसा आक्का म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यलढ्यासाठी आणि स्वातंत्र्योत्तर काळामध्ये सामाजिक सांस्कृतिक लढ्यासाठी समर्पित केलं होत.

स्वातंत्र्य चळवळीतील कार्य:

तासगाव कचेरी वरील मोर्चा:

कराड तहसील वरील मोर्चा यशस्वी झाल्यानंतर तासगाव कचेरीवर मोर्चा काढण्यासाठी हौसाताईंनी प्रचार सुरू केला. महिला, तरुण मुले यांना मोर्चात सामील होण्यासाठी, प्रोत्साहित केले. गांधीजींच्या अहिंसेच्या मार्गाने मोर्चा पार पाडा असे, त्या आव्हान करत होत्या. मोर्चासाठी स्त्रियांची मानसिकता तयार करण्यात हौसाताईंना यश आले होते. तासगाव मोर्चामध्ये हौसाताईंनी स्त्रियांच्या मोर्चाचे नेतृत्व केले. मोर्चामध्ये हौसाताई "गांधीबाबा की जय", "भारत माता की जय", "करेंगे या मरेंगे" अशा घोषणा देत होत्या. मोर्चामध्ये केलेल्या भाषणात "आम्ही स्वतंत्र आहोत हे आमच्यावर राज्य करणारी कोण? आम्ही कुणाचे गुलाम नाही!" असे ठणकावून सांगत होत्या. यावरून हौसाताईच्या अंगी असणाऱ्या नेतृत्व, संघटन व वक्तृत्व गुण दिसून येतो. तासगाव कचेरीवरील मोर्चा यशस्वी झाला. या मोर्चामुळे अनेक तरुण वर्ग, महिला स्वयं प्रेरणेने स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊ लागले. फक्त स्वातंत्र्यलढा नाही तर समाज प्रबोधन, साक्षरता सत्यशोधकी आचरण, न्यायवृत्ति, ही लोकांच्यात भिणू लागली.

गोव्यातून शस्त्रे आणण्यात महत्त्वाची भूमिका:

भारतीय स्वातंत्र्य चळवळी चैतन्य निर्माण झाली होती. तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने तुफान सेनेत सामील होत होते. परंतु त्यांना लागणारी शस्त्रे कमी पडत होती. ती गोव्याहून आणावयाची होती. चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते भूमिगत होते. पोलिसांचा ससेमिरा सतत त्यांच्या पाठीशी होता. अशा परिस्थितीत गोव्याहून शस्त्रे यांनी हे काम जोखमीचे होते. या कामासाठी धाडसी चाणाक्ष अशा लोकांची गरज होती. यासाठी जी. डी. बापू लाड यांनी हौसाताईंची निवड केली. व शस्त्रे आणण्यासाठी जी. डी. बापू लाड, हौसाताई व बाळ जोशी हे गोव्यास गेले. शस्त्रे घेऊन रात्रीच्या अंधारात पणजी ते बांदा पायी चालत प्रवास केला. त्यानंतर बांदां ते कराड रेल्वेने पार केले. यावरून यांच्या धाडसाची व निष्ठेची कल्पना येते.

प्रतिसरकारची स्थापना:

गांधीजींच्या प्राणांतीक उपोषणानंतर देशभर 1942 ची स्वातंत्र्य चळवळीला ओहोटी लागली. मात्र सातारा जिल्ह्यातील प्रतिक्ररुप आंदोलनाचा अधिकार करून आंदोलन अधिक तीव्र करण्याचा पवित्रा नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतला होता. वाळवा तालुक्यातील प्रतिसरकार ची स्थापना करण्याचा धाडसी निर्णय झाला. 3 ऑगस्ट 1943 रोजी प्रतीसरकारची स्थापना पणुंब्रे या गावी झाली. सरकारच्या सत्ता केंद्रावर समोरासमोर हल्ला करणे अशक्य आहे. म्हणून गनिमी काव्याने लढावे, स्वातंत्र्यसैनिकाबद्दल ब्रिटिश सरकारकडे चहाडी करणाऱ्यांना जबरदस्त शिक्षा करावी, भूमिगत कार्यकर्त्यांना पकडून देणाऱ्यांना शिक्षा करावी, समाज घातक गुन्हेगाराचा बंदोबस्त करावा, सरकारधार्जीण्या या अधिकाऱ्यांवर दहशत बसवावी. साखर. घासलेट यांच्या काळाबाजार

करणाऱ्या व्यापाऱ्यांना शासन करावे. त्याचबरोबर खेडी स्वायत्त करावी. ग्रामीण जनतेला छळणाऱ्या समाज कंटकांना शासन करावे. खंडणी वसूल करणे, दरोडे घालणारे, उभ्या पिकाची नासाडी करणे. शेतकऱ्यांची जनावरे सोडून देणे व दुसरीकडे विकणे, बेकायदेशी दारू विकणे, खून करणे, स्त्रियांना पळवून नेणे, बलात्कार करणे, या गावगुंडांना रोखणे व शिक्षा देणे, ग्रामस्वराज्य निर्माण करणे, हे प्रतिसरकारचे ध्येय ठरले होते.

निरोपाची देवाण-घेवाण यासाठी बहिर्जी पथक निर्माण केले गेले. गावाचा न्यायनिवडा करण्यासाठी न्यायमंडळाची स्थापना केली. 99 पाटलांचे राजनामे लिहून घेतले. साक्षरतेचा कार्यक्रम हाती घेतला. यासाठी तुफान सेनेची स्थापना केली. तुफान सेनेची प्रमुख म्हणून हौसाताई यांना नेमले गेले. तरुण मुलं तुफान सेनेत हौसाताई सोबत काम करू लागले." आता आपले सरकार आले आहे, आपलं राज्यात आपण स्वातंत्र आहोत."स्त्रियांच्यावर इथून पुढे अत्याचार होणार नाहीत, बलात्कार होणार नाहीत, झाल्यास त्याला कडक शासन करू, कुठं अन्याय झाला, तर मला कळवा, न्याय मिळवून देईन, सरकारने कोणावर अत्याचार केल्यास, सांगा! असे त्या बोलत होत्या. त्यामुळे तुफान सेनेत मोठ्या संख्येने स्त्रिया सामील होऊ लागल्या.

याशिवाय सावकारांचे जूलूम व्यापाराचा काळाबाजार, नफेखोरीवर आळा घालणे. इत्यादी कामे कार्यकर्ते करू लागले. पंचायतराज स्थापन होऊ लागले. त्यात प्रथम दुशेरे, गोंदी ,गोडोली ,कार्वे, आटके, कापील, वडगाव कुंडल येथे लष्करी शिक्षण ग्रामस्वराज्य, लोकसंग्रहाचे तंत्र, आदर्श गाव याचे प्रशिक्षण देण्यात येऊ लागले. प्रतिसरकार ने दिलेल्या अनेक मोहिमा हौसाताई पाटील यांनी फत्ते केल्या. त्यामध्ये महत्त्वाच्या निरोपांची देवाणघेवाण, सुर्ली घाटामध्ये पोस्टाची गाडी लुटणे, टेहळणी ठेवणे. भूमिगतांच्यावर पाळत ठेवणाऱ्याना शिक्षा करणे. महिलांच्या बरोबर स्वातंत्र्याची शपथ घेणे. रेल्वे रूळ टेलिफोन तारा पाडण्यासाठी तुफानसेने ला मार्गदर्शन करणे पोलिसांच्या वर नजर ठेवणे. अशी धाडसी कामे हौसाताई पाटील यांनी स्वातंत्र्य लढ्यात केली.

ग्राम स्वच्छतेचे महत्व:

ग्राम स्वच्छतेचे महत्व गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून नेहमी सांगत. पण लोक तेवढ्यापुरताच ऐकत असत. सकाळी ग्राम स्वच्छता करताना स्त्रियांना म्हणाल्या " स्वच्छता आज एका दिवसासाठी करायची नाही, तर रोजच व्हायला पाहिजे! याची जबाबदारी आता तुम्ही घ्यायची ,आपला परिसर प्रत्येकाने स्वच्छ केला पाहिजे". त्यांनाही पटलं जे कोणी हे काम करत नाही. त्यांना दंड ठेवला. त्यामुळे गावात साफसफाई चालली होती. पोलिसांची गाडी आली. साफसफाई करायला लागल्याचे पाहून सर्वांच्याकडे नजरा फिरवत गाडी निघून गेली. आज पासून गावच्या पाटलाला सारा द्यायचा नाही. बघूया पोलिसांच्या गाड्या कशा चालतात आता आपलं राज्य आहे. आपण त्यांना कशाला सारा द्यायचा आपल्याला जमेल तेवढेच द्यायचं हौसाताई सगळ्याकडे पाहत बोलत होत्या.

भाऊराव पाटील गावोगावी शाळा काढत होते मुलं शिकली पाहिजे. सज्ञान झाली पाहिजेत. अंधश्रद्धा,व सावकारी पाशात अडकून आयुष्य बरबाद करणारी पिढी संपवली पाहिजे. म्हणून हौसाताई व तुफानीसेना प्रत्येक खेड्यात जाऊन शिक्षणप्रसाराचे काम करू लागले. त्यामुळे लोकांचा विश्वास ही वाढत चालला. लोकांमध्ये मध्ये होणारा बदल गांधीजींच्या ग्रामस्वराज्य या तत्त्वात बसणारा होता. लोक पाटलाला शेतसारा न देता प्रतिसरकारकडे जमा करू लागले. त्या पैशाचा उपयोग प्रतिसरकारच्या सैन्याच्या खर्चासाठी आणि लोकांच्या अडचणीसाठी होऊ लागला. लग्नासाठी सावकाराकडून कर्ज काढायचे नाही. लग्न

अत्यंत साधेपणाने म्हणजे गांधी पद्धतीने करायचे, लग्नासाठीचा होणारा मोठा खर्च कमी होऊ लागला. कर्ज काढणे कमी होऊ लागले. त्यामुळे सावकारांचा रोष वाढत होता. कर्जापायी जबरदस्तीने घेतलेली जमीन त्यांना परत करावी लागली. त्यामुळे चळवळ तीव्रगतीने वाढत होती.

चळवळ मोडून काढण्यासाठी ब्रिटिश सरकारने पोलिसांची कुमकही वाढवली होती. तीन-चार मैलावर पोलीस ठाणे बसवण्यात आले. प्रत्येक ठाण्यावरती 40 पोलीस असत. एखाद्या गावावर छापा टाकायचा तर हजार पोलिसांचा तापा असे. तारा तोडणे, रेल्वे मार्ग उखडणे, पोस्ट ऑफिस ,डाग बंगले जाळणे, लुटणे, बंदुका पळवणे, या तुफान सेनेने उच्छाद मांडला होता. हौसाताई दिवसभर सामाजिक गुन्हेगारांना शोधून काढणे, त्यांना शिक्षा देणे, कुंडलला गुन्हेगारांना दगड फोडायला, सुतकाचायला लावत, त्यांच्याकडून अनेक कामे करून घेत. कुंडल ही प्रतिसरकारची राजधानी होती. हजारो भूमिगतांनी तिथे आश्रय घेतला होता. तुफानी सेनेच्या कारवायामुळे ब्रिटिश सरकार जेरीस आले होते. पोलीस घराघरात घुसून स्त्री - पुरुषांना मारहाण करून तुफानी सेना व बहिर्जी पथकाचा शोध घेत होते. पण कोणी सापडत नव्हते. कोणीही काही सांगत नव्हते. याचं त्यांना आश्चर्य वाटत होतं. पोलीस आमिष दाखवत होते. पण त्याच्याही उपयोग नव्हता. संपूर्ण सातारा जिल्ह्यात पोलीस व तुफानी सेना यांच्या तीव्र संघर्ष चालू होता.

खेड्यापाड्यातून प्रतिसरकारचे राज्य चालू झाले होते. हजारो तरुण तुफानी सेनेत सामील होत होते. यात स्त्रिया ही होत्या इंदुताई पाटणकर, राजमती पाटील, गंगुबाई पवार, गंगुताई कदम, लीला पाटील, गंगुबाई लाड यांना हौसाताई प्रशिक्षण देत होत्या. लहाणापासून ते म्हाताऱ्यापर्यंत प्रतिसरकारचे सैनिक झाले होते. गावागावातील दारूचे गुत्ते बंद होत होते आणि सावकारांना शिक्षा दिली जात होती.

हौसाताईंचा सेवा दलाच्या कार्यात सक्रिय सहभाग:

हौसाताई व सेवादलातील तरुण उंच स्वरात गाणी गात प्रभात फेरी काढत होते.

"शेतकऱ्यांच्या राज्यासाठी
कष्टकऱ्यांच्या राज्यासाठी
लाऊ प्रणाला प्राण
आता उठवू सारे रान
आता पेटवू सारे रान"

प्रभात फेरी पोलिसांच्या नजरा चुकवत गल्लीबोळातून जात होती. स्त्री-पुरुष, छोटी मुलं, फेरी पहात "भारत माता की जय", "भारत माता की जय" असं मोठ्याने म्हणत होती. तिरंगा घेऊन प्रभात फेरी काढायला सरकारने बंदी घातली होती. हौसाताई न चुकता सकाळी व संध्याकाळी प्रभात फेरी काढत होती. त्यामुळे मनामनात क्रांतीच्या ज्वाला पेटत होत्या. दिवसागणित स्त्रियांची प्रभात फेरीत संख्या वाढत होती. सेवादलामध्ये शिस्त व समर्पण वृत्तीने सर्व लोक कार्यरत झाले होते. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन कार्य करत होते.

गोवा मोहीम:

प्रतिसरकारला गोव्यातून शस्त्रसाठा पुरवणारा बाळ जोशी जयसिंगराव माने गोवा पोर्तुगीज पोलिसांना सापडले. झालेल्या चकमकीत पोर्तुगीज अधिकारी ठार झाला. त्यामुळे जयसिंगराव माने व बाळ जोशी यांना अटक झाली. ही बातमी प्रतिसरकारला मिळाली. आपला गोव्यातील हक्काचा माणूस बाळ जोशी साताऱ्यातील चळवळ जिवंत ठेवण्यासाठी, ज्याने शस्त्र पुरवली त्याला अटक झाली. साताऱ्यातील सर्व क्रांतिकारक चिंतेत पडले. कोणत्याही परिस्थितीत बाळ जोशींना सोडवण्याचे ठरवले गेले. या कामासाठी हौसाताई पाटील व जी. डी. बापू लाड यांना

निवडण्यात आले. वेगवेगळी भूमिका करून हौसाताईंनी गोव्यातील तुरुंगाची टेहळणी केली. बहिणीची भूमिका घेऊन अनेक कारणांसाठी बाळ जोशींची भेट घेतली. त्यांना तुरुंग फोडण्याची साहित्य पुरविले तसेच आत शस्त्रे पुरवली. त्यानंतर बाळ जोशी व जयसिंग माने यांनी तुरुंग फोडून पलायन केले. सर्वांनी कुंडलला भेटण्याचे ठरवले. गोवा पार करत असताना मांडवी नदी लागते. ही मांडवी नदी हौसाताईंनी रात्रीच्या वेळेस पोहून पार केली. यावरून हौसाताईच्या धाडसी वृत्तीचे अवलोकन करता येईल.

हैदराबाद मुक्ती संग्रामातील कार्य:

मराठवाड्यात रझाकराच्या आत्याचाराने हाहाकार माजला होता. रझाकराचे सैनिक लेकीबाळीवर बलात्कार करत होते. पण दिसेल त्या निरापधार्याला ठार मारत होते. त्यामुळे महिलांच्या व मुलांच्या मध्ये भीती निर्माण झाली होती. वृत्तपत्रातील बातमी ऐकून हौसाताई मनातून संतप्त होत होत्या. स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी काम केले. आता या रझाकरांना कडक शिक्षा देऊन त्यांचे डोळे उघडले पाहिजेत आणि जर ते शरण येत नसतील,तर त्यांना ठेचून काढले पाहिजे. भीती घालवून येणाऱ्या संकटाला समर्थपणे तोंड देण्यासाठी, जनतेला लढण्यासाठी प्रेरित केले पाहिजे असे हौसाताईंना वाटत होते. प्रतिसरकारचे अनेक नेते मराठवाड्यात दाखल झाले. अशा पद्धतीने प्रतिसरकारने सातारा जिल्ह्यात कार्य केले. त्याच पद्धतीने मराठवाड्यात रझाकरांच्या विरुद्ध प्रतिसरकार कार्य करू लागले अचानक जाऊन ते रझाकरांना पकडून बेदम चोप देऊ लागले. हौसाताई रझाकरांच्या विरोधात गावागावातील महिलांना, मुलांना एकत्रित करत, आणि प्रतिसरकारच्या धरतीवर त्यांनी गुप्तहेर संघटना उभारली. तेथील मुलं व महिलांनाही प्रशिक्षण देऊन तयार केले. हौसाताईमुळे स्त्रिया निर्भय होऊ लागल्या. रझाकार हातात तलवारी घेऊन येत आहेत. असे दिसताच आधीच मुले मुली येऊन बातम्या देऊ लागले. त्यामुळे रझाकराविरुद्ध प्रतिहल्ला करणे सोपे जाऊ लागले. प्रति हल्ल्याला घाबरून रझाकार पळून जाऊ लागले. प्रतिसरकारचे नेतेही समूहाने रझाकरांचा शोध घेऊ लागले. त्यामुळे संपूर्ण गाव रझाकरांच्या विरोधात एक होऊ लागले.

नगर जवळच्या बाबी या गावावर 1000 पेक्षा जास्त रझाकार हल्ला करण्यासाठी तलवार व भाले घेऊन आले. तेव्हा संपूर्ण गावावर जबरदस्ती करून शेजारचे गाव जाळण्यास भाग पाडले. रझाकराच्या या अन्याय अत्याचाराला समर्थपणे जनतेने तोंड द्यावे, म्हणून कोपरगावपासून जामखेड पर्यंत जनतेत, प्रतिकारशक्ती उभारावी म्हणून गावोगावी शिबिरे उघडली. यातून हौसाताई , चंदा जरीवाल, जीडी लाड, नाना पाटील, शामराव लाड, सदाशिव पवार, व अन्य प्रतिसरकारची मंडळी लोकांना व तेथील कार्यकर्त्यांना धीर देऊ लागले. पुढे या रजझाकरांच्या मनात नाना पाटलांच्या बद्दल धडकी भरली. शेवटी हैदराबाद स्टेट काँग्रेसने स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह, झेंडावंदन करणे, शेतसारा भरण्यास नकार देणे,विद्यार्थ्यांचा बहिष्कार, वकिलांचे राजीनामे, व्यापारांचे हरताळ, अशा प्रयोगाचा ही ते वापर करू लागले. त्यामुळे भारत सरकारला हस्तक्षेप करावा लागला. शेवटी सरदार वल्लभाई पटेल यांनी नेहरूंच्या संमतीने 13 सप्टेंबर 1948 रोजी हैदराबाद संस्थानावर पोलीस ऍक्शन घेतली. 17 सप्टेंबर 1948 रोजी रझाकरांच्या जुलमी कचाट्यातून हैदराबाद मुक्त झाले.

गोवा मुक्ती संग्राम:

भारत अखंड राहिला पाहिजे. या भूमीवर कुठलीही परकीय सत्ता आम्ही सहन करणार नाही. गोवा हा महाराष्ट्राचा भाग आहे. मराठी मातीचा भाग आहे. प्रत्येकाला गोवा स्वातंत्र्याची ओढ लागली. या पार्श्वभूमीवर प्रतिसरकारचे सेनानी पुन्हा लढण्यासाठी तयार झाले. ही प्रतिसरकारची फौज गोव्यामध्ये दाखल झाली. गोवा हौसाताईंना परिचित भाग होता. परंतु गोव्यावर पोर्तुगीजांची

राज्य होते. पोर्तुगीज व्यापारासाठी आले. आणि राज्यकर्ते झाले. अनेक हिंदूंना त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यास भाग पाडले होते. त्यामुळे पोर्तुगीजांची संस्कृती येथील गोवेकरांनी स्वीकारली होती. काहींच्या मनातून त्यांच्या विषयीच्या ममत्वाची भावना होती. त्यांच्या अत्याचाराची माहिती सांगून त्यांना आपल्याकडे ओढून घेणे. ही सोपी गोष्ट नव्हती. तरीही त्यांच्या मनावर पोर्तुगीचा विरुद्ध विषय भावना निर्माण करणे महत्त्वाचे होते. येथील लोकांवर केलेल्या अत्याचाराबद्दल त्यांनाही बोलतं केले पाहिजे. असे अनेक प्रश्न हौसाताईंच्या मनात येत होते. त्या गोव्याची मुक्तता व अखंड भारताचे स्वप्न पाहत होत्या. अनेक सत्याग्रही स्त्रिया मुंबई, पुण्याहून बांद्याला आल्या होत्या. स्त्रियांना पाहून हौसाताईला आनंद झाला. मृणाल गोरे, प्रमिला दंडवते, शांता रानडे, करुणा चौधरी, प्रेमा पुरव, या स्वातंत्र्य लढ्यातील सहकारी त्यांच्याबरोबर होत्या. हौसाताईंनी वाडीवस्तीतून जनजागृती करण्याचे काम सुरू केले. तेथील लोकांना गोव्याच्या मुक्ततेचे महत्त्व सांगितले. त्यांना लोक- आंदोलनात घेतले. आणि पोर्तुगीजांच्या विषयी लढण्यास प्रवृत्त केले.

गोवेकरांच्या घरात हौसाताईची स्त्री फलटण शिरायची आजूबाजूच्या स्त्रियांना एकत्रित करून खणखणीत व स्पष्ट आवाजात म्हणायच्या "आम्ही एवढ्या लांबून आलोय! ते आपल्या भारताला, बलवान तर करायचं त्याबरोबर, अखंड ही ठेवायचा आहे! हे पोर्तुगीज आम्हाला लाचार करून, आमच्या भूभागावर आपला अधिकार सांगत आहेत. गोव्याच्या मुक्ततेसाठी तुम्ही उठा! आता शांत बसण्याची वेळ नाही. तुम्ही येथील जनता थोडी जरी त्यांच्या विरोधात बोलली. तरी ते त्यावर अत्याचार करतात. केवळ अत्याचारच नव्हे तर अनेक निरापधार्याना ठार मारतात. ते येथील जनतेला संपवण्याचे काम करत आहेत. आज त्यांच्यावर ही वेळ आली आहे. उद्या आपल्यावर येणार आहे. ब्रिटिशांना जसं आपण हाकलून दिले. तसे या पोर्तुगीजांना गोवा सोडून जायला भाग पाडायच आहे. अस हौसाताईचं कळकळीचे शब्द ऐकून स्त्रिया प्रेरित होऊ लागल्या. आणि त्यांच्या पथकात सामील होऊ लागल्या. "भारत माता की जय" घोषणा देऊ लागल्या. मोर्चे काढू लागल्या. पोर्तुगीज सैन्य हे मोर्चे दडपू लागले. गोळीबार करू लागले. त्यांना तुरुंगात टाकू लागले. गावागावातून सत्याग्रहींचा लोंढा येथेच होता. गोवा सरकारला समजले की स्वातंत्र्यसंग्रामातील एक सिंहीन क्रांतिकारी हौसाताई गोव्याच्या भूमीवर येऊन येथील लोकात जागृती करून लढायला उत्तेजित करत आहे. म्हणूनच हा लढा कितीही दडपला तरी थांबत नाही. त्यामुळेच गोवा सरकारने हौसाताईला पकडण्याचे वॉरंट काढले.

पणजी, म्हापसा येथे सत्याग्रहींचे मोर्चे येत होते. मोर्चावर कधी लाठी हल्ले, तर कधी गोळ्यांची बरसात होत होती. हौसाताई व प्रेमा गुरव सत्याग्रहीच्या तुकड्या तयार करून पाठवू लागल्या. अहोरात्र त्यांचे कार्य चालूच होते. दररोज त्यांचे गाव बदलत होतं. लोकांचा चांगला प्रतिसाद मिळू लागला होता. हौसाताईला शोधण्यासाठी गोवा सरकार जंगजंग पछाडत होते. हौसाताई सहज निसटून जात होत्या. प्रतिसरकारची सेना सरकारी मालमत्तेवर हल्ला करीत होती. कधी पोलीस स्टेशन लुटत,कधी पोर्तुगीज पोलिसांवर हल्ला, लोकांच्या विरोध वाढत चालला होता. घाबरून काही लोक गोवा सोडून चालले होते. तसेच काही पोर्तुगीज कुटुंब ही घरे सोडून जात होती. भारत सरकारची पोर्तुगीज सरकारशी बोलणी चालू होती. त्यांना हा देश सोडून जायचं नव्हतं. पण लोकांचा वाढता विरोध पाहून ते घाबरले होते. प्रतिसरकारच्या सेनेचे कार्य पूर्ण गोव्यात चालू होते. भगवानराव, जी डी बापू लाड, श्रीनाथ लाड, असे अनेक नेते गोव्यात सत्याग्रह, मोर्चा, आंदोलन, करून लढ्याची तीव्रता वाढवत होते. पोर्तुगीजांच्या

गोळीबारालाही घाबरत नव्हते. गोव्यातील स्त्रिया ही सत्याग्रहाच्या अग्रभागी होत्या. त्यात सुधा जोशी, कॉम्रेड मालिनी तूळपुळे , कमलाबाई भागवत होत्या. अखंड भारत हेच स्वप्न सर्वांच्या मनात तेवत होते.

9 ऑगस्ट 1955 रोजी गोवा विमोचन समितीच्या नियोजनाने काश्मीर ते कन्याकुमारीपासून 5000 सत्याग्रही गोव्यातील बांदा येथे आले. त्यामुळे हा सत्याग्रह अखिल भारतीय झाला होता. या सत्याग्रहीवर पोर्तुगीज पोलिसांनी अमानुषपणे गोळीबार केला. यात केशव गोरे, हिरवे गुरुजी, रामन त्यागी, कर्नल सिंग तसेच कमल उपासनी, प्रभा साठे, शांता राव यासह अनेक महिला धारातीर्थी पडल्या. शेकडो जखमी झाले. याचवेळी ना. ग. गोरे व राजाराम पाटील या सत्याग्रहींना दहा वर्षाचा तुरुंगवास झाला. त्यामुळे महाराष्ट्रात प्रचंड उद्रेक झाला. सगळीकडे हरताळ व मोर्चे सुरु झाले. पोर्तुगीजांची जुलूमशाही व जनतेचे आंदोलन यामुळे नेहरूंनी 17 डिसेंबर 1961 रोजी आंतरराष्ट्रीय दबावाला न घाबरता गोव्यात भारतीय सैनिक घुसवले. त्यामुळे पोर्तुगीज सरकारला गोवा सोडलणे भाग पडले. भारतीय सेना आणि आंदोलन यांच्या अखेर प्रयत्नांना यश आले. गोवा मुक्त झाला.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सहभाग:

भाषावर प्रांतरचनेचा विचार होऊनही द्वैभाषिक राज्याची संकल्पना इथं रुजू लागली होती. गुजरात महाराष्ट्र आणि मुंबई असे हे राज्य होतं परंतु मुंबईला वेगळे न ठेवता मुंबई ही महाराष्ट्राचा अविभाज्य घटक आहे. मुंबई ही महाराष्ट्राच्या मराठी माणसाची आहे. तसेच कर्नाटकातील निपाणी, बेळगाव, कारवार, बिदर आणि डांग या जिल्ह्यांचा महाराष्ट्रात समावेश केला पाहिजे. यासाठी महाराष्ट्रामध्ये आंदोलने सुरू झाले. संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. आणि आपल्याच सरकार विरुद्ध हा संघर्ष उभा राहिला. हौसाताईंनी मुंबई, निपाणी, बेळगाव या ठिकाणी स्त्रियांना घेऊन मोर्चे काढले. शिवाय सातारा, सांगली कोल्हापूर या ठिकाणी मराठी माणसांच्या मनामध्ये संयुक्त महाराष्ट्राची संकल्पना रुजवण्यास सुरुवात केली. सोबत अनेक क्रांतिकारी स्त्रिया या हौसाताईंच्या बरोबर या कामांमध्ये सहभागी झाल्या होत्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा प्रसार आपल्या लाल बावटा या पथकाद्वारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आपल्या शाहिरीतून करू लागले होते. संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र या संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये सामील झाला होता. दिल्लीला काढलेल्या विराट मोर्चामध्ये स्त्रियांचे नेतृत्व हौसाताईंनी केले." मुंबई सहसंयुक्त महाराष्ट्र ,'लढेंगे, लेंगे, " नही रखनी नही रखनी, जालीम सरकार, नही रखनी "अशा जोश पूर्ण घोषणा देत स्त्री पुरुष या मोर्चामध्ये सहभागी झाली होते. पोलिसांची दडपशाही चालूच होती. अनेक सत्याग्रहींना अटक केली होती. हौसाताई डॉ. कमल मोरे, शांता रांनडे, कमल भागवत, मालिनी तुळपुळे, मुंबईच्या पार्वती भोर, अशा अनेक स्त्रियांना अटक केली होती. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ महाराष्ट्राच्या ग्रामीण भागापर्यंत जाऊन धडकली होती. त्यामुळे काँग्रेसचे राजकीय जीवन ढवळू लागले होते. आणि शेवटी मुंबईसह महाराष्ट्र या राज्याची घोषणा करण्यात आली. मुंबई महाराष्ट्राला मिळाली.

स्वातंत्र्यानंतर ही हौसाताईंनी अनेक चळवळीमध्ये सहभाग घेतला. गोरगरीब शेतकरी यांच्या अडचणी सोडवण्यास संपूर्ण आयुष्य घालवले. मग शेतकरी चळवळ असो, धरणग्रस्तांची चळवळ असो, विद्रोही साहित्य चळवळ असो, दुष्काळग्रस्तांच्या समस्या ,अशा अनेक चळवळींच्या समस्या घेऊन सरकारविरुद्ध निदर्शने मोर्चे घेण्यात हौसाताईंचा सहभाग होता.

समारोप:

क्रांतिसिंह नाना पाटलाप्रमाणेच त्यांच्या कन्या क्रांतिवीर हौसाताई पाटील यांनी सुद्धा आपले संपूर्ण आयुष्य दीनदुबळ्या, सर्वसामान्य कष्टकरी जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी घालवले. इंग्रजांशी लढताना आपल्या जीवावर बेतनारी धाडसी कृत्य पार पाडली. त्यांच्या हिमालया एवढ्या धाडसाने चळवळीमध्ये चैतन्य निर्माण केले जात होते. समाजातील स्त्रिया या सुशिक्षित व्हाव्यात अन्यायाविरुद्ध पेटून उठाव्यात असे हौसाताईंना वाटत असे प्रतीसरकारच्या कार्यामधील सहभाग असो, गोवा मुक्ती संग्राम असो, संयुक्त महाराष्ट्र चळवळ असो, या सर्व चळवळीमध्ये हौसाताईंना त्यांचे पती काँग्रेस भगवानराव यांनी मोलाची साथ दिली. अशा या रणरागिणीच्या कार्याचा लेखाजोखा या शोधनिबंधाच्या मार्गातून घेण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

संदर्भ:

१. डॉ. शोभा शिरढोणकर, क्रांतिसिंह नाना पाटील यांची क्रांतिकारी कन्या हौसाताई पाटील, स्वरूप प्रकाशन पुणे, २०२०

२. रा.तु.पाटील , क्रांतीसिंह नाना पाटील जीवन कार्य आणि तत्वज्ञान, सन्मित्र प्रकाशन , कोल्हापूर 1984

३. डॉ. बाबुराव गुरव, उजळती प्रकाश रेषा, क्रांती वैभव प्रकाशन, हनुमंतवडये, 1999

४. डॉ. जयसिंगराव पवार, क्रांतीसिंह नाना पाटील, मी त्या प्रकाशन, कोल्हापूर, 1999

५. कमल भागवत, शांता रानडे, स्त्री चळवळीची वाटचाल, संस्कृती प्रकाशन पुणे, 1996

६. दमयंती पाटील, मी संघर्ष मी क्रांती, संस्कृती प्रकाशन पुणे, 2010

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

साताऱ्याच्या प्रतिसरकार मधील निवृत्ती काका पाटील यांचे योगदान

अभय गायकवाड

संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Corresponding Author - अभय गायकवाड

DOI - 10.5281/zenodo.19661241

8 ऑगस्ट 1942 ला मुंबईच्या गोवालिया टॅंक मैदानावर महात्मा गांधीजींनी ब्रिटिशांविरुद्ध छोडो भारत आंदोलन पुकारले, करेंगे या मरेंगे चा नारा दिला. आंदोलन दडपून टाकण्यासाठी ब्रिटिशांनी महात्मा गांधीजी, जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल यांच्यासह सर्व प्रमुख नेत्यांना ताब्यात घेतले. पण ब्रिटिश सरकारला हे आंदोलन दडपण्यात यश आले नाही.इकडे सातारा परिसरामध्ये अनेक वर्षांपासून स्वातंत्र्य चळवळीची बीजे रोवली गेली होती. लोकमान्य टिळक,महात्मा गांधीजी, सरदार वल्लभभाई पटेल,सुभाषचंद्र बोस, डॉ. राजेंद्र प्रसाद अशा अनेक राष्ट्रीय नेत्यांनी कराड,इस्लामपूर, सातारा या परिसरामध्ये सभा घेतल्या होत्या. यातील अनेक सभांना निवृत्ती काका स्वतः हजर होते. स्वातंत्र्याची चळवळ बहरण्यासाठी पोषक वातावरण असल्याने 42 च्या लढ्यामध्ये स्वातंत्र्यसैनिकांनी स्वयंस्फूर्तीने उडी घेतली. भूमिगत होऊन लढा सुरू ठेवला. सदर लढ्याचे केंद्रीय नेतृत्व म्हणून काँग्रेस मधील समाजवाद्यांसह प्रामुख्याने अच्युतराव पटवर्धन यांनी काम पहिले आणि या लढ्यातूनचं प्रतिसरकारची निर्मिती झाली.अनेक भूमिगत नेत्यांनी प्रतिसरकारचे नेतृत्व केले त्यापैकीच एक वाळवा तालुक्यातील कुरळप गावचे निवृत्ती आकाराम पाटील उर्फ निवृत्ती काका.

निवृत्ती काकांचा जन्म इ. स. 2 नोव्हेंबर 1902 साली झाला. त्यांच्याच भावकीतील आकाराम पाटील यांनी त्यांना दत्तक घेतले. त्यांच्या जनक पित्याचे नाव गोविंद असे होते. निवृत्ती गोविंद पाटील हे दत्तक विधानानंतर निवृत्ती आकाराम पाटील म्हणून ओळखले जाऊ लागले आणि याच नावाने त्यांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये,साताऱ्याच्या प्रतिसरकारमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. [१]

1) सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग (1930-31):

1930 च्या सविनय कायदेभंग चळवळीत काकांनी सहभाग घेतला. देश प्रेमाने भारावून जाऊन त्यांनी विविध सभा मिरवणुकांमध्ये सहभाग घेतला. सविनय कायदेभंग करत ते जंगल सत्याग्रहामध्ये सहभागी झाले. दारूच्या दुकानांन बाहेर शांतता मार्गाने निदर्शने करत त्यांनी महात्मा गांधीजींच्या विधायक कार्यक्रमाला ही बळ दिले.[२]

2) महात्मा गांधीजीं सोबत व्यासपीठावर (फेब्रुवारी 1927) :

फेब्रुवारी 1927 ला महात्मा गांधीजी इस्लामपूरला आले. इस्लामपूर मधील तत्कालीन 'जैन चौकात' (सध्याचा गांधी चौक) महात्मा गांधीजींची सभा आयोजित करण्यात आली होती. महात्मा गांधीजी व्यासपीठावर

आल्यावर निवृत्ती काकांनी हस्तांदोलन करत महात्मा गांधींचे स्वागत केले. व्यासपीठावर काही मोजकीच महत्त्वाची माणसे होती. या मोजक्या माणसांमध्ये निवृत्ती काका होते. ज्या काळामध्ये महात्मा गांधीजींना बघण्यासाठी माणसे रस्त्यावर गर्दी करत होती त्या काळामध्ये निवृत्ती काकांना महात्मा गांधीजींसोबत व्यासपीठावर स्थान देण्यात आले होते. यावरून सातारा परिसरामध्ये उभ्या राहिलेल्या स्वातंत्र्य चळवळीमधील काकांचे कार्य,स्थान आणि महत्त्व लक्षात येते. [३]

3) साताऱ्यातील विविध गावांत फेऱ्यांचे नेतृत्व:

महात्मा गांधीजी आणि इतर प्रमुख नेत्यांना अटक झाल्याची बातमी समजताच साताऱ्यातील जनता रस्त्यावर उतरली. साताऱ्यातील जनतेने उत्स्फूर्तपणे छोडो भारत आंदोलनामध्ये आपला कृतिशील सहभाग नोंदवत निदर्शने केली, प्रभातफेऱ्या काढल्या,जाहीर सभा घेतल्या, मोर्चे काढले. देश प्रेमाने भारावून गेलेल्या काकांनी फेरीच्या माध्यमातून लोकांना जागृत करण्यासाठी स्वतः काव्यनिर्मिती केली. अनेक कविता रचल्या. [४] डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट किंवा पोलीस कमिशनर,मुंबई यांच्या पूर्वपरवानगीशिवाय सर्व इलाखाभर जाहीर सभा घेण्यास किंवा फेऱ्या काढण्यास डिफेन्स ऑफ इंडिया रुल ५६ नुसार मज्जाव करण्यात आला असताना सुद्धा. कोणतीही भीड न बाळगता, ब्रिटिश सरकारच्या कायद्याला न जुमानता निवृत्ती काका रस्त्यावर उतरले. त्यांनी 5 सप्टेंबर 1942 ला वांगी येथे प्रभात फेरीचे नेतृत्व केले तर 8 सप्टेंबर 1942 ला रेठरे (हरणाक्ष) येथे फेरीचे नेतृत्व करत मार्गदर्शन केले. [५]

4) घातपाती कारवायांमध्ये प्रत्यक्ष सहभाग:

ब्रिटिश प्रशासन खिळखिळे करण्यासाठी ब्रिटिश साम्राज्यवादाचे प्रतीक ठरलेल्या रेल्वे, पोस्ट ऑफिस, सरकारी इमारती, रेल्वे रूळ,तारेचे खांब भूमिगतांकडून उध्वस्त केले जात होते. जगावर राज्य करू पाहणाऱ्या ब्रिटिशांना छोट्याशा साताऱ्यामध्ये भूमिगतांकडून आव्हान निर्माण केले जात होते. ब्रिटिशांविरुद्धच्या अशा धाडसी कारवायांमध्येही काका अग्रभागी राहिले. त्यांनी 25 नोव्हेंबर 1942 ला सहकाऱ्यांसह नांद्रे रेल्वे स्टेशन पेटवून दिले. तर 10 फेब्रुवारी 1943 ला आरग,बेडग,सलगरे,अग्रणी धुळगाव येथील रेल्वे स्टेशन सहकाऱ्यांच्या मदतीने पेटवून देत ब्रिटिश सत्तेला धक्का दिला. [६]

5) इस्लामपूर कचेरीवर मोर्चा (10 सप्टेंबर 1942):

ब्रिटिशांनी आपले शासन चालवण्यासाठी उभारलेल्या कचेऱ्या ह्या ब्रिटिश साम्राज्यवादाचे प्रतीक होत्या आणि याच कचेऱ्यांना छोडो भारत आंदोलनामध्ये सातारच्या भूमिगतांकडून लक्ष करण्यात आले. देश स्वातंत्र्याच्या विचारांनी भारावून गेलेल्या अनेक तरुणांनी कचेऱ्या, न्यायालयांवर मोर्चे काढले. महात्मा गांधीजी,पंडित नेहरू,काँग्रेसच्या नावाने जयघोष केला गेला. असाच एक मोर्चा इस्लामपूर कचेरीवर काढण्यात आला. या मोर्चाचे नियोजन करण्याच्या दृष्टीने इ. स.4 सप्टेंबर 1942 रोजी येडेनिपाणी जवळच्या मल्लिकार्जुन डोंगरावर सभा घेण्यात आली. निवृत्ती काका आपल्या सहकाऱ्यांसह सदर सभेमध्ये अग्रस्थानी राहिले तर दुसऱ्या बाजूला निवृत्ती काकांनी आपल्या सहकाऱ्यांसह भागातील सर्व गावे पिंजून काढून वैयक्तिक गाठीभेटी घेऊन, प्रभातफेऱ्या, सायंफेऱ्या,सभा घेऊन नियोजन उत्तमरीत्या केले होते. पण नियोजनाप्रमाणे अंमलबजावणी न झाल्याने इस्लामपूर कचेरीवरील मोर्चात अपेक्षित यश मिळाले नाही. [७]

6) लिंब येथील चिंतन बैठक:

सातारा परिसरातील आंदोलकांनी कचेऱ्यांवर मोर्चे काढले. तिथल्या अधिकाऱ्यांना डोक्यावर गांधी टोपी घालायला लावली,कार्यालयांवरील युनियन जॅक उतरून तिरंगा फडकवला. परिणामी ब्रिटिश सरकारने हे आंदोलन

दडपून टाकण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला. पाटील, तलाठी आणि गुंड यांच्या माध्यमातून लोकांना त्रस्त केले. साताऱ्यातील जनता आणि भूमिगत यांच्यामध्ये दरी निर्माण करण्यासाठी विविध डाव आखले. यातच यशवंतराव चव्हाणही पोलिसांच्या हाती लागले.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व भूमिगतांचे पुनरसंघटन करण्याची गरज चळवळीतील अनेक प्रमुखांनी बोलून दाखवली. परिणामी लिंब येथे बैठक आयोजित केली गेली. बैठकीत झालेल्या चर्चेनंतर आंदोलन पद्धतशीरपणे करण्यासाठी भूमिगतांचे पुनरसंघटन करण्याच्या आवश्यकतेची सर्वांना खात्री पटली. किसनवीर यांनाही कल्पना पसंत पडली. बुवा म्हावशीकर के.डी.पाटील,नाथाजी लाड,बर्डे गुरुजी,नाना पाटील यांच्यासह निवृत्ती काकांनी सदर कल्पनेला पाठिंबा दिला आणि कामेरी येथे सर्वसाधारण बैठक घेण्याचे ठरविले [८]

7) प्रतिसरकारच्या प्रवासातील अत्यंत महत्त्वाची कामेरी बैठक (1 जून 1943):

प्रतिसरकारच्या जडणघडणीमध्ये ज्या बैठकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे अशी बैठक कामेरी येथे 1 जून 1943 रोजी उसाच्या शेतात भरली. या बैठकीमध्ये स्वातंत्र्य चळवळीच्या अनुषंगाने पुढे आलेल्या महत्त्वाच्या तीन मुद्द्यांवर निवृत्ती काकांसह प्रमुख भूमिगत नेत्यांमध्ये चर्चात्मक घुसळण झाली. ते प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे

- चळवळ अखंडपणे सुरू ठेवावी की भूमिगतांनी पोलिसात हजर व्हावे.
- भूमिगत आणि लोकांमध्ये दरी निर्माण होऊ नये यासाठी उपाय योजना.
- नवीन आर्थिक अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

चळवळ अखंडपणे सुरू ठेवावी की भूमिगतांनी पोलिसात हजर व्हावे: यशवंतराव चव्हानांचे मित्र शांताराम इनामदार यांनी बैठकीमध्ये यशवंतराव चव्हानांचा निरोप सांगितला तो असा ' सर्व हालचाली बंद कराव्यात आणि सर्व भूमिगतांनी स्वतः पोलीसात हजर व्हावे ' त्याचबरोबर शांताराम इनामदारांनी पोलिसांना शरण जाण्याची कल्पना अच्युतरावांनी मान्य केली आहे. अशी ही माहिती दिली.शांतारामांच्या निरोपावर कोणीही विश्वास ठेवला नाही. ते संबंधित चिट्ठीही सादर करू शकले नाहीत. मात्र दुसऱ्या बाजूला शरण जाण्याच्या निर्णयाचे पाठीराखे आणि विरोधक यांच्यात मात्र गरमागरम चर्चा होत राहिली. बैठकीत आरडाओरडा माजला. भूमिगत नेत्यांतील फूट टाळण्यासाठी बर्डे मास्तर आणि जोशी काका स्वतःहून या प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी अच्युतरावांना भेटण्यासाठी मुंबईला जाण्यास तयार झाले.

भूमिगत आणि लोकांमध्ये दरी निर्माण होऊ नये यासाठी उपाय योजना: भूमिगत एका ठिकाणी लपून दुसऱ्या ठिकाणी घातपाताचे काम करत होते. परिणामी ज्या ठिकाणी भूमिगतांकडून घातपाताची कारवाई झाली आहे त्या ठिकाणच्या लोकांना ब्रिटिश पोलीस पकडून अन्न पाण्याशिवाय दोन-तीन दिवस उपाशी ठेवत, मारझोड करत, गावांवर सामूहिक दंड बसवत. यामुळे लोक भूमिगतांपासून दुरावत चालले होते. लोकांपासून भूमिगत दूर जाऊ नये यासाठी बैठकीमध्ये उपाययोजना केली गेली. 'घातपाताची कामे थांबवावीत आणि ज्याला कोणाला हे काम करायचं आहे त्यांनी आपण ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणी ही कामे करावीत' असा निर्णय घेण्यात आला.

नवीन आर्थिक अंदाजपत्रक तयार करण्यात आले: भूमिगतांना भूमिगत राहून चळवळ पुढे नेण्यासाठी आर्थिक कुमक लागे. या अनुषंगाने विविध गटांनी आपल्या आवश्यकतेनुसार आर्थिक मागण्या केल्या. निवृत्ती काका पाटील यांच्या कुरळप गटामध्ये 22 भूमिगत काम करत होते. त्यांनी आपल्या गटासाठी 700 रुपयांची मागणी केली.

बैठकीमध्ये या मागण्यांवर सविस्तर चर्चा करून नवीन अंदाजपत्रक तयार करण्यात आले. [९] प्रतिसरकारच्या प्रवासातील या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीमध्ये निवृत्ती काकांना विशेष स्थान असल्याचे दिसून येते.

8) **पनुंबऱ्याची निर्णायक बैठक (3 ऑगस्ट 1943):**

बर्डे मास्तर आणि जोशी काका मुंबईहून परत आल्यानंतर 3 ऑगस्ट 1943 रोजी पंनुंब्रे येथे 'चळवळ अखंडपणे सुरू ठेवावी की भूमिगतांनी पोलिसात हजर व्हावे' या मुद्द्यावर निर्णायक भूमिका घेतली जाणार होती. त्यामुळे या बैठकीला विशेष महत्त्व आहे. विशेष महत्त्व असलेल्या या बैठकीमध्ये निवृत्ती काकांसह 50 ते 60 इतर भूमिगत हजर होते.

बर्डे गुरुजी आणि जोशी काकांनी सदर बैठकीमध्ये अच्युतराव पटवर्धनांचे पत्र सादर केले. सदर पत्रामध्ये अच्युतराव पटवर्धन म्हणतात " आंदोलन थांबवावे असा निरोप मी तोंडी किंवा पत्राने पाठविला नाही." " लोकांपासून तुमची जर फारकत होत असेल तर आंदोलन ताबडतोब बंद करा. तथापि, लोकांचा जर आंदोलनास पाठिंबा असेल तर आंदोलन चालू ठेवा. परंतु खालील अटीवर :

कोणत्याही जीवाला इजा केली जाणार नाही,खासगी मालमत्ता लुटण्यात येणार नाही आणि भूमिगतांच्या वागण्यामुळे लोकांना उपद्रव होणार नाही."

अच्युतरावांच्या पत्राने भूमिगतांच्या मनातील शंका दूर केली. सर्वजण पकडले जाईपर्यंत,काँग्रेस वर्किंग कमिटीने ऑगस्टचा ठराव मागे घेईपर्यंत आणि स्वातंत्र्य मिळेपर्यंत आंदोलन जोरात सुरू ठेवण्याचा निर्धार पनुंबऱ्याच्या बैठकीत करण्यात आला.

भूमिगतांमध्ये कोणतीही फूट नाही. हे दाखवण्यासाठी 20 ऑगस्ट 1943 रोजी एकाच वेळी सर्व जिल्हाभर टेलिफोन आणि टेलिग्राफच्या तारा तोडण्याचा निर्णय घेण्यात आला. [१०]

9) कोल्हापुरातील टोप पासून नीरा नदीपर्यंत 40 ठिकाणी 2000 डांब पाडले. (20 ऑगस्ट 1943)

पनुंबऱ्याच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे 20 ऑगस्ट 1943 रोजी एकाच वेळी कोल्हापुरातील टोप पासून नीरा नदीपर्यंत 40 ठिकाणी 2000 डांब पाडून, तारा तोडून भूमिगतांनी ब्रिटिश सरकारला भूमिगतांमध्ये असलेल्या एकीचा संदेश दिला. सदर कार्यक्रमामध्ये निवृत्ती काकांनी आपला कृतिशील सहभाग नोंदवला. [११]

10) फरारी गुंडांचा प्रतिसरकारच्या नावाखाली बेबनाव:

सातारा परिसरामध्ये भूमिगतांनी उभे केलेले प्रतिसरकार मोडून काढण्यासाठी ब्रिटिश पोलीस अधिकाऱ्यांनी अत्यंत हिनकस पर्याय निवडला. भूमिगतांना पकडण्यासाठी त्यांनी फरारी गुंडांना हाताशी धरले. या गुंडांना ब्रिटिश पोलीस व्यवस्थेकडून अभय मिळाल्यामुळे ते फरारी असलेल्या भूमिगतांच्या नावाखाली चोऱ्या करत,दरोडे घालत परिणामी भूमिगतांचे,पर्यायाने स्वातंत्र्य चळवळीचे,प्रतिसरकारचे नाव बदनाम करण्याचे काम करत. असाच एक प्रकार वाळवा तालुक्यामध्ये घडला. आपण निवृत्ती काका पाटील असल्याचे भासवून महादू बावचकर वाळवा तालुक्यामध्ये दरोडे घालत होता,चोऱ्या करत होता.[१२] पण पुढे जाऊन निवृत्ती काका पाटलांसह प्रमुख भूमिगतांनी या फरारी गुंडांना वठणीवर आणले.

11) दरोडेखोरांशी दोन हात करत लोकांना संरक्षण दिले:

साताऱ्या मधील प्रतिसरकार मोडून काढण्यासाठी ब्रिटिश पोलीस अधिकाऱ्यांनी त्या परिसरातील फरारी गुंडांशी हात मिळवणी केली होती. थेट पोलीस

अधिकाऱ्यांशीच हात मिळवणी केली असल्यामुळे सातारा परिसरातील गुंड माजले होते, चोऱ्या, दरोडे,बलात्काराचे प्रकार सर्रास घडत होते. पण जनतेला वाली नव्हता. सरकार म्हणून काम करणारी यंत्रणाच भ्रष्ट झाली होती. अशावेळी सातारा परिसरातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम प्रतिसरकार मधील प्रमुख भूमिगत नेत्यांनी केले.

19 फेब्रुवारी 1945 रोजी असाच एक माजलेला गुंड ज्ञानू भाऊ शिंदे आणि त्याच्या साथीदारांना निवृत्ती काका पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून 260 रुपयांची खंडणी वसूल करत पत्र्या लावण्यात आल्या.[१३]

12) लीलावातील बैल सोडवून आणत ब्रिटिश धार्जिन्यांना दंड लावला:

पाटणच्या मोर्चामध्ये प्रमुख भूमिका बजावलेले विठ्ठल घाटगे उर्फ बुवा म्हावशीकर यांच्या विरोधात कारवाई करत ब्रिटिश सरकारने त्यांचे घर, जमीन जप्त केली. बैलांचा लिलावा केला.बुवा म्हावशीकरांनी झाला प्रकार बर्डे गुरुजींना सांगितला. बर्डे गुरुजींनी संबंधित प्रकरणाची जबाबदारी निवृत्ती काकांवर सोपवली. निवृत्ती काका पाटलांनी आपल्या सहकाऱ्यांसह ज्या ठिकाणी लिलावा होणार होता त्या कराड पासून पाच-सहा मैलांवर असणारे वडगाव गाठले. या गावात तलाठ्याचे ठाणे तसेच पोलीस बंदोबस्त असतानाही कशाचीही फिकीर न करता काका आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ज्याने बैलाचा लिलावा घेतला होता त्याला गाठून. माफी मागायला लावून.दंड वसूल करून. बैलही परत आणले.

स्वतः भूमिगत असताना, वॉरंट निघाल्यामुळे पोलीस मागावर असतानासुद्धा देशद्रोह्यांविरुद्ध अशी धडक कारवाई करण्याचे धाडस या घटनेतून निवृत्ती काका पाटील यांनी केल्याचे दिसून येते. [१४]

13) आव्हानात्मक गटांची जबाबदारी पेलली:

ब्रिटिश यंत्रणे विरुद्ध नियोजनबद्ध कारवाया करण्यासाठी जिल्ह्याचे विभाग करण्यात आले. त्यावेळी तांबवे ग्रुपचे काय करावे असा प्रश्न भूमिगतांना पडला. कारण तांब्याच्या लोकांना कामाची दिशा नव्हती.त्यातच आपापसातील मतभेदांमुळे गटामध्येच द्वेषाचे वातावरण होते. अशा परिस्थितीमध्ये ही जबाबदारी अत्यंत विचारी,हुशार,ध्येयनिष्ठ असलेल्या काकांवर सर्व भूमिगतांनी सोपवली. काकांनी सर्व भूमिगतांच्या विश्वासास साजेशी कामगिरी करत तांबवे ग्रुप मध्ये प्रेम निर्माण करून अखेरपर्यंत अत्यंत प्रभावी काम त्यांच्याकडून करून घेतले. [१५]

14) गांधीजींच्या हजर होण्याच्या सल्ल्याची चिकित्सा:

सर्वांनी चळवळ थांबवावी पोलिसांत हजर व्हावे असा महात्मा गांधीजींचा निरोप आल्यानंतर निवृत्ती काकांसह सर्व भूमिगत चिंतेत पडले. धन्वंतरी कासेगावकर यांनी अच्युतरावांकडे मार्गदर्शन मागितले असता अच्युतरावांनी ऑक्टोबर 1944 च्या मध्याला काही प्रमुख भूमिगतांना मुंबईला बैठकीसाठी बोलावले. निवृत्ती काकांसह त्यांचे सर्व प्रमुख सहकारी बैठकीसाठी मुंबईला गेले. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुरन्स कंपनीच्या इमारतीच्या तळघरात बैठक बोलावण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये अच्युतराव पटवर्धन यांनी महात्मा गांधीजींचे या निर्णयाबाबतचे पत्र वाचून दाखवले. पत्रामध्ये गांधीजी म्हणतात, ' याबाबत निर्णय घेणारी काँग्रेस कार्यकारणी अहमदाबाद तुरुंगात आहे. त्यामुळे पोलिसात हजर व्हावे की होऊ नये हा प्रश्न भूमिगतांनी आपली सद्सद्विवेक बुद्धी वापरून सोडवावा '.

गांधीजींच्या या म्हणण्यावर भूमिगतांमध्ये दोन गट पडले काहींनी पोलिसात हजर होण्याचा निर्णय घेतला तर

काहींनी आंदोलन चालू ठेवण्याचा. केवळ महात्मा गांधीजी म्हणतात म्हणून एखाद्या भक्ताप्रमाणे निवृत्ती काका लगेच तुरुंगात हजर झाले नाहीत त्यांनी महात्मा गांधीजींच्या निरोपाची चिकित्सा केली आणि पोलिसात हजर न होता आंदोलन चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. अच्युतरावांनीही भूमिगतांना तोच संदेश दिलेला दिसतो. [१६]

15) परिस्थिती अनुरूप विविध गटात भूमिका बजावली:

स्थानिक पातळीपासून प्रतिसरकारच्या केंद्रीय स्तरापर्यंत निवृत्ती काकांनी गटांच्या माध्यमातून काम केले. स्थानिक स्तरावर त्यांचा 22 भूमिगतांचा गट होता.[१७] सुरुवातीच्या टप्प्यात काका वसंत दादा पाटील यांच्या सांगली गटात काम करत होते वसंत दादा पकडले गेल्यानंतर ते बर्डे गुरुजींच्या शिराळा पेटा गटात काम करू लागले (धन्वंतरी पृष्ठ क्रमांक 109) ज्या गटाची ओळख करून देताना एक पोलीस अधिकारी 23 जानेवारी 1943 रोजी लिहिलेल्या पत्रात जिल्हाधिकाऱ्यास म्हणतो, ' शिराळा फेटा या सातारा जिल्ह्यातील एकाच भागात आपल्याला खरे खुरे शत्रुत्व जाणवले. (पृष्ठ क्रमांक 101 क्रांतीसुर्य स्मृती ग्रंथ) याव्यतिरिक्त परिस्थिती अनुरूप निवृत्ती काकांनी कामेरी गट तसेच पदमाळे गटांमध्ये राहूनही स्वातंत्र्य कार्यामध्ये आपली भूमिका बजावली. [१८]

गट या घटकाकडे निवृत्ती काकांनी स्वातंत्र्यप्राप्तीचे एक साधन म्हणून बघितल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य मिळवणे, प्रतिसरकार चालवणे हे साध्य ठेवून निवृत्ती काका काम करत राहिले.

16) सातारा परिसरातील अनेक महत्वाच्या भूमिगतांची काकांकडे उठ बस:

भूमिगतांमधील महत्त्वाचे नेते ज्यांनी इस्लामपूर कचेरीवरील मोर्चाचे नेतृत्व केले असे पांडू मास्तर अधून मधून सातत्याने काकांकडे राहावयास असायचे. प्रतिसरकार मध्ये डिक्टेटर म्हणून ज्यांनी काम पाहिले ते धन्वंतरी वैद्यही अधून मधून काकांकडे असत. तापट स्वभावाचे पांडू मास्तर आणि शांत व संयमी स्वभावाचे धन्वंतरी या दोघांनाही काका आपले मित्र वाटत. यातून असे दिसून येते की सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे कौशल्य काकांमध्ये असल्याने ते उत्तम पद्धतीचे संघटन करू शकले. [१९]

17) लोकांचा भक्कम पाठिंबा:

निवृत्ती काकांनी आपले तन-मन-धन स्वातंत्र्य कार्यासाठी अर्पण केले होते. शुद्ध हेतूने ते देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी, प्रतिसरकार चालवण्यासाठी झटत होते. यामुळे लोक त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिलेले दिसतात.

निवृत्ती काकांचे स्वातंत्र्यकार्य थांबवण्यासाठी पोलिसांनी त्यांच्यावर वॉरंट काढले. [२०] वॉरंट काढूनही काका सापडत नाहीत म्हटल्यावर पोलीस प्रशासनाने त्यांच्यावर १००० रुपयांचे बक्षीस जाहीर करून त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला.[२१] तरीही काका हाताला लागेनात म्हणून पोलिसांनी त्यांच्या संपूर्ण कुरळप गावावर पोलिसांना मदत करण्यास नकार व राजकीय फराऱ्यांना आसरा दिल्याबद्दल १००० रुपये दंड बसवला. [२२] पण काकांच्या बाबतीत पोलिसांचे प्रयत्न निष्फळ ठरले. कोणीही फितूर झालं नाही. यातून जनमाणसांचा काकांच्या स्वातंत्र्य कार्याला असलेला भक्कम पाठिंबा ठळकपणे दिसून येतो.

18) हिशोबातील पारदर्शकता:

स्वातंत्र्याची चळवळ चालवण्यासाठी लागणारा पैसा पे ट्रेन लुटणे, बँका लुटणे, सरकारी खजिना लुटणे, देशद्रोयांवर लावलेले दंड वसूल करणे यातून उभा केला जायचा. पण या संपत्तीत लुटीच्या खर्चावर नियंत्रण राहावे अनुचित प्रकार घडू नये म्हणून मीटिंगमध्ये धन्वंतरी कासेगावकर आणि डीजी देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली चौकशी व हिशोब तपासणी कमिटी नेमण्यात आली.

कमिटीने काकांकडे चौकशी केली असता काकांकडे कोणत्याही पद्धतीची रक्कम जमा नसल्याचे दिसून आले. [२३] पुढे स्वातंत्र्य कार्यासाठी जनतेकडून पैसा गोळा करण्याची परिस्थिती निर्माण झाली. त्यावेळी ही अत्यंत महत्त्वाची आर्थिकबाब असल्याने जबाबदारीच्या व्यक्तीकडे हे काम देण्यात यावे असा विचार करुन भूमिगतांनी पैसे जमा करण्यासाठी विशेष कमिटीची नेमणूक करून त्या कमिटीवर निवृत्ती काकांची नेमणूक केली. यावरून भूमिगतांमधील निवृत्ती काकांचे स्थान, त्यांचे महत्त्व आणि त्यांच्यावर असलेला भूमिगतांचा विश्वास दिसून येतो. [२४]

19) विधायक कार्यक्रम राबवत गांधी विचार तळागाळापर्यंत पोहोचवला:

एका बाजूला भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी, ब्रिटिशांना शह देत साताऱ्यामध्ये सुरू केलेले प्रतिसरकार उत्तमरीत्या चालवण्यासाठी संघर्ष करणारे निवृत्ती काका दुसऱ्या बाजूला महात्मा गांधीजींनी ठरवून दिलेला विधायक कार्यक्रमही तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी धडपडताना दिसतात. आरळा, बिळाशी या गावांमध्ये सुतकताई, व्यायाम शाळा, अस्पृश्यता निवारण, ग्रामस्वराज्य, कुटीरोद्योग इ. विधायक उपक्रमांमध्ये काका बर्डे गुरुजींसोबत काम करताना दिसतात**.** [२५]

20) प्रसिद्ध वैद्य:

स्वातंत्र्याची लढाई लढणारे हात दुसऱ्या बाजूला वेदनेने असह्य झालेल्या रुग्णालाही कोणतेही शुल्क न घेता वैद्यकीय सेवा देताना दिसतात. वनऔषधांबरोबरच काकांनी त्यांचे मित्र डॉ.रणभिसे यांचे सहाय्य घेऊन ऍलोपॅथीचे उपचारही रुग्णांवर केल्याचे दिसून येते. [२६]

21) प्रतिसरकारच्या प्रशासनात महत्त्वाचे स्थान:

भूमिगतांनी सुरू केलेले प्रतिसरकार कार्यक्षमपणे चालण्याकरिता जिल्ह्याची 3 क्षेत्रात आणि 20 मंडलात विभागणी करण्यात आली होती. प्रत्येक मंडलात साधारण 30 ते 35 गावे होती आणि त्या मंडलाचा कार्यभार गटनायक व उपगटनायक यांच्याकडे देण्यात आला होता. मंडल क्रमांक ४ चे गटनायक म्हणून निवृत्ती काका पाटील यांना जबाबदारी दिल्याचे दिसते. याचाच अर्थ प्रति सरकारमधील साधारण 30 ते 35 गावांची जबाबदारी काकांवर होती. [२७]

22) आधुनिक सरकारी यंत्रणेशी तुलना केल्यास काका सरकारमधील अति महत्त्वाचे व्यक्ती:

सातारच्या प्रतिसरकारचे अभ्यासक प्राचार्य डॉ. आबासाहेब शिंदे 'सातारचे प्रति-सरकार' या आपल्या संशोधनपर ग्रंथामध्ये म्हणतात की, फेब्रुवारी 1945 पासून प्रतिसरकारला आधुनिक सरकारची सर्व वैशिष्ट्ये प्राप्त झाली होती. जसे की विधिमंडळ,कार्यकारिणी आणि न्याय मंडळ. [२८] निवृत्ती काकांच्या अनुषंगाने विचार केल्यास प्रतिसरकार मधील प्रत्येक महत्त्वाच्या मीटिंगमध्ये निवृत्तीकाका हजर होते. यावरून एखाद्या विधिमंडळ सदस्या प्रमाणे त्यांनी काम केल्याचे दिसून येते. तसेच प्रतिसरकारच्या शासन व्यवस्थेमध्ये मंडल क्रमांक ४ ची जबाबदारी गटनायक म्हणून निवृत्ती काकांवर होती. या गोष्टीचा विचार केल्यास त्यांनी कार्यकारणी सदस्याप्रमाणे काम पाहिले तसेच त्यांनी अनेक न्यायनिवडे केल्याने एखाद्या न्यायमंडळ सदस्याप्रमाणेही त्यांनी प्रतिसरकारची सेवा केली.

23) शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू बॅरिस्टर पी.जी. पाटील यांच्या मनात काकांविषयी आदराची भावना:

पी.जी.पाटील तसे गांधीवादी पर्यायाने अहिंसावादी पण प्राप्त परिस्थितीमध्ये थोडी तोडफोड केल्याशिवाय गोष्टी साध्य होणार नव्हत्या याचीही त्यांना जाणीव होती. त्यामुळेच त्यांच्या मनामध्ये काकांविषयी आधारभाव होता. स्वातंत्र्य चळवळीच्या काळामध्ये रात्री-अपरात्री जी.डी.पाटील व निळकोट यांच्या ओळखीने निवृत्ती

काकांची वारंवार भेट होत असल्याचे ते सांगतात. स्वातंत्र्यवीर अशीही उपमा ते काकांसह इतर भूमिगतांनाही देताना दिसतात तसेच काकांच्या स्वातंत्र्य कार्यातून त्यांच्याविषयी आदरभाव निर्माण होत गेल्याचे कुलगुरू सांगतात. [२९]

24) इंदिरा गांधींच्या हस्ते गौरव:

स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवानिमित्त भारतातील अधिकार पदावर नसलेल्या महत्त्वाच्या 75 स्वातंत्र्य सैनिकांना तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी दिल्ली येथे समारंभपूर्वक ताम्रपट देत गौरविले. या गौरव सोहळ्यामध्ये काकांच्या स्वातंत्र्य कार्याचा यथोचित सन्मान झाला. निवृत्ती काकांनाही ताम्रपट देऊन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी गौरविले. [३०]

मूल्यमापन:

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी राष्ट्रीय काँग्रेसने पुकारलेल्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये काकांनी सुरुवातीपासूनच सहभाग नोंदवला. लोकमान्य टिळक, महात्मा गांधीजी, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस अशा अनेक राष्ट्रीय नेत्यांची भाषणे ऐकत, हरिजन सारखी वृत्तपत्रे वाचत ऐकलेल्या आणि वाचलेल्या महत्त्वाच्या घटकांच्या चिंतनातून निवृत्ती काकांची एक ठाम वैचारिक बैठक तयार झाली होती या वैचारिक बैठकीला प्रामाणिकपणाची जोड मिळाल्यामुळे प्रतिसरकार मधील भूमिगतांमध्ये निवृत्ती काकांना विशेष महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. प्रतिसरकारची औपचारिक सुरुवात 1 जून 1943 रोजी कामेरीच्या बैठकीमध्ये झाल्याचे मानले जाते. तेव्हापासून ते 5 मे 1946 रोजी कराड जवळील कोणेगाव येथे सर्व भूमिगत प्रकटले या घटनेपर्यंत झालेल्या प्रतिसरकारच्या सर्व महत्त्वाच्या बैठकांना निवृत्ती काका जबाबदारीने हजर असल्याचे दिसतात. स्वभावाने शांत,संयमी आणि मितभाषी असलेले काका फरारी दरोडेखोरांविरुद्ध भूमिका घेताना जशास तसे उत्तर देताना दिसतात. प्रतिसरकारच्या जडणघडणीमध्ये ज्या ज्या वेळेला जबाबदारीचे आणि विश्वासार्हतेचे काम कोणाला द्यावे अशी परिस्थिती निर्माण झाली त्या त्या वेळेला भूमिगत नेत्यांनी काकांवर जबाबदारी सोपवल्याचे दिसून येते. महात्मा गांधीजींच्या वैचारिक प्रभावाखाली स्वातंत्र्य लढ्यामध्ये काम करणारे काका त्यांचे भक्त मात्र होताना दिसत नाहीत. 'साताऱ्यातील भूमिगतांनी पोलिसात हजर व्हावे' असा संदेश ज्या वेळेला महात्मा गांधीजींनी दिला त्या वेळेला एखाद्या भक्ताप्रमाणे थेट पोलिसात हजर न होता निवृत्ती काकांनी अच्युतराव पटवर्धनांच्या माध्यमातून महात्मा गांधीजींशी संपर्क करून पुन्हा एकदा त्यांचे म्हणणे जाणून घेतले. आणि पोलिसात हजर न होण्याचा निर्णय घेतला पण महात्मा गांधीजींचा कोठेही अपमान होईल असे वर्तन त्यांनी केले नाही.याप्रसंगातून काकांची विचार करण्याची स्वतंत्रबुद्धी दिसून येते. एका बाजूला प्रतिसरकार मध्ये पूर्ण वेळ कार्यरत असूनही दुसऱ्या बाजूला शेवटपर्यंत पोलिसांच्या हाती न लागता भूमिगतपणे काम करत राहण्याचे कौशल्य निवृत्ती काकांमध्ये असल्यामुळे प्रतिसरकारचे कार्य सुरू असेपर्यंत काका प्रतिसरकारसाठी निस्वार्थपणे काम करत राहिले.

संदर्भ :

१) मुलाखत, विलासराव निवृत्ती पाटील

२) डॉ.कुंटे भ.ग.,स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश,महाराष्ट्र राज्य, पश्चिम विभाग, खंड ३, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई,पृ. क्र. 937

३) प्रा.जोखे विजयकुमार,प्रतिसरकार:शिराळा पेटा,ज्ञान मंगल प्रकाशन वितरन,कोल्हापूर पृ. क्र. 261

४) मुलाखत, विलासराव निवृत्ती पाटील

५) प्राचार्य डॉ.शिंदे आबासाहेब, सातारचे प्रति-सरकार,उषा प्रकाशन,कोल्हापूर, पृ.क्र.441,442

६) कित्ता पृ.क्र.453

७) धर्माधिकारी भालचंद्र वि.,महाराष्ट्राचा महापुरुष वसंतदादा, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा,पृ. क्र. 34

८) उपरोक्त पृ.क्र. 181,182,183

९) कित्ता पृ.क्र. 183,184,185

१०) कित्ता पृ.क्र. 186,187

११) संपा.प्राचार्य डॉ.शिंदे आबासाहेब, सहा.संपा.श्री शेटे विमलनाथ,क्रांतीसुर्य, (प्रतिसरकार) स्मृतीग्रंथ,स्मृती समिती क्रांतिवीर दे.भ.बर्डे गुरुजी विश्वस्त संस्था, वाटेगाव, ता.वाळवा, जि.सांगली पृ. क्र. 71

१२) दै. पुढारी,कोल्हापूर, शुक्रवार, दि. 17 मे 1946 पृ. क्र.3

१३) उपरोक्त पृ.क्र.579

१४) उपरोक्त पृ. क्र. 92,93

१५) कुलकर्णी ल.ग. उर्फ वैद्य कासेगावकर धन्वंतरी, सातारचे प्रतिसरकार स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती, मनोकामना प्रकाशन,शिवनगर,इस्लामपूर, ता. वाळवा,जि. सांगली, पृ. क्र. 109,110

१६) उपरोक्त पृ. क्र. 273

१७) स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश

१८) उपरोक्त पृ. क्र. 506,510

१९) उपरोक्त पृ. क्र.72

२०) उपरोक्त पृ. क्र.529

२१) लोहार द. ब., स्वातंत्र्याचा संग्राम (1930 ते 1942),पहिली आवृत्ती 1982,पृ. क्र. 158

२२) उपरोक्त पृ. क्र 585

२३) उपरोक्त पृ. क्र.91

२४) कित्ता पृ. क्र.99

२५) उपरोक्त पृ. क्र. 317,318

२६) मुलाखत – सुभाष पाटील आणि विलासराव पाटील

२७) उपरोक्त,पृ. क्र. 201

२८) कित्ता पृ. क्र. 203

२९) उपरोक्त पृ. क्र.114

३०) सगरे अजित,जिद्दी झुंजार,श्रीराम प्रकाशन,कासेगाव,ता.वाळवा, जि. सांगली,पृ. क्र. 144,145

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव

(२६ जानेवारी २०२६ ला भारतीय संविधान स्वीकारल्याची ७५ वर्ष पूर्ण)

डॉ. रविराज रामचंद्र साळुंखे

विलिंग्डन महाविद्यालय (स्वायत्त), सांगली.

***Corresponding Author* - डॉ. रविराज रामचंद्र साळुंखे**

DOI - 10.5281/zenodo.19661260

सारांश:

२६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आलेले भारतीय संविधान हे आधुनिक भारताच्या राजकीय, सामाजिक आणि नैतिक पुनर्रचनेचे मूलभूत अधिष्ठान आहे. २०२५ मध्ये भारतीय संविधानाने ७५ वर्षांची ऐतिहासिक पर्व पूर्ण केली आहे. या अमृतमहोत्सवी टप्प्यावर संविधानाच्या कार्यक्षमतेचे, त्याच्या परिवर्तनशील स्वरूपाचे, संस्थात्मक स्थैर्याचे आणि सामाजिक न्यायातील योगदानाचे शास्त्रीय पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये भारतीय संविधानाच्या ऐतिहासिक निर्मितीपासून ते समकालीन डिजिटल युगातील आव्हानांपर्यंतचा प्रवास विश्लेषित करण्यात आला आहे. विशेषतः परिवर्तनशील संविधानवाद (Transformative Constitutionalism) या सैद्धांतिक चौकटीच्या आधारे संविधानाच्या सामाजिक बदल घडवून आणण्याच्या क्षमतेचे परीक्षण केले आहे. न्यायालयीन व्याख्या, घटनादुरुस्त्या, संघराज्यीय संतुलन, आणीबाणीचा कालखंड, आर्थिक उदारीकरण, सामाजिक न्याय धोरणे आणि समकालीन राजकीय प्रवाह यांच्या आधारे भारतीय लोकशाहीची टिकाऊ शक्ती अभ्यासली आहे. निष्कर्षतः भारतीय संविधान हे केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून सामाजिक परिवर्तनाचे जिवंत साधन आहे.

बीज शब्द: भारतीय संविधान, अमृतमहोत्सव, सामाजिक न्याय, लोकशाही, मूलभूत रचना सिद्धांत, घटनात्मक नैतिकता.

प्रस्तावना:

भारतीय संविधान हे जगातील सर्वांत विस्तृत आणि तपशीलवार लिखित संविधान म्हणून ओळखले जाते.[1] भारतीय संविधानाची निर्मिती ही केवळ प्रशासकीय रचना उभी करण्याची प्रक्रिया नव्हती; ती स्वातंत्र्य चळवळीच्या नैतिक तत्त्वांची संस्थात्मक अभिव्यक्ती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील मसुदा समितीने तयार केलेले हे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारले गेले आणि २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आले.[2] वसाहतवादी शोषण, जातीय विषमता, सामाजिक अन्याय आणि आर्थिक दारिद्र्य या ऐतिहासिक वास्तवांच्या पार्श्वभूमीवर संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवले. प्रस्तावणेतील "आम्ही भारताचे लोक" ही घोषणा भारतीय राज्यव्यवस्थेचा लोकसत्ताक आणि सार्वभौम स्वभाव अधोरेखित करते. [3] ७५ वर्षांच्या कालखंडात भारताने अनेक संकटांना तोंड दिले. राजकीय अस्थिरता, आणीबाणी, प्रादेशिक संघर्ष, आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण, तंत्रज्ञान क्रांती. तरीही लोकशाहीची चौकट टिकून राहिली. हे संविधानाच्या लवचिकतेचे आणि संस्थात्मक सक्षमता दर्शवते.

संशोधनाची पार्श्वभूमी आणि सैद्धांतिक चौकट:

परिवर्तनशील संविधानवादाची संकल्पना Granville Austin यांनी स्पष्ट केली आहे.[4] परिवर्तनशील संविधानवाद म्हणजे संविधान हे केवळ सत्तेचे विभाजन करणारे दस्तऐवज नसून समाजातील ऐतिहासिक अन्याय दूर करण्याचे साधन आहे. भारतीय संविधानाने सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे उद्दिष्ट स्पष्टपणे मांडले आहे. भारतीय संदर्भात संविधानाचा उद्देश तीन स्तरांवर दिसून येतो. १. राजकीय लोकशाहीची स्थापना २. सामाजिक समतेची प्रस्थापना ३. आर्थिक न्यायाचा विस्तार. संविधानाच्या प्रस्तावनेतील मूल्ये आणि भाग III व IV मधील तरतुदी या परिवर्तनशील ध्येयाकडे निर्देश करतात.

अमृतमहोत्सवाचे ऐतिहासिक महत्त्व:

भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव हा भारताच्या लोकशाहीच्या प्रवासातील अत्यंत महत्त्वाचा ऐतिहासिक टप्पा आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारले गेले, व ते २६ जानेवारी १९५० पासून ते अंमलात आले. ७५ वर्षांचा हा प्रवास भारताने विविध सामाजिक, राजकीय आणि आर्थिक आव्हानांचा सामना करत यशस्वीपणे पूर्ण केला आहे. त्यामुळे अमृतमहोत्सव हा केवळ उत्सव नसून आत्मपरीक्षण आणि भविष्यदृष्टीचा प्रसंग आहे. संविधानाने भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक म्हणून ओळख दिली. नागरिकांना समानता, स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य आणि शिक्षणाचा हक्क यांसारखे मूलभूत अधिकार प्रदान केले. तसेच मूलभूत कर्तव्यांची जाणीव करून देत नागरिकांना जबाबदारीची भावना दिली. सामाजिक न्यायाची संकल्पना दृढ करण्यासाठी आरक्षण धोरण, अस्पृश्यता निर्मूलन आणि स्त्री-पुरुष समानतेसारख्या तरतुदी महत्त्वपूर्ण ठरल्या. संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित राष्ट्राची पायाभरणी केली. स्वतंत्र न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग आणि संघराज्य रचना यांसारख्या संस्थात्मक व्यवस्थेमुळे लोकशाही अधिक बळकट झाली. अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने संविधानिक मूल्यांबद्दल जागरूकता वाढविणे, लोकशाही प्रक्रियांत सक्रिय सहभाग घेणे आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान देणे याची प्रेरणा मिळते. त्यामुळे भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव हा भूतकाळाचा गौरव करत भविष्याच्या प्रगतीचा संकल्प दृढ करणारा ऐतिहासिक सोहळा आहे.

ऐतिहासिक निर्मिती आणि संविधान सभेची भूमिका व मूलभूत मूल्यांचे विश्लेषण:

१९४६ मध्ये स्थापन झालेल्या संविधान सभेने जवळपास तीन वर्षे विस्तृत चर्चा करून संविधान तयार केले.[5] या सभेत विविध सामाजिक गटांचे प्रतिनिधित्व होते. संविधानावर ब्रिटिश संसदीय प्रणाली, अमेरिकेचे मूलभूत अधिकार, आयरिश राज्य धोरण तत्त्वे आणि कॅनडाची संघराज्यीय रचना यांचा प्रभाव पडला. [6] संविधान सभा ही वसाहतवादी राज्यव्यवस्थेपासून लोकसत्ताक व्यवस्थेकडे संक्रमणाचे प्रतीक होती. चर्चेच्या प्रक्रियेमुळे संविधान व्यापक सहमतीवर आधारित झाले. ही प्रक्रिया लोकशाही संस्कृतीची पायाभरणी ठरली. संविधानाच्या प्रस्तावनेत चार प्रमुख तत्त्वे अधोरेखित केली आहेत: १) न्याय (सामाजिक, आर्थिक, राजकीय) २) स्वातंत्र्य (विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा) ३) समानता (संधीची समानता) ४) बंधुता (राष्ट्रीय एकात्मता आणि व्यक्तीची प्रतिष्ठा). ही तत्त्वे भारतीय राज्यकारभाराच्या सर्व स्तरांवर मार्गदर्शक म्हणून कार्य करतात. १९७६ च्या घटनादुरुस्तीद्वारे "समाजवादी" आणि "धर्मनिरपेक्ष" या संकल्पनांची स्पष्ट नोंद करण्यात आली, ज्यामुळे राज्याची नैतिक दिशा अधिक स्पष्ट झाली.

मूलभूत अधिकार: उत्क्रांती आणि न्यायालयीन विस्तार:

संविधानातील कलम १५ आणि १६ अंतर्गत आरक्षण व्यवस्था सामाजिक समतेसाठी प्रभावी ठरली.

अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षण व रोजगारात संधी मिळाली.स्थानिक स्वराज्यातील महिला आरक्षणामुळे राजकीय सहभाग वाढला. यामुळे लोकशाहीचा सामाजिक आधार विस्तारला. भाग III मधील मूलभूत अधिकार हे नागरिकांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करतात. कलम १४ समानतेचा अधिकार देते; कलम १९ अभिव्यक्ती आणि हालचालीचे स्वातंत्र्य; कलम २१ जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करते.[7] Supreme Court of India ने या अधिकारांचा व्यापक अर्थ लावला. विशेषतः कलम २१ अंतर्गत "जीवन" म्हणजे सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले.

आरक्षण धोरण, महिला सक्षमीकरण, शिक्षणाचा अधिकार, अन्न सुरक्षा कायदा, ग्रामीण रोजगार हमी योजना यांमुळे सामाजिक न्यायाची व्याप्ती वाढली. तथापि, सामाजिक विषमता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. जातीय हिंसा, लैंगिक भेदभाव, आर्थिक दरी, ग्रामीण-शहरी विषमता ही आव्हाने अद्याप कायम आहेत. संविधानाची प्रभावी अंमलबजावणी आणि संस्थात्मक पारदर्शकता यांवर सामाजिक न्यायाचे यश अवलंबून आहे.

न्यायालयीन प्रकरणांचे विश्लेषण:

१. Kesavananda Bharati v. State of Kerala या प्रकरणात मूलभूत रचना सिद्धांत मांडण्यात आला. संसदेला घटनादुरुस्तीचा अधिकार आहे, परंतु संविधानाची मूलभूत रचना बदलता येत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

२. Maneka Gandhi v. Union of India या निर्णयात "प्रक्रिया न्याय्य, वाजवी आणि तर्कसंगत असावी" असे नमूद करून वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण मजबूत करण्यात आले.

३. Justice K.S. Puttaswamy v. Union of India या ऐतिहासिक निर्णयात गोपनीयतेचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे घोषित करण्यात आले.

४. Navtej Singh Johar v. Union of India या प्रकरणात लैंगिक अल्पसंख्याकांच्या अधिकारांना मान्यता देऊन समानतेच्या तत्त्वाचा विस्तार करण्यात आला.

५. या निर्णयांनी संविधानाला स्थिर न ठेवता गतिशील आणि परिवर्तनशील बनवले.[8]

राज्याच्या धोरणनिर्देशक तत्त्वांची भूमिका:

भारतीय संविधानाच्या भाग IV मधील राज्य धोरणनिर्देशक तत्त्वे (Directive Principles of State Policy) न्यायालयीनदृष्ट्या अंमलात आणता येत नसली तरी राज्याच्या धोरणनिर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. शिक्षण, आरोग्य, कामगार कल्याण, पर्यावरण संरक्षण यांसारख्या क्षेत्रांमध्ये या तत्त्वांचा प्रभाव दिसतो. सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची पूर्तता करण्यासाठी ही तत्त्वे अत्यावश्यक आहेत. मूलभूत अधिकार आणि धोरणनिर्देशक तत्त्वांमधील संतुलन राखणे हे भारतीय न्यायव्यवस्थेचे महत्त्वपूर्ण कार्य राहिले आहे.

तुलनात्मक दृष्टिकोन: जागतिक संदर्भातील भारतीय संविधान:

जगातील अनेक विकसनशील देशांमध्ये लोकशाही अस्थिर झाली आहे. सैनिकी उठाव, एकाधिकारशाही प्रवाह आणि संविधानिक निलंबनाची उदाहरणे आढळतात. या तुलनेत भारताने सातत्याने निवडणुका घेतल्या, सत्तांतर स्वीकारले आणि न्यायालयीन स्वायत्तता टिकवली. राष्ट्रवाद, धार्मिक ओळख, प्रादेशिक अस्मिता, आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरण या प्रवाहांनी भारतीय राजकारणाला नवी दिशा दिली आहे. या पार्श्वभूमीवर संविधानिक मूल्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. लोकशाही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून संस्थात्मक उत्तरदायित्व, स्वायत्त न्यायपालिका, मुक्त

माध्यमे आणि सक्रिय नागरी समाज यांवर अवलंबून असते. भारतीय संविधानाची लवचिकता, न्यायिक पुनरावलोकन, मूलभूत रचना सिद्धांत आणि बहुसांस्कृतिक रचना ही वैशिष्ट्ये जागतिक स्तरावर महत्त्वाची मानली जातात.

भारतीय संविधान हे केवळ देशांतर्गत राजकीय करार नसून ते जागतिक संवैधानिक परंपरांचा सर्जनशील संगम आहे. संविधान निर्मितीच्या वेळी संविधान सभेने विविध देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून भारतीय परिस्थितीनुसार तरतुदी स्वीकारल्या. त्यामुळे भारतीय संविधानाला "संमिश्र संविधान" (Borrowed yet Indigenous Constitution) असे संबोधले जाते.

१. अमेरिकेचे संविधान आणि भारतीय संविधान: Constitution of the United States ने भारतीय संविधानावर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकला. मूलभूत अधिकारांची संकल्पना, न्यायालयीन पुनरावलोकन (Judicial Review) आणि संघराज्यीय रचना या बाबतीत अमेरिकन प्रभाव स्पष्ट दिसतो.[9] मात्र, अमेरिकेच्या संविधानात मूलभूत अधिकारांची अंमलबजावणी प्रामुख्याने न्यायालयीन प्रक्रियेवर अवलंबून असते; तर भारतात अनुच्छेद ३२ आणि २२६ अंतर्गत थेट सर्वोच्च व उच्च न्यायालयाकडे जाण्याचा अधिकार दिला आहे.

२. ब्रिटिश संसदीय प्रणाली: Constitution of the United Kingdom प्रमाणे भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ लोकसभेस जबाबदार आहेत ही तरतूद ब्रिटिश पद्धतीवर आधारित आहे. मात्र, ब्रिटनप्रमाणे संसदीय सार्वभौमत्व भारतात नाही; येथे संविधान सर्वोच्च आहे.

३. आयर्लंड आणि राज्याच्या धोरणनिर्देशक तत्वे: Constitution of Ireland मधील Directive Principles of State Policy या संकल्पनेवरून भारताने राज्याच्या धोरणनिर्देशक तत्वांचा स्वीकार केला.[10] हे तत्व न्यायालयीन अंमलबजावणीयोग्य नसले तरी सामाजिक न्यायाच्या दिशेने राज्याला मार्गदर्शन करतात.

४. दक्षिण आफ्रिका आणि मूलभूत कर्तव्ये: Constitution of South Africa मधील अधिकार आणि कर्तव्यांचे संतुलन भारतीय संविधानाच्या ४२ व्या दुरुस्तीमधील मूलभूत कर्तव्यांच्या समावेशाशी सुसंगत दिसते.

घटनादुरुस्त्या: लवचिकतेचे प्रतीक आणि आणीबाणीचा कालखंड:

भारतीय संविधानात शंभराहून अधिक घटनादुरुस्त्या झाल्या आहेत. यामुळे संविधानाची लवचिकता स्पष्ट होते. तथापि, घटनादुरुस्त्यांमुळे सत्तासंतुलन बिघडण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. मूलभूत रचना सिद्धांतामुळे या धोक्यावर मर्यादा आल्या. ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला, ज्यामुळे लोकशाही तळागाळात पोहोचली.[11] ८६ वी घटनादुरुस्तीने शिक्षणाचा अधिकार मूलभूत अधिकार म्हणून मान्य केला. १९७५ ते १९७७ दरम्यान घोषित करण्यात आलेल्या राष्ट्रीय आणीबाणीने भारतीय लोकशाहीसमोर गंभीर आव्हान उभे केले. नागरी स्वातंत्र्यांवर निर्बंध आले, विरोधी नेत्यांना अटक झाली. परंतु १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत जनतेने सत्तांतर घडवून आणले. यामुळे लोकशाहीवरील विश्वास दृढ झाला.

संघराज्यीय रचना आणि केंद्र-राज्य संबंध:

भारतीय संविधानाने मजबूत केंद्रासह संघराज्यीय रचना स्वीकारली. राष्ट्रीय एकात्मता आणि प्रादेशिक विविधता यांमध्ये संतुलन राखण्याचा प्रयत्न केला गेला. तथापि, आर्थिक अधिकार, कररचना, राज्यपालांची भूमिका आणि संसदीय हस्तक्षेप यांमुळे काही वेळा तणाव निर्माण होतो. सहकारी संघराज्यवाद ही संकल्पना या तणावाचे निराकरण करण्यासाठी महत्त्वाची ठरते.

भारतीय संविधानाने मजबूत केंद्रासह संघराज्यीय रचना स्वीकारली आहे. आर्थिक अधिकार, कररचना (GST), राज्यपालांची भूमिका, आपत्कालीन तरतुदी यांमुळे केंद्र-राज्य संबंधांमध्ये काहीवेळा तणाव निर्माण होतो. तथापि, सहकारी संघराज्यवाद (Cooperative Federalism) ही संकल्पना धोरणनिर्मितीत संवाद आणि समन्वय वाढवते. प्रादेशिक विविधता आणि राष्ट्रीय एकात्मता यांच्यातील संतुलन राखणे हे भारतीय संविधानाचे मोठे यश आहे.

आर्थिक उदारीकरण, बाजारव्यवस्था आणि संवैधानिक संतुलन:

१९९१ नंतर भारताने आर्थिक उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण (LPG Reforms) स्वीकारले. या प्रक्रियेमुळे राज्याची भूमिका "कल्याणकारी राज्य" (Welfare State) पासून "सुविधादाता राज्य" (Facilitator State) कडे वळल्याचे दिसते.[12] तथापि, भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेतील सामाजिक आणि आर्थिक न्यायाची हमी लक्षात घेतल्यास, बाजाराभिमुख धोरणे स्वीकारताना राज्याने संवैधानिक मर्यादा पाळणे आवश्यक होते. आर्थिक उदारीकरणामुळे GDP वाढ, परकीय गुंतवणूक, औद्योगिक विस्तार आणि सेवा क्षेत्रातील प्रगती झाली. परंतु त्याचबरोबर आर्थिक असमानता वाढल्याची टीका देखील करण्यात आली. संविधानातील धोरणनिर्देशक तत्त्वे राज्याला संपत्तीचे न्याय्य वितरण, उपजीविकेची साधने आणि सामाजिक सुरक्षा यांची जबाबदारी देतात. त्यामुळे आर्थिक सुधारणांनंतरही सामाजिक न्यायाची चौकट अबाधित ठेवणे ही राज्याची संवैधानिक जबाबदारी राहते. न्यायालयीन निर्णयांमध्ये देखील आर्थिक धोरणांच्या संदर्भात "तर्कसंगतता" आणि "मनमानी नसणे" हे निकष लावले गेले आहेत. आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक समता यांच्यातील संतुलन राखणे ही भारतीय संविधानाची वैशिष्ट्यपूर्ण देणगी आहे. वित्त आयोग, जीएसटी परिषद आणि नियोजन प्रक्रियेद्वारे केंद्र-राज्य आर्थिक संबंध ठरविले जातात. जीएसटी व्यवस्थेमुळे राज्यांचे कराधिकार काही प्रमाणात मर्यादित झाले असले तरी सहकारी संघराज्यवादाची संकल्पना बळकट झाली.

न्यायिक सक्रियता आणि लोकहित याचिका (PIL):

१९८० च्या दशकापासून भारतीय न्यायपालिकेने लोकहित याचिकांच्या माध्यमातून सक्रिय भूमिका स्वीकारली. यामुळे वंचित, गरीब आणि दुर्बल घटकांना न्यायालयीन प्रवेश सुलभ झाला. Supreme Court of India ने पर्यावरण, कामगार हक्क, कैद्यांचे अधिकार, महिला संरक्षण, बालहक्क, प्रदूषण नियंत्रण यांसारख्या क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण हस्तक्षेप केले. न्यायिक सक्रियतेमुळे संविधानातील मूलभूत अधिकारांचा व्यावहारिक विस्तार झाला. तथापि, न्यायपालिका "धोरणनिर्मितीत हस्तक्षेप करते का?" हा वाद देखील निर्माण झाला. सत्ताविभाजनाच्या तत्त्वानुसार विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांच्यात संतुलन आवश्यक आहे. न्यायिक सक्रियता ही लोकशाहीच्या रक्षणासाठी महत्त्वाची असली तरी तिची मर्यादा निश्चित करणे तितकेच आवश्यक आहे.

पर्यावरणीय न्याय आणि संविधान:

पर्यावरण संरक्षण हे मूळ संविधानात स्पष्टपणे नमूद नव्हते; परंतु ४२ व्या घटनादुरुस्तीने पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी राज्य आणि नागरिकांवर टाकली. न्यायालयाने कलम २१ अंतर्गत स्वच्छ पर्यावरणाचा अधिकार मान्य केला.[13] नदीप्रदूषण, वायुप्रदूषण, जंगलतोड, औद्योगिक दुर्घटना अशा अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयाने हस्तक्षेप केला. पर्यावरणीय न्याय हा आता सामाजिक न्यायाचा अविभाज्य भाग बनला आहे. "शाश्वत विकास" (Sustainable Development) ही संकल्पना न्यायालयीन तत्त्व म्हणून स्वीकारली गेली.

डिजिटल युग, गोपनीयता आणि डेटा संरक्षण:

२१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञान आणि डिजिटल देखरेख यामुळे नवे संवैधानिक प्रश्न उद्भवले. नागरिकांची वैयक्तिक माहिती, बायोमेट्रिक डेटा, ऑनलाइन अभिव्यक्ती आणि सोशल मीडिया नियंत्रण या विषयांनी संवैधानिक चर्चेला नवी दिशा दिली. Justice K.S. Puttaswamy v. Union of India या निर्णयात गोपनीयतेचा अधिकार हा कलम २१ अंतर्गत मूलभूत अधिकार असल्याचे घोषित करण्यात आले. या निर्णयामुळे डिजिटल युगातील नागरिकांच्या स्वातंत्र्याला संवैधानिक संरक्षण मिळाले. तथापि, राष्ट्रीय सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांच्यात संतुलन राखणे हे मोठे आव्हान आहे. डेटा संरक्षण कायदे आणि सायबर नियमन यांना संविधानिक चौकटीत बसवणे आवश्यक आहे. डिजिटल अर्थव्यवस्था आणि सामाजिक माध्यमांमुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि गोपनीयतेचे नवे प्रश्न निर्माण झाले आहेत.डेटा संरक्षण कायदे, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसाठी संविधानाच्या चौकटीत नवे कायदे आवश्यक आहेत.डिजिटल निरीक्षण आणि नागरिकांच्या गोपनीयतेचा समतोल राखणे ही मोठी संवैधानिक कसोटी ठरते.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही निवडणूक प्रक्रिया:

संविधानातील कलम १९ (१) (अ) अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे.[14] माध्यमे, पत्रकार, लेखक आणि नागरिक यांना शासनावर टीका करण्याचा अधिकार आहे. तथापि, द्वेषपूर्ण भाषण, चुकीची माहिती, राष्ट्रीय सुरक्षेचे प्रश्न यांमुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्याची गरज निर्माण होते. संविधानात "वाजवी निर्बंध" (Reasonable Restrictions) ही संकल्पना दिली आहे. न्यायालयाने या निर्बंधांचे परीक्षण करून लोकशाही मूल्यांचे संरक्षण केले आहे. तथापि, संविधानाची ताकद केवळ तरतुदींमध्ये नसून नागरिकांच्या संवैधानिक जाणीवेत आहे. संस्थात्मक स्वायत्तता आणि पारदर्शकता यांवर लोकशाहीचे भविष्य अवलंबून आहे. भारतीय लोकशाहीची मजबुती निवडणूक प्रक्रियेवर अवलंबून आहे. Election Commission of India ही स्वतंत्र संस्था निवडणूक प्रक्रिया पारदर्शक ठेवते.[15] इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (EVM), मतदार नोंदणी सुधारणा, आदर्श आचारसंहिता यांमुळे निवडणुका अधिक विश्वासार्ह झाल्या. तथापि, राजकीय निधीकरण, गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार आणि माध्यमांचा प्रभाव ही आव्हाने अजूनही कायम आहेत.

समानतेचा अधिकार, सामाजिक न्याय, स्त्री-सक्षमीकरण:

Constitution of India मधील कलम १४ ते १८ ही समानतेची तरतूद भारतीय लोकशाहीचा मूलाधार आहे. अस्पृश्यतेचे उच्चाटन (कलम १७) ही तरतूद सामाजिक परिवर्तनाची क्रांतिकारी पायरी होती.[16] या तरतुदींच्या आधारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण धोरण राबविण्यात आले. सामाजिक प्रतिनिधित्वाची संकल्पना केवळ राजकीय न राहता शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रात विस्तारली. संविधानातील समानतेच्या तत्त्वामुळे महिलांना राजकीय हक्क, रोजगारातील समान संधी आणि मालमत्तेचे अधिकार मिळाले. पुढे पंचायतराज व्यवस्थेत ३३% आरक्षण देऊन स्थानिक स्वराज्यात महिलांचा सहभाग वाढविण्यात आला. यामुळे ग्रामीण राजकारणात महिलांचे नेतृत्व उभे राहिले. तथापि, प्रत्यक्षात सामाजिक पितृसत्ताक रचना अजूनही अडथळा ठरते.

निष्कर्ष:

संविधानाने भारताला एकात्मता, लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर आधारित राष्ट्र म्हणून घडविले आहे. न्यायालयीन सक्रियता, दुरुस्त्या आणि सामाजिक चळवळी यांच्या माध्यमातून संविधान

सतत विकसित होत आहे. अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने संविधानाच्या मूल्यांचे पुनरावलोकन करणे आणि त्यांची जपणूक करणे ही सर्व नागरिकांची जबाबदारी आहे. भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव हा केवळ उत्सवाचा क्षण नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. संविधानाने राजकीय स्थैर्य, सामाजिक न्याय आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांचे संतुलन राखले आहे. परिवर्तनशील संविधानवादाच्या माध्यमातून न्यायपालिकेने आणि विधिमंडळाने सामाजिक बदलांना संवैधानिक आधार दिला आहे. संविधानाची त्याची ताकद केवळ कागदावरील तरतुदींमध्ये नसून नागरिकांच्या विश्वासात आणि संस्थात्मक सक्षमतामध्ये आहे. ७५ वर्षांच्या प्रवासात सामाजिक क्रांती, आर्थिक न्याय, संघराज्यीय संतुलन आणि लोकशाहीची सुदृढता यांचा मार्ग दाखविला. संविधानाची शक्ती केवळ त्याच्या तरतुदींमध्ये नसून त्याच्या अंमलबजावणीत आहे. नागरिक, न्यायपालिका, विधिमंडळ आणि कार्यपालिका यांनी संयुक्तपणे संविधानिक मूल्यांचे रक्षण केले. अमृतमहोत्सव हा केवळ उत्सव नसून जबाबदारीची जाणीव आहे — समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे पुनरुज्जीवन करण्याची संधी आहे

References:

1. Constitution of India. (1950). Government of India.
2. Ambedkar, B. R. (1948). Constituent Assembly Debates. Government of India Press.
3. Austin, G. (1966). The Indian Constitution: Cornerstone of a Nation. Oxford University Press.
4. Austin, G. (1999). Working a Democratic Constitution: The Indian Experience. Oxford University Press.
5. Ambedkar, B. R. (1948). Constituent Assembly Debates. Government of India Press.
6. Ambedkar, B. R. (1948). Constituent Assembly Debates. Government of India Press.
7. Constitution of India. (1950). Government of India.
8. Austin, G. (1999). Working a Democratic Constitution: The Indian Experience. Oxford University Press
9. Constitution of the United States. (1787).
10. Constitution of Ireland. (1937).
11. Constitution of India. (1950). Government of India.
12. Austin, G. (1999). Working a Democratic Constitution: The Indian Experience. Oxford University Press.
13. Constitution of India. (1950). Government of India.
14. Constitution of India. (1950). Government of India.
15. Election Commission of India. (2023). Electoral Reforms Report.
16. Constitution of India. (1950). Government of India.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव: ७५ वर्षांच्या प्रवासाचा गौरव

श्री. कैलास शंकर माथणे

सहाय्यक प्राध्यापक,

सदगुरु गाडगे महाराज कॉलेज कराड.

Corresponding Author - श्री. कैलास शंकर माथणे

DOI - 10.5281/zenodo.19661287

सारांश (Abstract):

भारतीय संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आले. या घटनेच्या ७५ वर्षांच्या पूर्ती निमित्ताने, भारत सरकारने 'हमारा संविधान, हमारा स्वाभिमान' या थीम अंतर्गत वर्षभर चालणारा 'संविधान अमृत महोत्सव' साजरा केला. हा महोत्सव २६ नोव्हेंबर २०२४ पासून सुरू झाला आणि २६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत चालला, ज्यात संविधानाच्या मूल्यांचा प्रचार, नागरिक जागृती आणि विविध कार्यक्रमांचा समावेश होता. महाराष्ट्रात 'घर घर संविधान' मोहीम विशेष उल्लेखनीय होती, ज्यात शाळा, महाविद्यालये आणि ग्रामीण भागात संविधान प्रसार झाला. हा संशोधन लेख संविधानाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्रमुख वैशिष्ट्ये, संशोधने, न्यायालयीन व्याख्या, ७५ वर्षांच्या यश आणि आव्हाने, तसेच अमृत महोत्सवातील कार्यक्रमांचे विश्लेषण करतो. सरकारी दस्तऐवज, विद्वान अभ्यास आणि समकालीन अहवालांवर आधारित, हे पेपर संविधानाच्या भारतीय समाजावर झालेल्या प्रभावाचे मूल्यमापन करते आणि आधुनिक आव्हानांसाठी त्याच्या प्रासंगिकतेची चर्चा करते.

कीवर्ड: भारतीय संविधान, अमृत महोत्सव, लोकशाही, मूलभूत हक्क, न्यायालय, संशोधने.

प्रस्तावना (Introduction):

भारतीय संविधान हे केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नाही, तर राष्ट्राच्या लोकशाही आत्म्याचे प्रतीक आहे. जगातील सर्वात मोठे लिखित संविधान असलेले हे दस्तऐवज ३९५ कलमे (मूळ), १२ अनुसूची आणि अनेक संशोधनांसह समृद्ध आहे (Laxmikanth, 2025). २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आलेल्या या संविधानाने भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक बनवले (भारत सरकार, १९५०). स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे पूर्ण होत असताना, संविधान स्वीकारल्याला ७५ वर्षे पूर्ण होणे हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. केंद्र सरकारने २६ नोव्हेंबर २०२४ पासून 'हमारा संविधान, हमारा स्वाभिमान' अभियान सुरू केले, जे २०२५-२०२६ मध्ये शिगेला पोहोचले (Press Information Bureau, 2024a).

महाराष्ट्र शासनाने 'घर घर संविधान' मोहीम राबवली, ज्यात शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे आणि ग्रामीण भागात संविधान प्रसार केला गेला (महाराष्ट्र सरकार, २०२४). या उत्सवाने नागरिकांना संविधानाचे मूल्य – न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता – जीवनात रुजवण्याची संधी दिली. हा लेख ७५ वर्षांच्या संविधानाच्या प्रवासाचे मूल्यमापन करतो आणि अमृत महोत्सवातील योगदान पाहतो.

संविधानाची निर्मिती ही स्वातंत्र्य लढ्याचा परिणाम आहे. १९४६ मध्ये कैबिनेट मिशन योजनेच्या अंतर्गत संविधान सभा स्थापन झाली. डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली आणि डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या मसुदा समितीच्या नेतृत्वात, सभेने २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवस काम केले (Austin, १९६६). २६ नोव्हेंबर १९४९ रोजी २८४ सदस्यांनी स्वाक्षरी केली. हे संविधान फ्रेंच क्रांती, अमेरिकन संविधान आणि आयरिश संविधानातून प्रेरित आहे (Baxi, २०१५).

अमृत महोत्सवाच्या संदर्भात, हे पेपर संविधानाच्या विकासाचा अभ्यास करतो, ज्यात त्याच्या लवचिकतेचे आणि अनुकूलनक्षमतेचे विश्लेषण आहे. पुढील विभागात ऐतिहासिक पार्श्वभूमी, वैशिष्ट्ये, संशोधने, न्यायालयीन व्याख्या, यश आणि आव्हाने, अमृत महोत्सवाचे कार्यक्रम आणि निष्कर्ष यांचा समावेश आहे. या उत्सवाने संविधानाचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचवले, ज्यात डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा वापर झाला (Press Information Bureau, 2024b).

संविधान अमृत महोत्सवाने 'आजादी का अमृत महोत्सव' च्या धर्तीवर राष्ट्रीय एकता मजबूत केली. या महोत्सवात ४ मुख्य स्तंभ होते: प्रस्तावना, संविधान जाणणे, संविधान निर्मिती आणि संविधानाचा गौरव (Press Information Bureau, 2024a). महाराष्ट्रात सामाजिक न्याय विभागाने जिल्हास्तरावर समित्या स्थापन केल्या, ज्यात विविध उपक्रम राबवले गेले (महाराष्ट्र सरकार, २०२४). उदाहरणार्थ, शाळांमध्ये संविधान दिनी सामूहिक उद्देशिका वाचन, स्पर्धा आणि व्याख्याने आयोजित केली गेली.

संविधान निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी (Historical Background of the Constitution):

भारतीय संविधानाची निर्मिती ही ब्रिटिश राजवटीतून मुक्त होण्याच्या लढ्याचा परिणाम आहे. १९३५ च्या भारत सरकार कायद्याने संघराज्य व्यवस्था सुरू केली, पण पूर्ण स्वायत्तता नव्हती. १९४२ च्या क्रिप्स मिशन आणि १९४६ च्या कैबिनेट मिशनने संविधान सभा स्थापनेचा मार्ग मोकळा केला (Laxmikanth, 2025, Chapter 1). सभा ९ डिसेंबर १९४६ रोजी सुरू झाली, ज्यात २९९ सदस्य होते, त्यात महिलांचा समावेश होता.

डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वात मसुदा समितीने संविधान तयार केले. प्रमुख वैशिष्ट्ये:

- प्रस्तावना (Preamble): "आम्ही भारताचे लोक..." हे लोकसत्ता आणि संप्रभुत्वाचे प्रतीक आहे (Kesavananda Bharati v. State of Kerala, 1973). अमृत महोत्सवात राष्ट्रपतींनी प्रस्तावनेचे वाचन केले (Press Information Bureau, 2024a).
- मूलभूत हक्क (Fundamental Rights): कलम १२-३५ मध्ये बोलण्याचे स्वातंत्र्य, समानता, जीवनाचा हक्क इ. उदाहरण: कलम १४ ने समानता सुनिश्चित केली, जसे इंदिरा साहनी खटल्यात आरक्षण मर्यादा निश्चित (Laxmikanth, 2025, Part III).
- मूलभूत कर्तव्ये (Fundamental Duties): १९७६ च्या ४२व्या संशोधनाने समाविष्ट (Swarn Singh Committee, 1976). उदाहरण: पर्यावरण संरक्षण (कलम ५१अ(g)), जे आधुनिक आव्हानांसाठी उपयुक्त.

- राज्य धोरणाची निर्देशक तत्त्वे (Directive Principles of State Policy): सामाजिक-आर्थिक न्यायासाठी मार्गदर्शक (कलम ३६-५१). उदाहरण: मनरेगा योजना कलम ३९ नुसार अंमलात.
- संघराज्य व्यवस्था (Federal Structure): केंद्र आणि राज्यांमधील शक्ती वाटप (७वी अनुसूची). उदाहरण: GST ने आर्थिक संघराज्य मजबूत केले.

संविधानाने सामाजिक न्याय, लिंग समानता आणि अल्पसंख्याक संरक्षणावर भर दिला. अमृत महोत्सवात, या इतिहासाचा गौरव करण्यासाठी संसदेत विशेष कार्यक्रम झाले, ज्यात संस्कृत आणि मैथिली भाषेत संविधान प्रकाशन झाले (Press Information Bureau, 2024b). या विभागात संविधान सभेच्या चर्चांचे विस्तृत विश्लेषण आहे. उदाहरणार्थ, हक्कांच्या चर्चेत, अल्लादी कृष्णास्वामी अय्यर यांनी अमेरिकन बिल ऑफ राइट्सचा उल्लेख केला (Constituent Assembly Debates, 1948). हे संविधान २२ भाषांमध्ये उपलब्ध आहे, जे त्याच्या सर्वसमावेशकतेचे द्योतक आहे. संविधान सभेने ११५ दिवस चर्चा केल्या, आणि २,४७३ संशोधने मंजूर केले (Laxmikanth, 2025, p. 1.10-1.15). हे वैशिष्ट्ये विविध देशांच्या संविधानातून घेतले आहेत, जसे मूलभूत हक्क अमेरिकेतून, निर्देशक तत्त्वे आयरलंडतून.

संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत २८४ सदस्यांचा सहभाग होता, ज्यात १५ महिलांचा समावेश. डॉ. आंबेडकर यांनी ७ समित्यांचे अध्यक्षपद भूषवले. ब्रिटिश कायदे, गांधीजींचे विचार आणि सामाजिक न्यायाची प्रेरणा यांचा प्रभाव (Austin, १९६६). अमृत महोत्सवात 'Making of the Constitution' पुस्तक प्रकाशित झाले, ज्यात या प्रक्रियेची दृश्य चित्रे समाविष्ट (Press Information Bureau, 2024a).

संविधानातील प्रमुख बदल आणि संशोधने (Major Amendments to the Constitution):

संविधान गतिमान आहे, आतापर्यंत १०६ संशोधने झाली आहेत (Laxmikanth, 2025, Appendix). हे बदल समाजातील परिवर्तन दर्शवतात.

विस्तृत उदाहरणे आणि महत्वाचे संशोधने:

विस्तृत उदाहरणे:

- **पहिले संशोधन (१९५१):** भाषण स्वातंत्र्यावर (कलम १९) मर्यादा घातल्या, ज्यात सार्वजनिक व्यवस्था, विदेशी संबंध आणि अपराध प्रोत्साहन हे नवीन आधार जोडले. जमीन सुधारणांसाठी राज्यांना अधिकार दिले आणि नववी अनुसूची जोडली, ज्यात न्यायालयीन पुनरावलोकनापासून संरक्षण मिळते. हे सामाजिक न्यायासाठी आवश्यक होते, जसे शंकर प्रसाद खटल्यात (१९५१) मान्य झाले. प्रभाव: जमीनदारशाही संपुष्टात आणली आणि पिछड्या वर्गांसाठी विशेष तरतुदी सक्षम केल्या.
- **चौथे संशोधन (१९५५):** खासगी मालमत्तेच्या जबरदस्ती संपादनासाठी भरपाई न्यायालयीन पुनरावलोकनापासून मुक्त केली. नववी अनुसूचीत अधिक कायदे समाविष्ट केले. प्रभाव: राष्ट्रीयकरण आणि जमीन सुधारणा सुलभ झाल्या, जसे राज्य सरकारांना व्यापार राष्ट्रीयकरणाचा अधिकार मिळाला.
- **सातवे संशोधन (१९५६):** राज्यांची पुनर्रचना केली – A, B, C, D वर्गीकरण काढले आणि १४ राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेश तयार केले. उच्च न्यायालयांचे अधिकार संघशासित प्रदेशांपर्यंत वाढवले आणि दोन किंवा अधिक राज्यांसाठी सामाईक उच्च न्यायालयाची तरतूद केली. प्रभाव: राज्य पुनर्रचना

कायद्याच्या अंमलबजावणीसाठी महत्वाचे, जसे बॉम्बे राज्य विभाजन.

- **४२वे संशोधन (१९७६):** 'मिनी संविधान' म्हणून ओळखले जाते, ज्यात ५९ कलमे बदलली. प्रस्तावनेत 'समाजवादी', 'धर्मनिरपेक्ष' आणि 'एकात्मता' शब्द जोडले. मूलभूत कर्तव्ये (कलम ५१अ) जोडली, ज्यात पर्यावरण संरक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा समावेश. आपत्कालीन काळात न्यायालयीन हस्तक्षेप मर्यादित केला. प्रभाव: आपत्कालीन काळातील (१९७५-७७) संशोधन, जे जनता पार्टी सरकारने ४४व्या संशोधनाने सुधारले.
- **४४वे संशोधन (१९७८):** ४२व्या संशोधनातील अतिरेक सुधारले. मालमत्तेचा हक्क (कलम ३००अ) मूलभूत हक्कातून काढला आणि कायदेशीर हक्क बनवला. आपत्कालीन काळातील मूलभूत हक्क निलंबन मर्यादित केले. प्रभाव: लोकशाही पुनर्स्थापित केली आणि न्यायालयीन शक्ती मजबूत केली.
- **६१वे संशोधन (१९८८):** मतदान वय २१ वरून १८ वर्ष केले. प्रभाव: तरुणांना राजकीय प्रक्रियेत समाविष्ट केले, ज्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसाठी लागू.
- **७३वे आणि ७४वे संशोधन (१९९२):** ग्रामपंचायत आणि नगरपालिका व्यवस्था मजबूत केली. महिलांसाठी १/३ आरक्षण, अनुसूचित जाती/जमातींसाठी आरक्षण आणि ११वी-१२वी अनुसूची जोडली. प्रभाव: स्थानिक स्वराज्य मजबूत झाले, ज्यात २.५ लाख+ ग्रामपंचायतींना संवैधानिक दर्जा मिळाला.
- **९७वे संशोधन (२०११):** सहकारी संस्थांना संवैधानिक दर्जा दिला. प्रभाव: सहकारी क्षेत्र मजबूत केले, जसे सहकारी बँका आणि शेतकरी संघ.
- **१०१वे संशोधन (२०१६):** वस्तू आणि सेवा कर (GST) लागू केला, ज्यात ७वी अनुसूची बदलली. प्रभाव: आर्थिक एकीकरण, ज्यात एक राष्ट्र एक कर प्रणाली सुरू झाली.
- **१०३वे संशोधन (२०१९):** आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग (EWS) साठी १०% आरक्षण. प्रभाव: सामान्य वर्गातील गरीबांसाठी आरक्षण, जसे इंदिरा साहनी खटल्यातील ५०% मर्यादेच्या पलीकडे.
- **१०५वे संशोधन (२०२१):** OBC यादी राज्यांना तयार करण्याचा अधिकार स्पष्ट केला. प्रभाव: राज्यांना OBC आरक्षणात स्वायत्तता, जसे NJAC सारख्या पूर्व खटल्यांशी जोडले.
- **१०६वे संशोधन (२०२३):** महिलांसाठी लोकसभा आणि विधानसभेत १/३ आरक्षण. प्रभाव: लिंग समानता वाढवली, ज्यात SC/ST आरक्षणातील महिलांसाठीही तरतूद.
- **१२६वे संशोधन (२०१९):** अनुसूचित जाती/जमाती आरक्षण २०३० पर्यंत वाढवले. प्रभाव: सामाजिक न्याय कायम.
- **१२७वे संशोधन (२०२१):** OBC यादीसाठी राज्य अधिकार पुनर्स्थापित. प्रभाव: संघराज्य मजबूत.
- **१२८वे संशोधन (२०२३):** महिलांसाठी आरक्षण विधेयक (Women's Reservation Bill). प्रभाव: विधिमंडळात महिलांचा सहभाग वाढवला.
- **१३०वे संशोधन (२०२५):** मंत्र्यांना हिरासत झाल्यास पदमुक्त करणे. प्रभाव: राजकीय पारदर्शकता आणि जबाबदारी वाढवली.

हे संशोधने संविधानाच्या अनुकूलनक्षमतेचे प्रमाण आहेत. अमृत महोत्सवात या संशोधनांच्या चर्चा झाल्या, ज्यात संविधानाच्या लवचिकतेचा गौरव झाला. उदाहरणार्थ, ४२व्या संशोधनाने ५५ कलमे बदलले, पण ४४व्या संशोधनाने ते सुधारले. २०२६ पर्यंत नवीन संशोधने (जसे १३०वे) राजकीय स्थिरता आणि न्यायासाठी महत्वाचे ठरत आहेत

महत्वाचे संशोधने:

- **पहिले संशोधन (१९५१):** भाषण स्वातंत्र्यावर मर्यादा, जमीन सुधारणांसाठी (Shankari Prasad v. Union of India, 1951). हे संशोधन सामाजिक न्यायासाठी आवश्यक होते.
- **४२वे संशोधन (१९७६):** 'समाजवादी', 'धर्मनिरपेक्ष', 'एकात्म' शब्द प्रस्तावनेत; मूलभूत कर्तव्ये जोडले (Emergency period). ५५ कलमे बदलली, जे आपत्कालीन काळातील आहे.
- **४४वे संशोधन (१९७८):** मालमत्तेचा हक्क मूलभूत हक्कातून काढला (कलम ३००अ). हे जनता पार्टी सरकारने केले.
- **७३वे आणि ७४वे संशोधन (१९९२):** पंचायत आणि नगरपालिका व्यवस्था मजबूत (स्थानिक स्वराज्य). उदाहरण: २.५ लाख+ ग्रामपंचायती मजबूत झाल्या.
- **१०१वे संशोधन (२०१६):** GST लागू, आर्थिक एकीकरण. हे भारताच्या अर्थव्यवस्थेला एकसंध केले.
- **१०३वे संशोधन (२०१९):** EWS साठी १०% आरक्षण. हे सामाजिक न्याय विस्तारित केले.
- **१०६वे संशोधन (२०२३):** महिलांसाठी १/३ आरक्षण (Lok Sabha आणि विधानसभेत). हे लिंग समानतेचे उदाहरण.

हे संशोधने मूलभूत रचना (Basic Structure) संरक्षित ठेवतात, जसे केशवानंद भारती खटल्यात निश्चित (१९७३). अमृत महोत्सवात, या संशोधनांच्या चर्चा झाल्या, ज्यात संविधानाच्या अनुकूलनक्षमतेचा गौरव झाला (Loksatta, 2023). विस्तृत उदाहरणे: ४२व्या संशोधनाने आपत्कालीन काळात न्यायालयीन हस्तक्षेप मर्यादित केला, पण ४४व्या संशोधनाने तो सुधारला. १०६व्या संशोधनापर्यंत, संविधानाने १००+ बदल पाहिले, जे त्याच्या लवचिकतेचे प्रमाण आहेत (Laxmikanth, 2025, Chapter 10).

संशोधन प्रक्रिया कलम ३६८ नुसार आहे, ज्यात संसदेची भूमिका महत्त्वाची. उदाहरण: ९९वे संशोधन (२०१४) NJAC साठी, पण न्यायालयाने रद्द केले. हे न्यायपालिका आणि विधिमंडळातील संतुलन दर्शवते.

न्यायालयीन व्याख्या आणि संविधानाचे संरक्षण (Judicial Interpretations and Protection of the Constitution):

सर्वोच्च न्यायालयाने संविधानाला जिवंत दस्तऐवज बनवले आहे, ज्यात त्याच्या व्याख्या आणि संरक्षणाद्वारे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बदलांना अनुकूल केले जाते (Laxmikanth, 2025, Part V). न्यायालयीन व्याख्या ही संविधानाच्या मूलभूत रचनेचे संरक्षण करते, ज्यात लोकशाही, संघराज्य, न्यायपालिका स्वातंत्र्य, मूलभूत हक्क आणि धर्मनिरपेक्षता यांचा समावेश आहे (Baxi, 2015). हे विभाग प्रमुख न्यायालयीन निर्णयांचे विस्तृत विश्लेषण करतो, ज्यात ऐतिहासिक केसेसपासून २०२६ पर्यंतच्या नवीनतम व्याख्यांपर्यंत समावेश आहे. अमृत महोत्सवात न्यायालयीन व्याख्यांवर सेमिनार आणि चर्चा झाल्या, ज्यात मुख्य न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांनी भाग घेतला (Press Information

Bureau, 2024a). २०२४-२०२६ काळात न्यायालयाने १२+ घटनात्मक खंडपीठ निर्णय दिले, ज्यात मध्यस्थी पुरस्कार सुधारणा, निवडणूक आयुक्त नियुक्ती आणि अल्पसंख्याक शिक्षण संस्थांवरील RTE लागू न करण्यासारख्या व्याख्या समाविष्ट आहेत.

न्यायालयीन व्याख्येची प्रक्रिया आणि महत्व (Process and Importance of Judicial Interpretation):

संविधान व्याख्या ही कलम १४१ आणि १४४ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाची शक्ती आहे, ज्यात न्यायालय कायदे आणि संविधानाच्या तरतुदींची व्याख्या करते. हे 'जिवंत दस्तऐवज' सिद्धांतावर आधारित आहे, ज्यात संविधान वेळेनुसार अनुकूल होते. उदाहरणार्थ, मूलभूत रचना सिद्धांत (Kesavananda Bharati, 1973) ने संसदेच्या संशोधन शक्तींना मर्यादा घातल्या. २०२५-२०२६ मध्ये न्यायालयाने १४२६+ निर्णय दिले, ज्यात ३०+ महत्त्वपूर्ण होते, जसे मध्यस्थी पुरस्कार सुधारणा आणि स्पीकरची घटनात्मक प्रतिकारशक्ती.

विस्तृत केस उदाहरणे (Detailed Case Examples)

खालील केसेस संविधानाच्या व्याख्या आणि संरक्षणाचे प्रमुख उदाहरण आहेत, ज्यात ऐतिहासिक आणि नवीनतम समावेश आहे (Supreme Court of India, Landmark Judgments; Wikipedia, 2025).

गोलकनाथ खटला (Golaknath v. State of Punjab, 1967):

प्रमुख व्याख्या: मूलभूत हक्क (भाग III) संसद संशोधित करू शकत नाही, कारण ते संविधानाच्या मूलभूत भाग आहेत. ११ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ६-५ बहुमताने ठरवले की कलम ३६८ अंतर्गत संशोधने कलम १३ अंतर्गत 'कायदे' आहेत आणि मूलभूत हक्कांना आव्हान देता येत नाही.

उद्देश आणि प्रभाव: संसदेच्या असीमित शक्तींना आव्हान, ज्यात २४व्या आणि २५व्या संशोधनांना आधार मिळाला. हे संशोधन आणि हक्क संरक्षणातील संतुलन दर्शवते.

सामाजिक परिणाम: सामाजिक न्याय कायद्यांना (जसे जमीन सुधारणा) संरक्षण, पण केशवानंद खटल्याने सुधारित.

केशवानंद भारती खटला (Kesavananda Bharati v. State of Kerala, 1973):

प्रमुख व्याख्या: 'मूलभूत रचना' सिद्धांत – लोकशाही, संघराज्य, न्यायपालिका स्वातंत्र्य, मूलभूत हक्क, धर्मनिरपेक्षता आणि न्यायालयीन पुनरावलोकन हे अविभाज्य आहेत. १३ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ७-६ बहुमताने ठरवले; ६८३ पृष्ठांचा निर्णय.

उद्देश आणि प्रभाव: संसद संविधान संशोधित करू शकते, पण मूलभूत रचना नाही. २४व्या आणि २५व्या संशोधनांना मर्यादित मंजुरी.

सामाजिक परिणाम: ४२व्या संशोधनाच्या (१९७६) भागांना रद्द, ज्यात लोकशाही संरक्षण मजबूत झाले. २०२५ मध्ये हे सिद्धांत RTE आणि अल्पसंख्याक संस्थांवर लागू.

मिनर्वा मिल्स खटला (Minerva Mills v. Union of India, 1980):

प्रमुख व्याख्या: मूलभूत हक्क आणि निर्देशक तत्त्वे (कलम ३६-५१) संतुलित; ४२व्या संशोधनातील कलम ३१सी आणि ५५ रद्द, कारण ते न्यायालयीन पुनरावलोकन मर्यादित करतात.

उद्देश आणि प्रभाव: ४-१ बहुमताने मूलभूत रचना सिद्धांत विस्तारित.

सामाजिक परिणाम: सामाजिक-आर्थिक न्याय आणि हक्क संतुलन, जसे मनरेगा आणि RTE योजनांमध्ये.

इंदिरा साहनी खटला (Indira Sawhney v. Union of India, 1992):

प्रमुख व्याख्या: OBC साठी २७% आरक्षण मंजूर, पण ५०% मर्यादा आणि 'क्रीमी लेयर' वगळणे. ९ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ठरवले.

उद्देश आणि प्रभाव: मंडल आयोग शिफारशी अमलात; EWS १०% आरक्षण (१०३वे संशोधन) साठी आधार.

सामाजिक परिणाम: लाखो लाभार्थी, सामाजिक न्याय विस्तार; २०२३ मध्ये EWS व्याख्या विस्तारित.

नवतेज सिंह जौहर खटला (Navtej Singh Johar v. Union of India, 2018):

प्रमुख व्याख्या: कलम ३७७ रद्द (समलैंगिक संबंध गुन्हा नाही); कलम १४, १५, १९, २१ अंतर्गत LGBTQ+ हक्क मूलभूत.

उद्देश आणि प्रभाव: ५ न्यायमूर्तींच्या एकमताने; गोपनीयता आणि समानता व्याख्या.

सामाजिक परिणाम: LGBTQ+ समुदायासाठी समानता; २०२५ मध्ये ट्रान्सजेंडर हक्क विस्तारित.

गोपनीयता हक्क खटला (Justice K.S. Puttaswamy v. Union of India, 2017):


८. **बासु, डी. डी.**, *इंट्रोडक्शन टू द कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया*, लेक्सिस नेक्सिस, २०२१.

९. **हिदायतुल्ला, एम.**, *डेमोक्रेसी इन इंडिया अँड द ज्युडिशिअल प्रोसेस*, आशिया पब्लिशिंग हाऊस, १९६६.

ब) शासकीय अहवाल आणि कायदे (Government Reports & Acts)

१. **भारत सरकार**, *गॅझेट ऑफ इंडिया (१०३ वी घटनादुरुस्ती अधिनियम)*, जानेवारी २०१९.

२. **पाटील, पी. बी.**, *पंचायत राज पुनर्विलोकन समिती अहवाल*, ग्रामीण विकास विभाग, महाराष्ट्र शासन, १९८६.

३. **कॉन्स्टिट्यूअंट असेंब्ली डिबेट्स** (संविधान सभेतील चर्चा), खंड ११, लोकसभेचे सचिवालय, नवी दिल्ली.

क) न्यायालयीन खटले आणि शोधपत्रिका (Court Cases & Papers)

१. **ए.आय.आर. (All India Reporter)**, *मनेका गांधी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया*, १९७८.

२. **ए.आय.आर.**, *स्टेट ऑफ मद्रास विरुद्ध चंपकम दोराईराजन*, १९५१.

३. **ए.आय.आर.**, *न्यायमूर्ती के. एस. पुट्टस्वामी विरुद्ध केंद्र सरकार (खासगीपणाचा अधिकार)*, २०१७.

४. **ए.आय.आर.**, *जनहित अभियान विरुद्ध केंद्र सरकार (EWS आरक्षण)*, २०२२

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव: गौरवशाली प्रवासाचा ऐतिहासिक दृष्टिक्षेप

प्रा. कदम अभिजित अशोक

संशोधक विद्यार्थी,

इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर.

Corresponding Author - प्रा. कदम अभिजित अशोक

DOI - 10.5281/zenodo.19661395

भारताच्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असताना, या आधारभूत दस्तऐवजाच्या आणि त्याने घडवलेल्या राष्ट्राच्या महत्त्वपूर्ण प्रवासावर विचार करणे आवश्यक आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारलेले भारताचे संविधान, न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या तत्वांचे प्रतीक आहे, जे एका वैविध्यपूर्ण आणि उत्साही समाजाच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करते. हा प्रवास केवळ प्रशासनाबद्दल नव्हता, तर लोकशाही मूल्यांचा विकास, आव्हानांना तोंड देण्याची क्षमता आणि सर्वसमावेशक विकासाचा अथक पाठपुरावा याबद्दलही आहे.भारतीय संविधान वसाहतवादी राजवटीच्या आणि एका संघर्षमय स्वातंत्र्य लढ्याच्या परिस्थितीतून निर्माण झाले. डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्यासारख्या दूरदर्शी नेत्यांच्या नेतृत्वाखाली, मसुदा समितीने एक असा दस्तऐवज तयार करण्याचा प्रयत्न केला, जो भारताच्या विविध सांस्कृतिक, भाषिक आणि धार्मिकतेचे प्रतिबिंब होता. संविधान सभेतील विस्तृत चर्चा आणि विचार-विमर्शांनी लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी आणि व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी एक मजबूत कायदेशीर चौकट तयार केली. संविधानाची प्रस्तावना त्याच्या मूळ हेतूचे सुंदर वर्णन करते. न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूल्यांना तिने महत्त्व दिले आहे, जी राष्ट्रासाठी मार्गदर्शक ठरली आहे. अनेक वर्षांमध्ये या मूल्यांची परीक्षा घेतली गेली, परंतु संविधान लवचिक राहिले. सामाजिक-राजकीय बदलांना स्वीकारून ते मूलभूत अधिकारांचे रक्षण करते. नागरी समाज संघटना घटनात्मक मूल्यांचे रक्षण करण्यात मोलाची भूमिका बजावत आहेत. त्या मानवाधिकार, पर्यावरणीय स्थिरता आणि सामाजिक न्यायासाठी काम करत आहेत, तसेच ज्यांचा आवाज दाबला जातो त्यांच्यासाठी पहारेकरी आणि वकील म्हणून काम करतात. भारतातील जिवंत नागरी समाजाचे चित्र मजबूत लोकशाही दर्शवते आणि घटनात्मक वचनांची पूर्तता करण्यासाठी सामूहिक कृतीचे महत्त्व अधोरेखित करते. भारताची ताकद त्याच्या विविधतेत आहे. संविधान या अनेकत्वाचा आदर करते आणि भाषिक अधिकारांना संरक्षण देते.[१] गेल्या ७५ वर्षात, भारत भाषा, परंपरा आणि श्रद्धांचे एकत्रीकरण बनला आहे, ज्यामुळे राष्ट्राच्या सामाजिक एकतेला समृद्धता मिळाली आहे. या विविधतेला केवळ सहन केले जात नाही, तर साजरी केले जाते, आणि संविधान एक सुरक्षात्मक छत्र म्हणून काम करते.हा प्रवास आव्हानांशिवाय नव्हता. १९७० च्या दशकातील आणीबाणीच्या काळात मूलभूत अधिकार कमी करण्यात आले, संघराज्य आणि धर्मनिरपेक्षता बद्दल सतत वाद होत राहिले, अशा परिस्थितीतही संविधानाने मार्ग काढला. तरीही, भारतीय

लोकशाहीची लवचिकता दिसून आली. नागरिकांनी त्यांच्या हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले, अनेकदा संविधानाचा उपयोग अन्याय विरुद्ध ढाल म्हणून केला. एकविसाव्या शतकात आर्थिक विषमता, जातीय तणाव आणि तांत्रिक नियमांची गरज यांसारखी नवीन आव्हाने आली आहेत. तरीही, संविधानाने संवाद आणि सुधारणांसाठी एक चौकट तयार केली आहे, ज्यामुळे प्रशासनात सहभागात्मक दृष्टिकोन वाढला आहे.

भारतीय संविधान निर्मितीच्या प्रवासातील महत्त्वाच्या घटना:

भारतीय संविधानाची निर्मिती ही एक बदल घडवणारी प्रक्रिया होती, जी अनेक महत्त्वपूर्ण घटनांच्या माध्यमातून उलगडली, या प्रत्येक घटनेने नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रासाठी एक मजबूत लोकशाही चौकट स्थापन करण्यात योगदान दिले. या प्रवासाची सुरुवात भारत सरकार कायदा १९३५ (Government of India Act 1935) पासून झाली, ज्याने संघीय संरचनेची ओळख करून दिली आणि भारतातील घटनात्मक प्रशासनाचा पाया घातला, ज्यामुळे संविधानावरील पुढील चर्चांसाठी एक ब्लू प्रिंट तयार झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर आणि स्वातंत्र्याच्या वाढत्या मागणीनंतर, ब्रिटिश सरकारने १९४६ मध्ये कॅबिनेट मिशन योजनेची सुरुवात केली, ज्यामुळे संविधान सभेची स्थापना झाली. या सभेला संविधानाचा मसुदा तयार करण्याचे काम सोपवण्यात आले होते आणि त्यात भारतातील विविध प्रांतांचे आणि राजघराण्यांचे प्रतिनिधी होते, जे भारताच्या विविध लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करत होते. सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली, आणि ती राष्ट्रच्या भविष्यातील प्रशासनाबद्दलच्या जोरदार वादांनी चिन्हांकित झाली. १३ डिसेंबर १९४६ रोजी उद्दिष्टांच्या ठरावाचा स्वीकार हा एक महत्त्वाचा क्षण होता. या ठरावाने संविधानाची मूलभूत उद्दिष्ट्ये स्पष्ट केली, ज्यामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता यावर जोर देण्यात आला, आणि हे सर्व मसुदा बनवण्याच्या प्रक्रियेदरम्यान मार्गदर्शक तत्त्वे म्हणून काम करतील. मसुदा समिती, ज्याचे अध्यक्ष डॉ. बी. आर. आंबेडकर होते, यांची स्थापना १९४७ मध्ये या आदर्शांचे रूपांतर एका विस्तृत कायदेशीर चौकटीत करण्यासाठी करण्यात आली. पुढील दोन वर्षांमध्ये, समिती आणि सभेने प्रशासन, अधिकार आणि जबाबदाऱ्यांच्या विविध पैलूंवर विस्तृत चर्चा केली. सरकारची रचना, न्यायपालिकेची भूमिका आणि अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण यासारख्या मुद्द्यांवर जोरदार वादविवाद झाले, ज्यामुळे लोकशाही तत्त्वे आणि सर्वसमावेशकतेसाठी सभेची बांधिलकी दिसून आली. सभेने चोखपणे संविधानाची निर्मिती केली, ज्यात वसाहतवादी राजवटीमुळे झालेल्या ऐतिहासिक अन्यायांना संबोधित करताना विविध लोकसंख्येच्या आकांक्षांचा समतोल साधला.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी, संविधान स्वीकारले गेले, ज्यामुळे भारताच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण क्षण ठरला. हा दिवस दरवर्षी 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो, जो भारताला एक सार्वभौम राष्ट्र म्हणून स्थापित करण्याच्या दृष्टीने या घटनेचे महत्त्व दर्शवतो. २६ जानेवारी १९५० रोजी संविधान अधिकृतपणे लागू झाले, हा दिवस आता प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो, जो वसाहतवादी राजवटीतून स्व-शासनाकडे झालेल्या बदलाचे प्रतीक आहे.संविधानातील मुख्य वैशिष्ट्यांमध्ये मूलभूत अधिकार होते, ज्याने व्यक्तीस्वातंत्र्याची हमी दिली आणि भेदभावापासून संरक्षण दिले, आणि राज्य धोरणांची निर्देशक तत्त्वे होती, ज्याचा उद्देश राज्याला सामाजिक आणि आर्थिक न्याय प्राप्त करण्यासाठी मार्गदर्शन करणे हा होता. या घटकांनी केवळ राजकीय लोकशाहीच नव्हे, तर

सामाजिक समानतेसाठी संविधानाची बांधिलकी अधोरेखित केली. जसजशी वर्षे लोटली, तसतसे संविधान सामाजिक-राजकीय बदलांना जुळवून घेण्यास सक्षम ठरले.१९५१ मध्ये मंजूर झालेले पहिले संशोधन, स्वातंत्र्ये आणि अल्पसंख्याक समुदायांच्या हक्कांबाबत अधिक स्पष्टता गरजेची असल्याने करण्यात आले. हे राज्यघटनेच्या जिवंत स्वरूपाचे प्रदर्शन करते. अनेक दशकांमध्ये, भारताच्या बदलत्या आकांक्षा आणि आव्हानांना प्रतिबिंबित करत संविधानात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. प्रत्येक सुधारणेने लिंग समानता, आर्थिक विषमता आणि पर्यावरणीय समस्या यांसारख्या समकालीन समस्यांचे निराकरण करण्यासाठी संविधानाची समर्पकता पुन्हा स्थापित केली आहे. भारतीय संविधानाची निर्मिती हे त्याच्या निर्मात्यांच्या दूरदृष्टी आणि समर्पणाचा पुरावा आहे, ज्यांनी न्याय, स्वातंत्र्य आणि समानतेच्या मूल्यांचे समर्थन करणारे तसेच देशातील विविध मतांचा आदर करणारे एक दस्तावेज तयार करण्याचा प्रयत्न केला. आजही, हे संविधान भारताला अधिक समावेशक आणि न्यायसंगत समाजाच्या दिशेने मार्गदर्शन करत आहे, ज्या आदर्शांवर ते स्थापित झाले आहे, ते जतन करत भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करत आहे.[२]

संविधानातील घटनात्मक मूल्यांचा विकास:

कायदेशीर अभ्यासक हार्वे वॉकर यांच्या म्हणण्यानुसार, "राज्यघटना लोकांच्या जीवनातून व अपेक्षांमधून साकारायला हवी, ती इतर ठिकाणांहून घेतलेली नसावी. राज्यघटनेची पायाभूत सूत्रे आणि मूल्ये प्रभावी व चिरकाल टिकणारी होण्यासाठी विशिष्ट संस्कृती व काळानुसार योग्य असायला पाहिजेत." राज्यघटनेतून निर्माण होणारी मूल्ये आणि संस्था यांनी वेळोवेळी बदलणे खूप आवश्यक आहे. राज्यघटना एक मूलभूत कागदपत्र मानले जात असल्यामुळे, काळानुसार निर्माण होणाऱ्या कठीण समस्यांना सामावून घेण्यासाठी त्यात वाव असावा. भारतीय संविधान सभेत संविधानाला 'लवचिक' बनवण्यावर बरीच चर्चा झाली. विधानसभेतील वक्त्यांनी ए.व्ही. डायसी यांच्या मतावर जोर दिला, "संविधानात बदलण्याची शक्यता नसणे हे त्याच्या हिंसक उलथापालथीचे कारण ठरू शकते". भारतीय संविधानातील सुधारणांनी अनेक वर्षांमध्ये घटनात्मक दृष्टिकोन बदलले आहेत, जसे ते निर्मात्यांनी विचारात घेतले होते. या सुधारणांचा मूलभूत अधिकार, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये, सातव्या अनुसूचीतील याद्या, आणीबाणी तरतुदी, राज्यांची पुनर्रचना आणि भाषा, निवडणुका आणि उद्देशिका यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर परिणाम झाला आहे. इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे अमेरिकन संविधानात आतापर्यंत फक्त सत्तावीस वेळा सुधारणा करण्यात आली आहे, ऑस्ट्रेलियन संविधानात आठ वेळा, तर भारतीय संविधानात, ते खूप मोठे आणि नवीन असूनसुद्धा, शंभरहून अधिक वेळा सुधारणा करण्यात आली आहे.[३] यावरून आपण काय समजू शकतो? हे यामुळे आहे का, की आपले संविधान खूप लवचिक आहे, किंवा हे मूळ संविधानाचे विकृतीकरण आहे? काहीही असले तरी, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, की आपल्या संविधानामध्ये खूप आंतरिक शक्ती आहे, ज्यामुळे आपल्या घटनाकारांनी ठरवलेल्या मूलभूत मूल्यांशी तडजोड न करता आजपर्यंत सर्व सुधारणांचा सामना केला.[४] असे बोलल्यानंतर, प्रश्न असा आहे, की आपण आपले संविधान पूर्णपणे बदलू शकतो का? हा प्रश्न केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (१९७३)[५] या महत्त्वपूर्ण खटल्यात समोर आला. या ऐतिहासिक खटल्याने 'मूलभूत संरचना' सिद्धांत मांडला, ज्यात संसदेला संविधानात सुधारणा करण्याचा अधिकार आहे, पण ती त्याची मूलभूत रचना बदलू शकत नाही, असे सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय

दिला, की मूलभूत अधिकार आणि लोकशाहीची तत्त्वे, आणि सत्तांचे विभाजन आणि संघराज्य पद्धती हे या मूलभूत संरचनेचा भाग आहेत. मिनर्व्हा मिल्स लि. विरुद्ध भारत संघ (१९८०)[६] ने 'मूलभूत संरचना' सिद्धांताला दुजोरा दिला, ज्यात मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे यांमधील समतोल महत्त्वाचा आहे, यावर भर दिला. सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला, की या समतोलाचे उल्लंघन करणाऱ्या सुधारणा घटनाबाह्य आहेत, ज्यामुळे न्यायालयीन पुनर्विलोकनाला आणखी बळकटी मिळाली. जरी संविधानातील सुधारणांच्या न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या वैधतेवर वेगवेगळी मते आहेत. या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे मेनका गांधी विरुद्ध भारत संघ (१९७८)[७]**.** या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद २१ चा अर्थ व्यापक केला, जे जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या हक्काची हमी देते. न्यायालयाने असा निर्णय दिला, की जीवन जगण्याचा अधिकार केवळ जगण्यापुरता मर्यादित नाही, तर त्यात सन्मानाने जगण्याचा अधिकार समाविष्ट आहे, ज्यामुळे मूलभूत अधिकारांची विस्तृत समज निर्माण झाली आणि अनेक अधिकार समाविष्ट झाले जे आता जीवन आणि स्वातंत्र्याच्या हक्काचा अविभाज्य भाग म्हणून वाचले जातात. हळूहळू, जीवन आणि स्वातंत्र्याच्या हक्कासंबंधीच्या कायद्याचा आवाका वाढला आणि त्यात विविध अधिकार समाविष्ट झाले, जसे की गोपनीयतेचा अधिकार, आरोपीला त्वरित खटला चालवण्याचा अधिकार, निष्पक्ष खटल्याचा अधिकार, मोफत कायदेशीर मदत, अत्याचार, हातकडी, बेकायदेशीर अटकेविरुद्ध अधिकार, प्रदूषणमुक्त वातावरणाचा अधिकार, शिक्षण आणि आरोग्याचा अधिकार.अनुच्छेद १४, १९ आणि २१, ज्यांना अनेकदा संविधानाचा सुवर्ण त्रिकोण म्हटले जाते, भारतीय समाजातील प्रमुख आणि महत्त्वाच्या घटकांना दिलासा देण्यासाठी एक ढाल ठरले आहेत. विशाखा विरुद्ध राजस्थान राज्य (१९९७)[८] मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाला प्रतिबंध घालण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली, कारण असा छळ अनुच्छेद १४, १९ आणि २१ अंतर्गत मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करतो. हा निर्णय भारतातील महिलांच्या हक्कांसाठी आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी आधारस्तंभ ठरला. भारतीय समाजातील महिलांचे हक्क जपण्यासाठी आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे शायरा बानो विरुद्ध भारत संघ (२०१७)[९], ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने झटपट तिहेरी तलाकची प्रथा घटनाबाह्य ठरवली, आणि पुष्टी केली की ते मुस्लिम महिलांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करते आणि लैंगिक न्यायाच्या तत्त्वांच्या विरोधात आहे.आपल्या समाजातील विविधतेचा स्वीकार व आदर करण्यासाठी आणि एक समावेशक व एकात्मिक संस्कृतीच्या महत्त्वावर जोर देण्यासाठी, घटनात्मक तत्त्वे नियमितपणे दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या व्यक्तींची प्रतिष्ठा जपण्यासाठी साधने म्हणून वापरली जातात. नवतेज सिंग जोहर विरुद्ध भारत संघ (२०१८)[१०]च्या निकालामध्ये, सर्वोच्च न्यायालयाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३७७ मध्ये बदल करून समलिंगी संबंधांना कायदेशीर मान्यता दिली. या निकालात लैंगिक कल हा मानवी अस्तित्वाचा एक अविभाज्य भाग आहे, हे अधोरेखित करून समानता आणि भेदभावाचा नसण्याचा अधिकार सांगितला आहे. समाजातील एका मोठ्या वर्गाने या निर्णयाचे स्वागत केले, LGBTQ+ च्या हक्कांबाबत लोकांच्या मनात असलेल्या पारंपरिक कल्पनांना पूर्णपणे बदलले. त्याचप्रमाणे, व्यभिचाराशी संबंधित कायद्याच्या एका अन्य निर्णयात, सर्वोच्च न्यायालयाने जोसेफ शाईन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (२०१८)[११] मध्ये व्यभिचार कायदा असंवैधानिक ठरवला, कारण तो महिलांविरुद्ध भेदभाव करतो आणि त्यांच्या

समानता व प्रतिष्ठेच्या अधिकारांचे उल्लंघन करतो.आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात, गोपनीयतेशी संबंधित कायदा, जो घटनात्मक सिद्धांताच्या आधारावर विकसित झाला आहे, तो एक मजबूत आधार बनला आहे ज्यावर संबंधित समकालीन कायदे आधारित आहेत. जस्टीस के.एस. पुट्टस्वामी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (२०१७)[१२] मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेचा अधिकार अनुच्छेद २१ अंतर्गत मूलभूत अधिकार म्हणून मान्य केला. या निर्णयामुळे डेटा संरक्षण आणि डिजिटल युगातील व्यक्तीस्वातंत्र्यावर महत्त्वपूर्ण परिणाम झाला आहे.या व्यतिरिक्त, अनुच्छेद ३७० रद्द करणे हा आणखी एक महत्त्वाचा क्षण आहे, ज्यामुळे घटनात्मक विचार बदलण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने भारताच्या राष्ट्रपतींना भारतीय संविधानातील अनुच्छेद ३७० रद्द करण्याचा अधिकार एकमताने मान्य केला. ऑगस्ट २०१९ मध्ये हे रद्द केल्यामुळे पूर्वीचे जम्मू आणि काश्मीर राज्य दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभागले गेले, ते म्हणजे जम्मू आणि काश्मीर आणि लडाख. तसेच राज्याचे विशेषाधिकार काढून टाकण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, कलम ३७० हे केवळ तात्पुरते पाऊल होते, ज्यामुळे अंतर्गत अशांती आणि बाह्य धोक्यांनी त्रस्त असलेल्या स्थितीत पूर्वीच्या राजेशाही राज्याला भारतीय संघराज्यात सामील करणे शक्य झाले. सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले की, जम्मू आणि काश्मीरने भारतात सामील झाल्यानंतर स्वायत्ततेचा कोणताही भाग स्वतःकडे ठेवला नाही

वर नमूद केल्याप्रमाणे, न्यायपालिकेने गेल्या ७५ वर्षांत संविधानाचा अर्थ लावण्यात आणि त्याचा आवाका वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ऐतिहासिक निकालांनी उपेक्षित समुदायांच्या हक्कांचे समर्थन केले, लिंग समानतेला प्रोत्साहन दिले आणि पर्यावरणाचे संरक्षण सुनिश्चित केले आहे. भारतीय संविधानाचे गतिमान स्वरूप आणि विविध समाजातील मूलभूत हक्कांचे संरक्षण आणि विस्तार यासारख्या आधुनिक समस्यांशी जुळवून घेण्याची क्षमता आहे.

निष्कर्ष:

भारतीय संविधान आशेचा किरण आहे, ज्याने देशाला संकटातून तारले. ७५ वर्षांचा प्रवास लोकशाही व न्यायाचा साक्षीदार आहे. हीरक महोत्सव केवळ उत्सव नाही, तर कृतीची हाक आहे. नागरिक, कायदे निर्माते आणि समाजाने घटनात्मक मूल्ये जतन करून विषमतेचे निराकरण करावे. घटनात्मक हक्कांबाबत शिक्षण लोकांना अधिकार मिळवण्यास मदत करते. भारत एका महत्त्वाच्या वळणावर असून, संविधानातील तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे. हवामान बदल, डिजिटल अधिकार व सामाजिक समानता यांसारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी घटनात्मक सुधारणा आवश्यक आहेत. न्याय्य समाजास्तव निष्ठा, लवचिकता व बांधिलकी हवी. संविधानाचा मूळ गाभा कायम राहील. जनता सार्वभौम असल्याने, नवीन संविधान बनवण्याचा हक्क जनतेचा आहे.त्यासाठी लोकशाहीत सामूहिक जाणीव महत्त्वाची आहे.

संदर्भ सूची:

१. फली एस. नरिमन, यू मस्ट नो युवर कॉन्स्टिट्यूशन (तुम्हाला तुमचे संविधान माहित असायलाच हवे),हे हाऊस पब्लिशर्स,२०२३.

२. झिया मोदी , टेन जजमेंट्स दॅट चेंज्ड इंडिया (१० निकाल ज्यांनी भारत बदलला), पेंग्विन रँडम हाऊस,२०१३.

३. अरुण के. थिरुवेंगडम, द कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया: अ कॉन्टेक्स्टुअल ॲनालिसिस, हार्ट पब्लिशिंग,२०१८.

४. बी.एन. किरपाल आणि इतर, सुप्रीम बट नॉट इनफॅलिबल: एसेज इन ऑनर ऑफ द सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया, ऑक्सफर्ड इंडिया पेपरबॅक्स,२००४.

५. केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य, AIR १९७३ SC १४६१, १९७३

६. मिनर्व्हा मिल्स लि. विरुद्ध युनियन ऑफ इंडिया, १९८०AIR १७८९, १९८१ SCR (१) २०६.

७. मेनका गांधी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया, १९७८AIR ५९७, १९७८ SCR (२) ६२१.१.

८. विशाखा विरुद्ध राजस्थान राज्य, AIR १९९७ सुप्रीम कोर्ट ३०११.

९. शायरा बानो विरुद्ध युनियन ऑफ इंडिया, AIR २०१७ सुप्रीम कोर्ट ४६०९.

१०. नवतेज सिंग जोहार विरुद्ध युनियन ऑफ इंडिया, AIR २०१८ सुप्रीम कोर्ट ४३२१.

११. जोसेफ शाइन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया, AIR २०१८ सुप्रीम कोर्ट ४८९८.

१२. जस्टिस के.एस. पुट्टास्वामी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया, AIR २०१८ SC (SUPP) १८४१.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

75 Years of the Indian Constitution
(A Journey with Achievements and Challenges)

Ms. Kumbhar Bhagyashree Shamrao
Research Student,
Savitribai Phule Pune University, Pune
Corresponding Author - Ms. Kumbhar Bhagyashree Shamrao
DOI - 10.5281/zenodo.19661419

Abstract:

The completion of seventy-five years of independence marks a significant milestone in the evolution of Indian democracy. Since 1947, India has developed into the world's largest democracy, grounded in the principles enshrined in the Constitution of India. This research paper critically examines the journey of Indian democracy over the past seven and a half decades, highlighting its institutional development, electoral processes, socio-political transformations, and constitutional values. It explores the role of democratic institutions such as Parliament, the judiciary, and the Election Commission in sustaining democratic governance, while also addressing persistent challenges including social inequality, communalism, regionalism, corruption, and the politics of identity.

The study further evaluates the impact of economic liberalization, coalition politics, decentralization through Panchayati Raj institutions, and the rise of digital media on democratic participation. While Indian democracy has demonstrated resilience through peaceful transfers of power and vibrant electoral competition, concerns regarding institutional autonomy, civil liberties, and majoritarian tendencies warrant critical reflection. The paper argues that the future of Indian democracy depends on strengthening constitutional morality, inclusive development, and active citizen engagement. By analyzing both achievements and contemporary challenges, the study provides a balanced assessment of Indian democracy at seventy-five.

Keywords: Indian Democracy; Constitutionalism; Democratic Institutions; Electoral Politics; Social Justice; Federalism; Secularism; Political Participation; Governance; Civil Liberties; Democratic Challenges.

Introduction:

The Indian Constitution is the world's lengthiest written constitution, serving as a guiding document for the largest democracy. Drafted by the Constituent Assembly under the leadership ofDr. B.R. Ambedkar, Constituent assembly adopt the Indian constitution on the date of 26th of November 1949 it came into force on January 26, 1950. Over the past 75 years, The Indian Constitution has 448 articles divide into 25 parts and has 12 schedules presently. It was originally adopted in 1949 with 395 articles divide into 22 parts and had 8 schedules. It has since been amended 106 times.

The Constitution has guided India's development over the past decades, even as the country has faced various social and political challenges. The Constitution's flexibility and the critical role of equality, liberty, and fraternity. However, it acknowledges the gaps in achieving true social and economic equality it has been instrumental in upholding democracy, ensuring social justice, and promoting national integrity.

Historical Evolution:

1. Formation and Adoption of the Indian Constitution:

The Constituent Assembly that drafted the Indian Constitution came into existence as per the provisions of the Cabinet mission plan of May 1946. Its task was to formulate a constitution to facilitate the transfer of sovereign power from British authorities to Indian hands. The Constituent Assembly first sat on 9th December 1946**,** electing Rajendra Prasad as President, H. C. Mukharjee and V.T. Krishnamachari as Vice Presidents, and B.N. Rau as Constitutional legal advisor. The Constitution's adoption marked the culmination of the struggle for India's independence and the realization of Jawaharlal Nehru's declaration of 'PoornaSwaraj' in 1929. On 13th December 1946, Jawaharlal Nehru introduced the "Objective Resolution" in the Assembly, laying down the philosophy of the constitution aimed at fostering India as a Sovereign, Democratic Republic with federal distribution of powers and securing equality, justice, and rights for all its reflecting in preamble today.

The Constituent Assembly was given complete autonomy and legislative authority by the Indian Independence Act of 1947, allowing it to draft and adopt the constitution as India's first free parliament. drafting committee was set up on 29th August 1947 and appoint Dr. B R Ambedkaras a its chair person.After extensive deliberations and drafting by the drafting committee, the final constitution was passed and adopted by the Constituent Assembly on 26 November 1949, with certain provisions coming into effect immediately and the rest on 26 January 1950, which is celebrated as India's Republic Day. Dr.Rajendra Prasad was elected as India's first President, national flagnational anthem and national song were also adopted by the Constituent Assembly.

2. Amendments and Reforms.

Since its inception, the Constitution has undergone over 100 amendments, reflecting India's dynamic socio-political landscape.

Major Amendment in Indian Constitution:

1stAmendment (1951) added restrictions on freedom of speech (Article 19) concerning public order, security, and relations with foreign states empowered the state to make special provisions for the advancement of socially and educationally backward classes. Introduced the Ninth Schedule to protect land reform laws from judicial review.

7thAmendment (1956) Reorganized states based on linguistic lines. Abolished the classification of states into Part A, B, C and D categories Introduced the concept of Union Territories.

25th Amendment (1971) Limited the right to property by making it subordinate to Directive Principles of State Policy allowed the government to acquire private property for public purposes.

42ndAmendment (1976) 42nd Amendment Act, often referred to as the "Mini Constitution", made significant changes to the structure and powers of the Indian Constitution. amended articles more than 40. Inserted articles more than 10. Inserted parts 4A and 14A amended schedule 7. The Preamble was amended to add the words 'Socialist', 'Secular' and 'Integrity Transferred 5 subjects from the state list to the concurrent list: Education, Forests, Weights & Measures, Protection of wild Animals and Birds, and Administration of Justice Added 10 Fundamental Duties for citizens (on recommendations of the Swaran Singh Committee). Introduced Part XIV-A titled 'Tribunals dealing with Administrative matters' and 'Tribunals for other matters ‘added 4 new Directive Principles of State Policy (DPSPs) Art 39 to secure opportunities for the healthy development of children, Art 39A to promote equal justice and to provide free legal aid to the poor, Art 43A to take steps to secure the

participation of workers in the management of industries

Art 48A to protect and improve the environment and to safeguard forests and wildlife Curtailed the power of judicial review and writ jurisdiction of the Supreme Court and high courts Raised the tenure of Lok Sabha and state legislative assemblies from 5 to 6 years, etc.

44th Amendment (1978) reversed many provisions of the 42nd amendment restored the fundamental right to property as a legal right made it harder to declare a National emergency restored judicial review powers of the Supreme Court and High Courts.

52ndAmendment (1985) –Anti-Defection Law Introduced the Tenth Schedule, disqualifying MPs and MLAs who defect from their parties.

61stAmendment (1989) reduced the voting age from 21 to 18 years.

73rd and 74th Amendments (1992) established Panchayati Raj institutions and urban local bodies with constitutional status.

86th Amendment (2002) Made the Right to Education a fundamental right for children aged 6-14 years (Article 21A).

101st Amendment (2016) – GST Introduced the Goods and Services Tax (GST), replacing multiple indirect taxes

103rd Amendment, (2019) Introduced 10% EWS reservation (Articles 15(6), 16(6))

106thAmendment, (2023) Reserves one-third of all seats for women in LokSabha, State legislative assemblies, and the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi including those reserved for SCs and STs.

Landmark Judgments:

'Doctrine of Basic Structure' and important cases:

The Doctrine of Basic Structure has evolved through landmark Supreme Court judgments, establishing limits on Parliament's power to amend the Constitution and protecting the fundamental features of the Indian Constitution. Its refers to the division of powers between the various organs of the state - the executive, legislature, and judiciary the timeline shows the key court cases that have shaped the evolution of this doctrine.

Shankari Prasad v. Union of India (1951) the Supreme Court upheld the power of Parliament to amend the Constitution, including the Fundamental Rights.

Sajjan Singh v. State of Rajasthan (1965) and Golakhnath vs. State of Punjab (1967) the Supreme Court ruled that Parliament cannot amend the Fundamental Rights.

KesavanandaBharati v. State of Kerala (1973) the Supreme Court established the doctrine of basic structure, holding that Parliament cannot amend the basic features of the Constitution.

Minerva Mills v. Union of India (1980) the Supreme Court held that the Constitution is supreme, not Parliament, and that Parliament cannot have unlimited power to amend the Constitution.

WamanRao v. Union of India (1981) the Court held that all amendments made before KesavanandaBharati (1973) are valid, but future amendments must follow the basic structure doctrine.

S. R. Bommai v. Union of India (1994) Federalism and secularism are part of the basic structure, preventing arbitrary dismissal of state governments.

I. R. Coelho v. State of Tamil Nadu (2007) Laws placed under the Ninth Schedule (meant to protect them from judicial review) are still subject to the Basic Structure doctrine

The key principles established by the courts are

a) Parliament has the power to amend the Constitution, but it cannot alter the basic structure or framework of the Constitution.

b) Fundamental Rights are part of the basic structure and cannot be abridged or taken away.
c) The Constitution is supreme, not Parliament, and Parliament cannot have unlimited power to amend the Constitution.

Other Important Cases:

Public Interest Litigation (Mumbai Kamgar Sabha 1976) Introduced PIL as a mechanism to provide justice to marginalized sections of society, broadening access to legal remedies beyond traditional litigation.

Maneka Gandhi v. Union of India, 1978 Supreme Court ruled that personal liberty cannot be restricted arbitrarily, and any procedure limiting liberty must be fair, just, and reasonable.

IndraSawhney v. Union of India, 1992 (Social Justice – Reservations) set the 50% threshold for reservations and introduced the concept of excluding the 'creamy layer' from reservation benefits.

S.R. Bommai v. Union of India, 1994 limited the misuse of Article 356 by establishing judicial review criteria for imposing President's Rule in states.

NALSA v. Union of India, 2014 Recognized transgender persons as a third gender, affirming their right to dignity and equality under the Constitution.

Puttaswamy v. Union of India, 2017 declared privacy as a fundamental right emerging from Article 21, protecting individual autonomy and personal liberty.

ShayaraBano v. Union of India, 2017 declared triple talaq unconstitutional, ruling it as arbitrary and violative of fundamental rights.

Supreme court also decriminalise same sex relationship as well as electoral Bond scheme declared unconstitutional, triple talaq declared unconstitutional on the basis of right to religious freedom

Key Achievements of Indias Constitution in 75 Years:

a) **Democratic Foundation** Despite challenges, India has remained a vibrant democracy, conducting free and fair elections at regular intervals. Established a sovereign, socialist, secular, and democratic republic. Ensure checks and balances among the executive, legislature, and judiciary.
b) **Protection of Rights** The Constitution guarantees fundamental rights, including the right to equality, freedom, and protection against discrimination, enabled landmark judgments like Kesavan Anda Bharati (1973) upholding the Basic Structure Doctrine. while directive principles guide state policies toward social justice.
c) **Social Transformation** Facilitated affirmative action, including reservation policies for marginalized communities empowered women with 33% reservation in local bodies and recent legislation for Lok Sabha and Vidhan Sabha. and progressive laws on gender equality have been significant achievements.
d) **Economic and federal Reforms.** Enabled LPG (Liberalization, Privatization, Globalization) reforms under a constitutional framework encouraged policies balancing development with constitutional principles. The Constitution has facilitated economic liberalization, GST implementation, and decentralized governance, enhancing economic growth and federalism.
e) **Civic Responsibility.** Strengthened civic literacy and responsibilities through movements like Digital India and environmental safeguards.

f) **Judicial Independence The** judiciary has upheld constitutional supremacy, striking down unconstitutional laws and protecting civil liberties.

Challenges:

a) **Rapidly violation of fundamental rights** alleged misuse of laws like UAPA and sedition laws Cases such as Stan Swamy and Umar Khalid highlight rights violations.
b) **Judicial Overreach and Delays** the backlog of cases and judicial overreach have raised concerns about the efficiency of the judiciary.
c) **Political and Electoral Reforms** Issues such as electoral malpractices, money power in politics, Criminalization and Corruption in Politics Over 46% of MPs in 2024 LokSabha have criminal cases. Also they are using mussel power in election.
d) **Social Inequalities.** Despite constitutional safeguards, caste-based discrimination, gender inequality, and communal tensions persist.
e) **Federalism and Center-State Relations.** the balance of power between the Union and states has often led to disputes, necessitating better cooperative federalism.
f) **Digital and Privacy** Rights With increasing digitalization, issues related to data privacy, surveillance, and cyber laws need constitutional safeguards.
g) **Decline in Press Freedom.** Ranked 159th in World Press Freedom Index 2024.Increasing censorship and intimidation of dissent.
h) **Weakened Parliamentary Debates:** Decline in debates and discussions; 2023 Budget passed without discussion.

Way Forward:

a) **Limit State Power** Strengthen institutional checks to prevent overreach.
b) **Enhance Democratic Values** Democracy must emphasize accountability and free speech beyond elections.
c) **Uphold Directive Principles** Policies must align with socio-economic goals outlined in DPSPs.
d) **Judicial Independence** Safeguard judiciary's autonomy for upholding constitutional morality.
e) **Parliamentary Reforms** Revive debates, discussions, and oversight mechanisms in Parliament.
f) **Civic Engagement** Promote constitutional literacy and citizen participation in governance.

Conclusion:

The Indian Constitution has demonstrated remarkable resilience over the past 75 years, adapting to evolving socio-political and economic conditions. While it has ensured democratic governance, social justice, and national integrity, emerging challenges necessitate continuous reforms. Strengthening judicial efficiency, promoting political transparency, and safeguarding civil liberties will be crucial for sustaining India's constitutional democracy in the future.

References:

1. Austin Granville , The Indian Constitution: Cornerstone of a Nation, Oxford University Press.
2. Ambedkar B.R. Constituent Assembly Debates, Government of India Publications.
3. Basu. An introduction to the constitution.of India. LexisNexis Publication.
4. Second ARC report of government of India Publication.
5. M. Laxmikant. Indian Polity. McGraw Hill Publication.
6. Prsindia.com

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सहकारी समाजवादातील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका

डॉ. राजश्री दिलीप निकम

प्रोफेसर

कृष्णा महाविद्यालय बुद्रुक, तालुका कराड जिल्हा सातारा.

Corresponding Author - डॉ. राजश्री दिलीप निकम

DOI - 10.5281/zenodo.19661445

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जागतिक पातळीवर आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवला .त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोणत्या एका क्षेत्रापूरते मर्यादित नसून सर्व क्षेत्रातील व्यासंग त्यांच्या कार्यातून निदर्शनास येतो .पार्लमेंटरी सेक्रेटरी, मुख्यमंत्री, ग्रह ,अर्थ ,संरक्षण, परराष्ट्रमंत्री ते भारताचे उपपंतप्रधान पदावर विराजमान असणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांची सहकारी समाजवादातील भूमिका प्रस्तुत शोधनिबंधात मांडली आहे .त्यांनी महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा पाया रचण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली.

उद्दिष्टे :

1) यशवंतराव चव्हाण यांची सहकारी समाजवादाची भूमिका अभ्यासणे.
2) सहकारी समाजवादाचा ग्रामीण भागावर झालेला परिणाम अभ्यासणे.
3) सहकार समाजवादातून शेतकऱ्यांची भूमिका अभ्यासणे.
4) सहकारी साखर कारखान्यांची भूमिका अभ्यासणे.
5) सहकारी बँकांची भूमिका अभ्यासणे

सहकारी समाजवादातील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका अभ्यासताना त्यांचे विचार प्रकर्षाने जाणवतात. ते म्हणतात - संपूर्ण मानवी समाजाचे कल्यान हे आपले अंतिम ध्येय असून आर्थिक विकास हे ते ध्येय साध्य करण्याचे साधन आहे. विकासाच्या कुठल्याही योजना माणूस हा अतिशय महत्त्वाचा भाग मानला गेला पाहिजे. समाजातील कर्तुत्व जागे करून आपण एक कर्तुत्वान समाज निर्माण केला पाहिजे. (1)

यशवंतराव चव्हाणांच्या मतानुसार - हिंदुस्तान म्हणजे केवळ हिमालय सह्याद्री किंवा आपणास माहीत असलेले पाच पंचवीस खेड नव्हे तर या देशातील नद्यांच्या काठावर कशीबशी कालक्रमणा करणारे या देशाच्या माळरानात डोंगर कपारीत उपेक्षित जीवन जगणारे या देशाच्या विस्तीर्ण पठारावर जीवन संग्रामात हातबल झालेले असे जे लक्षवधी कोट्यावधी लोक आहेत. ते म्हणजे हिंदुस्तान. (2) या सर्वांचा विकास होण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरण होऊन ग्रामीण नेतृत्वाची नवी पिढी तयार व्हावी. सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे अनेकांना राजकारणाचे नेतृत्व करण्याचे संधी मिळावी. म्हणून त्यांनी पंचायत राज या त्रिस्तरीय व्यवस्थेची सुरुवात केली. कृषी औद्योगिक क्रांती निर्माण केली 12 सहकारी साखर कारखान्यांची स्थापना केली. संस्थात्मक बांधणी करून बँका ,दूध, बाजार

समिती, यांना महाराष्ट्राच्या प्रगतीत स्थान निर्माण करून दिले. सहकारी पतसंस्था, सहकारी ग्राहक भांडारे, सहकारी श्रमिक संस्था, खरेदी विक्री संघ, स्थापन करून आर्थिक प्रगतीच्या दिशेने वाटचाल केली. ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या नेतृत्वाला संधी मिळवून दिली.यशवंतराव चव्हाण सर्वसामान्य कुटुंबातून वर आलेले व्यक्तिमत्व असल्याने त्यांना जनसामान्यांच्या आकांक्षा अचूक समजत .त्यांचे जीवन ग्रामीण भागाशी निगडित असलेने शेतकऱ्यांच्या व्यथा त्यांनी जाणल्या. म्हणून त्या सोडवण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. म्हणून त्यांना पहिले कृषी क्रांती सुधारणेचे जनक मानले जाते. (3)

शेती आणि शेतकरी याविषयी आपल्या युगांतर या पुस्तकात लिहितात - 'भारत हा कृषिप्रधान देश आहे. जर शेती नव्या विषय आणि जगभराच्या तंत्र व शास्त्र यांनी बांधली नाही. विकसित केली नाही. तरी शेती व पर्यायाने खेडी ओस पडतील'.म्हणून शेतीचा नवा विचार कृषी विद्यापीठ व शेतीशास्त्र यांना अग्रक्रम देऊन अन्नधान्य एकरी उत्पादन नवीन बी –बियाणे आणि आधुनिक यंत्रांना शेती बांधणीसाठी शेतकऱ्यांमध्ये शक्ती उभी केली. (4)

तुमची शेती हा देशाचा विषय आहे. तुमची शेती पिकली नाही तर तुमचे व देशाचे नशीब विकणार नाही. सह्याद्रीचे वारे या पुस्तकावरील विवेचनावरून ते म्हणतात - महाराष्ट्राच्या भवितव्याची ही मोठीच मोठी लांबच लांब सफर आहे. त्यातील आम्ही प्रवासी आहोत. ही सफर तुम्हाला पुरी करायचे आहे. ती कष्टाची उद्योगाची सफर आहे. पण ती पुरी केलीच पाहिजे. कारण त्यात जनतेचे कल्याण आहे. (5)

कृषी औद्योगिक क्रांती निर्माण करण्यासाठी कमाल भूधारणामर्यादा कायदा व भूमी हीनांना जमीन वाटप यासाठी मुंबई राज्य सरकारने कुळ कायदा लागू केला. कसेल त्याची जमीन मुळे जमीन मालकीच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली. शेतकऱ्याच्या मनात सरकार विषयी आपुलकी निर्माण होऊन जमीन सुधारणेला चालना मिळाली. रोजी रोटीचा प्रश्न मिटला. 1 एप्रिल 1959 रोजी तुकडेबंदी व तुकडे जोड कायदा करून तो अमलात आणला. (6)

शेतकऱ्याला प्रशिक्षण देण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी ,पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला तसेच दापोली व परभणी कृषी विद्यापीठांची स्थापना केली. परभणी कृषी विद्यापीठाच्या समारंभातील भाषणात यशवंतराव चव्हाण म्हणतात - जगात एखाद्या राष्ट्राने कितीही प्रगती केली. चंद्रावर जाणारे रॉकेट तयार करणारे शास्त्रज्ञांच्या डोक्यात विचार चालवायचा असेल तर त्याच्या पोटात प्रथम ज्वारीचा कण गेला पाहिजे. कारण जमिनीतून निर्माण होणाऱ्या उत्पादनावरच शेवटी माणूस अवलंबून असतो. आणि त्यामुळे हिंदुस्तान शेतीमध्ये शास्त्रीय ज्ञानाची गरज आहे. यासाठी शेतीचा शास्त्रीय शिक्षणाचा दृष्टिकोन लोकांमध्ये वाढवला पाहिजे. देशातील कृषी विज्ञान नवा दृष्टिकोन हा विद्यार्थ्यापुरता मर्यादित न राहता तो शेतकऱ्यांच्या पर्यंत जाऊन पोहोचला पाहिजे. (7)

भूमिहीन शेतमजूर आणि छोटे शेतकरी यांचे भीषण दारिद्र्य अंतकरण पिळून टाकणारे आहे. कोरडवाहू जमिनीचा प्रश्न सोडवला नाही तर देशातील गरिबाचेआपण निर्मूलन करू शकणार नाही. कर्ज पुरवठ्यासाठी बँकांची भूमिका महत्त्वाची आहे. याविषयी आपले विचार व्यक्त करताना ते म्हणतात ज्यांच्याकडे संपत्ती मालमत्ता आहे. त्यालाच कर्ज दिले तर श्रीमंत श्रीमंत होणार व गरीब गरीबच राहणार म्हणून मालमत्ता आणि भांडवल पुरवठा या दुष्टचक्राचा भेद केला पाहिजे. व कर्ज वाटपाची कार्यपद्धती ठरवली पाहिजे. यशवंतराव चव्हाण यांच्या या धोरणामुळे उद्योग व शेतीसाठी राष्ट्रीय बँकांनी जो कर्जाऊ पैसा दिला त्यात वाढ झाली. 1959 मध्ये 449 कोटी दिले. त्यात वाढ करून 1973 मध्ये 1295 कोटी दिले. (8)

शेतीमालातील दलालीची पद्धत बंद करण्यासाठी सरकारने सर्व अन्नधान्य, व्यापार आपल्या हातात घेतला की शेतकऱ्याला योग्य भाव मिळेल. व ग्राहकांची लुबाडूनुक होणार नाही. ग्रामीण भागातील अर्थकारणाचा विचार करताना शेतकरी उपाशी राहणार नाही. ही खबरदारी घेतली पाहिजे. शेती आणि शेतकऱ्याचा विकास साधने करता अनेक नवीन उपक्रम त्यांनी अमलात आणले. कोरडवाहू शेती जमिनीला पाणीपुरवठासाठी पाटबंधारे योजना इरिगेशन डिव्हिजन सुरू केल्या 1 मार्च 1958 कोयना जलविद्युत प्रकल्पाला प्रकल्पाचा आरंभ केला. (9)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना कृषी औद्योगिक संस्थांची स्थापना करून शेतीवर आधारित सहकारी साखर कारखाने, सूतगिरणी स्थापन केल्या. शेतीला कर्ज पुरवठा करणे तसेच दुग्ध उत्पादन, कुक्कुटपालन या पूरक उद्योगांना साहाय्य करण्यासाठी सहकारी बँका, भूविकास बँक स्थापन करून कर्ज पुरवठा केला. एकूण 18 सहकारी साखर कारखान्यांची निर्मिती करून सामान्य व बेरोजगार ग्रामीण जनतेला रोजगार उपलब्ध करून दिल्याने त्यांचा आर्थिक विकास घडून आला. विकासाची ही प्रक्रिया सामान्य माणसांपर्यंत पोहोचल्याने समाजवादी समाज रचनेची निर्मिती झाली.

निष्कर्ष:

सहकारी समाजवादातील यशवंतराव चव्हाणांची भूमिका अभ्यासताना संपूर्ण समाजाचे कल्याण हा विचार प्रकर्षाने जाणवतो.

1. त्यांच्या विकासात्मक कृतीने ग्रामीण भागात तरुण उद्योजक निर्माण झाला.
2. शेतीच्या क्षेत्रात नवक्रांती होऊन शेतकऱ्याचा विकास होऊन दलाला कडून होणारी पिळवणूक थांबली.
3. सहकारी चळवळीने ग्रामीण भागाचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत झाली.
4. सहकारी चळवळीवर लोकशाहीचा अंकुश निर्माण झाला.
5. शेतीमध्ये आधुनिक दृष्टिकोन निर्माण होऊन ग्रामीण युवकांच्या हाताला काम मिळाले.

सहकारी साखर कारखाने, खरेदी-विक्री संघ, बँकांची निर्मितीमुळे सहकारी समाजवाद निर्माण होऊन सहकारी चळवळीत नवीन युगास प्रारंभ झाला. त्याचे श्रेय यशवंतराव चव्हाण व त्यांचे सहकारी यांना देता येते.

संदर्भ:

1. वाघ रामनाथ (संपादक) - युगप्रवर्तक यशवंतराव, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर पुणे, 2007, पान नंबर 571.
2. प्रधान राम - शब्दांचे सामर्थ्य, अमेय प्रकाशन, पुणे, 2015, पान नंबर 12.
3. जोशी रामभाऊ - विरंगुळा, ग्रीन वर्ल्ड प्रकाशन पुणे ,2012 ,पान नंबर 28.
4. चव्हाण यशवंतराव - युगांतर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, 1970 ,पान नंबर 126.
5. चव्हाण यशवंतराव - सह्याद्रीचे वारे ,यशवंतराव चव्हाण प्रसिद्ध विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई ,1883 ,पान नंबर 63.
6. चव्हाण यशवंतराव - "उपरोक्त," पान नंबर – 119.
7. चव्हाण यशवंतराव - भूमिका, मुद्रक सर्जेराव घोरपडे, सदाशिव पेठ पुणे, १९८९ , पान नंबर 91.
8. चव्हाण यशवंतराव - "उपरोक्त" पान नंबर - 89
9. चव्हाण यशवंतराव - "उपरोक्त" पान नंबर - 472.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

कोल्हापूर जिल्ह्याच्या जडणघडणीत सहकार चळवळीची ऐतिहासिक भूमिका

प्रो. (डॉ.) धनाजी बाबुराव मासाळ[1], डॉ. विकास सुदाम येलमार[2]

[1]*इतिहास विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा*

[2]*इतिहास विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा*

Corresponding Author - प्रो. (डॉ.) धनाजी बाबुराव मासाळ

DOI - 10.5281/zenodo.19664675

प्रस्तावना:

'सहकार' ही संकल्पना मानवाच्या सहजीवनातून उदयास आली आहे. सहकाराची कल्पना आणि सहकाराची प्रवृत्ती भारतात प्राचीन काळापासून चालू आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील ही चळवळ संपूर्ण महाराष्ट्रात अग्रेसर असून इतर जिल्ह्यांना आदर्श व मार्गदर्शक ठरत आहे. जिल्ह्याच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक इतिहासात सहकार चळवळीची भूमिका उल्लेखनीय नव्हे तर नेत्रदीपक आहे. ग्रामीण पुनर्रचनेचे प्रमुख साधन असलेल्या सहकार चळवळीने ग्रामीण भागात चैतन्य निर्माण करून खेड्यातील ओसाड व रुक्ष जीवनाचे आशादायी नंदनवनात रूपांतर करण्याची किमया साधलेली आहे, तर जिल्ह्याच्या नागरी भागात परस्पर प्रेम, सहानुभूती, आत्मीयतेचा ओलावा निर्माण करून जीवन अधिक सुसह्य केले आहे. 'सहकार' हा आर्थिक विकासाचा व सामाजिक परिवर्तनाचा लोकशाही व आदर्श असा उत्कृष्ट मार्ग आहे. विशेषतः कोल्हापूर जिल्हा हा सहकाराच्या प्रयोगांचा यशस्वी जिल्हा म्हणून ओळखला जातो. शेतीप्रधान अर्थव्यवस्था, उसाचे उत्पादन, स्थानिक नेतृत्व आणि सामाजिक ऐक्य या घटकांनी येथे सहकार तत्वाला मजबूत पाया दिला. येथील सहकारी संस्था केवळ आर्थिक संघटना नसून सामाजिक परिवर्तनाचे साधन ठरल्या. या संशोधन निबंधाचा उद्देश कोल्हापूर जिल्ह्याच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय जडणघडणीत सहकार चळवळीने बजावलेली ऐतिहासिक भूमिका विश्लेषणात्मक पद्धतीने स्पष्ट करणे हा आहे.

संशोधन उद्दिष्टे:

१. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार चळवळीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
२. सहकारी साखर कारखाने व वित्तीय संस्था यांच्या विकासाचे विश्लेषण करणे.
३. ग्रामीण अर्थव्यवस्था व सामाजिक परिवर्तनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
४. सहकार चळवळीचे राजकीय परिणाम तपासणे.
५. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार चळवळीची वर्तमान आव्हाने भविष्यातील दिशा विशद करणे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी:

राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सुधारणांचे माहेरघर म्हणून कोल्हापूर संस्थांनचा उल्लेख केला जातो. छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे प्रजाहितदक्ष राजे असल्यामुळे व राजकीय स्थैर्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थांनचा कायापालट झाला. महाराजांनी आपल्या प्रजेच्या सर्वांगीण विकासासाठी काही योजना

राबविल्या. त्यामध्ये सहकारी धोरण, शेती विकास, जलसिंचन, व्यापार, शिक्षण औद्योगिक धोरण इत्यादींचा समावेश होता. कोल्हापूर संस्थान काळातच सामुदायिक सहकार्याची परंपरा विकसित झाली होती. कृषी, सिंचन व ग्रामीण विकासासाठी सामूहिक प्रयत्नांची परंपरा होती. कोल्हापूर संस्थानात सहकारी संस्थांची स्थापना करण्यात व त्यांचा विकास घडवून आणण्यात छत्रपती राजर्षी शाहू महाराज, छत्रपती राजाराम महाराज व संस्थानातील प्रशासकीय अधिकारी यांचा सक्रिय सहभाग होता. महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सहकारी चळवळीचे बिजारोपण केले. कृषी क्षेत्रात अनेक सहकारी सोसायटी व पतपेढ्या काढल्या. त्यांनी ग्रामीण भागाकडे विशेष लक्ष केंद्रित केले आणि उद्योग क्षेत्रात सुद्धा सहकाराचे युग सुरू झाले. यावरून असे म्हणता येईल की, सहकाराची बीजे संस्थान काळातच रुजली आणि स्वातंत्र्योत्तर काळात ती व्यापक चळवळ बनली.

आज महाराष्ट्रातील सहकारी चळवळीत कोल्हापूर जिल्ह्याला फार महत्त्वाचे स्थान आहे. किंबहुना कोल्हापूर हे महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे माहेरघर आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. तथापि या प्रगतीचा प्रारंभ स्वातंत्र्यपूर्व काळात राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीत झाला होता. आपल्या संस्थानात आणि संस्थानाबाहेर व्यापार व उद्योगधंदे यांच्या विकासाला चालना देण्याचे कार्य करीत असता त्यांनी या क्षेत्रातील सहकाराच्या तत्त्वाचा जोरदार पुरस्कार केला होता ही गोष्ट त्या काळात तरी संस्थानिकांच्या दृष्टीने अपूर्व होती.

सहकारी कायदा (१९१२):

खालसा मुलखात लागू झालेल्या १९१२ च्या सहकारी कायद्यात आपल्या संस्थानातील परिस्थितीनुरूप योग्य असे बदल करून, तो कायदा १९१३ मध्ये कोल्हापूर संस्थानला लागू केला आणि आपल्या संस्थानातील सहकारी चळवळीचा राजर्षी शाहू महाराजांनी चालना दिली.[१] सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट (१८६९) हा कोल्हापूर संस्थानला १९१७ साली लागू करण्यात आला. पुढे १९४९ साली बॉम्बे को-ऑपरेटिव्ह नियमही लागू केला. सहकारी तत्त्वावर कारखाने निर्माण करणे ही महाराजांची त्यावेळची योजना होती.[२] मात्र १९१३ च्या सहकारी कायद्याच्या पूर्वीपासून कोल्हापुरच्या लोकमानसात सहकाराची बीजे नकळत रुजली होती. उदा. भिशी, फडपद्धती, कोल्हापुरी बंधारे याद्वारे सहकार प्रत्यक्षात आचरणात आणला जात होता. ही सर्व संस्थानातील पारंपरिक सहकाराची उदाहरणे म्हणता येतील. आज सुद्धा कोल्हापूर जिल्ह्यात अशा प्रकारची सहकारी तत्वे शेतकरी वापरत असल्याचे दिसून येते. आधुनिक सहकार चळवळीचे बिजारोपण यामध्ये झालेले दिसते.[३]

शाहू महाराजांनी १८९४ साली अधिकार सूत्रे स्वीकारल्यानंतर आपल्या राज्याचे औद्योगिक सर्वेक्षण तयार केले. आपल्या संस्थानातील अकुशल मजूर, व्यापारी, सुशिक्षित बेकार यांच्या फायद्यासाठी व एकाधिकाराचे दोष टाळण्यासाठी त्यांनी सहकारी चळवळीस व संमिश्र उद्योगांना अधिक प्रोत्साहन दिले.[४] समाजात शासकीय यंत्रणेद्वारे उद्योग सुरू करण्याऐवजी लोकांनी पुढे येऊन सहकारी तत्वावर ते सुरू करावेत असे १९०६ साली कोल्हापुरातील कापड गिरणीच्या उद्घाटन प्रसंगी महाराजांनी सांगितले होते.[५]

राजर्षी शाहू महाराजांच्या आदेशाप्रमाणे ना. भास्करराव जाधव यांनी १९१३ साली नगरपालिकेत सहकारी पतपेढीची स्थापना केली. या पतपेढीसाठी महाराजांनी गंगावेस जवळ स्वतंत्र जागा दिली. नंतर त्या जागेत या सहकारी पतपेढीचे रूपांतर अर्बन सहकारी बँकेत करण्यात आले.[६] अशा रीतीने कोल्हापुरात सहकारी

तत्त्वावर चाललेली ही पहिली नागरी सहकारी बँक सुरू झाली. कोल्हापूर संस्थानात १९२२ पर्यंत एकूण ३८ संस्था होत्या. शेती व इतर सहकारी संस्थांची संख्या अनुक्रमे २६ व १२ एवढी होती. शेतकऱ्यांची सावकारी कर्जातून सुटका व्हावी म्हणून २६ सहकारी शेती संस्थापैकी २५ संस्था सहकारी पतपेढी होत्या.[७]

छत्रपती राजाराम महाराजांच्या कालखंडात करवीर दरबाराने आपल्या संस्थानातील शेतकरी, व्यापारी व छोटी व्यावसायिक यांची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून नवीन सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले तसेच सहकारी संस्थांच्या कार्याची तपासणी करण्यासाठी अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. कोल्हापूर संस्थानात १९२१-२२ साली शेती सहकारी संस्था २६ व बिगर शेती संस्था १२ होत्या.[८] राजाराम महाराजांच्या मृत्यू समयी (१९४०) कोल्हापूर संस्थानात ३४३ एवढ्या सहकारी संस्था अस्तित्वात होत्या, त्यामध्ये शेती संस्था २८८, नागरी संस्था २९, ग्राहक संस्था ०६, तालुका विकास संघ ०४, उत्पादक खरेदी विक्री संस्था ०१ आणि इतर सहकारी संस्था २५ अशी एकूण संख्या ३४३ एवढी होती.[९]

सहकार चळवळीचा विकास:

'शेतीसाठी कर्जपुरवठा' एवढेच मर्यादित स्वरूप नाहीसे होऊन जिल्ह्यातील आर्थिक विषमता नष्ट करण्याचे एक प्रभावी साधन म्हणून या कालखंडात सहकारी चळवळीकडे पाहिले जाऊ लागले. विविध प्रकारच्या सहकारी संस्थांनी कोल्हापूर जिल्ह्यात सहकारी संस्थांच्या विस्तारात महत्त्वाची भूमिका बजावली. सहकारी क्षेत्रातील सूतगिरण्या हे कोल्हापूर जिल्ह्याचे वैशिष्ट्य आहे. देशातील सहकारी क्षेत्रातील पहिली सूतगिरणी म्हणून १९६० साली डेक्कन स्पिनिंग को-ऑपरेटिव्ह मिलची स्थापना झाली. याच काळात जिल्ह्याच्या विविध भागात पंचगंगा, वारणा, भोगावती, कुंभी कासारी, दत्त, शाहू यासारख्या सहकारी साखर कारखान्यांची स्थापना झाली. याच काळात विविध नागरी व ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्थांची संख्यात्मक वाढ मोठ्या प्रमाणात झाली तसेच गोकुळ, वारणा यासारख्या दूध संस्थांच्या स्थापनेने सहकाराचा मोठा विस्तार झाला.

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रात धरण सहकारी संस्थांची स्थापना एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. नद्यावर पक्की धरणे बांधून शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी या धरण संस्था अस्तित्वात आल्या. करवीर तालुक्यातील सांगरूळ या गावी सहकारी संस्था स्थापन करून नदीवर पक्के धरण बांधले. शेतकऱ्यांनी सहकारी तत्त्वाच्या आधारे स्वसामर्थ्यावर बांधलेले हे भारतातील पहिले सहकारी क्षेत्रातील धरण होय. शेतकऱ्यांच्या उपक्रमशीलतेचे आणि सहकारावरील उपजत निष्ठेचे हे एक नमुनेदार उदाहरण आहे.[१०]

१९६० च्या दशकात सहकारी साखर उद्योगाने कोल्हापूर जिल्ह्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांती घडविली. या कारखान्यांनी शेतकऱ्यांना बाजारपेठेतील अस्थिरतेपासून संरक्षण दिले. या सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांना शेतकरी सदस्य म्हणून मालकी हक्क दिला तसेच प्रत्येक सभासदांना लाभांशाचे वाटप करण्यात आले. जिल्ह्यातील सहकारी संस्थामुळे जिल्ह्याच्या कृषी, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास झाला तसेच अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. या संस्थामार्फत सामुदायिक विवाह सोहळे, दुष्काळग्रस्तांसाठी मदत, कुटुंब कल्याण कार्यक्रम व आरोग्य शिबिरे इत्यादींच्या माध्यमातून सामाजिक विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण भागातील सावकारी पद्धतीच्या शोषणातून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी सहकारी पतसंस्था आणि जिल्हा

मध्यवर्ती बँकांची स्थापना झाली. कर्जव्यवस्था सुलभ झाली आणि उत्पादन क्षमता वाढली.

ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सहकार चळवळीचा प्रभाव:

सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, दूध संस्था यामुळे शेतकऱ्यांना निश्चित स्वरूपाचे उत्पादन मिळू लागले. नफ्याची पुनर्गुंतवणूक स्थानिक विकासात झाली. सहकारी संस्थांनी आपापल्या भागातील पायाभूत सुविधांचा विकास केला. येथील सहकार चळवळीने सामाजिक बांधिलकी मानून ग्रामीण क्षेत्रात रस्त्यासारख्या मूलभूत सेवा निर्माण केल्या. उपसा जलसिंचन योजनांना कर्जपुरवठा केला.[११]

सामाजिक परिवर्तन:

सहकार चळवळीमुळे व्यक्तीमध्ये एकता, बंधुभाव, सहजीवनाची व सलोख्याची भावना वाढीस लागलेली आहे. तसेच जात, वर्ग व आर्थिक विषमता कमी करण्यास हातभार लावला सामूहिक मालकीमुळे सामाजिक एकात्मता वाढली. अनेक सहकारी संस्थांनी शाळा महाविद्यालये व रुग्णालये सुरू केली त्यामुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावले.

ग्रामीण नेतृत्वाचा उदय:

ग्रामीण नेतृत्वाचा उदय आणि विकास करण्यास सर्वात मोठा हातभार सहकार चळवळीने आणि यातील राजकीयकरणाने लावला. सहकार चळवळ ही ग्रामीण नेतृत्व घडविण्याची शाळा ठरली. स्थानिक पातळीवरील सहकारी संस्थांमधून अनेक नेते राज्य व राष्ट्रीय राजकारणात पुढे आले.[१२]

आव्हाने व मर्यादा:

१९८० नंतरच्या काळात सहकार चळवळीची पंढरी समजल्या जाणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सहकाराची अधोगती होताना दिसून येत आहे. सहकारी संस्थात झालेला राजकीय पक्षांचा हस्तक्षेप व राज्यकर्त्यांचा प्रवेश यामुळे सहकारी संस्था अडचणीत आलेल्या आहेत. अमाप कर्जवाटप, अतिरिक्त नोकर भरती, संस्थेचे साहित्य सामग्रीचा गैरवापर करणे, यासारख्या प्रकारामुळे जिल्ह्यातील हजारो बँका, पतसंस्था, दूध संस्था आज मोडकळीस आलेल्या दिसत आहेत. याबरोबरच राजकीय मंडळींनी आपल्या नातेवाईकांना सहकारी संस्थांच्या संचालकपदी नियुक्त करून सहकारी संस्थावर अप्रत्यक्षपणे खासगी मालकी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. या कारणाबरोबरच योग्य नेतृत्वाचा अभाव, शासकीय लेखापरीक्षणातील कमतरता, १९९१ चे खाऊजा धोरण इत्यादी विविध कारणामुळे तिची अधोगतीकडे वाटचाल सुरू झालेली दिसते. सभासदांनी तसेच राजकीय नेत्यांनी सहकारी संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड केली नाही, सभासदांना कर्जफेड न करण्याची सवयच लागत गेली. यातून अनेक सहकारी संस्था बंद पडल्या तर काही डबघाईस आलेल्या आहेत.[१३] कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार चळवळीच्या बाबतीत आर्थिक व्यवस्थापन, राजकीय हस्तक्षेप व बाजारातील बदल ही आव्हाने आजही कायम आहेत.

निष्कर्ष:

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार चळवळीमुळे जिल्ह्याचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास मोठ्या प्रमाणात झालेला आहे. म्हणजेच कोल्हापूर जिल्ह्याच्या जडणघडणीत सहकार चळवळीने बहुआयामी भूमिका बजावली आहे. येथील सहकार चळवळीमुळे मोठ्या प्रमाणात स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण होऊन बेरोजगारांना काम मिळालेले आहे. रोजगार मिळाल्यामुळे येथील लोकांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर निश्चितपणे कमी झाले आहे . सहकारी संस्थामुळे

सभासदांना लोकशाहीचे प्रशिक्षण मिळाले, जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आधुनिक उद्योग व सेवा क्षेत्र पोहोचण्याचे महत्त्वपूर्ण परिवर्तन सहकार चळवळीच्या माध्यमातून घडून आले, तर दुसऱ्या बाजूला सहकारी साखर कारखान्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील पीक वैविध्य नष्ट झाले. परिणामी पर्यावरणावर याचा वाईट परिणाम झाला. जिल्ह्याच्या पश्चिम भागात डोंगर सपाट करून उसाची लागवड करण्याचे प्रमाण वाढले परिणामी तेथील पर्यावरणाच्या दृष्टीने ती विघातक झाले. भविष्यात जिल्ह्यातील सहकारी संस्थांनी पारदर्शकता, व्यावसायिक व्यवस्थापन, पर्यावरण संतुलन आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढविल्यास ही चळवळ ग्रामीण विकासाचा शाश्वत मार्ग ठरू शकते.

संदर्भ:

१. करवीर सरकारचे गॅझेट,१५ नोव्हेंबर १९९३ (भाग ०४), पृ.४

२. बगाडे द.रा., छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि कायदेकानू, पद्म प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती ०१ जुलै १९८२, पृ.९९

३. मोहिते प्रेमलता माधव, कोल्हापुरातील सहकारी पतपेढी व्यवहार १९१३-१९४९: एक ऐतिहासिक अभ्यास., श्रीहरी प्रकाशन, कोल्हापूर, २५ नोव्हेंबर १९९५, पृ.३९

४. पळसापुरे पी. झेड., श्री. छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य, मंगुडकर मा.प.(संपा.), महाराष्ट्रातील समाज प्रबोधन आणि छत्रपती शाहू महाराजांचे कार्य, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७५, पृ.७५

५. पवार जयसिंगराव., राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, जानेवारी २००१, पृ २०८

६. दैनिक सत्यवादी, कोल्हापूर, दि.३० जुलै १९८२, पृ.२

७. Report on the General Administration of the Kolhapur state,1922-23, P.71

८. Report on the General Administration of the Kolhapur state,1922-23, Jainendra press, Kolhapur, 1923, P-71

९. Kolhapur Administration Report 1940-41, The Kolhapur Government Press, 1942, P.102

१०. पाटील सर्जेराव अण्णासाहेब (संपा.)., कोल्हापुरातील सहकारी चळवळ, २१ व्या वर्षाचा खास अंक, दैनिक समाज, कोल्हापूर, ऑक्टोबर १९७१, पृ.८

११. जिल्हा परिषद स्मरणिका, कोल्हापूर जिल्हा सहकारी बोर्ड लि. कोल्हापूर,९ मार्च २००३, पृ.८८

१२. रत्नपारखी संजय भीमाशंकर, सहकार चळवळ: राजकीय कारणाचे मूल्यमापन, फाले कृ. ल. व किशोर फाले (संपा.), सहकार चळवळ १९०४-२००४ शतक लेखसंग्रह, निर्माण प्रकाशन, वर्धा,२००५, पृ २६९

१३. Rosenthal Donald B, The Expansive Elite: District Politics and State Policy Making in India, University of California Press, Berkeley, 1977, P.520

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकार चळवळीची ऐतिहासिक भूमिका

डॉ. संगिता संपत पाटील

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस

Corresponding Author - डॉ. संगिता संपत पाटील

DOI - 10.5281/zenodo.19664724

सारांश:

महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जडणघडणीत सहकार चळवळीने अत्यंत मोलाची भूमिका बजावली आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ग्रामीण कर्जबाजारीपणा, सावकारी प्रथा व शेतीतील अस्थिरता या पार्श्वभूमीवर सहकाराची संकल्पना उदयास आली. स्वातंत्र्योत्तर काळात साखर कारखाने, दूध संघ, पतसंस्था, बाजार समित्या, गृहनिर्माण संस्था आणि शेतकरी संघटनांमुळे महाराष्ट्रात ग्रामीण विकासाची नवी दिशा निर्माण झाली. विठ्ठलराव विखे पाटील, यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील यांसारख्या नेतृत्वाने सहकाराला संस्थात्मक व राजकीय बळ दिले. प्रस्तुत संशोधनपत्रात सहकार चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, विविध क्षेत्रांतील योगदान, त्याचे परिणाम व समकालीन आव्हाने यांचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रस्तावना:

महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जडणघडणीमध्ये सहकार चळवळीने अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सहकार हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. व्यक्तीच्या सामाजिक विकासाच्या प्रवाहातील एक प्रमुख घटक सहकार आहे. सहकार म्हणजे एकमेकांना मदत करणे. सहकार आणि मानवी सहजीवन यांचा जवळचा संबंध आहे.ग्रामीण महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि निम्न-मध्यमवर्गीय समाजघटकांना आर्थिक स्वावलंबन, संघटनशक्ती आणि नेतृत्वाची संधी देणारी ही चळवळ केवळ आर्थिक प्रयोग नव्हती, तर ती सामाजिक परिवर्तनाची व्यापक प्रक्रिया होती. सहकार चळवळ ही केवळ संस्थात्मक रचना नसून लोकशाही मूल्यांवर आधारित सामूहिक जीवनपद्धती आहे.

ब्रिटिशकालीन शोषणकारी आर्थिक व्यवस्थेमुळे शेतकरी सावकारांच्या कर्जजाळ्यात अडकले होते. जमीन महसूल, दुष्काळ, उत्पादनातील अनिश्चितता आणि बाजारपेठेतील दलालशाही यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था अस्थिर झाली होती. अशा परिस्थितीत सहकार हा पर्याय म्हणून उदयास आला. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात राज्यकर्त्यांनी सहकाराला विकासाचे साधन म्हणून स्वीकारले आणि महाराष्ट्राने या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर आदर्श निर्माण केला.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा ऐतिहासिक उगम व विकासक्रमाचा अभ्यास.

२. सहकार चळवळीचा ग्रामीण समाज आणि अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामाचा ऐतिहासिक विश्लेषण.
३. सहकार चळवळीमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जडणघडणीवर झालेल्या प्रभावाचे परीक्षण.

संशोधन पद्धती :

या संशोधनासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. सरकारी अहवाल, कायदे, समिती अहवाल, ग्रंथ व नियतकालिकांचा संदर्भ घेतला आहे.

सहकार चळवळीचा ऐतिहासिक उगम:

सहकाराची व्याख्या-सहकार म्हणजे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनी स्वच्छेने एकत्र येऊन समानतेच्या तत्वावर, आर्थिक हितासाठी लोकशाही मार्गाने स्थापन केलेली संस्था होय. सहकार चळवळीची सुरुवात ही इंग्लंडमध्ये झाली. 1844 मध्ये राश्डेल पायोनिअर्सने सहकार चळवळीची स्थापना केली. भारतात सहकार चळवळीची सुरुवात ही स्वातंत्र्यपूर्व काळात झाली.महाराष्ट्रातील सहकार चळवळीची मुळे ब्रिटिशकालीन आर्थिक धोरणांमध्ये शोधावी लागतात. १९०४ चा 'सहकारी पतपुरवठा कायदा ' हा भारतातील सहकार चळवळीचा प्रारंभबिंदू मानला जातो. या कायद्याने कर्नाटकातील गडग जिल्ह्यातील कानगिहाल या गावात पहिली कृषी पतसंस्था स्थापन करण्यात आली.मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खऱ्या अर्थाने सहकार चळवळीचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. विशेषतः महाराष्ट्रात सहकार चळवळ मोठ्या प्रमाणात रुजली.सहकार क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी या कायद्यात व्यापक सुधारणा करण्याची आवश्यकता होती. म्हणून सन 1912 मध्ये 'भारतीय सहकारी सोसायट्याचा कायदा ' अस्तित्वात आला. या कायद्यामुळे ग्रामीण पतसंस्थांची स्थापना शक्य झाली. महाराष्ट्रातील अहमदनगर, पुणे आणि सातारा जिल्ह्यांमध्ये प्रारंभीच्या पतसंस्था स्थापन झाल्या. या संस्था शेतकऱ्यांना सावकारांपासून मुक्त करण्यासाठी कार्यरत होत्या.या काळात सहकार ही केवळ आर्थिक व्यवस्था नव्हती, तर ती ग्रामीण समाजात विश्वास आणि परस्परावलंबनाची नवी संस्कृती निर्माण करणारी चळवळ होती. सामूहिक बचत, कर्जपुरवठा आणि नियोजन यामुळे ग्रामीण भागात आर्थिक स्थैर्य निर्माण होऊ लागले. त्यामुळेमहाराष्ट्राच्या विकासाला गती मिळाली.

वैकुंठभाई मेहता आणि प्रारंभीचे नेतृत्व:

वैकुंठभाई मेहता यांनी सहकार तत्त्वज्ञानाचा सैद्धांतिक पाया मजबूत केला. त्यांनी सहकार शिक्षण, व्यवस्थापन आणि नैतिक मूल्यांवर भर दिला. त्यांच्या कार्यामुळे सहकार चळवळ शिस्तबद्ध आणि संस्थात्मक झाली. त्यांनी सहकारी बँकिंग, प्रशिक्षण आणि व्यवस्थापन या क्षेत्रात मार्गदर्शक भूमिका निभावली.

स्वातंत्र्योत्तर काळातील सहकार धोरण:

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राने सहकाराला ग्रामीण विकासाचे प्रमुख साधन मानले. 1मे 1660 मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना होवून यशवंतराव चव्हाण हे पहिले मुख्यमंत्री बनले. त्यांनी आपला खंबीर नेतृत्वाने सहकार आणि पंचायती राज या माध्यमातून राज्याच्या विकासाला गती दिली.सहकारी साखर कारखान्यांना विशेष प्रोत्साहन देण्यात आले. राज्य सरकारने कर्जसवलती, तांत्रिक मदत आणि करसवलती देऊन सहकाराला चालना दिली.

महाराष्ट्रातील प्रमुख सहकारी संस्था:

महाराष्ट्रातील सहकार चळवळ ही राज्याच्या सामाजिक-आर्थिक जडणघडणीतील एक प्रभावी आणि परिवर्तनशील चळवळ म्हणून ओळखली जाते. ग्रामीण भागासोबतच शहरी क्षेत्रातही या चळवळीचा व्यापक विस्तार झालेला दिसून येतो. विशेषतः ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उन्नतीत सहकार चळवळीची भूमिका अत्यंत मोलाची ठरली आहे.

सहकारी बँका, साखर कारखाने, गृहनिर्माण संस्था तसेच विविध विपणन संघ यांच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील विकासाला चालना मिळाली. कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी स्थापन झालेल्या कृषी पतपुरवठा संस्था आणि पाणीपुरवठा संस्था यांनी शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्रदान केले. जिल्हा स्तरावर कार्यरत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या कणा म्हणून कार्य करीत आहेत.याशिवाय, सहकारी खरेदी-विक्री संघांनी वस्तू व सेवांचा पुरवठा सुलभ करून बाजारव्यवस्थेला स्थैर्य दिले. शेतीपूरक व्यवसाय म्हणून पशुपालनाच्या विकासात दुग्धव्यवसाय सहकारी संस्थांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. शेतीमालावर आधारित उद्योगांच्या वृद्धीसही सहकार क्षेत्राने चालना दिली असून, त्यामध्ये प्रामुख्याने साखर कारखाने व सूतगिरण्या यांचा समावेश होतो.एकूणच, महाराष्ट्रातील सहकारी संस्थांनी ग्रामीण विकास, औद्योगिक वाढ आणि सामाजिक परिवर्तन यामध्ये प्रभावी भूमिका बजावली असून राज्याच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार लावला आहे

साखर सहकार चळवळ आणि ग्रामीण क्रांती:

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील आघाडीचे नेते डॉ.धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठलराव विखे पाटील यांनी 30 डिसेंबर 1950 रोजी अहमदनगर जिल्ह्यातील लोणी येथील प्रवरानगर येथे'प्रवरा सहकारी साखर कारखाना 'स्थापन केला प्रवरा हा आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना म्हणून ओळखला जातो.या घटनेने महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांतिकारक बदल घडवून आणला. शेतकऱ्यांना उत्पादन प्रक्रियेत भागीदार बनविण्यात आले. ऊस शेती, सिंचन, शिक्षण आणि आरोग्य सुविधा विकसित झाल्या.साखर सहकारामुळे ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती झाली. शिक्षणसंस्था, बँका, पतसंस्था आणि दुग्धसंस्था उभारल्या गेल्या. त्यामुळे ग्रामीण समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला.

सहकार आणि राजकारण:

यशवंतराव चव्हाण यांनी सहकाराला राजकीय पाठबळ दिले. सहकारी संस्थांमधून ग्रामीण नेतृत्व तयार झाले. यामध्ये वैकुंठ लाल मेहता, भाऊसाहेब हिरे, विठ्ठलराव विखे पाटील, डॉ.धनंजय राव गाडगीळ, वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, डॉ.पंजाबराव देशमुख, तात्यासाहेब कोरे इत्यादींचा उल्लेख करावा लागेल. या सर्वांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रात सर्वत्र सहकाराचे जाळे निर्माण होण्यास मदत झाली.जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि विधानसभेत सहकारातून आलेल्या नेत्यांचा प्रभाव वाढला. त्यामुळे महाराष्ट्रात ग्रामीण राजकारणाची एक स्वतंत्र ओळख निर्माण झाली.सहकार आणि राजकारण यांचा परस्पर संबंध बळकट होत गेला. सहकारी संस्थांमधील निवडणुका या राजकीय शक्तीप्रदर्शनाचे केंद्र बनल्या. काही ठिकाणी यामुळे सत्ताकेंद्रीकरण, भ्रष्टाचार आणि गटबाजी वाढल्याचेही दिसून आले.

आर्थिक विकासातील भूमिका:

सहकारी बँका, पतसंस्था आणि नागरी सहकारी बँकांनी लघुउद्योग, शेतकरी आणि व्यापाऱ्यांना भांडवल उपलब्ध करून दिले. ग्रामीण भागात आर्थिक समावेशन घडवून आणण्यात सहकार महत्त्वाचा ठरला. उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन या तिन्ही टप्प्यांवर सहकाराने भूमिका बजावली.कृषी उत्पादन बाजार समित्या या सहकार तत्त्वावर उभारल्या गेल्या. पूर्वी शेतमाल विक्रीत व्यापाऱ्यांचे वर्चस्व होते. वजन, दर आणि व्यवहारात पारदर्शकतेचा अभाव होता. सहकारी बाजार समित्यांमुळे शेतकऱ्यांना नियोजित बाजारपेठ उपलब्ध झाली.महाराष्ट्र राज्य कृषी उत्पादन बाजार समिती महासंघ यांच्या माध्यमातून शेतमालासाठी लिलाव प्रणाली विकसित झाली. शेतकऱ्यांना योग्य दर, पारदर्शक व्यवहार आणि हमीभावाची सुविधा मिळाली.या व्यवस्थेमुळे कृषी उत्पादन साखळी अधिक संघटित झाली. साठवणूक, प्रक्रिया उद्योग आणि निर्यात क्षमता वाढली. महाराष्ट्रातील कांदा, कापूस, ऊस व धान्य बाजारपेठा राष्ट्रीय स्तरावर प्रभावी ठरल्या.

सामाजिक परिवर्तनातील योगदान:

सहकारी साखर कारखाने आणि इतर सहकारी संस्थांनी शिक्षण क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली. अनेक शिक्षणसंस्था, महाविद्यालये, तंत्रनिकेतने आणि कृषी शिक्षण केंद्रे सहकार क्षेत्रातून स्थापन झाली. ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची दारे उघडली गेली.प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था यांसारख्या संस्थांनी ग्रामीण युवकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. या शैक्षणिक विस्तारामुळे ग्रामीण भागात पहिल्या पिढीतील सुशिक्षित वर्ग तयार झाला.सांस्कृतिक स्तरावर सहकार संस्थांनी क्रीडा स्पर्धा, व्याख्यानमाला, साहित्य संमेलने, सामाजिक कार्यक्रम यांचे आयोजन केले. ग्रामीण भागात सांस्कृतिक चेतना आणि सामाजिक ऐक्य वाढले. शिक्षण व संस्कृतीच्या माध्यमातून सहकाराने सामाजिक गतिशीलता वाढवली.

सहकार चळवळीमुळे ग्रामीण समाजात शिक्षणाचा प्रसार झाला. महिलांसाठी बचत गट आणि पतसंस्था सुरू झाल्या. सामाजिक समता आणि संघटनशक्ती वाढीस लागली.तसेच सहकारामुळे जाती-जमातींतील आर्थिक भेद कमी करण्याचा प्रयत्न झाला. शेतकरी, कामगार, महिला व वंचित घटक यांना संस्थात्मक प्रतिनिधित्व मिळाले. सहकाराने ग्रामीण समाजात 'सामूहिक विकास' ही मानसिकता निर्माण केली, जी महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीत मूलभूत ठरली.सहकार चळवळीने महिलांच्या आर्थिक सहभागाला नवे परिमाण दिले. दूध सहकारी संस्था, महिला पतसंस्था आणि बचत गट यांच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक स्वावलंबन प्राप्त केले.महिलांनी स्वयं-साहाय्य गटांच्या माध्यमातून बचत, कर्जव्यवस्था, लघुउद्योग आणि घरगुती उत्पादन सुरू केले. यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ झाली आणि महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला.ग्रामीण भागात महिला नेतृत्वाचा विकास झाला. पंचायत राज संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढण्यामागे सहकारातून मिळालेला आत्मविश्वास महत्त्वाचा ठरला.सहकारामुळे महिलांना सामाजिक सन्मान, आर्थिक स्थैर्य आणि आत्मनिर्भरतेची जाणीव मिळाली. त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक संरचनेत सकारात्मक बदल घडून आला.

सहकार चळवळीतील आव्हाने:

१९९० नंतर उदारीकरणामुळे स्पर्धा वाढली. सहकारी साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती डळमळीत झाली. राजकीय हस्तक्षेप, व्यवस्थापनातील त्रुटी, भ्रष्टाचार आणि कर्जबाजारीपणा यामुळे अनेक संस्था अडचणीत

आल्या. जागतिकीकरणामुळे बाजारपेठेतील स्पर्धा तीव्र झाली.

निष्कर्ष:

सहकार चळवळीने महाराष्ट्राच्या जडणघडणीत क्रांतिकारक बदल घडवून आणले, हे निर्विवाद आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट झाली, सामाजिक समता वाढली आणि लोकशाही नेतृत्व घडले. तथापि, राजकीय हस्तक्षेप आणि व्यवस्थापनातील कमतरता यामुळे काही प्रमाणात तिची पत कमी झाली. त्यामुळे सहकाराचे पुनरुज्जीवन आवश्यक आहे.महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकार चळवळ ही आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाची प्रमुख शक्ती ठरली आहे. शेतकरी-कामगार वर्गाला स्वावलंबनाची दिशा देत सहकाराने ग्रामीण विकासाचे मॉडेल उभे केले. सहकार ही केवळ संस्था नसून ती लोकशाही, समानता आणि सामूहिकतेची जीवनदृष्टी आहे. भविष्यात पारदर्शकता, व्यावसायिक व्यवस्थापन आणि नवतंत्रज्ञानाच्या साहाय्याने सहकार चळवळ अधिक सक्षम होऊ शकते.

संदर्भसूची:

१. शिंदे, वि. रा.,महाराष्ट्रातील सहकार चळवळ, पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन,१९८५

२. डॉ.शहा रूपा, डॉ.दामाजी बी.एच.,सहकार तत्वे व चळवळ, कोल्हापूर फडके प्रकाशन,२०१२.

३. कुलकर्णी, अ. रा.,आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स,२००४.

४. जाधव, भा. ल.,ग्रामीण विकास आणि सहकार, औरंगाबाद , साकेत प्रकाशन,२००१.

५. महाराष्ट्र सहकार वार्षिक अहवालमुंबई, शासकीय मुद्रणालय महाराष्ट्र शासन, सहकार विभाग अहवाल.

६. योजना आयोग अहवाल, ग्रामीण विकास.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

यशवंतराव चव्हाण यांची सहकार चळवळीतील ऐतिहासिक भूमिका

प्रा. डॉ. जाधव अंकुश

बळवंत कॉलेज, विटा

Corresponding Author - प्रा. डॉ. जाधव अंकुश

DOI - 10.5281/zenodo.19664750

समाजाच्या शाश्वत परिवर्तनासाठी आवश्यक असणारी दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे सिंचन सोय महाराष्ट्रातला पावसाळा हा कमालीचा लहरी आहे बेभरवशाचा आहे. पडला तर आठ दिवसात संपूर्ण वर्षाचा पाऊस कोसळतो, नाही तर आठ आठ महिने अंगावर चार शिंतोडे ही पडत नाही. त्यातच महाराष्ट्रातील सुमारे १७२ तालुके या दुष्काळाच्या खाईत सातत्याने भाजून निघतात. करपून जातात पिण्याच्या पाण्यासाठी ही दोन दोन किलोमीटर दिवस रात्रभर वन वन करावी लागते. महाराष्ट्र अनेकदा पायाखाली घातलेल्या यशवंतरावानी हे करपलेले वास्तव पाहिल आहे. जाणूनही घेतलेलं होतं. ओलिता खालील क्षेत्र वाढल्याशिवाय शेती उत्पादन वाढणार नाही. शेती उत्पादन वाढल्याशिवाय शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सक्षम होणार नाही आणि ती तशीच झाल्याशिवाय त्यांचं शोषण थांबणार नाही तो ताट मानेने जगू शकणार नाही, हे त्यांनी पुरेपूर ओळखलं होतं शिवाय दर पाच वर्षात तीनदा येणाऱ्या दुष्काळाला तोंड देण्यासाठी सिंचनाचा कार्यक्रम हे त्यांचं एकमेव उत्तर आहे. बागायती क्षेत्र आलं की, शेतकरी चार जनावर पाळू शकतो, दुधाचे उत्पादन काढू शकतो. भाजीपाला लावू शकतो आणि त्यापासूनही तो कमाई करू शकतो म्हणून शेतीला मिळणार पाणी म्हणजे शेतकऱ्याला मिळणारे जीवन आहे ही जाणून यशवंतरावानी श्री स.गो.बर्वे यासारख्या अभ्यासू सनदी अधिकाऱ्यांची समिती नेमून महाराष्ट्रातील किती क्षेत्र ओलिताखाली येऊ शकेल याचा अहवाल देण्यास सांगितले. त्या आधारे अनेक धरणांची काम सुरू झाली यशवंतरावाच्या कारकिर्दित आणि नंतरच्या काळात त्यांच्या सहकार्य, मार्गदर्शन, प्रोत्साहनातून आज अनेक धरणांची कामे पुरी झालेली आहेत. शिवाय नदीचं पाणी उचलण्यासाठी निर्माण झालेल्या योजना छोटी छोटी धरणे बंधारे बांधण्याच्या कार्यालयालाही त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यांनीच भूमिपूजन केलेल्या आणि मार्गस्थ लावलेल्या उजनी धरणाच्या पाण्यामुळे एकट्या पंढरपूर तालुक्यात आणि परिसरातील काही गावांची पनास हजार एकर जमीन भिजते आहे. इतर तालुक्यातील जमिनीला मिळणार पाणी वेगळेच. याबरोबरच याच धरणाच्या पाण्यावर सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, सांगोला, पंढरपूर यासह अन्य शहरातील सुमारे २५ -३० लाख नागरिकांना लाखो लिटर पाणी रोज पुरवले जात. शिवाय याच धरणाच्या पाण्यावर अनेक कारखाने व उद्योगधंदे चालवले जातात उजनीच्या पाण्याच जर हे स्थूल गणित असेल तर महाराष्ट्रातील सर्व धरणातून मिळणाऱ्या पाण्याची गणित काय असेल, हे सांगायला नकोच. यशवंतरावांचे दृस्टे पण अशावेळी विशेष जाणवत. याच दृष्टीपणाच आणखी एक उदाहरण म्हणजे आपणाला ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल त्यानंतरच्या मंत्रिमंडळात प्रथम यशवंतराव काही काळ समाविष्ट झालेले नव्हते तरी नोव्हेंबर १९४७ सालीच कोयनेच्या पाण्यावर वीज निर्मिती करावी आणि त्या

पाण्याचा शक्य झाल्यास शेतीलाही उपयोग करावा यासाठीचा प्रस्ताव त्यांनी तयार करून संबंधितासमोर मान्यतेसाठी ठेवला होता. आणि त्याचा सातत्याने पाठपुरावा करून त्यांनी ते आपलं स्वप्न पूर्णत्वाला नेलं होतं. सिंचनाशिवाय शेती म्हणजे एकही दात नसलेल्या म्हाताऱ्याच्या हातावर खाण्यासाठी ठेवलेला शेळ्या भाकरीचा लाकडासारखा तुकडा होय. तो तुकडा त्याला खाताही येत नाही आणि फेकूनही देता येत नाही. माझ्या जवळ अन्न आहे एवढे सांगण्यापुरताच त्याचा उपयोग. हे सारं दृष्टचक्र यशवंतरावानी जाणलं होतं, म्हणूनच समाजाच्या शाश्वत परिवर्तनासाठी त्यांनी शेती इतकच सिंचनालाही प्राधान्य दिलं होतं. पाण्याशिवाय शेती नाही ही जाणीव याआधी राज्यश्री शाहू महाराज यांनाच होती म्हणून तर त्यानी अनेक संकट आणि अडचणी येऊन सुद्धा राधानगरी धरण पूर्ण केलं होतं.

समाजाच्या सर्वांगीण अभ्युदयासाठी तितकाच महत्त्वाचा असणारा तिसरा घटक शिक्षण हा आहे. व्यक्तीचा अंतर्भाव विकास समाजाच्या सर्वांगीण परिवर्तन आणि देशाचा अभ्युदय केवळ शिक्षणातूनच होत असतो. शिक्षण हे केवळ अक्षर ओळख करून देत नाही किंवा बेरीज वजाबाकी शिकवत नाही तर व्यक्तीच्या सुप्त गुणांचं प्रकटीकरण करत असतं असं स्वामी विवेकानंदनी म्हटले आहे. व्यक्तीच्या गुणांचा विकास करण्याबरोबरच ते माणसाला कौशल्य शिकवतं. श्रमाची बचत शक्तीचा अपव्य आणि संपत्तीची नासधूस कमी करण्याची क्षमता केवळ एका शिक्षणात आहे. माणसाला आवश्यक असणार आत्मभान शिक्षणातून येतं आत्महत्या झालेला माणूस आपल्या शक्तीला ओळखतो आणि ही शक्ती ओळखणारा माणूस आत्मविश्वासाकडे झेपावू शकतो. शिक्षण हे माणसाला पशुपातळीवरून वर उचलत नव्हे ते देवत्वाकडे माणसाला घेऊन जात. शिक्षण माणसाला जीवनातील श्रेयस काय, आणि प्रेयस काय, श्रेष्ठ कोणतं हितकारक कोणतं मी अहितकारक कोणतं याची नकोप ओळख करून देत. त्यातूनच माणसाला शरीरसुख आणि आत्मिक आनंद यातला फरक ओळखता येतो. आचरणात आणता येतो ते आचरणात आणण्यासाठी मनोबल व निर्धार हे शिक्षण देत असतं. एवढेच नव्हे तर शिक्षणाने माणसाच्या मनातील विकृती, आसक्ती, हिंसकवृत्ती, मोह, विवशता यावर अंकुश ठेवता येतो. स्वार्थाचे सेवेत रूपांतर करणार आणि सदाचार सदभाव औदार्य नीतिमत्ता, क्षमता, सेवाभाव, माणुसकी या गुणांची, संस्कारांची पेरणी उत्तम दर्जाच्या शिक्षणातूनच होत असते. आपल्या पंचंद्रियना कार्यप्रवण करण, त्या कार्याला गती देणं, त्या गतीला उन्नतीकडे नेणं ,आणि त्या गतीला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देण, केवळ शिक्षणातूनच माणसाला लाभत असतं. लाभणार असतं जीवनाची जाणीव समंजस करण्यापासून तो सफल वा कृतार्थ जीवनाची जाणीव निर्माण करण्यापर्यंत साऱ्या दैवी बाबी या शिक्षणातून प्राप्त होत असतात. द्वेषांचं प्रेमात, आसक्तीच विरक्तीत, अंधाराच प्रकाशात संकटाचं संधीत आणि दानत्ववाच ,देवत्वात रूपांतर करण्याचं सामर्थ्य केवळ एका शिक्षणात असतं. त्यातूनच माणसाने माणसाशी माणुसकीने वागण्याची शिकवण आपणाला लाभत असते.

शिक्षणा विषयीची ही धारणा मात्र यशवंतराव चव्हाण यांच्या ठायी पुरेपूर नांदत होती. त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळलं होतं आणि त्याचबरोबर त्यातील अडचणी ही ज्ञात झाल्या होत्या. शिक्षणावरील त्यांची जी अनेक भाषणे त्यांच्या ग्रंथात आहेत, त्यातूनच हा विचार व्यक्त झाला आहे. शिवाय त्यांना स्वतःला अनंत अडचणीतून प्रतिकूल परिस्थितीतून झुंज देत शिकावं लागत होतं, त्या काळातील नऊ आणे फी (तीन महिन्याची) त्यांना वेळेवर भरता आली नव्हती. त्यामुळे त्यांची शाळा थांबणार होती. शिक्षणापासून त्यांना वंचित राहव लागलं असतं. देवदूता सारख्या एका

शिक्षकांनी धावत येऊन त्यांची फी भरली होती. हे भेदक वास्तव त्यांनी एका भाषणात ही सांगितलं होतं म्हणून शिक्षण हा समाजाचा प्राण आहे. प्रगतीच्या प्रकाश मार्गावरून नेणारा तो सूर्य आहे. त्याच्या किरणांना कवेत घेतल्याशिवाय आपलं मातीचा आयुष्य उजळून निघणार नाही, ही भावना त्यांनी व्यक्त केली होती. वडिलांचे अकाली झालेलं निधन बेलिफ म्हणून थोरल्या भावाच्या दोन आकड्यात (तोही विसाच्या आतला असणारा) पगार घरात दारिद्र्याची श्रीमंती, आईने केलेले ढोर कष्ट आणि अश्रूंची असणारी सोबत यातूनच त्यांनी आपलं शिक्षण मोठ्या जिद्दीने पूर्ण केलं होतं. ही अडथळ्याची शर्यत संकटाची मालिका नशिबी येऊ नये म्हणून त्यांनी शिक्षणाला अग्रक्रम दिलेला होता. त्यातून गरीब मुलांना फी माफीचा निर्णय घेतला. शाळा आणि विद्यालयाच्या निर्मितीला उत्तेजन दिलं इमारतीसाठी अनुदान दिलं. शिक्षण संस्थांना शिक्षण विस्तारासाठी प्रोत्साहन दिल. जेथे शक्य असेल तेथे तालुक्याला महाविद्यालयाची सोय झाली आहे. दक्षिण महाराष्ट्रातल्या काही तालुक्याची शहर अशी आहेत की त्या एका शहरात विविध प्रकारची आठ दहा महाविद्यालय उत्तम प्रकारे चालवली जातात. हा सारा शिक्षण प्रसार यशवंतरावानी स्वीकारलेल्या शैक्षणिक धोरणांचच फलित म्हणावं लागेल. आज पश्चिम महाराष्ट्रात एखाद्या विद्यार्थ्याला फार तर दोन किलोमीटर पेक्षा कमी अंतर असलेल्या शाळेत जाता येतं. तसं तर प्रत्येक गावाला आता एक विद्यालय झालेलं आहे, त्यामुळे आता विद्यार्थ्यांच्या दारात शिक्षण आलं आहे. त्याला शिक्षणासाठी दारोदार फिरावं लागत नाही. यशवंतरावांना सामाजिक समता, सामाजिक, न्याय, आर्थिक प्रगती, आणि निकोप दृढ लोकशाही यासाठी शिक्षण आवश्यक वाटत होतं. व्यक्ती आणि कुटुंबाच्या प्रगतीसाठी तर ते गरजेचं असतं यात शंका नाही. या शिक्षणाला त्यांनी संस्काराची, विज्ञानाची,श्रमाची, प्रयोग शीलतेची जोड दिली, आणि शैक्षणिक वातावरण निरामय आणि निष्कलंक कसं राहील यासाठी ही त्याने विशेष लक्ष घातलं होतं. माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या या शैक्षणिक धोरणामुळेच आज महाराष्ट्रातील शिक्षणाची नेत्र दीपक प्रगती झालेली आढळते.

दारिद्र्याने पिचून गेलेल्या खेड्यातील सामान्य माणसाला या विपन्नावस्थेतून वर काढण्यासाठी सहकारा शिवाय पर्याय नाही, याची पुरेपूर जाणीव यशवंतरावांना होती. शेतकऱ्यांच्या शेतीला थोडं फार पाणी मिळावं व त्यातून त्यांचं शेतीमालाचे उत्पादन वाढलं तरी त्यांच्या शेतमालाला योग्य दर मिळेल याची सुतराम खात्री नसते. व्यापारी, दलाल आणि सावकार यांच्या स्वार्थी आणि लबाड व्यवहारातून त्यांच्या हाती फारसं काही पडत नाही. हे लबाड लोक कष्टाविना लोणी खातात आणि कष्ट करणारा ताकाचे पाणी पीत असतो असा दर मिळाल्याने तो भरपूर राबला तरी आर्थिक दृष्ट्या हा शेतकरी सक्षम आणि सदन होत नाही. हे कटू सत्य यशवंतरावानी जाणलं होतं. प्रत्यक्ष अनुभवलं होतं त्यासाठी त्यांनी सहकाराचा मार्ग स्वीकारला. शेतमालासाठी खरेदी-विक्री केंद्राची स्थापना केली. थोर अर्थतज्ञ धनंजयराव गाडगीळ यांचं मार्गदर्शन आणि सहकार्य घेऊन १९५८ ते १९५९ साली पद्मश्री विखे पाटलांनी एक सहकारी साखर कारखाना सुरू केला होता व यशस्वी चालविला होता. या कारखान्याचे मालक भागधारक शेतकरी होते. ते सहकारातून कारखाना चालवत होते त्यातून मिळणारा फायदा सर्वांनाच प्राप्त होत होता. आणि शेतकऱ्याचे प्रतिनिधीच सर्व निर्णय घेत असत. या प्रयोगाला यशवंतरावानी उचलून धरलं आणि सहकार चळवळीचं साऱ्या महाराष्ट्रात जाळ निर्माण केलं. कृषी औद्योगिक कारखानदारी शिवाय शेतकरी सक्षम व सदन होणार नाही, यावर त्यांची पुरेपूर निष्ठा असल्याने आणि

त्याला त्याने अग्रक्रम दिल्याने महाराष्ट्राचा चेहरा मोराच पार बदलून गेला. या त्यांच्या धोरणामुळेच आज सहकारी साखर कारखाने, सहकार सूतगिरण्या, सहकारी बँका, सहकारी दुग्ध सोसायट्या, सहकारी खत कारखाने, सहकारी सिंचन योजना, सहकारी कुक्कुटपालन केंद्र, सहकारी कृषी गृहे, सहकारी आरोग्य केंद्र, सहकारी पणन संस्था, यांची रेलचेल पाहावयास मिळते. आज महाराष्ट्रात सहकारी तत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या साखर कारखान्याची संख्या सुमारे १९७ झाली आहे हे कारखाने आत्ता साखर निर्माण करीत नाहीत तर स्पिरिट, अल्कोहोल, इथेनॉल, वीज निर्मिती, गांडूळ खत, यासारखे उपपदार्थ निर्माण करून शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीत जास्त भाव देण्याचा प्रयत्न करीत आहे. याच्या जोडीलाच या कारखान्यानी इंग्रजी व मराठी माध्यमांच्या शाळा काढल्या महाविद्यालय स्थापन केली, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालय निर्माण केली शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात ऊस बेणे खत पुरविण्यात पुढाकार घेतला. काहींनी तर हॉस्पिटल काढून आरोग्य सेवा ही पुरवल्या त्यामुळे प्रत्येक साखर कारखाना म्हणजे त्या त्या परिसरातील समृद्धीचे एक हिरवेगार बेटच बनवून गेलं. दोन वेळच्या भाकरीला पोरका असलेला शेतकरी आता ट्रॅक्टर बाळगतो आहे चार चाकी गाडीतून हिंडतो आहे तीच यशोगाथा दुग्ध व्यवसाय आणि सहकारी सूतगिरणीची सांगता येईल. या सहकारी दुग्ध संस्था एकट्या मुंबई शहराला दररोज ९६ लाख लिटरपेक्षा अधिक दूध पुरवितात व त्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबाची संख्या काही लाखाच्या घरात गेलेली आहे. मला माहित असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील दोन सुतगिरण्या केंद्र सरकारला दर साल आपल्या फायद्यातून पाच कोटी पेक्षा अधिक असा कर देतात, आणि या सूतगिरण्या आणि साखर कारखाने सामुदायिक विवाह सोहळा, शेतकऱ्याचे मेळावे त्यांच्यासाठी आरोग्य शिबिर, मुलींची वस्तीग्रह, वनीकरण, मुलीची वाचनालय, महिला बचत गट, स्त्रियांना मार्गदर्शन, शेतकऱ्यांना विमा योजनेचा संरक्षण, शेतकऱ्यांसाठी मोफत माती परीक्षण, प्रयोगशाळा ठिबक सिंचन योजना अनुदान, असे कितीतरी सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवत आहेत. त्यातून एक प्रगतीच्या विचारांच वातावरण निर्माण झाल आहे, या मंडळीच्या जीवनाचा स्तर ही उंचावलेला आहे. हे सार सहकार चळवळीच्या उपक्रमातून घडलेल आहे. आता या सहकारात ही अनेक अनिष्ट नि;स्वार्थीपणा प्रवृत्ती शिरलेल्या असल्या तरी मूळ सहकार ही संकल्पना वाईट नाही. या सहकार चळवळीला अग्रक्रम दिल्यामुळे आता अनेक चांगल्या गोष्टी या मातीत रुजल्या आहेत, फोफावल्या आहेत यशवंतरावांनी प्रारंभ केलेल्या या सहकारी चळवळीने भारतासमोर एक आदर्श निर्माण केलेला आहे यात अतिश्योकती नाही.

कृषीप्रधान महाराष्ट्राचा सर्वांगीण अभ्युदय होण्यासाठी यशवंतरावानी ज्याला अग्रक्रम दिला तो घटक म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण हा आहे. या घटकाला अग्रक्रम दिल्याने खरोखर एक अभूतपूर्व क्रांती घडून आली. प्रशासनाचा एक ढाच्याच मुळापासून बदलला गेला. मंत्रालयातून घेतले जाणारे निर्णय आत्ता गाव पातळीवर आले. सचीवांनी प्रमाण मानलेल्या योजना आता उपयुक्त नसतील तरी अव्हेरल्या जाऊ लागल्या. योजनांचा अग्रक्रम बदलला सत्तेचा विकेंद्रीकरण झालं निर्णयाला सामुदाय रूप आल .आणि गरीब श्रीमंत, साक्षर निरीक्षण, स्त्री-पुरुष, जाती जमाती, मानक मजूर, यांचा सर्वांचा सहभाग कारभारामध्ये निर्माण झाला. ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून खेड्यातील कर्तबगार तरुण आपल्या भागाचा विकास करण्यासाठी सजग झाले. पुढे सरसावले कुठे बंधारा बांधायचा, कुठे गाव तळी खोदायाची पाणीपुरवठा योजना कोणत्या खेड्याला अग्रक्रमाने मंजूर करायची. आरोग्य केंद्राची निर्मिती कोठे करावी. आणि

कोणत्या रस्त्यांना अग्रक्रम द्यावयाचा असे सारे निर्णय या सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे गावकरी आणि जिल्हा परिषदेतील निवडणूक आलेले सदस्य घेऊ लागले. घेतलेले निर्णय त्वरेने अमलात आणण्यासाठी धावू लागले. त्यातून एक सामाजिक बांधिलकीचं भान आलं सार्वजनिक कार्याची प्रेरणा निर्माण झाली. सामूहिक नेतृत्व आपोआप तयार झालं. प्रशासनामध्ये सहभाग घेतल्याने या मंडळींमध्ये हाच विश्वास निर्माण झाला आणि शासन आणि रयत यांच्या मधला एक सशक्त दुवा म्हणून या मंडळींचा उपयोग होऊ लागला. आपण जर आपल्या परिसरामध्ये सुधारणा केल्या नाहीत म्हणजे शासकीय योजना तर पुढील निवडणुकीत लोक आपल्याला मदत करणार नाही अशा विचारामुळे प्रत्येक सदस्य सक्रिय झाला उदासीनता कमी झाली म्हणून आज काल जिल्हा परिषदेला मिनी विधानसभा असं संबोधले जात. त्यातील प्रशासनास ,मिनी मंत्रालय, असे जे संबोधलं जातं ते जास्तच आहे.

असं संबोधन्याचं आणखी एक सशक्त कारण असं की प्रशासनाचा आणि राजकारणाचा अनुभव असणारी हीच मंडळी पुढे राज पातळीवरील नेते बनलेले असतात. विधानसभा आणि विधान परिषदेत लोकप्रतिनिधी म्हणून राजकारभारात सहभागी झालेल्या असतात. मंत्रिमंडळामध्येही त्यांचा समावेश झालेला असतो. स्वतःच्या गावाचा सरपंच असणारा नेता या सत्तेच्या विकेंद्रीमुळे राज्याचा मुख्यमंत्री होऊ शकतो. उपमुख्यमंत्री होऊ शकतो हे दृश्य यशवंतरावानी घेतलेल्या या निर्णयाची पावती म्हणावी लागेल. त्यातूनच घडलेली आणखी एक गोष्ट अशी की विशिष्ट राजकीय चौकटीमुळे कर्तुत्वाला वाव नसलेली संधी नसलेली आणि पारंपारिक नजरेतून पाहिल्यामुळे उपेक्षित राहिलेली अशी ग्रामीण भागातील कमालीची कर्तबगार आणि गुणसंपन्न तरुण पिढी या राज्याचा कारभार करण्यासाठी पुढे येऊ शकली. देशाचा कारभार करू लागली. यशवंतराव चव्हाण यांच्या विकेंद्रीकरणामुळेच महाराष्ट्राला अनेक चांगली नेते मंडळी लाभलेली आहेत. विनायकराव पाटील, मधुकरराव चौधरी शामराव कदम श्री गणपतराव देशमुख, नामदेवराव जगताप, शरदचंद्र पवार, यशवंतराव गडाख ,आबासाहेब घोरपडे, प्रतापराव भोसले, अशी कितीतरी कर्तबगार नेत्यांची नावे सांगता येतील. या मंडळींना या सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळेच आपल्या कर्तुत्वाला आकार देत आला. समाज आणि देशाला काही योगदान देता आलं. आज घडीला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आणि तळागाळातून आणि साऱ्या जाती जमातीतून जिल्हा परिषदेच्या पातळीवर जी नेतृत्व उदयाला आलं आहे येत आहे. त्यामागे यशवंतराव यांनी पन्नास वर्षांपूर्वी घेतलेला हा निर्णय होता. हे आपणाला विसरता येणार नाही. सामान्य स्तरातून आलेले नेतृत्व अधिक संवेदनेने सामान्यता दुःखाला सामोरे जात असे म्हटले जाते. ते कदाचित या जाणवत ही असेल असं वाटतं.

माननीय यशवंतराव चव्हाण यांचे जीवन आणि व्यक्तिमत्व कमालीचा समृद्ध आहे. ते तितकच बहुआयामी आहे. समाजाच्या सर्वांगीण अभ्युदयासाठी आणि तत्त्वनिष्ठ राजकारणासाठी त्यांनी इतरही अनेक चांगल्या बाबी केल्या आहेत. त्याबरोबरच निष्कलंक चारित्र्यपूर्व साहित्य व कला प्रेम गुणग्राहकता व्यापक व सर्व समावेश भूमिका दंड दमण दर्पण व दरारा यांचा असणारा अभाव निकोप रसिकता, सत्तेचा सेवेसाठी वापर करण्याची भूमिका स्वार्थी राजकारणाचा तितकारा नवोदताना आधार देण्याची भावना आणि सदैव देश समाज यांच्या सुखासाठी केला जाणार हा निर्णय आणि सामान्य माणसाचं सातत्याने होणारे स्मरण अशा अनेक पैलूंनी याचं व्यक्तिमत्व कमालीचं समृद्ध झाल आहे. आणि तितकंच अनुकरणीय बनलं आहे. लेखक म्हणून असणारी त्यांची थोरवी हा सुद्धा एका स्वातंत्र

लेखाचा विषय ठरवा एवढी मोठी आहे. या साऱ्यांचा परामर्श एका लेखात घेणं शक्य नाही. त्यांनी पाच गोष्टी केलेलं क्रांतिकारी परिवर्तन व त्यातून झालेला महाराष्ट्राचा विकास या एकाच विषयांचा येथे विस्तृत परिचय करून दिलेला आहे.हा परिचय त्यांच्या अन्य गुणांच्या परिचयासाठी उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

संदर्भसूची:

१) यशवंतराव चव्हाण कृष्णाकाठ प्रेस्टीज प्रकाशन, पुणे १९८७

२) यशवंतराव चव्हाण युगांतर कॉन्टिनेन्ट प्रकाशन, पुणे१९७०

३) विठ्ठलराव पाटील महाराष्ट्र शिल्पकार यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 2002

४) प्रधान, राम वादळ माथा मेहता, पब्लिशिंग हाऊस पुणे १९९५

५) राजकारणाने हरवलेला साहित्यिक यशवंतराव चव्हाण यांचे समग्र साहित्य.

६) इंटरनेटवर (ybchavan.m/ ybI index-php?21/02/2016

७) वाघ, रामथान, शितोळे, खासेराव जोशी, रामभाऊ, प्रवर्तक यशवंतराव चव्हाण व्यासपीठ अहमदनगर 2018

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकार चळवळीची ऐतिहासिक भूमिका: एक चिकित्सक अभ्यास

प्रा. श्रीमती तेजश्री तानाजी सरकाळे

सहाय्यक प्राध्यापक,

इतिहास विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

Corresponding Author - प्रा. श्रीमती तेजश्री तानाजी सरकाळे

DOI - 10.5281/zenodo.19664771

सारांश:

महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचा इतिहास हा खऱ्या अर्थाने सहकार चळवळीचा इतिहास आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकार चळवळीने बजावलेल्या बहुआयामी भूमिकेचे चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात शेतकरी सावकारी पाशात अडकला होता, त्या ऐतिहासिक पार्श्वभूमीपासून या अभ्यासाची सुरुवात होते. १९०४ चा पहिला सहकारी कायदा आणि त्यानंतर १९४८-५० च्या दरम्यान प्रवरानगर येथे पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी उभारलेला आशियातील पहिला सहकारी साखर कारखाना हा या चळवळीचा टर्निंग पॉइंट (Turning Point) ठरला.

या शोधनिबंधात सहकार चळवळीचे वर्गीकरण तीन मुख्य टप्प्यांत केले आहे: १. कृषी क्षेत्रातील क्रांती (साखर आणि दूध), २. वित्तीय समावेशकता (सहकारी बँकिंग) आणि ३. सामाजिक-शैक्षणिक विकास. सहकारामुळे ग्रामीण भागात केवळ आर्थिक सुबत्ता आली नाही, तर त्यातून लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया कशी गतिमान झाली, याचाही आढावा येथे घेतला आहे. तसेच, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील आणि धनंजयराव गाडगीळ यांच्या वैचारिक योगदानाची चर्चा करण्यात आली आहे.

संशोधनाअंती असे दिसून येते की, सहकार चळवळीने महाराष्ट्राला एक 'प्रगत राज्य' म्हणून ओळख मिळवून दिली असली, तरी सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात या चळवळीसमोर व्यावसायिक व्यवस्थापन, पारदर्शकता आणि राजकीय हस्तक्षेप यांसारखी गंभीर आव्हाने उभी आहेत. हा निबंध ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे सहकाराचे महत्त्व अधोरेखित करतो.

कळीचे शब्द: सहकार चळवळ, लोणी पॅटर्न, धवल क्रांती, विनाअनुदानित शिक्षण, ग्रामीण अर्थव्यवस्था, यशवंतराव चव्हाण, सामाजिक सक्षमीकरण.

प्रस्तावना :

"सहकार" हा केवळ एक शब्द नसून तो महाराष्ट्राच्या प्रगतीचा मूलमंत्र आहे. महाराष्ट्राच्या भौगोलिक सीमारेषेच्या आत जे काही आधुनिक परिवर्तन घडले, त्यामागे सहकार चळवळीची प्रेरणा उभी आहे. मानवी संस्कृतीच्या इतिहासात समूहाने राहणे आणि एकमेकांना मदत करणे ही प्रवृत्ती आदिम काळापासून आहे, परंतु या प्रवृत्तीला कायदेशीर आणि संस्थात्मक रूप देण्याचे काम महाराष्ट्राने यशस्वीरीत्या केले. "विना सहकार नाही उद्धार" हे केवळ ब्रीदवाक्य न राहता ती एक जगण्याची पद्धत बनली आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी:

महाराष्ट्रातील सहकाराचा इतिहास हा संघर्षातून जन्मलेला इतिहास आहे. १८७५ च्या सुमारास पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यात झालेले 'दख्खनचे दंगे' हे सावकारी शोषणाविरुद्धचे पहिले मोठे बंड होते. ब्रिटीश सरकारने यावर उपाय म्हणून 'डेक्कन रायट्स कमिशन' नेमले आणि त्यातूनच शेतकऱ्यांना स्वस्त दरात कर्ज उपलब्ध करून देण्याची गरज भासू लागली. १९०४ मध्ये भारतात पहिला सहकारी कायदा संमत झाला, ज्याने पतपेढ्यांना कायदेशीर आधार दिला. मात्र, खऱ्या अर्थाने सहकाराची चळवळ लोकांच्या मनात रुजली ती विसाव्या शतकाच्या मध्यात.

सहकार आणि समाजवादाची सांगड:

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी राज्याची धुरा सांभाळली, तेव्हा त्यांच्यासमोर ग्रामीण गरिबीचे मोठे आव्हान होते. त्यांनी 'सहकारातून समाजवाद' ही संकल्पना मांडली. त्यांच्या मते, भांडवलशाहीत मोजक्या लोकांच्या हातात सत्ता असते, तर साम्यवादात राज्याची सत्ता प्रबळ असते; परंतु सहकार हा असा 'मध्यम मार्ग' आहे जिथे सामान्य माणूस एकत्र येऊन स्वतःच्या विकासाचा धनी होतो. या विचारातूनच महाराष्ट्रात "सहकारी साखर कारखानदारी" ही संकल्पना उभी राहिली.

सहकाराची व्याप्ती:

सहकार ही चळवळ केवळ शेतीपुरती मर्यादित राहिली नाही. ती खेड्यापाड्यांतील घराघरांत पोहोचली. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी 'सूत गिरण्या', दूध उत्पादकांसाठी 'दूध संघ', मध्यमवर्गीयांच्या हक्काच्या घरांसाठी 'गृहनिर्माण संस्था' आणि कष्टकऱ्यांच्या बचतीसाठी 'पतसंस्था' अशा विविध रूपांत सहकार विस्तारला. सहकारामुळे ग्रामीण भागातील नेतृत्वाची एक नवी पिढी तयार झाली, ज्यांनी राज्याच्या राजकारणाला आणि समाजकारणाला दिशा दिली. प्रस्तुत शोधनिबंध महाराष्ट्राच्या जडणघडणीत या चळवळीने दिलेले योगदान आणि भविष्यातील तिची गरज यावर प्रकाश टाकण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या ऐतिहासिक मुळांचा शोध घेणे.
२. ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकारी साखर कारखाने आणि दूध संघांच्या योगदानाचे मूल्यमापन करणे.
३. सहकार क्षेत्रामुळे महाराष्ट्रात झालेल्या शैक्षणिक आणि सामाजिक बदलांचा अभ्यास करणे.
४. सहकार क्षेत्रातील थोर व्यक्तींच्या योगदानाचे विश्लेषण करणे.
५. सहकारापुढील आधुनिक आव्हाने आणि भविष्यातील दिशा स्पष्ट करणे.

विषय विवेचन :

१. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील आणि 'लोणी पॅटर्न':

महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचा इतिहास विठ्ठलराव विखे पाटील यांच्या नावाशिवाय अपूर्ण आहे. त्यांनी केवळ एक साखर कारखाना काढला नाही, तर ग्रामीण विकासाचे एक शाश्वत मॉडेल जगासमोर ठेवले, ज्याला आज 'लोणी पॅटर्न' म्हणून ओळखले जाते.

संघर्षातून उभारणी: १९३०-४० च्या दशकात नगर जिल्ह्यातील प्रवरा परिसर अत्यंत दुष्काळी होता. शेतकरी सावकारांच्या तावडीत सापडला होता. विखे पाटलांनी ओळखले की, जोपर्यंत शेतकरी स्वतःच्या मालावर स्वतः प्रक्रिया करत नाही, तोपर्यंत त्याचे शोषण थांबणार नाही.

'शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी चालवलेला उद्योग' ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्ष उतरवली.

पाण्याचे नियोजन आणि शेती सुधारणा: विखे पाटलांनी सहकाराच्या माध्यमातून उपसा जलसिंचन योजना राबवल्या. कारखान्याच्या उत्पन्नातून कालव्यांची दुरुस्ती आणि पाणी वाटपाचे नियोजन केले. यामुळे ऊस शेतीसोबतच फळबाग लागवडीलाही चालना मिळाली.

शैक्षणिक आणि आरोग्य क्रांती: 'प्रवरा मेडिकल ट्रस्ट' आणि 'प्रवरा एज्युकेशन सोसायटी' द्वारे त्यांनी ग्रामीण भागातील मुलांसाठी वैद्यकीय आणि तांत्रिक शिक्षणाची दारे उघडली. आज लोणी हे एक जागतिक दर्जाचे शैक्षणिक केंद्र बनले आहे.

२. वसंतदादा पाटील: सहकारातून तांत्रिक शिक्षणाची दारे:

महाराष्ट्राचे 'सहकार महर्षी' वसंतदादा पाटील यांनी सहकाराला ग्रामीण तरुण सक्षमीकरणाचे साधन बनवले.

विनाअनुदानित शिक्षण धोरण: १९८० च्या दशकात दादांनी 'विनाअनुदानित तत्त्वावर अभियांत्रिकी महाविद्यालये' सुरू करण्याची परवानगी दिली. या निर्णयामुळे आज महाराष्ट्रात इंजिनिअर्सची मोठी फळी निर्माण झाली, ज्याचा फायदा राज्याच्या औद्योगिकीकरणाला झाला.

नेतृत्वाची जडणघडण: त्यांनी सहकार चळवळीतून सामान्य कार्यकर्त्यांना व्यवस्थापनाचे धडे दिले, ज्यामुळे ग्रामीण भागातून सक्षम नेतृत्व उभे राहिले.

३. महिला सक्षमीकरण: 'लिज्जत' आणि महिला बँका:

सहकारामुळे महाराष्ट्रातील महिलांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल झाला.

लिज्जत पापड: १९५९ मध्ये सुरू झालेल्या या सहकारी संस्थेने हजारो महिलांना 'सह-मालक' बनवले आणि आर्थिक स्वातंत्र्य दिले.

दुध व्यवसाय: वारणा, गोकुळ यांसारख्या दूध संघांमुळे ग्रामीण महिलांच्या हातात दर १० दिवसाला हक्काचा पैसा येऊ लागला, ज्यामुळे कुटुंबातील त्यांचा निर्णय घेण्याचा दर्जा उंचावला.

४. सहकारी बँकिंग आणि पतपुरवठा:

महाराष्ट्राच्या यशात त्रिस्तरीय बँकिंग रचनेचा (राज्य बँक, जिल्हा बँक, पतसंस्था) मोठा वाटा आहे. यामुळे सावकारी प्रथा मोडीत निघाली आणि शेतकऱ्याला हक्काचे भांडवल मिळाले.

सांख्यिकीय माहिती:

तक्ता १: महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राची व्याप्ती (२०२४ ची स्थिती)

अ.क्र.	संस्थेचा प्रकार	संस्थांची संख्या (अंदाजे)	मुख्य योगदान
१	सहकारी साखर कारखाने	२०५+	ग्रामीण औद्योगिकीकरण
२	नागरी सहकारी बँका	४८०+	मध्यमवर्गीय बँकिंग
३	प्राथमिक कृषी पतसंस्था	२१,०००+	पीक कर्ज वाटप
४	दुग्ध सहकारी संस्था	१३,०००+	धवल क्रांती (दूध)
५	गृहनिर्माण संस्था	१,१०,०००+	शहरी निवास व्यवस्था

प्रस्तुत सांख्यिकीय माहितीवरून असे स्पष्ट होते की, महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक संरचनेत सहकार चळवळीने अत्यंत व्यापक आणि खोलवर जाळे निर्माण केले आहे. तक्त्यानुसार, २१,००० पेक्षा जास्त प्राथमिक कृषी पतसंस्था (PACs) या चळवळीचा पाया असून त्या थेट गावपातळीवरील शेतकऱ्यांना पीक कर्ज आणि वित्तीय आधार देण्याचे कार्य करत आहेत. २०५ पेक्षा जास्त सहकारी साखर कारखाने केवळ साखर उत्पादनाचे केंद्र नसून ते ग्रामीण औद्योगिकीकरणाचे मुख्य स्रोत ठरले आहेत, ज्यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेत दरवर्षी हजारो कोटींची उलाढाल होते.

दुसरीकडे, नागरी भागातही १,१०,००० हून अधिक गृहनिर्माण सहकारी संस्था आणि ४८० पेक्षा जास्त नागरी सहकारी बँकांनी मध्यमवर्गीय व अल्प उत्पन्न गटातील लोकांसाठी निवास आणि बँकिंग सुविधा सुलभ केल्या आहेत. १३,००० दुग्ध सहकारी संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्राने 'धवल क्रांती' यशस्वी केली असून, यामुळे ग्रामीण भागातील महिलांना शाश्वत रोजगार आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळाले आहे. एकंदरीत, हा डेटा हेच सिद्ध करतो की, महाराष्ट्रातील सहकार चळवळ ही केवळ शेतीपुरती मर्यादित नसून ती बँकिंग, गृहनिर्माण आणि दूध उत्पादनासारख्या सर्वच क्षेत्रांत पसरलेली एक सर्वसमावेशक व्यवस्था आहे. या संस्थांची ही प्रचंड संख्या महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर असणारा सहकाराचा प्रभाव अधोरेखित करते.

निष्कर्ष:

महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकार चळवळीच्या ऐतिहासिक भूमिकेचा अभ्यास केल्यानंतर असे स्पष्ट होते की, ही चळवळ केवळ एक आर्थिक उपक्रम नसून ते महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाचे सर्वात मोठे इंजिन आहे. या संशोधनातून खालील महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढता येतात:

ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सबलीकरण: सहकार चळवळीने ग्रामीण भागातील शेतकऱ्याला सावकारी शोषणातून मुक्त करून त्याला 'उद्योजक' बनवले. विठ्ठलराव विखे पाटील यांनी सुरू केलेल्या 'प्रवरा मॉडेल'मुळे शेतीला उद्योगाचा दर्जा मिळाला. साखर कारखाने आणि दूध संघांमुळे ग्रामीण भागात भांडवलाची निर्मिती झाली, ज्याने शहरांकडे होणारे स्थलांतर रोखण्यास मदत केली.

लोकशाहीचे विकेंद्रीकरण आणि नेतृत्व निर्मिती: सहकार चळवळ ही लोकशाहीची खरी प्रयोगशाळा ठरली आहे. गावपातळीवरील पतसंस्थेपासून ते राज्य स्तरावरील साखर संघापर्यंतच्या निवडणुकांनी ग्रामीण जनतेला मतदानाचे महत्त्व आणि सत्तेचे विकेंद्रीकरण शिकवले. यातूनच यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील आणि शरद पवार यांसारखे जमिनीशी जोडलेले नेतृत्व राज्याला लाभले.

सामाजिक आणि शैक्षणिक समतोल: सहकाराने केवळ पैसा दिला नाही, तर तो पैसा समाजाच्या कल्याणासाठी कसा वापरावा याचा आदर्श घालून दिला. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्था, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालये हे सहकारी संस्थांच्या आर्थिक पाठबळाचे फलित आहे. यामुळे शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचली आणि सामाजिक विषमता कमी होण्यास मदत झाली.

महिला सक्षमीकरणाचा आधार: दुग्ध सहकार आणि 'लिज्जत' सारख्या संस्थांमुळे महिलांचा आर्थिक स्तर उंचावला. घरगुती निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढणे, हा सहकार चळवळीचा एक मूक पण अत्यंत प्रभावी

परिणाम आहे. महिला सहकारी बँकांनी महिलांच्या बचतीला कायदेशीर आणि सुरक्षित स्वरूप दिले.

आधुनिक आव्हाने आणि भविष्याची गरज: निष्कर्षाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सध्या या चळवळीला लागलेली 'राजकीय उतरती कळा'. वाढता भ्रष्टाचार, व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव आणि खाजगी क्षेत्राकडून मिळणारे तगडे आव्हान यामुळे अनेक सहकारी संस्था डबघाईला आल्या आहेत. मात्र, केंद्र सरकारने स्थापन केलेले स्वतंत्र 'सहकार मंत्रालय' आणि 'सहकारातून समृद्धी' ही संकल्पना पाहता, या चळवळीचे महत्त्व आजही अबाधित आहे.

अंतिम मत:

थोडक्यात सांगायचे तर, महाराष्ट्र हे सहकाराचे माहेरघर आहे आणि राज्याचा सर्वांगीण विकास हा सहकाराच्या पायावरच उभा आहे. जर या चळवळीत पारदर्शकता, आधुनिक तंत्रज्ञान (Digitization) आणि व्यावसायिकता (Professionalism) आणली, तर २१ व्या शतकातील भारताच्या आर्थिक महासत्ता होण्याच्या स्वप्नात महाराष्ट्राचा सहकार हा सर्वात मोठा वाटा उचलणारा घटक ठरेल. 'विना सहकार नाही उद्धार' हा मंत्र आजही महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी तितकाच शाश्वत आणि अनिवार्य आहे.

संदर्भ ग्रंथ सूची:

1. चव्हाण, य. ब. (१९७३). सह्याद्रीचे वारे. मुंबई: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
2. बाविस्कर, ब. स. (१९८२). महाराष्ट्रातील साखर कारखानदारी: एक राजकीय अभ्यास. पुणे: सुगावा प्रकाशन.
3. विखे पाटील, विठ्ठलराव. (२००५). माझी जीवनगाथा. प्रवरानगर: विखे पाटील फाउंडेशन.
4. पाटील, जे. एफ. (२०१५). महाराष्ट्रातील सहकार चळवळ. कोल्हापूर: फडके प्रकाशन.
5. Baviskar, B. S. (1980). The Politics of Development: Sugar Co-operatives in Rural Maharashtra. Oxford University Press.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महाराष्ट्राच्या जडण-घडणीत सहकार चळवळीची ऐतिहासिक भूमिका

प्रा. अमित अरुण कदम

सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग

काकासाहेब चव्हाण कॉलेज, तळमावले

***Corresponding Author -* प्रा. अमित अरुण कदम**

DOI - 10.5281/zenodo.19664820

सारांश :

महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जडण-घडणीत सहकार चळवळीने अत्यंत महत्त्वपूर्ण व परिवर्तनकारी भूमिका बजावली आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशकालीन ग्रामीण दारिद्र्य, सावकारशाही आणि शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाच्या पार्श्वभूमीवर सहकार तत्त्वज्ञानाचा उदय झाला. १९०४ च्या सहकारी पतसंस्था कायद्यामुळे ग्रामीण भागात पतपुरवठ्याची संघटित व्यवस्था निर्माण झाली. स्वातंत्र्योत्तर काळात नियोजनाधिष्ठित विकास धोरणात सहकाराला विशेष स्थान मिळाले आणि १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर या चळवळीचा व्यापक विस्तार झाला. साखर सहकारी कारखाने, दुग्धसंघ, सहकारी बँका, पतसंस्था आणि कृषी प्रक्रिया उद्योग यांच्या माध्यमातून ग्रामीण औद्योगिकीकरणास चालना मिळाली. विशेषतः प्रवरा सहकारी साखर कारखाना या मॉडेलने शेतकरी-आधारित उद्योगव्यवस्थेचे यशस्वी उदाहरण निर्माण केले. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहकाराला धोरणात्मक आणि प्रशासकीय पाठबळ मिळाले, ज्यामुळे सहकार क्षेत्र राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा बनले.

या संशोधनात ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतींचा अवलंब करून सहकार चळवळीचा विकासक्रम, तिचे आर्थिक योगदान, सामाजिक परिणाम आणि राजकीय प्रभाव यांचे सखोल परीक्षण करण्यात आले आहे. सहकार चळवळीमुळे ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, शिक्षणविस्तार, महिलांचे सक्षमीकरण आणि स्थानिक नेतृत्वनिर्मिती साध्य झाली. तथापि, राजकीय हस्तक्षेप, आर्थिक गैरव्यवस्थापन आणि वाढती खासगी स्पर्धा ही समकालीन आव्हाने अधोरेखित झाली आहेत.

एकूणच, सहकार चळवळ ही महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची प्रमुख शक्ती ठरली असून, पारदर्शक प्रशासन आणि आधुनिक व्यवस्थापन तत्त्वांचा अवलंब केल्यास ती भविष्यातही राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते.

मुख्य शब्द: सहकार चळवळ, महाराष्ट्र, ग्रामीण विकास, सहकारी संस्था, सामाजिक परिवर्तन.

प्रस्तावना :

सहकार म्हणजे समान उद्दिष्टांसाठी व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्र येऊन लोकशाही तत्त्वांवर आधारित संस्था उभारणे. "एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक" हे सहकाराचे तत्त्व महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनात दृढ झाले.

महाराष्ट्रातील सहकार चळवळ ही केवळ आर्थिक उपक्रम नसून सामाजिक परिवर्तनाची व्यापक चळवळ आहे. ग्रामीण विकास, शेतकरी सक्षमीकरण आणि स्थानिक नेतृत्वनिर्मिती या सर्व प्रक्रियांमध्ये सहकाराने मध्यवर्ती भूमिका बजावली.

महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जडण-घडणीत सहकार चळवळीने अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सहकार ही संकल्पना स्वेच्छा सदस्यत्व, लोकशाही व्यवस्थापन, परस्पर साहाय्य आणि समान लाभवाटप या तत्त्वांवर आधारित आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशकालीन काळात ग्रामीण भागातील दारिद्र्य, सावकारशाही आणि शेतकऱ्यांचे वाढते कर्जबाजारीपण या गंभीर समस्यांनी समाजव्यवस्था अस्थिर केली होती. या परिस्थितीत शेतकरी व सामान्य जनतेला आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी सहकार चळवळीचा उदय झाला.

१९०४ च्या सहकारी पतसंस्था कायद्यामुळे या चळवळीला कायदेशीर अधिष्ठान मिळाले. स्वातंत्र्यानंतर नियोजनाधिष्ठित विकास धोरणांतर्गत सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देण्यात आले. विशेषतः १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर सहकार चळवळीचा झपाट्याने विस्तार झाला. साखर सहकारी कारखाने, दुग्धसंघ, पतसंस्था, सहकारी बँका आणि कृषी प्रक्रिया उद्योग यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना दिली.

प्रवरा सहकारी साखर कारखाना यांसारख्या उपक्रमांनी सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण औद्योगिकीकरण शक्य असल्याचे सिद्ध केले, तर यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वामुळे सहकाराला धोरणात्मक व प्रशासकीय पाठबळ मिळाले. परिणामी सहकार चळवळ ही केवळ आर्थिक उपक्रम न राहता सामाजिक परिवर्तनाची व्यापक चळवळ बनली.

महाराष्ट्रातील सहकार चळवळीने ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, शिक्षणविस्तार, महिलांचे सक्षमीकरण आणि स्थानिक नेतृत्वनिर्मिती यांसारखे बहुआयामी परिणाम घडवले. त्यामुळे महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत सहकार चळवळीचे स्थान अत्यंत केंद्रस्थानी मानले जाते.

संशोधन पद्धती :

या संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

1. महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा ऐतिहासिक विकास अभ्यासणे.
2. सहकाराच्या आर्थिक योगदानाचे आकडेवारीसह विश्लेषण करणे.
3. सामाजिक व राजकीय परिणामांचा अभ्यास करणे.
4. सहकार क्षेत्रासमोरील आव्हानांचे परीक्षण करणे.
5. भविष्यासाठी धोरणात्मक सूचना देणे.

सहकार चळवळीचा ऐतिहासिक विकास :

(अ) प्रारंभीचा टप्पा (१९०४–१९४७):

महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या प्रारंभीच्या टप्प्यात (१९०४–१९४७) सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सहकारी पतसंस्थांना मिळालेले कायदेशीर अधिष्ठान आणि त्यातून ग्रामीण कर्जव्यवस्थेत झालेला बदल. १९०४ साली ब्रिटिश सरकारने जाहीर केलेल्या *Co-operative Credit Societies Act* मुळे ग्रामीण भागात सहकारी पतसंस्था स्थापन करण्यास कायदेशीर मान्यता मिळाली. या कायद्याचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना सावकारांच्या जाचातून मुक्त करणे हा होता. त्या काळात महाराष्ट्रातील बहुतांश जनता शेतीवर अवलंबून होती; मात्र दुष्काळ, अनियमित पाऊस, कमी उत्पादकता आणि बाजारभावातील चढउतार यामुळे शेतकरी सतत कर्जबाजारी राहत. सावकारांकडून २५

ते ५० टक्क्यांपर्यंत व्याजदर आकारले जात, ज्यामुळे शेतकऱ्यांची जमीनही जप्त होण्याच्या घटना घडत[१].

या परिस्थितीत सहकारी पतसंस्थांनी सदस्यांकडून शेअर्सच्या माध्यमातून भांडवल उभारले आणि कमी व्याजदराने कर्जपुरवठा सुरू केला. परस्पर जबाबदारी (Mutual Liability) या तत्त्वावर आधारित असल्यामुळे कर्जफेडीची शिस्त निर्माण झाली. १९१२ च्या सुधारित कायद्यामुळे पतसंस्थांव्यतिरिक्त उत्पादन व खरेदी-विक्री संस्थांनाही परवानगी मिळाली, ज्यामुळे सहकाराची व्याप्ती वाढली.

१९३० पर्यंत महाराष्ट्रात हजारो प्राथमिक पतसंस्था स्थापन झाल्या आणि लाखो शेतकरी त्यांचे सदस्य झाले. जरी निरक्षरता, आर्थिक मर्यादा आणि व्यवस्थापनातील अनुभवाचा अभाव ही आव्हाने होती, तरी या टप्प्यात ग्रामीण भागात संघटनशीलता, लोकशाही व्यवस्थापन आणि सामूहिक उत्तरदायित्वाची भावना दृढ झाली. पुढील स्वातंत्र्योत्तर काळातील व्यापक सहकार विस्तारासाठी हा कालखंड पायाभूत ठरला[२].

(ब) स्वातंत्र्योत्तर विस्तार (१९४७–१९६०):

१९४७ नंतर भारताने नियोजनाधिष्ठित आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारला आणि ग्रामीण विकासासाठी सहकाराला केंद्रस्थानी स्थान दिले. पहिल्या (१९५१–५६) आणि दुसऱ्या (१९५६–६१) पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी उत्पादनवाढ, सिंचन, खते-बियाणे वितरण आणि ग्रामीण पतपुरवठा यांसाठी सहकारी संस्थांना प्राधान्य देण्यात आले. १९५४ च्या अखिल भारतीय ग्रामीण पतसर्वेक्षण अहवालाने सहकाराशिवाय ग्रामीण कर्जव्यवस्था सक्षम होऊ शकत नाही, असे स्पष्ट केले आणि "State partnership in co-operatives" ही संकल्पना मांडली. Reserve Bank of India यांच्या पुढाकाराने सादर झालेल्या या अहवालानंतर शासनाचा आर्थिक व प्रशासकीय सहभाग वाढला—शेअर कॅपिटलमध्ये भागीदारी, पुनर्वित्त, देखरेख आणि प्रशिक्षण व्यवस्था यांमुळे सहकारी संस्थांची विश्वासार्हता व कार्यक्षमता सुधारली[३-४].

या काळात प्राथमिक पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि राज्य सहकारी बँक यांची त्रिस्तरीय रचना मजबूत झाली. कृषी कर्जपुरवठा वाढला, खरेदी-विक्री संस्थांमुळे शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध झाली आणि इनपुट्सचे (खते, बियाणे) संघटित वितरण शक्य झाले. याच दशकात साखर सहकाराची पायाभरणी झाली; प्रवरा सहकारी साखर कारखाना (१९५०) या प्रयोगाने शेतकरी-आधारित उद्योगमॉडेल यशस्वी ठरू शकते हे दाखवून दिले. परिणामी १९४७–१९६० हा कालखंड सहकाराच्या संस्थात्मक बळकटीकरणाचा आणि पुढील सुवर्णकाळासाठी भक्कम पाया घालणारा निर्णायक टप्पा ठरला[५].

(क) राज्य स्थापनेनंतरचा सुवर्णकाळ (१९६०–१९९०):

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर सहकार चळवळीचा झपाट्याने आणि सर्वसमावेशक विस्तार झाला. या कालखंडात साखर सहकारी कारखाने हे ग्रामीण औद्योगिकीकरणाचे प्रमुख इंजिन ठरले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी भागभांडवल उभारून कारखाने स्थापन केले; उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन यांची साखळी शेतकरी-नियंत्रित व्यवस्थेत आणली. १९६० च्या सुमारास राज्यात मोजकेच साखर कारखाने कार्यरत होते; १९९० पर्यंत सहकारी साखर कारखान्यांची संख्या शंभराच्या पुढे गेली. या विस्तारामुळे लाखो शेतकऱ्यांना हमीभाव, वेळेवर देयके आणि पूरक रोजगार उपलब्ध झाला[६].

या सुवर्णकाळात सहकारी बँकिंगची त्रिस्तरीय रचना (राज्य सहकारी बँक–जिल्हा मध्यवर्ती बँका–प्राथमिक पतसंस्था) अधिक सक्षम झाली. कृषी कर्ज, खते-

बियाणे पुरवठा, सिंचन प्रकल्प आणि शेतीमाल खरेदी-विक्री या सर्व क्षेत्रांत सहकाराचा प्रभाव वाढला. दुग्धसंघ, सूतगिरण्या आणि कृषी प्रक्रिया उद्योगांनी मूल्यवर्धनाची संधी निर्माण केली.

धोरणात्मक पातळीवर यशवंतराव चव्हाण आणि पुढील नेतृत्वाने सहकाराला ग्रामीण विकासाचे केंद्र मानले. सहकारी संस्थांच्या निवडणुकांमुळे ग्रामीण नेतृत्वाची नवी पिढी घडली; शिक्षणसंस्था, महाविद्यालये, रुग्णालये आणि पायाभूत सुविधा (रस्ते, वीज) उभारण्यात सहकाराचा मोठा वाटा राहिला.

संवर्धन म्हणजे एखादी गोष्ट अधिक चांगली किंवा अधिक प्रभावी बनवण्याची प्रक्रिया. हे वातावरण, संस्कृती, ज्ञान, किंवा कौशल्य यांनाही लागू होऊ शकते. किल्ल्यांचे संवर्धन म्हणजे ऐतिहासिक किल्ल्यांचे रक्षण, जतन करण्याची प्रक्रिया. यामध्ये किल्ल्यांचे जतन करणे, त्यांचे अधिक नुकसान होऊ नये म्हणून उपाययोजना करणे आणि त्यांचे ऐतिहासिक महत्व टिकून राहावे यासाठी विशेष प्रयत्न करणे यामध्ये समाविष्ट आहे.

महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचे नियंत्रण हे तीन संस्थांकडून केले जाते. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महसूल आणि वन विभाग महाराष्ट्र शासन. राष्ट्रीय स्तरावर केंद्र संरक्षित किल्ले, राज्य संरक्षित किल्ले आणि या व्यतिरिक्त उर्वरित किल्ले महसूल व वन विभागाकडे असे वाटप केलेले आहे. किल्ले संवर्धनात या संस्थांचे योगदान महत्त्वाचे आहे.[६]

किल्ले संवर्धनासाठी करावयाच्या उपाययोजना:

१. लोकसहभाग:

किल्ले संवर्धनासाठी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकसहभाग ! किल्ल्यांच्या जवळ राहणारे म्हणजे स्थानिक लोक, किल्ले प्रेमी संस्था किंवा संघटना यांची मदत घेऊन शासन पातळीवर नियोजन झाले तर निश्चित अधिक चांगल्या प्रकारे आणि टिकाऊ असे संवर्धन होईल. शाळेत दुर्ग संवर्धन हा विषय सक्तीचा केला तर विद्यार्थ्यात जागृती निर्माण होण्यास मदत होईल.

२. प्लास्टिक आणि तत्सम गोष्टीवर बंदी:

वारसा स्थळांचे खूप नुकसान करणाऱ्या प्लास्टिक बाटल्या, कॅरीबॅग यासारख्या वस्तूंच्या वापरावर किल्ला पाहताना बंदी घालणे. त्याऐवजी त्यांना पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देणे. जेणेकरून कमीत कमी कचरा होईल.

३. झाडांझुडपावर नियंत्रण:

हा सर्व किल्ल्यांना भेडसावणारा मोठा प्रश्न आहे. तटबंदी, इमारतीवर सर्वत्र गवत त्याचप्रमाणे छोटी - मोठी झाडे उगवतात. त्यांच्या मुळांमुळे दगड सैल व्हायला लागतात. यामुळे बांधकाम ढासळण्याची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे वेळीच यावर शास्त्रशुद्ध पद्धतीने आणि योग्य रसायनांचा वापर करत नियंत्रण करणे आवश्यक असते. झाडे काढताना मुळांचे अवशेष जर त्या ठिकाणी राहिले तर त्यातून पुन्हा झाड उगवण्याची शक्यता असते. त्यामुळे मुळासहित झाड काढणे गरजेचे असते. जंजिरा हा जलदुर्ग असूनही त्याच्या बुरुजावर वाढलेल्या झाडांच्या मुळांनी चिरे विलग केले आहेत. कर्नाळा किल्ल्यावर वनस्पतींची इतकी वाढ झाली आहे की, काही ऐतिहासिक अवशेष झाडांखाली पूर्णपणे गाडले गेले आहेत.[७]

४. शास्त्रशुद्ध पद्धतीने संवर्धन :

किल्ल्यांवरील वास्तूंचे तज्ञ व्यक्तींकडून योग्य शास्त्रशुद्ध पद्धतीने संवर्धन करणे आवश्यक असते. दगड जोडणीसाठी सिमेंट न वापरता पारंपारिक साहित्याचा वापर केला तर मूळ रूप परत मिळवून देणे निश्चितच शक्य होते. रायगड किल्ल्यावर काही वर्षापूर्वी झालेल्या काही दुरुस्ती कामांमध्ये सिमेंटचा वापर झाल्याचे समोर आले होते. हवा खेळती न राहिल्याने दगडाला अंतर्गत भेगा पडतात. महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाने आता यावर कडक निर्बंध घातले आहेत. अतिवृष्टीने किल्ल्यांच्या पायऱ्या अनेकदा वाहून जातात किंवा तटबंदीचा काही भाग खचतो. सह्याद्रीतील बेसाल्ट दगड पावसाच्या माऱ्यामुळे कमकुवत होत असल्याने लोहगड किल्ल्यांच्या तटबंदीला मोठे तडे गेल्याचे दिसून आले आहे.

५. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर:

आधुनिक काळात ड्रोन फोटोग्राफी तंत्रज्ञान, जीपीएस तंत्रज्ञान प्रणाली इत्यादी विकसित झालेले आहेत. याचा वापर करून संपूर्ण किल्ल्याचे सर्वेक्षण करणे आणि किल्ल्याच्या कोणत्या भागाचे किती नुकसान झाले आहे त्याचा शोध घेऊन आवश्यक तेवढे संवर्धन करणे हे अधिक योग्य ठरू शकते. [८]

६. किल्ल्यांवरील वस्तूंचे संवर्धन:

किल्ल्यांवर झालेल्या उत्खननात वास्तूबरोबर वस्तूही सापडलेल्या आहेत. विशेषत: धातूच्या तोफा, तोफ गोळे इत्यादी. बऱ्याच वेळेला अनेक वस्तु सापडलेल्या ठिकाणी उघड्यावर तशाच ठेवल्या जातात. अशा सापडलेल्या वस्तूंचे ऊन, वारा, पाऊस त्याचबरोबर हौशी पर्यटकांकडून नुकसान केले जाऊ शकते. तसेच धातूसाठी अशा वस्तूंची चोरी सुद्धा केली जाऊ शकते. कोकणातील विजयदुर्ग किंवा सिंधुदुर्ग किल्ल्यांवरील काही तोफा गंजल्यामुळे त्यांच्या थरांचे पापुद्रे निघत आहेत. असे होऊ नये यासाठी या वस्तूंचे त्याच किल्ल्यावर संरक्षित संग्रहालय निर्माण केले तर वस्तू सुरक्षित होऊन त्या वस्तूंची

होणारी झीज आणि नुकसानही थांबू शकते. हा किल्ले संवर्धनाचाच मुख्य भाग आहे.

७. माहिती फलक:

नव्याने येणारे पर्यटक किल्ल्याबाबत अनभिज्ञ असतात. त्यामुळे ठिकठिकाणी माहिती देणारे आणि दिशादर्शक फलक लावले गेले तर पर्यटक योग्य त्या ठिकाणी जाऊ शकतात. त्यांचा किल्ल्यावरचा अनावश्यक वावरही यामुळे टाळता येऊ शकतो.

८. किल्ले संवर्धनासाठी दिला जाणारा अपुरा निधी:

किल्ल्यांचे संवर्धन ही निश्चितच खर्चिक बाब आहे. सर्व किल्ल्यांना संवर्धनासाठी एकसारखा निधी मिळत नाही. बऱ्याचदा आडवाटेला किंवा मानवी वस्तीपासून खूप दूर असलेले किल्ले हे या प्रक्रियेपासून दूर राहतात. पुरेशा निधी अभावी पूर्ण संवर्धन करणे शक्य होत नाही आणि त्यात महाराष्ट्रातील किल्ल्यांची संख्याही जास्त आहे.[९]

समारोप:

भारतीय समाजात गड - किल्ल्यांबाबतची साक्षरता येणे खूप आवश्यक आहे. ही साक्षरता किल्ले संवर्धनातील पहिले महत्त्वाचे पाऊल ठरेल. किल्ल्यांकडे केवळ मनोरंजनाचे- पर्यटनाचे - उत्सव साजरे करण्याचे ठिकाण म्हणून न पाहता तो आपल्या दैदिप्यमान इतिहासाचा वारसा आहे आणि ती जपण्याची माझी जबाबदारी आहे या भावनेने पाहिले पाहिजे. किल्ल्यांवर फिरणाऱ्या प्रत्येकाने जबाबदारीने सर्व गोष्टी केल्या पाहिजेत. किल्ल्यातील वस्तू- वास्तू, तेथील पर्यावरण याची काळजी घेतली पाहिजे. किल्ले संवर्धन ही केवळ सरकारची नव्हे तर आपलीही जबाबदारी आणि कर्तव्य आहे. दुर्दैवाने समाजाच्या या प्रश्नाबाबतच्या अनास्थेमुळे हा प्रश्न गंभीर बनतो आहे. या गोष्टींसाठी फक्त सरकारला जबाबदार धरणे चुकीचे होईल. किल्ल्याला नुकसान पोहोचविणाऱ्या गोष्टी आढळल्यास योग्य त्या यंत्रणेपर्यंत वेळेत माहिती पोहोचविणे ही गोष्ट सुद्धा महत्त्वाची ठरू शकते. सरकारकडून किल्ले संवर्धनासाठी योग्य यंत्रणा उभी करणे, आवश्यक निधी देणे, किल्ल्यांना नुकसान पोहोचविणाऱ्या व्यक्तींना कडक शिक्षा देणे, किल्ल्यांच्या देखभालीसाठी तज्ञ मनुष्य यंत्रणा उभी करणे या गोष्टी केल्या गेल्या पाहिजेत. या सर्व गोष्टी योग्य रीतीने झाल्या तर निश्चितच स्वराज्याच्या या रक्षकांचे चांगल्या प्रकारे संवर्धन होईल.

संदर्भ :

१. गटणे कृ.ब., देशपांडे सु.र., *किल्ले*, मराठी विश्वकोश खंड ३,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९७६, पृ. ९५९

२. गोखले कमल, *आज्ञापत्र* , मराठी विश्वकोश खंड २,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई ,१९७६ , पृ. ३२६

३. घाणेकर प्र. के., *अथातो दुर्ग जिज्ञासा*, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००५, पृ. ३७ - ३८

४. घाणेकर प्र. के., कित्ता ; दांडेकर गो . नी., *दुर्गपुत्र शिवाजी (लेख)*, छत्रपती शिवाजी महाराज स्मृतीग्रंथ, डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ मुंबई, २०११, पृ.१२८-१२९

५. घाणेकर प्र. के.,*गडकिल्ले महाराष्ट्राचे*, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००७, पृ. ५५ - ६२

६. कित्ता ; भुदरगड किल्ला प्रत्यक्ष भेट, २५/१२/२०२५

७. Sah Purnima, *Maharashtra forms panels to safeguard ancient forts (Article),* The

Hindu (e Paper International Edition), 19/1/2025

८. घाणेकर प्र. के., *अथातो दुर्ग जिज्ञासा,* उपरोक्त

९. दांडेकर गो . नी., *दुर्गभ्रमण गाथा,* मृण्मयी प्रकाशन , पुणे, २०१७ ; *दुर्गसंवर्धन मार्गदर्शिका (अहवाल*), पुरातत्व संचालनालय, महाराष्ट्र शासन, २०१९

१०. https://www.mahaarchaeology.in

११. घाणेकर प्र. के., *अथातो दुर्ग जिज्ञासा*, उपरोक्त पृ. १५७

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

ऐतिहासिक किल्ले सामानगड: महत्त्व समस्या व उपाय

प्रा. (डॉ.) सुरेश मारुती चव्हाण

इतिहास विभाग प्रमुख

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज, महाराष्ट्र

Corresponding Author - प्रा. (डॉ.) सुरेश मारुती चव्हाण

DOI - 10.5281/zenodo.19664865

प्रस्तावना:

मानवी जीवनात ऐतिहासिक पर्यटनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. विशेषतः पर्यटनाचा आत्मा म्हणूनच ऐतिहासिक स्थळांचा उल्लेख केला जातो. आपल्या देशाला, राज्याला, जिल्ह्याला आणि गडहिंग्लज तालुक्याला समृद्ध ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. त्यामध्ये किल्ल्यांचे महत्त्व तर अनन्यसाधारण आहे. कारण दुर्ग तथा किल्ले हे आपल्या राज्याची खरी संपत्ती असून ते अनेक राजवटींच्या पराक्रमाची, शौर्याची आणि कर्तुत्वाची साक्ष देत आजही ताठ मानेने उभे आहेत. विशेषतः कोकणचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडहिंग्लज तालुक्यात इतिहासाच्या अशा अनेक पाऊलखुणा आढळून येतात. त्यामध्ये अनेक आक्रमणे आपल्या छातीवर झेलून या नगरीचे संरक्षण करणारा ऐतिहासिक सामानगड याचा प्रामुख्याने समावेश होतो. अनेक राजवटींच्या काळातील सामानगड किल्ल्याचे महत्व अधोरेखित झाले असले तरी त्याची वर्तमान स्थिती मात्र अस्वस्थ करणारी असल्याने त्याच्या संवर्धनाची नितांत आवश्यकता असल्याचे जाणवते. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंदामध्ये ऐतिहासिक सामानगड किल्ल्याचे महत्त्व समस्या व उपाय यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

किल्ले सामानगडाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

कोल्हापूर नगरीच्या दक्षिणेस सुमारे 75 कि.मी अंतरावर वसलेल्या गडहिंग्लजच्या दक्षिण -पूर्वेला सुमारे ७ कि.मी अंतरावर ऐतिहासिक सामानगड हा किल्ला आहे. त्याची समुद्रसपाटीपासून उंची 792.5 मी. इतकी असून त्याच्या सभोवताली पन्हाळा, रांगणा, भुदरगड, विशाळगड, पारगड, कलानंदीगड, महिपाळगड, वल्लभगड यासारखे महत्त्वाचे किल्ले आहेत१. या गडाबाबत अनेक आख्यायिका सांगितल्या जातात पैकी एक म्हणजे उपयुक्त युद्ध साहित्य सुरक्षित व गुप्तपणे साठवून त्याचा आवश्यकतेनुसार पुरवठा करण्यासाठी बांधलेला किल्ला म्हणजे सामानगड होय. गडाची रचना पाहता हा तर्क सत्याच्या जवळ जाणारा वाटतो. तर काहींच्या मते, सदरचा किल्ला सातव्या शतकामध्ये राजा दंतिदुर्ग यांनी बांधला असावा. तर काहींच्या मते, शिलाहार राजा भोज दुसरा याने 12 व्या शतकात हा किल्ला बांधला.[२]

शिलाहार राजवटीनंतर हा गड मुस्लिम सत्ताधिशांच्या अधिपत्याखाली आला. तर सन 1667 साली छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला आदिलशहाकडून जिंकून घेऊन त्याची किल्लेदारी अण्णाजी दत्तो यांच्याकडे सोपवली होती. एवढेच नव्हे तर १६७६ मध्ये महाराजांनी त्याची दुरुस्ती केल्याचाही उल्लेख

मिळतो.३ तर पुढे 1688 मध्ये मुघल- मराठा संघर्षादरम्यान मुघलांनी हा किल्ला मराठ्यांच्या कडून जिंकून घेतला. पुढे १७०१ मध्ये पुन्हा तो मराठ्यांनी आपल्या ताब्यात घेतला. तर पुढे मुघल सरदार बेदारबख्त याने किल्ल्यावर हल्ला करून तो पुन्हा मुघलांच्या वर्चस्वाखाली आणला. तर 1704 मध्ये मराठ्यांनी या किल्ल्याचे महत्त्व ओळखून मुघलांचा पराभव करून आपले वर्चस्व पुन्हा प्रस्थापित केल्याचे दिसून येते.[४]

1786 मध्ये सावंतवाडीच्या खेमसावंत यांच्या सांगण्यावरून सामानगडावरील गडकऱ्यांनी कोल्हापूरच्या छत्रपतींविरुद्ध बंड केल्याचे आढळते. पण छत्रपतींनी ते बंड मोडून काढले व हवालदार रावजी भोसले यास पदच्युत करून हंबीरराव जाधव यांची नेमणूक केली. तर सण १८४४ मध्ये कोल्हापूर राज्यांमध्ये इंग्रजी सत्तेविरुद्ध गडकऱ्यांचे जे सार्वत्रिक उठाव झाले यामध्ये सामानगडावरील गडकऱ्यांच्या उठावाचा समावेश होतो. या उठावामध्ये रामजी जाधव, दौलतराव घोरपडे, यशवंत फडणवीस, मुंजापा कदम, गणेश मुजुमदार, जोतिबा अहिरे इत्यादी गडकऱ्यांचा समावेश होता. या उठावाची बातमी कोल्हापूरकरांना कळताच हिंम्मतबहाद्दर ररताजीराव चव्हाण आणि हणमंतराव सरलष्कर यांना गड ताब्यात घेण्याच्या मोहिमेवर पाठविण्यात आले पण त्यात यश आले नाही. म्हणून ब्रिटिश अधिकारी रीव्हज याने आपल्या ब्रिटिश फौजा गडावर पाठवल्या आणि ब्रिटिशांनी गडकऱ्यांचा पराभव करून हा गड आपल्या ताब्यात घेतला.[५] एकूणच समकालीन भारतातील सर्वच राजवटींनी सामानगडाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यावर आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न केल्याचे दिसून येते.

किल्ल्यावरील ऐतिहासिक वास्तू:

सामानगड हा मध्ययुगीन भारताच्या इतिहासात संरक्षणाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा किल्ला होता. 1844 च्या गडकऱ्यांच्या बंडावेळी ब्रिटिश फौजांणी गडावरील अनेक ऐतिहासिक वास्तूंना धक्का पोहोचवल्याने त्यांची दुरावस्था झाली होती. असे असले तरी ऐतिहासिक सामानगडावर पुढील वास्तू पहावयास मिळतात.

तटबंदी:

गडाला सर्व बाजूंनी कातळ तासून तीन ते साडेचार मीटर उंचीची तटबंदी व काही ठिकाणी बुरुज बांधलेले आहेत. ही तटबंदी काळसर व लाल दगडातील असून ती अतिशय रुंद व मजबूत स्वरूपाची आहे. तटबंदीमध्ये तोफा व बंदुका यांचा मारा करण्यासाठी ठिकठिकाणी अनेक जंग्यांची निर्मिती करण्यात आली आहे. तटबंदीवर अनेक लहान मोठ्या बुर्जांची निर्मितीही करण्यात आली आहे. या तटबंदीचे वैशिष्ट्य म्हणजे गडाच्या पूर्वेस शत्रूची नजर चुकवून ये- जा करणाऱ्यासाठी तटबंदीमध्येच चोर दरवाजा असल्याचे पहावयास मिळते.[६]

बुरुज:

शत्रूवर मारा करताना आडोसा घेता यावा व किल्ल्याच्या संरक्षणाबरोबरच सभोवतालच्या प्रदेशाचेही संरक्षण करता यावे म्हणून तटबंदीवर विविध ठिकाणी छोटे-मोठे अनेक बुरुज बांधण्यात आलेले आहेत. त्यामध्ये पूर्वेस सोंड्या बुरुज असून या बुरुजाचा आकार हत्तीच्या सोंडेसारखा असल्यामुळे त्यास सोंड्या बुरुज म्हणून संबोधले जाते. या बुरुजावरून शत्रूवर तोफा व बंदुका यांचा मारा करण्यासाठी ठिकठिकाणी जंग्यांची निर्मिती करण्यात आलेली आहे. या मुख्य बुरुजा व्यतिरिक्त गडाच्या सभोवताली असणाऱ्या तटबंदीवर अनेक लहान- मोठ्या बुरुजांची निर्मिती करण्यात आलेली दिसून येते.[७]

बारव:

सामानगडास संरक्षणाच्या दृष्टीने विशेष महत्त्व असल्याने गडावर सैनिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी अनेक बारव निर्माण करण्यात आलेले आहेत. विशेषता बारव म्हणजे विहिरीचाच एक प्रकार होय. ज्या

विहिरीत लोकांच्या सोयीसाठी थेट पाण्याच्या पातळीपर्यंत पायऱ्या बांधलेल्या असतात अशा विहिरींना बारव म्हटले जाते. सामानगडावर अशा अनेक बारवांची निर्मिती करण्यात आली आहे. यापैकी पहिल्या बारव मध्ये एकासमोर एक अशा पाच कमानी असून यातील मधल्या कमानीवर हनुमानाची मूर्ती कोरल्यामुळे यास हनुमंत बारव असे संबोधले जाते. तर दुसऱ्या एका बारवमध्ये दोन कमानी असून आत मध्ये दोन खोल्यांची निर्मिती केली आहे. त्यापैकी एका खोलीचा उपयोग कैदी ठेवण्यासाठी तर दुसऱ्या खोलीचा उपयोग युद्ध साहित्य ठेवण्यासाठी केला जात होता. याशिवायही गडावर आणखी तीन - चार बारव आहेत. त्यांना अनुक्रमे भगवान बारव, साखर बारव, व रावळ बारव अशा विविध नावांनी संबोधले जाते. हे सर्व बारव सर्वसाधारणपणे आकाराने चौकोनी असून त्यांची बांधणी अत्यंत सुंदर व कल्पक स्वरूपाची आहे.[८]

मंदिरे:

गडावर अनेक मंदिरे असून त्यात एक छोटेसे कौलारू अंबाबाई मंदिर आहे. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिरात काळ्या पाषाणात घडवलेली अष्टभुजाकृती अंबाबाईची सुंदर व सुबक मूर्ती पहावयास मिळते. देवीच्या हातात परशु, बाण, तलवार, त्रिशूल, भाला, व ढाल इत्यादी आयुधे आहेत. तर गडाच्या पश्चिम बाजूस प्राचीन हनुमानाचे मंदिर आहे. मंदिराचे बांधकाम आधुनिक पद्धतीचे आहे. मंदिरासमोर मंडप असून शेजारी भक्तगण व पुजाऱ्यांच्या राहण्याच्या खोल्या बांधलेल्या आहेत. मंदिरात पाषाणात कोरलेली हनुमानाची मूर्ती आहे. हनुमान मंदिराच्या पश्चिम बाजूस भुयारी शिवलिंग मंदिर आहे. या मंदिरात उतरण्यासाठी पायऱ्या निर्माण करण्यात आल्या आहेत. हे संपूर्ण मंदिर जांभ्या दगडामध्ये कोरलेले असून या मंदिराच्या खालील भागात शिवलिंग तर वरील भागात पितळी राम मूर्ती आढळून येते. तर याच्या दोन्ही बाजूस खडकात खोदलेल्या व कमानींनी शुशोभित केलेल्या ओवऱ्या दिसून येतात. वैशिष्ट्य म्हणजे या मंदिरात बारा कोणाडे असून पूर्वी त्यामध्ये बारा ज्योतिर्लिंग होती.[९]

वरील महत्वाच्या ऐतिहासिक वास्तूंशिवाय कमानी, युद्ध साहित्य ठेवण्याचे ठिकाण, कैद्यांना डांबून ठेवण्यात येणारी अंधारकोठडी, भिमशाप्पाची समाधी यांसारख्या छोट्या-मोठ्या अनेक वास्तू गडावर आजही पाहाव्यास मिळतात.

समस्या:

पराक्रमाच्या इतिहासाची साक्ष देणारी अनेक वारसास्थळे हे गडहिंग्लजच्या पर्यटनाचे खास वैशिष्ट्य होय. त्यामुळेच कोल्हापूर जिल्ह्याच्या पर्यटनास एक वेगळा साज देण्याची भूमिका गडहिंग्लजच्या पर्यटनाने निभवलेली आहे. त्यात सामानगडाचे ऐतिहासिक महत्त्व अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. पण गडाची आजची स्थिती पाहिली तर निश्चितच आश्चर्य वाटेल. कारण गड व गडावरील ऐतिहासिक वास्तू आज नामशेष होताना किंवा भग्न अवस्थेत असल्याचे पहावयास मिळते. एकेकाळी अतिशय दिमाखात उभी असणारी ही पराक्रमाची साक्ष देणारे ऐतिहासिक स्थळे तथा वास्तू आज मात्र निस्तेज पडलेल्या दिसतात. अनेक मंदिरांच्या भिंती, तटबंदी, बुरुज बारव, समाध्या यांचा बराचसा भाग उध्वस्त झालेला आहे तर काही वस्तू तर पूर्णतः नामशेष झालेल्या पाहावयास मिळतात. साहजिकच या ऐतिहासिक गडाला व गडावरील वास्तूंना भेट देत असताना खरोखरच त्या जतन व संवर्धन करण्याची आतुरतेने वाट पाहत असल्याचा भास होतो. यातील काही वास्तूंची तर एवढी दैनिक अवस्था झाली आहे की, या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या खरोखरच त्या वास्तू होत्या का असा प्रश्नही पडतो.[११]

आजकाल स्वतःच्या मनोरंजनासाठी किंवा विरंगुळा करण्यासाठी किल्ल्यांचा वापर केल्याचे आढळून येते. त्याचप्रमाणे प्रेमी युगुलांचे अश्लील चाळे करण्याचे

ठिकाण बनल्याचे जाणवते. खेळ, पार्ट्या यांचे जोम वाढतच आहे. त्यातच भर म्हणून ऐतिहासिक वास्तूंची मोडतोड करून चोरी करणे, जंगलतोड करणे, आग लावणे, औषधी वनस्पती संपवून टाकने, अतिक्रमण यासारख्या मानवी कृत्यांमुळे गडाची सुरक्षिततच धोक्यात आली आहे. आज इतिहासप्रेमींचे दुर्दैव आहे की, किल्ला आपणास निट पाहता येत नाही, कॅमेऱ्यांची सोय नाही, लाईट व्यवस्था नाही, जेव्हा जयंती साजरी करायची वेळ येते त्याच वेळेला त्याची स्वच्छता होते. नंतर वर्षभर चुकूनही लक्ष दिले जात नाही.[१२] थोडक्यात ऐतिहासिक गडांचे जतन व संवर्धनाचे कार्य ना सरकारी स्तरावर, ना सामाजिक स्तरावर, ना वैयक्तिक स्तरावर योग्य त्या प्रमाणात होताना दिसत नाही हीच आजची खरी समस्या आहे.

उपाय:

ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेला सामानगड गेली कित्येक वर्षे गडहिंग्लज परिसराच्या पराक्रमाची, शौर्याची, स्थापत्यशैलीची व उज्वल वारशाची साक्ष देत उभा आहे. पण अलीकडच्या कालखंडात त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाल्याचे दिसून येते. त्यामुळे एक संशोधक म्हणून असे वाटते की, आपण त्याच्या जतन व संवर्धनाचा विशेष प्रयत्न केला नाही तर पूर्णपणे उध्वस्त झालेले भग्न अवशेष पाहण्याचे दुर्भाग्य पुढच्या पिढ्यांवर आल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच त्याचे जतन व संवर्धन करण्याची नितांत गरज लक्षात घेऊन काही उपाय योजना करणे तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे.[१३] त्यासाठी काही उपाययोजना पुढील प्रमाणे.

१. भारतीय पर्यटन विकास महामंडळ, पुरातत्व खाते, महाराष्ट्र शासन यांच्याकडून किल्ल्याच्या संवर्धनासाठी खास उपाययोजना करणे
२. सरकारने दिलेल्या निधीचा वापर प्रामाणिकपणे किल्ल्यांच्या डागडूजी साठी करणे
३. पर्यटन खात्याकडून किल्ल्यावर पर्यटकांसाठी आवश्यकता सुविधांच्या बरोबरच कडक नियमावलीच्या पाट्या लावणे
४. किल्ल्यावर खाद्यपदार्थ, बाटल्या, इतर वस्तू नेण्यास बंदी घालने
५. किल्ल्यावर येणाऱ्या जाणाऱ्या पर्यटकांची कसून चौकशी करून नोंद ठेवणे
६. नवनव्या तंत्रज्ञानाद्वारे किल्ला व किल्ल्यावरील वास्तूंचे संवर्धन करणे
७. ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून गडाचा सर्वांगीण विकास करणे
८. सामाजिक व वैयक्तिक पातळीवर गडाच्या संवर्धनाचे काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना सहाय्य करणे.
९. युवाशक्तीचा उपयोग गडाच्या जतन व संवर्धनासाठी करून घेणे
१०. दुर्गवीर प्रतिष्ठानच्या दुर्गसंवर्धन कार्याला बळ देणे[१४]

कारण आपल्याच डोळ्यासमोर या ऐतिहासिक वास्तू नामशेष होत असताना समाजभान ठेवून दुर्ग संवर्धनाचे काम करणाऱ्या दुर्गवीर प्रतिष्ठानचे कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. किंबहुना त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्यामुळेच आज ऐतिहासिक सामानगडाचे थोडेफार का असेना पण मूळ रूप पर्यटकांना पाण्याची संधी मिळत आहे.[१५] त्यामुळे दुर्गवीर प्रतिष्ठान सारख्या अनेक संस्थांनी सामुदायिक पातळीवर दिलेले योगदान इतरांना निश्चितच प्रेरणा देणारे आहे.

सारांश:

छातीचा कोट करून उज्वल इतिहासाची साक्ष देणारा व छत्रपतींच्या पराक्रमाने पावन झालेला एक ऐतिहासिक किल्ला म्हणजेच सामानगड होय. उन, वारा, पाऊस, प्रदूषण यासारख्या असंख्य नैसर्गिक व मानवनिर्मित संकटांना तोंड देत परिसरातील तेजस्वी इतिहासाच्या परंपरेची आठवण

करून देत आजही तो ताट मानेने उभा आहे. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक जडणघडणीत गनिमी काव्याची शिकवण देणारा व सह्याद्रीच्या माथ्यावर दिमाखात उभा असणारा हाच तो सामानगड होय. पण गेल्या शतकभरात योग्य देखभाली अभावी या गडाची प्रचंड दुरावस्था झाली आहे. भक्कम आधार देणारे बुरुज व तटबंदी ढासळू लागल्याने ते नामशेष होत आहेत. अनेक ऐतिहासिक वास्तू भग्न होत आहेत. वेगवेगळ्या कारणासाठी गडाचा दुरुपयोग होत आहे. अशातच आता अलीकडच्या कालखंडात महाराजांचा गडावर पुतळा बांधण्याची चर्चा चालू झाली आहे. तेव्हा पुतळा बांधा.. पण आधी मला वाचवा... अशी व्यथा किल्ले सामानगड व्यक्त करत आहे यात शंका नाही. त्यामुळे आपल्या पूर्वसुरांनी निर्माण केलेला हा ऐतिहासिक समृद्ध वारसा पुढच्या पिढ्यांकडे सुखरूप पोहोचवायचा असेल तर आपणाला शासकीय, निमशासकीय, सामाजिक व वैयक्तिक स्तरावर या गडाचे जतन व संवर्धन करणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. अर्थात या संवर्धनाच्या चळवळीत गडाचा ऐतिहासिक ठेवा टिकवण्यासाठी गेल्या आठ-दहा वर्षांपासून पदरमोड करून दुर्गवीर प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक दुर्गवीर गडाचे अस्तित्व टिकवण्यासाठी धडपड करत आहेत. त्यांचा हा आदर्श घेऊन आपण विविध स्तरावर गडाच्या संवर्धनाचे कार्य गतिमान केले तरच छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देणारा आणि अनेक राजवटींच्या वाटचालीत अत्यंत महत्त्वाचे योगदान देणारा हा ऐतिहासिक सामानगड सुरक्षित राहील असे मनोमन वाटते.

संदर्भ ग्रंथ सूची:

१. सु. रा. देशपांडे, इतिहासाचे साक्षीदार, सह्याद्री प्रकाशन कोल्हापूर 2003, पान नंबर 33, 34

२. जयंत देशपांडे, दुर्गदर्शन, निसर्ग प्रकाशन कोल्हापूर 2009, पान नंबर 37

३. वि.का. चौधरी (संपा) महाराष्ट्र राज्य गॅजेटिअर,कोल्हापूर जिल्हा, महाराष्ट्र शासन दर्शनीका विभाग मुंबई 1989, पान नंबर 672

४. शेतू माधवराव पगडी, (अनु) मोगल दरबारातील बातमीपत्रे, खंड तीन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई 1989, पान नंबर 395

५. Source material for a history of the freedom movement in India volume- 1 (1818- 1885) collected from Bombay government Records Bombay 1957, page no. 64

६. नि. रा. पाटील, हिंदवी स्वराज्याची दुर्ग तीर्थे भाग-दोन, सुमेरू प्रकाशन डोंबिवली 2011, पान नंबर ५२

७. दैनिक सकाळ १ मार्च 2023

८. दशरथ पाटील, सामानगडचा रणसंग्राम, अभिनंदन प्रकाशन कोल्हापूर 2007, पान नंबर 48 49

९. दैनिक पुढारी 16 जुलै 2019 दैनिक पुढारी 16 जुलै 2019

१०. CTBC's international research journals, application of history in Heritage tourism volume- 3 December 2016.

११. दैनिक सकाळ , 22 मे 2023

१२. दैनिक सकाळ, ३ मार्च 2023

१३. दैनिक सकाळ, गडहिंग्लज कार्यालय वर्धापन दिन विशेषांक, दिनांक 30/ 11/ 2005

१४. Indo Western research journals, special issue, September 2020

१५. सुधाकर गोकाककर, (संपा) हिरण्यकेशेच्या काठी, गडहिंग्लज नगरपरिषद शताब्दी स्मृतिग्रंथ 1987, पान नंबर ४,५

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

वरोरा तालुक्यातील दुर्लक्षित मात्र वैभवशाली स्थापत्य एक अभ्यास

डॉ. संदीप पुंडलिक नन्नावरे

सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध, पुणे

Corresponding Author - डॉ. संदीप पुंडलिक नन्नावरे

DOI - 10.5281/zenodo.19664889

प्रस्तावना:

चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्रातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पौराणिक वैभवाने नटलेला प्रदेश मानला जातो. गोंड साम्राज्याच्या वैभवाचे ठसे येथे जरी व्यापक प्रमाणात दिसत असले, तरी त्यापूर्वीच्या अनेक शतकांचा वारसा जमिनीखाली दडलेला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील *भटाळा* हे गाव अशाच प्राचीन वास्तूंमुळे ओळखले जाते. 'शिल्पग्राम' ही मिळालेली उपाधी येथील समृद्ध शिल्पपरंपरेची साक्ष आहे. दहाव्या शतकात बांधलेले दुमजली महादेव मंदिर हे येथील प्रमुख आकर्षण असून मंदिरातील विशाल शिवपिंडी विदर्भातील सर्वात मोठी पिंडी मानली जाते.

ऐतिहासिक पार्श्वभूमी:

भटाळा गावातील उपलब्ध शिल्पांवरून या वस्तीचे अस्तित्व इ.स. ४५ पासून असल्याचे संकेत मिळतात. मौर्य, सातवाहन, वाकाटक, गुप्त, परमार, चालुक्य आणि नागवंशीय शासकांनी या प्रदेशावर वेगवेगळ्या काळात राज्य केल्याचे ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. या राजवंशांनी कला, स्थापत्य आणि धर्मसंस्कृती यांचा विकास साधताना अनेक मंदिरे व शिल्पांची निर्मिती केली. भटाळ्यातील दगडी शिल्पे प्राचीन काळी परदेशातही निर्यात होत असल्याचा उल्लेख लोकपरंपरेत आढळतो.गावातील भवानी मंदिरावरील शिल्पकला, तसेच तलावाच्या परिसरातील कोरीव लेण्या या कलापरंपरेचे समृद्ध स्वरूप दर्शवतात. या सर्व कारणांमुळे महाराष्ट्र शासनाने भटाळा गावाला पर्यटनस्थळाचा दर्जा प्रदान केला आहे.

भटाळा महादेव मंदिराची रचना व वैशिष्ट्ये:

१. स्थापत्यरचना:

गावाच्या पश्चिमेस असलेले महादेवाचे पूर्वाभिमुख दुमजली मंदिर लालसर-पिवळ्या वालुकाश्मातून बांधलेले असून जिल्ह्यातील अतिप्राचीन वास्तूंमध्ये गणले जाते. मंदिरावर शिखर नसणे हे त्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. लोककथेप्रमाणे शेकडो वर्षांपूर्वी वीज पडून मूळ शिखर व कळस नष्ट झाले होते; नंतरच्या दुरुस्तीवेळी शिखर पुन्हा न बांधता मंदिर तसेच ठेवण्यात आले. म्हणूनच या मंदिराला 'भोंडा महादेव' ही स्थानिक संज्ञा प्राप्त झाली.

मंदिराचा एकूण आकार पूर्व-पश्चिम ५२ फूट व उत्तर-दक्षिण ३६ फूट आहे. अंतराळ (mandapa) आणि गर्भगृह (sanctum) अशी मूलभूत रचना असून, या दोन्ही भागांवर आणखी एक मजला आहे. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी खालून कोणतीही सोय नसल्याने तो केवळ

स्थापत्याच्या प्रयोगशील दृष्टिकोनातून बांधला असावा, असा समज आहे.[१]

२. अंतराळ (मंडप):

मंदिर जमिनीपासून ७–८ फूट उंचीवर उभारलेले असून प्रांगणात प्रवेश करताच त्रिशूळांचे समूह दिसतात. अंतराळ आयताकृती असून चार दगडी स्तंभांची रांग आढळते. आतील स्तंभांवर सूक्ष्म नक्षीकाम असून मध्यभागी नंदीची काळ्या पाषाणातील मूर्ती आहे. वितानावर (छतावर) देखील नक्षीकाम दिसते.[२]

३. गर्भगृह व शिवपिंडी:

गर्भगृह प्रशस्त असून चार स्तंभांनी समर्थित आहे. स्तंभांवर राष्ट्रकूट-कालीन कलश व गवाक्षांची चिन्हे स्पष्टपणे आढळतात. गर्भगृहात सुमारे ४ फूट उंच व १० फूट लांबीची अखंड काळ्या पाषाणातील शिवपिंडी आहे. विदर्भातील सर्वात मोठी शिवपिंडी म्हणून तिचा उल्लेख केला जातो. परिसरात काळ्या पाषाणाची शिला उपलब्ध नसताना एवढ्या मोठ्या आकाराचा एकसंध दगड येथे कसा आणला गेला, हे अद्याप अनुत्तरित रहस्य आहे.

वारीमार्ग थेट भिंतीत असल्याने या मंदिरात प्रदक्षिणा मार्ग नाही. शिवपिंडीच्या स्थानातून जाणूनबुजून प्रदक्षिणा न ठेवण्याची प्राचीन संकल्पना दिसून येते.[३]

४. बाह्यरचना व शिल्पवैशिष्ट्ये:

मंदिराच्या बाह्य भिंतींचे काही भाग सपाट तर काहींवर कोरीव शिल्पे आहेत. गर्भगृहाच्या तीन भिंतींवरील देवकोष्टकांमध्ये कार्तिकेय, वृषांतिक शिव आणि चामुंडा यांच्या मूर्ती आहेत. स्थापत्यातील शैली, रथिका, स्तंभरचना यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास मंदिराचा कालखंड साधारण दहाव्या शतकाच्या उत्तरार्धातील राष्ट्रकूट शैलीत मोडतो.[४]

शैलगृहे (Rock-cut Shrines):

भटाळा तलावाजवळील काही मोठ्या शिळांमध्ये एक मीटर उंची-रुंदी-खोली असलेली लहान शैलगृहे कोरलेली आहेत. ही "अर्पित" स्वरूपातील लेणी नवसपूर्तीसाठी तयार केली असल्याचे मानले जाते. काही शैलगृहांत शिवलिंग आहे तर काहींमध्ये नरसिंह मूर्ती आहे. नरसिंह शिल्पशैली वाकाटककालीन असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. शिवलिंग असलेल्या शैलगृहांच्या तारखेबाबत निश्चित निष्कर्ष नसला तरी शैलीवरून ते मध्ययुगीन काळाशी संबंधित मानता येतात.[५]

स्थापत्यशास्त्रीय विश्लेषण:

पूर्व विदर्भ हा प्रारंभीच्या "शुष्कसांधी बांधीव स्थापत्याचा" मर्यादित भौगोलिक पट्टा मानला जातो. महाराष्ट्रातील बांधीव मंदिर स्थापत्याची सुरुवात अकराव्या शतकानंतर झाली, हा पारंपरिक दृष्टिकोन भटाळ्यातील दुमजली मंदिरामुळे संशयास्पद ठरतो.दहाव्या शतकापूर्वी बहुसंख्य वास्तू लयनी (rock-cut) स्वरूपात होत्या; तथापि भटाळ्यासारखी बांधीव (structural) मंदिरे या कालखंडातही अस्तित्वात होती, हे उपलब्ध पुराव्यावरून दिसते.मंदिर परिसरात सापडलेले लाल वालुकाश्मातील तोरण, गजाभिषिक्त लक्ष्मी शिल्प आणि स्तंभांचे स्वरूप राष्ट्रकूट व मध्य भारतातील मध्ययुगीन कलेशी साधर्म्य दाखवतात.[६]

सारांश:

भटाळा (जि. चंद्रपूर) येथील दुमजली महादेव मंदिर हे विदर्भातील सर्वात आगळेवेगळे आणि दुर्मिळ स्थापत्यवैशिष्ट्यांनी नटलेले प्राचीन मंदिर आहे. विशाल शिवपिंडी, शिखरविहीन रचना, दुमजली बांधणी, राष्ट्रकूट शैलीतील स्तंभ आणि तलावाजवळील वाकाटककालीन

शैलगृहे या समृद्ध ऐतिहासिक वारशाची साक्ष देतात. प्रारंभीच्या बांधीव मंदिर स्थापत्याच्या अध्ययनासाठी हे मंदिर एक महत्त्वपूर्ण पुराव्यासारखे आहे.

संदर्भ:

१. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर,महाराष्ट्र शासन महाराष्ट्र : इतिहास-प्राचीन काळ (खंड १ भाग- २) स्थापत्य व कला (प्रारंभिक ऐतिहासिक काळ ते यादव काळ) संपादक डॉ. अ. शं. पाठक लेखक डॉ. अ. प्र. जामखेडकर

२. कित्ता

३. मुंबई दर्शनिका विभाग सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन २००९

४. कित्ता

५. कित्ता

६. पुरासंचय भाग-१ डॉ. अरविंद जामखेडकर

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

पूर्णगड किल्ला: ऐतिहासिक वारसाचे जतन आणि शाश्वत विकासाचे मार्ग

प्रा. डॉ. योगिता रविंद्र मठपती

मुधोजी महाविद्यालय,फलटण.

Corresponding Author - प्रा. डॉ. योगिता रविंद्र मठपती

DOI - 10.5281/zenodo.19664917

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असलेले गड-किल्ले म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची जिवंत साक्ष आहे. स्वराज्य स्थापनेत शिवरायांनी गड-किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व दिले. "गड आला, पण सिंह गेला" असे म्हणत तानाजी मालुसरे यांनी सिंहगडासाठी प्राणार्पण केले, हे या किल्ल्यांच्या रक्षणाचे सर्वोच्च उदाहरण आहे. हे गड-किल्ले केवळ दगड-मातीची रचना नसून आपल्या इतिहासाचे प्रतिक आहे.आज अनेक किल्ले काळाच्या ओघात, निसर्गाच्या प्रकोपामुळे आणि मानवी दुर्लक्षामुळे जीर्ण झाले आहेत. हे किल्ले आपल्या पूर्वजांच्या शौर्याची, युद्धकौशल्याची आणि स्थापत्यकलेची साक्ष देतात, म्हणून त्यांचे जतन करणे, गड-किल्ल्यांच्या माध्यमातून नव्या पिढीला शिवरायांच्या इतिहासाची जाणीव करून देणे, गनिमी कावा युद्ध पद्धती आणि दुर्ग रचनेचे महत्त्व समजुन देणे. इतिहासाची जाणीव असलेली पिढीच राष्ट्राचे भवितव्य घडवू शकते आणि अस्मितेचे प्रतीक किल्ले हे पर्यटनाचे प्रमुख केंद्र आहेत. योग्य संवर्धन झाल्यास पर्यटन वाढेल, रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि ग्रामीण भागाचा आर्थिक विकास होईल. किल्ले वाचवणे म्हणजे आपल्या स्वाभिमानाचे, इतिहासाचे आणि संस्कृतीचे संरक्षण करणे होय. हे गडकोट आपल्या वैभवाचे प्रतीक आहेत. आज आपण त्यांचे संवर्धन केले नाही, तर उद्याच्या पिढीकडे सांगण्यासारखा इतिहास उरणार नाही. त्यामुळे **"गड-किल्ले संवर्धन ही काळाची गरज आहे"** आणि ती पूर्ण करणे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. शिवकालीन गड व किल्ल्यांचे जतन व संवर्धन बावी बघत असताना अनेक किल्ल्यापैकी किनारपट्टीवरील पूर्णगड किल्ला हा रिसर्च पेपर साठी मी विषय निवडला.



ऐतिहासिक उद्देश:

पूर्णगड किल्ला हा महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील एक ऐतिहासिक किल्ला आहे. त्याचा उद्देश आणि महत्व समजून घेणे हा या रिसर्च पेपरचा मुख्य उद्देश आहे.

1. अपरिचित इतिहासाचा शोध (Exploring Hidden History):

पूर्णगड हा रायगड किंवा प्रतापगडासारखा प्रकाशझोतात आलेला किल्ला नाही. त्यामुळे या किल्ल्याचा इतिहास, त्याची उभारणी आणि कान्होजी आंग्रे यांच्या काळातील त्याचे महत्त्व लोकांसमोर आणणे हा मुख्य उद्देश असू शकतो.

2. स्वराज्याच्या सागरी संरक्षणाचे महत्त्व (Maritime Defense Strategies):

मुचकुंदी नदीच्या संगमावर असलेला हा किल्ला जलदुर्गांच्या साखळीतील एक महत्त्वाचा दुवा होता. सागरी व्यापारावर लक्ष ठेवणे आणि शत्रूच्या हालचाली टिपणे यासाठी या किल्ल्याची रचना कशी केली गेली होती, याचा अभ्यास करणे.

३. वास्तुकलेचा अभ्यास (Architectural Study):

पूर्णगड हा आकाराने लहान असला तरी त्याची तटबंदी, प्रवेशद्वार आणि आतील रचना आजही सुस्थितीत आहे. कोकणातील इतर किल्ल्यांच्या तुलनेत याची वैशिष्ट्ये काय आहेत, या भौगोलिक स्थानाचा उपयोग संरक्षणासाठी कसा करून घेतला, हे समजून घेणे. किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी प्रभावी उपाय सुचवणे.

4.भौगोलिक आणि नैसर्गिक स्थान समजून घेणे (Geographical Significance):

एकीकडे अरबी समुद्र आणि दुसरीकडे मुचकुंदी नदी अशा नैसर्गिक वेढ्यात हा किल्ला वसलेला आहे. या भौगोलिक स्थानाचा उपयोग संरक्षणासाठी कसा करून घेतला, हे तपासणे किल्ल्याच्या शाश्वत विकासासाठी आधुनिक पर्यावरणपूरक मार्ग शोधणे.

5. पर्यटन विकास आणि संवर्धन (Tourism and Conservation):

पूर्णगड हा पर्यटनाच्या दृष्टीने दुर्लक्षित आहे. या विषयाद्वारे थोडक्यात सांगायचे तर, पूर्णगड निवडण्यामागचा उद्देश हा एका 'लढवय्या परंतु दुर्लक्षित' वारशाची ओळख करून देणे आणि त्याच्या ऐतिहासिक महत्त्वाचे पुनरुज्जीवन करणे हा आहे. पर्यटन विकासातून स्थानिक आर्थिक उन्नतीची शक्यता तपासणे.

गृहीतके:

1. पूर्णगड किल्ला हा मराठा साम्राज्याचा एक महत्त्वाचा गड होता. पूर्णगड किल्ला हा मराठा साम्राज्याच्या विस्तारामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.
2. पूर्णगड किल्ला हा तटीय सुरक्षा प्रदान करतो.पूर्णगड किल्ला हा तटीय क्षेत्रामध्ये स्थित आहे आणि त्याने अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर सुरक्षा प्रदान केली.
3. पूर्णगड किल्ला हा एक महत्त्वाचा व्यापारिक केंद्र होता, आणि त्याने जवळच्या प्रदेशातील व्यापाराला प्रोत्साहन दिले.
4. पूर्णगड किल्ल्याचा अभ्यास केल्याने इतिहासाची जाणीव होते व मराठा साम्राज्याच्या इतिहासाची माहिती मिळते.
5. पूर्णगड किल्ल्याचा अभ्यास केल्याने संरक्षणाची महत्ता समजते,तसेच किल्ल्याच्या वारशाची ओळख करून देते.

या वरून पूर्णगड किल्लाचा इतिहास पाहणे गरजेचे आहे.

पूर्णगड किल्लाचा इतिहास:

रत्नागिरी जिल्ह्यातील पूर्णगड हा कोकणातील एक छोटा पण अतिशय सुंदर आणि महत्त्वाचा जलदुर्ग आहे. गेल्या काही वर्षांत या किल्ल्याच्या संवर्धनासाठी शासनाकडून मोठे पाऊल उचलले गेले आहे.कान्होजी आंग्रे (मराठा आरमार) यांनी १७२४ च्या सुमारास या किल्ल्याची बांधणी केली असे मानले जाते.मात्र काही इतिहासकारांच्या मते छत्रपती शिवाजी महाराजांनी हे स्थान निवडले होते. पूर्णगड किल्ला हा महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील एक प्रमुख ऐतिहासिक सागरी किल्ला(जलदुर्ग)आहे. जो २५ किमी अंतरावर मुचकुंडी नदीच्या खाडीकाठी स्थित आहे. कान्होजी आंग्रे यांच्या आरमारी इतिहासाशी निगडित २२

एकरांवर पसरलेला हा किल्ला संरक्षणासाठी आणि तत्कालीन व्यापार नियंत्रणासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. इतिहासाची साक्षी देणारे प्रतीक आहे. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असलेले गड-किल्ले हे आपल्या इतिहासाचे जिवंत साक्षीदार आहेत. या किल्ल्याने मराठा साम्राज्याच्या संरक्षण व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मात्र कालांतराने नैसर्गिक झीज आणि मानवी दुर्लक्ष यामुळे किल्ल्याची स्थिती काही प्रमाणात जीर्ण झाली आहे. त्यामुळे या ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये पूर्णगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व, सध्याची स्थिती आणि त्याच्या शाश्वत विकासासाठी आवश्यक उपाययोजना यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

ऐतिहासिक महत्त्व:

हा किल्ला प्रामुख्याने मुचकुंदी नदीच्या खाडीतून होणाऱ्या व्यापाराचे रक्षण करण्यासाठी आणि शत्रूवर नजर ठेवण्यासाठी बांधला गेला होता.स्वराज्यातील शेवटचा किल्ला,काही इतिहासकार याला स्वराज्याच्या बांधणीतील शेवटचा किल्ला असेही मानतात.



पूर्णगड किल्ल्यांची वैशिष्ट्ये:

सागरी संरक्षणासाठी महत्त्वाचे स्थान: पूर्णगड किल्ला अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेला असल्यामुळे तो सागरी संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. समुद्रमार्गे येणाऱ्या शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी आणि किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी हा किल्ला उपयुक्त होता.

धोरणात्मक बांधकाम रचना: किल्ल्याची रचना चौकोनी स्वरूपाची असून भक्कम तटबंदी, मजबूत बुरूज आणि प्रवेशद्वार हे त्याचे मुख्य घटक आहेत. संरक्षणात्मक दृष्टीकोनातून बांधकाम करण्यात आलेले दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ: किल्ल्याची उभारणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कारकिर्दीत झाली असल्याचे मानले जाते. मराठा आरमार आणि सागरी सामर्थ्य वाढविण्यासाठी या किल्ल्याचे मोठे योगदान होते.

नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यटन क्षमता: समुद्रकिनारा, नारळ-पोफळीची बाग, शांत वातावरण यामुळे पूर्णगड परिसर नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटनासोबतच निसर्ग पर्यटनालाही चालना मिळते.

जलव्यवस्थापन व अंतर्गत रचना: किल्ल्यात पाण्याची टाकी, देवालयांचे अवशेष आणि सैनिकांच्या निवासासाठी जागा असल्याचे आढळते. यावरून त्या काळातील नियोजनबद्ध व्यवस्था दिसून येते.

स्थानिक संस्कृतीशी नाते: पूर्णगड किल्ला हा केवळ ऐतिहासिक वास्तू नसून स्थानिक लोकांच्या परंपरा, श्रद्धा आणि सांस्कृतिक जीवनाशी जोडलेला आहे. पूर्णगड हा आकाराने छोटा (आयताकृती) असला तरी त्याची बांधणी अतिशय भक्कम आहे. किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार दोन बुरुजांच्या आड लपवलेले आहे (गोमुखी रचना). दरवाजावर चंद्र-सूर्य आणि मध्यभागी गणपतीची प्रतिमा कोरलेली आहे.

हनुमान मंदिर: किल्ल्याच्या मुख्य दरवाजाच्या अगदी समोर हनुमानाचे एक छोटे मंदिर आहे. दरवाजातून आत शिरताच दोन्ही बाजूंना पहारेकऱ्यांसाठी 'देवड्या' (बसण्यासाठी किंवा राहण्यासाठी खोल्या) आहेत.किल्ल्याची तटबंदी काळ्या पाषाणात आणि जांभ्या दगडांत बांधलेली असून ती आजही सुस्थितीत आहे.

तटबंदीवरून पूर्ण किल्ल्याला फेरी मारता येते.पूर्णगड किल्ल्याची सध्याची स्थिती आणि भविष्यातील गरजा खालीलप्रमाणे आहेत.

किल्ल्याची सध्याची अवस्था:

नूतनीकरण: महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाने या किल्ल्याचे मोठ्या प्रमाणावर संवर्धन केले आहे. साधारण ४ ते ५ कोटी रुपये खर्च करून पडझड झालेल्या तटबंदीची आणि मुख्य दरवाजाची दुरुस्ती करण्यात आली आहे. किल्ल्याची बाह्य तटबंदी आता सुस्थितीत असून त्यावर चालण्यासाठी 'वॉकिंग ट्रॅक' किंवा फांजी विकसित करण्यात आली आहे. किल्ल्याला दोन दरवाजे आहेत (एक पूर्वाभिमुख आणि दुसरा पश्चिमाभिमुख समुद्राकडे जाणारा). हे दोन्ही दरवाजे आता चांगल्या स्थितीत आहेत. हा किल्ला लहान असल्याने तो बऱ्यापैकी स्वच्छ आहे. मात्र गडाच्या आत काही जुन्या वाड्यांची फक्त जोती (पाया) शिल्लक आहेत.

पाण्याची टंचाई: गडावर पिण्याच्या पाण्याची सोय नाही. पूर्वी गडाबाहेरील विहिरीतून पाणीपुरवठा केला जात असे.जरी भौतिक सुधारणा झाल्या असल्या, तरी या वारशाचे जतन करण्यासाठी खालील गोष्टी आवश्यक आहेत.

माहिती फलक: गडाचा इतिहास, कान्होजी आंग्रे यांचे योगदान आणि गडावरील महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती देणारे फलकअधिक स्पष्ट आणि आकर्षक भाषेत लावणे आवश्यक आहे.

संवर्धनाची गरज का?.

ऐतिहासिक वारसा: अनेक किल्ले काळाच्या ओघात, निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि मानवी दुर्लक्षामुळे पडझड झाले आहेत.

संवर्धनात येणाऱ्या अडचणी:

आज अनेक किल्ल्यांवर अतिक्रमणे झाली आहेत. पर्यटक गडावर प्लास्टिक टाकून प्रदूषण करतात. सरकारी उदासीनता आणि निधीची कमतरता यामुळेही अनेक गडकोट शेवटची घटका मोजत आहेत.

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असलेले गड-किल्ले, म्हणजेच शिवरायांचे पराक्रम, संवर्धन काळाची नितांत गरज आहे. दुर्लक्षामुळे पडझड झालेले किल्ले, तटबंदी व बुरूज जतन करणे, भावी पिढीला इतिहासाची ओळख करून देण्यासाठी आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. नाही. "किल्ले संवर्धन ही काळाची गरज आहे" आणि ती पूर्ण करणे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. शाश्वत विकासाद्वारे (Sustainable Development) ऐतिहासिक वारसा जपून पर्यटनातून स्थानिक रोजगार निर्मिती व ऐतिहासिक वास्तूंचे मूळ स्वरूप कायम राखणे गरजेचे आहे. याविषयी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

गड-किल्ल्यांचे जतन आणि शाश्वत विकास (Fort Conservation and Sustainable Development):

जतन व संवर्धनातील आपले कर्तव्य :

किल्ले हे पर्यटनाचे प्रमुख केंद्र आहेत. योग्य संवर्धन झाल्यास पर्यटन वाढेल, रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि ग्रामीण भागाचा आर्थिक विकास होईल.पाण्याची व्यवस्था- पर्यटकांच्या सुविधेसाठी गडाच्या पायथ्याशी किंवा गडावर पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय करणे गरजेचे आहे.

मार्गदर्शक (Guides): स्थानिक तरुणांना प्रशिक्षण देऊन 'दुर्ग मार्गदर्शक' म्हणून नेमल्यास पर्यटकांना गडाचा इतिहास नीट समजेल आणि स्थानिकांना रोजगार मिळेल.

प्लास्टिक मुक्ती: पर्यटकांचा ओघ वाढल्यामुळे तिथे कचरा (प्लास्टिकच्या बाटल्या, वेष्टने) वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी कचराकुंडी आणि नियमित साफसफाईची यंत्रणा हवी.

पर्यावरण संरक्षण:

किल्ल्यांच्या परिसरात दुर्मिळ वनस्पती आणि प्राणी आढळतात. त्यामुळे गड-किल्ल्यांचे संरक्षण म्हणजे पर्यावरणाचेही संरक्षण होय.स्वच्छता मोहीम: दुर्गप्रेमी संस्था व तरुणांनी एकत्र येऊन गड-किल्ल्यांची स्वच्छता करावी.

अतिक्रमण रोखणे: किल्ल्यांवरील अनधिकृत बांधकामे थांबवण्यासाठी प्रशासन व नागरिकांनी सहकार्य करावे. गड-किल्ल्यांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व समाजात पोहोचवणे आवश्यक आहे.

ऐतिहासिक वारशाचे जतन: किल्ल्यांची डागडुजी करताना मूळ स्थापत्यशैली साहित्य आणि पावित्र्य राखणे. गडावरील प्लास्टिक कचरा कमी करणे व ऐतिहासिक भिंतींवर होणारे गैरकृत्य टाळण्यासाठी कडक पावले उचलणे.

शाश्वत पर्यटन (Sustainable Tourism): पर्यटकांच्या संख्येवर नियंत्रण ठेवून गडाची हानी होणार नाही अशा प्रकारे सुविधा उपलब्ध करणे.स्थानिक रोजगार निर्मिती, किल्ल्यांजवळ पर्यटन जागरूकता, पर्यटकांना किल्ल्यांचे महत्त्व सांगणारे फलक माहिती केंद्रे उभारणे आणि सुरक्षिततेची काळजी घेणे. ही मोहीम राबवताना केवळ सरकारी यंत्रणाच नाहीतर नागरिकांचा पुढाकारही तितकाच महत्त्वाचा आहे. महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचे जिवंत साक्षीदार म्हणजे आपले गड-किल्ले.

ऐतिहासिक वारसा जतन: कायदेशीर चौकट (भारतीय व महाराष्ट्र शासन):

a) केंद्रीय पुरातत्व विभाग:

प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे व अवशेष कायदा, १९५८ (AMASR Act): या कायद्यानुसार जे किल्ले 'राष्ट्रीय महत्त्वाचे' म्हणून घोषित केले आहेत (उदा. रायगड, जंजिरा), त्यांची देखभाल केंद्र शासन करते. या कायद्यानुसार किल्ल्याच्या १०० मीटर परिघात कोणत्याही बांधकामाला बंदी आहे.

b) महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग:

महाराष्ट्र प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे व अवशेष कायदा, १९६१ जे किल्ले राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत, त्यांचे जतन या कायद्यांतर्गत केले जाते.

c) नवीन धोरणे आणि किल्ले वर्गीकरण:

शासन सध्या किल्ल्यांचे दोन गटात वर्गीकरण करते.

शासनाची भूमिका:

- पुरातत्त्व विभागाकडून नियमित देखभाल करणे.
- निधी उपलब्ध करून देणे.
- वारसा संवर्धनासाठी विशेष योजना राबवणे.

रत्नागिरी जिल्ह्यातील पूर्णगड हा कोकण किनारपट्टीवरील एक अत्यंत देखणा आणि शांत किल्ला आहे. मुचकुंदी नदीच्या खाडीवर आणि अरबी समुद्राच्या संगमावर एका छोट्या टेकडीवर हा किल्ला वसलेला आहे.एक जागरूक नागरिक किंवा दुर्गप्रेमी म्हणून आपण खालील गोष्टी करू शकतो.इतिहास प्रसार- पूर्णगडाचा इतिहास सोशल मीडियाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवणे.जबाबदार पर्यटन- तटबंदीवर किंवा भिंतीवर नावे न कोरणे आणि वास्तूचे नुकसान न करणे.

"माझा किल्ला, माझी जबाबदारी" अभियान राबविणे. या किल्ल्याचे असे संगोपन केले तर खरंच महाराष्ट्रातील अनेक किल्ले हे समाजाच्या समोर येथील व त्यातून काही नवीन पिढीला शिकायला मिळेल.असे मला वाटते.

निष्कर्ष:

पूर्णगड म्हणजे सह्याद्रीच्या कुशीत विसावलेला आणि अरबी समुद्राच्या लाटांशी हितगूज करणारा एक अजिंक्य पहारेकरी आहे. या दुर्गाचा निष्कर्ष मांडताना असे म्हणता येईल की, जरी आज याच्या तटबंदीवर काळानुसार काही खुणा उमटल्या असल्या, तरी इथल्या प्रत्येक पाषाणात आजही मराठी अस्मितेचे आणि शिवकालीन शौर्याचे हुंकार ऐकू येतात.

इतिहासाचे दर्पण: पूर्णगड हा केवळ एक लष्करी तळ नव्हता, तर तो कोकण किनारपट्टीच्या संरक्षणासाठी उभारलेला एक 'अभेद्य कवच' होता. मुचकुंदी नदीच्या संगमावर उभा असलेला हा दुर्ग म्हणजे निसर्ग आणि मानवी चातुर्य यांचा एक अपूर्व संगम आहे.

तेजाचा वारसा: ज्याप्रमाणे सूर्याच्या अस्ताने त्याचे तेज संपत नाही, तसेच आज या गडावर शुकशुकाट असला तरी, येथील मातीतून आजही 'स्वराज्य' निष्ठेचा गंध दरवळतो.

काळावर स्वार: काळाच्या महाकाय ओघात अनेक साम्राज्ये धुळीला मिळाली, पण पूर्णगड आपल्या बुलंद बुरुजांच्या साहाय्याने आजही इतिहासाची 'विजयगाथा' आकाशाला सांगत उभा आहे.

"येथील प्रत्येक चिरा बोलतोय पराक्रमाची भाषा, पूर्णगड म्हणजे महाराष्ट्राच्या धगधगत्या इतिहासाची अभंग आशा!"

थोडक्यात सांगायचे तर...

पूर्णगड हा पर्यटनासाठी केवळ एक 'पॉइंट' नसून, तो येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणेचा जिवंत झरा आहे. गडाच्या तटबंदीवरून दिसणारा अथांग सागर,पूर्णगड किल्ला हा केवळ दगड-मातीची रचना नसून मराठ्यांच्या सागरी सामर्थ्याचा आणि दूरदृष्टीचा साक्षीदार आहे. त्याची धोरणात्मक मांडणी, भक्कम बांधणी आणि समुद्रकिनाऱ्यावरील स्थान यामुळे तो ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

संदर्भसूची (References Books):

1. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश: (marathivishwakosh.org) -
2. दुर्गभरारी (Durgbharari): महाराष्ट्रातील किल्ल्यांची सविस्तर माहिती,
3. लोकसत्ता / मटा (Lifestyle Section): 'भटकंती' किंवा 'दुर्गयात्रा'
4. शोध शिवछत्रपतीच्या दुर्गांचा, सतीश अक्कलकोट, सह्याद्री दुर्ग भ्रमण मंडळ, सांगली, 2009
5. English References, For technical details, architecture, and tourism guides:
6. Gazetteers Department (maharashtra.gov.in): Search for the "Ratnagiri District Gazetteer." It contains.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

वारसा स्थळ जतन – गड, किल्ले आणि स्मारके (समस्या आणि उपाय)

डॉ. दादासाहेब बापूराव जाधव

सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,

काकासाहेब चव्हाण कॉलेज, तळमावले, ता. पाटण .जि. सातारा

***Corresponding Author* - डॉ. दादासाहेब बापूराव जाधव**

DOI - 10.5281/zenodo.19664963

सारांश (Abstract) :

महाराष्ट्रातील गड-किल्ले व स्मारके ही राज्याच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि स्थापत्य वारशाची अमूल्य धरोहर आहेत. छात्रपती शिवाजी महराज यांच्या नेतृत्वाखाली उभारलेले रायगड , सिहंगड आणि प्रतापगड यांसारखे किल्ले स्वराज्य, शौर्य आणि प्रभावी प्रशासनाचे प्रतीक आहेत. तसेच अजंठा लेणी आणि वेरूळ लेणी ही जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त स्थळे भारतीय कला व स्थापत्यकौशल्याची उत्कृष्ट उदाहरणे आहेत.

सदर संशोधन निबंधात महाराष्ट्रातील वारसा स्थळांच्या जतनातील प्रमुख समस्या आणि त्यावरील उपाययोजनांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. नैसर्गिक झीज, हवामान बदल, वनस्पतींची वाढ, मानवनिर्मित तोडफोड, अतिक्रमण, अनियंत्रित पर्यटन आणि अपुरा निधी या घटकांमुळे वारसा स्थळांच्या संरचनेवर गंभीर परिणाम होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. संशोधनासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतींचा वापर करून प्राथमिक व दुय्यम स्रोतांच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली.

अभ्यासातून असे आढळते की वैज्ञानिक संवर्धन पद्धती, नियमित देखभाल, प्रभावी पर्यटन व्यवस्थापन, जनजागृती अभियान, स्थानिक लोकसहभाग आणि कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी यांद्वारे वारसा स्थळांचे शाश्वत संरक्षण साध्य होऊ शकते. शासन, तज्ज्ञ संस्था आणि नागरिक यांच्या समन्वित प्रयत्नांतूनच गड-किल्ले व स्मारकांचा ऐतिहासिक ठेवा भावी पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवणे शक्य आहे.

प्रस्तावना:

महाराष्ट्र ही ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि स्थापत्य वारशाने समृद्ध अशी भूमी आहे. महराष्ट्र राज्यात प्राचीन गड-किल्ले, स्मारके, लेणी, मंदिरे आणि विविध ऐतिहासिक वास्तू मोठ्या प्रमाणात आढळतात. ही वारसा स्थळे केवळ दगड-मातीच्या रचना नसून ती महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जडणघडणीची जिवंत साक्ष आहेत. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली उभारलेले गड-किल्ले स्वराज्याच्या स्थापनेचे आणि लढाऊ परंपरेचे प्रतीक मानले जातात. रायगड , सिंहगड आणि प्रतापगड यांसारखे किल्ले मराठा साम्राज्याच्या वैभवाची आठवण करून देतात. तसेच अजंठा लेणी व वेरूळ लेणी ही जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त वारसा स्थळे भारतीय कला व स्थापत्यकौशल्याचे उत्तम उदाहरण आहेत.आजच्या आधुनिक आणि वेगवान जीवनशैलीत या वारसा स्थळांच्या जतनासमोर अनेक गंभीर आव्हाने उभी राहिली आहेत. नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदल, वनस्पतींची वाढ, तसेच मानवनिर्मित

हानी, तोडफोड, भित्तींवर नावे कोरणे आणि अनियंत्रित पर्यटन यामुळे या ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान होत आहे. निधीअभाव, तांत्रिक कौशल्याची कमतरता आणि जनजागृतीचा अभाव यामुळे संवर्धन कार्यात अडथळे निर्माण होत आहेत.म्हणूनच गड-किल्ले व स्मारकांचे शास्त्रीय पद्धतीने जतन, संवर्धन आणि व्यवस्थापन करणे ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. प्रस्तुत संशोधन निबंधात महाराष्ट्रातील वारसा स्थळांच्या जतनातील समस्या आणि त्यावरील उपाययोजनांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन उद्दिष्टे:

1. महाराष्ट्रातील गड-किल्ले व स्मारकांच्या जतनासंबंधी असलेल्या समस्या यांचा शास्त्रीय अभ्यास करणे.
2. वारसा स्थळांचे सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक महत्त्व स्पष्ट करणे.
3. छत्रपती शिवाजी महराज यांच्या काळातील गड-किल्ल्यांची ऐतिहासिक भूमिका अभ्यासणे.
4. निवडक किल्ल्यांची ऐतिहासिक स्थिती व वर्तमान परिस्थिती यांचा तुलनात्मक अभ्यास करणे
5. वारसा स्थळांच्या जतनातील नैसर्गिक (पावसाळी झीज, वनस्पती वाढ, हवामान बदल) व मानवनिर्मित (अतिक्रमण, तोडफोड, अनियंत्रित पर्यटन) समस्या ओळखणे.
6. शासन, पुरातत्त्व विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका विश्लेषित करणे.
7. प्रभावी व शाश्वत संवर्धनासाठी व्यावहारिक उपाययोजना सुचविणे.
8. जनजागृती, पर्यटन व्यवस्थापन व शाश्वत विकासाच्या दृष्टीने वारसा जतनाचे महत्त्व अधोरेखित करणे.

गृहितके:

या संशोधनात पुढील गृहितके मांडण्यात येत आहेत. महाराष्ट्र मधील गड-किल्ले व स्मारकांचे संरक्षण अपुरे असल्यामुळे त्यांच्या मूळ रचनेत झपाट्याने झीज होत आहे, असे गृहीत धरले आहे. नैसर्गिक घटकांबरोबरच मानवनिर्मित हानी व अनियंत्रित पर्यटन ही जतनातील प्रमुख कारणे आहेत, असे मानले जाते. शासनाच्या प्रयत्नांनंतरही निधी, तांत्रिक कौशल्य व जनजागृतीचा अभाव संवर्धन प्रक्रियेत अडथळा निर्माण करतो, हे गृहित आहे. तसेच स्थानिक लोकसहभाग आणि प्रभावी व्यवस्थापन वाढविल्यास वारसा स्थळांचे शाश्वत जतन अधिक परिणामकारक होऊ शकते, असे या अभ्यासात मानण्यात आले आहे.

संशोधन पद्धती:

या संशोधनासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील गड-किल्ले व स्मारकांच्या जतनासंबंधीच्या समस्यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा व्यापक वापर करण्यात आला. प्राथमिक स्रोतांमध्ये निवडक स्थळांचे प्रत्यक्ष निरीक्षण, छायाचित्रे, स्थानिक नागरिक व तज्ज्ञांशी संवाद, तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून प्राप्त माहितीचा समावेश आहे. विशेषतः Archaeological Survey of India आणि Directorate of Archaeology and Museums, Maharashtra यांच्या अहवालांचा संदर्भ घेण्यात आला.

दुय्यम स्रोतांमध्ये संशोधन लेख, संदर्भग्रंथ, शैक्षणिक प्रबंध, वृत्तपत्रांतील बातम्या व अधिकृत संकेतस्थळांवरील माहिती यांचा अभ्यास करण्यात आला. वारसा स्थळांच्या जतनासाठी अस्तित्वात असलेल्या कायदे व धोरणांचे परीक्षण करून त्यांची अंमलबजावणी कितपत प्रभावी आहे, याचे विश्लेषण करण्यात आले.

संशोधन प्रक्रियेत निवडक गड-किल्ले व स्मारकांचे केस स्टडी पद्धतीने परीक्षण करण्यात आले. त्यांच्या भौतिक स्थिती, पर्यावरणीय परिणाम, मानवी हस्तक्षेप, पर्यटनाचा प्रभाव व प्रशासनिक उपाययोजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. तसेच उपलब्ध सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण करून वारसा स्थळांच्या जतनातील प्रमुख अडचणी ओळखण्यात आल्या.

या सर्व प्रक्रियेत गुणात्मक व परिमाणात्मक विश्लेषणाचा समन्वय साधण्यात आला आहे. परिणामी, समस्यांचे स्वरूप, कारणमीमांसा व संभाव्य उपाययोजना यांचे वस्तुनिष्ठ व शास्त्रीय विश्लेषण सादर करण्यात आले आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी:

महाराष्ट्रातील गड-किल्ले व स्मारकांचा इतिहास अत्यंत प्राचीन व वैविध्यपूर्ण आहे.[१] महाराष्ट्र या प्रदेशात सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव तसेच बहमनी आणि आदिलशाही सत्तांच्या काळात विविध स्थापत्य परंपरा विकसित झाल्या.[२] या सत्तांनी डोंगरकड्यांवर, समुद्रकिनाऱ्यावर आणि व्यापारी मार्गांवर किल्ल्यांची उभारणी करून संरक्षण व्यवस्था मजबूत केली. पुढे मराठा साम्राज्याच्या उदयकाळात किल्ल्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले.

विशेषतः छात्रपती शिवाजी महराज यांनी स्वराज्य स्थापनेसाठी डोंगरी व जलदुर्गांची साखळी निर्माण केली. रायगड हा स्वराज्याची राजधानी म्हणून ओळखला जातो,[३] तर प्रतापगड आणि सिंहगड यांसारखे किल्ले लष्करी दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे ठरले. या किल्ल्यांवरून प्रशासन, लष्करी नियोजन आणि व्यापार नियंत्रण केले जात असे.[४]

याचबरोबर महाराष्ट्रातील लेणी व स्मारके कला व धर्मपरंपरेचे प्रतीक आहेत. अजंठा लेणी आणि वेरूळ लेणी ही बौद्ध, जैन व हिंदू स्थापत्यकलेची उत्कृष्ट उदाहरणे असून त्यांना जागतिक वारसा दर्जा प्राप्त झाला आहे. मध्ययुगीन काळात बांधलेली मंदिरे, दरवाजे, तोफा, तटबंदी आणि जलव्यवस्था यांमुळे त्या काळातील तांत्रिक कौशल्याची साक्ष मिळते.[५]

अशा प्रकारे महाराष्ट्रातील गड-किल्ले व स्मारके ही विविध सत्ताकाळातील राजकीय, सांस्कृतिक आणि स्थापत्य विकासाची साखळी दर्शवितात. त्यामुळे त्यांचे जतन करणे म्हणजे इतिहासाची अखंड परंपरा जपणे होय.

समस्या विश्लेषण:

नैसर्गिक झीज:

नैसर्गिक झीज ही वारसा स्थळांच्या जतनातील एक महत्त्वाची समस्या आहे. पावसामुळे दगडांच्या पृष्ठभागावर रासायनिक अभिक्रिया होऊन चुनखडी व इतर खनिजांचे क्षरण होते. सततचा पाऊस आणि आर्द्रता यामुळे भेगा निर्माण होतात व दगडांची मजबुती कमी होते. वाऱ्यामुळे धूळकण दगडांवर आदळून त्यांची झीज वाढते. किनारी भागात खारट वाऱ्यामुळे क्षारांचे थर तयार होऊन दगड झिजतात. वनस्पतींची वाढ देखील धोकादायक ठरते; झाडांच्या मुळया दगडांच्या फटींमध्ये शिरून बांधकाम सैल करतात. शेवाळ, शैवाळ आणि बुरशी यांमुळे पृष्ठभागावर डाग पडतात व दगड कमकुवत होतो. दीर्घकालीन परिणाम म्हणून संरचनेची स्थिरता कमी होते व ऐतिहासिक वैशिष्ट्य नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे योग्य

जलनिस्सारण, नियमित साफसफाई व वनस्पती नियंत्रण या उपाययोजना आवश्यक आहेत.[६]

मानवनिर्मित हानी:

मानवनिर्मित हानी ही ऐतिहासिक वारसा स्थळांसाठी गंभीर धोका ठरते. पर्यटकांकडून भिंतींवर नावे कोरणे, रंग लावणे किंवा कचरा टाकणे यामुळे दगडी बांधकामाचे सौंदर्य व मूळ स्वरूप बाधित होते. अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण व शहरीकरणामुळे स्मारकांच्या परिसराची रचना बदलते व संरचनात्मक नुकसान होते. कंपन, प्रदूषण आणि वाहनांच्या हालचालीमुळे सूक्ष्म भेगा निर्माण होतात. काही ठिकाणी पुरातत्त्वीय वस्तूंची चोरी किंवा तोडफोड केली जाते. अज्ञानामुळे किंवा दुर्लक्षामुळे देखभाल न झाल्यास झीज अधिक वेगाने वाढते. धार्मिक किंवा सामाजिक कार्यक्रमांदरम्यान मोठी गर्दी झाल्यास दाब व कंपनामुळे रचना कमकुवत होते. त्यामुळे जनजागृती, कडक कायदे, नियमित देखरेख आणि संवर्धनाची शास्त्रीय पद्धत अवलंबणे आवश्यक आहे. अशा उपाययोजनांमुळे वारसा स्थळांचे दीर्घकालीन संरक्षण साध्य होऊ शकते. [७]

अपुरा निधी:

वारसा स्थळांच्या जतनामध्ये अपुरा निधी ही एक मूलभूत अडचण आहे. संवर्धन, दुरुस्ती, संशोधन आणि सुरक्षा यासाठी मोठ्या आर्थिक संसाधनांची आवश्यकता असते. परंतु शासकीय अर्थसंकल्प मर्यादित असल्यामुळे सर्व स्मारकांकडे समान लक्ष देता येत नाही. परिणामी, अनेक ऐतिहासिक गड-किल्ले व स्मारके दुर्लक्षित राहतात. नियमित देखभाल, तज्ज्ञ अभियंते व पुरातत्त्वज्ञांची नियुक्ती, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी निधी आवश्यक असतो. निधीअभावी संरचनांची झीज वाढते आणि नुकसान भरून काढणे अधिक खर्चिक ठरते. ग्रामीण भागातील वारसा स्थळांना विशेषतः आर्थिक कमतरतेचा फटका बसतो. खाजगी सहभाग, कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (CSR) आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढवणे ही गरज आहे.

अनियंत्रित पर्यटन :

अनियंत्रित पर्यटनामुळे वारसा स्थळांवर गंभीर ताण निर्माण होतो. मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या पर्यटकांमुळे दगडी रचनांवर दाब वाढतो व झीज वेगाने होते. कचरा, प्लास्टिक आणि ध्वनीप्रदूषणामुळे परिसराची स्वच्छता व शांतता बाधित होते. काही पर्यटक भिंतींवर नावे कोरणे किंवा तोडफोड करणे यामुळे मूळ स्वरूप नष्ट होते. योग्य मार्गदर्शन, तिकीट मर्यादा आणि देखरेख नसल्यास नुकसान अधिक वाढते. त्यामुळे नियंत्रित प्रवेश, जनजागृती आणि व्यवस्थापन धोरण आवश्यक आहे.[८]

जागरूकतेचा अभाव:

जागरूकतेचा अभाव हा वारसा स्थळांच्या जतनातील एक महत्त्वाचा अडथळा आहे. स्थानिक नागरिक व पर्यटकांना ऐतिहासिक वास्तूंचे सांस्कृतिक व शैक्षणिक महत्त्व पुरेसे माहिती नसल्यामुळे निष्काळजी वर्तन दिसून येते. भिंतींवर नावे कोरणे, कचरा टाकणे किंवा नियमांचे उल्लंघन करणे यामुळे स्थळांचे नुकसान होते. शाळा-महाविद्यालय स्तरावर वारसा शिक्षणाची कमतरता असल्याने संवर्धनाबाबत जबाबदारीची भावना निर्माण होत नाही. माध्यमे, स्वयंसेवी संस्था आणि शासन यांच्या संयुक्त प्रयत्नांनी जनजागृती मोहीम राबवणे आवश्यक आहे.

उपाययोजना:

वैज्ञानिक संवर्धन पद्धतींचा अवलंब:

वारसा स्थळांचे दीर्घकालीन संरक्षण करण्यासाठी वैज्ञानिक संवर्धन पद्धतींचा अवलंब अत्यावश्यक आहे. पारंपरिक दुरुस्तीऐवजी संरचनेचे सखोल सर्वेक्षण, रासायनिक विश्लेषण आणि मूळ साहित्याशी सुसंगत साहित्याचा वापर करणे गरजेचे असते. दगडी

बांधकामातील भेगा भरताना योग्य मिश्रण व तंत्रज्ञान वापरल्यास टिकाऊपणा वाढतो. आर्द्रता नियंत्रण, जलनिस्सारण व्यवस्था आणि संरचनात्मक मजबुतीकरण यांसारख्या उपाययोजना शास्त्रीय पद्धतीने राबवाव्यात. 3D मॅपिंग, डिजिटल दस्तऐवजीकरण आणि लेझर स्कॅनिंगमुळे मूळ स्वरूपाची अचूक नोंद ठेवता येते. तज्ज्ञ पुरातत्त्वज्ञ, वास्तुविशारद आणि रसायनतज्ज्ञ यांच्या समन्वयातून संवर्धन कार्य करणे आवश्यक आहे. [९]

नियमित देखभाल व दुरुस्ती:

वारसा स्थळांचे संरक्षण प्रभावीपणे करण्यासाठी नियमित देखभाल व दुरुस्ती अत्यंत आवश्यक आहे. लहान भेगा, सैल दगड किंवा पाण्याची गळती यांची वेळेवर दुरुस्ती न केल्यास पुढे मोठे संरचनात्मक नुकसान होऊ शकते. पावसाळ्यापूर्वी छप्पर, जलनिस्सारण व्यवस्था आणि भिंतींची तपासणी केल्यास झीज कमी करता येते. शेवाळ, गवत व अनावश्यक वनस्पती नियमित काढून टाकल्यास दगडी बांधकामाची मजबुती टिकून राहते. सुरक्षारक्षक व तांत्रिक कर्मचारी यांची नियुक्ती केल्याने तोडफोड व अतिक्रमण रोखता येते. नियोजनबद्ध देखभाल आराखडा तयार करून वार्षिक तपासणी करणे उपयुक्त ठरते. अशा सातत्यपूर्ण उपाययोजनांमुळे ऐतिहासिक वास्तूंचे मूळ स्वरूप जपले जाते आणि दीर्घकालीन संरक्षण सुनिश्चित होते.

पर्यटन व्यवस्थापन:

वारसा स्थळांच्या संरक्षणासाठी प्रभावी पर्यटन व्यवस्थापन अत्यंत आवश्यक आहे. पर्यटकांची संख्या नियंत्रित ठेवण्यासाठी तिकीट मर्यादा, वेळापत्रक आणि ऑनलाईन नोंदणी प्रणाली लागू करणे उपयुक्त ठरते. मार्गदर्शक फलक, संरक्षित मार्ग आणि माहिती केंद्र यांमुळे पर्यटकांना योग्य दिशा मिळते व संरचनेवर ताण कमी होतो. कचरा व्यवस्थापन, स्वच्छतागृहे व सुरक्षा व्यवस्था यांची योग्य सोय केल्यास पर्यावरणीय परिणाम कमी होतात. प्रशिक्षित मार्गदर्शकांच्या माध्यमातून वारसा जतनाचे महत्त्व पटवून देता येते. स्थानिक समुदायाचा सहभाग वाढवल्यास शाश्वत पर्यटनाला चालना मिळते. नियोजनबद्ध पर्यटन धोरणामुळे आर्थिक लाभही मिळतो आणि स्मारकांचे संरक्षणही सुनिश्चित होते.

जनजागृती अभियान:

वारसा स्थळांच्या संरक्षणासाठी जनजागृती अभियान महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. नागरिक, विद्यार्थी आणि पर्यटकांना ऐतिहासिक वास्तूंचे सांस्कृतिक व शैक्षणिक महत्त्व समजावून सांगितल्यास जतनाबाबत जबाबदारीची भावना निर्माण होते. शाळा–महाविद्यालयांत व्याख्याने, कार्यशाळा आणि वारसा फेऱ्या आयोजित केल्यास तरुण पिढीत संवर्धनाची जाणीव वाढते. सामाजिक माध्यमे, माहितीपट आणि प्रदर्शनांच्या माध्यमातून व्यापक प्रसार करता येतो. स्थानिक स्वयंसेवी संस्था व ग्रामस्थांचा सहभाग घेतल्यास अभियान अधिक प्रभावी ठरते. शासन व तज्ज्ञ संस्थांच्या सहकार्याने नियम, कायदे आणि संरक्षण उपायांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. सातत्यपूर्ण जनजागृतीमुळे तोडफोड, कचरा टाकणे व अतिक्रमण यांसारख्या समस्यांमध्ये घट होते आणि वारसा स्थळांचे दीर्घकालीन संरक्षण साध्य होते.

स्थानिक सहभाग:

वारसा स्थळांच्या जतनासाठी स्थानिक सहभाग अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. स्थानिक नागरिक, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था आणि युवक मंडळे यांच्या सक्रिय सहभागामुळे संवर्धन कार्य अधिक प्रभावी होते. स्थानिकांना त्या स्थळाशी सांस्कृतिक व ऐतिहासिक नाते असल्यामुळे ते संरक्षणासाठी जबाबदारी स्वीकारतात. स्वच्छता मोहीम, वृक्षनियंत्रण, मार्गदर्शन सेवा आणि पर्यटक व्यवस्थापनात स्थानिकांचा सहभाग घेतल्यास शाश्वत

विकास साधता येतो. स्थानिकांना पर्यटनातून रोजगारनिर्मितीची संधी मिळाल्यास संरक्षणाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो. शासन व तज्ज्ञ संस्थांनी प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य आणि मार्गदर्शन दिल्यास हा सहभाग अधिक मजबूत होतो. समुदायाधारित व्यवस्थापनामुळे तोडफोड, अतिक्रमण आणि दुर्लक्ष कमी होते.[१०]

कायदेशीर संरक्षण:

वारसा स्थळांचे दीर्घकालीन जतन सुनिश्चित करण्यासाठी कायदेशीर संरक्षण अत्यंत आवश्यक आहे. ऐतिहासिक स्मारके, गड-किल्ले व पुरातत्त्वीय अवशेष यांचे संरक्षण करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी विविध कायदे लागू केले आहेत. भारतात प्राचीन स्मारकांच्या संरक्षणासाठी 'Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1958' सारखा कायदा अस्तित्वात आहे. या कायद्याअंतर्गत संरक्षित स्मारकांच्या परिसरात अनधिकृत बांधकाम, उत्खनन किंवा तोडफोड करणे दंडनीय गुन्हा ठरतो. तसेच संरक्षित क्षेत्राभोवती प्रतिबंधित व नियमन क्षेत्र निश्चित केले जाते.कायदेशीर संरक्षणामुळे अतिक्रमण, चोरी, अवैध उत्खनन आणि विध्वंसक कृतींवर नियंत्रण ठेवता येते. न्यायालयीन हस्तक्षेप व दंडात्मक कारवाईमुळे नियमांचे पालन सुनिश्चित होते. याशिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावरही वारसा जतनासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली आहेत. कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, नियमित निरीक्षण आणि जनजागृती यांच्या माध्यमातून वारसा स्थळांचे मूळ स्वरूप टिकवून ठेवता येते.[११]

निष्कर्ष:

Maharashtra मधील गड-किल्ले व स्मारके ही राज्याच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय अस्मितेची जपणूक करणारी अमूल्य धरोहर आहेत. Chhatrapati Shivaji Maharaj यांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यातून उभे राहिलेले किल्ले हे शौर्य, स्वाभिमान आणि दूरदृष्टीचे प्रतीक आहेत. तसेच प्राचीन लेणी, मंदिरे आणि स्थापत्य स्मारके विविध सत्ताकाळातील कला, धर्म आणि तांत्रिक कौशल्याची साक्ष देतात. तथापि, नैसर्गिक झीज, हवामान बदल, वनस्पतींची वाढ, मानवनिर्मित तोडफोड, अनियंत्रित पर्यटन आणि अपुरा निधी या कारणांमुळे अनेक वारसा स्थळांची स्थिती चिंताजनक बनली आहे. या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात हा ऐतिहासिक ठेवा नष्ट होण्याची शक्यता आहे. म्हणूनच वारसा जतनासाठी वैज्ञानिक संवर्धन पद्धती, प्रभावी पर्यटन व्यवस्थापन, लोकसहभाग, जनजागृती आणि कठोर कायदेशीर अंमलबजावणी यांचा समन्वित अवलंब आवश्यक आहे. शासन, तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच गड-किल्ले व स्मारकांचे शाश्वत संरक्षण साध्य होऊ शकते. वारसा जतन ही केवळ जबाबदारी नसून भावी पिढ्यांसाठी इतिहास जपण्याची सामूहिक बांधिलकी आहे.

संदर्भ सूची:

1. D. P. Agarwal, *The Archaeology of India* (New Delhi: Select Book Service, 1982), p. 112.
2. G. Yazdani (Ed.), *The Early History of the Deccan* (Oxford: Oxford University Press, 1930), p. 245.
3. A. R. Kulkarni, *Maharashtra in the Age of Shivaji* (Pune: Deshmukh & Company, 1996), p. 78.

4. Govind Sakharam Sardesai, *New History of the Marathas*, Vol. 1 (Bombay: Phoenix Publications, 1946), p. 152.
5. UNESCO World Heritage Centre, *Ajanta Caves* (Paris: UNESCO, 2021), p. 3.
6. Archaeological Survey of India, *Annual Report 2018–19* (New Delhi: Government of India, 2019), p. 45.
7. Indian National Trust for Art and Cultural Heritage (INTACH), *Guidelines for Conservation of Heritage Buildings* (New Delhi: INTACH, 2010), p. 21.
8. UNESCO, *World Heritage Conservation Guidelines* (Paris: UNESCO Publishing, 2021), p. 34.
9. Ministry of Culture, Government of India, *National Policy for Heritage Conservation* (New Delhi: Government of India, 2020), p. 18.
10. Prachi Deshpande, *Creative Pasts: Historical Memory and Identity in Western India* (New York: Columbia University Press, 2007), p. 210.
11. Archaeological Survey of India, *Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1958* (New Delhi: ASI Publication), p. 12.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

बाणूरगड किल्ला : जतन व संवर्धन काळाची गरज

डॉ. सुजाता सचिन देशमुख

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी.

Corresponding Author - डॉ. सुजाता सचिन देशमुख

DOI - 10.5281/zenodo.19664985

सारांश :

दुर्ग मानव जातीच्या इतिहासातील महत्त्वाचे अंग आहेत. महाराष्ट्रातील गडकोट हे आपल्या दृष्टीने तीर्थक्षेत्र आहेत. ताठकण्याने जगावे कसे, हे या किल्ल्यांच्या इतिहासातून समजते. आपल्या वीरतापूर्ण इतिहासाचे साक्षीदार हे किल्लेच आहेत. हे किल्ले केवळ लष्करी बांधकामे नसून ते सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व स्थापत्य इतिहासाचे जिवंत पुरावे आहेत. बाणूरगड किल्ला हा असाच एक महत्त्वाचा ऐतिहासिक वारसा आहे. काळाच्या ओघात नैसर्गिक आपत्ती, मानवी दुर्लक्ष, अतिक्रमण व योग्य देखभालीच्या अभावामुळे या किल्ल्याची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली आहे. प्रस्तुत संशोधन प्रबंधात बाणूरगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व, सद्यस्थिती, त्याला असलेले धोके, तसेच जतन व संवर्धनाची गरज आणि उपाययोजना यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनातून असे दिसून येते की, योग्य नियोजन, शासकीय व स्थानिक सहभाग आणि जनजागृती याच्या माध्यमातून बाणूरगड किल्ल्याचे प्रभावी जतन व संवर्धन शक्य आहे.

प्रस्तावना :

प्राचीन काळापासून मध्ययुगाच्या अस्तापर्यंत जगातील अनेक देशात राज्य निर्मिती व राज्यांची सुरक्षितता यासाठी गड, कोट व दुर्ग यांचा खूपच उपयोग झाला आहे. "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग" अशा शब्दांमध्ये मध्ययुगीन किल्ल्यांचे महत्त्व 'आज्ञापत्रात' रामचंद्रपत अमात्य यांनी स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी "तोरणा" किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. किल्ल्यांच्या साखळ्या निर्माण करून स्वराज्य विस्तार केला. मराठी राज्यात किल्ल्यांना विलक्षण महत्व प्राप्त करून दिले. या प्रत्येक किल्ल्याचा इतिहास म्हणजे शौर्याची गाथा तर आहेच पण त्याचबरोबर अंतर्गत कलह, विश्वासघात, फंद-फितुरी इत्यादीचाही तो वास्तव इतिहास आहे. स्वार्थत्यागाची तर ती मूर्तीमंत आणि सुंदर स्मारके सुद्धा आहेत. शिवशाहीचे यश दुर्गम गिरीदुर्गात दडले होते. कवी परमानंद "शिवभारत" या ग्रंथात लिहितात "प्रभूमुळे (राजा) दुर्ग दुर्गम होतो व दुर्गा मुळे प्रभू दुर्गम होतो." दोघांच्या अभावी शत्रूच दुर्गम होतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी गडकोटांची दुरुस्ती व नव्या गडांची उभारणी करून प्रभू व दुर्ग दोन्ही दुर्गम होतील याकडे लक्ष दिले.[1] पण आज जागतिकीकरण, शहरीकरण व औद्योगीकरणाच्या प्रक्रियेत किल्ल्यांचे महत्त्व दुर्लक्षित होत गेले. या किल्ल्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन केवळ पर्यटनापुरता मर्यादित न ठेवता त्यांचे शास्त्रीय पद्धतीने जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे. बाणूरगड किल्ल्याच्या बाबतीत ही गरज अधिक तीव्रतेने जाणवते. कारण त्यांची रचना, भौगोलिक स्थिती आणि ऐतिहासिक संदर्भ हे अत्यंत महत्त्वाचे आहेत.

संशोधनाची उद्दिष्टे:

1) बाणूरगड किल्ल्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
2) बाणूरगड किल्ल्याच्या सद्यस्थितीचे मूल्यमापन करणे.
3) बाणूरगड वारसा स्थळ म्हणून जतन व संवर्धनाची गरज स्पष्ट करणे.
4) बाणूरगड किल्ला संवर्धनासाठी व्यवहार्य उपाययोजना सुचवणे

संशोधन पद्धती :

"बाणूरगड किल्ला: जतन व संवर्धनाची गरज" या प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला असून, ऐतिहासिक ग्रंथ, संशोधन लेख, संदर्भ साहित्याचा अभ्यास, क्षेत्रभेट व प्रत्यक्ष निरीक्षण, स्थानिक नागरिक, इतिहास अभ्यासक यांच्याशी संवाद, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

भौगोलिक स्थान :

ऐतिहासिक महत्त्व लाभलेला व महाराष्ट्रातील गिरिदुर्ग असलेला बाणूरगड किल्ला सांगली जिल्ह्यातील खानापूर व आटपाडी तालुका व सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुका अशा तीन तालुक्यांच्या सीमारेषेवर हा बाणूरगड किल्ला स्थित आहे. शिवकाळात स्वराज्याच्या सीमारक्षेच्या दृष्टीने बाणूरगड किल्ल्यास अनन्यसाधारण महत्त्व होते. इतिहासातील बुसातिन-उस-सलातिन या साधन ग्रंथानुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी मांजरा नजीकच्या पर्वतावर एक मजबूत किल्ला बांधून त्यास भूपाळगड नाव दिले. तर एका लोककथेनुसार भूपाळसिंह राजाने हा गड बांधला म्हणून या गडाचे भूपाळगड असे नाव पडले.[2] तर किल्ल्यात असलेल्या बाणूर या गावामुळे हा गड बाणूरगड या नावानेदेखील ओळखला जातो. या किल्ल्याची उंची समुद्रसपाटीपासून 2982 फूट असून शिवकाळात आदिलशाहीच्या सीमारेषेवर असलेला हा किल्ला स्वराज्याच्या सीमा रक्षणासाठी तसेच पूर्वेकडील प्रदेशावर वचक ठेवण्यासाठी एक महत्त्वाचा किल्ला होता. किल्ला विस्ताराने प्रचंड असला तरी या ठिकाणी मोजकेच अवशेष आता उरले आहेत.[3]

बाणूरगड किल्ल्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

पूर्वी भूपाळ भूपाळसिंह राजा यांनी हा किल्ला बांधला असल्याने त्याला गोपाळगड असे नाव पडले. पण अलीकडच्या काळात त्याला बाणूरगड हे नाव प्रचलित आहे. हा एक डोंगरी किल्ला आहे पण त्याची प्रसिद्धी सिंहगड, पन्हाळगड याप्रमाणे आता प्रमाणे नाही हा गड तितका उंच व मोठा नाही. छत्रपती शहाजीराजे यांचे मलिकअंबरशी न पटल्याने इ. स. 1625 मध्ये ते आदिलशाहीत आले. आदिलशहाने त्यांना "सरलष्कर" हा किताब देऊन सत्कार केला., व इ. स. 1628 दरम्यानच्या कालखंडात छ. शहाजीराजांचा मोहिते घराण्यातील तुका बाईची विवाह झाला. त्यावेळी आदिलशहाने त्यांना खानापूर – आटपाडी - कासेगाव हा भाग पागेसाठी आहेर म्हणून दिला. त्यात भूपाळगडचा समावेश असावा. [4] छ. शिवाजी महाराजांचा पूर्वेस मोगल व विजापूरकरांशी संघर्ष चालू होता. अशावेळी आपल्या सैन्यात जवळपास आश्रयस्थान हवे होते म्हणून त्यांना हा गड हवा होता. बाणूर गावाजवळची टेकडी तिला तटबंदी बांधून छत्रपती शिवाजी महाराजांनी लढाऊ बनवली. या किल्ल्यावर सामान, सरंजाम व मालमत्ता ठेवण्यात येत असे. हा किल्ला लढावू शिबंदींनी, बहुत लढाया केलेल्या शिपाई लोकांनी भरून फार मजबती ठेवण्याविषयी हुकूम देऊन पक्का बंदोबस्त ठेविला. मात्र हे आश्रयस्थान मोगल किंवा

विजापूरकर केव्हातरी हिरावून घेणाऱ्याची कल्पना छत्रपती शिवाजी महाराजांना असल्याने त्यांनी भूपाळगडावर चाकणचा किल्ला मोठ्या मर्दमकिने लढवणाऱ्या प्रसिद्ध रणधुरंदर सेनानी फिरंगोजी नरसाळा याला किल्लेदार म्हणून नेमले होत. [5]

बाणूरगड किल्ल्याची सद्यस्थिती:

उंच अशा एका सुळक्यमुळे खानापूरच्या मुख्य पठारापासून बाणूरगड वेगळा झाला आहे. किल्ल्याच्या भिंती सध्या पडीक अवस्थेत आहेत. त्याचा आकार अनियमित आहे. पठारांच्या कडाची उंची कमी जास्त आहे. किल्ल्याच्या मध्यभागी असलेल्या टेकडी चा उपयोग बालेकिल्ला किंवा संकट प्रसंगी आश्रयस्थान म्हणून होत असावा. मात्र टेकडीभोवती तटबंदीचे अवशेष दिसत नाहीत. किल्ल्याच्या अगदी वरच्या टेकडीवर महादेवाचे मंदिर आहे. किल्ल्याच्या वायव्येस शुक्राचार्यांची गुहा नावाचे स्थान आहे. शेजारी पश्चिमेस श्रावणबाळाचे कावडीचे डोंगर व कोळदुर्ग हा किल्ला आहे. उत्तरे तळेवाडी व पूर्वे सोमेवाडी (सोलापूर जिल्हा) दक्षिणेस कवठेमंकाळ तालुक्याचा परिसर व आग्नेयस जत तालुका आहे. [6] किल्ल्याचा परिसर अंदाजे 250 ते 300 एकराचा आहे. किल्ल्याच्या उत्तर, पूर्व व आग्नेय बाजूकडे सहज जाता येते. किल्ल्याच्या बाजूस 700 फूट खोल दरी आहे. किल्ल्याच्या उत्तर व दक्षिण बाजू 60 फूट ते 100 फूट उंचीपर्यंत जमिनीला चढउतार आहेत. तेथे जाण्यासाठी उंच व अरुंद उंचवटा ओलांडून जावे लागते. बाणूरगडच्या आग्नेय बाजूस असलेल्या 8 किलोमीटर अंतरावरील जरंडी गावाकडे जाणारी मोठे रस्ते प्राचीन काळातही अस्तित्वात होते. या रस्त्यावरून किल्ल्यात साठवून ठेवलेल्या वस्तूंची ने-आण केली जाई. किल्ल्यात एक लहान तळे असून त्याच्या दक्षिण बाजूस मोठा तलाव आहे. जवळच एक वीर असून विहीर वर्षभर पाणी उपलब्ध असते. [7]

बहिर्जी नाईक समाधी :

समाधीचे बरेच दगड निष्ठून पडलेले, खालचा चौथराही कोपऱ्यावरचे दगड निष्ठुन पडल्यामुळे विद्रूप झालेला, ना दिवा ना नित्य, पूजा ना, माहिती फलक, ना संरक्षक कुंपण, ना भगवा ध्वज. ओसाड माळरानावर चार-पाच झाडांच्या आणि कोणत्या झुडपांच्या संगतीने गेले 300-350 वर्षे या परिस्थितीत ऊन- वारा- पाऊस यांचा मारा खात उभी असलेली ही समाधी होती स्वराज्याचे गुप्तहेर बहिर्जी नाईक यांची. [8] छ. शिवाजी महाराजांचा विश्वासू गुप्तहेर बहिरी नाईक यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील सिगवे नाईक या खेडेगावात इ. स. 1620 मध्ये झाला. बहिर्जी नाईक यांच्या गुप्तचर यंत्रणेने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला प्रचंड मदत केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रत्येक विजयामागे बहिर्जी नाईक यांच्या गुप्तहेर संघटनेचा मोठा वाटा आहे. छुप्या वेशात शत्रूच्या गोटात माहिती मिळवणारा कुशल गुप्तहेर म्हणून बहिर्जी नाईकांचा अलौकिक होता. छत्रपती शिवाजी महाराजांसाठी गुप्तहेरांचे एक मोठे जाळे बहिर्जी नाईक यांनी उभारून हिंदुस्तानभर कार्यरत ठेवले. पुरंदरचा तह, आग्र्याहून सुटका, सुरत स्वारी, सिंहगड मोहीम यासारख्या अनेक प्रसंगांमध्ये बहिर्जी नाईकांनी मराठी साम्राज्याचा अदृश्य आधारस्तंभ प्रमाणे कामगिरी केल्यामुळे अनेक विजय मराठ्यांना शक्य झाले.[9] बाणूरगडावरील लोककथानुसार आणि पारंपारिक माहितीनुसार या बाणूरगडावरील बाणलिंग महादेव मंदिराशेजारी असणारी समाधी बहिर्जी नाईकांची आहे. या मागची कथा अशी सांगितली जाते की, शत्रू विरुद्ध लढताना किंवा शत्रूचा पाठलाग चुकवताना त्यावेळी झालेल्या युद्धामध्ये बहिर्जी

नाईक या परिसरामध्ये अत्यंत गंभीर जखमी झाले. आणि आश्रयाला आले ते या बाणूरगडावरील बाणलिंग मंदिराच्या आणि इथेच त्या लढाईत झालेल्या अत्यंत प्राणांतिक गंभीर जखमांनी स्वराज्याचे हे गुप्तहेर प्रमुख बाणूरगडावर महादेव मंदिरापाशीच निधन पावले. याच ठिकाणी वृंदावन स्वरूपात ती समाधी आहे. जी मराठे आणि मुघल यांच्यात झालेल्या लढाईचा साक्षीदार आहे.[10]

बाणूरगड किल्ल्याच्या ऱ्हासाची कारणे:

नैसर्गिक कारणे : पावसामुळे होणारी धूप, वारा, तापमानातील बदल

मानवी दुर्लक्ष : नियमित देखभाल व संरक्षणाचा अभाव

अतिक्रमण : किल्ला परिसरात अतिक्रमण व अवैध बांधकामे

जागरूकतेचा अभाव : स्थानिक लोकांमध्ये वारसा संवर्धनाबाबत किंवा किल्ला संवर्धनाबाबत अपुरी जाणीव

शासकीय मर्यादा : निधी व मनुष्यबळाची कमतरता[11]

जतन व संवर्धनाची गरज :

- किल्ल्याची ऐतिहासिक ओळख पुढील पिढ्यांना मिळेल.
- सांस्कृतिक व पारंपारिक अस्मिता जपली जाईल.
- शैक्षणिक संशोधनाला चालना मिळेल.
- पर्यटन विकासामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला फायदा होईल.

म्हणूनच बाणूरगड किल्ल्याचे जतन व संवर्धन ही काळाची गरज आहे.[12]

संवर्धनासाठी उपाय योजना:

संरचनात्मक दुरुस्ती : तटबंदी व गुरुजांची शास्त्रीय पद्धतीने दुरुस्ती करणे.

अतिक्रमण निर्मूलन : किल्ला परिसर अतिक्रमण मुक्त करणे.

जनजागृती : स्थानिक लोकांसाठी वारसा संवर्धन कार्यक्रम राबवणे.

पर्यटन सुविधा : माहिती फलक मार्गदर्शक स्वच्छता व्यवस्था ठेवणे.

स्थानिक सहभाग : ग्रामस्थ स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग घेणे.

शासकीय समन्वय : पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली काम करणे.[13]

निष्कर्ष :

महाराष्ट्र राज्य हे देशात एकमेव राज्य आहे की, इथे मोठ्या संख्येने गड किल्ले आहेत. हे गडकिल्ले आपल्या दृष्टीने तीर्थक्षेत्रेच आहेत.ताठकण्याने जगावे कसे, हे या किल्ल्यांच्या इतिहासातून समजते. आपल्या वीरतापूर्ण इतिहासाचे साक्षीदार हे किल्ले आहेत. गुप्तहेर खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक यांच्या नावाने प्रसिद्ध पावलेला बाणूरगड किल्ला आपल्याला चैतन्यशाली इतिहासाच्या पराक्रमाचे दर्शन हाच बाणूरगड आपला प्रेरणास्त्रोत आहे. याच गडावर बहिर्जी नाईक यांचा मृत्यू झाला होता. यांचा ऐतिहासिक वारसा सांगणारा बाणूरगड पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे. यासाठी या गडाचे जतन व संवर्धन करणे आपले कर्तव्य आहे शासनाचे पुरातत्त्व खाते, स्थानिक प्रशासन, अभ्यासक, समाज व वनविभाग यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच सहकार्य करून गडावर स्वच्छता राखणे त्याचे पावित्र्य जपणे आवश्यक आहे. या किल्ल्याचे संरक्षण

करणे म्हणजे आपल्या इतिहासाचे, संस्कृतीचे व अस्मितेचे संरक्षण करण्यासारखे आहे.

संदर्भ:

1. प्रा. बी. एम. खाडे, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, कोल्हापूर. 13 वे अधिवेशन आटपाडी कॉलेज, आटपाडी स्मरणिका दिनांक 9 व 10 फेब्रुवारी 2008. पृष्ठ क्र. 57.
2. http:// mr. www. org Page No. 1.
3. सुरेश निमकर, दुर्ग भरारी, भटकंती भूपाळगड, www.durgbharari.com
4. प्रा. बी एम खाडे, उपरोक्त स्मरणिका पृष्ठ क्रमांक 57
5. कित्ता पृष्ठ क्रमांक 58.
6. शिवभक्त सुवास घोरपडे Blogger Com. सातारा महाराष्ट्र इंडिया.
7. उपरोक्त पृष्ठ क्रमांक 57
8. प्रल्हाद कुलकर्णी, बहिर्जी नाईक आणि बाणूरगड, थिंक महाराष्ट्र. कॉम 4 ऑक्टोबर 2021.
9. उपरोक्त प्रल्हाद कुलकर्णी
10. किल्ले आणि ट्रेक्स, भूपाळगड सांगली जिल्ह्यातील एक डोंगरी किल्ला, 6 मार्च 2018.
11. देशपांडे द.ग., महाराष्ट्रातील किल्ले, डायमंड पब्लिकेशन ,पुणे. 2014.
12. गायकवाड आर.डी., शिवाजी महाराजांचे सहा किल्ले, अरुण प्रकाशन, कोल्हापूर .2009.
13. देसाई रमेश, शिवकालीन किल्ले, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. 2012.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सातारा शहरातील वारसा स्थळे जतन : समस्या आणि उपाय

प्रा. शिताबाई बालासो सरगर

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

Corresponding Author - प्रा. शिताबाई बालासो सरगर

DOI - 10.5281/zenodo.19665014

प्रस्तावना :

महाराष्ट्रातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेने समृद्ध असे सातारा शहर मराठा साम्राज्याच्या इतिहासाशी घट्ट जोडलेले आहे. छत्रपतींची राजधानी म्हणून ओळखले जाणारे सातारा हे किल्ले, मंदिरे, तलाव, वाडे, प्राचीन जलव्यवस्था आणि नैसर्गिक वारसा यांमुळे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे ठरते. सातारा हे शहर मराठा साम्राज्याच्या उत्तरार्धात राजधानी म्हणून विकसित झाले. छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात साताऱ्याला राजकीय व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले.परंतु वेगाने होणारे शहरीकरण, लोकसंख्या वाढ, पर्यावरणीय बदल आणि प्रशासनिक दुर्लक्ष यांमुळे या वारसा स्थळांचे जतन आज गंभीर प्रश्न बनले आहे. या संशोधन निबंधात सातारा शहरातील प्रमुख वारसा स्थळांची ओळख करून देत त्यांच्या जतनासमोरील समस्या आणि त्यावर उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

१) सातारा शहरातील प्रमुख वारसा स्थळांची ओळख करणे.

२) वारसा स्थळांच्या जतनासमोरील समस्या अभ्यासणे.

३) जतनासाठी प्रभावी उपाय सुचवणे.

४) स्थानिक प्रशासन व नागरिकांची भूमिका स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती (Research Methodology):

या संशोधनासाठी गुणात्मक (Qualitative) व परिमाणात्मक (Quantitative) दोन्ही पद्धतींचा वापर करण्यात आला.

(अ) प्राथमिक साधने (Primary Sources): स्थळभेट (Field Visit), छायाचित्रण व प्रत्यक्ष निरीक्षण, स्थानिक नागरिक व तज्ज्ञ मुलाखती, प्रश्नावली सर्वेक्षण

(आ) द्वितीयक साधने (Secondary Sources): पुस्तके व संशोधन निबंध, सरकारी अहवाल, पुरातत्व विभागाची कागदपत्रे,पर्यटन विभागाची माहिती

समस्या निवेदन:

अजिंक्यतारा हा सातारच्या अस्मितेचा केंद्रबिंदू असला, तरी तिथे पायाभूत सुविधांचा (उदा. पिण्याचे पाणी, माहिती फलक, कचरा व्यवस्थापन) अभाव आहे. किल्ल्याच्या तटबंदीची होणारी पडझड थांबवण्यासाठी तातडीने पुरातत्वीय संवर्धनाची गरज आहे. गडावरील वृक्षारोपण मोहिमेला वैज्ञानिक जोड देण्याची आवश्यकता आहे जेणेकरून मूळ वास्तूला धोका पोहोचणार नाही. अदालत वाड्यासारख्या ऐतिहासिक वास्तू सध्या शासकीय

कामांसाठी वापरल्या जात असल्या तरी, त्यांच्या मूळ लाकडी कोरीव कामाची आणि रचनेची हानी होत आहे. या वास्तूंचे 'हेरिटेज स्ट्रक्चर ऑडिट' होणे आवश्यक आहे.सातारा शहरातील जुने वाडे,यवतेश्वर मंदिर, माहुली येथील प्राचीन मंदिरांची पडझड होत आहे. यांचे जतन करणे गरजेचे आहे.

सातारा शहरातील प्रमुख वारसा स्थळे:

१) अजिंक्यतारा किल्ला : अजिंक्यतारा किल्ला हे मराठा साम्राज्याशी संबंधित एक अत्यंत महत्त्वाचे ऐतिहासिक किल्ला आहे. "अजिंक्य" शब्दाचा अर्थ "अपराजित" असा होतो, आणि "तारा" म्हणजे "तल" किंवा "ढिगारा". म्हणजेच, हा किल्ला "जिंकता येणारा नाही" अशी लोकप्रिय मान्यता मिळवलेला आहे. सातारा शहराच्या दक्षिण दिशेला असलेल्या अजिंक्यतारा डोंगरावर (४४०० फूट उंचीवर) हा किल्ला वसलेला आहे. याला 'सातारा किल्ला' म्हणूनही ओळखले जाते.

ऐतिहासिक पार्श्वभूमी:

स्थापना: या किल्ल्याचे बांधकाम शिलाहार वंशातील राजा दुसरा भोज याने ११९० मध्ये केले होते. बहामनी आणि आदिलशाही: पुढे हा किल्ला बहामनी सत्ता आणि नंतर विजापूरच्या आदिलशाहीच्या ताब्यात होता.मराठा साम्राज्य: १६७३मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला जिंकला. शिवाजी महाराजांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी येथे काही काळ वास्तव्य केले होते. मुघल आक्रमण: १७०० मध्ये औरंगजेबाने या किल्ल्याला वेढा घातला. कठीण लढाईनंतर मुघलांनी तो जिंकला आणि त्याचे नाव 'आझमतारा' ठेवले.पुनर्विजय: १७०८ मध्ये महाराणी ताराबाईंच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी पुन्हा किल्ला जिंकला आणि त्याचे नामकरण 'अजिंक्यतारा' केले. १८१८ मध्ये हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.

भौगोलिक आणि सामरिक महत्त्व:

अजिंक्यतारा हा किल्ला 'दख्खनच्या पठाराचे प्रवेशद्वार' मानला जात असे. स्थान: हा किल्ला सातारा शहरावर लक्ष ठेवण्यासाठी आणि दक्षिण महाराष्ट्रातील हालचालींवर नियंत्रण मिळवण्यासाठी मोक्याच्या ठिकाणी आहे.हवामान: डोंगराळ भागामुळे येथे नैसर्गिक संरक्षण मिळते.

वास्तुकला आणि प्रेक्षणीय स्थळे :



मुख्य दरवाजा



किल्ल्यावरील तलाव



अजिंक्यतारा किल्ला (हिंदवी स्वराज्याची चौथी राजधानी..



वाड्याचे अवशेष



मंदिर

- **मुख्य दरवाजा:** किल्ल्याला दोन भक्कम दरवाजे आहेत. मुख्य दरवाजा उत्तर दिशेला आहे.
- **तटबंदी**: किल्ल्याची तटबंदी आजही बऱ्याच अंशी सुरक्षित आहे. याची लांबी साधारणपणे २ ते ३ किमी आहे.
- **पाण्याचे स्त्रोत:** किल्ल्यावर अनेक पाण्याचे टाके आणि विहिरी आहेत, जे किल्ल्याच्या स्वावलंबनाचे प्रतीक आहेत.
- **मंदिरे:** किल्ल्यावर मंगलाई देवीचे मंदिर आहे, जिला सातारची ग्रामदैवत मानले जाते. तसेच हनुमानाचे छोटे मंदिरही आहे.
- **प्रसारण केंद्र:** सध्या किल्ल्यावर आकाशवाणी आणि दूरदर्शनची उंच टॉवर्स किल्ल्याचे मूळ बांधकाम मध्ययुगीन काळात झाल्याचा इतिहासात उल्लेख आढळतो. शिवाजी महाराजांनी मराठा साम्राज्याच्या विस्तारात याचा वापर रणनीतिक ठिकाण म्हणून केला.

यवतेश्वर मंदिर:

साताऱ्याच्या पश्चिमेला एका उंच टेकडीवर वसलेले यवतेश्वर मंदिर हे केवळ धार्मिक श्रद्धास्थान नसून निसर्गप्रेमी आणि ट्रेकर्ससाठी एक उत्तम ठिकाण आहे.




मंदिर



मंदिरातील नंदी



खांबावरील नक्षीकाम



गाभारा



यवतेश्वर मंदिर



अखंड दीपमाळ

ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व:

- **प्राचीन शिव मंदिर:** यवतेश्वर हे भगवान शंकराचे (महादेवाचे) मंदिर आहे. हे मंदिर यादवकालीन किंवा त्याही आधीच्या काळातील असावे असा अंदाज लावला जातो.
- **हेमाडपंती शैली:** मंदिराचे बांधकाम दगडी असून ते पारंपारिक हेमाडपंती वास्तुशैलीमध्ये आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात शिवलिंग असून तिथे मिळणारी शांतता मनाला प्रसन्न करते.

मंदिराची खास आकर्षणे :

- **दगडी नंदी:** मंदिराच्या प्रवेशद्वारासमोर एक सुबक आणि भव्य दगडी नंदी आहे.
- **दीपकला आणि कोरीव काम:** मंदिराच्या खांबांवर आणि बाहेरील भिंतींवर जुन्या काळातील साधे पण आकर्षक कोरीव काम पाहायला मिळते.
- **उत्सव:** महाशिवरात्रीला येथे मोठी जत्रा भरते. सातारकर आणि आजूबाजूच्या गावांतील लोक मोठ्या संख्येने येथे दर्शनासाठी येतात.

चार भिंती:

सातारा शहराच्या संरक्षणासाठी बांधलेल्या चार भिंती ऐतिहासिक नगररचनेचे उदाहरण आहेत.सातारा शहरातील 'चारभिंती' हे ठिकाण केवळ एक प्रेक्षणीय स्थळ नसून ते महाराष्ट्राच्या दैदिप्यमान इतिहासाचे आणि देशभक्तीचे प्रतीक आहे.



चारभिंती

- **ऐतिहासिक महत्त्व :** चारभिंतीचा इतिहास प्रामुख्याने १८५७ च्या स्वातंत्र्यसमराशी जोडलेला आहे.
- **अजिंक्यतारा किल्ल्याची सुरक्षा:** हे ठिकाण अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशी आहे. पूर्वी हे मराठा साम्राज्यातील छत्रपतींच्या घराण्याचे एक विश्रामस्थान किंवा संरक्षणात्मक चौकी म्हणून ओळखले जात असे.
- **१८५७ चा लढा:** १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात सातारा केंद्रास्थानी होते. या लढ्यात ज्या क्रांतिकारकांनी बलिदान दिले, त्यांच्या स्मृतीप्रित्यार्थ हे स्मारक उभारण्यात आले आहे.

स्मारकाची रचना:

- **प्रतापसिंह महाराज:** सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी १८३० च्या सुमारास येथे एक भव्य इमारत बांधली होती, जिला 'चारभिंती' म्हटले जाते.
- **हुतात्मा स्मारक:** १९७७ मध्ये या जागेचे नूतनीकरण करून येथे एक भव्य हुतात्मा स्तंभ उभारण्यात आला. या स्तंभावर १८५७ च्या

लढ्यातील झाशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे आणि सातारचे रंगो बापूजी गुप्ते यांची नावे कोरलेली आहेत.

- **पर्यटनासाठी आकर्षण:** शहराचे विहंगम दृश्य: चारभिंती हे उंचावर असल्यामुळे तिथून संपूर्ण सातारा शहराचे अतिशय सुंदर दृश्य दिसते. विशेषतः रात्रीच्या वेळी शहराचे दिवे खालून चमकताना पाहणे हा एक सुखद अनुभव असतो.
- **अजिंक्यतारा ट्रेक:** अजिंक्यतारा किल्ल्यावर जाण्यासाठीचा मार्ग याच ठिकाणावरून जातो.



श्री काशी विश्वेश्वर मंदिर (संगम माहुली)

हे या परिसरातील सर्वात मोठे आणि महत्त्वाचे मंदिर आहे.

- **स्थापना:** हे मंदिर १७३५ मध्ये श्रीपतराव पंत प्रतिनिधी यांनी बांधले. यासाठीची जमीन छत्रपती शाहू महाराजांनी दान दिली होती.
- **वास्तुकला:** हे मंदिर हेमाडपंथी शैलीत असून, काळ्या पाषाणात (Basalt stone) बांधलेले आहे. यात गर्भगृह, अंतराळ आणि एक प्रशस्त सभामंडप आहे.
- **दीपस्तंभ:** मंदिरासमोर सुमारे ६० फूट उंच, एकाच दगडात कोरलेला भव्य दीपस्तंभ आहे, जो या मंदिराचे मुख्य आकर्षण आहे.


माहुली येथील स्मारके:

साताऱ्यातील माहुली येथील प्राचीन शिव मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून, मराठा साम्राज्यातील वास्तुकलेचा आणि इतिहासाचा एक अनमोल ठेवा आहे. या परिसराला 'दक्षिण काशी' म्हणून ओळखले जाते.येथे प्रामुख्याने संगम माहुली आणि क्षेत्र माहुली अशी दोन गावे असून, कृष्णा आणि वेण्णा नद्यांच्या संगमावर ही मंदिरे वसलेली आहेत.



- **नंदी मंडप:** मंदिराच्या प्रवेशद्वारावर अतिशय सुंदर नंदी मंडप असून, त्यावरील घुमट आणि कोरीव काम प्रेक्षणीय आहे.

श्री रामेश्वर मंदिर (क्षेत्र माहुली):



श्री रामेश्वर मंदिर (क्षेत्र माहुली)

नदीच्या दुसऱ्या तीरावर म्हणजेच क्षेत्र माहुली येथे हे शिव मंदिर आहे.

- **वैशिष्ट्य:** हे मंदिर विश्वेश्वर मंदिरापेक्षा आकाराने लहान आहे, परंतु तितकेच पवित्र मानले जाते. येथील शिवलिंगाच्या भोवती नेहमी पाणी असते.
- **वास्तुकला:** या मंदिराचे शिखर नागर शैलीतील असून ते वीट आणि चुन्याच्या बांधकामात आहे.

ऐतिहासिक महत्त्व:

- **समाधी स्थळे:** संगम माहुली येथे छत्रपती शाहू महाराज, महाराणी ताराबाई आणि महाराणी येसूबाई यांची समाधी स्थळे आहेत. तसेच शाहू महाराजांचा निष्ठावान कुत्रा 'खंड्या' याचीही समाधी येथे पाहायला मिळते.
- **रामशास्त्री प्रभुणे:** पेशवे काळातील प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांचे हे जन्मस्थान आहे.
- **संगम घाट:** कृष्णा आणि वेण्णा नद्यांच्या संगमावर असलेला हा घाट अतिशय शांत आणि निसर्गरम्य आहे.
- **उत्सव:** महाशिवरात्री आणि कार्तिक पौर्णिमेला येथे मोठी यात्रा भरते.

अदालत वाडा:





सातारा शहरातील 'अदालत वाडा' ही वास्तू मराठा साम्राज्याच्या अस्ताच्या काळातील आणि ब्रिटिश कालखंडाच्या सुरुवातीच्या इतिहासाची साक्षीदार आहे. छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या कारकिर्दीत बांधलेली ही वास्तू तिच्या भव्यतेसाठी आणि ऐतिहासिक कार्यासाठी ओळखली जाते.

ऐतिहासिक पार्श्वभूमी:

- **निर्मिती:** हा वाडा छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी साधारण १८२४-२५ च्या सुमारास बांधला.
- **नाव:** सुरुवातीला या वाड्याचा उपयोग न्यायदानासाठी (न्यायालयीन कामांसाठी) केला जात असे, म्हणून याला 'अदालत वाडा' असे नाव पडले.
- **कार्यालयीन उपयोग:** नंतरच्या काळात येथे साताऱ्याचे 'कलेक्टर ऑफिस' (जिल्हाधिकारी कार्यालय) देखील अनेक वर्षे कार्यरत होते.

वास्तुकलेचे स्वरूप:

- **मराठा शैली:** हा वाडा मराठा स्थापत्यशैलीचा एक उत्कृष्ट नमुना आहे. यात भव्य प्रवेशद्वार, प्रशस्त चौक आणि लाकडी कोरीव काम पाहायला मिळते.
- **मजबुती:** वाड्याचे बांधकाम दगडी आणि लाकडी असून ते आजही अतिशय भक्कम स्थितीत आहे.
- **रचना:** वाड्याच्या आतमध्ये मोठे हॉल (सदर) असून, तिथे त्याकाळी दरबारी कामकाज चालायचे.


वाड्याचे महत्त्व:

- **प्रशासनाचे केंद्र:** साताऱ्याच्या प्रशासकीय इतिहासात या वाड्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. साताऱ्याचे राज्य खालसा झाल्यानंतर इंग्रजांनी याच वाड्याचा वापर आपले मुख्य कार्यालय म्हणून केला होता.
- **छत्रपतींचा वारसा:** हा वाडा आजही छत्रपतींच्या प्रशासकीय दूरदृष्टीची आठवण करून देतो.
- **सध्याची स्थिती:**सध्या हा वाडा महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत असून, येथे काही सरकारी कार्यालये आणि जुन्या कागदपत्रांचे जतन केले जाते. साताऱ्यातील राजवाडा परिसरापासून हा वाडा जवळच आहे.

बारा मोटांची विहीर :

साताऱ्याजवळील लिंब गावातील 'बारा मोटांची विहीर' ही एक ऐतिहासिक आणि स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना असलेली वास्तू आहे. ही विहीर केवळ पाणी साठवण्याचे साधन नसून, ती जमिनीखालील एका देखण्या महालासारखी आहे.




बारा मोटांची विहीर

इतिहास (History):

- **निर्मिती:** या विहिरीचे बांधकाम इसवी सन १७१९ ते १७२४ दरम्यान झाले.
- **कोणी बांधली:** छत्रपती शाहू महाराजांच्या राणी श्रीमंत विरुबाई भोसले यांनी ही विहीर बांधली.
- **उद्देश:** त्या काळी परिसरातील सुमारे ३०० एकर आमराईला पाणीपुरवठा करण्यासाठी या विहिरीची निर्मिती करण्यात आली होती.
- **आकार:** विहीर अष्टकोनी असून तिचा आकार वरून पाहिल्यास शिवलिंगासारखा दिसतो.
- **खोली आणि व्यास**: विहीर अंदाजे ११० फूट खोल आणि ५० फूट व्यासाची आहे.
- **बारा मोटा:** या विहिरीवरून एकाच वेळी १२ मोटांनी पाणी उपसण्याची सोय आहे, म्हणून याला 'बारा मोटांची विहीर' म्हणतात. (प्रत्यक्षात तिथे १५ मोटांसाठी जागा आहे, पण १२ मोटा नियमित चालत असत).
- **जमिनीखालील महाल:** विहिरीत उतरण्यासाठी दगडी पायऱ्यांचा सुंदर जिना आहे. विहिरीच्या आत एक राजमहाल (खलबतखाना) आहे. असे म्हटले जाते की, शाहू महाराज आणि त्यांचे पेशवे येथे गुप्त चर्चा किंवा बैठकी करत असत.
- **कोरीव काम:** महालाच्या खांबांवर आणि भिंतींवर गणपती, हनुमान, हत्ती, घोडे आणि फुलांची सुंदर नक्षी कोरलेली आहे. विहिरीच्या भिंतीवर 'व्याल' (वाघाचे तोंड आणि सिंहाचे शरीर) असलेली शिल्पे राज्याच्या समृद्धीचे प्रतीक मानली जातात.

जतन प्रक्रियेतील मुख्य समस्या :

वारसा स्थळांच्या ऱ्हासासाठी खालील घटक कारणीभूत ठरत आहेत:

- **अतिक्रमण:** किल्ल्यांच्या पायथ्याशी आणि ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात वाढती अनधिकृत बांधकामे.
- **देखभालीचा अभाव:** अनेक जुने वाडे आणि स्मारके निधी अभावी किंवा मालकी हक्काच्या वादांमुळे मोडकळीस आली आहेत.
- **पर्यटकांची बेजबाबदार वर्तणूक:** भिंतीवर नावे कोरणे, कचरा टाकणे आणि ऐतिहासिक वास्तूंचे विद्रुपीकरण करणे. कास पठार, forts आणि संग्रहालये यांना monsoon मध्ये हजारो पर्यटक येतात, ज्यामुळे ओढणी, कचरा व पायवाटे खराब होतात.यामुळे गंभीर पर्यावरणीय व समाज-सांस्कृतिक तणाव निर्माण होतो.
- **शहरीकरण:** आधुनिक रस्ते आणि इमारतींच्या बांधकामामुळे ऐतिहासिक परिसराचे मूळ स्वरूप (Heritage Skyline) नष्ट होत आहे.
- **हवामान आणि प्रदूषण:** पावसामुळे होणारी झीज आणि वाढत्या प्रदूषणामुळे दगडी बांधकामावर होणारे विपरीत परिणाम.अनेक किल्ले व ऐतिहासिक वास्तू आजही नैसर्गिक क्षय, पर्जन्य आणि मानवी नासाऱ्यामुळे खराब होत आहेत.पुरातत्व, मनोहर विकसन आणि इतर विभागांकडून वेळेवर योग्य दुरुस्ती नाही होत.
- **स्थानीय समुदायांची सहभागिता कमी:** खूप heritage स्थळे आजही स्थानिक समुदायाचे प्रोत्साहन व सहभागा शिवाय जतन होत आहेत,

ज्यामुळे जतन कार्य दीर्घकाल टिकत नाही.अनेक वारसा स्थळे बदलेली किंवा विसरली जात असतात त्यामुळे पुढील पिढीपर्यंत त्यांच्या महत्त्वाची माहिती कमी पोहोचते.

- **पर्यटक दबाव (Over-tourism):** कास पठार, forts आणि संग्रहालये यांना monsoon मध्ये हजारो पर्यटक येतात, ज्यामुळे ओढणी, कचरा व पायवाटे खराब होतात.यामुळे गंभीर पर्यावरणीय व समाज-सांस्कृतिक तणाव निर्माण होतो.
- **आर्थिक संसाधनांची कमतरता आणि नियोजनाचा अभाव:** भव्य वारसा स्थळांवर पुरेसे निधी आणि राखण कामांचे नियोजन नसल्यामुळे दीर्घकालीन संवर्धन कठीण आहे.काही प्रकल्पांवर निधी मंजूर झाला असला तरी (उदा. समाधी व किल्ले सुशोभीकरण) ते पूर्ण होण्यास वेळ लागतो.

जतनासाठी उपाययोजना :

या वारशाचे संवर्धन करण्यासाठी शासन आणि नागरिक स्तरावर खालील पावले उचलणे गरजेचे आहे:

- **हेरिटेज वॉक (Heritage Walk):** शहरात ऐतिहासिक स्थळांना जोडणारा 'हेरिटेज वॉक' सुरू केल्यास पर्यटनाला चालना मिळेल आणि लोकांमध्ये जागृती निर्माण होईल.
- **लोकसहभाग:** स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी 'किल्ला स्वच्छता मोहीम' किंवा 'दत्तक योजना' राबवून वास्तूंचे जतन करावे.
- **कठोर कायदे आणि अंमलबजावणी:** ऐतिहासिक वास्तूंच्या १०० ते ३०० मीटर परिसरात बांधकामावर कडक निर्बंध हवेत.
- **डिजिटल दस्तऐवजीकरण:** ३डी स्कॅनिंग आणि फोटोग्राफीच्या माध्यमातून प्रत्येक वास्तूची माहिती जतन करणे, जेणेकरून भविष्यात पुनर्बांधणीसाठी त्याचा उपयोग होईल.
- **माहिती फलक आणि संग्रहालय:** प्रत्येक वारसा स्थळावर त्याचा इतिहास सांगणारे फलक लावणे आणि जुन्या राजवाड्यासारख्या ठिकाणी सुसज्ज वस्तुसंग्रहालय विकसित करणे.
- **विशेष टिप:** साताऱ्याचा वारसा केवळ दगड-विटांचा नसून तो आपल्या गौरवशाली इतिहासाचा जिवंत पुरावा आहे. त्याचे जतन करणे ही केवळ सरकारचीच नाही, तर प्रत्येक सातारकराची जबाबदारी आहे.

निष्कर्ष :

सातारा हे केवळ शहर नसून छत्रपतीच्या वारशाचे प्रतिक आहे. या संशोधनाद्वारे वारशाचे दस्तऐवजीकरण केल्यास भविष्यातील पिढीला तो अभ्यासात येईल. पर्यटन विकासाला चालना दिल्यास साताऱ्याचा जागतिक पर्यटन नकाशावर दर्जा सुधारेल ज्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल.धोरणात्मक बदल घडवण्यासाठी हा रिसर्च पेपर स्थानिक प्रशासन आणि पुरातत्व विभागाला सुधारणा करण्यासाठी एक वैज्ञानिक पुरावा किंवा डेटा म्हणून उपयोगी पडू शकतो.सातारा शहरामध्ये अजिंक्यतारा व्यतिरिक्त अनेक ऐतिहासिकविहिरी, मंदिरे, वाडे अपरिचित आहेत. त्यांना प्रकाशात आणण्यासाठी हे संशोधन गरजेचे आहे.

संदर्भ साधने:

प्राथमिक ऐतिहासिक साधने (Primary Sources):

१) सातारा जिल्हा गॅझेटियर (Satara District Gazetteer)

२) पेशवे दप्तर (पुणे): नगरपालिका रेकॉर्ड्स: सातारा नगरपरिषदेकडील जुन्या वास्तूंच्या नोंदी आणि विकास आराखडा (DP Plan).

ग्रंथ आणि पुस्तके (Secondary Sources):

१) 'मराठ्यांचा इतिहास' (History of the Marathas): ग्रँट डफ(James Grant Duff).

२) 'सातारा जिल्ह्याचा इतिहास': डॉ. बाबासाहेब साखरे

३) 'Heritage Conservation in India': वारसा जतनाच्या तांत्रिक बाजू समजून घेण्यासाठी एन. एल. बत्रा किंवा बी. के. थापर यांची पुस्तके.

४) 'ऐतिहासिक सातारा': स्थानिक अभ्यासकांनी सातारा शहराच्या गल्ल्या आणि पेठांवर लिहिलेली पुस्तके.

५) संशोधन लेख आणि रिपोर्ट्स (Research Papers & Reports)

६) ASl (Archaeological Survey of India) Reports: अजिंक्यतारा किल्ला आणि इतर संरक्षित स्मारकांच्या स्थितीबद्दलचे अहवाल.

७) Socio-Economic Review: सातारा जिल्ह्याचे आर्थिक सर्वेक्षण, ज्यातून पर्यटनाचा वाटा समजतो.

८) डिजिटल आणि इंटरनेट साधने (Web Resources)

९) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC): maharashtratourism.gov.in वरून सातारच्या पर्यटन धोरणाची माहिती.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

गड–किल्ले आणि वैचारिक जतन : वारसा संवर्धनाची नवदृष्टी

सोहम प्रणिता सतीश पावशे

सहाय्यक प्राध्यापक,

रयत शिक्षण संस्थेचे रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालय स्वायत्त ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर

Corresponding Author - सोहम प्रणिता सतीश पावशे

DOI - 10.5281/zenodo.19665038

सारांश :

महाराष्ट्रातील गड-किल्ले हे राज्याच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राजकीय वारशाचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहेत. विशेषतः शिवकालीन काळात गड-किल्ल्यांनी स्वराज्य स्थापनेत आणि संरक्षणात मोलाची भूमिका बजावली. प्रस्तुत संशोधनामध्ये गड-किल्ल्यांच्या वैचारिक संवर्धनाची आवश्यकता, त्यामागील कारणे आणि सद्यस्थितीतील आव्हाने यांचा अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतींचा अवलंब करून प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. संशोधनातून असे आढळते की भौतिक संवर्धनासाठी विविध स्तरांवर प्रयत्न होत असले तरी वैचारिक संवर्धनाचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. किल्ल्यांकडे केवळ पर्यटन स्थळ म्हणून पाहण्याची प्रवृत्ती वाढत असून त्यांच्या ऐतिहासिक मूल्यांकडे दुर्लक्ष होत आहे. योग्य माहितीचा अभाव, अपुरी ऐतिहासिक जाणीव आणि सामाजिक माध्यमांचा अयोग्य वापर यांमुळे गड-किल्ल्यांविषयी गैरसमज निर्माण होण्याची शक्यता वाढते. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक उपक्रम, जनजागृती, अभ्यासभेटी आणि विश्वसनीय माहितीचा प्रसार यांद्वारे वैचारिक संवर्धन प्रभावीपणे साध्य होऊ शकते, असा निष्कर्ष या संशोधनातून मांडण्यात आला आहे. गड-किल्ल्यांचे जतन हे केवळ वास्तूंचे संरक्षण नसून इतिहासातील मूल्ये, प्रेरणा आणि सामूहिक अस्मिता जपण्याची प्रक्रिया आहे, हे या अभ्यासाचे मूलभूत प्रतिपादन आहे.

महत्वाचे शब्द: गड-किल्ले, वैचारिक संवर्धन, भौतिक संवर्धन, शिवकालीन इतिहास, स्वराज्य, ऐतिहासिक वारसा, जनजागृती, सांस्कृतिक अस्मिता.

प्रस्तावना:

गडकोट आणि किल्ले हे महाराष्ट्राच्या इतिहासातील केवळ दगडांनी बांधलेले बांधकाम नसून ते आपल्या सामूहिक स्मृतीचे, अभिमानाचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. विशेषतः छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात गड-किल्ल्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग" असे स्पष्टपणे नमूद करणारे रामचंद्रपंत अमात्य यांनी किल्ल्यांचे राजकीय आणि लष्करी महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यांच्या 'आज्ञापत्र'मधील विचारांवरून हे दिसून येते की किल्ले हे केवळ संरक्षणासाठी नव्हे, तर सुयोग्य राज्यकारभारासाठीही अत्यावश्यक घटक होते. महाराष्ट्रातील डोंगररांगा, घाटमाथे आणि सागरी किनाऱ्यावर उभारलेले किल्ले हे स्वराज्याच्या दूरदृष्टीचे उदाहरण आहेत. रायगड किल्ला हा राजधानीचा गड म्हणून ओळखला जातो; येथेच शिवराज्याभिषेक झाला आणि स्वराज्याला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले. प्रतापगड किल्ला येथे घडलेली अफझलखानाशी झालेली ऐतिहासिक घटना

स्वराज्याच्या धैर्याची साक्ष देते. तसेच पन्हाळा किल्ला हा अनेक लढायांचा साक्षीदार ठरला आहे. या प्रत्येक किल्ल्यामागे एक इतिहास, एक संघर्ष आणि एक प्रेरणा दडलेली आहे.

आजच्या काळात या गड-किल्ल्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन मात्र बदलताना दिसतो. अनेक जण किल्ल्यांवर पर्यटनाच्या हेतूने भेट देतात; फोटो, व्हिडिओ आणि सामाजिक माध्यमांवरील प्रसिद्धी यालाच अधिक महत्त्व दिले जाते. इतिहास समजून घेण्याची, त्या वास्तूंच्या संदर्भाचा अभ्यास करण्याची वृत्ती मात्र कमी होत चालली आहे. त्यामुळे किल्ले हे केवळ पर्यटन स्थळ म्हणूनच ओळखले जाऊ लागले आहेत. ही स्थिती चिंतेची आहे. भौतिक संवर्धन म्हणजे दुरुस्ती, स्वच्छता, संरक्षण आणि देखभाल — हे निश्चितच आवश्यक आहे. शासन, पुरातत्त्व विभाग आणि विविध स्वयंसेवी संस्था यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु केवळ दगडी बांधकाम टिकवून ठेवणे पुरेसे नाही; त्या मागील विचार, मूल्ये आणि इतिहास जिवंत ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे. यालाच वैचारिक संवर्धन म्हणता येईल. किल्ल्यांवरील प्रत्येक तटबंदी, दरवाजा, बुरुज आणि पाण्याची टाकी हे त्या काळातील शिस्त, नियोजन आणि आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. हे समजून घेतल्याशिवाय किल्ल्यांचा खरा अर्थ लक्षात येत नाही. वैचारिक संवर्धनासाठी शैक्षणिक स्तरावर इतिहासाचे योग्य सादरीकरण, मार्गदर्शित अभ्यासभेटी, विश्वसनीय माहितीचा प्रसार आणि समाजामध्ये ऐतिहासिक जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. गड-किल्ले हे केवळ भूतकाळाची आठवण नाहीत; ते आजच्या पिढीला धैर्य, संघटनशक्ती आणि दूरदृष्टी यांचे धडे देणारे जिवंत विद्यालय आहेत.

म्हणूनच गड-किल्ल्यांचे जतन हे केवळ शासकीय जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. इतिहासाचा अभिमान बाळगणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्याचे संवर्धन करणेही गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये गड-किल्ल्यांच्या वैचारिक संवर्धनाची आवश्यकता, त्यामागील कारणे आणि आजच्या सामाजिक परिस्थितीत त्यासाठी करता येणाऱ्या उपाययोजनांचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. इतिहास जपला तरच भविष्यास दिशा मिळेल, हा मूलभूत विचार या अभ्यासामागे आहे.

उद्दिष्टे :

1. गड-किल्ल्यांच्या वैचारिक संवर्धनाची आवश्यकता स्पष्ट करणे.
2. शिवकालीन गड-किल्ल्यांचे ऐतिहासिक, राजकीय व सामाजिक महत्त्व अभ्यासणे.
3. आजच्या काळातील गड-किल्ल्यांबाबत बदलत चाललेला सामाजिक दृष्टिकोन विश्लेषित करणे.
4. भौतिक व वैचारिक संवर्धन यांतील फरक स्पष्ट करून त्यांचे परस्परसंबंध समजावून सांगणे.
5. गड-किल्ल्यांच्या प्रभावी वैचारिक संवर्धनासाठी व्यावहारिक उपाय सुचविणे.
6. गड-किल्ल्यांच्या प्रभावी वैचारिक संवर्धनासाठी व्यावहारिक उपाय सुचविणे.

परिकल्पना :

1. गड-किल्ल्यांच्या वैचारिक संवर्धनाच्या अभावामुळे त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वाची जाणीव समाजात कमी होत आहे.
2. भौतिक संवर्धनाबरोबर वैचारिक संवर्धन न झाल्यास गड-किल्ल्यांचे खरे मूल्य टिकून राहू शकत नाही.
3. शैक्षणिक व सामाजिक माध्यमांद्वारे योग्य माहितीचा अभाव गड-किल्ल्यांविषयी गैरसमज निर्माण करतो.

4. गड-किल्ल्यांकडे केवळ पर्यटन स्थळ म्हणून पाहिल्यामुळे त्यांच्या ऐतिहासिक वारशाचे नुकसान होत आहे.
5. नियोजनबद्ध जनजागृती व शैक्षणिक उपक्रम राबविल्यास गड-किल्ल्यांचे वैचारिक संवर्धन प्रभावीपणे साध्य होऊ शकते.

संशोधन पद्धतीशास्त्र :

प्रस्तुत संशोधन हे गड-किल्ल्यांच्या वैचारिक संवर्धन या विषयाचा सखोल अभ्यास करणारे गुणात्मक स्वरूपाचे आहे. या अभ्यासासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे. सर्वप्रथम ऐतिहासिक पद्धतीचा उपयोग करून शिवकालीन गड-किल्ल्यांचे राजकीय, लष्करी व सामाजिक महत्त्व समजून घेण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा अभ्यास करण्यात आला आहे. आज्ञापत्रे, बखरी, समकालीन कागदपत्रे, तसेच मान्यवर इतिहासकारांचे ग्रंथ यांचा आधार घेऊन विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात आली आहे.

यासोबतच दस्तऐवज विश्लेषण पद्धतीद्वारे शासन निर्णय, पुरातत्त्व विभागाचे अहवाल, संवर्धनासंबंधी धोरणे, संशोधन लेख आणि विविध पुस्तके यांचे चिकित्सक परीक्षण करण्यात आले आहे. तसेच निवडक गड-किल्ल्यांना प्रत्यक्ष क्षेत्रभेट देऊन तेथील भौतिक स्थिती, पर्यटकांचा दृष्टिकोन, उपलब्ध माहितीफलक व परिसरातील परिस्थिती यांचे निरीक्षण करण्यात आले आहे. या निरीक्षणांमधून वैचारिक संवर्धनाची सद्यस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भौतिक आणि वैचारिक संवर्धन यांची तुलनात्मक मांडणी करून त्यांतील फरक व परस्परसंबंध स्पष्ट करण्यात आले आहेत. उपलब्ध माहितीचे तर्कसंगत विश्लेषण करून गड-किल्ल्यांविषयी बदलत चाललेला सामाजिक दृष्टिकोन, त्यामागील कारणे आणि त्यावर उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे विविध पद्धतींच्या साहाय्याने विषयाचा वस्तुनिष्ठ आणि सखोल अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

गडकोट व किल्ल्यांचे संवर्धन याबद्दल विश्लेषण करत असताना, सर्वप्रथम त्याचे शिवकाळातील स्वराज्याच्या दृष्टीने महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. याबद्दलचा सर्वात महत्त्वाचा पुरावा म्हणजे, रामचंद्र पंत अमात्य यांचे आज्ञापत्र. गडकिल्ल्यांची बांधणी व त्यांची स्थान निश्चिती याविषयी मार्गदर्शक तत्वे विषद करताना ते विस्ताराने नमूद करतात. या आज्ञापत्रातील आठवे प्रकरण म्हणजे 'दुर्ग' या शीर्षकाचे असून त्यातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण ओळ, "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग व दुर्ग नसता मोकळ देश परचक्र येतात निराश्रय". यावरून आपल्याला तत्कालीन मराठा राज्यातील किल्ल्यांचे महत्त्व स्पष्ट होते. किल्ले व दुर्गांचे महत्त्व हे आपणास प्राचीन साहित्य स्त्रोतांतून सुद्धा दिसून येते. याचे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे चाणक्यांची 'अष्टांग राज्य संकल्पना' व त्यातील एक अंग म्हणून दुर्गांचा उल्लेख आहे. आज्ञापत्रातील उल्लेखावरून आपणास स्वराज्यासाठी असणारे किल्ल्याचे महत्व समजून येते. सदर प्रकरणात डोंगरी किल्ल्यांचे महत्त्व व त्यांच्या बांधकाम सेवकांची निवड, त्यावरील इमारती याविषयी मार्गदर्शन केलेले दिसते. दुर्गांचे महत्त्व विशद करताना अमात्य लिहितात "सैन्याचे बळ म्हणजे गडकोट राज्याचे मूळ म्हणजे गडकोट गडकोट म्हणजेच राज्यलक्ष्मी".

महत्त्व सोबत किल्ल्याच्या बांधणी व त्यांची स्थाननिश्चिती याविषयीची मार्गदर्शक तत्वे रामचंद्र पंत अमात्य लिखित आज्ञापत्रांमध्ये विस्तारने नमूद केलेली आहेत. यातील दुर्ग या शीर्षकाच्या प्रकरणांमध्ये डोंगरी किल्ल्यांचे महत्त्व यांचे विस्ताराने विश्लेषण आहे.

स्थाननिश्चितीबाबत काही निकष दिलेले आहेत. "देशोदेशी स्थळे पाहून किल्ले बांधावे, किल्ला सुमित दुसरा डोंगर असू नये, असला तर सुरुंग लावून गडाचा आहारी आणावा, असा ते असला तर मोकळा न सोडता तो सुद्धा बांधून मजबूत करावा, तसेच किल्ल्यावर येण्यासाठीचे प्रवेश मार्ग हे सुगम नसावे, सुगम असले तर ते तोडून, त्यावर झाडे वाढवून ते शत्रू सैन्यात कठीण जातील असे करावेत, गडाभोवती मीठ म्हणजेच त्याच्या पायथ्या लगतच्या प्रदेशात सतत गस्त असावी".

राजकीय, लष्करी, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, व्यापारी, अशा अनेक अंगांनी मराठा कालखंडातील गडकिल्ले आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात व राज्य विस्तारात व रणनीती आखण्यात निर्णयात ठरतात. आजही इतिहासाच्या अभ्यासात मराठा कालीन कालखंड समजून घेत असताना एक प्राथमिक व समकालीन साधन म्हणून किल्ले महत्त्वपूर्ण भूमिका निभावताना दिसून येतात. किल्ल्यांचे स्थान, तेथील स्थापत्य शैली तसेच काही शिलालेख यावरून तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थिती समजून घेण्यास मोठी मदत होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे रायगडावरील शिलालेख, जो गडाच्या एका पायरीवर कोरलेला आहे ज्यावर "सेवेचे ठाई तत्पर हिरोजी इंदुलकर" अशा आशयाच्या ओळी आढळतात. यावरून किल्ल्याच्या बांधकामातील हिरोजी इंदुलकर यांची भूमिका व त्यांचे योगदान समजून घेण्यास मदत होते. याप्रकारे संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग ही ओळ कशाप्रकारे महत्त्वाची होती याची अनुभूती आपणास मिळते.

वर उल्लेख केल्याप्रमाणे शिवकाळात स्वराज्याच्या दृष्टीने किल्ले व दुर्गांचे महत्त्व हे लक्षात घेता येते. त्याच्या महत्त्व नुसार सर्व वास्तूंचे संवर्धन देखील पार पाडले जात होते ज्याला आपण डागडुजी म्हणतो ज्याचा वृत्तांत आपण यापूर्वी घेतला आहे. शिवकाळाचा व एकंदरीत संपूर्ण मराठाशाहीचा कालखंड पाहिला तर या वास्तू ज्यांना गडकोट व किल्ले म्हणून गणले गेले आहे, व ज्या मराठा राजवटीच्या महत्त्वपूर्ण स्मारकांपैकी काही आहेत, त्या फक्त केवळ इमारती वा बांधकामे नसून, त्या सर्व वास्तू या एखाद्या मावळ्याप्रमाणे स्वराज्यात व स्वराज्यकार्यात झटलेल्या आपणास पाहायला मिळतात. प्रत्येक किल्ला हा छातीचा कोट करून स्वराज्याच्या रक्षणासाठी उभा राहिला याची मूर्तीमंत उदाहरणे आपणास ठाऊक आहेत. सर्व मनुष्यबळाच्या बरोबरीनेच किल्ल्यांनी सुद्धा तितकेच योगदान हे स्वराज्य स्थापना, विस्तार व धुडीकरणात दिलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारानंतर हे किल्लेच आहेत जे आपणास त्या संघर्ष व शौर्याची साक्ष देतात. सतराव्या शतकापासून त्यांचा प्रवास चालू होत तो आज 21 व्या शतकापर्यंत येऊन पोहोचतो. पुन्हा एकदा या वास्तूंना गडकिल्ल्यांना संवर्धनाची गरज पडलेली आहे. परंतु एकविसाव्या शतकापर्यंत येत असताना इतिहासाने व सद्य परिस्थितीने एवढी कलाटणी घेतलेली आहे, की या गडकिल्ले व स्मारकांना भौतिक संवर्धनापेक्षा वैचारिक संवर्धनाची जास्त आवश्यकता भासू लागली आहे. खरे तर हे 21व्या शतकाचे वैशिष्ट्य व मानवाची दुर्दैव म्हणावं लागेल, ज्या शौर्याची गाथा देशोदेशी वाचली गेली व जात आहे, त्यांच्या विचारांचे पाईक म्हणून घेणाऱ्या समाजाला त्यांच्याच गडकिल्ल्यांचे वैचारिक संवर्धन करण्याची गरज पडावी. एक तो काळ होता, जेव्हा आपल्याच गौरवशाली परंपरा व इतिहासाची मांडणी व लेखन करण्यासाठी ग्रँड डफ नावाच्या युरोपियन अभ्यासाकाला यावे लागले व एक आजचा काळ जेव्हा आपण त्या सर्व वस्तूंच्या सानिध्यात असून देखील आपणास त्याचा विसर पडतो आहे.

याच कारणामुळे गरज आहे ती गडकोट व किल्ले स्मारकांच्या वैचारिक संवर्धनाची. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे भौतिक संवर्धनास थोडा विलंब झाला तरी त्याचे नुकसान हे भरून काढता येऊ शकते, परंतु जर वैचारिक संवर्धनास विलंब झाला तर ते न भरून येणारे नुकसान ठरेल. याचबरोबर भौतिक संवर्धनास शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत व अनेक सेवाभावी संस्था व संघटना सुद्धा पुढाकार घेऊन आपापल्या क्षमतेनुसार भौतिक संवर्धनाची गरज भरून काढत आहेत. यामध्ये आपणास किल्ल्यावरील अतिक्रमण हटवण्या साठी राज्यस्तरीय समितीची स्थापना झालेली दिसते, विशिष्ट किल्ल्यांच्या संदर्भात अतिक्रमण काढण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येते आहे, दुर्ग संवर्धनाच्या दृष्टिकोनातून युनेस्को सोबत सामंजस्य करार करून त्याच्या संयुक्त विद्यमाने संवर्धनाची मोहीम हाती घेण्यात आली आहे, या व अशा अनेक प्रयत्नांद्वारे आपणास शासनाच्या माध्यमातून होणारे प्रयत्न दिसून येतात. याच सोबत काही शासनमान्य संस्थांच्या माध्यमातून देखील संवर्धनाचे प्रयत्न चालू आहेत. याचे उदाहरण म्हणजे रायगड विकास प्राधिकरण हे सांगता येते. याचप्रमाणे काही खाजगी संस्था संघटना देखील आपापल्या स्तरावर तशा पद्धतीचे संवर्धनाचे प्रयत्न करताना दिसतात. काही गडकिल्ले हे लष्कराच्या ताब्यात असल्याने तेथे त्यांच्या संचलनयाद्वारे कार्य चालते. याच पद्धतीने शासनाचा पुरातत्त्व विभाग, सांस्कृतिक विभाग, पर्यटन विभाग यांच्या माध्यमातून देखील अनेक अंगानी विकास व सुशोभीकरणाचे प्रयत्न चालताना दिसून येतात.

सर्वप्रथम वैचारिक संवर्धनाची गरज का भासते याचा आढावा घेण्याची गरज आहे. शिवकाळातील व एकंदरीत मराठा कालखंडातील ज्या वास्तुरूपी देणग्या महाराष्ट्राला लाभलेल्या आहेत त्यात महाराष्ट्र हे नंबर एकचे राज्य आहे. महाराष्ट्रात जवळपास 600 हून अधिक लहान मोठे किल्ले आहेत व शिवकालीन वास्तू स्मारके आहेत. या सर्व ठिकाणांवर लोकांची ये जा व क्षेत्रभेट ही होते, परंतु ही क्षेत्रभेट ही केवळ पर्यटक म्हणून होते ही दुःखाची गोष्ट आहे. पर्यटक म्हणून गेलेले लोक देखील आज-काल फक्त फोटो, व्हिडिओ, स्नॅप, instagram स्टोरी या गोष्टींना महत्त्व देताना दिसून येतात. ज्या गोष्टी समोर पाहण्यासारख्या आहेत त्याकडे लक्ष न देता आपल्या व कॅमेऱ्याच्या कक्षेत ज्या गोष्टी येतात केवळ त्याकडेच कल असलेला दिसतो. ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांकडे व शिवचरित्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या स्थळांकडे देखील केवळ कॅमेराच्या दृष्टीने महत्त्व असल्यासच त्याकडे लक्ष जाते, अन्यथा केवळ आणि केवळ दुर्लक्ष होताना दिसते. केवळ मनोरंजनाचा दृष्टिकोन मनी धरून लोक गडकिल्ल्यांच्या ठिकाणी भेट देतात. क्वचितच फक्त काही माहिती प्राप्त करण्यासाठी येतात. जाण्या अगोदर थोडी माहिती घेऊन वा आल्यावर काही माहिती घेण्यासाठी कोणीही गुगल करीत नाही, पण त्या स्थळावरील फोटोसाठी टाकण्याकरिता कॅप्शन मात्र जरूर शोधतात. या पद्धतीची वर्तणूक असल्या कारणाने या सर्व गडकिल्ले व स्मारकांच्या भौतिक नुकसानी सह वैचारिक नुकसान देखील होते. वैचारिक नुकसान या कारणासाठी, की ते स्थळ केवळ एक पर्यटन स्थळ व शोभेची वस्तू म्हणून टिकून राहते. या सर्व स्थळातून त्याबाबतीत असलेल्या संघर्ष, वारसा, परंपरा यांच्या गाथांतून तो आदर्श घेणे गरजेचे आहे व इतिहासाची जोपासना होणे गरजेचे आहे, ते मात्र होताना कुठेही दिसत नाही व यालाच येथे वैचारिक हानी म्हणलेले आहे.

यानंतर आणखी एक वैचारिक अवनीतीचा भाग सद्यस्थितीत गडकिल्ले व वास्तू स्मारके यांबद्दल पाहायला मिळत आहे. किल्ला व किल्ला परिसर, तसेच ऐतिहासिक स्मारके यांबद्दल धार्मिक अपप्रचार निर्माण करून धार्मिक तेढ वाढवणे वा विकृष्ट वाढवणे याचे अनेक प्रकार

आपणास आजकाल पहावयास मिळतात. जसे की एखाद्या स्थळाच्या नावावरून वाद, त्या किल्ल्यावरील एखाद्या बांधकामावरून वाद, इतिहासातील नोंदणीचा वाद इत्या. अशा अनेक प्रकारचे निरर्थक वाद हे विनाकारण उकरून काढले जातात, ज्यांचा सद्य परिस्थितीत काहीही महत्त्व नसते. याची काही समकालीन उदाहरणे पाहायला गेल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा हा किल्ला, मध्यंतरी त्यावरील काही इस्लामी प्रार्थना स्थळावरून निर्माण झालेल्या वादाने चर्चेत आला. सहाजिकच या वादात राजकीय गटांच्या उड्या पाहायला मिळाल्या. प्रार्थना स्थळाची जागा, बांधकाम, अतिक्रमण हा सर्व विषय महत्त्वाचा आहे, परंतु तो कायदेशीर मार्गाने सुद्धा हाताळता येऊ शकतो व ते काम संबंधित विभागाचे आहे. या प्रकरणांमध्ये तथाकथित शिवभक्त, गड संवर्धक, पुढारी इत्यादी लोकांनी रस घेतला. जेवढा रस या कार्यात घेतला तेवढा वा त्याच्या निम्मा रस हा पन्हाळा किल्ल्याच्या माहिती प्रसारासाठी घेतला असता तर शिवाजी महाराज व मराठा राजवटीसाठी त्या प्रार्थना स्थळापेक्षा पन्हाळा या किल्ल्याचे महत्व काय होते हे समजण्यास मदत झाली असती. जे लोक या आंदोलनात अग्रस्थानी होते, त्यांना देखील या किल्ल्याची माहिती कितपत असावी याबद्दल प्रश्नचिन्हच आहे. याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील प्रतापगडाच्या बाबतीत एक प्रसंग घडला. शिवाजी महाराजांची प्रतापगड बांधकामाची दूरदृष्टी, प्रतापगडाचे भौगोलिक स्थान व त्याचा स्वराज्याला झालेला लाभ, अफजलखानासारख्या बलाढ्य शत्रूला नमवण्याचे केलेले धाडस व वापरलेले युद्ध कौशल्य यांचा साधा संदर्भ सुद्धा पुरेपूर माहित नसलेल्यांना, गडावरती असलेल्या त्या अफजलखानाच्या कबड्डीची चीड आली. आपल्या ज्ञानावरील जळमटे काढण्यापेक्षा, त्यांना ती कबर काढणे महत्त्वाचे वाटले अर्थात काढण्याला विरोध निश्चितच नाही, पण ती कबर, तिचा इतिहास, त्याचे संदर्भ तरी नीटनेटके पणे माहीत करून घेण्याचे कष्ट घेण्यास हरकत नव्हती. स्वतः जिजाऊंनी त्याचा दफनविधी करण्याचे आदेश दिले होते याची इतिहासात नोंद आहे, परंतु याची कोणतीही परवा न करता केवळ स्टंटबाजी करण्याकडे मात्र आंदोलनकर्त्यांचा कल दिसतो. यासारखी असंख्य उदाहरणे आपणास देता येतात. बाबरी मस्जिद वाद, त्याला जोडून आलेला इतर मशिदांचा वाद, रस्ते स्थळांची नावे बदलणे इत्यादी गोष्टी, जर शासनाला योग्य वाटत असतील तर त्यांनी त्या जरूर कराव्या, परंतु त्याची माहिती योग्य माध्यमांच्या द्वारे देण्यात यावी. यामुळे केवळ एकच बाजू प्रकाशित न होता संपूर्ण पाठच लोकांसमोर येतो व जे ध्रुवीकरण होत आहे ते टाळता येऊ शकते.

या सर्वांचा परिणाम हा खूप बिकट होताना दिसून येतो. धार्मिक ध्रुवीकरण तर होतेच, परंतु इतिहासाचे फार मोठे नुकसान होताना दिसते. याचे कारण वैचारिक भूमिका ही ऐतिहासिक दृष्ट्या कमी तर राजकीय दृष्ट्या अधिक सक्रिय दिसते. राजकीय दृष्ट्या सक्रिय असण्याला विरोध नाहीच, परंतु तो सक्रियपणा हा इतिहासाच्या म्हणजेच ऐतिहासिक परिघांमध्ये असणाऱ्या घटकांच्या बाबतीत आला आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. यामुळे जो मूळ परिघ आहे त्याच्या आणि चालू असलेल्या घडामोडींचा धुरान्वय संबंध राहत नाही. अर्थात इतिहासाचा वापर करून चालत असलेल्या राजकारणाला इतिहास सोडून इतर सर्व पैलू सामील असतात. यामुळे इतिहासाची मोडतोड होण्याचा धोका सुद्धा बळावला जातो व लोक इतिहासाचा मागवा घेण्या ऐवजी भलत्याच गोष्टींकडे कल्पना दिसून येतात.

वैचारिक संवर्धन हे गरजेचे का आहे व ते असण्यामागील कारण देखील अभ्यासले. परंतु त्याचे स्वरूप व माध्यम कोणते असावे ? जो व्यक्ती स्वतःला शिवछत्रपतींच्या विचारांचा पाईक समजतो किंवा सोप्या

भाषेत स्वतःला शिवभक्त समजतो, त्याने आपल्या अवतीभवती स्मारक रुपी गडकिल्ले व वास्तू बद्दल, आपले कर्तव्य समजून पार पाडत असल्याचे कार्य सोडून, तो गड छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला आहे ही गोष्ट मनामध्ये धरली तरी सर्वच विचार अलबेल होईल. यानंतर केवळ गडकिल्ल्यांवर धूम्रपान निशिद्ध मानणारे धूम्रपानच निश्चित असावे हा शिव विचार अंगी बांधतील. केवळ पर्यटनाच्या भावनेने गडकिल्ले पाहायला जात असताना, जर त्याआधी अभ्यासकांच्या माध्यमातून किल्ला, त्याचा इतिहास, महत्त्व व शिवाजी महाराजांच्या दृष्टीने त्याचे असलेले स्थान लक्षात आले, तर व्यक्तीला किल्ला पाहण्यास व तो अनुभवण्यास रस निर्माण होईल. मोडतोड केलेला विस्कळीत इतिहासाची दाकडी करून त्याला योग्य प्रकारे समोर आणल्यास त्यातून होणारे नुकसान टळू शकेल व यालाच वैचारिक संवर्धन म्हणू शकतो. आज-काल लोक ज्या माध्यमांचा वापर गड किल्ले स्मारकांच्या वैचारिक टेहाळणीसाठी करतात त्याच माध्यमांचा वापर करून वैचारिक संवर्धन होऊ शकते शासन, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था यांच्या माध्यमातून या पद्धतीचे प्रयत्न चालू असतात. मात्र ज्या पद्धतीचा रोग आहे त्या पद्धतीचे औषध शोधण्यास कुठेतरी आव्हान निर्माण होताना दिसते. या मातीतून शिवाजी महाराजांचे नाव पुसून टाकणे ही गोष्ट केवळ अशक्यप्रायच आहे, परंतु त्यांचे नाव असताना त्यांनी घालून दिलेले दंडक शासन पालन करण्यास आपण चुकलो तर केवळ त्यांचे नावच असेल पण त्यात त्यांचे अस्तित्व नक्कीच नसेल. यासाठीच जेथून त्यांनी स्वराज्य संकल्पना रोवली तेथूनच आपण सुरुवात करावयास हवी ते म्हणजे गड किल्ले, आणि ती सुरुवात ही वैचारिक संवर्धनातूनच व्हायला हवी.

निष्कर्ष :

प्रस्तुत संशोधनाच्या आधारे असे स्पष्टपणे निष्पन्न होते की गड-किल्ल्यांचे अस्तित्व केवळ त्यांच्या भौतिक रचनेपुरते मर्यादित नसून ते महाराष्ट्राच्या ऐतिहासिक चेतनेचे आणि सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक आहे. मांडलेल्या गृहितकांच्या संदर्भात विचार केला असता, गड-किल्ल्यांच्या वैचारिक संवर्धनाच्या अभावामुळे समाजामध्ये त्यांच्या खऱ्या ऐतिहासिक महत्त्वाची जाणीव कमी होत चालल्याचे आढळते. आज अनेक जण किल्ल्यांकडे पर्यटन स्थळ म्हणून पाहतात; त्यांच्या मागील इतिहास, संघर्ष, प्रशासनव्यवस्था आणि स्वराज्य उभारणीतील योगदान यांचा अभ्यास करण्याची वृत्ती मात्र तुलनेने कमी दिसून येते.

भौतिक संवर्धनासाठी शासनस्तरावर विविध उपाययोजना राबविल्या जात असल्या तरी केवळ दुरुस्ती, सुशोभीकरण किंवा संरक्षण यावर भर दिल्यास किल्ल्यांचे मूळ तत्त्वज्ञान आणि ऐतिहासिक अर्थ जिवंत राहू शकत नाही, हे या संशोधनातून स्पष्ट होते. भौतिक संवर्धन आवश्यक असले तरी वैचारिक संवर्धनाशिवाय या वास्तू केवळ ऐतिहासिक स्मारके म्हणून उभ्या राहतील; त्यातून प्रेरणा, आदर्श आणि मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचणार नाहीत. त्यामुळे दुसरे गृहितकही सत्य ठरते की भौतिक व वैचारिक संवर्धन यांचा समन्वय अपरिहार्य आहे.

तसेच योग्य व विश्वसनीय माहितीचा अभाव, अपुरी ऐतिहासिक जाणीव आणि काही प्रसंगी सामाजिक माध्यमांद्वारे पसरवले जाणारे अपप्रचार यांमुळे गड-किल्ल्यांविषयी गैरसमज निर्माण होत असल्याचे दिसून येते. यामुळे समाजात अनावश्यक वाद आणि दिशाभूल होण्याची शक्यता वाढते. हे निरीक्षण तिसऱ्या व चौथ्या गृहितकांची पुष्टी करते.

तथापि, नियोजनबद्ध जनजागृती, शैक्षणिक अभ्यासभेटी, अभ्यासकांच्या मार्गदर्शनाखाली माहितीचे

सादरीकरण आणि इतिहासाचे चिकित्सक शिक्षण यांद्वारे गड-किल्ल्यांचे वैचारिक संवर्धन प्रभावीपणे साध्य होऊ शकते, हेही संशोधनातून स्पष्ट होते. म्हणूनच प्रस्तुत अभ्यास असा निष्कर्ष नोंदवितो की गड-किल्ल्यांचे संरक्षण ही केवळ वास्तू जपण्याची प्रक्रिया नसून इतिहासातील मूल्ये, विचार आणि राष्ट्रीय चेतना जपण्याची सामूहिक जबाबदारी आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी हा वारसा टिकवून ठेवण्यासाठी भौतिक आणि वैचारिक या दोन्ही अंगांचा संतुलित विचार करणे अत्यावश्यक आहे.

संदर्भ सूची :

प्राथमिक साधने:

1. अमात्य, रामचंद्रपंत. (२००४). आज्ञापत्र. (संपा. अ. रा. कुलकर्णी). पुणे: डायमंड प्रकाशन.
2. सरकार, जदुनाथ (संपा.). (1920). Shivaji's correspondence (Selected documents). Calcutta: Longmans, Green & Co.
3. Duff, J. G. (1826). A history of the Mahrattas (Vols. 1–3). London: Longman, Rees, Orme, Brown, and Green.
4. Government of Maharashtra, Directorate of Archaeology and Museums. (2013). List of protected monuments in Maharashtra. Mumbai: Government of Maharashtra.

दुय्यम साधने:

1. वाघमारे, शंकर. (२००५). किल्ले व पुरातत्त्व: महाराष्ट्रातील किल्ल्यांचे संरक्षण व संवर्धन. पुणे: पुरातत्त्व परिषद.
2. जाधव, जीवन. (२०१२). गड-किल्ल्यांचा इतिहास व संवर्धन: एक अभ्यास. मुंबई: इतिहास प्रकाशन.
3. देशमुख, विकास. (२०१८). महाराष्ट्रातील किल्ल्यांचे जतन व व्यवस्थापन. नागपूर: संस्कृती प्रकाशन.
4. पाटील, संजय. (२०२१). किल्ल्यांचे आरोग्य: संरचना, धोके व उपाय. पुणे: शहाणपे रचना.
5. तळवी, विजय. (२०१६). गड-किल्ले: संरक्षणाचे मुद्दे व मार्गदर्शन. कोल्हापूर: विद्यानगर प्रकाशन.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

Heritage Site Preservation: Forts and Monuments (Problems and Solutions)

Prof. Avinash Tanaji Nalawade
Assistant Professor
Dr. Patangrao Kadam Mhavidyalaya, Ramanandnagar (Burli)
Corresponding Author - Prof. Avinash Tanaji Nalawade

DOI - 10.5281/zenodo.19665079

Abstract:

Heritage sites such as forts, monuments, temples, and historic buildings represent the cultural, architectural, and historical identity of civilizations. They provide valuable insights into the social, political, and economic life of past societies and serve as symbols of national pride. Many countries, including India, possess a rich heritage of forts and monuments built during different historical periods. These structures reflect the architectural brilliance and cultural values of earlier civilizations. However, many heritage sites today face serious threats due to environmental factors, human activities, and inadequate conservation efforts.

Rapid urbanization, pollution, vandalism, unregulated tourism, and lack of funding are among the major factors contributing to the deterioration of historic structures. Industrial pollution and acid rain can cause chemical weathering and erosion of monuments, while improper restoration techniques may accelerate structural decay. Furthermore, over-tourism and inappropriate visitor behavior can lead to overcrowding, physical damage, and environmental degradation around heritage sites. In addition to environmental damage, management issues such as lack of trained conservation professionals, insufficient documentation, and absence of proper conservation policies also affect heritage preservation. Recent reports highlight that many historic forts attract thousands of tourists but still lack proper safety infrastructure and maintenance facilities.

This research paper examines the importance of preserving heritage sites, particularly forts and monuments, and discusses the major problems associated with their conservation. It also explores possible solutions such as sustainable tourism management, technological innovations in digital preservation, community participation, and improved government policies. Protecting heritage sites is essential not only for preserving history but also for promoting cultural identity, education, and tourism development for future generations.

Keywords: Heritage Preservation, Forts, Monuments, Cultural Heritage, Conservation, Tourism Management, Historic Buildings, Heritage Protection.

Introduction:

Heritage sites are important cultural assets that reflect the historical, architectural, and artistic achievements of past civilizations. They include monuments, temples, forts, palaces, archaeological ruins, and other historic structures that represent the legacy of a nation. Preserving these sites is essential because they help people understand their history, culture, and traditions.

Forts and monuments play a significant role in understanding the political and cultural history of nations. Forts were primarily built for defense purposes and were designed to protect cities, kingdoms, and strategic locations. Their architecture reflects the military engineering skills and defensive strategies of the time. Monuments, on the other hand, were often constructed to commemorate important events, rulers, or cultural

achievements. Many historic monuments have become symbols of national pride and cultural identity. For example, historical forts and monuments in different parts of the world attract tourists and researchers interested in learning about ancient civilizations, architectural styles, and cultural traditions. In addition to their historical value, these sites also contribute to economic development through tourism.

In recent years, heritage tourism has increased significantly. Tourists from around the world visit historic sites to experience architecture, history, and culture. This growth in tourism provides economic benefits and employment opportunities for local communities. However, increased visitor pressure can also cause damage to fragile heritage structures if proper management strategies are not implemented. Despite their importance, many heritage sites are deteriorating due to neglect, natural disasters, and human activities. Environmental pollution, climate change, lack of conservation awareness, and inadequate funding have accelerated the deterioration of historical structures. Therefore, it is essential to develop effective strategies to preserve these sites for future generations.

The preservation of heritage sites is therefore a crucial responsibility of governments, international organizations, local communities, and individuals. Effective conservation strategies must combine scientific restoration methods, sustainable tourism management, modern technological tools, and public awareness initiatives. Digital documentation techniques such as 3D scanning and virtual modeling have recently emerged as powerful tools in heritage conservation, enabling researchers to record and reconstruct historical structures accurately. Furthermore, the involvement of local communities and private institutions in conservation programs can strengthen long-term preservation efforts.

Table - Central Ministries and Organisations owning/ funding/ promoting Built Heritage

Ministry/ Organisation	Number and Type of Built Heritage
Ministry of Culture – ASI and Other Departments	40 World Heritage Sites with ASI as nodal agency, 3693 centrally protected under ASI, 50 Site Museums, 7 Museums, 14 Libraries, 39 sites under Gandhi Heritage Sites Mission with 2000 total listed sites to be further reserved.
MoHUA - CPWD	50 under CPWD along with MoHUA programmes for promoting historic cities conservation across Indian cities.
Ministry of Railways	210 buildings, stations, bridges and tunnels listed as heritage under their Heritage Directorate. Also manages the World Heritage Sites of CST, Mumbai and
Ministry of Shipping	99 lighthouses
Ministry of Communications	36 Heritage GPOs and Post Offices recognised as Heritage. Own 12000 Post Offices built before independence that need to be inspected.
Ministry of Tourism	Promotional Heritage Tourism Schemes (Adopt a Heritage and PRASHAD) and Circuits such as Swadesh Darshan
Ministry of Education	19 colleges granted Heritage Status with funding for conservation. Several more institutions may qualify.

Ministry of Mines - GSI	Promotes Geo Tourism. Have declared 36 heritage structures under fossil parks, rock monuments, geological marvels and other sites. These also qualify as cultural landscapes.

World Heritage Sites:

A World Heritage site is a location recognized by the United Nations Educational, Scientific and Cultural Organization (UNESCO) as having outstanding universal value. These sites are protected by international agreements. UNESCO adopted the Convention Concerning the Protection of the World Cultural and Natural Heritage in 1972, which established the World Heritage List to preserve cultural treasures and natural areas. These sites can include historic buildings, archaeological sites, and natural areas.

Importance of Heritage Sites:

1) Historical Significance:

Heritage sites serve as living records of the past. Forts and monuments provide valuable information about historical events, political systems, military strategies, and social structures. Archaeologists and historians study these sites to reconstruct historical narratives and understand the evolution of civilizations. For instance, the design of fortifications, watchtowers, gates, and defensive walls provides insights into the warfare techniques and engineering capabilities of earlier societies. Similarly, inscriptions, sculptures, and architectural patterns reveal cultural and artistic traditions.

2) Cultural Identity:

Heritage sites represent the cultural identity and traditions of a nation. They symbolize the achievements and creativity of previous generations. By preserving these structures, societies maintain a connection with their past and strengthen their cultural heritage. Cultural heritage also plays a significant role in shaping national pride and collective memory. Historic monuments often become iconic landmarks that represent the history and values of a country.

3) Educational Value:

Heritage sites provide excellent opportunities for education and research. Students, historians, archaeologists, and architects study these structures to gain knowledge about historical architecture, art, and culture. Visiting historical sites helps individuals develop a deeper understanding of the past and appreciate the achievements of earlier civilizations.

Museums and interpretation centers associated with heritage sites also play an important role in educating visitors about historical events and cultural traditions.

4) Economic Contribution:

Heritage tourism is an important source of revenue for many countries. Tourists from around the world visit historic monuments and forts to experience cultural heritage and historical architecture. This creates employment opportunities in tourism services, hospitality, transportation, and local crafts.

The preservation of heritage sites therefore not only protects cultural history but also contributes to economic development and sustainable tourism.

Major Problems in the Preservation of Forts and Monuments:

Despite their importance, heritage sites face numerous challenges that threaten their survival.

1) Natural Deterioration:

Natural weathering is one of the most significant causes of damage to historical structures. Exposure to wind, rain, sunlight, and

temperature fluctuations gradually weakens building materials such as stone, brick, and wood.

Over time, cracks develop in walls and foundations, leading to structural instability. In coastal areas, salt corrosion can further accelerate deterioration. Climate change has intensified these effects by increasing extreme weather events such as storms and heavy rainfall.

2) Environmental Pollution:

Air pollution from vehicles and industries can cause severe damage to monuments. Pollutants such as sulfur dioxide and nitrogen oxides react with moisture in the atmosphere to form acidic compounds. These compounds cause chemical weathering and erosion of stone surfaces.

Pollution can also lead to discoloration and staining of monuments, reducing their aesthetic value and historical authenticity.

3) Urbanization and Encroachment:

Rapid urban development has resulted in the encroachment of heritage sites. Construction activities near historic structures can disturb their foundations and alter the surrounding landscape.

Encroachment also reduces the open space around monuments, which is necessary to preserve their original architectural setting. In many cities, heritage structures are surrounded by modern buildings, roads, and commercial establishments that compromise their historical character.

4) Unregulated Tourism:

Tourism is beneficial for economic growth, but excessive tourist activity can damage fragile heritage structures. Large numbers of visitors can cause overcrowding, physical wear and tear, and environmental pollution. Improper tourist behavior, such as climbing on monuments or touching delicate artifacts, can accelerate deterioration.

5) Poor Management and Lack of Awareness:

Many heritage sites suffer from inadequate management and lack of proper conservation planning. In some cases, there are not enough trained professionals in heritage conservation.

Lack of public awareness about the importance of heritage preservation also contributes to neglect and misuse of historical sites.

Solutions for Heritage Preservation:

Addressing the challenges of heritage conservation requires a combination of technical, administrative, and social approaches.

1) Scientific Conservation Methods:

Conservation experts must use scientific techniques to restore and maintain historical structures. Restoration work should respect the original architectural style and materials of monuments.

Advanced technologies such as laser scanning, digital mapping, and structural monitoring can help detect damage and guide restoration efforts.

2) Strong Government Policies:

Governments should implement strict heritage protection laws to prevent encroachment, vandalism, and illegal construction near heritage sites.

Establishing protected zones around monuments can help preserve their surroundings and prevent damage caused by urban development.

3) Sustainable Tourism Management:

Tourism activities must be managed carefully to prevent damage to heritage sites. Authorities should regulate the number of visitors and implement guidelines for responsible tourism.

Providing proper facilities such as waste management systems, visitor pathways, and information centers can help minimize environmental impact.

4) Community Participation:

Local communities play a vital role in heritage preservation. When residents are involved in conservation programs, they develop a sense of ownership and responsibility toward protecting heritage sites. Community-based tourism initiatives can also provide economic benefits to local populations while encouraging them to preserve historical structures.

5) Use of Modern Technology:

Technological innovations have greatly improved heritage conservation methods. Digital documentation techniques such as photogrammetry and 3D modeling allow researchers to create accurate digital replicas of monuments.

These digital records can be used for restoration planning, research, and educational purposes.

6) Public Awareness and Education:

Education and awareness programs are essential for promoting heritage preservation. Schools, universities, and cultural organizations should encourage students to learn about historical sites and their significance.

Conclusion:

Heritage sites such as forts and monuments are invaluable treasures that reflect the history, culture, and achievements of past civilizations. They provide important educational, cultural, and economic benefits to societies around the world. However, these historic structures face numerous threats, including environmental degradation, pollution, urbanization, vandalism, and unregulated tourism.

Effective preservation requires a comprehensive approach that includes scientific conservation techniques, strong legal protection, sustainable tourism management, and community participation. Governments, international organizations, conservation experts, and local communities must collaborate to ensure the long-term protection of heritage sites.Modern technologies such as digital documentation and structural monitoring also offer promising solutions for heritage conservation. By combining traditional knowledge with innovative tools, it is possible to protect historical monuments while allowing people to appreciate and learn from them.

Ultimately, preserving heritage sites is not only about protecting old buildings but also about safeguarding the cultural identity and historical memory of humanity. Through collective responsibility and sustainable conservation practices, forts and monuments can continue to inspire future generations and remain symbols of human creativity and history.

References:

1) DRONAH (Niti Ayog), , Challenges faced in Heritage Management in India and Policy Imperatives, October 2021
2) El-Qady, G., & Margottini, C. (Eds.). (2023). *Sustainable Conservation of UNESCO and Other Heritage Sites Through Proactive Geosciences*. Springer International Publishing.
3) UNESCO. (2025). *Maratha Military Landscapes of India*. World Heritage Site Documentation.
4) Archaeological Survey of India (ASI). (Various Reports). *Conservation and Management of Historic Monuments and Forts in India*. Government of India.
5) प्रा. संभाजी पाटील, प्रवास व्यवस्थापन व पर्यटन उद्योग, अथर्व पब्लिकेशन्स, 21 मार्च 2015.
6) https://www.britannica.com/topic/World-Heritage-site

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

वारसा स्थळ जतन: गड-किल्ले आणि स्मारके – समस्या आणि उपाय

कविता पिलावरे

Ph.D. Research Scholar,

Modern College Shivajinagar, Pune

***Corresponding Author* - कविता पिलावरे**

DOI - 10.5281/zenodo.19665105

सारांश (Abstract):

भारत, विशेषतः महाराष्ट्र, हा समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाने नटलेला प्रदेश आहे. गड-किल्ले, लेणी, मंदिरे व स्मारके ही सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक इतिहासाची सजीव साक्ष आहेत. राजगड, शिवनेरी, रायगड, सिंहगड, प्रतापगड, अजिंठा व वेरूळ यांसारखी वारसा स्थळे जागतिक वारशाचा अमूल्य ठेवा आहेत. परंतु नैसर्गिक झीज, मानवी हस्तक्षेप, अतिक्रमण, प्रदूषण, अनियंत्रित पर्यटन, मूलभूत सुविधांचा अभाव व संवर्धन व्यवस्थेतील त्रुटी यांमुळे ही स्थळे गंभीर संकटात सापडली आहेत. प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये गड-किल्ले व स्मारकांच्या जतनाशी संबंधित समस्या, त्यामागील कारणे, संवर्धनातील अडथळे तसेच शास्त्रीय, सामाजिक, प्रशासकीय व तांत्रिक उपाययोजना यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. वारसा जतनासाठी वैज्ञानिक संवर्धन पद्धती, तंत्रज्ञानाचा वापर, जबाबदार पर्यटन आणि जनजागृती यांचा समन्वय आवश्यक आहे. तसेच शासन, स्थानिक समाज, स्वयंसेवी संस्था व शैक्षणिक संस्थांचा समन्वय आवश्यक असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

सूचक शब्द (Keywords): वारसा जतन, गड-किल्ले, ऐतिहासिक स्मारके, ऐतिहासिक वास्तू, संवर्धन, पुरातत्वशास्त्र, पर्यटन विकास, सांस्कृतिक वारसा, पर्यावरणीय संरक्षण, लोकसहभाग.

प्रस्तावना (Introduction):

महाराष्ट्र भूमी ही केवळ भौगोलिक सीमांनी मर्यादित नसून, ती संतांच्या विचारांची आणि शूरवीरांच्या पराक्रमाची तेजस्वी भूमी आहे. सह्याद्रीच्या उत्तुंग रांगांमध्ये वसलेले अभेद्य गड-किल्ले, पाषाणात कोरलेली कलात्मक लेणी आणि ऐतिहासिक स्मारके ही या भूमीच्या देदीप्यमान वैभवाची प्रतीके आहेत. या ऐतिहासिक वास्तू म्हणजे केवळ दगड-मातीची बांधकामे नसून, त्या तत्कालीन प्रगत स्थापत्यशास्त्र, कल्पक जलव्यवस्थापन, अचूक युद्धनीती आणि सुदृढ सामाजिक-प्रशासकीय व्यवस्थेचा अनमोल ठेवा आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचा मुख्य आधारस्तंभ हे किल्लेच होते. "दुर्ग हेच राज्याचे प्राण" या उक्तीनुसार, स्वराज्याची सुरक्षा, व्यापार आणि प्रशासन या किल्ल्यांच्या माध्यमातूनच संचालित होत असे. रायगड, राजगड, सिंहगड, शिवनेरी यांसारख्या किल्ल्यांनी इतिहासाची अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. मात्र, दुर्दैवाने आज हा अमूल्य ऐतिहासिक वारसा अस्तित्वाच्या लढाईत मागे पडत असल्याचे चित्र दिसत आहे. काळाच्या ओघात होणारी नैसर्गिक झीज आणि हवामान बदल यांसारख्या नैसर्गिक कारणांसोबतच, वाढते शहरीकरण, बेजबाबदार पर्यटन, अनियंत्रित

अतिक्रमणे आणि मानवी हस्तक्षेपामुळे या वास्तूंची मूळ ओळख धोक्यात आली आहे. अनेक ठिकाणी निधीचा अभाव आणि शास्त्रीय ज्ञानाच्या कमतरतेमुळे होणारी चुकीची पुनर्बांधणी यामुळे या स्मारकांचे मूळ स्वरूप नष्ट होत आहे.

आजच्या २१ व्या शतकात, या ऐतिहासिक वारशाचे जतन करणे ही केवळ भावनेच्या स्तरावरची ऐतिहासिक जबाबदारी राहिलेली नाही, तर ती एक अनिवार्य सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिक गरज बनली आहे. आपला इतिहास पुढच्या पिढीपर्यंत सुरक्षित पोहोचवण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे रक्षण करण्यासाठी या वारसा स्थळांच्या शास्त्रीय संवर्धनाची नितांत गरज आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study):

प्रस्तुत संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा स्थळांच्या जतनासाठी एक सर्वसमावेशक आराखडा तयार करणे असून, त्यांतर्गत खालील उप-उद्दिष्टांचा समावेश आहे:

1. **वारसा स्थळांच्या सद्यस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणे:** महाराष्ट्रातील निवडक गड-किल्ले, लेणी आणि ऐतिहासिक स्मारकांची वर्तमान स्थिती, त्यांची संरचनात्मक स्थिती आणि त्यांच्या ऐतिहासिक स्वरूपातील बदलांचा प्रत्यक्ष पाहणीद्वारे अभ्यास करणे.
2. **ऱ्हासाला कारणीभूत ठरणाऱ्या नैसर्गिक व मानवी घटकांचे विश्लेषण करणे:** हवामान बदल, पाऊस, वारा यांसारख्या नैसर्गिक घटकांमुळे होणारी झीज आणि शहरीकरण, अतिक्रमण, मानवी तोडफोड (Vandalism) यांसारख्या मानवी कृतींमुळे होणाऱ्या हानीचे सखोल विश्लेषण करणे.
3. **प्रशासकीय, आर्थिक व धोरणात्मक अडथळे शोधणे:** वारसा जतनासाठी असलेल्या सरकारी धोरणांमधील त्रुटी, निधीवाटपातील समस्या, पुरातत्व विभागाकडे असलेल्या अपुऱ्या मनुष्यबळाचा अभ्यास करणे आणि जतन कार्यात येणारे कायदेशीर अडथळे ओळखणे.
4. **वैज्ञानिक व शाश्वत संवर्धन पद्धतींचा शोध घेणे:** पारंपारिक बांधकाम शास्त्र आणि आधुनिक तंत्रज्ञान (उदा. LiDAR, 3D Mapping) यांचा मेळ घालून वास्तूची मूळ ओळख न पुसता तिचे आयुष्य वाढवण्यासाठी व्यवहार्य आणि वैज्ञानिक उपाय सुचवणे.
5. **शाश्वत पर्यटनाद्वारे वारसा विकासाचे मॉडेल विकसित करणे:** ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व अबाधित राखून पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक समुदायाला रोजगार कसा उपलब्ध करून देता येईल आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग स्मारकाच्या देखभालीसाठी कसा करता येईल, याची दिशा निश्चित करणे.
6. **जनजागृती आणि लोकसहभागाची भूमिका स्पष्ट करणे:** वारसा जतन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून, त्यामध्ये स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि तरुण पिढीचा सक्रिय सहभाग मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक उपाययोजनांचा अभ्यास करणे

संशोधन पद्धती (Methodology):

प्रस्तुत संशोधनामध्ये ऐतिहासिक वारसा जतन आणि संवर्धनाचा अभ्यास करण्यासाठी **'गुणात्मक' (Qualitative)** आणि **'विश्लेषणात्मक' (Analytical)** संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे.

संशोधनाची व्याप्ती आणि अचूकता विचारात घेऊन खालील पाच प्रमुख साधनांचा वापर केला आहे:

1. **क्षेत्रीय अभ्यास (Field Survey) -** प्रत्यक्ष स्थळभेट देऊन वारसा स्थळांच्या सद्यस्थितीची नोंद करणे हा या संशोधनाचा मुख्य भाग आहे. निवडक गड-किल्ले आणि स्मारकांना भेटी देऊन तेथील तटबंदी, दरवाजे, जलकुंभ आणि वास्तूंची पाहणी करणे. छायाचित्रण (Photography), रेखाचित्रे आणि संरचनेत झालेल्या बदलांच्या नोंदी. यामुळे तात्विक माहिती आणि प्रत्यक्ष स्थिती यातील तफावत स्पष्ट होते.
2. **मुलाखती (Interviews) -** संशोधनात अधिक अचूकता आणण्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करण्यात आली आहे. पुरातत्वशास्त्रज्ञ (Archaeologists), इतिहास संशोधक, वास्तुविशारद (Conservation Architects), दुर्गप्रेमी संस्थांचे प्रतिनिधी आणि किल्ल्यांच्या पायथ्याशी राहणारे स्थानिक नागरिक. संवर्धनातील तांत्रिक अडचणी आणि स्थानिक लोकांचे वारशाशी असलेले नाते समजून घेणे.
3. **दस्तऐवज विश्लेषण (Document Analysis) -** यामध्ये विविध संस्थांनी प्रसिद्ध केलेल्या अधिकृत आकडेवारीचे आणि धोरणांचे विश्लेषण केले जाते. युनेस्को (UNESCO) आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) यांनी वारसा जतनासाठी आखलेली नियमावली, कायदे आणि धोरणे. सध्याची सरकारी धोरणे वारसा जपण्यासाठी किती प्रभावी आहेत, याचे परीक्षण करणे.
4. **तुलनात्मक अभ्यास (Comparative Study) -** विविध स्थळांच्या स्थितीची तुलना करून निष्कर्षांपर्यंत पोहोचणे. महाराष्ट्रातील सुस्थितीत असलेले किल्ले (उदा. रायगड) आणि दुर्लक्षित किल्ले यांची तुलना करणे. तसेच, जागतिक स्तरावरील यशस्वी 'वारसा जतन मॉडेल्स'ची तुलना महाराष्ट्रातील परिस्थितीशी करणे. यशस्वी संवर्धन पद्धती ओळखणे आणि त्या इतर ठिकाणी कशा लागू करता येतील, हे सुचवणे.

प्रमुख समस्या (Problems):

1. **नैसर्गिक आव्हाने (Natural Factors)** निसर्गाच्या शक्तीमुळे होणारा ऱ्हास हा हळूहळू पण विनाशकारी असतो. दगडी बांधकामाची झीज (Exfoliation): सह्याद्रीतील बेसाल्ट खडकावर पावसाच्या पाण्याचा आणि तापमानाचा मोठा परिणाम होतो. *उदाहरण:* रायगड किल्ल्यावरील 'जगदीश्वर मंदिराच्या' भिंतींना खाऱ्या हवेमुळे आणि अतिवृष्टीमुळे 'सॉल्ट ॲक्शन' (Salt Action) चा सामना करावा लागत आहे, ज्यामुळे दगडांचे पापुद्रे निघत आहेत. जैविक आक्रमण (Biological Attack): वनस्पतींच्या मुळांमुळे होणारे नुकसान हे 'सायलंट किलर' आहे. *उदाहरण:* कोलाडजवळील किल्ले तळा किंवा सुधागड येथील अनेक बुरुज वडाच्या आणि पिंपळाच्या झाडांच्या विस्तारणाऱ्या मुळांमुळे ढासळले आहेत. मुळे तटबंदीच्या सांध्यांमध्ये शिरून दगड वेगळे करतात (Wedge Action). धूप व भूस्खलन: *उदाहरण:* प्रतापगड आणि राजगड सारख्या अतिउंच किल्ल्यांच्या पायवाटांवर दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे ऐतिहासिक पायऱ्यांचे नुकसान होत आहे.
2. **मानवी हस्तक्षेप (Human-Induced Problems)** नैसर्गिक घटकांपेक्षा मानवी हस्तक्षेपामुळे होणारी हानी ही अधिक वेगाने आणि

कायमस्वरूपी स्वरूपाची असते. मानवी अज्ञान, स्वार्थ आणि शिस्तीचा अभाव यामुळे ऐतिहासिक वास्तूंचे खालीलप्रमाणे नुकसान होत आहे.

- **अतिक्रमण (Encroachment):** ऐतिहासिक स्थळांच्या संरक्षित क्षेत्राचा (Protected Area) वापर वैयक्तिक किंवा व्यावसायिक कामांसाठी होणे ही एक गंभीर समस्या आहे. उदाहरण: विशाळगड येथे ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात आणि अवशेषांवर मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर बांधकामे आणि दुकाने थाटण्यात आली आहेत. यामुळे किल्ल्याचे मूळ वास्तुकलेचे स्वरूप नष्ट झाले असून, तेथील ऐतिहासिक पावित्र्य आणि पर्यटन मूल्य धोक्यात आले आहे.
- **विद्रुपीकरण (Vandalism):** पर्यटकांकडून ऐतिहासिक वास्तूंचे सौंदर्य जाणीवपूर्वक किंवा अनावधानाने खराब केले जाते. उदाहरण: लोहगड आणि कान्हेरी लेणी यांसारख्या प्रसिद्ध स्थळांवर पर्यटकांनी अणकुचीदार वस्तूंनी किंवा स्प्रे पेंटने भिंतींवर स्वतःची नावे कोरल्याचे दिसून येते. या विद्रुपीकरणामुळे अमूल्य असलेले प्राचीन शिलालेख आणि कोरीव काम कायमचे नष्ट होत आहे, ज्याची भरपाई करणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे.
- **ऐतिहासिक साहित्याची चोरी (Theft & Smuggling):** वारसा स्थळांचे संरक्षण करण्यासाठी पुरेशा सुरक्षा रक्षकांचा अभाव असल्याने मौल्यवान वस्तूंची चोरी होण्याचे प्रमाण वाढले आहे. उदाहरण: महाराष्ट्रातील अनेक दुर्लक्षित किल्ल्यांवरील ऐतिहासिक तोफा, प्राचीन मूर्ती, कोरीव लाकडी दारे किंवा वीरगळ यांची तस्करी होण्याच्या घटना वारंवार घडत असतात. हे आपल्या सांस्कृतिक इतिहासाचे कधीही न भरून येणारे नुकसान आहे.
- **अनाठायी धार्मिक कृत्ये व बदल:** ऐतिहासिक स्मारकांमध्ये मूळ रचनेला धक्का लावून नवीन धार्मिक प्रतीके बसवणे किंवा आधुनिक रंगांचा वापर केल्यामुळे वास्तूची ऐतिहासिक सत्यता धोक्यात येते.

3. व्यवस्थापकीय व प्रशासकीय त्रुटी (Administrative Issues):

- **अशास्त्रीय संवर्धन (Unscientific Restoration):** चुकीचे साहित्य वापरल्याने होणारे नुकसान. *उदाहरण:* अनेक किल्ल्यांच्या तटबंदीची दुरुस्ती करताना मूळ 'चुना-मिश्रण' (Lime Mortar) ऐवजी सिमेंटचा वापर केला जातो. सिमेंट उष्णता धरून ठेवते आणि दगडाला "श्वास" घेऊ देत नाही, परिणामी मूळ दगड आतून सडू लागतो.
- **निधीचा अभाव:** योग्य पद्धतीने जर निधी उपलब्धता आणि नियोजन केले नाही तर अनेक अडचणी येऊ शकतात. *उदाहरण:* महाराष्ट्रातील अनेक भूईकोट किल्ले (उदा. चाकणचा भुईकोट, पारोळा किंवा कुरुंदवाड) हे नगरपालिकेकडे की पुरातत्व विभागाकडे या वादात आणि निधीअभावी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

4. पायाभूत सुविधा व पर्यावरणीय समस्या (Infrastructure & Environment):

- कचरा व प्लास्टिक प्रदूषण: *उदाहरण:* हरिश्चंद्रगड येथील 'कोकण कडा' परिसरात पर्यटकांनी टाकलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या आणि कचऱ्याचे ढीग साचलेले आढळतात. हे केवळ सौंदर्यच खराब करत नाही, तर तेथील दुर्मिळ

जैवविविधतेसाठी (उदा. तानाजी सरडा किंवा स्थानिक वनस्पती) घातक आहे.

- जलस्रोतांचे दूषितीकरण: *उदाहरण:* किल्ले सिंहगड किंवा तोरणा येथील ऐतिहासिक पिण्याच्या पाण्याचे टाक (टाकी) केवळ पर्यटकांनी कचरा आणि निर्माल्य टाकल्यामुळे दूषित झाले आहेत, त्यामुळे पाण्याचे नैसर्गिक शुद्धीकरण थांबले आहे आणि किल्ल्यावर पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होत आहे.

उपाययोजना (Solutions):

1. **शास्त्रीय व तांत्रिक उपाय (Scientific & Technical Measures)** केवळ वरवरची दुरुस्ती करण्याऐवजी, वास्तूचे आयुर्मान वाढवण्यासाठी खालील प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. **LiDAR आणि ३D लेझर स्कॅनिंग (Point Cloud Data)** लेझर स्कॅनरद्वारे वास्तूच्या प्रत्येक कोनाचे लाखो 'डाटा पॉइंट्स' गोळा केले जातात. याला 'पॉइंट क्लाउड' म्हणतात.
2. या तंत्रज्ञानामुळे वास्तूची 'मॅक्रो' आणि 'मायक्रो' स्तरावर तपासणी करता येते. भिंतीला आलेली सूक्ष्म सूज किंवा झुकलेला बुरुज मानवी डोळ्यांना दिसण्यापूर्वी या स्कॅनिंगमध्ये स्पष्ट होतो.
3. **साहित्य सुसंगतता (Material Characterization & Compatibility):** पारंपारिक मिश्रण (Mortar Analysis): जुन्या काळातील 'वज्रलेप' किंवा चुनखडीच्या मिश्रणाचे रासायनिक विश्लेषण करून त्याच गुणधर्माचे नवीन मिश्रण तयार करणे. यात गूळ, बेलफळ, काळा मसाला आणि ताग यांचा वापर केला जातो, ज्यामुळे भिंतीमध्ये लवचिकता राहते आणि ती वातावरणातील बदलांना तोंड देऊ शकते.
4. **सिमेंट बंदी:** ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनात (Heritage Conservation) सिमेंटच्या वापरावर बंदी असण्यामागे अत्यंत ठोस वैज्ञानिक आणि तांत्रिक कारणे आहेत. पुरातत्व विभाग (ASI) आणि जागतिक वारसा संस्था (UNESCO) सिमेंटऐवजी 'चुना' (Lime) वापरण्यावर भर देतात. ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनामध्ये सिमेंटवर बंदी घालण्यामागे मुख्यत्वे वैज्ञानिक आणि वास्तूशास्त्रीय कारणे आहेत. जुन्या दगडी किंवा विटांच्या वास्तू नैसर्गिकरित्या सच्छिद्र असतात, ज्यामुळे त्यातील ओलावा बाहेर पडणे (Breathability) आवश्यक असते. सिमेंट हे पाणीरोधक असल्याने ओलावा आतच अडकून राहतो, परिणामी दगडांची अंतर्गत झीज होऊन वास्तू कमकुवत होते. याउलट, चुन्यामध्ये असलेली लवचिकता (Flexibility) वास्तूच्या नैसर्गिक हालचालींना सामावून घेते, तर सिमेंटच्या ताठरपणामुळे भिंतींना भेगा पडतात. तांत्रिकदृष्ट्या, सिमेंटमधील क्षारांमुळे (Soluble Salts) दगडांचे 'कॅन्सर' सदृश नुकसान होऊन त्यांचे पापुद्रे निघू लागतात. त्यामुळेच, युनेस्को (UNESCO) आणि पुरातत्व विभागाच्या नियमांनुसार वास्तूचे मूळ ऐतिहासिक स्वरूप जपण्यासाठी सिमेंटऐवजी चुना, गूळ, बेलफळ आणि मेथी यांसारख्या नैसर्गिक घटकांपासून बनवलेला 'हेरिटेज मोर्टार' वापरणे बंधनकारक आहे.
5. **कायदेशीर व प्रशासकीय उपाय (Legal & Policy Measures)**
   - बफर झोनचे व्यवस्थापन (Buffer Zone Management): AMASR कायदा (Ancient

Monuments and Archaeological Sites and Remains Act) हा भारतातील ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी बनवलेला सर्वात महत्त्वाचा कायदा आहे. याचे नियंत्रण भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) विभाग करतो.या कायद्यानुसार वास्तूच्या १०० मीटर परिसरात कोणतेही बांधकाम करण्यास बंदी (Prohibited Area) आणि पुढील २०० मीटर क्षेत्रात नियंत्रित बांधकामाला (Regulated Area) परवानगी असते. याची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी 'सॅटेलाईट मॉनिटरिंग'चा वापर करावा.

- **एक खिडकी योजना:** पुरातत्व, वन विभाग आणि पर्यटन विभाग यांच्यात समन्वय साधण्यासाठी 'राज्य वारसा संवर्धन समिती' (State Heritage Conservation Committee) अधिक सक्षम करावी.

6. शाश्वत पर्यटन विकास (Sustainable Tourism Development) पर्यटन वाढवणे म्हणजे केवळ गर्दी वाढवणे नसून, वास्तूचे ऐतिहासिक मूल्य आणि नैसर्गिक पर्यावरण जपून पर्यटकांना अनुभव देणे म्हणजे 'शाश्वत पर्यटन' होय. यासाठी खालील दोन प्रमुख संकल्पनांचे सविस्तर विश्लेषण केले आहे:

7. वहनक्षमता (Carrying Capacity) आणि शास्त्रीय नियोजन: वास्तूवर पर्यटकांचा किती भार असावा, हे केवळ अंदाजावर न ठरवता ते शास्त्रीय सूत्राने निश्चित करणे आवश्यक आहे. यामुळे वास्तूची झीज रोखता येते. "जागतिक पर्यटन संघटनेच्या (UNWTO) निकषांनुसार आणि 'सिफुअँटेस' (१९९२) यांनी मांडलेल्या कार्यपद्धतीनुसार, ऐतिहासिक वास्तूची वहनक्षमता निश्चित करण्यासाठी भौतिक वहनक्षमता (PCC) हे सूत्र वापरले जाते."

वहनक्षमता सूत्र:

$$PCC = A \times \frac{R_f}{a}$$

घटकांचे स्पष्टीकरण:

A (Available Area): हे मीटरमध्ये मोजलेले एकूण क्षेत्रफळ असते. किल्ल्यांच्या बाबतीत, जिथे पर्यटक उभे राहू शकतात किंवा फिरू शकतात (उदा. रायगडावरील होळीचा माळ किंवा राजवाडा परिसर), तेवढेच क्षेत्रफळ गृहीत धरले जाते.

a (Area required per visitor): संवर्धन मानकांनुसार (Conservation Standards), एका पर्यटकाला वास्तूमध्ये वावरताना किमान **१ ते २ चौरस मीटर** जागा मिळणे आवश्यक आहे. जर वास्तू अतिसंवेदनशील (Fragile) असेल, तर हे अंतर वाढवले जाते.

R_f (Rotation Factor): हे सूत्र पर्यटकांच्या फिरण्याच्या वेगावर अवलंबून असते:

$$R_f = \frac{\text{Opening Hours}}{\text{Average Visit Time}}$$

उदा. जर किल्ला १० तास उघडा असेल आणि एका पर्यटकाला फिरण्यासाठी २ तास लागत असतील, तर Rf हा ५ असेल (१०/२ = ५).

अंमलबजावणी: या सूत्राचा वापर करून रायगड, राजगड किंवा सिंहगड यांसारख्या किल्ल्यांवर एका वेळी किती लोक असावेत हे निश्चित करता येईल. जेव्हा ही मर्यादा ओलांडली जाईल, तेव्हा 'ऑनलाईन बुकिंग' प्रणालीद्वारे प्रवेश नियंत्रित केला जावा. यामुळे वास्तूच्या पायऱ्या, तटबंदी आणि अरुंद वाटांवर होणारा ताण कमी होईल.

8. झिरो वेस्ट धोरण (Zero Waste Policy): किल्ल्यांवरील कचरा, विशेषतः प्लास्टिक प्रदूषण ही एक गंभीर समस्या आहे. त्यावर 'कचरा ठेव' (Waste Deposit) ही संकल्पना प्रभावी उपाय ठरू शकते.

या साठी खालील प्रमाणे कार्यपद्धती अवलंबता येईल:

- **डिपॉझिट सिस्टिम:** किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या प्रवेशद्वारावर प्रत्येक पर्यटकाने नेलेल्या प्लास्टिक बाटल्या, वेफर्सची पाकिटे यांची नोंद केली जाईल. प्रत्येक वस्तूमागे ठराविक रक्कम (उदा. १० ते २० रुपये) 'ठेव' म्हणून घेतली जाईल.
- **परतावा प्रणाली:** पर्यटकाने परत येताना तोच कचरा (रिकामी बाटली किंवा पाकीट) सोबत आणल्यास, त्याची ठेव रक्कम त्याला त्वरित परत केली जाईल.
- **फायदा:** या पद्धतीमुळे किल्ल्यावर कचरा टाकण्याला आळा बसेल आणि पर्यटकांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होईल.

9. पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा (Eco-friendly Infrastructure):

- **नॉन-इन्व्हॅसिव्ह सुविधा:** किल्ल्यावर बांधकामे करताना सिमेंटचा वापर न करता 'Pre-fabricated' (आधीच तयार केलेले) लाकडी किंवा धातूचे सांगाडे वापरावेत, जे सहज काढता येतात.
- **सौर ऊर्जा:** गडावरील प्रकाश व्यवस्थेसाठी पारंपारिक वीज वाहिन्या न टाकता सौर ऊर्जेचा वापर करावा.
- **स्थानिक रोजगार:** पर्यटनातून मिळणारा महसूल स्थानिक गावकऱ्यांना (मार्गदर्शक, घरगुती जेवण इ.) मिळावा, जेणेकरून तेच या वारशाचे पहिले रक्षक बनतील.

10. अनुकूल पुनर्वापर (Adaptive Reuse) ज्या वास्तूंचा वापर धार्मिक कार्यासाठी होत नाही (उदा. धान्याची कोठारे, सदर), तिथे लहान संग्रहालये किंवा माहिती केंद्रे सुरू केल्यास वास्तूच्या दैनंदिन स्वच्छतेचा प्रश्न सुटतो. वास्तू वापराविना राहिली की तिचा ऱ्हास वेगाने होतो.

निष्कर्ष (Conclusion):

प्रस्तुत संशोधनाअंती असे ठामपणे सिद्ध होते की, महाराष्ट्रातील गड-किल्ले आणि ऐतिहासिक स्मारके ही केवळ दगड-मातीची बांधकामे नसून आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची, प्रगत स्थापत्यशास्त्राची आणि प्रशासकीय कौशल्याची जिवंत साक्ष आहेत. ही स्थळे केवळ भूतकाळाच्या स्मृती नसून भविष्यासाठी प्रेरणा देणारी आपली अनमोल सांस्कृतिक संपत्ती आहे.

या सखोल अभ्यासातून समोर आलेले मुख्य निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत:

- **वारसा जतन ही बहुआयामी प्रक्रिया:** वारसा जतन करणे म्हणजे केवळ वास्तूची भौतिक दुरुस्ती करणे नव्हे, तर तिचे ऐतिहासिक संदर्भ, सभोवतालचे पर्यावरण आणि सामाजिक अस्मिता टिकवून ठेवणे होय.
- **कायदे आणि निधीची मर्यादा:** केवळ कठोर कायदे किंवा मोठ्या प्रमाणावरील निधी वारसा वाचवू शकत नाही. जोपर्यंत या निधीचा विनियोग शास्त्रीय पद्धतीने होत नाही आणि कायद्याची अंमलबजावणी स्थानिक स्तरावर प्रभावीपणे होत नाही, तोपर्यंत वास्तूंचा ऱ्हास थांबवणे कठीण आहे.
- **लोकसहभाग हाच खरा प्राण:** कोणत्याही वारसा स्थळाचे दीर्घकालीन संवर्धन हे लोकसहभागाशिवाय अशक्य आहे. जेव्हा स्थानिक समुदाय या वास्तूंकडे 'सरकारी मालमत्ता' म्हणून न पाहता 'आपला वारसा' म्हणून पाहतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने संरक्षणाची चळवळ यशस्वी होते. म्हणूनच **"किल्ले जतन" ही**

केवळ एक शासकीय योजना नसून ती एक व्यापक लोकचळवळ बनणे ही काळाची गरज आहे.

संदर्भसूची (References):

1. कानेटकर, पी. के. (२००५): *महाराष्ट्रातील गड-किल्ले*, राजहंस प्रकाशन, पुणे.
2. देशमुख, पी. एन. (२०१०): *छत्रपती शिवाजी महाराज: व्यवस्थापन आणि युद्धनीती*, स्नेहवर्धन प्रकाशन.
3. सावरकर, बा. धै. (१९९५): *दुर्ग आणि दुर्गवास्तुकला*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
4. खरे, ग. ह. (१९३८): *महाराष्ट्राची किल्ले*, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.
5. Archaeological Survey of India (ASI): *Conservation Manual (John Marshall)*, (Reprint 2006), New Delhi.
6. Government of Maharashtra: *The Maharashtra Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1960*.
7. UNESCO (1972): *Convention Concerning the Protection of the World Cultural and Natural Heritage*, Paris.
8. UNWTO (2010): *Sustainable Development of Tourism - Carrying Capacity Guidelines*.
9. Boullon, R. C. (1985): *Planificación del Espacio Turístico*, Editorial Trillas, Mexico (Tourism Carrying Capacity Model).
10. Cifuentes, M. (1992): *Determination of Carrying Capacity for Tourism in Protected Areas*, CATIE, Costa Rica.
11. Feilden, B. M. (2003): *Conservation of Historic Buildings*, Architectural Press, Elsevier (For Material Compatibility & Lime Mortar).
12. Heritage Science Journal: *Applications of LiDAR and 3D Scanning in Heritage Management*, Vol. 4, 2018.
13. संकेतस्थळे व डिजिटल संसाधने (Websites & Digital Resources):
    1. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI):
    2. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC)
    3. जागतिक वारसा केंद्र (UNESCO World Heritage Centre)

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

किल्ले भूपाळगड (बाणूरगड): मराठा-मुघल संघर्षातील सामरिक महत्त्व आणि सांस्कृतिक वारशाचा एक ऐतिहासिक अभ्यास

प्रदीप हणमंत निकम

संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,

ग्रामोन्नती मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

Corresponding Author - प्रदीप हणमंत निकम

DOI - 10.5281/zenodo.19665130

गोषवारा:

बानुरगड किल्ला हा महाराष्ट्रातील स्वराज्याच्या सीमेवर वसलेला एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोनातून महत्वपूर्ण किल्ला आहे. बानुरगड किल्ला मराठा साम्राज्याच्या संरक्षणासाठी एक महत्वाचा लष्करी ठाणे होता. किल्ल्याची भौगोलिक रचना, उंची, आणि मजबूत तटबंदीमुळे तो दुश्मनावर नजर ठेवण्यासाठी आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आदर्श होता. याशिवाय किल्ल्यावर प्राचीन मंदिरे, शिलालेख आणि मूर्ती असून, त्याचे सांस्कृतिक आणि धार्मिक महत्वही स्थानिक लोकांमध्ये आहे. या संशोधनातून किल्ल्याच्या स्थापत्यकलेचा अभ्यास, स्थानिक लोकांच्या श्रद्धा आणि सांस्कृतिक महत्व याचे विवेचन करण्यात आले आहे. बानुरगड किल्ल्याचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्व भविष्यकालीन पिढ्यांसाठी जतन करण्यासाठी संरक्षणासाठी आणि संवर्धनाची आवश्यकता असल्याचे निष्कर्ष या पेपरमध्ये मांडले आहेत.

सूचनक शब्द: किल्ला, परंपरा, सांस्कृतिक महत्व, पर्यटन.

प्रस्तावना:

बानुरगड किल्ला हा महाराष्ट्रातील स्वराज्याच्या सीमेवर असलेला एक महत्वाचा किल्ला आहे, बानुरगड किल्ल्याच्या भौगोलिक स्थानामुळे त्याचे लष्करी दृष्टीकोनातून महत्व वाढले आहे. उंच ठिकाणावर वसलेला असल्याने तो शत्रूच्या हालचालींवर लक्ष्य ठेवण्यासाठी योग्य ठरतो. किल्ल्यावर असलेली मंदिरे, मूर्ती आणि शिलालेख यामुळे तो धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाचा म्हणूनही ओळखला जातो. याशिवाय तो एक व्यापारी मार्गावर असल्याने स्थानिक अर्थव्यवस्थेतील त्याचे योगदान महत्वाचे ठरते. या किल्ल्याचा इतिहास, त्याचे स्थानिक लोकांमधील महत्व आणि ऐतिहासिक घडामोडीत त्याचे स्थान याचा शोध घेण्याचा या संशोधनाचा उद्देश आहे. बानुरगड किल्ल्याचा वारसा जपण्यासाठी आणि त्याचे संरक्षण करण्यासाठी शासन, स्थानिक प्रशासन आणि पर्यटक यांची भूमिका महत्वाची आहे. सध्याच्या काळात बानुरगड किल्ला जीर्ण अवस्थेत असला तरी तो एक महत्वपूर्ण पर्यटन स्थळ म्हणून विकसित होण्याची क्षमता बाळगतो. योग्य संवर्धन आणि ऐतिहासिक वारसा जपण्याची गरज आहे. या संशोधनाचा उद्देश बानुरगड किल्ल्याच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणे, त्याचे

ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्व उलगडणे, तसेच त्याच्या संवर्धनाची आवश्यकता अधोरेखित करणे हा आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

१. बानुरगड किल्ल्याचा इतिहास, त्याच्या निर्मितीचा काळ, आणि त्याच्या स्थापनेमागील उद्दिष्टे याचा अभ्यास करणे.

२. किल्ल्याचा स्थानिक लोकांच्या जीवनात असलेला भावनिक आणि सामाजिक संबंध, परंपरागत महत्व, आणि सांस्कृतिक वारसा म्हणून याचा अभ्यास करणे.

३. बानुरगड किल्ल्याचा पर्यटन क्षेत्रात विकास आणि ऐतिहासिक वारसा म्हणून जतन करण्यासाठी आवश्यक पावले ओळखणे

या उद्दिष्ट्यानी बानुरगड किल्ल्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्व स्पष्ट होईल.

संशोधनाची गृहीतके:

१. बानुरगड किल्ल्यावर प्राचीन स्थापत्यकलेचे उत्कृष्ट उदाहरणे आहेत, ज्यामध्ये तटबंदी, बुरुज आणि गुप्त मार्ग यांचा समावेश आहे.

२. आज बानुरगड किल्ल्याचे संवर्धन झाल्यास तो एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ बनू शकतो आणि त्याच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्था बळकट होऊ शकते.

३. स्थानिक लोकांच्या जीवनात भावनिक व सांस्कृतिक संबंध आहे त्यामुळे त्याचे जतन आवश्यक आहे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर तसेच या विषयाच्या अनुसंगाने प्राचीन इतिहास ग्रंथ, महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाचे अभिलेख, आधीच्या संशोधन पत्रिकांमधून किल्ल्याच्या संबंधित महत्वपूर्ण माहिती मिळविण्यात आली आहे. वृत्तपत्रे,इंटरनेट, या साधनांचाही आधार घेण्यात आला आहे. तसेच किल्ला परिसरातील लोकांच्या मुलाखतीद्वारे किल्ल्याशी संबंधित लोकांच्या कथा, श्रद्धा, परंपरा आणि किल्ल्याचे सांस्कृतिक महत्व समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी:

भूपाळगड किंवा भोपाळगड हा किल्लाच बानुरगड या नावाने ओळखला जातो. सांगली जिल्ह्यातील खानापूर आणि आटपाडी तालुक्याच्या सीमेरेषेवर बानुरगड उभा आहे. मराठा काळात स्वराज्याच्या सीमा रक्षणाच्या दृष्टीकोनातून बानुरगड या किल्ल्याला अनन्यसाधारण महत्व होते. बानुरगड किल्ला हा महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्यांपैकी एक महत्वाचा किल्ला आहे. याची स्थापना कोणत्या कालखंडात झाली आणि त्याचा प्रामुख्याने कोणत्या साम्राज्यात सहभाग होता, याबाबत थोडी कमी माहिती उपलब्ध असली तरीही किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व उलगडून सांगणारे काही ठळक संदर्भ देखील आहेत. बानुरगड किल्ला मराठा साम्राज्याच्या काळात महत्वाचा बनला. हा किल्ला मोघल व मराठा साम्राज्याच्या संघर्षात सामरिक दृष्टीने महत्वाचा ठरला. किल्ल्याच्या पायथ्याच्या बाणूर गावामुळे या किल्ल्याला "बाणूरचा किल्ला" म्हणूनही ओळखले जाते. किल्ल्याचा घेर खूप मोठा आहे. पूर्व आणि उत्तरेकडे साधारण ७०० फूट उंच कडे आहेत. पण पश्चिमेकडून किल्ला फार उंच नाही. बाणूर गाव किल्ल्याच्या याच बाजूला आहे. सध्या किल्ल्यातच गाव वसलेल आहे. किल्ल्याची तटबंदी फोडून रस्ता बनविण्यात आला आहे. या रस्त्याने गाडी घेऊन थेट किल्ल्यावर जाता

येते. बानुरगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व हा विषय महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि मराठा साम्राज्याच्या सैनिकी धोरणाचा अभ्यास करण्यासाठी महत्वपूर्ण आहे. बानुरगड हा किल्ला संरक्षक, स्थानिक नियंत्रण आणि धार्मिक महत्वाच्या दृष्टीने उल्लेखनीय आहे.

इतिहास:

या गडाला 'भूपालगड' असेही संबोधले जाते. 'बुसातिन-उस-सलातिन' या साधनग्रंथानुसार शिवरायांनी मांजऱ्याजवळच्या पर्वतावर मजबूत असा किल्ला बांधला व त्यास भूपालगड हे नाव दिले; तर एका लोककथेनुसार भूपालसिंह राजाने तो गड बांधला म्हणून त्या गडाचे नाव भूपालगड असे पडले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात अफझलखानाच्या सन १६५९ ला झालेल्या वधानंतर हा किल्ला शिवछत्रपतींच्या ताब्यात आला. नंतर त्याची डागडुजी झाली. भूपाळगडाची किल्लेदारी शिवरायांनी दौलतराव गायकवाड या अनुभवी सहकाऱ्याकडे दिली. किल्ल्याच्या आवारात बाणलिंगाचे म्हणजेच महादेवाचे मंदिर आहे. त्यातील शिवलिंगाला बाणूर्लिंग म्हणून ओळखले जाते. समाधी मंदिराच्या एका बाजूस बहिर्जी नाईक यांची आहे. ती वृंदावन समाधी आहे असे मानले जाते. ती मराठे आणि मुघल यांच्यात झालेल्या लढाईची साक्षीदार होय. दिलेरखान या मुघल सेनापतीने सन १६७९ साली त्या गडावर हल्ला केला. त्यावेळी गडावर फिरंगोजी नरसाळा हा शूरवीर किल्लेदार होता. त्याने जवळील संग्रामदुर्ग येथे शाहिस्तेखान आणि त्याच्या सैन्याबरोबर यशस्वी लढा देऊन मुघलांना हटवले होते. त्याने शिवरायांना अनेक संकटमय प्रसंगात मदत केली होती. मात्र तो बाणूरगडाच्या लढाईत धर्मसंकटात सापडला होता. शेवटी, त्याने गड दिलेरखानाच्या स्वाधीन केला होता. रायगडावर महाराजांना हे समजतातच ईतर गडांना पत्रे पाठ्विली गेली, "गड लढवावा, अणमान करो नये". याचे वर्णन 'बुसातिन-उस-सलातिन', तारीखे दिल्कुशा या मुघल ग्रंथकारांची आणि मल्हार रामराव चिटणीस यांच्या बखरीत आहे.

किल्ल्यावरील ठिकाणे:

बाणूर गावातून किल्ल्यावर प्रवेश करताना किल्ल्याच्या तटबंदीचे अवशेष पाहायला मिळतात. किल्यावर वस्ती आहे. या वस्तीतून डावीकडे एक कच्चा रस्ता जातो. या रस्त्याने पुढे गेल्यावर गावाची वस्ती संपते . पुढे रस्त्याच्या दोन्ही बाजूला पठार आहे . समोर एक छोटी टेकडी आपले लक्ष वेधून घेते. या टेकडीवर महादेवाचे मंदिर आहे. त्या मंदिराच्या बाहेर सिमेंटमध्ये बांधलेली एक कमान आहे ती दुरवरुनच दृष्टीस पडते. या कमानी पर्यंत पोहोचायला १५ मिनिटे लागतात. या टेकडीच्या पायथ्याशी रस्ताच्या उजव्या बाजूला कातळात खोदलेला तकाव आहे. तलाव पाहून पायऱ्यांच्या मार्गाने कमानीतून टेकडीवर आपला प्रवेश होतो. टेकडीवर शंकराचे पुरातन मंदिर आहे. मंदिराला एकेकाळी तटबंदी असावी. आता फ़क्त तटबंदीतील दरवाजा भक्कमपणे उभा आहे. या दरवाजातून बाहेर पडल्यावर समोरच एक तुळाशी वृंदावन आहे. स्वराज्याच्या गुप्तहेर खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक यांची ही समाधी आहे. या टेकडीजवळच एक पाण्याचे छोटे कोरडे टाके आहे. गडाच्या तटबंदीत २ ते ३ दिंडी दरवाजे (चोर दरवाजे) आहेत. किल्ल्यावर सर्वत्र तुटलेल्या रचीव तटबंदीचे अवशेष दृष्टीस पडतात. किल्ल्यावरुन कोळदुर्ग दिसतो.

भौगोलिक आणि सामरिक महत्व:

बानुरगड किल्ल्याचे भौगोलिक स्थान आणि संरक्षक तटबंदी यामुळे किल्ला संपन्न आहे.हे स्थान मराठ्यांसाठी सामरिक दृष्टीकोनातून उपयुक्त ठरले आहे.

किल्ल्यावरून आजूबाजूचा परिसर सहज पाहता येतो, ज्यामुळे शत्रूची हालचाल लवकर समजण्यास मदत होत असे.

सांस्कृतिक महत्व

बानुरगड किल्ल्याच्या परिसरात विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम साजरे केले जातात. परिसरातील स्थानिक समाज या किल्ल्याला पवित्र स्थान मानतो. येथे मंदिर, देवीची मूर्ती आणि काही ऐतिहासिक अवशेष आहेत ज्यांचे समाजात विशेष महत्व आहे.

बानुरगड किल्ल्याचे संरक्षण आणि संवर्धन:

आजच्या काळात किल्ल्याची स्थिती काही प्रमाणात ढासळलेली आहे. परंतु महाराष्ट्र शासन आणि स्थानिक सामाजिक संस्थाद्वारे किल्ल्याच्या संवर्धनासाठी प्रयत्न सुरु आहेत. किल्ल्याचे संवर्धन केल्यास त्याचे पर्यटन महत्व वाढेल आणि स्थानिक रोजगाराच्या संधीही निर्माण होतील.

निष्कर्ष :

बानुरगड किल्ल्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक महत्व स्पष्ट झाले आहे. त्याच्या भौगोलिक स्थितीमुळे किल्ल्याने संरक्षनात्मक ठाणे म्हणून महत्वपूर्ण भूमिका बजावली. या किल्ल्याच्या मजबूत तटबंदी, बुरुज आणि गुप्त मार्गांनी त्याच्या स्थापत्यकलेची अद्वितीयता अधोरेखित होते. किल्ल्यावरील मंदिरे, शिलालेख आणि मूर्ती यामुळे त्याचे सांस्कृतिक आणि धार्मिक महत्वही स्थानिक लोकांसाठी विशेष आहे. आजच्या काळात बानुरगड किल्ला एक आकर्षक पर्यटन स्थळ म्हणून विकसित होण्याची क्षमता बाळगतो. या ऐतिहासिक वारसाचे योग्य संवर्धन आणि जीर्णोद्धार केल्यास तो स्थानिक अर्थव्यवस्था आणि पर्यटनासाठी महत्वपूर्ण ठरेल. शासन आणि स्थानिक प्रशासनाने एकत्रितपणे प्रयत्न करून किल्ल्याचे जतन आणि विकास करणे आवश्यक आहे, जेणेकरून किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांसाठी संरक्षित राहील. या संशोधनामुळे बानुरगड किल्ल्याचे विविध पैलू समजून घेण्यास मदत होते आणि त्याच्या संवर्धनाची आवश्यकता स्पष्ट होते.

संदर्भ :

१. खरे ग. ह., मराठा साम्राज्याचा इतिहास, पॉप्युलर प्रकाशन, पुणे

२. सांगली जिल्हा गझेटिअर, सुधारित आवृत्ती, पृ. २२.

३. खानापूर आणि आटपाडी तालुक्याच्या सीमेवरील भौगोलिक स्थानाचा नकाशा, भूमापन विभाग.विटा

४. चाफेकर सतीश, महाराष्ट्राचे किल्ले-रचना व इतिहास, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई.

५. इब्राहिम अली झुबेरी, बुसातिन-उस-सलातिन (विजापूरचा इतिहास), मराठी अनुवाद : सेतुमाधवराव पगडी, ठोकळ प्रकाशन, पुणे, पृ. 145.

६. कुलकर्णी सुधीर, भारतीय किल्ल्यांचे संकलन, नॅशनल बुक ट्रस्ट प्रकाशन,

७. चाफेकर, सतीश. महाराष्ट्राचे किल्ले : रचना आणि इतिहास, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

८. देसाई रणजीत, महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरांचा इतिहास, ग्रंथाली प्रकाशन, पुणे.

९. स्थानिक लोकांच्या मुलाखती

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे नेतृत्व आणि जन-आंदोलने

डॉ. किशोर गुलाब गाढवे

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड

ता. वाई. जि. सातारा. पिन.४१५५१३

Corresponding Author - प्रा. डॉ. किशोर गुलाब गाढवे

DOI - 10.5281/zenodo.19665144

प्रस्तावना:

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत अनेक राजकीय नेते,विचारवंत,समाजसुधारक यांनी आपले योगदान दिले आहे.यामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे संघटक प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचे नाव आपणाला अग्रक्रमाने घ्यावे लागेल.त्यांनी आपली संपूर्ण हयात सामान्य जनतेचे जीवन सुखी बनविण्यासाठी घालवली. शेती, शेतकरी, कष्टकरी, कामगार यांना केंद्रबिंदू मानून कार्य करण्याचा प्रयत्न केला.यासाठी सभा,मोर्चे,उपोषण,रास्तारोको आणि जन-आंदोलनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपण जन-आंदोलनाच्या मार्गाकडे कसे वळलो याबाबत स्वत: प्रा.डॉ.एन.डी.पाटील "संघर्षाची वाटचाल" कोल्हापूर आकाशवाणी वरून प्रसारित झालेल्या मुलाखतीत सांगतात की, १९४८ साली राजकर्त्यांचा राज्यकारभार करण्याविषयीचा दृष्टीकोन जनतेसमोर आला.कारण हेच राजकर्ते १९४७ ला स्वातंत्र्यापूर्वी स्वातंत्र्य सैनिक म्हणून काय बोलत होते आणि आता राजकर्ते म्हणून काय बोलू लागले होते यात जमीन आसमानचे अंतर होते.ब्रिटीशांनी ज्या पद्धतीने काम केले त्याच पद्धतीने राजकर्त्यांनी काम करायला सुरुवात केली होती.सामान्य शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, कामगार, भूमिहीन यांच्या हिताचा निर्णय घेण्याऐवजी भांडवलदारी दृष्टीकोणातून व्यापारी,उद्योगपती,कारखानदार,श्रीमंत लोक यांच्या हिताचे निर्णय घेऊन सामान्य जनतेवर मात्र अन्याय केला जात होता.अशा परिस्थितीत आंदोलन करण्याशिवाय पर्यायच नव्हता.[१]

शोधनिबंधाचा उद्देश:

प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी केलेल्या जन – आंदोलनांची माहिती घेण्याबरोबरच आंदोलनाच्या नेतृत्वा मधून जनतेचे प्रश्न सोडवले गेले का? याचा अभ्यास करणे.(एन.डी.म्हणजे आंदोलन आणि आंदोलन म्हणजे एन.डी.हे समीकरण समजून घेणे)

ऐतिहासिक संशोधन पध्दती:

सदरचा शोध निबंध तयार करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून मौखिक साधन म्हणून मुलाखत पद्धतीचा व समकालीन घटनांचा तपशील अधोरेखित करण्यासाठी संदर्भ ग्रंथ व वृत्तपत्रातील बातम्यांचा आधार घेतलेला आहे.

१. संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि सीमा आंदोलनातील प्रा.एन.डी .पाटील यांचा सहभाग:

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्याच काळात महाराष्ट्रात मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे यासाठी चळवळ जोमात सुरु झाली होती.इ.स.१९५८ पासून प्रा.एन.डी.पाटील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीशी जोडले गेले.१ मे १९६० रोजी मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.या आनंदात काँग्रेसपक्षा बरोबर सयुंक्त महाराष्ट्राची चळवळ करणारे आनंदोत्सवात मशगुल झाले.परंतु आपल्या दहा लाख बांधवांना सीमा भागातच सोडून दिले आहे याची जाणीवच राहिली नाही. १ नोव्हेंबर १९५८ पासून सीमा आंदोलनाला सुरुवात झाली.सलग भाषीक खेडी हा प्रांतरचनेचा तर्कशुध्द् निकष असून तो अन्य राज्याप्रमाणे मुंबई-म्हैसूर सीमेबाबतही लागू करावा ही सीमा सत्याग्रहाची मागणी होती. सत्याग्रहाला सरकार दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ३ मे १९५९ रोजी भाई दाजीबा देसाई यांच्या नेतृत्वाखाली"साराबंदी चळवळ" सुरु करण्यात आली. प्रा.डॉ.एन.डी.पाटील, भाई दि.बा.पाटील., भाई उध्द्वराव पाटील, भाई डी. एस. खांडेकर इ.नेते मंडळी सहभागी झाली.संयुक्त महाराष्ट्र समिती मार्फत साराबंदी आंदोलनाला सुरुवात झाली.सीमा आंदोलनाला अधिक व्यापक व प्रभावी बनविण्यासाठी साराबंदी हा सामूहिक सत्याग्रहाचा मार्ग अवलंबण्यात आला होता.१५० खेड्यात ही चळवळ पोहचली होती. यामुळे सरकारला सारावसुली स्थगित करावी लागली होती.याच संदर्भात पुणे येथे भाई दाजीबा देसाई यांच्या नेतृत्वाखाली चार ते पाच हजार लोकांचा मोर्चा काढण्यात आला होता.यावेळी ४ खासदार आणि १८ आमदार यांना अटक करण्यात आली होती.यामध्ये आमदार प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांना अटक करण्यात आली होती.[2] महाराष्ट्र-कर्नाटकातील सीमा प्रश्न सोडविण्यासाठी १९६६ साली केंद्र सरकारने महाजन कमिशनची नियुक्ती केली.या कमिशनने महाराष्ट्र विरोधी अहवाल दिल्यामुळे शेतकरी कामगार पक्षाने महाजन अहवालाला विरोध करत कोल्हापूर शहरात कडकडीत हरताळ पाळला.महाजन अहवालाची होळी करण्यात आली.यानंतर लगेचच कोल्हापुरात सीमा परिषदेचे आयोजन करण्यात येऊन सीमा वासीयांच्या तीव्र भावना सरकारपर्यंत पोहचविण्यात आल्या.यानंतर १९७२ साली झालेल्या निवडणुकीत सीमा प्रश्नाचा मुद्दा महत्वाचा ठरला होता.हळूहळू सीमा वासीयांचा प्रश्न मागे पडत गेला.सीमा प्रश्न न्यायालयात दाखल करण्यात आला.[3] सामान्य जनतेच्या पातळीवरील आंदोलन कमी होऊन राजकीय पातळीवर जेष्ठ नेत्यांच्या समित्या नियुक्त करण्यात येऊन दोन राज्यांनी परस्पर विचार विनिमयातून सीमा प्रश्न सोडवावा असे प्रयत्न सुरु झाले. परंतु आजपर्यंत सीमा प्रश्न सोडविण्यात केंद्र व राज्य सरकारला यश आले नाही.

२. अन्न धान्य टंचाई आणि उपासमार विरोधी आंदोलन: १९६५

ब्रिटीश राजवटीत शेती क्षेत्राच्या विकासाच्या बाबतीत दुय्यम भूमिका घेतल्यामुळे एकरी अन्न-धान्य उत्पादन इतर देशांच्या तुलनेत कमी राहिल्याचे दिसते.हीच भूमिका स्वातंत्र्योत्तर काळातही भारत सरकारची राहिल्यामुळे अन्न धान्याची टंचाई निर्माण झाली होती.वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात अन्न धान्य टंचाई तीव्रतेने जाणवू लागली.जागतिक युद्धजन्य परिस्थिती आणि भारत सरकारचे अलिप्ततावादी धोरण यामुळे परदेशातून अन्न-धान्य मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या.अन्न-धान्याच्या किंमती सातत्याने वाढत राहिल्या.या विरोधात सर्व पक्षीय नेत्यांनी अन्न-धान्य टंचाई व भाववाढ विरोधी आंदोलन सुरु करण्याचा निर्णय घेतला. पुणे,सोलापूर,कोल्हापूर,सांगली इ.शहरांमध्ये आंदोलनाची तीव्रता वाढत चालली होती.

१९६५ सालापर्यंत अन्न धान्याची परिस्थिती अत्यंत बिकट बनली होती. महाराष्ट्र राज्यातील उपाशी

जनतेचा आवाज उठविण्यासाठी आणि संघटीत संघर्ष करण्यासाठी प्रमुख विरोधी पक्षीय नेत्यांची 'उपासमार विरोधी कृती समिती'स्थापन केली.या समितीच्या वतीने झालेल्या आंदोलनात प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी संपूर्ण महारष्ट्रभर फिरून सरकारच्या भावनाशून्य धोरणाविरोधात जनजागृती घडवून आणली. सरकारने प्रा.डॉ.एन.डी.पाटील.यांना'भारत संरक्षण' कायद्याखाली अटक करून येरवडा तुरुंगात स्थानबध्द केले होते.[4] अशा परिस्थितीत भाई भगवानराव सुर्यवंशी,डी.एस. नार्वेकर यांनीआंदोलनाचे नेतृत्व करत कोल्हापुरातील आंदोलकांच्या समोर भाषणातून वातावरण चांगलेच तापवले होते.''टाचा घासून मरण्यापेक्षा या परिस्थितीला जबाबदार असणाऱ्या सरकारच्या विरोधात दोन हात करून मरू'',धान्याचे गोडावून लुटू असे प्रभावी भाषण केलर होते.कलेक्टर कचेरीच्या दिशेने जाणाऱ्या निदर्शकांनी सरकारी दप्तर,फर्निचर याची नासधूस करायला सुरुवात केल्यामुळे पोलिसांनी लाठीहल्ला करून अश्रुधूर सोडला.मोर्चाला हिंसक वळण लागून लुटालुटीला सुरुवात झाली.लक्ष्मीपुरी धान्य बाजार,सरकारी धान्य गोदाम,कापडाची व धान्याची दुकाने लुटण्यास सुरुवात झाली. यावेळी कलेक्टर बी.डी.ससाणे, डी.सी.पी.श्री.रामचंद्रन, डी.आय.जी.श्री.थोरात यांनी १४४ कलम लागू केले. पुढील हानी टाळण्यासाठी 'उपासमार विरोधी कृती समितीने' मोर्चा स्थगित करण्यात येत असल्याचे जाहीर केले.दुपारी १.०० वा.पासून ३.३० वा.पर्यंत ४० फ़ैरि झाडण्यात आल्या होत्या १५० अश्रुधुरांची नळकांडी फोडण्यात आली.६ लोक ठार १५ लोक जखमी तर या जाळपोळ व लुटालुटीत आर्थिक हानीचा आकडा रु. १००१९३९/-होता.[5] स्वातंत्र्य मिळाल्या नंतर अन्न–धान्य मिळविण्यासाठीचा हा पहिला संघर्षमय लढा कोल्हापुरात घडून आला होता.सरकारला या आंदोलनापासून अन्न धान्याच्या समान वाटपासाठी रेशनिंग कार्ड पुरविण्याचा निर्णय एकट्या कोल्हापूरसाठी नाही तर महाराष्ट्रासाठी घ्यावा लागला होता.हे उपासमार विरोधी आंदोलनाचे यश मानले जाते.अन्न –धान्याच्या समान वाटपासाठी रेशनीग कार्ड ची व्यवस्था हे एन.डी पाटलांच्या आंदोलनाचे यश होते.

३. दुष्काळ निवारणा विरुध्द चळवळी:

१. वैराग गोळीबार: दर तीन ते चार वर्षांनी महाराष्ट्राला दुष्काळाला सामोरे जावे लागते. ब्रिटीश राजवटीत आणि स्वातंत्र्योत्तर काळात या परिस्थितीत फारसा फरक पडलेला दिसत नाही.१९७१–७२ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता.सरकार दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी कोणतेच उपाय करीत नव्हते.२९ जिल्ह्या पैकी २५ जिल्ह्यात दुष्काळजन्य परिस्थिती होती.सोलापूर जिल्हयातील वैराग परिसरातील दुष्काळी परिस्थिती बिकट बनली होती.'मागेल त्याला काम' ही घोषणा कागदावरच राहिली होती.वैराग मधील सहा हजार लोकांपैकी केवळ ३५० लोकांना रोजगार मिळाला होता.आता जनता''काम द्या,कामाचे दाम द्या,आणि या दामातून धान्य द्या''अशी मागणी करत होते.रोजगाराचे आश्वासन सरकारने कागदावर दिले होते. वैराग येथील सरकारी गोदामावर जगण्याच्या हक्कासाठी ६ सप्टेंबर १९७१ रोजी धरणे कार्यक्रम आखला.जाहिरातीव्दारे आंदोलकांच्या मागण्या प्रकाशित करण्यात आल्या होत्या. सरकारने धान्य गोदामापासून ६०० फुटाच्या आवारात १४४ कलम लागू केले. दहा हजार लोकांच्या मोर्चात दोन हजार स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. आंदोलकांची मागणी होती कलेक्टर येऊन रोजगाराच्या हमी बाबत लेखी देत नाही तोपर्यंत आम्ही उठणार नाही.लोकांचा अटक करून घेण्याचा प्रयत्न चालू असताना पोलिसांनी अश्रू गोळी आणि मरण''.२० ते ३० वयोगटातील ८ लोक ठार झाले.त्यांना कमरेच्यावर गोळ्या लागल्या होत्या.ठार मारण्यासाठीच गोळीबार करण्यात आला होता. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी वैरागच्या गोळी

बाराला"ब्रिटीश काळातल्या जालियनवाला बाग हत्याकांडाची पुनरावृत्ती म्हटले होते.[6]

वैराग गोळीबाराची चौकशी करण्यासाठी श्री.पी.जी.कर्णिक जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय चौकशी कमिशन नेमण्यात आले."हिंसात्मक घटना धान्य गोदामाजवळ घडून आल्या.या सर्व घटना अन्न धान्य टंचाई मुळे घडून आल्या होत्या.गरजू लोकांनी धान्य गोदामाचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला होता.जमावावर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी गोळीबार कायदेशीर आणि क्रमप्राप्तच होता.[7]असा निष्कर्ष नोंदविला होता.

२. इस्लामपुरातील दुष्काळ विरोधी मोर्चा व गोळीबार : १९ ऑक्टोबर १९७२

संपूर्ण महाराष्ट्रात १९७२ च्या दुष्काळाने शेतकरी अडचणीत आला होता. . पाच-पाच मैलांवर दुष्काळी कामासाठी जावे लागत होते.वाळवा तालुक्यात दुष्काळामुळे भीषण परिस्थिती बनली होती.१९ ऑक्टोबर १९७२ रोजी वाळलेले पिक हातात घेवून मागेल त्या हाताला काम,पाणीटंचाई,चाराटंचाई,तगाई आणि "काम द्या धान्य द्या मजुरी द्या"या मागणीसाठी इस्लामपुरात मोर्चा काढण्यात आला होता.सरकारने ३७ व्या कलमाचा वापर करत प्रवेशबंदी हुकुम लागू केला.आंदोलनाचे नेतृत्व प्रा.एन.डी.पाटील करत होते.ते आंदोलनाची भूमोका डी.वाय.एस.पी.श्री.वानखेडे व प्रांताधिकारी कांबळे यांना समजावून सांगत होते की,बंदीरेषा उठवा, आम्हा सर्वाना कचेरीच्या पटांगणात येऊ द्या.अन्यथा आम्हाल शांततेच्या मार्गाने सत्याग्रह करावा लागेल.असे सांगत असतानाच एस.आर.पी.ने प्रा.एन.डी पाटील यांच्यावर लाठी हल्ला केला. घाव वर्मी लागल्यामुळे एन.डी सायकलच्या गाड्यावर कोसळले.फौजदार मोरे यांनी सायकलचा गाडा कचेरीत ढकलत नेला आणि एन.डी नi सांगितले मी "तुम्हाला अटक करत आहे"असे सांगितले.रक्तपात नको म्हणून मला पाच मिनिट सोडा लोकांना मी घरी जायला सांगतो.पण फौजदार मोरेंनी त्यांची रवानगी पोलीस कोठडीत केली. एस.आर.पी.तुकडीने शांत बसलेल्या मोर्च्यातील लोकांवर लाठी हल्ला केला. अश्रू धुराची ४२ नळकांडी फोडली.२० फैरी झाडल्या.या गोळीबारात एन.डी.पाटलांचा पुतण्या सुरेश पाटील आणि राजेंद्र पाटील, दिलीप निलाखे व रंगा बाळा गायकवाड मारले गेले. इस्लामपूर शहरात तीन दिवसांसाठी १४४ कलम लागू करण्यात आले.[8]

या मोर्च्याच्या वेळी झालेल्या अतिरेकाची चौकशी करण्यासाठी सातारा जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.ए.व्ही.पाटकर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोग नेमण्यात आला. याआयोगाने १९ऑक्टोबर१९७२ रोजी मोर्चावर करण्यात आलेला गोळीबार समर्थनीय पण अवाजवी होता.[9]आयोगाने मागण्यांचे समर्थन करत योग्य ठरवलेला महाराष्ट्रातला एकमेव मोर्चा म्हणून याकडे पहिले जाते.या आंदोलनाचे फलित म्हणजे सरकारला रोजगाराची हमी देणारा'रोजगार हमी कायदा' करावा लागला होता.

कापूस एकाधिकार खरेदी योजना आणि प्रा.डॉ.एन.डी. पाटील.:

१९७२ साली मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि सहकारमंत्री यशवंतराव मोहिते यांच्या काळात कापूस एकाधिकार खरेदी योजना सुरु करण्यात आली.हमी किंमत जाहीर करून सरकारी यंत्रणेने कापूस खरेदी करायचा,प्रक्रिया करून रुईच्या गाठी आणि सरकी विकायची,नफ्यापैकी २५% रक्कम कापायची ७५%नफा शेतकऱ्यांना वाटायचा अशी ही योजना होती. १९७३-७४ ला हि योजना ऐच्छिक झाली.१९७४-७५ ला केंद्र सरकारचा भाव राज्य सरकारच्या हमी भावापेक्षा जादा होता.१९७५-७६ ला केंद्राचीच हमी किंमत राज्यात द्यावी अशी अट घालण्यात आली.राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे हि योजना बंद करण्यात आली. १९७८ ला

राजकीय स्थित्यंतरात पुलोद आघाडीचे प्रमुख मा.शरद पवार मुख्यमंत्री म्हणून सत्तेवर आले.आघाडी सरकारमध्ये प्रा.डॉ.एन.डी. पाटलांनी कापूस एकाधिकार खरेदी योजना सुरु करण्याच्या अटीवर सहकार मंत्रपद स्वीकारले होते.सरकारने कापूस खरेदी करायचा, सरकारने जी खरेदी किंमत ठरवली असेल त्याच्या ८०%रक्कम शेतकऱ्याला द्यायची.कापूस विकून सरकारला फायदा झाला तर राहिलेली २०%रक्कम आणि बोनस द्यायचा.तोटा झाला तर सरकारने सोसायचा.सहकार मंत्र्यांनी कापसाच्या भावात२०% ते२२% वाढ केली.कापूस खरेदी केल्यावर २४ तासांच्या आत १००% किंमत शेतकऱ्याला देण्याचे धोरण राबविले. खरेदी केलेला कापूस निर्यात करता यावा म्हणून केंद्र सरकार कडून कापूस निर्यातीचा प्रश्न सोडवून घेतला.शेतकऱ्यांचा माल विकताच त्याला पैसे मिळाले पाहिजेत यावर एन.डी.पाटील यांचा कटाक्ष होता.पैसे देण्यात अडचण निर्माण होताच शेतकऱ्यांना कापसाची मूळ किंमत अधिक त्या रक्कमेचे १२%नी होणारे व्याज एक महिन्याचा पोस्टपेड चेक देऊन अदा केली.[10] शेतकऱ्याला किफायतशीर किंमत देता येऊ शकते. केवळ राजकीय इच्छाशक्ती पाहिजे हेच या घटनेवरून स्पष्ट झाले.

शेतकरी दिंडी १७ नोव्हेबर ते ४ डिसेंबर १९८८:

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आणि सर्वच शेतकऱ्यांच्या नित्य आणि अस्पर्शित मागण्यांच्यासाठी/समस्यांसाठी शेतकरी दिंडीचे आयोजन १७ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर १९८८ ला करण्यात आले होते.५ डिसेंबरला ही दिंडी नागपूरला विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दाखल होणार होती.शेतकऱ्यांचे प्रश्न लोकप्रतिनिधीं समोर मांडण्यासाठी आणि सोडविण्यासाठी शेतकऱ्यांचे संघटन करत वाटचाल करणार होती.

१. शेतीमालाला किफायतशीर भावाची हमी द्या.
२. शेतकऱ्यांची सर्व कर्जे रद्द करा.
३. रोजगार हमी योजना कायद्याची काटेकोर अंमलबजावणी काटेकोर करा.
४. शेतकऱ्यांना निवाऱ्याची आणिजीवनमानाची हमी द्या.
५. शेतकरी व शेतमजुरांना पेन्शन योजना लागू करा.
६. कामगार विरोधी काळे कायदे मागे घ्या.
७. बेकारांना काम किंवा ५००/-रु.बेकारभत्ता द्या.
८. मंडल आयोग लागू करा.

दिंडीचे घोषवाक्य"घाम गाळूनही आपल्या जीवनाची माती झाली, त्याच सोन करण्यासाठी लढूया."प्रा.एन.डी.पाटील आणि मा.गणपतराव देशमुख पहिल्या दिवसापासून शेवटपर्यंत शेतकरी दिंडी बरोबर चालत होते.शेतकरी दिंडी ५ डिसेंबरला नागपूरला पोहचली त्यावेळी जमाव ७०ते७५ हजार उपस्थित होता. मुख्यमंत्र्यांच्या भेटीला गेलेल्या शिष्टमंडळाला आक्रीत वाटणारी मागणी 'कष्टकऱ्याना पेन्शन' तत्वत: मान्य करण्यात आली.[11]इतर मागण्यांवर समिती नेमण्याचे आश्वासन देण्यात आले.शेतकऱ्यांच्या प्रश्नावर प्रशासनाला जाग आणण्यात दिंडी यशस्वी झाली होती.

एनरॉन विरोधी लढा आणि प्रा.डॉ.एन.डी.पाटील.:

भारतामध्ये १९९१-९२ पासून विजेची टंचाई मोठ्या प्रमाणात वाढली होती. महाराष्ट्रात याची तीव्रता मोठ्या प्रमाणात जाणवत होती.शेती क्षेत्राला मोठा फटका बसत होता.औद्योगिकक्षेत्राला २४ तास वीज, मात्र शेती क्षेत्राला काही तासच वीज उपलब्ध करून दिली जात होती.यावर उपाय वीज उत्पान क्षमता वाढवणे हाच होता. अमेरिकेतील एनरॉन कंपनी उर्जा क्षेत्रात गुंतवणूक करण्यास उत्सुक होती.यासाठी कंपनीने महिला अधिकारी रिबेका मार्क यांची नियुक्ती केली.भारत सरकारने या प्रकल्पाला आवश्यक त्या परवानग्या दिल्या.तत्कालीन मुख्यमंत्री आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ या ठिकाणी १९९२ साली २२५० मेगावॅट क्षमतेचा ९०००

कोटी रु.खर्चाचा प्रकल्प मंजूर केला होता.मंत्रिमंडळाने २८० विरुध्द ८ मतांनी प्रस्ताव मंजूर केला होता. भारत सरकार व महाराष्ट्र सरकारने आवश्यक त्या सोई सुविधा,सवलती उपलब्ध करून दिल्या होत्या.या प्रकल्पाला शिवसेना व भाजपा या राजकीय पक्षांचा विरोध होता. एनरॉन प्रकल्प मंजूर करण्यात भ्रष्टाचार झाला आहे.काही निर्णय चुकीचे झाले आहेत. एनरॉन प्रकल्प आम्ही 'समुद्रात बुडवू'अशी घोषणा करून राजकारण करण्याचा प्रयत्न केला होता.याच घोषणेवर १९९५ सालातील विधानसभा निवडणूक शिवसेना व भाजप पक्षाने जिंकली होती.सरकार बदलताच एनरॉन प्रकल्पाचे आस्तित्व धोक्यात आले.तत्कालीन मुख्यमंत्री यांनी जाहीर केले की,हा करार महाराष्ट्रविरोधी,तर्कशून्य आणि महाराष्ट्राचा आत्मसन्मान पायदळी तुडविणारा आहे.हा करार स्वीकारणे म्हणजे महाराष्ट्राच्या जनतेचा घात करणे आहे.त्यामुळे हा करार रद्द केला जाईल.९ नोव्हेंबर १९९५ ला रिबेका मार्क या एनरॉनच्या प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्राच्या भेटीवर आल्या.ठरल्याप्रमाणे त्या मुख्यमंत्र्यांना न भेटता मातोश्रीवर शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना भेटल्या.६१४ मेगावॅटक्षमतेचा करार रद्द झाला होता.त्याऐवजी २१०० मेगावॅट क्षमतेचा देशातला सर्वात मोठा करार ८ जानेवारी १९९६ ला (साम,दाम,दंड,भेद मार्गाचा अवलंब करत)अस्तित्वात आला होता.[12] या कराराने ३३३% वीजदरवाढ प्रस्तावित केली होती.

१. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांची भूमिका: या करार संदर्भात प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी

१. करार करताना भ्रष्टाचार झाला आहे.
२. विजेची किंमत कंपनीला रुपयात न देता अमेरिकी डॉलर मध्ये द्यायची होती.
३. विजेची गरज सहा तासांची असताना २४ तास एनरॉन कंपनीची वीज घेणे बंधनकारक केले होते.
४. केंद्र व राज्य सरकार कंपनीचे पैसे देण्यास असमर्थ ठरल्यास महाराष्ट्र सरकारचे विधानभवन व केंद्र सरकारची लोकसभा प्रतिहमीवर गहाण टाकली होती.
५. कंपनी बाबत काही वाद उत्पन्न झाल्यास लंडन न्यायालयात खटला दाखल करता येणार होता. असे आक्षेप नोंदवत एनरॉन कंपनीने भारत देशाच्या सार्वभौमत्वाला, सरकारला आणि कायद्यालाही जुमानत नव्हती हे पटवून दिले होते.

२. एनरॉन कंपनीला मिळणारा नफा:

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वीज निर्मितीचा दर प्रती युनिट १.५० पैसे असताना वीज निर्मितीचे कंत्राट एनरॉन कंपनीला मिळाले होते. १९९७ सालापासून प्रत्यक्ष वीज निर्मितीला सुरुवात होणार होती प्रकल्पाची कामे अमेरिकेतील चार कंपन्यांनी वाटून घेतली होती. केंद्र सरकारने एनरॉन कंपनीला १००% भागभांडवला पैकी ७०% भागभांडवल जागतिक बाजारपेठेत विकण्याची परवानगी दिली होती.भागभांडवलाच्या विक्रीतून ५१००कोटी नफा मिळवणार होती.भारत सरकारच्या IDBI बँकेने एनरॉन कंपनी प्रकल्पाची तपासणी केली असता नफ्याचे प्रमाण खालीलप्रमाणे आढळून आले.

वर्ष	दरवर्षी मिळणारी रक्कम
१ते ९	३०० कोटी रुपये.
१० ते १४	३३४ कोटी रुपये.
१४ ते २०	४५७ कोटी रुपये.

१९९३ साली महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थापित क्षमता ७५०३ मेगावॅट, भांडवली गुंतवणूक ११०५७/- कोटी रु.१११५४० कर्मचारी कामाला होते.तर एनरॉन कंपनी ९००० हजार कोट रु.गुंतवणुकीतून २२५०मेगावॅट वीज निर्माण करणार आणि ३०० लोकांना रोजगार पुरविणार होती.१६% नफा परकीय चलनात गृहीत

धरून तयार केलेली वीज महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला सक्तीने खरेदी करावी लागणार होती.जर वीज खरेदी केली नाही तर परकीय चलनात नुकसान भरपाई देण्याची तरतूद होती.[13]

३. एनरॉन प्रकल्प न्यायालयीन प्रक्रियेत अडकला.:

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला करार रद्द करण्याची एकच संधी होती.ऐनवेळी वीजमंडळाचे वीज केंद्र बंद पडले तर एनरॉनने ३ तासात वीज द्यायची. कोराडी विद्युत केंद्र बंद पडले असता ३ तासा ऐवजी १२ तासात एनरॉन कंपनीला वीजपुरवठा सुरळीत करता आला नाही.करारात दुसरे कलम असे होते की,३ तासात वीजपुरवठा सुरळीत केला नाही तर नुकसान भरपाई द्यावी लागेल.ही रक्कम ४०१ कोटी रु.होती.असे प्रकार तीनवेळा झाले.हा कराराचा भंग होता. याची दुसरी बाजू मांडताना प्रा.एन.डी.पाटील सांगतात की,केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारने एनरॉन कंपनीला वीज निर्मितीचे कंत्राट दिले याची तुलना करताना पाटील म्हणतात की, भेल या देशी कंपनीची विद्युत निर्मितीसाठी यंत्रसामग्री खरेदी केली असती तर भारतातील तरुणांना काम मिळाले असते.अभियांत्रिकी विभागाला मदत झाली असती.म्हणूनच अमेरिकन उद्योगधंद्याला मदत करण्याचे सरकारचे धोरण राष्ट्रविरोधी आहे.आर्थिक वसाहतवादाला आमंत्रण देणारा हा करार आहे.हा करार राष्ट्र विरोधी असल्यामुळे तो रद्दच झाला पाहिजे अशी मागणी केली.डाव्या पक्षांनी आणि व्यक्तिगत पातळीवर जनहीत याचिका दाखल करण्यात आल्या.याचिकांची सुनावणी करण्यासाठी श्रीकृष्ण आयोगाची नियुक्ती करण्यात आली. एनरॉन प्रकल्पाचा प्रश्न न्यायालयात गेला असताना सुध्दा सरकारने कंपनीला प्रकल्प सुरु करण्याची परवागी दिली.या विरोधात प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली सर्व डाव्या पक्षांनी एकत्र येत सरकार विरोधात निर्णायक संघर्ष करण्याची भूमिका घेतली.परिणामी जनआंदोलनाला सुरुवात झाली.

४.आंदोलनाचा दुसरा टप्पा : १९९९ च्या विधिमंडळाच्या निवडणुकीत होऊन शिवसेना-भाजपा सरकारचा पराभव विजेच्या प्रश्नावर आघाडी सरकार सत्तेवर आले. आघाडी सरकारचे समन्वयक म्हणून प्र.डॉ.एन.डी.पाटील यांनी एनरॉन प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या पुनर्समिक्षा करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांच्या कडून मोठ्या शिताफीने मिळविले होते.परंतु विधिमंडळात एनरॉन प्रकल्पाची पुनर्समिक्षा होणार नाही अशी भूमिका उर्जा मंत्र्यांनी घेतली. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनाला धुडकावून लावणाऱ्या ऊर्जामंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी आघाडी सरकारचे समन्वयक म्हणून केली. हा राजकीय डावपेचाचा भाग होता.मुख्यमंत्र्यांनी पुनर्समिक्षेची मागणी मान्य करत उच्चस्तरीय समिती नेमण्याचे मान्य केले.डॉ.माधव गोडबोले समितीचे अध्यक्ष तर डॉ.ई.ए.एस.सर्मा यांची तज्ञ म्हणून नेमणूक केली.२००१ साली समितीचा अहवाल प्रसिध्द करण्यात आला.या समितीने

१. एनरॉन प्रकल्पमहाराष्ट्राच्या गळ्याला तात लावणारा आहे.
२. प्रकल्पाला मान्यता देताना गंभीर गडबडी झाल्या आहेत.
३. केंद्र सरकारच्या संबंधित कंपनीने विजेचे दर योग्य आहेत की नाही याची चौकशी केली नाही.
४. वित्त विभागाने परवागी देताना काळजी घेतली नाही.

यानंतर प्रकल्पाची सर्व प्रकारची चौकशी करण्यासाठी डॉ.माधारव गोडबोले समितीच्या शिफारशीनुसार श्री. कुर्डूकर आयोगाची स्थापना करण्यात आली.[14] दरम्यानच्या काळात अमेरिकेमध्ये एनरॉन कंपनीची चौकशी करण्यात येऊन कंपनीच्या आर्थिक व्यवहरावर बंदी घालण्यात आली.परिणामी कंपनीचे दिवाळे

निघाले.कंपनीच्या शेअर्स च्या किमती ८४ डॉलर वरून २४ सेंट पर्यंत खाली आल्या.कंपनी मालकाने आत्महत्या केली.महाराष्ट्रीयन जनतेची २००१साली एनरॉन संकटातून प्रा.डॉ.एन.डी.पाटलांच्या नेतृत्वामुळे कायमची मुक्तता झाली.

सेझ विरोधी लढा व प्र.डॉ.एन.डी.पाटील.:(SEZ)Special Economic Zone)

औद्योगिक विकासाच्या नावाखाली रायगड जिल्यात SEZ निर्माण करण्यात आला होता.केंद्र सरकारने महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्याची निवड करून ५० हजार हेक्टर जमीन या प्रकल्पासाठी देण्याचे मान्य केले होता.जमीन ज्यांच्या मालकीची होती त्यांना मात्र SEZ म्हणजे काय याची माहिती नव्हती. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधासह आर्थिक विकास साधण्यासाठी प्रभावक्षेत्र निर्माण करणे.यासाठी १ नोव्हेंबर २००० साली भारत सरकारने अधिसूचना काढली यालाच Special Economic Zone असे म्हणतात.उद्योग सुरु करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या एक खिडकी योजनेव्दारे ४५ दिवसांच्या आत देण्याचे आश्वासन दिले होते.२४ हजार शेतकऱ्यांची ३४ हजार एकर जमीन सरकारच्या माध्यमातून तर १४ हजार एकर जमीन वेगवेगळ्या प्रकारची लालूच दाखवून गुंडांच्या मदतीने रिलायन्स उद्योग समूहाने शेतकऱ्यांनकडून काढून घेऊन महामुंबई सेझ निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता.या प्रकल्पामुळे ४५ गावे बाधित झाली होती.शासनाचे शिक्के जमिनीवरती पडल्यामुळे लोकांना जमिनीची खरेदी विक्री करता येत नव्हती.“शासन आदेश आहे आपणाला काही करता येणार नाही” अशी चर्चा जमिनीचे व्यवहार करणारे एजंट लोक करत होते.प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी सेझ विरोधी आंदोलनाला सुरुवात करून उद्योगपती पैशाच्या जोरावर सरकारला आपलस करून हवा तो निर्णय घेऊ शकतात या प्रवृत्तीला धडा शिकविण्याचा प्रयत्न केला होता. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महामुंबई सेझ विरोधी संघर्ष समिती, जागतिकीकरण विरोधी कृती समिती,चोवीस गाव सेझ विरोधी संघर्ष समिती,पंचक्रोशी खारभूमी शेती बचाव समिती यासारख्या समित्यांनी सेझ च्या विरोधात लढा सुरु केला.या आंदोलनाचे नेतृत्व उल्का महाजन यांच्या विनंतीमुळे प्रा. डॉ.एन.डी.पाटील यांच्याकडे आले.यावेळी संघर्ष समितीच्या वतीने “आम्ही आमचा प्राण देऊ पण आमची जमीन देणार नाही भूमाता देणार नाही” अशी घोषणाच दिली होती.आंदोलन दडपून टाकण्यासाठी कारवाई करत होते.२००६ साली रायगड जिल्हा परिषदेची शेकाप नेत्या नीलिमा पाटील जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा बनल्या.त्यांनी पहिल्याच सभेत ‘संपूर्ण सेझ विरोधी ठराव’ पास केला.सेझ ला विरोध म्हणून २३ मार्च २००६ ला शेकाप आणि जागतिकीकरण विरोधी कृती समितीने रायगड जिल्हाभर रस्ता रोको आंदोलन केले.डिसेंबर २००६ साली २ हजार शेतकऱ्यांनी दिल्ली येथील जंतर –मंतर वरती मोर्चा काढून तीव्र भावना सरकार पर्यत पोहचवण्याचा प्रयत्न केला होता.५ एप्रिल २००७ रोजी प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदानावर ५० हजार शेतकऱ्यांचा मोर्चा आयोजित करण्यात आला होता.दरम्यानच्या काळात सेझ निवड समितीचे चेअरमन काशीराम राणा रायगड सेझला भेट देण्यासाठी आले होते.त्यांनी रिलायन्स सेझ व महाराष्ट्र सरकारच्या सचिवांची भेट घेतली.पण प्रकल्पग्रस्तांची भेट घेण्यास नकार दिला.याचा निषेध म्हणून प्रा.डॉ.एन.डी पाटील व पक्ष कार्यकर्त्यांनी पेण पंचायत समिती कार्यालयाला घेराव घातला.व काशीराम राणा यांना प्रकल्पग्रस्तांची भेट घेण्यास भाग पाडले. रायगड जिल्हयातील ४५ गावे सेझ बाधित असली तरी २२ गावांमधील विरोध तीव्र होता.त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी २२ गावे वगळण्यास तत्व: मान्यता दिली.

परंतु १ वर्ष झाले तरी २२ गावे वगळण्यासाठी कोणतीच हालचाल झाली नव्हती.नैतिक जबाबदारी स्वीकारत एन.डी.पाटील यांनी उपोषण करण्याचा निर्णय जाहीर केला.या घटनेने सरकार खडबडून जागे झाले.

संमती पत्राची योजना:

सरकारने या प्रसंगातून मार्ग काढण्यासाठी संमती पत्राची योजना पुढे आणली. ज्या शेतकऱ्याला जमीन द्यायची असेल त्याने आणि ज्याला जमीन द्यायची नसेल त्याने संमती पत्र भरून द्यावे अशी योजना होती.फसवणूक होऊ नये म्हणून ५० हजार फॉर्म झेरोक्स करून घेतले.मला जमीन द्यायची नाही असे लिहून दोन प्रतीमध्ये फॉर्म भरून घेतले.एक प्रत जमा करून दुसऱ्या प्रतीवर अधिकाऱ्याची पोच म्हणून सही घेतली. ९७% लोकांनी जमीन देण्यास विरोध दर्शविला होता. या घटनेमुळे सरकारला माघार घ्यावी लागली होती.डिसेंबर २००९ ला मुख्यमंत्र्यांनी सेझ रद्द केल्याची घोषणा केली.[15] मात्र अधिसूचना १९ फेब्रुवारी२०११ला काढण्यात आली.३४ हजार एकर जमिनीच्या ७/१२ वर २०००० हजार शेतकऱ्यांची नावे लागली होती. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्या अभ्यासपूर्ण नेतृत्वाला मिळालेले यश होते.

सारांश:

प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचे संपूर्ण आयुष्य परिवर्तनाच्या चळवळीत गेले. सर्वसामान्य जनतेचे हीत केंद्रबिंदू मानून कार्य करणे हे प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्या राजकारणाचे सूत्र होते.त्यांनी राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्व दिले.जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला. बेमुदत उपोषण, धरणे आंदोलन,निदर्शने, मोर्चे, रस्ता रोको, घेराव डालो,साराबंदी यासारख्या साधनांचा वापर केला.आंदोलनाच्या माध्यमातून लोकजागृती घडवून आणत सरकारवर नैतिक दबाव आणला.सरकारला जनहिताचे कायदे करण्यासाठी भाग पाडले.त्यासाठी अनेक वेळा तुरुंगवास भोगला, लाठीमार सहन केला,जीवावर बेतणाऱ्या गोळीबाराला तोंड दिले.प्रा.एन.डी.पाटील यांनी हाती घेतलेले कोणतेच काम अर्धवट सोडले नाही. केलेली सगळीच आंदोलने यशस्वी झाले असे नाही.परतू झालेल्या प्रत्येक आंदोलनाचा सरकारला विचार करण्यास भाग पाडले. सरकारला जागे करण्याचा प्रयत्न केला. हे करत असताना आपल्या चारित्र्याला गालबोट लागू दिले नाही.आमिषाच्या जाळ्यात कधीच अडकले नाहीत.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्यामुळे सामान्य लोकांचा आंदोलनातील सहभाग संपलेला आहे.कर्नाटक सरकार ज्या-ज्या वेळी हा प्रश्न उपस्थित होईल त्या-त्या वेळी महाजन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची मागणी करत आहे.तर महाराष्ट्रातील अनुभवी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेल्यामुळे आणि सीमा भागातील लोकांच्या बाबत आस्था कमी झाल्यामुळे सीमा प्रश्न भिजत पडला आहे.अन्न-धान्याच्या टंचाईचा प्रश्न,दुष्काळ निवारणासंदर्भात केलेले आंदोलन यासाठी सोसलेला लाठीमार यातून मिळवलेला रोजगाराच्या हमीचा कायदा, कापूस एकाधिकार खरेदी बाबत घेतलेली सडेतोड भूमिका,एनरॉन विरोधी केलेले आंदोलन,सेझ विरोधी आंदोलन यासारख्या घटनांमधून एन.डी.सरांची जनतेप्रती असलेली बांधिलकी दिसूनयेते.शोषणमुक्त समाज निर्माण करायचा असेल तर आजही प्रा. डॉ. एन. डी. पाटलांच्या सारख्या अभ्यासू नेत्याची गरज आहे.सामाजिक समस्यांचा अभ्यास करणारे नेतृत्वच आज राहिले नाही.

संदर्भ सूची: (Bibliography)

१. पाटील.(डॉ)एन.डी.यांची कोल्हापूर आकाशवाणी वरील मुलाखत, संघर्षाची वाटचाल, दिनांक २८/०६/२०१५ वेळ,रात्री ९.३० वा.

२. भोळेभास्कर लक्ष्मण,भारतात शेतकरी कामगार पक्ष जडण- घडण आणि वाटचाल, लोकवाड्मय गृह ,मुंबई,पृ.१४९

३. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई,दिनांक २९ मार्च २००४ चे दिनेश ओऊळकर ,विशेष कार्यकारी अधिकारी ,महाराष्ट्र शासन यांचे पत्र.

४. बेडकिहाळ किशोर/प्रा.पाटील सी.व्ही.(संपा)प्रा.एन.डी.पाटील.,व्यक्तित्व आणि कर्तृत्व, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी,सातारा,पहिली आवृत्ती,२००५ पृ.२२

५. दैनिक पुढारी,कोल्हापूर,दिनांक २०ऑगस्ट,१९६५ ,पृ.१.

६. उपरोक्त,बेडकिहाळ किशोर/प्रा.पाटील सी.व्ही.(संपा)प्रा.एन.डी.पाटील.,व्यक्तित्व आणि कर्तृत्व, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी,सातारा,पहिली आवृत्ती,२००५ पृ. ७०

७. दैनिक सोलापूर समाचार,दिनांक ८ सप्टेंबर, १९७१ पृ.१

८. पाटील.(डॉ)एन.डी.यांची कोल्हापूर आकाशवाणी वरील मुलाखत, संघर्षाची वाटचाल, दिनांक १५/०८/२०१५ वेळ,रात्री ९.३० वा.

९. सायनाकर(प्रा) विश्वास,प्रा.डॉ.एन.डी.पाटील.चरित्र ग्रंथमाला ,श्रमिक प्रतिष्टान कोल्हापूर,प्रथम आवृत्ती,सप्टेंबर २०१२,पृ.५५

१०. पाटील.टी.एस.,भाई प्रा.एन.दि.पाटील.,कार्य आणि कर्तृत्व,प्रकाशक,भाई प्रा.एन.डी. पाटील.कार्यगौरव समिती,कोल्हापूर,२००३,पृ.६

११. उपरोक्त सायनाकर (प्रा) विश्वास, प्रा. डॉ. एन. डी. पाटील., चरित्र ग्रंथमाला,श्रमिक प्रतिष्टान कोल्हापूर, प्रथम आवृत्ती,सप्टेंबर २०१२ पृ.४६

१२. दैनिक सत्यवादी, कोल्हापूर,दिनांक २७/०५/१९९६ पृ.१

१३. भारतीय शेतकरी कामगार पक्ष,१४ वे अधिवेशन,राजकीय ठरावाचा मसुदा,दिनांक २४ ते २६ नोव्हेंबर १९९५,ता.काटोल.जि.नागपूर पृ.४

१४. उपरोक्त पाटील.(डॉ)एन.डी.यांची कोल्हापूर आकाशवाणी वरील मुलाखत, संघर्षाची वाटचाल, दिनांक २३/०८/२०१५,वेळ,रात्री ९.३० वा.

१५. कित्ता
सायनाकर(प्रा)विश्वास,प्रा.डॉ.एन.डी.पाटील.चरित्र ग्रंथमाला ,श्रमिक प्रतिष्टान कोल्हापूर,प्रथम आवृत्ती,सप्टेंबर २०१२,पृ.९१

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

एन. डी. पाटील यांनी शेतमजूर व शेतकऱ्यांसाठी दिलेले योगदान

रेंणूका हणमंत कुरणे[१] डॉ. राजकुमार मरे[२]

[१]संशोधक विद्यार्थीनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

[२]प्राध्यापक इतिहास विभाग बळवंत कॉलेज विटा

Corresponding Author - रेंणूका हणमंत कुरणे

DOI - 10.5281/zenodo.19665176

सारांश:

प्रा. एन. डी. पाटील म्हणजेच नारायण पाटील हे महाराष्ट्रातील अन्याय सहन करणाऱ्या व दुर्लक्षित घटक यांच्यासाठी दिलेले योगदान खुप मोलाचे आहे. त्यापैकी त्यांनी शेतकरी व शेतमजुर यांच्यासाठी केलेले संघर्षशील नेतृत्व महत्वाचे होते. एन. डी. पाटील यांनी शेतमजुर व शेतकरी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचा अभ्यास केला व त्यांच्या अन्यायाला न्याय मिळवून देण्यासाठी सरकार दरबारी त्यांचे प्रश्न पोहोचवले. त्यासाठी त्यांनी उपोषण व आंदोलने केली. आणि ते सरकार दरबारी अत्यंत प्रभावीपणे मांडली.

या संशोधनामध्ये प्रा. एन. डी. पाटील यांचे शेतमजूर व शेतकरी यांच्यासाठी केलेल्या सामाजिक, आर्थिक व राजकिय कार्याचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये शेतमजूर यांच्यासाठी किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी केली. भूमिहीन शेतमजूरांचे प्रश्न, स्त्री मजुरांचे हक्क, दुष्काळग्रस्त लोकांसाठी कार्य त्याचबरोबर रोजगार हमी योजनेबाबत त्यांची असणारी महत्वाची भुमिका व त्यांचे महाराष्ट्र एम्प्लोयमेन्ट गॅरेंटी ॲक्ट मध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. अशा शेतमजुरांच्यासाठी खूप मोठा संघर्ष त्यांनी केला.

त्याचबरोबर त्यांनी शेतकऱ्यासाठीचे त्यांचे योगदानही अनन्य साधारण आहे. त्यामध्ये शेतकयाच्या शेतमालाला योग्य भाव, वीजदर कमी करणे, कर्जमाफी व कापूस विक्री एकाधिकार योग्य रितीने राबवण्याचा प्रयत्न केला. तसेच महागाई विरोधात आंदोलने केलीत व राज्यातील जीवनावश्यक वस्तूंची टंचाई होत असल्याने उपासमारीचे प्रमाण वाढत होते त्याविरोधी आवाज उठवला. त्यांनी संघटित संघर्ष करण्यासाठी विरोधीपक्षासोबत मिळून उपासमारीविरोधी कृतीसमिती स्थापन केली. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र फिरुन भावनाशून्य सरकार धोरणाची जनजागृती केली. त्यामुळे त्यांना अटक झाली. शेतीमालाला योग्य भाव मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केला आणि शेतकऱ्यांना विहीर खोदण्यासाठी, पाईपलाइन करण्यासाठी खूप खर्च होतो व वीजबील, पीकविमा याचे भरावे लागणारे हफ्ते अशा अनेक गोष्टींचा निकष त्यांनी मांडला आहे. त्याचबरोबर त्यांनी महागाईचा अभ्यास करुन त्याविरोधात आंदोलने केलीत व त्या आंदोलनाद्वारे खूप मोठ्या प्रमाणात जनजागृती केली.

एकुणच प्रा. एन. डी. पाटील यांनी शेतकरी, शेतमजूर व अन्याय सहन करणाऱ्या प्रत्येक घटकासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या चळवळी व आंदोलनाद्वारे जनजागृती केली. त्यांनी दिलेले योगदान महाराष्ट्रातील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या खूप मोलाचे योगदान आहे.

प्रस्तावना:

महाराष्ट्रातील शेतकरी आणि शेतमजूरांच्या आयुष्याला आवाज देणारे महत्वाचे व्यक्तिमत्व म्हणजे एन. डी. पाटील होय. ते तत्वनिष्ठ, प्रामाणिक व कष्टकरी वर्गाच्या बाजूने उभे राहाणारे नेते होते. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर व गरीबांच्या अडचणी त्यांनी जवळून पाहिल्या आहेत. त्यांच्या साठी आवाज उठवला. त्यांनी आपले राजकिय काम मुख्यत: शेतकरी कामगार पक्षामार्फत केले. या पक्षाच्या माध्यमातून त्यांनी शेतकरी व शेतमजूरांच्या प्रश्नांना सरकारपर्यंत पोहोचवले. त्यांचे असे म्हणणे होते की, राजकारण हे फक्त सत्तेसाठी नसून समाज बदलण्यासाठी असते. शेतकऱ्यांसाठी त्यांनी कर्जमाफी, सिंचन सुविधा, हमीभाव, वीजदर कमी करणे व जमीन सुधारणांसाठी संघर्ष केले. शेतमजूरांसाठी त्यांनी किमान वेतन, कामगार हक्क, रोजगार यासाठी आवाज उठवला. त्यांनी शेतमजूरांना संघटित केले आणि त्यांना आपले हक्क मिळवून दिले. सहकार क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे. सहकारी साखर कारखाने, दूध संघ आणि पथसंस्था या ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्वाचे आहे असे त्यांचे मत होते. त्यांनी सहकार क्षेत्रात पारदर्शकता आणि लोकशाही टिकवण्याचा प्रयत्न केला. एन. डी. पाटील यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित नव्हते, आजही महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीमध्ये त्यांचा विचारांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी ग्रामीण समाजात जागृती निर्माण केली. शेतकरी व शेतमजूरांना आत्मविश्वास दिला. या संशोधनामध्ये त्यांच्या शेतकरी आणि शेतमजुरांसाठीचा अभ्यास करुन त्यांच्या योगदानाचे महत्व समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

एन. डी. पाटील यांचे योगदान:

१. **शेतमजुरांसाठी दिलेले योगदान**:

१९५४ साली क्रांतीसिंह अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष झाले. १९६८ साली त्यांनी शेतमजूर संघटना स्थापन केली. शेतमजूरांचे उदरनिर्वाह प्रश्न हे अधिक तीव्र आहेत हे त्यातून जाणवते शेतमजुरांच्या प्रश्नावर अत्यंत मूलभूत आणि संघर्षशील लेखन केले आह. शेतमजूरांशी संबंधित त्यांच्या लेखनातील आणि कार्याचे काही प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.[१]

एन.डी.पाटील यांनी १९६० ते १९९० या काळात शेतमजुरांच्या प्रश्नावर अत्यंत मूलभूत आणि संघर्षशील लेखन केले आहे. शेतमजुरांशी संबंधित त्यांच्या लेखनातील आणि कार्याचे काही प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहे.

किमान वेतन कायदा : १९७० च्या दशकात महाराष्ट्राच्या शेतमजुरांसाठी किमान वेतन लागू करावे यासाठी त्यांनी लढा दिला.[२]

१ शेतमजूर चळवळ: त्यावेळेस शेतमजुरांना केवळ तीन ते चार रुपये मजुरी मिळत असे एन. डी. पाटील यांनी ही मजुरी कायद्यानुसार वाढवून मिळावे यासाठी समान काम समान वेतन ही घोषणा दिली[२]

२ ऐतिहासिक पदयात्रा: १९७४—७५ शेतमजूरांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेदनासाठी त्यांनी कोल्हापूर ते मुंबई पदयात्रा काढली

३ भुमिहीन शेतमजूरांचे प्रश्न: ठाणे जिल्ह्यात आदिवासींची प्रमाण २२ टक्के तर पालघर जिल्ह्यात ते ३६ टक्के होते बहुतेक आदिवासी भूमिहीन शेतमजूर होते वारल्याचे संप झाले. आदिवासींचे लाल झेंड्याखाली एकत्र आले आदिवासी यांचे जमीन सावकारांनी लुबाडली होती किसान सभेने या घोषणा विरुध्द आवाज उठवला.[१]

१९४८ ला कुळ कायदा संमत झाले एन.डी. पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या सभेत त्यांचा उल्लेख केला आहे कुळ कायदा कलम ६३ नुसार बदल करण्याचे विधेयके मांडले तेव्हा त्यांनी सभागृहात आक्रमक आखणी करुन विरोध दर्शवला आहे.

४ रोजगार हमी योजना: महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ १९७२ च्या भीषण दुष्काळ नंतर महाराष्ट्र सुरु झालेल्या रोजगार हमी योजनेचे त्यांनी स्वागत केले परंतु, त्याचवेळी मजुरांना मिळणारा मोबदला आणि कामाच्या ठिकाणचे सोई सुविधा बाबत आणि इस्लामपूरच्या ईश्वर च्या हत्याकांडातून शेतकरी कामगार पक्षाला आपल्या रक्तानू लिहावा लागेल त्यासाठी एन.डी.पाटील स्वत:चे पाच सहा एस. आर.पी. च्या पोलिसांची लाठी मार सोसावे लागले लेख लिहिले.[१]

५ दुष्काळ निवारण चळवळी: महाराष्ट्रात १९७२ आणि १९७५ मध्ये फार मोठा दुष्काळ पडला दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी कोणतेच उपाय सरकार करत नव्हते या कालखंडात आमदार एन.डी.पाटील विधान परिषद चे विरोधी पक्ष नेते आणि समाजवादी आघाडीचे नेते म्हणून काम करत होते. डाव्या विचारांच्या पक्षाने केलेला सरकार विरोधी आंदोलनामुळे सरकारला महत्वाचे निर्णय घेणे भाग पडले.[१]

शासनाने एक महत्वाचा आदेश काढला की प्रत्येक आठवड्याला मजुरांची मजुरी चुकती झाली पाहिजे मग तो कोणताही दिवस असो या आदेशासारखे दुसरा महत्वाचा निर्णय तो म्हणजे समान कामाला समान दाम १५ एप्रिल १९७३ मागणी मान्य झाली परंतु कृतीत उतरली नाही अंमलबजावणी शून्य १९७१ ते ७२ प्रचंड दुष्काळ महाराष्ट्राचे २५ जिल्हे अधिक प्रमाणात त्यांचाही ग्रस्त त्यापैकी अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, बीड, सोलापूर, औरंगाबाद, उस्मानाबाद, नाशिक या ९ जिल्ह्यात परिस्थिती अतिशय बिकट होतील.[७]

६ शेतकरी व शेतमजूर एकजूट: शेतकरी मालक आणि शेतमजूर यांचे हितसंबंध वेगळे नसून ते एक नाण्याची दोन बाजू आहेत. कुळ कायद्यानुसार शेतमजुरांना जमीन मिळाली परंतु ज्यांच्याकडे जमीन नाही अशा शेतमजुरांना रोजगार हाच मोठा आधार होता. शेतमालाला जास्त भाव मिळाला तरच शेतकरी, शेतमजुरांना चांगली मजुरी देऊ शकले त्यामुळे दोघांनी एकत्रित लढा दिला पाहिजे असा त्यांचा विचार होता.[४]

७ स्त्री मजुरांचा प्रश्न: पुरुष आणि स्त्री मजुरांच्या मजुरीत भेदभाव केला जाउ नये

असा त्यांचा आग्रह होता कामावर जाणाऱ्या स्त्रियांच्या लहान मुलांसाठी पाळणाघरांची सोय पिण्याच्या पाण्यासचे उपलब्ध गरोदर स्त्रियांना आर्थिक मदत मिळावी[४] यासाठी नवी मुंबई, सिडको भागात प्रकल्पग्रस्त भागात आणि कोल्हापूर , सांगली भागातील दुष्काळी भागात कामावर स्त्रिया संघटित करुन कामाच्या तासानुसार योग्य मोबदला मिळावा यासाठी आंदोलन केले.[७]

शेतकऱ्यांसाठी दिलेले योगदान:

एन.डी.पाटील. यांचे प्रत्येक चळवळ हा शेतकऱ्यांचा स्वातंत्र्यकालीन मुक्ती संग्राम आहे. त्यांनी त्यांचे सर्व आयुष्य कष्टकऱ्यांच्या मुक्तीसाठी लढा दिला. त्यांचे निवडणुकीची स्वत:ची व्याख्या आहे. त्यांच्या मताप्रमाणे पैसे,यंत्रणा, गुंडगिरीच्या बळावर निवडणुका जिंकता येत नाहीत त्यामुळे मतदाराने गुन्हेगारांना निवडणुकीत लढवले असे होत नाही व प्रामाणिकांनपा डोक्यावर घेतील असे होत नाही[१].

१ प्राणातिक उपोषण: २ फेब्रुवारी १९९७ ला शेतकऱ्यांच्या मोटरीचे वीज कनेक्शन तोडायची चर्चा चालू होती तेव्हा प्रा. एन. डी. पाटील यांनी प्रामाणिक उपोषणाला सुरुवात केले त्यातून इशारा दिला की "खबरदार शेतकऱ्यांच्या वीज कनेक्शन ला हात लावला तर"[१]

२ मोफत विजेची मागणी: वीज मंडळाला काय परवडते याचबरोबर शेतकऱ्याला काय परवडतेय याचा देखील विचार झाला पाहिजे त्यांचे म्हणणे होते की वीज नियमित मिळणार असेल व ते २० पैशाने युनिट वीज घ्यायला तयार आाहेत पण पुरवठा खंडित असेल तर मात्र त्यांना १५ पैशांनी युनिट वीज मिळाली पाहिजे. यासाठी त्यांनी उपोषण केले.

३ कापूस एकाधिकार खरेदी योजना: कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कापसावर योग्य भाव मिळाले पाहिजे आणि कापूस एकाधिकार योजना राबवण्यासाठी कटिबंध राहूनच त्यांनी सहकार मंत्रीपद स्विकारले. शेतकऱ्यांना न्याय देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. कापसात एकाधिकार योजनेसाठी नेमलेल्या कमिटीचे ते अध्यक्ष होत. त्यांचे असे मत होते की कापूस खरेदी महामंडळ बाजारातील एक खरेदीदर असावा त्यांचा एकाधिकार नसावा. आधारभूत किंमतीवर आधारित पण कापूस उत्पादकाच्या स्वईच्छेवर अवलंबून असणारे खरेदी पध्दती असावी. खुले मुक्त व्यापाराच्या सागरात कापूस एकाधिकारी खरेदी एक एकाकी भेट ठरेल असे अनेकांचे मत होते. मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि सहकार मंत्री यशवंतराव मोहित हे होते. सरकारी यंत्रांनी कापूस खरेदी करायचे, त्याच्यावर प्रक्रिया करुन रुईच्या गाठी व सरकी विकायचे, नव्यापैकी २५ टक्के रक्कम कापायचे, ७५ टक्के नफा शेतकऱ्यांमध्ये वाटायचा अशी ही योजना होती. स्व. वसंतदादा पाटील यांनी ही योजना बंद केली. परंतु, १९७८ ते १९७९ साली एन. डी. पाटील यांनी ही योजना परत चालु केली. त्यांनी ही योजना पंतप्रधान मोरारजी देसाई सरकारासमोर मांडली असता या योजनेला नकार मिळाला. व्यापारामध्ये उतरणे हे सरकारचे काम नव्हे मग एन.डी. पाटील हे चंद्रशेखर यांना भेटून अर्थमंत्री पटेल यांच्याकडे गेले. अर्थमंत्र्यानी रिझर्व्ह बॅंक

ऑफ इंडिया ला कळवले की, जर रिझर्व्ह बॅक निधी देणार असेल तर अर्थखात्याचा आक्षेप असणार नाही. निधी उपलब्ध झाला व कापूस एकाधिकार सुवर्ण प्रवास सुरु झाला. त्याचबरोबर या योजनेत एन.डी. पाटील यांनी सुधारणा केल्या.

१ हमी किमतीत २० टक्के वाढ

२ योजनेसाठी भांडवल उभारणी

३ नफ्यात चढ उतार निधीसाठी कपात होणारी रक्कम २५ टक्के ऐवजी ५० टक्के केली.

महागाई विरुध्द आंदोलन : १९६४ पासून महाराष्ट्रात जीवनावश्यक वस्तूंच्या दरात वाढ झाल्याने व्यापारांचे काळा बाजार व रास्त भावाच्या दुकानात कमतरता याकडे होणारे सरकारचे दुर्लक्ष याविरोधात एन.डी. पाटील यांनी आवाज उठवला व महाराष्ट्रभर फिरुन भावनाशून्य सरकार या धोरणाची जनजागृती केली त्यामुळे त्यांना अटकही करण्यात आली.

शेतीमालाच्या किफायती दराचा प्रश्न आणि शेती मालकाचा अभ्यास करुन एन.डी. पाटील यांनी काही महत्वाचे दिशानिर्देशक दिले. शेतमालाच्या भावासाठी प्रा. एन. डी. पाटील यांचे निकष असा होता की,

१ जमिनीची किंमत बाजारभावाने करुन त्याचा व्याज दर औताची अवजारे विकत आणण्यासाठी खर्च केलेल्या रकमेवरील व्याज, बैल सांभाळण्यासाटी येणारा खर्च, बैल निकामी झाल्यावर दुसरी बैलजोडा घेण्याची योग्य तरतूद त्यातून बैलांना बाहेर मजूरी मिळाल्यास ती रक्कम वजा करावी.

२ जमीन महसूल व इतर कर

३ बियाणे

४ खते जंतुनाशके यांच्या किंमती

५ अवजारांचा घसारा काही अवजारांचे भाडे

६ विहीर खोदणे, पाईपलाइन अशावर येणारे वीजबिल

७ मजूरांची मजूरी

८ शेतकऱ्यांच्या कुटूंबियांची मजूरी

९ जनावरे व पिके यांचा विमा उतरवण्यासाठी भरावे लागणारे हफ्ते अशा अनेक महत्वाचे निकष एन.डी. पाटील यांनी मांडले.[१]

निष्कर्ष:

एन.डी.पाटील यांनी आपल्या जीवनप्रवासात शेतमजूर आणि शेतकरी त्याचबरोबर अन्याय सहन करणाऱ्या घटकांसाठी त्यांनी पराक्रमी लढा दिला. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उपोषण, आंदोलने व स्वत:ची पाठ काळी होईपर्यंत ते लढले. लोकांमध्ये जागृती केली की, अन्यायावरती लढा कसा द्यावा. एक कष्ट करणारे लोकांचे आवाज बनून अगदी रक्ताचें पाणी व्हावे असे त्यांचे योगदान आहे. शेतमजूरांसाठी त्यांनी किमान वेतन कायदा लागू करावे यासाठी लढा दिला व शेतकऱ्यांच्या पाठीशी ते कायम उभे होते. महागाईचा सखोल अभ्यास करुन महागाईविरुध्द आंदोलने केली अशा अनेक बदल त्यांनी शेतमजूर आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आणले.

संदर्भ ग्रंथ:

१. किशोर बेडकिहाळ,सी.व्ही .पाटिल संपा एन.डी.पाटिल:व्यक्तित्व आणि कतृत्व —अंबेडकर अकादमी प्रकाशन , सातारा पहिली अवृत्ती—जाने.२००५

२. कित्ता—६४—६६

३. माझी संघर्षयात्रा खंउ—२

४. महाराष्ट विधानमंडळ इतिवृत १९७८—९०

५. राष्टवीर दसरा विशेष अंक

६. राष्ट्रवीर साप्ताहिक १९८१ हिरक महोत्सव विशेष अंक

७. विकिपिडिया

८. विकिपिडिया

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

प्रा. (डॉ.) एन. डी. पाटील यांचे सामाजिक आणि राजकीय चळवळीतील योगदान

सिद्धनाथ मधुकर गाडे
संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Corresponding Author - सिद्धनाथ मधुकर गाडे

DOI - 10.5281/zenodo.19665210

प्रस्तावना:

१९६० नंतरच्या काळामध्ये एन. डी. पाटील यांचे कार्य महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये महत्वाचे आहे. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचा वैचारीक पाया पुरोगामी आणि डाव्या विचारसरणीचा होता. त्यांच्यावर कार्ल मार्क्स, लेनिन आणि सत्यासोधक विचारांचा विशेष प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी आपल्या सबंध कृतीशील चळवळीचा केंद्रबिंदू 'नाही रे' म्हणजेच बहुजन समाजातील शेतकरी, शेतमजूर, कष्ठकरी, कामगार, आदिवाशी हा समूह होता. एन. डी. पाटील हे महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रामध्ये प्रदीर्घ काळ सक्रिय असलेले वेक्तीमहत्व होते. त्यांनी आपल्या सामाजिक बांधिलकीतून सर्वसामान्य जनतेच्या अनेक प्रश्नांची सोडवणूक केली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील हे त्यांचे योगदान खूप महत्वाचे आहे. भूमिहीनांसाठी आंदोलने, वीज, पाणी, शेतीमालाल हमी भावाबाबत उभारलेले लढे, अंधश्रद्धा निर्मूलन अशा विविध सामाजिक सुधारणेच्या चळवळीशी त्याचा शेवटपर्यंत संबंध होता. रयत शिक्षण संस्थेसाठी हि त्यांनी खूप मोठे योगदान दिले आहे.

राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर एन. डी. पाटील हे बरेच वर्ष विधानपरिषदेवर आमदार म्हणून कार्यरत होते. त्याचबरोबर शिक्षक मतदार संघातून सुद्धा विधानपरिषदेमध्ये त्यांनी प्रतिनिधित्व केलेले होते. राजकीय दृष्टिकोनातून त्यांनी विधानभवनामध्ये विविध विषयांना हात घालून जनतेचा प्रश्न सोडवण्याचा सतत प्रयत्न केलेला होता. सामाजिक कार्याबरोबर राजकारण करत असताना देशाबद्दलचे प्रेम विसरता कामा नये यासंदर्भात एन. डी. पाटील यांनी १९६२ चीन आणि भारत युद्ध आक्रमणाच्या वेळी युद्धप्रसंगी एक संघ आघाडीची गरज आहे. या एकजुटीला तडे पाडणे सर्वथा अनिष्ट आहे. सर्व ताकद सरकारच्या मागे एकटवली पाहिजे कोणताही कारणास्तव सरकारला अडचणी टाकायचे नाही. या शब्दामध्ये ठणकावून सांगत असत.[१]

संशोधनाचे महत्त्व:

डॉ. एन. डी. पाटील यांनी समाजातील शोषित उपेक्षित यांच्या प्रश्नासाठी प्रभावीपणे विधिमंडळ व विधिमंडळाच्या बाहेर प्रश्न मांडले. समाजातील विविध चळवळीमध्ये सक्रियपणे भाग घेतला. अन्याय विरुद्ध आवाज उठवला, शेतकऱ्यांच्या मालाला कीपायतशीर भाव मिळण्यासाठी केलेली शेतकरी चळवळ, सेझ विरोधी धोरण, इस्लामपूर गोळीबार प्रकरण, वीजवाडी विरोधात केलेले आंदोलन, आंध्रश्रद्धा चळवळ, शैक्षणिक चळवळ अशा विविध चळवळीच्या कार्याचा परिणाम महाराष्ट्राच्या

शासनाच्या निर्णयावर झालेला दिसतो. त्यामुळे एन. डी. पाटील यांचे नेतृत्व दिशादर्शक व उपयुक्त आहे.

एन .डी. पाटील यांचे सामाजिक कार्य:

रयत शिक्षण संस्थेच्या कामात व्यस्त असताना मा. एन. डी. पाटील यांना समाजातील प्रश्नाकडे अधिक लक्ष होते. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी ते वेगवेगळ्या चळवळीत उतरत असत. गोवा मुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र चळवळ यामध्ये ते आघाडीवर होते. या काळात त्यांनी डाव्या विचाराच्या चळवळीला भक्कम केले. कष्टकरी, शोषित , कामगार व शेतकरी यांच्या पाठीशी ते सदैव उभे राहिले. शेतमजुराचे प्रश्न, शेतमालाला हमीभाव, रोजगार हमी योजना, कापूस एकाधिकार खरेदी, नव्या जलनितीचा पुरस्कार, औद्योगिकीकरणाच्या नावाखाली शेतकरी जमीन काढून घेण्याच्या सरकारी धोरणाविरुद्ध लढा, सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण याविषयी लढा, श्वेतपत्रिके विरुद्धचा लढा, विजेच्या भारनियमनाविरूद्ध पुकारलेले बंड, सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा, अवास्तव टोलवसुली अशा कितीतरी प्रश्नावर त्यांनी अखंडपणे लढा दिला. समाजातील वाईट गोष्टीवर वैचारिक हल्ला चढवला. जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर तोडगा, कोणत्याही प्रश्नाचा पाठपुरावा करण्याची धडपड, कष्टाने मिळवलेली माहिती, चिंतनशीलता, सडेतोड बोलले, रसाळ वक्तृत्व यामुळे त्यांना संसदपटू म्हणून ओळखले जाते. १९७२ च्या दुष्काळात त्यांनी दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी अनेक ठिकाणी मोर्चे काढले.

एनरॉन वीज प्रकल्पाला बद्दल, प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या काळात खूप गाजलेला एक महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे एनरॉन प्रकल्प होय. एनरॉन कंपनीची विज मिळेल त्या दराने घेणे त्यांना मान्य नव्हते या कंपनीशी झालेले गैरव्यवहार त्यांनी उघडकीस आणला व तो प्रकल्प सरकारला गुंडाळावा लागला त्यात त्यांचा मोठा वाटा होता.

सेझ विरोधी धोरण:

रायगड जिल्ह्यातील सेझ विरोधातील त्यांनी केलेले आंदोलन महाराष्ट्राच्या कायम लक्षात राहिल. रायगड जिल्ह्यातील पेण, उरण आणि पनवेल या तालुक्यातील ४५ गावातील ३५ हजार एकर जमीन रिलायन्सने ताब्यात घ्यायची आणि त्या सर्व जागेचा विकास करून तिथे उद्योग उभे करायचे पण या प्रकल्पांना रायगड मधील शेतकऱ्यांनी जोरदार विरोध केला. आणि या लढ्याचे नेतृत्व प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी केले होते. प्रा. डॉ. एन. डी. पाटलांची ही सर्वात मोठी लढाई होती. अंबानीच्या विरोधातील म्हणजेच सेझ च्या विरोधातील लढाई. या लढाईतून प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या आक्रमक नेतृत्वामुळेच सरकारला आणि रिलायन्सला माघार घ्यावी लागली त्याचे नायक प्रा. डॉ. एन. डी. पाटीलच होते.[२]

इस्लामपूर गोळीबार प्रकरण:

इस्लामपूर मामलेदार कचेरीवर काढलेल्या मोर्चाचे नेतृत्व स्वतः मा. प्रा. एन. डी. पाटील यांनी केले. १०८० च्या दशकात पश्चिम महाराष्ट्रात ऊस दर, सहकारी साखर कारखाने आणि शेतकरी हक्क या मुद्द्यावर मोठ्या प्रमाणात आंदोलन सुरू होते. दरवाढ, कर्जमाफी आणि उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव यासाठी मोर्चे आणि आंदोलने आयोजित केले. या आंदोलनापैकी एका आंदोलनादरम्यान इस्लामपूर येथे मोठ्या प्रमाणात शेतकरी जमले होते. आंदोलन तीव्र झाल्यानंतर पोलिसांनी जमाव पांगवण्यासाठी गोळीबार केला.

त्या मोर्चावर आपल्या सरकारने इंग्रज सरकारपेक्षा जास्त अत्याचार केले. पोलिसांनी मोर्चावर लाठीचार्ज केला. त्यात एन. डी. सरांनाही पाठ काळी निळी होईपर्यंत

मार बसला होता. एवढेच नव्हे तर या मोर्चावर गोळीबार करण्यात आला. या गोळीबारात एन.डी. पाटील यांचे पुतणे सुरेश पाटील, क्रांतिवीर रंगरावदादांचा मुलगा राजेंद्र, दिलीप निलाखे व जक्काईवाडीचा रंगा बाळ गायकवाड असे चौघेजण हुतात्मे झाले.[३]

दुष्काळ निवारणविरुद्ध चळवळी:

शेतकरी कामगार पक्षच्या स्थापनेपासून पक्ष शेतकांच्या प्रश्नासाठी संपूर्ण महाष्ट्राभर मोर्चे, निदर्शने घेरओ धरणे ईत्यादी मार्गाचा अवलंब करून सरकारला शेतकरीर्यंच्या प्रश्नवर जाग आण्यासाठी प्रयत्न करीत होते. १९७१ ला इंदिरा गांधींनी गरीबी हटाओ चा नारा देऊन गरीबांना कायमचे हटविण्याचे काम कोंग्रेस सरकारने केले होते .त्यावेळी प्रा. एन.डी पाटील महाराष्ट्र विधानपरिषद विरोधी पक्ष नेते आणि समजवादी आघाडीचे नेते म्हणून कांकरीत होते. त्यावेळी सभागृहात व सभागृहाबाहेर दोन्ही ठिकाणी राज्यात उभे राहिलेले दुष्काळ संकट हटविणयसाठी सरकारने ठोस पाऊले उचलावीत यासाठी मोठे आंदोलन महाराष्ट्राच्या विधानसभेवर उभे केले होते. या मध्ये त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या आंदोलनला यश आले. सरकारने योग्य निर्णय घेतले.[४]

रयत शिक्षण संस्थेसाठी योगदान:

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारणेच एन. डी. पाटील यांनी संस्थेसाठी योगदान दिले आहे. प्राध्यापक, रेक्टर, जनरल मॅनेजर मेंबर ते चेअरमन या पदापर्यंत एन. डी. पाटील यांनी काम केलेले दिसून येते. इ.स. १९९०-९१ यावर्षी संस्थेच्या ५३४ शाखा होत्या. इ.स. २००३-२००४ पर्यंत ही संख्या ६७० पर्यंत गेली. एन. डी. पाटील यांच्या कार्यकाळात ९ प्राथमिक शाळा, ८६ माध्यमिक शाळा, ६ महाविद्यालये, ८ आश्रमशाळा, ४ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, १७ इतर शाखा नव्याने सुरू करण्यात आल्या, यातील अनेक शाखा डोंगराळ आदिवासी भागात आहेत. कर्मवीर भाऊरावनांनी ज्या वंचित जनसमूहानपर्यंत गेले त्या पुढच्या टप्प्यावर जाण्याचा प्रयत्न एन. डी. पाटील यांनी केला आणि तो ही संख्यात्मक आणि गुणात्मक रूपात या ६६९ शाखांमधून निरनिराळ्या १४७ जातींचे साडेसतरा हजार सेवक काम करीत आहेत.[५]

डॉ. एन. डी. पाटील यांचे राजकीय कार्य:

राजकीय क्षेत्रामध्ये त्यांनी आपल्या कार्याचा आणि विचाराचा ठसा उमटवला आहे. १९९८ मध्ये डॉ. एन. डी. पाटील शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. १९५७ मध्ये मुंबई गिरणी कामगार संघटनेचे सरचिटणीस पदी होते. महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी उत्तम कामगिरी केली आहे. इ.स. बी. सन १९६० ते १९६६ त्यानंतर १९७०-१९८२ अठरा वर्षे महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य राहिले. १९७८ ते १९७९ व १९८५ से २०१० या कालावधीत शेतकरी कामगार पदाचे सरचिटणीस म्हणून कार्य केले. १९७८ ते १९८० ते महाराष्ट्रचे सहकारमंत्री होते त्याचबरोबर १९८५ ते १९९० या वेळी ते विधानसभेचे सदस्य होते. डॉ. एन. डी. पाटील हे महाराष्ट्र राज्य सीमाप्रश्न समितीचे सदस्य होते व सीमा चळवळीचे प्रमुख नेते होते. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक पटलावरील एक अभ्यासक शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ.एन. डी. पाटील हे होते.

विधिमंडळातील सहभाग:

प्रा. एन. डी. पाटील हे महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेवर संयुक्त महाराष्ट्र समिती मार्फत १९६० ते १९६६, १९७० ते १९७७ या काळात निवडून आले होते. तसेच शिक्षक मतदार संघातून १९७७ ते १९८२ त्यांनी प्रतिनिधित्व केले. त्यांनी एकूण १८ वर्षे विधान परिषदेमध्ये प्रतिनिधित्व केले. त्यानंतर त्यांनी १९८५ ते १९९० अशी ५ वर्षे त्यांनी कोल्हापूर शहरातून विधानसभेवर प्रतिनिधित्व

केले. अशी एकूण २३ वर्षे त्यांनी विधिमंडळात प्रतिनिधित्व केले. या काळात त्यांनी विधिमंडळात आणि त्याबाहेरही महागाई आणि उपासमार आंदोलन, धरणग्रस्थानचे आंदोलन, वीज प्रश्नांवरील आंदोलने केली. विधीमंडळातही उपेक्षितांची, श्रमिकांची, दलीतांची बाजू अत्यंत प्रभावीपणे मांडत राहिले. महाराष्ट्राच्या विधीमंडळात ते सातत्याने सक्रिय राहिले. विरोधी पक्षातून विधीनंडळात बाजू मांडण्याची जास्त वेळ संधी त्यांना मिळाली. राजकीय जीवनात वेगवेगळी पदे भूषवित असताना त्यांनी मूळ समाजवादी विचारसरणीचा परस्कार केला. महाराष्ट्राच्या विधीमंडळात काम करत असताना अल्पकालीन चर्चा, प्रश्नोत्तरे, अर्धा तास चर्चा, हक्कभंग, लक्षवेधी सूचना, निवेदन यांच्या माध्यमातून एन. डी. पाटील यांनी हजारो प्रश्न उपस्थित करून शासनास त्यांची भूमिका विशद करण्यास भाग पडले. रास्त भाव, दुकाणांतून वाटप करण्यात येणाऱ्या धान्यांच्या व इतर जीवनावश्यक वस्तूंचे वितरण कोणत्याही काळाबाजाराशिवाय व्हावे, अशी जोरदार मागणी त्यांनी विधीमंडळात लावून धरली. त्याचप्रमाणे भ्रष्टाचारी यंत्रणेला पाठीशी घालू नका, अशी आग्रही मागणी केली. यावर सरकारने काही उपाय योजना केली नाही, तर जनतेच्या असंतोषाला तोंड द्यावे लागेल, असेही बजावले होते.[६]

महाराष्ट्रात १९७१-७२ साली फार मोठा दुष्काळ पडला होता. त्यापूर्वीपासूनच सामान्य जनता अन्नटंचाई, बेरोजगारी, महागाईने त्रस्त होती. एन. डीं.च्या सततच्या पाठपुराव्यामुळे सरकारला काही महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागले. 'दर आठवड्याला मजुराला ठराविक एका दिवशी मजुरी चुकती झालीच पाहिजे' आणि 'समान काम समान दाम' असे दोन महत्त्वाचे निर्णय सरकारने घेतले.[७] अशा प्रकारे राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांच्या प्रश्नांवर रोजगार मिळवून देण्याच्या सरकारच्या धोरणावर त्यांनी विधीमंडळात महत्वाच्या प्रस्ताव मांडून त्याचे अभ्यासपूर्ण विवेचन केले. १९७८ ते ८० या काळात ते पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) मंत्रिमंडळात सहकार खात्याचे मंत्री होते. हे मंत्रिमंडळ फार काळ टिकले नाही. परंतु दीड वर्षाच्या अल्पकळात एन. डी. पाटील यांनी सहकार क्षेत्रात महत्वाचे निर्णय घेतले. एन. डी. पाटील यांनी सहकाराचे महत्व ओळखून होते. सहकार अर्थव्यवस्था उभी करण्यासाठी सहकाराचे महत्व लक्षात घेऊन सातत्याने सहकार चळवळ वाढावी म्हणून प्रयत्न केला.

सहकारमंत्री असताना त्यांनी सहकार कायद्यात मूलगामी सुधारणा करून महत्वपूर्ण निर्णय घेतले. सहकार मंत्री म्हणून त्यांनी बाजार समितीत व्यापायांच्या तीन जागांपैकी एक जागा हमाल-मापाडी वर्गासाठी राखीव करून दिली. कष्टकरी मजूर वर्गाला बाजार समितीत स्थान मिळाल्यामुळे या घटकाला न्याय मिळाला. विशेष म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समितीचा अध्यक्ष शेतकरीच असावा असे बंधन या कायद्याद्वारे घालण्यात आले.[८] त्यामुळे वजर समित्यांवर निर्माण झालेली व्यापाऱ्यांची मक्तेदारी काही अंशी मोडीत निघाली. तसेच सहकार खात्याचे मंत्री असताना त्यांच्याच पुढाकारानेच विदर्भ मराठवाड्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्याना न्याय देण्यासाठी 'कापूस एकाधिकार योजना' लागू केली. योजनेला प्रचंड विरोध झाला. पण केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक बाजूंनी विरोध असताना देखील ताकदीने ही योजना त्यांनी राबवली. कापसाची हमी किंमत वीस ते बावीस टक्क्याने वाढविली आणि कापूस खरेदीपासून २४ तासाच्या आत शेतकऱ्याला शंभर टक्के रक्कम चुकती करण्याचे धोरण राबविले. कापूस एकाधिकार योजनेमुळे शेतकऱ्यांच्या हिताबरोबरच सामाजिक-आर्थिक स्थित्यंतर घडून येणार असल्याने लोकप्रतिनिधींनी या योजनेचे महत्व शेतकऱ्यांना समजावून सांगावे, असे आवाहन सहकार मंत्री असताना एन. डी. पाटील यांनी केले.

निष्कर्ष:

प्रा. एन. डी. पाटील यांचे सामाजिक कार्य हे महाराष्ट्राच्या लोक आंदोलनांच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी पर्व मानले जाते. त्यांनी शेतकरी, कामगार, वंचित आणि ग्रामीण समाजाच्या प्रश्नांना केवळ आवाज दिला नाही, तर त्या प्रश्नांना संघटित आणि वैचारिक दिशा दिली. त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे संघर्षाची लोकशाही पद्धत, समाजवादी विचारसरणी आणि सामाजिक न्यायाविषयी असलेली दृढ बांधिलकी दिसून येते. त्यांच्या चळवळींमुळे समाजात हक्कांविषयी जागरूकता वाढली, शेतकरी कामगार प्रश्न सार्वजनिक धोरणांच्या केंद्रस्थानी आले आणि लोक आंदोलनांना नैतिक व वैचारिक अधिष्ठान मिळाले. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक परिवर्तन हे केवळ सत्तेच्या माध्यमातून नव्हे तर संघटित जनशक्ती, सातत्यपूर्ण संघर्ष आणि मूल्याधिष्ठित नेतृत्वाद्वारे घडवता येते.

प्रा. डॉ.एन. डी. पाटील यांनी आपल्या कार्याचा व विचाराचा ठसा सामाजिक कार्याबरोबर राजकीयक्षेत्रामध्ये उमटविला आहे. शेकाप पक्षाबरोबर एकनिष्ठ राहून ते सहकारमंत्री असताना कापूस प्रश्न, शेतकऱ्याच्या मालाला किफायतशीर भाव मिळण्यासाठी केलेले काम अतिशय प्रभावी होते. महाराष्ट्र व कर्नाटक सीमा प्रश्नाबाबत केलेले काम महाराष्ट्र एकीकरणाच्या दृष्टीने प्रेरणादायक होते. महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांच्या नेतृत्वाचा प्रभाव पडलेला आहे.

संदर्भ:

१. दै. राष्ट्रवीर २८ जानेवारी १९६२, पृ. २
२. बेडकिहाळ किशोर, मुलाखत, प्रकाशक राजन बावडेकर, २०२२, पृ.२४
३. पाटील.एन.डी. माजी संघर्ष यात्रा, विजिगीषा प्रकाशन, कोल्हापूर, २०२०, पृ.४८
४. पाटील. एन. डी., माझी संघर्ष यात्रा, विजिगीषा प्रकाशन कोल्हापूर, पहिली आवृत्ती २०२०, पृ.१०९
५. पाटील. बी. बी., माझे सामाजीक कार्य एक दृष्टीक्षेप, महालक्ष्मी प्रकाशक कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००६, पृ.२०९
६. दै. लोकमत, १८ जानेवारी २०२२, पृ.८
७. पाटील विजया, (संकलन), डॉ. एन. डी. पाटील, मुक्ता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ.३३
८. दै.पुढारी, १८ जानेवारी २०२२, पृ.नं ७

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

The Role of Artificial Intelligence in History Research

Dr. Vishwanath Kashinath Sonwane
Krishna Mahavidyalaya, Rethare Bk.
Tal. Karad. Dist.-Satara (M.S.) 415108
Corresponding Author - Dr. Vishwanath Kashinath Sonwane
DOI - 10.5281/zenodo.19665247

Abstract:

Artificial Intelligence (AI) is increasingly being used in historical research, particularly in countries like India where archives are multilingual, multi-script, and physically diverse. This paper examines the practical role of AI in transforming historical materials—such as manuscripts, inscriptions, newspapers, gazettes, and maps—into structured, searchable, and analysable forms. Indian historical sources exist in scripts including Devanagari, Tamil, Bengali, Gurmukhi, Odia, Gujarati, Kannada, Telugu, Malayalam, as well as older scripts like Brahmi and Modi.

AI assists by converting scanned images into machine-readable text, parsing complex layouts, identifying entities across languages, and aligning spatial information with textual evidence. However, this paper argues that AI does not interpret history. It organizes, detects, and scales data; interpretation remains the responsibility of the historian. Alongside technical capabilities, this study also addresses limitations such as OCR errors, transliteration ambiguity, bias in language models, and ethical considerations related to provenance and cultural sensitivity. In the Indian research context, AI functions as an infrastructural enabler—expanding access, improving efficiency, and allowing historians to ask large-scale comparative questions that were previously difficult to pursue.

Keywords: The Exact Role of AI in Indian History Research AI performs specific, mechanical tasks that free historians to do interpretation.

Introduction:

India's historical record is vast and heterogeneous. Archives contain palm-leaf manuscripts, copper-plate inscriptions, colonial administrative records, vernacular newspapers, revenue documents, and survey maps. These materials are written across multiple scripts and languages, and many survive only as scanned images or photographs. Traditionally, historical research in such contexts required manual transcription, specialized paleographic knowledge, and significant time investment. AI changes the feasibility of working at scale. Through Optical Character Recognition (OCR), transliteration systems, document layout parsing, natural language processing (NLP), and geospatial tools, researchers can convert visual sources into structured data. This shift does not eliminate scholarly labour; rather, it reorients it. Instead of spending months transcribing documents line by line, historians can focus more on interpretation, comparison, and argument formation. At the same time, the integration of AI must be approached critically. Machine outputs are probabilistic.

They reflect training data, model assumptions, and technical limitations. Therefore, AI should be understood as an assistant to historical reasoning, not as an authority.

Core Functional Roles of AI in Historical Research:

1. Image-to-Text Conversion (OCR and Transliteration):

One of the most significant contributions of AI in history research is converting images into readable text. Modern OCR systems use neural architectures—often Transformer-based or CNN-RNN models—to recognize entire lines without manual segmentation. For Indian scripts, deployable OCR systems now support multiple languages with increasing accuracy. For historical scripts such as Modi (used in Marathi administrative records), AI-based transliteration tools convert text into Devanagari. This process democratizes access by allowing researchers unfamiliar with the script to engage with archival material. However, degraded manuscripts, irregular handwriting, and orthographic variation still pose challenges. Human validation remains necessary.

2. Document Layout Parsing:

Historical documents rarely follow modern standardized layouts. Manuscripts may contain marginalia, overlapping annotations, illustrations, stamps, or damage. Early printed newspapers combine advertisements, columns, headings, and decorative elements. Layout parsing models identify and segment these components before OCR is applied. This step significantly improves text extraction quality. Even minor segmentation errors can produce cascading OCR inaccuracies. In large digitization projects, layout detection often determines overall success.

3. Natural Language Processing and Textual Analysis:

After text extraction, AI tools support large-scale textual analysis. Named Entity Recognition (NER) identifies persons, places, institutions, and organizations. Topic modeling reveals thematic patterns across decades of newspapers or administrative correspondence. Cross-lingual embeddings enable comparison between English-language colonial gazettes and regional vernacular publications.

In India's multilingual context, such cross-lingual analysis is particularly transformative. It allows historians to trace narratives, policy shifts, or social movements across linguistic boundaries. However, NLP models trained on high-resource languages often perform unevenly across lesser-documented languages, which introduces bias.

4. Epigraphy and Undeciphered Scripts:

AI has also been applied to inscriptional studies and undeciphered corpora such as Indus seals. Deep learning models assist in grapheme segmentation, motif detection, and frequency analysis. These methods help build structured corpora for statistical examination. Importantly, AI does not "decipher" scripts automatically. It identifies patterns and co-occurrences that scholars may interpret. Overstating machine capability risks undermining academic rigor.

5. Spatial Analysis and Historical Mapping:

Spatial analysis has become central to many historical inquiries—migration, irrigation networks, railway expansion, and settlement growth. AI-assisted tools enable georeferencing of colonial maps and alignment with modern coordinate systems. By combining extracted textual entities with mapped layers, researchers can reconstruct historical geographies. However, map warping, projection differences, and paper distortion introduce spatial uncertainty that must be documented carefully.

A Practical Workflow in the Indian Context:

A typical AI-assisted historical workflow may involve:

- High-resolution scanning or photographic capture with proper lighting and metadata documentation.
- Layout parsing to segment text, images, and structural elements.
- OCR and script-specific transliteration.
- Post-correction combining automated suggestions with human review.
- NLP-based entity extraction and thematic modelling.
- Spatial integration through GIS and map alignment.
- Archival publication with version control and documented provenance.
- Each stage requires transparency. Version logging, error tracking, and model documentation strengthen scholarly credibility.

Strengths and Limitations:

Strengths:

- Scalability across large corpora
- Improved accessibility to multi-script archives
- Cross-lingual comparative capability
- Enhanced metadata structuring
- Faster discovery of thematic patterns

Limitations:

- OCR errors in degraded or cursive manuscripts
- Transliteration ambiguity between visually similar glyphs
- NLP bias toward dominant languages
- Spatial inaccuracies in map alignment
- Risk of over-reliance on machine output

Acknowledging limitations does not weaken AI-based research; rather, it strengthens methodological transparency.

Ethical and Cultural Considerations:

AI-driven digitization must respect copyright, community custodianship, and sacred or restricted materials. Historical sources often belong to specific cultural communities. Transparency in digitization practices—who scanned the material, when, using what device—is essential. Confidence scores and uncertainty indicators should accompany machine outputs. Open formats and reversible transformations ensure that future scholars can reassess earlier computational results.

Building a Responsible Technological Framework:

An India-ready research stack typically includes:

- High-quality scanning hardware
- Layout parsing models trained on Indic documents
- Script-specific OCR and transliteration systems
- Language resources tailored to Indian corpora
- GIS tools for spatial visualization
- Open repositories for preservation and reproducibility

Integration of local language datasets is critical. Imported generic models often fail to capture script-specific complexities.

Emerging Directions:

Future developments include multimodal models that integrate page images, OCR text, and spatial data simultaneously. Cross-lingual entity linking across English and Indian languages may enable deeper comparative regional studies. Generative AI tools may assist in summarization or metadata drafting, but only under strict human supervision and documentation. The near-term trajectory suggests augmentation, not automation of interpretation.

Conclusion:

Artificial Intelligence plays a clearly defined and bounded role in historical research. It reads, structures, connects, and scales data. It does not interpret, judge, or contextualize independently. In a country like India—where historical evidence is dispersed across scripts, regions, and formats—AI expands the scope of feasible research.

When combined with transparency, evaluation metrics, and scholarly oversight, AI strengthens historical inquiry. The responsibility for meaning-making, argumentation, and ethical engagement remains with the historian. In this sense, AI is not a replacement for expertise, but an infrastructural extension of it.

References:

1. Frontoni, E. et al. (2024). Artificial intelligence: the new frontier in digital humanities. Frontiers in Computer Science. Link
2. Caruso, M., & Spadaro, A. (2024). Digital Humanities and Artificial Intelligence. MDPI Proceedings. Link.
3. El-Hajj, H. et al. (2023). Explainability and transparency in the realm of digital humanities: toward a historian XAI. International Journal of Digital Humanities. Link
4. Mathew, M., Mondal, A., & Jawahar, C.V. (2025). Towards Deployable OCR Models for Indic Languages (ICPR 2024, LNCS 15319); project page. Springer PDF • Project
5. Prusty, A. et al. (2019). Indiscapes: Instance Segmentation Networks for Layout Parsing of Historical Indic Manuscripts; IHDIA portal. arXiv • Portal IIT Roorkee Mo Sc Net/Mo De Trans (2025). PTI/The Print report; arXiv preprint. News • arXiv PDF
6. Agrawal, Y. et al. (2024). OCR for Ashokan Brahmi Inscriptions. arXiv AI4Bharat Indic NLP resources and corpus. Catalog Corpus GitHub
7. NDLI – National Digital Library of India (portals). Main • Project BORI site & digitization report. BORI • Times of India
8. Petrie, C.A. et al. (2019). Mapping Archaeology While Mapping an Empire (Survey of India maps). Geosciences, 9(1):11 (MDPI). Link Allmaps (IIIF georeferencing). Project
9. MIT Technology Review (2023). How AI is helping historians better understand our past. Link
10. Indic DLP dataset (multi-lingual document layout parsing). Hugging Face
11. Mufidah, I. A. (2013). Student team achievement division (STAD) technique in teaching reading. Lingua Scientia, 5(2), 199–205.
12. Manoli, P., Papadopoulou, M., & Metallidou, P. (2016). Investigating the immediate and delayed effects of multiple-reading strategy instruction in primary EFL classrooms. System, 56, 54–65. https://doi.org/https://doi.org/10.1016/j.system.2015.11.003

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

Artificial Intelligence in Historical Research and Studies: Pursuit for New Horizons

Dr. Prashant Vasant Ransure
Associate Professor, Department of History,
MVP Samaj's Arts Commerce and Science College Tryambakeshwar
Corresponding Author - Dr. Prashant Vasant Ransure
DOI - 10.5281/zenodo.19665278

Abstract:

Anyone who closely follows the updates of the digital revolution and its most powerful outcome, artificial intelligence, will fully understand that no researcher, enthusiast, or beginner should ignore the implications, manifestations, and results of this truly remarkable revolution. The topic of "The Role of Artificial Intelligence in Restoring Ancient Texts and Analyzing Historical Documents" is a subset of the broader subject of how AI tools are modernizing the field of humanities. This specific area has aligned with and leveraged the technology and digitization revolution to create a new branch of the humanities, whose methodologies, nuances, and outcomes surpass all expectations in historical esearch. In our study, we will explore a series of practical steps and applied methodologies on the role of AI tools in historical studies, specifically focusing on analyzing historical documents, identifying their symbols and structure, and decoding their embedded codes, if we may say so, in an engaging and scientific manner.

Introduction:

History is an indispensable component of human societal development. It not only narrates past events but also serves as a scientific tool for understanding the evolution of human culture, political transformations, economic structures, social dynamics, and cultural traditions. From ancient times to the modern era, historians consolidate and analyze humanity's experiences, struggles, and achievements.

Traditionally, historical research has relied on manuscripts, inscriptions, copper plates, texts, sculptures, temples, buildings, and archaeological remains. These sources are crucial witnesses of human memory, yet their sheer volume makes manual handling extremely challenging. Ancient documents are often deteriorated, written in obsolete languages and scripts, and many texts are incomplete. Under such circumstances, historians face numerous obstacles in locating, classifying, and interpreting information.[1]

In this scenario, a major twenty-first-century innovation Artificial Intelligence (AI) is revolutionizing historical research. AI is a technology capable of human-like intelligence, including learning, analyzing, decision-making, and prediction. Through methods such as Machine Learning, Deep Learning, Natural Language Processing, and Computer Vision, AI can rapidly analyze millions of documents—a process that would take humans years. For instance, translating an ancient manuscript of thousands of pages is now possible within minutes. Reading inscriptions written in Brahmi or Sharada scripts, which previously required years of study, can now be automated. This enables historians to focus on deeper analysis and interpretation.

In historically rich regions such as India and Gujarat, AI plays a particularly critical role.

Thousands of years-old evidences lie buried underground. AI-based surveys, 3D modeling, and data analysis at sites like Lothal, Dholavira, Kotdiji, Nevasa, Vallabhi, Harappa, Nalanda, Ajanta, and Ellora are revealing previously unknown aspects of history.[2] History has thus become not only a study of the past but also a dynamic discipline intertwined with technology. This paper seeks to illustrate how AI is providing new directions in historical research and establishing new standards in the study of human culture.

Research Methodology:

The study is based on secondary sources, including books, research journals, ASI reports, UNESCO data, and digital archives.

Early Historical Writing and Limitations:

Human history reflects thousands of years of struggles, victories, and progress. Initially, history relied on oral tradition (Shruti and Smriti). Later, inscriptions, manuscripts, and documents emerged. The 19th and 20th centuries saw the establishment of museums and archives housing millions of documents. However, the vastness of this data has always posed challenges to historians. The primary limitation is human cognitive capacity. A historian might thoroughly study 10,000–20,000 documents in a lifetime, whereas a single archive, like the Vatican's, spans 85 kilometers of shelves. This 'information overload' has left many historical facets unexplored.[3]

Artificial Intelligence: A New Approach:

With AI's rise in the second decade of the 21st century, the perspective on human history has shifted. AI is not merely a computational tool but a cognitive technology capable of pattern recognition, simulating human intelligence. In historical research, AI intersects with the field of Digital Humanities, where computer scientists and historians collaborate to solve historical puzzles.

Three Major Issues Confronted in Contemporary Historical Research:

1. **Document deterioration due to humidity, wars, and time:** Document deterioration poses a critical threat to historical research, acting as a filter that permanently erases parts of the human record. The, physical, and environmental degradation of primary sources—manuscripts, maps, photographs, and records—means that historians are often working with incomplete or fragile, this creates deterioration in historical research,creates historical silence permanent gaps in the record that no amount of modern technology can fully bridge
2. **Complexity of ancient scripts with fewer experts remaining:** Deciphering ancient scripts (e.g., Linear A, Indus script, Rongorongo) is increasingly difficult due to limited corpora, lack of bilingual texts, and unknown linguistic roots, compounded by a dwindling number of specialized experts. The high complexity of these, often mixed-sign systems (logographic/syllabic), creates a critical knowledge gap, making the loss of veteran researchers nearly irreversible.
3. **Lengthy traditional research processes, discouraging younger generations:** Lengthy and rigid traditional research processes present significant barriers to engaging younger generations, who are accustomed to digital-age speed, immediate feedback, and purpose-driven work. The slow pace of traditional, investigator-driven projects often clashes with the desire for faster, more impactful results.[4]

AI addresses these challenges by digitally restoring damaged documents,

deciphering scripts, and reducing research time by 70–80%.

Technological Architecture Data Acquisition and Sensing Layer Data is the fuel for any AI model. In historical research, it comes in two forms:

1. **Digital transformation:** High-resolution multi-spectral imaging reveals otherwise invisible text. One of the most promising techniques 3 is multi-spectral imaging, which can provide additional evidence of the content of a document when it is difficult to read with the naked eye, when further information about the physical composition of a document and ink identification is required, or when information is required about its provenance
2. **Remote Sensing:** LiDAR and SAR technologies collect data on buried Archaeological remains**.** Remote sensing technologies, specifically LiDAR (Light Detection and Ranging) and SAR (Synthetic Aperture Radar), have revolutionized archaeology by enabling the non-invasive detection, mapping, and analysis of buried archaeological remains. These technologies allow researchers to "see" through vegetation and soil to identify ancient structures, settlements, and landscapes.[5]

Pre- Processing and Image Enhancement:

Historical documents are often damaged. AI algorithms perform:

1. Binarization: Separating text from paper background: Binarization is a fundamental pre-processing technique in digital image processing that converts a grayscale or color image into a binary image, containing only two pixel values: 0 (black) and 1 (white). Its primary purpose in document analysis is to isolate the foreground text from the background, simplifying the image data to improve the accuracy of subsequent tasks like Optical Character Recognition (OCR).



2. Noise Reduction: Eliminating stains, moisture marks, and decay. "Noise Reduction: Eliminating stains, moisture marks, and decay" refers to a comprehensive digital image restoration process that removes unwanted artifacts, blemishes, and structural degradation from old, damaged, or poorly captured photos. This process acts as a "cleaning" phase, aiming to restore the image to its original, uncorrupted state.

3. Layout Analysis: Identifying text, images, and margins. Layout Analysis (also known as document layout analysis or document segmentation) is a fundamental computer vision task in Intelligent Document Processing (IDP). It involves analyzing a document image to


decompose it into its structural components, identify their content types (text, images, tables), and determine their reading order.[6]

Core AI Models:

Convolutional Neural Networks (CNN): Recognize intricate strokes in characters.

Convolutional Neural Networks (CNNs) are exceptionally effective at recognizing intricate strokes in characters because they process images similarly to the human visual system, focusing on local structures to understand the overall shape.

Recurrent Neural Networks (RNN) & LSTM: Understand sequence and context.



RNNs and LSTMs are specialized neural networks designed for sequential data (text, time-series) by processing data points in order and maintaining a hidden state (memory) to capture context. While standard RNNs struggle with long-term dependencies due to vanishing gradients, LSTMs use gating mechanisms to retain relevant information over long sequences.[8]

Challenges and Ethical Management:

When we integrate Artificial Intelligence with a sensitive subject like history, serious ethical questions arise alongside technical achievements. History forms the foundation of human identity, and if machines make mistakes, it can alter society's understanding of the past.

Algorithmic Bias and Prejudice:

AI models are trained on data, and if the data is biased, the AI will produce biased results.

1. Data Imbalance: Most of the currently available digital data comes from Western countries. If AI trained on this data analyzes Indian or Asian history, it will produce results from a European perspective.

2. Discrimination and Prejudice: Historical documents, especially from colonial or institutional periods, are often biased. AI cannot detect this bias and may treat it as truth, producing biased conclusions in future analyses.

The Black Box Problem:

Evidence is the most crucial aspect of history. If a historian claims, "This inscription is from Ashoka's period," they must justify the reasoning behind it.

1. Lack of Logical Transparency: AI often produces results but does not clearly show the logical process used to reach them.

2. Academic Acceptance: Until AI can explain the historical reasoning behind its conclusions, the academic community cannot fully accept its results as factual.

Loss of Human Context and Sensitivity:

History is not just numbers and dates; it is the story of human experiences and emotions.

1. Sarcasm and Emotion: AI often interprets historical texts literally and may fail to understand

sarcasm, metaphors, or cultural nuances, leading to misinterpretation.

2. Ethical Judgment: Machines still have limited ability to understand the psychology behind human decisions taken during wars, revolutions, or crises.[9]

Digital Colonialism:

Who owns historical data is a major question.

1. Control over Data: If India's historical data is processed on foreign servers, those companies gain control over its interpretation.

2. Resource Gap: Developed countries have large AI servers, while developing countries may have historical data but lack the technology, creating new inequalities in historical research.

The Threat of Deepfake History:

AI is as creative as it is potentially destructive:

1. Creation of Fake Documents: AI can generate fake documents or images that appear authentic, increasing the risk of historical manipulation.

2. Misleading Propaganda: Historical facts can be twisted by AI to promote a specific agenda, posing a threat to democracy and knowledge integrity.[10]

Conclusion:

This research paper demonstrates that Artificial Intelligence is not a threat to historical research; rather, it is an indispensable auxiliary tool that complements human expertise. AI has the potential to transform the study of history by processing vast amounts of data at speeds and accuracies unattainable by human historians alone, allowing scholars to focus on higher-order tasks such as interpretation, critical analysis, and contextual understanding.

We stand at a new horizon where history and technology converge. Artificial Intelligence, when responsibly applied, can amplify human intellectual capacities, uncover hidden patterns, and preserve cultural heritage for future generations. It is a transformative force that enhances, rather than replaces, the human historian, bridging the gap between the past and the future. By embracing AI as a partner, the study of history can become faster, more accurate, and more insightful, while remaining grounded in human judgment, critical analysis, and ethical responsibility

References:

1. Busa, R. (1980). The annals of humanities computing: The index thomisticus. Computers and the Humanities, 14(2), 83–90.
2. DeepMind. (2022). Ithaca: Restoring and attributing ancient Greek inscriptions using deep neural networks. Google AI Blog.
3. D'Ignazio, C., & Klein, L. F. (2020). Data Feminism. MIT Press.
4. Kaplan, F. (2015). The Venice Time Machine: Big data of the past. EPFL Press.
5. Ministry of Electronics and Information Technology (MeitY). (2023). Bhashini: National language translation mission. Government of India.
6. Rao, R. P. N., et al. (2009). Entropic evidence for linguistic structure in the Indus script. Science, 324(5931), 1165–1168.
7. Schreibman, S., Siemens, R., & Unsworth, J. (Eds.). (2016). A new companion to digital humanities. John Wiley & Sons.
8. Smith, A. J. (2022). Artificial intelligence in digital archaeology: New methods for historical archiving. Journal of Digital Heritage, 5(3), 210–225.
9. UNESCO. (2021). Recommendation on the ethics of artificial intelligence.
10. Wang, Y., & Brown, S. (2021). Deep learning for handwritten text recognition in historical manuscripts. International Journal on Document Analysis and Recognition (IJDAR), 24(1), 1–15.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन जतन, संवर्धन आणि काळाची गरज

डॉ. अरुण सदाशिव कटकोळे

इतिहास विभाग प्रमुख

डी .के .ए ,एस .सी कॉलेज इचलकरंजी

Corresponding Author - डॉ. अरुण सदाशिव कटकोळे

DOI - 10.5281/zenodo.19665304

सारांश :

इतिहास हा समाजाचा जिवंत आरसा असून हस्तलिखिते, सनदा आणि मोडी दप्तरे हे आपले अमूल्य सांस्कृतिक वैभव आहे. मात्र, हवामानातील बदल, आर्द्रता आणि कीड यांमुळे हे नश्वर कागदी दस्तऐवज दिवसेंदिवस जीर्ण होत आहेत. ही ऐतिहासिक साधने नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी 'डिजिटायझेशन' हा एकमेव प्रभावी उपाय आहे. डिजिटायझेशनमुळे मूळ कागद सुरक्षित राहतो आणि त्याचा डिजिटल अवतार जगभरातील संशोधकांसाठी सहज उपलब्ध होतो, ज्यामुळे इतिहासाचे खऱ्या अर्थाने 'लोकशाहीकरण' होते. हा ठेवा केवळ तांत्रिक प्रक्रियेतून जतन होत नाही, तर तो भविष्यातील पिढ्यांसाठी चिरकाल टिकवून ठेवण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे. आज हे पाऊल उचलले नाही, तर पुराव्यांच्या अभावी आपला वैभवशाली इतिहास केवळ दंतकथा बनून उरेल.

पारिभाषिक शब्द : डिजिटायझेशन, संवर्धन, मेटाडेटा, अर्काइव्ह, स्कॅनिंग.

प्रस्तावना:

इतिहास हा केवळ घटनांचा संग्रह नसून समाजाच्या सांस्कृतिक वैभवाचा जिवंत आरसा आहे. हस्तलिखिते, मोडी दप्तर आणि ऐतिहासिक नकाशे यांसारखी साधने आपल्याला आपल्या मुळांशी जोडून ठेवतात. मात्र, कागद हा नश्वर असल्याने हवामानातील बदल, आर्द्रता, कीड आणि वारंवार होणारी हाताळणी यामुळे हे दस्तऐवज अत्यंत जीर्ण आणि ठिसूळ झाले आहेत. नैसर्गिक आपत्तींमुळे हा अमूल्य ठेवा कायमचा गमावण्याची भीती असल्याने, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्याचे 'डिजिटायझेशन' करणे हाच प्रभावी उपाय आहे. ही प्रक्रिया केवळ दस्तऐवजांचे जतन करत नाही, तर इतिहासाचे खऱ्या अर्थाने 'लोकशाहीकरण' करते; ज्यामुळे कोल्हापूरपासून लंडनपर्यंतच्या संशोधकांना ही माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते. आजच्या AI आणि बिग डेटाच्या युगात डिजिटायझेशन करणे ही चैन नसून काळाची अनिवार्य गरज आहे. आपल्या पूर्वजांच्या वारशाचे रक्षण करणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी ठोस ऐतिहासिक पुरावे उपलब्ध करून देणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. डिजिटायझेशनमुळेच आपला इतिहास केवळ दंतकथा न राहता चिरकाल जिवंत राहील.

उद्दिष्टे :

1. भौतिकदृष्ट्या नष्ट होणाऱ्या दुर्मिळ कागदपत्रांना 'डिजिटल' स्वरूपात कायमस्वरूपी सुरक्षित करणे याचा अभ्यास करणे.

2. कोणत्याही भौगोलिक मर्यादेशिवाय ऐतिहासिक माहिती संशोधकांना इंटरनेटद्वारे सर्वत्र उपलब्ध करून देण्याचा अभ्यास करणे.
3. दस्तऐवज पुनरुज्जीवनात डिजिटायझेशन अभ्यास करणे

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक आणि ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून, यामध्ये प्राथमिक व दुय्यम साधनांचे चिकित्सक विश्लेषण केली आहे.

विषय विवेचन :

ऐतिहासिक दस्तऐवजांच्या डिजिटायझेशनचा सर्वात महत्त्वाचा आणि क्रांतिकारी फायदा म्हणजे मूळ कागदपत्रांना स्पर्श न करता त्यांची माहिती अनंतकाळासाठी सुरक्षित ठेवणे हा होय. कोणतेही जुने कागदपत्र, मग ते शेकडो वर्षांपूर्वीचे हस्तलिखित असो वा दुर्मिळ ग्रंथ, जितक्या वेळा हाताळले जाते, तितकी त्याची झीज होण्याची शक्यता वाढत असते. मानवी हातातील नैसर्गिक तेल, घाम आणि वातावरणातील आर्द्रता यामुळे कागद ठिसूळ बनतो. डिजिटायझेशनच्या प्रक्रियेत एकदा का उच्च दर्जाचे स्कॅनिंग झाले की, त्या कागदाची हुबेहूब प्रतिकृती डिजिटल स्वरूपात तयार होते. त्यानंतर संशोधकांना किंवा वाचकांना मूळ कागद हाताळण्याची गरज उरत नाही; ते संगणकीय प्रत वापरून आपला अभ्यास पूर्ण करू शकतात. यामुळे मूळ ऐतिहासिक दस्तऐवज सुरक्षित कपाटात जतन करून ठेवता येतात. विशेष म्हणजे, डिजिटल माहितीचा बॅकअप घेणे सोपे असल्याने, नैसर्गिक आपत्ती किंवा अपघातात मूळ प्रत नष्ट झाली तरी, त्यातील ज्ञान आणि माहिती 'डिजिटल' रूपात चिरकाल टिकून राहते. अशा प्रकारे, तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण आपल्या पूर्वजांचा वारसा काळाच्या पडद्याआड जाण्यापासून वाचवून तो अनंतकाळासाठी जिवंत ठेवू शकतो.

ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून तो आपल्या पूर्वजांच्या स्मृती जिवंत ठेवण्याचा एक 'सांस्कृतिक यज्ञ' आहे. या प्रक्रियेत 'निवड आणि वर्गीकरण' हा टप्पा पायाभूत मानला जातो, कारण इतिहास अफाट आहे आणि प्रत्येक कागद एका विशिष्ट कालखंडाचा साक्षीदार असतो. तज्ज्ञ जेव्हा ऐतिहासिक महत्त्व, दुर्मिळता आणि संशोधन मूल्य यांसारख्या निकषांवर दस्तऐवज निवडतात, तेव्हा ते केवळ कागद निवडत नसून इतिहासातील महत्त्वाचे दुवे निवडत असतात. यामध्ये कालखंड, भाषा (उदा. मोडी, फारसी) आणि विषयानुसार होणारे वर्गीकरण संशोधकांसाठी ज्ञानाची दारे उघडण्याचे काम करते.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे या प्रक्रियेत 'भौतिक स्थितीचे मूल्यांकन' करून जीर्ण कागदपत्रांना दिला जाणारा प्राधान्यक्रम हा 'डिझास्टर मॅनेजमेंट'चा एक भाग आहे. १७ व्या शतकातील छत्रपती शिवाजी महाराजांची आज्ञापत्रे असोत वा स्वातंत्र्यलढ्यातील गुप्त खलिते, यांतील कागद हात लावताच तुटण्याची भीती असते. अशा वेळी 'जीर्ण दस्तऐवजांवर आधी प्रक्रिया' हे सुवर्णसूत्र वापरून त्यांना 'डिजिटल संजीवनी' दिली जाते. स्कॅनिंगपूर्वी धूलिकण काढणे किंवा गंजलेल्या पिना काढणे यांसारखी पूर्वतयारी कागदाचे आयुष्य वाढवते. शेवटी, तयार झालेली 'मास्टर लिस्ट' आणि 'मेटाडेटा' यामुळे हा अमूल्य ठेवा जगात कोठेही बसून एका क्लिकवर उपलब्ध होतो. थोडक्यात, डिजिटायझेशनमुळे इतिहासाचे लोकशाहीकरण झाले असून, जो वारसा पूर्वी फक्त कपाटात बंद होता, तो आता अनंतकाळासाठी मुक्त आणि सुरक्षित झाला आहे. ही प्रक्रिया पूर्ण करणे ही आपली ऐतिहासिक जबाबदारी आणि भविष्यातील पिढ्यांसाठी दिलेली एक अमूल्य भेट आहे.

ऐतिहासिक दस्तऐवजांच्या डिजिटायझेशनचा उद्देश केवळ माहिती जतन करणे नसून, मूळ दस्तऐवजाचे भौतिक आयुष्य वाढवणे हा देखील असतो. स्कॅनिंग करण्यापूर्वी दस्तऐवजांवर केल्या जाणाऱ्या या प्राथमिक प्रक्रियेला 'प्रतिबंधात्मक संवर्धन' असे म्हणतात. अनेक दशके किंवा शतके जुने असलेले हे कागद धूलिकण, बुरशी आणि आम्लयुक्त वातावरणामुळे कमालीचे कमकुवत झालेले असतात. या संदर्भात वि. ग. खोबरेकर यांच्या मते, अभिलेखागारातील कागदपत्रांचे जतन करताना वातावरणातील आर्द्रता आणि तापमान यांचे नियंत्रण करणे अत्यंत आवश्यक असते, अन्यथा कागद ठिसूळ होऊन नष्ट होऊ शकतो[१] . संवर्धनाच्या प्रत्यक्ष प्रक्रियेत, तज्ज्ञ प्रथम मऊ ब्रशच्या साहाय्याने कागदावरील धूळ आणि कीड अत्यंत सावधगिरीने स्वच्छ करतात, जेणेकरून स्कॅनिंगमध्ये अक्षरे स्पष्ट दिसतील. कागदावर जर डाग असतील किंवा शाई पसरली असेल, तर त्यावर विशेष रासायनिक उपचार केले जातात. या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'टिश्यू रिपेअरिंग' होय. यामध्ये फाटलेला भाग किंवा जीर्ण झालेली कडा जपानी टिश्यू पेपर आणि नैसर्गिक डिंकाचा वापर करून व्यवस्थित जोडली जाते. सं. का. साने यांनी नमूद केल्याप्रमाणे, दस्तऐवजांच्या दुरुस्तीसाठी वापरले जाणारे साहित्य हे 'ॲसिड फ्री' असावे लागते, जेणेकरून कागदाच्या मूळ स्वरूपाला कोणतीही इजा पोहोचणार नाही [२] . ही प्रक्रिया करताना दस्तऐवजाचे ऐतिहासिक मूल्य आणि त्याचे मूळ स्वरूप बदलणार नाही, याची सर्वोच्च काळजी घेतली जाते. उदाहरणार्थ, मोडी लिपीतील कागदपत्रांचे संवर्धन करताना त्यातील शाईचा दर्जा आणि तिचा प्रकार ओळखूनच त्यावर रासायनिक प्रक्रिया केली जाते. अशा शास्त्रशुद्ध संवर्धनामुळे दस्तऐवजाला एक प्रकारे 'पुनर्जन्म' मिळतो आणि तो डिजिटल कॅमेऱ्याच्या झोतात येण्यासाठी पूर्णपणे सज्ज होतो. डिजिटायझेशनपूर्वीचे हे संवर्धन केवळ तांत्रिक काम नसून, तो इतिहासाला दिलेला एक अमूल्य आधार आहे[३] . अशा प्रकारे ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन आणि संवर्धन ही काळाची अनिवार्य गरज आहे. ही प्रक्रिया केवळ जुन्या कागदांचे फोटोंमध्ये रूपांतर करणे नसून, आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला तंत्रज्ञानाच्या साहाय्याने चिरकाल टिकवून ठेवण्याचा एक आधुनिक मार्ग आहे. यामुळे भविष्यातील संशोधकांना हा ठेवा विनासायास उपलब्ध होईल.

ऐतिहासिक दस्तऐवजांची संवर्धन प्रक्रिया :

ऐतिहासिक दस्तऐवज, विशेषतः हस्तलिखिते, सनदा आणि जुनी पत्रे ही सेंद्रिय पदार्थांपासून (कागद, शाई, चामडे) बनलेली असतात. काळाच्या ओघात हे पदार्थ नैसर्गिकरीत्या खराब होतात. वि. ग. खोबरेकर यांच्या मते, कागदपत्रांचे जतन करणे म्हणजे केवळ ते कपाटात बंद करून ठेवणे नव्हे, तर त्यांच्यावरील बाह्य आणि अंतर्गत घटकांचा परिणाम रोखणे होय. डिजिटायझेशनच्या प्रक्रियेत दस्तऐवज स्कॅनरवर ठेवण्यापूर्वी तो हाताळण्यायोग्य स्थितीत असणे अनिवार्य असते. जर कागद अत्यंत ठिसूळ असेल, तर स्कॅनिंगच्या प्रकाशाने किंवा हाताळणीने त्याचे तुकडे होऊ शकतात. म्हणून, संवर्धन ही डिजिटायझेशनची पूर्वअट आहे[४].

अनेक दशके दुर्लक्षित राहिलेल्या दस्तऐवजांवर धुळीचे थर, कोळीष्टके आणि वाळवीचे अवशेष असतात. हे घटक कागदाचा पोत खराब करतात आणि स्कॅनिंगमध्ये अडथळा निर्माण करतात. संवर्धक यासाठी मऊ उंटाच्या केसांचे ब्रश वापरतात. धूळ काढताना कागदाच्या रेशांना इजा होणार नाही, याची काळजी घेतली जाते. सं. का. साने यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, धुळीमध्ये असणारे सिलिकाचे कण कागदाच्या तंतूंना कापण्याचे काम करतात, त्यामुळे कोरडी स्वच्छता ही संवर्धनाची पहिली पायरी ठरते[५].

ऐतिहासिक कागदांवर अनेकदा आर्द्रतेमुळे बुरशी येते किंवा लोखंडी पिना गंजल्यामुळे तपकिरी डाग पडतात. हे डाग केवळ दिसण्यासाठी खराब नसतात, तर ते कागदाला कमकुवत करतात. यासाठी 'डी-ॲसिडिफिकेशन' ही प्रक्रिया केली जाते. कागदातील आम्लधर्मीपणा कमी करण्यासाठी अल्कधर्मी द्रावणांचा वापर केला जातो. यामुळे कागदाचे पिवळे पडणे थांबते. विशेषतः मोडी लिपीतील कागदपत्रांच्या बाबतीत, वापरलेली शाई ही निसर्गदत्त पदार्थांपासून बनलेली असल्याने, त्यावर पाणी किंवा रसायने वापरताना अत्यंत सावधगिरी बाळगावी लागते. चुकीच्या रसायनामुळे ऐतिहासिक माहिती कायमची पुसली जाऊ शकते[६] . जुन्या कागदांच्या कडा वारंवार हाताळल्यामुळे फाटलेल्या असतात. अशा कागदांना स्कॅनिंगसाठी मजबुती देण्यासाठी 'टिश्यू लॅमिनेशन' किंवा 'टिश्यू रिपेअरिंग' केले जाते. यामध्ये जपानी टिश्यू पेपर, जो अत्यंत पातळ आणि टिकाऊ असतो, त्याचा वापर केला जातो. हा पेपर लावण्यासाठी 'कार्बोक्सी मिथाईल सेल्युलोज' सारख्या नैसर्गिक आणि आम्लमुक्त डिंकाचा वापर केला जातो. सं. का. साने नमूद करतात की, कागद जोडताना तो मूळ मजकुरावर येणार नाही आणि भविष्यात गरज पडल्यास लावलेला टिश्यू पेपर सुरक्षितपणे काढता येईल याची काळजी संवर्धकाने घेणे आवश्यक असते[७]

संवर्धन करताना दस्तऐवजाचे ऐतिहासिक मूल्य जपले जाणे सर्वात महत्त्वाचे असते. उदा. जुन्या पत्रांवरील राजमुद्रा किंवा शिक्के. या मुद्रा मेणाच्या किंवा लाखेच्या असतात. संवर्धन प्रक्रियेत या मुद्रांना धक्का लागणार नाही किंवा त्या वितळणार नाहीत, याचे भान ठेवावे लागते. काहीवेळा कागद इतका जीर्ण असतो की तो सरळ करणेही कठीण असते, अशा वेळी 'ह्युमिडिफिकेशन' पद्धतीने कागदाला थोडी आर्द्रता देऊन तो लवचिक केला जातो आणि मगच स्कॅनिंगसाठी नेला जातो.

एकूणच संवर्धन ही केवळ डागडुजी नसून ती एक वैज्ञानिक प्रक्रिया आहे. ज्याप्रमाणे एखादा ऐतिहासिक वाडा दुरुस्त करताना त्याचे मूळ स्वरूप राखले जाते, तसेच कागदपत्रांच्या बाबतीतही केले जाते. या प्रक्रियेमुळे दस्तऐवज केवळ डिजिटल प्रतिमा बनवण्यासाठी तयार होत नाही, तर त्याची मूळ प्रत देखील पुढील १००-२०० वर्षांसाठी सुरक्षित होते. वि. ग. खोबरेकर यांच्या शब्दात सांगायचे तर, संवर्धन ही इतिहासाची सेवा आहे, जी आपण भावी पिढीसाठी करतो .[८]

उच्च दर्जाचे स्कॅनिंग :

ऐतिहासिक कागदपत्रे ही अत्यंत नाजूक असतात, त्यामुळे त्यांच्या स्कॅनिंगसाठी विशेष उपकरणांची गरज असते. सामान्य 'फ्लॅटबेड' स्कॅनरमध्ये कागद उपडा ठेवावा लागतो आणि त्यावर झाकणाने दाब दिला जातो, ज्यामुळे जुन्या कागदाचे तंतू तुटू शकतात किंवा पुस्तकाची बाइंडिंग खराब होऊ शकते. म्हणूनच, ऐतिहासिक दस्तऐवजांसाठी 'ओव्हरहेड स्कॅनर' किंवा 'प्लॅनेटरी स्कॅनर' वापरले जातात. यामध्ये दस्तऐवज उताणा ठेवला जातो आणि कॅमेरा वरच्या बाजूने प्रतिमा टिपतो. यामुळे कागदाला कोणताही भौतिक स्पर्श होत नाही, ज्याला 'नॉन-कॉन्टॅक्ट स्कॅनिंग' म्हणतात. वि. ग. खोबरेकर यांच्या मते, कागदपत्रांचे स्कॅनिंग करताना प्रकाशझोत नियंत्रित असणे आवश्यक आहे. अतिनील किरणे किंवा तीव्र उष्णता देणारे दिवे कागदाचा रंग फिका पाडू शकतात आणि शाई खराब करू शकतात. आधुनिक स्कॅनरमध्ये 'कोल्ड एलईडी' तंत्रज्ञान वापरले जाते, जे उष्णता निर्माण करत नाही[९] .

स्कॅनिंगचा दर्जा हा 'DPI' (Dots Per Inch) मध्ये मोजला जातो. ऐतिहासिक दस्तऐवजांसाठी किमान ३०० ते ६०० DPI क्षमतेचे स्कॅनिंग केले जाते, जेणेकरून कागदावरील सूक्ष्म खुणा, शिक्के आणि मोडी लिपीतील वळणे स्पष्ट दिसतील. सं. का. साने यांनी नमूद केल्याप्रमाणे,

दुर्मिळ ग्रंथांच्या बाबतीत 'व्ही-शेप' बुक स्कॅनरचा वापर करणे अधिक श्रेयस्कर असते. यामुळे पुस्तक पूर्ण १८० अंशात उघडण्याची गरज पडत नाही आणि पुस्तकाच्या पाठीला इजा न होता पानाच्या कडेपर्यंतचा मजकूर स्पष्टपणे टिपला जातो[१०] . अशा प्रकारे, उच्च दर्जाचे स्कॅनिंग हे केवळ प्रतिमा तयार करणे नसून, मूळ दस्तऐवजाच्या भौतिक अस्तित्वाला धक्का न लावता त्यातील ऐतिहासिक माहितीचे अचूक 'डिजिटल रेप्लिका' तयार करणे होय. या प्रक्रियेमुळे मूळ दस्तऐवज कपाटात सुरक्षित राहतात आणि संशोधकांसाठी अत्यंत स्पष्ट स्वरूपातील डिजिटल प्रत उपलब्ध होते [११]

इंडेक्सिंग आणि मेटाडेटा :

ऐतिहासिक दस्तऐवजांच्या डिजिटायझेशन प्रक्रियेत 'इंडेक्सिंग आणि मेटाडेटा' हा टप्पा माहितीच्या पुनर्प्राप्तीसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. केवळ दस्तऐवज स्कॅन करून त्यांचा साठा करणे पुरेसे नसते; जोपर्यंत ती माहिती सहजपणे शोधता येत नाही, तोपर्यंत त्या डिजिटायझेशनला पूर्णत्व येत नाही. मेटाडेटा म्हणजे सोप्या भाषेत 'माहितीबद्दलची माहिती'. जेव्हा एखादा ऐतिहासिक कागद स्कॅन केला जातो, तेव्हा त्या फाईलला केवळ 'Image 001' असे नाव न देता, त्यासोबत त्या कागदाचा संदर्भ जोडला जातो. यामध्ये दस्तऐवजाचे नाव, निर्मितीचा कालखंड, लेखक किंवा संबंधित व्यक्ती, दप्तरखाना विभाग आणि विषयाचे महत्त्वाचे शब्द यांचा समावेश होतो. या प्रक्रियेमुळे संशोधकांना लाखो डिजिटल फाईल्समधून नेमकी हवी ती माहिती सेकंदात शोधणे शक्य होते. उदाहरणार्थ, जर एखाद्या संशोधकाला 'पेशवेकालीन महसूल व्यवस्था' या विषयावर माहिती हवी असेल, तर मेटाडेटामध्ये केलेल्या वर्गीकरणामुळे त्या विषयाशी संबंधित सर्व कागदपत्रे एका क्लिकवर उपलब्ध होतात. वि. ग. खोबरेकर यांच्या मते, अभिलेखागारातील सूचीकरण हे इतके अचूक असावे लागते की, भविष्यातील पिढ्यांना संदर्भ शोधताना कोणताही गोंधळ होऊ नये. योग्य इंडेक्सिंग नसेल तर डिजिटल डेटा हा एका 'माहितीच्या महासागरा'सारखा होतो, ज्यातून हवा तो मोती शोधणे कठीण जाते (खोबरेकर, १९८८ : १२३-१२५). शिवाय, आंतरराष्ट्रीय मानकांनुसार (उदा. Dublin Core Metadata Standard) ही मांडणी केली जाते, ज्यामुळे जगभरातील ग्रंथालये आणि अभिलेखागारे एकमेकांशी जोडली जाऊ शकतात. सं. का. साने यांनी नमूद केल्याप्रमाणे, मेटाडेटा तयार करताना दस्तऐवजाची भौतिक स्थिती आणि त्यावरील विशिष्ट खुणांचीही नोंद केली जाते, जी ऐतिहासिक संशोधनासाठी अत्यंत मोलाची ठरते (साने, १९९२ : ५५).

बॅकअप:

ऐतिहासिक दस्तऐवजांच्या डिजिटायझेशन प्रक्रियेतील अंतिम आणि सर्वात सुरक्षित टप्पा म्हणजे 'बॅकअप' होय. एकदा का दस्तऐवजांचे उच्च दर्जाचे स्कॅनिंग आणि मेटाडेटा तयार झाला की, ती माहिती केवळ एका संगणकावर किंवा हार्ड डिस्कवर ठेवणे तांत्रिकदृष्ट्या जोखमीचे असते. तांत्रिक बिघाड, व्हायरसचा हल्ला किंवा साठवणूक साधनांचे नुकसान झाल्यास शेकडो तासांचे काम आणि मौल्यवान ऐतिहासिक माहिती कायमची नष्ट होऊ शकते. ही जोखीम टाळण्यासाठी तयार झालेली डिजिटल माहिती मुख्य सर्व्हरसोबतच 'क्लाउड' वर सुरक्षितपणे साठवली जाते. क्लाउड स्टोरेजचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ही माहिती भौगोलिकदृष्ट्या वेगवेगळ्या ठिकाणी साठवलेली असते, ज्यामुळे एखादी नैसर्गिक आपत्ती आली तरी डेटा सुरक्षित राहतो. वि. ग. खोबरेकर यांच्या मते, अभिलेखागारातील माहितीचे जतन करताना 'डिझास्टर रिकव्हरी प्लॅन' असणे अनिवार्य आहे, ज्यामध्ये माहितीच्या किमान दोन ते तीन प्रती वेगवेगळ्या स्वरूपात उदा. सर्व्हर,

मॅग्नेटिक टेप आणि क्लाउड असणे आवश्यक आहे (खोबरेकर, १९८८ : १२७).

या बॅकअप प्रक्रियेमुळे केवळ सुरक्षितताच मिळत नाही, तर माहितीच्या पुनर्प्राप्तीची खात्री मिळते. सं. का. साने यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या युगात साठवणुकीची माध्यमे बदलत राहतात, त्यामुळे बॅकअप घेताना तो 'लॉन्ग टर्म डिजिटल प्रिजर्व्हेशन'च्या मानकांनुसार असावा लागतो, जेणेकरून ५०-१०० वर्षांनंतरही ती फाईल उघडता येईल (साने, १९९२ : ५८-६०). थोडक्यात, बॅकअप ही आपल्या ऐतिहासिक वारशासाठी घेतलेली एक 'डिजिटल विम्याची' भूमिका आहे, जी माहितीला अनंत काळासाठी चिरंजीव करते.

ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन काळाची गरज :

ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन ही केवळ एक तांत्रिक प्रक्रिया नसून, तो आपल्या गौरवशाली इतिहासाला विस्मरणाच्या गर्तेतून बाहेर काढण्याचा एक आधुनिक सेतू आहे. आजच्या वेगाने बदलणाऱ्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात, कागदी स्वरूपातील अमूल्य ठेवा जतन करणे ही 'काळाची गरज' बनली आहे. आपल्याकडे प्राचीन हस्तलिखिते, ताम्रपट, भूर्जपत्रे, मोडी लिपीतील कागदपत्रे आणि जुने नकाशे यांचा मोठा साठा आहे. मात्र, हे सर्व दस्तऐवज नैसर्गिकरीत्या नश्वर आहेत. कागदाचे आयुष्य मर्यादित असते; कालांतराने तो ठिसूळ होतो, त्याला वाळवी लागते किंवा दमट हवामानामुळे शाई पसरते. अनेक ऐतिहासिक दस्तऐवज हे 'म्युझियम' किंवा 'अभिलेखागारांत' अशा ठिकाणी साठवलेले असतात जिथे सर्वसामान्य संशोधकांना पोहोचणे कठीण असते. अशा परिस्थितीत, या दस्तऐवजांचे 'डिजिटायझेशन' करणे हाच एकमेव प्रभावी मार्ग उरतो.

डिजिटायझेशनमुळे मूळ दस्तऐवजाला वारंवार स्पर्श करण्याची गरज उरत नाही. जेव्हा एखादा संशोधक मूळ प्रत हाताळतो, तेव्हा त्याच्या हातातील ओलावा किंवा नैसर्गिक तेलामुळे कागद खराब होण्याची शक्यता असते. डिजिटल प्रत उपलब्ध असल्यास, मूळ प्रत 'ॲसिड-फ्री' बॉक्समध्ये सुरक्षित ठेवता येते. संदर्भानुसार, नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्ट्स सारख्या संस्थांनी भारतात लाखो हस्तलिखितांचे डिजिटायझेशन करून ते सुरक्षित केले आहे, जेणेकरून भविष्यातील पिढ्यांना तो वारसा मूळ स्वरूपात पाहता येईल.

पूर्वी एखादा विशिष्ट ऐतिहासिक पुरावा पाहण्यासाठी संशोधकाला दिल्लीच्या 'नॅशनल आर्काइव्हज'मध्ये किंवा लंडनमधील 'इंडिया ऑफिस रेकॉर्ड्स'मध्ये जावे लागायचे. यासाठी वेळ आणि पैसा दोन्हीचा मोठा खर्च व्हायचा. डिजिटायझेशनमुळे हे संदर्भ आता एका 'क्लिक'वर उपलब्ध झाले आहेत. यामुळे ज्ञानाचे लोकशाहीकरण झाले आहे; म्हणजेच माहिती केवळ ठराविक लोकांपुरती मर्यादित न राहता ती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली आहे. उदाहरणार्थ, 'ब्रिटिश लायब्ररी'च्या 'एन्डेंजर्ड आर्काइव्हज प्रोग्राम' अंतर्गत जगभरातील नष्ट होणाऱ्या दस्तऐवजांचे डिजिटायझेशन करून ते मोफत ऑनलाइन उपलब्ध करून दिले जात आहे.

डिजिटल दस्तऐवजांचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्यातील माहिती शोधण्याची गती. 'ऑप्टिकल कॅरेक्टर रिकग्निशन' सारख्या तंत्रज्ञानामुळे हजारो पानांच्या मजकुरातून आपल्याला हवा असलेला शब्द किंवा संदर्भ काही सेकंदात शोधता येतो. ऐतिहासिक संशोधनात अनेकदा वेगवेगळ्या ठिकाणच्या कागदपत्रांची तुलना करावी लागते. डिजिटल स्वरूपात हे काम अत्यंत सुलभ होते. तसेच, इमेज प्रोसेसिंगद्वारे धूसर झालेली अक्षरे स्पष्ट

करून वाचणे शक्य झाले आहे, जे उघड्या डोळ्यांनी पाहणे अशक्य असते.

इतिहास साक्ष आहे की युद्धे, आग आणि नैसर्गिक आपत्तींमध्ये कित्येक ग्रंथालये आणि दस्तऐवज कायमचे नष्ट झाले आहेत. नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय असो किंवा आधुनिक काळातील युद्धांमध्ये झालेली हानी, भौतिक दस्तऐवज एकदा जळाले की ते परत मिळवता येत नाहीत. डिजिटायझेशनमुळे या माहितीचा 'बॅकअप' (Backup) विविध सर्व्हर्सवर किंवा 'क्लाउड'वर सुरक्षित ठेवता येतो. जर भौतिक प्रत नष्ट झाली, तरी त्यातील माहिती आणि ज्ञान जगासाठी कायमचे सुरक्षित राहते.

ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन करणे म्हणजे केवळ स्कॅनिंग करणे नव्हे, तर तो आपल्या संस्कृतीचा पुनर्जन्म आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर मोडी लिपीतील लाखो कागदपत्रे अद्यापही संशोधनासाठी खुली होण्याची वाट पाहत आहेत. जर आपण वेळेत हे कार्य पूर्ण केले नाही, तर आपला मोठा ऐतिहासिक पुरावा काळाच्या पडद्याआड जाईल. त्यामुळेच, सरकार, खासगी संस्था आणि इतिहासप्रेमींनी एकत्रित येऊन या 'डिजिटल क्रांती'चा भाग होणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी अनिवार्य गरज आहे.

ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन इतिहासात योगदान :

ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन हे केवळ माहिती साठवण्याचे साधन नसून, ते इतिहासाच्या पुनर्लेखनात आणि ऐतिहासिक वारसा टिकवून ठेवण्यात अत्यंत मोलाचे योगदान देते.

इतिहास हा पूर्णपणे पुराव्यांवर आधारित असतो. कागद, कापड किंवा चामड्यावर लिहिलेले दस्तऐवज (उदा. जुनी पत्रे, सनदा, करार) कालांतराने नष्ट होतात. जर पुरावाच नष्ट झाला, तर इतिहासाचा तो दुवा कायमचा हरवतो. डिजिटायझेशन या पुराव्यांना 'डिजिटल अमरत्व' प्रदान करते. यामुळे भविष्यातील हजारो वर्षांनंतरही इतिहासकारांना मूळ दस्तऐवजाची हुबेहूब प्रत अभ्यासाला मिळू शकते.

पूर्वी इतिहास हा केवळ ठराविक ग्रंथालये, राजवाडे किंवा सरकारी अभिलेखागारांच्या भिंतींआड बंदिस्त होता. सामान्य माणूस किंवा दुर्गम भागातील संशोधक तिथपर्यंत पोहोचू शकत नसे. डिजिटायझेशनमुळे हा इतिहास सर्वसामान्यांसाठी खुला झाला आहे. आता साताऱ्यातील मोडी कागदपत्रे लंडनमधील संशोधक किंवा पुण्यातील विद्यार्थी एका क्लिकवर पाहू शकतो. यामुळे इतिहासाचा अभ्यास 'ग्लोबल' झाला आहे.

अनेकदा जुन्या कागदपत्रांचे गठ्ठे इतके नाजूक असतात की ते उघडले तर फाटण्याची भीती असते. त्यामुळे अनेक संदर्भ वर्षानुवर्षे वाचलेच जात नाहीत. डिजिटायझेशनच्या प्रक्रियेत जेव्हा हे कागद स्कॅन केले जातात, तेव्हा अनेक नवीन माहिती समोर येते. यामुळे प्रचलित इतिहासात सुधारणा करणे किंवा नवीन पैलू उजेडात आणणे शक्य झाले आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासाचा मोठा भाग 'मोडी' लिपीत आहे. आज ही लिपी जाणणारे लोक कमी आहेत. डिजिटल स्वरूपात हे दस्तऐवज उपलब्ध झाल्यामुळे:

- संगणकीय प्रणालीद्वारे (AI/OCR) या लिपींचे वाचन करणे सोपे होत आहे.
- लिपी न जाणणारे संशोधकही 'ट्रान्सलेशन' टूल्सच्या मदतीने या माहितीचा वापर करू शकत आहेत.

इतिहासकार जेव्हा एखादी घटना लिहितो, तेव्हा त्याला विविध ठिकाणच्या संदर्भांची गरज असते. उदाहरणार्थ: पानिपतच्या युद्धाचा अभ्यास करताना मराठ्यांची पत्रे,

अफगाण बाजूचे संदर्भ आणि ब्रिटिशांच्या नोंदी एकाच वेळी पडताळून पाहाव्या लागतात. डिजिटल लायब्ररीमुळे हे सर्व संदर्भ एकाच स्क्रीनवर आणून त्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे शक्य झाले आहे, ज्यामुळे इतिहासाची मांडणी अधिक वस्तुनिष्ठ होते.

अनेकदा ऐतिहासिक संदर्भांचा चुकीचा अर्थ लावला जातो किंवा माहितीमध्ये फेरफार केला जातो. मूळ दस्तऐवजाची डिजिटल 'हाय-रिझोल्यूशन' प्रत सार्वजनिकरीत्या उपलब्ध असल्यास, कोणताही चुकीचा दावा फेटाळणे सोपे जाते. हे दस्तऐवज 'डिजिटल पुरावा' म्हणून कायमस्वरूपी जनमानसात राहतात.

इतिहासाला डिजिटायझेशनचे सर्वात मोठे योगदान हे आहे की, त्याने इतिहासाला केवळ 'भूतकाळातील आठवण' न ठेवता 'वर्तमानातील जिवंत संदर्भ' बनवले आहे. यामुळे येणाऱ्या पिढ्यांना आपला वारसा शोधण्यासाठी धुळीने माखलेली कपाटे चाळावी लागणार नाहीत, तर ते तंत्रज्ञानाच्या जोरावर आपल्या मुळांशी जोडून राहू शकतील.

निष्कर्ष :

१. ऐतिहासिक दस्तऐवजांच्या डिजिटायझेशनमुळे मूळ आणि दुर्मिळ कागदपत्रांना वारंवार होणाऱ्या मानवी स्पर्शापासून मुक्ती मिळते. एकदा का उच्च दर्जाचे स्कॅनिंग झाले की, संशोधकांसाठी 'डिजिटल रेप्लिका' उपलब्ध होते, ज्यामुळे मूळ प्रत सुरक्षित कपाटात दीर्घकाळ टिकवून ठेवता येते. हे प्रतिबंधात्मक संवर्धन इतिहासाला भौतिक विनाशापासून वाचवते.

२. पूर्वी इतिहास हा ठराविक दप्तरखान्यात किंवा ग्रंथालयांच्या भिंतींआड बंदिस्त होता. डिजिटायझेशनमुळे भौगोलिक मर्यादा संपुष्टात आल्या आहेत. कोल्हापूरच्या महसूल प्रशासनाचे दस्तऐवज असोत वा पेशवेकालीन मोडी पत्रे, ती आज जगाच्या पाठीवर कोणत्याही संशोधकाला एका क्लिकवर उपलब्ध होऊ शकतात. हे माहितीचे विकेंद्रीकरण खऱ्या अर्थाने संशोधनाला 'ग्लोबल' बनवत आहे.

३. केवळ फोटो काढणे म्हणजे डिजिटायझेशन नव्हे, तर त्यासोबत जोडलेला 'मेटाडेटा' आणि 'इंडेक्सिंग' यामुळे माहिती शोधणे अत्यंत वेगवान झाले आहे. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (AI) आणि 'मशीन लर्निंग'च्या मदतीने भविष्यात मोडी किंवा फारसी सारख्या क्लिष्ट लिपींचे स्वयंचलित वाचन करणे शक्य होणार आहे, ज्यामुळे इतिहास लेखनातील मानवी चुका कमी होऊन वस्तुनिष्ठता वाढेल.

४. इतिहास साक्ष आहे की युद्धे, आग आणि पूर यांमुळे अनेक जागतिक ग्रंथालये नष्ट झाली. डिजिटायझेशनमध्ये माहितीचा 'बॅकअप' विविध ठिकाणी साठवला जात असल्याने, मूळ प्रत नष्ट झाली तरी त्यातील ज्ञान आणि माहिती भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित राहते. हा एक प्रकारचा 'डिजिटल विमा' आहे.

५. इतिहास हा कोणत्याही समाजाचा जिवंत आरसा असतो. जर आपण आज या दस्तऐवजांचे संवर्धन केले नाही, तर भविष्यातील पिढीकडे केवळ दंतकथा उरतील, ठोस ऐतिहासिक पुरावे नाही. त्यामुळे डिजिटायझेशन हे केवळ तांत्रिक कार्य नसून आपल्या पूर्वजांप्रती असलेली कृतज्ञता आणि संस्कृतीप्रती असलेली आपली नैतिक जबाबदारी आहे.

संदर्भ सूची:

1. खोबरेकर, वि. ग., (१९८८), 'महाराष्ट्र दप्तरखाना: अभिलेखागार व्यवस्थापन', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.पृ.११५ ११७ .

2. साने, सं. का., (१९९२), 'ऐतिहासिक कागदपत्रे आणि त्यांचे संवर्धन', इतिहास संशोधन मंडळ प्रकाशन, पुणे.पृ १४७ ४८
3. खोबरेकर, वि. ग., (१९८८), 'महाराष्ट्र दप्तरखाना: अभिलेखागार व्यवस्थापन', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.पृ.१२०
4. Ibid ११५ ११६ .
5. साने, सं. का., (१९९२), 'ऐतिहासिक कागदपत्रे आणि त्यांचे संवर्धन', इतिहास संशोधन मंडळ प्रकाशन, पुणे.पृ ४५ .
6. खोबरेकर, वि. ग., (१९८८), 'महाराष्ट्र दप्तरखाना: अभिलेखागार व्यवस्थापन', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.पृ.११८ .
7. साने, सं. का., (१९९२), 'ऐतिहासिक कागदपत्रे आणि त्यांचे संवर्धन', इतिहास संशोधन मंडळ प्रकाशन, पुणे.पृ ४९
8. खोबरेकर, वि. ग., (१९८८), 'महाराष्ट्र दप्तरखाना: अभिलेखागार व्यवस्थापन', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.पृ.१२२
9. Ibid ११८ ११९ .
10. साने, सं. का., (१९९२), 'ऐतिहासिक कागदपत्रे आणि त्यांचे संवर्धन', इतिहास संशोधन मंडळ प्रकाशन, पुणे.पृ ५२ .
11. खोबरेकर, वि. ग., (१९८८), 'महाराष्ट्र दप्तरखाना: अभिलेखागार व्यवस्थापन', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.पृ.१२१ .
12. कुलकर्णी, अ. रा., (२००५) , 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने: एक परिचय', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
13. हिंगणे, वि. ग., (२०१०), 'अभिलेख शास्त्र आणि संवर्धन', विद्या प्रकाशन, नागपूर.
14. नॅशनल अर्काइव्ह्ज ऑफ इंडिया, (२०२१), अधिकृत मार्गदर्शक तत्त्वे: रेकॉर्ड मॅनेजमेंट आणि डिजिटायझेशननॅशनल अर्काइव्ह्ज ऑफ इंडिया (NAI), नवी दिल्ली.
15. युनेस्को (UNESCO), (२००३) , 'डिजिटल प्रिजर्व्हेशन ऑफ कल्चरल हेरिटेज: चार्टर ऑन द प्रिजर्व्हेशन ऑफ डिजिटल हेरिटेज', युनेस्को मुख्यालय, पॅरिस.
16. महाराष्ट्र राज्य अभिलेखागार, (२०१५), 'संचालनालय कार्यपद्धती पुस्तिका', महाराष्ट्र शासन, मुंबई.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

ऐतिहासिक कागदपत्रांचे डिजिटायझेशन

प्रा. निशांत राजेंद्रकुमार गोंधळी

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे

Corresponding Author - प्रा. निशांत राजेंद्रकुमार गोंधळी

DOI - 10.5281/zenodo.19692286

सारांश:

ऐतिहासिक कागदपत्रे ही राष्ट्राच्या सांस्कृतिक स्मृतीची मूळ साधने आहेत. इतिहास संशोधनासाठी कागदपत्रे, हस्तलिखिते, अभिलेख, पत्रव्यवहार, नकाशे, ताम्रपट व वृत्तपत्रे ही प्राथमिक साधने मानली जातात. शासननिर्मित अभिलेख, दप्तरातील पत्रव्यवहार, सनदपत्रे, मोडी लिपीतील दस्तऐवज आणि दुर्मिळ ग्रंथ यांच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहासाचे स्वरूप स्पष्ट होते. परंतु कालांतराने हवामानातील बदल, कीटकांचा प्रादुर्भाव, अयोग्य साठवण व मानवी हस्तक्षेपामुळे या कागदपत्रांची हानी होते. या पार्श्वभूमीवर डिजिटायजेशन ही प्रक्रिया दस्तऐवजांचे डिजिटल रूपांतरण करून त्यांचे दीर्घकालीन संरक्षण व सुलभ उपलब्धता सुनिश्चित करते. या संशोधनात ऐतिहासिक कागदपत्रांच्या डिजिटायजेशनची संकल्पना, तांत्रिक प्रक्रिया, आंतरराष्ट्रीय मानके, महाराष्ट्र व भारतातील उपक्रम, तसेच आव्हाने व उपाययोजना यांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. डिजिटायजेशन ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून सांस्कृतिक वारशाचे राष्ट्रीय संरक्षण आहे हे या संशोधनातून निष्पन्न होते.

बीजशब्द: ऐतिहासिक कागदपत्रे, डिजिटायजेशन, डिजिटल संवर्धन, अभिलेखागार, मोडी लिपी, OCR.

प्रस्तावना:

इतिहास हा कागदपत्रांवर आधारलेला शास्त्रीय अभ्यास आहे. ई. एच. कार यांच्या मते, इतिहास म्हणजे भूतकाळातील घटनांचे दस्तऐवजाधारित विश्लेषण होय.[1] इतिहास संशोधनासाठी प्राथमिक स्रोतांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अ. रा. कुलकर्णी यांच्या मते इतिहासाची विश्वासार्हता ही मूळ दस्तऐवजांवर अवलंबून असते.[2] महाराष्ट्रातील पेशवाईकालीन दप्तर, मोडी लिपीतील महसूल नोंदी आणि दुर्मिळ ग्रंथ हे इतिहासाचे मौल्यवान स्रोत आहेत.[3] परंतु भौतिक स्वरूपातील या दस्तऐवजांना झीज, ओलावा, कीटक आणि शाई फिकट होण्याची समस्या भेडसावते. त्यामुळे कागदपत्रांचे जतन व संवर्धन ही इतिहासशास्त्राची मूलभूत गरज आहे.[4] डिजिटायझेशन म्हणजे कागदी स्वरूपातील दस्तऐवजांचे संगणकीय प्रतिमांमध्ये किंवा डेटा स्वरूपात रूपांतर करून त्यांचे दीर्घकालीन जतन करणे होय.[5]

ही प्रक्रिया केवळ स्कॅनिंगपुरती मर्यादित नसून मेटाडेटा निर्मिती, वर्गीकरण, अनुक्रमण, संग्रहण व सार्वजनिक प्रवेश या सर्वांचा समावेश करते. आज माहिती-तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या युगात डिजिटायझेशन ही ऐतिहासिक कागदपत्रांच्या संरक्षणासाठी प्रभावी व शाश्वत उपाययोजना ठरली आहे.

ऐतिहासिक कागदपत्रांचे स्वरूप व महत्त्व:

ऐतिहासिक कागदपत्रे विविध प्रकारची असतात –

1. राजकीय व प्रशासकीय अभिलेख – महसूल, आज्ञापत्रे, दरबार नोंदी.
2. हस्तलिखिते व धार्मिक ग्रंथ – पाली, संस्कृत, फारसी, मराठी बखरी.
3. पत्रव्यवहार – राजकीय, सामाजिक, आर्थिक संदर्भातील पत्रे.
4. नकाशे व ताम्रपट – भौगोलिक व प्रशासनिक माहिती.
5. वृत्तपत्रे व नियतकालिके – सामाजिक चळवळींचे दस्तऐवजीकरण.

उदाहरणार्थ, National Archives of India येथे मुघल, ब्रिटिश व स्वातंत्र्योत्तर काळातील लाखो अभिलेख जतन केलेले आहेत.[6] तसेच Asiatic Society of Mumbai येथे दुर्मीळ हस्तलिखितांचा मोठा संग्रह आहे.[7] या कागदपत्रांच्या आधारेच इतिहासलेखन, संशोधन व सांस्कृतिक वारशाचे पुनरावलोकन शक्य होते.

डिजिटायझेशनची तत्त्वमीमांसा:

डिजिटायझेशनचे तत्त्वज्ञान तीन प्रमुख आधारांवर उभे आहे –

1. संवर्धन (Preservation)
2. सुलभता (Accessibility)
3. शाश्वतता (Sustainability)

Paul Conway यांच्या मते डिजिटल संरक्षण ही केवळ तांत्रिक नव्हे तर सांस्कृतिक जबाबदारी आहे.[8] डिजिटल संरक्षण विषयक संशोधन २०व्या शतकाच्या उत्तरार्धात वाढले. Borghoff यांनी डिजिटल दस्तऐवजांच्या दीर्घकालीन संरक्षणासाठी तांत्रिक मानके सुचविली आहेत.[9] डिजिटल प्रत तयार केल्याने मूळ दस्तऐवजांचा वापर कमी होतो व त्यांचे भौतिक आयुष्य वाढते. तसेच ऑनलाईन प्लॅटफॉर्ममुळे संशोधकांना भौगोलिक अडथळ्यांशिवाय माहिती उपलब्ध होते.

डिजिटायझेशनची प्रक्रिया:

१) निवड व मूल्यांकन - ऐतिहासिक, कायदेशीर व संशोधनमूल्य लक्षात घेऊन दस्तऐवजांची निवड केली जाते.

२) भौतिक संवर्धन - स्कॅनिंगपूर्वी कागदपत्रांची स्वच्छता, दुरुस्ती व डी-ॲसिडिफिकेशन केली जाते.[10]

३) स्कॅनिंग - उच्च-रिझोल्यूशन (300–600 DPI) स्कॅनिंगद्वारे प्रतिमा तयार केल्या जातात.

४) मेटाडेटा निर्मिती - Dublin Core सारख्या मानकांनुसार दस्तऐवजाची माहिती नोंदविली जाते.[11]

५) संचयन व बॅकअप - डिजिटल फाइल्स सुरक्षित सर्व्हर, क्लाउड व हार्ड डिस्कवर बॅकअपसह संग्रहित केल्या जातात.

भारतातील डिजिटायझेशन उपक्रम:

भारतामध्ये विविध संस्था ऐतिहासिक कागदपत्रांचे डिजिटायझेशन करीत आहेत –

• Indira Gandhi National Centre for the Arts (IGNCA)

• National Digital Library of India

• Maharashtra State Archives

IGNCA ने हजारो हस्तलिखितांचे डिजिटल जतन केले आहे.[12] National Digital Library of India द्वारे विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश उपलब्ध आहे.[13] महाराष्ट्र

शासनाच्या पुराभिलेख विभागाच्या अहवालात राज्यातील संवर्धन उपक्रमांचे सविस्तर वर्णन आढळते.[14]

महाराष्ट्रातील उपक्रम:

महाराष्ट्र राज्य पुराभिलेख विभागाने ऐतिहासिक दस्तऐवजांचे वर्गीकरण व जतन केले आहे.[15] राज्य मराठी विकास संस्थेने मराठी दुर्मिळ ग्रंथांचे संगणकीकरण केले आहे.[16]

कायदेशीर व नैतिक पैलू:

डिजिटायझेशन करताना कॉपीराइट कायदे, गोपनीयता, व बौद्धिक संपदा हक्क यांचा विचार करणे आवश्यक आहे. भारतीय कॉपीराइट कायदा १९५७ नुसार काही दस्तऐवज सार्वजनिक क्षेत्रात (Public Domain) येतात, तर काहींवर मर्यादा लागू असतात.[17]

डिजिटायझेशनचे फायदे:

Brian Lavoie यांच्या OAIS मॉडेलनुसार डिजिटल संरक्षण दीर्घकालीन स्थैर्य सुनिश्चित करते.[18]

१) **माहितीचे दीर्घकालीन संवर्धन व जतन:** भौतिक कागदपत्रे काळानुसार झिजतात, नष्ट होतात किंवा हवामानातील बदलांमुळे खराब होतात. डिजिटायझेशनमुळे या दस्तऐवजांचे स्कॅनिंग करून त्यांचे सुरक्षित डिजिटल संग्रह (Digital Repository) तयार करता येतात. विशेषतः ऐतिहासिक कागदपत्रे, दुर्मिळ ग्रंथ आणि हस्तलिखिते डिजिटल स्वरूपात जतन केल्यास सांस्कृतिक वारसा दीर्घकाळ सुरक्षित राहतो. यासाठी UNESCO ने 'डिजिटल हेरिटेज' संवर्धनासाठी मार्गदर्शक तत्त्वे सुचवली आहेत.[19]

२) **माहितीचा जलद व सुलभ प्रवेश:** डिजिटल स्वरूपातील माहिती इंटरनेट किंवा संस्थात्मक सर्व्हरद्वारे त्वरित उपलब्ध होते. संशोधक, विद्यार्थी आणि प्रशासकीय अधिकारी एका क्लिकवर आवश्यक माहिती मिळवू शकतात. उदाहरणार्थ, National Digital Library of India या उपक्रमामुळे लाखो ई-पुस्तके व संशोधन साहित्य देशभरातील विद्यार्थ्यांना उपलब्ध झाले आहे.[20]

३) **प्रशासकीय पारदर्शकता व उत्तरदायित्व:** डिजिटायझेशनमुळे ई-गव्हर्नन्स सशक्त झाले आहे. ऑनलाइन अर्ज, डिजिटल नोंदी, ई-टेंडरिंग यांसारख्या सुविधा पारदर्शकतेला चालना देतात. भारतामधील Digital India या मोहिमेमुळे शासनसेवा डिजिटल माध्यमातून उपलब्ध झाल्या आहेत, ज्यामुळे भ्रष्टाचारात घट आणि कार्यक्षमता वाढ झाली आहे.[21]

४) **खर्चात बचत व संसाधनांचे योग्य व्यवस्थापन:** डिजिटायझेशनच्या प्रारंभी खर्च असला तरी दीर्घकालीन दृष्टीने कागद, छपाई, साठवणूक व वहन खर्चात मोठी बचत होते. डिजिटल फाईल्समुळे कार्यालयीन जागेचा वापर कमी होतो. संशोधनानुसार, डिजिटल दस्तऐवज व्यवस्थापन प्रणालीमुळे प्रशासकीय खर्चात ३०–४०% घट होते.[22]

५) **माहितीचा जलद शोध व पुनर्प्राप्ती:** डिजिटल डेटाबेसमध्ये कीवर्ड, मेटाडेटा व टॅगिंग प्रणालीद्वारे माहिती काही सेकंदांत शोधता येते. पारंपरिक फाईल पद्धतीत हे कार्य वेळखाऊ असते. विशेषतः बिग डेटा (Big Data) विश्लेषणामुळे मोठ्या प्रमाणातील माहितीवर आधारित संशोधन शक्य झाले आहे.[23]

६) **पर्यावरण संरक्षण:** डिजिटायझेशनमुळे कागदाचा वापर कमी होतो, ज्यामुळे वृक्षतोडीवर नियंत्रण येते. ई-फाईलिंग, ई-मेल, ई-ऑफिस प्रणालीमुळे

पर्यावरणपूरक प्रशासन शक्य झाले आहे. ग्रीन ऑफिस संकल्पना डिजिटल तंत्रज्ञानामुळे अधिक प्रभावी ठरते.[24]

७) **आपत्ती व्यवस्थापन व डेटा सुरक्षा:** पूर, भूकंप, आग यांसारख्या आपत्तींमध्ये भौतिक कागदपत्रे नष्ट होऊ शकतात; परंतु डिजिटल बॅकअपमुळे माहिती सुरक्षित राहते. क्लाऊड कम्प्युटिंग आणि एन्क्रिप्शनमुळे संवेदनशील माहितीचे संरक्षण अधिक बळकट झाले आहे.[25]

८) **शिक्षण क्षेत्रातील परिवर्तन:** ई-लर्निंग, ऑनलाइन कोर्सेस आणि व्हर्च्युअल क्लासरूममुळे शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध झाले आहे. कोविड-१९ काळात डिजिटल शिक्षण अत्यंत उपयुक्त ठरले. SWAYAM या राष्ट्रीय प्लॅटफॉर्मद्वारे विविध विद्यापीठांचे अभ्यासक्रम ऑनलाइन उपलब्ध आहेत.[26]

९) **जागतिक सहकार्य व ज्ञानविनिमय:** डिजिटल माध्यमामुळे विविध देशांतील संशोधक एकत्रित प्रकल्प राबवू शकतात. ई-जर्नल्स, ओपन ॲक्सेस रिपॉझिटरीज यामुळे ज्ञानाचे जागतिक आदानप्रदान सुलभ झाले आहे.[27]

१०) **कार्यक्षमता व उत्पादकता वाढ:** डिजिटल साधनांमुळे कामाचा वेग वाढतो, त्रुटी कमी होतात आणि निर्णयप्रक्रिया अधिक अचूक होते. ऑटोमेशन व कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे उद्योग व सेवाक्षेत्रात उत्पादकता वाढली आहे.[28]

ऐतिहासिक कागदपत्रांचे डिजिटायझेशन करताना येणारी आव्हाने:

१. भौतिक जतनाशी संबंधित आव्हाने: अनेक ऐतिहासिक कागदपत्रे कालौघात जीर्ण, नाजूक आणि भुसभुशीत झालेली असतात. अशा कागदपत्रांचे स्कॅनिंग करताना त्यांची हानी होण्याची शक्यता असते. कागदातील आम्लता, आर्द्रता, बुरशी, कीटकदोष इत्यादींमुळे दस्तऐवजांची गुणवत्ता आधीच खालावलेली असते.[29] तसेच काही कागदपत्रे ताडपत्री, भुर्जपत्र, कापडी किंवा हस्तलिखित स्वरूपात असल्याने त्यांना विशेष जतन प्रक्रिया आवश्यक असते.[30]

२. तांत्रिक आव्हाने: उच्च प्रतीचे स्कॅनर, योग्य रिझोल्यूशन, रंग संतुलन आणि प्रकाशयोजना यांचा अभाव असल्यास डिजिटायझेशनची गुणवत्ता कमी होते.[31] जुन्या मोडी, फारसी, ब्राह्मी किंवा इतर लिपींचे OCR (Optical Character Recognition) अचूकपणे रूपांतर करणे कठीण जाते.[32] दीर्घकालीन डिजिटल संचयनासाठी सुरक्षित सर्व्हर, बॅकअप प्रणाली आणि फाइल फॉरमॅटची निवड ही देखील मोठी समस्या आहे.[33]

३. भाषिक व लिपीगत अडचणी: इतिहासकालीन कागदपत्रे मोडी, फारसी, उर्दू, संस्कृत, इंग्रजी अशा विविध भाषांमध्ये उपलब्ध असतात. मोडी लिपीचे वाचन व लिप्यंतर करण्यासाठी तज्ञांची आवश्यकता असते.[34]
लिप्यंतर प्रक्रियेत शब्दरचना, व्याकरण आणि आशय यांचे अचूक जतन करणे आव्हानात्मक ठरते.[35]

४. कायदेशीर व नैतिक प्रश्न: काही दस्तऐवजांवर प्रताधिकार (Copyright) लागू असतो. त्यांचे डिजिटायझेशन व सार्वजनिक प्रसारण करताना कायदेशीर परवानग्या आवश्यक असतात.[36] खाजगी अभिलेख, संस्थात्मक दस्तऐवज किंवा वैयक्तिक पत्रव्यवहार यांचे सार्वजनिक प्रदर्शन नैतिकदृष्ट्या संवेदनशील असू शकते.[37]

५. आर्थिक व मनुष्यबळाशी संबंधित आव्हाने: उच्च दर्जाचे स्कॅनर, सॉफ्टवेअर, संचयन प्रणाली आणि तज्ञ कर्मचारी यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद आवश्यक असते.[38] ग्रामीण किंवा लहान संस्थांकडे तांत्रिक कौशल्य असलेले मनुष्यबळ उपलब्ध नसते.[39]

६. मानकीकरण व मेटाडेटा समस्या: डिजिटल दस्तऐवजांना योग्य मेटाडेटा (उदा. लेखक, कालखंड, स्थान, विषय) न दिल्यास भविष्यात शोध व संदर्भासाठी अडचणी निर्माण होतात.[40] आंतरराष्ट्रीय मानके (उदा. Dublin Core) स्वीकारली नाहीत तर डेटा परस्पर-सुसंगत राहत नाही.[41]

७. दीर्घकालीन डिजिटल जतन (Digital Preservation): डिजिटल माध्यमे कालांतराने कालबाह्य होतात. सॉफ्टवेअर अपडेट, फाइल फॉरमॅट बदल आणि हार्डवेअर निकामी होणे ही दीर्घकालीन समस्या आहे.[42] 'Digital Obsolescence' टाळण्यासाठी नियमित स्थलांतर (Migration) व बॅकअप आवश्यक असतो.[43]

समुदाय-सहभागी डिजिटायझेशन मॉडेल:

ऐतिहासिक कागदपत्रांचे डिजिटायझेशन ही प्रक्रिया परंपरेने सरकारी अभिलेखागार, विद्यापीठे किंवा संशोधन संस्था यांच्या माध्यमातून राबविली जात होती; तथापि, नव्या काळात समुदाय-सहभागी डिजिटायझेशन मॉडेल ही संकल्पना पुढे येत आहे.[44] या मॉडेलनुसार स्थानिक नागरिक, इतिहास अभ्यासक, स्वयंसेवी संस्था आणि शैक्षणिक संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांतून दस्तऐवजांचे संकलन, स्कॅनिंग, मेटाडेटा निर्मिती आणि जतन केले जाते. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात अनेक ऐतिहासिक कागदपत्रे खाजगी वाड्यांमध्ये, देवस्थानांमध्ये किंवा कुटुंबीयांकडे सुरक्षित असतात.[45] अशा दस्तऐवजांपर्यंत सरकारी यंत्रणेला सहज प्रवेश मिळत नाही. या पार्श्वभूमीवर समुदायाच्या विश्वासावर आधारित डिजिटायझेशन प्रकल्प अधिक प्रभावी ठरतात.

या पद्धतीमुळे तीन महत्त्वाचे परिणाम दिसून येतात —

(१) इतिहासाचे लोकशाहीकरण: इतिहास संशोधन काही मोजक्या तज्ज्ञांपुरते मर्यादित न राहता सर्वसामान्य लोकांचा सहभाग वाढतो.[46]

(२) दुर्मिळ दस्तऐवजांचा शोध: घराघरांत असलेले अप्रकाशित कागदपत्र प्रकाशात येतात.[47]

(३) सांस्कृतिक ओळखीचे जतन: स्थानिक पातळीवरील परंपरा व इतिहास डिजिटल माध्यमातून जागतिक स्तरावर पोहोचतो.[48]

निष्कर्ष:

ऐतिहासिक कागदपत्रांचे डिजिटायजेशन हे सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणासाठी अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र व राष्ट्रीय स्तरावर सकारात्मक पावले उचलली गेली आहेत. भविष्यात तांत्रिक सुधारणा, आर्थिक पाठबळ आणि प्रशिक्षण यांवर भर देणे आवश्यक आहे. डिजिटायझेशन ही इतिहाससंवर्धनाची आधुनिक दिशा असून भविष्यातील संशोधनासाठी ती अपरिहार्य ठरणार आहे.

ऐतिहासिक कागदपत्रांचे डिजिटायजेशन ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून ती सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक दायित्वाची व्यापक चळवळ आहे. या संशोधनातून असे स्पष्ट होते की, पारंपरिक स्वरूपातील हस्तलिखिते, अभिलेख, राजपत्रे, जमीन नोंदी, नकाशे, वाङ्मयीन दस्तऐवज इत्यादींचे डिजिटल रूपांतर केल्यामुळे त्यांचे दीर्घकालीन संरक्षण आणि व्यापक प्रसार शक्य झाला आहे. डिजिटायजेशन प्रक्रियेमुळे कागदपत्रांचे भौतिक झीज, हवामानातील बदल, कीड, आग किंवा नैसर्गिक आपत्ती यांपासून संरक्षण मिळते. तसेच डिजिटल स्वरूपात साठविलेली माहिती एका ठिकाणी मर्यादित न राहता जागतिक स्तरावर उपलब्ध होते. परिणामी संशोधक, विद्यार्थी, इतिहास अभ्यासक आणि सामान्य वाचक

यांच्यासाठी माहितीची दारे खुली झाली आहेत. यासंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर UNESCO ने सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी डिजिटायजेशनला प्रोत्साहन दिले आहे. त्याचप्रमाणे भारतात National Archives of India आणि Indira Gandhi National Centre for the Arts यांसारख्या संस्थांनी ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटल जतन करण्यासाठी व्यापक उपक्रम हाती घेतले आहेत. या प्रयत्नांमुळे स्थानिक इतिहास आणि सांस्कृतिक वारसा राष्ट्रीय व जागतिक पातळीवर पोहोचू लागला आहे.

तथापि, संशोधनातून असेही निदर्शनास आले की डिजिटायजेशन प्रक्रियेत अनेक आव्हाने आहेत. उच्च प्रतीचे स्कॅनिंग, योग्य मेटाडेटा निर्मिती, दीर्घकालीन डिजिटल साठवण, कॉपीराइट व गोपनीयता यांसारख्या मुद्द्यांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. विशेषतः जुन्या लिपी, मोडी लिपी किंवा हस्तलिखित दस्तऐवजांचे अचूक OCR करणे हे तांत्रिकदृष्ट्या अजूनही आव्हानात्मक आहे. त्यामुळे तांत्रिक कौशल्य, आर्थिक गुंतवणूक आणि प्रशिक्षित मनुष्यबळ यांची उपलब्धता ही अत्यावश्यक ठरते. ऐतिहासिक कागदपत्रांचे डिजिटायजेशन ही काळाची गरज असून ती एक सातत्यपूर्ण व बहुआयामी प्रक्रिया आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि क्लाऊड तंत्रज्ञानाच्या साहाय्याने डिजिटायजेशन अधिक अचूक, जलद आणि सुरक्षित होईल. परंतु त्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, अभिलेखागार, तंत्रज्ञान तज्ञ आणि समाज यांच्यात समन्वय व सहकार्य आवश्यक आहे. अंततः, डिजिटायजेशन ही केवळ माहिती जतन करण्याची प्रक्रिया नसून ती आपल्या ऐतिहासिक अस्मितेचे संवर्धन, सांस्कृतिक सातत्याची जपणूक आणि ज्ञानपरंपरेचा जागतिक प्रसार करण्याचे प्रभावी साधन आहे. त्यामुळे या प्रक्रियेला संशोधनात्मक, धोरणात्मक आणि तांत्रिक पाठबळ देणे ही काळाची अपरिहार्यता आहे.

संदर्भ सूची:

1. Carr, E. H., What is History?, London: Penguin, 1961, p. 9.
2. अ. रा. कुलकर्णी, इतिहास संशोधन पद्धती (पुणे: डायमंड पब्लिकेशन्स, 2010), पृ. 45–48.
3. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य पुराभिलेख विभागाचा इतिहास (मुंबई: शासन प्रकाशन, 2008), पृ. 78–82.
4. Uwe M. Borghoff, Long-Term Preservation of Digital Documents (Berlin: Springer, 2005), pp. 15–20.
5. Conway, Paul, "Preservation in the Digital World," 1996, p. 5.
6. National Archives of India, Annual Report, 2018, p. 12.
7. Asiatic Society of Mumbai, Catalogue of Manuscripts, 2015, p. 3.
8. Conway, Paul, ibid., p. 10.
9. Uwe M. Borghoff, Long-Term Preservation of Digital Documents (Berlin: Springer, 2005), pp. 15–20.
10. Harvey, Ross, Preserving Digital Materials, 2005, p. 45.
11. Weibel, Stuart, "The Dublin Core Metadata Initiative," 2000, p. 4.
12. IGNCA, Manuscript Digitization Project Report, 2015, p. 18.
13. National Digital Library of India, Annual Statistics Report, 2020, p. 7.

14. महाराष्ट्र शासन, अभिलेख संवर्धन अहवाल (मुंबई, 2015), पृ. 33–40.
15. महाराष्ट्र शासन, पृ. 90–95.
16. राज्य मराठी विकास संस्था, पृ. 25–30.
17. Government of India, Copyright Act, 1957 (Amended 2012).
18. Lavoie, Brian, "The Open Archival Information System (OAIS) Model," 2014, p. 10.
19. युनेस्को, डिजिटल वारसा संवर्धन जाहीरनामा, २००३, पृ. ४.
20. भारत सरकार, नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया अहवाल, २०१६, पृ. ८.
21. इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, डिजिटल इंडिया कार्यक्रम अहवाल, २०१५, पृ. १५.
22. लॉडन, केनेथ सी. व लॉडन, जेन पी., मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम्स, पिअर्सन प्रकाशन, २०१८, पृ. ४५.
23. मेयर-शॉनबर्गर, व्हिक्टर व कुकियर, केनेथ, बिग डेटा, २०१३, पृ. ७८.
24. युएनईपी, ग्रीन इकॉनॉमी रिपोर्ट, २०११, पृ. ५२.
25. रिटिंगहाऊस, जॉन व रॅन्सम, जेम्स, क्लाऊड कम्प्युटिंग इम्प्लिमेंटेशन, २०१७, पृ. १०१.
26. स्वयं (SWAYAM) अधिकृत संकेतस्थळ अहवाल, २०१९, पृ. ६.
27. युनेस्को, ओपन ॲक्सेस मार्गदर्शक तत्त्वे, २०१५, पृ. १२.
28. ब्रिन्योल्फसन, एरिक व मॅकाफी, अँड्रयू, द सेकंड मशीन एज, २०१४, पृ. ९२.
29. भारत सरकार, राष्ट्रीय अभिलेखागार, अभिलेख जतन मार्गदर्शक तत्त्वे (नवी दिल्ली : राष्ट्रीय अभिलेखागार, २०१५), पृ. १२.
30. एस. पी. सेन, अभिलेख संवर्धन तंत्रज्ञान (कोलकाता : कोलकाता विद्यापीठ प्रकाशन, २००८), पृ. ४५.
31. ॲन आर. केनी, ग्रंथालये व अभिलेखांसाठी डिजिटल इमेजिंग (कॉर्नेल : कॉर्नेल विद्यापीठ ग्रंथालय, २००३), पृ. २७.
32. बी. एस. राजपुरोहित, "भारतीय लिपींसाठी ओसीआर तंत्रज्ञानातील अडचणी," ग्रंथालय विज्ञान संशोधन पत्रिका, खंड ५२ (२०१२) : पृ. ७८.
33. पॉल कॉनवे, डिजिटल जगातील जतन प्रक्रिया (वॉशिंग्टन : सीएलआयआर अहवाल, १९९६), पृ. ३४.
34. अ. रा. कुलकर्णी, मोडी लिपी आणि ऐतिहासिक कागदपत्रे (पुणे : डायमंड पब्लिकेशन्स, १९९९), पृ. १८.
35. वि. का. चव्हाण, "मध्ययुगीन हस्तलिखितांच्या लिप्यंतरातील समस्या," इंडियन हिस्टॉरिकल रिव्ह्यू, खंड ३९ (२०१३) : पृ. १०२.
36. भारत सरकार, भारतीय प्रताधिकार अधिनियम १९५७ (सुधारित २०१२), कलम ५२.
37. ॲन गिलिलँड, २१व्या शतकातील अभिलेख संकल्पना (शिकागो : सोसायटी ऑफ अमेरिकन आर्काइविस्ट्स, २०१४), पृ. ५६.
38. युनेस्को, मेमरी ऑफ द वर्ल्ड : डिजिटायझेशन मार्गदर्शक तत्त्वे (पॅरिस : युनेस्को, २००२), पृ. २१.
39. आर. के. शर्मा, "ग्रामीण अभिलेखागारांतील डिजिटायझेशन प्रक्रिया," डेसिडॉक जर्नल ऑफ

लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, खंड ३३ (२०१३) : पृ. २१०.

40. मर्था बाका (संपा.), मेटाडेटाचा परिचय (लॉस एंजेलिस : गेट्टी रिसर्च इन्स्टिट्यूट, २००८), पृ. ९.
41. डब्लिन कोर मेटाडेटा इनिशिएटिव्ह (DCMI), मेटाडेटा मानके : एक आढावा (२०१२).
42. रॉस हार्वे, डिजिटल क्युरेशन (न्यूयॉर्क : नील-शुमन प्रकाशन, २०१०), पृ. ६७.
43. ब्रायन लाव्होई, "ओपन आर्काइवल इन्फॉर्मेशन सिस्टीम (OAIS) मॉडेल," ओसीएलसी अहवाल (२००४) : पृ. १४.
44. पाटील, अर्चना. डिजिटल ह्यूमॅनिटीज : संकल्पना व उपयोजन, मुंबई: लोकवाङ्मय गृह, २०२०, पृ. ९१.
45. भोसले, शंकर. इतिहास संशोधन पद्धती, पुणे: डायमंड पब्लिकेशन्स, २०१८, पृ. ५८.
46. देशमुख, वी. बी., लोकइतिहासाची संकल्पना, पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन, २०१६, पृ. ७३.
47. शिंदे, प्रवीण. "खाजगी संग्रहातील ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन", संशोधन वार्ता, २०१९, पृ. २२.
48. पवार, मंगला. सांस्कृतिक वारसा आणि आधुनिक तंत्रज्ञान, मुंबई: ग्रंथाली, २०१५, पृ. १०२.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

इतिहासलेखनाच्या पद्धतीवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा परिणाम : एक समीक्षात्मक अभ्यास

प्रा. सुरज निळकंठ कांबळे

सहाय्यक प्राध्यापक

श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरूड

***Corresponding Author* - प्रा. सुरज निळकंठ कांबळे**

DOI - 10.5281/zenodo.19692308

गोषवारा :

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence-AI) ही आधुनिक ज्ञानयुगातील सर्वात परिवर्तनकारी तंत्रज्ञानांपैकी एक मानली जाते. शिक्षण, विज्ञान, वैद्यक, अर्थव्यवस्था आणि समाजशास्त्र यांसह इतिहासशास्त्रावरही तिचा दूरगामी प्रभाव पडत आहे. इतिहासलेखन ही पारंपरिकरित्या स्रोतसमीक्षा, कालानुक्रमिक विश्लेषण, भाषिक अर्थनिर्णय आणि सामाजिक संदर्भ यांच्या आधारे विकसित झालेली एक शास्त्रीय प्रक्रिया आहे. तथापि, डिजिटल क्रांतीनंतर कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधनांच्या वापरामुळे इतिहास संशोधनाची पद्धत, स्रोत विश्लेषणाची गती, निष्कर्षनिर्मितीची रचना आणि ज्ञानप्रसाराचे माध्यम यामध्ये मूलभूत बदल झाले आहेत. प्रस्तुत संशोधनात इतिहासलेखनाच्या पारंपरिक पद्धतींचे स्वरूप, डिजिटल इतिहासाची संकल्पना, कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांचे प्रकार, त्यांचे उपयोग, परिणाम, नैतिक आव्हाने यांचा अभ्यास करण्यात आला आहे. गुणात्मक संशोधन पद्धतीद्वारे विविध शैक्षणिक लेख, ग्रंथ, डिजिटल प्रकल्प आणि तांत्रिक अहवालांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. निष्कर्षतः असे आढळते की कृत्रिम बुद्धिमत्ता इतिहासकाराची जागा घेत नाही उलट इतिहासलेखन अधिक अचूक, व्यापक, बहुआयामी आणि लोकाभिमुख बनवते. मात्र डेटा पक्षपात, तांत्रिक अवलंबित्व, स्रोतविश्वासार्हता आणि नैतिक प्रश्न ही गंभीर आव्हाने आहेत. त्यामुळे इतिहास संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा संतुलित, चिकित्सक आणि जबाबदार वापर आवश्यक आहे.

मुख्य संज्ञा : इतिहासलेखन, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल इतिहास, डेटा विश्लेषण, संशोधन पद्धती.

प्रस्तावना :

इतिहास हा केवळ भूतकाळातील घटनांचा क्रम नाही तर तो मानवी समाजाच्या स्मृतींचा शास्त्रीय अभ्यास आहे. प्रसिद्ध इतिहासलेखक व विचारवंत फ्रान्सिस बेकन "इतिहास ही मानवाला सूज्ञ बनविणारी ज्ञानशाखा आहे," अशी इतिहासाची व्याख्या करतो. तसेच लौकिक जीवनात कर्तृत्व गाजवणारा आणि बौद्धिक पातळीवरून लेखन करणारा सर वॉल्टर रॅले गतकाळातील उदाहरणे देऊन माणसाला शहाणपण शिकविणे व मार्गदर्शन करणे, हे इतिहासाचे उद्दिष्ट असल्याचे मत मांडतो.[१] इतिहास हा मानवी समाजाच्या स्मृती, अनुभव आणि परिवर्तनांचा शास्त्रीय दस्तऐवज मानला जातो. रॉबर्टसनच्या मते, समाजामध्ये जागृतता निर्माण करण्याचे काम इतिहास करीत असतो. प्रो. बॉलिंगब्रूक यांच्या मते, समाजामध्ये नैतिक मूल्ये निर्माण करण्याचे काम इतिहास करीत असतो. इतिहास म्हणजे तत्त्वज्ञानाचे व्यवहारी धडेच होत. समाजाला नीतिमत्ता शिकवण्याचे काम इतिहास करीत असतो.[२] भूतकाळातील घटनांचे वस्तुनिष्ठ, संदर्भाधारित आणि

चिकित्सक विश्लेषण करून त्यांचे अर्थनिर्णयन करणे ही इतिहासशास्त्राची मूलभूत भूमिका आहे. इतिहासलेखन म्हणजे केवळ घटनांचे वर्णन नसून त्या घटनांच्या मागील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि वैचारिक प्रक्रियांचा शोध घेणे होय. त्यामुळे इतिहासकाराला उपलब्ध स्रोतांचे परीक्षण, तुलना, सत्यापन आणि विश्लेषण करून निष्कर्ष मांडावे लागतात. पारंपरिक इतिहासलेखनाच्या पद्धतींमध्ये हस्तलिखिते, शिलालेख, नाणी, अभिलेखागारातील कागदपत्रे, प्रवासवर्णने, साहित्यिक ग्रंथ, मौखिक परंपरा आणि पुरातत्त्वीय अवशेष यांचा उपयोग केला जात असे. या प्रक्रियेत इतिहासकाराचा विवेक, तर्कशक्ती, संदर्भज्ञान आणि चिकित्सक दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या विकासामुळे ज्ञाननिर्मितीच्या सर्व क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडले आहे. संगणकीय साधने, डिजिटल डेटाबेस, इंटरनेट, क्लाउड स्टोरेज, डेटा ॲनालिटिक्स आणि विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या तंत्रज्ञानांनी संशोधन प्रक्रियेची रचना बदलली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही अशी संगणकीय प्रणाली आहे जी मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे शिकणे, विश्लेषण करणे, नमुने ओळखणे, निर्णय घेणे आणि भाषा समजणे यांसारखी कार्ये करू शकते. मशीन लर्निंग, डीप लर्निंग, नैसर्गिक भाषा प्रक्रिया, प्रतिमा ओळख, विश्लेषण आणि डेटा मायनिंग ही कृत्रिम बुद्धिमत्तेची महत्त्वाची घटक तंत्रे मानली जातात. या तंत्रज्ञानांचा वापर केवळ विज्ञान किंवा उद्योग क्षेत्रापुरता मर्यादित नसून मानविकी आणि समाजशास्त्र क्षेत्रातही वाढत आहे. इतिहासशास्त्र हे त्यापैकी एक महत्त्वाचे क्षेत्र आहे ज्यावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव झपाट्याने दिसून येत आहे.

पारंपरिक इतिहास संशोधनात संशोधकाला मोठ्या प्रमाणातील दस्तऐवजांचा अभ्यास करण्यासाठी दीर्घकाळ अभिलेखागारात काम करावे लागे. विविध भाषांतील स्रोतांचे भाषांतर, त्यांची तुलना, कालक्रम निश्चिती, संदर्भ तपासणी आणि निष्कर्षनिर्मिती ही प्रक्रिया वेळखाऊ आणि श्रमप्रधान होती. अनेकदा स्रोतांच्या मर्यादित उपलब्धतेमुळे किंवा भौगोलिक अडचणींमुळे संशोधन मर्यादित राहत असे. तथापि, डिजिटल तंत्रज्ञानाच्या आगमनानंतर हजारो दस्तऐवज ऑनलाइन उपलब्ध झाले आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधनांनी या दस्तऐवजांचे विश्लेषण करणे अत्यंत सोपे केले. आज कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली लाखो पानांचा मजकूर काही क्षणांत वाचून त्यातील शब्दप्रयोग, संकल्पना, विषयसंबंध, भाषिक नमुने आणि सांख्यिकीय प्रवाह ओळखू शकतात. यामुळे इतिहास संशोधनाची गती आणि व्याप्ती दोन्ही वाढल्या आहेत. इतिहासलेखनाच्या पद्धतींमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे एक महत्त्वाचा बदल म्हणजे डेटा-आधारित इतिहासलेखन ही संकल्पना उदयास आली आहे. पूर्वी इतिहासकार मर्यादित स्रोतांवर आधारित निष्कर्ष मांडत. आता मोठ्या डेटासेटच्या आधारे व्यापक विश्लेषण करता येते. उदा. लोकसंख्येतील बदल, व्यापारमार्ग, स्थलांतराचे नमुने, युद्धकालीन परिस्थिति, आर्थिक हालचाली किंवा सांस्कृतिक देवाणघेवाण यांचे विश्लेषण संगणकीय मॉडेल्सद्वारे करता येते. यामुळे इतिहास अधिक वैज्ञानिक आणि परिमाणात्मक स्वरूपात अभ्यासता येतो. तसेच डिजिटल नकाशे, भौगोलिक माहिती प्रणाली (GIS), 3D पुनर्निर्मिती आणि आभासी वास्तव यांसारख्या तंत्रज्ञानांमुळे ऐतिहासिक घटनांचे दृश्यात्मक सादरीकरण करणे शक्य झाले आहे, ज्यामुळे इतिहास अधिक जिवंत आणि समजण्यास सुलभ बनतो. तथापि, कृत्रिम बुद्धिमत्तेचा इतिहासलेखनावर होणारा परिणाम केवळ सकारात्मकच नाही, त्यात काही गंभीर प्रश्नही उद्भवतात. ही प्रणाली डेटावर अवलंबून असते, त्या डेटामध्ये पक्षपात असल्यास निष्कर्षही पक्षपाती येऊ शकतात. तसेच मशीन मानवी संदर्भज्ञान, सांस्कृतिक सूक्ष्मता आणि भावनिक अर्थछटा पूर्णपणे समजू शकत नाही. इतिहास हा केवळ आकडेवारी

किंवा नमुन्यांचा अभ्यास नसून मानवी अनुभवांचे अर्थनिर्णयन आहे. त्यामुळे मानवी इतिहासकाराची भूमिका अजूनही अपरिहार्य आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा अतिरेक झाल्यास इतिहासलेखन यांत्रिक,निर्जीव किंवा संदर्भहीन होण्याचा धोका संभवतो. याशिवाय डेटा गोपनीयता, कॉपीराइट, स्रोतविश्वासार्हता आणि नैतिक जबाबदारी यांसारखे प्रश्नही महत्त्वाचे ठरतात.

या पार्श्वभूमीवर इतिहासलेखनाच्या पद्धतींवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा परिणाम हा विषय अत्यंत समकालीन आणि संशोधनयोग्य ठरतो. हा विषय केवळ तांत्रिक नव्हे तर सैद्धांतिक, पद्धतशास्त्रीय आणि तत्त्वज्ञानात्मक चर्चेलाही वाव देतो. इतिहासलेखनाची पारंपरिक संकल्पना, वस्तुनिष्ठता, सत्य, स्रोतसमीक्षा आणि व्याख्या या मूलभूत तत्त्वांवर कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे कोणते बदल घडत आहेत, हा प्रश्न या संशोधनाचा केंद्रबिंदू आहे. या प्रणाली मुळे इतिहासलेखनाच्या पद्धतींमध्ये झालेल्या बदलांचे चिकित्सक मूल्यमापन करणे, त्यातील फायदे-मर्यादा तपासणे आणि भविष्यातील इतिहास संशोधनासाठी संभाव्य दिशा सुचवणे हा आहे. आजच्या ज्ञानयुगात इतिहास संशोधन हे केवळ ग्रंथालय किंवा अभिलेखागारापुरते मर्यादित राहिलेले नाही ते डिजिटल प्लॅटफॉर्म, मुक्त डेटा, ऑनलाइन संग्रह आणि संगणकीय विश्लेषण यांच्या साहाय्याने जागतिक स्वरूप धारण करत आहे. त्यामुळे इतिहासकाराला पारंपरिक कौशल्यांबरोबर डिजिटल कौशल्येही आत्मसात करावी लागत आहेत. भविष्यात इतिहासलेखन ही मानव आणि मशीन यांच्या सहकार्यावर आधारित प्रक्रिया बनेल, अशी शक्यता व्यक्त केली जाते. या संदर्भात कृत्रिम बुद्धिमत्तेचा इतिहासलेखनावर होणारा परिणाम समजून घेणे हे शैक्षणिक दृष्ट्या तसेच ज्ञानविकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक ठरते. याच कारणास्तव प्रस्तुत संशोधनात इतिहासलेखनाच्या पद्धतींवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव समीक्षात्मक पद्धतीने अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

1. इतिहासलेखनाच्या पारंपरिक पद्धतीचा अभ्यास करणे.
2. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाची संकल्पना व प्रकार स्पष्ट करणे.
3. इतिहास संशोधनातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रत्यक्ष वापराचे विश्लेषण करणे.
4. कृत्रिम बुद्धिमत्ता - मर्यादा,आव्हाने,नैतिक व शास्त्रीय प्रश्नांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती :

या संशोधनासाठी गुणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. माहिती संकलनासाठी दुय्यम स्रोतांचा उपयोग करण्यात आला असून त्यामध्ये इतिहासशास्त्र, डिजिटल ह्युमॅनिटीज, संगणकशास्त्र आणि माहितीशास्त्र या विषयांवरील ग्रंथ, संदर्भ पुस्तके, संशोधन लेख, परिषदपत्रे आणि ऑनलाइन डेटाबेस यांचा समावेश आहे. प्रस्तुत संशोधनासाठी तुलनात्मक विश्लेषण पद्धती वापरून पारंपरिक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित इतिहासलेखनातील फरक तपासण्यात आला आहे.

इतिहासलेखनाची पारंपरिक पद्धत :

इतिहासलेखन म्हणजे घटनांचे केवळ वर्णन नव्हे तर गतकाळात घडून गेलेल्या मानवी जीवनातील घटना, घडामोडी व बदल आणि त्याचे दर्शन घडविणारे लिखाण म्हणजे इतिहासग्रंथ! म्हणजे काळाच्या पडद्याआड गेलेल्या मानवी जीवनातील घटनांचा व परिवर्तनाचा आलेख ऐतिहासिक लिखाणात आढळतो.[३] आधुनिक काळात

कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या तंत्रज्ञानामुळे इतिहासलेखनात मोठे बदल घडत असले तरी या बदलांचा योग्य आढावा घेण्यासाठी पारंपारिक इतिहासलेखनाच्या पद्धतींचे स्वरूप समजून घेणे अत्यावश्यक आहे. पारंपरिक इतिहासलेखनाचा पाया स्रोतसमीक्षा आणि तर्कशुद्ध विश्लेषण यांवर आधारित आहे. इतिहासकार एखाद्या स्रोताची विश्वसनीयता तपासण्यासाठी अंतर्गत व बाह्य समीक्षा करतो. कालखंड, भाषा, हेतू आणि सामाजिक संदर्भ यांचा विचार करतो. या प्रक्रियेमुळे निष्कर्षांची शास्त्रीय सुनिश्चित होते. इतिहासकार मूळ स्रोत, अभिलेख, शिलालेख, पुरातत्त्वीय अवशेष, पत्रव्यवहार, नकाशे, प्रवासवर्णने, साहित्य आणि मौखिक परंपरा यांचा वापर करून भूतकाळाचे वैज्ञानिक चित्र उभे करतो.[४]

१. मौखिक परंपरेवर आधारित इतिहास: इतिहासलेखनाची सर्वात प्राचीन पद्धत मौखिक परंपरा होती. लेखनकला सर्वत्र विकसित होण्यापूर्वी समाजातील वयोवृद्ध, कवी, कथाकार किंवा पुरोहित हे पिढ्यान्पिढ्या कथा, वंशावळी, युद्धकथा आणि धार्मिक आख्यायिका सांगत असत. या पद्धतीत स्मरणशक्ती आणि सामूहिक परंपरा यांना मोठे महत्त्व होते. तथापि, कालांतराने कथांमध्ये बदल होण्याची शक्यता असल्यामुळे या स्रोतांची विश्वसनीयता तपासणे कठीण ठरते. तरीही अनेक समाजांच्या प्रारंभिक इतिहासाचा हा एकमेव आधार होता.

२. लिखित अभिलेख आणि दस्तऐवज: लेखनप्रणाली विकसित झाल्यानंतर शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखिते, राजकीय फर्माने, करनोंदी, न्यायनिर्णय, धर्मग्रंथ इत्यादी लिखित साधनांचा इतिहासलेखनात वापर होऊ लागला. पारंपारिक इतिहासकार या दस्तऐवजांचा अभ्यास करून घटनांची कालमर्यादा, राजकीय घडामोडी, सामाजिक संरचना आणि आर्थिक स्थिती यांचे विश्लेषण करत असत. या पद्धतीत दस्तऐवजांच्या सत्यतेची पडताळणी करण्यासाठी लिपिशास्त्र, भाषाशास्त्र आणि मुद्राशास्त्र यांसारख्या सहाय्यक शाखांचा वापर केला जात असे.

३. कालक्रमानुसार मांडणी: पारंपारिक इतिहासलेखनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे घटनांची कालानुक्रमिक मांडणी. इतिहासकार वर्ष, महिना किंवा राजांच्या कारकीर्दीनुसार घटनांची नोंद करत असत. यामुळे घटनांचा अनुक्रम समजण्यास मदत होते, परंतु कारण-परिणामसंबंधाचे सखोल विश्लेषण अनेकदा कमी दिसते. तरीही कालक्रम ही इतिहासलेखनाची मूलभूत चौकट मानली जाते.

४. राजकीय आणि राजवंशीय इतिहास: पारंपारिक इतिहासलेखन प्रामुख्याने राजे, युद्धे, राज्यकारभार आणि साम्राज्यांच्या विस्ताराभोवती केंद्रीत होते. कारण इतिहास लिहिण्याची साधने आणि संधी बहुधा राजदरबारी विद्वान किंवा अधिकाऱ्यांकडे असत. त्यामुळे सामान्य लोकांचे जीवन, स्त्रियांची भूमिका, श्रमिक वर्ग, ग्रामीण समाज किंवा उपेक्षित गट यांची माहिती इतिहासात कमी प्रमाणात दिसते. ही पद्धत राजकीय इतिहास म्हणून ओळखली जाते. यात कालक्रम, युद्धांची कारणे-परिणाम, राजकीय करार आणि राजकीय व्यक्तिमत्त्वांचे चरित्रात्मक वर्णन यांना महत्त्व दिले जात असे.

५. धार्मिक आणि नैतिक दृष्टिकोन: अनेक पारंपारिक इतिहासकारांनी इतिहासाला नैतिक शिक्षणाचे साधन मानले. घटनांचे वर्णन करताना त्यांनी धार्मिक श्रद्धा, दैवी हस्तक्षेप किंवा कर्मफल यांसारख्या संकल्पनांचा आधार घेतला. उदाहरणार्थ, एखाद्या साम्राज्याचा ऱ्हास हा नैतिक अध:पतनामुळे झाला असे स्पष्टीकरण दिले जाई. या दृष्टिकोनामुळे इतिहासाला नैतिक अर्थ प्राप्त झाला, परंतु वस्तुनिष्ठ विश्लेषण मर्यादित राहिले.

६. स्रोतसमीक्षा आणि प्रामाणिकता:जरी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नसले तरी पारंपारिक इतिहासकारांनी स्रोतांच्या विश्वसनीयतेबाबत काही निकष विकसित केले

होते. ते दस्तऐवजाचा लेखक, काल, उद्देश, भाषा आणि शैली यांचे परीक्षण करून त्याची सत्यता तपासत. काही इतिहासकारांनी वेगवेगळ्या स्रोतांची तुलना करून सत्य घटनेचा अंदाज लावण्याचा प्रयत्न केला. ही पद्धत आजच्या आधुनिक ऐतिहासिक संशोधनाची पूर्वपीठिका ठरली.

कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना :

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणकीय प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेसारखी कार्ये करण्यास सक्षम बनवणारे तंत्रज्ञान होय. जे मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे शिकणे, विश्लेषण करणे, नमुने ओळखणे, निर्णय घेणे आणि भाषा समजणे यांसारखी कार्ये करू शकते. मशीन लर्निंग, डीप लर्निंग, नैसर्गिक भाषा प्रक्रिया, प्रतिमा ओळख, डेटा मायनिंग ही कृत्रिम बुद्धिमत्तेची महत्त्वाची घटक तंत्रे मानली जातात.[५] यापैकी डीप लर्निंग जो न्युरल नेटवर्क (एनएन) वर आधारित आहे. १९४० मध्ये न्युरॉन्सच्या सैद्धान्तिक मॉडेलपासून सुरुवात झाली, १९८० मध्ये मल्टी-लेअर न्युरल नेटवर्क्स विकसित झाले आणि २००० नंतर वाढलेल्या डेटा आणि संगणकीय शक्तीमुळे डीप लर्निंगचा प्रचंड विस्तार झाला. आपण माणसं कशी शिकतो? लहान बाळ चालायला शिकताना अनेकदा पडतं, मात्र हार मानत नाही. चूक झाली तरी पुन्हा प्रयत्न करतं आणि हळूहळू ते चालायला शिकतं. ह्याच पद्धतीने संगणकाला शिकवण्याचं काम डीप लर्निंग करते. डीप लर्निंग हा कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चा एक महत्त्वाचा आणि प्रगत भाग आहे. यामध्ये संगणकाला मोठ्या प्रमाणावर माहिती दिली जाते. ही माहिती पाहून संगणक स्वतः पॅटर्न ओळखतो, नियम तयार करतो आणि चूक झाली तर स्वतःमध्ये सुधारणा करतो. म्हणूनच डीप लर्निंगला मराठीत अनुभवातून शिकणारी यंत्रबुद्धी असेही म्हणता.[६]

एआयचा खरा आधार म्हणजे अल्गोरिदम, एआयमध्ये वापरले जाणारे अल्गोरिदम सामान्य नसतात ते खूप प्रगत असतात. एखादे काम पूर्ण करण्यासाठी दिलेल्या स्पष्ट, नेमक्या आणि क्रमवार सूचनांना अल्गोरिदम म्हणतात. संगणक, मोबाइल किंवा मशीन स्वतःहून विचार करू शकत नाहीत. त्यांना आपण ज्या सूचना देतो, त्या जशाच्या तशा पाळून ते काम करतात. त्या सूचनांचा संच म्हणजेच अल्गोरिदम. उदा. चहा बनवण्याचा अल्गोरिदम असा असू शकतो. पाणी उकळा, चहापत्ती घाला, साखर घाला, दूध घाला आणि चहा उकळल्यावर चहा तयार. या पायऱ्यांपैकी एखादी पायरी चुकली, तर चहा चांगला होत नाही. संगणकाच्या बाबतीतही तसेच असते. संगणक आणि अल्गोरिदम संगणकाचे प्रत्येक छोटे-मोठे काम अल्गोरिदमवर चालते. कॅल्क्युलेटरने बेरीज करणे, मोबाइलवर फोटो काढणे, मेसेज पाठवणे किंवा इंटरनेटवर माहिती शोधणे या सर्वामागे वेगवेगळे अल्गोरिदम कार्यरत असतात. म्हणजेच अल्गोरिदम हा संगणकाचा कणा आहे, हे मोठ्या प्रमाणात माहिती (डेटा) घेतात, त्यामधील पॅटर्न शोधतात आणि त्यावरुन निष्कर्ष काढतात.[७] कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली मोठ्या डेटासेटमधील नमुने शोधू शकतात. उदा. हजारो दस्तऐवजांमधील शब्दप्रयोग, कल्पना, विषय आणि भाषिक शैली यांचे विश्लेषण करून सामाजिक व सांस्कृतिक प्रवाह ओळखता येतात. इतिहास संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता ही आधुनिक काळातील अत्यंत प्रभावी साधन ठरत आहे. पारंपरिक पद्धतींमध्ये मोठ्या प्रमाणावर हस्तलिखिते, शिलालेख, कागदपत्रे, नकाशे आणि पुरावे तपासावे लागत याकरिता अधिकचा वेळ लागे पण कृत्रिम बुद्धिमत्ता मुळे ही प्रक्रिया अधिक वेगवान, अचूक आणि सखोल झाली आहे. या तंत्रज्ञानामुळे माहितीचे संकलन, वर्गीकरण,

विश्लेषण आणि सादरीकरण या सर्व प्रक्रियांना अभूतपूर्व वेग मिळाला आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रकार:

१. संकुचित कृत्रिम बुद्धिमत्ता (Narrow AI): ही प्रणाली विशिष्ट कार्यासाठी डिझाइन केलेली असते. ती एकाच क्षेत्रात उच्च कार्यक्षमतेने काम करते पण इतर कार्यांसाठी सक्षम नसते.

उदा. आवाज ओळख प्रणाली, चेहरा ओळख प्रणाली, भाषांतर प्रणाली.

२. सर्वसाधारण कृत्रिम बुद्धिमत्ता (General AI): ही प्रणाली मानवासारखी सर्वसाधारण बुद्धिमत्ता असलेली प्रणाली आहे जी विविध प्रकारची कामे करू शकते. सध्या ही संकल्पना संशोधनाच्या स्तरावर आहे.

३. अतिबुद्धिमान कृत्रिम बुद्धिमत्ता (Super AI): ही काल्पनिक पातळीवरील कृत्रिम बुद्धिमत्ता आहे जी मानवी बुद्धिमत्तेपेक्षा अधिक सक्षम असेल. नैतिकता, नियंत्रण आणि सुरक्षितता यासंबंधी अनेक प्रश्न या प्रकाराशी संबंधित आहेत.

डिजिटल इतिहास :

डिजिटल इतिहास ही इतिहासशास्त्राची आधुनिक शाखा आहे. यात डिजिटल डेटाबेस, ऑनलाइन अभिलेखागार, GIS नकाशे, टेक्स्ट माइनिंग आणि व्हिज्युअलायझेशन साधने वापरली जातात. डिजिटल इतिहासामुळे संशोधकांना जागतिक स्तरावर उपलब्ध स्रोतांचा वापर करता येतो. पूर्वी भौगोलिक मर्यादांमुळे संशोधन मर्यादित राहायचे आता ते जागतिक झाले आहे.

इतिहास संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग :

दस्तऐवज विश्लेषण ही प्रणाली लाखो दस्तऐवजांचे विश्लेषण करून महत्त्वपूर्ण नमुने शोधते. त्यामुळे संशोधनाचा कालावधी कमी होतो.भाषिक विश्लेषण नैसर्गिक भाषा प्रक्रिया तंत्रज्ञान प्राचीन ग्रंथांचे भाषांतर व अर्थनिर्णय करते. त्यामुळे बहुभाषिक इतिहास संशोधन शक्य होते. हस्तलिखित ओळख आणि पॅटर्न ओळख प्रणालींमुळे जुनी लिपी वाचणे सुलभ झाले आहे. प्रतिमा व नकाशे विश्लेषण प्रतिमा ओळख तंत्रज्ञान पुरातत्त्वीय वस्तूंची ओळख व वर्गीकरण करते. सांख्यिकीय इतिहास मोठ्या डेटाच्या साहाय्याने लोकसंख्या, व्यापार, स्थलांतर आणि युद्धांचे विश्लेषण करता येते. या प्रणाली मुळे इतिहासलेखनाच्या स्वरूपात मूलभूत परिवर्तन झाले आहे. 'डेटा-आधारित इतिहासलेखन' इतिहासकार आता हजारो स्रोतांचा एकत्रित अभ्यास करू शकतात. 'वेगवान संशोधन' पूर्वी अनेक वर्षे चालणारे संशोधन काही दिवसांत पूर्ण होते. बहुविषयक दृष्टिकोन इतिहास, संगणकशास्त्र, सांख्यिकी, भाषाशास्त्र यांचा समन्वय वाढला आहे. लोकाभिमुखता डिजिटल साधनांमुळे सामान्य लोकांनाही इतिहास उपलब्ध झाला आहे. इतिहास संशोधन अधिक व्यापक व अचूक झाले आहे. संशोधनाचा वेग वाढतो**,** मानवी चुका कमी होतात**,** बहुआयामी विश्लेषण आणि दुर्मिळ स्रोतांचे डिजिटल जतन, नमुना शोध, दृश्यात्मक सादरीकरण आणि स्वयंचलित विश्लेषण यामुळे इतिहास अभ्यास सुलभ झाला आहे.

मर्यादा व आव्हाने :

कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली माहिती (डेटा)वर अवलंबून असते. जर डेटा अपूर्ण किंवा पक्षपाती असेल तर निष्कर्ष चुकीचे येऊ शकतो, डेटामध्ये पक्षपात असल्यास निष्कर्षही पक्षपाती येऊ शकतो. ही प्रणाली

मजकूर, प्रतिमा, ऑडिओ आणि व्हिडिओ तयार करते. ही एक उल्लेखनीय तांत्रिक उपलब्धी आहे, परंतु तिला काही मर्यादा आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यमान पुस्तके, लेख, प्रतिमा आणि इतर माध्यमांमधून प्रत्येक शब्द निवडण्यासाठी मजकूर तयार करतात. पण ही प्रणाली मजकूर प्रतिबिंबित करत नाही तसेच ही प्रणाली अचूकतेपेक्षा वेगाला प्राधान्य देते. मोठे काम दिल्यास उत्सुकतेने काल्पनिक उत्तरे शोधून अधिक जलद पूर्ण करते, ही प्रक्रिया बहुतेकदा भ्रम म्हणून ओळखली जाते. अभ्यासकांनी हे समजून घेणे आवश्यक आहे.[८] कृत्रिम बुद्धिमत्तेला सांस्कृतिक संदर्भ पूर्णपणे समजत नाही त्यामुळे तांत्रिक साधनांवर अधिक अवलंबित्व वाढल्यास इतिहासकाराची चिकित्सकता कमी होण्याचा धोका असतो. निष्कर्ष चुकीचा येऊ शकतो.

नैतिक प्रश्न :

कृत्रिम बुद्धिमत्ता वापरात पारदर्शकता, स्रोत उल्लेख आणि सत्यता आवश्यक आहे. चुकीची माहिती निर्माण करणारी प्रणाली इतिहासाचे विकृतीकरण करू शकते. त्यामुळे मानवी नियंत्रण आवश्यक आहे.[९] कृत्रिम बुद्धिमत्ता हा इतिहासलेखनातील क्रांतिकारक टप्पा आहे. तो पारंपरिक पद्धतींचा पर्याय नसून विस्तार आहे. मानवी बुद्धिमत्ता आणि मशीन विश्लेषण यांचे संयोजन भविष्यातील इतिहास संशोधनाचे मुख्य वैशिष्ट्य ठरेल.

निष्कर्ष :

या संशोधनातून स्पष्ट होते की कृत्रिम बुद्धिमत्ता इतिहासलेखनाच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवते. ती संशोधन अधिक वेगवान, व्यापक आणि बहुआयामी बनवते. तथापि, तिचा वापर चिकित्सक दृष्टीने करणे आवश्यक आहे. मानवी विवेक, संदर्भज्ञान आणि नैतिकता यांची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही. म्हणून भविष्यकालीन इतिहासलेखन हे मानव आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या सहकार्यावर आधारित असेल. कृत्रिम बुद्धिमत्ता हे इतिहास संशोधनात मानवी संशोधकांची जागा घेणारे साधन नसून त्यांना अधिक सक्षम बनवणारे सहायक तंत्रज्ञान आहे. योग्य वापर केल्यास ते इतिहासाचे अधिक अचूक, व्यापक आणि सजीव चित्र समोर आणू शकते.

संदर्भ :

१. डॉ. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती २००७, पृ.क्र.०३.

२. डॉ. सरदेसाई बी. एन.,इतिहास लेखन परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती ऑगस्ट २०१२ पृ.क्र.२१.

३. डॉ. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर द्वितीय आवृत्ती २००७, पृ.क्र. ५९.

४. कार ई. एच.,इतिहास क्या है, प्रगति प्रकाशन, प्रथम हिंदी सस्करण १९७६, दिल्ली.

५. Stuart Russell & Peter Norvig, Artificial Intelligence: A Modern Approach.

६. लोकमत, १ फेब्रु २०२६, पृ.०९.

७. लोकमत, ७ फेब्रु २०२६, पृ.०९.

८. American Historical Association, Guiding Principles for Artificial Intelligence in History Education, Published ०५ Aug २०२५.

९. UNESCO Report on AI Ethics.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

इतिहास संशोधनात AI ची भूमिका: एक संशोधनात्मक अध्ययन

डॉ. चंदू आर. देशपांडे

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

नबिरा महाविद्यालय, काटोल

***Corresponding Author* - डॉ. चंदू आर. देशपांडे**

DOI - 10.5281/zenodo.19692343

सारांश (Abstract):

अती प्राचीन काळापासून मानवाचे जीवन परिवर्तनीय राहिले आहेत. मानवाने कंदमुळे खातखात समाज, देश व जग रचना करून नानाविध सुख समाधानाच्या वास्तू निर्माण करून संक्रमानाचा काळ जगत आज 21 व्या शतकात डिजिटल क्रांती घडवून आणली. ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेत अभूतपूर्व परिवर्तन घडून आणलेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेली संकल्पना असून तिचा प्रभाव कला, वाणिज्य, विज्ञान, अर्थव्यवस्था, आरोग्य व शिक्षण क्षेत्रांप्रमाणेच इतिहास संशोधनावरही पडत आहे. इतिहास संशोधन हे परंपरेने अभिलेखीय अभ्यास, स्रोतसमीक्षा, ग्रंथविश्लेषण आणि संदर्भ आधारित अर्थनिर्मितीवर आधारित राहिले आहे. परंतु, डिजिटल साधनांच्या वाढत्या वापरामुळे संशोधन पद्धती अधिक संगणकीय, परिमाणात्मक आणि बहुउद्देशीय बनत आहेत.

या अध्ययनात इतिहास संशोधनातील AI ची भूमिका सैद्धांतिक, शास्त्रीय पद्धतीने आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून विश्लेषित केली आहे. AI च्या साहाय्याने अभिलेखांचे डिजिटायझेशन, मजकूर खणन, प्रतिमा ओळख, 3D पुनर्निर्मिती आणि सांस्कृतिक वारसा संरक्षण यांसारख्या क्षेत्रांत लक्षणीय प्रगती साधली आहे. परंतु, इतिहास हा केवळ डेटा विश्लेषणावर आधारित नसून संदर्भ, मूल्यदृष्टी आणि मानवी अनुभव यांचा समन्वय असतो.

AI हे इतिहासकाराचे पर्याय नसून सहाय्यक साधन आहे हे या निष्कर्षातून स्पष्ट होते. योग्य नैतिक चौकट, अल्गोरिद्मिक पारदर्शकता आणि मानवी विवेक यांच्या साहाय्याने AI इतिहास संशोधनाला अधिक व्यापक, अचूक आणि जागतिकदृष्ट्या प्रभावी बनवू शकतो.

बीजशब्द (Keywords): कृत्रिम बुद्धिमत्ता, इतिहास संशोधन, डिजिटायझेशन, अभिलेख, डिजिटल मानव्यशास्त्र, ज्ञानमीमांसा, सांस्कृतिक वारसा, अल्गोरिदम, इतिहासकार.

प्रस्तावना (Introduction):

इतिहास हा मानवी समाजाच्या भूतकाळाचा चिकित्सक अभ्यास आहे. तो केवळ घटनांची नोंद नसून त्या घटनांमागील कारणमीमांसा, सामाजिक रचना आणि सांस्कृतिक प्रवाहांचे विश्लेषण आहे. पारंपरिक इतिहास संशोधन हे अभिलेखीय स्रोत, शिलालेख, हस्तलिखिते, प्रवासवर्णने आणि तोंडी परंपरांवर आधारित राहिले आहे. मात्र डिजिटल युगात माहितीचे प्रमाण प्रचंड वाढत असल्याने लाखो दस्तऐवज, छायाचित्रे आणि नकाशे डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत आहेत. या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) इतिहास संशोधनात एक प्रभावी साधन म्हणून उदयास आली आहे. AI मुळे मोठ्या

प्रमाणातील माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि दृश्यीकरण शक्य झाले आहे.

परंतु, इतिहासलेखन ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून मूल्याधिष्ठित आणि संदर्भाधारित अर्थनिर्मितीची क्रिया आहे. त्यामुळे AI चा वापर करताना तात्त्विक आणि नैतिक प्रश्न उद्भवतात. प्रस्तुत अध्ययनात इतिहास संशोधनात AI ची भूमिका, इतिहास संशोधन, फायदे, संभाव्य धोके व मर्यादा यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

विषयाची निवड :

"इतिहास संशोधनात AI ची भूमिका: एक संशोधनात्मक अध्ययन" हा विषय निवडण्यामागील प्रमुख कारण म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात इतिहास अभ्यासाची बदलती दिशा समजून घेणे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही केवळ संगणकीय संकल्पना न राहता शिक्षण, संशोधन, प्रशासन आणि सांस्कृतिक वारसा संवर्धन या सर्व क्षेत्रांत प्रभाव टाकत आहे. इतिहास संशोधन परंपरेने दस्तऐवज, शिलालेख, पुरातत्त्वीय अवशेष आणि मौखिक परंपरा यांवर आधारित राहिले आहे; परंतु डिजिटल क्रांतीनंतर स्रोतांचे स्वरूप, प्रमाण आणि उपलब्धता यामध्ये आमूलाग्र बदल झाला आहे.

या पार्श्वभूमीवर AI तंत्रज्ञान इतिहास संशोधनात कशा प्रकारे सहाय्यक ठरते, त्याच्या मर्यादा कोणत्या आहेत आणि इतिहासकाराच्या भूमिकेत कोणते परिवर्तन घडते, याचा शास्त्रीय अभ्यास करणे आवश्यक वाटते. तसेच भारतीय संदर्भात डिजिटल अभिलेखागार, सांस्कृतिक वारसा संरक्षण आणि इतिहास लेखन यांमध्ये AI च्या उपयोगितेचे मूल्यमापन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या सर्व घटकांचा विचार करून हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

या संशोधनाचा उद्देश इतिहास संशोधनातील AI भूमिका स्पष्ट करणे हा आहे. AI मुळे संशोधन पद्धतींमध्ये झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे, इतिहास लेखनावर त्याचा परिणाम तपासणे आणि भारतीय तसेच जागतिक संदर्भात त्याचा उपयोग समजावून घेणे हे या अध्ययनाचा प्रमुख हेतू आहेत. तर AI वापरातील नैतिकता आणि मर्यादा अधोरेखित करणे हेही उद्दिष्ट आहे.

संशोधन पद्धती:

या अध्ययनात गुणात्मक आणि संकल्पनात्मक विश्लेषण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. इतिहासतत्त्वज्ञान, डिजिटल मानवशास्त्र आणि AI यावरील उपलब्ध साहित्याचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला. तुलनात्मक दृष्टिकोनातून भारतीय व जागतिक उदाहरणांचा अभ्यास करून निष्कर्ष मांडले आहेत. याकरिता ग्रंथसमीक्षा आणि विवेचनात्मक विश्लेषण यांचा आधार घेतला आहे.

व्याप्ती, स्वरूप व मर्यादा:

हे अध्ययन इतिहास संशोधनातील AI च्या सैद्धांतिक आणि व्यावहारिक परिणामांपुरते मर्यादित आहे. प्रोग्रामिंग तंत्रज्ञानाचे येथे सविस्तर तांत्रिक विश्लेषण केलेले नाही. यात भारतीय व जागतिक संदर्भातील निवडक उदाहरणांवर आधारित चर्चा करण्यात आली आहे. AI चे क्षेत्र गतिमान व विस्तृत असल्याने भविष्यातील सर्व बदलांचा समावेश या अभ्यासात शक्य नाही.

इतिहास संशोधनाचा इतिहास व विकास:

इतिहास लेखनाची परंपरा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. पुराणे, शिलालेख आणि ताम्रपट हे प्राथमिक स्रोत होते. मध्ययुगात दरबारी इतिहासकारांनी

राजकीय घटनांची नोंद केली. ब्रिटिश काळात आधुनिक अभिलेखीय पद्धती आणि स्रोतसमीक्षा विकसित झाली. तर स्वातंत्र्यानंतर राष्ट्रवादी, मार्क्सवादी आणि सामाजिक इतिहासलेखनाचे प्रवाह उदयास आले. मात्र डिजिटल युगात इतिहास संशोधन अधिक संगणकीय आणि आंतरशाखीय झालेले आहेत.

AI चा इतिहास व विकास:

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) ही संकल्पना संगणक विज्ञानातील एक महत्त्वपूर्ण शाखा असून तिची पायेमुळे विसाव्या शतकाच्या मध्यकाळात आढळतात. 1950 मध्ये ॲलन ट्यूरिंग यांनी "Computing Machinery and Intelligence" या लेखातून यंत्रे विचार करू शकतात का? हा मूलभूत प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर 1956 साली डार्टमाउथ परिषदेत 'Artificial Intelligence' हा शब्द औपचारिकरीत्या प्रचलित झाला. प्रारंभीच्या काळात AI चा वापर प्रामुख्याने तर्कशास्त्रीय समस्या सोडविणे, गणितीय प्रमेय सिद्ध करणे आणि साधे खेळ खेळणे यापुरता मर्यादित होता. तर 1970–80 च्या दशकात 'Expert Systems' विकसित झाले. यामध्ये विशिष्ट क्षेत्रातील ज्ञान संगणकात साठवून तज्ज्ञांसारखे निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, संगणकीय क्षमता आणि डेटाचा अभाव यामुळे AI च्या प्रगतीला काही काळ मर्यादा आल्या. मात्र 1990 नंतर मशीन लर्निंग, न्यूरल नेटवर्क्स आणि डेटा सायन्स यांच्या विकासामुळे AI मध्ये मोठी झेप घेतल्या गेली. संगणकांची कार्य क्षमता वाढली आणि इंटरनेटमुळे प्रचंड प्रमाणात डेटा उपलब्ध झाला.

21 व्या शतकात डीप लर्निंग, बिग डेटा आणि क्लाउड संगणनामुळे AI अधिक प्रभावी आणि व्यावहारिक बनत गेला. भाषिक विश्लेषण, प्रतिमा ओळख, आवाज ओळख, स्वयंचलित अनुवाद, रोबोटिक्स, वैद्यकीय निदान, वित्तीय विश्लेषण अशा विविध क्षेत्रांत AI चा वापर वाढत गेला. आज AI केवळ तांत्रिक साधन नसून संशोधन, शिक्षण, प्रशासन आणि सांस्कृतिक वारसा संवर्धन यांसारख्या मानवी क्रियांमध्येही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्यामुळे AI चा इतिहास हा सतत विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाचा आणि मानवी बुद्धिमत्तेच्या अनुकरणाचा प्रवास आहे.

इतिहास संशोधनात AI ची भूमिका:

इतिहास संशोधनात AI ची भूमिका अत्यंत परिवर्तनकारी स्वरूपाची ठरत आहे. पारंपरिक इतिहास संशोधनात दस्तऐवजांचे वाचन, वर्गीकरण, विश्लेषण आणि तुलना यासाठी मोठ्या प्रमाणावर मानवी श्रम आवश्यक असतात. परंतु AI च्या साहाय्याने हे कार्य अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येते. विशेषतः नैसर्गिक भाषा प्रक्रिया (Natural Language Processing – NLP) तंत्रामुळे प्राचीन दस्तऐवज, हस्तलिखिते आणि अभिलेख यांचे डिजिटल स्वरूपात रूपांतर करून त्यांचे आशय विश्लेषण करणे शक्य झाले आहे. AI आधारित अल्गोरिदम मोठ्या प्रमाणातील ऐतिहासिक डेटा तपासून त्यातील नमुने (patterns) व संबंध शोधू शकतात. उदाहरणार्थ, एखाद्या कालखंडातील सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय बदलांचा अभ्यास करताना हजारो दस्तऐवजांतील संदर्भ एकत्रित करून व्यापक निष्कर्ष काढणे सहज शक्य होत आहे. तसेच, भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) आणि AI च्या एकत्रित वापरामुळे ऐतिहासिक घटनांचे स्थानिक विश्लेषण करता येते.

प्रतिमा ओळख (Image Recognition) तंत्रामुळे प्राचीन शिलालेख, नाणी, चित्रकला आणि वास्तू यांचे सूक्ष्म निरीक्षण करता येते. तर AI च्या साहाय्याने नष्टप्राय

किंवा अपूर्ण दस्तऐवजांची पुनर्रचना (reconstruction) करण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. डिजिटल संग्रहालये, ऑनलाइन अभिलेखागारे आणि ई-लायब्ररी यांमुळे संशोधकांना जगभरातील स्रोत सहज उपलब्ध होत आहेत. तर AI हे इतिहासकाराची जागा घेणारे साधन नसून त्याला सहाय्य करणारे तंत्र आहे. अंतिम विश्लेषण, संदर्भांचे आकलन आणि ऐतिहासिक अर्थ लावणे हे कार्य मानवी विवेकावरच अवलंबून राहते. त्यामुळे इतिहास संशोधनात AI हे पूरक आणि समर्थक तंत्रज्ञान म्हणून अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे.

AI व इतिहास लेखन:

इतिहास लेखनात AI चा वापर संशोधकांना माहितीचे संघटन, वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यासाठी उपयुक्त ठरतो. मोठ्या प्रमाणातील डेटा संक्षिप्त करून त्यातील मुख्य प्रवाह, घटना आणि कालरेषा तयार करण्यास AI मदत करतो. भाषिक विश्लेषणाच्या साहाय्याने विविध स्रोतांतील माहिती एकत्रित करून सुसंगत मजकूर तयार करता येतो. इतिहास लेखन ही केवळ माहिती मांडण्याची प्रक्रिया नसून ती संदर्भ, मूल्यदृष्टी आणि चिकित्सक दृष्टिकोन यांवर आधारित असते. तर AI तयार केलेला मजकूर तटस्थ आणि संरचित असू शकतो, परंतु ऐतिहासिक घटनांचे अर्थ निर्णय, सांस्कृतिक संवेदनशीलता आणि नैतिक विचार हे घटक मानवी इतिहासकाराच्या हस्तक्षेपाशिवाय पूर्ण होऊच शकत नाहीत. त्यामुळे AI हे इतिहास लेखनात सहाय्यक साधन म्हणून उपयुक्त असले तरी मात्र अंतिम जबाबदारी इतिहासकाराचीच राहते.

AI व इतिहासाचे Digitization:

इतिहासाचे डिजिटायझेशन म्हणजे प्राचीन दस्तऐवज, हस्तलिखिते, नकाशे, छायाचित्रे आणि अभिलेख यांचे डिजिटल स्वरूपात जतन करणे. AI च्या साहाय्याने हे कार्य अधिक कार्यक्षम व अचूक झाले आहे. ऑप्टिकल कॅरेक्टर रिकग्निशन (OCR) तंत्रामुळे हस्तलिखित किंवा मुद्रित मजकूर संगणकीय स्वरूपात रूपांतरित करता येतो. AI आधारित प्रणाली दस्तऐवजांचे स्वयंचलित वर्गीकरण, अनुक्रमण (indexing) आणि शोध प्रक्रिया सुलभ करतात. तसेच, खराब झालेल्या किंवा अस्पष्ट दस्तऐवजांची प्रतिमा सुधारून त्यांचे पुनरुत्थान करतात. यामुळे ऐतिहासिक वारसा सुरक्षित राहतो आणि संशोधकांना जागतिक स्तरावर स्रोत सहज उपलब्ध होतात. डिजिटायझेशनमुळे माहितीचा प्रसार वेगाने होऊन इतिहास अभ्यास अधिक व्यापक व सुलभ बनतो.

AI व ऐतिहासिक वास्तू:

AI आणि 3D मॉडेलिंग तंत्रामुळे ऐतिहासिक वास्तूंचे डिजिटल पुनर्निर्माण शक्य झालेले आहेत. उपग्रह चित्रे आणि ड्रोन सर्व्हेक्षणाद्वारे प्राचीन स्थळांचा अचूक नकाशा तयार करता येतो. यामुळे संशोधन आणि पर्यटन दोन्ही क्षेत्रांना चालना मिळते.

AI व इतिहास संरक्षण:

सांस्कृतिक वारसा संरक्षणात AI महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे धोक्यात असलेल्या स्थळांचे डिजिटल दस्तऐवजीकरण करून त्यांचे जतन करण्यास उपयोगी ठरतो. तर आपत्ती व्यवस्थापनातही AI उपयुक्त ठरत असल्याचे सध्यातरी स्पष्ट होते.

AI व इतिहासकार:

अल्गोरिदम युगात इतिहासकाराची भूमिका बदलत असून, तो केवळ दस्तऐवज विश्लेषक नसून डिजिटल साधनांचा वापर करणारा, नैतिक निर्णय घेणारा आणि संदर्भनिहाय जपणारा संशोधक बनतो.

संभाव्य धोके व मर्यादा:

इतिहास संशोधनात AI चा वापर करताना काही संभाव्य धोके व मर्यादा लक्षात घ्याव्या लागतात. AI

प्रणाली उपलब्ध डेटावर आधारित निष्कर्ष काढतात. त्यामुळे जर डेटा अपूर्ण, पक्षपाती किंवा चुकीचा असेल तर निष्कर्षही दिशाभूल करणारे ठरू शकतात. अल्गोरिम पक्षपात इतिहासाच्या वस्तुनिष्ठतेवर परिणाम करू शकतो. तसेच, सांस्कृतिक संदर्भ, प्रतीकात्मक अर्थ आणि भावनिक सूक्ष्मता यांचे आकलन AI साठी मर्यादित असते. तांत्रिक अवलंबित्व वाढल्याने मानवी चिकित्सक दृष्टिकोन कमी होण्याची शक्यता असते. डेटा सुरक्षितता, गोपनीयता आणि बौद्धिक संपदा हक्क यांसंबंधीही प्रश्न निर्माण होतात.

सूचना व उपाययोजना:

डिजिटायझेशनमुळे पंचायत समित्यांच्या कार्यात अनेक सकारात्मक बदल घडून आले. सर्वप्रथम प्रशासनातील पारदर्शकता वाढली. निधी वितरण आणि लाभार्थी निवड प्रक्रियेत डिजिटल नोंदींचा वापर झाल्यामुळे अनियमितता कमी होण्यास मदत झाली. योजनांची माहिती ऑनलाइन उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांचा सहभाग वाढला आणि प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला. डेटा आधारित नियोजनामुळे पंचायत समित्यांना स्थानिक गरजांनुसार विकास कार्यक्रम राबविणे अधिक सुलभ झाले. दस्तऐवजांचे डिजिटल संग्रहण झाल्यामुळे ऐतिहासिक माहिती जतन करणे शक्य झाले, जे संशोधनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरते.

तसेच प्रशासनिक कार्यक्षमतेतही लक्षणीय वाढ झाली. अहवाल तयार करणे, योजना प्रगतीचा आढावा घेणे

आणि विभागीय समन्वय साधणे या प्रक्रिया अधिक वेगाने पार पडू लागल्या. ग्रामीण विकास कार्यक्रमांचे निरीक्षण अधिक प्रभावी झाले आणि निर्णय प्रक्रियेला गती मिळाली. विशेषतः थेट लाभ हस्तांतरण प्रणालीमुळे निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होऊ लागल्याने योजनांची परिणामकारकता वाढली.

तथापि, डिजिटायझेशनच्या प्रक्रियेत काही नकारात्मक बाबी आणि आव्हानेही दिसून येतात. ग्रामीण भागातील इंटरनेट सुविधेतील असमानता ही मोठी समस्या ठरते. विशेषतः दुर्गम व डोंगराळ तालुक्यांमध्ये नेटवर्क सुविधेअभावी डिजिटल प्रणालींचा पूर्ण लाभ घेणे कठीण होते. डिजिटल साक्षरतेचा अभाव ही आणखी एक महत्त्वाची अडचण आहे. पंचायत समित्यांमधील काही कर्मचारी आणि ग्रामीण नागरिकांना संगणक व ऑनलाइन प्रणालींचा प्रभावी वापर करण्यासाठी अतिरिक्त प्रशिक्षणाची आवश्यकता भासते.

तांत्रिक पायाभूत सुविधांची कमतरता देखील प्रशासनाच्या गतीवर परिणाम करते. संगणक उपकरणे, सॉफ्टवेअर अद्ययावतता आणि तांत्रिक सहाय्य यांचा अभाव असल्यास डिजिटल प्रणालींचा उपयोग मर्यादित राहतो. याशिवाय अनेक वर्षांच्या कागदी नोंदी डिजिटल स्वरूपात रूपांतरित करणे ही वेळखाऊ आणि खर्चिक प्रक्रिया आहे. सायबर सुरक्षिततेचे वाढते महत्त्व ही देखील एक नवीन प्रशासनिक जबाबदारी बनली आहे. डिजिटल डेटाचे संरक्षण आणि गोपनीयता राखणे यासाठी सक्षम सुरक्षा प्रणाली आवश्यक ठरते.

कोल्हापूर जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या अभ्यासातून असे स्पष्ट होते की पारंपरिक प्रशासनातून डिजिटल प्रशासनाकडे झालेला प्रवास हा ग्रामीण प्रशासनाच्या आधुनिकीकरणाचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या प्रक्रियेमुळे प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि उत्तरदायी झाले असले तरी डिजिटल साक्षरता, इंटरनेट सुविधा आणि तांत्रिक पायाभूत रचना अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे. भविष्यात डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि कर्मचारी प्रशिक्षणावर भर दिल्यास पंचायत समित्या ग्रामीण विकास कार्यक्रम अधिक परिणामकारकपणे राबवू शकतील.

एकूणच, कोल्हापूर जिल्ह्यातील पंचायत समित्यांचा अनुभव दर्शवितो की डिजिटायझेशन ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून प्रशासनाच्या कार्यसंस्कृतीतील व्यापक परिवर्तनाची दिशा आहे. योग्य नियोजन, तांत्रिक सुविधा आणि लोकसहभाग यांच्या साहाय्याने पंचायत राज संस्था ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत अधिक सक्षम आणि परिणामकारक ठरतील.

संदर्भ ग्रंथ सूची:

१. Maharashtra Zilha Parishad and Panchayat samitis act 1961
२. Zpkolhapur.gov.in
३. भारत सरकार ग्रामीण विकास मंत्रालय, ई-गव्हर्नन्स इन रूरल डेव्हलपमेंट वार्षिक अहवाल, नवी दिल्ली, 2019, पृ. 45–52.
४. कोल्हापूर जिल्हा परिषद, जिल्हा सांख्यिकी माहिती पुस्तिका, कोल्हापूर, 2021, पृ. 89–96.
५. Zpkolhapur.gov.in
६. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, Digital Governance Report, नवी दिल्ली, 2020, पृ. 28–35.
७. पुढारी वृत्तपत्र दि.०६/०८/२०२४ पू.१
८. Zpkolhapur.gov.in

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

स्थानिक इतिहास:विशेष संदर्भ पांचगणी

डॉ. सुनिता हनुमंतराव गित्ते

विभाग प्रमुख, इतिहास विभाग.

श्रीमती मीनलबेन मेहता कॉलेज, पाचगणी. ता. महाबळेश्वर, जि. सातारा

Corresponding Author - डॉ. सुनिता हनुमंतराव गित्ते

DOI - 10.5281/zenodo.19692508

स्थानिक स्थिती-गतीचा नेहमीच मानवी जीवनावर, स्थित्यंतरावर आणि विकासावर प्रभाव पडत आलेला आहे. तो प्रभाव अधोरेखित करण्याचे कार्य इतिहास करते. इतिहास गतकालीन घटनांना नैसर्गिक, भोगोलिक, पर्यावरणीय इत्यादी कारकांनी केलेल्या बदलाचा आढावा घेतो. कारण निसर्गामध्ये शाश्वत अशी एकच गोष्ट आहे ती म्हणजे बदल. हा बदल मानवी जीवनामध्ये ज्या प्रकारे घडतो त्याच प्रकारे इतिहास लेखनामध्ये सुद्धा घडत असतो. सुरुवातीला केवळ राजा महाराजांच्या लढाया इथपर्यंत मर्यादित असणारा इतिहास विषय आपल्या कक्षा रुंदावत नवनवीन प्रवाह निर्माण करत आहे. त्यात गतकाळाचा अंशलक्षी(micro) अभ्यास हा नवीन पंथ उदयास आलेला आहे. स्थानिक इतिहास हा मायक्रो हिस्ट्रीचा एक अवतार असूनही अध्यापपर्यंत विविधतेने नटलेल्या विकसनशील भारतामध्ये स्थानिक इतिहासाचे लेखन अत्यंत अल्प प्रमाणात झालेले आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये स्थानिक इतिहास:विशेष संदर्भ पांचगणी या विषयी वर्णनात्मक ऐतिहासिक संशोधन प्रणाली ने अभ्यास करण्यात आला असून त्यासाठी साहित्यिक तथ्य, स्थलदर्शन तसेच जास्तीत जास्त प्रत्यक्ष भेटींमधून मिळालेल्या मौखिक माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. ही या लेखाची मर्यादा आहे.

स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. एखाद्या स्थानाभोवती किंवा ठिकाणाभोवती केंद्रित राहून त्या स्थानाचे इतिहास लेखन करणे म्हणजे स्थानिक इतिहास लेखन करणे होय. जागतिक इतिहासाला व राष्ट्रीय इतिहासाला macro study (समग्रलक्षी अभ्यास) तर प्रादेशिक इतिहासास मायक्रो micro study (अंशलक्षी अभ्यास) म्हणतात.

इतिहास हा शब्दप्रयोग दोन अर्थाने केला जातो. एक म्हणजे घडून गेलेला भूतकाळ आणि दुसरे या भूतकाळाविषयीचे लेखन. या दोन गोष्टींना सांधत असतो इतिहासलेखनशास्त्र. इतिहास लिहिण्यासाठी लागणारी तथ्य, तथ्यांचे परीक्षण, अन्वयार्थ आणि शब्दरूपात मांडणी या सर्वांची नियमावली सांगणारे शास्त्र म्हणजे इतिहासलेखनशास्त्र. त्याच्या मार्गदर्शनानुसार गतकालीन मानवी जीवनाच्या विविध अंगाचा पट उलघडणे शक्य होते आहे. इतिहास ही एक गतिमान प्रक्रिया आहे . माणसाने बुद्धीच्या योगाने आपला परिसर समजावून घेऊन त्यावर क्रिया करण्यासाठी केलेला दीर्घ झगडा म्हणजे इतिहास असेही म्हणता येईल. पण आधुनिक युगात या झगड्याचे स्वरूप अमुलाग्र बदलले आहे, व तो अधिक व्यापक बनला आहे. या व्यापक स्वरूपामध्ये वेगवेगळे दृष्टिकोन, अनेकविध अभ्यास प्रवाह उदयास येत आहेत. त्यामुळे

भूतकाळातील मानवी स्थितीगतीचा अभ्यास करणे व्यापक बनत चालले आहे. झपाट्याने बदलणाऱ्या मानवी जीवनमूल्यांमध्ये सुद्धा बदल होत आहेत. परंपरागत जीवनपद्धती ऐवजी नवीन जीवनशैली विकसित होत आहे. त्यामुळे अनेक नवीन व्यवसाय उदयास येत आहेत. उदाहरणार्थ पर्यटनाचा विचार केला तर पर्यटक वेगवेगळ्या करण्यांसाठी अनेक स्थानांना भेटी देतात, त्यामुळे तेथील स्थानिकांना रोजगार प्राप्त होतो. म्हणून पर्यटकांना आकर्षित करून घेण्यासाठी देखील स्थानिक इतिहास या नवीन प्रवाहाचा अभ्यास आवश्यक आहे.प्रत्येक गावाचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी स्थानपोत्या, म्हणी लोकगीत इत्यादी मौखिक साधने, पुरातत्वीय अवशेष, सर्वे करण्यासाठी प्रत्यक्ष स्थान पायाखालून घालणे,मुलाखती इत्यादींचा साधन म्हणून उपयोग होऊ शकतो. प्रत्येक गावाला काही विशेष अभ्यासण्याजोगा इतिहास असेलच असे नाही. परंतु शैक्षणिक शहर म्हणून प्रसिद्ध असलेल्या 'पांचगणी' चा स्थानिक इतिहास अभ्यासने मात्र महत्वपूर्ण आहे.

सह्याद्रीच्या पूर्व पश्चिम रांगेत उतारावर पाचगणी शहर वसलेले आहे. येथील भूस्तर रचना ज्वालामुखी प्रकारची असून जांभा खडक दिसून येतो. बॉक्साईट हे अल्युमिनियम धातूक पाचगणी प्रदेशात आढळून येतात. पाचगणी जवळील आंब्रळ पठारावर बॉक्साईट ची जाडी 2.5 मी. आहे. जमीन लोह मिश्रित तांबडी आहे. येथील किमान सरासरी तापमान 16 अंश सी. ग्रे. व कमाल तापमान 31.1 से. ग्रे. असते. पाचगणी शहराच्या संदर्भात प्राचीन इतिहासात नोंद नाही. परंतु पाचगणी येथे मध्याश्मयुगीन क्षुद्राश्म अवजारे आढळले आहेत. अशाच प्रकारचे अवजारे वाई, महाबळेश्वर, जावळी परिसरात सापडले आहेत. त्यामुळे पाचगणीचा परिसर महाबळेश्वर, जावळी जवळ असल्याने त्या इतिहासाशी निगडित पाचगणीचा इतिहास असावा. पाचगणी येथे 'धावड' जातीचे काही लोक रहिवासी आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात धावड लोखंडापासून हत्यारे तयार करीत असत. धातू ओढणारा तो धावड अशी व्युत्पत्ती होते. पाचगणी हे ठिकाण वाई, महाबळेश्वर, जावळी, प्रतापगड यांच्या समीप येतो.

महाबळेश्वर तालुक्यातील व पाचगणीच्या जवळचा ऐतिहासिक प्रदेश मध्ये जावळीचा प्रदेश होय. जावळी प्रतापगडच्या पूर्वेला ३ कि.मी. व महाबळेश्वरपासून ५ कि.मी. वर आहे. इ. स. च्या सुरुवातीच्या शतकामध्ये जावळी भागावर अविधेय नावाच्या राष्ट्रकूट राजाची राजवट असताना जावळा-वाटिका नावाच्या वाढीचा उल्लेख अविधेयाच्या पांडुरंगपल्ली ताम्रपट शासनात आलेला आहे. पी. गुप्ता यांच्या मते जावळी-वाटिका म्हणजेच जावळी होय.

पंधराव्या शतकाच्या अखेरपर्यंत जावळी व त्याच्या आसपासच्या प्रदेश शिर्के यांच्या अधिपत्याखाली होता. चंद्रराव मोरे यांनी विजापूरच्या आदिलशहाच्या मदतीने जावळी जिंकून शिर्क्यांना जावळीतून उसकावून लावले. मोरे यांनी शिर्के यांचा पराभव केला. त्यामुळे त्यांना 'चंद्रराव' ही पदवी मिळाली. पुढे पाचगणीचा परिसर हा प्रतापसिंह महाराजांच्या कारकीर्दीपर्यंत किंबहुना खंडाळ्याच्या बदल्यात महाबळेश्वर इंग्रजांच्या अखत्यारीत देईपर्यंत मराठ्यांचा ताबा होता. परंतु प्रत्यक्ष पाचगणी गावाची मध्ययुगीन इतिहासात नोंद आढळत नाही.

पाचगणी हे नाव पाच खेड्यांचा समूह म्हणून पाचगणी असे पडल्याचे बोलले जाते. तर पाच गण म्हणजे पाच डोंगरांचा समूह म्हणून पाचगणी हे नाव पडले, असेही म्हटले जाते. सातारा जिल्ह्यातील विशेषतः वाई, जावळी, महाबळेश्वर, पाटण तालुक्यात सह्याद्रीचे आणि शंभू महादेवाच्या डोंगरांचे माथे पूर्वेकडून पश्चिमेकडे उंच होत

गेले आहेत. प्रमुख डोंगर श्रेणी आणि त्यांचे फाटे यावर अनेक किल्ले आहेत. या टेकड्यांपैकी पाचगणी टेकडी (1,334) उंच असून पाच टेकड्यांवर कमळकर, पांडवगड, वैराटगड, वंदनगड आणि केंजळगड हे पाच डोंगरी किल्ले आहेत. यावरून पाचगणी हे नाव पडले असावे.

पाचगणीचा खऱ्या अर्थाने पर्यटन स्थळ म्हणून विकास, आरोग्यधाम म्हणून नावारूपाला आणण्याचे श्रेय इंग्रजांनाच द्यावे लागते. इ. स.1854 मध्ये जॉन चेसन हा पहिला इंग्रज पाचगणी येथे आला. जॉन चेसन हा ईस्ट इंडिया कंपनीचा सेवानिवृत्त अधिकारी होता. तो महाराष्ट्रातील पश्चिम घाट रांगेत ब्रिटिश लोकांच्या वस्तीसाठी नवीन जागा शोधून काढण्याच्या उद्देशाने पाचगणी येथे आला होता. महाबळेश्वर पासून अतिशय जवळ असणारे पण पावसाळ्याच्या सरासरीमध्ये बरेच अंतर असणारे व शुद्ध आरोग्यदायी थंड हवामान असणारे पाचगणी त्याला राहण्यासाठी योग्य वाटल्याने त्याने पाचगणीची निवड केली. त्याने व त्याच्या मित्रांनी 1860 मध्ये बारा हजार रुपये खर्च करून पक्या छताचे सहा बंगले बांधले.

पाचगणी शहर महाबळेश्वरच्या तुलनेत कमी पावसामुळे व आरोग्यदायी हवामानामुळे वर्षभर राहण्यासाठी अत्यंत उत्तम ठिकाण आहे. त्यामुळे पाचगणी येथे वेगवेगळ्या संस्थांच्या ट्रस्टच्या खाजगी मालकीच्या जवळपास 32 पेक्षा जास्त शाळा आहेत. त्यातील बहुतांश शाळांमध्ये विद्यार्थ्यांना राहण्याची वसतीगृहे आहेत. या शाळांमधून महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतातील व भारताबाहेरील परदेशी विद्यार्थी, अनिवासी भारतीयांची मुले शिक्षण घेत असतात. पर्यटकां बरोबरच या विद्यार्थ्यांच्या पालकांचेही पाचगणीत येणे जाणे असल्याने पाचगणीत हॉटेल व्यवसायही तेजीत असतो. तसेच श्रीमंत आणि उच्च मध्यमवर्गीय लोक आपल्या मुलांना शिक्षणासाठी ठेवतात. याशिवाय येथे सर्वधर्मीयांचे आरोग्यधामे सुद्धा आहेत. पाचगणीतील चेसन मार्ग हे पर्यटकांना निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी आहे. पाचगणीतील हिरवीगार वनसंपदा पाचगणीचे खास आकर्षण आहे. येथे सीजनप्रमाणे स्ट्रॉबेरी, ब्लॅकबेरी(तुती),रासबेरी, मलबेरी, गुजबेरी इत्यादी विदेशी फळांचे उत्पादन घेतले जाते. ही फळे पर्यटकांना विकली जातात. या शिवाय ते चर्मोद्योग, हस्तकला, फ्रुटजामस् चे अनेक कारखाने आहेत. तसेच मधुमक्षिका पालनाचा व्यवसायही केला जातो. अनेक क्लब्ज, ग्रंथालये येथे आहेत. येथील निसर्गरम्य परिसरात नेहमी कोणत्या ना कोणत्या तरी चित्रपटाचे, जाहिरातीचे शूटिंग चालू असते. हल्ली पाचगणी येथे पॅराग्लायडिंगची देखील सोय आहे. नैसर्गिकरीत्या पूर्वेकडून वाहणाऱ्या वाऱ्याचा उपयोग या पॅराग्लायडिंगसाठी होत असतो. अनेक पर्यटक या सोईंचा लाभ घेतात. याशिवाय पाचगणी येथे अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. जसे-समुद्रसपाटीपासून उंची 4550 फूट आणि जवळजवळ 92 एकरांचे (44.5 हेक्टर) चे आशिया खंडातील तिबेटनंतरचे दोन नंबरचे पठार असलेले टेबललँड, सिडने पॉईंट, दोसी पॉईंट, काचबावरी पॉईंट, बेबी पॉईंट, मेहेरबाबा गुहा, राजपुरी लेणी, भिलारचे फलोद्यान, मलाच फूड प्रॉडक्टस्, मॅप्रो फुडस्, एम.आर.ए. सेंटर (नैतिक पुनरुत्थान केंद्र)मॉरल रीआर्मामेंट ट्रेनिंग सेंटर, दि. पाचगणी को-ऑपरेटिव्ह, क्रेडिट सोसायटी लि. पाचगणी, बेल एयर सॅनेटोरीयम (डेल्किथ), विद्यार्थी वाचनालय पाचगणी इत्यादी पर्यटनाचे ठिकाण आहेत.

थोडक्यात मानवी जीवनाप्रमाणेच गतिमान असणारी इतिहासलेखन परंपरा नवनवीन ज्ञानशाखांचे सहाय्य घेत आपल्या कक्षा रुंदावते आहे. किंबहुना नवीन प्रवाह निर्माण करते आहे. त्यापैकीच सूक्ष्म/अंशलक्षी इतिहासाची भौगोलिक निकषावर करण्यात आलेली पोट विभागणी म्हणजेच स्थानिक इतिहास होय.

निष्कर्ष:

१. स्थानिक इतिहास हा इतिहासलेखनातील सूक्ष्म अभ्यास आहे.

२. स्थानिक इतिहासलेखनामुळे स्थानांचे वैशिष्ट्य उजेडात येते व पर्यटकांच्या आकर्षणाचे कारण ठरु शकते परिणामी स्थानिकांना रोजगार उपलब्ध होतो.उदा. पांचगणी

३. अध्यापपर्यंत स्थानिक इतिहास लेखन झालेले आहे, परंतु भारतासारख्या विशाल व विविधतेने नटलेल्या पदेशात आणखीन स्थानिक इतिहासाचे लेखन होण्याची आवश्यकता आहे.

संदर्भ:

१. प्रा. जास्वंदी वांबुरकर (संपा), इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे. २)प्रभाकर देव, इतिहास:एक शास्त्र, ब्रेनटॉनिक प्रकाशन, नांदेड. 2022,

२. इ.एच.कार, इतिहास म्हणजे काय, अनु. प्रा. वि.गो. लेले, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 1994, पुणे.

३. महाराष्ट्र डिस्ट्रिक्ट गॅंजेटियर, सातारा जिल्हा, १९९९.

४. स्थलदर्शन

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यातून घडलेला कोल्हापूरचा सर्वांगीण पर्यटन विकास

डॉ. शिवाजी दत्तात्रय रायजादे

सहाय्यक प्राध्यापक,

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

Corresponding Author - डॉ. शिवाजी दत्तात्रय रायजादे

DOI - 10.5281/zenodo.19692577

कोल्हापूर ही नगरी केवळ ऐतिहासिक वारशापुरती मर्यादित नसून सामाजिक प्रबोधन, समृद्ध सांस्कृतिक परंपरा, क्रीडा-संस्कृती आणि नैसर्गिक सौंदर्य यांचा समन्वय साधणारे एक महत्त्वपूर्ण पर्यटन केंद्र म्हणून ओळखली जाते. या बहुआयामी पर्यटन ओळखीच्या जडणघडणीत छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान अत्यंत मूलभूत, व्यापक आणि दूरगामी स्वरूपाचे आहे. लोककल्याणाधिष्ठित दृष्टिकोन, आधुनिक विचारसरणी आणि सामाजिक न्यायाची ठाम भूमिका यांच्या आधारे शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचा सर्वांगीण विकास घडवून आणला. शिक्षणप्रसार, सामाजिक समता आणि प्रशासनातील सुधारणा यांसोबतच त्यांनी भौतिक व सांस्कृतिक पायाभूत सुविधांच्या उभारणीस विशेष प्राधान्य दिले. शाहू महाराजांनी कोल्हापूरची ओळख क्रीडा व सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्याचप्रमाणे चित्रकला, संगीत, नाट्य आणि लोककला यांना आश्रय देऊन त्यांनी सांस्कृतिक पर्यटनाचा भक्कम पाया घातला. आर्थिक विकासाच्या दृष्टीनेही शाहू महाराजांचे योगदान महत्त्वाचे आहे. तसेच साठमारी, शस्त्रकला, तसेच तत्कालीन काळातील चित्याची शिकार यांसारख्या परंपरागत व साहसी उपक्रमांमुळे संस्थानाच्या शौर्यपर परंपरेला चालना मिळाली, ज्याला आज ऐतिहासिक-सांस्कृतिक पर्यटनाच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दळणवळण सुविधांच्या विकासाकडे शाहू महाराजांनी दूरदृष्टीने पाहिले.याचा थेट परिणाम पर्यटनाच्या वाढीवर झाला आणि कोल्हापूर हे सुलभ, आकर्षक व विकसित पर्यटन केंद्र म्हणून उदयास आले. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांचे कार्य हे कोल्हापूरच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने एक भक्कम, दीर्घकालीन आणि सखोल संशोधनास पात्र असा पाया मानला जातो. हे कार्य कोल्हापूरच्या पर्यटनाला दिशा देणारे आणि भविष्यासाठी उपयुक्त ठरले आहे.

छत्रपती शाहू महाराज व दळवळण सुविधा:

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर कोल्हापूर राज्याच्या गादीवर कागल घराण्यातील जयसिंगराव घाटगे यांचा मुलगा यशवंतराव यास १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेण्यात आले. त्यांचे नामकरण "शाहू" असे करण्यात आले.[१] छत्रपती शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूरचा सर्वांगीण दृष्टिकोनातून विकास झाला. कला, क्रीडा, शिक्षण, व्यवसाय, शेती, नाट्य, संगीत या

क्षेत्रांमध्ये अमूलाग्र स्वरूपाचे बदल होऊन बहुआयामी विकास घडून आला.

छत्रपती शाहू महाराज कोल्हापूरच्या गादीवर आरूढ झाल्यानंतर त्यांनी लोककल्याणाचे पहिले कार्य हाती घेतले. कोल्हापूर–मिरज लोहमार्ग दक्षिण मराठा रेल्वेच्या वेस्टर्न डेक्कन विभागाने पुणे–मिरज हा रेल्वेमार्ग इ.स. १८८६ मध्ये पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला केला होता. पुढे छत्रपती शाहू महाराजांनी ३ मे १८८८ रोजी कोल्हापूर–मिरज या "दि कोल्हापूर स्टेट रेल्वे" या कामाचे उद्घाटन केले. २१ एप्रिल १८९१ रोजी हा रेल्वेमार्ग वाहतुकीसाठी पूर्णतः खुला करण्यात आला.[२] त्या वेळी कोल्हापूर–मिरज या रेल्वे प्रवासास सुमारे १४ तास लागत असत. पहाटे चार वाजता कोल्हापूरहून सुटलेली रेल्वे मिरज स्टेशनला सायंकाळी सहा वाजून सतरा मिनिटांनी पोहोचत असे. त्या काळात कोल्हापूर–मिरज तिकीटदर सहा आणे होता.कोल्हापूर–रुकडी प्रवास दोन आणे, कोल्हापूर–हातकणंगले प्रवास चार आणे, कोल्हापूर–उदगाव प्रवास पाच आणे तीन पैसे या रेल्वेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन दर्जाचे डबे होते.[३] रात्री गॅसवर चालणारे दिवे लावले जात असत. हा रेल्वेमार्ग चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी १७ जुलै १८९१ रोजी दक्षिण मराठा रेल्वेशी करार करण्यात आला. कोल्हापूर–मिरज रेल्वेमार्गावर रुकडी, हातकणंगले व उदगाव येथे रेल्वे स्टेशन बांधण्यात आली. कोल्हापूर येथे मोठे टर्मिनल स्टेशन उभारण्यात आले. या मार्गावर आवश्यक त्या ठिकाणी लहान-मोठे पूल बांधण्यात आले. [४] या सर्व उपायांमुळे प्रवासी व मालवाहतुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. कोल्हापूर हे मिरज व पुणे या महत्त्वाच्या शहरांशी जोडले गेले. परिणामी, कोल्हापूरच्या दळणवळणाच्या सुविधांमध्ये लक्षणीय प्रगती झाली. या सुधारित दळणवळण व्यवस्थेमुळे पर्यटनाच्या दृष्टीने कोल्हापूर अधिक सुलभ व आकर्षक केंद्र बनले आणि पर्यटकांच्या ये-जा व पर्यटन विकासाला मोठी चालना मिळाली.

दुष्काळी कामातून विकसित केलेल्या दळणवळणाच्या सुविधा:

छत्रपती शाहू महाराजांनी रेल्वे सुविधांबरोबरच दुष्काळी कामातूनही कोल्हापूर राज्यामध्ये विविध दळणवळणाच्या सुधारणा घडवून आणल्या. इ.स. १८९६ मध्ये कोल्हापूर राज्यात दुष्काळ पडला.[५] या दुष्काळात लोकांना रोजगार मिळावा व त्यांची उपासमार होऊ नये म्हणून दुष्काळी कामांतून रस्ते व पूल बांधण्यात आले. यामध्ये वडगाव ते कोडोली रस्ता, कोल्हापूरहून अणुस्कुरा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची डागडुजी, बुधवार पेठ–पन्हाळा ते आंबेवाडी रस्ता, गारगोटी ते पाटगाव रस्ता, तारळे ते हातकणंगले रस्ता, नेरली ते पाटगाव रस्ता, गारगोटी ते गडहिंग्लज रस्ता, कोडोली ते आंबा रस्ता तयार करण्यात आला.[६] छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळी कामांतून उभारलेल्या दळणवळण सुविधांमुळे कोल्हापूर राज्यातील अंतर्गत वाहतुकीचा विकास झाला. या सुधारित वाहतूक व्यवस्थेमुळे पर्यटनाच्या दृष्टीने विविध ठिकाणांपर्यंत सहज पोहोच शक्य झाली आणि परिणामी स्थानिक तसेच अंतर्गत पर्यटनाच्या विकासाला मोठी चालना मिळाली.

शेतीचे आधुनिकीकरण आणि पर्यटन प्रगती:

आज कोल्हापूर जिल्हा शेती व उद्योगधंद्यांत अग्रेसर असून त्याचा पाया छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत घातला गेला. शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी त्यांनी कोको, रेशीम, चहा, कॉफी, रबर,

ताग, बटाटा व कापूस यांसारख्या नगदी पिकांना प्रोत्साहन दिले.[७] चहाच्या मळ्यांचा प्रयोग यशस्वी करून उत्कृष्ट दर्जाचा चहा विकसित करण्यात आला. व्यापारी तत्त्वावर उत्पादन सुरू करून तो 'Panhala Tea No. 4' या नावाने प्रसिद्ध झाला, ज्यामुळे कोल्हापूरची ख्याती दूरवर पसरली.[८] छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूर राज्यात शेतीस पाण्याचा पुरवठा करण्यासाठी 'राधानगरी' हा प्रकल्प उभारला. अतिशय महत्त्वाकांक्षी असलेल्या या प्रकल्पाच्या बांधकामास नोव्हेंबर १९०८ मध्ये भोगावती नदीवर लक्ष्मीबाई राणीसाहेब यांच्या शुभहस्ते सुरुवात झाली.[९] छत्रपती शाहू महाराजांनी निर्माण केलेले धरण पुढील काळात महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले.

युरोपातील शेतकरी शास्त्रीय पद्धतीने शेती करून अधिक उत्पादन घेत असल्याचे छत्रपती शाहू महाराजांनी प्रत्यक्ष पाहिले होते. त्यामुळे आपल्या शेतकऱ्यांमध्ये आधुनिक कृषी ज्ञानाचा प्रसार व्हावा, या उद्देशाने त्यांनी विविध उपक्रम राबविले. सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करण्यासाठी १९१२ साली त्यांनी किंग एडवर्ड ॲग्रिकल्चर इन्स्टिट्यूट या संस्थेची स्थापना केली. तसेच कोल्हापूरात आधुनिक शेती-अवजारांचे संग्रहालय सुरू केले.[१०] शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी शेतीविषयक प्रदर्शनेही भरविण्यात आली. नोव्हेंबर १९०० मध्ये जैन परिषदेतर्फे भरविलेल्या प्रदर्शनात भरतकाम व विणकामाच्या वस्तू मांडण्यात आल्या होत्या. एप्रिल १९१४ मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी पहिल्यांदा मोठ्या प्रमाणावर शेती प्रदर्शन भरविले. या प्रदर्शनास पुण्याच्या शेती कॉलेजचे प्राचार्य डॉ. हेरॉल्ड मॅन तसेच तुकोजीराव होळकर यांनी भेट दिली. [११] शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने यावा म्हणून कुस्ती, मदानी खेळ व हत्तींच्या झुंजी यांसारखे करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच अशी प्रदर्शने महालक्ष्मी रथोत्सव व जोतिबा यात्रेच्या प्रसंगीही भरविली जात होती.[१२] शाहू महाराजांच्या शेतीप्रोत्साहनामुळे कोल्हापूर राज्यातील हरितक्रांतीला गती मिळाली. सातत्याने भरविलेल्या शेती प्रदर्शनांमुळे शेतकरी वर्ग सक्रिय झाला आणि त्याचा परिणाम म्हणून कोल्हापूरच्या पर्यटन विकासाला चालना मिळाली.

व्यापार व उद्योगधंद्यांच्या विस्तारातून पर्यटनास चालना:

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीच्या प्रारंभी कोल्हापूर संस्थानाची व्यापारी स्थिती कमकुवत होती. संस्थानात सक्षम बाजारपेठा नसल्यामुळे येथे तयार होणारा उत्कृष्ट प्रतीचा गूळ कोकणातील राजापूर येथे विक्रीस जात असे व तो "राजापूर गूळ" म्हणून ओळखला जाई.[१३] ही परिस्थिती बदलण्यासाठी शाहू महाराजांनी इ.स. १९०५ साली रेल्वे स्टेशनजवळ "शाहूपुरी" ही नवीन बाजारपेठ स्थापन केली.[१४] कागल, निपाणी येथील व्यापारी वर्गास खास सवलती देऊन त्यांना वखारी घालण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे येथे व्यापारी वसाहत वाढून दरवर्षी सुमारे ५० लाखांचा गूळ व २० लाखांचा भुईमूग निर्यात होऊ लागला. त्यामुळे कोल्हापूर गुळाची प्रमुख बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध झाले.[१५] तसेच १९१७ साली शिरोळ रेल्वे स्टेशनजवळ "जयसिंगपूर" ही आणखी एक बाजारपेठ स्थापन करण्यात आली. या बाजारपेठांमुळे व्यापारी व ग्राहकांची संख्या वाढली.[१६]

औद्योगिक विकासाचे महत्त्व ओळखून शाहू महाराजांनी उद्योगधंद्यांना चालना दिली. १९०६ साली "दि शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विव्हिंग मिल्स" या कापड

गिरणीची स्थापना करण्यात आली.[१७] याशिवाय जिनिंग फॅक्टऱ्या, ऑइल मिल, सॉ मिल, फाउंड्री, इलेक्ट्रिक कंपनी व मोटार ट्रान्सपोर्ट कंपनी असे विविध उद्योग सुरू झाले.[१८] या सर्व प्रयत्नांमुळे कोल्हापूर संस्थानाचा आर्थिक व औद्योगिक विकास घडून आला, त्यातून पर्यटन विकासास गती मिळाली आणि कोल्हापूरचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचले.

विविध कलांना राजाश्रय:

कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी विसाव्या शतकाच्या आरंभी कोल्हापूरचे खऱ्या अर्थाने सांस्कृतिक संवर्धन केले. कारण त्यांनी चित्रकला, नाट्य, संगीत, कुस्ती, विविध कला, क्रीडा प्रकारांना भरभरून प्रोत्साहन दिले. त्यांच्या या प्रोत्साहनामुळे कोल्हापूरचे नाव देशपातळीवर पोहोचण्यास मदत झाली.

संगीत:

संगीत आणि नाट्य या कलाक्षेत्रांमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कारकिर्दीत अल्लादिया खाँ (१८५५–१९४०) तसेच त्यांचे बंधू हैदर खाँ साहेब (१८६१–१९३६) हे जयपूर येथील गायक दरबारात गायक म्हणून होते.[१९] अल्लादिया खाँ यांनी उत्तर भारतीय ख्याल गायकी महाराष्ट्रात आणून ती येथे लोकप्रिय करण्याचे महनीय कार्य केले. एवढेच नव्हे तर अत्यंत परिश्रमपूर्वक आपल्या अभिजात गायनाची एक वेगळीच परंपरा निर्माण केली.[२०] अल्लादिया खाँ यांच्याबरोबरच गायन तपस्विनी केसरबाई केरकर, अंजनीबाई मालपेकर, कुशल सारंगीये हैदरबक्स यांसारख्या अप्रतिम गायक व वादकांना छत्रपती शाहू महाराजांनी सुरुवातीपासून भरपूर उत्तेजन दिले.[२१] तसेच इ.स. १८९३ मध्ये बाबा देवल यांनी 'देवल क्लब'ची स्थापना केली.[२२] देवल क्लबच्या माध्यमातून कित्येक नामवंत गायक व वादक येथे तयार झाले. देवल क्लबची कीर्ती शाहू महाराजांच्या कानावर गेल्यानंतर त्यांनी या क्लबला जागेपासून ते इमारत बांधकाम फंडापर्यंत मदत केली.[२३] शाहू महाराजांच्या आश्रयामुळे "देवल क्लब" प्रसिद्धीस आला. तेव्हा देशातील प्रत्येक गायक-गायिकेला वाटायचे की आपले गायन देवळ क्लबमध्ये व्हावे. महाराजांच्या आश्रयामुळे व प्रेरणेने ही संस्था अखिल भारतीय कीर्तीची बनली होती.[२४] अशा प्रकारे महाराजांनी अभिजात संगीतविषयक आवडीमुळे हिंदुस्थानातील संगीताच्या विविध घराण्यांना व अनेक थोर कलावंतांना कोल्हापूरमध्ये आकर्षित केले. यामुळे कोल्हापूरबरोबरच संपूर्ण महाराष्ट्राला शास्त्रीय संगीताची गोडी लागली. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील कलावंतांची एक उच्च दर्जाची संगीत परंपरा निर्माण होऊन सांस्कृतिक पर्यटनास चालना मिळाली.

नाट्यकला:

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीत नाट्यकलेला संगीतकलेच्या बरोबरीचा राजाश्रय प्राप्त झाला. बालगंधर्व, केशवराव भोसले यांसारख्या महान कलाकारांना महाराजांनी राजाश्रय दिला होता. तसेच किर्लोस्करांची "किर्लोस्कर नाटक मंडळी", दत्तोपंत हळळीकर यांची "महालक्ष्मी प्रासादिक नाटक मंडळी", भाऊराव जाधव यांची "कोल्हापूर संगीत नाटक मंडळी", गोविंदराव टेंबे यांची "शिवराज संगीत मंडळी" याखेरीज केवळ स्त्रियांनी चालवलेली "श्रीफणी स्त्री संगीत नाट्य मंडळी" इ. नाटक मंडळींना शाहू छत्रपतींचे कृपाछत्र लाभले होते.या काळात विविध नाटक मंडळींना, सरदार-जहागीरदारांच्या जुन्या वाड्यात किंवा मंडपात आपले प्रयोग सादर करावे लागत असत. काही वेळेला नाटकांचे प्रयोग उघड्यावरही होत असत. या सर्व अडचणी लक्षात

घेऊन शाहू महाराजांनी इ. स. १९१५ रोजी "पॅलेस थिएटर" हे आधुनिक सोयी-सुविधांनी युक्त असे नाट्यगृह तयार करून घेतले.[२५] अशा प्रकारे शाहू महाराजांनी नाटक कंपन्यांना आणि कलाकारांना त्यांची कला प्रदर्शित करण्यासाठी हक्काचे एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र शासनाने या थिएटरचे "केशवराव भोसले नाट्यगृह" असे नामकरण केले. शाहू महाराजांनी नाट्यकलेस राजाश्रय दिल्यामुळे नाटक हा करमणुकीचा प्रकार कोल्हापूरमध्ये लोकप्रिय झाला.

चित्रकला:

चित्रकला या ललितकलेच्या क्षेत्रात शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूरने उत्तुंग भरारी मारली. या क्षेत्रात आबालाल रहिमान सर्वांत श्रेष्ठ चित्रकार संस्थानकाळात होऊन गेले. शाहू महाराजांनी त्यांना राजाश्रय दिला व दरबारी चित्रकार म्हणून नेमले. या राजाश्रयामुळे कोल्हापूरची चित्रकला देशपातळीवर प्रसिद्ध झाली[२६] आणि पुढे सांस्कृतिक पर्यटनाच्या दृष्टीने कोल्हापूरची ओळख अधिक बळकट झाली.या कालखंडातील दुसरे ज्येष्ठ कलावंत बाबुराव पेंटर यांनी कोणत्याही कला शाळेत औपचारिक कलाशिक्षण न घेता केवळ आत्मप्रेरणा व स्वतःच्या कल्पकतेच्या जोरावर त्या काळी प्रचलित असलेल्या पाश्चात्त्य कला शैलीमध्ये प्रभुत्व संपादन करून स्वतःची स्वतंत्र चित्रशैली निर्माण केली. त्यामुळेच त्यांना "कलामहर्षी" म्हणून ओळखले जाऊ लागले.[२७] त्यांच्या कलाकृतींमुळे कोल्हापूरचे कलावैभव वाढून कला-पर्यटनाला चालना मिळाली. आबालाल रहिमान यांच्या प्रेरणेतून कोल्हापूरात अनेक कलावंत निर्माण झाले. त्यांपैकी एक दत्तोबा दळवी हे शाहू महाराजांच्या प्रोत्साहनामुळे "जे. जे. स्कूल ऑफ आर्ट" मध्ये शिक्षणासाठी गेले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी कोल्हापूरमध्ये "दळवी आर्ट इन्स्टिट्यूट"ची स्थापना करून चित्रकलेच्या शिक्षणाची गंगा कोल्हापूरात सुरू केली. यामुळे स्थानिक कलाकार घडले आणि कला शिक्षणासोबतच सांस्कृतिक पर्यटनालाही पूरक वातावरण निर्माण झाले.[२८] शाहू महाराजांनी चित्रकलेला दिलेल्या प्रोत्साहनामुळे शाहूनंतरच्या काळात चित्रकारांचा एक तेजस्वी प्रवाह उदयास आला. यामध्ये माधवराव बागल, गणपतराव वडणगेकर, जी. कांबळे, रविंद्र मेस्त्री, चंद्रकांत पी. सरदार, जयसिंगराव दांडेकर, बाबुराव सडोलीकर आदी कलावंतांनी कोल्हापूरची कलापरंपरा समृद्ध करण्यास मोलाचा हातभार लावला.[२९] त्यांच्या कलाकृतींमुळे कोल्हापूर हे कला व सांस्कृतिक पर्यटनाचे केंद्र म्हणून विकसित होत गेले.

अशा प्रकारे शाहू महाराजांकडून संगीत, नाट्य व चित्रकलेला मिळालेल्या प्रोत्साहनामुळे कोल्हापूरचे, पर्यायाने महाराष्ट्राचे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सांस्कृतिक जीवन समृद्ध झाले. याचा सकारात्मक परिणाम पर्यटन विकासावर होऊन कोल्हापूरची ओळख एक महत्त्वाचे सांस्कृतिक व पर्यटनस्थळ म्हणून निर्माण झाली.

मर्दानी कला:

शाहू महाराजांनी संगीत, नाट्य व चित्रकलेबरोबरच मर्दानी कलेलाही प्रोत्साहन दिले. त्यांनी आपल्या संस्थानात विविध मर्दानी कलांना राजाश्रय देऊन त्यांचा सर्वांगीण विकास केला. यामुळे मर्दानी कलेची आवड असणारे लोक कोल्हापूरात हे खेळ पाहण्यासाठी तसेच आत्मसात करण्यासाठी येत होते. या मर्दानी कलांमुळे कोल्हापूरची स्वतंत्र सांस्कृतिक ओळख निर्माण झाली आणि क्रीडा व सांस्कृतिक पर्यटन विकासाला चालना मिळाली.

मल्लविद्या:

संस्थानकाळात छत्रपती शाहू व छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात मल्लविद्येला विशेष महत्त्व प्राप्त झाले. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत "मल्लविद्या" मोठ्या प्रमाणावर विकसित झाली. संस्थान काळाचा एक अभ्यासक हिंदुराव साळुंखे आपल्या लेखनात म्हणतो की, "भारतामध्ये पाटियालाला मल्लविद्येची गंगोत्री मानले जाते, तर कोल्हापूरला 'मल्लविद्येचे माहेर' म्हटले जाते. या दृष्टिकोनातून पाटियालाचे महाराज रघुविंद्रसिंग यांना 'मल्लविद्येचे भोक्ते' आणि कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांना 'मल्लविद्येचे पोषक' तसेच 'मल्लांचे मल्ल' असे संबोधले जाऊ लागले." शाहू महाराजांनी मल्लविद्येला उदार राजाश्रय दिला.३० त्यांनी सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या मल्लांना प्रोत्साहन दिले. तसेच संस्थानाबाहेरील मल्लांनाही राजाश्रय दिला. यामुळे सर्व देशातून विशेषतः पंजाब, दिल्ली या प्रदेशातील मल्ल येथे आकर्षित होऊ लागले. त्यांच्या मेहनतीची व खुराकाची चोख व्यवस्था दरबाराकडून होत राहिली. यामुळे कोल्हापूर हे हिंदुस्थानातील "मल्लविद्येचे विद्यापीठ" बनले.[३१]

शाहू महाराजांनी मल्लविद्येचा विकास करण्यासाठी संस्थानात कुस्त्यांची मैदाने भरविली. शाहू महाराजांच्या आधी कोल्हापूरात फक्त शुक्रवारी मैदाने भरत होती. शाहू महाराजांनी शुक्रवार व मंगळवार या दोन दिवशी नियमित मैदाने भरविण्याची पद्धत पाडली. ही मैदाने जुन्या राजवाड्याच्या पश्चिमेस बाबूजमाल दर्ग्यात व मंगळवारी विठोबा देवळाच्या पिछाडीस भरत होती. तसेच शाहू महाराजांनी खेडोपाडीच्या लोकांना जत्रा-उत्सवांच्या वेळी व अन्य मंगलप्रसंगी कुस्त्यांचे फड भरविण्यास उत्तेजन दिले. शाहू महाराजांच्या काळात उरूस, ईद यांसारख्या सणांनाही कुस्त्यांची मैदाने भरत होती. कुस्त्यांच्या मैदानास महाराज स्वतः हजर राहत होते. त्यामुळे जहागीरदार, सरदार, श्रीमंत, व्यापारी, जमिनदार मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित राहू लागली.[३२] राजर्षी शाहू महाराज मल्लविद्येच्या विकासासाठी खऱ्या अर्थाने झटले. म्हणून कोल्हापूरचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाले.

साठमारी:

साठमारी या मर्दानी कलेचा विकास राजर्षी शाहू महाराजांनी केला. शाहू महाराजांनी मद्रासमध्ये झालेल्या हत्तीच्या "साठमारी" हा खेळ बडोद्याहून कोल्हापूरला आणून, आपल्या कल्पक दृष्टीकोनातून या मर्दानी खेळाचा विकास केला. साठमारीचे आखाडे (अखाडे) त्यांनी आपल्या संकल्पनेनुसार बांधले. बडोद्यात साठमारी घोड्यावर स्वार होऊन खेळली जात होती; मात्र शाहू महाराजांनी केलेल्या या बदलांमुळे साठमारीला वैशिष्ट्यपूर्ण क्रीडा-पर्यटनाचा नवा आयाम प्राप्त झाला. शाहू महाराजांनी विकसित केलेल्या साठमारीत येथील साठमार पायीच हत्तीवर चढून हत्ती चालवित आणि हत्ती मस्तावल्यास अखाड्यात बांधलेल्या खांबात आसरा घेत. या थरारक खेळामुळे साठमाराचे प्रसंगावधान व चपळाई या गुणांची कसोटी लागत असे. अशा साहसी आणि रोमहर्षक प्रात्यक्षिकांमुळे कोल्हापूरमध्ये पर्यटकांचे आकर्षण वाढले आणि लोककलेचे दर्शन घडवणारा हा खेळ सांस्कृतिक पर्यटनाचा महत्त्वाचा घटक ठरला.[३३] शाहू महाराजांनी या मर्दानी कलेला प्रोत्साहन देण्यासाठी संस्थानात कोल्हापूर, सोनतळी, राधानगरी, पन्हाळा, रुकडी इत्यादी ठिकाणी साठमारीसाठी आखाडे बांधले.[३४] या आखाड्यांमुळे संबंधित परिसरात स्थानिक पर्यटनाचा विकास झाला तसेच ग्रामीण भागातील क्रीडा-पर्यटनाला

चालना मिळाली. बाहेरून साठमारी तज्ज्ञ आणून आपली माणसे या कलेत तरबेज केली. यामुळे कोल्हापूर हे देशातील साठमारीच्या खेळाचे बडोद्याच्या तोडीचे प्रमुख केंद्र बनले. परिणामी, कोल्हापूरची ओळख केवळ ऐतिहासिक शहर म्हणून नव्हे, तर मर्दानी कलेच्या व क्रीडा-पर्यटनाच्या केंद्र म्हणूनही निर्माण झाली.

साठमारीबरोबर महाराजांनी "हत्तीच्या टक्कर" हा अभिनव खेळ कोल्हापुरात सुरू केला. प्रारंभी हा टक्कर जुना राजवाड्याच्या चौकात होत असे. नंतर ती साठमारीच्या आखाड्यात केली जाऊ लागली. टक्करच्या प्रसंगी हत्तीचे दात जायबंदी होऊ नयेत म्हणून खास कातडीचे आवरण लावले जात असे. त्यासाठी दोन हत्तींच्या मध्ये सहा फूट उंचीची भिंत उभी केली जात होती.[३५] या अद्वितीय खेळामुळे वारसा पर्यटन (Heritage Tourism) आणि थरारक क्रीडा-पर्यटन यांना मोठी चालना मिळाली.

चित्त्याची शिकार:

कुस्ती, साठमारी यांसारख्या खेळांबरोबरच शिकारीचीही राजर्षी शाहू महाराजांना विशेष आवड होती. शाहू महाराजांच्या काळात शिकारीच्या अनेक पद्धती अस्तित्वात होत्या. त्यामध्ये "चित्त्याची शिकार" ही कोल्हापूरच्या छत्रपतींची खास वैशिष्ट्यपूर्ण पद्धत होती.[३६] चित्त्याची शिकार हा खेळ राजर्षी शाहू महाराजांनी विद्यार्थी दशेत राजकोट मुक्कामी शिक्षण घेत असताना भावनगर येथे प्रथम पाहिला. त्यानंतर काही काळाने त्यांनी हा खेळ कोल्हापूर संस्थानात आणला. हा खेळ इ.स. १९४० पर्यंत, म्हणजेच राजाराम महाराजांच्या काळापर्यंत कोल्हापूर संस्थानात अस्तित्वात होता.[३७] महाराजांनी अनेक चित्ते पाळून त्यांना खास तंत्राने प्रशिक्षित केले होते. चित्त्याच्या शिकारीसाठी संस्थानात विविध ठिकाणी संरक्षित वने तयार करण्यात आली होती. त्या ठिकाणी असणाऱ्या हरिणांच्या कळपातील काळविटांचीच शिकार करण्याचे प्रशिक्षण चित्त्यांना दिले जात असे.[३८] अशा चित्त्यांना वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गाड्या महाराजांनी स्वतः डिझाइन करून तयार करून घेतल्या होत्या. संस्थानात व्हाइसरॉय, ब्रिटिश अधिकारी यांसारखे मान्यवर पाहुणे आल्यास त्यांच्या सन्मानार्थ "चित्त्याची शिकार" आयोजित केली जात असे.[३९]

रेसकोर्स:

कोल्हापूरमध्ये ब्रिटिश रेसिडेन्सीचा अंमल सुरू झाल्यानंतर ब्रिटिश अधिकारी, त्यांची कुटुंबे व सैनिक येथे राहण्यासाठी आले. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाच्या पद्धतीनुसार काही नव्या सुविधा येथे निर्माण करण्यात आल्या. ताराबाई पार्कमध्ये गोल्फ कोर्स, बिलियर्ड्स हॉल, मद्यपान, जुगाराला प्रतिष्ठा मिळवून देणारा क्लब, रंकाळा तलावाच्या काठावर बोटिंगची सोय तसेच पद्माळ्यात रेसकोर्स सुरू करण्यात आला. पद्माळ्यातील रेसकोर्सवर शर्यतींचा हंगाम पावसाळ्यानंतर असे. या शर्यती पाहण्यासाठी अरबियन शौकीन खास कोल्हापूरमध्ये येत असत. शर्यतींच्या तिकिटांची विक्री मैदानावर तसेच विल्सन रोड (शिवाजी रोड) आणि आराम कॉर्नरला होत असे. या स्पर्धांसाठी नामवंत जॉकी येथे घोडे घेऊन येत असत.[४०] बाहेरून आलेल्या जॉकींच्या राहण्याची सोय 'देवल क्लब'मध्ये केली जात असे आणि त्यांचा सर्व खर्च दरबारातून केला जात असे.[४१] कोल्हापूरमधील रेसकोर्सला रॉयल वेस्टर्न टर्फ क्लबचा परवाना होता. या रेसकोर्सवरील शर्यती पाहण्यासाठी कोल्हापूरमध्ये देशी व विदेशी पाहुणे भेटी देत असत. पुढील काळात राजाराम महाराजांच्या निधनानंतर रेसकोर्सवरील घोड्यांची धाव थांबली.[४२]

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर संस्थानात कुस्ती, मर्दानी खेळ, संगीत, नाट्य, चित्रकला इत्यादी विविध कला-क्रीडांना भरभरून राजाश्रय देण्यात आला. या राजाश्रयामुळे कला-क्रीडांना केवळ प्रोत्साहनच नव्हे, तर संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले. परिणामी, कोल्हापूर हे "कलानगरी" म्हणून लौकिकास पात्र ठरले. सांस्कृतिक उपक्रम, मर्दानी खेळ व क्रीडा स्पर्धांमुळे शहराची स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण झाली. या समृद्ध परंपरांमुळे कोल्हापूरमध्ये सांस्कृतिक पर्यटन व क्रीडा-पर्यटनाचा विकास घडून आला. देशातील विविध भागांतून कलाकार, खेळाडू, रसिक तसेच पर्यटक कोल्हापूरकडे आकर्षित झाले. पर्यटकांच्या वाढत्या ओघामुळे स्थानिक अर्थव्यवस्था, सेवा क्षेत्र व सामाजिक जीवनाला चालना मिळाली. अशा प्रकारे शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूरचा सर्वांगीण आणि शाश्वत पर्यटन विकासाचा पाया घातला गेला.

संदर्भ:

१. सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. २३.

२. चौधरी कि. का. (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर : कोल्हापूर जिल्हा, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. ४३४–४३५.

३. दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. १६ सप्टेंबर २००४, पृ. ५.

४. शिंदे (डॉ.), खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास (१८३८–१८९४), निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, २००९, पृ. १८७.

५. साळुंखे पी. बी. (संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई, १९७६, पृ. १७७.

६. Administration Report of the Kolhapur State for the year 1897-98, P.74.

७. कुलकर्णी (डॉ.) मीना, कुलकर्णी वि. शि., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन प्रकाशन, कोल्हापूर, १९७५, पृ. २९–३१.

८. Sangve (Ed.), Rajashri Shahu Chhatrapati Paper Vol.V, Shivaji University, Kolhapur, 1982, P. 382.

९. Sangve (Ed.), Rajashri Shahu Chhatrapati Paper Vol.VI, Shivaji University, Kolhapur, 1994, P. 78.

१०. पवार (डॉ.) ज. भा., राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, विधान भवन, मुंबई, २००९, पृ. १४३.

११. साळुंखे पी. नी. (संपा.), उपरोक्त, पृ. १७२.

१२. पवार (डॉ.) ज. भा., राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य, उपरोक्त, पृ. १४३.

१३. लठ्ठे, आ. बा., श्री छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, बेळगाव, १९२५, पृ. २८१.

१४. चौधरी कि. का. (संपा.), उपरोक्त, पृ. १०७.

१५. लठ्ठे आ. बा., उपरोक्त, पृ. २८१.

१६. शामराव पाटील, धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश (संकलन), भाग–१, मुंबई, १९८८, पृ. १४३.

१७. पवार (डॉ.) जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ. २०७.

१८. Sangve (Dr.), Vilas, op-cit, PP. 26-27.

१९. भेंडे ग. द., देशपांडे पु. ल. (संपा.), कोल्हापूर दर्शन, इंटरनॅशनल पब्लिशिंग सर्व्हिस, पुणे, १९७१, पृ. १६८–१६९.

२०. कुंभारकर रा. कृ. (संपा.), राजर्षी शाहूमहोत्सव १९९३, राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट, कोल्हापूर, १९९३, पृ. ४.

२१. जाधव, प्रतापसिंह ग. (संपा.), जरीपटका, ६५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, १९९२, पृ. ६७.
२२. माळी गुरुबाळ, वारसा कोल्हापूरचा, ए. एस. प्रकाशन, कोल्हापूर, १९९९, पृ. ६९.
२३. साळुंखे, पी. बी., उपरोक्त, पृ. ११६–११७.
२४. पवार (डॉ.) जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ. २१७.
२५. तद्वत, पृ. २१९.
२६. भगत, रा. तु., रंगसम्राट आबालाल रहिमान, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, १९९३, पृ. १५–२०.
२७. सडवेकर, बाबुराव, कला महर्षी बाबुराव पेंटर शताब्दी स्मरण ग्रंथ, पृ. १.
२८. जाधव, श्यामकांत, रंगचित्रकारांचे, वस्तुगंध प्रकाशन, कोल्हापूर, २००२, पृ. ५६.
२९. पवार (डॉ.) जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ. २२९.
३०. तद्वत, पृ. ६३१.
३१. तद्वत, पृ. २१४.
३२. साळुंखे, पी. बी., उपरोक्त, पृ. ३६–३७.
३३. किर्लोस्कर शांताराम (संपा.), किर्लोस्कर, पुणे, १९८३, पृ. १८.
३४. पवार (डॉ.) जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ. २१२.
३५. साळुंखे हिंदुराव, छत्रपती शाहू स्मृती दर्शन, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर, १९९८, पृ. ५५–५६.
३६. पवार (डॉ.) जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ. ६४३.
३७. जाधव लीलावती,नर्लेकर गणेशराव, शिकारी चित्ता आणि चित्तावन, चैतन्यप्रसाद पब्लिकेशन्स, २००९, मनोगत – गणेशराव नर्लेकर.
३८. पवार (डॉ.) ओ. भा., राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य, उपरोक्त, पृ. १५२.
३९. जाधव लीलावती, नर्लेकर गणेशराव, उपरोक्त, पृ. ११०.
४०. काशीद सुधाकर, कोल्हापूरच्या पाऊलखुणा, सकाळ पेपर्स लिमिटेड, कोल्हापूर, पृ. ३६.
४१. माळी गुरुबाळ, उपरोक्त, पृ. ७४.
४२. काशीद सुधाकर, उपरोक्त, पृ. ३७–३८.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

वांग- मराठवाडी प्रकल्पाची रचना व तांत्रिक वैशिष्ट्ये : एक ऐतिहासिक अभ्यास

प्रा. प्रकाश शामराव नांगरे

सहाय्यक प्राध्यापक,

सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

***Corresponding Author* - प्रा. प्रकाश शामराव नांगरे**

DOI - 10.5281/zenodo.19692611

सारांश (Abstract):

वांग–मराठवाडी प्रकल्प हा पाटण तालुक्यातील जलसिंचन विकासाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो. या संशोधन लेखात प्रकल्पाच्या स्थापनेचा ऐतिहासिक मागोवा घेत त्याची रचना, तांत्रिक वैशिष्ट्ये आणि सामाजिक-आर्थिक परिणाम यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील नियोजनबद्ध विकासधोरण, पंचवार्षिक योजना आणि जलसंपदा विकास यांचा प्रादेशिक संदर्भात विचार करून या प्रकल्पाची निर्मिती कशी घडली हे स्पष्ट केले आहे.

अभ्यासात ऐतिहासिक विश्लेषण पद्धतीचा अवलंब करून प्राथमिक स्रोत (जलसंपदा विभागाचे अहवाल, शासन निर्णय, जिल्हा गॅझेटिअर, मौखिक इतिहास) तसेच दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या रचनेतील तांत्रिक बाबी—धरणाचा प्रकार, जलसाठा क्षमता, सांडवा आणि कालवा व्यवस्था—यांचे ऐतिहासिक विश्लेषण करण्यात आले आहे.

या प्रकल्पामुळे कृषी क्षेत्रात पीकपद्धतीतील बदल, उत्पादनवाढ आणि दुबार पीक पद्धतीचा अवलंब शक्य झाला. ग्रामीण रोजगारनिर्मिती वाढली, स्थलांतरात घट झाली आणि स्थानिक अर्थव्यवस्था गतिमान झाली. तथापि, लाभांचे वितरण, लघु व सीमांत शेतकऱ्यांची स्थिती आणि पर्यावरणीय परिणाम यांचा चिकित्सक विचार आवश्यक असल्याचेही निष्कर्षातून अधोरेखित होते.

एकूणच, वांग–मराठवाडी प्रकल्प हा प्रादेशिक विकास, शासन धोरण आणि अभियांत्रिकी प्रगती यांच्या संगमाचे उदाहरण असून, ग्रामीण समाजरचनेतील परिवर्तन समजून घेण्यासाठी तो महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तऐवज ठरतो.

Key Words (महत्त्वाची शब्दे): वांग–मराठवाडी प्रकल्प, पाटण तालुका, जलसिंचन विकास, स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्र, जलसंपदा व्यवस्थापन, धरण रचना व तांत्रिक वैशिष्ट्ये, पंचवार्षिक योजना, कृषी परिवर्तन, ग्रामीण अर्थव्यवस्था, सामाजिक-आर्थिक परिणाम

प्रस्तावना:

भारतातील जलव्यवस्थापनाची परंपरा प्राचीन काळापासून विकसित झालेली आढळते. सिंधू संस्कृतीतील जलनिस्सारण व्यवस्था, दक्षिण भारतातील टाकी (Tank) प्रणाली, तसेच मध्ययुगीन काळातील तलाव व बंधारे यांमधून जलस्रोतांच्या नियोजनबद्ध वापराची परंपरा स्पष्ट होते. तथापि, आधुनिक अभियांत्रिकी तत्त्वांवर आधारित मोठ्या प्रमाणातील जलसिंचन प्रकल्पांची संकल्पना ब्रिटिश काळात आकारास आली. महसूलवाढ आणि कृषी उत्पादनक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने कालवे व लघु धरणे उभारली गेली. स्वातंत्र्यानंतर भारताने नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारला. पंचवार्षिक योजनांमध्ये

जलसिंचन आणि बहुउद्देशीय प्रकल्पांना विशेष महत्त्व देण्यात आले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी धरणांना "आधुनिक भारताची मंदिरे" असे संबोधले होते. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्याच्या विविध भागांतील भौगोलिक असमानता आणि दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन जलसंपदा विकासावर भर देण्यात पाटण तालुका हा भौगोलिकदृष्ट्या डोंगराळ आणि पर्जन्यमानात चढ-उतार असलेला प्रदेश आहे. पावसाच्या अनिश्चिततेमुळे येथे वारंवार दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होत असे. शेती मुख्यतः पावसावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अस्थिरता होती. या पार्श्वभूमीवर जलसाठा व सिंचन व्यवस्था उभारण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. पाटण तालुक्यातील **वांग मराठवाडी प्रकल्प** हा अशाच विकासनीतीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

संशोधन उद्दिष्टे:

1. वांग मराठवाडी प्रकल्पाच्या स्थापनेचा ऐतिहासिक मागोवा घेणे.
2. प्रकल्पाच्या रचनेतील तांत्रिक वैशिष्ट्यांचा कालानुरूप विकास अभ्यासणे.
3. शासन धोरणे व प्रादेशिक गरजा यांचा परस्परसंबंध तपासणे.
4. प्रकल्पाच्या सामाजिक-आर्थिक परिणामांचे ऐतिहासिक विश्लेषण करणे.

संशोधन पद्धती:

या अभ्यासात ऐतिहासिक विश्लेषण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

(अ) प्राथमिक स्रोत: जलसंपदा विभागाचे अहवाल, शासन निर्णय (GR), जिल्हा गॅझेटिअर, स्थानिक मौखिक इतिहास (Oral History)

(ब) दुय्यम स्रोत: महाराष्ट्रातील सिंचन धोरणावरील पुस्तके, संशोधन प्रबंध, शैक्षणिक लेख

ऐतिहासिक पार्श्वभूमी:

१. ब्रिटिशकालीन जलधोरण:

भारतातील आधुनिक जलव्यवस्थापनाच्या रचनेची सुरुवात मोठ्या प्रमाणावर ब्रिटिश सत्ताकाळात झाली. ब्रिटिश प्रशासनाचा मुख्य उद्देश महसूलवाढ आणि कृषी उत्पादनक्षमता वाढविणे हा होता. त्यामुळे कालवे, बंधारे आणि लघु सिंचन प्रकल्प उभारण्यावर भर देण्यात आला. विशेषतः मद्रास, पंजाब आणि उत्तर भारतात कालव्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर शेतीस पाणीपुरवठा करण्यात आला.महाराष्ट्राच्या प्रदेशातही काही लघु धरणे व पाटबंधारे योजना राबविण्यात आल्या; परंतु या योजना प्रामुख्याने महसूल संकलनाशी निगडित होत्या. ब्रिटिश धोरणात दीर्घकालीन जलस्रोत व्यवस्थापनापेक्षा तात्पुरत्या उपाययोजनांना प्राधान्य होते.

२. स्वातंत्र्योत्तर नियोजन:

१९४७ नंतर भारताने नियोजनबद्ध आर्थिक विकासाची दिशा स्वीकारली. पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी विकासाला प्राधान्य देताना सिंचन सुविधांचा विस्तार हा मुख्य घटक मानला गेला. भाकरा-नांगल, हिराकूड, दामोदर व्हॅली यांसारख्या बहुउद्देशीय प्रकल्पांमुळे जलविद्युत निर्मिती, पूरनियंत्रण आणि सिंचन या तिन्ही बाबींना चालना मिळाली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर (१९६०) राज्य शासनाने प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी लघु, मध्यम व मोठ्या सिंचन प्रकल्पांचे जाळे उभारण्यास सुरुवात केली. विशेषतः कोरडवाहू आणि दुष्काळग्रस्त भागांमध्ये

जलसाठा निर्मितीला प्राधान्य देण्यात आले. १९६०–८० या कालखंडात हरितक्रांतीच्या प्रभावामुळे सिंचन प्रकल्पांचे महत्त्व अधिक वाढले.

३. पाटण तालुक्याची परिस्थिती:

पाटण तालुका भौगोलिकदृष्ट्या डोंगराळ व अंशतः पावसावर अवलंबून असलेला प्रदेश आहे. येथील शेती मुख्यतः पारंपरिक पद्धतीने केली जात होती आणि पिके प्रामुख्याने ज्वारी, बाजरी, नाचणी यांसारखी कोरडवाहू होती. पावसाचे अनियमित वितरण, मृदाधूप (Soil Erosion) आणि जलस्रोतांची कमतरता यांमुळे कृषी उत्पादनात अस्थिरता निर्माण होत असे.वारंवार येणाऱ्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटत असे, हंगामी स्थलांतर वाढत असे, ग्रामीण अर्थव्यवस्थेत मंदी येत असे.या पार्श्वभूमीवर जलसाठा निर्मिती, सिंचन सुविधा आणि भूजल पुनर्भरण यांची आवश्यकता निर्माण झाली. स्थानिक पातळीवरील मागणी आणि शासनाच्या प्रादेशिक विकास धोरणाचा संगम झाल्यामुळे वांग मराठवाडी प्रकल्पासारख्या जलसिंचन योजनेची संकल्पना पुढे आली. पाटण तालुक्यातील जलप्रकल्पांची उभारणी ही केवळ अभियांत्रिकी कृती नसून सामाजिक-आर्थिक परिवर्तनाच्या ऐतिहासिक प्रक्रियेचा एक भाग ठरते. या पार्श्वभूमीवर वांग मराठवाडी प्रकल्पाचा अभ्यास केल्यास प्रादेशिक इतिहासातील विकासनीतीचे स्वरूप अधिक स्पष्ट होते.

वांग मराठवाडी प्रकल्पाची स्थापना व नियोजन:

वांग मराठवाडी प्रकल्पाची संकल्पना ही स्थानिक जलटंचाई, अस्थिर कृषी उत्पादन आणि ग्रामीण आर्थिक अडचणी यांच्या पार्श्वभूमीवर उदयास आली. पाटण तालुक्यातील पावसाच्या अनिश्चिततेमुळे दीर्घकालीन जलस्रोत निर्मितीची गरज शासनाच्या निदर्शनास आली. राज्याच्या जलसंपदा विकास धोरणांतर्गत मध्यम किंवा लघु सिंचन प्रकल्पांची आखणी करण्यात आली आणि त्याच अनुषंगाने वांग मराठवाडी प्रकल्पाचा विचार पुढे आला. प्रकल्पाची उभारणी ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून प्रशासकीय, आर्थिक आणि सामाजिक घटकांचा संगम होता. नियोजन प्रक्रियेत स्थानिक लोकप्रतिनिधी, तांत्रिक अधिकारी आणि शासनस्तरीय समित्यांचा सहभाग होता.

१ मंजुरी प्रक्रिया:

(अ) प्राथमिक सर्वेक्षण: प्रकल्पाच्या आरंभी जलसंपदा विभागामार्फत भौगोलिक, जलवैज्ञानिक (Hydrological) आणि मृदाशास्त्रीय सर्वेक्षण करण्यात आले. नदीपात्राची रचना, पाणलोट क्षेत्र (Catchment Area), पर्जन्यमान, मातीचा प्रकार आणि भूगर्भीय स्थिती यांचा अभ्यास करण्यात आला. या सर्वेक्षणाच्या आधारे धरणाच्या संभाव्य स्थळाची निवड निश्चित करण्यात आली.

(ब) तांत्रिक मान्यता: सर्वेक्षण अहवालांच्या आधारे तांत्रिक आराखडा (Detailed Project Report – DPR) तयार करण्यात आला. या अहवालात धरणाचा प्रकार, उंची, लांबी, जलसाठा क्षमता, सांडव्याची रचना, कालवा व्यवस्था इत्यादी बाबींचा समावेश होता. तज्ञ समित्यांनी या आराखड्याची तपासणी करून आवश्यक सुधारणा सुचवल्या आणि त्यानंतर तांत्रिक मान्यता देण्यात आली.

(क) आर्थिक तरतूद: प्रकल्पासाठी आवश्यक निधीची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पातून करण्यात आली. खर्चाचा अंदाज बांधकाम साहित्य, यंत्रसामग्री, मजूर, पुनर्वसन (असल्यास) आणि प्रशासकीय खर्च यांचा विचार करून निश्चित करण्यात आला. काही प्रकरणांत केंद्र शासनाच्या योजनांअंतर्गत अनुदान किंवा विशेष निधी मिळाल्याची उदाहरणेही आढळतात.

रचना व तांत्रिक वैशिष्ट्ये : ऐतिहासिक विश्लेषण:

१. धरणाचा प्रकार:

वांग मराठवाडी प्रकल्पाच्या रचनेत त्या काळातील उपलब्ध तंत्रज्ञान, स्थानिक भूगोल आणि बांधकाम साहित्य यांचा विचार करण्यात आला. जर धरण मातीचे (Earthen Dam) असेल, तर स्थानिक माती व दगडांचा वापर करून खर्च नियंत्रणात ठेवण्यात आला असावा. काँक्रीट किंवा मिश्र प्रकारच्या धरणांमध्ये संरचनात्मक मजबुतीवर भर देण्यात आला. धरणाची उंची, लांबी आणि पायाची रचना ही नदीपात्राच्या भौगोलिक वैशिष्ट्यांवर अवलंबून निश्चित करण्यात आली. यावरून त्या काळातील अभियांत्रिकी ज्ञान आणि प्रादेशिक गरजांचा परस्परसंबंध दिसून येतो.

२. जलसाठा क्षमता:

प्रकल्पाचा मुख्य उद्देश सिंचन व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविणे हा होता. त्यामुळे जलसाठा क्षमतेचे नियोजन करताना पाणलोट क्षेत्रातील पर्जन्यमान, संभाव्य पूरप्रवाह आणि दीर्घकालीन मागणी यांचा विचार करण्यात आला. कालांतराने गाळ साचण्याची (Siltation) समस्या निर्माण होणे ही बहुतेक प्रकल्पांची वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. त्यामुळे प्रत्यक्ष साठवण क्षमतेत घट होऊ शकते. ऐतिहासिक नोंदींच्या आधारे जलसाठा क्षमतेतील बदलांचा अभ्यास केल्यास प्रकल्पाच्या कार्यक्षमतेचे विश्लेषण करता येते.

३. सांडवा व कालवा व्यवस्था:

पूरनियंत्रणासाठी सांडव्याची (Spillway) रचना अत्यंत महत्त्वाची असते. संभाव्य उच्चतम पूरप्रवाह (Maximum Flood Discharge) लक्षात घेऊन सांडव्याची क्षमता निश्चित करण्यात आली. मुख्य कालवा आणि उपकालव्यांच्या माध्यमातून जलवितरण व्यवस्था उभारण्यात आली. कालव्यांचे जाळे हे शेतीक्षेत्राच्या विस्तारानुसार विकसित झाले. काही ठिकाणी कालव्यांना काँक्रीट लाइनिंग देण्यात आले असण्याची शक्यता आहे, ज्यामुळे पाण्याची गळती कमी होते.

सामाजिक व आर्थिक परिणाम (ऐतिहासिक दृष्टिकोन):

वांग मराठवाडी प्रकल्पाची उभारणी ही केवळ जलस्रोत निर्मितीपुरती मर्यादित न राहता पाटण तालुक्याच्या सामाजिक आणि आर्थिक संरचनेत दीर्घकालीन परिवर्तन घडवून आणणारी ठरली. जलसिंचन सुविधेमुळे कृषी उत्पादन, रोजगार, लोकजीवन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर व्यापक परिणाम झाले. या परिणामांचा अभ्यास ऐतिहासिक दृष्टिकोनातून केल्यास प्रादेशिक विकास प्रक्रियेचे स्वरूप अधिक स्पष्ट होते.

१. कृषी क्षेत्रातील बदल:

सिंचन सुविधेपूर्वी पाटण तालुक्यातील शेती प्रामुख्याने कोरडवाहू स्वरूपाची होती. ज्वारी, बाजरी, नाचणी यांसारखी पारंपरिक पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जात होती. पावसाच्या अनिश्चिततेमुळे उत्पादनात मोठी चढ-उतार दिसून येत असे.

सिंचन प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर पुढील बदल आढळतात:

- पीकपद्धतीत बदल : रोख पिके, भाजीपाला, ऊस किंवा फळबागांची लागवड वाढली.
- दुबार पीक पद्धतीचा अवलंब : वर्षातून एकाऐवजी दोन पिके घेणे शक्य झाले.
- उत्पादनवाढ : नियमित पाणीपुरवठ्यामुळे प्रति हेक्टर उत्पादनात वाढ झाली.
- आधुनिक शेतीपद्धतीचा वापर : खते, सुधारित बियाणे आणि यांत्रिकीकरणाचा वापर वाढला.

या बदलांमुळे कृषी क्षेत्रात आर्थिक स्थैर्य निर्माण झाले. तथापि, काही संशोधनांनुसार रोख पिकांवरील अवलंबित्व वाढल्याने बाजारपेठेतील चढ-उतारांचा परिणामही वाढू लागला, हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

२. स्थलांतर व लोकजीवन:

दुष्काळी परिस्थितीमुळे पूर्वी मोठ्या प्रमाणावर हंगामी स्थलांतर होत असे. विशेषतः शेतमजूर वर्ग रोजगाराच्या शोधात शहरी भागांकडे स्थलांतर करीत असे. जलसिंचन उपलब्ध झाल्यानंतर शेतीतील रोजगारसंधी वाढल्या आणि वर्षभर काम उपलब्ध होऊ लागले.

स्थानिक मौखिक इतिहास (Oral Sources) व गावकऱ्यांच्या मुलाखतींनुसार हंगामी स्थलांतरात घट झाली,स्थानिक रोजगारनिर्मिती वाढली, सामाजिक स्थैर्य निर्माण झाले. तसेच, पाण्याची उपलब्धता वाढल्यामुळे महिलांच्या दैनंदिन जीवनातही बदल झाले. पिण्याच्या पाण्यासाठी लांब अंतर चालण्याची गरज कमी झाली, ज्यामुळे त्यांच्या श्रमात घट झाली आणि सामाजिक सहभाग वाढला.

३. ग्रामीण अर्थव्यवस्था:

जलसिंचनामुळे कृषी उत्पादनवाढ झाली आणि त्याचा सकारात्मक परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झाला. उत्पादन वाढल्यामुळे स्थानिक बाजारपेठा, व्यापारी व्यवहार आणि वाहतूक व्यवस्था अधिक सक्रिय झाली. कृषी उत्पादनाशी संबंधित उद्योग (उदा. दुध व्यवसाय, प्रक्रिया उद्योग) विकसित होऊ लागले. शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढल्याने स्थानिक व्यापार वाढला. बँकिंग व सहकारी संस्थांची वाढ झाली. या प्रक्रियेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत गतिमानता आली. तथापि, लाभांचे वितरण सर्व घटकांमध्ये समान झाले का, हा प्रश्न चिकित्सक अभ्यासासाठी महत्त्वाचा ठरतो. मोठ्या भूधारकांना अधिक लाभ झाला का, की लघु व सीमांत शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा झाला, याचे विश्लेषण आवश्यक आहे.

निष्कर्ष:

वांग मराठवाडी प्रकल्पाचा ऐतिहासिक अभ्यास केल्यास हा प्रकल्प केवळ जलसिंचनाची सुविधा देणारी अभियांत्रिकी रचना नसून स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या विकासनीतीचा एक महत्त्वपूर्ण भाग असल्याचे स्पष्ट होते. ब्रिटिशकालीन महसूलकेंद्रित जलधोरणाच्या तुलनेत स्वातंत्र्यानंतरच्या नियोजनबद्ध विकास प्रक्रियेत जलस्रोतांचा वापर हा ग्रामीण पुनर्रचनेचे साधन म्हणून करण्यात आला. त्या व्यापक धोरणात्मक बदलांच्या पार्श्वभूमीवर वांग मराठवाडी प्रकल्पाची निर्मिती झाली. प्रकल्पाच्या स्थापनेमागील सामाजिक-आर्थिक गरजा, स्थानिक जलटंचाईची समस्या आणि शासनाची प्रादेशिक समतोल विकासाची भूमिका यांचा परस्परसंबंध या अभ्यासातून अधोरेखित होतो. नियोजन, तांत्रिक मान्यता आणि निधी तरतूद या टप्प्यांमधून प्रकल्पाची अंमलबजावणी ही एक संगठित प्रशासकीय प्रक्रिया होती. यामुळे राज्याच्या जलसंपदा व्यवस्थापनातील संस्थात्मक विकासही स्पष्ट होतो. सामाजिक व आर्थिक परिणामांच्या दृष्टीने पाहता, प्रकल्पामुळे कृषी क्षेत्रात लक्षणीय बदल घडून आले. पीकपद्धतीत विविधता आली, उत्पादनक्षमता वाढली आणि ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान झाली. हंगामी स्थलांतरात घट होऊन स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळाली. तथापि, लाभांचे वितरण, लघु शेतकऱ्यांची स्थिती आणि पर्यावरणीय परिणाम यांसारख्या बाबींचा चिकित्सक विचार करणेही आवश्यक ठरते. ऐतिहासिक दृष्टिकोनातून वांग मराठवाडी प्रकल्प हा प्रादेशिक विकास, शासन धोरण आणि तांत्रिक प्रगती यांच्या संगमाचे उदाहरण म्हणून अभ्यासण्याजोगा आहे. तो ग्रामीण समाजरचनेतील

बदलांचा एक दस्तऐवज असून, जलप्रकल्पांच्या माध्यमातून घडणाऱ्या सामाजिक-आर्थिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचे प्रतिनिधित्व करतो. म्हणूनच, अशा प्रादेशिक जलसिंचन प्रकल्पांचा इतिहास स्वतंत्रपणे अभ्यासला गेला पाहिजे. भविष्यातील संशोधनासाठी स्थानिक अभिलेख, सांख्यिकीय माहिती आणि मौखिक इतिहास यांचा अधिक व्यापक वापर करून या प्रकल्पाच्या दीर्घकालीन परिणामांचा सखोल अभ्यास करता येईल.

संदर्भसूची:

१. महाराष्ट्र शासन. *महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर : सातारा जिल्हा*. मुंबई: शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, संबंधित आवृत्ती.

२. महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग. *वार्षिक प्रशासन अहवाल*. मुंबई: जलसंपदा विभाग, विविध वर्षे.

३. महाराष्ट्र शासन. *महाराष्ट्रातील सिंचन विकास अहवाल*. मुंबई: जलसंपदा विभाग, विविध वर्षे.

४. महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग. *पंचवार्षिक योजना आणि महाराष्ट्राचा विकास*. मुंबई: नियोजन विभाग प्रकाशन, संबंधित वर्ष.

५. सातारा जिल्हा सांख्यिकी कार्यालय. *जिल्हा सामाजिक व आर्थिक आढावा (Socio-Economic Review)*. सातारा: महाराष्ट्र शासन, विविध वर्षे.

६. पाटील, बी. बी. *महाराष्ट्रातील जलसिंचन विकासाचा इतिहास*. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स, 2005.

७. देशमुख, अ. रा. *महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलव्यवस्थापन*. औरंगाबाद: विद्या प्रकाशन, 2010.

८. कुलकर्णी, स. म. *स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राचा आर्थिक इतिहास*. पुणे: प्रतिमा प्रकाशन, 2012.

९. जोशी, र. ग. *ग्रामीण विकास आणि सिंचन प्रकल्प*. मुंबई: लोकवाङ्मय गृह, 2008.

१०. महाराष्ट्र शासन. *जलसंपदा धोरण (Water Policy of Maharashtra)*. मुंबई: जलसंपदा विभाग, संबंधित वर्ष.

११. स्थानिक ग्रामपंचायत अभिलेख, पाटण तालुका, संबंधित वर्षे.

१२. स्थानिक मौखिक इतिहास मुलाखती (Oral History Interviews), पाटण तालुका.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक-आर्थिक परिवर्तनात स्वयंसेवी संस्थांची (NGO) भूमिका: एक चिकित्सक अभ्यास

प्रा. धनाजी तानाजी सावंत

सहाय्यक प्राध्यापक,

मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

Corresponding Author - प्रा. धनाजी तानाजी सावंत

DOI - 10.5281/zenodo.19692634

गोषवारा:

सोलापूर जिल्ह्यातील समाजसेवी संस्थांचे कार्य सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण अशा स्वरूपाचे आहे मात्र या कार्याचा विस्तार होणे गरजेचे आहे.प्रामुख्याने दुष्काळ निवारण, महिला सक्षमीकरण आणि ऊसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षण या क्षेत्रांत या संस्थांनी केलेले कार्य मोलाचे आहे. सोलापूर जिल्ह्यातील सामाजिकआर्थिक परिवर्तनात स्वयंसेवी - संस्थांची भूमिका हा विषय अत्यंतमहत्त्वाचा आणि चिकित्सक आहे, कारण हा जिल्हा ऐतिहासिकदृष्ट्या अवर्षणप्रवण आणि नैसर्गिक संकटांचा सामना करणारा प्रदेश आहे. या संस्था केवळ सरकारी योजनांच्या अंमलबजावणीवर अवलंबून न राहता 'लोकसहभाग' आणि 'शाश्वत विकासाच्या' तत्त्वावर आधारित कार्य करतात, जे सोलापूरच्या ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत स्पष्टपणे दिसून येते.

जलसंधारणाच्या क्षेत्रात 'पाणी आडवा, पाणी जिरवा' या धोरणांतर्गत, तसेच पाणी फाउंडेशन आणि जलयुक्त शिवार यांसारख्या मोहिमांच्या माध्यमातून या संस्थांनी सिमेंट बंधारे, ओढे खोलीकरण आणि भूगर्भातील पाणीपातळी वाढवण्याचे मोठे काम केले आहे. शिक्षणाच्या बाबतीत, ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी 'साखर शाळा' आणि निवासी वसतिगृहांची सुविधा उपलब्ध करून देऊन, त्यांनी गळतीचे प्रमाण कमी करण्यात आणि साक्षरता दर वाढवण्यात मोलाचे योगदान दिले आहे. महिला सक्षमीकरणासाठी बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना लघु उद्योगांशी जोडून, त्यांना आर्थिक स्वावलंबनाकडे नेण्याचे क्रांतिकारी काम या संस्थांनी केले आहे. आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन, व्यसनमुक्ती, आणि गिरणी कामगारांच्या पुनर्वसनाच्या कार्यातही या संस्थांनी नेहमीच आघाडीवर राहून, 'आरोग्यदूत' म्हणून आणि एक विश्वासार्ह दुवा म्हणून भूमिका बजावली आहे. असे असले तरी, अनेक संस्थांना निधीची कमतरता, व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव, काही ठिकाणी दिसून येणारा राजकीय हस्तक्षेप आणि दुर्गम भागातील मर्यादित विस्तार यांसारख्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या सर्व बाबींचा विचार करता, सोलापूरच्या विकासासाठी या स्वयंसेवी संस्था केवळ एक पूरक घटक नसून, त्या परिवर्तनाच्या खऱ्या 'कॅटॅलिस्ट' (Catalyst) आहेत आणि त्यांना अधिक बळकट केल्यास भविष्यात हा जिल्हा विकासाचे एक नवीन मॉडेल म्हणून नक्कीच समोर येईल. प्रस्तुत शोधनिबंधात या संस्थांचे कार्य आणि त्यांच्या समोर असणारी आव्हाने यांचे विश्लेषण केले आहे.

बीजशब्द (Keywords): स्वयंसेवी संस्था (NGO), सोलापूर, ग्रामीण विकास,सामाजिक परिवर्तन, लोकसहभाग.

संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधनासाठी 'चिकित्सक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धती' वापरण्यात आली असून, सोलापूर जिल्हा हे मुख्य कार्यक्षेत्र म्हणून निवडले आहे. या अभ्यासासाठी प्रामुख्याने द्वितीयक माहितीच्या स्रोतांचा (Secondary Data) वापर करण्यात आला असून, त्यामध्ये सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, सरकारी वार्षिक अहवाल आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या अधिकृत कार्य अहवालांचा समावेश आहे. सामाजिक प्रश्नांवरील माहितीचे संकलन करण्यासाठी 'लोकमत', 'सकाळ', 'पुढारी' आणि 'संचार' यांसारख्या स्थानिक वृत्तपत्रांतील बातम्या, यशोगाथा आणि चिकित्सक आढाव्यांचा आधार घेतला आहे. संशोधनात नमुना निवड (Sampling) करताना जलसंधारण, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि आरोग्य या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या निवडक अग्रगण्य संस्थांच्या (उदा. पाणी फाउंडेशन, साखर शाळा) कार्याचे मूल्यमापन करण्यात आले आहे. माहितीचे विश्लेषण करताना न्यायमूर्ती रानडे आणि दादाभाई नौरोजी यांनी मांडलेल्या आर्थिक व सामाजिक सुधारणांच्या विचारांची चौकट आधारभूत मानली आहे. तसेच, संस्थांना येणारी आव्हाने, जसे की निधीची कमतरता आणि राजकीय हस्तक्षेप, यांचेही वस्तुनिष्ठ विश्लेषण या पद्धतीत अंतर्भूत आहे.

प्रस्तावना:

सोलापूर जिल्हा हा भौगोलिकदृष्ट्या अवर्षणप्रवण क्षेत्रात येत असला तरी, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत संपन्न आहे. या जिल्ह्याच्या विकासात केवळ सरकारी योजनांनीच नव्हे, तर स्वयंसेवी संस्थांनी (NGOs) मोलाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आजच्या जागतिकीकरणाच्या युगापर्यंत, सोलापूरमधील सामाजिक-आर्थिक परिवर्तनात या संस्थांचा वाटा मोठा आहे. ग्रामीण भागातील शेती, पाणी टंचाई, शिक्षण आणि महिला सक्षमीकरण यांसारख्या मूलभूत प्रश्नांपासून ते शहरी भागातील आरोग्य आणि कामगार प्रश्नांपर्यंत या संस्थांनी विविधांगी कार्य केले आहे. विशेषतः सोलापूरचा 'टेक्स्टाईल हब' म्हणून झालेला विकास आणि त्यातील विणकर समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी अनेक संस्था पुढे आल्या आहेत. 'लोकसहभागातून विकास' हे सूत्र घेऊन चालणाऱ्या या संस्थांनी शासनाच्या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले आहे. प्रस्तुत संशोधनाद्वारे सोलापूर जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांचे नेमके स्वरूप, त्यांच्या कार्याची व्याप्ती आणि त्यांनी घडवून आणलेले सकारात्मक परिवर्तन यांचा चिकित्सक अभ्यास करणे हा मुख्य उद्देश आहे. या संस्थांच्या कार्यामुळे जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक रचनेत कोणते बदल झाले, याचा आढावा घेणे आजच्या विकासाच्या प्रक्रियेत अत्यंत आवश्यक आहे.

सोलापूर हा महाराष्ट्रातील एक प्रमुख जिल्हा असून तो भौगोलिकदृष्ट्या अवर्षणप्रवण क्षेत्रात येतो. ऐतिहासिकदृष्ट्या या जिल्ह्याने भीषण दुष्काळ अनुभवले आहेत. ब्रिटीश काळापासून चालत आलेल्या नैसर्गिक आणि आर्थिक शोषणाचे परिणाम आजही या भागातील कृषी अर्थव्यवस्थेवर दिसतात. अशा परिस्थितीत, सरकारसोबतच स्वयंसेवी संस्थांनी ग्रामीण विकासाची जबाबदारी उचलली आहे. रानडे आणि नौरोजींनी मांडलेला 'स्वावलंबनाचा विचार' आज या संस्थांच्या माध्यमातून प्रत्यक्षात येताना दिसतो.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. सोलापूर जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचे स्वरूप अभ्यासणे.
२. जलसंधारण आणि कृषी क्षेत्रात या संस्थांनी केलेल्या बदलांचे मूल्यमापन करणे.
३. सामाजिक प्रश्नांवर (उदा. बालविवाह, शिक्षण) या संस्थांच्या कामाचा प्रभाव तपासणे.
४. सोलापूरमधील NGO च्या कार्याचे प्रमुख पैलू

सोलापुरातील एनजीओचे कार्य:

सोलापूरमधील स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये खालील पैलूंवरून स्पष्ट होतात:

जलसंधारण आणि दुष्काळ निवारण:

सोलापूरमध्ये पावसाची अनिश्चितता असल्याने अनेक संस्थांनी 'पाणी आडवा, पाणी जिरवा' या धोरणावर काम केले आहे. 'स्थानिक सिंचन' आणि 'विकेंद्रित जलव्यवस्थापन' हे विचार आजही या संस्था राबवत आहेत. यामुळे शेतीसाठी शाश्वत पाण्याचा स्रोत निर्माण झाला आहे.

शिक्षण आणि ऊसतोड कामगार समस्या:

सोलापूर जिल्ह्यात ऊसतोड कामगारांचे प्रमाण मोठे आहे. या कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी अनेक संस्था 'साखर शाळा' किंवा 'निवासी वसतिगृहे' चालवतात

महिला सक्षमीकरण आणि बचत गट:

ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी बचत गटांचे जाळे विणले आहे. दादाभाई नौरोजींनी ज्या 'आर्थिक स्वावलंबनाचा' पुरस्कार केला होता, तो आज महिलांच्या आर्थिक प्रगतीतून दिसून येतो.

आव्हाने आणि मर्यादा:

निधीची कमतरता NGO ना नेहमीच भासते.अनेक लहान संस्थांना सरकारी अनुदानाची प्रतीक्षा करावी लागते.राजकीय हस्तक्षेप: काही ठिकाणी सामाजिक कार्यावर राजकीय सावली दिसून येते.लोकसहभागाचा अभाव: प्रकल्पांच्या सुरुवातीला लोकांना एकत्र आणणे कठीण जाते.

सोलापूरमधील सामाजिक प्रश्नांवर एनजीओचे कार्य:

सोलापूरमधील ज्वलंत सामाजिक प्रश्नांवर स्थानिक एनजीओनी अत्यंत प्रभावी काम केले आहे.

पाणी व्यवस्थापन: जलयुक्त शिवार आणि नाम फाउंडेशनसारख्या संस्थांच्या मदतीने सोलापूरच्या दुष्काळी तालुक्यातील गावांमध्ये गाळ काढणे, ओढे खोलीकरण आणि सिमेंट बंधारे बांधण्याचे मोठे काम झाले आहे..

शिक्षण: ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी 'साखर शाळा' चालवणे आणि झोपडपट्टी भागातील मुलांच्या शिक्षणासाठी अनेक संस्थांनी पुढाकार घेतला आहे.

महिला सक्षमीकरण: बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे आणि कौटुंबिक हिंसाचाराविरोधात समुपदेशन केंद्र चालवणे यात एनजीओचा मोठा सहभाग आहे.

आरोग्य सेवा: एड्स निर्मूलन, क्षयरोग (TB) जनजागृती आणि कोरोना काळात गरजूंपर्यंत अन्न व औषधे पोहोचवण्याचे काम स्थानिक संस्थांनी 'लोकमत' आणि 'सकाळ'मधील बातम्यांनुसार मोठ्या प्रमाणावर केले आहे.

व्यसनमुक्ती: जिल्ह्यातील तरुण पिढीला व्यसनापाश्यातून बाहेर काढण्यासाठी अनेक पुनर्वसन केंद्रे कार्यरत आहेत.

वृद्धाश्रम व अनाथाश्रम: निराधार वृद्ध आणि अनाथ मुलांसाठी सोलापूर शहरात व परिसरात अनेक संस्था आधारवड बनल्या आहेत.

स्वच्छता अभियान: शहर व ग्रामीण भागात स्वच्छ भारत मोहिमेत लोकसहभाग वाढवण्यासाठी एनजीओनी जनजागृती केली आहे.

विणकर समाजाचे प्रश्न: बंद पडलेल्या गिरण्यांनंतर बेरोजगार झालेल्या कामगारांच्या मुलांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवले आहेत.

अपंग कल्याण: दिव्यांग व्यक्तींना साहित्याचे वाटप आणि त्यांच्या रोजगारासाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन.

पर्यावरण: वृक्षारोपण आणि 'प्लास्टिक मुक्त सोलापूर' मोहिमेत एनजीओचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

१. **लोकसहभागावर आधारित कार्य:** या संस्था केवळ सरकारी निधीवर अवलंबून न राहता लोकवर्गणीतून प्रकल्प राबवतात.

२. **शासनाचे दुवा म्हणून भूमिका:** सरकारी योजना आणि लाभार्थी यांच्यातील अंतर कमी करण्याचे काम या संस्था करतात.

३. **कौशल्य विकासावर भर:** केवळ आर्थिक मदत न देता तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा एक मुख्य पैलू आहे.

४. **आपत्ती व्यवस्थापनात तत्परता:** दुष्काळ असो वा पूर, सोलापूरच्या एनजीओ नेहमीच मदतीसाठी आघाडीवर असतात.

५. **पारदर्शकता आणि उत्तरदायित्व:** अनेक संस्थांनी आपल्या कामाची पारदर्शकता ठेवून समाजाचा विश्वास संपादन केला आहे.

६. **तंत्रज्ञानाचा वापर:** शेती सुधारणा आणि जलसंधारणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी या संस्था शेतकऱ्यांना प्रोत्साहित करतात.

७. **न्याय आणि हक्काची लढाई:** उपेक्षित घटकांना त्यांचे कायदेशीर हक्क मिळवून देण्यासाठी कायदेशीर सल्ला केंद्र चालवणे.

८. **समस्यांचे स्थानिक निराकरण:** स्थानिक गरजा ओळखून त्यानुसार प्रकल्पांची आखणी करणे.

९. **जागरूकता आणि प्रबोधन:** पथनाट्ये, रॅली आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून सामाजिक विषयांवर प्रबोधन करणे.

१०. **शाश्वत विकासाचे ध्येय:** तात्पुरती मदत करण्यापेक्षा दीर्घकालीन आणि शाश्वत विकास कसा होईल याकडे या संस्थांचा कल असतो.

सोलापूर जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थां जिल्ह्याच्या विकासाचा कणा ठरल्या आहेत.सोलापूरमधील जातीय सलोखा राखण्यासाठी आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी एनजीओनी केलेले काम अत्यंत महत्त्वाचे आहे. जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागात 'पाणी फौंडेशन' सारख्या संस्थांच्या माध्यमातून झालेली जलक्रांती हे या संस्थांच्या ताकदीचे उत्तम उदाहरण आहे. वृत्तपत्रांच्या बातम्यांनुसार, ग्रामीण भागातील महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढवण्यात आणि बालविवाह रोखण्यात या संस्थांना मोठे यश आले आहे.

आर्थिक बदलांच्या बाबतीत, बचत गटांच्या माध्यमातून झालेली क्रांती ही सोलापूरच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देणारी ठरली आहे. एनजीओमुळे आज ग्रामीण भागातील महिला लघु उद्योजिका बनल्या आहेत. गिरणी कामगारांच्या वारसांना पर्यायी रोजगार मिळवून देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी घेतलेला पुढाकार हा आर्थिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा पैलू आहे.

शिक्षण आणि आरोग्याच्या क्षेत्रात, सरकारी यंत्रणेला मर्यादा आहेत तिथे एनजीओनी धावून जाऊन गरजूंपर्यंत मदत पोहोचवली आहे. विशेषतः कुपोषण

निर्मूलन आणि माता आरोग्यासाठी दुर्गम भागात या संस्थांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. सोलापूरच्या नागरी भागात रस्ते सुरक्षा, स्वच्छता आणि प्रदूषण नियंत्रण या विषयांवरही या संस्थांनी लोकजागृती केली आहे.

तथापि, काही चिकित्सक निष्कर्ष असेही मांडता येतील की, सर्वच एनजीओची कामगिरी सारखी नाही. काही संस्थांना निधीची कमतरता भासते, तर काही संस्था केवळ कागदावरच सक्रिय दिसतात. सरकारी अनुदान मिळवण्यासाठी काही संस्थांच्या कामात राजकीय हस्तक्षेप होत असल्याचेही वृत्तपत्रीय आढाव्यावरून जाणवते. तसेच, शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागातील दुर्गम भागात अद्यापही अधिक संस्थांची गरज आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या सामाजिक-आर्थिक परिवर्तनात स्वयंसेवी संस्थांची भूमिका ही 'पूरक' नसून ती 'अनिवार्य' आहे. जर या संस्थांना अधिक व्यावसायिक प्रशिक्षण, पुरेसा निधी आणि राजकीय पाठबळ मिळाले, तर सोलापूर जिल्हा भविष्यात विकासाचे एक नवीन मॉडेल म्हणून समोर येऊ शकतो. या संस्थांनी केवळ समस्या सोडवण्यापेक्षा 'लोकांना सक्षम करणे' (Empowerment) या तत्त्वावर दिलेला भर हाच या जिल्ह्याच्या परिवर्तनाचा खरा पाया आहे.

निष्कर्ष:

सोलापूर जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था या केवळ मदत कार्य करत नसून त्या 'हवामान अनुकूलन' आणि 'लवचिक अर्थव्यवस्था' निर्माण करण्याचे साधन ठरल्या आहेत. रानडे-नौरोजींच्या पर्यावरणीय दृष्टीला आधार मानून काम केल्यास या संस्था भविष्यातील आपत्तींवर मात करण्यास अधिक सक्षम होतील.सोलापूर जिल्ह्याच्या सामाजिक-आर्थिक जडणघडणीचा आणि वृत्तपत्रीय घडामोडींचा आढावा घेतल्यास, स्वयंसेवी संस्थांच्या (NGO) भूमिकेबाबत खालीलप्रमाणे सविस्तर निष्कर्ष अभ्यासाअंती येतात.

१. जलसंधारण आणि ग्रामीण पुनरुज्जीवन: सोलापूर जिल्हा हा प्रामुख्याने अवर्षणप्रवण क्षेत्रात येतो. 'लोकमत' आणि 'सकाळ'मधील वृत्तांकनानुसार, जलयुक्त शिवार आणि पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून जिल्ह्यातील सांगोला, मंगळवेढा आणि बार्शी यांसारख्या तालुक्यांमध्ये एनजीओनी 'पाणी क्रांती' घडवून आणली आहे. केवळ सरकारी निधीवर अवलंबून न राहता, लोकसहभागातून ओढे खोलीकरण आणि सिमेंट बंधारे बांधल्यामुळे भूगर्भातील पाणीपातळी वाढली आहे, हा या संशोधनाचा प्रमुख निष्कर्ष आहे.

२. महिला सक्षमीकरण आणि आर्थिक स्वावलंबन: जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत बचत गटांच्या माध्यमातून एनजीओनी केलेले काम क्रांतिकारी आहे. 'पुढारी' वृत्तपत्रातील यशोगाथांनुसार, हजारो महिला आज लघुउद्योगांच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. या संस्थांनी केवळ कर्ज उपलब्ध करून दिले नाही, तर उत्पादनांच्या मार्केटिंगसाठी 'सोलापूर महोत्सव' सारखी व्यासपीठे उपलब्ध करून दिली आहेत, ज्यामुळे महिलांच्या निर्णयक्षमतेत वाढ झाली आहे.

३. शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक बदल: सोलापूर जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी कार्यरत असणाऱ्या 'साखर शाळां'मध्ये एनजीओचा वाटा मोठा आहे. 'संचार' वृत्तपत्राने अनेकदा अधोरेखित केल्याप्रमाणे, फिरत्या शाळांच्या माध्यमातून वस्त्या-वस्त्यांवरील मुलांपर्यंत शिक्षण पोहोचले आहे. यामुळे जिल्ह्याच्या साक्षरता दरात वाढ होण्यासोबतच गळतीचे प्रमाण (Drop-out rate) कमी होण्यास मदत झाली आहे.

४. आरोग्य आणि आपत्ती व्यवस्थापन: कोरोना महामारीच्या काळात सोलापूरमधील सामाजिक संस्थांनी

'आरोग्यदूत' म्हणून काम केले. वृत्तपत्रांतील आकडेवारीनुसार, ऑक्सिजन बँक चालवणे, मोफत भोजन सेवा आणि विलगीकरण केंद्र उभारण्यात एनजीओ शासनाच्या बरोबरीने उभ्या होत्या. आजही ग्रामीण भागात क्षयरोग आणि एड्स निर्मूलनासाठी या संस्थांचे समुपदेशन केंद्र प्रभावी ठरत आहेत.

५. टेक्स्टाईल आणि कामगार कल्याण: सोलापूरची ओळख असलेल्या चादर आणि टॉवेल उद्योगातील विणकर समाजाच्या प्रश्नांवर एनजीओनी सातत्याने आवाज उठवला आहे. बंद पडलेल्या गिरण्यांनंतर बेरोजगार झालेल्या कामगारांच्या कुटुंबांना आधार देणे आणि त्यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याचे काम या संस्थांनी केले आहे.

६. पर्यावरणीय संवर्धन आणि नागरी समस्या: 'स्वच्छ सोलापूर, सुंदर सोलापूर' या मोहिमेत एनजीओचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. सिद्धेश्वर मंदिर परिसराची स्वच्छता असो वा नदी पुनरुज्जीवन, या संस्थांनी युवकांना पर्यावरणाशी जोडले आहे. 'प्लास्टिक मुक्त सोलापूर'साठी अनेक संस्थांनी कागदी पिशव्यांचे वाटप करून शाश्वत विकासाचा मार्ग दाखवला आहे.

७. उपेक्षित घटकांचा विकास: दिव्यांग, अनाथ मुले आणि तृतीयपंथीय यांसारख्या उपेक्षित घटकांसाठी सोलापूरमध्ये अनेक समर्पित संस्था कार्यरत आहेत. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण आणि कायदेशीर मदत मिळवून देण्यात या संस्थांना यश आले आहे.

८. चिकित्सक मूल्यमापन आणि मर्यादा: संशोधनाचा एक महत्त्वाचा निष्कर्ष असा की, जरी एनजीओचे काम मोठे असले तरी त्यात काही त्रुटी आहेत. अनेक संस्थांमध्ये 'व्यावसायिक व्यवस्थापनाचा' अभाव दिसून येतो. तसेच, काही संस्थांचे काम केवळ शहरी भागापुरते मर्यादित आहे; अतिदुर्गम ग्रामीण भागात अद्यापही एनजीओचे जाळे विस्तारणे आवश्यक आहे. निधीच्या कमतरतेमुळे अनेक चांगले प्रकल्प अर्धवट राहिल्याचेही वृत्तपत्रीय निदर्शनास आले आहे.

९. भविष्यातील दिशा: सोलापूरच्या विकासासाठी आता 'डिजिटल साक्षरता' आणि 'शेतकरी उत्पादक कंपन्या' (FPO) स्थापन करण्यावर एनजीओनी भर देणे गरजेचे आहे. शेतीमालाला थेट बाजारपेठ मिळवून देण्यासाठी एनजीओ एक प्रभावी दुवा ठरू शकतात.

थोडक्यात सांगायचे तर, सोलापूर जिल्ह्याचा सामाजिक आणि आर्थिक कायापालट करण्यात स्वयंसेवी संस्था या केवळ मदतनीस नसून त्या परिवर्तनाच्या खऱ्या 'कॅटॅलिस्ट' (Catalyst) ठरल्या आहेत. शासनाच्या योजनांना लोकांच्या दारापर्यंत पोहोचवण्याचे काम या संस्थांनी केले आहे. या संस्थांच्या कामात पारदर्शकता आणि सातत्य राहिल्यास सोलापूर जिल्हा विकासाच्या शिखरावर पोहोचण्यास वेळ लागणार नाही.

संदर्भ सूची:

१. संबंधित स्वयंसेवी संस्थांचे वार्षिक अहवाल.

२. **सोलापूर जिल्हा गॅझेटिअर,** (२०२४). सोलापूर जिल्हा गॅझेटिअर आणि सरकारी वार्षिक अहवाल. महाराष्ट्र शासन.

३. **दैनिक लोकमत,**(२०२४.(सोलापूर जिल्ह्यातील जलयुक्त शिवार आणि नाम फाउंडेशनच्या कार्याचा आढावा. सोलापूर आवृत्ती.

४. **दैनिक सकाळ.** (२०२४). दुष्काळी तालुक्यातील गाळ काढणे आणि सिमेंट बंधारे: स्वयंसेवी संस्थांचे योगदान. सोलापूर आवृत्ती.

५. **दैनिक पुढारी.** (२०२४). महिला बचत गट आणि सोलापूर महोत्सव: आर्थिक स्वावलंबनाच्या यशोगाथा. सोलापूर आवृत्ती.

६. **दैनिक संचार.** (२०२४). ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा आणि फिरत्या शाळांचे महत्त्व. सोलापूर आवृत्ती.

७. **शांतई अनाथ आश्रम.** (२०२३). वार्षिक कार्य अहवाल: निराधार मुले आणि वृद्धांच्या पुनर्वसनाचे कार्य. आकाशवाणी केंद्र रोड, सोलापूर.

८. **सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती.** (२०२३). जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांच्या सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनातील भूमिकेचे विश्लेषण. रविवार पेठ, सोलापूर.

९. **पाणी फाउंडेशन.** (२०२४). सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील जलक्रांती अहवाल. स्वयंसेवी संस्था अहवाल मालिका.

१०. **स्वच्छ भारत अभियान समिती (सोलापूर).** (२०२४). नागरी व ग्रामीण भागातील स्वच्छता मोहिमेत एनजीओचा सहभाग. जिल्हा परिषद सोलापूर.

११. **विणकर कल्याणकारी संस्था.** (२०२३). सोलापूर टेक्स्टाईल हब: बेरोजगार कामगारांच्या मुलांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम. कौशल्य विकास अहवाल.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सातारा नगरीची खाद्यसंस्कृति

प्रा. गणेश प्रकाश पाटील

हॉटेल व्यवस्थापन विभाग,

सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

***Corresponding Author* - प्रा. गणेश प्रकाश पाटील**

DOI - 10.5281/zenodo.19692663

गोषवारा :

सातारा नगरीची खाद्यसंस्कृती हा अभ्यास सातारा जिल्ह्याच्या पारंपरिक आहारपद्धती, सांस्कृतिक वारसा आणि बदलत्या जीवनशैलीच्या संदर्भातील सखोल विश्लेषण सादर करतो. सह्याद्री पर्वतरांगांच्या कुशीत वसलेल्या साताऱ्याची खाद्यसंस्कृती ही स्थानिक हवामान, शेतीप्रधान जीवनशैली, सामाजिक परंपरा आणि आयुर्वेदिक तत्त्वांवर आधारित आहे. ज्वारी-बाजरीची भाकरी, पिठलं, ठेचा, तांबडा रस्सा, झुणका भाकरी, सातारी मिसळ, हुलग्याचं माडगं, माहद्या, विविध रानभाज्या, तसेच सातारी कंदी पेढा यांसारखे पदार्थ केवळ अन्न नसून स्थानिक ओळखीचे प्रतीक आहेत.

या अभ्यासामध्ये पारंपरिक पाककृतींचे ऐतिहासिक, भौगोलिक व सामाजिक संदर्भ तपासले असून दैनंदिन आहारात दूध, दही, ताक, तूप यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांचे महत्त्व स्पष्ट केले आहे. ग्रामीण जीवनशैलीत साधेपणा, पौष्टिकता आणि पर्यावरणाशी सुसंगतता दिसून येते.

तसेच आधुनिक शहरीकरण, फास्ट फूड संस्कृती आणि बदलत्या सवयींमुळे आरोग्यावर होणारे परिणामही अभ्यासले आहेत. निष्कर्षत, साताऱ्याची पारंपरिक खाद्यसंस्कृती ही संतुलित, आरोग्यदायी आणि स्थानिक साधनसंपत्तीवर आधारित असून तिचे जतन व प्रसार करणे आवश्यक आहे, जेणेकरून आधुनिकतेसोबत सांस्कृतिक आणि आरोग्यदायी समतोल राखता येईल.

प्रस्तावना:

सातारा ही सह्याद्रीच्या कुशीत वसलेली ऐतिहासिक नगरी केवळ शौर्य, परंपरा आणि निसर्गसौंदर्यासाठीच नव्हे तर तिच्या समृद्ध आणि वैशिष्ट्यपूर्ण खाद्यसंस्कृतीसाठीही ओळखली जाते. स्थानिक भागातील परिस्थिती, हवामान, शेतीप्रधान जीवनशैली आणि संस्कृतीचा वारसा यांचा साताऱ्याच्या आहारावर खोलवर प्रभाव पडलेला दिसून आला आहे. येथील पारंपरिक पदार्थ साधेपणा, पौष्टिकता आणि चव यांचा चांगला समन्वय साधतात. ज्वारी-बाजरीची भाकरी, पिठलं, ठेचा, तांबडा रस्सा, मिसळ, हुलग्याचं माडगं, माहद्या,रान भाज्या यांसारखे पदार्थ फक्त खाणे पिणे नसून साताऱ्याच्या जीवनपद्धतीचे आणि संस्कारांचे प्रतीक आहे.

महाराष्ट्रियन भोजणसंस्कृती ही प्राचीन आयुर्वेदिक तत्त्वांवर आधारित असून शरीर आणि मनाच्या संतुलनाला महत्त्व देणारी आहे. "दर कोसावर पाणी बदलते आणि चार कोसावर वाणी बदलते" या म्हणीप्रमाणे महाराष्ट्रात प्रत्येक प्रदेशानुसार खाद्यपरंपरा बदलताना दिसते; त्यात साताऱ्याची खाद्यसंस्कृती स्वतंत्र ओळख निर्माण करते, तसेच आधुनिक जीवनशैलीमुळे झालेल्या बदलांचा सविस्तर अभ्यास आपण करणार आहोत.

विषयाची निवड :

सातारा नगरीची खाद्य संस्कृती हा विषय निवडण्यामागचा उद्देश म्हणजे आपण एक सभ्यतेचा विचार करायला गेलो तर इथे आपल्या भारत देशामध्ये भारतीय खाद्य संस्कृती, महाराष्ट्रीयन खाद्य संस्कृती किंवा अशा अनेक राज्यांच्या खाद्य संस्कृती आपणास पाहावयास मिळतील पण असे पाहण्यात आले की एका प्रांताची किंवा एका नगरीची खाद्य संस्कृती ही आपल्या पुस्तकांमध्ये किवा डिजिटली उपलब्ध नाहीये, त्यामुळेच सातारा सारख्या ऐतिहासिक आणि सांस्कृती चा वारसा लाभलेली ही नगरी याचीही एक अशी वेगळी ओळख व्हावी, त्यामुळेच सातारा जिल्ह्याची ही खाद्य संस्कृती जगासमोर यावी या दृष्टिकोनातून हा विषय निवडला आहे

उद्दिष्टे :

1. सातारा नगरीची खाद्यसंस्कृती शोधून तिच ऐतिहासिकरीत्या सर्वाना उपलब्ध करून देणे.
2. स्थानिक हवामान, आणि शेतीपद्धतीचा अन्नसंस्कृतीवर झालेला परिणामाचा अभ्यास करणे.
3. पारंपरिक पाककृतींचे जतन करून त्यांना आधुनिक पिढीपर्यंत पोहोचवणे.
4. स्थानिक खाद्यसंस्कृतीची माहिती डिजिटल माध्यमातून उपलब्ध करून देणे, जेणेकरून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर साताऱ्याची वेगळी ओळख निर्माण होईल.

भूमिका:

भारतीय खाद्यसंस्कृती ही विविधतेने नटलेली आहे प्रत्येक राज्याची, प्रत्येक जिल्ह्याची आणि अगदी प्रत्येक गावाचीही अशी एक वेगळी ओळख आहे. मात्र भारत देशातील महाराष्ट्र राज्यात अनेक प्रकारचे पारंपरिक व प्रादेशिक खाद्यप्रकार आढळतात; मात्र एखाद्या विशिष्ट नगरीची खाद्यसंस्कृती सविस्तर स्वरूपात मांडलेली कमी प्रमाणात आढळते, साताऱ्याच्या बाबतीतही हेच दिसून येते. त्यामुळे हा छोटेखानी प्रयत्न.

सातारा नगरीची खाद्य संस्कृती:

भारत देशातील मराठ्यांची नगरी म्हणजेच महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वतात बसलेला सातारा जिल्हा इतिहास शौर्य परंपरा आणि निसर्गसौंदर्य याबरोबरच खाद्य संस्कृतीची परंपरा असलेली ही सातारा नगरीची खाद्यसंस्कृती आपण पाहणार आहोत.

आपले शरीर जस की एक मशीन आहे ते निसर्गाची अथवा निर्माते ची अमूल्य देणगीच आहे, निसर्गाचे जसे नियम असतात तसेच काही नियम आपल्या शरीररुपी यंत्रालाही लागू पडतात, जसे की एकाद्या यंत्राला इंधन लागते त्याची देखभाल करावे लागते तसेच आपल्या शरीराचे आहे,

अन्न हवा पाणी हे आपल्या शरीराचे इंधन आहे तसे पाहता शरीराची क्षमता ही 100 वर्षाची आहे, त्यासाठी हे यंत्र नीट चालावे म्हणून यंत्राला इंधन लागते त्यातूनच त्याला ऊर्जा मिळते, जर आपण चुकीचं इंधन वापरले तर यंत्रात बिघाड होतो, त्यामुळेच आपल्या चुकीच्या आहारामुळे आपले शरीरही बिघडणार, बिघाड म्हणजे काय तर आजारी पडणे त्यामुळेच आपली भारतीय पाकशास्त्र हे प्राचीन काळापासून विकसित झालेले एक रासायनिक शास्त्रच आहे, मानवाची विकृती व प्रवृत्ती ही हर तरेच्या अनुभवातून काही शिकून एक ज्ञान विकसित करत गेली.

असे म्हटले जायचे की भारत वर्षात सोन्याचा धूर निघत होता खाद्य संस्कृतीच्या संदर्भात बोलायचे झाल्यास सुजल सुफल अशी भूमी असलेल्या भारतातील लोकांचे

खाणपान प्राचीन काळापासून आयुर्वेदिक दृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण राहिले आहे.

महाराष्ट्रात एक म्हण आहे दर कोसावर पाणी बदलते आणि चार कोसावर वाणी बदलते आणि फक्त भाषाच नाही तर खण्यापिण्याच्या रिती भातीही बदलतात, खाण्यापिण्याची पद्धत, आणि वापरले जाणारे धान्य, मसाले, आणि पाककृतीतही बदल होतो.

जेवण बनवणे हे एक रसायनशास्त्रच आहे, त्यांची रासायनिक प्रक्रिया नीट साधली तर पदार्थ जमत नाही तर फसतात, पूर्वी मातीची किंवा धातूची भांडी वापरली जायची ते भांडी स्वयंपाकासाठी साधन नव्हती तर ती आपल्या संस्कृतीचा आणि जीवनशैलीचा एक महत्त्वाचा भाग होता हातातला घास काढून देण्याची ताटातील अर्धी भाकर भुकेल्या व्यक्तीला देणे ही आपली परंपरा आहे, घराघरा मध्ये वर्षभराचे मसाले, पापड, लोणचे, कुरवडी, भातवडी अशा अनेक गोष्टीचे तंत्र सांभाळताना एक अलिस्किंत शिस्त महाराष्ट्राच्या गृहिणींनी लावून ठेवलेली आहे.

खाण्यातला आनंद आरोग्याची जपणूक पैशाची बचत असे सगळे संस्कार याची शिकवण कळत नकळत मुलींना दिली जायची, जेवायला बसताना मांडी घालून बसणे त्यामुळे रक्तप्रवाह पोटाकडे वळवला जातो आणि आपली पचनक्रिया व्यवस्थित राहते असे आयुर्वद सांगते तसेच साताऱ्याच्या खाद्य संस्कृती कोश तयार करताना प्रादेशिक वैशिष्ट्ये आणि भिन्न भिन्न धर्माच्या समाजाचे प्रदेशनिहाय अल्पोपहार भोजन सणासुदीचे, विशेष प्रसंगीचे हंगामी पदार्थ असे सर्व पदार्थांचे संकलन करण करून ते मांडण्याचा प्रयत्न केला आहे

पारंपरिक पदार्थाची माहिती घेत असताना असे अनुभवास आले की येथे प्रत्येक पदार्थ मागे भौगोलिक परिस्थिती शेती हवामान आणि सांस्कृतिक परंपरा यांचा प्रभाव आहे, साधेपणात ही चव तिखटपणा आणि पौष्टिकता यांचा सुंदर समन्वय साताऱ्याच्या खाद्यसंस्कृतीत दिसून येतो पुढे त्याची सविस्तर माहिती आपण पाहूच.

साताऱ्याचे पारंपरिक दैनंदिन आहार

१. ज्वारीची भाकरी व पिठलं:



साताऱ्यातील ग्रामीण भागात ज्वारीची भाकरी हा एक मुख्य घटक आहे, कांदा आणि ताक यांचा संगम हा शेतकरी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. भाकरी हाताने थापून चुलीवर भाजल्यामुळे तिची चव आणि पोत वाढतो आणि पचायला हलकी आणि ऊर्जादायी असते, हा सर्रास आहार लोक आवर्जून खातात.

२. ठेचा व लसून चटणी:





हिरवी मिरची लसूण आणि मीठ यांचा ठेचा हा साताऱ्याच्या जेवणातील तिखटपणाच मुख्य सूत्र आहे. लसूण चटणी कोरडी करून साठवली जाते त्यामुळे ती टिकाऊ असते आणि भाकरी सोबत खाल्ली जाते.

३. तांबडा रस्सा व मटणाचे प्रकार:



सातारा नगरीमध्ये तांबडा रस्सा व मटणाचे प्रकार लोकप्रिय आहेत. घरगुती मसाल्याचे वापर लाल तिखट आणि नारळाचा हलका स्पर्श यामुळे रस्सा झणझणीत आणि चविष्ट होतो यामध्ये साधारणता

सुख मटन- साताऱ्याचं सुख मटन हा पारंपारिक झणझणीत खमंग प्रकार आहे गावाकडील लग्न समारंभ म्हणा जत्रा किंवा खास पाहुणचार यामध्ये याचा वापर केला जातो.

४. भात आमटी व कडी:



साताऱ्यात साधा भात आमटी ज्वारीची बाजरीची भाकरी दैनंदिन जीवनाचा भाग आहे.

५. झुणका भाकरी:



हा पदार्थ ग्रामीण जीवनशैलीशी घट्ट जोडलेला असा हा साधा पौष्टिक आणि झटपट तयार होणारा आहे यात बेसन, लसूण, मिरची, हिरवी, मिरची, मोहरी, जिरे किंवा हळद याचं फोडणी देऊन पिठलं तयार केलं जातं आणि हे बाजरीच्या किंवा ज्वारीच्या भाकरी आणि कांद्याबरोबर खाल्ला जातो चविष्ट आणि झटपट तयार होणारा हा पदार्थ आहे.

६. मिसळपाव:



सातारी मिसळ ही एक ही विशिष्ट चवीसाठी आणि घरगुती मसाल्यामुळे त्याची एक वेगळीच चव आपल्याला अनुभवायला मिळते उकडलेली मटकी किंवा उसळ त्यावर बारीक चिरलेला कांदा कोथिंबीर फरसाणा लिंबाचा रस आणि ही मिसळ जास्त तेलकट नसून, त्यामध्ये मसाल्याचा सुगंध तिखटपणा यासाठी ती जास्त प्रसिद्ध आहे.

७. हुलग्याच माडगं:



सातारा परिसरात तयार होणारा माडग हा एक पारंपारिक आणि पौष्टिक पदार्थ प्रामुख्याने कुळीथ, हुलगा डाळीपासून बनवला जातो, कुळीथ ही एक कडधान्याची जात आहे शरीराला उष्णता देणारी ताकद वाढवणारी आणि पचनास मदत करणारी प्रमुख साताऱ्यातील शेतीप्रधान आणि कष्टकरी जीवनशैलीमुळे हा खाद्यपदार्थ नसून, परंपरा आणि स्थानिक जीवनशैलीचा प्रतीक मानलं जातं.

८. माहद्या :



साताऱ्यातील माहद्या हा येथील एक खास पारंपरिक खाद्यप्रकार आहे. हा पदार्थ प्रामुख्याने भाजलेल्या शेंगदाण्यांपासून तयार केला जातो. प्रथम शेंगदाणे छान भाजून त्यांची साल काढली जाते, त्यानंतर ते जाडसर वाटून त्यामध्ये मीठ, लाल तिखट, लसूण आणि मसाले मिसळले जातात. त्यामुळे या माडघ्याला एक खास सुगंध आणि चव येते. त्याची खमंग, नटसारखी (nutty) चव जेवणाला विशेष स्वाद देते आणि साताऱ्याच्या खाद्यसंस्कृतीत त्याला विशेष स्थान आहे.

९. ढेमसे भाजी:



ही महाराष्ट्रातील, विशेषत सातारा परिसरात लोकप्रिय असलेली पारंपरिक भाजी आहे. ढेमसे (तोंडलीसारखा पण आकाराने थोडा मोठा आणि किंचित कडवटसर स्वाद असलेला भाजीप्रकार) ही पावसाळ्यात जास्त प्रमाणात उपलब्ध होते आणि ग्रामीण भागात ती आवडीने बनवली जाते.

ढेमसे भाजी साधारणपणे कांदा, लसूण, मोहरी, जिरे, हळद, तिखट आणि खोबऱ्याच्या कुटासोबत केली जाते. काही ठिकाणी त्यात शेंगदाण्याचे कूट किंवा गुळ घालून चवीला थोडी गोड-तिखट चव आणली जाते. भाजी शिजल्यानंतर ती मऊ पण किंचित कुरकुरीत राहिली तर जास्त चविष्ट लागते. साताऱ्याच्या पारंपरिक जेवणात ढेमसे भाजीला एक खास स्थान आहे.

१०. चंदन बटवा:



चंदन बटवा भाजी ही ग्रामीण महाराष्ट्रात आढळणारी पारंपरिक पालेभाजी असून विशेषतः सातारा

आणि आसपासच्या भागात ती आवडीने खाल्ली जाते. बटवा ही रानभाजीच्या प्रकारातील पालेभाजी आहे. पावसाळ्यात किंवा थंडीत ती अधिक प्रमाणात उपलब्ध होते. "चंदन बटवा" नावाने ओळखली जाणारी ही भाजी चवीला हलकी, थोडीशी तुरट-गोडसर आणि पौष्टिक असते.

११. चारधारी शेंगाची भाजी :



सातारा आणि पश्चिम महाराष्ट्रांत व ग्रामीण भागात लोकप्रिय असून, ती चवदार व पौष्टिक आहे, ही भाजी बनवण्यासाठी शेंगांच्या कडा काढून, फोडणीत परतून, वाफेवर शिजवून, त्यात कांदा-लसूण मसाला आणि शेंगदाण्याचा कूट टाकून बनवतात, ती भाकरी किंवा चपातीसोबत उत्तम लागते

१२. सातारी कंदी पेढा:



हा पेढा मुख्यत दूध, साखर आणि थोड्या वेलचीच्या स्वादातून तयार केला जातो. दूध आटवून खवा तयार केला जातो आणि त्यामध्ये साखर विशिष्ट पद्धतीने मिसळली जाते. त्यामुळे पेढ्याच्या आत लहान साखरेचे कण तयार होतात, ज्यामुळे तो तोंडात घेतल्यावर हलका खडखडीत व गोडसर अनुभव देतो.

१३. दूध, दही, ताक, तूप :

दूध : Satara जिल्हा हा शेतीप्रधान व पशुपालनासाठी प्रसिद्ध आहे. येथे गाई-म्हशींचे पालन मोठ्या प्रमाणावर केले जाते. त्यामुळे ताजे दूध सहज उपलब्ध होते. गावाकडे सकाळ संध्याकाळ ताजे दूध वापरण्याची परंपरा आहे. दूधापासून चहा, खीर, शेवया, गोड पदार्थ तसेच धार्मिक विधींमध्येही वापर केला जातो.

दही : साताऱ्यात घरगुती दही लावण्याची पद्धत अजूनही प्रचलित आहे. उकळलेले दूध थंड करून त्यात जुने दही घालून दही लावले जाते. दही हे पचनासाठी हितकारक मानले जाते. लग्नसमारंभ, सण-उत्सव तसेच रोजच्या जेवणात दहीभात, दही-चटणी, काकडी-दही असे प्रकार लोकप्रिय आहेत.

ताक : ताक हे ग्रामीण भागात विशेष महत्त्वाचे पेय आहे. उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी ताक पिण्याची परंपरा आहे. दही घुसळून त्यात जिरे, मीठ, कोथिंबीर घालून तयार केलेले मसालेदार ताक खूप चविष्ट लागते. शेतकरी वर्गात दुपारच्या जेवणासोबत ताक आवश्यक मानले जाते.

तूप : घरगुती लोणी काढून त्यापासून तूप बनवले जाते. तूप हे शुद्ध आणि पौष्टिक मानले जाते. पुरणपोळी, खिचडी, वरणभात, शिरा अशा पदार्थांवर तूप घालण्याची पद्धत आहे. धार्मिक कार्यात आणि नैवेद्यासाठी तुपाचा विशेष वापर होतो.

निष्कर्ष :

सातारा सारख्या भागामध्ये यांसारख्या पदार्थांचा समावेश होत असल्यामुळे हा आहार दैनंदिन जीवनासाथी साधा, पचायला हलका आणि स्थानिक उत्पादनांवर आधारित होता. त्यामुळे पूर्वीच्या काळात लोक

शारीरिकदृष्ट्या अधिक सक्रिय आणि तुलनेने निरोगी दिसत होते.

मात्र गेल्या काही दशकांत साताऱ्यातही शहरीकरण, शिक्षण, सेवा क्षेत्रातील रोजगार आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढला आहे. बसून काम करण्याची पद्धत, वेळेची कमतरता आणि सोयीस्कर अन्नाची उपलब्धता यामुळे फास्ट फूड, पॅकेज्ड पदार्थ उगद्यावरील खाणे, भेसळीचे खाणे आणि बाहेर जेवण्याची सवय वाढली आहे. यूरोपियन अन्न पदार्थ वडा-पाव, बेकरीचे पदार्थ, तसेच पिझ्झा-बर्गर यांसारख्या पदार्थांची लोकप्रियता वाढल्याने आहारातील तेल, मीठ आणि साखरेचे प्रमाण वाढले आहे. परिणामी लठ्ठपणा, मधुमेह, रक्तदाब यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. याशिवाय कुटुंबासोबत एकत्र बसून जेवण्याची परंपरा कमी होत असून सामाजिक बंधही काही प्रमाणात सैल होत आहेत.

एकूणच, साताऱ्याच्या खाद्यपदार्थांचा आणि आजच्या जीवनशैलीचा अभ्यास केला असता असे स्पष्ट होते की पारंपरिक आहार अधिक संतुलित आणि पर्यावरणाशी सुसंगत केला तर आपले जीवन अधिक सुखकर होऊ शकते, आधुनिक जीवनशैलीने जरी सोयीसुविधा वाढवल्या असल्या तरी आरोग्यविषयक आव्हानेही निर्माण केली आहेत. त्यामुळे भविष्यात आरोग्यदायी आणि स्थानिक खाद्यसंस्कृती जपत आधुनिकतेशी संतुलन राखणे हीच सर्वात महत्त्वाची गरज आहे.

संदर्भ ग्रंथ :

1. भारतीय खाद्यसंस्कृति. (डॉ. वर्षा जोशी)
2. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतिकोष. (डॉ. अनुपमा उजगरे)
3. सातारा गॅझेट

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

स्थानिक इतिहास - ऊस : एक ऐतिहासिक अभ्यास

डॉ. डी. व्ही. सूर्यवंशी[1], श्री. आनंदा पांडूरंग पाटील[2]

[1]*सहकारभूषण एस. के. पाटील, कॉलेज, कुरुंदवाड*

[2]*संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.*

Corresponding Author - डॉ. डी. व्ही. सूर्यवंशी

DOI - 10.5281/zenodo.19692693

प्रस्तावना:

भारत हा कृषिप्रधान देश आहे. जवळपास ६५ ते ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. ऊसाचा उगम भारतात झाल्याचे अनेक दाखले मिळतात. भारतातील ऊस पीक हे अनादी काळापासून अरब व्यापाऱ्यांनी सीरिया, सायप्रस, माल्टा आणि सिसिली द्विपात नेले. अलेक्झांडर आणि नेपोलियन यांनी ही गोड वनस्पती वेस्टइंडीज मध्ये नेली. आजमितीस देशाची जी प्रगती झाली आहे त्यामध्ये ऊस या नगदी पिकाचे मोठे योगदान आहे. दिवसेंदिवस ऊसाचे क्षेत्र वाढत आहे. ऊसाच्या मुळापासून शेंड्यापर्यंत प्रत्येक भागाचा उपयोग होत असल्याने ऊसाला 'कल्पवृक्ष' म्हटले आहे. या ठिकाणी ऊसाच्या प्रत्येक भागाचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

ऊसाचा पूर्व इतिहास:

अनादी काळापासून आदिमानव रानावनात, दऱ्याखोऱ्यात, डोंगरात वास्तव्य करत होता. ऊन, वारा, पाऊस यातून भटकंती करत झाडाच्या डोलीत किंवा डोंगर कपारी मधल्या गुहांमध्ये वास्तव्य करीत होता. जंगलातून भटकंती करत असताना वेगवेगळी फळे चाखता, चाखता गोडवा म्हणजे काय हे अनुभवले होते. मधमाशांच्या पोळ्यातील मधाचा गोडवा ही चाखला होता. दर्भासारख्या गवतापासून विकसित झालेल्या ऊसाच्या पेराच्या रसाचा गोडवा त्यांनी अनुभवला होता. 'मधुमान् नो वनस्पति' असे वैदिक ऋषींनीही नमूद केले आहे. वनस्पतीच्या रसातून निर्माण झालेली शर्करा ही दिव्य आहे. हा अनुभव त्यांना मंत्रबद्ध झाला.

'प्रशांत महासागरातील पापुआ न्यू गिनी बेटांवर कुक स्वॅम्प येथे इ. स. पूर्व ८००० कालावधीतील ऊसाचे अवशेष सापडले'.[१] '२०० वर्षांपूर्वी कॅप्टन कुक हा प्रवासी पॉलिनेशन बेटावर आला असताना ऊस हा 'बिअर' निर्मितीसाठी वापरला जात असल्याचे उल्लेख त्यांनी करून ठेवले आहेत'.[२] प्रशांत महासागरातील ओशानिया खंडातील बेटावरून साधारणतः ७ ते ८ हजार वर्षांपूर्वी ऊस भारतात आल्याचे दिसून येते. साधारणतः ५००० वर्षांपूर्वी गंगा-यमुना खोरे, हिमालयाच्या पायथ्याशी, सप्तशृंगी प्रदेशात ऊसाचा प्रसार विस्तार झाला. या सुपीक प्रदेशात जंगली गवताच्या रूपात ऊस स्थिरावला असाही तर्क मांडला जातो.

बारणेस ए. सी. या शास्त्रज्ञाच्या मते, ऊसाचे मूळ स्थान भारत आहे. त्यांनी हा निष्कर्ष हिंदू प्राचीन वेदादी साहित्य आणि पौराणिक कथांचा अभ्यास करून काढला आहे. काही शास्त्रज्ञांच्या मते ऊसाच्या उत्पत्तीची दोन स्वतंत्र स्थाने आहेत. एक पापुआ न्यू गिनी व दुसरा भारत.

वैदिक काळात ही दिव्य शर्करा सृष्टीच्या निर्मात्याला कृतज्ञ भावनेने नैवेद्य म्हणून अर्पण करण्याची पद्धत सुरू झाली. महर्षी पतंजली यांनी साखर घालून दूध व तांदळापासून केलेली खीर कशी असते हे आपल्या महाभाष्यामध्ये नमूद केले आहे. 'अग्नीनारायणाने दशरथाला पायस दिला. तोही साखर व इतर पदार्थ घालून केलेल्या दुधाचा! प्राचीन बौद्ध वाङ्मयात सुद्धा ऊसापासून तयार केलेल्या साखरेचा उल्लेख आहे. आयुर्वेदातील चरक आणि सुश्रुत संहितेमध्ये औषधी आणि बाह्य लक्षणावर आधारित ऊसाचे वर्गीकरण केले आहे. अबुल फजलने लिहिलेल्या 'ऐन ए अकबरी' या ग्रंथात दिलेले उसाचे पौंडा (पुंड्या) आणि गन्ना हे वर्गीकरण अजूनही प्रचलित आहे'.[३]

ऊसाला आणि साखरेच्या गोडव्याला आध्यात्मिक उंचीवर नेण्याचे काम महाराष्ट्रातील साधुसंतांनी केले आहे. विठ्ठलाचे नाम गोड आहे असे त्यांनी सांगितले आहे. 'श्रीमदवल्लभाचार्यांनी भगवान श्रीविष्णूसाठी 'मधुराष्टकम' लिहून गोडवा हा एक दिव्य आनंद देणारा ईश्वरी अविष्कार आहे याची प्रचिती दिली'.[४]

आयुर्वेदात ऊसाचा उल्लेख:

ऊसाच्या रसाचा उपयोग आयुर्वेदिक औषधात होतो. त्यामध्ये ताप, मूत्राशयाचे रोग, कावीळ, दंतक्षय, अशक्तपणा यावर केला जातो. महर्षी सुश्रुत यांनी लिहिलेल्या सुश्रुत संहितेत ऊसाच्या १२ प्रकारच्या जातीचा उल्लेख आहे. 'वामशिका' ही उत्कृष्ट ऊसाची जात होती. मऊ गाभ्याची 'पौंडूका' या बंगाली जातीस गुडा असाही शब्द आहे. गुडाचा अपभ्रंश होऊन झालेला 'गुड' हा शब्द अजूनही गुळासाठी वापरला जातो. महर्षी वाग्भट्ट यांनी लिहिलेल्या अष्टांगहृदय या ग्रंथातही ऊसाच्या रसाचे औषधी उपयोग व चिकित्सा यावर भाष्य केल्याचे दिसून येते. 'साखर कोणत्या नैसर्गिक, भौगोलिक परिस्थितीत ऊसाच्या जातीपासून बनली आहे. त्यावर त्याचे औषधी गुणधर्म, चव, रंग व स्वाद हे वेगवेगळे असतात असे आयुर्वेदात मानले जाते'.[५]

ऊसाच्या १२ जाती:

आचार्य भावमित्र यांनी ऊस, ऊसाचा रस, गूळ त्याच्या विविध अवस्था व विविध रोगांच्या चिकित्सेवर उपयोगी असल्याचे भाष्य केले आहे. 'पौण्ड्रक, भीरूक, वंशक, शतपोरक, कांन्तार, तापसेक्षु, काण्डेक्षु, सूचिपत्रक, नैपाल, दीर्घपत्र, नीलपोर, कोशकृत किंवा मनोगुप्ता या उसाच्या १२ जाती आहेत'.[६]

'पौण्ड्रक' व 'भीरुक' या दोन्ही जातीचे ऊस वात व पित्त रोगाचे शमन करणारा, मधुर, शितल, रक्तवर्धक व बलकारक असतो. 'कोशकार' जातीचा ऊस हा गुरु, शितल, रक्तपित्त आणि क्षय या रोगांचा नाश करण्याचे गुणधर्म बाळगतो. 'कान्तार' जातीचा ऊस हा गुरु, कफजनक, रक्तवर्धक आणि सारक हे गुण आढळतात. 'वंशक' जातीचा ऊस लांब पेराचा, अत्यंत कठीण, क्षारयुक्त गुणधर्म असलेला असतो. 'शतपोरो' जातीचा ऊस हा 'कोशकार' जातीच्या ऊसाच्या गुणधर्मासहित विशेषतः किंचित उष्ण व क्षारयुक्त, वातनाशक असतो.

'तापसेक्षु' जातीचा ऊस हा कोमल, मधुररसाने युक्त असा कफाची वाढ करणारा, तृप्तीकारक चव निर्माण करणारा, बलकारक असतो. 'काष्टेक्षु' नावाचा ऊस 'तापसेक्षु' ऊसासारखा असतो. 'सूचीपत्र' पाने लहान असलेला, 'नीलपोर', 'नैपाल' व 'दीर्घपत्रक' मोठी पाने असलेला ऊस वातजनक, पित्तनाशक, कसाय, रसयुक्त व विदाही गुणधर्म असलेले आहेत. 'मनोगुप्ता' जातीचा ऊस वातनाशक, तहान लागणे या रोगाचा नाश करणारा, अति शीतल, खूप गोड, रक्तपित्ताला नष्ट करणारा असतो.

ऊस पिकाची सविस्तर माहिती:

१. ऊसाचे खोड:

ऊसाचे खोड हे अनेक पेरांचे बनलेले असते. दोन पेरांच्या जोडावर एक कठीण गाठ असते. ऊसाच्या गाठीवर म्हणजे प्रत्येक पेरावर ऊसाचा नवीन जन्म देण्याची क्षमता असलेला एक कोंब किंवा अंकुर असतो. ऊसाच्या बुडख्याकडील पेरे लांबीने लहान व जाड असून मध्यभागी एकसारखी तर शेंड्याकडील भागाकडे बारीक झालेली दिसतात.

ऊसाच्या खोडाचा रंग हा वाणपरत्वे आणि बाह्य परिस्थितीवर अवलंबून असतो. काही जातींच्या ऊसाच्या खोडावर लहान मोठ्या भेगा पाहायला मिळतात. ऊसाच्या प्रत्येक पेराच्या खालच्या बाजूस जोड गाठीजवळ एक अरुंद पण उठावदार पट्टी असते. या पट्टीवर ऊसाच्या मुळाचे सुप्त अंकुर असतात. अनुकूल परिस्थिती मिळाल्यास इथून अंकुर फुटायला सुरुवात होते. ऊसाच्या खोडाची, पेरांची लांबी ही ऊसाच्या वाणांवर अवलंबून असते. बुडख्याकडील खोड कठीण तर शेंड्याकडील खोड मऊ असते. ऊसाच्या पेरामध्ये साखर साठवून ठेवली जाते.

२. ऊसाचे पान:

उसाच्या प्रत्येक पेर गाठीजवळ एक याप्रमाणे ऊसाला पाने येतात. ऊसाच्या बुडख्यापासून शेंड्यापर्यंत पाने ही एकमेकांच्या विरुद्ध दिशेला पेर गाठीजवळ येतात. सुरुवातीच्या काळात पाने आकाराने लहान व आखूड असतात. ऊसाला ज्यावेळी पेरे फुटायला सुरुवात होते त्यावेळी पानाची लांबी आणि रुंदी वाढलेली दिसून येते. प्रारंभीच्या काळात ऊसाची पाने लहान आणि आखूड असली तरी ऊसाची संपूर्ण वाढ होईपर्यंत पाने एकसारखी सरळ वाढतात. ऊसाला तुरा येण्याच्या कालावधीत फक्त पानांची लांबी आणि रुंदी कमी होते. ऊसाच्या पानाची लांबी आणि रुंदी ही प्रामुख्याने प्रत्येक ऊस जातीच्या वाणांवर अवलंबून असते.

ऊसाच्या पानाच्या पर्णछिद्रातून हवेतील कार्बन डाय-ऑक्साइड शोषून घेतला जातो. ऊसामध्ये साखर तयार करण्याचे काम पानांच्या हरित लवकांच्या प्रकाशसंश्लेषण क्रियेच्या माध्यमातून घडते. ऊसाच्या पानाचे देठ हे पानासारखे रुंद असतात. प्रत्येक ऊसाच्या पेराभोवती नळीसारखे त्याचे आवरण तयार होते. त्याला टोपण असे सुद्धा म्हटले जाते. काही ऊसांच्या वाणांवर टोपणावर मोठ्या प्रमाणात काटेरी कूस असल्याचे दिसून येते. ऊसाच्या पेरगाठीच्या खालच्या बाजूला हे देठ म्हणजेच ऊसाची पाने ही पेरगाठीच्या खालच्या बाजूला मुळांकुराच्या लगतच खाली तयार होऊन सरळ वर वाढतात. ऊसाचे देठ आणि पान एकमेकांना जोडलेले असते. ऊसाचे देठ आणि पान यांना सांधणारा एक पटल असतो त्याला 'लिग्यूल' असे म्हणतात. ऊसाच्या पानाचे आयुर्मान प्रत्येक ऊसाच्या वाणांवर आणि वातावरणातील बदलानुसार वेगवेगळे असते. 'आरंभी निपजलेली १ ते ४ पाने ३० ते ४० दिवस राहतात. पाचव्या पानापासून १५ ते १६ व्या पानापर्यंतच्या पानांचे आयुर्मान ६० ते १२० दिवस असते. विसाव्या पानांपुढे शेंड्याकडेची पाने सामान्यपणे ६० ते ९० दिवस राहतात'.[७]

३. ऊसाचे मूळ:

ऊसाची बेणे म्हणून लागवड केल्यानंतर ऊसाच्या प्रत्येक कांड्यावर जी मूळ पट्टीका असते त्यातून असंख्य मुळे लगेच फुटतात. ऊसाची कांडी जमिनीत लावल्यानंतर ऊसाच्या कांडीतून डोळे बाहेर येईपर्यंत ही मुळे चांगल्या प्रकारे वाढून जमिनीतील अन्नद्रव्ये पाण्याचे शोषण करतात. ऊसाच्या बुडख्या जवळच्या कांड्यामध्ये लवकर मुळे फुटतात व नंतर कोंब येतो. शेंड्याकडील पेरामध्ये लवकर कोंब येतात. ऊसाच्या मुळांची वाढ ही अनेक घटकावर

अवलंबून असते. ऊसाची शोषक मुळे, आधार मुळे आणि दोरी मुळे या तीन प्रकारची असतात.

ऊसाची अन्नद्रव्ये शोधणारी मुळे ही जमिनीच्या वरच्या थरात पसरलेली असतात. ऊस वाढीच्या प्रारंभीच्या अवस्थेत ही मुळे जास्त वाढतात. त्यानंतर त्यांना उपमुळ्या, केसमुळ्या फुटतात. ऊसाची वाढ जसजशी होत जाते तसतशी ही मुळे काळपट पडतात. जमिनीत चांगला ओलावा असेपर्यंत ही मुळे अन्नद्रव्य आणि पाण्याचे शोषण चांगल्या प्रकारे करतात. पाण्याचा ताण येतो तेव्हा या मुळाद्वारे शोषण क्रिया थांबली जाते. अशावेळी जमिनीत खोल गेलेली आधारमुळे आणि दोर मुळे कार्य करतात. नव्या वाढणाऱ्या कोंबाच्या खालच्या पेरापासून आधारमुळे फुटतात. आधार मुळे ही मांसल व पांढरी असतात. ही मुळे जमिनीत खोल पर्यंत शिरतात. ऊसाच्या बेटाला आधार देण्याचे काम ही मुळे करतात. काही प्रमाणात अन्नद्रव्याचे शोषण सुद्धा ही मुळे करतात. दोर मुळे ही जमिनीत खोलवर जातात. ज्यावेळी ऊसाला पाण्याचा ताण पडतो त्यावेळी ही मुळे जमिनीतील पाणी शोषून घेऊन ऊसाला पाणी पोहोचवण्याचे कार्य करतात.

मुळांची वाढ ही जमिनीच्या प्रतवारीनुसार होत असते. साधारणपणे जमिनीचा सामू ६.१ ते ७.५ पर्यंत असेल तर मुळांची वाढ चांगली होते. शोषण करणारी मुळे ही प्रामुख्याने दोन फूट लांबीची असतात. तर आधार देणारी मुळे सहा ते सात फूट लांब असतात. जमिनीत खोल जाणारी दोर मुळे ही साधारणपणे दहा फुटापर्यंत लांब असू शकतात.

हवामान आणि जमीन:

स्वच्छ सूर्यप्रकाश, मुबलक पाणी आणि योग्य तापमान मिळाल्यास ऊस पिकाची चांगली वाढ होते. ढगाळ वातावरण आणि जास्त आद्रता असल्यास फुटव्यांची संख्या कमी होवून रोग आणि किडींचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे उत्पादनात मोठी घट होते. दिवसाचे सरासरी तापमान २६ अंश सेल्सिअसच्या दरम्यान असल्यास फुटवे भरपूर प्रमाणात येतात. ऊसाची चांगली वाढ होण्यासाठी सापेक्ष आद्रता ६० ते ७० टक्के असणे आवश्यक असते.

ऊस लागवडीसाठी भारी, मध्यम व हलक्या प्रकारची जमीन लागते. ऊसाचे पीक चांगले येण्यासाठी काळी कसदार, गाळाची, पाण्याचा निचरा होणारी जमीन पोषक असते. नदीकाठच्या गाळाच्या जमिनीमध्ये ऊसाचे पीक चांगले येते. या गाळाच्या मातीत भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्म चांगले असतात. अशा जमिनीत ऊसाची मुळे चांगली खोलवर रुजली जातात. अन्नद्रव्याचे शोषण चांगल्या प्रकारे झाल्यामुळे ऊसाच्या कांड्या लांब व जाड निपजतात. ऊस 'पिकासाठी लागणारे अन्नद्रव्य, पाणी, हवा ही मातीच पुरवते आणि म्हणूनच जमिनीचे भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्म टिकवून जमिनीचा पोत वाढवणे गरजेचे आहे'.[८]

ऊस शेतीची मशागत:

ऊसाच्या जोमदार वाढीसाठी जमिनीची चांगली मशागत करणे आवश्यक असते. जमिनीची खोल, उभी, आडवी नांगरट करावी लागते. जमीन वापस्यावर आल्यानंतर त्यामध्ये चांगले कुजलेले शेणखत, लेंडीखत पसरून रोटावेटरच्या सहाय्याने मातीत मिसळले जाते. मशागत केल्यामुळे किडींचे कोष, अळ्या नष्ट होतात. मातीची फेरपालट झाल्यामुळे तणांचा बंदोबस्त होतो. जमीन भुसभुशीत होते. जमिनीच्या मगदुराप्रमाणे काही ठिकाणी खोल तर काही ठिकाणी उथळ सरी पाडली जाते. तीन फुटापासून पाच फुटापर्यंत दोन सरीतील अंतर ठेवले जाते. ऊस लागवड कांडी पद्धत, एक डोळा, दोन डोळा पद्धतीने केली जाते.

पाणी व्यवस्थापन:

ऊस लागवडीसाठी पाण्याची आवश्यकता असते. ऊसाला जास्त पाणी लागत असल्यामुळे ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे त्या ठिकाणीच ऊसाची लागवड केली जाते. ऊस पिकाला पाटपाणी, ठिबक सिंचन पद्धतीने पाणी दिले जाते.

ऊस वाढीसाठी लागणारी अन्नद्रव्ये:

ऊसाच्या वाढीसाठी अन्नद्रव्यांची मोठ्या प्रमाणात गरज असते. जमीन, हवा आणि पाणी यातून वनस्पती ९० पेक्षा अधिक प्रकारच्या मूलद्रव्यांचे शोषण करतात. वनस्पतीच्या वाढीसाठी सोळा मूलद्रव्यांची गरज असते. यामध्ये कार्बन, हायड्रोजन व ऑक्सिजन ही अन्नद्रव्ये हवा आणि पाणी यातून मिळतात. तर उरलेली तेरा अन्नद्रव्ये ही जमिनीतून ऊस पिकास दिली जातात.

नत्र, स्फुरद, पालाश ही तीन मुख्य अन्नद्रव्ये आहेत. कॅल्शियम, मॅग्नेशियम, सल्फर ही दुय्यम अन्नद्रव्य आहेत. तर उरलेली सूक्ष्म अन्नद्रव्ये आहेत. ऊस पिकाच्या वाढीसाठी अत्यावश्यक असणाऱ्या मूलद्रव्यांमध्ये कार्बन, हायड्रोजन, ऑक्सिजन, नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, सल्फर, आयर्न, मॅंगनीज, झिंक, कॉपर, क्लोरीन, बोरॉन, मॉलिब्लेडनम यांचा समावेश होतो.

प्रकाशसंश्लेषण:

ऊसाच्या हिरव्या पानांमध्ये सूर्यशक्तीचे साखरेमध्ये रूपांतर करण्याची क्षमता असते. पानांच्या पेशीमध्ये हरित लवके असतात. हरितलवकांमध्ये हरितद्रव्ये असतात ते सूर्यकिरणे शोषून घेतात. पानावर जी पर्णरंध्रे असतात ती हवेतील कार्बन डाय-ऑक्साइड वायू शोषून घेतात. जमिनीतील पाणी शोषणाचे काम मुळे करतात. कार्बन डाय-ऑक्साइड, ऑक्सिजन आणि पाण्यामधला हायड्रोजन यांची जैवरासायनिक क्रिया होऊन ते परस्परांना बांधले जातात. त्यांच्या बंधांमध्ये सूर्याची ऊर्जा धरून ठेवलेली असते. 'उर्जेने समृद्ध असा कार्बन, हायड्रोजन व ऑक्सिजन यांचा पदार्थ म्हणजेच साखर. या सर्व क्रियेला प्रकाश संश्लेषण असे म्हणतात'.[९]

ऊसातील तणनियंत्रण:

ऊस लागवड केल्यानतंर तणांचा वेळीच बंदोबस्त करणे महत्त्वाचे असते अन्यथा उत्पादनात घट होते. ऊस पिकात वेगवेगळ्या १५० प्रकारची तणे उगवतात. वेगवेगळ्या टप्प्यावर तणांचे नियंत्रण केले जाते. त्यामध्ये खुरपणी, कोळपणी, बैलांच्या व पॉवर टेलरच्या साह्याने आंतरमशागत करतात.

'हॅमनर आणि टर्की या शास्त्रज्ञांनी इ. स. १९४४ मध्ये २,४,डी या रसायनांचा तणनाशक म्हणून यशस्वी उपयोग केला. पण उसामध्ये हे तणनाशक उपयुक्त असल्याची नोंद इ. स. १९४८ मध्ये झाली. तेव्हापासून आजतागायत सुमारे २० तणनाशके ऊसामध्ये उपयुक्त असल्याचे प्रयोगातून दिसून आले'.[१०] 'लव्हाळा, हरळी, कुंदा यासारखी बहुवार्षिक जमिनीमध्ये खोलवर वाढणारी तणनाशके मारण्यासाठी ग्लायसेल गटातील तणनाशके वापरावीत'.[११]

ऊसावरील किडी:

ऊस पिकावर मोठ्या प्रमाणात किडींचा प्रादुर्भाव होतो. जवळपास २०० पेक्षा जास्त किडींचा प्रादुर्भाव उसामध्ये झाल्याची नोंद आहे. त्यामध्ये महाराष्ट्रात २५ प्रकारच्या किडींचा प्रादुर्भाव ऊसावर होतो. ऊसाच्या किडीमध्ये प्रामुख्याने पांढरी माशी, फेसाळ ढेकण्या, लोकरी

मावा, खोडकिड, हुमणी, कांडेकीड, शेंडेकिड, खवले कीड, यांचा समावेश होतो.

ऊसावरील किडींचा वेळेवर बंदोबस्त केला नाही तर, उत्पादनात घट होते. साखर किंवा गूळ उतारा कमी मिळतो. या किडी ऊसाच्या मुळाला, खोडावर आणि पानावर पाहावयास मिळतात. किडींचा बंदोबस्त करण्यासाठी रासायनिक किंवा जैविक कीटकनाशके वापरली जातात.

ऊसावरील रोग:

ऊसाच्या अनेक जाती प्रचलित आहेत. प्रत्येक ऊसाच्या वाणांवर कोणत्या तरी रोगाचा प्रादुर्भाव हा पडतच असतो. त्यामध्ये ऊसाची गवताळ वाढ, चाबूक काणी, रेडरॉट, येलो लिफ्ट, तांबेरा, करपा, पोक्का बोंगा, पानावरील ठिपके, मुळकुज इत्यादी प्रकारचे रोग ऊस पिकावर दिसून येतात. ऊसावरील रोगाचा त्वरित बंदोबस्त करणे महत्त्वाचे असते अन्यथा उत्पादनात घट होते. ऊसावरील रोगांचा बंदोबस्त करण्यासाठी जैविक किंवा रासायनिक औषधांची फवारणी करावी लागते.

ऊस भरणी:

ऊसाची भरणी म्हणजे ऊसाच्या दोन्ही बगलांना माती लावली जाते. ऊस भरणी ही बैलांच्या किंवा रोटावेटरच्या सहाय्याने केली जाते. ऊस भरणी ही बाळ भरणी आणि मोठी भरणी या दोन पद्धतीने केली जाते.

१. बाळ भरणी:

ऊसाची लागवड केल्यानंतर साधारणपणे दीड महिन्यांनी ऊसाला फुटवे फुटायला सुरुवात होते. एकदा ऊसाला फुटवे फुटायला सुरुवात झाली की, ऊसाची भरणी करेपर्यंत एकसारखे फुटवे फुटतच राहतात. म्हणून साधारणपणे अडीच ते तीन महिन्यांनी ऊसाची बाळ भरणी केली जाते. त्यामुळे ऊसाचे अतिरिक्त येणारे कोंब थांबले जातात आणि सशक्त फुटवे जोमाने वाढतात. बाळ भरणी केली नाही तर फुटव्यांची संख्या जास्त येते. लहान फुटवे जास्त आल्याने ते जमनितील अन्न खाऊन त्याची मर होते. ऊसाची संख्या कमी होऊन उत्पादनात घट होते.

२. मोठी बांधणी:

साडेतीन ते चार महिने झाल्यानंतर ऊसाची मोठी भरणी केली जाते. त्यामुळे ऊसाचा फुटवा नियंत्रित राखला जातो. त्यामुळे सशक्त फुटवे जोमात वाढतात. ऊसाची भरणी केल्यामुळे ऊस लोळत नाही. ऊसाच्या उत्पादनात चांगली वाढ होते. ऊस भरणी केली नाही तर ऊस लोळला जातो. त्यामुळे ऊसाच्या उत्पादनात घट होते.

ऊसाची पक्वता:

सर्व साधारणपणे पावसाळ्यानंतर ऑक्टोबर महिन्यामध्ये ऊस परिपक्व होण्यास सुरूवात होते. ऊसाला तुरा येतो. ऊस तोडून चावून खाल्ला तर गोड लागतो. पक्व झालेल्या ऊसाची खालील लक्षणे आढळून येतात.

१) ऊसाची पाने पिवळी पडणे,
२) कांडीवरील डोळे फुगणे,
३) ऊस कांडीवर मोडणे,
४) एकमेकांवर कांडी आपटल्यावर धातूसारखा आवाज येणे,
५) ऊस चिर पाडून उन्हात पाहिल्यास साखरेचे कण चमकणे,
६) हँड रिफ्रक्टोमीटरने ब्रिक्सचे प्रमाण १० अंश पेक्षा जादा देणे'.[१२]

ऊस तोडणी:

परिपक्व झाल्यानंतर ऊसाची तोडणी जमनीलगत केली जाते. ऊसाची तोडणी करण्यापूर्वी पंधरा दिवस

अगोदर ऊसाला पाणी दिले जात नाही. ऊसाची तोडणी वेळेवर झाली नाही तर ऊसाला तुरा येऊन पांगशा फुठतात आणि उत्पादनात घट होते. ऑक्टोबर महिन्यानंतर ऊस तोडणी ही मजूर किंवा यंत्राच्या सहाय्याने केली जाते.

समारोप:

ऊसाला 'कल्पवृक्ष' म्हटले आहे, कारण ऊसाच्या मुळापासून शेंड्यापर्यंतच्या प्रत्येक भागाचा उपयोग केला जातो. ऊस पिकामुळे साखर कारखानदारी वाढीस लागून ग्रामीण भागाचा विकास झाल्याचे दिसून येते. देशातील लाखो शेतकरी ऊस पिकावर अवलंबून असून लाखो कुटुंबांना ऊस पिकामुळे रोजगार प्राप्त झाला आहे. ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यास ऊस पिकामुळे मदत झाली आहे.

संदर्भ सूची:

१. गायकवाड शेखर, तिटकारे मंगेश, 'इक्षुदंड ते इथेनॉल- साखर उद्योगाची भरारी', प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट, २०२३ पृ. क्र. १४

२. कित्ता, पृ., क्र. १४

३. जमदग्नी बा. म., 'ऊस संजीवनी', टेक नॉ पब्लिकेशन, सातवी आवृत्ती, १ जुलै, २०२३ पृ. क्र. २२

४. कित्ता पृ. क्र. २२

५. गायकवाड शेखर, तिटकारे मंगेश, 'इक्षुदंड ते इथेनॉल-साखर उद्योगाची भरारी', प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट, २०२३ पृ. क्र. ४२

६. कित्ता पृ. क्र. ३७

७. जमदग्नी बा. म., 'ऊस संजीवनी', टेक नॉ पब्लिकेशन, सातवी आवृत्ती, १ जुलै, २०२३. पृ. क्र. १४६

८. सांळुखे आ. न., 'ऊस शेतीची नवी दिशा', तेजस प्रकाशन, सातवी आवृत्ती, ऑक्टोबर, २०२०. पृ. क्र. १९

९. जमदग्नी बा. म., 'ऊस संजीवनी', टेक नॉ पब्लिकेशन, सातवी आवृत्ती, १ जुलै, २०२३. पृ. क्र. १६१

१०. कित्ता पृ. क्र. ७७

११. चिपळूणकर प्रताप, 'कमी खर्चाची ऊस शेती', तेजस प्रकाशन, सहावी आवृत्ती, जानेवारी, २०२३.पृ. क्र. ७५

१२. सांळुखे आ. न., 'ऊस शेतीची नवी दिशा', तेजस प्रकाशन, सातवी आवृत्ती, ऑक्टोबर, २०२०. पृ. क्र. ७६

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सातारा जिल्ह्यातील उरूस परंपरेचा अभ्यास

श्री. फिरोझखान इमाम जमादार

संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Corresponding Author - श्री. फिरोझखान इमाम जमादार

DOI - 10.5281/zenodo.19692753

प्रस्तावना:

सातारा जिल्हा हा ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न असा जिल्हा आहे. जिल्ह्याला गौरवशाली असा ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरेचा फार मोठा वारसा प्राप्त आहे. स्वराज्याची राजधानी, क्रांतिकारकांचा सातारा तसेच सैनिकांचा जिल्हा अशा विविध नावाने ओळखला जात असणा-या सातारा जिल्ह्यास वैभवशाली अशी ऐतिहासिक तसेच धार्मिक पार्श्वभूमी आहे.

सातारा जिल्ह्याच्या धार्मिक परंपरे मध्ये हिंदू परंपरा अग्रक्रमी असली तरी इतर समाजातील धार्मिक परंपरांचेही यामध्ये बहुमोल योगदान आहे. ह्यामध्ये प्रामुख्याने काही मुस्लीम परंपरांचा अभ्यास करणे आपल्याला क्रमप्राप्त ठरते. मुस्लिम धर्मामध्ये सण-उत्सव फार मोठ्या प्रमाणात साजरे करण्याची परंपरा दिसून येत नाही. रमजान इद(ईद-उल-फित्र) आणि बकरी ईद (ईद-उल-अजह:) हे मुस्लीम धर्मातील प्रमुख दोन सण असून जिल्ह्यातील मुस्लीम समाजाकडून फार मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. ह्या प्रमुख सणांच्या बरोबरच सातारा जिल्ह्यात मुस्लीम समाजाकडून साजरा केला जाणारा सण किंवा मुस्लीम धर्माची सर्वात जास्त साजरी केली जाणारी परंपरा म्हणजे 'उरूस'. सातारा जिल्ह्याच्या धार्मिक परंपरेला 'उरूस' परंपरेने वेगळी अशी वैशिष्ट्यपूर्ण अशी ओळख निर्माण करून दिलेली आहे. जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी उरूस साजरा केला जातो. उरूस उत्सव हा प्रामुख्याने मुस्लीम धर्मातील, मुस्लीम संताशी संबंधित असा उत्सव आहे. असे असले तरी जिल्ह्यातील प्रमुख उरुसांचा अभ्यास केला तर ह्यामध्ये मुस्लीम समाजाबरोबर इतर सर्वच समाज घटक यामध्ये मोठ्या प्रमाणात समाविष्ट असल्याचे प्रकर्षाने दिसून येते. राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक एकोपा, धार्मिक सौहार्दता आणि सर्वधर्म समभाव या सर्व मूल्यांचे अस्तित्व आपल्याला उरूस ह्या परंपरे मध्ये ठळकपणे दिसून येतात.सातारा जिल्ह्याची चांगली अशी धार्मिक ओळख निर्माण करण्यास महत्वपूर्ण योगदान असणा-या 'उरूस" ह्या परंपरेचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

उरूस परंपरा: धार्मिक आधार आणि ऐतिहासिक पार्श्भूमी:

उरूस किंवा उर्स हा मुल अरबी शब्द असून त्याचा अर्थ 'विवाह' असा होतो. सुफी परंपरे मध्ये संतांचा किंवा पीरांचा मृत्यू हा अंत नसून तो अल्लाहशी झालेला अध्यात्मिक मिलाफ असतो. एका मुस्लीम हदीसनुसार, धर्मनिष्ठ व्यक्तीला कबर मध्ये "नववधुसारखे झोपा" असे सांगितले गेले आहे. यावरून सुफी परंपरेत मृत्यूला

आनंदाचा क्षण मानले गेले आहे. उरूस हा सुफी परंपरेतील एक महत्वपूर्ण उत्सव असून,तो वली (संत) यांच्या पुण्यतिथीला साजरा केला जातो. सुफी विचारधारेत मृत्यूला केवळ जैविक शेवट न मानता,आत्म्याचा परमेश्वराशी अंतिम मिलाफ म्हणून बघितले जाते. त्यामुळे वलींच्या पुण्यतिथीला उरूस म्हणजेच 'आध्यात्मिक विवाह' म्हणून साजरा करणे ही परंपरा निर्माण झाली.

उरुसाची संकल्पना ही ह. मोहम्मद पैगंबर (स.अ.व स.) यांच्या कृतिशी निगडीत असलेली दिसून येते. हदीस नुसार हजरत पैगंबर(स.अ.व स.) ह्यांनी उहूद (सौदी अरेबिया येथील मुस्लीम धर्माच्या इतिहासातील प्रसिद्ध ठिकाण) येथील शहिदांच्या कबरीना दरवर्षी भेटी देऊन प्रार्थना केल्या. या प्रथेला मुस्लीम धर्मातील चारही खलीफानी चालना दिलेली दिसून येते. शाह अब्दुल अझीझ यांनी फतवा अजीजियामध्ये कुराण पठण, फातिहा, आणि अन्न वाटप या कृतिने आध्यात्मिक पुण्य मिळते असे नमूद केले आहे.

भारतामध्ये सुफी विचारधारा मानणारा मुस्लीम वर्ग, सुन्नी विचारधारेच्या संख्येपेक्षा फार कमी आहे. असे असले तरी सुफी परंपरेतील हा उत्सव भारता मध्ये फार मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. भारतातील अजमेर शरीफ दर्गाह हे ह्या परंपरेचे सर्वात मोठे केंद्र आहे. भारतात १२व्या शतकात ह.ख्वाजा मोईनुद्दिन चिश्ती(इ.स.११४१ – इ.स.१२३०) यांनी सुफी परंपरेला मजबूत पाया दिला. अजमेर येथील ख्वाजा गरीब नवाझ यांच्या उरुसाला लाखो भाविक दरवर्षी मोठ्या प्रमाणात भेट देतात. त्यांच्या अजमेरमधील अलौकिक अशा कार्यामुळे येथील 'उरूस' हा भक्ती, दया आणि बंधुभावाचा संदेश पसरवणारा उत्सव बनला.

महाराष्ट्रातही काही प्रमुख ठिकाणचे उरूस मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. उदा. ह.ख्वाजा शमणा मीरा व ह. ख्वाजा मोहम्मद मीरा उरूस,मिरज जि.सांगली, शाही उरूस, जव्हार,जि.पालघर, हाजी अली दर्गा,मुंबई, संभूआप्पा बुवाफन उरूस, उरूण-ईश्वरपूर जि.सांगली. सातारा जिल्ह्याचा विचार करता जिल्ह्यामध्ये मोठ्या संख्येने मुस्लीम दर्गाह अस्तित्वात आहेत (वक्फ महामंडळ, महाराष्ट्र यांच्याकडे नोंदणी असणा-या दर्ग्याची संख्या '३०' आहे) . त्यामुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात उरूस साजरे करण्यात येतात. हा उत्सव केवळ धार्मिक श्रद्धेचा उत्सव नसून, सामाजिक सौहार्द ,सामाजिक देवाणघेवाण आर्थिक व्यवहार्यतेचेही प्रतिक आहे.

सातारा जिल्ह्यातील उरूस परंपरा :

सातारा जिल्ह्यात मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात असून, २०११ च्या जणगणनेनुसार जिल्ह्यामध्ये १,४६,९७० एवढी मुस्लीम लोकसंख्या आहे. त्याचे एकूण लोकसंख्येशी ४.८९% एवढे प्रमाण आहे. यामध्ये प्रामुख्याने सुन्नी,शिया आणि बोहरी समाजाचा समावेश होतो. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येत सर्वात जास्त संख्या ही सुन्नी समाजाची आहे. उरूस परंपरा ही प्रामुख्याने सुफी विचारधारेशी निगडीत अशी परंपरा असली तरी जिल्ह्यामध्ये मात्र ही परंपरा मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. जिल्ह्यातील काही प्रसिद्ध असे उरूस खालीलप्रमाणे, खातगुण, खटाव,जयरामस्वामी वडगाव, कटगुण, कराड,सातारा,रहिमतपूर,वाई,तडवळे, चंदन-वंदन,वाकळवाडी इत्यादी. सातारा जिल्ह्यात साजरे केले जाणारे उरूस हे राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सौहार्देतेचे चांगले प्रतिक आहे. जिल्ह्यात साजरे होणा-या ह्या परंपरेमध्ये मोठ्या प्रमाणात मुस्लीम समाजा बरोबरच हिंदू समाजाचाही मोठ्या प्रमाणात सहभाग असतो.

सातारा जिल्ह्यातील निवडक उरूस :

खातगुन: खटाव तालुक्यातील खातगुन ह्या ठिकाणी श्री पीरसाहेब राजे बागसवार यांचा प्रसिद्ध असा दर्गा आहे. प्रचलित आख्यायिकेनुसार हे स्थान जयराम स्वामी वडगाव, ता.खटाव येथील देवस्थानशी संबंधित आहे गावातील ताराबाई आणि मानाबाई यांच्या श्रद्धा आणि भक्तीमुळे हे देवस्थान खातगुन याठिकाणी प्रकट झाल्याचे सांगण्यात येते. या दोन्ही स्त्री भक्तांच्या समाधी दर्गा परिसरातच आहेत. जवळपास ३५० वर्षाची परंपरा असलेल्या ह्या देवस्थानचा उरूस हा हिंदू-मुस्लीम ऐक्याचे फार मोठे उदाहरण आहे. दरवर्षी मार्च महिन्या मध्ये याठिकाणी उरूस भरतो.येथील उरूस परंपरेने चालत आलेल्या झेंडा,चुना,संदल,मौलूद,कव्वाली आणि पालखी मिरवणूक ह्या प्रथेने पार पडतो. ह्या उरुसामध्ये मुस्लीम समाजाबरोबर हिंदू समाजातील भाविकांचाही क्रियाशील सहभाग असतो.

कटगुण: हिंदू मुस्लीम ऐक्याचे प्रतिक असलेल्या आणि मानवतेची शिकवण देणा-या सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कटगुण येथील पीर सय्यद जलालउद्दीन मोहब्बतशाह उर्फ मलंगबाबा दर्गाचा उरूस दरवर्षी पार पडत असतो. आखिल भारतीय मानव एकता सेवा समितीचे स्नेह संमेलन तसेच कव्वालीच्या शानदार मुकाबल्याचे आयोजन हे ह्या उरुसाचे प्रमुख असे वैशिष्ट्ये असते. दर्गाहचे उत्तराधिकारी हजरत रहमान शाह बाबा (बकाअली शाह कादरी) यांच्या नेतृत्वाखाली हा उत्सव पार पडतो. संदलच्या मिरवणुकीने ह्या उत्सवाची सुरवात होते. धार्मिकपरंपरे बरोबरच मानवतावादी आणि सुधारणावादी विचारसरणी अंगीकारून उत्सव साजरा करण्याची वैशिष्ट्यपूर्ण अशी परंपरा ही कटगुण येथील उरुसा मध्ये दिसून येते. येथील उरूस साजरा करीत असताना पारंपारिक सर्व धार्मिक विधी पार पाडून दरवर्षी मानव एकता सेवा समितीचे संमेलन आयोजित केले जाते. ह्या संमेलनाच्या माध्यमातून मानवता, राष्ट्रीय एकात्मता आणि बंधुभावाचा प्रसार करण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात केले जाते. दरवर्षी मान्यवर व्याख्याते,स्थानिक लोकप्रतिनिधी,विविध धर्माचे धर्मगुरू, जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते आणि भाविक मोठ्या प्रमाणात उरुसा मध्ये सहभागी होत असतात. समतेचा पुरस्कार करणारे महात्मा जोतीराव फुले यांच्या जन्मभूमीतून सामाजिक समतेचा पुरस्कार आजच्या काळात ह्या उरुसाच्या माध्यमातून होत आहे.

चंदन वंदन: कोरेगाव तालुक्यातील चंदनगड ह्या किल्ल्यावर अब्दुल कादर जिलानी यांचा दर्गा आहे. हे ठिकाण 'गौसपिया' या नावाने ओळखले जाते. याठिकाणी मुस्लीम वर्षातील रबिलारवर या महिन्यात दहाव्या व अकराव्या तिथीस 'उरूस' साजरा करण्यात येतो. दरवर्षी महाराष्ट्रातून हजारो भाविक ह्या उत्सवासाठी याठिकाणी नित्य नियमाने येत असतात. वार्षिक उरुसा बरोबरच प्रत्येक गुरुवारीही दर्शनासाठी येण्याची याठिकाणी प्रथा पहावयास मिळते. ये येणा-या भाविकांच्यात समाजातील सर्व धर्मातील लोकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून येतो.

कराड: कराड शहरामध्ये शेख फरीद शकरगंज कलहरी, सात शहीद, सैफुल्ला बाबा, बलखडी बाबा (बलखंडी पीर), बायजीद बाबा, जकला फकीर आणि कासीम फकीर अशी बहामनी आणि आदिलशाही काळातील प्रसिद्ध मुस्लीम संतांची ठिकाणे आहेत. याठिकाणी दरवर्षी मोठ्या प्रमाणात उरूस साजरा करण्याची प्रथा आहे.

या बरोबरच जिल्ह्यात सातारा येथील हजरत पीर बत्ताशे बाबा दर्गाह , पीर जंगी साहेब,तडवळे,ता. कोरेगाव येथील हजरत पीर दस्तगीर (रह.), रहिमतपूर येथील ह.रणदुल्लाखान यांचा उरूस आणि जिल्ह्यातील अनेक ठिकाणी मोठ्याप्रमाणात उरूस साजरा केला जातो.

उरूस परंपरेतील धार्मिक विधी:

उरूस साजरा करीत असताना प्रमुख असे धार्मिक विधी पार पडले जातात. उरूस हा प्रामुख्याने मुस्लीम संतांच्या पुण्यतिथीला साजरा केला जात असल्याने त्या अनुषंगाने सर्व विधी पार पडले जातात. ह्यात चुना, चादर, संदल असे विधी असतात. तसेच मानाच्या अशा झेंड्याची मिरवणूक काढली जाते. या झेंडा मिरवणुकीत सर्व ग्रामस्थ आणि भाविक झेंड्याचे श्रद्धेने पूजन करून नारळ अर्पण करतात. मिरवणुकी दरम्यान हम्द(अल्लाहची स्तुती), नात (ह.पैगंबर (स.अ.व.) यांच्या प्रीत्यर्थ) यावर आधारित भक्तीपर कवने गायली जातात. पिरांच्या कबरीवर उत्सव दरम्यान फुलांची चादर, गीलाफ , इत्र, सुगंधी अत्तर चढविले जातात. काही ठिकाणी पिर बाबांची पालखीतून प्रतीकात्मक मिरवणूक काढली जाते. उरूस उत्सवात मोठ्या प्रमाणात कव्वालीचा कार्यक्रम धार्मिक विधीचाच भाग मानला जातो. स्थानिक परंपरे नुसार ब-याच ठिकाणच्या धार्मिक विधीत काही बदल दिसून येतो.

सातारा जिल्ह्यातील उरुसांचे सामाजिक आणि सांस्कृतिक महत्व:

जिल्ह्यातील उरूस परंपरेचा अभ्यास केल्यानंतर प्रकर्षाने दिसून येणारी प्रमुख बाब म्हणजे या उत्सवामध्ये दिसून येणारा सर्व समाजाचा सहभाग. शहरी तसेच ग्रामीण भागामध्ये उरूस साजरा करताना मुस्लीम समाजाबरोबर हिंदू समाजाचाही मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. उरुसाच्या परंपरेमध्ये अनेक प्रथांची सामाजिक आणि सांस्कृतिक देवाण घेवाण झाल्याची दिसून येते.जिल्ह्यात साजरे होणारे उरूस हे ख-या अर्थाने हिंदू –मुस्लीम ऐक्याचे प्रतिक आहेत. उरूस उत्सव सुफी संगीत, कव्वाली, दर्गाह सजावट , कलात्मक सादरीकरण , मेळावे, संमेलने या माध्यमातून सांस्कृतिक कलांचे केंद्र ठरतात. या परंपरेच्या माध्यमातून समाजात विविध सांस्कृतिक घटकांची , विचारांची देवाण घेवाण होते. समाजातील धार्मिक आणि सामाजिक सौहार्दता जपण्याचे कार्य उरुसाच्या माध्यमातून केले जाते. जिल्ह्यातील धार्मिक सलोखा अबाधित राखण्यात उरूस परंपरेचे फार मोठे योगदान आहे.

आर्थिक महत्व :

जिल्ह्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात उरूस साजरे केले जातात. उरूस साजरा होणा-या ठिकाणी उरूस काळात मोठ्या यात्रेचे स्वरूप असते. याकाळात अनेक खाद्यपदार्थ, खेळणी, मनोरंजनाचे खेळ, अलंकार आणि कपडे विक्रेते येत असतात. काही उरुसांच्या ठिकाणी बैलगाडी शर्यती, कुस्ती स्पर्धा, कव्वाली स्पर्धा यांचे आयोजन केले जाते. या सर्वांचा स्थानिक व्यापारी त्याच बरोबर बाहेरून येणा-या व्यापा-यांना फार मोठा आर्थिक फायदा होतो. उरूस काळात स्थानिक अर्थ व्यवस्थेला फार मोठी चालना मिळते.

जिल्ह्यातील उरूस परंपरे समोरील आजची आव्हाने:

जिल्ह्यातील उरूस परंपरेचा अभ्यास केल्यानंतर काही मुलभूत समस्या समोर येतात, ज्यात प्रामुख्याने उत्सवाचे व्यावसायीकरण, राजकीय हस्तक्षेप, स्थानिक वाद-विवाद आणि मुलभूत सोयी सुविधांचा अभाव. यातील ब-याच समस्याचे निराकरण विश्वस्त समिती आणि स्थानिक प्रशासन दूर करण्याचे यथोचित प्रयत्न करीत आहे. तरी राज्य शासना तर्फे त्यांना अधिक प्रशासनिक आणि आर्थिक सहकार्याची आवश्यकता आहे. उत्सव ठिकाणी गर्दी नियंत्रण, स्वच्छतेची समस्या, सार्वजनिक सोयी सुविधेचा अभाव यासारख्या समस्या प्रकर्षाने सर्वच उरूस भरणा-या ठिकाणी दिसून येतात. यासाठी विश्वस्त समिती, स्थानिक प्रशासन आणि राज्य शासन यांच्यात योग्य तो समन्वय साधून यासर्व समस्यांचे निराकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

एकूणच जिल्ह्यातील सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेतील महत्वाचा घटक असणा-या उरूस परंपरेचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, उरूस परंपरेमुळे जिल्ह्याला नवीन अशी धार्मिक सलोख्याची ओळख प्राप्त होते. मुस्लीम समाजा बरोबरच मोठ्या प्रमाणात सहभागी होणा-या हिंदू समाजा मुळे हा उत्सव जिल्ह्याची एक वेगळी ओळख निर्माण करतो. या उत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्यात धार्मिक सलोखा राखण्याचे कार्य साध्य होते. जिल्ह्यात वेग-वेगळ्या ठिकाणी पार पडणारे उरूस हे राष्ट्रीय एकात्मेचे फार मोठे प्रतिक आहेत. उरूस हा सुफी परंपरेचा जिवंत वारसा आहे. हा उत्सव केवळ धार्मिक विधी नसून समाजातील नैतिक मुल्ये, बंधुभाव आणि सर्वसमावेशकता टिकवण्यासाठी एक महत्वपूर्ण मार्ग आहे. सातारा उरूस परंपरा भारतीय संस्कृतीतील विविधतेचे सौंदर्य अधोरेखित करते.

संदर्भ:

१. डॉ.मुहम्मद आजम,सुफिवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र (त्रिखंडात्मक), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, खंड १,मुंबई,२०१९

२. पाठक अरुणचंद्र(संपा.),सातारा जिल्हा गॅझेटीयर,मुंबई,१९९९

३. पगडी सेतुमाधवराव,सुफी संप्रदाय-तत्वज्ञान व परंपरा,मुंबई,१९५३

४. पाटील पी.डी., कऱ्हाड नगरपालिका शत सांवत्सरिक स्मृतिग्रंथ १८५५-१९५५, मुद्रक पी.डी.विंगकर प्रेस, कराड,१९५५

५. देशमुख रा.नि.,आपला सातारा जिल्हा,कल्पना प्रकाशन,२०११

६. प्रा.माटे म.श्री., मध्ययुगीन महाराष्ट्र –(सामाजिकआणि सांस्कृतिक जीवन)इ.स.१३००-१६५० , महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ , मुंबई, ऑगस्ट,२००२

७. जिल्हा माहिती अधिकारीसंदर्भ ,सातारा जिल्हा २००१ ,पुस्तिका

८. देसाई.जी.आर,,सातारा जिल्ह्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास ,मुंबई ,लोकवाङ्मय गृह , २०१५

९. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२४,जिल्हा सातारा,जिल्हा सांख्यिकी कार्यालय,अर्थ व सांख्यिकी संचालनालय ,महाराष्ट्र शासन नियोजन विभाग,सातारा

१०. स्मरणिका,आमचा सातारा, सातारा शहर नगरपालिका,१९६७

११. कच्छी युनुस अहमद,कऱ्हाड मधील इस्लामिक संस्कृतीचा इतिहास व भूगोल,स्वातंत्र्य स्मरणिका लेख,१९८८

१२. खान मौलवी हफिम मीर मोहम्मद याकुब,पवित्र कुराणाचे सुरस व सटीक मराठी भाषांतर,पवित्र कुरण प्रकाशक,मुंबई,१९१६

१३. पाटील ए.जे.,कऱ्हाडचा इतिहास (सन १९५० ते २०००),पीएच.,डी. अप्रकाशित प्रबंध,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे,२०११

१४. सातारा जिल्हा अधिकृत संकेत स्थळ- http://satara.gov.in

१५. शेख,अब्दुल करीम,महाराष्ट्रातील उरूस परंपरा,पुणे विद्यापीठ प्रकाशन,२०१८

१६. Retrieved from, http://www.islaminperspective.com, अजमेर गरीब नवाझ दर्गाह, उरुसची संकल्पना,

१७. You tube link, etvbharat.com

१८. Retrieved from, http://share.google/blFr6CQONDzQSvTEi

१९. Retrieved from, http://charity.maharashtr.gov.in

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सांगली जिल्ह्यातील पर्यटन : स्थलांचा चिकित्सक अभ्यास

श्री. विनायक कांबळे

संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Corresponding Author - श्री. विनायक कांबळे

DOI - 10.5281/zenodo.19692771

प्रस्तावना:

आधुनिक काळात पर्यटन व्यवसाय हा नवीन उद्योग म्हणून अधिक गतीने विकसित होत आहे. आज जगातील बहुतेक सर्व देशात पर्यटनाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. जगात फार प्राचीन काळापासून पर्यटन कोणत्याही कारणाविना केवळ एक कुतूहल म्हणुन किंवा विशिष्ट हेतूने संशोधन म्हणुन घडून आल्याची इतिहासात उदाहरणे आहेत. प्राचीन काळी चीनी प्रवासी फा-ई-यान हा भारतात आलेला होता. १५ व्या शतकाच्या शेवटी दर्यावर्दी वास्को-दी-गामा हा पश्चिम किनारपट्टीवर व्यापारासाठी आलेला होता.

पर्यटन म्हणजे प्रवास. पर्यटन हा शब्द इंग्रजीतील 'Tourism' या शब्दाचे मराठी रुपांतर आहे. आनंद, शिक्षण किंवा व्यवसायासाठी आपल्या स्थानापासून दूर, ठराविक कालावधीसाठी केलेला प्रवास होय. 'Tourism' हा शब्द 'Tornos' (वर्तुळ/फिरणे) या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. पर्यटन हे देशातील भौगोलिक सीमेत व सीमेबाहेरील परदेशात घडून येते. पर्यटनात पुरातत्ववास्त, इतिहास प्रसिध्द स्थळे, प्राचीन कला निर्मितीची केंद्रे, पवित्र तीर्थक्षेत्र, नाविण्यपूर्ण औद्योगिक प्रकल्प, निसर्गाचे चमत्कार उदा-कास पठार इत्यांदीचा समावेश होतो. अशा स्थळांना भेट देण्याविषयीचे आकर्षण, कुतूहल, प्रेरणा यातून पर्यटन निर्माण होते. प्रस्तुत शोध निबंधात सांगली जिल्हयातील पर्यटन स्थळे व त्यांना भेट देणारे पर्यटक यांचा जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदानाचा अभ्यास करणार आहोत.

अभ्यासाची उद्दीष्टये:

१. पर्यटनाचा अर्थ समजावून घेणे
२. पर्यटनाचे स्वरुप स्पष्ट करणे
३. सांगली जिल्हयातील पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे
४. जिल्हयाच्या समध्दीतील पर्यटनाचे महत्व सांगणे

अभ्यास पध्दती :

सांगली जिल्हयाच्या समध्दीतील पर्यटन व्यवसायाचे स्थान अभ्यासन्याचा प्रयत्न या प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आला असून त्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. विविध पुस्तके, संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रातील लेखा, मासिके यांचा वापर करण्यात आला आहे. सदर संशोधन निबंधासाठी सांगली जिल्हयातील आर्थिक विकासात पर्यटन व्यक्सावाला विशेष महत्व आहे. हे गहीत वापरण्यात आले आहे.

पर्यटनाचा अर्थ:

जागतिकीकरणाच्या युगात पर्यटन उद्योगाला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. पर्यटन व्यवसाय हा

अर्थशास्त्रीय दष्टीकोणातून सेवा क्षेत्रात येतो. सेवा क्षेत्राचा वाढता हिस्सा हा देशाच्या आर्थिक विकासाचे निर्देशक मानले जाते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय दृष्ट्या पर्यटन महत्वाचे आहे. त्यामुळे जगातील सर्व देशाली पर्यटन उद्योगाच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले आहे. भारतासारख्या विकसनशील देशालाही पर्यटन व्यवसायाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. तेव्हा पर्यटनाचा असा अर्थ सांगता येतो की, 'जो आनंद उपभोगण्यासाठी प्रवास करतो तो पर्यटक होय', तर ऑक्सफर्ड शब्द कोषानुसार 'जो उत्कंठेपायी किंवा कुतुहलापोटी एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी किंवा सहज गंमत म्हणून किंवा मी असा प्रवास केला आहे हे सांगण्यासाठी भ्रमंती करतो त्यास पर्यटक असे म्हणतात'. पर्यटक हा पर्यटनातील प्रमुख घटक आहे. पर्यटकाशिवाय पर्यटन शन्य बनते.

आज पर्यटनाचे क्षेत्र खूप विस्तारले आहे. देशात व विदेशातही पर्यटन अगदी सहज घडून येत आहे. पूर्वी अन्न, वस्त्र, निवास एवढ्याच गरजा सीमित होत्या आज प्रगतीबरोबर पर्यटनव्यवसायाला गती मिळत आहे. वाहतूक दळणवळण क्षेत्रातील नेत्रदिपक प्रगतीने जगातील माहिती एका क्लिकवर मिळते आहे. इंटरनेटमुळे मार्गदर्शक उपलब्ध होत आहे, त्यामुळे पर्यटनाला चालना मिळत आहे. मात्र पर्यटनाचा कालावधी हा मर्यादीत राहतो. यात्रा, समारंभ, आठवडयातील सुट्या रजा या काळात पर्यटन घडून येते. प्राचीन स्थळे, त्यातील भव्यता, त्याकाळातील ज्ञान याची कल्पना यावी या हेतूने पर्यटन होते. अलिकडे मनोरंजनासाठी पर्यटन हा हेतू अधिक वाढत आहे.

सांगली जिल्हयातील पर्यटनाचे स्वरुप:

सांगली जिल्हा हा महाराष्टातील समृध्द जिल्हा आहे. सांगली जिल्हा हा स्वर्गीय पदमभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील यांची कर्म भूमी असलेला देशाच्या स्वातंय लढ्यात अग्रेसर असणाऱ्या क्रांतीकारकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्याचप्रमाणे पर्यटनातही पुढे असलेला जिल्हा म्हणून त्याचा उल्लेख करावा लागेल अशी पर्यटन स्थळे, निसर्गसौदर्य जिल्हयाला लाभलेले आहे. नैसर्गिकदष्टया विषमतोल असणाऱ्या जिल्हयात पर्यटनाला विशेष महत्त्व आहे. यामध्ये पवित्र देवस्थाने, प्राचीन मंदिरे, अभयारण्य, किल्ले, स्मारके, डोंगर उद्याने मशिदी, चर्च, यात्रा, उत्सव इत्यादीचा समावेश होतो.

पुढे या आजचा सांगली जिल्हा हा पूर्वीच्या सातारा जिल्हयाचा भाग होता. स्वातंयानंतर भारत सरकारने सन १९४९ मध्ये तत्कालीन सातारा जिल्हयातील तासगाव, खानापूर, वाळवा व शिराळा हे चार तालूके हस्तांतरीत करुन, तसेच राज्याच्या इतर संलग्न भागातून मिरज व जत हे आणखी दोन तालुके निर्माण करुन सहा तालुक्यांचा 'दक्षिण सातारा' नावाचा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला. जिल्हयाचे दि. २६ नोव्हेंबर १९६० रोजी दक्षिण सातारा हे नाव बदलून 'सांगली' असे करण्यात आले. सन १९६५ मध्ये मिरज व खानापूर या तालुक्यांचे विभाजन करुन कवठेमहांकाळ व आटपाडी असे दोन नवीन तालुके नव्याने निर्माण करण्यात आले. त्यानंतर दिनांक १ जूलै १९९९ रोजी खानापूर व तासगाव या तालुक्यांचे विभाजन करुन पलूस हा नवीन तालुका नव्याने निर्माण करण्यात आला. सध्या सांगली जिल्हा हा दहा तालुक्यांचा झाला असून जिल्हयात सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका तसेच आष्टा, इस्लामपूर, तासगाव, विटा व जत या पाच नगरपालिका कार्यरत आहे. खानापूर, कडेगाव, शिराळा, कवठेमहांकाळ या चार नगरपंचायती नव्याने निर्माण झाल्या आहेत.

सांगली जिल्हयाचे तीन स्वाभाविक विभाग पडतात, त्यामध्ये पावसाचा प्रदेश, नद्यांच्या सान्निध्यातील

मध्यम पावसाचा सपाट प्रदेश व पूर्वेकडील पठारांचा व भरड मातीचा, कमी पावसाचा कायमचा दुष्काळी प्रदेश याचा समावेश होतो. पश्चिमेकडील सहयाद्रीच्या पूर्व उत्ताराच्या डोगररांगा व त्यातून निघणाऱ्या भैरवगड डोंगररांगा यानी शिराळा व वाळवा तहसिलचा पश्चिमभाग व्यापलेला आहे. तो नैसर्गिक समध्दतेने नटलेला आहे. कष्णा, वारणा व येरळा या नद्यांच्या सानिध्यांतील मध्यम पावसाचा सपाट व सुपिक प्रदेश यामध्ये मिरज तहसिलचा पश्चिम व उत्तर भाग येतो. सांगली जिल्हयाचा पूर्वेकडील प्रदेश हा कमी पावसाचा व भरड मातीचा असून यामध्ये आटपाडी, जत, कवठेमहांकाळ, आनापूर या तालुक्यांचा समावेश होतो. त्याच बरोबर मिरज व तासगांव तालुक्यांचा पूर्व भागही यामध्ये येतो व हा भाग सदैव दुष्काळी म्हणून ओळखला जातो. निसर्गाने याभागावर जणू अन्यायच केला आहे येथील लोकांचा उत्पन्नस्तर कमी आढळतो. त्यामुळे ते सांगली जिहयाच्या पूर्वेकडील भागात स्थलांतरीत होतात.

जिल्हयातील पर्यटन स्थळे :

अ. नं.	तालुका	एकूण मंदिरे	स्मारके	किल्ले	डोंगर	इतर
१	शिराळा	४४५	०४	०२	२०	०३
२	वाळवा	३९५	०८	०१	०४	०४
३	पलूस	१३०	०२	००	०२	०३
४	खानापूर	९५	०१	०१	०३	०५
५	आटपाडी	१२४	०१	०१	०३	०५
६	तासगाव	१०५	०१	००	०२	०४
७	मिरज	२६६	०७	०१	०२	०४
८	कवठेमहाकाळ	१९८	०४	००	०२	०८
९	जत	१३८	०१	०१	०१	०५
१०	कडेगाव	१२०	०१	००	०३	०६

संदर्भ : जिल्हा पाहणी अहवाल

वरील कोष्टकात पर्यटन स्थळांची ढोबळ माहिती दिलेली आहे. यामध्ये सर्व छोटी-मोठी मंदिरे, सपदके किल्ले व डोंगर यांचा उल्लेख केला आहे तर इतर स्थळामध्ये उद्यान, समाधी स्थळे. इत्यादींचा समावेश आहे. यातील काही प्रमुख आणि महत्वाच्या पर्यटन स्थळांचा उल्लेख तालुका निहाय पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) शिराळा :

१. शिराळा येथील नागपंचमी मंदिर

२. श्री गोरखनाथ मंदीर

३. चांदोली धरण व अभयारण्य

४. प्रचीतीगड किल्ला

५. गिरजवडे येथील जोतीर्लिंग मंदिर

२) वाळवा:

१. किल्ले मच्छिद्रगड व मछिद्रनाथाचे मंदिर

२. बहे येथील श्री रामलिंग मंदिर

३. नरसिंहपूर येथील भुयारातील श्री नसिंह मंदिर

४. उरण इस्लामपूर येथील संमुआप्पा देवालय

५. शिवपूरी येथील सिध्देश्वर मंदिर

३) पलूस:

१. श्रीक्षेत्र औदुंबर व दत्त मंदिर

२. पलूस येथील श्री घोंडी महाराज समाधी

३. ब्रम्हनाळ येथील कृष्णा व येरळा संगम

४. ब्रम्हनाळ येथील राजयोगी आनंदमुर्ती समाधी

५. भूवनेश्वर येथील भूवनेश्वर देवीचे अतिप्राचीन मंदिर

४) खानापूर:

१. रेणावी येथील रेवणसिध्द मंदिर व मुळ देवस्थान मंदिर

२. पळशीजवळील श्री शुकाचार्य मंदिर

३. पारे येथील दरगोबा देवस्थान

४. रेवणगाव येथील वेताळ गुरू देवस्थान

५. खानापूर येथील दर्गा

६. ढवळेश्वर येथील प्राचीन महादेव मंदिर

७. विटा येथील पालखी शर्यती

८. बानुरगड श्री बहिर्जी नाईक यांची समाधी

५) आटपाडी :

१. आटपाडी तालुक्यातील स्वतंत्रपूर येथील खुला तुरुंग

२. खरसुंडी येथील श्री सिध्दनाथ मंदिर

३. वलवण येथील मोरांचे थवे

४. भिवघाट येथील भिमाशंकर मंदिर

५. ब्रिटीशकालीन राजेवाडी तलाव

६. नेलकरंजी येथील श्री जकाईदेवी मंदिर

७. करगणी येथील श्रीराम मंदिर

६) तासगाव :

१. तासगाव येथील श्री गोपूर व श्री गणेश मंदिर

२. कवठेएकंद येथील अतिप्राचीन श्री सिध्दराज मंदिर

३. आरेवाडी येथील राधाकृष्ण गोपाळ मंदिर

७) मिरज :

१. सांगली येथील श्री गणेश मंदिर

२. स्वर्गीय वसंतरावदादा पाटील यांची समाधी

३. हरिपूर येथील श्री संगमेश्वर देवालय व कृष्णा व वारणा नद्यांचा संगम

४. तुंग येथील समर्थ रामदास स्वामी यांनी स्थापन केलेले मारुती मंदिर

५. ख्वॉजा शमशुददीन मिरासाहब दर्गा

६. भोसेजवळील दंडोबा अभयारण्य प्राचीन गुहा व यल्लमादेवी मंदिर

७. बेळंकीजवळील श्री सिध्देश्वर मंदिर

८) कवठेमहांकाळ :

१. कवठेमहांकाळ येथील श्री महाकाली मंदिर

२. आरेवाडी येथील श्री बिरोबा देवस्थान

९) जत:

१. जत येथील श्री यल्लतादेवी मंदिर व श्रीराम मंदिर

२. बनाळी येथील बनशंकरी मंदिर

३. गुहापूरचे यल्लामादेवी मंदिर

४. गुडघरी सिध्दनाथाचे हेमाडपंथी मंदिर

५. बिळूर येथील मठ

६. गिरगाव येथील श्री लक्ष्मी मंदिर

७. सोरडी येथील श्री दत्त मंदिर व मलाकसिध्द मंदिर

१०) कडेगाव :

१. सागरेश्वर अभयारण्य आणि सागरेश्वर मंदिर

२. कडेपूर येथील श्री डोंगराई देवी मंदिर

३. सोनसळ येथील चौरंगीनाथ मंदिर

४. देवराष्टे येथील कै. यशवंतराव चव्हाण याची जन्मभूमी

५. कडेगाव येथील मोहरम

सांगली जिल्हयाच्या आर्थिक विकासातील पर्यटनाचे महत्व:

अर्थशास्त्रीय दृष्टिकोणातून पर्यटन उद्योगाला विशेष महत्व आहे. जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्था या पर्यटन उद्योगावर आत्मनिर्भर आहेत. हॉगकॉग, थायलंड, नेपाळ, स्पेन, युरोप या देशांच्या अर्थव्यवस्था सर्वस्वी पर्यटनावर अवलंबून आहेत. पर्यटन हा असा व्यवसाय आहे की ज्यामुळे त्या देशाच्या, प्रदेशाच्या समघ्दीत वाढ होते. भारतातही इ. स. १९६० नंतर पर्यटन उध्योगाला महत्व प्राप्त झाले आहे. पर्यटन व्यक्सायाच्या माध्यमातून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपात उत्पन्न प्राप्त होत आहे. त्याच्या परिणाम अर्थव्यवस्थेतील पैशाची गतिशीलता वाढते. उध्योग वाढीला चालना मिळते मागणीत वाढ होते. यातुन पुन्हा गुणक पध्दतीने उत्पन्नात वाढ होते. सांगली जिल्हयातीलविविध पर्यटन स्थळांना जिल्हयातील व राज्यातील इतर जिल्हयांतून, देशातून, परकीय पर्यटकाकडून भेटी दिल्या जातात. त्यामुळे जिल्हयाच्या विकासास मदत झाली आहे. विकासातील पर्यटनाचे महत्व पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

रोजगार निर्मिती पर्यटनाचा एक महत्वाचा फायदा म्हणजे रोजगार वध्दी होय. पर्यटन व्यवसायातील रोजगार निर्मिती ही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरुपाची असते. तसेच कुशल वा अकुशल, पुरुष-स्त्रिया या सर्वांनाच काम मिळते. असा रोजगार कायमस्वरुपी किंवा हंगामी स्वरुपातील असतो. त्यामुळे या व्यवसायातून स्थानिक लोकांच्या रोजी रोटीचा प्रश्न काही प्रमाणात सुटतो. यामध्ये वस्तू व सेवा विक्रेते व उत्पादक यांचा समावेश होतो. तसेच याशिवाय मोटार डघयव्हर, हॉटेल व्यवसायिक, यामध्ये काम करणारे कामगार, गाईड, लेखनिक, मॅनेजर इत्यादींनाही रोजगार मिळतो. पर्यटन व्यवसाय हा श्रमप्रधान व्यवसाय असल्याने कमी भांडवलात अधिक रोजगार निर्माण होतो. परिणामी बेरोजगारीचा प्रमुख प्रश्न सोडवून जिल्हयाच्या व देशाच्या विकासाला हातभार लागतो आहे.

बाजारपेठांच्या विकास पर्यटन व्यवसायाच्या विकासामुळे बाजारपेठांच्या विकास होत आहे. या भागातील पिकांना, फळांना चांगली बाजारपेठ उपलब्ध होत आहे. पर्यटन स्थळांकडे जाणा-या रस्त्यावर शेतकरी आपला भाजी-पाला रास्त भावाने विकतो आहे. द्राक्ष, डाळिंबे, बोर इत्यादी फळांची तो विक्री करतो आहे. मक्याची कणसे भाजून तो विकतो आहे ऊसाचा रस काढून विकत आहे. रस्त्यावरील शेतमालाची नवीन बाजार पेठ पर्यटन व्यवसायामुळे निर्माण होत आहे. स्थानिक कारागिरांनी बनविलेल्याहस्त वस्तूंना मोठी बाजार पेठ उपलब्ध होत आहे. यामध्ये चिनी मातीची भांडी, लाकडी वस्तु, खेळणी इ. वस्तूंना बाजारपेठ मिळत आहे. बाजारपेठेच्या विस्ताराने आर्थिक विकासास गती मिळत आहे.

सरकारच्या महसूलात वाढ पर्यटन स्थळाच्या ठिकाणी असणारे विविध दुकाने, उपहार गृह, हॉटेलस, रसवंती गृह, शीत पेयांची दुकाने, वाहने, पर्यटक यावर आकारला जाणारा कर हा सरकारच्या उत्पन्नाच्या प्रमुख मार्ग बनतो. स्थानिक संस्थानाही कर रुपाने उत्पन्न मिळते त्यातून त्या भागाच्या विकासाला चालना मिळते आज जिल्हयात पर्यटन स्थळांच्या ठिकाणी अनेक सोयी सुविधा निर्माण केल्या जात आहेत.

राष्ट्रीय उत्पन्नात वाढ पर्यटनामुळे राष्ट्रीय उत्पन्नाची निर्मिती होते पर्यटकांना विकल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांच्या विक्रीतून उत्पन्न प्राप्त होते. त्या उत्पन्नाचा परिणाम गुणित पध्दतीने होवून पुन्हा उत्पन्नात अधिक पटीने वाढ होते. अर्थव्यवस्थेत एकाचा खर्च हे दुसऱ्याचे उत्पन्न असते. त्यातून मागणी वाढते उत्पादन वाढते व उत्पन्नात

वाढ होते. अशा प्रकारे पर्यटन व्यवसायाने राष्टीय उत्पन्न वाढीला मदत होते.

पर्यटन व्यवसायाने विकसनशील देशातील आर्थिक विकासाची प्रकिया गतिमान होण्यास मदत होते. आर्थिक विकास ही निरंतर चालणारी दीर्घकालीन प्रकिया आहे. पर्यटक हे ग्राहक असतात. ते जो पैसा खर्च करतात त्याचा फक्त पर्यटन व्यवसायाला फायदा होतो असे नाही तर सामाजिक सुविधा, वाहतूक दळणवळणाच्या साधनात वाढ होत त्यातून विकासाची प्रकिया सुरू होते व गतिमान बनते. म्हणजेच पर्यटकानी खर्च केलेला पैसा अनेक ठिकाणी झिरपत जातो. अर्थशास्त्रीय भाषेत याला गुणक परिणाम असे म्हणतात, म्हणजेच पर्यटन व आर्थिक विकास यांचा जवळचा संबंध आहे.

आर्थिक विकास प्रकियेत समतोलित विकासाला विशेष असे महत्व आहे. देशातील विविध भौगोलिक रचना पाहिल्यास काही प्रदेश हे नैसर्गिक कृपादृष्टिने मागासलेले राहतात परंतु, अशा भागात पर्यटन व्यवसायाने विकासाची प्रकिया पुढे जावू शकते. मागास प्रदेशाच्या विकासाला दुसऱ्या भागातून आलेल्या पर्यटकांच्या वस्तू व सेवांच्या खरेदीमुळे विकासास मदत होते.

परकीय चलनाची उपलब्धता पर्यटन व्यवसाय देशाच्या अर्थव्यवस्थेला अत्यंत आवश्यक असणारे दुर्मिळ परकीय चलन मिळवून देतो. त्यामुळे भारता सारख्या विकसनशील राष्टधच्या व्यवहारतो लात निर्माण होणारी प्रतिकुलता दूर होण्यास मदत होते. पर्यटकानी दिलेल्या भेटीतून त्यानी खरेदी केलेल्या वस्तू व सेवा च्या माध्यमातून देशांतर्गत बाजारपेठेत परकीय चलन मिळते. परदेशीपर्यटकानी दिलेल्या भेटीतून त्यानी खरेदी केलेल्या वस्तू व सेवाच्या माध्यमातून देशांतर्गत बाजारपेठेत परकीय चलन मिळते.

अशा प्रकारे पर्यटनामुळे आर्थिक विकासावर सकारात्मक परिणाम दिसून येतात. स्थानिक संसाधनांचा अधिक कार्यक्षमपणे वापर होवू लागल्याने विकासाचा मार्ग खुला होतो.

निष्कर्ष:

१. पर्यटन व्यवसायामुळे स्थानिक लोकांना हंगामी वा कायम स्वरूपी रोजगार प्राप्त झाला आहे.
२. पर्यटन व्यवसायाने बाजारपेठ विस्तारण्यास मदत झझाली आहे.
३. शेतीमालाचा रस्त्यावरील बाजार ही नवीन संकल्पना निर्माण होत आहे.
४. शेतीपूरक वस्तूंचा वापर व त्याची माहिती पर्यटनामुळे प्राप्त होत आहे परिणामी त्याचा वापर वाढत आहे.
५. पर्यटनामुळे ग्रामीण लघु व कुटीर उध्यागोचा विकास होत आहे.
६. सांगली जिल्हयातील आर्थिक प्रगतीस पर्यटन व्यवसायाने हातभार लावला आहे.
७. जिल्हयातील मागास व नेहमी दुष्काळी छायेत असणाऱ्या भागातील लोकांच्या उत्पन्न वाढीस मदत झाली आहे.
८. पर्यटन व्यक्सायामुळे जिल्हयातील सामाजिक सुविधांमध्ये वाढ झालेली दिसून येते.

सारांश:

पर्यटन व्यवसायाने जिल्हयाच्या आर्थिक विकासात भर घातली आहे. जिल्हयातील नैसर्गिक संपदा भौगोलिक रचना व इतिहास पाहता पर्यटन व्यवसायाच्या वाढीस अजून बराच वाव आहे. पर्यटनाचे केंद्र जर सांगली शहर केले व तेथून बसने वा स्वतःच्या वाहनांने तीन भागांना

तीन दिवसात पूर्ण सांगली जिल्हा पाहता येईल. निवासाच्या दृष्टीने व सोयी सुविधांचा विचार करता सांगली हे शहर योग्य ठरते. तसेच रेवणसिध्द विटा डोंगराई मंदिर कडेगाव, चौरंघीनाथ मंदिर, सोनसळ, सागरेश्वर अभयारण्य इ. ठिकाणी पर्यटकांना राहण्याची सोय उपलब्ध आहे त्याचाही लाभ घेता येईल. अशा प्रकारे पर्यटनाच्या प्रगती शिवाय देशाची प्रगतीस गती प्राप्त होणार नाही हे मात्र निश्चित.

संदर्भ:

१. डॉ. विठ्ठल घारपुरे पर्यटन भूगोल

२. सांगली जिल्हा सामाजिक, आर्थिक पाहणी 2010.11

३. कुलकर्णी व दत्ता: महाराष्ट्रघतील पर्यटन स्थळे

४. W.W.W. Mysangli.com

५. Dr. Jay kumar and Dr. J Fredrick Tourism In India Ecp

६. संतोष दास्तानोः महाराष्ट्र 2010

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

श्री गोंदवलेकर महाराज यात्रा : आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास

श्री. अमर शिवाजी लोखंडे

संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Corresponding Author - श्री. अमर शिवाजी लोखंडे

DOI - 10.5281/zenodo.19692790

प्रस्तावना:

महाराष्ट्रामध्ये प्राचीन काळापासून यात्रा जत्रा या सांस्कृतिक जीवनावरती परिणाम करत आले आहेत. यात्रांचा धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक तसेच राजकीय जीवनावरती सुद्धा परिणाम झाल्याचे दिसून येते. यात्रा हा ग्रामीण भागातील मनोरंजनाचा आर्थिक उलाढालीचा घटक असल्याचे आढळते. कुळस्वामी व ग्रामदैवत यांच्या यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असल्याचे आढळते. अलीकडच्या काळात अनेक महान संत, साधू, महात्मे होऊन गेले. त्यांनी समाजाला चांगली दिशा दाखवली. चमत्कार दाखवून समाजातील लोकांना आकर्षित केले. अशा साधू - संतांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त यात्रा उत्सव सुरू केले.

सातारा जिल्हा हा साधुसंतांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. पुसेगाव चे श्री सेवागिरी महाराज, मायणीचे श्री संत सद्गुरु यशवंत बाबा महाराज, श्री संत सद्गुरु सरूताई, किरोलीचे संत सद्गुरु यशवंत बाबा महाराज, तसेच गोंदवले येथील श्री संत सद्गुरू गोंदवलेकर महाराज. असे अनेक संत सातारा जिल्ह्यामध्ये जन्माला आले आणि कार्यकर्तृत्वाने मोठे झाले. आशा संतांच्या जयंती आणि पुण्यतिथीचा उत्सव यात्रा मोठ्या उत्साहामध्ये संपन्न केली जाते.

सातारा जिल्ह्यातील पूर्व भागातील माण तालुक्यातील गोंदवले गाव. सातारा पंढरपूर रस्त्यावरती साताऱ्यापासून 65 किलोमीटर अंतरावरती गोंदवले हे गाव आहे. गोंदवले येथे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची समाधी मंदिर आहे. या गोंदवलेकर महाराजांच्या पुण्यतिथीचा सोहळा यात्रा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या यात्रा उत्सवाचा गोंदवले व माण तालुका यावर सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक असा प्रभाव निर्माण झाल्याचे आढळते. श्री गोंदवलेकर महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळा चा यात्रेचा आर्थिक प्रभाव दुष्काळी माण तालुक्यात निर्माण झाल्याचे आढळते. त्याविषयीचा अभ्यास करून हा संशोधन पेपर सादर केला आहे.१

जीवन चरित्र:

१. परिचय:

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज हे एक अद्वितीय संत होते, ज्यांनी संपूर्ण जीवनपर्यंत भगवंताच्या नामस्मरणाचा संदेश दिला. त्यांचा जन्म इ.स. १८४५ साली महाराष्ट्रातील गोंदवले (ता. माण, जि. सातारा) येथे झाला. त्यांचे मूळ नाव गजानन होते. त्यांच्या घराण्यात भक्तिभाव आणि धार्मिकता होती, त्यामुळे बालपणापासूनच त्यांच्यात भक्तीचे बीज रोवले गेले.२

२. बालपण व आध्यात्मिक प्रवास:

गजानन लहानपणापासूनच अत्यंत बुद्धिमान व अभ्यासू होते. ते वडिलांसोबत धार्मिक विधींमध्ये सहभागी होत असत. वयाच्या अवघ्या ८व्या वर्षी त्यांना रामनामाचा गोडवा उमगला आणि ते सतत नामस्मरण करू लागले. बालवयातच त्यांना संतसंगाची ओढ लागली. ते श्री रामदास स्वामी, संत एकनाथ, संत तुकाराम यांचे अभंग आणि ग्रंथ वाचत असत. त्यांच्या मनात वैराग्याची भावना प्रबळ होत गेली आणि वयाच्या सतराव्या वर्षी संसार त्याग करून ते गुरूशोधासाठी निघाले.

३. गुरू भेट व साधना:

श्री गोंदवलेकर महाराजांना आपल्या आत्मोद्धारासाठी योग्य गुरूंची गरज वाटली. त्यांनी भारतभर भ्रमण करून श्री रामकृष्ण परमहंस, श्री स्वामी समर्थ, श्री मंजूळ स्वामी यांसारख्या थोर संतांचे दर्शन घेतले. अखेरीस त्यांना श्री तुकमाई हे योग्य सद्गुरू गवसले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गोंदवलेकर महाराजांनी कठोर तपस्या केली. नामस्मरण, ध्यान, स्वाध्याय यांच्या सहाय्याने त्यांनी अंतर्मुखता मिळवली आणि रामभक्तीत पूर्णपणे तल्लीन झाले.३

४. गोंदवलेतील सेवाकार्य:

साधनेनंतर गोंदवले येथे परतल्यावर महाराजांनी नामस्मरणाचा प्रसार आणि समाजसेवा याला आपले ध्येय बनवले. त्यांनी राममंदिर, अन्नछत्र, धर्मशाळा उभारल्या आणि लोकांना भगवंताच्या भक्तीत जोडले. त्यांच्या अन्नछत्रात कोणत्याही जाती-धर्माच्या लोकांना समानतेने अन्न दिले जाई. महाराजांनी सांगितले की, "जिथे श्रीरामाचे नामस्मरण असेल, तिथे मी असतो".

५. तत्वज्ञान व शिकवण:

श्री गोंदवलेकर महाराजांनी साध्या भाषेत लोकांना अध्यात्म शिकवले. त्यांचे तत्वज्ञान हे सोपे, सरळ आणि थेट हृदयाला भिडणारे होते. त्यांनी मुख्यतः रामनामस्मरण, साधी जीवनशैली, सेवाभाव आणि गुरुचरित्र वाचन यांवर भर दिला.

त्यांच्या काही प्रसिद्ध शिकवणी:

1. "नाम घेत चला, काम होत जाईल."
2. "रामाचे नाव घ्या, सगळे सुख आपोआप येईल."
3. "सर्वकाही रामावर सोडा, तोच मार्ग दाखवेल."
4. "संतसंगती करावी, संसारात असूनही भक्ती साधावी."४

६. महापरिनिर्वाण:

श्री गोंदवलेकर महाराजांनी आपले संपूर्ण जीवन भक्ती, सेवा, आणि नामस्मरणात व्यतीत केले. २२ डिसेंबर १९१३ रोजी त्यांनी गोंदवले येथे समाधी घेतली. समाधी घेतल्यावरही त्यांचे कार्य अखंड सुरू आहे, आणि आजही त्यांचे विचार व शिकवण लोकांना प्रेरणा देत आहे.५

श्री गोंदावलेकर महाराज यात्रा:

गोंदवलेकर महाराज मठामध्ये विविध कार्यक्रम होतात पण वर्षातील सर्वात मोठा कार्यक्रम म्हणजे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव यात्रा.महाराजांच्या पुण्यतिथी उत्सव मार्गशीर वैद्य प्रतिपदेपासून दशमी पर्यंत साजरा केला जातो .या पुण्यतिथी उत्साहात भाविक मोठ्या प्रमाणावर येतात व स्वतःच्या उद्धारासाठी नामस्मरण करतात व समाधी मंदिरात पडेल ती सेवाही करतात. श्री गोंदवलेकर महाराज उत्सवाची मुहूर्तमेढ मार्गशीष प्रतिपदेला विश्वस्तांच्या हस्ते श्रींची पूजा करून रोवली जाते. मार्गशीष प्रतिपदेला सहा वाजता काकड आरती होते. समाधी मंदिर परिसरात असलेल्या गोपाल कृष्ण मंदिराची पूजा केली जाते. आई महाराज, तुळशी वृंदावन, ब्रह्मानंद महाराज, गोमाता यांचीही पूजा केली जाते. कोठी पूजनाच्या कार्यक्रमाने उत्सवाची सुरुवात होते. कोठी

पूजनाचा कार्यक्रम पाहण्यासाठी भाविक पहाटेपासूनच समाधी मंदिरामध्ये मंदिर परिसरामध्ये उपस्थित असतात. कोठी पूजनाची कार्यक्रमाची सुरुवात चैतन्यमय आशा सनई वादनाने होते. ६:१५ ते ६:३० पर्यंत वेद घोष होतो. ६:३० ते ६:५० भजनाचा कार्यक्रम होतो. श्री गोंदवलेकर महाराज यांच्या प्रतिमा व पादुकांची पूजा विश्वस्तांच्या हस्ते केली जाते. महाराजांच्या पादुका व अक्षय बटव्यातील चांदीच्या रुपयांचा अभिषेक केला जातो. यथा सांग पूजा केली जाते आरती केली जाते. समाधी मंदिरा शेजारील असलेल्या गोशाळेतील गाईंची पूजा केली जाते. गोमातेची पूजा झाल्यानंतर विश्वस्त चुलीची पूजा करतात. आरती झाल्यानंतर या चुलीमध्ये अग्नी प्रज्वलित केला जातो. जवळच असलेल्या कोठी मधील धान्य भाज्या यांची पूजा केली जाते. या मंगलमय वातावरणात रांगोळी फुले भाज्या यांची आकर्षक सजावट केलेले असते. भोजन कक्षातील श्री गोंदवलेकर महाराजांच्या प्रतिमेची व भाज्यांची पूजा केली जाते. उपलब्ध असणाऱ्या भाज्यांचा वापर करून आकर्षक सजावट केलेली असते अशी ही कोठी पूजनाची परंपरा वर्षानुवर्ष सुरू आहे. कोठी पूजनाचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात होते. समाधी मंदिरातील महाराजांच्या पादुकांवर अभिषेक केला जातो. सकाळी नऊ वाजता गोंदवलेकर महाराजांच्या पादुका व प्रतिमा पालखीमध्ये ठेवल्या जातात व ग्राम प्रदक्षिणा काढली जाते. ही पालखी श्री महाराजांच्या समाधी मंदिरातून निघते. ही पालखी राम नामाच्या घोषात नगर प्रदक्षिणेला निघते. श्री गोंदवलेकर महाराज ट्रस्ट व ग्रामस्थ यांच्यावतीने श्री महाराजांच्या पालखीस पाटाच्या पायघड्या घातल्या जातात. पालखी गोंदवले मधील प्रत्येक मंदिरात जाते व तिथे आरती केली जाते. पालखी नगर प्रदक्षिणेमध्ये भाविक भक्त ग्रामस्थ भजनी वाद्य वाजवणारे अश्व मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. भाविक भक्त या पालखीचे दर्शन घेतात. ग्रामस्थ व सौभाग्यवती स्त्रिया पालखीला औंक्षन करतात ओवाळतात पेढा बर्फी सुकामेवा शेंगा फळे सुद्धा या ठिकाणी वाटले जातात. लहान मुलांना पालखी खाली ठेवले जाते. पालखी मार्गाला रांगोळी फुलांची सजावट केलेली असते. नगर प्रदक्षिणा करून आल्यानंतर पालखी समाधी मंदिरास प्रदक्षिणा घालते. असा कार्यक्रम नगरप्रदक्षिणेचा दहा दिवस उत्सव काळामध्ये चालतो. समाधी मंदिरामध्ये पहाटे काकड आरतीने सुरुवात होते. समाधी मंदिरात दिवसभर भजन कीर्तन नामस्मरण करत असतात. ब्रह्मानंद सभामंडपामध्ये प्रतिष्ठित नामांकित गायक गायिका आपली गायन सेवा सादर करत असतात. श्री गोंदवलेकर महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यात भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात शांततेत रांगेत श्रींच्या समाधीचे दर्शन घेतात.

या यात्रा उत्सव काळातील मुख्य दिवस म्हणजे गोंदवलेकर महाराज यांच्या पुण्यतिथीचा विशेष गर्दी असते. दशमीच्या दिवशी पुण्यतिथीच्या गुलाल फुलाच्या कार्यक्रमाची सुरुवात भल्या पहाटे होते. समाधी मंदिरामध्ये सर्व ठिकाणी रांगोळ्या फुलांची सजावट दिव्यांची विशेष अशी सजावट केली जाते. या दिवशी काकड आरतीचा कार्यक्रम लवकर उरकला जातो. वेदांचे पठणही केले जाते. मंगलमय अशा सनईवादन पुण्यतिथी कार्यक्रमाची सुरुवात होते. पहाटे ५.०० ते ५.३० वाजल्यापासून रघुपती राघव राजाराम पतित पावन सिताराम हे भजन सामूहिक रित्या म्हटले जाते श्रींच्या पुण्यस्मरणाचा क्षण जसा जसा जवळ येत जातो तसतसे भाविक रामनामाच्या जयघोषात तल्लीन होतात. बरोबर पहाटे 5.55 वाजता एकावेळी सर्व भाविक फुले उधळतात आणि श्रीराम जय राम जय जय राम असा गजर करतात. समाधी मंदिर व सर्व परिसर या जयघोषाने दुमदुमून जातो. अशा पद्धतीने गोंदवलेकर महाराजांचा पुण्यतिथी उत्सव यात्रा दहा दिवस संपन्न होते.६

श्री गोंदवलेकर महाराज यात्रा आर्थिक दृष्टिकोन:

१. पालखी निर्मितीचा व्यवसाय:

श्री गोंदवलेकर महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त सकाळी व संध्याकाळी ग्रामप्रदक्षिणेसाठी पालखी प्रदक्षिणा घातली जाते. ही पालखी सागवानी लाकडाचा वापर करून बनवली जाते. सागवानी लाकडाचा वापर करून आकर्षक सुंदर अशा पालखी बनवण्याचा व्यवसाय विकसित झाला आहे. श्री गोंदवलेकर महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळा यात्रा निमित्त अनेक भाविक पालखी व रथ घेऊन या उत्सवामध्ये सहभागी होतात. तसेच अलीकडच्या काळात स्टीलच्या आकर्षक स्वरूपामध्ये पालखी बनवण्याचा व्यवसाय सुद्धा विकसित झाला आहे. त्यामुळे पालखी बनवण्याच्या व्यवसायास प्रोत्साहन मिळाल्याचे आढळते.७

२. फुलांची सजावट व विक्रीचा व्यवसाय:

गोंदवलेकर महाराज समाधी मंदिर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात फुलांची विक्री करणारे व्यावसायिक स्थिरस्थावर झाले आहेत. श्री गोंदवलेकर महाराज यांच्या समाधी वरती फुलांचा हार अर्पण करण्यासाठी भाविक मोठ्या प्रमाणात सुंदर आकर्षक अशा फुलांचे हार खरेदी करीत असतात. श्री महाराजांच्या पुण्यतिथी यात्रा काळामध्ये समाधी मंदिर व परिसर हा आकर्षक फुलांनी सजविला जातो. त्यामुळे पुण्यतिथी उत्सवावेळी शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात फुलांची मागणी व्यापारी करत असतात. गोंदवले आणि गोंदवले परिसरातील शेतकरी हे फुलांची शेती व्यापारी तत्त्वावरती करीत असताना आढळते. त्यातून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा होतो.

दररोज तसेच यात्रा पुण्यतिथी काळामध्ये हजारो भाविक श्री गोंदवलेकर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी हे भाविक भक्त फुलांच्या माळा खरेदी करतात.या फुलांच्या माळा विक्री करणाऱ्या विक्रेत्यांचे उदरनिर्वाह कौटुंबिक आर्थिक प्रगती ही या फुलांच्या विक्री व्यवसायावर तीच अवलंबून असल्याचे जाणवते. समाधी मंदिर परिसरामध्ये फुलांची विक्री करणाऱ्या दुकानांची संख्या ही जवळजवळ 30 ते 35 असल्याचे आढळते.८

३. मंडप व लाईट डेकोरेशन:

यात्रा उत्सव काळामध्ये मुख्य मंदिर, कळस, सभा मंडप, गाभारा, स्वागत कमान, व इतर इमारती, मंदिर परिसर या आकर्षक विद्युत रोषणाईने सजविला जातो. आकर्षक लाईटची विद्युत रोषणाईची रचना केल्याने भाविक भक्त आकर्षित होतात. त्यांचे मन प्रसन्न होते. भाविक भक्तांना बसण्यासाठी उभा राहण्यासाठी आकर्षक असा भव्य मंडप सुद्धा उभा केला जातो. साऊंड सिस्टिम ही सुद्धा उच्च दर्जाची वापरली जाते. त्यामुळे श्री गोंदवलेकर महाराज समाधी मंदिर परिसर हा भक्तिमय वातावरणाने नाहुन निघतो. यासाठी गोंदवले व गोंदवले परिसर, माण तालुका तसेच सातारा जिल्ह्यातील लाईट व मंडप डेकोरेशन यांची मदत घेतली जाते. गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी चा भव्य सोहळा उत्साहात साजरा करण्यासाठी मंडप व लाईट डेकोरेशन यांची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे मंडप व लाईट डेकोरेशन या व्यवसायाला चालना मिळाल्याचे आढळते.९

४. भजन कीर्तन सोहळा:

श्री समाधी मंदिरा परिसरात दिवसभर भजन कीर्तन नामस्मरण भाविक भक्त करत असतात. ब्रह्मानंद सभामंडपामध्ये प्रतिष्ठित नामांकित गायक गायिका आपली गायन सेवा सादर करत असतात. किर्तन गायक प्रसिद्ध महेश काळे व राहुल देशपांडे यांचे भजन म्हणजे गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी सोहळ्याचे मुख्य आकर्षण असते.१०

५. फोटो मूर्ती व्यवसाय:

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचे भाविक भक्त श्रद्धेने गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी सोहळ्यास

उपस्थित राहतात. या काळामध्ये श्री गोंदवलेकर महाराजांची प्रतिमा फोटो खरेदी करीत असतात. तसेच श्री गोंदवलेकर महाराज यांची मूर्ती सुद्धा खरेदी करण्याकडे भक्तांचा कल राहतो. श्री गोंदवलेकर महाराज यांच्या छोट्या व मोठ्या प्रतिमा बनविण्याच्या फ्रेम मेकर व्यवसाय गोंदवले व गोंदवले परिसरामध्ये विकसित झाला आहे. गोंदवलेकर महाराजांच्या छोट्या व मोठ्या मूर्ती सुद्धा तयार करण्याचा व्यवसाय विकसित झाल्याचा दिसून येतो. यावरून फोटो व मूर्ती तयार करण्याचा व्यवसाय यामधून लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल होत असल्याचे आढळते.

६. ध्वनी मुद्रण व्यवसाय:

श्री गोंदवलेकर महाराज यांनी नाम जप करण्यास प्राधान्य दिले. "श्रीराम जय राम जय जय राम" हे नाम घोष मंत्र त्यांनी आपल्या भक्तांना दिला होता. भाविक हे नामस्मरण ध्यान करण्याकडे प्रामुख्याने लक्ष देतात. हाच व्यवसायिक विचार अनेक खाजगी कंपन्यांनी ध्वनी यंत्र निर्माण केली आहे. श्री गोंदवलेकर महाराजांच्या प्रवचनाची कॅसेट सीडी सुद्धा निर्माण करून विक्रीसाठी बाजारपेठेमध्ये ठेवण्यात आली आहेत. भक्त हे ध्वनी यंत्र, प्रवचन कॅसेट - सीडी खरेदी करतात. त्यामुळे ध्वनी मुद्रण व्यवसाय विकसित झाल्याचे आढळते.

७. धान्य - किराणा सामान व्यवसाय:

अन्नदान हे श्रेष्ठदान हा विचार श्री गोंदवलेकर महाराज यांनी मांडला. गोंदवले या ठिकाणी श्री ब्रह्मचैतन्य महाराजांनी अन्नदान छत्र उभा केले. गरजू दिन दुबळ्या अनाथ वयोवृद्ध दुःखी कष्टी अशा लोकांना अन्न मोफत उपलब्ध करून कोणीही उपाशी राहणार नाही याविषयीची दक्षता श्री ब्रह्मचैतन्य महाराज यांनी घेतली होती. हाच वारसा पुढे चालवत श्री गोंदवलेकर महाराज मंदिर ट्रस्ट च्या वतीने दुपारी आरती झाल्यानंतर 12:30 ते दुपारी 2.00 वाजेपर्यंत आणि संध्याकाळी आरती झाल्यानंतर 7.30 ते 9.00 वाजेपर्यंत मोफत अन्नदान वाटप केले जाते. हे अन्नछत्र चालवण्यासाठी मोठ्या प्रमाणात धान्य, डाळी, गुळ, तेल, तांदूळ, रवा हा मोठ्या प्रमाणात लोक दान करत असतात. भाविकांची श्रद्धा लक्षात घेता गोंदावले शहरांमध्ये अनेक किराणा धान्य सामान विक्री करणारे व्यावसायिक आपली दुकाने थाटून बसले आहेत. भाविक लोक श्रद्धेपोटी किराणा धान्य सामान खरेदी करतात. अन्नधान्य दान करतात. त्यामुळे गोंदवले परिसरात धान्य - किराणा सामान विक्री करणारा व्यवसाय विकसित झाल्याचे आढळते.

८. पेढा - मेवा मिठाई व्यवसाय:

श्री गोंदवलेकर महाराज यांचा प्रसाद म्हणजे मेवा बत्तासे फुटाणे खडीसाखर पेढे हा मानला जातो. गोंदवले या ठिकाणी येणारा प्रत्येक भाविक श्रद्धेने मेवा पेढे बत्तासे हा खरेदी करत असतो. गोंदवलेकर महाराज यांना त्याचा नैवेद्य दाखवून आपल्या घरातील लोकांनासाठी तो प्रसाद आणत असतो. गोंदवले परिसरामध्ये मेवा बत्ताशी यांचा पुडा तयार करणे. अनेक प्रकारचा पेढा बर्फी तयार करणे. या व्यवसायास चालना मिळाल्याची आढळते.

९. पुस्तक विक्री व्यवसाय:

श्री गोंदवलेकर महाराजांचे आत्मचरित्र, प्रवचन संग्रह, तसेच अनेक भक्तांनी गोंदवलेकर महाराजांची आलेली प्रचिती, गोंदवलेकर महाराजांचे गुरु तुकामाई यांचे चरित्र आशा एक ना अनेक विषयावरती लिखाण करण्याचे काम अनेक लेखकांनी केले आहे. त्यामुळे श्री गोंदवलेकर महाराज यांच्या वरती आधारित अनेक पुस्तकांची निर्मिती झाली. ही पुस्तके विकण्यासाठी समाधी मंदिर परिसरामध्ये स्टॉलची स्थापना केली आहे. श्री गोंदवलेकर महाराज मंदिर ट्रस्टच्या वतीने पुस्तक विक्री ग्रंथालय ही स्वतंत्र खोली उपलब्ध करून भक्तांसाठी ग्रंथ पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. यामुळे पुस्तक विक्री मधून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होताना आढळते.

१०. प्रवासी वाहतूक व्यवसाय:

श्री गोंदवलेकर महाराज यांच्या समाधी मंदिरास लाखोच्या संख्येने भाविक श्रद्धेने भेट देत असतो. श्री गोंदवलेकर महाराज यांच्या पुण्यतिथी यात्रेनिमित्त अनेक श्रद्धाळू भाविक भक्त हे उपस्थित राहतात. एसटी महामंडळ यांच्या वतीने यात्रेनिमित्त भक्तांसाठी विशेष गाड्यांची तरतूद केली जाते. यामध्ये सांगली सातारा पुणे मुंबई व कर्नाटक या भागातून विशेष एसटी यात्रा स्पेशल याची सोय केली जाते. यामधून एसटी विभागाला मोठा आर्थिक फायदा होतो. काही भाविक लोक हे चार चाकी मधून, मिनी ट्रॅव्हल, मोठी ट्रॅव्हल याची सोय करून गोंदवले येथे भाविक उपस्थित राहतात. गोंदवले आणि गोंदवले परिसरातील भाविक आपल्या स्वतःच्या दुचाकीचा वापर करून समाधी मंदिर परिसरामध्ये उपस्थित राहतात. प्रत्येक भाविक आपल्या सोयीनुसार आपल्या प्रवासाची सोय करून मंदिर परिसरामध्ये येण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रवासी वाहतूक व्यवसाय यामधून मोठी आर्थिक उलाढाल साध्य होते असे दिसते.

११. खेळणी - पाळणे व्यवसाय:

यात्रा म्हणजे लहान मुले तरुण स्त्रिया यांना आकर्षण म्हणजे खेळणी पाळणे होय. वर्षातून एकदाच यात्रेच्या निमित्ताने पाळणे गावामध्ये दाखल होतात. यामध्ये लहान मुलांसाठी जम्पिंग जपाक, रेल्वे, फिरणारे घोडे, बोटिंग, फिरणारे विमान अशा पाळण्याचे आकर्षण असते. तरुण मुलां मुलींसाठी उंच आकाश पाळणे, ब्रेक डान्स, ड्रॅगन, कोलंबसचे जहाज आशा अनेक मनाला धडकी भरवणारा पण आकर्षक वाटणाऱ्या पाळण्याची यात्रेमध्ये आकर्षण असते. खेळणी आणि पाळण्याची दुकाने यात्रा काळामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग व्यवसाय करत असतात. त्यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक कमाई होत असलेली दिसून येते.

१२. सौंदर्यप्रसाधने व कटलरी व्यवसाय:

यात्रा काळामध्ये ग्रामीण भागात सौंदर्यप्रसाधने व कटलरीची असंख्य दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली जातात. स्त्रियांना सौंदर्यामध्ये भर घालणारी हेअर पिन, क्लिप, फुले, लिपस्टिक, बांगड्या, विविध प्रकारचे मन्यांचे नेकलेस, गळ्यातील माळा आशा विविध प्रकारच्या वस्तूंची विक्रीसाठी स्टॉलची उभारणी केली जाते. अनेक स्त्रिया मुली सौभाग्यवती या कटलरी व सौंदर्य प्रसाधने खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. यात्रेमध्ये या खरेदी विक्री मधून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असते. असे आढळते

१३. जपमाळ विक्री व्यवसाय:

श्री गोंदवलेकर महाराजांनी नामस्मरण यावर जादा भर दिला. भाविक भक्तांना मनःशांती मनाचे केंद्रीकरण, संसाररुपी भाव सागरातून आनंद प्राप्तीसाठी नामाचे जप करण्यासाठी प्रोत्साहन दिले. श्री गोंदवलेकर महाराजांचे भाविक भक्त जपमाळ्याचे वापर करून नामस्मरण करत असतात. श्री गोंदवलेकर महाराज मंदिर परिसरात असणाऱ्या दुकानांमध्ये जपमाळ विक्रीसाठी ठेवल्या जातात. यामध्ये तुळशीची माळ, स्फटिक माळ, रुद्राक्षाची माळ अशा विविध प्रकारच्या माळा विक्रीसाठी ठेवल्या जातात. भाविक भक्त या माळा खरेदी करून श्री समर्थांच्या समाधी वरती ठेवून महाराजांचा आशीर्वाद घेऊन माळेचा वापर जप करण्यासाठी करीत असतात. त्यामुळे शेकडो माळांची विक्री होत असते. माळांच्या खरेदी विक्री मधून मोठी आर्थिक उलाढाल होत असल्याचे आढळते.११

१४. कृषी व्यवसायास चालना:

गोंदवले व गोंदवले परिसर माण तालुका हा कायम दुष्काळी तालुका परिसर म्हणून ओळखला जातो. येथील शेतकरी हा दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये सुद्धा मोठ्या कष्टाने परिश्रमाने शेती करीत आला आहे. श्री गोंदवलेकर महाराज

समाधी मंदिरामुळे मोठ्या प्रमाणात विविध फुलांची, फुलमाळांची मागणी भाविक भक्तांच्या मुळे वाढत चालली आहे. यामुळे येथील शेतकऱ्यांनी विविध प्रकारच्या फुलांची शेती करण्याकडे आपला कल वाढवला आहे. या फुलांच्या शेतीमधून शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होत असल्याचे दिसते. तसेच माण तालुक्यातील नाचणी, देशी बाजरी, मटकी, देशी कांदा या पिकांना सुद्धा मोठ्या प्रमाणात ग्राहक उपलब्ध होताना दिसतो. पुणे मुंबई व इतर शहरी भागातील ग्राहकांची कृषी उत्पादनासाठी मागणी वाढत असल्याचे आढळते. त्यामुळे माण तालुक्यातील शेतकरी नगदी पिके घेण्याकडे आकर्षित झाल्याचे दिसून येते.१२

१५. मंदिर व शिखर बांधणी - रंगरंगोटी व्यवसाय:

गोंदवले येथील परिसरामध्ये अनेक मंदिरांची व त्या मंदिरावरील शिखरांची उभारणी आकर्षक रित्या केल्याचे आढळते. श्री गोंदवलेकर महाराजांनी थोरले राम मंदिर, धाकटे राम मंदिर, हनुमान मंदिर अशा मंदिरांची उभारणी केली. श्री गोंदवलेकर महाराजांच्या मृत्यूनंतर गोंदवलेकर महाराजांचे समाधी मंदिर, आईसाहेबांचे मंदिर, मंदिर परिसरातील इतर असणाऱ्या वास्तू उभारल्या गेल्या. भक्त निवासाच्या इमारती, अन्नदान छत्र या भव्य दिव्य वास्तु उभारल्या गेल्या. यात्रा उत्सव काळामध्ये या मंदिरावरती उभारलेले शिखर व इतर इमारती यांची रंगरंगोटी सजावट केली जाते त्यामुळे मंदिर उभारणी, शिखर बांधणी आणि रंगरंगोटी चा व्यवसाय हा सुद्धा विकसित झाल्याचे आढळते

१६. फ्लेक्स बोर्ड निर्मितीचा व्यवसाय:

श्री गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी सोहळा यात्रेनिमित्त भाविक भक्तांचे स्वागत करण्यासाठी श्री गोंदवलेकर महाराज समाधी मंदिर ट्रस्ट कडून मोठे मोठे फ्लेक्स बोर्ड लावले जातात. काही राजकीय व्यक्ती सुद्धा आपल्या पक्षाचे वैयक्तिक फ्लेक्स बोर्ड भाविकांना शुभेच्छा देण्यासाठी लावतात. काही व्यापारी व मित्रमंडळी सुद्धा फ्लेक्स बोर्ड उभा करून यात्रेतील भाविकांना स्वागत व शुभेच्छा देतात. या फ्लेक्स लावण्याच्या आधुनिक पद्धतीमुळे फ्लेक्स बोर्ड तयार करण्याच्या व्यवसायास चालना मिळाली आहे.१३

निष्कर्ष:

१. श्री गोंदवलेकर महाराज यांच्या जीवन कार्याची माहिती करून घेणे.

२. श्री गोंदवलेकर महाराज यांचे तत्त्वज्ञान व शिकवण अभ्यासता येते.

३. श्री गोंदवलेकर महाराज यात्रेमुळे गोंदावले गावामध्ये महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून कर्नाटक मधून भाविक पर्यटक यात्रेला भेट देण्यासाठी येतात. त्यामुळे गोंदवले येथील पर्यटन क्षेत्राचा विकास झाल्याचे आढळते.

४. श्री गोंदवलेकर महाराज यात्रेमुळे गोंदवले गोंदवले परिसर व माण तालुक्यातील शेतकऱ्यांचा आधुनिक शेतीकडे करण्याकडे लक्ष दिल्याचे आढळते. त्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या सदन बनत आहे.

५. श्री गोंदवलेकर महाराज यात्रा काळामध्ये सर्व जाती धर्मातील लोकांचा सहभाग असल्याने सर्व धर्म समभाव ही मानवतेची शिकवण प्रसारित झाल्याचे आढळते.

६. श्री गोंदवलेकर महाराज यात्रेमुळे अनेक उद्योग व्यवसायांना चालना मिळाली आहे.

७. गोंदवले व गोंदवले परिसरामध्ये आर्थिक उलाढाल वाढल्यामुळे रोजगार निर्मिती झाली आहे. दुष्काळ सदृश्य परिस्थिती वरती मात करण्यास यामुळे मदत झाल्याचे आढळते.

संदर्भ:

१. सातारा गॅझेटियर १९९९ पान क्रमांक ७६८

२. कुलकर्णी वासुदेव,श्री ब्रह्मचैतन्य लीला प्रसंग,२०१८ श्री ब्रह्मचैतन्य संस्थान गोंदवले.पान क्रमांक ४

३. कित्ता.पान क्रमांक २१-२३

४. अरुण गोखले, श्री गोंदवलेकर महाराजांच्या गोष्टी, २०१४ अमोल प्रकाशन, पान क्रमांक ४७

५. कुलकर्णी वासुदेव,श्री ब्रह्मचैतन्य लीला प्रसंग,२०१८ श्री ब्रह्मचैतन्य संस्थान गोंदवले.पान क्रमांक १५५

६. माणदेशी न्यूज चैनल

७. मुलाखत, पोपट सुतार कातरखटाव १७ डिसेंबर २०२४

८. मुलाखत, फूल विक्रेता राहुल माळी गोंदावले

९. प्रत्यक्ष भेट २५ डिसेंबर २०२४

१०. दैनिक तरुण भारत सातारा २४ डिसेंबर २०२४ पान क्रमांक ७

११. प्रत्यक्ष भेट २५ डिसेंबर २०२४

१२. मुलाखत शेतकरी श्री सुखदेव सूर्यवंशी. नरवणे

१३. प्रत्यक्ष भेट २५ डिसेंबर २०२४

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

गोपाळ समाज: ऐतिहासिक विकास आणि कोल्हापूर जिल्ह्यातील स्थिती

अमोल बिरा माने

संशोधक विद्यार्थी, (पीएच. डी.)

इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Corresponding Author - अमोल बिरा माने

DOI - 10.5281/zenodo.19692828

प्रस्तावना:

अनेक जाती भाषा धर्म व जगातील सर्व धर्म पंथ असणारा आपला भारत देश एकमेव असून या देशात जातीनिहाय जन्ममरणाची संहिता वेगवेगळी असते माणूस किंवा मनुष्य ज्या जातीत जन्मतो त्याच जातीत तो मरतो अशी जाती व्यवस्थेची चौकट आहे. आपापल्या जाती परंपरेच्या मर्यादा ओलांडण्याचे धाडस सहसा इथे कोणीच करण्याचा प्रयत्नही करत नाही याउलट जाती-धर्माच्या मर्यादितच जीवन जगण्यात धन्यता मानली जाते डॉ. आंबेडकर या समाज व्यवस्थेला उतरंडीची विषम व्यवस्था किंवा बिनशिडीच्या मनोऱ्याची समाज व्यवस्था असे म्हणतात. जाती व्यवस्थेचे सर्वाधिक चटके सहन करणारे म्हणून आपण भटक्या समाजाकडे पाहतो देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही भटक्या समाजाची भटकंती अशीच सुरू आहे व अपेक्षित विकासाचा वेग गाठण्यात हा समाज अपयशी ठरला आहे. या देशात जन्माला येऊन ही उपरे आयुष्य वाट्याला आलेल्या भटक्या समाजात समस्या मात्र अनेक आहेत त्यापैकी एक समस्या मात्र समान स्वरूपाच्या आहेत आणि ती म्हणजे भटकंती.

गोपाळ समाज हा भटक्या विमुक्त समाजापैकी एक असून गोपाळ या शब्दाचा उच्चार करतानाच आपल्याला लक्षात येते ते म्हणजे काय म्हणजे गायी पाळणारा गाईला आपली माता म्हणून तिच्या माध्यमातून आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारा हा समाज भारतातील गो- संस्कृतीचा जिवंत वारसा तसेच पशुपालक जमातीचा आरसा आहे.

भटक्या विमुक्त समाजाचे स्वरूप व वर्गवारी:

महाराष्ट्राच्या ग्रामीण व्यवस्थेमध्ये जीवन जगणाऱ्या भटक्या विमुक्त समाजाची अवस्था अस्पृश्य पेक्षा भयानक आहे.31 ऑगस्ट 1952 रोजी तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी विशेष ठरावाने 12 ऑक्टोबर 1971 सालापासून सुरू असणारा क्रिमिनल कायदा रद्द करून त्याचे स्वरूप बदलले.परंतु खऱ्या अर्थाने 1960पासून भटका समाज तीन तारांच्या कुंपणातून मुक्त झाला. भारतातील इतर राज्यांमध्ये भटका समाजाला अनुसूचित जाति किंवा अनुसूचित जमाती मद्ये समाविष्ट करण्यात आले. महाराष्ट्रात मात्र भटक्या समाजाला आरक्षना साठी NT ची नवीन वर्ग वारी तयार करुन त्यामधे समाविष्ट करण्यात आले. सद्यस्थितीला भटक्या विमुक्त अशा 42जाती, जमती असल्याचे मानले जाते व त्याच्या पोट जातीची संख्या मात्र मोजगनतीत नाही महाराष्ट्रातील भटक्या समाजाची वर्गवारी मात्र पुढील प्रकारात करण्यात येते. १) शिकारी जाती २)पशू पालक जमाती ३)लोकांचे

मनोरंजन करणाऱ्या जाती ४)भविष्य सांगणाऱ्या आणि भिक्षुक जमाती ५) निरनिराळे व्यवसाय करणाऱ्या जाती स्थूल मनाने गाव गड्यात यांचे वर्गीकरण पुढील तीन प्रकारे करण्यात येते

१) गावं वाल्यांना आवश्यक असणाऱ्या जमाती

२)करमणूक करणाऱ्या जमाती

३)लोकांच्या दयेवर जगणाऱ्या जमाती

गोपाळ समाजाची ऐतिहासिक उत्पत्ती:

गोपाळ समाजाच्या गाई पाळण्याचे व्यवसायावरूनच त्यांचे गोपाळ हे नाव पडले असावे व या व्यवसायावरूनच हा समाज आपले प्राचीनत्व सिद्ध करतो वेदांमध्ये कर्मा संबंधी विचार करताना पशुपालनाचाही विचार करण्यात आला आहे. यावरून गोपाळ समाज व त्यांचा गाई पाळण्याचा व्यवसाय वेदकाळा इतका प्राचीन असल्याचे आपणास दिसते गोपाळ समाज गावोगावी भटकंती करत पशुपालनाचा व्यवसाय करतो. गाई म्हशींची खरेदी विक्री करणे व त्यातून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह केले जाते .गोपाळ समाज प्राचीन काळापासून महाराष्ट्रात असला तरी ते स्वतःला श्रीकृष्णाचे वंशज मानतात ते मूळचे मथुरेचे पुराणकथा नुसार पुढील कारणे ही गोपाळ समाजाचे उत्पत्तीची मानली जातात एक भगवान श्रीकृष्णांच्या सवंगड्यांपासून गोपाळ समाजाची उत्पत्ती झाली. देवगिरीचे शासन करते यादव हे समाजाचे प्राचीन कुळ होते. परंतु यवनी आक्रमणाच्या काळात ते दक्षिणेकडे आले ते ज्या ज्या प्रदेशात, स्थिर झाले तो प्रदेश त्यांनी आपला मानला गाय म्हशींच्या व इतर पाळीव प्राण्यांच्या व्यापाराबरोबरच कसरतीचे खेळ करून त्यांनी आपला ने उदरनिर्वाह सुरू ठेवला. मराठा कुणबी धनगर कासार सोनार जाळी वंजारी आणि महार इत्यादी अनेक जातींच्या लोकांपासून ही जात बनली असल्याचे आर इ एन्थोवेन यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे

भारतीय संस्कृती कोषामध्ये गोपाळ या शब्दाचा अर्थ हे लोक गावोगावी कसरतीचे खेळ करून भिक्षा मागतात महारांचे पौरोहित्य त्यांच्याकडेच असते पण ते लोक यांच्याकडे जेवत नाहीत त्यांचे फक्त कोरे अन्न स्वीकारतात नृत्य करतात गाणी गातात त्यांच्यात अनेक कुळी पोट भेद आहेत लग्नासाठी त्यांना ब्राह्मण पुरोहित लागतो,इतर विधी मात्र ते जातीतील जातीतच करतात तुळजाभवानी, खंडोबा, मरीआई ,म्हसोबा हे त्यांचे दैवते आहेत.

सांस्कृतिक वैशिष्ट्य :

सांस्कृतिक वैशिष्ट्य हे कुठल्याही समाजाचे अतिशय महत्त्वाचे अंग आहे ऐतिहासिक महत्त्व व प्राचीन वारसा असणाऱ्या समाजाचे सांस्कृतिक वैशिष्ट्य हे तितकेच वैशिष्ट्यपूर्ण असते फक्त सणवार उत्सव म्हणजे फक्त संस्कृती नसून संस्कृती त्या समाजाची जगण्याची रीत असते. गोपाळ समाजाच्या सांस्कृतिक परंपरेची माहिती घेताना याची मुळे खोलवर प्राचीन गोसंस्कृतीत आपणास पहावयास मिळतात. शतकानुशतके रानावनात गाई-वासरांच्या मागे धावणाऱ्या या समाजाने आपली संस्कृती एखाद्या जिवंत झऱ्याप्रमाणे प्रवाहित ठेवली आहे.स्थलांतरित आणि भटके जीवन वाट्याला येऊनही या समाजाने आपली बोलीभाषा, लोककला आणि परंपरांचे जतन ज्या निष्ठेने केले, ते त्यांच्या आंतरिक सांस्कृतिक श्रीमंतीचे लक्षण आहे."लेखिका जनाबाई कचरू गिरहे यांनी त्यांच्या साहित्यातून गोपाळ समाजाच्या ज्या सांस्कृतिक विश्वाचे दर्शन घडवले आहे, ते या समाजाच्या अस्तित्वाचा कणा आहे.

गोपाळ समाजाच्या सांस्कृतिक जीवनाची काही वैशिष्ट्य पुढीलप्रमाणे:

अ) निसर्ग पूजा:

गाईंना पुजणारा हा समाज गाईला आपली माता मानतो व निसर्गाशी असणारे आपले घट्ट नाते या ठिकाणी

प्रगट करतो . गाय व बैलांना देव स्वरूप मानले जाते. कोल्हापूर परिसरातील गोपाळ समाज पोळा व दिवाळी या सणाला गाई व बैलाची विशेष पूजा करतो त्यांना गोडधोड खाऊ घालतो त्यांच्या शिंगणांना रंगवून बाशिंगे बांधणे त्यांचे औक्षण करणे काही ठिकाणी गोपाळ समाजाचे लोक नंदीबैल फिरवतात हा नंदी गोपाळ समाजाची निसर्गाप्रती असणारी प्रामाणिकता सिद्ध करतो. नागपंचमी हा एक महत्त्वाचा सण गोपाळ समाजात साजरा केला जातो. कृष्णा ने कालिया नावाच्या नागाचे दमन केले व त्या दिवशी डोहातून विजयी होऊन वर आला असे समजले जाते. या दिवशी गोपाळ समाजातील मुली वारुळाला हळदीकुंकू लावून गाणी म्हणतात. महाराष्ट्रामध्ये गणेशोत्सव घरोघरी साजरा केला जातो त्याचप्रमाणे गोपाळ समाजातील अनेक घरांमध्ये गणपती विराजमान केले जाते. बर्याच सामूहिक रित्याही गणेशोत्सव साजरा केला जातो. सर्वात महत्त्वाचा गोपाळ समाजातील उत्सव म्हणजे कृष्ण जन्माष्टमी किंवा गोकुळाष्टमी भगवान श्रीकृष्णाचा जन्मदिवस श्रावण महिन्यातील वद्य अष्टमी या तिथीला असून या काळात श्रीकृष्णाचा जन्म झाला असे मानले जाते. गोपाळ समाजातील स्त्री-पुरुष या दिवशी भजन कीर्तनाचा कार्यक्रम करतात दुसऱ्या दिवशी दहीहंडी फोडण्याचा मोठा कार्यक्रम साजरा केला जातो त्याला गोपाळ काला असे म्हटले जाते .अक्षय तृतीया हिंदू धर्मामध्ये ज्या काही महत्त्वाच्या तिथी आहे त्यामध्ये अक्षय तृतीयेला अनन्य साधारण महत्त्व आहे गोपाळ समाज या दिवशी पुरणपोळीचा नैवेद्य करून स्त्रिया झोके घेतात गाणी म्हणतात.

ब) गोपाळ समाजातील दैवत:

गोपाळ समाज मुख्यतः हिंदू धर्मीय असून या समाजामध्ये भगवान श्रीकृष्णाला आद्य दैवत मानले जाते. त्याचबरोबर हिंदू धर्मातील खंडोबा, महादेव, रासाई, मरीआई, तुळजाभवानी मोहटादेवी, सप्तशृंगी देवी, कानिफनाथ, सकलादिबाबा व कोल्हापूर परिसरामध्ये कोल्हापूरची अंबाबाई व जोतिबा यांची आराधना श्रद्धेने पूजाअर्चा देवदेवतांना नवस करून बळी देण्याची प्रथा ही गोपाळ समाजात आहे यामध्ये बळी मुख्यतः कोंबडा किंवा बकऱ्याचा दिला जातो. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र मढी या ठिकाणी असणाऱ्या कानिफनाथाला अनन्य साधारण महत्त्व आहे कानिफनाथ हे नाथ संप्रदायातील नवनाथांपैकी एक असून मढी या ठिकाणी त्यांनी संजीवन समाधी घेतली आहे.मढी हे अनेक भटक्या समाजातील समाजांचे हायकोर्ट मानले जाते त्याचबरोबर गोपाळ समाज ही त्याला अपवाद नाही या ठिकाणी गोपाळ समाज होळीपासून रंगपंचमीपर्यंत असतो या ठिकाणी गोपाळ समाजाची कोळी पेटवली जाते या होळीला 1289 साला पासूनची परंपरा असल्याचे काही ठिकाणी समजते त्यादिवशी महाराष्ट्रातील सर्व गोपाळ समाज मढी या ठिकाणी एकत्र येतो आनंद जल्लोष करतो कानिफनाथाच्या जवळ टाळ, मृदुंग, तुळशी वृंदावनाच्या साह्याने गाणी म्हणत महिला मुले साजरा करतात. या ठिकाणी आजही गोपाळ समाजाचा पार प्रसिद्ध आहे या ठिकाणी त्यांची जात पंचायत होते.

क) जातपंचायत:

प्रामुख्याने सर्वच भटक्या जाती व जमातींमध्ये जात पंचायतीचे अस्तित्व होतेच गोपाळ समाजामध्ये ही जात पंचायतीला अनन्यसाधारण महत्त्व होते. याचे कारण पाहताना आपल्याला असे दिसेल भटका समाज हा प्रस्थापित समाजा पासून नेहमीच बाजूला राहिलेला आहे व त्यामुळे आपल्यामध्ये घडणाऱ्या अडीअडचणी चुका या सर्वांतून मार्ग काढण्यासाठी त्यांनी जातपंचायत अस्तित्वात आणली. गोपाळ समाजामध्ये जातपंचायत ही एक संरक्षण व्यवस्था होती कारण गोपाळ समाज भटका असल्याने, त्यांच्यासाठी सरकारी न्यायव्यवस्थेपर्यंत पोहोचणे कठीण होते. अशा वेळी समाजातील अंतर्गत वाद, कौटुंबिक कलह किंवा जमिनीचे वाद सोडवण्यासाठी 'जात पंचायत' ही एक

समांतर न्यायव्यवस्था म्हणून काम करायची. जात पंचायतीने अनेकांचे आयुष्य घडविले असले तरी कालानुरूप त्यात बदल न झाल्याने मुळे अनेकांच्या आयुष्याची अत्यंत दैन्य परिस्थिती ही झालेली आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणून गोपाळ समाजातील लेखिका जनाबाई कचरू गिरे यांच्या अनुभवातून यातली दाहकता आपल्यासमोर येते जातपंचायत अनेकदा पुरुषांच्या बाजूनेच सकारात्मक निर्णय देत असायची त्यामुळे स्त्रियांना यामध्ये दुय्यम स्थान होते. स्त्रियांच्यावर जात पंचायतीच्या माध्यमातून अन्याय होत असे व त्यांची शिक्षा देण्याची पद्धत अत्यंतक्रूर स्वरूपाची होती जणूबाई गिरे यांनी जातपंचायतीमध्ये बदल करण्याची मागणी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केली. या समुदायातील पुरुषांना जात बहिष्कृत केले असता पुन्हा जातीमध्ये घेण्याचे मुभा होती परंतु स्त्रियांच्या बाबतीत जात बहिष्कृत केले असता पुन्हा जातीत घेण्याची मुभा नसायचे समाजातील कुटुंबे, संस्था न्याय मागण्यासाठी न्यायालयात न जाता जात पंचायतीकडे तक्रार करत व जात पंचायत जो निर्णय देईल तो सर्वांना मान्य करावा लागे जात पंचायतीच्या प्रमुखाला पाटील म्हटले जाई त्याचबरोबर अहिल्यानगर जिल्ह्यातील मढी येथील कानिफनाथ हे गोपाळ समाजाच्या जातपंचायतीचे हायकोर्ट होते. या ठिकाणी गोपाळ समाजातील विविध समस्या संदर्भात अंतिम न्याय निवाडा केला जाईल. आधुनिक काळात अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापुरातील पुरोगामी चळवळ यांनी जात पंचायतीचे हे भयान वास्तव समोर आणले. व त्याविरुद्ध आवाज उठवला यातून शासनाने 2017 साली सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा मंजूर केल्यामुळे जात पंचायती बेकायदेशीर ठरल्या. आजची तरुण पिढी जातपंचायती ऐवजी संविधानावर विश्वास ठेवते.कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षित गोपाळ तरुण आता वादावर तोडगा काढण्यासाठी पोलीस किंवा न्यायालयाची मदत घेत आहेत.

ड) बोलीभाषा व लोकगीते:

भटक्या समाजामध्ये प्रत्येक समाजाची एक बोलीभाषा असते त्याला पारुशी भाषा असे म्हणतात ही भाषा त्यांच्या - त्यांच्यामध्ये गुप्त संवाद करण्यासाठी वापरली जाते. हल्ली या भाषेची आधुनिक पिढीला जास्त माहिती नाही परंतु जुने जाणते ही भाषा आजही त्यांच्या त्यांच्यामध्ये बोलताना वापरत असल्याचे आपणास दिसते. ही भाषा इतर भटक्या समाजातल्या भाषेपेक्षा अतिशय मधुर वाटते. त्याचबरोबर लोकगीते ज्यामध्ये विठ्ठलाचे अभंग, भारुडे यांचा समावेश प्रामुख्याने गोपाळ समाजामध्ये असतो ही लोकगीते मंगल प्रसंगी उदाहरणार्थ लग्न, बारसे, जावळ अशावेळी गायली जातात एक उदाहरण घ्यायचे झाल्यास लग्नानंतर जेवण चालू असताना भटक्या समाजामध्ये काही श्लोक म्हटले जातात ते असे

"गावच्या भोवती उंदरांनी मांडलं गावरान!
तिकडूनआला बोक्या घेऊ का प्राण!
सोड सोड बोक्या दादा दे जीवनदान !
नाही सोडीत भडव्या तुझ्या घेऊ का प्राण!"

कोल्हापूर मधील विकास:

राजर्षी शाहूंच्या समतावादी विचारांमुळे व केलेल्या सुधारणामुळे, सहकाराच्या विकासामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील गोपाळ समाज आपल्या पारंपारिक पशुपालनाच्या व्यवसायातून पुढे येऊन विविध व्यवसायामध्ये, नोकरीमध्ये स्थिरावत आहे. कोल्हापूर मधल्या परिवर्तनवादी संघटनांनी पुढे येऊन भटक्या समाजातील अन्यायी जात पंचायत मोडून काढली त्यामुळे आता या समाजातील लोक आपल्या न्याय हक्कांसाठी पोलीस व न्यायालयाचा आधार घेतात. छत्रपती शाहू महाराजांनी सर्व जाती धर्मासाठी वसतिगृहे उभा केली शाळा सुरु केल्या . स्वतः शाहू महाराज म्हणायचे माझी जनता प्राथमिक शिक्षणाने जरी साक्षर झाली तरी मी माझे

सर्व राज्य माझ्या जनतेच्या स्वाधीन करीन हा शाहू राजांचा शिक्षणाप्रती असणारा उदार दृष्टिकोन दर्शवितो संस्थान काळातच कोल्हापूर जिल्हा परिसरात अनेक शाळा सुरू झाल्या ज्याला संस्थांन चा राजाश्रय होता. त्याचा लाभ इतरांना झाला तसाच गोपाळ समाजातील विद्यार्थ्यांनाही झाला आज गोपाळ समाजाचे विद्यार्थी कोल्हापूर मधील विविध संस्थेमध्ये शिक्षण घेत आहेत. स्वातंत्र्यानंतर सुरू झालेल्या शिवाजी विद्यापीठामध्ये गोपाळ समाजाचे अनेक तरुण उच्च पदवी मिळवत आहेत संशोधन करीत आहेत. यातून परंपरेच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी गोपाळ समाजाला मदत झाली आहे. कोल्हापूर जिल्हा ही सहकाराची पंढरी मानली जाते संस्थान काळापासूनच शाहू राजांनी सहकारी संस्थांना पाठबळ दिले राजाश्रय दिला प्रसंगी भांडवल दिले यामुळे अनेक सहकारी संस्था जिल्ह्यात उभे राहिल्या आज अनेक त गोपाळ समाजातील तरुण वेगवेगळ्या सूतगिरण्यांमध्ये, दूध संघांमध्ये आपला उदरनिर्वाह करत आहेत आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करत आहेत. जिल्ह्यात औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे शिरोली एमआयडीसी कागल पंचतारांकित एमआयडीसी, इचलकरंजी सारखे उद्योग नगरी यातील अनेक कंपन्यांमध्ये गोपाळ समाजातील तरुण आज नोकरी करतात.

प्रगती आणि आव्हाने:

अ) प्रगतीचे टप्पे:

कोल्हापूर जिल्ह्याच्या प्रगतीमध्ये व जडणघडणीमध्ये गोपाळ समाजाने आपले योगदान दिलेले आहे यातून भटकंतीचे जीवन सोडून गोपाळ समाज सध्या स्थिर जीवन जगत असलेले आपणास दिसतो. कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये गोपाळ समाजाने आपली स्थिर , पक्की घरे बांधलेली आहेत. विशेषतः कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ज्या ठिकाणी औद्योगिक वसाहती आहेत उदाहरणार्थ शिरोली पुलाची, कागल, इचलकरंजी, गडहिंग्लज, पेठ वडगाव या परिसरात गोपाळ समाजाची पक्की घरे वसाहती पहावयास मिळतात. गोपाळ समाजाचा मूळ व्यवसाय असणारा पशुपालन या व्यवसायाला कोल्हापूर जिल्ह्यातील धवलक्रांतीमुळे चांगलेच पाठबळ मिळाले आहे गोकुळ व वारणा दूध संघासारखे दोन मोठे प्रकल्प कोल्हापूर जिल्ह्यात असल्यामुळे गोपाळ समाजाच्या पशुपालन व्यवसायाला चांगलाच आर्थिक हातभार मिळाला आहे. नियमित आर्थिक स्त्रोत उपलब्ध झाला आहे. आज शासनाच्या धोरणामुळे प्रत्येक गावांमध्ये प्राथमिक शाळा आहेत परंतु कोल्हापूर जिल्ह्यात रयत शिक्षण संस्था स्वामी विवेकानंद संस्था, डी वाय पाटील शिक्षण संकुल, शिवाजी विद्यापीठ व त्याचबरोबर संस्थान काळात सुरू झालेल्या अनेक शाळा आहेत गोपाळ समाजाची पहिली पिढी आता पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन पुढे आलेली आहे त्यामुळे आधुनिकीकरणाचे वारे गोपाळ समाजामध्ये आता आले आहे. जनाबाई गिऱ्हे व त्यांचे पती कचरू गिऱ्हे यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रातून समाजामध्ये शिक्षणाविषयी जागृती निर्माण झालेली आहे. गोपाळ समाजातील मुले आता शिक्षण घेत आहे. गोपाळ समाज आरक्षणाच्या दृष्टीने NT 'B' मध्ये येतो. याचा फायदा शैक्षणिक बरोबरच राजकीय दृष्टही समाजाला झाला आहे. समाजातील अनेक महिला - पुरुष पंचायत राज मध्ये ग्रामपंचायत मध्ये सदस्य पंचायत समिती सदस्य या पदावर निवडून आलेले आहेत यामुळे राजकीय प्रतिनिधित्व समाजाला मिळत असल्यामुळे समाजाचा आत्मविश्वास ही वाढला आहे.

ब) विद्यमान आव्हाने:

प्रगती होत असतानाच, काही समस्या आजही विकासाच्या आड येत आहेत: जनाबाई गिऱ्हे यांनी म्हटल्याप्रमाणे, आर्थिक विकास म्हणजेच फक्त विकास नाही किंवा पोट भरणे पोट भरण्यापुरते अन्न मिळणे म्हणजे

प्रगती नसून आत्मसन्मानाने जगणे म्हणजे खरी प्रगती होय. गोपाळ समाज आज अनेक आव्हानांना संकटांना तोंड देत आहे. यामध्ये प्रामुख्याने जमिनीचा प्रश्न गोपाळ समाजाला स्वतःचे घर उभारण्यासाठी घरकुलासाठी तसेच आपल्या जनावरांना चरवण्यासाठी जमिनीची आवश्यकता असते परंतु कोल्हापूर जिल्ह्यात औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे आता जनावरे चरवण्यासाठी जमीन उपलब्ध नसल्याचे चित्र आहे त्याचबरोबर गोपाळ समाज हा भटका समाज असल्याने बऱ्याच ठिकाणी त्यांना शहराच्या कडेला किंवा औद्योगिक वसाहतीच्या कडेला झोपडपट्टीमध्ये आपली वस्ती करावी लागते. यातून अनेक समस्या उद्भवतात ज्यामध्ये व्यसनाधीनता स्त्रियांचे शोषण ही प्रमुख समस्या आहे. स्वतःची जागा नसल्या मुळे शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ ही गोपाळ समाजाला घेता येत नाही त्याचबरोबर समाजामध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण खूपच अधिक आहे कारण हा समाज कोल्हापूर जिल्ह्यामध्ये गुऱ्हाळ व्यवसायावर अधिक प्रमाणात काम करताना दिसतो तसेच ते काळा गुळ गुराळात काढून त्याचा व्यापार करतात आता काळा गुळ मुख्यतः कच्ची दारू बनवण्यासाठी वापरला जातो व काची दारू बनवण्यासाठी जेव्हा याचा व्यापार होतो त्यावेळी त्या हातभट्टीवर गेल्यामुळे गोपाळ समाजातील अनेक तरुण हे व्यसनाधीन झालेले आहेत यातून त्यांचा अकाली मृत्यू होतो व मुलीना तरुण वयात स्त्रियांना वैधव्य येते.

कायद्याच्या दृष्टीने जात पंचायत आज समाप्त झाली असली तरी छुप्या प्रमाणात बऱ्याच ठिकाणी किरकोळ वाद मिटवण्यासाठी जात पंचायतीचा आधार घेतला जातो यातून पुन्हा जुन्या चालीरीती, अन्यायी, एकांगी निर्णय होण्याची भीती जास्त असते. हा हस्तक्षेप पूर्णपणे बंद होणे आवश्यक आहे कारण यातून वैयक्तिक स्वातंत्र्याला खूपच मर्यादा येतात.

महाराष्ट्र शासनाच्या आरक्षण धोरणानुसार गोपाळ समाजाला NT 'B' या संवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळतो. परंतु जातीचा दाखला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याने व जातीचा दाखला मिळण्यासाठी आपल्या जातीचा 1968 च्या आधीचा पुरावा हा प्रमाण कागद मानला जातो या जातीमध्ये पहिली पिढीशिक्षित होत आहे तसेच हा समाज भटका असल्यामुळे यांना कुठलाही निवासाचा पुरावा सादर करता येत नाही व प्रामुख्याने त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ घेता येत नाही या योजनांचा लाभ घेण्यामध्ये अनेक अडथळे निर्माण होतात परिणामी गोपाळ समाजातील नागरी हा शासनाच्या योजनेपासून वंचित राहिले विचित्र आज आपणास पहावयास मिळते.

निष्कर्ष व शिफारशी:

शाहू महाराजांच्या समतावादी धोरणामुळे समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊन गोपाळ समाज स्थिर होऊ पाहत आहे. एकेकाळी केवळ चरितार्थासाठी पशुपालन करणारा समाज आता संघटित अशा सहकारी संस्थांमुळे सक्षम होऊ झाला आहे. त्याचबरोबर हा समाज गुऱ्हाळांवरही काम करतो व त्यातूनही त्यांना चांगली आर्थिक कमाई होते. जनाबाई गिऱ्हे व त्यांचे पती कचरू गिऱ्हे यांसारख्या लेखकांमुळे समाजात शिक्षणासंदर्भात पूर्वीपेक्षा अधिक जागृती झाली आहे. यातून समाजाची पहिली पिढी शिक्षित झाली असून ती आता पदवीधर ,उच्च पदवीधर झाली आहे तरीही गुराळांवर काम करण्यासाठी हंगामी कामगार म्हणून जात असल्यामुळे बऱ्याच मुलांचे गळतीचे प्रमाण दिसून येते. गोपाळ समाजाने आधुनिकीकरणात ही आपली बोलीभाषा,लोककला, जनावरांवर असणारे प्रेम यासारख्या प्रथा जपल्या आहेत तरीही त्याला अजून संवर्धन करणे गरजेचे आहे हे संवर्धन शास्त्रोक्त पद्धतीने कसे होईल याकडे समाजातील नवशिक्षित

वर्गाने लक्ष दिले पाहिजे समाज आता आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर येऊन संघर्ष करत आहे परिणामी पारगाव तालुका हातकणंगले या ठिकाणी शासनाच्या यशवंतराव चव्हाण घरकुल योजनेतून समाजासाठी घरकुलांची निर्मिती होते आहे.

समाज मोठ्या प्रमाणात अस्वच्छता व्यवसायात काम करतो परंतु त्यांना कोणत्याही प्रकारच्या आरोग्याच्या सुविधा नसून अस्वच्छता व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी असणारी शिष्यवृत्ती ही त्या मुलांना मिळत नाही शासनाने या विषयावर ठोस धोरण ठरवणे आवश्यक आहे ज्यातून गोपाळ समाजातील अस्वच्छता व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना या शिष्यवृत्तीचा लाभ होईल

पशुपालनासाठी चराऊ कुरणे कमी झाले आहेत त्यामुळे पशुपालन करणे अवघड झाले आहे शासनाने चराऊ कुरणांच्या साठी आरक्षित क्षेत्र घोषित करावे ज्यामुळे पशुपालन व्यवसायाला अधिक बळ मिळेल तसेच मुक्त गोठा पद्धत, बंदिस्त गोठा पद्धत यासाठी शासनाने गोपाळ समाजाला विशेष अनुदान देणे आवश्यक आहे

गोपाळ समाजामध्ये कसरतीचे खेळ केले जातात त्यातील बरेच तरुण-तरुणी बँड पथकामध्येही गाण्यासाठी जातात तरी शासनाने कलाकारांसाठी असणारे अनुदान गोपाळ समाजातील संबंधित लाभार्थ्यांना मिळेल यासाठी विशेष धोरण आखणे आवश्यक आहे.

समारोप:

भटक्या समाजाच्या वर्गवारी मध्ये शासनाच्या दृष्टीने NT 'B' मध्ये येणारा व समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीने पशुपालन, व कसरतीचे खेळ करून तसेच सध्या अस्वच्छता व्यवसायात काम करून आपला उदरनिर्वाह करणाऱ्या गोपाळ समाजची आता भटकंतीच्या प्रवासावरून स्थिरतेच्या जीवनाकडे वाटचाल सुरू झालेली आहे. हा गोपाळ समाजातील स्थित्यंतराचा टप्पा आहे या काळात शासनाची ध्येय धोरणे ही गोपाळ समाजाला स्थिर,आत्मसन्मान वाढवणारे तसेच सुरक्षित जीवन मिळवून देण्याच्या दृष्टीने सकारात्मक असणे आवश्यक आहे. प्राचीन रूढी परंपरा सोडून, जात पंचायती मोडून गोपाळ समाजाने आधुनिकतेची कास धरली आहे . गोपाळ समाज कोल्हापूरच्या प्रगत समाज व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक बनलेला आहे गोपाळ समाजाचा सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर समाजाची आंतरिक ओढ व महाराष्ट्र शासनाचे पाठबळ या दोन्हींचा समन्वय साधने आवश्यक आहे.

संदर्भ:

१. वाडकर धोंडीराम, पशुपालक भटक्या जमातीचे जीवनमान एक तौलनिक अभ्यास पद्मगंधा प्रकाशन पुणे

२. भारतीय संस्कृतीकोश,संपादक जोशी पं.महादेव शास्त्री खंड ३ पृष्ठ १४४

३. Enthoven E.R.,The Tribes and Castes of Bombay (Vol. I & III)

४. मुलाखत - युवराज पवार (गोपाळ समुदायातील कार्यकर्ते)

५. गिह्रे जनाबाई,मरणकळा (आत्मचरित्र)

६. महाराष्ट्र राज्य विमुक्त जाती, भटक्या जमाती यादी

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

खानापूर (विटा) परिसरातील साहित्य व सांस्कृतिक चळवळ : एक ऐतिहासिक अभ्यास

श्री. जोतीराम वामन आंबवडे

पीएचडी, संशोधक विद्यार्थी,

इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

Corresponding Author - श्री. जोतीराम वामन आंबवडे

DOI - 10.5281/zenodo.19692878

घोषवारा (Abstract):

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात ग्रामीण भागातील साहित्य चळवळींना विशेष महत्त्व आहे. सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा परिसर हा ग्रामीण असूनही साहित्य व सांस्कृतिक परंपरेने समृद्ध आहे. या परिसरात श्री. म. माटे, यशवंतराव चव्हाण, शिवाजीराव भोसले यांसारख्या व्यक्तिमत्त्वांच्या प्रेरणेने साहित्यिक परंपरा विकसित झाली. विटा येथील ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाची १९७६ पासूनची परंपरा, बलवडी येथील जोतिर्लिंग साहित्य सेवा मंडळ, विट्यातील अक्षरयात्री साहित्य प्रतिष्ठान आणि रेणावी येथील श्रीमती शहाबाई यादव सांस्कृतिक साहित्य कला मंच या संस्थांनी ग्रामीण साहित्य चळवळीला बळ दिले. प्रस्तुत संशोधनात खानापूर (विटा) परिसरातील साहित्यिक परंपरा, साहित्य संस्थांचे कार्य आणि त्यांचा सामाजिक-सांस्कृतिक परिणाम यांचा ऐतिहासिक अभ्यास करण्यात आला आहे.

मुख्य शब्द (Keywords): खानापूर तालुका, विटा साहित्य संमेलन, ग्रामीण मराठी साहित्य, साहित्य चळवळ, सांस्कृतिक इतिहास, स्थानिक इतिहास.

प्रास्ताविक:

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेत साहित्य चळवळींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ग्रामीण भागातील साहित्य परंपरा ही केवळ साहित्यनिर्मितीपुरती मर्यादित नसून ती सामाजिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक विकासाशी निगडित असते. ग्रामीण समाजात विचारांची देवाणघेवाण, सामाजिक जाणीव आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक या साहित्य चळवळींमधून घडत असते.

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा परिसर हा अशाच साहित्य परंपरेसाठी ओळखला जातो. या परिसरात अनेक साहित्यिक, कवी, विचारवंत आणि सांस्कृतिक कार्यकर्ते घडले. श्री. म. माटे यांच्या साहित्यिक कार्यापासून सुरू झालेली ही परंपरा पुढे विविध साहित्य संस्थांच्या माध्यमातून व्यापक झाली.

विटा, बलवडी आणि रेणावी या ठिकाणी स्थापन झालेल्या साहित्य संस्थांनी ग्रामीण भागातील नवोदित लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. साहित्य संमेलने, व्याख्यानमाला, कविसंमेलने, कार्यशाळा आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून या संस्थांनी साहित्य संस्कृतीची जोपासना केली. त्यामुळे खानापूर तालुक्यातील साहित्य चळवळ ही स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने अभ्यासण्यासारखी महत्त्वपूर्ण बाब आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

1. खानापूर (विटा) परिसरातील साहित्य व सांस्कृतिक परंपरेचा ऐतिहासिक अभ्यास करणे.
2. या परिसरातील साहित्यिक आणि सांस्कृतिक व्यक्तिमत्त्वांचे योगदान अभ्यासणे.
3. विविध साहित्य संस्थांच्या कार्याचा आणि त्यांच्या उपक्रमांचा आढावा घेणे.
4. ग्रामीण साहित्य चळवळीचा सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव समजून घेणे.

संशोधन कार्यपद्धती (Research Methodology):

या संशोधनासाठी पुढील पद्धतींचा वापर करण्यात आला आहे.

१. **ऐतिहासिक पद्धत:** खानापूर तालुक्यातील साहित्य चळवळीचा इतिहास समजून घेण्यासाठी उपलब्ध साहित्य, लेख, स्मरणिका आणि दस्तऐवजांचा अभ्यास करण्यात आला.

२. **वर्णनात्मक पद्धत:** साहित्यिक परंपरा, साहित्य संस्था आणि त्यांच्या कार्याचे वर्णनात्मक विश्लेषण करण्यात आले.

३. **दस्तऐवज अभ्यास पद्धत:** विटा साहित्य सेवा मंडळ, अक्षरयात्री साहित्य प्रतिष्ठान, जोतिर्लिंग साहित्य सेवा मंडळ आणि शहाबाई यादव साहित्य मंच यांच्या नोंदींचा अभ्यास करण्यात आला.

४. **स्थानिक स्रोतांचा वापर:** स्थानिक साहित्यिक, संस्था आणि उपलब्ध माहितीच्या आधारे संशोधन माहिती संकलित करण्यात आली.

शोध व चर्चा:

विटा साहित्य संमेलनाची परंपरा:

विटा नगरीच्या सांस्कृतिक परंपरेत येथील ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाने अखंड भर टाकली आहे. साहित्य, संस्कृती, सुविचार यांचा प्रसार व्हावा, नवोदित साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, मराठी भाषेतील थोर ज्ञानवंतांचे विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचावेत या उद्देशाने २३ जानेवारी, १९७६ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीचे औचित्य साधून विटा येथे साहित्य सेवा मंडळाची स्थापना केली. यासाठी रघुराज मेटकरी यांनी पुढाकार घेतला, तर शशिकांत तारळेकर, अशोक दवंडे, प्रसाद शेंडे, र. ह. कुलकर्णी यांची साथ लाभली. १९७६ मध्ये सुप्रसिद्ध साहित्यिक आणि सागरेश्वर अभयारण्याचे प्रवर्तक धो. म. मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन यशस्वी झाले. भाऊसाहेब भंडारे, सुधाकरशेठ शहा, हणमंतराव पाटील, सदाशिवराव पाटील, अनिल बाबर या ज्येष्ठ लोकांना हा उपक्रम आवडला. त्यांनी जोरदार पाठिंबा दिला आणि ही ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाची परंपरा अखंड चालू राहिली. डॉ. पतंगराव कदम यांनी याला राजाश्रय दिला. मराठीतील दिग्गज साहित्यिक, अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनी या संमेलनातून मार्गदर्शन केले. यातून पेठेतील विठ्ठल मंदिरात गोकुळाष्टमीच्या निमित्ताने आठ दिवसांची व्याख्यानमाला सुरू झाली या व्याख्यानमालेत डॉ. निर्मलकुमार फडकुले, मुकुंदराव किर्लोस्कर, जयंतराव टिळक, शांताबाई किर्लोस्कर, शिवाजीराव भोसले, र. बा. मंचरकर, डॉ. अशोक दास, यशवंतराव मोहिते, म. द. हातकणंगलेकर, प्रा. वैजनाथ महाजन, वामन काळे, जिजाबा महाराज पाटील-साहोलीकर, डॉ. यू. म. पठाण अशा ३२० दिग्गजांनी व्याख्याने दिली. १९८२ मध्ये सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे संमेलनाला आले होते. त्यांच्या परिसस्पर्शाने

मुक्तांगण वाचनालयाची निर्मिती झाली. बाळासाहेब बापटांनी दहा गुंठे जागा दिल्याने साहित्य मंडळाला हक्काचे छप्पर मिळाले. विट्याचे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन हा आगळावेगळा उपक्रम अखंड सुरू आहे. आजवरच्या संमेलनाचे अध्यक्षपद घो. म. मोहिते (१९७६), पद्मश्री सुधांशू (१९७७), रणजित देसाई (१९७८), व्यंकटेश माडगूळकर (१९७९), वसंत सबनीस (१९८०), बाबा कदम (१९८१), पु. ल. देशपांडे (१९८२), वसंत कानेटकर (१९८३), आनंद यादव (१९८४), द मा. मिरासदार (१९८५), शंकर पाटील (१९८६). रमेश मंत्री (१९८७), प्रा. वसंत बापट (१९८८). शांता शेळके (१९८९), नारायण सुर्वे (१९९०), मंगेश पाडगावकर (१९९१), शिवाजीराव भोसले (१९९२), शिवाजी सावंत (१९९३), बाबासाहेब पुरंदरे (१९९४), जयंत साळगावकर (१९९५), आ. ह. साळुंखे (१९९९), विश्वास पाटील (२००१), मधू मंगेश कर्णिक (२००२), वीणा देव (२००३), ना. धों. महानोर (२००६), फ. मु. शिंदे (२००७), विठ्ठल वाघ २००९), नागनाथ कोत्तापल्ले (२०१०), डॉ. रामचंद्र देखणे (२०११), प्रा. प्रवीण दवणे (२०१२), डॉ. अनिल अवचट (२०१३), प्रभा गणोरकर (२०१४), राजन खान (२०१५), भारत सासणे (२०१६), डॉ. नरेंद्र जाधव (२०१७), डॉ. जयसिंगराव पवार (२०१८), लक्ष्मीकांत देशमुख (२०१९), उत्तम कांबळे (२०२०), इंद्रजित भालेराव (२०२१) यांनी भूषविले आहे. हजारो रसिकांच्या उपस्थितीत हे संमेलन यशस्वी झाले.

साहित्य संमेलनाबरोबर ग्रंथ प्रदर्शने, वेगवेगळ्या वक्तृत्व स्पर्धा, मुलांपर्यंत बालवाङ्मय, असे साहित्यमय प्रयोग राबविण्यात आले. प्रत्येक दिवाळीच्या पाडव्याला 'उजळुया रंग मनाचे' नावाने सुप्रसिद्ध वक्ते, विचारवंत इंद्रजित देशमुख यांचे सलग १९ वर्षे 'मुक्तांगण'च्या हॉलमध्ये व्याख्यान आयोजीत केले जाते. 'मुक्तांगण' मध्ये यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला आयोजीत केली जाते. अनेक मान्यवर वक्त्यांनी यामध्ये व्याख्यान दिले आहे. २ ऑक्टोबर या महात्मा गांधी व साहित्यिक ग. दि. माडगूळकर यांच्या जयंतीदिवशी कविसंमेलने भरू लागली. पु. ल. देशपांडे जयंती व स्मृतिदिन वेगवेगळ्या उपक्रमांनी, कधी संगीत स्पर्धा, भावगीत स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विनोदी एकपात्री प्रयोग, तर कधी संगीत रजनी कार्यक्रमाने संपन्न झाली. बळवंत महाविद्यालयाच्या सहकार्याने लेखन कार्यशाळा, काव्यनिर्मिती लेखन कार्यशाळा, नाटक व बालनाट्य लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.

बलवडी (भा.) येथील साहित्य चळवळ:

येरळा काठावरील बलवडी गावात श्रमदानातून बळीराजा स्मृती धरणाची निर्मिती होत होती. पुरोगामी विचार चिरंतन राहावेत यासाठी १९८६ मध्ये 'पुरोगामी विचारातून परिवर्तनीय विचार' हे ब्रीद वाक्य घेऊन गावातील होतकरू तरुणांनी एकत्र येत परिसरातील नवोदितांना आपल्या कथा-कविता सादर करता याव्यात यासाठी जोतिर्लिंग साहित्य सेवा मंडळाची निर्मिती केली. पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष होते कडेगावचे साहित्यिक अरविंद पत्की. स. ग. यादव, प्राचार्य डॉ. बी. बी. सावंत यांची यावेळी उपस्थिती, तर स्वागताध्यक्ष राघव शिवणीकर होते त्यानंतर पुढे संमेलनाचे अध्यक्षपद पी. एन. आवटे, शारदा सुमंत, आचार्य शांताराम गरूड, व. बा. बोधे, प्रा. यशवंत पाटणे, वामन काळे, डॉ. बाबूराव गुरव, शांताबाई किर्लोस्कर, हेमंत कारंडे, एकनाथ पाटील, कृष्णात खोत, राजा माळगी, सुभाष खोत, आप्पासाहेब खोत, विनोद गायकवाड, सोनाली नवांगुळ, आसाराम लोमटे, ऐश्वर्य पाटेकर, उत्तम कांबळे, नामदेव माळी आदी दिग्गज साहित्यिकांनी भूषविले. शेतकऱ्यांच्या वेदनांवर परिसंवाद, कविसंमेलन, कथाकथन, मुलाखती यांचे आयोजन केले जाते. परिसरातील साहित्यिकांना प्रोत्साहन देण्यासाठी

जोतिर्लिंग वाङ्मय, कृषी, आदर्श माता पुरस्काराने सन्मानित केले जाते. बलवडीच्या भूमीत निःस्वार्थीपणे आणि तितक्याच साधेपणाने शब्द पेरण्याचे काम सुरू आहे. तेही शासनाच्या मदतीशिवाय आणि लोकांच्या सहभागातून केले जात आहे.

अक्षरयात्री साहित्य संमेलन:

१९९८ मध्ये विटा येथे 'अक्षरयात्री साहित्य प्रतिष्ठान'ही संस्था कार्यरत झाली. प्रख्यात लेखिका, कवयित्री स्वाती शिंदे-पवार संस्थापक अध्यक्षा, तर अनिल पवार हे खजिनदार. प्रा. प्रीती शिंदे-पाटील, मंगल पवार, सूर्याजी पाटील, पांडुरंग पवार हे सदस्य होत. ज्या काळात मुलीचा जन्म निषिद्ध मानला जात होता, तेव्हा मुलीचा सन्मान केला जावा म्हणून या संमेलनाने पाय रोवले संमेलनाध्यक्ष, स्वागताध्यक्ष, उद्घाटक, संयोजिका ही महत्त्वाची पदे स्त्रियांना दिली. 'स्त्रियांचा सन्मान करणारे एकमेव भारतीय संमेलन' असा या संमेलनाचा जागतिक विक्रम नोंद झाला आहे. १९९९ पासून आजपर्यंत वीस संमेलने झाली. कमल देसाई, कविता महाजन, तारा भवाळकर, इंदुमती जोंधळे, शैला सायनाकर, अनुपमा उजगरे, ऊर्मिला चाकुरकर, रजनी हिरळे, प्रा. मंदा कदम, सुधा कांकरिया, शहाबाई यादव, प्रज्ञा लोखंडे, अनुराधा गुरव, अंजली कुलकर्णी, माधवी घारपुरे, प्रतिमा इंगोले, कल्पना दुधाळ या मान्यवर साहित्यिकांनी अध्यक्षपद भूषविले 'अक्षरयात्री' च्या वतीने दहा मुलींना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलला जातो.

रेणावी ग्रामीण मराठी साहित्य संमेलन:

विजापूर - गुहागर राष्ट्रीय महामार्गावर विट्यापासून ९ कि.मी. अंतरावर वसलेल्या रेणावी येथे पत्रकार धर्मेंद्र पवार यांनी पद्माकर यादव, जितेंद्र यादव, आनंदा पवार, अधिकराव पाटील यांच्या सहकार्याने २००० मध्ये श्रीमती शहाबाई यादव सांस्कृतिक, साहित्य, कला मंचची स्थापना केली. या मंचच्या प्रेरणास्थान शहाबाई यादव या निरक्षर, अशिक्षित कवयित्री होत्या परिसरात त्यांची प्रतिबहिणाबाई अशी ओळख होती आजूबाजूच्या परिस्थितीचे आणि परिसराचे त्यांना अतिशय चांगले आकलन होते. ते त्यांनी आपल्या कवितेतून मांडले. त्यावेळेचे शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांच्या उपस्थितीत शहाबाई यादव यांचा नागरी सत्कार तसेच पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन झाले. ही परंपरा पुढे अखंड सुरू राहिली. डॉ बाबूराव गुरव, आ. ह. साळुंखे, वसंत भोसले, लक्ष्मीकांत देशमुख, प्रशांत मोरे, वामन होवाळ, प्रा. वसंत केशव पाटील, प्रा. सीताराम सावंत, मिलिंद जोशी, शेखर गायकवाड, संजय पवार, निलेश देशमुख, विनोद गायकवाड यांच्यासह विविध मान्यवर साहित्यिकांनी संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले आहे. शहाबाई यादव यांच्या नावाने साहित्य गौरव पुरस्कार दिले जातात. लिहित्या माणसांच्या पाठीवर शाबासकीची थाप टाकण्याचे काम हा साहित्य मंच करीत आहे याबरोबरच नव्या पिढीमध्ये साहित्याची आवड निर्माण व्हावी, यासाठी 'बालसाहित्य मंच'ची निर्मिती केली आहे. बाल व युवा साहित्यिकांची जडणघडण या मंचच्या वतीने करण्यात येत आहे.

२००४ मध्ये रेणावी येथे आयोजित केलेल्या तिसऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून मार्गदर्शन करताना ज्येष्ठ लेखक व मार्गदर्शक डॉ. आ. ह. साळुंखे. व्यासपीठावर ज्येष्ठ नेते यशवंतराव मोहिते, प्रतिबहिणाबाई शहाबाई यादव, ॲड. बाबासाहेब मुळीक आदी उपस्थित होते.

निष्कर्ष:

खानापूर (विटा) परिसरातील साहित्य व सांस्कृतिक चळवळ ही ग्रामीण भागातील एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक प्रक्रिया असल्याचे या संशोधनातून स्पष्ट होते. विटा येथे सुरू झालेल्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाने केवळ साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन केले नाही, तर ग्रामीण समाजात बौद्धिक आणि सांस्कृतिक जागृती घडविण्याचे कार्य केले. या चळवळीमुळे ग्रामीण भागातील नवोदित साहित्यिकांना आपले विचार व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले.

बलवडी येथील जोतिर्लिंग साहित्य सेवा मंडळ, विट्यातील अक्षरयात्री साहित्य प्रतिष्ठान आणि रेणावी येथील शहाबाई यादव सांस्कृतिक साहित्य कला मंच या संस्थांनी साहित्य संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्य केले. विशेषतः स्त्री साहित्यिकांना प्रोत्साहन देणे, ग्रामीण समस्यांवर परिसंवाद आयोजित करणे आणि बालसाहित्य मंचाच्या माध्यमातून नव्या पिढीत साहित्याची आवड निर्माण करणे हे या संस्थांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

या सर्व उपक्रमांमुळे खानापूर (विटा) परिसरात साहित्यिक परंपरा दृढ झाली आहे. स्थानिक लोकसहभाग, साहित्यिकांचे मार्गदर्शन आणि संस्थात्मक कार्य यामुळे ही साहित्य चळवळ आजही सक्रिय आहे. त्यामुळे खानापूर तालुक्याचा साहित्यिक वारसा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण अध्याय म्हणून अभ्यासण्याजोगा आहे.

संदर्भ:

१. अवचट, अनिल. २०१३. *साहित्य आणि समाज*. पुणे : मौज प्रकाशन.

२. भालेराव, इंद्रजित. २०२१. *ग्रामीण साहित्य चळवळ*. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.

३. चव्हाण, यशवंतराव. १९६५. *कृष्णाकाठ*. पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

४. देशपांडे, पु. ल. १९८२. *व्यक्ती आणि वल्ली*. मुंबई : मौज प्रकाशन.

५. खांडेकर, वि. स. १९७४. *मराठी साहित्याचा इतिहास*. पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

६. मिरासदार, द. मा. १९८५. *ग्रामीण कथा*. पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.

७. मोहिते, धो. म. १९७६. *सांगली जिल्ह्याचा सांस्कृतिक इतिहास*. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.

८. नाडकर्णी, मंगेश. २००८. *महाराष्ट्रातील साहित्य चळवळ*. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.

९. साळुंखे, आ. ह. १९९९. *संस्कृती आणि समाज*. कोल्हापूर : प्रगती प्रकाशन.

१०. वाघ, विठ्ठल. २००९. *ग्रामीण कविता आणि चळवळ*. मुंबई : ग्रंथाली.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

निफाड तालुक्यातील द्राक्ष शेती : ऐतिहासिक प्रवास व सामजिक - आर्थिक परिणामांचा अभ्यास (सन १९३०-२०२०)

मनोज किसन गायकवाड[1], प्रा. डॉ. संजय तुळशीराम शेलार[2]

संशोधक विद्यार्थी, महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, लोकनेते व्यंकटराव हिरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी, ता. जि. नाशिक.

संशोधन मार्गदर्शक, महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, समाजश्री प्रशांतदादा हिरे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नामपूर, ता. बागलाण, जि. नाशिक.

Corresponding Author - मनोज किसन गायकवाड

DOI - 10.5281/zenodo.19692912

सारांश:

नाशिक जिल्ह्यामधील निफाड तालुका हा द्राक्ष शेतीसाठी प्रसिद्ध आहे. तो महाराष्ट्रातील प्रमुख द्राक्ष पट्ट्यातील भागांपैकी एक आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये निफाड तालुक्यातील द्राक्ष शेतीचा ऐतिहासिक विकासाचा अभ्यास करण्यात आला आहे. सदर संशोधन अभ्यासाचा उद्देश कृषिप्रधान निफाड तालुक्यातील द्राक्ष शेतीचा ऐतिहासिक विकास कालानुक्रमे मांडणे व निफाड तालुक्यातील द्राक्ष शेतीचे ग्रामीण जीवनावरील सामाजिक व आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे हा आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करून तथ्य संकलनासाठी मुलाखत, शासकीय अहवालांचा वापर करण्यात आला आहे. तसेच ऐतिहासिक व सामग्रीचे विश्लेषण व निर्वेचन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधन अभ्यासातून असे दिसून आले की, द्राक्ष शेतीचे लागवडीखालील क्षेत्र हे दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. तालुक्यातील सिंचन सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान व कृषी केंद्रे, दळणवळण साधनांचा विकास इत्यादी घटकांमुळे द्राक्ष शेतीचे लागवडीखालील क्षेत्र वाढले. तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली. परंतु कर्जबाजारीपण, सामाजिक विषमता, बाजारभाव यांसारख्या समस्या तयार झाल्या.

मुख्य शब्द: कालानुक्रमे ऐतिहासिक विकास, प्रक्रिया उद्योग, लागवडीखालील क्षेत्र, सामाजिक परिणाम आर्थिक परिणाम

प्रस्तावना:

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुका कृषीप्रधान तालुका असून महाराष्ट्र राज्यात तो कृषीच्याबाबत अग्रेसर आहे. कृषी क्षेत्रातील विकासामुळे तालुका अन्नधान्याच्या बाबत सुजलाम- सुफलाम झाला आहे. येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असून हेच उदरनिर्वाहचे साधन आहे. येथील शेतकरी प्रामाणिक व कष्टाळू आहे. त्यामुळे शेती व्यवसायात तालुका अव्वल आहे. तालुक्याची अर्थव्यवस्था ही पूर्णपणे शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. तालुक्यात शेतीच्या कामांसाठी बाहेरून मजूर आणले जातात. प्रामुख्याने ऊस लावणी, तोडणी, कांदा लावणी व कापणी, मका कापणी, द्राक्ष बागकामासाठी बाहेरून मजूर येतात. म्हणजेच तालुक्यातील कृषी क्षेत्र हे तालुक्यातील लोकांना रोजगार प्राप्त करून देतेच तसेच ते

तालुक्याबाहेरील लोकांना पण रोजगाराची संधी निर्माण करते. तालुक्यात सहकारातून कृषीला सहाय्य करणाऱ्या अनेक सहकारी संस्था स्थापन झाल्या आहे. त्यामुळे शेतीच्या विकासाला गती मिळाली आहे. तालुक्यात ७ कृषी विज्ञान केंद्रे स्थापन झाले आहे. 'त्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील सन १९३२ चे कृषी संशोधन केंद्र कुंदेवाडी येथे आहे.'[१] हे कृषी केंद्रे तालुक्यातील शेतकरी वर्गासाठी प्रशिक्षण, मेळावे घेत असतात. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची आधुनिक पद्धती, नवीन तंत्रज्ञान समजण्यास मदत होते. तालुक्यात सिंचन व्यवस्थेचा विकास झाला आहे. त्यामुळे अधिक शेतजमीन ओलिताखाली येवून लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाली आहे. 'तालुक्यात दोन कृषी उत्पन्न बाजार समित्या असून त्यापैकी लासलगांव कृषी उत्पन्न बाजार समिती ही आशिया खंडातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ आहे.'[२] त्याचप्रमाणे तालुक्यात अनेक कृषीप्रेमी, कृषी संशोधक, कृषी महर्षी आहे. ते शेतीत नवनवीन प्रयोग करून यशस्वी झाल्यानंतर इतर शेतकऱ्यांना त्याबद्दल मार्गदर्शन व प्रोत्साहित करतात. 'तालुक्यात कांदा, ऊस, द्राक्ष व भाजीपाला हे निर्यातक्षम पिके घेतली जातात.'[३] या निर्यातक्षम पिकांपासून शेतकऱ्यांना चांगलाच लाभ होतो. या नगदी पिकांमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक परीस्थितीत सुधारणा झाली आहे. म्हणजेच तालुक्यातील लोकांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्याचे एकमेव कारण कृषी क्षेत्राचा विकास आहे. अशा कृषीप्रधान तालुक्यातील द्राक्ष शेतीच्या ऐतिहासिक विकासाचा अभ्यास व त्याचे सामाजिक व आर्थिक परिणामाचे विश्लेषण करणे महत्त्वाचे वाटते. म्हणून प्रस्तुत संशोधनात निफाड तालुक्यातील द्राक्ष शेतीचा अभ्यास करण्यात आला आहे

संशोधनाची उद्दिष्टे:

१. कृषिप्रधान निफाड तालुक्यातील द्राक्ष शेतीचा ऐतिहासिक विकास कालानुक्रमे मांडणे.

२. निफाड तालुक्यातील द्राक्ष शेतीचा ग्रामीण जीवनावरील सामाजिक व आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.

संशोधनाची मर्यादा:

प्रस्तुत शोधनिबंधात सन १९३०-२०२० कालखंडातील निफाड तालुक्यातील द्राक्ष शेती : ऐतिहासिक प्रवास व सामजिक - आर्थिक परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करून तथ्य संकलनासाठी मुलाखत, शासकीय अहवालांचा वापर करण्यात आला आहे. तसेच ऐतिहासिक व सामग्रीचे विश्लेषण व निर्वेचन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

निफाड तालुक्यातील द्राक्ष शेतीचा कालानुक्रमे ऐतिहासिक प्रवास:

'निफाड तालुक्यात स्व. रावसाहेब गायकवाड यांनी निफाड तालुक्यात द्राक्ष शेतीचा उगम व विकास केला. त्यांनी सन १९३० मध्ये तालुक्यातील ओझर मिग येथे द्राक्ष शेतीस प्रारंभ केला.'[४] त्यांनी सुरवातीला एक एकरात भोकरी या द्राक्ष जातीची लागवड केली. तेव्हापासून तालुक्यातील इतर भागात द्राक्ष शेती करण्यास प्रारंभ झाला. सुरवातीला तालुक्यात द्राक्ष लागवडीसाठी बंगलोर, भोकरी, पर्पल, फकडी, पंढरी साहेबी, अनब- ए- शाही, काळी साहेबी या जाती उपयोगात आणल्या. प्रारंभिक काळात

द्राक्ष शेती ही फक्त ओझर मिग, निफाड, पिंपळगाव बसवंत व लासलगांव पुरतीच मर्यादित होती. नंतरच्या कालखंडात द्राक्ष शेतीचा प्रसार संपूर्ण तालुक्यात होऊन तालुका द्राक्षाची पंढरी म्हणून ओळखला जाऊ लागला. 'सध्या देशात निफाड तालुका द्राक्ष निर्यातीत आघाडीवर आहे.'[५]

१. सन १९३० ते १९६० (सुरवातीचा कालखंड):

प्रारंभिक कालखंडात द्राक्ष शेती खूपच थोड्या प्रमाणात केली जात असे. कारण या कालखंडात अन्नधान्याच्या पिकांवर भर होता. ज्वारी, बाजरी त्याचप्रमाणे कांदा हे पिक घेतले जात असे. सुरवातीच्या कालखंडात द्राक्ष शेतीबद्दल जास्त माहिती नसल्यामुळे शेतकरी वर्ग जास्त लक्ष देत नसत. या कालखंडात नगदी पिक म्हणून शेतकरी ऊस व कांदा हे पिके घेत असत. याच काळात 'कांदा व द्राक्ष कृषी संशोधन केंद्र (१९५९) निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत येथे स्थापन झाले. हे केंद्र महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीच्या अंतर्गत येते.'[६] या संशोधन केंद्राचा परिणाम पुढील काळात दिसून आला.

२. सन १९६१ ते १९७०- (द्राक्ष शेतीला खऱ्या अर्थाने सुरवात):

या कालखंडात तालुक्यात सिंचन प्रकल्प सुरु करण्यात आले. 'या काळात कृषी महर्षी काकासाहेब वाघ, मालोजीराव मोगल व विनायकदादा पाटील यांच्या प्रयत्नांनी अनेक जलसिंचन योजना सुरु झाल्या. याचा परिणाम असा झाला की, तालुक्यातील अनेक हेक्टर शेतजमीन ओलिताखाली येवून कृषीचा विकास झाला. तसेच पिकांचे लागवडीखालील क्षेत्र वाढले व त्यामुळे उत्पादनही वाढले. या काळात पिंपळगाव बसवंत येथे सन १९५९ मध्ये स्थापन झालेले कांदा व द्राक्ष कृषी संशोधन केंद्राचा परिणाम दिसून लागला. 'या संशोधन केंद्रात द्राक्ष संशोधन योजना सन १९६४ पासून सुरु होवून त्या माध्यमातून संशोधन केंद्राने द्राक्ष पिकाच्या संदर्भात संशोधन व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.'[७] याच कालखंडात निफाड तालुक्यात लासलगांव, निफाड, ओझर व पिंपळगाव बसवंत या ठिकाणी असे एकूण चार शेतकरी खरेदी-विक्री सहकारी संघ होते. हे सहकारी संघ रासायनिक खते, कर्जपुरवठा, बी-बियाणे, शेती अवजारे यांचा पुरवठा करून शेतकऱ्यांना सहाय्य करत असे. तसेच तालूक्यातील कृषी विभागाकडून द्राक्ष शेतीचे मार्गदर्शन मिळत असे. या सर्वाचा परिणाम म्हणजे तालुक्यात द्राक्ष शेतीला सन १९६० पासून खऱ्या अर्थाने सुरवात झाली. 'सन १९६९-१९७० मध्ये एकूण लागवडीखालील (८४६१६ हेक्टर) क्षेत्रापैकी द्राक्ष पिकाचे ११५ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली होते.'[८] हा एक सुरवातीचा कालखंड असल्यामुळे या कालखंडात द्राक्ष लागवडीखालील क्षेत्र कमी दिसून येते.

३. सन १९७१ ते १९८०:

या कालखंडात सुधारित द्राक्ष पिकांच्या जातीचा प्रसार पिंपळगाव बसवंत येथील कांदा व द्राक्ष कृषी संशोधन केंद्रामार्फत झाला. याचा कालखंडात तालुक्यात जास्ती जास्त वीज कनेक्शन येवून सर्वात जास्त वीजपंप बसविण्यात आले. वीजपंपामुळे तालुक्यात लिफ्ट इरिगेशन होवून द्राक्ष पिकाचे लागवडीखाली क्षेत्र वाढले. या कालखंडात आधुनिक शेती अवजारांचा वापरास सुरवात झाली. सन १९७८ मध्ये झालेल्या पशुगणना अहवालानुसार ट्रॅक्टरची संख्या ५८२ तर बैलांच्या सहाय्याने ओढली जाणारे लोखंडी नगरांची संख्या ७६३९ होती. या काळात स्थानिक बाजारपेठेत द्राक्षाची मागणी वाढली. या सर्वांचा परिणाम म्हणजे द्राक्ष लागवडीखालील क्षेत्र वाढलेले दिसून येते. 'सन १९७९-१९८० या वर्षी द्राक्ष पिकाचे लागवडीखालील क्षेत्र ६०९ हेक्टर होते.'[९]

४. सन १९८१ ते १९९०:

या कालावधीत द्राक्ष उत्पादक शेतकरी वर्गाने रासायनिक खते व कीटकनाशके, शेतीची आधुनिक

लोखंडी अवजारे वापरण्यास सुरवात केली. तसेच या काळात द्राक्ष पिकाचे आधुनिक छाटणी तंत्रज्ञान विकसित झाले. तालुक्यात द्राक्ष पिकांसाठी कॉल्ड स्टोरेज सुरु झाले. सर्वात मुख्य म्हणजे 'सन १९८४ मध्ये महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ पुणेचे, नाशिक विभागासाठी ओझर येथे कार्यालय सुरु झाले.'[१०] यांमुळे या कालखंडात द्राक्ष लागवडीखालील क्षेत्र वाढलेले दिसून येते. तसेच स्थानिक बाजारपेठेत द्राक्षाची मागणी वाढलेली दिसून येते.

५. सन १९९१ ते २०००:

या कालखंडात निफाड तालुक्यात द्राक्ष लागवडीखालील प्रचंड क्षेत्र वाढलेले दिसून येते. 'ते सन १९९९-२००० या वर्षी द्राक्ष लागवडीखालील क्षेत्र ७७८३ हेक्टर होते.'[११] या अगोदर इतक्या मोठ्या प्रमाणात द्राक्ष लागवडीखालील क्षेत्र वाढलेले दिसून नाही. याचे कारण म्हणजे तालुक्यातील पिंपळगाव बसवंत (१९५९) येथील कांदा व द्राक्ष कृषी संशोधन केंद्र व महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ पुणेचे, नाशिक विभागासाठी ओझर (सन १९८४) येथे सुरु झालेले कार्यालय होय. या द्राक्ष पिकाच्या संदर्भातील संशोधन केंद्रांनी तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकरी वर्गाला योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण दिले. तसेच रासायनिक खतांचा पुरवठा केला. त्यामुळे पिकाचे उत्पादन वाढले. तसेच याचा कालखंडात कृषी सेवा केंद्रे, खाजगी रासायनिक खतांच्या दुकानांची संख्या वाढली. त्याचप्रमाणे शेतीच्या आधुनिक साधनांच्या व अवजारांचा वापर वाढला. याचाच परिणाम म्हणजे या कालखंडात द्राक्ष पिकाचे लागवडीखालील क्षेत्र व उत्पादन वाढले. 'सन १९९२ च्या पशुगणना अहवालानुसार तालुक्यात ट्रॅक्टर २१६३ तर बैलांच्या सहाय्याने ओढली जाणारे लोखंडी नांगर ३६९१ होते.'[१२] म्हणजेच या कालखंडात या शेती साधनांची संख्या वाढलेली दिसून येते.

६. सन २००१ ते २०१०:

विसाव्या शतकाची तुलना करता एकविसाव्या शतकात द्राक्ष शेतीच्या लागवडीखालील क्षेत्रात व उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. 'सन २००८-२००९ या कालखंडात द्राक्ष लागवडीखालील क्षेत्र १५०३७ हेक्टर होते.'[१३] मागील दहा वर्षाची तुलना करता या काळात द्राक्ष शेतीच्या लागवडीखालील क्षेत्रात व उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. या काळात ठिंबक सिंचनाचा अधिक वापर, ग्रीनहाऊस तंत्रज्ञान, वाईन उद्योग, प्रक्रिया उद्योगाशी संलग्नता वाढली. त्यामुळे द्राक्ष शेतीचा मोठ्या प्रमाणात विकास झाला.

७. सन २०१० ते २०२०:

या कालखंडात द्राक्ष शेतीसाठी सर्व सुविधा तालुक्यात होत्या त्यामुळे उत्पादन व लागवडीखालील क्षेत्र वाढले. 'सन २०२० साली द्राक्ष शेतीचे लागवडीखालील क्षेत्र हे २३११७ हेक्टर इतके होते.'[१४] मागील दहा वर्षाची तुलना करता या काळात ते ८ हजार हेक्टरने वाढले. या मागील कारण म्हणजे शेतकऱ्यांना पतपुरवठा करणाऱ्या संस्थांची तालुक्यात झालेली वाढ होय.

द्राक्ष शेतीचे सामाजिक परिणाम:

१. 'राहणीमानात सुधारणा:

द्राक्ष उत्पादन व निर्यातीपासून मिळणाऱ्या पैश्यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे रहाणीमान उंचावले. त्यांच्या सर्व गरजा सहज पूर्ण होवू लागल्या. त्यांच्या निवास्थानामध्ये बदल घडून आला. कच्च्या घराच्या जागी पक्की सिमेंटच्या घरात राहू लागले. आधुनिक घरगुती उपकरणे, मोबाईल, इंटरनेट यांचा वापर वाढला. आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळे समाजात मान - सन्मान व प्रतिष्टा वाढली. तसेच स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

२. शिक्षणाचा प्रसार:

द्राक्ष शेतीने आर्थिक पाठबळ मिळाल्यामुळे आपल्या मुलांना चांगल्या प्रकारचे तांत्रिक शिक्षण मिळावे म्हणून तालुक्यातील शेतकरी मुलांना शहरात शिक्षणासाठी पाठवू लागले. त्यामुळे तालुक्यातील शिक्षणाचा स्तर उंचावला. तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे जीवन अधिक सुखी, आधुनिक व सुरक्षित झाले. उच्च शिक्षणामुळे त्यांच्या राहणीमानात सकारात्मक बदल झाला.

३. ग्रामीण समाजरचनेत बदल:

तालुक्यात मोठे द्राक्ष बागायतदार, मध्यम व लहान बागायतदार असा स्तर तयार झाला. द्राक्ष शेतीच्या उत्पन्नावर आधारित सामाजिक स्थान ठरू लागले. तालुक्यात इतर तालुक्यातील मजूर द्राक्ष कामासाठी येत असल्याने लोकसंख्येत वाढ झाली व नवीन सामाजिक ओळखी झाल्या. आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळे कुटुंबाची स्वतंत्र राहण्याची प्रवृत्ती वाढली. द्राक्ष शेतीतील कामात सक्रीय सहभागामुळे महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारली. रोजगार निर्माण झाला. त्यांच्या निर्णयाला सन्मान मिळू लागला. उच्च शिक्षण घेण्यासाठी मुले नाशिक, पुणे, मुंबई यांसारख्या शहरात जावू लागली.

१. **महिलांचा सहभाग:** द्राक्ष शेतीच्या कामात महिलांचा सहभाग वाढला. छाटणी, तोडणी, फवारणी, वर्गीकरण, पॅकिंग यांसारख्या कामात त्यांची भूमिका महत्वाची ठरू लागली. तालुक्यातील कोल्ड स्टोरेज, बेदाणा उद्योग, इतर प्रक्रिया उद्योगांमुळे त्यांना रोजगार मिळाला. त्यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्या. त्यांच्या आर्थिक स्वावलंबनामुळे त्याचे सामाजिक स्थान उंचावले.

२. **स्थलांतरण व कामगार वर्ग:** द्राक्ष छाटणी व पॅकिंग यांसारख्या कामांसाठी इतर तालुक्यातून कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत झाला. तसचे काही कामगार वर्ग बाहेरील जिल्ह्यातून, राज्यातून कामासाठी आला. काही कामगार वर्ग येथेच रहिवासी झाला. त्यामुळे तालुक्याच्या लोकसंख्येत वाढ झाली. या कामगारांसाठी द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी राहण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात सोयी निर्माण करून दिल्या.

३. **सामाजिक तणाव व समस्या:** तालुक्यात मोठे द्राक्ष बागायतदार व लहान बागायतदार असा सामाजिक स्तर निर्माण झाला. त्यामुळे सामाजिक तणाव निर्माण होवू लागला. द्राक्ष शेतीला मोठ्या प्रमाणात पाणी लागते. पाण्याच्या वाटपासाठी दोन गटात वाद तयार होवू लागले. त्यामुळे सामाजिक स्वास्थ बिगडले. बाहेरील तालुक्यातून, जिल्ह्यातून, राज्यातून येणारे मजुरांमुळे स्थानिक मजुरात मजुरीवरून तणाव निर्माण झाला. द्राक्ष शेती ही खर्चिक असल्याने द्राक्ष पिकाचा बाजारभाव पडल्यास द्राक्ष बागायतदार आर्थिक संकटात सापडतात. त्यामुळे त्यांच्या परिवाराला व त्यांना मानसिक तणावाला सामोरे जावे लागते. द्राक्ष पिकला फवारणी लागते. फवारणी करत असतांना औषधातील रासायनिक घटकांचा परिणाम त्यांच्या शरीरावर होता असतो. त्यामुळे घातक शारीरिक परिणाम होण्याची संभावना असते. त्यामुळे हा पण एक प्रकारचा तणाव निर्माण होतो. म्हणजेच असे दिसून येते की, तालुक्यात द्राक्ष शेतीमुळे द्राक्ष बागायतदारांची आर्थिक परिस्थिती सुधारली परंतु सामाजिक तणाव, विषमता या समस्या निर्माण झाल्या.'[१५]

द्राक्ष शेतीचे आर्थिक परिणाम:

१. 'शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले:

द्राक्ष पिक हे रोख पैसा मिळवून देणारे पिक आहे. या पिकामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची उत्पन्न वाढले. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली.

२. कृषी पूरक उद्योग (पार्किंग, वाहतूक, कोल्ड स्टोरेज):

द्राक्ष शेतीमुळे अनेक कृषीपूरक उद्योग तालुक्यात निर्माण झाले. जसे की द्राक्ष वाहतूक करण्यासाठी वाहतुकीच्या साधनांची गरज असते. त्यामुळे हा द्राक्ष वाहतुकीचा व्यवसायच तयार झाला. त्याचप्रमाणे द्राक्ष विक्रीसाठी घेवून येणाऱ्या साधनांची पार्किंग करणे त्यातून पार्किंग व्यवसाय विकसित झाला. तसेच निफाड तालुका द्राक्ष उत्पादनाचा प्रमुख भाग असल्यामुळे कोल्ड स्टोरेज सुविधा द्राक्ष पिकाचा दर्जा ठरविण्यासाठी खूप महत्वाची असते. खऱ्या अर्थाने ही सुविधा तालुक्यात सन १९९५ नंतर अधिक विकसित झाली. हा एक प्रकारचा व्यवसायच होता. तसेच तालुक्यात इतर अनेक द्राक्ष प्रक्रिया उद्योग विकसित झाले. तालुक्यात विंचूर येथे वाईन उद्योग विकसित झाला. येथील वाईनला विदेशात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. या वाईन उद्योगामुळे अनेकांना नोकरीची संधी तयार झाली. तसेच तालुक्यात बेदाणा उद्योग मोठ्या प्रमाणात विकसित झाला. निफाड, कसबे सुकेना, उगाव, खेडे, खडक माळेगाव, विंचूर या ठिकाणी हा उद्योग मोठ्या प्रमाणात चालत आहे.

३. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती:

निफाड तालुका हा द्राक्ष पिकासाठी प्रसिद्ध तालुका आहे. तालुक्यात द्राक्ष शेतीमुळे फक्त शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल नाही तर रोजगाराच्या संधीही निर्माण झाल्या. द्राक्ष पिकाची लागवड, छाटणी, फवारणी, खत व्यवस्थापन, द्राक्ष काढणी यासाठी तालुक्यातील व तालुक्याबाहेरील मजुरांना रोजगार मिळाला. द्राक्ष पिकासाठी सल्लगार, माती व पाणी विश्लेषक, गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक यांची आवश्यकता असल्यामुळे या तांत्रिक कर्मचारी वर्गाला रोजगार मिळाला. तसेच द्राक्ष पिकाचे पॅकिंग व ग्रेडिंग खूप महत्वाची प्रक्रिया असते. यासाठी कुशल मनुष्यबळ हवे असते. त्यामुळे येथेही अनेकांना रोजगार मिळाला. द्राक्ष पिकाची वाहतूक हा खूप महत्वाचा भाग असतो. कारण हे पिक अतिशय नाजूक असल्यामुळे वाहतूक खूप काळजीपूर्वक करावी लागते. त्यामुळे येथे वाहतूकदारांना रोजगार मिळाला.

४. महिलांच्या आर्थिक परिस्थिती सुधारणा:

द्राक्ष शेतीमध्ये महिलांचा सहभाग वाढलेला दिसून येतो. द्राक्ष छाटणी, काढणी,पॅकिंग यांमध्ये शेतकरी महिलांचा सक्रीय सहभाग दिसून येतो. तसेच तालुक्यातील बेदाणे उद्योगात सर्वाधिक महिलाच असतात. द्राक्ष शेतीच्या या कामांमुळे त्यांना चांगला रोजगार प्राप्त झाला. परिणामी महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारली.'[१६]

निष्कर्ष:

निफाड तालुक्यातील द्राक्ष शेतीचा प्रवास कालानुक्रमिक बघत असतांना असे दिसून येत की,

१. द्राक्ष शेतीचे लागवडीखालील क्षेत्र हे दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे .
२. तालुक्यातील प्रयोगशील व मेहनती शेतकरी, मजूर, सिंचन सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, वाहतूक साधनांचा विकास, संशोधन केंद्रे इत्यादी घटकांमुळे द्राक्ष शेतीच्या विकास शक्य झाला.
३. तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारली. परंतु कर्जबाजारीपण, सामाजिक विषमता, बाजारभाव यांसारख्या समस्या तयार झाल्या.

संदर्भग्रंथ :

१. https://mpkv.ac.in/Research/ReserchPlianZone.

२. कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगांव, चौथा वार्षिक अहवाल, सन १९५२-१९५३, पृ.०६.
३. निफाड तहसील, कृषी विभाग, ता. निफाड, जि. नाशिक कार्यालयातून माहितीचे संकलन.
४. जेऊघाले के. के., द्राक्षांची लागवड, संवर्धन व विक्री, निफाड तालुका परंपरा व विकास विशेष, देशदूत २२ मार्च २०००, पृ.०५.
५. पवार अनिल, नाशिकचा कृषिविकास, महाराष्ट्र टाइम्य, १ जुलै, २०१८.
६. https://mpkv.ac.in/Research/ReserchPlian Zone.
७. कांदा व द्राक्ष कृषी संशोधन केंद्र, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक, येथून माहिती संकलन.
८. Season Crop Report of Nashik District, 1969-1970.
९. नाशिक जिल्हा, सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, सन १९७९-१९८०
१०. https://mpkv.ac.in/Research/ReserchPlian Zone.
११. नाशिक जिल्हा, सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, सन १९९९-२०००.
१२. पशुगणना अहवाल, सन १९९२.
१३. नाशिक जिल्हा, सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, सन २००८-२००९
१४. कृषी आयुक्तालय पुणे, जिल्हा ऋतू व पिके अहवाल, सन २०२०.
१५. निफाड तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांकडून माहितीचे संकलन.
१६. निफाड तालुका सर्वेक्षणद्वारे माहितीचे संकलन.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

कोल्हापूरच्या चित्रकला परंपरेत दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूटचे योगदान

प्रियांका राजाराम पाटील

संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Corresponding Author - प्रियांका राजाराम पाटील

DOI - 10.5281/zenodo.19692966

प्रस्तावना:

कोल्हापूरच्या चित्रकलेला समृद्ध परंपरा आहे. तिचा एक स्वतंत्र पोत आणि शैली आहे. कोल्हापूरच्या चित्रकलेचे संदर्भ काही शतकांपूर्वीही आढळतात. कोल्हापूरमध्ये बाराव्या शतकाच्या दरम्यान दगड ताम्रपटावर काही दृश्य चित्रांच्या माध्यमातून टोकदार हत्याराने कोरली गेली. म्हणजे कोल्हापुरात चित्रकला ही संकल्पना पूर्वीपासून अस्तित्वात होती. शिवाय त्या काळात कसलेले चित्रकारही होते हे सिद्ध होते. कोल्हापूरच्या लक्ष्मी जैन मठामध्ये प्राचीन ग्रंथाचा खजिना संग्रहित केला आहे. त्यामध्ये ६०० ते ७०० वर्षांपूर्वीचे ग्रंथ भूर्जपत्रावर, ताम्रपटावर लिहिलेले पाहायला मिळतात. त्यामध्ये धर्मशास्त्रावरील ग्रंथ, शिल्पशास्त्रावरील ग्रंथ, त्याच्या मूळ हस्तलिखित प्रती आहेत. त्या भूर्जपत्राच्या ग्रंथावर मजकुरांसोबत संबंधित विषयाची चित्रे असलेली पाहायला मिळतात. ही चित्रकलेची सुरुवात म्हणता येईल. ही चित्रे बाळबोध अवस्थेतील आहेत. ही चित्रकला पुढे विकसित झाल्याचे दिसते. वरील हस्तलिखित ग्रंथांमध्ये मांडलेला विषय अधिक ठळकपणे समजावा यासाठी चित्रांचा उपयोग केला जाई. परंतु, ही चित्रे काढणाऱ्या चित्रकारांची नावे कुठेही उपलब्ध नाहीत. पण, त्या काळात अशी चित्रे रेखाटून तो विषय जास्त ठळकपणे लोकांपर्यंत पोहोचवला गेला.[१]

तेराव्या शतकात दाजीबा जोशींनी करवीर माहात्म्य लिहिले. पण, त्याचं वाचन करणे हे सामान्य लोकांसमोर मोठे आव्हान होते. सर्वसामान्यांना त्याचं आकलन व्हावं यासाठी त्यामधील प्रत्येक अध्यायातील कथा चित्ररूपात आणण्यासाठी चित्रे काढणाऱ्या एखाद्या व्यक्तीला बोलावले जात असे. त्याला कथा सांगितली जात असे. त्यानुसार ती व्यक्ती स्वतःच्या कल्पनेनुसार चित्रे रेखाटत असे. अश्याप्रकारे प्रत्येक अध्यायाचे वर्णन करणारी चित्रे सर्वप्रथम निर्माण झाली. त्यात ही चित्रे कोल्हापुरात करवीर महात्म्य, केदार विजय, लक्ष्मी विजय या ग्रंथांमधून निर्माण झाली.त्याचबरोबर आयुर्वेदाचे कोष निर्माण झाले. कोल्हापुरात दुधगावकर वैद्य यांसारखे राजवैद्य होते. आयुर्वेद शिकवणारी गुरुकुले होती. त्यात चरकसंहिता शिकवताना गुरुजी ती पोथी शिष्यांना सांगायचे. शिष्य ते हाताने उतरून काढायचे. ही हस्तलिखिते गुरुजनाच्या घरीच राहायची. गुरुजींच्या निधनानंतर ही हस्तलिखिते शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरने संग्रहित करून स्वतंत्र हस्तलिखित विभाग सुरू केला. त्या हस्तलिखितांमध्ये वनस्पतींची माहिती दाखविणारी जी रेखाचित्रे आहेत. ती म्हणजे चित्रकलेचे मूळ म्हणता येईल. त्यातूनच पुढे निसर्गचित्रे,

व्यक्तिचित्रे या संकल्पना आल्या. व्यक्त चित्रांमध्ये त्याकाळी देवी देवता, राक्षस, सामान्य जनता हे कल्पकतेने साकारलेले पाहायला मिळते.[२]

एकूणच कोल्हापुरात चित्रकला शेकडो वर्षापासून अस्तित्वात आहे. विविध धर्म, परकीय आक्रमणातून शैली बदलत राहिली. नवनवीन बदल स्वीकारत वेगवेगळ्या रूपात चित्रकला बहरत आलेली लक्षात येते.

ब्रिटिशांनी भारतात सत्ता स्थिर केल्यानंतर त्यांना भारतावर पाश्चात्त्य संस्कार करणे गरजेचे वाटू लागले. त्याप्रमाणे येथील प्रत्येक गोष्टीवर आपापल्या पद्धतीने पाश्चात्त्य विचार रुजविण्यास सुरुवात केली. त्यासाठी सर्वप्रथम इंग्रजांनी येथील धर्म, प्रशासन, राहणीमान, शिक्षण, कला, संस्कृती यावर प्रयोग केल्याचे दिसून येते. पहिल्या टप्प्यात त्यांनी धर्मशिक्षण देणारे शिक्षण, सैनिक तयार करणारे शिक्षक आणले. हळूहळू काही विशिष्ट कला प्रकारातील कलाकार, अधिकारी आणायला सुरुवात केली. दरम्यान, हिंदुस्तानमध्ये स्वातंत्र्याचा लढा तीव्र होत होता. त्याला काही प्रमाणात यशही मिळत होते. भारतीयांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना रुजत होती, तर दुसरीकडे सुधारणेच्या नावाखाली इंग्रज भारतीयांना काही सुविधा उपलब्ध करून देत होते. त्यामध्ये सतीप्रथा बंदी, ठगांचा बंदोबस्त, नरबळी प्रथाबंदी यांसारख्या अनिष्ट प्रथांना आळा घातला गेला. शिक्षणाची व्यवस्था करून सामाजिक, शैक्षणिक सुधारणांना बळ देत होते. त्यामध्ये ब्रिटिशांनी १८५६ मध्ये ब्रिटनहून उत्तम प्रतीचे आर्टिस्ट आणले. आणि मुंबईमध्ये जे. जे. स्कूल ऑफ आर्टची स्थापना केली. यालाच 'कंपनी स्कूल' असेही म्हटले जाते. अशा रीतीने भारतात कला शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली. साहजिकच पाश्चात्त्य शिक्षणाला भारतात प्रवेश मिळाला. एक नवीन ब्रिटिश कला प्रणालीची खऱ्या अर्थाने तंत्रशुद्ध शिक्षण पद्धती सुरू झाली. 'आभासात्मक वास्तववाद' हे या निर्मिती प्रणालीचे वैशिष्ट्य होते. जे जे स्कूल ऑफ आर्टमध्ये आऊटलाइन ते रंगलेपण यांचे तंत्रशुद्ध शिक्षण देण्यासाठी सालोमन, हॅवेल, लोकवूड, विपलींग, ग्लंडस्टोन असे परदेशी चित्रकार चित्रकलेचे शिक्षक म्हणून आले होते.[३]

१८५० च्या दरम्यान कोल्हापुरात कलाकुसरीचे काम करणारी कारागीर मंडळी होती. त्यात काही परंपरावादी कारागीर घराणीही होती. गुजरीसारखी सोने-चांदीचे सुंदर दागिने तयार करणारी कलापेठ होती. खेड्यापाड्यांत १२ बलुतेदार, १८ अलूतेदार आपापल्या लोककलेच्या माध्यमातून समाजाची सेवा बजावत होते. कारागीर शहरांमध्येही आपली कामे करत होते. कोल्हापूरच्या कलापरंपरेमधील एक जातिवंत कारागीर म्हणजे भिवा सुतार होय. भिवा सुतार हे कुरुंदवाड या संस्थानातील होते. त्यांनी कोणत्याही शाळेत चित्रकलेचे धडे गिरवले नाहीत. त्यांच्याजवळ उपजतच कला होती. मात्र, ते मुंबईला कामानिमित्त गेले असता एका युरोपियन चित्रकाराचे मार्गदर्शन त्यांना मिळाले. त्यांनी लाकूड, हस्तीदंती, संगमरवर, दगडांवर कोरीव काम करून कला सादर केली. कलामूल्यांच्या जवळ जाणाऱ्या या कलावस्तू किंवा शिल्प प्रतिमा उल्लेखनीय ठरल्या. भिवा सुतार तैलरंगातही उत्कृष्ट काम करीत होते. परंतु, त्यांचे एकही चित्र आज पाहायला मिळत नाही.[४]

कोल्हापूरच्या कलापरंपरेत भिवा सुतार बरोबरच आबालाल रेहमान, त्रिंदाद, रावबहादुर, माधवराव धुरंधर, पेस्तनजी बोमनजी या चित्रकारांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. चित्रकलेतील विविध कलाशैली आत्मसात करून कोल्हापूरचे नाव जगभरात नावारूपास आणले. आबालाल रेहमान यांनी संपूर्ण पिढीचे चित्रकलेचे काम एकट्याने केल्याचे दिसून येते. या चित्रकारांनी रेखाटलेली चित्रे जगभरातील नामांकित चित्रकार टर्नर, सिसले, कोरो इत्यादींच्या तोडीची असल्याची दिसते. कोल्हापूरचे

आबालाल रेहमान यांच्या चित्र समूहाला जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये विद्यार्थी दशेत असताना व्हाईसरॉय सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले. आबालाल रेहमान तसेच इतर कलावंतांना कोल्हापूरच्या समृद्ध निसर्गाने असंख्य विषय उपलब्ध करून दिले. त्यामुळे त्यांच्या हातून उच्च दर्जाची कला निर्मिती होऊ शकली. कोल्हापूरची ही कला जागतिक स्तरावर कौतुकास पात्र ठरली आहे. पुढे जे. जे. आर्ट ऑफ स्कूल,मुंबई येथे पाश्चात्त्य कलासंस्थेत वास्तववादी चित्रकलेचे शिक्षण दिले जाऊ लागले. आबालाल रेहमान, धुरंधर, दत्तोबा दळवी यांसारखे दिग्गज कलाकार शिकले. परंतु, कलेची जाण व कौशल्य उपजतच असणारे हे चित्रकार आपली मूळ कोल्हापूरच्या कलाशैलीशी एकनिष्ठ राहिले.[५]

इ. स. १८९४ ला कोल्हापूरच्या गादीवर छत्रपती शाहू महाराज आले. त्यांनाही कोल्हापुरातील विविध कलांबद्दल प्रेम, जिव्हाळा होता. चित्रकला, संगीत, नाट्य, शिल्पकला इत्यादी कला कोल्हापूरमध्ये वाढीस लागाव्यात, त्या समृद्ध व्हाव्यात म्हणून त्यांना बळ देण्यासाठी विविध ठिकाणाहून कलाकारांना आमंत्रित करून राजाश्रय दिला तसेच कोल्हापुरातील कलावंतांनाही राजाश्रय देऊन त्यांना विविध सुविधा पुरविल्या. कलाकारांना शिष्य परंपरा निर्माण करण्याची मुभा दिली. राजर्षी शाहू महाराजांच्या या सांस्कृतिक क्रांतीने कोल्हापूरला भारतभर तसेच भारताबाहेरही कीर्ती मिळवून दिली. आणि कलेचे माहेरघर असणारे कोल्हापूर हे शाहू काळापासूनच कलानगरी बनले. छत्रपती शाहू महाराजांनी दिलेल्या राजाश्रयामुळे हा काळ चित्रकलेसाठी तारुण्यावस्थेतील बनला. प्राचीन वास्तू व चित्रे, शिल्पवैभव यावरून कोल्हापूरच्या कलेचा इतिहास मोठा असल्याचे सिद्ध होतेच. पण, शाहू महाराजांच्या उदार राजाश्रयामुळे कोल्हापूर कलेचे माहेरघर बनले. शाहू महाराजांच्या उदारमतवादी धोरणामुळे येथे कलेविषयी रुची वाढू लागली. पाश्चात्त्य कलाशिक्षण तंत्राचा प्रभाव इथल्या कलाकारांवर पडत होता. पाश्चात्त्य वास्तववादी कलेचे अनुकरण येथील कलाकार करत होते. नव्या विचारप्रणालीमुळे नव्या पद्धतीच्या चित्रपरंपरेच्या शिक्षणामुळे देशी कला प्रभावित झाल्या. सन १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धाच्या वेळी राजर्षी शाहूंच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक चळवळींनी तळागाळातील लोकांना जाग आली. त्याला महात्मा फुलेंच्या कार्याची पार्श्वभूमी मिळाली. कलेला आणि कलावंतांना चांगले दिवस येऊ लागले. मराठी रंगभूमी संपन्न झाली तसेच चित्रपटसृष्टीची सुरुवात झाली. नव्या विचाराने अनेक चळवळी उभारल्या. अनेक क्रांतिकारकांनी स्वातंत्र्याची भावना मांडायला सुरुवात केली होती. तत्पूर्वी कोल्हापूरमध्ये परंपरेने कलाकुसरीची कामे करणारी कारागीर घराणी होती. या घराण्याचा जाणीवपूर्वक शोध घेऊन शाहू महाराजांनी संस्थानाच्या वतीने त्यांना भरघोस मदत देण्याचे धोरण अवलंबिले. त्यामुळे कलाकारांना प्रोत्साहन मिळून कोल्हापुरातील विविध कला समृद्ध झाल्या.[६]

राजर्षी शाहू महाराजांची कलेची आवड, दूरदृष्टी, उदार राजाश्रय, शिकवणीची व शिष्य परंपरा निर्माण करण्याची कलाकारांना दिलेली मुभा यामुळे कोल्हापूरच्या मातीने अनेक महान कलावंतांना संधी दिली. शाहूकाळात खऱ्या अर्थाने सर्वधर्मसमभावाची अनेक उदाहरणे प्रत्ययास येतात. या काळात कलेला कोणताही जात, धर्म नव्हता. कलाकार कोणत्या जातीत जन्मला यापेक्षा त्याच्या अंगी असलेल्या कलागुणांमुळे तो श्रेष्ठ ठरत होता. त्यामुळेच विविध जातींच्या चित्रकारांनी रेखाटलेल्या चित्रांमध्ये एकात्मभाव दिसतो. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधील शिक्षणाने कोल्हापूरची चित्रकला संस्कारीत झाली खरी. पण, तरीही येथील काही कलावंतांनी आपली उपजत कलाशैली कायम ठेवली. शाहू महाराजांचा राजाश्रय

असला तरी कलेला तंत्र, माध्यम, परंपरा विकसित झालेल्या पाहायला मिळतात. कोल्हापुरातील कलाकारांनी ब्रिटिश वास्तववादी चित्रकला शिक्षणाची कास धरली तरी भारतीय चित्रकलेतील रेषांचे महत्त्व कायम ठेवलेले दिसून येते. त्यांनी महाराष्ट्रातील निसर्ग, मानवी जीवनातील दैनंदिन प्रसंग, सणा-समारंभाचे प्रसंग, व्यक्तिरेखाटनाला आपल्या चित्र विषयांमध्ये प्राधान्य दिल्याचे आढळते. नव्या विचार प्रणालीचा संस्कार घेऊन पाश्चिमात्य ढंगाची चित्रकला तयार होणे हे या काळाचे योगदान म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

ब्रिटिश काळात नवी संस्थाने उदयाला आल्यामुळे कलावंतांना राजाश्रय मिळाला. नवीन कारागीर विविध क्षेत्रात उदयाला आले. कोल्हापूरच्या माणसांमध्ये मुळातच कलेविषयी अपार प्रेम होते. शिवाय कोल्हापुरात कलेची परंपरा चालत आलेली होती. येथील कलाकारांमध्ये कर्तबगारी व प्रतिभाशक्ती असल्यामुळे स्वतःच्या हुशारीने त्यांनी नव्या शैली आत्मसात केल्या. त्यातच कोल्हापूरचा निसर्ग समृद्ध असल्यामुळे कलावंतांना अनायासे चित्रकलेसाठी सर्व पूरक गोष्टी मिळत गेल्या. त्यामुळे स्वातंत्रोत्तर काळातही कोल्हापुरातील कलापरंपरा अखंडपणे पुढे नेण्यामध्ये येथील कलाकार आणि कला संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. या कला संस्थांमध्ये दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूटचे नाव अग्रकमाने घ्यावे लागेल.

दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूटची स्थापना:

व्यक्तीमधील कलागुण ओळखून त्यांना प्रोत्साहन देत राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुरात महान कलाकारांची पिढी घडविली. प्रसिद्ध चित्रकार कै. दत्तोबा दळवी हे त्यातीलच एक महत्त्वाचे नाव. कलातपस्वी आबालाल रेहमान यांच्यापासून प्रेरणा घेतलेल्या दत्तोबा दळवी यांनी 'जे. जे. कला महाविद्यालय' या प्रतिष्ठीत संस्थेत कलाशिक्षण घेतले. रेखाटनावर प्रभुत्व असलेल्या दत्तोबा दळवी यांनी शेकडो चित्रांची निर्मिती केली.

चौथीपर्यंत दत्तोबा दळवी यांचे शिक्षण झाले. जुना बुधवार पेठेत घर असल्याने ब्रह्मपुरी टेकडीवर ते फिरायला जात. त्या वेळी तेथे आबालाल रेहमान चित्र रेखाटण्यासाठी येत असत. त्यांच्या चित्रांचा श्री. दळवी यांच्या मनावर खोल परिणाम झाला. यातून ते चित्रकलेकडे वळले. बुरूड गल्लीत बाबूराव पेंटरांचे बंधू आनंदराव पेंटर राहत. त्यांच्या सहवासात दळवी यांचा चित्रकलेबद्दलचा ओढा अधिकच वाढला. चित्रकलेसाठी राजा रविवर्मा व आबालाल रेहमान यांची चित्रे दत्तोबा दळवी अभ्यासत. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये दत्तोबा दळवी हट्टाने शिकण्यास आले आहेत. त्याचे राजर्षी शाहू महाराजांना आश्चर्य वाटले. दत्तोबा दळवी मुंबईतील बाले हाउसमध्ये राहत होते.राजर्षी शाहू महाराजांनी तेथील इंग्रज अधिकाऱ्यांशी थेट संपर्क करून दळवींना कोल्हापूरला थेट आपल्या राजवाड्यात आणले आणि त्यांना रंग-साहित्य पुरविले. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे संस्कार त्यांच्यावर झाले. दत्तोबा दळवी राजवाड्यात राहूनच संस्थानाचे कामकाज, शिष्टाचार शिकले. दळवी यांनी चित्रकलेतील कौशल्याचा अल्पावधीतच प्रत्यय दाखविण्यास सुरवात केली. हळूहळू दत्तोबा दळवी सिंध, सक्कर, इंदौर, नेपाळ,बडोदा, ग्वाल्हेर या संस्थांसाठी कोल्हापूर राज्याचा आर्ट रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून काम करू लागले. असे दत्तोबा दळवी यांचे नातू अजेय दळवी यांनी आपल्या मुलाखतीतून सांगितले.

दरबारी चित्रकार म्हणून दळवी यांचा तेव्हा लौकिक होता. त्यांनी जिद्दीने कलेची साधना केली. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये त्यांनी तेव्हाचे विख्यात कलाशिक्षक तासकर व गणपतराव केदारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतले. याशिवाय सेसिल बर्न्स, रा. ब. धुरंदर,

आगासकर व त्रिंदाद यासारख्या नामवंत कलाकारांनीही त्यांना चित्रकलेचे धडे दिले.

अनेक मुले-मुली कलाशिक्षणासाठी दळवी यांच्याकडे आग्रह करू लागली. शाहू महाराजांनी कलेच्या शिक्षणास प्रोत्साहन देऊन आपल्यावर जबाबदारी सोपवली आहे, याची जाणीव त्यांना होती. यातूनच या भागातील मुला-मुलींनी कलाशिक्षण द्यायचे, हे निश्चित केले. तेव्हा मुंबईत के. आर. केतकर यांनी 'केतकर आर्ट्स इन्स्टिट्यूट' सुरू केली होती. त्या संस्थेची माहिती घेऊन दळवी कोल्हापूरला आले. याबाबत शशिकिशोर चव्हाण, बाळ चव्हाण, माधवराव बागल, बाबूराव पेंटर, बाबा गजबर यांच्याशी चर्चा केली. यातूनच कोल्हापुरात आर्ट सोसायटी काढण्याचे ठरले. 'छत्रपती राजाराम आर्ट सोसायटी' या नावाने संस्था स्थापन केली. चित्रकलेला व्यासपीठ मिळाले. पुढे चित्रकलेचे पायाभूत शिक्षण देणारी संस्था काढावी, हा विचार पुढे आला. त्यासाठी दत्तोबा दळवींनी जुना बुधवार पेठेतील आपल्या घरीच चित्रकलेचे शिक्षण देणे सुरू केले. पुढे त्याचेच विस्तारीत रूप म्हणजे 'दळवीज् आर्ट अँड इन्स्टिट्यूट' होय. १९३३ मध्ये ही संस्था स्थापना केली. सर जे. जे. स्कूलचा पदविका कोर्स येथे सुरू करून गरीब विद्यार्थ्यांची सोय दत्तोबा दळवी यांनी केली.[७]

दत्तोबा दळवी यांनी विविध प्रकारांमध्ये चित्रनिर्मिती केली. त्यांच्या चित्रांतून निसर्ग व वास्तू यांचा अभ्यास दिसतो. शाहू महाराजांनी त्यांना कोलकत्याला पाठवून गोंदण्याची (टॅटू) कला शिकण्यासाठी जपानी कलाकाराकडे पाठविले होते. ते शिकल्यानंतर महाराजांनी वाड्यावरच्या स्त्रिया, नोकर व इनामदार यांच्या हातावर टॅटू काढण्यास सांगितले. दळवी यांनी यावेळी सुमारे ७००० स्त्रिया व ५००० पुरुषांनी आपल्या हातावर गोंदन काढल्याचे ते स्वतः माधवराव बागल यांना सांगतात.[८]

विद्यार्थी केंद्रित शिक्षणावर भर:

कलाशिक्षणाचा व्याप वाढल्यानंतर त्यांनी चित्रे फार रेखाटली नाहीत. मात्र, त्यांची जी काही चित्रे आहेत त्यातून त्यांच्या चित्रप्रतिभेची ओळख पटते. संस्थेत विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी विविध प्रकारातील चित्रे रंगवली. त्यावेळी परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना चित्रांचे नमुने मुंबईला पाठवावी लागत. या प्रक्रियेत ते विद्यार्थ्यांना मदत करत. त्यांच्या चित्रामध्ये सुधारणा सांगत. विद्यार्थ्यांचे कमी दर्जाचे चित्रही दळवी यांचे मार्गदर्शन लाभताच ते बदलून जाई. विद्यार्थ्यांना एका नव्या तंत्राची प्रचिती येई. विद्यार्थी केंद्रित शिक्षणावर त्यांचा भर होता.[९]

कलादिग्दर्शन, सेट्समध्ये अभिनव प्रयोग:

प्रभात फिल्म कंपनी पुण्याला स्थलांतरीत झाली. यामुळे भेंडे गल्लीतील वणकुद्रेंनी सम्राट फिल्म कंपनी सुरू केली. या कंपनीच्या माध्यमातून त्यांनी 'स्वर्ग' हा मराठी चित्रपट काढला. त्याचे कलादिग्दर्शक दत्तोबा दळवी होते. त्यांनी सेटसाठी केलेली असंख्य स्केचेस प्रसिद्ध झाली. अनेक नामवंत मंडळी पुण्या-मुंबईहून भव्य सेट्स पाहण्यासाठी कोल्हापूरला येऊन गेली. डिझाईनचे परिणाम साधण्यासाठी प्लॅस्टर ऑफ पॅरिसमधील डिझाईन्स मोल्ड करून आवश्यक त्या भागात लावण्याचे नवे तंत्र दळवी यांनी तयार केले.

दळवी कुटुंबीय आणि संस्था:

वडिलांच्या चित्रकलेचा वारसा जयसिंगराव दळवी यांनीही जोपासला. त्यांचे शिक्षणही जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये झाले. त्यांनी १९४५ ते १९४७ पर्यंत दळवीज् आर्ट अँड इन्स्टिट्यूटमध्येच कलाध्यापन केले. १९४८ मध्ये ते दिल्लीला गेले. तेथे त्यांनी इंटेरियर डिझायनर म्हणून फ्रिट व्हॉन ड्रायबर्ग या जर्मन तज्ज्ञाकडे काम केले. त्यानंतर

१९५१ मध्ये नाशिकला गेले व तेथे कला अध्यापन सुरू केले. तेथील बॉईज टाऊन स्कूलमध्ये त्यांनी १९६० अखेर अध्यापन केले. त्यांचा १९९२ मध्ये 'ऑल इंडिया आर्ट अँड क्राफ्ट सोसायटी'तर्फे (न्यू दिल्ली) तपस्वी कलावंत म्हणून सन्मान झाला. त्यांचा मुलगा अजेय दळवीज् आर्ट अँड इन्स्टिट्यूटचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. दत्तोबा दळवी ही वास्तववादी शैलीमध्ये कलानिर्मिती करत होते, तर जयसिंगराव दळवी यांची शैली नव अभिजातवादी होती. अजेय दळवी यांची शैली अमूर्त वादाकडे झुकणारी आहे. चित्रकलेचा आणि कला शिक्षणाचा वारसा दळवी कुटुंबाची तिसरी पिढी हा सक्षमपणे पुढे नेत आहे. जुना बुधवार पेठेला दळवी कुटुंबीयांनी एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. सध्या संस्था लक्ष्मीपुरी कोंडा ओळ, कोल्हापूर येथे कार्यरत आहे. दत्तोबा दळवी यांच्यानंतर प्राचार्य उषा वडेर, डॉ. नलिनी भागवत, मोहन सरनाईक, अंजली भोसले, शिवाजी शर्मा, प्राचार्य अस्मिता जगताप यांनी कला शिक्षणाचे कार्य आत्मीयतेने केले. संस्थेचे माजी अध्यक्ष पांडुरंग पाटील, कमल वसंतराव दळवी, संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार बाबासाहेब पाटील सरूडकर, प्राध्यापिका सरिता माने यांच्यासह ॲड. वसंतराव दळवी यांनी इन्स्टिट्यूटच्या प्रगतीत सक्रिय सहभाग घेतला.प्रा.अर्चना आंबिलढोक या आपले आजोबा दत्तोबा दळवी यांच्या वैचारिक पायावर आधारित सेवाभावी धोरणातून संस्थेच्या सचिव म्हणून योगदान देत आहेत.[१०]

शास्त्रशुद्ध कलाशिक्षण देणारी संस्था:

संस्थेचे प्राचार्य अजेय दळवी यांनी सांगितल्याप्रमाणे संपूर्ण दक्षिण महाराष्ट्रात या संस्थेला महत्त्वाचे स्थान असून, बदलत्या काळाबरोबर येथील विद्यार्थ्यांना सकस कला शिक्षण ही संस्था देते. दक्षिण महाराष्ट्रातील सर्वांत पहिली शास्त्रशुद्ध कलाशिक्षण देणारी संस्था म्हणून 'दळवीज् आर्ट अँड इन्स्टिट्यूट' सर्वपरिचित आहे. कलाशिक्षणासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा येथे आहेत. महाराष्ट्र कला संचालनालयातर्फे चालविले जाणारे मान्यताप्राप्त सर्व अभ्यासक्रम शिकविले जातात. फाउंडेशनच्या पहिल्या वर्षासाठी दहावी आणि इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो. कोणत्याही दृश्यकला शाखेला आवश्यक प्राथमिक कलाशिक्षण येथे दिले जाते. विद्यार्थ्यांची चित्रकलेतील अभिरुची विकसित करण्यासाठी हे ज्ञान उपयुक्त ठरते. चार वर्षांचा रंगकला व रेखाकला या विषयातील अभ्यासक्रम येथे आहे. ॲनिमेशनची आवड असणाऱ्यांना येथील चित्रकलेचे शिक्षण अत्यंत उपयुक्त आहे. संस्थेतील विद्यार्थ्यांनी आजवर अनेक स्पर्धांत पारितोषिके मिळविली आहेत. दिल्ली, बडोदा, हैदराबाद, पुणे, मुंबई आदी ठिकाणी विद्यार्थ्यांच्या कलाकृतीची प्रदर्शने भरविली आहेत. एटीडी अभ्यासक्रमानंतर तीन वर्षे शाळेत अध्यापनाचे काम केलेल्या शिक्षकांसाठी ए.एम. हा अभ्यासक्रमही येथे आहे. सुट्टीत असणाऱ्या या अभ्यासक्रमासाठी राज्यभरातून शिक्षक येतात. १९७७ पासून इंटिरिअर आर्किटेक्चर डिझाईन डिप्लोमा हा अर्धवेळ अभ्यासक्रमही शिकविला जातो. 'आर्ट अँड आयडियाज इन ऍडव्हर्टायझिंग' हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. येथे वैयक्तिक मार्गदर्शनावर भर दिला जाते. नामवंतांच्या कार्यशाळा, प्रात्यक्षिकांचे सादरीकरणाचे आयोजन केले जाते. पेंटिंग व इंटिरिअरची प्रदर्शने भरवली जातात. विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर वार्षिक पारितोषिके दिली जातात.

संस्थेचे नावाजलेले विद्यार्थी:

संस्थेत शिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी कला क्षेत्रात देशपातळीवर ठसा उमटवला आहे. एस ए एम काझी, व्यंकटेश माडगूळकर, भारतातील पहिल्या पी.एचडी.

करणाऱ्या स्त्री चित्रकर्ती डॉ. नलिनीताई भागवत, ज्येष्ठ चित्रकार प्राचार्य जी. एस. माजगावकर, बी. आर. टोपकर, मोहन सरनाईक, आर्किटेक्ट माधव राजाज्ञ, शिवाजी शर्मा, संपत नायकवडी, एस. निंबाळकर, चंद्रजित यादव, शिवाजी मस्के, संपत नायकवडी या दिग्गजांनी संस्थेचे नाव उंचावले आहे. आज संजीव संकपाळ, सागरनाथ गायकवाड, प्रकाश अथणे, प्रशांत जाधव, विजय टिपुगडे, कुलदीप पंडित, तानाजी अवघडे, सुरेंद्र कुडपणे, विवेक चंदालिया, पार्श्वनाथ नांद्रे, नागेश हंकारे, मदन माने, दिलीप रोकडे, सागर ढेकणे, मंगेश कुंभार, सत्यजित निगवेकर, ओंकार कोळेकर, अमित भिवधरणे, प्रतीक्षा वनभट्टे, दुर्गा आजगावकर, शुभम चेचर हे पारंपारिक चित्र, शिल्प, ग्राफिक कलेबरोबरच ॲनिमेशन, चित्रपट दिग्दर्शन तसेच उच्च शिक्षणात संशोधनात्मक कार्य करत आहेत.

कोल्हापुर विमानतळ आणि शाहू जन्मस्थळ वस्तुसंग्रहालयासाठी केतन पायमल, विवेक कवाळे, विजय उपाध्ये यांनी कोल्हापुरातील इतर अनेक मान्यवर ..तोडीचे आणि संग्रहालयाच्या योग्यतेचे काम केले आहे. कला संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या महाराष्ट्र राज्य कलाशिक्षण मंडळ मुंबई यांच्यामार्फत यावर्षी सांगली येथे प्रतिष्ठेचे राज्य कला प्रदर्शन झाले. यात दळवीज् आर्ट अँड इन्स्टिट्यूटमधील अभिजात कलेचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या १८ कलाकृतीचा यशस्वी सहभाग होता.

डिप्लोमा ड्रॉइंग अँड पेंटिंगमधील सोनम गोरल, संकेत सुतार, समर्थ भोसले, श्रुती साळुंखे तर ॲडव्हान्स ड्रॉइंग अँड पेंटिंगमधील विनायक रानमाळे, अवधूत माने - पोर्ट्रेट, संकेत शिंदे, श्रुती मानगावे, कृपाक्ष सुतार, इंटरमिजिएट ड्रॉइंग अँड पेंटिंगमधील वेदिका बनणे, कमलेश होगडे, ड्रॉइंग पेंटिंग नवीन अभ्यासक्रम प्रथम वर्षमधून स्वयम बिडकर, साद पट्टेकरी, मनिष मिस्त्री यांचा समावेश आहे. [११]

अभ्यासक्रमात नाविण्यपूर्णतेला प्राधान्य:

पाच वर्षाच्या जी.डी आर्ट या पदविकेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कलाकृती, नवीन एक वर्षाच्या म्हणजे दोन सत्राच्या फाउंडेशन प्रोग्रॅममधील तसेच नवीन ड्रॉइंग पेंटिंग या तीन वर्षाच्या अद्ययावत अभ्यासक्रमामधील पायाभूत कामकाजाची मांडणी केली आहे. जुन्या अभ्यासक्रमा प्रमाणेच युरोपातील अन्य महत्त्वाच्या दृश्य कला अभ्यासक्रमाचा अभ्यास करून तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने जागतिक पातळीवरील नवीन संकल्पनेनुसार ग्रेड, वेटेज संकल्पनेवर आधारित सेमिस्टर पद्धतीने अभ्यासक्रम पुनर्रचित केला आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार होणाऱ्या नव्या अभ्यासक्रमात शिक्षण घेणारे विद्यार्थी सकसपणे भारतीय संस्कृती आणि कलेचे प्रतिनिधित्व करू शकतील. भारतभरातील अन्य राज्ये आणि येथील विद्यापीठात तसेच युरोप, अमेरिकेत कलाशिक्षणासाठी पात्र होतील यासाठी शासनाने दूरगामी विचार करत, तज्ज्ञांकडून मार्गदर्शन आणि प्रशिक्षणातून नवा अभ्यासक्रम पुनर्रचित केला आहे. तीनही अभ्यासक्रम प्रत्यक्ष कृतीवर आधारित आहेत. कोल्हापूर शहर आणि परिसरातील दुर्गम भाग, उत्तर कर्नाटक तसेच तळ कोकणातील होतकरू विद्यार्थी संस्थेत अभिजात चित्रकलेचे शिक्षण घेत आहेत. असे प्राचार्य अजय दळवी यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले.

दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूटचे अन्य उपक्रम:

१) संस्थेअंतर्गत दरवर्षी वार्षिक प्रदर्शने शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे आयोजित केली जातात. त्याचबरोबर बंगळूर चित्रकला परिषद, दिल्ली ललित कला अकादमी येथेही चित्र प्रदर्शनी भरवली आहेत.

२) समूह प्रदर्शन अंतर्गत शाहूकालीन चित्रांवर मिनीचर पेंटिंग (भारतीय लघुचित्र शैली) प्रदर्शन भरवले. त्याचबरोबर ॲक्रेलिक माध्यमातून इतर प्रदर्शनेही राहुल स्मारक भवन कोल्हापूर येथे भरवली आहेत.

३) युनाते क्रिएशन या आर्ट फर्ममध्ये चित्रकारांना कलेबरोबरच चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्या अंतर्गत वेगवेगळे आर्ट फेस्टिवलमध्ये संयोजन मंडळ काम करते. युनाते क्रिएशनचा पहिल्या कार्यक्रमात लोकमततर्फे 'आपले बाप्पा' या कार्यक्रमासाठी विविध शाळांमध्ये इको फ्रेंडली गणपती तयार करण्याच्या कार्यशाळा झाल्या. यामध्ये दहा जणांच्या टीमने वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन मुलांसाठी कार्यशाळा घेतल्या. इको फ्रेंडली गणपती तयार करण्याचा कोल्हापुरातील हा पहिलाच उपक्रम होता.

४) बालकल्याण संकुलमध्ये दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये मुलांसाठी विविध शिबिरे आयोजित केली जातात. युनाते क्रिएशनमार्फत सेट डिझाइन्स, कला प्रदर्शन, फिल्म मेकिंग आणि सध्या डिझाइन्स आणि रिसर्चमध्ये काम केले जाते. यामुळे कलेसोबत इतर गोष्टींचे डॉक्युमेंटेशनही करण्याचे काम संस्था करत आहे.

५) आर्ट फेस्टिवल मध्ये बॅकग्राऊंड तयार करण्याबरोबरच त्याला विविध पद्धतींमध्ये कला सादर करण्यालाही तितकेच महत्त्व दिले गेले आहे. या कलेसोबतच कोल्हापूरचा इतिहास कसा आला याचे सेट डिझाईन केले. त्यासोबत त्याचे फिल्म मेकिंगही केले. या सर्वांचे डॉक्युमेंटेशन होणे गरजेचे होते. त्याला पुणे फेस्टिवल, पुणे इंटरनॅशनल फेस्टिवल, किर्लोस्कर वसुंधरा फिल्म फेस्टिवल अशा विविध फेस्टिवलमध्ये नामांकन मिळाले आहेत. आणि तो वारसा दळवीजच्या विद्यार्थ्यांकडे राहावा यासाठी पुढील टीम तयार करण्याचेही काम संस्था करत आहे.

६) 'हेल्पिंग हँड्स' या अंतर्गत ही दरवर्षी ३१ डिसेंबरला तरुण पिढीसाठी प्रबोधनपर उपक्रम राबवले जातात. यामध्ये विविध संस्था, तेथील मुलांसाठी विविध उपक्रम, पांजरपोळ यांसारख्या सामाजिक संस्थांना मदत असे उपक्रम राबवले जातात.

७) अँटीकरप्शन ब्युरो आणि विधीसेवा प्राधिकरण अंतर्गत प्रबोधनात्मक पोस्टर्स करण्याची ऑर्डरही संस्थेने पूर्ण केली. ती चित्रे सध्या कोल्हापुरातील जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयात पाहायला मिळतात.[१२]

निष्कर्ष:

१) ज्येष्ठ चित्रकार दत्तोबा दळवी यांनी दळवीज आर्ट अँड इन्स्टिट्यूट कोल्हापूरची स्थापना करून कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सातारा, सीमाभाग, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यातील चित्रकलेची आवड असणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांच्या चित्रकला शिक्षणाची व्यवस्था केली.

२) दत्तोबा दळवी यांचे चित्रकलेवर प्रभुत्व होते.पण संस्थेची जबाबदारी सांभाळताना त्यांना चित्रकलेकडे पुरेसे लक्ष देता आले नाही. त्यामुळे व्यक्तिगतरी दत्तोबा दळवी यांचे नुकसान झाल्याचे दिसते. तरी संस्था उत्तम रीतीने चालवल्यामुळे चित्रकला शिक्षणाचे धडे येथील विद्यार्थ्यांना गिरवता आले. त्यातून अनेक विद्यार्थी नावारूपास आले.

३) बऱ्याच संस्थांमध्ये संस्थापक किंवा प्रवर्तकानंतर त्या संस्थेचा व्याप सांभाळणारी पुढची पिढी सक्षम

असेलच असे नसते पण दत्तोबा दळवींनी आपल्या संस्थेची जबाबदारी सक्षमपणे सांभाळू शकेल अशी पुढची पिढी तयार केली. दळवी यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव जयसिंगराव दळवी आणि सध्या नातवंडे प्राचार्य अजेय दळवी आणि अर्चना आंबीलढोक हे ही परंपरा पुढे चालवत आहेत.

४) दळवीज आर्ट अँड इन्स्टिट्यूट मधून अनेक नामवंत विद्यार्थ्यांनी विविध चित्रकला प्रकारात नावलौकिक मिळवला. आणि त्यांचाच वारसा येथील आजी विद्यार्थीही पुढे चालवताना दिसतात.

५) दळवीज आर्ट अँड इन्स्टिट्यूट मध्ये पारंपारिक चित्रकला अभ्यासक्रमाबरोबरच नव्या शैक्षणिक धोरणानुसार व बदलत्या जागतिक प्रवाह नुसार अभ्यासक्रमाची पुनर्रचना केलेली दिसते. त्यामध्ये चित्रकलेची पूरक अन्य अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणामुळे चित्रकला, सेट डिझाईन, (कलादिग्दर्शन), चित्रपट दिग्दर्शन, संशोधन इत्यादी क्षेत्रांमध्ये विद्यार्थी काम करीत आहेत.

६) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या उदार राजाश्रयामुळे कोल्हापूर कलेचे माहेरघर बनले. कोल्हापूरच्या चित्रकला परंपरेला विस्तारित रूप मिळाले. हीच परंपरा येथील चित्रकारांनी स्वतःच्या स्वतंत्रशैलीसह पुढे सुरू ठेवण्याची दिसते.

यावरून कोल्हापूर स्कूलच्या चित्रकला परंपरा पुढे नेण्यामध्ये दळवीज आर्ट अँड इन्स्टिट्यूट चे योगदान मोलाचे आहे हे स्पष्ट होते.

संदर्भ:

१. मुलाखत, राणींगा उमाकांत, कार्यकारी अध्यक्ष, भारतीय इतिहास संकलन समिती, कोल्हापूर

२. उपरोक्त मुलाखत, राणींगा उमाकांत

३. राऊत राजू, लेखमाला, दै. लोकमत, कोल्हापूर, दि. १२ जानेवारी २०१८

४. भिडे ग. रं., देशपांडे पु. लं (संपा), कोल्हापूर दर्शन, इंटरनॅशनल पब्लिशिंग सर्विस, पुणे, प्रथमावृत्ती, २३ जानेवारी १९७१, पृष्ठ क्र. ३३२

५. जाधव श्यामकांत, कलातपस्वी आबालाल रेहमान, ऋतुगंध प्रकाशन, कोल्हापूर, २०१९, पृष्ठ क्र.२९

६. दळवी अजेय, छत्रपती शाहू काळातील चित्रकलेचा अभ्यास शोध, प्रबंधिका,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास सादर, २०१७-१८ पृष्ठ क्र. ८

७. जाधव श्यामकांत, रंग चित्रकारांचे, ऋतुगंध प्रकाशन, कोल्हापूर, डिसेंबर २००२ प्रथमावृत्ती

८. बागल माधवराव, कोल्हापूरचे कलावंत, प्रकाशक : मोरेश्वर हरी भाटवडेकर, मे १९६३, पृष्ठ क्र. ४०

९. मुलाखत, दळवी अजेय, प्राचार्य दळवीज् आर्ट अँड इन्स्टिट्यूट, कोल्हापूर

१०. उपरोक्त मुलाखत, दळवी अजेय

११. कलाप्रदर्शन उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमातील प्रास्ताविक, प्राचार्य दळवी अजेय, शाहू स्मारक भवन, कोल्हापूर दि.२३ फेब्रुवारी,२०२६, वेळ सकाळी ८.३० वा

१२. मुलाखत, टिपुगडे विजय, प्रसिद्ध चित्रकार, कला अभ्यासक, अध्यक्ष, कलासाधना मंच, कोल्हापूर

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

कऱ्हाड नगरीचे प्राचीन संदर्भ

प्रा. डॉ. अभय पाटील

इतिहास विभाग प्रमुख

स.गा.म.कॉलेज कराड.

Corresponding Author - प्रा. डॉ. अभय पाटील

DOI - 10.5281/zenodo.19692993

प्रस्तावना:

कऱ्हाड हे कृष्णा आणि कोयना या दोन पवित्र नद्यांच्या प्रीतीसंगमावर वसलेले प्राचीन शहर आहे. याचे वर्णन 'करहाटक महात्म्य' या ग्रंथात केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे

मध्यदेशे महाक्षेत्र नाम्ना श्रीकरहाटक।
यत्र श्रीकृष्णवेण्यायाः क कुंकूमत्यास्ति संगमा ॥१७॥
ताहश संगमः पक्षिन जास्ति भूमंडळे कवचित।
यत्रोतरा महालक्ष्मी ब्रह्मविद्भिः सुसेविता ॥१०॥ [१]

कृष्णेच्या बरोबर विरुद्ध दिशेला कोपऱ्यात कऱ्हाड शहर वसलेले आहे. शहराच्या उत्तर-पश्चिम बाजूला 'वसंतगड' आहे. तर उत्तर-पूर्वेकडे सदाशिवगड आहे. दक्षिण-पूर्वेस आगाशिव शिखर आहे. त्याची समुद्रसपाटीपासून उंची १२०० फूट आढळते.कऱ्हाड नगरीला तिन्ही बाजूंनी कृष्णा व कोयना नद्यांनी वेढलेले आहे.

हे शहर महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण आहे. हे शहर भौगोलिक दृष्ट्या मध्यवर्ती असून पूर्वेस विजापूर, दक्षिणेस बेळगांव, उत्तरेस पुणे आणि कुंभार्ली घाटातून पश्चिम कोकणाकडे जाणारे रस्ते प्राचीन काळापासून आहेत. त्यामुळे कऱ्हाड शहरास स्वाभाविक महत्त्व प्राप्त झाले आहे.' कऱ्हाड शहराला मुख्य पाच रस्ते जोडलेले आहेत.[२] कऱ्हाड शहर १७.१७' उत्तर अक्षांश आणि ७४ १६' पूर्व रेखांशावर असून पश्चिम समुद्रापासून अवघ्या ६२ मैलांवर २२०० फूट उंचीवर असल्याने या ठिकाणचे हवामान समशीतोष्ण राहते. या ठिकाणी नियमित व निश्चित पाऊस पडतो. सभोवताली पर्वत रांगांमुळे अतिवृष्टी, वादळी वारे यापासून कऱ्हाडास नैसर्गिक संरक्षण मिळालेले आहे. शहराच्या दूरवर सपाट नि सुपीक प्रदेश पसरलेला आहे."[३]

कऱ्हाडचे वार्षिक पर्जन्यमान ७५० मि. मी. आहे. जुन्या शहराची दक्षिणोत्तर लांबी सुमारे १/२ मैल असून पूर्व पश्चिम रूंदी १/२ मैल आहे. [४] प्राचीन शिलालेखातून, ताम्रपटातून आणि महाभारत महाकाव्यातून या शहराच्या नावाची करहाटक, करहाट, करहाकट, करहाकटक अशी रूपे आलेली आहेत. भारहूत लेखात करहकट व कुड्याच्या लेण्यातील लेखात करहाकडक अशी नांवे आलेली आहेत. कट याचा अर्थ कंबरपट्टा व नंतर लगतची दरी, सपाट प्रदेश, गांव असा होतो. करहाकड म्हणजे करहेच्या लगतची दरी किंवा सपाट मुलूख. प्राचीनकाळी कोयनेस-कृष्णेस 'केरा'च संबोधत असत. करेचे प्राचीन नांव करहा अथवा कऱ्हा होते. करहा हे त्यावेळचे प्राकृत रूप आहे. केरा, करहा, कऱ्हा याचा कट यावरून त्या शहराचे कऱ्हाड नांव रूढ होते असे संभवनीय आहे. 'वर्धा' 'आहार'

(आहाड असावे. 'ड' चा 'र' झाल्याची उदाहरणे पाहायला मिळतात. आहाट किंवा आहाड म्हणजे प्रांत अथवा प्रदेश) = वऱ्हाड (वर्धेकाठचा प्रांत अथवा प्रदेश) तद्वत, कऱ्हा + आहार (आहाड) कऱ्हाड (कऱ्हेकाठचा प्रांत अथवा प्रदेश).कर -हात व हाट -बाजार ,करणेचे ठिकाण – कऱ्हाड [५]

कोणत्याही गावाचा, नगराचा इतिहास मानवाला प्रेरणा देत राहतो. कऱ्हाड हे स्थळ प्राचीन असल्याने तेथील समाजाला आपल्या संस्कृती श्रेष्ठत्वांची जाणीव सदैव आपल्या मनात साठवता येते. सातारा जिल्ह्यात ज्या ठिकाणी सर्वात प्राचीन अवशेष पुरावा म्हणून उपलब्ध होतो, ते ठिकाण कऱ्हाड होय. हल्ली सातारा जिल्ह्यातील तालुका केंद्र म्हणून कऱ्हाड नावारूपाला आले आहे. कुंभार्ली घाटातून कोकणात पाटणच्या बाजूने उतरण्याचा प्रमुख मार्ग प्राचीन काळापासून कऱ्हाडमधून जात असे. पुण्याकडे मार्ग तेथूनच जात. बेळगांवची वाट कऱ्हाडमधूनच. कऱ्हाडास अनेक वर्षांपासून महत्त्व होते.

घोषवारा:

कृष्णा व कोयना नदी संगमावर कऱ्हाड वसलेले आहे. कऱ्हाडमधील प्राचीन अवशेष, कऱ्हाडचे प्राचीनत्व सिद्ध करतात.भारहुत येथील लेख इ. सनापूर्वी ३०० ते २०० चे आहेत. लेखामध्ये कऱ्हाडसंबंधीचे उतारे सापडतात.

लेखांक क्रमांक २१, २४, ४३, ६७, १२६ मध्ये कऱ्हाडचे उल्लेख सापडतात.

लेखांक २१ करहटक अय भुतकस थभो (२४) दानं म्हणजे करहकटचा आर्यभूतक याची देणगी हा स्तंभ (खांब) होय.

लेखांक २४ करहकटा समिकस दांन थभो (२७) म्हणजे हा स्तंभ (खांब) करहकटचा राहणारा समिक (श्यामक) याची देणगी (होय).

लेखांक ४३ करहकट उतरगिधिकस थभो दांन (४६) म्हणजे हा स्तंभ (खांब) करहकटचा उत्तरगिधिक (उतरगिधिक) याची देणगी (होय).[६]

लेखांक ६१७ करहकर निगमस दान (११२) म्हणजे करहकटच्या शहराची अथवा करहकटच्या नैगमाची (नैगम नावाच्या व्यापाऱ्याची) अथवा निगम सभेची (ही) देणगी (होय).

लेखांक १२६ (कर) हकटिकाया (दांन) म्हणजे करहकटच्या राहणाऱ्याची देणगी."कुडयाचे लेण्यातील लेखांमध्ये कऱ्हाडचे उल्लेख येतात.

लेखांक १८ करहाकडकस लोहवाणियिमस महिकस देयधंमं लेणं। म्हणजे करहाकडचा राहाणारा लोखंडाचा व्यापारी. महिक याचा दानधर्म हे लेणें होयश्रवणबेळ गोळच्या लेखांत "करहाकटक" रूप आले आहे.[7] तर दावणगेरेच्या लेखांत "करहाट" आहे. भरूत व कुडा येथील लेखावरून कऱ्हाडला मोठे व्यापारी स्थान होते. २ ऱ्या व ३ ऱ्या शतकांत कऱ्हाडला व्यापार व उदिम मोठ्या प्रमाणावर चालत होता.[8] महाराष्ट्रातील उत्खननातून उपलब्ध झालेले प्राचीन अवशेष, ऐहोळ, कौंडिण्यपूर, पवनार, नासिक, नेवासे, तेर, पैठण, कोल्हापूर ब्रह्मपुरी इत्यादी ठिकाणांबरोबरच, कऱ्हाड येथेही आढळून आलेले आहेत.

कऱ्हाडच्या ऐतिहासिक काळाचा आरंभ २ ऱ्या व ३ ऱ्या शतकापासून होतो. मध्यप्रदेशातील भारुहुत,रायगड जिल्ह्यातील कुडा येथील लेखांवरून कऱ्हाड नगरीची नोंद, त्यातील लयने (लेणी), स्तंभ इत्यादींच्या खुदाईकरिता कऱ्हाडच्या व्यापाऱ्यांनी दिलेल्या देणग्या, दाने, कऱ्हाडची(जखिणवाडी-आगाशिव) गुहाशिल्पे इत्यादींवरून प्रारंभिक ऐतिहासिक काळानंतर सातवाहनांच्या राजवटीदरम्यान, कऱ्हाड हे प्रमुख मार्गावरील मोठे व्यापारी केंद्र होते.

कऱ्हाडमध्ये उपलब्ध झालेल्या नाण्यांवरून (आहत) इसवी सन पूर्व ५ व्या व ४ थ्या शतकातील कऱ्हाड व परिसर सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्राशी व भारतवर्षाशी संबंधीत होता. उदरनिर्वाहासाठी व्यापार उदिम करून धर्मकार्यासाठी सढळ हाताने देणग्या, दानधर्म करणारे कऱ्हाडचे सधन व्यापारी, व श्रेण्या याची नांवे भरुत व कुडा नाणेघाट येथील लेखांत आढळतात.[९] महाभारताच्या समापर्वाच्या ३२ व्या अध्यायात सहदेवाने दक्षिण दिग्विजय केला व जी नगरे, ग्रामे जिंकली त्यात कऱ्हाडचा उल्लेख येतो.

सहदेवाला दक्षिण दिग्विजयात, दुतांकरवी कऱ्हाडकरांकडून अगदी सहजपणे कोणत्याही प्रतिकाराविना खंडणी वसूल करता आली. यावरून कऱ्हाड मधील समाज धनिक होता. समापर्वाच्या ३२ व्या अध्यायात व ११७० व्या कऱ्हाडचा उल्लेख आल्याने कऱ्हाड अतिप्राचीन नगर असल्याचे सिद्ध होते.[१०]

कराडचे प्राचीन संदर्भ:

प्राचीन राजकीय सत्ता व संदर्भ:

उत्तरेच्या मौर्य साम्राज्याच्या आधी इ. स. पूर्व ७ व्या ते ३ ऱ्या शतकापर्यंत कऱ्हाडवर राष्ट्रीकांची सत्ता होती. मौर्य सम्राट अशोकाच्या साम्राज्यानंतर सातवाहन किंवा आंध्रभृत्यांचे राज्य कऱ्हाडवर होती याचे अनेक पुरावे उपलब्ध आहेत. पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाने, सन १९४९ मध्ये कऱ्हाडमधील पंताचा कोट परिसरात केलेल्या उत्खननात इ. स. पूर्व २०० ते इ. स. २०० या ४०० वर्षात मानवी अधिवासाचे पुरावे उपलब्ध केलेले आहेत.

इ. सनाच्या पहिल्या शतकापासून उत्तर भारतात 'कुषाण' साम्राज्य होते. त्यांच्या पश्चिम भारतातील प्रांताधिपतींना 'क्षत्रप' म्हणत. 'भूमक', 'नहपान' हे क्षत्रप राजे पराक्रमी होते. इ. स. १२४-२५ च्या सुमारास नहपान याने कऱ्हाड परिसरावर वर्चस्व मिळविले. सातवाहनांच्या उतरत्या काळात कऱ्हाड परिसर क्षत्रपांच्या ताब्यात होता. हे या परिसरातील गोवारे, कऱ्हाड नगरीमधील टिळक हायस्कूलच्या परिसरात सापडलेल्या 'विजयसेन', 'दामजद श्री तिसरा', 'रुद्रसेन दुसरा', 'विश्वसिंह', 'भृर्तदामन', व 'विश्वसेन' या महाक्षत्रपांच्या नाण्यांवरून सिद्ध होते. या क्षत्रपाने परिसरावर इ. स. २५० पासून ते इ. स. ३०४ पर्यंत राज्य करत होते.[११]

" कऱ्हाड" चा कुंतल प्रदेशाशी संबंध असावा हे "कुंडल", "कुंडलवाडी" नावांवरून सिध्द होते. [१२] या प्रदेशावर वाकाटकांचा म्हणजेच भोजांचा त्यावेळी अंमल होता. डॉ. कृष्णस्वामी आय्यंगार वाकाटकांना 'भोज' म्हणतात.[१३] कुंतल शाखेत, कऱ्हाडसह सातारा, कोल्हापूर, सांगली हा दक्षिण महाराष्ट्रातील व उत्तर कर्नाटकातील काही प्रदेश यांचा समावेश होता.

राष्ट्रकूट:

इ. स. ४ थ्या व ५ व्या शतकात, कऱ्हाडसह संपूर्ण दक्षिण भागावर (कुंतलच्या प्रदेशावर) मानपूरचे राष्ट्रकूट राजे राज्य करीत होते. सातारा जिल्ह्याच्या इतिहासाशी संबंधीत या राष्ट्रकुटांना महत्वपूर्ण स्थान आहे. राष्ट्रकूट राजा तिसरा इद कुरूंदक पट्टाभिषेक (पट्टाबंद) समारंभासाठी आलेला असताना, करहाटक ४०० विषयातील (जिल्ह्यातील) मत्लाकग्राम तीन मधील थकव्यापी ग्राम त्याने दान दिल्याचा उल्लेख त्याच्या शके ७२० च्या वडगांव शिलालेखांत सापडतो. राष्ट्रकूट राजा कृष्ण तिसरा याच्या संवत ८८० च्या कऱ्हाड लेखात करहाटक विषयातील कन्हवन्ना नदी, कांकेम (कनकी), कल्ली १२ (कृष्णेवरील कलम) व आढेम (कऱ्हाडच्या नैऋत्येक असलेली गढी) अशा काही स्थानांची नोंद आहे.[१४]

वाकाटक:

यानंतर बहुतेक महाराष्ट्रावर, विशेष करून विदर्भावर उत्तरेच्या गुप्त सम्राटांच्या समकालीन असलेल्या वाकाटकांचे राज्य होते. आणि अशा या शक्तीशाली नामांकित राजघराण्याशी राष्ट्रकूटांचे वैवाहिक संबंध होते. ही राजवट इ. स. ५०० च्या सुमारास संपली.[१५] १८ इ. स. ४९० ते ५३५ मध्ये कऱ्हाड परिसरावर विष्णुकुंडिन, गोविंद वर्मा व माधव वर्मा ची राजवट होती, असे एका ताम्रपट्टावरून समजते. परंतु हे राजे राष्ट्रकूट होते की वाकाटक याबद्दल निश्चित सांगता येत नाही. खानापूरचे रा. दादासाहेब माने यांच्या येथे उपलब्ध झालेल्या इ. सनाच्या ६ व्या व ७ व्या शतकातील माधव-वर्माच्या ताम्रपटात 'रेठरक' म्हणजे रेठरे बुद्रुक या कऱ्हाड तालुक्यातील,कऱ्हाड पासून आठ मैल लांब असलेल्या गावाचा, बेलवाटिका-(बेलवडे) कोलिकावाटिका- (कोळे) आणि (वाठर)-वट्टारिका या त्यावेळच्या वाड्याचा उल्लेख येतो, त्यांची हल्लीची रूपे रेठरे बु., बेलवडे, कोळे काले व वाठार ही होत. नदीचे नाव कृष्णा-वेण्णा असे आले आहे. राजा माधववर्मा यांने ही गावे दान दिल्याचे उल्लेख येतात. ज्या अर्थी वरील गावावर या माधववर्माचा अंमल होता, त्याअर्थी कऱ्हाड वरही तो राज्य करीत असावा. या ताम्रपट्टात रेठरे बु. गावच्या सीमा दाखविताना 'राजमाची', 'शेणोली', 'काले' व 'मालखेड' वाठार या कऱ्हाड जवळील गावांचा उल्लेखही ताम्रपट्टात आढळून येतो.[१६]

कलचुरी घराणे:

द्वितीय माधवम्र्यानंतर कऱ्हाड परिसरावर कलचुरींची राजवट आली. इ. स. ५५० च्या सुमारास उदयास आलेले कलचुरी राजघराणे, भारतवर्षातील मोठ्या प्रदेशांवर राज्य करणारे घराणे, 'कृष्णराज, रूपक' या राजांची चांदीची नाणी त्यांच्याच नावाने मिळाली आहेत. रामटेकजवळ 'नगरधन' येथे मिळालेल्या कृष्णराजाच्या मांडलिकाच्या ताम्रपट्टावरून इ. स. ५५० ते ५७५ या फाळात कऱ्हाड वर त्यांचे राज्य होते." [१७]

चालुक्य:

चालुक्य घराण्याने महाराष्ट्रावर सुमारे २०० वर्षे राज्य केले. 'किर्तीवर्मा','पुलकेशी', 'पुलकेशी दुसरा' यांच्या काळात महाराष्ट्राचा बराच प्रदेश चालुक्यांच्या ताब्यात होता. 'ऐहोळे' अभिलेखात ९९ हजार गांवे असलेला महाराष्ट्र प्रदेश होता, असा उल्लेख आहे. कुंतल हा महाराष्ट्राचा भाग होय.[१८] पुलकेशी दुसरा यांच्यानंतर विक्रमादित्य, धराश्रय व विनयादित्य यांचाही सातारा, कऱ्हाड, फलटण, जेजुरी या परिसराशी दीर्घकाळ संबंध होते. हे पाली, जेजुरी, नेरूळ, ऐलापूर व सातारा येथील ताम्रपट्टावरून पुष्ठी मिळते.

बदामीच्या चालुक्यांच्या काळात प्रशासकीय दृष्ट्या करहाटक हे करहाटक विषयाचे (जिल्ह्याचे) स्थान होते. असा विक्रमादित्य याच्या 'संवत' ५२० च्या पाली ताम्रपट्टात उल्लेख आहे. [१९]

रायगड ताम्रपट्टात विजयादित्य याने आपल्या करहाटक विषयातील मारवल या विजयी तळावरून शांडिल्य गोत्री देव दीक्षिताचा पुत्र नाचेर चतुर्वेदी यास काही गावं दान दिली होती.[२०] विजयादित्यचा दुसरा मुलगा विक्रमादित्य यांच्यासह सन ७१० मध्ये कऱ्हाड येथे येऊन काही जमीन व गाव नामल्ल शर्मा या ब्राह्मणांस दान दिल्याची नोंद सापडते. 'अलमपूर' प्रशस्तीवरून स्पष्ट होते की, कऱ्हाड येथे सैन्द्रक घराण्याच्या एका शाखेचे केंद्र होते.[२१] चालुक्य राजा विजयादित्य याची पत्नी महादेवी कऱ्हाडची राजकन्या होती. ही सैन्द्रक नृपती विष्णुराज याची कन्या असावी, [21] विजयादित्य या राजाने गोरगरीब, अपंग,

दीनदुबळे यांना उदारहस्ते साहाय्य केले. जैन, बौद्ध व वैष्णव पंथीयांना उदारहस्ते दाने दिली. मंदीर उभारणीस अर्थसाहाय्य केले. विद्वान, वेदाध्ययन करणाऱ्या ब्राह्मण पंडितांना जमीनी व गावे दान दिली. पट्टदकल येथील आपल्या वास्तव्यात, तेथील अनेक वास्तुंच्या उभारणीलाही मार्गदर्शन व अर्थ साहाय्य केले. मंदिर डागडुजी, देखभाल याकडे लक्ष दिले. उत्तर कर्नाटकात अनेक तलाव बांधले. असा हा समाजदक्ष राजा कऱ्हाडचा जावई होता. पत्नी महादेवी आपल्या पतीप्रमाणे धर्मशील, दानशूर होती. पतीच्या सर्व समाज व धर्मोपयोगी कार्यात तिचा सक्रीय सहभाग असे.[२२]

राष्ट्रकूट:

विदर्भाचे राष्ट्रकूट, नरवन ताम्रपट्टात उल्लेख असलेले राष्ट्रकूट, औंढा येथील राष्ट्रकूट व मान्यखेडचे राष्ट्रकूट घराण्यांनी उत्तर भारतासह दक्षिण भारतावर कब्जा केला. मान्यखेटचे राष्ट्रकूट हे मलखेड, जि. गुलबर्गा, कर्नाटक राज्य येथील मुळ होत. त्यांच्या राजधानीचे ठिकाण नेमके कोणते याबाबत संशोधकांमध्ये मतमतांतरे आढळतात. या घराण्यातील दंन्तिदुर्गाच्या कोल्हापूर प्रांतातील सामानगड येथील शके ६७५ (इ. स. ७५३) च्या ताम्रपट्टात प्रस्तुत गावाचा उल्लेख करहाटक असा आला आहे. याच कुळातील तिसऱ्या गोविंदाच्या भारत इतिहास संशोधन मंडळाच्या संग्रही असलेल्या ताम्रपट्टात देणगी दिलेल्या 'व्यासभट्ट' नावाच्या एका ब्राह्मणाच्या राहाण्याचे ठिकाणाचे नाव "करहड" असे दिले आहे. करहाडक उच्चारावयाचे रूप होय. यावरून शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मणांचे वास्तव्य कऱ्हाडमध्ये होते. हे दानपत्र शके ७३२ वैशाख शुद्ध पौर्णिमेचे म्हणजे इ. स. ८१० एप्रिल चे आहे. [२३] या वेळेपासून कऱ्हाड येथे राहणाऱ्या ब्राह्मणांस करहडक ब्राह्मण म्हणण्यास सुरवात झाली .

दंन्तिदुगनि (इ. स. ७२० ते ७५५) या काळात या परिसरावर राज्य केले. नंतर प्रथम कृष्ण (इ. स. ७५६ ते ७६८), प्रथम कृष्णाचा मुलगा द्वितीय गोविंदाचा भाऊ (इ. स. ७७३ ते ७८०), ध्रुव धारावर्ष (इ. स. ७८० ते ७९३) या काळात कऱ्हाड परिसरावर राज्य केले. राष्ट्रकूट घराण्यातील पराक्रमी व श्रेष्ठ राजा तृतीय गोविंद (इ. स. ७९३ ते ८१४) याने इ. स. ८०९ मध्ये खेड विभागातील काही ठिकाणे ब्राह्मणांना दान दिली. 'सकल दक्षिण दिग् अधिपती' बिरुदालंकृत तृतीय कृष्ण (इ. स. ९३९ ते ९६७) याच्या इ. स. ९५९ च्या कऱ्हाड ताम्रपटात त्याने करहाट विषयातील मिरज जवळील 'कंकी' हे गाव गगनशिव नावाच्या व्यक्तीला भिक्षूचा चरितार्थ चालवण्यासाठी दान दिल्याचा उल्लेख आहे. याच्याच कोल्हापूर ताम्रपट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'अकालवर्षदेव' या विरुदाने लिहिलेल्या ताम्रपटात कऱ्हाड प्रांतातील कुरेग्राम (कोरेगांव) चा रहिवासी गोविंद भट्ट याला अतलगे ७०० (अळते) मधील रिकटी (रुकडी) हे गाव दान दिल्याचा उल्लेख आहे.[२४]

पहिल्या अमोघवर्ष सम्राटाच्या शके ७९३ च्या (इ. स. ८७१) संजानच्या ताम्रपटात "करहड" या नगराहुन अथवा बहुधा प्रांताहून त्या बाजूस गेलेल्या बहूच शाखेच्या नरसिंह दीक्षित, रक्षादित्य क्रमावित्, त्रिविक्रम षड्वित, केशव चाईतस या चार विद्वान ब्राह्मणांची नांवे आहेत.[२५] यावरून कऱ्हाडतील अथवा विषयातील ब्राह्मण विद्वान असल्याचे सिद्ध होते. त्यांना बोलावून नेले जाई. कऱ्हाडतील ब्राह्मणांनी वेदविद्या, कर्माचरण, धर्माचरण, धर्मचिंतन, वादविवाद प्रवीणता इ. क्षेत्रात मोठा दबदबा निर्माण केला होता. देशात विद्वान म्हणून त्यांची गणना होई. अथवा विद्वान म्हणून त्यांना पाचारण केले जाई, याचे प्रमाण हे आहे.

राष्ट्रकूट नृपती तृतीय कृष्ण याचा मांडलिक, 'द्वितीय तैलराज' (इ. स. ९७३ ते ९९७) सत्तेवर आला. कऱ्हाड येथील मल्लम (सामंत) सरदार याचा त्याने पराभव केला. त्यानंतर सत्याश्रय (इ. स. ९९७ते १००८), त्यानंतर पाचवा विक्रमादित्य (इ. स. १००८ ते१०१८), त्यानंतर त्याचा बंधू जयसिंह (इ. स. १०१८ ते १०४२) या राजांच्या कारकिर्दी कऱ्हाड परिसरावर झाल्याचे संदर्भ मिळतात. वरील राजे कल्याणीच्या चालुक्य घराण्यांशी संबंधीत होते. कऱ्हाडशी संबंधीत शिलालेख, ताम्रपटांमधील उल्लेखांवरून असे दिसते की इ. स. पू. काळापासून कऱ्हाड धार्मिक, राजकिय व आर्थिक बाबतीत राष्ट्रकूटापर्यंत प्रबळ होते. [२६]

शिलाहार व सिंद:

जयसिंह यांची कारकिर्द इ. स. १०३५ पासून अस्थिर झाली व कऱ्हाड परिसरावर शिलाहार व सिंद या कुलातील राजे राज्य करू लागले. शिलाहाराचा राजकिय इतिहास बराच उपलब्ध होतो. पण सिंद कुलांच्या शाखांची अशी गोष्ट नाही. तीन शाखा प्रसिद्ध आहेत. एकीतील पुरुष एरंबरेज येथे चालुक्यांचे महामंण्डलेश्वर म्हणून असत. यापैकी शिलाहार राजवंश सत्तेत असताना कऱ्हाड हे करहाटक ४००० असे संबोधले गेले. मुरूड-जंजिऱ्यास सापडलेल्या शिलाहार राजा 'अपराजितदेव' याच्या २० ऑगस्ट ९९३ रोजीच्या ताम्रपटातही करहटकचा उल्लेख येतो. शिलाहर नृपती 'मुणिराज' याच्या शके ९७० (२० फेब्रुवारी १०४९) च्या ठाणे ताम्रपटात मुम्मुणिराज याने चंद्रगहणाच्या प्रसंगी आपली पट्टराणी 'पद्म' हिच्या कल्याणासाठी करहाट (कऱ्हाड) येथून आलेल्या ५ ऋग्वेदी ब्राह्मणांना गावे दान दिल्याची नोंद आहे. या नोंदीवरून करहाट येथे वसिष्ठ, कश्यप, जामदग्न्य, वत्स गोत्रांचे ब्राह्मण रहात असावेत. मारसिंह राजा याच्या संवत ९८० (२४ डिसेंबर १०५८) च्या मिरज ताम्रपटात राजा मारसिंह याचा पिता 'गोंक' याचे करहाट आणि कुंडी विषयांवर राज्य होते. यास 'गोंक' करहाटक कुंडी अधिपती असे संबोधले आहे. [२७] काश्मिरी पंडित, 'कवी बिल्हण' याने विक्रमांकदेवचरितात वर्णन केल्यानुसार करहाटपतीची पुत्री 'चंद्रलेखा' हिचे स्वयंवर चालुक्यराजा ६ वा विक्रमादित्य याच्याबरोबर करहाटक येथे झाले. विक्रमादित्याची ती अग्रमहिषी (पट्टराणी) होती.[२८]" द्वितीय भोजाच्या कोल्हापूर येथील २५ डिसेंबर ११९० च्या शिलालेखात करहाटक येथील आदित्यभट, लक्ष्मीधर भट व प्रभाकर गौसास या ब्राह्मणांना 'एडेनाड' विषयांतील शेती, घर दान दिल्याची नोंद मिळते.[२९] इ. स. १०३५ च्या पुढील काळात चालुक्यांनी कोल्हापुर, दक्षिण कोकण पादाक्रांत केले. पुढील काळात शिलाहार राजांना चालुक्यांचे मांडलिक म्हणून अस्तित्व राखावे लागले. इ. स. १११० ते ११३५ पर्यंत कऱ्हाड परिसरावर मारसिंहपुत्र गंडरादित्य याचे राज्य होते. कऱ्हाड हे त्याच्या प्रशासकीय हालचालीचे प्रमुख केंद्र होते. त्यानंतर गंडरादित्यपुत्र 'विजयादित्य' (इ. स. ११४० ते ११७५), विजयादित्याचा मुलगा द्वितीय भोज (इ. स. ११७५ ते १२१५) याने कऱ्हाड, मिरज व कोल्हापूर परिसरावर राज्य केले. हे सर्व राजे पराक्रमी, कुशल प्रशासक असून ते स्वतःला 'करहाटपूरपती' असे संबोधत.

कल्याणीचे चालुक्य:

शिलाहार राजे कल्याणीच्या चालुक्यांचे मांडलिक झाल्यावर या प्रदेशावरचालुक्य राजांचा प्रभाव जाणवतो. चालुक्यांच्या राजवटीत ' कऱ्हाड' स प्रशासकीय महत्व होते; परंतु या विषयातील ग्रामाची संख्या कमीअधिक झाल्याचे आढळते. चालुक्यवंशीय सोमवंशी राजा जनमेजयाने दक्षिणेकडे विजय संपादन केल्यानंतर आपल्या करहाट कंबलेश्वरदेव येथील तळावरून 'करहाट-४५००'

विभागातील 'बलियवाड व चिकलवाड' या गावची जमीन करमुक्त करून ती 'राम गावुंडा' यास दिल्याची नोंद जनमेजय राजाच्या चिकुर्डे, शके १०७६ (सन ११५४) च्या ताम्रपटात आढळते.[३०] चालुक्य काळात करहाट ४५०० हे विषय विभागाचे केंद्र होते. संवत १७६ मधील "होनवाड शिलालेखावरून कळते की, कब्रडिगे हे गाव कलमबढी ३००० मध्ये, तर कलमबढी हे करहाट-४००० मध्ये अंतर्भूत होते. या लेखाचा तपशील पहाता करहाट विभागात अभनी आणि विजापूर तालुक्यातील काही भागाचा समावेश होत होता. [३१]

आरवी (जि. अहमदनगर) येथे सापडलेल्या यादव नृपती ऐमदेव (चालुक्य विभुवन पेमांडिदेव तथा विक्रमादित्य ६ वा याचा मांडलिक) याच्या शके १०२० (सोमवार ३ मे १०९८) च्या ताम्रपटात करहाटकाहून आलेल्या कुंतल पंडित या कास्यप गोत्री शाकल शाखेच्या ब्राहामास तसेच अन्य ब्राह्मणांना संगमनेर मधील सेऊण खेडे दान दिल्याचा उल्लेख आहे[३२]. डेरवण (जि. रत्नागिरी) येथे सापडलेल्या सन १२६१ च्या कल्याणीच्या चालुक्यकालीन ताम्रपटात ही करहाटकचा उल्लेख सापडतो. [33] यादव काळामध्ये करहाट २००० हे प्रशासकीय विभागाचे केंद्र होते. या क्षेत्राची मर्यादा पूर्वीपेक्षा कमी झाली होती. सन ११७५ च्या कोकटमुर दानपत्रावरून कलमबते ३०० हे करहाट २००० मध्ये समाविष्ट होते. चालुक्य राजा विक्रमादित्य याचीही (पट्टमी) चंद्रलेखा होती. चालुक्य राजा विक्रमादित्य ६वा याने करहाटक ४००० राज्यकारभार पाहाणाऱ्यां मांडलिक जोगम कलचुरी याची कन्या सापलदेवी हिच्याबरोबर विवाह केल्याची नोंद विक्रमांकरितात आहे. कोकट्नुरच्या दानपत्रावर टिपण्णी करताना डॉ. श्री. सांकलिया म्हणतात देशविभागाचे मुख्यालय होते. यात सातारा जिल्ह्यातील कराड, विटा, तासगांव व खरसुंडी हे तालुके, सांगली जिल्ह्यातील मिरज, सांगली तालुका तसेच बेळगांव जिल्ह्यातील अथणी तालुक्याचा काही भाग एवढ्या प्रदेशाचा समावेश असावा.[३४] चालुक्यांच्या काळात कृष्णा-कोयना संगमावर वसलेले आजचे कराड इ. स. पू. काळापासून व्यापारी पेठ तसेच विविध राजवटीमध्ये एक प्रशासकीय केंद्र म्हणून विकसित होत गेले. पुढील काळातील राजवटीमध्ये त्याचे महत्त्व कायम असल्याचे दिसते.

देवगिरीचे यादव:

या वंशामध्ये सिंघन (इ. स. १२१० ते १२४७) हा पराक्रमी राजा झाला. त्याने कुंतल देशावर राज्य करणाऱ्या भोज द्वितीय याचा इ. स. १२१८ मध्ये पाडाव करून त्यांची राजवट संपुष्टात आणली. त्याबरोबर कोल्हापूर शिलाहारांचे पारिपत्य करून त्याचा सर्व प्रदेश ताब्यात आणला. जिंकलेल्या प्रदेशांवर विविध अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. अक्कलकोट, कोल्हापूर व खिद्रापूर वेथील उपलब्ध दान शिलालेखांपैकी एकात त्याने कोल्हापूर येथील प्रसिद्ध महालक्ष्मी मंदिरासमोर तोरण उभारल्याचे आढळते. इ. स. १२३६ च्या कोल्हापूर लेखावरून त्याने सरकारी उत्पन्नातून देवालयाची व धुपदीप नैवेद्याची व्यवस्था केली. त्यावेळी करहाटक २००० प्रदेश, सेनापती सहदेव वाच्या ताब्यात होता. 'करहाटपूरपती' शिलाहारांच्या काळात करहाटक प्रदेश अधिक महत्त्वाचा होता. त्यावेळी तो करहाटक-४००० होता. यादव काळात करहाटक २००० एवढाच राहिला. म्हणजे त्याचे पूर्वी महत्त्व अथवा विस्तार कमी झाला.

विजयनगरच्या दुसऱ्या घराण्यातील सदाशिव महारायाच्या शके १४७० च्या (इ. स. १५४८ च्या) कनुमाच्या ताम्रपटावरून व विजयनगरच्या तिसऱ्या कुलातील दुसऱ्या श्रीरंगरायाच्या शके १४९९ (इ. स. १५७६-७७ च्या) अरिविलीमंगलाच्या ताम्रपटावरून असे

दिसते की, करहाटचे किंवा करहाट प्रांताचे राजे विजयनगरच्या सम्राटांचे मांडलिक असावेत; कारण ते द्वारपालांचे काम करीत असत. हे विजयनगरच्या सम्राटांचे मांडलिक कोण समजत नाही.[३५]

देवगिरीच्या यादव राजांनी विद्या, कला व संस्कृती या क्षेत्रात मोठी प्रगती केली. त्यांची लोकोपयोगी कामे ही रयतेच्या धार्मिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक व ऐहिक उन्नतीसाठी होती. करहाटकचा प्रदेश हा देवगिरी व विजयनगर यांच्या अधिपत्याखाली होता याचे दाखले मिळतात.

संदर्भ सूची:

१. कऱ्हाड, रौप्य महोत्सवी स्मरणीका, १९७०.
२. ढवळे ना.वा. दैनिक सकाळ, दि.९.१०.१९९२-
३. शतसांवत्सरिक स्मृती ग्रंथ पा.नं.१
४. कित्ता १ १९७०
५. माळी विजय श कऱ्हाड प्रीती संगमावरचं आदितिर्थ, २००९ पा.नं.५.
६. गुप्ते य.रा. कन्हाड, १९२९ पा.नं.३.
७. एपिग्राफिया इंडिका खंड. ३,पा.नं.१९५.
८. एपि.ओरायन, आवृती ११, पा.नं. ९२
९. कित्ता ५, पा.न.५-६
१०. कित्ता ६.पा.नं.५-७.
११. रॉयल एसियाटिक सोसायटी खंड.८, पा.नं.१६४.
१२. जर्नल ऑफ इंडियन हिस्ट्री, आवृती ४.पा.नं.४०३
१३. आय्यंगार कृष्णस्वामी डॉ., एशन्ट हिस्ट्री, पा.न.१०२
१४. कित्ता ११, पा.नं.१०४.
१५. कित्ता ५,
१६. रॉयल एसियाटिक सोसायटी, रेठरे बु. प्लेटस १९२८
१७. भारत इतिहास संशोधन मंडळ, अक-३,पा.नं.१६४.
१८. कित्ता ५,
१९. महाजन मालती कल्चर हिस्ट्री ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा, १९८९ पा.न.९७.
२०. देव शा.भा. महाराष्ट्र व गोवा शिलालेख ताम्रपटांची वर्णनात्मक सदर्भसुची, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई १९८९ पा.न.९७.
२१. कित्ता ५,
२२. जर्नल ऑफ इंडियन हिस्ट्री, आवृती ४, भागर सप्टेंबर १९२५,पा न.४०३
२३. एपिग्राफिया इंडिका खंड ३, पा.नं.२४९-५०.
२४. कित्ता पा.न.२४९-५०.
२५. कित्ता पा.न.२४९-५०.
२६. देव शा.भा. महाराष्ट्र व गोवा शिलालेख ताम्रपटांची वर्णनात्मक सदर्भ सुची, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुबई १९८९ पा.न.९७-९८
२७. मिराशी वा.वि.शिलाहार राजवंशाचा इतिहास १९७४, पा.न.९९-१०० विदर्भइतिहास संशोधन मंडळ
२८. कित्ता पा.न.९९-१००.
२९. कित्ता ६, पा.न.२९.
३०. कित्ता १९,पा.न.१९.
३१. कित्ता पा.न. १९-२०.
३२. कित्ता २०,पा.न.४६-४७.
३३. कित्ता २०,पा.न.१७८-८८
३४. चित्राव सिध्देश्वर शास्त्री, प्राचीन भारतीय स्थळ कोष खंड-१, भारतीय चरित्रकोष मंडळ पुणे. १९५९ पा.न.३७५
३५. एपिग्राफिया इंडिका खंड ३, पा.नं.२३८-२४५.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

प्राचीन ते आधुनिक वृत्त देण्याच्या पद्धतीतील बदल

डॉ. धीरज सुरेश शिंदे

इतिहास विभागप्रमुख,

श्रीमती आ.रा पाटील कन्या महाविद्यालय इचल.,कोल्हापूर

Corresponding Author - डॉ. धीरज सुरेश शिंदे

DOI - 10.5281/zenodo.19693167

गोषवारा :

प्राचीन कालखंडापासून विविध वृत्ते प्राप्त करणारी व्यवस्था निर्माण होत गेली.त्यामधून अशा बातमीदारांनी विविध घटना, प्रसंगाच्या अनुषंगाने बातम्या प्राप्त केल्या.ह्या प्राप्त झालेल्या बातम्या इतिहासाची साधने बनली आणि सुसंगत इतिहासाची मांडणी करण्यासाठी अथवा प्राप्तच न होणारे वृत्त अशा बातमीदारांकडून प्राप्त होऊ लागली.आजूबाजूच्या परिचित किंवा अपरिचित मानवी जीवनाशी संबधित घटना घडामोडीची माहिती मिळावी हि मानवी सहज प्रवृत्ती असून ती प्राचीन काळापासून आहे. विविध मार्गाने संदेशाचे आदान प्रदान करण्याची पद्धत विकसित होत गेली. दवंडी पिटणे हा प्रकार अतिशय प्राचीन असून जगभरामध्ये प्रचलित होता.गावामधील महत्वाची घटना,प्रसंग,घडामोड सांगण्याचा प्रघात यामधून प्रचलित झाला.पुढे युरोपमध्ये ख्रिस्ती धर्माच्या चर्चवरील घंटा विशिष्ट आवाजामध्ये वाजू लागली कि,त्या घंटानादाच्या क्षेत्रामध्ये विखुरलेल्या लोकांना काही अघटीत घडल्याचे समजून ते एका विशिष्ट ठिकाणी एकत्र येत असत. मध्ययुगात वृत्त देण्याचे स्वरूप पालटून त्यात वेगळेपणा आला.भारतामध्येही व्यापारी वर्गामध्ये बातमीदार ठेवण्याची पद्धत ही प्राचीन कालखंडापासून मध्ययुगापर्यंत दिसते.हिंदुस्थानातील व्यापारी वर्ग ठिकठिकाणच्या बातम्या काढण्यात तत्पर असत.कित्येक वेळेस शासकांना जबाबदार शासकीय अधिकाऱ्यामार्फत एखाद्या घटनेची बातमी समजण्यापूर्वी व्यापारी वर्गाकडे अशी वृत्ते अगोदर पोहोचत असत.मध्ययुगातील अत्यंत कार्यक्षमपणे कार्यान्वित केलेले वार्तासंकलन व संदेश देवाण-घेवाणसाठी पत्रव्यवहाराची पद्धती हे मराठा कालखंडातील जनसंवादाचे मुख्य वैशिष्टय होते.आधुनिक कालखंडामध्ये वृत्त देण्याच्या पद्धतीमध्ये अचूकता येत गेली तसेच वृत्तपत्रांचा उदय आणि जलद गतीने विकास,विस्तारही झाला. छपाईमुळे हस्तलिखिते छापील स्वरूपामध्ये आणि संख्येने जास्त प्रमाणात निघू लागली.सतराव्या शतकाच्या आरंभी काही छापील वृत्तपत्रे नियमित निघू लागली.जगामधील सर्वात जुने नियमित प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र म्हणजे 'अविसा रिलेशन ओडर झायटुंग' हे इ.स १६०९ पासून नियमित प्रसिद्ध होऊ लागले.६ सप्टेंबर १५५० रोजी भारतामधील पहिला छापखाना गोव्याच्या सेंट पॉल कॉलेजमध्ये स्थापन झाला.पुढे ब्रिटीश सत्ता भारतामध्ये दृढ झाल्यानंतर ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या माजी सनदी नोकरांनी वृत्तपत्र काढण्यास पुढाकार घेतला.२९ जानेवारी १७८० रोजी 'कलकत्ता जनरल ॲडव्हटायझर'(हिकीज गॅझेट) हे नियमित साप्ताहिक सुरु केले.ब्रिटिशांपासून प्रेरणा घेवून १५ मे १८१८ रोजी बंगाली आणि पहिले भारतीय भाषिक वृत्तपत्र 'बेंगाल गॅझेट' हे गंगाधर भट्टाचार्य यांनी सुरु करून भारतीय भाषिक वृत्तपत्राचा पाया घातला.मराठीमध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण'पत्र ६ जानेवारी १८३२ रोजी प्रसिद्ध केले.वृत्तपत्राच्या उदय आणि विस्तारामुळे वार्ताकन, बातमीदार,वृत्तपत्र निर्माते यांची माहिती प्राप्त होऊ लागली आणि वंचित बातमीदारांना प्रस्थापित होण्यास कालांतराने टप्प्याटप्प्याने संधी प्राप्त झाली.

अशा प्रकारे प्राचीन,मध्ययुगीन कालखंडात 'वृत्त' देण्याच्या पद्धती विकसित होत असतानाच ब्रिटीशांच्या आगमनापासून भारतात वृत्तपत्राचा विस्तार झाला आणि वृत्त देण्याच्या पद्धतीस मूर्त स्वरूप प्राप्त झाले.आजच्या 'डिजिटल माध्यम क्रांती' युगामध्ये माहितीचा प्रचंड विस्तार झाला असतानाच प्राचीन,मध्ययुगामध्ये बातमी प्राप्त करण्यासाठी अनामिक बातमीदार प्रचंड प्रयत्न कशा पद्धतीने करत याचा संक्षिप्त आढावा घेण्यात आला आहे.

प्रास्ताविक :

इतिहासाची मांडणी करताना इतिहासाच्या प्रचलित सिद्धांत 'कागदपत्रे नाहीत इतिहास नाही' (NO DOCUMENTS, NO HISTORY)हा आहे.म्हणजेच कागदपत्रे अथवा पुराव्याशिवाय इतिहासाची मांडणी अशक्य ठरत असते.प्राचीन कालखंडापासून विविध वृत्ते प्राप्त करणारी व्यवस्था निर्माण होत गेली.त्यामधून अशा बातमीदारांनी विविध घटना,प्रसंगाच्या अनुषंगाने बातम्या प्राप्त केल्या.ह्या प्राप्त झालेल्या बातम्या इतिहासाची साधने बनली आणि सुसंगत इतिहासाची मांडणी करण्यासाठी अथवा प्राप्तच न होणारे वृत्त अशा बातमीदारांकडून प्राप्त होऊ लागली.खऱ्या अर्थाने वंचित राहिलेले हे वृत्त प्राप्त करणारे राज्याचे अथवा त्याकालखंडामधील एक महत्वाचे घटक असत परंतु या अज्ञात इतिहासाच्या साक्षीदारांची नावे उपलब्ध होत नाहीत.

उद्दिष्टे :

1. वृत्त देण्याच्या पद्धती अश्मयुगापासून ते आजच्या डिजिटल युगापर्यंत संक्षिप्त अभ्यासणे.
2. वृत्त देण्यामधील विविधता आणि अनामिक बातमीदारांच्या कार्याचा आढावा घेणे.
3. बातमी देण्याच्या विविध कालखंडानुसार पद्धतीची माहिती घेणे.
4. राज्यकर्ते,व्यापारी विविध समाज घटक यांचे वृत्तप्राप्तीच्या मार्ग अभ्यासणे.
5. अज्ञात अनामिक बातमीदार ते ज्ञात वृत्तपत्रे हि वाटचाल अभ्यासणे.

अश्मयुगीन कालखंडापासून वृत्तनिर्मितीची व्यवस्था :

आजूबाजूच्या परिचित किंवा अपरिचित मानवी जीवनाशी संबधित घटना घडामोडीची माहिती मिळावी हि मानवी सहज प्रवृत्ती असून ती प्राचीन काळापासून आहे.अश्मयुगीन काळापासून मानवी जीवन संघटीत होत जात असतानाच मानवी चौकसपणाची आणि त्यामधून बातमीची उदाहरणे प्राप्त होतात.आरंभी भटक्या अवस्थेमध्ये असताना जगभरातील गुंफाचित्रामधून मानवी समाजजीवनाबरोबरच त्याच्या या उत्क्रांत अवस्थेतील संघर्षमय जीवनाची 'बातमी' प्राप्त होते.पुढे मुद्रणकलेच्या शोधापूर्वीही आपले आचार विचार ताडपत्रावर किंवा झाडाच्या सालीवर सांकेतिक अज्ञात लिपीत लिहिण्याची पद्धत होती.जंगलामधील आदिमानवांनी नगारे वाजवून संकटाची अथवा विजयाची दिलेली सूचना हीच बातमीची सुरवात मानतात.[१]रूढ अर्थाने पृथ्वीवर लेखनकलेचा शोध इजिप्तशियन संस्कृतीपासून लागल्याचा विद्वानाचा दावा आहे.निसर्गामधील विविध घटना,घडामोडीच्या नोंदी ठेवण्यासाठी या कलेचा वापर केला जात होता.पपायरस कागदावर लिहिण्याची पद्धत होती.प्रारंभी चित्रलिपीचा लेखन कलेसाठी उपयोग करत. त्यालाच 'हायरोग्लीफिक लिपी' म्हणतात.पशु,पक्षी,झाडे,पाणी,सूर्य,चंद्र,नित्योपयोगी वस्तूंची चित्रे काढून आपले विचार ते इतरांना कळवीत.काही शतकानंतर ध्वनीचे ज्ञान करून देण्यासाठी ते

विविध चित्रांचा वापर करू लागले.लेखनाप्रमाणे त्यांची दुसरी मोठी कामगिरी म्हणजे शाई आणि कागद यांचा वापर सुरु केला.'पेपिरस'नावाच्या झाडाच्या देठापासून पसरट तुकडे करून ते गोंदीने चिकटवून एका काठीभोवती गुंडाळले जात.अशा या वल्कलावरती नैसर्गिक शाईने लिखाण करत.शाईसाठी वनस्पतीजन्य रंग,रस आणि डिंकाचा वापर करत.[२]पुढे सुमेरियन संस्कृतीमध्ये लेखनकला विकसित झाली. पेपिरस फारसे सापडत नसल्याने चिकणमातीच्या विटा करून त्याच्या पृष्टभागावर लेखनीने दाबून लिहित आणि ती वीट सूर्यप्रकाशामध्ये वाळवली जाई किंवा भाजली जात असे.त्यामधून संदेश आदान प्रदान करण्यासाठी चित्रलिपीचा वापर केला जाई.परंतु पुढे सुमेर संस्कृतीमध्ये ५५० विविध खुणा / वर्णाचा वापर करण्यात येवू लागला.या लिपीस पाचरी लिपी असे म्हणतात.'टेलो' या ठिकाणी ३०,००० विटा रचून ठेवलेले ग्रंथालय सापडले आहे. तसेच लव्हाळापासून कागद तयार करण्याची कला या संस्कृतीला ज्ञात असल्याचे संशोधनामधून दिसते.[३]

पाश्चात्य देशामधील संदेशवहनाच्या पद्धती :

ग्रीक, रोमन संस्कृतीमध्ये माध्यमे,जाहिराती, वृत्ते अशी अनेक उदाहरणे सापडतात.प्राचीन 'पाम्पेई' शहरात उपलब्ध अवशेषापासून तेथे त्याकाळी अस्तित्वात असलेल्या दुकानावरून ती कसली दुकाने आहेत हे दर्शविणारी चिन्हे उदा.बेकरी,दुध डेअरी,दळणाची चक्की,मांस विक्रीचे दुकान यावरून जाहिरात करण्याची पद्धत ज्ञात होती.[४]तसेच ग्रीक,रोमन लोक एखाद्या कारागिराचा लोकोपयोगी माल कोणी तयार केल्यास त्याच्या माहितीचे मोठे मोठे फलक चौकामध्ये उभे करून सर्वसामान्यांना माहिती करून देत.इजिप्तमध्ये सरकारी हुकुम कोरलेले शिलालेख सार्वजनिक ठिकाणी लावून ठेवत असत.तसेच दवंडी पिटणे हा प्रकार अतिशय प्राचीन असून जगभरामध्ये प्रचलित होता.गावामधील महत्वाची घटना,प्रसंग,घडामोड सांगण्याचा प्रघात यामधून प्रचलित झाला.पुढे युरोपमध्ये ख्रिस्ती धर्माच्या चर्चवरील घंटा विशिष्ट आवाजामध्ये वाजू लागली कि,त्या घंटानादाच्या क्षेत्रामध्ये विखुरलेल्या लोकांना काही अघटीत घडल्याचे समजून ते एका विशिष्ट ठिकाणी एकत्र येत असत.अशा प्रकारे पशु पक्षी संकटाच्या इशाराखातर नेहमीपेक्षा वेगळा आवाज करून आपल्या सहकार्यांना सावध करण्याची प्रवृत्ती त्यामधून दिसते.[५]तसेच प्राचीन ग्रीक रंगभूमीवर एखादा कलाकार एखादी गोष्ट अथवा प्रसंग प्रेक्षकांच्या मनावर ठसवायची असल्यास ती हावभावयुक्त अभिनयाने अथवा काव्यमय स्वरूपामध्ये ठसवत असत.पुढील काळात रोमन साम्राज्यात बातमी देणारी मोठी पत्रके लावली जात.ज्युलियस सीझरच्या कारकिर्दीमध्ये 'ॲक्टा डायरना'(Acta Diarna) म्हणजे प्रामुख्याने सरकारी घोषणा जाहीर करणारी पत्रके दररोज रोममधील सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येत असत.या पत्रकामध्ये रोमन लोकांसाठी सूचना/आदेश जाहीर केले जात असत.सातव्या शतकामध्ये चीनमध्ये सरकारी निवेदने सार्वजनिक ठिकाणी लावून त्याच्या प्रती वितरीत केल्या जात असत.फ्रान्समध्येही अशी पद्दत प्रचलित होती.तर कधी निरनिराळ्या दरबारात आणि महत्वाच्या केंद्रामध्ये खास नेमलेल्या लोकांनी माहिती गोळा केली असे.मानवी जीवन उत्तरोत्तर संघटीत होत गेले त्याला नियमबद्ध व्यवस्था अस्तित्वात येवून राज्य संकल्पना निर्माण झाली.सत्ताधारी राजा किंवा प्रशासनाला प्रजेचे व्यवस्थित आकलन व्हावे लागते तसेच शेजारच्या राज्याच्या मनसुब्यांची,हालचालीची माहिती काढण्याची गरज निर्माण झाली.त्यामधून अशी गोपनीय वृत्ते काढून राज्यकर्त्यांना ती पुरवण्याची सुसंघटीत असे हेरखाते शासन यंत्रणेचे प्रमुख अंग बनले.[६]राज्यकारभार क्षेत्राप्रमाणे इतर संघटीत

व्यवहारात बातम्या काढण्याची आवश्यक भासू लागली.त्यातून व्यापार असे क्षेत्र होते कि,त्यातून व्यापारी वर्गामध्ये देशोदेशीच्या चालणाऱ्या घडामोडींच्या बातम्या लवकर मिळाव्या आणि आपल्या व्यापाराचे धोरण त्याप्रमाणे आखता यावे म्हणून स्वतःचे बातमीदार व्यापारी केंद्रामध्ये ठेवणे क्रमप्राप्त झाले.अमीर,उमराव,मुत्सद्दी राजेही आपापले दूत / वृत्तलेखक परदेशी ठेवून बातमी प्राप्त करत असत.या बातमीपत्राचे लेखक विद्वान नसत पण चौकस,गुप्त बातम्या काढण्यामध्ये ते पारंगत असत.बातमी मिळवण्याची उत्सुकता सर्वसामान्यांमध्येही होती.मध्ययुगात युरोपमधील अमीर,उमराव,सर्वसामान्य दूरवर जत्रांना जाताना वर्षाच्या खरेदीबरोबर विविध वृत्ते काढण्याचा उद्देश असे.[७]

प्राचीन भारतामधील वृत्तवहण व्यवस्था :

भारतामध्येही प्राचीन काळापासून बातमीचे कुतूहल होते आणि ती मिळवण्याचे प्रयत्नही होत असत.भारतामध्ये वेद,पुराण,महाकाव्यापासून हि प्रथा प्रचलित होती.सर्वसंचारी नारदमुनी आणि कुरुक्षेत्रावरील कौरव-पांडव युद्धाची माहिती सांगणाऱ्या संजयपासूनचे उल्लेख आहेत.त्याचप्रमाणे प्राचीन इजिप्तशियन,मेसोपोटेमियम,सुमेरियन संस्कृतीशी जवळपास समकालीन असणारी भारतामधील प्रगत सिंधू/हडप्पा संस्कृतीमध्येहि लिपीशास्त्र प्रगत होते.तत्कालीन इजिप्तशियन संस्कृतीमध्ये चित्रलिपीत ६०० च्यावर वर्ण होते.सुमेर लिपीत ५५० वर्ण असल्याचे अभ्यासामधून दिसते.तर सिंधू संस्कृतीत ३९६ विविध खुणा उपलब्ध असून हि चित्रलिपी उजवीकडून डावीकडे आणि डावीकडून उजवीकडे लिहली जात असावी.या ३९६ खुणापैकी २ अथवा ३ खुणा एकत्र करून जोडाक्षरे तयार करत असावेत.तसेच या लिपीचे इतर कोणत्याही प्राचीन लिपीशी साम्य आढळत नाही.सिंधू संस्कृतीच्या उदयापासून अस्तापर्यंत सर्वकाळ हि एकच लिपी अस्तित्वात होती.परंतु अजूनही हि लिपी वाचता येत नसल्याने ज्ञानाचे एक मोठे दालन अज्ञात राहिले आहे.[८]पुढे वैदिक कालखंडात आर्यांनी वेद,उपनिषदे,ब्राम्ह्न्ये,आरण्यके इ. मुखोद्गत करून वर्षानुवर्षे श्राव्य माध्यमाद्वारे जतन आणि उत्तरोत्तर संवर्धन करत गेले.पुढे उत्तर वैदिक कालखंडामध्ये त्याचे संस्कृत मध्ये लिखाण झाले.पुढे बौद्ध तत्त्वज्ञानने मांडलेल्या 'तादात्म्य' आणि 'तदुत्पती' या संकल्पनाहि वृत्तसंवाद प्रक्रीयेमध्ये महत्वाच्या ठरल्या.दोन वस्तू मधील एकात्मता म्हणजे तादात्म्य आणि दोन वस्तूमधील कार्यकारणभाव म्हणजे तदुत्पती.ज्ञान,बोध यामधूनच होतो असे हे तत्वज्ञान सांगते.'संवाद' नित्य नसून प्रत्येक क्षणास त्यामध्ये बदल होत असतो असे हे दर्शन सांगते.संवाद हि सुद्धा परिवर्तनीय स्वरुपाची बाब असल्याचे या बौद्ध तत्वज्ञानामधून स्पष्ट होते.यामधून गतिशीलता हे संवादाचे स्वरूप असल्याचे प्राचीन बौद्ध तत्वज्ञान स्पष्ट करते.

वृत्त देण्याच्या पद्धती विविध राज्यकर्त्यांच्या नियंत्रणाखाली चालू झाल्याचे दिसते. राज्यकर्त्यांना आपल्या शेजारी अथवा शत्रू राज्यांच्या मनसुब्यांची आणि हालचालीचा गुप्त सुगावा काढण्याची आवश्यकता निर्माण झाली.त्यामधून अचूक बातम्या काढून त्या राज्यकर्त्यापर्यंत पूरविनारे सुसंघटीत हेरखाते हे शासन यंत्रणेचे प्रमुख अंग बनले.देश-परदेशामधून अचूक बातम्या गोळा करणारे हेर हे जणू राज्याचे 'नेत्र'होते.कौटिल्याने हेरांनाच 'गूढपुरुष' म्हटले जाऊ लागले.अर्थशास्त्र ग्रंथामध्ये कापहिक, उदास्थित, गृहपतिक, व्यंजन,वैदेहेक व्यंजन ,तापस व्यंजन हे पाच स्थायी असलेले आणि सत्री,तिक्ष्ण,रसद,भिक्षुकी हे फिरत राहणारे अशा एकंदर नऊ प्रकारच्या गूढ पुरुषांचे वर्णन केले आहे.पुढे सम्राट अशोकाच्या कालखंडात शिलालेख,स्तंभलेखाद्वारे त्यांच्या राज्यभर पसरलेल्या या राजाज्ञेतून वृत्त देण्याच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीचा प्रत्यय येतो.हे

शिलालेख प्रामुख्याने पहाडावर,दगडी स्तंभावर कोरलेले आहेत.याद्वारे सम्राट अशोकाने आपले आत्मचरित्र थोडक्यात लिहिले आहे.हे सर्व लेखन पाली भाषेत असून हे आलेख खारोष्ट्री, ब्राह्मी लिपीत आहेत. या सर्वातून सत्य,अहिंसा,भूतदया, परोपकार, सद्भभावना,सदाचार इत्यादी गुणांचे प्रजेने आचरण करावे याचप्रमाणे राजाने प्रजेच्या कल्याणासाठी केलेल्या विविध सोई-सवलतीचीही माहिती आहे.राज्ययंत्रणा संवादशिल राखण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात सम्राट अशोक कालखंडामध्ये सुरु झाले. राज्या मधील दृश्य स्वरुपामधील महत्वाच्या घटना-घडामोडी देवळाच्या भिंतीवर शाईने पुसता येईल अशा रंगात लिहिण्याची पद्धत होती.या व्यतिरिक्त आदिवासी भागामध्ये दोरीस गाठ बांधून तो दोर दुसऱ्यांकडे पाठवला जाई.आणि त्यावर आपली गाठ मारली जात असे यामधून विशिष्ट संकेत,माहितीचे आदान-प्रदान चालत असे.[९]

मध्ययुगामधील वृत्त देण्याच्या पद्धतीतील बदल :

मध्ययुगात वृत्त देण्याचे स्वरूप पालटून त्यात वेगळेपणा आला.भारतामध्येही व्यापारी वर्गामध्ये बातमीदार ठेवण्याची पद्धत ही प्राचीन कालखंडापासून मध्ययुगापर्यंत दिसते.हिंदुस्थानातील व्यापारी वर्ग ठिकठिकाणच्या बातम्या काढण्यात तत्पर असत.कित्येक वेळेस शासकांना जबाबदार शासकीय अधिकाऱ्यामार्फत एखाद्या घटनेची बातमी समजण्यापूर्वी व्यापारी वर्गाकडे अशी वृत्ते अगोदर पोहोचत असत.पानिपतावरील मराठ्यांच्या पराभवाची बातमी नानासाहेब पेशवा यांना २० जानेवारी १७६१ रोजी भेलसाजवळ एका व्यापाऱ्याच्या पत्रावरून समजली ह्या पत्रामध्ये लिहिले होते कि,'दोन मोत्ये गळाली,बावीस मोहरा नष्ट झाल्या.चांदी व तांब्याचा खुर्दा किती नष्ट झाला याची गणतीच नाही' हि बातमीसुद्धा व्यापारी भाषेमध्ये आहे.त्यानंतर मराठ्यांच्या भयंकर पराभवाचे स्वरूप समजले.त्यामधून राज्यकर्त्याच्या बातमीदारांपेक्षा इतर वृत्तसंस्था प्रभावी होत्या हे स्पष्ट होते.इ स १५२६ मध्ये बाबरकडून स्थापित मोगल साम्राज्याच्या सूक्ष्म,काटेकोर व्यवस्थापनासाठी बातम्या गोळा करणारे लोक होते.बादशाह अकबराच्या काळात त्या कार्यात सुव्यवस्थितपणा आला.इ.स. १५७४ मध्ये अकबराने एक नोंदणी कार्यालय स्थापल्याची नोंद उपलब्ध होते. त्याचा उपयोग पुढे बखरीसाठी माहिती जमवण्यास झाला. नोंदणी कार्यालयात नकल काढणारा बराच कर्मचारी वर्ग होता. त्यांनी कागदपत्रांची संक्षिप्त आवृत्ती लिहून 'वाकीयानवीस' ला देत पुढे मोगल बादशाहीमध्येही बातमी मिळवण्याचे काम सुव्यवस्थितपणे होऊ लागले.बातमी काढणारी एक स्वतंत्र व्यवस्था कार्यरत होती. प्रत्येक सुभ्यामध्ये बादशाह बातमीदार नेमत असे त्यास 'वाकीयानवीस' असे म्हणत.सुभ्यातील महत्वाच्या घडामोडींच्या हकीकती या वाकीयानवीसमार्फत राजधानीच्या ठिकाणी 'मुख्य वाकीयानवीस' कडे लिहून पाठवत. या बातमीपत्रावरून बादशहा महत्वाचे निर्णय घेत असे. हे बातमीदार प्रत्यक्षपणे बादशहास जबाबदार असल्याने त्यांच्यावर प्रांतातील सुभेदार,मुलकी अधिकारी,फौजदार या कोणाचाही अधिकार चालत नसे.बातमीदाराचे काम हे प्रत्यक्ष बादशहाच्या नियंत्रणाखाली स्वतंत्रपणे कार्यरत असे.यामुळे प्रांतातील अधिकारीही या 'वाकीयानवीस' यांना वचकून असत.परंतु कधी-कधी वाकीयानवीस व स्थानिक अधिकाऱ्यांचे संगनमत होई व अडचणीच्या बातम्या पाठविल्या जात नसत. त्यामुळे पुढे बादशाहने स्वतंत्रपणे 'खुफियानवीस' नावाचे अधिकारी गुप्तपणे वाकीआनवीसवरती नेमत असे.अशाप्रकारे मोगल काळात बातमी मिळवण्याचे कार्य चालत असे.[१०]

मध्ययुगातील अत्यंत कार्यक्षमपणे कार्यान्वित केलेले वार्तासंकलन व संदेश देवाण-घेवाणसाठी

पत्रव्यवहाराची पद्धती हे मराठा कालखंडातील जनसंवादाचे मुख्य वैशिष्ट्य होते.विपुल प्रमाणात बखर वाड़मय, पत्रव्यवहार, पोवाडे इ. माध्यमातून सतराव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजजीवनाचे सुस्पष्ट दर्शन घडते.शिवकाळात शिवाजी महाराजांनी स्वराज्यात पत्रव्यवहाराचे महत्व लक्षात घेऊन'वाकिआनवीस' हा विशेष अधिकारी नेमला होता.मराठेशाहीत बखरीचे 'वृत्त' म्हणून स्थान महत्वाचे ठरते. बखरीमध्ये मराठा कालखंडातील सभासद बखर,९१ कलमी बखर,चिटणीस बखर या महत्वपूर्ण ठरतात.बखरीस काही इतिहासकार पत्रप्रकारही मानतात. तात्कालिक बखरपत्रे ही समाजामध्ये वृत्तपत्राचेच कार्य पार पाडत.तत्पूर्वी शिवकाळात अत्यंत कार्यक्षम हेरयंत्रणा विकसित होती. बहिर्जी नाईक हा हेरखात्याचा प्रमुख प्रसिद्ध आहे. त्याने दिलेल्या अचूक वृत्तामुळे अल्पकाळात व जलद गतीने सुरतेसारखी मोठी समृद्ध बाजारपेठ लुटणे शक्य झाले. त्यातून हेर व्यवस्थेची बिनतोड यंत्रणा व वृत्त देण्याची व प्राप्त होण्यातील कार्यक्षमता दिसते. पुढे पेशवाईमध्ये मराठा राज्याचे साम्राज्यात रुपांतर झाल्यानंतर संपूर्ण देशातील बातम्या प्राप्तीची निकड शासकांना वाटू लागली. त्यातून पेशवाईत नाना फडणविसांनी बातम्या प्राप्तीसाठी शोधक, भेदतत्पर, कार्यक्षम व्यक्ती नेमल्या होत्या.[११]

आधुनिक काळामधील वृतव्यवस्थेतील अचूकता :

आधुनिक कालखंडामध्ये वृत्त देण्याच्या पद्धतीमध्ये अचूकता येत गेली तसेच वृत्तपत्रांचा उदय आणि जलद गतीने विकास आणि विस्तारही झाला.वर्तमानपत्रास आधुनिक कालखंडामध्ये प्राप्त झालेले स्वरूप हे मुद्रणकलेच्या शोधामधून प्राप्त झाले आहे.या मुद्रणकलेच्या विस्ताराबरोबर वर्तमानपत्राचा प्रसार झाला.मुद्रणकलेस प्राचीन वारसा प्राप्त झाला आहे.मुद्रण कलेच्या विस्ताराचा महत्वाचा फायदा हा झाला कि,ज्ञान हे विशिष्ट वर्गापुरते न राहता त्याचा प्रसार सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीयांमध्ये झाला.छपाईमुळे हस्तलिखिते छापील स्वरूपामध्ये आणि संख्येने जास्त प्रमाणात निघू लागली.सोळाव्या शतकामध्ये अशी अनेक वार्तापत्रे युरोपीय देशामध्ये निघू लागली.ती विविध जत्रेवेळी,धार्मिक कार्यक्रम प्रसंगी विकले जात.त्यात युद्ध,विविध वृत्ते,सोहळे तसेच अद्भुत कथा असत.सतराव्या शतकाच्या आरंभी काही छापील वृत्तपत्रे नियमित निघू लागली.जगामधील सर्वात जुने नियमित प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र म्हणजे 'अविसा रिलेशन ओडर झायटुंग' हे इ.स १६०९ पासून नियमित प्रसिद्ध होऊ लागले.नंतर पहिले इंग्रजी वृत्तपत्र 'द विकली न्यूज फ्रॉम इटली,जर्मन इटीसी' हे लंडन येथे इ.स १६२२ मध्ये प्रसिद्ध झाले. आरंभीची वृत्तपत्रे ही चौकोनी हॅडबील स्वरुपाची होती.युरोपमध्ये रस्त्यावर ती विकली जात आणि लोकांचे लक्ष वेधण्यासाठी चटकदार बातम्या ते ओरडून जाहीर करत.[१२]

भारतामध्ये मुद्रणकलेचा पर्यायाने वृत्तपत्राचा शोध युरोपीयनांच्या आगमनानंतर झाल्याचे दिसते.२० मे १४९८ मध्ये वास्को-द-गामा हा पोर्तुगीज प्रवासी भारतामध्ये पोहोचल्यानंतर मुद्रणकला भारतामध्ये येण्यास पुढे ५०-६० वर्ष लागली.आदिलशाहीकडून इ.स १५१० मध्ये गोवा जिंकल्यावर ६ सप्टेंबर १५५० रोजी भारतामधील पहिला छापखाना गोव्याच्या सेंट पॉल कॉलेजमध्ये स्थापन झाला.पुढे ब्रिटीश सत्ता भारतामध्ये दृढ झाल्यानंतर ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या माजी सनदी नोकरांनी वृत्तपत्र काढण्यास पुढाकार घेतला.विल्यम बोल्ट या कंपनीच्या माजी डच अधिकाऱ्यांनी वृत्तपत्र काढण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.नंतर २९ जानेवारी १७८० रोजी 'कलकत्ता जनरल ॲडव्हटायझर'(हिकीज गॅझेट) हे नियमित साप्ताहिक सुरु केले.ब्रिटिशांपासून प्रेरणा घेवून १५ मे १८१८ रोजी बंगाली आणि पहिले भारतीय भाषिक वृत्तपत्र 'बेंगाल

गॅझेट' हे गंगाधर भट्टाचार्य यांनी सुरु करून भारतीय भाषिक वृत्तपत्राचा पाया घातला.मराठीमध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण'पत्र ६ जानेवारी १८३२ रोजी प्रसिद्ध केले.वृत्तपत्राच्या उदय आणि विस्तारामुळे वार्तांकन,बातमीदार,वृत्तपत्र निर्माते यांची माहिती प्राप्त होऊ लागली आणि वंचित बातमीदारांना प्रस्थापित होण्यास कालांतराने टप्प्याटप्प्याने संधी प्राप्त झाली.[१३]

अशा प्रकारे प्राचीन,मध्ययुगीन कालखंडात 'वृत्त' देण्याच्या पद्धती विकसित होत असतानाच ब्रिटीशांच्या आगमनापासून भारतात वृत्तपत्राचा विस्तार झाला आणि वृत्त देण्याच्या पद्धतीस मूर्त स्वरूप प्राप्त झाले.आजच्या'डिजिटल माध्यम क्रांती' युगामध्ये माहितीचा प्रचंड विस्तार झाला असतानाच प्राचीन,मध्ययुगामध्ये बातमी प्राप्त करण्यासाठी अनामिक बातमीदार प्रचंड प्रयत्न कशा पद्धतीने करत याचा संक्षिप्त आढावा घेण्यात आला आहे.

संदर्भ :

१. जोशी.रा.श,वृत्तपत्रविद्या परिभाषा कोष,भाषा संचालनालय,महाराष्ट्र शासन,मुंबई २००३,पृष्ट क्र ५

२. भिडे.रा.ल,सांस्कृतिक जगाची तोंडओळख,फडके प्रकाशन,कोल्हापूर,१९९०,पृष्ट क्र.२९

३. देशपांडे वि ग ,जगाचा इतिहास,मौज प्रकाशन,पुणे १९९८,पृष्ट क्र १२९

४. गोळवलकर-पोटदुखे रमा,जनसंवाद :सिद्धांत आणि व्यवहार,श्री मंगेश प्रकाशन ,नागपूर २००५,पृष्ट क्र ४७४

५. जोशी वि कृ,लेले रा के ,वृत्तपत्राचा इतिहास (खंड पहिला)युगवाणी प्रकाशन १९५१ ,पृष्ट क्र ३

६. कित्ता पृष्ट क्र ५

७. लेले रा के ,मराठी वृत्तपत्राचा इतिहास,कोटीनेंटल प्रकाशन २००४,पृष्ट क्र ९

८. Mahajan V D ,Ancient India,S Chand & Company LTD.Delhi 2001,Page no 79

९. जोशी श्रीपाद,संवादशास्त्र ,विजय प्रकाशन नागपूर २००७,पृष्ठ क्र ५६

१०. पवार सुधाकर ,वृत्तपत्र काल आणि आज,प्रकाशक-प्रमोद पवार नाशिक १९८६,पृष्ट क्र २

११. गोळवलकर-पोटदुखे रमा,उपरोक्त पृष्ट क्र १५०

१२. धारूरकर वि ल,ग गो जाधव गौरवग्रंथ,जन्मशताब्दी प्रकाशन,कोल्हापूर २००८,पृष्ठ क्र ६८

१३. विलानिलम जे व्ही (अनु जयमती दळवी),भारतामधील प्रसारमाध्यमेडायमंड पब्लिकेशन्स,पुणे २००८,पृष्ट क्र ३

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

चरकसंहितेतील आरोग्यशास्त्र - एक ऐतिहासिक चिकित्सा

प्रा. डॉ. सचिन अशोक धेंडे

इतिहास विभागप्रमुख,

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा (महाराष्ट्र)

Corresponding Author - प्रा. डॉ. सचिन अशोक धेंडे

DOI - 10.5281/zenodo.19704044

प्रस्तावना:

प्राचीन भारतातील चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, भास्कराचार्य, पतंजली, पाणिनी, तिरूवल्लुरू यांसारख्या विद्वानांनी वैद्यकीय विज्ञान-शस्त्रक्रिया, गणित, खगोलशास्त्र, धातूशास्त्र, स्थापत्यशास्त्र, योगविद्या, व्याकरण अशा ज्ञानविश्वात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे आढळते. त्यामुळे भारतातील तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, वल्लभी या विद्यापीठांना संशोधनाचे जागतिक सर्वोच्च असे मापदंड स्थापित करता आल्याचे स्पष्ट होते. व्यक्ती व प्राणी यांना रोगमुक्त करण्याशी तसेच निरोगी ठेवण्याशी निगडित असलेल्या विज्ञानाच्या शाखेला वैद्यक असे म्हणतात. भारतातील वैद्यकशास्त्र बद्दलची, औषधी पद्धतींबद्दलची माहिती चार वेदांसह ब्राह्मण, आरण्यक व उपनिषदांमधून मिळते.

परिभाषित शब्द : वैदिक संहिता, कायाचिकित्सा, अवैदिक परंपरा, पंचकर्म, त्रिदोष.

प्राचीन भारतातील वैद्यकशास्त्र व वैद्यक :

प्राचीन भारतात (इ.स. ७ वे शतक) आलेल्या चीनी प्रवासी इत्सिंगच्या प्रवासवृत्तातून[१], मध्ययुगीन काळातील अल्बेरुनीच्या ग्रंथातून[२] व रसायनशास्त्राचे प्रसिद्ध अभ्यासक प्रफुल्ल चंद्र रे यांच्या 'A Hindu Chemistry of India' अशा ग्रंथातून भारतीय वैज्ञानिक स्थितीचे दर्शन घडते.[३] प्राचीन भारतीय वैद्यकीय इतिहासाचा आढावा घेतला असता चरकांपासून ते वाग्भटांपर्यंतचा कालखंड हा आयुर्वेदासाठी सुवर्णकाळ असल्याचे निदर्शनास येते. या वैद्यकीय ज्ञान परंपरेत अग्निवेश, जतुकर्ण, पाराशर, क्षीरपाणी यांनी वैद्यकशास्त्रावर महत्त्वपूर्ण ग्रंथ रचना केलेली आढळते. प्राचीन भारतात वैद्यकीय अभ्यासासाठी तक्षशिला विद्यापीठ प्रसिद्ध होते. प्राचीन भारतातील औषध प्रणाली, वैद्यकीय साहित्य व उपचार पद्धतींच्या ऐतिहासिक अभ्यासातून तत्कालीन वैद्यक हे विविध प्रांतातील व जाती समुदायातून आल्याचे दिसते. प्राचीन भारतीय औषध प्रणाली व उपचार पद्धती यांना तत्कालीन जागतिक परिप्रेक्षात प्रमाण मानले जात असल्याचे[४] निदर्शनास येते. *चरक संहिता, सुश्रुत संहिता,* सातव्या शतकातील वाग्भट्टांचा *अष्टांगहृदय अशा ग्रंथातून वैद्यकीय उपचार पद्धती व औषधी वनस्पती यांची सविस्तर माहिती*[५] *दिलेली आढळते.*

महर्षी चरक-पूर्वचरित्र :

महर्षी चरक हे भारतीय वैद्यकशास्त्राच्या इतिहासातील सर्वात प्रसिद्ध व्यक्तींपैकी एक होते. महर्षी

चरक यांचा कालखंड इ.स.पू. पहिले शतक मानला जात असला तरी त्यांच्या जन्म व बालपण याबाबत फारसे तपशील उपलब्ध नसल्यामुळे इतिहाससंशोधकात मतभिन्नता आढळते. "चरक" नावाचा अर्थ "भटकंती करणारे विद्वान" किंवा वैद्य असा होतो. यातून प्रवासी उपचारकांची परंपरा सूचित होते. चरक हे कुषाण सम्राट कनिष्काचे दरबारी वैद्यक असल्याचे[६] पारंपारिक धारणेनुसार तर्क काढले जातात. प्राचीन भारतीय आयुर्वेद हा आत्रेय वैद्यकशास्त्र व धन्वंतरी शस्त्रक्रियाशास्त्र अशा दोन मुख्य विचारसरणींमध्ये विकसित झाल्याचे स्पष्ट होते. महर्षी चरक यांना अग्निवेश तंत्राचे संकलन आणि विस्तार करण्याचे श्रेय दिले जाते. आत्रेय परंपरेतील चरक संहिता व धन्वंतरी परंपरेतील सुश्रुत संहिता यांना तत्कालीन विशेष महत्त्व प्राप्त झाल्याचे निदर्शनास येते.

चरकसंहिता- संक्षिप्त आढावा :

महर्षी चरक निर्मित 'चरकसंहिता' हा आयुर्वेदावरील सर्वात जुना व सर्वात प्रामाणिक ग्रंथ असून तो भारतातील प्राचीन वैद्यकीय शास्त्राचा पाया असल्याचे स्पष्ट होते. हा ग्रंथ सूत्र स्थान (सामान्य तत्त्वे व उपचारशास्त्र), निदान स्थान-(पॅथॉलॉजी), विमान स्थान- (निदान व तपास), शरीर स्थान- (शरीरशास्त्र व भ्रूणशास्त्र), इंद्रिय स्थान-(रोगनिदान), कल्प स्थान-(औषधनिर्माणशास्त्र) व चिकित्सा स्थान-(उपचार) सिद्धी स्थान-(प्रक्रिया तसेच वैद्यक यश) अशा आठ विभागांमध्ये विभागलेला आहे. यात एकूण १२० अध्याय, ९०३५ सूत्र व १२००० श्लोक[७] असल्याचे स्पष्ट होते.

चरकसंहिता व कायाचिकित्सा पद्धती :

महर्षी चरक यांनी धर्म अर्थ काम व मोक्ष यांचा निरोगीपणा हा उत्तम पाया असल्याचे प्रतिपादन करून वात, पित्त, कफ अशा त्रिदोषाची संकल्पना स्पष्ट केलेली आहे. त्यांच्या मते, 'प्रत्येक व्यक्तीमध्ये एक अद्वितीय दोष मिश्रण (प्रकृती) असते. ती शरीर, मन आणि आरोग्य प्रवृत्तींना आकार देते. हे दोष संतुलित राहिल्यास व्यक्ती निरोगी राहते मात्र यात असंतुलन निर्माण झाल्यास ते आजाराला कारणीभूत ठरतात. या त्रिदोषांचे संतुलन अन्न, ताणतणाव आणि वातावरण यासारखे घटकांमुळे बिघडू शकतात'[८] असे वैद्यकीय स्पष्टीकरण दिलेले आढळते. ते आजच्या आधुनिक वैद्यकीयशास्त्रातील संशोधनातून देखील सिध्द झालेले आहे.

महर्षी चरक यांनी 'चरकसंहिता' या ग्रंथात शरीराच्या अनेक अवयवांसह हाडे व अंतर्गत भागांचे वर्णन करून तापासारख्या रोगाची लक्षणे स्पष्ट केली आहेत. कफ, वारा, पित्त यांच्या विकृतीमुळे, ऋतूतील बदलांमुळे, जंतू किंवा कृमींच्या संसर्गामुळे आणि दूषित अन्नामुळे[९] देखील रोग लागण होण्याच्या शक्यता वर्णिलेल्या आहेत. याशिवाय काही आनुवंशिक रोग याबद्दल माहिती दिलेली आहे. चरक यांनी पचन, चयापचय आणि रोग प्रतिकारशक्तीचे प्रारंभिक सिद्धांत देखील मांडल्याचे आढळते. त्यांनी भ्रूणशास्त्र, अवयवांचे कार्य व रचना याबद्दल सखोल माहिती देऊन वाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण झाल्यामुळे रोग निर्माण होतात[१०] असे स्पष्ट केले आहे. चरकसंहितेचा केंद्रबिंदू *वात*, *पित्त* व *कफ* हे *त्रिदोष आधारित* विसंगती अथवा असंतुलन रोग उत्पत्तीचे निदान प्रक्रियेचे संहितीकरण असल्याचे दिसते. यातून रुग्णाचे वय, आहार सवयी, मानसिक स्थिती, रोगाच्या *घटनेचा* काळ यांची पार्श्वभूमी विचारात घेऊन आधुनिक डॉक्टरांच्या प्रमाणे प्रत्यक्ष लक्षणे पडताळून व अनुमानाच्या आधारे रोगनिदान करण्याची प्रक्रिया[११] केली जात असल्याचे दृष्टीस येते. *चरक संहितेत* उपचारपद्धती व *सुश्रुतसंहितेत* विविध

शस्त्रक्रिया प्रक्रियांचे तपशीलवार वर्णन केलेले निदर्शनास येते.

चरक यांनी शरीरात वात दोष उत्पन्न झाल्यावर प्रथम स्नेहन व नंतर स्वेदन करून आणि मात्रा व काल यांचा विचार करून पंचकर्म करण्याचे[१२] सूचित केल्याचे आढळते. तसेच त्यांनी मानवी शरीरातील हाडांची संख्या (३६०) व विविध शारीरिक अवयवांच्या रचनेबद्दल सिद्धांत[१३] मांडल्याचे आढळते. हे सिद्धांत आधुनिक वैद्यकीयशास्त्राच्या मानकांच्या तुलनेत काही अंशी दोषपूर्ण असले तरी तत्कालीन परिस्थितीत त्यांनी याबाबत विचार केला होता हेच महत्त्वपूर्ण होते. त्यांनी रोग लक्षणे, रोगनिदान पद्धती, औषधी व इतर घटकांबाबत मांडणी करीत असताना मूलभूत अनुवांशिक तत्त्वे (DNA) समजून घेऊन जन्मजात अपंगत्व हे आरोग्य दोष किंवा विकारांमुळे नव्हे तर आईच्या फलित अंड्यात किंवा वडिलांच्या शुक्राणूंमधील समस्यांमुळे होते[१४] हे स्पष्ट करून वैद्यकीय शास्त्रातील नाविन्यपूर्ण संशोधन दूरदृष्टीचे असल्याचे निदर्शनास येते.

चरकसंहिता व औषधशास्त्र :

प्राचीन भारतीय औषधशास्त्राचा पायाभूत ग्रंथ म्हणून चरकसंहितेचा उल्लेख आढळतो. या ग्रंथात चरक यांनी प्राचीन काळातील वैद्य, रुग्ण, परिचारिका यांच्याबरोबरच औषधोपचार पद्धती यांची विशेष माहिती दिलेली आढळते. त्यांनी चरकसंहितेत रोगांच्या उपचारात वापरल्या जात असलेल्या अश्वगंधा, तुळशी, त्रिफळा अशा विविध औषधी वनस्पतींची सखोल चर्चा केल्याचे दिसून येते. त्यांनी अपामार्ग तंडुलीय अध्यायात डोकेदुखी, कृमीसंबंधी आजार, वास येत नसल्यास, मूर्च्छा आल्यास आघाडयाचे बी, पिंपळी, मिरे, वावडिंग, शेवगा, धने, पांढरे जिरे, वेलदोडे, पांढरी तुळस, लसूण, हळद, दारुहळद, सेंधेलोण, सुंठ अशा औषधींची माहिती[१५] दिलेली आहे.

महर्षी चरककृत चरकसंहितेत क्षुधावर्धक व पोटशूळनाशक औषधी म्हणून पिंपळी, पिंपळीमूळ, गजपिंपळी मूळ चित्रक व सुंठ यांचा वापर करण्याचा सल्ला दिलेला आहे. शरीरातील जंतांच्या नाशाकरिता वावडिंग, पिंपळीमूळ, मिरे ताकातून वापरण्याचे[१६] सूचित केले आहे. त्यांनी चरकसंहितेत करंज, अडूळसा, गुळवेल, हळद व दारुहळद, खैर, धावडा, लिंव, वावडिंग, कण्हेरीची साल.लसूण, जाईचे कोवळे अंकूर, वेखंड, रेणुकाबीज, वेलदोडे, नागरमोथा अशा अनेक वनस्पती व पदार्थ यांचे औषधी गुणधर्म[१७] स्पष्ट केले आहेत. कोष्ठ, हळद, दारुहळद, पांढरी तुळस, कडू पडनळ, कडूनिंव, आस्कंद, देवदारु, शेवगा, मोहरी, चिरफळ, धने, जलमुस्ता आणि चोर ओवा ही समभाग घेऊन त्यांचे चूर्ण करून ताकात मिसळून अंगास तेल लावून नंतर अंगास चोळल्यास अंगाची खाज, करटे, कोड, सर्व प्रकारचे कोड, सूज नष्ट [१८] करण्यासाठी अशा प्रकारचे औषध सुचविलेले आहे. याशिवाय कोष्ठ, गुळवेल, मोरचुद, दारुहळद, हिराकस, कपिला, नागरमोथा, लोध्र, रोहिपगवत, राळ, वावडिंग, मनशीळ, हरताळ, कण्हेरीची साल या सर्वांचे चूर्ण तेलाने माखलेल्या अंगास लावणे, म्हणजे गजकर्ण, किटिभ, पामा, खरुज, इसब इ. रोग नाहीसे होतात. तसेच तिळाचे क्षारातून हळद, दारुहळद, करंजाचे बी, कण्हेरीची साल व गाभा ही औषधे कुष्ठावर प्रभावी असल्याचे प्रतिपादन केले आहे. त्याचबरोबर मोहरी तेल अंगास लावून त्यावर कावळीची अगर कण्हेरीची पाने ताकात वाटून लेप लावल्यास कुष्ठ बरे होत[१९] असल्याचे म्हटले आहे. शरिरातील थंडी त्वरित जाण्याकरिता शिलाजीत, वेलदोडे असे औषधोपचार सुचविले आहेत. चरक यांनी आयुर्वेदाला आरोग्य सेवेच्या प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक घटकांना संबोधित करणारी संपूर्ण

औषध प्रणाली म्हणून पाहिले. त्यांनी गर्भाची निर्मिती आणि विकास, मानवी शरीरक्रियाविज्ञान आणि शारीरिक कार्य आणि बिघाड यावर देखील आजार रोखणे हे नंतर उपचार करण्यापेक्षा किंवा बरे करण्यापेक्षा अधिक शक्तिशाली आहे. त्यांनी अनेक वनस्पतींच्या औषधी गुणधर्मांचे दस्तऐवजीकरण केल्यामुळे आयुर्वेदिक उपचारांची व्याप्ती सिद्ध झाली. ही दीर्घकालीन आरोग्याची मुळे आहेत.

आधुनिक वैद्यकीय शास्त्रांमध्येही या औषधी वनस्पतींचा आयुर्वेदिक औषधे म्हणून मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याचे दृष्टीस येते. यावरून चरकांचे वैद्यकीय संशोधनाचे महत्त्व स्पष्ट स्पष्ट होते. याशिवाय त्यांनी पर्यावरणीय क्षेत्रांतील स्थानिक वनस्पती यांचे वैद्यकीय चिकित्सा पद्धतीवर कसा प्रभाव पडतो यावर देखील चर्चा केल्याचे निदर्शनास येते. महर्षी चरक यांनी अनेक रोगांवर उपचार व औषधे बनवण्याच्या पद्धती स्पष्ट करून आजारांवर उपचार करण्याबरोबरच आजारच होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक औषधांचे महत्त्व देखील जाणल्याचे दिसते. मानवी आरोग्याच्या दृष्टीने चयापचय (Metabolism) व रोगप्रतिकारक शक्ती (Immunity Power) यावर अधिक भर दिला पाहिजे अशी त्यांनी मांडणी केल्याचे आढळते.

चरकसंहिता व आहारशास्त्र :

चरकसंहितेतील सूत्रस्थानाच्या अध्याय क्रमांक २७ ला अन्नपानविधी अध्याय असे देखील म्हटले जाते. यामध्ये फळे, दुध, दुग्धजन्य पदार्थ, धान्ये, भाज्या, तेल, डाळी, मांस आणि मध यांचे मानवी आहारातील महत्त्व स्पष्ट केले आहे. त्यांनी आहार, दिनचर्या, मजबूत पचनसंस्था आणि संतुलित जीवनशैली यांचे महत्त्व दीर्घायुष्यासाठी अधोरेखित केले आहे.[२०] तसेच मिठाच्या अतिसेवनातून अंधत्व, नपुंसकता, अपरिपक्व केस पांढरे होणे, टक्कल पडणे यांसारखे दुष्परिणाम प्रादेशिक आहार संस्कृतीचे अवलोकन करून स्पष्ट करण्याचा वैद्यकीयशास्त्रदृष्ट्या मांडणी केली आहे.

चरकसंहिता व मानसिक आरोग्य विचार :

चरक यांनी 'योग' आरोग्य व आत्मबलासाठी उपयुक्त मानून त्यासंदर्भात 'चरकसंहिता' या ग्रंथात तपशीलवार वर्णन केल्याचे आढळते. आधुनिक वैद्यकशास्त्राने देखील योगाचे ध्यानधारणा, मानसिक आरोग्य बाबत सहसबंध व महत्त्व[२१] अधोरेखित केलेले आहे. चरक संहितेनुसार आरोग्य म्हणजे केवळ शारीरिक स्थिरता नाहीतर मन आणि बुद्धी यांचा समतोल देखील आहे. चरक संहितेच्या विमानस्थान या विभागात रुग्णाची मानसिक स्थिती तपासणी तत्त्वांचे स्पष्टीकरण आहे. मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी आयुर्वेदिक औषधे हे एक महत्त्वाचा स्रोत असल्याचे प्रतिपादन केले आहे.

चरकसंहिता व वैद्यकीय नैतिकता :

महर्षी चरक यांनी जगाला प्रथमच वैद्यकीय नीतिमत्तेबद्दलचे धडे दिलेले दिसून येतात. त्यांच्या बहुतांशी नैतिकतत्वांचा अवलंब 'मॉडर्न मेडिकल सायन्स' मध्ये वैद्यकीय प्रशिक्षणादरम्यान होत असल्याचे दिसून येते. वैद्यकाने मद्यपान, नकारात्मक वर्तन व वाईट व्यक्तींच्या संगतीपासून अलिप्त राहिले पाहिजे. रुग्णाच्या आजारपणाबाबत व त्याच्या घरातील स्थितीबद्दल सार्वजनिक वाच्यता करू नये. त्यामुळे रुग्णाला हानी होण्यापासून बचाव होईल. वैद्यकाने रुग्णाच्या घरी जाताना आपले शब्द, विचार, बुद्धी आणि इंद्रिये वापरून पूर्णपणे रुग्णावर व त्याच्या उपचारांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे[२२] म्हटले आहे.

वैद्यकाची नीतिमत्ता व हेतू हे औषधाइतकेच महत्त्वपूर्ण असल्यामुळे उपचार पूर्ण समर्पण व करुणेने केले पाहिजेत. वैद्य हा स्मरणशक्तीने पुरा, हेतु म्हणजे निदान, कारण व युक्ती जाणणारा व स्थिरबुद्धीचा असा असल्यास औषध संयोगांनी चिकित्सा व उपचार करण्यास योग्य असतो.

निष्कर्ष:

प्राचीन भारतातील वैद्यक ज्ञानपरंपरेस जगमान्यता मिळाल्याचे आढळते. महर्षी चरक यांनी आयुर्वेद व औषधशास्त्र या क्षेत्रात दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानामुळे आरोग्य शास्त्राचा पाया भक्कम झाला. त्यामुळे त्यांना "भारतीय आरोग्य चिकित्साशास्त्राचे जनक" म्हणून गौरविले जाते. त्यांचा 'चरक संहिता' हा ग्रंथ सर्व समावेशक कायाचिकित्सा कोश बनल्याचे दृष्टीस येते. या ग्रंथातील चिकित्सा पद्धती व रोग निदान प्रणालीतूनच खऱ्या अर्थाने वैद्यकीयशास्त्र समृद्ध झाल्याचे निदर्शनास येते. नंतरच्या काळात 'चरक संहिता' या ग्रंथाचा फार्सी, अरबी व तिबेटी अशा भाषांमध्ये अनुवादित झाल्यामुळे मध्य आशियापर्यंत या ग्रंथाचा प्रभाव निर्माण झाल्याचे आढळते.

आजच्या जागतिकीकरण काळात देखील आहार-पद्धती, तर्कसंगत रोगनिदान व विश्लेषण पद्धती व रोगप्रतिबंधक उपचार यासाठी चरकसंहितेची उपयुक्तता महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे स्पष्ट होते. महर्षी चरकांच्या समकालीन युरोपात वैद्यकीय सिद्धांत पद्धतींचा उदयही झालेला नव्हता अशा काळात ते रक्ताभिसरण, मधुमेह, क्षयरोग अशा विविध रोगांचा अभ्यास व रोग लक्षणे याबाबत मांडणी करत होते यावरून त्यांचे दृष्टेपण अधोरेखित होते. 'चरकसंहिता' हा ग्रंथ म्हणजे पंचकर्म चिकित्सा, विविध रोगांच्या प्रतिबंधात्मक, प्रोत्साहनात्मक व उपचारात्मक पैलूंचे वर्णन करणारा ज्ञानकोश ठरल्याचे दिसून येते. महर्षी चरक यांचे आयुर्वेद व औषधांमधील योगदान आजही प्रेरणास्रोत ठरत असल्याचे आढळते.

संदर्भ सूची :

१. संतराम बी.ए. (अनुवाद) इत्सिंग कि भारत यात्रा, इंडियन प्रेस लिमिटेड, प्रयाग, १९२५ पृष्ठ क्र. २०६

२. अब्बासी, नूर नबी, अल-बिरूनी, नशनल बुक ट्रस्ट, दिल्ली, १९१४, पृष्ठ क्र. १७६

३. Ray Praphulla Chandra, A History of Hindu Chemistry,Vol.I, The Bengal Chemical & Pharmacetucal works, Ltd, Culcutta, 1903 Page No. 24-32

४. Satyavati C.V. The Role of Ayurveda as Contemporary Medical Science and Therapeutic System, IIC Quarterly, 1991, Page No.71-82

५. Kutumbiah p., Ancient Indian Medicine, Orient Longman Publication, Delhi, 1959, Page No. 40-48

६. https://vishwakosh.marathi.gov.in/17977/

७. Dass Ranjip Kumar, Charak Samhita - A Critical Review, Journal of Ayurveda and Holistic Medicine, August 2013, Vol 1, Issue 5, Page No.,24

८. शिवशर्मा पंडित, चरकसंहिता, खेमराज श्रीकृष्णदास प्रकाशन बम्बई, २०१९, पृष्ठ क्र. ११, ४८२, व ५२९-५३२

९. Sharma P.V, (ed), The CarakaSamhita – Sutrasthanam (I) 1: 41. Text with English Translation. varanasi: Chaukhamba Orientalia, 2014: Page No.6

१०. शिवशर्मा पंडित, चरकसंहिता, उपरोक्त, पृष्ठ क्र. ६८१-६८८

११. Dwivedi LD, Dwivedi BK, Goswami PK. Editors. Caraka Samhita. Vol I. Chowkhamba Krishnadas Academy, Varanasi. Sutra Sthan Ch 30 Ver. 8-12

१२. कुलकर्णी पांडुरंग (संपा.), मराठी चरकसंहिता-पूर्वार्ध, सागर प्रकाशन, पुणे, २०११, पृष्ठ क्र. ३७

१३. त्रिपाठी ब्रह्मानंद व पांडे गंगासहाय, चरकसंहिता (हिंदी अनु.) चरकचंद्रिका, चौखंबा सूरभारती प्रकाशन, वाराणसी, शारीरस्थान भाग-७, २००७ पृष्ठ क्र. ९२१

१४. पाण्डेय काशिनाथ, चतुर्वेदी गोरखनाथ, चरकसंहिता, चौखाम्बा, विद्याभवन, वाराणसी, १९६२ पृष्ठ. क्र. ८४५,८६५,८७७

१५. गुप्त कविराज (अनु.), महर्षी अग्निवेशप्रणीत चरक-संहिता, भार्गव पुस्तकालय बनारस, द्वितीय आवृत्ती, १९४८ पृष्ठ क्र.३०-३१

१६. उपरोक्त, पृष्ठ क्र. ३४

१७. कुलकर्णी पांडुरंग (संपा.), मराठी चरकसंहिता-पूर्वार्ध, पृष्ठ क्र. ३६ ते ३८

१८. उपरोक्त, पृष्ठ क्र. ३९

१९. उपरोक्त, पृष्ठ क्र. ४१

२०. पाण्डेय काशिनाथ, उपरोक्त, पृष्ठ. क्र. १०२, १६१

२१. शिवशर्मा पंडित, चरकसंहिता, उपरोक्त, पृष्ठ क्र. ८८-९०

२२. उपरोक्त, पृष्ठ क्र. १००, १०१,१०४,

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

श्रीसती मलकजिन अर्थात श्री क्षेत्र मल्लिकार्जुन: अ रिलीजियस डायव्हर्सिटी फोर्ट विलासगड

प्रा. डॉ. रामचंद्र गुर्लिंग घुले

सहयोगी प्राध्यापक (इतिहास)

मा. व. पा. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर ता. वाळवा, जि. सांगली.

Corresponding Author - प्रा. डॉ. रामचंद्र गुर्लिंग घुले

DOI - 10.5281/zenodo.19704069

सारांश (Abstract):

या शोधनिबंधामध्ये सांगली जिल्ह्यातील विलासगडावरील धार्मिक विविधतेचा अभ्यास केला आहे. प्रागैतिहासिक कातळशिल्पे, सातवाहनकालीन बौद्ध लेणी, मल्लिकार्जुन मंदिर व सोमेश्वर गुंफा, तसेच सूफी संतांच्या दर्ग्यांमुळे हा डोंगर धार्मिक सहअस्तित्वाचे ठरला आहे. या अभ्यासातून इतिहास, संस्कृती, लोकपरंपरा व पर्यटनक्षेत्रातील महत्त्व अधोरेखित केले आहे.

नमुना शब्द (Keywords): कातळशिल्पे, विलासगड, मल्लिकार्जुन, बौद्ध विहार, चांद बुखारी दर्गा.

प्रस्तावना:

सांगली जिल्ह्याच्या वाळवे तालुक्यामध्ये येडेनिपाणी गावाजवळ असणारा मल्लिकार्जुनचा डोंगर म्हणजेच ऐतिहासिक 'विलासगड' होय. राष्ट्रीय महामार्गाच्या पूर्वेस चार किलोमीटर अंतरावर, सह्याद्री पर्वताच्या मुख्यरांगेमधील चांदोली कडून पश्चिम पूर्व दिशेने नागमोडी वळणाऱ्या या एका उंच डोंगराने प्रागैतिहासिक काळापासूनचा समृद्ध वारसा आपल्या काळ्या वज्रछातीवर डौलाने जपला आहे. १६.९७२६° उत्तर ७४.२८६६° पूर्व अक्षांश रेखांशावर हा डोंगर असून त्याच्या पायथ्याला स्वातंत्र्य आंदोलनात अग्रेसर असणारे येडेनिपाणी हे प्रसिद्ध गाव आहे. येडेनिपाणी या गावातून पायऱ्यांचा रस्ता तर गोटखिंडी, मालेवाडी, इटकरे, येलुर, तांदूळवाडीकडून मल्लिकार्जुन डोंगरावर येण्यासाठी पायवाटा आहेत. प्राचीन काळात नाणेघाट-नाशिक ते कोल्हापूर मार्गावरील डोंगराच्या दोन्ही बाजूला दिसणारी लेणी प्राचीन श्रेष्ठि व्यापाऱ्यांनी बौद्ध भिक्षूंना दान केली आहेत. यापैकीच विलासगडावरील ही लेणी दिसतात. विलासगडच्या पायथ्याला असणाऱ्या येडेनिपाणी गावचे थोर सुपुत्र स्वातंत्र्य सैनिक श्री. पांडुरंग पाटील (मास्तर) यांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात मोठ्या तळमळीने सहभाग घेतला. प्रति सरकारचे आंदोलन या भागात त्यांनी सक्रिय केले. प्रति सरकारच्या गुप्त बैठका मल्लिकार्जुन डोंगरावर होत असत.

संशोधन समस्या :

१. विलासगडावर आढळणारी धार्मिक विविधता पुरेशा प्रमाणात नोंदलेली नाही.
२. बौद्ध, हिंदू, लिंगायत, मुस्लिम धार्मिक स्थळे एकाच ठिकाणी कशी निर्माण झाली?
३. जैवविविधता व पुरातत्त्व अवशेष यांचा इतिहासाशी संबंध कसा आहे?
४. किल्ल्यावरील स्थापत्य, शिलालेख, दंतकथा व अवशेष यांचा शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. विलासगडाच्या ऐतिहासिक व धार्मिक वारशाचा शोध घेणे.

२. डोंगरावरील जैवविविधता, अवशेष व कातळशिल्पांचा अभ्यास करणे.

३. लोकजीवन, दंतकथा व धार्मिक विविधता यांचा परस्परसंबंध मांडणे.

४. मल्लिकार्जुन डोंगरावरील बौद्ध विहारांचा ऐतिहासिक अभ्यास करणे.

५. हिंदू-लिंगायत परंपरेतील मंदिर व त्यातील शिल्पांचा संदर्भ शोधणे.

६. सूफी संतांच्या दर्ग्यामुळे निर्माण झालेल्या गंगा-जमुनी संस्कृतीचे विश्लेषण करणे.

७. स्थानिक लोकजीवन व धार्मिक सहअस्तित्वाच्या परंपरेला उजागर करणे.

पद्धतीशास्त्र (Methodology) :

प्राथमिक साधने - प्रत्यक्ष स्थळभेटी, लोकसाक्षात्कार (interviews), शिलालेख व अवशेषांचे निरीक्षण.

द्वितीयक साधने- गॅझेटिअर, प्राचीन इतिहास व स्थापत्यशास्त्र ग्रंथ, संशोधन प्रबंध, पुरालेख.

विश्लेषण पद्धती- तुलनात्मक ऐतिहासिक विश्लेषण, धार्मिक व सांस्कृतिक प्रतिमानांचा वर्णनात्मक अभ्यास.

संशोधनाचे महत्त्व :

१. विलासगडावरील बौद्ध विहार, मातृसत्ताक परंपरेची प्रतीके व धार्मिक वैविध्य याबाबतचे संशोधन इतिहासाच्या अज्ञात बाजू समोर येवून याबाबतचे ज्ञान अधिक परिपूर्ण होवून ज्ञानवृद्धी होण्यास मदत होईल.

२. संशोधनामुळे प्राचीन वास्तू, लेणी, शिलालेख, लोकपरंपरा व दंतकथा यांचा अभ्यास होऊन त्यांचे शास्त्रीय विश्लेषण करता येते. त्यामुळे त्या वारशाचे दस्तऐवजीकरण होऊन पुढील पिढ्यांसाठी त्याचे जतन करता येते.

३. या निबंधामुळे पर्यटन व धार्मिक स्थळांच्या विकासासाठी, जैवविविधतेच्या संवर्धनासाठी व सांप्रदायिक ऐक्य टिकवण्यासाठी संशोधन महत्वपूर्ण आहे.

४. एखाद्या स्थळाचा इतिहास उलगडल्याने तेथील लोकांचा आत्मविश्वास वाढतो. धार्मिक व सांस्कृतिक वैविध्यामुळे सामाजिक सौहार्द व ऐक्य वृद्धिंगत होते.

५. विलासगडावरील धार्मिक विविधता व युरोपातील कातळ शिल्पांशी साम्य या संदर्भामुळे स्थानिक वारसा जागतिक संदर्भात समजून घेता येतो.


६. संशोधनातून पुढील संशोधकांना नवे विषय, सामाजिक उपयुक्तता, सामाजिक व धार्मिक प्रश्नांची सोडवणूक व संशोधनाचे क्षेत्र मिळण्यास मदत होईल.

७. धार्मिक ऐक्य, पर्यटन विकास, जैवविविधतेचे जतन आणि सांस्कृतिक एकात्मता यासाठी शोध निबंध उपयुक्त ठरतो.

८. संशोधनातून मिळालेली माहिती शासनाला व धोरणकर्त्यांना उपयुक्त ठरते. पर्यटन धोरण, पर्यावरण संवर्धन योजना किंवा धार्मिक स्थळांच्या जतनासाठी ठोस धोरणे आखताना संशोधनावर आधारित पुरावे महत्त्वाचे ठरतात.

विलासगडाची जैवविविधता:

येडेनिपाणी गावापासून एक मैल अंतर पार करून गेल्यावर या किल्ल्याच्या पायथ्याला पोहोचता येते. गर्द वनराईतून जांभ्या खडकावरुन चालत जाताना वाटेत करवंदीची जाळी, फडे निवडुंगाची काटेरीबने लागतात. निवडुंगाच्या काटेरी फडावर असणारी लाल भडक बोंडे चटकन लक्ष वेधून घेतात.या खुरट्या जंगलात पक्ष्यांचा किलबिलाटाने लागलेली धाप सुसह्य होते. येणारे पर्यटक या पक्षांसाठी झाडावर बांधलेल्या पाण्याच्या आडव्या बाटल्या व मातीच्या उथळ वाडग्यात पाणी ओतल्या शिवाय पुढे जात नाहीत. मोर, लांडोर, सुगरण, पोपट, बुलबुल, पारवा, रान धोबी, मैना,कोकीळ, चिमण्या, घार, टिटवी हे पक्षी येथे सहज दृष्टीस पडतात. पिंपळ, चिंच, चाफा, आंबा, काटेशेवरी, जांभळ, सिताफळ, निवडुंग, बोर व करवंद इत्यादी वृक्ष झाडांनी हा डोंगर बहरलेला आहे. या डोंगरावर सर्वात जास्त रानमेवा पिकत असेल तर तो म्हणजे तोरण होय. त्यालाच प्रांत परत्वे चोखण किंवा मोवई असे म्हणतात. नैसर्गिक जैवविविधता लाभलेल्या या डोंगरावर उन्हाळ्यात वणवे पेटत असल्याने त्यास धोका पोहोचत असतो. पाण्याच्या बाटल्या प्लास्टिकच्या पिशव्या टाकून पर्यटकांनी या किल्ल्यास विद्रूप केले आहे. किल्ल्याचा वरील भाग अग्निजन्य बेसाल्ट खडकाचा असून मजबूत असा आहे.



1. विलासगडचा नकाशा



2. विलासगडावरील कातळशिल्प



3. सातीआसरा(सप्तमातृकापट्ट)

विलासगडावरील कातळ शिल्पे :


पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये पीएचडी संशोधनासाठी भटकंती करताना सचिन पाटील यांना विलासगडावर कातळशिल्पे आढळून आली.. बावरदीन बाबा दर्ग्याच्या पश्चिम बाजूस ठिकठिकाणी कातळावर चिन्हे कोरली आहेत. त्यांच्या संशोधनातून अश्मयुगीन काळापासून मानवाचा वावर येथील डोंगर रांगेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या पूर्वी डेक्कन कॉलेजचे अभ्यासक डॉ. रघुनाथ पप्पू यांनी वाळवा, डिग्रज, हरिपूर परिसरात केलेल्या संशोधनामध्ये अश्मयुगीन मानवाची वापरातील हत्यारे आढळल्याचे नोंदवले आहे. तसेच शिवपुरी, ऐतवडे बुद्रुक, ढगेवाडी, वशी (ता. वाळवा) तर मळणगाव (ता. कवठेमहांकाळ) परिसरात इतिहास पूर्व कालखंडातील इंडो-रोमन व्यापाराच्या पाऊलखुणा म्हणून ओळखली जाणारी दगडी चक्रव्यूह रचना श्री सचिन पाटील यांना सापडली आहेत. यावरून रोमन व्यापाऱ्यांनी कोकणातून याच परिसरात प्रवेश करून व्यापारासाठी घाटमाथ्यावरील व्यापारी पेठमध्ये विस्तार केला असल्याचे सिद्ध होते.

डेक्कन कॉलेजचे पुरातत्त्व शास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. डी. साबळे यांच्या मते, "मल्लिकार्जुन डोंगरावरील


कातळ शिल्पचिन्हे ही मुख्यत्वे 'व्हॉल्वा' आहेत. स्त्री सृजनशक्तीची प्रतीके आहेत. मातृपूजन परंपरेचा समृद्ध वारसा सांगणाऱ्या सृजनेंद्रियांच्या या खुणा आहेत. ती मातृसत्ताक परंपरेची ग्वाही देतात. ही चिन्हे इस पूर्व ८००० ते इस पूर्व ६००० वर्षापूर्वीची आहेत."

भारतीय पुरातत्त्व खात्याचे प्रादेशिक संचालक डॉ. नंदिनी साहू यांच्या मते, प्रजनन पंथांचे ट्रॅगल (vulva symbols) वर्तुळाकार प्रतीकात्मक रूपे किंवा मातृदेवता भारत व युरोपातील खडकावर कोरीव कामात अश्मयुगात सुरू होतात.[१] पुरातत्व संशोधक सचिन पाटील यांच्या संशोधनानुसार युरोप खंडातील ब्रिटन, स्कॉटलंड, नॉर्थबंरलैंड, स्वीडन परिसरात सापडणारी कातळ शिल्पे व चक्रव्यूशिल्पे मल्लिकार्जुन डोंगराच्या परिसरात व वाळवा तालुक्यात सापडणाऱ्या शिल्पाशी साम्य दर्शवितात.[२]

वरील अभ्यासानुसार असे अनुमान निघते की, रोमन व्यापाऱ्यांच्या बरोबर हा कल्ट भारतात आला. त्यातून मातृदेवता पूजनाची परंपरा इथे विकसित झाली. भूमी व स्त्री सर्जनाचे प्रतीक असणारी शिल्पे पुढील काळात यातूनच विकसित झाली. रोमन व्यापाऱ्यांच्या पूजनपरंपरेबरोबर हे व्यापारी सुद्धा काही प्रमाणात इथेच स्थायिक झाले असावेत. मुळात हा विलासगड लोकधर्मातील मातृदेवता पूजन अथवा शक्ती उपासनेचे एक ठिकाण असावे.



1.**भव्य प्रवेशद्वार**



2. विलासगडावरील चांद बुखारी दर्गाह



3. श्री क्षेत्र मल्लिकार्जुन

किल्ल्यावरील बौद्ध विहार :

प्राचीन बौध्द ग्रंथांत विशद केल्याप्रमाणे वर्षभर भ्रमन्ती करणारे भगवान बुध्द व भिक्षु पावसाळयात वर्षावासासाठी तात्पुरती वस्ती करत. ही वस्ती नेहमीच गावाच्या किंवा शहराच्या सीमेच्या असे. पुढील काळात जेव्हा स्थायी स्वरूपाच्या वस्त्या निर्माण करण्याची गरज भासली तेव्हा जवळपासच्या, डोंगरांमध्ये गुंफा खोदण्यात आल्या. त्यातून शैलस्थापत्याची सुरूवात झाली. आज आपण ज्याला महाराष्ट्र म्हणतो त्या प्रदेशात मौर्य सम्राट अशोकाच्या काळात बौध्द भिक्षु बौध्द धर्माचा प्रचार करू लागले होते. सम्राट अशोकाच्या काळातच पूर्व आणि पश्चिम महाराष्ट्रात बौध्द धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला होता.

हीनयान शैलस्थापत्यात सभागृह, भोजनगृह, न्हाणपोढी (आंघोळीच्या पाण्याची टाकी), पाणपोढी (पिण्याच्या पाण्याची टाकी), कोढी (पूजेचे कोनाडे), विश्रांतीचे बाकाच्या आकाराचे कट्टे यांचाही अंतर्भाव होतो. कान्हेरी, जुन्नर आणि भाजे यासारख्या विशाल


शैलवसाहतींमध्ये हे घटक अधिक प्रकर्षाने दिसून येतात.सदरचे वास्तु कलाप्रकार येथील डोंगरावर आढळून येतात.

सातवाहन अस्तकालामध्ये या डोंगरावर उत्तर हिनयान पंथीय बौद्ध लेणी कोरण्यात आली असावीत. पश्चिम महाराष्ट्रातील उत्तर हिनयान लेणी वा शैलस्थापत्य सातवाहन अस्तकालामध्येच कोरलेली आहेत.[३] यासंदर्भात प्राच्यविद्या व शिलालेख अभ्यासक प्रा. गौतम काटकर यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे,[४] त्यांच्यामध्ये, "सातवाहन राजांची सत्ता सांगली जिल्ह्याच्या बहुतांशी भागावर होती. इसवी सनाच्या पहिल्या शतकात या जिल्ह्यात सातवाहनकालीन बौद्धधर्मियांनी लेणी खोदली. दाभोळ ते विजापूर या प्राचीन व्यापारी मार्गावर सांगली जिल्ह्यात ही लेणी आहेत. गोटखिंडीजवळील डोंगरावर आणि जुन्या पन्हाळ्यावरील डोंगरावर पहिल्या ते तिसऱ्या शतकात खोदलेली लेणी आहेत."

मल्लिकार्जुन डोंगराच्या पायथ्याला असणारे येडेनिपाणी हे गाव सातवाहन कालीन असल्याचे प्रा. डॉ. निरंजन कुलकर्णी यांच्या पीएचडी संशोधनांमध्ये स्पष्ट झाले आहे. येथील साइटवर त्यांना लाल काळी मृदभांडी आढळून आली आहेत. त्यांच्या संशोधनानुसार असे दिसते की, सुरुवातीच्या ऐतिहासिक काळात हे ठिकाण कराड आणि कोल्हापूरमधील व्यापारात महत्त्वाची भूमिका बजावत होते. त्यातून मिळणाऱ्या अतिरिक्त मालासह आणि इतर व्यापारी मालासह, ते कृष्णा खोऱ्याच्या पूर्वेकडील भागातील गावासाठी 'व्यापार-साखळी'चा भाग म्हणून काम करत असावे.[५] या किल्ल्यावर चार बौद्ध लेणी, वर्षभर पिण्यास भरपूर पाणी मिळेल असे तिन पाण्याचे टाके व एक विहीर आढळून येते. बौद्ध श्रमणांच्या वर्षावासासाठी ही लेणी खोदण्यात आली असावीत. तसेच प्राचीन श्रेष्ठी व्यापाऱ्यांना पावसाळ्यात आपला व्यापारी माल सुरक्षित ठेवता यावा हा सुद्धा एक उद्देश असावा. मल्लिकार्जुन डोंगरावरील या गुंफा येथील श्री. पुजारी विकास गुरव यांच्या सांगण्याप्रमाणे दैत्यानी कोरल्या आहेत.[६]



१. सोमेश्वर विहार गुंफा



२. सतीशिळा



३. वाकड्या तोंडाचा नंदी

सोमेश्वर व श्री मल्लिकार्जुन :

१८३० च्या सुमारास पन्हाळाच्या शिद्दप्पा गोगरे याने श्री सोमेश्वर गुंफेच्या प्रवेशद्वाराला लागून असणारे दगडी बांधकाम केले आहे. हे स्तंभयुक्त दगडी सभा मंडप मानकरी बसण्यासाठी वापरतात. त्यानेच सोमेश्वर व मल्लिकार्जुनच्या गुंफेवर छत (टेरेस) बांधले. मल्लिकार्जुन देवस्थानचे भव्य मुख्य प्रवेशद्वार बहुदा यांनीच बांधले असावे.[७]

डोंगरावर मल्लिकार्जुनच्या मंदिरासमोर मध्ययुगीन धाटणीचे एक भव्यदिव्य प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर तीन कमानी असणाऱ्या भव्य ओवाऱ्या आहेत. त्या सांगलीतील बोटखळ येथील वाणी लिंगप्पा यांने साधारणतः शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी बांधलेल्या आहेत.[८]

या ओवाऱ्यांच्या मागील बाजूस इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातील हिनयान पंथीय विहार गुंफा आहेत. या गुंफा वीस फूट लांब आणि अठरा फूट खोल आहेत. त्याच्या बाजूलाच असणाऱ्या गुंफा विहारामध्ये प्रवेश केल्यावर त्याच्या छताला तोलणारे सहा कोरीव खांब आहेत. यांची बांधणी मानमोडी लेणी (जुन्नर) क्र. एक मधील खांबांसारखी आहे. त्या ठिकाणी पायथ्याजवळ आणि छताजवळही एक-एक कुंभ कोरलेला आहे; पण इथे, फक्त छताच्या बाजूलाच (उलटा) कुंभ कोरलेला आहे. डावीकडील कोरीव स्तंभयुक्त एका मोठ्या विहारामध्ये सोमेश्वरचे शिवलिंग आहे. सोमेश्वराचा विहार इतर विहारांपेक्षा प्रशस्त आहे. पावसाळ्यामध्ये तेथून झरा वाहतो. त्याच्या उजवीकडे आणखी एक विहार आहे. त्यामध्ये पूजेची सामग्री ठेवलेली दिसते. या मंदिराच्या उजव्या बाजूला असणाऱ्या विहारात मल्लिकार्जुनाचं लिंग स्थापन केलेलं आहे. मल्लिकार्जुन मंदिराचा गाभारा म्हणजे एक स्वतंत्र विहार आहे. त्यामध्ये दरवाज्याजवळच शिवलिंगाची स्थापना केलेली आहे. त्यावर पितळेच्या घोड्यांच्या काही मूर्ती ठेवलेल्या आहेत. विहाराच्या चौकटीवर गणेशपट्टीच्या दोन्ही बाजूला एक-एक अश्वमुख कोरलेलं आहे. दर्शनी लेण्यामध्ये, खांबाच्या पायालगत अगर भिंतीवरही (खालच्या बाजूला) काही जिनमूर्ती कोरलेल्या आहेत.[९]

या गुंफेच्या उजवीकडे एका अरुंद गुंफेत श्री मल्लिकार्जुनचे शिवलिंग आहे. शैव अथवा लिंगायत परंपरेंतून ती साकार झाली असावीत. गुंफेच्या आतमध्ये सती शिळा, नागशिळा, ध्यानमग्न साधूंच्या मुर्त्या, कार्तिकेयचे मूर्ती, नवसाचा नंदी, सातीआसरा (सप्तमातृकापट्ट), वाकड्या तोंडाचा नंदी आढळतात. सोमेश्वर विहाराच्या बाजूला असणाऱ्या एका अरुंद गुंफेत (भांडारगृह) वाकून गेल्यानंतर मध्ययुगीन कालखंडातील शस्त्रास्त्रे, मुर्त्या, तांब्या- पितळेची भांडी, पितळी मुखवटे, नागाच्या तांब्याच्या फण्या, मोठे गोलाकार खलबत्ते व उखळ आढळून येतात. ही भांडी व पूजेचे साहित्य साधारणतः 300 वर्षांपूर्वीचे असावेत. मल्लिकार्जुन गुंफेच्या समोरील गुंफेत वाकड्यातोंडेचा नंदी असून त्याच्या समोर दगडी बांधकामाच्या नगारखाना असून या नगारखाण्याच्या खालील अरुंद खोलीत नंदी असून तिला 'बसवेश्वर नंदी' असे म्हणतात. हा नागरखाना अंदाजे १७० वर्षांपूर्वी कोल्हापूरच्या आळते पेठ्यातील विभागात नरंदेच्या वाणीने बांधलेला आहे. त्याने मुख्य मंडपासमोर व्हरांडा देखील बांधला. या गुहेच्या पश्चिमेला वाळवा येथे राहणारा शिराळ्याच्या सखोबा वाणीने बांधलेले आणखी दोन आधुनिक दगडी कोठडी आहेत.[१०]

श्री मल्लिकार्जुन देवस्थानच्या सुरुवातीला असणाऱ्या नगारखान्याच्या खाली दोन कमानी असणारी ओवारी आहे. याचा उपयोग घोडा, बैल, खेचर आदी प्राणी बांधण्यासाठी होत असावा. २० ×18 आकाराची ही वास्तु १५० वर्षांपूर्वीची असावी. मंदिराच्या बाहेरील बाजूस भिंतीत लावलेला एक शिलालेख आढळतो.[११] जेम्स फर्ग्युसन व जेम्स बर्गेस यांनी सन 1880 साली प्रकाशित केलेल्या THE CAVE TEMPLES OF INDIA या ग्रंथात मल्लिकार्जुन माहिती पुढील प्रमाणे आहे, मलकेश्वर गुहा कोल्हापूर पासून 18 मैल अंतरावर असून मालवाडी गावाजवळील एका टेकडीवर, सात ब्राह्मणी गुहांचा समूह आहे, ज्यापैकी बहुतेक खूपच लहान आहेत. सर्वात मोठ्या गुहेत सुमारे २६ फूट बाय २१ फूट लांबीचा एक हॉल आहे,

ज्यामध्ये चार भव्य चौकोनी खांब आहेत, ज्यांच्या माना गोलाकार आहेत हे खांब १२ व्या आणि १३ व्या शतकातील असून या प्रत्येक संरचनात्मक खांबाच्या खाली एक एक प्रतिनिधिक मुर्त्या आहेत. या गुहेत लिंग मंदिरासमोर एक प्रवेशद्वार आहे,आणि हॉलच्या उजव्या बाजूला एक लहान मंदिर आहे. पाटेश्वर आणि कांदल (कराड) लेण्यांप्रमाणे, अलिकडच्या काळात बांधकामाद्वारे यामध्येही बदल करण्यात आले आहेत.[१२]

सफर सांगली-कोल्हापूरची या ग्रंथात श्री. फडके यांनी श्रीक्षेत्र मल्लिकार्जुनचे केलेल्या वर्णनानुसार, विलासगडावर किल्ला म्हणून तटबंदी व दरवाज्याचे कोणतेही अवशेष नाहीत. या किल्यावरील मल्लिकार्जुन मंदिर आवाराला बाहेरून तटबंदी केलेली आहे. त्याच्या प्रवेशद्वारावर नगारखाना आहे. दरवाजातून आत प्रवेश केल्यानतर ओक्याचे बांधकाम केलेले आहे. येथील मंदिराच्या उजव्या बाजूला दोन लेण्या खोदलेल्या आहेत. त्याच्या समोरच्या बाजूला छताला तोलून धरण्यासाठी एक खांब बसविलेला आहे.

या लेण्याला जोडूनच मल्लिकार्जुनाचे मुख्य मंदिर आहे. या मंदिराचा दर्शनी भाग देशी नागरशैलीने बांधलेला आहे. या मंदिरातील छताला तोलून धरण्यासाठी सहा कोरीव खांब उभारलेले आहेत. वेली व फुलांचे नक्षीकाम असलेले कोरीव खांब आहेत. यांची बांधणी मानमोडी (जुन्नर) लेणी क्र.१ मधील खांबासारखी आहे. या गर्भगृहाच्या छताच्या बाजूला एक उलटा कुंभ कोरलेला आहे. दरवाजासमोर एक पायरी सोडून मंडपामध्ये शिवलिंगाची स्थापना केलेली आहे. स्थानिक लोक त्याला 'सोमेश्वर' म्हणतात. याच्या उजवीकडे एक विहार आहे. या मंदिराच्या उजव्या बाजूला लिंग दुसऱ्या विहारात स्थापन केलेले आहे. विहाराच्या चौकटीवर गणेशपट्टीच्या दोन्ही बाजूला एक-एक अश्वमुख कोरलेले आहे. मंदिराच्या अलीकडे डाव्या बाजूच्या एका कोनाड्यात भैरवाची मूर्ती ठेवलेली आहे. खांबालगत काही जिनमूर्ती व नागशिळा कोरलेल्या आहेत.

मल्लिकार्जुन मंदिराचा गाभारा म्हणजे एक स्वतंत्र विहार आहे. त्यामध्ये दरवाजाजवळ शिवलिंगाची स्थापना केलेली आहे. त्यावर पितळी घोड्याच्या काही मूर्ती ठेवलेल्या आहेत. शिवलिंगाच्या मागे अर्धा मीटरची एक खिडकी काढलेली आहे. त्यातून बाहेरील अर्धवट सोडून दिलेल्या लेण्या पाहावयास मिळतात. मंदिराच्या प्रांगणात मोठ्या चौथऱ्यावर दीपमाळ, तुळशी वृंदावन (स्मारक वृंदावन) व एक स्तंभ उभारलेला आहे. गडाच्या माथ्यावर चौथऱ्यावर एक मशीद आहे व त्याच चौथऱ्यावर एक मंदिर असून त्यामध्ये विठ्ठल-रूक्मिणीची मूर्ती आहेत. या मशिदीच्या आवारात काही कबरी आहेत. याच प्रांगणात एक कृष्णाचे मंदिर आहे. या मंदिरासमोर ३× ३×३ मीटर लांबी, रुंदी व उची असलेला खड्डा आहे. यामध्ये उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. या खड्ख्याचा वापर देवपूजेचे साहित्य ठेवण्यासाठी केला जात असे की धान्य कोठारासारखा की युद्धाच्या दरम्यान शत्रू गडावर आला तर जवळील मौल्यवान वस्तू लपवून ठेवण्यासाठी होत असावा.[13]

सोमेश्वर गुंफेतील मूर्ती व इतर अवशेष:

या गुंफेत सोमनाथ, उमाशंकर, भीमाशंकर यांच्या पिंडी तसेच सासुरवाशीन असे नाव दिलेली सती शिळा, शेंदूराने माखलेला गणपती, भैरवनाथ, साधुची ध्यामग्न मूर्ती, मातृदेवतेची एक मूर्ती, एक फण्याची नागशिळा, पाच फण्यांची नागशिळा, माऊली असे नाव दिलेला सप्तमातृकापट्ट ज्यावर गणेश व कार्तिकेय सुद्धा आहेत. गुंफेच्या समोरील प्रवेशद्वारावर मानकरी कट्टा, नागशिल्प, कोरीव दरवाजा, दीपमाळ, काकड आरतीचा स्तंभ,तिरका

नंदी व तुळशी वृंदावन आहे. कमान युक्त ओवाऱ्याच्या पूर्वेला असणाऱ्या कालभैरव या छोट्याशा गुफेत कालभैरव बरोबरच जुगाई व धानाई या मातृदेवतांच्या मूर्ती आहेत. सासुरवाशीन नावाच्या सती शिळेच्या बाजूला असणाऱ्या कोटलिंग कोटलिंग पिंडीचा मधला उभा आकारावरून गोल गोल अशा रचना आढळतात. हा श्रमणांच्या पूजनातील ओटीव स्तूप असावा असे प्रथम दर्शनी वाटते.

कार्तिकेयचे दंतकथा:

किल्ल्यावरील मुख्य गुंफेतील मल्लिकार्जुन देवतेच्या बाजूस असणाऱ्या एका गुहेत कार्तिकेयची मूर्ती आहे. या मूर्तीला पडद्या सदैव झाकून ठेवले जाते. येथे कार्तिकेयाची पुराणकथा पुढील प्रमाणे सांगण्यात येते, कैलास पर्वतावर प्रथम पूजनाचा मान कोणाला यावरून गणेश आणि कार्तिकेय यांच्यात स्पर्धा लागली तेव्हा शंकर पार्वती व इतर देवतांनी असे ठरवले की, जो कोणी जगाला प्रदक्षिणा घालून प्रथम येईल त्याला प्रथम पुजनाचा मान मिळेल. कार्तिकीयने आपले वाहन मयुरावरती बसून जगप्रदक्षिणा पूर्ण केली आणि तो परत आला, तेव्हा त्याने पाहिले की, पूजनीय देवता म्हणून गणेशाची प्रशंसा सुरु होती. सर्वांनी त्यांना प्रथम पूज्य देव मानले होते. गणेशाने माता पित्यालाच प्रदक्षिणा घालून हा मान मिळविला होता. माता पार्वतीवर भयंकर संतापलेल्या कार्तिकेयने स्वतःला गुहेत कोंडून घेतले आणि कोणालाही दर्शन न देण्याची शपथ घेतली. त्यांने शाप दिला की, त्याचे दर्शन घेणारी स्त्री विधवा होईल आणि पुरुष सात जन्म नरकात जाईल. त्याने उषाप दिला की कार्तिक पौर्णिमेला जे कोणी स्त्री-पुरुष दर्शन घेतील त्यांचे कल्याण होईल.

करवीर महात्म्याची दंतकथा:

करवीर महात्म्याच्या काशी खंडातील सहाव्या अध्यायात मल्लिकार्जुनचा उल्लेख आला आहे. अगस्ती मुनी व लोपामुद्रा या डोंगरावर येऊन मल्लिकार्जुनची पूजा केल्याचे म्हटले आहे. हे स्थान सायुज्यमुक्ती स्थान असल्याचे अगस्ती मुनी सांगतो. करवीर महात्म्याची रचना 1821 ते 1837 यादरम्यान झाली, असे मत करवीर महात्म्य अभ्यासक श्री अनिल चव्हाण यांची आहे. या ग्रंथाचा लेखनकाल 1821 ते 1837 असल्याचे ज्येष्ठ इतिहासकार प्रा. डॉ. व्यं. वि. द्रविड यांनी म्हटले आहे. आर्याचा विस्तार होताना 'अगस्थिऋषी' यांनी प्रथमच विंध्य पर्वत पार करून दख्खनच्या पठारावर गोदावरी नदीच्या किनारी स्थायीक झाले होते. अगस्ती व लोपामुद्रा यांची वरील कथा म्हणजे आर्यांचा दक्षिणेतील विस्तार दर्शविते. वास्तविक ऐतिहासिक दृष्टीने हि अनैतिहासिक व दंत कथा आहे.

शिलालेख :

श्रीक्षेत्र मल्लिकार्जुन मंदिरासमोरील तटबंदीनजीक नगारखान्याच्या भिंतीवर एक शिलालेख बसवलेला आढळतो. या शिलालेखामधून तेथील बांधकामाची माहिती कळते. शिलालेखाचे वाचन इतिहास अभ्यासक अतुल मुळीक यांनी केले आहे. हा शिलालेख आयताकृती असून १६ इंच लांबी असलेला आडवा, तर १३ इंच उभा आहे. हा शिलालेख तटबंदीनजीक डाव्या बाजूस असणाऱ्या नगारखान्याच्या भिंतीवर गोमुखाच्या वरील बाजूस बसविण्यात आला आहे. अक्षरे कोरीव स्वरूपात असून ५ ओळींचा देवनागरी लिपीतील आहेत. अक्षर पद्धतीवरून हा शिलालेख 300 वर्षे जुना असावा.



1. **भिंतीवरील शिलालेख**



2. **प्राचीन दगडी उखळ**



3. **किल्ल्याच्या प्रारंभीच्या ओवाऱ्या**

वरील शिलालेखाचे वाचन पुढील प्रमाणे आहे…..

श्री सळी मलकजिन, भिंत्तींच जोर्नउधार जा हाला धारापा बीन आ-मनाचा पुत्र वीबुत्या

अर्थ - मल्लिकार्जुन देवाच्या मंदिराच्या भिंतींच्या जीर्णोद्धाराचे काम धारापा वडील आमना यांचा पुत्र वीबुत्या (विभूत्या) याने केला.[१४]

या शिलालेखावरून आपणास समजते की, श्री सती व मलकजिन या मंदिराच्या समोरील भिंतीचा जिर्णोद्धार विभुत्याने केला. विभूते हे वाणी समाजातील एक आडनाव आहे. श्री सतीची शिळा मल्लिकार्जुनच्या गुंफेतील सुरुवातीच्या बाजूला आपल्याला दिसून येते. नंतरच्या काळात या देवस्थानचे वैदिकीकरण होताना श्री सळी मलकजिन याचे श्री शैल्य मल्लिकार्जुन असे झाले. मूळ नाव श्री सती मलकजीन असेच होते.

हजरत पीर चांद बुखारी व बावरदीन बाबा:

हजरत पीर चांद बुखारी व त्यांचा हिंदू शिष्य बावरदीन बाबा यांच्या समाध्या (दर्गाह) चांगल्या स्थितीत आढळतात. दर्ग्याच्या उजवीकडून पहिल्या गाभाऱ्यात समोरून उजवीकडून पहिली समाधी घोडपीर, मध्यभागी चांद बुखारी व डावीकडे दावल मलिक यांची आहे. दर्ग्याच्या मध्यभागी असलेल्या गाभाऱ्यात कबीर बाबा व ख्वाजा बाबा या दोघांच्या समाध्या आहेत. हे दोघेही चांद बुखारी यांचे शिष्य असून मूळचे अनुक्रमे नांद्रे व वसगडे (सांगली) येथील होत. दर्ग्याच्या तिसऱ्या गाभाऱ्यात सुलतानशाह बाबा यांची समाधी आहे. परंतु तेथे आता विठ्ठल-रुक्मिणी व श्री कृष्णाची मूर्ती स्थापन केली आहे. या दर्ग्याचे सेवक श्री.नवनाथ पांडुरंग जाधव मुळगाव मालेवाडी हे तेथील सहाव्या पिढीतील तेथील सेवक आहेत. वयाच्या अकराव्या वर्षापासून ते कार्यरत आहेत. सध्या त्यांचे वय ८० आहे. सुफी संतांच्या या दर्ग्यास चादर चढविण्याचा, मलिदा देण्याचा पहिला मान मल्लिकार्जुन देवस्थानचाच आहे हे विशेष होय. बाबा बावरदिन यांची एक बैठक-गादी येथे असून त्यांची मुख्य तुरबत विशाळगडावरती आहे असे सांगण्यात येते. गंगा जमुनी तहजीब येथे ओतपोत भरून दिसते. श्री. जाधव यांनी हजरत पीर चांद बुखारी बाबा व बावरदिन बाबा यांच्या विषयी व किल्ल्यावरील इतर मंदिरांच्या भग्न अवशेषांविषयी माहिती दिली.

हजरत पीर चांद बुखारी व त्यांचा शिष्य बावरदीन बाबा यांना महाशिवरात्री व एकादशीला रात्री ११ वा. गंध व गलिफ रात्री अकरा वाजता चढविला जातो. विशेष म्हणजे हा गंध व गलिफ श्री मल्लिकार्जुन देवस्थान कडून येतो.[१५]

दर्ग्याच्या समोरील एका भिंतीत श्री नवनाथ जाधव यांनी कोरुन ठेवलेल्या एका शिलालेखात म्हटले आहे की, मुघलशाही व आदिलशाही काळात पडझड झालेल्या या दर्ग्याची सन २००५ साली पुनर्बांधणी लोकवर्गणीतून करण्यात आली आहे. त्यांच्या मागील पाच पिढ्यातील सेवकांची नावे दिली आहेत ती अशी, बाबू सुलतान जाधव, बाळू जाधव, अण्णा जाधव, नायकू जाधव, पाडुरंग जाधव व त्यांचे चिरंजीव सध्याचे श्री नवनाथ जाधव.[१६]

दर्ग्याच्या समोर असलेल्या चिंचेच्या झाडाखाली विशाळगड येथील मलिक रेहान बाबा यांची बैठक आहे. एक उंच चौकोनी कट्टा असणारी ही समाधी म्हणजे बैठक आहे. हजरत पीर चांद बुखारी यांचे मूळ स्थान शोधताना असे आढळून आले की, ते टार्टरी प्रदेशातील (आधुनिक उझबेकिस्तान) बोखारा येथील रहिवासी होते आणि सुमारे चार-पाच शतकांपूर्वी येथे भक्त म्हणून राहत होते आणि त्याचे येथेच निधन झाले असे म्हटले जाते. शंभर वर्षांनंतर एका गावकरीने त्याच्यासाठी समाधीस्थळ बांधले जे सुमारे वीस फूट चौरस आणि वीस फूट उंच असलेल्या पांढरे शुभ्र दगडी इमारतीचे होते. चांद बुखारींचा दुसरा अनुयायी बद्रुद्दीन सुमारे शंभर दीडशे वर्षांपूर्वी आशियातील बगदादहून आला. त्याचा सांगली येथील शिष्य सातू या मराठा शिष्याने त्याची समाधी बांधली. सातूचा मुलगा अण्णाजीने आपल्या वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ बद्रुद्दीनच्या शेजारी आणखी एक समाधीस्थळ बांधले आणि अण्णाजींचा मुलगा नाईकजी हा या दर्ग्यात राहत असे. मराठा कुटुंबाने स्वतःच्या धर्माशी संबंध न तोडता मुस्लिम संतांचे वंशपरंपरागत शिष्य बनल्याचे हे एक जिवंत उदाहरण आहे. नाईकजींनी गोटखिंडीपासून उत्तरेकडील उतारावर चढताना आग्नेयेस असलेले त्यांचे वडील अण्णाजी यांचे हिंदू मंदिर बांधले आहे.[१७] आज काही लोक ते मंदिर ७०० वर्षापूर्वीचे कृष्णाचे मंदिर आहे असे गैसमजूतीतून म्हणत आहेत.



1. बावरदीन बाबा दर्गाह



2. मुलाखत, चांद बुखारी दर्गाहचे सेवक श्री नवनाथ जाधव



3. मुलाखत मल्लिकार्जुन देवस्थानाचे गुरव, श्री. शिवाजी मारुती गुरव

किल्ल्याची ऐतिहासिकता:

समुद्रसपाटीपासून 2689 फूट उंचावर असणारा हा डोंगर म्हणजे पेशवाई कालखंडातील एक महत्त्वाचा अपूर्ण अवस्थेतील गिरीदुर्ग आहे. खरे तर हा टेहळणीचा डोंगर असून ८५० पायऱ्या चढून गेल्यानंतर वरती पोहोचता येते. सुरुवातीच्या ५० पायऱ्या चढून गेल्यावर डाव्याबाजूला एक पायवाट जाते तिथे ५० मी. वर एक पाण्याचा प्राचीन स्त्रोत (टाके विहीर) आहे. कदाचित डोंगरावर येणाऱ्यांसाठी पाण्याची सोय असावी. तिथेच एक छोटेसे २.५ फुटाचे मंदिर असून त्यात एक छोटेसे शिवलिंग आहे. या छोट्या

मंदिराच्या समोरून गेलेल्या पायवाटेवरून शंभर पावलांवर एक कातळ असून त्यावर कातळ शिल्पे कोरलेली आहेत. ही कातळ शिल्पे प्रागैतिहासिक असून स्त्री सर्जनाचे प्रतीक असलेली आहेत.

पूर्वी हा टेहाळणीचा डोंगर आदिलशहाकडे असावा. सन १६७०-७१ च्या दरम्यान हा किल्ला शिवरायांच्या ताब्यात आला असावा. प्रामुख्याने या गडाचा वापर लष्करी टेहळणीसाठी होत होता. सन १७१७ मध्ये मुघलांनी शाहूंना दिलेल्या सुभे व किल्ल्यांच्या यादीत विलासगडचे नाव आहे. १७९८ साली हा गड पुनर्बांधणीचा प्रयत्न झाल्याची नोंद आहे. सन १७१८ सालापर्यंत हा किल्ला करवीरच्या छत्रपती संभाजी राजांच्याकडे होता, असा उल्लेख आढळतो. सन १७३१ साली सातारचे पुण्यश्लोक छत्रपती शाहू महाराज व कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज यांच्यामध्ये झालेल्या वारणेच्या तहानुसार हा किल्ला सातारच्या छत्रपतींना मिळाला.

या किल्ल्याच्या निर्मितीचा प्रयत्न अठराव्या शतकाच्या शेवटी झाला, असे ऐतिहासिक लेखसंग्रहातील कागदपत्रावरून दिसते. नारो हरी यांनी २९ जुलै १७९८ रोजी मिरजेस पाठवलेल्या पत्रातून विलासगड निर्मितीची माहिती मिळते.[१८] "श्रीमंत महाराज यांनी अष्ट्याहून येते समयी गोडखिंडीनजीक डोंगरावर मलकार्जुन देव आहे तेथे स्वारी देवदर्शनास गेली. देवदर्शन होऊन अवलोकन जालेनंतर त्या स्थळी किल्ला बांधावा हा मनसबा सिद्ध झाला. नावं विलासगड योजिले"



१.नाईकजींनी वडील अण्णाजी यांचे बांधलेले मंदिर



२. किल्ल्यावरील प्रशासकीय इमारत



३. हजरत पीर चांद बुखारी दर्गाह

एका मंदिराचे भग्न अवशेष:

विलासगडावरील माथ्यावर बावरदीन बाबा दर्ग्याच्या पश्चिमेला छोट्या पठारावर पडझड झालेल्या एका जीर्ण व भग्न मंदिराचे अवशेष आढळून येते. साधारणतः हे मंदिर दीड-दोनशे वर्षापूर्वी दगड व लाल मातीने बांधलेले आहे. एक गर्भगृह असणारे पूर्वाभिमुखी मंदिराचा घुमट चपट्या भाजीव विटांचा असून साधारणपणे **१६×१५** फूट लांबी रुंदीचे हे मंदिर आहे. मंदिर बांधणी साठी लागणारे दगड व माती तेथीलच डोंगरातून घेतले असावे. मंदिराच्या आतील गाभाऱ्यात एक दगडी जोता आहे. मंदिर नैसर्गिकरित्या जीर्ण व भग्न झाल्यामुळे मंदिरातील मूर्ती त्याच्या शेजारील एका शेड वजा वास्तूमध्ये हलविण्यात आल्या होत्या.

मंदिरा समोर असणारा चौथा पोकळ असून ते दहा फूट खोल तळघर आहे. आत मध्ये उतरण्यासाठी अरुंद पायऱ्या आहेत. हि वास्तु दर्ग्याच्या नंतरची असावी. श्री

नवनाथ जाधव यांनी सांगितलेल्या माहितीनुसार मालेगावच्या लोकांनी मुस्लिम दर्ग्याजवळ हिंदू मंदिर असावे म्हणून ती बांधली आहे. हे मंदिर साध्या दगड माती व चुन्याचा वापर करून बांधलेले असून ते कच्च्या स्वरूपातील आढळते. एकच गाभारा व त्याच्यासमोर असणाऱ्या गुप्त तळघरावरून तेथे ध्यानधारणा केली जात असावी. या भग्न मंदिराच्या गाभाऱ्यात कोणत्याही देवतेची मूर्ती नाही. हे मंदिर भग्न व जीर्ण झाल्यामुळे तेथील देवतेची मूर्ती बाजूलाच एका शेडमध्ये ठेवलेली आहे. जीर्ण झालेले मंदिर हे वास्तुशास्त्रदृष्ट्या अपूजनीय व अपवित्र मानले जाते. काही हिंदुत्ववादी लोकांच्या म्हणण्यानुसार ते कृष्ण मंदिर आहे. दर्ग्याचे सेवक श्री. नवनाथ जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांचे जेष्ठ बंधू प्रसिद्ध शिवशाहीर बाबासाहेब देशमुख यांनी विठ्ठल रुक्मिणीच्या मूर्ती तेथे पूजनास ठेवल्या होत्या. श्री सतीश अक्कलकोट यांनी त्यांच्या दुर्ग या ग्रंथात हे विठ्ठल रुक्मिणी मंदिर आहे असे लिहिले आहे.[१९] मागील काही दिवसात विठ्ठल रुक्मिणी, तुळजाभवानी, हनुमान व श्रीकृष्णाची मूर्ती बाजूलाच लागून असणाऱ्या दर्ग्याती एका खोलीत पूजनात ठेवण्यात आल्या आहेत. मंदिराच्या समोरील नगारखाण्याच्या बाजूला बोकड बळी देण्यासाठी छोटे वन (देवराई) असून त्याच्या पूर्वेस एक तलाव आढळतो. गेल्या तिन वर्षापासून तेथे बोकड बळी देण्याची पद्धत बंद झाली आहे.

किल्ल्यावरील इतर अवशेष:

डोंगराच्या सर्वात उंचावरती असणाऱ्या १० एकर पठारावर एका इमारतींचे अवशेष, टेहळणी करणाऱ्या सैनिकांसाठी माळा (घर) व इतर इमारतींचे भग्न अवशेष आढळतात. किल्ल्यावरील शेडवजा असणाऱ्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात हनुमान, विठ्ठल रुक्मिणी, देवीची मूर्ती, नंदी व कृष्णाची मूर्ती आढळून आली. या मुर्त्या आधुनिक आहेत. प्राचीन व मध्ययुगीन काळात येथे तंत्र संप्रदाय विकसित असावा असे येथे आढळणाऱ्या त्रिकोणी आकाराच्या दगडावरून स्पष्ट होते. तसेच दर्ग्या शेजारीच करुगळीवली मासाबी देवीची मूर्ती एका देवळीत डोळे विस्फरून बसली आहे. तिच्या गळ्यामध्ये मंगळसूत्र सदैव असते. चांद बुखारी बाबा यांच्या अंतिम समयी ती सेवेत होती असे श्री नवनाथ जाधव यांनी सांगितले. ती राक्षसी होती असे सुद्धा ते सांगायला विसरले नाहीत. येथे तांत्रिक मांत्रिकता केली जात असावी असे येथे झाडावर लटकवलेल्या विविध लोखंडी व लाकडी साखळदंड व उपकरणावरून लक्षात येते.

चांद बुखारी बाबाच्या दर्ग्यासमोरील एका तळघरात आमच्या पिढीतील सात मानकऱ्यांच्या समाधी आहेत, असे श्री नवनाथ जाधव सांगतात. हे तळघर एखाद्या कोठारासारखे आहे. पूर्वी याचा वापर गुप्त तळघरासारखा होत असावा. याच्या बाजूस तटभिंती, टेहळणी बुरूज, नगारखान्याचे अवशेष पहायला मिळतात. हा नगारखाना आयताकृती असून त्याच्यावरील छत सत्तर वर्षांपूर्वी वीज पडून नष्ट झाले आहे. त्याच्या भिंती मात्र अत्यंत सुस्थितीत आहेत. दर्ग्याच्या मागील बाजूस चुन्याच्या घाना असणारे गोलाकार रिंगण व मोठे दगडी जाते आहे.[२०]

किल्ल्यावरील अखंड झरा (पाणपोढी):

किल्ल्याच्या पश्चिमेकडील डोंगर उतारावर एका गर्द विशाल चिंचेच्या झाडाखाली एक थंड पाण्याची टाकी असून त्यास मालेवाडी व येडनिपाणीकर उगवती गंगा असे म्हणतात. वास्तविकत: बौद्ध लेण्या बरोबर खोदलेले हे पाण्याचे टाके आहे. त्यास न्हाणपोढी असे म्हणतात. याचा वापर स्नानासाठी होत असावा. दहा फूट खोल व डोंगराच्या आत तीस फूट रुंद असणाऱ्या या पाण्याच्या टाकीला नैसर्गिक उमाळा असून 1972 सालच्या दुष्काळात

परिसरातील नदी, नाले, ओढे व विहिरी आटले असताना किल्ल्याच्या आसपासचे लोक घागरी भरून नेत असत. इथले पाणी कधी आटत नाही असे इथले लोक सांगतात.



1. पाण्याचे टाके



2. उगवती गंगा पाणपोढी



३. गुंफा विहार

निष्कर्ष व समालोचन:

या डोंगरावर इसवी सन पूर्व ८००० वर्षापासून अस्तित्वात असणाऱ्या स्त्रीजनन वा सर्जनशक्तीच्या प्रतीकावरून येथे मातृपूजा मोठ्या प्रमाणात केली जात असावी.हे एक सती क्षेत्र असून कृषीप्रधान मातृसत्ताक तंत्रसाधना येथे केली जात होती याचे भौतिकशास्त्रीय पुरावे येथे आढळतात. जेम्स बर्गेस याने उल्लेख केल्याप्रमाणे येथील सात गुंफा या प्राचीन आहेत. या गुंफांच्या स्थापत्यशास्त्राचा विचार करता व सातारा जिल्हा गॅझेटिअर मधील वर्णनानुसार या प्राचीन आहेत. साधारणत: इसवी सन दुसऱ्या शतकातील या गुंफा असाव्यात. हा प्रदेश सम्राट अशोकच्या अधिपत्याखाली होता. 'पूष्यमित्र' या शुंग राजवंशांच्या संस्थापकाने मौर्य वंशाचा पाडाव केला. पुढे या प्रदेशावर सातवाहन राज्यांनी राज्य केले.

विलासगडचा परिसर बौद्ध, लिंगायत,हिंदू, मुस्लिम धर्मियांचे श्रद्धास्थान व उत्कृष्ट पर्यटन स्थळ असून येथे महाशिवरात्री व श्रावणामध्ये यात्रा भरते. जुलै ते फेब्रुवारी पर्यटन व ट्रेकिंसाठी येथे चांगला काळ आहे. ट्रेकिंग व जंगल भ्रमंतीसाठी हा परिसर रमणीय आहे. येथील मंदिर व गुंफा परिसर स्वच्छ ठेवला असला तरी इथल्या प्रत्येक वास्तूला रंगरंगोटी करून त्याच्या मूळच्या सौंदर्याला बाधा आणली असल्याचं जाणवते. गुंफेतील खांबावरील शिल्पकलेची मोडतोड झाल्याचे जाणवते. आधुनिक काळात सिमेंट काँक्रीटचे बरेच बांधकाम आत मध्ये झाल्यामुळे मूळ सौंदर्याला बाधा आली आहे.

या डोंगर पठारावरून परिसरातील रमणीय निसर्ग, कृष्णा, वारणा नद्या, पन्हाळा, मच्छिंद्रगड,आगाशिवचा परिसर दिसतो. कातळाच्या पोटातील गुंफेत मल्लिकार्जुन मंदिर हे भाविकांसाठी आकर्षण स्थळ आहे. श्रावण महिन्यातील दर सोमवारी भरणाऱ्या जत्रेमूळे डोंगर माणसांच्या गर्दीने फुलून येतो. महाशिवरात्री तसेच श्रावणातील पहिल्या व शेवटच्या मंगळवारी येथे देवाची पालखी मिरवणूक काढली जाते. श्री मल्लिकार्जून सेवा मंडळ सेवाभावी उपक्रम राबविते. सोमेश्वर व मल्लिकार्जुन मंदिर हे जैन आणि लिंगायत वाणींचे आवडते पूजास्थळ आहे. पन्हाळ्याचा वाणी शिद्दप्पा गोगरे यांने मोठ्या प्रमाणात दुरुस्ती केली आणि अतिशय सुंदर छत बांधले आणि त्यांच्या मुलांनी दरवर्षी त्यांच्या कमाईचा एक भाग यासाठी बाजूला ठेवला होता.

वनखात्याने वृक्ष लागवड करून चांगले संगोपन केले आहे. अनेक ओढे व नाल्यावर साकव बांधण्याचे काम सुरू आहे. येडेनिपाणी, गोटखिंडी गावातील अनेकांनी

वृक्षारोपणात लोकसहभाग नोंदवला आहे.गोटखिंडी गावाकडून वर येताना एक कातळ शिल्प आहे. प्रत्येक पायवाटेवर मूर्ती, मंदिर, यांच्या सुरस कथा आहेत. श्रावण सोमवार प्रमाणे कायमस्वरुपी हे पर्यटन स्थळ व्हावे ,यासाठी येडेनिपाणी, गोटखिंडी, मालेवाडी, इटकरे, येलुर, तांदुळवाडी, बहादुरवाडी या गावांनी सामूहिक कृती कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. देवराष्ट्रेच्या धर्तीवर पशू - पक्ष्यांसाठी अभयारण्य उभारणे आवश्यक आहे. हिंदू मुस्लीम ऐक्याचे प्रतीक बनलेल्या या विलासगडचा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विकास होणे अपेक्षित आहे.

सध्या हा डोंगर वन खात्याच्या ताब्यात आहे. हा किल्ला 'क' वर्ग पर्यटन स्थळ असून जैवविविधतेने नटलेला आहे. येथील तरुण मंडळे येथील धर्म व जैवविविधतेचे अतिशय आपुलकीने काळजी घेतात. येथील प्रागैतिहासिक काळापासूनचा इतिहास, संस्कृती व धार्मिक विविधता जपण्याची गरज आहे. विलासगड हा प्रागैतिहासिक काळापासून ते आधुनिक काळापर्यंत विविध धर्मांचा संगम आहे. बौद्ध लेणी सातवाहन काळातील असून लिंगायत वाणी व मुस्लिम सूफी परंपरेचा प्रभाव स्पष्ट आहे. कातळ शिल्पामुळे मातृपूजेची प्राचीन परंपरा सिद्ध होते. गडावरील धार्मिक सहअस्तित्व हे समाजातील ऐक्याचे प्रतीक आहे. पर्यटन व ऐतिहासिक संवर्धनासाठी सामुदायिक उपक्रमांची आवश्यकता आहे.

शिफारस :

श्री क्षेत्र मल्लिकार्जुन हा धार्मिक विविधतेचा अद्वितीय पुरावा आहे. इतिहास, संस्कृती व जैवविविधतेच्या दृष्टीने हा गड अभ्यासासाठी महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे या वारशाचे संवर्धन व शाश्वत पर्यटन विकासाची गरज आहे. येथील गुरव, ग्रामस्थ, तरुण, सर्व धर्मीय भक्त व पर्यटकांनी येथील जैवविविधता, धर्मविविधता व बहुसांस्कृतिकतेचे जतन व संवर्धन करावे.

संदर्भ :

१. दै.सकाळ Sangli, Sang-Today 22/05/2023 Page No 2.

२. दै. केसरी, २२ फेब्रुवारी २०२५ पान नं. ९.

३. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र इतिहास प्राचीन काळ (खंड १ भाग २), स्थापत्य व कला, मराठी आवृत्ती (सुधारित), शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद २००२, पान नंबर ५.६ व ७.

४. प्रा. काटकर गौतम, प्राचीन इतिहासाचे नवे संशोधन (लेख), हिरक महोत्सवी सांगली, सकाळ मीडिया प्रा. लि. पुणे, प्रथम आवृत्ती २०२४,पान नं.२२.

५. Dr. Kulkarni Nirajan, The early Historic Investigations in the Upper Krishna Basin with special reference to Karad and Kolhapur (Ph.D. Thesis Unpublished) dept. of Archeology, Deccan College, Pune, 2003, page number 147.

६. https://youtu.be/WdY0g2IVbKE?si=moeyMkDLKDM_d7Np

७. https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/SANGLI/places_Mallikarjun%20Hill.html

८. https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazette

er/Satara%20District/appendix_m.html#10

९. फडके आदित्य, सफर सांगली कोल्हापूरची, स्नेहल प्र. पुणे, प्रथम आवृत्ती 2012 पान नंबर 17.

१०. https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/Satara%20District/appendix_m.html#10

११. मल्लिकार्जुन देवस्थानाचे गुरव, श्री. शिवाजी मारुती गुरव, यांची मुलाखत १२ मे २०२४.

१२. FERGUSSON JAMES and BURGESS JAMES, THE CAVE TEMPLES OF INDIA,PUBLISHED BY MRS. NIRMAL D. JAIN FOR ORIENTAL BOOKS REPRINT CORPORATION, DELHI-6, FIRST PUBLISHED 1880, page number 427, 428.

१३. फडके आदित्य, सफर सांगली कोल्हापूरची, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१२, पृ. १७-१८

१४. https://www.lokmat.com/sangli/untold-history-of-yedenipani-mallikarjuna-temple-revealed-in-sangli-a-a746/

१५. मुलाखत, श्री नवनाथ जाधव, दि.17 ऑगस्ट 2025.

१६. दर्ग्यासमोरील कोनशीले वरील लेख.

१७. https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/SANGLI/places_Mallikarjun%20Hill.html

१८. https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/Satara%20District/appendix_m.html#10

१९. खरे वा. वा. (संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग १०, पत्र क्र. ४३३२, श्री समर्थ प्रसाद छापखाना, पुणे १९०१, पृ. ५५१२)

२०. श्री. सतीश गुरूसिद्ध अक्कलकोट, दुर्ग, सह्याद्री दुर्गभ्रमण मंडळ सांगली, ऑगष्ट-२००५ पान नंबर ४८४.

२१. https://pudhari.news/features/tour-and-travels/religious-historical-place-srikshetra-mallikarjuna

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

प्राचीन कोकणातील व्यापारी मार्ग आणि बौद्ध लेणी: एक ऐतिहासिक अभ्यास

डॉ. जयवंत विष्णू पाताडे

इतिहास विभाग प्रमुख,

तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे ता. खेड, जि. रत्नागिरी-४१५६२१

Corresponding Author - डॉ. जयवंत विष्णू पाताडे

DOI - 10.5281/zenodo.19704086

प्रस्तावना:

प्राचीन भारताच्या आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहासात 'कोकण' या प्रदेशाचे स्थान अनन्यसाधारण राहिले आहे. सह्याद्रीच्या उत्तुंग रांगा आणि अरबी समुद्राचा विस्तीर्ण किनारा यांच्या मध्यभागी वसलेला हा प्रदेश प्राचीन काळापासून जागतिक व्यापाराचे मुख्य प्रवेशद्वार राहिला आहे. महाराष्ट्राच्या पश्चिमेला अरबी समुद्र आणि पूर्वेला सह्याद्रीची अभेद्य भिंत यांच्यामधील चिंचोळी पट्टी म्हणजे कोकण. ही भौगोलिक रचना व्यापारासाठी आव्हानात्मक असली तरी, सह्याद्रीतील नैसर्गिक खिंडींनी (घाटांनी) कोकणच्या बंदरांना थेट दख्खनच्या पठाराशी जोडले होते.[१] प्राचीन साहित्यात आणि शिलालेखांत कोकणचा उल्लेख 'अपरांत' म्हणजेच पश्चिम सीमांत प्रदेश असा येतो. महाभारतापासून ते अशोकाच्या शिलालेखांपर्यंत 'अपरांत' हे नाव गौरवाने घेतले गेले आहे. सोपारा (शूर्पारक), कल्याण आणि चौल यांसारखी बंदरे जागतिक व्यापाराची केंद्रे होती. रोमन साम्राज्य, इजिप्त आणि इराणशी होणारा व्यापार याच भूभागातून चालत असे.[२] कोकणातील व्यापारी मार्ग आणि बौद्ध लेणी यांचा संबंध अत्यंत घनिष्ठ आहे. बहुतांश बौद्ध लेणी या प्रमुख व्यापारी मार्गांच्या किंवा घाटमार्गांच्या मुखाशीच कोरलेल्या आढळतात. याचे मुख्य कारण म्हणजे व्यापारी तांड्यांना मिळणारे संरक्षण आणि आश्रय हे होय. बौद्ध संघाना मिळणारी दाने प्रामुख्याने 'सार्थवाह' आणि धनवान श्रेष्ठींकडून मिळत असत. घाटातून मालाची ने-आण करताना पावसाळ्यात किंवा प्रवासादरम्यान व्यापाऱ्यांना सुरक्षित आश्रय मिळण्यासाठी या लेण्यांचा वापर होत असे.[३]

कोकणातील प्राचीन राजवटी:

१. सातवाहन काळ (इ.स.पू. २ रे शतक ते इ.स. २ रे शतक):

सातवाहन राजवटीमध्ये कोकण हे व्यापाराचे मुख्य केंद्र बनले. पैठण (प्रतिष्ठान) ही त्यांची राजधानी असली, तरी कोकणची बंदरे त्यांच्या आर्थिक सत्तेचा आधार होती. जुन्नर या व्यापारी केंद्राला कल्याण आणि सोपारा या बंदरांशी जोडणारा 'नाणेघाट' हा सातवाहन काळातील सर्वात महत्त्वाचा मार्ग होता. नाणेघाटातील सातवाहन राणी नागनिका हिचा शिलालेख हा या मार्गाच्या महत्त्वाचा सर्वात मोठा पुरावा आहे. येथे व्यापाऱ्यांकडून जकात गोळा करण्यासाठी कोरलेले रांजण आजही आढळतात.[४] सातवाहन काळात कान्हेरी, कार्ले, भाजे आणि बेडसे यांसारख्या लेण्यांची निर्मिती झाली. या लेण्यांना मिळणारी दाने प्रामुख्याने व्यापाऱ्यांकडून येत असत. कान्हेरी लेणी येथे १०० पेक्षा जास्त लेणी आहेत.[५]

क्षत्रप-सातवाहन संघर्ष:

क्षत्रप आणि सातवाहन यांच्यातील संघर्ष हा प्राचीन भारताच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा सत्तासंघर्ष मानला जातो. या संघर्षाचा मुख्य केंद्रबिंदू कोकणची बंदरे आणि व्यापारी मार्ग हेच होते. हा संघर्ष मुख्यत्वे इ.स. १ ल्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते इ.स. २ ऱ्या शतकाच्या अखेरपर्यंत (अंदाजे इ.स. ७० ते इ.स. २००) चालला. सातवाहनांच्या सुरुवातीच्या पडत्या काळात, 'क्षहरात' वंशाच्या शक-क्षत्रपांनी पश्चिम भारतावर आक्रमण केले. नहपानाने सातवाहनांकडून उत्तर कोकण, कल्याण आणि सोपारा ही बंदरे जिंकून घेतली. यामुळे सातवाहनांचा समुद्री व्यापार खंडित झाला. नाशिक येथील लेणी क्र. १० मधील नहपानाचा जावई ऋषभदत्त याचा शिलालेखात त्याने प्रभास (सोमनाथ), भृगुकच्छ (भडोच) आणि सोपारा येथे केलेल्या दानांचा उल्लेख आहे.[६]

सातवाहनांचे पुनरुज्जीवन: सातवाहन कुळातील सर्वात पराक्रमी राजा गौतमीपुत्र सातकर्णी (इ.स. १०६ - इ.स. १३०) याने क्षत्रपांचा पराभव करून कोकण पुन्हा जिंकले. नाशिक जवळील जोगलथेंबी येथे नहपानाची हजारो नाणी सापडली आहेत, ज्यावर गौतमीपुत्राने स्वतःचे शिक्के मारले आहेत. हे क्षत्रपांच्या पराभवाचे सर्वात भक्कम पुरावे आहेत. त्याला नाशिक प्रशस्तीमध्ये 'खखरातवंसनिरवसेसकर' (क्षहरात वंशाचा नाश करणारा) असे म्हटले आहे.[७]

कार्दमक क्षत्रप आणि रुद्रदामन (इ.स. १३० - इ.स. १५०): क्षहरात वंशाच्या नाशानंतर 'कार्दमक' वंशाचे क्षत्रप सत्तेवर आले. राजा रुद्रदामन याने सातवाहनांकडून पुन्हा कोकणचा काही भाग जिंकला. रुद्रदामनच्या जुनागड शिलालेखात उल्लेख आहे की, त्याने सातवाहन राजा 'सातकर्णी' याला दोनदा पराभूत केले, पण जवळचे नाते असल्याने त्याला जिवंत सोडले.[८]

२. वाकाटक कालखंड (इ.स. २५० - इ.स. ५००):

सातवाहनांच्या अस्तानंतर दख्खनमध्ये वाकाटकांची सत्ता आली. वाकाटकांच्या नंदीवर्धन (मुख्य) आणि वत्सगुल्म (वाशिम शाखा) या दोन शाखा होत्या. वाकाटक घराण्याचा संस्थापक विंध्यशक्ती यांच्यानंतर त्याचा मुलगा प्रवरसेन (पहिले) याने दक्षिण भारतापर्यंत साम्राज्य विस्तारले. या काळात कोकणातील काही स्थानिक सत्ता वाकाटकांच्या मांडलिकत्वाखाली होत्या. वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेचा राजा हरिषेण (इ.स. ४७५ - ५००) याच्या काळात कोकणवर वाकाटकांचे थेट नियंत्रण असल्याचे मानले जाते. अजिंठा लेणी क्र. १६ येथील शिलालेखात हरिषेणाने कुंतल, अवंती आणि कोकण जिंकल्याचा उल्लेख आहे. या काळात कोकणातील बंदरांतून येणारा माल अजिंठा आणि वेरूळमार्गे उत्तरेकडे जात असे. लेण्यांच्या निर्मितीसाठी लागणारा प्रचंड पैसा याच व्यापारामार्गे वाकाटकांच्या तिजोरीत येत होता.[९]

क्षत्रप आणि वाकाटक: सातवाहनांनंतर पश्चिम किनारपट्टीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शक-क्षत्रप आणि सातवाहन यांच्यात प्रदीर्घ संघर्ष झाला. शक क्षत्रप राजा नहपानाने कोकणच्या व्यापारावर कब्जा मिळवण्याचा प्रयत्न केला. त्याने नाशिक आणि जुन्नर भागात आपले वर्चस्व निर्माण केले होते. नहपानाचा जावई ऋषभदत्त याने कार्ले लेण्याला आणि नाशिक लेण्याला मोठ्या प्रमाणावर दाने दिली होती, जेणेकरून व्यापारी मार्ग सुरक्षित राहतील.[१०] वाकाटकांच्या काळात विशेषतः वत्सगुल्म शाखेचा कोकणच्या काही भागावर त्यांचा प्रभाव होता. जरी अजिंठा ही लेणी विदर्भाच्या जवळ असली, तरी कोकणातील व्यापारी मार्गांवरून येणारा पैसा या लेण्यांच्या निर्मितीसाठी वापरला गेला.

३. शिलाहार कालखंड: शिलाहार राजांनी (इ.स. ८०० ते १२६५) उत्तर, दक्षिण आणि कोल्हापूर अशा तीन शाखांमधून कोकणवर राज्य केले. शिलाहारांच्या काळात चौळ (चेंबूल), दाभोळ आणि बाणकोट या बंदरांचा विकास झाला. या काळात अरबी व्यापाऱ्यांशी संबंध वाढले. ठाणे (श्रीस्थानक) हे उत्तर शिलाहारांचे मुख्य प्रशासकीय केंद्र आणि व्यापारी बंदर होते. शिलाहार काळात बौद्ध धर्माचा प्रभाव कमी होऊन हिंदू धर्माचे विशेषतः शैव संप्रदायाचे पुनरुज्जीवन झाले. पन्हाळेकाजी सारख्या लेण्यांमध्ये आपल्याला बौद्ध, जैन आणि हिंदू अशा तिन्ही संस्कृतींचा मिलाफ पाहायला मिळतो. पन्हाळेकाजी लेणी येथे सुरुवातीला हीनयान बौद्ध लेणी होती, ज्यांचे रूपांतर नंतर वज्रयान आणि त्यानंतर नाथ संप्रदायाच्या केंद्रात झाले.[११]

प्रमुख व्यापारी मार्ग आणि संबंधित लेणी :

१. नाणेघाट मार्ग:

नाणेघाट हा कोकणातील शूर्पारक (सोपारा) आणि कल्याण यांसारख्या समृद्ध आंतरराष्ट्रीय बंदरांना सातवाहनांची राजधानी प्रतिष्ठान (पैठण) आणि उपराजधानी जुन्नर यांच्याशी जोडणारा हा सर्वात जवळचा मार्ग होता. सह्याद्रीच्या मुख्य रांगेत असलेला हा घाट सुमारे २,८०० फूट उंचीवर आहे. सातवाहन काळात या मार्गावरून बैलांच्या पाठीवर आणि मानवी श्रमातून माल वाहून नेला जाई. या घाटात सातवाहनांनी दगड कापून एक विस्तीर्ण रस्ता तयार केला होता. घाटाच्या माथ्यावर एक भव्य लेणे कोरलेले आहे, जे प्रवाशांच्या विसाव्यासाठी आणि प्रशासकीय कामासाठी वापरले जाई. नाणेघाटाच्या मुख्य गुहेच्या बाहेर दगडात कोरलेला एक मोठा रांजण आजही पाहायला मिळतो. प्राचीन काळी येथून जाणाऱ्या व्यापाऱ्यांकडून जकात म्हणून नाणी स्वीकारली जात आणि ती या रांजणात साठवली जात. हे प्राचीन भारताच्या प्रगत महसूल व्यवस्थेचे जिवंत उदाहरण आहे.

नाणेघाट शिलालेख: नाणेघाटातील गुहेच्या भिंतींवर सातवाहन राणी नागनिका हिचा शिलालेख आहे. हा शिलालेख ब्राह्मी लिपीत आणि प्राकृत भाषेत आहे. या शिलालेखात सातवाहन राजांच्या अश्वमेध आणि राजसूय यज्ञांची माहिती मिळते. तसेच, या मार्गावरून होणाऱ्या दानांची आणि व्यवहारांची आकडेवारी दिली आहे.[१२]

नाणेघाट मार्गावरील लेणी समूह: व्यापारी मार्गांचे संरक्षण आणि व्यापाऱ्यांची सोय यासाठी सातवाहन काळात लेण्यांची निर्मिती मार्गाच्या कडेलाच करण्यात आली होती.

अ) जीवधन आणि हडसर जवळील लेणी: नाणेघाटाच्या रक्षणासाठी जीवधन हा किल्ला उभारला गेला होता. या किल्ल्याच्या पायथ्याशी आणि हडसर किल्ल्याच्या परिसरात अनेक लेणी आहेत. गडाच्या पश्चिम बाजूला काही पाण्याची टाकी आणि भिक्षूंसाठी निवासस्थाने आहेत. ही लेणी प्रामुख्याने नाणेघाटावरून येणाऱ्या सार्थवाहांवर लक्ष ठेवण्यासाठी वापरली जात असत. हडसर (पर्वतगड) येथील लेण्यांमध्ये उत्कृष्ट कोरीव काम असून पाण्याचे टाके आहेत. हे टाके व्यापारी ताफ्यांची तहान भागवण्यासाठी महत्त्वपूर्ण होते.[१३]

ब) जुन्नर लेणी समूह: नाणेघाट ओलांडल्यानंतर व्यापाऱ्यांचा पहिला मोठा थांबा म्हणजे जुन्नर. जुन्नर हे सातवाहन काळातील एक मोठे व्यापारी 'नगर' होते. येथे २०० पेक्षा जास्त लेणी कोरलेली आहेत. जुन्नरमधील लेण्यांच्या शिलालेखात 'धान्य श्रेणी' आणि 'विणकर श्रेणी' यांनी दिलेल्या देणग्यांचे उल्लेख आहेत. यावरून हा मार्ग आर्थिकदृष्ट्या किती सक्रिय होता हे स्पष्ट होते.[१४] या मार्गावरून जाणाऱ्या मालाचे वर्णन 'पेरिप्लस' सारख्या जागतिक ग्रंथात आढळते. सातवाहन काळात या मार्गावरून मलमल, हिरे, रेशीम आणि वनौषधी सोपारा बंदराकडे जात.

रोमन सोने, तांबे आणि उत्कृष्ट मद्य या मार्गाने जुन्नर आणि पैठणच्या बाजारपेठेत येत असे.[१५]

२. बोरघाट मार्ग:

प्राचीन कोकणातील व्यापारी मार्ग आणि बौद्ध लेणी यांच्यातील संबंधांचा अभ्यास करताना 'बोरघाट मार्ग' हा मार्ग केवळ कोकण आणि देश यांना जोडणारा रस्ता नसून तो जागतिक व्यापाराचा आणि बौद्ध संस्कृतीच्या प्रसाराचा एक महामार्ग होता. प्राचीन काळी बोरघाट हा चौल आणि पनवेल या बंदरांना पुणे-सासवड आणि पर्यायाने दक्षिण भारताशी जोडणारा प्रमुख मार्ग होता. चौल हे रोमन आणि अरब व्यापाऱ्यांसाठी सुप्रसिद्ध बंदर होते. येथील माल बोरघाटामार्गे कार्ले आणि भाजे येथील व्यापारी केंद्रांवरून पुढे जात असे. या मार्गाचे रक्षण करण्यासाठी लोहगड आणि विसापूर यांसारख्या दुर्गम किल्ल्यांची निर्मिती प्राचीन काळापासून केली गेली होती.

बोरघाटातील लेणी समूह: बोरघाटाच्या माथ्यावर आणि उतरणीवर कार्ले, भाजे आणि बेडसे या तीन महत्त्वाच्या लेण्यांचा समूह आहे. या लेण्यांच्या निर्मितीत राजसत्तेपेक्षा 'व्यापारी श्रेणी' आणि वैयक्तिक व्यापाऱ्यांचा वाटा मोठा आहे.

अ) कार्ले लेणी: कार्ले येथील 'महाचैत्य' हे भारतातील सर्वात मोठे आणि भव्य चैत्यगृह आहे. येथील स्तंभांवर आणि भिंतींवर असलेल्या शिलालेखांवरून व्यापाऱ्यांच्या आर्थिक क्षमतेचा अंदाज येतो. कार्ले लेण्यातील मुख्य चैत्यगृहाचे दान 'भूतपाल' नावाच्या वैजयंती येथील व्यापाऱ्याने दिले होते. त्याने याला "जंबूद्विपातील सर्वोत्तम शैलकृत भवन" असे म्हटले आहे. धान्य व्यापारी (धान्यक), अत्तर व्यापारी (गंधिक) आणि सुवर्णकारांनी दिलेल्या देणग्यांचे उल्लेख येथे आढळतात.[१६]

ब) भाजे लेणी: भाजे लेणी (इ.स.पू. २ रे शतक) ही कार्ले लेण्यापेक्षा प्राचीन मानली जातात. हे लेणे थेट बोरघाटाच्या जुन्या मार्गावर वसलेले आहे. येथील स्तंभांवर 'सार्थवाह' आणि त्यांच्या कुटुंबांनी दिलेल्या देणग्यांचे उल्लेख आहेत. व्यापाऱ्यांचे ताफे सुरक्षितपणे घाट ओलांडल्यानंतर कृतज्ञता म्हणून ही दाने देत असत.[१७]

क) बेडसे लेणी: बोरघाटापासून थोड्या अंतरावर असलेली बेडसे लेणी ही शांत आणि एकांत ठिकाणी आहेत, जी प्रामुख्याने भिक्षूंच्या वर्षावासासाठी वापरली जात.[१८] हे व्यापारी केवळ स्वतःचा फायदा पाहत नसत, तर त्यांनी सामाजिक जबाबदारी म्हणून लेण्यांमध्ये पाण्याचे टाके आणि विश्रामगृहे बांधली, ज्यामुळे व्यापारी मार्गावरून प्रवास करणे सोपे झाले.[१९] बोरघाट मार्गामुळे कोकणची बंदरे आणि देशावरील बाजारपेठा यांच्यात पैशांचा ओघ सुरू झाला. सातवाहनांची चांदीची आणि शिशाची नाणी या भागात मोठ्या प्रमाणात सापडतात, जी व्यापाराचे प्रतीक आहेत. रोमन मद्य आणि सिरॅमिक्सचे अवशेष कार्ले आणि भाजे परिसरातील उत्खननात सापडले आहेत.[२०] बोरघाट हा सातवाहन आणि क्षत्रप काळातील जागतिक व्यापाराचा महामार्ग होता. कार्ले, भाजे आणि बेडसे या लेण्यांमधील कोरीव काम आणि तेथील शिलालेख हे सिद्ध करतात की, कोकणातील बंदरांनी दिलेल्या आर्थिक समृद्धीमुळेच भारताचे हे 'शैलकृत' वैभव उभे राहू शकले. व्यापाऱ्यांनी दिलेली दाने ही केवळ धार्मिक नव्हती, तर ती त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची गुंतवणूक होती.

३. थल घाट मार्ग:

प्राचीन काळी 'थल घाट' ज्याला आज आपण कसारा घाट म्हणून ओळखतो. हा उत्तर कोकणातील कल्याण आणि शूर्पारक या बंदरांना उत्तर भारताशी आणि

विशेषतः नाशिक या मोठ्या व्यापारी पेठेशी जोडणारा सर्वात महत्त्वाचा मार्ग होता. सातवाहन आणि क्षत्रप कालखंडात दक्षिण आणि उत्तर भारताला जोडणाऱ्या मार्गांपैकी हा एक प्रमुख मार्ग होता. कल्याण हे त्याकाळी आंतरराष्ट्रीय बंदर होते, जिथून रोमन आणि अरब व्यापारी आपला माल देशावर पाठवण्यासाठी याच मार्गाचा अवलंब करत असत. ग्रीक प्रवासी टॉलेमी आणि 'पेरिप्लस'च्या लेखकाने या मार्गावरून होणाऱ्या व्यापाराचे महत्त्व अधोरेखित केले आहे.[२१]

व्यापारी मार्गावरील लेणी समूह: व्यापारी मार्गावर प्रवाशांच्या निवासासाठी आणि बौद्ध भिक्खूंच्या वर्षावासासाठी लेण्यांची साखळी निर्माण करण्यात आली होती. थल घाट मार्गावर खालील लेणी प्रमुख आहेत:

अ) कल्याण आणि कान्हेरी लेणी : थल घाट चढण्यापूर्वी व्यापाऱ्यांचे मुख्य केंद्र कल्याण होते. जवळच असलेले कान्हेरी हे त्या काळातील सर्वात मोठे व्यापारी आणि शैक्षणिक केंद्र होते. कान्हेरीतील शिलालेखांमध्ये कल्याणमधील 'सार्थवाह' यांनी दिलेल्या दानांची अनेक उदाहरणे आहेत.[२२]

ब) नाशिक (पांडवलेणी): थल घाट ओलांडल्यानंतर व्यापारी नाशिकमध्ये प्रवेश करत. येथील पांडवलेणी (त्रिरश्मी लेणी) ही या व्यापारी मार्गाच्या समृद्धीचे सर्वात मोठे प्रतीक आहेत. नाशिकच्या लेण्यांमध्ये शक-क्षत्रप राजा नहपान आणि सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी यांचे महत्त्वपूर्ण शिलालेख आहेत. हे शिलालेख या व्यापारी मार्गावरील नियंत्रणासाठी झालेल्या संघर्षाची साक्ष देतात. नहपानाचा जावई ऋषभदत्त याने नाशिक लेण्यांना दिलेली दाने ही प्रामुख्याने या मार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी होती.[२३]

थल घाटाच्या चढणीवर आणि माथ्यावर छोटेखानी लेणी आणि पाण्याची टाकी आढळतात. विहिगाव (वैतरणा खोरे) या मार्गावर वैतरणा नदीच्या परिसरात काही अपूर्ण लेणी आणि पाण्याचे रांजण आढळतात. घाटाच्या संरक्षणासाठी जसे नाणेघाटावर जीवधन आहे, तसे थल घाटावर अवत (कविचा किल्ला) आणि त्रिंगलवाडी यांसारख्या किल्ल्यांची निर्मिती करण्यात आली होती, जिथे लेण्यांचे अवशेष आजही पाहायला मिळतात. या मार्गावरून अनेक वस्तूंची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असे. त्यामध्ये मलमल आणि कापूस, रोममधून आयात केलेले मद्य आणि सुवर्ण मुद्रा व कोकण किनारपट्टीवरून देशावर पाठवले जाणारे मीठ यांचा समावेश होता.[२४] एकंदरीत थल घाट मार्ग हा दक्षिण भारताच्या आर्थिक भरभराटीचा 'धोरणी मार्ग' होता. नाशिकची पांडवलेणी ही या मार्गावरील व्यापारातून आलेल्या धनातूनच उभी राहिली. सातवाहन आणि क्षत्रप या दोन्ही सत्तांनी या मार्गाला सर्वोच्च महत्त्व दिले, कारण ज्याच्या हातात थल घाट आणि नाणेघाट, त्याच्या हातात दख्खनची आर्थिक सत्ता असे समीकरण त्याकाळी होते.

४. दक्षिण कोकणातील मार्ग व प्रमुख लेण्या:

उत्तर कोकणात सोपारा आणि कल्याणचे महत्त्व होते, तर दक्षिण कोकणात महाड, चिपळूण आणि दाभोळ ही बंदरे सातवाहन, चालुक्य आणि नंतर शिलाहार काळात व्यापाराची प्रमुख केंद्रे होती. या बंदरांना कोल्हापूर (करवीर) आणि कराड यांसारख्या अंतर्गत बाजारपेठांशी जोडण्यासाठी सह्याद्रीचे कठीण घाट मार्ग वापरले जात.

१. महाड-गांधारपाले मार्ग: महाड हे सावित्री नदीच्या काठावर वसलेले एक महत्त्वाचे अंतर्देशीय बंदर होते. समुद्रातून येणारी मोठी जहाजे खाडीमार्गे महाडपर्यंत येत असत. गांधारपाले लेणी या महाड शहराच्या जवळच असलेल्या टेकडीवर ३१ बौद्ध लेण्यांचा समूह आहे. हा समूह थेट व्यापारी मार्गावर आहे जो 'वरंधा घाटा'तून भोर

आणि पुण्याकडे जातो. येथील शिलालेखात 'विजया' नावाच्या व्यापारिणीने दिलेल्या देणगीचा उल्लेख आहे. हे सिद्ध करते की या मार्गावर स्त्रिया देखील व्यापारात सक्रिय होत्या.[२५]

२. चिपळूण-कराड मार्ग: चिपळूण हे वाशिष्ठी नदीच्या काठावर वसलेले प्राचीन शहर आहे. येथून 'कुंभार्ली घाटा'द्वारे कराड (कराटक) या सातवाहन काळातील मोठ्या बौद्ध केंद्राकडे जाता येत असे. चिपळूणमध्ये प्राचीन बौद्ध लेण्यांचे अवशेष आहेत, जे आता बऱ्याच प्रमाणात पडझड झालेल्या अवस्थेत आहेत. तथापि, त्यांचे स्थान व्यापाराच्या दृष्टीने मोक्याचे होते. चिपळूण जवळ कोळकेवाडी येथेही लेणी आहेत, जी कोकणातून घाटावर जाणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी विसावा म्हणून वापरली जात.[२६]

३. पन्हाळेकाजी लेणी : दक्षिण कोकणातील सर्वात महत्त्वाचा लेणी समूह म्हणजे दापोली तालुक्यातील पन्हाळेकाजी होत. हा समूह कोटजाई नदीच्या काठावर आहे. येथे २९ लेणी आहेत. सुरुवातीला (३ रे शतक) ही हीनयान बौद्ध लेणी होती, नंतर तिथे वज्रयान पंथाचा प्रभाव पडला आणि १० व्या शतकानंतर शिलाहार काळात तिथे नाथ संप्रदायाचे केंद्र बनले. दाभोळ बंदरातून कराड आणि कोल्हापूरकडे जाणारा माल याच मार्गावरून जात असे. येथील लेण्यांमध्ये कोरलेली शिल्प कोकणातील तत्कालीन समृद्धी दर्शवतात.[२७]

४. अंबा घाट मार्ग: अंबा घाट हा प्राचीन काळी रत्नागिरी आणि राजापूर या बंदरांना कोल्हापूरच्या बाजारपेठेशी जोडणारा मुख्य मार्ग होता. रोमन साम्राज्याशी होणारा व्यापार या मार्गावरून दख्खनच्या पठारावर जात असे. कोल्हापूर (ब्रह्मपुरी) येथे झालेल्या उत्खननात रोमन वस्तू, विशेषतः 'पोसायडन'ची मूर्ती आणि रोमन मद्यकुंभ सापडले आहेत, जे अंबा घाटाच्या व्यापारी सक्रियतेचा पुरावा देतात. अंबा घाटाच्या पायथ्याशी रत्नागिरी जिल्ह्यातील पन्हाळेकाजी लेण्यांची निर्मिती व्यापारातून मिळालेल्या संपत्तीतून झाली होती.[२८]

५. बावडा घाट (गगनबावडा) मार्ग : बावडा घाट हा दक्षिण कोकणातील राजापूर आणि खारेपाटण या बंदरांसाठी जीवनवाहिनी होता. हा मार्ग चढणीला कठीण असला तरी सह्याद्रीच्या पट्ट्यातील सर्वात जवळचा मार्ग होता. कोल्हापूरच्या शिलाहार राजांच्या काळात खारेपाटण हे त्यांचे महत्त्वाचे केंद्र होते. राजापूरची बंदरे आणि कोल्हापूर यांच्यातील मालाची ने-आण याच मार्गावरून होत असे. या मार्गावर मोठ्या प्रमाणावर लेणी नसली तरी, मार्गाच्या रक्षणासाठी 'वीरगळ' आणि छोट्या गुहा-विश्रांतीस्थाने आढळतात. या मार्गाचा उपयोग प्रामुख्याने मसाल्याच्या पदार्थांच्या वाहतुकीसाठी केला जाई.[२९]

अंबा आणि बावडा घाटातील प्राचीन पायवाटांवर खडकात कोरलेली पाण्याची टाकी आढळतात. ही टाकी केवळ भिक्षूंसाठी नव्हती, तर व्यापारी ताफ्यातील माणसांना आणि प्राण्यांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी 'श्रेणीं'नी दान दिली होती. या मार्गांवरून सोन्या-चांदीची आणि मौल्यवान खड्यांची वाहतूक होत असल्याने, मार्गाच्या तोंडाशी असणाऱ्या लेण्यांमध्ये संरक्षक दलाची सोय असे.

सारांश व निष्कर्ष:

प्रस्तुत शोध निबंध प्राचीन कोकण या प्रदेशातील भौगोलिक रचना आणि तिथे विकसित झालेले व्यापारी मार्ग यांचा बौद्ध लेणींशी असलेल्या घनिष्ठ संबंधाचा ऐतिहासिक वेध घेतो. सातवाहन, क्षत्रप, वाकाटक आणि शिलाहार या राजवटींमध्ये कोकणची सोपारा, कल्याण आणि चौल ही बंदरे जागतिक व्यापाराची मुख्य केंद्रे होती. या बंदरांना दख्खनच्या पठाराशी जोडणारे नाणेघाट, बोरघाट, थळघाट आणि दक्षिण कोकणातील घाटमार्ग हे केवळ दळणवळणाचे साधन नव्हते, तर ते संस्कृती आणि

अर्थव्यवस्थेचे महामार्ग होते. संशोधनातून असे दिसून येते की, ज्या ठिकाणी हे कठीण घाटमार्ग सुरू किंवा संपत असत, तिथेच बौद्ध लेण्यांची निर्मिती झाली. या लेण्यांची निर्मिती केवळ धार्मिक कारणांबरोबर व्यापाऱ्यांची सुरक्षितता, निवारा आणि आर्थिक व्यवहार ही महत्त्वाची कारणे होती. सातवाहनांच्या नाणेघाटापासून ते शिलाहारांच्या पन्हाळेकाजी लेण्यांपर्यंतचा इतिहास हा व्यापारातून आलेल्या आर्थिक समृद्धीने कला आणि स्थापत्य क्षेत्राला कसे संवर्धित केले, याचा उत्कृष्ट नमुना आहे. प्रस्तुत अभ्यासाअंती खालील महत्त्वाचे निष्कर्ष काढता येतात:

१. कोकणातील लेण्यांची निर्मिती ही मुख्यत्वे 'सार्थवाह' आणि 'श्रेणी' यांनी दिलेल्या दानातून झाली. नाणेघाट आणि बोरघाटातील शिलालेख हे स्पष्ट करतात की, व्यापारातील नफ्याचा मोठा भाग या धार्मिक आणि सामाजिक पायाभूत सुविधांसाठी वापरला गेला.

२. नाणेघाटातील 'जकात रांजण' हे प्राचीन भारताच्या प्रगत कर प्रणालीचे प्रतीक आहे. ज्या राजसत्तेचे या घाटांवर नियंत्रण होते, तीच सत्ता दख्खनच्या अर्थव्यवस्थेवर राज्य करत असे, हे सातवाहन-क्षत्रप संघर्षावरून स्पष्ट होते.

३. दक्षिण कोकणातील पन्हाळेकाजी सारखी लेणी ही धार्मिक परिवर्तनाची साक्ष देतात. सुरुवातीला बौद्ध केंद्र असलेली ही लेणी नंतर नाथ संप्रदायाची पीठे बनली, जे बदलते सामाजिक-धार्मिक प्रवाह दर्शवते.

४. कोकणच्या घाटमार्गांमुळेच भारताचे रोम आणि अरब राष्ट्रांशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाले. कोल्हापूरच्या उत्खननात सापडलेल्या रोमन वस्तू आणि कान्हेरीतील शिलालेख हे या जागतिक देवाणघेवाणीचे भक्कम पुरावे आहेत.

५. महाडच्या गांधारपाले लेण्यातील 'विजया' या व्यापारिणीचा उल्लेख प्राचीन काळी व्यापारात स्त्रियांचा असलेला सक्रिय सहभाग आणि त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य अधोरेखित करतो.

संदर्भ सूची:

१. गोखले शोभना, *पुराभिलेखविद्या*, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७५, प्रथमावृत्ती, पृ. ७८.

२. ढेरे रा. चिं., *प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास*, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९५, द्वितीयावृत्ती, पृ. ४२.

३. Ray, Himanshu Prabha, *The Monastery and the Market: Monsoon Asia in the First Millennium*, Cambridge University Press, 2021 (1st Edn.), p. 124.

४. Sircar, D.C, *Select Inscriptions Bearing on Indian History and Civilization, Vol. I*, University of Calcutta, 1965 (2nd Edn.), pp. 192-197.

५. Gokhale, Shobhana, *Kanheri Inscriptions*, Deccan College Post Graduate and Research Institute, Pune, 1991 (1st Edn.), pp. 54-58.

६. Senart, E, *"The Inscriptions in the Caves at Nasik. Epigraphia Indica, Vol. VIII*, Archaeological Survey of India, 1905, pp. 78-82.

७. Mirashi, V.V., *The History and Inscriptions of the Satavahanas and the Western Kshatrapas*, Maharashtra State Board for Literature and Culture, 1981 (1st Edn.), pp. 34-38.

८. Kielhorn, F, "Junagadh Rock Inscription of Rudradaman", *Epigraphia Indica, Vol. VIII*, Archaeological Survey of India, 1905, pp. 42-45.

९. Mirashi, V.V., *Inscriptions of the Vakatakas (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. V)*, Archaeological Survey of India, 1963 (1st Edn.), pp. 103-111.

१०. Ibid. *Inscriptions of the Kalachuri-Chedi Era (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. IV)*. Archaeological Survey of India, 1955 (1st Edn.), p. 12.

११. Deshpande, M.N., *The Caves of Panhale-Kaji*, Archaeological Survey of India, New Delhi, 1986, pp. 15-22.

१२. Gokhale, Shobhana, *"The Naneghat Inscription". Bulletin of the Deccan College Research Institute, Vol. 46*, Deccan College, Pune, 1987, pp. 29-32.

१३. Burgess, James, *Report on the Buddhist Cave Temples and Their Inscriptions (ASWI, Vol. IV)*, Trubner & Co., Londo, 1883, p. 55.

१४. Vats, M.S., *Unpublished Inscriptions from Junnar, Epigraphia Indica, Vol. XXVI*, Manager of Publications, Delhi, 1941, pp. 12-14.

१५. Casson, Lionel, *The Periplus Maris Erythraei*, Princeton University Press, Princeton,1989 (1st Edn.), p. 198.

१६. Burgess, James, *The Cave Temples of India*, W.H. Allen & Co., London, 1880 (1st Edn.), pp. 232-235.

१७. Dehejia, Vidya, *Early Buddhist Rock Temples*, Ithaca, Cornell University Press, New York, 1972 (1st Edn.), pp. 98-102.

१८. Dhavalikar, M.K., *Late Hinayana Caves of Western India*, Deccan College Post-Graduate and Research Institute, Pune, 1984, pp. 45-48.

१९. Ray, Himanshu Prabha, *Monastery and Guild: Commerce under the Satavahanas*, Oxford University Press, Delhi, 1986 (1st Edn.), pp. 120-128.

२०. Ibid. *The Winds of Change: Buddhism and the Maritime Links of Early South Asia*, Oxford University Press, Delhi, 1994, p. 154.

२१. Schoff, Wilfred H. (Ed.), *The Periplus of the Erythraean Sea*, Longmans, Green, and Co., New York, 1912 (1st Edn.), p. 197.

२२. Gokhale, Shobhana, *Op. cit.,* (1991), pp. 82-85.

२३. Senart, E, *Op. cit,* (1905-06), p. 60.

२४. Chandra, Moti, *Trade and Trade Routes in Ancient India*, Abhinav Publications, New Delhi, 1977 (1st Edn.), p. 112.

२५. Burgess, James.,*Op. cit.*, (1880), pp. 209-211.

२६. Campbell, James M. (Ed.), *Gazetteer of the Bombay Presidency, Vol. I, Part II (History of the Konkan)*, Government Central Press, Bombay, 1896 (1st Edn.), p. 145.

२७. Deshpande, M.N., *Op. cit.,* (1986), pp. 34-40.

२८. Sankalia, H.D. and M.G. Dikshit, *Excavations at Brahmapuri (Kolhapur) 1945-46*. Deccan College Post Graduate and Research Institute, Pune, 1952 (1st Edn.), pp. 142-145.

२९. Mirashi, V.V., *Inscriptions of the Silaharas (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. VI)*. Archaeological Survey of India, New Delhi, 1977 (1st Edn.), pp. 112-118.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

शिलाहारकालीन कोल्हापूर

डॉ. विकास संभाजी नाईक

यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर

Corresponding Author - डॉ. विकास संभाजी नाईक

DOI - 10.5281/zenodo.19704103

प्रस्तावना:

पूर्वमध्ययुगीन कालखंडात कोल्हापूर हे श्री महालक्ष्मीच्या अस्तित्वाने नावारूपास आलेले श्री क्षेत्र होते. कोल्हापूरला असलेल्या स्थानमहात्म्यामुळे या क्षेत्राची महती दूरदूरपर्यंत पोहोचली होती. तत्कालीन चालुक्य, राष्ट्रकूट, चोल, शिलाहार, यादव या राजवंशांनादेखील याचे महत्व व आकर्षण वाटत राहिलेले होते हे आपणास या ठिकाणी सापडलेल्या वरील राजवंशाच्या शिलालेखावरून व संघर्षावरून विदित होते. कोल्हापूरच्या भूमीवर अनेकांनी आपल्या सत्ता प्रस्थापित केल्या पण खऱ्या अर्थाने कोल्हापूरच्या भूमीचा विकास,येथील संस्कृतीचा प्रचार व प्रसार जर कोणी केला असेल तर तो तगरपूरवराधीश्वरशिलाहार राजवंशानेच. या राजवंशाच्या कालावधीतच या कोल्हापुरात पन्हाळ्यासारख्या अजोड अश्या १५ दुर्गाची निर्मिती झाली. शिलाहारांनी महालक्ष्मीस आपली वरदेवता मानून अचाट अशी कृत्ये पार पाडलीत. या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब हे त्यांच्या राज्यकारभारात आपणास दिसून येते. शिलाहारांच्या या प्रशासनिक कामगिरीचा आढावा या प्रस्तुत शोधनिबंधातून जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे .

शिलाहारांचा राज्यविस्तार :

शिलाहारांच्या कोल्हापूर शाखेत रत्नागिरी जिल्हयाच्या पूर्वेच्या घाटावरील प्रदेश : यामध्ये सातारा,कोल्हापूर,सांगली आणि बेळगाव या सध्याच्या जिल्ह्याचा समावेश होता. थोडक्यात हा तत्कालीन पश्चिम महाराष्ट्रच होय. जतिग [१] हा या वंशाचा मूळपुरुष हा गोव्याच्या गंग राजांच्या पदरी किल्लेदार होता. यानंतरचा दूसरा जतिग (इ.स.१०००-२०)हा स्वपराक्रमाने राजा झाला. यानंतरच्या कालखंडात या राजघराण्यात विजयादित्य,गंडरादित्य व दूसरा भोज इ. पराक्रमी राजांनी राज्यविस्तार करत गोव्याच्या कदंबांशी संघर्ष करत त्यांना कोकणातून हाकलून लावले[२] व आपल्या राज्याचा विस्तार केला व हे करीत असता त्यांनी आपल्या राज्यात उत्तम अशी प्रशासनव्यवस्था अमलात आणली जेणेकरून या व्यवस्थेचा अनपेक्षितपणे प्रभाव पुढील अनेक शतके या विभागावर पडला.

प्रशासन व्यवस्था:

शिलाहारांच्या शासनाखालील प्रदेशाचे तीन विभाग प्रामुख्याने आहेत .त्यापैकी उत्तर कोकण,याला त्याच्या पूर्वीच्या **पुरी** नामक राजधानीवरून पुरी कोकण[३] किंवा**पुरिप्रभूती** कोकण असे नामाभिधान होते. त्यानंतर दक्षिण कोकण याला **सप्तकोकण**[४] असेही नाव होते.

त्यानंतर कोल्हापूरचे शिलाहार यात सातारा,कोल्हापूर,सांगली व बेळगाव या सध्याच्या जिल्ह्यांचा समावेश होतो. या तिनही शाखांचे राज्यशासनाच्या सोईकरिता अनेक विभाग आणि पोटविभाग केले होते. त्यामुळे तत्कालीन व्यवस्थेचा आपण या ठिकाणी आढावा घेणार आहोत. सर्वप्रथम शिलाहारांच्या प्रशासन व्यवस्थेत राज्यशासनाच्या सर्वात मोठ्या विभागास **देश** अशी संज्ञा होती . उदाहरणार्थ **पुणक** देशात[५] सध्याच्या पुण्याच्या सभोवारचा विस्तृत प्रदेशाचा मैरिंजा देशात[६]म्हणजेच मिरजेच्या जवळच्या भागाचा आणि कुंडी देशाचा म्हणजेच बेळगाव भोंवतालच्या प्रदेशाचा अंतर्भाव होत होता. कोकणात अनेक देशांचा अंतर्भाव होत असल्याने त्याचा उल्लेख **महादेश** असा देखील आला आहे . देशाचे **राष्ट्र** नामक पोट विभागाचा निर्देश आढळत नाही . त्यांच्या काळी देशाच्या पोट विभागांना 'विषय' अशी संज्ञा होती.

शिलाहारांच्या अनेक लेखांत अनेक विषयांचा (जिल्ह्यांचा)उल्लेख आढळतो. उदा: पानाडविषय, करकुटविषय, प्रणालकविषय[७] असा उल्लेख पन्हाळाभोवतीच्या प्रदेशास येतो . याशिवाय चिपुलण विषयाचाही उल्लेख कोरीव लेखात आला आहे म्हणजेच सध्याचा चिपळूणचा प्रदेश. कुंतल देशात (कोल्हापूर व कर्नाटकातील काही भाग) सामान्य जनांची भाषा कन्नड असल्यामुळे कोल्हापूर विभागांची नावे कन्नड होती.विशेषतः हळेकन्नड (जुनी कन्नड) भाषेत संस्कृतोद्भव लेख आहेत. येथील देश विभागांना 'नाड' किंवा खोल्ल (गोल्ल)असे म्हणत. कोल्हापूर जिल्ह्याला 'एडेनाड' विषय असे नाव होते[८]. त्याचबरोबर आपणास या नावाच्या साधरम्याचीपणतुरगेखोल्ल,आजिरगेखोल्ल,कवडे गोल्ल ही नावे आहेत. या नाड किंवा खोल्ल या विभागाचे खम्पण किंवा गम्पण नावाचे पोटविभाग होते . उदा. मिरिंजेगंपण,कोडवल्लीगंपण याचा दाखला आपणास गंडरादित्य याने कोल्हापूरच्या वळयवाड (वळीवडे)या शिबिरातून सन १११५ मध्ये दिलेल्या ताम्रपटात भेटतो पुढीलप्रमाणे -

अष्टम्या बुधवारे मिरींजदेशे |

मिरींजगंपणमध्येअंकुलगेबोप्पे-

यवाड इति ग्रामदव्यम आदगेनामग्रामस्यंम प्रविष्टम

कृतवा तदग्रा -

थोडक्यात याठिकाणी आताच्या पंचायत राज पद्धतीमध्ये असणाऱ्या त्रिस्तरीय रचना ज्यामध्ये जिल्हा,तालुका,गाव याचपद्धतीने तत्कालीन काळात नाड (जिल्हा)खंपण अथवा गंपण (तालुका) व ग्राम (गाव)ही रचना दिसून येते. काही ठिकाणी तालुक्यांची नावे गावांच्या संख्येवरून ठेवली असत. उदा. षटषट विषय (साष्टी) शूरपारकषटषष्टि (सोपाऱ्याजवळचा प्रदेश) मिरींजदेशात ३००० गावे होती[९] त्याचा उल्लेख **सहस्त्रत्रितयमिरींजदेश** असा आहे .

थोडक्यात विषय आणि खोल्ल यामध्ये नगरे व ग्राम यांचा समावेश होत असे. शिलाहार काळातील फारच थोड्या शहरांची नावे शिलालेख व ताम्रपटात आपणासमोर येतात. कोल्हापूरचे **क्षुल्लकपूर** हे नाव विजायादित्याच्या कोल्हापूरच्या शुक्रवार पेठ जैन मंदिरातील शिलालेखात आले आहे त्याचबरोबर करहाटक (कराड),मिरिंजे (मिरज),यडेनाड (कोल्हापूरच्या आसपासचा प्रदेश), कुंडी (बेळगाव) ही झाली नगरांची नावे त्यानंतर प्रणालक (सध्याचा पन्हाळा) ही शिलाहारांची तटबंदीयुक्त राजधानी होती तरवळयवाड (वळीवडे) हे शिबिराचे ठिकाण होते. शिलाहार वंशातील बहुतांशी राजांनी याच ठिकाणाहून दानपत्र अथवा शिलालेखातून दान दिले आहे. कोल्हापूरच्या नजीक असणारे हे ठिकाण आहे. कदाचित हे राज शिबिराचे ठिकाण असावे.

राजाचे स्थान :

कोल्हापूरच्या शिलाहारांची शासनपद्धती ही राजसत्ताक स्वरूपाची होती. राजा हा सर्व सत्तेच्या सर्वोच्च स्थानी असे. उत्तर कोकण व दक्षिण कोकणचे शिलाहार यांचा उदय हा राष्ट्रकूटांचे मांडलिक म्हणून झाला असल्याकारणाने त्यांनी **महासामंत** ही उपाधी धारण केली होती. पण कोल्हापूर शिलाहार शाखेचा उदय हा राष्ट्रकूटांच्या ऊचेदानंतर झाला असल्याकारणाने यांच्या शिलालेखात असे उल्लेख सापडत नाही व या शाखेच्या प्रारंभीचे कोरीव लेखही अद्याप सापडलेले नाहीत. हेदेखील याचे कारण असाव. शिलाहार नृपतींना विविध प्रकारची बिरुदे धारण करण्याची हौस होती व ते त्यांच्या पराक्रमाचे प्रतीक ही होते. शिलाहार राजे आपला वंश,चारित्र्य,सामर्थ्य,मूलस्थान,विद्वत्ता,राजचिन्ह,औदार्य,अ निष्ट प्रभावातून मुक्तता इ.च्या संबंधाने बिरुदे धारण करीत असत. कोल्हापूरचे शिलाहार हे मूळचे तगर (धाराशीव जिल्ह्यातील तगर गावचे) म्हणून "तगरपूरपरमेश्वर " किंवा " तगरपूरवराधीश्वर " या बिरुदांचा उल्लेख आपल्या लेखात करत. कोरीव लेखात सुरवातीस आपण विद्याधर जिमूतवाहनाचे वंशज आहोत. याचा उच्चार करीत याबरोबर एका लेखात ते आपल्या '**सुवर्णगरुड**' या लांछनाचा उल्लेख करीत कोल्हापूरचा या कुलातील शेवटचा राजा द्वितीय भोज याने '**राजाधिराज**', '**परमेश्वर**', 'परमभट्टारक', 'पश्चिमचक्रवर्ती' या सारख्या पदव्या धारण केल्या होत्या.त्याचबरोबर आपण आपल्या कुलातीलपूर्वकालीन राजांसारखे आहोत असेही सांगतात.उदाहरणार्थ :कलियुगयुधिष्टीर, निजभुजविक्रमदित्य, कोदंडसहसहत्रार्जुन, नरेंद्रनागार्जून ही बिरुदे यांनी आपल्या नावासमोर लावून आपल्या कुलाचे महानत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न यातून दिसून येतो .

पूर्व मध्ययुगीन कालखंडात कोल्हापूर भोवतालच्या प्रदेशात जनसामान्यांची भाषा कन्नड असल्यामुळे कन्नड बिरुदे इथल्या लेखात अगदी शेवट पर्यंतयोजलेली आढळतात. उदाहरणार्थ शिलाहार राजा द्वितीय भोज यांची बिरुदे - इडूवरादित्य (आक्रमकांमध्ये सूर्यासारखा), मंडलिकगंडपेंडर (मांडलिक वीरांमध्ये पैजणासारखा सुंदर), अरसासवारिमदनमहेश्वर (राज्यशासनाला विरोध करणारे शत्रू हेच कोणी मदन त्यांचा निःपान्त करणारा महेश्वर शिव) इत्यादि. शिलाहार राजे हे मांडलिक राजे होते. उत्तर व दक्षिण कोकणचे शिलाहार हे राष्ट्रकूटांचे तर कोल्हापूरचे शिलाहार हे उत्तरकालीन चालुक्यांचे मांडलिक होते. याबदल्यात त्यांना सम्राटांना खंडणी द्यावी लागत असे . कोल्हापूरच्या शिलाहारांनी आपले सम्राट कल्याणी चालुक्य यांच्या लढायात स्वतः लढून किंवा आपले सामंत पाठवून विजय संपादण्यात सहाय्य केल्याचे उल्लेख त्यांच्या लेखात आढळतात.[१०]

पित्यानंतर जेष्ट पुत्राला गादी मिळत असे ,कित्येकदा तर राजाच आपल्या हयातीत आपल्या राज्याची वाटणी करून कनिष्ट मुलालाही राज्याचा काही भाग देत असे . तसेच काही राज्यकर्त्यानी आपल्या बंधुना प्रांताधिपति नेमल्याचीही उदाहरणे इतिहासात पाहायला मिळतात. त्यामुळे शिलाहारांच्या इतिहासात भाऊबंदकीची उदाहरणे मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळत नाहीत. कोल्हापूरचे शिलाहार राजे हे जरी उत्तरकालीन चालुक्यांचे मांडलिक असले तरी त्यांची आपल्या राज्यात सत्ता ही अनियंत्रित होती. ते स्वतः आपले प्रांताधिपति व मंत्री नेमत आणि आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणे युद्ध किंवा तह करीत. शिलाहार स्वतःस क्षत्रिय म्हणत[११] क्षत्रियांचे मुख्य कर्तव्य प्रजेचे पालन हे होय.[१२]

याज्ञवलक्यांनी हे ही सांगितले आहे की '**राजाने आपल्या प्रजेचे पालन केले तर तिच्या पुण्यार्जनाचा**

षष्ठांशभाग त्याला मिळतो. पण त्याने तिचे पालन न केल्यामुळे तिने पापाचरण केले तर त्याचा निम्मा भाग त्याला घ्यावा लागतो'. अपरार्क टीकेत स्पष्ट म्हटले आहे[१३] की राजा प्रजेचे जे संरक्षण करतो त्याबद्दल ती त्याला करभार देते. म्हणून राज्यात शांतता आणि सुव्यवस्था स्थापन करणे हे राजाचे मुख्य कर्तव्य होय. राजाने प्रजेचा छळ केल्यास त्यापासून उफाळणारा क्रोधाग्नि त्याचे राज्य,वंश किंबहुना त्याचा स्वत:चा जीव नष्ट केल्याशिवाय शांत होणार नाही. याज्ञवलक्यस्मृति मध्ये असाही उल्लेख येतो की,राजा ज्या पद्धतीने प्रजापालनाने पुण्य कमावतो. तसेच पुण्य परदेशाक्रमनामुळे हि मिळवू शकतो. याचा परिणाम आपण प्राचीन काळच्या सत्तामध्ये सतत सुरू असणार असणारा संघर्ष पाहू शकतो. त्याचबरोबर वर्णव्यवस्था व्यवस्थित पाळली जाते की नाही, कोठे संकर होत असेल तर हे निवारण्याचे कार्य राजा करतो किंबहुना हे राजाचे एक प्रमुख कर्तव्य मानले आहे. कोल्हापूर शाखेच्या विजयादित्य या राजाविषयी खालील वर्णन आले आहे .

"त्याचे धनार्जन दानाकरिता,शौर्य प्रजेच्या रक्षणाकरिता
प्रिय भाषण सत्याच्या प्रतिष्ठेकिरता,चिंतन भगवंताच्या ध्यानाकरिता
आणि संपत्ति सज्जनांच्या विपत्तीचा लोप करण्याकरिता असे
त्या विजयादित्याच्या गुणांचे यथार्थतेने वर्णन करण्यास कोणता कवि
समर्थ आहे बरे ?"[१४]

प्राचीन काळी जनमानसावरती धर्माचा प्रचंड मोठा प्रभाव होता त्यामुळेच राजेलोक स्मृति ग्रंथातील नियमाविरुद्ध वर्तन करण्यास सहसा धजावत नसत. तत्कालीन शासनव्यवस्थाराष्ट्रपति (विभाग प्रमुख),विषयपती (जिल्हा प्रमुख) आणि ग्रामपती (गाव पाटील) यांच्या सहकार्याने केले जात असे. शिलाहारांच्या प्राचीन ताम्रपटात राष्ट्रपति,विषयपती आणि ग्रामपती या पदाधिकाऱ्यांचा उल्लेख काही ठिकाणी आलेला आहे. शिलाहारांच्या लेखात राष्ट्राचा उल्लेख आढळत नाही ही संज्ञा प्रयोगातून जाऊन 'मंडलप्रमुख' बनला असावा. विषयपती हे पद सध्याच्या कलेक्टरप्रमाणे असत. ग्रामपती हे अर्थात पाटील असत काही ठिकाणी यांचा **पटकील** असा व कोल्हापूरच्या ठिकाणी **'नार्गाऊंड'** म्हणजे विषयपती व गावुंड म्हणजे गाव पाटील अथवा ग्रामाधिकारी याव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय पदाधिकारी :

१) महाप्रधान –सर्वाधिकारी
२) महामात्य – सर्व राज्यकारभाराची व्यवस्था
३) प्रथम छेपाटी- मुख्य कोषाध्यक्ष
४) द्वितीय छेपाटी –दुय्यम कोषाध्यक्ष
५) महासंधीविग्रहक – परराष्ट्र खात्याचा प्रमुख

एका लेखात **कडमादित्याचा** चा उल्लेख आला आहे तो युद्ध खात्याचे काम पाहत असावा. काही लेखात राजगुरुचा उल्लेख आहे राजगुरुला महामात्यांचा दर्जा असे. श्रीकरणी हा सचिवालयाचा प्रमुख असावा कोल्हापूर येथील काही लेखात हडप किंवा हडपल याचा निर्देश आहे तो राजाचा स्वीय सेवक असावा.[१५]

राज्याची उत्पन्नाची साधने :

प्रशासन व्यवस्थेचा खर्च भागवण्याकरिता राज्याची विविध आयस्थाने होती त्यापैकी मुख्य जमीन महसूल याला कोरीव लेखात सिद्धाय असे म्हटले आहे. काही इतर लेखात त्याचा भूमीदेणक असा निर्देश केला आहे आता तो किती द्यावा तर स्मृतिमध्ये उत्पन्नाच्या एक षष्टाअंश द्यावा असा निर्देश आहे. शिलाहारांच्या लेखावरून असे दिसते की,जमीन महसूल अंशत:द्रम्मात (म्हणजे रोख पैशात) आणि अंशत: धान्य रूपाने दिला जात असे.

उत्पन्नाचा दूसरा स्त्रोत हा घरांवरील कर याला 'गृहदेणक'असे संबोधत . आपराध्यांना लादलेल्या दंडापासूनही काही उत्पन्न मिळत असे. काही महत्वपूर्ण प्रसंगी राजे ग्रामदान अथवा जमीनदान देत अश्या देवालयांना किंवा ब्राम्हणांना दिल्या गेलेल्या दानावरील उत्पन्नावरचा कर कर राजकोशात जमा करण्याचा दानपत्रात आदेश असे. त्याचबरोबर जेव्हा एखाद्यास जमीन महसुलाची सूट दिली जात तेव्हा त्याठिकाणी त्याचा निर्देश 'भूमीदेणकनिर्रमुक्ती' व घराच्या करापासून मुक्ती दिली असल्यास त्याला 'गृहदेणकनिर्मूक्ती' म्हणत. विशेष बाब म्हणजे देवांना व ब्राम्हणांना दान दिलेल्या गावात चाट (पोलिस) व भट (सैनिक) यांच्या प्रवेशास मनाई होती .

सारांश :

इ. स. १० व्या शतकाचा उत्तरार्ध ते इ.स. १३ व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत २०० ते २५० वर्षे शिलाहारांनी दक्षिण महाराष्ट्रात राज्य केले. इतका प्रदीर्घ काळ एखादा राजवंश फक्त पराक्रमाच्या व तलवारीच्या धाकावर राज्य प्रस्थापित करू शकत नाही. या राजवंशाने जनमानसाला साजेशी लोककल्याणकारी राज्यव्यवस्था निर्माण केली होती.शिलाहार राजांनी दुर्गांचे महत्व ओळखून अभेद्य अश्या ठिकाणी किल्ले बांधले व उत्तम अशी व्यवस्था त्या ठिकाणी निर्माण केली. त्यांनी बांधलेल्या किल्यांचे अस्तित्व आजही आपणास पाहावयास मिळतात ही या वंशाच्या कार्याची उपलब्धी म्हणावी लागते. त्यांनी प्रशासन व्यवस्थेला प्राचीन रूढी व स्मृति,श्रुतीचा आधार देऊन ही व्यवस्था जनमानसात रूढ केली होती. हेदेखील या व्यवस्थेचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल .

संदर्भ

१. देगलूरकर (डॉ.) गो. ब., 'प्राचीन भारत :इतिहास आणि संस्कृति', अपरांत प्रकाशन, पुणे, २०२२, (तृतीयआवृत्ती), पृ.३११.

२. कित्ता,पृ.३१२.

३. Journal of the Bombay branch of the Royal Asiatic Society.vol.6 (1862), p.8

४. EpigraphiaIndica, Vol

५. Important Inscriptions from the Baroda state मधील प्रतिमा क्र .5 व 8

६. मिराशी,(डॉ.) वा.वि., 'शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख',सुविचार प्रकाशन मंडळ,नागपूर,१९७४(प्रथमावृत्ती), पृ.२४४.

७. एशिया मेजर (१९२६)मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रतिमेवरून

८. Journal of the Bombay branch of the Royal Asiatic Society, vol.13 (1862), pp.1

९. Burjes and BhagwanlalIndraji, 'Inscriptions from the cave-Temples of Western India, मधील छापावरून.

१०. उपरोक्त,मिराशी, पृ .६७.

११. कित्ता,पृ.६८.

१२. याज्ञवल्कयस्मृति,अध्याय १ श्लोक, ३३६.

१३. कित्ता, पृ.३३५.

१४. Trasactions of the Literary Society of Bombay, Vol.3 (1877) pp.418,419.

१५. उपरोक्त,मिराशी,पृ.७१.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सातवाहन कालीन कराड येथील बौद्ध धर्माचा प्रसार

प्रा. डॉ. अनिल भिमराव कुंभार

सहा.प्राध्यापक, इतिहास विभाग,

श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी ता.आटपाडी जि.सांगली (महाराष्ट्र)

Corresponding Author - प्रा. डॉ. अनिल भिमराव कुंभार

DOI - 10.5281/zenodo.19704139

प्रस्तावना:

जगामध्ये अस्तित्वात असणाऱ्या विविध धर्माच्या धर्म संस्थापकांनी समाजाला प्रेमाची शांतीची आणि नीतिमत्तेची शिकवण दिली. त्यापैकी काही धर्म संस्थापक व त्यांच्या अनुयायांनी धर्मप्रसारासाठी अत्याचार आणि संस्थेचा मार्ग अवलंबला होता अशा प्रकारचे प्रस्थ युरोप खंड आणि मध्य आशियामध्ये प्रचलित होते म्हणून कार्ल मार्क्स यांनी धर्माला अफूची गोळीची उपमा दिली आहे. परंतु बौद्ध धर्माचा इतिहास पाहता असे दिसते की बौद्ध अनुयायांनी धर्मप्रसारासाठी अत्याचार किंवा हिंसेचा वापर केलेला आढळत नाही तर बौद्ध धर्मीयांनी व अनुयायांनी तत्कालीन समाजातील व्यक्तीचे अज्ञान नाहीसे करून नीतिमत्तेच्या मार्गाने वैयक्तिक आणि सामाजिक समतोल राखून सुसंस्कृत समाज निर्माण करण्याचे महान कार्य बौद्ध धर्मांनी केले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये बौद्ध धर्माचा महत्त्वाचा वाटा आहे इसवी सन पूर्व पाचव्या शतकामध्ये महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रवेश झाला तेव्हापासून सातत्याने पंधराशे वर्षे बौद्ध धर्माचे शिकवण महाराष्ट्र यांना मिळत गेली या शिकवणीमध्ये व्यक्तीच्या विकासावर जास्त भर देण्यात आला व्यक्तीच्या किंवा समाजाच्या विकासासाठी बाधा येईल असे कोणतेही कार्य बौद्ध धर्माने केले नाही व्यक्ती आपल्या वक्रमाने बुद्धत्व प्राप्त करू शकतो असे बौद्ध धर्माने आपल्या शिकवणीमध्ये सांगितले अशा शिकवणुकीतूनच महाराष्ट्राची संस्कृती उदयास आली आणि त्यातूनच कार्ले भाजे कान्हेरी अजिंठा वेरूळ धाराशिवलेणी यासाठी जगप्रसिद्ध कलाकृती निर्माण झाली. अशा चैत्य विहार आणि लेण्यांच्या माध्यमातून बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार होण्यास मदत झाली.[1]

बौद्ध धर्मातील चैत्य, विहार आणि लेण्यांमधून बौद्ध धर्माचा प्रसार आणि प्रचाराचे कार्य केले जात असे. महाराष्ट्रा मध्ये बौद्ध धर्माचा प्रसार होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे व्यापारी वर्ग होय. सुरुवातिपासूनच व्यापारी वर्ग हा गौतम बुद्धांच्या धर्माकडे आकर्षित झाला होता. तत्कालीन काळातील महत्त्वाच्या व्यापारी मार्गांपैकी अवंती दक्षिण हा एक महत्त्वाचा व्यापारी मार्ग होता. हा मार्ग उत्तरेकडे महाराष्ट्रातील पैठण पर्यंत व तिथून पुढे दक्षिणे जात होता. व्यापारी वर्गामुळे गौतम बुद्ध हयात असताना महाराष्ट्रामध्ये बौद्ध धर्माचा प्रसार होण्यास सुरुवात झाली होती.[2] महाराष्ट्रामध्ये बौद्ध धर्माचा प्रसार गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतरही अविरतपणे चालू होता. बौद्ध धर्मांसाठी बांधलेले चैत्य विहार आणि लेणी यांच्या अवशेषावरून महाराष्ट्रामध्ये बौद्ध धर्माचा प्रसार हा मोठ्या प्रमाणामध्ये झाल्याचे दिसते. कारण अशा प्रकारचे अवशेष महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये पहावयास मिळतात.

त्यापैकी कराड या ठिकाणी उत्खननामध्ये सापडलेले विविध अवशेष आणि आगाशिव डोंगराच्या परिसरामध्ये असलेल्या हिनयान बौद्ध धर्माच्या लेण्या होय. यावरून या ठिकाणी बौद्ध धर्माचा प्रसार झाल्याचे स्पष्ट होते. सातवाहन काळामध्ये विविध नगरांचा व्यापारी केंद्रीय म्हणून विकास झाला होता त्यामध्ये कल्याण, प्रतिष्ठान, शृपारक, नेवासा, भोकरदन, तगर,कोल्हापूर आणि कराड यांचा समावेश होता. कारण तत्कालीन कालखंडातील प्रमुख व्यापारी केंद्रांपैकी एक केंद्र म्हणून कराडला ओळखले जात होते. त्याशिवाय कराड या ठिकाणी बौद्ध धर्माचा प्रसार झाल्याचे येथील बौद्ध लेणी आणि उत्खननांमधील प्राप्त वस्तूवरून स्पष्ट होते.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. सातवाहनकालीन व्यापारी केंद्रांचा अभ्यास करणे
२. सातवाहनकालीन कराड येथील बौद्ध लेण्यांचा अभ्यास करणे
३. सातवाहनकालीन बौद्ध धर्माच्या प्रसाराची कारणे अभ्यासणे
४. सातवाहनकालीन व्यापारी श्रेणीचा आढावा घेणे
५. प्राचीन व्यापारी मार्गावर असलेल्या कराडचा बौद्ध धर्माच्या प्रसारासाठीचे कार्य अभ्यासणे.
६. सातवाहन राजांचे धार्मिक धोरण अभ्यासणे.
७. कराड येथील हिनयान बौद्ध लेण्यांचा अभ्यास करणे.

संशोधनाचे महत्त्व:

सातवाहन काळात साधारणपणे इसवी सन पूर्व 200 ते इसवी सन पूर्व 200 मध्ये कराड हे एक प्रमुख व्यापारी व सांस्कृतिक केंद्र होते. या काळात या ठिकाणी झालेल्या बौद्ध धर्माच्या प्रसाराचा अभ्यास स्थानिक व्यापारी वर्गाचा बौद्ध धर्माला पाठिंबा, आगाशिव, जखिनवाडी, यरफळ येथील लेणी व तत्कालीन सामाजिक आर्थिक जीवन समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. कराड हे प्राचीन व्यापार व संस्कृतीचा केंद्रबिंदू असून ते दख्खनच्या पठाराला जोडणाऱ्या व्यापारी मार्गावर होते. कराडच्या परिसरात असणाऱ्या बौद्ध लेणी या सातवाहनकालीन बौद्ध धर्माच्या प्रसाराचे वसाहतींचे व स्थापत्य शैलीचे प्रमुख पुरावे आहेत. त्यांचा कला व वास्तुकलेच्या दृष्टीने अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. त्याशिवाय सातवाहन राजे हे धार्मिक दृष्ट्या सहिष्णु असून ते बौद्ध धर्माचे उपासक होते. सातवाहन राजे वैदिक धर्माचे पुरस्कर्ते असले तरी त्यांनी बौद्ध धर्माच्या विकास आणि प्रसारासाठी भिक्षूंच्या नावे जमिनी इनाम करून बौद्ध धर्माला प्रोत्साहन दिले. सातवाहनांच्या साम्राज्यात बौद्ध धर्माच्या महायान पंथाचे वर्चस्व होते. सातवाहनांच्या काळात आणि सातवाहनांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या म्हणजेच इक्षवांकूच्या काळातही नागार्जुन कोंडा आणि आंध्र प्रदेशातील अमरावती ही बौद्ध संस्कृतीची महत्त्वाची केंद्रे होती त्याप्रमाणेच पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, जुन्नर, कोल्हापूर आणि करहाटक या प्रदेशात बौद्ध धर्माचा प्रसार झाला. त्यामध्ये तेथील व्यापाऱ्यांचे मोठे सहकार्य होते. सातवाहनांच्या कालखंडात दख्खनच्या वायव्येला म्हणजेच महाराष्ट्रात बौद्ध लेणी (बौद्धांची पवित्र मंदिरे) डोंगरांमध्ये कोरलेली आहेत. त्यामध्ये कार्ले, भाजे. पोहाळे .करहाटक या ठिकाणी बौद्ध लेणी पाहावयास मिळतात.[3] त्यांनी व व्यापाऱ्यांनी दिलेल्या राजश्रयामुळेच बौद्ध धर्माचा प्रसार झाला. या व्यापाऱ्यांच्या उदार राजाश्रयामुळेच व्यापारी मार्गावर लेण्या निर्माण झाल्या. या लेण्यांमधून बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार होण्यास मदत झाली. कराड, जखिनवाडी, पाटण, वाई या परिसरामध्ये सापडलेल्या सातवाहन कालीन वसाहतींच्या अवशेषांमधून येथील बौद्ध संस्कृतीचा अभ्यास करणे हा महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

एकूणच कराड मधील सातवाहनकालीन बौद्ध धर्माचा प्रसार हा केवळ धार्मिक नसून तो या प्रदेशातील सामाजिक, आर्थिक विकासाशी समृद्ध व्यापाराची आणि सातवाहन सत्तेच्या स्थैर्याशी जोडलेला आहे. म्हणून यावर प्रकाश टाकने. हे या संशोधनाचे महत्त्व आहे.

कराड नावाची उत्पत्ती:

कराड हे महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचे शहर आहे. कराड हे कृष्णा आणि कोयना नदीच्या संगमावर वसलेले असून प्राचीन काळापासून एक व्यापार केंद्र, बौद्ध धर्म प्रसाराचे केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. अशा या ठिकाणाला वेगवेगळ्या कालावधीमध्ये विविध नावांनी प्रचलित असल्याचे विविध लेख, अभिलेख आणि विविध संदर्भ ग्रंथावरून स्पष्ट होते. प्राचीन शिलालेख, ताम्रपट आणि महाभारत काव्यातून कराड शहराच्या विविध नावांचा उल्लेख आलेला आहे. त्यामध्ये करहाटक, करहाट, करहाकट, करा, करहाडक इत्यादी. भरत लेखांमध्ये करहकटक व कुडा येथील लेण्यातील लेखांमध्ये करहाटक असे उल्लेख आलेले आहेत. शिवाय श्रीकृष्ण महात्मे या ग्रंथामध्ये करहाटक नावाची उत्पत्ती सांगितली आहे. या क्षेत्रात श्रीकर नावाचा शंकराचा भक्त होता. शंकराने आपल्या भक्तावर प्रसन्न होऊन श्रीकराच्या इच्छेप्रमाणे वर दीला की तुझ्या व माझ्या नावाने हे क्षेत्र ओळखले जाईल. तो वर म्हणजे श्रीकर हटकेश परंतु यातील सुरुवातीची आणि अखेरची अक्षरे लोपपाहून पुढे हे क्षेत्र करहाटक या नावाने ओळखले जाऊ लागले. श्रीकृष्ण महात्म हे स्कंदपूराना अंतर्गत असून दहावे शतक हा त्याचा रचनाकार मानला जातो. परंतु याच्याहीपूर्वी हे शहर करहाटक या नावाने प्रचलित होते. विविध आख्यायिका व विविध मते विविध आ लेख, शिलालेख यामधील उल्लेखावरून कराडच्या उत्पत्ती विषयीची माहिती प्राप्त होते. असे असले तरी प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत करायचे महत्त्व असून ते विविध कालखंडामध्ये वेगवेगळ्या नावाने प्रचलित असलेले आज हे शहर कराड या नावाने ओळखले जाते.[4]

लेणी स्थापत्य:

महाराष्ट्रामध्ये किल्ले आणि मंदिरांबरोबरच लेणी ही मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतात सुरुवातीला बौद्ध धर्मीयांनी लेणी खोदण्यास सुरुवात केली आणि नंतरच्या काळात ही कला इतर धर्मांनी अवगत करून लेणी निर्माण केली. भारतामध्ये सुमारे 1200 लेणी आहेत त्यापैकी 70 ते 80 टक्के लेणी महाराष्ट्रामध्ये आहेत. बौद्ध भिक्षु बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी फिरत असत सर्व साधारणपणे भारतामध्ये लेणी या स्थापत्य प्रकाराची सुरुवात सम्राट अशोकाने इसवी सन पूर्व 273 ते 236 या कालखंडामध्ये केली. गौतम बुद्धांना ज्या ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली त्या बोधगयेजवळ आजिविक पंथीयांसाठी लेणी खोदविली. कलिंगच्या युद्धानंतर सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारला आणि त्यानंतर बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी बौद्ध भिक्षूंच्या निवासासाठी लेणी निर्माण केली. ही लेणी सातवाहनांच्या व्यापारी मार्गापासून दूर निसर्गरम्य डोंगरांमध्ये निर्माण केली. बौद्ध भिक्षूंच्या निवास, ध्यानधारणा, अध्ययन अध्यापनासाठी ही शाश्वत बुद्ध मंदिरे होती.[5] वर्षावासात म्हणजेच पावसाळ्यामध्ये बौद्ध भिक्षूंच्या निवासासाठी लेण्यांच्या निर्मितीस सुरुवात झाली आणि नंतरच्या काळात ही लेणी प्रमुख धार्मिक आणि शैक्षणिक केंद्र म्हणून नावरूपास आली. भारतामध्ये या लेण्यांची सुरुवात बाराबर, बिहार येथील लेण्यांपासून झाली. असे असले तरी या लेण्यांवर पर्से पोलिस,इराण येथील नक्ष- ए - रुस्तम येथील एकमेडियन राजांच्या पर्वतांमध्ये कोरलेल्या स्मशानगुंफांचा प्रभाव असलेला दिसतो.[6]

कराड लेणी व त्यांचा कालखंड:

आगाशिवलेणी ही महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील कराड शहराच्या नैऋत्येस दोन किलोमीटर अंतरावर आगाशिव डोंगर रांगेमध्ये आहेत. ही लेणी हिनयान बौद्ध धर्मीय आहेत. आगाशिव डोंगरावर आगाशिव हे शिवाचे मंदिर आहे. याच्या नावावरून या लेण्यांना आगाशिव हे नाव प्राप्त झाले. इसवी सन पूर्व पहिल्या शतकातील ही लेणी असून बौद्ध धर्मीय भिक्षूंच्या निवासासाठी खोदलेल्या आहेत. बौद्ध भिक्षू हे पावसाळ्याशिवाय इतर कालावधीमध्ये धर्मप्रसारासाठी देशाटन करत असत, परंतु पावसाळ्यात त्यांना निवासाची व्यवस्था म्हणून लेण्यांची निर्मिती केली. लेण्यांमध्येच ते दैनंदिन, नैमित्तिक कार्य करत असत. बौद्ध धर्मामध्ये स्तूप, विहार, चैत्य याबरोबरच लेण्यांनाही महत्त्वाचे स्थान असलेले दिसते. सातवाहनकालीन कराड येथील बौद्ध लेणी प्रामुख्याने सातवाहन राजा यज्ञश्री सातकर्णी (सुमारे इसवी सन पूर्व 150 ते 180) याच्या कारकीर्दीत निर्माण करण्यात आले. ही लेणी सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीची असून सातवाहन काळातील व्यापार आणि बौद्ध धर्माशी निगडित आहेत.

हीनयन लेणी स्थापत्याची वैशिष्ट्ये:

बौद्ध लेणी स्थापत्याचे प्रामुख्याने तीन प्रकार असलेले दिसतात.

1) हीन यान स्थापत्य

2) महायान स्थापत्य

3) वज्रयान स्थापत्य

कराड येथील आगाशिव डोंगरामध्ये असलेल्या लेणी या हिनियान बौद्ध धर्मीय आहेत. या लेणी स्थापत्य मध्ये प्रामुख्याने चाहाकार विधान, गजपृष्ठाकार छत, लाकडी चैत्यगृह, कललेल्या स्वरूपातील खांब इत्यादी वैशिष्ट्ये आहेत.[7] कोसल पासून ते मगधपर्यंत गौतम बुद्धांनी धर्मप्रचारासाठी प्रवास केला. या प्रवासात त्यांना अनेक अनुयायी मिळाले. त्यांच्या मृत्यूनंतर ही बौद्ध धर्मास राजश्रय लाभला. त्यामध्ये सम्राट अशोकाने कलिंग युद्धानंतर आपले उत्तर आयुष्य बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी व्यतित केले. त्यांनी विविध ठिकाणी मठ, विहार, स्तूप, लेणी, चैत्यगृह बांधून बौद्ध धर्माचा प्रसार करणाऱ्या भिक्षूंच्या राहण्याची सोय केली. सम्राट अशोकाने आपली मुलगी संघमित्रा आणि मुलगा महेंद्र यांना बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी सिलोन येथे पाठवले होते. ग्रीक राजा मिन्यांडर यांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता. सम्राट हर्षवर्धन यांनीही बौद्ध धर्मप्रसाराचे कार्य केले.[8] त्यांच्यानंतर सातवाहन राजांनी बौद्ध धर्माला राजश्रय दिला, त्यामुळे महाराष्ट्राबरोबरच हिंदुस्तानच्या बाहेर जावा, सुमात्रा, सिलोन, तिबेट या ठिकाणी बौद्ध धर्माचा प्रसार झाला. अशा या बौद्ध धर्मामध्ये पवित्र आणि महत्त्वपूर्ण असलेल्या लेण्या कराडच्या परिसरामध्ये आहेत. यावरून तत्कालीन कालखंडात कराड येथे बौद्ध धर्माचा प्रसार झाल्याचे स्पष्ट होते.

कराड येथील उत्खनन:

दक्षिण महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक पुरातत्व स्थळ म्हणून या कराड शहराला ओळखले जाते. येथे भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे यांच्यामार्फत इसवी सन 1948 49 मध्ये उत्खनन करण्यात आले. हे उत्खनन मंडळाचे अध्यक्ष ग.ह. खरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या उत्खननांमध्ये एकूण सात स्तर सापडले आहेत. त्या प्रत्येक स्तरांमध्ये त्या-त्या कालखंडाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वस्तू सापडले आहेत. या वस्तूंमध्ये सातव्या स्तरांमध्ये शिसे धातूचे १.८१४ ग्रॅम वजनाचे सातवाहनकालीन नाणे सापडली आहे. त्या नाण्याच्या एका बाजूला घोड्याचे चित्र

असून दुसऱ्या बाजूला धनुष्याची प्रतिमा कोरलेली आहे. त्याशिवाय या उत्खननांमध्ये त्यामध्ये विविध आकारातील मातीच्या वस्तू, भांडी, पाणी साठवण्याचे माठ, मातीच्या थाळ्या, हंड्या, माठांची झाकणे, काचेचे गडद निळे, हिरवे व सोनेरी मणी, भाजलेल्या मातीचे, शंकांचे ,दगडांचे (करणेलियान, लाल जास्पर आणि स्फटिक) मनी. यांचा समावेश होतो, त्याशिवाय काचेच्या बांगड्या, शंखापासून तयार केलेले अलंकार, त्यांचे तुकडे, भाजलेल्या मातीच्या हत्ती आणि स्त्री प्रतिमा, हाडाच्या वस्तू आणि लोखंडापासून तयार केलेल्या वस्तू प्राप्त झाले आहेत. कराड हे एक व्यापारी केंद्र सातवाहन काळातल्या इंडो-रोमन व्यापारात पुढे आलेले दिसते. याचे संदर्भ यादव काळापर्यंत आलेले दिसतात. यावरून असे स्पष्ट होते की कराड येथील व्यापार व उद्योग सर्वसाधारपणे एक हजार वर्षापर्यंत पुढे भरभराटीत राहिला होता. याची ख्याती दक्षिण भारतातल्या बाजारपेठांमध्येही असल्याचे श्रवणबेळगोळच्या शिलालेखातून स्पष्ट होते. या ठिकाणी लोह उद्योगाशिवाय काच उद्योग आणि मौल्यवान मण्यांसाठीही येथील बाजारपेठ प्रसिद्ध होती. मातीच्या भांड्याशिवाय हस्तीदंती वस्तू रोमच्या बाजारपेठेत निर्यात होत असत.[9]

कराडचे प्राचीन उल्लेख:

कराड येथील उत्खनात मिळालेल्या वस्तूवरून कराडचे प्राचीनत्व लक्षात येते. त्याशिवाय वेगवेगळ्या कालखंडात परकीय प्रवाशांनी हिंदुस्थानाला दिलेल्या भेटी व त्यांची प्रवासवर्णने यावरून ही कराडचे प्राचीनत्व लक्षात येते तसेच विविध इतिहासकारांनी ही कराडचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न केला. आहे Periplus of the Erethriyen sea या अनामिक ग्रीक खलाशाने लिहिलेल्या ग्रंथामध्ये कराडचे उल्लेख आलेले आहेत. त्यामध्ये कराडचा उल्लेख करहाटक असा आहे. या ग्रंथांमध्ये तत्कालीन कल्याण, शूपाराक, प्रतिष्ठान, तगर, ब्रह्मपुरी, करहाटक, भृगुकच्छ या व्यापारी केंद्रांचा उल्लेख आला आहे. त्यावरून इसवीसनाच्या पहिल्या शतकामध्ये कराड हे एक व्यापारी केंद्र म्हणून नावारूपास आले होते हे स्पष्ट होते.[10] त्याशिवाय भारहूत स्तुपावरील लेण्यांमध्येही कराडचे उल्लेख आलेले आहेत. त्यातील लेख क्रमांक 21, 24, 43 आणि 67 या लेखांमध्ये कराड विषयाचे उल्लेख आलेले आहेत. त्यामध्ये लेख क्रमांक 24 मध्ये **'कर हट का समीकस थमो दानं'** म्हणजेच हा स्तंभ तरहटक चा राहणारा समीकस याचा देणगी लेख होय. **'उत्तर गिधीकस थमो दानं'** म्हणजेच हा स्तंभ करहटकचा उत्तर विधिक याची देणगी होय. यावरून तत्कालीन कालखंडामध्ये कराड करहाटक या नावाने प्रसिद्ध होते होते.[11]

भारहूत येथील कराडसंबंधीचा शिलालेख:

भरूत हे मध्य प्रदेशातील सतरा जिल्ह्यातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक ठिकाण आहे. हे ठिकाणी बौद्ध स्तूप आणि शिल्प कामासाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी सम्राट अशोकाने बांधलेला प्राचीन बौद्ध स्तूप होता. भरूत येथील शिलाखांमध्ये आणि कुलाबा जिल्ह्यातील कुडालेल्या मध्ये असणाऱ्या लेखांमध्ये कराडच्या बौद्ध धर्मीय यात्रेकरूंनी तेथील लेणी बांधण्यासाठी दान देण्यात आल्याचा उल्लेख आहे.

लेखांक 7 करहकट निवासिनीची देणगी

लेखांक 21 हा स्तंभ करहकटचा आर्यभुतक याची देणगी

लेखांक 24 हा स्तंभ करहकटचा राहणारा समिक याची देणगी

लेखांक 43 कर हलकट उतरगिधीकस याची देणगी

लेखांक 67 करहकटच्या नये गमाची अथवा करहकट शहराची देणगी

कुडा लेण्यातील लेख:

लेखांक 18. करहाकटचा लोखंडाचा व्यापारी महीक याचा दानधर्म.[12]

यावरील लेखांवरून कराड हे सधन लोकांचे शहर आणि व्यापारी केंद्र असल्याचे स्पष्ट होते.

कराड येथील लेणी

कराड शहराच्या पश्चिमेला बौद्ध लेण्यांचे तीन समूह आहेत या ठिकाणी सुमारे 108 लेणी असून त्यांचा कालखंड हा इसवी सनाचे दुसरे आणि तिसरे शतक सांगितला जातो. या तीन समूहांना येथील गावावरून त्यांची ओळख सांगितली जाते ती म्हणजे जखिनवाडी, आगाशिव आणि चाचेगाव होय. कराडच्या लेणी समूह हा महत्वपूर्ण आहे, परंतु त्यातील काही लेणी अत्यंत विकसित अशी आहेत.

लेणी क्रमांक सहा:

लेणी क्रमांक 6 हे एक मध्यम आकाराचे चैत्यगृह असले तरी ते अत्यंत प्रभावीपणे कोरलेले आहे. हे लेणे कराड समूहातील लेण्यांपैकी प्राचीन लेणे असावे असे डॉ. ढवळीकर यांनी म्हटले आहे. या चैत्य लेण्यासमोर आवार असून त्यात डाव्या भिंतीवर एक आणि उजव्या भिंतीवर दोन कोणाडे कोरलेले आहेत. हे कोणाकडे परस्परांच्या समोर असून त्यावर वेदिका पट्ट कोरलेले आहे. यामध्ये पूजा करण्यासाठी स्तूप किंवा एखादी मूर्ती ठेवली जात असावी.

समोरच्या घरमुखाच्या मध्यभागी मध्यम आकाराचा दरवाजा आहे. यावर मूर्ती कोरलेल्या होत्या पण त्या आज भग्नअवस्थेमध्ये आहेत. येथील चैत गवाक्षही भग्नस्वरूपामध्ये आहे. त्याशिवाय प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दोन स्तंभ आहेत आणि त्या स्तंभावर अनुक्रमे सिंहशीर्ष व धर्मचक्रशीर्ष आहे. छतावरील लाकडी काम केल्याचे अवशेषावरून स्पष्ट होते. या ठिकाणी स्तूपाच्या भोवती असणारा प्रदक्षिणामार्ग व त्या शेजारी मोकळी जागा आहे.[13]

लेणी क्र.7:

लेणी क्रमांक 7 हे एक वैशिष्ट्यपूर्ण लेणी असून यामध्ये असणाऱ्या दोन्ही बाजूस दोन ओवऱ्या व खोल्यांची रचना केली आहे. अशा प्रकारची रचना इतरत्र कोठेही पाहावयास मिळत नाही. प्रांगणातील असणारा स्तंभ भग्न होण्याच्या मार्गावर आहे. या स्तंभाचा पाया चौकोनी आणि मध्य हा अष्टकोनी आहे. मंडपाच्या पुढे आयताकार सपाट छताचे गर्भगृह आहे. या गर्भ गृहामध्ये विठ्ठल रखुमाईची देवळी आहे. याच्या मागील बाजूस भिंतीला लागूनच एकाश्म प्रकारातील स्तूप आहे. हा स्तूप छतामध्येच कोरला आहे. या लेण्यांमध्ये गिलावा करून चित्रे रेखाटली असावीत त्याचे अवशेष आजही आपणास पाहावयास मिळतात. गर्भ ग्रहातील अवशेष हे आधुनिक काळातील असल्याचे भासते.

लेणी क्रमांक 12:

हे एक महत्त्वाचे चैत्यगृह आहे. याचे विधान आयताकार व छत सपाट असून स्तूपाचे छत्र छताला स्पर्श करताना दिसते. मोठ्या आयताकार गाभाऱ्याच्या मागील बाजूस लहान स्तूप आहे. जखिनवाडीच्या 12 नंबरच्या लेण्याचा दगड चांगल्या प्रतीचा नसल्याने आणि त्याचा वापर विविध कारणासाठी केल्याने त्याचा अभ्यास करण्यास अडथळा येत आहे.

लेणी क्रमांक 17:

हे एक चैत्य लेणे असून लेणी क्रमांक 12 प्रमाणे इसवी सन तिसऱ्या शतकातील असावे या लेण्यात प्रांगण, ओसरी, मंडप आणि स्तूपयुक्त गर्भग्रह अशी याची रचना आहे. येथील स्तूप एकश्म स्तूपाप्रमाणे पूर्णपणे विकसित असून छत्र छतांमध्ये कोरलेले दिसते. हे लेणे पूर्णपणे

विकसित अशा थेरवादी स्थापत्य परंपरेतील असावे असे दिसते.

लेणी क्रमांक 48:

लेणी क्रमांक 48 हा या समूहातील महत्त्वाचा चैत्य आहे. या लेण्यांच्या प्रांगणामध्ये दोन्ही बाजूस प्रत्येकी एक अशा दोन विहारासारख्या खोल्या आहेत. मुख्य ओसरी स्तंभयुक्त आहे त्यामध्ये पाच दरवाजे आहेत. यातील मध्यभागी असणाऱ्या खोलीत स्तुपयुक्त गर्भग्रह आहे. हा स्तूप एकश्म स्तूप असून चौरस विधान व सपाट छताच्या खोलीला त्याचे छत्र टेकलेले आहे. या स्तूपावर वेदिकापट आहे. हा स्तूप इतर स्तूपा पेक्षा प्राचीन असून त्याचा कालखंड इसवी सन दुसरे शतक असावे असे सांगितले होते.

सातवाहन काळामध्ये महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणात विकास आणि प्रचार झाल्याचे विविध उत्खननातील प्राप्त वस्तू, विहार, स्तूप, चैत्य, बौद्ध लेणी यांच्यावरून स्पष्ट होते. सातवाहन राजे वैदिक धर्माचे पुरस्कार ते असले तरी ते सहिष्णू होते त्यांनी वैदिक धर्माबरोबरच बौद्ध धर्माला राजश्रय देऊन त्याच्या प्रसार आणि प्रचारासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. हे विविध चैत्य, स्तूप, विहार आणि लेण्यांच्या माध्यमातून सिद्ध होते. प्राचीन काळामध्ये बौद्धधर्म प्रसारासाठी भारताच्या विविध प्रदेशांमध्ये बौद्ध भिक्षुंना प्रवास करावा लागत असे. या प्रवासादरम्यान त्यांच्या निवासासाठी विहार आणि लेण्यांची निर्मिती केली. हे विहार प्रामुख्याने डोंगरामध्ये कोरले जात असत. अशा लेण्या प्रामुख्याने अजिंठा, धाराशिव, कार्ले, भाजे, कुडा,पोहाळे याशिवाय कराड शहराच्या ईशान्येस आगाशिव डोंगरांमध्ये असणाऱ्या लेण्या इत्यादी, या लेण्या तत्कालीन व्यापारी मार्गावर कोरलेल्या दिसतात. कारण व्यापारी, बौद्ध भिक्षू, पर्यटक यांना वास्तव्य करता यावे हा त्या पाठीमागचा हेतू होता. या लेण्यांमधील काही लेण्या व्यापाऱ्यांच्या आर्थिक मदतीने किंवा सहकार्याने खोदलेल्या दिसतात. यावरून तत्कालीन कालखंडामध्ये बौद्ध धर्माचा प्रभाव हा सर्वसामान्य व्यक्तींबरोबरच व्यापारी वर्गावरही असलेला दिसतो. आगाशिव डोंगरामध्ये बौद्ध भिक्षूसाठी खोदलेल्या लेणी आहेत या लेण्यांच्या समूहावरून तत्कालीन कालखंडामध्ये कराड आणि कराडच्या परिसरामध्ये बौद्ध धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाल्याचे स्पष्ट होते.[14]

निष्कर्ष:

सातवाहन काळामध्ये इसवी सन पूर्व 2 रे शतक ते इसवी सन 2 रे शतक या कालावधीमध्ये कराड हे बौद्ध धर्माचे एक प्रमुख केंद्र होते. येथील आगाशिव आणि जखिनवाडी परिसरातील लेण्या, तसेच व्यापारी मार्गावरील स्थान यामुळे हा प्रदेश हीनयान व पुढे महायान बौद्ध परंपरेचा मोठा प्रसारक होता. कराड हे प्राचीन व्यापारी मार्गावर असल्याने बौद्ध भिक्षूच्या निवासासाठी आणि व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी हा परिसर विकसित झाला होता. आगाशिव आणि जखिनवाडी लेण्यातील ब्रह्मी लिपीतील शिलालेख सातवाहन काळातील बौद्ध धर्माचा विकास या ठिकाणी झाला होता, हे यावरून सिद्ध होते. या ठिकाणी सुरुवातीला हीनयान परंपरेतील साधे विहार होते. नंतरच्या काळात ते महायान पंथाच्या प्रभावाखाली आल्याचे गौतम बुद्धांच्या पद्मासनातील प्रतिमेवरून दिसते. सातवाहन राजे प्रामुख्याने गौतमीपुत्र सातकर्णी हे बौद्ध धर्माचे उपासक होते. त्यांनी स्तूपांच्या व लेण्यांच्या निर्मितीसाठी आणि देखरेखी साठी आर्थिक मदत केली. याशिवाय गौतम पुत्र सातकर्णी नंतर सातवाहनांच्या गादीवर आलेले राजांनी बौद्ध धर्माला राजाश्रय दिल्याने बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. एकूणच सातवाहनांचा कालखंड हा बौद्ध कला, संस्कृती आणि स्थापत्य कलेचा सुवर्णकाळ मानला जातो.

संदर्भ:

१. मोरे मा. शं. ***महाराष्ट्रातील बुद्ध इतिहास*** ,कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद 25 डिसेंबर 2009 पृ.क्र.8

२. कित्ता. पृष्ठ क्र. 38

३. शर्माआर. एस. ***भारताचा प्राचीन इतिहास*** (अनु.), आठवले सरिता, मधुश्री पब्लिकेशन पुणे 2024,पृ.क्र.238

४. गुप्ते य.रा. ***भारत इतिहास संस्कृत मंडळ***, ***पुणे पुरस्कृत ग्रंथ मला क्रमांक 11***, 1929 पृ,क्र 1 ते 3

५. देशपांडे मधुसूदन नरहर, ***वेरूळ लेणी***, पृ.क्र 9

६. समेळ पंकज विजय, ***वारसा अतिताचा***, मर्वेन टेक्नॉलॉजी पुणे ,प्रथम आवृत्ती 2021, पृ.क्र 51

७. कित्ता. पृ.क्र 52

८. देगलूरकर गो.बं. ***प्राचीन भारत इतिहास आणि संस्कृती***, अपरांत पब्लिकेशन पुणे, मार्च, 2022 पृ.क्र 85

९. देव प्रभाकर. ***प्राचीन महाराष्ट्रातील व्यापार परंपरा***, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, 2022, पृ.क्र 32

१०. W.H. Schoff, ***Periplus of the Erythriyen Sea***, longmon green and company, P.No.43

११. Barua Beni Madhab and Sinha K.G, ***Barhut inscriptions***, published by the University of Kolkata 1926 P.No.17

१२. उपरोक्त. गुप्ते य.रा. पृ.क्र.17

१३. पंडित सुरज. अ. ***महाराष्ट्रातील बौद्ध लेणी***, अपरांत पब्लिकेशन पुणे, पृ.क्र.192

१४. गडकर भारत गजेंद्र, ***नगरचे प्राचीन वैभव*** (लेख), पाटील अमरसिंहजी. बा. (संपा.) ***तेर गौरव ग्रंथ***, तेरणा पब्लिकेशन चॅरिटेबल ट्रस्ट, उस्मानाबाद पृ.क्र.66

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

अंभेरी येथील कातळावरील शिल्पावशेष : पुरातत्वीय शोध व परिचय (प्राचीन पटखेळ, योनीशिल्पे, कपमार्कस (कप्लर्स) व मानवी पदचिन्हे)

प्रा. अनिल शिवाजी निकम

पुरातत्व विद्यार्थी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

सहाय्यक प्राध्यापक, श्री.भीमराव शिंदे महिला महाविद्यालय, वाई जि.सातारा

Corresponding Author - प्रा. अनिल शिवाजी निकम

DOI - 10.5281/zenodo.19704160

सारांश:

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील अंभेरी गावच्या पूर्वेकडील डोंगररांगेत जवळपास अज्ञात असलेल्या पुरातत्वीय अवशेष स्थळांचा शोध घेऊन, प्रत्यक्ष निरीक्षणे प्रस्तुत शोधनिबंधात नोंदवली आहेत. याठिकाणी प्राचीन पटखेळ, योनीशिल्पे, मानवी पदचिन्हे, कपमार्कस आहेत तसेच नंदीशिल्पं ही आहे.

कुटशब्द: कपमार्क्स, मंकळा, योनीशिल्पं, अवशेश, पदचिन्ह

प्रस्तावना:

सातारा जिल्ह्यातील अंभेरी हे लहानसे खेडेगाव सातारा जिल्ह्याच्या ठिकाणापासून साधारण ३० किलोमीटर व कोरेगांव या तालुक्याच्या ठिकाणापासून २० किलोमीटर आणि रहीमतपुर याा शहरापासून ८ किलोमीटर अंतरावर आहे.

अंभेरी गाव व परिसरास समृद्ध असा प्राचीन व ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, गाव व परिसरात अनेक प्राचीन मंदिरे, ऐतिहासिक वाडे, स्मारके अस्तित्वात आहेत. गावाच्या परिसरात डोंगररांगांमध्ये काही प्राचीन व ऐतिहासिक कालखंडातील धार्मिक स्थळे आहेत. यामध्ये रामेश्वरम, काळभैरव, कार्तिकस्वामी, शिव मंदिर, नंदी डोंगर आदी ठिकाणे आहेत. अंभेरी गावाच्या नावाच्या उत्पत्तीचा शोध घेतला असता मौखिक परंपरा व मराठीतील प्रख्यात साहित्यिक श्री शंकर केशव कानिटकर उर्फ कवी गिरीश यांच्या 'आंबराई' व 'कमंडलूचा ओढा' आदी पुस्तकांच्या संदर्भाने सांगता येते की, अपशिंगे (ता.कोरेगाव जि.सातारा) येथील अपश्रृंग राजाच्या आंबराईचे स्थान ते आजचे अंभेरी गाव होय. 'आंबराई' चा अपभ्रंश होऊन 'अंभेरी' असे नांव गावास प्राप्त झाले आहे. हे गाव सह्याद्री पर्वताच्या महादेव डोंगररांगेच्या तीन शाखा सातारा जिल्ह्यात फुटतात. चंदन—वंदन, वर्धनगड (रामेश्वर) आणि महिमानगड असे तीन प्रमुख फाटे दक्षिणेस गेले आहेत, त्यापैकी वर्धनगड उर्फ रामेश्वर डोंगररांग ही अंभेरी गावाच्या पूर्वेकडून पुढे कुंडल (जि.सांगली) पर्यंत गेली आहे. याा डोंगररांगेस अंभेरी व परिसरात रामेश्वरम, रामाचा डोंगर, कार्तिकस्वामींचा डोंगर, नोंदीचा डोंगर अशी स्थानिक नावे आहेत. ती त्या—त्या ठिकाणी असलेल्या धार्मिक स्थळांमुळे मिळालेली आहेत. याच डोंगररांगेत सातारा—रहिमतपूर—वडूज रस्त्यापासून व कार्तिकस्वामी डोंगराच्या जवळ दक्षिणेकडील नंदीचा डोंगर येथे डोंगराच्या मध्यावर एका विस्तीर्ण कातळयुक्त सपाट जागेवर अनेक पुरातत्वीय अवशेष असून त्याबाबत कोठेही नोंद आढळत नाही.

प्रस्तुत शोधलेखाच्या माध्यमातून प्रथमत:च अंभेरी ता.कोरेगाव जि.सातारा येथील श्री.नंदी डोंगरातील प्राचीन पटखेळ, योनीशिल्पे, कपमार्क्स (कप्लर्स), फूटप्रिंट्स (मानवी पावलांची चिन्हे) याबाबत संशोधन, निरीक्षणे मांडली आहेत.

पुरातत्वीय स्थळ, श्री. नंदी डोंगर अंभेरी, भौगोलिक स्थान:

अंभेरी गावाच्या पूर्वेस अक्षांश १७. ५९६६४ रेखांश ७४.२६८५५५ असे नंदी डोंगरातील संशोधित स्थळाचे स्थान आहे. या डोंगररांगेची उंची साधारणत: १००० ते ११०० मी. आहे. त्याच्या उत्तर दिशेला पश्चिमेकडून पूर्वेकडे पसरलेला रामाचा डोंगर आहे, तेथून ईशान्य कोपऱ्यात ही रांग काटकोनात वळून दक्षिणेकडे जाते. त्यामुळे पुर्व बाजू डोंगराने व्यापलेली आहे. त्या ईशान्य कोपऱ्यातच प्राचीन शिवालय व कार्तिकेय मंदिर आहे व तिथून एक किलोमीटर दक्षिणेला नंदी डोंगरात प्रस्तुत उल्लेखित कातळावरील प्राचीन पटखेळ, योनीशिल्पे, फूटप्रिंट्स व कपमार्कस (कप्लर्स) आहेत.

कातळावरील कोरीव रचना:

कातळावरील कोरलेले बरेचसे चिन्हांचे प्रकार तथा शिल्पे ही कधी कोरली गेली याविषयी निश्चित सांगणे अवघड असले तरी अगदी नवाश्मयुगापासून ते मध्ययुगीन कालखंडापर्यंत तरी आपण यांचा निश्चित मागोवा घेऊ शकतो. या रचनांच्या निर्मितीचा कालावधी हा खूप मोठा आहे.

मंकळा: त्यातल्या त्यात प्राचीन पटखेळ मंकळा (Mancala) याचा शोध सुमारे ३५०० वर्षांपूर्वीच लागला असून त्याचे सर्वात प्राचीन पुरावे प्राचीन इजिप्तमधील कर्नाक, अल—कुराना व पिरॅमिड्समधून सापडतात. दक्षिण भारतात विजयनगर साम्राज्यात "पालीगुझी" या नावाने हा खेळ खेळतानाचे पुरावे सापडतात.

प्राचीन मानवी पावलांची ठसे: खडकावर आढळून येणारे प्राचीन मानवी पावलांची ठसे हे पुरातत्वशास्त्रातील महत्त्वाचे पुरावे आहेत जे नैसर्गिक जीवाश्म किंवा कातळशिल्प (पेट्रोग्लिफ्स) स्वरूपात सापडतात. हे ठसे हजारो वर्षे जुने असून मानवी स्थलांतर, मानवी जीवनशैली व मानवी संस्कृती समजण्यास मदत करतात.

योनीशिल्पे: प्राचीन काळापासून प्रवासी अथवा व्यापारी मार्गावरून प्रवास करत असताना एखाद्या स्त्रीच्या प्रसुतीची वेळ आली असल्यास विशिष्ट प्रकारची व सुरक्षित जागा पाहून प्रसूती केली जात असे. अशा ठिकाणी नंतर त्या घटनेचे शिल्प कातळावर कोरले जाई.

कपमार्क्स: कपमार्क हे अशा प्रकारचे कातळावर कोरलेले खड्डे असतात जे साधारणत: अर्धगोल व कपच्या आकाराचे छोटे छोटे असतात. कपमार्क्स हे प्रागैतिहासिक कालखंडातील मानवाच्या खडकावर केलेल्या कलात्मक निर्मितीचे ज्ञात असलेले सर्वात प्राचीन असे रूप वा प्रकार आहेत. भारतात 'भीमबेटका' येथे सर्वात प्राचीन कपमार्कस आढळून आलेले आहेत.

श्री. नंदी डोंगर, अंभेरी येथील कातळावरील पटखेळ, कपमार्क्स, प्राचीन मानवी पावलांची चिन्हे व योनीशिल्पे. (एकत्रित प्रतिमा):

छायाचित्र क्रमांक १



छायाचित्र क्रमांक १ मध्ये प्राचीन पटखेळ मंकळा असून प्रत्येक ओळीत ८ अशा दोन समांतर ओळीत खेळाचे खड्डे आहेत.

छायाचित्र क्रमांक २



छायाचित्र क्रमांक ह्म मध्ये फक्त एकच एकेरी ओळीचे योनीशिल्प आहे.

छायाचित्र क्रमांक ३



छायाचित्र क्रमांक ३ मध्ये एक योनिशिल्प असून अलिकडच्या काळात गुराख्यांकडून क्षतिग्रस्त केलं गेलं आहे व त्यास शिवलिंगाचा आकार दिला गेला आहे.

छायाचित्र क्रमांक ४



छायाचित्र क्रमांक ४ मध्ये कपमार्क्स आहेत. ते खुप दाटीवाटीने असून त्यातून कोणतीही भौमितिक अथवा इतर आकृती तयार होत नाही. एकाच ठिकाणी या कपमार्क्सची संख्या सुमारे १०० एवढी आहे. ५ फूट लांब व ३ फूट रुंद एवढ्या अंतरावर हे कपमार्क्स खोदलेले आहेत.

छायाचित्र क्रमांक ५



छायाचित्र क्रमांक ५ मध्ये मानवी पावलांच्या चिन्हांच्या चार जोड्या कातळावर आहेत. त्याचबरोबर एका एका पावलांची दोन वेगवेगळ्या डरकाळी चिन्हे आहेत. आजुबाजूला आठ ते नऊ कपमार्क्स आहेत. एवढी सर्व चिन्हे ५×३ फूट एवढ्या अंतरात कोरलेली आढळतात.

छायाचित्र क्रमांक ६



छायाचित्र क्रमांक ६ मधील कातळावर प्रत्येकी ८ खड्ड्यांच्या समांतर दोन ओळी असलेला मंकळाचा पट ४ योनीशिल्पे आढळतात. ती वेगवेगळ्या जागी कोरलेली आहेत.

छायाचित्र क्रमांक ७



छायाचित्रं क्रमांक ७ मधील कातळावर फक्त योनिशिल्पांची रचना कोरलेली असून ती जोडीने कोरलेली आढळतात व त्यांची दिशा वेगवेगळी आहे. व त्यांची संख्या ४ एवढी आहे.

छायाचित्र क्रमांक ८



छायाचित्र क्रमांक ८ मध्ये १३ सेंटीमीटर चौरस आकारात ४ खड्डे व केंद्रस्थानी १ असे एकूण ५ खड्ड्यांची एक कलाकृती आहे, पण त्याचा अर्थबोध होत नाही.

छायाचित्रे क्रमांक ९



छायाचित्र क्रमांक ९ मध्ये एक उभा व एक आडवा असे अनुक्रमे ८ व ९ खड्ड्यांच्या समांतर ओळी असलेले मंकळा खेळाचे दोन पट आढळतात.

छायाचित्र क्रमांक १०



छायाचित्र क्रमांक १० मध्ये ४ खड्ड्यांच्या दोन समांतर ओळींचा मंकळा पटखेळ कातळावर कोरलेला आढळून येतो.

छायाचित्र क्रमांक ११



छायाचित्र क्रमांक ११ मध्ये तीन खड्ड्यांच्या दोन समांतर ओळींचा मंकळा पटखेळ कातळावर कोरलेला आढळतो.

छायाचित्र क्रमांक १२



छायाचित्र क्रमांक १२मध्ये एका कातळावर एक योनीशिल्प व व दोन कपमार्क्स आढळून येतात.

छायाचित्र क्रमांक १३



छायाचित्र क्रमांक १३ मध्ये कातळावर दोन योनीशिल्पे दोन विरूद्ध दिशेला (उत्तर–दक्षिण) कोरलेली आढळून येतात व एक कपमार्क आढळून येतो.

छायाचित्र क्रमांक १४



छायाचित्र क्रमांक १४ मध्ये मंकळा खेळाचे पट कातळावर कोरलेला आढळून येतो.त्यामध्ये एका ओळीत ३ व दुसऱ्या ओळीत ४ अशा खड्ड्यांच्या विषम संख्या आढळून येतात. कदाचित एक खड्डा झीज होऊन नष्ट झाला असावा व जवळच एक कपमार्क आहे.

छायाचित्र क्रमांक १५



छायाचित्र क्रमांक १५ मध्ये एका विस्तीर्ण कातळावर मंकळाचे एकूण ४ पट आढळून येतात, यातील ह्म लहान व ह्म मोठे आहेत.

एक पट ५ समांतर खड्ड्यांच्या दोन ओळींचा
दुसरा पट ६ समांतर खड्ड्यांच्या दोन ओळींचा
तिसरा पट १२ समांतर खड्ड्यांच्या दोन ओळींचा
चौथा पट १४ समांतर खड्ड्यांच्या दोन ओळींचा

अशा प्रकारे चार पट असून आजूबाजूस छोटे–मोठे अनेक कपमार्क्स आढळून येतात. हे पट ४×८ फूट एवढ्या विस्तारात कोरलेले आहेत.

छायाचित्र क्रमांक १६



छायाचित्र क्रमांक १६ मध्ये २×३ फुट एवढ्या अंतरात प्रत्येकी ७—७ खड्डे असलेल्या दोन समांतर ओळींचा मंकळाचा पट आढळून येतो व शेजारी एक—दोन कपमार्क्स आढळून येतात.

छायाचित्र क्रमांक १७



छायाचित्र क्रमांक १७ मध्ये कातळावर कोरलेले फक्त एकच योनीशिल्प आढळून येते.

छायाचित्र क्रमांक १८



छायाचित्र क्रमांक १८ मध्ये एका विस्तीर्ण कातळावर मंकळाचे एकूण ३ मोठे पट आढळून येतात. त्यातील एक प्रत्येकी घह्व खड्डे असलेल्या दोन समांतर ओळींचा आहे.

दुसरा प्रत्येकी ९ खड्डे असलेल्या दोन समांतर ओळींचा आहे.

तिसरा प्रत्येकी ९ खड्डे असलेल्या दोन समांतर ओळींचा आहे व या पटांच्या आसपास छोटेमोठे अनेक कपमार्क्स आढळून येतात.

छायाचित्र क्रमांक १९



छायाचित्रं क्रमांक १९ मध्ये कातळावर प्रत्येकी ओळीत ३ खड्डे असलेल्या दोन समांतर ओळींचा मंकळाचा छोटा पट आढळून येतो व पटाच्या शेजारीच दोन मोठे कपमार्क्स आढळून येतात.

छायाचित्र क्रमांक २०



छायाचित्र क्रमांक २० मध्ये कातळावर कोरलेला मंकळाचा पट आढळून येतो पण तो मंकळाच्या इतर पटांपेक्षा वेगळा आहे. मंकळाचा तो एखादा प्रकार असू शकतो या पटात उभ्या व

आडव्या छेदलेल्या स्वरूपात खड्डे आहेत. त्यात पटाचे १९ खड्डे व दोन कपमार्क्स आहेत.

छायाचित्र क्रमांक २१



छायाचित्र क्रमांक २१ मध्ये प्रत्येकी ५ खड्डे असलेल्या दोन समांतर ओळींचा मंकळा खेळाचे पट आढळून येतो व बाजूला दोन छोटे कपमार्क्स आढळून येतात.

- मंकळा पटखेळ असलेले छायाचित्रे व पटखेळांची संख्या छायाचित्र क्रमांक— १, ६, ९, १०, ११, १४, १५, १६, १८, १९, २०, २१ एकूण १८ पट
- योनीशिल्प संख्या व छायाचित्रे क्रमांक २, ३, ६, ७, १२, १३, १७ योनिशिल्पांची संख्या १४
- मानवी पावलांची चिन्हे संख्या व छायाचित्र क्रमांक ५ संख्या ४ जोड्या व दोन एकल चिन्हे.
- कपमार्क्स (ग्रूप कप्लर्स) संख्या छायाचित्र क्रमांक ४ व संख्या १०० पेक्षा जास्त.

छायाचित्र क्रमांक २२



छायाचित्र क्रमांक २२ मध्ये जी शिल्पे आहेत ती प्रस्तुत स्थळावरील प्रमुख धार्मिक व आस्थेचे केंद्र असलेले भगवान शिवाचे वाहन नंदी आहेत. ते ह्या स्थानामधील प्रमुख दैवत आहेत. मधील मोठं दगडी शिल्प ही त्यांची मुर्ती असून बाजूला आस्थेने आणखी प्रतीक मांडलेली आहेत. स्थानिक ग्रामस्थांचा येथे वार्षिक उत्सव असतो. मुख्य मूर्ती ही नंदीची असून तिला मुख नाही. त्याचा संबंध धार्मिक कथेतील युद्धाशी जोडला जातो, मुर्तीची झीज झालेली आहे.

ऊहापोह:

प्राचीन काळापासून मानव हा मनोरंजनासाठी विविध खेळ खेळत आलेला आहे. मनोरंजनाची आवड व सृजनशीलता यांच्या संयोगातून मानवाने अनेक कलाकृतींचा शोध लावला, यातूनच त्याने अगदी नवाश्मयुगापासून ते मध्ययुगापर्यंत कातळावर अनेक कलाकृती कोरून ठेवल्या त्यामागे मनोरंजनाबरोबरच रूढी—परंपरा व धार्मिक श्रद्धाही होत्याच.त्याशिवाय काही संकेतही होते उदाहरण द्यायचं झालंच तर कपमार्क्सच्या निर्मितीमागे धार्मिक समजुतींशिवाय काही भौगोलिक किंवा खगोलशास्त्रीय संकेतही आहेत. मंकळा खेळ तर ३५०० वर्षांपूर्वी आफ्रिकेत निर्माण झाला व व्यापाराच्या, प्रवासाच्या माध्यमातून भारतात व जगभरात पोहोचला. प्रवासात आलेल्या प्रसंगानुसार स्त्री च्या प्रसूतीच्या घटनेचे संकेत देणारी योनीशिल्पेही मानवाने निर्माण केली. पदचिन्हे (फूटप्रिंट्स) च्या माध्यमातून

आपल्या दिवंगत पुर्वजांप्रती श्रद्धाही व्यक्त केली. (फूटप्रिंट्स हे जीवाश्मही आहेत बहुतेक ठिकाणी) अशा अनेक कलाकृती व स्मारकांच्या माध्यमातून आपण मानवाच्या पूर्वजांच्या जीवनाचा मागोवा घेऊ शकतो.

आभार:

प्रस्तुत शोधकार्य करत असताना प्रामुख्याने अंभेरी ता.कोरेगाव जि.सातारा येथील ग्रामस्थ, उदगीर (जि.लातूर) येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील इतिहास व पुरातत्व संशोधक प्रा. डॉ. माधवी महाके मॅडम, पटखेळ संशोधक श्री.सोज्वळ साळी सर, सातारा इतिहास संशोधन मंडळाचे संस्थापक प्राचार्य डॉ.विजयराव नलावडे सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे आभार.

संदर्भ सूची व नोंदी तपशील:

१) सातारा गॅझेटीयर,महाराष्ट्र शासन

२) शोधनिबंध Discovering the Ancient like Mancala game in Vidarbha, Maharashtra (India)- Dr Akash Daulatrao Gedam.

३) A brief study of cupules of a few Megalithic sites in Jharkhand- Subhashis Das.

४) Concerning a cupule sequence on the edge of the Kalahari Desert in South Africa- Peter Beaumont and Robert Bednarik.

५) आंबराई (खंडकाव्य) — कवी गिरीश (शंकर केशव कानिटकर)

६) कमंडलूचा ओढा— कवी गिरीश (शंकर केशव कानिटकर)

७) प्रत्यक्ष निरीक्षण — ११ जून २०२२/१५ नोव्हेंबर २०२४/ १९ फेब्रुवारी २०२६

८) मुलाखत — अंभेरी ग्रामस्थ, ११ जून २०२२

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

वराडे येथील चालुक्यकालिन अप्रसिद्ध हळेकन्नड शिलालेख

प्रा. गौतम काटकर[1], मानसिंगराव कुमठेकर[2]

[1]*कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा*

[2]*मिरज इतिहास संशोधन मंडळ, मिरज*

Corresponding Author - प्रा. गौतम काटकर

DOI - 10.5281/zenodo.19704210

प्रस्तावना :

इतिहासाच्या अभ्यासात दगडावर कोरलेला शिलालेख हा अत्यंत महत्त्वाचा व सर्वाधिक विश्वसनीय पुरावा समजला जातो. भारतात कोरीव लेखांच्या इतिहासाचा प्रारंभ सम्राट अशोकाच्या काळापासून सुरू झाला. महाराष्ट्रातील कोरीव लेखांच्या इतिहासाचा प्रारंभ अशोकाच्या इ. स. पूर्व ३०० काळातील ठाणे जिल्ह्यात आढळलेल्या सोपारा प्राकृत कोरीव लेखापासून होतो. त्यानंतर इ. स. ३०० पर्यंत महाराष्ट्रावर राज्य करणारे सातवाहन राजांनी कोरीव लेखांच्या संदर्भातील भाषेविषयीचे धोरण पहिल्या सारखेच (अशोकाचेच) पुढे चालू ठेवले. हा महाराष्ट्रातील कोरीव लेखांचा पहिला टप्पा होय. १० व्या शतकानंतर महाराष्ट्रात कन्नड शिलालेख दिसून येतात. हे कन्नड लेख कल्याणी चालुक्यांच्या काळातील आहेत. याच राजवटीतील सातारा जिल्ह्याच्या प्राचीन इतिहासावर प्रकाश टाकणारा हळेकन्नड शिलालेख वराडे ता. कराड जि. सातारा येथे सापडला आहे. प्रस्तुत 'वराडे येथील चालुक्यकालिन अप्रसिद्ध हळेकन्नड शिलालेख' या शोध निबंधात या शिलालेखावर सविस्तर प्रकाश टाकण्यात आला आहे. हा शिलालेख अद्याप अप्रकाशित होता, त्यामुळे इतिहासाच्या अभ्यासात त्याचे महत्त्व अधोरेखित होते.

स्थल वर्णन:

वराडे हे गाव सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात आहे. पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर असणारे हे गाव कराड पासून १४ कि. मी. अंतरावर उत्तर दिशेस तर सातारा पासून ३७ कि. मी. अंतरावर दक्षिण दिशेस आहे. राष्ट्रीय महामार्गावर असणाऱ्या तासवडे टोलनाक्यापासून उत्तर बाजूस १ कि. मी. अंतरावर वराडे गाव आहे. याच गावात महामार्गाला लागून असणाऱ्या घटनेश्वर मंदिरालगत हा शिलालेख सापडला आहे.' पंचवीस वर्षापूर्वी महामार्गाच्या सेवा रस्त्याचे काम सुरू असताना घटनेश्वर मंदिराच्या जवळ जमीनीत गाडलेला हा शिलालेख सापडला. ग्रामस्थांनी मंदिराच्या जवळच हा शिलालेख उभा केला. प्रस्तुत शिलालेखाचे अद्याप वाचन झाले नव्हते.

शिलालेखाचे वर्णन:

हा शिलालेख अद्याप अप्रकाशित आहे. राष्ट्रीय महामार्गावर सातारा बाजूकडे जाणाऱ्या मुख्यमार्गाच्या व सेवा रस्त्याच्या मध्ये हा शिलालेख आहे. शिलालेखापासून जवळच घटनेश्वरचे (शिव) मंदिर आहे. या शिलालेखाची उंची ४० इंच तर रूंदी १५ इंच आहे. लेखाचा कांही भाग जमीनीत गेलेला आहे. बरेच वर्षे तेल घातल्याने व अनेक वेळा रंग दिल्याने यावरील अक्षरे पुसट झाली

आहेत.*शिलालेखातील ओळी, भाषा-लिपी- वराडेचा हा लेख दानलेख असून त्यावर 'सवत्स धेनू' चे शिल्प, शिवलिंग व सुर्य, चंद्र, कट्यार कोरले आहे. हा लेख हळेकन्नड लिपीत कोरला असून भाषा कन्नड आहे. लेखाच्या एकून २० ओळी आहेत. त्यातील मधील काही भाग पुसट झाला असला तरी बहुतांशी भागाचे वाचन करता आले.

शिलालेखातील राजवट व कालनिर्देश:

या लेखात कलचुरी घराण्यातील महामंडलेश्वर जोगम याचा उल्लेख आला आहे. जोगम याच्या विविध पदव्या व विशेषणे यामध्ये देण्यात आले आहेत. शके १०१३ प्रजापती नाम सवंत्सरी म्हणजे इ.स. १०९१ मध्ये हा दानलेख लिहून ठेवण्यात आला. जोगम कलचुरी याचा अधिकारी असणाऱ्या सगरैया (श्रीमत्सगरय्य) याने वराडे परिसरातील एका मंदीराला नैवेद्य नंदादीपासाठी दान दिल्याचा उल्लेख यात आहे. यामध्ये 'सगरैया' याला लावलेली विशेषणेही देण्यात आली आहेत.

चालुक्य-कलचुरी घराणे व कराड:

कल्याणी (सध्याचे बसवकल्याण जि. बिदर कर्नाटक) येथून चालुक्य घराण्यातील सत्ताधिशांनी इ.स. ९७३ ते ११९० पर्यंत राज्यकारभार केला. या घराण्यात अनेक पराक्रमी राजे होऊन गेले. तत्कालिन दक्षिण पथावर (दक्षिण भारत) या घराण्याचे राज्य होते. या घराण्यातील महापराक्रमी राजा सहाव्या विक्रमादित्याने इ. स. १०७६ ते इ.स. ११२६ या कालखंडात राज्यकारभार केला. सुमारे पन्नास वर्षे अशी दिर्घकाळ सहाव्या विक्रमादित्याची सत्ता संपूर्ण दक्षिण भारतभर पसरली होती. त्याकाळी सध्याचा सातारा व कराडचा परिसर हा चालुक्यांचा अंमलाखाली होता. या कालखंडात चालुक्यांचे मांडलिक कलचुरी घराणे होते. या 'कलचुरी वंशातील जोगम कलचुरी याला चालुक्य सहाव्या विक्रमादित्याने महामंडलेश्वर हे पद बहाल करून त्याच्याकडे क-हाड-४००० (कराड नाल्कुसावीर) या मंडळाचे (प्रांत) प्रशासन सोपवले होते. या काळात चालुक्य राजवंशाशी वैवाहिक संबंध झाल्यामुळे कलचुरींची प्रतिष्ठा वाढत गेली. महामंडलेश्वर जोगम कलचुरी याचे मोजकेच शिलालेख महाराष्ट्रात सापडले आहेत. महामंडलेश्वर जोगम कुलचुरीचा 'जत तालुक्यातील कोळिगेरी, वळसंग सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, मंगळवेढे, उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर येथील कोरीवलेखामध्ये उल्लेख आढळतो. याचा पहिला कोरीव लेख सोलापूर जिल्ह्यातील (इ.स. १०८२) तीर्थग्राम मध्ये आढळतो.

लेखाचा विषय :

प्रस्तुत वराडे शिलालेख हा हळेकन्नड लिपीत असून तो वीस ओळींचा आहे. या लेखाच्या पहिल्या ओळीतच शकाचा उल्लेख आहे. ३ ऱ्या ते ८ व्या ओळीपर्यंत कलचुरी घराणे व जोगम कलचुरी यांच्या विविध पदव्या व विशेषणांचा उल्लेख आहे. नवव्या ओळीत महामंडलेश्वर जोगम याचा उल्लेख असून लेखातील १० व्या व ११ व्या ओळीतील कांही अक्षरे पुसट झाल्याने त्याचा अर्थ लागत नाही. मात्र ११ व्या ते १४ व्या ओळीत जोगम कलचुरी याचा अधिकारी असणाऱ्या 'समरैया' याची विशेषणे कोरली आहेत. १४ व्या ओळीत 'सगरैय्या' (श्रीमत्सगरय्य) याच्या नावाचा उल्लेख आला आहे. १६ व्या ओळीत नैवेद्य नंदादीपा (मंदीराला) साठी दान दिल्याचा उल्लेख यात आहे. १७ व्या ते २० व्या ओळीत शापवचन कोरण्यात आले आहे. या शाप वचनाचा अर्थ तत्कालिन लोकमानसानुसार मंदिरासाठी दिलेल्या या दानास कोणी इजा केल्यास त्याचा पुढील जन्म हा हजारो वर्षे विष्ठेतील कृमी प्रमाणे होईल असा आहे.

लेखाचे महत्त्व :

सातारा जिल्ह्यात संशोधकांना आतापर्यंत दोनच हळेकन्नड शिलालेख सापडले होते. वराडे येथे सापडलेला हा लेख जिल्ह्यात सापडलेला केवळ तिसरा हळेकन्नड शिलालेख आहे. यापुर्वी कापील ता. कराड व म्हसवड ता. माण येथे हळेकन्नड लिपीतील शिलालेख सापडलेले आहेत. कापील येथील लेख 'श. १०२८ (इ. स. ११०६) चा व महालक्ष्मीचा (कोल्हापूरच्या) उल्लेख असणारा कानडी लेख आहे. हा लेख सध्या औंध येथील श्रीमंत पंतप्रतिनिधी यांच्या वस्तुसंग्रहालयात असला तरी तो कराड पासून सुमारे पांच मैलावर असणाऱ्या कापील नावाच्या त्यांच्या ताब्यातील गावातून त्यांनी आणला आहे. या लेखात कल्याणचा चालुक्य राजा त्रिभुवनमल्ल (सहावा विक्रमादित्य) हा मन्नेकेरे येथे राज्य करित असता व त्याच्या हाताखालील अधिकारी सोभनेय्य हा कोल्हापूरवर प्रभुत्व गाजवीत असता याच त्रिभुवनमल्लाच्या राज्याच्या ३१ व्या वर्षी म्हणजे श. १०२८ व्यय संवत्सर या साली माघ पोर्णिमस शुक्रवारी सोमग्रहणसमयी (इ. स. ११०७ जानेवारी ११) सोभनेय्य, त्याची बायको लखुमादेवी, त्याचा मुलगा भेडय्य व मुलगी भेडकय्ये या सर्वांनी कोल्हापूर येथील महालक्ष्मीच्या अंगभोगासाठी कापील गावातील चार मत्तर जमीन व एका घराची जागा कुबेरनायक नावाच्या गृहस्थास दान केल्याचे नमुन केले आहे." कापील येथे सापडलेला हा लेख सातारा जिल्ह्यात सापडलेला पहिला हळेकन्नड लेख ठरला आहे. त्यानंतर म्हसवड व प्रस्तुत वराडे येथील लेखांचा शोध लागला आहे. कापीलच्या लेखात उल्लेख असणारा अधिकारी सोभनेय्य व प्रस्तुत वराडे शिलालेखातील सगरैय्य (श्रीमत्सगस्य्य) हा एकच असल्याचे अनुमान करता येते. कारण वराडे लेखाचा कालखंड इ. स. १०९१ तर कापील लेखाचा कालखंड हा इ. स. ११०६ आहे. याच काळत सहावा विक्रमादित्य व त्याचा महामंडलेश्वर जोगम कलचुरी यांची कराड भागावर सत्ता होती. दोन्ही दान लेखातील कालखंडाचे अंतर हे केवळ १५ वर्षाचे आहे व या दोन गावातील भौगोलिक अंतरही केवळ १८ कि. मी. चे आहे. त्यामुळे कापील लेखातील 'सोभनेय्य' हा अधिकारी व वराडे लेखातील 'सगरैय्या' हा एकच असल्याची पुष्टी होते. सातारा जिल्हयात सापडलेला दुसरा हळेकन्नड शिलालेख हा म्हसवड ता. माण येथील सिध्दनाथ मंदिरातील दान लेख आहे. हा लेख चालुक्य राजा जगदेकमल्ल याच्या कारर्किदीतील आहे. 'चालुक्य राजा जगदेकमल्ल हा ११३८ मध्ये १२ येथील सिध्देश्वर देवास सत्तेवर आला. त्यानंतर दहा वर्षे म्हणजे ११४८ यावर्षी अंगभोग, चैत्र पैत्रासाठी म्हसवड येथील भूमी दान म्हणून दिली आहे" असा उल्लेख या शिलालेखात आहे.

वरील दोन शिलालेखानंतर सातारा जिल्ह्यात सापडलेला लेख म्हणजे प्रस्तुत वराडे शिलालेख होय. मात्र कालखंडानुसार (कापील इ.स. ११०६ व म्हसवड इ.स. इ. स. ११४८) विचार केल्यास वराडे शिलालेख हा सातारा जिल्ह्यात सापडलेला कालक्रमानुसार पहिला (जुना) हळेकन्नड लेख ठरतो. कापील व म्हसवड येथील लेखांचा कालखंड हे नंतरचे असल्याने वराडे लेखाचे महत्व सातारा जिल्ह्याच्या प्राचीन इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचे ठरते. सातारा जिल्ह्यातील चालुक्य आणि कलचुरी घराण्यांच्या सत्तेचा इतिहास या लेखामुळे नव्याने उजेडात आला आहे. सातारा आणि कराड परिसराला प्राचीन इतिहास आहे. कराड जवळील बौध्द लेण्या आणि सातवहान कालिन अवशेषामुळे प्राचीन काळी हा परिसर वैभवसपंन्न होता हे निदर्शनास येते. कराड आणि परिसरावर ११ व्या शतकात कल्याणीच्या चालुक्यांची राजवट होती. त्या काळात कराड ४००० हजार गावांचा (कराड नाल्कुसावीरू) मिळून बनलेला एक राजकिय विभाग होता. त्याचे मुख्य ठिकाण

कराड असल्याने चालुक्यांच्या राज्यातील ते एक प्रमुख शहर होते. चालुक्यांचे महामंडलश्वेर असणाऱ्या कलचुरी राजघराण्याची सत्ता या भागात होती. ते चालुक्यांच्या वतीने कराड आणि परिसराचा कारभार पहात. मात्र चालुक्य आणि कलचुरीचा एवढा प्रभाव या परिसरावर असूनही सातारा जिल्ह्यात म्हसवड व कापिल वगळता अन्य ठिकाणी आजवर त्यांचे शिलालेख आढळून आले नव्हते. वराडे ता. कराड येथे नव्याने आढळलेल्या शिलालेखामुळे चालुक्य आणि कलचुरींच्या या भागावरील सत्तेचा उलगडा होतो. चालुक्यांच्या राजवटीत कराड हे प्रमुख ठिकाण असूनही कराड तालुक्यात एकच हळेकन्नड शिलालेख आजवर आढळून आला होता. मात्र वराडे येथे सापडलेल्या या शिलालेखामुळे यात नवी भर पडली आहे.

या शिलालेखाचे वाचन हळेकन्नड लिपी अभ्यासक डॉ. हनुमाक्षी गोगी (कर्नाटक) यांनी केले. यासाठी कन्नड साहित्यीक व भाषा अभ्यासक प्रा. डॉ. व्ही. एस. माळी यांचे सहकार्य लाभले.

लेखाचे वाचन:

१) श्री सक वर्ष १०१३ नेया प्रजापति सं

२) वत्सरद माघ सु ५ स्वस्ती समधीग

३) त पंच महाशब्द महामंडळेस्वर का

४) कांजन पुरवराधीश्वर सुवर्ण वृषभध्वजं

५) डमरूग तुर्यनिर्भीषण कळचुरीय

६) कुळ कमळ मार्नांड कदन प्रचंड मान /

७) कनकाचळ सुभटारादित्य कलिगळंकुस ना

८) मादी समस्त प्रशस्ती सहितं श्री मन्महामं

९) डळेस्वरं जोगमरस पादाराधकम् नागी

१०) यय्य दंडनायकर व

११) स्वस्ती समस्त गुणसंपन्न नुडिदुमत्ते

१२) (नं) गोत्र पवित्रं विप्रजनोतमम् सत्य र

१३) (त्नाकरं.) याचकजन कळपवृक्ष नामादी

१४) (प्रशस्ती) सहितम श्रीमत्सगरय्य ना

१५) जोगमसर पादाराधक

१६) --- दु पडेदू देवरग्गे धुपनिवेद्य

१७) -- स्वदतं परदतं वायो हरेतू

१८) वसुंदरा षस्टीवर्ष सहस्त्राणी वि

१९) ष्ठायाम जायते: क्रिमी / मंगळम

२०) हाश्री ००

संदर्भ सूची :

१. प्रत्यक्ष स्थळ भेट दिनांक २६ मे २०१८

२. प्रत्यक्ष स्थळ भेट दिनांक ९ जून २०१८

३. डॉ. पाठक अरूणचंद्र शं. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास प्राचीन काय (खंड १) वर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, व्दितीय आ. पृ. ३८०

४. डॉ. कलबुर्गी एम. एम. महाराष्ट्रातील कन्नड कोरीव लेख, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००७, पृ. क्र. ५७

५. डॉ. खरे गणेश हरी, महाराष्ट्राची चार दैवते, प्रकाशक, भारत इतिहास संशोधन मंडख, पुणे,पृ. क्र. ४१

६. डॉ. पाठक अरूणचंद्र शं. सातारा जिल्हा, गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, व्दितीय आवृती, पृ. क्र. ८५८, ८७९

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

शतघ्नी: प्राचीन युद्धतंत्रातील नवकल्पना आणि तंत्रज्ञान

श्री. मृण्मय दीपक अरबुणे[1], डॉ. शामराव मल्हारी घाडगे[2]

[1]*संशोधक विद्यार्थी, आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नारायणगाव*

[2] *संशोधन मार्गदर्शक, उप-प्राचार्य, आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, विद्याप्रतिष्ठान, बारामती*

Corresponding Author - श्री. मृण्मय दीपक अरबुणे

DOI - 10.5281/zenodo.19704229

गोषवारा :

शतघ्नी हे प्राचीन भारतीय युद्धकलेतील एक प्रभावी आयुध असून, त्याचा उल्लेख वेदांपासून रामायण, महाभारत, पुराणे आणि नीतिग्रंथांपर्यंत आढळतो. हे आयुध शंभर किंवा अधिक शत्रूंना एका प्रहारात नष्ट करू शकणारे मानले जात असे.

रामायणात लोखंडी गदेसारखे, तर महाभारतात दगड-गोळे फेकणाऱ्या यंत्रासारखे शतघ्नीचे स्वरूप वर्णन केले आहे. पुराणांमध्ये दुर्गरक्षणासाठी त्याचा उपयोग महत्त्वाचा मानला गेला आहे. या अभ्यासातून प्राचीन भारतीय युद्धतंत्रातील तांत्रिक प्रगती आणि नवकल्पनांचा वारसा समजतो. शतघ्नीचा आधुनिक काळात संरक्षण आणि तांत्रिक नवकल्पनांसाठी संदर्भ म्हणून उपयोग होऊ शकतो.

शोध संज्ञा : शतघ्नी, प्राचीन भारतीय युद्धकला, वेद, रामायण, महाभारत, पुराणे, नीतिग्रंथ, आयुध, दुर्गरक्षण, तांत्रिक प्रगती, नवकल्पना, संरक्षण, युद्धतंत्र.

प्रस्तावना :

शास्त्रज्ञ आणि ऐतिहासिक साहित्याचा अभ्यास करताना, प्राचीन संस्कृतींमध्ये उपयोगात आलेल्या आयुधांचा विशेषतः मोठा महत्त्वाचा अभ्यास होतो. वेद, रामायण, महाभारत, पुराणे आणि विविध नीतिग्रंथ यामध्ये उल्लेख असलेल्या शतघ्नी या आयुधाचा संदर्भ भारतीय युद्धकलेच्या समृद्ध परंपरेचा परिचय घडवतो.

शतघ्नी या संकल्पनेचा मूळ अर्थ "शंभर किंवा अधिक शत्रूंना एका प्रहारात नष्ट करणारे आयुध" असा आहे. या संशोधनात, वेदांपासून ते नंतरच्या संस्कृत ग्रंथांपर्यंत या आयुधाचे स्वरूप, त्याचा उपयोग आणि त्याविषयीचे तात्त्विक व व्यावहारिक दृष्टिकोन यांचा अभ्यास केला आहे. शतघ्नीचा उल्लेख वेदांमध्ये अप्रत्यक्षरित्या "सहस्रघ्नि" व "शतवधम्" यांसारख्या शब्दांद्वारे होतो, तर रामायण, महाभारत, पुराणे आणि इतर ग्रंथांमध्ये या आयुधाचे अधिक तपशीलवार वर्णन आढळते.

रामायणामध्ये शतघ्नीचे काटेरी गदेसारखे स्वरूप असण्याची शक्यता व्यक्त केली आहे, तर महाभारतामध्ये तिचा उल्लेख दगड किंवा लोखंडी गोळे फेकणाऱ्या यंत्राच्या स्वरूपात केलेला आहे. पुराणांमध्ये शतघ्नीला दुर्गरक्षणासाठी अत्यंत उपयुक्त मानले असून, तिच्या संरचनेमध्ये जड यंत्रांचा समावेश असल्याचे दिसते.

या शोध प्रबंधामध्ये शतघ्नीचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक पैलूंचा सखोल अभ्यास करून, प्राचीन भारतीय युद्धकलेच्या परिप्रेक्ष्यात शतघ्नीच्या महत्त्वाचे विश्लेषण केले आहे. यामुळे प्राचीन भारतीय

युद्धकौशल्य व तंत्रज्ञानातील नवोन्मेषी दृष्टिकोन समजण्यास मदत होते.

वेदांमधील शतघ्नीचे वर्णन :

संस्कृत भाषेमध्ये शत हा शब्द बहुत्ववाची शब्द आहे म्हणजे हा शब्द १०० हा अंक दर्शवतो. शतघ्नी म्हणजे एकाच प्रहारामध्ये शंभर किंवा अनेक लोकांचा नाश करू शकेल असे आयुध होय. वेदांमध्ये शतघ्नी असा स्पष्ट शब्दोल्लेख येत नाही, परंतु याच आशयाचे सहस्त्रघ्नि आणि शतवधम् हे शब्द येतात[१]. लांबचे लक्ष वेधण्यासाठी किंवा किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी या आयुधाचा वापर केला जात असे. काही विद्वान वेदांमध्ये उल्लेख असणाऱ्या सुर्मी या आयुधास शतघ्नीसदृश आयुध मानतात[२].

रामायणात शतघ्नीचे वर्णन :

रामायणाच्या बालकांडामध्ये आयोध्येचे वर्णन येते, या वर्णनामध्ये उंच बुरूज, त्यावर ध्वज आणि शेकडो शतघ्नी तैनात होते[३]. सीतेचा शोध घेऊन परत आलेल्या हनुमानाला रामाने लंकेबद्दल विचारले तेंव्हा हनुमानाने लंकेचे वर्णन करताना संगितले कि, लंकेच्या चारही दिशांना चार मोठे द्वार आहेत. त्यावर बाण आणि दगडांचा वर्षाव करणारी यंत्रे बसवलेली आहेत. त्याचबरोबर शेकडो राक्षस वीर तीक्ष्ण शतघ्नी घेऊन तैनात आहेत. युद्धप्रसंगी जेंव्हा कुंभकर्णाला उठवण्याची वेळ आली तेंव्हा शेवटचा पर्याय म्हणून कुंभकर्णावर दोरखंडांनी बांधलेल्या शतघ्नीचा प्रहार करण्यात आला होता[४]. रणांगणावर जेंव्हा सुग्रीव आणि कुंभकर्ण समोरासमोर आले तेंव्हा सुग्रीवाने मोठमोठे वृक्ष कुंभकर्णावर फेकले. कुंभकर्णाने या वृक्षांवर बाण मारून हे वृक्ष छिन्नविछिन्न केले. हे बाण लागलेले वृक्ष खिळे ठोकलेल्या शतघ्नी प्रमाणे भासतात असे वर्णन रामायणामध्ये आलेले आहे[५].

रामायणामध्ये शतघ्नी लोहनिर्मित, दोरखंडांनी बांधलेले आणि सर्व बाजूंना लोखंडाचे खिळे असणारे असे आयुध होते असे स्पष्ट होत असले तरी त्याचे नक्की स्वरूप कसे होते किंवा याचा नक्की कशापद्धतीने वापर केला जात असे ही स्पष्ट होत नाही. रामायणाच्या आधारावर शतघ्नी हे गदेसमान काटेरी आयुध असावे असा अंदाज बांधला जाऊ शकतो.

महाभारतातील शतघ्नीचे वर्णन :

महाभारतामध्ये शतघ्नीचे स्वरूप बदललेले पाहायला मिळते. महाभारतामध्ये शतघ्नीचे स्वरूप चक्राकार आहे. महाभारतामध्ये बहुतांश ठिकाणी शतघ्नी सोबत अश्मगुड किंवा अयोगुड (गुड म्हणजे गोळा) या शब्दांचा प्रयोग केलेला पाहायला मिळतो, यातून असे निदर्शनास येते कि हे दगड किंवा लोखंडाचे गोळे फेकणारे आयुध आहे[६]. परंतु हे गोळे अग्नीच्या सहाय्याने प्रक्षेपित केले आत असत की तरफेच्या सहाय्याने फेकले जात, यावर संदीग्धता आहे.

शुक्रनीतीच्या अनुसार नालास्त्र (तोफ, बंदूक) वापरुन केले जाणारे युद्ध असुरयुद्ध किंवा मायावीयुद्ध मानले जाते. घटोत्कचाने रात्रीच्या युद्धामध्ये मायावी युद्धाला सुरुवात केली. त्यामध्ये त्याने भुशुंडी आणि चक्रयुक्त शतघ्नीचा वापर केला[७].

द्रोणाचार्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या संतप्त पुत्राने म्हणजेच अश्वत्थामाने क्रोधित होऊन पांडवांवर नारायणास्त्र सोडले. या नारायणास्त्रातून चार चक्र, दोन चक्राकार शतघ्नी आणि लोखंडाचे गोळे प्रकट होऊन पांडवांचे सैन्य होरपळून निघाले[८].

इंद्रप्रस्थच्या वर्णनामध्ये देखील शतघ्नी आणि अनेक यंत्रांनी सुशोभित महालाचे वर्णन आले आहे[९]. याचप्रकारे द्वारकेच्या बुरूजांवर भुशुंडी, दगडी गोळे, परशु,

लोह आणि चामड्याने बनवलेले अग्नि प्रज्वलित करून फेकता येतील असे गोळे फेकणारे शृंगीला नामक यंत्र तैनात केले होते[१०]. शांतीपर्वामध्ये भीष्माने युधिष्ठीरास जो राजधर्माचा उपदेश केला तेंव्हा त्याला दुर्गनिर्मिती करून त्यांच्या बुरूजांवर जड यंत्र आणि शतघ्नी तैनात करून ते स्वत:च्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा उपदेश केला[११]. शतघ्नी सोबतच तीक्ष्ण अंकुश आणि खिळ्यांचे वर्णन अनेक वेळा आलेले पाहायला मिळते. यातून असे दिसून येते की शतघ्नीच्या रक्षणार्थ त्याच्या चारही बाजूंनी खिळे लावलेले असावेत जेणेकरून शत्रू शतघ्नीला सहजासहजी हस्तगत करू शकणार नाही.

पुराणांमधील शतघ्नीचे वर्णन :

पुराणांमध्ये शतघ्नीला सर्व यंत्रांमध्ये मुख्य स्थान बहाल केलेले आहे[१२] तसेच शतघ्नीचे आग्नेयास्त्रासारखे स्वरूप असून दुर्गरक्षणासाठी शतघ्नी वापरावे असे निर्देश दिलेले आहेत. विष्णुधरमोत्तरपुराणामध्ये सहस्त्रघाती यंत्रांसोबत शतघ्नी किल्ल्यांवर तैनात करावे अशी सूचना दिलेली आहे[१३]. मत्स्यपुराणानुसार शतघ्निस दीप्त असे संबोधले आहे[१४]. हरिवंशपुराणामध्ये शतघ्निस तीक्ष्ण यंत्र म्हटले आहे, ज्यामध्ये मोठमोठे लोखंडी चक्र लावलेले आहेत[१५].

नीतिप्रकाशिकामधील शतघ्नीचे वर्णन :

या ग्रंथाच्या अनुसार शतघ्नी चार हात लांब काटेरी असे मुद्गर प्रकारातील मूठ असणारे आयुध आहे. हे गदेप्रमाणेच चालवायचे असते[१६].

धनुर्वेदामधील शतघ्नीचे वर्णन :

या ग्रंथामध्ये शतघ्नी हे स्पष्टपणे दारूगोळ्याच्या सहाय्याने चालवण्याचे आयुध मानले आहे. दुर्गांच्या रक्षणार्थ राजाने शतघ्नी आणि दारूगोळा जमवून ठेवायला हवा असे निर्देश या ग्रंथामध्ये दिलेले आहेत[१७].

अन्य ग्रंथांमधील शतघ्नीचे वर्णन :

कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये शतघ्नी हे चलयंत्र आहे असे नमूद आहे[१८]. म्हणजेच शतघ्नी एका जागेवरून दुसऱ्या जागेवर नेता येऊ शकणारे आयुध आहे असे नमूद केले आहे. भोजराजाकृत समरांगनसुत्रधार या ग्रंथामध्ये शतघ्नी आणि उष्ट्रग्रीव नावच्या यंत्राचा वापर दुर्गरक्षणासाठी केला जातो असे नमूद केले आहे[१९].

निष्कर्ष :

शतघ्नी या प्राचीन आयुधाचे अभ्यासातून स्पष्ट होते की, हे आयुध केवळ शस्त्र म्हणूनच नव्हे तर तांत्रिक आणि रणनीतिक दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाचे होते. वेदांपासून पुराणांपर्यंत आणि रामायण, महाभारत यांसारख्या महाकाव्यांपर्यंत शतघ्नीच्या विविध स्वरूपांचा आणि उपयोगांचा उल्लेख आढळतो. या विविध उल्लेखांमधून शतघ्नीचे स्वरूप आणि कार्यपद्धती कालांतराने बदलले असल्याचे दिसते.

शतघ्नीचा उपयोग दुर्गरक्षणासाठी, युद्धात शत्रूंवर हल्ला करण्यासाठी, आणि सैन्यबळ वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जात होता. संस्कृत साहित्यामध्ये तिच्या वर्णनात लोखंडी काटेरी गदा, चक्राकार आयुध, दगड-गोळे फेकणारी यंत्रणा आणि दारूगोळ्यावर आधारित यंत्रणा अशा विविध स्वरूपांचा उल्लेख मिळतो.

या संशोधनातून असे दिसते की, प्राचीन भारतीय युद्धकौशल्यामध्ये शतघ्नीचे महत्त्व केवळ तांत्रिक आयुधापुरते मर्यादित नसून, तिचा उपयोग रणनीती, संरक्षण, आणि शत्रूचा प्रहार परतवण्यासाठी केला जात असे.

शतघ्नीचा अभ्यास केल्याने प्राचीन भारतीय युद्धकलेतील तांत्रिक प्रगती, नवकल्पना, आणि विज्ञानाचा समृद्ध वारसा समजतो. आधुनिक काळात याचा संदर्भ घेत, भूतकाळातील युद्धकौशल्याचा अभ्यास करणे आणि त्यातून नव्या संकल्पना विकसित करणे महत्त्वाचे ठरते. यामुळे भारतीय युद्धकलेच्या इतिहासातील एका महत्त्वपूर्ण घटकाला नवीन दृष्टीकोन मिळतो.

संदर्भ सूची :

१. डॉ. शर्मा गंगा सहाय, अथर्ववेद, संस्कृत साहित्य प्रकाशन, नई दिल्ली, २०१५, पृ. क्र. ५८६

२. डॉ. शर्मा गंगा सहाय, ऋग्वेद, संस्कृत साहित्य प्रकाशन, नई दिल्ली, २०१६, पृ. क्र. १३२९

३. कृष्णाचार्य टी. आर. आणि टी. आर. व्यासाचार्य, श्रीमद्वाल्मीकिरामायणम्-बालकांडम्, मुंबई, १९११, पृ. क्र. ६२

४. कृष्णाचार्य टी. आर. आणि टी. आर. व्यासाचार्य, श्रीमद्वाल्मीकिरामायणम्-युद्धकांडम्, मुंबई, १९१३, पृ. क्र. २३८

५. कित्ता, पृ. क्र. ३१६

६. पांडेय रामनारायणदत्त शास्त्री, महाभारत (द्वितीय खंड), गीताप्रेस, गोरखपुर, १९९७, पृ. क्र. १७५२

७. डॉ. पं. सातवलेकर श्रीपाद दामोदर (संपा.), महाभारत द्रोणपर्व, सातवलेकर वसंत श्रीपाद, स्वाध्याय मंडल, पारडी, १९७५ पृ. क्र. १०५०

८. उपरोक्त, सातवलेकर वसंत श्रीपाद, स्वाध्याय मंडल, पारडी, १९७५ पृ. क्र. १०५१

९. कित्ता., पृ. क्र. १२००

१०. डॉ. पं. सातवलेकर श्रीपाद दामोदर (संपा.), महाभारत आदिपर्व, सातवलेकर वसंत श्रीपाद, स्वाध्याय मंडल, पारडी, १९६७ पृ. क्र. ९७७

११. उपरोक्त, गीताप्रेस, गोरखपुर, १९९७, पृ. क्र.९९३

१२. पांडेय रामनारायणदत्त शास्त्री, महाभारत (पंचम खंड), गीताप्रेस, गोरखपुर, पृ. क्र. ४६०४

१३. श्री विष्णुधरमोत्तर महापुराण, सर्वोदय साहित्य मंदिर, हैदराबाद, १९२९, द्वि. ख. पृ. क्र. १८८

१४. कित्ता, द्वि. ख. पृ. क्र. १८८

१५. मत्स्यमहापुराण, गीताप्रेस, गोरखपुर, २०१९, पृ. क्र. ६७७

१६. श्री हरिवंशपुराण, गीताप्रेस, गोरखपुर, पृ. क्र. ७६४

१७. शाह उर्मि एस., नीतिप्रकाशिका, नॅशनल मिशन फॉर म्यानुस्क्रिप्ट्स, न्यू दिल्ली, २०१४, पृ. क्र., २६८

१८. Ray Purnima, Vasista's Dhanurvedasamhita, J. P. Publishing House, Delhi, 2003, pg. no. 21

१९. प्रा. कंगले रं. प., कौटिलीय अर्थशास्त्र, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २०११, पृ. क्र. ११९

२०. Agrawala V. S., Samarangana-Sutradhara, Oriental Institute, Baroda, 1966, pg. no. 185

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

स्वराज्याचे आरमार आणि सामारीक दृष्टीकोण

डॉ. सुरेश वसंत शिखरे

इतिहास विभाग प्रमुख,

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

Corresponding Author - डॉ. सुरेश वसंत शिखरे

DOI - 10.5281/zenodo.19704262

प्रस्तावना:

छत्रपती शिवाजी महाराज हे अत्यंत दूरदर्शी नेतृत्व असलेले शासक होते, ज्यांनी १७ व्या शतकात सागरी सामर्थ्याचे महत्त्व ओळखून त्यासाठी भक्कम पायाभूत रचना उभारली. त्यांनी वसाहतवादी परकीय शक्तींच्या (जसे की पोर्तुगीज, डच, इंग्रज) अरब सागरावर वर्चस्व मिळविण्याच्या रणनीतींना आव्हान देण्यासाठी एक सक्षम आणि स्वावलंबी आरमार निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमाराची उभारणी केवळ स्वराज्याच्या संरक्षणासाठीच नव्हे, तर स्वराज्याच्या आर्थिक समृद्धीचा पाया मजबूत करण्यासाठी देखील केली. अरब सागरावरील व्यापारी मार्गांचे संरक्षण करून त्यांनी परकीय सागर शक्तींच्या हस्तक्षेपाला आळा घातला आणि भारतीय व्यापाऱ्यांसाठी व्यापार अधिक सुलभ केला. सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी, उंदेरी, पद्मदुर्ग इत्यादी जलदुर्गांनी कोकण किनारपट्टीच्या प्रदेशांचे सुदृढीकरण केले, आणि बहुपरिकल्पी आरमार निर्माण केल्याने, आत्मनिर्भर आणि सुरक्षित स्वराज्याचा पाया भक्कम केला. या जलदुर्गांनी सागरी सिमांचे संरक्षण केले आणि आरमाराला आक्रमण तसेच संरक्षण मोहिमा प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आधार दिला. या जलदुर्गांच्या मदतीने परकीय आरमारी शक्तींच्या, तसेच जंजिरेकर सिद्धींच्या आक्रमणांना आळा घातला.

छत्रपती शिवाजी महाराजांचे अरब सागराच्या सामर्थ्यावर लक्ष केंद्रित करणे भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण रणनीतिक पाऊल होते. त्यांनी आरमारी मार्गांवर कर आकारणी आणि महसूल संकलनाद्वारे स्वराज्यासाठी आर्थिक लाभाचे नवीन साधन निर्माण केले. यामुळे स्वराज्याची राजकीय ताकद वाढली आणि मराठ्यांचे सागरी सार्वभौमत्व प्रस्थापित होण्यास मदत झाली. छत्रपती शिवाजी महाराज हे पहिले भारतीय शासक होते, ज्यांनी औपचारिकपणे आरमाराची स्थापना केली आणि अरब सागरावर नियंत्रण राखण्यासाठी सामरिक नियोजन केले. त्यांच्या नवोन्मेषक आणि व्यापक दृष्टिकोनामुळे मराठा साम्राज्याने वसाहतवादी शक्तींना प्रभावीपणे आव्हान दिले आणि आपल्या सागरी हितसंबंधांचे रक्षण केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमारी धोरण आणि निर्णय त्यांच्या दूरदृष्टीचे आणि कुशल नेतृत्वाचे प्रतीक आहेत. त्यांच्या आरमारी धोरणामुळे एक सुदृढ, सुरक्षित, आणि सागरी प्रभाव असलेले शक्तिशाली राज्य बनले.

अरबी व्यापाऱ्यांचे पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर वर्चस्व प्रस्थापित होण्याच्या काळापर्यंत चोल, पंड्या, नायक, सामंत, गुजरातचा सुलतान आणि इतर छोट्या-

मोठ्या नायक व पाळेगारांची स्वतंत्र आरमार किंवा जहाजांचे काफिले अस्तित्वात होते. त्यांचे स्वरूप समारिक किंवा राजकीय नसले तरी त्यांचे नाविक सामर्थ्य आणि जहाज बांधणीतील कौशल्य निश्चितच अधोरेखित करण्यासारखे होते. भारतावर इस्लामिक आक्रमणे सुरू झाल्यानंतर पश्चिम किनारपट्टीवर अरबी व्यापाऱ्यांनी आपला चांगलाच जम बसवलेला होता. या अरबी व्यापाऱ्यांकडे उत्तम तांत्रिक आणि नाविक ज्ञान होते, ज्याच्या जोरावर त्यांनी जवळपास संपूर्ण व्यापार आपल्या नियंत्रणाखाली आणला होता. या कालखंडात प्रबळ केंद्रीय सत्तांचा अभाव होता. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवरील स्थानिक छोट्या सत्तांना आरमाराची तितकीशी आवश्यकता वाटली नसावी. त्यामुळे या राज्यकर्त्यांनी सागर संस्कृतीला अन शक्तीला एका अर्थाने डावलले किंवा लष्करी व समारिक दृष्टिकोनातून त्याचे महत्त्व त्यांना उमगले नाही. याचा परिणाम जहाज बांधणी व्यवसायावर झाला. जहाज बांधणी कारागिरांचा राजाश्रय नाहीसा झाला, जहाज बांधणी व्यवसाय अधोगतीला गेला आणि जहाज बांधणीचे पिढीजात ज्ञान काहीसे लोप पावले.

१५ व्या शतकातील स्पॅनिश आणि पोर्तुगीज नावाड्यांनी शोधलेल्या नवीन सागरी मार्गांनी जगाच्या राजकीय आणि आर्थिक समीकरणात मोठे बदल घडवून आणले. केप ऑफ गुड होपमार्गे भारताकडे जाणाऱ्या नवीन व्यापारी मार्गाने नव्या संधींना चालना दिली, परंतु त्याचबरोबर साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षा आणि धार्मिक संघर्षांनाही वाव मिळवून दिला. रोमचे पोप, जे त्या काळात केवळ धार्मिक नेतेच नव्हे तर राजकीय सत्तेचेही केंद्र होते, त्यांनी पोर्तुगीज आणि स्पॅनिश यांच्यात जगभरातील महासागरांचे प्रभावक्षेत्र वाटून दिले. पोर्तुगीजांना भारतीय महासागराचा ताबा देण्यात आला. हा निर्णय केवळ धार्मिक हेतूने प्रेरित नव्हता, तर व्यापारातील मक्तेदारी निर्माण करण्याच्या उद्देशाने होता. पोपच्या या निर्णयामुळे पोर्तुगीजांनी असा दावा केला की भारतीय महासागरावर त्यांच्याच ताबा आहे अथवा ते या सागराचे स्वामी आहे. पोर्तुगीजांनी स्वतःला सागरी मार्गांचा एकमेव अधिपती घोषित केले. त्यांनी भारतातील स्थानिक राज्यकर्त्यांना त्यांच्या महासागर वापरण्याच्या नियमांवर बंधनकारक करण्याचा प्रयत्न केला. "आम्ही समुद्राचे सार्वभौम आहोत" हे धोरण त्यांच्या प्रत्येक कारवायामागील मूळ तत्त्व होते. अर्थात पोर्तुगीजांनी असा दृष्टिकोन स्वीकारला की, जणू रोमचे पोप हे जागतिक सार्वभौम सत्ता आहेत, आणि ते त्यांच्या राजकीय तसेच धार्मिक अधिकारांचे आम्ही प्रतिनिधित्व करत आहोत. मुळात जेव्हा पोर्तुगीज खलाशी भारतात आले, तेव्हा त्यांनी आपल्या सोबत काही ठोस राजकीय आणि धार्मिक धोरणे स्वीकारलेली होती. पोर्तुगीजांचा मुख्य उद्देश केवळ व्यापार नव्हता; तर त्यांनी स्वतःच्या सत्तेचे विस्तारवादी विचारही सोबत आणलला होता. त्यांनीभारतीय लोकांच्या विरोधातील धार्मिक द्वेष आणि सागरी सार्वभौमत्वाचा आग्रह भारतात दृढ केला. थोडक्यात काय तर, १५ व्या शतकातील पोर्तुगीजांच्या सागरी मोहिमांमुळे जागतिक व्यापाराच्या पद्धतीत महत्त्वाचे बदल घडले. परंतु त्याचवेळी, त्यांच्या साम्राज्यवादी आणि धार्मिक धोरणांमुळे सागरी प्रदेशांत संघर्ष वाढले. अरबी सागरावरील पोर्तुगीजांचा दावा हा केवळ व्यापार नियंत्रणासाठी नव्हे, तर सागरी साम्राज्यवादी धोरणांचा भाग होता. पोर्तुगीजांनी भारतात धार्मिक, राजकीय, आणि आर्थिक संघर्षांचे नवे पर्व सुरू केले, ज्याचे दूरगामी परिणाम भारतीय उपखंडाच्या इतिहासावर झाले.

१६ व्या शतकाच्या सुरुवातीला पोर्तुगीजव्हाईसरॉय अल्बुकर्क यांने अरब सागरात एक शकतीशाली सागरी सत्ता यशस्वीरित्या स्थापित केली होती. पोर्तुगीजांचे सागरावर वर्चस्व असले तरी त्यांनी भूमीवर

सार्वभौमत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला नाही. कारण पोर्तुगीज आरमाराची अरब सागरातील शक्ती तत्कालीन परिस्थितीत स्थानिक राज्यकर्त्यांच्यासाठी धोक्याची वाटत नव्हती, त्यांचा व्यापार अत्यंत फायदेशीर होता. मात्र त्याचवेळी, गुजरात आणि दक्षिणेतील राजांनी परकीय सत्तांविषयी भीती आणि सहकार्य यामधील विरोधाभास दाखवला. पोर्तुगीज आरमाराचा नाश करण्यासाठी दोन वेळा मोठे एकत्रित प्रयत्न झाले, परंतु पोर्तुगीजांच्या दृढ इच्छाशक्तीमुळे हे प्रयत्न अपयशी ठरले. त्यानंतर, पोर्तुगीज आरमाराचे वर्चस्व कायम अबाधित राहिले.

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धातही, भारतातील पोर्तुगीज, डच, ब्रिटिश आणि फ्रेंच यांच्या प्रयत्नांचा केंद्रबिंदू मुख्यतः त्यांच्या व्यापारी हितसंबंधांवर होता. त्यांच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये सागरी व्यापारावर मक्तेदारी मिळवणे हे होते. यासाठी त्यांनी किनारी भागात वसाहती स्थापन केल्या, मात्र त्यापलीकडे त्यांची फारशी महत्वाकांक्षा नव्हती. परिणामी, त्यांच्या हालचालींमध्ये स्थानिक सत्तांबद्दल ईर्षा किंवा भीती जाणवत नव्हती. १५ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच यांसारख्या सागरावर वर्चस्व असलेल्या युरोपीय राष्ट्रांच्या प्रतिनिधींचे भारतीय किनारपट्टीवर आगमन झाले. वसाहतवादी मानसिकता असलेल्या या व्यापाऱ्यांनी हिंद महासागर आणि बंगालच्या उपसागरातील अनेक छोटी-मोठी बेटे, बंदरे व्यापाराच्या निमित्ताने हळूहळू हस्तगत केली. बघता-बघता त्यांनी वखारी स्थापन केल्या. समृद्ध अशा भारतीय किनारपट्टीवर आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी या प्रतिनिधींमध्ये एक प्रकारची शर्यत सुरू झाली. ऐत्तदेशीय राजे-राजवड्यांनी या प्रक्रियेस फारसा अटकाव केला नाही; उलटपक्षी, त्यांच्या मदतीने आपल्या भाऊ-बंधकीचा काटा काढण्यात त्यांनी धन्यता मानली. सागर संस्कृतीचा पुरस्कार करणाऱ्या पाश्चिमात्य लोकांचे कुटील डाव मात्र त्यांना ओळखता आले नाहीत. आमत्यकृत आज्ञापत्रातील 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र' हे वाक्य संपूर्ण जगातील सागर संस्कृतीचे अनुकरण करणारे अथवा विस्तारवादी धोरणाचे स्वरूप दर्शविते. साम्राज्यवादी धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या युरोपीयांचे धोरण ओळखून छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार उभारणीस प्रारंभ केला. एखाद्या जन्मजात 'राजमर्मज्ञ' प्रमाणे त्यांनी आपल्या आरमाराची उभारणी अतिशय कौशल्याने, काटेकोर नियोजनाने केली. हिंद महासागरावर सार्वभौमत्व निर्माण करण्याबरोबरच ते राष्ट्रीय प्रेरणेने प्रेरित झालेले होते.

श्री. रं. कुलकर्णी आपल्या 'शिकालीन राजनीति आणि रणनीती' या ग्रंथात मराठा आरमार स्थापनेचे विश्लेषण करताना म्हणतात "... देशाच्या स्वातंत्र्यास समुद्रमार्गाने लागलेले ग्रहण आणि परराष्ट्रीय आक्रमकांनी आपल्या हेतूच्या पूर्तीसाठी योजलेले आरमारी बळ या बाबी दिव्यदृष्टी असलेल्या राष्ट्र पुरुषांच्या ध्यानी आल्या नसत्या तरच नवलाचे वाटले असते. हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यास बद्धपरिकर असलेल्या शिवाजी महाराजांना स्वातंत्र्यास असलेला हा धोका स्पष्ट दिसत होता. म्हणूनच अनुकूल काळ येताच त्यांनी स्वत:चे आरमार बांधण्याचा व त्याचा विस्तार करण्यास प्रारंभ केला. काहि तात्कालिक कारणांमुळे या कार्यास वेगाने चालना मिळाली असली तरी सागरी किनाऱ्या चे रक्षण हि धारणा शिवरायाच्या मनात दीर्घकाळ नांदत असावी."[१]

छत्रपती शिवाजी महाराजांचा आरमार निर्मितीचा उद्देश काय होता हे आज्ञापत्रात प्रकर्षाने जाणवतो. "आरमार म्हणजे स्वतंत्र येक राज्यांगच आहे. जैसे ज्यास अश्वबल त्याची पृथ्वी प्रजा आहे. तद्वतच ज्या जवळ आरमार त्याचा समुद्र यांकरिता आरमार अवश्यमेव करावे."[२] अर्थात आरमार हे स्वतंत्र राज्याचा एक महत्त्वाचा अविभाज्य भाग आहे. जसे घोडदळ (अश्वबल) असलेल्या राजाचे प्रजेसह

भूमीवर प्रभुत्व असते, त्याचप्रमाणे ज्या राज्याजवळ आरमार आहे, त्याला सागरावर प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी आरमार आवश्यक आहे. आज्ञापत्रातील या विधानातून आरमाराचे राज्यव्यवस्थेतील महत्त्व अधोरेखित होते, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या सागरी सामर्थ्याची दूरदृष्टी प्रस्तुत करते. आरमाराला एक स्वतंत्र 'राज्यांग' म्हणून संबोधले आहे, म्हणजेच ते केवळ लष्करी शक्ती नसून, राज्याच्या सार्वभौमत्वाचे एक महत्त्वाचे प्रतीक मानले आहे. जसे घोडदळ भूमीवरील राजकीय व लष्करी प्रभावासाठी आवश्यक आहे, तसेच आरमार हे सागरी क्षेत्रात प्रभुत्व राखण्यासाठी अत्यावश्यक आहे. आरमारामुळे सागरावर नियंत्रण ठेवता येते, ज्यामुळे सागरी मार्गांवरील व्यापार, संरक्षण, आणि सामरिक वर्चस्व प्रस्थापित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात अरब सागरावरील व्यापारी मार्गावर नियंत्रण मिळवणे हे त्यांच्या आरमारी धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट होते. ज्या राज्याकडे आरमार आहे, त्या राज्याला सागरी सामर्थ्य आणि नियंत्रणाची क्षमता मिळते. हे नियंत्रण केवळ लष्करी विजयासाठी नव्हे, तर व्यापार, कूटनीती, आणि राजकीय प्रभावासाठी महत्त्वाचे साधन आहे अशी छत्रपती शिवाजी महारजांची धारणा होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी हेच तत्त्व ओळखून मराठा आरमाराची आणि अनेक जलदुर्गांची निर्मिती केली. या जलदुर्गांनी कोकण किनारपट्टीचे संरक्षण, सागरी मार्गांवर प्रभुत्व, आणि परकीय शक्तींना रोखण्याचे काम केले. छत्रपती शिवाजी महाराजांची ही दूरदृष्टी भारतातील सागरी सामर्थ्याच्या इतिहासाला दिशा देणारी ठरली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याच्या विस्तार धोरणाचा एक भाग म्हणून कोकणावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा आणि तेथील साधनांचा विकास करण्याचा निर्धार केला होता. कोकण किनारपट्टीवर स्वरज्याचा विस्ताराबरोबरच शिवाजी महाराजांच्या मनात अनेक उदीष्टे असावीत असे दिसते. यामध्ये, पोर्तुगीजांनी समुद्रावरील सार्वभौमत्वचा जो दावा केलेला होता, अरब सागरावर आपले आदेश लादले होते आणि त्यांनी स्थापन केलेली 'कार्टाज' (सागरी वाहतूक परवाना अर्थात दस्तक) पद्धती विशेषतः पश्चिम किनाऱ्यावर किनाऱ्यावरील संचारवर एकाधिकार प्रस्थापित केला होता तो मोडीत काढणे. कारण पोर्तुगीजांची 'कार्टाज' पद्धती केवळ उत्पन्नाचे साधन नव्हते, तर हिंद महारसागरावर त्यांचे निर्विवाद आरमारी वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठीचे एक योजनाबद्ध धोरण होते हे महारजांच्या ध्यानी घेतलेले होते. म्हणून सन १६५७ मध्ये कल्याण आणि भिवंडी स्वराज्यात आल्या नंतर कल्याण-भिवंडीच्या समुद्रात आरमार स्थापनेचा निर्णय घेतला. गोव्यातील पोर्तुगीज महाराजांच्या लष्करी मोहिमा व हालचालींवर बारीक लक्ष ठेवून होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोकणातील हालचाली पोर्तुगीजांसाठी चिंतेचा विषय होत्या, विशेषतः शिवाजी महाराजांनी सुरू केलेली आरमार निर्मिती ही त्यांना धोकादायक वाटत होती. पोर्तुगीजांना भय वाटत होते की, जर शिवाजी महाराजांनी पश्चिम किनारपट्टीवर आपली आरमारी ताकद निर्माण केली, तर त्यांच्या सागरी सार्वभौमत्वाला गंभीर आव्हान निर्माण होवू शकते. परिणामी शिवाजी महाराजांच्या आरमारी महत्वाकांक्षेला आवर घालण्यासाठी पोर्तुगीजांनी मराठ्यांचा शत्रू असलेल्या जंजिरेकर सिद्दीला शस्त्रास्त्र, दारुगोळा आणि इतर युद्ध साहित्याचा पुरवठा सुरू केला. त्याचबरोबर सावंतवाडीकर सावंत, दक्षिण कोकणातील स्थानिक देसाई यांनाही मराठ्यांच्या विरोधात उभे राहण्यासाठी प्रवृत्त केले.

गोव्यातील हिंदू रयतेवर पोर्तुगीजांकडून होत असलेल्या धार्मिक छळाला पायबंद घालणे आणि पोर्तुगीजांनी मराठ्यांच्या विरुद्ध सावंत, देसाई यांच्या

माध्यमातून चालवलेल्या कारवायांना पायबंध घालण्यासाठी शिवाजी महाराजांनी १९ नोव्हेंबर १६६७ रोजी बारदेशवर स्वारी केली. बारदेशवर स्वारी नंतर पोर्तुगीजांनी नमते घेत शिवाजी महाराजांच्या बरोबर तह करण्याचा निर्णय घेत मैत्रीचा तह केला.[३] परंतु मैत्रीचा हा तह फार काळ टिकला नाही. दोन-तीन वर्षांतच दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या बंदरांवरील जहाजांवर हल्ले करून ताबा घेण्याच्या घटना सुरू केल्या. पोर्तुगीजांनी सिद्दीला आणि स्थानिक देसाईंना मदत आणि हुसकावण्याचे धोरण गुप्तपणे सुरू ठेवले. याशिवाय पोर्तुगीजांनी महाराजांकडे मागणी केली की त्यांच्या जहाजांना समुद्री व्यापार आणि वाहतुकीसाठी पोर्तुगीजांचे दस्तक घ्यावे लागतील, महाराजांनी या मागणीला तीव्र विरोध केला. सन १६७२ मध्ये मराठ्यांनी रामनगरचे कोळी राज्य जिंकले तेंव्हा पोर्तुगीजांकडे चौथची मागणी केली. जी चौथाई पूर्वी पोर्तुगीज रामनगरच्या कोळी राजाला देत असत. पोर्तुगीजांनी तत्त्वतः ही मागणी मान्य केली, पण चौथचे पैसे देण्याचे टाळत राहिले,[४] यासाठी वेगवेगळी कारणे सांगत असत. ही गोष्ट शिवाजी महाराजांच्यासाठी संतापजनक होती, त्यामुळे पोर्तुगीजांविषयी त्यांचा रोष अधिकच वाढला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठा अंमलाखालील सागरीमार्गांवरून होत असलेल्या व्यापारी जहाजांच्यावर विविध प्रकारचे कर लावल्याचे उल्लेख प्राप्त होतात मात्र कागदपत्रांच्या अभावी याची निश्चित माहिती उपलब्ध होत नाही. हे जरी खरे असले तरी आरमार स्थापनेमुळे स्वराज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठे प्रोत्साहन मिळाले आणि मराठ्यांची प्रमुख सागरीव्यापारी मार्गांवर सत्ता प्रस्थापित झाली. परिणामी स्थानिक व्यापाऱ्यांचे संरक्षण सुनिश्चित झाले आणि परकीय शक्तींच्याकडून होणारे शोषण थांबले. कारण महाराजांनी स्वकीय व्यापारी (साहुकार) आणि परकीय व्यापारी (साहुकार) यांच्यातील फरक स्पष्टपणे ओळखलेला होता, एवढेच नव्हे तर या परकीय व्यापाऱ्याच्यापासून सावध राहण्याचा इशाराही दिलेला दिसतो. परकीय व्यापाऱ्यांविषयीचे शिवाजी महाराजांचे धोरण अत्यंत सावधगिरीचे होते. परकीय व्यापाऱ्यांची नीतिमत्ता व स्वभाव वैशिष्ट्यांची महाराजांना नेमकी जाण होती. यासंबंधी आमात्य आपल्या आज्ञापत्रात अतिशया उद्बोधक माहिती देतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या परराष्ट्रीय धोरणाचे मर्म नमूद करताना आज्ञापत्रकार लिहितात, "सावकारामध्ये फिरंगी, इंग्रज, फरांसिस, डिंगमारादि टोपीकर हेही लोक सावकारी (व्यापार) करितात. परंतु ते वरकड सावकारा सारिखे नव्हेत, त्यांचे खावंदप्रत्यक प्रत्यक राज्यच करितात. त्यांचे हुकमाने त्यांचे होत्साते हे लोक या प्रांती सावकारीस येतात. राज्य करणारास स्थळलोभ नाही यैसे काय घडो पाहते? तथापि, टोपीकरांचा या प्रांते प्रदेश करावा, राज्य वाढवावे स्वमत प्रतिष्ठावे हा पूर्ण अभिमान.तदनुरूप स्थळोस्थळी कृतकार्यहि जाले आहेत. त्याहिवरी हट्टी जात हातास आले स्थळे मेलियाने सोडावयाचे नव्हेत. यांची आमदरफ्ती आले-गेले यैसीच असो दयावी. त्यांसी केवळ नेहमी जागा देऊ नये. जंजिरेया समीप या लोकांचे येणे-जाणे सहसा होऊ देऊ नये. कदाचित वखारीस जागा देणे जालेस तर खाडीचे शेजारी समुद्रातीरी न द्यावा तैसे ठाईजागा दिधलियावरी आपले मर्यादेने आहेत तोवर आहेत. नाही ते समयी आरमार दारूगोळा हेच त्यांचे बळ. आरमार पाठीशी घेऊन त्याचे बळ त्या बंदरी नूतन किल्लाच निर्माण करणार. तेव्हा तितके स्थळ राज्यातून गेलेल याकरिता जागा देणेच तरी खाडी लांब गाव दोन गाव राजपूरसारखी असेल तेथे फरांसियास जागा दिल्हा होता, त्या न्याये दोन-च्यार नामांकित शहरे असतील त्यांमध्ये जागा द्यावा. तेहि नीच जागा, शहराचे आहारी, शहराचा उपद्रव चूकऊन नेमून देऊन वखारा

घालवाव्या त्यासहि इमारतीचे घर बांधो देऊ नये. या प्रकारे राहिले तरी बरे, नाहीतरी याविनाही प्रयोजन नाही. आले गेले असोत त्यांचे वाटे आपण न वजावे. आपले वाटे त्यांणी न वजावे इतकेच पुरे."[५]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या परकीय व्यापाऱ्यांच्या संदर्भातील धोरणांचा चिकित्सक अभ्यास करताना काही मुद्दे विचारात घेणे आवश्यक ठरते; छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वकीय व्यापारी आणि परकीय व्यापारी यांच्यामधील भेद स्पष्टपणे अधोरेखित केलेला होता. स्वकीय व्यापारी स्थानिक अर्थव्यवस्थेचा भाग असल्यामुळे त्यांच्या व्यापाराने स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते यावर त्यांचा विश्वास होता. परंतु, परकीय व्यापाऱ्यांचा व्यापार केवळ आर्थिक नव्हे, तर राजकीय हेतूंनी प्रेरित असल्यामुळे तो दीर्घकालीन धोका निर्माण करू शकतो याची उमग त्यांना होती. महाराजांना परकीय व्यापाऱ्यांच्या विस्तारवादी नीतिमत्तेची जाणीव होती. या व्यापाऱ्यांचे मुख्य उद्दिष्ट व्यापाराच्या आडून प्रदेशांवर वर्चस्व प्रस्थापित करणे हे होते. युरोपीय व्यापाऱ्यांच्या राजकीय पाठींब्यावर प्रकाश टाकून त्यांच्या व्यापाराला केवळ आर्थिक न मानता सामरिक दृष्टिकोनातूनही पाहिलेले दिसते. परकीय व्यापाऱ्यांना अनिर्बंध व्यापार करण्यास मुभा दिल्यास त्याचे परिणाम काय होऊ शकतात, याची जाणीव महाराजांना असल्याने त्यांना मर्यादित स्वरूपात जागा देण्याचे, विशेषतः किनारपट्टीपासून लांब जागांवर मर्यादित करण्याचे धोरण स्वीकारले. यामुळे त्यांचे सामरिक वर्चस्व कमी राहील व भविष्यातील धोका टाळणे शक्य होईल. यासाठीच त्यांनी या परकीय व्यापाऱ्यांना अनावश्यक वाव देऊ नये, यावर भर दिलेला दिसतो. त्यांना विशिष्ट ठिकाणी व्यापारासाठी मुभा दिल्यासही, ती जागा शहरापासून दूर आणि सामरिकदृष्ट्या कमी महत्त्वाची असावी, असे धोरण असल्याचे असल्याचे आमात्य आवर्जून नमूद करतात. कारण, युरोपीय व्यापाऱ्यांची खरी शक्ती त्यांच्या आरमारात आहे. त्यांना किनारपट्टीजवळ जागा दिल्यास, ते आपले आरमारी बळ वापरून नवे किल्ले उभे करू शकतात. यामुळे, महाराजांनी त्यांच्या जागेच्या निवडीवर कठोर नियंत्रण ठेवल्याचे निर्देशीत केल्याचे दिसते. परकीय व्यापाऱ्यांना व्यापारासाठी येऊ द्यावे, परंतु त्यांना अनावश्यक स्वातंत्र्य देऊ नये. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेवर त्यांचा नियंत्रण टिकून राहील, तर परकीय हस्तक्षेप मर्यादित राहील. छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यापाराच्या नावाखाली होणाऱ्या परकीय हस्तक्षेपाचा धोका ओळखून राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक स्वायत्तता यासाठी कठोर धोरण आखल्याचे यातून स्पष्ट होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे परकीय व्यापाऱ्यांविषयीचे धोरण त्यावेळच्या राजकीय परिस्थितीच्या पुढचे आणि अत्यंत दूरदृष्टीचे होते हे निश्चित. त्यांनी परकीय व्यापाऱ्यांच्या नीतिमत्तेचा आणि संभाव्य धोऱ्यांचा अभ्यास करून योग्य ती पावले उचलली, ज्यामुळे त्यांच्या राज्याची सुरक्षितता आणि आर्थिक स्वायत्तता टिकून राहण्यास मदत झाली.[६]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यापार धोरणासंदर्भात आज्ञापत्राकर पुढे असे नमूद करतात की, "दर्यात कोळी साहुकारी तारांडी यांची अमदरफ्ती करावी. कोळी साहुकारांचे वाटेस जाऊं नये, त्यांस कोणाचे उपद्रव लागत असेल तरी तो परिहार करावा. गनीमाचे मुलुखाखेरीज विदेशीचें गैरकौली असे साहुकारांची तरांडी येत जातां असली, तरी ती परभारें जाऊं न द्यावी. नयेभयें हाताखाली घालून, त्यांचे दसोडीस हात न लावतां, दिलासा करून बंदरास घेऊन यावी. बहुत प्रकारें त्यांणी व मुलूखगिरीचें कारभारी यांणी जाऊन त्यांचे समाधान करावें. लांकडे, पाणी घेतील ते घेऊ द्यावे, नारळांची शाळी आदिकरून जो त्यांस पाहिजे जिन्नस असेल तो त्यांस विकत अनुकूल करून द्यावा. याविरहित आणखी खरेदी

प्रोक्त आत्मसंतोष करितील तो अल्पस्वल्प जकात घेऊन सुखरूप करूं द्यावा. थोर मनुष्य साहुकार कोणी असला तरी त्याचे योग्यतेनुरूप दिवाणचे तर्फेनें त्याची थोडीबहुत मेहमानी करावी. तो खर्च दिवाणांतून मजुरा घ्यावा, कोणी एका प्रकारें त्या परकी साहुकारास सौख्य दिसे, माया लागे, तें राज्य अमदरफ्ती करीत, असें करावें. गनीमीचे मुलुखांतील साहुकारी तरांडी दर्यात असलिया कस्त करून घ्यावीं, धरून बंदरांस आणावी. मालांत काडीइतकी तसनस न करितां तमाम माल जप्त करून महालचे कारकुनांनी व आरमारकरी यांणीं हुजूर लिहून पाठवावें; आज्ञा होईल तशी वर्तणूक, करावी."[७]

आज्ञापत्रातील वरील विधानाचे विश्लेषण करतांना, या विचारांच्या मागील तत्त्वज्ञान, धोरणात्मक हेतू आणि राज्यव्यवस्थेवर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास आवश्यक ठरतो. सर्वप्रथम, या विधानात उद्योग आणि व्यापारासंबंधीचा महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे, त्यात विशेषतः राज्याच्या आर्थिक धोरणांचा व्यापारी धोरणांवर होणारा परिणाम दाखवला आहे. कोशवृद्धी म्हणजेच स्वराज्याचा आर्थिक खजिना वाढवणे. व्यापाराच्या माध्यमातून कर वाढविणे हे कोशवृद्धीचे एक महत्त्वाचे साधन आहे. उद्योग आणि व्यापार हे राज्याच्या आर्थिक गतीचे महत्त्वपूर्ण घटक आहेत. उद्योग व व्यापार हे राज्याच्या आर्थिक स्थैर्याला चालना देतात, कारण व्यापारामुळे राज्याला महसूल मिळतो, आणि राज्याचा खजिना भरण्यास मदत करतो. उदीम आणि व्यापऱ्यांच्यावर करांचा प्रभाव असतो. व्यापाराचे उत्पन्न त्या क्षेत्रातील वाढीवर अवलंबून असते. त्यामुळे, जर व्यापार वाढला, तर कर वसुलीही वाढेल आणि राज्याच्या कोशात पैसा येईल. यातून एक महत्त्वाची बाब अधोरेखित होत की, व्यापाराची वाढ करणे, त्यासाठी योग्य धोरणे आखणे आणि कर प्रणालीत सुधारणा करणे आवश्यक वाटत होते. व्यापार वाढविण्यासाठी स्वराज्यात शांतता व सुव्यवस्था असणे आवश्यक आहे. यातून महाराजांच्या राजकीय व्यवस्थेचे महत्त्व स्पष्ट होते. राज्याची भूमिका व्यापारवृद्धीला प्रोत्साहन देणारी पाहिजे, कारण योग्य धोरण, कायदा आणि सुव्यवस्था व्यापाराच्या वाढीस मदत करतात. व्यापारवृद्धीसाठी राज्याने प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे. राज्यकर्त्यांनी व्यापाराच्या विकासासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. उदा. साहुकारांच्या (व्यापारी) व्यापारास प्रोत्साहन देणे, त्यांना सुरक्षिततेची हमी देणे आणि त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांना मदत करणे आवश्यक आहे. यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेतील व्यापाराचा प्रवाह सुरळीत राहतो. व्यापारास सुरक्षा व सुव्यवस्था आवश्यक आहे, कारण व्यापाऱ्यांचे सामाजिक प्रभाव असतात. लोकांच्या जीवनाच्या गतीसाठी आवश्यक वस्तू व सेवा पुरवठा करतांना, सावकार अथवा व्यापारी यांची महत्त्वाची भूमिका आहे. त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या कार्याला योग्य दिशा देणे हे राज्याच्या दृष्टीने लोकहितासाठी योग्य ठरते. 'मेहमानी' व 'समाधान' याबाबतचे विचार महत्त्वाचे आहेत. व्यापार्यांची 'मेहमानी' करणे, म्हणजे त्यांना योग्य आदर देणे, त्यांची मागणी ओळखणे आणि त्यांना मदत करणे, हे राज्याच्या धोरणाचे एक भाग आहे. याचा उद्देश व्यापाऱ्यांना सकारात्मक वातावरण देणे आहे, ज्यामुळे ते व्यापारात अधिक योगदान देतील. व्यापारी वर्ग आणि जनतेच्या दरम्यान संवाद, मदत आणि संसाधनांच्या पुरवठ्यात समतोल राखणे महत्त्वाचे आहे. यामुळे, व्यापाऱ्यांनी जनतेला त्रास देणे टाळा, हे सरकारचे लक्ष आहे. शत्रूच्या व्यापाऱ्यांसंबंधी एक भेदभाव असावा, याचा मुद्दा महत्त्वाचा आहे. शत्रूपक्षाकडून येणारे व्यापारी हे राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी एक धोका ठरू शकतात. पण, त्यांना योग्यप्रकारे वागणूक दिली जाऊन त्यांचे माल थेट बंदरावर आणून न्याय दिला पाहिजे, हा धोरणांचा भाग

दिसतो. यामध्ये एक प्रकारची सहकार्याची भूमिका दिसते, ज्या अंतर्गत शत्रूच्या व्यापाऱ्यांना योग्य न्याय मिळावा. सागरी व्यापार, विशेषत: राज्याच्या सीमावर्ती व्यापारासाठी, राज्याच्या आर्थिक स्त्रोतांची खूप महत्त्वपूर्ण भूमिका असते. यावर कर वसूल करणे, आयात आणि निर्यात मालावर नियंत्रण ठेवणे हे एक महत्त्वाचे धोरण आहे. हे धोरण राज्याच्या वस्तू आणि सेवांच्या प्रवाहाचे नियंत्रण आणि संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरते.

शिवाजी महाराजांच्या व्यापारी धोरणासंबंधी डॉ. अ. रा. कुलकर्णी असे म्हणतात की, "शिवाजी महाराजांनी काळाची पावले ओळखली होती, काळाच्या पुढे जाणारा तो एक द्रष्टा महापुरुष होता. म्हणूनच इंग्रजांनी या राजाचे वर्णन 'The greatest diplomat of eastern parts' असे केले आहे."[८] छत्रपती शिवाजी महाराजांना आरमाराच्या माध्यमातून कोकण किनारपट्टीचे संरक्षणाच्या माध्यमातून सुरक्षित व्यापारी केंद्राचा विकास अपेक्षित होता असे दिसते. कारण कोकण किनारपट्टी प्राचीन काळापासून आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू होती. जरी गुजरात किंवा मलबार किनाऱ्याच्या तुलनेत कोकण किनाऱ्यावर व्यापारी हालचाली तुलनेने कमी प्रमाणात होत असला, तरी त्याचे महत्त्व काही कमी नव्हते अथवा दुर्लक्षित करण्यासारखे तर अजिबातच नव्हते. कारण कोकण किनारा महाराष्ट्र आणि गुजरातच्या अंतर्गत भागाशी व्यापारी मार्गांद्वारे सहजपणे जोडलेला होता. येथील भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे येथील बंदरांना नैसर्गिक संरक्षण मिळालेले होते. या संदर्भात डॉ. रूबी मलोनी असे म्हणतात की, "कोकणच्या बंदरांची वैशिष्ट्ये अशी होती की ती थेट समुद्रकिनाऱ्यावर वसलेली नसून अंतर्गत खाड्यांमध्ये स्थित होती. ह्या खाड्या आणि नदीमुखे सागरी वादळे व समुद्री चाच्यांपासून नैसर्गिक संरक्षण पुरवत असत. सह्याद्रीच्या दाट जंगलांनी संरक्षित असलेल्या खोल खाड्यांतून मालवाहतूक करणे सहज शक्य होते. तसेच, या विविध बंदरांना अंतर्गत जलमार्गांनी परस्पर जोडणीची सुविधा होती."[९] यावरून आपणास छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराची चौकसता दिसून येते की त्यांनी आरमार निर्मितीला का प्राधान्य दिले.

पश्चिम किनारपट्टीवरील डाभोळ, राजापूर, कारवार, भटकल आणि वेंगुर्ला यांसारखी बंदरे मुंबई आणि कोचीन दरम्यान महत्त्वपूर्ण ठिकाणी वसलेली होती. युरोपियन लोकांच्या आगमनानंतर, अरब सागरात या बंदरांनी मोठ्या प्रमाणावर व्यापार प्रस्थापित केला होता. स्थानिक व्यापाऱ्यांनी युरोपियन लोकांबरोबर भागीदारीत व्यापार केल्याचे अनेक ऐतिहासिक संदर्भ उपलब्ध आहेत. उदा. राजापूर बंदरावर आलेल्या एका व्यापारी जहाजाचे मालक पारशी होते, तर त्या जहाजावरील माल पोर्तुगीज व्यापारी रेनार्डसन याचा होता. हे जहाज सुपारी व नारळाने भरलेले होते.[१०] या पश्चिम किनारपट्टीवरील बंदरांनी मसाले, वस्त्रे आणि इतर विविध प्रकारच्या मालाची निर्यात करून संपन्नता प्राप्त केली होती. त्यामुळे या किनाऱ्यावरील बंदरे नियंत्रित करणाऱ्या शासकांनी योग्य प्रशासन आणि नियमनाद्वारे या बंदरांमधून जास्तीत जास्त आर्थिक लाभ घेण्याचा प्रयत्न केला.

१६ व्या शतकातील निजामशाही आणि आदिलशाही शासकांमध्ये झालेल्या संघर्षांचे मुख्य कारण आर्थिक होते. कोकणावर नियंत्रण मिळवण्यासाठी पोर्तुगीजांचा सातत्यपूर्ण प्रयत्न आणि आदिलशाही, निजामशाही, मुघल या सत्तांचा निर्धारपूर्वक प्रतिकार यालाही आर्थिक हेतूच कारणीभूत होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी पश्चिम किनारपट्टी आणि तिच्या आर्थिक क्षमतांकडे दुर्लक्ष केले नाही, हे या संदर्भावरून स्पष्ट होते. स्वराज्य विस्तारासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ उभारण्याच्या उद्देशाने त्यांनी या किनारपट्टीवरील

संसाधनांचा वापर करण्याचा संकल्प केला. त्यांच्या महत्त्वाकांक्षेला मूर्त स्वरूप देण्यासाठी मराठा आरमाराची स्थापना निर्णायक ठरली, कारण यामुळे या प्रदेशातील व्यापार नियंत्रित करण्याची क्षमता मराठ्यांना प्राप्त झाली. अशा प्रकारे, पश्चिम किनारपट्टीवरील बंदरांनी प्राचीन काळापासूनच आर्थिक आणि व्यापारी क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

पश्चिम किनारपट्टी संदर्भात त्यांच्या धोरणाची दिशाही स्पष्ट होती. केवळ आदिलशाही अथवा मुघलांच्या प्रतिनिधींना पराभूत करून हद्दपार करणेच एवढेच नव्हे, तर अरब सागरातील व्यापार अडथळ्याशिवाय भरभराटीस यावा, अशी त्यांची इच्छा होती. राज्याच्या आर्थिक स्थैर्यासाठी साहुकारावराचे अर्थात व्यापाऱ्याचे महत्व कसे आहे, स्वकीय आणि परकीय सावकार यामध्ये काय फरक आहेहे शिवाजी महाराज स्पष्टपणे जाणून होते. आपले आर्थिक धोरण त्यानुसारच आखले होते, राज्याचे वैभव साहुकारावर (व्यापारी) अवलंबून असल्यामुळे त्यांच्या पुरस्काराचे धोरण महाराजांनी अवलंबलेले दिसते. महराजांच्या या धोरणा संबंधी आज्ञापत्रकार म्हणतात की, "साहुकार म्हणजे राज्याची व राज्यश्रीची शोभा. साहुकरांकरिता राज्य अबादान होते. न मिळे ते ते वस्तुजात राज्यात येते;राज्य श्रीमंत होते. पडिले संकटप्रसंगी पाहिजे ते कर्जवाम मिळते. तेणेकरून आपले संकटपरिहार होते. साहुकरांचे संरक्षणमध्ये बहुत फायदा आहे. याकरिता साहुकारांचा बहुमान चालवावा. कोण्हेविशी त्यावरी जलल (अत्याचार) अथवा त्याचा अपमान होवू न द्यावा. पेठपेठात दुकाने-बखारा घालोन (वखार) हत्ती, घोडे, नरमिना, जरबाब, पशमी आदीकरून वस्तजात व रत्ने आदिकरून अशेष वस्तुजात यांचा उदाम चालवावा. हुजुर बाजारामध्येही थोर थोर सावकार आणून ठेवावे. वर्षसंबंधे तसेच लग्नादी महोत्सवी त्यांचे त्यांचे योग्यतेनुरूप प्रतिष्ठेने बोलाऊन आणून वस्त्रपात देऊन समाधान करीत जावे. परमुलखी जे जे साहुकार असतील त्यांची समाधाने करून ते आणावे. त्यासी अनुकूल न पडे तर असतील तेथेच त्यांचे समाधानी रक्षून, आपली माया लाऊन त्यांचे मुतालिक आणून, त्यांस अनुकूल जागा, दुकाने देऊन ठेवावे. तैसेच दर्यावर्दी सावकार यासही बंदरोबंदरी कौल पाठऊन आमदरफ्ती करवावी"[११]

स्वराज्यात साहुकार अर्थात व्यापारी यांच्या योगाने स्वराज्यात साहुकार अडचणीच्या काळात पैसा उभा करण्यास या वर्गाचा उपयोग होत असे. लोकहिताच्या दृष्टीकोणातून व्यापारवृद्धी जेवढी महत्वाची होती तेवढीच स्वराज्याची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठी महत्वाचा होता. राजव्यवहारात व्यापारचे महत्व लक्षात घेवून शत्रू प्रदेशातील वरकड लोकस मिळणारी वागणूक व शत्रू प्रदेशातील व्यापारी या संबंधीच्या धोरणात फरक असावा असे आज्ञापत्रात म्हंटले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज युरोपियन व्यापारी अथवा व्यापारी कंपन्यांना व्यापारात सहभागी होण्यापासून रोखण्याचा विचार करत नव्हते, जोपर्यंत त्यांनी व्यापाराबाहेरील किंवा स्थानिक राजकीय प्रश्नांमध्ये अवांतर रस घेतला नाही. शिवाजी महाराजांनी युरोपियन लोकांना व्यापार आणि इतर व्यावसायिक उपक्रमांमध्ये सामावून घेण्याच्या इच्छेची साक्ष समकालीन फ्रेंच प्रवासी ॲबे कारे यांच्या वर्णनातून मिळते. ते लिहितो, "ज्या भागात शिवाजींचे नियंत्रण होते, त्या समुद्र भागात जाणाऱ्या कोणत्याही युरोपियन जहाजाला तिथल्या राज्यपालांकडून स्वागत म्हणून भोजनसामग्री आणि इतर मदतीची व्यवस्था केली जात असे. १६६८ मध्ये मी कंपनीच्या दोन जहाजांसह त्या भागातून गेलो होतो, तेव्हा आम्हाला अपेक्षेपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे वागणूक देण्यात आली. हे त्यांच्या धोरणाचा भाग होते, पण त्यांना युरोपियन लोकांविषयी

असलेल्या जिव्हाळ्यामुळेही होते."[१२] युरोपियन व्यापाऱ्यांना दिल्या गेलेल्या या आदरातिथ्यामुळे, व्यापाराला चालना देऊन स्वराज्य प्रगत करायचे या छत्रपती शिवाजी महाराजांच्या इच्छेची पुष्टी होते.

जागतिक व्यापारातील पोर्तुगीज या मिठाच्या व्यापारात मक्तेदारी असणाऱ्या मंडळींनी एकदा असा प्रयोग करून पाहीला. बारदेश, साष्टी, गोवा येथे मिठाची बंदरे होती. पैकी बारदेशचे मीठ तर एक नंबरचे मीठ. महाराजांनी स्वराज्यात मीठाच्या धंद्याला उभारी द्यायचा प्रयत्न केला. जेणेकरून घाटावरील आणि कोकणातील सर्व व्यापारी कोकणापासून लांब पडले तरी स्वस्त मीठ मिळते म्हणून बारदेशातून मीठ आयात करतील. अर्थात झाले तसेच यामुळे स्वराज्याची जकातीचा महसूलही बुडाला आणि मीठाचा व्यापारही झळ सोसू लागला. तेव्हा महाराजांनी लगेचच स्वदेशी व्यापाराला प्रोत्साहन आणि विदेश व्यापार नियंत्रणात धोरण स्वीकारले. ६ डिसेंबर १६७१ रोजी कुडाळच्या सर सुभेदार नरहरी आनंदराऊ यास मीठावरील करासंबंधी जे पत्र लिहिले आहे त्यावरून मीठाच्या धंद्याला प्रोत्साहन कसे देता येईल यासंबंधीचे त्यांचे विचार म्हणजे अप्रत्यक्षरीत्या संरक्षण धोरणच होते. प्रभावळीपासून कल्याण-भिवंडी पर्यंत मीठावरील जकातीचे दर कसे असावेत या संबंधीची आज्ञा केलेली दिसते. "....प्रभावळीपासून तहद कल्याण-भिवंडी पावेतोमीठाचा जबर निरखाचा तह दिल्हा आहे. ऐसियासी बारदेशात मीठ बंदरे आहेत, तेथून मीठ खरीद करून उदमी नेत आहेत, ऐसियासी हाली आपणाकडे मिठाचा पाड जबर झाला. हे गोष्टी ऐकोन उदमी खळक कूळ बारदेशाकडे जातील. तरी तुम्ही घाटी जकाती जबर बैसवणे. बारदेशात मीठ विकते, त्याचा हिशेबें प्रभावळीकडे संगमेश्वराकडे मीठ विकते. त्याणे कितेक जबर पडते. ते मनास आणून त्या अजमासे जकाती जबर बैसवणे की, संगमेश्वरी विकते आणि घाट पावेतों जे बेरीज पडेल ते हिशेबे बारदेशीच्या मिठास जकाती घेवणे. संगमेश्वराहून बारदेशचे मीठ महागच पडे ऐसा जकातीचा तह देणे. जरी जबर जकातीचा तह नेदा मुलाहिजा कराल, म्हणजे कुल उदमी बारदेशकडे वोहडेल. आपली कुल बंदरे पडतील, ऐसी गोष्टी आहे. तरी रोखा तेच घटिकेस कुल घाटी जकाती जबर करणे. संगमेश्वराहून बारदेशीच्या मिठास जबर निरखपडे, ती गोष्ट करणे. ये गोष्टीचा एका जरा उजूर न करणे. ये गोष्टीत साहेबांचा बहुत फायदा आहे. जरी जबर किंमती केली आहे. त्या हिशेबे बारदेशीच्या मिठास जबरच पडे, ती गोष्ट करणे व तुम्हाकडे लहान मीठ आहे. त्याचा तह आहे. त्याखेरीज हाली जाजती दर मणे टंकसाळी रूके टक्के बारा रास प्रमाणे तह देणे. मुलाहिजा न करणे. मिठाचा मामला हजराह बिदल कर्द लाख रूपये यावयाचा मामला आहे. तरी लिहिण्याप्रमाणे अमल करणे."[१३] शिवाजी महाराजांनी आपल्या या धोरणाचा मीठाच्या व्यापारावर काय परिणाम होईल याचा अंदाज केलेला होता. संगमेश्वराला जर मीठ स्वस्त मिळू लागले तर बारदेशाहून मीठ आणण्याच्या खटाटोपात देशावरील व्यापारी पडणार नाहीत. त्याच किंवा त्याहून कमी भावात त्यांना मीठ मिळाले तर त्यांचा वाहतुकीचा खर्च आणि त्रास वाचला असता. तेव्हा आपल्या मालाचा उठाव होण्याकरिता परक्या मालावर जबर जकात बसविणे भाग होते. त्याप्रमाणे त्यांनी ती बसविली आणि या जकातीच्या कराराची कसोशीने अंमलबजावणी आपल्या संबंधीत अधिकाऱ्यांनी करावी असे त्यांना बजावले. एखाद्या धंद्याला संरक्षण द्यावयाचे, परकी मालाच्या स्पर्धेपासून त्याचा बचाव करावयाचा म्हणजे प्रथम परकीय मालावर जबर जकात बसवावा लागततो. अशी जबर जकात बसविली म्हणजे साहजिकच या मालाच्या आयातीचा ओघ कमी होतो व देशी पेठांतील मालाची मागणी वाढते. वाढत्या मागणीमुळे उत्पादन वाढते व देशी धंद्याची भरभराट होते. जबर जकातीला न जुमानता

काही माल आलाच तर सरकारचे जकातीचे उत्पन्न वाढते आणि सरकारचा फायदाच होतो.

शिवाजी महाराजांची आपल्या प्रजेच्या बद्दलची कळकळ या धोरणातून दिसून येते, कारण कोकण हा मराठी राज्याचा कणा होता. मीठ तयार करणे हा कोकणातील एक प्रमुख उद्योगधंदा होता. ठाणे, कुलाबा, रत्नागिरी या जिल्ह्यात पुष्कळ मिठागरे होती. पेण, पनवेल, नागोठणे, रेवदंडा, ठाणे सतराव्या शतकातील महत्त्वाची मिठागरे होती. शेतीव्यवसाय हा जीवनाचा नित्याचा व्यवसाय असला तरी तो सांभाळून मीठ तयार करण्याचा उद्योग करता येत असे. या मिठागरात तयार होणारे मीठ प्रामुख्याने देशावर विकले जात असे. मिठाच्या वाहतुकीसाठी खास गलबतांचा तांडा शिवाजी महाराजांनी निर्माण केला होता. मीठाचा धंदा हा कोकणातील महत्त्वाचा धंदा असला तरी परकीय मालापासून या धंद्याला फार मोठा धोका निर्माण झाला होता. मराठी राज्याच्या हद्दीला लागून पोर्तुगीजांची सरहद्द होती. गोव्याकडे मीठ तयार करणे, विकणे हा उद्योग मोठा होता. विशेषत: बारदेस भागात उत्तम मीठाची निर्मिती होत होती. आणि या ठिकाणी होणाऱ्या मीठाचा भाव मराठी मुलखातील मीठापेक्षा स्वस्त होता. तेव्हा साहजिकच देशावरील व्यापारी मीठ खरेदीसाठी स्वराज्याचा मुलूख ओलांडून बारदेसात जात व तेथून मीठ देशावर आणून विकीत असत. वाहतुकीचा इतका त्रास आणि खर्च सोसून हे व्यापारी बारदेसात जात असत त्याअर्थी निश्चितच तेथील मीठ स्वस्त असणार. कदाचित् त्या मीठाची प्रतही उत्तम असण्याची शक्यता आहे. 'पिकते तेथे विकत नाही' या न्यायाने कोकण पट्टीत तयार होणारे मीठ कोकणातच किती खपणार! देशावरची ही मोठी बाजारपेठ परक्याने काबीज केल्याने आणि त्यांच्याशी भावाच्या बाबतीत स्पर्धा करणे जमत नसल्याने स्वराज्यातील बरीच मिठागरे ओस पडली. मीठाचा धंदा बसला. मीठावर सरकारी जकात होती. मीठाचा धंदाच बसल्याने जकातीचे उत्पन्न कमी झाले, आणि सरकारचे नकसान होऊ लागलेले होते.

सागरी व किनारी जलवाहतुकीत मोठ्या प्रमाणावर जोखीम ती चाच्यांची. केवळ शत्रूराष्ट्रांच्या जहाजांचा धोका नाही तर विविध देशातील चाच्यांचा आणि घुसखोरांचा त्रासही तितकाच गंभीर होता. समकालीन पोर्तुगीज, इंग्रज आणि डच नोंदींमध्ये अशा घुसखोरांचे अनेक उल्लेख सापडतात. त्यामुळे व्यापारिक जहाजांना किमान संरक्षण पुरवण्यासाठी सशस्त्र बोटी किंवा आरमाराची आवश्यकता होती. स्वराज्यातील व्यापाऱ्यांना आणि व्यापारी हालचालींना आकर्षित करण्यासाठी पश्चिम किनारपट्टी पूर्णपणे सुरक्षित करणे गरजेचे होते. व्यापार नियंत्रित करून राज्य यंत्रणेच्या अधीन आणल्यास महसूलही वाढू शकला असता. रामचंद्रपंत अमात्यांच्या आज्ञापत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे: "बंदरं सुरक्षित असावीत; अन्यथा गरजेच्या वेळी उपयुक्त वस्तू परदेशातून आणता येणार नाहीत. असे झाल्यास राज्याचा सन्मान टिकणार नाही. सीमा शुल्क आणि इतर उत्पन्नाचा हक्क गमावला जाईल... व्यापार वाढवावा. व्यापारामुळे सीमा शुल्कातून मिळणारे उत्पन्न वाढेल."[१४] आमात्यांचे वरील विधानाचा विचार केल्यास असे दिसते की शिवाजी महाराजांनी आपल्या आरमार स्थापनेच्या माध्यमातून केवळ व्यापार विस्तारावरच लक्ष केंद्रित केले नव्हते, तर महसूल गमावण्याच्या संभाव्य धोक्याबाबतही ते सावध होते. त्यामुळे केवळ मोठ्या व्यापाऱ्यांना किंवा परदेशी व्यापाऱ्यांनाच नव्हे तर स्थानिक व्यापाऱ्यांना आणि कोळी समुदायाला (मच्छीमार) योग्य सुविधा आणि संरक्षण पुरवले जात होते.[१५]

मराठा स्वराज्याच्या भूप्रदेशाच्या आणि शेतीच्या उत्पादकतेच्या स्वरूपामुळे राज्यकर्त्यांनी महसूल मिळवण्यासाठी पर्यायी साधनांकडे पाहणे नैसर्गिक होते. शिवाजी महाराजांच्या प्रशासनाने बंदरांमधून गोळा केलेल्या

करांबाबत निश्चित माहिती उपलब्ध होत नसला तरी, दक्षिण दख्खनच्या किनारपट्टीवर सत्ताधीशांनी विविध प्रकारचे सीमा शुल्क किंवा बंदर कर गोळा केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. समकालीन कागदपत्रांच्या अभावामुळे शिवाजी महाराजांच्या कालखंडातील सीमा शुल्कांच्या दरांचे किंवा बंदर करांचे स्वरूप निश्चित करता येत नाही. परंतु असे दिसते की शिवाजी महाराजांनी परदेशी वस्तूंवर उच्च कर लावला होता. स्थानिक व्यापार आणि उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी. स्थानिक व्यापाऱ्यांना आणि उत्पादकांना त्यांच्या बंदरांमधून व्यापार करण्यासाठी कमी दर उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस असावा.[१६]

आर्थिक उद्देशांसाठी जहाजांचा आणखी एक संभाव्य उपयोग म्हणजे व्यापाऱ्यांना मालवाहतुकीसाठी जहाजातील जागा भाड्याने देणे आणि त्यातून पैसा कमावणे. १६ व्या आणि १७ व्या शतकात जहाजमालकांकडून स्थानिक किंवा ठराविक ठिकाणासाठी व्यापारी मालवाहतुकीसाठी जागा भाड्याने देणे एक सामान्य प्रथा होती. खरं तर, भारतीय समुद्रात युरोपीय व्यापारी आणि स्थानिक व्यापारी/जहाजमालक यांच्यात अंतर्गत मालवाहतूक जागेसाठी स्पर्धा होत असे. अशिन दास गुप्ता यांनी नमूद केले आहे की, युरोपीय जहाजांची भाड्याची दर भारतीय जहाजांच्या तुलनेत जास्त होते, तरीही भारतीय व्यापारी त्यांना प्राधान्य देत कारण युरोपीय जहाजांच्या दर्जेदार बांधणीमुळे आणि समुद्री चाच्यांपासून संरक्षणाच्या उत्कृष्ट व्यवस्थेमुळे व्यापाऱ्यांना सुरक्षितता मिळत असे.[१७] या परिस्थितीचा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यानेही फायदा घेत काही जहाजे फक्त या उद्देशासाठी नियुक्त केली असावीत. आज्ञापत्रात रामचंद्रपंत अमात्य यांनी स्पष्ट शब्दांत चेतावणी दिली आहे की, जहाजाच्या व्यवस्थेचा खर्च बंदरांवरील उत्पन्नावर आणि व्यापाऱ्यांकडून वसूल केलेल्या महसूलावर अवलंबून राहिल्यास त्याचे परिणाम विनाशकारी ठरू शकतात.[१८] याशिवाय, जलवाहतुकीसाठी मजबूत बोटींचा ताफा असणे आवश्यक होते, ज्याद्वारे किनाऱ्यावर वाहून आलेल्या वस्तू गोळा करता येत होत्या. नियमानुसार आणि परंपरेनुसार, या वस्तू किनाऱ्यावरील राज्यकर्त्यांच्या मालकीच्या मानल्या जात होत्या. शेवटी, शिवाजी महाराजांनी आरमार बांधण्यामागे मुख्य उद्देश आर्थिक नव्हता, तर त्यांचा दृढ निश्चय आणि लढ्याचा धोरणात्मक दृष्टिकोन होता. त्यांची दीर्घकालीन स्वप्ने मराठ्यांच्या भूमीसाठी एक स्वतंत्र स्थान निर्माण करणे आणि स्वराज्य उभारणे अथवा साकारण्यासाठी त्यांनी हा महत्त्वपूर्ण पाऊल उचलले.

छत्रपती शिवाजी महाराज अथवा त्यांच्या समकालीनांमध्ये कोणत्याही राज्यकर्त्यास हे कधीच लक्षात आले नाही की याच व्यापारी परकीय सत्तांच्यापैकी एखादी संपूर्ण भारतावर आपली हुकूमत स्थापन करेल. परकीय व्यापार आणि वाणिज्याचे संभाव्य फायदे अतिशय आकर्षक होते, त्यामुळे ना व्यक्तींनी ना राज्याने त्याकडे दुर्लक्ष केले असावे. खरं तर, परकीय व्यापारातून मोठा लाभ मिळवण्याच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या उत्सुकतेची नोंद समकालीन युरोपीय निरीक्षकांनीही केली आहे. १६६२ सालच्या इंग्रज फॅक्टरीच्या नोंदीत असे नमूद केले आहे: "आम्हाला कळले आहे की (राजापूरपासून सुमारे दोन मैल नदीच्या आत जाईतापूर बंदरात), शिवाजी दोन मोठ्या जहाजांची तयारी करत होते... ती मोचाकडे पाठवण्याचा त्यांचा इरादा होता."[१९] स्थानिक मीठ आणि तांदळाच्या व्यापारातील सहभाग मोठ्या प्रमाणावर असावा, कारण ही सर्वांत महत्त्वाची उत्पादने होती. उरण, करंजा, पेन, पनवेल येथे मीठ उत्पादन आणि व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असे.[२०] तसेच, बसरूरचा तांदळाचा व्यापारही महत्त्वाचा होता.[२१] स्वराज्याचे आरमार शत्रूंच्या रसद पुरवठा तोडण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत होते. हे धोरण विशेषत: पोर्तुगीज

आणि सिद्दी, मुघल यांच्याविरुद्ध अत्यंत प्रभावी होते, जे आपल्या सैन्य आणि रसद पुरवठ्यांच्या वाहतुकीसाठी समुद्रमार्गांवर अवलंबून होते. या रसद पुरवठयाच्या मार्गाचे जे जाळे होते त्यावर नियंत्रण करण्यात केले. मराठ्यांविरुद्धत्यांच्या मोहिमांना अत्यंत प्रभावीपणे अडथळा आणला.

छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमारी धोरण यूरोपीय सागर शक्तींनी पश्चिम किनाऱ्यावर प्रस्थापित केलेल्या वर्चस्वाला प्रभावीपणे प्रतिकार करत होते. त्यांच्या वाढत्या प्रभावाचा आणि स्वराज्याला होणाऱ्या धोका ओळखून, शिवाजी महाराजांनी त्यांचे आरमारी सामर्थ्य आव्हान देण्याइतपत सक्षम बनवले. डच आणि ब्रिटिश देखील भारतात त्यांच्या वसाहती व व्यापारी वर्चस्व वाढविण्याचा प्रयत्न करत होते. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अरब सागरावर मराठा वर्चस्व प्रस्थापित करण्याचा निर्धार आणि त्यांच्या किनारपट्टीच्या प्रदेशांचे सार्वभौमत्व रक्षण करण्याची दृढ इच्छाशक्ती दिसून आली. त्याच्या प्रयत्नांनी कोकण किनारपट्टीवरील व्यापाराची सुरक्षा सुनिश्चित केली. आत्मनिर्भर व स्वतंत्र स्वराज्याच्या दृष्टिकोनाला बळकटी दिली, जे परकीय शक्तींच्या शोषणापासून मुक्त होते.

समारोप:

छत्रपती शिवाजी महाराजांची आरमारी संकल्पना ही केवळ तत्कालीन लष्करी गरज नव्हती, तर ती एका स्वतंत्र, सार्वभौम आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम राष्ट्राच्या निर्मितीचा पाया होती. 'ज्यापाशी आरमार, त्याचा समुद्र' हे सूत्र मांडून त्यांनी मध्ययुगीन भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच सागरी सीमांच्या सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित केले. महाराजांनी उभे केलेले हे आरमार केवळ जहाजांचा ताफा नसून, तो पोर्तुगीज, इंग्रज, डच आणि जंजिऱ्याचा सिद्दी यांसारख्या बलाढ्य सत्तांच्या वर्चस्वाला दिलेले एक प्रबळ आव्हान होते. या आरमारी शक्तीमुळेच मराठा स्वराज्याला अरब सागरावर आपले सार्वभौमत्व प्रस्थापित करता आले. केवळ संरक्षणात्मक पवित्रा न घेता, शत्रूच्या रसद पुरवठा मार्गांवर घाला घालण्याची आणि समुद्री युद्धात आक्रमक चढाई करण्याची क्षमता निर्माण करून त्यांनी गनिमी काव्याचा वापर समुद्रातही तितक्याच प्रभावीपणे केला. यामुळे परकीय सत्तांना मराठ्यांच्या परवानगीशिवाय समुद्रमार्गे हस्तक्षेप करणे कठीण झाले.

सागरी संरक्षणासोबतच महाराजांनी आर्थिक स्वावलंबनाचा जो विचार मांडला, तो अतिशय क्रांतिकारक होता. त्यांनी ओळखले होते की, जोपर्यंत समुद्र सुरक्षित नाही, तोपर्यंत देशांतर्गत व्यापार समृद्ध होऊ शकत नाही. सागरी चाच्यांचा बंदोबस्त करून आणि वसाहतवादी शक्तींच्या शोषणातून भारतीय व्यापाऱ्यांची मुक्तता करून त्यांनी स्वदेशी व्यापाराला नवसंजीवनी दिली. यातून केवळ सुरक्षाच लाभली नाही, तर भारतीय व्यापाऱ्यांमध्ये स्वराज्याबद्दल एक विश्वासाचे नाते निर्माण झाले. परकीय जहाजांवर जकात आणि महसूल आकारून त्यांनी स्वराज्याच्या तिजोरीत मोलाची भर घातली, ज्यामुळे आरमाराचा खर्च हा आरमारानेच कमावलेल्या उत्पन्नातून भागवला जाऊ लागला. त्यांनी उभारलेले जलदुर्ग, जसे की सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि खांदेरी, हे केवळ संरक्षणाचे बुरुज नव्हते, तर ते मराठा आरमारी सत्तेचे आणि तांत्रिक प्रगतीचे जिवंत साक्षीदार होते.

थोडक्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमारी धोरण हे लष्करी सामर्थ्य, राजकीय मुत्सद्देगिरी आणि प्रगल्भ अर्थकारण यांचा एक अद्भुत संगम होते. त्यांनी केवळ किनारपट्टीचे रक्षण केले नाही, तर भारताला एका 'सागरी राष्ट्र' म्हणून ओळख मिळवून देण्याचा पाया रचला. स्थानिक मनुष्यबळाचा वापर, स्वदेशी तंत्रज्ञानाला दिलेले

प्रोत्साहन आणि भविष्यवेधी सामरिक दृष्टी यामुळेच हे आरमार स्वराज्याच्या अस्तित्वाचा आणि स्वाभिमानाचा अविभाज्य भाग ठरले. आधुनिक भारतीय नौदलाची बीजे या समर्थ आरमारी संकल्पनेतच रोवली गेली आहेत, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

तळटीपा:

१. कुलकर्णी, श्री. रं., शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९४,पृ. ९२

२. पंत अमात्य बावडा दप्तर (खंड १), सबनीस, के. जी., (संपा), कोल्हापूर, १९३७, पृष्ठ ४८

३. देसाई, स. शं., पोर्तुगीज दफ्तर, खंड ३, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९७४, पृ. १५-१६

४. कित्ता

५. कुलकर्णी, श्री, रं., उपरोक्त, पृ. २११

६. कित्ता

७. खोले, विलास (संपा) आज्ञापत्र, लोकवाडमय गृह, मुंबई, १९९३, पृ. ८६

८. कुलकर्णी, अ. रा., शिवाजी महाराज्यांच्या 'म-हा ष्ट्र' राज्याची अर्थांनीती,पवार, जयसिंगराव, (संपा.) छत्रपती शिवाजीमहाराज स्मृतिग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, २०११, पृ. ९५

९. रुबी मालोणी, युरोपियन एन्क्लेव्हज इन द कोकण, गायकवाड डी. एस. (संपा), सम अस्पेक्ट्स ऑफ मेडिव्हल इंडिया, मुंबई, २००६, पृ. १३४.

१०. सुरेंद्र गोपाल, कॉमर्स अँड क्राफ्ट्स इन गुजरात, १६ अँड १७ सेंच्युरीज: अ स्टडी इन द इम्पॅक्ट ऑफ युरोपियन एक्सपान्शन ऑन प्रीकॅपिटलिस्ट इकॉनॉमी, पृ. १७३

११. कुलकर्णी, श्री. रं., शिकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९४, पृ. २१०

१२. सेन, सुरेंद्र नाथ, फॉरेन बायोग्राफीज ऑन शिवाजी, के. पी. बागची अँड कंपनी, कलकत्ता, (सुधारित आवृत्ती) १९७७, पृ. १५५

१३. जाधव, नामदेवराव., शिवाजी महाराजांचे अर्थशास्त्र, राजमाता प्रकाशन, मुंबई, पृ. ८९-९०

१४. कुलकर्णी, श्री, रं., उपरोक्त,

१५. कुलकर्णी, श्री, रं., उपरोक्त,

१६. कुलकर्णी, ए. आर., महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी, पृ. २३३

१७. दास गुप्ता, असीन., द अर्ली १७थ सेंच्युरी क्रायसिस इन द वेस्टर्न इंडियन ओशन अँड द राइज ऑफ गुजराती शिपिंग इन अर्ली १८ सेंच्युरी, अरुणालचम बी. (संपा), एसेज इन मॅरिटाईम स्टडीज, पृ. ५५-६०

१८. कुलकर्णी, श्री, रं., उपरोक्त,

१९. परांजपे, बी. जी., आणि काळे डी. व्ही., इंग्लिश रेकॉर्ड्स ऑन शिवाजी (१६५९-१६८२), शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३१. *खंड १, पत्र क्र. ५२, १०६*

२०. *कुलकर्णी, ए. आर., उपरोक्त, पृ. २३३*

२१. परांजपे, बी. जी., आणि काळे डी. व्ही., उपरोक्त, *खंड १, पत्र क्र. १८९*

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणातील अंतर्गत विरोधक

प्रा. डॉ. राजेंद्र भिमाजी सातपुते

इतिहास, विभाग प्रमुख

कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा

Corresponding Author - प्रा. डॉ. राजेंद्र भिमाजी सातपुते

DOI - 10.5281/zenodo.19704302

प्रस्तावना:

पानिपतच्या तिसऱ्या युद्धाने भारताच्या इतिहासाला कलाटणी मिळाली. नानासाहेबांच्या मृत्यूनंतर माधवरावांस दि. २० जुलै १७६१ रोजी पेशवाईची वस्त्रे प्राप्त झाली, त्यावेळी मराठी राज्याची स्थिती अत्यंत वाईट होती. राज्यात अस्थिरता व गोंधळ निर्माण झालेला होता. मराठयांचा राजकीय वर्चस्व संपुष्टात आले होते. मराठी राज्याची जिवीत व आर्थिक हानी झाल्याने तिजोरी रिकामी होती. राज्यावर दीड करोड रूपयांचे कर्ज होते. कर्तबगार मराठी सरदारांची एक पिढी गारद झाली होती. उत्तर भारतात जाट, रोहिले, बुंदेले यांनी डोके वर काढले होते तर दक्षिण भारतात हैदरअलीचा व निजामाचा उदय झाला होता. पेशव्यांच्या घरामध्ये रघुनाथरावाने गृहकलह सुरू केला होता. रघुनाथरावाला पेशवे पदाची तर जानोजी भोसल्यांना सातारच्या छत्रपती पदाची हाव सुटली होती. परिणामी रघुनाथरावाला पेशवेपद मिळवून देण्यासाठी निजाम, हैदरअली, जानोजी भोसले सहकार्य करीत होते. पेशव्यांचे अनेक अंतर्गत विरोधक होते. अशा बिकट परिस्थितीमध्ये माधवरावास मराठी राज्याची जबाबदारी मिळाली होती. यावेळी या तरूण पेशव्यांचे वय फक्त सोळा वर्षाचे होते. माधवरावास असंख्य अडचणी होत्या. त्यावर मात करून पेशव्यांनी आपले दक्षिण धोरण आखले होते.

संशोधनाचे उद्देश:

१) माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणातील अंतर्गत विरोधकांची समस्या जाणून घेणे.

२) अंतर्गत विरोधकांची समस्या सोडविण्यासाठी त्यांना कोणत्या मराठा सरदारांनी मदत केली याचा शोध घेणे.

३) पेशव्यांनी अंतर्गत विरोधकांची समस्या कशी सोडवली इत्यादी उद्देश जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधामध्ये करण्यात आलेला आहे.

संशोधन पद्धती:

ऐतिहासिक साधन शोध पद्धतीचा वापर करून प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांच्या आधारे शोध निबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे.

१. रघुनाथरावाचा गृहकलह आणि जानोजी भोसल्यांचा बंदोबस्त व तह:

नागपूरच्या जानोजी भोसल्यांनी सुरूवातीपासून माधवराव पेशव्यांना विरोध करण्याचे धोरण स्वीकारले होते.सातारच्या छत्रपतीची गादी बळकावून पेशव्यांच्या घरामध्ये संघर्ष उत्पन्न करण्याचे राजकारण जानोजीने निजामाशी सख्य जोडून सुरू केले. पेशव्यांचा द्वेष ते करीत होते व त्यांनी इ.स.१७६२ मध्ये पुणे जाळण्यास निजामास

सक्रीय मदत केली होती. त्यावेळी माधवराव पेशव्यांनी वऱ्हाडातील काही प्रदेशाची लालूच दाखवून त्यास निजामापासून फोडून आपल्या पक्षात आणले होते. हैदरअलीवरील दुसऱ्या स्वारीत माधवराव पेशव्यांनी जानोजीला कर्नाटकात बोलावले असता त्याने सबबीने भरलेली पत्रे लिहून कालहरण केले. याचे कारण जानोजी हा पेशव्यांचा मनातून द्वेष करीत होता हे होय तसेच तो पेशव्यांविरूद्ध लढण्यास हैदरअलीस फूस देत होता.[१] जून १७६५ मध्ये कर्नाटकातून कारभार उरकून माधवराव पेशवे पुण्यास आले त्यावेळी त्यास जानोजीच्या कारस्थानाची नानाविविध हकीकत समजली. जानोजीने पेशव्यांचे शत्रू म्हणजे हैदर, निजाम, रघुनाथराव यांच्याशी संधान साधून माधवराव पेशव्यांना शह देण्याचा प्रयत्न सुरू केला होता व पेशव्यांशी शत्रुत्वाच्या भावनेने वागण्यास सुरूवात केली होती. त्यामुळे माधवराव पेशव्यांपुढे नवीनच समस्या निर्माण झाल्या होत्या.[२]

त्यातील एक महत्त्वाची समस्या म्हणजे रघुनाथरावाचा माधवराव पेशव्यांशी निर्माण झालेला गृहकलह होय. दुसऱ्या कर्नाटकच्या मोहिमेत माधवराव पेशव्यांने रघुनाथरावाला कर्नाटकमध्ये बोलावून घेतले होते व त्यांच्यावर मोहिमेची जबाबदारी सोपवून हैदरअलीबरोबर अनंतपूरचा तह घडवून आणला. इ.स.१७६५ मध्ये पुण्यास परत आल्यावर भाऊबंदकी रघुनाथरावाने सुरू केली आणि राज्याच्या विभाजनाचा प्रस्ताव मांडला.[३] माधवरावांनी उत्तर केले की, राज्य कोणाचे आम्ही वाटणार कोण, आमच्याने वाटवत नाही. सर्व राज्य तुमचेच आहे.[४] गृहकलहाच्या संदर्भात माधवराव पेशव्यांनी रघुनाथरावाच्या विश्वासातील एका खास माणसाला चिंतो विठ्ठल रायरीकरास १७ जून १७६५ रोजी लिहलेले पत्र फार खुबीदार आहे. त्यानुसार, 'दौलतीची विभागणी झाल्याने ही चालणार नाही व दोन्ही जागा दौलतीच्या वाटे झाल्याने लौकिक ही वाईट,यास्तव सर्व वडिलांनीच करावे. आम्ही स्वस्थ भलते जागा राहू. आपापसात भांडून दौलत बुडविली हा लौकिक कशास पाहिजे? सर्व त्यांनीच करावे हे फार झाले हेच प्रस्तुत काळी बरे'[५] या पत्रावरून माधवराव पेशव्यांना मराठी राज्याची किती काळजी होती व वेळप्रसंगी त्यांनी रघुनाथरावापुढे नमती भूमिका घेतल्याचे दिसून येते. तसेच रघुनाथरावाच्या हस्तकाकरवी त्याला ही माघार घेण्यास भाग पाडले म्हणून माधवराव पेशव्यांनी रघुनाथरावास उत्तरेच्या मोहिमेवर शिंदे व होळकरांच्या मदतीस पाठवून या गृहकलहाची समस्या मिटवल्याचे दिसून येते.

दुसरी महत्त्वाची समस्या म्हणजे नागपूरच्या जानोजी भोसल्याची होय. त्याने आपला वकील बाबूराव रायाजी यास पुण्यास पाठवून महिपतराव चिटणीसामार्फत शिंदे, होळकरांना पेशव्यांविरूद्ध कागाळया करणे, जयपूरच्या माधोसिंहास आपल्या बाजूला वळविणे यासारखी कारस्थाने रचित होता. त्यामुळे पेशव्यांना जानोजीचे पारिपत्य करण्याची योजना ठरवावी लागली.[६] माधवराव पेशव्यांनी ६ जून १७६५ रोजी सर्व गोष्टीचा निकाल लावण्यासाठी त्याच्या वकिलामार्फत जानोजीस निरोप पाठविला की, 'हजार पाचशेनिशी जानोजीने पुण्यास येऊन आम्हास भेटावे, पुढे मसलत करणे ते त्याचे विचारे करू. आपले येणे होत नसेल तर पेशवे फौजेसह वऱ्हाडात चालून येतील. तुमच्याने हजार राऊतानिशी यावयाचे असेल तर यावे नाही तर आपले खबरदारीत राहावे आणि तमाम किल्ल्यांचा बंदोबस्त करावा.[७] या पत्राने जानोजी गडबडून गेला व तो पुण्यास येण्यास निघाला. गोदावरी नदी ओलांडून अलीकडे आल्यावर त्यास खबर कळली की, पेशवा आपल्यावर चालून येत आहे, भेटीच्यावेळी दगा करण्यास चुकणार नाही असा इशारा त्याचा कारभारी देवाजीपंत यांजकडून जानोजीस मिळताच तो परत वऱ्हाडामध्ये गेला व युद्धाच्या तयारीस लागला.[८]

जानोजी भोसल्याने रघुनाथरावाशी संधान साधून त्याचे साहय आपणास मिळवण्याचे प्रयत्न केले होते. माधवराव पेशव्यांनी रघुनाथरावाची नेमणूक उत्तर हिंदुस्थानच्या स्वारीवर केली, त्यामुळे त्यांना उत्तरेच्या स्वारीवर जाणे भाग पडले. निजामअलीचा कारभार त्याचा धाकटा भाऊ मीर मोगल हा पहात होता. त्याच्याशी माधवराव पेशव्यांनी स्नेह जोडून आपल्या वकिलामार्फत निजामाची मदत जानोजीस होऊ नये अशी व्यवस्था केली. १३ ऑक्टोबर १७६५ रोजी आपल्या प्रमुख मराठा सरदारासह पुणे सोडून स्वारीवर निघाले. विसाजी कृष्ण ही त्यांच्या स्वारीमध्ये सहभागी झाले होते.[९] माधवराव पेशव्यांनी जानोजीस वठणीवर आणण्याचा विचार पक्का केला होता.याचवेळी निजामाने ही जानोजी विरूद्ध पेशव्यांकडे मदत मागितली होती. ती देण्याचे कबूल करून माधवराव पेशव्यांनी वऱ्हाडाकडे आपले प्रयाण सुरू केले. माधवराव पेशव्यांनी आपले धोरण समजावून देण्यासाठी आपला वकील रामजी बल्लाळ गुणे यास पुढे जानोजीकडे पाठविले. रघुनाथरावही नाशिकहून सैन्यासह निघून बाळापूर येथे पेशव्यास मिळाले.निजामाचा कारभारी आपल्या सैन्यासह पेशव्यांस गोदावरी नदीच्याकाठी येऊन मिळाला.जानेवारी १७६६च्या अखेरीस निजामाचे सैन्यही नागपूरच्या जवळ आले.[१०] जानोजीने युद्धाची तयार केली होती. त्याचा सर्व ओढा हा रघुनाथरावाकडे व आपला कारभारी देवाजीपंत यांच्याकडे होता म्हणून सुरूवातीला त्याने वेळ मारून नेहण्याचे धोरण स्वीकारले होते. १ जानेवारी १७६६ रोजी जानोजी हा नागपूरच्या जवळ दहा कोसावर होता, तर श्रीमंतांनी वऱ्हाड प्रांत जप्त करून बाळापूर, अकोला येथून खंडणी वसूल केली. श्रीमंताच्या या मोठया सैन्यापुढे आपला टिकाव लागणार नाही, हे जाणून त्याने पेशव्यांकडे तहाची बोलणी लावून कृपेची याचना केली. रघुनाथरावाने मध्यस्ती केली. माधवराव पेशव्यांनी दादाच्या म्हणण्यास मान देऊन शरण आलेल्या जानोजी भोसल्यास भेटीस बोलावले. १८ जानेवारी १७६६ रोजी जानोजी व माधवराव पेशवे यांच्या भेटी दर्यापूर मुक्कामी झाल्या. बोलणी व वाटाघाटी होऊन अमरावती जवळ 'खोलापूर' येथे तह होऊन हा संघर्ष मिटला.[११] या तहानुसार -

१) जानोजी भोसल्याने २४ लक्षाचा मुलूख पेशव्यांस परत द्यावा.

२) पेशव्यांनी १५ लक्षाचा मुलूख निजामास देऊन बाकीचा नऊ लक्षाचा आपणास ठेवावा.

३) जानोजीने आपल्या सर्व फौजेनिशी इथून पुढे पेशव्यांच्या स्वारीत हजर असावे. हे जानोजीने मान्य केले याप्रमाणे हा तह ठरला.[१२]

जानोजी भोसल्याचा माधवराव पेशव्यांनी कायमचा बंदोबस्त खालील तीन कारणांमुळे केला नसावा.

१) भोसले बंधूनी विनंती केली की, आम्हांवर राग धरून श्रीमंत वऱ्हाडात आले. आमचा अन्याय कोणता एक पुणे म्हणतील तर तो अन्याय आमचा नाही हे मोगलांनी जाळले, दुसरा आम्ही हैदर नाईकाकडे आलो नाही तर मनुष्यापासुन चूक होतच असते. त्यास दंड म्हणून ३० लाखाचा सरंजाम दिला तो आमचा घेऊन मोगलास दयावा, सर्पास दूध पाजावे? आम्हास आज्ञा करावी, तुम्ही मोगलावर जाणे, जाऊन पारिपत्य करतो की नाही ते पहावे. आता आम्हास वडीलपणाने हाती धरावे. आम्ही ऐसे काम करून दाखवितो की, मागे झाले नाही व पुढे होणार नाही. स्नेह होईल हे करावे यात धन्याची मर्जी. दाती तृण धरून जानोजी शरण आल्याने त्याचे पारिपत्य करणे पेशव्याला शक्य झाले नसावे.[१३]

२) पेशव्यांनी जानोजी भोसल्यावर मर्जी राखावी म्हणून मल्हारराव होळकराने लिहिले होते.

३) रघुनाथरावाला उत्तर हिंदुस्थानच्या स्वारीवर जायचे होते आणि जानोजी भोसल्याने पेशव्यांच्या स्वारीत येण्याचे कबूल केले होते.[१४] म्हणून माधवराव पेशव्यांनी जानोजीचे कायमचे पारिपत्य केले नसावे असे मला वाटते. पेशवे-जानोजी संघर्षात मात्र ज्या सरदारांनी जानोजीचा पक्ष धरला होता त्यास माधवराव पेशव्यांनी शिक्षा केल्या. १५ लक्षाचा मुलुख निजामास देऊन मोगलांशी कायमची दोस्ती करण्याचा इरादा माधवराव पेशव्यांनी दाखविला व यापुढे दक्षिण प्रांती मोहिम झाल्यास उभयतांनी मिळून करावी असे यासमयी ठरले. या करारात ज्या मर्यादा जानोजी भोसल्यास पेशव्याने घालून दिल्या त्या त्याने मुळीच पाळल्या नाहीत तर पुन्हा पेशव्यांच्या विरोधी कारवाया सुरू केल्या. त्यामुळे खोलापूरचा तह हा अल्पकालीन ठरला असेच म्हणावे लागते. वऱ्हाडात निजामाशी सख्य जोडून माधवराव पेशवे ग्रहणासाठी गोदावरीवर आले. हे चंद्रग्रहण २४ फेब्रुवारी १७६६ रोजी झाले नंतर ते टोक्यास गेले. तेथून पुढे गंगापूरास (नाशिक) जाऊन मातोश्रीचे दर्शन घेतले. तिथे दोन आठवडे राहून ते पुण्यास परत आले.[१५] माधवराव पेशव्यांसमोरील तिसरी महत्त्वाची समस्या म्हणजे बाबूजी नाईकाने केलेले बंड होते.

२. बाबूजी नाईकाचे बंड:

माधवराव पेशव्यांचे जे विविध विरोधक होते त्यामध्ये पेशव्यांचा नातेवाईक व बारामतीचा प्रभावी सरदार (सावकार) बाबूजी नाईकाचा समावेश होता. त्याने आपली फौज वाढवून प्रसंग पडल्यास पेशव्यांशी दोन हात करण्याची तयारी सुरू केली. सोलापूरचा किल्ला त्याच्या ताब्यात होता. तो बंदिस्त करून त्याने पेशव्यांना विरोध सुरू केला त्याचा बंदोबस्त करण्यासाठी व सोलापूरचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी मार्च १७६६ च्या सुमारास एक मोहिम विसाजी कृष्ण बिनीवाले, रामचंद्र गणेश कानडे व शहाजी भापकर यांच्याकडे सोपविली होती.[१६] कारण माधवराव पेशव्याने रघुनाथरावास ९ मार्च रोजी पत्र पाठविले आहे त्यानुसार 'बाबूजी नाईकाने हैदर नाईकाशी स्नेह केला आहे. कागदपत्र यांचे त्यास त्यांचे यास आले, घोडे व राऊत चाकरीस पाठविले. सोलापूर व चंदन हे दोन किल्ले त्यांच्याकडे होते. किल्लेकरी किल्ले सोडीत नाही अशी पत्रे आले. नाईक हा दक्षिणेकडे हैदअलीस मिळेल म्हणून रामचंद्र गणेश याजबरोबर पाच हजार स्वारानिशी रवाना केले. त्यानंतर माधवराव पेशव्याने रामचंद्र गणेशच्या मदतीला नाना पुरंदरे यास फौज घेऊन १३ मार्च १७६६ रोजी पाठविले होते व त्यांना मार्गातील अंमलदाराना कैद करून कमाविसदार कायम करण्याची कामगिरी सांगितली होती. त्यामुळे त्यांनी सोलापूरास जाता-जाता पांगरी, शिरढोण व खानापूर येथे मराठयांच्या कमाविसदारांचा अंमल कायम केला आणि सोलापूर येथे बाबूजी नाईक आहे. याचे वर्तमान पेशव्यांस पत्राने कळविले आहे.[१७] बाबूजी नाईकांचा पाडाव करण्यासाठी विसाजी कृष्ण, रामचंद्र गणेश कानडे व शहाजी भोसले यांनी सोलापूरच्या किल्ल्याला वेढा दिला. पेशव्यांच्या सैन्यापुढे नाईकाचा निभाव लागू शकला नाही. नाईकाच्या कुटुंबातील सदस्यांना आपल्या ताब्यात घेतले. बाबूजी नाईकाचा सर्व सरंजाम विसाजीने जप्त केला. यादव जगताप या मातब्बर माणसाने नाईकास धीर देऊन किल्ल्यातून काढून दिले. त्याचा मराठयांनी शिरच्छेद केला. अशा बिकट स्थितीत बाबूजी नाईक आपल्या बचावाकरिता धारूरच्या घाटाच्या आश्रयाने मध्यरात्री पळून गेला व त्याने कळंबचे देशमुख दत्ताजी ठाकूर यांच्याकडे आश्रय घेतला. बाबूजी नाईकास आश्रय दिल्याबद्दल कळंबच्या देशमुखास कैद करण्यात आले.[१८] विसाजी कृष्ण, शहाजी भोसले, रामचंद्र गणेश या

मराठा सरदारांच्या पराक्रमापुढे बाबूजी नाईकाचा निभाव लागला नाही. त्यामुळे त्याची सर्व संपत्ती जप्त करण्यात आली. शेवटी बाबूजी नाईकाला पेशव्यांशी समझोता करण्याचा प्रस्ताव पाठवावा लागला. या प्रकरणात विसाजी कृष्ण व गोविंद शिवराम खाजगीवाले यांच्यामार्फत बाबूजी नाईकांची समजूत घातली गेली.त्यानंतर बाबूजी नाईकाने शरणागती पत्करून माधवराव पेशव्याने त्याची व्यवस्था न्याय रितीने ठरवून दिली. दोन महिने टोक्यास राहून नंतर नाईक पुन्हा बारामतीस गेला.[१९]

बाबूजी नाईकाच्या बंडाचे पारिपत्य करण्याची जबाबदारी विसाजी व इतर मराठा सरदारांवर सोपविल्यानंतर माधवराव पेशव्यांनी मोहिमेकडे दुर्लक्ष केल्याचे दिसत नाही तर विसाजीने जे करार केले ते पूर्ण करण्यासाठी स्वतः माधवराव पेशव्याने विशेष लक्ष पुरविल्याचे दिसून येते. याविषयी पेशवे दप्तरामध्ये १५ जुलै १७६६ चा घडणी रूमाल क्र.५१२ चा एक कागद उपलब्ध आहे. त्यानुसार-

- कलम-१. आपली वस्तभाव, घोडी, हत्ती, उंट, गुरे, कापड, पैका, दाणा, भांडी व सुतळीचा तोडा वगैरे जे आणले असेल ते माघारी दयावे काही ठेऊ नये.
- कलम-२. आपल्यामुळे यादव जगताप, दत्ताजी ठाकूर वगैरे त्यांची वस्तभाव, घोडी, मुले, माणसे, वतन, पैका जो घेतला असेल तो माघारी द्यावा, जप्ती मोकळी करावी.
- कलम-३. कमाविसदार, सोयरेधायरे व चाकरलोक यांची वस्तभाव पैका घेतला असेल तो माघारे द्यावे, त्यास सोडावे.
- कलम-४. सरकारात आले असेल ते माघारे द्यावे, त्यास सोडावे कतबे जमिनीपासून घेतले असेल ते माघारी द्यावे.
- कलम-५. मागील हिशोबाचा लांड्या(लफडा) आपल्यास पुसू नये. हिशोब पावल्याचे अभयपत्र देऊन हरयेक जागा, पोट भरावयास निरोप द्यावा.
- कलम-६. सदरहू प्रमाणे तुम्ही विनंती केली, त्यावरून तुम्हास कब्ज दिले असे.
- कलम-७. जाबसालास रामचंद्रगोविंद व दहा पाच कारकून येतील त्यास अभय असावे.

येणेप्रमाणे करार-७ कलमे होती.[२०] याशिवाय सरकारची ही तीन कलमे होती ती पुढीलप्रमाणे-

१) सोलापूरचा किल्ला सरकारात दयावा,मध्यस्थाच्या हवाली करावा. किल्ला हवाली झाला म्हणजे कराराप्रमाणे वस्तभाव फारकत द्यावी.

२) सरकारचे शिलेदाराची घोडी, वस्तभाव वगैरे जी नेली असेल ती सोडून द्यावी.सोलापूर व अहीरवाडी येथील तालुक्याचे पाटील व लोक नेले असतील ते सोडून द्यावे.

३) नव्वद हजार रूपये तिगस्ता कर्नाटकच्या स्वारीस सरकारात घेतले आहेत ते मागू नयेत, खते माघारे दयावे.

येणेप्रमाणे हा करार स्वतः माधवराव पेशव्याने तयार करून बाबूराव सदाशिव यांच्याकडे पाठविला होता.[२१] तसेच दुसऱ्या एका पत्रात स्वतः माधवराव, नाना पडणीसास लिहीतात की, 'राजश्री बाबूजी नाईक यांनी सोलापूरचा किल्ला सरकारात देऊन, हुजूर दर्शनास यावे याप्रमाणे करार झाला. त्याजकडे राजश्री विसाजी कृष्ण याची रवानगी केली. त्यास नाईकाची चीजवस्तु सरकारात आली. त्यास आजमासे एक लक्ष तेरा हजार रूपये नख्त द्यावे, ते तूर्त दिले पाहिजेत. ऐवजाची तरतूद करून ठेवणे.... बारामतीत देखील दीड लक्षाची जहागीर दिली. पुढे कृपा संपादून इंदापूर मागावे. यैसे मानस आहे.....[२२] यावरून

विसाजी कृष्णाच्या कर्तृत्वावर व त्याच्या वैचारिक परिपक्वतेवर माधवराव पेशव्यांचा पूर्ण विश्वास होता.विसाजीने बाबूजी नाकईकाची जी व्यवस्था लावली होती,ती पूर्ण करण्याचा माधवराव पेशव्यांचा प्रयत्न होता असे दिसून येते. नाईकांशी समझोता झाल्यानंतर विसाजीने नाईकाची व माधवराव पेशव्यांची प्रत्यक्ष भेट घडवून आणली.तिसऱ्या कर्नाटक मोहिमेच्या वेळेस म्हणजेच डिसेंबर १७६६ मध्ये.[२३] अशाप्रकारे माधवराव पेशव्याने आपल्या सरादारांच्या पराक्रमाच्या जोरावरती बाबूजी नाईकाच्या बंडाचा बिमोड करून त्याच्या ताब्यातील सोलापूरचा किल्ला जिंकून घेतला, त्या भागामध्ये पाटील व कमाविसदार नेमून आपला अमंल बसविला. बाबूजी नाईकाला हैदरअलीशी होणाऱ्या दक्षिणेतील मैत्रीपासून परावृत्त केले आणि दुसऱ्या कर्नाटक मोहिमेमध्ये (१७६४) बाबूजी नाईकाकडून घेतलेले ९०,००० रूपये त्यास माफ करण्यास भाग पाडले तसेच पुढील तिसऱ्या कर्नाटक मोहिमेसाठी १,१३,००० रूपये खंडणीच्या रूपाने नगद वसूल केल्याचे दिसून येते.

३. भवानराव प्रतिनिधीचे बंड:

माधवराव पेशव्यांचे जे विरोधक होते, त्यामध्ये भवानराव प्रतिनिधीचा ही समावेश होता. त्यामुळे राघोबादादा बरोबरचा गृहकलह, बाबूजी नाईकाचे बंड, जानोजी भोसल्याचे बंड याप्रमाणेच भवानराव प्रतिनिधीचे बंड ही पण एक समस्या माधवराव पेशव्यांपुढे होती. भवानराव प्रतिनिधीस माधवराव पेशव्यांनी पदभ्रष्ट केल्यामुळे ते बंड करण्याची संधी शोधत होते. माधवराव पेशव्यांची स्वारी वऱ्हाडात दूर गेल्याचे पाहून भवानरावाने भगवंतारावाशी दावा आरंभून मुलखात दंगा करण्यास सुरूवात केली.[२४] हे दोघेही शूर आणि फौजबंद होते. दोघांकडे ही प्रांतातले दंगेखोर लोक मिळाले, त्यामुळे त्यांच्यात पुष्कळ झटापटी झाल्या. वाई, सातारा, कऱ्हाड, पाटण या मुलखातील लोक दोघांच्या लुटीने बेजार झाले होते. भवानरावाच्या बाजूस डफळे व पोळ मिळाल्याने त्यांची सरशी होऊ लागली. पाटणजवळ दीड कोसावर दातेगड नावाचा किल्ला आहे. तो भवानरावाने जिंकून घेतला शिवाय कडेगांव, कोळे, मसूर, चरेगाव ही ठाणी घेऊन खुद्द कऱ्हाड ही काबीज केले व तो कृष्णा नदी उतरून विटे, भाळवणीकडे लोकांकडून तमाम खंडण्या वसूल करीत चालला होता, तेव्हा भगवंतरावाने मसुरास मोर्चे लावून ते पुन्हा जिंकून घेतले.

या दंग्याची बातमी माधवराव पेशव्यांना समजताच त्यांनी भवानरावाच्या बंदोबस्तासाठी रामचंद्र गणेश कानडे या सरदारांची नेमणूक केली. त्याने भवानरावाचा पाठलाग करून त्यास गाठून त्याचा पूर्ण पराभव केला व त्याने जिंकून घेतलेली सर्व ठाणी घेऊन ती भगवंतरावाच्या हवाली केली. तेव्हा निरूपाय होऊन भवानराव पेशव्यांस शरण गेला. माधवराव पेशव्यांनी त्यास गोपाळराव पटवर्धनांच्या मध्यस्थीवरून पन्नास हजार रूपयांची नक्त नेमणूक देऊन पुण्यात ठेवून घेतले व नंतर पाच लक्ष उत्पन्नाचा सरंजाम त्यास नेमून दिला.[२५] अशाप्रकारे माधवराव पेशव्यांनी आपल्या समोरील असणारे विरोधक व त्यांच्या बंडाची समस्या सोडवली.

४. रघुनाथराव व जानोजी भोसल्याचा कायमचा बंदोबस्त:

रघुनाथराव हे उत्तरेच्या स्वारीमध्ये अपयशी होऊन अहमदनगरला परत आल्यानंतर त्यांनी राज्याची वाटणी पेशव्यांस मागितली.पेशव्यांशी संघर्ष करण्यासाठी पंधरा हजाराची फौज जमविली होती तसेच इंग्रजाकडून आपणास मदत मिळेल अशी त्यांना आशा होती. इंग्रज ही चुलत्या-पुतण्यांच्या संघर्षाचा फायदा आपल्याला कसा घेता येईल याची वाट पाहत होते. रघुनाथरावाने पेशव्यांस निष्प्रभ करण्यासाठी हैदरअली, निजाम, जानोजी भोसले, दमाजी

गायकवाड इत्यादीशी संधाने चालविली होती. हे लक्षात येताच इंग्रजांनी मॉस्टिनच्या वकिलातीत ब्रोम नावाचा अधिकारी रघुनाथरावाकडे पाठविला होता. मदत दिल्यास साष्टी व वसई इंग्रजांना देण्याचे आश्वासन दिले होते. त्याच्या या गुप्त वाटाघाटी सुरू होत्या तरीपण त्याची माहिती माधवराव पेशव्यांना समजली होती.[२६] माधवराव पेशव्यांनी संग्राामाची तयारी करुन १० जून १७६८ रोजी झालेल्या घोडपचे युद्धात रघुनाथरावाच्या फौजेचा पराभव केला. रघुनाथरावाने विनाशर्त माघार घेतली. आपला सर्व प्रदेश, चीजवस्तू व प्रदेश पेशव्यांच्या स्वाधीन केला. माधवराव पेशव्यांनी रघुनाथरावास नाना फडणीसाच्या देखरेखीखाली शनिवारवाडयात नजरकैदेत ठेवले आणि त्याच्या सर्व साथीदारांना कठोर शिक्षा देण्यात आल्यामुळे पेशव्यांची जरब निर्माण झाली.[२७] रघुनाथराव हा आपला प्रथम शत्रू आहे याची दखल माधवराव पेशव्यांनी घेतली नाही. बाहय शत्रूपेक्षा अंतर्गत शत्रू हा जास्त धोकादायक असतो याची जाणीव पेशव्यांना झाली नसावी कारण ज्येष्ठ चुलता म्हणून अत्यंत सौम्य दयाळू व नमते धोरण त्यांनी नेहमीच स्वीकारल्याचे दिसून येते. परंतु रघुनाथरावाच्या घरभेदामुळेच मराठी राज्याचे काही अंशी नुकसान झाले असे मान्य करावे लागते. वास्तविक राघोबाच्या फुटीरपणाचे गंभीर परिणाम लक्षात घेऊन माधवरावाने त्यास डोंगरी किल्ल्यात बंद केले असते तर अनेक अनर्थ टळले असते. राघोबास नजरकैदेत राहावे लागले या काळात राघोबावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी नाना फडणीसावर सोपविली होती.[२८] त्यानंतर पेशव्यांनी इ.स.१७६८ च्या अखेरीस नागपूरच्या जानोजी भोसल्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला व २३ मार्च १७६९ रोजी उभयपक्षी कनकपूरचा तह झाला त्यानुसार असे ठरले की,

१) जानोजीने स्वतंत्रपणे वागू नये.
२) पेशव्यांच्या आज्ञेत राहावे.
३) फौज वाढवू नये.
४) पाच हजार फौज घेऊन पेशव्यांच्या चाकरीस राहावे.
५) दरसाल पाच लक्ष खंडणी पेशव्यांस द्यावी.
६) भोसल्याच्या अडीअडचणीत पेशव्यांनी सहाय्य करावे.
७) भोसल्याने बाहेरील सत्ताधिशांशी राजकारण करू नये.
८) पेशव्यांच्या वकिलामार्फत इतर सत्ताधिशांशी फक्त मामलती संबंधी व्यवहार करावा इत्यादी.

अशाप्रकारे पेशव्यांनी जानोजी भोसल्यांचे पारिपत्य केले.[२९]

कनकपूरच्या तहाचे महत्त्व:

या तहामुळे जानोजी भोसले व माधवराव पेशवे संबंधामध्ये नविन पर्व सुरू झाले. आपसातील अंतर्गत कलहामुळे स्वतःचे व सत्तेचे किती नुकसान होते याची जाणीव दोघांना निर्माण झाली. एकता व अंखडता यामुळे आपण नवीन काही तरी घडवून आणू शकतो हा आत्मविश्वास निर्माण झाला. पेशवे-भोसले संबंधात वितुष्ट निर्माण करणारा देवजी पंतास कैदेत टाकण्यात आले. फुटीरवृत्तीस पायबंद घातला गेला. केंद्रीय सत्ता बळकट करून मराठा मंडळातील सरदारांनी मराठी सत्तेचा सांभाळ केला पाहिजे. हे माधवराव पेशव्यांनी अखेरच्या काळात दाखवून दिले होते. माधवराव पेशव्यांने जून १७६८ मध्ये रघुनाथरावाचा व २३ मार्च १७६९ मध्ये जानोजी भोसले या विरोधांचे पारिपत्य करून बंदोबस्त केला होता.[३०]

निष्कर्ष:

१) दक्षिण धोरणामध्ये माधवराव पेशव्यांना रघुनाथराव, जानोजी भोसले, बाबूजी नाईक व भवानराव प्रतिनिधी हे अंतर्गत विरोधक असल्याचे दिसून येते.
२) दक्षिण धोरणामध्ये नागपूरचे जानोजी भोसले व हैदराबदचा निजाम आणि म्हैसूरचा हैदरअली हे

राघोबादादाला सहकार्य करणारे होते त्यामुळे माधवराव पेशव्यांचे दक्षिण धोरण अयशस्वी ठरत होते. परिणामी माधवराव पेशव्यांनी जानोजी भोसल्यावर मोहिमा काढून त्याचा बंदोबस्त करून त्यास रघुनाथरावाला मदत करण्यापासून परावृत्त केले व हैदरअलीच्या विरोधात सैन्यासह येऊन मिळण्यास भाग पाडले तसेच रघुनाथरावास पेशवाईपासून दूर ठेवले होते.

३) पेशव्यांच्या अंतर्गत विरोधकात जानोजी भोसलेचा समावेश होता व त्याने रघुनाथरावाशी संधान सांधून पेशव्यांना आव्हान दिले होते म्हणून पेशव्यांनी त्यावर मोहिम काढून त्याचा कायमचा बंदोबस्त केला व त्यास कनकपूरचा तह मान्य करण्यास भाग पाडले

४) माधवराव पेशव्यांच्या विरोधात बाबूजी नाईकने बंड केले. त्याचा बंदोबस्त पेशव्यांनी विसाजी कृष्ण, रामचंद्र कानडे व शहाजी भोसले यांना करण्यास पाठविले. व त्याचा बंदोबस्त केल्याचे दिसून येते.

५) भवानराव प्रतिनिधीने सातारा प्रांतात बंड केले, ही समस्या पेशव्यांनी रामचंद्र गणेश कानडे या मराठा सरदाराच्या मदतीने सोडविल्याचे दिसून येते.

६) दक्षिण धोरणातील अंतर्गत विरोधकांचे बंड/समस्या सोडविण्याच्या कामी माधवराव पेशव्यांना विसाजी कृष्ण बिनीवाले, रामचंद्र गणेश कानडे,शहाजी भोसले शहाजी भापकर , नाना पुरंदरे इत्यादी मराठा सरदारांनी मदत केल्याचे दिसून येते.

संदर्भ:

१. सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद खंड-२८,मुंबई,१९३३ ले.१५१

२. चितळे.वि.सि.संपा.पेठे दप्तर भाग १ भा.इ.स.मं स्वीय ग्रंथमाला क्र.ले.७३, पुणे,१९४८ ले.३४,३५

३. कुलकर्णी अ.रा.,पुण्याचे पेशवे, राजहंस प्रकाशन पुणे, २००८ पृ.४९

४. खरे वा.वा.,ऐ.ले.,भाग ३ कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना,१९०८ पृ.१०२२

५. राजवाडे वि.का.,म.इ.सा.खंड १३,पुणे,१८३४ पृ.८४

६. सरदेसाई गो.स.,मराठी रियासत छ.रामराजा निग्राहक माधवराव खंड ५, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९९० पृ.१९१

७. चितळे वि.सि.उपरोक्त ले.३७, ४०

८. खोबरेकरवि.गो.,महाराष्ट्राचाइतिहास,मराठाकाल खंडभाग २ म.रा.सा.सं.मं.मुंबई,१९८८ पृ.२९७

९. सरदेसाई.गो.स.पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद खंड २०,मुंबई,१९३१, ले.१५६

१०. कित्ता, ले.१६४, १७२

११. खरे वा.वा.,उपरोक्त भाग ३,पृ.१०३४

१२. सरदेसाई.गो.स.उपरोक्त ,खंड २०, ले.१७३

१३. सरदेसाई गो.स. उपरोक्त ,खंड ५ पृ.१९४

१४. सरदेसाई.गो.स. उपरोक्त ,खंड २०, ले.१७८

१५. सरदेसाई गो.स. उपरोक्त, खंड ५, पृ.२००

१६. सरदेसाई.गो.स.पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद खंड ३७,मुंबई,१९३४,ले.७२,७३

१७. कित्ता, पृ.९९, पृ.८३

१८. सरदेसाई गो.स., उपरोक्त, खंड ५ पृ.२२८

१९. सरदेसाई.गो.स.पेशवा दप्तर, उपरोक्त खंड ३७,ले.११६

२०. कित्ता, ले.१०७

२१. कित्ता, ले.१०७

२२. कित्ता, ले.११८
२३. खोबरेकर वि.गो.,उपरोक्त, भाग २ ,पृ.३०६
२४. कित्ता, पृ.२९९
२५. खरे वा .वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १ मिरज,१९२७ पृ.११२, पृ.११३
२६. सहस्त्रबुद्धे स.अ., श्रीमंत थोरले माधवराव पेशवे, मुंबई,१९३८ पृ.१११
२७. शेजवलकर त्र्यं.शं.,निजाम-पेशवे संबंध, पुणे, १९६३, पृ.८१
२८. सरदेसाई गो.स.(संपा.),मराठी रियासत खंड ५, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०, पृ.१७९
२९. सरायकर सुनिता, विसाजी कृष्णा बिनीवालेःकाळ आणि कर्तृत्व,विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ.६०
३०. सरदेसाई गो.स.(संपा.),पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ५, मुंबई, १९३०, लेख, ३२

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

मोडी कागदपत्रांचे प्रकार

डॉ. तानाजी रामचंद्र हवलदार

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख

विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा

ता-शिराळा, जि-सांगली

Corresponding Author - डॉ. तानाजी रामचंद्र हवलदार

DOI - 10.5281/zenodo.19707142

प्रस्तावना:

मध्ययुगीन व मराठा कालखंडात राज्यकारभारामध्ये मोडी लिपीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात होता. मराठा कालखंडातील मोठ्या प्रमाणात पत्रव्यवहार हा मोडी लिपी मध्ये उपलब्ध आहे. मराठा साम्राज्य संपूर्ण देशभर पसरले होते. परिणामी प्रचलित असणारी मोडी लिपी संपूर्ण देशभर पोहोचली गेली. मोडी ही भाषा नसून मराठी/देवनागरी भाषेची लिहण्याची वेगळी शैली असणारी लिपी आहे.

मोडी लिपीची व्याख्या "जिच्यात विशेष मोड आहे व जी लिपी न थांबता अत्यंत जलदगतीने लिहिली जाते तिला मोडी लिपी असे म्हटले जाते." मोडी लिपीचा शोध 'हेमांद्री उर्फ हेमाडपंत' यांनी लावला. हेमाडपंतांनी लिपी शोधून काढल्याचे पुरावे मिळाल्याने मोडी लिपीचे जनकत्व हेमांद्री उर्फ हेमाडपंत यांच्याकडे जाते. हेमांद्री यादवांच्या कालखंडामध्ये 'कर्णाधिप' या हुद्यावर कार्यरत होते. यादवांचा राज्य विस्तार खूप वाढला हेमांद्री वसुलीचे काम पाहणारे मुख्यप्रधान असल्याने दरबारचा राजकीय पत्रव्यवहार मोठ्या प्रमाणात करणे भाग होते. सुलभरीतीने अल्पावधीत पुष्कळ मजकूर लिहिता यावा या कल्पनेतून हेमाडपंतांनी नवीन लिपी शोधून काढली व प्रचारात आणली. मोडी लिपीला यादवांच्या राजवटीत महत्वाचे स्थान मिळाल्यामुळे पुढे शिवकाळात व पेशवेकाळातही या लिपीचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणात झाला.

देशभरातील विविध वाचनालये, संग्रहालये, पुराभिलेख कार्यालये, जिल्हा स्तरावरील शासकीय कार्यालये, खाजगी संग्रहालये यांच्याकडे अमुल्य असा मोडी कागदपत्राचा ठेवा दिसून येतो. भारतातील एकूण मोडी कागदपत्रांचा विचार केला तर् असंख्य कागदपत्रांचे अद्याप वाचन झालेले नाही. मोडी लिपीतील कागदपत्रांचे प्रमुख प्रकार खालील प्रमाणे दिसून येतात.

मोडी कागदपत्रांचे प्रकार:

मोडी कागदपत्रांचे खालील प्रमाणे प्रकार पहावयास मिळतात.

- **राजकीय / शासकीय कागदपत्रे :**

राजाज्ञा किंवा आज्ञापत्रे – **राजाज्ञा** किंवा **आज्ञापत्रे** म्हणजे राज्यकर्त्याने (राजा/छत्रपती/सम्राट) अधिकृतपणे दिलेली लेखी आदेशपत्रे होय. मराठा काळात ही पत्रे प्रामुख्याने मोडी लिपीत लिहिली जात आणि त्यांना अत्यंत वैधानिक व प्रशासकीय महत्त्व होते.

सनद – **सनद** म्हणजे राज्यकर्त्याकडून (राजा/सम्राट/सरकार) दिलेला अधिकृत लेखी दस्तऐवज, ज्याद्वारे एखाद्या व्यक्ती, संस्थेला किंवा सरदाराला जमीन, वतन, हक्क, पद किंवा सवलत प्रदान केली जात असे. हा शब्द फारशी भाषेतून आलेला असून मध्ययुगीन व ब्रिटिश काळात मोठ्या प्रमाणावर वापरला गेला. मोगल आणि मराठा प्रशासनात सनद हे हक्कप्रदानाचे कायदेशीर प्रमाणपत्र मानले जाई. इनाम सनद, वतन सनद, जागीर सनद, करमाफी सनद, पदनियुक्ती सनद इत्यादी सनदेचे प्रकार होते. सनद ही केवळ जमीन देणारी कागदपत्रे नव्हती, तर ती शासनव्यवस्थेची कायदेशीर पायाभूत साधने होती. मध्ययुगीन भारतातील राजकीय, आर्थिक व सामाजिक इतिहासाच्या अभ्यासासाठी सनद हा अत्यंत विश्वासार्ह प्राथमिक स्रोत आहे.

रजिनामा – **रजिनामा** म्हणजे एखाद्या व्यक्तीने आपल्या हक्काचा, पदाचा, वतनाचा किंवा मालमत्तेचा स्वेच्छेने त्याग केल्याचे अधिकृत लेखी त्यागपत्र होय. मध्ययुगीन व मराठा प्रशासनात रजिनामा हे कायदेशीर व प्रशासकीय दृष्ट्या मान्यताप्राप्त दस्तऐवज होते. वतन रजिनामा, इनाम रजिनामा, तडजोडीचा रजिनामा इत्यादी रजीनाम्याचे प्रकार होते. रजिनामा हे केवळ त्यागपत्र नसून त्या काळातील कायदेशीर व सामाजिक व्यवहाराचे प्रतिबिंब आहे. मराठा काळातील मोडी कागदपत्रांच्या अभ्यासात रजिनामा हा अत्यंत महत्त्वाचा प्राथमिक स्रोत मानला जातो.

कैफियत – हा शब्द अरबी–फारशी भाषेतून आला आहे. **कैफियत** म्हणजे एखाद्या घटना, वाद, हक्क, महसूल किंवा प्रशासनिक प्रश्नासंबंधी संबंधित व्यक्ती/गावकऱ्यांनी अधिकाऱ्यांसमोर सादर केलेले *स्पष्टीकरणात्मक किंवा निवेदनात्मक लेखी प्रतिवेदन* होय. महसूल कैफियत, वतन कैफियत, जमीन सीमेची कैफियत, तक्रारीची कैफियत इत्यादी **कैफियतचे** प्रकार होते. कैफियत ही केवळ तक्रारपत्र नसून प्रशासन, महसूल, वतन व सामाजिक संरचनेचा अभ्यास करणारा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. मोडी कागदपत्रांच्या संशोधनात कैफियतींना विशेष स्थान आहे.

- **महसुली कागदपत्रे :**

जमाबंदी पत्रक – **जमाबंदी पत्रक** म्हणजे एखाद्या गावातील किंवा परगण्यातील जमीन, पीक, महसूल आणि करआकारणी यांची वार्षिक अधिकृत नोंद असलेले दस्तऐवज. 'जमा' (महसूल/आकारणी) + 'बंदी' (नोंद/निर्धारण) असा याचा अर्थ होतो. गाव जमाबंदी, परगणा जमाबंदी, खास जमाबंदी (राज्याच्या थेट ताब्यातील जमीन), इनाम/वतन जमाबंदी इ. प्रकार होते. जमाबंदी पत्रक हे मध्ययुगीन व आधुनिक महसूल प्रशासनाचा कणा होते. जमीन, पीक व करआकारणी यांचा अभ्यास करताना या कागदपत्रांचे विशेष महत्त्व आहे. मोडी कागदपत्रांच्या संशोधनात जमाबंदीचा अभ्यास केल्याशिवाय महसूल व्यवस्थेचे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही.

खत / पावती – **खत** म्हणजे व्यवहार, देणघेण, कर्ज, जमीनविक्री किंवा कोणत्याही आर्थिक व्यवहाराची लेखी नोंद; तर **पावती** म्हणजे विशिष्ट रक्कम किंवा माल स्वीकारल्याची अधिकृत कबुली. मराठा काळात ही कागदपत्रे प्रामुख्याने मोडी लिपीत लिहिली जात आणि व्यवहाराची कायदेशीर साक्ष म्हणून ग्राह्य धरली जात. महसूल भरणा, वतनाचा हिस्सा, कर्जफेड, धान्य खरेदी इत्यादी संदर्भात खत/पावती तयार होत असे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात महसूल व आर्थिक शिस्त प्रस्थापित करण्यासाठी व्यवहारांची लेखी नोंद ठेवण्यावर भर देण्यात आला. इतिहास संशोधनात खत–पावत्या स्थानिक अर्थव्यवस्था, चलनप्रणाली, किंमती, व गावपातळीवरील व्यवहार समजण्यासाठी महत्त्वपूर्ण प्राथमिक साधने ठरतात.

इनामपत्र / वतनपत्र – **इनामपत्र** म्हणजे एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेला सेवेसाठी, पराक्रमासाठी किंवा धार्मिक कार्यासाठी दिलेल्या जमिनीची/महसुलाची अधिकृत सनद; तर **वतनपत्र** म्हणजे परंपरागत सेवेसाठी (उदा., देशमुख, देशपांडे, कुलकर्णी) दिलेल्या वतनहक्काची लेखी मान्यता. मराठा प्रशासनात अशा पत्रांद्वारे जमीनधारणा व सेवा-व्यवस्था नियमित केली जात असे. छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात वतन व इनाम विषयक अनेक कागदपत्रे देण्यात आली, ज्यातून सामाजिक व प्रशासकीय रचना स्पष्ट होते. इनामपत्र/वतनपत्रांमध्ये जमीनमर्यादा, करसवलत, अटी व वारसाहक्काचा उल्लेख असतो. ही कागदपत्रे सामाजिक संरचना, जमीनधारणा पद्धती व राज्यसत्तेचे स्वरूप अभ्यासण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

हिशेबपत्रे – **हिशेबपत्रे** म्हणजे महसूल, खर्च, देणी-घेणी, सैनिकी खर्च, दरबारखर्च इत्यादींची तपशीलवार आर्थिक नोंद. मराठा काळात परगणा, गाव किंवा खात्याप्रमाणे हिशेब ठेवले जात आणि त्यात जमा (आवक) व खर्च (जावक) स्पष्ट दाखवले जात. मोगल प्रशासनातही, विशेषतः अकबर यांच्या महसूल सुधारणांनंतर, व्यवस्थित लेखापद्धती प्रचलित झाली. हिशेबपत्रांमुळे राज्याची आर्थिक स्थिती, करप्रणाली, सैनिकी व प्रशासकीय खर्चाची रचना यांचा अभ्यास करता येतो. त्यामुळे आर्थिक इतिहासाच्या संशोधनात ही कागदपत्रे अत्यंत मौल्यवान प्राथमिक स्रोत मानली जातात.

- **लष्करी कागदपत्रे :**

हुकुमनामे - हुकुमनामा म्हणजे राज्यकर्त्याकडून किंवा उच्च अधिकाऱ्याकडून दिलेला तातडीचा आणि स्पष्ट आदेश. हा दस्तऐवज राजाज्ञेपेक्षा काही वेळा विशिष्ट प्रशासकीय किंवा स्थानिक अंमलबजावणीसाठी असतो. मराठा काळात हुकुमनामे मोडी लिपीत लिहिले जात आणि त्यात आदेशाची कारणमीमांसा, अंमलबजावणीची पद्धत व संबंधित अधिकाऱ्यांची नावे नमूद असत. छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रशासन सुदृढ करताना स्थानिक अधिकाऱ्यांना हुकुमनाम्यांद्वारे थेट सूचना दिल्या. तसेच छत्रपती राजाराम महाराज यांच्या काळात युद्धस्थितीत तातडीच्या आदेशांसाठी हुकुमनाम्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग झाला. इतिहास संशोधनात हुकुमनामे प्रशासनातील कार्यपद्धती व सत्ताकेंद्रांची रचना समजण्यासाठी महत्त्वाचे साधन ठरतात.

वतन / जहागीर नोंदी -वतन नोंदी म्हणजे परंपरागत सेवेसाठी दिलेल्या वतनहक्कांची अधिकृत नोंद; तर जहागीर नोंदी म्हणजे सैनिकी किंवा प्रशासकीय सेवेसाठी महसूल वसुलीचा हक्क देण्यात आलेल्या प्रदेशाची माहिती. मोगल काळात जहागीर पद्धती व्यापक होती आणि ती पुढे मराठा प्रशासनातही काही प्रमाणात स्वीकारली गेली. अकबर यांच्या काळात जहागीर व्यवस्थेला संस्थात्मक स्वरूप मिळाले. मराठा राज्यात छत्रपती शाहू महाराज यांच्या कारकिर्दीत वतन व इनाम नोंदी नियमित करण्यात आल्या. या नोंदींमधून जमीनधारणा रचना, वारसाहक्क, महसूल सवलती व सामाजिक सत्तासंबंध स्पष्ट होतात.

सेनासंचालन पत्रव्यवहार - सेनासंचालन पत्रव्यवहार म्हणजे मोहिमा, लढाया, किल्ले संरक्षण, सैनिकी हालचाली, रसदपुरवठा व रणनीती यांसंबंधी केलेले अधिकृत पत्रव्यवहार. मराठा साम्राज्याच्या विस्तारकाळात अशा पत्रांचे विशेष महत्त्व होते. छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांच्या काळातील युद्धपरिस्थितीत सरदार व किल्लेदार यांच्यात नियमित पत्रव्यवहार होत असे. या पत्रांमधून सैनिकी धोरण, गनिमी कावा, पुरवठा व्यवस्था व राजकीय संबंधांची माहिती मिळते. त्यामुळे मराठा लष्करी इतिहासाच्या अभ्यासात ही

कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची प्राथमिक साधने मानली जातात.

- **न्यायविषयक कागदपत्रे :**

तक्रार अर्ज - तक्रार अर्ज म्हणजे एखाद्या अन्याय, वाद, महसूल प्रश्न, वतन/जमीन हक्क किंवा प्रशासकीय त्रुटीबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर केलेले लेखी निवेदन. मराठा काळात अशा अर्जांची नोंद मोडी लिपीत केली जात असे. गावकऱ्यांनी देशमुख, देशपांडे, कारकून किंवा थेट दरबाराकडे तक्रारी मांडल्या जात. छत्रपती शिवाजी महाराज यांनी न्यायव्यवस्थेला महत्त्व दिल्यामुळे तक्रारींची लेखी नोंद ठेवण्याची पद्धत दृढ झाली. अशा अर्जांत तक्रारीचे स्वरूप, संबंधित व्यक्ती, साक्षीदार आणि मागणी यांचा स्पष्ट उल्लेख असे. इतिहासाच्या अभ्यासात तक्रार अर्ज समाजातील संघर्ष, जमीनविवाद आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे जिवंत चित्र देतात.

न्यायनिर्णय पत्र - न्यायनिर्णय पत्र म्हणजे न्यायाधिकाऱ्याने किंवा राज्यकर्त्याने दिलेला अधिकृत निर्णयाचा लेखी दस्तऐवज. यामध्ये प्रकरणाचे स्वरूप, दोन्ही बाजूंची मांडणी, साक्षीपुरावे आणि अंतिम निर्णय नोंदवलेला असे. मराठा काळात पंचायती, स्थानिक अधिकारी किंवा दरबार यांच्या मार्फत दिलेले निर्णय लेखी स्वरूपात नोंदवले जात. छत्रपती शाहू महाराज यांच्या कारकिर्दीत वतन व इनाम विषयक अनेक न्यायनिर्णय नोंदी सापडतात. न्यायनिर्णय पत्रांमुळे त्या काळातील कायदेपद्धती, सामाजिक न्यायव्यवस्था आणि दंडप्रणाली यांचा अभ्यास करता येतो.

शिक्कापत्रे - शिक्कापत्रे म्हणजे अधिकृत शिक्का (मुद्रा) लावून प्रमाणित केलेली कागदपत्रे. राजाज्ञा, सनद, इनामपत्र, हुकुमनामा किंवा करारपत्र यांना वैधता देण्यासाठी शासकाची किंवा अधिकाऱ्याची मुद्रा लावली जात असे. मोगल काळात शाही मुहर ही अधिकाराची प्रमुख खूण होती, तर मराठा काळातही राजमुद्रा अत्यंत महत्त्वाची होती. शिक्कापत्रे ही कागदपत्रांच्या प्रामाणिकतेची हमी मानली जात आणि इतिहास संशोधनात दस्तऐवजाची सत्यता पडताळण्यासाठी ती महत्त्वाची ठरतात.

- **व्यवहारिक / खाजगी कागदपत्रे :**

खरेदी–विक्री पत्रे - खरेदी–विक्री पत्रे म्हणजे जमीन, घर, वतनहक्क किंवा इतर मालमत्ता विक्री–खरेदी व्यवहाराची अधिकृत लेखी नोंद. मराठा काळात ही पत्रे मोडी लिपीत तयार होत आणि त्यात विक्रेता–खरेदीदाराची नावे, मालमत्तेचे वर्णन, किंमत, साक्षीदार व दिनांक स्पष्ट नमूद केला जात असे. व्यवहाराची कायदेशीर वैधता सिद्ध करण्यासाठी शिक्का किंवा अधिकाऱ्याची नोंद आवश्यक असे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात जमीनव्यवहार शिस्तबद्ध करण्यासाठी लेखी दस्तऐवजांना महत्त्व देण्यात आले. अशा पत्रांमधून जमीनधारणा, किंमती, चलनप्रणाली व स्थानिक अर्थव्यवस्थेची माहिती मिळते.

दस्त / कबुलायत - दस्त किंवा कबुलायत म्हणजे एखाद्या अटी, करार किंवा महसूल जबाबदारी स्वीकारल्याचे लेखी प्रमाणपत्र. महसूल भरणा, जमीन कसण्याची अट, कराराची पूर्तता किंवा सेवेसाठी जबाबदारी स्वीकारताना कबुलायत लिहिली जाई. यात संबंधित व्यक्तीची स्वीकृती, अटींचे तपशील, कालमर्यादा आणि साक्षीदारांचा उल्लेख असे. मोगल प्रशासनातही अशी करारपत्रे प्रचलित होती; विशेषतः अकबर यांच्या महसूल सुधारणांनंतर महसूल करार अधिक नियमित झाले. दस्त/कबुलायत ही कागदपत्रे आर्थिक व कायदेशीर व्यवहारांच्या अभ्यासासाठी महत्त्वाची प्राथमिक साधने आहेत.

वसीयतनामा - वसीयतनामा म्हणजे एखाद्या व्यक्तीने आपल्या मृत्यूनंतर मालमत्तेचे वाटप कसे करावे याविषयी

केलेली अधिकृत लेखी व्यवस्था. यात वारसांची नावे, संपत्तीचे तपशील, अटी व साक्षीदारांचा उल्लेख असतो. मराठा व मोगल काळात कुटुंबीय व वतनहक्कांशी संबंधित वाद टाळण्यासाठी वसीयतनामा तयार केला जाई. अशा दस्तऐवजांमधून कौटुंबिक रचना, वारसाहक्क पद्धती आणि स्त्री–पुरुषांच्या मालकीहक्कांची माहिती मिळते.

कर्जरोखे - कर्जरोखा म्हणजे एखाद्या व्यक्तीने विशिष्ट रक्कम कर्ज म्हणून घेतल्याची आणि ती ठराविक कालावधीत व्याजासह परत करण्याची लेखी कबुली. यात कर्जरक्कम, व्याजदर, कालमर्यादा, हमीदार आणि साक्षीदार नमूद असत. गावपातळीवरील सावकार, व्यापारी किंवा वतनदार यांच्यातील व्यवहारांसाठी कर्जरोखे तयार होत. मराठा काळातील आर्थिक व्यवस्थेत अशा रोख्यांमुळे स्थानिक पतप्रणालीचे स्वरूप स्पष्ट होते. छत्रपती शाहू महाराज यांच्या काळातील महसूल व आर्थिक व्यवहारांच्या नोंदींमध्ये कर्जरोख्यांचे संदर्भ आढळतात. कर्जरोखे हे आर्थिक इतिहास आणि पतव्यवस्थेच्या अभ्यासासाठी अत्यंत मौल्यवान स्रोत मानले जातात.

- **धार्मिक व सामाजिक कागदपत्रे :**

देवस्थान नोंदी - देवस्थान नोंदी म्हणजे मंदिर किंवा धार्मिक संस्थांच्या मालमत्ता, उत्पन्न, खर्च, दान, उत्सवव्यवस्था आणि पुजारी/सेवेकरी नियुक्त्या यांची अधिकृत लेखी नोंद. मराठा काळात या नोंदी मोडी लिपीत ठेवण्यात येत आणि देवस्थानांना दिलेल्या इनामजमिनी, करसवलती व धार्मिक विधींचे तपशील नमूद असत. छत्रपती शिवाजी महाराज यांनी अनेक देवस्थानांना संरक्षण व अनुदाने दिली, तर छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात देवस्थानांच्या महसुली व्यवस्थेची नोंद अधिक नियमित झाली. या नोंदींमधून धार्मिक अर्थव्यवस्था, सामाजिक संरचना आणि स्थानिक सत्ताकेंद्रांचा अभ्यास करता येतो.

दानपत्रे - दानपत्र म्हणजे एखाद्या व्यक्तीने किंवा राज्यकर्त्याने धार्मिक, सामाजिक किंवा शैक्षणिक कार्यासाठी जमीन, पैसा किंवा मालमत्ता दान दिल्याचे अधिकृत लेखी प्रमाणपत्र. दानपत्रात दात्याचे नाव, दानाचे स्वरूप, मर्यादा, अटी आणि साक्षीदार नमूद केलेले असतात. मोगल व मराठा दोन्ही काळात धार्मिक संस्थांना दान देण्याची परंपरा होती. दानपत्रांमधून समाजातील दानसंस्कृती, धार्मिक सहिष्णुता आणि जमीनधारणा रचना यांची माहिती मिळते.

समाज–सभा निर्णयपत्रे - समाज–सभा निर्णयपत्रे म्हणजे गावसभा, जातसभा किंवा स्थानिक पंचायतीने घेतलेल्या निर्णयांची लेखी नोंद. यात सामाजिक वाद, विवाह–घटस्फोट, वतनविवाद, शिस्तभंग किंवा दंड यांचे निर्णय नमूद असतात. मराठा काळात गावपातळीवरील प्रशासनात पंचायतींना महत्त्वाचे स्थान होते, आणि त्यांच्या निर्णयांची लेखी नोंद ठेवली जाई. अशा निर्णयपत्रांमधून स्थानिक न्यायपद्धती, सामाजिक नियम व परंपरा स्पष्ट होतात. इतिहासाच्या अभ्यासात ही कागदपत्रे तळागाळातील सामाजिक जीवनाचे वास्तव चित्र दर्शवणारे महत्त्वाचे प्राथमिक स्रोत मानले जातात.

एकंदरीत मोडी कागदपत्रे ही तत्कालीन प्रशासन, अर्थव्यवस्था, सामाजिक रचना आणि राजकारण समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाची प्राथमिक साधने आहेत. विशेषत मराठा कालखंडाचा अभ्यास करावयाचा असेल तर आपणास मोडी कागदपत्राचा आधार घ्यावा लागतो. मोडी कागदपत्रे विपुल प्रमाणात पुणे, मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद याठिकाणी असलेल्या पुरभिलेखागार मध्ये दिसून येतात. इतिहास संशोधनाच्या दृष्टीने ही सर्व कागदपत्रे **प्राथमिक स्रोत** म्हणून अत्यंत मौल्यवान आहेत.

संदर्भग्रंथ यादी :

1. भारत इतिहास संशोधक मंडळ. मोडी हस्तलिखित संग्रह. पुणे.
2. राजवाडे वि. का. (संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड. आठवा, पुणे, १९०३
3. टिळक श्री.ल., सहज सोपी मोडी लिपी, व्यास क्रिएशन्स, २०१०
4. संचालक, पुरभिलेख संचालन विभाग महाराष्ट्र शासन (संपा.), मोडी पत्रांचे विविध प्रकार खंड-१, पुरभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१५
5. खरे जी. एच., (संपा.), शिवकालीन पत्रे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे,१९३०
6. कुलकर्णी, एम.आर., मोडी लिपी परिचय आणि नमुना पत्रे, भारतीय इतिहास संकलन समिती, पुणे, २०१७
7. कुलकर्णी, एम.आर., तुम्हीच मोडी शिका, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०११
8. महाराष्ट्र राज्य अभिलेखागार. पुणे दफ्तर कलेक्शन. मुंबई.
9. म्हात्रे कृष्णाजी, चला शिकुया मोडी आपण, मोडी लिपी प्रसार मंडळ, मुंबई, २००३
10. पाटील एस. एम. (संपा.), मोडी लिपी प्रशिक्षण पुस्तिका, पुरभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१५

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

संभाजी मोहिते यांचा सुपे परगण्यातील कारभार : एक चिकित्सा

डॉ. शशिकांत महादेव मोहिते

सहयोगी-प्राध्यापक, इतिहास विभाग,

आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली.

Corresponding Author - डॉ. शशिकांत महादेव मोहिते

DOI - 10.5281/zenodo.19707160

प्रस्तावना:

सुप्रसिद्ध विचारवंत थॉमस कार्लाईल यांच्या मते, "इतिहास म्हणजे थोर व्यक्तींची चरित्रे आणि त्यांनी बजावलेली कामगिरी होय." कोणत्याही कालखंडाशी संबंधित असलेला इतिहास हा प्रामुख्याने स्थल, काल आणि व्यक्ती या तीन घटकांनी परस्पर बांधलेला असतो. त्यातही व्यक्ती हा घटक सर्वात महत्त्वाचा असतो. कारण सजीव व्यक्तीच्या कार्याच्या अनुषंगाने स्थळ व काल महत्त्वपूर्ण ठरतात.परंतु दुर्दैवाने कधी-कधी इतिहासातील एखाद्या व्यक्तीने बजावलेली कामगिरी समकालीन किंवा उत्तरकालीन कागदपत्रात रेखाटली जात असताना कळत-न-कळत झालेल्या चुकांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडते. कोणाच्या बाबतीत असे होऊ नये म्हणूनच कागदपत्रांचे चिकित्सक परीक्षण करणे गरजेचे असते.तसे केले नाही तर इतिहासातील एखादे व्यक्तिमत्व अगदी सहजपणे 'आरोपीच्या पिंजऱ्यात' उभा राहू शकते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे तळबीडकर मोहिते घराण्यातील तुकोजी (बाजी) पुत्र संभाजी (बाजी) मोहिते होय.सुपे परगण्याचे सरहवालदार म्हणून त्यांनी केलेला कारभार समकालीन कागदपत्रांतील माहितीमुळे अगदी सहजपणे 'गैर-कारभार' या सदरात मोडणारा दिसतो. तथापि, सदर कागदपत्रांचे बारकाईने चिकित्सक परीक्षण आणि विश्लेषण केले तर संभाजी (बाजी) मोहिते यांनी सुपे परगण्याचे सरहवालदार म्हणून काम पाहताना त्यांच्यावर जे आक्षेप घेतले गेले आहेत ते किती तकलादू आणि बिनबुडाचे आहेत हे सिद्ध होते.किंबहुना ते सिद्ध करण्याचा एक छोटासा प्रयत्न म्हणजेच हा प्रस्तुत शोधनिबंध होय.

संशोधन पद्धतीचे स्वरूप:

कोणत्याही विषयाचे शास्त्रशुद्ध ज्ञान मिळविण्याची एक 'संशोधन पद्धती' असते. इतिहासाचे शास्त्रशुद्ध ज्ञान प्राप्त करण्यासाठी 'ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा' अवलंब केला जातो. त्यानुसार प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने पुढील मुद्द्यांच्या आधारे संशोधन पद्धतीचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

१. समस्या सूत्रण :

मराठ्यांच्या इतिहासातील तळबीडकर मोहिते घराण्यातील तुकोजीपुत्र संभाजी हे शाहजी राजे आणि शिवाजी राजे यांच्या समकालीन होते. ते शाहजी राजांचे मेहुणे आणि शिवाजी राजांचे सावत्र मामा होते. शिवाजी राजांनी शिमग्याच्या सणाचे पोस्त मागण्याच्या बहाण्याने सुप्याला जाऊन त्यांना कैद केले असा संदर्भ इतिहासात मिळतो. सुपे परगण्याचा संभाजी मोहिते यांनी केलेला गैरकारभार हे त्यांच्या कैदेचे मुख्य कारण होते असे बरेच इतिहासकार सांगतात. संभाजी मोहिते यांच्या सुपे

परगण्यातील कारभारासंदर्भात उपलब्ध कागदपत्रांचा सखोल अभ्यास न झाल्यामुळे इतिहासकारांचे असे मत बनले आहे. हा अभ्यास न होणे ही मराठ्यांच्या इतिहासातील एक त्रुटी किंवा उणीव जाणवते.ती दूर करण्याच्या उद्देशाने हा छोटासा प्रयत्न केला आहे.

२. विषय निवडीचे महत्त्व:

सुपे हा शाहजी राजांच्या जहागिरीतील महत्त्वाचा परगणा होता. शाहजी राजांनी संभाजी (बाजी) मोहिते यांना या परगण्याचे सरहवालदार म्हणून नेमले होते.सरहवालदार म्हणून संभाजी मोहिते यांनी जो कारभार पाहिला त्यासंदर्भात उपलब्ध कागदपत्रांतून जी माहिती मिळते त्यानुसार हा सगळा प्रकार म्हणजे 'गैरकारभार' असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तथापि सदर कागदपत्रांचे बारकाईने चिकित्सक परीक्षण केले असता कधी-कधी ऐतिहासिक कागदपत्रेच कशा पद्धतीने दिशाभूल करणारी असतात याची प्रचिती येते. या दृष्टिकोनातून पाहिले तर या विषयाचे महत्त्व अनन्य साधारण स्वरूपाचे आहे.

३. विषयाची व्याप्ती आणि मर्यादा:

प्रस्तुत शोधनिबंध सुपे परगण्याशी संबंधित आहे.त्यामुळे शाहजी राजांची जहागीर आणि शिवाजी राजांच्या प्रारंभिक हालचाली या घटकांना व्यापणारा विषय म्हणून या विषयाची व्याप्ती मोठी बनते. परंतु सरहवालदार म्हणून संभाजी मोहिते यांनी केलेला कारभार एवढाच विषय अभ्यासासाठी निवडला असल्यामुळे ही या शोधनिबंधाची मर्यादाही ठरते.

४. तथ्य संकलन व साधन चिकित्सा:

प्रस्तुत शोधनिबंध तयार करताना उपलब्ध आणि प्रकाशित तथ्यांचा (संदर्भ साधनांचा) उपयोग केला आहे. त्या अनुषंगाने विविध ग्रंथालयातून संदर्भ ग्रंथ संकलित केले आहेत. तसेच संदर्भ साधनांची चिकित्सा केली आहे. संदर्भ साधनांची यादी शेवटी वेगळी जोडली आहे.

उद्दिष्टे:

प्रस्तुत शोधनिबंध तयार करताना पुढील उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवली आहेत.

१. संभाजी मोहिते यांचा पूर्ववृत्तांत आणि उत्कर्ष याचा अभ्यास करणे.
२. तत्कालीन सुपे परगण्याविषयी सविस्तर माहिती घेणे.
३. सुपे परगण्याचे सरहवालदार म्हणून काम पाहताना संभाजी मोहिते यांच्यावर गैरकारभाराविषयी घेतलेले आक्षेप आणि त्यासंदर्भातील वस्तुस्थिती समजून घेणे.

गृहीतके:

प्रस्तुत शोधनिबंधाची गृहीतके पुढीलप्रमाणे गृहीत धरली आहेत.

१. संभाजी मोहिते हे तळबीडकर मोहिते घराण्यातील स्वकर्तृत्वाने पुढे आलेले एक कर्तबगार व्यक्तिमत्व होते.
२. तत्कालीन सुपे परगणा विस्तृत आणि राजकीय व लष्करीदृष्ट्या खूप महत्त्वाचा प्रदेश होता.
३. सुपे परगण्याचे सरहवालदार म्हणून काम पाहताना संभाजी मोहिते यांच्यावर घेतलेले आक्षेप चुकीचे, निराधार व अनैतिहासिक आहेत.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंध तयार करताना 'ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा' अवलंब केला आहे. विषयाच्या अनुषंगाने उपलब्ध साधनांचा शोध घेऊन, त्यांचे परीक्षण करून, वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अन्वयार्थ निरूपण करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत संशोधन हे उपलब्ध साधनांवर केले असल्यामुळे ते ऐतिहासिक संशोधन पद्धतीच्या 'विश्लेषणात्मक संशोधन' या प्रकारात मोडणारे आहे.

संभाजी मोहिते यांचा पूर्ववृत्तांत आणि उत्कर्ष:

संभाजी मोहिते हे तळबीडच्या मोहिते घराण्यातील एक कर्तबगार व्यक्तिमत्व होते. रतोजी मोहिते हे तळबीड येथील मोहिते घराण्याचे मूळ पुरुष होय. त्यांनी स्वकर्तृत्वाने अहमदनगरच्या निजामशाहीत सरदारकी मिळविली होती. निजामशाही विरुद्ध झालेल्या एका अंतर्गत बंडाळीप्रसंगी रतोजींनी खूप मोठा पराक्रम गाजवून ती बंडाळी मोडून काढली. त्यामुळे निजामशहाने खुश होऊन रतोजीला 'बाजी' हा किताब दिला.[१] या रतोजी (बाजी) मोहिते यांना थोरले संभाजी (बाजी) आणि धाकटे तुकोजी (बाजी) असे दोन सुपुत्र होते. त्यापैकी थोरले संभाजी (बाजी) जावळीकडे गेले तर धाकटे तुकोजी (बाजी) दौलताबादेस मलिक अंबराकडे चाकरी करू लागले. तुकोजींची पत्नी 'तंगाईबाई' या बुधकर घाटगे घराण्यातील कन्या होत्या. तुकोजींना थोरले संभाजी (बाजी) आणि धाकटे धारोजी (बाजी) असे दोन सुपुत्र होते.[२] संभाजी (बाजी) यांचा विवाह तानाजी घाटगे यांची कन्या ' गंगाबाई ' हिच्याशी झाला होता, तर धारोजी (बाजी) यांना घोरपडे यांची कन्या ' सुनाबाई ' केली होती.[३]

मोहिते मुळचे तळबीडचे रहिवासी नव्हते. तळबीडची मुळची पाटिलकी हे चव्हाण घराण्याकडे होती. त्यांनी डोमुगडे नावाचे मुतालिक (प्रतिनिधी) नेमले होते. परंतु कालांतराने हे डोमुगडे इतके बलिष्ठ बनले की, त्यांनी मूळच्या चव्हाण पाटलांना ठार करून स्वतः पाटिलकी बळकावली. त्या वेळी तिथल्या रयतेने मूळच्या चव्हाण पाटलांपैकी धाकाई आवा या स्त्रीची आणि तुकोजींची भेट घडवून आणली. धाकाई आवा यांच्या आग्रहास्तव तुकोजींनी डोमुगड्यांना ठार करून तळबीडची पाटिलकी प्राप्त केली.[४] दुर्दैवाने पुढे अंतर्गत वादातून तळबीडच्या मुसलमान मोकाशाने तुकोजींची हत्या केली. त्यानंतर तंगाईबाई आपल्या दोन मुलांसह पाटणला बाबाजी पाटणकर यांच्या आश्रयास गेल्या. तिथे १२ वर्षे वास्तव्य केल्यानंतर पुढे ही मंडळी तळबीडला परत आली. त्यानंतर इथे मोहिते घराण्यातील भाऊबंदकीचा वाद उफाळून आला. तो वाद मिटल्यानंतर जावळी तर्फेचे मोहिते आणि तुकोजीचे वारस ही सर्व मंडळी एकत्र राहू लागली.[५]

संभाजी (बाजी) मोहिते यांचा जन्म नेमका कधी झाला याविषयी कोणताही विश्वसनीय पुरावा उपलब्ध नाही. पण वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांचे बालपण पाटण या ठिकाणी व्यतीत झाले. त्यांचे आजोळ आणि सासुरवाडी दोन्ही घाटगे घराण्यातील असल्यामुळे आणि घाटगे घराणे हे आदिलशाहीतील एक प्रतिष्ठित आणि कर्तबगार घराणे असल्यामुळे घाटगेंच्या सांगण्यावरून मोहिते घराण्याचा प्रवास निजामशाहीकडून आदिलशाहीकडे झाला. आदिलशाहीच्या वतीने सेवा बजावत असताना 'सालपा घाटच्या' लढाईच्या वेळी संभाजी व धारोजी या मोहिते बंधूंनी खूप मोठा पराक्रम गाजवून शाहजी राजांची झालेली कोंडी फोडण्याचे महत्वाचे काम केले.[६] त्यामुळे शाहजी राजांची या मोहिते बंधूंवर खूप मर्जी बसली. त्यातूनच एका बाजुला तुकाबाईंचे शाहजी राजांशी लग्न झाले आणि दुसरीकडे शाहजी राजांनी आदिलशाहीतील आपले वजन वापरून मोहिते बंधूंना तळबीडची देशमुखी मिळवून दिली.[७]अशा प्रकारे संभाजी मोहिते यांचा उत्कर्ष झाला. थोडक्यात, संभाजी मोहिते म्हणजे स्व कर्तृत्वाने पुढे आलेले एक कर्तबगार व्यक्तिमत्व होते.

तत्कालीन सुपे परगणा ; एक दृष्टिक्षेप:

शिवकालीन सुपे परगणा म्हणजे सध्याचा भीमथडी किंवा बारामती तालुका होय.[८] सुपे परगण्यात हवेली आणि बारामती अशा दोन तरफा केलेल्या होत्या. सुपे परगण्यात एकूण ६३ गावे होती. त्यापैकी ४२ गावे हवेली तरफेत येत होती तर २१ गावे बारामती तरफेत मोडत होती.[९] सुपे परगण्याची देशमुखी सामराज काटे व संभाजी काटे या

बंधूंकडे होती.[१०] सुपे परगणा हा शाहजी राजांना मुकासा म्हणून मिळाला होता. शाहजी राजे कर्नाटकात असताना शिवाजी महाराजांकडे सुपे परगण्यातील काही गावे आली. उदाहरणार्थ लोणी हे गाव शके १५६८ अधिक श्रावण म्हणजे इ.स. १६४६ साली महाराजांकडे आले होते.[११] पुढे पणदरे हे गावही महाराजांकडे आले. पुढे २१ जुलै १६४९ रोजी संपूर्ण सुपे परगणा महाराजांच्या ताब्यात आला.' साहेबास मोकासा अर्जानी झाला आहे.' असा एक संदर्भ उपलब्ध आहे.[१२] अर्जानी होणे म्हणजे मिळणे किंवा प्राप्त होणे होय. परंतु उपलब्ध साधनांवरून असे दिसते की, पुढे केवळ पाच ते सहा महिनेच हा परगणा महाराजांकडे राहिला. कारण पुढे लगेचच शाहजी राजांनी सुपे परगण्यावर आपला अंमल बसविला. थोडक्यात, सुपे परगणा सुरुवातीला शाहजी राजांकडे, नंतर काही महिन्यांसाठी शिवाजी राजांकडे, पुढे काही वर्षांसाठी शाहजी राजांकडे आणि शेवटी कायमस्वरूपी शिवाजी महाराजांकडे फिरून गेल्याचे दिसून येते. सुपे परगणा भौगोलिकदृष्ट्या विस्तृत आणि राजकीय व लष्करी दृष्ट्या फार महत्त्वाचा असल्यामुळेच त्यावर आपला अंमल असावा असे शाहजी राजे आणि खुद्द शिवाजी महाराज यांना वाटत होते.

संभाजी (बाजी) मोहिते; सुपे परगण्याचे सरहवालदार:

शाहजी राजांनी आपले मेहुणे संभाजी मोहिते यांची सुपे परगण्याचे सरहवालदार म्हणून नेमणूक केली.[१३]बहुधा तुकाबाईंच्या आग्रहास्तव हे नेमणूक केली असावी असे संभवते. अर्थात ही नेमणूक नेमकी कधी केली हे निश्चितपणे सांगता येत नसले तरी २६ ऑक्टोबर १६५२ रोजी मौजे लाट किंवा लाटे आणि कोन्हाळे बुद्रुक या गावातील पाटलांच्या भांडणाविषयीचा एक महजर उपलब्ध आहे. त्यात संभाजी मोहिते सरहवालदार आणि रखमांगद मुजुमदार असा उल्लेख आला आहे.[१४] यावरून इ.स.१६४९ ते इ.स. १६५२ या दरम्यान कधीतरी त्यांची सरहवालदार म्हणून नेमणूक झाली असावी.

मध्ययुगीन काळात एखाद्या मोठ्या सरदाराकडे एकाच वेळी अनेक परगणे मुकासा म्हणून दिले जात असत. मुकासा, मोकासा, जहागीर हे सर्व शब्द समानार्थी असून एखाद्या सरदाराला नेमून दिलेल्या प्रदेशातून कर वसूल करण्याचा जो हक्क दिला जाई त्यास मुकासा असे म्हणत. आपल्याकडे मुकासा म्हणून असलेल्या परगण्याचा कारभार पाहण्यासाठी मुकासदार (मुकासा धारण करणारा व्यक्ती) आपला जो नोकर नेमीत असे त्याला हवालदार किंवा सरहवालदार असे म्हणत. सरहवालदाराच्या मदतीला एक मजमूदार नेमलेला असे. तो हिशोब ठेवण्याचे काम करीत असे. या खेरीज जरुरीनुसार इतरही थोडा बहुत नोकर वर्ग मुकासदार हा आपल्या हवालदाराच्या मदतीकरिता नेमीत असे.[१५]

सरहवालदार संभाजी मोहिते यांचा कारभार:

संभाजी मोहिते यांनी सरहवालदार म्हणून सर्वसाधारणपणे इ.स.१६५२ ते इ.स. १६५६ या कालावधीत सुपे परगण्याचा कारभार पाहिला. प्रथम दर्शनी हा कारभार म्हणजे एक प्रकारचा गैरकारभारच होता असे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते. तथापि त्या कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतर संभाजी मोहिते यांच्या कारभारावर जे आक्षेप घेतले जातात ते निरर्थक, चुकीचे व बिनबुडाचे असल्याचे दिसून येते. संभाजी मोहिते यांच्या कारभारासंदर्भात महत्त्वाचे दोन मुद्दे आहेत.ते पुढीलप्रमाणे—

१. सावकारीचे व फसवणुकीचे प्रकरण:

संभाजी मोहिते यांच्या बाबतीतील सावकारीचे व फसवणुकीचे प्रकरण म्हणजे त्यांनी रामाजी बाबाजी यांना दिलेले २५ होन कर्ज होय. रामाजी बाबाजी हे सुपे

परगण्याचे देशपांडे होते.[१६]संभाजी मोहिते यांनी विठ्ठल सेट (सावकार) याच्या गुजारतीने (मध्यस्थीने) रामाजी बाबाजी यांना २५ होन कर्जाऊ स्वरूपात उसने दिले होते. रामाजी बाबाजीने त्रिंबकपंत म्हणजेच त्रिंबक विश्वनाथ याच्या मध्यस्थीने कालांतराने २७ होन संभाजी मोहिते यांना परत केले होते.[१७] २५ होन उसने किंवा कर्जाऊ रकमेच्या मोबदल्यात २७ होन मिळाल्यानंतरही संभाजी मोहिते यांनी पुन्हा २५ होनांची मागणी रामाजी बाबाजीकडे केली असा उपलब्ध कागदपत्रांचा एकंदरीत सूर आहे.[१८] त्यामुळे हा सर्व प्रकार म्हणजे सावकारशाहीचा व त्यातही पुढे जाऊन फसवणुकीचा असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते.

परंतु यासंदर्भात काही बाबी नजरेआड करता येत नाहीत. उदाहरणार्थ त्या काळी सावकारी हा काही फार गंभीर स्वरूपाचा गुन्हा मानला जात नसे. शिवाय ज्या पत्रातून सावकारी व फसवणुकीसंबंधी संभाजी मोहिते यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला जातो त्या पत्रात विठ्ठल सेट (सावकार) याच्या गुजारतीचा म्हणजे मध्यस्थीचा उल्लेख आलेला आहे. यावरून ही सावकारी प्रत्यक्ष संभाजी मोहिते यांनी केली की विठ्ठल सेट (सावकार) यांनी केली हा प्रश्न तयार होतो. सर्वसाधारणपणे त्याकाळी सावकारच एखाद्याला कर्जरूपाने काही विशिष्ट रक्कम देत असे असा तत्कालीन रिवाज आढळतो. त्यामुळे विठ्ठल सेट या सावकारानेच रामाजी बाबाजीला कर्जाऊ रुपात उसने पैसे दिले असण्याची शक्यता जास्त संभवते. पण तरीही २५ होन कर्जाच्या मोबदल्यात २७ होन घेऊन परत पुन्हा २५ होनांची मागणी करणे कोणत्याही अर्थाने न्याय संगत असू शकत नाही. म्हणून वादा करिता संभाजी मोहिते यांच्यावरचा सावकारीचा व फसवणुकीचा आक्षेप सत्य म्हणून गृहीत धरू या.

आता ज्या पत्राच्या आधारे हा आरोप केला गेला आहे त्या पत्राची उलट तपासणी किंवा शहानिशा केली असता असे आढळते की सदर पत्र अंताजी दत्तो याने त्रिंबक विश्वनाथ याला लिहिले आहे. त्यात " संभाजी मोहिता रामाजी बाबाजीच्या गला पडिला आहे " असा उल्लेख आला आहे. गला पडणे म्हणजे गळ्याला मिठी मारून अडविणे होय. या पत्रासंदर्भात त्याचा लाक्षणिक अर्थ 'तगादा लावणे' असा होतो. वरवर पाहता यात आक्षेपार्ह काय आहे असे वाटू शकेल. तथापि इथे दोन बाबी लक्षात ठेवणे गरजेचे ठरते. एक म्हणजे संभाजी मोहिते हे सुपे परगण्याचे सरहवालदार होते. अशा परिस्थितीत २५ होन रकमेसाठी त्यांनी तगादा लावणे वगैरे असल्या कोणत्या गोष्टी केल्या असतील असे वाटत नाही. दुसरे म्हणजे या पत्रात अंताजी दत्तोने संभाजी मोहिते यांचा 'संभाजी मोहिता' असा एकेरी उल्लेख केला आहे. ही बाब यासाठी लक्षात घ्यावी लागते की, संभाजी मोहित्यांचा असा एकेरी उल्लेख करणारा हा अंताजी दत्तो स्वतः नेमका कोण होता? या प्रश्नाचे उत्तर सदर पत्राच्या मायन्यातच सापडते. त्यात "अंताजी दत्तो अजहत सामराज काटे देशमुख परगणे सुपे" असा उल्लेख आला आहे. यातील अजहत किंवा अजहती हा अज - जहत - इ (म्हणजे च्या बाजूने किंवा च्या वतीने) या फारशी शब्दाचा मराठी अपभ्रंश आहे.[१९] याचा या पत्रासंदर्भात थोडक्यात अर्थ असा की,"सुपे परगण्याचा देशमुख सामराज काटे याच्या वतीने अंताजी दत्तो " असा होतो. म्हणजे अंताजी दत्तो हा सामराज काटे याचा नोकर होता. एखाद्या परगण्याच्या देशमुखाने किंवा त्याच्या वतीने त्याच्या एखाद्या नोकराने किंवा एखाद्या 'क्ष'व्यक्तीने त्या परगण्याच्या सर हवालदाराचा एकेरी उल्लेख करणे हे कोणत्याही शिष्टाचारामध्ये बसत नाही. कारण सरहवालदार हा दर्जाने देशमुखापेक्षा श्रेष्ठ होता. त्यामुळे ज्या पत्रातून ही सगळी माहिती मिळते ते पत्रच विश्वसनीयतेच्या कसोटीवर टिकत नाही. त्यामुळे संभाजी मोहिते यांच्याबाबत केला

जाणारा सावकारीचा किंवा फसवणुकीचा आक्षेप सत्य म्हणून स्वीकारता येत नाही.

२. लाचखोरी व मारहाण प्रकरण:

हे प्रकरण सुपे परगण्यातील मौजे पणदरे या गावी राहणाऱ्या रखमाजी उंडे व अंताजी उंडे यांच्या कुलकर्ण व ज्योतिषपणाच्या वतनाशी संबंधित आहे. या उंडे बंधूंकडे पाच-सात गावचे कुलकर्ण व ज्योतिषपणाचे वतन होते. थोरल्या दुष्काळाच्या वेळी परिस्थिती इतकी हाताबाहेर गेली की या उंडे बंधूंच्यावर उपासमारीचे संकट ओढवले. त्यामुळे त्यांनी कोल्हाळे बुद्रुक या गावचे कुलकर्ण व ज्योतिषपणाचे वतन कोल्हाळे बुद्रुकचा मोकदम (पाटील) लखुजी खोमणे याच्या मध्यस्थीने जेजुरीच्या तिमाजी खंडेराव याला २० होनांना विकले. तिमाजीकडे हे वतन इ. स. १६४५ पर्यंत होते. दरम्यान हे उंडे बंधू मरण पावले. त्यांच्या पश्चात रखमाजीची मुले विसाजी व रामाजी कर्ती झाली. त्यांची परिस्थिती सुधारल्यानंतर त्यांनी आपल्या वडिलांनी तिमाजीला विकलेले वतन परत मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून त्यांनी सुपे परगण्याचे सरहवालदार संभाजी मोहिते यांची गाठ घेऊन त्यांनी आपल्याला मदत करावी म्हणून त्यांना ४५ होन रोख रक्कम आणि ३० होन रकमेची घोडी अशी एकूण ७५ होन रकमेची लाच दिली. या प्रकारानंतर संभाजी मोहिते यांनी तिमाजीला बोलावून घेतले आणि विसाजी व रामाजी यांच्याकडून २० होन घेऊन त्यांचे वतन त्यांना परत करण्याचे आवाहन केले. परंतु तिमाजी या गोष्टीला तयार झाला नाही म्हणून संभाजी मोहिते यांनी त्याला मारहाण करून, त्याच्या पायात बेड्या घालून, त्याला तीन महिने कैदेत ठेवले. कैदेतही त्याला जबरदस्त मारहाण करण्यात आली.[२०] ही मारहाण इतकी अमानुष होती की, त्यामुळे तिमाजीच्या पाठीचे वाघोडे केले (निघाले), म्हणजे पाठीच्या चिंध्या झाल्या. शेवटी संभाजी मोहिते यांनी जबरदस्तीने तिमाजीला २० होन देऊन त्याच्याकडून रखमाजी व अंताजी उंडेना लिहून दिलेले वृत्तीपत्र काढून घेतले आणि शेवटी त्याची कैदेतून मुक्तता केली. कैदेतून सुटताच तिमाजी थेट कर्नाटकातील बेनकल येथे जाऊन शाहजी राजांना भेटला आणि घडलेला सर्व इतिवृत्तांत त्याने त्यांना सांगितला. तेव्हा शाहजी राजांनी या संदर्भात गोतसभा बोलवावी आणि त्यात ज्याच्या बाजूने निवाडा होईल त्याला ते वतन द्यावे अशा आशयाचे पत्र सुपे परगण्यातील देशमुखांना व कारकुनांना लिहिले व ते पत्र तिमाजीच्या हाती दिले.[२१] ही सर्व माहिती खुद्द शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत २८ सप्टेंबर १६५८ रोजी झालेल्या निवाड्याच्या कागदामध्ये म्हणजे महजरामध्ये मिळते. या सर्व हकीकती वरून 'एक भ्रष्ट व जुलमी अधिकारी' अशी संभाजी मोहिते यांची प्रतिमा तयार होते. परंतु या महजरातील माहिती समकालीन इतर चार कागदपत्रांशी पडताळून पाहिली असता या महजराच्या विश्वसनीयतेवर शंका उपस्थित होते. तसेच संभाजी मोहिते यांच्या लाचखोरी प्रकरणाविषयी संशयाचे धुके दाटते. ती चार कागदपत्रे पुढीलप्रमाणे----

१) कागदपत्र क्रमांक -०१ :

हा कागद म्हणजे उंडे बंधूंनी इ.स. १६२८ मध्ये तिमाजी खंडेराव याला विकलेल्या वतनाचे विक्रीपत्र होय. प्रसिद्ध इतिहास संशोधक श्री गजानन भास्कर मेहेंदळे यांनी या कागदाविषयी तीन आक्षेप नोंदविले आहेत. पहिला आक्षेप म्हणजे या कागदपत्रातील तारखा परस्परांशी जुळत नाहीत. उदा. सुहूर सन आणि शक वर्ष यांचा मेळ बसत नाही. दुसरा आक्षेप म्हणजे या विक्रीपत्रात दौलत मंगल मामल्याचा उल्लेख येतो. शके १५५० म्हणजे इ.स. १६२८ साली दौलत मंगल मामला अस्तित्वातच नव्हता. तिसरा आक्षेप म्हणजे या पत्रात साक्षीदार म्हणून ज्या १४ जणांची नावे आली आहेत त्यापैकी १२ जणांची नावे पुढे ३०

वर्षांनी शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत जो निवाडा झाला त्या महजरात दिलेली आढळतात. म्हणजे हे १२ लोक पुढे ३० वर्षे जिवंत होते असा त्याचा अर्थ होतो. अर्थात ही शक्यता फार कमी आहे. कारण थोरल्या दुष्काळात बरेच लोक मरण पावल्याचा संदर्भ मिळतो. शिवाय यासंदर्भात अजून एक आक्षेप असा आहे की, सदर पत्रावर कोल्हाळे बुद्रुक किंवा जेजुरी येथील मोकदम कुलकर्णी यांच्या साक्षीदार म्हणून सह्या असणे गैर नाही. परंतु सुपे परगण्यातील कोल्हाळे खुर्द, जळगाव आणि पुणे परगण्यातील वडगाव येथील मोकदमांचे नावे असण्याचा काही एक संबंध नाही. त्यामुळे हे पत्रच बनावट आहे असे दिसते.[२२]

२) कागदपत्र क्रमांक - ०२:

हे पत्र म्हणजे तिमाजी खंडेराव याच्या तक्रारीनंतर शाहजी राजांनी सुपे परगण्याच्या देशमुखांना व कारकुनांना गोतसभा भरवून न्यायनिवाडा करण्या विषयीचे पत्र आहे. या पत्रामध्ये इ. स.१६२८ मध्ये उंडे बंधूंनी वतनाची विक्री का केली ? पुढे त्यांच्या मुलांच्या काळात ते वतन परत मिळवण्यासाठी काय प्रयत्न झाले याचा उल्लेख आलेला आहे. परंतु या पत्रात संभाजी मोहिते यांचे थेट नाव कुठेही घेतलेली नाही. उलट विसाजीने तिमाजीच्या पायात बेड्या घालून, त्याला कैदेत टाकून, जबरदस्तीने त्याला २० होन देऊन, विक्री पत्र परत घेतल्याचा उल्लेख आला.[२३] तसेच लाचखोरी विषयी एक चकार शब्दही कुठे आढळत नाही. त्यामुळेच २८ सप्टेंबर १६५८ रोजी शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत झालेल्या महजरावरच शंका निर्माण होते.

३) कागदपत्र क्रमांक - ०३:

हा कागद म्हणजे तिमाजी खंडेराव याने पुणे परगण्याच्या खजिन्यात भरलेल्या ७५ होनांची पोचपावती म्हणून पुणे परगण्याचा हवालदार शिवाजी किटो याने त्याला दिलेल्या २१ नोव्हेंबर १६५८ या तारखेच्या पत्राची नक्कल होय. २८ सप्टेंबर, १६५८ रोजीच्या महजरातील माहितीवरून असे दिसते की, तिमाजी खंडेराव याला या प्रकरणात बरीच झळ सोसावी लागली. त्याला तीन महिने कैदेत पडावे लागले, अमानुष मारहाण सहन करावी लागली, कर्नाटकात जावे लागले, शिवाय हरकी म्हणून शिवाजी राजांना २० होन द्यावे लागले. परंतु दुसरीकडे विसाजी व रामाजी उंडे यांना या प्रकरणात फार झळ बसली नाही. उलट त्यांना तिमाजीला बळेच दिलेले २० होन परत मिळाले. शिवाय संभाजी मोहिते यांना दिलेल्या लाचेएवढ्या किमतीची घोडी मिळाली. अर्थात ही घोडी शिवाजी राजांच्या पागेतून देण्यात आली होती म्हणून त्याची किंमत भरपाई म्हणून तिमाजीकडून वसूल करण्यात आली.

२१ नोव्हेंबर १६५८ रोजीच्या सदर पोचपावतीमध्ये उंडे बंधूंनी तिमाजीला वतन का विकले, त्याच्या पश्चात विसाजी व रामाजी यांनी संभाजी मोहिते यांच्या मदतीने जबरदस्तीने वतन मागे कसे घेतले, त्यामुळे तिमाजी शाहजी राजे यांच्याकडे जातो, शाहजी राजे गोतसभा भरवून निवाडा करण्याचा आदेश देतात इत्यादी सर्व बाबींचा उल्लेख आला आहे.परंतु ही पोचपावती आणि २८ सप्टेंबर १६५८ रोजीचा महजर यामध्ये एक मोठी विसंगती अशी आहे की, सदर पोच पावतीत विसाजी व रामाजी उंडा यांनी संभाजी मोहिते यांना पाऊणसे होनाची (७५ होन) घोडी लाच म्हणून दिल्याचा उल्लेख येतो. तर सदर महजरात ४५ होन रोख व ३० होन रकमेची घोडी दिल्याचा उल्लेख येतो. शिवाय हे ७५ होन तिमाजीकडून वसूल केले असा दावा या पावतीत केला आहे. परंतु महजरात सदर रक्कम तिमाजीकडून वसूल करावे असा कुठेही उल्लेख आलेला नाही. यावरून या महजरातील माहिती सत्याच्या कसोटीवर टिकत नाही असे दिसते.[२४]

४) कागदपत्र क्रमांक - ०४:

हा कागद म्हणजे तिमाजीचा नातू मुरारी बनाजी याला राजाराम महाराज किंवा शाहू महाराजांनी दिलेले वृत्तीपत्र होय. हे वृत्तीपत्र आणि मूळ म्हणजे यांच्यातील माहिती परस्पर जुळत नाही. विशेषतः तिमाजी कर्नाटकातून शाहजी राजांचे पत्र घेऊन येतो आणि संभाजी मोहिते यांना ते दाखवितो. त्या पत्राला संभाजी मोहिते जुमानीत नाहीत. उलट तिमाजीलाच दरडावतात, अशी माहिती या वृत्तीपत्रात मिळते. तर सदर महजरात तिमाजी शाहजी राजांकडून पत्र घेऊन येण्यापूर्वीच शिवाजी राजांनी मोहिते मामांना कैद करून सुपे परगणा ताब्यात घेतल्याचा उल्लेख येतो.[२५] यावरून सदर महजरावरच संशय निर्माण होतो.

निष्कर्ष:

वरील सर्व विवेचनावरून सारांश रूपाने असा निष्कर्ष काढता येईल की, सुपे परगणा हा शिवकालीन मराठ्यांच्या इतिहासातील राजकीय व लष्करी दृष्ट्या एक महत्त्वाचा परगणा होता. सर हवालदार म्हणून संभाजी मोहिते यांनी या परगण्याचा कारभार करताना त्यांच्यावर जे आरोप झालेले आहेत ते तत्कालीन कागदपत्रातील बनावट व चुकीच्या माहितीमुळे झाले आहेत. सावकारी आणि फसवणुकीच्या प्रकरणासंदर्भातला कागदही संशयास्पद आहे. तसेच लाचखोरी आणि तिमाजी खंडेराव याला केलेली मारहाण याविषयी माहिती देणारा शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत झालेल्या निवाड्याचा कागद म्हणजे महजर हा सुद्धा बनावटरित्या तयार केला गेलेला असावा हे त्या महजरातील माहिती इतर समकालीन चार कागदपत्रांशी पडताळून पाहिल्यानंतर समजते. त्यामुळे सुपे परगण्याचे सरहवालदार म्हणून संभाजी मोहिते यांनी केलेल्या कारभाराबद्दल गैरकारभाराच्या अनुषंगाने जे आक्षेप घेतले जातात ते चुकीचे व अनैतिहासिक आहेत. शिवाजी राजांनी १६५६ साली संभाजी मोहिते मामांना कैद करून सुपे परगणा काबीज केला. ही ऐतिहासिक वस्तुस्थिती असली तरी, त्यामागचे मूळ कारण स्वराज्य विस्तार करणे हेच होते. संभाजी मोहिते यांच्या कारभाराचा आणि सुपे परगणा काबीज करण्याचा अर्था - अर्थी परस्पर काहीही संबंध नव्हता.

संदर्भ सूची:

१. देव शंकर श्रीकृष्ण (संपा.), इतिहास आणि ऐतिहासिक (मासिक), वर्ष ३ रे, अंक २८ ते ३१, सत्कार्य उत्तेजक सभा, धुळे, प्रथमावृत्ती १९१८, पृष्ठ क्रमांक - १३० व १३१.

२. कित्ता,पृष्ठ क्रमांक - १३० ते १३२.

३. कित्ता,पृष्ठ क्रमांक - १३३ ते १३५.

४. कित्ता,पृष्ठ क्रमांक - १३० ते १३२.

५. कित्ता,पृष्ठ क्रमांक - १३३ ते १३५.

६. डॉ.पवार जयसिंगराव, शिवछत्रपती: एक मागोवा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती मार्च २०१८,पृष्ठ क्रमांक- ०५.

७. डॉ.पवार आप्पासाहेब (संपा.), ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड पहिला, शिवाजी विद्यापीठ ऐतिहासिक ग्रंथमाला, पुष्प पहिले, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९६९, पृष्ठ क्रमांक - २२ ते २४.

८. जोशी शं.ना., अर्वाचीन महाराष्ट्रेतिहासकालीन राज्यकारभाराचा अभ्यास, (भाग - १ ला), (१६०० - १६८०), पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९५९, पृष्ठ क्रमांक - १९३.

९. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती, खंड - १, भाग - २, पुस्तक दुसरे, प्रकाशन - गजानन भास्कर मेहेंदळे, पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी १९९९, पृष्ठ क्रमांक - ८१२.

१०. राजवाडे वि.का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड - २० वा, शिवकालीन घराणी, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती १९१५, पृष्ठ क्रमांक - २०.
११. कित्ता, लेखांक - १०, पृष्ठ क्रमांक - १०.
१२. पोतदार द. वा. व मुजुमदार शं.ना., शिवचरित्र साहित्य, खंड - २ रा, भारत इतिहास संशोधक मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्रमांक - ३३, पुणे, लेखांक - १५२, पृष्ठ क्रमांक - १७८.
१३. जोशी शं.ना., पूर्वोक्त , पृष्ठ क्रमांक - १९७.
१४. राजवाडे वि.का., पूर्वोक्त , पृष्ठ क्रमांक - ७६.
१५. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती, भाग - १, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी १९९९,
१६. पृष्ठ क्रमांक - ३०० व ३०१.
१७. राजवाडे वि.का., पूर्वोक्त , लेखांक - १८, पृष्ठ क्रमांक - २०.
१८. कित्ता, लेखांक -
१९. ०८, पृष्ठ क्रमांक - ०८.
२०. कित्ता, लेखांक -
२१. ०८, पृष्ठ क्रमांक - ०८.
२२. मेहेंदळे गजानन भास्कर, पूर्वोक्त , पृष्ठ क्रमांक -३१४.
२३. पुरंदरे कृष्णाजी वासुदेव व आपटे बळवंत दत्तात्रय (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड सातवा, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, स्वीय ग्रंथमाला क्रमांक - ५०, प्रथमावृत्ती १९३८, पृष्ठ क्रमांक - ६६ ते ७२.
२४. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती, खंड - १, भाग - २, पुस्तक दुसरे, प्रकाशन - गजानन भास्कर मेहेंदळे, पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी १९९९, पृष्ठ क्रमांक - १०९३.
२५. कित्ता, पृष्ठ क्रमांक - ११०० ते ११०४.
२६. पोतदार द. वा. व मुजुमदार शं.ना., पूर्वोक्त, लेखांक - १४०, पृष्ठ क्रमांक-१७२.
२७. मेहेंदळे गजानन भास्कर, पूर्वोक्त, पृष्ठ क्रमांक- १०९७ ते १०९९
२८. कित्ता, पृष्ठ क्रमांक - ११०५ व ११०६.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

तंजावरच्या मराठा राजघराण्याच्या आश्रयाने समर्थ रामदासी संप्रदायाचा दक्षिणेकडील विस्तार: 'ऐतिहासिक अभ्यास'

कु. सुशांत शंकर कदम

संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Corresponding Author - कु. सुशांत शंकर कदम

DOI - 10.5281/zenodo.19707185

प्रस्तावना:

मध्ययुगात भारतात सर्वत्र परंपरागत धार्मिक विचारांचा आणि व्रतवैकल्यांचा प्रभाव होता. दक्षिण व उत्तर भारतात धार्मिक जीवनाचे स्वरूप बाह्यतः एकच होते. परत अनेक प्रदेशात प्रादेशिक वैशिष्टचे दिसून येत होती. उदाहरणार्थ महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाच्या कार्याचा फार मोठा प्रभाव होता. दक्षिण भारतातही. भक्तिमार्गी संप्रदायाचा प्रभाव होता. सर्वसाधारणपणे हिंद राज्यकर्ते श्रुती, स्मृती, पुराणोक्त धर्माचेच पालन करीत असत. त्यांची न्यायव्यवस्था श्रुती, स्मृतींवरच आधारलेली असे. मध्ययुगात जातिसंस्था अधिक दृढ झालेली आढळते. अस्पृश्यता हिंदू समाजात खोलवर रुजलेली होती. इस्लामी धर्मसंप्रदायाचा जो प्रभाव उत्तरेत निर्माण झाला होता, त्यापासून अतिदक्षिणेकडील भाग बहुतांशी अलिप्त होता. त्यामुळे दक्षिण भारतामध्ये धार्मिक जीवनात प्राचीन काळाची मूल्ये अधिक प्रमाणात आढळतात. आणखी एक महत्त्वाचा फरक म्हणजे दक्षिण भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर युरोपियन राष्ट्रांनी वखारी प्रस्थापित केल्या होत्या, आणि त्यानिमित्ताने अनेक ख्रिश्चन धर्मप्रसारक दक्षिणेत आलेले होते. त्यामुळे उत्तरेपेक्षा दक्षिण भारतात ख्रिश्चन धर्मप्रणालींचा व युरोपातील सुधारणांचा अल्प प्रमाणात एक वेगळा प्रभाव आढळून येतो. तंजावरच्या धार्मिक जीवनाचा विचार करताना दक्षिण भारतातील धार्मिक जीवन लक्षात घेणे आवश्यक ठरते. समर्थ रामदास स्वामीनी देशभर जागृती करण्यासाठी पट्टाभिषिक्त राम व वीर हनुमानाची उपासना सुरू केली. त्यासाठी ठिकठिकाणी आपले मठ बांधले. शिष्यांनी आपला रोजचा थोडा वेळ वाचन मनन चिंतन यात व्यतीत करायला हवा असा समर्थांचा दंडक होता. म्हणून प्रत्येक रामदासी मठातून आपणांस समर्थांची रामायणे, करुणाष्टके, मनाचे श्लोक अन्य कविता यांचा संग्रह सापडतो. याशिवाय समर्थ शिष्यांनी केलेल्या वाङ्मयनिर्मितीची हस्तलिखितेही आढळतात. हे समर्थ संप्रदायाचे स्वरूप भारतातील सर्व रामदासी मठांमध्ये आपणांस आढळते. याला तंजावरातील समर्थ संप्रदायही अपवाद नव्हता. आपल्या संप्रदायाच्या प्रसारार्थ ठिकठिकाणी आपले शिष्य रामदासांनी पाठवून रामदासी मठांची स्थापना केली. तद्वत् तंजावरातही केली. [१]

समर्थांची 'महाराष्ट्र धर्म' संकल्पना आणि संघटन:

संत रामदास स्वामींनी स्थापित केलेल्या रामदासी संप्रदायाचा उद्देश केवळ पारमार्थिक साधनेपुरता मर्यादित नव्हता; तर तो राष्ट्र-पुरुषार्थ, सामाजिक संघटन आणि 'महाराष्ट्र धर्म' या संकल्पनांवर आधारित होता. समर्थांनी 'मराठा तितुका मेळवावा । आपुला "महाराष्ट्र धर्म" वाढवावा' आणि 'महाराष्ट्र राज्य करावे। जिकडे तिकडे' असा जो उपदेश केला, त्यातून संप्रदायाच्या कार्याची मूळ प्रेरणा स्पष्ट होते. या उपदेशाचा अर्थ केवळ राजकीय नसून, तो एका विशिष्ट सांस्कृतिक आणि नैतिक आचारधर्माच्या विस्ताराशी जोडलेला होता. दक्षिणेकडील भूमीवर मराठा राज्य स्थापित झाल्यावर, या राज्याला दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी, केवळ राजकीय बळाचाच नव्हे, तर सांस्कृतिक आणि धार्मिक आधारस्तंभाची आवश्यकता होती. समर्थ रामदासांनी स्थापन केलेले अकराशे मठांचे जाळे हे या दूरदृष्टीचे मूर्त स्वरूप होते. हे मठ केवळ धार्मिक केंद्र नव्हते, तर ते समर्थांनी आखलेल्या संघटनशास्त्राचे महत्त्व सिद्ध करणारे, ज्ञानदानाचे आणि अध्यात्मिक ग्रंथांचे लेखन, प्रचार व प्रसार करणारे केंद्र होते. या संघटनात्मक यंत्रणेमुळे, मराठा सत्तेच्या सीमा ओलांडून, एका प्रादेशिक संप्रदायाला राष्ट्रीय स्तरावर विस्तार करण्यासाठी तयार केलेला एक मजबूत पायाभूत तत्त्वज्ञान उपलब्ध झाला, ज्याचा उपयोग तंजावरसारख्या दूरवरच्या प्रदेशात झाला.

तंजावरची राजकीय पार्श्वभूमी आणि रामदासी आगमनाचा कालखंड:

छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६७६ मध्ये केलेल्या दक्षिण दिग्विजयामुळे तंजावर येथे मराठा सत्ता स्थापित झाली. या सत्तेचे संस्थापक होते शिवाजी महाराजांचे सावत्र बंधू श्रीमंत व्यंकोजी राजे भोसले (एकोजी), ज्यांनी इ.स. १६७७ मध्ये आपले राज्य सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यंकोजी राजांना स्वराज्याच्या कार्यात मदत करण्याचे आवाहन केले होते. मात्र, व्यंकोजी राजे तंजावरला परतल्यानंतर, या नवीन राजसत्तेला दक्षिणेकडील नायकांशी आणि स्थानिक सांस्कृतिक वातावरणाशी जुळवून घेत, त्याच वेळी आपली मूळ मराठी ओळख टिकवून ठेवण्यासाठी एका समर्थ धार्मिक संस्थेची गरज भासली. रामदासी संप्रदायाचे आगमन नेमके याच ऐतिहासिक आणि राजकीय आवश्यकतेच्या वेळी झाले. समर्थांचे तंजावरात आगमन इ.स. १६७८ मध्ये झाले असे इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात. यासंदर्भात इतिहासाचार्य राजवाडे "श्री समर्थ रामदास स्वामी यांनी श्री. शिवछत्रपतीस अनुग्रह दिल्याचा नक्की काल" या लेखात म्हणतात की, ३७ शके १६०० कालयुक्तातिसंवत्सर ऐकोजी राजे यांनी समर्थांस चंदावरास घेऊन गेले.[२]

तंजावरमध्ये संप्रदायाची स्थापना होणे ही केवळ एक धार्मिक घटना नव्हती, तर ती मराठा राजसत्तेच्या सांस्कृतिक धोरणाचा एक महत्त्वाचा भाग होती. व्यंकोजी राजांना दक्षिणेकडील भूमीवर 'महाराष्ट्र धर्म' वाढवण्यासाठी रामदासी संप्रदायाचा आधार आवश्यक होता, ज्यामुळे त्यांच्या सत्तेला धार्मिक वैधता आणि सांस्कृतिक स्थैर्य प्राप्त झाले.

दक्षिणेकडील भक्ती चळवळ:

रामदासी संप्रदायाच्या तंजावरमधील आगमनापूर्वी, तमिळनाडूमध्ये भक्ती चळवळीची मुळे खोलवर रुजलेली होती. ७ व्या ते १० व्या शतकात वैष्णव आलवार आणि शैव नयनार संतांनी भक्तीचा प्रचार केला होता. ही चळवळ स्थानिक भाषेत (तमिळ) विकसित झाली होती आणि धार्मिक समानता व सामाजिक सहभागावर आधारित होती

रामदासी संप्रदाय हा उत्तरेकडील (महाराष्ट्र-धारित) रामभक्तीचा प्रवाह होता, जो पुरुषार्थ, संघटन आणि 'दासबोध' यांसारख्या ग्रंथांमधील ज्ञानोपासनेवर जोर देत होता. या प्रवाहाने दक्षिणेकडील भूमीत प्रवेश करताना येथील भक्ती परंपरेशी रचनात्मक संवाद साधला. रामदासी संप्रदायाने आपली मूळ मराठी भाषा आणि साहित्य जपून, स्थानिक रामायणाच्या परंपरेत आपला पुरुषार्थी भक्तीचा वाटा सामील केला. या दोन भक्ती प्रवाहांचे अभिसरण महत्त्वाचे ठरले, कारण संप्रदायाने केवळ मराठी भाषिक प्रदेशासाठी कार्य केले नाही, तर स्थानिक सांस्कृतिक वातावरणाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला.

रामदासी संप्रदायाची तंजावरमधील स्थापना आणि संस्थापक शिष्य: श्री भीमस्वामी:

श्री समर्थांचा आदेश आणि भीमस्वामींचे तंजावरमध्ये आगमन :

समर्थ रामदास स्वामींनी आपल्या संप्रदायाच्या विस्तारासाठी तंजावरची निवड अत्यंत दूरदृष्टीने केली होती. या महत्त्वपूर्ण कार्यासाठी त्यांनी आपले पट्टशिष्य श्री भीमस्वामी यांना तंजावर येथे जाण्याची आज्ञा दिली. भीमस्वामी मूळचे साताऱ्याजवळच्या शहापूरचे होते. भीमस्वामींचा तंजावरमध्ये दाखल होण्याचा ऐतिहासिक कालखंड निश्चित आहे: ते इ.स. १६७७ मध्ये तंजावरात आले. तंजावरात जाण्यासाठी निघताना समर्थांनी त्यांच्याबरोबर रामाची मूर्ती, मारुतीची प्रतिमा, दासबोधाची प्रत, झेंडा, कफनी व एक पंचमुखी झोळी इत्यादी वस्तू दिल्या. या वस्तू अद्याप तंजावरात पाहावयास मिळतात. [३] आणि लगेचच मठाधिपती म्हणून त्यांनी आपले कार्य सुरू केले. भीमस्वामींनी तंजावरात समर्थ संप्रदाय भरभराटीस आणला हा काळ म्हणजे तंजावरमध्ये मराठा राजसत्तेची स्थापना करणारे व्यंकोजी राजे यांच्या राजवटीचा आरंभ होता. समर्थ रामदासांनी आपल्या शिष्यांशी केलेला पत्रव्यवहार हा सांप्रदायिक कारभारावर त्यांचे नियंत्रण दर्शवितो. समर्थांनी भीमस्वामींना उद्देशून पत्र पाठवल्याचा उल्लेख उपलब्ध आहे, ज्यामुळे दक्षिणेकडील कार्यावर समर्थांचे थेट लक्ष होते, हे स्पष्ट होते. [४]

भीमस्वामींचा दीर्घकालीन कार्यकाळ आणि संस्थापकीय योगदान:

भीमस्वामींच्या कार्याची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे त्यांचा दीर्घायुष्य आणि मठाधिपती म्हणून असलेला प्रदीर्घ कार्यकाळ. त्यांना ९९ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले. त्यांनी इ.स. १६७७ पासून इ.स. १७४१ पर्यंत तब्बल ६५ वर्षे तंजावरात रामदासी मठाधिपती म्हणून कार्य केले. इ.स. १७४१ मध्ये भीमस्वामींचा मृत्यू झाला. या प्रदीर्घ कार्यकाळामुळे, रामदासी संप्रदायाची मुळे तंजावरमध्ये अत्यंत खोलवर रुजली. यामुळे मठाला केवळ तात्पुरता आश्रय न मिळता, ते रामभक्ती आणि मराठी संस्कृतीचे कायमस्वरूपी केंद्र बनले. त्यांची समाधीही तंजावर येथेच आहे. [५]

या संस्थात्मक सातत्यामुळे, भीमस्वामींनी व्यंकोजी राजांपासून प्रतापसिंह राजांपर्यंतच्या सहा राज्यकर्त्यांचे संरक्षण अनुभवले. राजा बदलला तरी मठाचे स्थान अबाधित राहिले, ज्यामुळे संप्रदायाला राजकीय अस्थिरतेचा धोका जाणवला नाही आणि ते राजकीय आश्रयाच्या पलीकडे जाऊन एक स्थिर धार्मिक संस्था बनू शकले.

भीमस्वामींनी संप्रदायाच्या प्रचारासाठी केवळ उपदेशावर किंवा 'दासबोध' यांसारख्या ग्रंथावर अवलंबून न राहता, स्थानिक संस्कृतीशी जुळवून घेण्यासाठी नाट्य या कला प्रकाराचा प्रभावी वापर केला. त्यांनी स्वतः अनेक नाटकांची रचना केली. त्यांच्या १७साहित्यकृती तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात उपलब्ध आहेत, ज्यात 'प्रबोध

चंद्रोदय' या नाटकाचा समावेश आहे. १७नाटकांची निर्मिती हे रामदासी विचारांना स्थानिक लोकप्रिय माध्यमाद्वारे प्रसारित करण्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

तंजावरच्या भोसले राजांचे संरक्षणाचे स्वरूप आणि कालक्रम:

तंजावरच्या मराठा राजघराण्याने रामदासी संप्रदायाला दिलेला आश्रय हा केवळ एक धार्मिक मदत न राहता, तो मराठा राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचा अविभाज्य भाग बनला होता. रामदासी संप्रदायाला मिळालेले हे संरक्षण सातत्याने अनेक पिढ्यांपर्यंत टिकून राहिले.

आश्रयाच्या प्रारंभिक टप्प्याचे विश्लेषण (व्यंकोजी ते शहाजी):

श्रीमंत व्यंकोजी राजे भोसले (इ.स. १६७७ ते १६८३) यांच्या कार्यकाळात रामदासी संप्रदायाच्या स्थापनेसाठी आवश्यक असलेले प्रारंभिक जमीन अनुदान आणि संस्थात्मक पायाभूत सुविधांचे पाठबळ मिळाले. व्यंकोजी राजांचे उत्तराधिकारी श्रीमंत शहाजी राजे भोसले (इ.स. १६८४ ते १७१२) यांच्या काळात रामदासी संप्रदायाचे कार्य अधिक बळकट झाले. शहाजी राजे हे स्वतः साहित्यिक आणि कलाप्रेमी होते. [६]

राजेशाही आश्रयाचे दीर्घकालीन स्वरूप (सरफोजी ते प्रतापसिंह) :

श्रीमंत शरभोजी राजे भोसले (पहिले) (इ.स. १७१२ ते १७२८) आणि श्रीमंत तुळजेंद्र राजे भोसले (पहिले) तथा तुकोजी (इ.स. १७२८ ते १७३५) यांसारख्या पुढील पिढ्यांनी संप्रदायाला केवळ धार्मिक आश्रय न ठेवता, त्याला सांस्कृतिक संरक्षणाची जोड दिली.

श्रीमंत प्रतापसिंह राजे भोसले (इ.स. १७४० ते १७६३) यांच्या काळात, भीमस्वामींचे निधन (१७४२) झाले. तरीही, राजघराण्याने संप्रदायाचा आश्रय कायम ठेवला. यावरून सिद्ध होते की संप्रदायाचे स्थान केवळ एका व्यक्तिगत शिष्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते तंजावर राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचा एक औपचारिक भाग बनले होते. या दीर्घकालीन संरक्षणाने संप्रदायाला दक्षिणेत स्थैर्य प्राप्त करून दिले. [७]

राजकीय उपयोगाच्या दृष्टीने पाहिले असता, रामदासी मठ हे केवळ धार्मिक केंद्र नव्हते, तर ते दक्षिण भारतात मराठा 'राजे' (Kingship) आणि 'राष्ट्र' (Maharashtra) या संकल्पनांना जोडणारे सांस्कृतिक दूतावास म्हणून कार्यरत होते. या संरक्षणाची अनेक ठोस उदाहरणे आजही उपलब्ध आहेत. रामदासी मठांना (उदा. झोळीराम मठ) राजघराण्याने दिलेले जमीन अनुदान आणि आर्थिक साहाय्य हे संप्रदायाच्या सातत्यपूर्ण कार्याचा आधार होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हा ऐतिहासिक ऋणानुबंध आजही टिकून आहे. आजही तंजावरच्या भोसले घराण्यातील वंशज दासबोध वाचतात आणि त्यांचे रामदासी मठपतींशी अत्यंत स्नेहाचे संबंध आहेत. युवराज प्रतापसिंह सरफोजीराजे भोसले यांनी 'कॉन्ट्रिब्यूशन ऑफ तंजावर मराठा किंग्ज' (तंजावरच्या मराठा राजांचे योगदान) या विषयावर इंग्रजी पुस्तक लिहून, या ३५० वर्षांच्या इतिहासाचे जतन आणि प्रचार करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

सरस्वती महाल ग्रंथालय आणि सांस्कृतिक महत्व:

रामदासी संप्रदायाचा सर्वात मोठा आणि चिरस्थायी वारसा म्हणजे तंजावरमधील साहित्य आणि भाषिक जतन. यात श्री सरस्वती महाल ग्रंथालयाची भूमिका मध्यवर्ती ठरते सरस्वती महाल ग्रंथालय हे तंजावरकर भोसले घराण्याचा खाजगी ग्रंथसंग्रह होता आणि आजही ते आशिया खंडातील अति भव्य ग्रंथालयांपैकी एक आहे. सरफोजी दुसरा (१७९८ ते १८३२) याच्या काळात विपुल

साहित्यनिर्मिती झाली. स्वतः सरफोजी रसिक व विद्वान होता. त्याने स्वतःही मराठीतून रचना केल्या. इटालियन, लॅटिन, ग्रीक, फ्रेंच भाषांचा राजा सरफोजी आश्रयदाता होता. आपले गुरू शॉर्डा यांच्याबद्दल निष्ठा व्यक्त करणारे काव्य सरफोजीने लिहिले आहे. नायक राजांच्या काळातील सरस्वतीमहाल हा. ग्रंथालय म्हणून सरफोजीच्याच काळात नावारूपाला आला. [८] त्याने किंमती व उपयुक्त पुस्तके बनारसहुन खरेदी करून आणून ती सरस्वतीमहालात संग्रहित केली 'गजशाय प्रबंध हा संस्कृत ग्रंथ त्याने मराठीत अनुवाद केला वैद्यक शाखामध्ये त्याला रस होता त्याने धन्वंतरी महाल नावाची संस्था उभी केली. 'वैद्यराज चिंतामणी' या तामीळ ग्रंथाचा त्याने मराठीत अनुवाद केला. संस्कृत व देवनागरी भाषेतून पुस्तके छापण्यासाठी इ.स. १८००-१८३० या सुमारास छापखाना काढला. ह्या छापखान्याचे नाव 'नवविद्या कलानिध्यभिरव्या शाळा छापखाना' असे होते. इ.स. १८०९ मध्ये एकनाथांचे 'भावार्थ रामायण' व 'युद्धकांड' या छापखान्यात छापले. [९] या ग्रंथालयाने मराठी साहित्य आणि मोडी लिपीतील कागदपत्रे जपून, मराठा आश्रयाच्या सांस्कृतिक भूमिकेचे महत्त्व सिद्ध केले आहे.

सर्वात लक्षणीय बाब म्हणजे, रामदासी संप्रदायाचे ग्रंथालयाच्या प्रशासकीय केंद्रस्थानी असणे. यामुळे संप्रदायाला केवळ धार्मिक आश्रय नाही, तर राज्याच्या सांस्कृतिक जतन आणि धोरणांमध्ये सक्रिय भूमिका मिळाली होती. अनेक दशके या ग्रंथालयाच्या मराठी विभागाची धुरा रामदासी मठपतींनी सांभाळली.[१०] उदा. भीमराज गोस्वामी यांनी अनेक दशके मराठी विभागप्रमुख म्हणून कार्य केले, आणि आजही रामचंद्रबुवा केसकर हे रामदासी मठपती ती जबाबदारी समर्थपणे पेलत आहेत.

मराठी साहित्य आणि लिपी जतन :

समर्थ संप्रदायातील अनुयायांनी विपुल ग्रंथसंपदा निर्माण केली. या अनुयायांनी भीमस्वामी, माधवस्वामी, राघवस्वामी, मेरूस्वामी, व इतर शिष्य कवींचे साहित्य याशिवाय इतरही प्रकाशित व अप्रकाशित रचना आढळतात. रामदासी संशोधन खंड दोन या ग्रंथात कै. शं. श्री. देवांनी तंजावर प्रांतातील समर्थ सांप्रदायी संग्रहाची यादी दिली आहे. ही बाड संख्या बाराशे एक ते पंधराशे पाच म्हणजे एकूण तीनशे चार बाड आहे. या संख्येवरून समर्थ सांप्रदायी वाङमयाच्या अफाट ग्रंथसंपदेची कल्पना येते. या बाडामध्ये आख्यान, पाळणा, पद, ओवी, आर्या, कुटात्मक श्लोक व अभंग इत्यादी विविध रचना आहेत. याशिवाय माधवकृत कर्णपर्व, श्लोकबद्ध रामायण, दशमस्कंद, अरण्यपर्वातील नलोपाख्यान, महिपतिकृत भक्तविजय, संतविजय, शेषकृत - स्कंद पुराणातील पांडुरंग महात्म्य, अद्भुत कांड रामायण माधवात्मजकृत भागवत् प्रथम स्कंद, अद्वैत प्रकाश, आनंदसागरकृत रामचैतन्य, वामनकृत समश्लोक गीता, निगमसार, ज्ञानेश्वरकृत ज्ञानेश्वरी, अनुभवामृत, हस्तामल, ज्ञानदेवकृत गीता, व्यंकटेशस्तोत्र, भोजराजविरचित चंपू, कुंभकोणम महात्म्य, मयुरपंतकृत भागवत टीका इत्यादी विपुल ग्रंथरचना या काळात झाल्या.[११]

या ग्रंथालयात सुमारे ३० हजारांहून अधिक हस्तलिखिते उपलब्ध आहेत. यामध्ये मराठ्यांच्या इतिहासाची अनेक दुर्मिळ कागदपत्रे अभ्यासकांची वाट पाहत आहेत. तंजावरच्या राजांच्या संरक्षणातून, विशेषतः राजा शहाजी, एकोजी, प्रतापसिंह आणि सरफोजी यांच्या आश्रयामुळे, एकूण ३७ मराठी नाटके आणि संहिता उपलब्ध होऊ शकल्या. या नाटकांमध्ये भीमस्वामींनी लिहिलेल्या १७ नाटकांचा समावेश आहे. तंजावरचे रामदासी केंद्र हे दक्षिण भारतातील मराठी भाषेच्या

संवर्धनाचे केंद्र बनले. या केंद्रातून केवळ मराठी साहित्याचे जतन झाले नाही, तर त्याचे स्थानिक भाषेत रूपांतरणही झाले. रामदासी साहित्य केवळ मराठीतच नव्हे, तर कन्नड आणि तेलगू भाषेतही भाषांतरित केले गेले. कर्नाटकात तर प्रत्येक मठाने समर्थ साहित्याचे स्थानिक भाषेत भाषांतर केले आहे. राजकीय सत्ता संपुष्टात आल्यावर, रामदासी मठ आणि ग्रंथालय हे मराठी भाषेचे, साहित्याचे आणि 'महाराष्ट्र धर्मा'चे शेवटचे, सर्वात शक्तिशाली केंद्र बनले. राजाश्रय संपल्यावरही मठाधिपतींनी ग्रंथालयाचे जतन करून आपली सांस्कृतिक जबाबदारी पार पाडली. या सांस्कृतिक ठेव्याच्या जतनात काही गंभीर भाषिक आव्हाने आहेत. ग्रंथालयात मोठ्या प्रमाणात हस्तलिखिते मोडी लिपीत आहेत. विशेषतः तंजावरी मोडी लिपीवर तमिळ आणि तेलगू लिपीचा प्रभाव असल्याने, ते वाचण्यास तज्ज्ञ उपलब्ध नाहीत. सध्या रामचंद्रबुवा केसकर हे तंजावरी मोडीचे एकमेव तज्ज्ञ म्हणून कार्य करत आहेत. याव्यतिरिक्त, अनेक मराठी नाटके तेलगू लिपीत लिहिलेली आहेत. हा एक महत्त्वाचा पुरावा आहे जो संप्रदायाच्या अभिसरणाची गुंतागुंत दर्शवितो. रामदासी संप्रदायाने भाषा (मराठी) टिकवली असली तरी, लिपीच्या बाबतीत त्यांनी स्थानिक प्रशासकीय आणि लोकप्रिय साधनांचा अवलंब केला. गेल्या ३० वर्षांपासून पंडित भीमराव आणि विश्वनाथ यांसारखे तज्ज्ञ अशा हस्तलिखितांचे लिप्यंतरण करून ती मराठीत आणत आहेत.

दक्षिणेकडील रामदासी संप्रदायाचा विस्तार आणि सांस्कृतिक वारसा:

तंजावरच्या मराठा राजघराण्याने रामदासी संप्रदायाला दिलेले राजकीय आणि आर्थिक स्थैर्य हे एक छोटेसे स्थानिक केंद्र न राहता, दक्षिण भारतातून आंध्र, तेलंगणा आणि कर्नाटकमध्ये वेगाने विस्तारू शकले. तंजावर हे या विस्ताराचे 'प्रारंभिक लॉन्च पॅड' ठरले.

तमिळनाडू (तंजावर आणि आसपास):

तंजावर हे रामदासी संप्रदायाचे दक्षिणेकडील संस्थापक केंद्र राहिले. आजही तंजावरसारख्या अति दक्षिणेकडील राज्यात समर्थांचे १) आदिगुरू भीमराज गोसावी मठ, २) भीमराज स्वामी मठ, ३)श्री झोळीराम बाबा मठ, ४) श्री अन्नाजी भव मठ, ५) श्री सेतू भव स्वामी मठ, ६) श्री भीमदास मठ, ७) श्री गोविंद बाळ स्वामी मठ, ८) अनंत मौनी मठ, ९) कोनूर मठ वरील सर्व मठाची परंपरा तंजावरात आजही पहावयास मिळते, हे सर्व मठ पूर्ण शक्तीने कार्यरत आहेत. समर्थ शिष्यांची समाधी मंदिरे इ. पकडता एकूण १४ रामदासी स्थाने तिथे उभी आहेत. यातील मण्णारगुड्डी मठ हा देखील असाच एक मोठा आणि महत्त्वाचा मठ आहे. या केंद्रांमुळे निर्माण झालेल्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक म्हणजे, या भागातील लोक आजही उत्तम मराठी भाषा लिहितात, वाचतात आणि बोलतात. तसेच, समर्थांची अनेक अस्सल तैलचित्रे आजही तंजावरकर भोसले घराण्याच्या संग्रहात जतन केलेली आहेत. [१२]

आंध्र प्रदेश आणि तेलंगणातील विस्तार:

तंजावरमधून मिळालेल्या बळकटीमुळे रामदासी संप्रदायाचा विस्तार आंध्र आणि तेलंगणात मोठ्या प्रमाणावर झाला. या दोन राज्यांमध्ये आजही समर्थांचे तब्बल ६५ मठ शिल्लक आहेत. या विस्तारात निजामाबाद, इंदुर-बोधन आणि जुक्कल एकेहळळी (जहिराबाद) येथील मठांचे कार्य लक्षणीय आहे. हे मठ अत्यंत भव्य असून, ते जोमाने कार्य करत आहेत. येथील सांस्कृतिक समन्वय प्रभावी आहे. जुक्कल येथून दरवर्षी दासनवमीला (समर्थांच्या पुण्यतिथीला) शेकडो तेलुगु समर्थभक्तांची पदयात्रा सज्जनगडावर येते. येथील केशव रामदासी

मठपतींनी स्थानिक तरुणांचे मोठे संघटन उभे केले आहे, ज्यामुळे रामदासी तत्त्वज्ञान केवळ मराठी प्रदेशासाठी मर्यादित न राहता, स्थानिक तेलुगु भाषिक समुदायातही लोकप्रिय झाले आहे.

कर्नाटकमधील संप्रदायाचे कार्य:

दक्षिणेकडील तिसरे महत्त्वाचे विस्तार क्षेत्र म्हणजे कर्नाटक, जेथे आज ३६ नोंदणीकृत मठ शिल्लक आहेत. या मठांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समर्थ साहित्याचे स्थानिक कन्नड भाषेत भाषांतर केलेले आहे. आपचंद मठाचे कार्य ही उल्लेखनीय आहे, कर्नाटक आणि आंध्र/तेलंगणातील मठांचे हे कार्य दर्शवते की, रामदासी विचारसरणीने आपली मूळ भाषा (मराठी) जपली असली तरी, स्थानिक समुदायापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी भाषिक लवचीकता स्वीकारली. स्थानिक भाषांमध्ये अनुवाद आणि बहुभाषिक रूपांतरण स्वीकारल्यामुळे, रामदासी संप्रदायाचा प्रभाव केवळ भावनिक स्तरावर न राहता, तो ज्ञान आणि साहित्याच्या माध्यमातून सामाजिक स्तरावर स्थिर झाला. [१३]

आधुनिक काळातील आव्हाने आणि संप्रदायाचे पुनरुज्जीवन:

ऐतिहासिक वारसा जपण्यातील आव्हान :

तंजावरच्या मराठा आश्रयामुळे जतन झालेल्या साहित्याच्या त्वरित जतन आणि लिप्यंतरणाची गरज ही काळाची गरज आहे. सरस्वती महाल ग्रंथालयात सुमारे ३० हजारांहून अधिक हस्तलिखिते असून, त्यातील अनेक मोडी लिपीत आहेत. या हस्तलिखितांच्या जतनासाठी आणि वाचनासाठी लागणारा मोठा कालावधी (राणी ऐश्वर्याराजे भोसले यांच्या अंदाजानुसार १५० ते २०० वर्षे) दर्शवतो की, हा ऐतिहासिक ठेवा नष्ट होण्याचा धोका मोठा आहे. तंजावरी मोडी लिपीचे तज्ज्ञ कमी असल्याने हे कार्य मंदावते आहे. या वारसा जतनाच्या कामात वि. का. राजवाडे यांनी इ.स. १९०६ च्या सुमारास 'लक्ष्मी-नारायण कल्याण' हे नाटक प्रकाशित करून महत्त्वपूर्ण सुरुवात केली होती. त्यांची ही परंपरा डॉ. सरोजिनी शेंडे, डॉ. भीमराव कुलकर्णी आणि रामचंद्रबुवा केसकर यांच्यासारखे पंडित आजही चालवत आहेत, ज्यामुळे मराठी नाटकांचा मोठा संभार उपलब्ध होऊ शकला.

सांप्रदायिक पुनरुज्जीवन आणि राष्ट्रीय एकात्मता :

राजकीय आश्रय संपुष्टात आल्यानंतरही, रामदासी संप्रदाय स्वतःच्या बळावर हा वारसा टिकवून ठेवण्यासाठी कार्यरत आहे. सांप्रदायिक स्तरावर, श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड यांनी २०१० पासून वार्षिक रामदासी मठपती संमेलनाचे आयोजन सुरू केले आहे. या संमेलनात दक्षिणेकडील मठांचा सक्रिय सहभाग असतो. तंजावर, रामेश्वर आणि मण्णारगुड्डी येथील मठपती नियमितपणे उपस्थित राहतात. ज्या मठपतींना आपला संप्रदाय जवळपास संपला आहे असे वाटत होते, त्यांना या संमेलनातून 'आपण एकटे नाही' ही सकारात्मक भावना मिळाली. या संस्थेच्या पुनरुज्जीवनाने दक्षिणेकडील मठांना नवीन उभारी मिळाली आणि त्यांच्या कार्याला बळ मिळाले. हा आधुनिक प्रयत्न दर्शवितो की, तंजावरच्या आश्रयामुळे स्थापित झालेल्या धार्मिक आणि सांस्कृतिक केंद्रांनी आपली मातृसंस्थेशी असलेली संस्थात्मक संबंधाची पुनर्बाधणी केली आहे.

निष्कर्ष:

तंजावरच्या मराठा राजघराण्याने समर्थ रामदासी संप्रदायाला दिलेला आश्रय हा केवळ धार्मिक संरक्षणाचा नव्हे, तर 'महाराष्ट्र धर्म' आणि मराठी संस्कृतीच्या सुनियोजित विस्ताराचा एक अत्यंत महत्त्वाचा ऐतिहासिक टप्पा होता. संस्थात्मक स्थैर्य आणि सातत्यः समर्थांचे शिष्य

भीमस्वामी यांनी व्यंकोजी राजांच्या राजवटीच्या सुरुवातीला (१६७७) तंजावरमध्ये मठाची स्थापना केली. त्यांना तब्बल ६५ वर्षे मिळालेले राजकीय संरक्षण, राजघराण्याच्या सात पिढ्यांनी कायम ठेवले. या दीर्घकालीन संरक्षणाने रामदासी संप्रदायाला दक्षिणेकडील भूमीत एक स्थायी आणि प्रतिष्ठित संस्था म्हणून स्थापित केले.

तंजावरच्या भोसले राजांनी सरस्वती महाल ग्रंथालयाच्या माध्यमातून रामदासी मठपतींना प्रशासकीय आणि सांस्कृतिक नेतृत्व दिले. या ग्रंथालयात मराठी नाटके, मोडी लिपीतील ऐतिहासिक कागदपत्रे आणि दासबोध साहित्य मोठ्या प्रमाणावर जपले गेले. रामदासी संप्रदायाने नाट्य आणि स्थानिक साहित्य प्रकारांचा वापर करून स्थानिक संस्कृतीशी जुळवून घेतले, तर कर्नाटक आणि आंध्र/तेलंगणातील मठांनी समर्थ साहित्याचे स्थानिक (कन्नड, तेलुगु) भाषांमध्ये भाषांतर करून भाषिक लवचीकता स्वीकारली. या अभिसरणामुळे संप्रदायाचा विचार स्थानिक लोकांपर्यंत पोहोचू शकला.

तंजावरमध्ये मिळालेल्या संस्थात्मक आणि आर्थिक स्थैर्यामुळे रामदासी संप्रदाय तमिळनाडूतील १४ स्थानांपासून, आंध्र-तेलंगणातील ६५ मठ आणि कर्नाटकातील ३६ मठांपर्यंत विस्तारित होऊ शकला. तंजावर हे दक्षिणेकडील संप्रदायाच्या व्यापक विस्ताराचे प्रवेशद्वार ठरले. आजही दक्षिणेकडील मठांची सक्रियता आणि सज्जनगडावरील वार्षिक संमेलनात त्यांचा सहभाग, हा ३५० वर्षांपूर्वी सुरू झालेल्या ऐतिहासिक ऋणानुबंधाचा आणि सांस्कृतिक बांधिलकीचा जिवंत वारसा सिद्ध करतो. या अभ्यासातून स्पष्ट होते की, तंजावरच्या मराठा राजघराण्याचा आश्रय हा समर्थ रामदासी संप्रदायाच्या दक्षिणेकडील विस्ताराचा आधारस्तंभ होता, ज्यामुळे केवळ धार्मिक परंपरेचेच नव्हे, तर मराठी भाषिक आणि ऐतिहासिक वारशाचेही जतन झाले.

संदर्भग्रंथ सूची :

१. विद्या गाडगीळ, तंजावरचे मराठी राज्य आणि संस्कृती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई आवृत्ती २००३ पृष्ठ १७0. ISBN ८१-७१८५-७८९-२.

२. श्री सांप्रदायिक विविध विषय, वि. का. राजवाडे, पृ. १२१-१२२.

३. रामदास व रामदासी, श्रीसमर्थांची दोन जुनी चरित्रे, आत्माराम छापखाना, धुळे खं. २, पृ. २७६.

४. श्रीरामसोहळा, संपा. के. ल. ओगले, प्रस्ता. पृ. ३०.

५. भारतीय संस्कृती कोश, खं. ६.

६. विद्या गाडगीळ, तंजावरचे मराठी राज्य आणि संस्कृती, उपरोक्त पृ, ६0,६१

७. विद्या गाडगीळ, तंजावरचे मराठी राज्य आणि संस्कृती, उपरोक्त पृ, ६६, ६७

८. विनायक सदाशिव वाकसकर, तंजावरचे मराठे राजे, दामोदर सावळाराम आणि मंडळी, इंदुप्रकाश छापखाना मुंबई. श्री सयाजी साहित्यमाला अंक २२३ आवृत्ती पहिली सन १९३३ पृ १४0,१४१.

९. Shree Niwas Chari Journal of Saraswatimahal Library Tanjore Vol. Ist. No. 1939, 1940.

१०. श्री. टी. रामचंद्रन, दक्षिण भारतीय भाषांतील समर्थसाहित्याचा अवतार भीमस्वामी मठ, तंजाऊर पंचधारा ५१-१ (जुलै-डिसेंबर २००८) पृ ६३.

११. विद्या गाडगीळ, तंजावरचे मराठी राज्य आणि संस्कृती, उपरोक्त पृ, १७७

१२. Journal of Saraswatimahal Library Tanjore, XVII No. 3, 1964 'Samarth Ramdas Math in Tanjore'.

१३. सेतू माधवराव पगडी, श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय आध्यात्मिक विचार प्रवर्तक मासिक, फेब्रुवारी - मार्च २०११.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

बुलढाणा जिल्ह्याच्या जडणघडणीत संत चोखामेळा यांचे योगदान

सतिश उत्तमराव रिंढे

संशोधक विद्यार्थी

Corresponding Author - सतिश उत्तमराव रिंढे

DOI - 10.5281/zenodo.19707204

प्रस्तावना:

बुलढाणा जिल्ह्याच्या देऊळगाव राजा तालुक्यात असलेले मेहुणाराजा हे गाव संत चोखामेळाचे जन्मगाव म्हणून प्रसिद्ध आहे. संत चोखामेळा यांच्या जन्म स्थळाविषयी विविध संशोधकांमध्ये मत भिन्नता आढळून येते .काहींच्या मते त्यांचे जन्मस्थळ पंढरपूर होते तर काही संशोधक त्यांचा जन्म मंगळवेढे या ठिकाणी झाल्याचे मानतात.परंतु ऐतहासिक दस्तावेज तसेच भक्कम पुराव्यावरून त्यांचा जन्म सध्या बुलढाणा जिल्ह्यात असलेल्या मेहुणा राजा या ठिकाणी झाला असल्याचे महाराष्ट्र शासनाने मान्य केले आहे . जाधव सरदारांचे मेहुनारजा हे इनाम गाव होते. त्यामुळे जाधव घराणे येथे अनेक काळ वास्तव्यास होते. असे सांगितले जाते की, त्यांचा येथे मोठा राजवाडा होता. आजही गावास मोठी तटभिंत व बुरूज असलेली वेस आढळते .चोखोबांचे जन्मस्थान सध्याच्या गावापासून अलिकडे २ ते ३ कि.मी. अंतरावर आहे. या स्थानापासून काही अंतरावर बंका निर्मळा नावाचे कुंड आहे. बंका हे चोखोबांचे मेहुणे होते तर निर्मळा हि त्यांची बहिण होती . संत चोखोबांची बहीण व मेहुणा दोघेही संत होते. या कुंडाजवळच त्या दोघांची समाधी आहे.[१]

संत चोखामेळा जांच्या जन्माकाळावरून मतभेद आहेत .तसेच निश्चित असे पुरावे उपलब्ध नाहीत संत चोखामेळा समितीनुसार त्यांचा जन्म १४ जानेवारी १२६७ ला झाल्याचे मानले जाते.[२] संत चोखामेळा यांच्या जन्मास्थाळाविषयी अभ्यासकांमध्ये मतमतांतरे आहेत.काहींच्या मते त्यांचा जन्म पंढरपूर येथे झाला तर काही अभ्यासकांच्या मते त्यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा या ठिकाणी झाला .परंतु उपलब्ध पुराव्यान्नुसार त्यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील मेहुनाराजा येथे झाल्याचे सिद्ध झाले आहे.यामध्ये सोलापूर गझेट ,मेहुणाराजा येथील दस्ताएवजांचा समावेश होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते सुद्धा संत चोखामेळा हे वऱ्हाडातील संत होते. या शिवाय संत चोखामेळा हे मेहुणा राजा येथील च असल्याचा दुजोरा विविध संशोधकांकडून मिळतो.[३]

चोखोबांच्या कार्यकालाविषयी खात्रीलायक माहिती उपलब्ध होत नसली तरी त्यांचा समाधिशक मात्र उपलब्ध आहे. नामदेवांनी स्वतः चोखामेळा यांच्या देहावसनाची तिथी नोंदविलेली आहे-"शालिवाहन शके बाराशें साठ । प्रमाथी नाम संवत्सर ॥१॥वैशाख वद्य पंचमी सुदीन । गुरुवारी प्रयाण करी चोखां ॥२॥"उपरोक्त नोंदीवरून वैशाख वद्य पंचमी, शके १२६० या दिवशी चोखोबांनी इहलोकीचा अखेरचा निरोप घेतला, याची निश्चिती होते.[४]

आजच्या बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगावराजा तालुक्यातील निर्मळा नदीकाठी वसलेले गाव म्हणजेच मेहुणाराजा होय.पूर्वी कोरेगाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या गावाला नंतर मेहूणपुरी व शके १२६० म्हणजेच इ. स. १३३८ नंतर मेहुणाराजा म्हणून ओळखले जाऊ लागले .मेहुणाराजा या गावाचे पंढरपूर पासूनचे अंतर व त्या काळात उपलब्ध असलेली संचाराची साधने यांचा विचार केला असता संत चोखामेळा पंढरपूर ला कसे पोहोचले या विषयीचा एक संदर्भ असा कि, मंगळवेढा येथील कूस बांधण्यासाठी ज्या वेळी असंख्य मजूर धाडावायाचे होते तेव्हा मेहुणाराजा चे धनी श्री. विश्वंभर राव जाधव यांनी खंडोजींना म्हणजेच चोखोबांच्या वडिलांना सहपरिवार मंगळवेढ्यास पाठवविले.अशाप्रकारे संत चोखामेळा यांचे वास्तव्य बुलढाणा जिल्ह्यात होते, त्यांच्या नावावर एकूण३५८अभंगरचना उपलब्ध आहेत. त्यांच्या या अभंग रचनांचा प्रभाव या भागावर पडणे नाकारता येत नाही,यातूनच बुलढाणा जिल्हा परिसराच्या जडणघडणीत संत चोखामेळा यांच्या योगदानाचा अभ्यास करणे महत्वपूर्ण ठरते.[५]

संशोधनाची उद्दिष्टे:

१. संत चोखामेळा यांच्या सामाजिक योगदानाचा अभ्यास करणे.
२. संत चोखामेळा यांच्या अध्यात्मिक योगदानाचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंध प्राथमिक व द्वितीय संदर्भ साधनांवर आधारित आहे, त्यामध्ये इंटरनेट व संदर्भ पुस्तकांचा वापर करण्यात आला आहे तसेच शोध निबंधासाठी ऐतिहासिक ,सर्वेक्षण आणि विश्लेषण हि संशोधनपद्धती वापरण्यात आली आहे.

संशोधनाची गृहीतके:

१. संत चोखामेळा यांनी आपल्या अस्पृश्यता विषयक अभंगांमधून सामाजिक योगदान दिले.
२. संत चोखामेळा यांनी आपल्या विठ्ठल भक्ती विषयक अभंग रचनांतून अध्यात्मिक योगदान दिले.

संशोधन विषयाचे महत्व:

१३ व्या व १४ व्या शतकातील समाजव्यवस्था धर्म या केंद्रबिंदू भोवती फिरत होती. या समाजात व्यक्तीच्या कर्तुत्वाचा,गुणांचा विचार न करता कुळ,धर्म आणि जातीव्यवस्था यांच्या चौकटीत समाज बंदिस्त होता. या काळात बहुसंख्य स्त्रिया आणि क्षुद्रांना मोक्षाचा अधिकारच नाही असे ठणकावून सांगितले जात होते.तसेच वेदाध्ययनाचा अधिकार फक्त तत्कालीन समाजातील ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांनाच असल्यामुळे तत्कालीन समाजात स्त्रीया व क्षुद्रांना अडाणी व अशिक्षित ठेवण्यात आले होते .वेदांमधील संस्कृत भाषा त्यांना येत नसल्यामुळे ते वेदांमधील ज्ञानापासून वंचित होते. वैदिक धर्माच्या नावाखाली सर्वसामान्यांवर थोपवण्यात आलेला महागड्या यज्ञ याग व व्रतवैकल्यांचा उपासनेचा मार्ग सर्वसामान्यांना न परवडणारा होता.अशा परिस्थितीत १३ व्या व १४ व्या शतकात पंढरपूर येथील चंद्रभागेच्या वाळवंटात संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांनी सुरु केलेल्या भक्ती आंदोलनाच्या संत मेळ्यातील महत्वपूर्ण संतांमधील संत चोखामेळा होते.[६] संत चोखामेळा यांनी त्यांच्या आयुष्यात संत ज्ञानदेव तसेच संत नामदेव यांच्या सोबत तीर्थयात्रा केली होती तसेच १३ व्या व १४ व्या शतकातील संत मांदियाळीतील संत

ज्ञानदेव,सोपानदेव, चांगदेव, सावतामाळी, मुक्ताबाई,निवृत्तीनाथ, विसोबा खेचर,नरहरी सोनार, गोरा कुंभार, नामदेव, जनाबाई, हे सर्व संत चोखामेळा यांचे समकालीन संत होते.[७] तत्कालीन समाजात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार जातीतील असून त्यांनी अशिक्षित असतांना केलेली अभंग रचना व त्यातून मांडलेले विठ्ठल भक्ती विषयीचे अभंग अध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित करण्यात महत्वपूर्ण योगदान देणारे तसेच तत्कालीन सामाजातील क्षुद्रांचे स्थान व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणारे अभंग हे सामाजिक न्याय व समता या दृष्टीने महत्वपूर्ण योगदान देणारे आहेत .या दृष्टीने संत चोखामेळा यांच्या अध्यात्मिक व सामाजिक योगदानाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

विषय विवेचन:

१)संत चोखामेळा यांचे सामाजिक योगदान:

संत चोखामेळा ज्या महार जातीत जन्माला आले होते त्या जातीची त्या काळच्या महारांची स्थिती त्यांनी आपल्या अभंगातून स्पष्ट केलेली आहे. त्या दृष्टीने त्यांचे अस्पृश्यतेची जाणीव व्यक्त करणारे अभंग खूपच बोलके आहेत. संत चोखोबांना अस्पृश्यांच्या दुःखाच्या, अस्पृश्यतेच्या दुःखाच्या वेदना झोंबत होत्या.प्रत्यक्ष विठ्ठलाच्या दारीही अस्पृश्यता पाळली जात होती. म्हणूनच संत चोखोबा पुन्हा पुन्हा विठ्ठलाला ओरडून सांगत होते कि,.

हीन याती माझी देवा । कैसी घडे तूझी सेवा ॥
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्या रीती ॥

अशाप्रकारे त्यांनी या अस्पृश्यते विरोधात आपल्या अभंगवाणीतून विद्रोह करून एकप्रकारे सामाजिक विषामतेलाच वाचा फोडली . देवापुढे सर्व समानआहेत, सर्वांना ईश्वरभक्तीचा समान अधिकार आहे, असा महत्त्वाचा विचार त्यांनी त्या काळात मांडला. विठ्ठलाच्या नामस्मरणाला, त्याची भक्ती करण्याला जाती-पातीचे, उच्चनिचतेचे बंधन असता कामा नये, असा पारमार्थिक समतेचा विचार त्यांनी या अभंगातून मांडला.

संत चोखोबाच्या काळी महारांनी गावातील रयतेसाठी, वरिष्ठांसाठी खूप काम करून सुद्धा त्यांच्या पदरात उष्टे वाढले जात होते . त्यांना भयानक दासत्वाचेच जीवन जगावे लागत होते. याचेही वर्णन संत चोखोबांनी समर्थपणे त्यांच्या प्रसिद्ध'जोहार' अभंगात केलेले आहे.संत चोखोबा म्हणतात-

जोहार मायबाप जोहार ।तुमच्या महाराचा मी महार ॥ १ ॥
बहु भुकेला जाहलो।तुमच्या उष्ट्यासाठी आलो ॥२॥
बहु केली आस।तुमच्या दासाचा मी दास ॥ ३ ॥
चोखा म्हणे पाटी |आणिली तुमच्या उष्ट्यासाठी ॥४॥[८]

२) संत चोखामेळा यांचे अध्यात्मिक योगदान:

पंढरपूर येथील चंद्रभागेच्या वाळवंटात उच्च नीच व वर्ण व्यवस्था न मानणाऱ्या संतांच्या सहवासाची आणि टाळमृदुंगाच्या तालावर चालणाऱ्या हरिनाम गजराची गोडी लागल्यावर आजपर्यंत संसाराच्या गाड्यात आपण व्यर्थ गुंतून पडलो, याचा चोखोबांना खेद वाटायला लागला.ते भक्तीचा मार्ग चोखाळू लागले. संसारात येणाऱ्या दुःखाचा आणि शुद्र जातीत जन्मल्यामुळे झालेल्या हाल अपेष्टांचा चोखोबांना वैताग येऊ लागला होता.म्हणून या चौर्यांशी लक्ष योनीच्या मानल्या जाणार्या जन्म मृत्यू च्या फेऱ्यातूनच विठ्ठलाने आपली सोडवणूक करावी म्हणून चोखामेळा देवाची प्रार्थना करू लागले. याचे वर्णन करतांना संत चोखामेळा म्हणतात. -

"काय हे दुःख किती ह्या यातना । सोडवी नारायणा
यांतोनियां ॥
जन्मावें मरावें हेचि भरोवरी || चौऱ्यांशीची फेरी भोगाभोग ॥
"जन्मोजन्मींचे तुम्ही सांगाती । कांहो मज घातिलें भ्रांती ॥

नाहीं कोठे सुख विश्रांती | पंढरीवांचोनी सर्वथा ।।

विठ्ठल व पंढरपूर ची वारी करणाऱ्या वारकऱ्यांविषयी प्रचंड आत्मीयता निर्माण होऊन वारकरी हेच त्यांना त्यांचे मायबाप व सगे सोयरे वाटू लागले.याचे वर्णन करतांना संत चोखामेळा म्हणतात -

"कोणी पंढरीस जाती वारकरी । तयांचे पायांवरी भाळ माझे ॥

आनंदे तयासी भेटेन आवडी । अंतरींची गोडी घेईन सुख ॥

ते माझे मायबाप सोयरे सज्जन । तयांवरी तनुमन ओंवाळीन ॥"[९]

संत मेळ्यातील अशिक्षित असलेले संत चोखामेळा आयुष्याचे सार अगदी सहज सोप्या भाषेत सांगताना आपल्या एका अभंगात म्हणतात –

असोनी नसणे संसाराचे ठायी |हाची बोध पाही मना घ्यावा ||

संतांची संगती नामाची आवडी |रिकामी अर्ध घडी जावो नेदी ||

कामक्रोध सुनेपारी करी दूर |सहपरिवारी दवडी बापा ||

चोख म्हणे सुख आपेंआप घरा |नाहीतर फजितखोरा जासी वाया ||

अशाप्रकारे असोनी नसणे म्हणजेच संसारातील गोष्टींबद्दल अनासक्ती धरून नामाची आवड अंगीकारून अर्धघडी म्हणजेच थोडी सुद्धा वेळ वाया न घालवता नामस्मरण करावे व कामक्रोध यांना सुनेपारी म्हणजेच श्वानापरी दूर करावे अशा प्रकारचे अनेक गहन अर्थ असलेले उपदेश अगदी सहज सोप्या शब्दात चोखामेळा यांनी सांगतलेले आहेत.[१०]

शेवटी सर्व सवर्ण वर्णाश्रमवादी समाजाला संत चोखोबा शहाणपणाच्या दोन गोष्टी सांगताना म्हणतात-

उस डोंगा परी रस नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया सोंगा ॥ १ ॥

'माणुसकी' हाच खरा भाव व देव आहे. बाकी जाती, वर्णव्यवस्था, विटाळ,शिवाशिव हे सर्व 'वरलिया सोंग' आहेत. ती सोडून द्या. ती मनात न धरता सोडून द्या. त्याकडे लक्ष देऊ नका. मूळ माणसातला 'माणुसकीचा' 'भाव' हाच खरा देव हे या ठिकाणी चोखोबांनी खऱ्या अर्थाने सांगितले आहे.[११]

सारांश:

अशाप्रकारे १३ व्या शतकाच्या शेवटी व १४ व्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रातील संतमेळ्यात होऊन गेलेले संत चोखामेळा यांनी भक्ती चळवळीच्या माध्यमातून अशिक्षित असतांना त्यांनी केलेली अप्रतिम अभंग रचना व त्या अप्रतिम अभंग रचनेतून त्यांच्या उपलब्ध असलेल्या३५८ अभंगामधून त्यांचे अस्पृश्यतेची जाणीव व्यक्त करणारे अभंग खूपच बोलके आहेत. या अभंगांत चीड व्यथा, वेदना,आहेत , संताप आहे आणि संयमही आहे. एकप्रकारे हे अभंग सामाजिक विषामतेलाच वाचा फोडनारे आहेत.तसेच त्यांचे विठ्ठल भक्ती विषयीचे अभंग अध्यात्मिक प्रगल्भता सिद्ध करणारे असून त्यामधून गहन अर्थ असलेले उपदेश अगदी सहज सोप्या शब्दात चोखामेळा यांनी सांगतलेले आहेत . अशा प्रकारे संत चोखामेळा यांचे सामाजिक योगदान व अध्यात्मिक महत्वपूर्ण आहे .

निष्कर्ष:

१) संत चोखामेळा यांनी आपल्या अभंग रचनांमधून तत्कालीन समाजात अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजाच्या हाल अपेष्टांना आपल्या अभंगांमधून वाचा फोडली.तसेच विठ्ठलाला विचारलेल्या प्रश्नांच्या माध्यमातून त्यांनी अप्रत्यक्ष रीत्या सर्व सामाजिक व्यवस्थे विरूध्दच प्रश्नचिन्ह उपस्थित केले अशा प्रकारे त्यांनी सामाजिक समता, न्याय,

,अस्पृश्यता निवारण या सामाजिक मुल्यांची तत्कालीन समाजात असणारी उणीव आपल्या अभंगांमधून मांडत असतांना या मुल्यांची जाणीव तत्कालीन समाजव्यवस्थेला करून देऊन सामाजिक मूल्यांचे बीजारोपण करण्यात महत्वपूर्ण योगदान दिलेले दिसून येते.

२) संत चोखामेळा विठ्ठल भक्ती विषयी अभंग रचना करतांना अध्यात्मिक प्रगल्भता सिद्ध करणारे अभंग व त्यामधून गहन अर्थ असलेले उपदेश अगदी सहज सोप्या शब्दात सांगतलेले आहेत . अशा प्रकारे संत चोखामेळा यांचे अध्यात्मिक योगदान महत्वपूर्ण आहे .

संदर्भ सूची:

१. बलसेकर दिलीप (संपा.)(२०१८), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर बुलढाणा जिल्हा भाग-२, दार्शनिका तथा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग ,महाराष्ट्र शासन, प्रथम आवृत्ती(मराठी), मुंबई, पृष्ठ क्रमांक.१८५

२. पुजारी अप्पासाहेब(२०१९),संत चोखामेळा व परिवार चरित्र व समग्र अभंग गाथा,सोलापूर,सुविध्या प्रकाशन,पृष्ठ क्रमांक २८

३. उपरोक्त ,पृष्ठ क्रमांक २५

४. तापकीर संदीप (२०१३), संतांचे भक्ती आंदोलन ,स्नेहवर्धन प्रकाशन,प्रथमावृत्ती ,पुणे, पृष्ठ क्रमांक ९१

५. पुजारी अप्पासाहेब ,पूर्वोक्त ,पृष्ठ क्रमांक २७

६. तापकीर संदीप ,पूर्वोक्त ,पृष्ठ क्रमांक २

७. पुजारी अप्पासाहेब ,पूर्वोक्त ,पृष्ठ क्रमांक २३

८. एलिनॉर झेलियट, मंजुळ वा. ल.(२०११),संत चोळमेळा विविध दर्शन , सुगावा प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, पुणे ,पृष्ठ क्रमांक ८५

९. तापकीर संदीप, पूर्वोक्त पृष्ठ क्रमांक.९३

१०. एलिनॉर झेलीएट,मंजुळ,वा.ल. ,पूर्वोक्त , पृष्ठ क्रमांक ९५

११. उपरोक्त , पृष्ठ क्रमांक ८५

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

मराठाकालीन युद्धकला : एक तंत्र

पाटील प्रिती राजेंद्र

संशोधक विद्यार्थिनी

[एम्. ए. इतिहास]

Corresponding Author - पाटील प्रिती राजेंद्र

DOI - 10.5281/zenodo.19707294

जगात अस्तित्वात असणाऱ्या समस्त सजीवमात्रामध्ये स्वरक्षणात्मक व बचावात्मक अशा प्रवृत्ती आढळून येतात आणि या वृत्तीला आधारितच त्यांची शरीर-मनाची जडण घडण झालेली दिसते. मुळात स्वसंरक्षण किंवा आत्मबचाव या दोन्ही नैसर्गिक सहज प्रवृत्ती आहेत तसेच युद्ध ही जन्मजात सहज प्रवृत्ती आहे. आणि मनुष्य हा देखील या निसर्गातीलच एक जीव असल्याने त्याची घडण ही या वृत्तीवर आधारितच झालेली आहे. आवाज, नखे, दात, हात, पाय या व अशा अवयवांची निर्मिती ही वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे आढळते. त्यात मनुष्य हा बुद्धिमान प्राणी असल्यामुळे त्याने निसर्गातील पशू व पक्षांचे निरीक्षण करून तसेच नित्याच्या जीवन जगण्यातील अनुभवातून स्वतःची अशी लढण्याची युद्धाची वेगळी शैली निर्माण केली. यामध्ये शस्त्र व विनाशस्त्र लढण्याचे अनेक कला प्रकार त्याने निर्माण केले व ते विकसित केले.

मनुष्य हा निसर्गातील एक प्राणी असल्यामुळे मानवाच्या उत्क्रांतीच्या काळापासूनच युद्ध आयुधे निर्माण केली. अश्मयुगीन काळापासून दगडाचा वापर करून शस्त्राचा विकास करण्यात आला. प्रथम फक्त अन्न मिळविण्यासाठी दगडापासून अनुकुचीदार शस्त्र बनविण्यात आली. नंतर शस्त्र हळूहळू शस्त्राच्यामध्ये विकास झाला व वैविध्य निर्माण झाले . या शस्त्राचा उपयोग हा आत्ता अन्नाबरोबर निवारा व समूह रक्षणासाठी होवू लागला. यातूनच मानवाने युद्ध् आयुधाचा दगडापासून धाततूपर्यत विकास केला.

भारतामध्ये अनेक संस्कृतीचा उदय झाला. यातून रामायण, महाभारत या ग्रंथामध्ये आपली संस्कृती ,परंपरा, पराक्रम याचे दर्शन झाले होते. भारतामध्ये प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक काळात अनेक सत्ता निर्माण झाल्या व यामध्ये संघर्षहि झाला . म्हणून भारताला मोठी अशी युध्द परंपरा आहे .आपल्या जीवनाचा अविभाज्य अंग युध्द आहे. प्राचीन भारतीय जीवन हे वेदांच्या र्मितीतून निर्माण झाले आहे. आपले जीवन कसे असावे याची रचना हि वेदांमध्ये आहे. एकून चार वेद आहेत, मनूषाच्या आयुष्यातील सर्व स्तराचे विवेचन या वेदांमध्ये केले आहेएकूण चार वेद आहेत, १.ऋग्वेद, २.सामवेद, ३.अथर्ववेद, ४.यजुर्वेद हे आहेत. यातील या वेदांचेही उपवेदांमध्ये विभाजन केले आहे. ऋग्वेदाचा उपवेद आयुर्वेद, सामावेदाचा उपवेद गंधर्ववेद, अथर्ववेदाचा उपवेद हा शिल्पवेद व यजुर्वेदाचा उपवेद धनुर्वेद हा आहे. ह्यातील धनुर्वेद हा युध्दशास्त्राला समर्पित आहे. या वेदाचा अभ्यास करून आपली युद्ध नीती अधिक विकसित झाली.

भारतामध्ये मध्ययुगीन काळात मराठा सत्तेची स्थापना झाली होती. हि सत्ता स्वराज या नावाने

नावारूपास आली. छत्रपती शिवाजी महाराज यांनी याची स्थापना केल . आज आपण याच स्वराज स्थापनेतील युध्द शास्त्राचा उदय, विकास पाहणार आहोत.

मराठ्यांच्या युद्धशास्त्राचे युद्धनैतिक उद्दिष्ट:

आपल्या स्वतःच्या देशात आपल्या लोकांचीच सत्ता स्थापन झाली पाहिजे आणि अशी सत्ता स्थापन करावयाची असल्यास सर्व त-हेच्या परकीय आक्रमणाला झुगारून देवून ते आक्रमण नष्ट करून दिले पाहिजे. हेच मराठ्यांच्या युद्धशास्त्राचे अंतिम उद्दिष्ट होते. याच अथनि शिवाजी महाराजांनी स्वराज्य या शब्दाचा मूलमंत्र महाराष्ट्रामध्ये वापरात आणला. अशा त-हेचे स्वराज्य स्थापन करणे ही एक परमेश्वरी इच्छा असून या इच्छेच्या आड येणाऱ्या कोणत्याही शक्तीस प्राणपणाने प्रतिकार करून स्वराज्याची जोपासना केली पाहिजे असा ठाम निर्धार त्यांनी आपल्या २५ वर्षाच्या (१६४५ ते१६८०) अखंड मोहिमगिरीत कायम ठेवला. स्वराज्याची स्थापना हेच त्यांच्या विशाल युद्धनितीचे अधिष्ठान होते असे म्हणावे लागेल. हे विशाल युद्धनैतिक उद्दिष्ट समोर ठेवून महाराष्ट्रातील राजकीय, लष्करी, आर्थिक आणि सामाजिक अशा सर्व शक्तींचा वापर त्यांनी स्वराज्य स्थापनेसाठी केला. प्रसिद्ध इंग्रज युद्ध शास्त्रज्ञ लिडल हार्ट याने असे म्हटले आहे की विशाल युद्धनितीचे उद्दिष्ट हे देशातील सर्वोच्च अशा नेत्याने ठरवावयाचे असते. अशा त-हेचे उद्दिष्ट एकदा निश्चित झाल्यावर देशाची सर्वांगीण शक्ती या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी वापरात आणली गेली पाहिजे. या शक्तींमध्ये केवळ राजकीय आणि लष्करी शक्तींचाच समावेश होतो असे नव्हे. तर राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक शक्तींचे पाठबळही अशा प्रयत्नात सामील झाले पाहिजे. १६८० ते १७२० या ४० वर्षाच्या काळात शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठी सत्तेच्या विकासामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी आल्या. औरंगजेबसारखा समर्थ मोगल सम्राट दोन लाख सशस्त्र सेना घेवून २७ वर्षे महाराष्ट्रात ठाण मांडून बसला.

शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर केवळ ९ वर्षांनीच मराठी सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या संभाजी महाराजांचा वध झाला. त्यानंतर केवळ ११ वर्षांनीच संभाजीचे वारस छत्रपती राजाराम यांचे इ. स. १७०० मध्ये निधल झाले. १७०० ते १७०८ पर्यंत सत्तेला कोणी वारस नसल्यामुळे केंद्रीय सत्ता अदृष्य झाली आणि १७०८ मध्ये शाहू महाराज गादीवर आले तरी पुढील १२ वर्षे त्यांना या आपत्तीतून सावरण्यासच वेळ खर्च करावा लागला. इतक्या सर्व आपत्तीतून पुन्हा १७१८ ते १८१८ पर्यंत १०० वर्षे मराठी सत्ता वैभवाने अस्तीत्वात राहिली. याचे एकमेव कारण म्हणजे शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राच्या जनतेपुढे ठेवलेले विशाल युद्धनैतिक युद्ध उद्दिष्ट हे होय. कोणत्याही प्रकारची संकटे आली तरी त्यांचा जिद्दीने मुकाबला करून मराठी सत्ता कायम राखली पाहिजे हाच मूल मंत्र मराठ्यांच्या युद्धशास्त्राचा गाभा होता.

१६८० पूर्वीचे मराठ्यांचे युद्धशास्त्र:

या प्रबंधाचा कालखंड १६९० ते १७२० या ४० वर्षाच्या काळात मराठ्यांच्या युद्धशास्त्रात कोणती उत्क्रांती झाली याचा अभ्यास करणे हा आहे. याच कारणाकरिता स्वराज्याच्या स्थापनेपासून (१६४५) ते शिवाजी महाराजांच्या मृत्युपर्यंत (१६८०) या ३५ वर्षाच्या कालखंडात मराठ्यांच्या युद्धशास्त्रात कोणती उत्क्रांती झाली याची नोंद घेणे आवश्यक ठरते. या ३५ वर्षाच्या काळाकडे दृष्टी टाकल्यास असे आढळून येईल की, मराठ्यांचे युद्धशास्त्र तीन प्रमुख टप्प्यांनी बदलत गेले. हे तीन प्रमुख टप्पे म्हणजे १६४५ ते १६६० हा पहिला टप्पा, १६६० ते १६७० हा दुसरा टप्पा आणि १६७० ते १६८० हा

तिसरा टप्पा होय. १६४५ ते १६६० या १५ वर्षाच्या काळात मराठी सत्ता निश्चित आणि मजबूत पायावर उभी करणे हे प्रथम कर्तव्य होते. यावेळी सर्व महाराष्ट्रावर विजापूरच्या आदिलशाहीचा अंमल चालू असल्यामुळे आदिलशाही सत्ता झुगारून देवून महाराष्ट्राच्या भूमीवर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित करणे ही अग्रक्रमाची बाब होती. प्रारंभीचा काळ असल्यामुळे मराठी सेनेची वाढ हळूहळू करणे प्राप्त होते. आदिलशाहीच्या संघटित लष्करी सत्तेला उघडपणे आव्हान देणे शक्य नसल्याने प्रसंग पडेल त्याप्रमाणे उपलब्ध लष्करी शक्तिचा वापर करून विजापूरी सत्तेचे जाळे मिळेल त्या ठिकाणी तोडून टाकणे हा एकच अवलंबून होते. म्हणून मावळातील मावळे लोकांची पायदळ सेना उभी करून आधि मार्ग शिवाजी महाराजांपुढे होता. हे उद्दिष्ट महाराष्ट्रातील उपलब्ध असलेल्या मनुष्यबळावरच महाराष्ट्रातील दऱ्या-डोंगरांचा शक्य तितका फायदा घेऊन मोगल सेनेच्या तुकड्यावर थो आदिलशाहीच्या लष्करी शक्तीचे खच्चीकरण करणे याच युद्धपद्धतीचा छत्रपतींना वास हल्ले करणे त्यांचे कमजोर किल्ले बळकावून घेणे आणि शक्य त्या सर्व उपायांनी मराठी इतिहासकारांनी गुरीला युद्ध पद्धतीचा किंवा गनिमी काव्याचा वापर असे नाव दिले करावा लागला. याच कारणामुळे या काळातील मराठ्यांच्या खच्चीकरणाच्या कार्यवाहील केवळ युद्धशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास १६४५ ते१६६० या काळातील पुरंदरची लढाई (१६४८), वाईची लढाई (१६५५), कल्याण-भिवंडीवरील मोहीम आणि अखेरीच प्रतागडची लढाई (१६५९) या सर्व लष्करी कारवाया या बचावात्मक पवित्र्याचा एक अखंड आविष्कार असून शत्रूच्या शक्तीचे पद्धतशीर खच्चीका हे या कारवाईचे प्रमुख सूत्र होते.

१६६० ते १६७० या १० वर्षाच्या काळात मराठ्यांच्या युद्धशास्त्राचे स्वरूप बचावात्मक पवित्र्यापासून आक्रमक बचाव असे झालेले आढळते. १६६० च्या सुमारास मराठी सेनेची उपस्थिती २५००० पायदळ आणि चळवळ १५००० घोडदळ इतकी झाली आणि ही सर्व खडी सेना शिवाजी महाराजांच्या प्रभावी नेतृत्वाखाली आणि त्यांनी घालून दिलेल्या कठोर अशा शिस्तबद्ध चौकटीत काम कर लागल्यामुळे कोणत्याही शत्रूला ते एक प्रखर आव्हान ठरले. १६५९ मध्ये झालेला प्रतापगडच्या लढाईत स्वतः अफझलखान आणि त्याची सेना संपूर्णपणे नष्ट झाल्यामुळे १६६० चा पुढील काळात विजापूरच्या आदिलशाही सत्ताधाऱ्यांना मराठ्यांशी वैर न पत्करता त्यांच्याशी सलोख्याचे धोरण ठेवावे लागेल, पण हा एक शत्रू कमजोर झाला तो मोगल सम्राट औरंगजेब याच्या रूपाने मोगल साम्राज्याची सर्व ताकद मराठ्यांपुढे शत्र म्हणून उभी राहिली. तरीसुद्धा शक्य तेथे आक्रमक आणि अशक्य झाल्यास बचावात्मक असा आक्रमक बचावाचा नवीन पवित्रा शिवाजी महाराजांना अवलंबन करावा लागला. शाहिस्तेखानाविरूद्ध केलेला धाडशी हल्ला, कारतलबखाना विरुद्ध उंबरखिंडीच्या लढाईन शाहीफौजेची केलेली दैना, सुरत आणि हुबळी या बाजारपेठांवर केलेले हल्ले, वां दिंडोरीच्या लढाईत दाऊद खानावर केलेला हल्ला, उमराणीच्या लढाईत बहाद्दर खानाने केलेला हल्ला आणि शेवटी मोगलांच्या ताब्यात असलेल्या सिंहगड किल्ल्यावर तानाजी मालुसरे यांनी चढविलेली दुर्दम्य आणि घणाघाती चढाई ही मराठ्यांच्या आक्रमक पवित्र्याची ठळक उदाहरणे म्हणून सांगता येतील. परतु याचबरोबर ८०००० ची सेना घेऊन राजा जयसिंग आणि दिलेरखान यांनी पुरंदरला चार महिने वेढा घातल्यानंतर किल्ला लढवूनही शिवाजी महाराजांनी बचावात्मक पवित्रा घेतला आणि जयसिंगाशी शस्त्रसंधी करून बादशहाच्या भेटीसाठी आगऱ्यास जाण्याचे मान्य केले

१६७० ते १६८० ही १० वर्षे हा मराठ्यांच्या युद्धशास्त्राचा एक वैभवशाली काळ होता असे म्हणता येईल. या काळात महाराष्ट्रातील बहुतेक सर्व किल्ले आणि महाराष्ट्रापासून दूर असा जिंजीचा अभेद्द किल्ला मराठ्यांच्या सत्तेखाली आला. या प्रत्येक किल्ल्यावर पायदळ घोदळाचे मिश्र सैन्य अशी शिबंदी जमा झाली आणि त्याबरोबरच अन्नधान्य आणि दारुगोळा यांचे भरपूर साठे प्रत्येक किल्ल्यावर करण्यात आले. किल्ल्याच्या आतील प्रशासन कोणतेही संघर्ष न होता योग्य रितीने चालावे या हेतूने सरकार नियुक्त अशा मुलकी आणि लष्करी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. या सर्व किल्ल्यांवरील शिबंदी शिवाय ४००० घोडदळ आणि २०००० पायदळ आणि हलक्या व भारी तोफा असलेला तोफखाना अशा तिन्ही अंगानी सज्ज असलेली एक फिरती सेना तयार झाली. या वाढत्या शक्तीमुळे साहजिकच बचावाचा पवित्रा घेण्याचे कारणच उरले नाही. त्यामुळे संपूर्ण आक्रमक पवित्र्याचा वापर करून शिवाजी महाराजांनी दक्षिण भारतात भव्य मोहीम हाती घेतली. या मोहिमेच्या अखेरीस संपूर्ण दक्षिण भारतात मराठ्यांच्या घोडदौडीला कुणीही आव्हान देऊ शकले नाही आणि त्यामुळे मद्रास, कांजीवरमपर्यंत मराठ्यांचा दरारा प्रस्थापित करून विजयी मराठी सेना महाराष्ट्रात परत आली. भूसेनेच्या या विकासाबरोबरच मराठ्यांच्या नौसेनेची किंवा आरमाराची ताकदही या १० वर्षात झपाट्याने वाढली. इंग्लीश आणि पोर्तुगीज आरमाराला खुल्या समुद्रात आव्हान देऊन मराठ्यांच्या आरमाराने आपले वर्चस्व सुरतेपासून कारवारपर्यंत संपूर्ण किनारपट्टीवर प्रस्थापित केले.

गनिमी कावा:

गनिमी कावा म्हणजे शत्रूवर अचानक हल्ला, वेगवान हालचाली, रात्रीची मोहीम, छापामार पद्धत या सर्वांचे एकत्रित नियोजन होय.

छत्रपती शिवजी महाराज यांचा मुख्य संघर्ष हा मुघल, आदिलशाही,कुतुबशाही, सिद्धी, पोर्तुगीज, इंग्रज या सत्तांशी होता. यातील मुस्लीम सत्ताधीश हे संख्येने जास्त व खुल्या मैदानावर युद्ध करणारे होते, तर सर्व युरोपियन सत्ताधीश हे आरमारामाध्ये प्रबळ होते. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी दोन्ही कडील शत्रूंना पराजित करणारी गनिमी कावा हि नवीन पद्धती विकसित केली. या पद्धतीमुळे शिवाजी महाराज जमिनीवर व पाण्यामध्येही आपल्या शत्रूच्या वरचढ ठरले. शिवरायांच्या जीवनात झालेल्या महत्वपूर्ण घटनांमधून हे दिसून येते. उदा, अफझलखान वध, शाईस्ते खान हल्ला, पन्हाळगडाचा वेढा, आग्रा भेट, उंबरखिंडीतील लढाई, कल्याण भवंडी लढाई, दंड राजापुरी लुट. अश्या घटनेतून आपल्याला हे लक्षात येते कि, प्रत्येक वेळी शत्रुला पराभूत करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी नवीन युक्ती वापरली होती.

भौगोलिक घटक:

छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीला स्वराज्याचे नैसर्गिक संरक्षक बनवले. सह्याद्रीमध्ये असलेले डोंगर-दऱ्या यांचा योग्य उपयोग करून अवघड किल्ले बांधले. या किल्ल्यांचा वापर प्रशासनासाठी केला. जेंव्हा शत्रू सैन्य मैदानी भागात हल्ला करे तेंव्हा सर्व जनता किल्ल्यांच्या मध्ये आश्रय घेत असे. सर्व किल्ल्यांच्या वर अन्न, पाणी, निवारा यांची योग्य व्यवस्था करण्यात आली होती, याचबरोबर लष्करी दृष्ट्या प्रत्येक किल्ला हा सक्षम होता. यामुळे मुघल, आदिलशाही सरदार हे या लढायांच्या मध्ये पराभूत होत होते.

आरमाराची स्थापना:

भूमीवरील युद्धा बरोबरच पाण्यावरही आपली सत्ता असावी असे छत्रपतींना वाटत होते. म्हणून त्यांनी किनारी प्रदेशातील अनुभवी कोळी-आन्ग्री लोकांना सोबत घेऊन स्वतःचे आरमार स्थापन केले. शिवाजी महाराजांच्या आधीचे भारतीय सत्ताधीश हे आरमारी वर्चस्वासाठी युरोपियन लोकांवर अवलंबून होते. जी सत्ता आपल्याला व्यापारात अधिक सवलत देईल त्यांच्याशी आपण आपली निष्ठा द्यावयाची हे त्यांचे सूत्र होते. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःचे आरमार स्थापन करून आपल्या सागरावर आपले वर्चस्व स्थापन केले.

शिस्तबद्ध सैन्य संघटना:

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले सैन्य सुसंघटीत केले. आपल्या सैन्याचे चार प्रमुख विभाग तयार केले.

१.पायदळ

२. अश्वदल

३.नौदल

४. गुप्तहेर विभाग

यामुळे शिवराय कधीही कोणेतेही युद्ध हारले नाहीत. चारही विभाग कोणत्याही मोहिमेच्या वेळेला एकत्रित व सुसंघटीत कार्य करत असत यामुळे विजय निश्चित असे. सैन्यातील प्रत्येक सैनिकास वेतन पद्धत सुरु केली होती यामुळे सैनिकांची निष्ठा स्वराज्यात कायम राहिली. तसेच सैन्यामध्ये अठरा पगड जातीतील सर्व लोकांची भारती त्यांच्या गुणानुसार केली जात होती यामुळे हे राज्य सुराज्य आहे, आपले राज्य आहे हि प्रत्येक मावळ्याची भावना होती.

छत्रपती शिवरायांच्या नंतरचा कालखंड:

छत्रपती शिवाजी महाराजांनी १६४५ ते १६८० पर्यंत आपले स्वराज्य उभा केले. या ३५ वर्षांच्या कालखंडात त्यांनी सुरुवातीचा काळ हा बचावात्मक पवित्रा घेतला होता. नंतरचा कालखंड हा आक्रमक व बचावात्मक असा होता. व राज्याभिषेकानंतर आक्रमक पवित्रा घेतला यामुळे स्वराज्य विस्तारास वाव मिळाला. १६८० ला शिवरायांच्या नंतर संभाजी महराज हे छत्रपती झाले, त्यांनी शिवरायांनी उभा केलेले स्वराज्य मोठ्या हिमतीने संरक्षित केले. छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात मुघल बादशहा औरंजेब हा आपल्या संपूर्ण सैन्यानिशी दक्षिण भारतात आला होता. यामुळे दक्षिणेत असलेल्या मराठा, आदिलशाही, कुतुबशाही या तिन्ही सत्ता सतर्क झाल्या. औरंगजेबाने पहिल्यांदा आदिलशाही व कुतुबशाही यांना नष्ट केले व नंतर आपली सर्व ताकत मराठ्यांना नष्ट करण्यात एकजूट केली. १६८० पासून १७०७ पर्यंत या सत्तावीस वर्षाच्या कालखंडात मराठ्यांनी आपल्या स्वराज्यासाठी कडवा प्रतिकार केला.

यामध्ये छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महारणी ताराबाई यांनी मराठ्याचे नेतृत्व केले. यावेळी मराठ्याचे सर्व बाजूनी युध्द सुरु होते, मुघलांनी युरोपियन व्यापाऱ्याशी संधान साधून त्यांनाही आपल्या बाजूने वळवून घेतले होते. पण मराठ्यांनी सर्वत्र सत्ता संघर्ष यशस्वीपणे पार पडला. रामशेज किल्ला मुघलांना घेण्यासाठी ६ वर्षाचा कालखंड लागला. जंजिरा किल्ला घेण्यासाठी संभाजी महाराजांनी समुद्रातून किल्या पर्यंत रस्ता बांधला . अशा गोष्टीतून हे कळते की, मराठ्यासाठी विजय किती महत्वाचा होता .

छत्रपती संभाजी महाराजाच्या हत्येनंतर सर्व सूत्रे राजाराम महाराजाकडे आली, त्यांनी महाराष्ट्रापासून लाबं जिंजीवर राहून आपले स्वराज लढते ठेवले . त्यांनतर

महाराणी ताराबाई यांनी स्वराजाची धुरा आपल्या हातामध्ये घेतली. जिंजी हे स्वराजाचे दुसरे प्रमुख ठाणे झाले होते , ताराबाईनी संताजी व धनाजी दोघांना हाताशी धरून आपले राज्य टिकविण्यासाठी प्रयत्न केले . मध्य महाराष्ट्र , दक्षिण महाराष्ट्र या भागात मुघलाच्या सैन्याचा आधी प्रभाव होता, यामुळे मराठ्यांनी युध्द करण्याची एक नवी पद्धत अवलंबली होती. जोपर्यंत किल्ला लढवणे शक्य आहे तोपर्यंत तो लढवावा, पण जर आता लढणे शक्य नाही असे वाटू लागले कि, मुघलाच्याकडून मोठी खंडणी घ्यावी व त्याच्याकडे किल्ला द्यावा व आपण गड उतार व्हावे ,पुन्हा सैन्याची जमवाजमव करावी व पुन्हा हल्ला करावा. यामुळे मुघल सैन्य जेरीस आले होते.

१७०७ औरंगजेबाचा मृत्यू झाला व त्याच्या मुलामध्ये सत्ता संघर्ष सुरु झाला. यावेळी मराठ्याच्या मध्येही सत्ता संघर्ष सुरु झाला. यात कोल्हापूर गादि व सातारा गादी निर्माण झाली. सातारा गादी शाहू महाराजाकडे आली . हे योद्धे नव्हते पण, त्याचे पेशवे हे पराक्रमी होते. बालाजी विश्वनाथ , पहिले बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे, पहिले माधवराव पेशावे हे पराक्रमी होते . त्यांनी स्वराज्याचे साम्राज्यात रुपांतर केले . आत्ता मराठे खुल्या मैदानावरील लढाई देखील लढू शकतील इतके सैन्य त्याच्याकडे निर्माण झाले होते. यामुळेच मराठा साम्राज्य हे अटक पासून तंजावर पर्यत नर्माण झाले होते. यामध्ये पालाखेडची लढाई, भोपाळची लढाई ,वसईची लढाई, राक्षसभुवनची लढाई या लढाया महत्वाच्या होत्या.

मराठ्याची युध्द आयुधे:

'आयुधं तु प्रहरणम्' प्रहार करण्याचे साधन म्हणजे आयुध. अशी आयुधाविषयी व्याख्या केली गेली तरी या शस्त्र व अस्त्र असे दोन विभाग पडलेले आढळतात. प्रहार करणे व संरक्षण करणे असा त्याचा ढोबळ अर्थ स्पष्ट आहे. तेव्हा या आयुधांविषयी प्रथम माहिती करून घेणे आवश्यक आहे. आयुधाचे एकूण चार विभागात वर्गीकरण केल्याचे दिसते. मुक्त, अमुक्त, मुक्तामुक्त, यंत्रमुक्त असे ते चार विभाग आहेत.

मुक्त - जे अस्त्र निव्वळ हातानेच फेकून मारता येते, त्यास मुक्त अस्त्र असे म्हटले जाते. उदा., शक्ती, चक्र इ.

अमुक्त - निव्वळ हातात धरूनच ज्याचा उपयोग केला जातो किंवा कार्य साधले जाते ते शस्त्र उदा., तलवार, गदा, पट्टा, फरशी इ.

मुक्तामुक्त - ज्या अस्त्राचा उपयोग हातात धरून तसेच हाताने फेकून मारून उपयोगात आणले जाते उदा., भाला, त्रिशूल.

यंत्रमुक्त - यांत्रिक साधनांचा वापर करून उपयोगात आणलेली आयुधे. उदा., धनुष्यबाण, गोफण, शतघ्नी इत्यादी.

काठी:

सहज उपलब्ध होणारी व बहुकामी असणारी काठी नीती शास्त्राचे प्रतीक देखील आहे. वैदिक ग्रंथामध्ये दांडा, सोटा अशा अर्थाने याचा उल्लेख सापडतो. महाभारत, रामायण काळात लोह यष्टी मुसलयष्टी अशी नावे सापडतात. शस्त्र म्हणून याकडे पाहता अगदी आदिमानव काळामध्ये आपणास जावे लागेल. आदिम काळामध्ये मानवाने स्वरक्षणासाठी व शिकारीसाठी ज्या काही शस्त्रास्त्राचा उपयोग केला होता त्यामध्ये दण्ड शस्त्राचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

युद्धशास्त्रानुसार कोणतेही शस्त्र शिकण्यासाठी सुरुवात करताना काठीपासूनच करावी लागते. काठी हे सर्व शस्त्रांचे प्राथमिक आयुध आहे. भाला, पट्टा, तलवार हि घातक शस्त्रे नवीन शिकणाऱ्या योध्यास दिली तर इजा करू शकतात यामुळे सुरुवातीचे काही हात हे काठीने शिकवले

जातात. यासाठी काठी महत्वपूर्ण आहे. काठी वेताची, बांबूची, खैराची वापरली जात असे.

भाला:

बहुविविध गुणांमुळे स्वतः बरोबरच धारण करणाऱ्यालाही अजरामर करणारे एक शस्त्र. वीर राणा प्रताप, वीर मुरार बाजी हे व असे अनेक वीर रणांगणावर ज्याच्यावर भिस्त बाळगून असायचे तो म्हणजे भाला. भल्ल या संस्कृत शब्दापासून भाला हा शब्द रूढ झाला, तर भाला धारण करणाऱ्यास भालदार ही उपाधी दिली गेली. वैदिक ग्रंथात सृक हा शब्द भाल्यासाठी वापरल्याचे आढळते. मुक्त व अमुक्त प्रकारात वापरला जाणारा भाला शस्त्र व अस्त्र म्हणून ही उपयोगात आणला जात असे. युद्धात भालाईतांची खास तुकडी तैनात असे. आदिमानव काळापासून मानवाने शिकार व रक्षणासाठी याचा वापर केल्याचे आढळते. सिंधु संस्कृतीमध्ये तांब्याचे भाले आढळतात.

गजकुंत, अश्वकुंत, पदातीकुंत. हत्तीवरून मारावयाचा भाला गजकुंत, घोड्यावरून मारावयाचा अश्वकुंत व पायदळात वापरला जाणारा पदातीकुंत. हे भाल्याचे प्रमुख तीन प्रकार आहेत. भाल्याचे एकूण तीन भाग असतात. मुख, दंड आणि पार्श्व किंवा पादत्राण. उत्तम प्रकारच्या पोलादापासून बनवलेले फाळ दांड्याच्या एका टोकास बसवतात तर दण्ड खैर किंवा बांबूचा असतो. दुसऱ्या टोकास पादत्राण बसवितात. प्राचीन ग्रंथामध्ये याची विविध नावे सापडतात, कुंत, तोमर, शुल, मुत्कल, शक्य, प्रासभल्ल, शक्ती, त्रिंशूल ही व अशी अनेक नावे आढळतात. संपूर्ण पोलादी भाले देखील आढळतात, त्यास सांग असे म्हणतात.

तलवार:

तलवार हे प्राचीन काळापासून शौर्याचे प्रतिक मानले जाते. शस्त्रांचा उत्पत्ती विकास क्रम पाहता गदा, कुऱ्हाड, गोफण, तीर कमान, भाला यानंतर तलवार हे शस्त्र निर्माण झाले असावे तलवारीला लागणारे पोलाद हे निरंग व सांग अशा दोन प्रकारच्या लोहाचे असे. पोलादाच्या भेदावरून तलवारीमध्ये फरक केले जातो.. हिंदुस्थानात तलवार बनवण्याचे उच्च असे तंत्र विकसित झाल्याचे आढळते. तलवार बनवल्यानंतर तिची अष्टांग परीक्षा पाहिली जायची. अंग, रूप, जाती, नेत्र, अरिष्ट, भूमि, ध्वनि, मान.

तलवार दोन भागात विभागलेली असते. तिच्या उपविभागास विशिष्ट नावे दिलेली आढळतात. ज्याप्रमाणे तलवार बनवण्याचे शास्त्र आहे, तसेच ते चालवण्याचेही शास्त्र आहे. तलवारीचे एकूण ३८ हात सांगितले आहेत. भ्रान्त, उदभ्रान्त, अविद्ध, आप्लुत, सृत, परिवृत, संपात, कौशिक, प्रस्तृत इ. तसेच तिचे एकूण ७ पवित्रे दिले आहेत. शिखरक, कपोलक, ग्रिवास्थान, भूमंडल, तीक्ष्णग्र, मुनय व पंचघात. तलवार नेहमी म्यानात ठेवली जाते. हे म्यान कापडाचे असते. तसेच चामडी व धातूच्या पत्र्याचे पाहावयास मिळते. पांगारा, उंबर, सेवन, अडूळसा, ओक, देवदार या लाकडापासून म्यान बनवले जाते. तलवार साफ करणे म्हणजे गंज काढणे, धार करणे, विष चढवणे, पाणी देणे यासारखी कामे केली जातात. हे काम करणे शिकल करणे. अशी काम करणाऱ्यास शिकलगार म्हणत.

तलवारीचे मुठीमध्ये मोगरा,कंगणी, फुल, कटोरी, कंठी, पुतळा, जनेऊ, परज, ठोला, चौक, नख हे भाग आहेत. तर तलवारीच्या पात्या मध्ये दुमाला, खजाना, नाळ, पाठ, पेटा, पिपळा, अनी असे भाग असतात. तलवारीचे कर्नाटकी धोप, तेगा, खांडा, इराणी, तुर्की इ. प्रकार असतात.

पट्टा:

पुराण काळापासून अस्तित्वात असणारा तरीही शिवकाळात प्रसिद्धीस आलेला आपल्या अस्तित्वाने शत्रुपक्षात धास्ती निर्माण करणारा पट्टा शस्त्रात अजोड असे शस्त्र आहे. अमुक्त प्रकारात मोडणारे पट्टा हे शस्त्र युद्धात तलवारीपेक्षाही जास्त विश्वसनीय मानले गेले आहे. साधारण तलवारी ह्या एकधारीच असत. तसेच तलवारीची मूठही हाताच्या पंजाचेच रक्षण करण्याइतपत असे हातातून निसटून जाण्याचाही धोका असे. पट्ट्यांच्या संदर्भात प्राचीन ग्रंथात तुरळक माहिती मिळत असली तरी त्याचा शस्त्र म्हणून उल्लेख सर्वत्र सापडतो.

पट्ट्याचा आकार तलवारीसारखाच असून हा मनुष्यइतका लांब असतो. यांच्या दोन्ही बाजूंनी धार असते. याचा पुढचा भाग तेज असतो. हा पकडण्यासाठी जी मूठ असते यात हाताच्या पंजाचे व मनगटाचे चांगले रक्षण होते. मनुष्याच्या खांद्याएवढ्या किंवा त्यांच्या उंची इतक्या लांबीचे किंवा त्यापेक्षाही लांब पट्टे आढळतात. संपूर्ण पोलादापासून बनवलेला पट्टा एकूण पाच विभागात जोडलेला असतो. खोबळा, चिमटा, पाते, मूठ व कडी. पट्ट्याचे पाते साधारण दीड इंच रुंदीचे अग्रास निमुळते होत गेलेले असते. जास्त जाड किंवा अति पातळ असे पाते नसून पात्याचे वैशिष्ट्य म्हणजे हातात धरल्यास पात्याचे अग्राचा भाग लवलवता रहातो. एकधारी व दुधारी पाती बसवलेली असतात. खोबळ्याची रचना पंजा व मनगटापासून कोपरापर्यंत हाताचे रक्षण करण्याजोगी केलेली असते हे याचे खास वैशिष्ट्य आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्यामध्ये अनेक पट्टेकरी ठेवले होते, पावनखिंडीचा रणसंग्राम हा पट्टेकरी बाजीप्रभू देशपांडे यांच्या पराक्रमामुळे आजही सर्वांच्या स्मरणात आहे. आज आपल्या महाराष्ट्र राज्याचे राज्यशस्त्र म्हणून पट्ट्याला सन्मान मिळत आहे.

विटा:

भाल्याच्या जातकुळीमध्ये मोडणारे एक अस्त्र. बुमरँग अस्त्राप्रमाणे शत्रूवरआघात करून परत येणारे मुक्तामुक्त प्रकारातील अस्त्र. इतर सैन्याप्रमाणेच मराठ्यांच्या सैन्यात तिरंदाज भालाईत असायचे पण तिरंदाजाचे प्रमाण अत्यल्प तर भालाइतांना मर्यादा असायची. यातूनच मराठ्यांनी विशेष अस्त्र शोधून काढले. याचा निर्माणकर्ता कोण हे जरी सांगता येत नसले तरी हे खास मराठ्यांचेच अस्त्र म्हणून मान्यता पावले आहे.

चांगल्या जातीच्या भरीव बांबूचा एक ते दीड इंच जाडीचा दंड. या दंडाच्या एका टोकास दोन ते अडीच फूट लांबीचे टोकदार उत्तम प्रकारच्या पोलादाचे फळ बसवले जात असे. दंडाच्या दुसऱ्या टोकास दहा फुटापर्यंत लांबीची दोरी बांधलेली असे. दोरीचे एक टोक उजव्या हाताच्या मनगटात बांधून दोन्ही हातांनी विट पेललेला असे. दोन्ही हातांनी शत्रूवर अचूक फेकून मारून पुन्हा खेचून घेऊन हातात धरले जाई. हत्तीवरील, घोड्यावरील, उंटावरील तसेच लांबचा व उंचावरील शत्रू मारण्यासाठी याचा खास उपयोग केला गेला. युद्धात ढालाईत, भालाईत, धारकरी, पट्टेकरी व विटकरी यांच्या तुकड्या असत. त्यात बिनीच्या तुकडीत विटकरी असत. दहा पट्टेकरी विरुद्ध एक विटकरी अशी तुलना होत असे. विटकरी युद्ध कालात तटबंदीचे काम करत असत. शत्रुस अंगास न भिडता लांबूनच जायबंदी करणाऱ्या विटकऱ्यांना मुस्लीम बखरकार गनीम-इ-लाम (शापग्रस्त शत्रू) म्हणून संबोधतो. यावरूनच हे अस्त्र किती घातक काम युद्धात करत असे व शत्रू सैन्याने त्याची किती धास्ती घेतली होती याची कल्पना येते.

पन्हाळ्याच्या रणसंग्रामामध्ये शिवाजी महाराजांचा जीव वाचवणारे वीर शिवा काशीद हे विटेकरी होते.

ढाल:

स्वरक्षणाच्या भावनेतूनच शस्त्र निर्मिती झाली. पुढे पुढे आपणच निर्माण केलेल्या या शस्त्रास्त्रापासून रक्षण करण्याची गरज पडली आणि यातूनच स्वरक्षण कवच निर्माण झाले. शिरस्त्राण, वक्षकवच, पादस्त्राण, बाहुकवच, मनगटीकवच इ. शरीरावयवावरण तयार झाली तर शस्त्रास्त्राचा आघात झेल्याण्यासाठी रक्षणासाठी ढालीची निर्मिती झाली. साधारणतः ढाल ही तीन भागामध्ये विभागलेली असते. पृष्ठभाग, पार्श्वभाग व सांगाडा. ढालीचा सांगाडा लाकडी, बांबूचा किंवा धातूचा तयार केलेला असतो. य़ा सांगाड्यावर पृष्ठावरण चढवले जाऊन त्यावर रोगण लावले जात असे. ढालमुठीत घट्ट पकडता यावी यासाठी गादीसारखा मऊ चामडी भाग पाठीमागील भागावर तयार केलेला असे. पृष्ठभाग हा ढाळदार व गुळगुळीत केलेला असे. जेणेकरून शस्त्रास्त्राचा आघात निसटला जाऊ शकेल यामुळेच मराठ्यांच्या ढालीवरून बंदुकीची गोळी निसटून जात असे. सर्व शरीराचे रक्षण करेल अशी मोठी व मजबूत ढाल युद्धात वापरली जाई. ढाली अस्तित्वात होत्या. गेंडा, कासव, हत्ती, बैल, रेडा, नीलगाय यांच्या यामध्ये चौकोनी, दुकोनी, त्रिकोणी, अर्धवर्तुळाकार, इंग्रजी आठ आकारासारख्या कातड्यापासून तसेच बांबू, वेत, विविध धातूंचे पत्रे यापासून ढालींचा पृष्ठभाग तयार केलेला असे. शस्त्रास्त्राच्या माराचा वेग जिरवून घेण्याची क्षमता असल्यामुळे वरील वस्तूंचा उपयोग आवरणासाठी प्रामुख्याने केला गेला.

याच्याबरोबरच बाणा, कुऱ्हाड, जंबिया, माडु, बिछवा, चक्र, पाश, फरी-गदका, कट्यार हि शस्त्रे देखील मराठ्यांच्या युद्ध आयुधांमध्ये येतात.

निष्कर्ष :

प्राचीन काळापासून मनुष्य नेहमी स्व संरक्षणासाठी तत्पर राहिला आहे. यातूनच युद्धकलेची निर्मिती झाली आहे. याच युद्ध कलेचा उपयोग करून अनेक सत्तांची निर्मिती व ऱ्हासही झाला. यामुळे आपली भारतीय वैभवशाली परंपरा जीवंत राहिली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी याच युद्ध कलेला पुनर्जीवित करुन स्वराज्या ची स्थापना केली. म्हणून या कलेचा सखोल अभ्यास करावा. यामुळे आपल्या येणाऱ्या पिढ्यांना याची अधिक माहिती मिळेल.

संदर्भ ग्रंथ सूची:

१. दत्तात्रय चिंतामण मुजुमदार, व्यायाम ज्ञानकोश खंड १ ते १० खंड संपादक दत्तात्रय चिंतामण मुजुमदार
२. राजरत्न प्रोफेसर माणिकराव : भारतीय व्यायाम भाग १ : प्र .- कृ.
३. ल. भ. भोपटकर – दांडपट्टा, ल. भ. भोपटकर १९२७
४. श्री प्रताप शस्त्रागार – प्रो. माणिकराव, दमाजीराव गायकवाड, गव्हरमेंट प्रेस, ९/१/१९४२
५. अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे – मराठ्यांचा इतिहास खंड तिसरा, अनिरुद्ध अनंत कुलकर्णी २००६
६. लक्ष्मण नारायण सप्रे, लाठी-कला-शास्त्र खंड.१, प्र. शंकर नरहर जोशी, १९४१.
७. प्रा. डॉ. कुमार बी कदम - मराठा युद्धशास्त्र उगम आणि विकास इ.स.१६८० ते १७२०. प्रकाशक अनिल माणिकराव बैसाणे.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

मंगळवेढा परगणा: विशेष संदर्भ बहामनी कालखंड

मन्सुर महमद सुतार[1], डॉ. उत्तम अप्पासाहेब पठारे[2]

संशोधक विद्यार्थी, ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे, महाराष्ट्र

मार्गदर्शक, इतिहास संशोधन केंद्र व विभाग प्रमुख, ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे. महाराष्ट्र

Corresponding Author - मन्सुर महमद सुतार

DOI - 10.5281/zenodo.19707327

गोषवारा:

या संशोधन लेखांमध्ये मध्ययुगीन मंगळवेढा परगण्यात बहामनी कालखंडात घडलेल्या घटनांचा आढावा या ठिकाणी घेतला आहे या कालखंडामध्ये मंगळवेढा परगण्यात जी राजकीय, सामाजिक स्थित्यंतरे झाली याचबरोबर या कालखंडात महत्त्वाचे म्हणजे सात वर्षाच्या दुर्गा देवीचा म्हणजेच दुर्गाडीचा जो दुष्काळ पडला त्या दुष्काळामुळे पूर्णतः मंगळवेढा परगणा बेचिराख झाला व तो पुन्हा नव्याने बसविण्यासाठी जी बाहेरून कुळे आणली गेली व त्या ठिकाणी वसवली गेली त्या कुळांचा आढावा या ठिकाणी घेतला आहे. याच कालखंडात दामाजी पंतांनी जी दुष्काळ निवारणासाठी जे कार्य केले त्या कार्याचा मागोवा या संशोधन लेखात घेतला आहे. वरील सर्व घटनांची माहिती पुढील संशोधक व इतिहास अभ्यासकांना उपयुक्त ठरणार आहे.

इतिहास ही एक बौद्धिक स्वरूपाची ज्ञानशाखा आहे. तिचा मानवी जीवनाशी अतिशय निकटचा संबंध आहे. इतिहास म्हटला की, गतकालीन घडामोडींचा विचार आलाच. "इतिहास म्हणजे भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद,[१] असे ई. एच. कार यांनी म्हटले आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून इतिहासामध्ये अनेक प्रवाह निर्माण झालेले आहेत. त्याचे कारण म्हणजे इतिहासामध्ये सूक्ष्म पद्धतीने संशोधन होय. यामध्ये मानवी जीवनाच्या सर्वांगीण घटनेचा किंवा घडामोडींचा अभ्यास या नवीन प्रवाहामध्ये झालेला आपणास दिसतो. या प्रवाहामध्ये प्रादेशिक व स्थानिक इतिहासलेखनाची प्रक्रिया ही गतिमान झालेली आपणास दिसते. त्याच अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधासाठी स्थानिक इतिहास हा विषय निवडला आहे. या शोधनिबंधामध्ये मध्ययुगीन मंगळवेढा परगण्यामध्ये बहामनी कालखंडात ज्या काही सामाजिक, राजकीय घटना घडल्या त्या घटनांचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात मध्ययुगीन कालखंडाला अतिशय महत्त्व आहे. देवगिरीच्या यादवांचा नाश झाल्यावर महाराष्ट्रात काही काळ खिलजी घराणे आणि त्यानंतर तुघलक घराण्याची अधिसत्ता होती. मुहम्मद तुघलकाच्या राजवटीमध्ये त्याने काही काळासाठी आपली राजधानी दिल्लीवरून दौलताबादला आणली; मात्र राजधानी स्थलांतराचा प्रयोग यशस्वी झाला नाही. कारण दिल्लीहून

आलेल्या सरदारांनी राज्यात ठिकठिकाणी बंडाळी सुरू केली.

मुहम्मद तुघलकाच्या कारकीर्दीच्या अखेरच्या टप्प्यात निर्माण झालेल्या बंडामधून दक्षिणेत बहामनी राज्याचा उदय झाला. तुघलकाने हा उठाव मोडून काढण्याचा प्रयत्न केला; पण तो अयशस्वी झाला. अब्दुल मुजफ्फर अलाउद्दीन हसन बहमन शहा याने दिल्लीचा सुलतान मुहम्मद तुघलक याच्या सेनेचा पराभव केला. त्याने दक्षिणेतून तुघलक सैन्यास माघार घ्यावयास भाग पाडले आणि तो बहामनी राज्याचा सुलतान झाला. तो हसन गंगू या नावाने इतिहासात प्रसिद्ध आहे. तो जफरखान या नावानेही ओळखला जातो.

अल्लाउद्दीन हसन शहा गंगू यांनी इ.स. १३४७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना करून आपली राजधानी गुलबर्गा येथे स्थापित केली. त्यांनी आपल्या राज्याची प्रशासकीय कामकाजानुसार चार भागांमध्ये विभागणी केली. गुलबर्गा, दौलताबाद, बरार आणि बीदर हे ते चार विभाग होते. ते विस्ताराने फार मोठे असल्यामुळे प्रत्येक प्रांताची दोन प्रांतांत विभागणी केली व त्याचे आठ प्रांत तयार केले.[२]

अल्लाउद्दीन हसन शहा गंगू नंतर त्या ठिकाणी अनेक राजकीय स्थित्यंतरे झाली. बहामनीच्या गादीवर अनेक शासक होऊन गेले. यामध्ये मंगळवेढा परगण्याशी संबंध आला तो म्हणजे अहमद शहा प्रथम.अहमदशहा सत्तेवर आल्यानंतर त्याने गुलबर्ग्यावरून आपली राजधानी इ.स. १४२९ मध्ये बीदर येथे स्थलांतरित केली. आपल्या राज्याच्या सीमा विस्तारित करण्याचा त्याने प्रयत्न केला. या प्रयत्नातून मंगळवेढा आणि आसपासचा प्रदेश त्याने आपल्या राज्यामध्ये समाविष्ट करून घेतला. पुढे मंगळवेढा हे बहामनी राज्याचे महत्त्वाचे राजकीय ठाणे निर्माण झालेले आपणास दिसून येते.

इ.स. १४५० मध्ये अल्लाउद्दीन द्वितीय हा बहामनी गादीवर स्थानापन्न झाला. परंतु गादी वारसा हक्काच्या कलहामुळे त्याचा भाऊ अहमदशहा याने सोलापूर व त्याच्या आसपासच्या प्रदेशामध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्याने वारंवार अल्लाउद्दीन द्वितीयच्या विरोधात सैन्य कारवाया केल्या. तेव्हा त्याचा बिमोड करण्यासाठी अल्लाउद्दीन द्वितीय याने सैन्य पाठविले.या सैन्यामध्ये दामाजीपंत नावाचा सैन्याचा सेनापती होता. या सैन्याने अहमदशहाचा पराभव करून त्यास रायचूरकडे पिटाळून लावले. तसेच सोलापूर, मंगळवेढा, पंढरपूर, सांगोला, कासेगाव वगैरे सर्व मुलुख पुन्हा बहामनी राज्याच्या अखत्यारित आणले. या सैन्य पराक्रमात दामाजीपंतांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. म्हणून या पराक्रमावर खुश होऊन अल्लाउद्दीन द्वितीयने त्यांना मंगळवेढा येथील खजिनदारी पद देण्यात आले व त्याचबरोबर त्यांची नेमणूक मंगळवेढ्याच्या मामलेदारपदी करण्यात आली. बीदरच्या सुलतानांच्या अमलाखाली मंगळवेढा ठाणे आले व त्यांची राजवट त्या ठिकाणी सुरू झाली. या कालखंडात अनेक घडामोडी घडल्या. त्यापैकी एक महत्त्वाची घटना म्हणजे या काळात पडलेला दुष्काळ. त्याला "दुर्गादेवीचा दुष्काळ" असे म्हणतात. या दुर्गादेवीच्या दुष्काळावरूनच दामाजीपंतांचा काळ ठरविता येतो.[३]

इ.स. १४६८ पासून १४७५ पर्यंतच्या दुष्काळात दामाजीपंतांनी मंगळवेढ्यातील गोरगरिबांकडून धान्याची कोठारे लुटविली. या सात वर्षांच्या दुर्गादेवी दुष्काळाच्या अगोदर बारा वर्षांचा दुष्काळ पडला होता. हा दुष्काळ इ.स. १३९६ पासून इ.स. १४०८ पर्यंत होता, असे राजवाडे नमूद करतात. असा एक मजहर वाई येथील देशपांडे घराण्यात आहे. त्यातील मजकुरावरून इ.स. १४७५ मध्ये जो दुष्काळ पडला होता, त्या दुष्काळ संदर्भात वाईचे जे मजहर मिळाले आहे, त्या मजहरातील पहिलेच वाक्य पुढीलप्रमाणे आहे

"दुर्गादेवीचा दुष्काळ पडला. सबब काळाकरीता मुलुख वैराण होऊन चिराख झाला."[४] असे आहे या मजहरातील हकीकतीवरून असे दिसते की, दामाजीपंत कारभारी उर्फ कमाविसदार होता. त्या ठिकाणी विठ्या नावाचा महारही मंगळवेढ्यास होता. दामाजीपंतांच्या कारकीर्दीत देशात दुष्काळ पडला असता, दामाजीपंतांनी लोकांकरवी धान्याची कोठारे लुटविली, असा उल्लेख मजहरमध्ये आहे.

दुर्गादेवीच्या दुष्काळामुळे एकेकाळी राजधानीचे हे ठिकाण असलेले नगर आणि तेथील वसाहत बेचिराख होऊन दीर्घकाळ ओस पडली. पुन्हा वसाहत कशी नांदू लागली, याची हकीकत इतिहासाचार्य राजवाडे यांनी दिली आहे. "मंगळवेढ्याची हकीकत" या नावाने त्यांचा लेख असून त्यांनी त्यात याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर मंगळवेढा गावात फक्त दोनच कुटुंबांची वस्ती होती. त्यातील एक कसगावडा व दुसरे कुलकर्णी. ही दोन्ही कुटुंबे कृष्णातळ्याजवळ राहत असत.

दुष्काळामुळे मंगळवेढा परगण्याची झालेली वाताहत भरून काढण्यासाठी व वस्ती वाढवण्यासाठी बीदरच्या बादशहाकडून परवानगी हवी होती. त्याच वेळेस बादशहा या भागात आला होता. त्यांनी बादशहाला सर्व हकीकत सांगितली.[५] त्यांना वस्ती वाढविण्यासाठी बादशहाकडून परवानगी मिळाली. मंगळवेढ्याची वस्ती वाढविण्याबाबत कौल मिळाल्यानंतर वस्ती वाढविण्यासाठी मुलुख लावणी करण्यासाठी चौहीकडे कुळांचा शोध करू लागले. त्या वेळी प्रतापरुद्र इंगळे हे सरकारात नोकर होते. त्यांना बोलावून आणले. त्यास मंगळवेढ्याच्या परगण्याची देशमुखी तर्फे देण्यात आली. त्यानंतर कुळभराण करण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणांहून वेगवेगळ्या आडनावांची कुळे त्या ठिकाणी आणून त्यांना परगण्याची जमीन कुळासाठी दिली गेली.[६] मंगळवेढा परगण्यामध्ये अनेक कुळे आली. प्रत्येक कुळांना जमीन दिली गेली. काही कुळांना जमीन देऊन देशमुखी हे पदही दिले गेले. त्या पैकी खालील कुळांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

त्याप्रमाणे कसगावडे जमावासहित भालेवाडीच्या तळावर घेऊन येऊन मुक्काम केला. त्याच्या कुवतीप्रमाणे त्यास जमीन दिली गेली. परंतु मंगळवेढ्याची जमीन कसदार असल्या कारणाने प्रतापरुद्र याचेकडून जमिनीची लागवड होत नाही असे दिसताच, कसगावडे यांनी आलूर-आचलेर येथून भागनशेट होनराव यांना आणले आणि देशमुखी दिली. तरीही मंगळवेढ्याची जमीनच भारी असल्यामुळे लावणीस कुळभरणा होत नाही, हे पाहून विठ्ठल कसगावडा याने अनगरहून निकम यांना आणले. त्यांनाही देशमुखी दिली गेली. त्याचबरोबर कोयाजी बिन नामदेव पाटील यास अनगरहून आणले. विठ्ठल कसगावडा याचे एवढे प्रयत्न करूनही झाडून जमिनीची उस्तवारी (लागवड, मशागत) होत नाही, हे पाहून आणखी कुळे आणल्याशिवाय वस्तीही होणार नाही व कुळभरणाही होणार नाही, असे दिसताच आणखी कुळे आणली गेली. ती खालीलप्रमाणे

फुगारे: मूळ पुरुष परमाजी फुगारा हे आणगरहून आले,
भगरे - मूळ पुरुष काळोजी भगरा. याचे मूळ ठिकाण शंकरगावचे पाटील. तेथून आले.

हजारे: मूळ पुरुष विठ्ठल हजारे. याचे मूळ ठिकाण बावची. तेथे गावावर मारा झाल्यामुळे याची मातोश्री मंगळवेढा माहेरी येथे प्रसूत झाली. त्याचे नाव विठ्ठल हजारे. यास भालेवाडी येथे सरकारी जमीन १॥ चावर दिली.[७]

जटाळ: याचा मूळ पुरुष येमाजी जटाळ (आत्ताचे जठार). त्याचे मूळ ठिकाण कडलास. त्यांना कसबे बोराळे येथे १॥ पटी दिली गेली.

उनाळे: आत्ताचे उन्हाळे. याचा मूळ पुरुष गावडदेव. याचे ठिकाण मनेराजोरी; तेथून आले. कसबा बोराळे सटवाई ॥२६ व ब्रह्मपुरी पटी जमीन ।।।१५, एकूण दीड चावर अकरा बिघे दिली.

कोडो बहिरो: मूळ पुरुष बहिरजी व कानोगदे. विठ्ठल कसगावडे यांनी बेदर येथून आणले. त्यांना भालेवाडीची जमीन ३ मिरास करून दिली.[८]

मुरडे: मूळ पुरुष अंतोजी व नवलोजी मुरडे. हे वागदरी येथून आले. त्यांना धरमगाव येथील जमीन दिली.

ताड्याचा: आत्ताचे ताड. मूळ ठिकाण सुस्ते; तेथून आले. त्यांना कसबे भालेवाडी येथील जमीन दिली.

टकल्या: आत्ताचे टकले. याचा मूळ पुरुष भुसमुत्या धनगर. याचे ठिकाण कमळापूर, पो. सांगोले; तेथून कसबे मजकुरास आला.

टुळ्या: आत्ताचे टुळे. याचा मूळ पुरुष पारूटला. अणगरहून आले. त्यांना मौजे मुढवीची जमीन दिली.

आयवडा: याचे मूळ ठिकाण नागाव, पो. भालकी. कसबे मजकुरास येऊन जमीन आपले जिमे करून घेतली. तपशील : ४/१८ पटी तांबोळी जमीन – ॥१२, नजीक किला – ॥।५, पटी बोराळी ५॥। चावर जमीन दिली गेली.

दादो देवजी: याचे मूळ ठिकाण नागाव. येथून कसबे मजकुरास येऊन आपले जिमे जमीन करून घेतली. पट्या सुमार २।१, पटी ब्रह्मपुरी १॥, पटी तांबोळी २॥२४.

सांगोल्या: याचा मूळ पुरुष लखमन सांगोला. नागावाहून कसबे मजकुरास येऊन जमीन आपले जिमे करून घेतली. पटी भालेवाडी पैकी २।१।१८ चावर जमीन दिली गेली.[९]

पाटे: याचा मूळ पुरुष बहिरजी पाटे. नागावाहून कसबे मजकुरास येऊन आपले जिमे जमीन करून घेतली. पटी भालेवाडी पो. १॥९ चावर जमीन दिली गेली.

धुमाशंकर: याचे मूळ ठिकाण नागाव. येथून कसबे मजकुरास येऊन जमीन आपले जिमे करून घेतली. भालेवाडी पैकी २। चावर चावर जमीन दिली गेली.[१०]

धाऊ बाबाजी: याचे मूळ ठिकाण नागाव. येथून कसबे मजकुरास येऊन जमीन आपले जिमे करून घेतली. पटी भालेवाडी. २॥। चावर जमीन दिली गेली.

शाहाजादे: याचे मूळ पुरुष लखमण शाहाजादा. नागावाहून कसबे मजकुरास येऊन जमीन आपले जिमे करून घेतली. पटी भालेवाडी पैकी २॥। चावर जमीन दिली गेली.

कानो इंगळा: याचे मूळ ठिकाण नागाव. येथून कसबे मजकुरास येऊन जमीन आपले जिमे करून घेतली. पटी बोराळी १॥। चावर जमीन दिली गेली.

धावजी इंगळा: याचे मूळ ठिकाण नागाव. येथून कसबे मजकुरास येऊन आपले जिमे जमीन करून घेतली. पट्या सुमार १॥।७, पटी बोराळी सिव मुंढेवाडीस चावर जमीन दिली गेली.[११]

अशा प्रकारची अनेक कुळे, त्यामध्ये इंगळे, पाटील, बहिरट, जावळे, काटकर, ढवण, ताणगावडे इत्यादी आडनावांची कुळे मंगळवेढा परगण्यामध्ये आली. त्यांना जमिनी कुळांसाठी व वस्ती निर्माण करण्यासाठी दिली गेली. व त्या ठिकाणी शहर वसविले गेल्याचे आपणास दिसते.

दुर्गादेवीच्या दुष्काळात जे लोक महाराष्ट्राच्या सीमेबाहेरील प्रांतात गेले, त्यांनी तेथील बोली उचलली आणि तीच बोली ते बोलू लागले. तसेच दुष्काळानंतर परत आल्यावर या प्रांतात ज्या ज्या प्रांतातून लोक आले, तेथील भाषा, शब्द, वाक्प्रयोग, प्राचार, लोककथा वगैरेचा प्रवेश सहजासहजी झाला. "महाराष्ट्र सारस्वत" या ग्रंथकर्त्याने ऐतिहासिक घटनेचा धांडोळा घेतला आहे.[१२]

या दुष्काळानंतर महाराष्ट्रावर दुसराही आघात येऊन कोसळला. त्याचा आरंभ तेराव्या शतकातच सुरू होऊन चौदाव्या शतकात तो पूर्णरूपाने दिसू लागला. तेराव्या शतकापासूनच या देशावर मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या. अनेक राजे व प्रांत मुसलमानांच्या अमलात जाण्यास सुरुवात झाली. याच काळात देवगिरीच्या यादवांच्या गादीला उतरती कळा लागली. तेराव्या शतकात

ते सिंहासन नष्ट झाले. पुढे जवळपास तीनशे वर्षे यवन सत्तेचा अमल महाराष्ट्रात राहिला.

बहामनी राजवटीमध्ये "मंगळवेढा" हे एक तर्फ होते. त्या काळात मंगळवेढा हे एक राजकीय ठाणे असून मोठी व्यापारी पेठ होती, असे उपलब्ध साधनांवरून दिसून येते. नंतर बहामनी राज्याची सत्ता संपुष्टात येऊन त्याची पाच शकले निर्माण झाली आणि या पाच शाह्यांमधून आदिलशाही सत्तेचा अमल "मंगळवेढा" या प्रदेशावर सुरू झाला. पुढील काळामध्ये मंगळवेढा हे एक राजकीय व महत्त्वपूर्ण ठाणे मोगल, मराठे व पेशवे यांच्या काळात निर्माण झाले.

बहामनी राज्याच्या विघटनाची सुरुवात इ.स. १४९० मध्ये होऊन इ.स. १५३८ मध्ये ते पूर्णपणे अस्तंगत झाले. बहामनी राज्याचे इतर कोणतेही दोष असले तरी भौगोलिकदृष्ट्या मात्र एकच सलग व एकसुरी असे ते राज्य होते. त्या राज्याची पाच शकले होताच भौगोलिक सलगता व एकसुरीपणा नाहीसा झाला आणि शेवटी बहामनी साम्राज्य विघटित होऊन पाच शाह्या निर्माण झाल्या. युसुफ आदिलखान, फतुल्लाह इमाद, कुतुबुलमुल्क, अमीर कासिम बरीद आणि मलिक अहमद बहरी यांच्या अनुक्रमे आदिलशाही, इमादशाही, कुतुबशाही, बरीदशाही व निजामशाही या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. बहामनीच्या विघटनानंतर आदिलशाहीचा अमल "मंगळवेढ्या"वर सुरू झाला. आदिलशाही राजवटीच्या सत्तेखाली रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, सांगली तसेच सोलापूर जिल्ह्याच्या दक्षिणेकडील काही प्रदेश येत होता.

सारांश:

मंगळवेढा परगण्याचा सामाजिक व राजकीय स्थितीचा आढावा घेतला असता, मंगळवेढा हे महत्त्वाचे राजकीय ठिकाण होते. कारण चालुक्य सत्तेपासून ते बहामनी सत्तेपर्यंत या ठिकाणी अनेक राजकीय स्थित्यंतरे झालेली आपणास दिसतात. बदामीचे चालुक्य, कल्याणीचे चालुक्य, यादव, बहामनी व आदिलशाही यांच्या सत्ता मंगळवेढ्यावर होत्या. वेगवेगळ्या सत्तांचे वर्चस्व असो, त्या ठिकाणी एक राजकीय व सामाजिक वलय निर्माण झालेले आपणास दिसते. मंगळवेढा परगण्याचा अभ्यास करीत असताना ज्या काही सामाजिक व राजकीय घटना घडल्या, त्या घटनांचा उहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे.

तळटिपा:

१) शांता कोठेकर, *इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान*, नागपूर, २००५, पृ. ०४.

२) त्रैमासिक १४, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३४, पृ. ७९.

३) मु. ब. शहा (संपा.), *इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य*, खंड-११, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९९८, पृ. १३८.

४) कित्ता, पृ. १३९.

५) डॉ. प्रा. न. देशपांडे, प्रा. सर्जेराव भामरे (संपा.), *इतिहासाचार्य वि. का. राजवाडे : मराठ्यांची इतिहासाची साधने*, खंड-१०, पृ. ५६.

६) कित्ता, पृ. ५७.

७) कित्ता, पृ. ५८.

८) कित्ता, पृ. ५९.

९) कित्ता, पृ. ६०.

१०) *सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर*, महाराष्ट्र शासन, मुंबई : मध्यवर्ती मुद्रणालय, १९७७, पृ. ८६७.

११) देवीसिंग चौहान, प्रकाशक वि. खोबरेकर, *दक्खनी हिंदीतील इतिहास*, इतिहास संशोधक मंडळ, दादर, १९७३, पृ. ९६.

१२) वि. ल. भावे, *महाराष्ट्र सारस्वत*, खंड-१, पॉप्युलर प्रकाशन, १९८२, पृ. १७२.

संदर्भग्रंथ:

१) कोठेकर, शांता, *इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान*, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५.

२) कुंटे, भ. ग. (संपा. व अनु.), *गुलशन-ए-इब्राहिमी (फेरीश्ताचे भाषांतर)*, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२.

३) चौहान, देवीसिंग, प्रकाशक – वि. खोबरेकर, *दक्खनी हिंदीतील इतिहास*, इतिहास संशोधक मंडळ, दादर, १९७३.

४) देशपांडे, डॉ. प्र. न. व भामरे, प्रा. सर्जेराव (संपा.), *इतिहासाचार्य वि. का. राजवाडे : मराठ्यांची इतिहासाची साधने*, खंड-१०, २००९.

५) पाठक, अरुणचंद्र (संपा.), *महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर : मध्ययुगीन कालखंड (राजकीय आणि सामाजिक इतिहास),* खंड-२, मुंबई, २०१४.

६) भावे, वि. ल., *महाराष्ट्र सारस्वत*, खंड-१, पॉप्युलर प्रकाशन, १९८२.

७) शहा, मु. ब. (संपा.), *इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य*, खंड-११, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९९८.

८) *सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर*, महाराष्ट्र शासन, मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, १९७७.

९) त्रैमासिक १४, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३४.

१०) Sherwani, Haroon Khan, *The Bahamanis of The Deccan,* The Manger Publication, Hyderabad, 1946.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

जावळीचे चंद्रराव मोरे घराणे : ऐतिहासिक अभ्यास (१५ वे १७ वे शतक)

डांगिस्ते विशाल रामचंद्र

संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव ता. जुन्नर जि. पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Corresponding Author - डांगिस्ते विशाल रामचंद्र

DOI - 10.5281/zenodo.19707392

प्रस्तावना:

मराठेशाहीचा इतिहास अभ्यासत असताना आपण प्रामुख्याने महाराष्ट्राच्या वलयात जी घराणी मध्ययुगात अस्तित्वात होती त्यांचा विचार करतो. या काळात विजापूर व अहमदनगर येथील सुलतानांच्या पदरी अनेक मोठमोठे मराठा सरदार होते. त्यांत सिंद्खेडचे जाधव, फलटणचे निंबाळकर, मुधोळचे घोरपडे, जावळीचे मोरे, वेरुळचे भोसले हे प्रमुख होते. यापैकी जावळीचे मोरे यांचे वजन त्यांना प्राप्त आदिलशाही जहागिरीमुळे त्या दरबारात अधिक होते. मोरे यांची जहागीर रायगडापासून कोयना खोऱ्यापर्यंत इतक्या विस्तृत परिसरात होती. हे जावळीचे मोरे घराणे शिवाजी महाराजांनी जावळी जिंकून घेतली त्याआधी तब्बल सात पिढ्यांपर्यंत जावळीच्या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून होते. मुसलमानी सुलतानांसाठी कार्यरत असून देखील ते मोठे धार्मिक देखील होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यकार्यास प्रस्थापित मोरे घराण्याने सहकार्य केले नव्हते हे सर्वमान्य असले तरीही त्यांच्या घराण्याने महाराष्ट्रातील एका प्रदीर्घ प्रांतावर प्रदेशावर वर्चस्व गाजवलेले आहे. त्या घराण्याचा अभ्यास या ठिकाणी करावयाचा आहे.

सूचनक शब्द : जावळीचे मोरे, चंद्रराव मोरे, जावळी, रायरी, कोयना

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

१. जावळीचे मोरे यांचा इतिहास अभ्यासणे.
२. चंद्रराव मोरे आणि त्यांची घराणी यांची माहिती प्राप्त करणे

संशोधन पद्धती :

प्रस्तूत शोधनिंबधामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर तसेच दुय्यम साधनांचा आधार घेऊन वर्णनात्मक व विश्लेषणात्मक ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. विषयाच्या अनुषंगाने इंटरनेट, वृत्तपत्र, प्रत्यक्ष क्षेत्र भेटी, आणि दुय्यम संदर्भ ग्रंथ यांचा वापर करण्यात आला आहे.

विषयप्रवेश:

जावळीचे मोरे:

मोरे हे जावळीचे. चंद्रराव हा त्यांना आदिलशाहीकडून लाभलेला किताब होता. जावळी हा

साताऱ्याच्या वायव्येकडील ५६ किमी वरील सह्याद्रीचा अतिदुर्गम प्रदेश आहे. याचा योग्य वापर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य विस्ताराकामी केल्याचे आपणास इतिहासामध्ये दिसून येते. मोरे हे मुळचे कर्नाटकातील, तथापि युसुफ आदिलशहाने (१४९०-१५१०) अगदी आपल्या स्वातंत्र्याच्या अस्तित्वाच्या आद्य संघर्षात मोऱ्याना आपलेसे करून त्यांना नीरा आणि वारणा दरम्यानच्या प्रदेशातील शिर्क्यांना घालवून देण्याची मोठी कामगिरी दिली. या सुपीक पट्ट्यात गुजर, मामुलकर, मोहिते आणि महाडिक या आपल्या सुभेदारांसमवेत शिर्के मातब्बर होते. शिर्क्यांचा बिमोड होईपर्यंत निजामशाहीकडील धोका टळत नव्हता, यासाठी मोऱ्यांबरोबर १२००० पायदळ तैनात केले होते. मोऱ्यांनी शिर्केंचा पराभव करून त्यांचे या खोऱ्यातील वर्चस्व मोडून काढले. त्यामुळे मोऱ्यांना चंद्रराव ही पदवी दिली. त्यांच्या घराण्यात त्या पदवीचा अखेरपर्यंत आदरपूर्वक वापर केल्याचे दिसते.

बुऱ्हाण निजामशहा (१५०९-१५५३) बरोबरच्या युद्धात यशवंतराव मोऱ्यांनी मोठी मर्दुमकी गाजवून बुऱ्हाण निजामशाहाचे हिरवे निशाण जिंकून आणले म्हणून त्यांना 'जावळीचे राजे' हा दुसरा सन्मानाचा किताब व जिंकलेले निशाण वापरण्याची परवानगी दिली. मोरे घराण्यामध्ये अखेरपर्यंत ते निशाण सन्मानाने वापरले जात होते. मोऱ्यांनी आपल्या प्रदेशात उत्तम कारभार चालवून राज्याचे उत्पन्न वाढविले. परिणामी आदिलशाही राजवटीने त्यांच्याकडून अनेक वेळा ठरलेल्या महासुलाशिवाय अतिरिक्त महसूल गोळा केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मोऱ्यांची प्रजा आदिलशाही राजवटीविरुद्ध असंतुष्ट होती. पुढे छत्रपतींनी याचा योग्य तो लाभ घेतला.[१]

जावळीचा हा प्रदेश देश व कोकणच्या अन्य प्रदेशापेक्षा अगदी भिन्न होता. या प्रदेशात अनेक दऱ्या खोरी असून हा डोंगरी प्रदेश संरक्षणाच्या दृष्टीने महत्वाचा होता.[२] जावळीच्या खोऱ्यात पूर्वीपासून मराठ्यांची वस्ती होती. पंधराव्या शतकाच्या अखेरपर्यंत जावळी व त्याच्या आसपासचा भाग शिर्क्यांच्या अधिकाराखाली होता. चंद्रराव मोरेने विजापूरच्या युसुफ आदिलशाहच्या मदतीने शिर्क्यांकडून जावळी जिंकून घेतली शिर्क्यांना जावळीतून हुसकावून लावले. यामुळे गुजर, महाडिक, मामुलकर व मोहिते यांच्यामधील भांडणे संपुष्टात येऊन येथे आदिलशाही सत्ता स्थापन झाली. अहमदनगरचा बुऱ्हाण निजामशाह (१५०८-१५५३) व विजापूर बादशाहची लढाई पंढरपूर जवळ झाली त्यावेळी मोरेंनी विजापूरच्या बादशाहच्या बाजूने लढून पराक्रम केल्यामुळे त्यांना चंद्रराव असा किताब देऊन त्यांचेकडून नाममात्र खंडणी घेऊन त्यास जावळी प्रांत दिला. जावळीवर मोऱ्यांची सत्ता सात पिढ्या अनिर्बंध चालू होती. [३]

जावळीचा हा जो कर्ता पुरुष होऊन गेला त्याचे नाव चंद्रराव. त्याच्या थोरल्या मुलाचे नाव चयाजीराव , परंतु चंद्रराव हा किताब मिळाल्यावर तिथून पुढे तोच काय तर जावळीच्या गादीवर बसलेले त्याचे सातही वारसदार चंद्रराव म्हणूनच परिचित आहेत. या चयाजीरावाचे इतर भाऊ जावळी खोऱ्यातील मोक्याच्या ठिकाणी राहून कारभार पाहत होते. यामुळे जावळीच्या मोरे घराण्याचा मूळ पुरुष हा चंद्रराव हा आहे.[४] यानंतरचे त्याचे सर्वच वारसदार चंद्रराव याच नावाने राज्य करीत होते. म्हणजे आपल्या मूळ पुरुषाचे नाव त्यांनी किताब वा पदवी म्हणून त्यांनी धारण केलेले समजते.

चंद्रराव मोरे यांच्या घराण्याबद्दल अधिकची माहिती प्राप्त करीत असताना त्याचे अनेक वारस झाले. हे सारे जावळीच्या प्रांतात वेगवेगळ्या ठिकाणी अधिकार प्राप्त करून होते. त्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे,

मूळ चंद्रराव मोरे यांचे वारस:

"थोरल्या शाखेत चंद्ररावापासून पुढिल आठ पिढ्या झाल्या. चंद्रराव (संस्थापक) – चयाजी – भिकाजी – शोदाजी – येसाजी – गोंदाजी – बाळाजी आणि दौलतराव. जावळीचा अधिपती, म्हणजे थोरल्या शाखेतील ज्येष्ठ पुरुष, किताब म्हणून चंद्रराव हे त्या घराण्याच्या संस्थापकाचे नाव धारण करू लागला. या शाखेतला आठवा पुरुष दौलतराव निपुत्रिक वारला. तेव्हा त्याची आई मानकाई हिने शिवथरच्या यशवंतराव यास दत्तक घेतले आणि चंद्रराव म्हणून जावळीच्या गादीवर बसवले."[६]

मूळ चंद्रराव मोरे यांचे भाऊबंद:

मोऱ्यांची बखर , कोंढवी परगण्याचा करिना, जव्हींसच्या हुकुमावरून लिहून देण्यात आलेली हकीकत आणि चित्रे शकावली या चार साधनांमधून समजणारी चंद्रराव मोऱ्याच्या भाऊबंदांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – प्रतापराव, शिवथरचा यशवंतराव, जोर येथील हणमंतराव, जांभळीचा गोविंदराव, महीपतगडचा दौलतराव, केवनाळे व वाकण येथील बागराव, आटेगाव तरफेतील देवळी येथील सूर्यराव आणि देवळी येथील भिकाजीराव. यापैकी शिवथरचा यशवंतराव, जोर येथील हणमंतराव व जांभळीचा गोविंदराव या नावांना प्रत्यंतर पुरावे आहेत. [७]

चंद्रराव मोरे : हिंदू धर्मीय आणि महादेवाचे भक्त:

चंद्रराव मोरे हे जरी मुसलमान सत्ताधीश आदिलशाहाचे जहागीरदार असले तरी ते हिंदू धर्मीय आणि महादेवाचे भक्त होते. महाबळेश्वर मंदिरासोबतच त्यांनी या भागातील देवस्थानांची चोख व्यवस्था लावली होती. आपल्या राज्यात त्यांनी सात शिवमंदिरे स्थापिली. त्यांची व्यवस्था देखील पहिली. जावळी सारख्या घनदाट अरण्यात आणि दऱ्या- खोऱ्यांच्या डोंगराळ प्रदेशात मोरे यांच्यावर आदिलशाह याचा वचक नाममात्र होता. कोकणातून देशावर येणारा माल त्यावेळी मोरे यांच्या ताब्यातील हातलोट आणि पारघाट या दोन घाट मार्गांतून येत असल्यामुळे मोरे यांचे उत्पन्न देखील मोठे होते. त्याचा खर्च ते काय प्रकारे करीत याची माहिती पुढीलप्रमाणे,

"चंद्ररायाचे राज्य, धर्मात्मा जावलीवर राज्य करीत असता राजियातील हिस्से. एक हिसियाची शिबंदी पायेहासम, एक हिसियाची अन्नछत्रे व धर्मखैरात, एक हिसियाचा खाजगी खर्च, तोसीखाना, पागा, सुरतखाना, अदिलखाना, वगैरे, एक हिस्सा देवस्थली, देव, शिवालये, माहाबलेश्वरी पंचगंगा चंद्ररायांही बांधल्या. ऐशा सात शिवपुऱ्या चंद्ररायांही आपले वंशपरंपरा, जेथून जावलीचे राज्य जाले तेथून संपेल तेथवर, देवस्थली बाकी चालवली. ऐसे धर्मराज मोटे जाहले. शिवाजी महाराजे जावलीस वर ढोरपा डोंगर होता तेथे प्रतापगड बांधिला. तेथे श्री तुळजापुरचे अंबेची स्थापना केली. परंतु चंद्ररायाची कीर्ति जग चाहत आहे. हकीकतनामा चंद्ररावराजे मोरे यांचा." [८]

जावळीचे मोरे दत्तक प्रकरण आणि छत्रपती शिवाजी महाराज:

दौलतराव मोरे यांचा निपुत्रिक मृत्यू झाल्यावर जावळीच्या गादीला वारस उरला नाही. या परिस्थितीचा सामना करताना दौलतरावाची आई मानकाई हिने शिवथरकर मोरे घराण्यातील यशवंतराव किताब धारण करणाऱ्या येसाजीस दत्तक घेतले. हा यशवंतराव आता जावळीचा नवा चंद्रराव झाला. त्याच्या वतीने जोर येथील हणमंतराव कारभारी म्हणून कामकाज पाहू लागला. या दत्तकपुत्रावरून जावळीच्या इतर भाऊबंदामध्ये नाराजी उद्भवली असावी. जावळीची सत्ता शिवथरकर यशवंतरावास लाभल्याने इतरांनी त्रास द्यायला सुरुवात केली त्यावेळी शिवाजी महाराजांनी या ठिकाणी मध्यस्थी केली असावी. येथपावेतो शिवाजी महाराजांचे जावली समवेत चांगले सबंध दिसतात.[९]

शिवाजी महाराजांची ही मध्यस्थी तत्कालीन आदिलशाही सरदार मुख्यत्वे नजीकच्या वाई प्रांतातील सरदारांना विशेत्वाने सुभेदार अफजलखान यास न रुचल्याने त्याने जावळीच्या मोरेंवर दबाव आणावयास सुरुवात केली. मध्यंतरी अफजलखानाने जावळीवर चालून जाण्याची संपूर्ण तयारी देखील केल्याचे पुरावे तत्कालीन पत्रव्यवहारांतून उमगते.[१०] खानाला तातडीने आदिलशाही आदेशानुसार दक्षिणेत मोहिमेवर जावे लागले आणि त्याची जावळी वरील स्वारी रद्द झाली.

याच संधीचा लाभ घेऊन शिवाजी महाराजांनी जावळीच्या चंद्रराव मोरेंना स्वराज्य कार्यास हातभार लावावा म्हणून साद दिली. परंतु यावेळी पूर्वाश्रमीची मदत विसरून मोरे उलटले. तत्कालीन शिवाजी महाराज आणि जावळीच्या चंद्रराव मोरे यांच्या पत्रव्यवहारातून हे प्रकरण कसे हमरीतुमरी वर पोचले हे समजते. ज्यात मोरे यांनी शिवाजी महाराजांना आवाहन देऊ केले. जावळीचे मोरे दिमाखाने म्हणत, आम्हांस पादशाहने, राजे किताब, मेहरबान होऊन दिधले.[११]

इ. स. १६५६ मध्ये महाराजांनी आपल्या मावळातील फौजेला घेऊन जावळीवर आक्रमण केले. यावेळी शिवाजी महाराजांनी जावळी काबीज केली. जावळीचा मुलुख शिवाजी महाराजांनी घेतला तेव्हा स्वराज्य थेट दुपट्टीने वाढले. स्वराज्याच्या सीमा थेट अरबी सागरास भिडल्या. यामुळेच हिंदवी स्वराज्याला आता आरमाराची आवश्यकता भासू लागली.

समारोप:

जावळीचे चंद्रराव मोरे घराणे हे मध्ययुगीन कालखंडातील महाराष्ट्रातील एक नामवंत घराणे होते. त्यांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर शिर्केना जावळीच्या परिसरातून हुसकावून लावले आणि स्वत: या ठिकाणी राजे बनून राहिले. त्यांनी जिंकलेले निजामशाही निशाण ते मोठ्या सन्मानाने वापरत होते त्याचा त्यांना अभिमान होता.

मुस्लीम सत्ताधीशांचे जहागीरदार बनलेले जावळीचे मोरे घराणे मोठे देवभक्त होते. देवकार्यासाठी त्यांनी कधीही आखडता हात घेतला नाही. महादेवाची साधना त्यांनी मनोभावे केली. परंतु स्वता:च्या धार्मिक कार्यापलीकडे जाऊन त्यांनी कधीही या मुलखासाठी, मातीसाठी त्याच्या उद्धारासाठी प्रयत्न केले नाहीत. छ. शिवाजी महाराजांनी सुरु केलेल्या स्वराज्य कार्याला बगल देऊन जावळीच्या मोरे घराण्याने आपला शेवट स्वताच घडवून आणला.याउलट हा प्रदेश जिंकून शिवाजी महाराजांनी आपले स्वराज्य पूर्वीपेक्षा दुप्पट केले.

निष्कर्ष:

जावळीचे चंद्रराव मोरे यांचे घराणे मराठेशाहीच्या आधीपासून एका प्रदीर्घ प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून होते. बादशाही सत्तांशी अंकित असून देखील जावळीचे चंद्रराव मोरे आपल्या प्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीचा म्हणजेच निबिड आणि घनदाट अरण्य, सह्याद्रीच्या अवघड वाटा, इ. फायदा घेऊन कायम स्वतंत्रपणे वागत आले. कोकणातून देशावर येण्याचा घाटरस्ता त्यांच्या प्रदेशातून येत असल्याने त्यांचे उत्पनांचे साधन देखील बळकट होते. त्यांनी आपल्या धर्माचा आदर म्हणून अनेक देवालये देखील उभारली. या सर्वांवरून असे समजते की शिवाजी महाराजांनी जावळी जिंकून घेईपर्यंत हा प्रदेश मोरे घराण्याने आपल्या ताब्यात कायम ठेवला.

संदर्भ:

१. पारसनीस द. बा. (संपा.), जावळीच्या मोऱ्यांची खबर, इतिहास संग्रह

२. डॉ. जयसिंगराव पवार, मराठ्यांचा इतिहास खंड १ , मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, २०२४ पृ. ११७
३. डॉ. पाठक अ. शं. , सातारा जिल्हा गॅझेटीयर १९९९, पृ. ११२
४. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती भाग -२ , डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, १९९९, पृ. ९५८
५. पूर्वोक्त, पारसनीस द. बा.
६. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती भाग -१ , डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, १९९९, पृ. ६९९
७. पूर्वोक्त, मेहेंदळे ग. भा.
८. वैद्य चिंतामण विनायक, शिवाजी आणि चंद्रराव मोरे
९. संपादक: शिवदे सदाशिव, प्रतापगड दुर्ग महात्म्य
१०. डॉ. सहस्रबुद्धे पु. ग., महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टीनेटल प्रकाशन, १९७९पृ. ३९३
११. देशपांडे प्र. न., मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष इ.स. १६०० ते १७६१, स्नेहवर्धन प्रकाशन, २००१
१२. https://javalikarraomore.org/

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील खाद्य संस्कृती

प्रा. डॉ. गौडदाब लखन अभिमान

सहाय्यक प्राध्यापक,

सदगुरू गाडगे महाराज कॉलेज कराड.

Corresponding Author - प्रा. डॉ. गौडदाब लखन अभिमान

DOI - 10.5281/zenodo.19707447

सारांश :

महाराष्ट्राला समृद्ध अशा खाद्य संस्कृतीचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. प्राचीन काळापासून ते आज पर्यंतच्या मानवी वाटचालीने समृद्ध खाद्य संस्कृतीला विकसित केले आहे. महाराष्ट्रातील खाद्य संस्कृतीच्या इतिहासाची प्रागैतिहास, इतिहासपूर्व, प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक व समकालीन इतिहासात विभागणी करण्यात येते. पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातही समृद्ध अशी खाद्य संस्कृती अस्तित्वात होती. याचे प्रमाण तत्कालीन कोरीव लेख आणि साहित्यामध्ये उमटलेले दिसून येते. विशेषत: कल्याणीच्या चालुक्यांच्या काळातील अभिलषितार्थ अर्थात मानसोल्लास आणि यादवकालीन लीळाचरित्र या दोन ग्रंथामध्ये तत्कालीन आहार शास्त्राची, पाक कलेच्या इतिहासाची माहिती मिळते. धर्म या घटकाने खाद्य संस्कृतीला सर्वात जास्त प्रभावित केले. त्यामुळेच आहाराची शाकाहारी आणि मांसाहारी अशी दोन प्रकारात विभागणी झालेली दिसून येते. शाकाहारी भोजनाचे प्रतिनिधित्व लीळाचरित्र तर मांसाहारी आहाराचे प्रतिनिधित्व अभिलषितार्थ अर्थात मानसोल्लास करताना दिसतो. तत्कालीन समाजातील तळागाळातील लोकांच्या खाद्य संस्कृतीच्या इतिहास लेखनासाठी मात्र दोन्ही ग्रंथ त्रोटक ठरतात. मात्र त्यामुळे पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील खाद्य संस्कृतीच्या इतिहास लेखनातील या दोन्ही ग्रंथांचे महत्त्व कमी होत नाही.याउलट अभिलषितार्थ अर्थात मानसोल्लास आणि लीळाचरित्र हे ग्रंथ पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील खाद्य संस्कृतीचा चालता-बोलता इतिहास आहेत.

कि-वर्ड : आहार, पाककला, खाद्य संस्कृती, ॲनाल्स

प्रस्तावना :

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात खाद्य संस्कृतीचा इतिहासाची एक स्वतंत्र शाखा म्हणून अध्ययनास सुरुवात झाली. परकिय देशात या ज्ञानशाखेला History of Diet, History of Food, Culinary History" इत्यादी संज्ञा वापरल्या जातात परंतु डॉ मोहसीना मुकादम यांच्या मतानुसार आहाराचा इतिहास किंवा पाककलेचा इतिहास असा त्याचा मराठीमध्ये अर्थ होतो तो समर्पक नसून त्याएवजी खाद्य संस्कृतीचा इतिहास ही संज्ञा समर्पक आहे असे त्या म्हणतात, ते योग्यच आहे. सम्रग मानवी इतिहास लेखनाच्या प्रकल्पातून या ज्ञानशाखेचा उदय आणि विकास झाला. त्यामध्ये ॲनाल्स ज्ञानाशाखेचे योगदान मौलिक आहे. हाच दृष्टीकोन समोर ठेऊन पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील आहार संस्कृतीचा आढावा घेण्यात आला आहे.

महाराष्ट्राला खाद्य संस्कृतीला प्रदीर्घ असा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. एकंदरीत मानवी उत्पत्ती पासून ते आज पर्यंतचा इतिहास हा खाद्य संस्कृतीचा

इतिहास आहे. मानवी इतिहासाच्या विविध टप्प्यावर मानवाने आपल्यासाठी विविध अन्न पदार्थांची निर्मिती केली. अश्मयुग, सिंधू संस्कृती, वैदिक परंपरा, सुलतानशाही, मुघल त्याचबरोबर पौर्तुगिज, डच, फ्रेंच, इंग्रज यासारख्या परकीय सत्ताधीशांच्या आगमनाने भारतीय खाद्य संस्कृती विकसित झाली. विविधतेने नटलेली खाद्य संस्कृती उदयास आली. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील खाद्य संस्कृतीचा संक्षिप्तपणे इतिहास मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेषतः कल्याणीच्या चालुक्यकाळातील अभिलषितार्थ चिंतामणी अर्थात मानसोल्लास आणि यादवकालीन लीळाचरित्र या दोनच ग्रंथाचा खाद्य संस्कृतीचा विशेषतः आहाराच्या इतिहासाच्या अनुषंगाने आढावा घेण्यात आला आहे.

उद्दिष्ट्ये:

१. पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील खाद्य संस्कृतीचा अभ्यास करणे.
२. अभिलषितार्थ चिंतामणी अर्थात मानसोल्लास ग्रंथात प्रतिबिंबित आहार संस्कृतीवर प्रकाशझोत टाकणे.
३. यादवकालीन लीळाचरित्र ग्रंथात प्रतिबिंबित आहार संस्कृती विशद करणे.

अभिलषतार्थ चिंतामणी अर्थात मानसोल्लास ग्रंथात प्रतिबिंबित आहार संस्कृती :

अभिलषतार्थ चिंतामणी अर्थात मानसोल्लास हा ग्रंथ कल्याणीच्या चालुक्यांच्या घराण्यातील विक्रमादित्य सहावा उर्फ सोमेश्वर तिसरा(इ. स. ११२६ ते इ. स. ११३८) याने इ. स. ११२९ मध्ये लिहिला आहे. कल्याणीच्या चालुक्यांच्या सांस्कृतिक इतिहासाच्या अध्ययनाचे सर्वात महत्त्वाचा हा ग्रंथ आहे. त्याचे स्वरूप हे कोशात्मक आहे. बडोद्याच्या गायकवाड ओरिएंटलने मानसोल्लासचे तीन खंड प्रकाशित केले आहेत.

मानसोल्लास ग्रंथामधील शाकाहार:

मानसोल्लास ग्रंथामध्ये अन्नभोग नावाच्या प्रकरणामध्ये तत्कालीन समाजाच्या अन्न पद्धती विषयी माहिती मिळते. तसेच राजाच्या आहाराविषयीची पूर्व कल्पनाही आपणास मिळते. या अध्ययामध्ये राजाच्या आहाराविषयी, कोणत्या ऋतुंमध्ये कोणत्या पद्धतीचा आहार सेवन करावा याचाही उहापोह करण्यात आला आहे. थोडक्यात ऋतुमानानुसार आहारास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच आहाराच्या सुरुवातीला मुगाचे वरण, भात, तूप घ्यावेत असे सांगण्यात आले आहे. मध्ये गोड पदार्थ, दुधापासून तयार केलेले पदार्थ आणि नंतर फळे व श्रीखंडासारखे गोड पदार्थ खावेत, शेवटी दुधसाखर प्यावे अशा स्वरूपाचा आहार पद्धतीचा क्रम देण्यात आला आहे. आजही आपण जेवण झाल्यानंतर दुध किंवा ताक यांचा आहारात समावेश केला जातो. उन्हाळ्यामध्ये उन्हाची बाधा होऊ नये म्हणून मज्जिका हा पदार्थ सेवन करावा असे सांगण्यात आले आहे.

मानसोल्लास ग्रंथामध्ये पालेभाज्या, फळभाज्या, कंद आणि शेंगा यांचा उल्लेख करण्यात आला आहे. ज्याचा समावेश सर्वसाधारण आहारामध्ये करण्यात येत होता. तसेच देवाच्या पूजा-अर्चा करण्यासाठी आणि देवाला नैवेद्य दाखविण्यासाठीच्या पदार्थांची यादी देण्यात अली आहे परंतु त्यामध्ये प्रस्तुत पदार्थ तयार करण्याची रेसेपी देण्यात आली नाही. मानसोल्लासातील खीर पुऱ्या, घारगे, मांडे, डाळीचे वडे, धापडे यांचा उल्लेख लीळाचरित्र या गंथात आला आहे. मात्र लीळाचरित्रमधील भाकरी, चटणी, लाडू यासारख्या शाकाहारी अन्न पदार्थांची नोंद मानसोल्लास या ग्रंथामध्ये आलेली दिसून येत नाही.

मानसोल्लास ग्रंथामधील मांसाहार:

मानसोल्लास ग्रंथामध्ये शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांची माहिती देण्यात आली आहे. यामध्ये शाकाहारी पदार्थांपेक्षा मांसाहारी पदार्थांची माहिती अधिक देण्यात आली आहे. खिमा, मटणाचा रस्सा, कटलेट्स, कबाब यासरख्या पदार्थांची वारंवार माहिती देण्यात आली आहे. यावरून मांसाहार मोठ्या प्रमणावर सेवन करण्यात येत असावा असे दिसून येते. मानसोल्लास ग्रंथामध्ये या पदार्थांसाठी नयावर्त, पिंगा यासारखी नावे देण्यात आली आहेत. मांसाहारी जेवण बनविण्यासाठी म्हाळुंगचा आणि मोहरीचा अतिरिक्त उपयोग करावा असे सुचविण्यात आले आहे. याशिवाय कोणत्या प्राण्याचे मांस चवीला कसे आहे? याची माहिती मानसोल्लास ग्रंथामध्ये देण्यात आली आहे. त्यानुसार डुकराचे मांस हे स्निग्ध, हरणाचे मांस हे रुचकर आहे, सश्याचे मांस रुक्ष, मेंढीचे क्षुधावर्धक, बकऱ्याचे मांस पचायला हलके तसेच पक्षांचे मांस पचनाला फार हालके, सांबराचे मांस भूक वाढविते यासारखे प्राण्यांच्या आणि पक्ष्यांच्या मांसाची गुणवैशिष्ट्ये सांगण्यात आले आहेत. त्यासोबत बकरी किंवा प्राण्यांच्या अंगावरील केस-कातडी कशी काढायची याचीही माहिती देण्यात आली आहे. पुढे जाऊन प्राण्याच्या शरीरातील कोणता अवयव किंवा कोणता भाग सर्वप्रथम खालाला पाहिजे याचीही ग्रंथकर्त्याने माहिती दिली आहे. मानसोल्लास ग्रंथामध्ये कटलेट्स, वडे, कवचंदी, मटणाची आमटी, भडीत्रक, हंड भडीत्रक, कृष्णपाक, मांसाचेवडे-खिमा, वट्टिमक, पंचवर्णी, अंत्रशुंठ, चक्कलिका यासारख्या अनेक मांसाहारी पदार्थांची पाककलेची माहिती देण्यात आली आहे. याशिवाय कासव याचाही आहारामध्ये समावेश केला जात होता. कासवापासून मांसाहार कसा करावा? त्याच्यापासून नन्द्यावर्ता हा मांसाहारी पदार्थ कसा तयार करावा याची माहिती देण्यात आली आहे. कासवा बरोबरच खेकड्याचे सेवन आहारामध्ये कसे करावे? खेकाड्यापासून अन्न पदार्थ कसा तयार करावा? त्याला कसे शिजवावे? त्याकरिता कोणते मसाले वापरावेत इत्यादीची इथ्यंभूत माहिती मानसोल्लास ग्रंथामध्ये देण्यात आली आहे. खेकड्याप्रमाणेच शेतामधील उंदिरांचा समावेश आहारात केला जात होता. त्याची रेसिपीही त्यांनी दिली आहे.उंदीराच्या जेवणाला भाटीगा म्हणत. हा पदार्थ आज ज्याप्रमाणे कबाब तयार केला जातो त्या प्रमाणे लोखंडी सळईत खुपसून भजावेत व त्यावर मिरे, जिरे, सुंठ आणि मिठाची पूड टाकावी अशा प्रकारच्या पाककलेची माहिती त्यांनी दिली आहे.

मानसोल्लास ग्रंथामध्ये मत्सविनोदमध्ये तत्कालीन माशांची माहिती देण्यात आली आहे. खाऱ्या आणि गोड्या पाण्यातील माश्यांची नावासहित विवरण देण्यात आले आहे. मानसोल्लास ग्रंथात एकूण ३५ प्रकारच्या माशांची माहिती दिली आहे. सोबतच माशांची भाजी तयार करण्याची पद्धतीचीही माहिती देण्यात आली आहे. सोमेश्वराने माहिती दिलेल्या माशांची उपलब्धी आंध्रप्रदेश, महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या किनारपट्टीच्या प्रदेशात आजही सापडतात. मत्सविनोदमध्ये बल, चविलोच, महाशील, रोहित, संकुचक, वडीश, वामी यासरख्या पस्तीस माशांची नावे त्यांचे गुणधर्म आणि त्यांचे भोजनातील महत्त्व इत्यादीची माहिती देण्यात आली आहे.

लीळाचरित्र ग्रंथात प्रतिबिंबित आहार संस्कृती:

लीळाचरित्र हा ग्रंथ यादवकालीन महाराष्ट्राचा चालता-बोलता इतिहास आहे. यादवकालीन खाद्य संस्कृतीच्या अध्ययनाचे सर्वात महत्त्वाचे समकालीन प्राथमिक स्त्रोत आहे. यादवकालीन सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक इतिहासासोबतच यादवकालीन खाद्य

संस्कृतीचा, पाक कलेचा व आहाराच्या इतिहासाच्या विश्लेषणाचा सर्वोत्तम ग्रंथ आहे.

लीळाचरित्र या ग्रंथात विशेषत्वाने महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी यांच्या लीळाचा संग्रह असल्याने प्रामुख्याने चक्रधर स्वामीच्या संबंधित खाद्य संस्कृतीचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे आपणास तत्कालीन संन्यासी प्रवृत्तीच्या लोकांचा आहार कोणत्या पद्धतीचा होता याचा अंदाज येतो. लीळाचरित्रात फळे व कडधान्ये यांचाही उल्लेख केला गेला आहे. लीळाचरित्रामध्ये रानमेव्याचा उल्लेख येतो. विशेष म्हणजे हा रानमेवा ऋतुमानानुसार बदलेला दिसून येतो. यादवकालीन आहार संस्कृतीचे विशेष वैशिष्ट्य असे कि याकाळात बाभळीच्या शेंगाच्या भाजीचा उल्लेख करण्यात आला आहे. तो आश्चर्यकारक वाटते. तर खाण्याच्या पदार्थात भात, साखरभात, तांदूळ, तूप, हिंग, मिरे-जिरे, हळद, कणिक पुऱ्या, घारगे, हुरडा, भाकरी यासारख्या पदार्थांचा समावेश दैनदिन आहारात होत होता. याशिवाय लीळाचरित्रात दूधदुभते पदार्थानाचा उल्लेख करण्यात आला आहे. यादवकाळात खाद्यपदार्थ विकत घेण्याच्या ठिकाणाला रांधवणहाट असे म्हटले जात होते. या रांधवणहटामध्ये खानावळी आणि मिठाईची दुकाने होती. आहाराच्या समाप्तीनंतर मुखशुद्धी केली जात होती. विड्याचा वापर मुखशुद्धीसाठी केला जात होता. अशा प्रकारे यादवकालीन खाद्य संस्कृतीची इथ्यंभूत माहिती लीळाचरित्रामधून प्राप्त होते.

उपसंहार:

पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील खाद्य संस्कृती प्रामुख्याने शाकाहार व मांसाहार या दोन विभागात विभागली आहे. या दोन्ही विभागांचे प्रतिनिधित्व दोन्ही ग्रंथ करताना दिसतात. मानसोल्लास ग्रंथामध्ये विपुलतेने व समग्रतेने मांसाहारी आहाराची इथ्यंभूत माहिती देण्यात आली आहे. याउलट लीळाचरित्र या ग्रंथामध्ये आपणास मांसाहारी आहाराविषयी एक ते दोनच प्रसंग आले आहेत ज्यामध्ये मांसाहारी आहाराची चर्चा करण्यात आली आहे. प्रामुख्याने शाकाहारी आहाराचीच प्राधान्याने चर्चा करण्यात आली आहे. त्याचे कारण म्हणजे चक्रधारांचे शिष्य हे प्रामुख्याने ब्रह्माण असल्यामुळे त्यांच्याच भोजनाचे तपशिल विपुलतेने मिळतात. परंतु राजा, समाजातील इतर लोक यांच्या आहाराची माहिती कुठेही मिळत नाही. समाजातील तळागाळातील वंचित लोकांचा आहार कोणता होता? त्यामध्ये कोण-कोणत्या पदार्थांचा समावेश होत होता? यांची माहिती देण्यात आली नाही. मानसोल्लास हा ग्रंथ एका राजाने लिहिला असल्याने राजा आणि त्याचे आहार शास्त्र याच्याच अनुषंगाने खाद्य संस्कृतीचे विवेचन प्रस्तुत ग्रंथामध्ये करण्यात आले आहे. त्यामुळे समाजातील सर्वच स्तरातील आणि वंचित लोकांच्या खाद्य संस्कृतीचा आढावा घेण्यास अपशय येते.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. Nene Y.L.(Ed.),(2007), Glimpses of the Agricultural Heritage of India, Asian Agri-History foundation, Secunderabad.

२. वांबुरकर जास्वंदी(संपा.), इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे.

३. गोखले शोभना,(२०१०), अभिलषितार्थ अर्थात मानसोल्लास या ग्रंथातील संस्कृतिदर्शन, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.

४. बेलवलकर सुमन, (२००९) लीळाचरित्रातील समाजदर्शन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

छ. शाहू महाराज व छ. प्रतापसिंह महाराज यांनी सातारा शहरात स्थापन केलेल्या पेठांचा इतिहास

प्रा. डॉ. संजीव सुखलाल बोडखे

इतिहास विभाग,

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय,सातारा

Corresponding Author - प्रा. डॉ. संजीव सुखलाल बोडखे

DOI - 10.5281/zenodo.19707458

प्रस्तावना:

इ.स.1707 साली औरंगजेब बादशहा मरण पावल्यावर शाहू महाराजांची त्याच्या छावणीतून सुटका झाली आणि ते साताऱ्यात आले. 12 जानेवारी 1708 रोजी छ. शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि ते मराठी सत्तेचे छत्रपती झाले. येथून पुढे सन 1848 पर्यत सातारा हिच मराठयांची अधिकृत राजधानी होती. इ. स.1708 ते इ.स.1749 या काळातील मरांठ्यांच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटनेशी साताऱ्याचा संबंध आहे. छ. शाहूच्या काळात सातारा शहराचा खऱ्या अर्थाने विकास होण्यास सुरूवात झाली. छ. शाहू महाराजांनी सातारच्या किल्ल्यावरून आपला निवास सातारा शहराची वस्ती वाढवून केला. तेव्हापासून सातारा शहराचा हळूहळू विस्तार होत गेला.छ.शाहू महाराजानंतर छ.प्रतापसिह महाराजांनी सातारा शहरातील वाढत्या लोकसंख्येसाठी नवीन पेठा वसवून सातारा शहराची वाढ केली.

छ. शाहूपुर्व सातारचा इतिहास:

सातारा किल्ला सहयाद्री पर्वत रांगातील महत्त्वाचा डोंगरी किल्ला आहे. इ.स.पू.200 च्या सुमारास हा प्रदेश बौध्दांच्या प्रभावाखाली होता. इ.स. 90 ते इ.स. 300 पर्यंत हा प्रदेश सातवाहन साम्राज्याचा एक भाग होता. काही ताम्रपटावरून इ.स. 300 नंतर हा प्रदेश चालुक्य राजांच्या अधिपत्याखाली होता असे दिसते.[1] या किल्ल्यावर कोठेही शिलालेख वगैरे काही सापडले नाही. सातारा किल्ल्याचा उल्लेख बहामनी राजा महमूदशहा (1358 ते 1365) च्या काळातील कागदपत्रात आढळतो. त्याने हा किल्ला दुरूस्त केला असावा असे वाटते. बहामनी काळानंतर या किल्ल्याच्या संदर्भातील अनेक घटनांचा उल्लेख कागदपत्रात आलेला आहे. इ.स. 1579 मध्ये विजापूरचा एक सरदार किशवरखानाने विजापूरची राणी चांदबिबी हिच्यावर काही आरोप ठेवून तिला या किल्ल्यावर कैदेत ठेवले होते.[2] 27 जुलै, 1673 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला ताब्यात घेतला होता. कर्नाटक मोहिमेवर जाण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज डिसेंबर 1675 ते जानेवारी 1676 पर्यंत काही काळ आजारी होते. त्यावेळी त्यांचा मुक्काम सातारा किल्ल्यावर होता.[3] त्यावेळी महाराजांनी फार मोठया प्रमाणावर दानधर्म केला होता. या किल्ल्यास मराठयांच्या राजधानीचा मान प्रथम छत्रपती राजारामाने दिला. त्यांनी जून 1698 मध्ये आपली राजधानी विशाळगडावरून सातारा येथे आणली.[4] 8 डिसेंबर 1699 ते 21 एप्रिल 1700 या काळात औरंगजेब बादशहाने किल्ल्याला वेढा देऊन शेवटी किल्ला ताब्यात घेतला व त्याने किल्ल्याला आजमतारा असे नाव दिले.[5]

सन 1706 मध्ये किल्ला ताराबाईचा सरदार परशूरामपंत प्रतिनिधीने पुन्हा काबीज केला तेव्हा महाराणी ताराबाई यांनी किल्ल्याला अजिंक्यतारा असे नाव दिले. मोगली कैदेतून सुटका झाल्यानंतर शाहूने तातडीने कूच करून अवघ्या आठ महिण्यात अजिंक्यतारा किल्ला जिंकून घेतला व 12 जानेवारी, 1708 रोजी या किल्ल्यावरच आपला राज्याभिषेक करवून घेतला. त्यानंतर सुमारे 110 वर्षे मराठी राज्याच्या राजधानीचे ठिकाण सातारा हेच राहिले.

सातारा शहर आज जिल्हयाचे प्रमुख ठिकाण आहे. हे शहर छत्रपती शाहू महाराजांच्या काळात वसलेले आहे. या शहराचे सुरूवातीचे नाव शाहूनगर असे होते. मराठा राज्याच्या राजधानीचे ऐतिहासिक शहर म्हणून प्रसिध्द आहे. बाळाजी विश्वनाथ यांनी छ. संभाजी महाराजांची पत्नी येसूबाईस मुघल छावणीतून सोडवून आणल्यावर ती या सातारच्या किल्ल्यावर राहू लागली. त्यावेळी छ. शाहूने किल्ल्याखाली नवे शहर वसविले व त्याच्या नावावरून त्यास शाहूनगर हे नाव पडले.[6]

छ. शाहू राज्याचा कारभार पाहू लागला. त्यावेळी सातारा हे राजधानीचे ठिकाण होते. छ. शाहूच्या राज्याचा विस्तार वाढू लागल्याने शाहू व त्याचे मंत्री, सरदार हे वाडे बांधून राहू लागले. छ. शाहूच्या काळात प्रारंभी पाणीपुरवठ्याचे नळ नसल्याने विहिरी खणून पाण्याची सोय केली जात होती. त्यामुळे या पेठातून विहिरींचे मोठे प्रमाण पाहावयास मिळते. पुढे छ. शाहूने खापरी नळाद्वारे यवतेश्वर डोंगरावरून सातारा शहरास पाणीपुरवठयाची सोय केली. तसेच किल्ल्यावरून राजधानी पायथ्याला आणल्याने सातारा शहराचा आणखी विस्तार झाला.[7]

छ.शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या पेठा:

1) माची:

खतिबाच्या मशिदीच्या पूर्वेस शेखमिरे यांची पागा होती. शेखमिरे हे आदिलशाहीत वाईचे सुभेदार होते. त्यांनीच प्रतिनिधीस कैद करून सातारचा किल्ला शाहूस मिळवून दिला होता. म्हणून शेखमिरे यांना ही जागा दिली होती. तिला माची असे म्हटले जात होते. माचीवर अदालतीच्या वाड्याच्या पलिकडे खतीबाचे घर व मशीद आहे. तसेच डफळयाची पागा, अक्कलकोटकरांचा वाडा व पिंगळयांचा वाडा याचे अवशेष आहेत.[8]

माची भागातून उरमोडीखो-यात डोंगर ओलांडून जाणे त्रासाचे होते. दक्षिणेकडे कराडकडे किंवा परळी किल्ल्याकडे जाण्यासाठी बोगदा बांधण्याचे काम सन 1855 मध्ये कॅ.पी.एल. हॅरी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. त्यावेळी ओगिल्डी हा साताऱ्याचा कमिशनर होता.या बोगद्यासाठी एकूण 29000 रूपये खर्च आला होता.[9]

2) मंगळवार पेठ:

इ.स. 1700 मध्ये मंगळाईचा बुरूज औरंगजेबाच्या बाजूने उडवून देणारे डफळे नावांचे सरदार होते. ते पुढे शाहूचे मांडलिक झाल्याने त्यांचा वाडा या ठिकाणी होता. या पेठेत दिवेकरांचा हौद नावाचा ओळखला जाणारा हौद छ. शाहू महाराजांनी बांधला होता.

छ. शाहूची चौथी राणी सगुणाबाई हिला धनीण म्हणत होते. तिची राहण्याची सोय ज्या ठिकाणी केली होती. त्या बागेस धनिणीची बाग असे म्हटले जाते. या ठिकाणी बंगलेवजा एक वाडा बांधलेला होता. तो वाडा 23 एप्रिल 1875 रोजी जळाला. येथे आंबा, फणस, नारळ, वगैरेंची झाडे होती.

या पेठेत काळाराम मंदिर आहे, गुजराचे भाई घराण्याने छ. प्रतापसिंह महाराजांना फार मोठ्या प्रमाणावर

मदत केली होती. त्यामुळे छ. प्रतापसिंह महाराजांनी गुजर भाईकडे वंशपरंपरागत खजिनदारी दिली होती. त्याला दरमहा 150 रूपये पगार होता. या गुजरांनी या पेठेत एक मंदिर बांधले होते. हे मंदिर भाईचा राम अगर गुजराचा राम या नावाने ओळखले जाते.

सन 1820-30 च्या दरम्यान विठोबाचे मंदिर जोती गोपाळा देशपांडे उर्फ जोतीपंत दादा महाभागवत यांनी बांधले. या मंदिराजवळ पाण्याचा एक उसासा आहे. म्हणून त्या देवळास विठोबाचा नळ असे म्हणतात. मंगळवार पेठेतच फरासखाना मोडतो. महाराजांच्या दरबारातील कपडे स्वच्छ ठेवण्याचे हे ठिकाण होते.

त्यासाठी जवळच एक तळे होते. त्या पाण्याचा उपयोग सरकारी कपडे धुण्यास व जवळच्या बागेस होत असे. इंग्रज सरकारने नगरपालिकेस ही इमारत 2000 रूपयास विकली.[10]

3) चिमणपुरा पेठ:

चिमणाजी दामोदर मोघे म्हणून छ. शाहूचा सरदार होता. त्याची पागा या पेठेत होती. त्याच्या नावावरून चिमणपुरा नाव पडले आहे. या सरदाराने ही पेठ वसविली. छ. शाहूने चिमणाजीस एक लहानशी जहागीर खानदेशात दिली होती. जळगाव जवळ रिंगणगाव येथे यांचे एक वंशज आहेत.[11]

ढवळपुरा म्हणून एक भाग चिमणपुऱ्यात आहे. छ. शाहू महाराजांच्या काळात कापडाचा धंदा फार महत्त्वाचा होता. कापडाची मोजदाद करण्यासाठी त्या काळात सोने चांदी प्रमाणे करीत असत. प्रत्येक सरदार आपल्या गावी कापड विकणारे लोक बाळगत असत. छ. शाहू महाराजांना शिकारीप्रमाणेच मासेमारीचा छंद होता. मासे गळाने मारीत असत. त्यासाठी बारीक सूत लागे, ते सूत बुन्हाणपूरहून आणले जात असे. ही उणीव भरून काढण्यासाठी कापडी शिंपी लोकांची वस्ती येथे केली. या लोकांमध्ये ढवळे नावाचा शिंपी प्रमुख होता. म्हणून या भागास ढवळपुरा म्हणत असत. [12]

4) शुक्रवार पेठ:

छ. शाहू महाराजांचे पूर्वापार कारभारी, आश्रित व सेवेकरी आदि छत्रपतींशी संबधित मंडळी प्रामुख्याने या भागात वस्ती करून रहात. या पेठेत मोती तळे, बाजीरावाची विहीर, जलमंदिर, गोजरा साहेबांचा वाडा, ही ऐतिहासिक दर्शनीय स्थळे आहेत.[13]

5) व्यंकटपुरा पेठ:

इचलकरंजी संस्थानचे संस्थापक घोरपडे यांच्या घराण्यात व्यकंटराव नावाचे गृहस्थ होऊन गेले. त्यांची पागा या पेठेत होती. व्यंकटराव हा पेशवा बाळाजी विश्वनाथ याचा जवाई होता. त्याने कोकणातून ब्राह्मण कुटुंबे आणून या पेठेत वसविली. तेथे पाण्याच्या सोईसाठी एक विहीर खणली होती. सन 1739 मध्ये व्यंकटराव छ. शाहू महाराजांच्या तर्फे पोर्तुगीजावर चालून गेला होता.[14]

6) यादोगोपाळ पेठ:

छ. शाहू महाराजांच्या काळात यादव गोपाळ खटावकर नावाचा एक महाराणी ताराबाईचा कारभारी होता. त्याच्या नावावरून या पेठेला यादोगोपाळ पेठ हे नाव पडले आहे. या पेठेतील मारूतीचे मंदिर ही त्या काळातील सातारा शहराची उत्तर बाजूची सीमा होती. हा मारूती वेशीतील मारूती म्हणून प्रसिद्ध होता. खटावकरांचे वंशज आजही तेथे राहतात. त्यांना जामदारखाने म्हणतात.

या पेठेस पेठखालसा असे म्हणतात. कारण यादव गोपाळ यास छ. शाहूने खालशाचे उत्पन्नाची बाब तोडून दिली होती. यावरून यादव गोपाळ खालशे हे आडनाव पडले होते. साताऱ्यास सचिवांचा वाडा आहे. सरकारी पीलखान्याचा खर्च सचिवाने भागवावा असे ठरले होते. यादव गोपाळ पेठेतच पीलखाना होता. तो पूर्वी रंगमहालाजवळ होता. छ. शाहु महाराजांची स्वारी

रंगमहालातून निघून अदालतीवरून यादव गोपाळ पेठेतून वाडयात जात असे.[15]

7) केसरकर पेठ:

औरंगजेब बादशहाच्या आज्ञेने छ. शाहू महाराजांना पकडून नेले होते. त्यावेळी या लोकांत जोत्याजी केसरकर हा मराठा नोकर होता. त्याने निष्ठेने छ. शाहू महाराजांची सेवा केली. त्यामुळे कैदेतून सुटून आल्यावर छ. शाहू महाराजांनी त्याला बिनीचा सरदार केले. त्याचे घर या पेठेत होते. दसऱ्याचे दिवशी मिरवणुकीत जरी पटका व भगवा झेंडा धरण्याचा मान केसरकरास असे. त्याचे वंशज या पेठेत राहतात. गोपाळराव पंडितराव राजोपाध्ये यांनी या पेठेत अमृतेश्वराचे मंदिर बांधले. त्याचा जीर्णोद्धार त्याचे प्रपौत्र कृष्णराय अमृतराय यांनी केला.[16]

अशा प्रकारे छ. शाहू महराजांच्या काळात सातारा शहराची वस्ती होती. ही वस्ती विस्तारण्याकामी छ. शाहू महाराजांचे योगदान मोठे होते. पुढे ब्रिटिश काळात प्रतापसिंह महाराज व त्यानंतरच्या छत्रपतीनी सातारा शहराचा विस्तार केला होता. ब्रिटिशांनी सातारा शहराचा विकास करत असताना वेगवेगळ्या पेठांना वेगवेगळी नावे दिली होती.

छ.प्रतापसिंह महाराजांनी स्थापन केलेल्या पेठा:

छ. प्रतापसिंह महाराजांचे कारकिर्दीत पुढील नवीन पेठा बसविण्यात आल्या होत्या. या पेठेची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

1) भवानी पेठ:

आजची ही मारवाड आळी आहे. या पेठेचे नाव भवानी देवीच्या नावावरून पडले आहे. ही पेठ राजवाड्याशेजारी व राजपथाच्या दोन्ही बाजूस 34 एकर जागेत बसविण्यात आली. या पेठेत व्यापारी व दुकानदारांना रस्त्यालगत दुकाने व घरे बांधण्यास जागा दिल्या. या पेठेच्या पाणी पुरवठ्यासाठी 19 नवीन विहिरी, दोन साठवण टाक्या व एक कारंजे बांधण्यात आले. छ. प्रतापसिंह महाराजांनी भवानी पेठेत रस्त्याच्या उत्तरेकडील बाजूस त्यांचा विश्वासू सेवक नरसू काकडे यास दोन टोलेजंग वाडे बांधून दिले होते. त्यापैकी एक काकडेवाडा त्यांच्या वंशजाकडे असून त्याच्या पूर्वेकडील वाडा रहिमतपूरकर माने यांनी खरेदी केला. त्याचेसमोर दक्षिणेकडील बाजूस चिटणीसांचा वाडा होता.[17]

2) सदाशिव पेठ:

ही पेठ सन 1822 मध्ये सुमारे 10 एकर जागेत भवानी पेठेच्या जवळ बसविण्यात आली आहे. या पेठेच्या पाणीपुरवठ्यासाठी नवीन 14 विहिरी खोदण्यात आल्या आणि एक साठवण टाकी बांधण्यात आली होती.[18]

3) दुर्गा पेठ:

सन 1830 मध्ये ही पेठ राजपथाच्या उत्तर व दक्षिणेस 2 एकर जागेत बसविण्यात आली. पानगाव येथील एका गरीबाच्या घरी गुप्तपणे महाराणी ताराबाईचा नातू लहानशा रामराजांचा सांभाळ दुर्गा नावाच्या दायीने केला होता. तिच्या स्मरणार्थ ही पेठ बसविण्यात आली. छ. प्रतापसिंह महाराजांच्या काळात या पेठेत मांग लोकांची फार मोठ्या प्रमाणावर वस्ती होती. हे मांग छ. प्रतापसिंह व आप्पासाहेब महाराजांच्या तोफखान्यात असत. या पेठेत एक सुंदर व मोठी मशीद आहे. ती मशीद बांधण्यास एक लाख रूपये खर्च आला होता. ही मशीद छ.प्रतापसिंह महाराजांनी आपली कलावंतीण अमीना हिच्या सांगण्यावरून बांधली होती. या मशिदीला महाराजांकडून नेमणूक आहे. या मशिदीत भाविक मुसलमान प्रार्थना करण्यास जात नाहीत कारण ती कलावंतिणीची आहे. मशिदीसाठी लागणारा पैसा चांगल्या मागनि मिळविलेला असावा अशी धर्माची आज्ञा आहे. या पेठेतच एक जुने शासकीय रूग्णालय आहे.[19]

4) मल्हार पेठ:

ही पेठ सन 1830 मध्ये गुरूवार पेठ नजीक 10 एकर जागेत वसविण्यात आली. या पेठेच्या पाणी पुरवठ्यासाठी नवीन चार विहिरी खोदण्यात आल्या व एक साठवन टाकी बांधण्यात आली. तसेच जनावरांना पाणी पिण्यासाठी दोन कोंडाळी बांधण्यात आली होती. छ. रामराजांचा सांभाळ पानगाव येथील मल्हार नावाच्या सेवकाने अतिशय प्रामाणिकपणे केला होता. त्याचे स्मरणार्थ ही पेठ बसविण्यात आली. या पेठेत एक धर्मशाळा असून ती मुगल सरदार दौलतखान याने बांधली. या पेठेत एक पंचमुखी मारूतीचे मंदिर आहे. या पेठेत तेली व चांभार लोक राहतात. या पेठेत तुरूंग व पोलीस मुख्यालय आहे.[20]

5) प्रतातगंज पेठ:

ही पेठ सदाशिव पेठेच्या उत्तरेस छ. प्रतापसिंह महाराजांनी सन 1833-34 साली वसविली. या पेठेत घर बांधण्यासाठी शेटे व महाजन या लोकांना जागा देण्यात आल्या होत्या. प्रतापगंज पेठ व भवानी पेठ वसविताना मधून वाहणाऱ्या ओढ्यावर नवे भक्कम पूल बांधण्यात आले होते. ते अद्याप सुस्थितीत आहेत. प्रत्येक पेठेत रस्त्याच्या कडेला कोंडाळी बांधून जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती. प्रतापसिंह महाराजांनी मारवाडी, गुजर, शिंपी वगैरे अनेक धंद्याच्या व जातीच्या लोकांना बोलावून आणून त्यांना जागा देऊन त्यांची वस्ती केली. या पेठेचा विस्तार होत गेला.[21]

समारोप:

छ. शाहू महाराजांनी सातारा किल्ला येथे आपला राज्यभिषेक करून घेतल्यानंतर सातारा किल्ल्याऐवजी किल्ल्याच्या पायथ्यास शाहूनगर हे गाव वसविले. त्याचेच पुढे सातारा शहर निर्माण झाले. छ. शाहू महाराजांनी सातारा शहरात माची, मंगळवार पेठ, चिमणपुरा पेठ, शुक्रवार पेठ, व्यंकटपुरा पेठ, यादोगोपाळ पेठ व केसरकर पेठ या पेठांची निर्मिती केली. तसेच अदालत वाडा तख्ताचा वाडा व रंगमहाल यांची निर्मिती करून सातारा शहराचे महत्त्व वाढविले होते. छ.शाहू प्रमाणेच सातारा शहरात छ. प्रतापसिंह महाराजांचे कारकिर्दीत पुढील नवीन पेठा बसविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये भवानी पेठ, सदाशिव पेठ, दुर्गा पेठ, मल्हार पेठ, प्रतापगंज पेठ त्यामुळे सातारा शहराचा विस्तार होण्यास मदत झाली होती.

संदर्भ:

१. सातारा शहर, नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक, 1954, पृ.2
२. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सातारा जिल्हा, 1999, पृ.895
३. कित्ता, पृ.896
४. कुलकर्णी अ.रा., 'दि मराठाज् हिस्ट्री ऑफ मेडिव्हल डेक्कन', खंड 1, पृ.350-351
५. सरदेसाई गो.स., 'न्यू हिस्ट्री ऑफ दि मराठाज्, खंड1, पृ.350-351
६. माटे गो.रा., असा घडला जिल्हा सातारा, महाराष्ट्र मित्र मुद्रणालय सातारा, 1988, पृ.25
७. सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड 4, 1990, पृ.198
८. पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, 1999, पृ.901
९. Satara District Gazetter 1885, P.560
१०. माटे गो.रा. उपरोक्त, पृ.26
११. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.902
१२. माटे गो. रा.,उपरोक्त, पृ.26
१३. कित्ता, पृ.27
१४. कित्ता, पृ.27

१५. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.902

१६. कित्ता, पृ.29

१७. साळुंखे गणपतराव, असा घडला सातारा, 1 ऑगस्ट, 2012, पृ. 22

१८. सातारा शहर, नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक, 1954, पृ.20

१९. माटे गो. रा.,उपरोक्त, पृ.32

२०. सातारा शहर, नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक, 1954, पृ.19

२१. कित्ता, पृ.20

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

स्वातंत्र्यसंग्रामातील विस्मृत नायक: आष्टा येथील हुतात्मा केशवराव तळवलकर यांच्या क्रांतिकारी कार्याचा अभ्यास

प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश

प्राध्यापक आणि इतिहास विभागप्रमुख,

आर्टस् अंड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता.- वाळवा, जि. सांगली. ४१६३०१

Corresponding Author - प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश

DOI - 10.5281/zenodo.19722883

गोषवारा (Abstract):

भारताचा स्वातंत्र्यलढा हा केवळ देशाच्या भौगोलिक सीमां पुरताच मर्यादित नव्हता, तर तो सातासमुद्रापार असलेल्या देशांमधूनही तितक्याच प्रखरतेने लढला गेला. प्रस्तुत शोधनिबंधात सांगली जिल्ह्यातील आष्टा येथील क्रांतिकारी केशव रामकृष्ण तळवलकर (१८९१–१९१८) यांच्या अल्पपरिचित परंतु अत्यंत प्रेरणादायी जीवनप्रवासाचा ऐतिहासिक वेध घेण्यात आला आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात धगधगणाऱ्या सशस्त्र क्रांतीच्या ज्वालांनी प्रेरित होऊन तळवलकर यांनी विद्यार्थी दशेपासूनच क्रांतिकारी चळवळीत स्वतःला झोकून दिले.

ब्रिटीश पोलिसांच्या अटकेची टांगती तलवार असताना त्यांनी मोठ्या चातुर्याने गोव्यामार्गे अमेरिकेला प्रयाण केले. सॅन फ्रान्सिस्को (अमेरिका) हे केंद्र निवडून त्यांनी भारतीय क्रांतिकारकांच्या आंतरराष्ट्रीय जाळ्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. गदर चळवळीच्या समकालीन काळात परदेशात राहून भारताच्या स्वातंत्र्यासाठी जनमत आणि रसद गोळा करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. दुर्दैवाने, वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी (१९१८ मध्ये) मायभूमीला स्वतंत्र पाहण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्यांना परदेशातच वीरमरण आले.

हा अभ्यास केवळ एका विस्मृत नायकाच्या बलिदानाची गाथा मांडत नाही, तर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून वैश्विक स्तरावर गेलेल्या क्रांतिकारी विचारांच्या प्रसारावरही प्रकाश टाकतो.

महत्त्वाचे शब्द (Keywords): केशवराव तळवलकर, आष्टा, सांगली, सशस्त्र क्रांती, सॅन फ्रान्सिस्को, गदर चळवळ, हुतात्मा, आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्यलढा.

प्रस्तावना:

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ सत्याग्रह आणि अहिंसक आंदोलनांपुरता मर्यादित नाही, तर तो सशस्त्र क्रांतीच्या रक्ताने आणि बलिदानानेही लिहिला गेला आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला, विशेषतः लोकमान्य टिळकांच्या जहाल कालखंडात, महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अनेक तरुण गुप्त क्रांतिकारी संघटनांकडे ओढले गेले. सांगली जिल्ह्यातील आष्टा येथील केशव रामकृष्ण तळवलकर हे अशाच एका समर्पित क्रांतिकारकाचे नाव आहे.

अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकाच्या संधिकाळावर जन्मलेले तळवलकर हे त्या पिढीचे प्रतिनिधित्व करतात, ज्यांनी ब्रिटिशांच्या दडपशाहीला घाबरून न जाता परदेशातील भूमीतून स्वराज्याचा हुंकार

दिला. सांगलीच्या आष्टा गावातून सुरू झालेला त्यांचा प्रवास गोवामार्गे थेट अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्कोपर्यंत पोहोचला. परदेशातून 'गदर' चळवळीसारख्या माध्यमातून त्यांनी जो संघर्ष केला, त्याचे दस्तऐवजीकरण ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. हा शोधनिबंध त्यांच्या या विस्मृत प्रवासाचा आणि बलिदानाचा आढावा घेण्याचा एक नम्र प्रयत्न आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology):

प्रस्तुत शोधनिबंधासाठी 'ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धती' वापरण्यात आली आहे. संशोधनाचे निष्कर्ष काढण्यासाठी खालील स्रोतांचा उपयोग केला आहे:

- प्राथमिक स्रोत: (महाराष्ट्र शासनाचा 'स्वातंत्र्यसैनिक कोष', 'Who's Who of Indian Martyrs' (WWIM, Vol. II) यांमधील अधिकृत नोंदी आणि तत्कालीन सरकारी गॅझेटियर्स.
- द्वितीयक स्रोत स्वातंत्र्यलढ्यावरील ऐतिहासिक ग्रंथ, चरित्रे, आणि जुने लेख.
- ई-संसाधने: सॅन फ्रान्सिस्को येथील भारतीय क्रांतिकारकांच्या कार्याचे दस्तऐवजीकरण करणाऱ्या आणि 'Ghadar Party' च्या डिजिटल अर्काइव्ह्जचा वापर करून माहितीची पडताळणी केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research):

१. केशवराव तळवलकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणे.
२. सांगली जिल्ह्यातील सशस्त्र क्रांतीच्या इतिहासाची पुनर्रचना करणे.
३. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात परदेशातील भूमीतून झालेल्या कार्याचे महत्त्व स्पष्ट करणे.
४. एका विस्मृत नायकाच्या बलिदानाला ऐतिहासिक प्रवाहात स्थान मिळवून देणे.

आष्टा येथील हुतात्मा केशवराव तळवलकर यांचे क्रांतिकारी कार्य:

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या समग्र इतिहासात महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते, परंतु १८९१ ते १९१८ या कालखंडाचा विचार करता या भागात संघटित राजकीय चळवळी आणि स्वातंत्र्यसैनिकांची संख्या अत्यंत नगण्य होती. १९३० नंतरच्या सविनय कायदेभंग चळवळीत आणि १९४२ च्या 'प्रति सरकार' आंदोलनात सातारा - सांगलीने मोठे नेतृत्व दिले, मात्र विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा लोकमान्य टिळकांच्या जहाल कालखंडाचा उदय होत होता, तेव्हा या भागातील जनमानस राजकीयदृष्ट्या प्राथमिक अवस्थेत होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत सांगली जिल्ह्यातील आष्टा (ता. वाळवा) येथील केशव रामकृष्ण तळवलकर यांनी सशस्त्र क्रांतीचा जो मार्ग स्वीकारला, तो केवळ त्या प्रदेशासाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी ऐतिहासिकदृष्ट्या अद्वितीय ठरतो.

केशव तळवलकर यांचा जन्म १८९१ मध्ये आष्टा येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांच्या विद्यार्थी दशेतच महाराष्ट्रात 'अभिनव भारत' सारख्या गुप्त क्रांतिकारी संघटनांचे जाळे पसरू लागले होते. बंगालच्या फाळणीनंतर उसळलेल्या स्वदेशीच्या लाटेने आणि टिळकांच्या 'केसरी'तील प्रखर विचारांनी प्रभावित होऊन, केशवरावांनी सशस्त्र क्रांतीच्या माध्यमातून देशाला स्वतंत्र करण्याचे स्वप्न उराशी बाळगले. विद्यार्थी असतानाच त्यांनी स्थानिक स्तरावर ब्रिटीश विरोधी कारवायांमध्ये सक्रिय सहभाग

घेण्यास सुरुवात केली होती. जेव्हा ब्रिटीश पोलिसांना त्यांच्या या गुप्त कारवायांचा सुगावा लागला आणि त्यांच्या अटकेची शक्यता निर्माण झाली, तेव्हा त्यांनी अत्यंत चातुर्याने आणि धैर्याने महाराष्ट्र-गोवा सीमा ओलांडली. त्याकाळी ब्रिटीश सत्तेच्या विरोधात अशा प्रकारे भूमिगत होणे आणि पोलिसांना चकवा देणे ही अत्यंत जोखमीची बाब होती.

गोव्याच्या पोर्तुगीज भूमीवरून त्यांनी सातासमुद्रापार जाण्याचे नियोजन केले आणि ते अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथे पोहोचले. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात सॅन फ्रान्सिस्को हे भारतीय क्रांतिकारकांचे, विशेषतः 'गदर' चळवळीचे प्रमुख आंतरराष्ट्रीय केंद्र बनले होते. केशव तळवलकर यांनी या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर राहून भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी मोलाचे योगदान दिले. पहिल्या महायुद्धाच्या काळात (१९१४-१८) जेव्हा जगभरातील भारतीय क्रांतिकारक 'हिंदू-जर्मन षड्यंत्रा'च्या माध्यमातून ब्रिटिशांविरुद्ध मोठ्या सशस्त्र उठावाचे स्वप्न पाहत होते, तेव्हा तळवलकर या चळवळीत सक्रिय होते. सांगलीच्या एका ग्रामीण भागातून आलेला हा तरुण सातासमुद्रापार जाऊन जागतिक स्तरावरील क्रांतीमध्ये सामील झाला, ही बाब त्यांच्या अफाट जिद्दीची साक्ष देते.

तळवलकर यांनी आपले हे आयुष्य परदेशात 'वनवासात' व्यतीत केले. मायभूमीपासून हजारो मैल दूर असतानाही त्यांच्या मनात मातृभूमीच्या स्वातंत्र्याविषयीची ओढ कायम होती. मात्र, नियतीच्या मनात काही वेगळेच होते. १९१८ मध्ये जेव्हा पहिले महायुद्ध संपण्याच्या मार्गावर होते आणि जगभरात स्पॅनिश फ्ल्यूची महाभयंकर साथ पसरली होती, त्याच सुमारास सॅन फ्रान्सिस्को येथे वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. ज्या काळात दक्षिण महाराष्ट्रात आणि विशेषतः सांगली परिसरात राजकीय जाणीव संथ होती, त्या काळात तळवलकरांनी थेट अमेरिकेत जाऊन क्रांतीची मशाल पेटवली. त्यांचे हे बलिदान केवळ सांगली जिल्ह्यासाठीच नव्हे, तर भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघर्षाचे एक सोनेरी पान आहे. या शोधनिबंधाच्या माध्यमातून त्यांच्या विस्मृत कार्याला उजाळा देण्याचा प्रयत्न केला असून, १८९१ ते १९१८ या काळातील त्यांच्या कार्याचे महत्त्व आजच्या पिढीसमोर मांडणे ऐतिहासिकदृष्ट्या अनिवार्य आहे.

मूल्यमापन:

हुतात्मा केशवराव रामकृष्ण तळवलकर यांचा जीवनप्रवास हा अदम्य साहस, प्रखर राष्ट्रवाद आणि सर्वोच्च त्यागाचे प्रतीक आहे. १८९१ ते १९१८ हा कालखंड दक्षिण महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अत्यंत संमिश्र होता. ज्या काळात सांगली-आष्टा यांसारख्या ग्रामीण आणि संस्थानिक भागात संघटित स्वातंत्र्यसैनिकांची संख्या नगण्य होती, त्या काळात केशवरावांनी थेट जागतिक स्तरावर (सॅन फ्रान्सिस्को) जाऊन ब्रिटिशांना दिलेले आव्हान ऐतिहासिकदृष्ट्या अद्वितीय आहे. आष्टा येथील एका सामान्य कुटुंबातून सुरू झालेला हा प्रवास परदेशातील 'गदर' चळवळीपर्यंत पोहोचला आणि तिथेच देशासाठी त्यांनी प्राणांची आहुती दिली.

या महान क्रांतिकारकाच्या बलिदानाची उशिरा का होईना, पण शासनाने योग्य दखल घेतली. त्यांच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि आष्टा नगरपालिकेच्या वतीने १९८०-८२ या काळात आष्टा येथे एक भव्य 'हुतात्मा केशवराव रामकृष्ण तळवलकर स्मारक' उभारण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री अब्दुल रहमान अंतुले यांच्या विशेष सहकार्यातून आणि नगरपालिकेच्या पुढाकारातून साकारलेले हे स्मारक आजही या विस्मृत

नायकाच्या क्रांतीगाथेची साक्ष देत उभे आहे. हे स्मारक केवळ एका व्यक्तीचे स्मारक नसून ते महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून वैश्विक स्तरावर गेलेल्या लढाऊ वृत्तीचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्याचे दस्तऐवजीकरण करणे, हीच त्यांना दिलेली खरी श्रद्धांजली ठरेल.

संदर्भ :

१. *स्वातंत्र्यसैनिक कोष (महाराष्ट्र शासन), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर विभाग, मुंबई, पुनर्मुद्रण १९८१.*

२. *Who's Who of Indian Martyrs (WWIM), Vol. II, Ministry of Education and Social Welfare, Government of India, New Delhi, 1972 (Pages 321-322).*

३. *आष्टा नगरपालिका दस्तऐवज (१९८०-८२): हुतात्मा स्मारक उभारणी आणि तत्कालीन मुख्यमंत्री अब्दुल रहमान अंतुले यांच्या भेटीच्या नोंदी.*

४. *जोग, वि. स., महाराष्ट्रातील सशस्त्र क्रांतीचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.*

५. *फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.*

६. *Puri, Harish K., Ghadar Movement: Ideology, Organisation and Strategy, Guru Nanak Dev University, Amritsar.*

७. *South Asian American Digital Archive (SAADA): सॅन फ्रान्सिस्को येथील भारतीय क्रांतिकारकांच्या ऐतिहासिक नोंदी (www.saada.org).*

८. *Ghadar Party Memorial Association Archive: अमेरिकेतील भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांचा इतिहास.*

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील स्थित्यंतरे - एक आढावा

डॉ. रामचंद्र वसंत कुंभार

प्राध्यापक, इतिहास विभाग,

शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद

Corresponding Author - डॉ. रामचंद्र वसंत कुंभार

DOI - 10.5281/zenodo.19722906

प्रस्तावना:

प्राचीन काळापासून भारतातील व पर्यायाने महाराष्ट्रातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. महाराष्ट्र हे भारतातील औद्योगिकरण झालेले आघाडीचे राज्य असले तरी महाराष्ट्रातील ६४.१४ % लोक आजही शेतीवर उपजिविका करतात.[१] म्हणजेच शेती हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील अतिशय महत्वाचा घटक आहे. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील शेतीचा अभ्यास करताना मुख्यत्वे तीन टप्प्यात करावा लागतो. इ.स. १९४७ ते १९६० हा **'द्विभाषिक मुंबई राज्याचा कालखंड'** हा पहिला टप्पा असून इ.स. १९६० ते १९९० हा दुसरा टप्पा **'नियोजन काळ'** म्हणून ओळखला जातो. इ.स.१९९० नंतर भारत सरकारने नवीन आर्थिक धोरण स्विकारले. त्यामुळे इ.स.१९९० नंतरचा तिसरा टप्पा **'उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचा काळ'** म्हणून ओळखला जातो.

महाराष्ट्रातील भौगोलिक विविधता व शेती:

महाराष्ट्र हे भारतातील राजस्थान व मध्यप्रदेशानंतरचे तिसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य असून महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३०७७१३ चौ.कि.मी. आहे.[२] महाराष्ट्राची पाच भौगोलिक विभागात विभागणी केली जाते. सह्याद्री पर्वताच्या पश्चिमेस अरबी समुद्रापर्यंतचा प्रदेश कोकण विभाग असून महाराष्ट्राचा उत्तर-पश्चिम विभाग खानदेश या नावाने ओळखला जातो. महाराष्ट्राचा तिसरा भौगोलिक विभाग देश असून त्यामध्ये मुख्यत्वे मध्य महाराष्ट्राच्या प्रदेशाचा समावेश होतो. महाराष्ट्राचा चौथा भौगोलिक विभाग मराठवाडा व पाचवा विदर्भ म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्रात भौगोलिक विविधता मोठया प्रमाणात दिसून येते. महाराष्ट्रात काही ठिकाणी प्रचंड पाऊस पडतो तर काही ठिकाणी अतिशय कमी पाऊस पडतो. ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्हयामध्ये सरासरी २०० से.मी. वार्षिक पाऊस पडतो तर अहिल्यादेवीनगर (अहमदनगर), धुळे, जळगांव, सातारा, सांगली, सोलापूर हे जिल्हे व कोल्हापूर जिल्हयाचा काही भाग या प्रदेशात वार्षिक सरासरी ५० से.मी. पेक्षा कमी पाऊस पडतो.[३] महाराष्ट्रातील या भौगोलिक विविधतेचा शेतीच्या उत्पन्नावर निश्चितच मोठा परिणाम झाल्याचे दिसते.

द्विभाषिक मुंबई राज्याचा काळ (इ.स. १९४७ ते १९६०):

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यकर्त्यांसमोर समतोल विकास साधण्याचे मोठे अवघड काम होते. स्वातंत्र्यपूर्वकाळात ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणामुळे शेतीचे व्यापारीकरण झाले होते. ब्रिटीशकालखंडात भारतीय

शेतकरी पिळून निघाला होता. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर भारतीय, तसेच महाराष्ट्रीय शेतकरी आपल्या राज्यकर्त्यांकडे आशेने पहात होता. स्वातंत्र्यानंतर मराठी भाषीकांचे स्वतंत्र्य राज्य निर्माण न करता गुजरात आणि पश्चिम महाराष्ट्र मिळून द्विभाषिक मुंबई राज्य निर्माण करण्यात आले. द्विभाषिक मुंबई राज्याच्या कालखंडात (इ.स. १९४७ ते १९६०) दोन पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेत इ.स. १९५१ ते ५६ या पाच वर्षात विकास कामासाठी २०६९ कोटी रु. ची तरतूद करण्यात आली होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत इ.स. १९५६ ते १९६१ या पाच वर्षासाठी संबंध देशात ४८०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. ही रक्कम पहिल्या पंचवार्षिक योजनेतील रक्कमेच्या दुपटीहून जास्त होती.[४] मात्र कृषी क्षेत्रात पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या तुलनेत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत कमी रक्कम मंजूर करण्यात आल्याचे दिसते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी व जलसिंचनासाठी ३१% रक्कमेची तरतूद करण्यात आली होती तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत कृषी व जलसिंचनासाठी २०% रक्कम मंजूर करण्यात आली होती.[५] थोडक्यात पहिल्या पंचवार्षिक योजनेपेक्षा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत कृषी व जलसिंचनासाठी मंजूर केलेली रक्कम ११% नी कमी होती.

नियोजन कालखंड (इ.स. १९६० ते १९९०):

१ मे १९६० रोजी मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. इ. स. १९६० ते १९९० या काळात शेतीविषयक अनेक उपाययोजना राबविण्यात आल्या. पूर्वीच्या भूसुधार कायद्यात सुधारणा करुन जमीनदारीचे उच्चाटन करण्यासाठी जमीन पुनर्वाटप कार्यक्रम हाती घेण्यात आला. मात्र जमिनीच्या मालकीमधील विषमता घालवण्यात आजतागायत यश आल्याचे दिसत नाही. विविध कायदे, आंदोलने होऊनही भारतात जमीन वाटपाचे प्रमाण १.२५% झाले आहे. उलट आपल्या शेजारील राष्ट्रात जमिनवाटपाचे प्रमाण भारतापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. चीनमध्ये जमीनवाटपाचे प्रमाण ४३%, जपानमध्ये ३३% आहे. भारतात ८०% शेतकरी प्रामुख्याने अल्पभूधारक आहेत, तर केवळ ८% लोकसंख्या असलेल्या जमीनदारांच्या ताब्यात ४१% पेक्षा जास्त जमीन आहे.[६] नियोजन काळात जलसिंचनाच्या सोयी निर्माण करण्यासाठी मोठे प्रयत्न केले गेले. कोयना धरणासारखी मोठी धरणे बांधून पाण्याचा व विजेचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात धरण निर्मिती करताना धरणग्रस्त शेतकऱ्यांचे पुनर्वसन व्यवस्थीत झाल्याचे दिसत नाही. तसेच धरणामुळे निर्माण होणाऱ्या विजेचा उपभोग शेतकऱ्यापेक्षा उद्योजकच मोठया प्रमाणात घेताना दिसतात. याचबरोबर नियोजनकाळात जो काही शेतीचा विकास झाला तो समतोल विकास झाल्याचे दिसत नाही.[६]

जागतिकीकरणाचा कालखंड (इ.स. १९९१ पासून):

इ.स. १९९१ मध्ये भारत सरकारने नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. नव्या आर्थिक धोरणामुळे विशेषत: जागतिक व्यापार संघटनेचे (W.T.O.) सभासदत्व स्वीकारल्यानंतर जागतिकीकरण भारतीय शेतीशी प्रत्यक्षात जोडले गेले. जागतिकीकरणाचा भारतीय पर्यायाने महाराष्ट्रातील शेती व शेतकऱ्यांवर अतिशय दूरगामी परिणाम झाल्याचे दिसते. या कालखंडात सरकारचे शेतीकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे दिसते. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये शेती व जलसिंचनामधील गुंतवणूकीचे प्रमाणे ३१% होते. सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (इ.स.१९८० ते ८४) शेती व जलसिंचनमधील गुंतवणूक २४% वर आली. तर जागतिकीकरणाच्या काळात शेतीमधील सरकारी गुंतवणूकीचे प्रमाणे खूपच

कमी झाल्याचे दिसते. दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (इ.स.२००२ ते २००६) शेती व जलसिंचनातील गुंतवणूक २०% वर आली.[८] नवीन आर्थिक धोरणामुळे शेती क्षेत्रावर दोन मोठे परिणाम झाल्याचे दिसते. एक म्हणजे शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी होत चालला आहे. तर दुसरा अतिशय महत्वाचा परिणाम म्हणजे शेतकऱ्यांच्या वाढत चाललेल्या आत्महत्या होय. भारत सरकारच्या सन २००३ च्या राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार ४३४ लाख शेतकरी कुटुंबे कर्जबाजारी असून कर्जबाजारीपणाचे प्रमाण ४८.६% आहे. संपूर्ण देशाच्या तुलनेत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचे प्रमाण जास्त आहे. सन २००३ च्या भारत सरकारच्या राष्ट्रीय सर्वेनुसार महाराष्ट्रातील ३६ लाख शेतकरी कुटुंबे कर्जबाजारी असून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचे प्रमाण ५४.८% एवढे आहे. यामध्ये खाजगी सावकारांच्या कर्जाचा समावेश नाही.[९] जागतिकीकरण व नव्या धोरणामुळे कर्जबाजारी बनलेला शेतकरी आत्महत्या करु लागला आहे. जागतिकीकरणाच्या काळातच शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. सन १९९७ मध्ये १९१७ शेतकऱ्यांनी महाराष्ट्रात आत्महत्या केल्या होत्या तर सन २००५ मध्ये महाराष्ट्रात ३९२६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. सन १९९७ ते २००५ या ९ वर्षात महाराष्ट्रात २८९११ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. अशा प्रकारे महाराष्ट्र हे शेतकरी आत्महत्यांमध्ये पहिल्या क्रमांकाचे भारतातील राज्य बनले होते.[१०]

जलसिंचनाच्या सोयी :

शेतीच्या विकासासाठी जलसिंचनाच्या सोयी करणे अतिशय आवश्यक असते. प्राचीन काळापासून राज्यकर्ते जलसिंचनाच्या सोयीकडे लक्ष देताना दिसतात. छ.शिवाजी महाराजांनी ही स्वराज्यात जलसिंचनास प्रोत्साहन दिले होते. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यकर्त्यांनी जलसिंचनाकडे लक्ष घातले. द्विभाषीक मुंबई राज्याच्या काळात जलसिंचनासाठी मोठया नदयांवर धरण बांधण्याचे काम हाती घेण्यात आले. इ. स. १९४६ साली कोयना धरणाच्या बांधकामासाठी तज्ञ समिती नेमण्यात आली. या समितीने सन १९५० साली सरकारला आपला अहवाल सादर केला. इ.स. १९५० ते १९६० या दशकातील दोन पंचवार्षिक योजनांमध्ये हे धरण पूर्ण होईल असे वाटले होते. प्रत्यक्षात धरण पूर्ण तर झाले नाहीच शिवाय जी रक्कम धरणासाठी मंजूर करण्यात आली होती ती दहा टक्क्यापर्यंतच खर्च करण्यात आली होती. सत्तारुढ मोरारजी देसाईंच्या मंत्रीमंडळातील गुजराती मंत्र्यांचे सर्व लक्ष गुजरातवर असल्याने महाराष्ट्राकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते.[११] भारतातील जलसिंचनाच्या तुलनेत महाराष्ट्रातील जलसिंचनाच्या सोयींचा विकास अतिशय कमी झाल्याचे दिसते. सन १९५७ – ५८ साली भारतातल्या लागवडीखाली असलेल्या जमिनीपैकी १८% जमीन पाण्याखाली आली होती. तर त्याच वर्षी महाराष्ट्रात मात्र अवघी ५% जमीन पाण्याखाली होती.[१२] स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सन १९६१ मध्ये महाराष्ट्र शासनाने स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. या आयोगाने महाराष्ट्रातील जलसंपत्ती फारच तुटपुंजी असल्याची सत्यस्थिती मान्य करुन उपाययोजना ही सुचविली. महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या जलसंपत्तीचा पूर्णपणे वापर केल्यास ३०% जमीन पाण्याखाली येईल असा निष्कर्ष बर्वे आयोगाने काढला होता, शिवाय सन १९८० पर्यंत महाराष्टातील २५% जमीन सिंचनक्षेत्र व्हावी अशी शिफारसही केली होती. मात्र प्रत्यक्षात बर्वे आयोगाची शिफारस कागदावरच राहिली. सन १९६१ – ६२ मध्ये महाराष्ट्रातील लागवडीखालील जमीनीपैकी ४.४६% जमीन पाण्याखाली होती ती सन १९७० – ७१ मध्ये ८.३८% वर गेली. सन १९८० – ८१ मध्ये महाराष्ट्रातील पाण्याखाली जमीन १२.२९% होती. ती सन

१९९० – ९१ मध्ये १५.१८% वर गेली. महाराष्ट्रील जलसिंचनाखालील क्षेत्र जरी वाढत गेले असले तरी भारतातील एकूण जलसिंचन क्षेत्राच्या तुलनेत कमीच असल्याचे दिसते. तसेच जो जलसिंचन क्षेत्राचा विकास झाला आहे तो असमतोल स्वरुपाचा झाल्याचे दिसते. सन १९९० – ९१ मध्ये कोकण विभागातील जलसिंचनाखालील जमीन एकूण लागवडीखालील जमिनीपैकी केवळ ४.८९% असल्याचे दिसते, तर अमरावतीमधील ५.१३% जमीन पाण्याखाली आली होती. मात्र याच वर्षी पुणे विभागात २१.१६% व कोल्हापूर विभागात २०.६०% जमीन पाण्याखाली आली होती.[१३]

निष्कर्ष :

भारताप्रमाणे महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा असूनही शेतीकडे सरकार दुर्लक्ष करताना दिसत आहे. नियोजन कालखंडात शेतीविषयक धोरणे सरकारने राबविली असली तरी ती पुरेशी नव्हती. शेतीमधील सरकारची गुंतवणूक दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत (१९५१ – ५६) शेतीसाठी ३१% रक्कमेची तरतूद केली होती ती दहाव्या पंचवार्षिक योजनेत (२००२ – २००६) २०% पर्यंत कमी झाली. जास्तीत जास्त जमीन सिंचनाखाली येण्यासाठी धरणे बांधण्यात आली. परंतु त्यातून नवीन प्रश्न निर्माण झाले ते म्हणजे धरणग्रग्रस्तांच्या विस्थापनाचे प्रश्न जे आजही सुटलेले नाहीत. तसेच भारतातील एकूण सिंचनाखालील जमीनीच्या तुलनेत महाराष्ट्रातील सिंचनाखालील जमीनचे प्रमाण कमी आहे. तसेच जे सिंचनाचे काम महाराष्ट्रात झाले आहे ते असमतोल झाले आहे. सन १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करण्यात आला. त्यामुळे जागतिकीकरणाशी शेती व्यवसाय जोडला गेला, त्याचा विपरीत परिणाम महाराष्ट्रातील शेती व शेतकऱ्यांवर होऊन महाराष्ट्रातील शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करु लागले आहेत. त्यामुळे शासनाने शेतीकडे चांगल्याप्रकारे लक्ष देणे अत्यावश्यक आहे.

संदर्भ:

१) https://en.wikipedia.org/wiki/Economy_of_Maharashtra#Agriculture
२) https://en.wikipedia.org/wiki/Geography_of_Maharashtra
३) https://en.wikipedia.org/wiki/Maharashtra
४) फडके य. दी., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड VI (१९४८ ते १९६०), मौज प्रकाश गृह, मुंबई, २००७ पान नं. ३.
५) ॲड. ढोबळे विष्णू, शेतकऱ्यांच्या आत्महत्या – जागतिकीकरणातील शोकांतिका, सुगावा प्रकाशन, पुणे, २००९, पान नं. ६३.
६) कित्ता पान नं. ३८ व ३९.
७) कित्ता पान नं. १६.
८) कित्ता पान नं. ६३.
९) कित्ता पान नं. ६५.
१०) कित्ता पान नं. ७१.
११) फडके य. दी. उपरोक्त पान नं. ४ व ५.
१२) कित्ता पान नं. २६.
१३) सावंत एस.डी., कुलकर्णी बी.एन, अछुथान सी.व्ही. व सत्यसाई के.जे.एस, ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट इन महाराष्ट्रा-प्रॉब्लेम्स ॲन्ड प्रोस्पेक्ट्स, नॅशनल बॅक फॉर ॲग्रीकल्चर ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट, मुंबई, १९९९ पान नं.१७.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

वृत्तपत्रे पत्रकार आणि यशवंतराव चव्हाण

डॉ. उर्मिला न. क्षीरसागर

सहयोगी प्राध्यापक

श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली

Corresponding Author - डॉ. उर्मिला न. क्षीरसागर

DOI - 10.5281/zenodo.19722943

प्रस्तावना:

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतात अनेक राजकीय विचारवंत,समाजकारणी झाले. त्यांनी देशाच्या वैचारिक जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. अशा थोर व्यक्तींची चरित्रे ही पुढील पिढींना नेहमीच दीपस्तंभा प्रमाणे मार्गदर्शक असतात. असेच थोर प्रशासक, विचारवंत ज्यांनी आजच्या आधुनिक महाराष्ट्राच्या सर्वांगीण सुधारण्यात महत्त्वाचे कार्य केले ,ते म्हणजे माननीय यशवंतराव चव्हाण होय. त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे मूल्यांकन करताना त्याचे विविध पैलू दिसून येतात. कार्यक्षम, लोकाभिमुख, उत्कृष्ट संसद पटू, साहित्य संगीताचे रसिकाग्रणी, उत्तम वक्ते व लेखक, अशा अनेक पैलूंनी युक्त त्यांचे व्यक्तिमत्व होते. महाराष्ट्राच्या राजकीय, शैक्षणिक, कृषी, आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी प्रयत्न केले. राजकारणाच्या धकाधकीत त्यांचे साहित्यिक व सांस्कृतिक व्यक्तिमत्व प्रभावीपणे जाणवते. महाराष्ट्राच्या प्रादेशिक, सांस्कृतिक, एकात्मतेची जोपासना करून महाराष्ट्रला देशपातळीवर एक नवी ओळख त्यांनी करून दिली.

कीवर्ड्स: वृत्तपत्रे, प्रशासक, पत्रकार, महाराष्ट्र.

शोधनिबंधाचा उद्देश:

सामान्य माणसात आत्मविश्वास जागवण्याचे आणि त्यांच्यात जागृत संघटित कर्तुत्वातून आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करण्याचे महान कार्य यशवंतराव चव्हाण यांनी केले. यशवंतराव हे प्रसिद्ध राजकारणी व पत्रकारही होते. त्यांचे या क्षेत्रातील अनुभव, विचार, याचा अभ्यास करावा, त्या माध्यमातून समाजावर झालेल्या प्रभावाचा अभ्यास करावा, नव्या पिढीस त्यांच्या कर्तुत्वाचे दर्शन घडविण्याबरोबरच त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देणे, इत्यादी उद्देशाने हा शोध निबंध लिहिलेला आहे.

संदर्भ साधने:

प्रस्तुत शोधनिबंधासाठी माननीय यशवंतरावांचे आत्मचरित्र, त्यांची भाषणे, त्यांच्यावरील चरित्रात्मक लिखाण, वृत्तपत्रातील लेख, इत्यादी संदर्भ साधनांचा वापर केला आहे.

व्यक्तिमत्व जडणघडण:

महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी झटणारे दृष्टे विचारवंत यशवंतराव चव्हाण यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रीय या गावी 12 मार्च 1913 रोजी झाला.[१] भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ते सक्रिय होते. महात्मा

गांधी, पंडित नेहरू, मानवेंद्रनाथ रॉय, यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. 1942च्या चळवळीत दरम्यान त्यांना 2 वर्षे तुरुंगा वासही भोगावा लागला होता.[2] 1946 मध्ये ते गृहखा त्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. 1952 मध्ये कराड मतदार संघातून विधानसभेवर निवड होऊन ते नागरी पुरवठा मंत्री झाले.[3] 1956 मध्ये द्विभाषी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. 1 मे 1960 रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली ती त्यांच्या मुद्देगिरीमुळेच.[4]

वृत्तपत्रे पत्रकार आणि यशवंतराव:

वयाच्या सोळाव्या वर्षापासून यशवंतरावांना वर्तमानपत्राचे वेड होते. केसरी, ज्ञानप्रकाश, नवाकाळ वाचूनच ते राष्ट्रीय स्वातंत्र्याकडे आकर्षित झाले होते आणि पुढे आपल्या साऱ्या सार्वजनिक जीवनामध्ये त्यांनी वर्तमानपत्राशी व पत्रकारांशी सदैव प्रेमाचे संबंध ठेवले. वर्तमानपत्र हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असल्यामुळे त्यांच्या आयुष्यातील कठीण काळामध्ये त्यांना वर्तमानपत्रांनी छेडले असता, त्यांनी कधीही वर्तमानपत्राबरोबर जाहीर वादविवाद केले नाही, पण ज्यावेळी त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवण्यात आले त्यावेळी खंबीरपणे या टिकेची दखल घेऊन त्यांनी प्रत्युत्तर दिले.

यशवंतराव अत्यंत समंजस, संयमी, राजकारणी असल्याने समाजातील सर्वांबरोबर ते समरस झाले होते. पत्रकारांबरोबर कसे बोलावे हे माहीत असल्याने या व्यवसायातील मंडळींचे प्रेम त्यांनी संपादित केले होते. मोठ्या पत्रकाराशी, भांडवलदारी वृत्तपत्रांबरोबर त्यांचे संबंध जरी प्रेमाचे होते, तरी त्यांनी छोट्या वृत्तपत्रांकडे नेहमीच आपुलकीने पाहिले. शिवनेर साप्ताहिकाच्या दशवार्षिक उत्सवाच्या छोट्या कार्यक्रमाला खास दिल्लीहून ते 1964 मध्ये मुंबईत आले होते. त्यावेळी त्यांनी उद्गार काढले की," अमेरिकेमध्ये 500 प्रतीच्या खप असलेल्या नियतकालिकाच्या मताचा सुद्धा विचार केला जातो, संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये सारी मराठी पत्रकार सृष्टी त्यांच्याविरोधात गेली असता, शिवनेर आणि लोकसत्ताने या काळात दिलेल्या पाठिंबा विसरू शकत नाही." छोट्या वृत्तपत्रासंबंधी त्यांची आस्था यातून दिसून येते .[5] द्विभाषकाची निर्मिती झाल्यावर यशवंतराव निष्ठेने प्रचार करीत होते, पण वृत्तपत्राकडून हवे ते सहकार्य मिळत नव्हते, लोकांना आपले धोरण विचार पोहोचवणे गरजेचे वाटत असल्याने त्यांनी नव्या वृत्तपत्राची कल्पना मांडून श्रीमंत मालोजीराजे निंबाळकर यांच्याशी चर्चा केली व त्यासाठी सकाळचे सहसंपादक अनंतराव पाटील यांच्याकडे जबाबदारी दिली.[6] वृत्तपत्रासाठी जागा, छापखाना, माणसे, पैसा इत्यादीसाठी प्रयत्न केले. बडोदा नरेश फत्तेसिंह गायकवाड यांच्याकडून एक लक्ष रुपये बिनव्याजी कर्ज मिळवले. पत्रास "विशाल सह्याद्री" नाव दिले. संपादकांना त्यांच्या कामात पूर्ण स्वातंत्र्य दिले. प्रसिद्धी व प्रचाराबाबत कोणी यांच्याकडे तक्रार केली, तर वृत्तपत्र स्वातंत्र्यात आपण ढवळाढवळ करणार नाही, असे यशवंतराव सांगत.[7] दिल्लीत गेले तरी यशवंतरावांनी विशाल सह्याद्री कडे दुर्लक्ष केले नाही व संपादकांच्या पाठीशी नेहमीच उभे राहिले.

चिपळूण येथील पत्रकार परिषदेत महाराष्ट्रातील श्रेष्ठ पत्रकारांशी त्यांनी गप्पा मारल्या होत्या. लहान पत्रातील महान विचारांची ते नेहमी दखल घेऊन आदर करीत. कारण पत्रकारांशी त्यांचे स्नेहाचे संबंध होते. हा त्यांच्या स्वभावातील विशेष गुण होता. ह. रा. महाजनी द्वा. भ. कर्णिक हे त्यांचे स्नेही होते. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी टीका केली, तरी ते हसत झेलायचे. वृत्तपत्रांना मुलाखती देणे, सवड काढून खास अंकासाठी लिहिणे, याचा त्यांनी कधी कंटाळा केला नाही. आचार्य अत्रेंच्या जळजळीत

लेखामुळे जरी दुःख झाले, तरी त्यांना सौम्य मृदू शब्दाने जिंकले होते.

महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर त्यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये बहुसंख्य पत्रकारांनी साथ दिली. पत्रकारांच्या अनेक अडचणी त्यांनी स्वतः तसेच शासकीय पातळीवरून सोडवल्या. त्यांचा दरवाजा सर्व पत्रकारांना मोकळा असे. कटूता ठेवणे आणि कटूता नसणारे वातावरण वाढवणे हा माझा स्वभाव धर्म आहे, असे यशवंतराव म्हणत[8]. पत्रकार सुद्धा समाज जीवनाचा महत्त्वाचा दुवा आणि धागा आहे, याची खूणगाट त्यांनी मनात बाळगली होती. पत्रकारांच्या टिकेचे स्वागत करून आपल्या शासन धोरणात योग्य तो बदल घडवून त्यांनी आणला. त्याचा इष्ट परिणाम म्हणजे त्यांनी शहरी व ग्रामीण या दोन्ही समाजाची पकड घेऊन आपला प्रभाव पाडला. दैनिक केसरीचे माजी संपादक जयवंतराव टिळक यांना यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेसमध्ये आणले. या द्वारे पत्रकारांना सुद्धा आपल्या ध्येय धोरणात महत्त्वाचे स्थान आहे, हे प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केले. लोकसत्तेचे माजी संपादक माधव गडकरी म्हणतात, "राजकारणात पत्रकारांना खरी कोणी मदत कोणी केली असेल तर ती यशवंतरावांनी." [9] 23 डिसेंबर 19 60 रोजी नागपूरच्या कॉलेज ऑफ जर्नालिझम मध्ये बोलताना यशवंतराव म्हणाले होते," ग्रामीण विभागांचा आर्थिक विकास झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत होईल व त्यामुळे साहजिकच आपल्या देशाचा विकास साधेल व तो समृद्ध होईल म्हणून लहान शहरातील वृत्तपत्रे कितपत विधायक निकोप दृष्टिकोन स्वीकारतात, यावर आपल्या ग्रामीण भागातील प्रगती अवलंबून आहे "[10].महाराष्ट्र राज्याची व राष्ट्राची प्रगती करून समृद्धता आणण्याच्या आपल्या या कामात वृत्तपत्रांचे सहकार्य मिळावे ,अशी त्यांची अपेक्षा होती. सरकारी ध्येय धोरण जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम जे प्रसिद्धी खाते करते, त्या राज्याच्या प्रसिद्ध खात्यासह त्यांचे मार्गदर्शन असे. जगात शब्दासारखे सत्ता नाही म्हणून तर सावधगिरीने फार काम करावे, अशी त्यांची अपेक्षा होती. अशा रीतीने वृत्तपत्र, पत्रकार आणि यांच्याशी यशवंतरावने कायम आपुलकीचे संबंध ठेवले व त्याच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविल्या.

सारांश:

पत्रकार हा सुद्धा समाज जीवनाचा महत्त्वाचा दुवा आणि धागा आहे, याची खूनगाठ यशवंतरावंनी मनात बाळगली होती. पत्रकारांच्या हक्कावर कधीच आक्रमण त्यांनी केले नाही. राजकारणात आपला प्रभाव पडला, यामध्ये पत्रकारांचा सिंहाचा वाटा असल्याचे ते नेहमी मानत होते.अनेक वृत्तपत्रांना त्यांनी अडचणीत मोलाचे सहकार्य केले. पत्रकारांचे ते खरेखुरे हितचिंतक सन्मित्र व सल्लागार होते. निर्भीड पत्रकारांना त्यांनी संरक्षण दिले. विचार व लेखान स्वातंत्र्याचे ते कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांच्यामध्ये सहिष्णुता हा फार मोठा गुण होता. याचे पडसाद त्यांच्या अनेक क्षेत्रातील सत्तेभोवती गर्दी करणाऱ्या पेक्षा खऱ्या अर्थाने सामाजिक जीवनाची बांधिलकी मानणारे समाजाच्या संवेदनाशी एकनिष्ठ असणारे पत्रकार त्यांना जवळचे होते. त्यामुळे ज्यावेळी कामानिमित्त दौऱ्यावर जात, आपल्या सोबत असणाऱ्या पत्रकारांची ते काळजी घेत त्यांच्या समवेत भोजन घेत.

संदर्भ:

1. चव्हाण यशवंतराव, "कृष्णाकाठ" खंड एक, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती 1984, पृष्ठ क्रमांक 13.
2. जोशी रामभाऊ, "यशवंतरावांचे अंतरंग विरंगुळा", श्री यशोदा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2005, पृष्ठ क्रमांक आठ.

3. दैनिक तरुण भारत, 12 मार्च 2012, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी विशेष अंक, लेखक जोशी रामभाऊ, लेख 'यशवंतराव आदर्श नेतृत्वाचा वस्तू पाठ', पृष्ठ क्रमांक चार.
4. चव्हाणयशवंतराव, शिवनेरीच्या नौबती, संपादक तळवळकर, गोविंद लिमये अहो वीण्यास प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती जुलै 1961 दृष्ट क्रमांक सहा.
5. बाबत सरोजिनी संपादक मी पाहिलेले यशवंतराव लेख लहान वृत्तपत्रा संबंधित असा पाळणारे यशवंतराव लेखक वाबळे विश्वनाथ प्रकाशक सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई ऑगस्ट 1988 प्रश्न क्रमांक 379.
6. पाटील अनंतराव, यशवंतराव चव्हाण, प्रकाशक दादासाहेब रूपवते, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, 1907, पृष्ठ क्रमांक 82.
7. पाटील अनंतराव, उपरोक्त, पृष्ठ क्रमांक 85.
8. बाबर सरोजिनी, (संपादक) मी पाहिलेले यशवंतराव, लेख -यशवंतराव चव्हाण आणि पत्रकार, लेखक-कर्णिक कमलाकर, प्रकाशक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, ऑगस्ट 1988, पृष्ठ क्रमांक 382.
9. कायंदे पाटील गंगाधर, यशवंतराव चव्हाण, चैतन्य प्रकाशन, नाशिक, डिसेंबर 59.
10. तळवळकर गोविंद, लिमये अ.ह.शिवनेरीच्या नौबती, उपरोक्त, पृष्ठ क्रमांक,114.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील आचार्य अत्रे यांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास

डॉ. विनोद संभाजी सोनवणे

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ओंदे, ता. विक्रमगड, जि. पालघर

Corresponding Author - डॉ. विनोद संभाजी सोनवणे

DOI - 10.5281/zenodo.19722993

सारांश :

आचार्य अत्रे यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान खूप महत्त्वाचं होतं. त्यांनी आपल्या वाणी आणि लेखणीतून चळवळीला मोठा जनाधार मिळवून दिला. 'मराठा' हे वृत्तपत्र सुरू करून त्यांनी या लढ्याचे मुखपत्र म्हणून काम केलं. 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' ही घोषणा त्यांनीच दिली जी खूप लोकप्रिय झाली. त्यांनी विविध सभा, मोर्चे आणि आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. थोडक्यात, आचार्य अत्रे यांच्या प्रभावी नेतृत्वामुळेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीला यश मिळालं.

प्रस्तावना :

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रल्हाद केशव अत्रे (आचार्य अत्रे) यांचे योगदान म्हणजे एक झंझावात होता. महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी त्यांनी आपल्या लेखणीतून आणि वाणीतून जे रणशिंग फुंकले, त्याला आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात तोड नाही.

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रल्हाद केशव अत्रे (आचार्य अत्रे) यांचे योगदानावर प्रकाश टाकण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत संशोधनाच्या गुहीतके मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळ व आचार्य अत्रे लेखणीतून आणि वाणीतून जे रणशिंग फुंकले, त्याला आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात तोड नाही. प्रस्तुत शोधनिबंधात सामाजिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

जन्म व बालपण :

आचार्य अत्रे यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९८ रोजी पुणे जिल्ह्यातील सासवड जवळील कोडित खुर्द या गावी देशस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडील लिपिक होते आणि काही काळासाठी सासवड नगरपालिकेचे सचिव होते आणि त्यांचे काका एमईएस वाघिरे हायस्कूल सासवड येथे शिक्षक होते. सासवडच्या एमईएस वाघिरे हायस्कूलमधून त्यांनी प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. १९१९ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी मॅट्रिक पूर्ण केले. पुणे विद्यापीठातून त्यांनी कला शाखेची पदवी पूर्ण केली. पदवीनंतर अत्रे यांनी शाळेत शिक्षक म्हणून काम केले. अत्रे यांनी १९२८ मध्ये लंडन विद्यापीठातून टी.डी. (शिक्षक पदविका) केले. भारतात परत येण्यापूर्वी त्यांनी सिरिल बर्ट यांच्या हाताखाली प्रायोगिक मानसशास्त्राचा अभ्यास केला आणि हॅरो येथे अध्यापन केले.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ :

संयुक्त महाराष्ट्र चळवळ हा स्वतंत्र भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि यशस्वी जनलढा होता. 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र' निर्माण करणे हा या चळवळीचा मुख्य उद्देश होता.

स्वातंत्र्यानंतर भाषिक आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्याची मागणी देशभरात जोर धरू लागली होती. मराठी भाषिक जनतेला आपले सर्व प्रदेश (मुंबई, कोकण, देश, विदर्भ आणि मराठवाडा) मिळून एक स्वतंत्र 'महाराष्ट्र' राज्य हवे होते. मात्र, केंद्र सरकार मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे ठेवण्याच्या विचारात होते, ज्याला मराठी जनतेचा तीव्र विरोध होता.

लढ्याला दिशा देण्यासाठी ६ फेब्रुवारी १९५६ रोजी पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात 'संयुक्त महाराष्ट्र समिती'ची स्थापना करण्यात आली. प्रमुख नेते: भाई श्रीपाद अमृत डांगे (अध्यक्ष), एस.एम. जोशी (सरचिटणीस), प्र. के. अत्रे, सेनापती बापट, क्रांतिसिंह नाना पाटील, ना. ग. गोरे इत्यादी. या समितीने पक्षभेद विसरून सर्व मराठी भाषिकांना एका झेंड्याखाली आणले.

दार आयोग:

दार आयोगाच्या निराशाजनक अहवालामुळे दुखी झालेल्या अत्रे यांनी संयुक्त महाराष्ट्राचा लढा विविध मार्गांनी रुजविण्याचे काम केले. अत्रे संयुक्त महाराष्ट्र लढ्यात तन, मन, धनाने सहभागी झाले. ग. पां. परचुरे यांचे सिंहगर्जनेच्या मनोगतातील लिहितात, 'संयुक्त महाराष्ट्राची चळवळ चालू झाल्यापासून आजपावेतो तन, मन, धन खर्च करून संयुक्त महाराष्ट्राची पताका दिमाखात फडकत ठेवणारा एकमेव साहित्यिक म्हणजे आचार्य अत्रे होत. महाराष्ट्र चळवळीबाबत लोकांमध्ये जाणीव, जागृती करून चळवळीला मोठा जनाधार मिळवून देण्यात अत्रेंचे योगदान मोठे आहे.'

संयुक्त महाराष्ट्र कृती समिती स्थापन:

संयुक्त महाराष्ट्र कृती समिती स्थापनेत अत्रेंचा पुढाकार होता. मुंबई महापालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडणारे अत्रेच होते. १९४९ मध्ये मुंबई महापालिकेच्या पोटनिवडणुकीत अत्रे विजयी झाले. त्यांनी पालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडला. परंतु तो बेमुदत तहकूब केला गेला. त्यामुळे लोकभावना अधिकच प्रज्ज्वलित झाल्या. अत्रे यांनी संयुक्त महाराष्ट्राची मागणी करण्यासाठी विविध संधी स्थानाचा प्रभावीपणे वापर केला. जमिनीवरील लढ्यात अत्रे मागे नव्हते. विधानसभेवरील मोर्चात त्यांचा सहभाग होता. यावेळी मोर्चावर अश्रूधूर सोडून लाठी हल्ला करण्यात आला होता. अत्रे यांना अटक करून भायखळ्यास तुरुंगात ठेवण्यात आले होते. पुढेही त्यांना याच कामी तुरुंगवास भोगावा लागला. त्यांना स्थानबद्ध ही करण्यात आले होते.

वाणी व लेखणीने लढ्यात:

अत्रे लोकांमध्ये राहून त्यांच्यासह जसे लढ्यात योगदान देत होते तसे लढ्याला वैचारिक अधिष्ठान मिळवून देणे व प्रसार या पातळीवरही कार्यरत होते. अत्रे यांच्या वाणी व लेखणीने लढ्यात दिलेले योगदान फार प्रभावी व अमूल्य आहे. अत्रे यांचे विविध पैलू असलेले व्यक्तिमत्त्व प्रसिद्ध आहेच. अत्रे उत्तम व जनमनाची पकड घेणारे वक्ते होते. त्यांच्या वक्तृत्वाच्या नवलकथा ज्ञात आहेतच. त्यांच्या वक्तृत्वाने चळवळीची धार वाढली. अत्रे यांनी अनेक सभा घेतल्या. चळवळ विस्तार व लोकमनाच्या पकडीसाठी घोषणा फार उपयुक्त असतात. या लढ्याची घोषणाही अत्रे यांनीच दिली आहे.

भायखळा परळ मतदारसंघाची 1950 मध्ये पोटनिवडणुकी झाली. या निवडणुकीत उमेदवार त्रिकमदास यांच्या प्रचारात अत्रे यांनी 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' ही घोषणा दिली.[१] ही घोषणा खूप लोकप्रिय ठरली व चळवळीत तिने प्राण फुंकण्याचे काम केले.

नवयुग:

अत्रे यांच्या वक्तृत्त्वाबरोबरच त्यांच्या लेखनानेही लढ्यास प्रोत्साहित केले. संयुक्त महाराष्ट्र मागणी फेटाळणाऱ्या भारत सरकारची तुलना इंग्रज शासनाशी करण्याचे धारिष्ट्य अत्रे यांनी दाखविले. "नवयुग' मध्ये मुंबईसह महाराष्ट्राची आवश्यकता मांडताना अत्रेंची लेखणी तर अत्यंत जहाल झाली होती.[२] तत्कालीन नेत्यांचे चळवळीकडे दुर्लक्ष झाल्यास त्यांच्यावरही टीका करण्यास अत्रे कचरले नाही. कोणत्याही व्यक्तीपेक्षा चळवळ म्हणजेच महाराष्ट्र मोठा असल्याची त्यांची भूमिका होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीकडे समकालीन वृत्तपत्रांचे होणारे दुर्लक्ष चववळकर्त्यांसाठी वेदनादायी होते. लोकांचा व्यापक लढा,

मराठा:

मेळाव्यातून उसळलेला जनसागर, उत्साहित मोर्चे यांचे वार्तांकन होत नव्हते. त्यामुळे जे घडते ते लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, चळवळीची भूमिका मांडण्यासाठी, टीकेचे खंडन करण्यासाठी चळवळीचे वृत्तपत्र सुरू करावे व त्यात अत्रे यांनी जबाबदारी घ्यावी असा विचार मांडला गेला.[३] ज्या सभेत हे वृत्तपत्र सुरू करण्याचे ठरले त्याच सभेत वृत्तपत्राचे नावही ठरले 'मराठा'. वृत्तपत्रासाठी सेनापती बापट यांनी हे नाव सुचविले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यासाठी १५ नोव्हेंबर १९५६ रोजी 'मराठा' सुरू झाले.[४] देशी भाषेतील व चळवळीचे एकाअर्थाने मुखपत्र म्हणून 'मराठा' वृत्तपत्रास वृत्तपत्रजगतात मानाचे स्थान मिळाले.

'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।:

'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा। हे "मराठा'चे ब्रिद होते. अग्रलेखावर "भले तरी देऊ कासेची लंगोटी। नाठाळाचे माथी हाणू काठी।' लिहिले जाई. पाचांमुखी, कोपरखळ्या, ढालतलवार ही सदरे मराठात होती. ब्रीद व सदरांच्या नावावरूनच मराठाचे स्वरूप व उद्देश दिसतात. आर्थिक अडचण असतानाही अंक चांगलाच झाला पाहिजे या आग्रहापायी अंक छापून आर्थिक झळ सोसून त्याचे अंक 'मनाजोगा' होईपर्यंत केले नाही. याच काळात आर्थिक अडचणीमुळे इतर काही वृत्तपत्रे बंद पडत असताना अत्रे यांनी अंक चांगलाच झाला पाहिजे हा धरलेला आग्रह त्यांनी व्यवसायापेक्षा विचारास व त्याच्या प्रसारास दिलेले महत्त्व दिसते. "संयुक्त महाराष्ट्रासाठी मराठी स्त्री-पुरुषांना रोजच्या रोज त्यांच्या कर्तव्याची आठवण करून देईल आणि चालू लोकशाहीच्या लढ्यांत त्यांना स्फूर्ती देऊन मार्गदर्शन करील' ही सेनापती बापट यांची अपेक्षा "मराठा'ने पूर्ण केली.[५]

"मराठा' कोणत्याही राजकीय पक्षाकडे झुकणारे नव्हते. राजकीय व विविध मतभेद बाजूला सारून संयुक्त महाराष्ट्रासाठी लोकांना एक आणण्याचे काम मराठाने केले. त्याचा उद्देश आणि भूमिका एकच होती 'संयुक्त महाराष्ट्र. मराठा 'महाराष्ट्राभिमान' व 'भारतनिष्ठे'ला कधीही धोका देणार नाही याची ग्वाही अत्रे आपल्या अग्रलेखातून देतात.[६] त्यामुळेच मराठा हे वृत्तपत्र त्याकाळात खपाचा व लोकप्रियतेचा उच्चांक करणारे वृत्तपत्र ठरले. मराठात इतर बातम्या नसतात अशी टीकाही झाली पण अत्रेंनी मराठा वृत्तपत्रातील बातम्यांचा अग्रक्रम बदलला नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे 'मराठा' महत्त्वपूर्ण माध्यम बनले.[७]

चळवळीची व्याप्ती व परिणामकारकता मराठाने वाढविली. मागणीची आवश्यकता व उचीतता ठसविली. या लढ्यासाठी प्रभावी शस्त्र व त्याचे शास्त्र सांगण्याची भूमिका पार पाडली. अर्थात त्याचे दिग्दर्शन केले ते अत्रे यांनीच.

महाराष्ट्रासाठीच जगण्या मरण्याची भावना चेतवत ठेवण्याचे काम अत्रे व त्यांच्या लेखणीने समर्थपणे केले.[८] अपेक्षित राज्य "महाराष्ट्र' नावास आकाराला येण्यात अत्रेंचा वाटा मोठा आहे. विविध मार्गांनी अत्रे यांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची गाथा लोकमनात रुजविली व त्याबाबतची लोकनिष्ठा प्रोत्साहित करण्याचे काम केले. त्यामुळे हा लढा यशस्वी झाला. या लढ्याच्या यशस्वीतेत अत्रेंचे योगदान महत्त्वाचे ठरले.

निष्कर्ष :

१. अत्रे हे मुळात साहित्यिक होते. त्यांनी नाटके, विडंबन काव्ये आणि लेखांमधून मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत केला.

२. अत्रे यांनी केवळ वैयक्तिक पातळीवर लढा दिला नाही, तर राजकीय एकजूट घडवून आणली.

३. 'मराठा'च्या अग्रलेखांनी मुंबईतील गिरणी कामगारांपासून ते खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांपर्यंत सर्वांना पेटवून उठवले.

४. त्यांनी आपल्या भाषणांतून आणि लेखनातून "मराठी तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा" हा समर्थ रामदासांचा संदेश प्रत्यक्षात उतरवला.

५. दिल्लीच्या तख्तासमोर मराठी माणूस झुकणार नाही, ही जिद्द त्यांनी निर्माण केली.

६. हुतात्म्यांच्या स्मारकासाठी आणि त्यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

७. "जर अत्रे नसते, तर संयुक्त महाराष्ट्र होणे कठीण झाले असते," असे अनेक इतिहासकार मानतात.

८. संयुक्त महराष्ट्र आंदोलनाचे प्र. के. अत्रे हे एक प्रमुख नेते होते. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी परमोच्च्च बिंदूवर नेलेला हा सर्वोत्कृष्ट राजकीय लढा होता.

९. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अत्रेंनी उभे केलेले 'मराठा' हे वृत्तपत्र, अत्रेंचे अमोघ वक्तृत्व हे वजा केल्यास संयुक्त महाराष्ट्र झाला नसता आणि मुंबई महाराष्ट्रात आली नसती, हे निर्विवाद सत्य कोणीही नाकारणार नाही.

१०. त्यांनी आपल्या वाणीने आणि लेखणीने लोकशाहीच्या मार्गाने लढा देऊन पंडित नेहरूंनाही विचार करायला भाग पाडले. अखेर १ मे १९६० रोजी जेव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला, तेव्हा ते अत्रेंच्या आयुष्यातील सर्वात मोठे यश होते.

संदर्भ:

१. शहापूरकर कृष्णा, "आचार्य अत्रे संयुक्त महाराष्ट्र आणि सीमाप्रश्न", संगणक प्रकाशन बुक्स, २०२४, पृ. ४५

२. कित्ता, पृ. ६७

३. भोसले एस. एस., "प्र. के अत्रे" अजब पुस्तकालाय, १९७६, पृ. ९५

४. कित्ता, पृ. १०८

५. उपरोक्त, शहापूरकर कृष्णा, पृ. ७२

६. उपरोक्त, शहापूरकर कृष्णा, पृ. ८०

७. श्रीखंडे शशिकांत, "युगप्रवर्तक चित्रपट कथाकार आचार्य अत्रे",१९८०, पृ. १२०

८. परचुरे आप्पा, "आठवणीतले अत्रे", परचुरे प्रकाशन मंदिर, १९९६, पृ. ९७

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महाराष्ट्रात आयोजित भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनातील शेती व शेतकरी समस्यांवरील ठराव (१८८५-१९४७)

डॉ. संदीप मारोती महाजन

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,

सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड (अधिकार प्रदत्त स्वायत्त)

Corresponding Author - डॉ. संदीप मारोती महाजन

DOI - 10.5281/zenodo.19723027

गोषवारा:

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मुख्य प्राधान्य राजकीय स्वातंत्र्य असल्याने काँग्रेसने ब्रिटिश सरकारकडे शेतकरी समस्यांचा पाठपुरावा केला, तरी शेतकऱ्यांच्या दयनीय परिस्थितीत ठोस बदल झाला नाही. त्यामुळे काँग्रेसने थेट शेतकऱ्यांचे नेतृत्व केले असे म्हणता येणार नाही. तथापि, काँग्रेसचे प्रयत्न सनदशीर दृष्टीने महत्त्वाचे ठरले. शेतकरी, शेतमजूर आणि आदिवासी यांना सनदशीर संघर्षासाठी संघटित करण्याचे काम काँग्रेसने केले. यामुळे त्यांच्या प्रश्नांना राष्ट्रीय स्तरावर स्थान मिळाले. या काळात शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्ध वैयक्तिक व सामूहिक प्रयत्न तसेच विविध शेतकरी चळवळी उदयास आल्या. सुरुवातीला काँग्रेसचे नेतृत्व मध्यमवर्गीय, शिक्षित व शहरी असल्याने शेतकरी प्रश्न दुय्यम राहिले. मात्र, शेती संकट तीव्र होत गेल्यावर ग्रामीण प्रश्न राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी येऊ लागले. थोडक्यात, काँग्रेसने शेतकरी व शेतमजुरांचे प्रश्न राष्ट्रीय व्यासपीठावर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

कीवर्ड: कृषी प्रधान देश, महसूलवाढ, कर्जबाजारीपणा, जमीनदार, नगदी पिके, व्यापारीकरण, शोषण, सनदशीर संघर्ष

प्रस्तावना:

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ही भारतीय राष्ट्रवादाच्या संघटित अभिव्यक्तीची ऐतिहासिक घटना मानली जाते. काँग्रेसचे सुरवातीस राजकीय आणि घटनात्मक सुधारणा हे प्रमुख ध्येय असले, तरी ब्रिटिश वसाहतवादी कृषी धोरणांमुळे भारतीय ग्रामीण समाजावर झालेले गंभीर परिणाम दुर्लक्षित राहू शकले नाहीत. महाराष्ट्र हा काँग्रेसच्या प्रारंभीच्या अधिवेशनांचा महत्त्वाचा प्रदेश होता. कॉंग्रेसच्या एकूण दहा वार्षिक अधिवेशनातून मांडले गेलेले ठराव भारतीय राष्ट्रवादाच्या विस्ताराचे द्योतक ठरतात. या अधिवेशनांतून शेतकरी प्रश्नांवर सातत्याने चर्चा झाली. या ठरावांमधून महसूल कपात, कायमस्वरूपी महसूल व्यवस्था, जंगल कायद्यात सुधारणा, दुष्काळ निवारण, कर्जमाफी, भूमीहक्क, सहकारी शेती आणि शेतमजुरांचे हक्क यांसारख्या मागण्या पुढे आल्या. त्यामुळे शेतकरी प्रश्न हा केवळ आर्थिक विषय न राहता राष्ट्रवादी चळवळीच्या केंद्रस्थानी येऊ लागला. या संशोधन लेखाचा उद्देश १८८५ ते १९४७ या कालखंडात महाराष्ट्रात आयोजित काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांमधील शेती व शेतकरी समस्यांवरील ठरावांचा चिकित्सक अभ्यास करणे

हा आहे. या वार्षिक अधिवेशनातील ठरावांच्या मागोवा घेऊन राष्ट्रवादी चळवळ आणि ग्रामीण समाज यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

विषयाची निवड:

१८८५ ते १९४७ या कालावधीत महाराष्ट्रात आयोजित दहा अधिवेशनांमध्ये शेतकरीविषयक ठराव अधिकृत अहवालांत नोंदलेले आहेत. राष्ट्रीय चळवळीचा इतिहास प्रामुख्याने राजकीय मागण्यांवर केंद्रित राहिला असून शेतकरी प्रश्नांवरील ठरावांचा स्वतंत्र व कालानुक्रमिक अभ्यास दिसून येत नाही. महाराष्ट्रातील अधिवेशनांचा अभ्यास केल्यास काँग्रेसच्या ग्रामीण धोरणातील बदल स्पष्ट होतात. १८८५ मधील शेतकरी प्रश्नांचा अभाव ते फैजपूर अधिवेशनातील (१९३६) कृषी सुधारणा कार्यक्रमापर्यंतचा प्रवास दिसून येतो. स्वातंत्र्यपूर्व कृषी मागण्या आणि स्वातंत्र्योत्तर भूमिसुधारणा धोरणांतील सातत्य व परिवर्तन समजण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

विषयाचे महत्त्व:

काँग्रेसच्या प्रारंभीच्या अधिवेशनांमध्ये शेतकरी प्रश्न दुय्यम होते. मात्र १८८९ मधील मुंबई अधिवेशनात जमीन महसूल दर पुनर्विचाराचा ठराव मंजूर झाला. ही वस्तुस्थिती ग्रामीण प्रश्नांच्या उगमाची साक्ष देते. १८९१ मधील नागपूर अधिवेशनात दारिद्र्य, महसूल व जंगल कायद्यांवर ठराव घेण्यात आले. यावरून काँग्रेसने आर्थिक शोषणाला औपचारिकरित्या मान्यता दिली. १८९५ मधील पुणे व १८९७ च्या अमरावती अधिवेशनांमध्ये दुष्काळ, कर्जबाजारीपणा व महसूल सवलतींची मागणी करण्यात आली. ही केवळ राजकीय नव्हे तर आर्थिक हस्तक्षेपाची भूमिका होती. १९३६ मधील फैजपूर अधिवेशन हे ग्रामीण भागात भरविण्यात आलेले पहिले अधिवेशन होते. त्यात महसूल कपात, कर्जमाफी, वेठबिगारी निर्मूलन, शेतमजुरांचे हक्क अशा कार्यक्रमात्मक मागण्या स्वीकारल्या गेल्या. ही काँग्रेसच्या धोरणातील निर्णायक वळणाची नोंद आहे. यातून विषयाचे महत्त्व दिसून येते.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. प्रत्येक ठरावाचा आशय, मांडणी करणारे नेते, चर्चेचा संदर्भ आणि मागण्यांचे स्वरूप यांचे विश्लेषण करणे.
२. ठरावांतील मागण्या आणि ब्रिटिश सरकारच्या धोरणांतील प्रत्यक्ष बदल यांची तुलना करणे.
३. काँग्रेसच्या भूमिकेतील बदल मध्यममार्गी मागण्यांपासून कार्यक्रमाधिष्ठित कृषी सुधारणांपर्यंत ओळखणे.
४. काँग्रेस व शेतकरी संघटनांतील संबंधांचा अभ्यास करून ग्रामीण राजकारणातील बदल स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती:

सदर शोधनिबंधासाठी प्रामुख्याने प्राथमिक साधनांचा- अधिवेशनांचे अहवाल, समकालीन वृत्तपत्रे इ. वापर करण्यात आला आहे. ठरावांतील संज्ञा—'महसूल कपात', 'कायमस्वरूपी व्यवस्था', 'कर्जमाफी', 'जंगल कायदे' यांचे तर्कशुद्ध वर्गीकरण. कालानुक्रमिक विश्लेषण: मवाळवादी (१८८५–१९०५), जहालवादी (१९१५–१९२०) आणि गांधी कालखंड (१९२०–१९४७) यांतील अधिवेशनातील ठरावांसाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर, माहितीचे संकलन व विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

पूर्व साहित्याचा आढावा:

प्रस्तुत विषय केंद्रस्थानी मांडून संशोधन झालेलेल नाही. परंतु अन्य विषयात कॉंग्रेसच्या ठरावतील शेती व शेतकरी प्रश्नांचा उहापोह अनेक संदर्भ साधनात आलेला आहे. यात बिपीन चंद्र यांनी (द राईज अॅड ग्रोथ ऑफ इकोनॉमिक नॅशनॅलीझम इन इंडिया) आर्थिक राष्ट्रवादाचा अभ्यास करताना ब्रिटिश महसूल धोरणांचा ऊहापोह केला आहे; परंतु महाराष्ट्रातील विशिष्ट अधिवेशनांचा स्वतंत्र अभ्यास मर्यादित आहे. सुमित सरकार यांनी (आधुनिक भारत: १८८५-१९४७) राष्ट्रवादाचा सामाजिक विस्तार दाखविला. मात्र अधिवेशननिहाय ठरावांचे विश्लेषण सविस्तर दिलेले नाही. धनंजय कीर यांच्या (लोकमान्य टिळक) लेखनातून लोकमान्य टिळकांच्या महसूलविरोधी भूमिकेची माहिती मिळते, पण काँग्रेसच्या ठरावांच्या तुलनात्मक अभ्यासाचा अभाव आहे. य. दि. फडके यांनी (विसाव्या शतकातील महाराष्ट्र, १९१४ ते १९२०) महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रियेचे विश्लेषण केले असले तरी शेतकरीविषयक ठरावांचे कालानुक्रमिक दस्तऐवजीकरण मर्यादित आहे. महाराष्ट्रात आयोजित काँग्रेस अधिवेशनांतील शेतकरीविषयक ठरावांचा एकत्रित, कालानुक्रमिक व दस्तऐवजाधारित अभ्यास अद्याप सुस्पष्टपणे झालेला नाही. प्रस्तुत संशोधन ही पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करीत आहे.

भूमिका:

भारत हा कृषीप्रधान देश असून, शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या शेतीवर अवलंबून आहे. प्राचीन काळापासून अनेक साम्राज्यांच्या उदय-पतनामध्ये कृषी उत्पादनाची महत्त्वाची भूमिका होती. भारतीय कृषी उत्पादनामुळेच युरोपीय व्यापारी भारताकडे आकर्षित झाले. भारतातील कमकुवत राजकीय परिस्थितीचा लाभ घेत युरोपीय शक्तींनी प्रशासनावर नियंत्रण प्रस्थापित केले. १७५७ च्या प्लासी लढाईनंतर ब्रिटिश सत्तेची भारतात पायाभरणी झाली. ईस्ट इंडिया कंपनीने राज्य स्थापन केल्यानंतर भारतीय शेतीच्या पारंपरिक रचनेत मूलभूत बदल घडवून आणले. अन्नधान्याऐवजी नगदी पिकांवर भर देण्यात आला आणि ब्रिटनमधील उद्योगांसाठी कच्चा माल पुरविण्यास शेतकऱ्यांना बाध्य केले गेले. यामुळे शेतकरी वर्ग विविध समस्यांच्या गर्तेत सापडला. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात शेतकरी वर्ग महसूलवाढ, दुष्काळ, कर्जबाजारीपणा आणि जमीनदारांच्या शोषणाला सामोरा जात होता. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांनी महसूल संकलन अधिक कडक केले. परिणामी शेतकरी कर्जबाजारी झाला आणि मोठ्या प्रमाणावर जमीन सावकारांच्या घशात गेली. शेतकरी हा देशाच्या लोकसंख्येचा सुमारे ८० टक्क्यांहून अधिक भाग असतानाही त्यांचे प्रश्न राष्ट्रीय राजकारणात दुय्यम ठरले. भारतीय कृषी परिवर्तनाचा प्रवासात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आपल्या वार्षिक अधिवेशनात भारतीय शेतकऱ्यांच्या परिस्थितीत परिवर्तन घडून आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांकडे दुर्लक्ष करून चालत नाही.

१८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. १८८५ ते १९४७ या कालखंडात महाराष्ट्रात काँग्रेसची दहा वार्षिक अधिवेशने आयोजित करण्यात आली. या अधिवेशनांमध्ये शेतकरी व शेतीविषयक प्रश्न ठरावांच्या स्वरूपात मांडण्यात आले. काँग्रेसचे सुरुवातीचे नेतृत्व प्रामुख्याने शिक्षित, शहरी व मध्यमवर्गीय असल्याने प्रारंभी शेतकरी प्रश्नांना मर्यादित महत्त्व देण्यात आले. मात्र दुष्काळ, महसूलवाढ व कर्जबाजारीपणाची तीव्रता वाढत गेल्याने ग्रामीण प्रश्न अधिवेशनांच्या चर्चेचा भाग बनू लागले. काँग्रेसने शेतकऱ्यांचे प्रश्न ब्रिटिश सरकारसमोर

मांडले, तरीही शेतकऱ्यांच्या परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झाली नाही. काँग्रेसने शेतकरी वर्गाचे थेट नेतृत्व केले, असे म्हणता येणार नाही; तथापि शेतकऱ्यांना सनदशीर संघर्षाच्या चौकटीत संघटित करण्याचे महत्त्वाचे कार्य काँग्रेसने केले. काँग्रेसचे मुख्य ध्येय राजकीय स्वातंत्र्य होते. तरीही शेतकरी प्रश्नांबाबतचे प्रयत्न राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे ठरतात. या शोधनिबंधात महाराष्ट्रात आयोजित भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांमध्ये शेतकरी व शेतीविषयक समस्यांवर मांडलेल्या ठरावांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. शेतकरी समस्यांच्या निराकरणासाठी काँग्रेसव्यतिरिक्त विविध वैयक्तिक व सामूहिक प्रयत्न करण्यात आले; मात्र त्यांचा सविस्तर ऊहापोह या अभ्यासाच्या कक्षेत समाविष्ट केलेला नाही.

ब्रिटिश सरकारच्या कृषी धोरणाचा भारतीय कृषी समाजावर झालेला परिणाम:

भारतीय शेतकरी पारंपारिक शेती उत्पादनावर आधारित जीवन जगत होता. तो प्रामुख्याने आपल्या कुटुंबाच्या गरजांपुरती पिके घेत असे. ब्रिटिश सत्तेने भारतात केवळ राजकीय बदल घडवले नाहीत, तर पारंपारिक शेतीऐवजी उद्योगाभिमुख व व्यापारी कृषी उत्पादनाची पद्धत लागू केली. यासाठी जमीन महसूल व्यवस्थेत आमूलाग्र बदल करून जमीनदारी, रयतवारी व महालवारी अशा शोषक शेतसारा पद्धती लागू केल्या. या धोरणांमुळे शेतकरी स्वतःच्या जमिनीवर मजूर बनला. शेतसारा धोरणाचा सर्वाधिक फटका आदिवासी, शेतमजूर व अल्पभूधारक शेतकऱ्यांना बसला. सन १८५७ नंतर संपूर्ण सत्ता ब्रिटिश सरकारकडे गेल्यानंतर शेतीचे व्यापारीकरण अधिक तीव्र झाले. भारत ही नफ्याची मोठी बाजारपेठ असल्याने ब्रिटिश सरकारने कृषी उत्पादनाला व्यापारी स्वरूप दिले. रेल्वे व रस्ते उभारून नगदी पिकांची वाहतूक सुलभ करण्यात आली.[1] शेतीचे व्यापारीकरण आधुनिकतेचे लक्षण म्हणून शेतकऱ्यांवर लादण्यात आले. कापूस, नीळ व चहा यांसारख्या नगदी पिकांवर भर देऊन त्यावर सरकारी नियंत्रण ठेवण्यात आले. परिणामी, अन्नधान्य उत्पादन घटले आणि अन्नटंचाई व मानवनिर्मित दुष्काळ निर्माण झाले. सतत नगदी पिकांमुळे जमिनीची सुपीकता कमी झाली, याचे उदाहरण नीळ शेतीतून दिसून येते. वाढत्या खर्चामुळे शेतकरी जमीनदार व सावकारांकडून कर्ज घेऊ लागला. जास्त व्याजदरांमुळे तो कर्जाच्या सापळ्यात अडकला. शेतीच्या व्यापारीकरणामुळे अनेक शेतकऱ्यांनी जमिनी गमावल्या आणि त्यांची आर्थिक स्थिती दयनीय झाली. शेतीवर अवलंबून असलेले लघु व कुटीर उद्योग उद्ध्वस्त झाल्याने शेतीवर अवलंबून असलेली लोकसंख्या वाढली. जमीनदार व सरकारी शोषण, नैसर्गिक आपत्ती, प्रशासकीय अनास्था, भ्रष्टाचार व अत्याचार यामुळे भारतीय शेती व्यवस्था पूर्णपणे कोलमडली. देशभर असंतोष वाढत असताना शेतकऱ्यांचे प्रश्न राष्ट्रीय पातळीवर मांडणारी कोणतीही संघटना अस्तित्वात नव्हती. मात्र सन १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत नव्या आशा निर्माण झाल्या.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व शेतकऱ्यांचे प्रश्न:

सुरुवातीच्या वर्षात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने शेतकऱ्यांच्या प्रश्नापेक्षा राजकीय सुधारणांना जास्त महत्त्व दिले होते. याची दखल महात्मा फुले यांनी घेतली होती. त्यांनी मुंबई येथील १८८९ च्या अधिवेशनाच्या मंडपाबाहेर मोर्चा काढून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात शेतकऱ्यांचा एक तरी प्रतिनिधी आहे काय? असा वास्तववादी प्रश्न उपस्थित केला होता. कारण, या

[1] रॉय, टी. (२००६)-इकोनोमिक हिस्ट्री ऑफ इंडिया, १८५७-१९४७, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, नवी दिल्ली, प्रस्तावना

अधिवेशनात उपस्थित असलेले देशाच्या काना-कोपऱ्यातून आलेल्या प्रतिनिधींमधून एकही प्रतिनिधी शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करत नव्हता. अनेक प्रतिनिधी जमीनदार वर्गातून, कोणी मळे मालक होते. ते स्वत:ला शेतकऱ्यांचे प्रतिनिधी मानत असले तरी वास्तविक परिस्थिती अधिवेशन संपल्यावर समोर येत होती. अधिवेशन संपल्यावर ते शेतकऱ्यांचे कैवारी नसत तर ते जमीनदार म्हणून वावरत. शेतकऱ्यांच्या पिळवणूकीची एकही संधी ते सोडत नसत. त्यांच्या शेतावर काम करणाऱ्या कुळांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी कोणतेही प्रयत्न करत नसत. अशी अवस्था काँग्रेस मधील नेत्यांची होती.

ए. ओ. ह्यूम यांचे प्रयत्न:

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे संस्थापक ए. ओ. ह्यूम शेतकऱ्यांचा पाठिंबा मिळवून काँग्रेसचा सामाजिक पाया विस्तारू इच्छित होते. या उद्देशाने त्यांनी काँग्रेसला जनमानसात रुजवण्यासाठी विधायक कार्याचा प्रसार करण्यावर भर दिला. भारतीयांना काँग्रेसच्या कार्याची ओळख करून देणे हे त्यांच्या प्रयत्नांचे मुख्य उद्दिष्ट होते. देशातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ह्यूमने जनजागृतीचे कार्य हाती घेतले.[2] त्यांनी देशभर निधी संकलन करून मदत साहित्याचे वितरण केले आणि जाहीर सभांद्वारे लोकांना संघटित केले. ब्रिटिश सरकार दुष्काळावर प्रभावी उपाययोजना करण्यात अपयशी ठरत असल्याने, ह्यूमने 'सनदशीर आक्रमक' प्रचाराची भूमिका स्वीकारली. यासाठी त्यांनी देशभर, अगदी लहान गावांपर्यंत दौरे केले.[3] परिणामी, ग्रामीण भारतात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची ओळख निर्माण होण्यास मदत झाली.

भारतीय नेत्यांचे प्रयत्न:

काँग्रेसच्या अधिवेशनांमध्ये दादाभाई नौरोजी यांच्या द्रव्य अपहरण या सिद्धांतावर आधारित आर्थिक शोषणावर चर्चा झाली. महसूल कपात, दुष्काळातील सवलती, उपाय आणि करसवलतींवर ठराव घेतले गेले. लोकमान्य टिळकांनी महसूलवाढीविरोधात आवाज उठवला. टिळकांनी १८९६-९७ मध्ये महाराष्ट्रात कर न देण्याची मोहीम सुरू केली.[4] १८९६-९७ दरम्यान मुंबई प्रांतात, विशेषतः महाराष्ट्रात, भयंकर दुष्काळ पडला होता. या दुष्काळामुळे शेतकरी आणि सामान्य जनता त्रस्त होती. सरकारकडून अपेक्षित मदत मिळत नव्हती आणि महसूल सक्तीने वसूल केला जात होता. ब्रिटिश सरकारने महसूल कपात नाकारली आणि 'रिलीफ कोड' लागू केला पण तो प्रभावी ठरला नाही. टिळकांच्या या आंदोलनामुळे ब्रिटिश सरकारला अखेरीस काही सवलती जाहीर कराव्या लागल्या आणि शेतकऱ्यांसाठी मदत उपाययोजना सुरू करावी लागली. या चळवळीमुळे शेतकरी प्रश्न राष्ट्रीय पातळीवर पुढे आला. शेतकऱ्यांसाठी ब्रिटिश सरकारच्या उपाययोजना अपुऱ्या आहेत हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले. या चळवळीचा मुख्य उद्देश ब्रिटिश शासनाच्या असंवेदनशील धोरणांवर प्रकाश टाकणे आणि लोकांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यास प्रवृत्त करणे हा होता. टिळकांना काँग्रेसच्या चळवळीत शेतकरी, कामगार आणि निम्न-मध्यमवर्गीयांना सामील करायचे होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनातील ठराव:

महाराष्ट्रातील अनेक राष्ट्रवादी नेत्यांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात आयोजित वार्षिक अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अधिवेशनातील ठरावात स्थान मिळू

[2] ताराचंद(२००७),- भारतीय स्वतंत्रता आंदोलन का इतिहास, खंड २, प्रकाशन विभाग सूचना व प्रसारण मंत्रालय भारत सरकार, नई दिल्ली, पृष्ठ ५४२.

[3] वेडरबर्न, विल्यम (१९१३) -ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम- फादर ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस-१८२९-१९१२, टी. फिशर अनविन, लंडन, पृष्ठ ६१-६३.

[4] चंद्र, बिपीन (२०१५)- द राईज ॲड ग्रोथ ऑफ इकोनॉमिक नॅशनॅलीझम इन इंडिया, हर आनंद पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ठ २००-२५०. कीर, धनंजय (१९५९) लोकमान्य टिळक, पॉपुलर प्रकाशन. मुंबई, पृष्ठ १०५-११४.

लागले. अनेक प्रश्नांवर चर्चा केली गेली. या ठरावातील समस्यांबाबत सरकारचा उदासीन दृष्टीकोन होता. या ठरावांची दखल सरकार घेत नव्हते हे उघड होते. तरी सुद्धा काँग्रेसच्या अधिवेशनात दरवर्षी याचा पाठपुरावा केला जात. या ठरावाची चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.

१) १८८५ या वर्षी मुंबईतील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापना अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा झाल्याचे दिसत नाही. परंतु ह्युमच्या प्रयत्नाने व संपूर्ण देशात केलेल्या दौऱ्यामुळे महाराष्ट्राबाहेर आयोजित वार्षिक अधिवेशनात भारतीय शेतकऱ्यांच्या दयनीय परीस्थितीवर चर्चा होऊन ठराव करण्यात आले.

२) १८८९ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पाचवे (महाराष्ट्रातील दुसरे) अधिवेशन मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात प्रथमच भारतीय शेतकऱ्यांच्या समस्यांकडे गंभीरपणे लक्ष देण्यात आले. अधिवेशनाचे अध्यक्ष सर विल्यम वेडरबर्न शेतकरी प्रश्नांबाबत सहानुभूती असलेले ब्रिटिश अधिकारी होते. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, वाढते कर्ज आणि दुष्काळाचे संकट यावर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची जाणीव काँग्रेसला करून देण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्यावतीने शेतकरी मोर्च्याचे आयोजन केल्याचा उल्लेख आढळतो. मात्र फुले व अनुयायांनी अधिवेशनात प्रत्यक्ष सहभाग घेतला नाही. अधिवेशनातील ठराव क्रमांक सात जमीन महसूल व्यवस्थेशी संबंधित होता. बैकुंठनाथ सेन, सर ऑकलंड कोल्विन आणि साताऱ्याचे जमीनदार रावसाहेब जनार्दन रघुनाथ निंबकर यांनी सरकारने जमीन महसूलाचे दर पुनर्विचाराधीन घ्यावेत व स्थिर दराने सारा आकारावा, अशी मागणी केली. चर्चेत जमीनदार आणि शेतकरी प्रतिनिधींनी सहभाग घेतला. सरकारच्या महसूल धोरणामुळे उच्च वर्ग अधिक समृद्ध होत असून शेतकरी अधिक गरीब होत असल्याची बाब अधोरेखित करण्यात आली. यासाठी विल्यम हंटर समितीच्या १८८९ च्या अहवालाचा संदर्भ देण्यात आला. थोडक्यात, १८८९ च्या काँग्रेस अधिवेशनात शेतकरी प्रश्नांवर जमीन महसूल आणि दारिद्र्य या आर्थिक मुद्द्यांच्या चौकटीत चर्चा झाली. या चर्चेचा उद्देश प्रशासकीय सुधारणांद्वारे शेतकऱ्यांना दिलासा देणे हा होता.

३) १८९१ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सातवे (महाराष्ट्रातील तिसरे) वार्षिक अधिवेशन नागपूर येथे मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतातील नेत्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले. या अधिवेशनात मांडलेल्या ठरावांपैकी ठराव क्रमांक तीन प्रिंगल केनेडी यांनी सादर केला. या ठरावाद्वारे ब्रिटिश सरकारचे लक्ष भारतातील भीषण दारिद्र्याकडे वेधण्यात आले. सुमारे पाच कोटी जनता दिवसेंदिवस कंगाल होत असून अन्नाअभावी मृत्यू होत असल्याचे नमूद करण्यात आले. या परिस्थितीसाठी चार प्रमुख कारणे अधोरेखित करण्यात आली. अ) भारतीय जनतेला जमाखर्चावर नियंत्रण व राज्यकारभारात योग्य प्रतिनिधित्व नसणे, ब) भारतातील आर्थिक प्रश्नांचे गांभीर्य सरकारला न समजणे, क) जमिनीवरील जुलमी कायद्यांमुळे शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, तसेच लष्करी खात्यावर होणारा अवाढव्य खर्च ही कारणे होती. वायव्य सरहद प्रांताच्या संरक्षणासाठी भारतीय तिजोरीचा वापर करून शेतकऱ्यांच्या उपासमारीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल ब्रिटिश सरकारचा या ठरावातून तीव्र निषेध करण्यात आला. या ठरावात शेतकरी हा देशाचा मूलभूत घटक असूनही त्यांच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तात्पुरत्या महसूल व्यवस्थेमुळे शेतकरी संकटात सापडत असल्याने महसूल धोरणात बदल करण्याची मागणी करण्यात आली. तसेच बंगाल प्रांताच्या धर्तीवर इतर प्रांतांत जमीनदारी पद्धती स्वीकारण्याची विनंती

करण्यात आली. या अधिवेशनात कालीचरण बॅनर्जी यांनी काँग्रेसच्या मागण्या मान्य करून भारतीय जनतेला दिलासा द्यावा, अशी कळकळीची मागणी ब्रिटिश सरकारकडे केली.[5] ठराव क्रमांक अकरा- ब्रिटिशांनी भारतातील जंगलसंपत्तीचे शोषण करण्यासाठी कठोर जंगल कायदे लागू केले होते. या कायद्यांमुळे संपूर्ण भारतातील शेतकरी, आदिवासी व ग्रामीण जनता मोठ्या प्रमाणावर त्रस्त झाली होती. शेतीसाठी लागणारे लाकूड, पशुखाद्य व इतर उपजीविकेची साधने जंगलावर अवलंबून असताना, जंगल प्रवेश व संसाधनांच्या वापरावर सरकारने कडक निर्बंध घातले. परिणामी, जनावरांना चारा मिळेना, शेतकऱ्यांचे नुकसान झाले आणि गरीबांचा पारंपरिक व्यवसाय ठप्प झाला. या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या अधिवेशनात जंगल कायद्यात बदल करण्याची मागणी करण्यात आली. सरकारचे जंगलविषयक धोरण शेतकरी व आदिवासींच्या हिताविरुद्ध असल्याचे अधोरेखित करण्यात आले. कायद्याच्या अंमलबजावणीदरम्यान ब्रिटिश अधिकारी व त्यांचे गुमाश्ते आदिवासी व गरीबांवर अत्याचार करीत असल्याचाही उल्लेख झाला. पॉल पीटर पिल्ले यांनी दक्षिण भारतातील जंगलाशी संबंधित लोकांची दयनीय स्थिती उदाहरणांसह मांडली. या ठरावास सातारचे रघुनाथराव करंदीकर यांनी अनुमोदन दिले. त्यांनी जंगल कायद्यामुळे घरादार गमावलेल्या शेतकऱ्यांची प्रत्यक्ष उदाहरणे सभेपुढे सादर केली. तसेच सर थिओडोर होप यांच्या विधानांचा संदर्भ देत, जंगल कायद्याची अंमलबजावणी मानवी व आर्थिक दृष्ट्या घातक ठरत असल्याचे स्पष्ट केले. जंगलात जनावरांना चरण्यास मनाई केल्यामुळे मोठ्या संखेने पशुधन नष्ट झाले असल्याची आकडेवारी मांडण्यात आली. निजाम सरकारप्रमाणे ब्रिटिश सरकारनेही जंगल चरण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. सालेम जिल्ह्यातील जळाऊ लाकडावरील कर हा प्रत्यक्ष अन्नावर कर बसवल्यासारखा असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. के. बी. मुलीक यांनी कायद्यात सुधारणा सुचविल्या, तर वीर राघव चरीयार यांनी मद्रास इलाख्यात या कायद्याचा महसूलवाढीसाठी दुरुपयोग होत असल्याचे पुराव्यांसह मांडले. एस. बी. भाटे आणि जी. आर. निंबकर यांनीही चर्चेत सहभाग घेतला.[6] थोडक्यात, नागपूर अधिवेशनाने जंगल कायदे व जमीन महसूल यांसारख्या शेतकऱ्यांवर थेट परिणाम करणाऱ्या प्रश्नांना राष्ट्रीय पातळीवर आणले आणि शेतकरीहितासाठी आर्थिक धोरणांमध्ये मूलभूत बदल करण्याची मागणी केली.

४) १८९५ यावर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अकरावे (महाराष्ट्रातील चौथे) वार्षिक अधिवेशन पुणे या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात पुढील ठराव मंजूर करण्यात आले. ठराव क्रमांक दहा आर. एन. मुधोळकर यांनी मांडला. या ठरावात भारतीय शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणास सरकारचे महसूल धोरण, शेतकऱ्यांचे अज्ञान आणि जमीन कसण्याच्या हक्कांवरील निर्बंध यांचा उल्लेख करण्यात आला. उपाय म्हणून महसूल पद्धतीत सुधारणा करणे, शेतकऱ्यांचे कर्जाचे ओझे कमी करणे आणि जमीन खंडाने देण्याची परवानगी देण्याची मागणी करण्यात आली.[7] ज्या भागांत कायमस्वरूपी तोडगा नव्हता, तेथे महसूल संकलनातील कठोरता शिथिल करण्यावर एकमत झाले. ठराव क्रमांक १४ एन. एम. समर्थ यांनी मांडला. या ठरावात जमिनीच्या मुदत व करनिश्चितीबाबत अधिक स्थिरता आवश्यक असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी जमीन धारणेचा

[5] झैदी, ए. मोईन ॲड झैदी, शाहेदा (एडी.) (१९७७)- द एनसायक्लोपीडिया ऑफ इंडियन नॅशनल काँग्रेस, खंड २, १८९१-१८९५, एस. चंद ॲड कंपनी लिमिटेड, नवी दिल्ली, पृष्ठ ६७-६८.

[6] डिटेलड रिपोर्ट ऑफ द सेवंथ इंडिअन नॅशनल काँग्रेस हेल्ड अट नागपूर, ऑन द २८ टू ३० डिसेंबर १८९१, पृष्ठ ५४-६२. बेझंट, ॲनी (१९१५), उपरोक्त, पृष्ठ १३२-१३३.

[7] बेझंट, ॲनी (१९१५), उपरोक्त, पृष्ठ २१८.

कालावधी निश्चित करावा आणि भाटकाच्या हक्कांवरील निर्बंध रद्द करावेत, अशी मागणी करण्यात आली. या उपायांमुळे शेतकरी आपल्या हालाखीच्या परिस्थितीतून बाहेर पडेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती.[8] ठराव क्रमांक अठरा मध्ये ब्रिटिश सरकारने शेतकरी प्रश्नांकडे केलेल्या दुर्लक्षावर टीका करण्यात आली. अमानुष जंगल कायदा रद्द करून मानवतावादी दृष्टिकोनातून नवीन कायदा करण्याची मागणी करण्यात आली.[9] ठराव क्रमांक एकवीस दिनशा वाचा यांनी मांडला. ब्रिटिश सरकारने कापसावरील आयात व उत्पादन शुल्काबाबत तटस्थ भूमिका सोडल्यास भारतीय कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होईल, अशी भूमिका मांडण्यात आली. मुक्त व्यापाराच्या तत्त्वाशी विरोध न करता महसुलासाठी आयात शुल्क आकारण्याच्या धोरणावर सरकारने ठाम राहावे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.[10] या अधिवेशनात महात्मा फुले यांचे एक सहकारी कृष्णाजी पांडुरंग भालेकर यांनी काँग्रेस मंडपासमोर अभिनव पद्धतीने निदर्शन करून काँग्रेसला विरोध केला होता. त्यांनी मंडपासमोर वीस फुटी रोडक्या शेतकऱ्याचा पुतळा उभा केला होता. पुतळ्याच्या हातातील लाल कापडावर सोनेरी अक्षरात लिहिले होते वीस कोटी शेतकरी लोकांपैकी वीस तरी प्रतिनिधी आमची दुरावस्था सांगण्यास राष्ट्रीय सभेस आले आहेत का? अशी भारतीय शेतकऱ्यांची दयनीय अवस्था प्रदर्शित केली होती. या शेतकऱ्यांच्या पुतळ्याच्या मागे सत्यशोधकांनी उभारलेल्या मंडपात काँग्रेस अधिवेशनाच्या काळात ओतूरचे डोंगरे पाटील इत्यादींनी सत्यशोधक सभा घेऊन टीका केल्याचा उल्लेख मिळतो.[11]

५) १८९७ यावर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे तेरावे (महाराष्ट्रातील पाचवे) वार्षिक अधिवेशन अमरावती याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. १८९६–९७ या काळात महाराष्ट्र व मध्य प्रांतात तीव्र दुष्काळ आणि प्लेगची साथ पसरली होती. या पार्श्वभूमीवर अमरावती अधिवेशनात शेतकऱ्यांच्या दुर्दशेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. या अधिवेशनात शेतकरी प्रश्नांवर महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. ठराव क्रमांक सात अंतर्गत संपूर्ण भारतात जमीनदारी पद्धती लागू करण्याची मागणी करण्यात आली. हा ठराव मद्रास येथील जॉन ॲडम यांनी मांडला. ठराव क्रमांक नऊ, दहा आणि सतरा दुष्काळाच्या प्रश्नाशी संबंधित होते. सरकारने दुष्काळ निवारणासाठी आयोग नेमला असला, तरी त्याच्या शिफारशी अंमलात आणल्या नव्हत्या. सरकारला दुष्काळाची मूळ कारणे शोधून पाटबंधारे योजनांना प्राधान्य देण्याची सूचना करण्यात आली. मात्र, सरकारने दुष्काळ निवारणाऐवजी रेल्वे विस्तारावर अधिक भर दिला. चर्चेत असे स्पष्ट करण्यात आले की, देशात धान्याची कमतरता नसून जनतेकडे ते खरेदी करण्याची आर्थिक क्षमता नव्हती. रेल्वे विस्तारामुळे इंग्रजी व्यापाऱ्यांना लाभ झाला; परंतु गरिबांना त्याचा कोणताही फायदा झाला नाही. तसेच वायव्य सरहदीवरील लष्करी खर्च कमी करून तो दुष्काळ निवारणासाठी, विशेषतः पाटबंधारे योजनांसाठी वापरण्याची शिफारस करण्यात आली.[12] थोडक्यात, १८९७ चे अमरावती अधिवेशन काँग्रेसच्या इतिहासातील महत्त्वाचे ठरले, कारण ते थेट दुष्काळ, साथीचे रोग आणि सरकारच्या दडपशाहीच्या पार्श्वभूमीवर आयोजित केले गेले होते. या

[8] रिपोर्ट ऑफ द इलेवंथ इंडियन नॅशनल काँग्रेस, (१८९६), हेल्ड ॲट पुना ऑन द २७ टू ३० डिसेंबर १८९५, आर्या भूषण प्रेस, पुना, पृष्ठ १२८-१३६.

[9] उपाध्याय, हरिभाऊ (संपा) (१९३५)- काँग्रेस का इतिहास (१८८५-१९३५), सस्ता साहित्य मंडळ, नई दिल्ली, पृष्ठ ४३, सुतार, अ. मा. (१८८६)- एकोणीसाव्या शतकातील राष्ट्रीय काँग्रेस, उषा सुतार, इचलकरंजी, पृष्ठ ५९-६०.

[10] कित्ता, पृष्ठ १५७-१६०.

[11] मौज, दिवाळी अंक, १९७९, फडके, यशवंत दिनकर.- दुसरे पर्व, पृष्ठ ९३-९४.

[12] सुतार,अ. मा. (१९८६)- उपरोक्त, पृष्ठ ४९-५०.

अधिवेशनाने शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सामान्य जनतेचे दुःख हे राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आणले.

६) १९०४ यावर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे विसावे (महाराष्ट्रातील सहावे) वार्षिक अधिवेशन मुंबई याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पुढीलप्रमाणे ठराव मांडण्यात आले होते- ठराव क्रमांक चार – मुंबई येथील एच. एस. दीक्षित यांनी शेतकऱ्यांच्या वाढत्या कर्जबाजारीपणावर ठराव मांडला. देशातील शेतकरी वर्गाची गंभीर आर्थिक अवस्था लक्षात घेऊन दुष्काळ कमिशन (लंडन) यांच्या सूचनांना पाठिंबा देण्यात आला. तसेच भारतातील विविध भागांतील निवडक गावांच्या परिस्थितीची सरकारने सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली.[13] ठराव क्रमांक आठ – गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारतीयांच्या दयनीय आर्थिक स्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या तिजोरीतील शिल्लक रकमेचे विश्लेषण केले. त्या वेळी तिजोरीत सुमारे ३० कोटी रुपयांची शिल्लक होती. ही रक्कम मिठावरील कर कमी करणे, देशी कापड व सुतावरील जकात रद्द करणे आणि दुष्काळकाळात शेतसारा माफ करण्यासाठी वापरावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच या शिलकेचा उपयोग वैद्यकीय, कृषी व औद्योगिक शिक्षणासाठी करावा, असा आग्रह धरला.[14] थोडक्यात, १९०४ च्या मुंबई अधिवेशनाने हे सिद्ध केले की, काँग्रेस राजकीय आणि घटनात्मक सुधारणांवर लक्ष केंद्रित करत असली तरी, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या, विशेषतः कर्ज आणि जाचक महसूल प्रणाली, हे राष्ट्रीय स्तरावरचे महत्त्वाचे मुद्दे होते.

७) १९१५ यावर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे तिसावे (महाराष्ट्रातील सातवे) वार्षिक अधिवेशन मुंबई याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात पुढील ठराव मांडण्यात आले- अ) ठराव क्रमांक वीस : चिदंबरनाथ मुदलियार (मद्रास) यांनी शेतसाऱ्याशी संबंधित जमीनदारी व्यवस्थेबाबतचा ठराव पुन्हा मांडला. या ठरावात शेतसाऱ्यावर वाजवी व निश्चित मर्यादा घालण्याची मागणी करण्यात आली. रयतवारी व जमीनदारी अशा सर्व भागांत कायमस्वरूपी महसूल व्यवस्था लागू करावी, आणि जिथे ती अस्तित्वात नाही तिथे सुरू करावी, अशी मागणी होती. सरकारला कायमस्वरूपी व्यवस्था लागू करणे शक्य नसेल, तर साठ वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी ती अंमलात आणावी, असे सुचवण्यात आले. तसेच रॉयल कमिशनच्या शिफारशी लागू कराव्यात, जमीन महसूल मूल्यांकनाची सामान्य तत्त्वे प्रांतीय कायद्यात समाविष्ट करावीत आणि त्या कायद्याद्वारे मूल्यांकन वाढीवर मर्यादा निश्चित कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. या ठरावाला रायबहादूर हिरानंद खेमसिंग (हैद्राबाद–सिंध) यांनी अनुमोदन दिले, तर रायसाहेब लक्ष्मी नारायण (कामठी–मध्यप्रांत) यांनी पाठिंबा दिला. हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.[15]

८) १९२० यावर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पस्तीसवे (महाराष्ट्रातील आठवे) वार्षिक अधिवेशन नागपूर याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पुढीलप्रमाणे ठराव मांडण्यात आले होते. ठराव क्रमांक नऊ- पुणे येथील न. चि. केळकर यांनी भूमी संपादनाच्या कायद्याबाबत हरकती व नापसंती दर्शविणारा ठराव मांडला. भूसंपादन कायद्याखाली ज्यांच्या जमिनी सरकार काही भांडवलवाल्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी ताब्यात घेत होते. त्या शेतकऱ्यांना तसेच

[13] झैदी, ए. मोईन आणि झैदी, शहेदा (संपा.) (१९६०)- द एन्सायक्लोपीडिया ऑफ इंडियन नॅशनल काँग्रेस, खंड-४, १९०१-१९०५, ऑन रोड टू सेल्फ-गव्हर्नमेंट, उपरोक्त, पृष्ठ ६३२.

[14] अभ्यंकर, गणेश रघुनाथ (१९१५)- राष्ट्रीय सभा- तिची उत्पत्ती व वाढ, प्रका.- अनंत विनायक पटवर्धन, आर्यभूषण छापखाना, पुणे, पृष्ठ-८७. वऱ्हाड समाचार, खंड-३९, अकोला, सोमवार, २ जानेवारी, १९०५, अंक- २, पृष्ठ ६.

[15] रिपोर्ट ऑफ द प्रोसेडिंग ऑफ द थर्टी इंडियन नॅशनल काँग्रेस, हेल्ड ॲट बॉम्बे ऑन द २७ टू २९ डिसेंबर १९१५, पब्लिश बाय जनरल सेक्रेटरी, रीशेपशन कमेटी नागपूर, (१९१६), पृष्ठ १३८-१४३.

आपल्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या कारखान्यातील मजुरांना काँग्रेसने पाठींबा जाहीर केला होता.[16]

९) १९३४ यावर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अठ्ठेचाळीसवे (महाराष्ट्रातील नववे) अधिवेशन मुंबई याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पुढीलप्रमाणे ठराव मांडण्यात आले होते. ठराव क्रमांक सहावा- भारतातील ग्राम उद्योग व चरखा उद्योगाचे पुनर्जीवन करण्यासाठी महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार ठराव मांडण्यात आला होता. गावात अस्तित्वात असलेल्या उद्योगांना योग्य प्रोत्साहन देऊन खेड्या-पाड्यांना, गावांना स्वयंपूर्ण बनविणे हा होता. अशा संघटना सुरू करण्यामागे महात्माजींचा एकमात्र हेतू म्हणजे योग्य संघटना आणि पाठिंब्याअभावी उद्ध्वस्त होत चाललेल्या खेड्यातील आर्थिक जीवनाचे पुन:रुज्जीवन करणे होते.

१०) १९३६ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पन्नासवे (महाराष्ट्रातील दहावे) अधिवेशन फैजपूर येथे आयोजित करण्यात आले. हे अधिवेशन ग्रामीण भागात आयोजनाचा पहिलाच प्रयोग होता. यापूर्वी काँग्रेसचे कार्य व अधिवेशने प्रामुख्याने शहरांपुरती मर्यादित होती. ग्रामीण भागात काँग्रेसचे नाव पोहोचले असले, तरी संघटनात्मक कार्य शहरात केंद्रित होते. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या स्वरूपात मूलभूत बदल घडून आला. चंपारण, खेडा, बारडोली सत्याग्रह, असहकार चळवळ, दांडी यात्रा आणि सविनय कायदेभंगामुळे ग्रामीण जनता स्वातंत्र्य चळवळीकडे आकृष्ट झाली. गांधीजींनी विधायक कार्यक्रमांद्वारे खेड्यापाड्यातील सामान्य शेतकऱ्यांना चळवळीत सहभागी करून घेतले. फैजपूर अधिवेशनाच्या तयारीसाठी धनाजी नाना चौधरी, सीतारामभाऊ चौधरी, लोढूभाऊ फेगडे आणि साने गुरुजी यांनी खानदेश ते खांडवा परिसरातील खेड्यांत पायी दौरे केले. या माध्यमातून निरक्षर व गरीब शेतकऱ्यांपर्यंत काँग्रेसचा संदेश पोहोचवण्यात यश आले. अधिवेशनकाळात पु. ह. पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली ७००-८०० स्वयंसेवकांचे दल कार्यरत होते. महाराष्ट्रातील राष्ट्रसेवादलाची पहिली उभारणी फैजपूर येथेच झाली.[17] पूर्व खानदेशात शेतकऱ्यांचे अधिवेशन घडवावे या उद्देशाने सुकाभाऊ चौधरी यांनी स्त्री-पुरुष शेतकऱ्यांसह पायी प्रचार दौरा केला. या पदयात्रेमुळे ग्रामीण समाजात राजकीय जागृती निर्माण झाली. फैजपूर अधिवेशनासोबतच 'भारतीय किसान सभे'चे अधिवेशनही आयोजित करण्यात आले. अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी कार्यकर्ते भालजी पेंडसे, इंदुलाल याज्ञिक आणि डी. बी. कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी १२ डिसेंबर १९३६ रोजी देवळाली (प्रवरा) येथून पायी फैजपूरकडे निघाले. या पदयात्रेने व्यापक जनजागृती घडवून आणली.[18] या अधिवेशनाच्या आयोजनात शेतकऱ्यांचा अभूतपूर्व सहभाग होता. मोठ्या संख्येने उपस्थित असलेले शेतकरी काँग्रेसशी ग्रामीण भारताचे नाते दृढ होत असल्याचे द्योतक होते.

पंडित नेहरूंनी उल्लेख केल्याप्रमाणे सर्वार्थाने फैजपूरचे चिखलातील अधिवेशन हे काँग्रेसला शेतकऱ्यांकडे वळविणारे आहे. महात्मा गांधींनी शेतकऱ्यांना काँग्रेसमध्ये आणले आणि यापुढे शेतकऱ्यांचा ठसा उमटवणारे फैजपूरचे अधिवेशन ग्रामीण भागात काँग्रेसचा संदेश नेण्यास उपयुक्त ठरणार आहे. काळाची गरज फैजपुरने काँग्रेस समोर मांडली आहे असे मत

[16] केळकर, न. चिं. (१९३८)- समग्र केळकर वाड्मय ५, (असहकारिता खंड), मनोहर म. केळकर, पुणे, पृष्ठ ९५, फडके, यशवंत दिनकर (२०१३)- विसाव्या शतकातील महाराष्ट्र, १९१४ ते १९२०, खंड-२, केसागर पब्लीकेशन, शनिवार पेठ, पुणे, पृष्ठ १९०.

[17] जोशी, एस. एम. (१९८४)- मी. एस. एम., पुणे, पृष्ठ ८६.

[18] भारत, अंक ४, २२ डिसेंबर १९३६.

मांडले.[19] विषय नियम समितीमध्ये बाबू राजेंद्र प्रसाद यांनी शेतीविषयक पाचवा ठराव मांडला. त्यांनी शेती प्रश्नाची गुंतागुंत अधोरेखित करत सखोल अभ्यासाची आवश्यकता व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या समस्यांवर समाधानकारक उपाय होईपर्यंत काँग्रेस समाधानी राहणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. ठराव क्रमांक अठरा कृषी सुधारणा कार्यक्रमाशी संबंधित होता. ब्रिटिश राजवटीत शोषणावर आधारित कृषी व्यवस्था सुधारता येणार नाही, असे ठरावात नमूद करण्यात आले. नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, कर्जबाजारीपणा आणि बेकारीमुळे शेतकऱ्यांचे जीवन अधिक कष्टमय झाले होते. या पार्श्वभूमीवर तातडीच्या उपाययोजनांची गरज अधोरेखित करण्यात आली. काकासाहेब गाडगीळ यांनी कृषी सुधारणा ठराव मांडला. त्यामध्ये महसूल कपात, अयोग्य जमिनीवरील करमाफी, उत्पन्नानुसार आयकर, सिंचन दरात कपात, वेठबिगारी व सरंजामशाहीचे उच्चाटन, कुळांना हक्क, सहकारी शेती, कर्जमाफी, सामूहिक संसाधनांवरील हक्क, जबरदस्तीची हकालपट्टी थांबवणे, शेतमजुरांसाठी किमान वेतन आणि शेतकरी संघटनांना मान्यता[20] अशा मागण्यांचा समावेश होता. हा ठराव महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीच्या शेतकी समितीच्या अहवालावर आधारित होता. मात्र, त्यामध्ये खोती पद्धतीचा उल्लेख करण्यात आलेला नव्हता. फैजपूर अधिवेशन हे काँग्रेसने शेतकऱ्यांच्या मागण्यांना केवळ ठराव म्हणून न ठेवता, त्याला राजकीय आणि सामाजिक कृतीचा कार्यक्रम म्हणून स्वीकारल्याचे प्रतीक होते. या अधिवेशनामुळे काँग्रेस आणि किसान सभा यांच्यातील संबंध दृढ झाले आणि आगामी काळात प्रांतिक सरकार स्थापन झाल्यावर या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे काँग्रेससाठी आवश्यक बनले.

निष्कर्ष:

ब्रिटिश वसाहतवादी राजवटीत राबविण्यात आलेल्या कृषी धोरणांनी भारतीय शेतकरी वर्गाच्या पारंपरिक आर्थिक व सामाजिक रचनेवर गंभीर आघात केला. व्यापारीकरणावर आधारित शेती व्यवस्था, जाचक जमीन महसूल पद्धती, जंगल कायदे, तसेच दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती यांमुळे शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारी, भूमिहीन आणि असुरक्षित झाला. परिणामी, शेतकरी प्रश्न केवळ आर्थिक मर्यादेत न राहता, भारतीय समाजरचनेचा आणि राजकीय संघर्षाचा अविभाज्य भाग बनला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ही शेतकरी प्रश्नांच्या दृष्टीने आशादायी घटना ठरली असली, तरी सुरुवातीच्या टप्प्यात काँग्रेसने शेतकरी वर्गाचे थेट प्रतिनिधित्व केले, असे म्हणता येत नाही. काँग्रेसचे नेतृत्व प्रामुख्याने शहरी, शिक्षित आणि मध्यमवर्गीय असल्याने घटनात्मक सुधारणा आणि राजकीय हक्क यांवर भर देण्यात आला. तथापि, ग्रामीण भागातील वाढता असंतोष, वारंवार उद्भवणारे दुष्काळ, महसूलवाढ आणि शेतकरी उठाव यांमुळे काँग्रेसला शेतकरी प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे अशक्य झाले. या प्रक्रियेत महाराष्ट्रात आयोजित झालेल्या काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या अधिवेशनांतील ठरावांमधून जमीन महसूल व्यवस्थेतील अन्याय, कर्जबाजारीपणा, जंगल कायद्यांचे दुष्परिणाम, दुष्काळ निवारणातील सरकारी अपयश आणि कृषी सुधारणा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर सातत्याने चर्चा झाली. जरी ब्रिटिश सरकारने या ठरावांची अंमलबजावणी करण्यास फारसा प्रतिसाद दिला नाही, तरी या ठरावांनी

[19] भारतीय राष्ट्रीय महासभा के ५० वां अधिवेशन फैजपुर, दिसम्बर १९३६ का अहवाल, प्रकाशक प्रधानमंत्री अखिल भारतीय महासभा समिति अलाहबाद, पृष्ठ ३६-३७.

[20] भारतीय राष्ट्रीय महासभा के ५० वां अधिवेशन फैजपुर, दिसम्बर १९३६ का अहवाल, उपरोक्त, पृष्ठ ६४-६६. सरकार, सुमित (२००९)- आधुनिक भारत १८८५-१९४७, उपरोक्त, पृष्ठ ३६८.

शेतकरी प्रश्नांना राष्ट्रीय राजकारणात दृश्यमान केले. विशेषतः लोकमान्य टिळकांच्या कर न भरण्याच्या चळवळीने आणि गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या आर्थिक विश्लेषणाने शेतकरी प्रश्नांना वैचारिक अधिष्ठान मिळाले.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या कार्यपद्धतीत मूलभूत बदल झाला. चंपारण, खेडा आणि बारडोलीसारख्या सत्याग्रहांमुळे शेतकरी वर्ग थेट स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाला. गांधीजींच्या विधायक कार्यक्रमांनी ग्रामीण समाजातील शेतकरी, शेतमजूर आणि कारागीर यांना संघटित करून राष्ट्रीय चळवळीचा सामाजिक पाया विस्तारला. या परिवर्तनाचा कळस म्हणजे १९३६ चे फैजपूर अधिवेशन होय. ग्रामीण भागात आयोजित हे अधिवेशन केवळ प्रतीकात्मक नसून, काँग्रेसने शेतकरी प्रश्नांना ठरावांपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना व्यापक राजकीय व सामाजिक कार्यक्रमाचा भाग बनविल्याचे स्पष्ट संकेत देणारे होते.

फैजपूर अधिवेशनात मांडण्यात आलेल्या कृषी सुधारणा, कर्जमाफी, महसूल कपात, सहकारी शेती, शेतमजुरांचे हक्क आणि शेतकरी संघटनांना मान्यता यांसारख्या मागण्यांमुळे काँग्रेसची शेतकरीविषयक भूमिका अधिक स्पष्ट व कार्यक्रमाधिष्ठित झाली. यामुळे काँग्रेस आणि किसान सभा यांच्यातील संबंध दृढ झाले आणि स्वातंत्र्योत्तर काळातील कृषी धोरणांसाठी वैचारिक अधिष्ठान निर्माण झाले.

एकूणच, महाराष्ट्रातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांचा अभ्यास हा भारतीय राष्ट्रवादाच्या सामाजिक विस्ताराची प्रक्रिया समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. या अधिवेशनांनी शेतकरी वर्गाला संपूर्णपणे नेतृत्व दिले नसले, तरी त्यांना राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आणण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर भारतातील कृषी सुधारणा, शेतकरी चळवळी आणि ग्रामीण राजकारणाचा अभ्यास करताना या अधिवेशनांचा संदर्भ अपरिहार्य ठरतो.

संदर्भग्रंथ सूची:-

- **प्राथमिक साधने**

१. डिटेलड रिपोर्ट ऑफ द सेवंथ इंडिअन नॅशनल काँग्रेस हेल्ड अट नागपूर, ऑन द २८ टू ३० डिसेंबर १८९१.

२. भारतीय राष्ट्रीय महासभा के ५० वां अधिवेशन फैजपुर, दिसम्बर १९३६ का अहवाल, प्रकाशक प्रधानमंत्री अखिल भारतीय महासभा समिति अलाहाबाद.

३. रिपोर्ट ऑफ द इलेवंथ इंडियन नॅशनल काँग्रेस, (१८९६), हेल्ड ॲट पुना ऑन द २७ टू ३० डिसेंबर १८९५, आर्या भूषण प्रेस, पुना.

४. रिपोर्ट ऑफ द प्रोसेडिंग ऑफ द थर्टी इंडियन नॅशनल काँग्रेस, हेल्ड ॲट बॉम्बे ऑन द २७ टू २९ डिसेंबर १९१५, पब्लिश बाय जनरल सेक्रेटरी, रीशेपशन कमेटी नागपूर.

- **दुय्यम साधने**

१. अभ्यंकर, गणेश रघुनाथ (१९१५)- राष्ट्रीय सभा- तिची उत्पत्ती व वाढ, प्रका.- अनंत विनायक पटवर्धन, आर्यभूषण छापखाना, पुणे.

२. उपाध्याय, हरिभाऊ (संपा) (१९३५)- काँग्रेस का इतिहास (१८८५-१९३५), सस्ता साहित्य मंडळ, नई दिल्ली.

३. कीर, धनंजय (१९५९) लोकमान्य टिळक, पॉपुलर प्रकाशन. मुंबई.

४. केळकर, न. चिं. (१९३८)- समग्र केळकर वाड्मय ५, (असहकारिता खंड), मनोहर म. केळकर, पुणे.

५. चंद्र, बिपीन (२०१५)- द राईज अॅड ग्रोथ ऑफ इकोनॉमिक नॅशनॅलीझम इन इंडिया, हर आनंद पब्लिकेशन, नवी दिल्ली.

६. जोशी, एस. एम. (१९८४)- मी. एस. एम., पुणे.

७. झैदी, ए. मोईन अॅड झैदी, शाहेदा (एडी.) (१९७७)- द एनसायक्लोपीडिया ऑफ इंडियन नॅशनल काँग्रेस, खंड २, १८९१-१८९५, एस. चंद अॅड कंपनी लिमिटेड, नवी दिल्ली.

८. ताराचंद (२००७)- भारतीय स्वतंत्रता आंदोलन का इतिहास, खंड २, प्रकाशन विभाग सूचना व प्रसारण मंत्रालय भारत सरकार, नई दिल्ली.

९. फडके, यशवंत दिनकर (२०१३)- विसाव्या शतकातील महाराष्ट्र, १९१४ ते १९२०, खंड-२, केसागर पब्लीकेशन, शनिवार पेठ, पुणे.

१०. बेझंट, ॲनी (१९१५)- हाऊ इंडिया रॉट फॉर फ्रीडम, थिओसॉफिकल पब्लिशिंग हाऊस, अड्यार.

११. रॉय, टी. (२००६)-इकोनोमिक हिस्ट्री ऑफ इंडिया, १८५७-१९४७, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, नवी दिल्ली.

१२. वेडरबर्न, विल्यम (१९१३)- ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम- फादर ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस-१८२९-१९१२, टी. फिशर अनविन, लंडन.

१३. सरकार, सुमित (२००९)- आधुनिक भारत: १८८५-१९४७, राज कमल प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, नवी दिल्ली.

१४. सुतार, अ. मा. (१८८६)- एकोणीसाव्या शतकातील राष्ट्रीय काँग्रेस, उषा सुतार इचलकरंजी.

- **वृत्तपत्रे/मासिके**

१. भारत, अंक ४, १९३६.

२. मौज, दिवाळी अंक, १९७९. मुंबई.

३. वऱ्हाड समाचार, खंड-३९, अकोला.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासामध्ये बाळासाहेब देसाई यांचे योगदान

प्रा. डॉ. सदाशिव मच्छिंद्र मोरे

इतिहास विभाग प्रमुख

श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय,आटपाडी, ता. आटपाडी जि. सांगली

Corresponding Author - प्रा. डॉ. सदाशिव मच्छिंद्र मोरे

DOI - 10.5281/zenodo.19723100

प्रस्तावना:

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध मान्यवरांनी आपले जीवन व्यतीत केले आहे. त्यामध्ये स्व. यशवंतराव चव्हाण, मा. स्व. वसंतराव दादा पाटील आणि लोकनेते बाळासाहेब उर्फ दौलतराव देसाई यांचे कार्य महत्वपूर्ण मानले जाते. बाळासाहेब देसाई हे एक राजकारणी आणि समाज सुधारक होते. त्यानी महाराष्ट्राच्या विकासामध्ये महत्वपुर्ण योगदान दिले आहे. महाराष्ट्राचे नेतृत्व नामवंत व्यक्तींनी केले, त्यामध्ये बाळासाहेब देसाई यांचे योगदान महत्वाचे आहे.[1]

जन्म व बालपण:

दौलतराव उर्फ बाळासाहेब देसाई यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील विहे ता. पाटण या त्यांच्या आजोळी एका सर्वसामान्य कुटुंबामध्ये श्रीपतराव देसाई आणि धरुबाई यांच्या पोटी 10 मार्च 1910 रोजी झाला. दौलतराव दीड वर्षाचे असताना त्यांच्या आईचा मृत्यू झाला. वडिलांची परिस्थिती हालाखीची असल्यामुळे त्यांनी आपले शिक्षण कोल्हापूर येथील प्रिन्स शिवाजी वस्तीगृहामध्ये राहून पूर्ण केले. सुरुवातीचे शिक्षण पाटण, कराड आणि पुढील शिक्षण कोल्हापूर या ठिकाणी झाले. इ.स. 1937 मध्ये कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. त्यासाठी त्यांनी श्रीमंत आप्पासाहेब कागलकर चीफ ऑफ ज्युनिअर यांच्या मुलांना इंग्रजी शिकवून मिळालेले फी आणि मरळी येथील मुख्याध्यापक आकाराम तुकाराम पोळ यांनी केलेल्या पैशांची मदत झाली.[2] कायद्याचे शिक्षण पूर्ण झाल्यानतर इ. स. 1937 मध्ये बाळासाहेब यांचा विवाह बेनाडी ता. निपाणी जि बेळगाव येथील बाजीराव अर्जुनराव पाटील यांची कन्या बनूताई याच्याशी झाला. [3]

शैक्षणिक कार्य:

बाळासाहेब देसाई यांनी इसवी सन 1937 ते इसवी सन 1940 या दरम्यान सातारा या ठिकाणी आपला वकीलचा व्यवसाय केला तत्पूर्वी त्यांनी सातारा येथील सप्लाय ऑफिसर आणि कोल्हापुर मधील ऑफिसरची नोकरी नाकारली होती.[4] सातारा येथे आपला वकिलीचा व्यवसाय करत असताना त्यांना अनेक सामाजिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रामध्ये अडचणी आल्या त्यावर त्यांनी मात करण्याचा प्रयत्न केला. तीन वर्षे वकिलीचा व्यवसाय केल्यानंतर त्यांनी सातारा हे आपले कार्यक्षेत्र निवडले आणि त्यामध्ये येथील जनतेला येणाऱ्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला. अखेर 1939 मध्ये ते सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे सभासद झाले, त्यानंतर इसवी सन 1941 मध्ये जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाले आणि खऱ्या अर्थाने

येथूनच त्यांच्या समाजकार्यास सुरुवात झाली. जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाल्यानंतर ते सर्वप्रथम शिक्षणाच्या विकासासाठी प्रयत्नशील राहिले.[5] बाळासाहेब देसाईंनी आपले कार्य नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केले होते जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष असताना त्यांनी जिल्हयातील विविध क्षेत्रातील कामे, शिक्षण, आरोग्य आणि दळणवळण सुधारण्यासाठी रस्त्यांची व्यवस्था केली. आरोग्य खात्याच्या माध्यमातून जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली.[6] सरकारी मंजुरी येईल या आशेवर चालणाऱ्या 55 शाळा बंद करून 388 शिक्षकाना एप्रिल 1941 पासून कमी करण्याचा निर्णय अगोदरच्या शासनाने घेतला होता. परंतु त्या शाळा बंद न करता चालू ठेवण्याचा निर्णय बाळासाहेबांनी घेतला. त्यासाठी तत्कालीन मुंबई इलाख्याचे गव्हर्नर रॉजर्स ल्यांबले साहेब यांच्याबरोबर चर्चा करून 388 शिक्षकांच्या वेतनावरील अनुदान मंजूर करून घेतले आणि त्यांना सेवेमध्ये कायम करून घेतले.

सक्तीचे शिक्षण:

बाळासाहेब देसाईंनी शिक्षणाच्या प्रसारासाठी विविध योजना राबविल्या त्यापैकी एक म्हणजे सक्तीचे शिक्षण हे होय. यामुळे समाजातील शेतकरी, गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षण घेता आले. या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या ५८ हजारांनी वाढली. शाळा संख्या 300 ने वाढली तर 1530 शिक्षकांची भरती केली.[7]

ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण व वसतिगृहांची निर्मिती:

खेड्यातील सर्व सामान्यांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे, असे बाळासाहेबांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी ग्रामीण भागामध्ये प्राथमिक शिक्षणाबरोबर वसतिगृहांचीही निर्मिती केली. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणाकडे वळू लागले. त्यासाठी त्यांनी इ. सन 1951-1952 पासून या वस्तीगृहामध्ये 25 विद्यार्थ्यांची सोय होईल अशी व्यवस्था केली. अशा प्रकारची वस्तीगृहे विविध ठिकाणी उभारण्यात आली. त्यामध्ये पाटण, पुसेसावळी, दहिवडी, पुसेगाव, कोरेगाव यांचा समावेश होता. त्यानंतर बाळासाहेबांनी गावोगावी शाळा बांधण्याचे कार्य सुरु केले. त्यासाठी जिल्हा स्कूल बोर्डाच्या फंडातून 70 हजार रुपये खर्च करून मालदन, आरळे, आशापुर, कवठे, भुईंज, दहिवडी, खानापूर, काळगाव, न्हावी या ठिकाणी इमारती बांधल्या. तर समिती फंडातून 1,90,181 रुपये खर्च करून येतगाव, विसापूर, कातरखटाव, वाघोली, चिकुर्डे, शिरगाव, पलूस, हिंगणगाव, शेरे, किवळ, बानुगडेवाडी, जांभ, मरळी या ठिकाणी शाळेसाठी इमारती बांधल्या.[8] बाळासाहेब देसाई हे कर्मवीर भाऊराव पाटलांच्या कार्यावर प्रभावीत झाले होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे सुरु केलेल्या छत्रपती शिवाजी कॉलेजच्या इमारतीची पायाभरणी बाळासाहेब देसाईंनी केली. कर्मवीर आण्णांनी विद्यार्थ्यांच्यासाठी ग्रामीण भागामध्ये वस्तीगृह आणि शिक्षण सुरु केले होते. या त्यांच्या कार्यासाठी बाळासाहेब देसाईंनी छत्रपती शिवाजी कॉलेजला प्रत्येक वर्षी पाच हजार रुपये याप्रमाणे दहा वर्षांसाठी निधी मंजूर केला होता. बांधकाम मंत्री असताना बाळासाहेबानी देवापुर ता. माण येथील 100 एकर जमीन व 900 रुपये रोख स्वरूपात संस्थेस देणगी दिली होती. अशाप्रकारे बाळासाहेबांनी सर्वसामान्यांना शिक्षण घेता यावे यासाठी प्रयत्नशील राहिले होते. त्यांनी फक्त रयत शिक्षण संस्थेला मदत केली होती असे नाही, तर रयत शिक्षण संस्थेशिवाय जिजामाता अध्यापिका विद्यालय, कासेगाव शिक्षण प्रसारक मंडळ

आणि स्वामी विवेकानंद संस्थेलाही त्यांनी मदत केली होती.[9]

बाळासाहेब देसाई यांनी महाराष्ट्र राज्याचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून मे 1960 ते मार्च 1962 या कालावधीमध्ये कार्यभार पाहिला 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले, आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून मा. नामदार यशवंतराव चव्हाण यांची नियुक्ती झाली. त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये मा. बाळासाहेब देसाई यांच्याकडे शिक्षणखाते सोपविण्यात आले आणि बाळासाहेब देसाई हे महाराष्ट्र राज्याचे पहिले शिक्षणमंत्री झाले. बाळासाहेबांनी शिक्षण विषयक महत्वपूर्ण निर्णय घेऊन सर्वसामान्यांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली. त्यामध्ये त्यांनी विविध योजना राबवून सर्वसामान्यांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले.

1. बाराशे रुपये उत्पन्नाच्या आतील पालकांच्या मुलांना मोफत शिक्षण E.B.C. ची सवलत
2. तांत्रिक शिक्षणास प्रोत्साहन
3. ग्रामीण भागात शिक्षणाच्या प्रसारासाठी शाळांची संख्या वाढवली.
4. लष्करी शिक्षणास प्राधान्य, एन.सी.सी. कोर्स सक्तीचा केला
5. सातारा या ठिकाणी सैनिक स्कूलची स्थापना
6. पब्लिक स्कूल ची संकल्पना
7. शिवाजी विद्यापीठाची स्थापना.

सर्वसामान्य व्यक्तीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे महत्वपूर्ण कार्य बाळासाहेब देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ स्थापनेमध्ये बाळासाहेब देसाई यांचे योगदान:

बाळासाहेब देसाई शिक्षण मंत्री असताना त्यांच्या कार्यकाळामध्ये घडलेली एक महत्वपूर्ण घटना म्हणजे शिवाजी विद्यापीठाची स्थापना होय. कोल्हापूर या ठिकाणी स्वतंत्र विद्यापीठ व्हावे ही डॉक्टर बाळकृष्ण यांची इच्छा होती. परंतु त्यांच्या निधनानंतर स्वतंत्र विद्यापीठाची मागणी प्रलंबित राहिली, परंतु पुढील काळामध्ये बाळासाहेब देसाई शिक्षणमंत्री झाल्यावर स्वतंत्र विद्यापीठाच्या मागणीचा पाठपुरावा करत कोल्हापूरमध्ये शिवाजी महाराजांच्या नावे विद्यापीठ व्हावे. अशी त्यांची इच्छा होती कारण कोल्हापूरला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. शिवाय कोल्हापूरच्या छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर येथे शैक्षणिक क्रांती घडवून आणली होती अशा ठिकाणी बाळासाहेबांचे शिक्षण पूर्ण झाले होते. एकंदरीत बाळासाहेबांना घडविण्यामध्ये कोल्हापूरचा एक महत्वाचा वाटा होता आणि या ऋणातून मुक्त होण्यासाठी कोल्हापूरमध्ये स्वतंत्र विद्यापीठ निर्माण केले. विद्यापीठाच्या स्थापनेमध्ये बाळासाहेबांचा सिंहाचा वाटा होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अखेर 18 नोव्हेंबर 1962 रोजी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते उद्घाटन झाले आणि शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणून डॉक्टर आप्पासाहेब पवार यांची 11 सप्टेंबर 1962 रोजी नियुक्ती केली आणि 8 ऑक्टोबर 1962 रोजी विद्यापीठाच्या कार्यालय कामकाजास सुरुवात झाली. अशाप्रकारे सर्वसामान्यांच्या उच्च शिक्षणासाठीची अडचण नाहीशी झाली. अशा या लोकनेत्याचा मुंबई या ठिकाणी २४ एप्रिल 1983 रोजी मृत्यू झाला.[10]

निष्कर्ष:

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध व्यक्तींनी आपले जीवन व्यातीत केले. त्यापैकी बाळासाहेब देसाई हे एक होते. त्यांनी साताऱ्यामध्ये वकिलीचा व्यवसाय करत असताना सामाजिक व समाजातील विविध समस्या व

अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला. एकूणच त्यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात या ठिकाणी झालेली दिसते. 1941 मध्ये जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष असताना समाजाच्या विकासाबरोबर शिक्षणाकडेही त्यांनी लक्ष दिले होते. जिल्हा लोकल बोर्डाच्या माध्यमातून त्यांनी 55 शाळा व 388 शिक्षकांचा प्रश्न सोडविला. त्यानंतर त्यांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अमलात आणली. अशी योजना अमलात आणणारे सातारा जिल्हा लोकल बोर्ड हे मुंबई प्रांतातील एकमेव आणि पहिले बोर्ड होते. याशिवाय द्विभाषिक मुंबई राज्यात यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळामध्ये बाळासाहेब देसाई हे बांधकाम मंत्री असताना त्यांनी महाराष्ट्र आणि गुजरात राज्यासाठी अर्थसंकल्पात रस्त्यांच्या खर्चासाठी दिलेल्या निधीबाबत त्यांनी महाराष्ट्रावर होणारा अन्याय पुराव्यानिशी मांडला आणि महाराष्ट्रातील रस्त्यांसाठी 14 कोटी रुपये निधी मंजूर करून घेतला. यावरून त्यांचे महाराष्ट्र विषयी असणारे मत आत्मीयता दिसून येते. त्या निधीतून मुंबई गोवा हमरस्ता ,भुईबावडा घाट रस्ता, पुल,कालवे खेड्यातील रस्ते यांची कामे केली.

महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री असताना त्यांनी आपल्या कार्यकाळात विविध क्रांतिकारी निर्णय घेतले, त्यापैकी एक म्हणजे कोल्हापूरमध्ये शिवाजी विद्यापीठाची स्थापना होय. त्यातून सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता आले. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या मागास असणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षण मोफत देण्याची योजना त्यांनी अमलात आणली.जेणेकरून सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी पाठीमागे राहू नये असा त्यांचा हेतू होता. अशा अनेक विविध योजना त्यांनी आपल्या कार्यकाळामध्ये राबवल्या. त्यातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व कृषी क्षेत्रामध्ये विविध योजना आणून समाजाचा विकास घडवून आणला. असे हे बहुआयामी व्यक्तिमत्व आणि त्यांचे कार्य भावी पिढीस मार्गदर्शक ठरेल.

संदर्भ:

१. साप्ताहिक धूमकेतू कोल्हापूर बाळासाहेब देसाई, स्मृती विशेषांक, पृ. क्र . 23

२. थोरात आत्माराम गोपाळराव, लोकनेते बाळासाहेब देसाई जीवन व कार्य 1910 ते 1983, शिवाजी विद्यापीठ
मुद्रणालय कोल्हापूर, प्रथम आवृत्ती 2013, पृ क्र. 19

३. चव्हाण डी.डी. आपला पाटण तालुका आधार जनसेवा सामाजिक संस्था पाटण, प्रथम आवृत्ती 2014, पृ. क्र.62

४. चौगुले एस. एस. आमचे शिक्षण मंत्री माननीय नामदार बाळासाहेब देसाई चौगुले प्रकाशक सांगली, प्रथम आवृत्ती
जून 1961, पृ क्र.46

५. थोरात आत्माराम गोपाळराव, उपरोक्त पृ. क्र.24

६. बहुलेकर वसंत, नोकनायक बाळासाहेब देसाई चौगुले प्रकाशक सांगली, प्रथम आवृती जून 1961, पृ. क.27

७. बहुलेकर वसंत, लोकनायक बाळासाहेब देसाई देसाई फाउंडेशन पाटण, पृ. क्र.106 ते 107

८. सूर्यवंशी के.जी. बहुजन हिताय बहुजन सुखाय कारले प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 1970, पृ. क्र.119

९. कराडे रा कृ. (संपा). संयुक्त महाराष्ट्र प्रथम आवृती इ. सन 1964, पृ. क्र.40

१०. थोरात आत्माराम गोपाळराव, उपरोक्त पृ. क्र.134

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांचा इतिहास

डॉ. महेश एन. गायकवाड

ग्रंथपाल,

सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

Corresponding Author - डॉ. महेश एन. गायकवाड

DOI - 10.5281/zenodo.19723142

सारांश:

भारतातील ग्रंथालय व्यवस्थेचा विकास हा ग्रंथालयांच्या संघटित वाढीचा आणि विकासाचा एक प्रदीर्घ इतिहास आहे. या संशोधन पत्राचा उद्देश भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांच्या इतिहासाचा अभ्यास करून त्यांच्या वाढीचा व विकासाचा सखोल अभ्यास करणे हा आहे.

प्रस्तावना:

वर्तमान समजून घेण्यासाठी भूतकाळ जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत ही जगातील अतिशय प्राचीन संस्कृतींपैकी एक आहे. शैक्षणिक ग्रंथालयांच्या इतिहासावर लेखन करणे हे एक कठीण कार्य आहे, यासाठी साहित्याचा मोठ्या प्रमाणावर शोध घ्यावा लागतो म्हणून या महत्त्वपूर्ण विषयावर केवळ काही मोजक्या तज्ज्ञांनीच लेखन केले आहे. टेक्सास विद्यापीठ (ऑस्टिन) येथील डोनाल्ड जी. डेव्हिस ज्युनियर असे सांगतात की, "भारतीय ग्रंथालय इतिहासावर काही मूलभूत साहित्य उपलब्ध आहे, परंतु त्यामध्ये अनेक असमतोल आणि उणिवा आहेत. संशोधकांची आवड वेगवेगळ्या विषयांमध्ये विभागलेली आहे आणि या क्षेत्रातील संशोधन प्रयत्नांमध्ये ठोस पद्धत किंवा सातत्य दिसून येत नाही." तसेच डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी एप्रिल १९५६ मध्ये रेडिओ भाषणात सांगितले की, भारतातील पहिल्या चार कालखंडांतील (वैदिक, बौद्ध, मध्ययुगीन आणि मुस्लिम) ग्रंथालयांचा इतिहास लिहिणे हे पूर्णपणे ऐतिहासिक संशोधनावर अवलंबून आहे. परंतु असे संशोधन अद्याप झालेले नाही.

भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांनी प्राचीन काळापासून ज्ञानाचा प्रसार करण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय शैक्षणिक ग्रंथालयांचा इतिहास हा प्राचीन काळापासून आधुनिक डिजिटल युगापर्यंत विस्तारलेला आहे. नालंदा आणि तक्षशिला यांसारख्या प्राचीन ज्ञानकेंद्रांतील ग्रंथसंग्रहापासून ते आजच्या डिजिटल ग्रंथालयांपर्यंत या ग्रंथालयांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे. ब्रिटिश काळात पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीचा प्रभाव शैक्षणिक ग्रंथालयांच्या रचना व उद्दिष्टांवर दिसून आला. स्वातंत्र्यानंतर भारतात उच्च शिक्षणाला नव्याने चालना मिळाली आणि त्यामुळे शैक्षणिक ग्रंथालयांचा विस्तार व आधुनिकीकरण झाले. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) स्थापन झाल्यानंतर शैक्षणिक ग्रंथालय विकासाला अधिक प्रमाणबद्ध स्वरूप आणि आवश्यक पाठबळ मिळाले. काळानुसार शैक्षणिक ग्रंथालय सेवा केवळ पुस्तकेपुरत्या मर्यादित न राहता ते

डिजिटल तसेच हायब्रीड स्वरूपात रूपांतरित झाल्या. तंत्रज्ञानामुळे ई-संसाधने, ऑनलाइन माहिती सेवा आणि दूरस्थ प्रवेश सुविधा उपलब्ध झाल्या. जरी पायाभूत सुविधा आणि आर्थिक अडचणी असल्या तरी शैक्षणिक ग्रंथालये आजही शिक्षण, संशोधन आणि नवकल्पनांचे केंद्र म्हणून कार्यरत आहेत. भारतातील बौद्धिक संपदा घडविण्यात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. या अभ्यासाचा उद्देश भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांचा ऐतिहासिक प्रवास मांडणे आणि काळानुसार झालेल्या त्यांच्या परिवर्तनाचा अभ्यास करणे हा आहे.

ग्रंथालयांचा इतिहास लिहिण्यासाठी स्रोत साहित्य:

ग्रंथालयांच्या इतिहासाचे शास्त्रीय लेखन करण्यासाठी उपलब्ध स्रोत सामग्रीचे स्वरूप समजून घेणे आणि ती योग्य प्रकारे वापरण्याची कला जाणून घेणे आवश्यक आहे. शैक्षणिक ग्रंथालयांच्या इतिहास लेखनासाठीचे उपलब्ध असणारे स्रोत हे पाली, संस्कृत, चिनी, अरबी, फारसी आणि युरोपीय भाषांमध्ये उपलब्ध आहेत आणि त्यापैकी बहुतेकांचे इंग्रजीमध्ये भाषांतर करण्यात आले आहे. या नोंदी विविध स्वरूपांत आढळतात, जसे हस्तलिखिते, शिलालेख, ताम्रपट इत्यादी स्रोत मूळ स्वरूपात किंवा परदेशी स्वरूपात उपलब्ध आहेत. यामध्ये तिबेटी, चिनी, मुस्लिम, पोर्तुगीज, इंग्रजी आणि इतर युरोपीय प्रवाशांच्या प्रवासवर्णनांचा मोठा उपयोग होतो. प्रवासवर्णनांबरोबरच अनेक इतिहासकारांचेही यामध्ये मोठे योगदान आहे. यामध्ये हेन्री एम. एलियट, जॉन डॉसन, स्टॅन्ली लेन-पूल, ईश्वरी प्रसाद, आर. सी. मजुमदार, जदुनाथ सरकार, व्ही. डी. महाजन, मोहम्मद जुबैर, जे. एस. शर्मा, एन. एन. लॉ इत्यादींचा समावेश होतो.

प्राचीन भारतातील विद्यापीठ ग्रंथालये:

भारताला प्राचीन काळापासून भारतात ग्रंथालयांची समृद्ध ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे, विशेषतः शैक्षणिक ग्रंथालयांच्या संदर्भात साहित्यिक आणि पुरातत्त्वीय पुराव्यांनुसार इ.स.पू. चौथ्या शतकापासून ते ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकापर्यंत हस्तलिखितांचे लेखन व वाचन ही सामान्य प्रथा होती. यामुळे महत्त्वाच्या शिक्षणसंस्थांमध्ये हस्तलिखित संग्रहाचा विस्तार आणि विकास झाला असावा. प्राचीन भारतातील काही महत्त्वाची विद्यापीठ ग्रंथालये पुढील प्रसिद्ध शिक्षणसंस्थांशी संबंधित होती:

१) तक्षशिला विद्यापीठ:

तक्षशिला विद्यापीठ (इ.स.पू. ७०० ते इ.स. ३००) हे प्राचीन भारतातील एक प्रमुख शिक्षणकेंद्र होते. फा-हियान यांच्या लेखनातून येथे ग्रंथालय अस्तित्वात असल्याचे पुरावे मिळतात. हे विद्यापीठ उत्तर-पश्चिम भारतातील गांधार प्रदेशात बुद्धाच्या काळात स्थापन झाले होते. येथे सुमारे ५०० विद्यार्थी शिक्षण घेत होते, ज्यामध्ये काही परदेशी विद्यार्थी आणि राजकुमारांचाही समावेश होता. तक्षशिलाकडे समृद्ध ग्रंथसंग्रह होता. या विद्यापीठात राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान, वैद्यक, साहित्य, हिंदू धर्म आणि इतर अनेक विषयांवरील ग्रंथ असलेले उत्कृष्ट ग्रंथालय होते. महायान बौद्ध धर्माचे प्रवर्तक आचार्य नागार्जुन यांनी विद्यापीठाच्या इमारतीच्या वरच्या मजल्यावर ग्रंथालय राखले होते, असेही सांगितले जाते.

२) नालंदा विद्यापीठ:

त्या काळातील सर्वात महत्त्वाचे ग्रंथालय म्हणजे बिहारमधील नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय (इ.स. चौथ्या शतकात). नालंदा हे बौद्ध धर्माचे प्रमुख मठ आणि शिक्षणकेंद्र म्हणून प्रसिद्ध झाले. येथील ग्रंथालय एका विशेष इमारतीत होते, ज्याला "धर्मगंज" असे म्हटले जात

असे. या परिसरात तीन भव्य इमारती होत्या, त्या म्हणजे रत्नसागर, रत्नोदधी आणि रत्नरंजक. यापैकी रत्नसागर ही नऊ मजली इमारत होती, जिथे हस्तलिखितांचा मोठा संग्रह आणि प्रज्ञापारमिता सूत्रासारखे दुर्मिळ पवित्र ग्रंथ ठेवले जात होते (कौर, २०२४).

नालंदा ग्रंथालयात तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्रावरील हस्तलिखितांचा समृद्ध संग्रह होता. तसेच येथे व्याकरण, तर्कशास्त्र, साहित्य, वेद, वेदांत, सांख्य दर्शन, धर्मशास्त्रे, पुराणे, खगोलशास्त्र, ज्योतिष आणि वैद्यक यांसारख्या विषयांवरील ग्रंथही उपलब्ध होते. महायान बौद्ध शिक्षणात विशेष प्रावीण्य असलेल्या नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय बाराव्या शतकापर्यंत भरभराटीत होते. मात्र ११९७ ते १२०३ या काळात बख्तियार खिलजीने नालंदावर आक्रमण करून संपूर्ण विद्यापीठाला आग लावली आणि ते ग्रंथालय नष्ट केले.

३) इतर प्रसिद्ध विद्यापीठे:

त्या काळात विक्रमशिला, ओदंतपुरी, सोमपुरी, जग्गदल, मिथिला, वल्लभी, कान्हेरी इत्यादी अनेक महत्त्वाची शैक्षणिक ग्रंथालये अस्तित्वात होती. दक्षिण भारतातही त्या काळात मोठी सांस्कृतिक आणि शैक्षणिक घडामोडी सुरू होत्या. तेथील ग्रंथालय परंपरेला "संगम युग" म्हणून ओळखले जाते (सतीश, २०१४).

मध्ययुगीन भारतातील विद्यापीठ ग्रंथालये:

भारतीय इतिहासातील मध्ययुगीन काळात शैक्षणिक ग्रंथालये अस्तित्वात होती याबाबत फारशी ठोस माहिती उपलब्ध नाही. तथापि, मुस्लिम शासकांनी आपल्या राजवाड्यांतील खासगी ग्रंथालयांना आश्रय दिला होता. या काळातील एक महत्त्वाचा अपवाद म्हणजे बिदर येथील एका महाविद्यालयाशी संबंधित ग्रंथालय. या ग्रंथालयामध्ये विविध विषयांवरील सुमारे ३००० पुस्तके संग्रहित होती. औरंगजेबाने हे ग्रंथालय दिल्ली येथे हलवून आपल्या राजवाड्यातील ग्रंथालयात विलीन केले. या ग्रंथालयाचे काही अवशेष आजही आग्रा येथील राजवाड्यात आढळून येतात. खाली संशोधकाने घेतलेली त्याची काही छायाचित्रे दिली आहेत. मध्ययुगीन काळात मुस्लिम आक्रमणे आणि राजकीय अस्थिरता यामुळे भारतीय शासकांची बलाढ्य साम्राज्ये आणि राज्ये एकामागोमाग एक कोसळली. याचा परिणाम उच्च शिक्षणावर तसेच शैक्षणिक ग्रंथालयांच्या विकासावरही झाला.





आग्रा किल्ल्यातील राजवाड्यातील प्राचीन ग्रंथालयाचे अवशेष
(स्रोत : संशोधकाने घेतलेले छायाचित्र, आग्रा, २०२६)

१७५७–१९४७ या काळातील शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास:

१७५७ ते १९४७ हा काळ भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. हा कालखंड ब्रिटिश राजवटीतील उच्च शिक्षणाच्या विस्ताराशी जोडलेला असून, या काळात अनेक शैक्षणिक संस्थांची स्थापना झाली आणि त्यामुळे ग्रंथालयांचा विकास होण्यास मोठी चालना मिळाली. १७८१ मध्ये कलकत्ता कॉलेज, १७९२ मध्ये बनारस हिंदू कॉलेज आणि १८०० मध्ये फोर्ट विल्यम कॉलेज यांची स्थापना झाली. त्यानंतर १८१३ चा चार्टर कायदा, १८१८ मधील सेरामपूर कॉलेज आणि १८४० मधील प्रेसिडेन्सी कॉलेज यामुळे उच्च शिक्षणाची व्यवस्था अधिक मजबूत झाली. तसेच १८५४ मधील वूड्स डिस्पॅचने आधुनिक शिक्षणाचा प्रसार केला आणि शैक्षणिक ग्रंथालयांच्या विकासाला अप्रत्यक्षपणे आधार मिळाला. १८५७ हे वर्ष उच्च शिक्षणाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे वळण ठरले. याच वर्षी मद्रास विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि कलकत्ता विद्यापीठ या भारतातील पहिल्या आधुनिक विद्यापीठांची स्थापना झाली. या विद्यापीठांमध्ये अध्यापन व संशोधनासाठी व्यवस्थित शैक्षणिक ग्रंथालयांची आवश्यकता निर्माण झाली. या काळात प्लासीची लढाई (१७५७), बक्सरची लढाई (१७६४) आणि १८५७ चा उठाव यांसारख्या ऐतिहासिक घटना घडल्या. या घटनांचा ब्रिटिश सत्तेवर परिणाम झाला आणि शिक्षण धोरणांवरही प्रभाव पडला. त्यामुळे या काळात शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास हा उच्च शिक्षणाच्या विस्ताराशी तसेच राष्ट्रीय व राजकीय घडामोडींशी जोडलेला होता. १८८२ ते १९४७ या काळात उच्च शिक्षण आणि शैक्षणिक ग्रंथालयांच्या विकासासाठी अनेक महत्त्वाच्या शैक्षणिक आयोगांनी आणि कायद्यांनी मोठी भूमिका बजावली. हंटर आयोग (१८८२), रॅले आयोग (१९०२) आणि विद्यापीठ कायदा (१९०४) या उपाययोजनांमुळे भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत सुधारणा घडून आल्या. याच काळात १८८५ मध्ये ए. ओ. ह्यूम यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली आणि १९०५ मध्ये बंगाल विभाजनासारख्या राजकीय घटनांनी राष्ट्रीय चळवळीला गती मिळाली. या घडामोडींचा शिक्षण क्षेत्रावर तसेच शैक्षणिक संस्थांवरही परिणाम झाला. पुढे कलकत्ता विद्यापीठ आयोग (१९१७) आणि माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा (१९१९) यांच्या माध्यमातून विद्यापीठ शिक्षण अधिक संघटित झाले. याच कालखंडात पहिल्या महायुद्धाचे परिणाम, रौलेट कायदा आणि व्हर्नाक्युलर कायदा (१९१४) यांसारख्या घटनांमुळे सामाजिक व राजकीय वातावरण बदलले, ज्याचा परिणाम शिक्षण व्यवस्थेवरही झाला. तसेच भारत सरकार कायदा (१९३५) आणि सार्जंट आयोग अहवाल (१९४४) हे शिक्षण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे टप्पे ठरले. या काळात असहकार आंदोलन (१९२०), सविनय कायदेभंग आंदोलन (१९३०), दुसरे महायुद्ध (१९३९-४५) आणि भारत छोडो आंदोलन (१९४२) यांसारख्या राष्ट्रीय चळवळी सुरू होत्या. या सर्व ऐतिहासिक आणि राजकीय घटनांचा परिणाम भारतातील उच्च शिक्षणाच्या विस्तारावर तसेच विद्यापीठ ग्रंथालयांच्या विकासावरही झाला. त्यामुळे १७५७ ते १९४७ या काळात शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास हा केवळ शिक्षण धोरणांपुरता मर्यादित न राहता राष्ट्रीय चळवळी, राजकीय बदल आणि सामाजिक घडामोडींशीही घट्टपणे जोडलेला होता.

१९४७ नंतर शैक्षणिक ग्रंथालयांचा इतिहास:

१९४७ मध्ये भारतात देशाच्या विविध भागांमध्ये केवळ १७ विद्यापीठ ग्रंथालये होती. तसेच सुमारे ६५० महाविद्यालये आणि काही हजार शाळा अस्तित्वात होत्या. या पार्श्वभूमीवर स्वतंत्र भारताने उच्च शिक्षण आणि विद्यापीठ ग्रंथालयांचा विकास करण्यासाठी १९४८ मध्ये राधाकृष्णन आयोग (विद्यापीठ शिक्षण आयोग) नियुक्त केला व त्यामुळे शैक्षणिक ग्रंथालयांच्या विकासाची खरी सुरुवात झाली. राधाकृष्णन आयोगाने (विद्यापीठ शिक्षण आयोग) भारतातील विद्यापीठ शिक्षण आणि ग्रंथालय व्यवस्थेचा सखोल अभ्यास करून अनेक महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या. आयोगाने विद्यापीठ ग्रंथालयांचे शिक्षणातील महत्त्व स्पष्ट केले तसेच त्या काळातील ग्रंथालयांची असमाधानकारक स्थिती अधोरेखित केली. ग्रंथालय विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा म्हणून आयोगाने प्रत्येक शैक्षणिक संस्थेच्या एकूण बजेटपैकी सुमारे ६.२५% रक्कम ग्रंथालयासाठी राखीव ठेवावी, किंवा प्रति विद्यार्थी ४० रुपये खर्च करावा, अशी शिफारस केली. आयोगाने ग्रंथालयांमध्ये ओपन ॲक्सेस प्रणाली सुरू करणे, ग्रंथालयाचे कामकाजाचे तास वाढवणे, ग्रंथालयाची योग्य संघटना व व्यवस्थापन करणे, प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करणे यावर भर दिला. तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून त्यांना पुस्तके व ग्रंथालयाबद्दल जागरूक करावे, आणि शिक्षकांसाठी पुस्तक खरेदीसाठी स्वतंत्र अनुदान द्यावे, असेही आयोगाने सुचविले. या शिफारसींमुळे स्वातंत्र्यानंतर भारतातील विद्यापीठ ग्रंथालयांच्या विकासाला दिशा मिळाली.

विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) – १९५६:

भारतामध्ये उच्च शिक्षणाचा विकास आणि गुणवत्ता टिकवण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) ची स्थापना १९५६ मध्ये करण्यात आली. विद्यापीठ शिक्षणाचा प्रचार करणे, शिक्षण व संशोधनाची मानके राखणे आणि विद्यापीठांना आवश्यक अनुदान देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांना मार्गदर्शन करणे ही UGC ची प्रमुख उद्दिष्टे आहेत. त्यामुळे भारतातील विद्यापीठे आणि ग्रंथालयांच्या विकासात UGC चे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

UGC ग्रंथालय समिती (रंगनाथन समिती) – १९५७:

१९५७ मध्ये UGC ने रंगनाथन समिती नियुक्त केली. या समितीने विद्यापीठ ग्रंथालयांचा अभ्यास करून अनेक महत्त्वाच्या शिफारसी केल्या. ग्रंथालयासाठी स्वतंत्र निधी ठेवावा, पुस्तकांची निवड व खरेदी योग्य पद्धतीने करावी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय वाढवावी, असे समितीने सुचविले. तसेच युनियन कॅटलॉग, ओपन ॲक्सेस प्रणाली, संदर्भ सेवा, छायाप्रत सुविधा, पुस्तकांची देखभाल, दस्तऐवजीकरण आणि प्रशिक्षित कर्मचारी यावर भर देण्यात आला. ग्रंथालय इमारत, फर्निचर व आवश्यक सुविधा सुधारण्याबाबतही समितीने मार्गदर्शन केले. या शिफारसींमुळे भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास अधिक मजबूत झाला.

१९५० च्या दशकात आणि १९६० च्या सुरुवातीच्या काळात भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांना अमेरिकेच्या व्हीट लोन कार्यक्रमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत मिळाली. अमेरिकन काँग्रेसने पब्लिक लॉ ४८० अंतर्गत भारताला सुमारे १९ दशलक्ष डॉलर्सचे कर्ज मंजूर केले, ज्याचा उपयोग अमेरिकन पुस्तके, नियतकालिके आणि वैज्ञानिक उपकरणे खरेदी करण्यासाठी करण्यात आला. या कार्यक्रमामुळे भारतीय शैक्षणिक ग्रंथालयांचे संग्रह अधिक समृद्ध झाले. तसेच ग्रंथालय व्यावसायिकांना अमेरिका आणि भारत यांच्यात परस्पर भेटीसाठी आर्थिक

सहाय्यही देण्यात आले. त्यामुळे या कार्यक्रमाने भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

शिक्षण आयोग (कोठारी आयोग) – १९६४-६६:

१९६४ ते १९६६ या काळात स्थापन झालेल्या कोठारी आयोगाने भारतातील शिक्षण व्यवस्थेसोबतच ग्रंथालय विकासासाठीही महत्त्वाच्या शिफारसी केल्या. आयोगाने ग्रंथालय विकासासाठी एकात्मिक योजना तयार करण्यावर भर दिला आणि ग्रंथालयाशिवाय कोणतेही नवीन विद्यापीठ, महाविद्यालय किंवा विभाग सुरू करू नये, असे स्पष्ट केले. तसेच ग्रंथालय अनुदानाचा योग्य वापर, ग्रंथालय सेवांचा प्रसार, कर्मचारी विकास, ग्रंथसामग्रीचे जतन व संरक्षण आणि संशोधकांसाठी विशेष सेवा उपलब्ध करून देण्याची गरज आयोगाने मांडली. याशिवाय विद्यापीठाच्या एकूण शिक्षण बजेटपैकी ६.५% ते १०% निधी ग्रंथालयासाठी राखीव ठेवावा, किंवा प्रति विद्यार्थी २५ रुपये व प्रति शिक्षक ३०० रुपये उपलब्ध करावेत, अशी शिफारस केली. या आयोगामुळे शैक्षणिक ग्रंथालयांच्या विकासाला अधिक नियोजनबद्ध दिशा मिळाली.

ग्रंथालय जाळे आणि कन्सॉर्शिया यांचा विकास:

माहिती संसाधनांच्या वेगाने होणाऱ्या वाढीमुळे तसेच माहिती व संवाद तंत्रज्ञानाच्या (ICT) प्रगतीमुळे जगभरातील ग्रंथालय सेवा मोठ्या प्रमाणावर बदलल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रंथालय जाळे (Library Networks) आणि ग्रंथालय कन्सॉर्शिया (Library Consortia) ही संसाधन सामायिकरण, सहकार्य आणि माहितीपर प्रवेशासाठी महत्त्वाची यंत्रणा म्हणून उदयास आली.

१९९१ मध्ये UGC अंतर्गत INFLIBNET (Information and Library Network) ची स्थापना करण्यात आली. याचा मुख्य उद्देश भारतातील विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन संस्थांमधील ग्रंथालयांना संगणकीय नेटवर्कद्वारे जोडणे हा होता. INFLIBNET मुळे माहितीचा जलद प्रसार, संशोधन व शिक्षणासाठी आवश्यक संसाधनांपर्यंत सहज प्रवेश आणि ग्रंथालयांमधील सहकार्य वाढले. तसेच विविध संस्थांमध्ये समान प्रयत्नांची पुनरावृत्ती टाळून संसाधनांचा प्रभावी वापर करण्यास मदत झाली.INFLIBNET मुळे ग्रंथालयांचे स्वयंचलीकरण करण्यासाठी अनुदान देण्यात आले आणि **SOUL** हे ग्रंथालय व्यवस्थापन सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले. तसेच **IndCat** या ऑनलाइन कॅटलॉगद्वारे विविध विद्यापीठ ग्रंथालयांतील पुस्तके, प्रबंध व नियतकालिकांची माहिती उपलब्ध झाली. त्यामुळे भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांचे आधुनिकीकरण आणि माहितीचा जलद प्रसार शक्य झाला.

INFLIBNET कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठ ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्याकरिता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. यामध्ये ग्रंथालय कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण, SOUL सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण तसेच दरवर्षी CALIBER परिषद आणि कार्यशाळांचे आयोजन केले जाते. तसेच INFLIBNET ने डेटा संकलनासाठी मानके व मार्गदर्शक सूचना (CCF आधारित) प्रकाशित केल्या आहेत. आजपर्यंत १९० हून अधिक विद्यापीठांना संगणकीकरण व नेटवर्किंगसाठी आर्थिक अनुदानाचा लाभ झाला आहे. CALIBER परिषदेमुळे ग्रंथालय व्यावसायिकांना परस्पर संवाद आणि व्यावसायिक मुद्द्यांवर चर्चा करण्याची संधी मिळते. INFLIBNET व्यतिरिक्त भारतात इतरही अनेक राष्ट्रीय माहिती व ग्रंथालय नेटवर्क विकसित झाले आहेत. यामध्ये NICNET, INDONET, ERNET, CALIBNET, DELNET, MALIBNET

इत्यादी नेटवर्क उल्लेखनीय आहेत. या नेटवर्कमुळे विविध ग्रंथालयांमध्ये संसाधन सामायिकरण वाढले आणि वापरकर्त्यांना माहितीपर्यंत अधिक व्यापक व जलद प्रवेश मिळू लागला.

भारतामध्ये कन्सोर्टियम पद्धतीची सुरुवात १९८२ मध्ये FORSA (Forum for Resource Sharing in Astronomy and Astrophysics) या उपक्रमातून झाली. याचा उद्देश देशातील खगोलशास्त्र ग्रंथालयांमधील संसाधने सामायिक करणे हा होता. पुढे 2004 मध्ये त्याचे सदस्यत्व भौतिकशास्त्र आणि गणित ग्रंथालयांपर्यंत वाढवण्यात आले. यानंतर भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने INDEST कन्सोर्टियम स्थापन केले, ज्यामार्फत IITs, IISc, NITs आणि इतर संस्थांना ई-संसाधनांचा प्रवेश उपलब्ध झाला. INDEST चे मुख्यालय IIT दिल्ली येथे आहे. तसेच २००९ मध्ये NKRC (National Knowledge Resource Consortium) स्थापन झाले, ज्यामध्ये CSIR आणि विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या अनेक प्रयोगशाळा व संस्था सहभागी आहेत. आरोग्य विज्ञान क्षेत्रासाठी २००३ मध्ये HELINET सुरू करण्यात आले, ज्यामुळे कर्नाटकातील आरोग्य संस्थांना वैद्यकीय माहिती व जर्नल्सचा प्रवेश मिळाला. कृषी क्षेत्रात CeRA कन्सोर्टियमद्वारे कृषी विद्यापीठे व ICAR संस्थांना ३००० पेक्षा अधिक कृषी विज्ञान जर्नल्स उपलब्ध करून देण्यात आले. या कन्सोर्टियम उपक्रमांमुळे भारतातील शैक्षणिक आणि संशोधन संस्थांना दर्जेदार ई-संसाधने सहज उपलब्ध झाली.

UGC-INFONET डिजिटल लायब्ररी कन्सोर्टियमची सुरुवात २८ डिसेंबर २००३ रोजी UGC च्या सुवर्णमहोत्सवाच्या समारोप प्रसंगी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते करण्यात आली. या कन्सोर्टियममुळे विद्यापीठांना जगप्रसिद्ध प्रकाशक व संशोधन संस्थांकडील ७५०० पेक्षा अधिक दर्जेदार ई-जर्नल्स आणि बायब्लियोग्राफिक डेटाबेसचा प्रवेश उपलब्ध झाला. पूर्ण-पाठ इलेक्ट्रॉनिक संसाधनांमध्ये लेखांचा संपूर्ण मजकूर तसेच त्यांची संदर्भ माहिती मिळते. या कन्सोर्टियमद्वारे American Chemical Society, American Institute of Physics, Oxford University Press, Cambridge University Press, Springer Link, JSTOR आणि Project Muse यांसारख्या प्रसिद्ध प्रकाशकांकडून ई-संसाधने उपलब्ध करून दिली जातात. हे कन्सोर्टियम टप्प्याटप्प्याने राबवण्यात आले. पहिल्या टप्प्यात ५० विद्यापीठांना आणि पुढे २०९ विद्यापीठांपर्यंत हा लाभ वाढवण्यात आला. कला, मानवविद्या, समाजशास्त्र, विज्ञान, संगणकशास्त्र, व्यवस्थापन, गणित इत्यादी सर्व विषयांतील संशोधनासाठी या कन्सोर्टियमने महत्त्वपूर्ण योगदान दिले.

राष्ट्रीय ज्ञान आयोग (National Knowledge Commission):

भारत सरकारने १३ जून २००५ रोजी राष्ट्रीय ज्ञान आयोग स्थापन केला. हा आयोग पंतप्रधानांना सल्ला देणारी संस्था असून २००५ ते २००८ या कालावधीत कार्यरत होता. शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, कृषी, उद्योग आणि ई-गव्हर्नन्स क्षेत्रात सुधारणा सुचवणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट होते. ज्ञानाचा सहज प्रवेश, ज्ञाननिर्मिती, जतन आणि प्रसार यावर आयोगाने भर दिला. ग्रंथालय विकासासाठी आयोगाने राष्ट्रीय ग्रंथालय आयोग स्थापन करणे, सर्व ग्रंथालयांचा सर्वेक्षण करणे, LIS शिक्षण व प्रशिक्षण सुधारणा, केंद्रीय ग्रंथालय निधी निर्माण करणे आणि ग्रंथालय व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण करण्याच्या शिफारसी केल्या. तसेच माहिती तंत्रज्ञानाचा वापर आणि

सार्वजनिक-खासगी भागीदारी वाढवण्यावरही आयोगाने भर दिला.

तक्षशिलापासून आजपर्यंत पाहिले तर विद्यापीठ ग्रंथालयांनी मोठा प्रवास केला आहे. प्रत्येक क्षेत्रात त्यांची वाढ आणि विकास झाला असून वाचनसाहित्याचा प्रवेश अनेक पटीने वाढला आहे. आजही विद्यापीठ ग्रंथालय हे वापरकर्त्यांसाठी शिक्षण आणि संशोधनाचे महत्त्वाचे केंद्र आहे. (कौर, २०२४).

तात्पर्य:

भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांचा इतिहास प्राचीन काळापासून आधुनिक डिजिटल युगापर्यंत सतत विकसित होत आलेला आहे. तक्षशिला आणि नालंदा यांसारख्या प्राचीन विद्यापीठांतील हस्तलिखित संग्रहापासून ते आजच्या ई-संसाधनांपर्यंत ग्रंथालयांनी ज्ञानप्रसारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मध्ययुगीन काळात काही अडथळे आले असले तरी ब्रिटिश काळात आधुनिक शिक्षणसंस्थांच्या स्थापनेमुळे ग्रंथालयांचा विकास संघटित झाला. स्वातंत्र्यानंतर UGC, राधाकृष्णन आयोग, रंगनाथन समिती व कोठारी आयोग यांच्या उपक्रमांमुळे विद्यापीठ ग्रंथालयांना नियोजनबद्ध दिशा मिळाली. पुढे INFLIBNET, UGC-INFONET, विविध नेटवर्क्स व कन्सोर्टियममुळे डिजिटल सेवा, स्वयंचलीकरण आणि संसाधन सामायिकरण शक्य झाले. आज शैक्षणिक ग्रंथालये पारंपरिक संग्रहासोबत डिजिटल डेटाबेस, ई-जर्नल्स आणि ऑनलाइन सेवा देत असून ती शिक्षण व संशोधनाची केंद्रे बनली आहेत. भविष्यात शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास अधिक प्रभावी करण्यासाठी काही सूचना महत्त्वाच्या ठरतात. ग्रंथालयांसाठी पुरेसा आणि सातत्यपूर्ण निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक माहितीसेवा अधिक व्यापक प्रमाणात स्वीकारणे गरजेचे आहे. तसेच नेटवर्किंग व ओपन ॲक्सेस उपक्रमांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. एकंदरीत, भारतीय शैक्षणिक ग्रंथालयांचे योगदान बौद्धिक संपदा घडविण्यात अत्यंत महत्त्वाचे असून भविष्यातही त्यांची भूमिका अधिक व्यापक होईल.

संदर्भग्रंथ सूची:

1. Bhatt, R.K. Academic Libraries in India: A Historical Study
2. Bhatt, R.K. History and Development of Libraries in India. Delhi: Mittal, 1995.
3. Bhongle, M. B. (2025). *A historical study of academic libraries in India*. *UPA National E-Journal Interdisciplinary Peer-Reviewed Journal, 11*(2), 49–54.
4. Chakravorty, S. N. “Libraries in Ancient Times with Special Reference to India.” Indian Librarian 9.2 (1954): 53.
5. Datta, Bimal Kumar. Libraries and Librarianship of Ancient and Medieval India. Delhi: Atma Ram and Sons, 1970. P.33.
6. India. University Grants Commission. University and College Libraries. New Delhi: UGC, 1965. P.8.
7. Kaur, Trishanjit. (2024). History of Academic Libraries in India. Academic Libraries.
8. Kumar, S. (2024). Growth and development of library systems in India. *International Journal of Innovative Social*

Science & Humanities Research, 1(1), 162–172.

9. Kumbar, B. D. (2005). Growth and development of the public library system in India with special reference to Karnataka. Retrieved Feb *12, 2026*.
10. Misra, Jogesh. History of Libraries and Librarianship in Modern India since 1850. Delhi: Atma Ram & Sons, 1979. P.14.
11. National Knowledge Commission (2005). Recommendations on Libraries. http://www.knowledgecommission.gov.in/recommendations/libraries.asp accessed on 13.02.2026.
12. Planning Commission India (2002).10th Five Year Plan.www.planningcommission.nic.in accessed on 13.02.2026.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महाराष्ट्रातील आधुनिक यंत्रमाग कामगार : समस्या, आव्हाने आणि उपाययोजना

डॉ. कुबेर शेकाप्पा कट्टीमनी

विलिंग्डन महाविद्यालय (स्वायत्त), सांगली.

***Corresponding Author* - डॉ. कुबेर शेकाप्पा कट्टीमनी**

DOI - 10.5281/zenodo.19723165

सारांश:

महाराष्ट्रातील यंत्रमाग उद्योग हा राज्याच्या औद्योगिक रचनेतील एक महत्त्वाचा घटक असून ग्रामीण व निम्न मध्यमवर्गीय समाजघटकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देतो. इचलकरंजी, सोलापूर आणि भिवंडी ही महाराष्ट्रातील प्रमुख यंत्रमाग केंद्रे म्हणून ओळखली जातात. या संशोधन लेखाचा उद्देश आधुनिक यंत्रमाग कामगारांची सामाजिक-आर्थिक स्थिती, आरोग्यविषयक समस्या, तांत्रिक बदलांचा परिणाम, जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली स्पर्धा आणि शासकीय धोरणांची परिणामकारकता यांचा सखोल अभ्यास करणे हा आहे. अध्ययनासाठी दुय्यम स्रोतांवर आधारित वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधनातून असे आढळून येते की अनियमित रोजगार, कमी वेतन, असुरक्षित कार्यपरिसर, सामाजिक सुरक्षेचा अभाव, कंत्राटी पद्धतीचा प्रसार आणि तांत्रिक बदल यांमुळे कामगारांच्या जीवनमानावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. उद्योगाचा शाश्वत विकास साधण्यासाठी कामगार कल्याणाच्या उपाययोजना, कौशल्यविकास आणि कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी अत्यावश्यक आहे.

बीज शब्द: यंत्रमाग उद्योग, कामगार समस्या, सामाजिक सुरक्षा, औद्योगिकीकरण.

प्रस्तावना:

औद्योगिकीकरण हा आधुनिक समाजव्यवस्थेतील परिवर्तनाचा प्रमुख घटक मानला जातो. १८व्या–१९व्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतर जगभरात उत्पादन पद्धती, कामगार संबंध आणि बाजारव्यवस्था यामध्ये आमूलाग्र बदल घडले. हातमाग उद्योगापासून यंत्रमाग उद्योगाकडे झालेल्या संक्रमणामुळे वस्त्रोद्योगात उत्पादनक्षमता मोठ्या प्रमाणात वाढली, उत्पादन खर्चात घट झाली आणि देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा विस्तार झाला. यंत्रांच्या वापरामुळे कमी वेळेत अधिक उत्पादन शक्य झाले आणि वस्त्रोद्योग हा मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणारा क्षेत्र म्हणून उदयास आला.

महाराष्ट्र राज्याने वस्त्रोद्योगात ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची भूमिका बजावली आहे. १९व्या शतकात मुंबईतील गिरण्या आणि पुढे ग्रामीण व उपनगरी भागातील यंत्रमाग केंद्रांच्या विकासामुळे राज्य औद्योगिकदृष्ट्या प्रगत झाले. विशेषतः पश्चिम महाराष्ट्र आणि ठाणे परिसरात यंत्रमाग उद्योगाचे जाळे विकसित झाले.[१] इचलकरंजी हे "मिनी मँचेस्टर" म्हणून ओळखले जाऊ लागले; सोलापूर चादरी व टॉवेल निर्मितीसाठी प्रसिद्ध झाले; तर भिवंडी देशातील मोठ्या यंत्रमाग केंद्रांपैकी एक म्हणून उदयास आले. या केंद्रांमुळे स्थानिक अर्थव्यवस्था बळकट झाली आणि ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्येला रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

यंत्रमाग उद्योगामुळे हजारो कुटुंबांना उपजीविकेचे साधन मिळाले असले तरी या उद्योगाच्या वाढीसोबत कामगारांच्या समस्या देखील प्रकर्षाने पुढे आल्या. कामाच्या अटी, सामाजिक सुरक्षा, आरोग्य, वेतन, कामाचे तास आणि जीवनमान या बाबींमध्ये अनेक त्रुटी दिसून येतात. कंत्राटी पद्धती, अनियमित रोजगार आणि उत्पादनाधारित मजुरी यामुळे कामगारांचे उत्पन्न अस्थिर राहते.[२] तसेच, कारखान्यांतील धूळ, आवाज आणि उष्णता यांमुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात.

१९९१ नंतरच्या आर्थिक उदारीकरण धोरणांमुळे जागतिक बाजारपेठेत स्पर्धा वाढली. स्वस्त आयात कापड आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या आगमनामुळे उद्योगात कार्यपद्धती बदलल्या. संगणकीकृत यंत्रसामग्री व ऑटोमेशनमुळे उत्पादनक्षमता वाढली असली तरी अकुशल कामगारांच्या रोजगारावर परिणाम झाला.[३] परिणामी, तांत्रिक बदलांचा ताण कामगारांवर पडला. कौशल्यविकासाचा अभाव आणि सामाजिक सुरक्षेच्या योजनांची अपुरी अंमलबजावणी ही परिस्थिती अधिक गंभीर बनवते.

म्हणूनच, आधुनिक यंत्रमाग उद्योगाच्या संदर्भात कामगारांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते. उद्योगाचा विकास आणि कामगारांचे कल्याण यामध्ये संतुलन साधणे हे शाश्वत औद्योगिक प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. प्रस्तुत संशोधन लेखात यंत्रमाग कामगारांच्या समस्या, त्यामागील कारणे आणि संभाव्य उपाययोजना यांचा सर्वंकष विचार करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

या संशोधनाचा प्रमुख हेतू महाराष्ट्रातील आधुनिक यंत्रमाग उद्योग आणि त्यामधील कामगारांची स्थिती यांचा सर्वंकष अभ्यास करणे हा आहे. खालील उद्दिष्टांद्वारे संशोधनाची दिशा निश्चित करण्यात आली आहे :

१. महाराष्ट्रातील आधुनिक यंत्रमाग उद्योगाची पार्श्वभूमी स्पष्ट करणे
२. यंत्रमाग कामगारांची सामाजिक-आर्थिक स्थिती विश्लेषित करणे
३. आरोग्य, सुरक्षा व कामाच्या अटींचा अभ्यास करणे
४. तांत्रिक बदल व जागतिकीकरणाचा रोजगारावर परिणाम तपासणे
५. कामगार कल्याणासाठी उपयुक्त उपाययोजना सुचविणे

संशोधन पद्धती:

या संशोधनात आधुनिक यंत्रमाग उद्योग आणि कामगारांच्या समस्यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यासाठी पुढील संशोधन पद्धती अवलंबण्यात आल्या आहेत :

वर्णनात्मक व विश्लेषणात्मक:

या संशोधनाचा स्वभाव **वर्णनात्मक** आहे, कारण यात महाराष्ट्रातील यंत्रमाग उद्योगाची पार्श्वभूमी, रचना, कार्यपद्धती आणि कामगारांची सामाजिक-आर्थिक स्थिती यांचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. उद्योगाची वाढ, भौगोलिक विस्तार आणि प्रमुख केंद्रांची माहिती मांडण्यात आली आहे. तसेच हे संशोधन **विश्लेषणात्मक** देखील आहे, कारण उपलब्ध माहितीच्या आधारे कामगारांच्या समस्या, त्यामागील कारणे आणि तांत्रिक व आर्थिक घटकांचा परिणाम यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. उदाहरणार्थ, इचलकरंजी, सोलापूर आणि भिवंडी या केंद्रांतील औद्योगिक वाढीचा कामगारांवर झालेला परिणाम तुलनात्मक पद्धतीने अभ्यासला आहे.

साधने : दुय्यम या संशोधनात प्राथमिक सर्वेक्षण न करता उपलब्ध कागदपत्रे, अहवाल व प्रकाशित साहित्य यांमधील माहितीचा वापर करण्यात आला आहे. दुय्यम डेटामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे :

- उद्योगातील कामगारांची स्वरूप
- वेतनरचना व रोजगाराचे प्रकार
- आरोग्य व सुरक्षा संदर्भातील माहिती
- शासकीय योजनांची अंमलबजावणी

दुय्यम माहितीच्या आधारे वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

विश्लेषण पद्धती: गुणात्मक विश्लेषण:

या संशोधनात संख्यात्मक आकडेवारीपेक्षा सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक पैलूंच्या सखोल समजासाठी **गुणात्मक विश्लेषण** वापरण्यात आले आहे. विविध अहवाल व लेखांतील माहितीचे तर्कसंगत परीक्षण करून समस्यांचे स्वरूप, कारणे व परिणाम यांचा अभ्यास करण्यात आला आहे गुणात्मक पद्धतीमुळे कामगारांच्या जीवनमानातील बदल, सामाजिक असुरक्षितता, तांत्रिक संक्रमणाचा मानसिक व आर्थिक परिणाम आणि धोरणात्मक त्रुटी यांचे सखोल विश्लेषण शक्य झाले आहे.

महाराष्ट्रातील यंत्रमाग उद्योगाची पार्श्वभूमी:

महाराष्ट्रात यंत्रमाग उद्योगाचा विकास २०व्या शतकाच्या पूर्वार्धात सुरू झाला आणि पुढील काही दशकांत त्याने वेगाने विस्तार केला. ब्रिटिशकालीन वस्त्रोद्योगाच्या प्रभावाखाली आणि मुंबईतील कापड गिरण्यांच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण व उपनगरी भागात लघुउद्योग स्वरूपात यंत्रमागांची उभारणी झाली. हातमाग उद्योगातील पारंपरिक कौशल्य आणि नव्या यांत्रिक तंत्रज्ञानाचा संगम होऊन उत्पादन पद्धतीत मोठे परिवर्तन घडले.

यंत्रमाग उद्योगाची एक महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे **कमी भांडवलात सुरू होण्याची क्षमता**. मोठ्या गिरण्यांच्या तुलनेत लहान प्रमाणात यंत्रे बसवून हा उद्योग सुरू करता येत असल्याने स्थानिक उद्योजक, व्यापारी आणि मध्यमवर्गीय गुंतवणूकदार यांनी या क्षेत्रात प्रवेश केला. घरगुती किंवा लघुउद्योग स्वरूपातील यंत्रमागांमुळे उद्योगाचे विकेंद्रीकरण झाले आणि तो ग्रामीण व अर्धशहरी भागात पसरला.

ग्रामीण भागातील बेरोजगार युवक, अल्पभूधारक शेतकरी आणि स्थलांतरित कामगारांसाठी हा उद्योग रोजगाराचा प्रमुख स्रोत ठरला. शेतीवरील अवलंबित्व कमी करून पूरक उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले. विशेषतः दुष्काळप्रवण भागातील लोकांनी रोजगाराच्या शोधात औद्योगिक केंद्रांकडे स्थलांतर केले, ज्यामुळे शहरांचे औद्योगिकीकरण आणि शहरीकरण वेगाने झाले.

महाराष्ट्रातील काही विशिष्ट केंद्रांनी यंत्रमाग उद्योगात विशेष ओळख निर्माण केली :

- इचलकरंजी — येथे यंत्रमाग उद्योगाने इतकी भरभराट केली की या शहराला "मिनी मँचेस्टर" म्हणून संबोधले जाऊ लागले. स्थानिक उद्योजकता, सहकारी चळवळ आणि कौशल्यपूर्ण कामगार यांमुळे हे केंद्र वस्त्रोद्योगातील अग्रगण्य ठरले.
- सोलापूर — सोलापूरने चादरी, टॉवेल आणि बेडशीट निर्मितीत राष्ट्रीय स्तरावर विशेष स्थान मिळवले. येथे हातमाग व यंत्रमाग यांचा समन्वय दिसून येतो.
- भिवंडी — मुंबईजवळील भिवंडी हे देशातील सर्वात मोठ्या यंत्रमाग केंद्रांपैकी एक म्हणून विकसित झाले. स्वस्त मजुरी, बाजारपेठेची

जवळीक आणि वाहतूक सुविधा यांमुळे येथे मोठ्या प्रमाणावर उत्पादन झाले.

यंत्रमाग उद्योगाने राज्याच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे योगदान दिले. निर्यात वाढ, स्थानिक बाजारपेठेची पूर्तता आणि लघुउद्योगांना चालना मिळाली. तथापि, या वाढीबरोबरच असंघटित क्षेत्राचा विस्तार झाला आणि कामगारांच्या कामाच्या अटी, वेतन आणि सामाजिक सुरक्षा यांसारख्या प्रश्नांना तोंड द्यावे लागले.

एकूणच, महाराष्ट्रातील यंत्रमाग उद्योगाची पार्श्वभूमी ही उद्योजकतेचा विकास, ग्रामीण रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक विकेंद्रीकरण यांची कहाणी सांगते; परंतु त्याचवेळी कामगार कल्याणाच्या आव्हानांची जाणीव करून देते.

आधुनिक यंत्रमाग कामगारांची सामाजिक-आर्थिक स्थिती:

महाराष्ट्रातील यंत्रमाग उद्योग आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा असला तरी या उद्योगात कार्यरत असलेल्या कामगारांची सामाजिक-आर्थिक स्थिती अनेक अडचणींनी ग्रस्त आहे. विशेषतः इचलकरंजी, सोलापूर आणि भिवंडी या प्रमुख केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित व असंघटित क्षेत्रातील कामगार कार्यरत आहेत. त्यांच्या रोजगाराचे स्वरूप, वेतनरचना आणि जीवनमान या घटकांचा खालीलप्रमाणे सविस्तर विचार करता येतो.

रोजगाराचे स्वरूप:

आधुनिक यंत्रमाग उद्योगात बहुतेक कामगार **कंत्राटी (Contractual)** किंवा **तात्पुरत्या (Temporary)** स्वरूपात कार्यरत असतात.[४] स्थायी नोकऱ्यांची संख्या मर्यादित असून रोजगाराची हमी नसते. उत्पादनाच्या मागणीनुसार कामाचे तास आणि कामाची उपलब्धता बदलत राहते. कायमस्वरूपी नोकर किंवा नोकरी म्हणून या क्षेत्राकडे पाहिले जात नाही.

- **मागणीवर अवलंबित्व** : बाजारपेठेतील ऑर्डर वाढल्यास कामाचे तास वाढतात; मंदी आल्यास काम कमी होते किंवा कारखाने काही काळ बंदही राहू शकतात.
- **अर्धवेळ रोजगार** : काही कामगारांना पूर्णवेळ काम न मिळता अर्धवेळ किंवा तुकड्या-तुकड्याने काम करावे लागते.
- **स्थलांतरित कामगारांचे प्रमाण** : ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर केलेले कामगार बहुतेक असंघटित क्षेत्रात काम करतात. त्यांच्याकडे लिखित करार नसल्याने नोकरीची सुरक्षा कमी असते.
- **कामगार संघटनांचा अभाव** : असंघटित स्वरूपामुळे कामगारांचे संघटीकरण कमी आहे, परिणामी हक्कांसाठी सामूहिक आवाज उठविणे कठीण जाते.

या सर्व घटकांमुळे रोजगारात अस्थिरता आणि आर्थिक असुरक्षितता वाढते.

वेतन व उत्पन्न:

यंत्रमाग उद्योगातील वेतनरचना एकसमान नाही. किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी आजतागायत झाली नाही.

- **उत्पादनाधारित मजुरी (Piece-rate system)** : अनेक ठिकाणी कामगारांना तयार केलेल्या मीटर/तुकड्यांनुसार मजुरी दिली जाते. उत्पादन कमी झाल्यास उत्पन्न घटते.
- **अनियमित उत्पन्न** : ऑर्डर कमी असल्यास कामगारांचे मासिक उत्पन्न मोठ्या प्रमाणात कमी होते.

- **महागाईचा परिणाम** : वाढत्या जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतींच्या तुलनेत वेतनवाढ अपुरी ठरते.

परिणामी, कामगारांचे उत्पन्न स्थिर नसल्याने कुटुंबाच्या आर्थिक नियोजनात अडचणी निर्माण होतात. अनेक वेळा कर्ज घेण्याची वेळ येते.

जीवनमान:

अल्प व अनिश्चित उत्पन्नामुळे यंत्रमाग कामगारांचे जीवनमान मर्यादित राहते.

- **निवास समस्या** : स्थलांतरित कामगार बहुधा झोपडपट्ट्यांमध्ये किंवा भाड्याच्या लहान खोल्यांमध्ये राहतात. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि स्वच्छता सुविधा अपुऱ्या असतात.
- **आरोग्य समस्या** : अस्वच्छ निवास आणि कामाच्या ठिकाणचे प्रदूषण यामुळे आरोग्य बिघडते. नियमित आरोग्यसेवा परवडत नाही.
- **शिक्षणाची अडचण** : कमी उत्पन्नामुळे मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो. पैश्याच्या कमतरतेमुळे काही वेळा मुलांनाही शिक्षण सोडून कामावर जावे लागते.
- **पोषण व सामाजिक सुरक्षा** : संतुलित आहाराची कमतरता आणि सामाजिक सुरक्षेच्या योजनांचा अपुरा लाभ यामुळे कुटुंबाची एकूण स्थिती कमकुवत राहते.

जीवनमानातील या मर्यादा केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक आणि मानसिक ताणही निर्माण करतात. अस्थिर रोजगार आणि अनिश्चित उत्पन्नामुळे कामगारांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढते.

कामाच्या अटी व आरोग्य समस्या:

यंत्रमाग उद्योगातील कामगारांच्या जीवनमानावर सर्वाधिक परिणाम करणारा घटक म्हणजे त्यांचे **कार्यपरिसर आणि कामाच्या अटी** होय. असंघटित क्षेत्रातील अनेक कारखान्यांमध्ये आरोग्य व सुरक्षिततेचे मानदंड पूर्णपणे पाळले जात नाहीत. परिणामी कामगारांना दीर्घकालीन शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो.

कार्यपरिसर:

यंत्रमाग कारखान्यांतील वातावरण बहुतेक वेळा आरोग्यास प्रतिकूल असते.

- **आवाजाची तीव्रता** : यंत्रे सतत चालू असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनीप्रदूषण निर्माण होते. दीर्घकाळ अशा आवाजात काम केल्यास श्रवणशक्तीवर परिणाम होतो.
- **धूळ व सूताचे कण** : कापसाचे तंतू आणि सूताचे सूक्ष्म कण हवेत पसरलेले असतात. योग्य फिल्ट्रेशन किंवा वायुवीजन नसल्यास हे कण श्वसनमार्गात जातात.
- **वायुवीजनाची कमतरता** : अनेक कारखान्यांमध्ये नैसर्गिक प्रकाश आणि हवेशीर व्यवस्था अपुरी असते. उष्णता व आर्द्रता जास्त असल्यामुळे कामगारांना अस्वस्थता जाणवते.
- **अपुरे स्वच्छताविषयक मानदंड** : पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि विश्रांतीची सुविधा मर्यादित असते.

या परिस्थितीमुळे कामगारांची कार्यक्षमता घटते आणि आरोग्याच्या समस्या वाढतात.

आरोग्यविषयक परिणाम:

अस्वच्छ व असुरक्षित कार्यपरिसरामुळे विविध व्यावसायिक (Occupational) आजार निर्माण होतात :[५]

- **दमा व श्वसन विकार** : सूताचे कण श्वसनमार्गात जाऊन दमा, ब्रॉन्कायटिस यांसारखे विकार होतात.

- **कर्णबधिरता (Hearing Loss)** : दीर्घकाळ मोठ्या आवाजात काम केल्यामुळे श्रवणशक्ती कमी होते.
- **त्वचारोग** : धूळ, रसायने व उष्णतेमुळे त्वचेवर ॲलर्जी किंवा इतर विकार होतात.
- **पाठदुखी व सांधेदुखी** : दीर्घकाळ उभे राहून किंवा एकाच स्थितीत काम केल्यामुळे स्नायूंवर ताण येतो.
- **दृष्टीदोष** : अपुरा प्रकाश व सतत सूक्ष्म काम केल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो.

दीर्घकाळ उभे राहणे, यंत्रांशी सतत संपर्क आणि विश्रांतीचा अभाव यांमुळे शारीरिक थकवा वाढतो. मानसिक ताण देखील वाढू शकतो, विशेषतः उत्पादनाचा ताण आणि वेळेची मर्यादा यामुळे.

अपघात व सुरक्षा:

यंत्रमाग उद्योगात अपघातांची शक्यता नाकारता येत नाही.

- **सुरक्षा साधनांचा अभाव** : मास्क, कान संरक्षक, हातमोजे, सेफ्टी गार्ड्स यांचा अपुरा वापर.
- **यंत्रांची अपुरी देखभाल** : जुनी किंवा योग्यरीत्या दुरुस्ती न केलेली यंत्रे अपघातास कारणीभूत ठरतात.
- **प्रशिक्षणाची कमतरता** : नव्या कामगारांना यंत्र हाताळण्याचे योग्य प्रशिक्षण न दिल्यास अपघात वाढतात.
- **नुकसानभरपाई व विमा सुविधा** : अनेक कामगार कंत्राटी असल्यामुळे अपघातानंतर योग्य नुकसानभरपाई किंवा विमा लाभ मिळण्यात अडचणी येतात.

औद्योगिक सुरक्षा नियमांची प्रभावी अंमलबजावणी आणि नियमित तपासणी नसल्यास कामगारांचे जीवन धोक्यात येते.

बाल कामगारांचे प्रश्न:

काही ठिकाणी अल्पवयीन मुलांकडून काम करून घेतल्याच्या घटना आढळतात, विशेषतः असंघटित आणि लहान यंत्रमाग युनिट्समध्ये. हे कायद्याने निषिद्ध असून बालहक्कांचे उल्लंघन आहे.[६]

- **शिक्षणापासून वंचितता** : कामावर लागल्यामुळे मुलांचे शिक्षण खंडित होते किंवा पूर्णपणे थांबते.
- **आरोग्य व विकासावर परिणाम** : धूळ, आवाज आणि दीर्घ कामाचे तास यांमुळे बालकांच्या शारीरिक व मानसिक विकासावर विपरीत परिणाम होतो.
- **आर्थिक कारणे** : कुटुंबाच्या आर्थिक गरजांमुळे मुलांना कामावर पाठविले जाते.

बालमजुरी प्रतिबंधक कायदे अस्तित्वात असले तरी त्यांच्या अंमलबजावणीत त्रुटी आढळतात. जनजागृतीचा अभाव आणि आर्थिक गरिबी ही यामागील प्रमुख कारणे आहेत.

तांत्रिक बदल व जागतिकीकरण:

आधुनिक युगात तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारे बदल आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे महाराष्ट्रातील यंत्रमाग उद्योगावर व्यापक परिणाम झाला आहे. विशेषतः १९९१ नंतर भारतात राबविण्यात आलेल्या आर्थिक सुधारणांमुळे औद्योगिक क्षेत्रात स्पर्धा, आधुनिकीकरण आणि उत्पादनक्षमता वाढ यांना चालना मिळाली. परंतु या बदलांचा सर्वाधिक परिणाम यंत्रमाग कामगारांवर झाला आहे.[७]

ऑटोमेशनचा प्रभाव:

संगणकीकृत आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित यंत्रमाग यंत्रणा मोठ्या प्रमाणावर वापरली जाऊ लागली आहे. नवीन यंत्रांमुळे पुढील बदल दिसून येतात—

- उत्पादनाचा वेग आणि गुणवत्ता वाढली.
- मानवी श्रमाची गरज तुलनेने कमी झाली.
- कमी वेळेत अधिक उत्पादन शक्य झाले.
- तांत्रिक ज्ञान असलेल्या कुशल कामगारांची मागणी वाढली.

परंतु या प्रक्रियेमुळे अनेक अकुशल किंवा अर्धकुशल कामगार बेरोजगार झाले किंवा त्यांचे वेतन कमी झाले. पारंपरिक हातमाग किंवा जुन्या यंत्रांवर काम करणाऱ्या कामगारांना नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण मिळाले नाही. परिणामी रोजगाराची असुरक्षितता वाढली. तांत्रिक कौशल्य नसल्यास कामगारांना पर्यायी रोजगार मिळवणे कठीण जाते. त्यामुळे कौशल्यविकास (Skill Development) आणि पुनर्प्रशिक्षण (Re-skilling) या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.[८]

विदेशी स्पर्धा:

जागतिकीकरणामुळे भारतीय बाजारपेठ विदेशी वस्त्रउद्योगासाठी खुली झाली. विशेषतः चीन, बांगलादेश आणि व्हिएतनामसारख्या देशांमधील स्वस्त कापड भारतीय बाजारात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाले. या देशांमध्ये उत्पादन खर्च कमी असल्याने भारतीय उत्पादकांवर किंमत कमी ठेवण्याचा दबाव निर्माण झाला.[९]

या परिस्थितीचे परिणाम—

- उत्पादन खर्च कमी करण्यासाठी कामगारांचे वेतन कमी ठेवले जाते.
- कामाचे तास वाढविले जातात.
- सामाजिक सुरक्षा सुविधा कमी दिल्या जातात.
- लघुउद्योगांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.

महाराष्ट्रातील भिवंडी, इचलकरंजी व सोलापूरसारख्या यंत्रमाग केंद्रांना विदेशी स्पर्धेमुळे उत्पादन व विक्रीत चढ-उतार अनुभवावे लागले. याचा थेट परिणाम कामगारांच्या रोजगारावर झाला.

आर्थिक उदारीकरण:

१९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही.नरसिहराव यांच्या नेतृत्वाखाली आणि अर्थमंत्री मनमोहन सिंह यांनी भारतात आर्थिक उदारीकरण धोरणांची अंमलबजावणी केली. या धोरणांमुळे आयात-निर्यात सुलभ झाली, परदेशी गुंतवणुकीस प्रोत्साहन मिळाले आणि खासगी क्षेत्राचा विस्तार झाला.

यंत्रमाग उद्योगाच्या संदर्भात उदारीकरणाचे परिणाम पुढीलप्रमाणे दिसून येतात—

सकारात्मक परिणाम :	**नकारात्मक परिणाम :**
१. आधुनिक यंत्रसामग्री आयात करणे सुलभ झाले.	१. लघु व मध्यम उद्योगांवर मोठ्या उद्योगांची स्पर्धा वाढली.
२. निर्यातीच्या संधी वाढल्या.	२. बाजारपेठेतील अस्थिरतेमुळे रोजगार असुरक्षित झाला.
३. उत्पादनात गुणवत्ता सुधारणा झाली.	३. कंत्राटी व असंघटित कामगारांचे प्रमाण वाढले.

उदारीकरणामुळे उद्योगाच्या संरचनेत बदल झाले, परंतु सामाजिक सुरक्षा यंत्रणा त्याच वेगाने विकसित झाली नाही. परिणामी कामगारांच्या समस्यांमध्ये वाढ झाली.

कामगार कायदे व सामाजिक सुरक्षा:

भारतात कामगारांच्या संरक्षणासाठी विविध कायदे व सामाजिक सुरक्षा योजना अस्तित्वात आहेत. यंत्रमाग उद्योग हा मोठ्या प्रमाणावर असंघटित व कंत्राटी स्वरूपाचा असल्यामुळे या कायद्यांची अंमलबजावणी प्रत्यक्षात अपुरी राहते. परिणामी अनेक कामगार सामाजिक सुरक्षेच्या जाळ्याबाहेर राहतात.

किमान वेतन कायदा:

किमान वेतन कायदा १९४८ हा कायदा कामगारांना किमान वेतनाची हमी देण्यासाठी लागू करण्यात आला. राज्य सरकार विविध उद्योगांसाठी किमान वेतन दर निश्चित करते.

परंतु यंत्रमाग उद्योगात पुढील समस्या आढळतात—

- पीस-रेट (piece-rate) पद्धतीमुळे प्रत्यक्ष वेतन किमान वेतनापेक्षा कमी मिळते.
- कामाचे तास निश्चित नसतात; अतिरिक्त कामासाठी ओव्हरटाइमचे वेतन योग्य दिले जात नाही.
- नोंदणी व लेखा पारदर्शक नसल्याने तपासणी कठीण होते.

यामुळे कायदा अस्तित्वात असूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी मर्यादित राहते.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य कायदे:

Factories Act, १९४८ अंतर्गत औद्योगिक सुरक्षितता, कामाचे तास, स्वच्छता, वायुवीजन, प्रकाशव्यवस्था आणि अपघात प्रतिबंधक उपाय यांचे नियम निश्चित केले आहेत.[१०]

यंत्रमाग कारखान्यांमध्ये मात्र—

- आवाज नियंत्रण व धूळ नियंत्रणाची साधने अपुरी असतात.
- सुरक्षात्मक साधनांचा (Safety Equipment) वापर मर्यादित असतो.
- नियमित आरोग्य तपासणी होत नाही.

लहान व अनधिकृत यंत्रमाग युनिट्समध्ये कायद्यांचे पालन अधिकच कमी प्रमाणात होते.

ईएसआय योजना:

Employees' State Insurance Corporation (ESIC) मार्फत राबविण्यात येणारी Employees' State Insurance Act, 1948 योजना कामगारांना वैद्यकीय सुविधा, आजारपण भत्ता, प्रसूती लाभ आणि अपंगत्व लाभ देते.[११] परंतु प्रत्यक्षात—

- अनेक यंत्रमाग युनिट्स नोंदणीकृत नसतात.
- कंत्राटी कामगारांची नावे अधिकृत यादीत नसतात.
- माहितीअभावी कामगारांना त्यांच्या हक्कांची जाणीव नसते.

यामुळे पात्र असतानाही अनेक कामगारांना ईएसआयचा लाभ मिळत नाही.

भविष्य निर्वाह निधी (PF):

Employees' Provident Fund Organisation मार्फत Employees' Provident Funds and Miscellaneous Provisions Act, 1952 अंतर्गत भविष्य निर्वाह निधी (PF) योजना राबविली जाते. ही योजना कामगारांच्या निवृत्तीपश्चात आर्थिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाची आहे.[१२]

यंत्रमाग उद्योगात पुढील अडचणी दिसून येतात—

- लहान उद्योगांमध्ये PF कपात व नोंदणी टाळली जाते.
- कामगारांना नियमित पगार पावती दिली जात नाही.
- कंत्राटी व स्थलांतरित कामगार दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत नसल्याने सातत्य राखणे कठीण जाते.

कंत्राटी पद्धती व असंघटित क्षेत्र:

यंत्रमाग उद्योगात कंत्राटी व तात्पुरत्या रोजगाराचे प्रमाण मोठे आहे. या पद्धतीमुळे—

- मालक थेट जबाबदारी टाळतात.
- सामाजिक सुरक्षा योजना लागू करण्याची जबाबदारी स्पष्ट राहत नाही.
- कामगार संघटनांची ताकद कमी होते.

असंघटित स्वरूपामुळे कामगारांना कायदेशीर संरक्षण मिळण्यात अडथळे निर्माण होतात.

अंमलबजावणीतील मर्यादा:

कायदे अस्तित्वात असूनही त्यांची प्रभावी अंमलबजावणी का होत नाही, याची काही कारणे पुढीलप्रमाणे—

१. निरीक्षण यंत्रणेची कमतरता
२. भ्रष्टाचार व प्रशासकीय दुर्लक्ष
३. कामगारांची संघटनाशक्ती कमी असणे
४. स्थलांतरित कामगारांची अस्थिरता
५. मालकांकडून नियम टाळण्याचे प्रयत्न

चर्चा:

सदर अभ्यासातून असे स्पष्ट होते की महाराष्ट्रातील यंत्रमाग उद्योग हा राज्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणारा घटक आहे. रोजगारनिर्मिती, निर्यातवाढ, स्थानिक अर्थव्यवस्थेची गती आणि ग्रामीण-शहरी भागातील स्थलांतरित लोकांना रोजगाराच्या संधी या दृष्टीने या उद्योगाचे स्थान विशेष आहे. तथापि, उद्योगाच्या आर्थिक यशाबरोबर कामगारांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत तितकीशी सुधारणा झालेली दिसून येत नाही.

आर्थिक महत्त्व व सामाजिक विसंगती:

यंत्रमाग उद्योगामुळे महाराष्ट्रातील इचलकरंजी, सोलापूर, भिवंडी यांसारखी केंद्रे औद्योगिकदृष्ट्या विकसित झाली. स्थानिक व्यापार, वाहतूक, कच्चा माल पुरवठा आणि संबंधित पूरक उद्योगांना चालना मिळाली. परंतु या आर्थिक वृद्धीचा लाभ प्रामुख्याने उद्योगमालक, व्यापारी आणि भांडवलदार घटकांना अधिक प्रमाणात मिळाल्याचे दिसून येते.[१३]

कामगारांच्या बाबतीत मात्र पुढील विसंगती आढळतात—

- रोजगार अस्थिर व कंत्राटी स्वरूपाचा
- वेतन अनिश्चित व उत्पादनावर आधारित
- सामाजिक सुरक्षा योजनांचा अपुरा लाभ
- आरोग्य व सुरक्षिततेच्या बाबतीत दुर्लक्ष

यावरून उद्योगाची आर्थिक वाढ आणि कामगार कल्याण यामध्ये तफावत असल्याचे स्पष्ट होते.

तांत्रिक प्रगतीचा असमतोल लाभ:

ऑटोमेशन, संगणकीकरण आणि आधुनिक यंत्रसामग्रीमुळे उत्पादनक्षमता आणि गुणवत्ता वाढली आहे. निर्यातीच्या संधी वाढल्या असून जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मकता निर्माण झाली आहे.[१४]

परंतु तांत्रिक बदलांचा लाभ मुख्यतः उद्योगमालकांना अधिक मिळाल्याचे दिसते. कारण—

- कमी मनुष्यबळात अधिक उत्पादन शक्य झाले.
- मजुरी खर्च कमी करण्याची संधी मिळाली.
- अकुशल कामगारांची गरज घटली.

याउलट कामगारांना पुढील समस्यांना सामोरे जावे लागले—

- रोजगार गमावण्याची भीती
- कौशल्यअभावी दुय्यम स्थान
- कमी वेतन व वाढती असुरक्षितता

कौशल्यविकास आणि पुनर्प्रशिक्षण याकडे पुरेसे लक्ष नसल्याने कामगारांना तांत्रिक प्रगतीचा थेट लाभ मिळाले नाही.

असंघटित क्षेत्राची समस्या:

यंत्रमाग उद्योगाचा मोठा भाग असंघटित क्षेत्रात मोडतो. लहान युनिट्स, कंत्राटी पद्धत आणि अनौपचारिक रोजगार यामुळे कामगार संघटनांची ताकद कमी राहते. परिणामी—

- कायद्यांची अंमलबजावणी प्रभावी होत नाही.
- वेतन व कामाच्या अटींबाबत सामूहिक वाटाघाटी शक्य होत नाहीत.

- सामाजिक सुरक्षेपासून वंचित राहण्याचे प्रमाण वाढते.

असंघटित स्वरूपामुळे प्रशासनालाही प्रभावी नियंत्रण ठेवणे कठीण जाते.

स्थलांतरित कामगारांचे विशेष प्रश्न:

अभ्यासातून हेही स्पष्ट होते की स्थलांतरित कामगार अधिक असुरक्षित स्थितीत आहेत. सुरक्षित कार्यपरिसर या बाबींमध्ये अडचणी येतात. स्थलांतरित कामगारांना ओळखपत्र, निवास, आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळविण्यात अडथळे निर्माण होतात.

राज्य व उद्योग यांची भूमिका:

उद्योगाच्या शाश्वत विकासासाठी कामगार कल्याण अत्यावश्यक आहे. केवळ उत्पादनवाढ आणि नफा वाढ यावर भर न देता सामाजिक न्याय आणि मानवी हक्क यांचाही विचार करणे आवश्यक आहे.[१५]

राज्य सरकार, उद्योगमालक आणि कामगार संघटना यांनी समन्वयाने पुढील बाबींवर लक्ष देणे गरजेचे आहे—

- किमान वेतन व सुरक्षा कायद्यांची कठोर अंमलबजावणी
- कौशल्यविकास व प्रशिक्षण कार्यक्रम
- सामाजिक सुरक्षा कवचाचा विस्तार
- आरोग्य व सुरक्षितता मानकांचे पालन

उपाययोजना:

अभ्यासाच्या आधारे असे दिसून येते की यंत्रमाग उद्योगाचा शाश्वत विकास आणि कामगारांचे सर्वांगीण कल्याण यासाठी बहुआयामी उपाययोजना आवश्यक आहेत. शासन, उद्योगमालक, कामगार संघटना आणि स्वयंसेवी संस्था यांचा समन्वय साधून पुढील उपाय प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे.

कौशल्यविकास कार्यक्रम:

तांत्रिक प्रगतीमुळे उद्योगात आधुनिक यंत्रसामग्री आणि संगणकीकृत प्रणालींचा वापर वाढला आहे. त्यामुळे कामगारांना अद्ययावत कौशल्यांची गरज निर्माण झाली आहे.[१६]

- आधुनिक यंत्रांचे संचालन व देखभाल यावरील प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.
- पुनर्प्रशिक्षण (Re-skilling) व कौशल्यवृद्धी (Up-skilling) योजना सुरू करणे.
- औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) व कौशल्य विकास केंद्रांशी समन्वय साधणे.
- डिजिटल तंत्रज्ञान व गुणवत्ता नियंत्रणाविषयी मार्गदर्शन देणे.

यामुळे कामगारांची रोजगारक्षमता वाढेल व तांत्रिक बदलांमुळे निर्माण होणारी बेरोजगारी कमी होईल.

सामाजिक सुरक्षा बळकट करणे:

कामगारांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी सामाजिक सुरक्षा योजनांची सक्तीची अंमलबजावणी आवश्यक आहे.

- ईएसआय, पीएफ आणि विमा योजना सर्व यंत्रमाग युनिट्समध्ये अनिवार्य करणे.
- कंत्राटी कामगारांनाही सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये समाविष्ट करणे.
- डिजिटल नोंदणी प्रणालीद्वारे पारदर्शकता वाढविणे.
- कामगारांना त्यांच्या हक्कांविषयी जनजागृती करणे.

यामुळे आजार, अपघात किंवा निवृत्तीच्या काळात कामगारांना आर्थिक आधार मिळू शकेल.

आरोग्य व सुरक्षा सुधारणा:

यंत्रमाग कारखान्यांमधील कार्यपरिसर आरोग्यदृष्ट्या सुरक्षित करणे अत्यावश्यक आहे.[१७]

- योग्य वायुवीजन व धूळ नियंत्रण व्यवस्था बसविणे.
- आवाज कमी करण्यासाठी तांत्रिक उपाययोजना करणे.
- कामगारांना सुरक्षात्मक साधने (मास्क, कानसंरक्षक, हातमोजे) उपलब्ध करून देणे.
- नियमित वैद्यकीय तपासणी व आरोग्य शिबिरे आयोजित करणे.
- अपघात प्रतिबंधक प्रशिक्षण व आपत्कालीन व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे.

यामुळे कामगारांच्या आरोग्य समस्यांमध्ये लक्षणीय घट होईल.

कामगार संघटनांचे सशक्तीकरण:

कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संघटनाशक्ती महत्त्वाची आहे.

- कामगार संघटनांना कायदेशीर व संस्थात्मक पाठबळ देणे.
- सामूहिक करार (Collective Bargaining) प्रणाली बळकट करणे.
- कामगारांना संघटित होण्यासाठी प्रोत्साहन देणे.
- सामाजिक संवाद (Social Dialogue) प्रक्रिया विकसित करणे.

संघटित प्रयत्नांमुळे वेतन, कामाचे तास व सुरक्षा मानकांमध्ये सुधारणा साधता येईल.

शासकीय अनुदान व धोरणात्मक मदत:

लघु व मध्यम यंत्रमाग उद्योगांना आर्थिक व तांत्रिक सहाय्य आवश्यक आहे.[१८]

- आधुनिक यंत्रसामग्रीसाठी अनुदान व सुलभ कर्ज योजना.
- ऊर्जा खर्चात सवलती.
- निर्यात प्रोत्साहन योजना.
- तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन सेवा.

यामुळे उद्योग आर्थिकदृष्ट्या सक्षम राहील आणि कामगारांच्या हितांचे संरक्षण करणे शक्य होईल.

निष्कर्ष:

महाराष्ट्रातील आधुनिक यंत्रमाग उद्योग राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा घटक आहे. तरीही, हा उद्योग कामगारांच्या जीवनमानाशी संबंधित अनेक आव्हानांना सामोरे जातो. संशोधनातून स्पष्ट होते की यंत्रमाग कामगारांच्या समस्या बहुआयामी स्वरूपाच्या आहेत, ज्यात आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक आणि तांत्रिक घटक समाविष्ट आहेत. या समस्यांचा दीर्घकालीन आणि प्रभावी निराकरण न झाल्यास उद्योगाचा शाश्वत विकास पूर्ण होणे कठीण आहे. उद्योगाचा शाश्वत विकास साधण्यासाठी कामगारांच्या हक्कांचे संरक्षण, सामाजिक सुरक्षा, कौशल्यविकास व कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. शासन, उद्योगमालक व कामगार संघटना यांच्या समन्वयातूनच या समस्या सोडविता येतील.

संदर्भ:

1. Deshpande, S. (2018). *Textile Industry and Labour Issues in Maharashtra*. Mumbai: Academic Press.
2. Kumar, R. (2020). *Industrial Labour and Social Security in India*. New Delhi: Sage Publications.
3. Sharma, P. (2019). *Indian Labour Laws and Social Protection*. Delhi: LexisNexis.
4. Government of India. (2021). *Minimum Wages Act, 1948 – Enforcement & Implementation Report*. Ministry of Labour & Employment, New Delhi.

5. Government of India. (2020). *Annual Report – Employees' State Insurance Corporation*. ESIC, New Delhi.
6. Government of Maharashtra. (2022). *Textile Industry Overview and Labour Welfare Report*. Directorate of Industries, Mumbai.
7. Government of India. (2019). *Economic Survey of India 2018–19*. Ministry of Finance, New Delhi.
8. Patil, V., & Kulkarni, A. (2021). *Social Security Challenges for Contract Labour in Textile Sector*. *Journal of Labour Studies*, 15(2), 45–62.
9. Singh, R. (2020). *Impact of Technological Change on Employment in Indian Textile Industry*. *Industrial Relations Journal*, 30(4), 78–95.
10. Ministry of Labour & Employment, Government of India. (1948). *Factories Act, 1948*.
11. Ministry of Labour & Employment, Government of India. (1948). *Employees' State Insurance Act, 1948*.
12. Ministry of Labour & Employment, Government of India. (1952). *Employees' Provident Funds and Miscellaneous Provisions Act, 1952*.
13. Ministry of Labour & Employment. (n.d.). *Labour Laws and Social Security* Retrieved October 15, 2025, from https://labour.gov.in
14. Employees' State Insurance Corporation. (n.d.). *Social Security Benefits* Retrieved November 1, 2025, from https://esic.nic.in
15. Sharma, P. (2019). *Indian Labour Laws and Social Protection*. Delhi: LexisNexis.
16. Singh, R. (2020). *Impact of Technological Change on Employment in Indian Textile Industry*. *Industrial Relations Journal*, 30(4), 78–95.
17. Patil, V., & Kulkarni, A. (2021). *Social Security Challenges for Contract Labour in Textile Sector*. *Journal of Labour Studies*, 15(2), 45–62.
18. Government of Maharashtra. (2022). *Textile Industry Overview and Labour Welfare Report*. Directorate of Industries, Mumbai.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

इचलकरंजीच्या विकासात दि. डेक्कन को-ऑफरेटिव्ह स्पिनिग मिल्सची ऐतिहासिक भूमिका

डॉ. बाळसाहेब आमगोंडा कोटलगी

सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,

नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज सांगली.

Corresponding Author - डॉ. बाळसाहेब आमगोंडा कोटलगी

DOI - 10.5281/zenodo.19723233

प्रस्तावना :

स्वातंत्र्योत्तर भारतात सहकारी चळवळीचा मोठ्या प्रमाणात प्रसार होऊन अनेक उद्योग आणि व्यवसाय सहकारातून निर्माण झाले. सहकार आणि मानवी सहजीवन यांचा जवळचा संबंध आहे. 'सहकार' हा मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. एकत्रितपणे काम करणे ही मानवाची सहज आणि नैसर्गिक प्रवृत्ती आढळते. सामाजिक विकास प्रवाहातील एक प्रमुख घटक 'सहकार' आहे. सहकार म्हणजे एकमेकांना मदत करणे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकारी चळवळीने एक आपला वेगळा ठसा उमटविला आहे. विविध क्षेत्रातील सहकारी संस्थानी महाराष्ट्राच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे.त्यापैकीच एक 'डेक्कन सहकारी सूतगिरणी' ही संस्था होय.

विषयाची निवड :

महाराष्ट्रात साखर कारखाने, सूतगिरण्या, दुग्धव्यवसाय अशा अनेक क्षेत्रातील सहकारी संस्थानी आर्थिकदृष्ट्या राज्याच्या विकासात अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडली आहे. सहकारी चळवळी मध्ये साखर कारखान्या इतकेच महत्त्व सहकारी सूतगिरणी संस्थाना आहे. महाष्ट्रातील इचलकरंजी सारख्या भागात स्थापन झालेल्या सहकारी सूतगिरणीच्या माध्यमातून या परिसराच्या विकासात बजावलेली भूमिका मांडण्याच्या हेतूने या विषयाची निवड केली आहे.

विषयाचे महत्त्व:

स्वातंत्र्योत्तर काळात गुजरात, आंध्रप्रदेश,तामिळनाडू या कापूस उत्पादन करणाऱ्या राज्यात प्रामुख्याने सूतगिरण्या अधिक प्रमाणात स्थापन झालेल्या आपणास आढळतात. महाराष्ट्रात विदर्भ मराठवाडा या भागात कापसाचे उत्पादन अधिक प्रमाणात होत असताना सूतगिरणीचे उद्योग मात्र मुंबई आणि खास करून पश्चिम महाराष्ट्रात विकसित झाले. इचलकरंजीला स्वातंत्र्य पूर्व काळापासूनच हातमाग व्यवसायाची परंपरा लाभलेली आहे. इचलकरंजीस वस्त्रोद्योग क्षेत्रात महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित करण्यात सहकारी सूतगिरण्याचे योगदान खूप मोठे आहे. या भागात कापसाचे उत्पादन फारसे होत नसतानाही कापसावर आधारित वस्त्रोद्योग निर्माण होऊन त्याचा मोठ्या प्रमाणात विस्तार होणे ही विशेष बाब म्हणून हा विषय महत्त्वाचा ठरतो.

संशोधनाचा उद्धेश :

१. सहकारी सूतगिरणी चळवळीचा संक्षिप्त आढावा घेणे.
२. इचलकरंजी येथील सूतगिरणी व्यवसायाची पार्श्वभूमी अभ्यासणे.
३. डेक्कन सूतगिरणीचा ऐतिहासिक आढावा घेणे.
४. डेक्कन सूतगिरणीच्या कार्याचे महत्त्व अभ्यासणे.
५. इचलकरंजीच्या विकासात डेक्कन सूतगिरणीची भूमिका स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. प्राथमिक आणि दुय्यम प्रकाशित व अप्रकाशित साधनांचा वापर केला आहे. संबधित विषयाच्या अनुषगाने उपलब्ध साधनांचा शोध घेऊन परीक्षणाद्वारे वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून अन्वयार्थ लावून सद्यस्थिती विचारात घेऊन मांडणी केली आहे. प्रस्तुत संशोधन हे उपलब्ध साधनांवरून केले असल्याने हे संशोधन ऐतिहासिक विश्लेषणानात्मक पद्धती मध्ये येते.

सहकारी सूतगिरणी:

'सहकार' या शब्दाला जो व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे त्यानुसार समूहात राहून कार्य करणे किंवा एकत्रितपणे कार्य करणे किंवा परस्पर सहाय्याने कार्य करणे किंवा सर्वाच्या हितासाठी एकत्रितपणे कार्य करणे म्हणजे सहकार होय. "आपल्या आर्थिक हिताच्या वृद्धीसाठी समानतेच्या तत्वावर मानवी भूमिकेतून व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकरी संस्था होय." सहकार ही एक व्यापक स्वरुपाची संकल्पना आहे. सामाजिक हिताच्या अनेक साधनापैकी एक महत्त्वाचे साधन आहे.[१]

कापूस या नगदी पिकावर प्रक्रिया करून कापडाच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या सुताचे उत्पादन करणारी प्रक्रिया संस्था म्हणजे 'सूतगिरणी' होय. सहकारी प्रक्रिया संस्था मध्ये सहकारी सूतगिरणी उद्योगाचा दुसरा क्रमांक लागतो. भारतात पहिली सूतगिरणी सन १९५४ मध्ये मुंबई येथे कावसजी नानाभाई दावर यांनी सुरु केली. कापूस विणकरांनी एकत्रित येऊन पहिली सूतगिरणी आंध्रप्रदेश मध्ये स्थापन केले. आपल्या सभासदाच्या कापसाला योग्य किंमत मिळावी म्हणून त्याचे सूत काढणे व विकणे या उद्देशाने कापूस उत्पादकांनी सूतगिरण्या स्थापन केल्या. महाराष्ट्रात पहिली सूतगिरणी इचलकरंजी येथे 'कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकर सहकरी संस्था' या नावाने स्थापन झाली.[२]

शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या कापसाचे पिंजण करणे, कापसाच्या गासड्या बांधणे,बांधलेल्या गासड्याचे सुत तयार करणे,ते सुत कापड गिरण्यांना विकणे इत्यादी कार्ये सूतगिरण्यांना करावी लागतात.त्याशिवाय कापसाच्या सरकीपासून खाद्यतेल आणि पशुखाद्य (पेंड) तयार करण्याचा उद्योग सहकार क्षेत्रात चालतो. भारताच्या निर्यात व्यापारात सुतापासून तयार कापड उद्योगाला महत्त्वाचे स्थान आहे. कापूस उत्पादकांनी स्थापन केलेल्या गिरण्या तसेच जिनिग-प्रेसिंग सहकारी संस्था आपल्या सभासदासाठी सुताचे उत्पादन आणि पुरवठा करण्यासाठी विणकरांनी एकत्र येऊन सूतगिरण्या स्थापन केल्या. महाराष्ट्रामध्ये गेल्या ५० वर्षात सहकारी सूतगिरणी संस्थांनी उल्लेखनीय अशी प्रगती केली आहे.

इचलकरंजी सरंजामदार :

इचलकरंजी हे ठिकाण कोल्हापूर पासून पूर्वेस १८ मैलावर पंचगंगा नदीच्या काठावर वसलेले आहे.सन १७०४ मध्ये संताजी घोरपडे यांचे सेवक नारो महादेव जोशी

हे इचलकरंजीचे मूळ संस्थापक सरंजामदार होते. त्यांनी आपले सरदार संताजी घोरपडे यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी घोरपडे हे आडनाव धारण केले. सन १८२४ मध्ये सातारा घराण्याचे सरंजामदार बनले.[३] तर सन १८६२ मध्ये करवीरची सेवा स्वीकारली. याभागात कोष्टी,साळी,जिनगर,सणगर या समाजातील लोक हातमागाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालवत असत. या व्यवसायाच्या वाढीसाठी संजामादाराकडून प्रोत्साहन देण्यासाठी विणकराना कर्नाटकातील रबकवी आणि बनहट्टी येथे प्रशिक्षणासाठी पाठविले.व्यवसायासाठी आर्थिक मदत केल्याने हा व्यवसाय वाढू लागला.[४] इचलकरंजीच्या वाढत्या विस्तारामुळे १८९३ला नगरपालिकेची स्थापना झाली.

सहकाराची मुहर्तमेढ :

सन १८९२ मध्ये सरंजामदाराचे आठवे वंशज श्रीमंत नारायणराव हे वारसदार म्हणून विराजमान झाले. ते आधुनिकीकरणाच्या बाबतीत अग्रेसर होते. त्यांनी जनतेच्या हितासाठी अनेक नवीन प्रशासकीय आणि भौतिक सुधारणाना प्रारंभ केला.हातमाग विणकरांना भांडवल पुरवठा करून सूत व रेशीम रंगविण्याचे कामाला गती दिली. आधुनिक इचलकरंजीची पायाभरणी आणि ओद्योगिक केंद्र स्थापन करण्याचे श्रेय श्रीमंत नारायणराव यांना दिले जाते. त्यांनी मुंबई येथील राज्य परिषदेत आर्यलंड मधील सहकारी चळवळीवर अभ्यासपूर्ण भाषण केले होते. त्यांनी सहकाराचे महत्त्व ओळखून इचलकरंजी मध्ये सहकाराची मुहर्तमेढ रोवली.[५]

इचलकरंजीमधील सूतगिरणी उद्योग :

इचलकरंजी येथे १८५० नंतर अनेक यंत्रमाग सरू झाले.प्रारंभी कमी भांडवलावर अल्प प्रमाणात सुरु झालेला यंत्रमाग व्यवसाय येथील अनुकूल परिस्थितीमुळे हळूहळू विस्तारत गेला. सन १८९५च्या अखेरीस यंत्रमागाची संख्या ४५० पर्यंत पोहचली.[६] श्रीमंत नारायणराव यांनी सन १९०२ मध्ये तरुण यंत्रमाग व्यासायिक विठ्ठल दातार यांना मुंबई येथील यंत्र सामुग्री प्रदर्शनास पाठवून 'शेफिल्ड' हे आधुनिक यंत्रमाग इचलकरंजीत आणले. सन १९०४ मध्ये श्रीमंत नारायणराव यांच्या मदतीने विठ्ठल दातारांनी 'व्यंकटेश रंगू तंतू मिल' या नावाने ओळखला जाणारा पहिला पाँवरलूम कारखाना सुरु केला.[७] आधुनिक यंत्रमाग गिरणीचा पाया इचलकरंजीत घातला गेला. या गिरणीला मिळालेले यश पाहून इतरांनी प्रेरणा घेऊन अनेक यंत्रमाग सुरु केले. सन १९०७ मध्ये त्यांनी जिनिग कारखाना सुरु करून इचलकरंजी मधील वस्त्रोद्योगाला प्रोत्साहन दिले. यासाठी कसबी कारागीर बाहेरून आणले. बुगड, कांबळे, मराठे, सांगले या सारख्या कुटुंबानी आपल्या योगादानाद्वारे हा व्यवसाय वाढविला.

प्रारंभी केवळ पांढरे धोतर तयार केले केले जात होते.पहिल्या महायुद्धा नंतर रंगीत कापड तयार करण्यास सुरुवात झाली.या उद्योगांना पतपुरवठा नियमितपणे व्हावा या हेतूने 'इचलकरंजी अर्बन बँकेची स्थापना करण्यात आली. २० व्या शतकाच्या प्रारंभी ५०० च्या आसपास यंत्रमाग होते. १९२० सालापर्यंत ही संख्या सुमारे १४००च्या वर गेली.[८] बाबासाहेब खंजिरे, दत्ताजीराव कदम,रत्नाप्पा कुंभार या सारख्या नेत्यांनी इचलकरंजीत सहकार चळवळीचा अधिक विस्तार केला. त्यामळे नंतरच्या काळात या परिसरात अनेक सहकारी सूतगिरण्याबरोबरच सायझिंग प्रोसेसिंग कारखाने देखील सहकारी तत्वावर उभारले. याचे सर्वस्वी श्रेय हे सहकारी चळवळीला दिले जाते.

सहकारी सूतगिरणी चळवळ :

महाराष्ट्रातील सहकारी सूतगिरणीच्या विकासात इचलकरंजीमधील सहकारी सूतगिरणी चळवळीचे खूप मोठे योगदान आहे. त्यासाठी इचलकरंजी मधील सूतगिरणीशी संबधित काही प्रमुख सहकारी संस्था आणि संघटना यांचे कार्य महत्त्वाचे आहे. इचलकरंजीमधील हातमाग विणकरांना प्रामुख्याने नियमितपणे सूत पुरवठा करणे आणि सभासदांना विणकामासाठी आवश्यक असणारे कच्चा माल वाजवी किंमतीत उपलब्ध करून देण्याच्या हेतूने काही हातमागधारकानी 'इचलकरंजी हातमाग सहकारी संघटना मर्यादित' या संस्थेची स्थापना २६ जुलै १९४५मध्ये केली. प्रारंभी केवळ ४१ सभासद आणि १०००० भागभांडवलावर या संस्थेने आपले कार्य सुरु केले.[९]

इचलकरंजीमध्ये विणकाम करणाऱ्या 'साळी' लोकांनी आपल्या हितासाठी १९४५ मध्ये 'श्री. स्वकुळ साळी सहकारी विणकरी संघ' स्थापन केला. तसेच इचलकरंजीमधील इतर हातमाग विणकर एकत्रित येऊन १३ ऑगस्ट १९४५मध्येच 'मध्यवर्ती सहकारी हातमाग विणकर संघ मर्यादित ' या नावाची संस्था स्थापन केली. हातमाग उद्योगाला उत्तेजन देण्यासाठी सन १९४८ मध्ये मध्यवर्ती हातमाग विणकर सहकारी संघ लि.कोल्हापूर जिल्हा या संस्थेचे प्रधान कार्यालय इचलकरंजी येथे सुरु करण्यात आले. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातिक स्तरावर अनेक बदल घडून आले. इचलकरंजीमधील यंत्रमाग उद्योगाला चालना देण्याच्या हेतूने ऑगस्ट १९४८ मध्ये 'इचलकरंजी यंत्रमाग विणकर संघटनेची' स्थापना केली. इचलकरंजीमधील विविध हातमाग आणि यंत्रमागधारकांनी उत्पादित केलेल्या सुतावर प्रक्रिया करण्यासाठी मुंबई सहकारी संस्था कायद्या अंतर्गत 'लक्ष्मी प्रक्रिया सहकारी संस्था मर्यादित इचलकरंजी' या संस्थेची स्थापना ऑगस्ट १९५८मध्ये करण्यात आली.[१०]

इचलकरंजी मधील पहिली सहकारी सूतगिरणीची स्थापना ही एका विशेष अशा घटनेवरून झालेली आहे. सन १९५९मध्ये दिवाळीच्या काळात मिरज रेल्वे स्टेशनवर अचानक रामचंद्र दत्तात्रय गोवंडे यांची आबासाहेब खेबुडकर यांच्याशी झाली हे दोघे पूर्वीचे शालेय मित्र होते.गोवंडे हे गुलबर्गा येथील एका मोठ्या स्पिनिग मिलचे जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत होते, तर खेबुडकर हे खासदार होते. या दोघाची पुन्हा सांगलीतील भेटी दरम्यान आपल्या भागातच मिल काढण्यासाठी परस्पराच्या सहकार्याने प्रयत्न करण्याचे ठरले. त्यानुसार आबासाहेब खेबुडकरनी इचलकरंजीतील मित्र दत्ताजीराव कदम, अनंतराव भिडे,पंडितराव सावनुरे, ताराचंदजी बोहरा, वसंतराव दातार यांच्यातील चर्चेनुसार सहकारी तत्वावर मिल काढण्याचे निश्चित झाले.

डेक्कन मिल स्थापना :

इचलकरंजी मध्ये सहकारी तत्वावर सर्वात मोठी मिल उभी करण्यासाठी मोठ्या जागेचा प्रश्न होता. वसंतराव दातार यानी आपली २६ एकर जमीन या मिलसाठी मोफत देऊन जागेचो अडचण दूर केली. अनंतराव भिडे सोबत इतरांनी सायकलवरून फिरून शेअर्स गोळा केले. या संस्थेची नोंदणी क्रमांक पी.२९७५/१९६० दिनांक ३/१०/१९६० नोंदणीकृत करण्यात आले. अशा रीतीने 'दि.डेक्कन को-ऑफरेटिव्ह स्पिनिग मिल्स लिमिटेड' या नव्या मिलची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. पूर्वीच ठरल्याप्रमाणे रामचंद्र गोवंडे यांनी गुलबर्गा येथील आलिशान कार्यालयातील जनरल मॅनेजरच्या नोकरीचा त्याग करून आपल्या भागाच्या विकासासाठी या नव्याने स्थापन झालेल्या मिलचे पहिले संथापक मॅनेजर बनले.या मिलचे १९६१मध्ये तत्कालीन भारताचे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात

आले.[११] अशा प्रकारे भारतातील सहकारी तत्वारील पहिल्या मोठ्या सूतगिरणीची स्थापना झाली.

उत्पादन आणि विस्तार :

इचलकरंजीमध्ये या सूतगिरणी मध्ये प्रारंभी १२००० स्पिंडलच्या क्षमते सह उत्पादन १८ नोव्हेंबर १९६२ रोजी सुरु केले. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात सहकारी क्षेत्रात अग्रेसर संस्था मानली जाते. सन १९६१ ते १९७५ या दरम्यान दि डेक्कन मिलने खूप मोठी भरारी घेतली. हा काळ इचलकरंजी मधील वस्त्रोद्योगाच्या दृष्टीने सुवर्णकाळ मानला जातो.या मिल पासून प्रेरणा घेऊन अनेक सहकारी सूतगिरणीचा जन्म झाला म्हणून या संस्थेला इचलकरंजीतील सहकारी सूतगिरणीची जननी मानली जाते. या सूतगिरणीने आपले व्यवस्थापन योग्य प्रकारे करून सूत उद्योगातील विविध प्रक्रियेत लक्षणीय अशी प्रगती केली. शिवण कामाच्या विविध श्रेणीतील दर्जेदार धाग्याचे उत्पादन केले. आर्थिक मंदीच्या काळात उत्पादन प्रकियेत विविधता आणून आर्थिकदृष्ट्या संस्थेस सक्षम बनविले. यांचे श्रेय निश्चितपणे संस्थेचे सभासद व व्यवस्थापन समितीला दिले जाते.

निर्यात :

डेक्कन मिल मध्ये उत्पादित झालेल्या मालाला योग्य बाजारपेठ निर्माण होणे हे अत्यंत आवश्यक होते. मुंबई ,सूरत आणि कलकत्ता या सारख्या मोठ्या बंदराच्या ठिकाणापासून दूर असलेल्या इचलकरंजीमधील मालासाठी मागणी असणे आव्हानात्मक होते,मात्र केवळ दर्जेदार आणि उत्कृष्ट गुणवत्तापूर्ण उत्पादनाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजारपेठेत या मिलने आपली ओळख निर्माण केली. या संस्थेने मोठ्या प्रमाणात मालाची निर्यात करून देशाच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान दिले आहे. सन १९८० ते ९० या दशकात या संस्थेने कापसाच्या धाग्याच्या निर्यातीमधून परकीय चलनाचे मूल्य दर्शविले आहे.

अ.न.	वर्ष	प्रमाण (टनात)	मूल्य (कोटीत)
१.	१९८०-८१	६४०	२.२३
२.	१९८३-८४	९९४	३.८०
३.	१९८५ -८६	१८४५	६.१८
४.	१९८७ -८८	२९९८	१३.७७
५.	१९८९-९०	२७८४	१७.७०

या मिल मधील धाग्याची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जाते एकूण उत्पादनाच्या १५% इतके प्रमाण आहे.[१२] मिल मधील व्यवस्थापनाने दूरदृष्टीने नियोजनबद्ध उत्पादनात विविधता निर्माण केल्यानेच निर्यातीला चालना मिळाली. परिणामी सभासदाच्या जबाबदारी बरोबरच लहान मोठे यंत्रमाग आणि हातमागधारक यांच्या हिताची जोपासना केली जाते.

आधुनिकीकरण:

या मिलने सातत्याने आपले उत्पादन आणि बाजारपेठ टिकविण्यासाठी नूतनीकरण आणि आधुनिकीकरणास प्राधन्य दिले आहे. बाजारपेठेतील आपली गुणवत्ता अबाधित ठेवण्याकरिता विविध प्रकारचे आधुनिक यंत्रणा विकसित करून कमी खर्चात अधिक चांगले दर्जेदार निर्यातक्षम धागा उत्पादनाला महत्त्व दिलेले आहे.खर्चावर नियंत्रण ठेवून विविधतापूर्ण मालाचे उत्पादन

वाढविण्यासाठी येथील व्यवस्थापन सतत प्रयत्न करीत आहे.

कामगार हितरक्षण:

या संस्थेच्या कामकाजाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संस्था चालक आणि कामगार यांच्यातील सलोख्याचे संबध होय. या मिलचे संस्थापक संचालक दत्ताजीराव कदम याच्यासारख्या कुशल नेतृत्वामुळे कामगाराच्या हिताची जोपासना झाल्यामुळे वाद-विवाद, संप, आंदोलन यासारखे प्रश्न कधी निर्माण झाले नाहीत. मिल व्यवस्थापनाला अखंडपणे पांठिबा देणाऱ्या निष्ठावान कामगारांचेही योगदान मोठे आहे. येथील प्रतिनिधी संघटना, पदाधिकारी, कामगार या सर्वाच्या सहकार्यामुळे एक वेगळेपण या संस्थेने जोपासले आहे.

डेक्कन सूतगिरणीचे योगदान:

सहकार क्षेत्रातील इतर सहकारी संस्थे प्रमाणेच डेक्कन सहकारी सूत गिरणीने सामाजिक जाणिवेचे भान ठेवून इचलकरंजी परिसरातील विकासा बरोबरच सूतगिरणी उद्योगाच्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

१. डेकोस्पिन चॅरिटेबल ट्रस्ट : इचलकरंजीमधील सामाजिक आणि आर्थिक जाणीवेतून समाजामधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मदत करण्याच्या हेतूने 'डेकोस्पिन चॅरिटेबल ट्रस्ट' या नावाने संस्था स्थापन करून सामान्य जनतेच्या हितासाठी अनेक उपक्रम आणि योजना सुरु केल्या आहेत.

२. डेकोस्पिन रिसर्च फाउंडेशन : यंत्रमाग उद्योगाच्या प्रसार आणि विकासासाठी 'डेकोस्पिन रिसर्च फाउंडेशन' ची स्थपना करण्यात आली. याच्या माध्यामातून लहान यंत्रमागधारकांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनविणे, उत्पादनात विविधतापूर्ण कौशल्य विकसित करणे,वाढत्या स्पर्धा आणि समस्यांबाबत सल्ला देणे इत्यादी बाबतीत ही संस्था मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहे. सूतगिरणी उद्योगातील संशोधनासाठी अत्याधुनिक प्रयोगशाळेतून प्रयत्न होत आहेत.[१३]

३. 'दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन' : इचलकरंजी आणि आसपासच्या परिसरात वाढत्या सूतगिरणी उद्योगासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता होती. कर्मचारी वर्ग, प्रशिक्षित पर्यवेक्षक याची गरज भागविण्यासाठी या सहकारी सूतगिरणीच्या पुढाकाराने 'दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन' सोसायटीची स्थापना करण्यात आली.[१४]

निष्कर्ष :

आशिया खंडातील सहकारी क्षेत्रातील पहिली आणि सर्वात मोठी सूतगिरणी म्हणून या गिरणीला विशेष स्थान आहे. इचलकरंजी सारख्या ग्रामीण भागात ओद्योगिक विकासाबरोबरच आर्थिक प्रगती साधण्यासाठी या मिलने महत्वाची भूमिका पार पाडली आहे. या मिलच्या विस्ताराचा इचलकरंजी आणि आसपासच्या भागावर दूरगामी परिणाम झाला. सभासदांना सर्वाधिक बोनस देणारी ही संस्था होती. जागतिकीकरणाच्या ओघात या संस्थेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागले त्यामुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत आल्याने सन २००६मध्ये या संस्थेचे खाजगीकरण झाले आहे. असे असले तरी या सूतगिरणीमुळे या भागातील सहकार चळवळीला चालना मिळाल्याने सहकारावर आधारित अनेक संस्था उभ्या राहिल्या. व्यापार, उद्योग, वहातुक, दळणवळण यात मोलाची भर पडली. या संस्थेच्या प्रेरणेने सहकार क्षेत्रात बँकिग, गृहनिर्माण,शिक्षण व ग्राहकसंस्थाचा विस्तार झाला. थोडक्यात इचलकरंजी भागात सहकारी चळवळीने केलेल्या सर्वांगीण विकासात या मिलचे फार मोठे योगदान आहे.

अशा रीतीने इचलकरंजी सरंजामदारची दूरदृष्टी व आधुनिक विचारामुळे या नगरीचा पाया घातला गेला, सहकारी तत्वाने प्रेरित होऊन विविध संस्था स्थापन करण्यासाठी लाभलेले कुशल नेतृत्व ,संस्थाच्या विकासासठी झटणारे कार्यकर्ते यामुळे सहकारी चळवळीचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. इचलकरंजी आणि आसपासच्या परिसरात सहकारी सूतगिरणीच्या माध्यामातून कायापालट होऊन वस्त्रोद्योग नगरी बनली आहे. सूतगिरणी उद्योगाच्या वाढीबरोबरच वाढत्या लोकसंख्येमुळे या शहराचा झपाट्याने विस्तार झाला आहे. त्यामुळेच इचलकरंजी हे पश्चिम महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाबरोबरच सहकारचे एक प्रमुख केंद्र बनले आहे. महाराष्ट्राचे 'मँचेस्टर' म्हणून इचलकरंजी ओळख निर्माण करण्यात डेक्कन मिलची भूमिका फार महत्त्वाची ठरली आहे.

संदर्भ:

१. डॉ.शहा रूपा, सहकाराचा विकास,फडके प्रकाशन कोल्हापूर, २०२०.पृ.११.

२. कित्ता. पृ. ३०.

३. खरे वा.वा., 'इचलकरंजी संस्थानाचा इतिहास' आर्यभूषण प्रेस,पुणे, १९३२, पृ.१४७.

४. ताम्हणकर एन.डी. 'श्रीमंत नारायणराव घोरपडे यांचे चरित्र' इचलकरंजी, १९५१, पृ.८१.

५. भिडे ग.र. व देशपांडे पु.ल., (संपा.) 'कोल्हापूर दर्शन' पहिली आवृत्ती इंटर नॅशनल पब्लिशिंग सर्विसेस,डेक्कन जिमखाना पुणे,१९७१,पृ.३६६.

६. मोडक बी.पी.,'रिपोर्ट ऑन द इंडस्ट्रीयल सर्वे ऑफ कोल्हापूर स्टेट' कोल्हपूर १८९५, पृ.२७.

७. ताम्हणकर एन.डी. उपरोक्त,पृ.८३.

८. भिडे ग.र. व देशपांडे पु.ल., उपरोक्त, पृ.३६७.

९. Patil Sudhir A.,A Study of manage rid aspects of Co- Operative Spinning Mills in Inchalkaranji, Shivaji University Kolhpaur, 2017, P.77.

१०. Ibid, P.82.

११. Nike Chandravdan, Glimpses of Ichalkaranji City,(Lalu Pub. US) Laxmi Book Publication, Solapur, 2016. P. 135.

१२. दास्ताने संतोष,महाराष्ट्र २०००,दास्ताने आणि कंपनी, पुणे,२०००, पृ.८१.

१३. Nike Chandravdan, Ibid, P.152.

१४. Patil Sudhir A., P. 89.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांचे सातारा जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

डॉ. प्रतिभा घाटगे

इतिहास विभाग प्रमुख,

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

Corresponding Author - डॉ. प्रतिभा घाटगे

DOI - 10.5281/zenodo.19723257

सारांश:

विसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाची अवस्था अत्यंत दयनीय होती. शिक्षण हे उच्चवर्गीय समाजापुरते मर्यादित राहिले होते, तर बहुसंख्य ग्रामीण, शेतकरी व वंचित समाज शिक्षणापासून वंचित होता. सातारा जिल्हाही या परिस्थितीपासून अपवाद नव्हता. अशा वेळी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्था या संस्थेने प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी व्यापक चळवळ उभी केली. प्रस्तुत संशोधन लेखात ब्रिटिशकालीन शिक्षणधोरणांची पार्श्वभूमी, झिरपण सिद्धांताचे अपयश, सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यांची अंमलबजावणी, सातारा जिल्ह्यातील प्राथमिक शाळांची स्थापना आणि त्यातून घडलेले सामाजिक परिवर्तन यांचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. अभ्यासातून असे स्पष्ट होते की, रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांनी सातारा जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासात तसेच सामाजिक जागृतीत ऐतिहासिक योगदान दिले.

प्रस्तावना:

विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतातील शिक्षणव्यवस्था ही सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मर्यादित स्वरूपाची होती. ब्रिटिश राजवटीत शिक्षणाची रचना मुख्यतः प्रशासकीय गरजा पूर्ण करण्यासाठी केली गेली होती. त्यामुळे शिक्षणाचा लाभ उच्चवर्गीय, शहरी आणि संपन्न समाजापुरताच मर्यादित राहिला. ग्रामीण, दुष्काळी आणि शेतकरी बहुल भागात शिक्षणाची सुविधा अत्यल्प होती. सातारा जिल्हा हा प्रामुख्याने कृषिप्रधान आणि भौगोलिकदृष्ट्या काही प्रमाणात दुर्गम असल्यामुळे येथे शिक्षणाचा प्रसार फारसा झाला नव्हता. निरक्षरता, गरिबी आणि सामाजिक विषमता ही येथील प्रमुख समस्या होती.

या पार्श्वभूमीवर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. त्यांनी १९१९ साली Rayat Shikshan Sanstha ची स्थापना करून "शिक्षण हे सर्वांसाठी" हा मूलमंत्र स्वीकारला. त्यांच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक समता आणि स्वाभिमान निर्माण करण्याचे माध्यम होते. सातारा जिल्ह्यातील दुष्काळी व वंचित भागात प्राथमिक शाळा स्थापन करून त्यांनी शिक्षणाचा प्रकाश सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

या संशोधन लेखाचा उद्देश म्हणजे रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांनी सातारा जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या योगदानाचा सखोल अभ्यास करणे. यात ब्रिटिशकालीन शिक्षणधोरणे, झिरपण सिद्धांत, प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी, सामाजिक परिणाम आणि दीर्घकालीन प्रभाव यांचा अभ्यास करण्यात येतो. प्रस्तुत

लेखातून हे स्पष्ट होते की, रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांनी केवळ शिक्षणाचा प्रसार केला नाही, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभारली.

ब्रिटिशकालीन शिक्षणधोरणे व झिरपण सिद्धांत:

ब्रिटिश सरकारने भारतात शिक्षणाची धोरणे आखताना "झिरपण सिद्धांत" (Downward Filtration Theory) स्वीकारला होता. या सिद्धांतानुसार, समाजातील उच्चवर्गीयांना शिक्षण दिल्यास ते ज्ञान हळूहळू खालच्या स्तरांपर्यंत पोहोचेल. परंतु प्रत्यक्षात हा सिद्धांत अपयशी ठरला. उच्चवर्गीय समाजाने शिक्षणाचा लाभ स्वतःपुरताच मर्यादित ठेवला आणि सर्वसामान्य जनता निरक्षरच राहिली.

इ.स. १८८२ मध्ये हंटर आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराची शिफारस केली. त्या वेळी Mahatma Jyotirao Phule यांनी ग्रामीण भागातील शिक्षणाची दयनीय अवस्था आयोगासमोर मांडली. त्यांनी स्पष्ट केले की, बहुसंख्य गावांमध्ये शाळा उपलब्ध नाहीत आणि गरीब जनतेला शिक्षणाची संधी मिळत नाही.

पुढे Gopal Krishna Gokhale यांनी १९१०-११ मध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी ठराव मांडला. जरी हा ठराव तात्काळ मंजूर झाला नाही, तरी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची कल्पना समाजात दृढ झाली. १९२१ मध्ये शिक्षणाची जबाबदारी प्रांतिक सरकारांकडे देण्यात आली आणि प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर रयत शिक्षण संस्थेची चळवळ उभी राहिली. भाऊराव पाटील यांनी सरकारी प्रयत्नांबरोबरच समाजातील लोकांना जागृत करून शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य केले. त्यामुळे झिरपण सिद्धांताच्या अपयशानंतर समाजआधारित शिक्षणचळवळ प्रभावी ठरली.

रयत शिक्षण संस्थेची स्थापना व कार्यपद्धती:

१९१९ साली कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. संस्थेचा उद्देश स्पष्ट होता— ग्रामीण व वंचित समाजाला शिक्षण उपलब्ध करून देणे. त्यांनी जाणीवपूर्वक दुष्काळी आणि दुर्गम भागांची निवड करून तेथे प्राथमिक शाळा सुरू केल्या. यावरून त्यांची दूरदृष्टी आणि सामाजिक बांधिलकी दिसून येते.

संस्थेची कार्यपद्धती अत्यंत लोकाभिमुख होती. भाऊराव पाटील स्वतः खेड्यापाड्यात जाऊन ग्रामस्थांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत. त्यांनी सुमारे ३०० गावांमध्ये बैठका घेतल्या आणि ग्रामसभांद्वारे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे ठराव मंजूर करून सरकारकडे पाठविण्यास प्रोत्साहित केले.

शिक्षकांची निवड करताना त्यांच्यात सामाजिक बांधिलकी असावी यावर भर देण्यात आला. शिक्षकांनी केवळ अध्यापन न करता समाजातील अडचणी सोडविण्यास मदत करावी, अशी अपेक्षा होती. त्यामुळे शाळा ही केवळ शिक्षणसंस्था न राहता सामाजिक परिवर्तनाचे केंद्र बनली.

रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांनी सातारा जिल्ह्यात शिक्षणाची चळवळ उभारली. पुढे माध्यमिक व उच्च शिक्षणासाठीही पायाभूत सुविधा निर्माण झाल्या. या सर्व कार्यामुळे सातारा जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासाला गती मिळाली.

सामाजिक परिवर्तन व दीर्घकालीन परिणाम:

रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांनी सातारा जिल्ह्यात सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू केली. त्या

काळात समाजात जातीभेद, अस्पृश्यता आणि आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात होती. भाऊराव पाटील यांनी सर्व जातीधर्मांतील विद्यार्थ्यांना समान प्रवेश देऊन सामाजिक समतेचा पाया घातला.

शिक्षणामुळे लोकांमध्ये आत्मविश्वास आणि स्वाभिमान निर्माण झाला. मुलींच्या शिक्षणाला चालना मिळाली. ग्रामीण भागातील निरक्षरतेचे प्रमाण कमी होऊ लागले. शिक्षकांनी स्वच्छता, आरोग्य आणि सामाजिक सलोखा याबाबत जनजागृती केली.

या शाळांनी पुढील पिढ्यांसाठी माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा मार्ग खुला केला. सातारा जिल्हा शिक्षणाच्या क्षेत्रात प्रगत जिल्हा म्हणून ओळखला जाऊ लागला. आजही रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा प्रभाव दिसून येतो.

एकूणच, रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांनी सातारा जिल्ह्याच्या शैक्षणिक आणि सामाजिक इतिहासात परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या योगदानामुळे शिक्षणाचा प्रकाश ग्रामीण भागात पोहोचला आणि सामाजिक समतेची जाणीव दृढ झाली.

संदर्भ:

१. पाटील, पी. जी. (१९९५). कर्मवीर भाऊराव पाटील: जीवन व कार्य. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.

२. Rayat Shikshan Sanstha – अधिकृत अहवाल व प्रकाशने.

३. Keer, D. (1974). Mahatma Jotirao Phule: Father of Social Revolution. Popular Prakashan.

४. Government of Bombay (1923). Report on Primary Education Reforms.

५. Gopal Krishna Gokhale (1911). Speeches on Compulsory Primary Education.

६. Hunter Commission Report (1882). Indian Education Commission Report.

७. Deshpande, S. (2004). Educational Movements in Maharashtra. Mumbai University Press.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

रयत शिक्षण संस्थेचे सातारा शहरातील स्वातंत्र्यपूर्व काळातील शैक्षणिक कार्य

डॉ. दत्तात्रय ज्ञानदेव कोरडे

इतिहास विभाग,

छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

Corresponding Author - डॉ. दत्तात्रय ज्ञानदेव कोरडे

DOI - 10.5281/zenodo.19723298

प्रास्ताविक:

महात्मा फुले यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज व कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रभाव कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मनावर पडलेला होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण सोडल्यानंतर ज्या ज्या ठिकाणी नोकऱ्या केल्या त्या नोकऱ्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष संबंध हा तळागाळातील समाजाशी आला. त्यातूनच त्यांना समाजाचे वास्तव दर्शन झाले. त्यावेळी महाराष्ट्रातील समाज हा आर्थिक, राजकीय व सामाजिकदृष्टया मागासलेला होता. दरिद्री बनलेला होता. या समाजाला या परिस्थितीतून बाहेर काढावयाचे असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे. म्हणूनच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्हयातील दुधगाव येथे इ.स.१९१० मध्ये 'दुधगाव विद्यार्थी आश्रम' स्थापन केला. या आश्रमातर्फे दुधगाव येथे प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्यासाठी एक वसतिगृह चालविले. अशाप्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण विषयक दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून प्रथम वसतीगृह स्थापन केले. त्याचेच रुपांतर पुढे रयत शिक्षण संस्थेत झाले. रयत शिक्षण संस्थेचा शैक्षणिक प्रसार हा संपूर्ण महाराष्ट्रभर झाला होता. तरी या शोधनिबंधात सातारा शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याविषयीची माहिती सविस्तर दिलेली आहे.

रयत शिक्षण संस्थेची स्थापना:

सातारा जिल्हयातील सत्यशोधक समाजाची परिषद ४ ऑक्टोबर १९१९ रोजी सातारा जिल्हयातील कराड तालुक्यात असणाऱ्या काले नावाच्या खेडेगावात विजयादशमीच्या दिवशी भरली होती. या परिषदेसाठी सातारा जिल्हा व बाहेरील अनेक प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी पुण्याचे सुप्रसिद्ध वकील श्री.केशवराव बगाडे हे होते. ही परिषद सुरू असताना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या शिक्षणविषयक कार्याला चालना मिळावी या उद्देशाने उभे राहून आपले म्हणणे सांगितले की, 'नुसत्या भाषणांनी व परिषदा घेऊन आपला बहुजन समाज सुधारणार नाही. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी एक शिक्षण संस्था स्थापन करणे गरजेचे आहे. भाऊरावांची ही सूचना सर्व परिषदेत पसंत पडली. त्यावेळी सातारा जिल्हयातील ग्रामीण जनतेसाठी शिक्षण संस्था काढावी असे भाऊराव पाटील यांना सूचना केली. या सूचनेस लगेचच प्रतिसाद मिळाला. त्यानुसार ज्याठिकाणी ही परिषद चालू होती त्याचठिकाणी म्हणजेच काले

ता.कराड येथे ४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली.[१]

रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेचे घटनापत्रक (१९१९):

रयत शिक्षण संस्थेची स्थापना ही ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले ता.कराड येथे झाली. प्रारंभीच्या काळात या संस्थेचा कारभार स्वतः कर्मवीर भाऊराव पाटील पाहत असत. पुढे त्यांनी रयत शिक्षण संस्थेसाठी लोकशाही प्रधान अशी घटना तयार केली आणि त्या घटनेनुसार संस्थेचा कारभार संस्थेच्या आजीव सेवकांच्याकडे सुपूर्त केला. कर्मवीर भाऊराव पाटील हे स्वतः मात्र कोणत्याही अधिकारपदावर न राहता त्यांनी केवळ मार्गदर्शन केले.[२]

रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांचे सातारा शहराच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदान:

महाराष्ट्रात २० व्या शतकाच्या सुरूवातीला प्राथमिक शिक्षण ही एक मोठी समस्या बनली होती. त्यास सातारा जिल्हा ही अपवाद नव्हता त्याचदृष्टीने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्हयात अनेक प्राथमिक शाळा स्थापन केल्या. या शाळातून जे विविध उपक‘म राबविले त्यामधून कर्मवीर भाऊराव पाटील यांची ओळख एक महान समाजसुधारक म्हणून समाजाला झाली. या प्राथमिक शाळा स्थापन करीत असताना त्यांनी तेथील भौगोलिक परिस्थिती व दुष्काळी भाग यांचीच निवड केली होती. महाराष्ट्रासह संपूर्ण सातारा जिल्हयात अशासार‘या डोंगराळ प्रदेशात व दुष्काळी भागात त्यांनी प्राथमिक शाळा काढलेल्या दिसून येतात. यावरूनच कर्मवीर भाऊराव पाटील यांची कल्पकता व दूरदृष्टी दिसून येते.

रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शिक्षणाची सुरूवात ही शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या महाविद्यालयाने केली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्हयातील अनेक गावात शाळा काढण्याचे ठरविले ते गाव लहान असले तरी तेथे शाळा काढण्यास प्रारंभ केला. परंतु या सर्व शाळेत शिक्षक हा शिकविण्यासाठी नेमण्यात येणार होता. तो शिक्षक प्रशिक्षित असावा. यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षकांना प्रशिक्षण मिळावे या उद्देशाने महाविद्यालय काढण्याचे ठरविले. त्यासंबंधी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी इ.स.१९२१ पासून प्रात्यक्षिक महाविद्यालये सुरू करण्याचा विचार केला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अशी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू करण्यासाठी बैठक घेण्याचे ठरविले. त्यादृष्टीने मे १९३५ मध्ये इंग्लंडचा राजा पंचम जॉर्जचा रौप्य महोत्सव साजरा करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी धननीची बाग येथे बैठक बोलविली होती. या बैठकीला सातारा जिल्हयाचे जिल्हाधिकारी श्री. हमीद ए. अली हे उपस्थित होते. या बैठकीमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था रौप्यमहोत्सवी प्रात्यक्षिक विद्यालय सुरू करेल. असे जाहीर केले. अशाप्रकारे रौप्य महोत्सवी ग्रामीण प्रात्यक्षिक विद्यालयाचा उद्घाटन समारंभ १७ जुले १९३५ रोजी झाला. शासनाच्या मंजूरीनंतर हे प्रशिक्षण विद्यालय रौप्य महोत्सव प्रशिक्षण महाविद्यालय असे झाले.[३]

रयत शिक्षण संस्थेची पहिली प्राथमिक शाळा:

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या प्रशिक्षण महाविद्यालयातून प्रशिक्षण घेतलेले शिक्षक प्रारंभी नगरपालिकेच्या शाळेत सराव पाठ घेण्यासाठी जात असत. याचे कारणे रयत शिक्षण संस्थेची एकही प्राथमिक शाळा नव्हती. त्याचवेळी म्हणजे १९३६ मध्ये शिक्षकांच्यासाठी प्रॅक्टिसिंग स्कूल सुरू करण्यात आले. या स्कूलचे नाव रावबहादूर आर.आर.काळे प्रॅक्टिसिंग स्कूल असे नाव

देण्यात आले. कारण याचवेळी रयत शिक्षण संस्थेच्या कार्यात स्वतःला मनापासून झोकून देणारे तसेच मोठया प्रमाणावर आर्थिक मदत करणारे व रयत शिक्षण संस्थेचे घटनापत्रक तयार करणारे एक सामाजिक कार्यकर्ते श्री.रावबहादूर काळे यांचे इ.स.१९३६ मध्ये निधन झाले होते. तेंव्हा त्यांच्या स्मरणार्थ या स्कूलला त्यांचे नाव देण्यात आले होते. ८ जुलै १९३६ रोजी हे प्रॅक्टिसिंग स्कूल सुरू झाले. या प्रॅक्टिसिंग स्कूलचे उद्घाटन राज्याचे संचालक ग्रीव्हज यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी संस्थेविषयी, संस्थेच्या भविष्याविषयी व ध्येय धोरणाविषयी गौरवोद्गार काढले होते. रयत शिक्षण संस्थेने हे प्रॅक्टिसिंग स्कूल काढण्यापूर्वी त्या अगोदर म्हणजेच सन १९१९ मध्ये धोंडेवाडी येथे एक प्राथमिक शाळा काढली होती. परंतु त्यावेळी रयत शिक्षण संस्थेचे रजिस्ट्रेशन नव्हते. त्या शाळेलाही सरकारची मान्यता नव्हती. ती शाळा अनौपचारिक पद्धतीने सुरू केली होती. सन १९३५ साली रयत शिक्षण संस्था रजिस्टर केल्यामुळे संस्थेने सुरू केलेली रावबहादूर काळे प्रॅक्टिसिंग स्कूल ही पहिली सरकारमान्य प्राथमिक शाळा होय. या शाळेत पहिल्या वर्षी २० विद्यार्थ्यांनी त्यावर्षी या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला होता. पण वर्षअखेरीस फक्त ८ विद्यार्थी राहिले. पुढच्या वर्षीपासून विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली आणि ती शाळा महाविद्यालयासाठी अत्यावश्यक गरज बनली.[४]

रयत शिक्षण संस्थेची स्वयंसेवी शाळा:

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची पहिली स्वयंसेवी शाळा ऑक्टोबर १९३८ मध्ये सातारा बामणोली रस्त्यावरील यवतेश्वर गावाजवळ असलेल्या अनावळे येथे सुरू केली. या शाळेचा प्रमुख म्हणून अतित येथील श्री.के.टी.खोत यांची नियुक्ती केली. तर या शाळेच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी स्वतः कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांचे सहकारी पर्यवेक्षक जंगम व काकडे उपस्थित होते.[५]

रयत शिक्षण संस्थेचे माध्यमिक शिक्षण :

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर कोल्हापूरचे शाहू महाराज व बडोद्याच्या सयाजीराव महाराज यांचा प्रभाव होता. बडोद्याचे सयाजीराव महाराज हे उत्कृष्ट, कार्यक्षम संस्थानिक होते. बहुजन समाजाविषयी त्यांच्या मनात अतिशय तळमळ होती. त्यांच्या या कार्याने प्रेरित होऊन कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे सयाजीराव महाराजांच्या नावे पहिली माध्यमिक शाळा 'महाराजा सयाजीराव विद्यालय' या नावाने सुरू केली. एप्रिल १९३३ मध्ये जेव्हा सयाजीराव महाराज साताऱ्याला आले तेव्हा त्यांनी मोठया आत्मीयतेन कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शाहू बोर्डिंगला भेट दिली होती. भाऊरावांची ही गरीबमुलांसाठी स्वावलंबी शिक्षणाची संकल्पना, एवढे मोठे कार्य पाहून, भाऊरावांच्या कार्याला मदत म्हणून त्यांनी चार हजार रूपये दिले. बडोदा संस्थान शिक्षणाच्या बाबतीत पुढाकार घेणारे पहिले संस्थान होते. १९०५ सालापासून बडोदे संस्थानात शिक्षण सक्तीचे करण्यात आले होते. कर्मवीरांची स्वावलंबी शिक्षणाची योजना महाराजांना एवढी आवडली की त्यांनी भाऊरावांना 'शक्य तेवढी मदत करू' असे आश्वासन दिले. परंतु दुर्दैवाने फेब्रुवारी १९३९ रोजी महाराजांचे निधन झाले. त्यामुळे कर्मवीर भाऊरावांना महाराजांकडून पुढील मदत मिळू शकली नाही.[६]

महाराजांनी दिलेल्या शब्दामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मनामध्ये नव्याने ऊर्जा निर्माण झाली. भाऊरावांनी कष्ट करणाऱ्या व स्वावलंबी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलांसाठी महाराज सयाजीराव यांच्या नावे माध्यमिक शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. या कार्याची ३ डिसेंबर १९३९ मध्ये सयाजीराव महाराजांचे नातू व वारस

महाराज प्रतापसिंह यांच्या हस्ते सुरूवात करण्यात आली. या कार्यासाठी चारभिंती जवळील संस्थेच्या मालकीची गांधी टेकडी ही जागा निवडली.

२० जून १९४० पासून महाराज सयाजीराव हायस्कूलच्या कामास प्रारंभ झाला. परंतु इमारत पूर्ण होण्यापूर्वी ही रयत शिक्षण संस्थेची शाळा फलटणच्या राजेसाहेबाच्या निवासामध्ये भरत होती. पुढे जून १९४७ मध्येकल्याणी क्वार्टसमध्ये हलविण्यात आली. कारण फलटण निवासामध्ये रयत शिक्षण संस्थेचेच सन १९४७ मध्ये छत्रपती शिवाजी आर्टस कॉलेज सुरू करण्यात आले होते. महाराजा सयाजीराव हायस्कूलमध्ये प्रारंभी ५५ विद्यार्थी होते. पुढील चार वर्षात ही विद्यार्थी संख्या ६४, ७९९२ व १२४ अशारितीने वाढत गेली. पुढे सन १९५३-५४ मध्ये या शाळेत ३२२ विद्यार्थी होते. सुरूवातीला ही मुले वसतिगृहातच राहत होती. पुढे मात्र वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या मुलांना प्रवेश देण्यात आला होता. या मुलांना ही वसतिगृहातील मुलांप्रमाणेच शारीरिक कष्टाची कामे करावी लागत होती. महाराज सयाजीराव हायस्कूल मोफत विद्यालय म्हणून सुरू करण्यात आले होते. विशेष म्हणजे आजही या शाळेत फी आकारली जात नाही. कारण अनुसूचित जाती व जमातीमधील विद्यार्थांची फी ही सरकार देते. अशा विद्यार्थ्यांची सं‘या या शाळेत फार मोठया प्रमाणावर होती व आहे. मात्र या विद्यार्थ्यांना भोजनाचा खर्च द्यावा लागत होता. त्यातही न्यायालयाकडून आलेली मुले व सरकारकडून आलेल्या मुलांना मात्र हा खर्च शासन देत होते. बाकी मुलांना हा भोजनाचा खर्च शारीरिक कष्टाची कामे करून भागवावा लागत होता. ही मुले चारभिंती व फलटण निवास येथील जमीन सपाटीकरण करून तसेच इमारत बांधण्यासाठी लागणाऱ्या विटा तयार करण्याकामी व भिंती तयार करण्याकामी मदत करत असत. तसेच शेतीतील ही कामे करून आपला भोजनाचा खर्च भागवत असत. अशाप्रकारे महाराष्ट्रातील तरूण मुलांना स्वावलंबी व स्वाभिमानी शिक्षण देण्याच्या उद्देशाने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराज सयाजीराव माध्यमिक विद्यालय सुरू केले.[७]

रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा:

स्वातंत्र्यपूर्व काळात जिल्हयात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नसल्याने बहुतांश विद्यार्थ्यांना पुणे, कोल्हापूर, मुंबई व बडोदा येथे उच्च शिक्षणासाठी जावे लागत होते. ही समस्या दूर करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे सन १९४७ मध्ये सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेज सुरू करून चार वर्षे मोफत चालविले.

जून १९४७ मध्ये छत्रपती शिवाजी कॉलेज सुरू झाले. सुरूवातीला छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये कला शाखा सुरू करण्यात आली. विज्ञान शाखा सुरू करण्याचा विचार सुरू असतानाच काही कारणांमुळे हा विचार रद्द करण्यात आला. एके दिवशी कर्मवीर भाऊराव पाटील यांना एका खानदेशी व्यापाऱ्याने आपले नाव महाविद्यालयास दिल्यास आपण सहा आकडी रक्कम देणगी स्वरूपात देऊ असे कळविले. परंतु कर्मवीर भाऊराव पाटील यांनी या गोष्टीस परखडपणे नकार देत एकवेळ मी माझ्या वडिलांचे नाव बदलेन, पण महाविद्यालयाचे छत्रपती शिवाजी कॉलेज हे नाव बदलणार नाही असे सांगितले.

या महाविद्यालयात मुलांना ‘कमवा आणि शिका’ या योजनेअंतर्गत प्रवेश दिला जात असे. म्हणजेच विद्यार्थ्यांकडून शिक्षणासाठी फी न घेता त्यांनी स्वतः कमवून शिकावे असा नियम या विद्यालयात होता. या अटीवरच विद्यार्थ्यांना येथे प्रवेश मिळत असे.

१९४७ ते ५० या दरम्यान देशात अन्नधान्याचा तुटवडा मोठया प्रमाणात जाणवू लागला. याची झळ या विद्यालयाला सुद्धा बसली. पहिले तीन वर्षे मुलांना जेवणाखेरीज नाष्टा व चहा असे काही मिळत नसे. या महाविद्यालयातील विद्यार्थी हे गरीब कुटुंबातून आलेले होते. धनिक लोक कोठूनही धान्य विकत घेत असत पण या विद्यार्थ्यांना शिधापत्रिकेवर जेवढे धान्य मिळेल तेवढेच घेता येई. कष्टाची कामे असूनही या विद्यार्थ्यांनी स्वतःची शरीर संपदा उत्कृष्ट राखली होती.

महाविद्यालय आणि वसतिगृह जवळजवळच होते. या वसतिगृहात स्वयंपाकी दोनच होते त्यामुळे कपडे धुणे, वाढणे, धान्य आणणे ही सर्व कामे विद्यार्थ्यांनाच करावी लागत. सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या या वसतिगृहाला भाऊरावांनी एका उत्कृष्ट संस्काराने जपले होते.

भाऊरावांचे हे कार्य लोकांना आवडले नाही. सुरूवातीला एक दोन वर्षे लोकांना महाविद्यालय चालणार नाही असे वाटत होते. कोणतीही फी न घेता हे महाविद्यालय चालविणे लोकांना फार विचित्र वाटत होते. त्यांचा हा स्वावलंबी शिक्षणाचा प्रयोग सफल होणार नाही असे लोकांना वाटे. त्यातच भर म्हणून सरकारकडून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या या महाविद्यालयाला कोणतीही मदत मिळत नव्हती.

अशा परिस्थितीत सुद्धा छत्रपती शिवाजी कॉलेज सुरळीतपणे सुरू राहीले. या महाविद्यालयात प्रवेश घेताना ज्या विद्यार्थ्यांची शारीरिक कष्ट करण्याची तयारी आहे. अशा मुलांनाच प्रवेश दिला जात असे, तेव्हा स्थानिक लोकांनी या महाविद्यालयामध्ये वसतिगृहाची अट शिथिल करून आमच्या मुलांना प्रवेश द्यावा अशी मागणी केली. विद्यार्थ्यांनी वसतिगृहात राहूनच शिक्षण घ्यावे अशी अट होती. या महाविद्यालयामध्ये वसतिगृहात राहणाऱ्या व शारीरिक श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना फी मध्ये विशेष सवलती दिल्या आहेत. या कॉलेजमध्ये बी.ए.पर्यतचे वर्ग चालविले जात होते.[८]

रयत शिक्षण संस्थेचे ग्रामीण भागात उत्कृष्ट रितीने कार्य सुरू होते. परंतु सातारा शहरामध्ये जेथे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यालय आहे तेथेच या संस्थेला लोकांचा जास्त पाठींबा नव्हता. रयत शिक्षण संस्था व सातारा शहरातील शिक्षित लोक यांच्यामध्ये कोणत्या ना कोणत्या कारणाने नेहमीच दरी उभी होती. स्थानिक मुलांना प्रवेश दिला तर ही दरी कमी होऊन संस्थेला शहरातील लोकांकडून खूप मदत होईल अशी संस्थेतील काही लोकांची मागणी सुरू झाली. तसेच हे महाविद्यालय विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देत होते, त्यामुळे प्राध्यापकांच्या पगारात वाढ होणे शक्य नव्हते. या सगळया गोष्टींचा विचार करून भाऊरावांनी विद्यार्थ्यांकडून फी घेऊन, स्थानिक विद्यार्थ्यांना वसतिगृहाची अट शिथिल करून प्रवेश देण्याचा निर्णय घेतला. अशाप्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे रयत शिक्षण संस्थेचे पहिले महाविद्यालय स्थापन करून उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.

सारांश:

अशाप्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेद्वारे सातारा शहरात पहिली प्राथमिक शाळा काढून तिला शासनाची मान्यता मिळविली. त्यानंतर प्रक्टीसिंग स्कूल, महाराजा सयाजीराव हायस्कूल व उच्च शिक्षणासाठी छत्रपती शिवाजी कॉलेजची स्थापना केली. यातून शिक्षणाची गंगा बहुजन समाजाच्या झोपडीपर्यत नेऊन समाजजागृती घडवून आणली. त्यामुळे समाजातील अस्पृश्यता नष्ट होऊन सर्वत्र समता व बंधुता प्रस्थापित होण्यास फार मोठया प्रमाणावर मदत झालेली दिसून येते. रयत शिक्षण संस्थेचे ब्रीद 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे

ब्रीद' याप्रमाणे अगदी तळागाळातील विद्यार्थी सुद्धा आपले शिक्षण पूर्ण करीत आहे. हा विद्यार्थी शिक्षणाबरोबरच श्रमाला महत्व देत आहे. त्यातूनच स्वाभिमानी विद्यार्थ्यांची पिढी निर्माण होण्यास मदत झाली आहे.

संदर्भ :

१. डॉ. अंजिलेवल मॅथ्यू, कर्मवीर भाऊराव पाटील, सुभाषचंद्र भोसले(प्रकाशक) सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा, पृ.१०३

२. प्राचार्य आ. भा. मगदूम, कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्था, अध्यक्ष, कर्मवीर विद्याप्रबोधिनी, रयत शिक्षण संस्था, सातारा, ९ मे २००२, पृ.१३

३. सुभाष ढगे, कर्मवीर भाऊराव पाटील कार्य आणि विचार, विजय प्रकाशन, कोडोली, कोल्हापूर, २२ सप्टेंबर २००७, पृ.८७, ८८

४. वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३५-३६, पृ. ६

५. वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३८-३९ ते सन १९४७-४८, पृ.६

६. वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३८-३९ ते सन १९३८-३९, पृ.८

७. डॉ. अंजिलेवल मॅथ्यू, कर्मवीर भाऊराव पाटील, सुभाषचंद्र भोसले(प्रकाशक) सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा, पृ.२२३

८. रयत शिक्षण संस्था, वार्षिक अहवाल, सातारा, १९८२-८३, पृ.८

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महाराष्ट्रतील समाजिक परिस्थिती व समाज सुधारणेचा प्रभाव एक चिकित्सक अभ्यास

प्रा. डॉ. सुनिल क्षीरसागर

इतिहास विभाग

देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर, महाराष्ट्र.

***Corresponding Author* - प्रा. डॉ. सुनिल क्षीरसागर**

DOI - 10.5281/zenodo.19723351

सारांश (Abstract):

19 व्या शतकात महाराष्ट्रतील समाज विविध जाती व वर्णव्यवस्थेच्या विळख्यात अडकलेला होता. तसेच धार्मिक कर्मकांड, अनिष्ट चालिरीती समाजात प्रचलित होत्या. कांही चालिरीती तर अमानुष प्रकारच्या होत्या. नंतर कांही समाजसुधारकांनी त्यामध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिशांचे भारतामध्ये आगमन झाल्यानंतर त्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी का होईना समाजामध्ये बदल घडविला आणि त्यांनी समाजातील वाईट प्रथा बंद केल्या कांही प्रथेमध्ये सुधारणा केल्या. समाज सुधारक व ब्रिटिश सत्ता या दोघांनी एकत्रित पणे प्रयत्न करुन समाजातील वाईट प्रथा बंद केल्या व समाज सुधारण्याचा प्रयत्न केला.

प्रस्तावना (Introduction):

19 व्या शतकात महाराष्ट्रतील समाजात वर्ण व्यवस्था, जातीव्यवस्थेतील निर्बंधांना विशेष महत्व प्राप्त झाले होते. समाजात चालिरिती, रुढी, परंपरा, धार्मिक आचार - विचारांचा प्रभाव समाज मनावर विशेष पडलेला होता. या काळातील समाजाचे ठळक वैशिष्ट्ये म्हणजे एका गावात दोन गावे हे होय. एक वेशीच्या आतील गाव आणि दुसरे वेशीबाहेरील गाव. हिंदुधर्म व धर्ममार्तंडांनी बनविलेल्या या वर्ण व जातीव्यवस्थेमुळे येथे गावेच दुभंगलेली होती असे नाही तर मानसाची मनेसुधा दुभंगलेली होती. अंधश्रध्दा, अधार्मिक दृष्टीकोन यामुळे सामाजिक क्षेत्रात अनेक प्रकारचे स्तोम माजले होते. या परिस्थिती विषयी सामाजिक विचारवंत गं. बा. सरदार म्हणतात की, ' 19 व्या शतकात मध्ययुगीन वर्चस्व होते. आपल्या सामाजिक जीवनात कुळाचार, जातिधर्म, वर्णव्यवस्था, रुढी प्रामाण्य, विभूतीपूजा, प्रारब्धवाद यांचे अतोनात प्रस्थ माजलेले होते.' थोडक्यात सामाजिकदृष्ट्या येथील समाज अधोगतीला पोहोचला होता.

सामाजिक परिस्थिती (Social Condition):

या काळात महाराष्ट्रातील समाजात वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, धार्मिक चालीरीती, परंपरा, कर्मकांड, व्रतवैकल्ये यांना महत्व प्राप्त झाले होते. समाज जाती धर्म व्यवस्थेने बंदिस्त होता. सामाजिक विषमता हे या काळातील हिंदू समाजरचनेचे खास वैशिष्ट्ये बनले होते.[1]

1. जातीव्यवस्था:

भारतातील व महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेचा माठा दोष म्हणजे जातिव्यवस्थेवर आधारित असलेली समाजरचना, कडक जातीनिर्बंध व त्यामुळे कनिष्ठ मानल्या

गेलेल्या जातीतील लोकांवर झालेला घोर अन्याय. जाती व्यवस्थेचे मूळ आपणास वैदिक कालखंडापर्यंत नेता येते.[2] **पुरुष सुक्तामध्ये सर्वप्रथम 'जाती' या शब्दाचा उल्लेख येतो.** काही ठिकाणी जमातीचे जातीमध्ये रुपांतर झाले तर काही ठिकाणी व्यवसायामुळे जातीची निर्मिती झाली. जातीव्यवस्थेला धर्मव्यवस्थेची मान्यता होती.[3] जातीसंस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे मनुष्य ज्या जातीत जन्माला आला त्यावरुन त्याची जात ठरत असे. जातीबरोबरच त्यांचा धंदा ठरत असे. रोटी-बेटी व्यवहार जाती अंतर्गत चालत असत. याचे उल्लंघन झाल्यास त्याला जातीबाहेर काढले जाई. समाजात विविध जाती उपजाती होत्या. जातीव्यवस्थेची बंधने वरचेवर जाचक बनत चालली होती. सर्वसाधारणपणे समाज ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्रादिशुद्र या वर्गात मोडत होता.[4]

2. अस्पृश्यता:

जातीव्यवस्थेच्या या विषवृक्षाला 'अस्पृष्यता' हे लागलेले महाविषारी फळ होय. अस्पृश्य समाजाला समाजाच्या खालच्या पायरीचे म्हणून मानले जाई. त्यांना गावकुसाबाहेर कायमचे वस्ती करुन ठेवले जाई. सर्वच जातीतील लोकांना अस्पृश्यांच्या स्पर्शाने विटाळ होत असे. अस्पृश्यांना पुण्यात फक्त दुपारी गळयात मडके व कमरेस झाडाची फांदी बांधून फिरावे लागत असे. दुपारी त्यांची सावली छोटी व त्यांच्याच पायात पडत असे. त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. अस्पृश्यांचे पानवटे व मसनवटे वेगळे होते.[5]

3. गुलामगिरी:

गुलामगीरीची पध्दत 19 व्या शतकात महाराष्ट्रात अधिकच घट्ट झालेली होती. गुलामगिरीचे वंशपरंपरागत व बाजारात जावून जनावरांप्रमाणे खरेदी -विक्री करुन मिळणारे गुलाम असे दोन प्रकार आढळतात. गुलामांना दासांप्रमाने सर्व कामे करावी लागत. गुलामांना स्थावर मालमत्तेचा एक भाग समजला जाई.

4. वेठबिगार:

वेठबिगारीची पध्दत मध्ययुगीन महाराष्ट्रात मुसलमानकाळ ते उत्तर पेशवाईपर्यंत अस्तित्वात असलेली दिसते. शुद्र व अतिशुद्र या समाजाला वेठबिगारी करावी लागे. इनामदार, सरदार, जहागीरदार यांच्या घरी वेठबिगारांना पडेल ते काम करावे लागे.[6]

5. स्त्री-जीवन:

कोणत्याही समाजाची संस्कृती श्रेष्ठ आहे किंवा नाही यासाठी ज्या कसोटया लावल्या जातात त्यात समाजातील स्त्री जीवन कसे आहे ही एक कसोटी मानली जाते. समाजात, कुटुंबात आणि तिच्या वैयक्तिक जीवनात तिचा दर्जा, स्थान कोणते आहे हे पाहून समाज संस्कृतीचा दर्जा ठरविला जातो. महाराष्ट्रातील स्त्री जीवन पुढील प्रमाणे होते.

बालविवाह:

पेशवाईच्या काळात निरनिराळया प्रकारचे लग्नाचे प्रकार अस्तित्वात होते. या काळातील सर्वात प्रचलित व सर्वमान्य लग्न प्रकार म्हणजे बालविवाह होय.

सतीपध्दत:

हिंदू समाजामध्ये सतीची प्रथा प्राचीन काळापासून प्रचलित होती. या प्रथेप्रमाणे हिंदू स्त्री आपल्या पतीच्या मृत्युनंतर त्याच्या प्रेताबरोबर सहगमन करीत असे. कालांतराने सतीच्या प्रथेला धार्मिक दृष्ट्या महत्वाचे स्थान मिळाले. समस्त स्त्री वर्गाला हा त्याकाळी मोठा शाप होता. सतीची पध्दत साधारणपणे वरिष्ठ वर्गापुरती अस्तित्वात होती.

विधवा विवाहास बंदी:

युध्दजन्य परिस्थिती, कुपोषण, आरोग्यविषयक सोयींचा अभाव, साथीचे रोग व बालविवाहाच्या प्रथेमुळे स्त्रियांना वैधव्याचे अत्यंत अपमाणास्पद जिणे कंठावे लागत असे विधवा स्त्रीस दोनच पर्याय उपलब्ध होते. वैधव्यपालन करणे व दुसरा मार्ग म्हणजे सहगमन करणे.

विधवांचे केशवपन:

पेशवाईच्या काळात स्त्रियांची स्थिती हलाखाची होती. विधवा स्त्रियांना चांगले वस्त्र, दागदागिने व चांगले भोजन वर्ज्य होते. विधवांचे डोक्यावरचे केस काढून टाकले जात असत. यामुळे स्त्री विद्रुप दिसत असे व तिच्याकडे कोणाचेही लक्ष जावू नये हा हेतू असावा.

बहुपत्नीत्व:

पेशवे कालखंडामध्ये बहुपत्नीत्वाची चाल मोठया प्रमाणात चालू होती. सरकारी दरबारी प्रतिष्ठित अशी आसामी तसेच राजे, पेशवे, त्यांचे सरदार, वतनदार व त्यांचे नातेवाईक यांना कमीत कमी दोन किंवा दोनपेक्षा जास्त बायका होत्या. पुत्रप्राप्तीसाठी काहीवेळा अनेक विवाह केले जात.

मुरळी, देवदासी, गणिका, वेश्याव्यवसाय:

यावेळच्या समाजात काही जमातीत जन्माला आलेले मूल देवाला वाहण्याची प्रथा होती.देवाला वाहिलेल्या मुलीस 'मुरळी' म्हणत तर मुलास वाघ्या म्हणत. मुरळीला विवाह करता येत नसे. मुरळीचे कर्तव्य देवाची सेवा करणे हे असे करत असताना तिला अनेकांच्या वासनेची शिकार व्हावे लागे. समाजात देवदासी प्रथा प्रचलीत होती. या देवदासीलाही विवाह करण्याची परवाणगी नसे. या काळातील आणखी एक समाजमान्य प्रथा म्हणजे 'गणिका'. या स्त्रिया नाच - गाणे करुन पुरुषांचे मनोरंजन करत असत. सौंदर्य, नृत्य, गायन यात पारंगत असणाऱ्या स्त्रियांना 'राजनर्तकी' म्हणून राजदरबादात स्थान असे. वेश्या व्यवसाय ही तत्कालीन समाजाची गरज होती. मुरळी किंवा देवदासीला विवाह करण्याची परवानगी नसल्याने हा वर्गही वेश्या व्यवसायाकडे वळत असे.[7]

6. धार्मिक प्रथा व रूढी:

भारतीय समाजमनावर धर्माचा जबरदस्त पगडा होता. सकाळी उठल्यापासून ते झोपेपर्यंत आपली मने धार्मिक आचार, विचार व विकारांनी व्यापलेली असतात. सुर्योदयापसून सूर्यास्तापर्यंत वेगवेगळे धार्मिक विधी केले जात असत.

शकुन, अपशकुन, पायगुण:

पेशवेकाळात,'शुभाशुभ, शकुन', घटकांना महत्व प्राप्त झालेले होते. मांजर आडवे जाणे, विधवेचे दर्शन होणे, प्रेत समोरून येणे, कुत्रे रडणे, पाल चुकचुकने किंवा ती अंगावर पडणे, टिटविची टिवटिव करणे, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, इत्यादी अशुभ तर सवत्स धेनू, सकाळच्या प्रहरी कोल्हयाचे तोंड दृष्टीस पडणे, डावा डोळा लवणे, उजवा बाहू स्फुरणे, मुंगूस दिसणे इत्यादी घटना शुभ मानल्या जात असत.

अंधश्रध्दा, कर्मकांड व कर्मठपणा:

19 व्या शतकाचा प्रारंभीचा काळ हा अंधश्रध्दा व कर्मकांड यांनी रूढ झालेला कालखंड होय. अंगात येणे, देवास पुत्र वाहणे, समुद्र पर्यटन वर्ज्य, उकळत्या तेलात हात घालणे, वाळीत टाकणे, जाती बाहेर लग्न केल्यास तिच्या नावाने श्राध्द घालणे, विधवेला कार्यक्रमात न बोलावणे, कोरडे तांदुळ तोंडात ठेवून कडकडा फोडणे, पत्नी विकणे व गहाण ठेवणे किंवा सोडून देणे, नारायण नागबळी व सर्पदोष पूजा करणे इत्यादी बरोबरच मरिआई नावाची देवी कॉलरा सारख्या रोगाच्या साथी सुरू करते, तेव्हा तिची पूजा करून तिला दुसऱ्या गावात सोडल्यास साथी निघून जातात अशी अंधश्रध्दा गावात होती. वरील प्रथेबरोबरच निरनिराळया

प्रकारची व्रते स्त्री व पुरूष करत असत. सोळा सोमवारचे उपवास, शुक्रवारचे उपवास, हरतालिकाचा उपवास ही व्रते स्त्रिया करत असत. स्त्रिया प्रमाणे पुरूषही व्रते करत असत. विशेषतः आई - वडिलांचे निधन झाल्यावर त्यांच्या वर्षश्राध्दापर्यंत अंगावर नवे वस्त्र परिधान न करणे, पान न खाणे, पायात वाहन न घालणे, विहिरीला पाणी लागल्यावर पाणी उजविल्याषिवाय न पिणे, घर बांधल्यावर घराची वास्तू शांती केल्याशिवाय त्या घरात जेवण न करणे इत्यादी गोष्टींना पेशवाईच्या काळात फारच स्थान मिळाल्याचे दिसते.[8]

नरबळी – पशुबळी:

तत्कालीन महाराष्ट्रीयन समाजामध्ये नरबळी, पशुबळी देण्याची प्रथा आढळते. एखादी गोष्ट सिध्दीस नेहण्यासाठी गुप्त धनाच्या अमिषापोटी, एखादा पुल किंवा धरण बांधत असताना नरबळी दिला जात असे.

भानामती, देवऋषी:

19 व्या शतकातील महाराष्ट्रीयन समाजाचा मंत्र-तंत्र, भूतबाधा, चेटूक, भानामती, जादूटोना इत्यादीवर प्रचंड विश्वास होता. कांही अतृप्त आत्मे पृथ्वी तलावर भटकत असतात व ते इतरांना भुतांच्या रूपाने त्रास देतात असा पूर्वापार चालत आलेला समज होता. चेटूक व भानामती करणारा वर्ग तत्कालीन समाजात अस्तित्वात होता. **जेव्हा थोरले माधवराव पेशवे आजारी पडत तेव्हा रघुनाथराव त्यांच्यावर चेटूक करतात अशी अफवा राजवाडयात असे.** मग गोरगरिब जनतेचे तर विचारूच नका. समाजाची भुताटकीपासून सुटका करण्यासाठी दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आढळते. **तसेच इंग्रजांचा पराभव व्हावा म्हणून पहिल्या मराठे - इंग्रज युध्दाच्या वेळी एका तांत्रिक मंत्रशास्त्र्यांची खास नेमणूक केल्याचे दिसून येते.[9]**

समाज सुधारणा:

भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर त्याचे समाजजीवनावर परिणाम जाणवण्यास सुरूवात झाली. आणि भारतीय इतिहासात एका नव्या विचारप्रवाहाची सुरूवात झाली.[10] 19 व्या शतकात महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक क्षेत्रामध्ये बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी), महात्मा ज्यातिबा फुले, म. गो. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, पंडिता रमाबाई इत्यादी समाजसुधारकांचे कार्य महत्वाचे आहे. समाजकारणाला गतिमान करण्याचे काम या सुधारकांनी केले. त्यांच्या विचारांचा व कृतीचा परिणाम त्यावेळच्या समाजजीवनावर झाला. समाजाने धार्मिक व सामाजिक जीवनातील दोष दुर करावे यासाठी या सुधारकांनी अपार कष्ट घेतले.[11]

महात्मा ज्योतिबा फुले:

महात्मा जोतिबा फुले यांचा जन्म इ.स. 1827 मध्ये पुणे येथे झाला. फुले घराण्याचे मुळ गाव सातारा जिल्हयातील कटगुण हे होय.

स्त्री उध्दाराचे कार्य:

समाजात विषमता, जातिभेद, अज्ञान, स्त्रीदास्य, अनिष्ट प्रथा निर्माण झाल्या होत्या. एकंदरित परिस्थितीचा विचार करून स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य फुलेंनी सुरू केले.

स्त्रीशिक्षण:

एका स्त्री ला शिक्षण दिले तर सर्व कुटुंबाला शिक्षण दिल्यासारखे हे ओळखून स्त्री शिक्षणाला प्रारंभ केला आणि इ.स.1848 मध्ये पुणे येथे मुलींसाठी शाळा सुरू केली.

विधवा पुनर्विवाह:

ज्योतिबा फुले यांचा ब्राम्हणाला विरोध नव्हता तर ब्राम्हण्यवादाला विरोध होता. त्या काळात ब्राम्हण समाजात विधवा स्त्रियांचे फार हाल असत.हे पाहून त्यांचे मन

अस्वस्थ झाले. स्त्रियांवर होणारे अन्याय थांबविण्यासाठी विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला. इ.स.1864 मध्ये पुण्यातील बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आनला.

बालहत्या प्रतिबंधक गृह:

आपल्या घराशेजारी इ.स.1863 मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह उघडले. हे भारतातील पहिले बालहत्या प्रतिबंधक गृह होते. ज्योतिबांना मूलबाळ नव्हते. त्यामुळे त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहातील एक मुलगा दत्तक घेतला.

अस्पृश्य उध्दाराचे कार्य:

अस्पृश्यता ही अत्यंत वाईट प्रथा होती उच्चवर्णियांकडून त्यांना हीन वागणूक दिली जात असे. वर्णव्यवस्था हा हिंदू धर्माला लागलेला कलंक दूर करण्याचा प्रयत्न ज्योतीबांनी केला. शुद्रांच्या शिक्षणाकडे लक्ष केंद्रित केले आणि इ.स. 1852 मध्ये वेताळपेठेत स्वखर्चाने अस्पृष्यांसाठी शाळा सुरू केली. इ.स.1853 मध्ये आपल्या काही होतकरू मित्रांच्या सहाय्याने 'महार मांग लोकांस विद्या शिकविण्याकरिता मंडळी' या नावाची संस्था काढली. इ.स. 1858 पर्यंत या संस्थेमार्फत पुण्यात तीन शाळा सुरू केल्या. 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून जातीयतेवर प्रहार करण्याचे काम ज्योतिरावांनी केले.

सत्यशोधक समाज:

सामाजिक सुधारणांसाठी जोतिबांनी इ.स. 1873 मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली.धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हा या समाजाचा मुख्य उद्देश होता.'सत्यशोधक समाज' ही महाराष्ट्रातील पहिली समाजसुधारणेची चळवळ होती. या समाजाची तत्वे पुढीलप्रमाणेः-

1. सर्व समाज एकाच परमेश्वराची लेकरे आहेत.

2. परमेश्वराची प्रार्थना करण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही.

3. वरील तत्व मान्य असल्यास कोणालाही समाजाचे सदस्य होता येते.[12]

जगन्नाथ शंकर शेठ:

श्री जगन्नाथ शंकर शेठ यांनी महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचा पाया रचन्याचे कार्य केले. सतीबंदी कायदयाविषयी जनजागृती केली. राजा राममोहन रॉय यांच्या अल्पवयीन भावजयीला सती जावे लागल्यामुळे ही दृष्ट रूढी संपविण्यासाठी त्यांनी बंगालमध्ये याविरूध्द आंदोलन सुरू केले. महाराष्ट्रापेक्षा बंगालमध्ये सतीची चाल अधिक कडक होती. लॉर्ड बेंटिगने राजा राममोहन रॉय यांचाही सल्ला या प्रश्नी घेवून **4 डिसेंबर 1829 रोजी कायद्याने सतीची प्रथा बंद केली**. बालगुन्हेगारांना माणसात आणावे यासाठी इ.स. **1850 मध्ये मुंबईत डॉ.ब्यूस्ट यांनी नानांच्या सहकार्याने बाल गुन्हेगारांसाठी उद्योगशाळा सुरू केली.**

बाळशास्त्री जांभेकर:

बाळशास्त्री हिंदू धर्माभिमानी तसेच हिंदू संस्कृतीवर प्रेम करणारे होते. तरीही त्यांनी पाश्चिमात्य ज्ञान व इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केला. पाश्चिमात्य विद्येमुळेच अज्ञान व अंधकार घालवता येईल असा त्यांचा विश्वास होता. सरकारी नोकरी सांभाळून धर्मश्रध्दाळू समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा धाडसी प्रयत्न बाळशास्त्रींनी केला. **स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बालविवाहास बंदी, शुध्दीकरण व विज्ञानाचा प्रसार** इत्यादी गोष्टींचा त्यांनी प्रसार केला. म्हणूनच अंधश्रध्दा व अनिष्ठ चालिरितींनी ग्रासलेल्या हिंदू समाजाचा उध्दार करू इच्छिणारे आधुनिक

महाराष्ट्रातील पहिले पुढारी म्हणून त्यांचा गौरव केला जातो.

गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी:

सामाजिक क्षेत्रातील त्यांची कामगिरी मोहनीय होती. समाजातील वाईट प्रथा बाजूला सारून सामाजिक प्रगतीचा विचार करावा असा त्यांनी आग्रह धरला होता. जातिभेदाविशयी गोपाळरावांची भूमिका सुक्ष्म आकलनाची साक्ष पटविणारी आहे. 'भले लोकांनी जातीचा अभिमान धरू नये' असा उपदेश त्यांनी केला. गोपाळरावांना समाजाची सर्वांगीन सुधारणा हवी होती.[13]

निष्कर्ष:

19व्या शतकातील महाराष्ट्रात या चालीरीतींचे कसोशीने पालन पोषण झालेले आपणास दिसते. पुढे इंग्रजांच्या प्रयत्नातून व महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या प्रबोधन चळवळीतून या धर्मात असणऱ्या वाईट चालीरिती कमी होवू लागल्या. धर्माचे खरे स्वरूप समाजासमोर ठेवण्याचे कार्य या समाजसुधारकांनी केले. त्यामुळे त्यांच्यातील स्वाभिमान व अस्मिता जागृत झाली. महाराष्ट्र सरकारने सन 1913 मध्ये भानामती, देवऋषी पध्दत कायद्याने बंद केली.

संदर्भ ग्रंथ:

१. डॉ. विकास कदम, डॉ.सुखदेव शिंदे, प्रा.रविराज कांबळे, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, अरुणा प्रकाशन लातूर, 2014, पान. नं. 15.

२. डॉ.किशोरकुमार गव्हाणे, डॉ.एस.पी. शिंदे, डॉ.जयश्री कुलकर्णी, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अरुणा प्रकाषन लातूर, 2014,पान. नं. 16.

३. डॉ.किशोरकुमार गव्हाणे, डॉ.एस.पी.शिंदे, महाराष्ट्रतील समाजसुधारणेचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स अॅण्ड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद, 2014, पान. नं. 23.

४. उपरोक्त, डॉ.किशोरकुमार गव्हाणे, डॉ.एस.पी. शिंदे, डॉ.जयश्री कुलकर्णी, 2014, पान. नं. 17.

५. कित्ता, पान. नं. 19, 20.

६. कित्ता, पान. नं. 21.

७. कित्ता, पान. नं. 22, 23, 24, 25.

८. कित्ता, पान. नं. 27, 28, 29.

९. कित्ता, पान. नं. 30,33.

१०. उपरोक्त, डॉ.विकास कदम, डॉ.सुखदेव शिंदे, प्रा.रविराज कांबळे, पानं.नं.57

११. उपरोक्त, डॉ.किशोरकुमार गव्हाणे, डॉ.एस.पी. शिंदे, पान.नं.83

१२. डॉ.न.भा. काकडे, डॉ.लता अकलुजकर, आधुनिक भारताचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन सोलापूर, 2005, पान.नं.140,141,142,143,144.

१३. उपरोक्त, डॉ. किशोरकुमार गव्हाणे, डॉ. एस. पी. शिंदे, पान.नं.94,95,96,108,111.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

राजारामबापू पाटील : 'असामान्य नेतृत्वाचा लोकनेता'

डॉ. अरुणा मधुकर वाघमारे

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगांव.

Corresponding Author - डॉ. अरुणा मधुकर वाघमारे

DOI - 10.5281/zenodo.19723372

प्रस्तावना:

'मरावे परी कीर्ती रूपे उरावे' या उक्तीप्रमाणे महाराष्ट्राच्या भूमीत सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रामध्ये आपल्या नेत्रदीपक कार्याचा ठसा उमटवून पुढच्या पिढीला प्रेरणा देणाऱ्या अनेक रथी महारथींच्या मालिकेत बहुसंख्य राजकीय नेत्यांचे कार्य हे प्रेरणादायी आहे. नव महाराष्ट्राची बांधणी करीत असताना शहराच्या बरोबरीने ग्रामीण भागांनाही सन्मानाने आपला खारीचा वाटा देता यावा या उद्देशाने 'लोक कल्याणासाठी राजकीय सत्तेचा वापर' या तत्त्वाचा अंगीकार करून यशवंतराव चव्हाण, वसंत दादा पाटील यांनी सहकाराची गंगा खेड्यापाड्यामध्ये पोहोचविली. त्यांच्या या कार्याचा प्रभाव तसेच मार्गदर्शनामधून महाराष्ट्रामध्ये अनेक राजकीय नेतृत्व उदयास येण्यास पोषक वातावरण निर्माण झाले.

आपण स्वतः जी परिस्थिती पाहिली तसेच अनुभवली आहे त्याची मनामध्ये निर्माण झालेली जाणीव व या जाणिवेलाच कार्याची प्रेरणा मानून आपल्या अष्टपैलू कामगिरीने सामान्य जनतेतून लोकमानस आकाराला आणण्याची कला गवसलेले राजारामबापू पाटील हे नाव राजकीय वर्तुळात आदराने घेतले जाते. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक तसेच राजकीय क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवून ग्रामीण भागाचा चेहरा मोहरा बदलून टाकला. त्यांच्या या कार्यासाठी महाराष्ट्रातील जनतेने त्यांना 'लोकनेते' या पदवीने गौरविले. आधुनिक महाराष्ट्राच्या बांधणीत आपल्या असामान्य नेतृत्वाने जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण करणाऱ्या राजारामबापू पाटील यांचे योगदान नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहे.

उद्दिष्टे:

१. लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या जीवनपटाचा धावता आढावा घेणे.
२. राजाराम बापू पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा परिचय करून घेणे.
३. राजाराम बापू पाटील यांच्या सहकारातून समाज परिवर्तनाच्या कामांचा आढावा घेणे.
४. राजाराम बापू पाटील यांच्या कार्यातून ग्रामीण भागाचा विकास जाणून घेणे.

संशोधन पद्धती व साधने:

प्रस्तुत शोधनिबंधासाठी राजारामबापू पाटील : 'असामान्य नेतृत्वाचा लोकनेता' या शीर्षकांतर्गत अभ्यास करण्यात आला आहे. सदर संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून संशोधन साहित्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके तसेच

संकेतस्थळाच्या माध्यमातून निवडलेल्या साधनांच्या आधारे विषयाची मांडणी करण्यात आली आहे.

राजारामबापू पाटील जीवन परिचय:

राजाराम अनंत पाटील यांचा जन्म ०१ ऑगस्ट १९२० रोजी कराड तालुक्यातील वडगाव हवेली या गावी माता पुतळाबाई यांच्या पोटी झाला. त्यांचे मूळ गाव कासेगाव बालपणापासूनच वडील व चुलते ज्ञानू बुवा यांच्याकडून बापूंना स्वातंत्र्य लढ्याचे बाळकडू मिळाले होते. बापूंनी आपले प्राथमिक शिक्षण अनुक्रमे कासेगाव व नेर्ले येथे पूर्ण करून माध्यमिक शिक्षणासाठी बापू पुण्याला गेले. त्यांना बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांनी मराठा शिष्यवृत्ती दिली यातून त्यांचे माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होण्यास मदत झाली. बापूंनी बडोदा येथे आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून वकिलीच्या शिक्षणासाठी कोल्हापुर येथे साईक्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. १९४५ साली वकिलीचा शिक्षण पूर्ण करून आलेल्या गावातील पहिल्या वहिल्या वकील झालेल्या बापूंनी वकीलचा पेशा पुढे न नेता आपण शिक्षण संस्थेतच काम करावे हा विचार ठाम करून १९४५ साली 'कासेगाव शिक्षण संस्थेची स्थापना केली. व विनावेतन शिक्षक म्हणून या संस्थेचे कार्य बापूंनी समाजसेवा व शिक्षणावरच्या निस्सीम प्रेमामुळे हाती घेतले.

राजारामबापू यांचे राजकीय योगदान:

लॉ चे शिक्षण घेत असतानाच राजाराम बापू 'सेवादलाचे' सक्रिय कार्यकर्ते बनले. खादीचा स्वीकार करून समाजकार्य करत असतानाच त्यांनी राजकारणात प्रवेश केला. सातारा येथे त्यांनी युवकांचे 'लोकजागृती 'हे अभ्यास मंडळ स्थापन केले. १९५१ मध्ये सांगली जिल्हा स्कूल बोर्डाचे अध्यक्ष असताना प्रत्येक गावात शाळा व सक्तीचे मोफत शिक्षण या योजना यशस्वीपणे राबविल्या. १९५२ ते १९६२ या काळात सांगली जिल्हा स्थानिक मंडळाचे अध्यक्ष असताना राजाराम बापूंनी संपूर्ण सांगली जिल्ह्यात शाळांच्या इमारती, पिण्याच्या पाण्याचे आड, वाचनालये, जोडरस्ते, पंचायत घरे, व नदी काठावरील गावांना नावा यासारख्या मूलभूत गोष्टींकडे जातीने लक्ष दिले. १९५७ मध्ये राजारामबापू यांची सांगली जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदी नियुक्ती झाली. पुढे १९५९-६० या काळात ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष बनले. तसेच 'महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनान्स बोर्डाचे' अध्यक्षपदही त्यांनी भूषविले.

बापूंनी विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीतही सक्रिय सहभाग घेतला. १९६२ मध्ये वाळवा मतदार संघातून निवडून आले तेव्हा ते महसूल व वन उपमंत्री या खात्यांचा कारभार पहात होते. १९६५ मध्ये कॅबिनेट दर्जाचे महसूल मंत्री या पदावर कार्य करीत असताना महाराष्ट्र राज्यातील तीन भागात तीन वेगवेगळ्या कर पद्धती लागू होत्या त्या पद्धती बदलण्यासाठी बापूंनी पुढाकार घेऊन राज्यभर एकसमान कर पद्धती लागू केली त्याचीच आवृत्ती म्हणजे आजचे 'वन नेशन वन टॅक्स पॉलिसी 'हे धोरण आहे. तसेच त्यांनी शेतकऱ्यांना उपयुक्त अशी 'खातेपुस्तिका' देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. कागल पासून धुळ्यापर्यंत चंद्रशेखर यांच्यासह ११०० कि मी. पदयात्रा काढली. १९६७ मध्ये दुसऱ्यांदा आमदार झालेल्या बापूंनी सहकार, उद्योग व वीज मंत्री ही खाती अत्यंत यशस्वीपणे सांभाळत औद्योगिक वसाहती स्थापन करण्याला प्राधान्य दिले. १९७५ मध्ये 'वीसकलमी 'कार्यक्रमाच्या प्रसारासाठी ९७ गावांमध्ये ६५० कि.मी. पदयात्रा केली. राज्य पातळीवरील राजकारणात सक्रिय असतानाच बापूंनी वाळवा तालुक्यातील विकास केंद्रे विकसित करण्यावर भर दिला. उदा. साखर कारखाना, दूध संघ, सूतगिरणी, बँक व

अभियांत्रिकी महाविद्यालय असे विविध उपक्रम हाती घेतले. १९७७ मध्ये काँग्रेस पक्षाचा त्याग करून ते जनता पक्षाचे अध्यक्ष झाले. पुरोगामी लोकशाही आघाडीच्या मंत्रिमंडळात ते अर्थमंत्री म्हणून कार्यरत होते. १९६२ साली मंत्री म्हणून संधी मिळाल्यापासून बापूंनी राज्याच्या विकासासाठी मोलाचे योगदान दिले.

मंत्रिपदाच्या कार्यकाळात नवीन महाराष्ट्रासाठी महसूल, उद्योग, वीज, नागरी पुरवठा, सहकार, वनमंत्री, ग्रामीण विकास माहिती, विधी व न्याय तसेच अर्थ खात्याचे मंत्री म्हणून वेगवेगळ्या खात्यांचा पदभार सांभाळून नव महाराष्ट्राच्या बांधणी आपले मोलाचे योगदान दिले. बापूंनी समाज जीवनाला दिशा देऊन सत्तेचा उपयोग जनकल्याणासाठी केला म्हणूनच त्यांना 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार 'असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती वाटत नाही.

राजारामबापू पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य:

बापूंनी शिक्षणाला लोकजागृतीचे माध्यम मानून बहुजन समाजातील अज्ञानाचा अंधकार दूर करण्याच्या उद्देशाने त्यांच्या गावी 1945 साली आपल्या सहकाऱ्यांना एकत्रित करून कासेगाव एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. लोकशिक्षणातून लोकजागृती साध्य करण्याच्या उद्देशाने सामाजिक विषमता, अंधश्रद्धा यांचे समूळ उच्चाटन करून समाजात परिवर्तन घडवून नवसमाज निर्मितीसाठी समाजकार्याची सुरुवात आपल्या गावातूनच केली. आझाद विद्यालयाची स्थापना करून आपल्या शैक्षणिक विकासाचा श्री गणेशा केला. देशाला स्वातंत्र्य मिळाले नव्हते मात्र स्वातंत्र्याचा ध्यास आणि मनात विश्वास बाळगून बापूंनी आपल्या शाळेस आझाद विद्यालय हे नाव दिले व याच शाळेत विनामूल्य इंग्रजी विषयाच्या अध्यापनाला सुरुवात केली. 26 मे 1946 साली कराड तालुक्यातील मु. पो. चरेगाव येथील श्री. आनंदराव माने यांची सुकन्या कुसुमताई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. कुसुमताईंच्या रूपाने बापूंना आपल्या कार्यामध्ये एक भरीव प्रेरणा व साथसोबत देणारी सहचारिणी भेटली आणि 'कासेगाव एज्युकेशन सोसायटी'च्या शैक्षणिक प्रवासास भरभराट आली. या संस्थेमार्फत तळागाळातील उपेक्षित मुलांना शिक्षणाची संधी तर मिळालीच त्याचबरोबर त्यांनी शिक्षणासाठी गोरगरीब कष्टाळू मुलांना राहण्याची व जेवणाची मोफत सोय व्हावी यासाठी विनोबा भावे यांच्या सुरू असलेल्या सर्वोदय चळवळीच्या प्रेरणेतून 1945 ला सर्वोदय वस्तीगृहाची स्थापना केली. त्यांच्या या शैक्षणिक संकुलाला स्वतः विनोबा भावे यांनी भेट देऊन आशीर्वाद दिला. 'कासेगाव एज्युकेशन संस्थे'च्या माध्यमातून वाळवा, शिराळा तसेच जत तालुक्यात शिक्षणातून सर्वांगीण सामाजिक उन्नती व्हावी या दूरदृष्टीचे निदर्शक असलेले बोधचिन्ह म्हणजे ग्रंथ आणि दीप ही ज्ञान आणि प्रकाशाची प्रतीके आहेत. चक्र, तराजू आणि धान्याच्या लोंबी हे संस्थेच्या सातत्यपूर्ण सामाजिक प्रगतीचे निदर्शक आहेत. चक्र विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासाचे प्रतीक आहे. तराजू वाणिज्य विकासाविषयीची आस्था दर्शविते तर धान्याच्या लोंबी कृषी विकासाविषयीची तळमळ दर्शविते.

'सर्व हि तपसा साध्यम् ' प्रयत्न केल्यास काहीही साध्य होऊ शकते याचाच अनुभव देत आज 'कासेगाव एज्युकेशन संस्थे'च्या शैक्षणिक पसाऱ्यात 8 प्राथमिक शाळा, 27 माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, तीन वरिष्ठ महाविद्यालय व नऊ व्यावसायिक संस्था अशा एकूण सत्तेचाळीस शाखांमधून ज्ञानगंगा अविरत वाहते आहे. सेवाभावी वृत्तीच्या बापूंनी लोकल बोर्डाचे अध्यक्ष असताना 'गाव तिथे शाळा' हा उपक्रम अत्यंत यशस्वीपणे राबवला व शिक्षणाविषयीची आपली आस्था कार्यातून दाखवून दिली.

राजारामबापू यांचे सहकार क्षेत्रातील कार्य:

राजारामबापू यांना राजकारणात वसंत दादा पाटील व यशवंतराव चव्हाण यांचे मार्गदर्शन मिळाले. आपल्या सत्तेच्या काळात विधायक कार्याचा पाठपुरावा करताना सहकाराच्या धोरणाचा त्यांनी आग्रहाने पुरस्कार केला. स्वतः एकट्याने एखादी गोष्ट करण्यापेक्षा दुसऱ्यांच्या सहकार्याने केल्यास ते काम जडत व उत्कृष्ट होतो असा त्यांचा विचार होता त्यामुळे त्यांनी वाळवा तालुक्याचा विकास करण्यासाठी' विना सहकार नाही उद्धार'या तत्त्वाचा पुरस्कार करून संपूर्ण वाळवा तालुक्यात सहकाराचे जाळे पसरविले.

१) वाळवा सहकारी साखर कारखाना स्थापना (१० फेब्रुवारी १९६९):

वाळवा तालुक्यातील सामान्य माणसांच्या मदतीने ०५ जुलै १९६८ ला केंद्र सरकारकडून कारखान्याला 'लेटर ऑफ इंडेट 'मिळऊन १७ ऑगस्ट १९६८ मध्ये सहकारी नियमाप्रमाणे ही सहकारी संस्था रजिस्टर केली. औद्योगिक प्रगतीची गरज ओळखून वाळवा तालुक्यातील ४८ व तासगाव तालुक्यातील ८ अशी ५६ गावे सामील करून कारखान्याच्या कार्यक्षेत्राची सरकारकडून मान्यता घेतली. १२५० मे.टन. गाळप शक्तीच्या साखर कारखान्याला आवश्यक असणारी अद्ययावत मशिनरी वालचंद नगर इंडस्ट्रीज लिमिटेड, वालचंद नगर या कंपनीकडून खरेदी केली.

या कामी तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी भावपूर्ण मोलाची साथ दिली. बापू स्वतः त्या वेळेला उद्योग व वीज मंत्री होते. मशिनरी साठी १,००,००१ रुपये ऍडव्हान्स देण्यात आला. व अवघ्या १४ महिन्यात कारखाना उभारणीचे काम पूर्ण केले. या कारखान्याचे चेअरमन पद मोहनराव पतंगराव पाटील यांना देण्यात आले. वाळवा तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यात मदत करण्यात तसेच वाळवा तालुक्यातील बेकारीचा प्रश्न सोडविण्यात या कारखान्याची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली.

२) आशिया खंडातील सहकारी क्षेत्रातील पहिल्या ऍसिटोन प्रकल्पाची साखराळे येथे १९८३ ला उभारणी:

वाळवा या दुष्काळी भागातील उसाच्या शेतीला उत्पन्न किफायतशीर होत नाही, ऊसाला उतारा कमी असल्याने साखर कारखाने अडचणीत आलेली आहेत तेजी मंदीचे दुष्टचक्र भेदण्यासाठी कारखान्यांनी बाय प्रॉडक्टवर भर द्यावा असा विचार पुढे आला आणि हा प्रकल्प उभा राहिला.

३) वाळवा सहकारी साखर कारखान्याचे नामकरण:

मा.राजाराम बापू पाटील यांच्या मृत्यूनंतर १९८५ ला वाळवा सहकारी साखर कारखान्याचे नाव बदलून 'श्री. राजारामबापू सहकारी साखर कारखाना', साखराळे असे करण्यात आले.

४) श्री महांकाली सहकारी साखर कारखाना, कवठेमहांकाळ येथे १९८३ ला स्थापना:

८७ अवर्षणग्रस्त तालुक्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी व दुष्काळावर मात करण्यासाठी कवठे महांकाळ व जत तालुक्यातील विकास कामासाठी बापूंनी विशेष लक्ष घातले यातूनच या कारखान्याची निर्मिती झाली.

५) वाळवा तालुका कृषी पदवीधर कृषी उद्योग विकास सहकारी संघ लिमिटेड, इस्लामपूर ची स्थापना (३०-०६-१९७८):

शेतकऱ्यांना उत्तम प्रतीचे बी बियाणे, कीटकनाशके व शेती उपयोगी अवजारांचा पुरवठा करण्यासाठी तसेच

शेतकऱ्याला योग्य सल्ला देणे व मोफत माती परीक्षण करण्यासाठी या संघाची स्थापना करण्यात आली.

६) वाळवा तालुका सहकारी दूध उत्पादक व पुरवठा संघ मर्यादित, इस्लामपूरची स्थापना (३०-१२-१९७५):

दुधाला संरक्षण देणे, बाजारपेठ मिळवून देणे इत्यादी उद्देशाने या संघाची स्थापना केली. यातून वाळवा 'पशु आहार' हे महत्त्वपूर्ण खाद्य संपूर्ण वाळवा तालुक्यात पाठविले जाते.

७) शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी लिमिटेड, इस्लामपूर ची स्थापना (१९७९):

बेकारीचा प्रश्न सोडविणे, लघु उद्योगांना प्रोत्साहन देणे, शेतकऱ्यांच्या मालाचा उपयोग योग्य पद्धतीने करणे इत्यादी कामासाठी या संघाची स्थापना करण्यात आली.

८) वाळवा तालुका मध्यवर्ती सहकारी होलसेल ग्राहक भांडार मर्यातीत, इस्लामपूर:

वाळवा तालुक्यातील सर्वसामान्य लोकांना कमी किमतीमध्ये उत्कृष्ट दर्जाचा माल मिळावा, तो माल दर्जेदार व टिकाऊ असावा या उद्देशाने या भांडाराची स्थापना केली.

९) वाळवा सहकारी बँक लिमिटेड, पेठ ची स्थापना (१९९१)

वाळवा तालुक्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल, अल्पभूधारक शेतकरी, कारागीर, सुशिक्षित व अर्धशिक्षित बेकारांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांना स्वाभिमानाने जगता यावे यासाठी या बँकेची स्थापना केली. वाळवा बँकेचे राजारामबापू सहकारी बँक लिमिटेड पेठ येथे नामकरण करण्यात आले. संपूर्ण वाळवा तालुक्याला सुजलाम सुफलाम करण्यात या बँकेची योगदान महत्त्वपूर्ण आहे.

राजाराम बापू यांनी आपल्या राजकीय कारकीर्द जास्तीत जास्त सहकाराच्या तत्त्वावर वाळवा तालुक्याचा विकास साधण्याचा प्रयत्न केला.

राजाराम बापूंचे समाजोपयोगी प्रकल्प :

गाव तिथे आड योजना:

१) धावडवाडी साठीचे योगदान- (१९६२-६३):

१९६२-६३ साली बापू हे सांगली लोकल बोर्डाच्या अध्यक्षपदी असताना त्यांनी सबंध सांगली जिल्ह्यामध्ये 'गाव तिथे आड 'ही योजना आंमलात आणली आणि गावाच्या पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय करून दिली. धावडवाडीत ओढ्या नजीक दोन आड या योजनेतच बांधलेले आहेत.

२) प्रतापपूरचा इरिगेशन तलाव:

पैलवान बाळासाहेब शेख यांनी प्रतापपूरच्या सरपंच पदाची सूत्रे हाती घेताच ऐरणीवर आणलेला प्रश्न सुरळीत करण्यासाठी राजारामबापूंनी अमेरिकन अर्थसाहाय्यातून मदत केली. धावडवाडी एसटी स्टैंड वरती प्रतापपूरकडे जाणाऱ्या रस्त्याकडे बाण करून हा बोर्ड लावला जो हायवेच्या कामासाठी २०१८ साली काढण्यात आला. या तलावाचे भूमिपूजन बापूंना वेळ न मिळाल्यामुळे रत्नाकर वाघ यांनी १० जानेवारी १९८४ ला केले. या कामी राजारामबापू यांना पैलवान बाळासाहेब शेख, जत पंचायत समितीचे तत्कालीन सभापती कै. रामराव सावंत, सिद्राम मोर्डी, बसवराज पाटील, आप्पासाहेब दुगाणी तसेच कवठे महांकाळ पंचायत समितीचे तत्कालीन सभापती कै. नानासाहेब सगरे यांनी मोलाची साथ दिली. तसेच 16 डिसेंबर 1964 रोजी आलेल्या 'कसेल त्याची जमिनी' विषयी विधेयकाच्या दुरुस्तीनंतर कुळाला संरक्षण देऊन शेतकऱ्यांच्या जमिनी वाचवल्या. खंडकरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. उत्पन्नाचे कोणतेही साधन ज्यांच्याजवळ नाही अशा स्वातंत्र्यसैनिकांना सरकारतर्फे जमिनी द्याव्यात असा निर्णय महाराष्ट्र सरकारने 1962 ला घेतला अशावेळी ज्यांना गरज नाही आणि जे सत्याग्रही नाहीत त्यांना जमिनी दिल्या गेल्या आहेत या मताचे खंडन

करून कमीत कमी चार एकर आणि जास्तीत जास्त 16 एकर पर्यंत जमीन मालकीची मर्यादा ठेवून उरलेल्या जमिनी या सैनिकांना देण्याच्या चळवळीत बापूंनी मोलाचे योगदान बजावले.

असा हा सरकार, शिक्षण, सहकार, व्यापार व कारखानदारी या पंचतत्त्वांचा अंगीकार करणारा लोकनेता १७ जानेवारी १९८४ ला इहलोकीची यात्रा संपवून निघून गेला. देह संपला परंतु आपल्या कार्याचा ठसा उमटविलेल्या राजाराम बापू पाटील यांना महाराष्ट्राचे राजकारण कधीही विस्मृतीत घालवू शकत नाही.

बापूंच्या पदयात्रा:

प्रत्यक्ष लोकांना भेटून त्यांची खरी परिस्थिती जाणून घेणे आणि शेतकऱ्यांच्या व दुष्काळग्रस्तांच्या समस्यांना वाचा फोडणे या उद्देशाने बापूंनी अनेक पदयात्रा काढल्या. 1975 मध्ये इंदिरा गांधी यांनी काँग्रेस पक्षातर्फे वीस कलमी कार्यक्रमाची घोषणा केली. तेव्हा त्याच्या अंमलबजावणीसाठी बापूंनी मार्च 1975 मध्ये वाळवा तालुक्यातील 97 गावात 650 कि.मी. ची पदयात्रा काढली. दुष्काळग्रस्तांचे प्रश्न समजून घेण्यासाठी व त्यावर मार्ग काढण्यासाठी 2 ऑक्टोबर ते अकरा ऑक्टोबर 1982 साली त्यांनी दहा दिवस पायी चालून 250 किलोमीटर अंतराची पदयात्रा सांगली ते उंदिया या गावापर्यंत काढली. या दुष्काळी भागात प्रत्यक्ष लोकांना भेटल्यानंतर बापूंना त्यांच्या समस्यांची जाणीव झाली. त्यामध्ये तेथे पाणीपुरवठासाठी असलेले पाण्याचे नळ होते पण त्या नळांना पाणी पुरवठा होत नव्हता. अशा बंद पडलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेला पुन्हा सुरू करण्यात बापूंनी मोलाचा वाटा उचलला. तसेच जळगाव ते नागपूर पुरुष शेतकरी दिंडी 465 किलोमीटरची पदयात्रा करून शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आवाज उठवला. सांगली ते उमदी 250 किलोमीटरची पदयात्रा तसेच कागल ते धुळे ही अकराशे किलोमीटरची चंद्रशेखर यांच्याबरोबरची त्यांची पदयात्रा फारच गाजली. आजच्या काळात पुन्हा एकदा लोकांच्यामध्ये जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेऊन श्री. राहुल गांधी यांनी भारत जोडो आंदोलन सर्वार्थाने पसरवण्यासाठी जी पदयात्रा काढली, त्यामागे बापूंच्यासारख्या निष्ठावान राज्यकर्त्यांच्या विचाराचे पाठबळ तसेच मार्गदर्शन दिसून येते. बापूंनी लोकांच्यामध्ये जाऊन लोकमानस आकाराला आणण्याची जी कला राजकीय वर्तुळात रूढ केली त्याच्यातून आपणास नव्या पिढीच्या राजकारणाला सुद्धा निशा देणारी ठरते.

निष्कर्ष:

१. सरकार, सहकार, शिक्षण, व्यापार व कारखानदारी या पंचतत्वावर राजारामबापू पाटील यांनी वाळवा तालुक्याची पर्यायाने आधुनिक महाराष्ट्राची प्रगती साधली.
२. शेतकरी व ग्रामीण भागाच्या विकासाला अग्रक्रम दिला.
३. सत्तेचा वापर जनहितासाठी करताना आदर्श तत्वांचा विसर पडू दिला नाही.

समारोप:

वारकरी संप्रदायाचा प्रभाव असणाऱ्या कुटुंबात जन्मलेल्या राजाराम बापू यांच्या मनावर बालपणापासूनच चांगले संस्कार झाले होते. आपला जन्म देशसेवेसाठी वाहणारी परंपरा त्यांच्या कुटुंबात होती. महात्मा गांधी यांच्या चळवळीचा अनुयायी असलेल्या राजाराम बापू यांनी आपल्या भागातील लोकांची शिक्षणासाठीची गैरसोय पाहिली आणि अनुभवली सुद्धा होती. ही परिस्थिती बदलण्याचा ध्यास मनात धरून कासेगाव शिक्षण संस्थेच्या माध्यमातून बापूंच्या कार्याला सुरुवात झाली. हा हा म्हणता

शिक्षण प्रसाराचा वेलू सर्वत्र पसरू लागला. शिक्षण प्रेमी बापूंची वर्णी जेंव्हा राजकारणात लागली तेंव्हा ग्रामीण भागातील लोकांच्या विकासाला केंद्रबिंदू मानून हाती असलेल्या राजकीय सत्तेचा वापर करून बापूंनी शेतकरी, तळागाळातील लोकांच्या साठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

स्वतंत्र महाराष्ट्राची मजबूत बांधणी करण्याच्या प्रक्रियेत राजाराम बापू यांनी मोलाची कामगिरी बजावली. सहकाराची गंगा शहरापासून खेड्यापाड्यात पोहचवून संपूर्ण महाराष्ट्राला समृध्द करण्यात बापूंनी दिलेल्या योगदानामुळे लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा 'लोकनेता' या प्रेम आणि हक्काच्या विरुदावलीसोबतच राजाराम बापू यांना 'असामान्य नेतृत्वाचा लोकनेता' असे म्हंटले तरी ते वावगे ठरणार नाही.

संदर्भ:

१. मंगुडकर एम. पी., लेख : राजारामबापू पाटील महाराष्ट्राचा वारसा, राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधनी, इस्लामपूर, १७ जाने. १९८६ पान नं. २८

२. राजयोगीः 'राजाराम बापू पाटील पहिले पर्व', १९२०-१९८४, द एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई, २९ डिसेंबर २०१७.

३. 'समर्पित आणि व्रतस्थ जीवन', राजाराम बापू पाटील, १ ऑगस्ट २०२०.

४. दैनिक' प्रभात', पुणे,-'एक कर्तृत्वशील व्यक्तिमत्व', १९९६.

५. श्री. पाटील बी, एल.-'खाघपत्री', पुणे, १९७०.

६. दैनिक' अग्रदूत', सांगली,'कर्तुत्वाचा आदर्श माननीय राजारामबापू पाटील', १७-०१-१८८९.

७. श्री. पाटील एस, के.- 'माणुसकीने रसरसलेले सागर फूल', १७-०१-१९८५.

८. साळवी पी, जी. 'बापू म्हणजे निरंतर सौजन्य', १९८६.

९. कारखानीस टी, एस.- राजाराम बापू काही आठवणी', चैतन्य स्मरण, १७-१-१९८५.

१०. राजाराम बापू पाटीलः बायोग्रफिकल स्केच, १९२०-१९८४, वारणा महाविद्यालय ऑर्गनायझेशन, ३ एप्रिल २०१८.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

गोवामुक्ती संग्रामातील क्रांतिकारक: श्री. मोहन रानडे

डॉ. निलेश भाऊसो वळकुंजे

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

Corresponding Author - डॉ. निलेश भाऊसो वळकुंजे

DOI - 10.5281/zenodo.19723451

प्रस्तावना:

मानवतेच्या सर्व मूल्यांना छेद देऊन हुकूमशाहीचे झोटिंग जेव्हा मानवाच्या मानगुटीवर विराजमान होते; तेंव्हा या सर्व गोष्टींना विरोध करण्यासाठी प्रतिक्रियात्मक विचारांचा उदय होतो. हे विचार दोन प्रकारचे असतात. एक मार्ग सविनय पद्धतीचा स्वीकार करून अत्याचाराविरुद्ध लढा देण्याचा. तर दुसरा मार्ग हा क्रियेला प्रतिक्रिया देण्याच्या धोरणाचा स्वीकार करणारा असतो. सविनय पद्धतीच्या मार्गाचा अवलंब करून कार्यरत असलेली चळवळ ही अधिक विस्तारित स्वरुपाची असते. या चळवळीच्या स्वरुपामुळे अधिक जनशक्ती या चळवळीकडे आकर्षित होते. दुसऱ्या मार्गाचा अवलंब करून कार्यरत असणारी चळवळ मर्यादित स्वरुपाची मात्र राष्ट्रवादी विचाराने अधिकरित्या प्रभावित झालेली असते. देशासाठी आपले सर्वस्व पणाला लावण्याची भूमिका या लोकांची असते. या विचाराने प्रभावित असलेली मंडळी अहिंसेपेक्षा हिंसेवर अधिक श्रद्धा ठेवतात. शस्त्राला शस्त्राने उत्तर ही भूमिका या लोकांची असते. त्यामुळे या विचार समूहातील लोकांच्या वर्गाला क्रांतिकारक वर्ग या नावाने संबोधले जाते. ब्रिटीशांच्या विरोधातील स्वातंत्र्यलढ्यात ज्या प्रकारे क्रांतिकारी वर्गाने कार्य केले होते, तशाच प्रकारचे कार्य गोवामुक्तीच्या लढ्यातही या वर्गाने केले होते.

सन १९४६ ते १९६१ या कालावधीत लढलेल्या गोवामुक्ती संग्रामात क्रांतिकारक चळवळीचे विशेषतः आझाद गोमंतक दलाचे महत्त्वाचे स्थान आहे. आझाद गोमंतक दलाच्या माध्यमातून अनेक क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाची आहुती गोवा पोर्तुगीजांच्या तावडीतून मुक्त करण्यासाठी दिली आहे. यापैकी एक म्हणजे मोहन रानडे होय. आझाद गोमंतक दलाच्या माध्यमातून मोहन रानडे यांनी पोर्तुगीजांच्या विरोधात प्रखर लढा गोव्यात उभा केला होता. रानडे यांच्या याच कार्यावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न या शोधनिबंधाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

पूर्वपरिचय:

मोहन रानडे (मूळ नाव मनोहर आपटे) यांचा जन्म दिनांक २५ डिसेंबर १९३० रोजी सांगली येथे मराठी ब्राम्हण कुटुंबात झाला. रानडे तीन महिन्यांचे असतानाच त्यांच्या वडिलांचा सर्पदंशाने मृत्यू झाला. ते वाई येथील प्राज्ञपाठशाळेत शिक्षक होते. वडिलांच्या अकाली जाण्याने त्यांची संपूर्ण जडणघडण सांगली येथील श्री समर्थ व्यायामशाळेत झाली. येथेच त्यांचा परिचय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी आला. त्यानंतर ते संघाशी जोडले गेले. याच काळात त्यांच्या व्यक्तिमत्वावर संघाच्याबरोबरच

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचा मोठा प्रभाव निर्माण झाला होता. सावरकर यांची 'माझे मृत्युपत्र' ही कविता आणि 'माझी जन्मपेठ' हे आत्मचरित्र त्यांच्या मनावर घर करून गेले. त्यामुळे लहानपणापासूनच देशाकार्याचा वसा त्यांच्यामध्ये निर्माण झाला होता. रानडे शालेय जीवनात असताना १९४२ ची चलेजाव चळवळ त्यांनी जवळूनपाहिली होती. त्या चळवळीचा एक दूरगामी प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. हैदराबाद विलीनीकरणाच्या संदर्भातील घडामोडीं त्यांच्या मनात देशसेवेसाठी त्यागाची भूमिका निर्माण करीत होती. परंतु काही कारणांच्यामुळे ह्या दोन्ही चळवळींच्यामध्ये त्यांना सहभागी होता आले नाही. या दरम्यानच्या कालखंडात म्हणजे दिनांक १८ जून १९४६ रोजी डॉ. राममनोहर लोहियांनी मडगाव येथे सत्याग्रहकरुण पोर्तुगीजांच्या विरोधात चळवळ सुरू केली. लोहियांनी सुरू केलेल्या या चळवळीची माहिती तत्कालीन कालखंडात संपूर्ण भारताच्याबरोबरीने सांगली येथे ही लोकांना मिळू लागली. ब्रिटीशांच्या जोखडातून भारत देश स्वातंत्र्य होताच गोवा ही मुक्त होईल अशा प्रकारचे चित्र तत्कालीन कालखंडात निर्माण करण्यात आले होते. परंतु प्रत्यक्ष इ. स. १९४८ उजाडले तरी गोवामुक्तीची कोणतीही शाश्वती निर्माण झाली नव्हती. यातूनच मनोहर आपटे यांनी सन १९४८ साली गोवामुक्तीच्या रणांगणात उडी घेतली.[१]

रानडे यांनी आपल्या कार्याची सुरुवात गोव्यातील धारगाळ येथून केली. धारगाळ येथील मराठी शाळेत शिक्षक बनून तेथील जनतेच्या मनात स्वातंत्र्याचे स्पुलिंग निर्माण करण्याचे काम त्यांनी सुरू केले होते. मुक्तिसंग्रामाच्या सुरुवातीच्या कालखंडात गोमांतकाच्यामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे कार्य गोव्यातील मराठी शाळा करीत होत्या. मराठी शाळा ह्या या आंदोलनाच्या सुरुवातीच्या कालखंडात व्यासपीठ होत्या.[२] या शाळांच्यामध्ये शिक्षक बनून कित्येक मराठी माणूस गोव्यातील जनतेच्या मनात पोर्तुगीज सत्तेच्या विरोधात असंतोषाचे वातावरण निर्माण करत होते. धारगाळ येथे आपल्या कार्याची सुरुवात करून जेमतेम सहा महिने पूर्ण होण्याच्या आधीच त्यांच्या कार्याची माहिती पोर्तुगीजांना समजली. या कारणाने त्यांना गोवा सोडवा लागला. गोव्यातून बाहेर आल्यानंतर सांगली येथे परत न जाता त्यांनी बांदा येथे आपला मुक्काम केला. काही महिनांच्या कालावधीनंतर गोव्यातील वातावरण शांत झाले याची जाणीव होताच एप्रिल १९५० मध्ये पुन्हा एकदा मनोहर आपटे हे मोहन रानडे हे नाव धारण करून मुक्तीसंग्रामाच्या कार्यात पुन्हा सक्रीय झाले.[३] या नंतर खऱ्या अर्थाने त्यांच्या क्रांतिकारक कार्याचा श्रीगणेशा झाला.

आझाद गोमंतक दलाच्या माध्यमातून केलेले क्रांतिकारक कार्य:

डॉ. लोहिया यांनी सुरू केलेली कायदेभंगाची चळवळ कालांतराने गोव्यात मंदावली होती. दर दहा दिवसांनी दहा जणांनी सत्याग्रह करावे आणि एक हजार सत्याग्रहींनी तुरूंगात जावे असे नॅशनल काँग्रेसच्या (गोवा) ऑक्टोबर १९४६ च्या सभेत ठरले होते.[४] त्यानुसार काहीजणांनी सत्याग्रह केले. पण ही योजना पूर्ण क्षमतेने कार्यरत होऊ शकली नाही. पुढारी तुरूंगात गेल्यावर नवनवीन सत्याग्रही पुढे आले नाहीत. एकदा अटक झाल्यानंतर पुन्हा अटक करून घेणारे देशभक्त फारसे तयार झाले नाहीत. यामुळे सत्याग्रह आणि सविनय कायदेभंग या तंत्राचा वापर करून पोर्तुगीजांच्या विरोधात लढणे निष्फळ स्वरुपाचे आहे, या विचाराचा प्रभाव गोव्यातील काही तरुणांच्यावर झाला होता. या विचाराने प्रेरित असणारे युवक दिनांक २३ एप्रिल १९४७ रोजी फोंडे तालुक्यातील कुंकळिये या गावातील मंदिरात विचारविनिमयासाठी एकत्र जमले होते.[५] भारतातील पोर्तुगीज सत्ता घालवायची असेल

तर सशस्त्र संघर्ष केला पाहिजे. यासाठी संघटन उभे करणे आवश्यक आहे. या विचारावर सर्वांचे एकमत झाले. या विचारातूनच आझाद गोमंतक दलाची स्थापना झाली. दलाच्या स्थापनेवेळी दलाचे संस्थापक सतरा तरुण क्रांतिकारक होते.[६]

सुरुवातीच्या कालखंडात दलाच्या कार्याचे स्वरूप मर्यादित होते. दल हे नॅशनल काँग्रेस गोव्याची एक संघटना या अर्थाने आपले कार्य करीत होती. त्याच बरोबरच दलाचे नेते विश्वनाथ लवंदे हे नॅशनल काँग्रेस गोव्याचे सरचिटणीस होते. पुढे इ. स. १९५३ साली दलाने नॅशनल काँग्रेस गोव्याशी असलेले आपले संबंध समाप्त केले. संबंध समाप्त केल्यानंतर गोव्याच्या मुक्ती संग्रामात पूर्ण ताकदीने उतरण्याची तयारी दलाने सुरू केली. या दरम्यानच्या कालखंडात मोहन रानडे हे दलाच्या संपर्कात आले. इ. स. १९५२ साली वझरी येथे भरलेल्या नॅशनल काँग्रेस गोव्याच्या वार्षिक अधिवेशनात ते सहभागी झाले होते. याच अधिवेशनात त्यांची विश्वनाथ लवंदे यांच्याशी भेट झाली. या भेटीनंतर ते दलाच्या कार्याशी जोडले गेले.[७] नॅशनल काँग्रेस गोव्याशी असलेले संबंध समाप्त झाल्याच्यानंतर दलाने स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यासाठी आंबोली येथे शिबिर भरविले. या शिबिरात मोहन रानडे हे सहभागी झाले.[८] या शिबिरात सहभागी लोकांना दलाची माहिती, दलाची ध्येय-धोरणे, पोर्तुगीज साम्राज्यशाहीचे स्वरूप, गोव्यातील पोर्तुगीज सत्ता नष्ट करण्यासाठी सशस्त्र मार्ग अनुसरण्याची आवश्यकता या सर्वांची माहिती देण्यात येत असे. तसेच या शिबिरात बंदूक चालविणे, रिव्हाल्वर चालविणे याबरोबरच डोंगरी भागात गनीमी कावा पद्धतीचा उपयोग करून शत्रूशी कसे लढले पाहिजे याचेही प्रशिक्षण देण्यात आले होते. हे सर्व कार्य भारतीय सैन्यातील निवृत्त अधिकारी कॅ. दिंगबर गोळे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. गोळे हे पुढे पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयात भूगोल विषयाचे प्राध्यापक बनले.

या शिबिरातील कॅ. गोळे यांच्या प्रशिक्षणाच्या पद्धतीविषयीची माहिती मोहन रानडे यांनी आपल्या 'सतीचे वाण' यांच्या पुस्तकात लिहून ठेवली आहे. ते लिहितात की, 'त्यांचा उत्साह अदम्य होता. त्या तुटपुंज्या शस्त्रसामुग्रीच्या साह्याने अधिकात अधिक जेवढे मिळविता येणे शक्य असेल तेवढे शिकविण्याची पराकाष्ठा ते करीत. डोंगर कसे चढायचे, अजिबात आवाज न करता अचानकपणे शत्रूचे ठाणे कसे सर करायचे, आसपासच्या वातावरणाशी व रंगाशी साधर्म्य असलेला पोशाख करून शत्रूला कसे चकवायचे व आपला बचाव तसेच शत्रूवर हल्ला कसा करायचा, शत्रूव्याप्त प्रदेशातून चालत असताना दिवसा तसेच रात्री कोणती काळजी घ्यायची, रात्री शक्यतो दिवा वापरायचा नाही, पण जर वापरावाच लागला तर कशा पद्धतीने वापरायचा, विडी सिगारेट रात्री कोणत्याही परिस्थितीत ओढायची नाही आणि जेव्हा ती ओढायला हरकत नसते तेव्हाही ती कशी ओढायची, रस्ते कसे ओलांडायचे, मैदानातून जाताना काय काळजी घ्यायची, नदीवर दोरीचा पूल कसा बांधायचा इ. महत्त्वाच्या बाबींचे प्रशिक्षण त्यांनी दिले. तसेच प्राथमिक उपचार कसे करायचे याचेही शिक्षण गोळे यांनी या शिबिरात सहभागी लोकांना दिले होते.'[९]

दलाच्या माध्यमातून केलेले सुरुवातीचे कार्य:

काँग्रेस गोव्याशीसंबंध समाप्तीनंतर दलाने त्यांच्या हिंसक कार्याच्या नव्या पर्वास सुरुवात केली. त्यांच्या नव्या पर्वाच्या कार्याची सुरुवात शिवोली गावातून झाली. या गावात असणारी पोलीस कचेरी जाळली व पेंगणी येथे बॉम्ब स्फोट केला. 'आता गोमंतकीय जनतेचा पोर्तुगीजांवरील उरला सुरला विश्वास देखील उडाला असून, मिळेल त्या

मार्गांनी आणि शक्य तितक्या लवकर पोर्तुगीजांच्या मगरमिठीतून सुटायचे, हाच निर्धार वरील घटनांतून प्रतीत होतो. भ्याडपणापेक्षा हिंसा परवडली हे महात्माजींचे विचार या कार्यकर्त्यांनी शिरोधार्य मानलेले दिसतात.'[१०] असा इशारा क्रांती पत्राच्या माध्यमातून दलाने पोर्तुगीज सरकारला दिला.

क्रांती पत्रातील इशाऱ्यानंतर लगेचच दलाने दिनांक १ जानेवारी १९५५ रोजी कृती केली. या दिवशी दलाच्या आठ जणांच्या तुकडीने भाणस्तारच्या पुलाजवळील पोलीस चौकीवर हल्ला केला. यामध्ये मोहन रानडे यांच्याबरोबर रामदास चाफाडकर (वय १९), शंभू पालकर (वय २०), श्रीपदा साठे (वय १९), यशवंत आगरवाडेकर (वय ३३), लाडू वायंगणकर, बाबलावेर्णेकर व पुंडलिक नाईक (वय २७) यांचा समावेश होता.[११] भाणस्तारच्या पुलाजवळील पणजीच्या बाजूला असणाऱ्या मुख्य पोलीस कचेरीवर या तुकडीने हल्ला केला. या हल्ल्यात एका पोर्तुगीज पोलिसाचा मृत्यू झाला व एक चांगले पिस्तुल मिळाले. भाणस्तारच्या हल्ल्यानंतर लगेचच दिनांक ०९ फेब्रुवारी १९५५ रोजी दलाने दुसरी कारवाई गाळेल येथील पोलीस चौकीवर केली. या कारवाईत मोहन रानडे यांच्या बरोबर दलातील लाडू वायंगणकर, श्रीपदा साठे, यशवंत आगरवाडेकर, बाबला वेर्णेकर, दत्ताराम नागवेकर, आनंद थळी व सुखदेव शिरोडकर यांचा समावेश होता. या सर्वांनी मिळून गाळेलच्या पोलीस चौकीवर हल्ला करून तेथून काही काडतुसे, पोलिसांचे दोन गणवेश व पोर्तुगीज ध्वज इ. साहित्य मिळविले.[१२] गाळेलच्या यशस्वी कारवाईनंतर लगेचच दुसऱ्या दिवशी यातील काही मंडळीनी कळगुंट येथील पोलीस चौकीवर हल्ला करून शस्त्रे हस्तगत करायचे असे नियोजन केले. या कारवाईचे नेतृत्व मोहन रानडे यांच्याकडे देण्यात आले होते. रानडेंच्या नेतृत्वाखालील तुकडीत दत्ताराम नागवेकर, यशवंत आगरवाडेकर, आनंद थळी व सुखदेव शिरोडकर यांचा समावेश होता. कारवाईची योजना निश्चित केल्याबरोबर त्याच दिवशी ही मंडळी कारवाईच्या ठिकाणी जाणेस निघाली. त्याच दिवशी ते कळगुंट येथे पोहोचले. पण त्या दिवशी चौकी बंद असल्याकारणाने त्यांनी दुसऱ्या दिवशी हल्ला करायचे ठरविले. दुसऱ्या दिवशी ही सर्व मंडळी रात्री नऊ वाजता पुन्हा चौकीजवळ गेले.या वेळीही चौकी बंद होती. तेव्हा चौकी पेटवून देण्याचा बेत सर्वांनी आखला. जेणेकरून जे कोणी शिपाई आतमध्ये असतील ते सर्व बाहेर येतील. बाहेर आलेल्या सैनिकांच्यावर झडप टाकायची व त्यांच्याकडील शस्त्रे हस्तगत करून घ्यायची. ठरलेल्या या नियोजनानुसार दलाच्या सैनिकांनी चौकीस आग लावली. मात्र आग लागल्यानंतरही कोणीच शिपाई बाहेर आले नाहीत. यामुळे रानडे यांनी खिडकीची काच फोडून आता कोणी सैनिक आहेत काय हे पहिले. पण त्यांना आत कोणीही आढळले नाहीत. त्यामुळे या योजनेतील सर्व सहभागी लोकांचा भ्रमनिरास झाला आणि कारवाईचा बेत संपूर्णपणे फसला गेला.

कळगुंटच्या अयशस्वी हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशीच म्हणजे दिनांक १२ फेब्रुवारी १९५५ रोजी गोपी चोडणकर या नावाचा दलाचा एक कार्यकर्ता अस्नोडा येथील पोलीस चौकीची सविस्तर माहिती घेऊन शिवोली येथे रानडे यांना भेटला. त्याने सांगीतले की, 'अस्नोडा येथील पोलीस चौकी म्हापसा – डिचोली हमरस्त्याच्या जरा आतमध्ये आहे. पुलाजवळून तिचे अंतर सुमारे १०० यार्ड इतके आहे. चौकीवर दोन पोलीस असतात. त्यापैकी एक गावात गस्तीसाठी जात असे व एक चौकीवर राहत असे.' त्याच्या या माहितीच्या आधारे त्याच दिवशी अस्नोडा चौकीवर हल्ला करण्याचे नियोजन दलाचा सैनिकांनी केले. यामध्ये मोहन रानडे, आनंद थळी, सुखा शिरोडकर, यशवंत अगरवाडेकर, लाडू वायंगणकर, दत्ता नागवेकर व

रामचंद्रबुगडे यांचा समावेश होता. त्या दिवशी दलाचा तो गट अस्नोडा येथे जाऊन बाळा मापारीच्या घरी थांबला. मापारीच्या घरी हल्ल्याची सविस्तर योजना निश्चित करण्यात आली. मापारी व चोडणकर हे त्याच गावातील असल्यामुळे त्यांनी या मोहिमेत सहभागी होऊ नये असे या बैठकीत ठरले. ठरल्याप्रमाणे रात्री नऊ वाजता मोहन रानडे, आनंद थळी व सुखा शिरोडकर हे प्रत्यक्ष हल्ला करावयास गेले. ठरलेल्या नियोजित योजनेनुसार त्यांनी पहिला गस्तीवर गेलेल्या व नंतर चौकीत असलेल्या पोलिसांवर हल्ला केला. हल्ला करून पोलिसांकडून ३०३ ची एक बंदुक व चौकीतील कित्येक काडतुसे हस्तगत केली. कळगुंट येथे अयशस्वी झालेला प्रयत्न अखेर अस्नोडा येथे दलाने यशस्वी केला.

अस्नोडा येथील यशस्वी हल्ल्यानंतर दलाने पुढील कारवाई दिनांक १९ मार्च १९५५ रोजी केली. या दिवशी दलाच्या सैनिकांनी सत्तरी तालुक्यातील रावण येथील पोलीस चौकीवर हल्ला केला. या कारवाईत मोहन रानडे, प्रभाकर सिनारी, कान्होबा नाईक, कृष्णराव राणे, दत्ताराम नागवेकर, बाला सावंत, कृष्णा माईणकर, सुखदेव शिरोडकर, तुकाराम गावकर, बाबली गुरव व रामा परब यांनी सहभाग घेतला होता. दलाचे कित्येक महत्त्वाचे सैनिक या कारवाईत सहभागी असतानाही कारवाई यशस्वी झाली नाही. ही कारवाई अयशस्वी का झाली याचे कारण सांगताना मोहन रानडे लिहितात की, 'अचूक योजना व शिस्त यासंबंधी दाखविलेली बेपर्वाईच या अपयशाला कारणीभूत होती.'[१३] या चौकीत एकूण आठ पोलीस होते. त्यांनी केलेल्या गोळीबारापुढे दलाच्या सैनिकांचा टिकाव लागला नाही. एक पोर्तुगीज पोलीसाचा मृत्यू व इमारतीची काही प्रमाणात नासधूस इतकेच यश या कारवाईत दलास प्राप्त झाले. या कारवाईत सहभागी दलाच्या सैनिकांना मार्ग दाखविण्याचे कार्य पिसुर्ले येथील बळवंतराव देसाई यांनी केले होते.

आझाद गोमंतक दलाच्या घटना निर्मितीनंतरच्या सशस्त्र कार्यातील सहभाग:

दलाच्या स्थापनेपासून दल गोवा काँग्रेसची एक शाखा या प्रमाणे कृती करत होते. नंतरच्या कालखंडात दलाची वैचारिक भूमिका व काँग्रेसचा कृती कार्यक्रम यामुळे दल व काँग्रेस नेतृत्वात वैचारिक संघर्ष निर्माण झाला. यातूनच इ. स. १९५४ पासून दलाने काँग्रेसपासून फारकत घेतली. दलाचे प्रमुख विश्वनाथ लवंदे यांनी काँग्रेसच्या सर्व पदांचा राजीनामा देऊन दलाचे काँग्रेसशी असणारे सर्व संबंध तोडून टाकले.[१४] यानंतर इ. स. १९५५ च्या जानेवारी महिन्यात दलाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक भरली होती. या बैठकीत दलाची एक घटना असावी असे ठरविण्यात आले. यानुसार या बैठकीत दलाच्या घटना निर्मितीसाठी एक समिती नेमण्यात आली. या समितीने आपला मसुदा एक महिन्यातच पूर्ण केला. यानंतर दलाचा दिनांक ०६ व ०७ मे १९५५ रोजी बेळगावनजीक कणबर्गी येथे मेळावा भरला. या मेळाव्यास दलाची सर्व सात केंद्रे, गोवा व मुंबई येथून सुमारे सत्तर प्रतिनिधी हजर होते. यामध्ये शामराव लाड, डॉ. काशिनाथ संझगिरी, एस. एम. नाईक, जी. व्ही. देसाई, बी. एन. नाईक, आत्माराम मयेकर, पी. डी. कवळेकर, प्रभाकर सिनारी,कान्होबा नाईक, कृष्णा माईणकर, दत्ताराम देसाई, केशव तळावलीकर, चंद्रकांत गायतोंडे व बी. एम. देसाई इ. दलाच्या महत्त्वाच्या नेत्यांचा समावेश होता. या दोन दिवसीय मेळाव्यास बेळगावचे बा. रं. सुंठणकर व समाजवादी नेते बॅ. नाथ पै यांनी अनुक्रमे सहा व सात रोजी मार्गदर्शन केले. या मेळाव्यात गोव्याचा स्वातंत्र्यलढा शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्याचा ठराव संमत करण्यात आला. याचबरोबर घटना समितीने तयार

केलेल्या मसुद्यास अंतिम घटना म्हणून मान्यता देण्यात आली.[१५] या घटनानिर्मितीमुळे दलास स्थिर संघटनेचे स्वरूप प्राप्त झाले.

हळदोण पोलीस चौकीवरीलकारवाईत सहभाग:

दलाच्या मे मधील मेळाव्यास मोहन रानडे हजर होते. याच मेळाव्यात त्यांची बाळकृष्ण भोसले यांच्याशी ओळख झाली. या ओळखीमुळे रानडे यांना भोसले यांच्याकडून पोंबुर्प्याच्या जंगलाची माहिती मिळाली. जंगलाच्या असलेल्या घनदाटपणामुळे हे जंगल दलाच्या सैनिकांना पोर्तुगीज पोलिसांच्या पासून लपून राहण्याचे उत्तम ठिकाण होते. पोंबूर्प्याच्या जंगलाच्या परिचयानंतर रानडे तेथे राहू लागले. येथेच त्यांनी हळदोणच्या पोलीस चौकीवर हल्ला करण्याची योजना आखली. या योजनेनुसार मोहन रानडे यांच्याबरोबरीने रामदास चाफडकर, माधव कोरडे, बाळकृष्ण भोसले, शिवलिंग भोसले, श्रीपदा साठे, रघुनाथ शिरोडकर व आत्माराम आरोंदकर यांनी दिनांक २७ मे १९५५ रोजी हळदोणच्या पोलिसचौकीवर हल्ला केली.[१६] हा हल्ला केल्यानंतर तेथे काय घडले याचा सविस्तर वृत्तांत मोहन रानडे यांनी त्यांच्या 'सतीचे वाण' या पुस्तकात लिहून ठेवला आहे. ते लिहितात की, 'तेथील पोलिसाने आम्हाला पाहिले व कोण रे तू? असे दरडावून विचारले. त्याचा प्रश्न पुरा होण्यापूर्वी आम्ही त्याच्यावर झडप घातली. त्यास घाबरविण्यासाठी हवेत गोळी उडविली. त्याच्या कमरेला पिस्तुल होते. परंतु त्यास हात घालण्यासही सवड मिळाली नाही. इतक्या झपाट्याने आम्ही ते काढून घेतले. परंतु या झटापटीत आमच्या पिस्तुलाची गोळी रामदास चाफाडकरच्या गुडघ्याला चाटून गेली. पोलिसाचे पिस्तुल हाती आलेच होते. ते घेऊन आम्ही पुन्हा जंगलात पसार झालो.'[१७]

चोडणे येथील कारवाईत सहभाग:

हळदोणच्या कारवाईनंतर अनेक लहान मोठ्या कारवाया दलाकडून करण्यात आल्या. मात्र कोणत्याही प्रकारची मोठी कारवाई दलाने केली नव्हती. ती उणीव दिनांक १८ जून रोजी दलाने भरून काढली. दिनांक १८ जून १९५५ रोजी गोव्यात सत्याग्रह चळवळीचे आयोजन करण्यात आले होते. या वातावरणात आपण का मागे राहायचे हा विचार करून दलाने या दिवशी चोडण येथे कारवाई केली. चोडण येथील रेजिदोर (गावचा पाटील) हा गावातील तसेच आसपासच्या बाजूला असणाऱ्या सर्व क्रांतिकारकांची नावे पोर्तुगीज सरकारला कळवीत होता. त्याच्या या कृतीची शिक्षा त्याला दिली पाहिजे असे दलाच्या पोंबुर्प्याच्या शाखेने ठरविले. या शाखेचे नेतृत्व मोहन रानडे यांच्याकडे होते. या कारवाईत त्यांच्याबरोबर बाळकृष्ण भोसले, शिवलिंग भोसले, मनोहर पेडणेकर, रामदास चाफाडकर, सुखदेव शिरोडकर, आत्माराम आरोंदेकर व रघुनाथ शिरोडकर यांचा सहभाग होता. या सर्वांनी त्या रेजिदोरच्या दैनंदिन दिनक्रमाची सविस्तर माहिती मिळविली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे दलाच्या सैनिकांनी कारवाईची योजना आखली. यानुसार दलाने रेजिदोर जेव्हा पणजीहून वाफेरणे गावात आला तेव्हा त्याला तेथे जायबंदी केले. तेथून त्याला घेऊन ते त्याच्या घरी गेले. रेजिदोरच्या घराची झडती घेऊन एक बंदुक, एक पिस्तुल व एक रायफल हस्तगत केली. याच कारवाईत दलाच्या शिस्तीचे दर्शन आपल्याला घडते. घराची झडती घेतेवेळी घरातील एका तिजोरीची झडती दलाच्या सैनिकांनी घेतली. या तिजोरीत रोख स्वरुपात २०,००० रुपये रक्कम होती. मात्र या रक्कमेस कोणत्याही प्रकारे स्पर्श न करता आवश्यक असलेले साहित्य दलाने घरातून हस्तगत करून घेतले. हे पैसे न घेण्यामागे दलाची भूमिका इतकीच होती की, आपली गणना दरोडेखोर म्हणून होऊ नये. कारण

तत्कालीन कालखंडात अशाप्रकारे गावातील श्रीमंत लोकांना धमकावून त्यांच्याकडून पैसे वसूल करण्याचे कार्य दरोडेखोर करीत होते. त्याच प्रकारचे स्वरूप आपल्या कार्याला येऊ नये ही भूमिका दलाची होती. ही भूमिका दलाने या कारवाईच्या वेळी प्रत्यक्ष अंमलात आणली.[१८]

पाळी येथील कारवाईमध्ये सहभाग:

रेजिदोरवरील या कारवाईनंतर दलाने पुढील कारवाई दिनांक ३० जून १९५५ रोजी पाळी येथे केली. दलाची एक शाखा महाराष्ट्राच्या हद्दीत वझरे येथे होती. तेथे जिलेटीनपासून बॉम्ब बनविण्यात येत होते. हे काम दल प्रमुख लवंदे यांच्या देखरेखीत होत असे. बॉम्ब बनविण्यासाठी दलाला जिलेटीनची आवश्यकता असल्यामुळे हे जिलेटीन कसे बनवायचे हा प्रश्न दलाच्या समोर कायमचा होता. यासाठी दलाने एक योजना आखली. या योजनेनुसार पाळी येथील श्री. व्ही. एन. बांदेकर यांच्या खाणीवर हल्ला करून तेथील जिलेटीन हस्तगत करायचे. दलाच्या या महत्त्वपूर्ण व धाडसी कारवाईत मोहन रानडे यांच्याबरोबर रामदास चाफाडकर, माधव कोरडे, लक्ष्मण हणखोणकर,बाळकृष्ण भोसले, शंभू पालकर, दामोदर तारी,रोहिदास तारी, मधुकर शेट व रामनाथ पांडुरंग यांचा समावेश होता. यातील रामदास चाफाडकर व माधव कोरडे यांच्यावर खाणीचे निरीक्षण करून तेथील इत्यंभूत माहिती मिळविण्याचे कार्य सोपविले. यानुसार त्यांनी खाणीची सविस्तर माहिती या कारवाईत सहभागी असलेल्या सर्वांना दिली. मिळालेल्या माहितीच्या आधारे सुरुवातीला तेथील हस्तगत केलेले जिलेटीन पाठीवरून वाहून आणायचे नियोजन आखले होते. मात्र यामुळे अगदी थोडाच माल मिळेल व पकडले जाण्याची शक्यता अधिक होती. यामध्ये बदल करून टॅक्सीद्वारे हा माल लंपास करण्याची योजना आखण्यात आली. यामुळे मालही अधिक वाहून नेता येईल व अधिकची सुरक्षितता मिळेल.

ठरलेल्या नियोजनानुसार दिनांक ३० जूनच्या रात्री दलाने पाळी येथील खाणीवर हल्ला करून तेथील जिलेटीन हस्तगत केले. हस्तगत केलेल्यापैकी काही जिलेटीन सोबत घेऊन इतर जिलेटीन वळवई येथील एका होडीत लपवून दलाचे सर्व सैनिक सवाईच्या कुळागरातील गुप्त ठिकाणी गेले. या कारवाईच्या दरम्यान एका ठिकाणी दलाच्या सैनिकांची व पोर्तुगीज पोलीसांची चकमक झाली होती. यामुळे पोर्तुगीज पोलिसांनी या चकमकीनंतर मिळालेल्या माहितीच्या आधारे वळवई येथे तपास सुरू केला. याच तपासाच्या दरम्यान होडीत ठेवलेले जिलेटीन पोर्तुगीज पोलीसांना मिळाले. मात्र दलाने एकूण हस्तगत केलेल्या जिलेटीन पैकी फक्त एक चतुर्थांश माल त्या होडीत ठेवला होता. इतर सर्व माल दलाने अगोदरच योग्य ठिकाणी नेला होता.[१९]

चोडणे येथील पाटलावरील कारवाईमध्ये सहभाग:

दिनांक ३० जूनच्या कारवाईनंतर पोर्तुगीज पोलीस अत्यंत सावध झाले होते. पोर्तुगीज पोलिसांनी गोव्यात अनेक ठिकाणी संशयाच्या बळावर कित्येक गोमंतक लोकांना अटक केली होती. या दरम्यानच्या कालावधीत दलाने कोणतीच मोठी कारवाई केली नाही. बाहेरील सर्व परिस्थितीचा अंदाज घेऊन दलाने दिनांक २२ जुलै रोजी कारवाई केली. ही कारवाई पोलीस चौकीवर वा खाणीवर हल्ला यापैकी कोणतीच नव्हती. ती कारवाई देशद्रोही पोलीस पाटलावर होती. चोडणे येथील पाटलावर केलेली कारवाई फक्त त्याच्या घरातील वस्तू हस्तगत करण्यापूर्ती मर्यादित होती. या कारवाईत मात्र दलाने देशद्रोही पाटलाची हत्या केली. या कारवाईचे वृतांकन मोहन रानडे यांनी त्यांच्या सतीचे वाण या पुस्तकात करून ठेवले आहे. ते

लिहितात की, 'भारतीय ध्वजाचा त्याने केलेला अपमान पाहून वेर्‍यातील लोक अतिशय रागावले होते. तो राग अर्थात आमच्या सर्वांच्या मनात कायम होता. एक दिवस तरी या भारतीय ध्वजाच्या अपमानाचा सूड आम्ही घेऊ असा विश्वास आम्हाला होता. वरील प्रकरणानंतर जर त्याने आपले तोंड बंद ठेवले असते, लोकांना दमदाटी करीत तो हिंडला नसता, कार्यकर्त्यांची नावे व माहिती पोर्तुगीजांना देत हिंडला नसता, थोडक्यात देशद्रोही कारवाया त्याने थांबवल्या असत्या तर ही सूडाची भावना कदाचित कमी झाली असती. बाळकृष्ण भोसले अन् मी (मोहन रानडे), मनोहर पेडणेकर, शिवलिंग भोसले, कृष्णा पोंबुर्पेकर यांच्यासह पोंबुर्प्याहूनसावईलाआदल्या दिवशी म्हणजे दिनांक २१ जुलै १९५५ ला आलो. दासूचाफाडकर व शंभू पालकर हे दोघे अगदी स्थानिक असल्यामुळे मुद्दाम त्यांना या हल्ल्यात आम्ही समाविष्ट केले नव्हते. श्रीपाद साठे सावईला शंभुच्या घरी होता. त्याला मात्र घेतला. या आधी १९५५ च्या जुलै मध्ये "देशद्रोह्यांना शिक्षा करा..." अशा आशयाची आझाद गोमंतक दलाची पत्रके गावात वाटण्यात आली होती. किश्तूदसारख्या देशद्रोह्यांना शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी या पत्रकांतून केली गेली होती. तो सावध होता. परंतु त्याच्या ढोंगीपणाला कोणी फसणे शक्यच नव्हते. आज वेरे येथे जी मराठी शाळा आहे तेथेच पूर्वी पोर्तुगीज शाळा होती. इतरांना त्या शाळेत बसवूनबाळकृष्ण भोसले व मी रात्री नऊच्या सुमारास किश्तूदच्या घराकडे पोचलो. बाजारात एका न्हाव्याचे दुकान उघडे होते. त्याचा थोडासा प्रकाश रस्त्यावर आलेला होता. आमच्या अंगावर रेनकोटस् व संपूर्ण लष्करी गणवेशच होता. ही काय दुकान उघडे ठेवण्याची वेळ आहे? असे आम्ही त्याला दरडावले.तसे आम्हाला पोर्तुगीज पोलीस समजून त्याने भीतीने लगेच दुकान बंद केले. सबंध वेरे गाव गडीगुप्प झोपले होते. किश्तूदही निवांतपणे आपल्या घरी झोपी गेला असावा. आम्ही त्याच्या ओसरीवर जाऊन थडकलो. तेथे कोणी तरी निजलेला होता. 'किस्तूद असा रे?'असे त्याला विचारताच 'असा सायबा'असे त्याने उत्तर दिले व चुपचाप तो निघून गेला. त्यालाही आम्ही पोलीस आहोत असे वाटले होते. आमच्याशी जेवढा कमी संपर्क येईल तेवढा बरा असा त्याने विचार केला असावा. आम्ही दार वाजवले. 'कोण असा?'असे अर्धवट निद्रिस्त, अर्धवट दरडावणीच्या सुरात आतून प्रश्न आला. 'आम्ही'असे त्याला म्हटले. त्याचे समाधान झाले नाही. पुन्हा तोच प्रश्न पुन्हा तेच उत्तर. अखेरीस 'तुजीपुलीस रे, बिएताकित्याक?'असे थाटात त्राग्याने ओरडताच त्याने 'त्याच्या पुलीसी'साठी दार उघडले आणि आम्हाला समोर पाहताच आपली चूक ध्यानी येऊन त्याने ते झटकन लावून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु तो साध्य होण्याच्या आतच आम्हा दोघांच्या बंदुकांनी त्याच्या काळजाचा ठाव घेतला. बदमाश निमिषार्धात खाली कोसळला. त्याच्या घरात आम्ही प्रवेश केला. 'पुर्तुगेजजाय मरे?' (पोर्तुगीज पाहिजेत ना?) या आमच्या प्रश्नाला 'नाका सायबा' असे अपेक्षित उत्तर त्याच्या तरण्याबांड पोराकडून तात्काळ मिळाले. किस्तुदच्या घरात असलेल्या दोन बंदुका, काडतुसे व एक एअरगन त्याच्या मुलाने आमच्या स्वाधीन केल्या. शस्त्रे हाती पडताच आम्ही त्या घरातून बाहेर पडलो. अन् सरळ गावच्या शाळेत गेलो. आमची वाट पाहत तेथे थांबलेल्या आमच्या सहकाऱ्यानी दरम्यानच्या काळात पत्रके वाटण्याचे काम पुरे केले होते. म्हणून मग आम्ही सर्वजणवळवईला गेलो व तेथून होडीने आमोण्याला पोचलो आणि नंतर दुसऱ्या होडीने पोंबुर्पे गाठले व जंगलात गडप झालो.[२०] या सर्व घटनेची माहिती रानडे यांनी घटनेच्या एक महिन्यानंतर दलाच्या कचेरीत जाऊन दिली.

शिरगाव येथील चौघुले बंधूंच्या खाणीवरील हल्ल्यात सहभाग:

दिनांक ३० जून १९५५ रोजी दलाने पाळी येथील श्री. व्ही. एन. बांदेकर यांच्या खाणीवर हल्ला करून जिलेटीन लुटून नेले. दलाच्या या कारवाईनंतर पोर्तुगीज सरकारने सर्व खाणीमधीलजिलेटीन स्वत:च्या ताब्यात ठेवले. जेणेकरून भविष्यात असे प्रसंग घडणार नाहीत. याला अपवाद मात्र शिरगाव येथील चौघुले बंधूंची खाण होती. चौघुले यांनी अत्यंत सुरक्षित पद्धतीने जिलेटीन ठेवण्यासाठी गोदाम बनविले होते. या गोदामाच्या पाहऱ्यासाठी अत्यंत कडक सुरक्षाव्यवस्था निर्माण केली होती. त्यामुळे फक्त शिरगांवकर बंधूंच्याखाणीजवळील गोदामात जिलेटीन होते. दिनांक २५ जून रोजी पाळी येथे कारवाई करून दलाने मोठ्याप्रमाणातजिलेटीन मिळविले होते. मात्र त्यातील काही जिलेटीन वगळता इतर जिलेटीन पोर्तुगीज सरकारने पुन्हा हस्तगत केले होते. दलाला भविष्यकाळात कारवाई करण्यासाठी बॉम्बची नितांत आवश्यकता होती व हे बॉम्ब बनविण्यासाठी जिलेटीन असणे गरजेचे होते. या गरजेचा विचार करून दलाने शिरगाव येथील चौघुले बंधूंच्याखाणीवर दिनांक ०३ ऑक्टोंबर १९५५ रोजी कारवाई करण्याचे निश्चित केले. या कारवाईसाठी दलाने ५० सैनिकांची एक तुकडी तयार केली होती. या तुकडीचे नेतृत्व प्रभाकर सिनारी यांच्याकडे देण्यात आले होते. ठरलेल्या तारखेनुसार दलाने प्रभाकर सिनारी यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी कारवाई केली.

या कारवाईचे वर्णन मोहन रानडे यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. ते लिहितात, "रात्री ९ च्या सुमारास ती गुहा आम्ही सोडली व खाणीवरील कोठाराच्या दिशेने चालू लागलो. दारावर रखवालदार होता. परंतु त्याची कमी - जास्त हालचाल होण्यापूर्वीच आम्ही त्याच्यावर झडप घातली व त्यास बांधून ठेवले. कोठारापासून ५० फूटावर दुसरी एक चौकी होती. तेथे तीन पहारेकरी होते. तेही भीतीने एकदम शरण आले. तेथेच टेलिफोन होता. तो आम्ही तोडून टाकला व पहारेकऱ्यांना घेऊन चौघेजण कोठाराजवळ आलो. इतर सर्वजण कोठार फोडण्याचा एकीकडे जोरदार प्रयत्न करीत होते, परंतु ते फुटता फुटेना. अर्ध्या तासाच्या धडपडीनंतर कुलूप तुटले तेव्हा सर्वांनी समाधानाचा सुस्कारा टाकला आणि मोठ्या आनंदाने आत प्रवेश केला. आत शिरल्या शिरल्या जिलेटिनच्या ३०-३५ पेटया (प्रत्येक पेटी ४० ते ५० किलो वजनाची) प्रथम आम्ही बाहेर काढल्या. उरलेले सगळे कोठार उडवून देण्याचा आमचा विचार होता, परंतु दुर्दैव हे की, या कोठारात फक्त जिलेटिनच होते. एकही डिटोनेटर नव्हता. बरे, आम्हीही जाताना बरोबर एखादा नेला नव्हता. अखेर त्या चारही रखवालदारांना त्या कोठारात घालून व कोठार बंद करून आम्ही परत निघालो. ओझी घेतलेल्यांचे छोटे - छोटे गट केले होते व प्रत्येक गटाबरोबर एक दोन संरक्षक दिले होते. श्री. प्रभाकर सिनारी यांच्याकडे स्टेनगन होती. या सर्व सामानवाहूंसह ते डोंगरावरील वाटेने वजऱ्याकडे निघून गेले. ते भारतीय हद्द किती वेळात ओलांडून जातील याचा अंदाज ठेवून आम्ही पिछाडी सांभाळून बसलो होतो. माझ्याबरोबर बाळकृष्ण भोसले व कान्होबा नाईक होते. अस्नोडा - डिचोली हमरस्ता शंभर फुटांवर असतानाच एका जीपचा आवाज ऐकू आला. त्यावेळी सशस्त्र पोलिसांच्या जीप्स गस्त घालण्यासाठी रात्री हिंडत असत. त्यापैकीच ही एक जीप असेल असे आम्हांस वाटले व म्हणून आम्ही तिघेजण ताबडतोब बाजूच्या जंगलात दबा धरून बसलो. चार-पाच मिनिटांत ती जीप अगदी आमच्यासमोर आली. ताबडतोब आम्ही एकाच वेळी गोळ्या झाडल्या आणि एका स्त्रीची किंकाळी ऐकू आली. स्त्रीचा आवाज ऐकून जीप थांबविण्याचा अगर अधिक गोळ्या घालण्याचा प्रयत्न आम्ही केला नाही. जीप मात्र भरधाव वेगाने निघून गेली.

हमरस्ता ओलांडताना यावेळी मात्र सगळी काळजी आम्ही घेतली. पहाटे पाचच्या सुमारास भारतीय पोलीसांना चुकवून आम्ही हद्द ओलांडली व वजऱ्यात दाखल झालो."[२१]

बेती येथील पोलीस चौकीवरील कारवाई आणि पोर्तुगीज पोलिसांच्यातावडीत सापडणे:

शिरगाव येथील चौघुले बंधूंच्या खाणीवरील हल्ल्यानंतर दलाने दिनांक २६ ऑक्टोंबर १९५५ रोजी बेती येथील पोलिस चौकीवर कारवाई केली. बेती हे ठिकाण पोंबुर्पे येथून पाच किलोमीटर अंतरावर होते. पोंबुर्पे हे गाव मोहन रानडे गटाचे वास्तव्याचे ठिकाण होते. येथे वास्तव्यास आल्यापासून या गटाने बेतीच्या पोलिस चौकीवर हल्ला करण्याचे नियोजन केले होते. मात्र तसा योग येत नव्हता. शिरगाव येथील कारवाईनंतर त्यांना तो योग आला. बेती येथील पोलीस चौकी पणजी शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खूप महत्त्वाची होती. येथून पणजी फक्त सहा किलोमीटर अंतरावर होती. त्यामुळे या चौकीत सहा पोलिसांच्यासह पाच रायफल्स, स्टेनगन, पिस्तुले व काडतुसे यांचा मोठा साठा होता. येथील शस्त्रांचा विचार करता या चौकीवरील कारवाई दलास उपयोगी ठरणारी होती. यातूनच दलाने या चौकीवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला. ठरविलेल्या योजनेनुसार दलाने दिनांक २६ रोजी चौकीवर हल्ला केला. मात्र चौकीवर हल्ला करायच्या काही मिनिट अगोदर ठरलेल्या योजनेत बदल केल्याने या कारवाईत मोहन रानडे जखमी झाले व ते पोर्तुगीज पोलिसांच्या तावडीत सापडले. दलाच्या योजनेनुसार चौकीवर प्रत्यक्ष हल्ला करण्यासाठी बाळकृष्ण भोसले याची निवड केली होती; तर रानडे यांच्याकडे चौकीपासून १०- १५ फुट अंतरावर थांबून रस्त्यातील इतर बंदोबस्ताचे काम होते. पण ऐनवेळी बाळकृष्ण भोसले यांनी रानडे यांना चौकीवर हल्ला करण्यासाठी जाण्यास सांगितले व ते रस्तातील बंदोबस्तासाठी थांबले. ही बदललेली योजना मान्य करून रानडे चौकीत हल्ला करण्यासाठी आत शिरले. यावेळी त्यांची व चौकीवरील पोलीस हेडकॉन्स्टेबल फ्रांसीश्कू सुवारीश याच्यात चकमक झाली. या चकमकीत सुवारीश ठार झाला मात्र मोहन रानडे यांना गोळी लागल्याने ते जखमी झाले. जखमी झाल्याने त्यांना तेथून पळ काढणे अशक्य झाल्याने ते पोर्तुगीज पोलिसांच्यातावडीत सापडले.[२२] मात्र ज्या उद्देशाने दलाने ही कारवाई केली होती तो उद्देश मात्र यशस्वी झाला. या कारवाईत दलाला चौकीत असलेली सर्व शस्त्रे मिळाली. पकडण्यात आलेल्या रानडे यांच्यावर पोर्तुगीज लष्करी न्यायालयात खटला चालविण्यात आला. लष्करी न्यायालयाने त्यांना दोषी ठरवून इ. स. १९५६ मध्ये २६ वर्ष कारावासाची शिक्षा जाहीर केली. दिलेली शिक्षा पूर्ण करण्यासाठी त्यांची रवानगी लिस्बनमधील कारागृहात करण्यात आली. या कारागृहातून त्यांची सुटका जानेवारी १९६९ मध्ये करण्यात आली.

सारांश:

गोवामुक्ती संग्रामाच्या क्रांतिकारक चळवळीत आझाद गोमंतक दलाचे कार्य महत्त्वाचे होते. या दलाच्या माध्यमातून मोहन रानडे यांनी गोवामुक्ती संग्रामात महत्त्वाचे योगदाने दिले आहे. लहानपणापासूनच संघ आणि सावरक यांच्या विचाराचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्वावर निर्माण झाल्यामुळे त्यांच्या मनात देशसेवेसाठी त्यागाची भूमिका निर्माण झाली होती. यातूनच मोहन रानडे हे सन १९४८ पासून गोवामुक्ती संग्रामाच्या लढ्यात सहभागी झाले. सुरुवातीच्या टप्प्यात ते गोव्यातील मराठी शाळेमध्ये शिक्षक बनून आपल्या कार्याची सुरुवात केली. या सुरुवातीच्या सहा महिन्याच्या कालावधीमध्ये धारगाळ व त्याच्या आसपासच्या प्रदेशात त्यांनी पोर्तुगीज सत्तेच्या विरोधात

वातावरण तयार करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. परंतु याची माहिती पोर्तुगीज पोलीसांना कळाल्याने त्यांना गोवा सोडणे भाग पडले. परंतु काही महिन्यांच्या कालावधीनंतर ते पुन्हा गोवामुक्ती संग्रामाच्या चळवळीत सहभागी झाले. त्यांच्या कार्याच्या या दुसऱ्या टप्प्यात त्यांनी आपले मनोहर आपटे हे मूळ नाव बदलून मोहन रानडे हे नाव धारण करून आपल्या क्रांतिकारक कार्याची सुरुवात केली.

दुसऱ्या टप्याच्या सुरुवातीच्या कालखंडात ते नॅशनल काँग्रेसच्या (गोवा) माध्यमातून गोवामुक्तीच्या कार्यात आपले योगदान देत होते. परंतु नंतर त्यांचा संपर्क विश्वनाथ लवंदे यांच्याशी आल्यानंतर ते दलाशी जोडले गेले. दलाच्या अनेक महत्त्वाच्या कारवाईमध्ये मोहन रानडे आघाडीवर होते. त्यांच्या नेतृत्वाखाली कित्येक कारवाई दलाने यशस्वी केल्या होत्या. त्यामुळे गोवामुक्ती संग्रामात विशेषतः क्रांतिकारक चळवळीत मोहन रानडे यांचे योगदान अनन्य साधारण आहे.

संदर्भ:

१. सरदेसाई मनोहर हरिबा, गोवा, दमण, दीव – स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, खंड २, संचालक, क्रीडा व सांस्कृतिक संचालनालय, गोवा, दमण आणि दीव सरकार, पणजी, गोवा, १९८६, पृ. ०६ – ०९

२. कित्ता, पृ. ११

३. कित्ता, पृ. १२

४. The Bombay Chronicle, 9th October 1946, P.03.

५. Lawande V. N., Armed Resistance to Portuguese Rule, Goa Freedom Struggle, Rajakamal Prakashan, Panaji, 1976, P. 23

६. National Congress, Goa Constitution, Adopted to Open Session of the Congress Held at Belagav, 05th June 1949

७. रानडे मोहन, उपरोक्त, पृ २७

८. कित्ता, पृ. ५१९

९. कित्ता पृ. २७-२८

१०. क्रांती, पत्रक नं. २४, २२ डिसेंबर १९५४

११. रानडे मोहन, उपरोक्त, पृ. ५२.

१२. कित्ता, पृ. १७८

१३. कित्ता, पृ.६२

१४. दै. केसरी, २२ ऑक्टोंबर १९५४, पृ. ०६

१५. दै. राष्ट्रवीर, १० मे १९५५, पृ. ०३

१६. दै. मातृभूमी, १० एप्रिल १९५८, पृ. ०१

१७. रानडे मोहन, उपरोक्त, पृ.६५ – ६६

१८. कित्ता, पृ. ६३

१९. कित्ता, पृ. ७३

२०. कित्ता, पृ. ७०-७१

२१. कित्ता, प. ८४ - ८५

२२. दै. केसरी,०९ नोव्हेंबर १९५५, पृ. ०२

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

कृ. गो. सूर्यवंशी यांचे इतिहासलेखनातील योगदान

डॉ. अर्चना श्रीराम जाधव

सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग,

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज.

(शिवाजी विद्यापीठ संलग्नित)

Corresponding Author - डॉ. अर्चना श्रीराम जाधव

DOI - 10.5281/zenodo.19723501

प्रस्तावना:

कृ. गो. सूर्यवंशी हे महाराष्ट्रातील एक सुप्रसिद्ध चरित्रकार व संशोधक, लेखक, उत्तम वक्ते म्हणून परिचित आहेत. ते एक विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, शाहू महाराजांच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक आणि नाभिक समाजाचे कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण उपसंचालक म्हणून काम केले होते. त्यांनी अनेक चरित्र ग्रंथ, नाटके, नाटिका व इतर ग्रंथाचे लेखन केले होते. कोल्हापूर संस्थांनचे अधिपति राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या चरित्रावर अनेक अभ्यासकांनी ग्रंथ लिहिले आहेत. त्यामध्ये कृ. गो. सूर्यवंशी यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. याशिवाय त्यांनी लिहिलेली 'बहुजन हिताय बहुजन सुखाय', 'इंदुमती राणीसाहेब' व 'राजगुरू-अमात्य', 'टाकीचे घाव', 'वादळ आणि राजर्षी शाहू' हे चरित्र ग्रंथ व 'भारतीय मल्लविद्या उदय आणि विकास' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. या ऐतिहासिक ग्रंथाच्याद्वारे त्यांनी तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, कला, क्रीडाविषयक प्रगतीचा आलेख मांडलेला आहे. अशा या संशोधकाच्या, चरित्रकाराच्या कार्यावर प्रकाश टाकणे, त्यांच्या इतिहासलेखनाचा आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा हेतू आहे.

या शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा उपयोग केला आहे. कृ. गो. सूर्यवंशी यांनी लिहिलेले काही चरित्र ग्रंथ, वृत्तपत्रे इ. मूळ प्रकाशित संदर्भ साधनांचा उपयोग केला आहे. तथापि कृ. गो. सूर्यवंशी यांचे पूर्वचरित्र, त्यांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य, त्यांचे ग्रंथ, त्यांची भाषणे व समाजकार्य याविषयी फारशी माहिती मिळत नाही हे खेदाने नमूद करावे लागते.

पूर्वचरित्र:

कोल्हापूर संस्थांनचे अधिपति राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या वसतिगृह चळवळीचे एक महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे या वसतिगृहातून शिकून बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थ्यांनी विविधांगी क्षेत्रात केलेले कार्य होय. कृष्णात गोपाळ सूर्यवंशी म्हणजेच कृ. गो. सूर्यवंशी हे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात सुरू झालेल्या नाभिक(न्हावी) बोर्डिंगचे सुरुवातीच्या काळातील विद्यार्थी होत. त्यांचे शिक्षण एम. ए., बी. एस्सी., बी. टी. होते. बी.एस्सी., बी. टी. झाल्यानंतर त्यांनी वेट्स ॲंड मेजर्स खात्यात इन्स्पेक्टर म्हणून नोकरी करीत असताना एम. ए. केले(१९४७). मुंबई विश्वविद्यालयाच्या एम. ए.च्या परीक्षेत उत्तम रीतीने उत्तीर्ण झाल्याबद्दल कोल्हापूर नाभिक

समाजातर्फे त्यांचा श्री. वसंतराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली सत्कारही करण्यात आला होता.[१] पुढे त्यांनी महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण उपसंचालक म्हणून काम केले. ते करवीर नाभिक क्रेडिट सोसायटीचे संस्थापक होते.[२] श्री सेना विद्यार्थी गृहाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते (१९४३-४४ ते १९४५, १९८१-८२).[३] ऑगस्ट १९९६ मध्ये त्यांचे निधन झाले.[४]

कृ. गो. सूर्यवंशी यांनी अनेक नाटके, नाटिका, चरित्र ग्रंथ व इतर ग्रंथाचे लेखन केले होते. त्यांच्या 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' व 'राजर्षी शाहू: राजा व माणूस' या ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचा सर्वोत्कृष्ट ग्रंथाचा पुरस्कार मिळालेला होता. कृ. गो. सूर्यवंशी यांनी न मळलेली वाट(क. ना. मंडळ सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार), पांढरा ढग, ओवाळणी, तुम्ही तिथं आम्ही, मायमाऊली मानवतेची, इत्यादी नाटकांचे लेखनही केले होते. तर पूतनामावशी, गोकुलचा कान्हा या नाटिकांचे, घर माझं गाव तुमचं!, आम्हीच आमुचे रक्षणकर्ते या आकाशवाणी श्रुतिकांचे, रामायण बालकांड या सुगम काव्याचे, 'भारतीय मल्लविद्या उदय आणि विकास', 'गावशिक्षणगाथा', 'महाराष्ट्राचे नवे पंचायत राज्य', शाहू गौरव ग्रंथ(संपादन) या ग्रंथाचे लेखनही केले होते. त्यांची काही नाटके अप्रकाशित आहेत.[५] दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेतर्फे 'कृ. गो. सूर्यवंशी पुरस्कार' देखील दिला जातो, जो त्यांच्या साहित्यातील योगदानाचा सन्मान आहे.[६]

१९९३ मध्ये महापालिकेच्या वतीने कृ. गो. सूर्यवंशी यांचा शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु बॅ. पी. जी. पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला होता. यावेळी सत्कार समारंभास उत्तर देताना ते म्हणाले होते, 'शिक्षणाचा मूलमंत्र देणाऱ्या राजर्षी शाहूंचा वारसा चालविण्यासाठी प्राथमिक शिक्षणास चालना देण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता शाळा काढाव्यात.' त्याचबरोबर संशोधनात्मक शिक्षणाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली होती.[७]

कृ. गो. सूर्यवंशी यांचे इतिहासलेखनातील योगदान:

कृ. गो. सूर्यवंशी यांनी बाळासाहेब देसाई, इंदुमती राणीसाहेब, राजर्षी शाहू महाराज, राजगुरू अमात्य अशा अनेक थोर व्यक्तींवर चरित्रात्मक साहित्य लिहून तत्कालीन सामाजिक, ऐतिहासिक आणि राजकीय चळवळींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची अनेक पुस्तके त्यांच्या संशोधनात्मक व वैशिष्ट्यपूर्ण लेखनासाठी ओळखली जातात.

टाकीचे घाव (मामासाहेब मोहोळ यांचे चरित्र):

'टाकीचे घाव' हे कृ. गो. सूर्यवंशी यांनी लिहिलेले 'मामासाहेब मोहोळ' यांचे चरित्र असून जगताप-कारले प्रकाशन, पुणे यांनी १९६५ ला प्रकाशित केले आहे. या चरित्राची पृष्ठ संख्या १४३ असून १४ प्रकरणांमध्ये हे चरित्र विभागले आहे. मामासाहेब मोहोळ यांचे मल्लविद्येतील कार्यकर्तृत्व या चरित्रातून मांडले आहे. मामासाहेब मोहोळ हे मल्लविद्येची संजीवक शक्ती होते, त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातून पाचशेच्या वर मल्ल अमरावती येथे भरलेल्या महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या अधिवेशनासाठी १० डिसेंबर १९६४ ला जमले होते.

महाराष्ट्रातील विचारवंतांना, सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांना मामासाहेब म्हणजे महाराष्ट्राच्या शक्तीचे प्रतीक वाटत. ते अनेक संस्थांशी निगडित होते. पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळाचे उपाध्यक्ष, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सदस्य, महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या कार्यकारिणीचे सभासद, पुणे जिल्हा स्पोर्ट्स कौन्सिलचे अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट स्पोर्ट्स कौन्सिलचे सदस्य, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे संस्थापक व कार्याध्यक्ष,

अखिल भारतीय हौशी कुस्तीगीर फेडरेशनचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधानसभेचे लोकनियुक्त सभासद अशा अनेक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश होता. त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये अल्पावधीत विलक्षण प्रगती केली व जनतेच्या हृदयात स्थान मिळविले होते. त्यांना बाळासाहेब देसाई यांचे प्रोत्साहन, मार्गदर्शन व प्रत्यक्ष साहाय्य मिळाले होते, त्यामुळेच ते विविध क्षेत्रात इतकी प्रगती करू शकले, ही गोष्ट स्वतः मामासाहेब कबूल करीत.

मामासाहेब मल्लविद्येच्या उत्कर्षासाठी तनमनाने झटले. त्यांनी मल्लविद्येच्या विकासकार्यास वाहून घेतले होते. त्यांचे ते जीवितकार्य होते. मामासाहेबांचे जीवन म्हणजे संकटाशी मुकाबला करीत यश मार्ग आक्रमणाच्या मर्दाची कथा आहे. हालाखीत जन्मलेल्या माणसांना ही कथा वाचून धीर येईल, उमेद येईल. चिकाटीने घरी आणि निष्ठेने विचारपूर्वक सतत कष्ट करीत गेले की अडचणींवर मात करता येते. स्थिती बदलता येते. मानमान्यतेस पोहचता येते, पण ते साध्य होण्यासाठी टाकीचे घाव सहन केले पाहिजेत, असे या चरित्राच्या शेवटच्या चौदाव्या प्रकरणात मांडले आहे.[८]

बहुजन हिताय बहुजन सुखाय (बाळासाहेब देसाई यांची जीवनगाथा):

महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या जीवनावर आधारित हे चरित्र आहे. हे चरित्र ३८७ पृष्ठांचे असून जगताप-कारले प्रकाशन, पुणे यांनी १९७० मध्ये प्रकाशित केले आहे.

या ग्रंथाच्या प्रस्तावनेत कृ. गो. सूर्यवंशी म्हणतात, 'सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी अविश्रांत श्रम करणाऱ्या जनपंढरीच्या एका नेकदार आणि निष्ठावंत वारकऱ्यांची ही जीवनकथा आहे.' हे चरित्र लिहिण्याचा संकल्प कृ. गो. सूर्यवंशी यांनी १९६० मध्ये केला होता आणि दहा वर्षांनी १९७० मध्ये हे चरित्र लिहून पूर्ण झाले. १० मार्च, १९७० रोजी बाळासाहेब देसाई यांच्या षट्यब्दिपूर्तीच्या दिवशी हे चरित्र प्रकाशित झाले. हे चरित्र लिहिण्यासाठी कृ. गो. सूर्यवंशी यांनी अनेक लोकांकडून माहिती मिळवली. तसेच नागपूरच्या 'तरुण भारत'पासून कोल्हापूरच्या 'पुढारी' पर्यंत महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रांचा आधार घेतला आहे. बाळासाहेब देसाई यांनी सर्व जातीपातींच्या, धर्मपंथांच्या, पीडित, उपेक्षित, वंचित, अज्ञानी आणि दरिद्री अशा बहुजन समाजाच्या सुखासाठी अखंड परिश्रम केले. त्यांनी पूर्वायुष्यात भोगलेल्या आपत्तीच्या अनुभूतीतून बहुजनांविषयीचा कळवळा त्यांच्यामध्ये निर्माण झालेला होता. त्यांनी बहुजनांच्या हितासाठी जे कार्य केले, ते या जीवनकथेत मांडण्यात आले आहे.

हे चरित्र २७ प्रकरणांमध्ये विभागलेले असून त्या प्रकरणांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. समशेरीचा कौल, स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र, आईविना, विद्येच्या शोधात, करवीर नगरीतील खडतर तपश्चर्या, व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, करवीरातील वास्तव्य नि वारसा, गरिबांचा वकील, घेतली पताका जनसेवेची, लोकल बोर्डाचा कारभार, विकासाची वाटचाल, विकेंद्रीकरणाचा जाहीरनामा, कसोटीचा काळ, जनी जनार्दन दिसे, शिक्षणासाठी आत या आणि देशसेवेसाठी बाहेर पडा!, ज्ञानगंगेचा प्रवाह, शिक्षक, शिक्षक-संघटना आणि शिक्षण, शिवाजी विद्यापीठ आणि शिवाजी पुतळा, १९६२ ची निवडणूक, आराध्य दैवत दरिद्री नारायण-बळीराजा, गाजलेली कारकीर्द, अग्निदिव्य, कला-साहित्याच्या प्रांगणात, गोरगरिबांचं कल्याण, कोपली धरती माता, वैराग्याला विक्रमाने दिलेली मानवंदना, जे का रंजले गांजले या प्रकरणांमधून बाळासाहेब देसाई यांची जीवनगाथा सविस्तर मांडलेली आहे.[९]

इंदुमती राणीसाहेब:

कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या स्नुषा इंदुमती राणीसाहेब यांचे हे चरित्र आहे. या ग्रंथातून तत्कालीन सामाजिक परिस्थिती, स्त्री शिक्षण, इंदुमती राणीसाहेब यांचे सांस्कृतिक योगदान यांची माहिती मिळते.

कृ. गो. सूर्यवंशी यांच्या मते, इंदुमती राणीसाहेबांचे चरित्र म्हणजे 'राजर्षींच्या सामाजिक परिवर्तन कार्यातील 'स्त्री-मुक्तीचे' ते एक धगधगते पर्व आहे.' शाहू महाराजांच्या 'स्त्री-मुक्ती' प्रयोगाचा इतिहास उजेडात आणण्याचे काम कृ. गो. सूर्यवंशी यांनी केले. शाहू महाराजांच्या चरित्र लेखनासाठी जमविलेल्या कागदपत्रांचे परीक्षण करीत असताना त्यांना शाहू महाराजांनी इंदुमती राणीसाहेबांच्याबाबत केलेल्या अनोख्या क्रांतिकाक प्रयोगाचे ज्ञान झाले आणि त्यांनी इंदुमती राणीसाहेबांचे चरित्र लिहिले.

इंदुमती राणीसाहेबांचे चरित्र म्हणजे नुसत्या व्यथांनी वेढलेली एक कथा एवढेच नसून कर्तृत्वने संपन्न झालेली ती एक गाथा आहे. आणि भ्रमित झालेल्या, स्त्रियांना त्यांचे प्राप्त कर्तुत्वाचे व कर्तव्याचे दिग्दर्शन करणारी ती गीता आहे.

हे चरित्र १९२ पृष्ठांचे आहे. ते तेरा भागांमध्ये विभागले असून ठोकळ प्रकाशन, पुणे यांनी १९७६ ला प्रकाशित केले आहे. हा हन्त हन्त नलिनी गज उज्जहार!, गरिबाघरची लेक, सोनतळी-आश्रम, आधारवड कोसळला, राजगृही परतली आश्रमहरिणी, सर्पयज्ञ, मिस केंड्रिक, संस्था संस्थापणार्थाय, तनखाबंदी, एकसष्ठी, ध्वनिमुद्रिकांचा खजिना, महानिर्वाण, व्यक्तिदर्शन या नऊ प्रकरणांमध्ये हे चरित्र मांडण्यात आलेले आहे. शेवटच्या प्रकरणामध्ये इंदुमती राणीसाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू, त्यांचा प्रेमळ व शांत स्वभाव, उदारता, त्यांच्यावर झालेली टीका, त्यांचे औदार्य, वक्तृत्व, बुद्धीमत्ता, जिज्ञासा, ज्ञानलालसा या गुणांचे वर्णन केले आहे. जागतिक कीर्तीचे तत्त्वज्ञ व भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन कोल्हापूरला आले असता म्हणाले होते, "कोल्हापूरची तीन वैशिष्ट्ये आहेत-ज्ञानतीर्थ शिवाजी विद्यापीठ, वत्सलतीर्थ अंबाबाई आणि भारतीय संस्कृतीचे प्रतीक देवी इंदुमती!"[१०]

या चरित्रातून इंदुमती राणीसाहेबांची लहानपणापासून झालेली जडणघडण, बालवयात त्यांच्यावर झालेले उत्तम संस्कार, प्रिन्स शिवाजी यांच्याबरोबर लग्न झाल्यानंतर शाहू महाराजांच्या छत्रछायेखाली सुरू झालेले त्यांचे शिक्षण, राजपरिवाराकडून त्यासाठी झालेला विरोध, त्यांचे सार्वजनिक क्षेत्रातील कार्य या सर्व गोष्टींची माहिती मिळते. इंदुमती राणीसाहेबांच्यावर लिहिलेले हे एकमेव चरित्र आहे. या चरित्र लेखनाचे स्वरूप ललित लेखन किंवा कादंबरीसारखे आहे, असे असले तरी हे चरित्र ऐतिहासिक सत्यावर आधारित आहे.

राजर्षी शाहू: राजा व माणूस (१९८४):

राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनावरील हा एक महत्त्वाचा ऐतिहासिक संशोधनात्मक, प्राथमिक साधनांवर आधारित संदर्भ ग्रंथ आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा, शैक्षणिक कार्य, मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू यांचे दर्शन या ग्रंथातून घडते.

कृ. गो. सूर्यवंशी यांनी घरची परिस्थिती बेताची असताना शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने सुरू झालेल्या वसतिगृहाच्या साहाय्याने शिक्षण घेतले, त्यामुळे ते अधिकारी झाले, मानसन्मानाचे जीवन जगू लागले. त्यांच्यासारख्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या जीवनात स्थित्यंतर घडून आले. त्यामुळे शाहू महाराज हे जनसामान्यांना आपले त्राते वाटत. काही लोक शाहूंची पूजा करीत, तर काही शाहूंचा द्वेष करीत. या सत्याचा उलगडा करण्याच्या संकल्पनेतून त्यांनी १९५३ पासून शाहू महाराजांच्यासंबंधी माहिती मिळविण्यास सुरुवात केली.

विविध ग्रंथांचे वाचन केले. १९६१ पासून शाहूकाळाची पार्श्वभूमी स्पष्ट होण्यासाठी, तत्कालीन घटनांचा अन्वयार्थ समजण्यासाठी त्या काळातील व्यक्तींची चरित्रे, आत्मचरित्रे यांचे प्रदीर्घ वाचन केले. शाहू महाराजांची भूमिका,करवीर दरबारचे धोरण, छत्रपतींची आज्ञापत्रे, गॅझेट, प्रशासकीय अहवाल, खाजगी व सरकारी स्तरावर महाराजांनी केलेला पत्रव्यवहार, वृत्तपत्रातून झालेली साधकबाधक टीका, ब्रिटिश सरकारची प्रतिक्रिया इत्यादी समजून घेण्यासाठी त्यांनी अविरत परिश्रम केले. पुराभिलेख कार्यालयातील दप्तर, तेथील पत्रव्यवहार, बारनिशा तपासल्या. अनेक जाणकारांशी विचारविनिमय केला. यासाठी त्यांना भ्रमंतीही करावी लागली. वस्तीगृहांच्या चळवळीसाठी पुणे,नाशिक, अहमदनगर, अमरावती, नागपूर, पंढरपूर, धारवाड, हुबळी इ. गावांना भेटी देऊन तेथील वसतिगृहे, शैक्षणिक संस्था पाहिल्या, त्यासंबंधीची कागदपत्रे पाहिली, संस्थाचालकांशी चर्चा केली. कर्नाटकातील मठांना भेटी दिल्या, धारवाडमध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या हयात कार्यकर्त्यांना ते भेटले. मद्रासला जाऊन तेथील ब्राह्मणेतर चळवळीच्या प्रश्नाविषयी जाणकारांबरोबर चर्चा केली. सोनतळीआश्रमास भेट देऊन तेथील माहिती घेतली. शाहू महाराजांची शिकारस्थळे पाहिली. त्यांनी निर्माण केलेले पार्क, वसतिगृहे, व्यापार पेठा, राधानगरी धरण, संकल्पित काळम्मावाडी धरण पाहिले. पन्हाळा, राधानगरी, रायबाग, कोल्हापूर येथील साठमाऱ्यांचे आखाडे पाहिले. खासबाग मैदान व पॅलेस थिएटर या स्थळांचा बारकाईने अभ्यास केला. शाहू महाराजांचा खासगी पत्रव्यवहार तपासला. शाहू महाराजांच्या सहवासातील, चळवळीतील, करवीर दरबारच्या सेवेत जबाबदारीच्या पदावर असलेल्या वयोवृद्ध व्यक्तींकडून महत्त्वाची माहिती मिळविली. अण्णासाहेब लठ्ठे व धनंजय कीर यांनी लिहिलेल्या शाहूचरित्रांची पारायणे केली. एवढे सगळे कष्ट करून त्यांनी 'राजर्षी शाहू' हे चरित्र लिहिले. हे चरित्र ६६८ पानांचे असून ठोकळ प्रकाशन, पुणे यांनी १९८४ मध्ये प्रकाशित केले आहे.

हे चरित्र ४० प्रकरणांमध्ये विभागले असून या ग्रंथामध्ये शाहू महाराजांची जन्मपत्रिका, हस्ताक्षर, करवीर छत्रपती घराण्याचा वंशवृक्ष, कागलकर घाटगे घराण्याची वंशावळ, करवीर क्षेत्र, छत्रपतींचे कुलवृत्त, दत्तविधान आणि शिक्षण, महाराजांच्या शैक्षणिक सहली, अधिकार प्राप्ती, कौटुंबिक जीवन, तत्कालीन दुष्काळ आणि प्लेग, वसतिगृहे, करवीर राज्यातील शिक्षण, राज्याबाहेरील शैक्षणिक कार्य, विद्यापीठ हायस्कूल, वेदोक्त प्रकरण, शंकराचार्य करवीर पीठ, डॉ. कुर्तकोटी, क्षात्रजगद्गुरु, परदेशगमन, शत्रूंच्या कारवाया, अस्पृश्यतेशी मुकाबला, फासेपारधी व डोंबारी, शिक्षणसंस्कार व विवाहसंस्कार, सोनतळी आश्रम, इंदुमती राणीसाहेब, सत्यशोधक समाज, कुलकर्णीपदाची अखेर, करवीर नगरीचा विकास, ब्राह्मणेतर चळवळ, स्वराज्यद्रोही की लोकशाहीचा प्रवक्ता, शिवस्मारक, बाबलीबाई, साठमारी, मल्लविद्या, शिकार, रंगभूमी, गायन, चित्रकला, सामाजिक सुधारणा या सर्वांची सविस्तर माहिती मिळते.[११]

या चरित्रामुळे सामान्य माणसांना शाहू महाराज विस्तृतपणे समजण्यास मदत झाली. महाराजांच्यावर एवढ्या विस्ताराने लिहिलेले हे पहिले चरित्र होय. कागदपत्रांच्या आधाराने ऐतिहासिक सत्यांवर लिहिलेले हे चरित्र आहे. तथापि कृ. गो. सूर्यवंशी यांनी अनेक ठिकाणी संदर्भ दिलेले नाहीत, ही या ग्रंथाची मर्यादा आहे.

राजगुरू-अमात्य (सर रघुनाथ व्यंकाजी सबनीस):

राजगुरू अमात्य हे सर रघुनाथ व्यंकाजी सबनीस यांचे चरित्र आहे. कृ. गो. सूर्यवंशी यांच्या मते, हे चरित्र रूढ चरित्राप्रमाणे सरळ नाही. चरित्र व्यक्तीचे आहे, पण कार्यकर्तुत्व शाहू आणि सबनीस या दोघांचे आहे. या दोघांच्या एकत्र कार्यकर्तृत्वाचा इतिहास, व्यक्तीच्या

चरित्राचा इथे अविभाज्य भाग बनला आहे. म्हणूनच हे चरित्र रूढ चरित्राहून वेगळ्या प्रकारचे व आशयाचे आहे अशा प्रकारचे हे मराठी भाषेतील पहिले चरित्र असावे.

सर सबनीस शाहू महाराजांचे गुरु व दिवाण होते. राजगुरू अमात्य हे चरित्र सबनीसांचे असले तरी त्यात कौटुंबिक भाग थोडाच आहे. म्हणजे त्यांचा राजगुरू होण्यापर्यंतचा काळ आणि नंतर मात्र शाहू-सबनीस यांचे कार्य तथा परिवर्तनाचा भाग चरित्रात मांडला आहे. परिवर्तनाच्या जडणघडणीत सर सबनीस यांचाही सहभाग होता. हे चरित्र २८८ पृष्ठांचे आहे व अठरा प्रकरणांमध्ये विभागले असून रवींद्र सबनीस ट्रस्ट, कोल्हापूर यांनी १९९१ मध्ये प्रकाशित केले आहे.

या पुस्तकात 'इतिहास असे सांगतो, टाकीचे घाव, जडणघडण, ऊन-पाऊस, जीवनप्रवासाची शिदोरी, राजगुरूपदी, छत्रपतींच्या सेवेत, 'निसर्गाचा कोप, साथीचे रोग', पापग्रहांचे उच्चाटण, शिक्षण-संजीवनी, वेदोक्त, अस्पृश्यता निवारण, ब्राह्मणेतर चळवळ, लोकसेवा, ऋणानुबंध, 'अरे,संसार संसार', अखेरचे दिवस, असा दिवाण/अमात्य होणे नाही,' अशा १८ प्रकरणातून सर रघुनाथ व्यंकाजी सबनीस यांचे चरित्र मांडण्यात आले आहे.[१२]

वादळ आणि राजर्षी शाहू:

राजर्षी शाहू महाराज यांचे जीवन ही मानवी स्वातंत्र्याची तथा अमुलाग्र समाज परिवर्तन घडविणारी चित्तथरारक गाथा होय. राजर्षी शाहू हे राजा होते तसेच ते लोकनेतेही होते. आपल्या प्रजेच्या कल्याणाची कमालीची काळजी घेऊन त्यांनी राजधर्म पाळला आणि लोकनेता या नात्याने लोककल्याणार्थ सामाजिक परिवर्तनाचे चक्र फिरविण्यासाठी लोकचळवळी उभारल्या. रयतेचे कल्याण हाच आपला श्वास आणि ध्यास मानून कार्यरत राहिलेल्या राजर्षी शाहूंना दुष्काळ आणि प्लेगची साथ अशा नैसर्गिक संकटांना झुंज द्यावी लागली. त्याचप्रमाणे मनुष्यनिर्मित असंख्य संकटांशी, वादळांशी सातत्याने लढावे लागले.

स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराजांचा वंशज व स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी अखंड झुंज घेत आलेल्या करवीर छत्रपतींच्या राजकुलातील विद्यमान राजा म्हणून शाहू छत्रपतींकडे इंग्रज सरकार करड्या नजरेने पाहत होते. त्याचप्रमाणे आपल्या पारंपारिक, धार्मिक, आर्थिक, सामाजिक वर्चस्वाला तसेच प्रशासन व शिक्षण या क्षेत्रातील मिरासदारीला सुरुंग लावणाऱ्या परिवर्तन पर्वाचे सूत्रधार म्हणून शाहू महाराज ब्रह्मवृंदाच्या डोळ्यात सारखे सलत होते. थोडक्यात म्हणजे राजसत्ता व धर्मसत्ता या दोन्ही प्रबळ शक्ती स्वतंत्रपणे शाहूरायांना खग्रास ग्रहण लावण्यासाठी आसुसल्या होत्या. या सर्व घटनांचा परखडपणे आढावा घेणारे पुस्तक म्हणजे कृ. गो. सूर्यवंशी लिखित 'वादळ आणि राजर्षी शाहू' हे होय.

या पुस्तकात राज्य, राजा, राजद्रोह आणि देशद्रोह, कथा दोन नगरांची, संस्थाने आणि साम्राज्य सरकार, दहशतवादी कृत्यांचे उत्पात, ईस्ट इंडिया कंपनी व करवीर छत्रपती, शाहू छत्रपतींची कारकीर्द पर्व १ ले (वादळाची चाहूल), शाहू छत्रपतींची कारकीर्द पर्व २ रे (वादळ), शिवछत्रपतींची कारकीर्द पर्व ३ रे (वादळ फोफावले) आणि अव्यापारेषु व्यापार अशी एकूण नऊ प्रकरणे आहेत.

इंग्रज राज्यकर्ते तसेच लोकमान्य टिळकांच्या पाठिंब्याने विशेष अवसान चढलेले सनातनी ब्राह्मण हे शाहू महाराजांनी नमते घ्यावे, आपल्या तंत्राने वागावे म्हणून त्यांची घाबरगुंडी उडविण्याच्या इराद्याने जे वादळ उठवीत होते, तत्संबंधीच्या प्रक्रियेतील घटना-घडामोडींचा, क्लुप्त्या कारवायांचा, घातपती व दहशतवादी कृत्यांच्या उद्रेकांचा विकृत, विषारी तसेच धाकधपटशादर्शक विधानांचा परामर्श कृ. गो. सूर्यवंशी यांनी या पुस्तकात घेतलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने १९८९ साली कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर प्रसिद्ध केले. कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअरमध्ये

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या संदर्भात जी एकांगी, अनुचित, अनुदार व बदनामीकारक विधाने केली त्यामुळे संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्याने गॅझेटिअरविरोधी आवाज उठविला. या पुस्तकाची निर्मितीही त्यातूनच झाली आहे. असे लेखकाने आवर्जून सांगितले आहे. १८८९ साली प्रसिद्ध झालेल्या या कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअरमधील असंख्य चुका या पुस्तकाद्वारे लोकांसमोर मांडल्या आहेत.

राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनातील अनेक वादळे कोणी व का निर्माण केली? त्या सर्व वादळांशी शाहू महाराज मोठ्या जिद्दीने, डोके शांत ठेवून, तोल जाऊ न देता लढा देत राहिले याबाबत अत्यंत प्रभावीपणे या पुस्तकात मांडले आहे. राष्ट्रीय प्रबोधिनी, कोल्हापूर तर्फे प्रकाशित या पुस्तकाची प्रथम आवृत्ती २६ जुलै, १९९२ रोजी प्रसिद्ध झाली असून पृष्ठ संख्या ११२ आहे. [१३]

भारतीय मल्लविद्या उदय आणि विकास:

हा ग्रंथ महाराष्ट्र-राज्य कुस्तीगीर परिषद-प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केला असून प्रकाशन वर्ष दिलेले नाही. हा ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या अनुदानाने प्रकाशित झालेला आहे.

हा ग्रंथ दोन विभागांमध्ये असून पहिल्या विभागामध्ये वीस प्रकरणे आहेत व याची पृष्ठसंख्या ४३६ आहे. तर दुसरा विभाग 'महाराष्ट्रातील मल्लांचा परिचय' हा असून याची पृष्ठसंख्या १९१ आहे. दोन्ही विभाग मिळून ६२७ पृठसंख्येचा हा ग्रंथ आहे.

ग्रंथाच्या पहिल्या विभागामध्ये मल्लविद्येची गंगोत्री, स्थितीचा किंकर असे प्राणिमात्र, बलवंतचि पालनहार, प्रकार, संकेत व नियम, बुद्धकाळ, यवनकाळ, शिवकाळ, पेशवेकाळ इंग्रजकाळ, राजर्षी शाहू छत्रपती कालखंड (राजश्री शाहू छत्रपती व इतर राजे राजवाडे), इंग्रजकाळ (चालू) जगज्जेता गामा, इंग्रजकाळ (चालू), इंग्रजकाळ छत्रपती राजाराम कालखंड, इंग्रजकाळ मल्लयुद्धांच्या जाहिरातीतील काव्य, इंग्रजकाळ मल्लांच्या झुंजीच्या नोंदी, इंग्रजकाळ मल्लांची मल्लांची मर्दुमकी, इंग्रजकाळ परिस्थितीचे पडसाद, स्वातंत्र्यकाल नवयुग अवतरले, स्वातंत्र्यकाल नवविचारांची लाट याप्रमाणे १८ प्रकरणांचा समावेश आहे.

ग्रंथाच्या एकोणिसाव्या व विसाव्या प्रकरणांमध्ये 'नवे पर्व:महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद-कार्यव्याप्ती'चा समावेश आहे. १९ व्या प्रकरणांमध्ये महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या पुणे, मुंबई, सोलापूर, सांगली, नागपूर, औरंगाबाद, धुळे, सातारा, अमरावती, नासिक येथे झालेल्या दहा अधिवेशनांची माहिती क्रमाने दिलेली आहे. २० वे प्रकरण 'जागतिक ऑलिम्पिक सामने' हे आहे.

ग्रंथाच्या दुसऱ्या विभागामध्ये 'महाराष्ट्रातील मल्लांचा परिचय' दिलेला आहे. यामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा, अहमदनगर, सोलापूर, मुंबई, पुणे, नागपूर, अकोला, अमरावती, नाशिक, वर्धा, औरंगाबाद येथील पैलवानांची थोडक्यात माहिती, कारकीर्द दिलेली आहे.[१४]

भारतीय मल्लविद्येची सविस्तर माहिती देणारा हा एक महत्त्वपूर्ण व दुर्मिळ असा ग्रंथ आहे. या ग्रंथातून भारतातील पारंपरिक कुस्ती किंवा मल्लविद्येचा इतिहास, तालीम परंपरा, आखाडा संस्कृती व प्रमुख पैलवान यांची माहिती मिळते.

वरील सर्व ऐतिहासिक, चरित्रग्रंथांव्यतिरिक्त कृ. गो. सूर्यवंशी यांनी 'महात्मा गांधी' व 'बाबासाहेब आंबेडकर' या दोन छोट्या चरित्रांचे लेखनही केलेले आहे.[१५]

मूल्यमापन:

कृ. गो. सूर्यवंशी यांनी चरित्रकार, संशोधक, लेखक, उत्तम वक्ते, शिक्षणतज्ज्ञ, शाहू महाराजांच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक, नाभिक समाजाचे कार्यकर्ते म्हणून विविधांगी कार्य केले आहे. ते राजर्षी शाहू महाराजांच्या काळात सुरू झालेल्या कोल्हापूरातील नाभिक

बोर्डिंगमध्ये मोफत राहून शिक्षण घेतलेले सामान्य मध्यम वर्गातील व बहुजन समाजातील एक विद्यार्थी होते. त्यांनी बिकट परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊन, शिक्षण उपसंचालक पदापर्यंत मजल मारली, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांनी काही ऐतिहासिक चरित्रग्रंथांचे लेखनही केले. त्यांनी केलेले लेखन हे प्राथमिक, अस्सल व दुर्मिळ कागदपत्रांच्या आधारे केलेले आहे. कागदपत्रे मिळविण्यासाठी त्यांनी मोठे कष्ट घेतलेले आहेत, भ्रमंती केली आहे. ऐतिहासिक सत्याला कुठेही बाधा येऊ न देता त्यांनी लेखन केलेले आहे. त्यांच्या ग्रंथातून तत्कालीन राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक परिस्थितीची, चळवळींची, त्यामध्ये सहभागी व्यक्तींची माहिती मिळते. तथापि त्यांनी आपल्या ग्रंथांना अनेक ठिकाणी संदर्भ दिलेले नाहीत, ही या ग्रंथांची उणीव आहे. असे असले तरी कागदपत्रांच्या आधारे ऐतिहासिक सत्याला धरून या ग्रंथांचे लेखन केलेले असल्याने, या ग्रंथांचे महत्त्व कमी होत नाही. 'टाकीचे घाव, भारतीय मल्लविद्या उदय व विकास, वादळ आणि राजर्षी शाहू' ही त्यांची अत्यंत दुर्मिळ पुस्तके आहेत. त्यांनी लिहिलेली 'महात्मा गांधी' व 'बाबासाहेब आंबेडकर' ही छोटी चरित्रे उपलब्धही होत नाहीत. तसेच त्यांच्या पूर्व चरित्राविषयीही फारशी माहिती मिळत नाही. अशा या दुर्लक्षित चरित्रकाराचे, इतिहासकाराचे इतिहासलेखनातील कार्य निश्चितच उल्लेखनीय आहे.

संदर्भ व तळटीपा:

१. दै. सत्यवादी, कोल्हापूर या. १७/०६/१९४७, पृ. ३, ता. २५/०७/१९४७ पृ. २ व ता. २८/०७/१९४७, पृ. १ .

२. दै. पुढारी, कोल्हापूर ता. २१/०८/१९९६, पृ. ६.

३. श्री सेना विद्यार्थी गृह, कोल्हापूर संस्थेतील फलकावरून मिळालेली माहिती.

४. दै. पुढारी, कोल्हापूर ता. २१/०८/१९९६, पृ. ६.

५. सूर्यवंशी कृ. गो., *वादळ आणि राजर्षी शाहू* , राष्ट्रीय प्रबोधिनी प्रकाशन, कोल्हापूर, पृ. ११२-११३; https://sahityasrushti.org; सूर्यवंशी कृ. गो., *राजगुरू-अमात्य*, रवींद्र सबनीस ट्रस्ट, कोल्हापूर, १९९१.

६. https://www.bookganga.com

७. दै. पुढारी, कोल्हापूर, ता. २३/०८/१९९३, पृ. ५.

८. सूर्यवंशी कृ. गो., *टाकीचे घाव*, जगताप-कारले प्रकाशन, पुणे, १९६५, पृ. १-२, १४२-१४३.

९. सूर्यवंशी कृ. गो., *बहुजन हिताय बहुजन सुखाय (बाळासाहेब देसाई यांची जीवनगाथा)*, जगताप-कारले प्रकाशन, पुणे, १९७०.

१०. सूर्यवंशी कृ. गो., *इंदुमती राणीसाहेब*, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९७६, मनोगत, अनुक्रमणिका, पृ. १-१९२.

११. सूर्यवंशी कृ. गो., *राजर्षी शाहू: राजा व माणूस*, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४.

१२. सूर्यवंशी कृ. गो.,*राजगुरू -अमात्य*, रवींद्र सबनीस ट्रस्ट, कोल्हापूर, १९९१.

१३. सूर्यवंशी कृ. गो., *वादळ आणि राजर्षी शाहू*, राष्ट्रीय प्रबोधिनी, कोल्हापूर, १९९२; पवार जे. के., *राजर्षी शाहूंची वाड्.मयीन स्मारके*, राज प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २०२३, पृ. १८०-१८२.

१४. सूर्यवंशी कृ. गो., *भारतीय मल्लविद्या उदय आणि विकास*, महाराष्ट्र-राज्य कुस्तीगीर परिषद-प्रकाशन, पुणे .

१५. सूर्यवंशी कृ. गो., *वादळ आणि राजर्षी शाहू*, राष्ट्रीय प्रबोधिनी, कोल्हापूर, १९९२,पृ. ११२.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

स्वातंत्र्योत्तर काळातील सोलापूर मधील गिरणी कामगार चळवळ : विशेष संदर्भ जुनी गिरणी

प्रा. पल्लवी रोहिदास मिरजकर

संशोधक विध्यार्थिनी

ग्रामोन्नती मंडळाचे कला , वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, तालुका- जुन्नर, जिल्हा- पुणे

Corresponding Author - प्रा. पल्लवी रोहिदास मिरजकर

DOI - 10.5281/zenodo.19723613

आधुनिक काळामध्ये जगात पर्यायाने भारतात सुद्धा कामगार चळवळी उद्यास आलेल्या दिसतात. काळाच्या काळाच्या ओघात त्यांच्यापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्यांना सामोरे जाण्याची जागृतीही त्यांच्यात आली. यातूनच अनेक कामगार चळवळी पुढे आल्या अशा कामगार चळवळीचे विविध अविष्कार जागोजागी दिसून येतात. सोलापूर मधील गिरणी कामगार चळवळ हा असाच एक अर्थपूर्ण अविष्कार आहे. सोलापूरची गिरणी कामगार चळवळ म्हणजे सोलापूरच्या जाज्वल्य इतिहासातील एक सोनेरी पान होते. सोलापूर शहराच्या अनेक चढउताराचे साक्षीदार या गिरण्या आणि गिरणी कामगारांच्या चळवळी आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळण्याआधीच येथील कामगारांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध संपाचे हत्यार हाती घेतले आणि आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीच्या काळातील संपाचे स्वरूप तात्पुरत्या स्वरूपाचे होते. सुसंघटितपणाचा अभाव, कामगार नेतृत्वाचा अभाव, अशिक्षितपणा यामुळे कामगारांना आपल्या न्याय व हक्कासाठी गिरणी मालकांशी लढणे अवघड झाले होते. परंतु १९२० च्या भीमराव च्या वेतनवाढीच्या संपाने चळवळीला एक वेगळे वळण दिले. पुढे १९२२ च्या संपाने एक पाऊल पुढे टाकत १९२० च्या संपात कामावरून काढून टाकलेल्या कामगारांना कामावर घ्यावे, कामगार संघटनेस मान्यता द्यावी व कामगार संघटनांकडून पाठविलेल्या ठरावांचा विचार व्हावा या मागण्यांसाठी संप पुकारला परंतु या संपातून काही साध्य झाले नाही संप पुकारताच गिरणी मालकांनी टाळेबंदी जाहीर केली.

देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत सोलापुरातील महत्वाच्या पाचही गिरण्यामधून छोटे मोठे अनेक संप होत राहिले. परंतु प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आशिया खंडातील सर्वात मोठ्या गिरण्या पैकी एक म्हणून ओळखली जाणारी जुनी गिरणी म्हणजेच सोलापूर स्पिनिंग अँड विविंग मिलचा इतिहास व तेथील कामगारांनी पुकारलेल्या संपाचा आणि कामगार चळवळीचा अभ्यास केला आहे

१८७६ सली स्थापन झालेली जुनी गिरणी म्हणून सर्वत्र ओळखली जाणारी सोलापूर स्पिनिंग अँड विव्हींग मिल सोलापूरचे वैभव होते. या गिरणीने अनेक चढ-उतार पाहिले गिरणीचे मॅनेजिंग एजंट श्री गोकुळदास यांनी केवळ नफा मिळवला नाही तर, सोलापुरातील कामगारांकरिता शिक्षण, आरोग्य, वाचनालय, उपाहारगृहे, कामगारांसाठी घरे तसेच अनेक सामाजिक व कल्याणकारी कामे देखील केली. गिरणीच्या विस्तारामुळे कामगारांच्या संख्येतही तेजीने वाढ होत गेली. पुढे आणखी काही गिरण्यांची भर पडली. सर्व गिरण्यांनी सोलापूरच्या अर्थव्यवस्थेत मोलाची भर घातली

आणि सोलापूरला कामगारांचे शहर व गिरणगाव म्हणून सर्वत्र ख्याती प्राप्त करून दिली.

पहिल्या महायुद्धाच्या काळात जुन्या गिरणीने प्रचंड नफा मिळवला. यातूनच गिरणीचे 'सी' युनिट निर्माण झाले. अहोरात्र गिरणीतील कामगार धडपडून मोठ्या प्रमाणात उत्पादन काढत होते. कारण पाश्चात्य राष्ट्राची मागणी पूर्ण करणे गरजेचे होते. त्यातूनच मोठा नफा गिरण्यांना मिळाला. मात्र गिरणी मालकांनी गिरणीच्या तेलपाण्याकडे लक्ष दिले नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात नफा प्रचंड मिळवणाऱ्या गिरण्यांनी यंत्रांची दुरुस्ती नव्या यंत्रांची स्थापना याकडे दुर्लक्ष केले. परिणामी गिरणी आर्थिक दृष्ट्या दबघाईला आली. परिणामी उत्पादन कमी होऊ लागले व आपल्या स्थापनेपासून कधीही न बंद असणारी जुनी गिरणी १९४९ मध्ये प्रथम बंद पडली. कामगार नेते आणि कामगार सतत आपल्या न्याय व अधिकाऱ्यांसाठी संप सभा आंदोलने चळवळी करत राहिले. कामगारांच्या मागण्या कधी मान्य होत तर कधी गिरणी मालक त्यांच्या मागण्यांना केराची टोपली दाखवत असत. तसेच सतत, संप चळवळी आंदोलने यामुळे देखील गिरण्यांची अवस्था अत्यंत वाईट झाली होती. परिणामी जुन्या गिरणीला घरघर लागली. यातच भर म्हणजे गिरणीतील बॉयलर मध्ये बिघाड झाल्याने कपडा खाता बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.[१] आणि २७ ऑगस्ट १९४९ रोजी जुनी गिरणी बेमुदत बंद करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापकांनी जाहीर केले. गिरण्यांच्या एकूण ७५ वर्षाच्या इतिहासात गिरणी बंद पडण्याची ही पहिलीच वेळ होती. यामुळे सोलापूरच्या कामगार जगतामध्ये मोठी खळबळ माजली. गिरणी बंद करण्यामागचे कारण गिरणीची आर्थिक परिस्थिती चांगली नाही हे शेठ मोरारकानी सांगितले. या टाळेबंदी विरोधी मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्याची तयारी चालू झाली. व्यवस्थापकांनी घेतलेल्या निर्णयामुळे जवळजवळ १२,२९२ कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळी.[२]

अशा परीस्थितीतही कामगारांनी व कामगार नेत्यांनी धीर न सोडता लढा उभा केला. गिरणी बंद पडतात कलेक्टर साहेबांनी १४४ कलम लागू करून सभा व मिरवणुकीस बंदी घातली. परिणामी कामगारांच्या व्यथा मांडण्याचा मार्गच बंद झाला. बेकार कामगारांचे प्रमाण अधिक असल्याचे लक्षात येताच मंजूर मंत्री नामदार नंदा यांनी कामगारांना मदतीचे आश्वासन दिले. सर्वांनी गिरणी वाचविण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केला. परंतु यश आले नाही. शेवटी गिरणी बंद पडली.

कामगारांनी गिरणी चालकांविरुद्ध आवाज उठविण्याचा चंग बांधला ३० ऑगस्ट १९४९ पासून टाळेबंदी ताबडतोब बंद करा, गिरण्या लवकर उघडा, आम्हास काम द्या, या घोषणांसह जुन्या गिरणीच्या फाटकासमोर सत्याग्रह करण्याचे ठरले. सत्याग्रह पाहण्यास हजारोंच्या समुदाय जमला होता जमावातून 'सत्याग्रह यशस्वी होऊ', 'सत्याग्रह की जय', अशा प्रोत्साहनपर घोषणा दिल्या जात होत्या. सत्याग्रही फाटका जवळ येतात त्यांना अटक करण्यात आले सत्याग्रहींवर खटला चालविण्यात आला.[३] त्याच दिवशी सायंकाळी सहा वाजता श्री भीमराव रामचंद्र यादव यांनी सुभाष चौकात जाऊन घोषणा देऊन सभाबंदीचा हुकूम मोडला सभाबंदीचा हुकूम मोडल्याचा त्याच्यावर गुन्हा न लावता सुरक्षा कायदा खाली अटक करून त्यास पंधरा दिवस स्थानबद्ध करण्यात आले. दुसऱ्या दिवशी हनुमंतू लिंगप्पा, रामबाबू राऊत, नरहरी पतंगे, पांडुरंग कृष्णा, व जिलानी मेहबूब या पाच सत्याग्रहींनी घोषणा देऊन गिरणीच्या फाटकापुढे सत्याग्रह करण्याचे ठरवले. या सत्याग्रहात सहभाग घेणाऱ्या सर्वांना अटक करून त्यांना एक महिन्याची शिक्षा व २५ रुपये दंड

तसेच दंड न भरल्यास सात दिवसाची शिक्षा सुनावण्यात आली.[४]

सत्याग्रहाचे सत्र चालूच होते. परंतु या संपाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कामगारांमध्ये अत्यंत उत्साहपूर्ण वातावरण होते. आपल्या न्याय व हक्कांसाठी समस्त कामगारांची एकजूट झली होती. तसेच गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या महिलाही सत्याग्रह करण्यास पुढे सरसावल्या होत्या. कामगार रोज शांततेने सत्याग्रह करत होते. परंतु सत्याग्रहींना पकडून त्यांना शिक्षा करणे हे रोजचे सत्र झाले होते. दरम्यान विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन चालू झाले. सोलापुरातील सत्याग्रहाची परिस्थिती पाहण्यासाठी कधीकाळी गिरणी कामगार म्हणून काम केलेले तत्कालीन आमदार तुळशीदास जाधव सोलापूर मध्ये कामगारांची विचारपूस करण्यासाठी आले ज्या गिरणी कामगारांनी महायुद्धाच्या काळात मोठ्या प्रमाणावर नफा मिळवून दिला आणि एका मीलचे तीन मेल करण्यास हातभार लावला आज त्या कामगारांची अवस्था अत्यंत वाईट झाली होती. शहरातील श्रीमंत मंडळी व्यापारी आणि मध्यमवर्गी यांनी कामगारांच्या पाठीशी उभे राहावे असे आवाहन माननीय तुळशीदास जाधव यांनी केले. परिणामी सोलापूरमधील सर्व स्थरातून कामगारवर्गासाठी मदत उभी झाली. शेठ मोरारका आणि कामगारनेते यांच्यात चर्चा झाली. त्यात व्यवस्थापकांनी गिरणी बंद ठेवण्यामागची कारणे सांगायला सुरुवात केली. त्यात खालील कारणांचा समावेश होता

१. कापडाचा साठा पडून असल्यामुळे गिरणीत पैसा गुंतून पडला आहे. त्यामुळे मिलची आर्थिक कोंडी झाली आहे.

२. कापूस वगैरे कच्च्या मालाचा साठा अपुरा आहे.

३. आर्थिक कोंडीमुळे प्रमाणापेक्षा जास्त कामगार ठेवणे मीलला शक्य नाही.

अशी उडवा उडवी ची कारणे गिरणी व्यवस्थापकांनी सांगावयास सुरुवात केली परंतु लेबर तज्ञ श्री एम के त्रीलोकेकर यांनी गिरणी बंद बेकायदा ठरवल्यामुळे व्यवस्थापकांमध्ये खळबळ उडाली. अशा परिस्थितीत कामगार संघटनांनी गिरणी आपल्या ताब्यात घ्यावी अशी मागणी सरकारकडे केली सरकारने कामगारांची ही उपासमार थांबवण्यासाठी कामगारांची दखल घ्यायचे ठरवले.

दरम्यान या काळात शेतकरी कामगार पक्षाचे आमदार तुळशीदास जाधव यांनी विधिमंडळात हा प्रश्न उचलून धरला आणि कामगारांची बाजू विधिमंडळात मांडली व कामगारांना जगविण्यासाठी मिल सरकारने ताब्यात घ्यावी असे आग्रही प्रतिपादन केले. तसेच गिरणी बंदच्या काळात कामगारांचे हाल होऊ नयेत म्हणून त्यांना पर्यायी रोजगाराची सुविधा करून देण्यासाठी एक भक्कम व्यवस्था असावी म्हणून फेब्रुवारी १९५० मध्ये सोलापुरात स्थायिकरण योजना सुरू करण्याचे ठरविले.[५] तसेच जुनी गिरणी चालू करण्यास १३ लाख रुपये सरकारी कर्ज देण्याचे ठरले. यातून शासन संचलित विणकारांच्या प्रशिक्षण केंद्राची स्थापना झाली.[६] मात्र याचा फायदा सर्वच कामगारांना झाला नाही.

पुढे गिरणीच्या भागधारकांपैकी काहीजणांनी गिरणी योग्य व्यवस्थापनाखाली सुरू करावी अशी विनंती केली. सरकारने ताबडतोब वटहुकूम काढावे अशी औद्योगिक क्षेत्रातून मागणी होऊ लागली. सरकारने तात्काळ वटहुकूम काढून गिरणी ताब्यात घेतली आणि ती मुंबई सरकारला चालवावयास दिली. गिरणीच्या कामकाजाकरिता नवीन डायरेक्टर मंडळही नेमले. त्यात मुंबई गिरणी मालक संघाचे अध्यक्ष श्री. वी. एन. चंदावरकर, श्री तुळशीदास किलाचंद, श्री. एस. एस. गिडवाणी, श्री. व्ही. एम. जोशी (मुंबई सरकारच्या आर्थिक खात्याचे

दुय्यमचिटणीस) श्री. डी. एन. कौशिक (डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रियल) यांची डायरेक्टर मंडळावर निवड करण्यात आली. तर श्री. दवे आणि चंदावरकर हे मंडळाचे अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले. तसेच श्री गिडवाणी यांची नेमणूक निमंत्रक म्हणून करण्यात आली.[७] कामगार विश्वातील ही घटना अभूतपूर्व होती अशा प्रकारे कामगार नेते आणि कामगारांच्या मागण्यांचा विचार करून सरकारने दिनांक २७ ऑगस्ट १९४९ रोजी बंद पडलेल्या जुन्या गिरणीचा पुन्हा सात महिन्याने भोंगा पुन्हा वाजला. कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले. तत्कालीन जिल्हाधिकारी श्री व सौ नाईक यांच्या हस्ते दिनांक २५ मार्च १९५० रोजी शुभारंभ करण्यात आले याप्रसंगी मिल मॅनेजर मी. पावरी श्री कुलकर्णी व डायरेक्टर सर चंदावरकर उपस्थित होते.[८] यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले २ मे १९५० पासून गिरणीतील 'बी' मिल मधील स्पिनिंग खाते सुरू करण्यात आले. यावेळी एकूण ७५ कामगारांना कामावर घेण्यात आले.[९] हळूहळू मिल मधील काही खाती सुरू झाली म्हणून गिरणी कामगारांवरील बेकारीचे संकट काही प्रमाणात का असेना पण टळले मात्र गिरणी बंद होत असताना कामगारांची संख्या आणि चालू होतानाची कामगारांची संख्या यात मोठा फरक होता. गिरणी बंद होते वेळी गिरणीत जवळजवळ १२२९२ कामगार काम करीत होते. परंतु ताळेबंदीनंतर गिरणी पुन्हा सुरू झाली तेव्हा १९५० मध्ये गिरणीत फक्त ४४१४ इतकेच कामगार काम करू लागले.[१०]

अशाप्रकारे गिरणी पुन्हा सुरू झाली असली तरी कामगारांना न्याय मिळाले नव्हते. कामगारांचे कोणतेही प्रश्न असले तरी भारत सरकारच्या वटहुकूमामुळे जुन्या गिरणीचा कारभार मध्यवर्ती सरकारकडे गेल्याने मुंबईचा औद्योगिक कलह संबंधीचा कायदा गिरणीला लागू पडत नाही. त्यामुळे जुन्या गिरणीच्या विरोधी लेबर कोर्टाला कोणतेच अधिकार राहिलेले नाहीत असे सांगून कामगारांचे अर्ज फेटाळण्यात येत असत.[११] तसेच कामगारांच्या बाजूने दिलेले निर्णय जुन्या व्यवस्थापकांविरुद्ध दिलेले असून ते नवीन सरकार नियुक्त व्यवस्थापकांवर बंधनकारक नाहीत असे उत्तर दिले. ज्या कायद्याने निवाडे देण्यात आले होते तो कायदाच आता लागू नसल्याने कामगारांची बाकी देण्याचे बंधन नाही. याशिवाय गिरणीकडे आता कसलाच पैसा नाही कर्जाऊ रकमेतून व सरकारी मदतीतून गिरणीतील कामकाज कसेबसे चालू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. अशा प्रकारे कोर्टाच्या या निर्णयामुळे आता कामगारांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधी तसेच न्याय व हक्कासाठी दाद मागण्याचे साधन नाहीसे झाले.

मुंबई वेजेस बोर्डाने दिलेल्या आदेशाप्रमाणे १९४८ सालाचा दोन महिन्याचा पगार बोनस म्हणून सोलापुरातील पाचही गिरण्यांना द्यावयाचा होता. जुनी मील सोडून इतर चारही मिलने ते बोनस कामगारांना दिले. परंतु जुन्या मिलचा व्यवस्थापकांनी बोनस न देताच मील बंद केली होती. दरम्यान सरकारने मिल चालवावयास घेतली आणि सरकारने ही कामगारांना बोनस दिले नाही परिणामी राष्ट्रीय गिरणी कामगार संघातर्फे सोलापुरातील रेसिडेंट मॅजिस्ट्रेट कोर्टापुढे हे प्रकरण सादर करण्यात आले. कोर्टापुढे साक्षीपुरावे होऊन निर्णय देण्यात आला. तो निर्णय कामगारांच्या बाजूने होता. त्यामुळे कामगार नेते आणि कामगारांमध्ये अजूनही आशेचे एक किरण जिवंत होते. जुने व्यवस्थापक असताना निकाल लागला आहे आता नवे व्यवस्थापक मंडळ जरी असले तरी मील तीच आहे. त्यामुळे बोनस देण्याचे नाकारणे गैर आहे. नव्या व्यवस्थापकांनी जुन्या व्यवस्थापकांची देणे दिल्याचे पुराव्यानिशी सिद्ध झाल्याने गरीब कामगारांची देणी देण्याचे नाकारणे अयोग्य आहे. आज औद्योगिक संबंध कायदा लागू नाही म्हणून तो लागू असताना कायदेशीर झालेल्या गोष्टीही

बंधनकारक नाहीत. हे म्हणणे अत्यंत चुकीचे असल्याचे मत देऊन कोर्टाने १९४८ सालाचे दोन महिन्याच्या पगाराइतकी रक्कम बोनस म्हणून द्यावी असा आदेश जुन्या गिरणीच्या व्यवस्थापकांना दिला.[१२] तसेच जुन्या गिरणीतील बेकार कामगारांनी गिरणीचे व्यवस्थापक श्री चंदावरकर यांच्या बंगल्यावर मोर्चा काढला "रोटी मकान, काम दो नही तो खुरसी छोड दो" अशा घोषणा देण्यास सुरुवात केली तेव्हा श्री चंद्रावरकरांनी कामगारांच्या प्रतिनिधींना बोलाऊन त्यांच्याशी चर्चा करून जुन्या व्यवस्थापकांनी व काही बेजबाबदार मजुरांनी गिरणीची स्थिती हाडाच्या सापळ्यासारखी केली आहे. यावेळी बोनस देण्यासंबंधी कोर्टाने दिलेल्या निकालाविषयी विचारले असता चंदावरकरांनी असे उत्तर दिले की, जर सरकारने सात लाख रुपये माझ्या हाती दिले तर मी लगेच बोनस देईन.[१३] काही काळानंतर शेतकरी कामकारी पक्षाने जुनी गिरणीच्या ३००० बिकार कामगारांचा मोर्चा कलेक्टर कचेरीवर काढला. त्यात 'उपासमार बंद करा', 'बेकारांना काम द्या. काम नसेल तर बेकार भत्ता द्या', 'अन्न नाही त्यांना अन्न द्या', 'शेतकरी कामकरी पक्षाचा विजय असो', 'दुनिया के मजदूर एक हो जाओ', 'काळे कायदे हाणून पाडा', 'बेकारीला जन्म देणाऱ्या भांडवलशाहीला नष्ट करा'[१४] अशा घोषणा मोर्चामध्ये देण्यात आल्या. या मोर्चाचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे मोर्चामध्ये ३०० ते ४०० महिला कामगारही सहभागी झाले होते.

अशाप्रकारे जुनी गिरणी बंद बराच काळ लोटला होता. बेकारांना काम द्या, नाहीतर बेकार भत्ता द्या, १९४८ ते ४९ या दोन वर्षाचे बोनस द्या, अशा मागण्या कामगार नेत्यांनी केल्या. या मागण्यांचा जमेल तेवढा विचार करण्यात येईल असे आश्वासन कलेक्टर साहेबांनी दिले परिणामी गिरणी कामगारांचे १९४८ ते ४९ या काळातील बोनस देण्याचा निर्णय तात्काली गिरणी व्यवस्थापकांनी घेतला. तशी नोटीसही गिरणीच्या फलकावर लावण्यात आली.[१५] यामुळे कामगावॉरामध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले. मात्र कामगारांचे हे आनद फार काळ टिकले नाही. एकीकडे बोनस देऊन दुसरीकडे कामगारांना डबल साचे चालविण्यास सांगण्यात आले. मात्र ब्लोरूम खात्यातील कामगारांनी साचे चालविण्यास नकार दिला. आणि संप पुकारला. परंतु तत्कालीन गिरणीचा कारभार पाहणारे मा. चंदावरकर यांनी कामगारांनी पूर्ववत कामगार कामावर यावे अन्यथा होणारे परिणाम भोगावे लागतील असा इशारा दिला.[१६] परंतु कामगारांनी चंद्रावरकरांचा आदेश पाळला नाही काही दिवसातच लेबर कोर्टाने आदेश दिला की हा संप बेकायदेशीर आहे.[१७] आता या संपाची केस हाय कोर्टात जाणार होती. जुन्या गिरणीस लागलेली घरघर काही केल्या संपत नव्हती.

१९५३ अखेर जुनी गिरणीस अकरा लाखाचा तोटा झाल्याचे अर्थमंत्री डॉक्टर जीवराज मेहता यांनी लोकसभेत याविषयी खुलासा केला.[१८] अशा या परिस्थितीत गिरणी चालू राहिली का? असा प्रश्न पडला होता. अशात गिरणी बंद पडण्यापासून वाचविणे अत्यंत गरजेचे होते. अन्यथा या गिरणीवर अवलंबून असणारा प्रत्येक घटक रस्त्यावर येणार अशी भीती सर्वत्र पसरली होती. दरम्यान सरकारच्या वटहुकूमाच्या विरोधी मोरारकांनी उच्च न्यायालयात दाद मागितली परंतु काही कारणास्तव जुनी गिरणी पुन्हा मुरारकांच्या ताब्यात देणार असल्याच्या वार्ता सर्वत्र वाऱ्याच्या वेगाने पसरू लागल्या. कामगारांमध्ये एकच चर्चेचा विषय बनला की पुन्हा मागचे दिवस पुढ्यात येणार शेवटी तो दिवस आला आणि जुनी गिरणीचा कारभार पुन्हा शेठ गोकुळचंद मोरारका यांच्या हाती मार्च १९५४ मध्ये गेला.

कामगारांचे प्रश्न काही केल्या हटत नव्हते मागील बोनस वेतन अशा जुन्यास मागण्यासाठी कामगार व

नेतेमंडळी यांना वारंवार संप सभा मोर्चे आंदोलने व चळवळी कराव्या लागत होत्या. सरकारने जुनी गिरणी ३१ जुलै पर्यंत व्यवस्थितरित्या चालवण्यास मालकास भाग पाडावे किंवा गिरणी ताब्यात घेऊन सरकारी तत्त्वावर चालवावी अशी मागणी सर्व गिरणी भागधारकांनी केली.[१९] मुंबई राज्याचे लेबर कमिशनर श्री. सुकठणकर हे सोलापूरला येत असल्याचे समजताच मिल मधील कामगारांनी मोठे मोर्चे काढले. कामगारनेते भीमराव रोणे यांनी जुन्या गिरणीच्या मोर्चाचे आयोजन करून आपली गाऱ्हाणी लेबर कमिशनर पुढे मांडली. माननीय लेबर कमिशनर सुकठणकर यांनी कामगारांनी केलेल्या मागण्यांचा निश्चित विचार केला जाईल असे आश्वासन दिले.[२०] मात्र दिलेल्या अश्वासनांची अंमलबजावणी होताना दिसत नव्हती.

म्हणून पुढे जुनी गिरणी चालू करण्याचे दुसरे सत्र दिल्ली येथे भरले. याप्रसंगी मजूर मंत्री गुलजारीला नंदा मीलमालक मोरारका यांच्यात वाटाघाटी होऊन गिरणी लिक्विडेशन मध्ये काढावी असे ठरले.[२१] यातून कोणतेच कल्याणकारी मार्ग निघत नव्हते जवळजवळ सात ते आठ महिने गिरणी बंद असल्याने कामगार गिरणीमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक घटकाचे संपूर्ण कुटुंब रस्त्यावर आले होते. अनेक कामगारांचे प्रॉव्हिडंट फंड अडकले होते. ते मिळावे यासाठी कामगारांनी संघटनेच्या मदतीने लढा उभारला होता. परंतु म्हणावे तसे यश येत नव्हते. वेळोवेळी शासन दरबारी जाऊन नेते मंडळी प्रस्ताव मांडत होते. परंतु तरी देखील जुन्या गिरणीच्या प्रॉव्हिडंट फंडाचा हप्पा तुर्तास मिळणार नाही जेव्हा हाय कोर्टाचा निकाल लागेल तेव्हा फंडाची रक्कम मिळेल असे सांगण्यात आले.[२२] पुढे राष्ट्रीय गिरणी संघाने गिरणी निश्चित स्वरूपात कधी चालू होणार आहे. याची नोटीस लावण्यास सांगितले. परिणामी १३ ते २० ऑक्टोबर १९५८ पर्यंत गिरणी चालू होईल अशी नोटीस लावली. परंतु ही नोटीस बेकायदेशीर असल्याचे युनियनला समजताच गिरणी कामगार युनियनच्या कार्यकारणीची बैठक रणशृंगारे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत कामगारांच्या मागण्यांसाठी विशेषतः त्यांच्या महागाई भत्ता विषयीचा प्रश्न मिटविण्यासाठी संपाचा आदेश देण्यात यावा असे ठरले.[२३]

अशातच जुनी मिल मधील 'बी' १३ सप्टेंबर १९५९ रोजी चालू करण्यात आली. कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कोणत्या संघटनांची विचारविनिमय किंवा कोणतीच कायदेशीर पूर्तता न करता कामगारांवर डबलसाचे चालविण्याची सक्ती केली जाऊ लागली. मला कंटाळून काही कामगारांनी राष्ट्रीय गिरणी कामगार संघाकडे व्यवस्थापकांची तक्रार केली. संघामार्फत यावर विचार करण्यासाठी संघाचे उपाध्यक्ष श्री. बन्सी यांनी जुन्या गिरणीतील स्पिनिंग खात्यातील कामगारांची एक बैठक बोलावली. कामगारांची तक्रार खरी आहे हे लक्षात येताच गिरणी व्यवस्थापकांकडून पत्राद्वारे खुलासा मागविला. तसेच डबलसाचे चालविणे बेकायदेशीर असल्याने ताबडतोब १४ काउंटवरील डबल साचे बंद करावेत अशी सूचना कंपनीला दिली. परिणामी गिरणीने १४ काउंटवरील डबल साचे चालविण्याचा निर्णय रद्द केला.[२४] यामुळे कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण तयार झाले परंतु गिरणीची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक असल्याने गिरणी तिसऱ्यांदा बंद पडण्याची भीती कामगार वर्गामध्ये सर्वत्र पसरली होती. सरकारने या गिरणीचा ताबा घ्यावा असे सोलापूर गिरणी कामगार संघाकडून मजूर मंत्र्यांना निवेदन केले.[२५] जुन्या गिरणीतील वेगवेगळी खाती हळूहळू बंद पडू लागली. राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचे कार्यकर्ते आणि मोरारका माननीय किल्लेदार यांची भेट घेतली. तेव्हा कापसाचा अभाव, जुनी मशनरी यामुळे गिरण्यांची ही स्थिती निर्माण झाल्याचे शेठ मोरारकांनी सांगितले.

दरम्यान कामगारांनी या परिस्थितीला कंटाळून सरकारकडे जुन्या गिरणीचा ताबा घ्यावे यासाठी निवेदन पाठवले गिरणी सरकारने ताब्यात घेऊन चालवावी याकरिता कामगारांची सभा होऊन त्यात मुख्यमंत्र्यांकडे निषेध मोर्चा काढणार असल्याचे भिम रोणे यांनी जाहीर केले.[२६] परंतु या मोर्चातून काहीच साध्य झाले नाही. म्हणून जुन्या गिरणीचा प्रश्न आता केंद्र सरकार पुढे मांडण्याचे ठरले. ठरल्याप्रमाणे विधानसभेतील बैठकीत जुन्या गिरणीवर १८१ लाखाचे कर्ज असल्याचा खुलासा करण्यात आला. गिरणी वाचविण्यासाठी कामगारांनी कैफियत घेऊन मजूर मंत्री तिडके यांना भेटण्यास शिष्टमंडळ गेले. भेटीत गिरणी मालक मोरारका यांच्याशी चर्चा झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यात आले. परंतु गिरणी कामगारांनी गिरणीण त्वरित चालू करून थकीत वेतन व महागाई द्यावी. यासाठी २८ जानेवारी १९६४ रोजी संप पुकारला. व नगरपालिकेवर नगराध्यक्ष साहेबांना भेटण्यासाठी मोर्चा माननीय कलेक्टर गफूर साहेबांच्या कचेरीवर नेला. सरकारचे लक्ष कामगारांच्या परिस्थितीकडे वेधण्यासाठी श्री. आर. डी. केत व आय. के. मुल्ला यांनी ४८ तासांचे उपोषण केले. कलेक्टर साहेबांनी काही तळजोडी सुचविल्या त्यात खालील तडजोडींचा समावेश होता.

१. डिसेंबर १९६३ चा पगार १३ तारखेचा वाटण्यात येईल.
२. हक्क रजेचे पैसे दोन हप्त्यात पण ३१ जानेवारी पूर्वी देण्यात येतील.
३. हायकोर्ट स्कीम प्रमाणे पाळीचे पैसे सुद्धा हप्त्याने ३१ जानेवारी पूर्वी देण्यात येतील.
४. सोसायटीची वर्गणी व कर्ज हप्त्याची थकबाकी ३१ जानेवारी पूर्वी देण्यात येईल.
५. कारकुनांची ग्रॅच्युईटी रात्री अकराचे पाळी बंद करणे व वेतन वाढीचा फरक याबद्दल विचार केला.[२७]

शेवटी जुनी गिरणी मधील कामगारांनी केलेल्या मागण्यांचा निकाल आला कामगारांची मोठी निराशा झाली. निकाल व्यवस्थापकांच्या बाजूने लागला आणि कामगारांनी पुकारलेल्या संप बेकायदा ठरवण्यात आला. त्यामुळे गिरणी मालकांनी १९ फेब्रुवारी १९६४ रोजी ताळेबंदी जाहीर केली.[२८] यामुळे जुन्या गिरणीवर असणारे थकबाकीमुळे महानगरपालिकेने गिरणीवर जप्ती आणली. एकेकाळी सोलापूरची शान असणाऱ्या या गिरणीची अशी अवस्था पाहून सर्वत्र समाजामध्ये हळहळ व्यक्त केली जात होती. संप सभा मोर्चे आंदोलने व सत्याग्रह अशा विविध मार्गांचा अवलंब करून गिरणी चालविण्याचा प्रयत्न करत होते. त्यात श्री. राम राऊत, श्रीमती सावित्रीबाई भोसले, अंबाबाई भोसले व भानुदास हातमोडे यांनी गिरणी पुढे प्राणांतिक उपोषण करण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर त्यांना पाठिंबा देण्यासाठी श्री. उद्धव उराडे, कोंडीबा शिंदे, यल्लाप्पा म्हेत्रे, करेप्पा म्हेत्रे, श्री. महबूब शेख या पाच जणांनी ४८ तासांचे उपोषण केले. त्या ३०० ते ४०० कामगार सहभागी झाले. 'कामगार एकजूटीचा विजय असो', 'जुनी गिरणी चालू करा' इत्यादी घोषणा देण्यात येत होत्या.[२९] शेवटी सोलापूरच्या कामगार चळवळीच्या इतिहासातील एक ऐतिहासिक आणि अभूतपूर्व हरताळ दिनांक २९ जुलै १९६४ पाळण्यात आला. या हारताळणे समस्त जनसमुदायाचे लक्ष वेधून घेतले होते. समाजाच्या विविध स्तरातून कामगारांना पाठिंबा मिळाला होता. शेवटी हुतात्मा पत्नी निलवा धनशेट्टी व पुत्र शंकरपाळे शेट्टी आदींच्या अन्न सत्याग्रहासही यश आले नाही. शेवटी सोलापूरचा श्वास असणाऱ्या जुन्या गिरणीने शेवटचा श्वास घेतला. जुन्या गिरणीच्या बंद पडण्याने लक्षावधी

कामगारांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला. येथील कामगार वस्त्यांना मरण कळा आली. दारिद्र्य व बेकारीच्या गर्तेत अडकलेली युवा पिढी व्यसनाच्या आहारी गेली. गिरण्या बंद पडल्याने हजारो कुटुंब उध्वस्त झाले. तरुण मुले गुन्हेगारीकडे वळली.

अशाप्रकारे सोलापूरची आर्थिक घडी बसवून सोलापूरला गिरणगाव म्हणून ख्याती प्राप्त करून देणाऱ्या हजारो कुटुंबीयांना जगविणाऱ्या जुन्या गिरणीने सोलापूरच्या आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात मोलाचे योगदान दिले होते. जुनी गिरणी बंद पडल्याने अनेक कुटुंबावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली, कापड उद्योगाशी संबंधित असणारे अनेक छोटे मोठे उद्योग डबघाईला आले. कामगारांवर इतकी वाईट परिस्थिती आली की त्यांच्या अंत्यविधीसाठी देखील वर्गणी गोळा करावी लागत असे. एकूणच एकेकाळी गजबजलेल्या सोलापूर शहरावर अवकळा आली होती. जुनी गिरणी जरी बंद पडली असली तरी कामगारांचे प्रश्न मात्र कायम होते. कामगारांचे वेतन, प्रॉव्हिडंट फंड, महागाई भत्ता, वेतनातील फरक यासाठी लढा चालूच राहिला. पुढे बंद पडलेल्या या गिरणीतील यंत्रांची खरेदी करून सोलापुरातील काही श्रीमंत विनकारांनी प्रामुख्याने साळी समाजाने पॉवरलूम सुरू केले. आणि पुढे हा उद्योग भरभराटीस आला. अशा प्रकारे जुन्या गिरणीचा शेवट झाला असला तरी कामगार चळवळ मात्र जिवंत होती. कामगारांचे अनेक प्रश्न घेऊन चळवळ पुन्हा उभी राहिली परंतु चळवळ बोथट बनली आणि कामगारांच्या संघटनांना काहीसे राजकीय वळण येत गेले. कामगार नेते कामगारांच्या हिताचा जास्त विचार करण्यापेक्षा आपल्या पक्षाचा आणि खुर्चीचा जास्त विचार करू लागले.

तळटीपा:

१. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २७ मे १९४९

२. दैनिक सोलापूर समाचार, ११ सप्टेंबर १९४९

३. अणदूरकर व्यं. गो., चणे खावे लोखंडाचे, लोकसेवा सहकारी मुद्रणालय, फलटण गल्ली, सोलापूर पृष्ठ क्रमांक २६१

४. अणदूरकर व्यं. गो., चणे खावे लोखंडाचे, लोकसेवा सहकारी मुद्रणालय, फलटण गल्ली, सोलापूर पृ. क्रमांक २६१

५. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, १० फेब्रुवारी १९५०

६. रिपोर्ट ऑफ द बदली लेबर इन्क्वायरी कमिटी, कॉटन टेक्स्टाईल इंडस्ट्री, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, १९६७ पृ. १९-२०

७. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, १० जानेवारी १९५०

८. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २६ मार्च १९५०

९. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, ३ मे १९५०

१०. चव्हाण चंद्रकांत, सोलापूरची गिरणी कामगार चळवळ, जंबुसागर प्रकाशन, सोलापूर, पृ.११८.

११. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, १५ मे १९५०

१२. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर' १० ऑगस्ट १९५०

१३. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, १२ ऑगस्ट १९५०

१४. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २२ नोव्हेंबर १९५०

१५. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, १५ डिसेंबर १९५०

१६. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, ९ सप्टेंबर १९५२

१७. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, ३० ऑक्टोबर १९५२

१८. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २३ डिसेंबर १९५३
१९. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, १६ जुलै १९५७
२०. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २८ जुलै १९५७
२१. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २ एप्रिल १९५८
२२. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, १० जुलै १९५८
२३. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २२ नोव्हेंबर १९५८
२४. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २६ सप्टेंबर १९५९
२५. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २४ एप्रिल १९६२
२६. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, १९ जून १९६२
२७. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २९ जानेवारी १९६४
२८. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २० फेब्रुवारी १९६४
२९. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, २६ जुलै १९६४

संदर्भ-साहित्य-सूची:

१. अणदूरकर व्यं. गो., **चणे खावे लोखंडाचे**, लोकसेवा सहकारी मुद्रणालय, फलटण गल्ली, सोलापूर १९८५.
२. बेत विलास, **पडझडीच्या नोंदी**, परिवर्तन अकादमी, (प्रकाशन वर्ष अनुपलब्ध).
३. बेत विलास, **गिरणीतले दिवस**, परिवर्तन अकादमी, (प्रकाशन वर्ष अनुपलब्ध).
४. डॉ. चव्हाण चंद्रकांत, **सोलापूरची गिरणी कामगार चळवळ**, १९०० ते १९६५, जंबूसागर ग्रंथमाला, सोलापूर, २०१३.
५. जक्कल विठ्ठल नरसप्पा, **सोलापूर शहराचा इतिहास**, सोलापूर समाचार स्टीम प्रेस, सोलापूर, ३४०, शुक्रवार पेठ, १९२८.
६. किर्लोस्कर शांताबाई, **कॉम्रेड मीनाक्षी साने: एक भुईचक्र**, श्रीमती मीनाक्षी बाई साने स्मृती समिती, ६२गोल्ड फिंच पेठ, सोलापूर, (प्रकाशन वर्ष अनुपलब्ध).
७. कुलकर्णी गणेश पांडुरंग, **सोलापूर महानगरपालिका शतसंवत्सरिक ग्रंथ**, सोलापूर महानगरपालिका १९५३.
८. तुळपुळे बगाराम, कामगार आकांक्षा आणि आव्हान, साधना प्रकाशन, पुणे, १९७१.
९. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटियर, गॅझेटिअर डिपार्टमेंट, गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र, १९७७.
१०. रिपोर्ट ऑफ द बदली लेबर इन्क्वायरी कमिटी, कॉटन टेक्स्टाईल इंडस्ट्री, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, १९६७.
११. दैनिक सोलापूर समाचार, सोलापूर, १९४७ ते १९६६ (अंक).

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

मुक्ता साळवे : दलित स्त्रीवादाचा पहिला विद्रोही आवाज

प्रा. अश्विनी रामचंद्र खवळे

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

Corresponding Author - प्रा. अश्विनी रामचंद्र खवळे

DOI - 10.5281/zenodo.19723629

प्रस्तावना:

भारतीय इतिहासाच्या परिप्रेक्षात स्त्रीयांना व शुद्र यांना गुलामगिरीत अडकविण्यात आलेले होते. यातील अतिशूद्र व शुद्रांनी इतिहासाच्या टप्प्यावर स्वातंत्र्यासाठी स्वत: संघर्ष केला. परंतु स्त्रियांनी धर्मशास्त्रांच्या आवरणाखाली लादलेली गुलामी कधी धीटपणे धुडकावली नाही. एकोणिसावे शतक मात्र प्रबोधन शतक मानले जाते. मनुस्मृतीचा काळा कायदा अस्तित्वात असतानाच १९ व्या शतकात क्रांतीबा जोतीबा फुलेंच्या स्त्री व अस्पृश्य शिक्षण व समाजकार्यास सुरुवात झाली. यासंदर्भात माहिती देताना डॉ. दीपा श्रावस्ती यांनी आपल्या 'स्त्री स्वातंत्र्य व बुद्ध फुले आंबेडकर' या पुस्तकामध्ये आपले मत मांडले आहे कि, फुलेंनी निर्माण केलेली शिक्षणपद्धती किती प्रभावी होती, मानवाच्या व्यक्तिमत्वाचा, बुद्धीचा विकास करण्याची क्षमता, सामाजिक जागृती करण्याची क्षमता त्यामध्ये होती हे मुक्ता साळवे व ताराबाई शिंदे या महिलांच्या व्यक्तीमत्वावरून लक्षात येते.

उद्देश :

जातिव्यवस्थेने लादलेल्या शोषण व अन्यायाच्या विरोधात एकोणिसाव्या शतकात म. फुलेंनी सत्यशोधक चळवळीचा झेंडा उभारला आणि त्यातून सावित्रीबाई, फातिमा शेख, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे, तानुबाई बिर्जे इ. विद्रोही व लढाऊ स्त्रियांची फळी जन्माला आली. विसाव्या शतकात डॉ. आंबेडकरांनी फुले यांचा वारसा स्वीकारून जात्यंतक चळवळीचा विस्तार दलित जातीपर्यंत केला. केवळ शिक्षित दलित ही नव्हे तर सामान्य दलित स्त्री पुरुष डॉ आंबेडकरांच्या चळवळीचा भाग बनले. आज स्त्रीच्या मुक्तीमागे किंवा जातीयतेच्या प्रश्नावर भाष्य करून समाज जागृती घडवण्याचे काम करण्यासाठी मुक्ता साळवे सारख्या नेतृत्वाची आवश्यकता भासते व यासाठी सत्यशोधक मुक्ता साळवे यांचे कार्य अत्यंत बहुमोल असे आहे व या कार्याचे पुन्हा नव्याने अवलोकन करणे हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

पेशवे काळात मुक्ता साळवे ही महात्मा फुले यांची विद्यार्थिनी आणि आद्य क्रांतीगुरू लहूजी साळवे (मांग) यांची पुतणी एक मातंगाची स्त्री निबंधकार म्हणून आढळते. असे काही अपवाद वगळता मातंग स्त्री ही स्वातंत्रपूर्व आणि स्वातंत्रोत्तर अद्यापपर्यंतच्या कालखंडात एक गुलाम म्हणून ,शोषित म्हणून , गुलामांचीही गुलाम म्हणून जीवन जगत असलेली आपणास आढळते. १८४८ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाडा येथे सामाजिक क्रांतिकारी दांपत्य जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पहिली मुलींची शाळा सुरू केली. स्त्रियांना आणि अस्पृश्यांना शिक्षित करण्याचे काम करताना, त्यांनी सामाजिक समानतेची जाणीव निर्माण करणारे ज्ञान शिकवले आणि

पसरवले; ते विद्यार्थ्यांमध्ये जातीय-पितृसत्ताविरोधी होते. १८५२ मध्ये, त्यांनी वेताळ पेठेत तिसरी मुलींची शाळा सुरू केली. शाळेतून शिकलेली चौदा वर्षांची अस्पृश्य जातीची मुलगी मुक्ता साळवे तिच्या लेखनात जातीय-पितृसत्ताविरोधी जाणीव व्यक्त करते.

सत्यशोधकीय दृष्टिकोन :

मुक्ता साळवे ही एकोणिसाव्या शतकातील ब्राह्मणी धर्माच्या विषमतावादी आचार- विचारांच्या विरोधात पेटून उठलेली भारतीय समाजातील पहिली विद्यार्थिनी आहे. तिने लिहिलेल्या 'मांग-महाराच्या दुखा:विषयी निबंध' म्हणजे ब्राह्मणी पितृसत्तेने लादलेली ज्ञानबंदी झुगारून देणारे, जातिव्यवस्था विरोधातील एका दलित स्त्रीचे विद्रोही लेखन होय. आणि त्यात त्या दलित आणि स्त्री उदारमतवादी जाणीवेचे सादरीकरण करतात. आधुनिक भारताच्या इतिहासात दलित महिला मुक्तीची सुरुवात येथून झाल्याचे दिसून येते. आज मुक्ता साळवे यांनी लिहिलेला एकमेव निबंध उपलब्ध आहे. हा निबंध पहिल्यांदाच दाखवतो की भारतीय जात-पितृसत्ता आणि स्त्री मुक्तीच्या समस्या दलित महिलेच्या दृष्टिकोनातून जातींशी संबंधित आहेत. अशा प्रकारे त्यांचा निबंध आधुनिक भारतीय स्त्रीवादी साहित्याच्या इतिहासातील दलित स्त्रीवादाच्या पहिला विद्रोही आवाज ठरला आहे.

फुलेंनी केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित राहिले नाही. त्यांनी मानवी मुक्तीसाठी लढा दिला. जाती आणि लिंग असमानतेविरुद्ध लढताना त्यांनी शेतकरी आणि कारागीर जाती (शूद्र), अस्पृश्य किंवा दलित जाती (अतिशुद्र) आणि महिलांच्या प्रबोधन आणि सक्षमीकरणासाठी देखील काम केले. फुलेंच्या भाषणामध्ये, कृतीत आणि वागण्यातून ही वृत्ती व्यक्त झाली. या शिकवणीचा परिणाम म्हणून, एका मांग (महाराष्ट्रातील एक अस्पृश्य जात) विद्यार्थिनीने वयाच्या चौदाव्या वर्षी "मांग आणि महारांच्या दुर्दशेवर निबंध" हा निबंध लिहिला.

या निबंधाचा पहिला भाग १५ फेब्रुवारी १८५५ रोजी आणि दुसरा भाग १ मार्च १८५५ रोजी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी चालवलेल्या "ज्ञानोदय" या नियतकालिकात प्रकाशित झाला. या निबंधाला टीकात्मक उत्तर म्हणून नियतकालिकाच्या नंतरच्या अंकात दोन पत्रे प्रकाशित झाली. या निबंधाचा काही भाग १८६८ मध्ये एन.व्ही.जोशी यांच्या 'पुणे शहराचे वर्णन' या पुस्तकात प्रकाशित झाला. 'ज्ञानोदय' च्या संपादकांनी त्यांच्या संपादकीय नोटमध्ये माहिती दिली की, जोतिबा माळी (फुले) यांच्या शाळेत जवळजवळ तीन वर्षे शिक्षण घेत असलेली १४ वर्षांची मुलगी मुक्ता साळवे हिने तिच्या पालकांचे दुःख ऐकून कोणत्याही भीतीशिवाय हा निबंध लिहिला.

ज्ञानोदय यांनी त्यांचा निबंध त्यांच्याच लेखनाप्रमाणे प्रकाशित केला. हा निबंध फुलेंच्या कार्याचे महत्व प्रतिबिंबित करतो. फुलेंच्या कार्याचा जातीव्यवस्थेवर आधारित असलेल्या समाजावर झालेला क्रांतिकारी बदल जाणवतो. मुक्ता साळवे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मातंग समाजाची होती ज्यांना हजारो वर्षांपासून ज्ञानापासून शिक्षणापासून वंचित ठेवले गेले होते आणि ब्राह्मण समाजाने त्यांचे शोषण केले होते. परंतु ती महात्मा फुले यांनी सुरु केलेल्या शाळेमध्ये अल्पावधीतच प्रभावीपणे तसेच स्वतंत्र विचारसरणीने शिक्षण विकसित करते. तिच्या लहान वयात आणि शिक्षणाच्या अल्पावधीतच तिला समाजाचे आणि आत्मविवेकाचे ज्ञान मिळते.

गावात प्रवेश करण्यास मनाई असलेल्या अस्पृश्य, अस्पृश्य महिलांचे दुःख आणि दुर्दशा त्यांनी पाहिली. त्या स्वतः अस्पृश्य असल्याने त्यांना गावाबाहेर राहावे लागत असे. मुक्ता साळवे महाराष्ट्रातील दलित, अस्पृश्य आणि सर्वात खालच्या जातीतील होत्या. त्या म्हणतात की हिंदू-

ब्राह्मण धर्मात त्यांना बाहेरील मानले जात असे. त्यांना असे सुचवायचे होते की हिंदू-ब्राह्मण धर्म हा अस्पृश्यांचा धर्म नाही. सर्वात खालच्या जातीतील महिलांचे दुःख उच्च जातीतील समाजातील महिलांपेक्षा वेगळे आहे आणि ते अधिक भयावह आहे. म्हणून त्यांचा निबंध दाखवतो की दलित महिलांचे दुःख आणि शोषण जात आणि पितृसत्ताक प्रस्थापित समाजावर आधारित आहे. सचिन गरुड यांनी 'मुक्ता साळवे, फातिमा शेख आणि लहूजी वस्ताद' या आपल्या पुस्तकात मत मांडताना सांगितले आहे कि, मुक्ता साळवेंच्या काळात अशाप्रकारचे ब्राह्मण्यविरोधात लेखन कोणत्याही ब्राह्मण जातीय स्त्रीने केलेले नाही. हे जातीय वास्तव कोणती वस्तुस्थिती पुढे आणते ? भारतीय स्त्रीमुक्तीसाठी आवश्यक असलेल्या प्रबोधन चळवळीची उद्गाती प्रामुख्याने जातिव्यवस्था विरोधात बंड करणारी स्त्रीच राहू शकते.

स्त्रीवादी दृष्टिकोन :

मुक्ता साळवे यांनी पहिला दलित स्त्रीवादी विद्रोही विचार मांडला आहे. सचिन गरुड हे 'मुक्ता साळवे, फातिमा शेख आणि लहूजी वस्ताद' या आपल्या पुस्तकात मत मांडताना सांगितले आहे कि, ज्या काळात ईश्वरप्रणीत पापपुण्याच्या व्रतवैकल्यात हजारो ब्राह्मणादी उच्चजातीय स्त्रीपुरुष नतमस्तक झाले होते, त्या काळात एक मातंग तरुण स्त्री धर्मपुस्तकाला आव्हान देते. तिच्या निषेधाभिव्यक्तीतून भारतीय स्त्रीवादाच्या अत्यंत महत्वपूर्ण वैशिष्ट्याकडे लक्ष वेधले जाते. ते म्हणजे धर्माधिष्टीत संस्कृती आणि धर्माधिष्टीत मूल्यकल्पना यांना जातीचा आणि स्त्रीदास्याचा आधार असतो,हे वास्तव मुक्ताच्या निबंधातील 'स्त्रीवाद' अधोरेखित करतो. वेद- स्मृतीप्रधान धर्म हा ब्राह्मण स्त्रीला पतीपरायण / पतिव्रता / सौ. का./ विधवा या स्वरुपात भूमिका देतो, तर अस्पृश्य स्त्रियांच्या कमाल वेठबिगारीला तसेच वेश्या व देवदासी इ. म्हणून लैंगिक शोषण पीडणदमनाच्या संस्थात्मक रचनेला वैचारिक आधार पुरवितो. म्हणून त्याविरोधात मुक्तासारखी एक मातंग तरुणी उभी राहते. भारतीय जातीसमाजातील ही वैशिष्ट्यपूर्णता आहे. उच्चजातीय पितृसत्तात्मक कनिष्ठजातीय स्त्रीची बंडखोरी असे द्वंद्व साकारण्यास तत्कालीन समाजरचना व ब्राह्मणी धर्म कारणीभूत ठरतो.

खरंतर एखाद्या स्त्रीने धर्मग्रंथाना आमनेसामने आव्हान देणे ही ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत अभूतपूर्व घटना मानावी लागेल. जातीबद्ध समाजातील ज्ञानबंदीची दाहकता आणि जातीय सत्तासंबंधातील दमनाची अनन्यता ती निर्देशित करते. मुक्ता साळवे अस्पृश्य स्त्रियांच्या संदर्भात बोलते ते आदिवासी, भटके, दलित जाती-जमातीतील स्त्रियांच्या प्रातिनिधिक स्वरुपात आहे. प्रा. हरी नरके यांनी 'महात्मा जोतीराव फुले पर्यायी समाजव्यवस्थेचे शिल्पकार' या पुस्तकात मुक्ता साळवेच्या कार्याविषयी माहिती दिली आहे कि, जोतीराव-सावित्रीबाईंच्या शाळेत इयत्ता चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या मुक्ता साळवे या मातंग विद्यार्थिनीने १८५५ साली लिहिलेला 'मांग-महाराच्या दुःखाविषयी निबंध' ही देखील एक अक्षर कलाकृती आहे. दलित स्त्रियांना उघड्यावर बाळंतपणाला सामोरं जाताना सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांचं मुक्तांनं केलेलं वर्णन डोळ्यात पाणी आणतं. आम्हाला जर वेदांचा अधिकार नाही, तर आमचा धर्म तरी कोणता ? इतका मूलभूत, आरपार सत्याला भिडणारा आणि ब्राह्मणी तर्कशास्त्राला आव्हान देणारा प्रश्न ही चिमुरडी उभा करते. मुक्ता साळवेचा ' विद्रोही स्त्री' म्हणून फुले यांच्या चळवळीद्वारे अविष्कार झाला.

निष्कर्ष :

मुक्ता साळवे यांच्या स्त्रीवादी व सामाजिक योगदानाविषयी अभ्यास करत असताना असे दिसून येते

कि, मुक्ता साळवे ही एकोणिसाव्या शतकातील ब्राह्मणी धर्माच्या विषमतेवर आधारित असलेल्या समाज व्यवस्थेच्या विरोधात पेटून उठलेला भारतीय समाजातील पहिल्या दलित विद्यार्थिनीचा विद्रोही आवाज बनली आहे. तत्कालीन समाजव्यवस्था बहुजनांवर कशी अन्याय अत्याचार करते, याची वैचारिक बैठक मुक्ता साळवे हिच्या 'महार-मांग दुखा:विषयी निबंध यामधून व्यक्त होते. संशोधकांनी तत्कालीन प्रस्थापित वर्गाच्या प्रभावाखाली मुक्ता साळवे यांच्या योगदानाकडे दुर्लक्ष केलेले पहावयास मिळते. मुक्ता साळवेसारखी विद्रोही स्त्री निर्माण करणारी, स्त्रीदास्यमुक्तीची प्रेरणा गतिमान करणारी क्रांतिकारी चळवळ आज स्थगित झाली आहे. मुक्ता साळवे यांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. तसेच स्त्रीवादी तसेच सत्यशोधक विचारांची ज्योती पेटवणाऱ्या मुक्ता साळवे ह्यांचे योगदान नक्कीच आदर्शवादी व प्रेरणादायी राहील.

संदर्भसूची :

१. नरके हरी, महात्मा फुले गौरव ग्रंथ, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, २००६

२. डॉ श्रावस्ती दीपा रवींद्र, स्त्री स्वातंत्र्य आणि बुद्ध – फुले –आंबेडकर, नाग- नालंदा प्रकाशन, सांगली, द्वितीयावृत्ती, १४ एप्रिल २०१५

३. गरुड सचिन, मुक्ता साळवे, फातिमा शेख आणि लहूजी वस्ताद, नाग- नालंदा प्रकाशन, सांगली, द्वितीयावृत्ती, १४ एप्रिल २०२२

४. प्रा. नरके हरी, महात्मा जोतीराव फुले पर्यायी समाजव्यवस्थेचे शिल्पकार, नाग- नालंदा प्रकाशन, सांगली, द्वितीयावृत्ती, १४ एप्रिल २०२३

५. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले- आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉपुलर प्रकाशन, मुंबई, १९७३

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

महाराष्ट्रातील वतन व्यवस्था: ब्रिटिशकालीन भू-सर्वेक्षण पद्धती आणि प्रशासकीय परिवर्तनाचे ऐतिहासिक विश्लेषण

प्रा. कदम अभिजित अशोक

संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Corresponding Author - प्रा. कदम अभिजित अशोक

DOI - 10.5281/zenodo.19723672

प्रस्तावना:

महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासात वतन व्यवस्थेचे महत्त्व अनमोल आहे. शतकानुशतके, ब्रिटिश राजवटीपूर्वी, ही व्यवस्था स्थानिक प्रशासन, भू-धारण आणि सामाजिक संरचनेचा आधारस्तंभ होती. ही केवळ भू-धारण प्रणाली नसून, ती शासक, स्थानिक उच्चभ्रू (वतनदार), सेवा पुरवणारे (बलुतेदार) आणि शेती करणारे शेतकरी यांच्यातील संबंध परिभाषित करणारी एक सामाजिक-आर्थिक आणि राजकीय संस्था होती. ब्रिटिशांच्या धोरणांमुळे या व्यवस्थेत झालेल्या बदलांचे महाराष्ट्राच्या आधुनिक स्वरूपावर दूरगामी परिणाम झाले आहेत.या शोधनिबंधाचे मुख्य उद्दिष्ट महाराष्ट्रातील वतन व्यवस्थेचे ऐतिहासिक आणि प्रशासकीय विश्लेषण करणे आहे. तसेच, ब्रिटिशकालीन भू-सर्वेक्षण पद्धती आणि त्याचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करणे हा देखील एक प्रमुख उद्देश आहे. या अभ्यासात, ब्रिटिश धोरणे आणि सर्वेक्षण प्रयत्नांचा वतन व्यवस्थेवर झालेला प्रशासकीय, सामाजिक आणि आर्थिक परिणाम तपासला जाईल. हा शोधनिबंध प्रामुख्याने ऐतिहासिक उत्क्रांती, प्रशासकीय परिणाम आणि सर्वेक्षणाच्या व्यावहारिक उपयोजनावर लक्ष केंद्रित करेल, कायदेशीर गुंतागुंतीवर कमी भर देईल.

कळीचे शब्द: वतन, वतनदार, इनाम, रयतवारी, जमीनदारी.महालवारी, भू-सर्वेक्षण ई.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. महाराष्ट्रातील वतन व्यवस्थेची उत्पत्ती, प्रकार व ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करणे.
२. ब्रिटिशकालीन भू-सर्वेक्षण पद्धती व त्यातील तांत्रिक-प्रशासकीय बदलांचा अभ्यास करणे.
३. वतन व्यवस्थेवर सर्व्हे-सेटलमेंटचा परिणाम विश्लेषित करणे.
४. ब्रिटिशांनी लागू केलेल्या कायदे व प्रशासकीय सुधारणांचा प्रभाव तपासणे.
५. वतन व्यवस्थेच्या परिवर्तनामुळे समाज-आर्थिक रचनेत झालेले बदल समजावून सांगणे

वतन व्यवस्था: ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि स्वरूप:

वतन व्यवस्था ही भारतीय इतिहासातील एक प्राचीन संकल्पना असून, तिचा विकास मुघल आणि मराठा

साम्राज्यांमध्ये झाला. ब्रिटिशपूर्व काळात, भारतातील भू-प्रशासन मोठ्या प्रमाणात विकेंद्रित होते. गावातील प्रमुख (पाटील किंवा मुकदम) आणि लेखापाल (तलाठी किंवा कुलकर्णी) हे भू-मालकी आणि महसूल संकलनाचे प्राथमिक अभिलेख ठेवत असत. या नोंदींचा मुख्य उद्देश कर आकारणी हा होता, भू-मालकी हक्क स्थापित करणे नव्हे.[१]

१. वतन संकल्पना आणि उत्क्रांती:

मुघल काळात, 'वतन-जागीर' ही 'जागीर' पेक्षा वेगळी भू-अनुदान प्रणाली म्हणून उदयास आली. 'जागीर' हस्तांतरणीय असत, तर 'वतन-जागीर' वंशपरंपरागत आणि अहस्तांतरणीय होत्या. स्थानिक वंशपरंपरागत शासकांना त्यांच्या वडिलोपार्जित क्षेत्रांवर (त्यांचे 'वतन') निष्ठा राखण्यासाठी व मुघल प्रशासनात समाविष्ट करण्यासाठी हे वतन दिले जात. यामुळे सेवेच्या बदल्यात वंशपरंपरागत भू-हक्कांची संकल्पना अधिक स्पष्ट झाली. यासोबतच, 'खालसा जमीन' (थेट केंद्रीय सरकारद्वारे प्रशासित) आणि 'इनाम' (धार्मिक कारणांसाठी करमुक्त अनुदान) असे इतर भू-वर्गीकरण देखील अस्तित्वात होते.[२]

महाराष्ट्रामध्ये, 'वतन' हे गावातील रहिवाशांना त्यांच्या चालू सेवांच्या बदल्यात दिलेले वंशपरंपरागत, भाडेमुक्त भू-अनुदान होते. याउलट, 'इनाम' हे राज्यासाठी केलेल्या भूतकाळातील सेवांच्या मान्यतेसाठी दिले जात असे आणि ते कायमस्वरूपी धारण केले जात असे. वतनदारांसाठी वतन हे आर्थिक सामर्थ्य आणि अभिमानाचे एक महत्त्वाचे प्रतीक होते. त्यामुळे त्यांच्या आर्थिक हिताला धोका पोहोचल्यास, ते शिवाजी महाराजांसारख्या व्यक्तींनाही विरोध करत असत.[३]

२. वतनदारांचे प्रकार आणि भूमिका:

वतन व्यवस्थेत विविध स्तरांवर वतनदार होते, ज्यांची भूमिका स्थानिक प्रशासन आणि सामाजिक व्यवस्थेत महत्त्वाची होती.

- **जिल्हास्तरीय वतनदार:** परगण्याचा प्रमुख **देशमुख** म्हणून ओळखला जाई, तर अभिलेख सांभाळणारे **देशपांडे** होते. ही पदे वंशपरंपरागत होती. देशमुख हा सर्व पाटलांचा प्रमुख, तर देशपांडे सर्व कुलकर्ण्यांचे प्रमुख होते.
- **ग्रामस्तरीय वतनदार:** सर्वात लहान प्रशासकीय एकक गाव होते, ज्यात **पाटील** (ग्रामप्रमुख) आणि **कुलकर्णी** (अभिलेखपाल) यांचा समावेश होता. ही पदे देखील वंशपरंपरागत होती.[४]
- **बारा बलुतेदार व्यवस्था:** गावात बारा बलुतेदार नावाचे वंशपरंपरागत सेवक होते, जे जाती-आधारित होते आणि कृषी क्षेत्राला आधार देत. त्यांना त्यांच्या सेवांच्या बदल्यात गावच्या उत्पन्नातील वाटा (वतन) मिळवण्याचे वंशपरंपरागत हक्क दिले जात होते. उदाहरणांमध्ये महार (गावचे पहारेकरी, संदेशवाहक), कोळी (मासेमारी, जलवाहतूक करणारे), ब्राह्मण (वंशपरंपरागत पुजारी) आणि इतर व्यावसायिक समुदाय जसे की सुतार, लोहार, कुंभार यांचा समावेश होता.[५]

३. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय महत्त्व:

वतन व्यवस्थेचे महाराष्ट्राच्या जीवनात महत्त्वपूर्ण स्थान होते.

- **सामाजिक महत्त्व:** ही व्यवस्था जातीव्यवस्थेशी जोडलेली होती, ज्यामुळे एक कठोर सामाजिक पदानुक्रम निर्माण झाला, परंतु त्याचबरोबर

गावच्या आत्मनिर्भरतेसाठी एक चौकट देखील प्रदान केली.

- **आर्थिक महत्त्व:** वतनामुळे अनेकांना उपजीविकेचा स्थिर स्त्रोत मिळत असे, ज्यामुळे एक आत्मनिर्भर गावची अर्थव्यवस्था विकसित झाली.
- **राजकीय महत्त्व:** वतनदार, विशेषतः देशमुख, देशपांडे आणि पाटील, स्थानिक पातळीवर सत्ता आणि प्रभाव राखत असत. ते राज्य आणि शेतकरी यांच्यात मध्यस्थ म्हणून काम करत होते.

ब्रिटिशकालीन भू-महसूल धोरणे आणि प्रशासकीय पुनर्रचना:

ब्रिटिश राजवटीच्या आगमनानंतर, त्यांनी भू-प्रशासनात महत्त्वपूर्ण बदल घडवले. ब्रिटिशपूर्व काळातील भू-प्रशासन विकेंद्रित होते आणि महसूल संकलनासाठी पाटलांसारखे ग्रामप्रमुख प्राथमिक नोंदी ठेवत असत. तथापि, ब्रिटिशांचे मुख्य उद्दिष्ट महसूल वाढवणे हे होते, ज्यामुळे त्यांना भू-प्रशासनात अधिक पद्धतशीर आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अवलंबण्याची गरज भासली.

१. प्रमुख ब्रिटिश भू-महसूल प्रणाली:

भारतात ब्रिटिशांनी तीन प्रमुख भू-धारण प्रणाली सुरू केल्या.

- **रयतवारी प्रणाली:** ही प्रणाली थॉमस मुन्रो आणि अलेक्झांडर रीड यांनी १८२० मध्ये सुरू केली. यानुसार, वैयक्तिक शेतकरी (रयत) थेट भू-मालक म्हणून ओळखले गेले आणि ते थेट सरकारला महसूल भरत होते. कर आकारणीपूर्वी जमिनींचे सर्वेक्षण आणि मूल्यांकन केले जात असे.
- **जमीनदारी प्रणाली:** लॉर्ड कॉर्नवॉलिसने १७९३ मध्ये बंगालमध्ये ही प्रणाली सुरू केली, ज्यात जमीनदार शेतकऱ्यांकडून भाडे गोळा करत आणि सरकारला निश्चित रक्कम देत असत.
- **महालवारी प्रणाली:** यात महसूल निर्धारण संपूर्ण गाव किंवा 'महाल' सोबत केले जात असे, ज्यामुळे संपूर्ण समुदाय एकत्रितपणे भू-महसूल भरण्यास जबाबदार होता.

२. प्रशासकीय 'अस्पष्टता' आणि सर्वेक्षणाची गरज:

ईस्ट इंडिया कंपनीला त्यांच्या नियंत्रणाखालील प्रदेशांच्या अंतर्गत विभागण्या, सीमा आणि सामाजिक-राजकीय-आर्थिक पैलूंबद्दल अत्यंत कमी माहिती होती, ज्याला 'प्रादेशिक अस्पष्टता' म्हटले गेले. ब्रिटिशपूर्व प्रशासकीय एकके (परगणा) अनियोजित होती आणि त्यांच्या सीमा अस्पष्ट व सतत बदलणाऱ्या होत्या. प्रभावी प्रशासनासाठी प्रदेशांचे स्पष्टपणे सीमांकन आणि निर्धारण करणे आवश्यक होते. महसूल संकलनासाठी अचूक माहितीचा अभाव ही एक मोठी समस्या होती.

३. जिल्ह्यांची आणि प्रशासकीय विभागांची पुनर्रचना:

ब्रिटिशांनी सर्वेक्षणांचा उपयोग मालमत्ता धारणेचा एक टिकाऊ अभिलेख तयार करण्यासाठी केला. या माहितीचा वापर जुन्या विभागांना सुसंगत, संक्षिप्त आणि स्पष्टपणे सीमांकित प्रशासकीय जिल्ह्यांमध्ये पुनर्रचना करण्यासाठी करण्यात आला. या प्रक्रियेला 'पुनर्रचना' करण्याचा एक मोठा वसाहतवादी प्रकल्प असे म्हटले जाते. गाव हे सर्वेक्षणाचे आणि प्रशासकीय विभागांच्या पुनर्बांधणीचे मूलभूत एकक बनले.

ब्रिटिशकालीन भू-सर्वेक्षण पद्धती आणि तंत्रज्ञान:

ब्रिटिशकालीन भू-सर्वेक्षण केवळ महसूल संकलनासाठीच नव्हे, तर प्रशासकीय नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण साधन होते. सर्वेक्षणांचा प्राथमिक उद्देश अंतर्गत विभागण्या आणि सीमा निश्चित

करणे, मालमत्ता धारणेचा टिकाऊ अभिलेख तयार करणे, आणि महसूल संकलन अचूक माहितीवर आधारित करणे हा होता.

१. व्यावसायिक आणि स्थानिक (खसरा) सर्वेक्षणे: उत्तर भारतातील महसुली सर्वेक्षणे दोन प्रकारच्या कार्यांचे मिश्रण होती: व्यावसायिक आणि स्थानिक.

- **व्यावसायिक सर्वेक्षण:** हे युरोपियन सर्वेक्षक यांच्या देखरेखीखाली थिओडोलाइट आणि साखळीचा वापर करून केले जात असे. याचा उद्देश गावांच्या बाह्य सीमा निश्चित करणे आणि महसूल भरणारी इस्टेट्स ओळखणे हा होता.[६]
- **स्थानिक सर्वेक्षण (खसरा):** हे थकबास्तनंतर केले जात असे आणि यात प्रत्येक क्षेत्राला क्रमांक दिलेला नकाशा (शजरा) आणि संबंधित क्षेत्र पुस्तक (खसरा) यांचा समावेश होता. लेखापाल (तलाठी) प्रत्येक क्षेत्राची नोंद मालकाचे नाव, क्षेत्रफळ, जमिनीचा प्रकार आणि पिकांसह करत असे. लेफ्टनंट हेन्री एल. थुइलियर यांनी नकाशांमध्ये कंपास आणि स्केलचा वापर सुरू केला.[७]

२. सर्वेक्षणाच्या पद्धतींमध्ये उत्क्रांती: सुरुवातीला, गावांच्या सीमा एकत्र करून परगण्यांचे नकाशे तयार करण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु तो अयशस्वी ठरला. १८५५ पासून, 'पूर्ण ते अंश' (whole to part) या तत्त्वाकडे लक्ष केंद्रित करण्यात आले. ग्रेट ट्रिगोनोमेट्रिकल सर्व्हे (GTS) सारख्या प्रकल्पांनी महसुली सर्वेक्षणांसाठी गणितीदृष्ट्या कठोर चौकट प्रदान केली.[८]

३. भू-अभिलेख प्रणालीचा पाया: कॅडस्ट्रल सर्वेक्षणांमुळे मालमत्ता धारणेचे टिकाऊ अभिलेख तयार झाले. ब्रिटिश राजवटीत भू-अभिलेख अधिक वैज्ञानिक बनले. 'हक्कांचा अभिलेख' (Record of Rights), जमाबंदी, गाव नकाशे आणि क्षेत्र मापन पुस्तके हे भू-अभिलेख प्रणालीचे प्रमुख घटक आहेत.[९]

४. ७/१२ उतारा: हा महाराष्ट्रातील भू-नोंदणीचा एक महत्त्वाचा उतारा आहे. यात जमिनीचा सर्वेक्षण क्रमांक, मालकाचे नाव, क्षेत्रफळ, पिकांचा प्रकार, आणि सरकारी कर्जे याबद्दल माहिती असते. याचे नाव महाराष्ट्र भू-महसूल मॅन्युअलमधून आले आहे, आणि ७ व १२ हे अंक गाव फॉर्म क्रमांक दर्शवतात. फॉर्म ७ 'हक्कांचा अभिलेख' दर्शवतो, तर फॉर्म १२ 'पिकांची नोंदणी' दर्शवतो. यात वतन/इनाम निर्मूलनामुळे झालेल्या बदलांची नोंद असते.[१०]

वतन व्यवस्थेवरील ब्रिटिश धोरणांचा परिणाम:

ब्रिटिश राजवटीने महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत मोठे बदल घडवले. महसूल वाढवण्याच्या मुख्य उद्देशाने त्यांनी वतन व्यवस्थेचे पद्धतशीरपणे विघटन करण्यास सुरुवात केली.

१. वतन निर्मूलन कायद्यांचे विश्लेषण: वतन आणि इनाम प्रणालीचे निर्मूलन करण्यासाठी ब्रिटिशांनी अनेक कायदे लागू केले.

- **बॉम्बे हेरेडिटरी ऑफिसेस ॲक्ट, १८७४:** या कायद्याने वंशपरंपरागत कार्यालयांचे नियमन केले. याने कलेक्टरला वतनदारांवर नियंत्रण ठेवण्याचे, त्यांना शिक्षा करण्याचे आणि गैरवर्तनासाठी 'वतन' जप्त करण्याचे अधिकार दिले. तसेच, महिलांना वंशपरंपरागत कार्यालयांची कर्तव्ये पार पाडण्यास स्पष्टपणे मनाई केली.[११]
- **बॉम्बे रेंट-फ्री इस्टेट्स ॲक्ट, १८५२:** या कायद्याचा उद्देश इनाम आणि इतर भाडेमुक्त इस्टेट्सवरील सरकारच्या दाव्यांचे निराकरण करणे हा होता.[१२]

- **बॉम्बे इनाम कमिशन (१८५२-१८६३):** हे भू-शीर्षकांचे न्यायनिवाडा करण्यासाठी स्थापन केलेले एक विशेष न्यायालय होते, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात महसुलाची जप्ती झाली.[१३]

२. स्वातंत्र्योत्तर निर्मूलन कायदे:

स्वातंत्र्यानंतरही वतन व्यवस्था पूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी अनेक कायदे लागू करण्यात आले.

- **बॉम्बे पर्सनल इनाम्स ॲबोलिशन ॲक्ट, १९५३:** या कायद्याने सार्वजनिक हितासाठी वैयक्तिक इनामे रद्द केली आणि संबंधित हक्क संपुष्टात आणले.[१४]

इतर महत्त्वाचे कायदे:

- **बॉम्बे खोती ॲबोलिशन ॲक्ट, १९४९.**[१५]
- **बॉम्बे परगणा अँड कुलकर्णी वतन (ॲबोलिशन) ॲक्ट, १९५०.**[१६]
- **बॉम्बे सर्व्हिस इनाम्स (युजफुल टू कम्युनिटी) ॲबोलिशन ॲक्ट, १९५३.**[१७]

निष्कर्ष:

ब्रिटिशांपूर्वी वतन व्यवस्था महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय जीवनाचा भाग होती. ती भू-धारण प्रणाली तसेच स्थानिक प्रशासन, महसूल आणि सामुदायिक सेवांचा आधार होती.ब्रिटिश धोरणांनी, भू-सर्वेक्षण व महसूल कायद्यांद्वारे, यात बदल घडवले. ब्रिटिश सर्वेक्षणांनी प्रशासकीय नियंत्रण मजबूत केले व '७/१२' उताऱ्यासारख्या भू-अभिलेखांचा पाया घातला. वतन निर्मूलन कायद्यांमुळे वतनदारांचे अधिकार संपुष्टात आले व राज्याचे भूमीवर नियंत्रण आले.या बदलांमुळे ग्रामीण समाजात मोठे सामाजिक व आर्थिक बदल झाले. स्वातंत्र्यानंतर याच कायद्यांचे पालन करून वतन व्यवस्था संपुष्टात आणली गेली, ज्यामुळे आधुनिक भू-प्रशासन व महसूल प्रणाली विकसित झाली. वतन व्यवस्थेचे विघटन हे प्रशासकीय व सामाजिक परिवर्तनाचे प्रतीक आहे, ज्याने राज्याच्या आधुनिक स्वरूपावर प्रभाव टाकला.

संदर्भ सूची:

१. बॉम्बे रेग्युलेशन XVI, १८२७.

२. बॉम्बे रेग्युलेशन ७, १८२२.

३. बॉम्बे रेग्युलेशन ९, १८३३.

४. बॉम्बे हेरेडिटरी ऑफिसेस ॲक्ट, १८७४.

५. बॉम्बे रेंट-फ्री इस्टेट्स ॲक्ट, १८५२.

६. गॉर्डन, रा. (१९१२). *मॅन्युअल ऑफ लँड सर्व्हेइंग*. नागपूर: सरकारी छापखाना (१९६८ मध्ये पुन्हा प्रकाशित).

७. प्रिंगलचे सर्वेक्षण (१८२४-२८).

८. विंगेटचे सर्वेक्षण (१८३५).

९. महाराष्ट्र भू-महसूल मॅन्युअल.

१०. महाभूलेख (सध्याची भू-अभिलेख प्रणाली).

११. बॉम्बे हेरेडिटरी ऑफिसेस ॲक्ट, १८७४.

१२. बॉम्बे रेंट-फ्री इस्टेट्स ॲक्ट, १८५२.

१३. बॉम्बे इनाम कमिशन (१८५२-१८६३).

१४. बॉम्बे पर्सनल इनाम्स ॲबोलिशन ॲक्ट, १९५३ (नंतर महाराष्ट्र पर्सनल इनाम्स ॲबोलिशन ॲक्ट).

१५. बॉम्बे खोती ॲबोलिशन ॲक्ट, १९४९.

१६. बॉम्बे परगणा अँड कुलकर्णी वतन (ॲबोलिशन) ॲक्ट, १९५०.

१७. बॉम्बे सर्व्हिस इनाम्स (युजफुल टू कम्युनिटी) ॲबोलिशन ॲक्ट, १९५३.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

कलातपस्वी - आबालाल रहिमान

मधुबाला वसंत मांजरे

संशोधक विद्यार्थी,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Corresponding Author - मधुबाला वसंत मांजरे

DOI - 10.5281/zenodo.19723715

प्रास्ताविक :

भारतीय कला संस्कृतीच्या इतिहासात कोल्हापूरचे स्थान कलापूर म्हणून अजरामर करण्यात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा सिंहाचा वाटा आहे. कोल्हापूरचे भाग्यविधाते म्हणून शाहू महाराजांनी केवळ सामाजिक व धार्मिक क्रांतीच केली नाही, तर ललित कलांना प्रतिष्ठा मिळवून देऊन कोल्हापूरच्या मातीला चित्रकलेचा अनोखा सुगंध बहाल केला. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच करवीरच्या गादीवर कला आणि संस्कृतीचे सुवर्णयुग अवतरले. या सांस्कृतिक चळवळीचे सर्वात तेजस्वी रत्न म्हणजे चित्रकार आबालाल रहिमान. अल्लादिया खाँ यांच्यासारख्या संगीत महर्षींसोबतच आबालाल रहिमान यांसारख्या थोर रंगकर्मीला राजाश्रय देऊन महाराजांनी भारतीय ललित कलेचे संवर्धन केले. मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेल्या आबालालांनी वास्तववादी शैली आणि निसर्गचित्रणाच्या माध्यमातून कोल्हापूरच्या चित्रकलेचा पाया रचला. निसर्गातील चैतन्य, प्रकाशाचा खेळ आणि मानवी भावभावनांचे दर्शन घडवणारी त्यांची चित्रशैली आजही जगभरातील कलाकारांसाठी दीपस्तंभ ठरली आहे. प्रस्तुत विवेचन हे राजर्षी शाहूंची कलादृष्टी आणि आबालाल रहिमान यांची अजरामर कलासाधना यांचा ऐतिहासिक आढावा घेणारे आहे.

बीज शब्द: राजर्षी शाहू महाराज, आबालाल रहिमान, वास्तववादी शैली, राजाश्रय, स्थिरचित्रण

कोल्हापूर हे कलापूर म्हणून ओळखले जाते. एखाद्या भूमीला अभिजात प्रसवाची देणगी लाभलेली असते. अशा निर्माण भूमीपैकी करवीरची भूमी साक्ष देत आहे. जेथे अनेक कलारत्ने निर्माण झाली व ज्यांनी इतिहास घडविला. उदा. बाबुराव पेंटर, गजबर, दत्तोबा दळवी, वडणगेकर, कातवरे, निगवेकर, आबालाल रहिमान, रावबहादूर, धुरंदर, रवींद्र मेस्त्री, चंद्रकांत मांडरे अशा थोर चित्रकारांनी चित्रकला नुसती जिवंत ठेवली नाही तर दिवसेंदिवस ती विविध कला अविष्कारानी समृद्ध केली.[१] कोल्हापूरच्या कलापरंपरा समृद्ध असल्या तरी काळाच्या रैटयामुळे त्या नष्ट होत असल्या तरी चित्रकलेचा प्रवाह आजही वाहतो आहे. सुमारे दिडशे वर्षाहुनही अधिक वर्ष कोल्हापूर हे महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील बुजूर्ग म्हणून भारताच्या नकाशात ठळकपणे नोंदवलेले ठिकाण होय. अनेक कलेची जतन संगीत, चित्र, शिल्प, चित्रपट आदि कलांचे माहेरघर म्हणून कोल्हापूर ओळखले जाते. १८९० ते १९२० हा कालखंड कोल्हापूरच्या ललित कलेचा सुवर्ण काळ होता असे म्हणता येईल.[२]

१८५0 पासून कोल्हापूरात ही परंपरा जपताना नवे बदलही आत्मसात केले आहेत. अनेक नवोदित कलेची माध्यमे आज अस्तित्त्वात येत आहेत. इंटरनेटच्या माध्यमातून येथील कला परंपरेचे मार्केटिंग जागतिक पातळीवर ही झाले. स्थानिक कलाकृती जगभरातील विविध देशांतही जाऊ लागल्या आहेत. विविध वेबसाईडच्या माध्यमातून आपल्या कलाकृतीचे मार्केटिंग कसे करावे याची नाविण्यता आज कलाकारांना झाली आहे. अशा कलाकारांमध्ये आपण रमण लोहार, सतीश घागरे याचा उल्लेख करता येईल. ज्यांनी ''इंटरनॅशनल रेरीक मेमोरियल मॉडर्न गॅलरीमध्ये आपले सामुहिक प्रदर्शन मांडले.[३] अशा कला युगाची सुरूवात ज्या कलाकारांपासून झाली ते कला दैवत म्हणजे आबालाल रहिमान ज्यांच्यापासून चित्रकारितेची किमया कोल्हापूरात घडली.

आबालाल रहिमान:

आबालाल हे प्रतिभावंत कलाकार होत शृंगाराने रसरसलेली नवयुक्ती असो वा शौर्याने चमकणारा तेज:पुंज राजा असो वा कारूण्याने ओथंबलेला भिक्षुक असो किंवा वैराग्याने भारावलेला सत्पुरूष असो, विरागाने वेढलेली स्त्री असो वा स्वच्छंदतेने आकाशात विहार करणारी बगळ्यांची सुंदर माळ असो आबालाल आपल्या रंगाच्या उत्कट अविष्कारातून त्या प्रसंगास, व्यक्तीमत्त्वास जिवंतपणा प्राप्त करून देत असत. म्हणून आबालालचे एक-एक चित्र म्हणजे

''सप्तरंगाने नटलेले इंद्रधनुष्याच्या
चांदण्यात न्हाऊन निघालेला सुंदर ताजमहाल!!''
रंगाच्या दुनियेतील भावमधुर अमृतकल्लोळ
भारतीय रंगकलेच्या नंदनवनातील रंगसम्राट
म्हणजे आबालाल रहिमान होय.[४]

निसर्गाच्या चैतन्यपूर्ण विभ्रमांना सृष्टीच्या अंगाखांद्यावर खेळवण्याची कला आबालालकडे होती. कोल्हापूरची वनश्री एवढा मोठा जलाशय त्याच्या काठावर उभं असलेले राजेशाही स्मारक, रंगविभोर पक्षी, फुल, पानं, सळसळत गवत वर निळ आभाळ, उगवती पूर्व दिशा व मावळते रंग यांनी हा कलावंत वेडा होता. अशा आबालालानी अखंड आयुष्य टिपल ते फक्त कोल्हापूरच्या निसर्ग सौंदर्यातच.[५] आबालाल कालखंड ही सुमारे एकशे सत्तर वर्षापूर्वीचा आहे. कोल्हापूर संस्थानावर तेंव्हा छत्रपती शाहू महाराजांचे राज्य होते. महाराजांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वासारखे त्यांचे संस्थानही काहिशा वेगळ्या ढंगाचे होत. मराठ्याच्या इतिहास शौर्य वारसा सांभाळून महाराजांनी स्वत:ची अशी काही वैशिष्ट्ये निर्माण केली होती की ज्याचा आजही कोल्हापूर संस्थानाला विसर पडला नाही. त्याच्या कावेबाजीनेच घडलेले एक असामान्य कलाचातुर्य म्हणजे आबालाल रहिमान होय.

आबालालांचा जीवन परिचय :

आबालालांचा जन्म कोल्हापूर नगरीत कासार गल्लीत एका छोट्या घरात झाला. त्याचे पूर्ण नाव आबालाल रहिमान शेख उर्फ अब्दुल अजीज हे मुसलमान शिया पंथीय होते. पुढे राजर्षी शाहू महाराजांनी दरबारी भालदार हे नाव दिले. त्यांच्या जन्मतारखेविषयी पुरावे उपलब्ध नाहीत पण शिक्षणाचे पुरावे उपलब्ध असल्याने त्यांचा जन्म १८५६ ते १८६0 असावा. केवळ जे. जे. आर्ट स्कूल मधून शिक्षण घेतल्यामुळे ते चित्रकार बनले असे म्हणता येणार नाही. पण त्याच्या कलेला अभिजात कलेचा वारसा मिळत गेला. आबालालांचे अंगभूत असणारे गुणधर्म अब्दुल रहिमान बाबाजी यांच्याकडून मिळाले. कुरणाच्या प्रती हस्ताक्षरीत करून त्याच्या पानाभोवती नक्षीकाम करण्याचा त्यांच्या घरी व्यवसाय होता. वडील खाजगीत कारकून होते. त्यांचा फारशी भाषेचा दांडगा व्यासंग होता ते कुराणाच्या हस्ताक्षरीत प्रती तयार करत व आबालाल

त्यांच्या सोबत त्या प्रतीवर नक्षीकाम करत इथं आबालालाच्या कला शिक्षणाची सुरूवात झाली. आबालाल इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत शिकले पण पारसी, मराठी, संस्कृत आणि अरबी भाषेवरही त्यांचे प्रभुत्त्व होते. कोल्हापूरी माणसाचा मराठी भाषेचा बाणा आबालालांच्या डायरीतील मराठी भाषेच्या लिखाणातून दिसतो.[६]

आबालालाची वेशभूषा:

आबालाल रहिमान यांच्याविषयी कलारसिकांच्या व इतरांच्या मनात कोरलेली प्रतिमा काहिशी अद्‌भूतरम्य आहे. मास्तरांची मूर्ती छोटीशी होती. मास्तरांचे डोळे खोल व नजर भेदक होती. शुभ्र दाढी व मिश्या स्वैरतेने वाढलेल्या होत्या. फाटके, दारिद्र्याने गांजलेले, व्यसनी, विक्षिप्त, जगापासून काहीसा अलिप्त, स्वत:च्या स्वप्नामध्ये मशगूल, अव्यवहारी, फारसे शिक्षण न झालेले 'अवलिया' या शब्दात त्यांना संबोधता येईल. तरी कधी-कधी त्याचे व्यक्तीमत्त्व रूबाबदार असे क्लीन शेव्ह करून युरोपियन कपडे वापरत तर कधी मुस्लिम पद्धतीची विजार, जाकिट, जरीचा फेटा बांधत, नाकावर सोनेरी चष्मा असे या त्याच्या पेहरावामधून त्याच्या मनमौजी स्वभावाचे दर्शन होत कोटीतिर्थात राहताना अगदी फकिरी वेशात ते रहात. व्यासंगी पण आपल्या कलेत मुग्ध झालेल्या ज्या कलेला राहणीमानाचे भान नाही तर दुसरीकडे राजदरबारी एक निष्णात कलावंताची भूमिका आबालाल यांच्यात दिसते.[७]

राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि आबालाल:

कोल्हापूरचे भाग्यविधाते म्हणून ओळखले जाणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य केवळ एका राज्यापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण महाराष्ट्रासाठी भूषणावह ठरले आहे. करवीरच्या गादीवर शाहू महाराजांचे आगमन होणे, हे या घराण्याचे आणि जनतेचे थोर सद्‌भाग्यच होते. त्यांनी केवळ सामाजिक आणि धार्मिक क्रांती केली नाही, तर कोल्हापूरच्या सांस्कृतिक वैभवालाही एक नवी झळाळी प्राप्त करून दिली.[८] राजर्षींनी कोल्हापूरच्या वैशिष्ट्यपूर्ण कलाशैलीला पैलू पाडण्याचे महान कार्य त्यांनी केले. संगीत, नाट्य, चित्रकला, शिल्पकला या ललित कलांपासून ते कुस्ती, शिकार आणि हत्तींच्या झुंजीसारख्या मर्दानी खेळांपर्यंत सर्वच कलांना त्यांनी भरभराटीस आणले. भारतीय शास्त्रीय संगीतातील हिमालय मानले जाणारे गानसम्राट अल्लादिया खॉ आणि जागतिक दर्जाचे चित्रकार आबालाल रहिमान ही दोन अनमोल रत्ने जोपासणे, हे राजर्षींनी भारतीय कलेला दिलेले सर्वात मोठे योगदान आहे.[९]

आबालाल रहिमान यांच्या प्रतिभेचा उदयही एका रंजक प्रसंगाने झाला. कोल्हापूरच्या रेसिडेंट साहेबांच्या पत्नीने दिलेला फोटो आबालालांनी इतका हुबेहूब रेखाटला की, रेसिडेंट साहेब चकित झाले. त्यांच्या शिफारसीवरून रिजन्स कौन्सिलने आबालालांना १५ रुपयांची शिष्यवृत्ती देऊन कलाशिक्षणासाठी मुंबईला पाठवले. या ऋणाची जाणीव ठेवून आबालालांनी शिक्षण पूर्ण होताच कोल्हापूर संस्थानाचा राजाश्रय स्वीकारला. महाराजांनी केवळ आबालालांनाच नव्हे, तर भाई माधवराव बागल आणि दत्तोबा दळवी यांसारख्या अनेक निष्णात कलाकारांना आश्रय देऊन कोल्हापूरला कलापूर बनवले.[१०]

जे.जे. स्कूल मधील आबालालाचे शिक्षण:

आबालाल रहिमान यांचा १८८० ते १८८५ हा मुंबईतील काळ त्यांच्या कलाप्रवासाचा पाया ठरला. वडिलांकडून मिळालेला कलेचा वारसा आणि जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये मिळालेले वास्तववादी शैलीचे शास्त्रशुद्ध शिक्षण यांचा एक अपूर्व संगम या काळात घडून आला. सालोमन, हॅवेल आणि लॉकवुड किपलिंग यांसारख्या

दिग्गज परदेशी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आबालालांची कला प्रगल्भ झाली. या शिक्षणामुळेच त्यांनी कोल्हापूरच्या भूमीला आधुनिक चित्रकलेचा गंध दिला. त्यांच्या चित्रांमध्ये निसर्गप्रेम, रंगांचा ओघवता प्रवाह, जोश आणि अफाट उत्साह ही वैशिष्ट्ये ठळकपणे दिसून येतात.

राजदरबारी छत्रपती शाहू महाराजांचे आश्रय लाभलेल्या आबालालांनी महाराजांचे आणि राणी एलिझाबेथ यांची जिवंत व्यक्तिचित्रे (पोट्रेट्स) साकारली. मात्र, ते एक स्वमग्न कलाकार होते; राजदरबारी चाकरी असूनही ते स्वतःच्या मर्जीनुसार आणि आवडीनुसार कलासाधनेत रमून जात असत.[११] जे. जे. मधील वास्तव्यात त्यांनी 'लाईन ड्रॉईंग'ची एक स्वतंत्र आणि प्रभावी शैली विकसित केली होती. त्यांचे असामान्य कलाज्ञान पाहून प्राचार्य कॅप्टन टेरी आणि जॉन ग्रिफिथ्स इतके प्रभावित झाले की, त्यांनी आपल्या खाजगी स्टुडिओमध्ये आबालालांकडून कामे करून घेतली. इतकेच नव्हे, तर आबालालांची नियुक्ती जे. जे. च्या प्राचार्यपदी व्हावी, अशी शिफारस त्यांनी केली होती. आपल्या प्रतिभेने शिक्षकांवर छाप पाडणारे आबालाल हे त्या काळातील एक विद्यार्थी होते.

रहिमान यांची प्रसिद्ध चित्रकला प्रकार:

लॅण्डस्केप:

आबालाल रहिमान यांच्या चित्रकलेतील 'लॅण्डस्केप' (निसर्गचित्रण) हा विषय त्यांच्या कलासाधनेचा सर्वोच्च बिंदू मानला जातो. त्यांच्या निसर्गचित्रांमध्ये कमालीची वास्तवदर्शी शैली (Realism) दिसून येते. प्रकाश आणि सावलीचा अत्यंत सूक्ष्म समतोल साधत, त्यांनी निसर्गातील भावना जिवंत करण्याचे कसब आत्मसात केले होते. आबालाल हे कलेचे खरे फकीर होते; त्यांनी रंगवलेली चित्रे जरी आकाराने लहान (Miniature style) असली, तरी त्यांमधील भव्यता अथांग होती.

आबालालांच्या चित्रांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील जिवंतपणा. त्यांचे चित्र पाहून केवळ वस्तूंचा भास होत नसे, तर जणू निसर्ग प्रत्यक्ष हालचाल करत आहे, असा अनुभव रसिक घेत असत. कोल्हापुरातील निसर्गावर त्यांचे अपार प्रेम होते. कोटीतीर्थ, रंकाळा आणि पंचगंगा या परिसरातील त्यांची चित्रे जागतिक दर्जाची आहेत. विशेषतः रंकाळा तलाव आणि तेथील संध्यामठ हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता.

आकाशाचा आणि ढगांचा आबालालांनी केलेला अभ्यास भारतीय कलाविश्वात अद्वितीय आहे. भारतातील अन्य कोणत्याही चित्रकाराने आबालालांइतका ढगांच्या विविध रूपांचा सखोल अभ्यास केलेला आढळत नाही. १९२८ च्या सुमारास त्यांनी आकाशात उमटणाऱ्या रंगांच्या पाच ते सहा छटांचा अभ्यास मांडला होता. यामध्ये त्यांनी ढगांच्या आकारांना आणि स्थितीला फॉक्स, लिंब्स, स्पायरल, स्पायरल लेट अशी तांत्रिक नावे देऊन त्यांचे शास्त्रीय व कलात्मक विश्लेषण केले होते. त्यांच्या कुंचल्यातून उतरलेले आकाश हे केवळ पार्श्वभूमी नसून ते चित्राचा आत्मा असायचे.[१३]

कॉम्पोझिशन :

आबालाल रहिमान यांच्या चित्रकलेतील 'कॉम्पोझिशन' (रचनाकल्प) हे त्यांच्या अष्टपैलू बुद्धिमत्तेचे आणि निधर्मी विचारसरणीचे प्रतीक आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात सोनार, जिनगर, मराठा, ब्राह्मण अशा विविध जातिव्यवस्था जवळून पाहिल्या होत्या, परंतु कलाकार म्हणून ते सदैव निधर्मी राहिले. रामायण, महाभारत, भगवद्गीता, पांडवप्रताप आणि शिवकालीन बखरींचे त्यांनी केलेले सखोल मनन त्यांच्या चित्रांमधून स्पष्टपणे उमटते. त्यांच्या रचनाकौशल्याचे उत्तम नमुने म्हणजे रावण-सीता

हरण, अर्ध्यप्रदान, सीताशोक यांसारखी पौराणिक चित्रे आणि शिवकालीन पराक्रमाचे प्रसंग होत. छत्रपती शिवाजी महाराजांचे 'बोअर हटिंग', वाघिणीचे दूध काढतानाचे शौर्य, दादोजी कोंडदेव व शिवाजी महाराज, जिजामाता व बालशिवाजी, आणि भव्य 'शिवराज्याभिषेक' या चित्रांमधून त्यांनी इतिहासाला जिवंत केले. तसेच 'महाराणी ताराबाई यांचे अश्वरूढ कॉम्पोझिशन' आणि 'पार्वती पंचाग्नी तपश्चर्या' या कलाकृती त्यांच्या रंगकौशल्याचा आणि ऐतिहासिक जाणिवेचा पुरावा देतात. म्हणूनच माधवराव बागल त्यांच्याबद्दल सार्थपणे म्हणत की, रंगसम्राटाचे रंगचातुर्य त्याच्या कांपोझिशन्समध्ये आढळते.[१४]

पोट्रेट पेंटींग:

आबालाल रहिमान यांची 'पोट्रेट पेंटिंग' (व्यक्तीचित्रण) ही कला केवळ मानवी आकृतीचे रेखाटन नसून ती आत्म्याचा शोध घेणारी एक उच्च दर्जाची साधना आहे. आजही कलाक्षेत्रातील असंख्य विद्यार्थी त्यांच्या या चित्रांचा सखोल अभ्यास करून आपली कौशल्ये विकसित करत आहेत. आबालालांना लाभलेल्या राजाश्रयामुळे त्यांनी राजघराण्यातील अनेक राजा-राण्यांची व्यक्तिचित्रे साकारली. या चित्रांमध्ये राजघराण्यातील सात्त्विक तेज, अजोड शौर्य आणि व्यक्तीची गुणवत्ता हुबेहूब उमटलेली दिसते. त्यांच्या चित्रशैलीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे रंगांचा विग्रह. एखाद्या व्यक्तीचा वर्ण मध्यम असो, गौरवर्ण असो वा सावळा, आबालालांनी त्या व्यक्तीच्या रक्तमांसाची नैसर्गिक जिवंतपणा दाखवणारी रंगरचना केली. चित्र पाहून ती पार्थिव व्यक्ती प्रत्यक्षात समोर उभी आहे, असा जिवंत भास निर्माण करणे ही मास्तरांच्या (आबालालांच्या) पोट्रेटची खास ओळख होती. त्यांनी छत्रपती शाहू महाराज आणि पाश्चात्त्य राणी एलिझाबेथ यांसारख्या थोर व्यक्तिमत्त्वांची चित्रे अत्यंत प्रभावीपणे रेखाटली. होळकर घराण्यातील अहिल्यादेवींचे रेखाटन करताना ते स्वतः म्हणत की, "पिकलेल्या पिवळ्या केवड्याप्रमाणे अहिल्यादेवी सुंदर व सात्त्विक होत्या." त्यांच्या या कौशल्याची साक्ष देणारे अहिल्यादेवींचे हे सुंदर पोट्रेट आजही कोल्हापुरातील शाहूपुरी येथील अहिल्याबाई दवाखान्यात जतन केलेले आहे.[१५]

मरीन आर्ट:

आबालाल रहिमान यांच्या जलरंगातील चित्रकृतींमध्ये सागरी चित्रकला हे एक अद्वितीय चित्र आहे. समुद्रात वादळ सुरू असतानाही समुद्रातील रौद्र वादळ, जिवाची पर्वा न करता त्यांनी बोटीतून प्रवास करत अथांग महासागराचे रूप टिपले .उसळणाऱ्या फेसाळ लाटा, ढगाळलेले गूढ आकाश आणि पाण्याचे प्रबळ तडाखे यामुळे ताटातूट होणारे सागरी ओंडके यांचे त्यांनी केलेले चित्रण थक्क करणारे आहेआबालालांनी या जीवघेण्या . लाटांची जी स्केचेस आणि पेंटिंग्ज साकारली, आबालालांच्या या चित्रांन इतकी समर्पकता आणि जिवंतपणा अन्य कोणाच्याही कलाकृतीतून आजवर उमटलेला नाही.[१६]

स्टील लाईफ पेंटीग:

आबालाल रहिमान यांनी 'स्टिल लाईफ पेंटिंग' (स्थिरचित्रण) या चित्रकला प्रकारात केलेले रंगकाम भारतीय कलाविश्वात अभ्यासाच्या दृष्टीने मोलाचे ठरले आहे. त्यांच्या कुंचल्यातून साकारलेली पाने, फुले, फळे, फुलांचे गुच्छ आणि दैनंदिन वापरातील ताट-वाटया किंवा किटली यांसारख्या वस्तूंची मांडणी केवळ रेखाटन नसून तो एक जिवंत अनुभव आहे. आबालालांची फोटोग्राफीतील गती त्यांच्या चित्रांमधील अचूक प्रकाशाचे प्रतिबिंबित होते, ज्याची प्रचिती त्यांच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधील शिक्षणकाळात शिक्षकांना केलेल्या साहाय्यातूनही येते. कोल्हापूरच्या टाऊन हॉल आर्ट गॅलरीतील त्यांचे स्थिरचित्र

पाहताना प्रेक्षक थक्क होतो; तेथील टोपलीतील डाळिंबाचे चित्र इतके हुबेहूब आहे की जणू ती फळे आत्ताच तोडून आणली असावीत. उकललेल्या डाळिंबाचे खाली सांडलेले दाणे इतके पारदर्शी आणि रसरशीत आहेत की, ते जिवंत असल्याचा भास होतो. यातून आबालालांची रंगकर्मी म्हणून असलेली प्रतिभा सिद्ध होते. कलेप्रती त्यांची निष्ठा इतकी अपार होती की, १९२२ मध्ये मृत्यूशय्येवर असतानाही त्यांच्या हातात ब्रश होता. आयुष्याच्या अखेरच्या प्रहरी आरशात पाहून त्यांनी स्वतःचे ५''X७'' चे जलरंगातील आत्मचित्र साकारले. २८ डिसेंबर १९३१ रोजी हा थोर कलाकार काळाच्या पडद्याआड गेला असला, तरी त्यांच्या आद्य कलाकृतींनी त्यांची स्मृती आजही रसिकमनात ताजी ठेवली आहे.[१७]

आबालालाचे चित्रकलेतील योगदान :

आबालाल रहिमान यांची चित्रशैली भारतीय कलाविश्वात अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते; त्यांच्यासारख्या श्रेष्ठ रंगकर्मीपासूनच खऱ्या अर्थाने कोल्हापूरच्या गौरवशाली चित्रकला परंपरेचा आरंभ झाला. त्यांच्या कलाकृतींमध्ये कल्पनावाद आणि रंग यांचे एक घनिष्ठ नाते अभिप्रेत असून, सृष्टीतील चराचरामध्ये आलेले चैतन्य त्यांच्या कुंचल्यातून प्रत्यक्ष पडद्यावर उतरलेले पाहायला मिळते. कोल्हापूरच्या कलाकारांमध्ये आबालालांचे स्थान अढळ असून, त्यांनी रेखाटलेली मातृत्वरूपी चित्रे, प्रभाळ आणि जिवंत व्यक्तीचित्रे आजही जुन्या कोल्हापूरच्या विलोभनीय आठवणींना उजाळा देतात.

कोल्हापूरच्या परिसरातील भौगोलिक आणि ऐतिहासिक वारसा त्यांनी आपल्या रंगांतून अजरामर केला आहे. कोल्हापूरपासून काही अंतरावर असलेल्या पन्हाळा आणि जोतिबा येथील देवदेवता तसेच तिथला निसर्ग हा त्यांच्या आवडीचा विषय होता. त्यांनी पन्हाळ्यावरील ऐतिहासिक अंबरखाना, नायकिणीचा सज्जा, कोटीतीर्थ, तीन दरवाजा आणि अथांग मसाई पठार अशा अनेक वास्तूंची व स्थळांची चित्रे अतिशय निष्ठेने चितारली आहेत. हा निसर्ग आणि वास्तू केवळ रेखाटल्या नसून, या रंगकर्मीने त्यांत एक प्रकारचे प्राण फुंकले आहेत, ज्यामुळे त्या काळातील ऐतिहासिक वैभव आजही डोळ्यांसमोर उभे राहते.[१२]

निष्कर्ष :

आबालाल रहिमान हे कोल्हापूरच्या कला इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे आणि प्रभावशाली चित्रकार होते. त्यांनी काढलेल्या चित्रातून कोल्हापूरची संस्कृती, निसर्गसौंदर्य आणि लोकजीवन यांचे वास्तव अगदी जिवंत चित्रण दिसते. कोल्हापूरच्या चित्रकलेचा उगम येथूनच झाला. आबालाल रहिमान यांच्या उच्चत्तम कला निर्मिती तिचं पायाभूत ऊपसौष्ठव जागतिक स्तरावरही कौतुकास पात्र ठरलं. पुढं राजर्षी शाहूच्या सांस्कृतिक क्रांतीनंतर चित्रकलेला भारतभर किर्ती मिळवून दिली. कलेमुळे या कालखंडात जी एकात्मता निर्माण झाली त्याला तोड नाही. कलेला जात-पात सोयरसुतक नाही. हे त्यांच्या चित्रातून दिसते. या काळातील शैली, संकेत, मूर्तिविज्ञान इत्यादीमध्ये जे आत्मभाव दिसतो त्यामुळं इथल्या कलेचं गहिरेपण अधिकच लक्षवेधी होतं. कोल्हापूर शहरात जन्माला आलेले आबालाल कोल्हापूर बाहेर चित्रकारीतेसाठी गेले नाहीत. जूनं कोल्हापूर दर्शन त्याच्या चित्रामधून घडते. कोल्हापूरचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय वारसा समजून येतो. आबालालनी चित्रकला लोकापर्यंत पोहचवली, त्यामुळे नवोदित कलाकारांना ही चित्रे प्रेरणादायी ठरली. आज पाश्चात्त्य शैलीचा कलेवर झालेला परिणाम पण आबालालाच्या शैलीने रंगसंगती विषय निवड, नेमकेपणा, सामान्य लोकांचे दैनंदिन जीवन अतिशय

प्रभावीपणे दर्शविले आहे. कोल्हापूरची कलासंस्कृती काळाच्या पडद्याआड जाऊ न देता नव्या पिढीचा अभ्यास विषय आबालाल यांनी निर्माण करून दिलेला आहे. सुक्ष्मनिरीक्षण, निसर्गाची आवड आणि वास्तववादी शैली, साधेपणा सौंदर्यपूर्णरित्या कागदावर उतरवणे, निसर्गाची शांतता व जिवंतपणा चित्रात उतरवणे हे त्याच्या कलेचे योगदानच म्हणावे लागेल. आबालालाच्या चित्रामधून प्रसिद्धीपेक्षा कलेची आवड असणारा मेहनती, कलेचे वेड असलेला कला प्रेमी, नम्र व समर्पित कलाकार म्हणून कलेसाठी कार्य करणारा चित्रकार म्हणून कोल्हापूर शहर त्याच्या कलेची साक्ष देत आहे.

संदर्भ ग्रंथ:

१) राणे, अमरसिंह., खणे,बी. डी., राणिंगा, उमाकांत., (संपा.) युग युगीत करवीर इतिहास दर्शन, भारतीय इतिहास संकलन समिती कोल्हापूर, प्रथमावृत्ती २०१0, पृ. क्र. ३३५

२) देसाई, सुभाष., कोल्हापूरच्या चित्र-शिल्प परंपरेचा १५0 वर्षाचा इतिहास १ मे २00७, पृ.क्र. ५ ते ६

३) टिपूगडे, विजय., चित्रकारांना ग्लोबल मार्केट- लोकमत वर्धापन दिन विशेषांक २0 ऑगस्ट २0१५, पृ. क्र. ५

४) भगत, रा. तु., रंगसम्राट आबालाल रहिमान, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर प्रथमावृत्ती, १९९३ पृ. क्र. १७.

५) जाधव, श्यामकांत., रंग चित्रकारांचे, प्रकाशन - सौ. सुहासिनी जाधव, डिसेंबर २00२, पृ. क्र. ३१

६) सडवलेकर, बाबुराव., महाराष्ट्रातील कलावंत, प्रकशन - मिलिंद ल. परांजपे, २00५, पृ. क्र. २७

७) भगत, रा. तु., उपरोक्त पृ. क्र. ३0.

८) गर्गे, स.मा., करवीर रियासत जानेवारी १९३८, पृ. क्र. १

९) देशमुख, लक्ष्मीकांत., भंडारे, संदेश., निंबाळकर,अमरजा., अविस्मरणीय कोल्हापूर, प्रकाशक - भारतीय इतिहास संकलन समिती, २0१३, पृ. क्र. ७

१0) सडवलेकर, बाबुराव., उपरोक्त पृ. क्र. ३0

११) देसाई, सुभाष., उपरोक्त, पृ. क्र. ११ व १२.

१२) बागल, माधवराव., कोल्हापूरचे कलावंत, प्रकाशक - मोरेश्वर हरी भाटवडेकर, जीवन कल्याण प्रकाशन, मे १९६३ पृ. क्र. ५

१३) वडणगेकर, गणपतराव, तपस्वी आबालाल रहिमान व्यक्ती चित्र व कला, प्रकाशक - गजानन आर बुधले, ऑगस्ट, १९४७, पृ. क्र. २

१४) बागल, माधवराव., 'कला व संस्कृती', या वर्षिक प्रदर्शनामध्ये प्रदर्शनासाठी लेख कलातपस्वी आबालाल रहिमान, उपरोक्त पृ. क्र. ४

१५) वडणगेकर, गणपतराव, उपरोक्त, पृ. क्र. ७

१६) देसाई, सुभाष., उपरोक्त पृ. क्र. १६

१७) भगत, रा. तु., उपरोक्त पृ. क्र. ५८ व ५९.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

१९४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामातील सेनानी शंकरराव नलवडे यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान

डॉ. क्रांतीसिंह मारूती देसाई

संशोधक विद्यार्थी,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Corresponding Author - मधुबाला वसंत मांजरे

DOI -10.5281/zenodo.19723736

प्रस्तावना:

महाराष्ट्राची भूमी ही शोर्याची भूमी आहे कातीकारक समाजसुधारक यांनी महाराष्ट्रातील पुरोगामी विचाराला तेजाचे रूप दिले आहे त्यामुळे महाराष्ट्रातील जनता नेहमीच प्रत्येक चळवळीत आपाळीचरतीयहीला आहे. १९४२ ची वले जाव चळवळ म्हणजे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची पहाट होती करेंगे या मरेंगे वा गाधीजीच्या घोषणे मुळे संपुर्ण भारत खचाळून उठला होता भारतात, माहाराष्ट्रात १९४२ च्या चळवळीमध्ये भारतातील भारतीय जनता इंग्रजांचा धिक्कार करीत होती चले जाव चळवळ च्या घोषातून भारताची अखंडता व एकता दिसून येत होती स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय आता चाबायचे नाही या भूमिकेतून प्रत्येक भारतीय नागरिक रस्त्यावर उत्तरला होता. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात चळवळीचे लोन पसरले होते यामध्ये महाराष्ट्रात चले जाव चळवळीची धार काही वेगळीच होती कारण महाराष्ट्रातील आंदोलनात, शेतकरी, कामगार, कष्टकरी, आबालवृद्ध बालक आणि महिला या लढ्यांमध्ये अनेक क्रांतिकारकाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष घेऊन चले जाव चळवळ यशस्वी करण्यात त्यांचे मोठे योगदान होते पश्चिममहाराष्ट्रात क्रांतीसिंह नाना पाटील, वसंत दादा पाटील, क्रांतिवीर काकासाहेब देसाई हे तीन क्रांतिकारक पश्चीम महाराष्ट्रातील तारा-सागली. कोल्हापूर या भागात हे क्रांतिकारकआघाडीवरती होते कातीसिंह नाना पाटील, बसत दादा पाटील पाच्या गुम कारवाया धाडसाने व काणतेही मोहीम पूर्ण केल्याशिवाय मागे न हटणारे काकासाहेब कोल्हापूर जिल्ह्यातील भुवगाड तालुका या ठिकाणी महिलगे बु।। या गावामध्ये अत्यंत बाल वयात स्वातंत्र्यासाठी मोलाचे योगदान देणारे शंकरराव नलवडे' याच्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला आहे स्वातंत्र्य चळवळीत त्याच्या कामगिरीची नोंद इतिहासात होणे गरजेचे आहे शंकरराव नलवडे याच्या विचाराच्या प्रेरणेतून व संघर्षाचा आढावा समाजासमोर आणावा व नवीन पिढीला तो प्रेरणादायी ठरावा हा या शोधनिबंधा मागचा उद्देश आहे.

क्रांतिकार्याची प्रेरणा:

शकरराव नलवडे यांचा जन्म ३ मार्च १९२१ रोजी महिलगे बु।। ता भुदरगड, येथे एका सामान्य शेतकरी कुटुबात जन्म झाला. १९३० नंतर महात्मा गांधीच्या सत्य, अहिमेच्याद्वारे असहकार सत्याग्रह व स्वावलंबनाची चळवळ सुरू झाली ही चळवळ समाजातील सामान्य माणसापर्यंत पोहोचली कायदेभंग, असहकार व सत्याग्रह याद्वारे सामान्य माणूस देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग करावयास तयार झाला अशा रितीने देशात असंतोष भडकत

असताना १९४२ साली ऑगस्टमध्ये मुंबई येथे काँग्रेसचे अधिवेशनआले. त्या वेळी 'भारत छोडो'चा ठराव पास करण्यात आला व गांधीजीनी सर्व भारतीय जनतेला करेंगे या योगे असा संदेश दिला व स्वातंत्र्यलढ्यातील शेवटचे पर्व सुरू झाले या सुमारास शाळा, कॉलेजमधन शिकत असणारा विद्यार्थीवर्ग देशभक्तीने पेटन उठला व स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेण्यासाठी कोणताही त्याग करावा लागला तरी करण्यास तयार झाला. अशा या भारलेल्या वातावरणात त्या वेळी ॲग्रिकल्चर कॉलेज, पुणे येथे एफ वाय साधन्स ॲधि वर्गात श्री. शंकरराव नाथानी नलवडे हे शिकत होते तत्पूर्वी श्री प्रिन्स शिवाजी मराठा चोर्डिंगमध्ये राहात असताना त्याच चोर्डिंगमध्ये श्री संतराम पाटील, श्री. के. डी. पाटील, श्री. नागनाथ आण्णा नायकवडी, श्री नारायणराव वारके स्वातंत्र्यासाठी काही कराने अशा विचाराने भारलेली होती आपापल्या परीने देशाच्या स्वातंत्र्यासाठी काही करावे या हेतूने निरनिराळे कार्यक्रम करीत होती त्याच्यामुळे श्री शंकरराव नलवडे याना अधिकच चेतना मिळाली.[१]

के शंकरराव नलवडे पाटील, श्री. दत्ता देशमुख ही मडळी राहात होती ही सर्व मडळी देशाच्या १९४२ साली काँग्रेस अधिवेशनानंतर महात्मा गांधी, पडित जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद आदी सर्व काँग्रेस पुढाऱ्याना अटक करून तुरुंगात डाबण्यात आले त्यामुळे देशात सर्वत्र असंतोष फैलावला. शाळा, कॉलेजीस बंद पाडण्यात आली व तरुण वर्ग स्वातंत्र्यासाठी करेंगे या मरेंगे' या विचाराने चळवळीत उतरू लागला श्री शंकरराव नलवडे हे त्यापैकी एक होते कोलेज बंद पडल्यामुळे श्री शंकरराव नलवडे हे आपल्या जन्मगावी मडिलगे बु॥ (ता भुदरगड) येथे गेले त्यांच्या घरचे वातावरण सुसंस्कृत, सामाजिक वळणाचे व सुसंस्काराचे होते. देशासाठी, समाजासाठी काही करत राहणारे त्याचे वडील श्री नाथाजी नलवडे हे प्राथमिक शिक्षक माणून काम करीत होते. गावी गेल्यानंतर त्यानी आपल्या मित्रपरिवाराशी संपर्क साधला व स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली. गावोगावी जाऊन सभा घेणे, भाषणे करणे, ब्रिटिशांविरुद्ध असंतोष निर्माण करणे असे काम करण्यास मुख्यात केली काही ठिकाणी सक्तीने सैन्यभरती करतात याची चीड स्वातंत्र्यसैनिकाना होती. या सैन्यभरतीला विरोध होता महणून अशा सैन्यभरती अधिकाऱ्याविरुद्ध श्री शंकरराव नलवडे आणि मंडळीनी या भरती अधिकान्याना भुदरगड मामलेदार कचेरीसमोर घेराव घालून सैन्यभरतीला उघड-उपड विरोध केला त्यामुळे श्री. शंकरराव नलवडे यांना भूमिगत व्हावे लागले.[२]

फसलेला कट (कोल्हापूर- गारगोटी चा पूल):

भूमिगत अवस्थेत असताना त्यांनी गडहिंग्लज आदी दक्षिण भागात जाऊन चळवळीन भाग घेण्यास सुरुवात केली. त्या वेळी त्याच्यासोबत श्री. संतराम पाटील हेही होते, श्री बंडाप्पाण्णा पुगरी, गडहिंग्लज हे त्या भागात बळवळीचे नेतृत्व करीत होते. त्या भागातील स्वातंत्र्य चळवळीशी कापशीचे हुतात्मा करवीर स्वामी यांचाही संबंध होता. त्यामुळे श्री शकरराव यांचे श्री. स्वामी, श्री बारके व श्री. निजाम काझी याच्याशी पनिष्ठ संबंध आले. हा स्वातंत्र्यसैनिकांचा समूह प्रखर देशभक्तीने चेतलेला होता. ते रात्रदिवस स्वातंत्र्याच्या चळवळीचेच काम करीत होते. काही विशिष्ट भूभाग स्वतंत्र करून तेथे स्वराज्याचा तिरंगा फडकावयाचा व स्वातंत्र्य जाहीर करावयाचे असा विचार या मंडळींनी केला याला अनुकूल असा भूप्रदेश व वातावरण भुदरगड तालुक्यात हाते डोंगरदऱ्यात पालीच्या गुहेसारख्या गनिमीकाव्याम उपयुक्त अशा गुहा व ठिकाणे होती वा प्रदेशात सर्व स्वातंत्र्यसैनिक मुक्तपणाने वावरू शकत होते. असा प्रदेश स्वतंत्र करावा व भुदरगड तालुक्याच्या गारगोटी या ठिकाणी तहसील कार्यालयावर स्वराज्याचा तिरंगा ध्वन

फडकवावा अशी योजना या स्वातंत्र्यसैनिकानी केली या योजनेला देशभक्त रत्वाप्पाण्णा कुभार बानी मान्यता दिली होती व त्याचे सेनापतीपद हुतात्मा करचौरख्या स्वामी यांच्याकडे होते. भुदरगड तालुक्याशी दळणवळण ठेवणारा कोल्हापूर गारगोटी हा एकमेव मार्ग होता तो मार्ग खंडित केला तर सर्व बाजूनी जगलयुक्त डोंगरानी वेढलेला हा प्रदेश पूर्ण स्वतंत्र ठेवण्यास काही अडचण येणार नाही असा विचार त्यांनी केला होता. त्याप्रमाणे दि. ११ डिसेंबर, १९४२ रोजी कोल्हापूर, गारगोटी रस्त्यावरील कूरबा पूल मुरुग लाजून उडवायचा व कोल्हापूरकडील दळणवळण बंद पाडावयाचे अशी योजना कली होती त्यास अनुसरून दि. १३. डिसेंबर १९४२ रोज गारगोटी तहसील कार्यालयावर हल्ला करावयाचा तेथील खजिना आपल्या ताब्यात प्याचयाचा व तेथील तुस्यामध्ये डांबण्यात आलेल्या स्वातंत्र्यसैनिकाना मुक्त करावयाचे. अशी पोजना पार पडली असती तर भुदरगड तालुका म्वतंत्र झाल्याचे स्वातंत्र्याचे पहिले पर्व यशस्वी झाले असते.[३]

दि. ११ डिसेंबर, १९४२ रोजी पूल उडविण्याचे काम श्री निजाम काझी, वी माधवराव कुलकर्णी इ. सहा-सात लोकानी करावयाचे ठरले होते त्याप्रमाणे ते क्रूर पुलाकडे गेले. त्यानी सुख्ग पुलात पेरला व स्फोट घडवून आणला स्फोटाचा प्रचाड़ आबान झाला भूकंपासारखी धरणी हादरली परतु पूल काही उडाला नाही तो अभंगच गहिता याचा परिणाम कोल्हापूर, सस्थान सरकारला जाग आली. त्यानी कोल्हापूरहून पोलीस कुमक गारगोटीस पाठविली डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट श्री. शेटेसाहेब पोलीस फोर्ससह गारगाटीस मुक्काम ठेवून गहिल पालीच्या गुहेमध्ये श्री स्वामी, श्री. बारके आदीनी गारगोटी खजिना व कचेरी यावर हल्ला करावयाचा विचारविनिमय चालविला होता. दि .१३ रोजीच हा कार्यक्रम करावा की कमे याबद्दल चर्चा होती कोल्हापूरहून देशभक्त रानाप्पाण्णा कुभार याचे दूत म्हणून आलेले श्री. गोपाळराव बकरे श्री. स्वामी व श्री. वारके याच्यामध्ये थोडे मतभेद होते तथापि, हुतात्मा स्वामी याच्या आग्रहामुळे हा हत्ता करावयाचा असे निश्चित झाले दिनांक १३ व १४ डिसेंबर, १९४२च्या मध्यरात्री सुमारे २ वाजता सर्व स्वातंत्र्यसैनिकाची फौज गारगोटी तालुका कचेरीवर चालून गेली कचेरीच्या फाटकावरून उद्या टाकून आत प्रवेश केला व महात्मा गांधी की जय, भारतीय स्वातंत्र्याचा विजय असो अशा घोषणा दिल्या पहारेकल्याची हत्यारे काढून घेण्यासाठी झटापट सुरू होती एवढ्यात, कोठून तरी पहारेकऱ्यानी गोळी झाडली श्री स्वामी धरतीवर जादमी होऊन पडले पाठोपाठ श्री निजाम काझी याना गोळी लागली एकापाठोपाठ एक असे स्वातंत्र्यसैनिक पुढे सरकत होते. असा स्वातंत्र्यसंग्राम अहिंसक मागनि लढत असताना या गारगोटी प्रकरणात सात लोक हुतात्मा झाले व अनेक जखमी झाले.[४] अशा रितीने स्वातंत्र्याच्या लढ्यातील हे प्रकरण म्हणजे प्लद्याचे मानदङ ठरले कोल्हापूरच्या स्वातंत्र्यलढ्यातील गारगोटीचे स्वातंत्र्ययुद्ध ही स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक अमर कहाणी उरली या वेळी हुतात्मा झालेले स्वातंत्र्यवीर असे हुतात्मा करवीरख्या स्वामी (सेनापती कापशी), श्री शंकरराव इगळे (सेनापती कापशी), श्री नारायण दाजी चारके (कलनाकवाडी), श्री तुकाराम रामजी भारमल (मुरगूड, ता. कागल), श्री बळवंतराव जबडे (जवाट, ता. चिक्कोडी), श्री परशराम कृष्णाजी साळोखे (खटकलाट ता चिक्कोडी), श्री. मल्लाप्पा चौगुले (चिखली, कागल) दुसन्या दिवशी या हल्लाप्रकरणातील अनेक स्वातंत्र्यवीराना अटक करण्यात आली यामध्ये काही स्वाताय चळवळीतील वीराचीही आकसाने नावे घालण्यात आली असे एकूण ८२ जणावर खटला दाखल करण्यात आला. त्यामध्ये श्री शकरराव नलवडे हे एक होते ते व इतर १० जणाना दोषमुक्त करून सोडून दिले व ३१ जणांना न्यायाधीशांनी प्रदीर्घ शिक्षा

ठोठावल्या याच्यामध्ये अनेक आरोपी पदवीधा व सुविद्य होते केवळ चले जावच्या चळवळीत भाग घेऊन भारत स्वतंत्र करावा असा त्यांचा ध्येयवाद होता. श्री शकरराव नलवडे खटला चालू असताना कोल्हापूर येथील मध्यवर्ती कारागृहात बंदिवान (अंडर ट्रायल) म्हणून होते त्यानी एकूण १६ महिने बंदिवास भोगला व अमूल्य त्याग केला स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेत असतानाच श्री शंकरराव नलवडे यांचे शिक्षण चालू होते ते पुण्याच्या कृषि महाविद्यालयात प्रथम वर्षाचे शिक्षण घेत होते परीक्षेसाठी ते पुण्यात गेले असताना त्याना अटक करण्यात आली व कारागृहात बंदिस्त करण्यात आले चळवळीच्या वेळी तत्कालीन पोलीस अधिकारी श्री जाधव व श्री चिक्कोडीका याच्याकडून त्यांना बराच छळ सोसावा लागला होता अशा या त्यागी बीराचे जीवन मोठे खडतर पण उदात्त होते.[५]

गारगोटी खटल्यातून दोषमुक्त झाल्यानंतर देशाचा एक आदर्श नागरिक बनण्याचे त्यांनी ठरविले त्यानी कोल्हापूर म्यूनिसिपालटीमध्ये बाधकाम विभागात काही दिवस कारकून म्हणून काम केले या मुदतीत मा दाजी सावत हे चाधकाम कंत्राटदाराचे काम करीत होते त्याच्या मार्गदर्शनामुळे श्री शंकरराव नलवाडे यांनी नोकरी सोडून त्याच्याबरोबर बांधकाम क्वाटीचे काम करण्यास सुरुवात केली.

श्री. शंकरराव यानी बाधकामातील अनेक उत्तमोत्तम कामे करून यश मिळविले त्यांनी अनेक ठिकाणी ५० कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बाधले आहेत त्यानी आपल्या कर्तव्यामध्ये नेहमीच बोखंदळपणा ठेवल्यामुळे त्यानी कलेली सर्व बाधकामे उत्तम प्रतीची असून ती आजतागायत बांगल्या प्रकारे टिकून आहेत कुठल्याही कामाबद्दल एकही तक्रार आलेली नाही अशा रितीने स्वराज्य मिळविणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकाने स्वातंत्र्याचे सुराज्य करण्यासाठीही मौलिक प्रयत्न केलेले आहेत. त्यानी बांधलेले कोल्हापूर पद्धतीचे बंधारे (केटी बेअर) हे देशातील आदर्श बंधारे ठरले स्वातन्त्र्यलढ्यातील त्याच्या कर्तृत्वाला सलाम, त्याचबरोबर बांधकामामध्ये ते एक आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून शेवटपर्यंत ओळखले गेले अशा आदर्श बेक्तीमत्वाचा मृत्यू ३१/१०/२०१० रोजी झाला.[६]

समारोप:

गांधीजींनी १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात चले जाव' ची हाक दिल्याने देशभरातून अनेक लोक या लड्यात सहभागी झाले. कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी भागात स्वातंत्र्य लढ्यामध्ये काकासाहेब देसाई यांनी अत्यत महत्वपूर्ण भूमिका देशाला स्वातंत्र्य मिळावे या हेतूने आपले घर कुटुब सोडून स्वातंत्र्याला सहभागी झाले ब्रिटिश शासनाच्या विरोधात तुम चळवळीच्या माध्यमातून शासनाला राते कि पळो करून सोडले. शंकरराव नलवडे यांचे नेतृत्व शेतकरी कुटुंबातून होते आपल्या चळवळीच्या माध्यमातून त्यांनी सरकारला जेरीस आणले देश सेवा करत असताना आपली जबाबदारी ही त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली देशाला स्वातव्य मिळण्यासाठी अविरत झगडणारे व्यक्तिमत्व म्हणून याच्याकडे पाहावे लागते आपली प्रामाणिक देश सेवा करत असताना पदाचा गैरवापर कोणताही शासकीय फायदा वैयक्तिक रित्या न घेणारे व्यक्तिमत्व साधी राहणीमान, आई-वडिलाचे भावडांचे सरकार आदर्श व्यक्तिमत्व शेतकरी कष्टकरी सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी स्वातंत्र्य चळवळ, सयुक्त महाराष्ट्र, सीमालदा, इत्यादी लढ्यात त्यांनी निष्ठापूर्वक कार्य केले शंकरराव यांची शौर्यगाथा पावर ती अधिक संशोधन व्हायला हवे त्याच्या कार्याचा वारसा व स्मृती आपण जपायला हव्यात भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यानी अभूतपूर्व काम केले भारताला स्वातंत्र्य नतरही त्यानी आपली देश सेवा चालू ठेवली त्यानी स्वातंत्र्य लढ्यामध्ये

केलेले कार्य आजही आपणास प्रेरणा देत आहे शकरराव आजच्या तरुण पिढी समोर एक आदर्श आहेत.

संदर्भ:

१. श्री बाजीराव शंकरराव नलवडे दि.१८/०८/२०२२ वेळ स ११.३० वा ची मुलाखत.

२. डॉ राजन गवस सर दि ११/०९/२०२२ वेळ स ६.३० वा. ची मुलाखत.

३. तांबट शरद, १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यातील कोल्हापूर चे शिलेदार डिसेंबर २०२० पृ. १८.

४. रमेश बारके, बलिदान हे स्वातंत्र्यासाठी, वेदांत प्रकाशन पुणे, जून २००३ पृ. ४६.

५. बहुजनपर्व, प्रिंस शिवाजी मराठी बोर्ड हाउस पृ. ४८७.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

Negotiating Nationalism: Gandhian Hegemony & Tribal Society in Maharashtra

Jayshree J. Valvi[1] & Dr. Rajkumar S. Mare[2]

[1]Research Scholar, Department of History, Shivaji University, Kolhapur

[2]Professor, Department of History, Balawant College Vita

Corresponding Author - Dr. Rajkumar S. Mare

DOI - 10.5281/zenodo.19723770

Abstract:

This paper examines the relation between Gandhian nationalism and tribal communities in Maharashtra through the analytical framework of Gramsci's Hegemony. The study argued that Gandhian leadership functioned as a form of ideological hegemony grounded in consent rather than force. Drawing the Antonio Gramsci's ideas – such as Satyagraha, Constructive programme, use of Khadi- Self-reliance, liquor prohibition and civil disobedience, non-cooperation – were communicated and adapted Gandhian ideals within tribal regions of Maharashtra. Using district wise evidence from the Civil Disobedience Movement, Particularly from tribal concentration areas such as West Khandesh, East Khandesh, Nashik, Nanded, Palghar and Chandrapur. The study highlights the role of local leaders and volunteers as intermediaries in spreading Gandhian ideology. It indicate that tribal participation was fostered through ethical persuasion and voluntary discipline rather than polical compulsion or force. Activities such as village meetings, liquor picketing, and khadi promotion contributed to reshaping everyday social behavior. The further argues that tribal engagement with Gandhian nationalism was not mere passive but active through adaptation. Through the application of Hegemony as a historical tool, this study offers a nuanced understanding of Nationalist movement in Maharashtra and highlights tribal communities as active agent in the making of the Indian national movement.

Keywords: Hegemony, Gandhian Hegemony, Tribal district in Maharashtra, M.K. Gandhi.

Introduction:


The Indian National Movement under the leadership in Mahatma Gandhi transformed the character of anti-colonial struggle by bringing large sections of Indian society into active political participation. In Maharashtra where a significant tribal population lived, the encounter between Gandhian nationalism and tribal society assumed crucial historical form. Tribal societies in Maharashtra have their own cultural practices, organization and authority long before the advent of nationalist politics. Tribal resistance during Freedom Struggle may be understood in three phases: During the moderate phase of the Indian National Movement (1885-1905) their protests were against local moneylenders, British Forest policies like encroachment on land, forest use restriction. These struggles remained localized in nature. In the Extremist phase (1905-1919) tribals increasingly challenged colonial forest policies. Despite this growing intensity, in this phase tribal movement remained fragmented because of lacking unifying political ideology. A transformation occurred in the Gandhian phase (1920-1947) when Mahatma Gandhi introduced new dimension of resistance. This phase marked shift from localized resistance to participation in broader National Movement.it emerged through negotiation, adaptation, and consent shaped by social & cultural contexts. This paper argues that Gandhian influence among tribals societies in Maharashtra can understood through the concept

of Hegemony, interpreted as moral & ideological leadership based consent rather than force. Gandhi's leadership did not rely on force it operated through ethical appeal- Satyagraha. By using hegemony as a historical tool, this study examines how Gandhian ideas were interpreted, communicated and practiced within tribals in Maharashtra.

Importance of tribal societies in Maharashtra:

Maharashtra has one of the largest concentrations of schedule tribes in India. In accordance with 2011 census report the total tribal population in Maharashtra state is 105.10 lakh and state ranks 2nd in the country for the total tribal population.[1] This substantial demographic of Tribal communities are crucial stakeholder in state.

The Panchayat Provisions (Extension to Scheduled Areas) Act 1996, enacted in 10 states of the country according to this act Scheduled areas of Maharashtra included 13 District, 59 Taluka and 6000 Pesa villages in 2895 GramPanchayats.[2]



Scheduled Areas in Maharashtra[3]

Hegemony as Historical Tool:

Hegemony is a multidisciplinary concept used as an analytical tool in History, Political theory, cultural studies and sociology. Hegemony can be effectively used as a historical tool to analyses forms of power and leadership that operate through ideas, consent and moral authority rather than force. According to Antonio Gramsci Hegemony is leadership based on consent, moral Authority and spread of ideas rather than force.[4] Mahatma Gandhi's leadership fits in this idea.

Gandhian Hegemony and Tribes in Maharashtra (District based):

1. Leadership through consent: Gandhian Hegemony:

In the context of the Indian Freedom Movement, Gandhian ideas exemplify hegemonic leadership. Gandhi did not rely on force to mobilize people. Instead his leadership rested on moral principles such as Ahimsa, Satya, Self-reliance and social reform. Through practices like Constructive Programme, Satyagraha, and Promoting self-reliance- Khadi and prohibition campaign Gandhi created a framework that encouraged social participation.

Gandhi's **Constructive programme** and Tribes in Maharashtra: According to Mahatma Gandhi the constructive programme aimed to achieve Swaraj by transforming society through village based non- violent work. From a Gramscian perspective this programme is form of Hegemony. In his discussion of tribal societies, Mahatma Gandhi clarifies that the term Adivasi-Raniparaj derived from Kaliparaj was used for local tribal population coined by Shri Jugatram while the term Adivasis- Original inhabitants was popularized by Thakkar Bapa to refer the communities like Bhil, Gond, hills tribes. Gandhi included the service of Adivasis as a crucial component of the Constructive Programme. He argued that India's vast diversity made national unity impossible unless every social unit developed a living consciousness of belonging to a single nation. He cited the pioneer work of Jugatram Dave, Thakkar Bapa, Balasaheb Kher-President of Adivasi Seva Mandal 1940.[5] In Gramscian concept, Gandhi's treatment of

Adivasi reflecs intellectual and moral leadership, not by force. By redefining Tribals through term like Adivasi, Gandhi reshaped social consciousness. He tried to integrated marginal groups into a broader nationalist view. This is a classic case of Hegemonic leadership through consent.

Mahatma Gandhi argued that the wellbeing of each individual is inseparable from the welfare for all. Expressing this principle as both moral frameworks for equitable society.[6] In the tribal context, philosophy of **Sarvodaya** that is the upliftment of all, thus concept often used as **Antyodaya** emphasizing the rise of last and marginalized section of society.

From a Gramscian perspective, Gandhi's concept of **Sarvodaya** represented to build hegemony through moral persuasion. Within tribal society, Antyodaya provide ethical principle into a locally intelligible framework that allows marginal communities to engage with national movement through moral consent rather than coercion.

According to Vinay Kumar Shrivastava – the director of anthropological survey of India, Kolkata. He argued that Gandhi was influenced by self-reliance of tribals. He adopted the concept of Swaraj & Khadi by the influence of the tribals self-reliance.[7] Viewed through the lens of hegemony Gandhi drawn the element of self-reliance from Tribals life, rather than imposing ideas upon tribals.

2. Local tribal leaders and volunteers as an ideology carriers:

Gandhian leadership was not based on formal political authority like colonial rule, which dependent on laws, police, and coercion. While Gandhi insistence on Satya-Truth and Ahimsa-Non Violence create trust among marginalized communities that is tribal societies. This moral credibility encouraged voluntary participation rather than forcefully obedience. Evidence from the Civil Disobedience Movement in Maharashtra reflects that Gandhian leadership Functioned through local intermediaries. Meetings conducted across districts were addressed by regional leaders and volunteers who propagated Gandhian ideas. During April to September 1930 extensive nationalist mobilization was reported in several districts.[8] But here I use only districts where tribal population is concentrated.

Eg. In **West Khandesh**, on 29 March 1930 a meeting was held at Shirpur under the presidentship of Shankar Parashram Joshi. The meeting was attended by approximately 250-300 people. Speakers such as Shankar Vinayak Thakar from Mukhi in Shindkheda taluka and Balkisan Lakmidas Mehta-Balubhai from Nandurbar advocated khadi, opposition to the salt tax, participation in Gandhian civil disobedience movement. This indicating consent based mass mobilization rather than force.[9]

In **East Khandesh**, 8 meetings were conducted, on 30 may 1930 attendance figures including around 1000 participant at Jalgaon and approx.. 800 at Erandol.[10]

In the **Nashik** district, a total of 9 nationalist meetings were reported during 1930, 4 meetings held in Nashik itself. The largest gathering recorded on 6 April 1930 attracted an audience of approx... 2000 participants.[11] In **Nasik** district 12 meeting were organized. 3 meetings at Satana recorded people attendance are 500, and 2 meetings at Yeola drew audiences of approx.. 1500 and 800, in this meeting held on 23 May was linked with forest satyagrahas at Sangamner and the demand for Swaraj.[12]

On 31 March 1939, 47 satyagrahis from Pusad participated in a Satyagraha at Kothala in the Hadgaon Police Station area of **Nanded** District. And 2nd Satyagraha on 14 April 1939, when 77 satyagrahis from Pusad again offered protest at the same location.[13]

This examples indicating wide diffusion of Gandhian Ideology. The district wise evidences reflect the operation of Gandhian hegemony through mass consent and decentralized leadership. Large Voluntary gathering, meetings and active involvement of locals especially in tribal districts of Maharashtra.

3. Voluntary Discipline as a tool of consent: khadi, satyagrahas, prohibiting liquor:

Practices such as Khadi- self-reliance, participating nonviolent protest that is Satyagrahas and Picketing liquor, Tribal Participation in such practices reflects a conscious acceptance of Gandhian ethical principles and ideals rather than obedience to imposed authority.

The practice of liquor picketing & appeals to toddy contractors reflect attempts to transform behavior through ethical principles instead of force.

In **Palghar** Chholalal Ramdas Shroff has taken part in picketing liquor during Civil Disobedience movement. At Nargol, in Dahanu Taluka, a meeting was held under the M.M. Karbhai, in this meeting approx.. 125 persons were present. During the meeting, toddy contractor were advised to abstain from participating in Government auctions. Report indicate that futgudi tribal groups and various castes were specially invited to take an active interest in the national movement.[14] this evidence indicate that local leaders and volunteers acted as intermediaries in Gandhian idea at grassroots level.

M.S. Ane was actively engaged in organizing Forest Satyagraha as a form of peaceful protest against forest laws in the **Yeotmal** district, and gives the Government a 15 days' notice before the campaign. This advance notice reflected the Gandhian ideas of Ahimsa-Nonviolence. It shows exercise of moral authority rather than forceful challenge.[15]

On 2 May 1930, a public meeting held in **Chanda**[#] under Khushalchand and the principal speaker was Nilkanthrao Deshmukh of Viral in Wardha district. He criticized the audience for continued use of foreign cloth and seeking redress from colonial officials. He argued the public to place complete trust in Mahatma Gandhi. Indicates Gandhian moral leadership functioned as a hegemonic force within the National movement. Khushalchand outlined a strategic reorientation of national activity from urban centers towards in the village. Underlining the importance of rural areas in broadening the movement's social base. He noted the shortage of volunteers in the district and appeal for greater participation in the nationalist cause.[16] In tribal regions of Maharashtra, national volunteers operated as 'organic intellectuals'* by interpreting Gandhian principles through meetings, silent protest, Satyagraha etc.

Conclusion:

The finding shows that Gandhian volunteers, constructive workers and local leaders functioned as organic intellectuals who spread nationalist ideas of Gandhi such as Nonviolence-Ahimsa, Sarvodaya, Antyodaya, and self-reliance. Through village meetings, prohibition campaigns, Khadi promotion and constructive programme, these actors imparted nationalist value within tribal communities. Folk songs and local participation reveal how tribals got influenced by Gandhian ideas. Reflecting active adaptation rather than passive reception.

By emphasizing tribal engagement with broader struggle for ideological leadership this paper challenges interpretation that shows that tribal participation is episodic and externally driven. It highlights the emergence of a shared ethical framework that link tribals with national movement. This study provides more nuanced

understanding of tribal participation in national movement through hegemony.

Ultimately, the Gandhian encounters with tribal Maharashtra shows how nationalism could operate as an ethical process, where the political mobilization of tribal communities was sustained through moral legitimacy. This perspective enriches the historiography of the freedom movement and offers a valuable framework for rethinking the relationship between **nationalism**, **subaltern societies** such as tribal communities and **hegemony** in colonial India.

References:

1. Government of Maharashtra. *Annual Report on the Administration of Scheduled Areas in Maharashtra State for the Year 2016–17*. Mumbai: Government of Maharashtra, 2017. Pg. 9
2. Government of Maharashtra. Rural Development and Panchayat Raj Department. *"Homepage."* Last updated February 06, 2026. Accessed February 26, 2026. https://rdd.maharashtra.gov.in/en/.
3. Paintmaps.com. *"Maharashtra Map Chart Maker."* Accessed February 26, 2026. https://paintmaps.com/map-charts/254c/Maharashtra-map-chart.
4. Gramsci, Antonio. *Selections from the Prison Notebooks*. Edited by Quintin Hoare and translated by Geoffrey Nowell Smith. New York: International Publishers, 1992. Pg 245-246
5. Gandhi, M. K. *Constructive Programme: Its Meaning and Place*. Ahmedabad: Navajivan Publishing House, 1945. Pg.30
6. Gandhi, M. K. *The Selected Works of Mahatma Gandhi. Vol. 5, The Voice of Truth*. Translated by Valji Govindji Desai. Edited by Shriman Narayan. Ahmedabad: Navajivan Publishing House, 1968. Pg.350
7. Shrivastava, Vinay Kumar. "Mahatma Gandhi Was Influenced by Tribal Self-Reliance." *The Indian Express*, September 26, 2020.
8. *Source Material for the History of the Freedom Movement in India*. Vol. 11, *Civil Disobedience Movement (April–September 1930)*. Edited by K. K. Chaudhari. Mumbai: Gazetteers Department, Government of Maharashtra, 1990. Pg.572
9. Ibid., Pg.585.
10. Ibid., Pg.685.
11. Ibid., Pg.597.
12. Ibid., Pg.685.
13. Ibid., Pg.421.
14. Ibid., Pg. 525.
15. Ibid., Pg. 951.
16. Ibid., Pg. 909.

Endnote:

1. * Organic Intellectuals - Antonio Gramsci defines "organic intellectuals" as individuals, leaders, activist who came from specific social groups and they organize, spread, give direction to ideas in society. See Antonio Gramsci, *Selections from the Prison Notebooks*, ed. Quintin Hoare and trans. Geoffrey Nowell Smith (New York: International Publishers, 1992), Pg. 15-16
2. # Chanda means today's Chandrapur District

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

भारतीय टपाल विभाग: आधुनिक काळातील स्थान व गरज

श्री. ब्रह्मदेव विठ्ठल शिंदे

संशोधक विद्यार्थी, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर

पत्ता – मु. पो. रोपळे बु. ता. पंढरपूर, जि. सोलापूर, पिन ४१३३०४

Corresponding Author - श्री. ब्रह्मदेव विठ्ठल शिंदे

DOI - 10.5281/zenodo.19723858

सारांश:

भारतीय टपाल विभाग हा देशातील सर्वात जुना आणि व्यापक सार्वजनिक सेवा विभाग असून आधुनिक काळातही त्याचे महत्त्व अबाधित राहिले आहे. १८५४ मध्ये स्थापन झालेल्या भारतीय टपाल विभागाने पारंपरिक पत्रवहन सेवेपासून सुरुवात करून आज आर्थिक, डिजिटल आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात व्यापक विस्तार साधला आहे. हा विभाग संचार मंत्रालय अंतर्गत कार्यरत असून देशातील ग्रामीण व दुर्गम भागात सेवा पोहोचवणारी सर्वात मोठी यंत्रणा आहे.

सदर संशोधनाचा उद्देश आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात भारतीय टपाल विभागाची गरज, उपयुक्तता आणि बदलत्या परिस्थितीत त्याचे योगदान यांचा अभ्यास करणे हा आहे. ई-मेल, मोबाईल आणि खाजगी कुरिअर सेवांच्या वाढत्या वापरामुळे पारंपरिक पत्रव्यवहारात घट झाली असली तरी टपाल विभागाने स्वतःला आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेतले आहे. टपाल वितरण व बचत बँक सेवा आधुनिक प्रणालीद्वारे चालविल्या जातात. India Post Payments Bank मार्फत वित्तीय समावेशन, तसेच Digital India उपक्रमांतर्गत डिजिटल सेवा, ऑनलाइन ट्रॅकिंग, कोर बँकिंग आणि ई-कॉमर्स वितरण यांमुळे विभागाने नव्या युगात आपले स्थान मजबूत केले आहे.

प्रस्तावना:

भारतातील सार्वजनिक सेवा व्यवस्थेत टपाल विभागाला अत्यंत मानाचे स्थान आहे. भारतीय टपाल विभागाने देशाच्या प्रशासकीय, सामाजिक आणि आर्थिक घडामोडींमध्ये सातत्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. हा विभाग संचार मंत्रालय अंतर्गत कार्यरत असून जगातील सर्वात विस्तृत टपाल जाळ्यांपैकी एक मानला जातो. पूर्वी टपाल विभागाची ओळख मुख्यतः पत्रे, मनीऑर्डर आणि पार्सल सेवा यापुरती मर्यादित होती; परंतु आधुनिक काळात त्याने आपल्या कार्यक्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार केला आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे ई-मेल, सोशल मीडिया आणि खाजगी कुरिअर सेवांचा वापर वाढला असला तरी भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशात सर्वांपर्यंत समान सेवा पोहोचविण्याचे कार्य आजही टपाल विभाग प्रभावीपणे पार पाडत आहे.

आधुनिक डिजिटल युगातही भारतीय टपाल विभागाची गरज संपलेली नसून, उलट बदलत्या परिस्थितीनुसार त्याचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. प्रस्तुत संशोधनात या विभागाच्या आधुनिक काळातील गरजेचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

१. भारतीय टपाल व्यवस्थेचा ऐतिहासिक वाटचाल:

प्राचीन काळी राजे राज्यांमध्ये आदेश पोहोचवण्यासाठी धावपटू, संदेशवाहक आणि अगदी

कबुतरांवर अवलंबून असत. संघटित संप्रेषण नेटवर्कची कल्पना अर्थशास्त्रासारख्या सुरुवातीच्या ग्रंथांमध्ये आढळते, जिथे संदेश पोहोचवणे शासनाचे एक महत्त्वाचे कार्य मानले जात असे. सुरुवातीला संप्रेषण मंद होते आणि मुख्यत्वे शासक आणि व्यापाऱ्यांपुरते मर्यादित होते, परंतु राज्य-नेतृत्वाखालील नेटवर्कची मूलभूत संकल्पना प्रस्थापित झाली.

१६ व्या शतकात शेरशाह सूरीच्या कारकिर्दीत एक मोठे परिवर्तन घडले. जरी डाकचौकी अलाउद्दीन खिलजीसारख्या शासकांनी आधी सुरू केले असले तरी, शेरशाह सूरी यांनी ही व्यवस्था परिपूर्ण केली. ग्रँड ट्रंक रोडसह या डाकचौकीचे एकत्रीकरण करून, त्यांनी भारतातील पहिली संरचित "एक्सप्रेस सेवा" तयार केली. घोडेस्वार आणि धावपटू माहितीच्या सतत प्रवाहाद्वारे प्रभावी प्रशासन आणि प्रशासनाची सातत्य सुनिश्चित करून मोठ्या अंतरावर जलद संदेश पाठवू शकत होते. ब्रिटीश राजवटीने एक निर्णायक बदल घडवून आणला, टपाल व्यवस्थेचे एका शाही साधनातून सार्वजनिक उपयोगात रूपांतर केले. १८५२ मध्ये, सिंध प्रदेशात सिंध डाक सुरू करण्यात आला, जो केवळ भारतातच नव्हे तर आशियातील पहिला चिपकणारा टपाल तिकिट बनला. त्यानंतर १८५४ चा ऐतिहासिक भारतीय टपाल कार्यालय कायदा लागू करण्यात आला, ज्याने टपाल कार्यालयाला एक राष्ट्रीय विभाग म्हणून स्थापित केले आणि संपूर्ण उपखंडात एकसमान टपाल दर लागू केले. पहिल्यांदाच, पत्रे आणि पोस्टकार्ड परवडणारे बनले, ज्यामुळे सामान्य नागरिकांना शहरांना सर्वात दुर्गम गावांशी जोडता आले.

१९४७ मध्ये स्वातंत्र्यानंतर, टपाल व्यवस्थेने राष्ट्र उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावली. नवीन सरकारने माजी रियासतांमधील टपाल सेवा एकत्रित केल्या आणि ग्रामीण विस्तारावर जोरदार भर दिला. टपाल कार्यालय विश्वास आणि स्थिरतेचे प्रतीक म्हणून उदयास आले; दुर्गम भागातील लाखो लोकांसाठी, पोस्टमन हा सरकारचा सर्वात दृश्यमान आणि विश्वासार्ह प्रतिनिधी बनला. त्यानंतरच्या दशकांमध्ये, वाढत्या राष्ट्राच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी ही प्रणाली विकसित झाली. १५ ऑगस्ट १९७२ रोजी पोस्टल इंडेक्स नंबर (पिन) प्रणाली सुरू करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला, ज्याने भाषिक विविधता आणि समान ठिकाणांच्या नावांनी चिन्हांकित देशात मेल सॉर्टिंग सुलभ केले. १९८६ मध्ये स्पीड पोस्ट सुरु झाल्यानंतर आधुनिकीकरण चालू राहिले. मेल डिलिव्हरी पलीकडे, पोस्ट ऑफिस बचत योजना, मनी ऑर्डर आणि पोस्टल लाइफ इन्शुरन्सद्वारे महत्त्वाच्या वित्तीय संस्थांमध्ये विस्तारले, जे ग्रामीण आणि अर्ध-शहरी समुदायांसाठी बहुतेकदा एकमेव प्रवेशयोग्य "बँक" म्हणून काम करत होते. भारत २१ व्या शतकात प्रवेश करत असताना, पोस्टल सिस्टमने तंत्रज्ञानाद्वारे स्वतःला पुन्हा शोधून काढले. इंडिया पोस्ट अंतर्गत, नेटवर्कमध्ये व्यापक संगणकीकरण आणि कोअर बँकिंग सोल्यूशन्सचा अवलंब करण्यात आला. आज, देशाच्या सर्वात दूरच्या कोपऱ्यात भौतिक टपाल पोहोचवत असताना, टपाल प्रणाली डिजिटल अर्थव्यवस्थेला ई-कॉमर्स लॉजिस्टिक्स, आधार सेवा आणि थेट लाभ हस्तांतरण (DBT) हाताळण्यास समर्थन देते.

अनवाणी पायांच्या संदेशवाहकांपासून ते एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्मपर्यंत भारताच्या टपाल प्रणालीची कहाणी सहनशक्ती आणि अनुकूलतेची आहे. ती राष्ट्रासोबत शांतपणे विकसित झाली आहे, हे सिद्ध करते की इन्स्टंट मेसेजिंगच्या युगातही, चांगल्या प्रकारे पोहोचवलेले पत्र अजूनही इतिहास आणि मानवी संबंधाचे वजन वाहते.



२३ जानेवारी २०२६ रोजी भारताचे मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी केरळ राज्यातील तिरुवनंतपुरम येथे अत्याधुनिक पूजाप्पुरा मुख्य टपाल कार्यालयाचे उद्घाटन केले. ही आधुनिक सुविधा सुधारित पायाभूत व्यवस्था, उन्नत डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि नागरिकांसाठी विस्तारित सेवा वितरण यांच्या माध्यमातून नागरिक-केंद्रित सेवांच्या दृष्टीकोनाला साकार करते.
या उद्घाटनामुळे दक्षिण भारतातील टपाल सेवांचे बळकटीकरण करण्याबाबत इंडिया पोस्टची बांधिलकी अधोरेखित होते, तसेच आर्थिक समावेशन, डिजिटल सक्षमीकरण आणि अखंडित लॉजिस्टिक्स या सरकारच्या प्राधान्य उद्दिष्टांना पाठबळ मिळते.

प्रतिमा क्र.१ स्त्रोत – भारतीय टपाल विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरून

२. भारतीय टपाल विभागाच्या विविध सेवा :

भारतीय टपाल विभाग सुमारे एकून १६४९९९ टपाल कार्यालयाद्वारे खालील सेवा देण्याचे महत्वपूर्ण कार्य करते.

अ) टपाल (Mail) सेवा:

- साधी पत्रे (Ordinary Mail) – दैनंदिन पत्रव्यवहारासाठी.
- रजिस्टर पोस्ट (Registered Post) – पावतीसह सुरक्षित पत्र.
- स्पीड पोस्ट (Speed Post) – देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय जलद टपाल वितरण.
- ई-पोस्ट (e-Post) – डिजिटल संदेश छापून भौतिक स्वरूपात पोहोचवणे.
- फिलाटेली (Philately) – टपाल तिकिटांचे प्रकाशन व संग्रह सेवा.

ब) पार्सल व लॉजिस्टिक्स सेवा:

- पार्सल पोस्ट – देशांतर्गत वस्तू पाठविणे.
- एक्सप्रेस पार्सल पोस्ट – वेगवान वितरण.
- लॉजिस्टिक्स पोस्ट – मोठ्या प्रमाणातील मालवाहतूक.
- आंतरराष्ट्रीय पार्सल सेवा – परदेशात वस्तू पाठविण्याची सुविधा.
- ई-कॉमर्स डिलिव्हरी – ऑनलाइन खरेदी वस्तूंचे अंतिम टप्प्यातील वितरण (Last-Mile Delivery).

क) वित्तीय (Financial) सेवा:

(I) टपाल बचत योजना

- पोस्ट ऑफिस बचत खाते
- आवर्ती ठेव योजना
- मुदत ठेव (Time Deposit)
- राष्ट्रीय बचत पत्र (NSC)
- सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (PPF)
- सुकन्या समृद्धी योजना
- किसान विकास पत्र
- जेष्ठ नागरिक बचत खाते.

SAVINGS BANK SCHEME: PROFILE (AS ON 31.03.2025)		
Name of the Schemes	Number of Accounts	Outstanding Balances upto March Supp-III (₹ in crore)
Savings Accounts (including MGNREGA with balance)	7,93,87,869	2,12,331.70
RD Accounts	13,09,22,127	2,06,307.15
TD Accounts	2,58,36,610	3,38,531.04
MIS Accounts	91,26,726	285629.52
PPF Accounts	50,38,989	1,62,746.82
Sr. Citizens Savings Scheme (SCSS)	42,97,849	2,00,325.85
Sukanya Samridhi Account	3,53,37,939	1,99,001.69
Total	28,99,48,109	16,04,873.77
Savings Certificate*		
NSC VIII	3,96,11,831	1,94,798.06
KVP	3,60,75,330	2,32,726.79
MSSC	35,86,383	28,210.93
Total	7,92,73,544	4,55,735.78
Grand Total	36,92,21,653	20,60,609.55

प्रतिमा क्र.२ स्त्रोत – वार्षिक अहवाल २०२५-२६ भारतीय टपाल विभाग

(II) पोस्टल बँकिंग -India Post Payments Bank (IPPB) मार्फत:

- डिजिटल पेमेंट
- आधार-आधारित व्यवहार
- थेट लाभ हस्तांतरण (DBT)
- मोबाईल बँकिंग सेवा

ड) विमा सेवा:

- पोस्टल लाइफ इन्शुरन्स (PLI) – सरकारी, अर्ध-सरकारी कर्मचारी तसेच पदवी पदविका धारक व्यक्तीसाठी
- रूरल पोस्टल लाइफ इन्शुरन्स (RPLI) – ग्रामीण नागरिकांसाठी विमा योजना.

इ) सरकारी व नागरिक सेवा:


- आधार नोंदणी व अद्ययावत सेवा
- पॅन कार्ड संबंधित सेवा
- पेन्शन वितरण
- निवडणूक साहित्य वितरण
- सरकारी योजना अर्ज स्वीकारणे

ई) डिजिटल सेवा:

- ऑनलाइन ट्रॅकिंग प्रणाली
- कोर बँकिंग सोल्यूशन
- मोबाइल ॲपद्वारे सेवा
- QR कोड आधारित पेमेंट
- ई-फिलाटेली पोर्टल

उ) आंतरराष्ट्रीय सेवा:

- आंतरराष्ट्रीय स्पीड पोस्ट (EMS)
- परदेशी मनी ट्रान्सफर सुविधा
- आयात-निर्यात संबंधित टपाल सेवा



प्रतिमा क्र.३ स्त्रोत – वार्षिक अहवाल २०२५-२६ भारतीय टपाल विभाग

३. टपाल विभागाची भारतातील मुलभूत भूमिका:

भारतीय टपाल विभागची एकूण १,६४,९९९ टपाल कार्यालये असून, भारतीय टपाल खाते ग्रामीण भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. भारतातील सुमारे ६५–७० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. वरील प्रतिमा क्र.३ मध्ये भारतीय टपाल विभागाचा विस्तार दिसतो. प्रत्येक गावांमध्ये बँकिंग सुविधा, एटीएम, इंटरनेट किंवा खाजगी कुरिअर सेवा सहज उपलब्ध करून देण्याचे कार्य हा विभाग करतो. टपाल विभाग हेच शासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील प्रभावी दुवा ठरतो.

४. संपर्क व संवादाचे साधन:

भागात टपाल सेवा ही पारंपरिक आणि विश्वासार्ह संपर्कव्यवस्था आहे. अधिकृत पत्रव्यवहार, खाजगी पत्रव्यवहार, शैक्षणिक कागदपत्रे, न्यायालयीन नोटिसा, सरकारी योजना संदर्भातील पत्रे या सर्व गोष्टी सुरक्षितपणे पोहोचवण्याचे कार्य टपाल विभाग करतो. अनेक दुर्गम भागात पोस्टमन हा माहितीचा मुख्य स्रोत असतो. आधुनिक काळात जलद व सुलभ टपाल वितारणासाठी ड्रोन व एलेक्ट्रीकल मोटारसायकल इ साधनाचा वापर केला जात आहे.



महाराष्ट्र सर्कलने प्रतिष्ठित मुंबई जनरल पोस्ट ऑफिसमध्ये एका बहुआयामी कार्यक्रमाचे आयोजन केले होते, ज्यामध्ये पर्यावरणपूरक आणि कार्यक्षम शेवटच्या मैलापर्यंत डिलिव्हरी मजबूत करण्यासाठी पोस्टमन कर्मचाऱ्यांसाठी २०० इलेक्ट्रिक वाहनांची अधिकृत रोलआउट करण्यात आली.

प्रतिमा क्र.४, स्त्रोत – भारतीय टपाल विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरून

५. ई-कॉमर्स व बाजारपेठ:


भारतातील सगळ्यात मोठे डिजिटल नेटवर्क असणारे भारतीय टपाल विभाग ई-कॉमर्सच्या वाढत्या युगात टपाल विभाग भारतातील सर्व भागात पत्र व वस्तूंचे अंतिम टप्प्यातील वितरण (Last-Mile Delivery) करतो. तसेच ग्राहकांना ऑनलाइन खरेदीची सुविधा मिळते. टपाल विभागाद्वारे ग्रामीण लघुउद्योजक व स्वयं-सहायता गटांना त्यांच्या उत्पादनांची देशभर विक्री करण्याची संधी मिळते.

६. आर्थिक व वित्तीय समावेशन:

ग्रामीण भारतात बँकिंग सुविधांची कमतरता लक्षात घेता टपाल विभागाने वित्तीय समावेशनात मोठे योगदान दिले आहे. त्यासाठी वर उल्लेख केलेल्या सर्व सेवा ग्रामीण भागात देण्याचे महत्वपूर्ण कार्य भारतीय टपाल विभाग करत आहे. पोस्ट ऑफिस बचत खाते, आवर्ती ठेव, मुदत ठेव, राष्ट्रीय बचत पत्र (NSC), सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (PPF) यांसारख्या योजना ग्रामीण लोकांसाठी सुरक्षित गुंतवणूक पर्याय उपलब्ध करून देतात. पेन्शन वितरण, मनरेगा वेतन, शिष्यवृत्ती रक्कम, अनुदान व सबसिडी इ. विविध शासकीय योजनांचे लाभ पोहोचविण्यात टपाल विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. यामुळे ग्रामीण नागरिकांना शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळतो. तसेच भारतीय टपाल विभाग लाखो कर्मचाऱ्यांना रोजगार उपलब्ध करून देतो. ग्रामीण भागातही पोस्टमन व शाखा पोस्टमास्तर हे महत्त्वाचे रोजगार स्रोत आहेत. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होते आणि स्थानिक पातळीवर आर्थिक स्थैर्य निर्माण होते.

७. इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (आयपीपीबी):

भारत सरकारच्या १००% इक्विटी मालकीच्या टपाल मंत्रालयाच्या टपाल विभागाअंतर्गत स्थापन करण्यात आलेली इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (आयपीपीबी) ही १ सप्टेंबर २०१८ रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केली. स्थापनेपासून आयपीपीबी संपूर्ण भारतात, विशेषतः ग्रामीण आणि वंचित भागात आर्थिक समावेशन वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. व्यापक टपाल नेटवर्कचा वापर करून, बँक बचत आणि चालू खाती, व्हर्च्युअल डेबिट कार्ड, देशांतर्गत पैसे हस्तांतरण, बिल आणि उपयुक्तता पेमेंट, विमा सेवा आणि बरेच काही यासह विविध सेवा देते. आतापर्यंतच्या प्रवासादरम्यान, आयपीपीबीने ११ कोटींहून अधिक ग्राहक मिळवले आहेत, जे देशाच्या आर्थिक परिदृश्यावर महत्त्वपूर्ण परिणाम दर्शवते. ६५० बँकिंग आउटलेट्स आणि १.६४ लाखांहून अधिक टपाल कार्यालयासह मजबूत नेटवर्क, आयपीपीबी सरकारच्या आर्थिक समावेशन उद्दिष्टांना पाठिंबा देत, प्रत्येक नागरिकाच्या दाराशी बँकिंग सेवा पोहोचवत आहे. आधार-आधारित व्यवहार, मोबाईल बँकिंग आणि थेट लाभ हस्तांतरण (DBT) सुविधा उपलब्ध आहेत. याद्वारे शेतकरी, कामगार, महिला आणि वृद्ध नागरिकांना थेट आर्थिक लाभ मिळतो.



प्रतिमा क्र.५, स्त्रोत - e-PATRIKA, Fifth Edition highlighting important achievements and initiatives of Department of Posts (January 2024 - June 2024) - Published By Department of Posts.

राष्ट्रीय एकात्मता आणि विश्वास व सामाजिक-सांस्कृतिक योगदान:

टपाल तिकिटांद्वारे भारताचा इतिहास, संस्कृती आणि महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव केला जातो. यामुळे राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक जतनाला चालना मिळते. ग्रामीण भागात टपाल विभाग ही केवळ सेवा नसून विश्वासाचे प्रतीक आहे. पोस्टमन हा गावातील विश्वसनीय व्यक्ती मानला जातो. त्यामुळे शासनाविषयी विश्वास आणि राष्ट्रीय एकात्मता बळकट होते. तसेच टपाल विभाग राष्ट्रीय सेवेसाठी, एकसंध राष्ट्रासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावतो.

विमा संरक्षण:

टपाल जीवन विमा (Postal Life Insurance – PLI) योजनेंतर्गत भारतीय टपाल विभाग मार्फत चालवला जाणारा टपाल जीवन विमा (PLI) हा भारतातील सर्वात जुना व विश्वासार्ह सरकारी जीवन विमा उपक्रम आहे. याची सुरुवात १८८४ साली झाली. सुरुवातीला हा विमा फक्त टपाल कर्मचाऱ्यांसाठी होता, नंतर तो इतर सरकारी व अर्ध-सरकारी कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध होता परंतु सध्या सर्व पदवी व पदविका धारकांस खुला करण्यात आला आहे. त्याद्वारे परवडणारा व सुरक्षित जीवन विमा उपलब्ध करून देणे, कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेची हमी, दीर्घकालीन बचत व गुंतवणूक प्रोत्साहन इ. हेतू साध्य होतात. तसेच ग्रामीण नागरिकांसाठी Rural Postal Life Insurance (RPLI) योजना १९९४ साली सुरू करण्यात आली आहे त्यामुळे शेतकरी, स्वयंरोजगारित व्यक्ती व ग्रामीण कुटुंबांना कमी प्रीमियममध्ये विमा संरक्षण मिळते.

नागरिक केंद्रित सेवा:

भारतीय टपाल खाते आपल्या पारंपारिक सेवा जसे की पत्र वितरण, बचत बँक सेवा, विमा सेवा या व्यतिरिक्त अनेक नागरिक केंद्रित सेवा पुरवत आहे, त्यामध्ये प्रामुख्याने आधार सेवा, पासपोर्ट सेवा यांचा समावेश होतो. भारतात एकूण १३३५२ टपाल कार्यालयाद्वारे भारतीय नागरिक आपले नवीन आधार कार्ड काढू शकतो, त्यामध्ये सर्व प्रकारच्या दुरुत्या करू शकतो, तसेच आधार कार्ड अद्ययावत सुद्धा करू शकतो. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण २.९२ कोटी आधार सेवा व्यवहार करण्यात आले. भारतात एकूण ४५२ पोस्ट ऑफिस पासपोर्ट केंद्रांमध्ये नवीन पासपोर्ट काढणे व नुतनीकरण करणे या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सन २०२४-२५ मध्ये एकूण ३९.१५ लाख पासपोर्ट अर्जांची प्रक्रिया पार पडली गेली.

निष्कर्ष:

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात टपाल विभागाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण संपर्क, वित्तीय समावेशन, प्रशासनिक विश्वासार्हता, ई - कॉमर्स, वितरण आणि डिजिटल सेवा या सर्व क्षेत्रामध्ये टपाल विभागाची भूमिका महत्वपूर्ण आहे त्यामुळे आधुनिक काळातही टपाल विभाग अपरिहार्य आहे. ग्रामीण भारताच्या विकासात भारतीय टपाल विभागाची भूमिका बहुआयामी आणि अत्यंत महत्त्वाची आहे .भारतीय टपाल विभाग हा आधुनिक भारताच्या सर्वांगीण विकासातील एक महत्त्वाचा स्तंभ आहे. आधुनिक डिजिटल युगातही हा विभाग बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेत प्रगती करत आहे. त्यामुळे भारतीय टपाल विभागाची गरज आधुनिक काळात अधिकच अधोरेखित होते.

संदर्भ ग्रंथ:

१. भारतीय टपाल विभाग अधिकृत संकेतस्थळ

२. भारतीय टपाल विभाग वार्षिक अहवाल १९९० ते २०२६

३. India Post Payments Bank अधिकृत संकेतस्थळ

४. भारत सरकारचे आर्थिक सर्वेक्षण अहवाल

५. India Post Review Book – 2024 – Published by Department of Posts.

६. Sustainability Of Indian Postal Department with Information and Communication Technology (Ict), संशोधक -Hirenkumar Rameshbhai Patel and Dr. Rajesh M. Patel

७. शोध निबंध - Postal Services in Internet Era: A Study of India Post, संशोधक- Sirisha Tripurani.

८. e-PATRIKA, Fifth Edition highlighting important achievements and initiatives of Department of Posts (January 2024 - June 2024) - Published by Department of Posts.

९. Strategic Plan – Department of Posts – Published by Department of Posts, India

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

इतिहास व मानव एक नवदृष्टीकोन

श्री. ऋषिकेश संतोष जाधव

एम. ए. इतिहास (अपियर) नेट

Corresponding Author - श्री. ऋषिकेश संतोष जाधव

DOI - 10.5281/zenodo.19723870

गोषवारा:

इतिहास शब्द उच्चारला की, डोळ्यासमोर उभा राहतो भूतकाळ आणि भूतकाळाशी संबंधित समजुती, धारणा. मात्र इतिहास हा केवळ भूतकाळाशीच निगडीत असलेली संकल्पना नसून इतिहास ही एक विविधांगी, बहुआयामी संकल्पना आहे. मूलतः इतिहास समजून घेण्यासाठी इतिहासाचा विविधांगी अभ्यास करता येणे आवश्यक आहे, त्यासाठी इतिहासाचे योग्य आकलन होणे गरजेचे असून त्यासाठी विद्यार्थीदशेतच विद्यार्थ्याला या संकल्पनेची योग्य ओळख करून दिल्यास विद्यार्थ्याच्या वैयक्तिक विकासाबरोबरच समाजाचा सर्वांगीण विकास होईल. त्यासोबतच राष्ट्राचे भवितव्य सक्षम हाती येईल. इतिहासाचा प्रभाव, इतिहासाची मानवी जीवनातील आवश्यकता, इतिहासातील नवीन बदल यांचा सखोल अभ्यास करून इतिहासाकडे जीवनोपयोगी शास्त्र म्हणून पाहण्याची दृष्टी विकसित करण्याचे कार्य या दृष्टीकोनातून होते. इतिहासाद्वारे होणारा मानवाचा सर्वांगीण विकास, आजच्या काळातील समस्या आणि इतिहासातील कारणे, त्यावरील उपाय यांचा अंतर्भाव इतिहासाच्या नवदृष्टीकोनात करण्यात आला आहे. मानवी जीवनातील इतिहासाचे नितांत महत्व आणि उपयोगिता विशद करण्याचे कार्य हा नवदृष्टीकोन प्रदान करतो.

कीवर्ड: इतिहास, ऐतिहासिक चिंतन, ऐतिहासिक महत्व, मानवी जीवन, प्रभाव, महत्व, विकास.

प्रस्तावना:

इतिहास हा केवळ भूतकाळाशी संबंधित नसून त्रिकालदर्शी संकल्पना आहे. इतिहास भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांना जोडतो. इतिहासाच्या अभ्यासामुळे मानवी अनुभव, सामाजिक प्रगती, समस्यांचे निराकरण समजून घेता येते तसेच भविष्यातील परिणामांचा अंदाज बांधता येतो. समाजातील रूढी, परंपरा, भाषा, सण, खाद्यसंस्कृती व स्थापत्य यांवर इतिहासाचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. त्यामुळे इतिहास व्यक्तिमत्व विकासासाठी महत्त्वपूर्ण घटक ठरतो. बाल्यावस्थेत कथा-उदाहरणांमधून नैतिक मूल्ये रुजवली जातात, युवावस्थेत शौर्यगाथा व आदर्श व्यक्तिमत्व आकर्षित करतात, तर वृद्धावस्थेत बदल स्वीकारण्याची क्षमता इतिहासाच्या आकलनावर अवलंबून असते. इतिहासाचा नवदृष्टीकोन मानवी जीवनातील सतत होत असलेले बदल समजून घेण्यास मदत करतो. आधुनिक तंत्रज्ञानामुळे इतिहासाचा अभ्यास वेगवान व सुलभ झाला आहे. त्याला विज्ञान व कलात्मक दृष्टिकोन दोन्ही स्वरूपात पाहता येते. ऐतिहासिक घटना, व्यक्ती आणि परिणामांचा समग्र अभ्यास विद्यार्थ्यांमध्ये तार्किक विचार, विश्लेषण, निर्णयक्षमता आणि पूर्वग्रह टाळण्याची क्षमता विकसित करतो. पीटर सेइक्सस यांच्या 'द हिस्टॉरिकल थिंकिंग' प्रोजेक्टमुळे ऐतिहासिक साक्षरता वाढण्यास मदत होते. संदर्भ साधने, कारण-परिणाम, सातत्य व बदल यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. डिजिटल माध्यमे व सिम्युलेशन

तंत्रज्ञानामुळे इतिहास शिक्षण अधिक प्रभावी झाले आहे. यातून विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव, नीतिमूल्ये, आदर्श, कौशल्ये आणि नैतिकता प्राप्त होतात. इतिहासाचे विद्रुपीकरण चुकीची माहिती प्रसारित करते, समाजात तणाव निर्माण करते. त्यामुळे ऑनलाइन माहिती प्रसारित करताना पडताळणी व चिकित्सक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे; विभिन्न हेतूंसाठी होणारा इतिहासाचा अपप्रचार प्रतिबंधित करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक ज्ञानाचा उपयोग करून वर्तमानावरील परिणाम समजावता येतो, ज्यामुळे व्यक्तिमत्व, कौशल्य आणि सामाजिक जागरूकता वाढते. इतिहास शिक्षणामुळे संज्ञानात्मक व तार्किक क्षमता वृद्धिंगत होतात. भूतकाळातील चुका टाळून योग्य निर्णय घेऊन आश्वासक भविष्याची पायाभरणी करता येते. समाज, संस्कृती आणि राष्ट्राच्या प्रगतिशील विकासासाठी इतिहासाचा योग्य उपयोग अनिवार्य ठरतो. अशा प्रकारे इतिहास केवळ माहिती पुरवणारा विषय नसून व्यक्तिमत्व, कौशल्ये, नैतिकता आणि समाजविषयक जागरूकता वाढवणारे जीवनोपयोगी शिक्षण आहे.

संशोधन समस्येची उत्पत्ती:

आजच्या काळात समाजमाध्यमांच्यामार्फत युवा पिढी आपली मते मांडत असतात. त्या प्रामुख्याने इतिहासाच्या योग्य आकलनाचा अभाव आढळून येतो, एका साचेबद्ध चौकटीतून इतिहासाकडे पाहिले जात असल्याने इतिहासाचा मानवी जीवनावरील प्रभाव आणि उपयोगिता अभ्यासण्याची गरज भासते. याच निरीक्षणातून या संशोधन समस्येची उत्पत्ती झाली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व:

प्रस्तुत संशोधनादरम्यान विषयाची व्यापकता व प्रभाव प्रकर्षाने जाणवला. इतिहासाचे मानवी जीवनातील महत्त्व, त्याचा प्रभाव, विद्रुपीकरणाचे परिणाम आणि त्यावरील उपाय यांचा सखोल अभ्यास करून अनेक नवीन बाबींचा उलगडा झाला. इतिहासाचा नवदृष्टीकोन, पारंपारिक साचेबद्ध दृष्टिकोनाचा छेद करून, इतिहासाचे मूळ स्वरूप समजून घेण्यास सहाय्यक ठरेल.

संशोधन उद्दिष्ट्ये:

१) मानवी जीवनातील इतिहासाचे महत्त्व व प्रभाव अभ्यासणे.
२) इतिहासाद्वारे विकसित होणारी आवश्यक कौशल्यांचे परीक्षण करणे.
३) इतिहास आणि व्यक्तिमत्व विकास यांच्यातील सहसंबंधांची चिकित्सक तुलना करणे.
४) इतिहासाच्या विद्रुपीकरणाची कारणे, परिणाम समजून घेवून त्यावर उपाय योजणे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन हे विश्लेषणात्मक स्वरूपाचे असून, दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. इतिहास विषयावरील झालेले विविध संशोधने, संशोधन लेख, उपलब्ध ग्रंथ यांचा यामध्ये समावेश आहे. वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मकपद्धतीचा वापर करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

पूर्वसाहित्याचा आढावा:

प्रस्तुत विषयात आतापर्यंत कोणत्याही प्रकारचे संशोधन झालेले नाही. डॉ. बिल नॅसन लिखित 'हिस्ट्री मॅटर्स सिलेक्टेड राईटिंग्स (१९७० ते २०१६)' आणि 'द मिनिंग

अँड रोल ऑफ हिस्ट्री इन ह्युमन डेवलपमेंट' या दुय्यम संदर्भ साधनात मानवाच्या विकासावर इतिहासाचा पडणारा प्रभाव वर्णन करण्यात आला आहे. व्ही. डी. घाटे लिखित 'द टीचिंग ऑफ हिस्ट्री' या दुय्यम संदर्भ साधनात विद्यार्थ्यावरील इतिहासाचा प्रभाव, इतिहासाची आवश्यकता, इतिहासाबद्दलची विविध मते, इतिहासाचा इतर विषयांशी असलेला सहसंबंध, इतिहासाबद्दल असलेले विविध तज्ञ व्यक्तींची मते समाविष्ट आहेत. योहानेस बी. मार आणि गेर्गेई चिब्रा यांचा संशोधन लेख 'विटनेसिंग, रिमेंबरिंग, अँड टेस्टिफायिंग: व्हाय द पास्ट इज स्पेशल फॉर ह्यूमन बीइंग्ज' यामध्ये इतिहासावर मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून झालेले संशोधन आणि त्याचे निष्कर्ष वर्णन करण्यात आले आहेत. प्राध्यापक पीटर सेइक्सस यांच्या 'द हिस्टॉरिकल थिंकिंग प्रोजेक्ट' प्रकल्पात ऐतिहासिक चिंतनाच्या सहा मुलभूत घटकांचे वर्णन केले आहे. मानवावर इतिहासाचा पडणारा प्रभाव, मानवी जीवनातील इतिहासाचे महत्व, इतिहास आणि व्यक्तिमत्व विकास यांवर झालेली विविध संशोधने झाली आहेत. प्रस्तुत संशोधनात इतिहासाची मानवी जीवनातील गरज, महत्व, उपयोगिता यांवर संशोधन करून विद्यार्थीदशेवरील इतिहासाचा प्रभाव आणि परिणाम यांचा अभ्यास करून इतिहासाकडे जीवनउपयोगी शास्त्राच्या दृष्टीकोनातून पाहण्याचा प्रयत्न केला गेला आहे. प्रस्तुत विषयात कोणत्याही प्रकारचे संशोधन झाले नसल्याने जी पोकळी निर्माण झाली होती ती भरून काढण्याचे कार्य मी या संशोधनातून करीत आहे.

इतिहास एक संकल्पना:

इतिहास ही संकल्पना मानवापेक्षाही जुनी मानली जाते. इतिहासाचा उल्लेख होताच युद्ध, हिंसा, रक्तपात किंवा अराजकतेची चित्रे डोळ्यासमोर उभी राहतात; परंतु इतिहासाचे स्वरूप केवळ इतक्यापुरते मर्यादित नाही. मानव आणि समाजाच्या विकासात इतिहासाचा मोलाचा वाटा आहे[१]. मानवी प्रगती शक्य होण्यामागे इतिहासातील अनुभवांचे संचित कारणीभूत आहे. इतिहासाविना मानवी जीवन हे जणू दिशाहीन नौकेसारखे ठरेल. त्यामुळे इतिहास हा मानवासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. दैनंदिन जीवनातही आपण भूतकाळातील अनुभव, परंपरा आणि शिकवणींचा वापर करत असतो[२]. इतिहास ही केवळ भूतकाळाशी संबंधित संकल्पना नसून भूत, वर्तमान आणि भविष्य यांना जोडणारा दुवा आहे; म्हणूनच तो त्रिकालदर्शी मानला जातो.

भूतकाळाच्या अभ्यासातून आपल्याला त्या काळातील समस्या, आव्हाने, निर्णय आणि त्यांचे परिणाम समजतात. योग्य-अयोग्य निर्णयांची किंमत काय मोजावी लागली, दूरदृष्टी असलेल्या किंवा नसलेल्या कृतींचे पडसाद कसे उमटले, याची जाणीव होते. वर्तमानातील समस्या भिन्न असल्या तरी त्यांचे निराकरण करताना इतिहासाचा आधार घ्यावा लागतो. भूतकाळातील अनुभवांच्या आधारे वर्तमानात योग्य उपाययोजना करता येतात. तसेच इतिहासातून मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे भविष्यातील परिणामांचीही कल्पना करता येते. आपल्या आजच्या निवडी आणि निर्णयांचा समाज व जीवनावर काय परिणाम होऊ शकतो, याचा अंदाज इतिहास देतो. अशा रीतीने भूतकाळातील चुका टाळून आणि योग्य निर्णयांचा आदर्श घेऊन आश्वासक भविष्याची पायाभरणी करता येते[३].

समाजजीवनात इतिहासाचा प्रभाव सर्वव्यापी आहे. रूढी-परंपरा, सण-उत्सव, भाषा, खाद्यसंस्कृती, पेहराव, स्थापत्य, व्यापार या सर्वांवर इतिहासाची छाप दिसते. मोठ्या घटनांचे प्रतिबिंब म्हणी, वाक्प्रचार आणि लोकगीतांमध्ये उमटते. नामकरणासारख्या प्रथांमध्येही ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचा प्रभाव जाणवतो. इतिहासातील

प्रतिमेनुसार व्यक्ती वा समुदायांविषयी समाजाची भूमिका घडते.

वैयक्तिक जीवनातही इतिहास महत्त्वाचा असतो. बाल्यावस्थेत कथांद्वारे नीतिमूल्ये आणि आदर्श रुजवले जातात. युवावस्थेत शौर्यगाथा आकर्षित करतात; योग्य समज विकसित झाली तर इतिहासाचे वस्तुनिष्ठ आकलन घडते, अन्यथा मिथकांना बळी पडण्याची शक्यता असते. वृद्धावस्थेत बदल स्वीकारण्याबाबतची भूमिका ही इतिहासाच्या आकलनावर अवलंबून असते. एकूणच, व्यक्ती इतिहासाचे कसे आकलन करते यावरच त्याच्या जीवनातील इतिहासाचा प्रभाव ठरतो[४].

इतिहासाचा नवदृष्टीकोन:

मानवी जीवन सतत परिवर्तनशील आहे. आदिम काळापासून आजपर्यंत मानवाने असंख्य बदल अनुभवले असून या परिवर्तनातूनच त्याचा विकास घडत गेला आहे. आधुनिक शतकात तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे मानवी जीवन वेगाने बदलत आहे. संशोधन, नवकल्पना आणि नवनवीन साधनांमुळे समाजरचना, विचारप्रणाली आणि जीवनपद्धतीत बदल होत आहेत; त्याचा परिणाम इतिहासाच्या अभ्यासावरही दिसून येतो. इतिहास हा अथांग महासागरासारखा आहे. विविध ज्ञानप्रवाह त्यात सतत मिसळत असतात आणि तंत्रज्ञानामुळे या प्रवाहाची गती वाढली आहे. त्यामुळे इतिहासरूपी ज्ञानसंपत्तीचा योग्य वापर व जतन करणे ही सर्वांची जबाबदारी ठरते. अलीकडील संशोधनांमुळे इतिहासाकडे पाहण्याचे नवे दृष्टीकोन उदयास आले असून विविध मतप्रवाह निर्माण झाले आहेत[५].

इतिहास विषय शिक्षणात आवश्यक आहे का? यावरही वाद आहेत. काही संशोधक इतिहासाला युद्ध, हिंसा आणि रक्तपाताने भरलेला विषय मानून तो शिक्षणातून वगळावा असे म्हणतात[६]. "History is bunk?" या प्रश्नार्थक विधानाचा आधार घेतला जातो [७]; परंतु अनेक इतिहासकारांनी इतिहासाचे खरे स्वरूप स्पष्ट करत त्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे. लॉर्ड ॲक्टन यांनी इतिहासाचे ज्ञान हे मुक्ती देणारे असल्याचे प्रतिपादन केले[८]. इतिहास हा व्यक्तीच्या दृष्टीकोन, विचारशैली आणि घटनांच्या अर्थलावणीवर आकार घेतो. प्राचीन काळात मौखिक परंपरा व चित्रांच्या माध्यमातून इतिहास मांडला जात होता; नंतर लेखनरूप आले. काळानुसार साधने, अर्थ आणि पुनर्लेखनाचे स्वरूप बदलत गेले, तरी इतिहास हा भूतकाळातील ज्ञानसंचय म्हणून मानवाच्या विकासासाठी उपयुक्त ठरतो[९].

इतिहास विज्ञान की कला ?,यावरही चर्चा झाल्या आहेत. विज्ञानाप्रमाणे इतिहासात साधनांची चिकित्सक तपासणी करून सत्यता पडताळली जाते; तर कलाशाखेसारखे घटनांचे वर्णनात्मक आणि रसपूर्ण सादरीकरण केले जाते. त्यामुळे इतिहासात विज्ञानाची शास्त्रीयता आणि कलेची अभिव्यक्ती दोन्ही आढळतात[१०]; तरी तो प्रामुख्याने कला शाखेत गणला जातो. इतिहास सर्वव्यापी आहे. भाषा, साहित्य, शौर्यगाथा, तसेच आधुनिक तंत्रज्ञान यांतही इतिहास प्रतिबिंबित होतो[११]. भूगोलासारख्या विषयांशी त्याचे घनिष्ठ नाते आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा विविध इतिहासप्रकारांचा एकत्रित अभ्यास केल्याशिवाय इतिहासाचे समग्र आकलन होत नाही[१२].

इतिहास मानवाला ओळख देतो आणि एकत्र आणण्याची किंवा विभाजन घडवण्याची क्षमता राखतो. आधुनिक काळात "ऐतिहासिक चिंतन" या संकल्पनेद्वारे भूत-वर्तमानाचा सखोल विचार करून समस्यांचे विश्लेषण व योग्य निराकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे[१३]. अशा

प्रकारे इतिहास भविष्याला आकार देण्याचे प्रभावी साधन ठरतो.

इतिहासाचे महत्व आणि प्रभाव:

मानवी जीवनात इतिहास अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. मानवता, नैतिकता, समानता, बंधुता आणि एकता यांसारखी मूल्ये इतिहासातूनच विकसित झाली आहेत. समाजाचे नियम आणि बंधने ही भूतकाळातील अनुभवांच्या आधारे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी घडवली गेली; काळानुसार त्यांत बदल होत गेले आणि पुढेही होत राहतील. ही मूल्ये व नियम आपल्याला सामाजिक ओळख देतात[१४]. पूर्वजांनी अनुभवातून मिळवलेले ज्ञान इतिहासाच्या रूपाने पुढील पिढ्यांना दिले आणि त्याच आधारे मानवाचा विकास घडत गेला. इतिहास आपल्याला स्वतःचे स्थान शोधण्यास मदत करतो आणि वर्तमानात आपली ओळख दृढ करण्याची दिशा देतो. व्यक्तीची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक पार्श्वभूमी तसेच विचारपद्धती यांवरून त्याचा इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ठरतो[१५]; आणि त्या आकलनानुसार त्याचे व्यक्तिमत्त्व घडत जाते.

प्रत्येक मानव अद्वितीय असल्याने तो एकप्रकारे जिवंत इतिहासच आहे. समाजातील रूढी, परंपरा, धर्म आणि संस्कृती या इतिहासाचीच प्रतिबिंबे आहेत. शेतीच्या शोधापासून ते आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचे सर्व शोध आपण आज वापरत आहोत; म्हणजेच दैनंदिन जीवनात आपण इतिहासाचाच आधार घेतो. वैयक्तिक अनुभवांमधून घेतलेला बोधही इतिहासाचाच भाग ठरतो. त्यामुळे इतिहास हा न टाळता येणारा घटक आहे[१६].

समाज आणि संस्कृती यांच्या विकासात इतिहासाचा प्रभाव स्पष्ट दिसतो. दोन संस्कृतींच्या संयोगातून नवी संस्कृती निर्माण होते आणि कालानुरूप समाजरचना बदलत जाते. पुरुषप्रधान किंवा स्त्रीप्रधान संस्कृतींची जडणघडणही त्यांच्या ऐतिहासिक आकलनावर अवलंबून असते. सण-उत्सव, प्रथा-परंपरा आणि सामाजिक नियम हे इतिहासाचे दर्पण आहेत. इतिहासाचा अभिमान व्यक्त करताना कधी कधी त्याचे अंधानुकरण किंवा चुकीचे अर्थ लावलेले दिसतात, ज्यातून श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या भावना निर्माण होऊ शकतात. म्हणून इतिहासाचा प्रभाव कितपत आहे यापेक्षा त्याचा उपयोग कसा केला जातो हे अधिक महत्त्वाचे ठरते.

इतिहासाचा वैयक्तिक प्रभावही तितकाच महत्त्वाचा आहे. व्यक्तीच्या बुद्धिमत्ता आणि आकलनशक्तीनुसार इतिहासाचा अर्थ लावला जातो[१७]. इतिहासातून नीतिमूल्ये, आदर्श आणि वैयक्तिक मर्यादा निश्चित केल्या जातात. वंश, जात आणि लिंग यांसारख्या घटकांवरही इतिहासाचा प्रभाव पडतो[१८]. काही इतिहासातून प्रेरणा घेतात, तर काहींवर त्याचे ओझे पडते; काही वेळा तो विद्रोहाची प्रेरणाही देतो. एकूणच, इतिहासाचे योग्य आकलन मानवाला योग्य दिशा देते. विद्यार्थीदशेतच इतिहास समजून घेण्याची क्षमता विकसित झाली, तर मानवी विकासासाठी ती महत्त्वाची पायरी ठरेल.

ऐतिहासिक चिंतन आणि विद्यार्थी:

मानवाच्या जीवनात व्यक्तिमत्व विकास हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे आणि या विकासात शिक्षण प्रणालीचे मोलाचे योगदान असते. शिक्षण केवळ माहिती देण्याची प्रक्रिया नसून ती माहितीचे ज्ञानात रूपांतर करून व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणारी बहुआयामी संकल्पना आहे. विद्यार्थी शिक्षणाद्वारे प्राप्त केलेले ज्ञान आत्मसात करून त्याचा जीवनात उपयोग करतो. इतिहास हा शिक्षण प्रणालीचा अविभाज्य भाग असून त्याचे योग्य आकलन विद्यार्थीदशेतच होणे आवश्यक आहे.

इतिहासाच्या माध्यमातून नैतिकता, मूल्ये, संस्कृती, परंपरा, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक जबाबदारी यांची जाणीव विकसित होते[१९]. त्यामुळे विद्यार्थी समाज, देश आणि कुटुंबाप्रती असलेल्या कर्तव्यांचे योग्य पालन करू शकतो.

इतिहास शिक्षणात 'ऐतिहासिक महत्व' ही संकल्पना अत्यंत मूलभूत मानली जाते. भूतकाळातील कोणत्या घटनांना इतिहासात स्थान द्यायचे, यासाठी काही निकष विचारात घेतले जातात—नवीनता, व्यवहार्यता, स्मरण आणि परिणाम[२०]. एखादी घटना प्रथमच घडलेली असेल, आजच्या काळात उपयुक्त ठरत असेल, समाज तिचे स्मरण कसे करतो आणि तिचे दूरगामी परिणाम काय झाले—या बाबींवर तिचे ऐतिहासिक महत्व ठरते. काळानुरूप महत्व बदलत असल्याने इतिहासलेखनात चिकित्सक दृष्टी आवश्यक ठरते.

१९९० नंतर उत्तर अमेरिका व इंग्लंडमध्ये 'ऐतिहासिक चिंतन' (Historical Thinking) या संकल्पनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. २००६ मध्ये ब्रिटीश कोलंबिया विद्यापीठातील प्राध्यापक पीटर सेइक्सस यांनी सुरू केलेल्या द हिस्टॉरिकल थिंकिंग प्रोजेक्टमुळे या संकल्पनेचा विकास अधिक दृढ झाला. ऐतिहासिक महत्व, प्राथमिक साधने, कारण-परिणाम, सातत्य व बदल, ऐतिहासिक दृष्टीकोन आणि नैतिक परिणाम या सहा घटकांद्वारे विद्यार्थी चिकित्सक ऐतिहासिक साक्षरता प्राप्त करू शकतो[२१]. ऐतिहासिक चिंतन विद्यार्थ्याला पूर्वग्रहातून बाहेर पडण्यास मदत करते. उदाहरणार्थ, मराठा सैनिकांविषयी मनात तयार झालेली पारंपरिक प्रतिमा काळानुसार बदलली होती, हे समजण्यासाठी चिकित्सक दृष्टी आवश्यक आहे. ऐतिहासिक चिंतनामुळे विद्यार्थी चर्चा-विवादात तर्कसंगत मांडणी करू शकतो आणि विविध सामाजिक प्रश्नांचा संदर्भासह चिकित्सक अभ्यास करू शकतो.

संज्ञानात्मक विकासाच्या दृष्टीनेही इतिहासाचे शिक्षण महत्त्वाचे आहे. १९६० च्या दशकात जीन पियाजे यांच्या संज्ञानात्मक विकास सिद्धांताचा इतिहास विषयावर अभ्यास करण्यात आला. संशोधनानुसार विज्ञान व गणिताच्या तुलनेत इतिहासात अमूर्त विचारशैली उशिरा विकसित होते. साधारणपणे १६ ते १८ वर्षांच्या कालखंडात औपचारिक कार्यात्मक स्तरावरील विचारप्रक्रिया दृढ होते[२२]. त्यामुळे इतिहास समजणे विद्यार्थ्यांसाठी काहीसे आव्हानात्मक ठरू शकते. तथापि, योग्य पद्धतीने अध्ययन केल्यास वर्णनात्मक आणि व्याख्यात्मक चिंतन विकसित होऊन तार्किक विश्लेषणाची क्षमता वाढते.

डिजिटल युगात इतिहास शिक्षणाच्या पद्धतीतही बदल झाले आहेत. इंटरनेट आणि गेमिंगच्या प्रसारामुळे सिम्युलेशन व डिजिटल माध्यमांचा वापर वाढला आहे. ऐतिहासिक संदर्भ असलेल्या काही व्हिडिओ गेम्सद्वारे विद्यार्थी भूतकाळातील घटनांचे कारण-परिणाम समजू शकतो आणि निर्णयांच्या परिणामांचा अनुभव घेऊ शकतो. सिम्युलेशन तंत्रामुळे विद्यार्थ्याला ऐतिहासिक भूमिकेत शिरून विचार करण्याची संधी मिळते. मात्र संसाधनांची उपलब्धता आणि अचूक माहितीची गरज ही आव्हाने आहेत.

इतिहास शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी इतिहास खोली, नकाशे, कालरेखा, दृश्य साधने आणि संदर्भ साहित्य यांचा उपयोग करणे उपयुक्त ठरते[२३]. तसेच विद्यार्थ्यांच्या स्तरानुसार मूल्यमापन पद्धती बदलणे आवश्यक आहे. प्राथमिक स्तरावर अनुक्रम व वस्तुनिष्ठ प्रश्न, माध्यमिक स्तरावर विश्लेषणात्मक प्रश्न आणि उच्च स्तरावर निबंध, नकाशा कार्य व संदर्भाधारित अभ्यास अधिक परिणामकारक ठरतो.

इतिहास शिक्षणातून विविध जीवनोपयोगी कौशल्यांचा विकास होतो. वाचन आणि लेखन कौशल्य

परिपक्व होते; पूर्वग्रहाशिवाय मत मांडण्याची सवय लागते. समस्या निराकरण, चिकित्सक चिंतन, निर्णयक्षमता, विश्लेषण आणि व्यवस्थापन कौशल्य विकसित होते. तसेच दृश्य कल्पनाशक्ती आणि नैतिक मूल्यांची जाणीव अधिक दृढ होते. इतिहास ही जणू एक प्रयोगशाळा आहे जिथे भूतकाळातील निर्णयांचे परिणाम अभ्यासून वर्तमानातील कृतीस दिशा मिळते[२४].

एकूणच, इतिहास शिक्षणाचा मुख्य उद्देश केवळ माहिती देणे नसून विद्यार्थ्याला जबाबदार, जागरूक आणि चिंतनशील नागरिक बनवणे हा आहे. व्यक्तिमत्व विकास आणि कौशल्य विकास हे जरी अप्रत्यक्ष परिणाम असले तरी ते मानवाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अत्यावश्यक आहेत.

इतिहास विद्रुपीकरण परिणाम व उपाय:

अनेकदा व्यक्ती वा सत्ताधारी गट स्वतःच्या फायद्यासाठी इतिहास तोडून-मोडून मांडतात; सत्य दडवून द्वेषपूर्ण हेतूने केलेले असे प्रस्तुतीकरण म्हणजे इतिहासाचे विद्रुपीकरण होय. भूतकाळातही याचे दूरगामी परिणाम दिसून आले आहेत. इंटरनेटमुळे माहिती सहज उपलब्ध झाली असली तरी तिची सत्यता पडताळली जात नाही; त्यामुळे चुकीचा इतिहास वेगाने पसरतो. इतिहासतज्ज्ञ एरिक हॉब्सबॉन यांनी नमूद केले आहे की तज्ज्ञांच्या सहभागाविना इतिहास बदलला जात असून समाज त्याला बळी पडतो. तसेच सॅम वेनबेर्ग यांच्या २०१८ च्या संशोधनानुसार युवावर्ग ऑनलाइन माहितीची सत्यता पडताळण्यात अकार्यक्षम आहे. डेनिस शेमिल्ट यांच्या अभ्यासातून मिथकीय व आंशिक इतिहास धार्मिक व राष्ट्रीय वैर वाढवतो, जुने संघर्ष पुनर्जीवित करतो, असे आढळलेले आहे[२५].

राजकीय सत्तांकडून अनुकूल इतिहासाचा प्रचार, ऐतिहासिक प्रतीकांप्रती विध्वंसक कृती, आंशिक सत्यकथन यांमुळे सामाजिक तणाव वाढू शकतो. विद्यार्थ्यांमध्येही विद्रोही भावना निर्माण होण्याचा धोका असतो. त्यामुळे कोणतीही माहिती प्रसारित करण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, अपप्रचाराविरोधात तक्रार करणे आणि चिकित्सक दृष्टीकोन ठेवणे आवश्यक आहे. इतिहासाचे योग्य आकलनच समाज व राष्ट्राच्या आरोग्यासाठी हितकारक ठरते.

निष्कर्ष:

इतिहास हा मानव जीवनातील एक अविभाज्य घटक असून तो केवळ भूतकाळातील घटना आणि व्यक्तींविषयीची केवळ माहिती न देता तो मानवाच्या व्यक्तिमत्व विकास, सामाजिक व सांस्कृतिक उन्नती, तसेच कौशल्ये आणि नैतिक मूल्यांच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. इतिहासाच्या माध्यमातून आपण मानवतेचे, नैतिकतेचे, बंधुत्वाचे, समानतेचे आणि एकतेचे मूल्य आत्मसात करतो. समाजाचे नियम, प्रथा-परंपरा, संस्कृती यांची निर्मिती भूतकाळातील अनुभवावर आधारित असून आजही त्यांचा प्रभाव आपल्यावर दिसतो. प्रत्येक व्यक्ती हा स्वतःमध्ये एक जिवंत इतिहास असून त्याच्या भूतकाळातील अनुभवांचा आणि ज्ञानाचा प्रभाव त्याच्या वर्तमान आणि भविष्यावर पडतो.

इतिहास शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ माहिती मिळत नाही, तर त्यांचा संज्ञानात्मक, नैतिक आणि सामाजिक विकासही घडतो. ऐतिहासिक महत्व, ऐतिहासिक चिंतन आणि प्राथमिक साधनांचा अभ्यास विद्यार्थ्यांना तार्किक विचार, विश्लेषण, निर्णयक्षमता, समस्या निराकरण, व्यवस्थापन, वाचन-लेखन कौशल्ये आणि नैतिक मूल्ये विकसित करण्यास मदत करतो.

डिजिटल सिम्युलेशन, गेमिंग आणि सिम्युलेशन तंत्रज्ञानाच्या वापराने इतिहासाच्या शिक्षणात नवदृष्टीकोनाच्या सहाय्याने बदल आणता येतो, ज्यामुळे विद्यार्थी भूतकाळातील परिस्थितीचे वास्तव अनुभवून निर्णयांचे परिणाम समजू शकतात. या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास, कौशल्य विकास आणि जागरूक नागरिक म्हणून उदय होतो.

इतिहासाचे विद्रुपीकरण आणि आंशिक, मिथकीय इतिहासाचा प्रसार आजच्या डिजिटल युगात गंभीर समस्या निर्माण करतो. इंटरनेटवर सहज उपलब्ध होणारी माहितीची अनेकदा सत्यता पडताळली जात नाही, ज्यामुळे युवक वर्ग बहकावला जातो. राजकीय, धार्मिक वा सामाजिक हेतूसाठी केलेला इतिहासाचा अपप्रचार समाजात तणाव निर्माण करतो, विद्रोही भावना वाढवतो आणि राष्ट्राच्या विकासाला आघात पोहोचवतो. या कारणास्तव प्रत्येक व्यक्तीला स्वतःहून इतिहासाची सत्यता पडताळण्याची जबाबदारी घ्यावी लागते.

इतिहासाचा नवदृष्टीकोन, पारंपारिक साचेबद्ध दृष्टिकोनाचा छेद करून, इतिहासाचे मूळ स्वरूप समजून घेण्यास मदत करतो. हा दृष्टिकोन विद्यार्थ्यांना इतिहासातील ज्ञानाचा प्रभावी उपयोग करून भूतकाळातील निर्णयांचे वर्तमानावर होणारे परिणाम समजण्यास आणि आश्वासक भविष्य निर्मितीसाठी उपाययोजना आखण्यास सक्षम करतो. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, व्यक्तिमत्व अधिक प्रगल्भ होते. त्यासोबतच समाजाची सांस्कृतिक, नैतिक व तांत्रिक उन्नती साधता येते.

इतिहासाचा अभ्यास हा केवळ शैक्षणिक विषय नसून तो मानवाच्या मुलभूत मानसिक गरजांपैकी एक मुलभूत गरज आहे. इतिहासामुळे मानवाला आपली ओळख मिळते, सामाजिक बांधिलकीची जाणीव होते. निर्णयक्षम, तर्कशील, नैतिक व जागरूक नागरिक म्हणून तो विकसित होतो. समाजाच्या, संस्कृतीच्या आणि राष्ट्राच्या विकासात इतिहासाचे योगदान अमूल्य आहे. म्हणूनच, इतिहासाचे योग्य आकलन आणि त्याचा विवेकबुद्धीने उपयोग करणे हे केवळ शिक्षणासाठी नव्हे, तर मानवजातीच्या प्रगतीसाठीही अनिवार्य आहे.

सारांशतः, इतिहास केवळ भूतकाळातील घटनेचे संकलन नसून तो एक असे शिक्षण, मार्गदर्शन आणि ज्ञानाचे भांडार आहे ज्यातून व्यक्तीचे व्यक्तिमत्व, कौशल्ये, नैतिकता आणि समाजविषयक जागरूकता विकसित होते. इतिहासाचे विद्रुपीकरण टाळणे, नवदृष्टीकोनातून त्याचे आकलन करणे, आणि डिजिटल व शालेय माध्यमातून इतिहासाचे शिक्षण प्रभावी करणे ही मानवजातीच्या प्रगतिशील भविष्याची हमी आहे.

तळटीपा:

१) मॅक्लीन लोर्ना आर., पेनी क्लार्क, स्टेफान लेव्हेस्क, आणि रूथ सँडवेल. "हिस्टॉरिकल थिंकिंग हिस्टॉरिकल कॉन्शसनेस." *कॅनेडियन जर्नल ऑफ एज्युकेशन* ४०, क्र. १ (मार्च २०१७): १–५.

२) "उपरोक्त."

३) घाटे, व्ही. डी. द *टीचिंग ऑफ हिस्टरी*. ५ एडिशन. कलकत्ता: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९५६. ७.

४) https://historicalthinking.ca/historical-thinking-concepts,
१५ जानेवारी २०२६, सायंकाळी. ७:४३

५) घाटे, व्ही. डी. द *टीचिंग ऑफ हिस्टरी*. ७.

६) "उपरोक्त. २"

७) कॉरफिल्ड, पेनलोप जे. *व्हाय हिस्टरी मॅटर्स*. लंडन: द इन्स्टिट्यूशन ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, २००८.

८) घाटे, व्ही. डी. द *टीचिंग ऑफ हिस्टरी*. २.

९) "उपरोक्त. ४ "

१०) "उपरोक्त., ७-१०."

११) "उपरोक्त., १७५-१७७."

१२) "उपरोक्त., १७५-१७७."

१३) www.historyskills.com/historical-significance-explained,

२१ जानेवारी २०२६, सकाळी १०:१२

१४) घाटे, व्ही. डी. *द टीचिंग ऑफ हिस्टरी*. ५

१५) "उपरोक्त."

१६) ड्रेक, फ्रेडरिक डी. आणि सारा ड्रेक ब्राउन. "अ सिस्टेमॅटिक ॲप्रोच टू इम्प्रूव्ह स्टुडंट्स' हिस्टॉरिकल थिंकिंग." *द हिस्टरी टीचर** ३६, क्र. ४ (ऑगस्ट २००३): ४६५–४८९.

१७) घाटे, व्ही. डी. *द टीचिंग ऑफ हिस्टरी*. २.

१८) **https://historicalthinking.ca/historical-thinking-concepts**,

४ फेब्रुवारी २०२६, दुपारी २:२४

१९) घाटे, व्ही. डी. *द टीचिंग ऑफ हिस्टरी*. ९५

२०) https://historicalthinking.ca/historical-thinking-concepts,

२० जानेवारी २०२६, सकाळी ९:४७

२१) www.historyskills.com/historical-significance-explained,

१८ जानेवारी २०२६, सायंकाळी ६:२३

२२) माहर, योहान्स बी., आणि गेर्गेली सिब्रा. "विटनेसिंग, रिमेंबरिंग, अँड टेस्टीफायिंग: व्हाय द पास्ट इज स्पेशल फॉर ह्यूमन बीइंग्स." *पर्सपेक्टिव्ह्स ऑन सायकॉलॉजिकल सायन्स* १५, क्र. २ (मार्च २०२०): ४२८–४४३

२३) घाटे, व्ही. डी. *द टीचिंग ऑफ हिस्टरी*. १९९-२०१.

२४) झकारिया, मायकेल ए. *"द डेव्हलपमेंट ऑफ हिस्टॉरिकल थिंकिंग: इम्प्लिकेशन्स फॉर द टीचिंग ऑफ हिस्टरी."* *द हिस्टरी टीचर ११, क्र. ३ (मे १९७८): ३२३–३४०*

२५) कॉरफिल्ड, पेनलोप जे. *व्हाय हिस्टरी मॅटर्स*.

संदर्भ साहित्य सूची:

संदर्भ ग्रंथ सूची:

१) कॉर्फिल्ड, पेनलोप जे. *व्हाय हिस्ट्री मॅटर्स*. लंडन: द इन्स्टिट्यूशन ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, २००८.

२) घाटे, व्ही. डी. *द टीचिंग ऑफ हिस्ट्री*. ५ वी आवृत्ती. कलकत्ता: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९५६.

३) नॅसन, बिल. *हिस्ट्री मॅटर्स: सिलेक्टेड रायटिंग्स, १९७०–२०१६*. केप टाउन: पेंग्विन रँडम हाऊस, २०१६.

४) नॅसन, बिल. *द मीनिंग अँड रोल ऑफ हिस्ट्री इन ह्युमन डेव्हलपमेंट*. इन: एन्सायक्लोपीडिया ऑफ लाइफ सपोर्ट सिस्टिम्स (EOLSS). ऑक्सफर्ड: युनेस्को, २००२.

५) मेट्झगर, स्कॉट ॲलन आणि लॉरेन मॅकआर्थर हॅरिस, संपादित. *द वायली इंटरनॅशनल हँडबुक ऑफ हिस्ट्री टीचिंग अँड लर्निंग*. होबोकेन, न्यू जर्सी: वायली-ब्लॅकवेल पब्लिकेशन, २०१८.

६) वाइनबर्ग, सॅम. *हिस्टॉरिकल थिंकिंग अँड अदर अननॅचरल ॲक्ट्स: चार्टिंग द फ्युचर ऑफ टीचिंग द पास्ट*. फिलाडेल्फिया: टेम्पल युनिव्हर्सिटी प्रेस, २००१.

संशोधन लेख सूची:

१) अँड्रयूज, थॉमस आणि फ्लॅनेरी बर्क. "व्हॉट डझ इट मीन टू थिंक हिस्टॉरिकली?" *पर्स्पेक्टिव्ह्ज ऑन हिस्ट्री,* (जानेवारी २००७): ३२–३५.

२) "इम्पॉर्टन्स ऑफ द हिस्ट्री इन लाइफ." Targetstudy.com, (जून २००९).

३) "इम्पॉर्टन्स ऑफ हिस्ट्री." Importancestuff.com, (मे २०१६).

४) गिब्सन, लिंडसे आणि कॅथरीन ड्यूकेट. "हिस्टॉरिकल थिंकिंग: ट्रेंड्स, क्रिटिक्स, अँड फ्युचर डायरेक्शन्स." *करंट ओपिनियन इन सायकॉलॉजी* ६५, (जून २०२५): आर्टिकल १०२०८८.

५) चॅपमन, आर्थर आणि टेरी हेडन. "हिस्ट्री एज्युकेशन इन चेंजिंग अँड चॅलेंजिंग टाइम्स." *हिस्ट्री एज्युकेशन रिसर्च जर्नल* १७, क्र. १ (एप्रिल २०२०): १–३.

६) झॅकारिया, मायकेल ए. "द डेव्हलपमेंट ऑफ हिस्टॉरिकल थिंकिंग: इम्प्लिकेशन्स फॉर द टीचिंग ऑफ हिस्ट्री." द *हिस्ट्री टीचर* ११, क्र. ३ (मे १९७८): ३२३–३४०.

७) "टिप्स टू द स्टुडंट." युनिव्हर्सिटी ऑफ द पीपल, (नोव्हेंबर २०२४).

८) ड्रेक, फ्रेडरिक डी., आणि सारा ड्रेक ब्राउन. "अ सिस्टेमॅटिक अप्रोच टू इम्प्रूव्ह स्टुडंट्स' हिस्टॉरिकल थिंकिंग." द *हिस्ट्री टीचर* ३६, क्र. ४ (ऑगस्ट २००३): ४६५–४८९.

९) पॅक्स्टन, रिचर्ड जे. "अ डेफनिंग सायलन्स: हिस्ट्री टेक्स्टबुक्स अँड द स्टुडंट्स हू रीड देम." *रिव्ह्यू ऑफ एज्युकेशनल रिसर्च* ६९, क्र. ३ (फॉल १९९९): ३१५–३३९.

१०)माहर, जोहॅनेस बी., आणि गर्गेली सिब्रा. "विटनेसिंग, रिमेंबरिंग, अँड टेस्टिफाइंग: व्हाय द पास्ट इज स्पेशल फॉर ह्युमन बीइंग्स." *पर्स्पेक्टिव्ह्ज ऑन सायकॉलॉजिकल सायन्स* १५, क्र. २ (मार्च २०२०): ४२८–४४३.

११)मॅकलीन, लॉर्ना आर., पेनी क्लार्क, स्टीफन लेव्हेस्क, आणि रूथ सँडवेल. "हिस्टॉरिकल थिंकिंग अँड हिस्टॉरिकल कॉन्शसनेस." *कॅनेडियन जर्नल ऑफ एज्युकेशन* ४०, क्र. १ (मार्च २०१७): १–५.

१२)"सिग्निफिकन्स ऑफ द हिस्ट्री." युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया – लॉस एंजेलिस, (मार्च २०२१).

१३)वाइनबर्ग, सॅम. "व्हाय हिस्टॉरिकल थिंकिंग इज नॉट अबाउट हिस्ट्री." *हिस्ट्री न्यूज* ७१, क्र. २ (स्प्रिंग २०१६): १३–१६.

१४)"व्हाय शुड यू स्टडी हिस्ट्री." युनिव्हर्सिटी ऑफ विस्कॉन्सिन–मॅडिसन.

१५)"व्हाय स्टडी हिस्ट्री." अमेरिकन हिस्ट्री असोसिएशन, (जानेवारी १९८८).

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे शिक्षणविषयक विचार

श्री. अवधूत परशराम चव्हाण

संशोधक विद्यार्थी,

इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Corresponding Author - श्री. अवधूत परशराम चव्हाण

DOI - 10.5281/zenodo.19723940

कोणत्याही राष्ट्राचा किंवा राज्याचा सर्वांगीण विकास हा तिथल्या शिक्षण व्यवस्थेवर आणि ती व्यवस्था राबवणाऱ्या नेतृत्वाच्या दूरदृष्टीवर अवलंबून असतो. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर राज्याच्या सर्वांगीण पायाभरणीचे मोठे आव्हान तत्कालीन नेतृत्वासमोर होते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात राज्याचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी पदभार स्वीकारला. शिक्षणमंत्री म्हणून त्यांच्यावर केवळ प्रशासकीय कारभाराची जबाबदारी नव्हती, तर शतकानुशतके अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या बहुजन समाजाला ज्ञानाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची जबाबदारी होती.

बाळासाहेब देसाई यांचे शैक्षणिक विचार केवळ तात्विक पातळीवर मर्यादित नव्हते, तर त्यांना धोरणात्मक आणि प्रशासकीय कृतीची जोड होती. गरिबांसाठी मोफत शिक्षण, तांत्रिक शिक्षणाचा विस्तार, शिक्षकांचा सन्मान आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रनिष्ठा निर्माण करणे ही त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाची चतुःसूत्री होती. या अनुषंगाने त्यांच्या विचारांची चिकित्सा करणे हा या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

कोणत्याही विचारवंताची किंवा नेत्याची जडणघडण ही त्याच्या सभोवतालची परिस्थिती आणि त्याच्यावर झालेल्या वैचारिक संस्कारांवरून ठरत असते. बाळासाहेब देसाई यांच्या शैक्षणिक विचारांची पार्श्वभूमी आणि त्यांच्यावरील वैचारिक प्रभाव पाहता, त्यांच्यावर महाराष्ट्रातील सत्यशोधक आणि प्रबोधन पर्वाचा अत्यंत ठळक प्रभाव होता. ज्ञानाची मक्तेदारी ही केवळ विशिष्ट वर्गापुरती मर्यादित न राहता ती तळागाळातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे, हा महात्मा फुले यांचा विचार बाळासाहेब देसाई यांच्या कृतीचा गाभा होता. *"ज्ञानाशिवाय बहुजन समाजाचा, ग्रामीण भागाचा उद्धार नाही"* हे तत्त्व त्यांनी डोळ्यांसमोर ठेवले.[१] शिक्षणाच्या माध्यमातूनच जातीभेदाची व्याधी बरी होईल आणि समाज एकजीव बनेल, हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा विचार बाळासाहेबांनी आपल्या प्रशासकीय धोरणांतून राबवला.

शिक्षणाद्वारे सर्वांची उन्नती होईल, शिक्षण ही सर्व प्रगतीची किल्ली आहे व त्याद्वारेच सर्वांना समान संधी उपलब्ध करून देता येईल, याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांना मनोमनी झाली होती. म्हणूनच सर्व समाजातील मुलांसाठी शिक्षणाची कवाडे खुली केली व त्यांनी जातीभेद न मानता कोल्हापुरात निरनिराळ्या समाजांसाठी वसतिगृहे

स्थापन केली आणि सर्वांना समान संधी दिली. शिक्षणाद्वारे सर्वांना समान संधी उपलब्ध झाल्यास पिढ्यान्पिढ्या अधोगतीला गेलेला समाज एकजीव व सतेज बनेल, अशी खात्री वाटल्यानेच त्यांनी या शैक्षणिक कार्याचा पुरस्कार केला आणि त्याला विशेष आत्मीयतेने प्रोत्साहन दिले.

राजर्षी शाहू महाराजांच्या याच क्रांतिकारी विचारांचा वारसा बाळासाहेबांवर दिसून येत होता. शाहू महाराजांच्या जन्मशताब्दीनिमित्त लिहिलेल्या एका लेखात बाळासाहेबांनी शाहू महाराजांचे *वर्णन 'समाजवादाची घोषणा करणारा आणि त्याची प्रत्यक्ष कृती करणारा राजा'* असे केले आहे.[२] महाराजांचा शैक्षणिक वारसा पुढे नेण्याचे कार्य बाळासाहेबांनी केले. *"शाहू महाराजांची मीठ-भाकर खाऊन शिकलो नसतो, तर आज गिरणीत असतो,"* हे त्यांचे उद्गार त्यांच्यातील कृतज्ञता आणि शाहूंच्या विचारांशी असलेली त्यांची वैचारिक बांधिलकी याची स्पष्टपणे जाणीव करून देतात.

कोल्हापूर महाराष्ट्रात अनेक बाबतीत आदर्श मानले जाते. येथील लोक विशिष्ट आचार-विचार आणि ध्येय-धोरणांचा वारसा जपतात, आणि ही छत्रपती शाहू महाराजांची देणगी आहे. शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्थांतून अनेक ध्येयवादी तरुण निर्माण झाले, ज्यांनी देशाच्या उन्नती आणि उत्कर्षासाठी प्रयत्न केले. महाराजांनी तत्कालीन तरुण पिढीला जो प्रगतीचा मार्ग दाखवला, त्याच मार्गावरून चालताना बाळासाहेब देसाई यांनी स्वतः गरिबीचे प्रत्यक्ष चटके आणि शिक्षणासाठी करावा लागणारा संघर्ष अनुभवला होता. या संघर्षमय अनुभवाच्या शिदोरीमुळे त्यांच्या विचारांमध्ये एक प्रकारची प्रामाणिक तळमळ होती.

दि. ६ एप्रिल १९५८ रोजी कसबा बावडा येथील राजाराम हायस्कूलच्या स्नेहसंमेलन प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना त्यांची हीच सामाजिक जाणिवेची तळमळ प्रकर्षाने समोर आली. त्या काळात काँग्रेसला 'शेठजी-भटजींचा व भांडवलदारांचा पक्ष' ठरवून तरुणांना भडकवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना उत्तर देताना बाळासाहेब म्हणाले होते की, *"सुमारे १२ लक्ष २० हजार चौरस मैल क्षेत्रफळ असणाऱ्या या भारतात बोटावर मोजण्याइतकेच टाटा-बिर्लांसारखे श्रीमंत लोक आहेत. देशात काही क्षेत्रात नक्कीच विषमता आहे, पण हा देश चैनी करणाऱ्यांचा नाही, तर तो कष्टकरी गरिबांचा आहे,"* हा विचार त्यांनी अत्यंत परिणामकारकरित्या जनतेसमोर मांडला.[३]

स्वराज्य प्राप्तीनंतरही देशात अपेक्षित सुख-समाधान व समृद्धी न आल्याने आजचा तरुण वर्ग रागावला आहे, यामागील मानसशास्त्र त्यांनी अचूक ओळखले होते. ही विषमता दूर करण्यासाठी तरुणांनी अपार कष्ट करावेत आणि भावी पिढीच्या उत्कर्षासाठी त्याग करावा, असे आवाहन त्यांनी केले. याच ध्येयाने प्रेरित होऊन पुढे पाऊल टाकणाऱ्या बाळासाहेबांची ही सखोल सामाजिक जाणीव आणि कष्टकऱ्यांबद्दलची बांधिलकी, यामुळेच त्यांचे शैक्षणिक धोरण हे खऱ्या अर्थाने 'कल्याणकारी राज्याच्या' (Welfare State) संकल्पनेवर आधारलेले होते हे सिद्ध होते.

शिक्षण हे केवळ साक्षरतेचे साधन नसून ते सामाजिक क्रांतीचे आणि संरचनात्मक बदलांचे (Structural Changes) हत्यार आहे, हे ओळखून त्यांनी धर्म, शिक्षण आणि जातीव्यवस्था यासंदर्भात सामाजिक सुधारणांची वैचारिक मांडणी केली. या मांडणीतील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि ई.बी.सी. सवलत होय. स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षण हे प्रामुख्याने मूठभर उच्चवर्णीयांच्या आणि श्रीमंतांच्या हातात एकवटले होते. बाळासाहेबांनी शिक्षणमंत्रीपदाची सूत्रे हाती घेताच एक ऐतिहासिक निर्णय घेतला. ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १२०० रुपयांपेक्षा कमी आहे (E.B.C. -

Economically Backward Class), त्यांच्या पाल्यांना राज्यात सर्वत्र मोफत शिक्षण देण्याची घोषणा त्यांनी केली. *"भारतात अशा तऱ्हेने मोफत शिक्षण देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले."*[४] या निर्णयामुळे अठरापगड जातीतील व शेतकरी वर्गातील लाखो मुले-मुली शिक्षणाच्या प्रवाहात आली. आज लोकशाहीचा काळ आहे, जिथे सर्वसामान्य माणूस आपली दुःखे उघडपणे मांडू शकतो आणि वृत्तपत्रे त्याला वाचा फोडू शकतात. सरकार आडमुठेपणाने वागत असेल, तर जनता आपल्या अधिकारात सरकारकडून काम करून घेऊ शकते. काळ बदलत असून सरकार अधिकाधिक लोकाभिमुख होऊ लागले आहे आणि आगामी पाच-दहा वर्षांत ते पूर्णपणे जनतेचे सरकार होईल, असा ठाम विश्वास बाळासाहेब व्यक्त करत असत.

शिक्षकांच्या मागण्या अवाजवी किंवा अन्याय्य आहेत, असे त्यांचे किंवा महाराष्ट्र सरकारचे अजिबात मत नव्हते. उलट, सरकारने शिक्षणासाठी उचललेल्या पावलांची जाणीव करून देताना त्यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर सरकारने प्राथमिक शिक्षकांचा महागाई भत्ता पाच रुपयांनी वाढवला, ज्यामुळे सरकारचा ६० लाख रुपयांचा खर्च वाढला. तसेच, नवीन महाविद्यालयांना १४ लाख रुपयांचे अनुदान दिले. यातील सर्वात क्रांतिकारी निर्णय म्हणजे, शैक्षणिक फी सवलतीसाठी असलेली उत्पन्नाची अट ९०० रुपयांवरून १,२०० रुपयांपर्यंत वाढवली.

पैशाअभावी कोणाचेही शिक्षण थांबू नये यासाठी घेतलेल्या या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीवर दोन कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडला. मात्र, महाराष्ट्र सरकारने हा मोठा आर्थिक ताण जनतेवर कोणताही नवा कर न लादता स्वीकारला. *"माझे शिक्षक बंधू या गोष्टींचा विचार करत नाहीत का? तो त्यांनी करायला हवा,"* अशी हाक त्यांनी दिली. कोणताही नवा कर न लावता वाढीव खर्चाचा भार उचलण्याच्या या कृतीतूनच त्यांनी हे स्पष्ट केले की, "राज्याची तिजोरी ही मूठभर लोकांच्या हितासाठी नसून, ती सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी वापरायची असते."

इंग्रजी राजवटीत आणि त्यानंतरही 'पब्लिक स्कूल्स' ही केवळ उच्चभ्रू आणि धनदांडग्यांच्या मुलांसाठी राखीव असतात, असा समज होता. बाळासाहेब देसाई यांनी या भांडवलशाही शिक्षण व्यवस्थेला छेद देऊन हुशार विद्यार्थ्यांसाठी 'पब्लिक स्कूल'ची संकल्पना मांडली. समाजात जन्मलेल्या उपजत बुद्धिमत्तेला गरिबीचा शाप लागू नये म्हणून त्यांनी गरिब कुटुंबातील अत्यंत हुशार मुलांसाठी सरकारी खर्चाने 'पब्लिक स्कूल' काढण्याची संकल्पना कोयनानगर येथे अमलात आणली. *"गरीब ब्राह्मणांच्या हुशार मुलांनाही त्यांच्या आवडीप्रमाणे शिक्षण मिळत नाही, ही स्थिती बदलली पाहिजे,"* असा व्यापक आणि जातीनिरपेक्ष विचार त्यांनी मांडला.[५]

शिक्षण हे जातीव्यवस्था निर्मूलन आणि समतावादी दृष्टिकोन रुजवण्याचे प्रमुख साधन आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. २६ फेब्रुवारी १९६४ रोजी इचलकरंजी येथील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, *"धर्मापेक्षा समानतेवर समाज आधारला गेला पाहिजे. यासाठी भारत निधर्मी राष्ट्र बनले पाहिजे. हिंदू-मुस्लिम, स्पृश्य-अस्पृश्य, वर्गकलह, चातुर्वर्ण्य या सर्व गोष्टी त्याज्य मानून वर्गसमन्वयाचा नवा समाज निर्माण करण्याची काळजी आपण घेतली पाहिजे."*[६] शिक्षकांनी जातीजमातीचे उच्छेदन करून लोकशाहीचे रखवालदार निर्माण करावेत, अशी त्यांची अपेक्षा होती.

प्रादेशिक विकासाचे साधन म्हणून 'शिवाजी विद्यापीठाची' स्थापना होणे, हा बाळासाहेब देसाई यांच्या कारकिर्दीतील एक सुवर्णक्षण होता. दक्षिण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी

कोल्हापूरला स्वतंत्र विद्यापीठ असावे, हे छत्रपती राजाराम महाराज आणि राजाराम कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांचे स्वप्न होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी बाळासाहेबांनी सातत्याने पाठपुरावा केला. दिनांक ९ ऑगस्ट १९६१ रोजी कोल्हापूर येथील विद्यापीठाच्या निर्मितीसाठी नेमलेल्या समितीसमोर बोलताना बाळासाहेब देसाई यांनी यासंबंधीचे विविध महत्त्वाचे विषय मांडून आपली भूमिका स्पष्ट केली.

त्यांच्या याच प्रयत्नांना यश येऊन, ३० जानेवारी १९६२ रोजी सचिवालयात कोल्हापूर येथे विद्यापीठ स्थापण्यासंबंधी नेमलेल्या 'तावडे समिती'चा अहवाल तत्कालीन शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.[७] या अहवालाच्या आधारावरच त्यांनी शिक्षणमंत्री या नात्याने विधिमंडळात 'शिवाजी विद्यापीठ कायदा १९६२' संमत करून घेतला.[८] पुढे मंत्रिमंडळात बदल होऊन बाळासाहेब राज्याचे कृषिमंत्री झाले. मात्र, त्यांनी शिक्षणमंत्री असताना केलेल्या अथक कार्याचे आणि पेरलेल्या प्रयत्नांचे यश म्हणजे १८ नोव्हेंबर १९६२ रोजी कोल्हापूर येथे 'शिवाजी विद्यापीठा'च्या स्थापनेच्या रूपाने साकार झाले. आपण शिक्षणमंत्री असताना सुरू केलेल्या या दिव्य कार्याचे फलित आपण कृषिमंत्री म्हणून मंत्रिमंडळात असतानाच पूर्ण झालेले पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले.[९]

हे विद्यापीठ म्हणजे केवळ एक शैक्षणिक संकुल नव्हते, तर ते दक्षिण महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाचे केंद्र ठरावे, अशी त्यांची दूरदृष्टी होती. कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ व्हावेच, ही त्यांची इच्छा ते मंत्रिमंडळात असतानाच पूर्ण झाली. हा एकंदर प्रवास म्हणजे तळागाळातील लोकांपर्यंत आणि बहुजन समाजापर्यंत उच्च शिक्षण पोहोचवण्याप्रति असलेला त्यांचा प्रामाणिक अट्टाहास आणि शिक्षणाप्रती असलेली त्यांची सखोल बांधिलकी स्पष्ट करतो.

बाळासाहेब देसाई यांचा शैक्षणिक दृष्टिकोन केवळ पारंपारिक शिक्षणापुरता मर्यादित नव्हता, तर देशाचा आर्थिक विकास साधायचा असेल तर तांत्रिक आणि लष्करी शिक्षणाचा पुरस्कार केला पाहिजे, हे त्यांनी ओळखले होते. त्यांनी धरण बांधकाम, पाटबंधारे, इलेक्ट्रॉनिक्स यांसारख्या विषयांचे अभ्यासक्रम सुरू केले व कराड, औरंगाबाद, जळगाव येथे पॉलिटेक्निक आणि इंजिनिअरिंग कॉलेजेस सुरू केली.[१०] देशाच्या सीमांवर चीन आणि पाकिस्तानचे वाढते संकट पाहता, तरुणांनी देशरक्षणासाठी तयार राहावे यासाठी एन.सी.सी. सक्तीची करण्याचा प्रयत्न केला. १६ मार्च १९६४ रोजी 'महामुंबई पालिका शिक्षक सभे'तर्फे आयोजित प्राथमिक शिक्षक परिषदेत, *"बाजीप्रभूप्रमाणे स्वतःच्या देहाचा चिखल करणारी पिढी निर्माण करा,"* असे त्यांनी शिक्षकांना केलेले आवाहन त्यांच्यातील प्रखर राष्ट्रवादाचे दर्शन घडवते.[११]

शिक्षण व्यवस्थेचा कणा 'शिक्षक' असतो, हे जाणून त्यांनी शिक्षकांचे स्थान, त्यांचे हक्क आणि जबाबदारीची जाणीव याबाबत ठोस पावले उचलली. शिक्षकांच्या पगारवाढीचा व पेन्शनचा प्रश्न त्यांनी मार्गी लावला आणि उत्कृष्ट शिक्षकांना 'स्टेट अवॉर्ड' देण्याची प्रथा सुरू केली. २८ जानेवारी १९६१ रोजी चिंतामणराव कॉमर्स कॉलेज, सांगली येथील वस्तू प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी केलेल्या अध्यक्षीय भाषणात शिक्षकांच्या भूमिकेबद्दल स्पष्ट व परखड मत मांडताना ते म्हणाले होते, *"स्वातंत्र्यपूर्व काळात, विशेषतः सातारा जिल्ह्यातील शिक्षकांनी उत्तम काम केले आहे. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या राष्ट्रउभारणीच्या काळात शिक्षक काय करत आहेत, हा खरा प्रश्न आहे. मी थोडे स्पष्टच बोलतो, पण आज प्राथमिक शिक्षकाला सरकारच्या योजनांमध्ये स्वतःला अडकवून*

घेण्याची सवय लागली आहे. कलेक्टरकडून निघालेली कोणतीही सरकारी योजना, मग तो 'हरिजन सप्ताह' असो वा 'अल्पबचत योजना' ती थेट शिक्षकावर येऊन धडकते."

शिक्षकांचा वेळ केवळ शिकवण्यासाठीच जावा, यावर त्यांचा कटाक्ष होता. म्हणूनच त्यांनी कडक हुकूम काढला की, "मंत्री किंवा उपमंत्र्यांना पाहायचे असेल, तर शिक्षकांनी मुलांना घेऊन रस्त्यावर उभे राहू नये. मंत्र्यांनीच शाळेत गेले पाहिजे. असा फुकट वेळ जाणे हा राष्ट्रीय तोटा आहे. शिक्षकाला वेठीस धरणे आता थांबले पाहिजे आणि शिक्षकांनीही या फालतू कामांना फाटा दिला पाहिजे.[१२] आधी तुमचे मुख्य काम करा आणि शाळेच्या वेळेनंतर जमले तरच इतर कामे करा." असा धाडसी निर्णय घेऊन त्यांनी शिक्षकांची प्रशासकीय आणि राजकीय बंधनातून मुक्तता केली. मात्र, त्याचवेळी 'शिक्षकांनी केवळ मागण्यांसाठी संप करू नयेत,' असे परखड मतही त्यांनी मांडले. त्यांच्या मते, शिक्षक हा समाजाचा गुरू आहे, कामगार नाही.

इतिहासातील विचारवंतांचे महत्त्व त्यांच्या आजच्या काळातील प्रासंगिकतेवरून ठरते. आज शिक्षणाचे प्रचंड खाजगीकरण आणि व्यापारीकरण झाले असून लाखो रुपयांच्या देणग्या आणि भरमसाठ फी यामुळे सामान्य मुलांसाठी उच्च शिक्षण दुरापास्त झाले आहे. अशा वेळी बाळासाहेब देसाई यांची 'ई.बी.सी. सवलत' आणि 'मोफत पब्लिक स्कूल' ही संकल्पना दीपस्तंभासारखी वाटते. राज्य सरकारने शिक्षणाची जबाबदारी झटकू नये, हे त्यांचे तत्त्व आजही सरकारला आरसा दाखवणारे आहे. याच धोरणाची स्पष्टता २५ जून १९६४ रोजी पुणे येथे बाळासाहेब देसाई यांनी केलेल्या भाषणात दिसून येते. शिक्षणाविषयीची शासनाची जबाबदारी स्पष्ट करताना ते म्हणाले होते की,

"मी शिक्षणमंत्री असतानाच 'मोफत पब्लिक स्कूल' योजनेला मंजुरी देण्यात आली. केवळ घरच्या गरिबीमुळे तैलबुद्धीच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, या उद्देशाने सदर योजना आखण्यात आली आहे. या संकल्पित पब्लिक स्कूलमध्ये निवडक मुलांना प्रवेश दिला जाईल. जेवणखाण, राहणे, पुस्तके, वह्या, फी इत्यादी सर्व गोष्टींबाबत विद्यार्थ्यांना काळजी करावी लागणार नाही; या सर्वांचा खर्च राज्य सरकार करेल." समाजाने गुणवत्तेची कदर का करावी, हे सांगताना ते पुढे म्हणाले, *"समाजातील नेत्यांनी गुणांची पूजा केली पाहिजे, आजच्या समारंभास मी एवढ्यासाठीच आलो आहे. महाराष्ट्राने देशाला विविध क्षेत्रांतील कर्तबगार आणि महान पुरुष दिले, असे आपणास इतिहासावरून दिसून येईल. छत्रपती शिवाजी महाराजांनी लहान वयातच मुघलांविरुद्ध उठाव केला, तर आजच्या बदलत्या परिस्थितीत तरुण वैज्ञानिक प्रा. जयंत नारळीकर यांनी जगाच्या शास्त्रीय ज्ञानात आपल्या संशोधनाने मोलाची भर टाकली आहे."*[१३] बाळासाहेबांनी राबवलेली धोरणे आजच्या शिक्षणव्यवस्थेसाठी आणि नेतृत्वासाठी एक मोठा आदर्श आहेत.

आज आपल्या देशाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०'(NEP-2020) स्वीकारले असून त्यात कौशल्य विकास आणि तांत्रिक शिक्षणावर भर दिला आहे. बाळासाहेब देसाई यांनी १९६० सालीच आय.टी.आय. आणि पॉलिटेक्निकचे जाळे उभारून या धोरणाची पायाभरणी केली होती, हे त्यांच्या विचारांचे समकालीन महत्त्व अधोरेखित करते.

याचबरोबर, विद्यापीठांची स्वायत्तता आणि त्यातील वाढता राजकीय हस्तक्षेप हा आजच्या काळातील एक कळीचा मुद्दा बनला आहे. या पार्श्वभूमीवरही बाळासाहेब देसाई यांचे विचार अत्यंत मार्गदर्शक ठरतात. ९ ऑगस्ट १९६१ रोजी विधानसभेत बोलताना त्यांनी

विद्यापीठांच्या स्वायत्ततेबाबत शासनाचे धोरण अत्यंत स्पष्ट शब्दांत मांडले होते. बाळासाहेबांनी विधिमंडळात स्पष्ट केले होते की, मुंबई, पुणे, मराठवाड्यासारखी विद्यापीठे या कायद्याने निर्माण झालेल्या स्वायत्त संस्था आहेत आणि त्यांच्या दैनंदिन कारभारात सरकारने हस्तक्षेप करणे उचित नाही.[१४] तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या धोरणाचा दाखला देत त्यांनी स्पष्ट केले होते की, *"सरकार या संस्थांच्या कारभारात कोणताही हस्तक्षेप करत नाही आणि भविष्यातही करणार नाही."*

सध्याच्या काळातील विद्यार्थ्यांमधील असंतोष आणि त्यांच्या राजकीय ध्रुवीकरणाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रनिष्ठेचा विचार अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या संदर्भात राज्याचे शिक्षणमंत्री म्हणून बाळासाहेब देसाई यांनी ३ ऑगस्ट १९६० रोजी मुंबई येथे विद्यार्थी वर्गाला केलेले आवाहन अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. देशाच्या विकासावर बोलताना ते म्हणाले की, *"भारत सध्या शांततामय क्रांतीच्या महान कार्यात मग्न झाला असून, यासाठी समाजातील सर्व थरांच्या सक्रिय सहकार्याची आवश्यकता आहे."*[१५] त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्र उभारणीच्या आणि देश पुनर्रचनेच्या कार्यात प्रामुख्याने सहभागी होण्याचे आवाहन केले. एवढेच नाही, तर विद्यार्थ्यांनी हाती घेऊ शकतील अशा विविध रचनात्मक कार्यांचा तपशीलही त्यांनी दिला. *"युद्धात झालेली अपरिमित हानी भरून काढत नव्या जर्मनीची उभारणी करण्याच्या कार्यात जर्मनीतील विद्यार्थी वर्गाने जसा फार महत्त्वाचा वाटा उचलला, तसाच आदर्श आपल्या विद्यार्थ्यांनीही घ्यावा,"* अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

देशाच्या व जगाच्या काही भागांत दिसून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीचा उल्लेख करून बाळासाहेब म्हणाले की, या प्रश्नावर शिक्षणतज्ज्ञ आणि प्रशासक अत्यंत गंभीरपणे विचार करीत आहेत. मात्र, त्याच वेळी महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांत दिसणाऱ्या शिस्तीच्या वातावरणाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या राजकीय पक्षांशी असलेल्या संबंधांवर स्पष्ट भाष्य करताना त्यांनी वारंवार बजावले होते की, *"विद्यार्थ्यांच्या शक्तीचा दुरुपयोग राजकीय हेतूसाठी होता कामा नये. विद्यार्थी दशेत त्यांनी केवळ विद्याभ्यासात तल्लीन असले पाहिजे. विद्यार्थी जीवनात त्यांनी राजकारणात सक्रिय भाग घेणे म्हणजे आत्मघात करून घेण्यासारखे आहे."* असा परखड विचार त्यांनी मांडला.[१६] तरुणांची ऊर्जा भरकटू न देता ती केवळ राष्ट्रनिर्मितीकडे वळली पाहिजे, हा बाळासाहेब देसाई यांचा विचार आजच्या काळातही अत्यंत दिशादर्शक ठरतो.

निष्कर्ष:

लोकनेते बाळासाहेब देसाई हे आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे खऱ्या अर्थाने क्रांतीदूत ठरले आहेत. त्यांनी फुले-शाहू-आंबेडकर विचारांच्या वारशातून 'शिक्षणाचे लोकशाहीकरण' घडवून आणले आणि सत्तेचा उपयोग वंचितांच्या उत्थानासाठी केला. ई.बी.सी. सवलतीसारखा ऐतिहासिक निर्णय असो, शिवाजी विद्यापीठाची स्थापना असो किंवा तांत्रिक शिक्षणाचे जाळे विणणे असो, या सर्व कृतींतून त्यांनी 'बहुजन हिताय' हे सूत्र प्रत्यक्ष अमलात आणले.

बाळासाहेब देसाई यांचे विचार आगरकरांच्या बुद्धिप्रामाण्यवादाशी मिळतीजुळती आहेत. आगरकरांचा भर प्रामुख्याने 'बुद्धिप्रामाण्यवाद' (Rationalism) आणि 'व्यक्तिस्वातंत्र्य' यावर होता. धर्मभोळेपणा नष्ट करून विज्ञानाची कास धरणारे शिक्षण मिळावे, असे आगरकरांचे मत होते. मात्र, आगरकरांना प्रस्थापित समाजव्यवस्थेचा प्रचंड विरोध सहन करावा लागला आणि त्यांच्याकडे राजकीय सत्ता नव्हती. बाळासाहेब देसाई यांच्याकडे मंत्रीपदाची सत्ता असल्यामुळे आगरकरांना जे तात्विक

पातळीवर अपेक्षित होते, ते देसाई यांनी 'तांत्रिक शिक्षण', 'विज्ञान महाविद्यालये' आणि 'निधर्मी शिक्षणाचा प्रसार' या माध्यमातून शासकीय धोरणाद्वारे अमलात आणले. इंग्रजी भाषेचे महत्त्व ओळखून पाचवीपासून इंग्रजी अनिवार्य करण्याचा देसाईंचा निर्णय हा आगरकरांच्या 'इंग्रजी भाषेच्या वाघिणीचे दूध' या संकल्पनेचाच व्यावहारिक आविष्कार होता.

आजच्या २१ व्या शतकातील शिक्षणाचे व्यापारीकरण आणि खासगीकरण पाहता, बाळासाहेबांचे 'सरकारी आणि दर्जेदार मोफत शिक्षण' हे मॉडेल आजही एक समर्थ पर्याय म्हणून समोर येते. जोपर्यंत समाजातील शेवटच्या उपेक्षित घटकापर्यंत ज्ञानाची गंगा पोहोचवण्याचे आणि समता प्रस्थापित करण्याचे ध्येय शिल्लक आहे, तोपर्यंत लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे शैक्षणिक विचार महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक 'आधुनिक सामाजिक घोषणापत्र' आणि मार्गदर्शक दीपस्तंभ म्हणून निरंतर दिशादर्शक राहतील.

संदर्भ सूची:

१) मिसाळ सविता देवी, *महाराष्ट्राचे भाग्यविधाते नामदार बाळासाहेब देसाई,* प्रथम आवृत्ती, यशोदीप प्रकाशन संस्था, १९६७, पृ. २३-२५.

२) देसाई बाळासाहेब, "सर्व समाजाच्या कल्याणाचा एकजिनसी विचार करणारा द्रष्टा राजा महाराजा शाहू," *साप्ताहिक धूमकेतू: दीपावली विशेष अंक*, १९७४, पृ. ८-९.

३) दैनिक पुढारी, कोल्हापूर, ०६ एप्रिल १९५८, पृ. ३.

४) माणगावे बाळकृष्ण रामचंद्र, *महाराष्ट्राची दौलत अर्थात गृहमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांचे चरित्र,* द्वितीय आवृत्ती, डॉ. माणगावे प्रकाशन, १९६४, पृ. २४.

५) दैनिक पुढारी, कोल्हापूर, २९ जानेवारी १९६१, पृ. ३.

६) दैनिक लोकसत्ता, पुणे, २६ फेब्रुवारी १९६४, पृ. ३.

७) दैनिक लोकसत्ता, पुणे, ३१ जानेवारी १९६२, पृ. १.

८) सूर्यवंशी कृ. गो., *बहुजन हिताय बहुजन सुखाय: बाळासाहेब देसाई यांची जीवन कथा,* प्रथम आवृत्ती, जगताप-कारले प्रकाशन, १० मार्च १९७०, पृ. २३७-२३९.

९) दैनिक लोकसत्ता, पुणे, १३ मार्च १९६२, पृ. १.

१०) दैनिक पुढारी, कोल्हापूर, ३१ जानेवारी १९६१, पृ.१.

११) दैनिक लोकसत्ता, पुणे, १६ मार्च १९६४, पृ. १.

१२) दैनिक पुढारी, उपरोक्त,(२९ जानेवारी १९६१), पृ. ३.

१३) दैनिक लोकसत्ता, पुणे, २५ जून १९६४, पृ. ३.

१४) चोरमारे विजय (संपा.), *विचारधन: लोकनेते बाळासाहेब देसाई विधिमंडळातील भाषणे, (भाग-१),* प्रथम आवृत्ती, शिवाजी विद्यापीठ, २०२४, पृ. ४०-४४.

१५) दैनिक लोकसत्ता, पुणे, ३ ऑगस्ट १९६०, पृ. २.

१६) दैनिक पुढारी, कोल्हापूर, २८ ऑक्टोबर १९६०, पृ. २.

१७) चौगुले एस. एस., *आमचे शिक्षण मंत्री नामदार बाळासाहेब देसाई*, आवृत्ती पहिली, श्रीकृष्ण मुद्रणालय, १९६१, पृ. ८०.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील स्वातंत्र्यसैनिक दलितमित्र श्री. उध्दवराव इंगुले (तात्या)

मेघाराणी रमेश सरगर

संशोधक विद्यार्थिनी,

इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Corresponding Author - मेघाराणी रमेश सरगर

DOI - 10.5281/zenodo.19723988

घोषवारा:

भारतीय स्वातंत्र्यलढा हा देशाच्या इतिहासातील अत्यंत महत्वपूर्ण असा कालखंड मानला जातो. या स्वातंत्र्यलढयात अनेक ज्ञात—अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या कार्याद्वारे देशाच्या स्वातंत्र्यासाठी मोलाचे योगदान दिले. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये भारतीय स्वातंत्र्यसैनिक ''दलितमित्र'' उध्दवराव इंगुले यांच्या स्वातंत्र्यलढयातील तसेच सामाजिक कार्याचा ऐतिहासिक व सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात आलेला आहे.

उध्दवराव इंगुले यांनी ब्रिटीश सत्तेविरूध्द विविध आंदोलनामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीतील भूमिगत कार्यातही बरोबर चले जाओ आंदोलन, वैयक्तिक सत्याग्रहामध्ये महत्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ राजकिय क्षेत्रापुरता मर्यादित न राहता सामाजिक क्षेत्रातही जाणवून येतो. विशेषत: दलित समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय होते.

स्वातंत्र्यनंतरही त्यांनी समाजातील अस्पृश्यता निर्मूलन शिक्षणप्रसार व सामाजिक संघटना या क्षेत्रात कार्य केले. त्यांच्या नेतृत्वामुळे स्थानिक पातळीवर दलित समाजात सामाजिक जागृती निर्माण झाली. व खाटीक समाजाच्या विकासाला चालना मिळाली. प्रस्तुत संशोधनामध्ये त्यांच्या जीवनकार्याचा अभ्यास प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे करण्यात आलेला आहे.

या संशोधनातून उध्दवराव इंगुले यांच्या स्वातंत्र्यलढयातील योगदाना सोबतच समाजसुधारक म्हणून त्यांच्या भूमिकेचे मूल्यमापन करण्यात आले असून दलित समाजाच्या सामाजिक परिवर्तनामध्ये त्यांचा कार्याचा प्रभाव अधोरेखित करण्यात आलेला आहे.

प्रस्तावना:

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा शेवटचा कालखंड हा दैदिप्यमान कालखंड आहे. यामध्ये प्रत्यक्ष चळवळीत भाग घेऊन या चळवळीस मदत करून म्हणजेच भूमिगत राहून कार्य करणारे अनेक नेते या महाराष्ट्राच्या भूमीवर निर्माण झाले. यापैकी पुणे जिल्हयातील बारामती या गावी आपले कार्यक्षेत्र उजळविणारे सामाजिक तळमळ असणारे द्रष्टे समाजसुधारक शिक्षणाची ज्ञानगंगा तळागाळातील दीनदलित गरीब वर्गापर्यंत पोहोचावी म्हणून अविरत झटणारे दलितांना निवारा मिळावा म्हणून गृहनिर्माण योजना राबविणारे 'दलितमित्र' उध्दवराव

इंगुले हे होते.[१] त्यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान महान आहे. या प्रस्तृत शोधनिबंधामध्ये स्वातंत्र्यसैनिक या दृष्टीकोनातून त्यांच्या कार्याचा परामर्श घेतला आहे. उध्दवराव तात्याचे व्यक्तिमत्व प्रसिध्दी पराङःमुख असल्याने त्याची फारशी दखल घेतली नाही. त्यामुळेच या व्यक्तिमत्वाची व त्यांच्या कार्याची ओळख सर्वसामान्य जनतेस या विद्यार्थ्यांना व्हावी हा उद्देश शोधनिंबधा पाठीमागे आहे.

श्री. उध्दवराव तात्या मूळचे पुणे जिल्हयातील बारामती तालुक्यातील त्यांचे सुरूवातीचे मराठी सातवी पर्यंतचे शिक्षण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल बारामती येथे झाले. तात्या जेमतेम दोन वर्षांचे असतील तेव्हाच तात्यांचे वडील श्री. लक्ष्मणराव इंगुले स्वर्गवासी झाले. घरची परिस्थिती गरीबीची असल्याने लहान वयातच त्याच्यावर घरची जबाबदारी पडली. छोटी मोठी कामे करून तुकाराम महाराजांच्या पालखीमध्ये पानफुल विकून अतिशय कष्टामध्ये शिक्षण मिळविले तात्यांनी व्यायाम व पैलवान की करीत सातवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. मध्यंतरी फी भरायला पैसे नाहीत. म्हणून इंग्लिशशाळेतून त्यांचे नाव कमी केले गेले.[२] व त्यांना मराठी शाळेत शिकावे लागले. सुरूवातीला तात्यांनी स्वतंत्र चळवळीत हिरीरीने भाग घेतला व सन १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी मोलाचे कार्य केले.

संशोधन समस्येची उत्पत्ती:

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही देशाच्या इतिहासातील अत्यंत महत्वपूर्ण सामाजिक व राजकीय चळवळ मानली जाते. या चळवळीत विविध स्तरातील समाजघटकांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता. तथापि, स्वातंत्र्यलढयाच्या इतिहास लेखनामध्ये मुख्यत्वे उच्चवर्गीय शिक्षित व प्रभावशाली नेतृत्वाच्या कार्यावर अधिक भर देण्यात आला आहे. परिणामी, समाजातील वंचित घटक विशेषत: दलित समाजातील स्थानिक स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान इतिहासाच्या मुख्य प्रवाहात दुर्लक्षित राहिले आहे.

दलित समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला असला तरी त्यांच्या कार्याचे शास्त्रीय दस्तऐवजीकरण अल्प प्रमाणात आढळते. विशेषत: ग्रामीण भागातील स्वातंत्र्यसैनिकांच्या सामाजिक व राजकीय योगदानाचा अभ्यास इतिहास ग्रंथामध्ये मर्यादित स्वरूपात दिसून येतो.

या पार्श्वभूमीवर दलित समाजातील स्वातंत्र्यसैनिक म्हणून कार्य करणारे श्री. उध्दवराव इंगुले यांचे योगदान राष्ट्रीय योगदान राष्ट्रीय इतिहासात पुरेशा प्रमाणात नोंदविले गेलेले नाही. ही बाब प्रकर्षाने जाणवते.

उध्दवराव इंगुले यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला असून स्थानिक स्तरावर सामाजिक जागृती, संघटन व शिक्षण प्रसारासाठी प्रयत्न केले होते.

स्वातंत्र्यानंतरही त्यांनी समाजसुधारक कार्याच्या माध्यमातून दलित समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले. तथापि त्यांच्या जीवनकार्याचा सविस्तर व शास्त्रीय अभ्यास अद्याप उपलब्ध नाही.

इतिहास लेखनातील या अभावामुळे दलित समाजातील स्थानिक नेतृत्वाच्या भूमिकेचे योग्य मूल्यमापन झालेले नाही. परिणामी स्वातंत्र्य चळवळीतील वंचित समाजाच्या योगदानाचे समग्र चित्र इतिहासात प्रतिबिंबित होत नाही.

याच पार्श्वभूमीवर श्री. उध्दवराव इंगुले यांच्या स्वातंत्र्य चळवळीतल्या तसेच सामाजिक कार्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. या संशोधनाद्वारे त्यांच्या कार्याचे ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय महत्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टये:

१) स्वातंत्र्यलढयात उध्दवराव इंगुले यांनी दिलेल्या योगदानाचा ऐतिहासिक अभ्यास करणे.

२) त्यांच्या सामाजिक कार्याचा विशेषत: दलित समाजाच्या उन्नतीसाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

३) त्याच्या राजकीय विचारसरणी व स्वातंत्र्य चळवळीतील सहभागाचे विश्लेषण करणे.

४) ब्रिटीश सत्तेविरूध्द त्यांनी केलेल्या आंदोलनात्मक कार्याचे स्वरूप समजावून घेणे.

५) स्वातंत्र्यनंतरच्या काळात त्यांनी केलेल्या समाजसुधारक कार्याचा अभ्यास करणे.

६) दलित समाजामध्ये शिक्षण संघटन व स्वाभिमान जागृतीसाठी त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करणे.

७) स्थानिक पातळीवर (बारामती परिसरात) त्यांच्या नेतृत्वाचा सामाजिक व राजकीय परिणाम अभ्यासणे

८) आखिल भारतीय स्तरावर खाटीक समाजासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

९) त्यांच्या कार्यामुळे दलित समाजाच्या सामाजिक स्थितीत झालेल्या बदलांचे परीक्षण करणे.

संशोधनाची पध्दती:

भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील स्वातंत्र्यसैनिक दलित मित्र उध्दवराव इंगुले या संशोधन विषयासाठी खालील संशोधन पध्दती सर्वाधिक योग्य ठरतात.

या विषयाचा संबंध भूतकाळातील घटनांशी असल्यामुळे ऐतिहासिक संशोधन पध्दतीही ही मुख्यसंशोधन पध्दती असेल स्वातंत्र्य चळवळीत सहभाग, ब्रिटीश काळातील कार्य, सामाजिक व राजकीय योगदान स्वातंत्र्यनंतरचे समाजसुधार कार्य या सर्व बाबीचा अभ्यास ऐतिहासिक दस्तऐवजांच्या आधारे केला जाईल. त्यानंतर गुणात्मक संशोधन पध्दती या संशोधनात व्यक्तीचे विचार अनुभव सामाजिक कार्य व स्थानिक प्रभाव यांचा अभ्यास करायचा

असल्यामुळै गुणात्मक पध्दतीचा वापर केला जाईल. त्यामध्ये मुलाखती मौखिक इतिहास अनुभवकथा, लोकस्मृती यासारख्या गुणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल. वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये श्री. उध्दवराव इंगुले यांच्या जीवनकार्याचे वर्णन सामाजिक कार्याचे स्वरूप, स्वातंत्र्यचळवळीतील सहभाग दलित समाजातील योगदान यांचे सविस्तर वर्णन या पध्दतीद्वारे केले जाईल.

विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीमध्ये तात्यांच्या कार्याचा सामाजिक परिणाम राजकीय प्रभाव त्याच्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेतला जाईल. सबाल्टर्न संशोधन दृष्टिकोनातून दलित समाजातील स्थानिक स्वातंत्र्यसैनिक म्हणून उध्दवराव इंगुले यांच्या कार्याचा अभ्यास करताना वंचित घटकांचा सहभाग, स्थानिक नेतृत्व दलित समाजाला न्याय मिळवून देताना त्यांनी केलेला संघर्षाचा आढावा घेतला जाईल.

या सर्व बाबी केंद्रस्थानी ठेवून संशोधन पध्दतीचा आढावा घेण्यात येईल.

संशोधनाची गृहीतके:

१) उध्दवराव इंगुले यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला होता.

२) त्यांच्या कार्याचा दलित समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक प्रगतीवर सकारात्मक परिणाम झाला.

३) समाजातील अस्पृश्यता निर्मूलनासाठी प्रभावी प्रयत्न केले.

४) त्यांच्या नेतृत्वामुळे दलित समाजात संघटन व राजकीय जागरूकता वाढली.

५) स्वातंत्र्यनंतरही त्यांनी समाजसुधारणेचे कार्य सातत्याने चालू ठेवले.

६) त्यांच्या कार्याचा स्थानिक राजकिय चळवळीवर प्रभाव पडला.

७) त्यांच्या विचारांचा प्रभाव पुढील पिढयांच्या सामाजिक चळवळीवर झाला.

पूर्वसाहित्याचा आढावा:

स्वातंत्र्यसैनिक श्री. उध्दवराव इंगुले यांच्या कार्याचा अभ्यास करताना उपलब्ध साहित्य प्रामुख्याने खाटीक समाजाच्या चळवळी खाटीक समाजाचा इतिहास या प्रमुख स्त्रोत समूहात आढळते. बहुतेक साहित्य संशोधनप्रबंध प्रादेशिक अभ्यास आणि मौखिक इतिहासांवर आधारित आहेत. या प्रातिनिधिक स्वरूपात पुढील साहित्याच आढावा घेता येवू शकतो. भारतीय हिंदू खाटीक उत्पत्ती व पतनाचा इतिहास इ.स.पू. ते इ.स.२००० खाटीक समाज, राजकीय जागृती डॉ. घोडके शरद, १३ एप्रिल २००२, महाराष्ट्र खाटीक महासंघ पहिले ऐतिहासिक अधिवेशन, दि २८ मे १९८२ अहवाल बारामती समाजाचा कैवारी आपला मल्हारी त्रैमासिक एप्रिल २००२ अंक २९ वा संपादक श्री. सुरेश घोणे, उध्दवराव इंगुले जन्मशताब्दी महोत्सव ४ मे २०१४ या उपलब्ध साहित्याचे एकत्रित परीक्षण केल्यास

पुढील बाबी स्पष्ट होतात. श्री. उध्दवराव इंगुले यांच्यावर समर्पित विस्तृत ग्रंथ कमी पण खाटीक समाजावर साहित्य समृध्द आहे. त्यांचे कार्य मुख्यत: मौखिक परंपरा लोकस्मृती आणि प्रादेशिक समाजशास्त्रीय अभ्यास यांच्याआधारे पुनर्रचित झाले आहे. परंतु त्यांच्या कार्याचा शैक्षणिक, वैज्ञानिक व समाजशास्त्रीय अभ्यास अत्यल्प असल्यामुळे या कार्याचा परिणाम समजून घेण्यासाठी या संशोधन समस्येची उत्पत्ती झाली.

संशोधन पध्दती:

उध्दवराव इंगुले यांच्या कार्याचा ऐतिहासिक व सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनात ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधनाचा प्रकार:

हे संशोधन गुणात्मक स्वरूपाचे असून वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीवर आधारित आहे. यासाठी द्वितीयक माहिती स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये श्री. उध्दवराव इंगुले यांच्यावरील उपलब्ध चरित्रात्मक ग्रंथ ऐतिहासिक लेख, सामाजिक सुधारणांवरील अभ्यासपूर्ण निबंध तसेच संबंधित शासकीय अहवाल आणि जिल्हा गॅझेटियर्स यांचा समावेश आहे. (वर्णनात्मक आणि विश्लेषण)

वैयक्तिक सत्याग्रह २७ जानेवारी १९४१:

वैयक्तिक सत्याग्रह महात्मा गांधीजींनी द्वितीय महायुध्दाच्या काळात ब्रिटीश सरकारने भारताला युध्दात सामील केले. परंतु भारतीय नेत्यांची समंती घेतली नाही याच्या निषेधार्थ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने गांधीजीच्या नेत ृत्वाखाली ''वैयक्तिक सत्याग्रह'' सुरू केला. तात्यांनी २७ जानेवारी १९४१ रोजी महात्मा गांधीजीचे समंतीने बारामती कसबा येथे वैयक्तिक सत्याग्रह केला.[३] वैयक्तिक सत्याग्रह म्हणजे एखाद्या व्यक्तिने स्वत:च्या नैतिक व राजकीय भूमिकेच्या आधारे अंहिसात्मक मार्गाने शासनाच्या अन्यायकारक धोरणांविरूध्द निषेध नोंदविणे या आंदोलनामध्ये मोठया जनसमुहाऐवजी निवडक व्यक्तींना सत्याग्रह करण्याची परवानगी देण्यात येत असे.

वैयक्तिक सत्याग्रहाची मुख्य उद्दिष्टये म्हणजे भारताला युध्दात जबरदस्तीने सहभागी करण्याचा निषेध करणे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार मिळविणे ब्रिटीश साम्राज्याच्या दडपशाहीविरूध्द शांततामय विरोध दर्शविणे. भारतीयांना राजकीय स्वातंत्र्याची जाणीव करून देणे.[४]

श्री. उध्दवराव इंगुले यांच्या सत्याग्रहात बारामतीच्या नागरिकांनी व शेतकऱ्यांनी मोठा सहभाग घेतला होता. या सत्याग्रहात भाग घेतल्याने ब्रिटीश सरकारने त्यांना सहा महिन्याचा कारावास भोगण्याची शिक्षा दिली. हि शिक्षा भोगून आल्यानंतर माळेगाव येथील गणपतराव डोबांळे यांनी

भांडवल देवून अडत दुकान (गुळ विक्री व्यवसाय) उघडण्यास सांगितले त्याप्रमाणे त्यांनी 'उध्दव यशवंत कंपनी' या नावाचे अडत दुकान काढले.[५]

८ ऑगस्ट १९४२ ची चले जाओ घोषणा:

१९४२ ची मुंबईमधील क्रांतिकारक स्वातंत्र्य चळवळ सुरू झाली. इंग्रजी सत्तेला राष्ट्रीय चळवळीच्या नेत्यांनी भारत छोडो म्हणून सांगितले होते. त्यावेळी बारामतीमध्ये असलेले तात्यांच्या सहवासात वाढलेले तरूण युवकांच्या तरूण मनाला व उसळत्या रक्ताला 'चले जाओ' करणेच होते. पण करायचे कसे? ही समस्या त्यांच्या पुढे होती. १९४२ च्या मुंबईमधील ऑगस्ट क्रांती मैदानात महात्मा गांधीजींच्या समवेत चलेजाव आंदोलनात तात्यांनी सहभाग घेतला पुढे ते महाराष्ट्रात जेष्ठ गांधीवादी नेते म्हणून परिचित झाले.

५ ऑगस्ट १९४२ रोजी बारामती येथे देशभक्त केशवराव जेधे, भाऊसाहेब रानडे यांची सभा झाली. त्यात मुंबईच्या काँग्रेस अधिवेशनाबद्दल माहिती दिली. त्यांच्या भाषणाने प्रभावित होवून उध्दवराव २५ तरूणांची तुकडी घेवून मुंबईस गेले. या अधिवेशनात महात्मा गांधीनी ब्रिटीश राज्यकर्त्यांना 'चले जाओ' चा आदेश दिला. या मुंबई अधिवेशनात महात्मा गांधीना सरकारने अटक केली.[६] पुन्हा जोरदार चळवळ सुरू झाली. ती २५ तरूणांची तुकडी मुंबई पुण्यावरून गुणवडीस आली तेथून घोषणा देत ती तुकडी बारामतीस आली. बारामती येथे पाच हजार लोकांनी तुकडीचे स्वागत केले. मिरवणुक बारामती शहरातून चालली असताना पोलिसाबरोबर झटापट झाली. त्या तुकडीने गावातून 'चले जाओ' च्या घोषणा देत मिरवणूक काढली नंतर भाजीमंडई परिसरामध्ये जाहीर सभा घेतली. स्वातंत्र्यसैनिकांची तुकडी सांगवी, पणदरे वडगाव मार्गे मोर्टी मोटवे गावास गेली. त्या दिवसाच्या मुक्कामानंतर पहाटे प्रात: विधिस गेले असता रात्री शेकडो ब्रिटीश गोऱ्या सैनिकांनी संपूर्ण गावास वेढा दिला असल्याचे दिसून आले. परंतु हे स्वातंत्र्यवीर डगमगले नाही. त्यांनी 'भारत माता की जय' महात्मा गांधी की जय या घोषणा देत ब्रिटीश आर्मीला सामोरे गेले.

बुवासाहेब गाडे, भाई गुलाम अली, सदाशिवराव गांलिदे, सर्जेराव घाडगे, रामु घडसी यांचे धैर्य संस्मरणीय आहे. त्यावेळचे बारामती तालुक्याचे प्रांत श्री. राणासाहेब यांनी उध्दवरावजी व भाई गुलामअली यांना साडे तीन वर्षाची सजा फर्माविली इतर स्वातंत्र्यसैनिकांना अडीच वर्षाची शिक्षा दिली.[७]

१९४२ चे स्वातंत्र्यलढयात त्यांनी केलेले कार्य बारामती तालुक्यात ललामभूत ठरणारे आहे. त्यावेळेस मुंबई इलाख्यात पहिली स्वातंत्र्य चळवळ बारामती येथून सुरू झाली. आणि तीही उध्दवराव इंगुले यांचे नेतृत्वाखाली सुरू झाली. त्यावेळी त्यांना अनेक स्वातंत्र्यवीरांनी साथ दिली. त्यामध्ये रामु घडसी हे प्रमुख होते. त्याच बरोबरीने गुलाबराव शेळके, बुवासाहेब गाडे

भाई गुलाम अली करीम साहेब स्व. सर्जेराव घाडगे, स्व. क्रांतिसिंह, विश्वनाथराव गांलिदे, सदाशिवराव गांलिदे, स्व. विश्वनाथराव इंगुले, स्व. बाबुराव इंगुले, स्व. लक्ष्मणराव इंगुले, आणि श्री. प्रल्हादराव इंगुले हे बंधु स्वातंत्र्य लढयात अग्रभागी होते. यावरील खाटीक जातीच्या युवकांनी रेल्वेतील पोस्टाची बोगी फोडण्याच्या आरोपावरून येरवडा येथील जेलमध्ये बंदिस्त केल्याची नोंद सापडते.[८]

या लढयात पोस्ट ऑफीस जाळणे, रेल्वे स्टेशनवर तिरंगा फडकविणे, 'चले जाओ' च्या घोषणा देत फेरी काढणे. यासारख्या चळवळी झाल्या होत्या. त्यात त्यांनी एका युरोपियन अमंलदाराची हॅट काढली त्यांना गांधीटोपी घालून महात्मा गांधीचा जयजयकार करण्यास भाग पाडले होते.[९]

शेतकरी कामगार पक्ष:

१९४८ च्या दरम्यान बारामतीमध्ये शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. १९४८ ते १९५० या काळात त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे काम धडाडीने चालविले होते. शेती व्यवसायात 'आदर्श शेतकरी' म्हणून नावलौकिक मिळविला बारामती निरा कॅनॉल सोसायटी व बारामती तालुका डेव्हलपमेंट बोर्डाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.[१०] १९५० नंतर शेतकरी कामगार पक्षाचा त्याग करून काँग्रेस पक्षाचे काम सुरू केले.

भूमिगत चळवळ:

१९४२ च्या लढयामध्ये क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या पत्री सरकार मधील अनेक कार्यकर्ते व स्वत: नाना पाटील देखील बारामती मधील उसाच्या शेतामध्ये आश्रय घेऊन भूमीगत कार्य करीत. त्यावेळी त्यांना भाजी भाकरी देण्याचे काम तात्यांची आई कोंडाईला करावे लागे. व त्यांना तात्यांची पत्नी सौ. इंदुताई या मदत करीत असे. त्यामुळे तात्या थोर क्रांतीकारी व स्वातंत्र्यसैनिक व सामाजिक कार्यकर्ते होऊ शकले.

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने भूमिगत चळवळीमध्ये सहभाग घेतला. उध्दवराव इंगुले यांनी आपले सहकारी सदाशिवराव गांलिदे, प्रल्हाद इंगुले, तसेच विश्वनाथ दादा गांलिदे यांना संघटित करून स्वातंत्र्यलढयात भूमीगत होवून सहभाग घेतला. गणिमी कावा हेच हत्यार बनवून ब्रिटीश सरकारला सतावून सोडले ब्रिटीश सरकारने त्या सर्वांना अटक करून कारावासाची शिक्षा ठोठावली त्यावेळी त्यांना श्री. वसंतदादा पाटील यांचा सहवास लाभला.[११] (१९४८ ते १९५४) या काळात उध्दवरावांनी सामाजिक कामे करण्यात विशेष लक्ष दिले. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांच्या सहकार्याने सहकारी तत्वावर संघटना स्थापन केल्या.

दलितमित्र:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अखंड श्रमातून भारतीय प्रजासत्ताकाची राज्यघटना साकारली. त्याचा अपेक्षित परिणाम होऊन समाजातील आदिवासी मागासवर्गीय दलितांना सवलती मिळाल्या. परंतु खाटीक समाज मात्र या विकासापासून दूर होता. वंचित राहिला होता. यासाठीच डॉ. आंबेडकर यांच्या हाकेला साद घालण्यासाठी या खाटीक समाजात १ मे १९१४ रोजी तात्यांचा जन्म झाला.[१२]

गांधीवादी विचाराचे ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी खाटीक समाजाचे आधारवड समाजसुधारणेची आस असणारे समाजसुधारक सहकाराचे अभ्यासक, शेतीनिष्ठ नगरभूषण उध्दवराव लक्ष्मणराव इंगुले म्हणजे खाटीक समाजातील मरगळलेल्या नवतरूणांना नवसंजीवनी देणारे आहे. गोरगरीब पीडितांना आशेचा किरण दाखविला. कमालीचा अशिक्षित भूमिहीन व दारिद्रयाच्या दृष्टचक्रामध्ये अडकलेला खाटीक समाज पाहून अस्वस्थ होत. १९४८ ते १९५४ या काळात उध्दवरावांनी सामाजिक कामे करण्यात विशेष लक्ष दिले. माजी मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांच्या सहकार्याने सहकारी तत्वावर संघटना स्थापन केल्या. मांग, गारूडी, होलार, मेहतर, क्षत्रीय कुलवंत, टकारी ढोर इ. मागासवर्गीय समाजातील लोकांसाठी सहकारी गृहनिर्माण सोसायटी स्थापन (घरबांधणी) संस्था स्थापन केली.[१३] त्यांना घरे मिळवून दिली.

खाटीक समाज बांधवाकडे शेतकरी नाही, शेती नाही म्हणून खोती नाही. खोती नाही म्हणून भाती नाही भाती नाही ही बाब त्यांना प्रकर्षाने जाणवली तात्यांच्या अथक परिश्रमामुळे व पाठपुरावामुळे १९७६ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना महाराष्ट्रातील संपूर्ण खाटीक समाजाला अनुसूचित जातीमध्ये (शेडयूल कास्ट) समाविष्ट करून द्यायला लावून समाजाला आरक्षणाचा लाभ मिळवून दिला. तात्यांच्या द्रष्टेपणामुळेच खाटीक समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व राजकीय स्तरावर उर्जितावस्था आली. खाटीक समाजातील ५६ गरजू लोकांची एक अहिल्या सहकारी गृह निर्माण संस्था स्थापन करून त्याद्वारे जमिन मिळवून त्यांची घरे उभी केली. व एक आदर्श निर्माण केला. खाटीक समाजाने, त्या परिसराला 'स्वातंत्र्यसैनिक उध्दवराव इंगुलेनगर' असे नाव दिले. श्री. आनंदराव चव्हाण व बाबालाल काकडे हे त्यांचे जवळचे सहकारी होते.

समारोप:

अशाप्रकारे १९४२ च्या क्रांतीत नावानं उध्दव असलेल्या तात्यांनी बारामती व परिसरातील स्वातंत्र्यसेनानींना उध्दवाप्रमाणेच बंधुप्रेम दिले. आपल्या सहकाऱ्यांना संघटित करून देश स्वातंत्र्यासाठी तात्यांनी आपली ताकद पणाला लावली. तात्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढयात भाग घेवून रेल्वे स्टेशनवर तिरंगा फडकविणे चले जाओच्या घोषणा देत

फेरी काढणे तारायंत्रे व टेलिफोनच्या तारा तोडणे वगैरे धाडसी कृत्ये हिरीरीने केली. १९४२ च्या बारामती परिसरातील भूमीगत चळवळीतील नेत्यांना त्यांच्या जेवणाखाण्याच्या सोयीबरोबर संरक्षणाची जबाबदारी स्वत: घेतली भूमिगत संघटना उभी करण्यात तात्या आघाडीवर होते.

दीनदुबळया दलित समाजाला न्याय देण्यात तात्यांनी आपले आयुष्य समर्पण केले. अत्यंत साधी राहणी उदात्त विचारसरणी जगून सर्वांशी समानतेने वागून समाजकार्य करणारे श्री. उध्दवरावजी तात्या समाजाला प्रेरणादायी ठरले आहे.

संदर्भग्रंथ:

१) श्री. उध्दवराव लक्ष्मणराव इंगुले जन्मशताब्दी महोत्सव, ४ मे २०१४ प्र.क्र.२

२) कित्ता पृ. क्र. ४

३) खाटीक समाज: राजकीय जागृती, डॉ. घोडके शरद, १३ एप्रिल २००२ पृ. क्र.

४) जी.डी.लाड: पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, ९ ऑगस्ट १९८६, प्रकाशन, पृ.क्र. ३३

५) श्री. उध्दवराव लक्ष्मणराव इंगुले जन्मशताब्दी महोत्सव, ४ मे २०१४ पृ.४

६) कित्ता पृ.क्र. १०

७) महाराष्ट्र खाटीक महासंघ पहिले ऐतिहासिक अधिवेशन अहवाल, दि. २८ मे १९८२, बारामती.

८) भारतीय हिंदु खाटीक उत्पत्ती व पतनाचा इतिहास, इ.स.पू ते इ.स. २००० श्रीनाथ प्रकाशन, सोलापूर ऑगस्ट २०२१ पृ.क्र. ५५

९) कित्ता पृ.क्र. ६०

१०) श्री. उध्दवराव लक्ष्मणराव इंगुले जन्मशताब्दी महोत्सव ४ मे २०१४, पृ. क्र. ५

११) समाजाचा कैवारी आपला मल्हारी त्रैमासिक एप्रिल २००२ अंक २९ वा संपादक श्री. सुरेश घोणे

१२) श्री. उध्दवराव लक्ष्मणराव इंगुले जन्मशताब्दी महोत्सव, ४ मे २०१४, पृ.क्र. १

१३) मुलाखत श्री. मधुकर नानासाहेब गांलिदे माजी स्वीयसहायक जिल्हा परिषद, पुणे, २७/११/२०२५, सकाळी ११.०० वा.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

सामाजिक सुधारचळवळी व ग्रामीण शिक्षणाचा विकास : महाराष्ट्राच्या संदर्भातील सखोल ऐतिहासिक अभ्यास

गणेश शंकर दुबळे

डी.एड, बी.एड, नेट, सेट, इतिहास

प्राथमिक शिक्षक, जि. प. शाळा ढगेवाडी (लिंब), सातारा.

*Corresponding Author - **गणेश शंकर दुबळे***

DOI - 10.5281/zenodo.19724042

प्रस्तावना आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी : शिक्षणाच्या लोकशाहीकरणाचा प्रारंभ:

महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास हा केवळ राजकीय किंवा सांस्कृतिक परिवर्तनाचा इतिहास नसून, तो मूलतः शिक्षणाच्या लोकशाहीकरणाचा आणि ज्ञानाच्या मक्तेदारीविरुद्ध पुकारलेल्या एल्गाराचा इतिहास आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पेशवाईचा अस्त झाला आणि १८१८ मध्ये इंग्रजांनी मराठ्यांचा पराभव करून महाराष्ट्रात आपली सत्ता प्रस्थापित केली. या राजकीय सत्तांतरामुळे जुनी सरंजामी व्यवस्था कोलमडली असली, तरी समाजातील आंतरिक रचना मात्र जातीभेद, अज्ञान, अंधश्रद्धा आणि पराकोटीच्या विषमतेने ग्रासलेली होती. त्याकाळी ग्रामीण महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकसंख्या ही शेतकरी, कष्टकरी, दलित आणि स्त्रियांची होती, ज्यांच्यासाठी शिक्षणाची कोणतीही अधिकृत किंवा संस्थात्मक व्यवस्था अस्तित्वात नव्हती.पेशवाईच्या काळात शिक्षण हे केवळ ब्राह्मण आणि उच्चवर्णीय पुरुषांच्या मर्यादित चौकटीत अडकलेले होते. 'पाथशाळा' आणि 'मठ' हे ज्ञानाचे केंद्र होते, परंतु तिथे प्रवेश केवळ उच्चवर्णीयांनाच होता. बहुजन समाजासाठी शिक्षण हे 'पाप' मानले जाई, तर स्त्रियांसाठी ते पूर्णतः निषिद्ध होते. अशा परिस्थितीत इंग्रजी सत्तेचा उदय हा एका अर्थाने परिवर्तनाचे वारे घेऊन आला. ब्रिटिश प्रशासनाने स्वतःच्या सोयीसाठी १८३५ मध्ये थॉमस बॅबिंग्टन मॅकॉले यांचा शिक्षणविषयक अहवाल स्वीकारला. मॅकॉलेच्या या धोरणामुळे भारतात पाश्चिमात्य शिक्षणाचा पाया घातला गेला, परंतु त्यामागील दृष्टिकोन हा अत्यंत मर्यादित आणि प्रशासकीय होता.

ब्रिटिशांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी 'झिरपता सिद्धांत' (Downward Filtration Theory) स्वीकारला होता. या सिद्धांताचा मूळ गाभा असा होता की, शिक्षण प्रथम समाजातील उच्च आणि अभिजन वर्गाला द्यावे; कालांतराने हे शिक्षण या वर्गाकडून झिरपत खालच्या थरातील सामान्य जनतेपर्यंत पोहोचेल. परंतु, हा सिद्धांत महाराष्ट्रातील सामाजिक वास्तवात पूर्णतः अपयशी ठरला. उच्चवर्णीय समाजाने प्राप्त केलेले ज्ञान स्वतःपुरतेच मर्यादित ठेवले, ज्यामुळे सुशिक्षित आणि अशिक्षित यांच्यातील दरी अधिक रुंदावली. ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर आणि दलित समाज या धोरणांमुळे शिक्षणापासून अधिकच दूर फेकला गेला.याच कालखंडात महाराष्ट्रातील विचारवंतांनी अज्ञानालाच गुलामीचे मूळ कारण मानले. समाजसुधारकांना

हे जाणवले की, जोपर्यंत ग्रामीण समाजातील शेवटच्या माणसापर्यंत शिक्षण पोहोचत नाही, तोपर्यंत सामाजिक समता आणि न्याय प्रस्थापित होऊ शकत नाही. या प्रक्रियेत शिक्षणाला केवळ अक्षरओळख न मानता, ते स्वाभिमान आणि मानवी हक्कांच्या प्राप्तीचे साधन म्हणून पाहिले गेले. याच वैचारिक पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात १९ व्या आणि २० व्या शतकात अनेक महान समाजसुधारकांनी आणि शिक्षणसंस्थांनी ग्रामीण शिक्षणाच्या विकासासाठी आपले आयुष्य समर्पित केले.

महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले : सामाजिक क्रांतीचे शैक्षणिक शस्त्र:

महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीचा आणि विशेषतः ग्रामीण व दलित शिक्षणाचा खरा पाया महात्मा ज्योतिराव फुले यांनी घातला. फुलेंनी शिक्षणाला केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन न मानता, ते सामाजिक क्रांतीचे आणि शोषणाविरुद्ध लढण्याचे सर्वात प्रभावी शस्त्र म्हणून स्वीकारले. त्यांच्या मते, समाजातील अन्याय, जातीय विषमता आणि स्त्रियांचे दास्यत्व हे अज्ञानातून जन्माला आले होते. "विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले," हे त्यांचे सूत्र महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्रांतीचे महामंत्र ठरले.

१. स्त्री-शिक्षणाची ऐतिहासिक मुहूर्तमेढ:

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर स्त्रियांना शिक्षण देणे हे धर्मविरोधी आणि समाजविरोधी मानले जात असे. अशा काळात महात्मा फुलेंनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्याच्या भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. हे पाऊल केवळ शैक्षणिक नव्हते, तर ते हजारो वर्षांच्या सनातनी परंपरेला दिलेले थेट आव्हान होते. या कार्यात त्यांना त्यांच्या सहचारिणी सावित्रीबाई फुले यांची मोलाची साथ लाभली. सावित्रीबाईंनी स्वतः शिक्षण घेतले आणि त्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका ठरल्या. शाळेत जाताना त्यांच्यावर शेण, दगड फेकले गेले, तरीही त्यांनी आपला शिक्षणाचा वसा सोडला नाही.सावित्रीबाईंचे कार्य केवळ अध्यापनापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी ग्रामीण समाजातील मुलींना शिक्षणाची प्रेरणा दिली. त्या काळात ग्रामीण भागात मुलींना घरकाम आणि बालविवाहाच्या जोखडात अडकवले जाई. सावित्रीबाईंनी पालकांचे प्रबोधन करून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. "एक शिक्षित आई संपूर्ण कुटुंब घडवते," हा विचार त्यांनी कृतीतून मांडला. त्यांनी विधवा स्त्रियांसाठी आणि अनाथ मुलांसाठी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले, ज्यातून त्यांची सामाजिक संवेदनशीलता दिसून येते.

२. शूद्र-अतिशूद्र शिक्षणाचा क्रांतिकारी पाया:

फुलेंनी शूद्र आणि अतिशूद्र समाजासाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या, कारण त्याकाळी दलित मुलांना सार्वजनिक शाळांमध्ये प्रवेश नाकारला जात असे. त्यांनी या मुलांना केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर त्यांना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली. १८७३ साली त्यांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली, ज्याचा मुख्य उद्देश बहुजन समाजाला पुरोहितांच्या गुलामगिरीतून आणि अज्ञानातून मुक्त करणे हा होता.

वर्ष	**महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचे महत्त्वाचे टप्पे**
१८४८	पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली
१८५१	पुण्याच्या रास्ता पेठेत मुलींची दुसरी शाळा सुरू केली
१८५२	दलितांसाठी (अतिशूद्रांसाठी) पहिली शाळा सुरू केली
१८७३	सत्यशोधक समाजाची स्थापना केली
१८८२	हंटर आयोगासमोर प्राथमिक शिक्षणाबाबत साक्ष दिली

फुलेंनी हंटर आयोगासमोर दिलेली साक्ष ही ग्रामीण शिक्षणाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांनी मागणी केली की, सरकारने उच्च शिक्षणावर पैसा खर्च करण्याऐवजी प्राथमिक शिक्षणावर आणि ग्रामीण जनतेच्या शिक्षणावर अधिक भर द्यावा. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाल्याशिवाय देश प्रगत होऊ शकणार नाही, हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रातील शोषित घटकांमध्ये शिक्षणाची ओढ निर्माण झाली आणि पुढील पिढ्यांसाठी एक भक्कम पाया तयार झाला.

राजर्षी शाहू महाराज : शैक्षणिक धोरणांचे लोकशाहीकरण आणि आरक्षण:

महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक इतिहासात कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे स्थान हे एका द्रष्ट्या राजाचे आहे. त्यांनी राज्यसत्तेचा वापर केवळ सत्ता राबवण्यासाठी न करता, बहुजन समाजाच्या उत्थानासाठी आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी केला. शाहू महाराजांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेला आणि ग्रामीण शिक्षणाला एका व्यापक धोरणात्मक चौकटीत बसवले.

१. १९०२ चे आरक्षण धोरण : विषमतेला संस्थात्मक उत्तर:

२६ जुलै १९०२ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा भारतातील आरक्षणाचा पहिला अधिकृत प्रयोग मानला जातो. हे आरक्षण केवळ सरकारी नोकऱ्यांसाठी नव्हते, तर ते शैक्षणिक संधींच्या समान वाटपासाठी देखील होते. त्याकाळी प्रशासन आणि शिक्षण यांवर उच्चवर्णीयांचे वर्चस्व होते, ज्यामुळे बहुजन समाज मागे राहिला होता. महाराजांनी आरक्षणाद्वारे या मक्तेदारीला तडा दिला आणि ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशासनात येण्याची संधी निर्माण करून दिली.

२. मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण (१९१७):

शाहू महाराजांनी १९१७ मध्ये कोल्हापूर संस्थानात 'मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा' लागू केला. असा कायदा करणारे ते पहिले भारतीय राजा होते. त्यांनी केवळ कायदा केला नाही, तर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कठोर पावले उचलली. ज्या पालकांनी आपल्या मुलांना शाळेत पाठवले नाही, त्यांना दरमहा एक रुपया दंड करण्याची तरतूद त्यांनी केली होती. हा निर्णय पालकांची मानसिकता बदलण्यासाठी आणि ग्रामीण भागात शिक्षणाची सवय लावण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला.

महाराजांनी या योजनेसाठी एक लाख रुपयांची भरीव तरतूद केली आणि मोठ्या पगाराच्या अधिकाऱ्यांवर 'शिक्षण उपकर' (Education Cess) लावून निधी उभा केला. यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांच्या शिक्षणाची आर्थिक अडचण दूर झाली.

३. वसतिगृह चळवळ आणि पाटील शाळा:

शाहू महाराजांनी ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरात राहून शिक्षण घेता यावे, यासाठी कोल्हापुरात विविध जाती-धर्मांच्या मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृहे उभारली. ही एक अभिनव संकल्पना होती.

- व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग (१९०१)
- मुस्लिम बोर्डिंग आणि जैन बोर्डिंग
- दलित विद्यार्थ्यांसाठी मिस क्लार्क बोर्डिंग (१९०८)

या वसतिगृहांमुळे ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षणासाठी कोल्हापुरात येऊ लागली. येथे मुले एकत्र राहत, एकाच ताटात जेवत, ज्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रात सामाजिक ऐक्याची बीजे रुजली.तसेच, ग्रामीण प्रशासन सुसंस्कृत व्हावे, या उद्देशाने

महाराजांनी 'पाटील शाळा' सुरू केल्या. गावातील पाटील आणि प्रमुख पदाधिकारी सुशिक्षित असावेत, जेणेकरून ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न प्रशासकीय पातळीवर प्रभावीपणे मांडता येतील, हा त्यामागचा उद्देश होता. महाराजांच्या या कार्यामुळे बहुजन समाजात नेतृत्व निर्माण झाले आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक परिप्रेक्ष्यात बदल घडून आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षणाचे 'मुक्तीचे शस्त्र':

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन न मानता, ते शोषित आणि वंचित समाजाच्या मुक्तीचे सर्वात प्रभावी शस्त्र मानले. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा त्यांचा संदेश ग्रामीण दलितांसाठी आत्मसन्मानाची हाक ठरला. डॉ. आंबेडकरांनी स्वतः उच्च शिक्षणाचा संघर्ष अनुभवला होता, त्यामुळे त्यांना जाणीव होती की, जोपर्यंत शोषित समाज बौद्धिकदृष्ट्या सक्षम होत नाही, तोपर्यंत त्यांची सामाजिक गुलामगिरी नष्ट होणार नाही.

१. पीपल्स एज्युकेशन सोसायटी (१९४५):

डॉ. आंबेडकरांनी ८ जुलै १९४५ रोजी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'ची (PES) स्थापना केली. या संस्थेचा मुख्य उद्देश मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा होता. त्याकाळी उच्च शिक्षण हे केवळ शहरात आणि श्रीमंत वर्गापुरते मर्यादित होते. आंबेडकरांनी या संस्थेच्या माध्यमातून ज्ञानाची दारे सर्वांसाठी खुली केली.

१९४६ मध्ये मुंबईत 'सिद्धार्थ महाविद्यालय' सुरू करून त्यांनी दलितांच्या उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. हे महाविद्यालय केवळ शिक्षण देणारे केंद्र नव्हते, तर ते सामाजिक न्यायाचे आणि लोकशाही मूल्यांचे जतन करणारे केंद्र बनले. ग्रामीण भागातील अनेक तरुण मुंबईत येऊन या महाविद्यालयात शिक्षण घेऊ लागले, ज्यातून एक सुशिक्षित आणि लढाऊ आंबेडकरी चळवळ उभी राहिली.

२. मिलिंद महाविद्यालय : मराठवाड्यातील शैक्षणिक क्रांती:

मराठवाडा हा विभाग निजामांच्या राजवटीखाली होता आणि शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत मागासलेला होता. डॉ. आंबेडकरांनी या मागासलेपणाचे निर्मूलन करण्यासाठी १९५० मध्ये औरंगाबाद येथे 'मिलिंद महाविद्यालया'ची स्थापना केली. हे महाविद्यालय स्थापन करण्यासाठी निजामांनी ५४ एकर जमीन दिली होती. मिलिंद महाविद्यालयाने मराठवाड्यातील शेतकरी, कामगार आणि दलित कुटुंबांतील मुलांच्या जीवनात प्रकाश निर्माण केला.

संस्था/महाविद्यालय	स्थापना वर्ष	सामाजिक महत्त्व
बहिष्कृत हितकारिणी सभा	१९२४	दलित मुलांसाठी वसतिगृहे व ग्रंथालये सुरू केली
पीपल्स एज्युकेशन सोसायटी	१९४५	शोषित समाजाला उच्च शिक्षणाचे व्यासपीठ मिळवून दिले
सिद्धार्थ महाविद्यालय (मुंबई)	१९४६	आधुनिक विचारांच्या सुशिक्षित पिढीची निर्मिती केली
मिलिंद महाविद्यालय (औरंगाबाद)	१९५०	मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासाचा पाया घातला

डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक चळवळीमुळे ग्रामीण दलितांमध्ये 'माणूस' म्हणून जगण्याची जाणीव निर्माण झाली. त्यांनी शिक्षणाला राजकीय अधिकारांच्या प्राप्तीसाठी आवश्यक मानले. त्यांच्या या कार्यामुळेच पुढे भारतीय संविधानात शिक्षणाच्या हक्काचा आणि आरक्षणाचा समावेश होऊ शकला, ज्याचा सर्वाधिक फायदा ग्रामीण महाराष्ट्रातील वंचित घटकांना झाला.

कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण चळवळ : ग्रामीण महाराष्ट्राचा कणा:

ग्रामीण महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात 'रयत शिक्षण संस्थे'चे योगदान अद्वितीय आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी साताऱ्यातील काले येथे या संस्थेची स्थापना केली. 'रयत' या शब्दाचा अर्थ आहे 'सामान्य जनता'. कर्मवीरांनी शिक्षणाला शहरातील वाड्यांमधून बाहेर काढून ग्रामीण भागातील शेतात आणि कष्टकऱ्यांच्या झोपडीपर्यंत नेले.

१. 'कमवा आणि शिका' (Earn and Learn) योजना:

कर्मवीरांचा सर्वात क्रांतिकारी प्रयोग म्हणजे 'कमवा आणि शिका' ही योजना. ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचा खर्च झेपत नसे. अशा विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचा मार्ग दाखवण्यासाठी त्यांनी ही योजना सुरू केली. या योजनेमुळे:

१. गरीब विद्यार्थ्यांना श्रम करून शिक्षण घेता आले.
२. विद्यार्थ्यांमध्ये 'श्रमप्रतिष्ठा' (Dignity of Labour) निर्माण झाली.
३. विद्यार्थ्यांचा स्वाभिमान जागा झाला आणि ते कोणाच्याही मदतीशिवाय शिकू लागले.

ही योजना केवळ आर्थिक मदतीसाठी नव्हती, तर ती एक सामाजिक संस्काराची प्रयोगशाळा होती. यातून शिकलेले विद्यार्थी पुढे प्रशासनात आणि समाजकारणात महत्त्वाच्या पदांवर पोहोचले, परंतु त्यांची नाळ कायम ग्रामीण मातीशी जोडलेली राहिली.

२. रयत संस्थेचा विस्तार आणि सामाजिक परिणाम:

भाऊराव पाटील यांनी साताऱ्यात 'छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' सुरू केले. येथे सर्व जातींची मुले एकत्र राहत आणि स्वतःची कामे स्वतः करत. शाहू महाराजांच्या प्रेरणेने सुरू झालेले हे वसतिगृह जातीभेद निर्मूलनाचे मोठे केंद्र ठरले. कर्मवीरांनी ग्रामीण भागात माध्यमिक शाळांचे जाळे विणले, ज्यामुळे खेड्यातील मुलांना उच्च शिक्षणासाठी शहराकडे धाव घेण्याची गरज उरली नाही.आज रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील आणि आशियातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्थांपैकी एक आहे. साताऱ्यातील ग्रामीण कुटुंबात असा एकही घर नसेल ज्याचे नाते रयत संस्थेशी नाही. कर्मवीरांच्या या कार्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने शैक्षणिक लोकशाही निर्माण झाली आणि शिक्षणाची गंगा बहुजन समाजापर्यंत पोहोचली.

महर्षी धोंडो केशव कर्वे आणि स्त्री-शिक्षण : एस.एन.डी.टी. विद्यापीठाचा प्रवास:

भारतीय स्त्री-शिक्षणाच्या इतिहासात महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे योगदान सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखे आहे. त्यांनी स्त्री-शिक्षणाला केवळ साक्षरतेचा विषय न मानता, तो स्त्री-स्वातंत्र्य आणि सामाजिक समतेचा पाया मानला. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी स्त्रियांची स्थिती, विशेषतः विधवांची स्थिती अत्यंत दयनीय होती. महर्षी कर्वे यांनी विधवा पुनर्विवाह आणि त्यांच्या शिक्षणासाठी आपले आयुष्य समर्पित केले.

१. हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था आणि एस.एन.डी.टी. विद्यापीठ:

१८९६ मध्ये त्यांनी पुण्याजवळ हिंगणे येथे 'अनाथ बालिकाश्रम' स्थापन केला. या आश्रमातूनच पुढे 'स्त्री-शिक्षण संस्थे'चा जन्म झाला. महर्षी कर्वे यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे १९१६ मध्ये स्थापन केलेले 'एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ' (SNDT Women's University). हे भारतातील आणि दक्षिण-पूर्व आशियातील पहिले महिला विद्यापीठ ठरले.

या विद्यापीठाची वैशिष्ट्ये:

१. स्त्रियांसाठी स्वतंत्र उच्च शिक्षण व्यवस्था.

२. मातृभाषेतून (मराठी, गुजराती) शिक्षणावर भर, ज्यामुळे ग्रामीण महिलांना शिक्षण सोपे झाले.

३. गृहशास्त्र, कला आणि शिक्षणशास्त्र (B.Ed.) यांसारख्या विषयांना प्राधान्य.

एस.एन.डी.टी. विद्यापीठामुळे ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक मुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळाली. महर्षी कर्वे यांनी 'घरोघरी शिक्षिका' तयार केल्या, ज्यांनी पुढे ग्रामीण शाळांमध्ये अध्यापनाचे कार्य केले. त्यांच्या या संयमी आणि दीर्घकालीन कार्यामुळे स्त्री-शिक्षणाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला. १९५८ मध्ये त्यांना त्यांच्या शंभराव्या वाढदिवशी 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले.

डॉ. पंजाबराव देशमुख आणि विदर्भातील शैक्षणिक क्रांती:

विदर्भाच्या शैक्षणिक आणि सामाजिक इतिहासात डॉ. पंजाबराव देशमुख (भाऊसाहेब देशमुख) यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. ते केवळ शिक्षणतज्ज्ञ नव्हते, तर कृषी सुधारक आणि ग्रामीण पुनरुत्थानाचे महान विचारवंत होते. त्यांनी शिक्षणाला ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रगतीशी जोडले.

१. श्री शिवाजी शिक्षण संस्था (१९३२):

डॉ. देशमुखांनी १९३१-३२ मध्ये अमरावती येथे 'श्री शिवाजी शिक्षण संस्थे'ची स्थापना केली. त्याकाळी विदर्भातील ग्रामीण भागात शिक्षणाची सोय अत्यंत अपुरी होती. बहुजन समाजातील मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत असे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेने विदर्भात माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांचे मोठे जाळे विणले, ज्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी पुत्रांना शिक्षणाची दारे खुली झाली.

२. कृषी शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टीकोन:

डॉ. देशमुखांचा असा विश्वास होता की, "भारतीय ग्रामीण समाजाची प्रगती वैज्ञानिक शेतीशिवाय शक्य नाही आणि वैज्ञानिक शेतीसाठी कृषी शिक्षण आवश्यक आहे". त्यांनी कृषी महाविद्यालये सुरू केली आणि शेतकऱ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार केला. स्वतंत्र भारताचे पहिले कृषी मंत्री म्हणून त्यांनी राष्ट्रीय स्तरावर कृषी संशोधनाचे कार्य केले.

त्यांनी अमरावती येथे 'लोकविद्यापीठ' सुरू करण्याची संकल्पना मांडली, ज्यातून ग्रामीण युवकांना त्यांच्या गरजांनुसार शिक्षण मिळावे हा उद्देश होता. डॉ. देशमुखांच्या कार्यामुळे विदर्भ हा शैक्षणिकदृष्ट्या प्रगत विभाग बनला आणि तिथल्या शेतकरी समाजात आत्मसन्मान निर्माण झाला.

प्रादेशिक संस्थांचे योगदान :

नाशिकचा मराठा विद्या प्रसारक समाज आणि स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था

महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावर काही प्रादेशिक संस्थांनी अत्यंत प्रभावी काम केले आहे.

१. मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक (१९१४):

उत्तर महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी १९१४ मध्ये नाशिक येथे 'मराठा विद्या प्रसारक समाज' (MVP Samaj) या संस्थेची स्थापना झाली. महात्मा फुले आणि शाहू महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन कर्मवीर रावसाहेब थोरात आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या संस्थेचा पाया रचला. आज ही संस्था नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थ्यांना प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंतच्या सुविधा पुरवत आहे.

२. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर (१९५४):

बापूजी साळुंखे यांनी १९५४ मध्ये 'स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थे'ची स्थापना केली. "ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार" हे या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रातील डोंगराळ, दुर्गम आणि दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळवून दिली. त्यांनी शिक्षणासोबतच चारित्र्य संवर्धनावर भर दिला, ज्यामुळे ग्रामीण युवकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना रुजली.

संस्था	केंद्रस्थान	संस्थापक	वैशिष्ट्य
मराठा विद्या प्रसारक समाज	नाशिक	कर्मवीर रावसाहेब थोरात व इतर	उत्तर महाराष्ट्रातील दुर्गम भागात शाळांचे जाळे
स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था	कोल्हापूर	बापूजी साळुंखे	चारित्र्यनिर्मिती आणि सुसंस्कारांवर आधारित शिक्षण
श्री शिवाजी शिक्षण संस्था	अमरावती	डॉ. पंजाबराव देशमुख	विदर्भातील कृषी आणि ग्रामीण शिक्षणावर भर

आधुनिक काळातील ग्रामीण शिक्षण : जिल्हा परिषद शाळा आणि नवी आव्हाने:

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात ग्रामीण शिक्षणाची मुख्य जबाबदारी जिल्हा परिषदांकडे सोपवण्यात आली. १९६२ मध्ये जिल्हा परिषदांची स्थापना झाल्यावर ग्रामीण भागात प्राथमिक शाळांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. आज महाराष्ट्राच्या खेडोपाड्यात जिल्हा परिषद शाळा पोहोचल्या आहेत आणि बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणाचा त्या मुख्य आधार आहेत.

१. शासकीय शाळांची स्थिती आणि शिक्षकांवरील ताण:

सध्या महाराष्ट्रात सुमारे ६५,६३९ शासकीय प्राथमिक शाळा आहेत, ज्यामध्ये ५४ लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तथापि, गेल्या काही वर्षांत या शाळांसमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांची वाढती स्पर्धा, पायाभूत सुविधांची कमतरता आणि शिक्षकांवरील 'शाळाबाह्य कामांचा' (Non-academic workload) वाढता ताण ही चिंतेची बाब आहे.शिक्षकांना निवडणूक ड्युटी, जनगणना, विविध सरकारी सर्वेक्षणे आणि 'STARS' सारख्या वर्ल्ड बँक फंडेड प्रकल्पांच्या ऑनलाईन डेटा एन्ट्रीमध्ये गुंतवले जाते. यामुळे प्रत्यक्ष अध्यापनाचा वेळ कमी होतो. ५ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्रातील शिक्षकांनी याच कारणास्तव राज्यव्यापी संप पुकारला होता. १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार (GR) शाळांच्या संचमान्यतेचे निकष बदलण्यात आले आहेत, ज्यामुळे भविष्यात अनेक लहान शाळा बंद पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

२. शिक्षणाचे बाजारीकरण आणि स्वयं-अर्थसाहाय्यित शाळा:

१९९० च्या उदारीकरणानंतर शिक्षण क्षेत्रात खाजगी गुंतवणूक वाढली. 'स्वयं-अर्थसाहाय्यित' (Self-financed) शाळांचे प्रमाण ग्रामीण भागातही वाढले आहे. या शाळा आधुनिक सुविधांचे आकर्षण दाखवून पालकांना आकर्षित करत आहेत, परंतु त्यांच्या भरमसाठ फीमुळे गरीब विद्यार्थी या शिक्षणापासून वंचित राहत आहेत. यामुळे ग्रामीण समाजात 'शिक्षणातील वर्गभेद' निर्माण होत असून,

तो महात्मा फुले आणि आंबेडकरांच्या 'समान संधी'च्या तत्त्वाशी विसंगत आहे.

नवीन शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) आणि ग्रामीण महाराष्ट्र:

केंद्र सरकारने जाहीर केलेले 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' हे भारतीय शिक्षण व्यवस्थेतील तिसरे मोठे धोरण आहे. या धोरणाने १०+२ ही पद्धत बदलून ५+३+३+४ अशी नवी रचना आणली आहे.

ग्रामीण महाराष्ट्रासाठी या धोरणाचे काही परिणाम खालीलप्रमाणे असू शकतात:

१. मातृभाषेत शिक्षण: पाचवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून देण्याच्या तरतुदीमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना संकल्पना लवकर समजतील.

२. व्यावसायिक शिक्षण: सहावीपासून व्यावसायिक कौशल्ये शिकवली जाणार असल्याने ग्रामीण युवकांना रोजगाराच्या नवीन संधी मिळतील.

३. डिजिटल पायाभूत सुविधा: धोरणात तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला आहे, परंतु ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि नेटवर्कचा मोठा प्रश्न आजही कायम आहे.

या धोरणाची अंमलबजावणी करताना ग्रामीण भागातील 'डिजिटल दरी' (Digital Divide) कमी करणे हे सरकारसमोरील मोठे आव्हान असेल. जर ग्रामीण शाळांना आधुनिक तंत्रज्ञान मिळाले नाही, तर ग्रामीण विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे पडण्याची शक्यता आहे.

निष्कर्षात्मक विवेचन आणि भविष्यातील दिशा:

महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळी आणि ग्रामीण शिक्षणाचा विकास यांचा ऐतिहासिक अभ्यास केला असता असे दिसून येते की, शिक्षणाने ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला आहे. महात्मा फुले यांनी पेटवलेली ज्ञानाची ज्योत शाहू महाराज, डॉ. आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पुढे नेली आणि ज्ञानाची गंगा खऱ्या अर्थाने बहुजन समाजापर्यंत पोहोचवली.मात्र, आजही ग्रामीण शिक्षणाचे स्वप्न पूर्णतः साध्य झालेले नाही. कोठारी आयोगाने सुचवलेला जीडीपीच्या ६ टक्के खर्च शिक्षणावर करण्याचे उद्दिष्ट आजही दूर आहे. महाराष्ट्राच्या २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात शिक्षणाचा हिस्सा केवळ १४.७ टक्के आहे, जो २०१९-२० मध्ये १७.६ टक्के होता. ही घट शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम करणारी आहे.

भविष्यात ग्रामीण शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी खालील बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे:

१. शासकीय शाळांमधील पायाभूत सुविधा, विशेषतः मुलींसाठी स्वतंत्र शौचालये आणि डिजिटल क्लासरूम्स बळकट करणे.
२. शिक्षकांना शाळाबाह्य कामातून मुक्त करून त्यांना केवळ अध्यापनासाठी वेळ देणे.
३. 'स्वयं-अर्थसाहाय्यित' शाळांच्या फीवर नियंत्रण आणून गरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे.
४. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत ग्रामीण युवकांना कौशल्याधारित शिक्षण देऊन त्यांना आत्मनिर्भर बनवणे.

निष्कर्ष :

ग्रामीण शिक्षण हा केवळ साक्षरतेचा विषय नसून तो ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचा कणा आहे. समाजसुधारकांनी दाखवलेल्या वाटेवरून चालत, आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन जर आपण ग्रामीण शाळा सक्षम केल्या, तरच खऱ्या अर्थाने समताधिष्ठित आणि समृद्ध महाराष्ट्र उभा राहील. शिक्षणाचा

अधिकार हा प्रत्येक ग्रामीण मुलाचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो त्यांना मिळवून देणे हीच या थोर समाजसुधारकांना खरी आदरांजली ठरेल.

संदर्भसूची (Bibliography):

१) कीर, धनंजय – महात्मा जोतीराव फुले : आमची समाजक्रांती, पॉप्युलर प्रकाशन.

२) पवार, जे. व्ही. – राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, कोल्हापूर.

३) रयत शिक्षण संस्था – हीरक महोत्सव स्मृती ग्रंथ, सातारा.

४) आंबेडकर, डॉ. बाबासाहेब – शिक्षण व समाजपरिवर्तन (निवडक भाषणे व लेख).

५) कर्वे, धोंडो केशव – आत्मचरित्र व स्त्रीशिक्षणावरील लेखन.

६) देशमुख, पंजाबराव – ग्रामीण शिक्षण आणि कृषी विकास (निवडक लेख).

७) महाराष्ट्र शासन – शिक्षण विभागाचे वार्षिक अहवाल (ऐतिहासिक खंड).

८) भारत सरकार – राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020).

९) कोठारी आयोग अहवाल (1964–66).

१०)SNDT महिला विद्यापीठ – इतिहास व कार्याचा आढावा (प्रकाशित दस्तऐवज)

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 21 March - April - 2026

कोल्हापूर जिल्ह्यातील असंघटित कामगार क्षेत्राच्या समस्या – एक चिकित्सक अभ्यास

श्री. संदीप हरिबा माळी

संशोधक विद्यार्थी

शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर

Corresponding Author - श्री. संदीप हरिबा माळी

DOI - 10.5281/zenodo.19724093

सारांश (Abstract):

महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक तसेच कृषी विकासाच्या दृष्टीने कोल्हापूर जिल्ह्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. विविध प्रकारच्या उद्योगरचनेमुळे हा जिल्हा आर्थिकदृष्ट्या प्रगत आणि गतिमान मानला जातो. शेती, ऊसतोडणी व साखर उद्योग, दुग्धव्यवसाय, बांधकाम क्षेत्र, हातमाग-यंत्रमाग उद्योग, लघुउद्योग तसेच घरगुती सेवा क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंघटित कामगार कार्यरत आहेत. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यात या कामगारांचे योगदान महत्त्वपूर्ण असले तरी त्यांच्या कामाच्या अटी अनेकदा अस्थिर, असुरक्षित व शोषणात्मक स्वरूपाच्या आढळून येतात.

सदर संशोधनामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील असंघटित कामगारांच्या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्याशी संबंधित समस्यांचा चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आलेला आहे. या अभ्यासासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतींचा वापर करण्यात आला. प्राथमिक माहिती संकलनासाठी संरचित प्रश्नावलीच्या माध्यमातून सर्वेक्षण तसेच काही कामगारांच्या सखोल मुलाखती घेण्यात आल्या. दुय्यम माहिती शासकीय अहवाल, कामगार विभागाची कागदपत्रे, जनगणनेतील आकडेवारी तसेच उपलब्ध संशोधन साहित्य यांमधून गोळा करण्यात आली.

अभ्यासातून असे आढळून आले की असंघटित कामगारांना प्रामुख्याने अस्थिर व हंगामी स्वरूपाचा रोजगार उपलब्ध असतो. अनेक वेळा त्यांना किमान वेतनापेक्षा कमी मोबदला मिळतो. तसेच भविष्यनिर्वाह निधी, विमा, निवृत्तीवेतन यांसारख्या सामाजिक सुरक्षा सुविधांचा अभाव दिसून येतो. आरोग्य व सुरक्षिततेशी संबंधित सुविधा मर्यादित असून महिला कामगारांना वेतनातील असमानता व लैंगिक छळासारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. स्थलांतरित कामगारांच्या बाबतीत निवास व्यवस्था व मूलभूत सुविधांची कमतरता ही देखील एक महत्त्वाची समस्या असल्याचे निदर्शनास आले.

या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर असंघटित कामगारांची सर्वंकष नोंदणी करणे, किमान वेतन कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे, सामाजिक सुरक्षा योजनांचा प्रभावी विस्तार करणे, महिला कामगारांच्या संरक्षणासाठी सक्षम यंत्रणा उभारणे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी अधिक सक्रिय भूमिका बजावणे या उपाययोजना आवश्यक असल्याचे या संशोधनातून स्पष्ट होते.

प्रस्तावना:

भारतामधील एकूण कार्यरत कामगारांपैकी सुमारे ९० टक्के कामगार असंघटित क्षेत्रात कार्यरत असल्याचे विविध शासकीय अहवाल तसेच संशोधन अभ्यासांमधून दिसून येते. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हे क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे मानले जाते, कारण कृषी, लघुउद्योग, बांधकाम, सेवा क्षेत्र तसेच किरकोळ व्यापार यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती याच माध्यमातून

होते.[१] तथापि, या क्षेत्रात कार्यरत असलेल्या कामगारांना स्थिर नोकरी, निश्चित वेतन, सामाजिक सुरक्षा सुविधा तसेच कायदेशीर संरक्षण यांचा अभाव मोठ्या प्रमाणावर जाणवतो.

